00101425

THE
ASIATIC SOCIETY OF BOMBAY
Town Hall, Bombay.

Digitized with financial assistance from the
Government of Maharashtra
on 15 June, 2016

भारतवर्षीय

# प्राचीन चरित्रकोश

( श्रुति, स्मृति, पुराणें, सूत्रें आणि वेदांगें यांतील व्यक्तींची

साधार माहिती देणारा ग्रंथ )

+ 61
B7296

विद्यानिधि

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव


101425

I

LIBRARY OF THE BOMBAY BRANCH OF THE ROYAL ASIATIC SOCIETY

शके १८५४ ] [ इ. स. १९३२

किंमत बारा रुपये



प्राची … चरित्रकोशाकरितां तयार केलेला
वेद, …रतीययुद्ध व पुराणें यांतील
प्रमुख स्थलें व लोक दर्शविणारा
हिंदुस्तान
१ … स्थलें अधोरेखांकित आहेत.
२ … कंसांत दिली आहेत.
३ … लोक मोठ्या अक्षरांनीं दिले आहेत.
कपिशा
चीन
लौहित्य
त्रिपुर
अमरकंटक




...पं. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव ५८ शनिवारपेठ, पुणें २ यांनीं तयार केला.

बालोद्यान प्रेस ६८१ सदाशि...

:—
सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, मॅनेजिंग डायरेक्टर,
भारतवर्षीय चरित्रकोश मंडळ, लि.,
५८ शनिवार पेठ, पुणें २.

चें पुनर्मुद्रण, भाषान्तर व रूपान्तर इत्यादींचे सर्व हक्क
ग्रंथकर्त्यांनीं राखून ठेविले आहेत.

00101425

मुद्रकः—
सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी. ए., एलएल्
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत'
छापखाना, ९४७ सदाशिव, पुणें २.

# प्रस्तावना

आम्हां भारतवर्षीयांचा प्राचीन इतिहास फार उज्ज्वल आणि उद्बोधक आहे; आणि सुदैवानें त्याकडे आतां लक्ष वेधलें जात असून त्याबद्दलची जिज्ञासाहि वाढत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. केवळ हेटाळणी किंवा उपेक्षा करण्यापेक्षां आदरेवाईकपणें पाहण्यासारखें त्यांत कांहीं आहे, अशी आतां अभ्यासकांची खात्री पटत चालली आहे. भारतीयांनीं प्राणापलीकडे जपून ठेवलेलीं वेद व पुराणें हीं केवळ भाकडकथांनीं भरलेलीं नसून त्यांत इतिहासादिकांचे सुवर्णकण भरपूर आहेत व त्यांवरून प्रामाणिक इतिहास ध्यानीं येऊं शकतो, असें आतां निश्चितपणें वाटूं लागलें आहे. असें हें आपलें ज्ञानधन आपणच आपल्या दृष्टीनें तपासल्यास त्यांतून एका अंधःकारमय भासणाऱ्या कालखंडाचा तेजस्वी व स्फूर्तिदायक इतिहास आपण जगापुढें ठेवूं शकूं व त्यामुळें पूर्वेतिहासाविषयींच्या संकुचित कल्पना नाहींशा होऊन आपल्याला आपल्या भविष्यकालाविषयींहि विश्वास उत्पन्न होईल.

पण इतिहास हा बहुंशानें व्यक्तिचरित्रमय असतो. किंबहुना जगांत इतिहास असा कांहीं नसून जग म्हणजे एक मोठा व्यक्तिचरित्रकोशच होय. निदान भारतवर्षाच्या इतिहासाची मुख्य साधनसामग्री या दृष्टीनें या भूमींतील व्यक्तींच्या चरित्रसंग्रहाला महत्त्वाचें स्थान आहे, याबद्दल मतभेद नाहीं.

शिवाय त्या त्या देशांतील प्रमुख व्यक्तींचा अशा तऱ्हेचा चरित्रसंग्रह सांप्रत जगांतील पुढारलेल्या सर्व देशांतून तयार झाला आहे व क्रमानें त्याचा विकासहि होत आहे. परंतु भारतवर्षीयांचा भूतकाल इतका उज्ज्वल व भविष्यकाल तितकाच आशापूर्ण असतांहि या देशांत अशा प्रकारचा चरित्रकोश अद्यापि झालेला नाहीं. कै. र. भा. गोडबोलेशास्त्रीकृत 'भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश' हा या दृष्टीचा मराठींतील पहिला प्रयत्न होय. तो कोश छप्पन्न वर्षांपूर्वीं इ. स. १८७६ सालीं प्रसिद्ध झाला. तो प्रयत्न केव्हांहि अभिनंदनीयच आहे. पण त्यांत रामायणादि फारच थोड्या ग्रंथांतील माहिती घेतलेली आहे. शिवाय वेदांतील माहिती देऊं नये असें त्यांनीं धार्मिक बुद्धीनें लिहिलें आहे. आधारहि त्यांत क्वचितच आहेत. त्यामुळें तो ग्रंथ आज अपुरा आहे. ज्ञानकोशांत तर नवीन भर न पडतां मूळच्या माहितीलाहि संक्षेप देण्यांत आला. यावरून मध्यंतरींच्या अंधःकारमय कालखंडावर प्रकाश पाडून त्यांचें निरीक्षण करण्याचें काम कशा प्रकारें चालू होतें, याची कल्पना येईल. नाहीं म्हणावयास कांहीं थोडे व्यासंगी लोक प्रसंगानें किंवा मुद्दाम मधूनमधून लिहितांना दिसतात. पण ही स्थिति झपाट्यानें पालटत असून हिंदुस्थानच्या सर्व भागांतून भविष्यकालाप्रमाणें आतां भूतकालाकडेहि लक्ष देणारे विद्याव्यासंगी लोक सारखे पुढें येत आहेत. भूतकालीन गोष्टींनीं भविष्यकालाकरितां स्फूर्ति उत्पन्न करण्याचें काम अव्याहत चालू आहे; व त्याकरितां संशोधक, जिज्ञासु व सामान्य वाचक यांचें लक्ष भूतकालाकडे लागलें आहे व अधिक लागत आहे. त्यांतल्या त्यांत आम्हां भारतवासीयांची दृष्टि केवळ भौगोलिक, राजकीय किंवा ऐतिहासिकच नसून तिच्यांत आध्यात्मिकताहि असते. अशा निरनिराळ्या मनोवृत्तींच्या वाचकवर्गाच्या सोयीकरितां अनेक प्राचीन, अर्वाचीन, पौर्वात्य व पाश्चात्य ग्रंथांचें आलोडन व यथाशक्ति संशोधन करून हा ग्रंथ तयार करण्यांत आला आहे. अशा तऱ्हेचा ग्रंथ मराठींत अपूर्व आहे, एवढेंच नव्हे तर देशी किंवा इंग्रजी भाषेंतहि या विषयावर इतका व्यापक ग्रंथ अद्यापि झालेला नाहीं असें नम्रपणें म्हणावयास हरकत नाहीं.

**प्राचीन इतिहासाच्या साधनांचें समालोचन**—आपल्या प्राचीन इतिहासाच्या दृष्टीनें श्रुतिस्मृतिपुराणादि वाङ्मयाचें महत्त्व केव्हांहि नाकारतां येणार नाहीं. एवढेंच नव्हे तर प्राचीन इतिहासाचीं साधनें म्हणून याशिवाय दुसरें कोणतेंहि वाङ्मय आज आपल्यापुढें नाहीं. ऐतिहासिकांच्या चिकित्सक दृष्टीला अस्सल म्हणून पहिल्या दर्जाचीं साधनेंहि अपुरीं वाटतात, ही गोष्ट निराळी. पण एकादा विषय सांगण्याची प्रतिज्ञा करून पुढें आलेले वेद, रामायण, महाभारत किंवा पुराणादि ग्रंथ प्रतिज्ञात विषयांत अप्रमाण ठरविण्यास चांगल्याच प्रयत्नतराची आवश्यकता आहे. तुकोबाच्या अभंगांप्रमाणें देवांची आळवणी करतांना आलेले ऋग्वेदांतील प्रासंगिक उल्लेख, यज्ञयागादिकांच्या अनुषंगानें आलेले यज्ञकर्ते किंवा यज्ञविषयक कर्मांत मतभेद दर्शविणारे, तत्त्वज्ञ किंवा तत्त्वजिज्ञासु म्हणून आलेले ब्राह्मणादि ग्रंथांतील कथाभाग व निर्देश यांचें ऐतिहासिक साधन या दृष्टीनें असणारें महत्त्व केव्हांहि नाकारतां येणार नाहीं. शिवाय त्यांचें इ. स. पूर्वकालीन कित्येक हजार वर्षांपासूनचें स्वरूप जसेंच्या तसेंच आज आपणांस उपलब्ध होत आहे.

उपलब्ध असलेल्या वैदिक ग्रंथांत एकवाक्यता असल्यानें विशेषसा घोंटाळा नाहीं. सूत्र, प्रातिशाख्य व शिक्षा यांचीहि स्थिति प्रायः अशीच आहे. पण स्मृतिपुराणादि वाङ्मयाची तशी स्थिति नाहीं. याज्ञवल्क्य, पराशर किंवा अग्निपुराण इत्यादिकांनीं निर्दिष्ट केलेल्या स्मृतीशिवाय पुष्कळच अधिक

स्मृति आज उपलब्ध आहेत; व त्यांपैकीं सुमारें ५० स्मृति पाहून त्यांचा समालोचनात्मक भाग या ग्रंथांत आला आहे. स्मृतींपैकीं व्यवहाराचा भाग बहुतेकांतून गेला असून थोडा आचार व बहुतेक प्रायश्चित्ताचा भाग फक्त त्यांत आढळतो.

वेद व पुराणें यांचा संबंध पाहूं गेल्यास विशेषसा दिसून येत नाहीं. उपास्य दैवतें, त्यांची उपासना, सृष्ट्युत्पत्ति, कालमापनसाधनें, भौगोलिक स्थलें व वंशावळि या सर्व बाबतींत दोन्ही ग्रंथांत म्हणण्यासारखें साम्य नाहीं. यावरून भिन्न संप्रदायांतील लोकांनीं सांभाळलेलें हें वाङ्मय दिसतें. उल्लेखाच्या दृष्टीनें पाहिल्यास वेदांतहि पुराण शब्दानें ग्रंथांचा निर्देश येतो. पुराणांनीं वेदांचा गौरव तर मूलभूतच मानला आहे. पुराणांचें नीट समालोचन केल्यास असें दिसतें कीं, वेदांपेक्षांहि पुराणांचा कांहीं भाग निःसंशय प्राचीन असावा. निदान त्यांतील परंपरा तरी प्राचीन दिसतेच. मात्र त्यांची भाषा व रचना यांवर संस्कार करण्याची पद्धत असल्यामुळें पुराणांचें मूळ स्वरूप आपणांस उपलब्ध होऊं शकत नाहीं. म्हणूनच त्यांवर विश्वास ठेवतांना पडताळा मिळावा अशी अपेक्षा असते. वैदिक वाङ्मयाची स्थिति याहून वेगळी आहे. व्यासानें भारतीय युद्धकालीं वेदांचे परंपरेला अनुसरून संहितीकरण केल्यावर त्यांत बदल होण्याचा संभव दिसत नाहीं. म्हणजे मंत्रकालीन नसलें तरी संहिताकालीन तें वाङ्मय जसेंच्या तसेंच आज उपलब्ध आहे. वेदसंरक्षणाकरितां शौनकादिकांनीं अनुक्रमणीसारखे अनेक ग्रंथ केले. त्याला आधार ब्राह्मणादि ग्रंथांच्या द्वारां उपलब्ध झालेली परंपराच असावी (ऋ. ७. ३. २ सर्वानुक्रमणी ). हीं श्रुति, स्मृति, पुराणें आपण सर्व एकच वाङ्मय म्हणून स्वीकारीत असलों तरी तें भिन्न सांप्रदायांत भिन्न दृष्टीनें संरक्षिलेलें वाङ्मय आहे हें आपणांस वंशादिकांच्या पाहणीवरून सहज ध्यानांत येतें. निमि व सहस्रजित् यांवरील टिपणें पहा ( परिशिष्ट पा. ६७८; ६८२ ). तिसरा दिवोदास व सुदास शब्दहि या दृष्टीनें पाहण्यासारखे आहेत.

एवंच प्रतिज्ञापूर्वक इतिहास सांगण्याकरितां प्रवृत्त झालेलीं पुराणें व त्यांवरून इतर माहिती घेऊन प्रासंगिक ऐतिह्य वर्णन करणारे रामायण, महाभारत हे ग्रंथ प्राचीन इतिहासाचीं फार महत्त्वाचीं साधनें होत. पण हे साधनग्रंथ वेदांप्रमाणें अविकृत व पूर्ण स्वरूपांत आपल्यापुढें उपलब्ध नाहींत, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. तथापि आहे या स्वरूपांतहि त्यांचें महत्त्व बिलकूल कमी झालेलें नाहीं, असें त्यांचें आमूलाग्र परीक्षण करणारांनीं ठरविलें आहे. कौटिल्याच्या अर्थ-शास्त्रांतहि इतिहासांत पुराणें प्रामुख्यानें धरलीं आहेत ( कौ. अ. ५ ).

हें सर्व वाङ्मय सुरक्षित राहावें म्हणून धार्मिक या सदरांत घालण्यांत आलें व त्याच्या संरक्षणाकरितां ब्राह्मण व सूत हे स्वतंत्र वर्ग राखून ठेवण्यांत आले. राजकारणासारख्या आमूलाग्र उन्मूलन पावणाऱ्या गोष्टींपासून अलिप्त राहण्याचें व्रत या दोन जातींनीं केवळ ही परंपरा टिकावी एवढ्याकरितांच पत्करिलें व त्याचा परिणाम आज आपणांस अविकृत स्वरूपांत वेद व प्राचीन इतिहासाविषयीं प्रायः एकवाक्यता असणारीं पुराणें मिळण्यांत होत आहे. आजवर कितीतरी जगज्जेते निर्माण झाले, त्यांनीं मूळची संस्कृति व वाङ्मय धुळीला मिळविले. पण हे ग्रंथ व वाङ्मय प्रचलित स्वरूपांत जिवंत राहिले आहेत, याचें सर्व श्रेय अशी व्यवस्था करणाऱ्या दूरदर्शी व्यासादिकांना देणें अवश्य आहे.

व्यासादिकांनीं प्राचीन इतिहास टिकविण्याचा केलेला हा प्रयत्न अद्यापिहि अयशस्वी झालेला नाहीं. पुराणादि ग्रंथांत प्रक्षेप झालेले आहेत व तसे प्रक्षेप करणें किंवा स्वीकारणें यासंबंधीं कांहीं तरी विशेष व्यवस्थाहि असावी असें दिसतें. निदान असे प्रक्षेप करतांना मूळ ऐतिहासिक भाग बदलीत नसत, असें ऐतिहासिक किंवा परंपरित माहितींतील एकवाक्यतेवरून आजहि म्हणणें भाग पडतें. याकरितां पुराणांतील वंशांची एकवाक्यता, भूगोलवर्णन, कालगणनाकोष्टक याविषयींचीं आमचीं या ग्रंथाचीं परिशिष्टें पाहण्यासारखीं आहेत. केवळ भक्ति किंवा उपासना प्रसृत करण्याकरितां प्रवृत्त झालेलीं स्कंदपद्मादि कांहीं पुराणें पुढें घेऊन सर्व पुराणांचें वर्णन करणें केव्हांहि बरोबर होणार नाहीं.

यावरून पुराणांतील असंभाव्य व लोकविरुद्ध गोष्टींनें समर्थन करण्याचा किंवा त्या गोष्टी ऐतिहासिक सत्य आहेत, असें म्हणण्याचा बिलकूल उद्देश नाहीं. मात्र तशा वर्णनावरून सर्वच भागावर हरताळ फासावयास निघालेल्यांचा हात धरावयाचा आहे. श्रीमत् मध्वाचार्यांना सुद्धा दर्शन, गुह्य व समाधि या तीन भाषा ज्याला कळत नाहींत किंवा रीतिशत ज्याला ठाऊक नाहीं, त्याला पुराणांचा अर्थ कळणार नाहीं, इत्यादि लिहिण्याचा अशा कारणामुळेंच प्रसंग आला (भारततात्पर्यनिर्णयः ९: १३३–१४२ ).

पुराणें अद्यापि शुद्ध व पूर्ण स्वरूपांत उपलब्ध झालेलीं नाहींत व तसें करण्याकडे अद्यापि कोणाचें लक्षहि गेलेलें नाहीं. परंतु तशा प्रयत्नाची आवश्यकता मात्र फार आहे. आज श्रीव्यंकटेश्वर प्रेसमध्यें छापलेलीं अठरा महापुराणें मिळतात. पण त्यापेक्षां पुष्कळच पद्धतशीर प्रयत्नाची अवश्यकता आहे. तसा प्रयत्न कोणीं केल्यास प्राचीन इतिहासावर नवा प्रकाश पडेल व पुराणांसंबंधीं झालेला गैरसमज दूर होईल, असें म्हणण्यास आजहि पुष्कळच पुरावा उपलब्ध आहे.

पुढील कोष्टकावरून उपलब्ध वैदिक ग्रंथांची थोडक्यांत कल्पना येईल व शाखावार सूत्रग्रंथहि समजतील.

## वैदिक धर्मग्रंथ

| वेद | मूळ शाखा | उपलब्ध शाखा | ब्राह्मण | आरण्यक | उपनिषद् | श्रौतसूत्र | गृह्यसूत्र | धर्मसूत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऋग्वेद | २१ | (१) शाकल (या शाखेची संहिता शुद्ध स्वरूपांत संपूर्ण उपलब्ध आहे.) वरील संहितेंत थोड्या सूक्ताचा फरक केल्यानें इतर बऱ्याच शाखांच्या संहिता तयार होतात | (१) ऐतरेय ब्राह्मण (२) कौषितकी ब्राह्मण (म्हणजे सांख्यायन किंवा खांडायन) | (१) ऐतरेय-आरण्यक (२) सांख्या-यन आरण्यक | (१) ऐतरेय (ऐतरेय आरण्यकांतील २-३-६ भाग) (२) कौषितकी (सांख्यायन आरण्यकांतील ३ ते ६ भाग) (३) बाष्कल (हें बाष्कल शाखेचें उप० आहे.) | (१) आश्वलायन (२) सांख्यायन (म्हणजे कौषितकी) | (१) आश्वलायन (२) सांख्यायन म्हणजे कौषितकी | (१) वासिष्ठ |
| कृष्णयजुर्वेद | ८५ | (१) तैत्तिरीय (२) मैत्रायणी (३) कठ (४) कापिष्ठल (५) श्वेताश्वेतर | (१) तैत्तिरीय संहितांतर्गत ब्राह्मण (२) तैत्तिरीय ब्राह्मण | (१) तैत्तिरीय | (१) ऐतरेय (तैत्तिरीय आरण्यक भाग ६ ते ९) (२) महानारायण भाग १-७ (३) मैत्रायणी (४) काठक (५) श्वेताश्वेतर | (१) आपस्तंब (२) बौधायन (३) हिरण्यकेशी (सत्याषाढ) (४) भारद्वाज (५) वैखानस (६) वाधूल (७) मानव मैत्रायणी शाखेचें (८) वाराह | (१) मानव (२) आपस्तंब (३) बौधायन (४) हिरण्यकेशिन् (५) वैखानस (६) कठ | (१) आपस्तंब (२) बौधायन (३) हिरण्य-केशी |
| शुक्लयजुर्वेद | १६ | (१) काण्व (२) माध्यंदिन (वाजसनेय) | (१) शतपथ ब्राह्मण (हा शाखा भेदाप्रमाणें भिन्न आहे. काण्वशाखेचा १७ काण्डाचा व माध्यंदिन शाखेचा १४ काण्डाचा आहे.) | (३) बृहदारण्यक | (१) ईशावस्य (संहितेतील ४० वा अध्याय.) (२) बृहदारण्यक | (१) कात्यायन (म्हणजे पारस्कर) | (१) कात्यायन (म्हणजे पारस्कर) | |
| सामवेद | १०००० | (१) कौथुम (२) राणायनीय } या दोन शाखांच्या संहिता शुद्ध स्वरूपांत संपूर्ण उपलब्ध आहेत. | (१) पंचविंशः प्रौढ किंवा तांड्य ब्राह्मण (२) षड्विंश (३) सामविधान (४) आर्षेय (५) मंत्र (६) दैवताध्याय (७) वंश (८) संहितोपनिषद्ब्राह्मण (९) जैमिनीय ब्राह्मण (१०) जैमिनीयोपनिषद् ब्राह्मण | | (१) छांदोग्य (२) केन (जैमिनीयोनिषद् ब्राह्मणांतील ४।१८।२१ हे भाग) | (१) खादिर (२) लाट्यायन (३) द्राह्यायण | (१) खादिर (२) गोभिल (३) गौतम (४) जैमिनि | (१) गौतम |
| अथर्ववेद | ९ | (१) पिप्पलाद (२) शौनक | (१) गोपथब्राह्मण | | (१) प्रश्न (२) मांडुक्य (३) मुंडक इत्यादि. | (१) वैतान | (१) कौशिक | |

पुराणग्रंथांत महापुराणें व उपपुराणें असे भेद पुराणकारांनींच केले असून सोळा ठिकाणीं महापुराणांच्या व सात ठिकाणीं उपपुराणांच्या याद्या उपलब्ध होत आहेत ( महापुराणें–कूर्म. १.१.१३–२३; गरुड. १.२२३.१५-१६; दे. भा. १.३; नारद. १.९२.२६–२८; भा. १२.७.२२–२३; पद्म. पा. १५५; ब्रह्मवै. ४.१३३; लिंग. १.४०; वायु. २.४२; विष्णु. ३.६.१९-२३; भवि. ब्राह्म. १; स्कंद. १.२.४०; शिव. वा. ४१–४५; स्कंद. ५.३.१; ७.१.२; मत्स्य. ५३. उपपुराणें–कूर्म १.१३–२३; गरुड. १.२२३.१७–२०; दे. भा. १.३; पद्म. पा. ११५; ब्रह्मवै. ४.१३३; स्कंद. ५.३.१; ७.१.२ ). महापुराणांच्या यादींत प्रायः एकवाक्यता आहे. फक्त क्रमभिन्नता मात्र एकदोन ठिकाणांखेरीज सर्वत्र आढळते. देवीभागवत व मत्स्य यांनीं वैष्णवभागवताऐवजीं देवीभागवत महापुराणांत गणिलें आहे. बहुतेक ठिकाणीं शिवालाच वायु म्हटलें असून निराळें वायु नाहीं. गरुडाच्या यादींत वायु व शिव हीं दोन्ही आहेत, पण वामन नाहीं. कूर्मानें एकोणीस महापुराणें दिलीं आहेत. मत्स्यानें प्रत्येक पुराण कोणत्या कल्पांतील वृत्तान्त सांगतें, हेंहि सांगितलें आहे. बहुतेक पुराणें अपूर्ण किंवा विकृत आहेत. अग्नि, वामन, वराह व मार्कंडेय यांत पुराणोपपुराणांच्या याद्या उपलब्ध नाहींत व स्कंदांत तीन ठिकाणीं याद्या आहेत.

पण उपपुराणांच्या याद्यांची स्थिती याहून वेगळी आहे. सातांपैकीं एकहि ठिकाणची यादि दुसरीशीं जुळत नाहीं. त्यांची अकारादि क्रमानें यादि पुढें दिली आहे. आंड, आदित्य, उशनस् किंवा *औशनस, कपिल, *कालिका, कुमार, कूर्म, कृष्णमाहात्म्य, गौतम, दुर्वास, *देवीभागवत, नंदी, नारद, *नृसिंह, पंचरात्र, पराशर, ब्रह्म, ब्रह्मांड, प्रह्लाद, भारत, भागवत, भार्गव, महेश किंवा महेश्वर, मारीच, *रामायण, वरुण, शिवधर्म, शुक, सनत्कुमार, *सांब, *सौर, स्कंद. यांपैकीं खूण केलेलीं पुराणें मिळालीं आहेत. यांशिवाय सत्त्व, रज व तम या पद्धतीनें वर्गीकरण केलेली एक यादी आढळते ( गरुड. २.५८ ). त्यांत यांशिवाय विष्णुधर्मोत्तर, तंत्रभागवत, तत्त्वसार, विनायक, रैणुक व भैरव अशींहि उपपुराणें आढळतात. उपपुराणें मूळचीं महापुराणांतील प्रकरणात्मक भाग होत ( मत्स्य. ५३ ). पण तीं आज कांहीं महापुराणांत व बहुतेक स्वतंत्रच आढळतात.

**प्राचीन ग्रंथांतील इतिहास**–सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च। वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणम्॥ ( ब्रह्मांड. १.१.३७ ). हें पुराणांचें लक्षण सर्वत्र आढळतें. पण दुसऱ्या दोन ठिकाणीं पुराणांचीं दहा लक्षणें सांगितलीं आहेत (भा.१२.७.९-२२; ब्रह्मवै. ४. १३२). हें पुराणग्रंथाचें स्वरूपवर्णन आहे. व बऱ्याच पुराणांना आजहि हें वर्णन बरोबर लागू पडतें. सृष्टीच्या आरंभापासूनचा इतिहास देण्याचा पुराणांचा प्रयत्न असतो व त्याकरितां सृष्टि कशी होत गेली, हें त्यांनीं क्रमानें सांगितलेलें असतें. तें सांगत असतांना स्वायंभुव मनूच्या पूर्वीपासून क्रमानें सुरुवात करण्यांत येते. भूत शब्दावरील माहिती वाचली असतां त्यासंबंधीं कल्पना येईल. स्वायंभुव मन्वंतरांतील संगतवार वंशावळि व त्यांतील महत्त्वाच्या पुरुषांचें कर्तृत्व हेंहि कथन करण्याकरितां पुराणांचा प्रारंभींचा कांहीं भाग खर्ची पडतो; व त्यांत राजसंस्था निर्माण करणारे वैन्य पृथु, ध्रुव वगैरेंचीं चरित्रें वाचावयास मिळतात. वैवस्वत मनूपासून तें भारतीय युद्धापर्यंत महत्त्वाच्या पुरुषांचा संग्रह करणारे वंश व त्यांतच त्यांची मोजक्या शब्दांत विशेष माहिती दिलेली आढळते. त्यांत पुष्कळ ठिकाणीं अक्षरशः एकवाक्यता असते. यांतील वैवस्वत मनूपासून रजापर्यंत झालेलीं देवासुरांचीं बारा युद्धें व त्यांत देवांचा जय होऊन पुढें त्यांच्यांत झालेली फाटाफूट चांगलीच उद्बोधक आहे ( मत्स्य. ४७. ४१-५५; वायु. २. ३५. ७१-८६ ). ऋग्वेदांतील बऱ्याच ऋचा यापूर्वी झाल्या असून भारतीय युद्धापर्यंत त्यांत भर पडत असावी. या सर्व माहितीला व्यवस्थित इतिहासाचें स्वरूप देण्याचें काम अत्यंत कठीण आहे. महाभारताचें सध्यांचें स्वरूप हा तशा प्रयत्नाचा एक नमुना आहे. धर्म, तत्त्वज्ञान व राजकारण या तिन्ही दृष्टींनीं उपलब्ध होणारी माहिती चिकित्सक दृष्टीनें तपासून काढल्यास त्यांतून प्राचीन कालचा संकलित इतिहास बनेल. पण त्याकरितां हजरजबाबी माहिती देणारा असा एखादा ग्रंथ आवश्यक होता. तसें काम भागविण्याची सिद्धता या ग्रंथानें व अशाच कांहीं ग्रंथांनीं होणार आहे.

**प्राचीन चरित्रकोश**—याकरितां कालमर्यादा न स्वीकारतां ग्रंथमर्यादाच प्रामुख्यानें स्वीकारण्यांत आली आहे. श्रुति, स्मृति, पुराणें, सूत्रें व वेदांगें या सदरांत येणारे ग्रंथ या कोशाचे आधारग्रंथ होत. त्यांच्या आधारें व्यक्तिविषयक माहिती एकत्र काढून संगतवार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्ती वर्णक्रमानें दिल्या असल्यानें कोणतीहि व्यक्ति सहज काढितां येईल. आधारहि जेथल्या तेथें नमूद केले आहेत. त्यामुळें आधार, माहिती व तिची योग्यता हीं सहज ध्यानीं येतील. व्यक्तीच्या नांवानें संघ व संघाच्या नांवानें व्यक्ति येत असल्यानें संघ व जाति यांचे निदर्शक शब्दहि संग्रहित झाले आहेत. देवतांची माहिती देण्याचा प्रथम संकल्प नव्हता. पण कश्यपसंततींत बहुतेक देवतांचा संग्रह होत असल्यामुळें त्यांचीहि माहिती या कोशांत आली आहे. शिवाय देव, ऋषि, ऋषिपत्न्या, पितर, नाग, सर्प, यक्ष, राक्षस, गंधर्व, किन्नर, भूत, अप्सरा, राजे,

राजपत्न्या, मुत्सद्दी, दैवीसामर्थ्य असलेले, संशोधक, शास्त्रज्ञ, व कांहीं संघ इत्यादींची यावच्छक्य माहिती मिळवून ती संगतवार लिहून वर्णानुक्रमानें सुमारें १२००० हजार चरित्रें या ग्रंथांत आलीं आहेत.

या ग्रंथाची रचना करितांना अस्सल आधारांशिवाय एक शब्दहि लिहावयाचा नाहीं, असा संकल्प असल्यानें प्रथम मूळ ग्रंथ वाचून माहितीचीं टिप्पणें काढण्यांत आलीं. तीं टिप्पणें वर्णक्रमानें लावून एकत्र झाल्यावर प्रत्येक चरित्रांतील महत्त्वाच्या मुद्यांची कालक्रमानें संगति लावण्यांत आली. अशी संगति लावतांना मूळ ग्रंथांतील संकोचविस्तार, विरोध व कालविषयक अनुल्लेख यांमुळें आलेल्या अडचणींतून मार्ग काढीत चरित्राचा सांगाडा बनविला गेला. पण असें करितांना परस्परविरोधी माहिती नमूद करणें भाग पडलें. स्थल, काल व नांवें यांतील मतभेद साधार नमूद करावे लागले आहेत. आधारग्रंथाच्या प्रामाण्याबद्दल तरतमभाव दाखवून त्यांच्या योग्यतेनुसार त्यांना अनुक्रम व स्थल द्यावें लागलें. यामुळें सहजच वैदिक माहिती ऋग्वेदापासून प्रथम येऊन नंतर पौराणिक माहितीचा शेवट पद्मस्कंदांतील माहात्म्यात्मक माहितीनें झाला आहे. ग्रंथ, वंश व संप्रदाय हेहि जरूरीप्रमाणें आधारासह नमूद केले आहेत. हें करितांना प्राचीन व आधुनिक अभ्यासकांनीं या अनेक मुद्यांवर पाडलेल्या प्रकाशाचाहि निर्देश वाचकांच्या सोयीसाठीं केला आहे. तथापि असें करतांना कोणत्याहि मताबद्दल किंवा पक्षाबद्दल तटस्थपणा ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्तीचा इतिहास किंवा अभ्यास कोणत्याहि दृष्टीनें असूं शकतो हें ध्यानांत धरून उपलब्ध माहिती आस्तिक बुद्धीनें आहे त्या स्वरूपांत दिली आहे. असें करतांना विशिष्ट माहिती किती वेळां पडताळली जाई, हें सांगतां येणें अशक्य आहे. आधाराची बाबही किचकट, कंटाळवाणी व दरक्षणीं झुकांडी देणारी आहे. पण तिचा पिच्छा शेवटपर्यंत सोडलेला नाहीं. कारण आधार हे अशा ग्रंथांचे आत्मेच होत. तथापि ते सर्वच हस्तगत झालेले नाहींत. त्यांपैकीं लक्षांत आलेल्यांची व्यवस्था शुद्धिपत्रांत केलेली आहे, किरकोळ गोष्टींचे आधार मध्यें देऊन विस्तृत माहितीचे आधार शेवटीं दिले आहेत.

असे ग्रंथ करतांना सर्वच बाजूंनीं अडचणी उभ्या राहतात. ग्रंथ, स्थलें, पारिभाषिक शब्द व मतभेद व यांसारखेच इतर अनेक विषय यांचें संपूर्ण ज्ञान किंवा साधनें जवळ तयार नसल्यास पावलोंपावलीं अडचण येऊं लागते व कांहींतरी निर्णय करून काम भागवावें लागतें. तसा प्रसंग येऊं नये म्हणून प्राचीन ग्रंथकोश, प्राचीन स्थलकोश व ज्योतिषविषयक पारिभाषिक शब्दांचा कोश प्रथम तयार करून घेण्यांत आले व त्यांत मतभेदासह प्रत्येकाची साधार माहिती एकत्र केली. तसेंच वंशावळीच्या बाबतींतहि असणारी स्थिति स्पष्ट करतां यावी म्हणून भागवत, विष्णु, मत्स्य, वायु, ब्रह्मांड व हरिवंश यांच्या आधारें प्रत्येक वंशाच्या तुलनात्मक वंशावळि लिहून काढण्यांत आल्या व त्यांची सूचि करण्यांत आली. हें सर्व साहित्य वेगवेगळ्या ग्रंथरूपानें प्रसिद्ध होण्यासारखें आहे व तसा प्रयत्नहि चालू आहे. अशा पद्धतीनें कामाला पद्धतशीर व पायाशुद्ध स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यांत आला. स्थानिक व परस्थ विद्वानांनीं या पद्धतीनें चाललेलें काम पाहून प्रत्यक्ष सूचना कराव्यात म्हणून त्यांना प्रत्यक्ष काम दाखविण्यांत येत होतेंच.

**परिशिष्टें व नकाशे**— शेवटीं पांच परिशिष्टें जोडलीं आहेत. त्यांपैकीं पहिल्या परिशिष्टांत आधुनिक विद्वानांनीं केलेले कालनिर्णय आधारांसह नमूद केले आहेत. आणि पौराणिक कालगणनाहि कशी आहे, हें कोष्टकरूपानें मांडून दाखविलें आहे. शिवाय इ. स. पूर्वकालीन शक व त्यांची माहितीहि दिलेली असल्यानें कालदृष्ट्या या विषयाकडे पाहणाऱ्या वाचकांची चांगली सोय होईल. दुसऱ्या परिशिष्टांत पौराणिक भूगोलवर्णन आधुनिक भूगोलवर्णनाशीं कसें जुळवितां येतें हें दाखविलें व तसा एक नकाशाहि सोबत जोडला आहे. तिसऱ्या परिशिष्टांत या ग्रंथांत आलेल्या स्थलांची पृथक्करणात्मक सूचि जोडली आहे. त्यामुळें स्थल व व्यक्ति यांचे संबंध ध्यानांत येतील व केवळ स्थलांसंबंधीं अभ्यास करणारांचीहि सोय होईल. चवथ्या परिशिष्टांत पौराणिक वंश व त्यांची भिन्न पुराणांतर्गत एकवाक्यता ही आधारांसह दाखविली आहे आणि वैवस्वत मनूपासून आंध्रांच्या अखेरीपर्यंतचें समकालीनता दाखविणारें एक कोष्टक दिलें आहे. त्यावरून वंशावळीवर चांगलाच प्रकाश पडतो. पांचव्या परिशिष्टांत महत्त्वाच्या विषयांची सूचि दिली आहे. सहाव्या परिशिष्टांत अधिक उपलब्ध माहिती दिली आहे. दुसऱ्या परिशिष्टांत दिलेल्या जगाच्या नकाशाशिवाय या ग्रंथास आणखी एक हिंदुस्थानचा नकाशा जोडला आहे. त्यावरून भारतीय युद्धकालीन लोक व देश यांची स्पष्ट कल्पना येईल. त्यांत पाणिनिकालीन, वेदकालीन व कांहीं महत्त्वाचीं पौराणिक स्थलेंहि दाखविलीं आहेत. प्रारंभीं आधारग्रंथ व त्यांचे विभाग यांचे संक्षेप दिले आहेत. अशा रीतीनें सर्व तऱ्हेच्या लोकांना आकर्षक होईल अशी ग्रंथाची रचना करण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे हें ठरविणें अभ्यासू वाचकांकडे आहे.

**कालगणना**—पौराणिक ग्रंथांत दिलेल्या कालगणनेची माहिती आम्हीं पहिल्या परिशिष्टांत दिली आहे. तेथेंच आधार व अर्वाचीन लोकांनीं केलेले कालनिर्णयहि नमूद केले

आहेत. कालनिर्णय करणाऱ्या लोकांचा भर, पिढ्या, कांहीं वचनें, ज्योतिष व परंपरा वगैरे साधनांवर आहे. एका प्रमाणावर भर दिल्यावर दुसऱ्या प्रमाणाला गौणत्व येणें स्वाभाविक आहे. त्यांतल्यात्यांत पिढ्यांवर भर देणारा वर्ग मोठा आहे. बहुतेक नव्या नव्या ऐतिहासिकांचा त्यांत समावेश करावा लागेल. मात्र पुराणांत पिढ्या संपूर्ण दिल्या आहेत ही कल्पना त्यांना गृहीत धरावी लागते. शिवाय पिढी किती वर्षांची धरावी यांतहि मतभेद आहेच. बारा वर्षांपासून चाळीस वर्षांपर्यंत पिढी धरणारे वेगवेगळे लोक आहेत. वचनांवर भर देणारेहि बरेच अभ्यासक आहेत.

कै. राजवाडे यांनीं ' सप्तर्षयो मघायुक्ता काले पारीक्षिते शतम् । आन्ध्रांशे च चतुर्विंशे भविष्यन्ति मते मम ॥ ( वायु. २. ३७. ४१७ ).' यांतील मघा शब्दाचा दहा असा संख्यावाचक अर्थ घेऊन जुन्या परंपरेप्रमाणें असलेला युधिष्ठिरशक बरोबर असल्याचें दाखविलें आहे. ( भा. इ. सं. म. इतिवृत्त १८३५ ). पण इतर प्रमाणांचा विचार केलेला नाहीं. कै. शं. बा. दीक्षित यांचा ज्योतिषावर विशेष भर आहे. श्री. के. ल. दप्तरी यांची ज्योतिष व इतरहि दृष्टींनीं विचार करण्याची पद्धति आहे. ती पद्धत बरीच निराळी असल्यामुळें आणि त्यांनीं ठरविलेला काल कालनिर्णयकोशांत दिला असल्यामुळें आम्ही ती नमूद करीत आहोंत.

श्री. केशव लक्ष्मण दप्तरी ( नागपूर ) यांनीं गणितज्योतिषाचा इतिहाससंशोधांकडे आजपर्यंत कोणीहि केला नाहीं इतका उपयोग करून लहानमोठे पुष्कळ निबंध मराठींत लिहिले व अनेक महत्त्वाचे काल निश्चित केले. त्यांनीं लिहिलेले निबंधः— १ भारतीययुद्धकालनिर्णय (विविधज्ञानविस्तार). २ वैदिक कालगणनापद्धति आणि श्रीरामचंद्रजन्मकालनिर्णय, यालाच आम्ही " रामचंद्रजन्मकालनिर्णय " असें म्हटलें आहे ( सहविचार ). ३ " धर्मरहस्य " यांतील " वैदिक धर्माचा इतिहास " आणि " मुख्य धर्मग्रंथांचे काळ ". ४ भारतीय ज्योतिःशास्त्रनिरीक्षण. ५ भारतीयांचा अत्यंत प्राचीन म्हणजे मौर्यपूर्व इतिहास ( सहविचार वर्ष ६ व ७ ). ६ विक्रमादित्याविषयींच्या घोंटाळ्याचा उलगडा (सहविचार वर्ष ७ अं. ४।५ ). ७ कंसवधकालनिर्णय ( विविधज्ञानविस्तार वर्ष ६०, अं. ५ ) ८ कल्कि कोण? ( सहविचार वर्ष ९ अं. १). ९ राजतरंगिणीनिरीक्षण (सहविचार). १० प्राचीन भारतीय इतिहासाचीं साधनें (सहविचार ). ११ भारतीययुद्धकालाच्या विवादाचें परीक्षण ( विविधज्ञानविस्तार वर्ष ५९, अंक १।२ ). १२ श्रीशंकराचार्यकालनिर्णय ( विविधज्ञानविस्तार ). याशिवाय इतरहि किरकोळ प्रत्युत्तरार्थ लिहिलेले लेख आहेत.

यांमध्यें ठरविलेली वैदिककालगणनापद्धति अशी आहेः—

सध्यां ज्याला गतकलि म्हणतात, तोच गतवाराहकल्प होय. शकारंभीं त्याचीं ३१८० वर्षे गेलीं. हींच आठव्या श्वेत वाराहकल्पाचीं गत वर्षे होत. श्वेत वाराहकल्पाच्या आरंभापासून चारशें वर्षांचें कृतयुग, तीनशें वर्षांचें त्रेतायुग, दोनशें वर्षांचें द्वापरयुग आणि शंभर वर्षांचें कलियुग घेऊं लागले. कृतत्रेताद्वापरकलि यांचीं १००० वर्षे गेलीं म्हणजे द्वादशवार्षिक सत्र नांवाचें सत्र करीत. यालाच सहस्रवार्षिक सत्र असेंहि म्हणत. पहिल्या द्वादशवार्षिक सत्राच्या वेळीं इलापुत्र पुरूरवा हा राज्य करीत होता व दुसऱ्या द्वादशवार्षिक सत्राच्या वेळीं अधिसीमकृष्ण हा पांडवकुलोत्पन्न राजा राज्य करीत होता. तृतीय द्वादशवार्षिक सत्र झाल्याचें कोठें सांगितलेलें आढळत नाहीं. श्वेत वाराहकल्पापूर्वी १००० वर्षांचा एक एक असे सात महाकल्प घेतले गेले. सातव्या महाकल्पाचें नांव पाद्मकल्प असें होतें.

श्वेत वाराहकल्पारंभापासून प्रत्येक वर्षाचे तीसतीस दिवसांचा एक एक याप्रमाणें बारा महिने घेत. परंतु प्रत्येक चवथ्या वर्षी २१ दिवस अधिक घेत म्हणजे त्या वर्षीं दिवस ३८१ घेत. अशा चवथ्या वर्षी अश्वमेध नांवाचा यज्ञ करीत आणि इंद्रादि देव, सप्तर्षि व मनु हे अधिकारी बदलत. या चार वर्षांच्या कालालाच अर्थात् मन्वंतर, कल्प, चतुर्युग किंवा युग असेंहि म्हणत. हें पोटयुग होय. प्रत्येक चवथ्या वर्षाचे दिवस ३८१ घेत असे जें मागें सांगितले त्याला एक अपवाद आहे. वर्षाला ११२ चा भाग विशेष जात असेल तर त्या वर्षी ३८० दिवस घेत. मनु दर चवथ्या वर्षी बदलण्याचा जरी नियम होता तरी तसें खरोखर झालें नाहीं. एकंदरींत मन्वन्तरें अकरा झालीं. त्यांचे काळ व त्या वेळीं नेमले गेलेल्या मनूंचीं नांवें मन्वंतर या सदरांत पहा. शीघ्रपुत्र शांति हा मनु असतांना एकंदरींत चार दिशांचे चार मनु नेमले गेले होते. या चार मनूंचें नववें मन्वंतर चालू असतांनाच भगवद्गीता रचिली गेली. म्हणूनच "चत्वारो मनवः " असा निर्देश गीतेमध्यें आहे ( ध. र. १६६ पहा ).

या कालगणनापद्धतीस वेदांतच " मानुषयुगे " असे म्हटलें आहे. हिचाच इतिहास सांगतांना उपयोग करीत. दुसरी पद्धति होती तिला दैवयुगे म्हणत व तिचा सृष्टयुत्पत्तिशास्त्र वगैरे शास्त्रांमध्यें उपयोग करीत. अथर्ववेदांत युग १०० किंवा अयुत वर्षांचें म्हटलें आहे तें अनुक्रमें मानुष व दैव पद्धतीला अनुलक्षून म्हटलें आहे. सध्यां पुराणांमध्यें

जी युगपद्धति दिसते ती बहुतकरून ज्योतिषसिद्धांतकार वसिष्ठ यानें निर्मिली असावी असें श्री. दप्तरींचें म्हणणें आहे.

## कार्य व आभार—

चरित्रकोशाची प्रथम कल्पना ऋग्वेदाचें भाषान्तर प्रसिद्ध केल्यानंतर उपसंहार लिहिण्याकरितां सामग्री जमा करीत असतां सुचली. ती प्रसंगीं मित्रमंडळींत मांडिली असतां श्री. वा. वा. अतीतकर, बी. ए., हे नवे मित्र लाभले. पुढें अनेकांशीं विचारविनिमय करून प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन अशा तीन भागांत चरित्रकोश प्रसिद्ध करण्याची योजना प्रसिद्ध केली. प्राचीन चरित्रकोशाची सर्व जबाबदारी मी स्वतः पत्करून, १ जून १९२९ ला प्रत्यक्ष कामास सुरुवात केली. पुढें १५ आक्टोबर १९२९ रोजीं भारतवर्षीय चरित्रकोशमंडळ प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या कायद्याप्रमाणें नोंदण्यांत आलें. श्री. श्रीधर गणेश भालेराव, बी. एजी., श्री. वा. वा. अतीतकर, बी. ए., व श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव ( मॅनेजिंग डायरेक्टर ) हे तिघेजण प्रथमचे चालक ( डायरेक्टर ) होते. पण पुढें लवकरच श्री. वा. वा. अतीतकर यांनीं मंडळाशीं असलेला आपला संबंध सोडून ते राजकारणांत भाग घेऊं लागले. त्यांच्या ऐवजीं श्री. कृ. पां. कुलकर्णी, एम्. ए., यांचा सल्ला मंडळाला मिळूं लागला. श्री. भालेराव हे नोकरीच्या कारणामुळें परठिकाणीं असले तरी ते पत्रद्वारें सर्व गोष्टींकडे लक्ष ठेवीत असतातच. श्री. द. वि. आपटे, बी. ए.; प्रो. वि. ना. कुंभारे, एम्. ए.; प्रि. प. म. लिमये, एम्. ए; श्री. रा. दा. देसाई, बी. ए., वगैरेंनीं मंडळ स्थापन करण्याच्या बाबतींत अनेक वेळां सल्लामसलत दिली.

संकल्पित केलेल्या योजनेप्रमाणें प्राचीनचरित्रकोश आज वाचकांच्या हातांत दिला जात आहे. त्यांत ग्रंथमर्यादा स्वीकारली असली तरी कालदृष्ट्या मौर्य चंद्रगुप्तापर्यंतची माहिती आली आहे. पुढील कालांतील माहिती पुराणादि ग्रंथांत नमूद आहे, तेवढीच दिली आहे. इतर साधनांनीं उपलब्ध झालेली माहिती नमूद करण्याचें काम पुढल्या भागाच्या कक्षेंतील आहे. मौर्य चंद्रगुप्तापासून शिवाजीपर्यंतचा काल फार महत्त्वाचा असून त्या कालांतील महत्त्वाची माहिती पद्धतशीर रीतीनें अद्यापि मराठींत आलेली नाहीं. मध्ययुगीन चरित्रकोश प्रसिद्ध करण्याचा संकल्प करून मंडळानें ती जबाबदारी आपणांवर घेतली आहे. शिवाजीपासून पुढल्या कालाकरितां जशीं व्यासंगी माणसें मंडळाला लाभलीं आहेत, तशींच त्यापूर्वीच्या कालाचा व्यासंग करणारीं माणसेंहि. मंडळाला मिळवितां येतील तर मध्ययुगीन चरित्रकोशाचें कामहि चांगल्या प्रकारें पार पडेल यांत शंका नाहीं. पण सध्यां तरी या पहिल्या भागाच्या जनतेकडून होणाऱ्या स्वागतावर पुढला संकल्प अवलंबून आहे.

चरित्रकोशाच्या कामाकरितां ग्रंथांचा पुरवठा अनेक स्थानिक व परस्थ गृहस्थांकडून झालेला आहे. येथील बेलबागेंतील सुप्रसिद्ध पुराणिक धरणीधरशास्त्री गुर्जर यांचा अठराहि पुराणांचा संच बिनमुदत वापरावयास मिळाला. कै. वा. दा. तळवळकर यांचा वैदिकग्रंथसंग्रह केव्हांहि खुला होता. यांशिवाय श्री. रा. ग. देव यांचें महाभारत मिळालेंच होतें. यामुळें कार्याला सुलभता आली. वे. कृष्णभट प्रभुणे, वे. भास्करभट लिमये, श्री. ग. स. मराठे, प्रो. द. बा. पोतदार, डॉ. न. गो. सरदेसाई, श्री. श्री. ब. शालिग्राम, इत्यादिकांकडूनहि वेळोवेळीं पुस्तकें मिळत गेलीं व येथील अनेक संस्थांत असणारा संग्रहहि उपयोगांत आणितां आला.

यांशिवाय नागपूरचे सुप्रसिद्ध पंडितद्वय के. ल. दप्तरी, बी. ए., एलएल. बी., व विद्याभूषण कृष्णशास्त्री घुले यांनीं वेळोवेळीं आपलीं मतें पाठवून सल्लामसलत दिली. हस्तलिखितें तयार झाल्यावर सवडीप्रमाणें अनेक वेळां येऊन श्री. ज. स. करंदीकर, बी. ए., एलएल. बी., श्री. श्री. ना. ताडपत्रीकर, एम्. ए., व श्री. वि. के. खासनीस, बी. एजी., यांनीं कांहीं भाग वाचून सूचना केल्या.

श्री. श्री. ग. भालेराव, बी. एजी., यांनीं प्रथम अर्थसाहाय्य ( रु. ५०० ) करून मंडळाच्या कार्यास सुरुवात करून दिली. श्रीमंत वामनराव नाईक, हैद्राबाद दक्षिण (रु.५००) व श्री. लक्ष्मय्या जाजी, अध्यक्ष वैश्यसमाज, गुलबर्गा (रु.५००), यांनीं प्रत्येकीं पांचशें रुपये शेअररूपानें दिले. श्री. वा. वा. अतीतकर, बी. ए., ( रु. १०० ), श्री. वा. गो. विजापूरकर, एम्. ए., एलएल. बी., (रु. १००), न्या. एम्. व्ही. भिडे, आय. सी. एस्., ( रु. १०० ), श्री. रा. दा. देसाई, बी. ए., ( १०० ), डॉ. ग. रं. धडफळे ( रु. १०० ), व श्री. चिं. त्रिं. चितळे ( रु. ५० ) यांनीं त्यांच्या नांवांपुढें दिलेल्या रकमा मंडळाला ठेव म्हणून दिल्या. तसेंच श्रीमंत सरदार चंद्रोजीराव संभाजीराव आंग्रे, ग्वाल्हेर, यांनीं रु. ८८४–११–० एक वर्ष बिनव्याजीं कर्जाऊ दिले.

केसरी संस्था ( रु. १०० ), लोकमान्य ज्युबिली नॅशनल फंड ( रु. २०० ) आणि श्री. ना. गो. चापेकर ( रु. ३५ ) यांनीं येथें त्यांच्या नांवांशेजारीं नमूद केलेल्या रकमांच्या देणग्या देऊन मंडळाला साहाय्य केलें.

तसेंच मंडळाच्या कार्यालयांत काम करणारे श्री. द. ब. बोथरे, ग. रं. धडफळे व गं. त्रिं. स्मार्त यांनींहि

केलेल्या मदतीचा निर्देश करणें अवश्य आहे. तसेंच या पुस्तकाचे मुद्रक श्री. स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्‌एल्. बी., 'समर्थ भारत' छापखाना, यांनीं अशा कामाला आवश्यक असणारी दक्षता दाखविली व काम चांगल्या स्वरूपांत निघण्यास मदत केली.

वर निर्देश केलेल्या सर्व लोकांचें साहाय्य असल्यामुळेंच हें कार्य लोकांच्या पुढें ठेवतां येत आहे. सबब त्यांची व ज्यांचा निर्देश येथें करणें चुकीनें राहून जात असेल अशा अनेक मित्रांची क्षमा मागून या तीन वर्षे सतत चाललेल्या वाग्यज्ञाचें प्राचीन चरित्रकोशपर्व पुरें करितों.

वर्ष प्रतिपदा १८५४ } आपला सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

# कोश कसा पहावा ?

१ कोशांत व्यक्तींचा निर्देश अकारादि वर्णानुक्रमें केला आहे. चवर्ग, टवर्ग, तवर्ग व पवर्ग यांतील अक्षरांपूर्वीच्या अनुस्वारांना त्या त्या वर्गांतील अनुनासिक होत असल्यामुळें (उ. अङ्ग, विभाण्डक), त्या त्या ठिकाणीं ते ते अनुनासिक आहेत असें समजून क्रम लावला आहे. पण छपाईच्या सोईकरितां सर्वत्र अनुस्वार वापरला आहे (उ. अंग, विभांडक). य, र, ल, व, श, ष, स, ह यांच्या पूर्वीचे अनुस्वार व पवर्ग, श, ष, स, ह यांच्या पूर्वी विसर्ग येतील ते शब्द मात्र सर्वांच्या आधीं अनुस्वार व विसर्ग अशा क्रमानें घातले आहेत. क्ष हा कमध्यें व ज्ञ हा जमध्यें घातला आहे. तात्पर्य आम्ही वर्णक्रम संस्कृतप्रमाणें धरला आहे.

२ प्रारंभीं मूळ शब्द जाड्या ठशांत दिला आहे व त्यांतील पाठभेद, तेथेंच लिहिला आहे किंवा शेवटीं तो स्वतंत्र वाक्यानें नमूद केला आहे.

३ जाड्या ठशांतील शब्दांनंतर कंसांत वंशनिदर्शक संक्षेप दिलेले आहेत. त्यांचें स्पष्टीकरण व आधार चवथ्या परिशिष्टांत वर्णक्रमानें दिले आहेत (पा. ६७७-६८५) व आधारग्रंथांचे संक्षेप व त्यांचें स्पष्टीकरण प्रारंभीं जोडलें आहे.

४ पुढें आईबाप, जन्म, शिक्षण, विवाह, कर्तृत्व, वैशिष्ट्य, संतति, ग्रंथ, ग्रंथपरीक्षण, वंशावळि, गोत्रकार व मंत्रकार अशा क्रमानें उपलब्ध माहिती देण्यांत आली आहे. जेवढी माहिती उपलब्ध आहे तेवढी नमूद करण्यांत आली आहे.

५ प्रथम वैदिक माहिती, आणि नंतर पौराणिक माहिती दिली आहे. ऋग्वेदसंहिता, इतर वेद, उपनिषदें, सूत्रें, वेदांगें, वायुब्रह्मांडादि पुराणें, पद्मस्कंदादि पुराणें व ग्रंथविवेचन अशा क्रमानें माहिती ग्रथित केली आहे.

६ एकाच नांवाच्या अनेक व्यक्ति असतां त्या कालक्रमानें देण्याचा प्रयत्न केला आहे, पण तो सर्वत्र यशस्वी झालेला नाहीं.

७ पुनरुक्ति टाळण्याकरितां, विशेष माहितीकडे लक्ष वेध-ण्याकरितां, संबंध दर्शविण्याकरितां व सारखेपणाची जाणीव होण्याकरितां "अमुक शब्द पहा" असें कंसांत म्हटलें आहे. अनेक शब्द असल्यास कितवा शब्द पहावा याकरितां क्रमांकहि घातले आहेत.

८ पुत्र हा शब्द वारस अशा अर्थानें आणि मातृक व पैतृक हीं विशेषणें व्युत्पत्तिवरून तसें वाटलें म्हणून वापरलीं आहेत. त्यांचा अर्थ प्रसंगभेदानें बदलेल.

९ सारख्या माहितीमुळें, समकालीनत्वामुळें किंवा नाम-सादृश्यामुळें या ग्रंथांत एकच ठरविलेल्या व्यक्तींच्या एकपणा-विषयीं किंवा भिन्नपणाविषयीं मतभेद होण्याचा संभव आहे.

१० जाति व व्यक्ति एकच नांवानें संबोधण्यांत येत असल्यामुळें व्यक्तिविषयक व जातिविषयक माहिती यांचाहि संग्रह केला आहे. व्यक्तिविषयक माहितीखेरीज सामान्य माहितीचाहि कांहीं ठिकाणीं आवश्यक म्हणून संग्रह केला आहे.

११ कांहीं व्यक्तिनामें संस्कृत व्याकरणाच्या दृष्टीनें बरोबर वाटत नाहींत. तीं जशीं आढळलीं तशीं नमूद केलीं आहेत. उदाहरणार्थ—अहीना आश्वथ्य, चरऊ, तोंडमान्, बम्बा-विश्वावयस् वगैरे.

१२ आधारग्रंथ, त्यांची प्रत व त्याकरितां वापरलेले संक्षेप प्रस्तावनेनंतर दिले आहेत. आधारग्रंथांचें अल्पसें समालोचन प्रस्तावनेंत दिलें आहे. तेथेंच उपलब्ध वैदिक ग्रंथांचें पृथक्क-रणात्मक एक कोष्टक दिलें आहे. त्यावरून शाखा व त्यांचे उपलब्ध ग्रंथ कळून येतील.

१३ शेवटीं दोन नकाशे व सहा परिशिष्टें दिलीं आहेत. तिकडेहि विषयानुरोधानें पाहिल्यास अनेक गोष्टींचा खुलासा होईल. श्री. के. ल. दप्तरी यांच्या विचारसरणीचा खुलासा प्रस्तावनेंत केला आहे.

# आधार-ग्रंथ, त्यांचे संक्षेप व प्रत

| संक्षेप | संपूर्ण नांव | प्रत |
|---|---|---|
| अग्नि. | अग्निपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| अध्या. रा. | अध्यात्मरामायण | जगद्धितेच्छु प्रेस |
| अ. प्रा. | अथर्वप्रातिशाख्य | व्हिटनेप्रत |
| अ. रा. | अद्भुतरामायण ( उत्तरकांड ) | मोदवृत्त प्रेस, आवृत्ति तिसरी |
| अ. वे. | अथर्ववेद | |
| आदि. | आदिपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| आप. ध. किंवा आ. ध. | आपस्तंबधर्मसूत्र | विद्यामुद्राक्षरशाला कुंभकोणम्. |
| आप. श्रौ. | आपस्तंबश्रौतसूत्र | क्रिस्टल प्रत |
| आ. रा. | आनंदरामायण | दा. सा. यंदे ( वि. वा. बापट, भाषान्तर ) |
| —सार. | —सारकांड | |
| —यात्रा. | —यात्राकांड | |
| —याग. | —यागकांड | |
| —विलास. | —विलासकांड | |
| —जन्म. | —जन्मकांड | |
| —विवाह. | —विवाहकांड | |
| —राज्य. | —राज्यकांड | |
| — ,, १ | — —( पूर्वार्ध ) | |
| — ,, २ | — —( उत्तरार्ध ) | |
| —मनोहर. | —मनोहरकांड | |
| —पूर्ण. | —पूर्णकांड | |
| आश्व. गृ. | आश्वलायनगृह्यसूत्र | निर्णयसागर |
| आश्व. श्रौ. | आश्वलायनश्रौतसूत्र | आनंदाश्रम |
| आ. ब्रा. | आर्षेयब्राह्मण | बर्नेलप्रत |
| ई. उ. | ईशावास्य उपनिषद् | अष्टेकरमंडळी |
| ऋ. | ऋग्वेद | मक्समुल्लर २ री आवृत्ति |
| ऋ. प्रा. | ऋग्वेदप्रातिशाख्य ( सूत्रांक क्वचित् पटल व श्लोक ) | मक्समुल्लर प्रत |
| ऐ. आ. | ऐतरेय आरण्यक | आनंदाश्रम |
| ऐ. उ. | ऐतरेय उपनिषद् | आनंदाश्रम |
| ऐ. ब्रा. | ऐतरेयब्राह्मण | आनंदाश्रम |
| क. उ. | कठ उपनिषद् | अष्टेकर मंडळी |
| क. सं. | कठसंहिता | लिपझिक १९१२ |
| कपि. सं. | कपिष्ठलसंहिता | |
| कालि. | कालिकापुराण | श्रीवेंकटेशश्वर प्रेस, |
| कूर्म | कूर्मपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| के. उ. | केन उपनिषद् | |
| कै. उ. | कैवल्य उपनिषद् | |
| कौ. | कौशिकसूत्र | अमेरिकन ओरि. सो. सी. |
| कौ. अ. | कौटिल्यकृत अर्थशास्त्र | |
| कौ. उ. | कौषितकी उपनिषद् | |
| खा. गृ. | खादिरगृह्यसूत्र | |
| खा. श्रौ. | खादिरश्रौतसूत्र | म्हैसूर सीरीज |
| गणेश. | गणेशपुराण | मोदवृत्त छा. श. १८२८ |
| गरुड | गरुडपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| ग. सं. | गर्गसंहिता | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| गो. गृ. | गोभिलगृह्यसूत्र | |
| गो. ब्रा. | गोपथब्राह्मण | बिब्लिओथिका इंडिका |
| गौ. गृ. | गौतमगृह्यसूत्र | आनंदाश्रम |
| गौ. ध. | गौतमधर्मसूत्र | ,, |
| छां. उ. | छांदोग्य उपनिषद् | ,, |
| जै. अ. | जैमिनि अश्वमेध | पुराण-प्रकाशक मंडळ, वांई |
| जै. उ. ब्रा. | जैमिनीय उपनिषद्-ब्राह्मण | लाहोर १९२१ |
| जै. गृ. | जैमिनिगृह्यसूत्र | पंजाब संस्कृत सीरीज ११ |
| —१ | —पूर्वार्ध | |
| —२ | —उत्तरार्ध | |
| जै. ब्रा. | जैमिनीय ब्राह्मण | |
| तां. ब्रा. | तांड्य ब्राह्मण ( पंचविंश, प्रौढ व हा एकच ) | कलकत्ता १८७४ |
| तै. आ. | तैत्तिरीय आरण्यक | आनंदाश्रम |
| तै. उ. | तैत्तिरीय उपनिषद् | आनंदाश्रम |
| तै. प्रा. | तैत्तिरीयप्रातिशाख्य | म्हैसूर सीरीज |
| तै. ब्रा. | तैत्तिरीयब्राह्मण | आनंदाश्रम |
| तै. सं. | तैत्तिरीयसंहिता | आनंदाश्रम |
| दे. भा. | देवीभागवत | |
| द्रा. श्रौ. | द्राह्यायणश्रौतसूत्र | |

| संक्षेप | संपूर्ण नांव | प्रत |
|---|---|---|
| | लाट्यायन व हें प्रायः | |
| | एकच आहे. | |
| ना. उ. | नारायण उपनिषद् | आनंदाश्रम |
| नारद. | नारदपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| --१ | --पूर्वभाग | |
| --२ | --उत्तरभाग | |
| नि. | निरुक्त | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| नृसिंह. | नृसिंहपुराण | गोपाळ नारायण छा. |
| पद्म | पद्मपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| —सृ. | --सृष्टिखंड | |
| —भू. | --भूमिखंड | |
| --स्व. | --स्वर्गखंड | |
| —ब्र. | --ब्रह्मखंड | |
| —पा. | --पातालखंड | |
| —उ. | --उत्तरखंड | |
| --क्रि. | --क्रियायोग | |
| पं. ब्रा. | पंचविंश ब्राह्मण | कलकत्ताप्रत |
| परा. मा. | पराशरमाधव | निर्णयसागर |
| पा. गृ. | पारस्करगृह्यसूत्र | गुजराथ प्रेस १९१७ |
| पा. सू. | पाणिनिसूत्र | |
| प्र. उ. | प्रश्न उपनिषद् | आनंदाश्रम |
| बृ. उ. | बृहदारण्यक उपनिषद् | ( काण्व ) |
| बृहद्दे. | बृहद्देवता | राजेन्द्रलाल मित्र |
| ब्र. सू. | ब्रह्मसूत्र | |
| बौ. ध. | बौधायनधर्मसूत्र | |
| बौ. श्रौ. | बौधायनश्रौतसूत्र | |
| ब्रह्म. | ब्रह्मपुराण | आनंदाश्रम |
| ब्रह्मवै. | ब्रह्मवैवर्तपुराण | श्रीवेंकटेश्वर--प्रेस |
| —१ | —ब्रह्मखंड | |
| —२ | —प्रकृतिखंड | |
| —३ | —गणपतिखंड | |
| —४ | —कृष्णजन्मखंड | |
| ब्रह्मांड. | ब्रह्मांडपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| —१ | —प्रक्रियापाद | |
| —२ | —अनुषंगपाद | |
| —३ | —उपोद्घातपाद | |
| —४ | —उपसंहारपाद | |
| भवि. | भविष्यपुराण | मोदवृत्त प्रेस |
| —ब्राह्म. | —ब्राह्मपर्व | |
| —मध्यम | —मध्यमपर्व | |

| संक्षेप | संपूर्ण नांव | प्रत |
|---|---|---|
| —प्रति | —प्रतिसर्गपर्व | |
| —उत्तर | —उत्तरपर्व | |
| भवि. उ. | भविष्योत्तरपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| भा. | भागवत | निर्णयसागर प्रेस (श्रीधरी |
| भा. श्रौ. | भारद्वाजश्रौतसूत्र | व विजयध्वजी या |
| भा. सा. | भारतसावित्री. | टीकांचा उपयोग केला |
| म. | महाभारत | आहे.) |
| —आ. | —आदिपर्व | |
| —स. | —सभापर्व | (संस्कृत) कुंभकोणम् व |
| —व. | —वनपर्व | गणपत कृष्णाजी, नील- |
| —वि. | —विराटपर्व | कंठी टीकेसह. श्लोक |
| —उ. | —उद्योगपर्व | देतांना थोडी स्थल- |
| —भी. | —भीष्मपर्व | सोरीज कुंभकोणमप्रत |
| --द्रो. | —द्रोणपर्व | वापरली आहे. जेथें कुंभ- |
| —क. | —कर्णपर्व | कोणम् प्रतीचा [illegible] |
| —श. | —शल्यपर्व | केला आहे. तेथें कुं असें |
| —सौ. | —सौप्तिकपर्व | लिहिलें आहे. जेथें दोन्ही |
| —स्त्री. | —स्त्रीपर्व | प्रता सारख्याच आहेत |
| —शां. | —शांतिपर्व | तेथें कुं. असें लिहिलें |
| —अनु. | —अनुशासनपर्व | नाहीं. दोन प्रतींतील |
| —आश्व. | —आश्वमेधिकपर्व | फरक जागोजाग नमूद |
| —आश्र. | —आश्रमवासिकपर्व | केलेले आहेत. |
| —मौ. | —मौसलपर्व | |
| —महा. | —महाप्रस्थानिकपर्व | |
| —स्व. | —स्वर्गारोहणपर्व | |
| मत्स्य. | मत्स्यपुराण | आनंदाश्रम |
| मनु. | मनुस्मृति | निर्णयसागर |
| मां. उ. | मांडूक्य उपनिषद् | |
| मा. गृ. | मानवगृह्यसूत्र | |
| मार्क. | मार्कंडेयपुराण | मोदवृत्त छा. |
| मा. श्रौ. | मानवश्रौतसूत्र | |
| मिता. | मिताक्षरा | याज्ञवल्क्य-स्मृतिवरील |
| मुं. उ. | मुंडकउपनिषद् | आनंदाश्रम |
| मुद्गल. | मुद्गलपुराण | हस्तलिखित |
| मै. उ. | मैत्री उपनिषद् | |
| मै. सं. | मैत्रायणी संहिता | |
| याज्ञ. | याज्ञवल्क्यस्मृति | निर्णयसागर |
| यो. वा. | योगवासिष्ठ | चिपळुणकर मंडळी |
| र. वं. | रघुवंश | निर्णयसागर |
| रेणु. | रेणुकामाहात्म्य | हस्तलिखित |
| ला. श्रौ. | लाट्यायन श्रौतसूत्र | वाल्मीकि प्रेस, कलकत्ता |

| संक्षेप | संपूर्ण नांव | प्रत |
|---|---|---|
| लिंग. | लिंगपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| वायु | वायुपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| —१ | —पूर्वार्ध | |
| —२ | —उत्तरार्ध | |
| व. ध. | वसिष्ठधर्मसूत्र | |
| वं. ब्रा. | वंशब्राह्मण | कलकत्ता |
| वराह. | वराहपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| वामन. | वामनपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| —१ | —पूर्वार्ध | |
| —२ | —उत्तरार्ध | |
| वा. रा. | वाल्मीकि रामायण | निर्णयसागर |
| —बा. | —बालकांड | निर्णयसागरांतील केवळ |
| —अयो. | —अयोध्याकांड | मूळ असलेली प्रत वाप- |
| —अर. | —अरण्यकांड | रली, पण टीकांचा उल्लेख |
| —कि. | —किष्किंधाकांड | मध्वविलास बुकडेपोनें |
| —सुं. | —सुंदरकांड | प्रसिद्ध केलेल्या सटीक |
| —यु. | —युद्धकांड | पुस्तकावरून केला आहे. |
| —उ. | —उत्तरकांड | |
| वारा. श्रौ. | वाराहश्रौतसूत्र | |
| वा. सं. | वाजसनेयसंहिता | निर्णयसागर |
| विष्णु. | विष्णुपुराण | मोदवृत्त छा. |
| विष्णुधर्म. | विष्णुधर्मोत्तर | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| वै. श्रौ. | वैखानसश्रौतसूत्र | |
| श. ब्रा. | शतपथब्राह्मण (माध्यंदिन) | वेबरप्रत |
| शा. | शाकुंतल | निर्णयसागर |
| शिव. | शिवपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| —विद्य. | —विद्येश्वरसंहिता | |
| —रुद्र. | —रुद्रसंहिता | |
| — —सृ. | — —(सृष्टि) | |
| — —स. | — —(सती) | |
| — —पा. | — —(पार्वती) | |
| — —कु. | — —(कुमार) | |
| — —यु. | — —(युद्ध) | |
| —शत. | —शतरुद्रसंहिता | |
| —कोटि. | —कोटिरुद्रसंहिता | |
| —उम. | —उमासंहिता | |
| — —१ | — —पूर्वार्ध | |
| — —२ | — —उत्तरार्ध | |
| —कै. | —कैलाससंहिता | |
| —वा. | —वायवीयसंहिता | |

| संक्षेप | संपूर्ण नांव | प्रत |
|---|---|---|
| शु. प्रा. | शुक्लयजुःप्रातिशाख्य | चौखंबा, बनारस |
| श्वे. उ. | श्वेताश्वतर उपनिषद् | आनंदाश्रम, |
| ष. ब्रा. | षड्विंश ब्राह्मण | |
| स. गृ. | सत्याषाढगृह्यसूत्र | हस्तलिखित |
| स. श्रौ. | सत्याषाढश्रौतसूत्र | |
| सां. आ. | सांख्यायन आरण्यक | आनंदाश्रम |
| सां. गृ. | सांख्यायन गृह्यसूत्र | |
| साम. | सामवेद | |
| सांब. | सांबपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| सां ब्रा. | सांख्यायनब्राह्मण | आनंदाश्रम, |
| सां. श्रौ. | सांख्यायनश्रौतसूत्र | बिब्लिओथिका इंडिका |
| सू. सं. | सूतसंहिता | आनंदाश्रम, |
| स्कंद. | स्कंदपुराण | श्रीवेंकटेश्वर प्रेस |
| —१ | —माहेश्वरखंड | |
| — —१ | — —केदारखंड | |
| — —२ | — —कौमारिकाखंड | |
| — —३ | — —अरुणाचल माहात्म्य | |
| —१ | —पूर्वार्ध | |
| —२ | —उत्तरार्ध | |
| —२ | —वैष्णवखंड | |
| — —१ | — —वेंकटाचलमाहात्म्य | |
| — —२ | — —जगन्नाथक्षेत्रमाहात्म्य | |
| — —३ | — —बदरिकाश्रममाहात्म्य | |
| — —४ | — —कार्तिकमासमाहात्म्य | |
| — —५ | — —मार्गशीर्षमासमाहात्म्य | |
| — —६ | — —श्रीमद्भागवतमाहात्म्य | |
| — —७ | — —वैशाखमासमाहात्म्य | |
| — —८ | — —अयोध्यामाहात्म्य | |
| — —९ | — —वासुदेवमाहात्म्य | |
| —३ | —ब्रह्मखंड | |
| — —१ | — —सेतु-माहात्म्य | |
| — —२ | — —धर्मारण्यखंड | |
| — —३ | — —ब्रह्मोत्तरखंड | |
| —४ | —काशीखंड | |
| — —१ | — —पूर्वार्ध | |
| — —२ | — —उत्तरार्ध | |
| —५ | —अवंती खंड | |
| —१ | —अवंतीक्षेत्रमाहात्म्य | |
| — —२ | — —चतुरशीतिलिंगमाहात्म्य | |
| —३ | —रेवाखंड | |

| संक्षेप | संपूर्ण नांव | प्रत |
|---|---|---|
| --६ | --नागरखंड | |
| --७ | --प्रभासखंड | |
| --१ | --प्रभासक्षेत्रमाहात्म्य | |
| --२ | --वस्त्रापथक्षेत्रमाहात्म्य | |
| --३ | --अर्बुदाचलमाहात्म्य | |
| --४ | --द्वारकामाहात्म्य | |
| स्मृतिचं. | स्मृतिचंद्रिका | |

C. C. Catalogus Catalogorum
I. A. Indian Antiquary
J. A. S. B. Journal of the Asiatic Society of Bengal
S. B. E. Sacred Books of the Eats Series.
S. B. H. Sacred Books of the Hindoos Series.
J. R. A. S. Journal of the Royal Asiatic Society of Great Britain.

यांशिवाय डॉ. मक्डोनेलकृत ' वैदिक इंडेक्स', 'वैदिक मायथॉलजी', श्री. एफ्. इ. पार्गिटर, एम्. ए.कृत ' एन्शन्ट इंडियन हिस्टॉरिकल ट्रॅडिशन', श्री. डॉ. सीतानाथ प्रधानकृत ' कॉनॉलजी ऑफ एन्शन्ट इंडिया', श्री. पां वा. काणेकृत ' हिस्टरी आफ धर्मशास्त्र ' हीं व या विषयावरील संस्कृत, मराठी व इंग्रजी या भाषांतील अनेक पुस्तकें व निबंध यांचा हें पुस्तक लिहितांना उपयोग झाला आहे व त्यांचा जेथल्या तेथें निर्देश केला आहे. यांशिवाय कांहीं पुस्तकांचा निर्देश कालनिर्णयकोशाच्या प्रारंभीं केला आहे. श्री. दप्तरी यांच्या लहानमोठ्या लेखांची यादि प्रस्तावनेंत दिली आहे. त्या लेखांचा विशेषतः कालनिर्णयकोशाकरितां उपयोग केला आहे. भारतसावित्रीचीं हस्तलिखितें दोन मिळालीं व त्यांत फरक आढळून आला. कालनिर्णयकोशांत ज्या प्रतीवरून माहिती दिली ती बरोबर असावी. या नव्या जुन्या ग्रंथकारांविषयीं कृतज्ञता व्यक्त करणें आमचें कर्तव्य आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| प्रस्तावना ... | १-८ |
| आधारभूत ग्रंथांचीं नांवें, त्यांचा संक्षेप व प्रत ... | ९-१४ |
| प्राचीन चरित्रकोश ... | १-६५५ |
| परिशिष्ट पहिलें—कालनिर्णयकोश ... | ६५७-६६४ |
| परिशिष्ट दुसरें—पौराणिक भूगोल व त्याची सध्यांच्या जगाशीं तुलना ... | ६६४-६६९ |
| परिशिष्ट तिसरें—स्थलसूचि ... | ६७०-६७७ |
| परिशिष्ट चवथें—( १ ) पुराणांतील वंश व त्यांचें स्पष्टीकरण ... | ६७७-६८५ |
| ( २ ) वंश व तुलना ( वैवस्वत मनूपासून आंध्राच्या अन्तापर्यंत कोष्टकरूपानें ) | ६८६-६९३ |
| परिशिष्ट पांचवें—विषयसूचि ... | ६९३-७१० |
| परिशिष्ट सहावें—अधिक माहिती ... | ७११-७१३ |
| शुद्धिपत्र ... | ७१४-७१५ |
| नकाशे— | |
| १ पौराणिक जगाचा नकाशा ... | ६६४ पानासमोर |
| २ वेद, भारतीय युद्ध व पुराणें यांतील प्रमुख स्थळें व लोक दर्शविणारा नकाशा ... | ६७६ पानासमोर |

भारतवर्षीय

# प्राचीन चरित्र कोश

## अ



**अंश**—अंशुमान् आदित्यास नामांतर.

२ ( सो. यदु. ) विष्णुमतें हा पुरुहोत्रपुत्र होय.

३ तुषित नांवाच्या देवगणांतील एक.

**अंशनिप्रभ**—रावणपक्षीय राक्षस. यास युद्धांत द्विविद वानरानें मारिलें ( वा. रा. यु. ४३ ).

**अंशपायन**—ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत हा अध्वर्युगणांतील उन्नेता होता ( पद्म. सृ. ३४ ).

**अंशु**—अश्विनी यांचें रक्षण केलें होतें (ऋ. ८.५.२६).

२ कृष्ण व बलराम यांचा गोकुळांतील सखा (भा. १०.२२).

३ मार्गशीर्ष महिन्यांत असणाऱ्या सूर्याचें नांव ( भा. १२.११ ).

**अंशु धानंजय्य**—अमावास्य शांडिल्यायनाचा शिष्य ( वं. ब्रा. १ ).

**अंशुमत्**—एक आदित्य. यास क्रिया नांवाची स्त्री आहे. हा आषाढांत प्रकाशतो व याचीं किरणें १५०० आहेत ( भवि. ब्राह्म. १७८ ). तिसरा अंशु व हा एकच.

२ पंचजनाचा पुत्र ( पद्म. उ. २१ ).

३ ( सू. इ. ) असमंजसाचा पुत्र. पितरांची कन्या यशोदा ही याची स्त्री होय. सगराचा अश्वमेधीय अश्व शोधून आणण्यास असमंजसानें यास पाठविलें. वाटेंत यास याचे पितृव्य कपिलाश्रमापाशीं मरून पडलेले दिसले; व तेथेंच तो अश्वहि दिसला. तेव्हां यानें कपिलाची स्तुति केली. पण कपिल ध्यानस्थ होता म्हणून त्यानें याची स्तुति ऐकिली नाहीं. इतक्यांत त्याचा मामा गरुड तेथें आला. त्यानें भागीरथीच्या जलाच्या स्पर्शानें काम होईल असें यास सांगितलें व तो निघून गेला. कपिल जागृत झाल्यावर त्यानें अंशुमानास स्तुति करीत असलेला पाहिला. त्याच्या स्तुतीनें संतुष्ट होऊन त्यानें त्यास भागीरथीची स्तुति करण्यास सांगितलें. पुढें तो अश्व घेऊन गेला व अगोदर अश्वमेध यज्ञ पुरा करविला. लगेच सगरानें यास राज्य देऊन तो वनांत गेला. हाहि आपला पुत्र दिलीप यास राज्यावर बसवून व त्यास प्रधानाचे ताब्यांत देऊन आपण भागीरथीचे प्राप्त्यर्थ सर्व आयुष्य तपांत घालविण्याकरितां वनांत गेला. पण सिद्धीपूर्वींच हा मरण पावला ( म. व. १०७; वा. रा. बा. ४१-४२ ). हा शिवभक्त होता. यानें ३०८०० वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. १.३१ ).

४ द्रौपदीच्या स्वयंवरास गेलेला राजा ( म. आ. २०१. ११ कुं. ). यास भारतीय युद्धांत द्रोणानें मारिलें ( म. क. ३. १४ कुं. ).

**अंहोमुच् वामदेव्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.१२७ ).

**अकपि**—तामसमन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अकपिवत्**—तामसमन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अकबर**—(ऐति.) तिमिरलिंगाच्या वंशांतील एक म्लेंच्छ राजा. हा होमायूचा पुत्र. यानें पन्नास वर्षे राज्य केलें. यास सलोमा नामक पुत्र होता ( भवि. प्रति. ४.२२ ).

**अकंपन**—कृतयुगांतील एक राजर्षि. याला हरि नांवाचा एकच पराक्रमी पुत्र होता. तो युद्धांत मरण पावला. तेव्हां यास दुःख होऊन हा शोक करीत आहे तों, तेथें नारद ऋषि आले व त्यांनीं मृत्यु अनिवार्य आहे असें सांगून याचें समाधान केलें ( म. द्रो. ५२-५४ ).

२ रावणदूत एक राक्षस. जनस्थानीं खरादिक राक्षसांचा वध रामचंद्रानें केला, तें रावणास यानें प्रथम कळविलें ( वा. रा. अर. ३१ ). यानें रावणास सीता चोरून आणण्याचा सल्ला दिला. रावणानें युद्धाविषयीं याची स्वतंत्र शिफारस केली होती ( वा. रा. यु. ५५ ). हा रामरावणयुद्धांत मारुतीच्या हातून मरण पावला ( वा. रा. युद्ध. ५६ ).

३ कश्यप व खशा यांचा पुत्र.

**अकर्कर**—एक सर्प ( म. आ. ३५.१६ कुं. ).

**अकर्ण**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**अकल्मष**—तामस मनूच्या पुत्रांतील एक.

**अकृतव्रण**—हिमालयस्थ शांताचा पुत्र. एकदां वाघ याचे अंगावर आला असतां हा ओरडत पळूं लागला. याच वेळीं परशुराम शंकरांना प्रसन्न करून परत येत होता. त्यानें हा प्रकार पाहतांच द्विजपुत्राला अभय देऊन वाघाला ठार मारलें. वाघानें या मुलाचे अंगाला व्रण न केल्यामुळें याचें अकृतव्रण असें नांव पडलें. पुढें परशुरामानें याला आपला शिष्य केला. हा अकृतव्रण निरंतर परशुरामाबरोबर असे (ब्रह्माण्ड. १. २५). युधिष्ठिरानें केलेल्या राजसूयांत हा उपद्रष्टा होता (म. व. ११६; भा. १०. ७४). यानें रोमहर्षणापासून सर्व पुराणांचें अध्ययन केलें (भा. १२. ७. ५; अंबा पहा.)

२ कृतयुगांतील एक ब्राह्मण. हा एकदां सरोवरांत स्नान करावयास उतरला असतां एका नक्रानें याचा पाय धरला व तो याला आंत ओढूं लागला. त्यामुळें यानें त्या सरोवरांतील जलास व जलदेवतेस शाप दिला कीं, जो कोणी या पाण्याला स्पर्श करील तो तत्काल व्याघ्री होईल! पुढें पांडवांचा अश्वमेधीय अश्व या सरोवरांत जलपानाकरितां उतरला असतां व्याघ्री झाला (जै. अ. २१).

**अकृताश्व** किंवा **अकृशाश्व**—(सू. इ.) मत्स्यमतें हा संहताश्वपुत्र होय.

**अकृष्टमाष**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९.८६. १-१०; ३१-४०).

**अकोप**—दशरथराजाच्या अष्टप्रधानांतील एक (वा. रा. बा. ७). यास अशोक असेंहि नामांतर आढळतें.

**अक्रिय**—(सो. रंभ.) गंभीराचा पुत्र. याची संतति तपानें ब्राह्मण झाली होती (भा. १०.११).

**अक्रूर**—(सो. वृष्णि.) श्वफल्काला गांदिनीपासून झालेला मुलगा. याला आसंग वगैरे अकरा भाऊ व सुचिरा नांवाची एक बहीण होती (भा. ९.२४; १५.१८). आहुकाची मुलगी सुतनु ही याची बायको (म. आ. २०१.१८). याच्यावर कंसाचा आणि रामकृष्णांचा सारखाच विश्वास होता. रामकृष्णांचा कांटा दूर करण्याच्या उद्देशानें कंसानें त्यांना मथुरेंत आणविण्याकरतां अक्रूराला पाठविलें. तेव्हां ती कामगिरी अंगावर घेऊन हा रामकृष्णांना मथुरेला घेऊन आला. वाटेंत यमुनेंत स्नान करतांना बुडी मारली असतां अक्रूराला रामकृष्णांचा साक्षात्कार झाला (भा. १०.३९.४१; ह. वं. २. २६). तसेंच पुढें पांडवांना धृतराष्ट्र नीट वागवितो कीं नाहीं हें बारकाईनें पाहण्याकरितांहि कृष्णानें अक्रूरालाच हस्तिनापुरीं धाडलें होतें (भा. १०.४९). कुन्तीनेंहि आपली स्थिति याला मोकळ्या मनानें सांगितली. तसेंच धृतराष्ट्रालाहि यानें चार उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. पण त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं हें धृतराष्ट्राच्या भाषणावरून यास कळून आलें (भा.१०.४९). कृष्णानें स्यमन्तकमण्याकरितां शतधन्व्याचा शिरच्छेद केला हें कळल्याबरोबर भीतीनें अक्रूरानें मथुरा सोडली. कारण, शतधन्व्यानें स्यमन्तकमणि अक्रूराजवळ ठेवला होता. अक्रूर मथुरेंतून कोठें गेला याचा भागवतांत उल्लेख नसला तरी तो काशीस गेला अशी आख्यायिका आहे. सध्यां तेथें आढळत असलेल्या अक्रूरघाटावरून या समजुतीला दुजोरा मिळतो. त्या वेळीं कृष्णानें अक्रूराला सौम्यपणें सांगितलें कीं, माझ्याजवळ स्यमन्तक मणि आहे असा लोकांना संशय आहे; करितां तूं मणि दाखवून सर्वांची संशयनिवृत्ति कर. तेव्हां अक्रूरानें मणि दाखवून सर्वांची संशयनिवृत्ति केली (भा. १०. ५६-५७). द्रौपदीच्या स्वयंवरार्थ आलेल्या राजांत अक्रूर होता. (म. आ. २०१. १८ कुं.). तसेंच युधिष्ठिराच्या दरबारांत बसलेल्या राजांत याचा उल्लेख आहे (म. स. ४.३३; १४. ३४ कुं.). एकदां सूर्यग्रहणाच्या पर्वकालीं हा स्यमन्तपंचकक्षेत्रीं गेला होता (भा. १०.८२.५). यादवी झाली तेव्हां अक्रूर व भोज यांचें युद्ध होऊन दोघेहि मृत्युमुखीं पडले (भा. ११.३०.१६). बभ्रु हें अक्रूराचें नामान्तर आहे असें म्हणण्यास आधार नाहीं. याला दानपति असें अनेक ठिकाणीं म्हटल्याचें आढळतें (भा. १०. ३६.२८; ४९.२६). याला देववान् आणि उपदेव असे दोन पुत्र होते (भा. ९. २४-१८).

२ कद्रुपुत्र.

**अक्रोधन**—(सो. पूरु.) अयुतानायिपुत्र. याची माता भासा. याच्या स्त्रीचें नांव कण्डू. याचा पुत्र देवातिथि होय (म. आ. ६३). भविष्यमतें अयुतायूचा पुत्र. यानें १०५०० वर्षें राज्य केलें.

**अक्ष**—रावणाला मंदोदरीपासून झालेला पुत्र. अशोकवनिकाभंगकालीं रावणानें मारुतीस धरण्याकरितां पांच सेनापति पाठविले होते. ते त्याच्या हातून मेल्यावर यास पाठविलें. हा आठ अश्वांनीं युक्त अशा रथांत बसून अशोकवनिकेंत गेला व मारुतीशीं युद्ध करून शेवटीं त्याच्याच हातून मरण पावला (वा. रा. सु. ४७).

**अक्ष मौजवत**—हा एका सूक्ताचा द्रष्टा (ऋ. १०.३४).

**अक्षपाद**—शिवावतार सोमाचा शिष्य (गौतम पहा).

**अक्षमाला**—पुनः उत्पन्न झालेल्या वसिष्ठ ऋषीची ही स्त्री (म. उ. ११७.११ कुं.). अरुंधतीस नामांतर.

**अक्षीण**—विश्वामित्राचा पुत्र (म. अनु. ७).

**अगहित**—(स्वा.) पुलस्त्याला हविर्भूपासून झालेला पुत्र.

**अगस्त्य**—वसिष्ठाप्रमाणें हाहि मित्रावरुणांचा पुत्र होय (ऋ. ७.३३.१३). उर्वशीला पाहून मित्रावरुणांचें रेत

कमळांत पडलें व त्यापासून वसिष्ठ व अगस्त्य उत्पन्न झाले (बृहद्दे. ५.१३४). ऋग्वेदांत अगस्त्याचीं पुष्कळ सूक्तें आहेत ( ऋ. १.१६५, १३-१५; १६६-१६९; १७०.२; ५; १७१-१७८; १७९.३; ४; १८०-१९१ ). नेहमींप्रमाणें अगस्त्यकुलांतील माणसांचीं सूक्तें अगस्त्य हें कुलनाम असल्यामुळें अगस्त्याच्या नांवावर असावींत. एके ठिकाणीं अगस्त्याचें मुमंभस् असें नांव आलें आहे. ( ऋ. १.१८५. १० ). मान्य व मान्दार्य हीं पैतृक नांवेंहि अगस्त्याला लावलेलीं आढळतात ( ऋ. १.१६५.१४; १५; १६६.१५ ). मरुतांकरितां आणलेला पशु इंद्रानें पळविला असतां ते वज्र घेऊन इंद्राला मारण्यास उद्युक्त झाले. त्या वेळीं अगस्त्यानें मरुतांचें सान्त्वन केलें व इन्द्रमरुतांचें सख्य घडवून आणलें. ज्या सूक्तानें सख्य घडवून आणलें तें अगस्त्याचें कयाशुभीय सूक्त होय ( ऐ. ब्रा. ५.१६ ). कयाशुभीय सूक्तांत इंद्रमरुतांचा विवाद आहे (ऋ. १.१६५). व मैत्रीं मरुतांचे सान्त्वन आहे. हा विवाद वैदिक ग्रंथांत बराच प्रसिद्ध दिसतो ( तै. सं. ७.५.५.२; तै. ब्रा. २.७. ११.१; मै. सं. २.१ ८; क. सं. १०.११; पं. ब्रा. २१. १४.५ ). याचें इंद्रावरहि अत्यंत वजन होतें (ऋ. १.१७०).

याच्या बायकोचें नांव लोपामुद्रा ( ऋ. १.१७९.४ ). ह्या सूक्तांत अगस्त्यलोपामुद्रासंवाद आहे. तेथें हा वृद्ध झाला असून लोपामुद्रा त्याला संभोगाविषयीं प्रवृत्त करीत आहे. हा खेलाचा पुरोहित असावा ( ऋ. १.१८२.१ ). अगस्त्याशिष्य ( ऋ. १.१७९.५; ६; ) व अगस्त्यस्वसृ (ऋ. १०.९०.९) यांच्या नांवावर कांहीं ऋचा आहेत. ऋषींत हा अत्यंत वृद्ध म्हणून इंद्रानें याला गायत्र्युपनिषदाचा उपदेश केला व यानें तो इषाला सांगून परंपरा सुरू केली ( जै. उ. ब्रा. ४.१५.१; १६.१ ). जैमिनीय उपनिषद्-ब्राह्मण म्हणजेच गायत्र्युपनिषद् होय. पौराणिक वाङ्मयांत वरील माहितीस विरोधी असें विशेष कांहीं आढळत नाहीं. समुद्रामध्यें दडलेल्या असुरांनीं इंद्रादिकांना त्रास देण्यास सुरुवात केली. तेव्हां देवांनीं अग्नि व वायु यांना समुद्र शोषून टाकण्यास सांगितलें. पण समुद्रांतील प्राण्यांचा नाश होईल म्हणून त्यांनीं शोषण करण्याचें नाकारिलें. तेव्हां इंद्रानें दिलेल्या शापानें मित्रावरुणांच्या वीर्यानें हा कुंभांत उत्पन्न झाला. त्यांपैकीं अगस्त्य अग्नि होय. यास मैत्रावरुणि व कुंभयोनि हीं नांवें यामुळें पडलीं ( मत्स्य. ६१.२०१; पद्म. सृ. २२; म. व. ९८; द्रो. १५७; १८५; शां. ३४४; ब्रह्माण्ड. ३.३५ ). अगस्त्य विरक्त होता; तथापि पितरांच्या आज्ञेनुसार विदर्भाधिपतीची कन्या लोपामुद्रा हिच्याशीं याचा विवाह झाला ( लोपामुद्रा पहा ). ती राजकन्या असल्यामुळें तिला अगस्त्यापेक्षां ऐश्वर्याची विशेष कल्पना होती. स्वतःच्या तपःसामर्थ्यानें वाटेल तें संपादन करूं शकत असतांहि तपाचा व्यय करण्याची अगस्त्याची इच्छा नव्हती. पण लोपामुद्रेची तीव्र इच्छा पाहून श्रुतर्वन्, ब्रध्नश्व व त्रसदस्यु यांच्याकडून संपत्ति मिळविण्याचा यानें प्रयत्न केला; पण याला यश आलें नाहीं. तथापि त्रसदस्यूनें अगस्त्याला इल्वलाच्या अपरंपार संपत्तीचें वर्णन सांगितलें. तेव्हां तिघांहि राजांना बरोबर घेऊन हा इल्वलाकडे गेला; व यानें आपल्या अतुल सामर्थ्यानें इल्वलाची संपत्ति घेऊन लोपामुद्रेला संतुष्ट केलें.

समुद्रांत राहणाऱ्या कालकेयांनीं लोकांना फारच त्रास देण्यास सुरुवात केली. तेव्हां यानें समुद्र पिऊन टाकले. नंतर देवांनीं कालकेयांना ठार करून सर्वांना त्रासांतून सोडविलें. पण यास समुद्र बाहेर सोडण्यास सांगितलें असतां यानें ते पोटांत जिरले असें सांगितलें ( पद्म. सृ. १९; म. व. १०५ ).

अग म्हणजे पर्वत, पर्वताचें स्तंभन करणारा अशी अगस्त्य शब्दाची व्युत्पत्ति आहे ( वा. रा. अ. ११ ). हा विंध्याचा गुरु होता. अगस्त्य दक्षिणेकडे निघाला असतां विंध्यानें याला नमस्कार केला. तेव्हां यानें विंध्याला सांगितलें कीं, मी परत येईपर्यंत तूं असाच पडून राहा. त्याप्रमाणें विंध्य नम्र राहिला व दक्षिणेशीं उत्तरेचें दळणवळण सुरू झालें ( म. व. १०४; दे. भा. १०.३.७ ). हा प्रथम काशीस राहत असे; पण विन्ध्यांतून मार्ग काढून दळणवळण सुरू करण्याकरितां यानें काशीवास सोडला. त्या प्रसंगीं अगस्त्यास दिलेल्या अभिवचनाप्रमाणें अगस्त्याकरितां काशीविश्वेश्वर रामेश्वरीं येऊन राहिला ( आ. रा. सार. १० ). काशीक्षेत्रांत राहण्याची याची इच्छा अपुरी राहिल्यामुळें एकोणतिसाव्या द्वापारयुगांत हा व्यास होऊन काशीस राहील असा याला गोदावरीतीरीं लक्ष्मीनें वर दिला ( स्कंद. ४.१.५ ). यानें दक्षिणेंत आल्यावर एक द्वादशवार्षिक सत्र केलें. त्यांतील ब्राह्मणांना पिप्पल व अश्वत्थ खाऊन टाकीत. त्यांना शनीनें मारलें ( ब्रह्म. ११८ ).

नहुषानें वाहन करून याचा अपमान केला म्हणून अगस्त्याच्या जटेंत बसलेल्या भृगूनें त्याला दहा हजार वर्षें साप होऊन पडशील असा शाप दिला ( म. अनु. १.५७ कुं.; स्कंद. १.१.१५ ).

दाशरथी राम वनवासाला चालला असतां याच्या दर्शनार्थ गेला होता. अगस्त्यानें रामास सोनें व हिरे यांनीं सुशोभित सुंदर धनुष्य, अमोघ बाण, बाण न संपणारा भाता व सोन्याच्या म्यानासह सोन्याचा खड्ग दिला ( वा. रा. अर. ११ ). अगस्त्याच्या आश्रमांत ब्रह्मदेव, रुद्र, विष्णु, इंद्र, सूर्य, सोम, भग, कुबेर, ब्रह्मन्, विश्वकर्मन्, वायु, वरुण, गायत्री, अष्टवसु, नागराज, गरुड, स्कंद व यम यांच्याकरतां योजलेलीं स्थानें रामाच्या दृष्टीस पडलीं ( वा. रा. अर. १२ ). यानें भद्राश्वाला

गीता सांगितली ( वराह. ३८ ). यानें स्वतःकरतां काढलेले कमलकंद एका भुकेलेल्या चांडालाला दिले ( पद्म. सृ. १९ ). प्रजांचें हित करावें या हेतूनें अगस्त्यानें सर्व मृग देवतांकरितां प्रोक्षण केले. त्यामुळें देवकार्य व पितृकार्य यांमध्यें मृगमांस अर्पण करण्यास हरकत नाहीं ( म. अनु. ११५ ). पण अगस्त्यानें द्वादशवार्षिक सत्र आरंभलें व त्यांत पशुहिंसा न करतां इंद्राला पाऊस पाडण्यास भाग पाडलें ( म. आश्व.९२).

लोपामुद्रेला इध्मवाह नांवानें प्रसिद्ध झालेला दृढास्यु नांवाचा पुत्र होता ( म. व. ९९ ). दृढास्यूस दृढद्युम्न, इंद्रबाहु वगैरे नामांतरें असावींत ( मत्स्य. १४५.११४). दृढास्यु, व इध्मवाह हे दोघे निराळे असावेत.

पुलस्त्य, पुलह आणि क्रतु हे अगस्त्यगोत्री नसूनहि यांची संतति अगस्त्यगोत्री समजली जाते. कारण वैवस्वत मन्वन्तरांतील क्रतु हा निपुत्रिक असल्यामुळें त्यानें अगस्त्यपुत्र इध्मवाहाला दत्तक घेतलें होतें. पुलहानें आपली स्वतःची संतति राक्षस जन्मली म्हणून अगस्त्यपुत्र दृढास्याला दत्तक घेतलें. पौलस्त्यानेंहि याचप्रमाणें अगस्त्यांपैकीं दत्तक घेतला ( मत्स्य. २०२.८.१२ ).

पण ब्रह्माण्डपुराणांत अय, दृढायु व विध्मवाह अशीं मुलें दिलीं आहेत ( २.३२.११९ ). अगस्त्याची गोत्रावळी पुढें दिली आहे. तिलाच अगस्त्यवंश असें म्हटलें आहे ( मत्स्य. २०२.६ ). हा मंत्रकार होता व ऋषिक होता ( वायु. १. ५९.९२-९४ ).

अगस्त्याचा संबंध नेहेमीं दक्षिणेसच येतो ( वा. रा. अर. ११; ब्रह्म. ८४, ११८.२ ). लंकेशींहि अगस्त्याचा संबंध आलेला आहे. याला लंकावासी असें म्हटलें आहे ( मत्स्य. ६१.५१ ). अगस्त्याला दक्षिणचा स्वामी व विजेता म्हटलेलें आहे ( ब्रह्म. ११८.१५९ ). अगस्त्याचा आश्रम दक्षिणेंत मलयपर्वतावर होता ( मत्स्य. ६१.३७; पद्म. सृ. २२; वा. रा. कि. ४१.१५-१६ ). पाण्ड्य व महानदी यांच्याजवळ महेन्द्रशींहि अगस्त्याचा संबंध आहे (वा. रा. कि.४१). सध्या अगस्त्याचीं मंदिरें जावा वगैरे बेटांत सांपडतात. तिकडे सांपडलेलें भारतहि दाक्षिणात्य पाठाशीं जुळतें आहे. अगस्तिपुरीहि नाशिकजवळ आहे ( म. व. ९४. १ कुं. ). वातापीचें ठिकाण दक्षिणेसच आहे अशी अद्यापि समजूत आहे. वातापि म्हणजे बदामी होय. पण नंदलाल डेनें वेरूळजवळचें ठिकाण दिलें आहे. विंध्याची गोष्ट स्पष्टपणें दक्षिणेकडचा संबंध दर्शविते. विदर्भ म्हणजे वऱ्हाड हा दक्षिणेकडील देश व तेथील राजाची मुलगी लोपामुद्रा याची बायको आहे. हे सर्व प्रसंग याचा दक्षिणेकडे अत्यंत संबंध दर्शवितात. एवढेंच नव्हे तर, हा दक्षिणेंतलाच रहिवाशी होता असेंहि म्हणतां आलें असतें. पण उत्तरेकडेहि यमुना, प्रयाग, गंगा वगैरेंशीं याचा संबंध आलेला आहे ( मत्स्य. १०३ म. आ. २३५.२ कुं; व. ९५.११ कुं ). त्यावरून हा विंध्याला नमवून दक्षिणेंत आला या कथेस बळकटी येते. अगस्त्य नांवाचा एक तारा दक्षिणेकडे भाद्रपदांत उगवतो व तो उगवला कीं पाणी निर्दोष होतें. या गोष्टीचा अगस्त्य ह्या व्यक्तीशीं संबंध जोडला आहे ( मत्स्य. ६१ ).

यानें केलेले ग्रंथ—१ वराहपुराणांत पशुपालोपाख्यानांत आलेली अगस्त्यगीता, २ पंचरात्रांतील अगस्त्यसंहिता, ३ स्कंदपुराणांतील अगस्त्यसंहिता, ४ शिवसंहिता (C.C), ५ भास्करसंहितेंतील द्वैधनिर्णयतंत्र ( ब्रह्मवै. २. १६ )

अगस्त्य वंशांतील गोत्रकार—

करंभ (करंभय), कौशल्य (ग), क्रतुवंशोद्भव, गांधारकायन, पौलस्त्य, पौलह, मयोभुव, शकट ( करट ), सुमेधस्‌ हे अगस्त्य, मयोभुव व महेन्द्र या तीन प्रवरांचे होत

अगस्त्य ( ग ), पौर्णमास ( ग ) हे अगस्त्य, पारण, पौर्णमास या तीन प्रवरांचे होत ( मत्स्य. २०२ ).

अगस्त्यगोत्री मंत्रकार

मत्स्य. १४५, ११४-११५; ब्रह्मांड. २, ३२, ११९-१२०

| मत्स्य | ब्रह्मांड |
|---|---|
| अगस्त्य | अगस्त्य |
| | अय |
| इंद्रबाहु | दृढायु |
| दृढद्युम्न | विध्मवाह |

**अगस्त्यशिष्य**—ऋग्वेदांतील कांहीं ऋचा याच्या नांवावर आहेत ( ऋ. १.१७९.५; ६ ).

**अगस्त्यस्वसृ**—मंत्रद्रष्ट्री ( ऋ. १०.६०.६ ).

**अग्नि**—इंद्राचा शिष्य. याचा शिष्य कश्यप ( वं. ब्रा. २ ).

२ धर्म व वसु यांचा पुत्र. याला वसोर्धारा नामक स्त्रीपासून द्रविणक वगैरे पुत्र झाले. व कृत्तिका नांवाच्या स्त्रीपासून स्कंद नांवाचा पुत्र झाला ( भाग. ६, ६.११ ).

३ स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक ( मनु पहा ).

४ तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक ( मनु पहा ).

५ ब्रह्मदेवाचा मानसपुत्र. त्याच्या कोपापासून याची उत्पत्ति झाली ( म. शां. २५६ ). दक्षप्रजापतीची स्वाहा नामक कन्या ही याची स्त्री ( म. व. २३१; भा. ४. १. ६० ). दुसरी स्त्री इक्ष्वाकुवंशांतील दुर्योधन राजाची कन्या सुदर्शना ( म. अनु. २ ). प्रथम स्त्री स्वाहा ही माहिष्मती नगरीचा राजा नीलध्वज याची कन्या. नीलध्वजानें आपली कन्या अग्नीला देतांना त्याच्याशीं असा करार केला होता कीं, अग्नीनें नेहमीं नीलध्वजाच्या नगरींतच राहावें व जो कोणी शत्रु माहिष्मती नगरीवर चालून येईल त्याचें सैन्य जाळून टाकावें. या करारानें बांधला गेल्यामुळें अग्नि आपल्या श्वशुराच्या येथे घर-

कबई होऊन राहिला. पुढें जेव्हां अर्जुनाच्या सैन्याशीं नील-राजा लढावें लागलें, त्या वेळीं अग्नीनें अर्जुनाचें सैन्य जाळलें ( जै. अ. १५ ). यानें सहदेवाचें सैन्य जाळलें व शेवटीं सहदेवानें याची स्तुति केल्यावर हा परत फिरला ( म. स. ३१; म. अनु. २ ). सप्तर्षींचे हविर्द्रव्य देवतांना अर्पण करून अग्नि परत चालला असतां सप्तर्षींच्या स्त्रिया त्याच्या दृष्टीस पडल्या. तेव्हां त्यांच्याविषयीं याला कामवासना उत्पन्न झाली व त्यांची प्राप्ति व्हावी म्हणून हा गार्हपत्यामध्यें प्रविष्ट होऊन चिरकाल त्यांच्याजवळ राहिला. परंतु त्या वश न झाल्यामुळें हा अत्यंत निराश होत्साता देहत्यागाचा निश्चय करून अरण्यांत गेला. त्या स्त्रियांपैकीं दक्षकन्या स्वाहा हिची मात्र याजवर प्रीति जडल्यामुळें ती याच्यामागें वनांत गेली व तिनें इतर सप्तर्षिस्त्रियांचीं स्वरूपें धारण करून याची इच्छा पूर्ण केली ( म. व. २२४ ). पण ती अरुंधतीचें रूप घेऊं शकली नाहीं. पूर्वी श्वेतकीनें अपरिमित यज्ञ केले. त्यानें केलेल्या सत्रांत बारा वर्षेपर्यंत अग्नि सतत हविर्द्रव्य भक्षण करीत होता. त्यामुळें याला जाड्य उत्पन्न होऊन त्यावर उपाय विचारण्याकरितां हा ब्रह्मदेवाकडे गेला. तेव्हां ब्रह्मदेवानें याला खांडववन भक्षिण्यास सांगितलें. त्याप्रमाणें यानें तें जाळण्यास सुरुवात केली. परंतु इंद्रानें पर्जन्यवृष्टि करून सात वेळां याचा पराभव केला. शेवटीं निराश होऊन पुनः हा ब्रह्मदेवाकडे गेला व घडलेला सर्व वृत्तांत यानें त्यास निवेदन केला. तेव्हां ब्रह्मदेवानें याला भूलोकांत कृष्णार्जुनांकडे जाऊन त्यांजपाशीं खांडववन मागण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो ब्राह्मणरूपानें कृष्णार्जुनांकडे येऊन त्यांजपाशीं यानें तें वन भक्षिण्यास मागितलें. तेव्हां अर्जुनानें सांगितलें कीं, आम्हांस युद्धसामग्रीची न्यूनता आहे, तेवढी आपण आम्हांला द्यावी, म्हणजे इंद्रापासून आम्ही तुझें संरक्षण करूं. त्यावरून अग्नीनें वरुणाजवळून श्वेतवर्णी अश्व जोडलेला व कपिध्वजयुक्त असा एक दिव्य रथ, गांडीव नांवाचें धनुष्य व अक्षय्य बाणांचे दोन भाते मागून घेऊन अर्जुनास दिले. व श्रीकृष्णास सुदर्शन चक्र व कौमोदकी नांवाची गदा दिली. त्यायोगें ते उभयतां संतुष्ट झाले. व त्यांनीं अग्नीला त्याचें संरक्षण करण्याची खात्री देऊन त्यास वन भक्षिण्यास सांगितलें. तेव्हां अग्नि तें वन भक्षण करूं लागला. हें वर्तमान इंद्रास समजतांच तो अग्नीचें निवारण करण्याकरितां तेथें येऊन पर्जन्यवृष्टि करूं लागला. परंतु कृष्णार्जुनांनीं त्याचा पराभव केला. याप्रमाणें पंधरा दिवसपर्यंत तें अरण्य आमूल भक्षण केल्यावर अग्नीचें जाड्य नाहींसें झालें. त्यांतून तक्षकाचा पुत्र अश्वसेन, मयासुर व महर्षि मंदपालाचे चार पुत्र शार्ङ्गक पक्षी हे मात्र वांचले ( म. आ. २२२-२३ ). एकवीस दिवसपर्यंत अग्नि तें अरण्य दग्ध करीत होता (म. आ. २३४).

वृत्राला मारून ब्रह्महत्येच्या भीतीनें पळालेल्या इंद्राचा यानें बृहस्पतीच्या सांगण्यावरून शोध केला ( म. उ. १५-१६ ). पुढें त्या ब्रह्महत्येपासून इंद्राची सुटका करण्याकरितां ब्रह्मदेवानें तिचे विभाग केले. त्यांपैकीं चवथा भाग अग्नीनें ग्रहण केला ( म. शां. २८३ ).

एकदां भृगु समिधा आणण्याकरितां अरण्यांत गेला असतां दमन नांवाचा राक्षस त्याची व त्याच्या पत्नीची चौकशी करूं लागला. तेव्हां भीतीमुळें अग्नीनें चहाडी केली व भृगुपत्नी कोठें आहे तें सांगितलें. भृगु परत आल्यानंतर त्यानें अग्नीनें चहाडी केली म्हणून यास ‘ तूं सर्वभक्षक होशील ’ असा शाप दिला. यावर अग्नीनें उःशाप मागितला असतां भृगूनें ‘ तूं सर्वभक्षक होऊनहि पवित्रच राहशील ’ असा उःशाप दिला ( पद्म. पा. १४ ). पुलोमा नांवाचा राक्षस, भृगु स्नानासाठीं बाहेर गेला असतां, त्याच्या आश्रमांत शिरला व त्यानें अग्नीला विचारिलें कीं, भृगुपत्नी पुलोमा हिला पूर्वी मी मनानें वरिलें आहे, हें सत्य आहे किंवा नाहीं. अग्नीनें तें सत्य असल्याबद्दल त्यास सांगितलें. म्हणून भृगूनें त्यास वरील शाप दिला ( म. आ. ५-७ ). या भृगूच्या शापामुळें अग्नि पुढें पाण्यांत गुप्त झाला. त्यामुळें देवादिकांचीं यज्ञयागादि कर्में बंद पडलीं. देव याचा शोध करूं लागले असतां त्यांना शेवटीं मत्स्यांनीं अग्नि दाखविला. तेव्हां देवांनीं याची स्तुति केल्यावर हा बाहेर आला व पूर्ववत् आपलें कार्य करूं लागला ( म. आ. ७; श. २७; व. २२४ ). ऋग्वेदामध्यें अग्नि गुप्त होण्याचें कारण असें सांगितलें आहे कीं, वषट्काररूप वज्रानें बांधव मेले असतां, सौचीक नांवाचा अग्नि, वषट्कार व हवि यांना वाहून नेण्याला भ्याला व देवांतून निघून पाण्यांत शिरला ( ऋ. १०.५१ ).

ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाविषयीं अग्नीचा इंद्राशीं संवाद झाला होता (म. अनु. १४ कुं.). तसेंच यानें गाय, ब्राह्मण व अग्नि यांना जो पादस्पर्श करतो, त्याच्यावर भयंकर आपत्ति येते, अशा प्रकारचें धर्मकथन केलें आहे (म. अनु. १२६). सीतेला लंकेंतून परत आणल्यावर राम तिचा स्वीकार करीना, तेव्हां अग्नीनें सीता निरपराधी असल्याचें सांगितलें ( म. व. २९१ ).

याला स्वाहा स्त्रीपासून स्कंद नांवाचा पुत्र झाला ( म. व. २३१ ). शिवाय, याच स्त्रीपासून पावक, पवमान व शुचि असे तीन पुत्र झाले ( भा. ४. १. ६०-६१ ). सुदर्शनेच्या ठिकाणीं सुदर्शन नांवाचा पुत्र झाला ( म. अनु. २ ). शिवाय, स्वारोचिष म्हणून याला पुत्र असल्याचा उल्लेख आहे ( भा. ८. १. १९; आप् पहा ).

अंगिराच्या मागण्यावरून अग्नीनें त्याला बृहस्पति हा पुत्र दिला. त्याची स्त्री तारा. हिच्यापासून पुढें अग्निवंश वाढला

(म. व. २१७-२२२). पावक, पवमान व शुचि यांच्यापासून पुढें पंचेचाळीस अग्नि झाले (भा. ४. १. ६०-६१; वायु. १.२९; मत्स्य. ५१; ब्रह्मांड २.५३). परंतु वस्तुतः हा अग्नीचा वंश नसून तीं त्याचीं अनेक स्वरूपें आहेत (वैश्वानर पहा). हा एका सूक्ताचा द्रष्टा आहे (ऋ. १०.१२४).

६ पुढें होणाऱ्या इंद्रसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अग्नि गृहपति सहस्पुत्र**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८.१०२).

**अग्नि चाक्षुष**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९.१०६. १–३; १०.१४).

**अग्नि तापस**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०.१४१).

**अग्नि धिष्ण्य ऐश्वर**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९.१०९).

**अग्नि पावक**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०.१४०).

**अग्नि पावक बार्हस्पत्य**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८.१०२).

**अग्नि यविष्ठ सहःपुत्र**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८.१०२).

**अग्नि वैश्वानर**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०.७९-८०).

**अग्नि शर्मायण**—कश्यपगोत्री ऋषिगण.

**अग्नि सौचिक**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. ५१. २; ४; ६; ८; ५२; ५३. ४; ५; ७९-८०).

**अग्निकेतु**—रावणपक्षीय राक्षस. हा रामाच्या हातून युद्धांत मरण पावला (वा. रा. यु. ९. ४३).

**अग्निजिह्व**—अंगिरागोत्री ऋषि.

**अग्नितेज**—धर्मसावर्णि मन्वन्तरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अग्निप**—वेदनिधि नामक ब्राह्मणाचा पुत्र. एकदां प्रमोदिनी, सुशीला, सुस्वरा, सुतारा व चंद्रिका या गंधर्वकन्या याच्यावर मोहित होऊन त्यांनीं याला आपल्याशीं विवाह करण्यास सांगितलें. परंतु हा ब्रह्मचारी असल्यामुळें त्यानें तें नाकारलें. शेवटीं कोपून त्यांनीं परस्परांस पिशाच होण्याविषयीं शाप दिला. पुढें याच्या पित्यानें त्याची मुक्तता होण्याविषयीं लोमशमुनींची प्रार्थना केली. तेव्हां लोमशाच्या सांगण्यावरून तीं सहा पिशाच्चें प्रयागतीर्थात स्नान केल्यामुळें पूर्वयोनिप्रत गेलीं. शेवटीं लोमशाच्या आज्ञेनें यानें त्या पांचहि गंधर्वकन्यांशीं लग्न लाविलें व तो पित्यासह अलकापुरींत राहिला (पद्म. उ. १२८–१२९).

**अग्निबाहु**—भौत्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ भौत्य मनूचा पुत्र.

३ स्वायंभुव मनूचा पुत्र.

**अग्निभाव**—अमिताभ देवगणांतील एक.

**अग्निभू काश्यप**—इंद्रभू काश्यपाचा शिष्य (वं.ब्रा.२).

**अग्निमाठर**—बाष्कलाचा शिष्य. बाष्कलानें यास ऋग्वेदाची एक संहिता शिकविली. भागवतप्रमाणें अग्निमित्र व ब्रह्माण्डाप्रमाणें अग्निमातर असा पाठभेद आहे (व्यास पहा).

**अग्निमातर**—(अग्निमाठर पहा).

**अग्निमित्र**—स्वायंभुव मनूचा पुत्र.

२ (अग्निमाठर पहा).

३ शुंगराजांतील पहिला राजा. हा मौर्यराजांतील शेवटच्या बृहद्रथानंतर राज्यावर आला (शुंग पहा).

**अग्नियुत स्थौर**—(अग्नियूप पहा).

**अग्नियूप स्थौर**—हा एका सूक्ताचा द्रष्टा आहे. अग्नियुत असाहि पाठभेद आहे (ऋ. १०.११६).

**अग्निवर्चस्**—व्यासाच्या पुराणशिष्यपरंपरेंतील विष्णु ब्रह्मांड व वायुमतें रोमहर्षणाचा शिष्य.

**अग्निवर्ण**—(सू. इ.) सुदर्शन राजाचा पुत्र.

**अग्निवेश**—शिवावतार शूलिनाचा शिष्य.

**अग्निवेश्य**—अंगिरागोत्री ऋषि.

२ (सू. नरिष्यंत.) देवदत्ताचा पुत्र. यास जातुकर्ण्य व कानीन अशीं नामांतरें आहेत. हा तपानें ब्राह्मण झाला होता. यामुळें याजपासून झालेल्या संततीस, अग्निवेश्यायन असें नांव पडलें (भा. ९.२.२१).

३ अगस्त्यऋषीचा एक शिष्य (म आ. १५१). यापासून द्रुपद व द्रोण यांनीं धनुर्वेदाचें शिक्षण व (भाग ९.२) ब्रह्मशिर अस्त्र संपादन केलें. हा अग्निवेश्य ऋषि पांडवांसमागमें कांहीं काल द्वैतवनांत होता. हा द्रोणाचार्यांचा चुलता व भरद्वाजाचा धाकटा बंधु (म. आ.१४०).

४ (कारुण्य पहा).

**अग्निवेश्यायन**—स्वरित कोठें होतो हें विशेष सांगणारा (तै. प्रा. १४.३२; २ अग्निवेश्य पहा).

**अग्निष्टुत् किंवा अग्निष्टोम**—चक्षुर्मनूस नड्वलेपासून झालेला पुत्र.

**अग्निष्वात्त**—ब्रह्मदेव आपली मानसकन्या संध्या हिला पाहून काममोहित झाला. त्या वेळीं त्याच्या घामापासून अग्निष्वात्त नांवाचे पितृगण उत्पन्न झाले. यांची संख्या चौसष्ट हजार आहे. हे नित्य मनोनिग्रह करून वैराग्यानें राहतात (कालि. २). हे काश्यपपुत्र असून देवांस पूज्य आहेत (म. १४-१५; ह. वं. १). यांची पत्नी स्वधा (भा. ४.१).

**अग्निहोत्र**—सविता व पृश्नी यांचा पुत्र (भा. ६.१८१).

**अग्निहोत्रिन्**—काश्यपकण्वास आर्यावतीपासून झालेला पुत्र (भवि. प्रति. २.७). याचें राज्य ब्रह्मावर्तांत असून यानें हजारों म्लेच्छांना द्विज बनविलें (भवि. प्रति. ४.२१).

**अग्नीध्र**—स्वायंभुव मनूचा पुत्र (आग्नीध्र पहा).

२ भौत्य मन्वन्तरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ भौत्य मनूचा पुत्र (आग्नीध्र पहा).

**अग्नीध्रक**—रुद्रसावर्णि मन्वन्तरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अग्रयायिन्**—( सो. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**अघ**—कंसाचा अनुचर. हा बकासुर आणि पूतना राक्षसी यांचा भ्राता होता. कंसानें यास गोकुलांत कृष्ण व बलराम यांच्या नाशार्थ पाठविलें. तेथें यानें चार योजनें लांबीचा सर्पदेह धारण केला; व कृष्ण आणि इतर गोप यांच्या गायी चारण्याच्या मार्गांत आपलें शरीर पसरिलें. तसेंच आपलें मुख यानें इतकें विस्तीर्ण केलें होतें कीं, ती मोठी गुहा असून गायी चारण्यास योग्य स्थल आहे, असें गोपांस वाटून, ते गायींसह वनभाग तींत शिरले. हें कृष्णानें जाणून तो तत्काल तेथें आला व याच्या मुखांत शिरून आणि मोठा देह धारण करून, त्यानें याचें मुख फाडिलें. त्यामुळें हा तत्काल मरण पावला ( भा. १०.१२ ).

**अघमर्षी**—( अघमर्षण पहा ).

**अघमर्षण माधुच्छन्दस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १९० ). विश्वामित्रवंशांतील गोत्रकार मधुच्छंदाचा पुत्र. याला अघर्षण असेंहि म्हटलेलें आढळतें.

**अघोर**—हिरण्याक्षाच्या सैन्यांतील एक असुर. यास कार्तिकेयानें मारलें ( पद्म. सृ. ७५ ).

**अंग**—( स्वा. उत्ता. ) हा उल्मुकाला पुष्करणीपासून झालेला पुत्र. अत्रीचा पुत्र असें वंशज अशा अर्थानें म्हटलें आहे (पद्म. सृ. ८). ब्रह्मांडांत आईबापांचीं नांवें उरु व षडाग्नेयी अशीं दिलीं आहेत ( ब्रह्मांड २.३६ १०८.११० ). हा कृतयुगाअंतीं प्रजापति होता. हा एकदां स्वर्गांत गेला असतां तेथील इंद्राचें वैभव पाहून खूष झाला व इंद्रासारखा वैभवशाली पुत्र व्हावा म्हणून यानें विष्णूची उपासना केली. तेव्हां विष्णूनें याला भाग्यवान् पुत्र होण्याकरितां कुलीन कन्येशीं विवाह करण्यास सांगितलें. यानें गांधर्वविधीनें यमकन्या सुनीथेशीं लग्न केलें. तीपासून याला वेन नांवाचा पुत्र झाला ( पद्म. भू. ३०–३६ ). तो अतिशय दुष्ट असल्यामुळें अंग राजा कंटाळून घरादाराचा त्याग करून वनांत गेला. याला सुमनस्, ख्याति, क्रतु, अंगिरस व गय असे पांच भ्राते होते ( भा. ४. १३. १७–१८ ).

२ ( सो. अनु. ) बलीचा ज्येष्ठ पुत्र. हा बलीची भार्या सुदेष्णा हिला दीर्घतमापासून झाला. याला वंग, कलिंग, पुण्ड्र व सुह्म असे चार भ्राते होते ( म. आ. १०४; भा. ९.२३.५; विष्णु. ४.१८.१; मत्स्य. ४८.२४–२५; ब्रह्म. १३. २९–३१; ह. वं. ३१ ). शिवाय याला आंध्र नांवाचा पांचवा भाऊ होता ( भा. ९, २३, ६ ). अंग आदिकरून पांच पुत्रांना बलीनें राज्याभिषेक केला होता. यांच्या देशांनाहि यांचींच नांवें पडलीं ( ह. वं. ३१ ). याचा पुत्र दधिवाहन (मत्स्य. ४८, ९१; ब्रह्म. १३, ३७; ह. वं. ३१), खनपान (भा. ९, १३, ६) व पार (विष्णु. ४, १८, ३). अंग राजानंतर झालेले राजे अंगवंशांतील राजे म्हणून प्रसिद्धीस आले (अनुवंश पहा). यानें पुष्कळ यज्ञ केले. याचें चरित्र नारदानें सृंजयाला सांगितलें ( म. द्रो. ५७ ). याचा मांधात्यानें पराभव केला होता ( म. शां. २७ ).

३ भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय म्लेच्छ राजा. याला भीमानें मारलें ( म. द्रो. २६. १४–१७ कुं. ).

४ भारतीय युद्धांत नकुलानें मारलेला म्लेच्छ राजा ( म. क. २२ ).

५ (सो. भविष्य.) हा मत्स्यमतें जनमेजयाचा पुत्र होय.

**अंग औरव**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.१३८ ).

**अंग वैरोचन**—अभिषिक्त राजांच्या यादींत या उदार राजाचा उल्लेख आहे. याचा उदमय आत्रेय या नांवाचा पुरोहित होता ( ऐ. ब्रा. ८.२२ ).

**अंगजा**—ब्रह्मदेवास झालेली मुलगी ( मत्स्य. ३.१२ ).

**अंगद**—वालीला तारेपासून झालेला पुत्र. हा रामचंद्राच्या साहाय्यार्थ बृहस्पतिअंशानें जन्माला आला होता, म्हणून भाषण करण्यांत अतिशय चतुर असे. युद्धांत रामाचा बाण लागून वाली पडल्यानंतर त्यानें आपला पुत्र अंगद याचें रक्षण करण्याविषयीं रामाला विनंति केली (वा. रा. कि. १८). रामानें वालीच्या वधानंतर सुग्रीवाची किष्किंधेच्या राज्यावर स्थापना करून त्याच वेळीं अंगदास यौवराज्याभिषेक केला (वा. रा. कि. २६). वानराधिपति सुग्रीवानें दक्षिणदिशेला जे वानर सीतेच्या शोधाकरितां पाठविले त्यांचा अंगद हा नायक होता ( वा. रा. कि. ४१ ). सीतेचा शोध करीत असतां याला एका पर्वतावर एक मोठा असुर भेटला व तो अंगदावर धावला. त्या वेळीं हाच तो रावण असें समजून अंगदानें त्याच्या एक तोंडांत मारतांच तो रक्त ओकूं लागला व भूमीवर निश्चेष्ट पडला (वा. रा. कि. ४८). सीता सांपडेना म्हणून सर्व वानरांनीं प्रायोपवेशन करण्याचें ठरविलें. इतक्यांत संपातीनें सीतेचा पत्ता सांगितला ( वा. रा. कि. ५५-५८ ). त्याबरोबर समुद्रोल्लंघन करून कोण किती वेळांत जाईल याची चौकशी अंगदानें केली. त्यांत अंगद म्हणाला कीं, मी एका उड्डाणासरसा १०० योजनें जाऊं शकतों (वा. रा. कि. ६५ ). सरतेशेवटीं ही कामगिरी मारुतीनें केली. रावणाशीं युद्ध करण्यापूर्वीं रामानें सामाची भाषा बोलण्याकरितां अंगदास वकील म्हणून पाठविलें होतें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं ( म. व २८५; वा. रा. यु. ४१ ). यानें इंद्रजिताशीं युद्ध करून त्यास जर्जर केलें ( वा. रा. यु. ४३ ). कंपनाशीं युद्ध करून त्यास ठार केलें ( ७६ ). नरांतकाचा ( ६९-७० ), महापार्श्वाचा (९८) व

वज्रदंष्ट्राचा वध केला ( ५४ ). कुंभकर्णाबरोबर युद्ध करितांना सर्व वानरसैन्य त्याच्या देहाकडे पाहून घाबरून गेलें. त्या वेळीं यानें वीररसपरिप्लुत असें भाषण करून सर्व वीरांना युद्धाला प्रवृत्त केलें ( ६६ ). याची ही सर्व कामगिरी लक्षांत घेऊन रामानें राज्याभिषेकसमयीं याला बाहुभूषणें अर्पण केलीं ( १२८ ). सुग्रीवानंतर यानेंच किष्किंधेचें राज्य केलें.

२ दशरथपुत्र लक्ष्मणाला उर्मिलेपासून दोन पुत्र झाले, त्यांतील हा ज्येष्ठ पुत्र होय. यानें स्थापिलेल्या नगरीस अंगदीया असें म्हणतात व तेथेंच हा राज्य करीत असे ( वा. रा. उ. १०२ ).

३ भारतीय युद्धांत पांडवांच्या विरुद्ध यानें कौरवांना मदत केली होती. हा त्याच युद्धांत मरण पावला ( म. द्रो. २५. ३९. कुं. ).

**अंगराज**—याला पालकाप्यानें हत्तींचें वैद्यक शिकविलें ( अग्नि. २९२ ).

**अंगराय**—( ऐति. ) अजमेरच्या चपहनि कुलांतील पुमथरायाचा पुत्र. याचा पुत्र विशाल ( भवि. प्रति. ४.२ ).

**अंगार**—( सो. द्रुह्यु. ) याचें मांधाता राजाशीं मोठें युद्ध झालें होतें ( म. शां. २८. ८८ ). याचें नांव अंगारसेतु असें आढळतें. हें युद्ध दहा महिने चालू होतें (ब्रह्म. १३.१४९). याला आरब्ध, आरद्वत्, शरद्वत् व अरुद्ध अशीं नांवें आढळतात ( वंशावलि पहा ).

**अंगारक**—मंगळ नांवाचा ग्रह. हा पूर्वजन्मींचा शिवपार्षद वीरभद्र होय (मत्स्य. ७१; म. स. ११; मंगळ पहा).

२ सौवीरदेशींचा एक राजपुत्र ( ३ जयद्रथ पहा ).

३ जयद्रथाचा भाऊ ( म. व. २६६ ११-१३ ).

४ सुरभि व कश्यप यांचा पुत्र ( वायु. १.२५ ).

**अंगारपर्ण**—पांडव लाक्षागृहांतून मुक्त झाल्यावर गुप्तपणानें रात्रींचा प्रवास करीत असतां हा कुंभीनसी इत्यादि स्त्रियांसहवर्तमान मार्गांतील नदींत क्रीडा करीत होता. त्यामुळें परस्परांची बोलाचाली होऊन अर्जुनाचें व याचें युद्ध झालें. त्यांत अर्जुनानें आपल्याला जिंकलें असें पाहून यानें अर्जुनास सूक्ष्मपदार्थदर्शक चाक्षुषीविद्या दिली व अर्जुनाजवळून अग्निशिरास्त्रविद्या आपण घेतली. नंतर पुरोहितावांचून तुम्हीं हिंडूं नका व धौम्य ऋषीस पुरोहित करा असें सांगून हा निघून गेला. पुढें यानें आपलें पहिलें नांव सोडून चित्ररथ हें नांव स्वीकारलें ( म. आ. १८६.४३; १९९.५ ).

**अंगिरस्**—हा वज्रकुलोत्पन्न होता ( ऋ. १. ५१. ४. सायण ). याचा मनु, ययाति ( ऋ. १. ३१. १७) व भृगुबरोबर उल्लेख आहे ( ऋ. ८. ४३. १३ ). येथें ह्या लोकांप्रमाणें मी अग्नीला बोलावतों असें म्हणत आहे व इतरांप्रमाणें अंगिरसांनाहि प्राचीन समजत आहे. दध्यच्, प्रियमेध, कण्व व अत्रि यांच्या बरोबरहि याचा उल्लेख आहे ( ऋ. १. १३९. ९ ). अंगिरसांच्या सत्रांत इंद्रानें सरमा पाठविली ( ऋ. १. ६२. ३ ). तसेंच अंगिरस सत्र करीत होते तेथें नाभानेदिष्ठ मानव, सत्रांत घेण्याविषयीं आशीर्वादपूर्वक विनंति करीत आहे ( ऋ. १०. ६२. १-६ ). इतर वैदिक ग्रंथांतहि नाभानेदिष्ठाचा अंगिरसाशीं संबंध आहे ( ऐ. ब्रा. ५. १४; तै. सं. ३. १. ९. ४ ). अंगिरस हा शब्द अग्नीला लावला आहे ( ऋ. १. १. ६; ). अग्नीला प्रथम अंगिरानें उत्पन्न केलें. अंगिरस सुधन्वा याचा निर्देश आहे ( ऋ. १. २०. १ ). बृहस्पति अंगिराचा पुत्र होता ( ऋ. १०. ६७). अंगिरसांनीं देवांना प्रसन्न करून एक गाय मागितली. देवांनीं कामधेनु दिली. पण त्यांना धार काढतां येईना, म्हणून त्यांनीं अर्यमन्‌चीं प्रार्थना केली व त्याच्या साहाय्यानें धार काढली ( ऋ. १. १३९. ७ ). अंगिरस व आदित्य यांच्या मध्यें स्वर्गांत प्रथम कोण पोंचतो याविषयीं शर्यत लागली. पण ती शर्यत आदित्यांनीं जिंकली व अंगिरस साठ वर्षांनीं मागाहून पोंचला, असा उल्लेख 'अंगिरसामयन' सांगतांना आला आहे ( ऐ. ब्रा. ४. १७ ). बहुवचनीं येणारा हा शब्द पितरवाचक आहे व हे आमचे पितर आहेत असेंहि म्हटलें आहे (ऋ. १. ६२. २; १०. १४. ६). येथें याला नवग्व, भृगु व अथर्वन् असेंहि म्हटलें आहे. अंगिरांनीं इंद्राची स्तुति करून जगांतील अंधार नाहींसा केला ( ऋ. १. ६२. ५ ). (अथर्वांगिरस पहा). हा अग्नींतून उत्पन्न झाला म्हणून यास अंगिरस म्हणतात ( नि. ३. १७). अंगिरसाचे पुत्र अग्नीतून उत्पन्न झाले ( ऋ. १०.६२.५ ). अंगिरस प्रथम मनुष्य असून पुढें देव झाले व त्यांना ज्ञान प्राप्त झालें ( ऋ. ४. ४. १३ ). अंगिरस दिवस्पुत्र होण्याची इच्छा करीत होते ( ऋ. ४. २. १५ ). अंगिरसांना प्रथम वाणीचें ज्ञान झालें व नंतर छंदोज्ञान झालें ( ऋ. ४. २. १६ ). ऋग्वेदाच्या नवव्या मंडळांतील सूक्तें अंगिरसकुलांतील ऋषींचीं आहेत. ब्रह्मविद्या कोणीं कोणाला सांगितली हें सांगतांना ब्रह्मन्-अथर्वन्-अंगिरस-सत्यवह-भारद्वाज-आंगिरस-शौनक असा क्रम आहे ( मुं. उ. १. १. २; ३; ३. २. ११ ). अंगिरसाचा जुन्या तत्वज्ञान्यांत उल्लेख आहे ( शि. उ. १ ). कांहीं उपासनामंत्रांना आंगिरस हें नांव प्राप्त झालें होतें ( छां. उ. १. २. १०. नृसिं. ५. ९ ). हा शब्द पिप्पलादाला कुलनामासारखा लावलेला आहे ( ब्रह्मोप. १ ). अथर्ववेदांतल्या पांच कल्पांपैकीं एका कल्पाचें नांव अंगिरसकल्प असें आहे. कौशिकसूत्रांतील मुख्य आचार्यांत याचें नांव आहे. आत्मोपनिषदामध्यें अंगिरसानें शरीर, आत्मा व सर्वात्मा यांविषयीं माहिती सांगितली

आहे ( १ ). अंगिरस कुलांतील लोक डोक्यावर पांच शेंड्या ठेवीत ( कर्मप्रदीप ). अंगिरस मंत्रकार होता. पण अंगिरसाच्या नांवावर मंत्र नसून अंगिरस कुलांतील लोकांचे मंत्र आहेत. हा स्वायंभुव मन्वंतरांत ब्रह्मदेवाचे डोक्यापासून झाला. हा ब्रह्मिष्ठ, तपस्वी, योगी आणि धार्मिक होता(ब्रह्मांड.२.९.२३). तथापि स्वायंभुवाची संतति वाढेना. म्हणून ब्रह्मदेवानें स्त्रीसंतति उत्पन्न केली. दक्षाची कन्या स्मृति याची बायको झाली. दक्षानें इतर जांवयांस घरीं बोलावून त्यांचा सन्मान केला. पण सती व शंकर यांना बोलावलें नाहीं. तथापि सती घरीं येऊन बापाशीं भांडली. पण बापानें शंकराला बोलावण्याचें नाकारलें. रागानें सतीनें आपलें शरीर जाळून घेतलें. हें कळतांच शंकरानें सर्वांना जाळून टाकलें ( ब्रह्मांड. २.१३.५०–६६; वायु. १.३०.५६–६४ मत्स्य. १९५). यास स्मृतीपासून सिनीवाली, कुहू, राका व अनुमति ह्या चार मुली व भारताग्नि व कीर्तिमत् असे दोन मुलगे झाले ( ब्रह्मांड. १.११.१७ ). वैवस्वत मन्वंतरांत शंकराच्या वरानें हा पुनः उत्पन्न झाला. हा ब्रह्ममानसपुत्र होता. हा ब्रह्मदेवाच्या मुखापासून निर्माण झाला. याला पैतामहर्षि म्हणतात. हा प्रजापति होता. अग्नीनें याचें पुत्र म्हणून ग्रहण केलें होतें; म्हणून यास आग्नेय असें नांव आहे ( मत्स्य. १९४ ). अग्नि क्रुद्ध होऊन तपास गेला तेव्हां हा स्वतः अग्नि झाला. तपानें अग्नीचें तेज कमी झालें. तेव्हां तो याच्याकडे आला. यानें त्यास पूर्ववत् अग्नि होऊन अंधकाराचा नाश करण्यास सांगितलें. यानें अग्नीपासून पुत्र मागितला. तोच बृहस्पति होय ( मत्स्य. २१७.२१८ ). याच्या नांवावरून उत्पत्तीची उपपत्ति लावल्यास अनेक प्रकार संभवतात (मत्स्य.१९५.९; बृहद्दे.५.९८; ब्रह्मांड. ३.१.४१). ब्रह्मदेवानें संततीकरतां अग्नींत रेताचें हवन केल्याचीहि गोष्ट आहे ( वायु. २. ४. ).

दक्षकन्या स्मृति ही याची पत्नी ( विष्णु. १.७ ). चाक्षुषमन्वंतरांतील दक्षप्रजापतीनें आपल्या कन्या स्वधा व सती याला दिल्या होत्या. पहिलीला पितर झाले व सतीनें अथर्वांगिरसांचा पुत्रत्वानें स्वीकार केला ( भा. ६.६ ). याला श्रद्धा नांवाचीहि एक पत्नी होती ( भा. ३.१२.२४; ३.२४.२२ ). शिवा (सुभा) ह्या नांवाचीहि एक पत्नी होती (म. व. २२५). सुरूपा मारीची, स्वराट् कार्दमी व पथ्या मानवी ह्या तीन स्त्रिया अथर्वनच्या दिल्या आहेत ( ब्रह्मांड ३.१.१०२. १०३ वा. २.४.९८). तरी मत्स्यांत सुरूपा मारीची अंगिरसाचीच दिली आहे ( मत्स्य. १९६.१ ). हे दोनहि एकच समजले जात असावेत. सुरूपेपासून दहा मुलें झालीं. यानें गौतमास तीर्थमाहात्म्य सांगितलें ( म. अनु. २५ ). यानें पृथ्वीपर्यटन व तीर्थयात्रा केल्या होत्या ( म. अनु. ९४ ). यानें सुदर्शन नामक विद्याधरास शाप दिला होता ( भा. ४.१३ ). याची व कृष्णाची स्यमंतपंचकक्षेत्रीं भेट झाली होती (भा.१०.८४). याला शिवेपासून बृहत्कीर्ति, बृहज्ज्योति, बृहद्ब्रह्मन्, बृहन्मनस्, बृहन्मन्त्र, बृहद्भास आणि बृहस्पति हे पुत्र असून भानुमती, रागा ( राका ), सिनीवाली, अर्चिष्मती ( हविष्मती), महिष्मती, महामती आणि एकानेका ( कुहू ) अशा सात कन्या होत्या (म. व. २१८). बृहत्कीर्त्यादि सर्व बृहस्पतीचीं विशेषणें आहेत, असें नीलकण्ठाचें मत आहे. शिवाय भागवतांत राका व अनुमती या कन्या दिलेल्या आहेत ( भा.३.१२. २४; २४.२२ ). याचीं मुलें बृहस्पति, उचथ्य व संवर्त अशीं आहेत ( म. आ. ६७.५ कुं.; भा. ९.२). याशिवाय वयस्य ( पयस्य ), शांति, घोर, विरूप व सुधन्वन् अशींहि आहेत (म. अनु. १३२.४३ कुं. ). यानें चित्रकेतूच्या मुलास सजीव करून राजाचें सांत्वन केलें ( भा. ६. १४; १ चित्रकेतु पहा ).

याचा व्यवहाराव्यतिरिक्त इतर सर्व विषयांवर उल्लेख आढळतो. याज्ञवल्क्यानें याचा उल्लेख केला आहे. अंगिरसाच्या मताप्रमाणें परिषदेंत १२१ ब्राह्मणांचा समावेश होतो ( याज्ञ. १.९ विश्व. ). धर्मशास्त्राचा अवलंब न करतां स्वेच्छेनें एकाद्यानें जर एकादें कृत्य केलें तर तें निष्फळ होतें ( याज्ञ. १.५० ). घोर पातकामुळें अपराधी ठरलेल्या ब्राह्मणांसाठीं वज्र नांवाचें व्रत अंगिरसानें दिल्याचें विश्वरूपांत आहे ( याज्ञ. ३.२४८ ). प्रायश्चित्तासंबंधीं विश्वरूपानें ( याज्ञ. ३.२६५ ) याचे दोन श्लोक दिले आहेत. यांत ब्राह्मणक्षत्रियवैश्यस्त्रीवधासंबंधीं विचार केलेला आहे. कांहीं पशुपक्ष्यांच्या वधासंबंधींहि यानें प्रायश्चित्त सांगितलें आहे ( याज्ञ. ३.२६६ ). यांतच भगवान् अंगिरस म्हणून याचा मोठ्या गौरवानें उल्लेख केलेला आहे. परिषदेच्या घटनेसंबंधीं याचे तेरा श्लोक अपरार्कानें (२२–२३) दिले आहेत. मिताक्षरेंत शंख व अंगिरस यांचे सहगमनासंबंधीं बरेच श्लोक दिले आहेत ( याज्ञ. १.८६ ). अपरार्कानें ( १०९.११२ ) सहगमनासंबंधीं चार श्लोक दिले असून त्यांत ब्राह्मणस्त्रीनें सती जाऊं नये असें आहे. मेधातिथीनें ( मनु. ५.१५७ ) अंगिरसाचें सती जाण्यासंबंधीं मत दिलें असून त्याबद्दल नापसंती व्यक्त केली आहे. याचे अशौचासंबंधीं श्लोक, मिताक्षरादि ग्रंथांत आणि इतरत्र आले आहेत. सप्त अंत्यजांसंबंधीं असलेला याचा एक श्लोक हरदत्तानें ( गौतम २०.१ ) दिला आहे. सुमंतूनें अंगिरसाचें मत ग्राह्य धरिलें असल्याबद्दल विश्वरूपानें दिलें आहे ( याज्ञ. ३.२३७ ). शुद्धिमयूखांत अंगिरसानें शातातपाचें मत ग्राह्य धरलें आहे. स्मृतिचंद्रिकेंत उपस्मृतींचा उल्लेख करतांना अंगिरसाचा निर्देश आहे. तेथें याचीं गद्य अवतरणेंहि दिलीं आहेत. अंगिरसानें

मनूचें धर्मशास्त्र श्रेष्ठ मानिलें आहे ( स्मृतिच. आह्निक ). आनंदाश्रमांत १६८ श्लोकांची, प्रायश्चित्त सांगणारी एक अंगिरसस्मृति दिली आहे. तींत प्रायश्चित्त व स्त्री यांच्या संबंधीं विचार केलेला आहे. मिताक्षरेंत आणि वेदाचार्यांच्या स्मृतिरत्नावलीमध्यें बृहद्-अंगिरस दिला आहे. मिताक्षरेंत मध्यमअंगिरसाचा कित्येक वेळां उल्लेख केलेला आहे.

अंगिरसाचे देवपुत्र—आत्मा, आयु, ऋत, गविष्ठ, दक्ष, दमन, प्राण, सत्य, सद व हविष्मान्.

मुख्य गोत्रकार—अजस (अयस्य), उतथ्य, ऋषिज (उशिज), गौतम, बृहस्पति, वामदेव व संवर्त.

उपगोत्रकार—अत्रायनि, अभिजित्, अरि, आरुणायनि, उतथ्य, उपबिंदु, ऐरिडंव, कारोटक, कासोरू, केराति, कौशल्य (ग), कौष्टिकि, क्रोष्टा, क्षपाविश्वकर, क्षीर, गोतम, तौलेय, पांडु, पारिकारारिरेव ( पारःकारिरेव ), पार्थिव ( ग ), पौषाजिति ( पौषजिति, पौष्यजिति ), भार्गवत, मूलप, राहुकर्णि ( रागकर्णि ), रेवाग्नी, रौहिण्यायनि, वाहिनीपति, वैशालि, रुजीविन्, सलौगाक्षि, सामलोमकि, सार्धनेमि, सुरैषिण, सोम व सौपुरि, हे सर्व आंगिरा, उशीज, सुवचोतथ्य या तीन प्रवरांचे आहेत.

अग्निवेश्य, आत्रेयायणि, आपस्तंबि, आश्वलायनि, उडुपति, एकेपि, कारकि ( काचापि ), कौचकि, कौरुक्षेत्रि, कौरुपति, गांगोदधि, गोमेदगंधिक, जैत्यद्रौणि, जैव्हलायनि, तृणकर्णि, देवरारि, देवस्थानि, ब्याल्येय, धमति ( भूनित ), नायकि, पुष्पान्वेषि, पैल, प्रभु, प्रावहि, प्रावेपि, फलाहार, बर्हिसादिन्, बाष्कलि, बालडि, बालिशायनि, ब्रह्मतन्वि ( ब्रह्म व तवि ), मत्स्याच्छाद, महाकपि, महातेज( ग ), मारुत, मार्ष्टिपिंगलि, मूलहर, मौञ्जवृद्धि, वाराहि, शालंकायनि शिखाग्रीविन्, शिलस्थलिसरिद्धवि, सायसुश्रीवि, सालडि ( भालुठिबालुठि ), सोमतन्वि ( सोम व तवि ), सौटि, सौवेष्ठ्य व हरिकर्णि, हे सर्व अंगिरा, बृहस्पति व भरद्वाज या तीन प्रवरांचे आहेत.

काण्वायन ( ग ), कोपचय ( ग ), क्रोष्टाक्षिन्, गाधिन्, गार्ग्य, चक्रिन्, तालकृत, नालविद, पौलकायनि, बलाकिन् (बालाकिन्), बहुग्रीविन्, भाष्ट्रकृत, मधुरावह, मार्कटि, राष्ट्रपिण्डिन्, लावकृत, लैन्द्राणि, वात्स्यतरायण, श्यामायनि, सायकायनि, साहरि व स्कंदस, हे सर्व अंगिरा, गर्ग, बृहस्पति, भरद्वाज व सैत्य या पांच प्रवरांचे आहेत.

उरुक्षय, ऊर्व, कपीतर, कलशीकंठ, काव्य, कारीरथ, कुसीदकि, जलसंधि, दाक्षि, देवमति, धान्यायनि, पतंजलि, बिंदु, भरद्वाजि, भावास्थायनि, भूयसि, मदि, राजकेशिन्, लध्विन् वौषडि, शंसपि, शक्ति, शालि, सोवुधि व स्वस्तितर, हे सर्व अंगिरा, उरुक्षय व दमवाह्य अशा तीन प्रवरांचे होत.

अनेह ( अनेहि ), आर्पिणि ( अर्पिणि ), गार्ग्यहरि (गर्गिहर ), गालव ( गालवि ), गौरवीति, चेनातकि, तंडि, तैलक, त्रिमार्ष्टि, दक्ष, नारायणि ( परस्परायणि ), मनु, संकृति व संबधि, हे सर्व अंगिरा, गौरवीति व संकृति या तीन प्रवरांचे आहेत.

कात्यायनि, कुबेराणि, कौत्स, पिंग, भीमवेग, माद्रि, मौलि, वात्स्यायनि, शाश्वदर्भि, हंडिदास व हरितक, हे अंगिरा, जीवनाश्व ( युवनाश्व ) व बृहदश्व या तीन प्रवरांचे आहेत.

बृहदुक्थ व वामदेव, हे अंगिरा, बृहदुक्थ व वामदेव या तीन प्रवरांचे आहेत.

कुत्सांचे प्रवर अंगिरा, पुरुकुत्स व सदस्यु असे तीन.

रथीतरांचे प्रवर अंगिरा, विरूप, रथीतर असे तीन.

कर्तण ( कर्मिण ), जतृण, पुत्र व विष्णुसिद्धि, वैरपरायण व शिवमति, हे अंगिरा, विरूप व वृषपर्व अशा तीन प्रवरांचे होत.

तंबि, मुद्गल, सात्यमुग्रि व हिरण्य, यांचे प्रवर अंगिरा, मत्स्यदग्ध व मुद्गल.

अग्निजिव्ह, अपाग्नेय, अश्वयु, देवजिह्व, परण्यस्त ( ग ), विमौद्गल, बिराडप ( बिडालज ) व हंसजिह्व यांचे प्रवर अंगिरा, तांडि व मौद्गल्य.

अपांडु, कटु ( कंकट ), गुरु, नाडायन, नारिन्, प्रागाथम (प्रागाथम), मरण ( मरणाशन ), मर्कटप ( कटक ), मार्कंड ( मार्कट ), शाकटायन, शिव व श्यामायन, हे अंगिरा, अजमीढ व काव्य या तीन प्रवरांचे होत.

कपिभू, गार्ग्य व तित्तिरि, हे अंगिरा, कपिभू व तित्तिरि या तीन प्रवरांचे होत.

ऋक्ष, ऋषिमित्रवर, ऋषिवान्मानव, भरद्वाज, हे अंगिरा, ऋषिमैत्रवर, ऋषिवान्मानव, बृहस्पति, भरद्वाज या पांच प्रवरांचे होत.

भारद्वाज, शैशिरेय, शौंग व हुत, हे अंगिरा, बृहस्पति, भारद्वाज, मौद्गल्य व शैशिर या पांच प्रवरांचे आहेत ( मत्स्य. १९६ ).

अंगिरस वंश—( यास अथर्वन् म्हटलें आहे )

पथ्या—धृष्णि—सुधन्वन्—ऋषभ.

सुरूपा—१ आधासि, २ आयु, ३ ऋत, ४ दनु, ५ दक्ष ६ प्राण, ७ बृहस्पति—भारद्वाज, ८ सत्य, ९ हविष्य, १० हविष्णु.

स्वराट्—१ अयास्य याचा कितव, २ उतथ्य याचा शरद्वान्, ३ उशिजाचा दीर्घतपस्, ४ गौतम, वामदेव व वामदेवाचा बृहदुक्थ.

याचे पोटभेद

अयास्य, आर्षभ, उतथ्य, उशिज, कण्व, कपि, कितव, गर्ग, भरद्वाज, भारद्वाज, मुद्गल, रथीतर, रुक्ष, विष्णुवृद्ध, सांकृति, हरित ( ब्रह्मांड. ३, १, १०८–११२ ).

अंगिरस गोत्री मंत्रकार

| वायु. | मत्स्य. | ब्रह्मांड. |
|---|---|---|
| १.५९.९८-१०२; | १४५.१०१-१०५; | २.३२.१०७-१११ |
| अंगिरस् | अंगिरस् | अंगिरस् |
| अजमीढ | अजमीढ | अजमीढ |
| | अपस्यौष | |
| अंबरीष | अंबरीष | अंबरीष |
| अमृत | | |
| | | अयास्य |
| आयाप्य | | |
| आहार्य्य | अस्वहार्य | आहार्य |
| | उकूल | |
| उतथ्य | उतथ्य | उतंथ्य |
| ऋपभ | | |
| औगज | ऋषिज | असिज |
| कक्षीवान् | कक्षीवान् | कक्षीवान् |
| कण्व | | कण्व |
| | | कपि |
| | कवि | |
| | काव्य | |
| | कृतवाच् | ऋतवाच् |
| | गर्ग | गर्ग |
| गार्ग्य | | |
| | गुरुवीत | |
| | | चक्रवर्ती |
| | | तुक्षय |
| त्रसदस्यु | | त्रसदस्यु |
| | त्रित | |
| दीर्घतमस् | दीर्घतमस् | दीर्घतमस् |
| पुरुकुत्स | पुरुकुत्स | पुरुकुत्स |
| पृषदश्व | पृषदश्व | |
| पौरुकुत्स | | पौरुकुत्स |
| बलि | | |
| बाष्कलि | | बाष्कलि |
| | बृहत् | |
| बृहदुक्त्थ | | बृहदुक्त्थ |
| भरद्वाज | भरद्वाज | भरद्वाज |
| भारद्वाज | | |
| मांधाता | मांधाता | मांधाता |
| मुद्गल | मुद्गल | मुद्गल |
| युवनाश्व | युवनाश्व | युवनाश्व |
| | लक्ष्मण | |
| वाजश्रवस् | वाजिश्रव | वाजश्रवस् |
| वामदेव | वामदेव | वामदेव |
| विरूप | विरूप | विरूपाक्ष |
| | | वृषादर्भ |
| वेधस | वैद्यग | |
| | शरद्वान् | |
| | शुक्र | |
| शैनी | | शिनि |
| संहृति | स्मृति संकृति | संकृति |
| सदस्युमान् | सदस्यवान् | दस्युमान् |
| | | सनद्वाज |
| सुचिति | सुचित्ति | |
| | स्वश्रव | |

( आंगिरस व वसुरोचिष् पहा )

३ उत्तानपादवंशीय उल्मुकास पुष्करिणीपासून झालेला पुत्र. श्रावण महिन्यांतील इंद्र नांवाच्या सूर्याबरोबर फिरणारा ऋषि ( भा. ४.१३; ह. वं. १.१८ ). हा एक पितृगण होता.

**अचल**—हा शकुनीचा भाऊ. भारतीय युद्धांत अर्जुनाच्या हातून मरण पावला ( म. द्रो० ३० ). हा एकरथ होता (म. उ. १६८; शकुनि पहा ).

२ ( सो. वसुदेव. ) वायुमतें हा वसुदेवास मदिरेपासून झालेला पुत्र.

३ ( मगध. भविष्य. ) मत्स्यमतें महीनेत्राचा पुत्र.

**अच्छावाक ऋतु**—ब्रह्मदेवाच्या पुष्कर तीर्थावरील यज्ञांत हा होतृगणांतील एक ऋत्विज होता ( पद्म. सृ. ३४).

**अच्छोदा**—बर्हिषद पितरांची मानसी कन्या. ही अग्निष्वात्त पितरांची कन्या(ह.वं.१.१८).हिजपासून अच्छोद सरोवर झालें. हिनें अजाणता पितरांपैकीं अमावसूला वरलें; म्हणून ही योगभ्रष्ट होऊन पडली. व पुढें द्वापारयुगांत अमावसूची कन्या झाली ( ब्रह्मांड.३. १०. ५४-७४; म. आ. ६४. ९४ कुं.; मत्स्य. १४. ). हीच पुढें सत्यवती झाली.

**अच्युत**—विभिंदुकीयांनीं केलेल्या सत्रांत हा प्रतिहर्त्यांचें काम करीत होता ( जै. ब्रा. ३. २२३ ).

**अज**—( सू. इ. ) रघुराजाचा पुत्र व दशरथाचा पिता. पद्मपुराणामध्यें हा रघूचा पौत्र व दुसऱ्या दिलीपाचा पुत्र आहे (पद्म. सृ.९ ). हा अजा म्हणजे शेळ्या पाळीत असल्यामुळें यास अज असें नामांतर प्राप्त झालें. यानें भैरवीचें पूजन करून सुख व ऐश्वर्य प्राप्त करून घेतलें. त्या भैरवीला अजापालेश्वरी असें नांव पडलें ( स्कंद. ७. १. ५७. ५८ ). याचा पुत्र दीर्घबाहु व त्याचा दशरथ ( पद्म. सृ. ९ ).

२ प्रतिहर्त्याला स्तुतीपासून झालेल्या दोन पुत्रांतील ज्येष्ठ. याचा भ्राता भूमन् ( भा. ५.१५.५ ).

३ ( सू. निमि. ) ऊर्ध्वकेतु जनकाचा पुत्र व उरुजित् जनकाचा पिता.

४ ( सो. पुरूरवस्. ) विजयकुलांतील बलाकाश्व राजाचा पुत्र. याचा पुत्र कुश अथवा कुशिक.

५ पांडवांकडील एक महारथी ( म. उ. १७१ ).

६ दाशराज्ञ युद्धांतील सुदासाचा शत्रु ( ऋ. ७.१८.१९ )

७ सुरभि व कश्यप यांचा पुत्र.

८ उत्तम मनूचा पुत्र.

९ एक ऋषि. याच्या कुलांत धनंजय, कपर्देय, परिकूट व पाणिनि हे ऋषि झाले ( विश्वामित्र पहा ).

१० तुषित देवगणांतील एक.

११ याची मुलगी पृश्नि ( जंतुधान व शंड पहा ).

१२ धर्म व मुहूर्ती यांचा पुत्र.

**अज एकपाद्**—हा अग्नि आहे. दुर्गाचार्य 'सूर्य' अर्थ करतात ( नि. १२.२९ ). याचें स्थान स्वर्ग आहे ( नि. ५. ६ ). याला पैयनिषेक देण्यांत येतो ( पा. गृ. २. १५-२ ). एकादश रुद्रांतील एक.

**अजक**—दनुपुत्र दानव ( स्कंद. ३. २. ८ ).

२ ( सो. अमा. ) बलाकाश्वाचा पुत्र. याचा पुत्र कुश अथवा कुशिक. भागवत व वायुमतें हा सुहोत्रपुत्र असून विष्णुमतें हा सुजंतुपुत्र आहे.

३ ( सो. इ. ) मत्स्यमतें हा दिलीपपुत्र होय. हें नांव अजाबद्दल पडलें आहे.

४ ( प्रद्योत. भविष्य. ) विशाखयूपाचा पुत्र.

**अजकर्ण**—मय व रंभा यांचा पुत्र

**अजगंधा**—कश्यप व मुनि यांची कन्या अप्सरा.

**अजन**—तेरा सैंहिकेयांतील एक असुर ( सैंहिकेय पहा ).

**अजब**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांडमतें हिरण्यनाभाचा शिष्य ( व्यास पहा ).

**अजमीढ**—( सो. पूरु. ) हस्तीच्या तीन पुत्रांतील ज्येष्ठ. यास नीलिनी, भूमिनी, धूमिनी व केशिनी अशा चार स्त्रिया होत्या. याच्या वंशास अजमीढवंश म्हणत असत. याचा वंश चालविणारे प्रियमेध, ऋक्ष, बृहदिषु आणि नील असे चार पुत्र होते. हा मूळ क्षत्रिय असून पुढें ब्राह्मण झाला ( वायु. २.२९.१००; ११४ ).

२ ( सो. पूरु. ) सुहोत्रास ऐक्ष्वाकीपासून तीन पुत्र झाले त्यांतील ज्येष्ठ. हा अंगिरागोत्रांतील प्रवर व मंत्रकार होता ( ऋ. ४. ४३. ४४ ).

**अजमीळ्ह**—( २ अजमीढ पहा )

**अजय**—( शिशु. भविष्य. ) भागवतमतें दर्भकाचा पुत्र.

२ ( ऐति. ) अजमीरच्या चपहानिकुलांतील महादेवराजाचा पुत्र. यानें सात वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४.२ ).

**अजस्य**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार. अयस्य असा पाठभेद आहे.

**अजात**—( सो. विदूरथ. ) हा मत्स्यमतें हृदीकाचा पुत्र.

**अजातरिपु**—( ऐति. ) मगधवंशीय वेदमिश्र राजाचा पुत्र. यास दर्भक नामक एक पुत्र होता. यानें पन्नास वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. २.७ ).

२ हा काशीचा राजा असून गार्ग्य बालाकी नामक एका अभिमानी ब्राह्मणाला यानें वादांत गप्प बसविलें ( बृ. उ. २.१.१; कौ. उ. ४.१ ).

**अजातशत्रु**—युधिष्ठिराचें नामांतर ( भा. १. ८. ५; म. भी. ८५ ).

२ ( शिशु. भविष्य. ) ब्रह्मांडमतें बिंबिसार राजाचा पुत्र. विष्णुमतें बिंदुसाराचा, मत्स्यमतें भूमिमित्राचा व वायुमतें क्षेमवर्मन्चा पुत्र होय.

**अजामिल**—कान्यकुब्ज देशांतील एक ब्राह्मण. हा प्रथम सदाचारी होता. पण पुढें एका वेश्येच्या नादीं लागून वृद्ध आईबापांचा व विवाहित स्त्रीचाहि यानें त्याग केला. वाटसरू लोकांना लुटणें, द्यूत खेळणें, फसविणें व चोऱ्या करणें इत्यादि साधनांनीं हा कुटुंबपोषण करी. अशीं याचीं अठ्ठयायशीं वर्षें गेलीं. त्या वेश्येपासून याला दहा मुलें झालीं. त्यांतील धाकट्या नारायणावर याचा फारच लोभ असे. पुढें मरणसमय आला असतांहि हा नारायणालाच हाक मारीत होता. केवळ नामस्मरणाच्या माहात्म्यानें यमदूतांच्या हातून विष्णुदूतांनीं याला सोडविलें. तेव्हां यमदूत व विष्णुदूत यांच्यांत झालेला संवाद याच्या कानीं आला. यमदूतानें सांगितलेला वेदप्रतिपादित गुणाश्रित धर्म आणि विष्णुदूतानें केलेल्या शुद्ध भागवतधर्माचें प्रतिपादन ऐकून, कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन, याची हरीवर भक्ति जडली. शेवटीं हा विरक्त होऊन हरिद्वारला गेला. व तेथें गंगेंत देहाचा त्याग करून मुक्त झाला ( भा. ६.१--२ ).

**अजामुखी**—लंकेंतील अशोकवनिकेंत सीतासंरक्षणार्थ असलेल्या राक्षसींतील एक ( वा. रा. सु. २४ ).

**अजित्**—स्वायंभुव मन्वंतरांतील याम देवांपैकीं एक.

२ चाक्षुष मन्वंतरांतील वैराग्य व संभूति यांपासून झालेला विष्णूचा अवतार ( मनु पहा ).

३ भौत्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अजित**—पृथुक देवांतील एक.

**अजिन**—उरुस षडाग्नेयीपासून झालेला पुत्र.

**अजिर**—सर्पसत्रांत हा सुब्रह्मण्य नांवाच्या ऋत्विजाचें काम करीत होता ( पं. ब्रा. २५.१५ ).

२ स्वायंभुव मन्वंतरांतील जिदाजितदेवांपैकीं एक.

**अजिह्म**—पारावत देवांतील एक.

**अजिह्विका**—अशोकवनिकेंतील राक्षसी (म. व. २८०).

**अजीगर्त सौयवसि**—भृगुकुलोत्पन्न एक ब्राह्मण. यास शुनःपुच्छ, शुनःशेप व शुनोलांगूल असे तीन पुत्र होते. शुनःशेपास यानें वरुणास बलि देण्याकरितां हरिश्चंद्रास विकलें ( ऐ. ब्रा. ७.१५-१७ ).

**अजेय**—पारावत देवांतील व विकुंठ देवांतील एक.

**अजैकपात**—भूतकपीला घोरेपासून झालेला एक रुद्र.

२ एक अग्नि व एक रुद्र ( अज एकपाद् पहा ).

**अजैकपाल**—शंकराचे प्रसादानें झालेला पुत्र. त्यास एक पाय बकऱ्याचा व दुसरा मनुष्याचा होता. लहान असतांनाच मृत्यु रोगांसह यास मारण्याकरितां आला. परंतु यानें मृत्यूस जिंकलें. त्यामुळें यास मृत्युंजय असें नांव पडलें. हा अत्यंत सात्विक होता ( भवि. प्रति ४.११ ).

**अंजक**—कश्यपास दनूपासून झालेला एक दानव.

**अंजन**—( सू. निमि. ) विष्णुमतें हा कुणिपुत्र होय.

२ ऐरावताचा पुत्र. यास संकीर्ण असें नामांतर आहे. हा यमाचें वाहन आहे ( ब्रह्मांड. ३.७.३३० ).

**अंजनपर्वन्**—घटोत्कचाचा पुत्र ( म. उ. १९४.२० कुं. ). हा रात्रियुद्धांत अश्वत्थाम्याच्या हातून मरण पावला ( म. द्रो. १५७.८९ कुं. ).

**अंजना**—ही पूर्वजन्मीं पुंजकस्थली नामक अप्सरा होती. हिला शाप झाल्यामुळें ही पृथ्वीवर कुंजरनामक वानराची कन्या झाली. पण दुसरीकडे ही गौतमऋषीची कन्या दिली आहे ( शिव. शत. २० ). ही केसरी वानराची पत्नी (भवि. प्रति. ४.१३). मतंग ऋषीच्या सांगण्यावरून अंजनीनें पतीसह वेंकटाचलावर जाऊन, पुष्करणी तीर्थावर स्नान करून, वराह व वेंकटेश यांना नमस्कार केला. नंतर आकाशगंगा-तीर्थावर वायूची आराधना केली. पुढें १००० वर्षे तप झाल्या-वर वायु प्रगट होऊन म्हणाला, " मी चैत्रांतील पौर्णिमेच्या दिवशीं तुझी कामना पूर्ण करीन, तरी वर माग. " तिनें पुत्र मागितला. पुढें वायुप्रसादानें हिला मारुती झाला ( स्कंद. २,४० ). हिला मार्जरा नामक सवत होती ( आ. रा. सार. १३ ). हिला अंजना व अंजनी या दोन्ही नांवांनीं उल्लेखितात. ही कामरूपधरा होती ( वा. रा. किं. ६६ ).

**अटमान**—( आंध्र. भविष्य. ) मेघस्वातीचा पुत्र.

**अट्टहास**— चालू मन्वंतराच्या विसाव्या चौकडींत हिमालयाच्या अट्टहास शिखरावर शिवाचा हा अवतार झाला. तेथें याचे पुढील शिष्य होते—१ सुमन्तु, २ बर्वरी, ३ कबंध, ४ कुशिकंधर ( शिव. शत. ५ ).

**अणि मांडव्य**—मांडव्य ऋषीस नामांतर.

**अणीचित् मौन**—धार्मिक विधिसंबंधीं एक तत्त्वज्ञ आणि जाबाल आणि चित्र गौश्रायणी यांचा समकालीन ( सा. ब्रा. २३. ५ ).

**अणुह**— ( सो. पूरु. ) विभ्राज अथवा पार राजाचा पुत्र. यास नीप असें दुसरें नांव आहे. याची पत्नी शुक्राचार्यांची कन्या कृत्वी अथवा कीर्तिमती. याला ब्रह्मदत्त व इतरहि शंभर मुलें होतीं.

**अतिकाय**—धान्यमालिनीपासून रावणास झालेला पुत्र. याचें शरीर अति स्थूल होतें म्हणून यास हें नांव पडलें. यानें ब्रह्मदेवाचें आराधन करून अस्त्रें, कवचें, दिव्य रथ आणि सुरासुरांपासून अवध्यत्व संपादिलें. त्यामुळें यानें इंद्राचा पराभव केला व वरुणास जिंकून त्याचा पाशहि आणिला. कुंभकर्ण मरण पावल्यावर हा युद्धार्थ आला तेव्हां लक्ष्मणानें यास मारिलें ( वा. रा. यु. ७१ ).

**अतिथि**—(सू. इ.) कुशाचा पुत्र. याचा पुत्र निषध. भविष्यमतें यानें दहा हजार वर्षे राज्य केलें.

२ आद्य देवगणांतील एक.

**अतिथिग्व**—दिवोदासास या नांवानें संबोधिलें आहे.

**अतिधन्वन्**—मशकाचा शिष्य. याचा शिष्य उदर शांडिल्य ( वं. ब्रा. २ ). यानें उदर शांडिल्याला उद्गीथाच्या उपासनेबद्दल माहिती सांगितली ( छां. उ. १. ९. ३. ).

**अतिनामन्**—चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अतिबाहु**—स्वायंभुव मनूचा पुत्र ( मनु पहा ).

२ कश्यपास प्राधेपासून झालेला गंधर्व.

**अतिभानु**—सत्यभामा आणि कृष्ण यांचा पुत्र.

**अतिभूति**—(सू. दिष्ट.) विष्णुमतें हा खनिनेत्रपुत्र होय.

**अतिरथ**—(सो.) हा मतिनाराचा पुत्र (म. आ. ८८).

**अतिरात्र**—चक्षुर्मनूचा पुत्र ( मनु पहा ).

**अतिसाम एतुरेत**—प्राणविद्येचें रक्षण करणाऱ्यांपैकीं एक तत्त्वज्ञानी म्हणून याला नमन आहे (जै. उ. ब्रा. ३६.१५).

**अतुलविक्रम**—( सू. इ. ) भविष्यमतें हा क्रोध-दानाचा पुत्र.

**अत्यंहस आरुणि**—प्लक्ष दय्यांपति याजकडे सावित्राग्नि-बद्दल प्रश्न करण्याकरितां यानें आपला शिष्य पाठविला होता. पण त्या शिष्याची त्यानें बरीच निर्भर्त्सना केली ( तै. ब्रा. ३.१०.९. ३-५ ).

**अत्यराति जानंतपि**—हा राजा नसतांनाहि वासिष्ठ सात्यहव्यानें ऐन्द्र महाभिषेक केल्यामुळें यानें सर्व पृथ्वी जिंकली.

वासिष्ठ सात्यहव्यानें जेव्हां पौरोहित्याची आठवण देऊन त्याबद्दल बक्षिस मागितलें तेव्हां उत्तरकुरुंना जिंकल्यावर सर्व पृथ्वीचें राज्य आपणांस देऊन मी आपला सेनापति होईन असें यानें उत्तर दिलें. यावर सात्यहव्य म्हणाला, तूं मला फसविलेंस; कारण उत्तरकुरूंना जिंकणें मनुष्यांना शक्य नाहीं. नंतर सात्यहव्यानें याला हतबल केलें. आणि शिबिराजाचा मुलगा अमित्रतपन शुष्मिण शैब्य याजकडून याचा वध केला ( ऐ. ब्रा. ८.२३ ). क्षत्रियानें ब्राह्मणांशीं द्रोह करूं नये म्हणून ही गोष्ट सांगण्यांत आली आहे.

**अत्रायनि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**अत्रि**—ऋग्वेदांत अत्रीच्या एका कथेचा उल्लेख वारंवार येतो. याला अत्यंत त्रास होत असतां अश्वींनीं याचा ताप शांत केला ( ऋ. १. ११२. ७ ). याला कांहीं कारणानें तुरुंगवास प्राप्त झाला होता. याच्या तुरुंगवासाचें कारण हा लोकांच्या बाजूनें राजाशीं भांडत असे. याचा लोकशासित राज्याविषयीं प्रयत्न असे ( ऋ. ५. ६६ ). याला पांचजन्य म्हटलें आहे ( ऋ. १. ११७. ३ ). अत्रि अग्निकुंडांत पडला किंवा अग्नीनें होरपळला व त्या अग्नीच्या दाहांतून अश्वींनीं याला सोडविलें ( ऋ. १. ११८. ७. ११९. ६ ). बहुतेक तुरुंगाच्या जाचाची कल्पना व्यक्त करण्याकरतां असें वर्णन केलें असावें ( ऋ. ५. ७८. ४; १०. ३९. ९. ). पांचव्या मंडळांत अत्रिगोत्रांतल्या बऱ्याच सूक्तकारांचा उल्लेख आहे ( यजत व रातहव्य पहा ). अत्रीनें चतूरात्र याग सुरू केला ( तै. सं. ७. १. ८. ). याला ग्रहणासंबंधीं प्रथम माहिती झाली. व त्यामुळें ग्रहण लागलें असतां अत्रि सूर्याला परत आणतो असें समजत ( ऋ. ५. ४०. ५. ९. ब्रह्मांड. ३.८.७७ ). स्वायंभुव मन्वंतरांत प्रजोत्पादनार्थ ब्रह्मदेवानें निर्माण केलेल्या दश मानसपुत्रांपैकीं हा एक ( वायु. १.९ ). हा ब्रह्मदेवाच्या नेत्रापासून किंवा मस्तकापासून उत्पन्न झाला होता ( भा. ३.१२; मत्स्य. ३.६-८; वायु. २.४-२२). हा स्वायंभुव मन्वंतरांत ब्रह्मयाच्या कानापासून झाला ( ब्रह्मांड. २.९.२३; ब्रह्मन् पहा ). स्वायंभुव दक्षाचा हा जांवई. दक्षानें सती व शंकर यांना न बोलावल्यामुळें सतीनें शरीर जाळून घेतलें. व त्या रागानें शंकरानें सर्वांना जाळून टाकलें त्यांत हा मेला. दक्षाची कन्या अनसूया याची बायको. अत्रीला अनसूयेपासून पांच मुलें झालीं. १ श्रुति ( शंखपदाची माता व कर्दम पौलह प्रजापतीची पत्नी ), २ सत्यनेत्र, ३ हव्य, ४ आपोमूर्ति शनैश्वर, ५ सोम. ह्या मन्वंतरांत हजारों आत्रेय उत्पन्न झाले ( ब्रह्मांड. २. ११). शंकराच्या वरानेंच हा पुनः वैवस्वत मन्वंतरांत उत्पन्न झाला. हा एक प्रजापति होता. (म. स. ११; शां. २०८; भा.३.१२; मत्स्य. १७१. २६-२७). कर्दम प्रजापतीच्या कन्यांतील अनसूया याची स्त्री होती (भा. ३. २१-२४). यास अनसूयेपासून दत्त, दुर्वास व सोम हे तीन पुत्र झाले (वायु. २.२९०; ब्रह्माण्ड ३. ६५; मत्स्य. १४४. १९८;ह. वं. १.२५; ब्रह्म. ९.१४४; पद्म. पा.२१८; मार्के. १७. ५.१०; कूर्म. १. १३; अग्नि. २०. १२; भा. ४. १). अत्रीला सोम आणि अर्यमा असे दोन पुत्र असल्याचें महाभारतांत दिलें आहे ( शां. २०८ ). पुष्कळ महर्षि याचे पुत्र होते असेंहि दिलें आहे ( म. आ. ६६ ). याच्या नेत्रापासून चंद्र उत्पन्न झाला ( भा. ९. १४ ). स्वायंभुव-मन्वंतरांत यानें उत्तानपादाला दत्तक घेतलें होतें ( ब्रह्मांड. २. ३६. ८४-९०. ह. वं. १.२). याचा गौतममुनीबरोबर ब्राह्मणमाहात्म्यावर संवाद झाला होता ( म. व. १८५ ). वायूचें हैहय अर्जुनाशीं युद्ध चालू असतां राहूनें चंद्र व सूर्य यांना पराभव करून सर्वत्र अंधःकार केला. त्या वेळीं देवांच्या विनंतीवरून अत्रि स्वतः चंद्र होऊन यानें त्या अंधःकाराचा नाश केला (म. अनु. २६१). हा एक सूत्रकार होता (वायु. ५९. १०४; ब्रह्म. २. ३२; मत्स्य १४५; बृ. उ. २. १ १.). अत्रीला पैतिमहर्षि असें म्हटलें आहे ( मत्स्य. १६१. २८). हा शिवावतार गौतमाचा शिष्य आहे. तसेंच हा स्वायंभुव व वैवस्वत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक असून एकुणिसाव्या द्वापारांत व्यासहि होता. आनंदाश्रमांतील स्मृतिसमुच्चयांत अत्रिसंहिता, व अत्रिस्मृति असे दोन ग्रंथ आहेत. अत्रिसंहितेंत नऊ अध्याय असून चारशें श्लोक आहेत व अनेक प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. व तेथें योग, जप, कर्मविपाक, द्रव्यशुद्धि व प्रायश्चित्त यांचा विचार केलेला आहे.

अत्रिस्मृतींत नऊ अध्याय असून त्यांत प्राणायाम, जपप्रशंसा व प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. मनूनें याचें मत गौरवानें घेतलें आहे ( ३.१६ ). दत्तकमीमांसेंत याच्या मताचा उल्लेख आहे. लघ्वत्रिस्मृति व बृहदात्रेयस्मृति असे याचे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. यानें एक वास्तुशास्त्रावरहि ग्रंथ केला होता (मत्स्य. २५२ ).

अत्रिवंशांतील गोत्रकार—अर्धपण्य. उद्दालकि, करजिव्ह, कर्णजिव्ह, कर्णिरथ, कर्दमायनशाखेय ( ग ), गोणीपति, गोणायनि, गोपन ( ग ), गौरग्रीव, गौरजिन, चैत्रायण, छंदोगेय, जलद, तकींबिंदु, तैलप, भदगपाद, लैद्राणि, वामरथ्य, शाकलायनि, शारायण, शौण, शौक्रतव ( शाक्रतव, शोक्रतव ), सवैलेय ( सचैलेय ), सौनकर्णि ( शौणवकर्णिरथ ), सौपुष्पि व हरप्रीति ( रसद्वाचि ). हे अत्रि, आर्चनानस, ( त्रिवराताम ) व श्यावाश्व या तीन प्रवरांचे होत.

ऊर्णनाभि, गविष्ठिर, दाक्षि, पर्णवि, बलि, बीजवापि, भलंदन, भौजकेत, शिरीष व शिलर्दनि, हे अत्रि, गविष्ठिर व पूर्वातिथि या तीन प्रवरांचे होत.

कालेय (ग), धात्रेय (ग), मैत्रेय (ग), वामरथ्य (ग) व सवालेय (ग), हे अत्रि, पौत्रि व वामरथ्य या त्रिप्रवरांचे होत (मत्स्य. १९७). अत्रिपुत्र सोम याच्या वंशांत विश्वामित्र झाला (मत्स्य. १९८). अत्रीचा वंश अनेक ठिकाणीं आला आहे (ब्रह्मांड. ३.८.७४–८७; वायु. २.९; लिंग. १.६३). इतरत्रहि विभागशः आला आहे (ब्रह्म. १.६३; ह. वं. १.३१; प्रभाकर पहा).

अत्रिकुलांतील मंत्रकार

वायु. १.५९.१०४; मत्स्य. १४५, १०७-१०८; ब्रह्मांड. २. ३२. ११८

| | | |
|---|---|---|
| अत्रि | अत्रि | अत्रि |
| अर्चिसन | अर्धस्वन | अर्वसन |
| | | आविहोत्र |
| | कर्णक | |
| निष्ठुर | गाविष्ठिर | गविष्ठिर |
| पूर्वातिथि | पूर्वातिथि | पूर्वातिथि |
| वल्गूतक | | |
| श्यामावान् | शावस्य | श्यावाश्व |

२ वसिष्ठगोत्रांतील एक प्रवर.

३ व्यासाच्या पुराणाच्या शिष्यपरंपरेंतील वायुपुराणाप्रमाणें हा रोमहर्षणाचा शिष्य (व्यास पहा).

**अत्रि**—ऋग्वेदांतील एका सूक्तांतील दहा ऋचा अनेक अत्रींनीं पाहिल्या आहेत (ऋ. ९. ८६. ३१-४०).

**अत्रि भौम**—सूक्तद्रष्टा (ऋ. ५. २७. ३७-४३; ७६; ७७; ८३-८६; ९. ६७. १०-१२; ८६. ४१-४५; १०. १३७. ४).

**अत्रि सांख्य**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १४३).

**अथर्वण**—(काबंधि पहा.)

२ पितृशर्मा नामक ब्राह्मणाचा पुत्र (भवि. प्रति. २.३०).

**अथर्वन्**—अश्वत्थाच्या दानस्तुतींतील दान ग्रहण करणारा (ऋ. ५. ४७. २४). हा एक प्राचीन उपाध्याय होता (ऋ. १०.१२०-९). यानेंच अग्निमंथनाचा प्रचार केला (ऋ. ६. १६. १३; तै. ब्रा. ३. ५. ११; वा. सं. ३०. १५). यानें उत्पन्न केलेला अग्नि विवस्वताचा दूत झाला (ऋ. १०. २१. ५). याच्या नांवावरूनच अग्नीला अथर्वन् हें नांव पडलें आहे (ऋ. ६.१६. १३). अग्नीला याची उपमा दिल्याचें आढळतें (ऋ. १०. ८७. १२; ८. ९. ७). अथर्वन् याचा अर्थ अग्निहोत्री असा आहे (ऋ. ७. १. १). याचा व इंद्राचा स्नेह होता. इंद्र यास मदत करीत असे (ऋ. १०. ४८. २). याची देवांमध्यें गणना केली आहे (बृ. उ. २. ५. २२३; ४. ५. २८). यानें इंद्राला उद्देशून एक स्तोत्र केलें आहे (ऋ. १. ८०. १६). यानें यज्ञ करून आपणास स्थैर्य प्राप्त करून घेतलें (ऋ. १० ९२. १०). यानें यज्ञसामर्थ्यानें मार्ग रुंद केल्यावर सूर्य उत्पन्न झाला (ऋ. १. ८३. ५). मनु व दध्यच् यांजबरोबर यानें तप केलें होतें (ऋ. १. १०. १६). अथर्वांगिरस् असा शब्द आढळतो (अ. वे. १०.७.२० श. ब्रा. ११.५.६७). यानें इंद्रास सोमरस दिला. (अ. वे. १८. ३. ५४). वरुणानें याला एक कामधेनु दिली होती (अ. वे. ५. ११; ७. १०४). याचा देवांशीं स्नेहसंबंध असल्यामुळें हा स्वर्गांत राहत असे (अ. वे. ४. १. ७). हा आचार्य होता (श. ब्रा. १४. ५. ५. २२; ७. ३. २८). अथर्वांगिरस् या ऋषींचा प्रादुर्भाव वैशाली राज्यांत झाला. या शब्दाचें बहुवचन पितर या अर्थी आलें आहे (ऋ. १०. १४. ४–६; १०. १५. ८). ते स्वर्गांत राहणारे देव होते (अ. वे. ११. ६. १३). एका अद्भुत मुळीनें ते दैत्यनाश करीत (अ. वे. ४. ३७. ७). हा ब्रह्मदेवाचा ज्येष्ठ पुत्र. यज्ञ नामक इंद्र याचा सहाध्यायी होता. या दोघांना ब्रह्मदेवापासून ब्रह्मविद्या प्राप्त झाली (मुं. उ. १. १. १-२). हा स्वायंभुव मन्वंतरांतील ऋषि होता. हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र होय. याला कर्दमकन्या शांति व चित्ति ह्या दोन स्त्रिया होत्या (भा. ४. १; १०. ७४. ९). याला सुरूपा मारीची, स्वराट् कार्दमी आणि पथ्या मानवी या तीन स्त्रिया आढळतात (ब्रह्मांड. ३. १. १०२–१०३; वायु. २. ४. ७०-९८). परंतु सुरूपा मारीची अंगिरसाची बायको दिली आहे (मत्स्य. १९६. १). धृतव्रत, दध्यच् आणि अथर्वशिरस् हे याचे पुत्र होत. यांना अथर्वण असें म्हणतात. हा युधिष्ठिराच्या यज्ञांत ऋत्विज होता (भा.१०. ७४.९). अंगिरस् कुलांतील पहिला म्हणून याचा उल्लेख आहे; व अथर्ववेदाशीं याचा संबंध असल्याचें अथर्ववेदांत दिलें आहे. (म. उ. १७. ५४८–५५१ कुं.; मुं. उ. १. १. १–२; वायु. २. १२; ब्रह्मांड. ३. ६५. १२; ह. वं. १. २५, याच्या आईचें नांव सती असें होतें (भा. ६. ६; म. स. ११. ३. १८). यानें समुद्रांतून अग्नि वर काढला (म. व. २२४. ३२ कुं.). नहुष इंद्रपदावरून भ्रष्ट झाल्यावर मूळ इंद्र गादीवर बसला. तेव्हां अंगिरा येऊन त्यानें अथर्ववेदमंत्रांनीं इंद्राचा सत्कार केला. म्हणून इंद्रानें तुझ्या वेदाचें नांव अथर्वांङ्गिरस् होईल; तुलाहि लोक अथर्वाङ्गिरस म्हणतील व तुला यज्ञभागहि मिळेल असा यास वर दिला (म. उ.१८. ५-८; पणि पहा.)

**अथर्वशिरस्**—हा अथर्वन्‌चा पुत्र ( अथर्वन् पहा ).

**अथर्वांगिरस्**—ही अंगिरस् याला इंद्रानें दिलेली संज्ञा. अथर्वन् व अथर्ववेद याला उपनिषदांत व सूत्रांत हा शब्द वापरला आहे (मैत्र्यु. ६. ३३; छां. उ. ३. ४. १–२; प्र. उ. २. ८ ).

**अर्थौजस्**—वैशाखमासींच्या सूर्यासमागमें असणारा यक्ष ( भा. १२. ११ ).

**अदम**—( ऐति. ) म्लेच्छधर्म वाढविण्याकरितां विष्णूच्या शरीरमलापासून उत्पन्न झालेल्या जोडप्यांपैकीं पुरुष. प्रदान नगराच्या पूर्वभागीं ईश्वरानें एक महावन निर्माण केलें. तें चार कोस दीर्घ होतें. एकदां पापवृक्षाच्या खालीं जाऊन हा बसला असतां यास पत्नीची भेट घेण्याची इच्छा झाली. तेव्हां कलीनें सर्पाचें रूप घेऊन याला फसविलें. अदमनें फळ भक्षण करून उंबराच्या पानांवर निर्वाह केला. दोघेंहि वायुभक्षण करीत. नंतर यांच्यापासून पुत्र झाले ते सर्व म्लेच्छ झाले. अदमचें आयुष्य नऊशें तीस वर्षे सांगितलें आहे ( भवि. प्रति. १. ४ ).

**अदिति**—मित्रावरुणांची (ऋ. ८.२५.३; १०३.८३) व अर्यम्याची ( ऋ. ८.४.७९ ) आई. यामुळें हिला राजाची आई हें विशेषण स्वाभाविकच लागलें आहे ( ऋ. २.२७.७ ). हिला आठ मुलगे आहेत व ते अत्यंत बलवान् आहेत (ऋ. १०.७२.८; ३.४.११; ८.५६.११ ). पौराणिक कथांमध्यें अदिति ही दक्षकन्या व कश्यपपत्नी आहे. परंतु वेदांत तिला विष्णूची पत्नी म्हटलें आहे ( वा. स. २९.६०; तै. सं. ७.५. १४ ). अदिति, आप आणि पृथ्वी यांच्यापासून देव उत्पन्न झाले ( ऋ. १०.६३.२ ). अदितीला द्यौ व पृथ्वी यांच्याशीं एकरूप कल्पिलें आहे ( ऋ. १. ७२.९; अ. व. १३.१.३८ ). तथापि पुष्कळ ठिकाणीं द्यावापृथिवीपेक्षां हिचा निराळा उल्लेख आहे ( ऋ. १०.६३.१० ). एके ठिकाणीं अदिति विश्वसृष्टीची मूर्ति असल्याची दिसते ( ऋ. १.८९-१० ). अदिति आदित्यांची माता म्हणून तेज मिळण्यासाठीं तिची प्रार्थना केली आहे ( ऋ. ४.२५.३; १०.३६.३ ). तिच्या तेजाचा गौरव केला आहे. ऋग्वेदांत व पुढील ग्रंथांत अदितीला गो म्हटलें आहे (ऋ. ७. ८२. १० ). उषेला अदितिमुख म्हटलें आहे ( ऋ. १.१५.३; ८.९०.१५; १०.११.१ इ.; वा. सं. १३. ४३; ४९ ) संस्कारांतल्या गाईला सामान्यतः अदिति म्हणण्यांत येतें. भूलोकच्या सोमाची अदितीच्या दुग्धाशीं तुलना करण्यांत आली आहे ( ऋ. १.९६.१५ ). अदितीची नप्ती ( कन्या ) म्हणजे दुग्धच असावें. ती सोमाशीं, तो पात्रांत पडत असतांना, एकजीव होते ( ऋ. ९.६९.३ ).

ही प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या व कश्यप प्रजापति याची स्त्री. यावरून ऋग्वेदांतील एका सूक्ताची द्रष्टी असणारी अदिति दाक्षायणी ही असावी ( ऋ. १०. ७२ ). मैनाक पर्वताचे मध्यावर असलेल्या विनशन नामक तीर्थावर अदितीनें चरु शिजविला होता ( म. व. १३५ ). देवयुगांत तिन्ही लोकांवर देवांचें स्वामित्व होतें. त्या वेळीं हिनें पुत्रप्राप्त्यर्थ सतत एका पायावर उभें राहून अति कडक तपश्चर्या केली व त्यामुळें विष्णु जन्मला ( म. अनु. ८३ ). विष्णूचे अगोदर हिला अकरा पुत्र झाले होते. ते व विष्णु मिळून तिला बारा पुत्र झाले ( कश्यप पहा ). तैत्तिरीय संहितेंत हिला आठच पुत्र झाल्याचें सांगितलें असून तिला सातच पुत्र पाहिजे होते. म्हणून तिनें आठवा गर्भ फोडला. पुढें सातच पुत्र घेऊन ही देवाजवळ गेली. आठवा मार्तंड अथवा विवस्वान् यास तिनें टाकिलें. हे आठ पुत्र म्हणजे अष्टवसु होत. भूमिपुत्र नरकासुर यानें अदितीचीं कुंडलें हरण करून तो प्राग्ज्योतिष नगरांत जाऊन राहिला. पुढें त्याला कृष्णानें जिंकून त्याजपासून तीं परत आणून अदितीस दिलीं ( म. उ. ४८ ).

**अदीन**—( सो. क्षत्र. ) सहदेवाचा पुत्र. याचा पुत्र जयत्सेन.

**अदूर**—रुद्रसावर्णि मनूचा पुत्र.

**अदृश्यंती**—मित्रावरुणि वसिष्ठपुत्र शक्तीची ही स्त्री व पराशर ऋषीची माता.

२ पूर्वी वैश्य असून नंतर तपानें ब्राह्मणत्व प्राप्त झालेल्या चित्रमुख ब्राह्मणाची कन्या ( म. अनु. ५३ ).

**अद्ध**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**अद्भुत**— अग्निविशेष. याची स्त्री प्रिया. पुत्राचें नांव विडुरथ ( म. व. २२४ ).

२ दक्षसावर्णि मन्वंतरांत होणारा इंद्र.

**अद्म**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**अद्रिका**—कश्यप व मुनि यांची कन्या अप्सरा. ही शापानें जलांत मत्स्यी झाली. हिच्या उदरीं मत्स्य नांवाचा राजा व मत्स्यगंधा नांवाची कन्या झाली. ( उपरिचर वसु पहा; म. आ. ६४ ). ही विमानांत अमावसु पितराबरोबर क्रीडा करीत असतांनाच अच्छोदेच्या मनांत अमावसूबद्दल कामेच्छा उत्पन्न झाली ( ब्रह्मांड. ३. १० ५४–६४ ).

**अधश्छायामय**—कश्यपगोत्रांतील एक ऋषिगण.

**अधर्म**—ब्रह्मदेवाच्या पृष्ठभागापासून झालेला धर्मविरोधी पुरुष. याची स्त्री मृषा होय. मृषेपासून दंभ आणि माया असे

मिथुन उत्पन्न झालें (भा.३.१२). यानें तें आपल्यास घेतलें. पुढें त्या मिथुनापासून लोभ आणि निकृति हें मिथुन उत्पन्न होऊन तथून क्रमानें क्रोध व हिंसा, कलि व दुरुक्ति, मृत्यु व भीति आणि निरय व यातना याप्रमाणें संतति झाली (भा. ४.८). याला हिंसेपासून अमृत व निकृति झाली. यांच्यापासून भय, नरक, माया व वेदना हीं उत्पन्न झाली. मायेपासून मृत्यु, वेदनेपासून दुःख व मृत्यूपासून व्याधि, जरा, शोक, तृष्णा व क्रोध हीं उत्पन्न झालीं (पद्म. सृ. ३).

३ वरुणास ज्येष्ठेपासून झालेला पुत्र. यास निर्ऋति नांवाची पत्नी होती. याचे पुत्र १भय, २महाभय व ३मृत्यु (म.आ.६७).

**अधिर्तस**—(सो.) भविष्यमतें अनुतंसाचा पुत्र.

**अधिपति**—भृगूचा पुत्र. एक देव.

**अधिरथ**—(सो. अनु.) सत्कर्म्याचा पुत्र. हा सारथ्यकर्म करीत असे. एकदां गंगेच्या कांठीं क्रीडा करीत असतां याला कुंतीनें कर्णाला घालून नदींत सोडलेली पेटी सांपडली. नंतर यानें कर्णाला बाहेर काढून त्याचें नालच्छेदन केलें व त्यास आपल्या राधा नामक स्त्रीच्या स्वाधीन करून पुत्राप्रमाणें त्याचें पालन केलें (भा. ९. २३. १३; म. आ. ६७; १३७; व. ३०९)

**अधिसामकृष्ण**—(सो. पूरु. भविष्य.) वायु, विष्णु व मत्स्य या पुराणांत याच्यापुढें भविष्यकालीन राजे सांगण्यास सुरवात झाली आहे. हा राज्य करीत असतां वायुपुराण लिहिलें. हस्तिनापुर वाहून गेल्यामुळें यानें कौशाम्बीला राजधानी नेली (वायु. १. ३७. २५४). हा मत्स्यमतें शतानीकपुत्र होय. विष्णुपुराणांत व मत्स्यांत अधिसोमकृष्ण असा पाठ आहे. भागवतांत असीमकृष्ण असा पाठ आहे.

**अधिसोमकृष्ण**—(अधिसामकृष्ण पहा).

**अधीर**—एक राजा. हा शंकराचा परमभक्त होता. एकदां यानें चुकून एका निरपराधी स्त्रीस देहान्त शासन केलें. त्याचप्रमाणें याच्या हातून शिवाचें एक मंदिरहि जाळलें गेलें. या दोन दुष्कृत्यांमुळें हा मेल्यानंतर पिशाच झाला व याच्या तोंडांतून नेहमीं अग्नीच्या ज्वाला निघूं लागल्या. परंतु शंकराच्या प्रसादानें याच्या मागची ती पीडा नष्ट झाली व हा शिवगणांपैकीं एक झाला (पद्म. पा. १११).

**अधृति**—अभूतरजस् देवांतील एक.

**अधृष्ट व अधृष्णु**—सावर्णि मनूचा पुत्र.

**अध्रिगु**—अश्वी व इंद्र यांनीं याचें संरक्षण केलें (ऋ. १. ११२. २०; ८. १२. २).

**अध्वरीवत्**—सावर्णि मनूचा पुत्र.

**अनग्नि**—पितरांपैकीं एक. त्याची पत्नी दक्षकन्या स्वधा. स्वधेपासून यास वयुना व धारिणी अशा दोन मुली झाल्या (भा. ४. १; पद्म. सृ. ९).

**अनघ**—उत्तम मन्वंतरांतल्या सप्तर्षींपैकीं एक.

२ धर्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ एक गंधर्व (म. आ. १३२).

**अनंग**—कर्दम प्रजापतीचा पुत्र (म. शां. ५८).

**अनंगपाळ**—(ऐति.) इंद्रप्रस्थाचा तोमर वंशांतील राजा. यानें संतानप्राप्त्यर्थ यज्ञ केला. त्यामुळें यास दोन मुली झाल्या (भवि. प्रति. ३.६).

**अनंत**—कद्रूपुत्र (कश्यप पहा).

२ (सो. यदु.) वीतिहोत्राचा पुत्र. याचा पुत्र दुर्जयामित्रकर्षण (ब्रह्म. १३).

**अनंतभागिन्**—भृगु कुलांतील एक गोत्रकार.

**अनंतसेन**—देवांपैकीं स्कंद अथवा रुद्र. यानें भीष्माच्या वधाकरतां अम्बेला माला दिली (म. आ. १०९).

**अनंती**—शतरूपेचें नामांतर.

**अनपान**—(सो. अनु.) वायुमतें दधिवाहनाचा पुत्र.

**अनपाया**—कश्यप व मुनि यांची कन्या, एक अप्सरा.

**अनमित्र**—(सू. इ.) निघ्नराजाचा पुत्र.

२ (सो. यदु.) वृष्णीचा कनिष्ठ पुत्र. यास निम्न, शिनि आणि वृष्णि असे तीन पुत्र होते (वृष्णि व सुमित्र पहा).

३ (सो. यदु.) शिनिराजाचा पुत्र. हा मोठा पराक्रमी होता. भागवतांत यास युधाजित्पुत्र असेंहि म्हटलें आहे.

४ ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

**अनरण्य**—(सू. इ.) त्रसदस्यूचा पुत्र (भा. ९.७.४). मत्स्य, ब्रह्मांड, वायु व लिंग या पुराणांच्या मतें हा संभूताचा पुत्र होय. हा अयोध्येंत राज्य करीत असतां रावणानें याच्यावर स्वारी केली. त्या वेळीं रावणाबरोबर यानें घनघोर युद्ध केलें. परंतु रावण जास्त बलवान् असल्यामुळें याचें सर्व सैन्य नष्ट झालें. यानें रावणाचे अमात्य मारीच, शुक, सारण व प्रहस्त यांचा पराभव केला. परंतु लवकरच हा भूमीवर पडला व मरतां मरतां यानें रावणास शाप दिला कीं, माझें तप, दान, हवन हीं सत्य असतील, तर माझ्या वंशांतील दशरथपुत्र राम तुझा कुलासह नाश करील (वा. रा. यु. ६०; उ. १९). हा युद्ध सोडून तप करीत असतां रावणानें याचा वध केला म्हणून यानें शाप दिला. याचा पुत्र दसदश्व. भविष्यमतें हा त्रिशदश्वाचा पुत्र असून यानें अठ्ठावीस हजार वर्षें राज्य केलें.

२ (सू. इ.) सर्वकर्म्याचा पुत्र. याचा पुत्र निघ्न (पद्म. सृ. ८).

**अनर्वन्**—वृत्रासुरानुयायी असुर (भा. ६. १०).

**अनर्शनि**—इंद्राच्या शत्रूंपैकीं एक (ऋ. ८. ३२. २).

**अनल**—धर्माला वसूपासून झालेला पुत्र. याचे पुत्र कुमार (कार्तिकस्वामी), शाख, विशाख व नैगमेय हा एक

वसु आहे. हा प्रस्तुतच्या मन्वंतरांत आग्नेयी दिशेचा स्वामी आहे. हा कुमार अनल व स्वाहा यांचा पुत्र होय ( ब्रह्मांड. ३. ३. २१-२६; म. आ. ६७ कुं.; विष्णु. १. १५ ).

२ बिभीषणाच्या अमात्यांतील एक ( मालेय पहा).

३ गरुडाचा पुत्र ( म. उ. १०१ कुं. ).

४ यमसभेमधील एक राजा ( म. स. ८ कुं. ).

**अनला**—रोहिणीच्या दोन कन्यांतील दुसरी. हिची कन्या शुकी.

२ माल्यवान् राक्षसास सुंदरी नांवाच्या स्त्रीपासून झालेली कन्या व विश्वावसु राक्षसाची स्त्री. हिची कन्या कुंभीनसी ( वा. रा. उ. ६१ ).

**अनवद्या**—कश्यपास प्राधेपासून झालेली अप्सरा.

**अनश्वस्**—( सो. पूरु. ) विदूरथाचा पुत्र. याची आई मगध वंशांतील संप्रिया. याच्या स्त्रीचें नांव अमृता. याच्या पुत्राचें नांव परीक्षित् ( म. आ. ६३ ).

**अनसूय**—कश्यपगोत्रांतील एक गोत्रकार.

**अनसूया**—स्वायंभुव व वैवस्वत मन्वंतरांतील ब्रह्ममानसपुत्र अत्रिऋषीची स्त्री. ही कर्दमाला देवहूतीपासून झाली; व ही दक्षकन्याहि होती (गरुड. २६). ऋग्वेदाच्या बाविसाव्या परिशिष्टांत फक्त अत्रीची आवडती स्त्री म्हणून हिचा उल्लेख आहे. पौराणिक वाङ्मयांत पतिव्रता म्हणून हिचा उल्लेख आहे. हिनें न खातां तीनशें वर्षे तप करून शंकराची कृपा संपादन केली. त्यामुळें हिच्या पोटीं दत्तात्रेय, दुर्वासस् व चंद्र असे तीन पुत्र झाले. शिवाय चित्रकूटावरील गंगा हिनें प्रवृत्त केली ( शिव. के. २. १९ ). राम वनवासाला निघाला असतां अत्रीच्या आश्रमांत आला, तेव्हां अत्रीनें अनसूयेचें पुढीलप्रमाणें वर्णन करून सीतेला हिच्या दर्शनास पाठविण्याविषयीं रामास सांगितलें. दहा वर्षे पर्जन्य न पडल्यामुळें लोक एकसारखे दग्ध होऊं लागले; तेव्हां अनसूयेनें फळेंमुळें उत्पन्न करून ह्या आश्रमांत गंगा आणली. ही उग्र तपश्चर्या करणारी व नियमांनीं कडक आहे. दहा हजार वर्षे हिनें मोठें तप केलें आहे. हिच्या व्रतामुळेंच ऋषींच्या तपाला येणारीं विघ्नें नाहींशीं झालीं. देवकार्याकरितां झटत असतां हिनें दहा रात्रींची एक रात्र केली. सीतेनें हिचें दर्शन घेतलें त्या वेळीं हिचीं सर्व गात्रें शिथिल झालीं होतीं; अंगावर सुरकुत्या पडल्या होत्या; केस पांढरे होते. वाऱ्यानें हलणाऱ्या केळीप्रमाणें हिची स्थिति होती. हिनें पतीबरोबर वनवासाला निघाली म्हणून सीतेची प्रशंसा केली; व तिला नेहमीं ताजी राहणारी माला, वस्त्र, भूषणें, उटि आणि अनुलेपन इ. दिलीं. नंतर सीतेशीं प्रेमानें स्वयंवराबद्दल गोष्टी केल्या. तिला अलंकार घालून प्रेमानें निरोप दिला (वा.रा.अयो. ११७-११९.). मांडव्यऋषीस शूलावर चढविलें असतां त्या शूलास अंधारांत एका ऋषिपत्नीचा धक्का लागला; म्हणून मांडव्यानें तिला शाप दिला कीं, तूं सूर्योदय होतांच विधवा होशील. तेव्हां हिनें सूर्योदय होऊं दिला नाहीं. त्यामुळें सर्व व्यवहार बंद पडले. तिची अनसूया ही मैत्रीण असल्यामुळें हिला विनंति केल्यावरून हिनें तिला वैधव्य येऊं न देतां सूर्यास उदयास आणून सर्व जग सुखी केलें ( माण्डव्य पहा).

**अनाधृष्टि**—(सो. पूरु.) रौद्राश्वाचा पुत्र (म. आ. ८८). याची स्त्री एक अप्सरा होती.

२ श्रीकृष्णानुयायी एक यादव (म. आ. २४७; स. १४; वि. ७८; उ. १५१ ).

३ ( सो. यदु. ) शूर राजाचा पुत्र.

**अनाधृष्य**—धृतराष्ट्रपुत्रांतील एक ( म. आ. ६८).

**अनानत पारुच्छेप**—एक सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. १११ ).

**अनायुष**—याच्या मानामुळें याचा पुत्र मेला (मार्क. २४).

**अनायुषा**—एक राक्षसी. हिला अररु, बळ, विनर, वृत्र व वृष असे पुत्र होते (ब्रह्मांड. ३.६.३१-३७).

**अनिकेत**—यक्ष ( म. स. १० ).

**अनिमिष**—गरुडाचा पुत्र ( म. उ. १०१ ).

**अनिरुद्ध**—( सो. यदु. ) प्रद्युम्नाला रुक्मकन्येपासून दहा हजार हत्तींचें बळ असलेला असा अनिरुद्ध झाला ( भा. १०. ९०; ह. वं २. ११८; विष्णु. ५.३२-३३ ). हा पर्वत उपटून त्यानेंच शत्रूला झोडपीत असे. याला अनेक बायका होत्या व हा मद्य पिऊन त्यांच्याशीं रममाण होत असे ( ह. वं. २. ११८), याला रुक्मीपौत्री रोचनेपासून वज्र झाला ( भा. १०. ६१). यालाच प्राद्युम्नि असें दुसरें नांव आहे ( म. स. ६० ). हा इतर यदुकुमारांबरोबरच अर्जुनापाशीं धनुर्वेद शिकला ( म. स. ४ ). यानें बाणासुराची कन्या उषा हिजबरोबर गांधर्वविधीनें लग्न केलें.

२ अठरा वास्तुशास्त्रकारांतील एक (मत्स्य. २५२).

**अनिल**—अष्टवसूंपैकीं एक. याच्या स्त्रीचें नांव शिवा. याला मनोजव व अविज्ञातगति असे दोन पुत्र होते. ( म. आ. ६७; ब्रह्मांड. ३.३.२१.२९; विष्णु. १.१५ ).

२ एक क्षत्रिय. शैब्य अथवा वृषादर्भीचा पुत्र. वृषादर्भीनें आपल्या एका यज्ञामध्यें याला दक्षिणा म्हणून सप्तर्षींना अर्पण केला. परंतु हा अल्पायु होऊन लवकरच मरण पावला. त्या वेळीं भयंकर अवर्षण पडल्यामुळें अत्यंत क्षुधातुर झालेल्या सप्तर्षींनीं याला स्थालीमध्यें शिजवून खाण्याचा विचार केला. परंतु हा न शिजल्यामुळें पुढें तें घडलें नाहीं ( म. अनु. ९३ ).

३ मित्रविंदेपासून कृष्णाला झालेल्या पुत्रांतील एक ( भा. १०. ६१. ६ ).

४ ( सो. पूरु. ) विष्णुमतें हा तंसूचा पुत्र होय.

५ गरुडाचा पुत्र. ( म. उ. १०१ ).

**अनिल वातायन**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.१६८ ).

**अनिष्टकर्मन्**—(आंध्र. भविष्य.) ब्रह्मांडमतें पटुमानाचा पुत्र; व भागवतमतें अटमानाचा पुत्र. विष्णुमतें अरिष्टकर्मन् असा पाठ आहे.

**अनीकविदारण**—जयद्रथाचा बंधु ( म. व. २६६ १३ कुं. ).

**अनील**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**अनीह**—( सू. इ.) भागवतमतें देवानीकाचा पुत्र. याचीं अहीनर इ. नामांतरें आहेत.

**अनु**—दाशराज्ञयुद्धांतील सुदासाच्या शत्रूंपैकीं एक ( ऋ. ७.१८.१४). इंद्राचा रथ अनूनें तयार केला ( ऋ. ५. ३१. ४). हा कारागीर आणि इंद्राचा उपासक होता. (ऋ.८.४.१.).

२ ( सो. ) ययातीस शर्मिष्ठेपासून झालेल्या तीन पुत्रांतील ज्येष्ठ (म. आ. ६३). यानेंहि यदुप्रमाणेंच पित्याची जरा ग्रहण केली नाहीं; म्हणून यास मुख्य राज्याधिकार नव्हता. हा उत्तरेकडे म्लेच्छांचा राजा झाला ( मत्स्य. ३४; वंश पहा ).

३ ( सो. अंध. ) क्रथकुलांतील कुरुवशाचा पुत्र.

४ ( सो. कुकुर. ) कपोतरोमाचा पुत्र. तुंबुरु याचा मित्र होता ( भा. ९. २४).

**अनुकृष्ण**—यजुर्वेदी ब्रह्मचारी.

**अनुग्रह**—भौत्य मनूचा पुत्र.

**अनुतंस**—( सो. ) भविष्यमतें हा समातंसाचा पुत्र.

**अनुतापन**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**अनुभूति**—यजुर्वेदी ब्रह्मचारी.

**अनुमति**—अंगिराऋषीपासून श्रद्धेस झालेल्या चार कन्यांतील कनिष्ठ ( भा. ४. १; ६. १८ ). द्वादशादित्यांतील धातृ आदित्याची स्त्री.

२ भृगुगोत्रांतील एक गोत्रकार.

**अनुमंत**—आभ नांवाच्या देवगणांतील एक.

२ तुषितदेवांपैकीं एक.

**अनुम्लोचा**—एक अप्सरा. ही भाद्रपदांत आदित्याबरोबर असते ( भा. १२. ११ ).

**अनुयायिन्**—धृतराष्ट्रपुत्रांपैकीं एक ( म. आ. ६८). भीमसेनानें याचा वध केला ( म. द्रो. १५८ ).

**अनुरथ**—( सो. यदु. ) विष्णुमतें कुरुवत्सपुत्र.

**अनुराधा**—दक्ष व असिक्री यांच्या कन्यांपैकीं एक व सोमपत्नी.

**अनुवक्तृ सात्यकीर्त**—एक आचार्य ( जै. उ. ब्रा. १. ५. ४ ).

**अनुविंद**—अवंतिराजा जयसेन याला वासुदेवभगिनी राजाधिदेवी हिच्यापासून झालेला कनिष्ठ पुत्र. याचा पराजय करून मित्रविंदा नांवाच्या याच्या बहिणीशीं श्रीकृष्णानें विवाह लाविला ( भा. १०. ५८. ३०–३१ ). हा भारतीय युद्धांत अर्जुनाच्या हातून मरण पावला. यास विंद नांवाचा भाऊ होता ( म. द्रो. ९९ ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र ( म. आ. ६८. १३१ कुं. ). हा घोषयात्रेमध्यें होता ( म. व. २४३ ). याला भीमानें मारलें ( म. द्रो. १२७ ).

३ केकय राजाच्या दोन पुत्रांपैकीं कनिष्ठ. यासहि विंद नांवाचा भाऊ होता. हा दुर्योधनाच्या बाजूस होता. यास सात्यकीनें मारलें ( म. क. २०. २१ कुं. ).

४ ( मगध. भविष्य. ) मत्स्यमतें क्षेमाचा पुत्र.

**अनुशाल्व**—(सो. क्रोष्टु.) सौभपति शाल्वराजाचा भाऊ. शाल्वाला कृष्णानें मारलें म्हणून कृष्णाशीं याचें वैर होतें. हा कृष्णाला ठार करण्याची संधि पाहात होता. पांडवांचा अश्वमेध चालू असतां कृष्ण सहपरिवार हस्तिनापुरीं आला होता. ही संधि साधून आपल्या सुनार नांवाच्या सेनापतीकडून यानें सैन्य तयार करविलें आणि हा गुप्तपणें हस्तिनापुराजवळ येऊन राहिला. अश्वमधाकरतां आणलेला घोडा पाहात कृष्ण बसला आहे, अशी याला बातमी लागली. त्या वेळीं यानें चपळाईनें घोडा पळविला. तेव्हां भीमसेन सेना घेऊन याच्या पाठीस लागला. प्रद्युम्न व वृषकेतु यांनीं याला धरून आणण्याचें विडेच उचललें. पुढें मोठें युद्ध होऊन प्रद्युम्नाचा पराभव झाला. पण वृषकेतुनें याला धरून आणलें. यानें मरणाच्या भीतीनें [illegible] अश्वमेधास साहाय्य करण्याचें वचन [illegible] गेला ( जै. अ. १२–१४ ).

**अनुशिख**—सर्पसत्रांतील [illegible]

**अनुह**—( ऐति.) श्येनाचा पु[illegible] राज्य केलें. याचा पुत्र कीनाश ( [illegible] ).

**अनुह्राद**—हिरण्यकशिपूस [illegible] पुत्रांतील एक. याची पत्नी सूर्मि[illegible] आणि महिष असे दोन पुत्र [illegible] क्रोधामुळें निपुत्रिक झाला, असा [illegible] केलेल्या उपदेशांत आला आहे ( [illegible] ).

**अनूचाना**— कश्यप आणि [illegible] अप्सरांतील एक ( म. आ. १३[illegible] ).

**अनूदर**—धृतराष्ट्राच्या पु[illegible]

**अनूहवत्**—हा क्षत्रिय अ[illegible] झाला होता ( वायु. २. २९. १[illegible] ).

**अनेनस्**—( सो. पुरूरवस्. ) आयु राजाच्या पांच पुत्रांतील कनिष्ठ ( गरुड. १३९. ८; ब्रह्म. ११. १-२ ). याच्या आईचें नांव स्वर्भानवी ( म. आ. ७५ ). याचा पुत्र प्रतिक्षत्र (ह. वं. १. २९; ब्रह्म. ११. २७). याचें शुद्ध असें नामांतर आहे ( भा. ९. १७. २ ). याचा वंश दिला आहे ( ह. वं. १. २९; ब्रह्म. ११. २७–३१ ).

२ ( सू. इ. ) ककुत्स्थ राजाचा पुत्र. भागवतमतें पुरंजयाचा पुत्र. याला पृथु नांवाचा पुत्र होता (म. व. २०२).

३ ( सू. निमि. ) हा विष्णुमतें क्षेमारिपुत्र होय. याचा पुत्र मनिरथ.

**अनेहहि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**अनोवैन**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें लौगाक्षीचा शिष्य ( व्यास पहा ).

**अनौपम्या**—बाणासुराची स्त्री.

**अन्तक**—(शुन. भविष्य.) सुज्येष्ठाचा मुलगा.

**अंतरिक्ष**—(स्वा. प्रिय.) ऋषभदेवाच्या शंभर पुत्रांतील नऊ तत्त्ववेत्त्यांपैकीं एक. हा मोठा भगवद्भक्त होता. यानें जनकाला उपदेश केला ( भा. ५. ४; ११. २. ३ ).

२ ( सू. इ. भविष्य. ) मत्स्यमतें किन्नराश्वाचा पुत्र; विष्णु व वायुमतें किन्नराचा पुत्र; व भागवतमतें पुष्कराचा पुत्र.

३ मुराच्या सात पुत्रांपैकीं दुसरा. याला कृष्णानें मारलें ( भा. १०.५९ ).

४ एक व्यास ( व्यास पहा ).

५ आद्य नांवाच्या देवांतील एक.

६ ( सू. इ. ) [illegible]मतें केशीनराचा पुत्र.

[illegible]—( [illegible] तान. ) पृथूच्या पुत्रांतील एक. [illegible]च्या शक्तीमुळें हें नांव पडलें होतें.

[illegible]—( [illegible] ) मत्स्यमतें यदुपुत्र.

[illegible]—( [illegible] ) मत्स्यमतें गुरुधिपुत्र.

[illegible]—( [illegible] ) हा भद्राश्वाचा पुत्र असून [illegible] पुरस्त्या असे तीन पुत्र होते [illegible]ऋचा पुत्र. याला वसुरोध, प्रति- [illegible] ( ब्रह्म. १३. ५१–५३ ). [illegible]ला झालेला पुत्र. याला तंसु, [illegible] नामक कन्या होती. हीच [illegible]वं. १.३२ ). सन्नतेयु अथवा [illegible] महान्, अतिरथ व द्रुह्य असे [illegible] ऋतेयूचा पुत्र. याचा पुत्र [illegible] ( [illegible] ) [illegible]ला तक्षककन्या ज्वलन्ती- [illegible]नदीच्या कांठीं द्वादशवार्षिक [illegible] सरस्वती नदी स्त्रीरूपानें प्रकट होऊन तिने स्वतःशीं लग्न करण्याविषयीं याला विनंति केली. तेव्हां यानें तिच्याशीं विवाह केला. तिच्यापासून याला तंसु नामक पुत्र झाला ( म. आ. ६३ कुं.; रंतिभार पहा ).

२ ( सो. यदु. ) कंबलबर्हिषाचा पुत्र. याचा पुत्र तमोजा.

**अंत्य**—भृगुपुत्र एक देव.

**अंत्यायन**—एक भृगुपुत्र.

**अंधक**—हा पार्वतीच्या घामापासून उत्पन्न झाला. हिरण्याक्ष पुत्रप्राप्तीकरितां तपश्चर्या करीत असतां शंकरानें त्याला हा पुत्र दिला ( लिंग. १. ९४ ). हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु मरण पावल्यावर हा राज्यावर आला. पण पुढें पार्वतीला पळविण्याचा यानें घाट घातल्यामुळें अवंती देशांतील महाकाल वनांत शंकराचें याच्याशीं घोर युद्ध झालें. त्या युद्धांत याच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबापासून याच्यासारखीच व्यक्ति उत्पन्न होऊन अंधकांनीं सर्व जग व्यापलें गेलें. तेव्हां शंकरानें अंधकाचें रक्त पिण्याकरितां मातृका उत्पन्न केल्या; आणि त्यांना अंधकाचें रक्त पिण्यास सांगितलें. त्याप्रमाणें रक्त पिऊन त्या तृप्त झाल्यावर पुनः रक्ताच्या थेंबांपासून अगणित अंधक उत्पन्न होऊं लागले. त्यांनीं शंकराचें अजगव धनुष्यहि पळविलें ( पद्म. सृ. ४६ ). शेवटीं शंकर त्रासून विष्णूकडे गेला. तेव्हां विष्णूनें शुष्करेवती उत्पन्न केली; व सर्व अंधक पुनः नाहींसे करून टाकिले. शंकरानें मुख्य अंधकाला शूलावर धरला असतां अंधकानें त्याची स्तुति केली. तेव्हां प्रसन्न होऊन शंकरानें याला गाणाधिपत्य दिलें. (मत्स्य. १७९). यानें पार्वतीला उघड मागणी घातल्यामुळें शंकराचें व याचें युद्ध झालें. पण शुक्राचार्य संजीवनी विद्येनें मेलेल्या असुरांना जिवंत करीत असल्यामुळें याची बाजू कमी पडेना. तेव्हां शंकरानें शुक्राचार्याला गिळून टाकलें; व अंधकालाहि गाणाधिपत्य देऊन संतुष्ट केलें. (शिव. रुद्र. यु. ४८; पद्म. सृ. ४६. ८१). गणांतील मुख्य स्थान दिल्यावर याचें नांव भृंगीरीटी असें ठेवण्यांत आलें. याच्या पुत्राचें नांव आडी होय.

कश्यपाला दितीपासून झालेला पुत्र. हा अत्यंत पराक्रमी असून यानें आपल्या उग्र तपश्चर्येच्या जोरावर सर्व देवांना जिंकण्याविषयीं शंकराजवळ वर मागितला. परंतु त्यानें विष्णु व शंकर यांशिवाय तूं सर्वांना जिंकशील असा वर दिला. पुढें ससैन्य असा हा अमरावतीमध्यें शिरला असतां इंद्र याला शरण आला. नंतर इंद्राच्या उच्चैःश्रवस, उर्वशी आदिकरून अप्सरा व इंद्राणी यांना घेऊन हा परत चालला असतां देवांनीं याच्या बरोबर युद्ध केलें. परंतु त्यांत त्यांचा पराभव झाला. पुढें अंधक पातालांत राहूं लागला. शेवटीं देवांच्या सांगण्यावरून विष्णूनें याच्याशीं युद्ध केलें. त्यांत याचा पराभव झाल्यावर यानें विष्णूची स्तुति केली; व शंकराशीं युद्ध करण्यास मंत्रि मिळावी

... न त्याच्यापाशीं वर मागितला. तेव्हां विष्णूनें याला कैलास पर्वत हालविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें यानें करतांच शंकराचें व याचें युद्ध जुंपलें. त्यांत शंकराला यानें मूर्च्छित पाडलें. परंतु शंकर जागा होऊन पुनः युद्ध सुरू झालें. अंधकाच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबापासून दैत्य उत्पन्न होऊं लागला, त्या वेळीं शंकरानें चामुंडेची आठवण केल्यावर तिनें याचें सर्व रक्त पिऊन टाकलें. तेव्हां यानें शंकराची प्रार्थना केली. शंकरानें याची शिवगणांत स्थापना करून याचें भृंगीश असें नांव ठेविलें ( स्कंद. ५. ३. ५५ ). हा उज्जयिनीमध्यें राज्य करीत होता. इंद्राच्या सांगण्यावरून शंकरानें याशीं युद्ध केलें. त्यांत याचा पराभव होणार असें दिसतांच यानें माया निर्माण करून अंधकार उत्पन्न केला व देवांस पळविलें. शेवटीं नरादित्य उत्पन्न होऊन त्यानें प्रकाश पाडल्यामुळें शंकरानें याचा नाश केला. याचा पुत्र कनकदान (स्कंद. ५, २, ३६). महिषासुराच्या सेनेंतील एक प्रमुख असुर. देवांशीं झालेल्या महिषासुरसंग्रामांत याचें विष्णूबरोबर सतत पन्नास वर्षें युद्ध चाललें होतें. शेवटीं विष्णूनें आपल्या गदाप्रहारानें याला मूर्च्छित पाडलें ( दे. भा. ५. ६ ). हा आठवा सुप्रसिद्ध संग्राम होय ( मत्स्य. ४७. ४४ ). यांत असुरांना शंकरानें मारिलें ( वायु. २. ३५. ८३ ).

२ ( सो. यदु. ) सात्वताला कौशल्येपासून झालेल्या सात पुत्रांतील एक ( ब्रह्म. १५. ४६; पद्म. सृ. १३. ३१–३२; लिंग. १. ६९. १–२). याला कुकुर, भजमान, संसक व बर्हिष असे चार पुत्र होते. याच्या वंशाला पुढें अंधक असें नांव पडलें ( ब्रह्म. १५; वृष्णि पहा ).

३ ( सो. यदु. ) भीमाचा पुत्र. हा मथुरा येथें राज्य करीत होता. हा मेल्यानंतर याचा पुत्र रैवत राज्य करूं लागला ( ह. वं. १. ३८ ).

४ ( सो. अंध. ) अनुराजाचा पुत्र. याचा पुत्र दुंदुभि.

५ ( सो. क्रोष्टु.) युधाजिताचा द्वितीय पुत्र ( ह. वं. २. ३४).

६ ( सो. वृष्णि. ) श्वफल्काला गांदिनीपासून झालेल्या पुत्रांपैकीं एक ( ह. वं. २. ३४ ).

**अंधिगु श्यावाश्व**—कांहीं ऋचांचा द्रष्टा ( ऋ. ९. १०१. १–३ ).

**अंध्र**—( सो. अनु. ) बलीच्या सहा पुत्रांतील कनिष्ठ.

२ दुष्यन्तपुत्र भरतानें दिग्विजयप्रसंगीं यांना जिंकलें. ( भा. ९. २०. ३० ).

४ ( सू. इ. ) हा वायु व ब्रह्मांड यांच्या मतें वृषदश्वाचा पुत्र ( आर्द्र पहा ).

**अन्नाद**—कृष्णपत्नी मित्रविंदेचा पुत्र ( भा. १०. ६१).

**अन्यतरेय**—स्वराविषयीं मत देणारा एक आचार्य ( ऋ. प्रा. २०८ ).

**अन्यादृश**—पांचव्या मरुद्गणांतील एक.

**अन्वग्भानु**—( सो. पूरु. ) मनस्यूला मिश्रकेशी नांवाच्या अप्सरेपासून झालेला पुत्र ( म. आ. ८८ ).

**अपनाप**—ब्रह्मांडमतें व्यासाच्या ऋक्शिष्य परंपरेंतील भरद्वाजाचा शिष्य ( व्यास पहा ).

**अपरदारका**—ही एक दुसऱ्या ब्रह्मांडाच्या दारावर असलेली देवता असून, हिला नारदानें तपश्चर्या करून पश्चिम द्वारावर स्थापन केली. चैत्र कृष्ण नवमीला बलि देऊन जे हिची पूजा करतील ते पातकांतून मुक्त होऊन त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतील ( स्कंद. १. २, ५३ ).

**अपराचीन**—( सो. पूरु. ) जयत्सेन व सुश्रवा यांचा पुत्र. याच्या स्त्रीचें नांव मर्यादा व पुत्राचें नांव अरिह होतें ( म. आ. ६३ ).

**अपराजित**—कृष्ण व लक्ष्मणा यांचा पुत्र ( भा. १०. ६१ ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. याला भीमानें मारलें ( म. भी. ८८ ).

३ एकादश रुद्रांपैकीं एक.

४ कश्यप व कद्रू यांच्या पुत्रांपैकीं एक.

५ कालेयांश एक क्षत्रिय ( म. आ. ६८ ).

**अपर्णा**—महादेवाची पत्नी. सती दक्षयज्ञांत मरण पावल्यावर हिमालयाला मैनेपासून कन्या झाली, ती अपर्णा होय. तेथें हिनें पूर्वपतीचीच प्राप्ति व्हावी म्हणून, वृक्षाचीं पानें भक्षण करून तप आरंभिलें. तथापि त्याची प्राप्ति होईना. तेव्हां पर्णेंहि सोडिलीं; व महादेव पति मिळविला. म्हणून हिला हें नांव पडलें. हिलाच तपानंतर उमा असें नांव पडलें. हिचा दत्तकपुत्र उशनस् (ब्रह्मांड. ३. १०. १-२१; ह. वं. १. १८).

**अपवर्मन्**—(सू. इ.) भविष्यमतें ध्रुवसंधीचा पुत्र. यानें दहा हजार वर्षें राज्य केलें.

**अपष्टोम**—( औपलोम पहा ).

**अपस्यौष**—अंगिरसगोत्रांतील एक मंत्रकार.

**अपहारिणी**—ब्रह्मधानाची कन्या.

**अपाग्नेय**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**अपांडु**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**अपान**—तुषितदेवांपैकीं एक.

**अपांतरतम**—एक ब्रह्मर्षि ( सारस्वत पहा ).

**अपांनपात्**—एक देवता ( ऋ. २. ३५. ) हा निधुट्टप अग्नि असावा. हा पाण्यांत प्रकाशतो. याला अग्नि म्हटलें आहे. त्याप्रमाणेंच अग्नीला अपांनपात् म्हटलें आहे.

**अपाला**—अत्रीची मुलगी. ही ब्रह्मज्ञानी होती. हिच्या शरीरावर कोड होतें; त्यामुळे नवऱ्यानें हिला टाकली. बापाच्या घरीं राहून इंद्राला प्रसन्न करण्याकरतां हिनें तप आरंभिलें. इंद्राला सोम फार आवडतो; हें कळल्यावर ही सोम आणण्याकरतां नदीवर गेली. तेथें मिळालेला सोम हिनें वाटेंतच चावून पाहिला. चावतांना झालेला अवाज ऐकून इंद्र तेथें आला. अपालेनें इंद्राला सोम दिला. इंद्रानें प्रसन्न होऊन हिच्या इच्छा पूर्ण केल्या. हिच्या बापाचें टक्कल नाहींसें केलें; हिचें शेत सुपीक केलें; ( हिच्या गुह्यावर केश उत्पन्न केले ) व हिचा कुष्ठरोग आखांवर घासून नाहींसा केला. ही कथा सायणाचार्यानें शाट्यायान ब्राह्मणांतून घेतली आहे. व ही मूलभूत धरूनच ऋग्वेदाचें एक सूक्त बनलें असावें ( ऋ. ८. ९१. ). ह्या सूक्तांत एकदां अपालेचा निर्देशहि आला आहे.

**अपास्य**—( अपोज्य पहा ).

**अपि**—सावर्णि मनूचा पुत्र.

**अपिकायति**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**अपिशली**—( आपाशि पहा ).

**अपीतक**—( आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें हा लंबोदराचा पुत्र.

**अपोज्य**—एक ऋषि (वायु. १. ५९. ९०-९१.). याचें अपास्य असें नामांतर होतें ( ब्रह्मांड. १. ३२. ९८–१०० ).

**अप्नवान**—भृगूच्या वंशांतील एक ( ऋ. ४. ७. १; ८. १०२. ४; श. ब्रा. ३. २. १४. ).

**अप्रतिपिन्**—(मगध. भविष्य.) मत्स्यमतें श्रुतश्रवस् पुत्र ( अयुतायु पहा ).

**अप्रतिम**—ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अप्रतिमौजस्**-ब्रह्मसावर्णिमन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अप्रतिरथ**—(सू. इ.) कुवलाश्वास नामांतर (म. व. २०४ ).

२ ( सो. पूरु. ) भागवतमतें रंतिभाराच्या तीन पुत्रांतील कनिष्ठ पुत्र. याचा पुत्र कण्व.

**अप्रतिरथ ऐंद्र**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १०३; ऐ. ब्रा. ८. १०; श. ब्रा. ९. २. ३. १–५ ).

**अप्रीत**—यजुर्वेदी ब्रह्मचारी.

**अभय**—स्वायंभुव मन्वंतरांतील धर्माला दयेपासून झालेला पुत्र.

२ ( स्वा. प्रिय. ) इध्मजिह्वाच्या सात पुत्रांतील कनिष्ठ. हा प्लक्षद्वीपांतील सातव्या वर्षाचा अधिपति होता.

३ विश्वामित्र गोत्रांतील एक गोत्रकार.

४ धृतराष्ट्रपुत्र. याला भीमानें मारलें ( म. द्रो. १२७ ).

५ ( सो. पूरु. ) विष्णुमतें हा मनस्युपुत्र.

**अभिजित्**—( सो. यदु. ) नलराजाचा पुत्र. याचा पुत्र पुनर्वसु.

२ आंगिरस गोत्रांतील एक गोत्रकार.

**अभितंस**—( सो. ) भविष्यमतें अधितंसाचा पुत्र.

**अभितपस् सौर्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ३७ ).

**अभिप्रतारिन् काक्षसेनि**—हा तत्त्वज्ञानविवादांत निमग्न असे ( पं. ब्रा. १०. ५. ७. १४. १. १२. १५. ). ( जै. उ. ब्रा. २. २. १३; ५९. १; ३. १; २१; २. १३ ). ( छां. उ. ४. ३. ५ ). हा कुरुकांतील एक राजपुत्र होता. व हा जिवंत असतांच याच्या मुलांनीं याची मालमत्ता वांटून घेतली. याचा पुरोहित शौनक होता ( जै. उ. ब्रा. १. ५९.२).

**अभिभू**—( सो. क्षत्र. ) काश्यपुत्र. भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय राजा ( म. द्रो. २३ ).

**अभिभूत**—( सो. वृष्णि. ) वायुमतें वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

**अभिमती**—अष्टवसूंतील द्रोणवसूची स्त्री (भा. ६.६).

**अभिमन्यु**—(सो. कुरु.) अर्जुनाचा मुलगा. हा सोमपुत्र वर्चा याच्या अंशानें सुभद्रेच्या उदरीं आला. जन्मल्याबरोबर हा निर्भय, भय उत्पन्न करणारा व महाक्रोधी दिसला म्हणून यानें अभिमन्यु असें नांव ठेवलें (म. आ. २२१). दैत्यांच्या त्रासानें भयभीत झालेल्या पृथ्वीस निर्भय करण्याकरितां ब्रह्मदेवानें सर्व देवांस अंशरूपानें पृथ्वीवर जन्म घेण्यास सांगितलें. त्या वेळीं सोमानें देवकार्यासाठीं आपल्या पुत्रास पृथ्वीवर पाठविलें. परंतु वर्चा याचा अत्यंत प्रिय असल्यामुळें यास पृथ्वीवर पाठवितांना हा फार दिवस पृथ्वीवर राहणार नाहीं, फक्त सोळाच वर्षे राहील, असें सोमानें सर्व देवांकडून कबूल करून घेतलें होतें. त्यामुळें याला वयाचे सोळाव्या वर्षींच मृत्यु आला ( म. आ. ६७ ).

अभिमन्यूनें अस्त्रशिक्षण व इतर युद्धकलाशिक्षण अर्जुनाचे खास देखरेखीखालीं झालें होतें. हा अस्त्रविद्येंत इतका प्रवीण होता कीं, याच्या हस्तचापल्यानें व अस्त्रयोजनानैपुण्यानें संतुष्ट होऊन बलरामानें यास रौद्र नांवाचें धनुष्य दिलें. हा अत्यंत पराक्रमी होता व आपल्या पराक्रमाच्या जोरावर हा अल्पवयाचा असतांहि महारथी झाला.

भारतीय युद्धांत द्रोणानें कौशल्यानें अर्जुनास इतर पांडवांपासून फोडलें व त्याला संशप्तकांकडे सैनेच्या बाहेर युद्धांत गुंतविलें. नंतर त्यानें भीमादि तिघांस युद्धांत गुंतविलें. अशा प्रकारें पांडव व अभिमन्यु आपल्या सेनेसह युद्धांत गुंतले आहेत हें पाहून युधिष्ठिर चिंतेंत पडला. युधिष्ठिरास चिंताग्रस्त पाहून अभिमन्यूनें त्यास चिंतेचें कारण विचारलें. त्यावरून युधिष्ठिरानें चक्रव्यूहाचा भेद करणारा आपल्या सेनेंत कोणीच नाहीं, म्हणून चिंता करीत आहें, असें यास सांगितलें.

तें ऐकून अभिमन्यूनें भीमाच्या मदतीनें चक्रव्यूहाचा भेद करण्याचें काम स्वीकारिलें. अभिमन्यूस फक्त व्यूहांत कसें शिरावें एवढेंच माहीत होतें. तरीहि हा डगमगला नाहीं. नंतर युधिष्ठिराचा आशीर्वाद घेऊन अभिमन्यु भीमासह व्यूहद्वारापाशीं आला. त्या ठिकाणीं द्रोणाचार्य सेनेसह व्यूहाचें रक्षण करीत होता. परंतु अभिमन्यु त्याची फळी फोडून व्यूहांत शिरला. व्यूहांत शिरल्याबरोबर अभिमन्यूनें मोठमोठ्या योद्धयांनाहि पराक्रमानें पळवून लाविलें. आपल्या सैन्याची पिछेहाट होत आहे हें पाहून द्रोणाचार्य अभिमन्यूवर चालून आला. परंतु अभिमन्यूनें त्यास चुकवून अश्मक नांवाच्या राजास ठार मारिलें व शल्याच्या बंधूचा वध केला. तेव्हां कर्ण यावर धांवला. परंतु त्यालाहि यानें जर्जर केलें.

याप्रमाणें युद्ध करीत असतां अभिमन्यु भीमादिकांपासून बराच दूर गेला. अभिमन्यूस एकटा पाहून दुःशासन याचेवर धावला. परंतु त्यालाहि अभिमन्यूनें रणांतून पळवून नंतर हा कौरवसेनेचा संहार करीत इतका दूर गेला कीं, हा भीमादिकांस मुळींच दिसेनासा झाला. अभिमन्यूनें भीमादिकांनीं आपल्यास मिळावें याकरितां मार्ग सुलभ ठेविला होता. परंतु जयद्रथानें रुद्रवराच्या प्रभावामुळें त्यांना अडवून धरून अभिमन्यूस मिळूं दिले नाहीं.

इकडे अभिमन्यु भीमादिकांची वाट पाहात होता; तों कर्णपुत्र याचेवर चालून आला. अभिमन्यूनें त्याचा पराभव करून दुर्योधनपुत्र लक्ष्मण व इतर योद्धे यांना ठार मारलें. तेव्हां द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा, कृतवर्मा व बृहद्बल हे सहाजण एकट्या अभिमन्यूशीं लढूं लागले. त्या सर्वांचेंहि यानें एकट्यानें निवारण केलें. तेव्हां द्रोणादिकांनीं मोठ्या प्रयासानें यास विरथ केलें. अभिमन्यु ढाल व तरवार घेऊन लढूं लागला. पण द्रोणानें तींहि तोडलीं. तेव्हां अभिमन्यूनें नुसती गदाच घेतली व दुःशासनाच्या पुत्राबरोबर गदायुद्ध आरंभिलें. त्या वेळीं अभिमन्यु फारच श्रांत झाला, पण भीमादिक लांब असल्यामुळें त्यांची यास मदत मिळूं शकली नाहीं. त्याच वेळीं दुःशासनाच्या पुत्राच्या गदेचा प्रहार याच्या अंगावर होतांच याला मूर्च्छा आली, व त्या मूर्च्छेतून हा जों सावध होत आहे तोंच दुःशासनपुत्रानें याला आणखी एका गदाप्रहारानें ठार केलें ( म. द्रो. ३४-४९ ).

अभिमन्यु हा सिंहासारखा अभिमानी व वृषभासारखा प्रशस्त खांद्यांचा होता. हा शौर्य, वीर्य, रूप, यांमध्यें अगदीं कृष्णतुल्य होता. जन्मल्याबरोबर हा दीर्घबाहू असा दिसला. हा कृष्णाप्रमाणें बलरामासहि अत्यंत प्रिय होता (म. आ. २२१).

विराटराजाची कन्या उत्तरा ही अभिमन्यूची पत्नी होती. याच्या मरणाच्या वेळेस उत्तरा ही गर्भवती होती. तिला जो पुत्र झाला तो परीक्षित् या नांवानें प्रख्यात आहे. या परीक्षिताचेच योगानें भारतीय युद्धांत अस्तंगत होऊं लागलेल्या पूरुकुलास नवजीवन मिळालें ( म. आ. ९५ ).

२ स्वायंभुव मन्वंतरांतील अजित् देवांपैकीं एक.

३ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

४ चाक्षुष मनु व नड्वला यांचा पुत्र.

**अभिमान**—स्वायंभुव मन्वंतरांतील धर्माचा पुत्र.

**अभिमानिन्**—भौत्य मन्वंतरांतील मनुपुत्र.

**अभियुक्ताक्षिक**—चवथ्या मरुद्गणांपैकीं एक.

**अभिरथ**—( सो. क्षत्र. ) विष्णुमतें केतुमानाचा पुत्र.

**अभिष्यन्त**—( सो. ) कुरु व वाहिनी यांचा पुत्र ( म. आ. १०१.३८ कुं. ).

**अभूतरजस्**—रैवत मन्वंतरांतील देवगण. यांत दहा व्यक्तींचा समावेश होतो. याचें अभूतरयस् असें नामांतर आहे.

**अभ्यग्नि ऐतशायन**—ऐतशाचा पुत्र. एकदां ऐतश आपल्या मुलापुढें कांहीं मंत्र पठण करीत असतां ते मंत्र अश्लील आहेत असें समजून यानें तोंडावर हात ठेवून त्याचें मंत्रपठन बंद पाडलें. त्यामुळें संतापून 'तुझें कुल पापी होईल,' असा त्यानें यास शाप दिला त्याप्रमाणें सर्व और्वकुलांतील या ऐतशपुत्र अभ्यग्नीला व याच्या संततीला पापी समजूं लागले ( ऐ. ब्रा. ६. ३३ ). ऐतशायनाला और्वकुलोत्पन्न न म्हणतां भृगुकुलोत्पन्न म्हटलें आहे ( सां. ब्रा. ३०.५ ). और्व व भृगु यांचा अगदीं निकट संबंध असावा अथवा एकाच कुळाच्या ह्या दोन शाखा असाव्यात. ऋग्वेदापासून यांचा एकत्र उल्लेख आढळतो.

**अभ्यावर्तिन् चायमान**—वरशिखाचे नेतृत्वाखालीं वृचिवानांस जिंकणारा व वरशिखाचे मुलांना ठार मारणारा. याच्या करितां इंद्रानें तुर्वश व वृचिवान यांना जिंकलें, परंतु तेथें हा व सृंजय देववात एकच असण्याचा संभव आहे. पार्थव म्हणून याचा उल्लेख आहे ( ऋ. ६. २७. ८ ).

**अमरेश**—याचें गोत्र भारद्वाज. यानें वर्णरत्नप्रदीपिका नांवाची २२७ श्लोकांची शिक्षा केली. हिच्या आरंभीं कृष्णाचें नमन असून हिच्यांत शौनक व शाकटायन यांचा उल्लेख आहे ( श्लो. १२२ ). ही प्रातिशाख्यास अनुसरून आहे.

**अमर्ष**—( सू. इ. ) विष्णुमतें सुगविपुत्र.

**अमर्षण**—( सू. इ. ) संधिराजाचा पुत्र ( म. ९. १२ ).

**अमल**—धृष्टबुद्धि प्रधानाचा पुत्र ( चंद्रहास पहा ).

**अमला**—वैवस्वत मन्वंतरांतील अत्रिऋषींची कन्या. ही मोठी ब्रह्मनिष्ठ होती.

**अमहीयु आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ६१ ).

**अमावसु**—( सो. पुरूरवस्. ) पुरूरवसूवंशांतच दोन अमावसु झाले. पहिला पुरूरवसूच्या मुलांपैकीं एक व दुसरा

अमावसूच्या वंशापैकीं कुशाचा पुत्र. त्यांपैकीं पुरुरवसपुत्र अमावसु हा कान्यकुब्ज घराण्याचा मूळ पुरुष होय. वंशावळ अनेक ठिकाणीं दिली आहे ( ब्रह्मांड ३.६६; ब्रह्म. १०; ह. वं. १.२७; विष्णु. ४.७; वसु व जन्हु पहा ).

२ रूपानें अत्यंत सुंदर असणारा एक पितर. याच्याकडे पाहून अच्छोदानामक पितरांची मानसकन्या मोहित झाली, परंतु यांनीं तिची विनंति नाकारल्यामुळें ती योगभ्रष्ट होऊन पुढील जन्मीं वसूची कन्या मत्स्यी [ काली, सत्यवती ] झाली ( पद्म. सृ. ९; अच्छोदा पहा ). याचाच पुढील जन्म पुरूरव्याचा पुत्र अमावसु होय.

**अमावास्य शांडिल्यायन**—अंशु धानंजय्याचा गुरु ( वं. ब्रा. १ ).

**अमावास्या**—अमावसु व अच्छोदा यांची कन्या ( मत्स्य. १४ ).

**अमाहठ**—एक सर्प ( म. आ. ५७ ).

**अमित**—(सो. पूरु.) जयाचा मुलगा ( भा. ९.१५ ).

२ सावर्णि मन्वंतरांतील देव.

३ रैवत मन्वंतरांतील देव.

**अमितौजस**—पांडवांकडील महारथी ( म. उ. १७१.११ कुं. ).

**अमित्र**—दुसऱ्या मरुद्गणांपैकीं एक. दितीचा मुलगा.

**अमित्राजित्**—( सू. इ. भविष्य. ) भागवतमतें सुतप राजाचा पुत्र. वायुमतें सुवर्णपुत्र व भविष्यमतें सुवर्णांगाचा पुत्र.

२. या राजाच्या राज्यांत सर्वत्र शिवमंदिरें होतीं. हें पाहून नारद ऋषीस आनंद होऊन तो याच्याकडे आला व म्हणाला, चंपकावती नगरांत मलयगंधिनी नांवाची एक गंधर्वकन्या असून तिला कंकालकेतु नांवाचा राक्षस पळवून नेत आहे. त्याच्यापासून सोडविणारास मी वरीन, असा तिचा पण आहे. म्हणून तूं हें कार्य कर. असें नारदानें सांगतांच यानें कंकालकेतूशीं युद्ध करून त्याचा नाश केला व हा गंधर्वकन्येसह स्वपुरीं आला. नंतर विवाह होऊन यांना वीर नांवाचा पुत्र झाला ( स्कंद. ४. २. ८२-८३ ).

**अमित्रतपन शुष्मिण शैब्य**—शिबीचा पुत्र. यानें अत्यराति जानंतपीचा वध केला ( ऐ. ब्रा. ८.२३ ).

**अमूर्तरजस**—( अमूतरयस व अमूर्तरयस् पहा ).

**अमूर्तरयस्**—( सो. पूरु. ) मत्स्यमतें हा अंतिनार पुत्र होय.

२ ( सो. अमा. ) विष्णुमतें हा कुशपुत्र होय. भागवतमतें मूर्तय असें नांव आहे. अमूर्तीर व हा एक असावा. विष्णुमतें अमूर्तरय असें नांव आहे.

३. एक क्षत्रिय गय राजाचा पिता ( म. व. ९३. २० कुं. ). यालाच अमूर्तरजस असें नामांतर होतें.

**अमूर्तीर**—( २ अमूर्तरयस् पहा ).

**अमृत**—( स्वा. प्रिय. ) इध्मजिह्वाच्या सात पुत्रांपैकीं एक. याचा वर्ष याच्याच नांवानें प्रसिद्ध आहे (भा. ५. २०).

२ अंगिरस गोत्रांतील मंत्रकार.

३ अमिताभ नांवाच्या देवांतील एक.

**अमृतप्रभ**—सावर्णि मन्वंतरांतील देव

**अमृतवत्**—स्वायंभुव मन्वंतरांतील जिदाजित् देवांपैकीं एक.

**अमोघ**—बृहस्पति व तारा यांची कन्या स्वाहादेवी हिचा पुत्र. अग्निविशेष ( म. व. २२१ )

२. एक यक्ष ( म. व. २३२ ).

**अमोघा**—शंतनु ऋषीची भार्या. पूर्वी ब्रह्मदेव शंतनु महर्षींच्या आश्रमीं गेला. परंतु तो ऋषि बाहेर गेला असल्यामुळें त्याच्या पत्नीनें ब्रह्मदेवाची पूजा केली. पुढें हिचें सुंदर रूप पाहून त्याचें वीर्यपतन होऊन तो लज्जेनें निघून गेला. कांहीं वेळानें शंतनु परत आल्यावर तें वीर्य पाहून कोण आलें होतें,म्हणून त्यानें चौकशी केली व ब्रह्मदेवाचें अमोघ वीर्य फुकट जाऊं नये म्हणून त्याचा स्वीकार करण्याची हिला आज्ञा केली. त्या वीर्यापासून उत्पन्न झालेल्या गर्भाचें तेज हिला सहन होईना. तेव्हां हिनें तो गर्भ युगंधर पर्वतावरील दरींतील उदकांत टाकला. त्यापासून लोहित नामक तेजस्वी तीर्थाधिपति निर्माण झाला. पुढें क्षत्रियांचा वध केल्याबद्दल विष्णूला पाप लागलें होतें, तें या तीर्थी स्नान करतांच नष्ट झालें ( पद्म. सृ. ५५ )

**अंबर**—वृत्रासुरानुयायी असुर ( भा. ६. १० ).

**अंबरीष**—ऋज्राश्व, सहदेव, सुराधस व भयमान यांच्याबरोबर वार्षागिर म्हणून याचा उल्लेख आहे (ऋ. १.१००. १७ ). हा सूक्तकर्ता आहे ( ऋ. १. १००; ९.९८ ). हा अंगिरसगोत्रांतील मंत्रकार आहे.

२ ( सू. नभग. ) नाभागाचा पुत्र ( म. स. ८.१२ कुं. ). हा मोठा शूर व धार्मिक होता. हा हजारों राजांबरोबर एकटा लढत असे. यानें लक्षावधि राजे व राजपुत्र यज्ञांत दान म्हणून दिले होते. अभिमन्यूच्या मृत्यूनें दुःखी झालेल्या धर्मराजानें सांत्वन करण्याकरितां नारदानें ह्याचे मृत्यु पावला असें सांगितलें (म. द्रो. ६४; शां. २८.१०० कुं. ).

एकदां याला कार्तिक महिन्यांतील एकादशीचें त्रिदिनात्मक व्रत असतां द्वादशीचे दिवशीं याचे येथें दुर्वास अतिथि म्हणून आला व आह्निक करण्यास नदीवर गेला. इकडे द्वादशी संपून जाऊं लागल्यामुळें यानें नैवेद्य समर्पण केला व तीर्थ घेऊन पारणा केली. हें जाणून दुर्वासानें जटेंतील केसांपासून उत्पन्न केलेली कृत्या अंबरीषावर सोडली. इतक्यांत विष्णूच्या

सुदर्शनानें कृत्येचा नाश केला व तें दुर्वासाच्या मागें लागलें. अशा स्थितींत विष्णूनेंहि त्याचें संरक्षण करण्याचें नाकारून परत अंबरीषाकडे जाण्यास सांगितलें. दुर्वासाला परत अंबरीषाकडे येण्यास एक वर्ष लागलें. तोंपर्यंत अंबरीष उपाशीच होता. यानें दुर्वासास पाहतांच त्याचें स्वागत केलें, चक्राची स्तुति करून तें परत फिरविलें व त्यास उत्तम भोजन दिलें ( भा. ९. ४-५ ). यानें पक्षवर्धिनी एकादशीचें व्रत केलें होतें. द्वादशी योग्य वेळीं सोडल्यामुळें हा विष्णूस प्रिय झाला. त्यामुळें हा मोक्षास गेला ( पद्म. उ. ३६; ३७; ८० ). यानें भीष्मपंचक व्रत केलें होतें ( पद्म. उ. १२४ ). हा स्वर्गी गेला असतां याचा सुदेव नांवाचा सेनापति याला स्वर्गांत दिसला. तेव्हां याला आश्चर्य वाटून स्वर्गांत कोण येतो, याविषयीं याचा इंद्राशीं संवाद झाला. तेव्हां इंद्रानें सुदेवास रणांगणांत मेल्यामुळें स्वर्गप्राप्ति झाल्याचें यास सांगितलें ( म. शां. ९८ कुं. ). याच्या पुत्राचें नांव सिंधुद्वीप. यानें १८३१९ वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. १.१ ). शिवाय याला विरूप, केतुमान् आणि शंभु असे तीन पुत्र होते ( भा. ९. ६ ).

२ ( सू. इ. ) मांधात्याला बिंदुमतीपासून झालेल्या तीन पुत्रांतील दुसरा ( भा. ९. ७ ).

३ ( सू. इ. ) त्रिशंकूच्या दोन पुत्रांतील दुसरा. यास श्रीमती नामक कन्या होती. ती नारद व पर्वत यांच्या वादांत विष्णूनें मिळविली ( अ. रा. ३-४ ). हा एकदा यज्ञ करीत असतां याच्या दुर्वर्तनामुळें याचा यज्ञीय पशु इंद्रानें पळविला. तेव्हां यानें ऋचीक ऋषीला द्रव्य देऊन त्याचा शुनःशेप नांवाचा मुलगा विकत घेतला व यज्ञ शेवटास नेला. यास धर्मसेन असें नामान्तर असून याचा पुत्र यौवनाश्व होय. हाच हरिश्चंद्र होय (लिंग. २. ५.६; वा. रा. बा. ६१; शुनःशेप पहा).

४ कद्रूपुत्र एक सर्प.

**अंबष्ठ** किंवा **अम्बष्ठक**—दुर्योधनपक्षीय क्षत्रिय. याचें अभिमन्यूबरोबर युद्ध झालें होतें ( म. भी. ९६ कुं. ). याला अर्जुनानें युद्धांत मारिलें ( म. द्रो. ९३ कुं. ).

२ पांडवपक्षीय क्षत्रिय. याच्या पुत्राचा वध लक्ष्मणानें केला ( म. क. ३ कुं. ).

**अंबष्ठ**—कंसाच्या कुवलयापीड हत्तीचा महात ( भा. १०. ४३. २–५ ).

**अंबा**—काशिराजाच्या तीन कन्यांतील ज्येष्ठ. आपल्या कन्या उपवर झाल्या असतां काशिराजानें त्यांच्या स्वयंवराचा निश्चय करून त्याप्रमाणें देशोदेशींच्या राजांना स्वयंवरार्थ निमंत्रणें पाठविलीं. या स्वयंवरांत कोणताहि पण लाविला नव्हता, तर जो सर्वांत बलवान् असेल, त्यानें खुशाल यांचें हरण करावें असें काशिराजानें ठरविलें होतें.

चित्रांगदाच्या निधनानंतर भीष्माचार्य आपल्या सावत्र आईच्या संमतीनें विचित्रवीर्याच्या नांवानें हस्तिनापूरचें राज्य चालवीत होता. विचित्रवीर्याचा विवाह अजून झाला नव्हता. तेव्हां काशिराजाच्या कन्यांच्या स्वयंवराची बातमी भीष्मास कळतांच तो विचित्रवीर्यासाठीं त्या कन्या हरण करून आणण्याकरितां स्वयंवरास गेला; व तेथील सर्व राजांचा पराभव करून त्यानें तिघींनाहि हरण करून आणिलें ( म. आ. १०२ ).

हस्तिनापुरास आल्यावर भीष्मानें त्या तिघींचा विचित्रवीर्याशीं विवाह करण्याचें ठरविलें. तें कळतांच अंबेनें भीष्मास माझें मन पूर्वीच शाल्वावर बसलें आहे, तेव्हां माझा विचित्रवीर्याशीं विवाह करणें योग्य होणार नाहीं, असें सांगितलें. हें ऐकून भीष्मानें हिला लव्याजम्यासह शाल्वाकडे पाठविलें. परंतु भीष्मानें सर्वांच्या देखत आपला पराभव करून हिचें हरण केलें, यास्तव हिच्याशीं आतां विवाह करणें युक्त नाहीं, असें वाटून शाल्वानें हिचा अंगिकार केला नाहीं. तेव्हां अंबा परत भीष्माकडे आली व त्यास म्हणाली कीं, तुम्हीं जिंकून आणिल्यामुळें शाल्व माझा स्वीकार करीत नाहीं, तेव्हां तुम्हींच मला वरावें हें योग्य आहे. परंतु भीष्मानें यावज्जीव ब्रह्मचर्य पाळण्याचा नियम केला असल्यानें त्यानें अंबेची मागणी स्वीकारिली नाहीं.

याप्रमाणें अंबा सर्व बाजूंनीं निराधार झाल्यामुळें अत्यंत दुःखी झाली व आपणांस या स्थितीस आणण्यास कारण भीष्मच आहे, तेव्हां भीष्माचा कोणत्या तऱ्हेनें सूड उगवतां येईल, याबद्दल ही विचार करूं लागली व तप करण्याकरितां हिमालयाकडे निघून गेली.

हिमालयावर जात असतां हिला वाटेंत शैखावत्य ऋषींचा आश्रम लागला. तेथील ऋषींस हिनें आपला निश्चय कळविला. तेव्हां त्यांनीं हिला आपल्या निश्चयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण तो निष्फळ ठरून अंबा तेथेंच तप करावयास राहिली. कांहीं दिवसांनीं होत्रवाहन नामक एक राजर्षि त्या आश्रमांत आला. हा अंबेचा मातामह होता. अंबेची ती स्थिति पाहून त्याला फार वाईट वाटलें, व आपल्या नातीचें दुःख दूर व्हावें, म्हणून त्यानें भीष्माचा गुरु परशुराम याच्याकडून भीष्माचें पारिपत्य करून त्यास अंबेचा स्वीकार करावयास लावण्याचा बेत केला. त्याप्रमाणें तो आपल्या नातीस घेऊन परशुरामाकडे निघणार, इतक्यांत परशुरामाचा अकृतव्रण नामक एक शिष्य त्या ठिकाणीं आला व त्यानें परशुराम या आश्रमाकडेच येत आहे, असें होत्रवाहनास सांगितलें. त्यावरून होत्रवाहन परशुरामाची वाट पाहात तेथेंच राहिला ( म. उ. १७५-१७७ ).

कांहीं कालानें परशुराम त्या आश्रमास आला. त्यास अंबेचें वृत्त कळतांच त्यानें अंबेला दुःखमुक्त करण्याचें वचन दिलें व भीष्मास अंबेचा स्वीकार कर अगर युद्धास तयार हो असा निरोप पाठविला. तेव्हां भीष्मानें आपण आजन्म ब्रह्मचारी राहणार असल्याचा आपला निश्चय परशुरामास कळवून तो युद्धास तयार झाला. पुढें कुरुक्षेत्रीं त्यांचें मोठें युद्ध होऊन त्यांत कोणाचाहि पराभव न होतां तें थांबलें.

अशा प्रकारें निराशा झाली असतांहि अंबेनें आपला भीष्माचा सूड घेण्याचा निश्चय मुळींच सोडला नाहीं. हिनें भीष्मवधार्थ शंकराची कडक उपासना चालविली. गंगेलाहि हिचा हा निश्चय कळतांच तिनें अंबेस तपापासून परावृत्त करण्याचा बराच प्रयत्न केला. पण अंबा गंगेचें मुळींच ऐकेना. तेव्हां गंगेनें हिला तूं अर्ध्या अंगानें पावसाळी नदी होशील असा शाप दिला. तरीहि अंबेनें आपला निश्चय कायम ठेविला (म. उ. १८६).

कांहीं कालानें महादेव हिच्या तपश्चर्येनें संतुष्ट होऊन हिला वर देण्यास तयार झाला. असतां हिनें भीष्मास मारण्याची आपली इच्छा त्यास निवेदन केली. तेव्हां या जन्मीं तुला हें शक्य नाहीं, पण पुढील जन्मीं तूं द्रुपदाच्या घरीं प्रथम कन्यारूपानें जन्मास येऊन नंतर तुला पुरुषत्व प्राप्त होईल व तूं शिखंडी या नांवानें प्रसिद्धीस येऊन भीष्मास ठार मारशील असा महादेवानें हिला वर दिला व तो अंतर्धान पावला. याप्रमाणें आपले मनोरथ पूर्ण झाले असें पाहून अंबेनें अग्नीमध्यें उडी घेऊन देहत्याग केला (म. उ. १८७).

महाभारताच्या कुंभकोणम् प्रतींत वरील कथेपेक्षां थोडी निराळी कथा आढळून येते ती पुढीलप्रमाणें. अंबेची उत्कृष्ट तपश्चर्या पाहून कार्तिकस्वामी प्रसन्न झाला व त्यानें एक प्रासादिक व दिव्य माला अंबेस देऊन सांगितलें कीं, जो ही माला धारण करील तो भीष्माचा वध निःसंशय करील. याप्रमाणें कार्तिकस्वामीनें सांगितलें असतां अंबेनें ती माला घेतली व कोणी क्षत्रिय ही माला धारण करून भीष्मास ठार मारण्यास समर्थ आहे काय, असें विचारीत ही अनेक देश हिंडली. परंतु भीष्माचा वध करूं इच्छिणारा असा कोणीहि क्षत्रिय हिला भेटला नाहीं. पुढें ही पांचालराज द्रुपद याच्याकडे गेली व तो नको नको म्हणत असतांहि हिनें ती माला त्याच्या राजवाड्याच्या दारांत टाकून ही निघून गेली. तेव्हां द्रुपदानें ती माळ उचलून आपल्या घरांत नेऊन ठेविली. पुढें शिखंडीनें अंबेनें दिलेल्या मालेच्या योगानें भीष्मास ठार मारलें (म. आ. ११० कुं.).

**अंबायवीया**—सत्यलोकांतील एक अप्सरा.

**अंबालिका**—काशिराजाच्या तीन कन्यांतील कनिष्ठ व विचित्रवीर्याची स्त्री (अंबा पहा). पतीपासून हिला संतति झाली नाहीं. पुढें पति मरण पावल्यावर सासू सत्यवती व दीर भीष्म यांच्या अनुमोदनानें हिनें व्यासाकडून पुत्रप्राप्ति करून घेतली. परंतु गर्भधारणप्रसंगीं ही भीतीनें पांढरी फटफटीत झाल्याकारणानें हिला होणारा मुलगा पांढऱ्या रंगाचा होऊन त्याचें नांव पांडु असें पडलें (म. आ. १०५-१०६; सत्यवती पहा).

**अंबिका**—काशिराजाच्या तीन कन्यांपैकीं मधली व विचित्रवीर्याची स्त्री (अंबा पहा). पतीपासून हिला संतति झाली नाहीं म्हणून हिनें व्यासाकडून पुत्रप्राप्ति करून घेतली. रतिप्रसंगीं हिनें डोळे मिटून धरिल्यामुळें हिला अंध धृतराष्ट्र झाला. हिला कौसल्या असेंहि अभिधान होतें. पुनः चांगला पुत्र प्राप्त व्हावा, म्हणून सासूनें हिला पुनः व्यासाकडे जाण्यास सांगितलें. परंतु व्यासाच्या रूपाची आठवण होऊन ही मनांत घाबरली व हिनें वरवर रुकार दिला. परंतु ऐन प्रसंगीं हिनें आपली एक दासी व्यासाकडे पाठवून दिली व तिला विदुर झाला (म. आ. १०५-१०६).

२ रुद्रपत्नी (श. ब्रा. २. ५. ३. ९).

**अंबुक**—ब्रह्मधानाचा पुत्र.

**अंबुधारा**—दक्षसावर्णि मन्वंतरांत होणाऱ्या ऋषभ अवताराची माता (भा. ८.१३).

**अंबुवीच**—मगध देशांत राजगृह नगरांत हा राजा होता. हा सर्व बाजूंनीं पंगु असल्यामुळें महाकर्णि प्रधान अत्यंत प्रबळ झाला. तथापि दैवयोगानें त्याला याचें राज्य बळकावितां आलें नाहीं (म. आ. २२३).

**अंभिणी**—ब्रह्मविद्येंतील सूर्याची शिष्या.

**अंभृण**—याची कन्या वाच् (वाच् पहा).

**अंभोरुद**—विश्वामित्राचा पुत्र (म. अनु. ७ कुं.).

**अय**—स्वारोचिष मन्वंतरांतील प्रजापति. वसिष्ठाचा पुत्र.

२ अगस्त्यगोत्रांतील मंत्रकार.

३ तुषित नांवाच्या देवगणांतील एक.

४ यजुर्वेदी ब्रह्मचारी.

**अयःशिरस्**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**अयतंस**—(सो.) भविष्यमतें परातंसाचा पुत्र.

**अयतायन**—विश्वामित्रकुलांतील एक गोत्रकार.

**अयति**—(सो.) नहुषाचा पुत्र (म. आ. ६९ कुं.).

**अयस्थूण**—शौल्बायन हा ज्यांचा अध्वर्यु होता, त्यांचाच हा गृहपति होता. यानें शौल्बायनाला विशिष्ट स्रुव्याचा उपयोग कसा करावा हें शिकविलें (श. ब्रा. ११. ४. २. १७).

**अयस्मय**—स्वारोचिष मनूचा पुत्र.

**अयस्य**—(अजस्य पहा).

**अयाप्य**—वायुमतें अयास्यास असलेलें नांव.

**अयास्य आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ४४; ४६; १०. ६७; ६८ ). अंगिरसाला स्वराजेपासून झालेला मुलगा. याचा पुत्र कितव ( ब्रह्मांड. ३. १ ). राजसूय यज्ञांतील हा उद्गाता होता. त्या यज्ञांत शुनःशेपाला बळी द्यावयाचें होतें ( पं. ब्रा. ११. ८. १०; १४. ३. २२; १६. १२. ४; सां. ब्रा. ३०. ६ ). धर्मकृत्यांत प्रमाण म्हणून याचा पुष्कळ ठिकाणीं उल्लेख आहे. हा आभूति त्वाष्ट्राचा शिष्य आहे ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३. ). शार्यात मानवाच्या यज्ञांत हा उद्गाता होता. ( जै. उ. ब्रा. २. ७. २; १०; ८. ३ ).

**अयुत**—( सो. जह्नु. ) राधिकाचा पुत्र.

**अयुताजित्**—( सो. भज. ) भागवतमतें सात्वतपुत्र भजमानास दुसऱ्या स्त्रीपासून झालेल्या तीन पुत्रांतील कनिष्ठ.

**अयुतनायिन्**—( सो. पूरु. ) महाभौम व सुयज्ञा यांचा पुत्र. याची स्त्री भासा. याचा पुत्र अक्रोधन ( म. आ. ६३. १९ कुं. ).

**अयुतायु**—( सू. इ. ) सिंधुद्वीपाचा पुत्र ( भा. ९. ९.).

२ ( सो. कुरु. ) विष्णुमतें आराधीचा पुत्र.

३ ( मगध. भविष्य. ) भविष्यमतें अर्णवाचा पुत्र. यानें ५००० वर्षे राज्य केलें. भागवत, वायु, मत्स्य व ब्रह्मांड यांच्या मतें श्रुतश्रवस्चा पण विष्णुमतें श्रुतवानाचा पुत्र आहे व अयुतायुत असा पाठभेद आहे.

**अयुताश्व**—( सू. इ. ) भविष्यमतें सिंधुद्वीपाचा पुत्र. हा वैष्णव होता.

**अयोबाहु**—धृतराष्ट्राच्या पुत्रांतील एक.

**अयोभुज**—धृतराष्ट्रपुत्र. याला भीमानें मारलें ( म. द्रो. १५८ कुं. )

**अयोमुख**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**अयोमुखी**—एक राक्षसी. सीतेचा शोध करीत रामलक्ष्मण मातंगाश्रमाकडे गेले. तेथें ही लक्ष्मणाकडे येऊन त्यास वरण्याची इच्छा दर्शवूं लागली. त्यानें शूर्पणखेप्रमाणेंच हिची अवस्था केली. तेव्हां हिनें तेथून पलायन केलें ( वा. रा. अर. ६९ ).

**अरजा**—उशनस शुक्राची कन्या. हिचें कौमार्य दंडराजानें नष्ट केलें होतें. म्हणून हिला पित्यानें दंडकारण्यांतच भार्गवाश्रमाजवळ असणाऱ्या सरोवरावर राहण्यास सांगितलें. तदनंतर हा निष्पाप झाली (वा. रा. उ. ८१; पद्म. सृ. ३४).

**अरण्य**—रैवत मनूचा पुत्र.

२ हिरण्याक्षानुयायी असुर. यास कार्तिकेयानें मारिलें ( पद्म. सृ. ७५ ).

**अरप**—भृगुगोत्री मंत्रकार.

**अररु**—एक दैत्य ( तै. सं. १०.१.९ ).

**अरविंद**—( सो. ) भविष्यमतें चित्ररथाचा पुत्र.

**अराल**—दतीचा शिष्य. याचा शिष्य शूष (वं. ब्रा. २).

**अरालि**—एक विश्वामित्रपुत्र.

**अरि**—अंगिरसकुलांतील एक गोत्रकार.

**अरिक्तवर्ण**—(आंध्र. भविष्य ) मत्स्यमतें स्वातिवर्णाचा पुत्र.

**अरिजित्**—(सो. यदु.) भद्रेपासून झालेला कृष्णाचा पुत्र.

**अरिंजय**—(मगध. भविष्य.) वायुमतें विरिजिताचा पुत्र व ब्रह्मांडमतें विश्वजिताचा पुत्र.

**अरितायु**—( सो. कुरु. ) मत्स्यमतें हा भीमपुत्र होय.

**अरिद्योत्**—( सो. अंधक. ) दुंदुभीचा पुत्र.

**अरिंदम**—विश्वंतराच्या सोमयज्ञांत श्यापर्णांचा प्रवेश झाल्यावर त्यांनीं सांगितलेल्या सोमाच्या परंपरेंत सनश्रुतानें अरिंदमाला ही परंपरा सांगितल्याचा उल्लेख आहे ( ऐ.ब्रा.७.३४).

**अरिमर्दन**—(सो. वृष्णि. ) श्वफल्काचा पुत्र.

**अरिमेजय**—सर्पसत्रांत यानें आध्वर्यव स्वीकारलें होतें ( पं. ब्रा. २५. १५ ).

२ (सो. वृष्णि. ) श्वफल्काचा मुलगा ( विष्णु. ४. १४. २). सारमेय व शारिमेजय असे पाठ आढळतात. हा पांडवांकडे जाण्याचा संभव आहे, असें धृतराष्ट्र म्हणतो ( म. द्रो. ११. २८ कुं. ).

**अरिष्ट**—कश्यप व दनु यांचा एक पुत्र.

२ कंसानें कृष्णावर पाठविलेला एक दैत्य. यानें बैलाचें रूप घेऊन कृष्णावर चाल केली. त्यांत यानें दोन हल्ले केले. दुसऱ्या हल्ल्याच्या वेळीं कृष्णानें याची मान पिळवटली व एक शिंग उपटून त्याच शिंगानें यास बडविलें. त्यासरसा हा रक्त ओकीत मरण पावला ( भा.१०. ३६. १६; ह.वं. २. २१).

३ विनतापुत्र. यास अरिष्टनेमि व तार्क्ष्य अशीं नामांतरें आहेत ( म. व. १८४. कुं १८७. ९ कुं.; व ग. कृ. प्रत. तुलना करून पहा ).

४ बलीच्या पुत्रांतील एक.

५ यमसभेंतील क्षत्रिय ( म. स. ८. १५ कुं ).

६ वैवस्वत मनूचा पुत्र.

७ सावर्णि मनूचा पुत्र.

**अरिष्टनेमि**—कश्यपास नामांतर ( म. शां. २०८ ). प्रजापतींपैकीं हा एक होता ( वायु. २. ४. ५३-५४ ).

२ गरुडास नामांतर.

३ विनतेच्या पुत्रांतील एक ( म. आ. ६५ ). हा एक मोठा तपोबलसंपन्न ऋषि होता. याचा पुत्र कुमार राजानें मारला होता. त्यास यानें तपोबलानें जिवंत उठविलें ( म. व. १८४ ).

४ पौष मासांतील सूर्याबरोबर फिरणारा गंधर्व.

५ ( सू. निमि. ) पुरुजित् जनकाचा पुत्र.

६ अज्ञातवासकाळीं तंतिपाल या नामाप्रमाणेंच सहदेवानें हेंहि नांव धारण केलें होतें ( म. वि. १० ).

७ बलीच्या सैन्यांतील एक दैत्य ( भा. ८. ६. ).

८ यमसभेंतील एक क्षत्रिय ( म. स. ८ कुं. ).

९ एक ब्राह्मण. याचा सगराबरोबर मोक्षसाधनविषयक संवाद झाला होता ( म. शां. २९४ कुं. ).

१० एक राजा. हा राज्याचा त्याग करून गंधमादन पर्वतावर तपश्चर्या करीत होता. हें पाहून इंद्रानें आपला दूत याजकडे पाठवून विमानांतून यास स्वर्गास घेऊन येण्यास सांगितलें. परंतु स्वर्गांतहि उच्च व नीच हा भेद असून पुण्यक्षय झाल्यावर अधःपतन असल्याचें दूताच्या तोंडून ऐकून रागानें त्यास परत पाठविलें. परंतु इंद्रानें दूतास पुनः याच्याकडे पाठवून वैराग्यसंपन्न राजाला आत्मज्ञानाचा बोध व्हावा म्हणून ब्रह्मनिष्ठ वाल्मीकीच्या आश्रमांत याला घेऊन जाण्यास सांगितलें. वाल्मीकींची भेट होतांच वाल्मीकीनें यास मुक्त करण्याकरितां समग्र रामायण सांगितलें व त्याच्या श्रवणमननिदिध्यासानें तूं जीवन्मुक्त होशील, असें आश्वासन दिलें ( यो. वा. १. १).

**अरिष्टनेमि तार्क्ष्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.१७८ ).

**अरिष्टसेन**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा ( म. श. ६ ).

**अरिष्टा**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या. कश्यपाची स्त्री. हिला गंधर्व व अप्सरा झाल्या. कश्यपाच्या स्त्रिया सांगतांना अरिष्टा सांगून प्राधा सांगितली नाहीं; पण संतति सांगतांना अरिष्टा नांवाऐवजीं प्राधा हें नांव वापरलें आहे, म्हणून अरिष्टा व प्राधा एकच.

**अरिह**—(सो. पूरु.) अपराचीन व विदर्भकन्या मर्यादा यांचा पुत्र. याच्या स्त्रीचें नांव आङ्गी (म. आ. ६३.१७ कुं.).

२ अमिताभ देवांपैकीं एक.

**अरुज**—रावणपक्षीय राक्षस. हा बिभीषणाकडून मारला गेला ( म. व. २८६ कुं. ).

**अरुण**—सृष्ट्युत्पत्तीच्या वेळीं ब्रह्मदेवाच्या शरीरांतील मांसापासून झालेला ऋषि. ब्रह्मदेवपुत्र ( तै. आ. १. २३.२६ ).

२ पांचव्या मनूच्या पुत्रांतील एक.

३ दनू व कश्यप यांचा पुत्र ( भा. ६.६).

४ विनता व कश्यप यांचा पुत्र. यास अनूरु व विपाद अशीं नामांतरें आहेत. कारण हा जन्मला तेव्हांपासूनच याला पाय नाहींत. याच्या आईनें आपली सवत कद्रू हिला आपल्या बरोबरच गर्भ राहिले व तिचीं मुलें हिंडूंफिरूंहि लागलीं आहेत, हें पाहून आपल्या दोन अंड्यांपैकीं एक अंडें फोडलें. त्या अंड्यांतून एक अर्धाच कमरेपर्यंत शरीर असलेला पुत्र बाहेर पडला. बाहेर येतांक्षणींच यानें सवतीमत्सरानें आपली ही दशा आपल्या आईनें केली हें पाहून तिला तूं सवतीचें ५०० वर्षें दास्य करशील असा शाप दिला; पण दुसरें अंडें परिपक्व होऊं दिल्यास दुसरा पुत्र त्या दास्यांतून सोडवील, असें यानें सांगितलें ( म. आ. १६; अनु. २० ). पुढें याचा धाकटा भाऊ गरुड यानें यास पूर्वभागीं नेऊन ठेविलें असतां यानें संतप्त झालेल्या सूर्याचें तेज आपल्या योगबलानें गिळलें. तेव्हां पासूनच यानें देवांच्या सांगण्यावरून सूर्याचें सारथ्य पत्करिलें (म. आ. २४). यास कश्यप व ताम्रा यांची कन्या श्येनी नांवाची भार्या होती. तिजपासून यास संपाति व जटायु आणि श्येन झाले ( म. आ. ६६-६७ ). अरुणस्मृतीचा निर्णयसिंधु व संस्कारकौस्तुभ यांत उल्लेख आहे ( C. C. ).

५ विप्रचित्तीच्या वंशांतील एक दानव. यानें गायत्रीमंत्राच्या जपानें हजारों वर्षें तप केलें व ब्रह्मदेवापासून युद्धांत मृत्यु नसावा असा वर मागितला. पुढें मदोन्मत्त होऊन आपलें निवासस्थान जें पाताल तें सोडून हा भूमीवर आला व यानें इंद्रादि देवांस युद्धास आव्हान करण्याकरितां दूत पाठविला. इतक्यांत आकाशवाणी झाली कीं, जोंपर्यंत यानें गायत्रीचा त्याग केला नाहीं, तोंपर्यंत यास मरण नाहीं. तेव्हां देवांनीं बृहस्पतीस याजकडून गायत्रीचा त्याग करविण्यास पाठविलें. पुढें बृहस्पतीस आलेला पाहून मी आपल्या पक्षाचा नसतांहि तुम्ही इकडे कुणीकडे असें विचारिलें. तेव्हां बृहस्पति म्हणाला कीं, ज्या अर्थी आम्हांप्रमाणेंच तुम्हीहि गायत्रीचे उपासक आहांत, त्या अर्थी तुम्ही आमच्या पक्षाचे कसे नाहीं? तेव्हां यानें देवांची उपास्यदेवता गायत्री सोडून दिली. पुढें देवीनें संतप्त होऊन लाखों भुंगे उत्पन्न केले व ते याजवर सोडून यास व याच्या सैन्यास युद्धाशिवायच ठार केलें ( दे. भा. १०.१३).

६ ( सू. इ. ) हर्यश्वास दृषद्वतीपासून झालेला पुत्र. यास निबंधन व त्रिबंधन अशीं नामांतरें होतीं.

७ नरकासुराचा पुत्र. नरकासुरास मारल्यावर हा व याचे सहा बंधु कृष्णावर धांवले. त्या वेळीं याच्या सुद्धां सर्वांस त्यानें ठार केलें.

८ धर्मसावर्णि मन्वंतरांत होणाऱ्या सप्तर्षींतील एक.

**अरुण आट**—सर्पसत्रांतील अच्छावाक नांवाचा ऋत्विज ( पं. ब्रा. २५.१५).

**अरुण औपवेशि**—एक आचार्य हा उपवेशीचा शिष्य व यांचा शिष्य उद्दालक ( बृ. उ. ६.५.३ ). अग्न्याधानाच्या वेळीं वाग्यत असावें, हें सांगण्याकरितां ह्या वृद्ध गृहस्थाची आख्यायिका दिली आहे. सत्यता पाळण्याकरितां

मौन पाळणें श्रेयस्कर, असें या आख्यायिकेचें तात्पर्य आहे (श. ब्रा. २.१.६.२०; तै. सं. ६.१.९.२; ४.५.१; तै. ब्रा. २.१.५.११). प्रसिद्ध उद्दालक आरुणि हा याचा पुत्र होय. हा उपवेशि गौतम याचा शिष्य व राजपुत्र अश्वपतीचा समकालीन होता (श. ब्रा. १०. ६. १. २).

**अरुण वैतहव्य**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०.९).

**अरुणा**—कश्यप व प्राधा यांची कन्या (म. आ. ६६).

**अरुणि**—ब्रह्मभानरपुत्र. हा विरक्त होता (भा. ४.८).

२. अरुण ऋषीचें नांव.

**अरुद्ध**—(सो. द्रुह्यु.) वायुमतें हा सेतुपुत्र (अंगार पहा).

**अरुंधती**—स्वायंभुव मन्वंतरांत कर्दम प्रजापतीस देवहूतीपासून झालेली मुलगी. ही वसिष्ठास दिली होती (भा. ३. २४; २३; मत्स्य. २०१. ३०).

२ कश्यपास अरुंधती नांवाची एक मुलगी होती. हिला नारद व पर्वत नांवाचे दोन भाऊ असून नारदानें हिला वसिष्ठास दिली होती (वायु. २. ९. ७९. ८३; ब्रह्मांड ३. ८. ८६; लिंग. १. ६३. ७८-८०; कूर्म. १. १९-२०. विष्णुधर्म. १. ११७). हिनें वसिष्ठाचें प्राप्तीस्तव गौरीव्रत केलें होतें. त्यामुळें हिला विवाहसौख्य लाभलें (भवि. ब्राह्म. २१).

मेधातिथि मुनीची कन्या. मेधातिथीनें ज्योतिष्टोम नांवाचा यज्ञ केला, त्या वेळीं ही यज्ञकुंडांतून उत्पन्न झाली. पूर्वजन्मांतील ही ब्रह्मदेवाची मानसकन्या संध्या होय. चंद्रभागा नदीचे तीरीं तपोरण्यामध्यें मेधातिथीचे घरीं ही वाढूं लागली. अशी पांच वर्षे झालीं. पुढें एकदां ही चंद्रभागा नदीवर गेली असतां ब्रह्मदेवानें विमानांतून हिला पाहिलें व तत्काल मेधातिथीची गांठ घेऊन अरुंधतीला साध्वी स्त्रियांच्या सहवासांत ठेवण्यास सांगितलें. ब्रह्मदेवाचें सांगण्यावरून मेधातिथि सावित्रीकडे जाऊन म्हणाला, आई, या माझ्या मुलीला उत्तम शिक्षण द्या. सावित्रीनें ती विनंती मान्य केली. अशीं सात वर्षे गेलीं. अर्थात् या वेळीं हिला १२ वर्षे पूर्ण झाल्यावर ही एकदां मानसपर्वतावर सावित्री, बहुला यांच्या बरोबर उद्यानांत गेली असतां तेथें वसिष्ठ ऋषि तपश्चर्या करीत बसलेला हिचे दृष्टीस पडला. वसिष्ठ व अरुंधती यांचा परस्परदृष्टिसंबंध होतांच कामवासना उत्पन्न झाली. तथापि मनोनिग्रहानें दोघेंहि आपआपले आश्रमांत गेलीं. पुढें सावित्रीला समजतांच तिनें या दोघांचा विवाह घडवून आणला (कालि. २३).

चालू वैवस्वत मन्वंतरांतील मैत्रावरुणि वसिष्ठाची पत्नी (म. स. ११.४२ कुं; व. १३२.१७ कुं.). हिलाच अक्षमाला असें दुसरें नांव होतें (म. उ. ११७ कुं.). अरुंधती शब्दाची व्युत्पत्ति अरुंधतीच्या तोंडीं पुढीलप्रमाणें आली आहे. ही वसिष्ठाला सोडून कुठेंहि नसते, त्याला केव्हांहि विरोध करीत नाहीं (म. अनु. १४२. ३९ कुं.). कमळ चोरण्याबद्दल शपथ घेण्याच्या प्रसंगीं हिनें कमळ न चोरल्याबद्दल शपथ घेतली आहे (म. अनु. १४३.३८ कुं.). तसेंच ऋषींनीं हिला धर्मरहस्य विचारलें असतां श्रद्धा, आतिथ्य व गोशृंगस्नान यांचें माहात्म्य हीं वर्णन केल्याची जुनी कथा भीष्मानें धर्माला सांगितली आहे (म. अनु. १९३. १-११ कुं.). ही फारच तपस्वी आणि नवऱ्याची सेवा करणारी होती. त्यामुळें अग्निपत्नी स्वाहेला इतर सहाहि ऋषिपत्न्यांची रूपें घेतां आलीं, पण हिचें रूप घेतां आलें नाहीं (म. व. २७७. १६ कुं). एकदां हिला बदरपाचनतीर्थावर ठेवून सप्तर्षि हिमालयांत फलमूलें आणण्याकरितां गेले असतां बारा वर्षे अवर्षण पडलें. तेव्हां सर्व ऋषि तिकडेच वसती करून राहिले. इकडे अरुंधतीच्या कडक तपश्चर्येची परीक्षा पाहण्याकरितां शंकर ब्राह्मणाचा वेष घेऊन भिक्षा मागण्यास आला. तेव्हां हिच्या जवळ कांहींच नसल्यामुळें हिनें कांहीं (लोखंडी) बोरें दिलीं. ब्राह्मणानें ती शिजविण्यास सांगितलीं असतां हिनें तीं अग्नीवर शिजत ठेविलीं व त्या ब्राह्मणाशीं अनेक विषयांवर बोलण्यास सुरुवात केली. बोलणें चालू असतां बारा वर्षे केव्हां निघून गेलीं, याचा पत्ताहि लागला नाहीं. हिमालयांतील ऋषीहि फळेंमुळें घेऊन परत आले. तेव्हां शंकरानें प्रगट होऊन अरुंधतीची कडक तपश्चर्या त्यांस कथन केली व हिच्या इच्छेप्रमाणें तें तीर्थ पवित्र म्हणून प्रसिद्ध होण्याचा वर दिला (म. श. ४८). हिचा आकाशांत सप्तर्षींमध्यें वसिष्ठाच्या शेजारीं उदय होतो. हिचा पुत्र शक्ति (ब्रह्मांड. ३. ८.८६-८७).

३ दक्ष व असिक्नी यांची कन्या व धर्माच्या दहा स्त्रियांतील एक (दक्ष व धर्म पहा).

**अरुपोषण**—(सो.) भविष्यमतें मिहिरार्थीचा पुत्र. यानें ३८००० वर्षे राज्य केलें.

**अरूरु**—अनायुषेचा पुत्र. याचा पुत्र धुंधु.

**अरूपा**—कश्यप व प्राधा यांची कन्या.

**अर्क**—(सो. नील.) पुरुजाचा पुत्र.

२ रामसेनेंतील एक वानर (वा. रा. यु. ४).

३ आठ वसूंपैकीं एक (भा. ६. ६.११).

**अर्कपर्ण**—कश्यप व मुनि यांच्या पुत्रांतील एक. याचें तृणप असें नामांतर आहे.

**अर्कसावर्णि**—नववा मनु (मनु पहा).

**अर्केष्टिमन्**—(सो.) भविष्यमतें वैकर्तनाचा पुत्र. यानें ४१०० वर्षे राज्य केलें.

**अर्गल काहोडी**—एक आचार्य ( क. सं. २५.७).

**अर्चत् हैरण्यस्तूप**—मंत्रद्रष्टा ( ऋ. १०. १४९ ).

**अर्चनानस् आत्रेय**—सूक्तद्रष्टा (ऋ. ५. ६३; ६४; ८. ४२ ). याला मित्रावरुणांनीं मदत केली ( ऋ. ५. ६४.७). शावाश्वाबरोबर अथर्ववेदांत याचा उल्लेख आहे (अ. वे. १८. ३. १५ ). पण शावाश्वाचा हा बाप होता ( पं. ब्रा. ८. ५. ९; श्यावाश्व पहा ).

**अर्चि**—(स्वा. उत्तान.) वेनराजाच्या देहमंथनांतून मिथुन उत्पन्न झालें, त्यांतील स्त्री. हीच त्या मिथुनांतील पुरुष जो पृथुराजा त्याची स्त्री झाली. ही लक्ष्मीचा अवतार होय ( भा. ४. १५. ५; पृथु पहा ).

२ कृशाश्व ऋषीच्या दोन स्त्रियांतील एक; व धूम्रकेश ऋषीची माता ( भा. ६. ६. २० ).

३ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील देव.

**अर्चिमालि**—सीताशुद्धीसाठीं पश्चिमेकडे गेलेल्या वानरांतील एक ( वा. रा. कि. ४२).

**अर्चिष्मत्**—दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

**अर्चिष्मती**—बृहस्पतीची दुसरी स्त्री शुभा, तिच्या सात कन्यांतील एक.

**अर्चिसन**—अत्रिगोत्री मंत्रकार. याला अर्वस्वन व अर्वसन अशीं नामांतरें होतीं.

**अर्जव**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें बाष्कलि भरद्वाजाचा शिष्य. वायुमतें अर्यव असा पाठ आहे ( व्यास पहा ).

**अर्जुन**—( सो. पूरु. ) कुन्तीला दुर्वासानें दिलेल्या इंद्र-मंत्रप्रभावानें झालेला मुलगा. हा कुन्तीचा तिसरा मुलगा. हा जन्मतांच याचा पराक्रम सांगणारी आकाशवाणी झाली ( म. आ. १२३ ). हा प्रत्यक्ष इंद्रापासूनच झाला (मार्क. ५). हा उत्तराफाल्गुनीसह पूर्वाफाल्गुनी नक्षत्र असतां, फाल्गुन महिन्यांत झाला म्हणून याचें नांव फाल्गुन पडलें ( म. आ. १३२. १७ कुं.). याचा जन्म हिमालयाच्या शतशृंग नांवाच्या भागावर झाला. पांडूच्या मृत्यूनंतर याचे उपनयनादि संस्कार हस्तिनापुरांत झाले (आ. १२८). वसुदेवानें कश्यप नांवाचा ब्राह्मण मुद्दाम पाठविला व त्यानें शतशृंगावरच याचे सर्व संस्कार केले ( म. आ. १३३. ४६ कुं. ).

सर्वच कौरवपांडवांनीं शस्त्रास्त्रविद्येचें शिक्षण द्रोणापासून घेतलें असलें, तरी विशेष नैपुण्यामुळें द्रोणाचें प्रेम याच्यावर फार होतें. अर्जुनाची अभ्यासांतील दक्षताहि वाखाणण्यासारखी असे. द्रोण सर्व शिष्यांना पाणी भरण्याकरितां लहानलहान भांडीं देऊन आपल्या मुलाचा वेळ जाऊं नये म्हणून अश्वत्थाम्याला मात्र मोठें भांडें देत असे. ही गोष्ट अर्जुनाच्याच प्रथम ध्यानांत आली व यानें युक्तीनें अश्वत्थाम्याबरोबर येण्याचा क्रम ठेवला. त्यामुळें हा इतरांच्या पुढें गेला. पण अश्वत्थाम्याच्याहि मागें राहिला नाहीं. एकदां हा जेवणास बसला असतां वाऱ्यानें दिवा गेला. पण अंधारांतहि न चुकतां अर्जुनानें जेवण व्यवस्थित पार पडलें. तेव्हां अर्जुनानें तर्क केला कीं, अंधारांतहि न चुकतां तोंडांतच घास जाण्याचें कारण दृढाभ्यास होय. लागलीच यानें अंधारांतहि लक्ष्यवेधाचा दृढाभ्यास करण्यास सुरवात केली. व हा धनुर्विद्येंत अत्यंत निष्णात झाला. द्रोणालाहि याचा अभिमान वाटून अर्जुनाचा पराजय करणारा कोणी असूं नये म्हणून त्यानें आपल्या एकलव्य नांवाच्या शिष्याचा उजव्या हाताचा अंगठा कपटानें मागून घेतला. इतक्या गुरुकृपेचा स्वाभाविक परिणाम असा झाला कीं, हा रथी व महारथी यांच्यांत पुढारीपणा घेऊन लढणारा म्हणून याची ख्याति झाली.

एकदां परीक्षा पाहण्याकरितां द्रोणानें झाडावर ठेवलेल्या एका खुणेवर लक्ष्यवेध करण्यास याला सांगितलें व प्रत्येकास विचारिलें असतां अर्जुनानेंच फक्त मला लक्ष्याच्या मस्तकाखेरीज कांहीं दिसत नाहीं असें सांगितलें. तेव्हां द्रोणाची यावर फारच मर्जी बसली. एकदां द्रोण गंगेवर गेला असतां तेथें त्यास सुसरीनें धरलें. तेव्हांहि इतर शिष्य दिङ्मूढ झाले असतां अर्जुनानेंच पांच बाण मारून द्रोणाची सुसरीपासून सुटका केली. द्रोणाचार्यानें शिष्यांच्या केलेल्या परीक्षेंत अर्जुन पहिला ठरल्यामुळें ब्रह्मशिर नांवाचें उत्कृष्ट अस्त्र त्यानें अर्जुनाला दिलें ( म. आ. १४३ ). व हें अस्त्र माणसावर सोडूं नको असें सांगितलें ( म. आ. १५१. १२-१३ कुं. ). एकदां द्रोणानें आपल्या सर्व शिष्यांचें शस्त्रास्त्रनैपुण्य दाखविण्याकरितां एक मोठा समारंभ केला. त्या वेळीं अर्जुनानें लागोपाठ पांच बाण असे सोडले कीं, ते एक बाणासारखे दिसावेत. एका लोंबत्या व हलणाऱ्या शिंगांत एकवीस बाण भरणें वगैरे प्रयोग करून दाखविले व सर्वांकडून वाहवा मिळविली. पण हें कर्णाला सहन झालें नाहीं. त्यानें अर्जुनानें केलेले सर्व प्रयोग करून दाखविले व अर्जुनाशीं द्वंद्वयुद्ध करण्याची इच्छा प्रदर्शित केली. तेव्हां अर्जुनानें आगंतुक म्हणून त्याची चेष्टा केली. तथापि द्रोणाच्या इच्छेनुसार हा युद्धाला सज्ज झाला. तूं राजकुलीन नसल्यामुळें तुझ्याशीं राजपुत्र अर्जुन युद्ध करणार नाहीं असें कृपानें सांगितलें. तेव्हां दुर्योधनानें कर्णाला अंगदेशाचा राजा करून अभिषेक करविला. युद्धाची भाषा सुरू केली. पण या गडबडींतच तो प्रसंग उधळला (म. आ. १४७ कुं ). पुढें द्रोणानें गुरुदक्षिणा म्हणून द्रुपदाला जिवंत धरून आणण्यास सांगितलें असतां फक्त अर्जुनाला तें काम करतां आलें. म. आ. १४८ कुं.). अर्जुनानें पुढें सौवीराधिपति दत्तामित्र या

नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या सुमित्राला जिंकलें. तसेंच वीर पांडूला जिंकतां न आलेल्या विपुलाला जिंकलें. तसेंच पूर्व आणि दक्षिण दिशा जिंकल्या. कांहीं प्रतींत तर अर्जुनानें पंधराव्या वर्षी दिग्विजय केला असें म्हटलें आहे ( म. आ. १५१. ४४-५० कुं. ). पांडवांचा सर्वत्र बोलबाला होण्यास अर्जुनाच्या पराक्रमाचा फारच उपयोग झाला. पुढें जतुगृहांतून सुटका झाल्यावर सर्व पांडव ब्राह्मणवेषानें द्रौपदीस्वयंवरास गेले. वाटेंत रात्रीं अंगारपर्ण गंधर्वानें यांना अडविल्यामुळें अर्जुनाचें व त्याचें युद्ध झालें. अर्जुनानें अंगारपर्णाचा पराजय केला. अंगारपर्णानें अर्जुनाला चाक्षुषीविद्या दिली व अर्जुनानें त्याला अग्न्यस्त्र दिलें व दोघांची मैत्री झाली ( अंगारपर्ण पहा ). पांचालनगरांत अर्जुनानें द्रौपदीच्या स्वयंवरार्थ लावलेला मत्स्ययंत्रभेदनाचा पण जिंकला; व द्रौपदीनें अर्जुनाला वरलें ( म. आ. १८८ ). पुढें धृतराष्ट्रानें विदुराला पाठवून पांडवांना हस्तिनापुरी आणविलें. तेथें एकदां आयुधागारांत युधिष्ठिर व द्रौपदी एकान्तांत असतां अर्जुनाला तेथें जाणें भाग पडलें. कारण, ब्राह्मणांच्या यज्ञीय धेनु चोरीस गेल्या म्हणून ते राजाला कळविण्यास आले होते. अर्जुनानें त्यांना भिऊं नका असे आश्वासन देऊन आयुधागारांतून शस्त्रें घेऊन गाई परत आणून दिल्या व हा युधिष्ठिर व द्रौपदी यांना एकान्तांत पाहिलें म्हणून पूर्वी ठरल्याप्रमाणें बारा महिने तीर्थाटनास गेला ( म. आ. २१३ ). पुढें अर्जुन फिरत असतां कौरव्य नागाच्या नागाच्या उलुपी नामक कन्येशीं पातालांत यानें विवाह केला ( म. आ. २१४ ). नंतर हा हिमालयावर गेला. तेथून बिंदुतीर्थावर गेला. तेथून पूर्वेकडे वळून उत्पलिनी नदी, नंदा, अपरनंदा, कौशिकी, महानदी, गया व गंगा हीं तीर्थे यानें पाहिलीं. तेथून अंग, वंग व कलिंग देश पाहून समुद्राकडे वळला. महेंद्रपर्वतावरून मणिपूरच्या राज्यांत शिरला. मणिपूरच्या राजाचें नांव चित्रवाहन होतें. त्याची चित्रांगदा नांवाची एक सुंदर कन्या होती. तिला अर्जुनानें मागणी घातली. राजानें मुलीचा मुलगा आपणांस मिळावा या अटीवर यास कन्या दिली. अर्जुन मणिपूरला तीन वर्षें राहिला. तेवढ्या अवधींत चित्रांगदेला एक मुलगा झाला. त्याचें नांव बभ्रुवाहन होय. तेथून पुढें सुसरीच्या त्रासानें सर्वांनीं सोडलेलीं पांच तीर्थें होतीं. त्यांपैकीं सौभद्रतीर्थावर अर्जुन प्रथम गेला व तेथें शापानें सुसरी झालेल्या अप्सरांचा उद्धार करून हा पुनः मणिपुरास आला व तेथें चित्रांगदा व बभ्रुवाहन यांना भेटून गोकर्णाला गेला. तेथून प्रभासक्षेत्रीं गेल्यावर तेथें कृष्णार्जुनांची भेट झाली. तेथून रैवतक पर्वत व द्वारकेस जाऊन पुढें कृष्णाच्या साहाय्यानें सुभद्रेला पळविण्याचें ठरलें; व या मसलतीस धर्मराजाची संमति मिळविण्यांत आली. मृगयामिषानें बाहेर पडलेल्या अर्जुनानें रैवतक पर्वतावरील देवतांचें दर्शन करून प्रदक्षिणा करून द्वारकेस परत फिरणाऱ्या सुभद्रेला आपल्या रथांत घेतलें व तेथून पलायन केलें. पण कृष्णानें अर्जुनाची तरफदारी करून बलरामाकडून अर्जुनास बोलावून आणून थाटानें विवाह करविला. सुमारें एक वर्ष तेथें राहून बाकीचे दिवस पुष्करतीर्थी घालविले. पण लोकप्रसिद्ध असणारी पुढील हकीकतहि कांहीं ठिकाणीं आहे. अर्जुनाला दुर्योधनाशीं होणाऱ्या सुभद्रेच्या लग्नाची बातमी प्रभासक्षेत्रीं कळली. तेव्हां यानें तिला मिळविण्याकरितां त्रिदण्डी संन्यास घेऊन द्वारकेंत चातुर्मास करण्याचें ठरविलें. तेथें याचा लोकांत अत्यंत बोलबाला झाला. तेव्हां बलरामानेंहि याला आपल्या घरीं भोजनास बोलावलें. सरळ प्रकृतीच्या बलरामाला अर्जुनाची ओळख कुठली पटणार? तेथें सुभद्रेची व अर्जुनाची प्रत्यक्ष दृष्टिभेट होऊन पुढें यात्रेकरितां गांवच्या बाहेर पडलेल्या सुभद्रेला अर्जुनानें रथांत घेऊन पळविलें व विरोधकांना चांगलाच हात दाखविला. अर्जुनाच्या त्रिदंडी संन्यासाची कथा भागवत व महाभारताच्या कुंभकोणम् प्रतींतच फक्त आहे (भा. १०. ८६; म. आ. २३८. ४. कुं. ). स्कंदपुराणांतहि अर्जुनाच्या तीर्थयात्रेचा उल्लेख असून नारदानें अर्जुनाला अनेक क्षेत्रांचें माहात्म्य कथन केलें आहे ( स्कंद. १. २. १. ५ ).

अर्जुनाला अनेकांकडून वेगवेगळ्या वस्तु मिळाल्याचा उल्लेख आहे. मयानें बिंदुसरावरून उत्तम आवाज करणारा देवदत्त नांवाचा वारुण महाशंख अर्जुनाला दिला ( म. स. ३. ९; २२ कुं. ). तसेंच अग्नीला खांडववन भक्षण करण्यास दिल्यामुळें अग्नीनें अर्जुनाला गांडीव धनुष्य, दोन अक्षय्य भाते, कपिध्वज असलेला पांढऱ्या घोड्याचा रथ इतक्या वस्तु दिल्या. ( म. आ. ६१. ४९-५०; २५१ कुं. ). या सर्व वस्तु अग्नीनें वरुणापासून मिळविल्या व वरुणानें सोमापासून मिळविल्या होत्या.

अर्जुन हा जरी इंद्रांशानें झालेला होता, तरी खांडवदाहाच्या वेळीं पाऊस पाडून विरोध केल्यामुळें इंद्राशीं अर्जुनाचें युद्ध झालें व त्यांत इंद्राला माघार घ्यावी लागली ( म. आ. २५३ कुं. ). पुढें इंद्रानें याला कवचकुंडलें दिलीं ( म. व. १७६. ४. कुं. ).

वनवासापूर्वी राजसूयाच्या वेळीं केलेल्या दिग्विजयाची कल्पना पुढील माहितीवरून येईल. प्रथम कुलिंद देशाच्या राजाला जिंकलें. आनर्त व कालकूट या देशांवर वर्चस्व स्थापून सुमंडलराजाचा पराजय केला. पुढें सुमंडलाला बरोबर घेऊन शाकलद्वीप व प्रतिविंध्य यांवर चालून गेला. त्या वेळीं शाकलद्वीपांतील व सप्तद्वीपांतील सर्व राजांना अर्जुनानें जिंकलें. व त्यांच्यासह प्राग्ज्योतिष देशावर अर्जुनानें

स्वारी केली. तेथें भगदत्ताशीं अर्जुनाचें आठ दिवस भयंकर युद्ध झालें. शेवटीं भगदत्तानें खंडणी देण्याचें कबूल केल्यावर अर्जुनानें कुबेराच्या प्रदेशावर स्वारी केली. तेथील सर्व राजांकडून खंडणी घेऊन उलूक देशावर स्वारी केली. उलूक देशाच्या राजाचें नांव बृहन्त असें होतें. त्याला युद्धांत पराभूत करून त्यापासून खंडणी घेऊन त्यासह सेनाबिंदूवर चाल करून गेला व त्याला राज्यावरून पदच्युत केलें. नंतर मोदापूर, नामदेव, सुदामन आणि उत्तर उलूक येथील राजांना एकत्र करून त्यांच्यापासून खंडणी वसूल केली. नंतर पंचगण देशाला जिंकून सेनाबिंदूच्या देवप्रस्थ नगराला गेला. तेथून यानें राजा पौरव विश्वगश्वावर चाल केली. त्याला जिंकून पर्वतांत राहणाऱ्या सांत उत्सवसंकेत गणांना जिंकलें. पुढें काश्मीरांतील वीरांना जिंकलें व दहा मांडलिकांसह लोहिताला जिंकलें. त्रिगर्त, दार्व व कोकनद यांच्याकडून करभार घेऊन अभिसारी नगरी जिंकली. उरगा नगरींतील रोचमानाला जिंकलें. चित्रायुधाचें सिंहपूर नगर उडविलें. पुढें सुह्म व चोल देश उध्वस्त करून बाल्हीक देशांत शिरला. तो देश जिंकून कांबोज व दरद देश हस्तगत केले. उत्तरेकडील दस्यूंना ताब्यांत घेऊन पुढें लोह, परमकांबोज, व उत्तर ऋषिक यांना अर्जुनानें जिंकलें. ऋषिक देशांत भयंकर युद्ध करावें लागलें. पण शेवटीं जय होऊन मयूरवर्ण व शुकोदरवर्ण घोडे खंडणीदाखल मिळाले. अशा प्रकारें निष्कुटासह हिमालय जिंकून अर्जुन श्वेत पर्वतावर येऊन राहिला (म. स. २७). तेथून किंपुरुषावास देशावर स्वारी करून राजा द्रुमपुत्रापासून करभार वसूल केला. हाटक देशांत जाऊन गुह्यकाकडून सामानेंच कर घेतला. मानससरोवरावरील ऋषींनीं काढलेले कालवे पाहिले. गंधर्वांच्या देशावर चाल करून तित्तिरिकल्माष व मंडूक या नांवाचे उत्तम अश्व खंडणीदाखल मिळविले. पुढें हरिवर्षावर चालून जात असतां द्वारपालानें यास अडविलें व येथेंच दिग्विजय थांबविण्यास सांगितलें. कारण ह्या उत्तर कुरु देशांत सर्वच अदृश्य आहे. तेव्हां अर्जुनहि पुढें न जातां धर्मराजाच्या सत्तेला मान्यता घेऊन परत फिरला व इंद्रप्रस्थास येऊन दाखल झाला (म. स. २८).

वनवासांत पाशुपतास्त्र–प्राप्तीकरितां इंद्रकील पर्वतावर अर्जुनानें तपश्चर्या केली व शंकराला प्रसन्न करून घेतलें. किरातवेषानें आलेल्या शंकराशीं यानें मूकवधावरून युद्ध केलें व शेवटीं त्याच्या कडून पाशुपतास्त्र मिळविलें. पाशुपतास्त्राचें रहस्यपूर्वक ज्ञान हा शंकरापासून शिकला (म. व. ३७-४० कुं.). इतर देवांनींहि अर्जुनाला अनेक अस्त्रें दिलीं (म. व. ४१ कुं.). नंतर इंद्राच्या बोलावण्यावरून त्यानें पाठविलेल्या रथांत बसून अर्जुन स्वर्गीं गेला. तेथें इंद्रानें अर्जुनाचा फारच सन्मान करून आपल्या अर्धासनावर यास जागा दिली. तेथें अर्जुनानें अनेक अस्त्रांचें शिक्षण घेतलें. अशा तऱ्हेनें अर्जुनाचीं पांच वर्षें स्वर्गांत गेलीं. इंद्राच्या सांगण्यावरून वाद्य वाजविणें, नृत्य करणें व गाणें वगैरे कलांचेंहि अर्जुनानें शिक्षण घेतलें. चित्ररथ गंधर्वाचा अर्जुनाला त्या कामीं फार उपयोग झाला (म. व. ४३. ३९ कुं.). एकदां अर्जुनाजवळ उर्वशीनें संभोगयाचना केली. पण अर्जुनानें तिला नकार दिला, त्यामुळें संतापून तिनें अर्जुनाला षण्ढ हो म्हणून शाप दिला. पण इंद्रानें अज्ञातवासांत असतां एक वर्षपर्यंत तूं षण्ढ होशील व या शापाचा तुला उपयोगच होईल असें सांगितलें (म. व. ४४). व लोमशाच्या द्वारा अर्जुनाचा समाचारहि इतर पाण्डवांना कळविला. पुढें अर्जुन आपल्या बंधूंत आल्यावर लवकरच अज्ञातवासाची वेळ आली. अज्ञातवासाकरतां विराट् नगरापाशीं द्रौपदीला खांद्यावर घेऊन जाण्याचें काम अर्जुनानें केलें (म. वि. ६ कुं.).

अज्ञातवासांत अर्जुनानें बृहन्नला असें नांव व षंढवेष स्वीकारला व द्रौपदीची परिचारिका होतें, असें सांगून उत्तरेला नृत्यगीतादि शिकविण्याची कामगिरी मिळविली. पुढें विराटादि सर्व मंडळी दक्षिणगोग्रहणांत गुंतली असतां दुर्योधनादिकांनीं उत्तरगोग्रहण केलें. राजवाड्यांत एकटा भूमिंजय (उत्तर)च होता. त्याला सारथि नव्हता. बृहन्नला सारथ्य करील असें समजल्यावर ही स्वारी युद्धास निघाली. पण ऐन वेळीं उत्तराची गाळण उडालीच. तो रथांतून उडी टाकून पळूं लागला. बृहन्नलेनें त्याची समजूत घालून स्वतः युद्ध करण्याचें ठरविलें व शमीवृक्षावरील आयुधें आणून उत्तराला आपली ओळख दिली. व निकरानें युद्ध करून गाई परत फिरवितांना कर्णास पळावयास लावून त्याच्या भावास ठार केलें (म. वि.५४). याबद्दल विराटानें अर्जुनाला सत्कार म्हणून उत्तरा देऊं केली, पण अर्जुनानें तिचा अभिमन्यूकरितां स्वीकार केला (म. वि. ७२).

भारतीय युद्धाची तयारी चालू असतां दुर्योधन कृष्णाचें साहाय्य मिळविण्याकरतां द्वारकेस गेला. अर्जुनहि तेथें येऊन दाखल झाला. दुर्योधन उशाशीं बसला व अर्जुन नम्रपणें पायाशीं बसला. उठल्याबरोबर प्रथम अर्जुन दिसला म्हणून व लहान म्हणून कृष्णानें याला मागणी मागावयास सांगितली. कृष्णानें दहा कोटि गोपालांचें नारायण नांवाचें सैन्य व निःशस्त्र असा आपण स्वतः असे दोन भाग करून जो पाहिजे तो भाग मागावयास सांगितलें. तेव्हां अर्जुनानें कृष्ण मागून घेतला व दुर्योधनानें आपल्याकडे हजारों सैनिक आले म्हणून समाधान मानलें (म. उ. ७). कृष्ण शिष्टाईला निघाला तेव्हां यानें कृष्णानें योग्य तें ठरवावें असें सुचविलें (म. उ. ७८).

भारतीय युद्धाचे प्रारंभीं अर्जुनाला युद्धाचा होणारा परिणाम दिसूं लागून आपण भलतेंच कृत्य करण्यास प्रवृत्त झालों आहों, असें यास वाटलें व हा युद्धापासून निवृत्त होऊं लागला. पण कृष्णानें याला कर्तव्यच्युत होण्यापासून परावृत्त केलें. तीच भगवद्गीता होय ( म. भी. २५–४२ ). युद्धाचे प्रारंभींच भीष्मार्जुनांचें युद्ध सुरू झालें. तिसऱ्या दिवशीं तर असें वाटूं लागलें कीं, भीष्म पांडवांना शिल्लक ठेवीत नाहीं. पण कृष्णानें प्रतिज्ञा मोडूनहि हातांत चक्र धरलें व अर्जुनानेंहि जोर केला. तिसऱ्या दिवसाच्या शेवटीं कौरवांची यानें फारच हानि केली. नवव्या दिवशीं अर्जुनाचें द्रोणाशीं युद्ध झालें. भीष्माशींहि कडाक्याचें युद्ध झालें. संध्याकाळ झाल्यामुळें युद्ध थांबविण्यांत आलें. पण भीष्मापुढें कोणाचें कांहीं चालेना, म्हणून सर्व हवालदील झाले व धर्म व कृष्ण यांनीं विचारानें भीष्मालाच स्वतःचा वध कसा करावा याविषयीं सल्ला विचारण्याचें ठरविलें. भीष्मानेंहि सरळपणें शिखंडीला पुढें करून अर्जुन माझ्याशीं लढल्यास माझा वध करितां येईल असें सांगितलें. कारण अभद्र ध्वजाच्या व एकदां स्त्री असलेल्या शिखंडीसारख्यावर भीष्म आपल्या नियमाप्रमाणें शस्त्र चालवीत नसे. दहाव्या दिवशीं शिखंडीला भीष्मावर सोडून अर्जुनानें कौरवांच्या सैन्याची दाणादाण उडविली. कौरवांनीं पांडवांना अडविण्याची कमाल केली, पण कांहीं एक उपयोग झाला नाहीं. अर्जुनानें शिखंडीच्या आडून बाण टाकून भीष्माला खालीं पाडलें. हजारों बाण ज्याच्या शरीरांत रुतले आहेत, असा भीष्म वीरोचित शय्येवर पडला असतां त्याची मान लोंबूं लागली म्हणून त्यानें उशी मागितली. इतरांनीं मऊ उशा दिल्या, पण अर्जुनानें मात्र भीष्माच्या वीरशय्येला उचित अशी तीन बाणांनीं उशी तयार करून भीष्माला प्रसन्न केलें. त्याचप्रमाणें पाणी मागितलें असतां इतरांनीं पाणी आणून दिलें, पण तें न स्वीकारतां अर्जुनानें भूमींत बाण मारून उत्पन्न केलेलें पाणी भीष्मानें स्वीकारलें (म. भी. १२१). याशिवाय युद्धांत शत्रूला मारूं किंवा मरूं अशा प्रतिज्ञेनें बाहेर पडलेल्या त्रिगर्त देशाचा राजा सत्यरथ, सत्यवर्मा, सत्यव्रत, सत्येषु आणि सत्यकर्मा व प्रस्थलाधिपति सुशर्मा, मावेल्लक, ललित्थ व मद्रक इत्यादिकांना अर्जुनानें परलोक दाखविला ( म. द्रो. १७; क. १८; ४८; ५५ ). नंतर अर्जुनानें हत्तीच्या सहाय्यानें लढणाऱ्या भगदत्ताला पापण्याचा पट्टा तोडून ठार केलें. भगदत्तानें एकदां अर्जुनावर प्राणघातक अंकुश फेकला. पण कृष्णानें मध्यें पडून तो आपल्या छातीवर घेतला व अर्जुनाला वांचविलें ( म. द्रो. २९ ). जयद्रथानें अभिमन्यूला मेल्यावर लाथ मारल्यामुळें अर्जुनानें दुसऱ्या दिवशीं सूर्यास्तापूर्वी त्याला ठार मारण्याची प्रतिज्ञा केली. रात्रीं स्वप्नांत येऊन याला शंकरानें धीर देऊन पुनः पाशुपतास्त्र दिलें (म. द्रो. ८१). अर्जुनाच्या अंगांत वीरश्रीचा संचार झाला. व यानें दुःशासनदुर्योधनादिकांचा अनेक वेळां पराभव केला. कर्णास पळावयास लावलें. अम्बष्ट, श्रुतायुस् व अश्रुतायुस् यांचा वध केला ( म. द्रो. ९२ कुं. ).

अशा रीतीचें तुंबळ युद्ध चालूं असतां सूर्यास्त होण्यापूर्वी अर्जुनानें जयद्रथाचें मुंडकें उडविलें ( म. द्रो. १४६ ). पुढें कर्णानें धर्मराजाचा पराभव केल्यामुळें कर्णाविषयीं धर्माच्या मनांत फारच द्वेष उत्पन्न झाला. पण कर्णापुढें तर कोणाचें कांहीं चालेना. तेव्हां धर्मानें अर्जुनाची निर्भर्त्सना करून कर्णवध करण्याची शक्ति नसेल, तर गांडीव दुसऱ्याला देऊन टाकण्याविषयीं याला सांगितलें व कर्णवध न करतां रणांतून परत आल्याबद्दल दोष दिला. तेव्हां हा पूर्वप्रतिज्ञेप्रमाणें गाण्डीव दुसऱ्याला दे म्हणून सांगणाऱ्या धर्माचा वध करण्याकरितां त्यावर खड्ग घेऊन धांवला असतां कृष्णानें धर्माधर्मांतील मर्म सांगून धर्माला अहो म्हणण्याच्या ऐवजीं अरे म्हणून अपमानणें हा त्याचा वध होय असें सांगितलें. त्याप्रमाणें अर्जुनानें धर्मराजाचा कुत्सित बोलून खूप पाणउतारा केला. शेवटीं असें करण्याचें कारण सांगून हा कर्णवधाच्या उद्योगाला लागला. कृष्ण तर याला सारखें उत्तेजन देतच होता. कर्णार्जुनाचें तुंबळ युद्ध सुरू झालें. अर्जुनानें कर्णाला घायाळ करून एकदां बेशुद्धहि पाडलें व बाणावर बसून आलेल्या तक्षकाला ठार केलें. पण युद्धाच्या ऐन भरांत कर्णाच्या रथाचें चाक पृथ्वीनें गिळलें. कर्णानें रथाखालीं उडी टाकून चाक उचलण्याचा प्रयत्न केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. धर्मयुद्ध म्हणून अर्जुनाला जरा थांबण्याचाहि त्यानें उपदेश केला. पण त्याचाहि कांहीं उपयोग न होतां अर्जुनानें कर्णाचें मस्तक उडविलें ( म. क. ९१ ). दुर्योधनाच्या मृत्यूनंतर त्याच्या शिबिरांत सर्व आले. तेव्हां अनेक अस्त्रप्रयोगांनीं पूर्वींच दग्ध पण कृष्णाच्या सामर्थ्यानें सुरक्षित राहिलेला अर्जुनाचा रथ कृष्णार्जुन खालीं उतरल्याबरोबर आपोआप जळून खाक झाला ( म. श. ६२ ). पुढें अश्वत्थाम्यानें चिडून रात्रीं ब्रह्मास्त्राचा प्रयोग केला व सर्वांना जाळावयास सुरवात केली. तेव्हां त्याचा परिहार करण्याकरतां अर्जुनानेंहि ब्रह्मास्त्राचा प्रयोग केला. पण तें या लोकांना त्रास देणारें म्हणून परतहि घेतलें ( म. सौ. १५ ). भारतीय युद्धांत अर्जुनाचा सारथि जरी कृष्ण होता ( म. उ. ७. ३९ ). तरी पूरु नांवाचा एक अर्जुनाचा नेहमींचा सारथि होता ( म. स. ३३ ).

युधिष्ठिरानें अश्वमेधाचा घोडा सोडला तेव्हां त्याचे संरक्षणार्थ अर्जुनाची योजना करण्यांत आली होती. अर्जुन प्रथम अश्वाच्या मागोमाग उत्तर दिशेकडे गेला. वाटेंत अनेक लहानमोठीं युद्धें

झाली. त्यांपैकीं महत्त्वाचीं तेवढीं महाभारतांत दिलीं आहेत. त्रिगर्तांचा राजा सूर्यवर्मा, तसाच त्यांचा भाऊ केतुवर्मा व धृतवर्मा यांना अर्जुनानें पराभूत केलें. प्राग्ज्योतिषपुराचा राजा भगदत्तपुत्र यज्ञदत्ताला चांगला हात दाखविला. नंतर हा सिंधुदेशांत गेला. सिंधुराजा जयद्रथाला मारल्यामुळें तेथील लोकांत अर्जुनाबद्दल त्वेष जागृत होता. त्यांनीं जोराचा हल्ला केला, तेव्हां अर्जुनाचे हातून गाण्डीव गळून पडलें. पण पुनः जोरानें यानें युद्ध सुरू केलें. हा आला आहे, ह्या बातमीनें जयद्रथपुत्र सुरथ मृत्यु पावला. पण जयद्रथाची बायको म्हणजे दुर्योधनाची भगिनी दुःशला आपल्या नातवाला घेऊन अर्जुनाकडे आली, तिनें याला शरण जाऊन युद्धापासून परावृत्त केलें. नंतर अर्जुन मणलूर देशांत गेला. तेव्हां याचा पुत्र बभ्रुवाहन याला अनेक लोकांसह सामोरा आला. पण अर्जुनानें क्षत्रियोचित वर्तन न केल्यामुळें त्याची निर्भर्त्सना केली. पाताळांतून उलूपी तेथें आली व तिनेंहि सवतीच्या मुलाला युद्धाविषयीं प्रोत्साहन दिलें. बभ्रुवाहनानें घनघोर युद्धाला सुरुवात करून अर्जुनाला मूर्च्छित पाडलें व आपणहि मूर्च्छित पडला. त्याची आई चित्रांगदा रणांत येऊन तिनें नवरा आणि पुत्र यांकरितां अत्यंत विलाप केला. बभ्रुवाहनानें प्रायोपवेशन केलें. तेव्हां उलूपीला सर्वांनीं दोष दिल्यामुळें केवळ स्मरणानें प्राप्त होणाऱ्या संजीवनमणीनें तिनें अर्जुनाला जागृत केलें. अजिंक्य असणाऱ्या अर्जुनाचा पराभव शिखण्डीला पुढें करून भीष्माला मारिल्यामुळें बभ्रुवाहनाला करितां आला. पुढें अर्जुन मगध देशांत गेला व तेथें जरासंधपौत्र मेघसंधीचा यानें पराजय केला. नंतर वंग, पुण्ड्र व केरल देश जिंकून दक्षिणेकडे वळला व चेदी देशावर स्वारी केली. तेथें शिशुपालपुत्र शरभाकडून सत्कार घेऊन काशि, अंग, कोसल, किरात व तङ्गण या देशांतून उलटून दशार्ण देशांत गेला. तेथें चित्रांगदाला युद्ध खेळून ताब्यांत घेतलें. निषादराज एकलव्याच्या देशांत गेला. तेथें एकलव्याच्या मुलाशीं युद्ध खेळून त्याला जिंकलें. पुनः दक्षिणेकडे येऊन द्रविड, आन्ध्र, रौद्र, माहिषक व कोल्लगिरेय यांना सहज जिंकून सुराष्ट्राच्या आसपास गेला. तेथून गोकर्ण, प्रभास, द्वारका या भागांतून समुद्राच्या कांठानें पंचनद देशांत गेला. तेथून गांधारांत गेला. गांधारांत शकुनिपुत्राशीं तुंबळ युद्ध झालें. व शकुनिपुत्राच्या सेनेचा संहार केला. तेव्हां आपल्याहि मुलाची हीच दशा होईल हें जाणून शकुनीच्या बायकोनें अर्जुनाला युद्धापासून निवृत्त केलें. अशा प्रकारें थाटानें अश्वाच्या मागोमाग दिग्विजय करून अर्जुन परत हस्तिनापुराला निघाला. त्या वेळीं माघी पौर्णिमा होती व यज्ञ चैत्री पौर्णिमेच्या सुमाराला व्हावयाचा होता. त्याकरितां अर्जुनानें सर्वांना आमंत्रणहि केलें होतें (म. आश्व. ७२–८६ कुं.). युधिष्ठिराला अर्जुन येण्याची बातमी प्रथम हेराकडून कळली. नंतर अर्जुनाच्या शरीरस्वास्थ्याबद्दल त्यानें कृष्णापाशीं विशेषच चौकशी केली. (म. आश्व. ८८ कुं.). अर्जुनानें येणाऱ्या राजांचा सन्मान करण्यास सांगतांना बभ्रुवाहनाचा विशेष सन्मान ठेवावयास सांगितलें (म. आश्व. ८७. १८–२१ कुं.).

सर्व यादवांचा संहार झाल्याची वार्ता दारुकानें हस्तिनापुरीं येऊन कथन केली. तेव्हां अर्जुनास ही गोष्ट खोटी आहे असें वाटलें. स्वतः द्वारकेस येऊन पाहिल्यावर याची खात्री झाली. कृष्णस्त्रियांचा हृदयभेदी विलाप कसातरी ऐकून सर्वांना यानें धीर दिला व वसुदेवाला हा भेटावयास आला. डोळ्यांत पाणी आणून यानें वसुदेवाचे पाय धरले. वृद्ध वसुदेवानें अर्जुनाला मिठी मारून शोक केला व शूर रामकृष्ण गेले पण मी मात्र जिवंत आहें म्हणून खेदोद्गार काढले. अर्जुनाला द्वारका समुद्रांत लवकर बुडणार आहे, असें सांगून स्त्रिया, रत्न व राज्य सांभाळण्यास सांगितलें. वसुदेवानें देहत्याग केला (म. मौ. ६–७). अर्जुनानें सर्वांना द्वारकेंतून इंद्रप्रस्थास निघण्याची तयारी करण्यास सांगितलें. व वसुदेव, कृष्ण व राम यांच्या देहाला अग्नि दिला. नंतर याच्या नेतृत्वाखालीं अवशिष्ट यादवस्त्रिया व पौर इंद्रप्रस्थाकडे निघाले. व इकडे द्वारका समुद्रानें पोटांत घेतली. इंद्रप्रस्थाकडे येतांना वाटेंत पंचनद देशांत अर्जुनाचा मुक्काम पडला. अर्जुन एकटाच अनेक स्त्रियांना घेऊन जात आहे, हें पाहून तेथील आभीर लोकांनीं अर्जुनावर हल्ला चढविला. अर्जुनहि त्या वेळीं वयातीत झाला होता. दैवहि फिरलें होतें. त्यामुळें अर्जुनाला पूर्वीप्रमाणें धनुष्य सज्ज करून बाण सोडितां येईनात. अस्त्रमंत्र आठवेनात, बाणहि संपले. शेवटीं यानें धनुष्यानें काठीप्रमाणें लोकांस बडविण्यास सुरुवात केली. त्यामुळें कितीक स्त्रिया पळविल्या गेल्या, कितीक आपणहून पळाल्या व अर्जुन राहिलेल्या परिवारासह कसातरी इंद्रप्रस्थाला येऊन पोहोंचला (अष्टावक्र पहा). जे कांहीं यादववंशांतील अंकूर शिल्लक होते, त्यांची व्यवस्था लावली. हार्दिक्यतनयाला मृत्तिकावताला राजा केलें. अश्वपतीला खाण्डववनाचें राज्य दिलें व बाकी सर्वांना इंद्रप्रस्थाला ठेऊन वज्राला इंद्रप्रस्थाचें राज्य दिलें (म. मौ. ८; पद्म. उ. २७९. ५६; ब्रह्म. २१०–२१२; विष्णु. ५. ३७–३८, अग्नि. १५). अशी निरवानिरव करून अर्जुन उद्विग्न अंतःकरणानें व्यासाश्रमांत गेला व तेथें व्यासाचें दर्शन घेऊन हस्तिनापुरीं येऊन युधिष्ठिराला यानें सर्व निवेदन केलें (म. मौ. ९ कुं.).

नंतर सर्व पांडव हिमालयावर चालले असतां हा १०६ व्या वर्षी पतन पावला. तेव्हां भीमानें हा मध्येंच कां पडला म्हणून

वध केला असतां धर्मानें सांगितलें कीं, हा, मी एकटाच शत्रूंना नष्ट करीन असें म्हणत होता, पण यानें तसें केलें नाहीं म्हणून हा पडला. तसेंच हा इतर सर्व धनुर्धाऱ्यांचा अवमानहि करीत असे ( म. महा. २१-२२ कुं. ).

अर्जुनाला द्रौपदीपासून झालेला श्रुतकीर्ति भारतीय युद्धांत मेला. सुभद्रेपासून झालेला अभिमन्यु चक्रव्यूहांत मेला व चित्रांगदापुत्र बभ्रुवाहन मणिपूरचा राजा झाला. उलूपीपुत्र इरावान् हाहि युद्धांतच मेला. पुढें अर्जुनाचा नातू परीक्षित राजा झाला.

अर्जुनानें हिरण्यपुरांतील पौलोम, कालकेय व दानव यांना मारलें ( ब्रह्मांड. ३. ६. २८ ).

हा नराचा अवतार असून परशुरामानें केलेल्या नरस्तुतींत अर्जुनाचीं खालील अस्त्रें आलीं आहेत.

१. काकुदिक (काम), २. शुक (क्रोध), ३. नाक (लोभ), ४. अक्षिसंतर्जन ( मोह ), ५. संतान ( मद ), ६. नर्तक (मान), ७. घोर ( मत्सर ), ८. आस्यमोदक ( अहंकार ), ( म. उ. ९६ ). अर्जुनाची पाणिनीच्या वेळीं उपासना चालू होती असें पाणिनीसूत्रांवरून दिसून येतें (पा. सू. ४.३.९८).

२ रैवत मनूचा पुत्र ( मनु पहा ).

**अर्जुनक**—एक लुब्धक. गौतमी नांवाच्या ब्राह्मणीचा पुत्र सर्पदंशानें मेला म्हणून ती शोक करीत असतां यानें त्या सर्पास धरून आणिलें व त्यास कसें मारूं असें तिला विचारिलें. तिनें प्राणी कर्मपरतंत्र आहेत, म्हणून सर्पास सोडून देण्यास सांगितलें ( म. अनु. १ ).

**अर्जुनपाल**— (सो. यदु. ) वसुदेवाचा अनुज शमीक सुदामिनी यांच्या दोन पुत्रांतील एक (भा. ९. २४. ४४).

**अर्णव**— इंद्राचा शत्रु ( ऋ. १०. ६६. ११; ६७. १२; १११. १४ ).

२ ( सो. ) भविष्यमतें जनसेनाचा पुत्र. यानें बारा हजार वर्षें राज्य केलें. याचें राज्य चार समुद्रांपर्यंत होतें.

**अर्थ**— स्वायंभुव मन्वंतरांतील धर्म व बुद्धि यांचा पुत्र ( भा. ४. १. ५१ ).

**अर्थसिद्धि**—धर्म व साध्या यांचा एक पुत्र ( भा. ६. ६. ७ ).

**अर्धनारी नटेश्वर**—ब्रह्मदेवानें प्रजा उत्पन्न करण्याकरितां तप आरंभिलें. तेव्हां शंकर प्रसन्न झाला व त्याच्या शरीरापासून अर्धनारीनटेश्वर उत्पन्न झाला ( शिव. शत. ३ ). शंकर संतुष्ट होऊन अरुणाचलावर तप करीत असलेल्या —पार्वतीच्या आज्ञेवरून दुर्गेनें महिषासुराचा वध केल्यावर— पार्वतीजवळ आला व तिला त्यानें आपल्या वामांकावर घेतलें. तेव्हां त्या प्रेमामुळें पार्वती शंकराच्या वामांगांतच लीन झाली. त्यायोगें शिवपार्वतीचें तें शरीर अर्धें शुभ्र, अर्धें तांबूस, अर्ध्यावर चोळी, अर्ध्यावर हार असें अर्धनारीनटेश्वर स्वरूप दिसूं लागलें ( स्कंद. १. २. ३. २१; स्वायंभुव पहा ).

**अर्धपण्य**—अत्रिकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**अर्पिणी**—( आर्षिणि पहा ).

**अर्बुद**—इंद्राचे शत्रु असलेले दोन असुर. इंद्रानें यांच्याशीं युद्ध करून यांच्यावर बर्फाचा मारा केला; त्यामुळें हा पराभूत झाला. इंद्रानें आपल्या वज्राच्या योगानें यास ठार केलें ( ऋ. ८. ३२. २६; १०. ६७. १२. )

**अर्बुद काद्रवेय**—हा नागर्षि होता. यानें यज्ञाचीं न्यूनें कशीं सुधारावींत व सोमरस कसा काढावा यांबद्दल ज्ञान सांगितलें ( ऐ. ब्रा. ६. १; सां. ब्रा. २९. १. ). सर्पसत्रांत हा ग्रावस्तुत होता ( पं. ब्रा. २५. १५. ). ह्या सर्व ठिकाणीं आलेला अर्बुद एकच असावा.

**अर्यमभूति**—भद्रशर्मन्चा शिष्य ( वं. ब्रा. ३ ).

**अर्यमन्**—ऋग्वेदांत येणारा एक देव. मित्रावरुणांबरोबर याचा उल्लेख येतो. आदित्य व मित्र यांच्याप्रमाणें हा इतर देवतांचा स्नेही आहे. संस्कारांत याचा उल्लेख येतो. इतर देवांप्रमाणें हाहि कश्यप व अदिति यांचा पुत्र. हा द्वादशादित्यांपैकीं एक. हा पितृगणांतील एक. हा वैशाखांत प्रकाशतो. याचीं किरणें ३०० आहेत. (भवि. ब्राह्म. १ ७८; भा. १२. ११. ३४). हा अत्रिपुत्र असल्याबद्दल महाभारताशिवाय इतरत्र आधार नाहीं ( म. शां. २०७. ९-१० ).

२ धर्म व मुहूर्ता यांच्या पुत्रांपैकीं एक.

३ एक ब्राह्मण. यास पितृवर्ती भार्या होती. ही श्राद्धयज्ञ राजाची कन्या होय. यानें धनेच्छेनें ज्येष्ठ महिनाभर भास्कराची पुष्कळ प्रकारें पूजा केली. तेव्हां सूर्यानें एक मणि दिला. या मण्याच्या योगानें यास रोज शेरभर सोनें मिळे. त्यामुळें यानें खूप धर्मकृत्यें केलीं. पुढें हा हजार वर्षांनीं मरण पावला. यास सात पुत्र होते ( भवि. प्रति. ४.७ ).

**अर्यल**—हा सर्पसत्रांत गृहपति होता ( पं. ब्रा. २३. १-५ ).

**अर्यव**—( अर्जव पहा ).

**अर्ववीर**—सावर्णि मनूचा पुत्र.

२ स्वारोचिष मनूचा पुत्र. याचें नामांतर और्व.

३ पुलहाच्या तीन पुत्रांतील एक ( मार्क. ५२ ).

**अर्वावसु**—रैभ्यऋषीच्या दोन पुत्रांतील दुसरा. हा गुणांनीं फार उत्तम असे ( यवक्रीत व परावसु पहा ). यालाच सूर्यमंत्रप्रकाशक रहस्यवेदसंज्ञक काठक ब्राह्मणाचें दर्शन झालें ( म. व. १३८ ). यानें पुत्राकरितां सूर्याची उपासना केली.

आकाशमार्गानें नेऊन सूर्यानें अरुणाच्या द्वारें यास सप्तमीकल्प विधि सांगितला. त्यामुळें याला पुत्र व ऐश्वर्य मिळालें ( भवि. ब्राह्म. ८० ).

**अर्षि**—श्रवाऋषीच्या दोन पुत्रांतील ज्येष्ठ (वीतहव्य पहा).

**आर्ष्टिषेण**—भृगुकुलोत्पन्न ऋषि ( म. श. ४० ). याचा युधिष्ठिराशीं संवाद झाला होता ( म. व. १५९ ). याचा वंशज आर्ष्टिषेण ( म. व. १४; देवापि पहा. ).

**अर्हत्**—अत्यंत विरक्त असणारा ऋषभ दक्षिण कर्नाटकांतील कोंकवेंक कुटक देशांतील कुटकाचलाजवळील अरण्यांत वणव्यांत सांपडून मेला. तेव्हां हा तेथील राजा होता. यानें ऋषभदेवाचा जैनधर्म स्वीकारला ( भा. ५.६.९ ).

**अलक्ष्मी**—ही कालकुटानंतर समुद्रांतून निघाली. हिचें तोंड काळें व डोळे लाल होते. हिचे केश पिंगट असून ही म्हातारी होती. देवांनीं हिला, ज्या घरांत कलह असेल तेथें तूं रहा. कठोर, खोटें बोलणारे व संध्याकाळचे वेळीं खाणारे यांस तूं ताप दे. जो हातपाय धुतल्याखेरीज भोजन करील त्यास तूं त्रास दे. तूं हाडें, कोळसा, केश, कोंडा यांत रहा व अभक्ष्यभक्षक, गुरु, देव, अतिथि यांस न पुजणारे, यज्ञ व वेदपाठ न करणारे, भांडणारी पतिपत्नी व जुगारी यांना तूं दरिद्री कर, असा वर दिला. पुढें लक्ष्मीचें लग्न विष्णूशीं व्हावयाच्या आधीं हिचें उद्दालक नामक ऋषीशीं लग्न करून दिलें (पद्म. ब्र.९-१०). समुद्रांतून विषानंतर व लक्ष्मीपूर्वी ही उत्पन्न झाली, म्हणूनच हिला ज्येष्ठा असें म्हणतात. महाभारताप्रमाणें प्रथम विष, नंतर ही कृष्णरूपधरा ज्येष्ठा व नंतर चंद्र उत्पन्न झाला ( म. अ. १८. ४७ कुं. ). हिचें लग्न दुःसहाशीं झालें. पुढें दुःसह पाताळांत गेल्यावर ही एकटीच पृथ्वीवर राहिली ( लिंग. २. ६ ). थोरलीचें लग्न झाल्याशिवाय धाकटीचें होत नाहीं, हिचें लग्न तर होईना. तेव्हां हिचें लग्न एका ब्राह्मणाशीं करून दिलें. पण त्या ब्राह्मणानें हिला टाकलें. तेव्हां ही पिंपळाच्या झाडाखालीं जाऊन बसली. दर शनिवारीं तेथें लक्ष्मी बहिणीला भेटावयास येते. म्हणून शनिवारीं पिंपळ लक्ष्मीप्रद व इतर वारीं स्पर्श केला असतां दारिद्र्य देणारा होय ( सनत्सुजातसंहितान्तर्गत कार्तिकमा. ). उद्दालकाशीं हिचें लग्न झालें होतें. हिला वैदिककर्म आवडेना. हिला मद्य, द्यूत वगैरे जास्त पसंत असे, असें पाहून उद्दालकानें हिला पिंपळाच्या झाडाखालीं बसविलें व आपण कोठेंतरी नाहींसा झाला. तेव्हां ही ज्येष्ठा तेथें रडूं लागली. तेव्हां लक्ष्मी विष्णूसह हिच्या समाचारास आली. विष्णूनें तिला पिंपळाच्या मूळाशीं राहण्यास सांगितलें. व जे तुह्मी तेथें पूजा करतील, त्यांना लक्ष्मी प्राप्त होईल असें हिला सांगितलें ( पद्म. उ. ११६ ).

**अलब्ध**—जटासुराचा पुत्र. याच्या पित्याचा भीमानें नाश केला म्हणून भारतीय युद्धांत हा दुर्योधनपक्षास मिळाला. हा राक्षस महारथी असून मायावी युद्धांत पटाईत होता. याचा त्याच युद्धांत घटोत्कचानें डोकें कापून नाश केला ( म. द्रो. १६७-१७४ ). अलंबल असा पाठ आहे.

**अलंबल**—( अलंबुश पहा ).

**अलंबुषा**—कश्यप व प्राधा यांच्या अप्सरा कन्यांतील एक. इन्द्र दधीचीच्या तपास फार भीत असे. तेव्हां त्याला भिवविण्याकरितां इंद्रानें हिला त्याजकडे पाठविली ( सारस्वत पहा ). हिनें दिष्टवंशांतील बंधुपुत्र तृणबिंदूस वरिलें व हिजपासून त्यास इडविडा नांवाची कन्या झाली ( भा. ९. २. ३१; ब्रह्मांड. ३. ७. ३५-४० ).

**अलंबुस**—दुर्योधनपक्षीय एक राजा. हा कधींहि युद्धांतून मागें न फिरणारा, शरासन व सुवर्णकवच धारण करणारा असा होता. याचें व सात्यकीचें मोठें युद्ध झालें. हा अतिशय संतप्त होऊन सात्यकीवर चालून गेला, पण सात्यकीनें यास मारिलें ( म. द्रो. १४० ).

२ हा बकासुराचा भाऊ होय ( म. स्त्री. २६ ). याच्या भावाला भीमानें ठार मारिलें होतें, तें वैर स्मरून हा भारतीय युद्धांत पांडवांचा नाश करण्याकरितां दुर्योधनास मिळाला होता. हा काजळासारखा काळाकुट्ट होता ( म. द्रो. १०९ ). याचें व भीमाचें बरेंच मोठें युद्ध झालें. हा इंद्रालाहि अजेय होता, पण शूर सात्यकीनें यावर ऐंद्रास्त्राची योजना करून यास रणांतून पळवून लाविलें ( म. भी. ८१-८२; द्रो. १०९ ). याची व अभिमन्यूची एक मोठी लढाई झाली. पण तीत याचाच पराभव होऊन हा पळून गेला (म. भी. १००-१०१). शेवटीं घटोत्कचाचें व याचें बरेंच मोठें मायावी द्वंद्वयुद्ध झालें त्यांत हा मरण पावला ( म. भी. ४५; द्रो. २५; क. २ ). हा किर्मीराचा पुत्र होय (म. द्रो. १०९). परंतु किर्मीर हाहि पण बकासुराचा भाऊच होय (म. व. ११) व अलंबुश हाहि बकासुराचा भाऊच ( म. स्त्री. २६ ).

**अलंबुसा** किंवा **अवलंबुसा**—एक देवस्त्री. ही एकदां ब्रह्मदेवाच्या सभेंत नृत्य करीत असतां वायूनें हिचें वस्त्र उडालें. तेव्हां तेथें असलेला अष्टवसूंपैकीं विधूसा नांवाचा वसु हिला पाहून कामपीडित झाल्यामुळें ब्रह्मदेवाचा त्याला शाप मिळून मनुष्ययोनींत राजकुलांमध्यें सहस्रानीक या नांवानें व अलंबूसेला कृतवर्मा राजाच्या कुळांत मृगवती या नांवानें जन्म घ्यावा लागला. पुढें या उभयतांचा विवाह होऊन अलंबुसा गरोदर राहिली असतां एकदां रक्ताप्रमाणें लाल अशा थिहिरींनं हिनें स्नान केल्यामुळें एका पक्षानें हिला विकलेलें फळ समजून वर उचलिलें व

हिला उंचावरून उदयाचल पर्वताच्या गुहेंत टाकिलें. त्यायोगें हिला मूर्च्छा आली. परंतु लवकरच सावध होऊन ही पतिविरहामुळें शोक करूं लागली. तितक्यांत जमदग्निमुनीनें हिचा विलाप ऐकून हिचें सांत्वन केलें व हिला आपल्या आश्रमांत आणलें. कांहीं कालानें ही प्रसूत होऊन हिला उदयन नांवाचा पुत्र झाला. पुढें सहस्रानीकाला हिची वार्ता समजतांच त्यानें उदयाचलावर जाऊन पुत्रासहित हिला आपल्या राज्यांत परत आणिलें. नंतर उदयनास गादीवर स्थापून त्यानें अलंबुसेसह चक्रतीर्थावर स्नान केलें. त्यायोगें सहस्रानीक व अलंबुसा ब्रह्मशापापासून मुक्त होऊन पूर्वस्थितीप्रत गेलीं ( स्कंद. ३. १. ५ ).

**अलर्क**—( सो. क्षत्र. ) काशीच्या दिवोदास राजाचा हा प्रपौत्र. याच्या बापाचें नांव वत्स, प्रतर्दन आणि ऋतध्वज असें आढळतें. दिवोदास प्रेमानें प्रतर्दनासच वत्स वत्स असें म्हणत असे. व तो सत्यनिष्ठ असल्यामुळें त्यास ऋतध्वज असेंहि दुसरें नांव होतें ( ह. वं. १. २९; विष्णु. ४. ९; भा. ९. १७ ). दिवोदासाचा पुत्र प्रतर्दन व त्याचा पुत्र ऋतध्वज ( गरुड. १३९ ). प्रतर्दनपुत्र वत्स व त्याचा पुत्र अलर्क. यानें काशी येथें ६६ हजार वर्षेंपर्यंत राज्य केलें ( ह. वं. १. २९; भा. ९. १७; ब्रह्म. ११ ). हा ब्राह्मणांचा मोठा सत्कर्ता असून अत्यंत सत्यप्रतिज्ञ होता. यानें एकदां अंध ब्राह्मणाला वर देऊं केला, तेव्हां त्यानें तुझे डोळे मला दे असा वर मागितला असतांहि यानें आपलें वचन पाळण्याकरितां आपले डोळे काढून त्यास दिले ( वा. रा. अयो. १२ ). लोपामुद्रेच्या कृपेनें हा सदैव तरुण असून याचें रूप कधींहि बिघडलें नाहीं. लोपामुद्रेच्या कृपेनें याला दीर्घायुष्य प्राप्त झालें. निकुम्भाच्या शापानें निर्मानुष झालेली वाराणशी यानें क्षेमकाला मारून पुनः वसविली ( ब्रह्मांड. ३. ६७ ). यानें वाराणशी नगराची पुनः स्थापना केली ( ह. वं. १. २९; ३२ ). यानें प्रथम धनुर्बलानें सर्व पृथ्वी जिंकली व मग याचें अंतःकरण सूक्ष्म ब्रह्माकडे वळलें. यानें नाक, कान, मन, जिह्वा इत्यादि इंद्रियें ताब्यांत ठेवण्याबद्दल नाककानादिकांबरोबर संभाषणें केलीं ( म. आश्व. ३० ). याला संतति या नांवाचा एक मुलगा होता ( भा. ९. १४; विष्णु. ४. ९; वायु. ९. ३० ). शत्रुजित्पुत्र ऋतुध्वजापासून मदालसेस झालेला चवथा मुलगा. याला मदालसा व दत्तात्रेय यांनीं निवृत्तमार्गाचा उपदेश करून ज्ञानी बनविलें ( मार्के. २३–४० ). याचा वडील भाऊ सुबाहु यानें काशिराजाच्या मदतीनें यावर स्वारी केली. हा अत्यंत संकटांत असतां आईच्या इच्छेनुसार त्यागी बनून यानें आपलें राज्य सुबाहूला दिलें ( मार्के. ३४ ).

**अलायुध**—हा बकाचा भाऊ ( म. द्रो. ९६. २७ कुं; श. २. ३९ कुं. ). याचें कांहीं वेळ अर्जुनाशीं युद्ध झालें होतें ( म. द्रो. १६८. २७ कुं. ) द्रोणयुद्धकालीं रात्रीं घटोत्कच आणि कर्ण यांचें युद्ध चाललें होतें. आज कर्ण घटोत्कचाच्या हातून वाचत नाहीं असें सर्वांना वाटूं लागलें. इतक्यांत हा दुर्योधनास म्हणाला कीं, मी घटोत्कचासहित पांडवांचा नाश करीन. दुर्योधनानें सांगतांच हा प्रथम भीमाशीं युद्ध करूं लागला. याचा रथ घटोत्कचाप्रमाणेंच शतअश्वांचा होता. यानें भीमास इतकें जर्जर केलें कीं, कृष्णानें घटोत्कचास हाक मारून याच्याशीं युद्ध करण्यास सांगितलें. तेव्हां घटोत्कचानें कर्णाशीं युद्ध करण्याचें सोडून याशीं युद्ध आरंभिलें. त्यांत हा घटोत्कचाच्या हातून मरण पावला ( म. द्रो. १७८–१७९. कुं. ).

**अलि**—स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अलिक**—(ऐति.) बनारसच्या तालन राजाचा पुत्र. यास दोन पुत्र होते (भवि. प्रति. ३.७). यास अल्लमतिप्रभृति आठ भाऊ होते.

**अलिन**—ऋग्वेदांत हा शब्द एकदां बहुवचनी आला आहे. तेथें तृत्सूंच्या गाई पळविल्या म्हणून यांना आनंद झाला आहे. हे लोक सुदासाच्या विरुद्ध असावेत (ऋ. ७.१८.७).

**अलिपिंडक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**अलीकयु वाचस्पत्य**—एक अधिकारी पुरुष (सां. ब्रा. २६. ५; २८. ४ ).

**अलोम**—( ऐति. ) तिमिरलिंगाच्या वंशांतील नवरंगराजाचा पुत्र. याचा पुत्र फलपुरुष (भवि. प्रति. ४.२२).

**अलोलुप**—धृतराष्ट्राच्या शतपुत्रांतील एक.

**अल्पमेधस्**—सुमेधस नांवाच्या देवगणांतील एक.

**अल्लमति**—( अलिक पहा. )

**अवगाह**—(सो. यदु.) मत्स्यमतें वसुदेव व वृकदेवी यांचा पुत्र.

**अवतंस**—(सो.) भविष्यमतें हा सोमवर्धनाचा पुत्र.

**अवत्सार काश्यप**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९. ५३-६०; ऐ. ब्रा. २.२४ ). यास अवत्सार प्राश्रवण असें म्हणतात ( सां. ब्रा. १३. ३ ). एवावद् यजत व सध्रि यांच्या बरोबर याचा उल्लेख आहे ( ऋ. ५. ४४. १० ).

**अवधूतेश्वर**—एकदां कैलासावर शंकराच्या दर्शनाकरितां इंद्र व बृहस्पति चालले होते. वाटेंत यांच्या परीक्षेकरितां दिगंबर व भयंकर असें रूप धारण करून शंकर मार्गांत बसला होता. अनेकदां सांगूनहि वाटेंतून दूरहि होईना व बोलेनाहि. शेवटीं इंद्रानें वज्र बाहेर काढलें. त्या वज्राचें स्तम्भन शंकरानें केलें व त्याच्या तृतीय नेत्रांतून क्रोधानें अग्नि बाहेर पडला. बृहस्पतीच्या विनंतीवरून तो अग्नि शेवटीं लवणोदधींत टाकण्यांत आला व

त्यापासून जालंधर उत्पन्न झाला. त्याचा शंकरानें वध केला ( शिव. शत. ३० ).

**अवध्य**—प्रतर्दन नांवाच्या देवगणांतील एक.

**अवरात**—प्रतर्दन नांवाच्या देवगणांतील एक.

**अवरीयस्**—सावर्णि मनूचा पुत्र.

**अवरोधन**—( स्वा. ) गय राजास गयंतीपासून झालेला पुत्र.

**अवस्यु आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ३१; ७५ ).

**अविकंपन**—ज्येष्ठ ऋषीचा शिष्य. एक ब्राह्मण.

**अविक्षित्**—( सू. दिष्ट. ) करंधमपुत्र ( आविक्षित् ). यानें शंभर अश्वमेध केले व स्वतः बृहस्पतीनें याचें याजन केलें. याच्या पुत्राचें नांव मरुत्त ( म. आश्व. ४ ). याला अश्ववान् असें प्रसिद्ध नांव होतें.

२ ( सो. ) कुरुपुत्र. याच्या आईचें नांव वाहिनी. याला आठ पुत्र होते. ते येणेंप्रमाणें. १. परीक्षित्, २. शबलाश्व, ३. आदिराज, ४. विराज, ५. शाल्मली, ६. उच्चैःश्रवा, ७. भंगकारक, ८. जितारि ( म. आ. १०१ कुं. ).

**अविज्ञात**—( स्वा. प्रिय. ) यज्ञबाहूच्या सात पुत्रांतील कनिष्ठ. याचा वर्ष याच्याच नांवानें प्रसिद्ध आहे. पुरंजनाचा मित्र ( भा. ४. २५; ४. २९ ).

**अविज्ञानगति**—( अनिल पहा ).

**अविंध्य**—लंकेंतील एक वृद्ध राक्षस. यानें सीता रामचंद्रास परत द्यावी म्हणून रावणास सांगितलें ( वा. रा. सुं. ३७ ). हा रामाचें कुशलवृत्त आणवून त्रिजटेकडून सीतेस कळवीत असे ( म. व. २८० ).

**अविन्द्र**—( सो. पूरु. ) वायुमतें हा जनमेजयपुत्र होय.

**अविहोत्र**—अत्रिकुलांतील एक मंत्रकर्ता.

**अव्यय**—रौच्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ रौच्य मनूचा पुत्र.

३ बारा भार्गव देवांतील एक (भृगु पहा).

**अशना**—बलीची स्त्री ( भा. ६. १८ ).

**अशोक**—अकोप प्रधानास नांव ( वा. रा. यु. १२९; म. आ. ६७ ).

२ दुर्योधनपक्षीय राजा. हा पूर्वी अश्वनामक राक्षस होता.

३ ( विशोक ) भीमसेनाचा सारथि ( म. भी. ६४ ).

४ ( मौर्य. भविष्य. ) वायु व ब्रह्मांड यांच्या मतें भद्रसाराचा पुत्र. पण भागवत व विष्णुपुराणांत अशोकवर्धन असें नांव दिलें असून पहिल्यांत वारिसाराचा व दुसऱ्यांत बिंदुसाराचा पुत्र आहे. पट्टणच्या कश्यपकुलांतील बिंदुसार राजाचा पुत्र. हा बौद्धधर्मी होता व बौद्धधर्माच्या प्रसारार्थ यानें बरीच खटपट केली. हा अत्यंत पराक्रमी होता ( भवि. प्रति. २. ७ ).

**अशोकवर्धन**—( ४ अशोक पहा ).

**अशोकसुंदरी**—ही पार्वतीची कन्या ( पार्वती पहा ). हिनें हुंड दैत्यास शाप दिला होता (हुंड पहा). हिचें नहुषाशीं लग्न झालें ( पद्म. भू. १०२–११७ ).

**अश्मक**—( सू. इ. ) अश्मा म्हणजे दगड. त्यानें याची उत्पत्ति केली, म्हणून याला अश्मक हें नांव पडलें. हा कल्माषपाद या नांवानें प्रसिद्ध असलेल्या मित्रसह राजाचा पुत्र ( वायु. २. २७. १७५–१७७; ब्रह्मांड. ३. ६३. १७५–१७७; विष्णु. ४. ४. ३८ ). कल्माषपाद राजाला एका ब्राह्मण स्त्रीचा शाप असल्यामुळें त्याला स्त्रीसमागम करतां येईना आणि इक्ष्वाकुकुलाची वृद्धि तर झाली पाहिजे, हें जाणून कल्माषपादानें वसिष्ठ ऋषीस सांगून त्याकडून आपल्या मदयंती नामक स्त्रीच्या उदरीं गर्भस्थापना करविली ( म. आ. १२२ ). बारा वर्षे झाली, तरी हा गर्भ बाहेर येईना, तेव्हां मदयंतीनें अश्मप्रहारानें उदरविदारण करून याला बाहेर काढलें (म. आ. १७७). सात वर्षांनंतर वसिष्ठानें अश्मप्रहार करून गर्भाला बाहेर काढिलें ( भा. ९. ९ ). यानें पौदन्य नांवाचें नगर वसविलें ( म. आ. १७७ ). याला मूलक नांवाचा पुत्र होता. यालाच पुढें नारी-कवच असें नांव पडलें. ( भा. ९. ९. ).

२ एक राजा. याला कर्णानें जिंकून खंडणी देण्यास लाविलें होतें ( म. क. ८ ). भारतीय युद्धांत हा पांडवांच्या बाजूला होता ( म. द्रो. ८५ ).

३ भीष्म शरपंजरीं पडला असतां त्याचाशीं असलेला एक ब्राह्मण.

४ अश्मक देशचा राजा ( म. स. ७८. २४ कुं. ). हा कौरवांच्या बाजूला होता. याला अभिमन्यूनें व्यूहभेद केल्यावर ठार केलें ( म. द्रो. ३७. २२ कुं. ).

**अश्मन्**—एक ब्राह्मण. याचें जनकाशीं सुखदुःख-निवृत्तिपर संभाषण झालें होतें ( म. शां. २८ ).

**अश्मरथ्य**—विश्वामित्रकुलांतील एक गोत्रकार.

**अश्रुतायु**—( अच्युतायु पहा. )

**अश्व**—कश्यप व दनु यांच्या पुत्रांतील एक.

२ सत्य नांवाच्या देवगणांतील एक.

३ कश्यप व खशा यांचा पुत्र.

**अश्वकेतु**—दुर्योधनपक्षीय मगध देशोत्पन्न राजा. याला अभिमन्यूनें मारलें ( म. द्रो. ४८ कुं. ).

**अश्वक्रंद**—अमृत रक्षण करणारा एक देव ( म. आ. ३२ कुं. ).

**अश्वग्रीव**--( सो. वृष्णि.) चित्रक राजाचा पुत्र.

**अश्वचक्र**---कृष्णपुत्र सांब यानें मारलेला एक राजा ( म. व. १२० ).

**अश्वजित**—( सो. पूरु. ) जयद्रथाचा पुत्र.

**अश्वतर**—कद्रूपुत्र ( ऊर्ज पहा ). यानें मदालसा मेल्यावर दुसरी मदालसा मिळवून ऋतध्वजाला दिली.

**अश्वतर अश्वि**—हें बुलिल याचें पितृनाम आहे. सायणमतानें बुलिल हा अश्व याचा मुलगा व अश्वतर याचा वंशज आहे. सत्रांतील कांहीं शंसनासंबंधी गौश्ल याच्या बरोबर त्याचा संवाद झाला ( ऐ. ब्रा. ६. ३० ).

**अश्वत्थामन्**—अश्वत्थामा हा सप्त चिरंजीवांपैकीं एक. हा द्रोणाचार्य व गौतमी कृपी यांचा एकुलता एक पुत्र होय. जन्मतांक्षणींच उच्चैःश्रवा घोड्याप्रमाणें यानें किंकाळी फोडून तिन्ही लोक कंपित केले, म्हणून आकाशवाणीनें याचें नांव अश्वत्थामा ठेविलें (म. द्रो. १९६). द्रोणाचार्यांचा पुत्र म्हणून यास द्रौणि किंवा द्रोणायन म्हणतात. रुद्राच्या अंशापासून याची उत्पत्ति झाली म्हणून याचे अंगीं क्रोध व तेज वसत होतें ( म. द्रो. २०१ ). एकदां एका धनिकाचे घरीं त्याचा पुत्र गाईचें दूध पितांना यानें पाहिला. त्यावरून आपणांस दूध पाहिजे असा हट्ट अश्वत्थामा धरून बसला. याचें समाधान करण्याकरितां याच्या मातेनें यवपिष्टांत पाणी घालून यास पिण्यास दिलें. त्यामुळें आपण दूध प्यालों असें म्हणत अश्वत्थामा आनंदानें नाचूं लागला ( म. आ. १३१; द्रोण पहा ). द्रोणाचार्यांकडून अश्वत्थाम्यास शस्त्रास्त्रविद्येचें शिक्षण कौरवपांडवांबरोबर मिळालें. जातीनें ब्राह्मण पण क्षत्रियांची विद्या शिकल्यामुळे याचे अंगीं क्षत्रियधर्म उतरला होता. सर्व सेनापति युद्धांत पडल्यावर भीमदुर्योधन यांचें गदायुद्ध होऊन दुर्योधन युद्धांत पडला असतां त्यानें अश्वत्थाम्यास सेनापत्याचा अभिषेक केला.त्या वेळीं अश्वत्थाम्यानें पांडवांना ठार मारण्याची प्रतिज्ञा केली (म.श. ६५). यानें एकट्यानें पांडवांकडची एक अक्षौहिणी सेना मारिली. अर्जुन व भीम यांच्याशीं हा पुष्कळ वेळां लढला, परंतु याचा पराभवच झाला ( म. वि. ५८-५९. क. १५; १७ ). पांडवांना अश्वत्थामा प्रिय होता व यालाहि ते तसेच प्रिय होते; असें असतांना तो संबंध भारतीय युद्धाच्या वेळीं बाजूस ठेवून दुर्योधनाच्या वाक्ताडनाला यानें उत्तर दिलें व द्रोणपुत्राला शोभेल असें लढून पांडवसेनेचा यानें नाश केला ( म. द्रो. १६० ). पुढें द्रोणाचा वध धृष्टद्युम्नानें केल्यावर कौरवसेना हाहाःकार करीत वाट फुटेल तिकडे धांवत असतां अश्वत्थाम्यानें कौरवेश्वराला सेना कोणाच्या मृत्यूनें धांवत सुटली आहे असें विचारलें ( म. द्रो. १९३ ). धृष्टद्युम्नानें अधर्मानें आपल्या पित्याचा वध केला हें याला कळतांच अश्वत्थाम्यानें धृष्टद्युम्नास मारण्याची प्रतिज्ञा केली ( म. क. ५७ ). पितृवधानें संतापलेल्या अश्वत्थाम्यानें सात्यकी, धृष्टद्युम्न, भीमसेन या रथीवीरांचा पराभव करून त्यांना पळावयास लावलें. द्रोणाचार्यांच्या वधानंतर पांडवांकडील नीलवीरानें कौरवसेनेचा विध्वंस मांडल्यानें अश्वत्थाम्यानें त्याचें शीर उडविलें ( म. द्रो. ३१ ). पांडवांच्या सैन्यांत यानें सोडलेल्या नारायणास्त्रानें अतिसंहार चालविल्याकारणानें भगवान् श्रीकृष्णानें सर्वांना निशस्त्र होण्यास सांगितलें तेव्हां तें शांत झालें ( म. द्रो. १९९-२०० ). अश्वत्थाम्यानें पांडवांचे बाजूस असलेले अंजनपर्वादि राक्षस, द्रुपद राजाचे सुरथशत्रुंजय हे पुत्र व कुंतिभोज राजाचे दहा पुत्र ठार केले ( म. द्रो. १५६ ). सर्व कौरव मारले गेल्यानंतर एकदां रात्रीच्या वेळीं अश्वत्थामा, कृपाचार्य व कृतवर्मा हे तिघे विश्रांतीसाठीं एका झाडाखालीं निजले असतां अश्वत्थामा काय करावें या विचारांत पडला. इतक्यांत एका घुबडानें छापा घालून त्या झाडावरील असंख्य कावळे मारले. त्यावरून हा एक नवीन प्रकार शिकला व पांडवांच्या सेनेवर रात्रीं छापा घालण्याचा विचार अश्वत्थाम्यानें केला. ह्या विचारापासून परावृत्त करण्याचा पुष्कळ उपदेश कृतवर्मा व कृपाचार्य ह्यांनीं त्यास केला, परंतु तें न ऐकतां अश्वत्थामा छापा घालण्यास एकटाच निघाला ( म. सौ. ५ ). पांडवांच्या शिबिराच्या द्वाराशीं येतांक्षणींच यानें शिबिराचें रक्षण करणारा एक भयंकर प्राणी पाहिला. त्याच्याशीं अश्वत्थाम्यानें युद्ध सुरू केलें. अश्वत्थाम्याच्या सर्व शस्त्रास्त्रांचा उपयोग त्या प्राण्यावर होईना व त्याचीं सर्व शस्त्रें संपून गेलीं, तेव्हां इलाज नाहीं, म्हणून अश्वत्थामा शूलपाणि शंकराला शरण गेला ( म. सौ. ६ ). शंकराची स्तुति केल्यानंतर यानें अग्निमध्यें आपली स्वतःची आहुती दिली. त्यावरून शंकरानें प्रसन्न होऊन यास दर्शन दिलें व यास दिव्य खड्ग देऊन याच्या शरीरांत प्रवेश केला ( म. सौ. ७ ). रात्रीच्या रात्रींत यानें पांडवांचे हजारों सैनिक, द्रौपदीचे सर्व पुत्र, पांचाल, सूत, सोम, धृष्टद्युम्न, शिखंडी वगैरे अनेक वीरांचा नाश केला ( म. सौ. ८ ).

इतकें करून ही हकीगत सांगण्याकरितां व कृतवर्मा व कृपाचार्य यांच्यासह अश्वत्थामा दुर्योधन ज्या ठिकाणीं तळमळत पडला होता त्या ठिकाणीं गेला. सर्व सेनेपैकीं पांच पांडव, श्रीकृष्ण, व आपण तिघे जिवंत आहोंत, बाकी सर्व सेना संहार पावली, अशी हकीगत ऐकल्यावर राजा दुर्योधनानें सुखानें प्राण सोडला ( म. सौ. ९ ).

द्रौपदीच्या सर्व पुत्रांचा अश्वत्थाम्यानें वध केल्यामुळें तिनें अत्यंत शोक केला व अश्वत्थाम्याच्या डोक्यांतील मणि काढून आणून तो युधिष्ठिराचे डोक्यावर पाहीन, तरच मी जीव ठेवीन अशी तिनें प्रतिज्ञा केली. तिच्या पूर्तीकरितां भीमसेन अश्व-

थाम्यावर चालून गेला ( म. सौ. ११ ). व्यासादि ऋषिसमुदायांत अश्वत्थामा धुळीनें भरलेला त्याच्या दृष्टीस पडला. अश्वत्थाम्याच्या अस्त्रप्रभावापुढें भीमाचें कांहीं चालणार नाहीं, असा विचार करून अर्जुनासह श्रीकृष्ण भीमाचे सहाय्यास निघाला. पांडवांच्या नाशाकरितां अश्वत्थाम्यानें ब्रह्मशीर नांवाचें अस्त्र सोडलें. त्यामुळें पृथ्वी जळूं लागली. त्या अस्त्राचा प्रतिकार करण्याकरितां अर्जुनानें तेंच अस्त्र सोडलें. या उभयतांच्या युद्धांत पृथ्वीचा नाश होतो कीं काय असें वाटून व्यास आदिकरून मुनींनीं ह्या अविचाराबद्दल अश्वत्थाम्याची कानउघाडणी केली व डोक्यांतील दिव्यमणि पांडवांस देऊन त्यांस शरण जाण्यास व्यासानें यास सांगितलें. यानें मणि दिला; परंतु उत्तरेच्या पोटीं असलेल्या पांडवांच्या वंशाचा तें अस्त्र नाश करील व नंतर शांत होईल असें अश्वत्थाम्यानें त्यांस सांगितलें. ह्या कृत्याबद्दल कृष्णानें तीन हजार वर्षेंपर्यंत पू व रक्त यांनीं शरीर दूषित होऊन हा अरण्यांत मूकभावानें फिरेल असा अश्वत्थाम्यास शाप दिला व उत्तरेच्या पोटांतील गर्भास जिवंत केलें ( म. सौ. १३-१६; भा. १.७. १६). हा शंकराचा अवतार असून चिरंजीव आहे व गंगातीरावर राहतो ( शिव. शत. ३७ ). हा सावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक होईल ( मनु पहा ) व व्यासहि हाच होणार आहे ( व्यास पहा ).

२ अक्रूराच्या पुत्रांतील एक.

**अश्वथ**—दानस्तुतींत पायूला दान करणारा म्हणून हा आला आहे ( ऋ. ६. ४७. २२-२४). प्रस्तोकालाच दिवोदास, अश्वथ आणि अतिथिग्व या नांवांनीं संबोधण्यांत येतें असें सायणाचार्य म्हणतात.

**अश्वपति**—कश्यप व दनु यांच्या पुत्रांतील एक.

२ मद्रदेशाचा राजा. यास मालती नांवाची एक स्त्री होती. यास पुष्कळ स्त्रिया होत्या त्यांपैकीं ही ज्येष्ठ. यानें सावित्रीदेवीची पराशरोक्त गायत्रीमंत्रानें आराधना केली व आराधनेनंतरचें हवन करीत असतां सावित्री अग्नींतून प्रगट होऊन तिनें तुला दोन्ही कुलांना ( माहेर व सासर ) उद्धारणारी एक कन्या होईल असें सांगितलें. त्याप्रमाणें सावित्री नांवाची एक कन्या झाली. यमापासून याच सावित्रीनें मागून घेतलेल्या वरानें यास १०० पुत्र झाले ( ब्रह्मवै. २. २३; सावित्री पहा ).

**अश्वपति कैकय**—हा आत्म्याचें ज्ञान असलेला पुरुष होता. आत्म्याविषयीं विचार करीत असतां निश्चय करितां येईना, तेव्हां प्राचीनशालादि विद्वान् माणसें हा आत्मज्ञ म्हणून याच्याकडे आलीं. यानें त्यांचा यथायोग्य सत्कार केला व दुसरे दिवशीं सकाळीं हा कांहीं दक्षिणा देऊं लागला असतां त्यांनीं ती नाकारली; तेव्हां याला वाटलें कीं, आपल्यांत कांहीं दोष आहे, म्हणून हे दक्षिणा घेत नाहींत. तेव्हां यानें आपल्या राज्यांत कशी स्थिति आहे याचें 'न मे स्तेनो जनपदे, न कदर्यो, न मद्यपो, नानाहिताग्निर्नाविद्वान् न स्वैरी स्वैरिणी कुतः' असें वर्णन केलें. आलेल्या लोकांनीं सांगितलें कीं, आम्ही दक्षिणेकरितां आलों नसून, वैश्वानर आत्म्याचें ज्ञान आम्हांस मिळावें म्हणून आलों आहोंत. तेव्हां यानें त्यांस ज्ञान सांगितलें ( छां. उ. ५. ११; १२; मै. उ. १. ४ ).

२ केकय देशाचा राजा. याची स्त्री मोठी साहसी होती. तिला कशाचीहि पर्वा नसे. यास एका ऋषीनें दिलेल्या वराच्या योगानें सर्व पक्ष्यांची भाषा कळे. एकदां असेंच एका जृंभ जोडप्याचे संभाषणामुळें यास हंसें आलें. तेव्हां याच्या स्त्रीनें हंसण्याचें कारण विचारलें असतां हा म्हणाला, तें कारण सांगतांच मी मरेन. इतकें तें भयंकर होतें तरी याच्या स्त्रीनें तें कारण सांगण्याचा हट्ट घेतला. तेव्हां त्या वर देणाऱ्या ऋषीला यानें ही गोष्ट सांगितली. त्यावरून त्या ऋषीनें यास आपल्या पत्नीस हांकून देण्यास सांगितलें व यानें त्याप्रमाणें लगेंच केलें. यास युधाजित् व कैकेयी अशीं दोन अपत्यें झालीं. भरताचा मामा युधाजित् होता. अश्वपति हें नांव उपनांवाप्रमाणें लावीत असें दिसतें ( वा. रा. अयो. १. २ ).

**अश्वपेज**—वेदाची शाखा सुरू करणारा (पाणिनि पहा).

**अश्वपेय**—वेदाची शाखा सुरू करणारा ( पाणिनि पहा ).

**अश्वमित्र गोभिल**—हा वरुणमित्र गोभिलाचा शिष्य ( वं. ब्रा. ३ ).

**अश्वमेध**—त्र्यरुणकृत दानस्तुतींतील एक राजा ( ऋ. ५. २७. ४-६ ).

**अश्वमेध भारत**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५.२७).

**अश्वमेधज**—( सो. पूरु.) सहस्राधीक राजाचा पुत्र. याचा पुत्र असीमकृष्ण ( भा. ९. २२ ).

**अश्वमेधदत्त**—( सो. कुरु. ) शतानीकाचा पुत्र. जनमेजयाचा पौत्र. याची आई वैदेही (म. आ. ६३. ८८ कुं.). हा अधिसोमकृष्ण असावा.

**अश्वय**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**अश्वरथ**—विश्वामित्र गोत्रांतील एक प्रवर.

**अश्वल**—वैदेह जनकाचा होता. वैदेह जनकानें मोठा यज्ञ केला व दक्षिणाहि खूप ठेवली. याज्ञवल्क्य सर्वश्रेष्ठ म्हणून पुढें झाल्यावर यानें याज्ञवल्क्याला कांहीं प्रश्न करून अडविण्याचा प्रयत्न केला. पण याला याज्ञवल्क्यानें गप्प बसविलें ( बृ. उ. ३.१.२; १० ).

**अश्वशंकु**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**अश्वसूक्ति काण्वायन**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८.१४-१५). व सामद्रष्टा (पं. ब्रा. १९.४.१०).

**अश्वसेन**—तक्षकाचा पुत्र. अर्जुनानें खांडववन जाळलें तेव्हां तक्षक तेथें नव्हता. अश्वसेनाच्या आईनें याला तोंडांत धरून उडी मारून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. तेव्हां अर्जुनानें तिचें डोकें उडविलें. पण सोसाट्याचा वारा सुटल्यामुळें हा दूर येऊन पडला आणि बचावला (म. आ. २५३. ९; २५४. ४७; श. ६२. ३४ कुं.). म्हणून यानें अर्जुनाचा सूड उगविण्याकरतां कर्णाच्या बाणावर आरोहण केलें. कृष्णानें हें ओळखून रथ असा दाबला कीं रथाचे घोडे गुडघ्यावर झाले. त्यामुळें बाण मानेवर न पडतां अर्जुनाच्या मुगुटावर पडून मुगुटाचे तुकडे झाले. पण अर्जुनानें याला ठार केलें (म. क. ९०).

**अश्वायु**—(सो.) मत्स्यमतें हा पुरूरवापुत्र होय.

**अश्वि**—धर्म व मुहूर्ता यांचा पुत्र.

**अश्विन्**—वैवस्वत मन्वंतरांतील देव (अश्विनीकुमार पहा).

**अश्विनी**—सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक.

२ अक्रूराच्या स्त्रियांतील एक.

**अश्विनीकुमार**—एकाच नांवानें ओळखल्या जाणाऱ्या द्युस्थानीय दोन देवता. यांच्या वर्णनपर ऋग्वेदांत सुमारें पन्नास सूक्तें आहेत. हे जुळे भाऊ असून यांची जोडी कधींहि फुटत नाहीं (ऋ. ३.३९.३). हे जुळे भाऊ सरण्यूपासून पहाटे उत्पन्न झाले (ऋ. १०.१७. २). पण हे दोघे वेगळे जन्मल्याचाहि उल्लेख आहे. एक निशेचा पुत्र व एक उषेचा पुत्र होता (नि. १२. २). नेहमीं यांची उगवण्याची वेळ उषा व सूर्योदय यांच्या मध्यें आहे (ऋ. ८.५.२). द्विवचनांत येणारा नासत्य शब्द एकवचनांत आला आहे (ऋ. ४.३.६). हे तरुण व देवांहून धाकटे आहेत (ऋ. ७.६७. १०; तै. सं. ७.२.७). यांचा रथ सोनेरी आहे व त्याला चाकें, बैठकी, धुरा वगैरे तीन तीन आहेत (ऋ. १.११८.१; २. १८०.१). सूर्येच्या विवाहसमारंभाला हे आले असतां यांच्या रथाचें एक चाक मोडलें (ऋ. १०.८५.१५). यांच्या रथाला श्येन (ऋ. १.११८.१), गरुड (४), हंस (ऋ.४.४५.४) व कांहीं ठिकाणीं पक्षी जोडल्याचा निर्देश आहे (ऋ. ६.६३.६). सोम व सूर्या यांच्या विवाहप्रसंगीं झालेल्या शर्यतींत यांच्या रथाला रासभ जोडलेले होते (ऐ. ब्रा. ४. ४-९). यांचा रथ एका दिवसांत पृथ्वी व स्वर्ग आक्रमितो (ऋ. ३.५८.८). यांचें वसतिस्थान द्यु व पृथ्वी (ऋ. १.४४.५), द्यौ व अंतरिक्ष (ऋ. ८.८.४). वृक्ष व गिरिगव्हर दिलें आहे (ऋ. ७. ७०.३). याचें स्थळ अज्ञात आहे (ऋ. ६. ६३.१; ८.६२.४). सूर्यकन्या सूर्येचे हे पति होत (ऋ.१.११७.१६; ४.४३.६). हे लोकांना संकटमुक्त करितात. (अत्रि, घोषा, भुज्यु व वंदन पहा). पण वायकांना पोरें देणें (ऋ. १. ११२.३; १०.१८४.२), वृद्धांना तरुण करणें (ऋ. १. ११९.७) इत्यादिहि गोष्टी आढळतात. अथर्ववेदांत प्रेमी युगुलांच्या भेटी करून देण्याविषयीं यांची प्रसिद्धी दिली आहे (अ.वे.२. ३०.२). शिवाय हे अंध, पंगु व रोगग्रस्त यांना बरे करणारे (ऋ. १०.३९.३), देवांचे धन्वन्तरि व मृत्यूला टाळणारे आहेत (ऋ. ८.१८.८; तै. ब्रा. ३. १. २. ११). यांनीं विदपलेला लोखंडी पाय बसविला वगैरे अनेक आख्यायिका आहेत (दधीच, भृज्यु, कवि व विमद पहा). अश्विदेवांची कल्पना गुरुशुक्रांच्या सान्निध्यावरून उत्पन्न झाली, हें दीक्षितांचें म्हणणें कोणालाहि पटण्यासारखें आहे (भारतीय ज्यो. पा. ६५).

अश्विनीकुमार म्हणजे आमचे वैदिक पूर्वज उत्तरध्रुव प्रदेशांत राहत असतांना त्यांनीं तेथें अवलोकन केलेले दोन देखावे—ज्यांना इंग्रजींत Astronomical and meteorological light किंवा Aurora Borealis असें म्हणतात—असावेत असें रा. वडेर यांचें मत आहे.

विवस्वानास संज्ञेचे ठायीं ती अश्वरूपानें संचरत असतां झालेले पुत्र. आपली स्त्री अश्विनी आहे, असें पाहून विवस्वानानें अश्वरूपानें तिजशीं संग केला. पण संज्ञेस हा परपुरुष असावा असें वाटून तें वीर्य तिनें नासापुटांतून बाहेर टाकिलें. त्यामुळें हे उत्पन्न झाले, म्हणून यांस अश्विनी, अश्विनीकुमार अगर नासत्य अशीं नामांतरें आहेत. (म. आ. ६७.३५ कुं.; भा.६.६. ४०). यांपैकीं थोरल्याचें नासत्य व धाकट्याचें दस्र अशीं नांवें आहेत (म. अनु. १५०). हे देवांचे वैद्य व हे वैवस्वत मन्वंतरांतील देव आहेत (भा. ८.१३.४; मनु पहा). देवांत हे शूद्र होत (म. शां. २०७.२६ कुं.).

उपमन्यूनें आपला गुरु आपोद धौम्य याच्या आज्ञेनें दृष्टिप्राप्त्यर्थ यांची स्तुति केली. या स्तुतीनें व गुरुवरील त्याच्या निष्ठेनें संतुष्ट होऊन यांनीं दृष्टि दिली (म. आ. ३. ५६ कुं.). हे एकदां च्यवनाश्रमांत आले असतां च्यवनानें यांस हविर्भाग मिळवून देण्याचें कबूल करून यांजजवळून तारुण्य प्राप्त करून घेतलें (म. व. १२४.६ कुं; भा. ९.३.२४). माद्रीनें आह्वान करून यांजपासून पांडूचे आज्ञेनें दोन पुत्र प्राप्त करून घेतले. हेच नकुल व सहदेव होत (म. आ. ६३.६६ कुं. १२३.१८ कुं.). हे शिशुमारचक्राच्या स्तनावर आहेत (भा. ५.२३.७; अश्विनीसुत पहा).

२ भास्करसंहितेंतील चिकित्सासारतंत्र नांवाच्या प्रकरणाचा कर्ता (ब्रह्मवै. २.१६).

**अश्विनीसुत**—सुतपस् भारद्वाजाची पत्नी तीर्थयात्रा करीत असतां तिला बलात्कारानें सूर्यापासून अश्विनीसुत नांवाचा सुंदर मुलगा झाला. ही हकीगत तिनें घरीं येऊन नवऱ्याला सांगितली. तेव्हां त्यानें दोघांसहि टाकलें. ती बाई गोदावरी नदी झाली. सूर्यानें याला मंत्रतंत्र व ज्योतिष शिकविल्यामुळें हा ज्योतिषी झाला, पण पुढें सुतपसनें रोगी व यज्ञभागरहित होशील म्हणून ह्या दोघांना शाप दिला. पुढें सूर्याची स्तुति केल्यावर रोगरहित व यज्ञांत भाग मिळविणारा झाला ( ब्रह्मवै. १. १०-११). अश्विनीकुमारांशीं ही गोष्ट जुळती आहे.

**अश्वय**— ( वश पहा ).

**अषाढ उत्तर पाराशर्य**—एक आचार्य ( जै. उ. ब्रा. ३. ४१. १. ).

**अषाढ कैशिन्**— कुंतिदेशानें पांचाल देशाचा पराभव केला, याबाबत याचा उल्लेख आहे ( क. सं. २६. ९. ).

**अषाढ सावयस**—यज्ञांतील यजमानानें पाळावयाचीं व्रतें सांगतांना त्यानें पूर्व दिवशीं अनशनव्रत करावें असें याचें मत आहे. कारण, येणाऱ्या देवतांना हवि दिल्यावांचून त्यानें खातां उपयोगी नाहीं ( श. ब्रा. १. १. १. ७. ).

**अषाढि सौश्रोमतेय**—यज्ञकुंडाच्या विटा लावण्याबाबत अयोग्य पद्धति स्वीकारली गेली, म्हणून हा मरण पावला ( श. ब्रा. ६. २. १. ३७. ).

**अष्टक वैश्वामित्र**- सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १०४ ). विश्वामित्राचा मुलगा ( ऐ. ब्रा. ७. १७ ). विश्वामित्र ऋषीस माधवीपासून झालेला मुलगा ( म. उ. ११९. १८-२० ). हा मोठा विद्वान् होता. एकदां हा आपल्या प्रतर्दन, वसुमनस् आणि शिबि या तिघां भावांसह रथांत बसून चालला असतां वाटेंत नारद भेटला. त्यालाहि यानें रथांत घेतलें आणि प्रश्न केला कीं, आम्हां चौघांपैकीं आधीं कोण पतन पावेल तें सांग. तेव्हां नारदानें याला सांगितलें कीं, तूं पुष्कळ गोप्रदानें केलींस, तरी तुला त्याबद्दल गर्व असल्यामुळें तूंच प्रथम पतन पावशील ( म. व. १९८ ). माधवीचा बाप म्हणजे याचा आजा ययाति आत्मश्लाघेमुळें स्वर्गांतून खालीं पडला, तेव्हां त्याला यानें ह्या लोकासंबंधीं व परलोकासंबंधीं अनेक प्रश्न विचारून माहिती मिळविली व आपलें पुण्य देऊन त्याला पुनः स्वर्गास पाठविलें ( म. आ. ८२-८४; मत्स्य. ३८ ). हा विश्वामित्र गोत्राच्या प्रवरांत आहे. याच्या मुलाचें नांव लौहि.

**अष्टम**— ब्रह्मसावर्णि मन्वन्तरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**अष्टादंष्ट्र वैरूप**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.१११ ). सामद्रष्टा ( पं. ब्रा. ८.९. २१ ).

**अष्टावक्र**- कहोळाचा पुत्र. उद्दालकाच्या सुजाता मुलीचा मुलगा. म्हणजे सुप्रसिद्ध श्वेतकेतु याचा हा मामा लागतो ( म. व. १३४ ). कहोळाच्या सतत चाललेल्या अध्ययनाची यानें गर्भांतूनच थट्टा केली, तेव्हां आपल्या शिष्यासमक्ष अपमान केला म्हणून त्यानें याला तूं आठ ठिकाणीं वांकडा होशील, असा शाप दिला. पुढें कांहीं दिवसांनी सुजाता दहावा महिना लागल्यामुळें बाळंतपणाला टेकली. पण जवळ पैसा नसल्यामुळें कहोळ जनकाकडे कांहीं पैसा मिळावा म्हणून गेला. पण तेथें वरुणपुत्र बंदीनें कहोळाला वादांत जिंकून तेथील नियमाप्रमाणें पाण्यांत बुडविलें. पण ही गोष्ट उद्दालकाच्या इच्छेप्रमाणें सर्वांनीं गुप्त ठेवण्याचें ठरविलें. अष्टावक्र जन्मास आल्यावर उद्दालकासच बाप आणि श्वेतकेतूस हा भाऊ समजत असे. अष्टावक्र बारा वर्षांचा झाल्यावर उद्दालकाच्या सहज मांडीवर बसला होता, तेव्हां श्वेतकेतूनें हीं तुझ्या बापाची मांडी नव्हे, असें म्हणून याचा अपमान केला. तेव्हां विचारल्यावरून सुजातेकडून याला सर्व हकीगत कळली. नंतर हा श्वेतकेतूबरोबर जनकाच्या यज्ञाकडे गेला. तेथें प्रवेशाला अडचण आली. द्वारपालांशीं सयुक्तिक भाषण करून यानें सभेंत प्रवेश मिळविला; व तेथे बंदीला वादाला आह्वान करून त्याला वादांत पराजित केलें. बंदीनें ज्यांना ज्यांना वादांत जिंकून पाण्यांत बुडविलें होतें ते सर्व वरुणाच्या घरच्या द्वादशवार्षिक सत्रांत गेले ते हे सर्व परत येत आहेत, असें यानें म्हणून सर्वांना तेथें परत आणलें. कहोळाची व अष्टावक्राची भेट झाली. तथापि शेवटीं बंदीला जनकानें सागरांत बुडविलेंच ( म. व. १३०-१३६ ). वरील अष्टावक्राची कथा लोमशानें युधिष्ठिराला श्वेतकेतूच्या आश्रमांत आल्याच्या निमित्तानें सांगितली आहे. कहोळानें याला समंगा नदींत स्नान करावयास सांगून याचें शरीर सरळ केलें ( म. व. १३६).

पुढें वदान्य ऋषीच्या सुप्रभा नांवाच्या मुलीशीं याचें लग्न झालें. पण त्यानें यास सांगितलें कीं, उत्तर दिशेस हिमालयाच्या वरच्या भागांत एक वृद्ध स्त्री तपश्चर्या करीत आहे, तेथपर्यंत जाऊन परत आल्यावर हा विवाह होईल. अष्टावक्रानें ही अट कबूल केली व त्याप्रमाणें प्रवास करीत त्या दिव्य प्रदेशांतून कुबेराचा सत्कार स्वीकारून हा वृद्ध स्त्रीच्या स्थलापाशीं आला. तेथें यास ऐश्वर्याची परमावधि आढळून आली. तेथें अनेक सुंदर स्त्रिया याच्या भोंवतीं होत्या. त्यांना जावयास सांगून त्या वृद्ध स्त्रीपाशीं यानें राहण्याचें ठरविलें. रात्रीं हा शयनावर पडला असतां ती वृद्ध स्त्री थंडीनें हुडीहुडी भरल्याप्रमाणें थडथडत अष्टावक्राला येऊन बिलगली व अष्टावक्राशीं प्रेमयाचना करूं लागली. पण अष्टावक्रानें परस्त्री म्हणून तिचा अव्हेर केला. याला तिच्या

प्रत्येक गोष्टीकडे पाहून किळस येई. दुसऱ्या दिवशीं दिवसभर उत्तम ऐश्वर्यांत गेल्यावर रात्रीं पुनः तसाच प्रकार घडला. तिनें तारुण्य स्वीकारलें होतें. तसेंच तिनें आपण अद्याप कुमारी असल्याचेंहि सांगितलें. परंतु आपला विवाह ठरल्याचें सांगून यानें तिला निवृत्त केलें. तेव्हां तिनेंहि याच्या निग्रहीपणाबद्दल समाधान व्यक्त करून केवळ तुझ्या भावी सासऱ्याच्या इच्छेनुसार उत्तरदिग्देवता असणाऱ्या म्या तुझी परीक्षा पाहिली, असें याला सांगितलें ( म. अनु. ५०-५२ कुं. ). नंतर याचा सुप्रभेशीं विवाह झाला. हा मोठा तत्त्वज्ञानी होता. याच्या नांवावर अष्टावक्रगीता नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. ती गीता यानें जनकाला सांगितली. एकदां लोकेश्वर नांवाच्या ब्रह्मदेवाच्या वेळीं व्याधाच्या बाणानें हरिहर नांवाच्या ब्राह्मणाचा पाय तुटला. तो पाय चक्रतीर्थांत स्नान केल्यानें परत आला. असें चक्रतीर्थाचें माहात्म्य यानें सांगितलें (स्कंद. ३.१.२४). अष्टावक्रसंहिता नांवाचा ग्रंथ याच्या नांवावर आहे. (c. c.). यानें अप्सरांना विष्णु पति मिळेल असा वर दिला, पण पाण्यांतून बाहेर आल्यावर अप्सरा याचें वकत्व पाहून हंसल्या, तेव्हां यानें त्यांना आभीर तुम्हांला पळवतील, असा शाप दिला (ब्रह्म. २१२. ८६). त्याप्रमाणें कृष्ण-निर्याणानंतर द्वारकेहून कृष्णस्त्रियांना अर्जुन घेऊन चालला असतां वाटेंत आभीरांनीं कृष्णस्त्रियांना पळविलें.

**असकृत्**—भृगु व पुलोमा यांचा पुत्र.

**असंग**—( सो. वृष्णि. ) मत्स्य व विष्णु यांच्या मतें युयुधानपुत्र.

**असमंजस्**—(सू. इ.) सगराला केशिनी नामक स्त्रीच्या ठिकाणीं झालेला पुत्र (भा. ९.८.१५; ह. वं. १.१५; विष्णु. ४.४.३; ब्रह्म. ८.७३; वायु. ८.२६.१५९; नारद. ८.६८; वा. रा. बा. ३८). हा शैब्येचा पुत्र ( म. व. १०७ ). हा भानुमतीचा पुत्र (पद्म. सृ. ८). हा पूर्वजन्मीं योगी असून कुसंगतीमुळें योगभ्रष्ट झाला होता. याला पूर्वजन्मींचें स्मरण असल्यामुळें संगतीचा अगदीं वीट आला होता. व पुनः कुसंगति घडूं नये म्हणून यानें आपलें वर्तन असमंजसपणाचें ठेविलें होतें. याच्या अंगांत पिशाच येत असे व त्यामुळें हा असें वर्तन करी (ब्रह्मांड. ३. ५१). अशा वर्तनामुळें लोकांनीं आपला कंटाळा करावा, हा उद्देश असे. त्याप्रमाणें हा लोकांच्या मुलांना सरयू नदींत बुडवीत असे. याबद्दल लोकांनीं सगराकडे तक्रार केली. यावरून राजानें याला घराबाहेर हांकलून लाविलें असतां हा वनांत निघून गेला. जातांना यानें लोकांचीं बुडविलेलीं सर्व मुलें योगसामर्थ्यानें जिवंत करून लोकांना परत आणून दिलीं. तेव्हां नागरिकांना आश्चर्य वाटून राजास अत्यंत पश्चात्ताप झाला (भा. ९.८.१४-१९; म. व. १०७; ब्रह्म. ७८. ४०-४३). दशरथ, कैकेयी व सिद्धार्थ नामक प्रधान यांच्या संवादांत याचा उल्लेख आला आहे ( वा. रा. बा. ३६ ). याचा पुत्र अंशुमान्. असमंजसाला पंचजन असें नामांतर होतें (ह. वं. १.१५; ब्रह्म. ८.७३). हा शिवभक्त होता. यानें ३०९०० वर्षें राज्य केलें ( भवि. ब्राह्म. १; प्रति. १ ).

**असमाति राथप्रोष्ठ**—रथप्रोष्ठ कुलांतील ऐक्ष्वाक असमाति आणि त्याचे उपाध्याय गौपायन यांचें भांडण झालें ( जै. ब्रा. ३.१६७; पं. ब्रा. १३.१२.५; ऋ. १०.५७. १; ६०. ७). नंतर किरात आणि आकुलि या दोन असुरांनीं कुलोपाध्यायास सोडून देण्याबद्दल राजाचें मन वळविलें आणि त्यांच्या पैकीं गौपायन सुबंधूचा वध करविला. परंतु त्याच्या भावांनीं त्याला या सूक्ताच्या जपानें जिवंत केलें ( ऋ. १०.६०; बृहद्दे. ७.९१-९६ ).

**असमौजस्**—( सो. यदु.) वायुमतें हा कंबलबर्हिषाचा पुत्र होय.

**असिक्नी**—प्राचेतस दक्षाची स्त्री. ही पंचजन प्रजापतीची कन्या, म्हणून हिला पांचजनी असें म्हटलेलें आहे ( भा. ६.४).

**असिज**—वायुमतें उतथ्यास असलेलें नामांतर.

**असित**—मांधाता राजाच्या हातून पराभव पावलेला एक राजा ( म. शां. २९ ).

२ ( सू. इ. ) भरतराजाचा पुत्र. याचे शत्रु हैहय, तालजंघ व शशबिंदु यांनीं याचा पराभव करून याला राज्याबाहेर हांकलून लाविलें. तेव्हां हा आपल्या उभयतां भार्यांसहित हिमालय पर्वतावर जाऊन राहिला. तेथेंच हा मरण पावला. मरणसमयीं याच्या दोन्ही स्त्रिया गर्भिणी होत्या. त्यांपैकीं एकीनें आपल्या सवतीच्या गर्भाचा नाश व्हावा म्हणून कालिंदीला सविष अन्न घातलें. तेव्हां ती अत्यंत शोक करूं लागली. परंतु च्यवन भार्गव मुनींच्या आशीर्वादानें तिला सगर नांवाचा सविष असा पुत्र झाला ( वा. रा. बा. ७०; अयो. ११० ).

**असित काश्यप**—सूक्तद्रष्टा. याला देवल काश्यप म्हणतात ( ऋ. ९. ५-२४. ). कश्यपाचा पुत्र. याचा गय आणि जमदग्नि यांच्यासह उल्लेख आहे ( अ. वे. ६. १३. ७. १ ). याला असित देवल ( पं. ब्रा. १४. ११. १८-१९; क. सं. २२. २ ). व असितो देवल म्हणतात. ( म. स. ४. ११; शां. २२९; २७५. ).

याची स्त्री हिमालयाची कन्या एकपर्णा. युधिष्ठिराच्या यज्ञांतील ऋत्विज (भा. १०.७४.७). युधिष्ठिरानें मयसभेमध्यें प्रवेश केला, त्या वेळीं इतर ऋषिगणांसमवेत हा त्यांच्या बरोबर

होता ( म. स. ४ ). नारद युधिष्ठिराला ब्रह्मदेवाच्या सभेचें वर्णन सांगत असतां त्या ठिकाणीं हा व्रतादिकांचें अनुष्ठान करीत होता (म. स. ११) श्रीकृष्ण व बलराम यांना भेटण्याकरितां अनेक ऋषींसहित स्यमंतकक्षेत्रीं हा गेला होता ( भा. १०. ८४. ३ ). पुढें कृष्णासहित श्रुतदेव ब्राह्मण व हा बहुलाश्वाला भेटण्याकरितां विदेहाकडे गेला होता (भा. १०. ८६. १८). त्याप्रमाणें नारदादिकांसह पिंडारक क्षेत्रीं हा गेला होता ( भा. १. १. ११ ).

मुमुक्षूनें ब्रह्मपदाची प्राप्ति कशी करून ध्यावी, या विषयासंबंधानें याचा जैगीषव्याशीं ( म. शां. २२९ ). व नारदाशीं ( म. शां. २७५ ) बराच संवाद झालेला होता. हा आदित्यतीर्थाचे ठिकाणीं गृहस्थाश्रमानें राहत असून त्यानें तेथें अचल भक्तिभावानें योग संपादन केला होता. एकदां जैगीषव्य ऋषि भिक्षुकाच्या वेषानें याच्या आश्रमांत आला असतां त्याचा यानें उत्तम प्रकारें गौरव करून पुष्कळ वर्षे पर्यंत पूजन केलें. बराच काल झाला, तरी जैगीषव्य एकहि चकार शब्द बोलत नाहीं, हें पाहून हा त्याची मनांतल्या मनांत अवहेलना करीत घागर घेऊन समुद्रावर गेला-तों पूर्वीच तेथें जैगीषव्य जाऊन बसलेला होता. त्याला पाहतांच याला मोठें आश्चर्य वाटलें. नंतर स्नान करून हा आश्रमांत परतला. तों पुनः जैगीषव्य आश्रमांत बसलेला याच्या दृष्टीस पडला. तेव्हां जैगीषव्याच्या तपाचा व योगाभ्यासाचा प्रभाव पाहून याला फार चिंता लागली. व त्याच्या विषयीं जिज्ञासा पूर्ण करण्यासाठीं हा आश्रमांतून अंतरिक्षांत उडाला तों तेथें सिद्ध जैगीषव्याचें पूजन करीत असल्याचें याला आढळून आलें. तेव्हां हा अगदीं भांबावून गेला. नंतर जैगीषव्य निरनिराळ्या लोकीं पुढें पुढें चालला. तोंपर्यंत यानें त्याचा सारखा पाठलाग सुरू ठेवला होता. शेवटीं पतिव्रतांच्या लोकीं पोंचल्यावर जैगीषव्य गुप्त झाला. यानें तेथील एका सिद्धाजवळ चौकशी करितां तो ब्रह्मपदीं गेल्याचें याला समजलें. म्हणून यानेंहि ब्रह्मलोकीं जाण्याकरितां उंच उडी मारली, परंतु याचें सामर्थ्य कमी असल्यामुळें हा खालीं पडला. शेवटीं त्या सिद्धानें याला परत जाण्यास सांगितल्यावरुन हा ज्या क्रमानें वर गेला होता, त्याच क्रमानें सर्व लोक उतरून आपल्या आश्रमांत परत आला. जैगीषव्य अगोदरच आश्रमांत येऊन बसलेला याच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्याच्या योगसामर्थ्यानें हा थक्क होऊन गेला व नम्र होत्साता यानें जैगीषव्याजवळ मोक्षधर्म जाणण्याविषयीं इच्छा दर्शविली. त्यावरून जैगीषव्यानें याला योगाचा उपदेश करून संन्यासदीक्षा दिली. त्यायोगें असित देवलास परम सिद्धि व श्रेष्ठ असा योग प्राप्त झाला (म. शां. ४९–५०; देवल पहा). हा कश्यपाचा व शांडिल्याचा एक प्रवरहि आहे. यानें सत्यवतीला मागणी घातली होती (म.आ. १००). याचा पुत्र देवल (ब्रह्मांड. ३. ८. २९–३३). कश्यप कुलांतील गोत्रकार ( मत्स्य. १९९. १९; लिंग. १. ६३. ५११) व मंत्रकार (वायु. १, ५९, १०३; मत्स्य. १४५. १०६–१०७; ब्रह्मांड. २. ३२. ११२–११३ ).

२ जनमेजयाच्या सर्पसत्रांतील एक सदस्य (म. आ. ५३ ).

**असित धान्वन**—वेदकालीन राजा. याचा असुरविद्या हा वेद असून दहा दिवस चालवयाच्या परिप्लवाख्यानांत याचा उल्लेख आहे ( सां. श्रौ. १६. २. २० ). याला असित धान्व असेंहि म्हटलें आहे. ( श. ब्रा. १३. ४. ३. ११; आ. श्रौ. १०.७ ).

**असित वार्षगण**—हरित काश्यपाचा हा शिष्य. यांचा शिष्य जिव्हावत् बाध्योग ( बृ. उ. ६. ५. ३ ).

**असितमृग**—हें कश्यप कुलाचें नांव आहे. ह्यांना जनमेजयानें एका यज्ञांतून वगळलें होतें. तथापि ह्यांनीं राजानें नेमिलेल्या भूतवीर नांवाच्या ब्राह्मणांकडून यज्ञाचें नेतृत्व हिरावून आपणांकडे घेतलें (ऐ.ब्रा.७.२७). असितमृग हे कश्यपाचे पुत्र होते व एकाचें नांव कुसुरुबिन्दु औद्दालकि असें होतें ( जै. ब्रा. १. ७५; ष. ब्रा. १. ४ ).

**असिता**—कश्यप व मुनि यांची एक कन्या अप्सरा.

**असितांग**—अष्ट भैरवांतील एक.

**असिपर्णिनी**—कश्यप व मुनि यांची एक कन्या.

**असिलोमन्**—कश्यप व दनु यांचा पुत्र, एक असुर.

**असीमकृष्ण**—( सो. कुरु. ) अश्वमेधक राजाचा पुत्र. याचा पुत्र निमिचक्र ( अधिसामकृष्ण पहा ).

**असुरा**—कश्यप प्राधा व यांची कन्या, एक अप्सरा.

**असुरायण**—विश्वामित्राचा पुत्र (म. अनु. ७.५६ कुं.).

२ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील एक. हा वायु व ब्रह्मांड यांच्या मतें कौथुम पाराशर्याचा शिष्य ( व्यास पहा ).

**असूर्तरजस्**—मूर्तय राजास नामांतर.

**असोम**—मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**अस्ति**—जरासंधाच्या दोन कन्यांतील ज्येष्ठ. हिची कनिष्ठ भगिनी प्राप्ति. या दोघी कंसाच्या स्त्रिया होत्या. कंसास कृष्णानें मारल्यावर दोघीहि पितृगृहीं येऊन राहिल्या ( भा. १०. ५०; म. स. १४.३२ कुं. ).

**अस्तिक**—( हरिमेध पहा ).

**अस्वहार्य**—अंगिरसगोत्रांतील मंत्रकार.

**अहंयाति**—(सो. पूरु.) शर्याति व वरांगी यांचा पुत्र. याची स्त्री कृतवीर्यपुत्री भानुमती. याचा पुत्र सार्वभौम ( म. आ. ६३.१३ कुं. ). भागवत व विष्णु यांच्या मतें संयातिपुत्र. मत्स्यांत अहंवर्चस् असा पाठभेद आहे.

**अर्हद्वर्चस्**—( अर्हयाति पहा )

**अहर**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**अहल्या**—ह्या स्त्रीचें अहल्या मैत्रेयी हें नांव आहे ( श. ब्रा. ३.३.४.१८; जै. ब्रा. २-७९ ष. ब्रा. १.१ ).

हिचा पिता मुद्गल होय ( भा. ९. २१ ). ही वध्य्रश्वास मेनकेपासून झालेली कन्या होय ( ह. वं. १.३२). ही ब्रह्ममानसपुत्री होय ( ब्रह्म. ८७ ). ब्रह्मदेवानें ही कन्या अत्यंत सुरूप निर्माण केली होती. हल म्हणजे विरूपता आणि हल्य म्हणजे विरूपतेमुळें आलेलें निंद्यत्व. हिला हल्य नव्हतें म्हणून हिचें नांव ब्रह्मदेवानें अहल्या असें ठेवलें ( वा. रा. उ. ३० ). पुढें ब्रह्मदेवानें ही शरद्वत गौतमाजवळ ठेव म्हणून ठेवली व ही वयांत आल्यावर त्यानें ब्रह्मदेवास परतहि दिली. त्या मुनीचें जितेंद्रियत्व व तपःसिद्धि पाहून ब्रह्मदेवानें ही कन्या त्यास भार्या म्हणून दिली ( वा. रा. उ. ३०; ह. वं. १. ३२; विष्णु. ४. १९; मत्स्य. ५० ). पण इंद्र, अग्नि, वरुण इत्यादि देव, दानव व राक्षस इत्यादिकांनाहि हिचा अभिलाष होता. तेव्हां प्रत्येकाच्या सामर्थ्याचीहि परीक्षा पहावी म्हणून ब्रह्मदेवानें ठरविलें कीं, जो प्रथम पृथ्वीप्रदक्षिणा करील, त्यास मी ही कन्या देईन. अहल्येचे अभिलाषी प्रदक्षिणा घालूं लागले. पण गौतमानें अर्धप्रसूत धेनु ही पृथ्वीच असल्यामुळें तिला प्रदक्षिणा घातली व एका लिंगास प्रदक्षिणा घालून तो ब्रह्मदेवाकडे गेला. तेव्हां गौतम प्रथम आला असें जाणून ब्रह्मदेवानें त्यास आपली कन्या दिली. देव एकामागून एक येऊं लागले; पण त्यांना कळलें कीं, अहल्यागौतमांचा विवाह झाला. ही बातमी ऐकून इंद्रास फार वाईट वाटलें, कारण त्याचें हिच्यावर प्रेम होतें. विवाहानंतर गौतम व अहल्या ब्रह्मगिरीवर राहण्यास गेलीं ( ब्रह्म. ८७ ).

पुढें एके दिवशीं संधि साधून गौतम आश्रमांतून नुकताच गेलेला पाहून इंद्र गौतमाच्या रूपानें हिचा उपभोग घेण्यास्तव आला. गणेशपुराणांत नारदानें अहल्येच्या रूपाची स्तुति करितांच तो कामुक होऊन आला असें दिलें आहे.

तेव्हां पतिव्रतांधर्मास अनुसरून त्याचा व हिचा समागम झाला ( ब्रह्म. ८७; १२२; म. उ. १२; अनु. १५३; वा. रा. उ. ३०; स्कंद. १.२.५२ ). हा बरेच दिवस लागोपाठ येत असे, असें ब्रह्मपुराणांत आहे ( ८७ ). पण तो इंद्र आहे हें जाणूनहि हिनें त्याच्याशीं समागम केला (वा.रा.बा.४८;५१).अहल्येनें त्याच्या अंगाच्या दिव्य वासावरून हा आपला पति नसावा असें ताडलें. इतक्यांत गौतम ऋषि आला. तेव्हां अहल्येस व इंद्रास फार भय वाटलें. पुढें दोन घटकांनीं ही पुढें आली व पतीच्या पायां पडून हिनें झालेला प्रकार सांगितला ( गणेश. १.३० ). दररोज गौतम नदीवर स्नानास गेला तरी दुसरा गौतम विद्यार्थ्यांस दिसतच असे. एके दिवशीं इंद्र आंत असतां गौतम आल्याबरोबर त्या विद्यार्थ्यांनीं त्यास आंतील गौतम दाखविला. तेव्हां गौतम कोपून त्यानें इंद्रास व अहल्येस शाप दिला ( ब्रह्म. ८७ ).

गौतम इंद्रास शाप देणार तों तो मांजराचे रूपानें घाईनें पळूं लागला. तेव्हां गौतमास शंका येऊन त्यानें त्यास दरडावून तूं कोण म्हणून विचारलें. तेव्हां इंद्र मूर्तिमंत त्यासमोर उभा राहिला ( ब्रह्म. ८७; पद्म. सृ. ५० गणेश. १.३१). तेव्हां गौतमानें त्यास शाप दिला कीं, तूं शत्रूंच्या हातून पराभूत होशील. मनुष्यलोकांत जारकर्म सुरू करणारांचा तूं उत्पादक असल्यामुळें प्रत्येक जारकर्माचें अर्धे पाप तुझ्या माथीं बसेल. देवराजांना अक्षयस्थान कधीं प्राप्त होणार नाहीं ( वा. रा. उ. ३०; ब्रह्म. १२२ ). तुझ्या अंगावर सहस्र भोकें उत्पन्न होतील ( म. अनु. ४१; १५३; ब्रह्म. ८७; पद्म. सृ. ५० ). तूं वृषणरहित होशील ( वा. रा. बा. ४८; लिंग. १. २९ ). नंतर अहल्येकडे वळून गौतम म्हणाला, तूं कोणालाहि दिसणार नाहींस अशा रीतीनें येथें विध्वंस पावशील व तुझें रूप सर्वत्र विभागलें जाईल. जेव्हां राम येथें येईल तेव्हां तुझा उद्धार होईल ( वा. रा. बा. ४८; उ. ३० ). तूं शिला होशील ( आ. रा. सार. १.३; स्कंद. १.२.५२; गणेश. १.३१ ). तूं एक जनस्थानीं शुष्क नदी होशील (आ. रा. सार. १.३; ब्रह्म. ८७). तुझ्या देहावर केवळ अस्थिचर्म राहील. सजीव प्राण्याप्रमाणें अंगावरील मांस व नखें तुझ्या शरीरांत उत्पन्न होणार नाहींत व तुझ्या या रूपानें स्त्रियांस पापकर्माची दहशत बसेल ( पद्म.सृ.५४).यावर अहल्येनें विनंती केली कीं, इंद्र आपलें रूप घेऊन आला असल्यामुळें मला ओळखूं आला नाहीं. तेव्हां शरद्वत गौतमानें हिचा अपराध नाहीं असें ध्यानस्थ होऊन ठरविल्यावर उःशाप दिला कीं, जेव्हां राम येथें येईल, तेव्हां तो पादस्पर्शानें तुला उद्धरील ( वा. रा. बा. ४८-४९; उ. ३०; गणेश. १.३१ ). गौतमानें हिच्या मुक्तीस्तव कोटितीर्थावर तप केलें. तेव्हां ही मुक्त झाली. त्यायोगें अहल्यासरोवर निर्माण झालें. त्या आनंदांतच गौतमानें गौतमेश्वर लिंगाची थापना केली ( स्कंद. १.२.५२). तसेंच तुझा गोदावरीशीं संगम होईल, तेव्हां तूं पूर्ववत् होशील असा हिला उःशाप आहे (ब्रह्म. ८७ ). तप करून शापानंतर ही पुनः पतीशीं संगत झाली. हिला शापापूर्वी शतानंद नांवाचा पुत्र होता. हा निमिवंशीय राजांचा उपाध्याय होता ( वा. रा. बा. ५१; आ. रा. सार १.३; भा. ९.२१; ह. वं. १.३२). हिला दिवोदास नांवाचा भाऊ होता (भा. ९.२१; ह. वं. १.३२). तो उत्तर-

पंचालाचा राजा होता. अहल्यायै जार असें इंद्राचें गौरवानें वेदांत वर्णन आहे. त्याअर्थी ही कथा रूपकात्मक असावी.

हिनें उत्तंक नामक आपल्या पतीच्या शिष्यास सौदासाच्या पत्नीचीं कुंडलें गुरुदक्षिणा म्हणून आणण्यास सांगितलीं (म. आश्व. ५६). इंद्रानें हिच्याशीं जो व्यभिचार केला तो देवांच्या कार्यास्तवच केला. कारण, गौतमाचें तप फार झालें होतें व त्याचा क्षय कर्तव्य होता (वा. रा. बा. ४९). हिला गौतमी असेंहि म्हटलें आहे (ब्रह्म. ८७). महर्षि गौतमाच्या वनांत अहल्योद्धारतीर्थ प्रसिद्ध आहे (म. व. ८४).

अहल्या व इंद्र यांच्या संबंधाची कथा रूपकात्मक आहे असें ब्राह्मणग्रंथ, जैमिनीसूत्रें वगैरेवरून दिसून येतें.

(१) अहल्या ही रात्र, गौतम म्हणजे चंद्र व इंद्र म्हणजे सूर्य. असें हें रूपक समजून त्याचें स्पष्टीकरण असें सांगतात कीं, इंद्ररूपी सूर्यानें अहल्यारूपी रात्रीचें धर्षण केलें, असें हें निसर्गरहस्य आहे (श. ब्रा. ३. ३. ४. १८).

(२) अहल्येचा रामचंद्रानें उद्धार केला याचें डॉ. रवींद्रनाथ टागोर यांनीं केलेलें पुढील विवरण सुंदर आहे. हल म्हणजे नांगर, हल्या म्हणजे नांगरलेली जमीन व अहल्या म्हणजे पडीक जमीन. अगस्त्य ऋषीनें दक्षिणेंत प्रथम वसाहत केली म्हणजे दक्षिणेंतील अहल्या जमीन हल्या करून तिचा उद्धार केला व त्या अहल्याभूमीची शापापासून मुक्तता केली. अशा प्रकारें रामानें अहल्येचा उद्धार केला म्हणजे दक्षिणेंतील पडीक जमीन लागवडीस आणली.

२ इंद्रद्युम्नपत्नी. ही इंद्रु ब्राह्मणाशीं रत झाली. हिच्या स्थूल शरीराला शिक्षा करून उपयोग झाला नाहीं. कारण ही मनोमय शरीरानें तादात्म्य पावली होती (यो. वा. ३. ८९–९१).

**अहि**—इंद्राचा शत्रु. (ऋ. १. ५१. ४) हा निजला असतां याला मारून इंद्रानें पाणी मोकळें केलें (ऋ. २. १२. ३).

**अहित**—मणिवरास देवजनीपासून झालेला पुत्र. यास गुह्यक असें साधारण नांव आहे.

**अहिरावण-महिरावण**—पाताळांत अहिरावण व महिरावण नांवाचे दोन रावणाचे मित्र होते. यांना रावणानें रामाचा नाश करावयास सांगितलें. पण सुवेळेवर सर्व सैन्य अभेद्य भिंतीच्या आंत असल्यानें यांनीं आकाशांतून शिबिरांत उडी टाकली; आणि शिळेवर निजलेल्या रामलक्ष्मणांना शिळेसह घेऊन हे पाताळांत गेले. पण मारुती माग काढीत निकुंभिलेस आला. याला कपोतकपोतींच्या संवादावरून रामलक्ष्मणांना देवीपुढें बलि देण्याकरितां दैत्यांनीं रसातळीं नेल्याचें समजलें. मारुती तिकडे निघाला असतां द्वारावर त्याला मकरध्वज भेटला. प्रश्नोत्तरांत दोघांचें पितापुत्रांचें नातें निघालें (मकरध्वज पहा). मकरध्वजानें कामाक्षीच्या मंदिरांत जाऊन बसावें व कार्य साधावें असें सुचविलें. पुढें सकाळीं वाद्यांच्या गजरांत त्यांना घेऊन राक्षस तेथें आले. तेव्हां मारुतीनें देवीचा स्वर काढून झरोक्यांतून पूजा करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें राक्षसांनीं देवीला पुष्कळ उपचार अर्पण केले व रामलक्ष्मणहि दारांतून आंत सोडले. नंतर तिघांनीं मिळून सर्व राक्षसांना मारण्यास सुरवात केली. पण अहिरावणमहिरावण यांच्या रक्तापासून पुनः तसलेच राक्षस निर्माण होऊं लागले. तेव्हां मारुतीनें अहिरावणाच्या बायकोस यांना मारण्याचा उपाय विचारला. तेव्हां, मी नागकन्या आहें, पण या दुष्टानें बलात्कारानें मला येथें आणिली; महिरावणहि माझ्यावर लुब्ध आहे; पण मी त्याला अनुकूल होत नाहीं, असें सांगून तिनें म्हटलें कीं, मजशीं राम विवाह करील तर मी उपाय सांगत्यें. तेव्हां रामाच्या भारानें हा मंचक मोडला नाहीं, तर तो तुझ्याशीं विवाह करील, असें मारुतीनें सांगितलें. तेव्हां ती म्हणाली, पूर्वी कांहीं मुलें भ्रमरांना काट्यांनीं टोंचीत होतीं त्यांस या दोघां बंधूंनीं सोडविलें. त्यामुळें ते प्रत्युपकार करण्याकरितां अमृतबिंदूंनीं यांना पुनःपुनः सजीव करीत असतात. यास्तव त्या भ्रमरांना तूं मार. सध्यां ते सर्व राक्षसांच्या निद्रास्थानीं आहेत. हें समजतांच मारुतीनें असंख्य भ्रमर मारिले. इतक्यांत एक भ्रमर त्याला शरण आला. त्यास जीवदान देऊन अहिरावणाच्या पत्नीचा मंचक पोखरून ठेवण्यास मारुतीनें सांगितलें; व तो स्वतः रामाकडे आला. इतक्यांत रामाच्या बाणांनीं सर्व राक्षस मरून पडले. पुढें मारुतीच्या आग्रहावरून राम नागकन्येच्या मंदिरांत गेला व पर्यंकाला स्पर्श करितांच तो मोडल्यामुळें तिला तिसऱ्या जन्मीं पत्नी करण्याचें आश्वासन देऊन दोघे सुवेळेस परत आले. रामवचनावर विश्वास ठेवून अहिरावणपत्नीनें अग्नींत देहत्याग केला (आ. रा. सार. ११).

**अहिर्बुध्न्य**—ही एक अन्तरिक्षस्थ देवता आहे (नि. ५. ४). हें एक वृत्राचें स्वरूप आहे. ऋग्वेदांत याकरितां स्वतंत्र सूक्त नसून कांहीं ऋचांत याचें स्तवन आहे. हें एक गार्हपत्य अग्नीचें नांव आहे (वा. सं. ५. ३३; ऐ. ब्रा. ३. ३६; तै. ब्रा. १. १. १०. ३.). हें रुद्राचें नांव आहे (भा. ६. ६.).

२ हा दुष्ट राक्षसांच्या संहारार्थ सुदर्शन चक्राची आराधना करीत होता. राक्षस याचा संहार करण्यास आले असतां चक्र प्रगट होऊन राक्षसांचा नाश झाला (स्कंद. ३. १. २३).

३ कश्यप व सुरभि यांचा पुत्र (शिव. शत. १८).

**अहिशुव**—इंद्राचा शत्रु (ऋ. ३२. २).

**अहीन**—(सो. क्षत्र.) सहदेवाचा पुत्र. अदीन असा पाठभेद आहे.

२ ( सो. कुरु. भविष्य ) विष्णुमतें हा उदयनपुत्र होय.

**अहीनगु**—अनीहाचें नामांतर.

**अहीनज**—( सू. इ. ) भविष्यमतें द्वारकाचा पुत्र. यानें १०००० वर्षे राज्य केलें.

**अहीनर**—अनीह राजाचें नामांतर.

२ ( सो. ) भविष्यमतें हा उद्यानाचा पुत्र.

**अहीना आश्वत्थ्य**—यानें सावित्राग्नीचें ज्ञानानें अमरत्व संपादन केलें ( तै. ब्रा. ३. १०. ९. १० ).

# आ

**आकथ**—मंकणाचा मुलगा. हा मोठा शिवभक्त होता. याच्या घराला आग लागून शिवलिंग अर्धे जळालें; म्हणून हा आपलें अर्धशरीर जाळून घेऊं लागला असतां शंकर प्रसन्न झाला ( पद्म. पा. ११७ ).

**आकाशज विप्र**—ब्रह्मदेवाचें नांव. मृत्यूनें याला मारतां येत नाहीं असें यमाला कळविलें. याला पार्थिव देह व कर्में नसल्यामुळें मृत्यु नाहीं. हा केवळ अज व विज्ञानरूप आहे ( यो. वा. ३. २; ब्रह्मन् पहा ).

**आकुलि**—( असमाति पहा ).

**आकूति**—ही स्वायंभुव मनु व शतरूपा यांच्या तीन कन्यांपैकीं पहिली व रुचि ऋषीची स्त्री होय. हिला यज्ञ आणि दक्षिणा असें कन्यारूप मिथुन झालें (मनु पहा).

२ ( स्वा. प्रिय. ) ही पृथुषेण राजाची स्त्री.

३ ( स्वा. उत्तान ) व्युष्टपुत्र सर्वतेजसची स्त्री व चक्षुर्मनूची माता ( भा. ४. १३. १५ ).

**आकृति**—एक गारुड विद्येचा आचार्य. युधिष्ठिरानें राजसूय यज्ञ केला, त्या वेळीं सहदेव दक्षिण दिशा जिंकण्यास गेला असतां याला जिंकून त्यानें याजकडून करभार घेतला होता ( म. स. ३१ ).

**आक्ताक्ष्य**—अग्निपूजेविषयीं विचार मांडणारा एक गृहस्थ ( श. ब्रा. ६. १. २. २४ ).

**आक्षील**—भरद्वाजांगिरस वंशमालिकेंतील द्विगोत्री ऋषि.

**आगस्त्य**—अगस्त्य नामक महर्षींचा पुत्र आगस्त्य होय. मांडूकेय व माक्षव्य यांचीं अनुक्रमें मतें वायुसंहिता व आकाशसंहिता अशीं आहेत. आगस्त्याचें म्हणणें दोनहि सिद्धान्त तुल्यबल आहेत ( ऐ. आ. ३.११. ). एक आचार्य ( ऋ.प्रा. १-२; सां. आ. ७. २; दृहलन्युन पहा ).

**आग्ना प्रासेव्य**—कश्यपगोत्रांतील एक ऋषिगण.

**आग्निवेशि**—शर्याचें पैतृक नांव.

**आग्निवेश्य**—शांडिल्य आनभिम्लात व गार्ग्य यांचा शिष्य याचा शिष्य गौतम ( बृ. उ. २.६.२ ). विसर्गसंधीविषयीं एक मत प्रतिपादणारा आचार्य ( तै. प्रा. ९. ४ ).

**आग्नीध्र**—विष्णुपुराणांत 'अग्नीध्र' असें आहे. प्रियव्रत व बर्हिष्मती यांच्या दहा पुत्रांपैकीं ज्येष्ठ पुत्र. कर्दमाच्या कन्या नांवाच्या मुलीचा पुत्र. ऊर्जस्वती नांवाची याला एक बहीण होती. शिवाय दोन बहिणी होत्या. त्यांचीं नांवें सम्राज् आणि कुक्षि अशीं होतीं. जंबुद्वीपाचा हा अधिपति. पुत्रप्राप्तीच्या इच्छेनें मंदराचलाच्या पहाडांत ब्रह्मदेवाची आराधना करीत असतां ब्रह्मदेवानें देवसभेंत गायन करणारी पूर्वाचित्ति नांवाची अप्सरा याच्याकडे पाठविली. तिनें शृंगारचेष्टा इत्यादिकांनीं आग्नीध्राचें मन कामवश केलें. याचें सौंदर्य, बुद्धिमत्ता इत्यादि अलौकिक गुणांवर लुब्ध होऊन तिनें दहा कोटि वर्षेपर्यंत विषयाचें सुख भोगिलें. तिच्यापासून आग्नीध्राला नऊ पुत्र झाले. त्यांचीं नांवें—१ नाभि, २ किंपुरुष, ३ हरिवर्ष, ४ इलावृत, ५ रम्यक ( रम्य ), ६ हिरण्मय ( हिरण्वान् ), ७ कुरु, ८ भद्राश्व, आणि ९ केतुमाल अशीं होतीं. कांहीं काळानें ती अप्सरा ब्रह्मलोकीं निघून गेली असतां हा राजा तिच्या विरहानें अत्यंत उदास झाला. नंतर यानें जंबुद्वीपाचे नऊ विभाग करून त्यांतील प्रत्येक विभागाला आपल्या पुत्राचें नांव दिलें व ज्याचा विभाग त्याचे स्वाधीन करून स्वतः शालग्राम नामक अरण्यांत तपश्चर्येकरितां निघून गेला. विष्णुपुराणांत कोणता विभाग कोणास दिला याविषयीं वर्णन आहे. तें असें—१ नाभीस हिमवर्ष ( हिंदुस्थान ), २ किंपुरुषास हेमकूटवर्ष, ३ हरिवर्षास नैषधवर्ष, ४ इलावृतास मेरुपर्वत असलेलें इलावृतवर्ष, ५ रम्याला नीलपर्वतयुक्त रम्यकवर्ष, ६ हिरण्वानाला श्वेतद्वीपवर्ष, ७ कुरूला शृंगवद्वर्ष, ८ भद्राश्वाला मेरूच्या पूर्वेस असणारें भद्राश्ववर्ष व ९ केतुमालास गंधमानवर्ष दिलें ( विष्णु. २. १; भा. ५. १. ३३; १. २२ ).

**आग्नीध्रक**—रुद्रसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**आग्रायण**—इंद्र शब्दाच्या व्युत्पत्तीविषयीं मत दर्शविणारा आचार्य ( नि. १०.९ ).

**आंगरिष्ठ**—एक राजर्षि. यानें कामंद ऋषीला शुद्ध धर्मादिकांविषयीं प्रश्न विचारला होता. जेणेंकरून चित्तशुद्धि होईल तो धर्म, पुरुषार्थ साधेल तो अर्थ आणि देहनिर्वाहापुरती इच्छा तो काम, असें त्यानें उत्तर दिलें होतें ( म. शां. १२३ ).

**आंगि**—(हविर्धान पहा).

**आंगिरस**—अंगिरसवंशांतल्या लोकांना हा शब्द कुलनाम म्हणून लावलेला आढळतो. वंशावळहि सांपडते (छां. उ. १.२ १०; पं. ब्रा. २०.२.१; तै. सं. ७.१.४.१).

अथर्ववेदाचा प्रवर्तक अंगिरस् होय. याच्या कुलांतील ऋषींनीं सत्र केलें. यज्ञानुष्ठानासाठीं दूध काढण्याकरितां यांनीं एक गाय बाळगिली होती. त्या गाईचा रंग पांढरा होता. अवर्षणामुळें त्या गाईला चारा मिळेनासा झाला. फक्त यज्ञांत कुटलेल्या सोमाच्या चोथ्यावर ती काळ कंठीत होती. तिचे पोटापायीं होणारे हाल अंगिरसांना पाहवेनात. गाईच्या पोटापुरता चारा उत्पन्न करण्याची शक्ति जर आमच्यांत नाहीं तर आम्ही सत्र कशाला आरंभिलें, असाहि विचार यांना त्रास देऊं लागला. पुढें यांनीं ‘ कारीरि ’ इष्टी केली त्यामुळें चारा भरपूर झाला. पण नव्या चाऱ्यांत पितरांनीं विष उत्पन्न केल्यामुळें गाय खराब होऊं लागली. पण पितरांना हविर्भाग दिल्यावर आंगिरसांना उत्कृष्ट चारा मिळूं लागला व ती खूप दूध देऊं लागली ( तै. ब्रा. २.१.१). यांनींच द्विरात्रयाग सुरू केला ( तै. सं. ७.१.४ ). अंगिरसानें रथीतराच्या स्त्रीचे ठिकाणीं उत्पन्न केलेल्या ब्रह्मक्षत्र संततीस आंगिरस म्हणत असत ( भाग ९.६.३ ).

( अभीवर्त, अमहीयु, अयास्य, आजीगर्ति, उचथ्य, ऊरु, ऊर्ध्वसद्मन्, कुत्स, कृतयशस्, कृष्ण, गृत्समद, घोर, च्यवन, तिरश्चि, दिव्य, धरुण, ध्रुव, नृमेध, पवित्र, पुरुमिहळ, पुरुमेध, पुरुहन्मन्, पूतदक्ष, प्रचेतस्, प्रभूवसु, प्रियमेध, बृहन्मति, बृहस्पति, भिक्षु, मूर्धन्वन्, रहूगण, वसुरोचिष्, बिंदु, विरूप, विहव्य, वीतहव्य, व्यश्व, शिशु, शौनहोत्र, श्रुतकक्ष, संवनन, संवर्त, सद्मयु, सव्य, सुकक्ष, सुदिति, सुधन्वन्, हरिमंत व हिरण्यस्तूप पहा ).

२ भौत्य मनूचा पुत्र.

३ भीष्माकडे आलेला ऋषि ( भा. १.९.८ ).

४ शुनकाचें नामांतर. यानें बभ्रु व सैन्धवायन यांना अथर्ववेद शिकविला ( भा. १२. ७. ३ ).

**आंगिरसी**—वसूची पत्नी ( भा. ६. ६. १५ ).

२ ( शश्वती पहा ).

**आंगी**—अपराचीनपुत्र अरिहाचा स्त्री. हिचा पुत्र महाभौम ( म. आ. ६३ ).

**अंगुलय** किंवा **अंगुलीय**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य. ब्रह्मांडांत आंगुलीय असा पाठ आहे ( व्यास पहा ).

**आंघ्रिक**—विश्वामित्राचा पुत्र ( म. अनु. ७ ).

**आचार**—कश्यप व अरिष्टा यांना पुत्र.

**आजकेशिन**—हें इंद्राचें नामांतर. याचा बकानें प्रतिकार केला ( जै. उ. ब्रा. १.९.३ ).

**आजगर**—अयाचित वृत्तीनें राहणारा एक ब्राह्मण. याचा प्रल्हादाशीं संवाद झालेला आहे ( म. शां. १७७ ).

**आजीद्रुप**—बभ्राचें पैतृक नांव.

**आजव**—कथाजवाबद्दल पाठभेद.

**आजिहायन**—काश्यपगोत्री ऋषिगण.

**आजीगर्ति**—शुनःशेपाचें पैतृक नांव ( ऐ. ब्रा. ७. १७ ). आंगिरस या नांवानें याचा उल्लेख आलेला आहे ( क. सं. १६. ११. २).

**आज्य**—सावर्णि मनूचा पुत्र.

**आज्यप**—एक पितृगण. हे ब्रह्म मानस पुत्र पुलहाचे वंशज असून यज्ञामध्यें आज्य ( शेळीच्या दुधापासून झालेलें तूप ) पान करतात, म्हणून असें नांव पडलें आहे. यांस सुस्वध असेंहि कोठें कोठें म्हटलेलें आहे (मत्स्य. १५). कर्दम प्रजापतीच्या लोकांमध्यें हे राहतात. यांना विरजा नांवाची एक कन्या आहे. हीच नहुषाची पत्नी होय ( पद्म. सृ. ९ ). यांना वैश्य पूज्य मानितात.

**आटविन्**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांड व वायु यांच्या मतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य ( व्यास पहा ). आटविन् व आवटिन् एकच होत.

**आट्णार**—पराचें पैतृक नांव.

**आडि**—अंधकासुराचा पुत्र. यानें ब्रह्मदेवास प्रसन्न करून अमरत्व मागितलें. पण तें अशक्य आहे असें सांगितल्यावर मी रूपांतर पावल्यावांचून मरूं नये, असा यानें वर मिळविला. पुढें आपल्या पित्यास मारणाऱ्या शिवाचें वैर उगवावें म्हणून, हा कैलासास गेला. तेथें द्वारावर वीरक किंवा वीरभद्र नांवाचा शिवगण होता. त्यानें आपल्यास अडवूं नये या हेतूनें सर्परूप धारण करून हा गुप्त रूपानें आंत शिरला. नंतर सर्परूप टाकून पार्वतीचें रूप धारण करून शिवासमोर जात आहे, तों शिवानें तें कपट जाणलें व यास यानेंच संपादिलेल्या वरप्रदानाप्रमाणें तत्काळ वधिलें ( मत्स्य. १५६; पद्म. सृ. ४४; वीरभद्र पहा ).

**आतिथिग्व**—इंद्रोताचें पैतृक नांव. ( दिवोदास पहा ).

**आतिथ्यवर्धन**—( सो. ) भविष्यमतें सूर्ययज्ञाचा पुत्र. यानें चार हजार आठशें वर्षें राज्य केलें.

**आत्मदेव**—एक ब्राह्मण. हा तुंगभद्रातीरीं कोहल गांवीं राहत असे. याची बायको गृहकृत्यांत निपुण पण भांडखोर होती. हा निपुत्रिक असल्यानें वैतागून भटकत असतां एका तळ्याकांठीं याची व एका सिद्धाची गांठ पडली. यानें त्यास पुत्रप्राप्तीस्तव एक फळ दिलें व आपल्या पत्नीस तें खाण्यास देण्याबद्दल सांगितलें. यानें तें फळ पत्नीस दिलें. पण तिनें न खातां बहिणीच्या सांगण्यावरून तें गाईस घातलें, व खाल्लें असें पतीस खोटेंच सांगितलें. बहिणीनें सांगितलें कीं, तूं गरोदरपणाचें ढोंग कर व मला होईल तो पुत्र मी तुला देईन. कारण ती स्वतः गरोदर होती. पुढें पुत्र झाल्यावर आत्मदेवानें त्याचें नांव धुंधुकारी ठेवलें. गाईसहि योग्य काळीं पुत्र झाला. त्याचें नांव गाईसारखे कान होते म्हणून गोकर्ण ठेवलें. पुढें धुंधुकारी दुर्वृत्त निघाला असतां हा त्रासला. तेव्हां गोकर्णानें यास संसारांतून निवृत्त होण्यास सांगितल्यावर यानें ईशभक्तीनें परमार्थ व मोक्ष साधला ( पद्म. उ. १९६ ).

**आत्मन्**—मंत्रद्रष्टा ( ऋ. ३. २६. ७ ).

२ अंगिरादेवांपैकीं एक. अंगिरा व सुरूपा यांचा मुलगा ( मत्स्य. १९६ ).

**आत्मप्रपूजक**—(सो.) भविष्यमतें ब्रह्मोष्टिवर्धनाचा पुत्र. यानें २७०० वर्षें राज्य केलें.

**आत्मवत्**—हा भृगुगोत्रांतील मंत्रकार होता. आत्मावत् असाहि पाठ आहे.

**आत्रेय**—संधि व उच्चार यांकरितां याच्या मताचा गौरवानें उल्लेख आहे ( तै. प्रा. ५. ३१; १७. ८ ). हाच तैत्तिरीय संहितेचा पदपाठकार असावा. तैत्तिरीयांच्या आचार्यतर्पणांत याचा समावेश यामुळेंच झाला आहे ( स. गृ. २०. ८. २० ). जैमिनिसूत्रांतहि ( ५. २. १८; ६. १. २६ ) एका आत्रेयाचा उल्लेख आहे. आत्रेयी शिक्षा व संहिता हे ग्रंथहि आत्रेयाचे आहेत ( C C). गर्भाधान संस्कारांतील मंत्र म्हणण्याविषयीं याच्या मताचा निर्देश आहे ( स. गृ. १९. ७. २५ ). मांटीचा शिष्य ( बृ. उ. २. ६. ३ ) व अंग राजाचा पुरोहित ( ऐ. ब्रा. ८. २२ ). वैद्यकांतहि धन्वंतरीच्या पूर्वी एक आत्रेय होऊन गेला आहे. धन्वंतरीनें आत्रेयप्रणीत मृतसंजीवनीकर असें काढे दिले आहेत ( अग्नि. २८५; गरुड. १. १. १४६ ). हे सर्व एक आहेत कीं भिन्न आहेत, हें सांगणें कठीण आहे.

( अर्चनानस्, अवस्यु, उरुचक्रि, एवयामरुत्, कुमार, कृष्ण, गय, गविष्ठिर, गातु, गृत्समद, गोपवन, दक्ष शात्यायनि, द्युम्न, द्वित, पुरु, पौर, प्रतिक्षत्र, प्रतिप्रभ, प्रतिभानु, प्रतिरथ, बभ्रु, बाहुवृक्ति, बुद्धि, मृक्तवाह, यजत, रातहव्य, वव्रि, वसुश्रुति, विश्वसामन्, शंग शात्यायनि, श्यावाश्व, श्रुतवित्, सत्यश्रवस्, सदापृण, सप्तवध्रि, ससव सुतंभर पहा. )

२ एक राजा. याला एकत, द्वित व त्रित अशीं मुलें होतीं ( त्रित पहा ).

३ वामदेवाचा शिष्य ( परीक्षित् पहा ).

४ जनमेजयसत्रांतील एक सदस्य (म. आ. ५३; शां. ४६).

५ हंसरूपानें संचार करणारा ऋषि. यानें साध्यांना नीति सांगितली ( म. उ. ३६ ).

**आत्रेयायणि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**आत्रेयी**—ही अत्रिऋषीची कन्या. ही अग्निपुत्र अंगिराला दिली होती. दत्त, दुर्वास व सोम हे हिचे बंधु होत. हिच्या पुत्रांना आंगिरस असें म्हणतात. आत्रेयीला हिचा पति नेहमीं निष्कारण निष्ठुरपणें बोलत असे. एके दिवशीं हिनें सासऱ्याकडे तक्रार केली. तुझा पति अग्निपुत्र आहे, म्हणून अतिशय तेजस्वी आहे. त्याला तूं जलरूपानें स्नान घालून शांत कर, असें अग्नीनें सांगितल्यावरून आत्रेयी परुष्णी नदी होऊन उदकानें आपल्या पतीला शांत करूं लागली. हिचा व गंगेचा संगम झाला ( ब्रह्म. १४४ ).

२ ( अपाला व विश्ववारा पहा. )

**आत्रेयीपुत्र**—हा गौतमीपुत्राचा शिष्य ( बृ. उ. ६. ५. २ ).

**आदर्श**—धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**आदित्य**—हें वैवस्वत मन्वंतरांतील देवतासमूहाचें नांव आहे. ऋग्वेदांत याच्या करितां सहा सूक्तें आहेत. फक्त एके ठिकाणीं आदित्यसंघांत सहा देवता आहेत (ऋ. २. २७. १). त्या येणेंप्रमाणें—१ मित्र, २ अर्यमन्, ३ भग, ४ वरुण, ५ दक्ष व ६ अंश. अदितीला आठ पुत्र होते ( अ.वे. ८. ९. २१ ). १ अंश, २ भग, ३ धातृ, ४ इन्द्र, ५ विवस्वत्, ६ मित्र, ७ वरुण, व ८ अर्यमन् ( तै. ब्रा. १. १. ९१ ). पण अदितीचा आठवा पुत्र मार्तण्ड दिला आहे ( ऋ. १०. ७२. ८; ९; श. ब्रा. ६. १. २. ८. ). पण आदित्य बारा असून ते बारा महिन्यांचे निदर्शक आहेत ( श. ब्रा. ११. ६. ३. ८ ). वेदोत्तर वाङ्मयांत बारा महिन्यांचे बारा आदित्य किंवा सूर्य प्रसिद्ध आहेत ( कश्यप पहा ). त्यांत विष्णु हा सर्वश्रेष्ठ मानतात. ऋग्वेदांत सूर्याला आदित्य म्हटलें आहे. त्यावरून सूर्य हा सातवा व मार्तण्ड हा आठवा आदित्य असावा. गाय ही आदित्यांची बहीण आहे ( ऋ. ८. १०१. १५. ).

इंद्र हा अदितीचा पुत्र म्हणजे आदित्यांपैकींच एक आहे ( ऋ. ७. ८५. ४; मै. सं. २. १. १२ ). पण बारा

आदित्यांहून इंद्र निराळाहि आहे (श. ब्रा. ११. ६. ३. ५). आदित्यांचा उल्लेख वसू, रुद्र, मरुत्, अंगिरस्, ऋभू व विश्वेदेव या देवतांबरोबर पुष्कळ ठिकाणीं असला तरी आदित्य हें सर्व देवांचें सामान्य नाम आहे. आदित्यांचें वर्णन बहुतेक सर्व देवांच्या सामान्य वर्णनाशीं जमत असलें तरी आदित्यांपैकीं प्रमुख मित्रावरुणाशीं मात्र जमत नाहीं. सर्वाधार, सर्वपालक, मनांतले विचार जाणणारे, पापी जनांना शिक्षा करणारे, व रोग नाहींसे करून दीर्घायुष्य देणारे असें यांचें वर्णन आहे.

आपल्या पोटीं साध्य देव यावेत म्हणून अदितीनें ब्रह्मयाला उद्देशून भात शिजविला. आहुति देऊन शिल्लक राहिलेल्या भातानें अदितीला धाता व अर्यमा अशीं दोन जुळीं मुलें झालीं. दुसऱ्या खेपेस मित्र व वरुण झाले. तिसऱ्या खेपेस तिला अंश व भग झाले. चवथ्या खेपेस इंद्र व विवस्वान् झाले. अदितीचे हे बारा मुलगे म्हणजेच द्वादशादित्य किंवा साध्य नामक देव होत (तै. ब्रा. १. १. ९.). आदित्यापासून सामवेद झाला (ऐ. ब्रा. २५. ७; सां. ब्रा. ६. १०; श. ब्रा. ११. ५. ८; छां. उ. ४. १७. २; जै. उ. ब्रा. ३. १५. ७; ष. ब्रा. ४. १; गो. ब्रा. १. ६). पुराणांत आदित्य कश्यप व अदिति यांचे पुत्र आहेत (कश्यप पहा).

१ अंशुमान् (आषाढ महिना, किरण १५००), २ अर्यमन् (वैशाख, १३००), ३ इंद्र (आश्विन, १२००), ४ त्वष्टृ (फाल्गुन, ११००), ५ धातृ (कार्तिक, ११००), ६ पर्जन्य (श्रावण, १४००), ७ पूषन् (पौष), ८ भग (माघ, ११००), ९ मित्र (मार्गशीर्ष, ११००), १० वरुण (भाद्रपद, १३००), ११ विवस्वत् (ज्येष्ठ, १४००), १२ विष्णु (चैत्र, १२००). यांचीं कार्येंहि सांगितलीं आहेत (भवि. ब्राह्म. ६५; ७४; ७८; विष्णु. १. १५. ३२). अंशुमानाबद्दल अंश किंवा अंशु असा पाठ आहे. व विष्णूबद्दल उरुक्रम असा पाठ आहे. पण स्कंदपुराणांत अगदीं वेगळी यादी आहे. १ लोलार्क, २ उत्तरार्क, ३ सांबादित्य, ४ द्रुपदादित्य, ५ मयूखादित्य, ६ अरुणादित्य, ७ वृद्धादित्य, ८ केशवादित्य, ९ विमलादित्य, १० गंगादित्य, ११ यमादित्य, १२ सकोलकादित्य (स्कंद. २. ४. ४६.).

**आदित्यकेतु**—धृतराष्ट्रपुत्र. यास भीमानें मारिलें (म. भी. ८८. २८ कुं.).

**आदिराज**—(सो. कुरु.) अविक्षिताचा पुत्र (म. आ. १०१. ४०).

**आदिवराह**—हिरण्याक्षास मारण्याकरितां या चालू कल्पारंभींच झालेला अवतार. यास श्वेतवराह असेंहि म्हणतात.

**आद्य**—रैवतमनूंतील देवगण (मनु पहा).

२ चाक्षुष मन्वंतरांतील देव.

३ विश्वामित्र कुलांतील एक गोत्रकार. हा उपरिचर वसूच्या सोळा ऋत्विजांत एक होता.

**आधूर्तरजस्**—गय राजाचा पिता. अमूर्तरय असा पाठ आहे (म. व. ९३; ३ अमूर्तरयस् पहा).

**आनक**—(सो. यदु.) शूरास मारिषेपासून झालेला चौथा पुत्र. यास कंका नामक स्त्रीपासून पुरुजित् आणि सत्यजित् असे दोन पुत्र झाले.

**आनकदुंदुभि**—(सो. यदु.) कृष्णपिता वसुदेवाचेंच हें नांव आहे. याच्या जन्मकाळीं देवांनीं दुंदुभि वाजविली म्हणून हें नांव पडलें.

**आनंद**—गालव्यकुलोत्पन्न एक ब्राह्मण. यानें ब्रह्मयाचा अधिकार धारण करून नवीन यज्ञपद्धति, विवाहपद्धति व वर्णाश्रमपद्धति स्थापन केली (वायु. १. २१. २६; २३. ४६; म. शां. ५९. ६७ कुं.). याचा मानसपुत्र विराट. यानें याचे मागें राज्य केलें. हें राज्य १३२ च वर्षे टिकलें. यानंतर ३०० वर्षे प्रजासत्ताक राज्यपद्धति चालू होती (दसरीकृत धर्मरहस्य पा. १५४).

२ मेधातिथीच्या सात पुत्रांपैकीं एक. याच नांवानें याचें वर्ष आहे (विष्णु. २. ४. ४).

३ सत्य नांवाच्या देवगणांतील एक.

**आनंदज चांधनायन**—हा शांबाचा शिष्य याचा शिष्य भानुमत् (वं. ब्रा. १).

**आनंददेव**—(ऐति.) अजमेरच्या चव्हाणवंशांतील जयसिंह राजाचा पुत्र. यास कीर्तिमालिनी नामक पत्नी असून धुंधुकार, कुमार व महीराज असे तीन पुत्र होते (भवि. प्रति. ४.२).

**आनंदवर्धन**—(सो.) भविष्यमतें हा म्लेंच्छदंनाचा पुत्र. यानें २८०० वर्षे राज्य केलें.

**आनभिम्लात**—हा दुसऱ्या एका आनभिम्लानाचा शिष्य (बृ. उ. २.६.२).

**आनर्त**—(सू. शर्याति.) शर्यातिपुत्र. आनर्त देश (गुजराथ) याच्याच नांवावरून प्रसिद्धीस आला. याचा पुत्र रेवत राजा (दे. भा. २.५). याचा पुत्र रैव. यानें कुशस्थली नगरी स्थापिली (ब्रह्म. ७; ह. वं. २. १०).

२ (सो. सह.) मत्स्यमतें हा वीतिहोत्रपुत्र होय.

**आंतरिक्ष**—एक व्यास (व्यास पहा).

**आंध्रभृत्य**—(आंध्र. भविष्य.) मत्स्यमतें पुलोमाचा पुत्र.

**आपू**—स्वारोचिष मनूचा पुत्र.

२ ही वरुणाची स्त्री आहे. तर्रा अग्नीपासून हिला पृथ्वी व आकाश अशीं दोन अपत्यें झालीं (तै. सं. ५.५.४).

**आप**—अष्टवसूंचें नांव.

२ स्वारोचिष मन्वंतरांतील वसिष्टपुत्र प्रजापति.

३ धर्म व वसु यांचा मुलगा. याचे पुत्र वैतंड्य, शांत व ध्वनि ( विष्णु. १. १५ ).

**आपगव**—( औपगव पहा ).

**आपमूर्ति**—स्वारोचिष मनूचा पुत्र.

**आपव वासिष्ठ**—वसिष्ठकुलांतील एक. याला वरुणपुत्र म्हटलें आहे ( ब्रह्मांड. ३. ६९. ४२; वायु. २. ३३. ४२ ). हिमालयाजवळ हा रहात होता. कार्तवीर्याच्या हातून याची पर्णकुटी जळाली म्हणून यानें त्याला शाप दिला होता ( कार्तवीर्य पहा ). कांहीं ठिकाणीं याची पर्णकुटी मेरुजवळ होती, असें म्हटलें आहे. याची कामधेनु सुरभि चोरून नेली म्हणून अष्टवसूंनाहि यानें मर्त्य लोकांत जन्म घ्या असा शाप दिला होता; व यानेंच दिलेल्या उःशापामुळें भीष्मा-खेरीज सर्वांना गंगेनें पाण्यांत बुडविलें ( म. आ. १०६ कुं. ).

**आपस्तंब**—भृगुकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि ( म. व. २९९; ७ ). हा तैत्तिरीय शाखी होय. कश्यप ऋषीनें दितीकडून पुत्र-कामेष्टि करविली. त्यांत हा आचार्य होता व त्याच इष्टीपासून मरुद्गण उत्पन्न झाले ( मत्स्य ७ ). याच्या स्त्रीचें नांव अक्षसूत्रा व पुत्राचें नांव कर्कि ( ब्रह्म. १३० ). यानें केलेले ग्रंथ—१ आपस्तंब श्रौतसूत्र, २ आपस्तंब गृह्यसूत्र, ३ आपस्तंब ब्राह्मण, ४ आपस्तंब मंत्रसंहिता, ५ आपस्तंबसंहिता, ६ आपस्तंबसूत्र, ७ आपस्तंबस्मृति, ८ आपस्तंबोपनिषद्, ९ आपस्तंबाध्यात्मपटल, १० आपस्तंबान्त्येष्टिप्रयोग, ११ आपस्तंबापरसूत्र, १२ आपस्तंबप्रयोग, १३ आपस्तंबशुल्वसूत्र, १४ आपस्तंब-धर्मसूत्र ( C. C. ). याच्या श्रौतसूत्रांतच श्रौत, गृह्य, धर्म, शुल्ब, मंत्रसंहिता वगैरे भाग आहेत.

याचें नांव याज्ञवल्क्यस्मृतींत दिलेल्या स्मृतिकारांत आहे. तर्पणांत याचें नांव बौधायनानंतर व सत्याषाढ हिरण्यकेशीच्या पूर्वी येतें. यावरून याची शाखा हिरण्यकेशी शाखेच्या बऱ्याच पूर्वीची असावी. आपस्तंबानें आपल्या धर्मसूत्रांत (२.७.१७. १७ ) उदीच्य लोकांच्या एका श्राद्धाचा उल्लेख केला आहे. व उदीच्य या शब्दाचा अर्थ हरदत्तानें शरावती नदीच्या उत्तरेकडील लोक असा दिला आहे. आपस्तंब शरावती नदीच्या उत्तरेकडे आंध्र देशांत रहात असला पाहिजे. त्याचप्रमाणें पल्हव राजांनीं आपस्तंबी लोकांना बऱ्याच देणग्या दिल्याचा उल्लेख आहे ( I. A. v. 155 ). त्यावरून आपस्तंबी शाखा ही आंध्र देशाच्या आसपास निघाली असावी.

आपस्तंब कल्पसूत्रांतील ( २८, २९ ) हे दोन प्रश्न म्हणजे आपस्तंबधर्मसूत्र होय. त्याचप्रमाणें २५ व २६ या दोन प्रश्नांचें एकीकरण करून त्यांना आपस्तंबीय मंत्रपाठ हें नांव दिलेलें आहे व कल्पसूत्रांतील २७ व्या प्रश्नास आपस्तंबगृह्यसूत्र हें नांव आहे. आपस्तंबाचें गृह्यसूत्र व धर्मसूत्र यांत बरेंच साम्य आहे.

आपस्तंबधर्मसूत्रांत आचार, प्रायश्चित्त, ब्रह्मचाऱ्याचीं कर्तव्यें व त्याचे वागण्याचे नियम, यज्ञोपवीतधारणेसंबंधीं नियम, श्राद्ध वगैरेसंबंधीं माहिती दिलेली आहे. तसेंच वेदाच्या सहा अंगांचाहि यानें विचार केला आहे. यानें कल्प-सूत्र वेद नसून वेदांगच होय असें सिद्ध केलें आहे ( आप. धर्म. २.४.८१२ ). ब्राह्मणग्रंथ नष्ट झाले आहेत. प्रयोगावरून तसे ब्राह्मणग्रंथ असावेत असें याचें म्हणणें आहे ( आप. धर्म १.४.१२-१० ).

आपस्तंबानें संहिता, ब्राह्मण व निरुक्त यांमधील कांहीं उतारे घेतले आहेत. आपल्या धर्मसूत्रांत कण्वपुष्करसादि दहा धर्मशास्त्र-कार, बौधायन व हारीत यांचींहि मतें यानें अनेकदां घेतलीं आहेत. जगाची उत्पत्ति व प्रलय यांविषयीं भविष्यपुराणांतील मताचा आपस्तंबधर्मसूत्रांत उल्लेख आहे व अनुशासन पर्वांतील ( ९०.४६ ) एक श्लोक यानें घेतला आहे. तसेंच आपस्तंबानें आपल्या धर्मसूत्रांत जैमिनीच्या पूर्वमीमांसेंतील बरींच मतें व पारिभाषिक शब्द यांचा उपयोग केला आहे. आपस्तंबधर्मसूत्राचा उल्लेख शबर, ब्रह्मसूत्रांतील शांकर-भाष्य, विश्वरूपाचा व्यवहार, मिताक्षरा व अपरार्क या ग्रंथांत केला आहे. आपस्तंबधर्मसूत्रांतील कित्येक मतें याच्या पूर्वीच्या धर्मशास्त्रकारांच्या विरुद्ध आहेत. आपस्तंबाच्या मतें नियोग त्याज्य आहे. त्याचप्रमाणें पैशाच व प्राजापत्य ह्या दोन विवाह-विधींना याची पूर्ण संमति आहे. तसेंच याच्या मतें कोणतेंहि मांस भक्षण करण्यास कांहीं हरकत नाहीं. आपस्तंब धर्म-सूत्रावर हरदत्ताची उज्ज्वलावृत्ति नांवाची टीका आहे. आप-स्तंबधर्मसूत्रांतील अध्यात्मविषयक दोन पटलांवर शंकरा-चार्यांचें भाष्य आहे ( १-८.२२-२३).

आपस्तंबधर्मसूत्राहून निराळा असा आपस्तंबस्मृति नामक एक २०५ श्लोकांचा ग्रंथ जीवानंदानें छापला आहे. आनंदाश्रमांतहि छापलेल्या स्मृतींत दहा अध्याय आहेत. या ग्रंथांत प्रायश्चित्ताचा विचार केला आहे. यांतील उतारे स्मृतिचंद्रिका व अपरार्क यांमध्यें बरेच वेळां आले आहेत. स्मृतिचंद्रिकेंत स्तोत्रापस्तंब नामक एका ग्रंथाचा उल्लेख आहे.

बुल्हरनीं याचा काल ख्रि. पू. ३०० चे अलीकडे नसावा असा ठरविला, पण टिळकांनीं त्याच्याहि अलीकडे मानला आहे (गी. र. पा. ५६१). वैद्यांनीं ख्रि. पू. १४२० वर्षे आपस्तंब-श्रौतसूत्राचा काळ ठरविला आहे, पण काणे ख्रि. पू. ६००—३०० मानतात.

**आपस्तंबि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

२ भृगुकुलांतील एक गोत्रकार. हा ब्रह्मर्षि होता ( म. व. २९९.१८ कुं; मत्स्य. ७ ).

**आपस्थूण**—वासिष्ठगोत्रांतील एक ऋषिगण.

**आपिशलि**—एक व्याकरणकार. संधीविषयीं याचा उल्लेख पाणिनीनें गौरवानें केला आहे ( ६.१.९२ ). यानें आपिशलि नांवाचा एक ग्रंथ केला आहे (C.C.). त्यांतील माहितीचा काशिकेंत ( ७.३.९५ ) व कैयटांत ( ५.१.२१ ) उल्लेखहि आहे. काशिकाकार व कैयट यांनीं तो ग्रंथ पाहिला असावा.

२ भृगुकुलांतील एक ब्रह्मर्षि.

**आपिशी**—भृगुकुलांतील एक गोत्रकार. अपिशली असा पाठ आहे.

**आपूरण**—कद्रूपुत्र.

**आपोद**—धौम्याचें पैतृक नांव ( धौम्य पहा ).

**आपोमूर्ति**—( अपांमूर्ति ) ब्रह्मसावर्णि मन्वन्तरांतील सप्तर्षीपैकीं एक.

**आपोलव**—(आंध्र. भविष्य.) ब्रह्मांडमतें शातकर्णीपुत्र.

**आप्त**—कद्रूपुत्र.

**आप्त्य**—( त्रित, द्वित, एकत व भुवन पहा ).

**आप्नवत्**—( अप्नुवान पहा ).

**आप्य**—चाक्षुष मन्वंतरांतील देव.

**आप्यायन**—(स्वा. प्रिय.) यज्ञबाहूच्या सात पुत्रांतील सहावा. याचा वर्ष याच्याच नांवानें प्रसिद्ध आहे.

**आप्लव**—( मनु पहा ).

**आभूतरजस्**—रैवत मन्वंतरांतील देवगण ( मनु पहा).

**आभूतरयस्**—( आभूतरजस् पहा ).

**आभूति त्वाष्ट्र**—हा विश्वरूप त्वाष्ट्राचा शिष्य ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ).

**आम**—(स्वा. प्रिय. ) घृतपृष्ठाच्या सात पुत्रांपैकीं ज्येष्ठ. याचा वर्ष आमवर्ष नांवानें प्रसिद्ध आहे.

२ कृष्णास सत्यभामेपासून झालेला पुत्र. हा महारथि होता.

३ ह्या कान्यकुब्ज देशांतील राजानें बुद्धधर्म स्वीकारून बुद्धधर्माचा प्रचार सुरू केला. पण रामानें मारुतीकडून याचा प्रतिकार करवून पुनः याला वैदिकधर्माचा केला. याची राजधानी धर्मारण्य होय (स्कंद.३. २. ३८ ).

**आमहासुर**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**आमहीयव**—( उरुक्षय पहा ).

**आमुष्यायण**—एक व्यास ( व्यास पहा ).

**आमूर्तरजस्**—गयाचें पैतृक नांव.

**आंबरीष**—( सिंधुद्वीप पहा ).

**आंबष्ठ्य**—याला पर्वत व नारद यांनीं राज्याभिषेक केला व मग यानें सर्व पृथ्वी जिंकून अश्वमेध केला ( ऐ. ब्रा. ८. २१ ).

**आंबाज**—आवेदाबद्दल पाठभेद.

**आंभृणी**—( वाच् पहा ).

**आयति**—मेरूची कन्या, नियतीची भगिनी व धातृ ऋषीची स्त्री.

२ ( सो. ) नहुषाचा पुत्र. ययातीचा बंधु.

**आयवस**—ह्या पराक्रमी राजाच्या तीन मुलांनीं कक्षीवानाला त्रास दिला होता ( ऋ. १. १२२. १५ ).

**आयास्य** किंवा **आयास्य**—हा अंगिरस् गोत्री मंत्रकार.

**आयु**—इंद्राने वेशाकरतां याचा पराभव केला होता ( ऋ. १०. ४९. ५ ). इंद्राने याचा पराभव केल्याचा आणखीहि उल्लेख आहेत ( ऋ. २. १४. ७; ८. ५३. २ ). पण आयूनें इंद्राच्या प्रशंसापर एक सूक्त केलें आहे ( ऋ. ८. ५२ ). हा शब्द सामान्य व विशेष अशा अर्थांनीं उपयोगांत आणलेला आहे. कुत्स व अतिथिग्व यांच्याबरोबर याचा उल्लेख आहे.

( सो. ) पुरूरव्याला उर्वशीपासून झालेल्या पुत्रांतील ज्येष्ठ ( म. आ. ७५; ९५; द्रो. १४४; अनु. १४७; वा. रा. उ. ५६; गरुड. १. १३९. ३; ब्रह्म. १९. ११; पद्म. सृ. १२. ८७; भू. १०३; ह. वं. १. २६). यानें दत्तात्रेयाच्या आश्रमीं शंभर वर्षेपर्यंत सेवा केल्यावर दत्तानें याला एक फळ दिलें. तें यानें आपल्या इंदुमती नामक भार्येस दिलें. त्यायोगें ती गरोदर राहून तिला नहुष पुत्र झाला. त्याला हुंड दैत्यानें पळविल्यामुळें हा आपल्या भार्येसहित शोक करूं लागला. परंतु नारदानें हुंड दैत्य नहुषाकडून मारला जाईल, असें याला सांगितल्यावर हा स्वस्थ राहिला ( पद्म. भू. १०३. १०५ ). याला स्वर्भानूची कन्या प्रभा नामक दुसरी स्त्री असून तीपासून नहुषादि पुत्र झाले ( भा. ९. १५; १७; गरुड. १३९. ८; ब्रह्मांड ३. ६७. १-२; ब्रह्म. ११; पद्म. पा. १२. ८७; ह. वं. १. २८ ). याचा वंश वरील ठिकाणीं दिला असून यानें २६ हजार वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. १. १ ).

२ पौष महिन्यांत भग नांवाच्या आदित्याबरोबर फिरणारा ऋषि ( भा. १२. ११. ४२ ).

३ कृष्णाला रोहिणी नामक स्त्रीपासून झालेला पुत्र ( भा. १०. ६१. १७ ).

४ अंगिरा व सुरूपा यांचा पुत्र. एक देव ( मत्स्य. १९६ ).

५ मंडूकांचा एक प्रसिद्ध राजा ( म. व. १९२ ).

६ प्राण नामक वसु व ऊर्जस्वती यांचा पुत्र (भा. ६. ६. १२).

७ (सो. क्रोष्टु.) पुरुहोत्र राजाचा पुत्र. याचा पुत्र सात्वत. (भा. ९.२४.६)

८ धर्म व वसु यांचा पुत्र. यांना वैतंड्य, शम, शांत, सनत्कुमार व स्कंद हे पुत्र होते (ब्रह्मांड. ३. ३.२१-२९).

**आयु काण्व**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८. ५२).

**आयुतायु**—(मगध. भविष्य.) भागवत, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें श्रुतश्रवसचा पुत्र.

**आयुर्दान**—नारावत नांवाच्या देवगणांतील एक.

**आयुष्मत्**—संव्हाद दैत्याच्या तीन पुत्रांतील ज्येष्ठ.

२ दक्षसावर्णि मन्वंतरांतील होणाऱ्या ऋषभ अवताराचा पिता.

३ उत्तानपादाचा पुत्र.

**आरणेय**—अरणीपासून उत्पन्न झाल्यामुळें शुकास मिळालेलें नांव (दे. भा. १.१७).

**आरण्य**—एक मध्यमाध्वर्यु.

**आरण्यक**—लोमशानें याला रामायण सांगितलें (पद्म. पा. ३५-३७).

**आरब्धत्**—(अंगार पहा).

**आरब्ध**—(अंगार पहा).

**आराधिन्** किंवा **आराविन्**—(सो. कुरु.) वायुमतें हा जयत्सेनपुत्र होय. विष्णुमतें आरावी.

**आरुणायनि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**आरुणि**—उद्दालकाचें पैतृक नांव (बृ. उ. ३. ६. १; छां. उ. ३. ११. ४.). सुब्रह्मण्याचा गुरु आरुणि यशस्विन्. तो हाच (जै. ब्रा. २. ८०). आरुणीनें हृदयांत असणाऱ्या अष्टदलयुक्त कमलाच्या ठिकाणीं ब्रह्मदृष्टि ठेवून ब्रह्माची उपासना केली (ऐ. आ. २.१.४). व्यास हा यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें मध्यदेशांतील शिष्य (व्यास पहा). हा वासिष्ठ चैकितायनाकडे ज्ञान मिळविण्याकरितां गेला होता (जै. उ. ब्रा. १. ४२. १). दुसरीकडेहि यज्ञांतील अग्नि अध्वर्यूचा नाश न करितां शत्रूचा नाश करितो हें सांगण्याकरितां याच्या नांवाचा उल्लेख आला आहे (श. ब्रा. १.१.२.११). अग्निहोत्राची प्रशंसा करतांनाहि एका आरुणींचा उल्लेख आहे (श. ब्रा. २.२.३.३१). आरुणि पांचाल्याला उद्दालक नांव आहे (उद्दालक पहा).

२ धर्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ विनतेचा पुत्र.

४ सर्प (म. आ. ५७).

५ एक व्यास (व्यास पहा).

**आरुणेय**—औपवेशीच्या कुलांतील उद्दालक आरुणि आणि मुलगा श्वेतकेतु यांचें हें पैतृक नांव आहे (श. ब्रा. १०. ३. ४. १; छां. उ. ५.३.१). प्राणविद्या सांगतांना याचा उल्लेख आहे (जै. उ. ब्रा. २. ५. १).

**आरुषी**—मनुकन्या. च्यवन ऋषीच्या दोन स्त्रियांतील ज्येष्ठ. ऊर्व ऋषीची माता (म. आ. ६७).

**आरैहण्य**—सुमंतूचा शिष्य. याचा शिष्य चैकितायन (वं. ब्रा. २).

**आर्क्ष**—हा प्रियमेधाचा आश्रयदाता होता (ऋ. ८. ६८. १५-१६). आतिथिग्व इंद्रोत व आर्क्ष यांजकडून दान मिळाल्याचा प्रियमेधानें उल्लेख केला आहे. एके ठिकाणीं आर्क्ष श्रुतर्व्याचा निर्देश आहे (ऋ. ८.७४.५).

**आर्क्षकायण**—(गल्लुनस पहा).

**आर्चनानस**—अत्रिगोत्राचा प्रवर.

**आर्चिष्मत्**—सुतपदेवांपैकीं एक.

**आर्जव** (आर्जय)—गांधार देशाधिपति शकुनीच्या सहा बंधूंतील एक. यास भारतीय युद्धांत इरावानानें मारिलें (म. भी. ९०)

**आर्जुनेय**—कुत्साचें पैतृक नांव.

**आर्तभाग जारत्कारव**—जरत्कारूचा पुत्र. हें नांव आस्तिक ऋषीसच असावें. दैवराति जनकाच्या सभेंत याज्ञवल्क्याशीं वाद करणारा व हा एकच असण्याचा संभव आहे (बृ. उ. ३. २. १; १३). याला कति ग्रहाः याचें उत्तर देऊन याज्ञवल्क्यानें गप्प बसविलें.

**आर्तभागीपुत्र**—हा शौंगीपुत्राचा शिष्य व वार्कारुणीपुत्राचा गुरु आहे (बृ. उ. ६. ५. २).

**आर्तव**—बर्हिषद पितरांचें नामांतर.

**आर्तायनि**—ऋतायनपुत्र शल्याचें पैतृक नांव (म. भी. ६२).

**आर्तिमत्**—एक ऋषि. याचें स्मरण केल्यानें सर्पबाधा नष्ट होते (म. आ. ५८).

**आर्द्र**—(सू. इ.) आर्द्रक असा पाठभेद आहे (म. व.२०५. ३ कुं.; इंदु पहा).

**आर्द्रक**—(आर्द्र पहा).

**आर्द्रा**—सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक.

**आर्बुदि**—(ऊर्ध्वग्रावन् पहा).

**आर्भव**—(सूनु पहा).

**आर्यक**—कद्रूपुत्र. याची कन्या मारीषा अथवा भोजा. यदुकुलोत्पन्न शूर राजाची स्त्री. तिच्या पासून शूरास पृथा नामक कन्या झाली. तिलाच पुढें कुंति नांव पडलें. भीमाची माता पृथा आर्यकाची पौत्री होती भीमास दुर्योधना-

दिक सनतकुंमारांनी, विषयुक्त अन्न चारून प्रमाणकोटितीर्थांत बुडविलें. तेथें नदींतील नागांनीं दंश केल्यामुळें त्याचें विष उतरलें. भीम सावध झाला, नाग पुनः दंश करावयास आले पण भीमानें युद्धास सुरुवात केली. हें वर्तमान आर्यकास कळल्यावरून हा तेथें आला. भीमास यानें ओळखिलें व त्यास पाताळांत नेऊन अमृतपान करविलें. आणि दहा सहस्र नागांचें तुला बळ असो असा आशीर्वाद देऊन, हस्तिनापुरासमीप पोहोंचविलें ( म. आ. ३५. १२८ ).

२ धर्मसावर्णि मन्वंतरांत होणाऱ्या विष्णूचा पिता.

**आर्श्यशृंगि**—दुर्योधनपक्षीय एक राक्षस. यानें अर्जुनपुत्र इरावानाचा वध केला ( म. भी. ९० ).

**आर्षिणि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**आर्ष्टिषेण**—कृतयुगामध्यें झालेला एक राजर्षि. हा तपश्चर्येनें ब्राह्मण झाला होता ( म. स. ८; श. ४०; वायु. १.२९. ११४ ). याचा आश्रम हिमालयावर नरनारायणाश्रमापाशीं होता ( म. व. १५६ ). याचेकडे पांडव गेले होते ( म. व. १५९-१६१ ). हा भृगुकुलांतील मंत्रकार होता. याला अद्विषेण असें नांव आढळतें ( वायु. १. ५९. ९५-९७ ). याचा निर्णयसिंधूंत आधार घेतला आहे ( देवापि पहा ).

२ ( सो. क्षत्र. ) शलाचा पुत्र ( वायु. २. ३१ ).

**आलंब**—एक ऋषि. धर्मराजाच्या सभेमध्यें होता ( म. स. ४ ).

२ वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार ऋषिगण.

**आलंबायन**—इंद्राचा मित्र. यानें रुद्राचें माहात्म्य सांगितलें ( म. अनु. ४९ ).

**आलंबायनीपुत्र**—आलंबीपुत्राचा शिष्य ( बृ. उ. ६. ५. २ ).

**आलंबि**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेपैकीं ब्रह्मांड व वायु यांच्या मतें प्राच्यापैकीं होय.

**आलंबी**—कश्यप व खशा यांची कन्या.

**आलंबीपुत्र**—हा जायंतीपुत्राचा शिष्य व कौशिकीपुत्राचा गुरु ( बृ. उ. ६. ५. १-२ ).

**आलुकि**—भृगुकुलांतील एक गोत्रकार. जलाभिद् असा पाठभेद आहे.

**आलेखन**—एक आचार्य ( आश्व. श्रौ. ६. १० ).

**आल्हकेय**—( हत्स्वाशय पहा ).

**आवटिन्**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य (व्यास पहा). हाच आटविन् होय.

**आवंत्य**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेपैकीं भागवतमतें ब्रह्मवेत्त्याचा शिष्य ( व्यास पहा ).

**आवरण**—( स्वा. ) भरत व पंचजनी यांचा पुत्र.

**आवाह**—( सो. यदु. ) विष्णूनें श्वफल्काला पुत्र.

**आविक्षित**—मरुत्ताचें पैतृक नांव. या मरुत्तानें कामप्रि असें दुसरें नांव असावें ( ऐ. ब्रा. ८, २१; श. ब्रा. १३. ५. ४. ६; म. शां. २८ ). वायुमतें हा करंधम पुत्र होय.

**आविर्होत्र**—ऋषभदेव व जयंती यांचा भगवद्भक्त पुत्र.

**आवेद**—भृगुकुलांतील एक गोत्रकार. ( आंबाज पहा ).

**आशावह**—विवस्वानाचा पुत्र.

२ द्रौपदी स्वयंवराकरितां आलेला यादव (म. आ. २०१).

**आश्मरथ्य**—अश्मरथाचा वंशज. याचें नांव सूत्रग्रंथांत मतभेद नमूद करण्याकरितां येतें ( आश्व श्रौ. ६. १०; ब्र. सू. १. २. २९; ४. २० ).

**आश्माकी**—प्राचीन्वताची स्त्री. यादवकन्या. हिचा पुत्र शर्याति ( म. आ. ६३. १२ कुं ).

**आश्रया**—स्थावरनगरांत राहणाऱ्या कौंडिण्याची स्त्री ( गणेश. १. ६३ ).

**आश्रायणि**—कश्यपकुलांतील एक गोत्रकार.

**आश्राव्य**—इंद्रसभेंतील एक ऋषि ( म. स. ७ ).

**आश्लेषा**—सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक.

**आश्वघ्न**—ही स्वतंत्र व्यक्ति असावी किंवा मनूचें विशेषण असावें ( ऋ. १०. ६१. २१ ).

**आश्वतर आश्वि**—बुडिलाचें पैतृक नांव.

**आश्वत्थ्य**—अहीनाचें पैतृक नांव.

**आश्वमेध**—एका राजाचें पैतृक नांव आहे. याचा उल्लेख दानस्तुतींत आला आहे ( ऋ. ८. ६८. १५-१६ ).

**आश्वल**—विश्वामित्राचा पुत्र व ब्रह्मर्षि.

**आश्वलायन**—एक शाखाप्रवर्तक आचार्य. आश्वलायनशाखा महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. ही ऋग्वेदाची शाखा आहे. पण ह्या शाखेचे संहिताब्राह्मणादि वैदिक ग्रंथ उपलब्ध नाहींत. याचे पुढील ग्रंथ सर्वत्र प्रसिद्ध आहेत. १ आश्वलायनगृह्यसूत्र, २ आश्वलायनश्रौतसूत्र, ३ आश्वलायनस्मृति.

हा शौनकाचा शिष्य होता. याच्या सूत्राचे शेवटीं ' नमः शौनकाय ' असें शौनकाला नमन केलें आहे. शौनकानें स्वतः १००० भागांचें एक सूत्र केलें होतें. पण आश्वलायनाचें सूत्र थोडक्यांत व चांगलें असल्या मुळें त्यानें आपलें सूत्र फाडून टाकलें. याचें श्रौतसूत्र बारा अध्यायांचें व गृह्यसूत्र चार अध्यायांचें आहे. श्रौतसूत्रांत हौत्रकर्मांत मंत्राचा विनियोग सांगितला आहे. दर्शपूर्णमास, अग्न्याधान, पुनराधान, आग्रयण, अनेक काम्येष्टि, चातुर्मास्य, पशु, सौत्रामणी, अग्निष्टोमादि सप्त सोमसंस्था, सत्रांचे होत्र व शेवटीं गोत्रप्रवरांचा थोडक्यांत संग्रह आहे. अग्निहोमासारख्या कर्मांचाहि क्वचित उल्लेख आहे. गृह्यसूत्रांत खालील विषय प्रामुख्यानें आले आहेत. संस्कार, नित्यकर्म, वास्तु, उत्सर्जन,

उपाकर्म, युद्धार्थसज्जता व शूलगव. गृह्यसूत्रांत दिलेल्या तर्पणांत ऋग्वेदाचे मंडळवार ऋषि घेतले आहेत व जेथें ऋषि घेणें अशक्य वाटलें तेथें प्रगाथ क्षुद्रसूक्त, महासूक्त व मध्यम असा उल्लेख केला आहे. तसेंच व्यासाचे शिष्य सुमंतु वगैरे सांगून सूत्र, भाष्य, भारत व महाभारत यांचाहि उल्लेख आहे. आचार्य व पितर खालीलप्रमाणें आहेत. शतर्चिन्, माध्यम, गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भरद्वाज, वसिष्ठ, सुमंतु, जैमिनि, वैशंपायन, पैल, जानंति, बाहवि, गार्ग्य, गौतम, शाकल्य, बाभ्रव्य, मांडव्य, मांडूकेय, गार्गी वाचक्नवी, वडवा प्रातिथेयी, सुलभा मैत्रेयी, कहोळ, कौषीतक, महाकौषीतक, पैंग्य, महापैंग्य, सुयज्ञ, सांख्यायन, ऐतरेय, महैतरेय, शाकल, बाष्कल, सुजातवक्त्र, औदवाहि, महौदवाहि, सौजामि, शौनक व आश्वलायन. ऐतरेय ब्राह्मणाशीं हें सूत्र जुळतें आहे व त्यांतील कांहीं अवतरणेंहि यांत सांपडतात. आश्वलायनाच्या श्रौतसूत्रांत पुढील आचार्यांचा उल्लेख येतो. आलेखन ( ६. १० ), आश्मरथ्य ( ६. १० ), कौत्स (१. २; ७.१), गाणगारि ( २. ६; १२. ९-१० ), गौतम (२. ६; ५. ६), तौल्वलि (२. ६; ५ ६), शौनक ( १२.१० ).

यांपैकीं तौल्वलि पौर्वात्य आहे ( पा. सू. २.४.६०-६१). विदेहाधिपति जनकाचा हा होता होता. अश्वलाशीं याचा संबंध असण्याचा संभव आहे. वेबरच्या मतें हा पाणिनीसमकालीन असावा. चिं. वि. वैद्यांनीं ख्रि. पू. १०० वर्षे याचा काल धरिला आहे. श्रौतसूत्र व गृह्यसूत्र एकाच आश्वलायनाचें नसावें. आश्वलायन गृह्यसूत्रांत जरी श्रौतसूत्राचे हवाले आढळत असले तरी भाषाभिन्नता स्पष्ट दिसते. हें आश्वलायनाच्या शिष्यपरंपरेपैकीं कोणीं तरी लिहून आश्वलायनाच्या नांवावर दाखल केलें असावें.

२ अथर्ववेदीय कैवल्योपनिषद् परमेष्ठीनें आश्वलायनाला सांगितलें आहे. वरचा व हा एकहि असेल.

३ कौसल्याचें पैतृक नांव.

४ शिवावतार सहिष्णूचा शिष्य.

**आश्वलायनिन**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**आश्ववातायन**—कश्यपगोत्रांतील एक गोत्रकार.

**आश्वसूक्ति**—सामाचा द्रष्टा ( पं. ब्रा. १९.४.२ ).

**आश्वायनि**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

२ अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**आश्विनेय**—( अश्विनीकुमार पहा ).

**आसंग**—( सो. यदु. ) श्वफल्काचा पुत्र.

**आसंग प्लायोगि**—एक दानशूर राजा व सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. १. ३२-३३ ). याचें पुंस्त्व नष्ट होऊन हा स्त्री बनला होता. परंतु मेध्यातिथीच्या कृपेनें याला पुरुषत्व प्राप्त झालें व त्यामुळें याची बायको शश्वती हिला आनंद झाला, अशी एक आख्यायिका सायणानें दिली आहे. इतरांना तिच्यांत सत्यता वाटत नाहीं. शेवटल्या ऋचेला संदर्भहि नाहीं. याच सूक्तांत आसंगाला याद्व म्हटलें आहे, त्यावरून कदाचित् हा यदुवंशज असावा ( ऋ. ८. १. ३१).

**आसमंजस**—( सू. इ. ) असमंजसचा पुत्र अंशुमान.

**आसारण**—भाद्रपदांतील सूर्याबरोबर फिरणारा यक्ष.

**आसुरायण**—दोन ठिकाणीं हा त्रैवणीचा शिष्य आहे (बृ. उ. २.६.३; ४.६.३ ) व तिसऱ्या ठिकाणीं हा आसुरीचा शिष्य आहे ( बृ. उ. ६.५.२ ). व्यासाच्या अथर्वशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें पाराशर्य कौथुमाचा शिष्य (व्यास पहा).

२ कश्यपगोत्रांतील एक ऋषिगण.

३ विश्वामित्राचा पुत्र ( म. अनु. ७ ).

**आसुरि**—हा सायंहोम पक्षाचा आहे. यानें उदितहोम पक्षाची अत्यंत निंदा केली आहे ( श. ब्रा. २. २. ३. ९ ). यानें अग्नीच्या उपस्थानाचा छोटा मंत्र सुचविला आहे ( श. ब्रा. २. ३. ३. २ ). हा भारद्वाजाचा शिष्य व औपजंघनीचा गुरु ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ). पण दुसरीकडे याज्ञवल्क्याचा शिष्य व आसुरायणाचा गुरु आहे ( बृ. उ. ६. ५. २ ). यज्ञविधीवर याला प्रमाण मानलेलें आहे ( श. ब्रा. १. ५. २. २६; २. १. ४. २७ ). अनिर्बंध मताबद्दल व सत्याच्या आग्रहाबद्दल याला मान्यता होती ( श. ब्रा.१४. १. १. ३३ ). शुक्लयजूंच्या ब्रह्मयज्ञांग पितृतर्पणांत हा आहे ( पा. गृ. परिशिष्ट ). व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें मध्यदेशांतील शिष्य ( व्यास पहा ). युधिष्ठिराच्या राजसूययज्ञांतील एक ऋषि. हा सांख्यशास्त्रज्ञ कपिलाचा शिष्य असून पंचशिखाचा गुरु होता ( म. शां. २१८ ). याचा कपिलाशीं व्यक्त व अव्यक्त यांवर संवाद झाला ( म. शां. ३२६-३२८ कुं. ). शिवावतार दधिवाहनाचा शिष्य.

**आसुरिवासिन्**—प्राश्नीपुत्राचें नांव (बृ. उ.४.५. २).

**आसुरी**—( स्वा. प्रिय. ) देवताजित् राजाची स्त्री व देवद्युम्नाची माता.

**आस्तिक (आस्तीक)**—भृगुकुलोत्पन्न जरत्कारु ऋषि व तक्षकभगिनी जरत्कारु यांचा पुत्र. गरोदरपणीं पति अरण्यांत निघून गेल्यावर जरत्कारु कैलासपर्वतावर आली. तेथें शंकरांनीं तिला ज्ञानोपदेश केला व ती पुत्र प्रसवली. यानें गर्भांत शंकराचा उपदेश ग्रहण केला म्हणून याचें नांव आस्तिक असें ठेवण्यांत आलें. मातेनें पतीला गर्भाविषयीं विचारलें असतां 'अस्ति' असें उत्तर मिळालें. म्हणून यास 'आस्तिक' असें नांव पडलें (दे. भा. २. १२). पुढें याची माता आपल्या बंधूजवळच राहिली. तेथेंच याचें संगोपन झालें. यानें उपनयनानंतर च्यवन भार्गव ऋषीपाशीं सांग वेदाध्ययन केलें

(म. आ. ४८). शंकरानें याचा व्रतबंध करविला. व यास वेदवेदांगें इत्यादिकांत निष्णात करविल्यावर मृत्युंजय मंत्राचा अनुग्रह केला. पुढें शंकराच्या अनुज्ञेनें जरत्कारु पुत्रासह आपल्या पित्याच्या आश्रमीं येऊन राहिली. जनमेजय राजानें आपल्या पित्याला सर्पदंशानें मृत्यु आला, असें मंत्र्याचे तोंडून ऐकिलें. तेव्हां त्याला राग येऊन सर्पसत्र करून सर्व सर्प मारून टाकण्याचा त्यानें निश्चय केला व यज्ञदीक्षा घेतली. आतां सर्पसत्रास आरंभ होणार इतक्यांत वास्तुशास्त्रामध्यें निष्णांत असणाऱ्या लोहिताक्ष स्थपती-(सुतारा)ला यज्ञमंडपांतील याज्ञिक कशा तऱ्हेनें शेवटास जाईल याविषयीं प्रश्न केला असतां, ज्या स्थलावर यज्ञमंडप उभारला आहे तें स्थल व ज्या वेळीं भूमापनास आरंभ केला ती वेळ यांवरून यज्ञास मोठें विघ्न येईल व एका ब्राह्मणाकडून हा यज्ञ मोडेल असें त्यानें सांगितलें. तथापि राजानें सर्व साहित्य जुळवून पूर्ण बंदोबस्तानें यज्ञकर्म सुरू केलें व सर्पांचा संहार केला. सर्पसत्रामध्यें शेवटीं तक्षकावर पाळी आली. सर्पांनीं ही गोष्ट जरत्कारूला सांगितली व भावाचें रक्षण करण्याविषयीं प्रार्थना केली. तिनें आस्तिकास मातुल-कुलाचें रक्षण करण्यास आज्ञा केली. मातृभक्त आस्तिकानें ती गोष्ट कबूल केली व हा जनमेजयाच्या यज्ञमंडपांत गेला. तेथें यानें आपल्या चातुर्यानें व मधुर वाणीनें राजाचें मन आकर्षित केलें. इकडे सर्पसत्रानें घाबरलेला तक्षक प्राणरक्षणार्थ इंद्राला शरण गेला; तेव्हां इंद्रानें त्याला अभय दिलें. यज्ञामध्यें ब्राह्मणांनीं तक्षकाचें आवाहन करतांच, इंद्रानें रक्षण केल्यामुळें तो येत नाहीं, असें ब्राह्मणांकडून राजाला समजतांच त्यानें इंद्रासहित तक्षकाचें आवाहन करण्याविषयीं ब्राह्मणांना सांगितलें. त्यांनीं 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' असें म्हणतांच इंद्रानें तक्षकाचा त्याग केला. त्यामुळें तक्षक एकटाच कुंडाच्या ऊर्ध्वप्रदेशीं येऊन खिन्नवदन उभा राहिला (म. आ. ५१-५३). ब्राह्मणांनीं इंद्रासह तक्षकाचें आवाहन करतांच इंद्रासह सर्व देव मनसेकडे गेले. तेव्हां तिनें आस्तिक पुत्राला सर्पांचें संकट निवारण्याविषयीं आज्ञा केली. आस्तिकाच्या भाषणानें तुला पाहिजे तें माग असें राजा याला म्हणूं लागला. तेव्हां ब्राह्मण म्हणूं लागले कीं, तक्षक आवाहन करूनहि अद्यापि येत नाहीं, तो येऊन कुंडांत पडेपर्यंत याला वर देऊं नको. असें ते बोलत आहेत तों ब्राह्मणांच्या मंत्रसामर्थ्यानें तक्षक कुंडाच्या ऊर्ध्वभागीं आलेला आस्तिकानें पाहिला. त्याला तिष्ठ तिष्ठ असें म्हणून यानें थांबविलें आणि वर मागण्यास हीच वेळ योग्य आहे, असें जाणून राजापाशीं सर्पसत्र बंद करावें असा यानें वर मागितला. हें ऐकून राजा अतिशय खिन्न होऊन यावांचून दुसरें कांहीं माग असें म्हणूं लागला. परंतु पूर्वीं वचन-बद्ध झालेला असल्यामुळें तथास्तु असें म्हणून राजानें शेवटीं सर्पसत्र बंद केलें, आस्तिकाचा गौरव केला व यास निरोप दिला. याप्रमाणें यश संपादन करून परत आल्यावर सर्व सर्पांनीं याचा मोठा गौरव केला, व प्रसन्न होऊन वर देऊं लागले. तेव्हां आस्तिकानें हें माझें आख्यान जे त्रिकाल पठन करतील त्यांना तुम्ही बिलकुल पीडा देऊं नये असा वर मिळविला (म. आ. ५८). पण आस्तिकानें जनमेजया-पाशीं इंद्र व तक्षक यांच्या प्राणांची याचना केली. तेव्हां ब्राह्मणांच्या आज्ञेनें राजानें यानें म्हणणें कबूल करून सर्पसत्र बंद करविलें. इंद्रानें मनसेकडे जाऊन स्वतः तिची पूजा करून तिला बलि अर्पण केला (दे. भा. ९. ४८). जनमेजयानें सर्पसत्र बंद केलें तो दिवस नंदिवर्धिनी नामक पंचमीचा होता म्हणून तो दिवस नागांस अतिशय प्रिय आहे (भवि. ब्राह्म. ३२; तक्षक पहा).

**आस्त्रबुध्न**—इंद्रानें याच्याकरतां वेन्य पृथूला दास केले (ऋ. १०. १७१. ३).

**आहार्य**—हा अंगिरसगोत्री मंत्रकार होता.

**आहुक**—(सो. कुकुर.) पुनर्वसूचा मुलगा. याला शंभर पुत्र होते (म. स. १८). तथापि देवक व उग्रसेन हे फार प्रसिद्ध आहेत. शाल्वाबरोबर श्रीकृष्णाचें युद्ध झालें, त्या वेळीं द्वारकेचें रक्षण यानें केलें (म. व. १५). हा अभिजित्पुत्र होता व याला आहुक नांवाचा एक भाऊ होता. हे अत्यंत ऐश्वर्यवान् व पराक्रमी म्हणून यांची ख्याति होती (ब्रह्म. १५. ४६-५१).

**आहुकी**—पुनर्वसु राजाची कन्या व आहुकाची भगिनी.

**आहेय**—याच्या बापाचें नांव शुचि व आईचें नांव अहि होय. स्वाध्याय गांवाच्या बाहेर करावा असा नियम असला तरी शक्य नसेल तर गांवांतच अध्ययन करावें असें याचें मत आहे (तै. आ. २. १२).

**आह्लाद**—(ऐति). देशराजास देवकीपासून झालेला पुत्र. यास स्वर्णवती नांवची स्त्री होती. तिच्यापासून याला इंदुल नांवाचा पुत्र झाला (भवि. प्रति. ३. १४).

# इ

**इक्षालव**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें शाक्वैण रथीतराचा शिष्य ( व्यास पहा ).

**इक्ष्वाकु**—( सू. ) हा वैवस्वत मनूच्या दहा मुलांपैकीं वडील पुत्र होय ( म. आ. ७५; भवि. ब्राह्म. ७९. ). याच्या उत्पत्तीसंबंधीं पुढील हकीगत आहे. एकदां मनूस शिंक आली. तेव्हां शिंकेबरोबर हा मुलगा पुढें उभा राहिला; यावरून यास इक्ष्वाकु असें नांव पडलें ( ह. वं. १. ११; दे. भा. ७. ८; भा. ९. ६; वा. रा. उ. ७. ७९; ब्रह्म. ७. ४४; विष्णु. ४. २. ३ ). मनूनें इक्ष्वाकूला तूं एका राजवंशाचा उत्पादक हो. दंडाच्या योगानें प्रजापालन कर. विनाकारण दंड करूं नकोस. अपराध्यांना दंड केला असतां स्वर्गप्राप्ति होते. असा उपदेश करून यानें करावयाच्या कार्याची रूपरेषा आंखून दिली. मनूनें पृथ्वीचे दहा भाग करून ते सुद्युम्नास न देतां वसिष्ठाज्ञेनें इक्ष्वाकूस दिले ( वायु. २. २३ ). मनूनें मित्र व वरुण या देवतांसंबंधीं याग केल्यामुळें मनूस इक्ष्वाकु व इतर पुत्र झाले अशी कथा आहे ( विष्णु. ४. १ ). इक्ष्वाकु राजाचा कुलगुरु वसिष्ठ होता ( म. आ. १७४; ब्रह्मांड. ३. ४८. २९; पद्म. सृ. ८ २१९; ४४. २३७; विष्णु. ४. ३. १८ वा. रा. उ. ५७ ). सूर्यवंशांत प्रत्येक राजाच्या वेळीं वसिष्ठ कुलगुरु असल्याचें लिहिलें आहे.

इक्ष्वाकु हा अयोध्येचा पहिला राजा होता ( वा. रा. अयो. ११० ). याला मध्यदेश मिळाला होता (ह. वं. १. १०. लिंग. १. ६५. २८; ब्रह्मांड. ३. ६०. २०; मत्स्य. १२. १५ ). यानें ३६००० वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. १. १ ). हा कांहीं ठिकाणीं क्षुपाचा पुत्रहि आहे. क्षुपानें यास प्रजापालनार्थ एक खड्ग दिलें होतें ( म. शां. १६६; आश्व. ४ ).

एकदां इक्ष्वाकु यात्रा करीत हिमालयाच्या पायथ्याजवळ आला. तेथें कौशिक नांवाचा जपकर्ता ब्राह्मण होता. त्याचा यम, ब्राह्मण, काल आणि मृत्यु यांच्याशीं निष्काम जपासंबंधीं संवाद झाला. त्या वेळीं इक्ष्वाकु तेथें होता ( म. शां. १९९ ).

इक्ष्वाकूला शंभर पुत्र होते ( ह. वं. १. ११; दे. भा. ७. ९; भा. ९. ६; म. अनु. २; म. आ. ७५ ). वडील मुलाचें नांव विकुक्षि असें होतें. हाच इक्ष्वाकूच्या मागून अयोध्येचा राजा झाला. विकुक्षीपासून निमिवंश निर्माण झाला. इक्ष्वाकूला दंडक या नांवाचा एक विद्याहीन मुलगा होता. याच्याच नांवावरून दंडकारण्य हें नांव पडलें ( वा. रा.उ. ७९; म. आ. ७५; भा. ९. ६; विष्णु. ४. २ ). याच्या दहाव्या मुलाचें नांव दशाश्व असून तो माहिष्मतीचा राजा होता (म. अनु. २. ६. ). विष्णुपुराणांत इक्ष्वाकूला एकशें एक पुत्र असल्याचें लिहिलें आहे ( ४ २ ). इक्ष्वाकूनें आपलें राज्य आपल्या शंभर मुलांस वांटून दिलें ( म. आश्व. ४ ). पैकीं शकुनिप्रभृति ५० पुत्रांना उत्तर हिंदुस्तानचें व बाकीचे शांतिप्रभृति ४८ पुत्रांना दक्षिण हिंदुस्तानचें राज्य दिलें. अयोध्येस इक्ष्वाकूचें राज्य असून याचा वंशहि फार कालपर्यंत अयोध्येस नांदला. या वंशांत अनेक थोर पुरुष उत्पन्न झाले. त्यामुळें बहुतेक पुराणांत याची वंशावळ सांपडते. पुराणांत दिलेल्या वंशावळींत बरेंच साम्य असलें तरी रामायणांत दिलेल्या वंशावळींत व तींत बराच फरक आहे. पुराणांत इक्ष्वाकूपासून भारतीय युद्धांत असणाऱ्या बहद्बलापर्यंत भागवताप्रमाणें ८८; विष्णूप्रमाणें ९३ व वायूप्रमाणें ९१ पिढ्या होतात. रामायणाप्रमाणें यांत संख्येपेक्षां व्यक्तींत बराच फरक आहे. संशोधकांच्या मतें वंशावळीच्या दृष्टीनें पुराणेंच जास्त बरोबर असण्याचा संभव आहे. याचा काल ख्रि. पू. २६०० ( पु. नि. ३१५ ) व ख्रि. पू. २१०१ ( दप्तरी ) असा ठरविला आहे ( सुमित्र, राम व ऐक्ष्वाक पहा ).

**इट भार्गव**—सूक्तद्रष्टा. याच्या रथाचें इंद्रानें संरक्षण केलें ( ऋ. १० १७१. १ ).

**इटन् काव्य**—हा केशिन् दार्भ्याचा समकालीन होता. ( साम. ब्रा. ७.४ ). दुसरीकडेहि थोड्या फरकानें हें नांव आहे ( पं. ब्रा. १४.९.१६ ).

**इडविड**—( सू. इ. ) शतरथास दुसरें नांव.

**इडविडा**—( इलविला पहा ).

**इडस्पति**—(स्वा.) भागवतमतें यज्ञ व दक्षिणा यांचा पुत्र. २ स्वारोचिष मन्वंतरांतील देवविशेष.

**इडा**—गिरेरवसर्पणानंतर मनूनें संतति व्हावी म्हणून यज्ञ केला, त्यामुळें मनूला एक मुलगी मिळाली. तिचें नांव इडा ( श. ब्रा. १. ६. ३. ७-११ ). मनूची संबंधी व यज्ञतत्त्वाचें प्रकाशन करणारी इडा नामक एक स्त्री होती. देव व असुर यांनीं अग्न्याधान केलें असें ऐकून ही तें पाहण्यास गेली. तेव्हां हिला दोन्ही ठिकाणीं अग्निस्थापनेचा क्रम चुकला आहे असें आढळून आलें. तेव्हां ही मनूकडे गेली व त्याला म्हणाली, 'देवासुरांप्रमाणें तुझा यज्ञ निष्फल होऊं नये म्हणून मी अग्नीची योग्य क्रमानें स्थापना करित्यें.' मनूनें इडेकडून अग्न्याधान केलें. इडेनें १ गार्हपत्य, २ दक्षिणाग्नि व ३ आहवनीय अशा क्रमानें अग्नींची स्थापना केली. त्यामुळें मनूचा यज्ञ सफळ होऊन तो प्रजा व पशू यांनीं समृद्ध झाला (तै. ब्रा. १. १. ४ ). मनु यज्ञकृत्यें करीत असतां यज्ञामुळें देवांनीं सर्व ऐश्वर्य मिळविलें. एकदां इडा मनूकडे गेली, तेव्हां देवांनीं प्रत्यक्षपणें व असुरांनीं अप्रत्यक्षपणें इडेस आपल्याकडे बोलावलें. तेव्हां ही देवांकडे गेली. त्यामुळें एकंदर प्राणीहि देवांकडे गेले व त्यांनीं असुरांचा त्याग केला ( तै. सं. १. ७. १ ).

**इतरा**—( ऐतरेय पहा ).

**इदृश्**—पांचव्या व सहाव्या मरुद्‍गणांतील एक.

**इध्म**—( स्वा. ) भागवतमतें यज्ञपुत्र होय.

२ स्वारोचिष मन्वंतरांतील देव.

**इध्मजिह्व**—( स्वा. प्रिय. ) प्रियव्रत व बर्हिष्मती यांच्या दहा पुत्रांतील दुसरा. हा प्लक्षद्वीपाचा स्वामी. यानें आपल्या द्वीपाचे वर्षसंज्ञक सात भाग करून शिव, यवय, सुभद्र, शांत, क्षेम, अमृत आणि अभय, या सात पुत्रांस क्रमानें त्यांचींच नांवें देऊन विभागून दिले (भा. ५. २०).

**इध्मवाह**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९.२६). अगस्त्यपुत्र दृढस्यूचें दुसरें नांव. याला क्रतूनें दत्तक घेतला होता. अगस्त्यकुलांतील एक गोत्रकार ( मत्स्य. २०२ ).

**इन**—अमिताभ देवांपैकीं एक.

**इंदीवराक्ष** किंवा **इंदीवरविद्याधर**—विद्याधराधिप नलनाभाचा पुत्र. एक गंधर्व. जरी यास ब्रह्ममित्रमुनींनें आयुर्वेद-विद्या दिली नाहीं तरी इतर शिष्यांस पढवीत असतां यानें अडून ग्रहण केली. यास आठच महिने लागले. यामुळें आनंद होऊन हा हंसला. त्या आवाजानें जाणून ब्रह्ममित्रानें यास तूं सात दिवसांत राक्षस होशील असा शाप दिला. पण यानें विनंति केल्यावरून तूं रागांध होऊन स्वतःचीं मुलें खाण्यास धांवशील, त्या वेळीं त्यांच्या अस्त्रतेजानें तुला ताप होऊन पुनः हें शरीर प्राप्त होऊन स्वस्थानापन्नहि होशील असा उश्शाप दिला. पुढें हा आपल्या कन्येस खादयास धांवला असतां तिच्यापासूनच शिकलेल्या अस्त्रविद्येनेंच स्वरोचीनें यास शरण आणिलें व त्यामुळें याचा उद्धार होऊन पुनः पूर्ववत् झाला. यानें आपली कन्या मनोरमा व ब्रह्ममित्रापासून घेतलेली विद्या स्वरोचीस दिली ( मार्क. ६० ).

**इंदु**—( सू. इ. ) विश्वगश्व राजाचा पुत्र. यास आंध्र, चंद्र व आर्द्र अशीं तीन नामांतरें असून युवनाश्व हा पुत्र होता.

२ जग हें मनोमात्र आहे हें सांगण्याकरितां सुवर्णजट प्रांतांत राहणाऱ्या कश्यपगोत्रीय इंदूची कथा भानूनें ब्रह्मदेवास सांगितली आहे ( यो. वा. ३. ८५–८७ ). तींत यानें केवळ मनःसंकल्पानें ब्रह्मदेवाचें श्रेष्ठ पद मिळवून स्थूल शरीर नष्ट झालें तरी सृष्टयुत्पत्तीचा क्रम चालूच ठेवला होता.

**इंदुमती**—सिंहलद्वीपाच्या चंद्रसेन राजाची कन्या ( मंदोदरी पहा ).

२ सोमवंशीय आयु राजाची बायको. हिचा मुलगा नहुष ( पद्म. भू. १०४ ).

३ बृहद्रथ राजाची पत्नी. पूर्वजन्मीं हिचें कंकण समुद्र-सरस्वतीसंगमांत पडल्यामुळें ह्या जन्मीं ही ऐश्वर्य भोगीत होती. ही प्रतिवर्षी प्रभासक्षेत्रीं सुवर्णकंकण टाकीत असे ( स्कंद. ७. १. ३७ ).

४ कल्याण वैश्याची बायको ( गणेश. १. ३२ ).

५ लैद्रांगद राजाची स्त्री ( लद्रांगद पहा ).

**इंदुल**—आह्लाद व स्वर्गवती यांचा पुत्र. सात महिन्यांचा असतांनाच इंद्र यास स्वर्गास घेऊन गेला. तेथें इंद्रपत्नी शचीनें याचें संगोपन केल्यामुळें हा अत्यंत बलवान् झाला. वल्मीककन्या चित्रलेखेशीं याचें लग्न झालें ( भवि. प्रति. ३.२२–२३ ).

**इंद्र**—यानें मेघ फोडले. याच्या करितां त्वष्ट्यानें वज्र तयार केलें. यानें सूर्य, द्यु आणि उषा यांना उत्पन्न केलें. वृत्राला हाण तोडून ठार केलें. वृत्राला मारून पाणी वाहविलें, नद्या वाहावयास लावल्या. गाई व सोम जिंकला. यानें भक्तांना गुरेढोरें दिलीं ( ऋ. १. ३३ ). यानें दशद्युचें संरक्षण केलें ( ऋ. १. ३३. १४ ) श्वित्र्याच्या गाईनें रक्षण केलें ( ऋ. १. ३३. १५ ). सामगानानें याला हुषारी येते. हा दासांचा शत्रु आहे. याचा रथ घोडे जोडलेला आहे. तो चालूं लागला कीं, मेघांचा गडगडाट होतो, पृथ्वी सपाट व स्थिर होते. सिंधूशीं याचें सख्य होतें. अंगिरस व इंद्र बरोबर असतात ( ऋ. १. ११ ). यानें उपजतांच देवांचें संरक्षण केलें. हलणारी पृथ्वी स्थिर केली. अंतरिक्षाची व्यवस्था लावली व द्युला आधार दिला. अहीला मारून सप्तसिंधु मोकळ्या केल्या. वलापासून गाई सोडविल्या. वीज उत्पन्न केली. यानें शंबराला चाळीस वर्षांनीं शोधून काढिलें ( ऋ. २. १२ ). याला सोम फारच आवडतो ( ऋ. २. १४ ). अंगिरानें स्फूर्ति दिल्यामुळें इंद्रानें वलाला ठार केलें. (ऋ. २. १५. ८). यानें सूर्याचें चक्र फेंकून दिलें व एतशाला वांचविलें ( ऋ. ४.१८.१४ ). सोम पिण्याकरितां इंद्राला बोलावीत असत ( अपाला, तुर्वश पहा ). इंद्राची उपासना न करणाऱ्यांना अनिंद्र असें निंदीत ( ऋ. ७.१८.१६ ). नेम नांवाच्या ऋषीनें इंद्र प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळें इंद्रच नाहीं असें प्रतिपादन केलें. तेव्हां इंद्रानें प्रत्यक्ष आपण आहोंत हें दाखविलें ( ऋ. ८. १०० ).

याचे वेदांत अनेक शत्रु आहेत. त्यांचा मुख्य दुर्गुण पाणी अडवणें हा आहे. त्यांचीं नांवें–अनर्शनि, अर्णव, अर्बुद, अहि, अहिशुव, और्णवाभ, अश्न, इलीबिश, करंज, कुयव, क्रिवि, चुमुरि, दभीक, धुनि, नमुचि, नार्मर, पर्णय, पिप्रु, वर्चिन्, वल, शंबर वगैरे आहेत. याचीं हत्यारें वज्र, अद्रि, दधीचीच्या अस्थि ( ऋ. १. ८४. १३ ), धनुष्यबाण, भाला, फेस, बर्फ वगैरे आहेत. जगदुत्पादक व सृष्टिक्रम घालून देणारा इंद्र आहे. याला इंद्राणी नांवाची पत्नी होती ( ऋ. १०. ८६ ). सीता नांवाची बायको असल्याचा निर्देश आहे ( पा. गृ. सू. १७.९; शची पहा ). हा अनेकांचा पुत्र झाला होता ( शृंगवृष पहा ). प्रत्येक मन्वंतरांत इंद्र असतो. तो, भूर्भुवःस्वः या तीन लोकांचा

आत्मपति असतो. शंभर यज्ञ करून इंद्रपदवी मिळवतां येते (नहुष व ययाति पहा). तो वज्रपाणि, सहस्राक्ष पुरंदर व मघवान् असतो व प्रजा संरक्षण करणें हें त्याचें मुख्य काम असतें. प्रत्येक मन्वंतरांत इंद्र वेगळे असले तरी त्यांचे गुण व कार्य सारखेंच असतें. सप्तर्षि त्यांचे सल्लागार असतात व गंधर्व-अप्सरा त्यांचें ऐश्वर्य असतें ( वायु. २. ३. १. २३ ). सर्वच अवतार जगाची व्यवस्था ठेवितां येईनाशी झाली कीं, यांच्या मदतीकरितां होतात ( मनु पहा ). शंभर यज्ञ केले कीं इंद्रपद मिळतें असें असल्यामुळें कोणाचेहि शंभर यज्ञ पुरे होऊं लागल्यास हा अश्वमेधाचा घोडा पळवून विघ्न करीत असे ( सगर, पृथु, रघु ). तसेंच कोणी मोठी तपश्चर्या करीत असल्यास भीतीनें हा अप्सरा पाठवून तपोभंग करी ( भा. ११. ४.७ ). हिरण्यकशिपु, बलि व प्रह्लाद हे तीन असुरांपैकींहि इंद्र झाले होते ( मत्स्य. ४७. ५५-५९; तारक पहा ). यावरून याचें राजकीय स्वरूप चांगलें व्यक्त होतें. विशेषतः त्रिशंकु, वसिष्ठ, विश्वामित्र, वामदेव, रोहित, गौतम, गृत्समद, रजि, भरद्वाज, उदारधी, सोम, इंदुल व अर्जुन इत्यादि प्राचीन व अर्वाचीन व्यक्तींच्या चरित्रांवरून इंद्राची चांगली कल्पना येते.

इंद्रविषयक पौराणिक कल्पना पुढील माहितीवरून व्यक्त होतील. अदितीचा पुत्र (कश्यप पहा). यास शक्र असें नामांतर आहे ( म. आ. ६६; भा. ६-६ ). हा श्रावण महिन्यांतील सूर्य होय ( भा. १२. ११. १७ ). हा देवांचा राजा आहे. ( भा १. १०. ३ ). हाच सध्यांचा पुरंदर इंद्र होय. हा पावसाचा देव आहे. एकदां गरुडाचे पाठीवर बसून नाग जात असतां गरुड इतका उंच गेला कीं, ते सगळे सूर्यतापानें मूर्च्छित होऊन जमिनीवर पडले. तेव्हां त्यांची माता कद्रू हिनें इंद्राची स्तुति करून तापशमनार्थ पाऊस पाडविला ( म. आ. २५.२६ ). यानें भीमद्वादशी व्रत केल्यामुळें यास इंद्रत्व मिळालें ( पद्म. सृ. २३ ). दक्षानें केलेल्या यज्ञास हा गेला होता व वीरभद्रास तूं कोण असें विचारिलें होतें (ब्रह्म. १२९). मंदारपर्वताचे पंख यानें तोडून टाकिले होते ( स्कंद. १.१९. ९ ). विश्वधर वाण्याचा पुत्र मेल्यामुळें तो शोक करूं लागला. तें पाहून यमास वैताग येऊन त्यानें आपलें काम सोडून तप आरंभिलें. यामुळें पृथ्वीवर पापी जन अतिशय पापें करीत पण मरेनात. त्यामुळें अति त्रास झाला. तेव्हां पृथ्वी इंद्राकडे गेली. इंद्रानें त्याचा तपोभंग करण्याकरितां गणिका नामें अप्सरेस पाठविलें. पण उपयोग झाला नाहीं. तेव्हां पित्यानें त्याची समजूत घातली ( ब्रह्म. ८६ ). कश्यप एकदां पुत्रकामेष्टि यज्ञ करीत असतां त्यास देवादिकांनीं साह्य केलें. त्यांत वालखिल्य व इंद्रहि मदत करीत होते. इंद्र झपाझप जात होता व सर्व वालखिल्य मिळून एक समिध घेऊन जात असतां ते गोष्पद-मात्र खड्ड्यांत सांठलेल्या पाण्यांत सांपडून गटंगळ्या खात होते हें पाहून इंद्र तिरस्कारानें हंसला. हें पाहून वालखिल्य संतापले व दुसऱ्या इंद्रास उत्पन्न करण्याकरितां तप करूं लागले. तेव्हां इंद्र कश्यपास शरण गेला व त्याच्या मध्यस्तीनें त्यांचा राग शांत केला ( कश्यप व वालखिल्य पहा; म. आ. ३० ). आपल्या मातेस दास्यांतून सोडविण्याकरितां गरुडानें मातेच्या दास्याच्या मोबदल्यांत नागांस अमृत देऊं केलें व तो तें स्वर्गीं आणावयास गेला. गरुडानें अमृत चाल-विलेंसें पाहून इंद्रानें त्यावर वज्र टाकिलें, पण व्यर्थ. त्याचें बल पाहून इंद्रानें त्याशीं सख्य करण्याचें ठरविलें. तेव्हां गरुडानें त्यास सांगितलें कीं, जर तुला अमृत परत पाहिजे असेल तर तें युक्तीनें पळव. त्याप्रमाणें इंद्रानें अमृत युक्तीनें पळविलें. गरुडास या वेळीं इंद्रानें सर्प तुझें भक्ष्य होतील असा वर दिला ( म. आ. ३४ ).

हिरण्यपुत्र महाशनि यानें इंद्रास जिंकून इंद्राणीसह यास बांधून आणिलें. पुढें देवादिकांनीं वरुणास सांगून इंद्रास महाशनीकडून सोडविलें. कारण महाशनि वरुणाचा जांवई होता. पुढें इंद्रानें इंद्राणीचे सांगण्यावरून शिवाची स्तुति केली. शिवानें विष्णूची स्तुति करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें यानें केलें असतां विष्णु व शिव यांच्या अंशानें एक पुरुष गंगाजलांतून उत्पन्न झाला. त्यानें महाशनीस मारिलें. इंद्र नेहमीं त्याचे मागेंमागें असे. यामुळें एकदां इंद्राणीशीं याचा प्रेमकलह झाला होता ( ब्रह्म. १२९ ). वाचक्नवि मुनीची स्त्री मुकुंदा, ही रुक्मांगद राजावर मोहित झाली होती. इतक्यांत इंद्रानें रुक्मांगदाचे वेषानें तिजशीं संभोग केला. पुढें याचे वीर्यानें मुकुंदेस गृत्समद झाला. या गृत्समदाचा पुत्र त्रिपुरासुर. त्रिपुरासुरादिकां-पासून गणेशानें इंद्राला वांचविलें ( गणेश. १. ३६-४० ).

सुकर्म्याचे हजार शिष्य अनाध्यायाचे दिवशीं अध्ययन करीत, म्हणून त्यांना इंद्रानें ठार केलें. सुकर्म्यानें प्रायोपवेशनास आरंभ केला. तेव्हां इंद्रानें त्यास वर दिला कीं, या हजारांसह आणखी दोन शिष्य उत्पन्न होतील व ते दोघे सुरांपैकीं असतील. हेच पौष्यंजि व हिरण्यनाभ ( कौशिक्य ) होत ( वायु. १.६१ २९-३२; ब्रह्मांड. ३५. ३३-३७ ).

च्यवनास अश्विनीकुमारांनीं दृष्टि दिली व जरारहित केलें; म्हणून त्यांस हवि मिळवून देण्याचा प्रयत्न शर्यातीनें केला. त्या वेळीं इंद्रानें बरीच हरकत घेतली. पण त्या ठिकाणीं इंद्राचें कांहीं चाललें नाहीं. कारण च्यवनानें हा वज्र मारूं लागला असतां याचे हात थांबविले व यास मारण्याकरितां मदनामें असुर उत्पन्न केला. तेव्हां इंद्र त्यास शरण गेला व अश्विनीकुमारांस यज्ञीय हवि मिळण्याचा अधिकार दिला ( म. व. १२५-

१२६).मरुत्तानें एकदां यज्ञ केला.त्यावेळीं त्यानें प्रथम बृहस्पतीस बोलाविलें होतें, पण त्यानें मला इंद्राकडे जावयाचें आहे तरी मागाहून येईन असें म्हटलें. पण मरुत्तानें त्याचा बंधु संवर्त यास बोलविलें व यज्ञ सुरू केला. हें बृहस्पतीस समजल्यावर त्यानें इंद्रास हा यज्ञच होऊं न देण्याबद्दल सांगितलें. त्याप्रमाणें करण्याकरितां इंद्र धांवून गेला. पण संवर्तानें आपल्या प्रभावानें यास विकलांग करून आणिलें. तेथें आल्यावर इंद्रानें स्वतः सदस्याचें काम केलें ( म. आश्व. १० ). यानें भंगास्वनाला स्त्री बनविलें ( भंगास्वन पहा ).

दुर्वास ऋषीनें यास एकदां एक माळ दिली होती. तिचा याचे हातून अनादर झाला, तेव्हां तूं ऐश्वर्यभ्रष्ट होशील असा यास शाप मिळाला. याच वेळीं यानें बृहस्पतीला तो आला असतां त्यास उत्थापनानें मान दिला नाहीं म्हणून बृहस्पति परत गेला. तो येण्याचें चिन्हहि दिसेना. तेव्हां यास नारदानें सांगितलें कीं, तूं लवकरच ऐश्वर्यभ्रष्ट होणार ! बलीहि याच वेळीं याचेवर स्वारी करण्यास निघाला होता, तो स्वारी करून इंद्राचें सर्व वैभव हिरावून घेऊन चालला. जातांना तें वाटेंतच समुद्रांत पडलें. ही गोष्ट इंद्रादि देवांनीं विष्णूस सांगितली. तेव्हां बलीशीं साम करून गोडीगुलाबीनें त्यास समुद्रमंथन करण्यास उद्युक्त कर असें विष्णूनें सांगितलें. त्याप्रमाणें हा बलीकडे पाताळांत गेला व तेथें त्याचे जवळ शरणागतासारखें कांहीं काळ राहून युक्तीनें समुद्रमंथनाची गोष्ट काढिली. बलीस तें शक्य वाटेना. तेव्हां आकाशवाणीनें समुद्रमंथन कसें करावयाचें तें सांगितलें. तेव्हां तो समुद्रमंथनास तयार झाला. नंतर यानें मंदराचलास रवी होण्यास बोलाविलें. तो यावयास तयार झाला. तेव्हां विष्णूनें त्यास गरुडावर आणिलें. ऐरावत उच्चैःश्रवा, पारिजातक व रंभादि अप्सरा या समुद्रांतून निघालेल्या चौदा रत्नांपैकीं चार रत्नें यानें घेतलीं ( भा. ६. ९; स्कंद. १. १. ९).

बृहस्पति परत येईना, त्या वेळीं इंद्रानें त्याचे जागीं विश्वरूपाचार्याची नेमणूक केली. पण त्याची माता ही दैत्यकन्या असल्यामुळें त्याचा ओढा दैत्यांकडे होता. तो देवांबरोबर दैत्यांसहि हविर्भाग देत असे. हें इंद्रास कळतांच यानें त्याचीं तिन्ही शिरें तोडिलीं (विश्वरूप पहा). आपला पुत्र मारिला असें त्वष्ट्यानें पाहून यास ठार करण्याकरितां वृत्र नांवाचा असुर उत्पन्न केला. व याला हविर्भाग मिळूं न देण्याचा प्रयत्न केला. त्यानें इंद्रावर चढाई करून याचा पुष्कळ वेळ पराभव केला व एकदां तर यास वृत्रानें गिळिलेंहि. या सर्वांचें कारण एकदां यानें प्रदोषव्रतांत महादेवाची पिंडी ओलांडली होती (स्कंद. १. १. १७).

वृत्रानें इंद्राचा पराभव केला म्हणून गुरूपदेशानें इंद्रानें साभ्रमतीतीरीं दुर्धर्षेश्वराची प्रार्थना केली. तेव्हां शंकरानें यास पाशुपतास्त्र दिलें. त्यानेंच वृत्रास मारिलें ( पद्म. उ. १५३ ). पराभव झाला तेव्हां इंद्र शंकरास शरण गेला. शंकरानें यास वज्र दिलें. त्यानें इंद्रानें वृत्रासुराचा वध केला ( पद्म. उ. १६८ ). इंद्रानें वृत्राचा वध करण्याकरितां वज्र करावें म्हणून दधीचि ऋषीजवळ अस्थि मागितल्या. त्यांचें विश्वकर्म्यानें वज्र बनविलें. षण्डामर्क वरत्री व त्वष्टा ह्या दैत्ययाजकांना इंद्रानें जाळून मारलें ( ब्रह्मांड. ३. १. ८५; दधीचि पहा).

विश्वरूप, वृत्र व नमुचि यांचे हननानें इंद्रास ब्रह्महत्येचें पातक लागलें होतें.व त्यामुळें हा भिऊन कोठें तरी कमळांत दडून राहिला होता. या वेळीं दोन इंद्र झाले. एक नहुष व दुसरा ययाति. पण ते लवकरच पतन पावले (स्कंद. १.१.१५). या ब्रह्महत्यांचें निराकरण कसें केलें याबद्दल निरनिराळ्या पुराणांत निरनिराळ्या कथा आहेत. ब्रह्महत्येचे चार भाग केले व ते भूमि, वृक्ष, जल व स्त्री यांस एकेक वर देऊन त्यांचे जवळ दिले. भूमींतील खळगे आपोआप भरणें व तिजवरील खार उखीरूपानें दिसणें. वृक्ष तोडला असतां त्या ठिकाणीं त्यास अंकुर फुटणें व डिंक सुटणें, पाणी ज्यांत मिसळलें जाईल तें वाढणें व फेंस येणें, आणि स्त्रियांस गरोदर असतांहि प्रसूतिकालपर्यंत संभोग करितां येणें, पण रजोदर्शन होणें, हे त्यांना दिलेले वर व ब्रह्महत्येचे परिणाम आहेत ( भा. ६. ९; स्कंद. १. १. १५; लिंग. २. ५१ ). रक्षांसि ह वा या मंत्रांत यासंबंधीं निर्देश आहे. हें पातक विश्वरूपहत्येचें होय. पण पद्मपुराणांत ही हकीकत वृत्रहत्येच्या पातकावर आहे ( उ. १६८ ). पण याच पुराणांत यानें हें पातक जावें म्हणून तप केलें व पुष्कर, प्रयाग, आद्य व वाराणसी या तीर्थांवर स्नान केलें असें म्हटलें आहे ( पद्म. भू. ९१ ). हें पातक नाहींसें व्हावें म्हणून यानें अश्वमेध यज्ञ केला ( म. उ. १० ). नमुचिवधानें लागलेल्या ब्रह्महत्येच्या शमनार्थ अरुणेवर स्नान केलें ( म. श. ४४.३३ ). याचे येण्यानें झालेल्या इंद्रागमतीर्थांत स्नान केल्यामुळें हा नष्टपाप झाला (पद्म. उ.१५१ ). त्रिस्पृशा एकादशीचें व्रतामुळें हा नष्टपाप झाला (पद्म. उ. ३४; अहल्या पहा ).

एकदां देवदैत्यांचें युद्ध झालें, त्यांत दैत्य देवांस आटोपेनात, म्हणून त्यांनीं सूर्यवंशांतील पुरंजयास मदतीस बोलविलें. तेव्हां त्यानें माझें वाहन इंद्र होईल तर येतों असें सांगितलें. प्रथम इंद्रानें कांकूं केलें, पण पुढें कबूल करून महावृषभाचें रूप धारण केलें ( भा. ९. ६. ). हिरण्यकशिपूनें स्वर्ग जिंकला व देवास पीडा दिली म्हणून विष्णूनें नृसिंहाचें रूप घेऊन त्यास ठार केलें व स्वर्ग परत इंद्राला दिला. शत्रूंची पीडा होऊं नये म्हणून इंद्रानें यमुनातीरीं हजारों यज्ञ केले. त्यामुळें ब्रह्मा, विष्णु व महेश प्रसन्न झाले ( पद्म. उ. १९९ ). प्रल्हादादि

दैत्यांनीं एकदां इंद्राचा स्वर्ग जिंकिला असतां रजीनें तो परत मिळवून दिला.

या उपकाराच्या फेडीकरितां व प्रह्लादादि दैत्यांपासून संरक्षण व्हावें म्हणून यानें त्यासच इंद्रपद दिलें. पण पुढें त्याचे पुत्र मात्र यास तें इंद्रपद परत देईनात. तेव्हां बृहस्पतीनें अभिचारविधानांनीं त्यांची बुद्धि भ्रष्ट केली. नंतर इंद्रानें ते भ्रष्टबुद्धीमुळें भ्रष्टबल झाले आहेत असें पाहून त्यांस ठार केलें ( भा. ९. १७; मत्स्य. ४४ ब्रह्म. ११ ). नहुष हा कोणत्या वेळीं इंद्र झाला हें निरनिराळ्या पुराणांचा मतभेद असल्यामुळें नक्की समजत नाहीं. इंद्र एकदां बलिराजास जिंकून उतथ्याचे आश्रमांत गेला. तेथें त्याची सुंदर स्त्री गादीवर निजलेली पाहून यानें तिजशीं जबरीनें संभोग केला. पण ती स्त्री गरोदर होती. आंतील गर्भानें आपण पडूं नये म्हणून आपल्या पायांनीं योनिद्वार आंतून बंद केलें. त्यामुळें इंद्राचें वीर्य जमिनीवर पडलें. हा आपल्या वीर्याचा अपमान झालेला पाहून इंद्रानें त्यास शाप दिला कीं तूं जन्मांध हो ( दीर्घतमस् पहा). पण यामुळें हा स्वतः हतवीर्य होऊन मेरूच्या गुहेंत जाऊन लपला. या वेळीं दैत्यांनीं बलीस इंद्रपदावर बसविलें. नंतर सर्व देव या गुहेपाशीं गेले व यास परत आणवून बृहस्पतीकडून त्याचेकडून अक्षय्यतृतीयेचें व्रत करवून पूर्ववत् ऐश्वर्यसंपन्न केलें (स्कंद. २. ७. २३; बृहस्पति पहा). चित्रलेखा व उर्वशी यांना केशी दैत्यानें पळविलें होतें. त्यांना पुरूरव्यानें सोडविलें व उर्वशी इंद्रास दिली (मत्स्य २४. २५). कितव नांवाच्या एका दुराचारी माणसास मृत्यू आला, त्या वेळीं त्यास आपल्या दुराचरणाचा पश्चात्ताप झाला. यामुळें यमानें त्यास तीन घटका इंद्रपद दिलें. तेवढ्या वेळांत त्यानें सर्व वस्तु ऋष्यादिकांना दान केल्या. पण पुनः इंद्र इंद्रपदावर आल्यावर त्यानें यमाकडून त्या सर्व परत मागविल्या. हा कितव पुढें बलि झाला ( स्कंद. १. १. १९ ). हिरण्यकशिपु व हिरण्याक्ष यांस इंद्रानें मारविल्यामुळें दितीनें इंद्रघ्न पुत्र निर्माण करण्याची तयारी चालविली. हें पाहून इंद्र तिची ब्राह्मणवेशानें सेवा करूं लागला; व योग्य संधि पाहून यानें त्या गर्भाचे एकूणपन्नास तुकडे केले. नंतर हा तिच्या गर्भांतून बाहेर आला व सर्व हकीकत तिला निवेदन केली. तेव्हां तिनें याजकडून त्यांची नेमणूक निरनिराळ्या वातांवर करवून घेऊन व यांशीं बंधुप्रेमानें वागण्याचें कबूल करवून यास सोडून दिलें ( मरुत् पहा; मत्स्य. ७-८ ). दितीनें पुनः आणखी वज्रांग नांवें एक पुत्र निर्माण करून त्यास इंद्रास मारण्यास सांगितलें. त्यानें इंद्रास बांधून आणिलें व नंतर त्यास मारणार इतक्यांत ब्रह्मानें त्यास गोडीनें प्रतिबंध केला ( वज्रांग पहा ). मेघनादानें इंद्राचा पराभव केला ( इंद्रजित् पहा ). इंद्रानें वज्रांगस्त्री वज्रांगी हिला त्रास दिल्यावरून वज्रांगानें तिचे ठायीं तारक नांवाचा पुत्र निर्माण करून त्यास इंद्रावर पाठविलें. त्याचें इंद्राशीं बराच काल युद्ध झालें. त्यांत इंद्रानें जंभासुरास पाशुपतास्त्रानें ठार केलें. तारकानें सर्व देवांस बांधून आणिलें. बाकीच्यांनीं मर्कटरूपें धारण केलीं. त्यांच्या चेष्टांनीं संतुष्ट होऊन त्यानें सर्व देवांस सोडून दिलें. या वेळीं तारकानें इंद्रपदाचा उपभोग घेतला होता. ( स्कंद. १ १. १५-२१ ). गौतमस्त्री अहल्या हिनें उत्तंकास सौदास राजाचीं कवचकुंडलें आणावयास सांगितलें. त्याप्रमाणें तो जात असतां मध्येंच इंद्रानें वृषभारूढ पुरुषाचे रूपानें दर्शन दिलें. या वेळीं यानें त्या वृषभाचें पुरीष उत्तंकास प्यावयास सांगितलें. नंतर पुनः उत्तंक नागलोकीं गेला असतां, एका अश्वासहित दर्शन दिलें. अश्वाचे अपानद्वारांत त्याजकडून फूंकर घालवून वासुक्यादि नागांस शरण आणवून त्यास कुंडलें परत मिळवून दिलीं. गुरुगृहीं लवकर पोंचावें म्हणून त्यास तोच अश्व बसावयास दिला व त्यामुळें उत्तंक क्षणार्धांत गुरुगृहीं पोंचला. या कथेंतील वृषभ म्हणजे अमृतकुंभ व त्याचें पुरीष अमृत होय. तो पुरुष इंद्र व अश्व अग्नि होय ( म. आ. ३). सुमुखास यानें पूर्णायु केलें, म्हणून याचेवर गरुड रागावला. पण विष्णूचे मध्यस्थीनें याची बाजू सांवरली गेली ( गरुड पहा ). एकदां इंद्र व सूर्य फिरत असतां एका सरोवरांत स्नान केल्यामुळें स्त्री झालेल्या ऋक्षरजाचे ठायीं हा मोहित झाला व तिचे केशांचे ठायीं याचें वीर्य पडलें. त्यामुळें लगेच एक पुत्र उत्पन्न झाला. तोच वाली होय. (वाली पहा). रामरावण-युद्धप्रसंगीं रावण युद्धास सिद्ध होऊन आला असतां, यानें आपल्या सारथ्यासह आपला रथ पाठविला होता ( म. व. २९१ ).

हा दमयंती-स्वयंवरास गेला होता ( म. व. ५१; नल पहा ). अर्जुन कुंतीला इंद्रप्रसादानें झाला ( म. आ. १८३; व. ६३. ५९ कुं. ). नंदादि गोपांकडून कृष्णानें गोवर्धनयाग करवून इंद्राचा पाणउतारा केला (भा. १. ५-१९. १६; १०. २५.१९; ब्रह्म. १८८ ). अर्जुनाला भेटून पाशुपतास्त्रप्राप्ति करून घेण्यास सांगितलें (म. व. ३७. ७८). कर्णाचे अंगावर कवचकुंडलें आहेत म्हणून तो अजिंक्य व अवध्य आहे, हें जाणून यानें ब्राह्मणरूपानें त्याजवळून भिक्षा म्हणून कवचकुंडलें आणिलीं. त्याच्या दातृत्वानें संतुष्ट होऊन यानें त्यास एक अमोघ शक्ति दिली ( कर्ण पहा ). इंद्राणीनें सर्व देव इंद्रास सोडून दुसऱ्यास इंद्रपद देत आहेत हें पाहून बृहस्पतीस शाप दिला कीं, तूं जिवंत असतां, इंद्र तुझ्या भार्येच्या ठायीं एक पुत्र उत्पन्न करील. त्याप्रमाणें केल्यामुळें गुरुपत्नीगमनाचा यास दोष लागला ( स्कंद. १.१ १९ ).

इंद्राच्या या पातकांचें क्षालन मृत्यूखेरीज होणें नाहीं तरी मृत्यूपर्यंत यानें पाण्यांतच बुडून राहावें, असें बृहस्पतीनें म्हटलें आहे (स्कंद. १.१.५१).

पुराणांतून इंद्राला पहिलें स्थान नाहीं, पण त्रिमूर्तींच्या खालचें आहे. हा अंतरिक्षाचा व पूर्व दिशेचा राजा आहे, हा विद्युत् सोडतो व फेंकतो, इंद्रधनुष्य सज्ज करितो. सोमरसाविषयीं त्याची गाढ आसक्ति असते. हा असुरांशीं लढतो. त्यांची यास भीति वाटते.

हा सुरूप आहे. पांढऱ्या घोड्यावर किंवा हत्तीवर वज्र घेऊन बसतो. याची प्रत्यक्षपणें पूजा होत नाहीं. शक्रध्वजोत्थान सणांत त्यावरील पूजाविधि आहे. याचें निवासस्थान स्वर्ग, राजधानी अमरावती, राजवाडा वैजयंत, बाग नंदन, गज ऐरावत; घोडा उच्चैःश्रवा, रथ विमान, सारथि मातली, धनुष्य शक्रधनु व तलवार परंज.

बृहस्पतीनें सर्व गुणांचा अंतर्भाव ज्यांत होतो असा गुण साम होय (म. शां. ८४ कुं.). तो शत्रूशीं ठेवावा (म. शां. १०३ कुं.) इत्यादि याला सांगितलें. पुनः प्रल्हादानें आपल्या शीलबलावर इंद्रपद घेतलें. त्या वेळीं उत्कृष्ट असा मोक्षप्राप्तीचा उपाय यानें कथन केला. याहिपेक्षां श्रेष्ठ ज्ञान असें शुक्रानें सांगितलें व याहिपेक्षां श्रेष्ठ शील असें प्रल्हादानें सांगितलें (म. शां. १२४-१२९ कुं.). तसेंच याचा एकदां महालक्ष्मीशींहि संवाद झाला (म. शां. २३२ कुं.). नमुचिमुनीनें भगवंताच्या चिंतनापासून मिळणारें श्रेय यास सांगितलें (म. शां. २३०) याचा महाबलीशींहि संवाद झाला होता (म. शां. २३२ कुं.). यास राजधर्म मांधात्यानें सांगितला (म. शां ६३ कुं.). युद्धांत मृत्यु म्हणजे स्वर्गप्राप्ति असें अंबरिषानें सांगितलें (म. शां. ९८ कुं.). अग्नीनें यास ब्राह्मण व पतिव्रता यांचें महत्त्व सांगितलें (म. अनु. १४ कुं.). शंबर राजर्षीनें यास ब्राह्मणमाहात्म्य सांगितलें (म. अनु. ७१). प्रशंसनीय काय हें एका शुक पक्ष्यानें सांगितलें (म. अनु. ११). कोणत्याहि प्रकारच्या नोकरांस लागणारे गुण यास मातलीनें सांगितले (म. अनु. ११). धृतराष्ट्रगंधर्वाचे रूपानें गौतमानें याशीं संवाद केला (म. अनु. १५९ कुं.). ब्राह्मण्यप्राप्त्यर्थ यास उद्देशून मतंगानें तप केलें त्यामुळें त्यास ब्राह्मण्य प्राप्त झालें (म. अनु. ४. १-१८).

कृष्ण नरकासुरास मारून सत्यभामेसह नंदनवनावरून जात असतां पारिजातक वृक्ष त्याचे दृष्टीस पडला. तो त्यानें उपटून नेला (ह. वं. २.६४). तो त्यानें प्रथम इंद्राजवळ मागितला, पण यानें कुरकुर केली व कृष्णाशीं इंद्र जयंतासह मोठ्या शिकस्तीनें लढला. पण कृष्णानें याचा पराभव करून पारिजात वृक्ष नेला (ह. वं. २.७५). अशी परस्परविरुद्ध हकीकत एकाच ग्रंथांत आहे. यास जयंताखेरीज ऋषभ व मीढुष असे दोन पुत्र होते (भा. ६.१८.७).

इंद्रानें ब्रह्मकृत राजनीतिशास्त्रावरील वैशालाक्ष ग्रंथाचा संक्षेप करून बाहुदंतक नांवाचा पांच हजार अध्यायांचा संक्षिप्त ग्रंथ केला (म. शां. ५९).

वैद्यकांतहि इंद्राच्या नांवावर अनेक औषधांचे पाठ आहेत.

२ वायूचा शिष्य. याचा शिष्य अग्नि (वं. ब्रा. २).

**इंद्र मुष्कवत्**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०.३८).

**इंद्र वैकुंठ**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. ४८-५०).

**इंद्रजानु**—अकरा कोटि वानरांचा स्वामी, असा रामसेनेंतील एक वानर.

**इंद्रजित्**—हा लंकेचा राजा रावण व मंदोदरी यांचा ज्येष्ठ पुत्र होय. याला मेघनाद असें नांव होतें. परंतु पुढें यानें इंद्राला जिंकलें, म्हणून यास इंद्रजित् असें नांव पडलें. याच नांवानें याचा सर्वत्र उल्लेख आढळतो (म. व. २८५; आ. रा. सा. १२; वा. रा. उ. २९-३०). यानें जन्मतःच मेघासारखी गर्जना केल्यामुळें यास मेघनाद असें नांव ठेविलें होतें (अध्या. रा. उ. १२).

मेघनाद हा स्वभावतः भयंकर असे. हा वयांत आल्यावर यानें शुक्राचार्यांच्या साहाय्यानें निकुंभिला येथें अश्वमेध, अग्निष्टोम, बहुसुवर्णक, राजसूय, गोमेध, वैष्णव आणि माहेश्वर असे सात यज्ञ केले. त्यांत शिवप्रसादानें याला दिव्य रथ, धनुष्यबाण, शस्त्रें, तामसी माया इत्यादिकांची प्राप्ति झाली. यानें आणखीहि यज्ञ करण्याचें मनांत आणिलें होतें. परंतु रावण देवांचा द्वेषी असल्यामुळें त्याला देवांस हविर्भाग देणें इष्ट नव्हतें, त्यामुळें इंद्रजितास तसें करितां आलें नाहीं (वा. रा. उ. २५).

रावण देवांस जिंकण्याकरितां स्वर्गीं गेला असतां, तेथें रावणाचा मातामह मारला गेला व पराजयाचें चिन्ह दिसूं लागलें. मेघनाद पुढें होऊन युद्ध करूं लागला. प्रथम यानें इंद्रपुत्र जयंताचा पराभव करून व इंद्राला शस्त्रास्त्रांनीं जर्जर करून बद्ध केलें व त्यास लंकेस नेलें. तेव्हां सर्व देव ब्रह्मदेवास घेऊन लंकेंत गेले व मेघनादास इंद्राला सोडून देण्याविषयीं सांगूं लागले. तेव्हां यानें अमरत्व मागितलें. साकार पदार्थ तितका नाशवंत आहे, यास्तव अमरत्व दुर्लभ आहे असें ब्रह्मदेवानें सांगितलें व दुसरा वर माग असें म्हणाला, तेव्हां "मी अग्नींत जेव्हां हवन करीन तेव्हां अग्नींतून अश्वासहित दिव्यरथ निघत जावा आणि त्यावर जोपर्यंत मी आहें तोंपर्यंत मी विजयी व अमर असावें" असा वर मागितला. हा वर देऊन ब्रह्मदेवानें इंद्रास मुक्त करून इंद्रपदीं स्थापन केलें. त्या दिवसापासून मेघनादास इंद्रजित्

असें नांव पडलें ( वा. रा. उ. २९-३० ). रावणानें सीतेस लंकेंत आणिल्यावर तिच्या शोधाकरितां रामाच्या आज्ञेनें मारुति लंकेंत गेला. त्यानें अशोकवनाचा विध्वंस करून अनेक राक्षस व रावणपुत्र अक्ष यांचा वध केला. त्या वेळीं रावणाच्या दुःखनिवारणार्थ इंद्रजित तेथें गेला व मारुतीस ब्रह्मास्त्रानें बद्ध करून रावणसभेंत आणिलें. वास्तविक ब्रह्मास्त्राचा मारुतीवर कांहींहि परिणाम झाला नाहीं हें इंद्रजितास सुद्धां समजलें होतें. पण मारुतीनें रावणसभा पाहण्याच्या हेतूनें व त्याचें भाषण ऐकण्याच्या हेतूनें बद्ध झालों असें दाखविलें. शिवाय मारुतीचें अमरत्वहि इंद्रजितानें धर्मबलाच्या साहाय्यानें जाणिलें होतें. याप्रमाणें हनुमानास रावणसभेंत नेल्यावर त्याला जाळण्याचा सल्ला रावणाच्या मंत्र्यांनीं रावणास दिला; पण बिभिषणानें वानरांना प्रिय असलेलें शेंपूट जाळण्याचा सल्ला दिला ( वा. रा. सुं. ४८. ४२ ).

बिभीषणानें रावणास सीतेला परत पोंचवून रामाशीं सख्य करण्याचा सल्ला दिला, तो कोणासहि पसंत पडला नाहीं. त्या वेळीं इंद्रजितानें त्याची खूप निर्भर्त्सना केली. त्यावर बिभीषणानें इंद्रजितास युद्धापासून परावृत्त होण्याचा उपदेश केला.

सीताशोधानंतर मारुति किष्किंधेस गेला. पुढें राम सुग्रीवाच्या वानरसेनेसहित लंकेस आला. तेव्हां इंद्रजितच प्रथम युद्धाकरितां पुढें आला. याचें व अंगदाचें युद्ध झालें, त्यांत हा अदृश्य होऊन लढला व रामलक्ष्मणांस नागपाशानें बद्ध करून व सर्व वानरांस मूर्च्छित करून लंकेस गेला ( वा. रा. यु. ४५ ).

पुढें देवांतकनरांतकादि रावणपुत्र, कुंभकर्ण, महापार्श्व, महोदर हे युद्धांत पडल्यावर रावणास दुःख झालें. तेव्हां त्याचें सांत्वन करून इंद्रजित् युद्धास निघाला. हा प्रथम निकुंभिलेस गेला व तेथें शस्त्रास्त्रें अभिमंत्रित केलीं. नंतर युद्धभूमीवर येऊन रामसेनेस गुप्तताडण केलें. या युद्धांत यानें सदुसष्ट कोटि वानर एका प्रहरांत ठार मारिले. शिवाय रामलक्ष्मणांस मूर्च्छित करून हा लंकेस परत गेला ( वा. रा. यु. ७३ ).

मकराक्षाच्या मृत्यूनंतर रावणानें पुनः याला युद्धार्थ पाठविलें. त्या वेळीं यानें रामसैन्यास अत्यंत त्रास दिला व एक मायावी सीता निर्माण करून, ती रामराम असा मुखानें दीन शब्द करीत रथांत बसलेली दाखवून तिचा वध केला. त्यामुळें रामादिक अतिशय दुःखित झाले ( वा. रा. यु. ८१ ).

हें कृत्य मायावी असल्याचें बिभीषणानें सर्वांस सांगितलें व त्यांचें समाधान केलें. यानंतर इंद्रजित् निकुंभिलेस गेला व हवन करूं लागला. त्यांत कोणी अडथळा करूं नये म्हणून त्यानें रक्षणाकरितां पुष्कळ राक्षस ठेविले. पण बिभीषणाच्या सांगण्यावरून रामानें लक्ष्मण व मारुति यांस वानरसेना देऊन तिकडे पाठविलें. तेथें त्यांनीं सर्व राक्षसांचा संहार करून यज्ञभंग केला. तथापि याचा यज्ञ पुरा होत आला होता म्हणून यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. परंतु वानरांनीं याच्या शरीरावर अनेक प्रहार करून तें छिन्न केलें. तेव्हां इंद्रजित् निरुपाय म्हणून क्रोधानें उठला व वानरांस पिटाळून लावलें. याचा तेथें अदृश्य होण्याचा एक वटवृक्ष होता, तिकडे हा जाऊं लागला. परंतु बिभीषणानें मारुति व इतर वानरांस याला अडविण्यास सांगितलें. तेव्हां बिभीषणाचें कारस्थान इंद्रजितास समजून येऊन हा त्याचा वध करण्यास प्रवृत्त झाला. यानें स्वकीयांशीं युद्ध करण्यास प्रवृत्त झालेल्या बिभीषणाची निर्भर्त्सना केली.

असा त्यांचा संवाद चालला असतां लक्ष्मण पुढें होऊन इंद्रजिताशीं युद्ध करूं लागला. प्रथम त्यानें याचा सारथि मारिला. तेव्हां हा स्वतः सारथ्य करून शिवाय लढूं लागला. तोंच प्रमाथी, रभस, शरभ आणि गंधमादन या चार वानरांनीं याचे चार अश्व मारिले. तेव्हां इंद्रजित दुसऱ्या रथांत बसून आला असें पाहून बिभीषणानें लक्ष्मणास सावधगिरीनें लढण्यास सांगितलें. इंद्रजित् व लक्ष्मण यांचें निकराचें युद्ध तीन दिवस झालें. तरी इंद्रजित् मरेना म्हणून लक्ष्मणानें ऐंद्रास्त्र हातांत घेतलें आणि प्रतिज्ञा केली कीं जर श्रीराम धर्मात्मा आणि सत्यप्रतिज्ञ असेल तर या बाणानें इंद्रजित् मरेल. असें म्हणून तें अस्त्र सोडिलें. त्यामुळें इंद्रजिताचें किरीटकुंडलयुक्त शीर तुटून जमिनीवर पडलें ( म. व. २८८-२८९ ). राक्षससैन्यानें माघार घेतली व तें लंकेंत पळून गेलें व त्यांनीं इंद्रजिताचें मरणवृत्त रावणास कळविलें. इकडे वानरांनीं याचें मस्तक रामास दाखविण्यासाठीं म्हणून सुवेला पर्वतावर रामाकडे नेलें ( वा. रा. यु. ८६-९२ ). इंद्रजितास सुलोचना नांवाची बायको होती. तिनें सासुसासऱ्यांच्या आज्ञेनें सहगमन केलें ( आ. सार. ११ ).

२ दनुपुत्र दानवांतील एक.

**इंद्रजिह्व**—रावणपक्षीय राक्षस ( वा. रा. सुं. ६ ).

**इंद्रतापन**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ वरुणसभेंतील एक असुर (म. स. ९).

**इंद्रदत्त**—एक स्मृतिकार. यानें इंद्रदत्तस्मृति नामक एक स्मृति लिहिली आहे ( C. C. ).

**इंद्रद्युम्न**—एक राजर्षि ( म. स. ८ ). हा पुण्य संपल्यामुळें मृत्युलोकीं आला असतां आपली कीर्ति नष्ट झाली कीं काय हें पाहण्याकरितां मार्कंडेय, हिमालयावरील प्राकारकर्ण उलूक, इंद्रद्युम्नसरोवरावरील नाडीजंघ बक व त्याच सरोवरांत असणारा अकूपार कासव या एकापेक्षां एक वृद्ध-

कडे जाऊन आपली कीर्ति ठाऊक असल्याबद्दल यानें चौकशी केली. शेवटीं अकूपार कासवानें इंद्रद्युम्नाची कीर्ति तो मोठा यज्ञकर्ता म्हणून सांगितली. कीर्ति असेपर्यंत मनुष्य असतो हें सांगण्याकरितां मार्कंडेयानें पांडवांस ही गोष्ट सांगितली (म. व. १९९).

२ हा कृतयुगांतील विष्णुभक्त राजा. याची राजधानी उज्जयनी होती. हा ओढ्र देशांतील पुरुषोत्तम क्षेत्रांत जगन्नाथाच्या दर्शनास गेला असतां जगन्नाथ वाळूंत गुप्त झाला. तेव्हां हा नीलाद्रीवर जाऊन प्रायोपवेशन करणार तों दर्शन होईल अशी आकाशवाणी झाली. यानें अश्वमेध करून नृसिंहाचें उत्कृष्ट देऊळ बांधिलें. ज्येष्ठ शुक्र द्वादशीचे दिवशीं स्वाती नक्षत्रावर नारदानें आणलेल्या नृसिंह मूर्तीची स्थापना यानें केली. राजाला स्वप्नांत नीलमाधवाचें दर्शन घडलें. समुद्रांत मुळें असलेल्या एका सुगंधी वृक्षाच्या १ विष्णु, २ बलराम, ३ सुदर्शन (तांबडा), ४ सुभद्रा (केशरी) अशा चार मूर्ति करण्याविषयीं आकाशवाणी झाली व त्याप्रमाणें वै. शु. अष्टमी गुरवारीं पुष्यनक्षत्रावर मूर्ति स्थापिल्या (स्कंद २. २. ७-२९). याला समुद्रावरून वाहत येणाऱ्या लांकडांपैकीं विशेष महत्त्वाच्या लांकडाची मूर्ति करण्याविषयीं दृष्टांत झाला. त्याप्रमाणें पाहतां एका लांकडाची कृष्णाची काळ्या रंगाची, बलरामाची पांढऱ्या रंगाची व सुभद्रेची पिवळ्या रंगाची अशा मूर्ति केल्या व जगन्नाथपुरींत त्यांची स्थापना केली (नारद. २. ५४).

३ हा मगध देशाचा राजा. याच्या स्त्रीचें नांव अहल्या. ती इंद्र नांवाच्या ब्राह्मणाशीं व्यभिचार करी. तिला अनेक शिक्षा केल्या. शेवटीं तिचें स्थूल शरीर जाळलें, तरी तिची मानसिक तन्मयता नष्ट झाली नाहीं (यो. वा. ३. ८९-९०).

४ हा पांड्य देशाचा राजा. एकदां तप करीत असतां तेथें अगस्त्य आला. पण ध्यानस्थ राजानें त्याला पाहिलें नाहीं. त्यामुळें मुनीला राग येऊन त्यानें तूं मत्त होऊन गेला आहेस, यास्तव मदोन्मत्त हत्ती हो, असा शाप दिला. तो शाप ऐकून राजानें त्याची प्रार्थना केली. तेव्हां नक्रानें तुला धरिलें असतां विष्णूच्या हातून तुझी सुटका होईल असा त्यानें उःशाप दिला. पुढें हुहु गंधर्व देवल मुनींच्या शापानें त्रिकूट पर्वतावरील सरोवरांत नक्र होऊन राहिला होता. त्यानें या हत्तीस पाण्यांत धरिलें. त्या वेळीं विष्णूनें नक्रास फाडून त्या हत्तीस मुक्त केलें (पद्म. उ. १३२; भा. ८. ४, आ. रा. सार. ९).

५ (सो. निमि.) यास ऐंद्रद्युम्न या नांवाचा एक मुलगा होता.

६ हा रुक्मीच्या पक्षाचा एक क्षत्रिय होता. रुक्मिणीस्वयंवरप्रसंगीं कृष्णानें याला सुदर्शन चक्रानें मारिलें (म.स.६१कुं.).

७ धर्मराज बकदाल्भ्याकडे गेला असतां त्यानें इतर ब्राह्मणांसमवेत याचा सन्मान केला. या वेळीं पांडव द्वैत वनांत होते (म. व. २६).

८ विष्णुपुराणाप्रमाणें नाभिवंशांतील सुमतीचा पुत्र.

**इंद्रद्युम्न भाल्लवेय वैयाघ्रपद्य**—अग्निवैश्वानराचे धर्म काय आहेत या बाबतींत इतर पुरोहितांबरोबर याचें मतैक्य होत नसे. याला अश्वपति कैकेय यानें विद्या शिकविली होती (छां. उ. ५. ११. १; १४. १). भाल्लवेयाला धर्मविधींत मान होता.

**इंद्रद्रुमि**—एक ऋषि (म. शां. २४०. १८ कुं.).

**इंद्रधन्वन्**—बाणासुर व लोहिनी यांचा पुत्र.

**इंद्रपाल**—ब्रह्महोमवंशीय हविर्होत्र राजाचा पुत्र. याचा पुत्र माल्यवान्. यानें इंद्रवती नामक नगरी वसविली (भवि. प्रति. ४.१).

**इंद्रपालित**—(मौर्य. भविष्य.) ब्रह्मांडमतें हा बंधुपालिताचा पुत्र.

**इंद्रप्रमति**—पैल ऋषींचा शिष्य. पैलानें आपणांस येत असलेल्या ऋग्वेदाचे दोन भाग करून त्यांच्या पैकीं एक इंद्रप्रमतीस शिकविला. यास मांडुकेयनामक एक शिष्य होता (व्यास पहा).

**इंद्रप्रमति वासिष्ठ**—वसिष्ठकुलांतील एक ऋषि. ऋग्वेदांत याच्या तीन ऋचा व एक सूक्त आहे (ऋ. ९.९७. ४-६; १०.१५३). याबद्दल चंद्रसंपति असा पाठभेद आहे. याचें कुणीति असें नामांतर होतें. हा वसिष्ठ व घृताची यांचा पुत्र. याची स्त्री पृथूची कन्या (ब्रह्मांड.३.९.८-१०). हा एक श्रुतर्षि होता. हा मंत्रकार होता (वायु.१.५९.१०५-१०६; ब्रह्मांड. २.३२. ११५-११६). याला इंद्रप्रतिम असेंहि म्हणतात. यास कापिंजल्य, त्रिमूर्ति अशीं नामांतरें होतीं. याचा पुत्र भद्र.

**इंद्रबाहु**—दृढास्यूचें नामांतर (मत्स्य. १४५). हा अगस्त्यगोत्रांतील मंत्रकार होता. याला विध्मवाह असें नामांतर आहे.

**इंद्रभू**—मित्रभूचा शिष्य. याचा शिष्य अग्निभू (वं.ब्रा.२).

**इंद्रमातृ देवजामि**—एक सूक्तद्रष्टा (ऋ. १०.१५३).

**इंद्रमालिन्**—उपरिचर वसूचें नामांतर.

**इंद्रवर्मन्**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा. याजवळ अश्वत्थामा नांवाचा एक नामांकित गज होता. हा माळव्याचा राजा होता (म. द्रो. १९१; द्रोण पहा).

**इंद्रवाह**—(सू. इ.) विकुक्षीचा पुत्र. ककुत्स्थ हें याचें नामांतर होतें.

**इंद्रसख**—( सो. अज. ) वायुमतें हा कृतराजाचा पुत्र. याला चैद्योपरिचर असेंहि दुसरें नांव आहे (उपरिचर वसु पहा).

**इंद्रसावर्णि**—एक मनु ( मनु पहा ).

**इंद्रसेन**—( स्वा. प्रिय. ) ऋषभदेव व जयंती यांचा पुत्र.

२ ( सू. नरिष्यंत. ) कूर्च राजाचा पुत्र. याचा पुत्र वीतिहोत्र.

३ ( सो. नील. ) ब्रह्मिष्ठाचा पुत्र. याचा पुत्र विंध्याश्व.

४ सुतलांतील दैत्य ( भा. १०. ८५ ५२).

५ युधिष्ठिराचा सारथि.

६ पांडवांचा दूत (म. स. १३; ३६. ३०; व २७०; कुं. स्त्री. २६ ). याला पांडवांनीं द्वारकेस पाठविलें होतें ( म. वि. ५ ).

७ नल राजाचा पुत्र ( म. व. ५४ ).

८ कौरवपक्षीय एक क्षत्रिय ( म. द्रो. १५७ ).

९ (सो.कुरु.) दुसऱ्या जनमेजयाचा पुत्र (म. आ.१०१).

१० माहिष्मतीचा राजा. नारदाच्या सांगण्यावरून आश्विन-कृष्णांतील इंदिरा एकादशी करून यानें आपल्या यमलोकीं असलेल्या पित्यास स्वर्गास पोंचविलें ( पद्म. उ. ५८ ).

**इंद्रसेना**—नल राजास दमयंतीपासून झालेली कन्या ( म. व. ५७ ). पांचालवंशीय ब्रह्मिष्ठ राजाची पत्नी व वध्र्यश्वाची आई. ब्रह्मिष्ठ हें मुद्गलाचें नांव असावें. ऋग्वेदांत मुद्गलानी इंद्रसेनेचा उल्लेख आलेला आहे. तिचा नवरा भर्म्यश्वपुत्र मुद्गलच आहे ( ऋ. १०. १०२. २; मुद्गल पहा ).

**इंद्रस्नुषा**—ही एका ऋचेची द्रष्टी आहे (ऋ.१०.२८.१).

**इंद्रस्पृश**—( स्वा. ) ऋषभास जयंतीपासून झालेला पुत्र.

**इंद्राणी**—ऋग्वेदांत हिच्या अनेक ऋचा आहेत (ऋ. १०. ८६. २; ६). हिनें पुत्रेच्छेनें गौरीव्रत करितांच हिला जयंत पुत्र झाला ( भवि. ब्राह्म. २२; शची पहा ).

**इंद्राभ**—( सू. दिष्ट. ) धृतराष्ट्राचा पुत्र. वैचित्रवीर्य धृतराष्ट्राचा पुत्र नव्हे.

**इंद्रोत**—हा सुदासाचा मुलगा असावा ( ऋ. ८. ६८. १७ ). येथें एक दाता म्हणून प्रियमेध अंगिरसानें याची स्तुति केली आहे.

२ वृषशुष्णाचा शिष्य. याचा शिष्य दृति (वं. ब्रा. २)

३ (सो.) पांचालवंशीय दिवोदासाचा पुत्र.

**इंद्रोत दैवाप शौनक**—यानें जनमेजयाच्या अश्वमेध यज्ञांत पौरोहित्य केलें होतें ( श. ब्रा. १३.५.३.५; ४.१; सां. श्रौ. १६. ७. ७; ८. २७ ). जनमेजयाचा पुरोहित तुरः कावषेय होता ( ऐ. ब्रा. ८.२१ ). हा श्रुतयाचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४०.१ ). हा भृगुकुलांतील होता. यानें जनमेजयास गार्ग्य मुनींच्या शापांतून अश्वमेध करवून मुक्त केलें ( म. शां १५०; ब्रह्म. १२; ह. वं. २. १३ ).

**इरा**—( ४ इला पहा ).

२ एक अप्सरा ( म. स. १०.१२ ).

३ दक्ष व असिक्नी यांची कन्या. ही कश्यपाची स्त्री. लता, अलता, वीरुधा या हिच्या कन्या होत.

**इरावत्**—पंडुपुत्र अर्जुनास ऐरावत नागाची सून उलूपी हिच्या पासून झालेला पुत्र. हा नागलोकांतच लहानाचा मोठा झाला. पण पुढें याचें व याच्या चुलत्याचें ( ऐरावत नागाचा दुसरा पुत्र जो अश्वसेन त्याचें ) नेहमीं भांडण होऊं लागून अश्वसेनानें यास हांकून दिलें. अर्जुन त्या वेळीं देवलोकीं इंद्राच्या येथें गेला होता. तेव्हां इरावान् स्वर्गांत अर्जुनाकडे गेला. तेथें उभयतां पितापुत्रांची गांठ पडली. भारतीय युद्धांत इरावानानें बराच पराक्रम करून कौरव सैन्यास जेरीस आणिलें. यानें शकुनीचे सहा भाऊ मारिले. पण पुढें तो आर्ष्यशृंगि नामक राक्षसाच्या हातून मारला गेला ( म. भी. ९० ).

**इरावती**—अर्जुनपौत्र परीक्षित् राजाची स्त्री. ही विराटपुत्र उत्तर याची कन्या होय.

२ ब्रह्मदेवानें मार्तंडाचा गर्भ द्विधा केला. त्यांतील बल हिचे नाभीचे ठिकाणीं ठेविलें. त्यामुळें हिला चार पुत्र झाले, ते अंजन, ऐरावत, कुमुद व वामन हे दिग्गज होत (ब्रह्मांड. ३. ७.२.९२). इरावतीचा विस्तृत वंश ब्रह्मांडांत आहे व तेथें त्यांची इतरहि माहिती आहे, पण ती सर्व हत्तींची असल्यामुळें येथें घेतली नाहीं.

**इल**—वैवस्वत मनु ( श्राद्धदेव ) व श्रद्धा यांना पुत्र नव्हता म्हणून त्यांनीं वसिष्ठाकडून मित्रावरुणांना उद्देशून पुत्रकामेष्टि केली. श्रद्धा अनुष्ठानाच्या कालांत केवळ दूध पिऊन राहत असे. तिनें होत्यास आपणास मुलगी पाहिजे असें सांगितलें. त्याप्रमाणें हवन झाल्यामुळें इला नांवाची मुलगी झाली. पण मनूच्या इच्छेप्रमाणें वसिष्ठानें तिला पुरुष केलें. तेव्हां त्याचें नांव इल किंवा सुद्युम्न असें ठेवण्यांत आलें. पुढें हा परिवारासह अरण्यांत मृगयेकरितां गेला. व शंकराचा शाप असलेल्या शरवणांत गेल्यानें परिवारासह स्त्री झाला. या अवस्थेंत याला बुधापासून पुरूरवस् नांवाचा मुलगा झाला. पुढें वसिष्ठाच्या कृपेनें हा एक महिना पुरुष व एक महिना स्त्री होऊं लागला ( मत्स्य. ११-१२; पद्म. पा. ८. ७५-१२५). याचा कारभार विशेष प्रिय नव्हता. याच्या मागून पुरूरवस् गादीवर बसला. याच्या प्रदेशास इलावृत्त म्हणतात ( भा. ९. १; दे. भा. १. १२; ब्रह्मांड. ३. ५९ ). हा कर्दम प्रजाप्रतीचा पुत्र व बाल्हिकाचा राजा. पण बुधाच्या प्रेरणेनें संवर्तीच्या देखरेखीखालीं मरुत्तानें अश्वमेध करून यास पुनः पुरुष केलें ( वा.

रा. उ. ८७-९० ). अरुणाचलेश्वराच्या उपासनेनें पुरुष झाला ( स्कंद. १. ३. १-६ ). एका यक्षाची गुहा इलनें बळकाविल्यामुळें त्यानें आपल्या पत्नीकडून उमावनांत नेऊन याला स्त्री केलें. तेथें याला बुधापासून पुरूरवस् नांवाचा मुलगा झाला. गौतमींत स्नान केल्यानें हा पुनः पुरुष झाला ( ब्रह्म. १०८ ). याची राजधानी प्रतिष्ठान होय. याला पुरूरवस्शिवाय उत्कल, गय व निमल अशीं तीन मुलें होतीं. निमलाबद्दल हरिताश्व, विनताश्व व विनत अशीं नांवें आढळतात. इल हा मनूच्या दहा मुलांतील थोरला. नऊ मुलगे असून दहावा पाहिजे म्हणून यज्ञ केला, पण बायकोच्या इच्छेप्रमाणें इला नांवाची मुलगी झाली व तिला बुधापासून पुरूरवस् झाला. पुढें पुरुष, स्त्री, पुनः पुरुष झाला ( वायु. २. २४. २७; ब्रह्मांड. ३. ६०.२७ ). इलेला पुरुषत्व येऊन पुनः स्त्रीत्व आलें तें बुधाशीं संबंध येण्याच्या पूर्वीच होय ( इला व सुद्युम्न पहा ).

**इलक**—( मध्यमाध्वर्यु पहा ).

**इलविल**—( सू. इ. ) शतरथ राजाचें नामांतर.

**इलविला**—तृणबिंदु व अलंबुषा यांची कन्या, पुलस्त्याची स्त्री व विश्रवसूची आई ( ब्रह्मांड. ३. ७. ३९-४२ ).

**इला**—वैवस्वत मनूची कन्या (म. आ. ६३. ६९; ह.वं. १.१०; ब्रह्म. ७; मत्स्य.११; भा.९.१). पण मित्रावरुणांच्या अंशानें झाली म्हणून ही त्यांच्याकडे गेली. तेव्हां तूं आमचीच मुलगी आहेस, पुढें तूं सुद्युम्न होशील असें त्यांनीं सांगितलें. नंतर ही परतली. वाटेंत बुधाची व हिची गांठ पडली. त्यापासून हिला पुरूरवा नांवाचा मुलगा झाला. देवी भागवतांत सुद्युम्नाची 'इला' झाली असें आहे, व श्रीमद्भागवतांत इलेचा सुद्युम्न झाला असें आहे ( इल पहा ).

२ वायूची कन्या. उत्तानपाद ध्रुवाची दुसरी स्त्री. हिला उत्कल नांवाचा पुत्र होता.

३ वसुदेवाच्या स्त्रियांपैकीं एक होय.

४ प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या होय. ही कश्यपाला भार्यार्थ दिली होती. हिजपासून वृक्षादिक झाले ( भाग ६. ६ ). भागवताखेरीज इतरत्र इरा असें नांव सांपडतें.

**इलावर्त**—( स्वा. ) ऋषभास जयंतीपासून झालेला पुत्र. हा नव्वद पुत्रांत वडील होता.

**इलावृत्त**—प्रियव्रत राजाचा पौत्र व आग्नीध्राला उपचिति अप्सरेपासून झालेला पुत्र. याचा वर्ष याच्याच नांवानें प्रसिद्ध असून हा तेथील अधिपति होता.

**इलिन**—( सो. पूरु. ) एक क्षत्रिय. त्रंसु किंवा तंसु याचा पुत्र. मत्स्यमतें हा अमूर्तरयाचा पुत्र होय. मातेचें नांव कालिंदी असून याच्या स्त्रीचें नांव रथंतरी होतें (म. आ. ६३ ). पुत्रांचीं नांवें १ दुष्यंत, २ शूर, ३ भीम, ४ प्रवसु, ५ वसु ( म. आ. ८८; इलिल पहा ).

**इलिना**—हिचा नातू दुष्यंत ( ब्रह्मांड. ३. ६ ). महाभारतांत इलिन असा पुरुष आहे.

**इलिल**—इलिन, ईलिन मलिन, अनिल व हा एकच.

**इलीष**—न्यूहवंशीय युनान राजाचा पुत्र ( भवि. प्रति. २. ५ ).

**इलूष**—( कवष पहा ).

**इल्वल**—हिरण्यकशिपूचा पौत्र. ह्लादास धमनीपासून झालेल्या पुत्रांतील एक ( भा. ६.१८ ).

२ तेरा संहिकेयांतील पांचवा व वातापीचा वडील बंधु. हा मणिमती नगरींत राहत असे. एकदां इल्वलानें इंद्रतुल्य पुत्र यावा म्हणून एका ऋषीची प्रार्थना केली. ती त्यानें नाकरल्यानें ब्राह्मण भेटला कीं त्यास आदरातिथ्याच्या मिषानें हा मारूं लागला. ब्राह्मण आला कीं, यानें त्याचा आदर करावा; नंतर मेष बनलेल्या आपल्या वातापी बंधूचा पाक करून त्यास भोजन द्यावें. पुढें ब्राह्मण जाऊं लागला असतां, त्याचें शरीर विदारून वातापी बाहेर येतांच ब्राह्मण तत्काळ मरण पावावा; अशा प्रकारें यानें सहस्रावधि ब्राह्मण मारिले. एकदां अगस्त्याला द्रव्याची अपेक्षा होती म्हणून तो अनुक्रमानें श्रुतर्वा, ब्रध्न्यश्व आणि त्रसद्दस्यु या तीन राजांकडे गेला. परंतु तेथें द्रव्य न मिळाल्यामुळें त्यांसहित हा इल्वलाकडे आला. त्यांस पाहून नित्याप्रमाणें यानें अगस्त्याचें कपटपूर्वक पूजन वगैरे करून भोजनास राहून घेतलें. अगस्त्य ऋषीनें तेथील कपट ओळखून सर्व पाक आपण एकट्यानेंच भक्षिला. आणि वातापीस उदरांत जीर्ण केलें. हें ओळखून इल्वल अगस्त्यापाशीं प्राणदानाविषयीं प्रार्थना करूं लागला, तेव्हां अगस्त्यानें याला अभय देऊन सांगितलें कीं, आम्हीं चौघेहि द्रव्यार्थी आहोंत. यास्तव तें देऊन आम्हांस मार्गस्थ कर. तेव्हां यानें त्रिवर्ग राजांस विपुल संपत्ति देऊन अगस्त्य ऋषीस त्याच्या द्विगुणित दिलें आणि सर्वांस मार्गस्थ करून ब्राह्मणांचा द्वेष सोडून दिला. यास वल्वल नांवाचा पुत्र होता ( म. व. ९४. ).

रामायणांत इल्वल व वातापि यांची गोष्ट अगस्त्याच्या सामर्थ्याचें वर्णन करितांना लक्ष्मण व सीता यांना रामानें सांगितली आहे. नित्यश्राद्धांत अगस्त्यांनीं जाऊन वातापीला पोटांत पचवून टाकलें आणि इल्वल संतापानें चाल करून येणार तोंच त्यालाहि दृष्टीनें भस्म करून टाकिलें ( वा. रा.

अर. ११; म. व. ९७ ). पण इल्वलास परशुरामानें मारिलें ( ब्रह्मांड. ३. ६. १८-२२ ).

**इध्म**—न्यूहवंशीय शिलह राजाचा पुत्र. याचा पुत्र फ़लज ( भवि. प्रति. २.५ ).

**इष**—( स्वा. उत्तान. ) वत्सरास स्वर्वीथी नामक भार्येपासून झालेल्या सहा पुत्रांतील एक.

२ उत्तम मनूच्या पुत्रांपैकीं एक.

३ सुधामान नांवाच्या देवगणांतील एक.

**इष आत्रेय**—सूक्तांचा द्रष्टा ( ऋ. ५. ७-८ ).

**इष श्यावाश्वि**—हा अगस्त्याचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ४. १६. १ ).

**इषिक हस्त**—पराशरकुलांतील गोत्रकार.

**इषीक**—यानें तुंबरु नांवाच्या गंधर्वाची उपासना करावयास सांगून शिखंडीला पुरुषत्व प्राप्त करून दिलें ( म. आ. ११०.२३ कुं. ).

**इषीरथ**—विश्वामित्राचा मूळ पुरुष ( विश्वामित्र पहा ).

**इषुपात्**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**इषुफालि**—अष्टकाकर्मांत तंत्र करावें असें याचें मत आहे ( कौ. सू. १३८.१६ ).

**इषुमत्**—( सो. वृष्णि. ) देवश्रव्यास कंसावतीपासून झालेला पुत्र.

## ई

**ईडन्य**—सावर्णि मनूच्या होणाऱ्या पुत्रांतील एक.

**ईदृश्**—दितिपुत्र मरुतांच्या पांचव्या गणांतील एक ( ब्रह्मांड. ३. ५. ९६ ).

**ईलिन**—(सो.) तंसूचा पुत्र (म. आ.८८; इलिल पहा).

**ईशान**—या नांवाच्या एका संन्याशानें विश्वेश्वराची आराधना केली. शंकर प्रसन्न होऊन यानें ज्या ठिकाणीं तप केलें, त्या स्थानाला ‘ ज्ञानवापी ’ म्हणतील असें सांगितलें ( स्कंद. २. ४. १. ३३ ).

२ देवांच्या हिरण्याक्षाशीं झालेल्या युद्धांत यास वायूनें मारिलें ( पद्म. सृ. ७५ ).

**ईश्वर**—सुरभि व कश्यप यांच्या पुत्रांपैकीं एक.

२ भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा. हा क्रोधवश असुरांशानें जन्मला होता ( म. आ. ६७ ).

३ ( सो. पूरु. ) पूरु व पौष्टी यांचा पुत्र (म. आ. ८८).

## उ

**उक्कूल**—अंगिरसगोत्री एक मंत्रकार.

**उक्त**—(सो. कुरु. भविष्य.) भागवतमतें हा निमिचक्रपुत्र.

**उक्थ**—स्वाहेचा पुत्र.

२ ( सू. इ. ) विष्णुमतें हा शलपुत्र होय. पण भविष्यमतें हा छद्मकारीचा पुत्र. यानें दहा हजार वर्षे राज्य केलें.

**उक्षन्यायन**—हरयाण व सुषामन् यांचेबरोबर याचा उल्लेख आला आहे ( ऋ. ८. २५. २२ ).

**उक्ष्णोरंध्र काव्य**—एक द्रष्टा (पं. ब्रा. ८. १९.१९).

**उख**—तैत्तिरीयांच्या पितृतर्पणांत येणारा एक आचार्य. याचा पितृतर्पणांत समावेश होण्याचें कारण हा एक हिरण्यकेशियांना जुळती असणारी शाखा प्रवृत्त करणारा होता हे असावें (स. गृ. २०. ८. २०; चरणव्यूह). पाणिनीनें शाखाप्रवर्तक म्हणून याचा उल्लेख केला आहे.

**उख्य**—उच्चार व संधि यांविषयीं कांहीं निराळींच मतें प्रतिपादन करणारा आचार्य ( तै. प्रा. ८. २२; १०. २०; १६. २३ ).

**उग्र**—यातुधानपुत्र. याचा पुत्र वज्रहा.

२ वारुणि कवीच्या आठ पुत्रांतील कनिष्ठ.

३ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. भीमानें मारिला ( म. द्रो. १५८ ).

४ दितीचा मुलगा व तिसऱ्या मरुद्गणांतील एक ( ब्रह्मांड. ३.५. ९४ ).

५ अमिताभ देवांतील एक.

६ भौत्य मनूचा पुत्र.

**उग्रक**—कद्रूपुत्र.

**उग्रकर्मन्**—साल्वराजा. याला भीमानें मारिलें (म. क. २).

**उग्रतप**—एक ऋषि. यानें एकदां गोपसिंह शृंगारमग्न कृष्णाचें ध्यान केल्यामुळें हा गोकुलांत सुनंद नामक गोपाच्या कन्येच्या रूपानें जन्मास आला व त्या ठिकाणीं यानें श्रीकृष्णाची उत्कृष्ट सेवा केली (पद्म. पा. ७२).

**उग्रतीर्थ**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा. (म. आ. ६७).

**उग्रदंष्ट्री**—(स्वा. प्रिय.) मेरूची कन्या व आग्नीध्रपुत्र हरिवर्षाची स्त्री.

**उग्रदृष्टि**—स्वायंभुव मन्वंतरांतील अजित् देवांपैकीं एक.

**उग्रदेव**—तुर्वस व यदु यांच्या बरोबर याचा उल्लेख आहे (ऋ. १. ३६. ११; पं. ब्रा. १४. ३. १७; २३. १६. ११). राजनि या नांवानें उल्लेख आहे (तै. आ. ५. ४. १२).

**उग्रपुत्र वैदेह**—गार्गीनें याज्ञवल्क्याला प्रश्न करितांना याचा उत्तम धनुर्धारी म्हणून उल्लेख केला आहे. हें व्यक्तीचें नांव नसून सामान्य निर्देश आहे (बृ. उ. ३. ८. २).

**उग्रमन्यु**—अर्जुनाच्या हातून मरण पावलेला भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा (म. क. ७७).

**उग्रंपश्या**—एक अप्सरा (तै. आ. २. ४).

**उग्रवीर्य**—महिषासुरानुयायी असुर.

**उग्रश्रवस्**—लोमहर्षण सूताचा पुत्र. यास सौति लोमहर्षणि असेंहि म्हणत (म. आ. १).

२ धृतराष्ट्रपुत्र (म. आ. ६८).

**उग्रसेन**—भीमसेन व श्रुतसेन यांचे बरोबर एक पारिक्षितीय व जनमेजयाचा भाऊ असा याचा निर्देश आहे. हा अश्वमेध करून पापमुक्त झाला (श. ब्रा. १३. ५. ४. ३; जनमेजय पहा). हा व साहवा एक नाहींत.

२ कश्यपास मुनीपासून झालेला देवगंधर्वांतील एक. हा सूर्याचा सहचर होय (म. आ. ६६).

३ (सो. यदु.) अंधकवंशांत जन्मलेल्या आहुक राजाच्या दोन पुत्रांतील दुसरा. याच्या बायकोचें नांव पद्मावती (पद्म. भू. ४८. ५१). यास कंस, सुनामा, न्यग्रोध, कंक, शंकु, सुहू, राष्ट्रपाल, सृष्टि आणि तुष्टिमान् असे नऊ पुत्र; तशाच कंस, कंसावती, कंका, शूरभू व राष्ट्रपालिका अशा पांच कन्या होत्या. ह्या पांच वसुदेवाचे देवभागादि नऊ भ्रात्यांतील पांच भ्रात्यांच्या स्त्रिया होत्या. याचा ज्येष्ठ पुत्र कंस अत्यंत दुष्ट असल्यामुळें त्यानें यास बंदींत ठेविलें पुढें कंसास कृष्णानें मारल्यावर, यास कृष्णानें पुनः मथुरेच्या राज्यावर स्थापिलें होतें (भा. १०. ४५).

४ धृतराष्ट्राच्या शतपुत्रांतील एक (म. आ. ६८).

५ भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा.

६ पांडवांतील अर्जुनाचा पौत्र परीक्षित्, त्याच्या चार पुत्रांतील एक. जनमेजयाचा बंधु.

७ स्वर्भानूचा अंशभूत क्षत्रिय (म. आ. ३; ६८)

**उग्रसेना**—अक्रूराच्या स्त्रियांपैकीं एक.

**उग्रहय**—हा रामाच्या अश्वमेधीय घोडयाचें रक्षण करण्यासाठीं लक्ष्मणाबरोबर गेला होता. (पद्म. पा. १२).

**उग्रा**—सिंधु दैत्याच्या आईचें नांव (गणेश. २. १२४).

**उग्राय**—महिषासुराकडील एक असुर.

**उग्रायुध**—(सो. द्विमीढ.) भागवतमतें नीपाच्या पुत्र. पण इतरांच्या मतें कृताचा पुत्र. यास क्षेम्य नांवाचा पुत्र होता. यानें नीपाचा नाश केला. यानें आठ हजार वर्षे तप केलें होतें. यमानें याला तत्त्वज्ञान शिकविलें (मत्स्य. ४९.५८-६९). यानें भल्लाटपुत्र जनमेजयास ठार केलें होतें. शंतनूच्या मृत्यूनंतर यानें सत्यवतीची मागणी केली म्हणून चिडून भीष्मानें याचा वध केला (ह. वं. १. २०).

२ धृतराष्ट्राच्या शतपुत्रांतील एक.

३ दुर्योधनपक्षीय भारतीय युद्धांतील एक राजा.

४ कर्णाच्या हातून मरण पावलेला पांडवपक्षीय एक राजा (म. क. ५६).

**उग्रास्य**—महिषासुराच्या बाजूचा एक दैत्य. याला अंबिकेनें मारिलें (मार्कं. ८०).

**उचथ्य**—अंगिरसाचा पुत्र (म. शां. ३५०; अनु. १३२ कुं.). याची स्त्री ममता. याला बृहस्पति व संवर्त असे दोन भाऊ होते (दीर्घतमस् पहा). याची दुसरी स्त्री सोमाची कन्या भद्रा. तिला वरुणानें पळविली असतां त्याचा प्रतिकार करण्याकरितां उचथ्यानें समुद्राचें शोषण केलें (म. अनु २५९). याचा मांधात्याबरोबर क्षात्रधर्मविषयक संवाद झाला (म. शां. ९०; १ सत्यतपस् पहा). याचा पुत्र दीर्घतमस् होय (भा. ९. २०; विष्णु. ४. १९; मत्स्य. ४).

**उच्चैःश्रवस्**—एक कोळी राजा. मत्स्यगंधेचें पोषण करणारा पिता (म. आ. १०७ कुं.).

२ (सो. कुरु.) अविक्षित व वाहिनी यांचा पुत्र (म. आ. १०१).

**उच्चैःश्रवस् कौपयेय**—हा कुरूंचा राजा आणि केशिन्चा मामा (जै. उ. ब्रा. ३. २९. १-३).

**उज्जयन**—विश्वामित्राचा पुत्र (म. अनु. ७).

**उंच्छवृत्ति**—एक ब्राह्मण. दारिद्र्यामुळें याला पोटभर जेवावयासहि मिळत नसे. एके दिवशीं भिक्षेकरितां फिरत

असतां याला एक शेर सातू मिळाले. यानें त्यांतील अग्नि व ब्राह्मण यांस दिले व बाकीचे आपल्या पुत्रादिकांस सारखे वाटून दिले व हा ते खावयास लागणार इतक्यांत प्रत्यक्ष यमधर्म ब्राह्मणाचे रूपानें याच्या कडे आला व यास खावयास मागूं लागला. ब्राह्मणानें त्याला आपल्या वांट्याचे सातू दिले. पण तेवढ्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. तेव्हां यानें आपल्या पुत्रादिकांच्या वांट्याचे सातू दिले. तें पाहून धर्म प्रसन्न झाला व या ब्राह्मणास त्यानें सकुटुंब व सदेह स्वर्गास नेलें. पुढें या पुण्यात्म्याचे जे सातू जमिनीवर सांडले होते त्यांत एक मुंगुस येऊन लोळलें, तों जी बाजू त्या सातूंस लागली ती एकदम सुवर्णमय झाली. पुढें तें मुंगूस धर्माच्या यज्ञांत आपली दुसरीहि बाजू सोन्याची व्हावी या आशेनें गेलें, पण त्याचें इच्छित पूर्ण झालें नाहीं ( जै. अ. ६६ ). यास सक्तुप्रस्थ व सत्य अशीं नामांतरें होतीं. याच्या बायकोचें नांव पुष्करमालिनी (म. शां. ३६२-३६३; आश्व. ९०-९२).

**उडुपाति**—अंगिरसकुलांतील एक गोत्रकार.

**उतथ्य**—( सत्यतपस् व उचथ्य पहा ).

२ अंगिराकुलांतील गोत्रकार. अंगिरसाला स्वराजेपासून उतथ्य झाला. याचा पुत्र शरद्वान्. भागवतमतें देवहूतीकन्या श्रद्धा व अंगिरस् यांचा पुत्र. हा अंगिरस् गोत्रांतील मंत्रकार होता.

३ शिवावतार गुहावसिनाचा शिष्य.

**उत्कचा, उत्कचोत्कृष्टा व उत्कटा**—कश्यप व खशा यांची कन्या.

**उत्कल**—(स्वा. उत्तान.) ध्रुव व इला यांचा पुत्र. ध्रुव वनांत गेल्यावर राज्य याच्या कडे आलें, पण हा विरक्त असल्यामुळें यानें त्याचा स्वीकार केला नाहीं ( भा. ४. १३ ).

२ वृत्रासुरानुयायी असुर. यानें समुद्रमंथनानंतर झालेल्या देवदैत्यप्रसंगीं मातृगणाशीं युद्ध केलें ( भा. ८. १० ).

३ सुद्युम्नाच्या तीन पुत्रांपैकीं एक. यानें उत्कल नगरी स्थापन केली (पद्म. सृ. ८; ब्रह्म. ७).

**उत्कल कात्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ३. १५-१६ ).

**उत्कला**—( स्वा. प्रिय. ) सम्राट् राजाची स्त्री. मरीचि राजाची माता.

**उत्तंक**—हा बैदाचा शिष्य. हा अत्यंत मनोनिग्रही होता. एकदां बैद ऋषी यजमानकृत्यासाठीं बाहेर गांवीं गेला असतां, त्यानें उत्तंकास आश्रमावर देखरेख ठेवण्यास सांगितलें. बैदाचे मागें त्याची बायको ऋतुमती झाली. तेव्हां तिनें उत्तंकाची परीक्षा पाहण्याकरितां आश्रमांतील स्त्रियांकडून गुरुपत्नीचा ऋतु व्यर्थ जाणार नाहीं असें कर, असा निरोप पाठविला. परंतु उत्तंकानें त्यांचा निषेध करून त्या प्रसंगाचें निवारण केलें. पुढें बैद ऋषी घरीं आल्यावर त्याला हा प्रकार कळला. तेव्हां त्यानें उत्तंक हा कसल्याहि मोहास वश होणारा नव्हे असें पाहून संतुष्ट होऊन यास वर दिला.

पुढें उत्तंकास उत्तम तऱ्हेनें शिकवून बैदानें यास घरीं जाण्यास सांगितलें. त्या वेळीं उत्तंकानें ‘ आपणांस कोणती दक्षिणा देऊं ? ’ असें आपल्या गुरूस विचारिलें. बैदानें दक्षिणा घेण्याचें नाकरिलें. परंतु उत्तंकाचा फारच आग्रह पाहून त्यानें तुझ्या गुरुपत्नीस जी गोष्ट लागेल ती आणून दे, म्हणून यास सांगितलें. उत्तंकानें गुरुपत्नीकडे जाऊन तिला काय पाहिजे म्हणून विचारिलें. तेव्हां तिनें यास पौष्य राजाच्या पत्नीचीं कुंडलें आणावयास सांगितलें. यानें पौष्य राजाच्या बायकोजवळून तीं कुंडलें मागून आणिलीं. त्या कुंडलांवर तक्षकाचा डोळा आहे हें पौष्याच्या बायकोस माहीत असल्यामुळें तिनें उत्तंकास कुंडलांस जपण्यास सांगितलें. उत्तंक कुंडलें घेऊन जात असतां तक्षक त्याच्या मागें बौद्धभिक्षूचे रूपानें जाऊं लागला. पुढें उत्तंकानें तीं कुंडलें खालीं ठेविलीं असतां तक्षकानें पाताळांत नेलीं. तेव्हां उत्तंक पाताळांत जाण्यास वाट पाहूं लागला. त्या वेळीं इंद्र याच्या गुरुभक्तीनें संतुष्ट होऊन याला ब्राह्मणरूपानें मदत करण्यास आला. त्यानें वज्राचे योगानें याला वाट करून दिली. पुढें उत्तंकानें पाताळांतून कुंडलें आणिलीं व तीं बैदभार्येस दिलीं. कुंडलें परत मिळालीं तरीहि उत्तंकाचा तक्षकाविषयींचा राग कमी झाला नाहीं. यानें त्याचा सूड घेण्याकरितां जनमेजयास सर्पसत्राची प्रेरणा केली (म. आ. ३; इंद्र पहा ). हीच गोष्ट केवळ नांवांच्या फरकांनीं दुसरीकडे आली आहे. हा एक भार्गव होता. हा मुनिश्रेष्ठ गौतमाचा शिष्य. यानें विद्याभ्यास संपल्यावर गुरूस गुरुदक्षिणा काय देऊं म्हणून विचारिलें असतां त्याच्या गुरुपत्नीनें यास सौदास राजाच्या पत्नीचीं सुवर्णकुंडलें आणावयास सांगितलें. सौदास हा फार भयंकर असून मनुष्यभक्षक होता. परंतु उत्तंक न भितां त्याचेपाशीं गेला व त्यास कुंडलें मागूं लागला. परंतु कुंडलें त्याच्या जवळ नसून त्याच्या बायकोजवळ होतीं. त्यामुळें उत्तंक सौदासाचे राणीकडे गेला व तिच्या कडून यानें कुंडलें घेतलीं आणि तीं आपल्या गुरुपत्नीस नेऊन दिलीं.

पुढें उत्तंक निर्जल अशा मारवाड देशांत तपश्चर्या करण्यास निघून गेला. एके दिवशीं श्रीकृष्णाची व याची भेट झाली. कौरवपांडवांचा भारतीय युद्धांत नाश झाला हें ऐकून हा कृष्णाला शाप देऊं लागला असतां कृष्णानें याला तत्त्वकथन करून विश्वरूप दाखविलें. यानें मरुभूतींत इच्छा होईल तेथें पाणी मिळावें असा वर मागितला व त्याप्रमाणें कृष्णानें माझें स्मरण केलें असतां पाणी मिळेल म्हणून सांगितलें. पण एकदां यानें स्मरण केलें असतां इंद्र मांगाच्या रूपांत यास

पाणी देण्याकरितां आला असतां यानें अपवित्र म्हणून त्याचा स्वीकार केला नाहीं. वास्तविक इंद्र अमृत देण्याकरितां आला होता. मग कृष्णानें ज्या ज्या वेळेस तुला पाणी लागेल त्या त्या वेळेस या मरुभूमींत सजल मेघ येतील असा यास पुनः वर दिला (म. आश्व. ३. ५३-५६ ). यानें धुंधु दैत्याचा वध करण्यास कुवलाश्व नांवाच्या राजास मदत केली ( म. व. २०१ ).

**उत्तम**—चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ एक मनु.

३ ( स्वा. ) उत्तानपाद व सुरुचि यांचा पुत्र. याला बलाढ्य यक्षानें मारिलें ( भा. ४. ८. ९; १०. ३ ).

**उत्तमा**—चालू मन्वंतरांतील एकविसावा व्यास.

२ मगधदेशाच्या देवदास राजाची पत्नी. ही यमुनेंत स्नान करून मुक्त झाली ( पद्म. उ. २१६ ).

**उत्तमोत्तरीय**—विसर्गसंधीविषयीं मत प्रतिपादन करणारा आचार्य ( तै. प्रा. ८. २० ).

**उत्तमौजस्**—एक पांचालदेशीय राजपुत्र. हा भारतीय युद्धांत पांडवांकडे होता ( म. द्रो. २१; २५; १३०; उ. १९६ ). हा पांडवांच्या शिबिरांत झोपेंत असतां यास अश्वत्थाम्यानें मारिलें ( म. सौ. ८ ).

**उत्तर**—विराट व सुदेष्णा यांचा पुत्र. याला भूमिंजय असें दुसरें नांव होतें ( म. वि. ३८. ६० कुं. ). हा द्रौपदी-स्वयंवरास गेला होता (म. आ. २०१. ८ कुं.). दुर्योधनानें गाईंचे कळप हरण करून नेल्याचें गोपांनीं उत्तराला सांगितलें. विराट दुसरीकडे युद्धांत गुंतला असल्यामुळें गाई सोडविण्याची जबाबदारी उत्तरावर होती. उत्तरानें अंतःपुरांत आपल्या पराक्रमाची बढाई मारिली व सारथि नसल्यामुळें जातां येत नाहीं याबद्दल खेद व्यक्त केला. परंतु द्रौपदी-( सैरंध्री )नें याची परीक्षा पाहण्याकरितां अर्जुन ( बृहन्नला ) तुझें सारथ्य करील असें सांगितलें. त्यामुळें उत्तरास युद्धास जाणें भाग पडलें. परंतु हा रथांत बसून कौरवांच्या अफाट सैन्याजवळ गेला नाहीं तोंच भयभीत होऊन परत फिरण्यास बृहन्नलेस (अर्जुनास) सांगूं लागला. त्या वेळीं अर्जुनानें बायकांत मारलेल्या बढाईची यास ओळख दिली. परंतु उत्तर गर्भगळित होऊन एकटाच पळूं लागला. तेव्हां बृहन्नलेनें आपण अर्जुन आहोंत असें सांगून यास धीर दिला व यास सारथी होण्यास सांगून आपण युद्ध करूं लागला. थोड्याच वेळांत अर्जुनानें सर्व खिल्लारें सोडवून आणिलीं. नंतर उत्तर जयघोष करीत नगरांत गेला ( म. वि. ३९. ३२ कुं. ). हा भारतीय युद्धांत पांडवांचे बाजूस होता. यानें बराच पराक्रम गाजविला. परंतु हा शल्याचे हातून मरण पावला (म. भी. ४७ कुं.). उत्तराचे मागें याची स्त्री गरोदर होती. तिला इरावती नांवाची कन्या झाली. तीच पुढें अभिमन्युपुत्र परीक्षितास दिली होती.

२ ( अषाढ उत्तर पाराशर्य पहा ).

३ कश्यपकुलांतलि गोत्रकार.

**उत्तरा**—सोमाच्या सत्तावीस स्त्रियांपैकीं एक.

२ विराटाची मुलगी. अर्जुनानें बृहन्नलेच्या रूपानें हिला गीतनृत्यादिकांचें शिक्षण दिलें होतें. गोग्रहणाच्या वेळीं गाजविलेल्या पराक्रमाबद्दल विराटानें ही अर्जुनाला देऊं केली होती. पण अर्जुनानें अभिमन्यूकरितां हिचा स्वीकार केला. अभिमन्यु भारतीय युद्धांत पडला, तेव्हां ही गर्भार होती. अश्वत्थाम्यानें निष्पांडवी पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा करून ऐषिकास्त्र सोडिलें ( म. सौ. १५. ३१ कुं. ). तेव्हां कृष्णानें हिच्या गर्भाचें संरक्षण केलें. हिचा पुत्र परीक्षित् होय ( म. वि. ११.१८; भा. १. ८ ).

**उत्तानपाद**—स्वायंभुव मनूच्या शतरूपेपासून झालेल्या पुत्रांतील कनिष्ठ ( मत्स्य. ४ ). याला सुनृता अथवा सुनीति आणि सुरुचि अशा दोन स्त्रिया असून, पहिलीस कीर्तिवान् आणि ध्रुव असे दोन पुत्र, व दुसरीस एकच उत्तम, मिळून तीन पुत्र होते ( भा. ४. ८ ). या दोन स्त्रियांत दुसरी सुरुचि यास अत्यंत प्रिय असे ( ध्रुव पहा ). स्वायंभुव मन्वंतरांत प्रजापति अत्रीनें याला दत्तक घेतलें होतें. याला सुनृतेपासून चार मुलगे व दोन मुली झाल्या. त्यांचीं नांवें—१ ध्रुव, २ कीर्तिमान्, ३ आयुष्मान्, ४ वसु व १ स्वरा, २ मनस्विनी ( ब्रह्मांड. २. ३६. ८४-९०; ह. वं १. २; ध्रुव पहा ).

**उत्तानबर्हि**—( सू. ) शर्याति राजाच्या तीन पुत्रांतील ज्येष्ठ.

**उत्पल**—( विदल पहा ).

**उत्साह**—भृगुवंशांतील श्रीचा पुत्र ( भृगु पहा ).

**उदक्सेन** किंवा **उदक्स्वन**—( सो. अज. ) विष्वक्सेनाचा पुत्र. याचा पुत्र भल्लाट.

**उदग्र**—महिषासुरानुयायी एक असुर.

**उदग्रज**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**उदग्रीष्ण**—धर्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**उदंक**—उत्तंकाबद्दल पाठभेद.

**उदंक शौल्बायन**—प्राण व ब्रह्म एकच आहेत असे याचे विचार होते ( बृ. उ. ४. १. ३ ). तो विदेह देशाच्या दैवरांत जनकाशीं समकालीन असावा. सत्रांतील दशरात्र ऋतु हाच मुख्य भाग आहे असें याचें मत आहे ( तै. सं. ७. ५. ४. १ ).

**उद्मय आत्रेय**—हा अंग वैरोचनाचा पुरोहित होता (ऐ. ब्रा. ८.२२).

**उदय**—व्यूहर्वंशीय कृष्णवर्म राजाचा पुत्र. याचा पुत्र वापिकर्मा. यानें उदयपूर बसविलें (भवि. प्रति. ४. ३).

**उदयन**—(सो. कुरु. भविष्य.) मत्स्य व विष्णु यांच्या मतें हा शतानीकपुत्र.

२ (शिशु. भविष्य.) विष्णुमतें दर्भकाचा पुत्र. याला वायु व ब्रह्मांड यांच्या मतें उदयिन् म्हटलें आहे. भविष्यांत उदयाश्व असा पाठ आहे. यानें गंगेच्या दक्षिणतीरावर पुष्पपूर स्थापन केलें. पुष्पपुराला पाटलिपुत्र असें नामांतर युगपुराणांत दिलें आहे.

**उदयसिंह**—देवराजास देवकीपासून झालेला पुत्र.

**उदयाश्व** व **उदयिन्**—(२ उदयन पहा).

**उदर शांडिल्य**—हा अतिधन्वन् शौनकाचा शिष्य (छां. उ. १.९.३; वं. ब्रा. १). एक ब्रह्मर्षि (म. स. ७ कुं.).

**उदरेणु**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**उदल**—सामाचा विश्वामित्रकुलांतील द्रष्टा (पं. ब्रा. १४. ११. ३३).

**उदवहि**—कश्यपकुलोत्पन्न शंडिल शाखेंतील एक ऋषि.

२ विश्वामित्रगोत्री ऋषि.

**उदान**—तुषितदेवांपैकीं एक.

**उदापेक्षिन्**—विश्वामित्राच्या पुत्रांतील एक.

**उदारधी**—प्राचीनगर्भ व सुवर्चा यांचा पुत्र. याची स्त्री भद्रा. यास दिवंजय व रिपुंजय असे दोन पुत्र होते. हा पूर्वजन्मीं इंद्र होता (ब्रह्मांड. २.३६. १००-११०).

**उदारवसु** किंवा **उदावसु**—(सू. निमि.) मिथि जनकाचा पुत्र. याचा पुत्र नंदिवर्धन.

**उदार्मीन**—(सो. वृष्णि.) मत्स्यमतें वसुदेव व देवकी यांचा पुत्र.

२ (शिशु. भविष्य.) मत्स्यमतें वंशकाचा पुत्र.

**उदुंबर**—विश्वामित्रकुलांतील एक गोत्रकार.

**उद्‌गाता**—(स्वा. प्रिय.) प्रतीह व सुवर्चला यांच्या तीन पुत्रांतील एक. हा यज्ञकर्मनिपुण होता. हें नांव मूळ भागवतांत नाहीं, पण प्रतिहर्त्रादि म्हटलें असल्यामुळें आदिपदानें याचा स्वीकार टीकाकार करितात (भा. ५.१५.५).

**उद्‌ग्राह**—वसिष्ठगोत्रांतील एक ऋषिगण. उद्‌घाट असा पाठभेद आहे.

**उद्‌गीथ**—स्वायंभुव मन्वंतरांतील मरीचि ऋषीस उर्णेपासून झालेल्या सहा पुत्रांतील दुसरा. हाच पुढें जन्मांतरीं कृष्णाच्या बंधूंत जन्माला आला होता.

२ (स्वा. प्रिय.) भूमनास ऋषिकुल्येपासून झालेला पुत्र.

३ (स्वा. नाभि.) हा विष्णुमतें भुवाचा पुत्र.

**उद्‌घाट**—(उद्ग्राह पहा).

**उद्दल**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**उद्दाल**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार व प्रवर.

**उद्दालक आरुणि**—हा अध्यात्मविद्येचा प्रसिद्ध आचार्य आहे. हा अरुण औपवेशि गौतमाचा पुत्र व शिष्य होय (बृ. उ. ६. ५. ३). याचा मुलगा श्वेतकेतु होय (बृ. उ. ६. २. १; छां. उ. ६. १. १). पतंचल काप्य याचा गुरु होता. यानें याज्ञवल्क्याला अध्यात्माविषयीं कांहीं प्रश्न विचारिले होते व त्यांचीं याज्ञवल्क्यानें विस्तृत उत्तरें दिल्यावर हा गप्प बसला (बृ. उ. ३. ७). पण एक याज्ञवल्क्य याचा शिष्यहि होता (बृ. उ. ६. ५. ३). याच्या ब्रह्मविद्येची परंपरा ब्रह्मथापासून आहे व याला याच्या पित्याकडूनच ब्रह्मविद्या मिळाली होती (छां. उ. ३.११.४). मोठे ज्ञानीलोकहि अध्यात्मविद्या संपादण्याकरितां याच्याकडे येत असत. इंद्रद्युम्न, सत्ययज्ञ, जन व बुडिल हे याच्याकडे अध्यात्मविद्या शिकण्याकरितां आले होते (छां. उ. ५. ११. १-२). याच्या कुलांतील माणसें विद्वान् अशी त्या वेळीं ख्याति होती. यानें श्वेतकेतूला शिकविलेलें तत्त्वज्ञान प्रसिद्ध आहे (छां. उ. ६. १; श्वेतकेतु पहा). इतरत्रहि याचा उल्लेख येतो. राज्याभिषेकाच्या वेळीं म्हणावयाच्या मंत्रांसंबंधीं याचें मत सर्वमान्य आहे (ऐ. ब्रा. ८. ७).

हा आपोद धौम्याचा शिष्य. याला एकदां गुरूनें पाणी अडविण्यास सांगितलें असतां पाण्याचा प्रवाह अडवितां येईना. तेव्हां यानें स्वतः आडवें पडून पाणी अडविलें. गुरुला शोध करीत असतां हें कळलें, तेव्हां गुरूनें आरुणि पांचाल्याचें नांव उद्दालक असें ठेविलें (म. आ. ३. २१-३२ कुं.). याला कुशिकाच्या कन्येपासून श्वेतकेतु व नचिकेतस् असे दोन पुत्र व सुजाता नांवाची एक कन्या झाली. सुजाता कहोलाला दिली होती. तिचा पुत्र अष्टावक्र होय (म. व. १३४ कुं.). एका निपुत्रिक ब्राह्मणानें याची पत्नी पुत्रोत्पादनाकरितां मागितली. पण श्वेतकेतूस तें सहन न होऊन स्त्रीला एकच पति असावा असा श्वेतकेतूनें नियम केला (म. आ. १२८). याच्यांत सत्तासामान्य ही दिव्यदृष्टि बाणली होती. त्यामुळें हा नेहमीं समाधिसुखांत असे. याचें शरीर सूर्यकिरणांनीं शुष्क होऊन हा ब्रह्मरूप झाला. याचें शव चामुंडा देवतेनें खड्ग व खट्वांग यांमध्यें भूषण म्हणून धारण केलें (यो. वा. ५. ५१-५६).

**उद्दालकायन**— हा जाबालायनाचा शिष्य (बृ. उ. ४. ६. २.).

**उद्दालकि**— अत्रिकुलांतील एक गोत्रकार.

**उद्दिष्ट**—वैवस्वत मनूचा पुत्र.

**उद्धत**—एका राक्षसाचें नांव. हा शुकरूपानें आला असतां विनायकानें यास मारिलें ( गणेश २९.).

**उद्धव**—( सो. यदु. ) हा देवभागाचा पुत्र. याच्या मातेचें नांव कंसा. याला चित्रकेतु, बृहद्बल असे दोन वडील बंधु होते. (भा.९. २४ ). यानें बृहस्पतीजवळ नीतिशास्त्राचें अध्ययन केलें. हा कृष्णाचा प्रियमित्र असून यादवमंडळांत याला मान असे. श्रीकृष्णानें एकदां यास आपला निरोप देऊन नंद, यशोदा व गोपी यांचें समाधान करण्यास पाठविलें.

यादवांच्या नाशानंतर कृष्णहि निजधामास जाणार हें कळतांच याला फार दुःख झालें. कृष्णानें यास तूं बदरिकाश्रमाला जा असें सांगितलें. परंतु अत्यंत प्रेमामुळें तो कृष्णाच्या मागोमाग सरस्वती नदीच्या कांठीं गेला. तेथें कृष्ण एकटाच झाडाला टेकून बसला होता. उद्धवास पाहून कृष्ण म्हणाला, तुला काय पाहिजे तें मी ओळखतों. तूं वसुनामक देवांचा अवतार आहेस. पूर्वी सृष्टि उत्पन्न करणाऱ्या वसूंच्या यज्ञांत माझी प्राप्ति व्हावी म्हणून तूं माझें पूजन केलें होतेंस. हा तुझा शेवटचा जन्म असून तूं माझी कृपा संपादन केलीस. तेव्हां मी तुला सर्वश्रेष्ठ आत्मज्ञान सांगतों. असें म्हणून उद्धवास कृष्णानें आत्मानात्मविवेक सांगितला. ही उद्धवगीता व अवधूतगीता म्हणून प्रसिद्ध आहे ( भा. ११. ७.२९ ). तेव्हां उद्धवानें आनंदमिश्रित दुःखानें त्याला प्रदक्षिणा घालून बदरिकाश्रमीं गमन केलें व तेथें नरनारायणाश्रमीं राहून लोकहितार्थ पुष्कळ तप केलें. पुढें विशालेला ( बदरिकाश्रमीं ) जाऊन मोक्ष मिळविला ( भा. ११. २९. ४७ ). श्रीकृष्ण उद्धवास आपल्याहून अणुहि कमी समजत नसे व आत्मज्ञानोपदेश करण्यासाठींच उद्धवास श्रीकृष्णानें मागें ठेविलें असें शुकाचार्यांनीं सांगितलें आहे ( भा. ३. ३. ४ ). उद्धव द्रौपदीस्वयंवरप्रसंगीं हजर होता ( म. आ. २०१. १८ ).

२ ( सो. पुरूरवस् ) हा मत्स्यमतें नहुषपुत्र

**उद्यान**—( सो. ) भविष्यमतें शतानीकाचा पुत्र.

**उद्बलायन**— कश्यपकुलांतील एक गोत्रकार.

**उन्नत**— चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**उन्नति**—दक्ष व प्रसुति यांची कन्या. धर्माची पत्नी.

**उन्माद**—कृष्ण व मित्रविंदा यांचा पुत्र. एक महारथी.

**उन्मत्त**—अष्ट भैरवांपैकीं एक.

२ अंगराज मायावर्मन् व प्रमदा यांचा पुत्र ( भवि. प्रति. ३.३१ ).

**उपकीचक**— सूताधिप केकय व मालवी यांचे पुत्र व कीचकाचे धाकटे भाऊ (म. वि. २१ कुं.). भीमानें कीचकानंतर यांना ठार केलें ( म. वि. २७ कुं. ).

**उपकोसल कामलायन**—कमलपुत्र उपकोसल हा सत्यकाम जाबालाच्या घरीं अध्ययन करण्यासाठीं ब्रह्मचर्यानें राहिला. बारा वर्षांनंतर सत्यकामानें इतर शिष्यांना समावर्तन करून स्वगृहीं जाण्याची परवानगी दिली. पण उपकोसलाचें समावर्तन केलें नाहीं. तेव्हां सत्यकामाची भार्या त्याला म्हणाली कीं, या ब्रह्मचाऱ्यानें अग्नीची सेवा उत्तम प्रकारें केली आहे. अग्नीनें आपणांस दोष देऊं नये म्हणून आपण याला ब्रह्मज्ञान सांगा. पण तें लक्षांत न घेतां तो प्रवासाला निघून गेला. तेव्हां उपकोसलानें मानसिक दुःखामुळें अन्न वर्ज्य केलें. ह्या ब्रह्मचाऱ्याचें तप आणि केलेली सेवा ध्यानीं आणून याला ज्ञान सांगण्याकरितां तेथें तीन अग्नि प्रगट झाले. ते तीन अग्नि यास म्हणाले कीं, प्राण, सुख आणि आकाश हीं प्रत्येकीं ब्रह्म आहेत. उपकोसल म्हणाला, प्राण ब्रह्म कसें हें मला समजलें. पण पुढील दोन्हींबद्दल मला समजत नाहीं. त्यावर अग्नींनीं योग्य उत्तरें देऊन याची समजूत घातली व अग्नींनीं आपलें स्वरूपहि याला समजावून दिलें. ते शेवटीं म्हणाले, उपकोसला, ही आमची विद्या आणि आत्मविद्या तुला सांगितली. ब्रह्मवेत्त्याचा पुढील मार्ग तुझ्या आचार्याकडून तुला कळेल. पुढें कांहीं दिवसांनीं याचा आचार्य परत आला व शिष्याचें मुखावलोकन करून तो म्हणाला, बाळा, ब्रह्मज्ञान्याच्या मुखाप्रमाणें तुझें मुख दिसत आहे. तुला कोणीं ज्ञान सांगितलें ? उपकोसलानें अग्नीनें ज्ञान सांगितल्याचें सांगितल्यावर गुरूनें याला उपदेश केला ( छां. उ. ४ १०. १४ ).

**उपक्षत्र**—( सो. वृष्णि. ) विष्णुमतें श्वफल्काचा पुत्र.

**उपगहन**—विश्वामित्राचा पुत्र ( म. अनु. ७ कुं. ).

**उपगु**—वसिष्ठकुलोत्पन्न एक ऋषि.

२ ( सू. निमि. ) विष्णुमतें हा सात्यरथीपुत्र होय.

**उपगुप्त**— (सू. निमि.) भागवमतें उपगुरु जनकाचा पुत्र.

**उपगुरु**—( सू. निमि. ) सत्यरथाचा पुत्र. याचा पुत्र उपगुप्त.

**उपगु सौश्रवस**—हा कुत्स और्व ह्याचा पुरोहित होता. ह्या पुरोहितानें इंद्राला हवि दिला म्हणून यजमानानें याला ठार मारिलें ( पं. ब्रा. १४. ६. ८).

**उपचित्र**—(सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. याला भीमानें मारिलें ( म. द्रो. १३६ ).

**उपचित्रा**—( सो. वृष्णि. ) वसुदेवास मदिरेपासून झालेली कन्या.

**उपदानवी**—मयासुराच्या तीन कन्यांतील ज्येष्ठ. हिरण्याक्षाची स्त्री.

२ सदाची कन्या. हिचा पुत्र दुष्यंत (ब्रह्मांड. ३.६.२५).

**उपदेव**—( सो. ) देवकाचा पुत्र.

२ ( सो. वृष्णि. ) अक्रूराचा पुत्र.

३ रुद्रसावर्णि मनूचा पुत्र.

**उपदेवा**—देवकाची कन्या. कृष्णपिता वसुदेवाची स्त्री. हिला कल्प, वर्ष वगैरे दहा पुत्र होते.

**उपनंद**—नंदाचा मित्र व हस्तक.

२ वसुदेव व मदिरा यांचा पुत्र.

**उपनंदक**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**उपनिधि**—विष्णुमतें वसुदेवास भद्रेपासून झालेली कन्या.

**उपबर्हण**—( नारद पहा ).

**उपबिंदु**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**उपबिंबा**—( सो. वृष्णि. ) वायुमतें वसुदेवास भद्रेपासून झालेली कन्या.

**उपसंग**—( सो. यदु. ) श्वफल्काचा पुत्र.

**उपमन्यु वासिष्ठ**—सूक्तद्रष्टा ( ऋ.९.९७.१३-१५ ). वसिष्ठकुलोत्पन्न व्याघ्रपादाचा हा पुत्र. याचा धाकटा बंधु धौम्य. याचा आश्रम हिमालय पर्वतावर होता. याच्या आईचें नांव अंबा. उपमन्यु आपोद धौम्य ऋषीचा शिष्य. उपमन्यूचीं भिक्षा, दूध, फेस इ. उदरनिर्वाहाचीं साधनें बंद केलीं. शेवटीं प्राण अगदींच व्याकुळ झाल्यामुळें यानें रुईचीं पानें भक्षण केलीं. परंतु त्यामुळें हा अंध झाला व विहिरींत पडला. गुरुजी शिष्याच्या शोधार्थ निघाले व त्यांनीं वनांत आल्यावर उपमन्यूस हांका मारिल्या. गुरुजींचा शब्द ओळखतांच उपमन्यूनें आपला वृत्तांत कथन केला. तेव्हां गुरुजीनें यास अश्विनीकुमारांची स्तुति करण्यास सांगितलें. यानें त्यांची स्तुति करितांच अश्विनीकुमार प्रसन्न होऊन त्यांनीं यास एक अपूप भक्षण करण्यास दिला. परंतु प्रथम गुरूस अर्पण केल्यावांचून यानें तो भक्षण करण्याचें नाकारलें. त्यांनीं हा कोठल्याहि मोहास वश होत नाहीं असें पाहून ते याच्यावर संतुष्ट झाले. अश्विनीकुमारांनीं याला उत्तम दृष्टि दिली. गुरुहि याजवर प्रसन्न झाले ( म. आ ३ ).

लहानपणीं एकदां हा दुसऱ्या मुनीच्या आश्रमांत खेळण्यास गेला असतां यानें गाईचें दूध काढतांना अवलोकन केलें. याला पूर्वीं एकदां पित्यानें एका यज्ञांत नेला असतां दूध प्राशन करण्यास दिलें होतें. त्यामुळें याला दुधाचे गुण व गोडी हीं माहीत होतीं ( म. अनु. १४). लिंग व शिवपुराणांत हा मामाचे घरीं गेला असतां यानें दुग्ध प्राशन केलें असें आहे ( लिंग. १. १०७; शिव. वाय. १. ३४. ३५). घरीं आल्यावर हा आईजवळ दूध मागूं लागला; आईनें पीठ पाण्यांत कालवून देतांच याला वाईट वाटलें. आईनेंहि याला कुरवाळून आपण पूर्वजन्मीं शंकराची आराधना न केल्यामुळें आपल्याला दूध मिळण्याइतकें दैव अनुकूल नाहीं असें सांगितलें. लगेच यानें शंकर कसा आहे, त्याचें ध्यान कसें करावयाचें वगैरे माहिती विचारली. ती आईनें सांगतांच आईला नमस्कार करून हा तपश्चर्येला गेला. तेथें दुस्तर तपश्चर्या करून शंकरास प्रसन्न केलें. शंकर प्रथम इंद्राच्या स्वरूपांत आला व माझीच आराधना कर असें सांगूं लागला. परंतु हा शंकराच्या अभावीं देहत्यागाची तयारी करूं लागतांच शंकर प्रगट झाले व यास अनेक वर दिले. क्षीरसागर दिला व याला गणांचा अधिपतीहि केलें. यानें केलेलीं शंकराचीं अनेक स्तोत्रें आहेत. यानें आठ विटांचें देऊळ करून मातीचें शिवलिंग करून आराधना केली व पिशाच्चांनीं विघ्नें आणिलीं तरी तपोभंग होऊं दिला नाहीं ( शिव. वाय. १. ३४ ). हा शैव असून यानें कृष्णास शिवसहस्रनाम सांगितलें व पुत्रप्राप्तीसाठीं तप करण्यास आला असतां शैवी दीक्षा दिली. हा शेवटीं हिमवान् पर्वतावरच्या आश्रमांत असतां चिंध्या पांघरून राही. यानें जटाहि धारण केल्या होत्या. हा कृतयुगांत होऊन गेला ( म. अनु. १४-१७ शिव. उमा. १ ). शंकरानें अत्यंत विस्तृत सांगितलेला शैवसिद्धांत यानें ऊरु, दधीच व अगस्त्य यांच्यासह संक्षिप्त करून लोकांत प्रसिद्ध केला ( शिव. वाय. ३२ ).

२ नंदिकेश्वरकृत काशिकेवर व्याघ्रपादाचा पुत्र उपमन्यु याची टीका आहे. या टीकाकारानें आपल्या टीकेंत या काशिकेविषयीं अशी माहिती दिली आहे कीं, आपल्या डमरूच्या मिषानें शिवानें सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार वगैरे ऋषींना व नंदिकेश्वर, पतंजलि, व्याघ्रपाद वगैरे भक्तांकरितां चवदा सूत्रांच्या द्वारें ज्ञान प्रगट केलें. पण त्यांपैकीं फक्त नंदिकेश्वर भक्तालाच या सूत्रांचा तत्त्वार्थ कळला व त्यानें या सव्वीस श्लोकांची काशिका रचिली (शिवदत्तप्रत महाभाष्य पा. ९२ पहा ). व्याकरणावरचीं माहेश्वराचीं चौदा वर्णसूत्रें प्रसिद्ध आहेत. तीं पाणिनीस महेश्वरानें डमरू वाजवून दिलीं अशी प्रसिद्धि आहे. या सूत्रांचा कांहीं गूढार्थ आहे असें नंदिकेश्वरकाशिकेवरून कळतें. शेखराचा कर्ता नागेशभट्ट यानें या नंदिकेश्वरकाशिकेला प्रमाण मानिलें आहे. या गोष्टीवरून हा उपमन्यु पाणिनि व पतंजलि यांच्या नंतरचा असावा असें कळून येईल. व्याघ्रपाद ( उपमन्यूचा पिता ), नंदिकेश्वर व पतंजलि हे समकालीन असल्याप्रमाणें दिसतें. पण कालदृष्ट्या सर्व उपमन्यु एक करणें अशक्य आहे असें वाटतें.

याच्या नांवावर असलेले ग्रंथ—१ अर्धनारीश्वराष्टक, २ तत्त्वविमर्षिणी तंत्र, ३ शिवाष्टक, ४ शिवस्तोत्र (बृहत्स्तोत्र रत्नाकरांत छापलेलें), ५ उपमन्युनिरुक्त (C.C.). याची एक स्मृतिहि असावी, असें जागोजागीं आलेल्या वचनांवरून दिसतें.

२ वेदऋषीचा शिष्य.

३ कृष्णद्वैपायन व्यासाचा पुत्र, शुकाचार्याचा बंधु.

४ इंद्रप्रमतिपुत्र वसूचा मुलगा (ब्रह्मांड. ३. ९. १०). हा एक ऋग्वेदी श्रुतर्षि मध्यमाध्वर्युहि होता.

**उपमश्रवस्**—हा मित्रातिथीचा मुलगा (ऋ. १०. ३३. ७). मित्रातिथि मेल्यानंतर कवष ऐलूष याचें सांत्वन करण्याकरितां आला (ऋ. १०. ३३). याच सूक्तांत कुरुश्रवण त्रासदस्यवाची दानस्तुति आहे. कुरुश्रवण त्रासदस्यव व मित्रातिथिपुत्र उपमश्रवस् यांचा कांहीं संबंध असेल असें वाटत नाहीं (सायणभाष्य व बृहद्दे. ७. ३५. ३६).

**उपयाज**—कश्यपगोत्रोत्पन्न ऋषि (द्रुपद पहा).

**उपयु**—पराशरकुलांतील गोत्रकार.

**उपरिचर वसु**—(सो. कुरु.) हा कुरुवंशांतील सुधन्व्याच्या शाखेंतील कृतयज्ञ किंवा कृतीचा पुत्र होय (सुधन्वन् पहा). यानें यादवांच्या कडून चेदि देश जिंकून घेतला व चैद्योपरिचर म्हणजे चैद्यांचा जेता हें नांव स्वतःस घेतलें (वायु. २. ३२; ब्रह्मांड. ३. ६. ८; ह. वं १. ३०; ब्रह्म. १२; म. भा. ६३). म्हणजे उपरिचर ही पदवी असून वसु हें याचें नांव आहे. ह्या उपरिचर शब्दासारखे अंतरिक्षग, आकाशस्थ, ऊर्ध्वचारी असे शब्दहि याला लावलेले आहेत. हा विमानांत बसून नेहमीं आकाशांत संचार करीत असे असेंहि याचें वर्णन आहे. गळ्यांतील इंद्रमालेमुळें इंद्रमाली असेंहि याला म्हणत. याच्या स्त्रीचें नांव गिरिका. यानें तप करून इंद्रास संतुष्ट केलें. तूं पृथ्वीवर धर्माचरण केल्यावर तुला पुण्यलोक प्राप्त होतील, तरी तूं चेदि देशांत वास्तव्य कर, असें सांगून इंद्रानें याला एक स्फटिकमय दिव्य विमान व जिच्यांतील कमळें कधीं कोमेजत नाहींत अशी इंद्रमाला नामक वैजयंती अर्पण केली. हिच्या प्रभावानें युद्धांत शस्त्रांचे व्रण होण्याची भीति नव्हती. नंतर इंद्रानें साधूंचे प्रतिपालनार्थ एक वेळूची काठी दिली. ती राजानें संवत्सर संपण्याचे दिवशीं थोडी जमिनींत पुरून ठेवली. तेव्हांपासून ही चाल राजेलोकांत अद्यापि रूढ आहे. वर्षप्रतिपदेला त्या काठीला वस्त्रभूषणांनीं सुशोभित करून व गंधपुष्पांनीं अलंकृत करून उंच उभारितात. वसुराजाप्रीत्यर्थ धारण केलेल्या हंसरूपी ईश्वराची या यष्टिद्वारां विधिपूर्वक मोठ्या आदरानें राजेलोक पूजा करितात. ह्या उत्सवाची राजानें प्रथा पाडलेली पाहून इंद्रानें असा वर दिला कीं, जे राजेलोक चेदिराजाप्रमाणें माझा उत्सव करितील, त्यांचा सदैव विजय होऊन त्यांच्या राज्यांत अखंड लक्ष्मी व जन हीं संतुष्ट राहतील.

बहुधा नगरीजवळून वाहणाऱ्या शुक्तिमती नदीला कोलाहल पर्वत अडवीत आहे हें पाहून राजानें पर्वतावर एक लत्ताप्रहार केला व त्याला एक विवर पाडिलें व नदीचा मार्ग मोकळा केला. परंतु तेवढ्या त्या पर्वतसंगामुळें नदीला मुलगा व मुलगी असें एक जुळें झालें. नदीनें कृतज्ञताबुद्धीनें तीं मुलें राजाला अर्पण केलीं. राजानें मुलाला आपला सेनापति केलें व मुलीचें आपण पाणिग्रहण केलें. हीच गिरिका होय. पुढें ही लवकरच वयांत आली. परंतु ऋतुदानदिवशींच राजाला पितरांनीं वनांत मृगयेस जाण्याची आज्ञा केली. आज्ञेप्रमाणें राजा मृगयेस गेला. परंतु अत्यंत कामोत्सुक झाल्यामुळें याचें रेतस्खलन झालें. तें यानें द्रोणांत धरून आपल्या भार्येकडे घेऊन जाण्यास एका श्येन पक्ष्यास सांगितलें. तें घेऊन तो चालला असतां वाटेंत दुसऱ्या एका बुभुक्षु श्येन पक्ष्यानें त्यावर झडप घातली. त्या झटापटींत तो द्रोण यमुनेंत पडला व अद्रिका नामक मत्स्यीला सांपडला. ही मत्स्यी एक शापभ्रष्ट अप्सरा होती. दहाव्या महिन्यानंतर ती धीवरास सांपडून चिरली जातांच तिच्या पोटांतून एक मुलगा व एक मुलगी बाहेर आलीं. तेव्हां धीवरांनीं तीं मुलें राजाकडे आणिलीं व त्यांचा इतिहास सांगितला. राजानें मुलाचें नांव मत्स्य ठेविलें व त्याचा स्वीकार केला व मुलगी एका धीवरास देऊन तिचें पालन करण्याविषयीं आज्ञा केली. हीच सत्यवती (मत्स्यगंधा) होय. याला पांच पुत्र होते. बृहद्रथ, प्रत्यग्रह, कुशांब, मणिवाहन (मावेल्ल) व यदु. यानें आपल्या पुत्रास निरनिराळीं राज्यें दिलीं (म. आ. ६३). याच्या मुलांत मत्स्य व काली नांवें आहेत. बृहद्रथानें मगधांत बार्हद्रथ घराण्याची स्थापना केली. कुशांबाला (मणिवाहन) कौशांबी, प्रत्यग्रहास चेदि, यदूस करूष व पांचव्या मावेल्लास मत्स्य देश मिळाला (म. द्रो. ९१). हा पूर्वजन्मीं अमावसु पितर होता.

एकदां इंद्र व महर्षि यांचा यज्ञांत पशुहिंसा विहित वा अविहित असा वाद पडला. इतक्यांत तेथें उपरिचर वसु प्राप्त झाला. सत्यवक्ता म्हणून या वादाचा निर्णय यास विचारिला. यानें इंद्राची बाजू धरून पशुवधाला अनुकूल मत दिलें. तेव्हां ऋषींनीं शाप दिला कीं, तूं अधोलोकीं पतन पावशील. शाप होतांच हा रसातलांत पतन पावला (मत्स्य. १४२). महाभारतांत हा वाद अजवध करावा कीं, बीज उपयोगांत आणावें असा आहे. व हा उपरि-

चर वसु अंतरिक्षांतून मार्गक्रमण करीत असतां ऋषींनीं याला निर्णयार्थ बोलाविलें. दोन्ही पक्ष समजून घेतल्यावर वसूनें देवांचा पक्ष घेतला. तेव्हां ऋषींनीं, ज्या अर्थी देवांचा पक्ष घेऊन तूं अनृत भाषण केलेंस त्या अर्थी तुला पृथ्वीच्या पोटांत शिरावें लागेल असा शाप दिला. त्याप्रमाणें हा राजा अधोमुख होऊन पृथ्वीच्या विवरांत शिरला. तरी नारायणाच्या कृपेनें नारायणाचा मंत्र जपून व पंचमहायज्ञ करून यानें नारायणास संतुष्ट केलें. शेवटीं विष्णूच्या आज्ञेनें गरुडानें येऊन याला शापमुक्त केलें व पूर्वीप्रमाणें अंतरिक्षांतून यास मार्ग आक्रमण करण्यास समर्थ केलें. हा बृहस्पतीचा पट्टशिष्य झाला व त्याजवळून यानें चित्राशिखंडी संज्ञक सप्तर्षींनीं रचिलेल्या शास्त्राचा अभ्यास केला. यानें अश्वमेध यज्ञ केला त्यांत बृहस्पतीनें होतृत्व पत्करिलें होतें. यांत पशुवध झाला नाहीं. याला यज्ञांत नारायणानें प्रत्यक्ष दर्शन दिलें. महतिल सोडल्यावर या नैष्ठिक राजास परमपद तात्काल प्राप्त झालें ( म. शां. ३३५-३३७ ). एकदां हा अद्रिका नामक अप्सरेसह विमानांतून जात होता. याला सोमपदीं राहणाऱ्या पितरांच्या अच्छोदा नामक मानसकन्येनें पाहिलें व यास आपला पिता मानिलें व यानेंहि तिचा कन्या म्हणून स्वीकार केला. हें पाहून तिच्या पितरांनीं तिला शाप दिला कीं, तूं या अप्सरेसह पृथ्वीवर जाशील व तुजपासून ही कन्या होईल. हें ऐकतांच वसूनें त्यांचे पाय धरिले. तेव्हां ते म्हणाले, तूं पृथ्वीवर कृतयजाचा पुत्र होऊन भगवदाराधना करून वैकुंठपदीं जाशील व अच्छोदा अद्रिकेचे ठिकाणीं काली नांवानें जन्म घेईल. हीच ती सत्यवती होय ( स्कंद. २. ९. ४-७; मत्स्य. ५० ).

**उपरिबभ्रव**—शान्त्युदक करितांना कोणता मंत्र वापरावा याविषयीं याचें मत भिन्न आहे ( कौ. सू. ९.१० ). तसेंच प्रेत कसें ठेवावें याविषयीं याचें मत पितृविधींत नमूद आहे ( कौ. सू. ८०. ५४ ).

**उपरिमंडळ**—भृगुकुलांतील एक गोत्रकार. परिमंडळ असा पाठ आहे.

**उपलप**—वसिष्ठगोत्रांतील ऋषिगण.

**उपलंभ**—( सो. वृष्णि. ) अक्रूरास रत्ना ऊर्फ शैब्येपासून झालेला मुलगा ( मत्स्य. ४५. २९ ).

**उपलोम**—वसिष्ठकुलोत्पन्न ऋषि.

**उपवर्ष**—पाटलिपुत्रांतील शंकरस्वामीचा मुलगा व पाणिनीच्या गुरूचा बंधु. यानें पूर्वोत्तरमीमांसासूत्रांवर वृत्ति केली आहे. शबर व शंकराचार्य यांनीं याचा वारंवार निर्देश केला आहे ( कथासरित्सागर ). बौधायनाचें हें दुसरें नांव असावें. पण श्रीभाष्यकार हीं दोन्ही एक मानीत नाहींत. कारण ऐकात्म्याधिकरणांत ( ब्र. सू. ३. ३. ५३ ). शंकराचार्यांनें उपवर्षाचा हवाला दिला असून श्रीभाष्यकार तेंच अधिकरण प्रत्यगात्मपर लावीत आहेत. उपवर्षाचा शबरस्वामीनेंहि उल्लेख केला आहे. अशी एक आख्यायिका आहे कीं, बौधायनवृत्ति एकदांच रामानुजाचार्यांना काश्मिरांत पाहावयास मिळाली व तेवढ्या संधींत त्यांनीं सर्व वाचून घेतलें व त्यावरून श्रीभाष्य लिहिलें.

**उपवेशि**—हा कुश्रीचा शिष्य ( बृ. उ. ६. ५. ३. ).

**उपश्लोक**—ब्रह्मसावर्णि मनूचा पिता.

**उपसुंद**—( सुंदोपसुंद पहा ).

**उपस्तुत वार्ष्टिहव्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ११५ ). याचा कण्व मेध्यातिथीबरोबर निर्देश आहे ( ऋ. १. ३६. १०; १७ ). याचा बहुवचनीं स्तोते म्हणून उल्लेख आहे ( ऋ. ८. १०३. ८ ).

**उपहूत**—स्वर्गांत राहणारे पितर. यांची कन्या यशोदा. यशोदेचा मुलगा खट्वांग ( ब्रह्मांड. ३. १०. ९० ).

**उपाध्याय**—कश्यपास आर्यावतीपासून झालेला पुत्र ( भवि. प्रति. ४. २१ ).

**उपान**—साध्यदेवांपैकीं एक.

**उपावि जानश्रुतेय**—उपसदकर्माविषयीं प्रमाण म्हणून मान्य असणाऱ्या एका प्राचीन आचार्याचें हें नांव आहे ( ऐ. ब्रा. १. २५ ).

**उपावृद्धि**—वसिष्ठकुलोत्पन्न एक ऋषि.

**उपासंगधर**—( सो. वृष्णि. ) मत्स्यमतें वसुदेवास देवरक्षितेपासून झालेला पुत्र.

**उपोदिति गौपालेय**—सामाचा द्रष्टा ( पं. ब्रा. १२. १३. ११ ).

**उभक्षय**—( सो. पूरु. ) हा वायुमतें भीमपुत्र होय.

**उभयजात**—भृगुकुलोत्पन्न ब्रह्मर्षि.

**उमा**—ही हिमालयास मैनेपासून झाली. हिचा पति रुद्र ( पद्म. सृ. ९ ). विद्येचा उमा हैमवती असा उपनिषदांत निर्देश आहे ( जै. उ. ब्रा. ४. २०-१२ ).

**उम्लोचा**—एक अप्सरा ( म. आ. १३२. कुं. ).

**उर वार्ष्णिवृद्ध**—एक आचार्य ( सां. ब्रा. ७-४ ).

**उरुक्रम**—आदित्यांतील एक. हा ऊर्ज ( कार्तिक ) महिन्यांत प्रकाशतो ( भा. १२. ११ ). पण भविष्यपुराणांत तो चैत्रांत प्रकाशतो असें दिलें असून यास १२०० किरणें आहेत ( भवि. १७८; विवस्वान् पहा ). यास आणखी विष्णु व त्रिविक्रम अशीं नामांतरें असून कीर्ति नांवाची भार्या होती. तिजपासून बृहश्च्छ्लोक नांवाचा पुत्र झाला ( भा. ६. ६ ).

**उरुक्रिय**—( सू. इ. भविष्य. ) अभिमन्यूनें मारलेला बृहद्बलाचा पौत्र व बृहद्रणाचा पुत्र. याचें उरुक्षय असें नामांतर असून, वत्सवृद्ध, किंवा वत्सद्रोह पुत्र होता.

**उरुक्षय**—( सो. पूरु. ) विष्णुमतें हा महावीर्यपुत्र होय. हा क्षत्रियाचा ब्राह्मण झाला होता व याला विशालेपासून झालेले त्र्य्यारुण, पुष्करिन् व कपि हेहि ब्राह्मण झाले.

२ अंगिरागोत्री प्रवर.

**उरुक्षय आमहीयव**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ११८).

**उरुक्षेप**—( सू. इ. ) भविष्यमतें हा बृहद्दैशानाचा पुत्र.

**उरुचक्रि आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ६९-७० ).

**उरुधिष्ण्य**—धर्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**उरुनेत्र**—जालंधर सेनेंतील एक राक्षस. यावर गणपतीनें खड्गप्रहार केला असतां याच्या मुखांतून नऊ डोक्यांचा व अठरा हातांचा दैत्य निघाला ( पद्म. पा. १७. ).

**उरुवल्क**—वसुदेव व इला यांचा पुत्र.

**उरुश्रवस्**--( सो. नरिष्यंत. ) सत्यश्रवस्चा पुत्र. याचा पुत्र देवदत्त.

**उर्मि**—सोमाचा पुत्र.

**उर्मिला**—एक गंधर्वी, सोमदेची माता.

२ सीरध्वज जनकाची कन्या. दशरथपुत्र लक्ष्मणाची स्त्री.

**उर्व**—एक ऋषि. हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र होता. यानें आपल्या मांडीपासून और्व नामक एक पुत्र उत्पन्न केला ( पद्म. सृ. ४१ ).

२ ( सो. पूरु. भविष्य. ) मत्स्यमतें हा पुरंजयपुत्र होय.

**उर्वरा**--एक अप्सरा ( म. अनु. ५० कुं. ).

**उर्वरीयाम**—सावर्णि मनूचा पुत्र.

**उर्वरीवत्**—और्वाचें नामांतर.

**उर्वशी**—ही एक अप्सरा म्हणून ऋग्वेदापासून प्रसिद्ध आहे. ऋग्वेदांत उर्वशीच्या एका संवादात्मक सूक्तांत बऱ्याच ऋचा आहेत (ऋ. १०.९५). ऋग्वेदांत उर्वशी शब्द बऱ्याच वेळां आला आहे ( ऋ. ४.२. १८; ५.४१.१९; ७. ३३. ११; १०.९५.१०; १७ ). तथापि शेवटल्या तीन ठिकाणीं तो निश्चित व्यक्तिवाचक शब्द आहे. सातव्या मंडळांत वसिष्ठाची हिच्यापासून उत्पत्ति झाली असें सांगितलें आहे. आणि दहाव्या मंडळांत उर्वशीपुरूरवा यांचा संवाद आहे. ठरलेल्या अटींप्रमाणें नग्न स्थितींत राजा दिसल्यामुळें उर्वशी त्याला सोडून जात आहे. आणि राजा हिनें सोडून जाऊं नये म्हणून वेड्यासारखा भटकत एका तळ्यापाशीं आला. तेथें ही आपल्या मैत्रिणींसह क्रीडा करीत होती व तेथें त्यांचा ऋग्वेदांत आलेला संवाद झाला (श. ब्रा. ११.५.१). उर्वशी गर्भार होती व हिनें राजाकडे परत येण्याचें नाकारलें. हें संवादाचें थोडक्यांत सार आहे. उर्वशीनें आपल्याकरितां प्राणत्याग करण्यास प्रवृत्त झालेल्या राजाला प्राणत्यागापासून निवृत्त होण्यास सांगून स्त्रीस्वभावाची चांगलीच कल्पना दिली आहे. तसेंच उर्वशी ही देवांपैकीं असल्याचेंहि तेथें म्हटलें आहे. आणि त्याकरितां मरून स्वर्गांत आल्यावर माझा सहवास तुला लागेल असेंहि हिनें सुचविलें.

उर्वशीला पाहूनच वासतीवरसत्रांत मित्रावरुणांचें रेतस्खलन झालें व त्या रेतापासून पुढें अगस्त्य व वसिष्ठ उत्पन्न झाले ( कात्यायनकृत सर्वानुक्रमणी १.१६६; बृहद्दे. २.३७. ४४.१५६; ३.५६). उर्वशीपुरूरवसांचें आख्यान फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. अप्सरा ऋग्वेदापासून आहेत.

नरनारायणऋषि बदरिकाश्रमीं तप करीत असतां ते आपलें इंद्रपद घेतील या भीतीनें इंद्रानें वसंत, काम, मेनका, रंभा, तिलोत्तमा, घृताची आदिकरून सोळा हजार पन्नास अप्सरा त्यांना तपापासून परावृत्त करण्यासाठीं धाडल्या होत्या (भा.९. १४; दे. भा. ४. ६ ). मत्स्यपुराणांत पुराणपुरुष विष्णु गंधमादनावर तप करीत असतां ही मदनसेना धाडली असें आहे ( पद्म. सृ. २२). त्यांनीं तेथें जाऊन गायनादि प्रकारांनीं त्यांस मोहित करावें म्हणून अनेक प्रकार केले. परंतु ते सर्व निष्फळ झाले असें पाहून ते सर्व खिन्न झाले. नरनारायणांनीं त्यांचें सर्वांचें अत्यंत मृदु वाक्यांनीं आदरातिथ्य करून कोणीकडे येणें झालें ? म्हणून विचारिलें. त्यामुळें कामादिक लज्जित झाले व अधोमुख करून स्तब्ध उभे राहिले. इतक्यांत तेथें त्यांनीं नारायण ऋषीच्या मांडीपासून सोळा हजार एकावन अप्सरा प्रगट झालेल्या पाहिल्या. त्यांतील उर्वशी फारच सुंदर होती. ही ऊरूपासून म्हणजे मांडीपासून निर्माण झाली असल्यामुळें हिला उर्वशी असें नांव पडलें. नरनारायणांनीं इंद्राला नजराणा म्हणून ही नयनमनोहर उर्वशी कामादिकांच्या हवालीं केली. नंतर त्या सर्व अप्सरा आम्ही आपल्या सेवेस राहतों असें नरनारायणांस म्हणाल्या असतां त्यांनीं त्यांची सेवा नाकारली ( दे. भा. ४.६; भा. ११. ४; मत्स्य. ६० ).

ही एकदां सूर्याराधनेस जात असतां हिनें मित्र आदित्यास वरण्याचें आश्वासन दिलें. पुढें वरुण भेटला. त्यानेंहि हिच्याजवळ वरण्याचें अभिवचन मागितलें. तेव्हां हिनें तें मित्रास दिल्याचें सांगितलें. नंतर त्यानें तिचें प्रेम मागितलें व तें हिनें दिलें. नंतर वरुणानें हिला उद्देशून एका कुंभांत आपलें वीर्य टाकिलें. हें मित्रास समजतांच त्यानें हिला ' मृत्युलोकीं पुरूरव्याची स्त्री हो ' असा शाप दिला. व नंतर आपलें वीर्य एका कुंभांत टाकलें. या दोन कुंभांत टाकलेल्या वीर्यांपासून अगस्त्य व वसिष्ठ यांचा जन्म झाला ( पद्म. सृ. २२. भा. ९. १४; मत्स्य. ६०; वा. रा. उ.५६.५७ ). मित्रावरुण बदरिकाश्रमीं

तप करीत असतां सौंदर्यवती उर्वशी फुलें तोडीत होती ती त्यांच्या दृष्टीस पडली. तेव्हां यांचें रेतस्खलन झालें. त्यापासून अगस्त्य व वसिष्ठ जन्मले ( म. भा. २०० ). उर्वशी दृष्टीस पडतांच मित्राचें रेतस्खलन झालें तें यानें शापभीतीनें पायाखालीं दाबलें, तेव्हां वसिष्ठाचा जन्म झाला ( विष्णु. ४. ५ ).

एकदां नारदानें पुरूरवस् राजाची पुष्कळ स्तुति केली. त्यायोगानें ही त्याच्यावर मोहित झाली ( भा. ९. १४ ). पुरूरव्यावर मोहित झाल्यामुळें लक्ष्मीस्वयंवर नामक प्रबंध करितांना हिचे कांहीं हावभाव चुकले. म्हणून हिला भरतऋषींनीं तूं पंचवीसशें वर्षें लता होऊन राहशील असा शाप दिला. हा शाप संपल्यावर ही पुरूरव्याकडे येऊं लागली असतां वाटेंत हिला केशी नामक दैत्यानें पळवून नेण्याचा प्रयत्न केला. पण सुदैवानें पुरूरव्यानेंच हिला सोडविलें ( पद्म. सृ. १२ ).

नंतर उर्वशी पुरूरव्याच्या नगरीस आल्यावर हिनें त्यास तीन अटी सांगितल्या. एक, या दोन मेंढ्यांना मी पुत्रवत् पाळीत आहें त्यांचें संरक्षण करणें; दुसरी, मी सदा घृतावरच राहीन व तिसरी, मी तुला मैथुनाखेरीज कधींहि नग्न पाहणार नाहीं. या अटी पाळून चैत्ररथ व नंदन वगैरे वनांत व अलका वगैरे नगरींत पुरूरव्यानें उर्वशीचा ६१००० वर्षें उपभोग घेतला. पण त्याला नंतर हिची तिसरी अट पाळतां न आल्यामुळें ही देवलोकीं गेली. हिच्याठायीं पुरूरव्यास आयु इत्यादि सहा पुत्र झाले होते ( भा. ९. १४-१५; विष्णु. ४. ६-७; दे. भा. १. १३; म. आ. ७५ ).

अर्जुन जन्मला त्या वेळीं गायन करणाऱ्या अकरा अप्सरांत हीहि एक होती ( म. आ. १२३ ). ही सदा कुबेराच्या सभेंत त्याची सेवा करण्यांत निमग्न असते ( म. स. १० ). अर्जुन इंद्रलोकीं शिक्षणास गेला असतां एकदां हिच्याकडे आपल्या कुलाची जननी या पूज्यतेनें पाहत होता. हें इंद्राचे लक्षांत न येऊन हा कामुक इच्छेनें हिजकडे पाहत असावा असें वाटून त्यानें चित्रसेन गंधर्वाकरवीं उर्वशीस तसा निरोप कळविला. तेव्हां ही संध्याकाळीं सुंदर पोशाख करून अर्जुनाकडे गेली. पण अर्जुनानें स्वतःची हिजविषयींची दृष्टि सांगून हिचा निषेध केला. मनोभंग झाल्यामुळें हिनें अर्जुनास तूं वर्षभर षंढ होशील असा शाप दिला. तेव्हां इंद्रानें त्याचें सांत्वन केलें कीं, तेराव्या वर्षीं अज्ञातवासांत तुला हा शाप उपयोगी पडेल ( म. व. ४५-४६ ). अष्टावक्राचा सन्मान करण्याकरितां वरुणानें ज्यांच्या करवीं नाच करविला त्यांत ही एक अप्सरा होती ( म. अनु. १९ ). अनेक पवित्र पदार्थ माझें रक्षण करोत असा भीष्माच्या मुखांतून निघणाऱ्या उल्लेखांत पवित्र अप्सरांत उर्वशीचें नांव आहे ( म. अनु. १६५ ). उर्वशीतीर्थ म्हणून एक पवित्र तीर्थहि प्रसिद्ध आहे ( म. व. ८२ कुं; देवव्रत पहा ). ही ब्रह्मवादिनी होती ( ब्रह्मांड. २. ३३ ).

**उर्वीभाग्य**—( सो. कुरु भविष्य. ) मत्स्यमतें पुरंजयाचा पुत्र.

**उर्वीशु**—हा पापी असून व्रत व दान यांमुळें याचा उद्धार झाला ( पद्म. क्रि. १९ ).

**उल वातायन**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १८६ ).

**उल वार्ष्णिवृद्ध**—एक आचार्य ( सा. ब्रा. ७ ४ ).

**उलुक्य जानश्रुतेय**—एक आचार्य ( जै. उ. ब्रा. १. ६. ३ ).

**उलूक**—एक ऋषि. विश्वामित्राचा पुत्र. ( म. शां. ४७; म. अनु. ७ कुं. ).

२ एक क्षत्रिय. शकुनीचा पुत्र ( म. आ. २०१ ). याला दुर्योधनानें युद्धारंभाचे पूर्वी उपप्लव्य नगरीस धर्माकडे दूत म्हणून पाठविलें होतें ( म. उ. १६०. १६३ ). याला कैतव असेंहि म्हणत. यानें धर्माला दुर्योधनाचा निरोप सांगितला ( म. भा. उ. १६३ कुं. ). याचे युयुत्सूबरोबर युद्ध झालें ( म. क. १६ कुं. ). याचा सहदेवानें वध केला ( म. श. २७-२८ कुं. ).

३ हिरण्याक्ष दैत्याच्या चार पुत्रांतील एक.

४ द्रौपदीस्वयंवरांतील एक राजा ( म. आ. १८६ ).

५ शिवावतार सोमाचा शिष्य.

६ शिवावतार सहिष्णूचा शिष्य.

**उलूकी**—ही कश्यप व ताम्रा यांची कन्या. हिला घुबडें झालीं ( म. आ. ६६ ). हिलाच काकी हें नांव असावें.

**उलूखल**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें हिरण्यनाभाच्या शिष्यांतील एक ( व्यास पहा ). वायूंत उलूखलक असा पाठ आहे.

**उलूप**—विश्वामित्रकुलांतील ऋषिगण.

**उलूपी**—ऐरावत नांवाच्या नागकुलांतील कौरव्य नागाची कन्या. ही ऐरावत नागाच्या पुत्रास दिलेली होती. विवाहानंतर थोड्याच दिवसांत हिच्या नवऱ्यास गरुडानें ठार मारिलें. त्यामुळें हिला लहानपणींच वैधव्य आलें होतें. पुढें कांहीं काळानें पंडुपुत्र अर्जुन तीर्थयात्रेस निघाला असतां तो गंगेंत स्नानास उतरला. त्यास पाहून उलूपीचें त्याच्यावर मन बसलें व हिनें त्यास पाण्यांत ओढून नेलें. पुढें अर्जुनानें उलूपीच्या विनंतीवरून गांधर्वविधीनें हिच्याशीं लग्न लाविलें. ऐरावताचीहि या विवाहास संमती होती. कारण यायोगें आपला वंश विस्तार पावेल असें त्याच्या मनांत होतें. पुढें उलूपीस अर्जुनापासून इरावान नामक पुत्र झाला ( म. आ. २१४ भी. ९० कुं. ). पांडवांच्या अश्वमेधप्रसंगीं अर्जुन बभ्रुवाहनाचे हातून मरण पावला. वस्तुतः तो मेला नसून

त्यानें भीष्मास शिखंडीच्या आडून मारिल्यामुळें त्याला लागलेल्या पापाचें निरसन व्हावें अतएव उलूपीनेंच मायेच्या योगानें त्यास मूर्च्छित केलें होतें. पुढें उलूपीनें संजीवनीमंत्राचें चिंतन करितांच नागांनीं तो आणून दिला व हिनें त्याच्या योगानें अर्जुनास सावध केलें ( म. आश्व. ७९-८१; बभ्रुवाहन पहा ). पांडव महाप्रस्थानास निघाले त्या वेळीं उलूपी त्यांच्या बरोबरच होती. पुढें हिनें गंगेंत उडी टाकून देहत्याग केला ( म. महा. १ ).

**उल्कामुख**—रामसेनेंतील एक वानर. हा अंगदाबरोबर दक्षिण दिशेस सीताशुद्धीसाठीं गेला होता (वा. रा. किं. ४१).

**उल्वण**—( स्वा. ) वसिष्ठ व अरुंधती यांच्या सात पुत्रांतील एक.

**उल्मुक**— ( स्वा. ) चक्षुर्मनु व नड्वला यांच्या अकरा पुत्रांतील कनिष्ठ. याची स्त्री पुष्करिणी. अंग, सुमना, ख्याति, क्रतु, अंगिरा आणि गय असे याचे सहा पुत्र होते ( भा. ४. १ ).

२ ( सो. वृष्णि ) बलरामाचा पुत्र. हा भारतीय युद्धांत पांडवांकडे होता ( म. द्रो. ११ ).

**उलूप**—उलूपाबद्दल पाठभेद.

**उशंगु**—( रुशंगु ) एक ऋषि. यानें आपल्याला वार्धक्य आलेलें पाहून पृथूदक तीर्थांत देह टाकून विष्णुलोकास गमन केलें ( म. श. ४० ). याच्या आश्रमामध्यें आर्ष्टिषेण, विश्वामित्र, सिंधुद्वीप, देवापि इत्यादिकांनीं तप करून ब्राह्मण्य संपादन केलें ( म. श. ४० ). त्या ठिकाणीं बलराम तीर्थयात्रेनिमित्त गेला होता.

**उशद्रथ**—( सो. अनु. ) भागवतमतें तितिक्षुपुत्र.

**उशनस्**— अग्नि हा देवांचा दूत असून उशना काव्य हा असुराचा कुलगुरु व अध्वर्यु होय. अग्नि व उशना काव्य हे दोघे प्रजापतीकडे गेले, तेव्हां प्रजापतीनें उशनाकाव्य याजकडे पाठ फिरवून अग्नीचीच निवडणूक केली. त्यामुळें देवांची सरशी झाली व असुरांचा पराजय झाला ( तै. सं. २. ५. ८ ). हा असुरांचा पुरस्कर्ता होता ( जै. उ. ब्रा. २. ७. २-६ ). वारुणि भृगूस पुलोमेपासून झालेला पुत्र ( मत्स्य. २४९. ७; ब्रह्म. ७३. ३१-३४ ). हा भृगूपासून उषेस झाला ( विष्णुधर्मोत्तर. १. १०६ ). याला उमेनें दत्तक घेतलें होतें. काव्य ( मत्स्य. २५. ९; वायु. २. ४. ७५; म. आ. ६७. ४२ कुं.). शुक्र (अंधक पहा. म. शां.२९५. ३२ कुं. ). कवींद्र ( म. क. ९८ ). कविसुत, ग्रह ( म. आ.भा. ४३१. ४२ ). ब्रह्मदेवानें पुत्र मानलें म्हणून ब्राह्म, शिवानें वरुण मानिलें म्हणून वारुण इत्यादि नांवांनीं यास संबोधितात. उशना, शुक्र व काव्य हे सर्व एकच (वायु. २. ४. ७५ ). याच्या आईचें नांव ख्याति व बापाचें नांव कवि असेंहि आढळतें (भा. ४. १). भृगूस दिव्येपासून झालेला शुक्र व हा एकच होत ( ब्रह्मांड. ३. १. ७४ ). याची बायको शतपर्वा ( म. उ. ११७. १३ कुं ). याला पितृसुता आंगी नांवाची एक बायको होती ( वायु. २. ४.७५ ). शिवाय आणखीहि पुढील बायका होत्या. प्रियव्रतपुत्री ऊर्जस्वती ( भा. ५.१). पुरंदरकन्या जयंती ( मत्स्य. ४७ ). पितृकन्या गौ (ब्रह्मांड. ३. १. ७४ ). हा पर्जन्याधिपति, योगाचार्य, देव व दैत्य यांचा गुरु आहे. ( म. आ. ४२. ४३; वायु. २. ४.७४). उशनस् काव्य हा कांहीं सूक्तांचा द्रष्टा आहे. (ऋ. ८. ८४; ९. ८७-८९ ). हा दानवांचा पुरोहित होता ( तै. सं. २. ५. ८. ५ ). याच्या घराण्यांत भृगूपासूनच संजीवनी विद्या अवगत असे ( भृगु पहा ). यानें ही विद्या शंकरापासून मिळविली होती ( दे. भा. ४. ११ ). उशनसानें कुबेराचें धन लुटल्यामुळें शंकरानें याला गिळिलें. तेव्हां हा शंकराच्या शिश्नांतून बाहेर पडला व शंकराचा पुत्र झाला. तेव्हांपासून याचें शुक्र असें नांव पडलें ( म. शां. २९५ कुं.; विष्णुधर्म. १. १०. ६ ). असुरांचा सारखा पराभव होऊं लागला तेव्हां असुरांना स्वस्थ राहण्यास सांगून शुक्र शंकरापासून बृहस्पतीस ठाऊक नाहींत असे मंत्र मिळविण्यास गेला. पण इकडे देवांनीं ही संधि साधून असुरांना त्रास देण्यास सुरुवात केली. तेव्हां शुक्राची आई पुढें झाली व तिनें देवांना जाळण्यास सुरवात केली. पण इंद्र पळून गेला व विष्णूनें याच्या आईस ठार करून देवांना वांचविलें. पण भृगूनें स्त्रीवर हत्यार चालविलें म्हणून विष्णूला पृथ्वीवर जन्म घेण्याविषयीं शाप दिला. व भृगूनें शुक्राच्या आईचें मुंडकें पुनः चिकटवून तिला पुनः सजीव केलें. तेव्हां इंद्र फारच घाबरला व त्यानें आपली जयंती नांवाची मुलगी शुक्राला दिली. इकडे शुक्रानेंहि हजार वर्षें तप करून शंकरापासून प्रजेशत्व, धनेशत्व व अवध्यत्व मिळविलें (. मत्स्य. ४७; विष्णुधर्म. १. १०६). शुक्रानें प्रभासक्षेत्रीं शुक्रेश्वराजवळ ( स्कंद. ७. १. ४८ ) दुर्धर्ष नांवाचें लिंग स्थापून संजीवनी विद्या मिळविली ( पद्म. उ. १५३ ). जयंती ही याच्या बरोबर दहा वर्षेंपर्यंत अदृश्य स्वरूपांत होती. हें तप वामन अवतारानंतर केलें. पण वायुपुराणांत दोघेहि अदृश्य होते त्यामुळें बृहस्पतीचें पुढील कारस्थान यशस्वी झालें असें म्हटलें आहे.

बृहस्पतीनें एनवेळीं युक्ति योजून शुक्राचें रूप घेऊन येणारा शुक्र खरा नसून मीच तुमचा गुरु आहें असें सांगून असुरांकडून खऱ्या शुक्राला परत फिरविलें व आपण असुरांना दुर्वृत्त बनवून हीन करून सोडिलें ( मत्स्य. ४७; वायु. २. ३६; दे. भा. ४. ११-१२ ).

याला ऊर्जस्वती व जयंती यांच्या पासून देवयानी झाली. आणखी देवी नांवाची मुलगी असून ती यानें वरुणाला दिली होती ( म. आ. ६७. ५२ कुं.). याला षण्ड व मर्क नांवाचीं दोन मुलें होतीं ( भा. ७.५.१ ). याला आंगीपासून त्वष्टृ, वरुत्रिन् व षण्डामर्क झाले ( कच, वामन व बृहस्पति पहा ). याला अरजा नांवाची एक मुलगी होती (पद्म.सृ.३७). सहाव्या मन्वंतरांतील हा व्यास होता ( व्यास पहा ). हा शिवावतार गोकर्णाचा शिष्य. सर्व जग मनोमय आहे हें सांगण्याकरितां याच्या कथेचा उपयोग केला आहे ( यो. वा. ४. ५–१६ ). यानें एक वास्तुशास्त्रावर ग्रंथ केला आहे (मत्स्य. २५२).

एक धर्मशास्त्रकार. उशनसधर्मशास्त्र नांवाचें सात अध्यायांचें एक लहान पुस्तक उपलब्ध आहे. त्यांत श्राद्ध, प्रायश्चित्त, महापातकांबद्दल प्रायश्चित्त व इतर व्यावहारिक निर्बंध यांच्या बद्दल माहिती आली आहे. याच्या धर्मसूत्रांतील बरींचशीं सूत्रें मनुस्मृति व बौधायनधर्मसूत्र यांच्यांतील सूत्रांशीं जुळतात. याज्ञवल्क्यानें याचा निर्देश केला आहे ( १. ५. ). मिताक्षरा ( ३. २६० ). व अपरार्क या ग्रंथांत औशनस धर्मशास्त्रांतील कांहीं उतारे घेतले आहेत. त्याचप्रमाणें औशनसस्मृति नांवाचे दोन निरनिराळे ग्रंथ—एक ५१ श्लोकांचा व दुसरा ६०० श्लोकांचा–जिवानंद संग्रहांत उपलब्ध आहेत.

त्याचप्रमाणें याचा राजकीय विषयावर शुक्रनीति हा एक ग्रंथ उपलब्ध आहे. यांतील उतारे कौटिल्यानें बरेच वेळां घेतले आहेत. उशनस उपपुराण असा निर्देश औशनस उपपुराणाकरितां आहे. औशनस उपपुराणाचा अनेक ठिकाणीं निर्देश आहे ( कूर्म. १. ३; गरुड. १. २२३. १९ ).

२ उत्तम मनूचा पुत्र.

३ सावर्णि मनूचा पुत्र.

४ स्वायंभुव मनूंतील एक जिदाजित् देव.

५ भौत्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक. यास शुद्ध असेंहि नांव आढळतें.

६ सुतप देवांपैकीं एक.

७ उरु व षडाग्नेयी यांचा पुत्र.

८ ( सो. यदु. ) भागवतमतें हा धर्माचा पुत्र होय. भविष्यमतें तामसाचा पुत्र.

**उशिक**—(सो. क्रोष्टु.) कृतीचा पुत्र. याचा पुत्र चेदि.

२ शिवाचा श्वेत नांवाचा दुसरा अवतार, त्याचा शिष्य.

**उशिज्**—( कक्षीवान् पहा ).

**उशिंज**—अंगिराकुलोत्पन्न ऋषि. यास ऋषिज असेंहि नामांतर आढळतें. याला ममतेपासून झालेला दीर्घतमा नांवाचा पुत्र होता. उषिज असाहि पाठभेद आहे.

**उशिति**—अंगिरस व स्वराज् यांचा हा मुलगा. उशितीचा मुलगा दीर्घतमस् ( ब्रह्मांड. ३. १ ).

**उशीनर**—( सो. अनु. ) हा चक्रवर्ति महामनाचा मुलगा. याला तितिक्षु नांवाचा एक भाऊ होता. याला मृगा, कृमी, नवा, दर्वा व दृशद्वती अशा पांच बायका होत्या. त्यांना क्रमानें मृग, नव, कृमि, सुव्रत व शिबि औशीनर असे पुत्र होते. उशीनर व तितिक्षु अशा दोन स्वतंत्र वंशशाखा सुरू झाल्या. यांचें राज्य केकय व मद्रक या देशांत शिवपूर, यौधेय, नवराष्ट्र, कृमिला व वृष्टा या ठिकाणीं विस्तारलें (वायु. २. ३७. १७–२४; विष्णु. ४. १८; मत्स्य. ४८ ). ययातिकन्या माधवीपासून यास शिबि झाला ( शिबि पहा ).

**उपस्त** किंवा **उषस्ति चाक्रायण**—एक सामवेत्ता ब्राह्मण. हा कुरु देशांत दुष्काळ पडला असतां मोठ्या वाईट स्थितींत एका गांवांत बायकोसह राहिला. भूक लागल्यामुळें एका माहुतास हुलगे खात असतां यानें त्यांतील मागितले. तेव्हां तो हुलगे देऊन पाणी देऊं लागला. तेव्हां पाणी उष्टें म्हणून यानें नाकारिलें. पण हुलगे उष्टे होते असें सांगतां यानें त्याशिवाय मी जगलों नसतों, पाणी मी इच्छेप्रमाणें कुठेंहि पिऊं शकेन असें सांगितलें. थोडे हुलगे बायकोकरितांहि आणिले. नंतर हा जवळच असणाऱ्या यज्ञाला गेला. पण यज्ञ आधींच सुरू झाला होता. तरी हा विद्वान् म्हणून याला इतर ऋत्विजांइतकी राजानें दक्षणा दिली व यानेंहि प्रस्तोत्याला मदत केली. उषस्ति असा दुसऱ्या ठिकाणीं पाठ आहे ( छां.उ. १. १०. १; ११. १ ). यानें याज्ञवल्क्याला आत्म्याच्या प्रत्यक्षत्वाविषयीं प्रश्न केला व याज्ञवल्क्यानें याला आत्मा प्रत्यक्ष दाखविणें अशक्य आहे असें सांगितलें ( बृ. उ. ३. ४. २ ).

**उषस्य**—काश्यप व खशा यांचा पुत्र.

**उषा**—बलिदैत्याचा पुत्र बाणासुर, त्याची कन्या. ही यौवनावस्थेंत आल्यावर, सख्यांसहित रात्रीं स्वमंदिरीं निजली असतां हिचा स्वप्नांत एका तरुण व सुंदर पुरुषाशीं समागम घडला. पुढें जागृत झाल्यावर हिची विरहयुक्त चर्या पाहून चित्रलेखेनें हिला कारण विचारिलें. हिनें तिला स्वप्नांतील इत्थम्भूत हकीकत सांगून त्या स्वप्नांतील पुरुषास घेऊन येण्यास सांगितलें. तेव्हां चित्रलेखेनें तिला त्रैलोक्यांतील प्रसिद्ध पुरुषांचीं क्रमानें चित्रें काढून दाखविलीं. पुढें यादववंश काढून दाखवीत असतां ही प्रद्युम्नाचें चित्र पाहून लाजली व अनिरुद्धाचें चित्र पाहतांच लज्जेनें अधोमुख झाली. त्यावरून चित्रलेखेनें स्वप्नांतील पुरुष ओळखला. चित्रलेखेंत योगसामर्थ्य होतें, म्हणून ती तिसरे दिवशीं शोणितपुराहून द्वारकेस योगसामर्थ्यानें एका क्षणांत गेली. तेथून तिनें

त्याला ताब्यांत घेऊन व कृत्रिम अंधकारांत झांकून आणिलें (शिव. रुद्र. यु. ५३). तिनें रात्रीं पर्यंकासहित निद्रित अनिरुद्धास आणिलें. तेव्हां उषेस पराकाष्ठेचा आनंद होऊन हिनें चित्रलेखेच्या योगसामर्थ्याबद्दल आश्चर्य प्रगट केलें. पुढें हिनें अनिरुद्धाशीं गांधर्वविवाह केला व त्यासह गुप्तपणें चार महिनेपर्यंत सुखानें राहिली. एकदां हें बाणासुरानें हिच्या रक्षणास ठेविलेल्या सेवकांच्या नजरेस पडतांच त्यांनीं बाणासुरास सर्व सांगितलें. हें कळतांच बाणासुर उषेच्या महालांत येऊन पाहतो तों उषा व अनिरुद्ध द्यूत खेळत बसले आहेत. तेव्हां बाणासुराचा कोपाग्नि भडकून त्यांचें तेथें युद्ध झालें. त्यांत नागपाश टाकून बाणानें अनिरुद्धास कैद केलें. इकडे यादवांनीं अनिरुद्धाचा खूप शोध केला पण तो सांपडेना. इतक्यांत नारदानें येऊन त्यांस अनिरुद्ध कोठें आहे व बाणासुरानें त्याची काय अवस्था केली तें सांगितलें. बाणासुराचें व कृष्णाचें तुमुल युद्ध झालें. बाणाची बहुतेक सेना नष्ट झाली व कृष्णानें बाणासुराचे ४ हात ठेवून शेष हस्त तोडिले. तेव्हां बाणमाता कोटरा व रुद्र यांच्या विनंतीवरून बाणासुरास जीवदान दिलें. पुढें बाणासुरानें मोठ्या समारंभानें उषा अनिरुद्धास दिली. तेव्हां सर्व यादव परत द्वारकेंत आले (पद्म. उ. २५०; भा. १०. ६२-६३; शिव. रुद्र. यु. ५१-५९).

**उष्ण**—(सो. कुरु. भविष्य.) वायुमतें हा निर्वक्रपुत्र व विष्णुमतें हा निचंकुपुत्र.

**उह्वाक**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

## ऊ

**ऊरु आंगिरस**—मंत्रद्रष्टा (ऋ. ९. १०८. ४; ५).

**ऊर्ज**—स्वारोचिष मनूचा पुत्र. सप्तर्षींपैकीं एक.

२ उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ उत्तम मनूचा पुत्र.

४ सुधामन देवांतील एक.

५ (स्वा. उत्तान.) वत्सर व स्वर्वीथि यांचा पुत्र (भा. ४-८).

६ (सो. अज.) हा वायुमतें सुधन्वन् याचा पुत्र.

**ऊर्जयत्**—भानुमताचा शिष्य. याचा शिष्य सुशारद (वं. ब्रा. १).

**ऊर्जयोनि**—विश्वामित्राचा पुत्र (म. अनु. ७).

**ऊर्जवह**—(सू. निमि.) विष्णुमतें हा शुचिपुत्र होय.

**ऊर्जव्य**—यज्ञ करणाऱ्या एका यजमानाचें नांव (ऋ. ५. ४१. २०).

**ऊर्जस्वती**—(स्वा.) प्रियव्रत व बर्हिष्मती यांची कन्या. शुक्राची स्त्री (भा. ५. १. २४).

२ अष्ट वसूंतील एका प्राणवसूची स्त्री.

**ऊर्जस्विन्**—वैवस्वत मन्वंतरांतील इंद्र.

**ऊर्जा**— ही दक्षाची मुलगी व वसिष्ठाची स्वायंभुव मन्वंतरांतील पत्नी. हिला त्या वेळीं चित्रकेतु, सुरोचि, विरजामित्र, उल्बण, वसुभृत्, यान व द्युमान् असे सात पुत्र झाले (भा. ४. १. ३८). यापेक्षां वेगळी संततिहि आढळते. १ पुंडरिका, २ रक्षस (रत्न), ३ गर्त, ४ ऊर्ध्वबाहु, ५ सवन, ६ पवन, ७ सुतपस, ८ शंकु (ब्रह्मांड. २. १२. ३९-४३).

**ऊर्जित**—(सो. यदु.) कार्तवीर्याच्या प्रमुख पांचपुत्रांपैकीं एक.

**ऊर्ण**—पौषांतील सूर्याबरोबर फिरणारा यक्ष.

**ऊर्णनाभ**—(सो. कुरु.) धृतराष्ट्रपुत्र.

२. कश्यप व दनु यांचा पुत्र.

**ऊर्णनाभि**—अत्रिकुलोत्पन्न ऋषि.

**ऊर्णा**—स्वायंभुव मन्वंतरांतील मरीचिप्रजापतीची स्त्री.

२ (स्वा. प्रिय.) चित्ररथ राजाची स्त्री. हिचा पुत्र सम्राज् (भा. ५. १५. १४).

**ऊर्णायु**— याची स्त्री मेनका (म. उ. ११७). प्राधेपासून झालेल्या देवगंधर्वांतील एक.

**ऊर्ध्वकृशन यामायन**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १४४).

**ऊर्ध्वकेतु**—(सू. निमि.) सनद्वाज जनकाचा पुत्र. यांचा पुत्र अज.

२ कश्यप व सुरभि यांच्या पुत्रांपैकीं एक.

**ऊर्ध्वग**—कृष्ण व लक्ष्मणा यांचा पुत्र. एक महारथी.

**ऊर्ध्वग्रावन् आर्बुदि**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १७५).

**ऊर्ध्वदृष्टि**—पुलह व श्वेता यांचा पुत्र. याला पांच मुली व पांच मुलगे होते (ब्रह्मांड. ३. ७. २०५).

**ऊर्ध्वनाभा ब्राह्म**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १०९).

**ऊर्ध्वबाहु**—रैवत मन्वंतरांतल्या सप्तर्षींतील एक.

**ऊर्ध्वसद्मन् आंगिरस**—मंत्रद्रष्टा (ऋ. ९.१०८.९).

**ऊर्व**—च्यवनाचा पुत्र. यानें आपल्या मांडीपासून पुत्र उत्पन्न केला. त्याचें नांव और्व (पद्म. सृ. ४१; और्व पहा).

**ऊर्वशी**—(उर्वशी पहा).

# ऋ

**ऋक्ष**--( आर्क्ष व श्रुतर्वन् पहा ).

२ (सो. पूरु.) ऋचाचा पुत्र. याची पत्नी तक्षकाची कन्या ज्वलन्ती, याचा पुत्र अंत्यनार ( म. आ. ६३. २५; अंतिनार पहा ).

३ (सो. पुरूरवस्.) अजमीढ व धूमिनी यांचा पुत्र. याची स्त्री रथंतरी. याचा पुत्र संवरण (म. आ. १०१; चेक्षु पहा).

४ ( सो. कुरु. ) वायुमतें देवातिथिपुत्र.

५ शुकाचा पुत्र. याची स्त्री विरजा (ब्रह्मांड. ३.७.२११).

**ऋक्षदेव**--( सो. नील. ) शिखंडीच्या दोन पुत्रांतील एक. हा भारतीय युद्धांत पांडवांकडे होता. युद्धांत हा आपल्या रथाला सोनेरी रंगाचे अश्व जोडीत असे ( म. द्रो. २३ ).

**ऋक्षपुत्र**--( सो. ) भविष्यमतें अक्रोधनाचा पुत्र.

**ऋक्षरजस्**--एकदां मेरूवर ब्रह्मा ध्यानमग्न असतां त्याच्या नेत्रांतून पडलेले उदकबिंदु त्यानें हातांत घेऊन चोळले. तेव्हां त्या अश्रुकणांतून हा ऋक्षरजस् वानर उत्पन्न झाला. एकदां याला तृषा लागून हा सरोवरावर आला. त्यांतील प्रतिबिंब शत्रू समजून यानें युद्धार्थ तळ्यांत उडी टाकली. वस्तुस्थिति लक्षांत येतांच हा बाहेर आला. परंतु आपण पूर्वीचा वानर नसून आतां स्त्री झालों आहों असें याच्या लक्षांत आलें. त्याच वेळीं अंतरिक्षांतून इंद्र व सूर्य यांची दृष्टि याकडे जाऊन ते दोघेहि कामविव्हल झाले. कामविकाराच्या उत्कटतेमुळें इंद्राचें वीर्य हिच्या मस्तकावर पडलें व सूर्याचें हिच्या मानेवर पडलें. ( वाल ) केशांवर वीर्य पडल्यामुळें वाली व ( ग्रीवा ) मानेवर पडल्यामुळें सुग्रीव झाले. ती रात्र संपतांच ह्या स्त्रीला पुनरपि पूर्वीचें वानरस्वरूप प्राप्त झालें. तेव्हां हा आपलीं हीं दोन मुलें घेऊन ब्रह्मयाकडे आला व झालेली हकीकत सांगितली. ब्रह्मदेवानें ऋक्षरजाचें अनेक तऱ्हांनीं सांत्वन केलें व एका दूताकरवीं ऋक्षरजाला किष्किंधा नगरींत राज्याभिषेक केला. तेथें अनेक प्रकारचे वानर असून त्यांच्यांत चातुर्वर्ण्यव्यवस्था प्रचलित होती. कालांतरानें ऋक्षरजस् मरण पावला. याच्या पश्चात् वालीस राज्य मिळालें ( वा. रा. उ. प्रक्षिप्त ६ ).

**ऋक्षशृंग**--काशीच्या उत्तरेस मंदारवनांत तप करणाऱ्या दीर्घतपस्याचा धाकटा मुलगा. चित्रसेनाच्या बाणानें हा मेल्यानें सर्व कुटुंबानें देहत्याग केला. पण राहिलेल्या दीर्घतपस्नें सर्वांच्या अस्थि शूलभेद तीर्थांत टाकल्यामुळें सर्व स्वर्गास गेले ( स्कंद. ३. ५३-५५. ).

**ऋक्षा**--अजमीढाची स्त्री. हिचा पुत्र संवरण होय ( म. आ. ६३; ३ ऋक्ष पहा ).

**ऋच**--( सो. कुरु. भविष्य. ) विष्णुमतें सुनीथपुत्र ( रुच पहा ).

२ (सो. कुरु.) देवातिथि व मर्यादा यांचा पुत्र. याची बायको अंगराजकन्या वामदेवी. पुत्र ऋक्ष ( म.आ. ६३.२४ कुं. ).

**ऋची**--आप्नवानाची स्त्री ( ब्रह्मांड. ३.१.७४).

**ऋचीक**--भार्गवकुलांतील च्यवनवंशज एक प्रख्यात ऋषि (मनु. ४). और्वाचा पुत्र ( म.आ. ६६; वायु. २.४; ह. वं. १. २७). हा और्वाची मांडी फोडून बाहेर आला ( ब्रह्मांड. ३.१.७४-१०० ). हा ऊर्वाचा पुत्र आहे (म. अनु. ५६ ). यास काव्यपुत्र असेंहि म्हटलें आहे ( ब्रह्म. १० ). याचा और्व ऋचीक असा उल्लेख आहे ( विष्णुधर्म. १. ३२ ). तसेंच यास भृगुपुत्र, भार्गव, भृगुनंदन, भृगु असेंहि अनेकदां म्हटलेलें आहे ( म. व. ११५; ह. वं. १. २७; ब्रह्म. ३.१०; वा. रा. बा. ७५; पद्म. उ. २६८ ). कार्तवीर्याच्या वंशजांनीं अतिशय त्रास दिल्यामुळें सर्व भार्गव ऋषि मध्यदेशांत पळाले. त्या वेळीं किंवा किंचित् आधीं ऋचीक जन्मला व लवकरच त्यांचा मुख्य झाला. बाल्यावस्थेपासून यानें आपला काळ वेदानुष्ठान व तप करण्यांत घालविला. एकदां हा तीर्थयात्रा करीत असतां विश्वमित्री नदीच्या तीरीं यानें कान्यकुब्जराज गाधि याची कन्या स्नानास आलेली पाहिली. तिच्या रूपास मोहित होऊन यानें कान्यकुब्जराज गाधि याजजवळ तिला मागणी घालण्याचें ठरविलें. हेंहयाविरुद्ध गाधिराजाची मैत्री संपादन करण्याकरितां हा विवाह ठरविण्यांत आला. याप्रमाणें हा मागणी घालण्यास आला असतां राजास नाहीं म्हणवेना. तेव्हां त्यानें म्हटलें कीं तूं जर मला सहस्र श्यामकर्ण अश्व आणून शुल्क म्हणून देशील तर ही माझी कन्या मी तुला देईन ( म. अनु. ३१; विष्णु. ४. ७; भा. ९. १५ ). सातशें अश्व मागितले ( स्कंद. ६. १६६ ). पण वनपर्वांत राजा मुलगी देण्यास तयार झाला, पण रूढि म्हणून त्यानें एका कानानें श्याम असे हजार अश्व मागितले ( ११५ ). असें राजाचें भाषण ऐकतांच हा तत्काल त्या कान्यकुब्जदेशीय गंगेच्या कांठीं गेला व वरुणाची स्तुति करून त्याजपासून अवश्य तेवढे अश्व मिळविले ( म. व. ११५; अनु. ४). अश्वो वोढा ( ऋ. ९. ११२ ) या ४ ऋचांच्या सूक्ताचें पठण करून यानें ते अश्व मिळविले ( स्कंद. ६. १६६ ). जेथें हे अश्व निर्माण झाले तें कान्यकुब्जदेशांतील गंगानदीचे कांठचें अश्वतीर्थ प्रसिद्ध आहे.

अश्व घेऊन गाधिराजाने आपली कन्या सत्यवती यास दिली. याच्या लग्नांत देव याच्या बाजूचे वऱ्हाडी होते (म. व. ११५). ऋचीक ऋषि, सत्यवती भार्येस घेऊन निघाला व आश्रम करून गृहस्थधर्म चालवूं लागला. नंतर हा तपश्चर्येस निघाला असता यानें पत्नीस वर मागण्यास सांगितलें. तिनें स्वतःस व मातेस एक उत्तम लक्षणांनीं युक्त असा पुत्र मागितला. त्या तिच्या विनंतीनें संतुष्ट होऊन यानें ब्राह्मणोत्पत्तीसाठीं एक व क्षत्रियोत्पत्तीसाठीं एक असे दोन चरु सिद्ध करून तिला दिले (म. शां. ४९; अनु. ५६; वायु. २.४; ह. वं. १. २७; ब्रह्म. १०; विष्णु. ४. ७; भा. ९. १५). यानें चरु तर दिलेच, पण ऋतुस्नात झाल्यावर तुझ्या मातेनें पिंपळास व तूं उंबरास आलिंगन द्यावेंस असें सांगितलें (म. व. ११५; अनु. ४; विष्णुधर्म. १. ३२–३३). यानें दोन घट अभिमंत्रून देऊन सत्यवतीच्या मातेनें वडास व सत्यवतीनें पिंपळास सहस्र प्रदक्षिणा घालाव्या असें सांगितलें (स्कंद. ६. १६६–६७.). पुढें तीर्थयात्रा करीत करीत गाधि ऋचीकाचे आश्रमीं आला. तेव्हां सत्यवतीला पतीनें दिलेल्या चरूचें स्मरण झालें. पण आईच्या सांगण्यावरून दोघींनीं चरूंची अदलाबदल करून चरु भक्षण केले. अल्पच काळांत सत्यवतीकडे ऋचीकानें पाहिलें असतां त्यास चरूंचा विपर्यास झाल्याचें दिसून आलें. पण सत्यवतीच्या इच्छेप्रमाणें क्षत्रियस्वभावाचा पुत्र न होतां पौत्र होईल असें ऋचीकानें सांगितलें. नंतर सत्यवतीस जमदग्निप्रभृति शंभर पुत्र झाले. ते सर्व शांति इत्यादि अनेक गुणांनीं युक्त होते. पण जमदग्नीस रेणुकेपासून झालेला परशुराम उग्रस्वभावी झाला. इकडे गाधीस विश्वामित्र झाला व त्यानें आपल्या तपःसामर्थ्यानें पुन्हां ब्राह्मणत्व संपादिलें (म. आ. ६१; व. ११५; शां. ४९; अनु. ४; ५६; वायु. २.४; ह. वं. २७; ब्रह्म. १०; विष्णु. ४.७; भा. ९.१५; स्कंद. ६.१६६–१६७). नंतर सत्यवती कौशिकी नदी झाली (ह. वं. १. २७; ब्रह्म. १०; विष्णु. ४.७; वा. रा. बा. ३४). या ऋषीनें वडवाग्नि शोधून काढला (विष्णुधर्म. १.३२). याला शाल्वदेशाधिपति द्युतिमान् राजानें आपलें राज्य अर्पण केलें होतें (म. शां. २३४; अनु १३७). हा परशुरामाचा पितामह होय (पद्म. भू. २६८). ऋचीक भृगुतुंग पर्वतावर राहत असे (वा. रा. बा. १.६१). विष्णूनें वैष्णव धनुष्य यास ठेव म्हणून दिलें तें त्यानें जमदग्नीस दिलें (वा. रा. १.७५). हा धनुर्विद्येंत बराच प्रवीण होता (म. अनु. १३). याच्या वंशजास आर्चिक म्हणतात (ब्रह्म. १०). जमदग्नीखेरीज वत्स (विष्णुधर्म. १. ३२), शुनःशेप व शुनःपुच्छ (ह. वं. १. १७; ब्रह्म. १०) एवढींच नांवें आढळतात.

२ प्रथम मेरुसावर्णि मनूचा पुत्र.

**ऋचेयु**—(सो. पूरु.) रौद्राश्वाला घृताचीपासून झाला. याला तक्षककन्या ज्वलनेपासून अंतिनार झाला (२ ऋक्ष पहा).

**ऋजिश्वन्**—याला वैदथिन असें दोनदां (ऋ. ४. १६. १३; ५. २९. ११) व औशिज असें एकदां म्हटलें आहे (ऋ. १०. ९९. ११). हे निर्देश आईबापांच्या नांवांवरून आले असावेत. पिप्रूशीं झालेल्या युद्धांत इंद्रानें याला मदत केली (ऋ. १. ५१. ५).

**ऋजिश्वन् भारद्वाज**—सूक्तद्रष्टा (ऋ. ६. ४९–५२; ९. ९८; १०८).

**ऋजु**—(सो. वृष्णि.) भागवतमतें वसुदेवदेवकीना कंसानें मारलेला पुत्र. विष्णुमतें ऋभुदास, मत्स्यमतें ऋषिवास व वायुमतें ऋजुदाय अशीं नांवें आहेत.

**ऋजुदाय**—(ऋजु पहा).

**ऋजुनस्**—सोमयज्ञ करणाऱ्या महा लोकांबरोबर यानें नांव आहे (ऋ. ८. ५२. २).

**ऋज्राश्व**—अंबरीष, सुराधस, सहदेव व भयमान यांच्या बरोबर ह्याचा एक वार्षागिर म्हणून उल्लेख आहे (ऋ. १ १००. १६–१७). ह्याच पाच भावांच्या नांवावर वरील संपूर्ण सूक्त आहे. एकदां अश्वांचा वाहन असणारा गाढव लांडगीच्या रूपानें याच्याकडे आला. तेव्हां यानें तिला एकशे एक मेंढ्या खावयास दिल्या. तेव्हां नगरवासी लोकांची हानि केली, म्हणून वृषागिर राजानें याचे डोळे फोडून टाकले. तेव्हां ऋज्राश्वानें अश्विदेवांची स्तुति केल्यावरून त्यांनीं यास दृष्टि दिली. त्या लांडगीचें भाषणहि ऋग्वेदांत पुढीलप्रमाणें दिले आहे. 'हे शूर व पराक्रमी अश्विहो, ह्या ऋज्राश्वानें तरुण व कामी पुरुषाप्रमाणें मला एकशें एक मेंढे कापून घातले आहेत' (ऋ. १. ११६. १६; ११७. १७–१८).

**ऋणंजय**—एक व्यास (व्यास पहा).

**ऋणंचय**—हा रुशमांचा राजा होता. यानें बभ्रु नांवाच्या सूक्तकाराला मोठें दान दिलें. तेथें बभ्रु म्हणतो—रुशमांनीं मला चार हजार गाई दिल्या. नीटनेटक्या हजार गाईंसह चांगले घर दिलें (ऋ. ५. ३०. १२; १४). रुशम म्हणजे कोणता देश किंवा कोणते लोक हे सांगतां येत नाहीं. हा मंत्रद्रष्टा होता (ऋ. ९. १०८. १२).

**ऋत**—अंगिरसपुत्र देवांपैकीं एक.

२ (सू. निमि.) विजय जनकाचा पुत्र. याचा पुत्र शुनक.

३ रुद्रसावर्णि मनूचें नामांतर (मत्स्य. ९).

४ चक्षुर्मनु व नड्वला यांचा पुत्र.

५ आभूतरजस नांवाच्या देवांतील एक.

६ तुषित नांवाच्या देवांतील एक.

७ सुख नांवाच्या देवांपैकीं एक.

**ऋतजित्**—दुसऱ्या मरुद्गणांतील एक.

**ऋतंजय**—एक व्यास ( व्यास पहा ).

**ऋतधामन्**—(सो. वृष्णि.) कंकास कर्णिकेपासून झालेला पुत्र. कृष्णाचा चुलत भाऊ.

२ रुद्रसावर्णि मन्वंतरांत होणारा इंद्र.

३ तेराव्या मनूचें नामांतर ( मत्स्य. ९ ).

**ऋतध्वज**—( सो. काश्य. ) हा शत्रुजिताचा पुत्र. गालवानें कुवलय नांवाचा अश्व याला देऊन आपल्या आश्रमाची पीडा दूर करण्यास यास सांगितलें. एकदां सूकररूपानें आलेल्या पातालकेतूच्या मागें लागून हा एका खड्ड्यांत पडून पाताळांत गेला. तेथें विश्वावसु गंधर्वाची कन्या मदालसा पातालकेतूनें पळवून आणली होती. तिच्याशीं याचें लग्न झालें व तिला घेऊन हा घरीं आला. पुढें यमुनेच्या तीरावर राहणाऱ्या पातालकेतूच्या भावानें तालकेतूनें याला फसवून यज्ञाच्या दक्षिणेकरतां याच्या गळ्यांतील कंठा मागून घेतला. व याला आपल्या आश्रमांत ठेवून घेऊन घरीं मदालसेला ऋतध्वज मेल्याची बातमी कळवून खुणेकरतां मरतांना कंठा दिल्याचें सांगितलें. मदालसा सती गेली. ऋतध्वजानें अविवाहित राहण्याचें ठरविलें. पण मुलाच्या इच्छेवरून अश्वतर नागानें सरस्वतीपासून गानविद्या मिळवून शंकराला प्रसन्न केलें व त्यापासून पूर्वीसारखी पण योगी मदालसा कन्या म्हणून मागून घेतली व ती ऋतध्वजाला दिली. ऋतध्वजाला तिच्यापासून विक्रांत, सुबाहु, शत्रुमर्दन व अलर्क असे चार पुत्र झाले व त्यांना मदालसेनें योगमार्गाचा उपदेश केला ( मार्क. १८–३४; प्रतर्दन पहा ).

**ऋतंभर**—एक राजर्षि. जाबाली ऋषीच्या सांगण्यावरून यानें गाईंची मनोभावें सेवा केल्यामुळें यास सत्यवान् नामक पुत्र झाला ( पद्म. पा. २८ ).

**ऋतसेन**—मार्गशीर्ष महिन्यांतील सूर्यासमागमें फिरणारा एक गंधर्व.

**ऋतस्तुभ**—या ऋषीचें अश्वींनीं रक्षण केलें ( ऋ. १. ११२. २० ).

**ऋतायन**—शल्याच्या पित्याचें नांव.

**ऋतु**—फाल्गुन महिन्यांत सूर्यासमागमें फिरणारा एक यक्ष.

२ प्रतर्दन नांवाच्या देवांतील एक.

**ऋतुजित्**—( सू. निमि. )विष्णुमतें हा अंजनपुत्र होय. व भागवतमतें पुरुजित्.

**ऋतुधामन्**—चवथ्या मेरुसावर्णि मन्वंतरांतील इंद्र.

**ऋतुध्वज**—( ऋतध्वज पहा ).

**ऋतुपर्ण**—हा भंगाश्विन यांचा मुलगा आणि शफालचा राजा असावा ( बौ. श्रौ. २०. १२ ).' ऋतुपर्णकयोवभिंभंग्याश्विनी ' असा उल्लेख आहे ( आप. श्रौ. २१. २०. ३ ).

२ ( सू. इ. ) अयुतायुपुत्र ( वायु. २. २६; ब्रह्म. ८. ८०; ह. वं. १. १५ ). हा अक्षविद्येंत फार निपुण होता. नलाचा सारथी वार्ष्णेय हा याच्याकडे सारथी होऊन राहिला होता ( म. व. ६० ). याच्याचपाशीं अज्ञातवासकालीं नल हा बाहुक नांव धारण करून सारथी म्हणून राहिला. याचा खरा सारथी जीवल ( म. व. ६७ ). यानें नलास आपली अक्षविद्या दिली, व नलानेंहि यास आपली अश्वविद्या दिली ( म. व, ७२ ). हा वीरसेनपुत्र नल राजाचा मित्र होता. याला आर्तपर्णि नांवाचा पुत्र होता ( ब्रह्म. ८. ८०; ह. वं. १. १५ ). याचा सुदास हा पुत्र ( भा. ९.९. ). यास सर्वकाम अगर सर्वकर्मा या नामांतरानें नल पुत्र होता ( वायु. २. २७ ).

**ऋतुमंत**—मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**ऋतेयु**—( सो. पूरु. ) रौद्राश्व व घृताची यांच्या दहा पुत्रांतील ज्येष्ठ. यास औचेयु असें नामांतर आढळतें. याला तक्षककन्या ज्वलनेपासून अंतिभार झाला ( ऋचेयु पहा ).

**ऋशु**—हा क्षत्रिय असून ब्राह्मण व ऋषि झाला होता ( वायु. २. २९. ११४ ).

**ऋद्धि**—वैश्रवणाची स्त्री.

**ऋभु**—हे मानव होते. पण तप, यज्ञ वगैरे करून यांनीं देवत्व मिळविलें. पण देव यांना आपल्यांत घेईनात. शेवटीं प्रजापतीच्या सांगण्यावरून ऋभूंना सूर्याबरोबर सोमपान करण्याचा मान मिळाला. तरी देखील सर्व देव यांच्या ठिकाणीं मनुष्यत्वाचा वास येतो म्हणून ऋभूंचा फार तिरस्कार करूं लागले ( ऐ. ब्रा. ३. ३० ). एक ब्रह्ममानसपुत्र ( भा. ४. ८ ). यांचा शिष्य निदाघ. ऋभूनें निदाघास तत्त्वज्ञानाचा उपदेश केला आहे (विष्णु. २. १६; नारद. १. ४९). चाक्षुष व वैवस्वत मन्वंतरांतील देवांत ऋभु आहेत. ऋभुगीता नांवाचा सत्तावीस अध्यायांचा एक वेदान्तविषयक ग्रंथ आहे ( C. C. ).

**ऋभुदास**—( ऋजु पहा ).

**ऋश्यशृंग**—काश्यप विभांडकाचा पुत्र. एकदां विभांडक गंगेवर स्नानास गेला असतां तेथें उर्वशी त्याच्या दृष्टीस पडली. त्याबरोबर कामविकार उत्पन्न होऊन त्याचें रेत पाण्यांत पडलें. इतक्यांत शापानें हरिणी झालेली एक देवकन्या तेथें पाणी पितांना तें रेत पाण्याबरोबर तिच्या पोटांत गेलें. त्यापासून हा उत्पन्न झाला (म. व. ११०). सर्व आकार माणसासारखा पण डोक्यावर ऋश्य नांवाच्या मृगासारखें शिंग होतें, म्हणून यास ऋश्यशृंग असें नांव पडलें (म.व.११०). हा जन्मल्याबरोबर याची आई शापमुक्त होऊन स्वर्गी गेली. तेव्हां अनाथ असणाऱ्या ऋश्यशृंगाचें पालनपोषण विभांडकानें केलें व याला

वेदवेदांगांत पारंगत केलें. हा मृगयोनींतला असल्यामुळें भितरा होता. त्यामुळें आश्रमाच्या बाहेर कुठेंहि जात नसे. विभांडकाचीहि यास तशीच आज्ञा असे (वा. रा. बा. ९). त्यामुळें यानें पित्याशिवाय दुसरें माणूस पाहिलें नव्हतें (म. व. ११.१). त्या सुमारास अंग देशांत तेथील चित्ररथ राजाच्या चुकीमुळें अवर्षण पडलें. चित्ररथाची व दशरथाची मैत्री होती. हा ब्राह्मणाशीं खोटेपणानें वागल्यामुळें ब्राह्मणांनीं त्याचा त्याग केला. त्याबरोबर त्याच्या राज्यांत अवर्षण पडलें व लोकांना फार त्रास होऊं लागला. तेव्हां त्यानें इन्द्राला पाऊस पाडावयास लावणाऱ्या थोर थोर तपस्व्यांना विचारलें. तेव्हां त्यांपैकीं एकानें त्याला सांगितलें कीं, ब्राह्मण तुझ्यावर फार रागावले आहेत त्यांचें निराकरण कर. तेव्हां त्याला ऋश्यशृंग जर आपल्या राज्यांत येईल तर सर्वत्र सुबत्ता होईल असें कळलें. ऋश्यशृंगास आणविण्याकरितां मंत्र्यांशीं वाटाघाट करितां वेश्यांशिवाय दुसरा उपाय त्याला सुचेना. वेश्यांना विचारितां एका म्हाताऱ्या वेश्येनें तें काम अंगावर घेतलें व त्याप्रमाणें कांहीं तरुण वेश्या बरोबर घेऊन विभांडक आश्रमांत नसतां तिकडे जाण्याचें ठरविलें. त्याकरितां एका नौकेवर आश्रम बांधून ती नाव आश्रमाच्या जवळ उभी करून तिनें आपल्या मुलीच्या द्वारां मोठ्या युक्तीनें याला आपल्या पाशांत गुंतविलें. ऋश्यशृंगानें वेश्या मुनिकुमार आहेत असें समजून त्यांच्याशीं व्यवहार केला. दुसऱ्या एका खेपेला ऋश्यशृंगाला घेऊन त्या वेश्या अंग देशांत आल्या. तेव्हां अंग देशांत भरपूर पाऊस पडला. रोमपादानेंहि याला आपली शान्ता नांवाची मुलगी दिली व पुष्कळ नजराणे दिले. विभांडक मुलगा शोधीत तेथें आला असतां रोमपादाच्या देणग्यांनीं त्याचाहि राग शांत झाला व त्यानें ऋश्यशृंगाला एक मुलगा होईपर्यंत तेथेंच राहण्याची परवानगी दिली व आपण परत गेला. ऋश्यशृंगहि एक पुत्र झाल्यानंतर शान्तेसह आपल्या आश्रमांत परत गेला (म. व. १००-११३; वा. रा. बा. ९-१०). दशरथाचा पुत्रकामेष्टि यज्ञ करण्याकरितां रोमपादाच्या मध्यस्थीनें दशरथानें याला आपले यज्ञांत अध्वर्यु केलें. त्यामुळें दशरथाला रामलक्ष्मणादि पुत्र झाले (वा. रा. बा. ११). हा ऋश्यशृंग सावर्णि मन्वंतरांत सप्तर्षींतील एक होणार आहे (भा. ८. १३; विष्णु. ३. २). कौशिकी नदीच्या तीरावर ऋश्यशृंगाचा आश्रम होता. तेथें वनवासांत असतां धर्मराज आले. तेव्हां लोमशानें ऋश्यशृंगाची वरील माहिती धर्मराजाला सांगितली आहे. तेथें दशरथाचा उल्लेख नाहीं (ऋष्यशृंग पहा). यानें केलेले ग्रंथ—१ ऋश्यशृंगसंहिता, २ ऋश्यशृंगस्मृति, ऋष्यशृंगस्मृतीचा उल्लेख, विज्ञानेश्वर, हेमाद्रि, हलायुध वगैरेंनीं केला आहे (C.C.). आचार, अशौच, श्राद्ध आणि प्रायश्चित्त यांसंबंधींचे याचे विचार मिताक्षरा, अपरार्क, स्मृतिचंद्रिकादि ग्रंथांत दिलेले आढळतात. मिताक्षरेंत (याज्ञ. २. ११९) शंखाचा म्हणून दिलेला श्लोक अपरार्कानें (७२४) ऋश्यशृंगाचा म्हणून दिला आहे. एकाद्या पोटहिस्सेदारानें जर नष्ट झालेली समाईक मिळकत पुनः मिळविली तर त्यास त्यांतील चतुर्थांश मिळतो व राहिलेल्यांत बाकीच्यांचे हिस्से होतात, असें या श्लोकांत दिलेलें आहे. स्मृतिचंद्रिकेंत (१. ३२) याचा एक गद्य उतारा दिलेला आहे.

**ऋषभ**—(स्वा. प्रिय.) नाभी व मेरुदेवी यांचा पुत्र. यज्ञ नांवाच्या इंद्रानें याला आपली कन्या जयंती दिली होती व तिजपासून या राजास शंभर पुत्र झाले. त्यांतील श्रेष्ठ भरत होय. त्यांपैकीं ८१ पुत्र कर्ममार्गाचरण करणारे ऋषि झाले व कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन असे नऊ पुत्र ब्रह्मनिष्ठ होते. ऋषभदेवानें भरत, कुशावर्त, इलावर्त, ब्रह्मावर्त, मलय-केतु, भद्रसेन, इंद्रस्पृश, विदर्भ व कीकट अशा आपल्या अजनाभ वर्षाचे नऊ खंड करून त्यांना अधिपति केलें व अवशेष भागावरचें सार्वभौमत्व भरतास दिलें. यानें आपल्या प्रजा, धर्मानुकूल करून पुत्रांस ब्रह्मविद्येचा उपदेश केला (भा. ५. ३-६).

लहानपणीं ऋषभदेवाच्या हस्तपादादि अवयवांवर जन्मतः वज्र, अंकुश व ध्वज वगैरे चिन्हें दिसूं लागलीं होतीं. याचें ऐश्वर्य पाहून इंद्राचे मनांत हेवा उत्पन्न झाला. व तो याचे खंडांत पर्जन्यच पाडीनासा झाला. तेव्हां त्याचें कपट ऋषभदेवानें ओळखून आपल्या मायेच्या प्रभावानें आपल्या अजनाभ खंडावर पाऊसच पाऊस करून टाकला. नंतर ऋषभदेवानें ही कर्मभूमि आहे इकडे लक्ष देऊन प्रथम गुरुगृहीं वास्तव्य केलें. नंतर गृहस्थाश्रम स्वीकारला व शास्त्रोक्त रीतीनें यथासांग आचरण केलें. हा आत्मविवेकानें वागणारा होता. तरी हा ब्राह्मणांची अनुज्ञा घेऊन राज्य चालवी. कालांतरानें ब्रह्मावर्तीं आपल्या मुलांना म्हणून यानें जगाला ज्ञानोपदेश केला. त्या वेळीं हा घरांतच वेड्यासारखा दिगंबर व केस अस्ताव्यस्त सुटलेले असा राही. नंतर यानें संन्यास घेतला व ब्रह्मावर्तांतून निघाला. पुढें लोकांनीं कुठल्याहि तऱ्हेचा उपसर्ग दिला तरी तिकडे दुर्लक्ष करून हा स्वस्वरूपीं स्थिर राही. अशा आनंदमय स्थितींत हा पृथ्वीवर भटकत असे. पुढें यानें देहाचा त्याग करण्याच्या इच्छेनें तोंडांत एक दगड धरला व दक्षिणेंत कटक पर्वतावरील अरण्यांत भटकत असतां तेथें वणव्यानें ऋषभदेवाचें शरीर दग्ध झालें (भा. ५. ३-६). आपण विरक्त होऊन वनांत गेला व आपला श्वासोच्छ्वास मातीच्या विटेनें बंद करून देहत्याग केला. (विष्णु. २. १. ३२; मार्क. ५०). हा भगवंताचा आठवा

अवतार होता (भा. १. ३. १३.). यानें परमहंस दीक्षा घेतली होती (भा. २. ७. १०; अर्हत् पहा).

याचा अनुयायी व नातू सुमति. सुमतीला याचा अनुयायी म्हणून नास्तिक लोक देव मानूं लागले.

ऋषभकूट शृंगावर राहणारा एक रागीट ऋषि. याजकडे अनेक लोक येऊं लागल्यामुळें याला त्रास झाला. म्हणून यानें पर्वतास व वायूस आज्ञा केली कीं, इकडे कोणी येऊं लागल्यास त्यांवर तुम्ही पाषाणांची वृष्टि करावी व त्यांस मागें फिरवावें (म. व. ११०). यानें सुमित्र राजास आशा किती सूक्ष्म व मोठी असते यांविषयीं तनुवीरयुस्रसंवादरूपी दृष्टांत देऊन समजाविलें आहे. या ऋषीच्या या संवादास ऋषभगीता असें नांव आहे (म. शां १२५-१२८).

वाराहकल्पांतील वैवस्वत मन्वंतराच्या नवव्या चौकडींत व्यासाच्या निवृत्तिमार्गाचा प्रसार करण्याकरितां ऋषभ नांवाचा शिवाचा अवतार होणार आहे. त्याचें अनुक्रमें—१ पराशर, २ गर्ग, ३ भार्गव, ४ गिरीश असे शिष्य होतील. हा योगमार्गाचा उद्धार करणारा होईल (शिव. शत. ५. ३६-४८; भद्रायु पहा). भद्रायूच्या कथेवरून हा प्रवृत्तिमार्गी आहे.

२ स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ इंद्र आन्वियाचा पुत्र (भा. ६. १८. ७).

४ एक असुर. बृहद्रथ राजानें यास मारून याच्या कातड्याच्या दुंदुभि केल्या होत्या (म. स. १६-१७).

५ अंगिरावंशांतील धृष्णीचा पुत्र. याचा पुत्र सुधन्वा (ब्रह्मांड. ३. १. १०७). हा मंत्रकार होता (वायु. १. ५९. ९८–१०२).

६ (सो. अज.) भागवतमतें कुशाग्र राजाचा पुत्र. याला सत्यहित नामक पुत्र होता.

७ एक वानर. रामाच्या राज्याभिषेकाचे वेळीं यानें समुद्राचें उदक आणलें होतें व मत्त राक्षसास ठार केलें होतें (वा. रा. यु. ७१).

८ (सू. इ.) राम व अयोध्यापुरनिवासी सर्व जन निजधामास गेल्यानंतर ज्यानें पुनरपि त्या शून्य झालेल्या प्रदेशांत वसती केली तो राजा. (वा. रा.उ. १११).

९ (सो. वृष्णि.) वृष्णीचा पुत्र (पद्म. सृ. १३).

१० श्रीकृष्णाच्या पुत्रांपैकीं एक (भा. १. १४. ३१).

११ एका गोपाचें नांव. हा रामकृष्णांचा मित्र होता (भा. १०. २२).

१२ हा युधिष्ठिराच्या सभेंत होता (म. स. ११. २४ कुं.).

१३ आयुष्मान् व अंबुधारा यांचा पुत्र. दक्षसावर्णि मन्वंतरांत होणारा विष्णूचा अवतार (मनु पहा).

**ऋषभ याज्ञतुर**—विश्वामित्राचा पुत्र (ऐ. ब्रा. ७. १७). हा श्विक्नाचा राजा असून अश्वमेध करणारांपैकीं एक होता (श. ब्रा. १३. ५. ४. १५; सां. श्री. १६. ९. ८. १०; गौरिवीति शाक्त्य पहा).

**ऋषभ वैराज** किंवा **शाक्वर**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १६६).

**ऋषभस्कंध**—रामसेनेंतील एक वानर (वा. रा. यु. ४६).

**ऋषिकुल्या**—ऋषभदेववंशीय भूमाच्या दोन स्त्रियांतील एक. हिचा पुत्र उद्गीथ.

**ऋषिज**—उशिजाचें नामांतर.

**ऋषिमित्रवर**—अंगिरागोत्रांतील एक प्रवर.

**ऋषिमैत्रवर**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**ऋषिवान्मानव**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार व प्रवर.

**ऋषिवास**—(ऋजु पहा).

**ऋष्टिषेण**—एक आचार्य (नि. २. ११).

**ऋष्य**—(सो. पूरु.) अजमीढवंशीय जन्हूच्या कुलांतील देवातिथीचा पुत्र.

**ऋष्यशृंग काश्यप**—ह्यांत हा कश्यपाचा शिष्य असून काश्यप हें पैतृक नांवहि ह्याला आहे (जै. उ. ब्रा. ३. ४०. १; वं ब्रा. २; ऋश्यशृंग पहा).

**ऋष्यशृंग वातरशन**—मंत्रद्रष्टा (ऋ. १०. १३६. ७).

## ए

**एक**—(सो. पुरूरवस्.) रयाचा पुत्र.

**एकजटा**—सीतासंरक्षणार्थ असलेल्या राक्षसींतील एक (वा. रा. सुं. २३).

**एकत**—गौतमाचा ज्येष्ठ पुत्र (त्रित पहा).

**एकद्यू नोधस**—सूक्तद्रष्टा. याला अनुक्रमणींत नोधस नोधःपुत्र म्हटलें आहे (ऋ. ८. ८०).

**एकपर्णा**—हिमवानास मेनेपासून झालेल्या तीन कन्यांतील दुसरी. अपर्णा व पर्णा यांची भगिनी. ही असितऋषीची

स्त्री. हिला देवलनामक एक पुत्र होता ( ब्रह्मांड. ३. ८. २९-३३; १०. १-२१; ह. वं. १. १८ ).

**एकपातला**—हिमवानास मेनेपासून झालेल्या तीन कन्यांपैकीं एक. ही जैगीषव्याला दिली होती. पर्णलाच बहुधा हें नांव असावें. हिचे पुत्र शंख व लिखित. पण यांना अयोनिज असें विशेषण लावलें आहे ( ब्रह्मांड. ३. १०. २१; ह. वं. १.१८ ).

**एकपाद्**—कश्यपास कद्रूपासून झालेला पुत्र.

**एकपादा**—सीतासंरक्षणार्थ असणाऱ्या राक्षसींतील एक ( म. व. २८० ).

**एकयावन् गांदम**—एक आचार्य ( पं. ब्रा. २१. १४. २०; तै. ब्रा. २. ७. ११ कांदम ).

**एकलव्य**—व्याधांचा राजा, हिरण्यधनूचा याचा मुलगा. द्रोणाचार्यांनें द्रुपदाकडील मदतीची आशा संपल्यावर चरितार्थाकरितां भीष्माचे येथें त्याच्या नातवांना धनुर्विद्या शिकविण्याची नोकरी पत्करिली. धृतराष्ट्राचीं व पंडूचीं मुलें त्याचेजवळ विद्याध्ययन करूं लागलीं असतां कांहीं दिवसांनीं द्रोणाचार्यांच्या अध्यापनाच्या हातोटीबद्दलची कीर्ति चोहोंकडे पसरली. त्यामुळें द्रोणाचार्यांकडे धनुर्वेद शिकण्याकरितां देशोदेशींचे राजकुमार येऊं लागले. एकलव्यहि द्रोणाकडे विद्यार्जनाकरितां आला. परंतु हा व्याधपुत्र आहे असें जाणून द्रोणांनीं याला विद्या शिकविण्याचें नाकारिलें. तेव्हां एकलव्य कोणत्याहि तऱ्हेचा विषाद न बाळगितां द्रोणाचार्यांवर दृढ भाव ठेवून द्रोणास नमस्कार करून निघून गेला ( म. आ. १३२ ). द्रोणानें एकलव्यास विद्या शिकविण्याचें नाकारिलें तरीहि यानें आपला निश्चय न सोडतां द्रोणाची एक लहान मातीची प्रतिमा केली व हा माझा गुरु असा त्या प्रतिमेवर दृढ भाव ठेवून त्या प्रतिमेसमोर विद्येचा व्यासंग चालू ठेविला व विद्येंत प्रवीण झाला. द्रोणाचार्यांनेंहि आपल्या शिष्यांस उत्तम प्रकारें शिकविलें होतें. त्याची अर्जुनावर सर्व शिष्यांपेक्षां जास्त प्रीति होती व त्यानें अर्जुनास मी माझ्या इतर शिष्यांस तुझ्यापेक्षां पराक्रमी करणार नाहीं असें आश्वासन दिलें होतें. कांहीं दिवसांनीं द्रोणाचार्य सर्व शिष्यांसह कुत्रा वगैरे मृगयेची सामग्री घेऊन मृगयेस गेले. शिकार करीत असतां त्यांचा कुत्रा त्यांचेपासून बराच दूर असलेल्या एकलव्याजवळ गेला व बलाढ्य अशा त्या काळ्याकभिन्न व्याधास पाहून याजवर भुंकूं लागला. तेव्हां एकलव्यानें त्या कुत्र्यास मुळींच इजा न करितां त्याचें भुंकणें फक्त बंद रहावें या हेतूनें मोठ्या कुशलतेनें त्याचे तोंडांत सात बाण मारिले. तव्हां तो कुत्रा तसाच आपल्या धन्याकडे आला. त्या कुत्र्याकडे पाहून इतक्या कुशलतेनें लक्ष्यवेध करणारा हा कोण असावा म्हणून इकडे तिकडे पाहात असतां द्रोणास एकलव्य दिसला. एकलव्यहि द्रोणास पाहून त्यांना अभिवादन करून मी तुमचा शिष्य आहें असें म्हणाला. द्रोणास याच्या कौशल्याचें कौतुक वाटलें व हा अर्जुनापेक्षां खात्रीनें वरचढ आहे असें वाटून त्याला अर्जुनास दिलेलें वचन मोडतें कीं काय अशी भीति वाटली. परंतु त्यानें युक्ति करून एकलव्याजवळ गुरुदक्षिणेकरितां त्याच्या उजव्या हाताचा आंगठा मागितला व एकवचनी एकलव्यानें तो दिलाहि. परंतु त्यामुळें याची पूर्वीची चपलता गेली. एकलव्य हा भारतीय युद्धांत कौरवांचे बाजूनें होता. उजवा हात बहुतेक निरुपयोगी असतांहि यानें अत्यंत पराक्रम गाजविला. पुढें श्रीकृष्णानें यास मारिलें ( म. द्रो. १८१ ). यास केतुमान् नावाचा एक मुलगा होता, तो भीमाचे हातून मारला गेला ( म. भी.५४ ).

**एकलोचना**—सीतासंरक्षणार्थ असलेल्या राक्षसींतील एक ( म. व. २८० ).

**एकवीर**—( सो. तुर्वसु. ) हरिवर्मा राजास विष्णुप्रसादानें प्राप्त झालेला पुत्र. हा वाजीरूपधर विष्णूपासून, वडवारूप धारण केलेल्या लक्ष्मीच्या ठायीं उत्पन्न झाला होता. म्हणून यास हैहय असें नांव होतें. हा यदुकुलोत्पन्न हैहय राजाहून अगदीं भिन्न आहे. यास एकावली आणि यशोवती अशा दोन स्त्रिया होत्या व याची उपास्यदेवता एकवीरा देवी होती ( दे. भा. ७. १७-२३ ).

**एकराथ**—तक्षकाचा पुत्र अश्वसेन ( म. क. ९७ ).

**एकाक्ष**—दनु व कश्यप यांचा पुत्र ( म. आ. ६६ ).

**एकांगी**—एक गौळण. हिला गोव्रतानें ऐश्वर्य मिळालें ( स्कंद २. ४. ९ ).

**एकादशरथ**—( सो. यदु. ) वायुमतें दशरथ पुत्र.

**एकानंगा**—यशोदेची कन्या. कृष्णाची भगिनी.

**एकानेका**—अंगिरसाची कन्या. हिलाच कुहू असें दुसरें नांव आहे ( म. व. २२१ ).

**एकायन**—भृगुकुलांतील एक गोत्रकार. शाकायन असा पाठभेद आहे.

**एकावली**—एकवीर राजाची स्त्री. रम्य राजास रुक्मरेखेपासून झालेली कन्या.

**एकेपि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**एतश**—ऋग्वेदांतल्या एका ऋचेचा हा सर्वानुक्रमणीप्रमाणें द्रष्टा आहे ( ऋ. १०. १३६. ६ ). तेथें याला वातरशन म्हटलें आहे. एतशाला अग्नीचें आयुष्य या नांवाचे कांहीं मंत्र स्फुरले. तेव्हां यानें आपल्या मुलांस सांगितलें कीं, माझ्या म्हणण्यास व्यत्यय आणूं नका. कारण, हे मंत्र यज्ञांतील व्यत्यय व व्यंगें नाहींसे करणारे आहेत. परंतु हे मंत्र म्हणत असतां त्याच्या

[illegible] अलायिन नांवाच्या सूक्तानें यास विघ्न केलें. त्या असंबद्ध मंत्रावरून त्यास बाप वेडा झाला आहे असें वाटलें व त्यानें याच्या तोंडावर हात ठेवला. तेव्हां रागावून यानें त्यास तल्ला महारोग होईल असा शाप दिला ( ऐ. ब्रा. [illegible] ). हें एका ऋषीचें नांव आहे ( सां. ब्रा. ३. ५ ). ऐ. ब्रा.त एतश असा शब्द आहे. तथापि ही कथा एतशाची असावी. एतशायन हे औवींतील अत्यंत वाईट म्हणून वर्णिले आहेत. ऐताशप्रलाप सध्यां अथर्ववेदाचा भाग म्हणून प्रसिद्ध आहे आणि तो तसाच अद्यापिहि असंबद्ध आहे ( अ. वे. २०. १२९-१३२; बृहद्दे. ८. १०१ ). स्वश्वपुत्र सूर्याशीं युद्ध चालू असतां इंद्रानें एतशाला वांचविलें ( ऋ. १. ५४. ५; ६१. १५; ८. १४. १७ ). याला सूर्यानें जखमी केलें ( ऋ.८. १. १८ ).

**एतश वातरशन**—मंत्रद्रष्टा ( ऋ. १०. १३६.६ )

**एनक**—ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांतील एक ऋषि ( पद्म. सृ. ३४ ).

**एरक**—एक सर्प ( म. आ. ५७ ).

**एलपत्र**—एक सर्प.

**एलापुत्र**—कद्रूपुत्र ( नभ पहा ).

**एवयामरुत् आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५.८७ ).

**एवावद**—हें नांव क्षत्र, मनस व यजत यांसह आलें आहे ( ऋ. ५. ४४. १० ).

## ऐ

**ऐकादशाक्ष मानुतंतव्य**—सूर्योदयाबरोबर होम करणाऱ्या ( उदितहोमी ) राजाचें हें नांव आहे ( ऐ. ब्रा. ५. ३० ). हा नगरिन् जानश्रुतेय याचा समकालीन होता.

**ऐकोपि**—( आंगिरस पहा ).

**ऐक्ष्वाक**—हा शब्द ब्राह्मणग्रंथांत बऱ्याच व्यक्तींना लावलेला आढळतो. राजा हरिश्चंद्र हा वैधस ऐक्ष्वाक होता ( ऐ. ब्रा. ७. १३. १६ ). पुरुकुत्साला हें आनुवंशिक नांव आहे ( श. ब्रा. १३. ५. ४. ५ ). ऐक्ष्वाक वार्ष्ण नांवाच्या आचार्याचा उल्लेख आहे ( जै. उ. ब्रा. १. ५. ४ ). त्र्यरुण हा ऐक्ष्वाक होता ( पं. ब्रा. १३. ३. १२ ). हें नांव बृहद्रथाला लाविलें आहे ( मैत्र्यु. १. २; असमाति पहा ). ऋग्वेदांत इक्ष्वाकूचा उल्लेख आहे ( ऋ. १०. ६०. ४; भगेरथ पहा ).

**ऐक्ष्वाकी**—(सो.) भूमन्युपुत्र सुहोत्राची स्त्री. तिला सुहोत्रापासून अजमीढ, सुमीढ आणि पुरुमीढ असे तीन पुत्र झाले ( म. आ. ९४ ).

**ऐडविड**—इडविडेचा पुत्र कुबेर.

२ ( सू. इ. ) दशरथ किंवा शतरथाचा पुत्र.

**ऐतरेय**—सायणाच्या मतें इतरा नांवाच्या स्त्रीपासून झाल्यामुळें हें मातृक नांव पडलें आहे. ह्याचा ( ऐ. आ. २. १.८; ३. ७ ), छांदोग्योपनिषद् ( छां. उ. ३. १६. ७ ), यांमध्यें व आश्वलायनगृह्यसूत्रांतील ब्रह्मयज्ञांगतर्पणांत उल्लेख आहे ( आश्व. गृ. ३. ४. ४ ). ऐतरेयिन् ह्या स्वरूपांत अनुपदसूत्र ( ८. १ ); व आश्व. श्रौ. सूत्रांत ( १.३ ) उल्लेख आहे.

हा हारीत ऋषीच्या वंशांतील मांडूकिऋषीला इतरा नांवाच्या स्त्रीपासून झाला; म्हणून याचें नांव ऐतरेय पडलें. हा लहानपणापासून 'नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा जप करूं लागला. हा कोणाशीं बोलत नसे. म्हणून मांडूकीनें दुसऱ्या पिंगा नांवाच्या स्त्रीशीं विवाह केला. तिच्या पासून त्याला चार पुत्र झाले. ते विद्वान् असल्यामुळें त्यांची मानमान्यता झाली. इतरा आपल्या मुलाला म्हणाली, तुझा पिता तूं गुणी नसल्यामुळें माझा अपमान करितो. मी आतां देहत्याग करितें. तेव्हां ऐतरेयानें तिला धर्मज्ञान सांगून देहत्यागाच्या विचारापासून परावृत्त केलें. पुढें विष्णूनें त्या दोघांस साक्षात् दर्शन दिलें व आशीर्वाद दिला. पुढें श्रीविष्णूनें सांगितल्याप्रमाणें कोटीतीर्थावर होणाऱ्या हरिमेध्याच्या यज्ञांमध्यें जाऊन यानें वेदार्थाचें प्रवचन केलें. तेव्हां हरिमेध्यानें याचें पूजन करून याला आपली मुलगी दिली ( स्कंद. १. २. ४२; महीदास पहा ).

**ऐतश**—( एतश पहा ).

**ऐधन**—आभूतरजस् नांवाच्या देवगणांतील एक.

**ऐंद्र**—( अप्रतिरथ, जय, लव, वसुक्र, विमद, वृषाकपि, सर्वहरि पहा ).

**ऐंद्राश्व**—(सो.) भविष्यपुराणाप्रमाणें हा धनयातीचा पुत्र.

**ऐंद्रोति**—( दृति ऐंद्रोति शौनक पहा ).

**ऐभावत**—हें प्रतीदर्शाचें पैतृक नांव आहे. ( श. ब्रा. १२. ८. २.३ ).

**ऐरंमद**—( देवमुनि पहा ).

**ऐरावत**—धृतराष्ट्र नांवाच्या नागाचें हें पैतृक नांव आहे ( पं. ब्रा. २५. १५. ३ ). येथें वर्णिलेल्या सर्पसत्रांत हा ब्रह्मा नांवाचा ऋत्विज होता ( अ. वे. ८. १०. २९ ). नाग ह्या शब्दाचे सर्प व हत्ती असे दोन अर्थ होतात. त्यामुळें पुढच्या वाङ्मयांत इंद्राच्या हत्तीशीं याचा संबंध जोडला असावा ( जरत्कारु पहा ). कद्रूपुत्र नागांना ऐरावत म्हणतात. जनमेजयाच्या सर्पसत्रांत याचीं दहा कुळें दग्ध झालीं, त्यांचीं नांवें- पारावत, पारियात, पांडुर, हरिण, कृश, विहंग, शरभ, मेद, प्रमेद आणि संहतापन ( म. आ. ३५; स. ९; उ. १०३ कुं. ).

२ फाल्गुन महिन्यांत पर्जन्य नांवाच्या सूर्योदयाबरोबर फिरणारा नाग ( भा. १२. ११. ४० ).

**ऐरीडव**—अंगिरागोत्री एक ब्रह्मर्षि.

**ऐल**—( पुरूरवस् पहा ).

**ऐलाकि**—जावलाचें पैतृक नांव.

**ऐलविल**—( कुबेर पहा ).

**ऐलिक**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**ऐलूष**—कवषाचें हें पैतृक नांव आहे.

**ऐशिज**—एक ऋषि ( वायु. १. ५९. ९०-९१ ). ब्रह्मांडांत उशिज असा पाठ आहे.

**ऐश्वर**—( अग्नि पहा ).

**ऐषरथ**—( कुशिक पहा ).

**ऐषावीर**— एका यज्ञामध्यें हे याज्ञिक चालवीत, परंतु वाईट चालवीत ( श. ब्रा. ११. २. ७.३२ ). सायणाच्या मतें एषवीराचे वंशज अशा अर्थाचें विशेषनाम असून एषवीर ही एक ब्राह्मणांतील निंद्य जात आहे ( ऐ. ब्रा. ९. ५. १. १६; सां. ब्रा १. १ ).

**ऐषुमत**—त्रातांचें पैतृक नांव.

## ओ

**ओघ**—( सो. ) भविष्यपुराणाप्रमाणें कुंतिभोजाचा पुत्र. याचें राज्य प्रतिष्ठानांत होतें. यानें १०००० वर्षे राज्य केलें.

**ओघरथ**—( सू. नृग. ). ओघ राजाचा पुत्र. याचा पुत्र नृग ( म. अनु. २ ).

**ओघवत्**—( सू. नृग. ) प्रतीकाचा पुत्र ( भा. ९. २ ). याचा पुत्र ओघरथ व कन्या ओघवती ( म. अनु. २ ).

२ ओघवाताचा पुत्र ( भा. ९.२ ).

**ओघवती**—प्रतीकाची कन्या व सुदर्शनाची पत्नी ( भा. ९. २ ).

२ ( सू. नृग. ) ओघवत् राजाची कन्या. ओघरथाची भगिनी ( म. अनु. २ ).

**ओंकार**—हा एक शंकराचा अवतार आहे. विंध्याकरितां हा पृथ्वीवर आला. हा ओंकार मांधाता येथें लिंगरूपानें व पृथ्वीवर प्रणवरूपानें आहे ( शिव. शत. ४२ ). याचें उपलिंग कर्दमेश होय ( शिव. कोटि. १ ).

**ओज**—श्रीकृष्ण व लक्ष्मणाचा पुत्र ( भा. १०. ६१ ). हा महारथी होता.

**ओजस्**—वैशाख महिन्यांत अर्यमा नांवाच्या सूर्याबरोबर फिरणारा यक्ष ( भा. १२. ११ ).

**ओजस्विन्**—भौत्य मन्वंतरांतील मनुपुत्र.

**ओजिष्ठ**—पृथुक नांवाच्या देवगणांतील एक.

## औ

**औगज**—हा अंगिरसगोत्रांतलि एक मंत्रकार. यालाच ऋषिज व असिज अशीं नांवें आहेत.

**औग्रसेन्य**—युधांश्रौष्टीचें पैतृक नांव.

**औघरथ**—सूर्यवंशीय दुसरा नृगराजा. ओघरथाचा पुत्र.

**औचथ्य**—( दीर्घतमस् पहा ).

**औचेयु**—( ऋतेयु पहा ).

**औडुलोमि**—एक तत्त्वज्ञानी. ब्रह्मसूत्रांत याच्या मताचा अनेक वेळां मतभेदप्रदर्शनार्थ निर्देश आहे ( ब्र. सू. १. ४. २१; ३. ४. ४५; ४. ४. ६ ).

**औत्तम** किंवा **औत्तमी मनु**—उत्तानपादाचा पुत्र उत्तम व बभ्रुकन्या बाभ्रव्या यांचा पुत्र. उत्तमाचा पुत्र म्हणून यास औत्तम किंवा औत्तमी मनु म्हणतात ( मार्क. ६९ ). हा प्रियव्रताचा वंशज होता ( विष्णु. ३. १. २४ ). भागवतांत यास प्रियव्रताच्या दुसऱ्या स्त्रीचा पुत्रच म्हटलें आहे व नांव उत्तम असेंच दिलें आहे ( भा. ८. १. २३; मनु पहा ). यानें देवीची वाग्भव मंत्रानें तीन वर्षे उपवास करून उपासना केली ( दे. भा. १०. ८ ). हा तृतीय मन्वंतराधिप मनु आहे.

**औदन्य**—मुंडिभाचें पैतृक नांव आहे. हा भ्रूणहत्येचें प्रायश्चित्त सांगणारा म्हणून आला आहे ( तै. ब्रा. ३. ९. १५. ३ ). येथें याचें नांव औदन्यव असें दिलें आहे.

**औदमय**—हा अंग वैरोचनाचा पुरोहित होता ( ऐ. ब्रा. ८. २२ ) वेबरच्या पाठानुसार हें आत्रेयाचें नांव आहे. येथें उन्मय असा पाठ कांहीं प्रतींत आढळतो.

**औदवाहि**—हा भारद्वाजाचा गुरु ( बृ. उ. २. ५. २०; ४. ५. २६ ).

**औदुम्बरायण**—निरुक्तांत शब्दाच्या नित्यत्वाविषयीं बोलतांना शब्द अनित्य आहेत असें म्हणणारा म्हणून याचा उल्लेख आहे ( १. २. १ ).

**औद्दालकि**—हें असुरविंद ( जै. ब्रा. १. ७५ ) किंवा कुसुरविंद ( ष. ब्रा. १. १६; पं. ब्रा. २२. १५. १० ) या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या आचार्याचें व श्वेतकेतूचें ( श. ब्रा. ३. ४. ३. १३; ४. २. ५. १५ ) पैतृक नांव आहे. कठोपनिषदांतहि औद्दालकि हें नाचिकेतसला लावलेलें आहे ( १. ११ ).

**औद्भारि**—खंडिकाचें पैतृक नांव (श ब्रा. ११. ८. ४. ६).

**औपगव**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण. आपगव असा पाठभेद आहे.

**औपगवि**—उद्धवाचें नांव ( भा. ३. ४ ).

**औपजंघनि**—हा आसुरीचा शिष्य व याचा शिष्य त्रैवणि ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ).

**औपतस्विनि**—रामाचें पैतृक नांव ( श. ब्रा. ४. ६. १. ७ ).

**औपमन्यव**—हें नांव पुष्कळ अध्यापकांना लावलेलें आढळून येतें. एका मंत्राच्या पठणासंबंधीं यानें माहिती सांगितली आहे ( बौ. श्रौ. २. २. १ ). एक वैयाकरण आहे ( नि. १ १. ५; २. २. ११ इत्यादि ). पक्ष्यादिकांचीं जीं नांवें पडतात तीं त्या पक्ष्यांना जो ध्वनि असतो त्यावरून पडतात या मताला औपमन्यव यानें निषेध केला आहे ( कांबोज, प्राचीनशाल, महाशाल पहा ).

२ वसिष्ठगोत्री ऋषि.

**औपर**—दंडाचें पैतृक नांव.

**औपलोम**—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार ऋषिगण. अपलोम असा पाठभेद आहे.

**औपवेशि**—उद्दालकपिता अरुण याचें हें पैतृक नांव आहे ( क. सं. २६. १०; अरुण पहा ).

**औपशवि**—एक वैयाकरण ( शु. प्रा. ३. १३२ ).

**औपस्थल**—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार. जपस्वस्था असा पाठभेद आहे.

**औपस्वतीपुत्र**—पाराशरीपुत्राचा शिष्य ( बृ. उ. ६. ५. १ ).

**औपस्थव**—विश्वामित्रगोत्रांतील ऋषिगण.

**औपावि जानश्रुतेय**—एक राजर्षि ( श. ब्रा. ५. १. १. ५-७ ). यानें वाजपेय केला होता (मै. सं. १. ४. ५).

**औपोदिति**—कुरूंचा स्थपति ( सेनानी ) व्याघ्रपाद याचा मुलगा. गौपालायन याचें हें पैतृक नांव आहे ( बौ. श्रौ. २०. २५ ). उपोदिता नामक स्त्रीचा मुलगा ( श. ब्रा. १. ७. ४. १६ ). श. ब्रा. ची काण्वप्रत याचें नांव तुमिंज औपोदितेय वैयाघ्रपाद्य असें देते ( श. ब्रा. १. ९. ३. १६ ).

**औपोदितेय**—( औपोदिति पहा ).

**औरव**—( अग्नि पहा ).

**औरस**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें कुथुमीचा शिष्य (व्यास पहा).

**और्णवाभ**—कौण्डिण्याचा शिष्य (बृ. उ. ४. ५. २६ माध्यं.). निरुक्तांत हा दोन ठिकाणीं नैरुक्त नामक व्याकरणकारांच्या मताला अनुसरतो ( ७. १५; १२. १९ ). व दुसऱ्या दोन ठिकाणीं ऐतिहासिकांच्या मताचें अनुकरण करतो ( ६. १२; १२. १ ).

**और्व**—हा भृगुवंशांतील असल्यामुळें भृगूशीं याचा निकट संबंध होता ( ऋ. ८. १०२. ४ ). एतश और्वांपैकीं होता ( ऐ. ब्रा. ६. ३३; सां. ब्रा. ३०. ५ ). और्वांनें स्वतः अत्रीपासून पुत्र मिळविले होते ( तै. सं. ७. १. ८. १ ). दोन और्वांचा सन्मानानें उल्लेख आला आहे ( पं. ब्रा. २१. १०. ६ ) और्व ही भृगूंच्या मोठ्या कुलाची शाखा असावी. और्व, गौतम भारद्वाज या तीन गोत्रांचा उल्लेखहि आहे ( स. श्रौ. १. ४ ).

एक ब्रह्मर्षि ( भा. १. १९ ). च्यवन ऋषीची भार्या मनुपुत्री आरुषी हिचा पुत्र ( म. आ. ६६ ). याचें नांव ऊर्व

असें आहे ( म. अनु. ५६ ). हा आत्मवान् व नाहुषी यांचा पुत्र होय ( विष्णुधर्म. १. ३२ ).

कृतवीर्य नांवाचा एक हैहयवंशीय राजा होता. त्याचे उपाध्याय भृगुकुलोत्पन्न होते. कृतवीर्यानें पुष्कळ यज्ञ करुन भृगूंना पुष्कळ संपत्ति दिली होती. पुढें कृतवीर्याच्या वंशजांना द्रव्याची टंचाई भासूं लागली. तेव्हां त्यानीं आपल्या उपाध्यायाकडे द्रव्याची मागणी केली. कांहींनीं भीतीनें कांहीं दिलें व कांहींनीं जमिनींत पुरुन ठेविलें. एका भार्गव ऋषीचें घर खणून पाहतां कांहीं द्रव्य सांपडलें. त्याबरोबर कृतवीर्याचे वंशज संतापून गेले व भार्गव ऋषि शरण आले असतांहि त्यांची कत्तल सुरु केली. इतकेंच नव्हे तर गर्भांचाहि नाश सुरू केला. तेव्हां भयामुळें भृगुवंशांतील स्त्रिया हिमालय पर्वतावर निघून गेल्या. त्या जात असतां एका स्त्रीनें आपला गर्भ गर्भाशयांतून काढून मांडींत ठेविला. ही गोष्ट एका स्त्रीनें राजास कळविली. तेव्हां हैहय त्या गर्भाचा वध करणार तों शंभर वर्षे मांडींत राहिलेला तो गर्भ बाहेर आला. त्याच्या तेजानें ते क्षत्रिय नेत्रहीन झाले. पुढें त्या आंधळया क्षत्रियांनीं और्वास प्रसन्न हो म्हणतांच त्यांस दृष्टि प्राप्त झाली. हा मातेच्या ऊरुपासून निर्माण झाला म्हणून यांस और्व असें नांव पडलें ( म. आ. ६६; १७८–१७९; अनु. ५६ ).

मोठा झाल्यावरहि हैहयवंशीय राजांनीं आपल्या ज्ञातिबांधवांस त्रास दिला म्हणून यानें त्यांच्या संहारार्थ तप चालविलें. पण पितरांनीं याला आम्हांस मृत्यु यावा म्हणून आम्हीच हें अन्यायाचें कृत्य केलें. आम्ही मेल्याबद्दल तूं क्रोधाविष्ट होऊं नकोस म्हणून सांगितलें. तेव्हां पितरांच्या समाधानार्थ यानें आपला क्रोधाग्नि समुद्रांत सोडिला. वरील कथा पराशराला राक्षसांच्या नाशापासून निवृत्त करण्याकरितां वसिष्ठानें सांगितली ( म. आ. १७९-१८० ). याचें उग्र तप पाहून ब्रह्मदेवानें यास सरस्वतीकरवीं समुद्रांत टाकिलें व तेथें अग्नितीर्थ उत्पन्न झालें ( स्कंद पु. ७. १. ३५ ).

अयोध्याधिपति वृकपुत्र बाहु यास त्याच्या शत्रूंनीं–हैहय व तालजंघ यांनीं–राज्यच्युत केल्यावर तो याच्या आश्रमापाशीं आला असतां मृत्यु पावला. तेव्हां त्याची पत्नी सती जाऊं लागली. पण ती गरोदर आहे असें पाहून तिला और्वानें सती जाण्यापासून निवृत्त केलें. पुढें ती सगर नांवाचा पुत्र प्रसवली. या सगराला और्वानें अनेक अस्त्रांचें व शस्त्रांचें शिक्षण दिलें व रामाचें प्रख्यात आग्नेयास्त्र शिकविलें. नंतर सगरानें हैहय, तालजंघ, यवन या सर्वांस जिंकिलें. तेव्हां वसिष्ठानें त्यास राज्याभिषेक केला. राज्याभिषेकाचे वेळीं हा आला व यानें केशिनी व सुमति ( नारद. १.८ ), प्रभा व भानुमती ( लिंग. १. ६६ ), या सगराच्या पत्न्यांना संतानवृद्धिदायक वर दिले ( मत्स्य. १२; पद्म. सृ. ८; लिंग. १ ६६; नारद. १ ७-८; भा ९. ८; ९.२३ ). यानें सगराचा अश्वमेध केला ( भा. ९. ८ ).

याचा पुत्र ऋचीक ( म. आ. ६६; अनु. ५६ ). परीक्षितास शाप झालेला ऐकल्याबरोबर जे ऋषि त्यास भेटण्यास आले होते त्यांत हा एक होता ( भा. १. १९ ). और्व व ऋचीक एक होत ( विष्णुधर्म. २. ३२. ) याचें नांव अग्नि असें असून ऊर्वाचा वंशज असल्यामुळें यास और्व असें नांव पडलें असावें. तसेंच याचा काल जमदग्नीनंतर असावा ( कूर्म. १. २१ ). याच्या नांवाचा उर्वीवर म्हणजे पृथ्वीवर असणारा असा अर्थ असावा. और्व मध्यदेशांत राहिले व तेथेंच त्यांचीं लग्नें झालीं असावीं, असें जमदग्नि गंगातीरीं राहत असे अशा माहितीवरुन दिसतें ( पद्म. उ. २६८. ३. ). पण ब्रह्मांडांत हा नर्मदेवर होता असें दिसतें ( ब्रह्मांड. ३. २६; ४७ ). यानें सगरास मदत केली. पण रामायणांत भृगूनें मदत केली म्हणून दिलें आहे. हा शेवटचा और्व होय. सगरानें हैहयादिकांचा नाश केला असतां तो सर्व पराक्रम परशुरामानें केला असें म्हणतात. असें होण्याचें कारण और्वानें त्यास रामाचें आग्नेयास्त्र शिकविलें होतें. पण पुढें या दोन और्वांचा घोटाळा झालेला दिसतो. हा भृगुगोत्री असून मंत्रकार होता.

२ याचा पिता भृगुवंशीय ऊर्व हा तप करीत असतां सर्व देव व ऋषि यास भेटण्यास आले. नंतर ऋषींनीं यास विवाह करुन प्रजोत्पादन करण्याची विनंति केली. तेव्हां ‘ पत्नीशिवाय प्रजोत्पादन माझ्यासारख्या तपस्व्यास अशक्य आहे अशी या ऋषींची कल्पना आहे ’ असें यास वाटल्यावरुन ‘ हा पहा मी पुत्र उत्पन्न करितों, पण तो भयंकर होईल ’ असें यानें ऋषींस बजावून सांगितलें व आपली मांडी अग्नींत घातली. नंतर एका दर्भाच्या काडीनें तिचें मंथन करुन त्या मांडीपासून एक पुत्र निर्माण झाला. त्याचेंच नांव और्व होय ( मत्स्य. १७५ ). पुत्राबरोबर उत्पन्न झालेली माया ऊर्वानें हिरण्यकश्यपूस दिली ( पद्म. सृ. ३८; ब्रह्मांड. ३. १. ७४-१०० ). हा जन्मल्याबरोबर खावयास मागूं लागला व यानें जगताचा दाह करण्यास आरंभ केला. याप्रमाणें तीन दिवस दाह केल्यावर ब्रह्मदेव येऊन त्यानें ऊर्वाची प्रार्थना केली. व आपण जेथें राहतों त्या समुद्रांत या बालकास स्थान देण्याचें कबूल केलें व म्हणाला, ‘ मी व हा बालक युगांतीं सर्व पदार्थांचा नाश करूं. ’ असें कबूल केल्यावर हा और्वाग्नि आपलें तेज पितरांत टाकून समुद्रांत राहण्यास गेला ( मत्स्य. १७५; पद्म सृ. ३८-४१ ). हा विष्णुच होय ( म. व. १८९; ब्रह्मांड. ३.७२ ). हाच

युगांत प्रलयकारक, पातळांतील विषाग्नि, विष्णूच्या मुखांतून निघालेला व शंकराच्या तृतीय नेत्रांत राहणारा होय ( मत्स्य. २ ). यास वडवामुख, वडवानल, संवर्तक व समुद्रप हीं नांवें आहेत ( वायु. १. ४७ ). याचा पुत्र संवर्तक अग्नि होय ( मत्स्य. ५२ ). हाच और्वाग्नि होय.

३ मालव ( माळवा ) देशांत राहणारा एक ब्राह्मण, याच्या स्त्रीचें नांव सुमेधा, व मुलीचें नांव शमीका. आपल्या मुलीचें यानें शौनकाचा शिष्य व धौम्यसुत मंदार याच्याशीं लग्न लाविलें. विवाहोत्तर कांहीं दिवसांनीं आपली स्त्री मोठी झाली असें जाणून तिला तो नेण्याकरितां और्वाच्या घरीं आला. और्वानें दोघांस आनंदानें निरोप दिला. मार्ग क्रमीत असतां वाटेंत ते दोघे भृशुंडीस पाहून हंसले. त्याबरोबर त्यानें यांस 'वृक्ष व्हा' असा शाप दिला. त्याप्रमाणें हे वृक्ष झाले. और्व व शौनक शोध करीत असतां हे वृक्ष झाले असें त्यांस कळलें. तेव्हां त्यांना फार खेद झाला. त्यांनीं देवाची आराधना केली. और्व अग्निरूपानें शमीवृक्षांत राहिला व शौनक मंदाराची मुळी घेऊन त्याची गणेशाची मूर्ति बनवून तिचें पूजन करीत आश्रमीं गेला. दोघांच्या अनुष्ठानामुळें शमीमंदार गणेशास प्रिय झाला ( गणेश. २. ३६ ).

४ स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

५ सावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**और्वेय**—भृगुगोत्रांतील एक ऋषिगण.

**औलान**—सायणाचार्यानें कुरुकुलोत्पन्न शंतनूचा वंशज असा याचा अर्थ केला आहे. हें शंतनूचें नांव असण्याचा संभव आहे ( ऋ. १०. ९८. ११ ).

**औलुंडच**—हें सुप्रतीकाचें पैतृक नांव आहे ( वं. ब्रा. १ ).

**औशनस**—( उशनस् व षण्डामर्क पहा ).

**औशिज**—हा शब्द कक्षीवत्, ऋजिश्वन् व दीर्घश्रवस् यांना लाविला आहे.

**औशीनर** किंवा **औशीनरि**—उशीनरापासून माधवीस झालेला शिबि ( म. द्रोण. ५८ ). यास औशीनरि असेंहि म्हटलेलें आहे ( म. स. ८. कुं.; शां. २८. कुं. ).

**औषदश्वि**—( वसुमत् पहा ).

# क

**कंस**—( सो. वृष्णि. ) उग्रसेनाचा पुत्र. हा पूर्वजन्मीं कालनेमि असुर होता ( म. आ. ६८. ६७ कुं; भा. ९. ९. २४; १०. १. ६८; गर्गसंहिता १. ६ ). हा उग्रसेनाच्या बायकोला द्रुमिल नांवाच्या दानवापासून झाला ( ह. वं. २. २८ ). हा मोठा शूर, मल्लविद्याविशारद आणि सर्वशास्त्रपारंगत होता ( म. स. २३. ४ ). राज्य द्यावें, ह्या अटीवर याला जरासंधानें आपली मुलगी दिली होती. म्हणून याला सर्व मंत्रिमंडळानें मथुरेस राज्याभिषेक केला. वसुदेव हा याचा प्रधान होता. पण पुढें यानें बापाला तुरुंगांत टाकलें व हा वसुदेवाचेंहि ऐकेनासा झाला ( म. स. २३ ). बापाला तुरुंगांत टाकून यानें राज्य बळकाविलें ( भा. १०. १. ६९ ). कंस आणि वसुदेव हे दोघेहि यदुवंशांतर्गत वृष्णिवंशांतील असले, तरी त्यांचा संबंध वंशावळीवरून बराच दूर होता. पुढें कंसाच्या चुलत्याची मुलगी म्हणजे देवकाची मुलगी देवकी वसुदेवाला देण्याचें ठरलें. त्या लग्नानंतर देवकीला वसुदेवाकडे पोंहोंचवितांना हातांत लगाम घेऊन रथ हाकारण्याचें काम कंसानें आपल्याकडे घेतलें होतें. थाटानें वरात चालली असतां आकाशवाणी झाली कीं, "जिचा रथ तूं हाकारीत आहेस तिचा आठवा गर्भ तुला मारणार आहे." हें ऐकल्याबरोबर बहीणच नाहींशी केल्यावर आठवा गर्भ कोठून येतो ? असें योजून देवकीचे केश धरून हा तिला ठार करण्यास तयार झाला. तेव्हां वसुदेवानें सर्व मुलें तुझ्या स्वाधीन करीन, असें सांगून तिची कशी तरी सुटका करून घेतली. त्याप्रमाणें वसुदेवानें पहिला मुलगा आणूनहि दिला. पण आठव्यापासून भय आहे, पहिल्यापासून भय नसल्यानें यानें वसुदेवास तो परत नेण्यास सांगितलें. पण नारदानें यादवांबद्दल याचें मत कलुषित केल्यामुळें यानें वसुदेवदेवकीला पायांत बेड्या घालून बंदिवासांत टाकिलें व प्रत्येक मुलाला ठार मारण्याचा सपाटा चालविला. प्रलंब, बक वगैरे अनेक लोकांचें जरासंधाप्रमाणेंच याला साहाय्य होतें. यादवांपैकीं प्रमुख लोक मात्र याच्या त्रासानें कुरु, पांचाल, केकय, शाल्व, विदर्भ, निषध, विदेह, कोसल इत्यादि देशांत निघून गेले. कांहीं कंसाचें प्रेम संपादून राहिले ( भा. १०. २. ३–४ ). चाणूरादिक याला साहाय्य असणारे लोक यानें युद्धानेंच आपलेसे केले होते.

हा पूर्वजन्मीं कालनेमि होता. विष्णूशीं युद्ध करीत असतां मेला. पण शुक्रानें संजीवनीच्या साहाय्यानें जिवंत केला. तेव्हां

यानें विष्णूला जिंकण्याकरितां मंदरपर्वतावर तप करण्यास सुरुवात केली. दूर्वांचा रस पिऊन शंभर वर्षें दिव्य तप केल्यावर ब्रह्मदेव प्रसन्न झाला. तेव्हां देवांच्या हातून मृत्यु नसावा, म्हणून यानें वर मागितला. ब्रह्मयानें पुढील जन्मीं होईल म्हणून सांगितलें. नंतर यानें उग्रसेनाच्या पत्नीचे ठिकाणीं जन्म प्राप्त केला. पुढें जरासंध विजयाला निघाला असतां यमुनेच्या काठीं छावणी पडली होती. तेव्हां कुवलयापीड नांवाचा हत्ती साखळी तोडून छावणींतून पळाला व जेथें मल्लयुद्ध चालू होतें तेथें आला. तेव्हां सर्व मल्ल पळाले, पण कंसानें त्याची सोंड धरून त्याला जमिनीवर आपटलें, पुनः उचलून गरगर फिरविलें व शंभर योजनें दूर असलेल्या जरासंधाच्या छावणीवर त्यास फेंकून दिलें. असें अद्भुत सामर्थ्य पाहून जरासंधानें याला आपल्या अस्ति व प्राप्ति अशा दोन मुली दिल्या. चाणूर, मुष्टिक, कूट, शल, तोशलक हीं माहिष्मतीच्या राजाचीं मुलें मल्लयुद्धांनीं कंसानें ताब्यांत घेतलीं ( गर्गसंहिता १. ६. ७ ).

हा राज्यक्रांतीचा इतिहास आहे. वसुदेव हा उग्रसेनाचा सुप्रसिद्ध मंत्री होता. कंसानें तो अपाय करील व उग्रसेनाला गादीवर बसवील, म्हणून त्याला तुरुंगांत टाकलें व त्याचीं मुलें मारण्याचा सपाटा चालविला ( ह. वं. २. ३४; वायु. २. ३४. १७३; १७८ ). आठव्या खेपेला झालेल्या योगमायेकडून यास कळलें कीं, आपला शत्रु सुरक्षित वाढत आहे. तेव्हां याला पश्चात्ताप होऊन यानें वसुदेवदेवकीस बंधमुक्त केलें. पण मंत्र्यांशीं सल्लामसलत करून शत्रूला हुडकून काढून ठार करण्याच्या प्रयत्नाला जोरानें सुरुवात केली. वसुदेवाच्या बाकीच्या बायका गोकुळांत असल्यामुळें तिकडे स्वाभाविकच मोर्चा वळला; व त्या सुमारास जन्मास आलेल्या मुलांवर यानें विशेष नजर ठेवण्याची व्यवस्था केली. त्याप्रमाणें पूतनेपासून गोकुळावर अरिष्टें येण्यास सुरुवात झाली. पण त्या सर्व संकटांतून कृष्ण निभावला. शेवटीं कुस्त्यांची दंगल करून त्यांत आपल्या मल्लांकडून कृष्णाला मारण्याचा घाट यानें घातला. कृष्ण आणि बळराम हे नामांकित पहिलवान आहेत, अशी त्यांची प्रसिद्धि झाली होती. तिला अनुसरून धनुर्याग करून मल्लयुद्धाची जंगी दंगल करण्याचें यानें ठरविलें. तसेंच दिग्विजय करतांना परशुरामाचें धनुष्य कंसानें मिळविलें होतें तेंहि तेथें ठेवून जो कोणी चढवून दाखवील त्याला बक्षिस ठेवण्यांत आलें, तें कृष्णानें सहज चढविलें ( गर्गसंहिता १. ६ ) व अनेक वेळां फिरवून मोडून टाकिलें ( ह. वं. २. २७. ).

कंसानें दारावर एक माजलेला हत्ती माहुताला सूचना देऊन कृष्णाला मारण्याकरितां ठेविला होता. कृष्णानें त्याला त्याच्याच दांतानें मारून महाताालाहि मारिलें. नंतर कृष्णानें चाणूर व तोशलक व बळरामानें आंध्रमल्ल मुष्टिक यांना मल्लयुद्ध करून मृतप्राय केलें व नंतर कंसावर वेगानें हल्ला चढवून याचे केश धरून सिंहासनावरून फरफटत खालीं ओढून याचा प्राण घेतला. कंसाच्या अंगावर कृष्णाच्या नखांनें खूप ओरखाडे उठले होते. ही गोष्ट कृष्णानें इतक्या चलाखीनें केली कीं, विजयी कृष्णाच्या जयजयकारांत काय झालें हें कोणाच्या ध्यानींहि आलें नाहीं ( ह. वं. २. २८-३० ). तसेंच कंसाच्या कंक, न्यग्रोधादि आठ भावांचाहि कृष्णानें तात्काळ वध केला ( भा. १०. ४४. ४० ).

**कंस वारकि**—हा दक्ष कात्यायनि आत्रेयाचा शिष्य होय ( जै. उ. ब्रा. ३. ४१. १; ४. १७. १ ).

**कंस वारक्या**—हा प्रोष्ठपाद वारक्याचा शिष्य आहे ( जै. उ. ब्रा. ३. ४१. १ ).

**कंसवती**—उग्रसेनाची कन्या व कंसाची भगिनी. ही वासुदेवाचा कनिष्ठ भ्राता देवश्रव्याची स्त्री असून हिला त्यापासून सुवीर आणि इषुमत् असे दोन पुत्र झाले (भा. ९. २४).

**कंसा**—उग्रसेनाची कन्या. वासुदेवभ्राता देवभागाची स्त्री. हिला त्यापासून चित्रकेतु, बृहद्बल व उद्धव असे तीन पुत्र झाले ( भा. ९. २४ ).

**कंसारी**—याज्ञवल्क्याची बहीण. हिला बृहस्पतिशापानें याज्ञवल्क्याच्या वीर्यानें पिप्पलाद झाला (याज्ञवल्क्य पहा).

**ककुत्स्थ**—( सू. इ. ) शशादविकुक्षीचा पुत्र. सांप्रतच्या पुरंदर इंद्राचें दैत्यांशी युद्ध चाललें असतां त्यानें यास आपल्या साहाय्यास बोलाविलें होतें, त्या वेळेस यानें इंद्रास वृषभ करून त्यावर आरोहण केलें व दैत्यांचीं पुरें जिंकिलीं. म्हणून यास असें नांव पडलें. यास क्वचित् इंद्रवाह, पुरंजय अशींहि नामांतरें आढळतात ( भा. ९. ६ ). चंद्रवाह असेंहि म्हटलें आहे ( दे. भा. ७. ९ ). यानें पापनाशिनी एकादशीचें व्रत केलें (पद्म. स्व. ३८). भविष्यमतें रिपुंजयाचा पुत्र. यानें ३५७०० वर्षें राज्य केलें. याच्या पुत्राचें नांव अनेनस् ( म. व. २०५ कुं. ).

**ककुदि**—मरीचिगर्भदेवांपैकीं एक.

**ककुद्मिन् रैवत**—( सू. नरिष्यंत. ) रेवत राजाचा मुलगा. याला रेवती नांवाची मुलगी होती. तिला घेऊन हा ब्रह्मदेवाकडे तिच्याकरतां वर विचारण्याकरितां गेला. तेथें गाणें चाललें होतें, म्हणून क्षणभर थांबला. नंतर ब्रह्मदेवाला यानें विचारलें. तेव्हां तो हंसून म्हणाला कीं, तूं येथें आल्यावर पृथ्वीवर चार युगांच्या सत्तावीस फेऱ्या झाल्या. सांप्रत द्वापारयुगांत परमेश्वरअंशानें बलराम अवतरला आहे, त्याला ही कन्या दे (भा. ९. ३ ). याला रैवत म्हणत असत ( विष्णु. ४. १. २० ). हा शंभर भावांत वडील होता. व याची राजधानी कुशस्थली होती.

पण हा परत आला, तेव्हां कुशस्थलीची द्वारका झाली होती ( ब्रह्मांड. ३. ६१. २२; वायु. २. २४. २७ ).

**ककुभ्**—धर्म ऋषीच्या अरुंधती नांवाच्या स्त्रीचें नामांतर. ( अरुंधती पहा ). ही दक्षकन्या होय ( भा. ३. ६ ).

**कक्षसेन**—असित पर्वतावर राहणारा एक राजर्षि ( म. अनु. १३७ कुं. ).

२ युधिष्ठिराच्या सभेमधील एक क्षत्रिय ( म. स. ४ ).

३ यमसभेमधील एक क्षत्रिय ( म. स. ८. कुं ).

४ एक राजर्षि ( म. अनु. २०० कुं ).

**कक्षीवत्**—हा दीर्घतमस्‌चा मुलगा. याच्या आईचें नांव उशिज्. याला औशिज म्हटलें आहे ( ऋ. १. १८. १; दीर्घतमस् पहा ). याच्या बायकोचें नांव वृचया ( ऋ. १.५१. १३ ). स्वनय भावयव्यानें याला देणगी दिली होती ( ऋ. १. १२५; १२६; सां. श्रौ. १६.४.५ ). आयवस व मशशीर यांच्या तीन मुलांनीं कक्षीवतास त्रास दिला होता. हा पज्रकुलांतील होता म्हणून आपणास पज्रिय म्हणवून घेतो ( ऋ. १. ११६. ७; ११७.६ ). पज्रहि म्हटलें आहे ( ऋ. १. १२६.४; पं. ब्रा. १४. ११. १६ ). लग्नाच्या वेळीं याचें वय बरेंच असावें ( ऋ. १. ५१. १३ ). हा बराच वृद्ध झाला असावा ( ऋ. ९. ७४.८ ). ऋग्वेदांतहि हा पुरातन समजला जात असे ( ऋ. १. १८. १; ४. २६. १). दीर्घतमस् आणि कक्षीवत् यांचा ऋग्वेदांत एका ऋचेंत उल्लेख आहे ( ऋ. ८. ९. १० ). हा क्षत्रिय असून तपानें ब्राह्मण व ऋषि झाला होता ( वायु. २. २९. १००; ११८ ). याला घोषा नांवाची एक मुलगी होती. एका सूक्तानें अश्वींना प्रसन्न करून यानें उत्तम लोक मिळविला (ऋ. १. १२०; ऐ. ब्रा. १. २१; जै. ब्रा. १. ६. ११). हा सूक्तद्रष्टा आहे ( ऋ. १. ११६-१२५; १२६. १-५; ९. ७४ ). विद्या शिकून घरीं परत जात असतां वाटेंत स्वनय भावयव्याची व याची भेट झाली. अंगिरसकुलांतील औचथ दीर्घतमस्‌चा हा मुलगा आहे असें समजल्यावर त्यानें आपल्या दहा मुली व खूप संपत्ति दिली. तेव्हा यानें त्याची प्रशंसा केली ( बृहद्दे. ३. १४१–१५० ). काक्षीवत्, औशिज किंवा कक्षीवत् हें नांव पुढील ग्रंथांतहि आहे ( म. स. ४. २३; ७१८; अनु. २७१. ३७ कुं. ). अंगिरसकुलांतील मंत्रकारांत याचें नांव आहे ( दीर्घतमस् पहा ).

२ भीष्माला भेटण्याकरितां आलेला एक ऋषि ( भा. १. ९ ).

**कक्षेयु**—( सो. पुरूरवस्. ) हा विष्णुमतें रौद्राश्वपुत्र व मत्स्यमतें भद्राश्वपुत्र होय.

**कंक**—वाराहकल्पांतील वैवस्वत मन्वंतरांत हा शंकराचा अवतार आहे. याला पुढीलप्रमाणें चार पुत्र आहेत. सनक, सनातन, सनंदन, सनत्कुमार. हा निवृत्तिमार्गी असून यानें तत्कालीन सवितृ व्यासाला साहाय्य केलें (शिव. शत. ४).

२ वृष्णिवंशांतील एक क्षत्रिय ( म. आ. २०१ ).

३ म्लेच्छ राजांचा वंश. यांचा पराभव दुष्यंतपुत्र भरतानें केला ( भा. ९. २० ).

४ (सो. यदु. ) शूर राजास, मारीषा अथवा भोजा हिजपासून झालेल्या दहा पुत्रांतील सातवा. वसुदेवाचा भ्राता. यास कर्णिका स्त्रीपासून ऋतधामन्‌व जय असे दोन पुत्र झाले होते ( भा. ९. २४ ).

५ (सो. वृष्णि.) उग्रसेनाच्या नऊ पुत्रांतील चवथा. कंसाचा कनिष्ठ भ्राता. बलरामानें याचा वध केला ( भा. ९.२४ ).

६ अज्ञातवासकालीं विराटगृहीं प्रवेश करतांना युधिष्ठिरानें आपणास धारण केलेलें नांव ( म. वि. १; ७ ). हा विराटाचा सभासद असून, त्याच्याशीं अक्षक्रीडा करीत असे. दक्षिणगोग्रहणकालीं विराट राजा सुशर्म्यावर चालून गेला असतां त्यानें यास समागमें घेतलें होतें. व तेथें सुशर्मा त्यास बांधून नेत असता, त्यापासून यानें आपल्या भ्रात्यांकडून त्याची मुक्तता करविली होती ( विराट पहा ).

७ कलियुगांतील सोळा राजांचा एक वंश (भा. १२. १).

**कंकट**—कटुबद्दल पाठभेद.

**कंकतीय**—हें एका कुलाचें नांव आहे. हें कुल शांडिल्य ऋषीपासून अग्निचयन करण्यास शिकलें (श. ब्रा. ९. ४. ४. १७ ). एका कंकटी ब्राह्मणाचा उल्लेख आपस्तंब श्रौतसूत्रांत ( १४. २० ४. ) आला आहे. कदाचित् बौधायन श्रौतसूत्रांतील ( २५. ६ ) छागलेय ब्राह्मणांत उल्लेखिलेला हाच ब्राह्मण असेल.

**कंकसुद्र**—ऋग्वेदी ब्रह्मचारी.

**कंका**—उग्रसेनाची कन्या व कंसाची भगिनी. वसुदेवाचा भाऊ आनक याची ही स्त्री होती.

**कंकी**—( सो. कुकुर. ) ही विष्णुमतें उग्रसेनकन्या होय.

**कच**—एक महर्षि (म. अनु. २६.). चालू मन्वंतरांतील अंगिरापुत्र बृहस्पतीचा पुत्र. परंतु याची माता कोण हें कांहीं सांगतां येत नाहीं. कारण, बृहस्पतीच्या शुभा व तारा या दोन्ही स्त्रियांच्या संततीत याचें नांव मुळींच नाहीं. एकदां देवदैत्यांचें त्रैलोक्याचें आधिपत्य व ऐश्वर्य प्राप्त व्हावें, म्हणून तुमुल युद्ध झालें. त्यांत दैत्यांचा गुरु शुक्राचार्य यास संजीवनी विद्या माहीत असल्यामुळें तो मृत राक्षसांस तत्काळ उठवी. त्यायोगानें दैत्यांचें बळ कमी होत नसे. पण देवगुरु बृहस्पतीला ही विद्या येत नसल्यानें देवांचें मात्र फार नुकसान

होई. म्हणून इंद्रानें व इतर देवांनी कचाची प्रार्थना करून त्यास सांगितलें कीं, तूं शुक्राचार्य व त्याची तरुण कन्या देवयानी हिचें मन खूष करून संजीवनी विद्या शिकून ये. तुझें शील, तुझं सौंदर्य, तुझें माधुर्य, तुझा मनोनिग्रह आणि तुझें आचरण हीं देवयानीला प्रसन्न करण्याचीं सर्व साधनें तुजजवळ आहेत. देवयानीस वश करण्याचें कारण, ती प्रसन्न झाली कीं, विद्याप्राप्तीला काय उशीर? कारण, देवयानी म्हणजे शुक्राचा दुसरा प्राणच आहे. असें सांगितल्यावर देवांनीं यास आशीर्वाद दिल्यावर कच देवांकडून निघून विद्या संपादन करावी, म्हणून शुक्राचार्याकडे आला. शुक्राचार्यांनें याची, तूं कोण? कोठून आलास? अशी विचारपूस केल्यावर यानें फार नम्रत्वानें मी बृहस्पतिपुत्र कच आपणांकडे विद्या संपादण्यासाठीं आलों आहें असें सांगितलें. शुक्राचार्यानें याला अतिथि म्हणून व गुरुपुत्र असल्यामुळें वंदनीय म्हणून, ठेवून घेतलें. तदनंतर हा तेथें गुरुभक्तीनें व ब्रह्मचर्यानें सेवा करीत राहिला. शुक्राचार्याची तरुण कन्या देवयानी हिचें मनोरंजन करण्याकरितां कच गाणें, वाद्यें वाजविणें, नाचणें, पुष्पेंफळें आणणें, तिनें सांगितलेलीं कामें करणें व गाई चारणें इत्यादि कामें करीत असे. याप्रमाणें यानें शुक्राचार्य व त्याची प्रिय कन्या देवयानी यांची कोठेंहि न्यूनता न पडूं देतां कडकडीत ब्रह्मचर्यव्रतानें ५०० वर्षे उत्तम सेवा केली. त्यायोगानें याच्यावर आचार्याची वृत्ति सुप्रसन्न असून देवयानीस तर हा आपला बहिश्चर प्राण वाटूं लागला.

देवगुरु बृहस्पतीचा पुत्र कच आपल्या आचार्यासमीप विद्यासंपादनार्थ येऊन राहिला आहे, तेव्हां हा संजीवनी विद्येच्याच हेतूनें आला असावा, असें दैत्यांस वाटून त्यांनीं याचा नाश करण्याचें ठरविलें. पुढें एके दिवशीं त्यांनीं यास गायी चारतांना पाहिलें. मग त्यांनीं क्रोधावशात् यास धरिलें व याच्या शरीराचे खंडशः तुकडे करून व लांडग्यांकडून खाववून ते आपापल्या स्थानीं निघून गेले. इकडे त्या दिवशीं सूर्य अस्तास जाऊन रात्र झाली तरी कच आला नाहीं, असें पाहून देवयानीनें तें वृत्त पित्यास कळविलें. त्यावरून शुक्राचार्यानें संजीवनी विद्येचा प्रयोग केला. लागलीच लांडग्यांचीं शरीरें फाडून कच सजीव होऊन आचार्य व देवयानी यांच्या समोर उभा राहिला. कच आला असें पाहून देवयानीनें यास विलंब लागण्याचें कारण विचारलें. तेव्हां यानें दैत्यांनीं केलेला सर्व प्रकार सांगितला. पुनः देवयानीच्या सांगण्यावरून एकदां कच अरण्यांत गेला असतां या राक्षसांच्या दृष्टीस पडला. पुनः त्याचे तुकडे करून त्यांनीं समुद्रामध्यें टाकून दिले. त्या वेळेसहि देवयानीनें पित्यास सांगून पूर्ववत् यास सजीव करविलें. तिसऱ्या वेळीं राक्षसांनीं यास मारून व याचें पीठ करून तें जाळलें आणि सुरेच्या पेयांत ती राख मिसळून तीच पेला शुक्राचार्यास पिण्याकरितां दिला व आपापल्या गृहीं गमन केलें. नंतर दिवस मावळून रात्र झाली, तरी कच आला नाहीं, असें पाहून देवयानीनें पित्यापाशीं कच अजून आला नाहीं, त्यावरून त्यास दैत्यांनीं मारलें असावें; तेव्हां त्यास सत्वर जिवंत करून आश्रमीं आणावें असा अतिशय हट्ट धरला. तेव्हां शुक्राचार्य देवयानीस म्हणाला, जिवंत केला तरी कच पुनः पुनः मरतो, याला आपण तरी काय करावें? तूं अशी रडूं नको. त्याच्या मरणाचा आतां कांहीं एक खेद करण्याचें प्रयोजन नाहीं. हें ऐकून देवयानीनें याच्या रूपगुणांचें रसभरित वर्णन केलें व शोकावेगानें ती प्राणत्यागास प्रवृत्त झाली. देवयानीचा आततायीपणा पाहून शुक्राचार्यानें असुरांस बोलावून आणलें व "माझ्याकडे शिकण्यास आलेल्या शिष्यास मारून टाकून तुम्ही मला अब्राह्मण करूं इच्छितां काय? तुमच्या पापाचा घडा भरला. प्रत्यक्ष इंद्रादिकांचाहि घात करण्यास ब्रह्महत्या चुकत नाहीं, मग तुमची काय कथा?" असें त्यांना रागानें सांगून शुक्राचार्यानें कचास हांक मारली. तेव्हां संजीवनीविद्येच्या सामर्थ्यानें शुक्राचार्याचे उदरांत जिवंत झालेल्या कचानें दैत्यांनीं आपणांस कसें मारलें व आपण पोटांत कसे आलों हें सांगितलें. नंतर हा म्हणाला, "गुरुहत्या लागूं नये म्हणून व देवयानीचें, माझें व सकल विश्वाचें अकल्याण होऊं नये म्हणून मी गर्भवासच पत्करतों." तेव्हां शुक्राचार्यानें देवयानीला, तुला कच हवा असेल तर माझा वधच झाला पाहिजे, अगर मी पाहिजे असेन तर उदरगत कच बाहेर येणें अशक्य आहे, असें सांगितलें. तेव्हां देवयानीनें, तुम्ही दोघेहि मला प्रियच आहां. तुम्हांपैकीं कोणाचाहि विरह मला दुःखद होणार, असें सांगितलें. तेव्हां प्रथमतः शुक्राचार्यानें कचास उदरांत संजीवनी विद्येचा उपदेश केला व बाहेर आल्यावर आपणांस सजीव करण्यास सांगितलें. नंतर विद्या प्राप्त झालेला कच शुक्राचार्याचें उदरविदारण करून बाहेर आला व यानें त्याच विद्येनें लागलीच शुक्राचार्यास सजीव केलें. आपला पिता शुक्राचार्य व कच या दोघांसहि सजीव पाहून देवयानीस पराकाष्ठेचा आनंद झाला. सुरापानामुळें कचाची राख आपण पीत असतांहि समजली नाहीं, याबद्दल फार वाईट वाटून व सुरादेवीवर रागावून शुक्राचार्यानें मद्यपानाविषयीं खालील निर्बंध घातला. "जो ब्राह्मण आजपासून पुढें व्यसनी लोकांच्या भिडेस पडून मोहानें किंवा मूर्खपणानें सुरापान करील, तो धर्मभ्रष्ट होऊन ब्रह्महत्येचें पातक शिरीं घेईल व त्याला इहपरलोकीं अप्रतिष्ठा व अनंत कष्ट भोगावे लागतील." अशी धर्ममर्यादा स्थापन करून त्यानें दैत्यांस सांगितलें कीं, तुमच्या मूर्खपणामुळें मात्र या माझ्या प्रिय शिष्य कचाला ही संजीवनी विद्या प्राप्त झाली.

याप्रमाणें गुरुपाशीं हजार वर्षे राहिल्यावर कच देवलोकीं जाण्यास निघाला.

शुक्राचार्यांनें कचास जाण्याची आज्ञा दिली असतां, हा देवलोकीं जाण्यास निघाला, असें पाहून देवयानीनें कचास "तूं व मी उभयतां कुलशीलानें समान आहों. तसेंच माझें तुझ्यावर अतिशय प्रेम आहे व या प्रेमानेंच मी तुला तिनदां राक्षसांनीं मारिलें असतां जिवंत केलें, म्हणून माझें पाणिग्रहण केल्याशिवाय तूं देवलोकीं जाणें बरें नाहीं." असें विनविलें. कचानें तिला पुष्कळ सांगून पाहिलें कीं, तूं व मी एकाच उदरांतून जन्म पावलों असल्यामुळें धर्मदृष्टीनें तूं माझी गुरुभगिनी होतेस. तस्मात् तूंहि मला गुरुसमानच पूज्य आहेस. इतकें सांगितलें तरी देवयानी आपला हट्ट सोडीना. तेव्हां कचानें, तूं सजवर पोटच्या पोराप्रमाणें प्रेम केलेंस, परंतु तुझा व माझा जन्म एकाच पित्यापासून असल्यामुळें तूं माझ्याशीं पाणिग्रहणाची इच्छा करूं नकोस, इतकें सांगून यानें देवयानीस शुक्राची सेवा मनोभावें करण्यास सांगितली. व तिचा आशीर्वाद मागितला. मनोरथाचा भंग झाल्यामुळें चवताळलेल्या देवयानीनें कचास शाप दिला कीं, ज्या अर्थी माझी विनंति लाथाडून तूं विद्या घेऊन माजोरीपणानें निघून जात आहेस, त्या अर्थी ही विद्या तुला केव्हांहि फलद्रूप व्हावयाची नाहीं. तेव्हां कच शांतपणानें म्हणाला कीं, तूं गुरुभगिनी असल्यामुळें व मी सात्त्विक ब्राह्मण आहें म्हणून, मी तुला प्रतिशाप देत नाहीं. हा तुझा कामविकारजन्य शाप आहे. अर्थातच ब्राह्मणपुत्रानें आपल्यास वरावें ही जी तुझी इच्छा ती कधींहि सफल होणार नाहीं. आतां माझी विद्या मला फलद्रूप होणार नाहीं, असा तुझा शाप आहे; तरी हरकत नाहीं. ज्याला मी ती शिकवीन त्याला ती फलद्रूप होईल. असें बोलून कच देवयानीचा निरोप घेऊन देवलोकीं गेला. याप्रमाणें विद्या संपादन करून तो देवलोकीं आला असतां देवांनीं व इंद्रानें याचें स्वागत केलें व याला यज्ञांतील भाग दिला (म. आ. ७६-७७; मत्स्य. २५-२६ ).

**कच्छनीर**—वैशाख महिन्यांत अर्यमा नांवाच्या सूर्याबरोबर फिरणारा नाग ( भा. १२. ११ ).

**कच्छप**—कुबेराच्या मूर्तिमान नऊ निधींतील पांचवा.

**कंजाजना**—दाशरथि रामाचा पुत्र लव, त्याची कनिष्ठ स्त्री.

**कटक**—मर्कटपबद्दल पाठभेद.

**कटायनि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**कटु**—एक अंगिराकुलांतील गोत्रकार. याबद्दल कत्य व कक्ष असे पाठभेद आहेत.

**कठ**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण ( म. आ. ८. स. ४ कुं. ). याच्या नांवावर कठपरिशिष्ट, कठब्राह्मण, कठसंहिता, कठवल्ल्युपनिषद् व कठसूत्र असे ग्रंथ आलेले आहेत. कठसूत्राचा कात्यायन श्रौतसूत्रांत निर्देश आहे ( १. ३. २३; ४. ८. १३ ). हाच कठशाखेचा प्रवर्तक असावा ( पाणिनि पहा ).

**कठशाठ**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**कणिक** किंवा **कणीक**—धृतराष्ट्राचा नीतिशास्त्रविशारद ब्राह्मण मंत्री. यानें धृतराष्ट्रास पांडवांविषयीं विपरीत बोध केला होता ( म. आ. १५३ कुं. ). इतकें वैर वाढल्यावर युद्धाशिवाय मार्ग नाहीं, असें यानें सांगितलें. याला कुलिंद असें नामांतर होतें ( म. आ. ६१ कुं. ).

**कणीशा**—कश्यप व क्रोधा यांची कन्या. पुलहाची स्त्री.

**कंठ**—( सो. पुरूरवस. ) हा वायुमतें अजमीढपुत्र होय.

**कंठायन**—( सो. पुरूरवस्. ) वायुमतें मेधातिथिपुत्र.

**कंठेविद्धि**—ब्रह्मविद्धीचा शिष्य. याचा शिष्य गिरिशर्मन् ( वं. ब्रा. १ ).

**कंडरीक**—ब्रह्मदत्ताच्या मंत्र्याचा पुत्र (पितृवर्ती पहा).

**कंडु**—एक ब्रह्मर्षि. याचा एक दहा वर्षांचा पुत्र ज्या वनांत मरण पावला होता, तें वन यानें वृक्षोदकरहित केलें ( वा. रा. कि. ४८ ). याच्या तपाचे नाशार्थ इंद्रानें प्रम्लोचा नांवाची अप्सरा पाठविली होती. याची कन्या मारिषा. ( विष्णु. १.१५. भा. ४. ३० ).

२ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हा लाङ्गलीचा शिष्य.

**कंडू**—ही कलिंगाची कन्या व अक्रोधनाची स्त्री होय. हिच्या पुत्राचें नांव देवातिथि ( म. आ. ६३ ).

**कण्व**—घोराला कण्व व प्रगाथ असे दोन पुत्र होते. हे अरण्यांत असतां प्रगाथानें कण्वाच्या बायकोची खोडी केली. म्हणून कण्व शाप देऊं लागला असतां प्रगाथानें यांना आईबाप मानलें. पुढें घोरपुत्र कण्व व याचे वंशज यांनीं ऋग्वेदाचें आठवें मंडळ तयार केलें ( बृहद्दे. ६. ३५-३९ ). कण्व या शब्दाचा सुखमय असा अर्थ नीलकण्ठानें केला आहे. हे यदुतुर्वशांचे पुरोहित असावेत. कारण यदु व तुर्वश हे तुझ्या प्रसादानें सुखी असलेले मी पहावें ( ऋ. ८.४.७ ). अशी कण्वकुलोत्पन्न देवातिथि इंद्राची प्रार्थना करीत आहे. कण्व या पुरातन ऋषीचा ऋग्वेदांत व इतरत्र वारंवार उल्लेख आला आहे. (ऋ. १. ३६. ८; १०-११; इत्यादि; अ. वे. ७. १५. १; १८. ३. १५; वा. सं. १७. ७४; पं. ब्रा. ८. २. २; ९.२. ६; सां. ब्रा. २८.८ ). याचे पुत्र व वंशज यांचाहि

वारंवार उल्लेख येतो. हा सूक्तद्रष्टा होता (ऋ. १. ३६-४३; ८; ९. ९४). अंगिरसकुलांतील कण्व मंत्रकार होते. कण्वाचा वंशज हा त्याच्या एकवचनाच्या कण्व अशा नांवानें (ऋ. १. ४४. ८; ४६.९; ४७. १०; ४८. ४; ८. ४३. १.) व पैतृक नांवांसहित, जसें कण्व नार्षद (ऋ. १. ११७.८; अ. वे. ४. १९.२), व कण्व श्रायस (तै. सं. ५. ४. ७. ५; क. सं. २१.८; मै. सं. ३. ३. ९.) असा संबोधिला जातो. शिवाय यांचा अनेकवचनीं उल्लेख कण्वाः सौश्रवसाः या नांवानें होतो (क. सं. १३. १२; सां. श्री. १६. ११. २०). अथर्ववेदांतल्या (२. २५) एका उताऱ्यावरून पाहतां ते शत्रुत्वानें वागविले जात होते असें दिसतें. क्षत्रियांच्या गायत्रीमंत्रांत कण्वानें सूर्यापासून मिळविलेली विश्वकल्याणकारक सद्‌बुद्धि मला मिळूं दे, असा उल्लेख आहे (वा.सं. १७. ७४). ऋग्वेदांत (१. ११७.८) पुढील कथा एका कण्वाबद्दल आली आहे. ब्राह्मणत्वाची परीक्षा पाहण्याकरितां असुरांनीं कण्वाला गाढ अंधारांत ठेविलें आणि सांगितलें कीं, तूं ब्राह्मण असशील तर उषःकाल केव्हां होतो, तें ओळख. याला अश्वी येऊन म्हणाले, ज्या वेळीं उषःकाल होईल, त्या वेळीं आम्ही वीणा वाजवीत येऊं. तो शब्द ऐकून तूं उषःकाल झाला असें सांग. विष्णुमतें ब्रह्मराताचा व भागवतमतें देवराताचा पुत्र असणाऱ्या याज्ञवल्क्याच्या पंधरा शिष्यांतील हा एक होता (व्यास पहा). पण पुढें यानें यजुर्वेदांत स्वतःची शाखा स्थापन केली व तिचे ग्रंथहि निर्माण केले (भा. १२. ६). ते ग्रंथ बऱ्याचशा बाबतींत याज्ञवल्क्याच्या विरुद्ध आहेत. हा एका गोत्राचा प्रवर्तक आहे.

कण्व हे अंगिरस गोत्रोत्पन्न असून ह्या नांवाचें कुल पुरूंतून निघालें. कांहीं ठिकाणीं मतिनारपुत्र अप्रतिरथापासून हा झाला असें आहे (ह. वं. १. ३२; विष्णु. ४. १९). पण दुसऱ्या कांहीं ठिकाणीं कण्वास अजमीढपुत्र म्हटलें आहे (वायु. २. ३७. कण्ठ; मत्स्य. ४९). पण पिढ्यांच्या दृष्टीनें हा फार मोठी तफावत आहे विष्णुपुराणांत तर दोनहि वंश दिले आहेत.

प्रगाथ काण्व हा दुर्गहांच्या नातवांचा समकालिन होता (ऋ. ८.६५.१२; दुर्गह पहा).

कण्ववंशाची वंशावळ बऱ्याच ठिकाणीं दिली आहे (मत्स्य. ५०; ह. वं. १.३२; वायु. २.३७; भा. ९.२१; प्रस्कण्व व मेधातिथि पहा). कण्वगोत्रांतल्यांना दक्षणा देऊं नये असें सत्याषाढ श्रौतसूत्रांत (१०. ४) सांगितलें आहे. त्याचें कारण भाष्यांत 'कण्वं तु बधिरं विद्यात्' असें गोपीनाथभट्टानें म्हटलें आहे. पण, त्यालाहि तें पटलें नाहीं. हा ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत होता (पद्म. सृ. ३४).

एक धर्मशास्त्रकार. आपस्तंबानें प्रथम 'कोणाचें अन्न ग्राह्य आहे?' अशी शंका उद्धृत करून लगेच तिच्या समाधानार्थ कण्वाच्या ग्रंथांतला, कोणींहि आदरानें दिलेलें अन्न ग्राह्य आहे, हा उतारा घेतला आहे (आप. ध. १. ६. १९. २-३). कण्वाच्या ग्रंथांतील आह्निक व श्राद्ध यांसंबंधीं बरेच उतारे स्मृतिचंद्रिकेंत घेतले आहेत. त्याचप्रमाणें मिताक्षरा या ग्रंथांत कण्वाच्या ग्रंथांतील बरेच उतारे घेतले आहेत (मिता. ३. ५८; १३. ६०).

याचे ग्रंथ—१ कण्वनीति. २ कण्वसंहिता. ३ कण्वोपनिषद्. ४ कण्वस्मृति. कण्वस्मृतीचा उल्लेख हेमाद्रि, मध्वाचार्य, वगैरेंनीं केला आहे (C. C.).

२ कश्यपगोत्रोत्पन्न एक ऋषि. याचा पिता मेधातिथि (म. अनु. २५५. कुं.). याचा आश्रम मालिनीनदीतीरीं असे. यानें मोठ्या प्रेमानें शकुंतलेचें पालनपोषण केलें होतें. हा एकदां बाहेर गेला असतां दुष्यंतानें शकुंतलेशीं गांधर्व विवाह केला व हा परत आल्यावर यानें तो योग्य म्हणून या विवाहास पुष्टि दिली (म. आ. ७०-७४; भा. ९. २०). यानें दुर्योधनास मातलीची कथा सांगितली. ती बोधपर कथाहि सांगून तो ऐकेना, तेव्हां तूं मांडी फोडल्यावर मरशील, असा यानें त्यास शाप दिला (म. उ. ९७.१०५ कुं.). पण ही दुर्योधनाला शाप दिल्याची गोष्ट कालदृष्ट्या पुढील एखाद्या कण्वाची असावी.

हा गौतमाश्रमीं गेला असतां तेथील समृद्धता पाहून आपणांसहि तशी समृद्धता प्राप्त व्हावी, म्हणून यानें तप करून गंगा व क्षुधा यांना प्रसन्न करून घेतलें व त्यांच्यापासून आयुष्य, द्रव्य, भुक्तिमुक्ति हीं मागून घेतलीं आणि मी व माझे वंशज क्षुधापीडित कधीं होऊं नयेत असा वर मागितला. त्याप्रमाणें तो यास मिळाला. नंतर जेथें यानें तपश्चर्या केली त्या तीर्थास कण्वतीर्थ नांव पडलें (ब्रह्म. ८५). नंतर भरतानें जेव्हां यज्ञ केले, तेव्हां हा मुख्य उपाध्य होता (म. आ. ७४). यास भरतानें एक हजार पद्मभार शुद्ध जाम्बूनद सोनें (म. द्रो. ६८) व एक हजार पद्म घोडे (म. शां. २९) दक्षिणा म्हणून दिले. भरताचे यज्ञांचे वेळीं हा अगर याचा पुत्र असणें संभवतें. याचा पुत्र बाल्हीक (काण्व) होय (ब्रह्म. १४८).

३ कश्यपाचा मुलगा. हा कलियुग लागून १००० वर्षांनीं भरतभूमींत प्राप्त झाला. त्याची पत्नी देवकन्या आर्यावती होय. याच्या मुलांचीं नांवें—उपाध्याय, दीक्षित, पाठक, शुक्ल, मिश्र, अग्निहोत्री, द्विवेदी, त्रिवेदी, पांडव, चतुर्वेदी. कण्वानें आपल्या संस्कृत वाणीनें मिश्र देशांतील १०००० म्लेच्छांस वश केलें. या शूद्र बनलेल्या म्लेच्छांच्या २००० वैश्यांपैकीं पृथु या

कण्वाप्रसेवकाला कण्वानें क्षत्रिय करून राजपुत्रनगर दिलें ( भवि. प्रति. ४. २१ ).

कण्वायन—याच्या दातृत्वाबद्दल कुशानें प्रशंसा केली आहे ( ऋ. ८. ५५. ४ ).

कत वैश्वामित्र—सूक्तद्रष्टा ( ऋ. ३. १७; १८ ). हा कुशिककुलांतील गोत्रकार व मंत्रकार आहे.

कत्तृण—अंगिराकुलांतील गोत्रकार.

कथक—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

कद्रु—ही दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या ( म. आ. ६६; भा. ६. ६ ). ही फार सुंदर व गुणवती होती. परंतु हिला एकच डोळा होता ( भवि. प्रति. १. ३२ ). ही दक्षानें कश्यपास दिली होती. पुढें हिनें कश्यपापासून वर मिळविला कीं, मला समबल असे सहस्र सर्प व्हावेत. पुढें उच्चैःश्रव्याचे रंगाबद्दल आपली सवत विनता हिजशीं हिनें पैज लाविली. त्यांत कद्रू उच्चैःश्रव्याचा रंग पांढरा आहे पण शेपटी काळी आहे असें म्हणाली. पुढें आपलें म्हणणें खरें आहे हें दाखविण्याकरितां हिनें आपल्या पुत्रांची मदत मागितली. पण ती तें देईनात म्हणून हिनें त्यांस शाप दिला कीं, तुम्हीं सर्पसत्रांत भस्म व्हाल. ही दुष्ट सर्पांचा नाश करण्याची योजना बरी आहे, हें पाहून ब्रह्मदेवानें येऊन हिचे शापास पुष्टि दिली ( म. आ. २१ ) व त्यांचा सापत्न बंधूहि त्यांना नक्षील असें तो म्हणाला. पुढें ते शरण येऊन त्यांनीं उःशाप मागितला व मदतहि देण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें ते उच्चैःश्रव्याचे शेपटीस जाऊन चिकटले ( म.आ. २१ ). अशा रीतीनें पुच्छ शेपटी त्यांनीं काळी आहे, असें विनतेस दाखविलें. त्यामुळें ती पैज हरली व तिनें कद्रूचें १००० वर्षे दास्य करावें असें ठरलें. पण पुढें ५०० वर्षांनीं गरुडानें आपली आई विनता हिला दास्यांतून सोडविलें ( म. आ २१–२८; कश्यप पहा ).

कंकुशंकु—( सो. कुकुर. ) हा वायुमतें उग्रसेनपुत्र होय..

कनक—( सो. सहस्र. ) हा मत्स्यमतें दुर्दमपुत्र व वायुमतें दुमंदपुत्र होय.

२ विप्रचित्ति व सिंहिका यांचा पुत्र. यास परशुरामानें मारलें ( ब्रह्मांड. ३. ६. १८–२२ ).

कनकध्वज—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. हा द्रौपदीस्वयंवरांत होता (म. आ. २०१. ३ कुं.). याचा वध भीमानें केला ( म. भी. ९६ ).

कनका—( नंदभद्र पहा ).

कनकांगद व कनकायु—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

कनकोद्भव—( सो. विदूरथ. ) हा वायुमतें हृदीकपुत्र.

कनिष्ठ—सौम्य मन्वंतरांतील एक देवगण.

कनीयक—(सो. विदूरथ.) हा मत्स्यमतें हृदीकाचा पुत्र.

कन्यक—कश्यपकुलांतील गोत्रकार.

कप—देवविशेष. यानें पूर्वी स्वर्गाचा अपहार केला असतां, ब्राह्मणांनीं इंद्राचा पक्ष धरून याचा नाश केला ( म. अनु. २६२. ४ कुं. ).

कपट—कश्यप व दनु यांचा पुत्र.

कपर—कश्यप व दनु यांचा पुत्र.

कपर्दिन् विनायक—( गजानन पहा ).

कपर्देय—विश्वामित्रकुलांतील एक गोत्रकार.

कपालभरण—हा विंध्यपर्वतावरील त्रिवककन्या सुशीलेला शुचि नामक ब्राह्मण तपस्व्यापासून झाला. याला इंद्रानें ठार मारलें. इंद्रानें याला मारल्यावर सीतासरस्तीर्थांत स्नान केलें. याचे मागें याचा मुलगा दुर्मेधस गादीवर बसला (स्कंद. ३. १. ११ ).

कपालिन्—कश्यप व सुरभि यांचा पुत्र एक रुद्र.

कपि—तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ भृगुगोत्री एक ऋषि व प्रवर ( भृगु पहा ).

३ ( सो. पुरूरवस्. ) हा विष्णुमतें उरुक्षयपुत्र व वायुमतें उभक्षयपुत्र. हा क्षत्रिय असून तपानें ब्राह्मण झाला होता ( वायु. २. २९. ११४ ).

४ रैवत मन्वंतरांतील एक मनुपुत्र.

५ हा अंगिरसगोत्रांतील मंत्रकार.

कपिंजल—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार.

कपिस्थक—कद्रुपुत्र एक सर्प.

कपिभू—अंगिराकुलांतील गोत्रकार.

कपिमुख—पराशरकुलांतील गोत्रकार. याबद्दल कपिश्रवस् असा पाठभेद आहे.

कपिल—एक अग्निविशेष. हा कर्म ऊर्फ विश्वपति अग्नि व रोहिणी ( हिरण्यकशिपुकन्या ) यांचा पुत्र. त्यालाच सांख्यशास्त्रप्रवर्तक कपिल म्हटलें आहे. यास अनन्याधिकार म्हणजे आहुति पोंचविण्याचा अधिकार आहे ( म. व. २२३.२१ ).

२ हा कर्दमास देवहूतीपासून झालेला पुत्र होय. स्वायंभुव मन्वंतरांतील अवतार आहे. कर्दम ऋषीनें संन्यस्त राहण्याचें ठरविलें त्या वेळीं देवहूतीनें, माझें संसारचक्रापासून रक्षण करणार कोण ? असा प्रश्न विचारला. श्रीहरीनें मी तुझ्या घरीं जन्म घेईन, या दिलेल्या वचनाची आठवण होऊन कर्दम म्हणाला कीं, श्रीहरि तुझ्या उदरीं जन्म घेईल व तो तुला ब्रह्मज्ञान सांगून . या संसारचक्रांतून मुक्त करील. श्रीहरीचें आराधन कर, म्हणजे तो तुझ्या उदरीं येईल. त्याप्रमाणें तिनें श्रीहरीची आराधना केली व पुढें तिला कपिल झाला. कपिलाचा जन्म सिद्धपुरला झाला ( दे. भा. )

९. २१ ). हा नेहमीं बिंदुसरावर राहत असे ( भा. ३. २५. ५ ). हीं दोनहि स्थलें एकच असावींत.

पुढें यानें देवहूतीस ब्रह्मज्ञान सांगितलें व तिला भवचक्रांतून मुक्त करून आपण पाताळांत जाऊन बसला. तेथें ध्यानस्त असतां अश्वमेधाच्या अश्वास शोधीत सगरपुत्र तेथें आले. हरिवंशांत झोंपला असतां असें आहे ( ह. वं. १. १४-१५ ). हाच चोर असून यानेंच आपला अश्व चोरिला असावा असें वाटून यास त्यांनीं शस्त्रास्त्रांनीं प्रहार केले, तेव्हां कपिलानें त्यांजकडे क्रोधयुक्त दृष्टीनें पाहून त्यांचें भस्म केलें. त्यांचेपैकीं चार मात्र जिवंत राहिले ( सगर पहा ). भागवतांत सर्वच दग्ध झाले असें आहे ( भा. ९.८.१२ ).

अव्यक्ताव्यक्त तत्त्वावर आसुरीशीं याचें संभाषण झालें होतें. त्यांत आसुरी हा पृच्छक असून कपिल हा निवेदिता होता. याचा शिष्य आसुरी व आसूरीचा शिष्य पंचशिख ( नारद. ४५ ). पण पंचशिख हा कपिलाचाच जणूं कांहीं अवतार आहे असें त्याच्या सांख्यज्ञानाच्या प्रभावावरून लोकांना वाटे ( म. शां. २१८ ). नारद पुराणांत दोन कपिल दिले आहेत. त्यांपैकीं एक ब्रह्मयाचा अवतार ( नारद. ४५ ) व दुसरा विष्णूचा ( नारद. ४९ ). आचार्यतर्पणांत पंचशिखादिकांअगोदर याचें नांव आहे ( मत्स्य. १२. ९८; कात्या. परि ).

पण यांपैकीं सांख्यशास्त्रज्ञ कोणता व वेदांती कोणता हें समजत नाहीं. कोणी एक कपिल नांवाचा ऋषि स्यूमरश्मीशीं संवाद करीत होता. त्यांचा संवाद कपिल अहारं वेद असें म्हणाल्यावरून सुरू झाला. पण यानें गाय यज्ञांतहि अवध्य आहे यावरच वादविवाद केला ( म. शां.२७४ कुं. ). भागवतांत सांख्यशास्त्राची रचना करण्याकरितां पांचवा जन्म घेशील म्हणून म्हणालास व त्याप्रमाणें माझे घरीं जन्मलास. या वचनावरून भागवतांतील कपिल सांख्यशास्त्रज्ञ असावा व हा तर विष्णूचाच अवतार आहे ( भा. १. ३;३. २४; विष्णु. २. १४ ). सांख्यशास्त्रज्ञ कपिलाची स्मृतीनें निंदा केली आहे व श्रुतींत एका कपिलाचें माहात्म्यहि वर्णन केलें आहे ( श्वे. उ. ५. २; ब्र. सू. २. १-१ शांकरभाष्य ). अर्थात् हा वेदांती कपिल असला पाहिजे. यास वासुदेव ( म. व. १०७ ) व चक्रधनु ( म. उ. १०९ ) अशीं नामांतरें दिलीं आहेत. वासुदेव व चक्रधनु हे दोन्ही कपिल सगरपुत्रघ्न अर्थात् एकच होत. कामरूप देशांत यानें कपिलेश्वराची स्थापना केली ( स्कंद. १. २. ४५ ).

ब्रह्मदेवापासून वर प्राप्त झाल्यावर रावण पश्चिमतीरावर गेला. तेथें त्यास कोणी एक तेजस्वी पुरुष दिसला. रावणानें यास युद्धास आव्हान केलें. तेव्हां यानें त्यास एक चापट मारिली, त्यामुळें रावण गिरिमिरी गेऊन जमिनीवर कोसळला. पुढें त्यानें तेथें एक सुंदर स्त्री पाहिली व तिचा अभिलाष केला. तेव्हां या पुरुषानें हें जाणून त्याजकडे नुसतें पाहिलें त्याबरोबर तो पुन्हां पडला. उठल्यानंतर रावणानें त्यास विचारिलें कीं, आपण कोण ? तेव्हां यानें सांगितलें, माझे हातून लवकरच तुझा मृत्यु होईल. यावरून हा भगवान् विष्णु असावा असें वाटतें. पण रामाच्या प्रश्नास उत्तर देतांना वसिष्ठानें हा पुरुष म्हणजे कपिल महर्षि होय असें म्हटलें आहे ( वा. रा. उ. ५ प्रक्षिप्त ).

वेनाला ठार केल्यावर याच्याच सांगण्यावरून पृथूला उत्पन्न करण्यांत आलें. व पृथूनें पृथ्वी स्थिरस्थावर केली ( भा. ८. १८-१९ ). ही माहिती गौतमी कपिलासंगमाचें माहात्म्य सांगतांना आली आहे ( ब्रह्म. १४१ ). पण पुढें सांख्यांचें तत्त्वज्ञान सांगितलें आहे तेथें कपिलाचें नांवहि नाहीं ( ब्रह्म. २३९; पंचशिख पहा ).

यानें केलेले ग्रंथ—१ सांख्यसूत्र, २ तत्त्वसमास, ३ व्यासप्रभाकर, ४ कपिलगीता ( वेदान्तविषयक ), ५ कपिलपंचरात्र, ६ कपिलसंहिता(उत्कलतीर्थमाहात्म्य), ७ कपिलस्तोत्र, ८ कपिलस्मृति. त्याचप्रमाणें वैद्यविषयक ग्रंथाचा कर्ता म्हणून याचा उल्लेख वाग्भटानें केला आहे ( C. C. ).

३ रुद्रगणांपैकीं एक.

४ विश्वामित्राच्या पुत्रांतील एक.

५ दनु व कश्यप यांचा पुत्र, एक दानव.

६ कद्रू व कश्यप यांचा पुत्र, एक नाग.

७ ब्रह्मांडमतें वसुदेवास सुगंधीपासून व वायुमतें वनराजीपासून झाला. हा राज्य न करतां विरक्त होऊन वनांत गेला.

८ विंध्यावर रहाणारा एक वानर.

९ वेनास मारणाऱ्या ऋषींपैकीं एक.

१० (सो. नील.) भद्राश्वाचा पुत्र. इतर पुराणांत कांपिल्य असा पाठभेद आहे.

१२ शिवावतार दधिवाहनाचा शिष्य.

१३ एक यक्ष. यानें खशाकन्या केशिनीचे ठिकाणीं ब्रह्मराक्षस उत्पन्न केले. याला नाला नांवाची कन्या होती ( ब्रह्मांड. ३. ७.१ ).

१२ एक ब्राह्मण. एकादशीचा उपवास घडल्यामुळे संपन्न झाला ( पद्म. उ. ३० ).

**कपिला**—दक्ष व असिक्नी यांची कन्या व कश्यपाची स्त्री.

२ पंचशिख ऋषीची माता (नारद. १. ४५; कबंधी पहा).

३ कश्यप व खशा यांची कन्या.

**कपिलाश्व**—( सू. इ. ) हा भागवत व विष्णु यांच्या मतें कुवलयाश्वाचा पुत्र. मत्स्य व वायु यांच्या मतें कुवलाश्वाचा पुत्र.

**कपिलोम**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**कपिवन**—याच्या नांवावर दोन दिवस चालणारा एक यज्ञ आहे ( का. श्री. २६,२-३; आश्व. श्री. १०. २ ).

**कपिवल भौवायन**—एक आचार्य ( मै. सं. १.४.५; क. सं. ३. २. २ ).

**कपिश**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**कपिश्रवस्**—( कपिमुख पहा ).

**कपिष्ठल**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**कपिवत्**—तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**कपीलर**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**कपोत**—गरुडाचा पुत्र.

२ एक राजा. हा आत्मज्ञानी होता ( भा. १०.७२ ).

**कपोत नैर्ऋत**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १६५ ).

**कपोतक**—पाताळांतील नागराजाचें नांव ( मार्कं. ६८ ).

**कपोतरोमन्**—( सो. कुकुर. ) हा भागवतमतें विलोमापुत्र. विष्णुमतें धृष्टपुत्र, वायुमतें धृतिपुत्र व मत्स्यमतें वृष्टिपुत्र होय.

**कबंध**—दंडकारण्यांतील एक राक्षस. याचें डोकें याच्या छातींत होतें. यामुळेंच यास कबंध ( शिरविरहित ) असें नांव दिलें गेलें. जटायुवधानंतर रामलक्ष्मण सीतेचा शोध करीत वनांत तिकडे हिंडत होते, हिंडतां हिंडतां ते क्रौंचवनाच्या पूर्वेस तीन कोसांवर असलेल्या मतंग मुनींच्या आश्रमाजवळ गेले. तेथें त्यांना एक मोठा ध्वनि ऐकूं आला. हाच या कबंध राक्षसाचा ध्वनि होता. तो एक कोस लांब असतां रामलक्ष्मणांच्या दृष्टीस पडला. भक्ष्याकरतां हात फिरवीत असतां त्यांत रामलक्ष्मण सापडले. रामलक्ष्मणांजवळ तरवारी होत्या. लक्ष्मण रामास निसटून जाण्यास सांगून स्वतः मरणास तयार झाला. पण रामानें त्यास धीर देऊन थांबविलें. राक्षसास आयतें चालून आलेलें भक्ष्य पाहून आनंद वाटला. त्याप्रमाणें हा बोलल्याहि. पण लक्ष्मण म्हणाला, क्षत्रियाला हें मरण अयोग्य. या वेळीं राक्षसास राग येऊन हा त्यांना खाण्यास प्रवृत्त झाला. तेव्हां रामानें याचा डावा हात तोडला व लगेच लक्ष्मणानें याचा उजवा हात तोडला. तेव्हां हा गतप्राण होऊन खालीं पडला. तदनंतर याच्या शरीरांतून एक सूर्यासारखा देदीप्यमान पुरुष निघून आकाशांत गेला. तेव्हां रामानें त्यास तूं कोण म्हणून विचारिलें. यावर हा म्हणाला, मी विश्वावसु नांवाचा गंधर्व आहें. ब्राह्मणाच्या शापानें ही राक्षसयोनि मला प्राप्त झाली होती. सीता रावणानें नेली आहे. तूं सुग्रीवाकडे जा म्हणजे तो तुला साहाय्य करील. कारण सुग्रीवाला रावणाच्या मंदिराची माहिती आहे. असें बोलून हा गुप्त झाला ( म. व. २७९; वा. रा. अर. ६९-७३ ).

२ अट्टहासनामक शिवावताराचा शिष्य.

३ व्यासाच्या अथर्वन् शिष्यपरंपरेंतील वायु, विष्णु, ब्रह्मांड व भागवत यांच्या मतें सुमंतूचा शिष्य.

**कबंध आथर्वण**—हा पतंचल काप्याच्या बायकोच्या अंगांत येत असे. यानें पतंचलाला कांहीं अध्यात्मज्ञान सांगितलें ( बृ. उ. ३. ७ ).

**कबंधिन् कात्यायन**—पिप्पलादाचा ब्रह्मविद्येंतील शिष्य ( प्र. उ. ११. ३. ).

**कबंधी**—पंचशिख ऋषीची माता. ( २ कपिला पहा ).

**कमठ**—युधिष्ठिराच्या सभेंतील एक क्षत्रिय (म. स. ४).

२ महीनगरांतील हारित नांवाच्या ब्राह्मणाचा मुलगा. सूर्य वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन आला व कांहीं प्रश्न केले. त्याचीं यानें समर्पक उत्तरें दिलीं. तेव्हां सूर्यानें तुझा पिता स्मृतिकार होईल, या स्थानाचा त्याग करणार नाहीं व हें स्थान जयादित्य या नांवानें प्रसिद्ध होईल असें सांगितलें ( स्कंद. १.२.५१ ).

**कमद्यू**—( विमद पहा ).

**कमला**—वल्लभभीमाची बायको ( गणेश. १.१९. ४०; दक्ष पहा ).

**कमलांशु**—( सो. ) भविष्यमतें शितांशुकाचा पुत्र.

**कमलाक्ष**—त्रिपुरांतील सुवर्णपुराधिपति असुर ( म. द्रो. २० कुं; २. लिंग. २. ७१ ). तारकासुराचा पुत्र. याला रुद्रानें मारलें ( म. क. २४. ७. कुं. ).

**कंपन**—अंगदानें युद्धांत मारलेला लंकेंतील राक्षस ( वा. रा. यु. ७५ ).

२ युधिष्ठिराच्या सभेमधील एक क्षत्रिय. (म. स. ४ कुं.).

**कंबल**—कद्रूपुत्र. पाताळांतील नागांचा अधिपति ( भा. ५. २४). हा अश्विन महिन्यांत त्वष्ट्र नांवाच्या सूर्याबरोबर असतो ( भा. १२. ११ ). अश्वतराचा भाऊ ( मार्कं. २१. ५० ).

**कंबलबर्हिष**—( सो. क्रोष्टु. ) अंधकाचा कनिष्ठ पुत्र.

२ ( सो. विदूरथ. ) हा मत्स्य व वायुमतें देवार्हपुत्र.

३ ( सो. यदु. ) हा मत्स्य व वायु यांच्या मतें मरुत्तपुत्र. याचा पुत्र असमौजस्.

**कयाधू**—ही तारकाच्या जम्भासुरनामक सेनापतीची कन्या. हिचा पति हिरण्यकशिपु. ही प्रथमतः गरोदर असतांना हिरण्यकशिपु मंदारपर्वतावर तपश्चर्येस गेला होता. ही संधि साधून इंद्रानें सर्व दैत्यांचा पराभव केला. व कयाधूचा गर्भ जन्मास आल्यावर त्याला मारतां यावें, म्हणून तो हिला घेऊन चालला. इतक्यांत मध्येंच नारद भेटला व त्यानें हिचे पोटांतील गर्भ भगवद्भक्त असल्याचें सांगितल्यावरून त्यानें हिला सोडून दिलें. पुढें नारदानें हिला आत्मबोध केला तो या गर्भानें ऐकून

ध्यानांत ठेविला. पण ही मात्र स्त्रीस्वभावास अनुसरून विसरली ( भा. ६. १८; ७. ७; हिरण्यकशिपु पहा ).

**करकर्ष**—( सो. क्रोष्टु. ) शिशुपालाच्या चार पुत्रांतील एक. याचा चेकितान यादवाशीं अत्यंत स्नेह असे.

**करकाक्ष**—भारतीं युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा ( म. द्रो. २० कुं.).

**करकायु**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**करजिह्व**—( कर्णजिव्ह पहा ).

**करंज**—इंद्राचा एक शत्रु (ऋ. १. ५३. ८;१०. ४८. ८).

**करट**—( शकट पहा ).

**करथ**—भास्करसंहितेंतील सर्वधरतंत्राचा कर्ता ( ब्रह्मवै. २. १६ ).

**करंधम**—( सो. तुर्वसु. ) हा भागवतमतें त्रिभानुपुत्र; विष्णुमतें त्रिशांबपुत्र, वायुमतें त्रिसारिपुत्र व मत्स्यमतें त्रिसानुपुत्र होय.

२ ( सू. दिष्ट. ) भागवत व वायु यांच्या मतें खनिनेत्राचा पुत्र व विष्णुमतें अतिभूतिपुत्र. अवीक्षित राजाचा पिता व मरुत्त राजाचा पितामह ( म. अनु. १३७ ). याचें मूळ नांव सुवर्चा असून करंधम नांव पडण्यास कारण असें कीं, एकदां कित्येक राजांनीं मिळून यास अतिशय उपद्रव दिला. त्यावरून यानें आपले हस्त कंपित करून सैन्य उत्पन्न केलें, आणि सर्वांचा पराभव केला ( म. आश्व. १६ ). याला कालभीतानें उपदेश केला होता ( स्कंद. १. २. ४०-४२ ).

**करभाजन**—ऋषभदेवांच्या नऊ सिद्धपुत्रांतील एक. हा योगी व ब्रह्मज्ञानी होता. यानें विदेहाच्या यज्ञांत ज्ञानोपदेश केला ( भा. ५. ४; ११. २ ). याची आई जयंती.

**करंभ**—अगस्त्यकुलांतील गोत्रकर.

२ एक दनुपुत्र.

३ ( सो. क्रोष्टु. ) हा मत्स्य व वायु यांच्या मतें शकुनिपुत्र होय ( करंभि पहा ).

**करंभक**—(सो. विदूरथ. ) हा मत्स्यमतें हृदीकाचा पुत्र.

**करंभि**—( सो. क्रोष्टु. ) हा भागवत व विष्णुमतें शकुनिपुत्र ( करंभ पह ).

**कररोमन् व करवीर**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**कराल जनक**—याचा वसिष्ठाबरोबर क्षराक्षरलक्षणाविषयीं संवाद झाला होता ( म. शां. ३०८-३१३; ब्रह्म. २४०-२४४ ). हा वंशावळींत आढळत नाहीं.

**करिक्रत वातरशन**—मंत्रद्रष्टा (ऋ. १०. १३६.५).

**करीराशिन्**—विश्वमित्रकुलांतील गोत्रकार.

**करीश**—विश्वामित्र कुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**करूष**—वैवस्वत मनूच्या दहा पुत्रांतील एक. याची संतति कारूषक नांवानें प्रसिद्ध आहे. याचें आधिपत्य उत्तरेकडे होतें ( मनु पहा ). हा दक्षसावर्णि मन्वन्तराधिप होता. यानें आपल्या इतर भावांबरोबर कालिंदीतीरीं वायुभक्षण करून देवीचें कडक तप केलें, त्यामुळें प्रसन्न होऊन मन्वंतराधिप होशील असा देवीनें यास वर दिला (दे. भा. १०. १३ ).

**करेणुमती**—पंडुपुत्र नकुलाची स्त्री. शिशुपालाची कन्या

**कर्कट**—मर्यादा पर्वतावरील एक भिल्ल. याला विष घालावयास निघालेल्या पत्नीस यानें सहज गोकर्णक्षेत्रांत मारिलें. त्यामुळें ती मुक्त झाली ( पद्म. उ. २२५ ).

**कर्कटी**—हिमालयाच्या उत्तर बाजूस राहणारी एक राक्षसी. हिला विषूचिका व अन्यायबाधिका अशीं नांवें आहेत. हिनें लोकांना मारण्याचा वर मिळविला. पण पुढें हें काम हिनें सोडिलें ही हिमालयांत कायम राहते. हिचें तेथें नांव कंदरादेवी असें आहे. खेकड्याच्या आकाराच्या राक्षसीची मुलगी म्हणून हिला कर्कटी म्हणतात ( यो. वा. ३.६८-८४ ).

**कर्कंधु**—याचें अश्विदेवांनीं संरक्षण केलें ( ऋ. १. ११२. ६ ).

**कर्कोटक**—कद्रुपुत्र एक नाग. हा वरुणाच्या सभेंत असतो ( म. स. ९ ). हा नागांच्या भोगवती राजधानींत राहतो ( म. उ. १०३ ). हा नारदाच्या शापानें दावानलांत सांपडला असतां नलराजानें यास बाहेर काढून वांचविलें होतें. उपकारामुळें यानें नलास दंश करून मुख्यत्वेंकरून कलीपासून यास पीडा होणार नाहीं, असें केलें. तसेंच वनवास संपेपर्यंत त्यास कोणी ओळखूं नये, म्हणून विरूपहि केलें. ' सुरूप व्हावेंसें वाटतांच मीं दिलेलीं दोन वस्त्रें परिधान कर, ' असें यानें नलास सांगितलें होतें ( म. व. ६६ ). कर्कोट या भारतवर्षीय देशांतील कर्कोटक लोकांस महाभारतांत विनमार्ग म्हटलें आहे (म. क. ४४ ). काश्मिरांत इ. स. ६०२ ते ८५६ पर्यंत कर्कोटकवंश होऊन गेला. कर्कोटक नाग या वंशानें रक्षण करीत असे, अशा समजुतीवरून हें नांव पडलें. सर्प नांवाचे भारतकालीन असंतुष्ट लोक सध्यांच्या राजक्रांतिकारकांप्रमाणें महाभारतकालीं राजक्रांतिकारकच होते.

**कर्ण**—कुंतीस सूर्यापासून झालेला मुलगा ( म. आ. १११). यास कुंतीनें जन्मतांच अश्वनदींत सोडून दिलें ( म. व. ३०८ कुं.). पेटींतील तें बालक वहात वहात नर्मण्वती नदींत आलें तेथून यमुना व भागीरथी नद्यांतून वहात चाललें असतांना तें धृतराष्ट्राचा सारथि अधिरथ यानें पाहिलें. तें घेऊन आपली बायको राधा हिला त्यानें दिलें. हें बालक पाहतांच तिच्या डोळ्यांत आनंदाश्रु येऊन तिला पान्हा फुटला. कर्णास

जन्मतः कवचकुंडलें असल्यामुळें तो आतांपर्यंत जिवंत राहिला होता. राधेनें कर्ण देवदत्त मुलगा मानून याचें पालनपोषण केलें. हा तेजस्वी होता म्हणून तिनें याचें नांव वसुषेण असें ठेविलें (म. आ. ६४; ६८; १२०). याचें लहानपण अंग देशांत गेलें. द्रोणाचार्यानें याला शस्त्रास्त्रविद्या शिकविली होती (म. शां. २. ५ कुं.). हा शस्त्रास्त्रविद्योयत होता (म. आ. ६८; १२०). यानें परीक्षेस पटांगणांत शिरल्यावर द्रोण व कृप यांना नमस्कार केला, तोहि विशेष आदरानें केला नाहीं (म. आ. १४६. ६ कुं.). यानें द्रोणाला ब्रह्मास्त्र शिकविण्याविषयींच फक्त विनंति केली होती (म. शां. २). तसेंच हा सर्व वेद व शास्त्रज्ञ होता असें कृष्णानें म्हटलें आहे (म. उ. १४०. ६-७). कर्ण अर्जुनावरहि ताण करीत असे, हें दुर्योधनानें पाहून ठेविलें होतें. कौरवपांडवांचा विरोध नुकतांच या वेळीं सुरू झाला होता. तेव्हां दुर्योधनानें याला या वेळीं उत्तेजन देऊन आपल्या बाजूस वळविलें होतें.

कर्णानें द्रोणाकडून धनुर्विद्या मिळविली खरी, परंतु ब्रह्मास्त्रप्राप्ति मात्र यास झाली नव्हती. ह्या एकाच कारणानें अर्जुन यास वरचढ झाला होता. तेव्हां यानें निष्पत्तीचा प्रकार आणि उपसंहार यांसह ब्रह्मास्त्र शिकवा असें द्रोणास सांगितलें. पण द्रोणानें तें कांहींतरी कारणानें नाकारिलें. परंतु अर्जुनावर ताण करण्याची महत्त्वाकांक्षा असल्यानें हा महेंद्रपर्वतनिवासी परशुरामाकडे गेला. परशुराम क्षत्रियांचा द्वेष्टा असल्यामुळें क्षत्रियांस तो विद्या शिकवीत नसे. या वेळीं कर्ण स्वकार्य यशस्वी करण्याकरितां खोटें बोलला. यानें आपण भृगुकुलोत्पन्न ब्राह्मण असल्याचें परशुरामास सांगितलें. त्यावरून परशुरामानें यास शिष्य म्हणून राहण्याची आज्ञा दिली. त्यानें कर्णाला सप्रयोग व यथाविधि ब्रह्मास्त्र शिकविलें. एके दिवशीं उपवासामुळें श्रांत झालेला परशुराम कर्णाच्या मांडीवर डोकें ठेवून निजला असतां एक कृमि येऊन त्यानें कर्णाची मांडी फोडिली. इतक्यांत रक्तस्पर्शानें परशुराम जागा झाला. हा प्रकार पाहून कर्णाविषयीं परशुरामाच्या मनांत हा क्षत्रिय असावा, अशी शंका आली. कारण अशा असह्य वेदना ब्राह्मणास सहन करितां येणार नाहींत. पण त्याला कर्णानें आपलें सत्यकथन करून संतुष्ट केलें तरी यास बरोबरीच्या योध्याशीं युद्ध करितांना व वधाची वेळ आली असतां अस्त्राची स्फूर्ति होणार नाहीं, इतर वेळीं होईल, असा शाप मिळाला. कर्ण खोटें बोलला, म्हणून परशुरामानें यास जाण्यास सांगितलें. परंतु जातांना तुझ्यासारखा योद्धा दुसरा कोणीहि क्षत्रिय असणार नाहीं, असा आशीर्वाद दिला (म. शां. ३. ३२). यानें मल्लयुद्ध करून जरासंधाचा सांधा ढिला केला म्हणून जरासंधानें याला मालिनी नांवाचें नगर देऊन याच्याशीं स्नेह संपादन केला (म. शां. ५०).

एकदां हा आश्रमाबाहेर धनुष्य घेऊन पडला असतां एका ब्राह्मणाचें वासरूं याच्या बाणानें मारिलें गेलें. त्या वेळीं त्या ब्राह्मणानें युद्धांत भूमि तुझ्या रथाचें चाक गिळील व तुझा बेसावधपणांत शिरच्छेद होईल, असा यास शाप दिला. यामुळें कर्णास दुःख झालें. यानें धन देऊन उश्शाप मागण्याचा प्रयत्न केला, पण याचा त्या ब्राह्मणानें धिःकार केला (म. क. ४२; शां. २).

धृतराष्ट्राच्या अनुज्ञेनें द्रोणानें कौरवपांडवांचें शस्त्रास्त्रकौशल्य पाहण्यासाठीं रंगभूमि तयार केली. त्यांत कर्णानें अर्जुनानें दाखविलेल्या कौशल्यापेक्षां आपण वरचढ कौशल्य दाखवूं असें सांगितलें. तेथें कौरवपांडवांचीं भांडणें होऊन कर्णानें अर्जुनास द्वंद्वयुद्धास आव्हान केलें. त्या वेळीं सर्व लोक आश्चर्यमूढ होऊन कर्णाकडे पाहत होते. परंतु दुर्दैवानें कर्णाचें जन्मवृत्त कोणास माहीत नसल्यामुळें तेथें यास खालीं पाहण्याची वेळ आली. शिवाय कर्णाचा पालनकर्ता बाप अधिरथ तेथें आला असतां त्यास कर्णानें नमस्कार केला. यामुळें सर्व लोक यास सूत, सूतपुत्र, राधेय इत्यादि नांवें देऊन अवहेलना करूं लागले. या वेळीं कुंतीची परिस्थिति भय, आनंद व दुःख यांनीं मिश्रित झालेली होती. तिचें हृदय पुत्रप्रेमानें उचंबळून आलें. परंतु याची अवहेलना व पांडववैर पाहून तिला दुःख वाटलें (म. आ. १४६ कुं.).

कर्ण राजपुत्र व क्षत्रिय नसल्यामुळें यास हें सर्व सोसावें लागत होतें. त्या वेळीं दुर्योधनानें शौर्य कुलावर अवलंबून नसतें असें सांगितलें व कर्णास अंगदेशाचें राज्य देऊन गौरव केला. अर्थात् ह्या उपकाराबद्दल उलट मी काय करावें, असें कर्णानें दुर्योधनास विचारिलें. तेव्हां माझ्याशीं कायम मैत्री ठेव, अशी इच्छा त्यानें प्रदर्शित केली (म. आ. १४६ कुं.). अशा तऱ्हेनें त्यांची लहानपणापासूनची मैत्री अकृत्रिम होऊन कर्णानें पुढें तेवढ्याकरितां मरणहि पत्करिलें (म. आ. १४६ कुं.).

कर्णानें पुष्कळ सूतकन्यांशीं विवाह केले (म. उ. १४०). द्रौपदीस्वयंवरांत हा मत्स्यवेध करण्यास पुढें सरसावला असतां द्रौपदीनें मी सूतपुत्रास वरणार नाहीं असें सांगितल्यामुळें हा मागें सरला (म. आ. १८८).

कौरवपांडवांच्या वैरांत पांडव व कर्ण यांचें विनाकारण वैर उत्पन्न झालेलें पाहून कुंतीस अत्यंत वाईट वाटलें. तिनें कृष्णास याचें समाधान करून यास पांडवांस साहाय्य करण्यासाठीं सांगण्याकरितां पाठविलें. त्याप्रमाणें कृष्ण शिष्टाईनंतर कर्णाकडे गेला, त्यानें याचें जन्मवृत्त सांगून सार्वभौमपदाचा लाभ मिळेल, पांडवांसारखे शूर नरवीर तुझी सेवा करतील, द्रौपदी तुझी अर्धांगी होईल, आणि अशा तऱ्हेनें कौरवांस तुम्ही हार न जातां सुखी व्हाल, पुढें होणारा क्षय चुकेल व



101425

सर्व सुरळीत होईल, इत्यादि आमिषें दाखवून पांडवांशीं मैत्री करण्यास सांगितलें. तेव्हां कर्ण म्हणाला, कृष्णा, तूं सांगितलेलें वृत्त मला मान्य असून कुंती माझी माता व पांडव माझे बंधु हेंहि मला मान्य आहे. पण कुंतीनें मला नदींत सोडून दिलें, ही फार मोठी चूक केली. त्यामुळें मला अधिरथाजवळ राहावें लागलें, मी सूतकन्यांशीं विवाह केले, व मला त्यांच्यापासून पुत्रपौत्रहि झाले. इतक्या कारणांमुळें व राधेच्या अनुपम व अकृत्रिम प्रेमामुळें मी बद्ध झालों आहे, आतां मला हे संबंध सोडितां येणें अशक्य आहे; शिवाय दुर्योधनास मी तुझी मैत्री आमरण ठेवीन असें आश्वासन दिलें आहे. अशा प्रसंगीं मी पांडवांस मिळणें अनुचित होय. यावर कृष्ण निरुत्तर झाला ( म. उ. १४० ).

तेव्हां कुंतीनें स्वतः कर्णाची भेट घेतली व यास पुत्र म्हणून ओळख दिली. तेव्हां कर्णानें प्रथमप्रमाणेंच सर्व सांगून पांडवांस मिळण्याचें साफ नाकारिलें. पण कुंतीच्या म्हणण्याप्रमाणें अर्जुनाशींच मी युद्ध करून त्याचा वध करीन, इतर पांडवांना मी धक्का लावणार नाहीं, असें वचन दिलें. तेव्हां कुंती परत गेली ( म. उ. १४५ ).

द्रोणवधानंतर कर्ण सेनापति झाला. तेव्हां हा युद्ध करण्यासाठीं आज्ञा मागण्यास भीष्माकडे गेला होता. त्या वेळीं भीष्मानें यास याचें जन्मवृत्त सांगून युद्धापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण कर्णानें तें ऐकिलें नाहीं. याच वेळीं कर्णानें मागें केलेल्या कृत्यांबद्दल भीष्माची क्षमा मागितली (म. भी. १२२).

कौरव घोषयात्रेस गेले असतां कर्णहि त्यांच्या बरोबर गेला होता. तेथें दुर्योधनाचें चित्रसेन गंधर्वाशीं युद्ध होऊन त्यांत कर्णानें प्रथम गंधर्वाचा पराभव केला. पण पुढें सर्व सैन्य याचे एकट्यावरच तुटून पडलें. व यास भग्नरथ करून विकर्णाचे रथांत बसून पळावयास लाविलें ( म. व. २४२ ).

पांडव अज्ञातवासांत विराटाच्या येथें राहत असतां दुर्योधन विराटनगरीवर चालून गेला, या वेळीं कीचक मेला असल्यामुळें विराट निर्बल झाला होता. दुर्योधनास कर्ण, संशप्तकवीर सुशर्मा यांचें साहाय्य होतें, तरीहि कौरवांचा त्यांत पराभव झाला. या युद्धांत कर्णार्जुनांचें तुंबळ युद्ध होऊन कर्णाचा पूर्ण पराभव झाला व याचा भाऊ शत्रुंतप अर्जुनानें मारिला ( म. वि. ५८ ). ही लढाई उत्तरगोग्रहण म्हणून प्रसिद्ध आहे; आणि याच युद्धांत विराटाच्या एक लक्ष गाई सुशर्म्यानें घेतल्या होत्या ( म. वि. ५४; ६० ).

कर्णानें अर्जुनाचा पराभव करण्याची प्रतिज्ञा केली, पण कृपाचार्यानें याचा निषेध केला. उलट कर्णानें त्याचा उपहास करून कृपाचार्य व अश्वत्थामा यांना मर्मभेदक भाषणानें दुखविलें. भांडण अत्यंत विकोपास गेलें; परंतु दुर्योधनानें तें मिटविलें ( म. वि. ४८-५१ ). यानें द्रुपद राजाचा मुलगा प्रियदर्शन याचा वध केला होता (म. आ. १३८ कुं.).

भीष्मानें चित्रसेन गंधर्वापासून पांडवांनीं दुर्योधनाचें रक्षण केल्याची ओळख दुर्योधनास देऊन पांडवांशीं समेट करण्यास सांगितलें. पण यावर दुर्योधन नुसता हंसला. कर्ण स्वतःचें अजिंक्यत्व सिद्ध करून भीष्मादिकांचें तोंड बंद करण्याकरितां दिग्विजयासाठीं योग्य मुहूर्तावर निघाला. प्रथम द्रुपदनगरास वेढा घालून द्रुपद व त्याचे अनुयायी यांना जिंकून त्यांच्याकडून कर घेतला. नंतर हा उत्तरेकडे गेला. प्रथम भगदत्तास जिंकून शिवाय हिमवान् पर्वतावरील राजांनाहि जिंकिलें व करभार घेतला. नंतर पूर्वेकडे नेपाल, अंग, वंग कलिंग, शुंडिक, मिथिल, मागध, कर्कखंड, आवशीर, योद्धय, अहिक्षत्र, वत्स भूमि, मृत्तिकावती, मोहननगर, त्रिपुरी व कोसलानगरी जिंकून करभार घेतला. नंतर दक्षिणेकडे कुंडिनपूरच्या रुक्मीशीं युद्ध केलें. युद्धांत कर्णप्रभावानें संतुष्ट होऊन तो शरण आला व कर्णाबरोबर यास मदत करण्यास निघाला. पांड्य. शैल, केरल, नील हे प्रदेश जिंकून करभार घेतला. पुढें यानें शिशुपालि यास जिंकून पार्श्व व अवंती प्रदेशांतील सर्व राजांना जिंकिलें. पुढें कर्ण पश्चिमेकडे गेला, तेथें यवन, बर्बर यांना जिंकून त्यांना कर द्यावयास लाविलें. ह्याप्रमाणें सर्व दिशा जिंकिल्यानंतर कर्णानें म्लेच्छ, अरण्यवासी व पर्वतवासी राजे, मद्र, रोहितक, आग्नेय आणि साल्व, यांचा पराभव केला. नंतर शशक व यवन यांचा पराजय करून नग्नजितप्रभृति महारथी नृपसमुदायास जिंकिलें. अशा तऱ्हेनें सर्व पृथ्वी पादाक्रांत करून कर्ण हस्तिनापुरीं आला. तेथें याचें उत्तम स्वागत झालें. या अपूर्व विजयामुळे दुर्योधनप्रभृतींना कर्ण पांडवांचा युद्धांत पराभव करील असें वाटलें ( म. व. २५५ कुं. ). कलिंगाधिपति चित्रांगदाची कन्या स्वयंवरांत दुर्योधनानें राजपुरांतून हरण केली त्या वेळीं कर्णानें त्याचें रक्षण केलें ( म. शां. ४.२. कुं. ).

दुर्योधनाच्या कृपेनें कर्णास अंगदेशचा राजा होतां आलें. या देशाच्या सीमा पुढीलप्रमाणें आहेत. भागलपूर व त्याभोंवतालीं असलेला मोंघीर प्रदेश धरून अंगदेश झालेला होता. हा भारतवर्षाचे जे अठरा राजकीय भाग त्यांपैकीं एक होता. चंपा किंवा चंपापुरी ही त्याची राजधानी होती. या राज्याचे उत्तरेकडील मर्यादेचें पश्चिम टोंक एके वेळीं गंगा व शरयु यांचा संगम होतें. हें रामायणांतील रोमपादाचें व भारतांतील कर्णाचें राज्य होतें. रामायणांत महादेवानें मदनास येथेंच मारिल्याचा उल्लेख आहे, म्हणून या देशाला अंग व मदनास अनंग असें नांव पडलें ( वा. रा. बा. २३. १३-१४ ). अंगदेशांत बिरभुम व मुर्शिदाबाद हे जिल्हे येतात. कांहीं तज्ज्ञांच्या मतें संताळपरगणेहि यांत येतात. हा देश इंद्रप्रस्थापासून पूर्वेस दूर

गंगातीरावर असणाऱ्या मगध देशाच्या अलीकडे असल्याचें महाभारतांत लिहिलें आहे ( म. स. ३० ). अंगदेशाचें नांव प्रथम अथर्ववेदांत आलें आहे ( अ. वे. ५. १४ ).

अंगराज कर्ण या वेळीं नांवाजलेला धनुर्धर असल्यामुळें व भविष्यकालीं कौरवपांडवयुद्धांत अर्जुनाविरुद्ध हा लढणार असल्यामुळे इंद्रास फार काळजी वाटूं लागली. इंद्रापासून कुंतीला अर्जुन झाला होता. पुत्राचें कल्याण करणें हें त्याचें कर्तव्य असल्यामुळें त्यानें कर्णास हतबल करण्यासाठीं त्याचीं कवचकुंडलें मागण्याचा विचार केला. या कवचकुंडलांमुळें कर्ण अजिंक्य व अमर होता आणि यामुळें कर्णाच्या हातून अर्जुनवध होण्याचा संभव होता. पण कर्ण अत्यंत उदार असल्यामुळें इंद्राची इच्छा पूर्ण होण्याजोगी होती. जशी अर्जुनाची काळजी इंद्राला तशी कर्णाचीहि काळजी सूर्याला होती. इंद्राचा हेतु सूर्यास समजला होता. तेव्हां सूर्य कर्णाच्या स्वप्नांत जाऊन त्यानें यास दर्शन दिलें. त्या वेळीं सूर्यानें इंद्र ब्राह्मणरूपानें येऊन तुझीं कवचकुंडलें मागील, तेव्हां तूं तीं देऊं नकोस; तीं अमृतापासून झालेलीं असून त्यांच्यामुळेच तूं अमर आहेस; तेव्हां तूं तीं देऊन आयुष्यक्षय करून घेऊं नकोस असें सांगितलें. तेव्हां कर्णास सूर्याची ओळख पटली. तो म्हणाला, आयुष्यापेक्षां कीर्ति श्रेयस्कर आहे आणि कीर्तीनेंच उत्तम गति मिळते. असें असतांना मी अमरत्वाच्या आशेनें कवचकुंडलाचा अभिलाष धरणार नाहीं. यावर सूर्य म्हणाला कीं, अर्जुनाचा पराभव करून जिवंतपणीं कीर्ति मिळविण्यासाठीं तूं तीं देऊं नकोस. तेव्हां कर्णानें तें घाफ नाकारिलें; असें पाहून सूर्यास फार खेद झाला. तो म्हणाला. मी तुझ्या हिताचेंहि सांगून तूं ऐकत नाहींस, तर निदान इंद्राजवळून एक शक्ति तरी मागून घे. हें कर्णानें कबूल करून हा इंद्राची वाट पाहूं लागला ( म. व. ३००-३०२ ).

एके दिवशीं इंद्र ब्राह्मणरूपानें कर्णाकडे आला. या वेळीं कर्ण जप करीत होता. त्या वेळीं इंद्रानें याचीं कवचकुंडलें मागितलीं. कोणत्याहि ब्राह्मणानें काय वाटेल तें मागितलें, तरी तें त्यास द्यावयाचें, असें याचें उदार व्रत असे. कर्णानें इंद्रास ताबडतोब होय म्हटलें. हें कवच त्वचेलगत असल्यामुळें सर्व अंग सोलून तें काढावयाचें होतें. तरीहि कर्ण डगमगला नाहीं. त्यानें तीं ताबडतोब काढून इंद्रास दिलीं. तेव्हां इंद्रास आश्चर्य वाटलें व तो प्रसन्न होऊन त्यानें एक अमोघ शक्ति कर्णास दिली आणि सांगितलें कीं, ही शक्ति ज्याच्यावर फेंकशील तो ताबडतोब मरेल, असें बोलून इंद्र गुप्त झाला. कवचकुंडलें कर्तन करून दिल्यामुळें कर्णास वैकर्तन हें नांव पडलें ( म. आ. ६७ ). कवचकुंडलें सोलून काढल्यामुळें विद्रूपपणा येणार, हें जाणून कर्णानें इंद्राला विद्रूपपणा न येण्याचे अटीवर तीं दिलीं ( म. व. ३१० ).

भारतीय युद्धास आरंभ झाल्यानंतर भीष्माच्या मागून द्रोण कौरवपक्षाचा सेनापति झाला. त्या वेळीं घटोत्कचानें कौरवसेनेची फार दाणादाण केली. याचें कारण असें होतें कीं, कृष्णाची कर्णाच्या कवचकुंडलांची जरी भीति गेली होती तरी, वासवी शक्तीची त्यास फार धास्ती होती. ती शक्ति नाहींशी करण्याच्या हेतूनेंच घटोत्कचाची त्या दिवशीं योजना त्यानें केली होती. घटोत्कचानें कौरवसैन्याचा फडशा उडवून त्यांना दे माय धरणी ठाय करून टाकलें. तेव्हां दुर्योधन कर्णाकडे गेला व यास ती अमोघ शक्ति घटोत्कचावर सोडण्याबद्दल विनंति केली. कर्णानें ती मुद्दाम अर्जुनाकरितां ठेविली होती. तसें यानें दुर्योधनास सांगितलें; पण कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं नाखुषीनें ती शक्ति घटोत्कचावर सोडून त्याचा वध केला ( म. द्रो. १७९ ). द्रोणाचार्यांच्या नंतर कर्णास सेनापत्याभिषेक झाला ( म. क. १० ). कर्णासारख्या अद्वितीय योद्धयाला तसाच अद्वितीय सारथि पाहिजे होता. त्या वेळीं फक्त दोन उत्तम सारथि होते. एक श्रीकृष्ण व दुसरा मद्रदेशाधिपति शल्य. पैकीं कृष्ण अर्जुनाचा सारथि होता. तेव्हां दुर्योधनानें शल्यास कर्णाचें सारथ्य करण्यास सांगितलें. यामुळें शल्यास राग येऊन तो, युद्ध सोडून जातों, असें म्हणाला. याचें कारण, तो कौरवांचा पोक्त आप्त व राजा होता. उलटपक्षीं कर्णाचें जन्मवृत्त उघड झालें नसल्यामुळें हा सूतपुत्र म्हणूनच ओळखला जाई. तेव्हां हीनकुलोत्पन्नाचें सारथ्य करणें त्यास अपमानास्पद वाटलें. परंतु कर्णाप्रमाणें शल्यहि दुर्योधनाकरितां तनमनधन खर्च करणारा असल्यामुळें अखेर हेंहि काम त्यानें पत्करिलें. तसें करितांना त्यानें उचित दिसेल तें मी बोलेन व तें कर्णानें सहन केलें पाहिजे अशी अट घातली ( म. क. ३२; ३५ ).

अशा रीतीनें कर्ण सेनापति असतांना घनघोर युद्ध सुरू झालें. भीष्म, द्रोण यांच्या तडाक्यांतून पांडवांचें जें निमेंअधिक सैन्य राहिलें होतें, त्यापैकीं निमेअधिक सैन्याचा यानें फडशा केला. द्रौपदीची विटंबना इत्यादि गोष्टींमुळें याचेंहि मन खात होतें. पण ज्याची खावी भाकरी त्याची करावी चाकरी या न्यायानें भीष्मद्रोणांप्रमाणें यास युद्धास सज्ज व्हावें लागलें. युद्ध चालू असतां प्रथमप्रथम शल्यानें आपल्या अटीचा चांगलाच उपयोग करून घेतला. त्यानें हरएक प्रकारें अर्जुनाचें शौर्य व बल याचें वर्णन करून कर्णास अर्जुनापुढें तुझा टिकाव लागणार नाहीं, असें बजाविलें. कर्ण युद्धाच्या धुमश्चक्रींत असतांना असें धैर्यगलित करून टाकणारें भाषण ऐकून भ्याला नाहीं. यानें त्यास सडेतोड उत्तर देऊन गप्प बसविलें ( म. क.

३६–४० ). यापुढें मात्र शल्यानें यास प्रोत्साहन दिलें ( म. क. ७९; ८४ ).

हें युद्ध चालू असतां कर्णाचा मुलगा वृषसेन याचा वध झाला ( म. क. ८५ ). त्यामुळें यास अपरिमित दुःख झालें व हा मोठ्या त्वेषानें लढूं लागला. याप्रमाणें कर्णार्जुनांचें घनघोर युद्ध सुरू असतां मागील शापाप्रमाणें याची स्थिति होऊं लागली. ब्रह्मास्त्र यास आठवेना. याच्या रथाचें चाक भूमींत रुतून बसलें. त्यामुळें याचा इलाज चालेना. तेव्हां हा रथाच्या खालीं उतरला व चाक उचलण्याचा प्रयत्न करूं लागला. हें करीत असतां यास युद्ध करणें अशक्य होतें; म्हणून अर्जुनाला थोडा वेळ यानें थांबण्यास सांगितलें. पण कृष्ण अर्जुनास म्हणाला कीं, कर्ण अशा स्थितींत आहे तरच त्याचा वध होणें शक्य, नाहीं तर अशक्य आहे. नंतर याच्या दुष्कृत्यांची कृष्णानें यास आठवण देऊन तुझा वध करणें हेंच श्रेयस्कर, असें सांगितलें. अशा रीतीनें कर्ण मोठ्या पेंचांत सांपडला. यानें एका हातानें चाक उचलिलें तों तीं भूमि चार अंगुलें उचलली गेली, पण तें चाक निघेना. दुसऱ्या हातानें तो अर्जुनाशीं लढत होता. अशा स्थितींत कर्ण बेसावध असतांना याचा अर्जुनानें वध केला. या युद्धांत धर्म, भीम व नकुल यांना त्यांचा पराभव करून कर्णानें सोडून दिलें होतें ( म. क. ८७; ९०–९१ ).

कर्णाच्या मृत्यूमुळें गांधारीस फार दुःख झालें ( म. स्त्री. २१ ). याचीं सहा मुलें या युद्धांत मारलीं गेलीं. पैकीं सुदामा व वृषसेन यांना अर्जुनानें, सत्यसेन, चित्रसेन व सुशर्मा यांना नकुलानें आणि सुषेणाला भीमानें मारिलें ( म. आ. २१८. कुं; ७५, क. ८५–८६; श. १० ).

कर्णाचे सहा भाऊ या युद्धांत पडले. पैकीं शत्रुंजय, शत्रुंतप व विपाट हे तिघे अर्जुनानें मारिले ( म. वि. ५८; क. ३२ ). एक अभिमन्यूनें मारिला ( म. द्रो. ४१ ). द्रुम व क्रकरथ यांना भीमानें मारिलें ( म. द्रो. १५५, १५७ ).

कर्णवध अर्जुनानें केला, म्हणून धर्मराजानें त्याची पाठ थोपटली ( म. क. ६९ ). पण कुंतीनें पुढें कर्ण आपला मुलगा असल्याचें पांडवांस सांगितलें ( म. स्त्री. २७ ). यामुळें पांडवांना अत्यंत दुःख झालें. याच वेळीं धर्मानें, बायकांच्या मनांत कांहीं गुप्त राहणार नाहीं, असा शाप दिला ( म. शां. ६ ). भविष्यपुराणांत कर्ण पुढें तारक या नांवानें जन्म घेईल, असें लिहिलें आहे ( भवि. प्रति. ३.१ ).

२ हा मत्स्यमतें अंगपुत्र होय.

३ हा वायुमतें जनमेजयपुत्र होय.

४ कद्रू व कश्यप यांचा पुत्र, एक नाग ( म. आ. ३५ ).

५ कश्यपगोत्री ऋषि.

**कर्णक**—अत्रिकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि ( अत्रि पहा ). हा मंत्रकार होता ( मत्स्य. १४५. १०७–१०८ ).

**कर्णजिह्व**—अत्रिगोत्री ऋषिगण. करजिह्व असा पाठभेद आहे.

**कर्णवेष्ट**—पांडवपक्षीय एक राजा ( म. उ. ४ ).

**कर्णश्रवस आंगिरस**—मंत्रद्रष्टा ( पं. ब्रा. १३. ११. १४ ).

**कर्णश्रुत वासिष्ठ**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ९७. २२–२४ ).

**कर्णिका**—एक अप्सरा.

२ ( सो. वृष्णि. ) वसुदेवाचा भाऊ कंक. त्याची ही स्त्री. हिला ऋतुधामन व जय असे पुत्र होते.

**कर्णिकार**—जटायूच्या पुत्रांतील एक.

**कर्णिरथ ( थ्य )**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**कर्दम**—एक ऋषि ( ब्रह्मांड. २. ३२. ९८–१०० ). याला कर्दम अर्थेहि म्हणतात ( वायु. १. ५९. ९०–९१ ). हा ब्रह्मदेवाच्या छायेपासून उत्पन्न झाला ( भा. ३. १२; म. स. ११ ). हा एक प्रजापति होता ( वायु. २. ४. ५३–५४ ). याचा जन्म स्वायंभुव मन्वंतरांत झाला ( भा. ३. १२ ).

ब्रह्मदेवानें कर्दम ऋषीला प्रजा उत्पन्न करण्यास सांगितलें. हा सरस्वती नदीच्या कांठीं गेला आणि यानें तेथें दहा हजार वर्षे तपश्चर्या केली. तेव्हां यास विष्णूचें दर्शन झालें व तुझें इच्छित पूर्ण होईल असें त्यानें सांगितलें. विष्णु म्हणाला, ब्रह्मदेवाचा पुत्र मनु हा सार्वभौम राजा असून ब्रह्मावर्तांत राहून सप्तसमुद्रांकित पृथ्वीचें पालन करीत असतो. तो धर्मज्ञ राजर्षि आपल्या शतरूपानामक पट्टराणीसह परवांच्या दिवशीं येथें येईल, त्याची उपवर कन्या देवहूति आपल्याला योग्य पति केव्हां मिळेल याची वाट पाहत आहे, ती तुला अनुरूप आहे; तेव्हां तूं तिच्याशीं लग्न कर. ती तुझी उत्तम प्रकारें सेवा करील. तिच्या उदरीं तुझ्या वीर्यासह मी प्रवेश करून अवतार घेईन व सांख्यशास्त्र निर्माण करीन एवढें बोलून विष्णु निघून गेला.

पुढें कर्दमाकडे मनुराजा आपल्या राणीसह आला. त्यानें आपली कन्या देवहूति मोठ्या समारंभानें कर्दमास अर्पण केली. कर्दमानें विष्णूच्या म्हणण्याप्रमाणें तिचा स्वीकार केला. पण एकदांच समागम करण्याची अट घालून समागमानंतर संन्यास घेणार असें बजाविलें. अशा तऱ्हेनें उभयतां कालक्रमण करीत असतां पतिव्रता देवहूतीची सेवा पाहून कर्दम संतुष्ट झाला व पत्नीस इच्छित सांग, म्हणून म्हणाला. तेव्हां तिनें संभोगाची

इच्छा दर्शविली. हा पूर्वजन्मीं क्षत्रिय असून सौभरीनें याला गणेशव्रत सांगितलें होतें (गणेश. १.१५१). तें कर्दमास मान्य होऊन यानें एक विमान निर्माण करून त्यांत समागमाचीं ऐश्वर्ययुक्त साधनें निर्माण करून शंभर वर्षें एकसारखा समागम केला. तेव्हां देवहूतीला कला, अनसूया, श्रद्धा, हविर्भू, गति, क्रिया, ख्याति, अरुंधती व शांति या नऊ मुली झाल्या. त्या ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून अनुक्रमें मरीचि, अत्रि, अंगिरा, पुलस्त्य, पुलह, क्रतु, भृगु, वसिष्ठ आणि अथर्वा यांना प्रजोत्पादनाकरितां दिल्या. देवहूतीच्या पोटीं कपिल या नांवानें विष्णूनें जन्म घेतला. पुढें कर्दमानें कपिलास एकांतांत भेटून नमस्कार केला. कर्दम यानंतर संन्यास घेऊन वनांत जाऊन विष्णुध्यानानें वैकुंठास गेला ( भा. ३. २१-२४ ).

**कर्दमायन शाखेय**--अत्रिकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**कर्मजित्**--( मगध. भविष्य. ) बृहत्सेन राजाचा पुत्र. याचा पुत्र सुतंजय.

**कर्मश्रेष्ठ**—स्वायंभुव मन्वंतरांतील पुलहाच्या तीन पुत्रांतील ज्येष्ठ. त्याच्या आईचें नांव गति ( भा. ४. १ ).

**कर्मायन**--एक ब्रह्मर्षि ( भृगु पहा ).

**कर्षिण**—कृतणबद्दल पाठभेद.

**कर्षिनू**--शुक्राचार्याच्या चार पुत्रांतील कनिष्ठ.

**कर्षण**--एक मुनि ( पुरुयशस् पहा ).

**कल**--सिंधु दैत्याचा मेहुणा ( गणेश. २. ११८ ).

**कलश**--एक सर्प ( म. उ. १०३ कुं. ).

**कलशपोतक**--कद्रूपुत्र.

**कलशीकंठ**--अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**कलहा**—सौराष्ट्र नगरांत राहणाऱ्या भिक्षु नांवाच्या ब्राह्मणाची ही पत्नी. त्याच्या उलट वागणें हाच हिचा स्वभाव असे. म्हणून हिच्या नवऱ्यानें हिच्याशीं उलट बोलण्याचा नियम धरला होता. त्या योगानें त्याच्या इच्छेप्रमाणें सर्व कामें पार पडत असत. एकदां चुकून त्यानें हिला श्राद्धाचे पिंड गंगेंत टाकण्यास सांगितलें. त्याबरोबर पतीच्या बोलण्याच्या उलट करण्याच्या हेतूनें हिनें ते पिंड गंगेंत न टाकतां शौचकुपांत टाकले. असा हिचा दुष्ट स्वभाव होता. त्यामुळें हिला पिशाचयोनि प्राप्त झाली. तीमधून धर्मदत्तानें हिचा उद्धार केला ( आ. रा. सार. ४ ). करवीरस्थ धर्मदत्तानें द्वादशाक्षरी मंत्र व कार्तिकमासाचें अर्धे पुण्य देऊन हिला मुक्त केलें. या पुण्यानें पुढल्या जन्मीं धर्मदत्त व कलहा दशरथकौसल्या होऊन यांच्या पोटीं राम झाला ( पद्म. उ. १०६-१०७; कैकेयी पहा ).

**कला**—कर्दम प्रजापति व देवहूति यांच्या नऊ कन्यांतील पहिली, मरीचि ऋषीची स्त्री. हिला कश्यप व पूर्णिमा असे दोन पुत्र होते ( भा. ३. ४.१ ).

२ बिभीषणाची ज्येष्ठ कन्या. ही रामाकडील कुशलवृत्त अशोकवनिकेंत वारंवार जाऊन सीतेस कळवीत असे (वा.रा.सुं.३७).

**कलाधर**—हा विद्याधर दुर्वासानें दिलेल्या शापांतून अरुणाचलेश्वरास प्रदक्षिणा घालून मुक्त झाला ( स्कंद. १. ३. २.२३ ). यानें एका बाणावर त्रिपुराला नगर बांधून दिलें व त्याकडून शंकराकडील चिंतामणीची मूर्ति आणवून घेतली ( गणेश. १. ४१ ).

**कलापि**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**कलावती**—( दाशार्ह पहा ).

२ ( नारद पहा ).

३ सत्यनारायणाच्या प्रसादाचा अपमान केल्यानें काय होतें हें सांगण्याकरितां सत्यनारायणमहात्म्यांत हिची गोष्ट आहे.

**कलि**—एक म्हातारा ब्राह्मण. याला अश्विनीं तरुण केलें ( ऋ. १०. ३९. ८ ) व बायको दिली (ऋ. १. ११२.१५).

२ हा अधर्माच्या वंशांतील क्रोध व हिंसा यांचा पुत्र. यास दुरुक्ति नांवाची बहीण होती. हिला कलीपासून भय नामक पुत्र व मृत्यु नामक कन्या अशीं दोन अपत्यें झालीं ( भा. ४.८. ३-४ ). हा दमयंतीस्वयंवरास निघाला असतां वाटेंत इंद्रानें स्वयंवर झाल्याचें सांगितल्यावरून यास क्रोध आला व यानें नलाचे शरीरांत प्रवेश केला व त्यास द्यूत खेळावयास लावून अतिशय पीडिलें. पुढें दमयंतीच्या शापामुळें हा बाहेर आला व तक्षकाच्या त्रासामुळें तुझ्या शरीराचा आश्रय घेतला, असें त्यास सांगितलें. नंतर यानें एका झाडांत प्रवेश केला. याचे अवतारांतील कलियुगाचें वर्णन मार्कंडेयांनीं युधिष्ठिरास सांगितलें आहे ( म. व. ५८; ५९; ७२; १९० ). यास तिष्य असें नामांतर आहे. ( म. भी. १०. ३ कुं. ).

यानें वृषभरूप धर्माचा व गोरूप पृथ्वीचा छळ आरंभिला हें पाहून परीक्षितानें यास राहावयास पांच जागा दिल्या. द्यूत, मद्यपान, स्त्रीसंग, हिंसा व सुवर्ण ( भा. १. १७ ). हें सर्व रूपक आहे. हा जातीनें म्लेच्छ आहे. प्रद्योतानें म्लेच्छांचा संहार केल्यावर कलि नारायणाकडे गेला व यानें नारायणाची स्तुति केली. यानें भगवंताला सांगितलें कीं, प्रद्योत व त्याचा वेदवान् यांनीं माझें स्थान नाहींसें करून टाकलें आहे. तेव्हां विष्णूनें याला सांगितलें कीं, मी तुझी इच्छा पूर्ण करीन. नंतर विष्णूच्या अंगाच्या मलापासून म्लेच्छाच्या वंशाची वृद्धि करणारा अदम व त्याची पत्नी हव्यावती हीं उत्पन्न झालीं. नंतर कलि नीलपर्वतावर गेला. तेथें कलीनें अदम व हव्यावतीस कांहीं दिवस ठेविलें ( भवि. प्रति १. ४ ).

३ कश्यप व मुनि यांच्या पुत्रांतील एक. याचें वरूथिनी नामक अप्सरेवर प्रेम होतें. पण तिनें यास झिडकारिलें होतें. या तिच्या झिडकारण्यामुळें हा अतिशय दुःखी होऊन नेहमीं तिच्या पाठीमागें असे. एकदां तिचें एका मुनीवर लक्ष गेलें. पण त्यानें तिला झिडकारिलें. ही संधि साधून यानें त्या मुनीचे रूपानें येऊन तिला अशी एक अट घातली कीं, तिनें यास हा तिच्यासह क्रीडा करीत आहे, तोंपर्यंत पाहूं नये. पुढें हा तिच्याशीं रममाण झाला. याजपासून तिला स्वरोचि नांवाचा पुत्र झाला ( मार्कं. ४९ ). यास त्याचे भार्येच्या ठिकाणीं निर्मार्ष्टि नामक कन्या झाली ( निर्मार्ष्टि पहा; मार्कं. ४८ ).

**कलि प्रागाथ**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ६६ ).

**कलिंग**—(सो. अनु.) हा बलीच्या सहा पुत्रांतील एक. हा बलीच्या भार्येस दीर्घतमसपासून झाला. ( अंग पहा ).

२ हा द्रौपदीस्वयंवरांत होता ( म. आ. २०१ ).

३ कृतयुगांतील एक दैत्य. यानें स्वर्ग जिंकून दिग्पालांचे ठिकाणीं दैत्य स्थापन केले. पण श्रीमाता देवीनें याचे उरावर पर्वत ठेवून त्यावर ती स्वतः बसली ( स्कंद ७. ३. २२ ).

**कलिल**—सोमाचा पुत्र.

**कल्कि**—कलियुगांतील बौद्धावतारानंतर होणारा अवतार. हा शंभल गांवीं राहणाऱ्या विष्णुयशस नामक ब्राह्मणाच्या घरीं दहावा किंवा अकरावा अवतार होईल. कलियुगांत माजलेल्या अधर्माचें हा उच्चाटन करील. सर्व दैत्यरूपी म्लेच्छांचा समूळ नाश करील. सर्व पृथ्वी म्लेच्छमय झाल्यावर हा हातांत लांब तलवार घेऊन देवदत्त अश्वावर बसून तीन रात्रींत दैत्यांचा संहार करील. या समयीं कोट्यवधि राजांचा वध होईल. कलीचें शासन व नाश यासाठींच हा अवतार होईल ( म. व. १९०; पद्म. उ. २५२; ब्रह्म. २१३. १६४; ब्रह्मवै. २. ७; विष्णुधर्म. १. ७४; ह. वं. १. ४१; भा. १. ३; २. ७; १२.२ ). या अवतारसमयीं कृतयुगास आरंभ होईल ( विष्णुधर्म. १. ७४). याप्रमाणें अवतार कार्य संपवून हा समाधिस्थ होईल ( ब्रह्मवै. २. ७ ). त्या समाधीपासून योगाग्नि उद्भवेल व प्रलय होईल. कलि बलीजवळ जाईल. पुनः कर्मभूमि उत्पन्न होऊन वर्णोत्पत्तिहि होईल. वैवस्वत मनु याच्या आज्ञेनें अयोध्येंत राज्य करील (भवि. प्रति. ४. २६ ). हा अदृश्य, पराशरगोत्री, ब्राह्मणसैन्ययुक्त व याज्ञवल्क्याचें साहाय्य असलेला असा असेल ( ब्रह्मांड. ३. ७३-१०४; विष्णुयशस् पहा ).

**कल्प**—( स्वा. उत्तान. ) ध्रुवास भ्रमीपासून झालेला पुत्र.

२ सैंहिकेयांतील एक ( विप्रचित्ति पहा ).

३ ( सो. यदु. ) वसुदेवास उपदेवेपासून झालेला पुत्र.

**कल्मष**—वायूनें सूर्याच्या सेवेस नेमलेला एक पारिपार्श्वक ( भवि. ब्राह्म. ५३ )

**कल्मषपावन**—( सू. ) भविष्यमतें सर्वकामाचा पुत्र.

**कल्माष**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

२ सूर्याच्या द्वारपालांतील एक ( भवि. ब्राह्म. ७६ ).

**कल्माषपाद**—( सू. इ. ) सुदास राजाचा पुत्र. कोसलाधिपति मित्रसह, अगर सौदास राजा, याचे नामांतर ( म. आ. १७७; वायु. २. २६; लिंग. १. ६६; ब्रह्म ८; ह. वं. १. १५ ); पण याला ऋतुपर्णाचा पुत्र म्हटलें आहे ( मत्स्य. १२; अग्नि. २७३ ). या नांवानें हा विशेष प्रख्यात होता. हें नांव यास पडण्यास कारण असें घडलें कीं, एकदां हा अरण्यांत मृगयेस गेला असतां यानें तेथें दोन वाघ पाहिले. ते एकमेकांचे मित्र होते ( वा. रा. उ. ६५ ). ते भाऊ भाऊ होते ( भा. ९. ९ ). हा राजा रेवा व नर्मदा या नद्यांचे तीरीं शिकार करीत असतां नर्मदातीरीं यानें एक वाघांचें मैथुनासक्त जोडपें पाहिलें. त्यांतील वाघिणीस यानें मारिलें. पण ती मरतां मरतां फार मोठी झाली ( नारद. १. ९). तेव्हां दुसरा वाघ राक्षस होऊन, तुझा सूड मी केव्हां तरी उगवीन, असें राजास बजावून गुप्त झाला. पुढें एकदां यानें अश्वमेधयज्ञास सुरुवात केली. तेव्हां यज्ञनिमित्तानें वसिष्ठऋषि बराच काळ याजकडे राहिला होता. यज्ञसमाप्तीचे वेळीं एके दिवशीं वसिष्ठ स्नानसंध्येस गेलेला पाहून त्या राक्षसानें वसिष्ठाचें रूप धारण केलें व तो राजास म्हणाला कीं, आज यज्ञ समाप्त झाला असल्यामुळें तूं मला मांसयुक्त भोजन लवकर दे. राजानें आचाऱ्यांस बोलावून तसें करण्याची आज्ञा केली. राजाज्ञेमुळें आचारी गोंधळून गेले. परंतु पुनरपि त्या राक्षसानेंच आचाऱ्याचा वेष धारण करून मानुष मांस राजाच्या स्वाधीन केलें. नंतर तें अन्न राजानें पत्नी मदयंतीसह गुरूस अर्पण केलें. तेव्हां भोजनार्थ आलेलें मांस मानुष आहे, असें समजून वसिष्ठ अत्यंत क्रुद्ध झाला व त्यानें राजास नरमांस भक्षक राक्षस हो असा शाप दिला. तेव्हां आपणच मला असें सांगितलें, असें म्हणतांच वसिष्ठानें अंतर्दृष्टीनें शोध केला. तेव्हां त्याला हें राक्षसाचें कृत्य कळून आलें. नंतर तो म्हणाला कीं, माझें भाषण खोटें होणार नाहीं. तूं फक्त बारा वर्षें नरमांसभक्षक होशील. हें श्रवण केल्यानंतर यानें क्रुद्ध होऊन मुनीला शाप देण्याकरितां हातांत पाणी घेतलें. पण याच्या भार्येनें गुरूला शाप देणें आपणांस योग्य नव्हे, असें सांगून याचा निषेध केला. तेव्हां तें पाणी जमिनीवर टाकलें, तर धान्यादिकांची रक्षा करील व आकाशांत टाकलें तर मेघ वाळून जातील, तसें होऊं नये म्हणून यानें

तें पाणी स्वतःच्या पायांवर घेतलें. तें याच्या क्रोधानें इतकें भरून गेलें होतें कीं, त्या पाण्याच्या योगानें याचे पाय काळसर झाले व तेव्हांपासून यास कल्माषपाद म्हणूं लागले ( वा. रा. उ. ६५; विष्णु. ४. ४; भा. ९. ९; नारद. १. ८-९; पद्म.उ. १३२; स्कंद. ३. ३. २ ). हा राक्षस होण्याचें कारण महाभारतादि ग्रंथांत निराळ्या प्रकारचें आहे. एकदां हा शिकारीहून राजधानीस परत येत असतां जेथून एकाच माणसास जातां येईल, अशा अडचणीच्या जागीं याची वसिष्ठ ऋषीचा पुत्र शक्ति याची गांठ पडली. त्यास दूर सरण्यास, सांगितलें यानें पण तो कांहीं केल्या सरेना. उलट तोच राजास सांगूं लागला कीं, रस्ता ब्राह्मणांचा आहे, राजानें ब्राह्मणास मार्ग दिलाच पाहिजे असा धर्म आहे. शेवटीं याला अतिशय संताप येऊन यानें राक्षसाप्रमाणें त्या ऋषीस चाबकाखालीं झोडलें. तेव्हां शक्तीनें कल्माषपादास शाप दिला कीं, तूं आजपासून नरभक्षक राक्षस होशील. हाच राजा यज्ञ करण्यास तयार झाला असतां विश्वमित्रानें याचा अंगिकार केला व म्हणून विश्वामित्र व वसिष्ठ यांत वैर पडलें. पुढें विश्वामित्रानें यास तूं ज्यास मारलेंस तो वसिष्ठपुत्र शक्ति असें सांगितलें. तेव्हां याला फार वाईट वाटलें. पुढें शक्तीकडे उश्शाप मागण्यास गेला असतां विश्वमित्रानें याच्यांत रुधिरराक्षसास प्रवेश करण्याची आज्ञा केली (लिंग. १.६४ ). नंतर राक्षसानें पछाडलेला हा राजा वनांत हिंडत असतां एका ब्राह्मणाच्या नजरेस पडला. त्या क्षुधाक्रांत ब्राह्मणानें याजपाशीं मांसयुक्त भोजन मागितलें. त्यास दोन घटका थांबण्यास सांगून हा निघून गेला व अंतःपुरांत स्वस्थ निजला. मध्यरात्रीं जागा झाल्यावर यास ब्राह्मणांस दिलेल्या वचनाची आठवण झाली. तेव्हां यानें आचाऱ्यास मांसयुक्त अन्न तयार करण्यास सांगितलें. पण तेथें मांस बिलकुल नव्हतें. तेव्हां राजानें त्यास म्हटलें, दुसरें कसलें मांस नसलें तर, मनुष्याचें कां होईना ? पण त्यास जेवावयास घाल म्हणजे झालें ! तेव्हां त्या आचाऱ्यानें आज्ञेप्रमाणें करून तें अन्न तपस्वी ब्राह्मणास नेऊन दिलें. तेव्हां तें अभोज्य आहे, हें जाणून त्यानेंहि यास नरमांसभक्षक राक्षस हो, असा शाप दिला. पुढें या दोन्ही शापांच्या योगानें याच्या अंगीं राक्षसाचा संचार तिसऱ्या दिवशीं झाला. (म. आ. १७६; वायु. १. २).

पुढें थोडक्याच कालानें याची व शक्तीची गांठ पडली. वंशावळीच्या दृष्टीनें हें बरोबर नाहीं ( शतयातु पहा ). तेव्हां ज्या अर्थी तूं मला अयोग्य शाप दिला आहेस, त्या अर्थी तुझ्यापासूनच मी भक्षणास सुरवात करतों, असें म्हणून त्यास यानें खाऊन टाकलें. पुढें या राजाच्या शरीरांत शिरलेल्या राक्षसास विश्वामित्रानें वारंवार उपदेश केल्यावरून या राजानें वसिष्ठाचे शंभरहि पुत्र खाऊन टाकले. पुढें वसिष्ठानें शोकामुळें जीव देण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण तो कांहीं यशस्वी झाला नाहीं ( म. आ. १७४; १७७; अनु. ३; लिंग. १.६४; ब्रह्मांड. १.१२ ). पुढें एकदां हा नर्मदातीरीं ( नारद. १.९ ) वनांत भटकत असतां यानें एक ब्राह्मणदांपत्य क्रीडेंत निमग्न असें पाहिलें. त्यांस पाहतांक्षणींच कल्माषपादानें धांवत जाऊन त्यांतील ब्राह्मणास भक्षिलें. तेव्हां ती ब्राह्मणी क्रुद्ध होऊन, तुझा स्त्रीशीं समागम होतांच तूं मृत होशील, असें बोलून सती गेली (म. आ. १८२; विष्णु. ४.४; भा. ९. ९; स्कंद. ३. ३. २.).

वसिष्ठानें यास तूं राक्षस होशील व पुढें गंगाबिंदु अंगावर पडला म्हणजे मुक्त होशील, असा उश्शाप दिला. मात्र ब्राह्मणीनें शाप मागील देऊन तूं सदा राक्षसच राहशील असाहि शाप दिला. राजास या दुसऱ्या शापाचा राग येऊन यानें तिला पुत्रासह तूं पिशाची हो, म्हणून उलट शाप दिला. पुढें ती पिशाची व हा राक्षस हीं दोघें एका पिंपळाजवळ आलीं. तेथें कल्माषपादाचा व सोमदत्त नामक एका ब्रह्मराक्षसाचा गुरुविषयीं संवाद होऊन त्यांचें पाप नष्ट झालें. तिकडून एक कोणी कलिंगदेशीय गर्ग मुनि गंगा घेऊन चालला होता. यांच्या विनंतीवरून त्यानें यांच्या अंगावर गंगोदक शिंपडतांच पिशाची व तो ब्रह्मराक्षस हीं मुक्त झालीं. हा शोक करीत असतां आकाशवाणी झाली कीं, दुःख करूं नको. तूंहि मुक्त होशील. तेव्हां हा काशीला गेला व नंतर यानें सहा महिने गंगास्नान केलें. त्यामुळें सर्व पातकांपासून मुक्त होऊन वसिष्ठानें यास मोठ्या सन्मानानें राज्याभिषेक केला. हा गौतम ऋषीच्या अनुज्ञेनें गोकर्णक्षेत्रीं जाऊन मुक्त झाला व अंतीं शिवलोकीं गेला ( स्कंद. ३. ३.२; नारद. १. ८-९ ). हा साभ्रमतींत स्नान करून मुक्त झाला ( पद्म. उ. ६. १३२ ).

अरण्यांत याची स्त्री मदयंती ही सदा यांच्याबरोबर असे ( म. आ. १८२ ). हा दिवसाच्या सहाव्या प्रहरीं आहार करीत असे. तेव्हां मात्र ती याच्या नजरेस पडत नसे. एकदां गौतमशिष्य उत्तंक हा अहल्येनें मागितल्यावरून मदयंतीचीं कुंडलें आणण्यास आला होता. त्यास हा खाण्यास धांवला; पण त्यानें कार्य झाल्यावर तुझ्याकडे पुनः येतों, असें सांगितल्यावरून त्यास कार्य काय म्हणून यानें विचारलें व कार्याकरितां उत्तंकास मदयंतीकडे जाण्यास सांगितलें. मदयंतीनें पतीकडून एक खूण घेऊन येण्यास सांगितलें. ती खूण याकडून नेतांच तिनें तीं कुंडलें उत्तंकास दिलीं व संभाळून नेण्यास सांगितलें. जातांना कल्माषपादानें उत्तंकास प्रतिज्ञेंतून मुक्त केलें ( म. आश्व. ५६-५७ ). पुढें याचें राक्षसत्व संपल्यावर वसिष्ठानें यास राज्याभिषेक केला. पतिव्रतेच्या वरील शापामुळें यास प्रजोत्पादन करतां येईना, तेव्हां यानें आपली स्त्री मदयंती हिच्या ठायीं

वसिष्ठाकरवीं गर्भस्थापना करविली. तोच अश्मक होय ( म. आ. १२२; १७७; शां. २३४; अनु. १३७; वा. रा. सुं. २४; विष्णु. ४. ४; भा. ९.९; नारद. १.९; वायु. २.२६; लिंग. १.६६; ब्रह्मांड. ३.६३; कूर्म. १.२१ ). यास सर्वकर्मा पुत्र दिला आहे ( मत्स्य. १२; ब्रह्मांड. ८; अग्नि. २७३; ह. वं. १.१५ ). याचा व वसिष्ठाचा गाईच्या माहात्म्याबद्दल संवाद झाला होता. यानें बऱ्याच गाई दान केल्या व मरणानंतर हा सद्गति पावला ( म. अनु. ७८-८० ).

**कल्याण**—एक वैश्य. सिंधुदेशांतील पाली गांवीं राहत असे. याची बायको इंदुमती. मुलगा बल्लाळ. हा पुढील जन्मीं दक्ष झाला ( गणेश. १. २२ ).

२ स्वर्गप्राप्तीसाठीं सत्रानुष्ठान करणाऱ्या अंगिरसांना देवांच्याकडे जाण्याचा जो देवयानमार्ग तो सांपडेना. त्या सत्रानुष्ठान करणारांपैकींच एक कल्याणनामक ऋषि या देवयानासंबंधीं विचार करीत ऊर्ध्वमार्गानें जात असतां वाटेंत याला अप्सरांच्यासह झोंपाळ्यावर बसून क्रीडा करीत असलेला एक ऊर्णायुनामक गंधर्व आढळला. त्या गंधर्वाला यानें देवयानासंबंधीं माहिती विचारिली असतां देवयानमार्ग मिळवून देणाऱ्या एका सामाचा त्यानें याला उपदेश केला. तेव्हां कल्याणानें देवयानमार्ग मिळवून देणारा साम मला मिळाला आहे, असें येऊन अंगिरसांना सांगितलें. कोणाकडून मिळाला हें सांगण्याचें नाकारिलें. त्या और्णायुवनामक सामाच्या योगानें अंगिरसांना स्वर्गप्राप्ति झाली. परंतु कल्याण खोटें बोलल्यामुळें याला मात्र स्वर्ग मिळाला नाहीं. व कोड झालें. और्णायव साम या नांवाऐवजीं और्णायुव साम असें नांव दिलें आहे. हाहि एक अंगिरसच होता ( पं. ब्रा. १२. ११. १०-११ ).

**कल्याणिनी**—धरनामक वसूची स्त्री. हिला द्रविण अथवा रमणनामक पुत्र होता.

२ एक अप्सरा. भीमद्वादशीव्रत केल्यानें ही इंद्रपत्नी शची झाली व हिच्या दासीनें तें व्रत केल्यानें ती कृष्णपत्नी सत्यभामा झाली ( पद्म. सृ. ३ ).

**कवचिन्**—धृतराष्ट्रपुत्र. याला भीमानें मारिलें ( म. क. ८८ ).

**कवष ऐलूष**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. ३१-३३). हा कुरुश्रवणाचा उपाध्याय होता (ऋ. १०. ३२. ९). इलूषपुत्र कवष सरस्वतीतीरावरील अंगिरसांच्या सत्रांत आला असतां शूद्रापुत्र, अब्राह्मण व जुगारी म्हणून यास यज्ञास अयोग्य ठरविण्यांत आलें. व याला रानांत सोडून पाणीहि मिळूं नये अशी व्यवस्था केली. पण अपोनप्त्रीय सूक्त म्हटल्यानें सरस्वती आपणहून याच्याकडे वळली. त्या जागेस परिसारक असें नांव अद्यापि आहे. पुढें ऋषींनीहि याची थोरवी जाणून याला परत बोलाविलें ( ऐ. ब्रा. २. १९; कौ. ब्रा. १२. १-३ ). सांख्यायन ब्राह्मणांत हा अब्राह्मण होता, म्हणूनच याला यज्ञांतून घालविलें असें स्पष्ट आहे. तृत्सूकरितां कवषादिकांचा इंद्रानें पराजय केला व यांचे बळकट किल्ले उध्वस्त केले ( ऋ. ७. १८. १२ ). याच्या सूक्तांत कुरुश्रवण, उपमश्रवस् व मित्रातिथि यांचा निर्देश आहे (ऋ. १०.३२-३३). मित्रातिथीच्या मृत्यूनें दुःखी झालेल्या उपमश्रवसूच्या समाचाराला हा आला होता. कवषस्मृति म्हणून एक ग्रंथ उपलब्ध आहे. या ग्रंथाचा उल्लेख पराशरस्मृतिव्याख्येंत केला आहे ( C. C. ).

२ एक आचार्य. युधिष्ठिराच्या राजसूययज्ञांतील होता नांवाचा ऋत्विज होता ( भा. १.९; १०.७४ ).

**कवषा**—एक ऋषिपत्नी. तुर ऋषीची माता (तुर पहा).

**कवि**—स्वायंभुव मन्वंतरांतील ब्रह्मपुत्र भृगुऋषि, त्याच्या तीन पुत्रांतील कनिष्ठ. याचा पुत्र उशनाऋषि. सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ४७-४९; ७५-७९; म. आ. ६७. ४२ कुं. ).

२ प्रियव्रत राजर्षीस बर्हिष्मतीपासून झालेल्या दहा पुत्रांतील कनिष्ठ. हा बाल्यावस्थेपासून विरक्त होता ( भा. ५.१ ).

३ तामस मन्वंतरांतील सप्तर्षींतील एक.

४ रैवत मनूच्या दहा पुत्रांतील पांचवा.

५ ( स्वा. प्रिय. ) भागवतमतें ऋषभदेव व जयंती यांच्या नऊ सिद्ध पुत्रांतील ज्येष्ठ.

६ वैवस्वत मनूच्या दहा पुत्रांतील कनिष्ठ. हा विरक्त होऊन अरण्यांत गेला ( भा. ९.२ ).

७ भागवतमतें मनुवंशी यज्ञ व दक्षिणा यांचा पुत्र.

८ वैवस्वत मन्वंतरांतील ब्रह्मपुत्र. यास वारुणि कवि अशी संज्ञा होती. यास कवि, काव्य, धृष्णु, उशनस्, भृगु, विरजस्, काशि व उग्र असे आठ पुत्र होते ( म. अनु. ८५ ).

९ ब्रह्मपुत्र जो वारुणि कवि त्याच्या आठ पुत्रांतील ज्येष्ठ ( म. अनु. ८५ ).

१० ( सो. पूरु. ) दुरितक्षयाचा मधला मुलगा. हा तपानें ब्राह्मण झाला ( भा. ९. २१. १९ ).

११ कौशिकऋषीच्या सात पुत्रांतील एक.

१२ कृष्णास कालिंदीपासून झालेला मुलगा.

१३ कृष्णाचा एक प्रपौत्र. हा महारथी होता.

१४ शुक्राचार्यांचा कवि शब्दानें उल्लेख असतो (उशनस् पहा).

१५ स्वारोचिष मन्वंतरांतील एक देव.

१६ शिवाचे श्वेत नांवाचे जे दोन अवतार झाले, त्यांपैकीं दुसऱ्याचा शिष्य.

**कविरथ**—( सो. पूरु. भविष्य. ) भागवतमतें चित्ररथाचा पुत्र. मत्स्यांत शुचिद्रथ, वायूंत शुचिद्रथ व विष्णूंत शुचिरथ, असे पाठभेद आहेत.

**कव्यवाह्**—पितरविशेष. ब्रह्मदेवाची मानसकन्या संध्या, हिला पाहून दक्षादि मोहित झाले असतां त्यांच्या अंगापासून गळलेल्या स्वेदबिंदूपासून यांची उत्पत्ति आहे. यांत सोमप, आज्यप व स्वकालीन असे भेद आहेत. क्रतूचे पुत्र ते सोमप, वसिष्ठाचे स्वकालीन व पुलस्त्याचे आज्यप हे सर्व हविर्भोगी आहेत. यानें नारदाची नरकास माहिती सांगितली (दे. भा. ११. १५). कव्य म्हणजे पितरांना दिलेलें अन्न, ते पितरांना पोंचविणारास कव्यवाह म्हणतात (बर्हिषद पहा).

**कंका**—(सो. कुकुर.) ही वायुमतें उग्रसेनकन्या होय.

**कशाय**—एक शाखाप्रवर्तक (पाणिनि पहा).

**कशु चैद्य**—ब्रह्मातिथि काण्वानें याच्या औदार्याची प्रशंसा केली आहे. यानें ब्रह्मातिथीला शंभर उंट, दहा हजार गाई आणि दहा राजे (सेवकरतां) दिले. हा इतका उदार होता कीं, यानें देणगी दिल्यावर दुसऱ्याकडे जावेंच लागत नसे. याचें राज्यहि विस्तृत होतें (ऋ. ८. ५. ३७–३९).

**कशेरुक**—एक क्षत्रिय. याला कृष्णानें मारलें (म. स. ६१ कुं.).

**कशेरुमत्**—एक क्षत्रिय. याला कृष्णानें मारलें (म. व. १२).

**कशोजू**—दिवोदासाचें नांव असावें (ऋ. १. ११२. १४).

**कश्यप**—'त्र्यायुषपस्य' ह्या मंत्रांत आयुष्यवृद्धीची प्रार्थना करितांना याचा निर्देश झाला आहे (जै. उ. ब्रा. ४. ३. १). हा अग्नीचा शिष्य. याचा शिष्य विभांडक (वं. ब्रा. २). कश्यप मारीचाचीं ऋग्वेदांत बरींच सूक्तें आहेत (ऋ. १. ९९. ८.२९; ९. ६४; ६७. ४–६; ९१; ९२; ११३; ११४; १०. १३; ७. २). याच्या कुलांतील मंत्रकार पुढें दिलें आहेत (हरित, शिल्प, नैध्रुव पहा). याचा व वसिष्ठाचा निकट संबंध आहे (बृ. उ. २. २. ४).

इंद्रियांचें अधिष्ठान जें शरीर त्याचें पालन करणारा जीव म्हणजे कश्यप होय (म. अनु. १४२). ब्रह्मयाचा मानसपुत्र. मरीचिपत्नी व कर्दमाची कन्या कला हिला कश्यप व पूर्णिमा असे दोन पुत्र झाले. पैकीं कश्यप हा ज्येष्ठ होय (भा. ४. १). याला तार्क्ष्य व अरिष्टनेमि अशीं नामांतरें होतीं. हा सप्तर्षींपैकीं एक असून प्रजापतींपैकींहि एक होय (म. श. ४९. ५२; अनु. १४१).

पण सप्तर्षींच्या यादींत कश्यपाऐवजीं भृगु व मरीचि अशीं नांवेंहि आढळतात. स्वायंभुव व वैवस्वत मन्वंतरांतील ब्रह्मपुत्र मरीचि वास्तविक एकच. तेव्हां दोन्ही वेळचा कश्यपहि एकच. यास पूर्णिमानामें सख्खा भाऊ होता व सहा सापत्न बंधु होते. याच्या सापत्न मातेचें नांव ऊर्णा होय. अग्निष्वात्त नामक पितर हेहि याचेच बंधु होत. यास सुरूपा नामक एक बहीणहि होती व ती वैवस्वत मन्वंतरांतील अंगिरा नामक ब्रह्मयाचे मानसपुत्रास दिली होती (वायु. २. ४. ५).

एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केल्यावर परशुरामानें सरस्वतीतीरीं रामतीर्थावर अश्वमेध यज्ञ केला. त्या वेळीं त्याचा अध्वर्यु कश्यप होता. दक्षिणा म्हणून कश्यपास पृथ्वी दान मिळाली. आतां अवशिष्ट क्षत्रियांचा नाश न व्हावा म्हणून कश्यपानें परशुरामास आपल्या प्रदेशाच्या हद्दीबाहेर जाऊन राहावयास सांगितलें व त्याप्रमाणें परशुराम समुद्रानें उत्पन्न केलेल्या शूर्पारकदेशीं जाऊन राहिला. परंतु भारतांत याला कोंकण म्हटलें आहे. मुंबईजवळ सोपारा म्हणून एक गांव आहे तें हें असावें (म. शां. ४९). पुढें कश्यपानें पृथ्वी ब्राह्मणांचें स्वाधीन केली व आपण वनांत राहावयास गेला.

पुत्रेच्छेनें कश्यप यज्ञ करीत असतां सर्व देव, ऋषि व गंधर्व यांनीं त्याला मदत केली. अशा तऱ्हेनें मदत करीत असतां इंद्रानें वालखिल्यांचा उपमर्द केला व त्यामुळें ते संतापले. या संतापापासून आपलें रक्षण करून घेण्याकरतां इंद्र कश्यपास शरण गेला. तेव्हां कश्यपानें वालखिल्यांस मोठ्या युक्तीनें खूष केलें. त्यांच्या कृपाप्रसादामुळें यास गरुड व अरुण असे दोन पुत्र झाले. कारण नवीन इंद्राकरतां केलेल्या तपाचें फळ वालखिल्यांनीं यास दिलें व इंद्र निर्भय झाला.

नंतर विनता व कद्रू यांच्यामध्यें उच्चैःश्रव्याचे रंगाबद्दल पैज लागली. ती पैज जिंकण्याकरितां कद्रूनें आपले पुत्र नाग यांची मदत मागितली, पण ती ते देईनात. म्हणून तिनें त्यांना शाप दिला कीं, 'तुम्ही जनमेजयाचे सत्रांत मराल.' या शापास पुष्टि देऊन दुष्ट सर्पांचा नाश करावा या हेतूनें ही संधि साधून ब्रह्मदेव तेथें आला, व 'त्यानें तुझ्या म्हणण्याप्रमाणेंच होईल (म. आ. २०) व शिवाय यांचा सापत्न बंधु गरुड हाहि त्यांना भक्षील' असा शाप दिला (पद्म. सृ. ३१). या शापामुळें कश्यपास वाईट वाटेल म्हणून यास विषहारविद्या दिली व याचें सांत्वन केलें (म. आ. २०). तिचा यानें उपयोगहि केला होता (काश्यप पहा). इंद्रादि देवांचा दैत्यांनीं पराभव केला म्हणून ते कश्यपास शरण आले व यास सर्व सांगितलें. तेव्हां हा काशींत शंकराकडे गेला व त्यास दैत्यांचा त्रास नष्ट करण्यास सांगितलें. तेव्हां शंकरानें याची स्त्री सुरभि हिचे उदरीं अकरा अवतार घेतले व दैत्यांचा नाश केला. हे अवतार अद्यापि आकाशांत ईशान्येस राहतात (शिव. शत. १८). कश्यपानें अर्बुद पर्वतावर मोठी तपश्चर्या केली. त्या वेळीं दुसऱ्या ऋषींनीं गंगा आणण्याबद्दल विनंति केली, तेव्हां कश्यपानें शंकराला विनंति करून शंकराजवळून गंगा मिळविली. त्या ठिकाणीं कश्यपतीर्थ झालें (पद्म. उ. १६४). पुढें ती गंगा घेऊन हा स्वस्थानीं गेला. या ठिकाणीं केशरंध्रतीर्थ झालें.

हिला कश्यपानें आणिली म्हणून काश्यपी असें म्हणतात. हिलाच चारी युगांत अनुक्रमें कृतवती, गिरिकर्णिका, चंदना व साभ्रमती अशीं नांवें आहेत ( पद्म. उ. १३५ ). हीच तपश्चर्या चालू असतांना गरुड आपल्या बापाकडे आला व आपणांस एका अदृश्य शक्तीनें वाहन होण्यास सांगितलें व आपणहि कबूल केलें असें सांगितलें. तेव्हां कश्यपानें अंतर्ज्ञानानें जाणून तूं विष्णूचें वाहन झालास व आतां त्याचीच आराधना करावीस असें सांगून त्यास नारायणमाहात्म्य कथन केलें.

इतक्यांत अंग राजानें पृथ्वी दान करण्याचें ठरविलें. म्हणून पृथ्वी आपलें कलेवर टाकून ब्रह्मदेवाकडे गेली. त्यामुळे कलेवर निर्जीव झालें, म्हणून कश्यप योगशक्तीनें आपल्या शरीरांतून बाहेर पडला व पृथ्वीचे कलेवरांत शिरला व तिला सजीव केलें. पुढें कांहीं दिवसांनीं पृथ्वी परत आली व कश्यपास नमस्कार करून आपले कलेवरांत शिरली. याप्रकारें पृथ्वी कश्यपाची कन्या म्हणून तिला काश्यपी असें म्हणतात.

पुढें पृथ्वी दुष्टांचे पीडेमुळें बुडूं लागली. तेव्हां कश्यपानें तिला आपले मांडीचा आधार दिला व तारिलें. म्हणून तिला काश्यपी व उर्वी अशीं नांवें प्राप्त झालीं ( म. शां. ४९ ). तिनें आपणांकरितां राजा मागितला व पुष्कळ क्षत्रियांचीं नांवें सुचविलीं, तेव्हां कश्यपानें त्या सर्वांस अभिषेक केला.

एकदां कश्यपादि सप्तर्षि पृथ्वीवर फिरत असतां शिबिपुत्र शैब्य ऊर्फ वृषादर्भि यानें सप्तर्षींना एका यज्ञांत आपला पुत्र दक्षिणा म्हणून दिला. इतक्यांत तो मेला. तेव्हां त्या क्षुधार्त ऋषींनीं त्याचें मांस शिजण्यास ठेविलें. हें त्या वृषादर्भीनें पाहिलें व त्यांना अघोर कर्मापासून परावृत्त करण्याकरितां त्यानें त्यांच्या इच्छेस येईल तें दान देण्याचें ठरविलें. पण ते घेईनात व तें मांसहि शिजेना म्हणून तेंहि टाकून ते निघून गेले. पुढें एका सरोवरांत कमळें होतीं तीं खाण्यास घेण्याच्या इच्छेनें त्यांनीं तेथील कृत्या यातुधानी हिच्या परवानगीनें कमळें तोडून आणून सरोवराकांठीं ठेविलीं. तीं इंद्रानें कांहीं कारणाकरितां चोरून नेलीं. यानंतर कश्यपाचा व ऐलाचा संवाद झाला, त्यांत ब्राह्मणाचें महत्त्व, पापपुण्यसूक्ष्मभेद व रुद्र हे विषय कश्यपानें समजावून दिले.

तार्क्ष्यमुनीचा सरस्वतीशीं संवाद झाला. त्यांतील श्रेष्ठ काय, काय केलें असतां कोणीहि धर्मभ्रष्ट होत नाहीं, अग्निहोत्राचे नियम, प्रत्यक्ष सरस्वती ही कोण व मोक्ष, हे विषय होते. पण हा तार्क्ष्य म्हणजे कश्यपच असें सांगतां येत नाहीं ( म. व. १८९ ). पुढें कश्यपानें एक सिद्ध पाहिला व त्यापासून ज्ञान मिळवावें म्हणून त्याची मोठ्या एकाग्रतेनें पूजा केली व त्याचे अभिवंदन त्यास कश्यपानें प्रश्न विचारिले व त्यानेंहि पण त्यांचीं उत्तरें देऊन त्यास संतुष्ट केलें ( म. आश्व. १७ ). हा एक ऋषि होता ( वायु. १.५९. ९०-९२; ब्रह्मांड २.३२.९८–१०० ). याचे शरीरापासून तीळ उत्पन्न झाले ( भवि. ब्रह्म. ७ ). व्यासाच्या पुराणशिष्यपरंपरेंतील भागवतमतें हा रोमहर्षणाचा शिष्य ( व्यास व आपस्तंब पहा ). हा स्वारोचिष व वैवस्वत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक होता.

कश्यपाचे नांवावर चरकसंहितेंत बरेच पाठ आहेत. यानें भुतांखेतांवरील मंत्रहि आहेत. याच्या नावावर पुढील ग्रंथ आहेत—१ कश्यपसंहिता ( वैद्यकीय ), २ कश्यपोत्तरसंहिता, ३ कश्यपस्मृति. कश्यपस्मृतीचा उल्लेख हेमाद्रि, विज्ञानेश्वर, माधवाचार्य यांनीं केला आहे. ( C. C. ). कश्यपसिद्धांत ( नारदसंहितेंत याचा उल्लेख आला आहे ).

कश्यपाला वत्सार व असित असे दोन पुत्र. वत्सारास निध्रुव व रेभ असे दोन पुत्र झाले. निध्रुवाला सुमेधेपासून अनेक कुंडपायिन् झाले. रेभ्यापासून रैभ्य झाले. अशीच वंशावळ इतरत्रहि आढळते ( ब्रह्मांड. ३. ८. २९–३३; वायु. ७. ९; लिंग. १.६३; कूर्म. १.१९ ).

कश्यपाच्या स्त्रिया—अदिति, अरिष्टा, इरा, कद्रू, कपिला, कालका, काला, काष्ठा, क्रोधवशा, क्रोधा, खशा, ग्रावा, ताम्रा, तिमि, दनु, दनायु, दया, दिति, धनु, नाग, पतंगी, पुलोमा, प्राधा, प्रोवा, मुनि, यामिनी, वसिष्ठा, विनता, विश्वा, सरमा, सिंही, सिंहिका सुनेत्रा, सुपर्णा, सुरभि, सुरसा, सूर्या, वास्तविक तेराच स्त्रिया असून कांहीं पाठांतरानें आल्या आहेत, तर कांहीं संतति सादृश्यामुळें एक वाटतात. भागवत व विष्णुमतें यास एका वेळीं अरिष्टनेमि म्हणून चार स्त्रिया सांगितल्या आहेत. या सर्व दक्षकन्या होत्या. पुलोमा व कालका या वैश्वानरकन्या होत.

अदितिपुत्र—आदित्य बारा आहेत. अंश ( अंशु, अंशुमत्, विधातृ ), अर्यमन् ( यम ), इंद्र ( शक्र ), उरुक्रम ( विष्णु ), त्वष्टा, धातृ, पूषन, भग, मित्र, वरुण ( पर्जन्य ) विवस्वत् ( मार्तंड ), सवितृ ( तै. आ. १.१३ ).

अरिष्टापुत्र—अतिबाहु, आचार, ज्योतिष्टम, तुंबुरु, दारुण, पूर्ण*, पूर्णांश (पूर्णायु)*, ( बर्हीच )*, ब्रह्मचारिन्*, भानु, मध्य, रतिगुण ( शतगुण ), वरूथ*, वरेण्य, वसुरुचि, विश्वावसु*, सिद्ध, सुचंद्र*, सुपर्ण*, सुरुचि*, हंस, हाहा, हूहू, इ. गंधर्व झाले. पैकीं खुणांनीं दर्शविलेल्यांचा उल्लेख कौशापुत्र म्हणून ब्रह्मांडांत आहे.

अरिष्टाकन्या—अनवद्या, अरुणा*, अरूपा, अलंबुषा*, असुरा, केशिनी*, तिलोत्तमा, भासी, मनु, मनोरमा, मार्गणाप्रिया*, मिश्रकेशी, रक्षिता*, रंभा, वंशा, विद्युत्पर्णा*, सुप्रिया, सुबाहु,

सुभगा, सुरजा*, सुरता. कुल्या दिलेल्यांचा उल्लेख ब्रह्मांडांत मुनिकन्या म्हणून आहे.

इरेला वृक्षादि झाले.

कद्रूपुत्र—अकर्कर, अकर्ण, अक्रूर, अनंत, अनील, अपराजित, अंबरीष, अलिपिंडक, अश्वतर, आपूरण, आप्त, आर्यक, उग्रक, एलापत्र, ऐरावत, कपित्थक, कपिल, कंबल, कररोमन्, करवीर, कर्कर, कर्कोटक, कर्दम, कलशपोतक, कल्माष, कालिय, कालीयक, कुंजर, कुठर, कुंडोदर, कुमुद, कुमुदाक्ष, कुलिक, कुहर, कूर्म, कूष्मांडक, कोरग्य, कौणपाशन, क्षेमक, गंधर्व, ज्योतिक, तक्षक, तित्तिरि, दधिमुख, दुर्मुख, धनंजय, धृतराष्ट्र नहुष, नाग, निष्ठानक, नील, पतंजलि, पद्म (संवर्तक), पाणिन, पिंगल, पिंजर (पिंजरक), पिठरक, पिंडारक, पुष्पदंष्ट्र, पूर्णभद्र, प्रभाकर, प्रह्राद, बलाहक, बहुमूलक, बहुल, बाह्यकर्ण, बिल्वक, बिल्वपांडुर, ब्राह्मण, भुजंगम, मणि, मणिस्थक, महाकर्ण, महानील, महापद्म, महापग्र, महाशंख, महोदर, मुद्गर, पिंडक, मूषकाद, वामन, वालिशिख, वासुकि, विमलपिंडक, विरजस्, वृत्त, शंकुरोमन्, शंख, शंखपाद, शंखपाल, शंखपिंड, शंखनख, शंखरोमन्, शंखशिरस्, शबल, शालिपिंड, शुभानन, शेष, श्रीवह, श्वेत, सुबाहु, सुमन, सुमुख, सूनामुख, हरिद्रक, हलक, हस्तिकर्ण, हस्तिपद, हस्तिपिंड, हेमगुह.

कपिलेला अमृत, ब्राह्मण, गंधर्व, अप्सरा, नंदिन्यादि गाई व दोन खुरी प्राणी झाले.

कालकेस कालकेय ऊर्फ कालकंज झाले.

कालापुत्र—क्रोध, क्रोधशत्रु, क्रोधहंतृ, विनाशन.

काष्ठेस अश्वादि एक खुराचे प्राणी झाले.

क्रोधवशाकन्या—इरावती*, कर्पाशा*, तिर्या*, दंष्ट्रा, मदमना*, भूता, मातंगी*, मृगमंदा*, मृगी*, रिपा, शार्दूली*, श्वेता*, सरमा*, सुरसा, हरि*, हरिभद्रा.* या कन्या पुलहाच्या भार्या होत. शिवाय हिला क्रूर जलचर पक्षी, दंदशूकादि सर्प व क्रोधवश या सामान्य नांवाचे राक्षस झाले. यांपैकी क्रोधवश हा मुख्य होय (अरिष्टा पहा).

खशेस अकंपन, अश्व, उपस्य, कपिलोमन्, कथन, नेत्राकर्भाकर, तुंडकोश, त्रिनाभ, त्रिशिरस्, दुर्मुख, धूम्रित, निशाचर, पांडापर, प्रहासक, बुध्न, बृहजिव्ह, भीम, मधु, मातंग, लालवि, वक्राक्ष, विस्फूर्जन, विलोहित, शतदंष्ट्र व सुमाली हे पुत्र व आलंबा, उत्कचोत्कृष्टा, कपिला, केशिनी, निर्ऋता, महाभागा व शिवा ह्या कन्या झाल्या. हे सर्व यक्ष, राक्षस, मुनि व अप्सरा आहेत.

ग्रीवेला श्वापदें झालीं.

ताम्रेस अरुणा, उलकी, काकी, क्रौंची, गृध्रिका (गृध्री), धृतराष्ट्रिका (धृतराष्ट्री), भासी, शुकी, शुची, श्येनी, सुग्रीवी व गाईम्हशी झाल्या.

तिमीस जलचरगण झाले.

दनुपुत्र—अजक, अग्र, अनुपायन, अशिरस्, अयोमुख, अरिष्ट, अरुण, अश्व, अश्वग्रीव, अश्वपति, अश्वशंकु, अश्वशिरस्, असिलोमन्, अहर, आमहासुर, इंद्रजित्, इंद्रतापन, इरागर्भशिरस्, इषुपात, ऊर्णनाभ, एकचक्र, एकाक्ष, कपट, कपिल, कपिश, कालनाभ, कुपथ, कुंभनाभ, कुंभमान, केतु, केतुवीर्य, केशिन्, गगनमूर्धन्, गविष्ठ, गविष्टिन्, चंद्रमस्, चूर्णनाभ, जभ, तारक, तुहुंड, दीर्घजिव्ह, दुदुंभि, दुर्जय, देवजित्, द्विमूर्धन्, धूम्रकेश, धृतराष्ट्र, नमुचि, नरक, निचंद्र, पुरुंड, पुलोमन्, प्रमद, प्रलंब, बलक, बलाढ्य, बाण, बिंदु, भद्र, भृशिन, मघ, मघवन, मद, मय, मरीचि, महागिरि, महानाभ, महाबल, महाबाहु, महामाय, महाशिरस्, महासुर, महोदक, महोदर, मारीचि, मूलकोदर, मेघवत्, रसिप, वज्रनाथ, वज्राक्ष, वनायु, वातापि, वामन, विकुभ, विक्रांत, विक्षोभ, विक्षोभण, विद्रावण, विपाद, विप्रचित्ति, विभावसु, विभु, विराध, विरूपाक्ष, वीर, वीर्यवत्, वृक, वृषपर्वन्, वैमृग, वैश्वानर, वैरूप, शकुनि, शंकर, शंकुकर्ण, शंकुशिरस्, शंकुशिरोधर, शठ, शतग्रीव, शतमाय, शतन्हद, शंकुरय, शतऱ्हाद, शतव्हय, शंबर, शरभ, शलभ, सत्याजित, सत्रजित्, सुकेतु, सुकेश, सुपथ, सूक्ष्म, सूर्य, हयग्रीव, हर, हिरण्मय, हिरण्यकशिपु.

दनायूला बल, विक्षर, वीर, वृत्र हे झाले.

दयेस पर्वत झाले.

दितीस मरुत् (एकुणपन्नास), वज्रांग, सिंहिका, हिरण्यकशिपु, हिरण्याक्ष. पद्मपुराणांत तर, दैत्यासारखें कृत्य करणारा सांपडला कीं तो दितिपुत्र ठरविला आहे (बल व वृत्र पहा).

धनु हें विष्णुधर्मोत्तरांत दनूचें नामांतर आहे. हिचा पुत्र रजि (१.१०६).

पतंगीस पक्षी झाले.

पुलोमेस पौलोम झाले. हे पौलोम व कालकेय मिळून साठ हजार किंवा चौऱ्याहत्तर हजार होते. त्यांस निवातकवच म्हणत.

प्राधा—(अरिष्टेची संतति पहा).

प्रोवा—हिला संतति नाहीं.

मुनिपुत्र—अर्कपर्ण, उग्रसेन, कलि, गोपति (गोमत्), चित्ररथ, धृतराष्ट्र, नारद, पर्जन्य, प्रयुत, भीम, भीमसेन, वरुण, शालिशिरस्, सत्यवाच (सर्वजित्), सुपर्ण, सूर्यवर्चस्, असे सोळा गंधर्व व अजगंधा, अनपाया, असिता, असिपर्णिनी, अद्रिका, क्षेमा, पुंडरीका, मनोभवा, मारीचि, लक्ष्मणा, वरंवरा, विमनुष्या, शुचिका, सुदती, सुप्रिया, सुबाहु,

सुभुजा, सुरसा व आणखी सहा (अरिष्टा पहा) अशा चोवीस अप्सरा झाल्या. वसिष्ठा हें मुनीस बहुधा नामांतर असावें.

यामिनीस टोळ झाले.

विनतेस अरिष्टनेमि, अरुण, आरुनि, गरुड, तार्क्ष्य, वारुणि, असे पुत्र व सौदामिनी कन्या झाली. अरिष्टनेमि व तार्क्ष्य हीं गरुडास नामांतरें असल्याचा उल्लेख आहे.

विश्वेस कोठ्यवधि यक्ष व राक्षस झाले.

सरमेस वनचर झाले.

सिंहि ऊर्फ सिंहिका हिला चंद्रप्रमर्दन, चंद्रहर्तृ, राहु व सुचंद्र झाले.

सुरभीस, अंगारक, अज (अजपाद), अहिर्बुध्न्य (हिंर्बुध्न्य), ईश्वर, ऊर्ध्वकेतु, एकपाद, कपाला (कपालि), चंड, ज्वर, निर्ऋति, पिंगल, भल, भीम, भुवन, मृत्यु, विरूपाक्ष, विलोहित, वृषभ (महादेवाचा), शंभु, शास्तृ, सदसस्पति, सर्प, असे पुत्र व गांधारी (गांधर्वी) व रोहिणी या कन्या झाल्या (शिव. शत. १८).

सुरसेस यातुधानादि राक्षस व एक हजार सर्प झाले.

सूर्येस यमधर्म झाला.

कश्यपास आणखी अरुंधती, नारद व पर्वत (वायु. २. ९. ७८-८०; लिंग. १. ६३. ७८-८०) व मनसा अशीं मानसअपत्यें होतीं (भा. ६. ६; विष्णु. १. १५; मत्स्य. ६; म. आ. ३५. ६६; स्कंद. १. २. १४; ३. २. ८; वायु. २. ५; ह. वं. १. ३; ब्रह्मांड. ३. ३). अरिष्टापुत्र फक्त ब्रह्मांड व महाभारत यांत दिले आहेत. सुरभिपुत्र वायु व शिवपुराण यांत दिले आहेत. मुनिपुत्र व क्रोधापुत्र ब्रह्मांड महाभारत यांत दिलीं आहेत. कद्रूपुत्र वायु, स्कंद व भागवत यांत नाहींत. दनुपुत्र स्कंद व वायु यांत नाहींत. वरील आदित्य स्कंदांत नाहींत (आदित्य पहा).

गोत्रकार–अग्निशर्मायण (ग), अधच्छायामय (ग), आग्रा प्रासेव्य (ग), आजिहायन (ग), आश्रायणि, आश्वलयनिन (ग), आश्ववातायन, आसुरायण (ग), उदग्रज (ग), उद्वलायन (ग), कन्यक (ग), कात्यायन (ग), कार्तिकेय, काश्यपेय (ग), काष्ठाहारिण, कौबेरक (ग), कौरिष्टि (ग), गोमयान (ग), ज्ञानसंज्ञेय (ग), दाक्षायण, देवयान (ग), निकृतज (ग), पैलमौलि, प्रागायण (ग), प्राचेय, बर्हि, भवनंदिन, भृगु (ग), भोज (ग), भौतपायन (भौमपायन, ग), महाचक्रि, माठार (ग), मार्तंगिन (ग), मारीच (ग), मृगय (ग), मेषकिरीटकायन (ग), मेषप (ग), योगगदायन (ग), श्रोथयान (ग), वात्स्यायन (ग), वैकर्णेय (वैकर्णिक, ग), वैवशप, शकय (शाकायण, ग), शालहलेय (ग), श्याकार (ग), श्यामोदर, श्रौतन (श्रुतय), सांपसाह्यारितायन (ग), हरितदान (ग), हास्तिक (ग) हे सव कश्यप, निध्रुव, वत्सर या त्रिप्रवरांचे आहेत.

अनसूय, काद्रुपिंगाक्षि (काद्रपिंगाक्षि), दिवावष्ट (दिवावस, दिवावसिष्ठ ग), नाकुरय, सार्मुनि (सामुकि), राजवर्तप (राजवल्लभ), शैपसेवकि (शेषसेवकि) शैशिरोदवहि, सजातंबि, सैरंधी (सैरंध्रि), स्नातप, हेहि द्विगोत्री असून कश्यप, वत्सर, वसिष्ठ या तीन प्रवरांचे आहेत.

उत्तर, कर्दम, काश्यप, कुलह, केरल, कैरात, गर्दभीमुग्त, गोभिल, जलंधर, दानव, देवजाति, नभ, निदाघ, पिप्पल्य, पूर्य, पैप्पलादि, भत्स्य, भुजातपूर, मस्रुण, मृगकेतु, वृषकंड, शांडिल्य, संयाति, हिरण्यबाहु हे असित, कश्यप व देवल या त्रिप्रवरांचे आहेत (मत्स्य. १९९).

कश्यप गोत्री मंत्रकार

| वायु. | मत्स्य. | ब्रह्मांड. |
|---|---|---|
| १,५९,१०२-१०३; | १४५,१०६-१०७; | २३२,११२-११३ |
| असित | असित | असित |
| कश्यप | कश्यप | कश्यप |
| देवल | देवल | देवल |
| | नित्य | |
| | नैध्रुव | नैध्रुव |
| रैभ्य | | रैभ्य |
| वत्सार | वत्सार | वत्सार |
| विक्षम | | |

ऋग्वेदांत वत्साराबद्दल अवत्सार, नैध्रुवाबद्दल निध्रुव, शिवाय भूतांश, रेभ व विवृह हे काश्यप आढळतात.

**कश्यप नैध्रुवि**—एक आचार्य (बृ. उ. ६.५. ३).

**कषाय**—एक शाखाप्रवर्तक (पाणिनि पहा)

**कहोड** किंवा **कहोल कौषीतकि**—एक ऋषि.

व्रीहि, यवादि नवीं धान्यें हीं वृष्टीपासून उत्पन्न होणारीं असल्यामुळें तीं प्रथम देवतांना (आग्रयण म्हणजे नवान्नाचा याग) करून भक्षण करावीं, ही चाल यानें सुरू केली. आश्वलायन गृह्यसूत्रांतील ब्रह्मयज्ञांगतर्पणांत याचें नांव आहे. कौषीतकेय असेंहि ह्याचें नांव दिलें आहे (बृ. उ. ३. ५. १). हा याज्ञवल्क्याच्या समकालीन होता (श. ब्रा. २. ३.५ १.; सां. आ. २५; काहोडी पहा).

उद्दालकऋषीचा शिष्य. यानें गुरुगृहीं राहून गुरुसेवा उत्तम प्रकारें केल्यामुळें गुरूनें संतुष्ट होऊन यास आपली कन्या सुजाता दिली होती. तिला घेऊन हा गृहस्थाश्रम करूं लागला असतां, सुजाता यापासून गर्भिणी झाली. एकदां हा अध्ययन करीत

असतां तिच्या गर्भानें यास अध्ययन न करण्याविषयीं सांगितलें. तेव्हां यास कोप येऊन यानें त्या गर्भास तूं आठ स्थलीं वांकडा होशील, असा शाप दिला. कांहीं कालानें याला अष्टावक्र नामक पुत्र झाला. पुढें एकदां हा द्रव्ययाचनेनिमित्त जनक राजाकडे गेला असतां, तेथें वरुणपुत्र बंदीनें अनेक ऋषींस वादांत जिंकून उदकांत बुडविलें (म. व. १३४). त्यांत हाहि बुडाला. तेथून यास पुनः याच्या पुत्रानें बंदीशीं वाद करून त्यास जिंकून परत आणिलें (म. व. १३६). हा एक मध्यमाध्वर्यु आहे.

**काकवर्ण**—(शिशु. भविष्य.) याचा पुत्र क्षेत्रधर्मन्.

**काकी**—कश्यप व ताम्रा यांच्या कन्यांपैकीं एक. हिला घुबडें झालीं.

२ स्कंदाच्या शरीरापासून उत्पन्न झालेल्या मातृकांपैकीं एक.

**काकुत्स्थ**—अनेनसूचें पैतृक नांव.

**काकेयस्थ**—कृष्णपराशरकुलांतील एक गोत्रकार. याबद्दल काकेय असा पाठभेद आहे.

**काक्षसेनि**—हें अभिप्रतारिनचें पैतृक नांव आहे (दृति ऐन्द्रोत पहा).

**काक्षीवत**—(दीर्घतमस् पहा).

**कांकायन**—शांत्युदक करितांना कोणता मंत्र घ्यावा, याविषयीं याचें मत आहे (कौ. सू. ९. १०).

**कांचापि**—(कारकि पहा).

**कांचन**—च्यवनभार्गवाचें नामांतर (वा. रा. उ. ६६).

२ (सो. पुरूरवस्.) हा भागवत व विष्णुपुराणांच्या मतें भीमपुत्र होय. वायुमतेंहि भीमपुत्रच. परंतु याला कांचनप्रभ असें तेथें म्हटलें आहे.

**कांचनमालिनी**—एक अप्सरा. प्रयागांत माघस्नान केल्यानें ही मुक्त झाली (पद्म. उ. १२७).

**काठ्य**—अंगिरसकुलांतील गोत्रकार व प्रवर.

**कांडमायन**—विसर्गसंधीविषयीं मतवादी आचार्य (तै. प्रा. ९. १).

**कांडशय**—पराशरकुलांतील एक गोत्रकार. कांडूषय असा पाठभेद आहे.

**कांडायन**—पदपाठांत प्लुत अनुनासिक होतो हें सांगणारा, म्हणून शांखायनाबरोबर याचा उल्लेख आहे (तै. प्रा. १५. ७).

**कांडूषय**—(कांडशय पहा).

**कांडूविय**—हा उद्गाता होता (जै. उ. ब्रा. ३.१०.२; जनश्रुत, नगरिन व सायक पहा).

**काण्व**—स्वरविषयक मत सांगणारा आचार्य (शु. प्रा. १. १२३; १४९).

२ वसिष्ठगोत्री ऋषिगण.

३ वायुमतें व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील याज्ञवल्क्याच्या शाखेंतील एक (व्यास पहा).

(आयु, इरिंबिठ, कण्व, कुरुसुति, कुसीदिन्, कृषि, त्रिशोक, दवातिथि, नाभाक, नारद, नीपातिथि, पर्वत, पुनर्वत्स, पुष्टिगु, पृषध्र, प्रगाथ, प्रस्कण्व, ब्रह्मातिथि, मातरिश्वन्, मेधातिथि, मेध्य, मेध्यातिथि, वत्स, शशकर्ण, श्रुष्टिगु, सध्वंस, सुपर्ण, व सोभरि पहा).

**काण्वायन**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार. कृशानें काण्वायनाकरितां प्रार्थना केली आहे (ऋ. ८.५५.४). पूरुकुलांतून निघालेलें एक ब्राह्मण कुल (अश्वसूक्तिन् व गोसूक्तिन् पहा).

**काण्वीपुत्र**—कापीपुत्राचा शिष्य (बृ. उ. ६.५.१).

**काण्व्यायन**—एक आचार्य (श. ब्रा. १. ३८).

**कात्थक्य**—अर्थविषयक विचार करणारा आचार्य (नि. ८. ५; ६; ९. ४१).

**कात्य**—(उत्कल पहा).

**कात्यायन**—कश्यपकुलोत्पन्न एक गोत्रकार. याचे ग्रंथ—१ श्रौतसूत्र, २ इष्टिपद्धति, ३ कर्मप्रदीप, ४ गृह्यपरिशिष्ट, ५ त्रिकाण्डिकसूत्र, ६ श्राद्धकल्पसूत्र, ७ पशुबंधसूत्र, ८ प्रतिहारसूत्र, ९ भ्राजश्लोक, १० रुद्रविधान, ११ वार्तिकपाठ, १२ कात्यायनी शांति, १३ कात्यायनीशिक्षा, १४ स्नानविधिसूत्र, १५ कात्यायनकारिका, १६ कात्यायनप्रयोग, १७ कात्यायन वेदप्राप्ति, १८ कात्यायनशाखाभाष्य, १९ कात्यायनस्मृति (हिचा उल्लेख याज्ञवल्क्य, हेमाद्रि, विज्ञानेश्वर, वगैरेंनीं केला आहे), २० कात्यायनोपनिषद् (C. C.), २१ कात्यायन गृह्यकारिका, २२ वृषोत्सर्गादिपद्धति, २३ आतुरसंन्यासविधि, २४ मूल्याध्याय, २५ गृह्यसूत्र, २६ शुक्लयजुःप्रातिशाख्य. याचीं वार्तिकें सुमारें सहा हजार आहेत. वार्तिकाची व्याख्या—सूत्रेऽनुक्तदुरुक्तचिंताकरत्वं वार्तिकत्वम् (नागेशः) किंवा उक्तानुक्तदुरुक्तानां चिंता यत्र प्रवर्तते, तं ग्रंथं वार्तिकं प्राहुर्वार्तिकज्ञा मनीषिणः (छाया). यास वररुचि असेंहि नांव आहे. हा एक व्याकरणकार असून यानें ऐन्द्रशाखेचा पुरस्कार केला होता. याच्या मतें उणादिसूत्रें हीं पाणिनिकृत आहेत. त्या सूत्रांचें यानें विशदीकरण केलें व पुढें पुढें यालाच उणादिसूत्रांचा कर्ता म्हणूं लागले (विमलसरस्वतीकृत रूपमाला. दुर्गसिंहकृत कातंत्रांतील 'कृत्' प्रकरण). कात्यायनानें मुख्यतः पाणिनीच्या सुमारें १५०० सूत्रांवर वार्तिकें लिहिलीं आहेत; व त्यांकरितां याला पाणिनीची परिभाषा वापरावी लागली तरी यानें अच्, हल्, अक्, या पाणिनीय पारिभाषिक शब्दांकरतां स्वर, व्यंजन, समानसारखे शब्द वापरिले आहेत; यावरून व कथासरित्सागरांतील ऐन्द्रशाखेचा पुरस्कर्ता असल्याच्या उल्लेखावरून

कात्यायन पाणिनीच्या पेक्षां वेगळ्या शाखेचा पुरस्कर्ता होता हें दिसून येतें. यानें केलेल्या वार्तिकांचा मुख्य उद्देश पाणिनीच्या सूत्रांचें विशदीकरण करून तीं समजावयास सोपीं करणें हा होय. यानें वाजसनेयी प्रातिशाख्य नामक एक दुसरा ग्रंथ केला आहे. कात्यायनापूर्वींहि बरेच वार्तिककार होऊन गेले; त्यांच्यापैकीं शाकटायन, शाकल्य, वाजप्यायन, व्याडि, पौष्करसादि वगैरेंचा उल्लेख यानें केला आहे. कथासरित्सागरांतील कथेवरून कात्यायन पाणिनीच्या समकालीन असावा असें वाटतें. परंतु पाणिनीमध्यें व याच्यांत बरेंच अंतर असलें पाहिजे, हें वरील माहितीवरून दिसून येईल. कथासरित्सागरांत याचा नंदाशीं संबंध आला आहे; त्यामुळें कात्यायनाचा काल अदमासें ख्रि. पू.५००-३५० हा ठरवितां येईल. पतंजलीनें याला दाक्षिणात्य असें म्हटलें आहे (प्रियतद्धिता दाक्षिणात्याः ८). याची एक स्मृति व्यंकटेश्वर प्रेसनें दिलेल्या स्मृतिसमुच्चयांत आहे. ती २९ अध्यायांची असून त्यांत यज्ञोपवीतविधि, श्राद्धविधि, संध्योपासना, अंत्यविधि इ. विषयांचें विवेचन केलेलें आहे.

याची माहिती निबंधग्रंथांतील याच्या उताऱ्यावरून मिळते. शिवाय शंखलिखित, याज्ञवल्क्य (१. ४-५) व पराशर यांनीं धर्मशास्त्रकार म्हणून याचा निर्देश केला आहे. बौधायनधर्मसूत्रांत कात्यायनाचा उल्लेख आहे (१. २.४७). व्यवहाराबद्दल लिहितांना नारद व बृहस्पति यांचीं मतें यानें ग्राह्य धरिलीं आहेत. परिभाषा वगैरे तशीच स्वीकारिली आहे. यानें स्त्रीधनाचे अनेक प्रकार कल्पिले आहेत व स्त्रियांचे अधिकारहि नमूद केले आहेत. याचे व्यवहारावरील ६०० श्लोक स्मृतिचंद्रिकेंत आले आहेत. यानें मनूचीं म्हणून उल्लेखिलेलीं मतें मनूंत सांपडत नाहींत. भृगूच्याहि मतांसंबंधीं असेंच आहे. याचें श्रौतसूत्र पाणिनीच्या पूर्वी झालें असावें. पण याची स्मृति इ. सन. ४००-६०० पर्यंत झाली असावी.

कात्यायनानें त्रयोदश श्लोकांनीं युक्त अशी कात्यायनी शिक्षा केली. तिच्यावर जयंतस्वामीनें टीका लिहिली. याच्या नांवावर स्वरभक्तिलक्षणपरिशिष्टशिक्षा नांवाची आणखी एक शिक्षा आहे. ही शुक्लयजुर्वेदाचीच शिक्षा आहे. परंतु प्रारंभीं बऱ्याचशा संज्ञा वगैरे ऋक्प्रातिशाख्याप्रमाणें आहेत. हिच्यामध्यें बेचाळीस श्लोक आहेत. हिच्यांत स्वरभक्तीचाच विशेषेंकरून विचार केलेला आहे (पारस्कर व वररुचि पहा).

२ रामाच्या अष्ट धर्मशास्त्र्यांतील एक.

३ (कबंधिन् पहा).

**कात्यायनी**—याज्ञवल्क्याच्या दोन स्त्रियांपैकीं एक. याज्ञवल्क्याचा संसारत्यागाचा विचार ठरल्यावर प्रपंचविषयक वस्तूंची मैत्रेयी आणि कात्यायनी ह्यांना सारखी वांटणी करण्याबद्दल याज्ञवल्क्यानें सांगितलें. परंतु मैत्रेयी अध्यात्मज्ञानांत पारंगत असल्याचें आढळून आल्यामुळें प्रापंचिक व्यवसाय कात्यायनीकडेच राहिला (बृ. उ.२.४.१;४.५.१).

**कात्यायनीपुत्र**—हा गौतमीपुत्र व कौशिकीपुत्र यांचा शिष्य. याचे शिष्य पाराशरीपुत्र व पौतिमाषीपुत्र होत (बृ. उ. ६. ५. १). जातूकर्ण्यनामक एक कात्यायनीपुत्राचा आचार्य म्हणून निर्देश आहे (सां. आ. ८.१०).

**काद्रवेय**—कद्रूपुत्रांचें मातृक नांव.

२ (अर्बुद पहा).

**कार्दपिंगाक्षि**—कश्यपकुलोत्पन्न एक गोत्रकार. याबद्दल कार्द्रपिंगाक्षि असा पाठभेद आहे.

**कानांध**—वध्र्यश्वाचापुत्र (बौ. श्रौ. २१.१०).

**कानीनि**—व्यासाच्या साम शिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें हिरण्यनाभाचा शिष्य (व्यास पहा).

**कानीत**—पृथुश्रवस्चें पैतृक नांव.

**कानीन**—(सू. दिष्ट.) हा भागवतमतें देवदत्तपुत्र.

२ (अग्निवेश्य, व्यास, कर्ण पहा).

**कान्तिमती**—भरतपुत्र पुष्कलाची स्त्री (पद्म. पा.१२).

२ (वीरबाहु पहा).

३ व्याधस्त्री (शंख पहा).

**कान्तिशालिन्**—एक विद्याधर. हा पापनाशन लिंगाचे दर्शनानें मुक्त झाला (स्कंद. १.३.२.४).

**कान्वायन**—(शिशु. भविष्य.) मत्स्यमतें विंध्यसेनाचा मुलगा.

**कापटव सुनीथ**—सुतेमनस शाण्डिल्यायनाचा हा शिष्य (वं. ब्रा. १). कापटव हें पैतृक नांव आहे.

**कापिलेय**—शुनःशेपाला विश्वामित्रानें मृत्यूपासून सोडविल्यानंतर आपल्या मांडीवर घेतलें. त्याचा बाप अजीगर्त हा शुनःशेपाला परत मागूं लागला असतां, शुनःशेप हा माझा मुलगा आहे व हे कापिलेय आणि बाभ्रव याचे बंधु आहेत असें विश्वामित्रानें त्यास उत्तर दिलें. यावरून हा व बाभ्रव हे विश्वामित्राच्या कुलांतील असावेत असें दिसतें (ऐ. ब्रा. ७. १७).

२ कुंभाला कपिलेपासून झालेल्या संततीस मातृक नांव (ब्रह्मांड. ३.७.१४५).

**कार्पीपुत्र**—आत्रेयीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य वैयाघ्रपदीपुत्र (बृ. उ. ६.५.१२).

**कार्पीय**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील हा हिरण्यनाभाचा शिष्य.

**कापेय**—यानें चित्ररथाकडून द्विरात्र यज्ञ करवून त्याला संपन्न केलें (क. स. १३. १२; पं. ब्रा. २०. १२. ५); कापेय म्हणजे कापेयी शाखेचें अध्ययन करणारे लोक (स. श्रौ. ९. ८; ज्योत्स्नाटीका). शौनक कपिगोत्रांतील असल्यामुळें त्याला हें गोत्रनाम म्हणून लाविलें आहे (छां. उ. ४.३.५-७).

**कापोत**—एक मुनि. उर्वशी व ककुत्स्थ यांची कन्या चित्रांगदा याची बायको होती. याचे तुंबुरु व सुवर्चस् असे दोन पुत्र होते. पुढें यानें कुबेराकडून द्रव्य आणून या पुत्रांना दिलें. तसेंच चंद्रशेखर राजाची स्त्री तारावती हिला वानरमुखी दोन पुत्र होतील, असा यानें शाप दिला (कालि. ५३).

**काप्य**—कैशोर्य काप्याचा शांडिल्य शिष्य. हा कुमार हारिताचा शिष्य (बृ. उ. २. ६. ३; ४. ६.३). काप्य हें पैल, पतंचल व पुरुकुत्स यांचें पैतृक नांव आहे. तसेंच बिभिंदुकीयांच्या सत्रांत आर्त्विज्य करणाऱ्या सेनक व नवक यांचेंहि हें पैतृक नांव आहे.

**काबंधि**—हा आथर्वण आहे. हा मांधात्याच्या यज्ञांत गेला व तेथें यजमान व ऋत्विज यांना ह्यानें कांहीं प्रश्न केले (गो. ब्रा. १.२.९). जलोद्भव अश्वापासून वेद भीति पावले, त्या अश्वाचें यानें शमन केलें (गो. ब्रा. २. १८). याला विचारिन् असें नांव होतें.

**काम**—ब्रह्मदेवाच्या हृदयापासून उत्पन्न झालेला पुत्र. ह्याची स्त्री रति. हा शंकराच्या तृतीय नेत्रानें दग्ध झाला. पण रुक्मिणीच्या पोटीं पुनः प्रद्युम्न या नांवानें जन्मास आला (भा. ३. १२. २६; १०. ५५. १). याला जाळिलें तें स्थळ म्हणजे अंगदेश होय. यानें बहीणभावांत कामविकार उत्पन्न केल्यामुळें शंकर जाळील असा शाप व शंकराला पुत्रेच्छा होईल तेव्हां उत्पत्ति असा उश्शाप मिळविला (शिव. रुद्र. सती. ३).

२ संकल्पाचा पुत्र (भा. ६. ६. १०).

३ वैवस्वत मन्वंतरांतील बृहस्पतीचा दौहित्र.

४ धर्मऋषीचा एक पुत्र. याचा पुत्र हर्ष (पद्म. सृ. ३)

५ परशुरामाचा बंधु (कालकाम पहा).

**कामकटंका**—(घटोत्कच पहा).

**कामकायन**—विश्वामित्रकुलोत्पन्न गोत्रकार. एक ब्रह्मर्षि.

**कामगम** व **कामज**—धर्मसावर्णि मन्वंतरांतील देवगणविशेष.

**कामठक**—एक सर्प (म. आ. ५७).

**कामंद**—(सोमकांत पहा).

२ एक ब्रह्मर्षि. आंगरिष्ट राजानें यास शुद्ध धर्म, अर्थ आणि काम कोणते तें मला सांगा, असा प्रश्न केला असतां, यानें जेणेंकरून चित्तशुद्धि होईल तो धर्म, पुरुषार्थ साधेल तो अर्थ आणि देहनिर्वाहापुरतीच इच्छा तो काम, असें उत्तर दिलें होतें (म. शां. १२३).

**कामप्रि**—मरुत्ताला हें पदवीसारखें लावीत (ऐ. ब्रा. ८. ८). सायणानें याचा अर्थ कामपूरक असा केला आहे.

**कामलायन**—उपकोसलाचें पैतृक नांव.

२ विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**कामहानि**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें लांगलीचा शिष्य.

**कामा**—देवी (घटोत्कच पहा).

**कामान्ध**—हा वध्र्यश्वाचा पुत्र (बौ. श्रौ. २१. १०)

**कामायनी**—(श्रद्धा पहा).

**कामुकायन**—कारुकायणाबद्दल पाठभेद.

**कामोदा**—क्षीरसमुद्रांतून कामोदा, रमा, वरा व वारुणी अशा चार कन्या झाल्या. पहिल्या तीन विष्णूच्या स्त्रिया झाल्या व वारुणी ही दैत्याच्या वांट्यास आली. ही आनंदानें हंसे, तेव्हां गंगेंत पडलेल्या हिच्या अश्रूंचीं कमळें बनत (नारद. २. ६८. १४). कामोदा, लक्ष्मी, ज्येष्ठा व वारुणी अशा क्षीरसागरांतून उत्पन्न झाल्या. ही अमृताच्या फेनापासून उत्पन्न झाली. हीच तुळस होय. ही कामोद नगरांत राहते. ही हंसली कीं, पिवळीं फुलें उत्पन्न होत असत (विहुंड पहा; पद्म. भू. ११८. १२१).

**काम्पिल्य**—(सो. नील.) हा भागवतमतें भर्म्याश्वपुत्र, विष्णुमतें हर्यश्वपुत्र व वायुमतें रिक्षपुत्र होय (१० कपिल पहा).

**काम्बोज औपमन्यव**—एक आचार्य (वं. ब्रा. २). निरुक्तांतहि वेगळ्या अर्थानें पण या दोन शब्दांचा एकत्र उल्लेख आला आहे (नि. २. २).

**काम्या**—कर्दम प्रजापतीची कन्या (म. आ. १३२).

**कायनि**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**कायव्य**—एक निषाद. हा अरण्यांतील सर्व दस्यूंचा अधिपति असे. हा शूर असून परमधार्मिक होता. यानें आपल्या अनुयायांना सांगितलें कीं, तुम्ही ब्राह्मणांचा द्वेष कधींहि करीत जाऊं नका. तर त्यांस सर्वभावानें भजून लहान बालकें, स्त्रिया, भयभीत, पलायन करणारे व निरायुध इतक्यांना मारीत जाऊं नका. जे ब्राह्मणांचे शत्रु असतील त्यांशीं युद्ध करून त्यांस मारा. अशा रीतीनें वागलां असतां उत्तम गति पावाल. दस्यूंचाहि सदाचारानें वागल्यानें उद्धार होतो. हे सांगण्याकरितां ही पुरातन कथा आहे (म. शां. १३५).

**कारकि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार. याबद्दल काचापि असा पाठभेद आहे.

**कारकृष्ण**—(वसिष्ठ पहा).

**कारंधम**—अविक्षिताचें नामांतर.

**कारीर**—उद्गीथाबद्दल विशेष ज्ञान असलेला आचार्य ( जै. उ. ब्रा. २. ४. ४. ).

**कारीरथ**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**कारीरय**—अंगिराकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**कारीषि**—विश्वामित्राचा पुत्र ( म. अनु. ७.५५ कुं. )

**कारुकायण**—विश्वामित्रकुलांतील एक गोत्रकार. याबद्दल कामुकायन असा पाठभेद आहे.

**कारूषक**—करुषक देशाचा राजा. वृद्धशर्म्यास नामांतर. याचा पुत्र दंतवक्र. हा राजा भारतीय युद्धांत दुर्योधनाकडे होता ( भा. ९. २४. ).

**कारोटक**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**कार्केय**—' काकेयस्थ 'चा पाठभेद.

**कार्तवीर्य**—( सो. सह. ) याच्या आईचें नांव राकावती ( रेणु. १४ ). शिवपूजा मोडल्यामुळें हा करहीन जन्मास आला. मधु पुढच्या जन्मीं शिवशापानें कार्तवीर्य झाला ( रेणु. २८ ). यास अर्जुन, सहस्रार्जुन व हैहयाधिपति अशीं नामांतरें आढळतात. हा सुदर्शन चक्राचा अवतार होय ( नारद. १. ७६ ). कृतवीर्याचीं शंभरहि मुलें च्यवनाच्या शापानें मेलीं. पण हा फक्त सप्तमीव्रतस्नानानें त्या शापांतून मुक्त झाला ( मत्स्य. ६८ ). कृतवीर्यानें संबंधीत्वन कार्तितांना एकदां जांभई देऊन सुद्धां आचमन केलें नाहीं. तथापि त्यास गणेशाच्या प्रसादानें चतुर्थीव्रत केल्यावर पुत्र झाला. पण वरील पापाचरणामुळें त्यास फक्त दोन स्कंध, वदन, नाक व नेत्र हींच इंद्रियें होतीं. हें पाहून याच्या मातापितरांनीं फार शोक केला. एकदां दत्त त्यांच्याकडे आला असतां त्यांनीं पुत्र त्याला दाखविला. त्या वेळीं हा बारा वर्षांचा होता. दत्तानें यास एकाक्षरी मंत्र सांगून गणेशाचें बारा वर्षे आराधन करण्यास सांगितलें. यानें त्याप्रमाणें करितांच गणेशानें यास सुंदर देहयष्टि व सहस्र हात दिले. त्यामुळें यास सहस्रार्जुन असें नांव पडलें ( गणेश १. ७२-७३ ). कृतवीर्यानंतर यास जेव्हां अमात्य राज्याभिषेक करूं लागले, तेव्हां कार्तवीर्यानें गादीवर बसण्याचें नाकारिलें. कारण, यास वाटत होतें कीं, राजा या नात्यानें कराचा योग्य मोबदला आपणांकडून प्रजेस मिळत नाहीं. तेव्हां गर्गमुनीनें राजास सल्ला दिला कीं, तूं सह्याद्रीच्या खोऱ्यांत दत्ताची सेवा कर ( मार्क. १६ ). पुढें यानें अतिशय निष्ठापूर्वक हजार वर्षे दत्तात्रेयाची सेवा केल्यावर यास चार वर मिळाले—( १ ) सहस्र बाहू असावेत, ( २ ) अधर्माकडे वळूं लागल्यास सज्जनांनीं व वेदांनीं आपलें निवारण करावें, ( ३ ) संपूर्ण पृथ्वी जिंकून तिचें धर्मानें परिपालन करावें, (४) लढतां लढतां रणभूमीवर कोणातरी वरिष्ठ योद्ध्याच्या हातून मृत्यु यावा ( म. व. ११५; शां. ४९; अनु. १५२; वायु. २. ३२; मत्स्य. ४३; ह. वं. १. ३३; विष्णु ४. ११; पद्म. सृ.१२; अग्नि. २७५; ब्रह्म. १३; विष्णुधर्म. १. २३; ब्रह्मांड. ३. ६९; मार्क. १७; भा. ९. १५. २३; अग्नि. ४; ब्रह्म. २१३; लिंग. १. ६८ ). यानें कर्कोटक नागापासून अनूप देशांतील माहिष्मती ऊर्फ भोगवती नगरी जिंकली. हेंच हल्लींचें ओंकार मांधाता शहर. तींत मनुष्यांची वस्ती करवून ती नगरी यानें आपली राजधानी केली. नंतर कार्तवीर्यास दत्त व नारायण यांनीं राज्याभिषेक केला. तेव्हां स्वर्गांतील सर्व देव, गंधर्व व अप्सरा ही सर्व उपस्थित होतीं ( मार्क. १७ ).

यानें थोडक्याच वेळांत पृथ्वी जिंकली व तिचें पालन हा करूं लागला. यानें मारी नामक राक्षसास मारिलें ( नारद. १. ७६ ). रावण याशीं युद्ध करण्यास शुक, सारण, महोदर, महापार्श्व व धूम्राक्ष यांसह आला होता. पण कार्तवीर्य राजवाड्यांत नाहीं असें कळलें. या वेळीं हा नर्मदेवर स्त्रियांसहित क्रीडा करण्यास गेला होता. पुढें रावण विंध्यपर्वतावरून नर्मदा नदीवर गेला व तेथें स्नान करून शंकराची पूजा करण्यास बसला. इकडे कार्तवीर्यानें आपल्या हजार हातांनीं लीलेनें नदीचा प्रवाह अडवून पाणी तुंबविलें. एवढेंच नव्हे तर तें निरनिराळ्या दिशांनीं वाहूं लागलें. अशा प्रकारचा एक लोंढा रावणापर्यंत पोंचला व त्याचा पूजाभंग झाला. पुढें अशा तऱ्हेनें पूजाभंग करणारा हा कार्तवीर्य आहे, असें समजतांच रावण याजवर चालून गेला. पण यानें त्याच्या अमात्यांस हतवीर्य केलें व रावणास पकडिलें. आपल्या नातवास पकडिलें हें वर्तमान ऐकून पुलस्त्य ऋषि कार्तवीर्याकडे आला. यानें त्याचा सन्मान केला व त्याची इच्छा विचारिली. तेव्हां त्यानें रावणास सोडण्यास विनविलें असतां, त्यास आनंदानें सोडून अग्निसमक्ष परस्पर स्नेह व एकमेकांस पीडा न देण्याचीं वचनें दिलीं ( वा. रा. उ. ३१-३३; विष्णु. ४. ११; आ. रा. सार. १३; भा. ९. १५ ). कार्तवीर्यानें नर्मदातटाकावरून उभें राहून व पांच बाण सोडून लंकाधिपति रावणास मूर्च्छित करून धनुष्यानें बांधून माहिष्मतीस आणलें व पुढें पुलस्त्याचे प्रार्थनेवरून सोडलें ( वायु. २. ३२; मत्स्य. ४३; ह. वं. १. ३३; पद्म. सृ.१२; ब्रह्म. १३ ). हा रावण वंशावळीवरून रामकालिन असणें शक्य नाहीं. रावण हें व्यक्तिनाम नसून तामिळ भाषेंतील Iraivan किंवा Iraivan या शब्दाचें संस्कृत केलेलें रूप असावें. या शब्दांचा अर्थ देव, राजा, सार्वभौम किंवा श्रेष्ठ असा आहे ( J R A S 1914 p. 285 ). रावण हें विशेषनाम समजल्यामुळें घोंटाळा उडाला. या गोष्टींत विष्णुपुराणांत पुलस्त्याचें नांव नाहीं ( ४. ११ ).

पृथ्वी जिंकून यानें दहा हजार यज्ञ केले; सातशें यज्ञ असे ( ह. वं. १. ३३ ) म्हटलें आहे. त्या वेळीं यास यज्ञांतून एक दिव्य रथ व ध्वज मिळाला ( वायु. २. ३२; मत्स्य ४३; ह. वं. १.३३; मार्क. १७; पद्म. सृ. १२; अग्नि. २७५; ब्रह्म. १३; भा. ९. २३; विष्णुधर्म. १.२३ ). पुढें हा प्रजेस त्रास देऊं लागला; इतका कीं, पृथ्वी नम्र होऊन गेली. तेव्हां देव विष्णूकडे गेले व त्यांनीं त्यास सर्व माहिती कळविली. विष्णूनें त्यांस अभय देऊन कार्तवीर्याच्या नाशास्तव परशुरामावतार घेण्याचें ठरविलें. शंकरानें परशुरामास कार्तवीर्याच्या संहारास पुरेसें बल दिलें ( म. व. ११५; क. ३४; विष्णुधर्म. २.२३ ). हैहयाधिपति मत्त झाल्यामुळें क्रमागमि लागून अत्रिमुनींचा अपमान करीत आहेसें दृष्टीस पडतांच कार्तवीर्यास दग्ध करण्यास सात दिवसांनींच दुर्वास मातेच्या उदरांतून च्युत झाला ( मार्क. १६ ). पण दुर्वास हा दत्ताचा थोरला बंधु असून दत्ताची कृपा कार्तवीर्यानें संपादन केलीच होती.

नंतर आदित्य विप्ररूपानें याजकडे कांहीं भक्ष्य मागण्यास आला. यानें कोणतें भक्ष्य देऊं असा त्यास प्रश्न केला. त्यानें सर्व द्वीपें मागितलीं. पण तीं देण्यास राजा असमर्थ दिसल्यामुळें आदित्य म्हणाला कीं, तूं हे पांच बाण सोड. त्यांच्या अग्रांवर मी बसतों व इच्छेस येईल तेवढा प्रदेश खातों. हें कबूल करून राजानें पांच बाण सोडिले. आदित्यानें जे पूर्वेचे व दक्षिणेचे प्रदेश जाळले त्यांत आपव वसिष्ठऋषींचा आश्रमहि जाळला. हा ऋषि वरुणाचा पुत्र असून कांहीं कार्यास्तव आश्रमाबाहेर १०००० वर्षे जलांत राहण्यास गेला होता (म. आ. ९९). परत येतांच त्यास आश्रम जळलेला दिसला. तेव्हां त्यानें कार्तवीर्यास शाप दिला कीं, तुला परशुराम रणांत मारील ( वायु. २.३२-३३; मत्स्य. ४३-४४; ह. वं. १.३३; पद्म. सृ. १२; ब्रह्म. १३; विष्णुधर्म. १. ३१). आदित्याऐवजीं अग्नि असें दिलें आहे (म. शां. ४९).

बरेच दिवस गेल्यावर हा एकदां मृगयेनिमित्त बाहेर गेला असतां फिरत फिरत जमदग्नीच्या आश्रमीं आला. तेथें जमदग्नीच्या भार्येनें व जमदग्नीनें आपणांस मिळालेल्या ( इंद्रदत्त ) कामधेनूकरवीं याचा उत्कृष्ट सत्कार केला. त्यायोगानें हा जमदग्नीपाशीं ती गाय मागूं लागला. पण ती देण्याचें त्यानें साफ नाकारिलें. तेव्हां हा जबरदस्तीनें ती नेऊं लागला. पण त्या गाईच्या शब्दांनीं व शृंगांनीं याचें सर्व सैन्य घटकेंत मेलें व ती स्वर्गी गेली ( पद्म. उ. २४१ ). पण कार्तवीर्यानें ती गाय नेलीच व तिच्यासह तिचें वासरूंहि नेलें. इकडे परशुराम तपश्चर्येस गेला होता. तो केशवास संतुष्ट करून अनेक दिव्यास्त्रें घेऊन आश्रमीं आला व पाहतो तों त्यास कामधेनु नेल्याचें वर्तमान समजलें. तेव्हां तो रागानें लाल झाला व कार्तवीर्यावर स्वारी करून नर्मदाकांठीं यास युद्धास पाचारिलें. कार्तवीर्याची पत्नी मनोरमा हिनें यास युद्धास जाऊं नका, असें विनविलें. पण हा ऐकत नाहींसें पाहून तिनें प्राणत्याग केला. दत्तवरानें प्राप्त झालेली याची बुद्धि नष्ट झाली. पुढें याचें परशुरामाशीं युद्ध होऊन सरतेशेवटीं हा बाहुच्छेद होऊन पतन पावला ( ब्रह्मवै. ३.३३-४०; म. आ. १०४; व. ११६; क. ५; आश्व. २९; मत्स्य. ४३; ह. वं. १. ३३; विष्णु. ४ ११; अग्नि. ४; ब्रह्म. १३; २१३; लिंग. १. ६८; भा. ९. १५ ). याच्या मुलांनीं याच्या न कळत वासरूं चोरून आणिलें ( म. शां. ४९ ). हें युद्ध गुणावतीच्या उत्तरेस व खांडवारण्याच्या दक्षिणेस असलेल्या टेकड्यांत झालें ( म. द्रो. ७० ). पुढें कार्तवीर्याचा परशुरामानें केलेला वध जेव्हां जमदग्नीनें ऐकला, तेव्हां त्यानें रामास सांगितलें कीं, ही गोष्ट तूं फार अनुचित केलीस. क्षमा हें ब्राह्मणाचें भूषण. तेव्हां आतां प्रायश्चित्तास्तव एक वर्ष तीर्थयात्रा करण्यास जा. त्याप्रमाणें राम तीर्थयात्रेस गेला असतां, कार्तवीर्याच्या पुत्रांनीं पूर्वीचें वैर स्मरून जमदग्नि ध्यानस्थ असतां त्यास बाणांनीं ठार मारिलें व ते मस्तकासह पळून गेले. राम परत आल्यावर त्यास हें समजतांच मातेचें सांत्वन होण्यास्तव एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा करून तो त्या पुत्रांवर चालून गेला व पांचखेरीज सर्व पुत्रांस त्यानें ठार मारिलें व मस्तक आणिलें ( म. व. ११७; भा. ९. १५; अग्नि. ४ ). कित्येक ठिकाणीं कार्तवीर्यानें जमदग्नीस मारिलें, असें दिलें आहे ( म. द्रो. ७०; वा. रा. बा. ७५; पद्म. उ. २४१ ). पद्मपुराणांत ठोसे मारिल्याचें दिलें आहे.

यास हजार हात होते, असें वर आलें आहे; पण यास घरगुती व अन्य कार्यास्तव दोन हात होते ( ह. वं. १.३३; ब्रह्म. १३ ). पण यास सहस्रबाहु हें नांव होतें ( ह. वं. १.३३; मत्स्य. ६८; अग्नि. ४; गणेश. १. ७३ ). महाभारतांत आपवाचा आश्रम हिमालयाजवळ होता असें दिलें आहे व हा आश्रम हा अग्नीस देऊं शकला, यावरून याचें राज्य मध्यदेशावर असावें. अयोध्येचे राजे हरिश्चंद्र व त्रिशंकु हे याचे समकालीन होते. मथुरेचा शूरसेन देश हा शत्रुघ्नपुत्र शूरसेनानें खरोखर स्थापिला असतांना तो याच्या पुत्रानें स्थापिला असें लिंगपुराण म्हणतें ( १.६८ ). याच्या सर्व पुत्रांस स्वतंत्र प्रदेश होते ( ब्रह्मांड. ३. ४९ ). ही सर्व गोष्ट जमदग्नीची कामधेनु मुख्य धरून सांगितली आहे. पद्मपुराणांत ती गाय सुरभि म्हणून सांगितली आहे (उ. २४१). तेथें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा नाहीं. येथें

(ब्रह्मांड. ३. २१. ५ ते ४७. ६१) परशुरामानें कान्यकुब्ज व अयोध्या येथील सर्व राजांच्या साह्यानें अर्जुनास मारिलें व भार्गवांचा पराभव केला.

याची कारकीर्द ८५ हजार वर्षे झाली ( वायु. २.३२; मत्स्य. ४३; ह. वं. १.३३; विष्णु. ४.११; पद्म. सृ. १२; भा. ९.१३; विष्णुधर्म. १.२३ ). याच्या या मोठ्या कारकीर्दीत यानें हैहयसत्ता व वैभव कळसास पोहोंचविलीं. यानें नर्मदेच्या मुखापासून हिमालयापर्यंत प्रदेश जिंकलेला दिसतो. याची सत्ता दूरवर पसरल्याचें लक्षण म्हणजे यास सम्राट व चक्रवर्ति असें बऱ्याच ठिकाणीं म्हटलेलें आहे (वायु. २.३२; ह. वं. १.३३; पद्म. सृ. १२; ब्रह्मां. १३; विष्णुधर्म. १. २३; नारद. १.७६ ).

हा नर्मदा व समुद्र आपल्या सहस्र हातांनीं असा घुसळी कीं, सर्व जलचर यास शरण येत ( वायु. २. ३३; मत्स्य. ४३; ह. वं. १. ३३; विष्णु. ४. ११; पद्म. सृ. १२; ब्रह्म. १३ ). हा यमसभेंत यमाच्या समीप अधिष्ठित असतो ( म. स. ८ ). याचा व पवनाचा ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाविषयीं संवाद झाला आहे ( म. अनु. १५२-१५७ ). तसेंच याचा समुद्राशीं, माझ्याशीं झुंज करण्यास कोण बलिष्ठ आहे, या विषयावरहि संवाद आला आहे ( म. आश्व. २९ ). यानें प्रवालक्षेत्रीं प्रवालगणपाचें मोठें मंदिर बांधिलें ( गणेश. १. ७३ ). याचा दत्ताशीं माघस्नानमाहात्म्यविषयक संवाद झाला होता ( पद्म. उ. २४२-२४७. ). नारदपुराणांत याचा पूजाविधि सांगितला आहे. तसेंच याच्या शरीरवर्णनांत हा काणा होता, असा उल्लेख आहे ( १. ७६ ).

याचे पुत्र शंभर असून त्यांचीं नांवें शूर, शूरसेन, वृष्टधाद्य, वृष, जयध्वज (वायु. २. ३२;), धृष्ट, कोष्ट, (मत्स्य. ४३), कृष्ण ( ह. वं. १. ३३; पद्म. सृ. १२ ), सूर, सूरसेन (अग्नि. २७५ ), वृषण, मधुपध्वज ( ब्रह्म. १३ ), धृष्ट, कृष्ण ( लिंग. १. ६८ ), वृषभ, मधु, ऊर्जित ( भा. ९. २३ ). शेवटल्या ठिकाणीं दहा हजार पुत्र होते असें म्हटलें आहे.

२ ( सो. सह. ) मत्स्य व वायुपुराणाप्रमाणें कनकाच्या चार पुत्रांतील एक.

**कार्तिकस्वामिन्**—( स्कंद व गजानन पहा ).

**कार्तिमति**—शुकाची कन्या व अणुहाची पत्नी.

**कार्तिरुग्रायुध**—(सू. दिष्ट.) हा विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें कृतपुत्र होय.

**कार्तिवय**—कश्यपगोत्री एक ब्रह्मर्षि.

**कार्दमायनि**—भृगुगोत्री एक ब्रह्मर्षि.

**कार्दपिंगाक्षि**—कादुपिंगाक्षीबद्दल पाठभेद.

**कार्पणि**—भृगुकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि.

**कार्मायन**—मांकायनाबद्दल पाठभेद.

**कार्शकेयीपुत्र**—हा प्राचीनयोगीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य वैदभृतीपुत्र होय ( बृ. उ. ६. ५. २. )

**कार्षणि**—भृगुकुलांतील गोत्रकार. पार्वणि असा पाठभेद आहे.

**कार्ष्णाजिनि**—एक प्राचीन आचार्य (जै. सू. ४. ३. १७; ६. ७. ३५; ब्रह्मसूत्र. ३. १. ९; का. श्रौ. १. ६.२३). यानें कार्ष्णाजिनिस्मृति नांवाचा एक ग्रंथ केला आहे. पैठीनसि, हेमाद्रि, माधवाचार्य वगैरे ग्रंथकार या स्मृतीचा उल्लेख करितात ( C. C. ). मिताक्षरा ( याज्ञ. ३. २६५), अपरार्क, स्मृतिचंद्रिका आणि श्राद्धविषयक इतर ग्रंथांत याचा उल्लेख आहे. अपरार्कांत ( पा. १३८ ) याचा एक श्लोक दिला आहे. त्यांत सनक, सनंदन, सनातन, कपिल, आसुरि, वोढ आणि पंचशिख ह्या ब्रह्मदेवाच्या सात पुत्रांचा उल्लेख आहे. राशींच्या चिन्हांसंबंधीं याचा एक श्लोक अपरार्कांत ( ४२० ) आला आहे.

**कार्ष्णायन**—कृष्णपराशरकुलांतील गोत्रकार.

**कार्ष्णि**—कृष्णपुत्रांना, विशेषतः प्रद्युम्नास नांव ( भा. १०,५५ ).

२ अभिमन्यु ( म. भी. ४७ ).

३ ( विश्वक पहा ).

**काल**—ध्रुव वसूचा पुत्र.

२ एक असुर ( महिषासुर पहा ).

३ एक योद्धा ( कुशीलव पहा ).

४ जालंदराचे सैन्यांतील एक असुर ( पद्म. उ. १२ ).

५ परशुरामाचा बंधु ( कालकाम पहा ).

६ अकरा रुद्रांतील एक ( भा. ३.१२ ).

**कालक**—विजराचा पुत्र.

**कालकंज**—हा आकाशांत असतो ( अ. वे. ६. ८०. २ ). परंतु याचा पराभव इंद्रानें केला. हें एक इंद्राच्या पराक्रमाचें स्थान आहे ( क. सं. ८.१; मै. सं. १.६.९; तै. ब्रा. १.१.२.४-६; कौ. उ. ३.१ ). हे असुर होते. यांनीं स्वर्गप्राप्तीकरितां अग्निचयनाचें अनुष्ठान आरंभिलें. तेव्हां याचा पाडाव करावा म्हणून इंद्र वेषांतर करून यांच्या जवळ आला व याला म्हणाला, हे असुरहो, मी ब्राह्मण आहें, मला तुमच्यांत अनुष्ठानास घ्या. मलाहि स्वर्गास यावयाचें आहे. असुर बरें म्हणाले. असुर चयनाकरितां इष्टका ( विटा ) मांडीत होते. त्याबरोबर इंद्रानें आपली एक वीट मांडली व मनामध्यें ही माझी चित्रा नामक वीट अशी खूण ठेवली. अनुष्ठान संपल्यावर मांडलेल्या चयनावर आरोहण करून ते असुर स्वर्गाला जावयास निघाले. इतक्यांत चयनांतून इंद्रानें आपली वीट हलकेच काढून घेतली.

त्यावेळी चयनरूप श्येनपक्षी ढांसळून खालीं पडला व असुराचें स्वर्गास जाणें थांबलें. कांहींनीं अर्धवट स्वर्गाचा पल्ला गांठला होता. पण ते चयन ढासळण्याच्या दोषामुळें कोळी नामक सहा पायांचे किडे झाले. दोघेजण असुर श्रद्धातिशय-मुळें स्वर्गापर्यंत जाऊन भिडले. पण शेवटीं चयनभ्रष्टतेच्या पापामुळें ते दोघेहि देवलोकांत कुत्रे झाले ( तै. ब्रा. १.१.२; कालकेय पहा ).

**कालकवृक्षीयमुनि**—एक ऋषि. याचे जवळ भूत, भविष्य, वर्तमान जाणणारा एक पक्षी होता. एकदां हा कोसल देशाधिपति क्षेमदर्शी राजाकडे गेला. राजानें या पक्षाचा गुण जाणून असा प्रश्न केला, माझे मंत्री माझ्याविषयीं कसे आहेत? त्यावरून पक्ष्यानें एकाचे दुर्गुण काय होते तें सांगून इतरांचें दुसरे दिवशीं सांगण्याचें ठरविलें. तेव्हां रात्रीं अन्य मंत्र्यांनीं त्या पक्ष्यास मारिलें. त्यावरून राजा समजला कीं, हे सर्वहि मंत्री माझें अनिष्ट चिंतन करणारे आहेत. म्हणून त्यानें याचें साहाय्य घेऊन सर्वांस शासन केलें ( म शां. १०१; स. ७. कुं. ). एकदां क्षेमदर्शी निर्बल होऊन या मुनीकडे आला व यास कोणती गोष्ट केली पाहिजे म्हणून विचारूं लागला. मुनीनें त्याची सर्व बाजूंनीं परीक्षा पाहून विदेहपतीस आज्ञा केली कीं, तूं या क्षेमदर्शी राजास आपला प्रधान करावें. ही गोष्ट विदेहपतीनें मान्य करून उभयतांनीं मुनीचें आदरपूर्वक पूजन केलें ( म. शां. १०४.–१०६; क्षेमदर्शिन् पहा ).

**कालका**—वैश्वानर दानवाची कन्या व कश्यपप्रजापतीची स्त्री ( भा. ६. ६ ). कोणी म्हणतात कीं, ही मारीच नांवाच्या असुराची स्त्री; पण तसें नसून कश्यपासच मारीच असें म्हणत व त्याची ही स्त्री होय. हिला कालकेय ऊर्फ कालकंज नामक असंख्य पुत्र झाले ( कश्यप पहा; म. व. १७५ कुं. ).

**कालकाम**—हे विश्वेदेवांपैकीं आहेत. सध्यां परशुराम-क्षेत्रांत परशुरामाच्या जवळ आहेत. यांचा तेथील लोक संकल्पांतहि उच्चार करतात, पण आधार सांपडला नाहीं.

**कालकामुक कार्मुक**—खर राक्षसाच्या बारा अमात्यांतील एक ( खर पहा ).

**कालकाक्ष**—गरुडानें मारिलेला एक असुर.

**कालकीर्ति**—एक क्षत्रिय ( म. आ. ६८ ).

**कालकूट**—त्रिपुरासुराचा आश्रित दैत्य (गणेश. १. ४३).

**कालकेतु**—एक असुर. याला एकवीर नांवाच्या हैहय राजानें मारिलें.

**कालकेय ( कालेय )**—हिरण्यपुरांत राहणारे असुर. त्यांना अर्जुनानें मारिलें ( म. व. ९९; १७५ ). मारीचाची स्त्री कालका, तिचे पुत्र कालकेय. यांस व कालखंज असेंहि नामांतर आहे ( म. स. ९ ).

**कालखंज**—( कालकंज, कालका व कालकेय पहा ).

**कालघट**—जनमेजय राजाच्या सर्पसत्रांतील एक सदस्य ( म. आ. ५३ ).

**कालजित्**—लक्ष्मणाचा सेनापति ( कुशीलव पहा ).

**कालजिह्व**—एक रुद्रगण.

**कालनर**—( सो. अनु. ) भागवतमतें सभानराचा पुत्र. याचा पुत्र सृंजय. यास कालानल असेंहि म्हणतात.

**कालनाभ**—हिरण्यकशिपूच्या सभेंतील एक दैत्य व रुषाभानूचा पुत्र ( भा. ७. २ ).

२ कश्यप व दनु यांचा पुत्र ( ह. वं. १. ३ ).

३ विप्रचित्ति व सिंहिका यांचा पुत्र. यास परशुरामानें मारलें ( ब्रह्मांड. ३. ६. १८-२२ ).

४ कृष्णपुत्र सांबानें मारिलेला एक दैत्य.

**कालनेमि**—लंकेंतील एक राक्षस. युद्धांत लक्ष्मण मूर्छित झाला असतां, मारुति द्रोणाचलावरील औषधि आणावयास जात आहे, असें रावणानें ऐकून त्यास मार्गांत निरोध करण्यासाठीं याला पाठविलें होतें. तेव्हां हा ऋषिवेष धारण करून मारुतीच्या मार्गांत बसला असतां जलपानार्थ तेथें मारुति थांबला. परंतु मारुतीस याचें कपट लवकर कळलें, म्हणून त्यानें मग विलंब न करितां यास मारून आपल्या कार्याकरितां तो पुढें चालता झाला ( अध्या. रा. यु. ७ ).

२ शंभर मुखांचा एक दैत्य ( मत्स्य. १७७ ).

३ पातालवासी एक दैत्य ( पद्म. उ. ६; म. स. ५१ ). विरोचन बद्ध झाल्यावर यानें सर्व सैन्याचा पराभव केला. पण हा विष्णूवर चालून गेला असतां त्यानें चक्रानें याचे शंभर हात व याचीं मस्तकें तोडून याचा प्राण घेतला ( पद्म. सृ. ४ ). विष्णूनें मारिलें म्हणून सूड उगविण्यासाठीं हा कंस झाला ( भा. १०.१; कंस पहा ).

४ संन्हादाचा पुत्र. याला ब्रह्मजित्, ऋतुजित्, देवांतक व नरांतक असे चार मुलगे होते.

**कालपथ**—विश्वामित्रऋषीचा पुत्र ( म. अनु. ७ ).

**कालपृष्ठ**—कश्यपाला दितीचे ठिकाणीं झालेला दैत्य. यानें तपश्चर्या करून ज्याच्या डोक्यावर मी हात ठेवीन, त्याचें भस्म व्हावें, असा वर मागितला. नंतर त्याचा प्रयोग शंकरावर करूं लागला. शेवटीं विष्णूनें मोहिनीचें रूप घेऊन यालाच स्वतःचे डोक्यावर हात ठेवावयास लाविलें. त्यायोगें याचें भस्म झालें ( स्कंद. ५. ३. ६७; भस्मासुर पहा ).

**कालभीति**—हा कालमार्गाला गर्भांत असतांनाच भीत होता म्हणून, याचें नांव कालभीति असें ठेविलें. याचा पिता मांटी, यानें पुत्राकरितां १०० वर्षें रुद्राचें अनुष्ठान केलें. तेव्हां मांटीची पत्नी गर्भार राहिली. परंतु चार वर्षें झालीं तरी गर्भ

बाहेर येईना; तेव्हां भांडीनें याचें कारण गर्भास विचारिलें. त्यानें मला कालमार्गाची भीति वाटते म्हणून सांगितलें. नंतर भांडीनें शंकराकडे जाऊन ही हकीकत त्यास सांगितली. शंकरानें आपले धर्म, ज्ञान, वैराग्य इत्यादिकांचा त्यास बोध करावयास सांगितला. बोध प्राप्त झाल्यावर हा गर्भ बाहेर आला. पुढें याचे संस्कार झाल्यावर कालभीतिक्षेत्रांत यानें अनुष्ठान केलें व हा स्वर्गसुख भोगूं लागला. पुढें शंकरानें याची भक्ति पाहून कालमार्गाला जिंकिलें म्हणून तूं 'महाकाल' या नांवानें प्रसिद्ध होशील असा यास वर दिला व पुढें येथें करंधमाला उपदेश करून नंतर माझा प्रतिहारी नंदी होऊन मजजवळ येशील, असा आशीर्वाद दिला ( स्कंद. १. २. ४० ).

**कालभैरव**—( भैरव व रुद्र पहा ).

**कालयवन**—गार्ग्य ( गर्ग ) व गोपाली यांचा पुत्र. वृष्णि व अंधक यांचा गार्ग्य नांवाचा पुरोहित होता. क्वचित् त्याला गर्ग म्हटल्याचेंहि आढळतें ( विष्णु. ५. २३ ). तो कडक ब्रह्मचर्यानें राहत असे. एकदां त्याचा मेव्हणा त्याला षंढ म्हणाल्यामुळें त्याला अत्यंत राग आला व त्यानें दक्षिणेंत जाऊन लोहपिष्ट भक्षण करून बारा वर्षें तपश्चर्या केली व शंकराला प्रसन्न करून घेतलें. शंकरापासून त्यानें यादवांचा पराजय करणारा पुत्र मागून घेतला. ही गोष्ट दक्षिणेंत अजितंजय नांवाच्या नगरांत घडली. त्या वेळीं यवनाधिपति राजा निपुत्रिक असून पुत्र व्हावा अशी इच्छा करीत होता. त्याला गार्ग्याला मिळालेल्या वराची हकीकत कळली. तेव्हां त्यानें गार्ग्याला गोपस्त्रियांपैकीं गोपाली नामक गवळणीपासून पुत्र व्हावा, अशी व्यवस्था केली. त्याप्रमाणें झालेला पुत्र कालयवन होय ( ह. वं. २.५२; ५७; विष्णु. ५.२३; ब्रह्म. १४. ४८-५२ ). यवनराजाच्या घरांत लहानाचा मोठा झालेला कालयवन सुदैवानें त्याच्या राज्याचाहि अधिपति झाला. श्रीकृष्णाशीं याचा युद्धप्रसंग सहज घडला कीं मुद्दाम घडवून आणिला, याविषयीं पुराणग्रंथांत एकमत नाहीं. कांहीं ग्रंथांत कालयवन दिग्विजय करण्याकरितां बाहेर पडला व मथुरेचे यादव बलिष्ठ म्हणून त्यांच्यावर यानें स्वारी केली ( विष्णु. २.५३; ब्रह्म. १९६ इत्यादि ). पण हरिवंशांत कृष्णाचा जरासंधाकडून पराजय होईना म्हणून, सौभपति शाल्वाला मुद्दाम पाठवून कालयवनाला बोलावणें केल्याचा उल्लेख आहे. त्याला जातांना कदाचित् कृष्ण त्रास देईल म्हणून सौभपति शाल्व आकाशमार्गानें कालयवनाकडे गेला. कालयवनाला अशी संधि पाहिजेच होती. यानें त्याच दिवशीं आपल्या विपुल सैन्यासह निघण्याची तयारी केली. हा जरी यवन होता, तरी निघतांना यानें अग्नींत हवन केल्याचा उल्लेख आहे ( ह. वं. २.५४ ).

इकडे कृष्णहि जरासंधाच्या वरचेवर होणाऱ्या स्वाऱ्यांनीं त्रस्त झाला होता म्हणून, त्यानें मथुरेसारखी सपाटीची राजधानी सोडून द्वारकेसारख्या दूरच्या व समुद्रवेष्टित स्थळीं राजधानी नेण्याविषयीं यादवांना सल्ला दिला. एका बाजूनें जरासंध व दुसऱ्या बाजूनें कालयवन अशी स्थिति पाहिल्याबरोबर चतुर कृष्णानें एका रात्रींत आपली राजधानी बदलण्याचें ठरविलें. त्यापूर्वी त्यानें कालयवनाला दहशत दाखविण्याचा प्रयत्न केला. एक काळाकुट सर्प घटांत घालून त्यावर मुद्रा करून तो घट आपल्या दूताकडून कालयवनाकडे पाठविला. पण त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. कालयवनानें सर्प पाहून सहजरीत्या उद्गार काढिले कीं, 'कृष्ण हा ह्या काळसर्पासारखा आहे.' नंतर कृष्णाला उत्तर म्हणून चावणाऱ्या खूप मुंग्या त्या घटांत भरून तो घट कृष्णाकडे रवाना केला. तात्पर्य हें कीं, तूं जरी काळसर्पासारखा प्रबळ असलास, तरी मी संख्येनें पुष्कळ असल्यामुळें मुंग्याप्रमाणें तुझा नाश करीन ( ह. वं २.५७ ).

कृष्णानें तें पाहून एका रात्रींत राजधानी बदलली ( पद्म. उ. २७३.४३ ) व सर्वांना धीर देऊन आपण पुनः मथुरेस पायीं आला. हा निःशस्त्र स्थितींत मथुरेंतून बाहेर पडत असतां कालयवनाच्या नजरेस पडला. तेव्हां कालयवन कृष्णाचा पाठलाग करूं लागला. कृष्ण पुढें व कालयवन मागें असे बरेच दूर गेल्यानंतर कृष्ण मुचुकुंद निजला होता, त्या गुहेंत शिरला. त्यानें आपलें वस्त्र हळूंच मुचुकुंदाच्या अंगावर घातलें व आपण बाजूस झाला ( भा. १०. ५१-५२ ). इतर ठिकाणीं वस्त्र अंगावर घातल्याचा उल्लेख नाहीं. कालयवनानें त्या निजलेल्या मुचुकुंदालाच कृष्ण समजून लत्ताप्रहार केला. त्याबरोबर मुचुकुंद जागा झाला व त्यानें रागानें कालयवनास केवळ दृष्टिक्षेपानें जाळून टाकिलें ( ह. वं. २. ५७; पद्म. उ. २७३. ४८-५७; विष्णु. ५. २३; ब्रह्म. १४. ४८-५२; १९६; म. शां. ३४८. २९ ).

**कालवीर्य**—एक असुर ( सैंहिकेय पहा ).

**कालशिख**—वसिष्ठगोत्री ऋषि.

**काला**—( काष्ठा पहा ).

२ ही देवांच्या स्तुतीनें प्रसन्न होऊन देवी पार्वतीनें शुंभनिशुंभांस मारण्याकरितां उत्पन्न केलेली शक्ति होय. हिनें धूम्रलोचन, चंडमुंड, रक्तबीज, शुंभ व निशुंभ यांस ठार मारिलें (दे. भा. ५. २२-३१; शुंभ, निशुंभ व रक्तबीज पहा ). हिला काली, कालिका व कौशिकी अशीं नामांतरें आढळतात. हिला वरील युद्धांत सर्व देवांच्या शक्ति त्यांच्या लक्षणांनीं युक्त होऊन मदत करण्यास आल्या. त्यांचीं नांवें--१ ब्राह्मणी, २ वैष्णवी, ३ शांकरी, ४ इंद्राणी,

५ वाराही, ६ नारसिंही, ७ याम्या, ८ वारुणी, ९ कौबेरी (दे. भा. ५. २८).

**कालाक्ष**—(घटोत्कच पहा).

**कालानल**—(सो. अनु.). कालनर व हा एकच.

२ एक दैत्य. यास गजाननानें विजयपुरीं मारिलें. तेथें गजाननाचें विघ्नहर असें नांव आहे (गणेश. १. ६३).

**कालायनि**—व्यासाच्या ऋकशिष्यपरंपरेंतील बाष्कलीचा शिष्य (व्यास पहा).

**कालिक**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य (व्यास पहा).

२ मय व रंभा यांचा पुत्र (ब्रह्मांड ३. ६. २८-३०).

**कालिंग**—एक अंत्यज. हा चोरी करावयास गेला असतांहि क्षेत्रांत मेला म्हणून उद्धरला (पद्म. उ. २१७).

**कालिंदी**—ही श्रीकृष्णाची स्त्री होय. ही पूर्वजन्मीं सूर्यकन्या असून ह्या जन्मीं श्रीकृष्णप्राप्तीकरितां यमुनेवर तप करीत असतां हिचा मनोदय जाणून श्रीकृष्णानें हिचें पाणिग्रहण केलें. हिला श्रुत, कवि, वृष, वीर, सुबाहु, भद्र, शांति, दर्श, पूर्णमास आणि सोमक असे दहा पुत्र होते (भा १०. ६. १).

**कालिय**—काद्रवेयकुलांतील पन्नग जातीचा हा नाग होता (भा. १०. १७. ४; म. आ. ३५. ६). हा पूर्वी रमणकद्वीपांत राहत असे. तेथें गरुडानें त्रास देऊं नये म्हणून त्याला दर महिन्याच्या पौर्णिमेस हा भक्ष्य पोहोंचवीत असे. एकदां गरुडाचा भाग यानें भक्षण केल्यामुळें गरुड याच्यावर रागावला. गरुडानें याला मारिलें असतें, पण थोडा तडाखा बसल्यावरोबर हा यमुनेच्या डोहांत येऊन लपला. तेथें सौभरीच्या शापामुळें गरुडाला येणें शक्य नव्हतें. कालियामुळें तेथील पाणी विषमय बनलें होतें. तें प्याल्यामुळें गोप व गाई मेल्या. तेव्हां कृष्णानें एका झाडावर चढून डोहांत उडी मारिली. व कालियाला तेथून रमणकद्वीपाकडे हुसकून दिलें व गरुड त्रास देणार नाहीं, अशी व्यवस्था केली. याला पांच तोंडें होतीं व मोठ्या ऐश्वर्यांत हा तेथें राहत असे (म. स. ५३. १५; भा. १०. १६; ह. वं. २. १२; विष्णु. ५. ७).

२ दाशरथि रामाच्या सभेंतील एक हास्यकार.

३ कश्यप व कद्रू यांच्या पुत्रांतील एक (म. आ. ३५).

**काली**—(दुर्गा पहा).

२ मत्स्यीच्या पोटीं जन्मलेली उपरिचर वसु राजाची कन्या. हिला मत्स्यगंधिनी, योजनगंधा इत्यादि नांवें असून पुढें सत्यवती असेंहि नांव पडलें होतें. हीच शंतनूची बायको झाली. हिला कौमार्यावस्थेंत पराशर पुत्र झाला.

३ पंडुपुत्र भीमसेनाची दुसरी स्त्री. हिला त्यापासून सर्वगत पुत्र झाला (भा. ९. २२. ३१). हिच्याबद्दल काशी, काश्य व काशेयी असे क्वचित् पाठभेद आढळतात.

**कालीयक**—कद्रू व कश्यप यांचा पुत्र.

**कालेय**—अत्रिकुलांतील गोत्रकार (अत्रि पहा).

२ रसातळांत राहणाऱ्या दैत्यांपैकीं एक (भा. ५.२४). हा कालकेयाचा भाऊ. भावाच्या मृत्यूस्तव चित्ररथावर हा धांवला, पण इंद्रपुत्र जयंतानें यास मध्येंच गांठून याचा वध केला (पद्म. सृ. ६६).

**कावषेय**—हें तुराचें मातृक नांव आहे. हा तत्त्वज्ञानाचा आचार्य होता (ऐ. आ. ३. २. ६; सां. आ. ८.२). हा तुरऋषीस कवषेपासून झालेला पुत्र होय (भा. ९. २२).

**काव्य**—बर्हिषद पितरांपैकीं एक व स्वतंत्र पितृगण (वायु. १. ५६. १३). हे कविपुत्र आहेत.

२ वारुणि कवीचा पुत्र. भार्गव व अंगिरस् गोत्रांतील मंत्रकार व ऋषि. सामवेदी श्रुतर्षि (उशनस् पहा).

३ तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक. उशनसचें पैतृक नांव (ऋ. १. ५१. ११; ८३. ५; १२१. १२; ६. २०. ११; ८. २३. १७; अ. वे. ४. २९. ६; तै. सं. २. ५. ८. ५). इट व उक्ष्णोरंध्र यांचेंहि हें पैतृक नांव आहे.

**काश**—(काश्य पहा).

**काशकृत्स्न**—एक व्याकरणकार. याचें तीन अध्यायांचें व्याकरण आहे (काशिका. ५. १. ५८). एक तत्त्वज्ञानी (ब्र. सू. १. ४. २२).

**काशि** किंवा **काश्य**—ह्या लोकांचा वैदिक वाङ्मयांत बऱ्याच वेळां उल्लेख येतो. काशीच्या राजाला उद्देशून हा शब्द वापरलेला असावा. शतानीक सात्राजिताकडून काशीचा राजा धृतराष्ट्र याचा पराभव झाला तेव्हां पुनः ब्राह्मणांचें वर्चस्व होईतोंपर्यंत काश्य लोकांनीं यज्ञ करण्याचें बंद केलें (श. ब्रा. १३. ५. ४. १९). दुसरा अजातरिपु हा काशीचा राजा होता. भद्रसेनहि काशीचा राजा होता. काशीविदेह असेंहि सामासिक नाम येतें. काशी, कोसल आणि विदेह यांचा एकच पुरोहित होता. (सां. श्रौ. १६. २९. ५). काशी आणि विदेह हीं अगदीं नजीक होतीं (बौ. श्रौ. २१. १३). काशीकौशल्य असाहि निर्देश आहे (गो. ब्रा. १. ९).

२ वारुणि कवीच्या आठ पुत्रांतील सातवा (कवि पहा).

३ (सो. क्षत्र.) भागवतमतें काश्यपुत्र. वायु व विष्णु यांच्या मतें काशपुत्र. वायूंत यास काश्य म्हटलें आहे. विष्णूंत यास काशिराज म्हटलें आहे (काश्य पहा).

**काशिक**—भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय राजा ( म. उ. १७१ ).

**काशिराज**—अंबा, अंबिका व अंबालिका यांचा पिता. परंतु हें नांव काशीच्या कोणत्याहि राजास लावितात ( भा. ९. २२; प्रतर्दन पहा ).

२ भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा (म.आ. ६७).

३ भास्करसंहितेंतील ' चिकित्साकौमुदी ' तंत्राचा कर्ता ( ब्रह्मवै. २. १६ ).

**काश्य**—( सो. क्षत्र. ) भागवतमतें सुहोत्राचा, वायु व विष्णु यांच्या मतें सुनहोत्राचा पुत्र. ब्रह्मांड, भागवत व विष्णु यांच्या मतें काश्यवंश अमावसुपुत्र क्षत्रवृद्धापासून सुरू झाला. ब्रह्म व अग्निपुराणांत पौरव सुहोत्रापासून निघाला. पण ब्रह्म व अग्नि यांमध्यें सुहोत्र व सुनहोत्र या नामसाम्यासुळें घोटाळा झाला असावा. या वंशाला क्षत्रवृद्धवंश किंवा काश्यवंश म्हणतात ( काशि पहा ).

२ सांदीपनीऋषीचा पिता.

३ ( सो. अज. ) सेनजित् राजाच्या चार पुत्रांतील तिसरा. मत्स्यमतें काव्य असें आहे.

४ भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय राजा. हा एकरथी असतां युद्धसमयीं कांहीं वरप्रभावानें अष्टरथी होत असे ( म. उ. ४. १७१ कुं. ).

५ हें काशिराज या अर्थानें अजातशत्रूला लागलें आहे ( २ अजातरिपु पहा ).

**काश्यप**—हें एका विस्तृत अशा कुलाचें नांव आहे. प्रजापतीनें उत्पन्न केलेल्या सर्वच प्रजा काश्यप म्हणजे कश्यप-कुलोत्पन्न आहेत ( श. ब्रा. ७. ५. १. ५; कश्यप पहा ).

हें पैतृक नांव सर्वसाधारण आहे ( तै. आ. २. १८; १०. १. ८ ). हाहि अगस्त्य व परशुराम यांच्या प्रमाणें दक्षिणेंतील वसाहत करणारा मानिला जातो. वंश किंवा वसाहत म्हणून कश्यपाशीं संबंध जोडून आपणास काश्यपगोत्री म्हणवून घेणारे लोक सर्व जातींत आढळतात. शाकटायनाबरोबर व्याकरणज्ञ म्हणून याचा उल्लेख आहे ( शु. प्रा.४. ५ ).

कश्यपगोत्रांतील मंत्रकार. हा ऋषिहि आहे ( भृगु, कश्यप अवत्सार, असित देवल, निध्रुवि, भूतांश, रेभ, रेभसूक्ति व विव्रि पहा ).

२ एक मांत्रिक ब्राह्मण. हा सर्पदेश झालेल्या परीक्षितास मंत्रसामर्थ्यानें सजीव करून पैसे मिळविण्याकरितां चालला होता. तक्षकाला ही बातमी समजल्याबरोबर वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन त्यानें काश्यपाला वाटेंत गाठलें. व म्हणाला, ह्या वृक्षाला मी चावतों. नंतर तूं आपल्या मंत्रसामर्थ्यानें हा वृक्ष सजीव कर; म्हणजे तुझें मंत्रसामर्थ्य मी खरें समजेन. त्याबरोबर तक्षकाच्या दंशानें भस्मसात् झालेला वृक्ष यानें मंत्रसामर्थ्यानें अंकुरित करून पल्लवित केला. तेव्हां याच्या मंत्रसामर्थ्याबद्दल तक्षकाची खात्री पटून राजा देईल त्यापेक्षांहि अधिक धन देऊन काश्यपास यानें परत फिरविलें. काश्यपहि ब्राह्मणाचा शाप वगैरेमुळें कदाचित् मंत्रसामर्थ्य चालणार नाहीं, असें समजून परत फिरला (म.आ.४३). पण राजाकडे गेला नाहीं म्हणून लोकांनीं याला वाळींत टाकिलें. तेव्हां हा वेंकटाचलाला गेला व तेथील तीर्थांत स्नान करून पापमुक्त झाला ( स्कंद. २. १. ११ ).

३ काश्यपाची एक जुनी गोष्ट युधिष्ठिराला भीष्मानें ज्ञानाचें महत्त्व वर्णन करण्याकरितां सांगितली आहे, ती अशी—काश्यप नांवाचा एक तपस्वी व सदाचारसंपन्न ब्राह्मण होता. याला एक वैश्यानें रथाचा धक्का देऊन पाडिलें. तेव्हां व्याकुळ होऊन क्रोधानें प्राण देण्यास हा प्रवृत्त झाला. हें जाणून इंद्र शृगाल-रूपानें तेथें आला व त्यानें यास मानवदेह व त्यांतहि ब्राह्मण्य याची प्रशंसा करून मृत्यूपासून निवृत्त केलें व ज्ञानाकडे याचें लक्ष वेधलें. तेव्हां काश्यपासहि आश्चर्य वाटून हा शृगाल नसून इंद्र आहे हें याच्या ध्यानीं आलें. तेव्हां यानें इंद्राची पूजा केली व हा घरीं परतला ( म. शां. १८०; नारद पहा ).

४ एक धर्मशास्त्रकार. अठरा उपस्मृतिकारांत काश्यप हा एक होता ( स्मृतिचंद्रिका १; सरस्वतीविलास पान १३ ). त्याप्रमाणें पाराशरधर्मसूत्रांतहि याचा धर्मशास्त्रकर्ता म्हणून उल्लेख आहे. पण याज्ञवल्क्यस्मृतींत याचें नांव सांपडत नाहीं. याच्या ग्रंथांत आह्निककर्म, श्राद्ध, अशौच, प्रायश्चित्त वगैरेबद्दल बरीच माहिती दिलेली आहे. मिताक्षरा, स्मृतिचंद्रिका वगैरे ग्रंथांत याच्या धर्मशास्त्रांतील उतारे घेतले आहेत. कश्यपस्मृति म्हणून एक स्वतंत्र ग्रंथ आहे. त्यांत गृहस्थांचीं कर्तव्यें, निर-निराळ्या तऱ्हांचीं प्रायश्चित्तें वगैरेबद्दल माहिती आहे. कश्यप म्हणून एक धर्मशास्त्रकार असल्याचा उल्लेख बौधायनधर्मसूत्रांत आहे ( १. २. २० ). परंतु हा व कश्यप हे दोघे निराळे किंवा एकच आहेत, याबद्दल नक्की माहिती सांपडत नाहीं. तसेंच एक व्याकरणकार म्हणून याचा उल्लेख पाणिनीनें केला आहे ( ८. ४. ६७ ). त्याचप्रमाणें हा शिल्पकार व शिक्षाकारहि आहे. याच्या नांवावर पुढील ग्रंथ उपलब्ध आहेत. १ काश्यपपंचरात्र, २ काश्यपसंहिता, ३ काश्यपस्मृति, ४ काश्यपसूत्र. काश्यपस्मृति व काश्यपसंहिता हे दोन ग्रंथ व कश्यपस्मृति व कश्यपसंहिता हे दोन ग्रंथ एकाच व्यक्तीनें लिहिले असावेत ( C. C. ).

हा अठरा ज्योतिषसंहिताकारांपैकीं एक असून याची काश्यपसंहिता प्रसिद्ध आहे. याच्या संहितेचीं एकंदर ५०

प्रकरणें आहेत. एकंदर श्लोकसंख्या सुमारें १५०० आहे. याच्या ग्रंथांत सूर्यावरचे डाग वर्णित असून व दूरवीक्षणा-( दुर्बिण )दि यंत्रेंहि आहेत म्हणतात ( कविचरित्र ).

४ भौत्य मन्वंतरांतील एक मनुपुत्र.

५ सावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

६ स्वारोचिष मन्वंतराच्या सप्तर्षींतील एक.

७ वैवस्वत मन्वंतराच्या सप्तर्षींपैकीं एक.

८ अत्रीचा मानसपुत्र ( ब्रह्मांड. ३. ८. ७४–८७ ).

९ एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

१० गोकर्ण नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

११ दाशरथि रामाच्या दरबारांतील एक धर्मशास्त्री.

१२ दाशरथि रामाच्या सभेंतील एक हास्यकार.

१३ हा पांडवांसह द्वैतवनांत होता.

१४ वसुदेवाचा पुरोहित. यानें पांडवांचे जातकर्मादि संस्कार केले ( म. आ. १३३. ४४ कुं. ).

**काश्यपि**—कश्यपाचा वंशजाचें नांव. अरुणासहि हें नांव आहे.

२ भृगुगोत्री ऋषि.

**काश्यपी**—( शिखंडिनी पहा ).

**काश्यपेय**—कश्यपगोत्री एक गोत्रकार गण. सूर्यासहि हें नांव आहे.

२ कृष्णाच्या दारुक सारथ्यास नांव ( म. द्रो. १४७ ).

**काश्या**—भीमाची बायको ( ३ काली पहा ).

**काषायण**—हा सायकायनाचा शिष्य व याचा शिष्य सौकरायण ( बृ. उ. ४. ६. २ ).

**काष्ठा**—प्राचेतस दक्ष प्रजापति व आसिक्नी यांची कन्या. ही कश्यपाची बायको ( कश्यप पहा ).

**काष्ठा हारिण**—कश्यपगोत्री एक गोत्रकार.

**कासार**—व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील बाष्कलीचा शिष्य ( व्यास पहा ).

**कासोरु**—अंगिरागोत्री एक गोत्रकार.

**काहोडी**—अर्गलाचें पैतृक नांव.

**किंकर**—एक राक्षस. हा विश्वामित्रानें आज्ञा केल्यावरून कल्माषपाद राजाच्या शरीरांत शिरला होता.

**किंकिण**—(सो. क्रोष्टु. ) सात्वतपुत्र भजमानाच्या दुसऱ्या स्त्रीस झालेल्या तीन पुत्रांतील दुसरा. यास विष्णुमतें कृकण व मत्स्यमतें कृमिळ अशीं नांवें आहेत.

**किंदम**—मृगरूप घेऊन मृगीबरोबर क्रीडा करणारा एक ऋषि. याला पांडुराजानें मारिलें. तेव्हां यानें पांडुराजाला शाप दिला ( म. आ. १२३ ).

**किन्नर**—( सू. इ. भविष्य. ) विष्णु व वायु यांच्या मतें सुनक्षत्राचा पुत्र. मत्स्यपुराणांत किन्नराश्व असा पाठभेद आहे. याचें मुख्य नांव पुष्कर होतें.

**किन्नराश्व**—( किन्नर पहा ).

**किम्पुरुष**—आग्नीध्राच्या नऊ पुत्रांतील दुसरा. याची स्त्री प्रतिरूपा. हा किंपुरुषवर्षाचाच अधिपति होता ( भा. ५. २; आग्नीध्र पहा ).

२ स्वारोचिष मन्वंतरांतील एक मनुपुत्र.

**किरात**—एक शंकराचा अवतार. यानें मूक नांवाच्या दानवाचा सूकरस्वरूपांत वध केला ( असमाति पहा ).

**किर्मीर**—एक राक्षस. बकासुराचा भ्राता (म. व. ११). हा वैत्रकीय नामक वनांत ( वेताच्या वनांत ) राहत असे. हस्तिनापुराहून पांडव निघून काम्यक वनांत आले असतां आपल्या भ्रात्यास भीमसेनानें मारिलें त्याचा सूड उगविण्यासाठीं हा वनांत आला व यानें पांडवांचा मार्ग चोहोंकडून रोधून धरिला. त्यावरून भीमसेनाशीं याचें घोर युद्ध होऊन, त्यांत हा त्याच्या हातून मरण पावला ( म. व. ११ ).

**किलकिल**—ब्रह्मांडमतें किलकिला नगरींत राज्य करणारा एक राजवंश.

**किशोर**—बलि दैत्याच्या पुत्रांतील एक (मत्स्य. १७२).

**कीकक**—( स्वा. प्रिय. ) भागवतमतें ऋषभ व जयंती यांचा पुत्र.

२ धर्मपुत्र संकटाचा पुत्र. याच्या पासून भूमीवरील दुर्गा-भिमानी देव उत्पन्न झाले ( भा. ६. ६ ).

**कीचक**—केकय व मालवी यांच्या एकशेंसहा पुत्रांपैकीं ज्येष्ठ पुत्र. याच्या धाकट्या भावांस उपकीचक म्हणत. विराटाची स्त्री सुदेष्णा याची सावत्र मावस बहीण. हा बाणाचा अंशावतार होय ( म. वि. २१. २२ कुं. ). विराटानें यास आपला सेनापति नेमिलें. सुदेष्णेच्या येथे एकदां सैरंध्रीवेषांतील द्रौपदी याच्या दृष्टीस पडली. चौकशी केल्यावर हा तिची मनधरणी करूं लागला. पण तिनें यास धिक्कारून आपल्या गंधर्वपतीकडून ठार मारण्याची भीति घातली. बहिणीबरोबर मसलत करून तिला आपल्या घरीं आणिलें व तिजशीं फारच लगट केली, पण ती पळून राजदरबारीं गेली. तेथें भरसभेंत यानें तिची वेणी धरून लाथ मारून खालीं पाडिलें. इतक्यांत पूर्वी कीचकाकडे जात असतांना द्रौपदीनें सूर्याची प्रार्थना करून त्याज-कडून रक्षणार्थ मिळविलेल्या राक्षसानें यास दूर फेकिलें. ही गोष्ट सैरंध्रीनें भीमास कळविल्यावर भीमानें युक्तीनें आपल्या ताब्यांत आणून यास ठार केलें (म. वि. १६-२६ कुं.; भीमसेन पहा).

२ भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा.

**कीर्ति**—( २ कुन्ति पहा ).

२ दक्ष प्रजापतीची कन्या, धर्माची स्त्री (म. आ. ६७ कुं.).

३ प्रियव्रत राजाची ज्येष्ठ पत्नी (गणेश. २. ३२. १३; प्रियव्रत पहा).

४ सुतपदेवांपैकीं एक.

**कीर्तिधर्मन्**—भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय राजा (म. द्रो. १५८).

**कीर्तिमत्**—(सू. इ.) दृगाचा पुत्र. वैशाखमाहात्म्या-मुळें यानें यमलोक ओस पाडला (स्कंद २. ७. १२-१३).

२ उत्तानपाद व सुनृता यांच्या दोन पुत्रांतील कनिष्ठ. ध्रुवाचा भ्राता.

३ हा भागवत, विष्णु, मत्स्य व वायुमतें देवकीच्या ठायीं जन्मलेला वसुदेवपुत्र होय. याला कंसानें मारिलें. कृष्णाचा वडील बंधु. यास ठरावाप्रमाणें न मारितां कंसानें प्रथम सोडिलें होतें; परंतु नारदाच्या उपदेशावरून नंतर मारिलें (भा. ९. २४; १०. ११). हा वायुमतें रोहिणीला झालेला वसुदेवपुत्र होय.

**कीर्तिमती**—शुक्राचार्य व पीवरी यांच्या कृत्वी नामक कन्येचें नामांतर. ही नीप अथवा अणुह राजाची स्त्री असून, हिच्या पुत्राचें नांव ब्रह्मदत्त असें होतें.

**कीर्तिमुख**—शंकराच्या जटेंतून निघालेला एक शिवगण. यास तीन तोंडें, तीन पाय, तीन पुच्छें व सात हात होते. यास शंकरानें प्रेतें खाण्यास सांगितलें. पुढें याचें साहस पाहून शंकरानें वर दिला कीं, तुझें स्मरण केल्याखेरीज जे माझें दर्शन घेतील त्यांचा अधःपात होईल (पद्म. उ. ६०).

**कीर्तिरथ**—(सू. निमि.) हा वायुमतें प्रतित्वकपुत्र. हें कृतिरथाचें दुसरें नांव.

**कीर्तिरात**—(सू. निमि.) कृतिराताचें नामांतर.

**कुकण**—एक सर्प (म. उ. १०३. कुं.).

**कुकर्दम**—पिंडारकक्षेत्राचा राजा. हा फार दुष्ट होता. यानें अनेक पापकृत्यें केल्यानें यास प्रेतयोनि लाभली. तेथें यास बरेच अनुयायी लाभले. एकदां हा फिरत असतां कहोडऋषीच्या आश्रमीं आला. कहोडानें आपल्या या शिष्याच्या उद्धारास्तव गोखुरासंमर्मी श्राद्ध केलें. इतरांचींहि श्राद्धें केलीं. तेव्हां त्यांचा उद्धार झाला (पद्म. उ. १३९).

**कुकुर**—(सो. क्रोष्टु.) हा अंधकाचा पुत्र. याच्यापासून कुकुरवंश उत्पन्न झाला.

**कुक्षि**—रैभ्यऋषीचा पुत्र (म. शां. ३४८).

२ पौष्यंजिऋषीचा शिष्य. यानें सामवेदाच्या शंभर संहितांचें अध्ययन केलें (व्यास पहा).

**कुक्षेयु**—(सो. पूरु.) रौद्राच्या दहा पुत्रांतील एक. कक्षेयु असा पाठभेद आहे.

**कुचैल**—(वाईट वस्त्रें असलेला). कृष्णाचा एक भक्त व सांदीपनीच्या घरीं झालेला त्याचा जुना मित्र. हा जातीनें ब्राह्मण असून मोठा विरक्त, जितेंद्रिय आणि ज्ञानी होता. जेवढें सहज मिळेल तेवढ्यावर राहणारा असल्यामुळें अत्यंत दरिद्री होता. याच्या बायकोनें दारिद्र्यानें गांजल्यामुळें आपल्या नवऱ्याला कृष्णाकडे जावयास सांगितलें. कारण, कृष्ण कुचैलाचा जुना मित्र व मोठा उदार होता. बायकोनें फारच आग्रह केल्यावर 'अयं हि परमो लाभ उत्तमश्लोकदर्शनम्' ह्या विचारानें हा कृष्णाकडे गेला. कांहींतरी न्यावयास पाहिजे, म्हणून बायकोनें मागून आणलेले चार मुठी पोहे यानें एका फडक्यांत बांधून बरोबर घेतले. द्वारकेंत येऊन कृष्णाला भेटल्यावर कृष्णानें आपला जुना मित्र भेटला म्हणून, याचा अत्यंत सत्कार केला. गुरुकुलांतल्या अनेक गोष्टींची आठवण काढली व हातांत हात घालून खूप गप्पा मारिल्या. कृष्णानें आपण होऊनच याला माझ्याकरितां काय आणिलें म्हणून विचारिलें व यानें पुढें केलेल्या पोह्यांतील एक मुष्टि पोहे मोठ्या आनंदानें भक्षण केले. त्या रात्रीं तेथें आनंदांत राहून दुसऱ्या दिवशीं हा तेथून निघाला. कृष्णानें याला कांहीं दिलें नाहीं व यानेंहि कृष्णाजवळ कांहीं मागितलें नाहीं. कारण हा अयाचित वृत्तीनें राहत असे. कृष्णानें आपल्याला धन कां दिलें नाहीं, याबद्दल उलट यानें असा तर्क केला कीं, धन प्राप्त झाल्यास मी कदा-चित् ईश्वरास विसरेन. पण घरीं येऊन पाहतो तों उत्तम प्रकारचें ऐश्वर्य प्राप्त झालेलें यास आढळलें (भा. १०. ८०-८१). भागवतांत याला सुदामन् किंवा श्रीदामन् असें कोठेंहि म्हटलें नाहीं. पण लोकांत तशी प्रसिद्धी आहे. सत्यविनायकाच्या कथेंत मात्र हीच कथा सुदामन् या नांवावर आली आहे.

**कुज**—मंगळ व नरकासुर यास म्हणतात.

**कुजंभ**—एक दैत्य. यानें तारकासुरास राज्याभिषेक केला (मत्स्य. १४६).

**कुंजर**—तारकासुराचा एक सेनापति.

२ एक वानर. अंजनीचा पिता.

३ सौवीरदेशीय एक राजपुत्र.

४ कश्यप व कद्रू यांच्या पुत्रांपैकीं एक.

**कुटीचर**—रुद्रगणविशेष.

**कुटुंबिनी**—कामंद वैश्याची स्त्री (गणेश. १. ७. १२).

**कुठर**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**कुणरवाडव**—एक व्याकरणकार. यानें शंकराबद्दल शंगग व वहीनराबद्दल विहीनर असें सुचविलें आहे (महाभाष्य. ३. २. १४; ७. ३. १).

**कुणारु**—एक असुर (ऋ. ३. ३०. ८).

**कुणि**—एक व्याकरणकार व स्मृतिकार. कैयटानें याचा निर्देश केला आहे ( पा. सू. १.१.७५ ).

२ ( सो. वृष्णि. ) सात्यकीच्या दहा पुत्रांतील भारतीय युद्धांत मेलेला एक.

३ ( सो. यदु. ) जयराजाचा पुत्र. याचा पुत्र युगंधर.

४ ( सू. निमि. ) हा विष्णुमतें सत्यध्वज पुत्र होय.

५ वेदशिरस नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**कुणि गर्ग** किंवा **गार्ग्य**— ( वृद्धकन्या पहा ).

**कुणिक**—एक आचार्य ( आप. ध. १. १९. ७ ).

**कुणिबाहु**—शिवावतार वेदशिरसचा शिष्य.

**कुणीति**—वसिष्ठ व घृताची यांचा पुत्र. याची पत्नी पृथुकन्या.

**कुंड**—गजरूपी असुर, याचा मृत्यु विनायकहस्तें झाला ( गणेश. २.१४ ).

**कुंडक**—( सू. इ. भविष्य. ) विष्णुमतें क्षुद्रकाचा पुत्र.

**कुंडकर्ण**—दंडीमुंडीश्वर नामक शिवावताराचा शिष्य.

**कुंडज**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राच्या शत पुत्रांतील एक.

**कुंडजठर**—जनमेजयाच्या सर्पसत्रांतील एक सदस्य.

**कुंडधार**—एक सर्प ( म. स. ९.१० कुं. ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. याला भीमसेनानें मारिलें ( म. भी. ८८ ).

**कुंडपायिन्**—एक आचार्य ( पं. ब्रा. २५. ४. ४; आश्व. श्रौ. १२. ४.६; कात्या. श्रौ. २४. ४. २१ ). सूत्रग्रंथांत याच्या नांवानें एक सत्र प्रसिद्ध आहे.

**कुंडपाय्य**—शृंगवृषाचें पैतृक नांव.

**कुंडभेदिन्**—धृतराष्ट्रपुत्र. याला भीमानें ठार केलें ( म. द्रो. १२७. ४२; भी. ९६. २७ कुं. ).

**कुंडला**—मदालसेच्या सखीचें नांव. ही विंध्यवानाची मुलगी असून पुष्करमालीची पत्नी होती. शुंभानें हिच्या पतीचा वध केला ( मार्क. १९ ).

**कुंडिन**—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार, मंत्रकार व प्रवर.

**कुंडिनेय**—मित्रावरुणाचा पुत्र.

**कुंडोदर**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**कुत्स**—हा रुरु नांवाच्या राजर्षीचा मुलगा. यानें अशक्त म्हणून मदतीकरितां इंद्राचा धांवा केला. इंद्रानें येऊन कुत्साच्या शत्रूंना ठार केलें. पुढें यांची दाट मैत्री झाली. एकदां इंद्र कुत्साकडे आला असतां तेथें शची आली. शचीला इंद्र कोणता हें ओळखतां येईना (ऋ. ४. १६.१० सायणभाष्य). याला आर्जुनेय म्हटलें आहे. यावरून हा अर्जुनी नांवाच्या बाईचा पुत्र असावा ( ऋ. १. ११२. २३; ४. २६. १; ७. १९. २; ८. ११ ). हा एक योद्धा होता. कुत्साला ताब्यांत घेऊन इंद्रानें वेतसूचें कल्याण केलें ( ऋ. १०. ४९. ४ ). इंद्रानें कुत्साकरितां शुष्णाचा लोखंडी चक्रानें वध केला ( ऋ. १. ६३. ३; १२१. ९; १७५. ४ ). तसेंच इंद्रानें सूर्याच्या रथाचें चाक याच्यासाठीं चोरिलें किंवा मोडिलें अशीहि एक अस्पष्ट गोष्ट येते (ऋ. १. १७४. ५; ४. १६. १२; ३०. ४). अतिथिग्व व आयु यांच्या बरोबर इंद्रस्तुतींत याचा उल्लेख आहे. हा इंद्राचा नेहमींच शत्रु नव्हता (ऋ. १.५१. ६; ६. २६. ३). सूर्याच्या रथाचें एक चाक इंद्रानें बाजूला केलें व दुसरें चाक कुत्साला दिलें ( ऋ. ५. २९. १० ). इंद्र कुत्साच्या घरीं गेला होता ( ऋ. ५. २९. ९-१० ). कुत्स व लुश हे दोघेहि इंद्राला एकदम बोलावीत होते. इंद्र पूर्वीच्या स्नेहसंबंधामुळें कुत्साकडे आला, पण कुत्साला शंका आल्यावरून इंद्राला यानें शंभर वाद्यांनीं अंडाचे ठिकाणीं बांधलें. पण लुशानें बोलावितांच इंद्र वाद्या तोडून निघाला. तेव्हां कुत्सानें एक साम म्हणून पुनः इंद्राला परत आणिलें ( ऋ. १०. ३८. ५; पं. ब्रा. ९.२. २२; जै. ब्रा. २२८ ). ही कथा निश्चित समजत नाहीं. इंद्राचें व याचें वैर असावें ( कुत्स औरव पहा ). इंद्राला पराक्रम गाजविण्यास कुत्स व रथाचें चाक यांची जरूर असे ( ऋ. १.१७४. ५ ).

२ ( स्वा. उत्तान. ) चक्षुर्मनु व नड्वला यांच्या अकरा पुत्रांतील दुसरा ( भा. ४. १३ ).

३ भृगु कुलांतील गोत्रकार.

४ दाशरथि रामाच्या सभेंतील एक ऋषि ( वा. रा. उ. २ प्रक्षिप्त ).

५ अंगिराकुलांतील गोत्रकार व मंत्रद्रष्टा ( ऋ. १. ९४-९८; १०१–११५; ९. ९७. ४५–५८ ).

**कुत्स औरव**—उपगु सौश्रवस हा कुत्स औरवाचा पुरोहित होता. कुत्सानें जाहीर केलें होतें कीं, जो कोणी इंद्राला हवि देईल त्याचें मी डोकें उडवीन. इंद्रानें उपगूनें कुत्साला सांगितलें कीं, मला सुश्रव्यानें हवि दिला. त्याबरोबर रागानें कुत्सानें सामगान करीत बसलेल्या उपगु सौश्रवसाचें डोकें उडविलें. सुश्रव्यानें इंद्राकडे तक्रार केली तेव्हां इंद्रानें तें पुनः जोडून दिलें ( पं. ब्रा. १४.६.८; कुत्स पहा ).

**कुत्सन्य**—भृगुकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि.

**कुथुमि**—विष्णु व वायु यांच्या मतें व्यासाच्या सामशिष्य परंपरेंतील पौष्यंजीचा शिष्य. ब्रह्मांडांत कुशुमी असा पाठ आहे ( व्यास पहा ).

**कुनाल**— ( मौर्य. भविष्य. ) वायुमतें अशोकाचा पुत्र.

**कुनेत्रक**—वेदशिरस् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**कुंतल**—कौंतल पुरातील एक राजा (१ चंद्रहास पहा).

**कुंतलस्वातिकर्ण**—(आंध्र. भविष्य) मत्स्यमतें मृगेंद्र-स्वातिकर्णाचा पुत्र.

**कुंति**—यांनीं पांचालांचा पराभव केला (कं. सं. २६. ९; मै. सं. ४. २. ६).

२ (सो. सह.) हा भागवतमतें नेत्रपुत्र. विष्णु व मत्स्यमतें धर्मनेत्रपुत्र. पण वायूंत हें नांव कीर्ति असें आहे.

३ (सो. यदु.) हा भागवत, विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें क्रथपुत्र होय.

**कुंतिभोज**—कुंतिभोज किंवा भोज ह्या नांवांनीं याचा उल्लेख येतो. वसुदेवपिता शूर याची कन्या पृथा ऊर्फ कुंती याला दत्तक दिली होती. कारण, हा त्याच्या आतेचा मुलगा असून अनपत्य होता व पूर्वी त्यानें पहिलें अपत्य देण्याविषयीं वचन दिलें होतें (म. आ. ६७). एकदां दुर्वासस् कुंतिभोजाच्या घरीं आला असतां कुंतिभोजानें पृथेला त्याची सर्व व्यवस्था करण्यास सांगितलें. तेव्हां तिला दुर्वासाकडून देवता प्रसन्न करणारे मंत्र मिळाले. त्यामुळेंच पुढें पांडवांची उत्पत्ति झाली (म. व. ३०४-३०६ कुं.). याला पुरुजित् नांवाचा एक अतिरथि पुत्र होता. तो द्रोणानें मारिला (म. उ. १७२. २; भी २५. ५; क. ३. २२ कुं.). याशिवाय आणखी याला दहा पुत्र होते. ते सर्व अश्वत्थाम्यानें ठार केले (म. द्रो. १५७.१८३ कुं.). हा स्यमंतपंचकक्षेत्रीं गेला होता (भा. १०. ८२. २४). याला द्रोणानें ठार केलें (म. क. ३. २२ कुं.). क्रथपुत्र कुंति व हा एक नव्हे. कारण तो यापेक्षां फार प्राचीन आहे.

**कुंती**—ही यदुकुलोत्पन्न शूर राजाची कन्या व वसुदेवाची वहीण होय. शूरानें आपला आतेभाऊ जो कुंतिभोज त्याला आपलें प्रथम अपत्य म्हणून कुंती देऊन टाकिली. हिचें नांव पृथा असें होतें. कुंतिभोज राजानें हिला दत्तक घेतलें होतें असें महाभारतांत दिलें आहे (म. आ. ६८. १२९ कुं.). हिचा जन्म चंबळा नदीस मिळणाऱ्या अश्वरथ अथवा अश्वनदीच्या कांठचे कुंतिभोजक नामक नगरांत झाला. ह्या शहराला नुसतें कुंतिदेश असें म्हटलें आहे (म. भी. ९; वि. १; बृहत्संहिता. १०. १५). कुंतिभोज राजानें कुंतीची योजना अतिथिसत्काराकडे केली. हें काम हिनें योग्य तऱ्हेनें केलें. दुर्वासाची कडक सेवा करून त्यास प्रसन्न करून घेतलें. तेव्हां कालांतरानें अडचणीचा प्रसंग येणार, हें जाणून दुर्वासानें हिला वशीकरणाचा एक मंत्र दिला; आणि ह्या मंत्रानें ज्या ज्या देवाला तूं बोलाविशील त्या त्या देवाच्या प्रभावानें तुला पुत्र होईल, असें सांगितलें. पुढें मंत्राची प्रतीति पाहण्याची कुंतीला जिज्ञासा उत्पन्न झाली आणि त्या मंत्राचा जप करून हिनें सूर्यास बोलाविलें, तों प्रत्यक्ष सूर्य येतांना पाहून हिला विस्मय वाटला. सूर्यापासून कुंतीस कवचकुंडलयुक्त कर्ण नांवाचा पुत्र झाला. कुंतीनें लोकभयानें कर्णाला अश्वनदींत सोडून दिलें. त्याचें पालन राधेचा नवरा अधिरथ यानें केलें (म. आ. १११).

कुंती उपवर झाल्यावर तिला अनेक राजांकडून मागण्या येऊं लागल्या. तेव्हां कुंतिभोजानें सर्व राजांना बोलावून आणून हिचें स्वयंवर केलें. तेव्हां कुंतीनें पांडूस वरिलें. नंतर पांडु कुंतीस घेऊन हस्तिनापुरीं गेला (म. आ. ११२). मृगयेसाठीं गेलेल्या पांडूनें किंदमुनि मृगरूप धारण करून मैथुन करीत असतां त्यास मारिलें. तेव्हां त्या ऋषीनें, त्यास तुला असाच मैथुनप्रसंगीं मृत्यु येईल, असा शाप दिला, म्हणून पुत्रोत्पादनाचा मार्ग बंद झाला. पुढें स्वर्गप्राप्तीसाठीं अपत्याची जरुरी असल्यामुळें त्यानें कुंतीस श्रेष्ठ जातीच्या पुरुषापासून पुत्रोत्पादन करण्याची आज्ञा केली. तिचा हिनें निषेध केला; आणि या बाबतींत भद्रेचें अनुकरण करण्याचा हिनें निश्चय केला. परंतु पांडूनें श्वेतकेतूचा नियम हिला सांगून पुनः तीच आज्ञा केली. यावर हिनें दुर्वासानें दिलेल्या मंत्रप्रभावानें यमधर्म, वायु व इंद्र यांना बोलावून युधिष्ठिर, भीम व अर्जुन यांना जन्म दिला. पुनश्च पांडूनें पुत्रोत्पादन करण्यास सांगितलें असतां हिनें नाकारिलें. पुढें पांडूच्या विनंतीवरून कुंतीनें माद्रीस तो मंत्र दिला. तेव्हां माद्रीस नकुलसहदेव हीं आवळींजावळीं मुलें झालीं. हींच पांच मुलें पांडव होत (म. आ. ११२. ११८-१२४).

पांडवांनीं बाल्यावस्थेंतसुद्धां बालक्रीडेसारख्या गोष्टींत कौरवांवर सरशी केली. पांच पांडव शंभर कौरवांना दे माय धरणी ठाय करून सोडीत. त्यांतल्यात्यांत भीम तर कौरवांना नकोसें करून सोडी. यामुळें कौरवपांडवांचा विरोध उत्पन्न झाला (म. आ. १२८).

म्हणून दुर्योधनानें धृतराष्ट्राकडून पांडव व कुंती यांना वारणावतास यात्रेकरितां पाठविलें. तेथें पुरोचनाकडून जतुगृह निर्माण करून पांडवनाशाची सिद्धता केली. परंतु विदुराच्या सूचनेप्रमाणें पांडवांनीं विवर खणून अग्नीपासून बचाव केला. त्यांत एक भिल्लीण आपल्या पांच पुत्रांसह मात्र जळून मेली. याबरोबरच जतुगृहाची रचना करणारा पुरोचनहि जळून मेला. कौरवांनीं भिल्लीण व तिचीं पांच मुलें यांचीं प्रेतें पाहून पांडवांचा नाश झाला असें मानिलें; व त्यांचें उत्तरकार्यहि केलें. पण पांडव सुखरूप वनामध्यें फिरत होते (म. आ. १४२-१५०). कुंतीचा स्वभाव परोपकारी असे. व्यासाच्या अनुमतीनें पांडव कुंतीसह एकचक्रा नगरींत येऊन राहिले. तेथें ते भिक्षा मागून चरितार्थ चालवीत असतां एक दिवस कुंती व भीम यांनीं ते

ज्याच्या घरांत राहत होते त्या ब्राह्मणावर आलेली आपत्ति ऐकिली. तेथें बकासुरास तीस मणांचा भात, दोन रेडे व एक मनुष्य असें देण्याची पाळी त्याजवर आलेली होती. तेव्हां कुंतीनें धर्माच्या विरोधास न जुमानितां भीमास पाठवून बकासुराचा वध करविला व त्या ब्राह्मणकुटुंबास संकटांतून मुक्त केलें. याकरितां सर्व लोकांनीं एक ब्रह्मोत्सवहि केला ( म. आ. १५७–१६४ ).

द्रोणाचार्यांच्या नेतृत्वाखालीं कौरवपांडवांनीं शस्त्रास्त्रविद्या संपादन केली. एक दिवस त्यांची परीक्षा पहावी, असें ठरून त्याकरितां एक विस्तीर्ण मंडपहि दिला. त्यांत सर्व कौरव-पांडव आपापलें कौशल्य दाखवीत असतां कर्ण तेथें आला, व आपण अर्जुनापेक्षांहि अप्रतिम कौशल्य दाखवूं असें म्हणाला व त्यानें अर्जुनाशीं युद्ध सुरू केलें. तें पाहून कुंतीला खरा प्रकार माहीत असल्यामुळें मूर्च्छा आली. याच वेळीं प्रथम हिला कर्णाची ओळख पटली असावी (म. आ. १३३-१३६ ). कर्ण दुर्योधनाला मिळालेला पाहून कुंती कर्णाकडे गेली. हिनें त्याचें जन्मवृत्त त्यास सांगून पांडवांची बाजू घेण्यास सांगितलें. परंतु कर्णानें तें मान्य केलें नाहीं. त्यानें कुंतीला पांच पुत्र कायम राहून मी किंवा अर्जुन यांपैकीं एक वांचेल, असें सांगितलें. याप्रमाणेंच कुंतीनें विदुरास कर्ण आपला मुलगा असल्याचें निवेदन केलें ( म. उ. १४४–१४६ ).

भारतीय युद्धसमाप्तीनंतर सर्व स्त्रिया गंगेच्या कांठीं आपल्या प्रिय माणसांकरितां शोक करीत होत्या. त्या वेळीं कुंतीनें कर्ण हा तुमचा भाऊ होता, असें पांडवांस सांगितलें. तेव्हां धर्मास अत्यंत वाईट वाटलें व तो यापुढें “ स्त्रियांच्या मनांत कांहीं एक गुप्त राहणार नाहीं ” असें म्हणाला ( म. स्त्री. २७ ). कुंती धृतराष्ट्राबरोबर वनांत गेली. युधिष्ठिरानें पुष्कळ विनवणी केली; पण ती परत फिरली नाहीं ( म. आश्र. १६–१७ ). अरण्यांत वणवा लागला असतां, धृतराष्ट्र, कुंती व गांधारी यांनीं अग्निप्रवेश केला ( म. आश्र. ३७ ).

**कुंतीभोज**—( सो. यदु. ) भविष्यमतें क्राथाचा पुत्र. हा वृषपर्व्याच्या मुलीचा मुलगा पूरु व पूरूच्या मुलीचा मुलगा कुंतिभोज. हा कुंतीभोज नगरांत राहत असे. हा इतर पुराणांतील कुन्ति होय ( ३ कुंति पहा ).

**कुंददंत**—एक ब्राह्मण. याचे दांत कुंदकळ्यांप्रमाणें होते म्हणून यास हें नांव पडलें. हा विदेहदेशांत राहत असे. याला आत्मज्ञानप्राप्तीची इच्छा झाली, तेव्हां हा आपलें घरदार सोडून अरण्यांत हिंडूं लागला. यानें कदंबास आपली आत्मज्ञानप्राप्तीची इच्छा दर्शविली. परंतु त्यानें अजून आपलीं इंद्रियें पूर्णपणें जिंकलीं नाहींत, असें जाणून कुंददंतास अयोध्येंत जाण्यास सांगितलें. कुंददंत त्याप्रमाणें अयोध्येंत जाऊन सर्व उपाधिरहित होऊन रामाजवळ राहिला, व यानें वसिष्ठाच्या तोंडून मोक्षोपाय नामक संहिता श्रवण करून ज्ञान प्राप्त करून घेतलें ( यो. वा. ६. १८०–१८६ ).

**कुपट**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**कुपालि**—अष्टभैरवांतील एक. यासच कपालिन् असें नांव आहे.

**कुबेर**—हा वैवस्वत मन्वंतरांतील विश्रवाऋषीचा पुत्र. इडविडा व मंदाकिनी अशीं याच्या आईचीं निरनिराळीं नांवें आहेत (विश्रवस् पहा). हा पुलस्त्य व गो यांचा पुत्र ( म. व. २७५ कुं. ). म्हणून यास वैश्रवण व ऐडविड असें म्हटलें आहे ( म. उ. १३६; श. ४८ ). ब्रह्मदेवानें राक्षसगणांसह यास लंका, पुष्पक विमान, यक्षांचें आधिपत्य, राजराजत्व, धनेशत्व, अमरत्व, लोकपालत्व, रुद्राची मैत्री व नलकूबर हा पुत्र इ. दिलें; पैकीं रावणानें लंका व पुष्पक हीं घेतलीं ( म. व. २७५-२७६ कुं. ). लंका मागितल्यावरून दिली व पुष्पक याचा युद्धांत पराभव करून घेतलें (वा. रा. अर. १५. २२). यानें धनपतित्वासाठीं तप केलें व हा कुबेर झाला. ज्या ठिकाणीं तप केलें त्या ठिकाणीं कौबेरतीर्थ झालें ( म. श. ४७ ). व याच तपामुळें वरील गोष्टी यास प्राप्त झाल्या. ( शिव. रुद्र. १. १९ ). या ठिकाणीं याची मूळ नगरी अलकावती आहे असें म्हटलें आहे. पार्वतीकडे डोळे किलकिले करून पाहत असतां याचा डावा डोळा गेला व उजवा पिंगट झाला म्हणून यास एकाक्षपिंगलिन् असें नांव पडलें ( वा. रा. उ. १३ ). याला मणिग्रीव व नलकूबर नांवाचे दोन मुलगे होते ( भा. ४. १. ३७; १०. ९. २३ ). हा उत्तराधिपति असून उत्तरेस असलेल्या यक्ष लोकांत राहतो. वृद्धि व ऋद्धि याच्या शक्ति असून मणिभद्र ( वा. रा. उ. १५ ), पूर्णभद्र, मणिमत्, मणिकंधर, मणिभूष, मणिस्रग्विन्, मणिकार्मुकधारक हे यक्ष याचे सेनापति होत ( दे. भा. १२.१० ). याची कुबेरसभा या नांवाची एक सभा आहे. या सभेंत हा आपल्या ऋद्धि व आणखी शंभर बायका यांसह बसतो. याला नरकूबर हा एक मुलगा होता (म. स. १०). कुबेराच्या एका पत्नीचें नांव भद्रा असें दिलें आहे (म. आ. २१६.६.कुं). यानें यक्षांचे अधिपतित्वासाठीं कावेरीनर्मदासंगमीं तप केलें; तेव्हां शंकराच्या कृपेनें याची इच्छा पूर्ण झाली ( पद्म. स्व. १६ ). गंधमादन पर्वतावरील संपत्तीचा चतुर्थांश भाग याचे ताब्यांत आहे. संपत्तीचा षोडशांश माणसास दिला आहे. हा आपल्या राक्षसांसह गंधमादन पर्वताच्या शिखरावर राहतो ( पद्म. स्व. ३. ). मेरु पर्वताचे उत्तरेस विभावरी हें याचें एक वसतिस्थान आहे ( भा. ५. २१. ७ ). हा कैलास पर्वतावर राक्षस व अप्सरांसह राहतो.

याचें वन सौगंधिक होय ( भा. ४. ६. २३ ). हा अलकाधिप आहे. कैलासाच्या दक्षिणभागीं वैद्युत नांवाचा पर्वत आहे, त्याच्या पायथ्याशीं मानससरोवर आहे. तेथें सरयूचा उगम होतो. तिच्या कांठीं वैभ्राजनामक एक दिव्य वन आहे. तेथें प्रहेतृपुत्र ब्रह्मधान नामक एक राक्षस राहतो. हा कुबेराचा नोकर होय ( वायु. १. ४७ ). येथें याच्या वंशाचें वर्णन आहे. हा त्या यक्ष, राक्षस, पौलस्त्य व आगस्त्य यांचा राजा असून अलकाधिप आहे ( वायु. २.८. १९० ). हा सूर्याच्या उत्तरेस असतो ( भवि. ब्राह्म. १२४ ). अर्जुनास शिवदर्शन झाल्यानंतर वरुणाप्रमाणें यानेंहि अर्जुनास दर्शन देऊन एक अस्त्र दिलें ( म. व. ४१. ७ कुं. ). द्रौपदीच्या विनंतीवरून भीमानें कुबेराच्या उपवनांतील सरोवरांत असलेलीं कमळें तेथील राक्षसांस न जुमानितां नेलीं. कुबेरानें त्यास अडथळा केला नाहीं ( म. व. १५४ ). परंतु भीमानें मणिमानाचा वध केला, हें ऐकून हा रागावला व ससैन्य पांडवांकडे गेला. तेथें एकमेकांस पाहून ते आनंदित झाले. कुबेरानें तेथें पांडवांस योग्य तो उपदेश करून इंद्र अर्जुनाची मार्गप्रतीक्षा करीत असल्याचें सांगितलें ( म. व. १६२ कुं. ). हा पूर्वजन्मीं कांपिल्य नगरांतील अग्निहोत्री यज्ञदत्ताचा गुणनिधि नांवाचा पुत्र होता ( शिव. रुद्र. स. १९ ). कुबेराचा ब्राह्मण-क्षत्रिय ऐक्यानें राज्यसुखाची वृद्धि होते, या विषयावर मुचकुंदाशीं संवाद झाला ( म. शां. ७४ कुं. ). ध्रुवाचें यक्षांशीं युद्ध झाल्यावर यानें त्यास उपदेश केला ( भा. ४. १२. २ ). याला सोम असेंहि एक नांव आहे. म्हणूनच उत्तरदिशेस सौम्या असें नांव पडलें.

**कुबेर वारक्य**—जयंत वारक्याचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४१. १ ).

**कुबेराणि**—अंगिरसकुलांतील गोत्रकार.

**कुब्जा**—हिला दुर्दैवानें बालपणीं वैधव्य प्राप्त झालें. पुढें हिनें आपलें साठ वर्षेपर्यंत आयुष्य पुण्यकर्मांत घालविलें. दरवर्षी माघस्नानहि केलें. पुढें ही वैकुंठलोकीं गेली. नंतर सुंदोपसुंदांचा नाश करण्याकरितां ही तिलोत्तमा नांवानें अवतरली. सुंदोपसुंद हिच्या हावभावांस भुलून एकमेकांशीं भांडून मेले. तेव्हां ब्रह्मदेवानें हिचें अभिनंदन करून हिला सूर्यलोकांत स्थान दिलें ( पद्म. उ. १२६ ).

२ कंसाची दासी. ही तीन ठिकाणीं शरीरानें वक्र होती. कृष्ण आणि बलराम यांस ज्या वेळीं मथुरेस धनुर्यागार्थ कंसानें आणविलें, त्या वेळेस कृष्णप्रसादानें ही सरळ झाली ( भा. १०. ४२; ब्रह्म. १९६ ).

३ कैकेयीची दासी मंथरा. हिला हें नांव होतें (मंथरा पहा).

**कुमार**—हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र असून प्रजापति होता ( वायु. २.४.५३ ). वायुपुराणांत ब्रह्मदेवाच्या सनक, सनंद, सनातन व सनत्कुमार यांकरितां हा शब्द योजिला आहे. हे ब्रह्ममानसपुत्र नेहमीं पांच सहा वर्षांच्या बालकांप्रमाणें दिसतात, म्हणून त्यांस कुमार म्हटलें आहे. हा आपल्या भावांसह वैकुंठास गेला असतां द्वारपालांनीं प्रतिबंध केला म्हणून यानें त्यांना शाप दिला ( भा. ७.१.३५ ). यानें सांख्यायनाला भागवत सांगितलें ( भा. ३.८.७ ).

२ ( स्कंद पहा ).

३ अनलनामक वसूला स्वाहेपासून झालेला पुत्र.

४ सोम नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

५ शिल्पशास्त्रावरील अठरा वास्तुशास्त्रकारांतील हा एक ( मत्स्य. २५२. २ ).

६ हैहयकुलोत्पन्न एक राजा. एकदां यानें मृग समजून एका ऋषिपुत्रास मारिलें, तेव्हां यास फार पश्चात्ताप झाला. तो ऋषिपुत्र कोण असावा, याबद्दल यानें शोध केला. शोध करितां करितां हा अरिष्टनेमि तार्क्ष्याच्या आश्रमांत गेला व ऋषीस वंदन करून बसला. इतक्यांत मारिलेला ऋषिपुत्र तेथें आला. त्यास पाहून याला आश्चर्य वाटलें व त्या ऋषीस कांहीं विचारणार, तोंच ऋषि म्हणाला, राजा आश्चर्य मानूं नकोस, कारण आम्ही तपोबलानें इच्छामरणी झालों आहोंत याकरितां ब्रह्महत्या झाली म्हणून साशंकित होऊं नकोस. तें ऐकून हा आपल्या नगरास गेला ( म. व. १८४ ).

**कुमार आग्नेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ७. १०१; १०२; वत्स पहा ).

**कुमार आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. २. १; ३–८; १०–१२ ).

**कुमार यामायन**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १३५ ).

**कुमार हारित**—हा गालवाचा शिष्य. याचा शिष्य कैशोर्य काप्य ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ). रैतानें महत्त्व वर्णन करितांना सांगितलेल्या आचार्यपरंपरेंत याचें नांव आहे ( बृ. उ. ६. ४. ४ ).

**कुमारी**—( चित्रलेखा पहा )

२ धनंजयाची स्त्री.

**कुमुद**—विष्णूच्या पार्षदगणांतील एक ( भा. ८.२१ ).

२ गोमती नदीतीरीं रम्यक पर्वतावर राहणारा रामसेनेतील एक वानर ( वा. रा. यु. २६ ). अकंपनाशीं युद्ध चालें असतां यानें मोठा पराक्रम केला ( वा. रा. यु. ५५ ).

३ कश्यपकद्रूंचा मुलगा.

४ व्यासाच्या अथर्वन् शिष्यपरंपरेंतील विष्णु, वायु, ब्रह्मांड व भागवत यांच्या मतें पथ्याचा शिष्य.

**कुमुदाक्ष**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र (म. आ. ३५).

२ मणिवर व देवजनी यांचा पुत्र. यांच्या पुत्रांना गुह्यक असें साधारण नांव आहे.

**कुमुदेक्षण**—विष्णूचा पार्षद.

**कुमुद्वती**—दाशरथि रामाची स्नुषा व कुशाची दुसरी स्त्री. हिचाच पुत्र अतिथि राजा. हिची सवत चंपका. हिला पुत्र नसल्यानें अतिथीच सूर्यवंशाचा विस्तार करणारा झाला. एकदां जलक्रीडा करीत असतां कुशाचें कडें शरयूंत पडलें, तें कुमुदनागाची कुमुद्वती नामक भगिनी घेऊन नागलोकीं गेली. कुश संतापून शरयु शुष्क करण्यास धनुष्य जोडून सज्ज झाला असतां, कड्यासह कुमुद्वती कुमुदानें अर्पण केली (आ. रा. विवाह. ४).

२ मयूरध्वज राजाची स्त्री व ताम्रध्वज राजाची माता.

**कुंपथ**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**कुंभ**—प्रल्हाद दैत्याच्या पुत्रांतील एक (म. आ. ६६).

२ कुंभकर्णाचा ज्येष्ठ पुत्र (कुंभनिकुंभ पहा).

३ लंकेंतील एक सामान्य राक्षस (भा. ९. १०–१८).

४ हिरण्याक्षाच्या सेनेंतील एक असुर. हा कुबेराशीं युद्ध करीत असतां, कुबेरानें याचे सर्व दांत पाडले; तेव्हां हा कुबेराच्या साहाय्यास येणाऱ्या इंद्रावर धांवला. पण इंद्रानें वज्रप्रहारानें याचा प्राण घेतला (पद्म. सृ. ७५).

**कुंभकर्ण**—वैवस्वत मन्वंतरांत पुलस्त्यपुत्र विश्रवाऋषीस कैकसी भार्येपासून झालेल्या चार मुलांतील दुसरा. भागवतमतें याच्या आईचें नांव केशिनी. हा रावणाचा धाकटा भाऊ. यानें जन्मल्याबरोबर हजारों लोक भक्षण केले. तेव्हां लोक तक्रार करीत इंद्राकडे गेले. इंद्रानें रागानें कुंभकर्णावर वज्र फेकलें. कुंभकर्ण हातपाय आपटांत जास्तच गर्जना करूं लागला. त्यामुळें लोकांचा त्रास अधिकच वाढला. यानें ऐरावताचा एक दांत उपटून इंद्रावर फेकला व इंद्राला रक्तबंबाळ केलें. हें ब्रह्मदेवाला समजल्यावर त्यानें याला सदोदित निद्रित राहशील, असा लोकांच्या संरक्षणार्थ शाप दिला. परंतु रावणाच्या विनंतीवरून सहा महिन्यांनीं एक दिवस जागा राहण्याविषयीं यास ब्रह्मदेवानें उःशाप दिला (वा. रा. यु. ६१). कुबेराशीं बरोबरी करण्याच्या इच्छेनें रावणादिकांबरोबर यानेंहि दहा हजार वर्षे गोकर्णक्षेत्रीं तप केलें. तेव्हां ब्रह्मदेव याला वर देऊं लागला असतां, देवांनीं त्याला विरोध केला. देव म्हणाले, यानें नंदनवनामध्यें सात अप्सरा, इंद्राचे दहा सेवक, तसेंच अनेक लोक व ऋषि यांचें भक्षण केलें आहे; तेव्हां याला वर देऊं नयेत. ब्रह्मदेवानें देवांचें म्हणणें सिद्धीस जावें, म्हणून सरस्वतीस बोलावून तिला कुंभकर्णाकडून योग्य तें बोलावयास लाविलें. तेव्हां यानें दीर्घकाल निद्रा मागितली. ब्रह्मदेव 'तथास्तु' म्हणून निघून गेला. मागाहून हा पश्चात्ताप करूं लागला. पण उपयोग काय? (वा. रा. उ. १०). पुढें कुबेराची लंका रावणानें बळकावल्यावर रावणाबरोबर हाहि लंकेंत गेला. तेथें गेल्यावर विरोचनपुत्राची (बलीची) नात वज्रज्वाला, तिच्याशीं ह्याचें लग्न झालें (वा. रा. उ. १२). रावणानें आपल्या झोपाळू भावाची निजण्याची उत्तम व्यवस्था केली. त्यानें विश्वकर्म्याकडून चार कोस रुंद व आठ कोस लांब असें एक सुंदर घर तयार करविलें. तेथें हा सारखा झोंप घेत पडत असे (वा. रा. उ. १३). हा जागा असे तेव्हां सभेलाहि येत असे. युद्ध होण्यापूर्वी युद्धाकरितां भरलेल्या एका सभेंत हा हजर होता. तेथें यानें रावणाला सीताहरणाबद्दल दोष देऊन पुढें मी तुला सर्व प्रकारें साहाय्य करीन असें सांगितलें (वा. रा. यु. १२). पुढें अनेक योद्धे मेल्यावर रावण रामाशीं युद्ध करीत असतां रावणाचा पराभव झाला व रावण रणांगणांतून परत आल्यावर त्याला आपल्या बंधूची आठवण झाली. त्यानें यूपाक्षाला कुंभकर्णास जागें करण्यास पाठविलें. युद्धासंबंधीं प्राथमिक वाटाघाट करण्याच्या सभेंत कुंभकर्ण हजर होता. तेव्हांपासून जो कुंभकर्ण निजला होता, तो नऊ महिने झाले, तरी अद्यापि हा जागा झाला नव्हता. याला जागृत करण्याकरतां आलेल्या लोकांनीं कुंभकर्ण जागा झाल्याबरोबर खाण्याकरतां मृग, महिष व वराह यांचे ढीग याच्या दाराशीं घातले. अन्नाची रास तयार केली. रक्त, मांस तयार केलें. चंदन अंगाला लावलें. सुगंधि द्रव्यें हुंगविलीं. भयंकर आवाज केले, इतक्यांनींहि भागेना, तेव्हां याच्या वक्षस्थलावर प्रहार करण्यास सुरुवात केली. याच्या कानांत पाणी ओतणें, चावणें वगैरे प्रयत्न झाले. एक हजार हत्ती जेव्हां याच्या अंगावर फिरविले, तेव्हां कोठें जरा जागा झाला. व जांभया देत पुढें होते ते सर्व यानें भक्षण केल्यावर हळूंच लोकांनीं याच्या कानावर सर्व वृत्त घातलें. तेव्हां हा एकदमच युद्धाला निघाला. पण महोदरानें बंधूचा सल्ला घेऊन युद्धाला जावें, असें सुचविल्यावरून हा बंधूकडे गेला. तेथें यानें प्रथम रावणालाच चार उपदेशाच्या गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला, पण रावणाला त्या रुचेनात. तेव्हां यानें रावणास रुचेल, असें बोलण्यास सुरुवात केली. पुढें महोदरानें रामवधाची आवई उठविल्यास सीता आपणहून आपल्या ताब्यांत येईल असें सुचविलें. तेव्हां कुंभकर्णानें त्या मार्गाचा तिरस्कार करून युद्धाचा पुरस्कार केला. व हा रणांगणीं दाखल झाला. तेव्हां याचें अवाढव्य शरीर पाहूनच वानरसेनेंत पळापळ सुरू झाली. पण अंगदानें सर्वांना धीर देऊन एकत्र केलें. प्रथम यानें शूलानें हनुमानाला जखमी केलें. तेव्हां पुनः आपल्या सैन्याला नीलानें धीर देऊन सावरलें. ऋषभ, शरभ, नील, गवाक्ष यांना कुंभकर्णानें रक्त ओकावयास लावलें. कुंभकर्णाचें

शरीर वानरांनीं भरलेल्या झाडाप्रमाणें दिसूं लागलें. कुंभकर्णानें फेकलेला शूल मोठ्या खुबीनें चुकवून अंगदानें याच्या छातीवर तडाखा देऊन याला मूर्च्छित केलें. उलट शुद्धींत आल्याबरोबर कुंभकर्णानें अंगदाला बेशुद्ध केलें.

सुग्रीवाला घेऊन हा लंकेकडे गेला असतां, सुग्रीवानें याचे नाककान तोडून तो रामाकडे परत आला. तशा विद्रुप स्थितींत हाहि पुनः परतून यानें खूपच रणधुमाळी माजविली. शेवटीं लक्ष्मण व नंतर राम यांशीं युद्ध करतांना रामानें याचे पाय अर्धचंद्र बाणानें तोडिले. तेव्हां हें अवजड धूड भूमीवर कोसळलें. तरी केवळ तोंड वासून रामावर सरकत येण्याचा प्रयत्न करीत असतां याला ऐन्द्रबाणानें रामानें ठार करून याचें मस्तक तोडलें ( वा. रा. यु. ६०-६७ ). याचें शरीर पडल्यानें लंकेंतील अनेक गोपुरें भग्न झालीं ( म. व. २८६-२८७ ). याला कुंभनिकुंभ असे दोन बलाढ्य पुत्र होते.

**कुंभनाभ**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**कुंभनिकुंभ**—कुंभकर्णास वृत्रज्वालेपासून झालेले दोन पुत्र. हे अतिपराक्रमी व बलवान् होते. रावणानें यांस रामसैन्यावर एकदां युद्धास पाठविलें असतां, यांनीं भयंकर युद्ध केलें. शेवटीं त्यांत सुग्रीवानें कुंभास व मारुतीनें निकुंभास ठार मारिलें ( वा. रा. यु. ७५-७७ ).

**कुंभमान**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**कुंभयोनि**—अगस्त्य ऋषीचें नामांतर.

२ द्रोणाचार्यांसहि हें नांव आढळतें ( म. द्रो. १८४ ).

**कुंभरेतस्**—भारद्वाज अग्नि व वीरा यांचा पुत्र. याला शरयू नामक स्त्री व सिद्धि नांवाचा पुत्र होता. यासच वीर, रथप्रभु, रथाश्वान इत्यादि नांवें आहेत. हा एक प्रकारचा अग्नि आहे ( म. व. २२१ ).

**कुंभहनु**—प्रहस्ताचा सचिव. यास तार नामक वानरानें मारिलें ( वा. रा. यु. ५८ ).

**कुंभांड**—बाणासुराचा मंत्री. बलीच्या मंत्र्यांतील श्रेष्ठ ( नारद. १० ). चित्ररेखेचा पिता ( भा. १०. ६२ ). याचें बलरामाबरोबर युद्ध होऊन त्याचे हातून हा मरण पावला ( भा. १०. ६३ ).

२ दंडीमुंडीश्वर नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**कुंभीनसी**—बलि दैत्याची कन्या. बाणासुराची भगिनी ( मत्स्य. १८६ ).

२ सुमाली राक्षसाला केतुमतीपासून झालेल्या चार कन्यांतील कनिष्ठ. रावणमाता कैकसीची ही भगिनी.

३ माल्यवान् राक्षसाची कन्या अनला, तिला विश्वावसु राक्षसापासून झालेली कन्या. हिला मधु राक्षसानें चोरून नेऊन हिच्याशीं विवाह केला होता व त्यापासून हिला जो पुत्र झाला तो लवणासुर नांवानें प्रख्यात आहे.

४ पुष्पोत्कटेस विश्रवाऋषीपासून झालेली कन्या ( लिंग. ६३ ).

५ अंगारपर्ण गंधर्वाची स्त्री.

६ चित्ररथनामक गंधर्वाची स्त्री ( म. आ. १८६ कुं. ).

**कुंभोदर**—रामास तीर्थयात्रा करण्यास लावणारा एक ऋषि ( आ. रा. याग. ५-६ ).

**कुयव**—याला इंद्रानें कुत्साकरितां मारिलें (ऋ. २. १९. ६).

**कुयवाच्**—याला इंद्रानें दुर्योणाकरितां ठार केलें ( ऋ. १. १७४. ७ ).

**कुरु**—( स्वा. प्रिय. ) आग्नीध्रास पूर्वचित्तीपासून झालेला सातवा पुत्र. याची पत्नी मेरुकन्या नारी होय. याचा वर्ष याच्याच नांवानें प्रसिद्ध आहे ( भा. ५. २ ).

२ ( सो. अज. ) संवरणास तपतीपासून झालेला पुत्र. याच्या स्त्रियांचीं नांवें शुभांगी व वाहिनी. शुभांगीच्या पुत्राचें नांव विदूरथ ( म. आ. ६३. ४२ कुं. ). वाहिनीच्या पुत्रांचीं नांवें—अश्ववत् ( अविक्षत् ), अभिष्यन्त, चैत्ररथ, मुनि व जनमेजय ( म. आ. १०१. ३६; वि. ५३. १४ कुं.; मत्स्य. ५० ). भागवतमतें परीक्षित्, सुधनु, जह्नु व निषधाश्व, पण मत्स्यांत निषधाश्वाच्या ऐवजीं प्रजन आहे. भविष्यांत हा अहीनजाचा पुत्र व यानें १०००० वर्षे राज्य केल्याचें दिलें आहे. वैदिक वाङ्मयांत कुरूचा उल्लेख आहे ( जै. उ. ब्रा. १. ३. ८. १ ). यापासून सुप्रसिद्ध कुरुवंश सुरू झाला. याच्या वंशजांना कौरव म्हणतात. याच्याच तपश्चर्येनें कुरुक्षेत्र याच्या नांवानें प्रसिद्ध झालें.

३ हें एका विशिष्ट लोकांचें नांव आहे (देवभाग श्रौतर्ष पहा).

**कुरुंग**—देवातिथि काण्वानें याच्या दानाची प्रशंसा केली आहे. हा तुर्वसांचा राजा होता ( ऋ. ८. ४. १९ ). हा कुरुवंशांतील कदाचित् असेल ( नि. ६. २२ ).

**कुरुवत्स**—( सो. ) भविष्यमतें नवरथाचा पुत्र.

**कुरुवश**—( सो. क्रोष्टु. ) मधुराजाचा पुत्र. यास अनु नांवाचा पुत्र होता ( भा. ५. २ ).

**कुरुश्रवण त्रासदस्यव**—हा त्रसदस्यूचा मुलगा होय. याच्या दानाची कवष ऐलूषानें प्रशंसा केली आहे ( ऋ. १०. ३३. ४-५ ). याच सूक्तांत मित्रातिथि मेला म्हणून त्याचा पुत्र उपमश्रवस् याचा समाचार घेण्याकरितां कवष ऐलूष आला आहे. वास्तविक एका सूक्तांत आलेल्या त्या दोन गोष्टींचा कांहीं संबंध नाहीं हें सायणमत योग्य दिसतें. कवष केवळ सूक्तकार आहे ( बृहद्दे. ७. ३५-३६ ).

**कुरुस्तुति काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ७६-७८ ).

**कुल**—दाशरथिरामाच्या सभेंतील एक हास्यकार.

२ दाशरथि रामाच्या सेनेंतील वानर.

**कुलक**—( सू. इ. ) रणक राजाचें नामांतर.

२ ( सू. इ. भविष्य. ) मत्स्यमतें क्षुद्रकाचा पुत्र. यास भागवतांत रणक, विष्णुमतें कुंडक व वायुमतें क्षुभिक म्हटलें आहे.

**कुलह**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**कुलिक**—कद्रूपुत्र एक नाग ( म. आ. ६६ कुं. ).

**कुल्मलबर्हिस् शैलूष**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.१२६ ).

**कुवल**—वीरवर्मन्‌चा पुत्र ( वीरवर्मन् पहा ).

**कुवलयाश्व**—( सो. काश्य. ) एक चक्रवर्ती राजा ( मै. उ. १. ४ ). दिवोदासपुत्र प्रतर्दनाचें नामांतर. यासच कुवलाश्व, द्युमत्, शत्रुजित् व ऋतुध्वज अशीं नामांतरें होतीं. भविष्यमतें हा बृहदश्वाचा पुत्र. यानें ३५२०० वर्षे राज्य केलें.

**कुवला**—हंसध्वजाची कन्या व सुधन्व्याची भगिनी.

**कुवलाश्व**—( सू. इ. ) बृहदश्व राजाचा पुत्र. बृहदश्वानें वनांत जाते समयीं यास धुंधु नांवाच्या उत्तंकाश्रमास पीडा देणाऱ्या दैत्यास पारिपत्य करावयास सांगितलें होतें. तेव्हां उत्तंकास बरोबर घेऊन हा धुंधूच्या निवासस्थानास गेला. धुंधु दैत्य हा उज्जालक नांवाच्या वालुकामय असलेल्या समुद्राचे तळाशीं आपल्या अनुयायांसह निजला होता. तेव्हां कुवलाश्वानें आपल्या दृढाश्वादि शंभर पुत्रांस, —भागवतांत याच्या पुत्रांची संख्या एकवीस हजार दिलेली आहे ( ९.६ )— तो वालुकामय समुद्र उपसण्यास सांगितलें. तेव्हां त्यांनीं सर्व वाळू बाजूला केल्यावर धुंधु बाहेर आला. त्या वेळीं त्याचे तोंडांतून अग्नीच्या ज्वाळा निघत होत्या. त्या ज्वाळांनीं कुवलाश्वाचे दृढाश्व, कपिलाश्व व भद्राश्व या तीन पुत्रांखेरीज करून बाकीचे सर्व पुत्र होरपळून मेले. तेव्हां कुवलाश्व स्वतः धुंधूशीं लढण्यास आला. त्याबरोबर विष्णूनें उत्तंकाला दिलेल्या वरावरून त्यानें आपलें तेज कुवलाश्वाचे शरीरांत घातलें. तेव्हां कुवलाश्वानें धुंधूचा तत्काल पराभव करून ‘ धुंधुमार ’ हें नांव मिळविलें. कुवलाश्वाचे मागून दृढाश्व गादीवर बसला ( म. व. २०५; ह. वं. १.११; वायु. २.२६; ब्रह्मांड. ३. ६३. २९; ब्रह्म. ७; भा. ९. ६; विष्णुधर्म. १. १६; कुवलयाश्व पहा ). मार्कंडमतें शत्रुजिताचा पुत्र ( मदालसा पहा ).

२ ( प्रतर्दन पहा ).

**कुश**—( सो. आयु. ) भागवतमतें सुहोत्र राजाच्या तीन पुत्रांतील दुसरा. याचा पुत्र प्रतिनामक राजा. याच्या पासून कुशवंश सुरू झाला.

२ ( सो. क्रोष्टु. ) विदर्भ राजाच्या तीन पुत्रांतील पहिला.

३ ( सो. पुरूरवस्. ) अजक राजाचा पुत्र. यास कुशिक असेंहि म्हणत असत. याला कुशांबु, असूर्तरजस, वसु आणि कुशनाभ असे चार पुत्र असून त्यांस कौशिक अशी संज्ञा असे ( ब्रह्मवै. २. १३ ).

४ ( सू. इ. ) भविष्यमतें दाशरथिरामाचा पुत्र. यानें १००० वर्षे राज्य केलें ( कुशलव पहा ).

५ एक दैत्य. यानें शंकरापासून अमरत्व मिळविलें. त्यामुळें विष्णूला याला मारतां येईना. शेवटीं याचें मुंडकें जमिनींत पुरून त्यावर शिवलिंग स्थापन केलें; तेव्हां हा शरण आला ( स्कंद. ७. ४. २० ).

**कुशकेतु**—( हेमकांत पहा ).

**कुशध्वज**—रथध्वज राजाचा पुत्र व वेदवतीचा पिता ( वेदवती पहा ).

२ ( सू. निमि. ) र्‍हस्वरोमा नामक जनकाच्या दोन पुत्रांतील दुसरा. सीरध्वज जनकाचा कनिष्ठ बंधु. हा मिथिलेंतील इंद्र देशाच्या सांकाश्या नामक राजधानींत राज्य करीत असे ( वा. रा. बा. ७० ). मांडवी आणि श्रुतकीर्ति ह्या दोघी याच्या कन्या असून त्या यानें दशरथपुत्र भरत आणि शत्रुघ्न यांना क्रमानें दिल्या होत्या. सीरध्वजास पुत्र नव्हता; म्हणून हाच पुढें मिथिलेचा राजा झाला होता. यास पुत्र होता, त्याचें नांव धर्मध्वजजनक. याला सीरध्वजाचा पुत्र असेंहि कांहीं ठिकाणीं म्हटलें आहे (भा. ९.१३; वायु. २.२७).

३ बृहस्पतीचा पुत्र ( बृहस्पति पहा ).

४ एक राजा. हा पूर्वजन्मीं वानर असून झोपाळ्यावरील शंकराला रात्रभर झोपाळा हलवून झोके देई. त्या पुण्यसंचयानें याला हा जन्म प्राप्त झाला. या जन्मांत यानें दमनकव्रत केलें. पुढें अग्निवेशऋषीच्या कन्येस ती नग्न स्थितींत स्नान करतांना यानें पळविल्यामुळें त्या ऋषीनें ‘ गृध्र हो ’ म्हणून यास शाप दिला. परंतु क्षमा मागितल्यामुळें ‘ इंद्रद्युम्नाला साह्य करून मुक्त हो ’ असा उश्शाप मिळाला ( स्कंद. १. २. १२ ).

**कुशनाभ**—(सो. अमा.) कुश अथवा कुशिक राजाच्या चार पुत्रांतील चवथा. यानें महोदयनामक पुरी स्थापिली होती. याच्या शंभर कन्या वायूच्या कोपानें वक्र झाल्या असतां, कांपिलीपुरीच्या चुलिसूनु ब्रह्मदत्त राजास दिल्यावर त्या सरळ झाल्या. परंतु देशास कान्यकुब्ज नांव जें पडलें तें पडलेंच ( वा. रा. बा. ३२-३३; भा. ९.१५ ).

२ वैवस्वतमन्वंतरांतील एक मनुपुत्र.

**कुशरीर**—वेदशिरस् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**कुशल**—हा व याची पत्नी दुराचारी असतांहि पुत्रानें गयेंत पिंडदान केल्यानें उद्धरलीं ( पद्म. उ. २१३ ).

२ प्रियव्रताचा प्रधान ( गणेश. २. ३२.१४ ).

**कुशलव**—दाशरथि रामापासून सीतेस झालेलीं हीं आवळीं जावळीं दोन मुलें होत. लोकापवादास्तव रामानें सीतात्याग करण्याचें ठरविलें. व लक्ष्मणाकडून तिला तमसातीरीं आश्रमाशेजारीं सोडून दिलें. पण शिष्याकडून वाल्मीकीस बातमी कळली. तेव्हां त्यानें आश्रमांत मुनिपत्न्यांमध्यें राहण्याची तिची व्यवस्था केली ( वा. रा. उ. ४८–४९ ). पुढें श्रावण महिन्यांत मध्यरात्रीच्या सुमारास सीता प्रसूत झाली व तिला दोन मुलें झालीं. वाल्मीकीला ही बातमी कळल्याबरोबर त्यानें मुलांच्या संरक्षणार्थ खालच्या बाजूला तोडलेली दर्भमुष्टि वृद्ध स्त्रियांना अभिमंत्रित करून दिली व प्रथम उत्पन्न झालेल्या मुलाच्या अंगावरून फिरविण्यास सांगितलें; मागाहून होणाऱ्या मुलाच्या अंगावरून खालचा तोडलेला भाग फिरविण्यास सांगून व अनुक्रमें कुश व लव अशीं नांवें ठेवण्यास सांगितलें ( वा. रा. उ. ६६ ). दर्भ व लव्हाळी यानें त्यांच्या अंगावर पाणी शिंपडलें म्हणून कुश व लव नांवें ठेविलीं ( जै. अ. २८ ). ज्या दिवशीं कुश आणि लव यांचा जन्म झाला, त्या दिवशीं लवणासुराचें पारिपत्य करण्याकरितां निघालेला शत्रुघ्न वाल्मीकीच्या आश्रमांतच होता. ती बातमी कळल्याबरोबर त्याला अतिशय आनंद झाला. पद्मपुराणांत तो लवणासुराचें पारिपत्य करून परत जातांना त्याचा मुक्काम आश्रमांत पडला होता व वाल्मीकीनें त्याला सीता आश्रमांत असून आतांच प्रसूत झाली हें कळविलें नाहीं, असें अगदीं वरच्या उलट आहे ( पद्म. पा. ५९ ).

यानंतर वाल्मीकीनें यांचे संस्कार करून यांना वेद व वेदांच्या दृढीकरणार्थ रामायण शिकविलें. धनुर्विद्येसारख्या क्षात्रविद्येंत यांना निष्णात केलें. पुढें रामानें अश्वमेध करून पृथ्वीपर्यटणाकरितां सोडलेला घोडा यांनीं धरला. कारण, त्याच्या मस्तकावर लावलेल्या लेखानें यांची क्षत्रियवृत्ति जागृत केली. त्यांत पुढीलप्रमाणें लिहिलें होतें. ' एकवीराच कौसल्या तस्याः पुत्रो रघूद्वहः । तेन रामेण मुक्तोऽसौ वाजी गृह्णात्विमं बली । ' हें पाहून लव म्हणाला कीं, आमची आई वंध्या आहे ? ती एकवीरा नाहीं वाटतें ? मुनिकुमार निवारण करीत असतांहि लवानें त्यांचें ऐकलें नाहीं, उलट त्यांना बजाविलें कीं, मी सीतेच्या उदरांत जन्मूनहि जर तुझ्यासारखाच वागेन, तर मी एक कृमीच ठरेन. अश्वाचें संरक्षण करण्यास शत्रुघ्न होता. त्यानें लवाला मूर्च्छित केलें असतां कुश आला व यानें शत्रुघ्नाला मूर्च्छित केलें. पुढें लक्ष्मण आपल्या सैन्यासह आला. लवानें जागृत होऊन सूर्यापासून नवें धनुष्य मिळविलें. पुढें लक्ष्मणाचा, भरताचा व हनुमानाचाहि यांनीं पराभव केल्यावर रामाला रणांगणावर जाणें भाग पडलें. बिभीषण व सुग्रीव यांसह राम रणांगणांत येऊन दाखल झाला. त्यानें दोघां कुमारांना पाहिल्याबरोबर, धनुर्वेद कोणापासून शिकलां ? तुमचे आईबाप कोण वगैरे प्रश्न केले. शेवटीं तर तुम्ही कुल सांगितल्याशिवाय युद्ध करणार नाहीं असें राम म्हणाला. तेव्हां यांनीं आम्ही सीतेचे पुत्र आहोंत असें सांगितलें. त्याबरोबर रामाच्या हातांतील धनुष्य स्वाभाविकच गळून पडलें. सुग्रीवादिकांनीं युद्धाची शिकस्त केली, पण सर्वांना मारून व रामालाहि मूर्च्छित करून हे मारुतीला सीतेच्या करमणुकीखातर बरोबर घेऊन घरीं गेले. पण सीतेनें त्यास परत सोडण्यास सांगितलें. इतका वेळ वाल्मीकि आश्रमांत नव्हता; तो आल्याबरोबर त्यानें रामास पुत्र व स्त्री यांचा स्वीकार करण्यास सांगितलें व हीं मुलें अश्वाचीं संरक्षक बनलीं व यज्ञ पार पडला (जै.अ. २८-३६).

पण वाल्मीकिरामायणांत या प्रसंगाचा उल्लेखहि नसून कुशलवांची व रामाची भेट रामायणगायनाच्या निमित्तानें झाली. रामानें अश्वमेध केला त्या वेळीं अनेक कलावान् लोक एकत्र झाले होते. वाल्मीकीलाहि मोठ्या सन्मानाचें आमंत्रण होतें. त्याच्या बरोबर हे दोघेहि अयोध्येस गेले. तेथें यांनीं वाल्मीकीनें शिकविलेलें रामायणमहाकाव्य तालसुरांत गाऊन दाखविण्यास सुरवात केली. ऋषींचीं पवित्र स्थानें, ब्राह्मणांचीं वसतिस्थानें, उपमार्ग, राजमार्ग, राजाचीं वसतिस्थानें, रामाचें निवासस्थान आणि जेथें ऋत्विजांचें अनुष्ठान चाललें आहे, अशा ठिकाणीं गाण्याचा क्रम ठेवला. हे आपला मेळ बिघडूं देत नसत. प्रत्येक दिवशीं हे वीस सर्गांचें गायन करीत. धनाची अपेक्षा दाखवूं नये, कोणी देऊं लागल्यास आम्हा मुनिकुमारांस धनाची काय जरूर आहे ? असें उत्तर देण्याविषयीं यांना आज्ञा झाली होती. कोणाचे पुत्र असें विचारल्यास वाल्मीकीचे शिष्य असें सांगत. परंतु रामायणश्रवणामुळेंच रामाला कुशलव हे आपले पुत्र आहेत, असें समजलें ( वा. रा. उ. ९३-९४ ). रामानें कोसल देशाचा राज्याभिषेक लवाला केला व उत्तर कोसलाचा कुशाला केला ( वा. रा. उ. १०७ ). लवाला सुमति व कंजानना अशा दोन बायका होत्या व कुशाला चंपका नांवाची बायको होती ( आ. रा. विवाह. ६-७ ).

**कुशाग्र**—( सो. अज. ) भागवतमतें उपरिचरवसूचा पुत्र बृहद्रथ, त्याच्या दोन पुत्रांतील दुसरा. जरासंधाचा कनिष्ठ बंधु. याचा पुत्र ऋषभ. पण वायु व मत्स्य यांच्यांत जरासंध कुशाग्रवंशांत दिला आहे. इतर पुराणांत हा स्वतंत्र वंश आहे.

**कुशांब**—( सो. अमा. ) कुश अथवा कुशिक राजाच्या चार पुत्रांतील पहिला. यास कुशांबु असेंहि म्हणत असत.

यानें स्थापिलेल्या नगरीचें नांव कौशांबी. याच्या पुत्राचें नांव गाधि असें होतें ( कुशिक पहा ).

२ ( सो. पूरु. ) उपरिचर वसु राजाच्या पुत्रांतील एक. हे चेदि देशाचे अधिपति होते ( भा. ९.२२ ). याला मणिवाहन असें नामांतर होतें ( म. आ. ६४ कुं. ).

**कुशांबु**—कौशांबी नगरींत राहणारा एक राजा ( कुशांब पहा ).

**कुशाल**—( मौर्य. भविष्य. ) ब्रह्मांडमतें अशोकाचा पुत्र.

**कुशावर्त**—(स्वा. प्रिय.) ऋषभदेव व जयंती यांचा पुत्र. याचा खंड याच्याच नांवानें प्रसिद्ध आहे ( भा. ५.४ ).

**कुशिक**—( सो. अमा. ) विश्वामित्राचा पूर्वज ( ऋ. ३. ३३. ५ ). वैदिकग्रंथांत याचे उल्लेख आहेत ( ऋ. ३. २६. १; २९. १५; ३०. २०; ४२. ९; ऐ. ब्रा. ७. १८; सां. श्रौ. १५. २७ ). शुनःशेपाचे कथेंत याचें नांव दिसतें. भरतांचें पौरोहित्य हे करीत असत. हे विशेषतः इंद्रोपासना करीत. यावरून इंद्रास कौशिक म्हणतात ( ऋ. १. १०. ११; मै. सं. ४.५.७; श. ब्रा. ३.३.४. १९; तै. आ. १. १. ४ ). कुशाचा पुत्र. यास भागवतमतें कुशांबु, विष्णुमतें कुशांब व वायुमतें कुशास्य अशीं नांवें आहेत. याचा पुत्र गाधि व पौत्र विश्वामित्र. हा एक विश्वामित्रकुलांतील गोत्रकार आहे.

कुशिक महोदयपुरांत घर करून राहत असे. एकदां याचा सासरा च्यवन याच्या येथें राहावयास आला. त्यांत याच्या कुळाचा नाश करावा हा त्याचा हेतु होता; कारण याच्या वंशांत पुढें संकर होणार होता. कुशिकानें आपल्या स्त्रीसह च्यवनाची उत्तम प्रकारें सेवा करून आपला वंश ब्राह्मण व्हावा असा वर मिळविला व त्याप्रमाणें झालेंहि ( म. अनु. ८७–९० कुं.; विष्णुधर्म. १. १४ ). इषीरथपुत्र ( वेदार्थदीपका ३ ). कुशिकानें इंद्रासारखा पुत्र व्हावा म्हणून तप केलें. म्हणून इंद्रानेंच याचे उदरीं गाधीच्या रूपानें जन्म घेतला ( भा. ९. १५; ह. वं. १. २०; म. शां. ४८ कुं. ).

कुशिककुलांतील मंत्रकार

| मत्स्य. १४५. ११२-११३; | ब्रह्मांड. २. ३२. ११७-११९ |
|---|---|
| अघमर्षण | अघमर्षण |
| अष्टक | अष्टक |
| | कत |
| | कोल |
| देवरात | देवरात |
| देवश्रवस् | देवश्रवस् |
| धनंजय | धनंजय |
| पुराण | पूरण |
| बल | उद्गल |
| भूतकील | |
| मधुच्छंदस् | मधुच्छंदस् |
| माम्बुधि | |
| | रेणु |
| लोहित | लोहित |
| विश्वामित्र | विश्वामित्र |
| शालंकायन | |
| शिशिर | |

२ लकुलिन् नामक शिवावताराचा शिष्य.

**कुशिक ऐषारथि**–सूक्तद्रष्टा ( ऋ. ३. ३१; कुशिक पहा).

**कुशिक सौभर**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.१२७ ).

**कुशिकंधर**—अट्टहास नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**कुशीलव**—भावशर्मानामक एक ब्राह्मण. हा ताडी फार पिऊन मेला. यास ताडाचा जन्म प्राप्त झाला. त्या ताडावर कुशीलव नामक ब्राह्मण कांहींहि दान न केल्यामुळें ब्रह्मराक्षस होऊन सकुटुंब होता. त्याचा गीतेचा आठवा अध्याय म्हटल्यानें उद्धार झाला ( पद्म. उ. १८३ ).

**कुशुमिन्**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें पौष्यंजीचा शिष्य.

**कुशुंभ**—( सो. ). भविष्यमतें शकुनीचा पुत्र.

**कुश्रि वाजश्रवस**—यास अग्निचयनाचें ज्ञान होतें ( श. ब्रा. १०. ५. ५. १ ). कुश्रि हा वाजश्रवस्चा आणि राजस्तंबायन यज्ञवचस्चा शिष्य. याचे शिष्य उपवेशि व वात्स्य हे होत ( बृ. उ. ६. ५. ३–४ ).

**कुषंड**—सर्पसत्रांत षंड नांवाच्या ऋत्विजाबरोबर ह्याचें नांव आलेलें आहे. त्या सत्रांत याच्याकडे अभिगिर ( स्तुति ) व अपगर ( निंदा ) नामक कर्में असत ( पं. ब्रा. २५. ५. ३; ला. श्रौ. १०. २०. १० ).

**कुषीतक सामश्रवस**—हा शमनीचमेढ्र नांवाच्या व्रात्यांचा यज्ञांतील मुख्य होता. हा व्रात्यांचा मुख्य झाला म्हणून यास लुशाकपि खार्गलीनें भ्रष्ट व्हाल म्हणून शाप दिला, म्हणून कौषीतकी शाखेचे लोक ( सांख्यायन ) कोठेंहि महत्त्व पावले नाहींत ( पं. ब्रा. १७. ४. ३ ).

**कुसीदकि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**कुसीहि**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील विष्णुमतें पौष्यंजीचा शिष्य.

**कुसु**—मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**कुसुदिन् काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ८१-८३ ).

**कुसुमामोदिनी**—ही पार्वतीच्या आईची सखी. पार्वती तपास निघाली, तेव्हां तिनें हिला मंदराचलाच्या शिखरीं कोणाचाहि प्रवेश होऊं देऊं नको असें विनविलें (पद्म. सृ. ४४).

**कुसुमायुध**—ब्रह्मदेवाच्या हृदयापासून उत्पन्न झाला (मत्स्य. ३. १०; काम पहा.).

**कुसुमि**—सामवेदी श्रुतर्षि.

**कुसुरुबिंद औद्दालकि**—यानें पशुसंपत्ति प्राप्त व्हावी म्हणून सप्तरात्र याग केला व हा चतुष्पादसंपत्तीनें समृद्ध झाला (तै. सं. ७. २. २. १). यानें एक दशरात्र याग सुरू केला. इतरत्र याचे कुसुरबिंद (पं. ब्रा. २२. १५. १-१०), कुसुरुबिंदु (सां. श्रौ. १६.२२. १४) असे निर्देश आहेत. हा संस्कारशास्त्रांतील ज्ञाता होता (ष. ब्रा. १. १६). यास औद्दालकि म्हटलें आहे. त्यावरून श्वेतकेतूचा व याचा नजीकचा संबंध असावा.

**कुस्तुक शार्कराक्ष्य**—श्रवणदत्ताचा शिष्य. याचा शिष्य भवत्रात (वं. ब्रा. १).

**कुस्तुंबुरु**—एक यक्ष (म. स. १०. १७ कुं.).

**कुहन**—सौवीर देशीय राजपुत्र. हा जयद्रथाचा बंधु होता (म. व. २६६. ११. कुं.).

**कुहर**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा.

२ कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**कुहू**—स्वायंभुव मन्वंतरांतील अंगिराऋषीस श्रद्धेपासून झालेल्या चार कन्यांतील दुसरी.

२ हविष्मंतनामक पितरांची स्त्री.

३ द्वादशादित्यांतील धातानामक आदित्याची स्त्री.

४ मयासुराच्या तीन कन्यांतील तिसरी.

**कूट**—कंससभेंतील एक मल्ल. हा धनुर्यागाचे वेळीं बलरामानें मारिला (भा. १०. ४४).

२ या पाषाणरूपी असुराचा गणेशानें नाश केला (गणेश. २.१३).

**कूपकर्ण**—एक रुद्रगण. बाणासुराच्या युद्धप्रसंगांत बलरामाशीं याचें युद्ध झालें होतें (भा. १०.६३).

२ बलीच्या प्रधानांपैकीं अग्रेसर (नारद. १ १०).

**कूर्च**—(सू. नरि.) भागवतमतें मीढ्वान राजाचा पुत्र. याचा पुत्र इंद्रसेन.

**कूर्चामुख**—विश्वामित्रऋषीचा पुत्र (म.अनु.७.५३ कुं.).

**कूर्म**—प्रजापति संतति निर्माण करण्याकरितां पाण्यांत कूर्मरूपानें संचार करितो (श. ब्रा. ७. ५. १. ५-१०; म. आ. १८; पद्म. उ. २५९). प्रजापतीनें कूर्माचें रूप धारण करून प्रजोत्पादन केलें. हा अकरावा अवतार आहे (भा. १. ३-१६). पृथ्वी रसातळास चालली असतां विष्णूनें हा अवतार घेतला (लिंग. ९४). या कूर्माच्या पाठीचा घेर एक लक्ष योजनें होता. दुर्वासानें दिलेल्या पारिजातकाच्या माळेचा अपमान केल्यामुळें इंद्राला त्यानें वैभव नष्ट होईल असा शाप दिला. त्याप्रमाणें लक्ष्मी समुद्रांत गुप्त झाली. 'तिला काढण्याकरितां समुद्रमंथन केलें पाहिजे. मंदराचलाची रवी करून तिला वासुकीची दोरी लावून देव व दैत्य एकत्र होऊन जर त्यांनीं समुद्रमंथन केलें तर लक्ष्मी सांपडेल. त्या वेळीं मी स्वतः कूर्मरूप घेऊन मंदराचल पाठीवर घेईन,' असें विष्णूनें सांगितलें (पद्म. ब्र. ८.). समुद्रमंथन-प्रसंगीं मंदराचल खालीं जाऊं लागतांच विष्णूनें कूर्मावतारधारण केला. अमृतासाठीं हें समुद्रमंथन चाललें होतें (पद्म. उ. २३१-२३३; भा. २. ७. १३; ८. ७. ८). अशा तऱ्हेनें क्षीरसागराचें देवदानवांनीं मंथन करून चौदा रत्नें काढून पूर्ववत् वैभव संपादिलें. लोहाघाटाजवळच विष्णूनें मंदारपर्वत धरण्यासाठीं कूर्मावतार घेतला. कूर्मावतारापासून लोक एकादशीचा उपवास करूं लागले (पद्म. उ. २३३).

२ कश्यप व कद्रू यांचा पुत्र (म. आ. ३५).

**कूर्म गार्त्समद**—सूक्तद्रष्टा (ऋ. २. २७-२९).

**कूशांब स्वायव लातव्य**—एक सामाचा प्राचीन आचार्य. यानें यज्ञायज्ञीय सामांत गिराऐवजीं इरा म्हणावयास सांगितलें (पं. ब्रा. ८. ६.८).

**कूष्मांड**—एक दैत्य. यास विष्णूनें कार्तिक शुक्ल नवमीचे दिवशीं ठार मारिलें (स्कंद. २. ४.३१).

**कूष्मांडराज**—रुद्रगणविशेष.

**कृकण**—(किंकिण पहा).

**कृणु**—एक ऋषि (वाल्मीकि पहा).

**कृत**—(सो. कुश.) जय राजाचा पुत्र. याचा पुत्र हर्यवन.

२ वसुदेवास रोहिणीपासून झालेल्या सात पुत्रांतील सातवा (भा. ९. २४).

३ मणिवर व देवजनी यांचा गुह्यक पुत्र.

४ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील भागवत, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य. भागवताप्रमाणें हा चतुर्विंशशाखाध्यायी आहे.

५ (५ कृति पहा).

**कृतक**—वसुदेवास मदिरेपासून झालेल्या चार पुत्रांतील तिसरा (भा. ९.२४).

**कृतंजय**—(सू. इ. भविष्य.) भागवतमतें बर्हिराजाचा, विष्णुमतें धर्माचा, वायुमतें धर्मीचा व मत्स्यमतें बृहद्राजाचा पुत्र.

२ एक व्यास (व्यास पहा).

**कृतद्युति**—चित्रकेतु राजाच्या कोटि स्त्रियांतील ज्येष्ठ. हिला अंगिराऋषीच्या कृपेनें पुत्र झाला, हें तिच्या सवतींना

सहन न झाल्यानें त्यांनीं त्या मुलाला विष दिलें. पण अंगिरानें त्याला पुनः जिवंत केलें ( भा. ९.१४; चित्रकेतु पहा ).

**कृतध्वज**—प्रतर्दन राजाचें नामांतर.

२ (सू. निमि.) धर्मध्वज जनकाच्या दोन पुत्रांतील एक.

**कृतनंदन**—(भविष्य.) विष्णुमतें कैलकिल वरांगाचा पुत्र.

**कृतप्रज्ञ**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय भगदत्त राजाचा पुत्र. यास नकुलानें मारिलें ( म. क. २.३१ कुं. ).

**कृतयशस् आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. १०८. १०–११ ).

**कृतवर्मन्**—( सो. क्रोष्टु. ) हा हृदीकाचा पुत्र ( मत्स्य. ४४. ८०–८१ ). हा दुर्योधनाचे पक्षास एक अक्षौहिणी सैन्य घेऊन आला होता ( म. उ. १९.१९ कुं ). बलरामानें केलेल्या रैवतक पर्वतावरील उत्सवास हा आला होता ( म. आ. २३९. ११ कुं. ). यानें पांडवांशीं निकराचें युद्ध केलें, पण भीमानें यास तीन बाणांनीं विद्ध केलें ( म. द्रो. ११४. ५९कुं. ). दुर्योधनाकडील तीन वीर वांचले, त्यांतील हा एक आहे. नंतर हा द्वारकेस गेला ( म. स्त्री. ११ ). युधिष्ठिराच्या अश्वमेधांत अर्जुनाबरोबर हा अश्वसंरक्षणार्थ गेला होता. हा यादवीत सात्यकीच्या हातून मरण पावला ( भा. ९. २४; म. मौ. ३ ).

२ ( सो. सह. ) भागवतमतें धनकाचा पुत्र ( कृतवीर्य पहा ).

**कृतवाच्**—हा अंगिरसकुलांतील मंत्रकार होता. कृतवाक् असा पाठभेद आहे.

**कृतवीर्य**—( सो. सह. ) भागवत व विष्णु यांमध्यें धनक राजाच्या चार पुत्रांतील पहिला. याचा पुत्र कार्तवीर्यार्जुन. यासच सहस्रार्जुन असें म्हणत असत ( म. आ. १९४; स. ८ ). मत्स्य व वायु यांमध्यें धनकाच्या ऐवजीं कनक असा पाठ आहे. संकष्टी चतुर्थीव्रताच्या प्रभावानें यास कार्तवीर्यार्जुनासारखा महापराक्रमी पुत्र झाला ( गणेश. १. ५८ ).

**कृतस्थली**—एक अप्सरा.

**कृताग्नि**—( सो. सह. ) धनक राजाच्या चार पुत्रांतील दुसरा.

**कृताश्व**—( सू. इ. ) संहताश्व राजाच्या दोन पुत्रांतील पहिला. यास कृशाश्व असें नामांतर असून, पुत्र श्येनजित् किंवा प्रसन्न होय.

**कृताहार**—पुलह व श्वेता यांचा पुत्र.

**कृति**—( सो. आयु. ) नहुषाच्या सहा पुत्रांतील कनिष्ठ.

२ ( सू. निमि. ) बहुलाश्व जनकाचा पुत्र. याचा पुत्र महावशिन्. विष्णु व वायु यांच्या मतें या पुरुषाच्या वेळीं निमि ऊर्फ विदेहवंश संपला.

३ ( सो. क्रोष्टु. ) रोमपादपुत्र बभ्रुचा पुत्र. याचा पुत्र उशिक राजा ( भा. ९. २४ ).

४ (सो. द्विमीढ.) सन्नतिमान् राजाचा पुत्र. यानें हिरण्यनाभापासून प्राच्यसामांच्या सहा संहिता संपादिल्या होत्या. याचा पुत्र नीप.

५ ( सो. कुरु. ) भागवतमतें च्यवनपुत्र. यास उपरिचर-वसु नामक पुत्र होता. याबद्दल कृत असा पाठ आहे.

६ भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा. याचा पुत्र रुचिपर्वा ( म. द्रो. २६. ५३ कुं. ).

७ संह्रादाची पत्नी. हिचा पुत्र पंचजन ( भा. ६. १८ ).

८ वसुपुत्र विश्वकर्म्याची पत्नी. हिला चाक्षुष नांवाचा सहावा मनु झाला ( भा. ६. ६ ).

९ सावर्णि मन्वंतरांतील एक मनुपुत्र.

१० रुद्रसावर्णि मन्वंतराच्या सप्तर्षीतील एक.

११ रैवत मनूचा पुत्र.

१२ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील विष्णुमतें पौष्यंजीचा शिष्य.

१३ हा निमि वंशांतील पहिला कृति. दुसरा कृति बहुलाश्व जनकाचा पुत्र होय ( २ कृति व कृतिरात पहा ).

**कृतिमत्**—( सो. द्विमीढ. ) भागवतमतें यवीनराचा पुत्र. यास सत्यधृति असेंहि म्हणत.

**कृतिरथ**—( सू. निमि. ) प्रदीपकाचा पुत्र. वायुमतें कीर्तिरथ असें नांव आहे.

**कृतिरात**—( सू. निमि. ) विष्णुमतें महाधृतीचा पुत्र. वायुमतें कीर्तिराज व भागवतमतें कृति असें नांव आहे.

**कृतेयु**—( सो. पूरु. ) भागवत व वायु यांच्या मतें रौद्राश्वाला घृताचीपासून झालेला मुलगा.

**कृतौजस्**—( सो. सह. ) हा मत्स्यमतें कनकपुत्र. भागवत व विष्णु यांच्या मतें धनकपुत्र.

**कृत्तिका**—प्राचेतस दक्षानें सोमास दिलेल्या सत्तावीस कन्यांतील एक.

२ अग्निनामक वसूची पत्नी. हिचा पुत्र स्कंद ( भा. ६.६; मत्स्य. ५.२७ ).

**कृत्नु भार्गव**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८.७९ ).

**कृत्वी**—कृष्णद्वैपायनपुत्र शुकाची कन्या. हिला कीर्तिमती असें दुसरें नांव आहे. अजमीढकुलोत्पन्न नीप अथवा अणुह राजाची ही स्त्री. हिचा पुत्र ब्रह्मदत्त.

**कृप**—हा रुशम व श्यावक यांचेसह इंद्राचा साहाय्यक म्हणून आला आहे ( ऋ. ८. ३. १२; ४. २ ).

२ ( सो. अज. ) हा उत्तर पांचाल देशाच्या राजघराण्यांतील गौतम नांवाच्या मुनीचा नातू होय. पांचाल देश म्हणजे हल्लींचा रोहिलखंड होय. गौतमाला शरद्वान् या नांवाचा एक महातपस्वी मुलगा होता. सत्यधृतीचा पुत्र शरद्वान् असेंहि कांहीं ठिकाणीं लिहिलेलें आढळतें. त्याचा तपोभंग करण्याकरितां इंद्रानें जालवती नांवाच्या अप्सरेस पाठविलें (म. आ. १४०.६ कुं.). कांहीं ठिकाणीं त्या अप्सरेस उर्वशी असें म्हटलें आहे ( भा. ९.२१.३५; मत्स्य. ५०. १-१४ ). व कांहीं ठिकाणीं तर सत्यधृतीचाच तपोभंग करण्याकारितां उर्वशीला पाठविलेलें आहे. त्या अप्सरेला पाहतांच त्याचें वीर्य स्खलन झालें व तें शर नांवाच्या गवताच्या बेटावर पडून त्यापासून एक पुत्र व एक कन्या उत्पन्न झालीं. पुढें त्याच वनांत शिकारीकरितां आलेल्या राजा शंतनूनें यांस घरीं उचलून नेलें व त्यांचें कृपेनें पालन केलें, म्हणून त्यांचीं कृप व कृपी अशीं नांवें पडलीं. तीच कन्या अश्वत्थाम्याची माता व गुरु द्रोणाचार्यांची पत्नी होय ( म. आ. १४०; विष्णु.४.२०; अग्नि. २७७; गरुड. १४०; भा. ९.२१ ). इकडे हीं मुलें नेल्याची बातमी तपःसामर्थ्यानें गौतमाला समजली. मग त्यानें राजाकडे जाऊन त्या मुलांस त्यांचें गोत्र वगैरे सर्व सांगितलें व त्याचप्रमाणें चार प्रकारांचा धनुर्वेद व सर्व प्रकारांची अस्त्रविद्या याला शिकविली ( म. आ. १४० ). त्यानंतर राजा धृतराष्ट्रानें वेदशास्त्रांत निपुण अशा या कृपाचार्याकडे आपल्या सर्व कुमारांना शिकविण्याकरितां ठेविलें. सर्व कौरव द्रोणापूर्वी कृपाचार्यांचेकडे धनुर्वेद शिकले ( म. आ. १३९.४२. कुं. ). भारतीय युद्धांत हा कौरवांच्या बाजूनें होता. तरी पण याचें लक्ष पांडवांकडे होतें. हा नेहमीं कर्णास टाकून बोले व अर्जुनाची स्तुति करी ( म. वि. ४९. १; ५०. २; द्रो. १५९. १३ कुं. ). एकदां तर कृपाचार्य पांडवांची स्तुति व कर्णाची निंदा करीत असतां कर्णानें सांगितलें कीं, ‘ हे दुर्मते, पुनः जर तूं असें अप्रिय भाषण करशील, तर या तलवारीनें तुझी जीभच कापून टाकीन. ’ ( म. द्रो. १५९.५६ कुं. ). अशा रीतीनें कर्णाची व कृपाचार्याची नेहमीं खडाजंगी होई. यानें भारतीय युद्धांत अतुल पराक्रम करून बरेच वीर स्वर्गास पाठविले. परंतु जयद्रथाच्या वधानंतर कृप व अश्वत्थामा हे अर्जुनावर चालून गेले असतां अर्जुनाच्या बाणानें कृपाचार्य बेशुद्ध झाला ( म. द्रो. १४९ ). यानें युद्धांत धृष्टद्युम्नास अचुक व नेमके बाण मारून जर्जर केलें होतें ( म. क. १७.१० ). दुर्योधनाच्या वधानंतर अश्वत्थामा अतिशय गांगरून गेला व त्यानें कृपाचार्यांस पांडवांच्या मुलांना निद्रित असतां मारण्याची आपली मसलत सांगितली. त्या वेळीं कृपाचार्यानें त्यास पुढील उपदेश केला. त्यावरून याची योग्यता दिसून येते. ‘ उद्योगाची बाजू लंगडी पडल्यावर नुसतें दैव कांहीं करूं शकत नाहीं. केव्हांहि आपण उद्योगास सुरुवात करितांना वडील माणसांचा विचार घ्यावा ” आणि म्हणून आपण धृतराष्ट्र, गांधारी व विदुर यांचा या बाबतींत सल्ला घेऊं ’ ( म. सौ. ४). यानें लग्न केलेंच नाहीं. हा चिरंजीव आहे. कौरवांच्या मृत्यूनंतर यानें गांधारीचें सांत्वन केलें व आपण स्वतः घोड्यावर बसून पांडवांच्या भीतीमुळें हस्तिनापुराकडे निघून गेला ( म. स्त्री. १८ ). हा शरद्वान् या नांवानेंच पुढें सावर्णि मन्वंतरांत सप्तर्षींपैकीं एक होणार आहे ( भा. ८. १३-१४ ). कृपाचार्य हा रुद्रगणाचा अवतार होय ( म. आ. ६८-७७ ).

३ उत्तानपादपुत्र ध्रुवाचा पौत्र. शिष्टाच्या चार पुत्रांतील ज्येष्ठ.

**कृपी**—( सो. अज. ) विष्णु, वायु व मत्स्य यांच्या मतें सत्यधृतिकन्या. जालवती नामक अप्सरेस पाहून शरद्वानाचें रेत शरस्तंभावर पडलें. त्यापासून ही उत्पन्न झाली. हिला शंतनूनें सांभाळिलें. ही द्रोणाचार्यांची स्त्री. हिचा पुत्र अश्वत्थामा ( कृप पहा ).

**कृमि**—( सो. अनु. ) हा विष्णु व वायुमतें उशीनरपुत्र होय.

२ ( सो. ऋक्ष. ) हा मत्स्यमतें च्यवनपुत्र होय. कृत, कृतक, कृति व हा एकच आहे.

**कृमिल**—( सो. क्रोष्टु; किंकिण पहा ).

**कृश**—यानें इंद्राला यज्ञ करून प्रसन्न केलें होतें ( ऋ. ८ ५. ४२ ) हा सत्यवक्ता होता ( ऋ. ८. ५९. ३ ). आश्वींनीं याच्यावर कृपा केली होती ( ऋ. १०. ४०. ८ ). सूक्तद्रष्टा कृश काण्व हाच असावा ( ऋ. ८. ५५ ).

**कृश** अथवा **कृशतनु**—एक ऋषि. यानें प्रतिग्रह न करितां आपला काळ तपाचरणांत घालविला. याची आकृति अत्यंत कृश होती. तीमुळेंच यास असें नांव पडलें होतें. यानें वीरद्युम्नपुत्र भूरिद्युम्न नष्ट झाला होता, तो त्याचा त्यास तपोबलानें आणून देऊन उपदेशपर असे किल्येक इतिहासहि सांगितले होते ( म. शां. १२८ ). हा शृंगऋषींचा मित्र होता ( म. आ. ४० ).

२ विकुंठदेवांतील एक.

**कृशानु**—सोमसंरक्षक गंधर्वांपैकीं एक ( तै. सं. १. २. ७ ). अश्वींनीं युद्धांत याचें रक्षण केलें (ऋ. १. ११२. २१).

**कृशाश्व**—एक ऋषि व प्रजापति. प्राचेतस दक्षानें यास आपल्या साठ कन्यांपैकीं दोन कन्या दिल्या होत्या. त्यांचीं नांवें अर्चि व धिषणा होत. अर्चीस धूम्रकेश आणि धिषणेस वेदशिरस्, देवल, वयुन व मनु असे पुत्र होते. शिवाय जया व प्रभा नांवाच्या दोन कन्याहि होत्या. परंतु ह्या कोणत्या

ओंपासून झाल्या याचा उल्लेख सांपडत नाहीं ( वा. रा. बा. २१ ). यजुर्वेदी ब्रह्मचारी.

२ ( सू. दिष्ट. ) महदेव राजाचा पुत्र. याचा पुत्र सोमदत्त.

३ ( सू. इ. ) कृताश्व राजाचें नामांतर.

४ नाट्यकलेचा आचार्य एक ऋषि ( पा. सू. ४. ३. १११ ).

**कृष्ण**—( सो. वृष्णि. ) छांदोग्योपनिषदांत ( ३. १७.६ ) पुरातन अशा घोर आंगिरसाचा देवकीपुत्र कृष्ण हा शिष्य होता, असा उल्लेख आहे. कृष्ण आंगिरस ऋग्वेदाच्या एका सूक्ताचा द्रष्टा आहे ( ऋ. ८. ८५. ३-४ ). हा किंवा याचा पुत्र विश्वक हा खालील सूक्तांचा (ऋ. ८. ८५-८७) द्रष्टा आहे. कृष्णीय हें ऋग्वेदांतील इतर दोन सूक्तांत आलेलें पैतृक नांव ( १.११६.२३; ११७.७ ) कृष्ण या शब्दापासून झालें आहे. खरें पाहतां कार्ष्णीय असें पाहिजे ( पज्रीय पहा ). ऋग्वेदांत अश्विनांनीं कृष्णिय विश्वक विष्णापूस परत दिला. असें असेल, तर कृष्ण विष्णापूचा आजा ठरतो. पण संहितेतर वाङ्मयांत आलेला ( सां. ब्रा. ३०. ९ ) कृष्ण आंगिरस व हा कृष्ण एक नव्हे. कृष्णाचा सांप्रदाय याच्या ह्यातींतच सुरू झाला असावा. पाणिनीनें याच्या भक्तिसांप्रदायाचा निर्देश केला आहे ( पा. सू. ४.३.९८). अर्वाचीन उपनिषदांतहि याला स्थान मिळालें आहे ( महाना. उ. ४.५ वासु. २; गोपी. ५; कृष्णो. ८; मुक्ति. १. ३९ ). वसुदेवास देवकीपासून झालेल्या आठ पुत्रांतील कनिष्ठ. याचा जन्म मथुरेंत कंसाच्या कारागृहांत झाला ( भा. १०. ३; विष्णु. ४. १५; ५. ३; ब्रह्मवै. ४. ७. ७४; गरुड. १. १३९; कूर्म. १. २४; भा. ९. २४; अग्नि. १२. ७; ह. वं. १. ३५; २. ४ ). देवकीच्या विवाहानंतर तिला पोहोंचविण्यास जाते वेळीं कंस रथाचे घोडे हांकीत असतां, देवकीपुत्राच्या हातून तुझा वध होईल, अशी आकाशवाणी झाली. त्या प्रसंगीं कंस तिचा वध करण्यास प्रवृत्त झाला. तेव्हां वसुदेवानें ती स्त्री व बहीण असल्यामुळें तिच्या हत्येचें पातक करूं नको असें त्यास सांगितलें. शिवाय, होणारीं मुलें स्वाधीन करण्याच्या अटीवर तिला त्यानें वांचविलें. कंसानें या कारणासाठीं वसुदेव व देवकी यांना आपल्या कैदेंत ठेविलें होतें. त्यांस होणारीं मुलें तो मारीत असे. याप्रमाणें सात मुलें त्यानें मारिलीं. अग्निपुराणांत सहा मारले व सातवा बल झाल्याचें दिलें आहे व रोहिणीस राम वेगळा दिला आहे. कृष्ण हा आठवा पुत्र होय. याचा जन्म श्रावण वद्य अष्टमीच्या दिवशीं मध्यरात्रीं रोहिणी नक्षत्रावर झाला. त्या दिवशीं बुधवार होता ( निर्णयसिंधु ). अभिजिन्नाम नक्षत्रे जयन्ती नाम शर्वरी। मुहूर्तो विजयो नाम तत्र जातो जनार्दनः। असा जन्मकाल कांहीं ठिकाणीं दिला आहे (ब्रह्मांड. ३. ७१. २०६; वायु. २. ३४. २०१; ह. वं. २. ४ ). पण यांतील अभिजित् नक्षत्राची संगति लागत नाहीं. अष्टमीला रात्रीं रोहिणी नक्षत्र असलें, म्हणजे त्या रात्रीला जयन्ती म्हणतात ( पद्म. उ. ३१ ).

वसुदेव हा उग्रसेनाचा प्रधान व विशेष उलाढाली असल्यामुळें त्याच्यावर कंसाचा विशेष राग होता. केवळ देवकीचींच मुलें कंसानें मारिलीं, अशी भागवतादिकांवरून समजूत होते. पण वायुपुराणावरून वसुदेवाच्या इतर स्त्रियांच्या मुलांनाहि कंसानें ठार केल्याचें दिसून येतें ( वायु. २. ३४. १७३; १७८ ). कृष्ण देवकीच्या पोटीं आला, याचा अर्थ हा गर्भावस्थेंत होता असा नाहीं. हा गर्भवासापासून अलिप्त आहे. देवकीच्या पोटांत फक्त वायु होता. दहाव्या महिन्यानंतर हा वायु नाहींसा होऊन कृष्ण प्रत्यक्ष प्रगट झाला ( ब्रह्मवै. ४. ७; ह. वं. २. ४ ). त्या वेळीं हा चतुर्भुज होता. त्या रूपाचें वर्णन पुराणांतरीं केलेल्या परमेश्वरस्वरूपवर्णनासारिखें आहे. हें साक्षात् दर्शन वसुदेवदेवकींस झालें. त्यांनीं याची पुष्कळ स्तुति केली. त्या वेळीं कृष्णानें त्यांना त्यांच्या पूर्वजन्मांची आठवण दिली. शेवटीं कंसाच्या भीतीमुळें वसुदेवानें कृष्णास बाल व मानव रूप धारण करण्यास सांगितलें. वसुदेवदेवकींस पुत्रप्रेमाचा उमाळा येऊन याच्या वधास टपलेल्या कंसाच्या भीतीमुळें त्यांचीं हृदयें विदीर्ण झालीं. त्यांनीं यास वांचविण्यासाठीं गोकुळांत नेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें वसुदेव कृष्णासह मथुरेहून निघाला. या प्रसंगीं ईश्वराची पूर्ण कृपा असल्यामुळें दारांचीं कुलुपें खुलीं पडून दारें सताड उघडीं पडलीं. पहारेकरी झोंपेच्या ऐन भरामध्यें होते. तेव्हां वसुदेवास बाहेर पडणें सोयिस्कर होऊन तो कृष्णास घेऊन गांवाबाहेर पडला. पुढें यमुना पाण्यानें भरली असतां दैवयोगानें तिचें पाणी कमी होऊन वसुदेव नदीपार झाला. त्यानंतर तो गोकुळांत नंदाच्या येथें पोहोंचला; व तेथील यशोदेपुढची मुलगी उचलून त्यानें तेथें कृष्णास ठेविलें. ती मुलगी म्हणजे योगमाया होय. वसुदेवानें तिला मथुरेंत आणिल्यावर देवकी प्रसूत झाल्याचा सर्वत्र पुकारा झाला. त्याबरोबर कंस मोठ्या ईर्ष्येनें धांवत तेथें आला. देवकीनें त्याला एवढें तरी मूल मला राहूं दे, अशी विनंति केली. परंतु तें न ऐकतां कंस त्या मुलीला उचलून शिळेवर आपटणार, तोंच ती त्याच्या हातांतून निसटली. तिनें आकाशांत आपलें रूप प्रगट केलें. त्याच वेळीं तिनें कंसास; तुझा वैरी जन्मला असून सुखानें वाढत आहे, असें सांगितलें. त्याबरोबर कंसाच्या मनाला धक्का बसला. त्यानें प्रलंबादि असुरांना बलवान् बालकांचा वध करण्याची आज्ञा दिली. कंसास देवकीचीं मुलें मारल्याबद्दल अत्यंत खेद व पश्चात्ताप झाला.

त्यानें देवकीची याबद्दल खेद प्रदर्शित करून क्षमा मागितली ( ह. वं. २.४ ).

कंसानें ताबडतोब वसुदेवदेवकींची सुटका केली. परंतु कंसाचा क्षणक्षणा बदलणारा स्वभाव त्यांना ठाऊक होता. त्याप्रमाणें पुनः कंसास त्यांचा संशय येऊन त्यानें त्यांना कारागृहांत ठेविलें.

मथुरेंतील लोकांनीं उग्रसेनास कैद करून कंसानें राज्य बळकाविलें म्हणून व त्याच्या दुष्ट राज्यकारभाराबद्दल तीव्र नापसंती दर्शविण्यासाठीं म्हणून कंसाविरुद्ध एक कट केला. त्यांनीं कृष्णाला गोकुळांत पोहोंचविलें; व त्याच रात्रीं जन्मलेल्या नंदाच्या मुलीला देवकीपाशीं आणून ठेविलें. वसुदेवाच्या दुसऱ्या बायकोचें नांव रोहिणी होतें. तिला बलराम या नांवाचा कृष्णापेक्षां वडील मुलगा होता. तो गोकुळांतच होता. कृष्ण वसुदेवाचाच मुलगा असावा, अशी कंसास शंका आली. पण उघडपणें तसें त्यास म्हणतां येईना. त्यानें कृष्णास मारण्याचे पुष्कळ प्रयत्न केले; पण ते सर्व फसले ( दे. भा. ४. २३).

पुत्रप्राप्तीमुळें आनंदित झालेला नंद एकदां मथुरेला कर भरण्यासाठीं गेला असतां वसुदेवाची व त्याची भेट झाली. त्या वेळीं वसुदेवानें मुलांची काळजी घेण्याबद्दल त्यास बजाविलें होतें. कारण, पुढें कांहीतरी संकटें येतील असें त्यास वाटत होतें (ब्रह्म. १८४.१-६; विष्णु. ५.५; भा. १०.५.१९-३२). हरिवंशांत नंद, यशोदा व कृष्ण हीं तिघेंहि मथुरेस आलीं होतीं, त्या वेळीं त्यांना तेथें न राहण्याची त्यानें सूचना दिली. त्याप्रमाणें तीं गोवर्धन पर्वताच्या पायथ्याजवळ जाऊन राहिलीं, असें सांगितलें आहे. वसुदेव गोकुळांत गेला व रोहिणीपुत्र बलरामास त्यानें यशोदेजवळ ठेविलें. कृष्णजन्माप्रीत्यर्थ नंदानें महोत्सव केले, त्या वेळीं गोपींनीं यशोदेला अनेक जिन्नस अर्पण केले. नंदाचा कुलोपाध्याय गर्गमुनि यानें कृष्ण व बलराम यांचें जातक गुप्तपणें केलें; आणि यांचीं नांवें ठेविलीं ( ब्रह्म. १८४; विष्णु. ५. ६; पद्म. उ. २४५. ६९-७४; भा. १०. ८. १-२० ). या वेळीं गर्गमुनीनें कृष्णाच्या भावी कृत्यांसंबंधीं व याच्या पांडवसाहाय्यासंबंधीं भविष्य सांगितलें होतें ( ब्रह्मवै. ४. १३. १२८ ). ह्या जन्मोत्सवाची बातमी कंसास आपल्या हेरांकडून समजली, आणि नारदानें त्यास नंदासंबंधीं हकीगत सांगितली ( दे. भा. ४. २४.१-५). पण कंसानें कृष्णनाशासाठीं केलेले प्रयत्न योगमायेमुळें फसले. प्रथम कंसानें पूतनेस पाठविलें. तिनें सुंदर रूप धारण केलें व ती गोकुळास गेली. यशोदेनें कृष्णास तिजजवळ दिलें असतां तिनें कृष्णास स्तनपान करविलें. त्यांत कृष्णानें तिचें प्राणहरण केलें. प्राणोत्क्रमणानंतर तिचें राक्षसी शरीर पाहून नंदयशोदादिक घाबरलीं व त्यांनीं कृष्णरक्षणार्थ कांहीं संस्कार केले ( दे. भा. ४. २३; अग्नि. १२. १४-२२ ). पूतना ही कंसाची दाई असून चिमणी ( शकुनि ) पक्ष्याप्रमाणें दिसत होती. ब्रह्मवैवर्त पुराणांत ( ४.१०. ९ ) ही कंसाची बहीण असें असून ब्राह्मणस्त्रीच्या वेषानें ती मथुरेहून आली, असें दिलें आहे. ती पूर्वजन्मीं बलीची मुलगी असून वामनाबद्दल तिच्या मनांत पुत्रभाव होता (ब्रह्म. १८४. ७-२१; भा. १०. ६; विष्णु. ५. ५ ). पद्मपुराणांत कंसानें तिला पाठविलें, असें नाहीं. तिनें आपल्या स्तनांत विष भरलें होतें ( पद्म. उ. २४५ ). पुढें कंसानें तृणावर्तास पाठविलें. त्यास कृष्णानें दगडावर आपटून मारिलें ( भा. १० ७. ३४-३७). या वेळीं कृष्णमुखांत यशोदेला विश्वदर्शन झालें ( भा. १०. ८. १-२० ). एकदां कृष्णावर माती खाल्ल्याचा आरोप आला, तेव्हांहि यशोदेला विश्वरूपदर्शन झालें. कुबेराचे दोन पुत्र नलकूबर व मणिग्रीव नारदाच्या शापानें वृक्ष झाले होते. त्यांचा कृष्णाच्या हातून उद्धार झाला ( भा. १०, ९-१० ). कृष्णानें वत्सासुर (भा. १०. ११.४६-५३; पद्म. उ. २४५; ब्रह्मवै. ४. १६. १-१३), बकासुर (भा. १०. ११) व अघासुर यांचा वध केला. ब्रह्मदेवानें गाई, वत्स व गोपाळ एक वर्षपर्यंत अदृश्य केलीं व कृष्णाच्या सामर्थ्याची परीक्षा केली ( भा. १०.१२; पद्म. उ. २४५; ब्रह्मवै. ४. २० ). कालिय नागामुळें यमुनेचें पाणी विषयुक्त झालें. तेव्हां कृष्णानें त्याचें मर्दन करून त्यास तेथून हांकून दिलें ( कालिय पहा ). धेनुकासुर, प्रलंबासुर यांचा कृष्णानें वध केला. त्याचप्रमाणें अरिष्ट, व्योम व केशि यांचाहि वध केला.

गोकुळांत दरवर्षी इंद्रोत्सव होत असे. परंतु इंद्राचा गर्व परिहार करण्यासाठीं कृष्णानें पर्वत व गाई यांचा उत्सव करण्याचें ठरविलें. यामुळें इंद्रास राग येऊन त्यानें अतिवृष्टि केली. कृष्णानें गोवर्धनोद्धार करून गोपांचा बचाव केला. तेव्हां इंद्र कृष्णाकडे आला. त्यानें कृष्णास अर्जुन हा आपला अंश आहे, असें सांगून त्यास साहाय्य करण्याची विनंति केली ( भा. १०. २४-२७; विष्णु. ५. १०-१२; ब्रह्मवै. ४.२१ ). विद्याधराचा सर्पयोनींतून उद्धार केला. एकदां नंद यमुनेंत बुडाला असतां त्याचें संरक्षण केलें. कृष्णाचें बालचरित्रच कांहीं पुराणांत आहे. सर्व ठिकाणीं पूतनावधापासून कृष्णाच्या बाललीलांना सुरुवात होते व केशिवधापाशीं प्रायः बाललीला संपतात. पूतनावध, धेनुकासुरवध, प्रलंबासुरवध, इंद्रगर्वहरण, रासक्रीडा, कालियामर्दन, दावाग्निभक्षण, अघासुरवध, गोवर्धनोद्धार व कंसवध इत्यादि गोष्टी सर्व ठिकाणीं सारख्याच आहेत ( भा. १०; विष्णु. ५; ब्रह्मवै. ४; ह. वं. २; ग. सं.; ब्रह्म. १८०-२१२; पद्म. उ. २४५ ). परंतु त्यांचा क्रम सारखा नाहीं व कथांचा संक्षेपविस्तार बराच केलेला दिसतो. विशेषतः विष्णुपुराणांत बालचरित्रांतील

बऱ्याच गोष्टी नाहींत. कंसवधाच्या पुढील हकीगत विष्णु, हरिवंश, गर्गसंहिता व ब्रह्मपुराण यांतच फक्त थोडक्यांत दिलेली आहे. आणि पांडवांशीं आलेला संबंध फक्त गर्गसंहितेंतच स्पष्ट सांगितला आहे. विशेषतः भागवत, ब्रह्मवैवर्त, हरिवंश व गर्गसंहिता यांतील चरित्र बाललीलांचें वर्णन करण्याकरितांच आहे.

कृष्णाचा राधेशीं ब्रह्मदेवानें विवाह करविला होता (ब्रह्मवै. ४. १५; राधा पहा). कृष्णानें आपल्या अलौकिक सामर्थ्यानें आतांपर्यंतचीं धाडसाचीं कामें केलीं, तीं कंसास समजलीं. शिवाय, नारदानें कंसास कृष्णजन्माची कथा सांगून गोपगोपींमध्यें वाढत असलेल्या कृष्णाची दिनचर्याहि सांगितली. तेव्हां कंसानें आपला दानपति जो अक्रूर याला बलराम व कृष्ण यांना धनुर्यागासाठीं निमंत्रण देण्यासाठीं पाठविलें. त्या वेळीं कंसानें ते दोघे विष्णूचे अंशभूत असून त्यांचा नाश झाल्याखेरीज मला स्वास्थ्य मिळणार नाहीं, असें अक्रूरास सांगितलें (भा. १०. ३८.४०; ब्रह्म. १९०. १–२१; विष्णु. ५.१५; पद्म. उ. २४५; ब्रह्मवै. ४. ६३–६५; दे. भा. ४. २४. १–९). वाटेंत अक्रूरास विश्वरूपाचें दर्शन झालें (भा. १०. ३८). अक्रूर गोकुळांत पोहोंचल्यावर कृष्णानें त्याचा सत्कार करून त्यास नंदाकडे नेलें. नंतर अक्रूरानें कंसाचा निरोप त्यास कळविला. दुसरे दिवशीं अक्रूर बलराम व कृष्ण यांसह रथांत बसून गेला. मथुरेंत पोहोंचल्यावर अक्रूरानें यांच्या इच्छेप्रमाणें यांस मथुरेंत सोडिलें. गोकुळांतून निघतांना पुनः कृष्ण भेटणार नाहीं, असें गोपींना वाटलें (ब्रह्म. १९१; विष्णु. ५. १८; पद्म. उ. २४५). त्यांनीं अक्रूराचा रथ मोडला (ब्रह्मवै. ४. ७०). अक्रूरानें कृष्ण व बलराम यांना मथुरेंतील आपल्या घरीं नेलें. त्यानें यांस आपल्या आईबापांस भेटूं नका कारण, त्यामुळें कंसास राग येईल असें सांगितलें. परंतु कृष्णानें कोणासहि न कळवितां तें कार्य करण्याचें ठरविलें. बलराम व कृष्ण मथुरेचें निरीक्षण करीत असतां एका रजकानें कपडे दिले नाहींत म्हणून यांनीं त्यास मारिलें (भा. १०. ४१). एका फूलवाल्यानें यांना पुष्पहार अर्पण केले व यांचे आशीर्वाद घेतले. कुब्जेनें चंदनाचें उटणें कृष्णास दिलें म्हणून तिचा देह यानें सरळ केला. नंतर हे शस्त्रागारांत गेले व तेथील एका भव्य धनुष्याचा कृष्णानें भंग केला. कंसानें यांचीं हीं कृत्यें पाहून चाणूर आणि मुष्टिक या बलवान् मल्लांना यांच्याशीं मल्लयुद्ध करण्यास सांगितलें. त्याच वेळेस त्यानें एक कुवलयापीड नांवाचा मस्त हत्ती प्रवेशद्वाराजवळ ठेविला होता. हेतु हा कीं, त्या मस्त हत्तीनें यांचा फडशा पाडावा. दुसरे दिवशीं ठरल्याप्रमाणें मल्लयुद्धासाठीं तयार केलेल्या मंडपाच्या प्रवेशद्वाराशीं कृष्ण येतांच तो हत्ती धांवून आला. परंतु कृष्णानें न डगमगतां त्याचा प्रतिकार केला आणि त्यास ठार केलें. नंतर कृष्णानें चाणुराशीं मल्लयुद्ध केलें, त्यांत चाणुराचा वध झाला. पुढें तोषलकाशींहि मल्लयुद्ध केलें व त्यासहि मारिलें. हें पाहून इतर सर्व पळून गेले. यामुळें आपले सर्व बेत फिसकटलेले पाहून कंसाचें मस्तक भणाणलें. इतक्यांत कृष्ण धांवत त्याच्या अंगावर गेला. यानें त्याला सिंहासनावरून ओढून ठार केलें. या प्रसंगीं कंसाच्या रक्षणाकरितां सुनाम तेथें आला; पण त्याचाहि कृष्णानें वध केला. कंसाचा वध यमुनातीरीं विश्रांतितीर्थीं झाला असें पद्मपुराणांत आहे (पद्म. उ. २१३). नंतर बलराम व कृष्ण यांनीं वसुदेव व देवकी यांची भेट घेतली. व कृष्णानें उग्रसेनास राज्य देऊन मथुरेंत शांतता प्रस्थापित केली (ब्रह्म. १९३-१९४; विष्णु.५.१९; पद्म. उ. २४५; ब्रह्मवै. ४.५४; भा. १०. ४१).

यानंतर नंदादि गोपालांना मथुरेंत आणून कृष्णानें त्यांचा योग्य सत्कार करून पुनः गोकुळास पाठविलें. यशोदेचें सांत्वन करण्यासाठीं कृष्णानें उद्धवास गोकुळीं पाठविलें होतें. नंतर बलराम व कृष्ण यांचें उपनयन झालें; त्यानंतर हे अवंतीमधील सांदीपनी नामक ऋषीकडे अध्ययनासाठीं गेले. तेथें हे धनुर्वेद व वेद शिकले. यांची बुद्धि तीव्र असून दिलेला पाठ तेव्हांच मुखोद्गत होत असे (भा. १०.४५.). हा गुरुगृहीं ६४ दिवस होता (ब्रह्म १९४.२१; ह. वं. २.३३; भा. १०. ४५; विष्णु. ५. २१;). परंतु ब्रह्मवैवर्त पुराणांत (४.१०२.२५) हा एक महिना होता, असें दिलें आहे. गर्गमुनीनें याला गायत्रीमंत्राचा उपदेश केला (भा. १०.४५). सांदीपनीनें याला गायत्रीमंत्राचा उपदेश केला (दे. भा. ४. २४.१५). याच्या उपनयप्रसंगीं देव, नंद, यशोदा आणि विधवा कुंती हीं उपस्थित होतीं (ब्रह्मवै. ४. १०१). कृष्ण गुरुगृहांतून परत आला, त्या वेळीं बारा वर्षांचा होता (दे. भा. ४. २४). यानें गुरुदक्षिणा म्हणून सांदीपनीचा मृतपुत्र दत्त त्यास परत आणून दिला (पद्म. उ. २४६; ब्रह्म. १९४. ३१). त्या वेळीं पंचजनाचा वध केला. याच वेळीं पांचजन्य शंख कृष्णास प्राप्त झाला (भा. ३. २; म. भी. २५. १५ कुं.). कंसाचा वध झाला, हें समजतांच कंसाचा सासरा मगध देशाचा राजा जरासंध हा मथुरेवर चालून आला. काश्मीरचा राजा पहिला गोनंद हा या वेळीं त्याला साहाय्य करीत होता (ह. वं. २. ३५. ३९). आणखीहि पुष्कळ राजे होते. जरासंधाचा कृष्णानें सतरा वेळा पराभव केला. जरासंधानें बोलाविल्यावरून कालयवनानें मथुरेला वेढा दिला असतां हा पळून मुचकुंद निजला होता तिकडे गेला व मुचकुंदाच्या हातून कालयवनाचा नाश झाला. परंतु

जरासंधाच्या भयानें कृष्णानें विश्वकर्म्याकडून मथुरेंतील सर्वस्व द्वारकेंत नेलें. हें जरासंधास समजतांच तो द्वारकेस आला. तेव्हां कृष्ण सबलसह प्रवर्षण गिरीवर पळून गेला. जरासंधानें त्या पर्वतास आग लाविली व तो परत निघून गेला. तेव्हां कृष्ण पुनः द्वारकेंत आला ( भा. १०. ५३–५४). द्वारकेजवळ गोमंत पर्वतावर गेला ( म. स. १४.४५-५२ ). पण हा गोमंतपर्वत दक्षिणेंत कारवारपाशीं असावा (ह. वं. २.४२ ). पण हा सध्याचा गोमांतक प्रांत नाहीं ( म. सा. ७. १९३० काणे ) यानें शिशुपालाचा पराभव करून भीष्मक राजाची कन्या रुक्मिणी हिचें हरण केलें. स्यमंतक मण्याच्या प्रसंगानें जांबवती व सत्यभामा यांच्याशीं याचा विवाह झाला. याच प्रसंगीं सत्राजिताला मारणाऱ्या शतधन्व्याचा यानें वध केला. कांहीं काळानंतर कृष्ण कांहीं यादवांसह पांडवांना भेटण्यास इंद्रप्रस्थास गला. तेव्हां पांडवांनीं यास चातुर्मास संपेपर्यंत राहवून घेतलें. त्या कालांत कालिंदीशीं याचा विवाह झाला. पुढें द्वारकेस गेल्यावर मित्रविंदा, सत्या, भद्रा व लक्ष्मणा यांच्याशीं यानें स्वपराक्रमानें त्यांना हरण करून विवाह केला ( भा. १०. ५८ ). या अष्टनायिकेंत सुलक्षणा, नामजित्ती व सुशीला या होत्या ( पद्म. उ. २४८-२४९ ). सुमित्रा, शैब्या, सुभीमा, माद्री, कौसल्या, विजया ( पद्म. सृ. १३ ), अनुविंदा व सुनंदा अशीं निराळीं नांवेंहि आढळतात ( पद्म.पा. ७०). कृष्णानें नरकासुराचा वध करून त्याच्या बंदींत असलेल्या सोळा हजार स्त्रियांशीं विवाह केले ( भा. १०. ५९. ३३; विष्णु. ५. २९ ). नरकासुरास मारून येतांना कृष्णानें इंद्राचा पारिजातक वृक्ष तोडून आणिला. तेव्हां इंद्रास राग येऊन त्यानें कृष्णांशीं युद्ध केलें. पण त्याचें कांहीं चालेना. तेव्हां कृष्णानें त्यास सांगितलें कीं, मी असेपर्यंत पृथ्वीवर हा असूं दे. मी निजधामास गेल्यावर परत ने ( पद्म.उ. २४८-२४९ ). यास एका वेळीं अनेक भिन्नरूपें धारण करण्याचें सामर्थ्य होतें ( भा. १०. ५९ ). कृष्णास एकंदर ८०००० पुत्र होते ( पद्म. सृ १३ ). पुत्रांचीं नांवें त्यांच्या त्यांच्या आईचे नांवावर पहा.

यशोदेची मुलगी एकानंगा हिची मथुरेंत रामकृष्णांशीं भेट झाली. हिच्याकरितांच कृष्णानें कंसाचा वध केला, असें तेथें म्हटलें आहे ( म. स. ५९. ९ कुं. ). तसेंच बाणासुराचे हजार हातहि यानेंच तोडले ( ब्रह्मांड. ३. ७३. ९९–१०२; वायु. २. ३६. ९८–१०१ ). याचे घोडे शैब्य, सुग्रीव, मेघपुष्प व बलाहक या नांवाचे होते ( म. आश्व. ११८. ५३ कुं. ). पांडवांना महत्त्व यावें, अशी याची इच्छा होती म्हणून यानें द्रौपदीस्वयंवरांत मत्स्यवेध करण्याचा प्रयत्न केला नाहीं ( म. आ. २०६. २० कुं. ).

कृष्णचरित्रांतील अत्यंत महत्त्वाचा भाग पुराणांत नसलेला, भाग महाभारतांत आहे. यानें पांडवांना अप्रतिम साहाय्य करून कौरवादिकांचा निःपात केला, हीच महत्त्वाची गोष्ट त्यांत घडलेली आहे. द्रौपदीस्वयंवराचे वेळीं हा उपस्थित होता. यानें द्रौपदीच्या लग्नाचे वेळीं वस्त्राभरणें व भूषणें पाठविलीं, त्यांचा पांडवांनीं स्वीकार केला. येथूनच कृष्णाचा पांडवांशीं विशेष संबंध सुरू झाला. पांडवांबरोबर हा हस्तिनापुरीं परत आला. पुढें इंद्रप्रस्थ नगर वसविल्यावर हा व बलराम द्वारकेस गेले ( म. आ. २०७ ). सुभद्रेच्या विवाहानंतर हा पांडवांकडे येऊन राहिला होता. पुढें खांडववन अग्नीला देऊन हा द्वारकेस परत गेला ( म. स. २ ). जरासंधानें वीस हजार राजे यज्ञांत बली देण्यासाठीं बंदींत ठेविले होते. त्यांनीं दूताबरोबर कृष्णास गुप्तरीतीनें निरोप पाठविला कीं, आपण सत्वर आलांत तरच आमचे प्राण वांचतील. तेव्हां यादवसभेंत कृष्ण यासंबंधीं विचार करीत बसला. इतक्यांत युधिष्ठिरानें दूत पाठवून राजसूययज्ञ करण्याचा हेतु प्रदर्शित करून कृष्णास पाचारण केलें. तेव्हां कृष्णास कोणीकडे जावें याबद्दल विचार पडला. तेव्हां उद्धवानें सांगितलें कीं, अगोदर युधिष्ठिरास भेटावें व नंतर जरासंधाकडे जावें. नंतर कृष्ण त्या दोन्ही दूतांस घेऊन इंद्रप्रस्थास गेला. व ' पुढें जरासंधास मारून तुमची सुटका करवितों ' असा निरोप त्या राजांना पाठविला. कृष्ण आलेला पाहून पांडवांस अत्यानंद झाला ( भा. १०. ७१; म. स. १३ ). राजसूययज्ञ करावयास पांडवांनाहि जरासंधासारखा प्रबळ प्रतिस्पर्धी मारणें अत्यावश्यकच होतें. पुढें कृष्णापाशीं युधिष्ठिरानें राजसूययज्ञ करण्याची इच्छा प्रदर्शित केली. तेव्हां कृष्ण अर्जुन व भीम यांसह जरासंधाकडे गेला. तेथें भीमाकडून जरासंधाचा वध करविला व त्याच्या मुलास गादीवर बसविलें (म.स. १३–२५). वासुदेव नांव धारण करून कृष्णाशीं स्पर्धा करणाऱ्या करुषाधिपति पौंड्रक व करवीराधिपति शृगाल यांचा वध यानें केला ( पौंड्रक व शृगाल पहा ). कृष्णानें युधिष्ठिराच्या राजसूययज्ञांत ब्राह्मणांचें पादप्रक्षालन केलें. सहदेवानें कृष्णाची भीष्माच्या अनुमतीनें अग्रपूजा केली. त्यामुळें शिशुपाल अत्यंत रागावला. त्याचे शंभर अपराध भरतांच कृष्णानें सुदर्शनचक्रानें त्याचा वध केला ( पद्म. उ. २५२ ). यज्ञसमाप्तीनंतर हा द्वारकेस गेला. पुढें यानें शाल्वाचा वध केला ( म. व. १४–२२. ) दंतवक्र व विदूरथ यांचा यानें वध केला ( भा. १०. ७८ ). पांडव वनवासांत असतां त्यांच्या समाचारासाठीं कृष्ण त्यांजकडे गेला व मी असतों, तर द्यूतक्रीडा होऊं दिली नसती, असें म्हणाला. तेथें कांहीं दिवस राहून अभिमन्यु व सुभद्रा यांना घेऊन द्वारकेस गेला ( म. व. १२–२२ ). पांडव काम्यकवनांत असतां सत्यभामेसह कृष्ण त्यांजकडे गेला।

होता. तेथें कांहीं दिवस राहून पुनः द्वारकेस परत गेला (म. व. १८५-२३६). दुर्योधनाच्या सांगण्यावरून दुर्वास पांडवांकडे गेला होता. तेव्हां कृष्णानें द्रौपदीस मोठी मदत करून दुर्वास ऋषीस संतुष्ट केलें (म. व. २६२-२६३). कृष्ण अभिमन्यूचे लग्नास उपप्लव्यास गेला असतां तेथें जमलेल्या राजेलोकांत पांडवांच्या हिश्शासंबंधीं यानें प्रश्न काढला. आणि दुर्योधनाचा नकार दिसतांच तिकडे जाण्याचें ठरविलें (म. वि. ७८; उ. ५). अर्जुन व दुर्योधन कृष्णाकडे युद्धासाठीं मदत मागण्यास गेलें असतां दुर्योधनास कृष्णानें त्याच्या मागणीप्रमाणें यादवसैन्य दिलें व अर्जुनाकडे स्वतः गेला. कृष्णानें युद्धांत प्रत्यक्ष भाग न घेण्याची प्रतिज्ञा केली होती. तरीहि अर्जुनानें यासच मागून घेतलें (म. उ. ७). अशा तऱ्हेनें कौरवपांडव आपापली सिद्धता करीत असतां युधिष्ठिरानें कृष्णास धृतराष्ट्राकडे शिष्टाई करण्यास पाठविलें. परंतु त्याचा कांहींहि उपयोग झाला नाहीं. धृतराष्ट्रानें कृष्ण येणार म्हणून हस्तिनापुरापासून वृकस्थलापर्यंतचा मार्ग सुशोभित केला होता (म. उ. ७२-९५). दुर्योधनानें कृष्णास भोजनास बोलाविलें, पण हा गेला नाहीं (म. उ. ९१). कृष्णाच्या तेथील भाषणामुळें कौरवांचीं दुष्कृत्यें उघडीं पडून पांडवांचें म्हणणें किती न्याय्य आहे, हें सर्व सभासदांस पूर्ण पटलें. भीष्मद्रोणादिकांनीं कृष्णासच पाठिंबा दिला. सभेंतील ऋषि, सद्‌गृहस्थ यांनाहि याचेंच म्हणणें सयुक्तिक वाटलें. कृष्णानें धृतराष्ट्रास निरनिराळ्या उद्‌बोधक कथा सांगून साम करण्यास सांगितलें. भीष्म, द्रोण, गांधारी, धृतराष्ट्र, कण्व व नारद यांनीं दुर्योधनास नानापरीनें सांगून पाहिलें. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. कृष्णानें त्यास तूं लवकर नाश पावशील असें सांगितलें. तेव्हां सभा बिथरलेली पाहून दुर्योधनास दुःशासनानें बाहेर जाण्याची खूण केली. दुर्योधन जाऊं लागला असतां पुनः भीष्मानें त्यास क्षत्रियकुलांचा विनाशकाल आला असल्याचें सांगितलें. दुर्योधनानें कृष्णास कैद करण्याचा विचार केला. हें सात्यकीस कळतांच त्यानें तें सभेंत सांगितलें. तेव्हां कृष्ण म्हणाला कीं, मीच त्यांना बांधून पांडवांकडे नेतों. म्हणून धृतराष्ट्रानें विदुराकडून दुर्योधनास सभेंत बोलाविलें व त्याची खूप निर्भर्त्सना केली. नंतर कृष्णानें आपलें खरें स्वरूप दाखविलें. धृतराष्ट्रानें दुर्योधन ऐकत नाहीं, असें सांगतांच कृष्ण निघाला (म. उ. १२४-१३१).

कृष्णास पोहोंचविण्यास भीष्मादिक आले होते. त्यांत कर्णहि होता. कृष्णानें त्याचें जन्मवृत्त सांगून पांडवांस मदत करण्यास त्यास सांगितलें. तें त्यानें कबूल केलें नाहीं. तेव्हां कृष्ण उपप्लव्यास गेला व पांडवांस युद्धाची सिद्धता करण्यास सांगून कुरुक्षेत्रास आला (म. उ. १४०-१५०).

भारतीय युद्धांत कृष्णानें धृष्टद्युम्न आणि सात्यकि यांच्या साहाय्यानें पांडवांच्या सैन्याचा तळ बसविला (म. उ. १५२. ५-९कुं.). कौरवपांडवांचीं सैन्यें एकमेकांसमोर युद्धासाठीं सज्ज झालीं असतां, त्यांत जवळजवळचे आप्त एकमेकांविरुद्ध युद्ध करण्यास तयार झालेले दिसत होते. कृष्णानें अर्जुनाचें सारथ्य पत्करिलें. होतें, यानें अर्जुनाच्या सांगण्याप्रमाणें त्याचा रथ दोन्ही सैन्याच्या मध्यभागीं आणून उभा केला. अर्जुनानें ती परिस्थिति अवलोकन करून युद्ध करण्याचा विचार सोडून दिला. तेव्हां कृष्णानें त्यास अत्यंत बहुमोल उपदेश करून त्याच्याकडून भारतीय युद्ध करविलें. हा बहुमोल उपदेश भगवद्‌गीता होय (म. भी. २५-४२). भगवद्‌गीता सांगितली तो दिवस श्री. ज. स. करंदीकर हे मार्गशीर्ष शुद्ध एकादशी मानितात. श्री. चिंतामणराव वैद्य यांनीं मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी मानिली आहे. महाभारत-टीकाकार नीलकंठानें मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी मान्य केली आहे. भारतसावित्रींतहि त्रयोदशीच लिहिली आहे व नक्षत्र यमदैवत (भरणी) होतें असें म्हटलें आहे. या युद्धांत कृष्णानें सर्व दुष्टांचा संहार करून पांडवांस राज्य दिलें व आपण द्वारकेस गेला. कृष्णानें पांडवांना महत्संकटांतून वांचविलें आहे. पांडवांच्या रथाचे घोड्यांचीसुद्धां सेवा करून ऐनयुद्धांत त्यांना पाणी पाजिलें (म. द्रो. १००). भगदत्ताच्या वैष्णवअस्त्रापासून अर्जुनाचा बचाव केला (म. द्रो. २९). अभिमन्युवध झाला, तेव्हां यानेंच सुभद्रेचें सांत्वन केलें (म. द्रो. ७७). भूरिश्रव्यास मरतांना यानेंच स्वर्गाची माहिती दिली (म. द्रो. १४३). जयद्रथवधाची अर्जुनाची प्रतिज्ञा यानेंच काळोख उत्पन्न करून शेवटास नेली (म. द्रो. १४७). घटोत्कचास पुढें करून कर्णाच्या वासवीशक्तीपासून अर्जुनाचें यानेंच रक्षण केलें (म. द्रो. १७९). द्रोणाचा वध होण्यासाठीं यानेंच धर्माला असत्य भाषण करण्याचा सल्ला दिला (म. द्रो. १९०). गांडीव दुसऱ्यास दे असें म्हटल्यामुळें अर्जुन युधिष्ठिरावर तरवार घेऊन धांवला असतां कृष्णानें त्यास कौशिकाची गोष्ट सांगून त्यापासून परावृत्त केलें (म. क. ६९). कर्णाच्या सर्पयुक्त बाणापासून यानें रथ पांच बोटें जमिनींत रुतवून अर्जुनाचें रक्षण केलें (म. क. ९७. ३० कुं.). कृष्णानें धर्मास शल्यवध करण्यास सांगितलें (म. श. ६. २६-४० कुं.). दुर्योधनाच्या मांडीवर अन्यायानें गदाप्रहार करवून त्याचा वध भीमाकडून कृष्णानें करविला (म. श. ५९. ३-१० कुं.). या वेळीं बलराम तेथें होता, त्यास भीमाच्या अन्यायी वर्तनाचा राग आला. परंतु कृष्णानें त्याचें समाधान केलें (म. श. ६१). या सर्व कृत्यांबद्दल दुर्योधनानें यास फार दोष दिला (म. श. ६२. २७ कुं.).

धर्मानें कृष्णाला गांधारीचें सांत्वन करण्यासाठीं हस्तिनापुरीं पाठविलें ( म. श. ६३ ). कृष्णानें कौरवांचीं अन्याय्य कृत्यें तिला सांगितलीं ( म. स्त्री. २६ ). तरीहि गांधारीनें यास शाप दिला ( म. स्त्री. २५ ). धृतराष्ट्र भीमभेटीस आला असतां यानें त्याची लोहप्रतिमेशीं भेट करविली; व भीमास वांचविलें ( म. स्त्री. ११. १५ कुं. ). युद्धामध्यें आप्तेष्टांचा वध झाल्यामुळें धर्मराजाचें मन फार अस्वस्थ झालें, तेव्हां कृष्णानें वक्तृत्वपूर्ण भाषणानें व निरनिराळ्या कथांच्या द्वारें त्याचें मन शांत केलें. शिवाय, कृष्णानें भीष्माकडूनहि धर्माला अनेक प्रकारचें ज्ञान देवविलें ( म. शां. व अनु. ). अश्वत्थाम्याच्या अस्त्रापासून उत्तरेच्या गर्भाचें यानेंच रक्षण केलें ( उत्तरा पहा; म. सौ. १६. १२ कुं. ).

जांबवतीस पुत्र व्हावा, म्हणून कृष्णानें महादेवास तपानें प्रसन्न करून त्यापासून वर मिळविले (म. अनु. ४५–४६कुं.). यानें सुवर्णतीर्थावर तप करून शंकरापासून अनेक वर मिळविले ( पद्म. स्व. २८ ). यानें पाशुपतदीक्षा घेऊन वाराणसींत तप केलें व एक वर मिळविला. त्या वरानें कृष्ण पूजनीय ठरला ( पद्म. स्व. ३६ ). यानें अर्जुनालाहि शिवाराधना करावयास सांगितली होती ( शिव. शत. ३७ ). हा द्वापारयुगांत आपल्या स्त्रियांसह क्रीडा करीत असतां नारदाच्या सांगण्यावरून जांबवतीपुत्र सांब गेला; तेथें त्या वेळीं कृष्णस्त्रियांनीं मद्यपान केलें असल्यानें त्या त्याच्यावर मोहित झाल्या. तेव्हां कृष्णानें तुम्हांस चोर चोरून नेतील असा त्यांना शाप दिला. परंतु दाल्भ्यानें सांगितलेल्या व्रतानें तुम्ही उद्धराल असा उःशाप दिला. व सांबास तूं कुष्ठरोगी होशील असा शाप दिला ( पद्म. सृ. २३; स्कंद. ७.१. १०१ ).

कृष्णानें अर्जुनास अनुगीता सांगितली ( म. आश्व. १७ कुं. ). उत्तंक ऋषीस यानें विश्वरूप दाखविलें ( म. आश्व. ५८ ). यानें वसुदेवास भारतीय युद्धकथा सांगितली ( म. आश्व. ६० ). धर्मराजाच्या अश्वमेधास हा उपस्थित होता ( म. आश्व. ८७–९ ). कण्व ऋषीची थट्टा केल्यामुळें त्यानें सांबास शाप दिला ( पद्म. उ. २५२ ). याच सांबास मुसळ झालें व त्याच्या योगानें सर्व यादवांचा संहार झाला. यादवांच्या यादवींत सांब, चारुदेष्ण, प्रद्युम्न व अनिरुद्ध मृत झाल्याचें पाहून कृष्णास कोप चढला व गद पडलेला पाहतांच कोप अनिवार होऊन यानें अवशिष्ट राहिलेल्यांचा संहार केला. तेव्हां दारुक व बभ्रु याला म्हणाले, भगवन्, राहिलेल्या बहुतेक सर्व लोकांचा तूं निःपात उडविलास. आतां बलरामाचा शोध करूं. कृष्णानें यादवींत लोकांचा फारसा प्रतिकार केला नाहीं. कारण कालचक्र कसें उलटलें आहे हें हा जाणून होता ( म. मौ. ३ ).

कृष्णाचें मरणसमयीं वय १२५ च्या वर होतें ( भा. ११. ६. २५; ब्रह्मवै. ४. १. ५४ ). १३५ व्या वर्षी निर्याण झालें ( भवि. प्रति. १. ३. ८१ ). श्रीकृष्ण अर्जुनापेक्षां तीन महिन्यांनीं ज्येष्ठ होता. तसेंच हा अर्जुनाचे अगोदर निजधामास गेला. दोघांच्या अंतकालांत पांच वर्षांचें सुमारें अंतर असावें, असें अर्जुनचरित्रावरून वाटतें. अर्जुनाचा अंतकाळ त्याचे १०६ वे वर्षी झाला ( म. आ. १३४ कुं. ). यावरून कृष्णाचें अंतकालीं वय १०१ असावें, असा जो कांहींचा अंदाज आहे तो बरोबर असावा. चि. वि. वैद्य, भारतीय युद्धसमयीं कृष्णाचें वय ८३ व अंतकालीं १०१ किंवा ११९ असावें असें म्हणतात ( महाभारत उपसंहार, पृ. १५७ ).

देवांनीं कृष्णास निजधामास येण्याबद्दल सूचना दिली. हें उद्धवास समजतांच त्यानें आपणांस बरोबर न्यावें अशी कृष्णास विनंति केली. तेव्हां कृष्णानें त्यास अध्यात्मविद्येचा उपदेश केला. पुढें द्वारकेंत दुःश्चिन्हें होऊं लागलीं. यादवांचा आपसांतील कलहानें नाश झाला. तेव्हां बलरामानें समुद्रतीरीं देहविसर्जन केलें. यानंतर कृष्ण अश्वत्थवृक्षाखालीं उजव्या मांडीवर डावा पाय ठेवून त्यास टेंकून बसला व हा मूलरूपाचें चिंतन करीत असतां जरा नामक व्याधानें यास मृग समजून बाण मारिला. तो कृष्णाच्या डाव्या तळपायास लागला. तें पाहून व्याधास वाईट वाटलें व कृष्णाची त्यानें क्षमा मागितली. तेव्हां कृष्णानें त्याचें सांत्वन करून त्यास विमानांत बसवून दिव्यलोकीं पाठविलें. इतक्यांत कृष्णाचा सारथि दारुक तेथें आला. त्यानें कृष्णास वंदन केलें. तोंच याचा रथ नाहींसा झाला. तेव्हां कृष्णानें वेळ भरत आली, असें दारुकास सांगून त्यास द्वारकेंत पाठविलें. कृष्णानें आतांपर्यंत घडलेले सर्व अनिष्ट प्रकार त्यास उग्रसेनादिकांस सांगण्यास सांगून द्वारका समुद्रांत बुडणार असल्यामुळें त्यांस द्वारकेबाहेर नेण्यास सांगितलें. दारुकानें द्वारकेंत हा वृत्तांत सांगतांच तेथें कल्लोळ माजला. वसुदेव, देवकी व रोहिणी यांनीं देहविसर्जन केलें. अष्टनायिकांनीं अग्निप्रवेश केला ( ब्रह्म. २१२. २. ). प्रद्युम्नादिकांच्या स्त्रियांनीहि असेंच केलें. कृष्णाच्या निजधामगमनप्रसंगीं अर्जुन, वसुदेव, उग्रसेन, देवकी, रुक्मिणी, नारद आदिकरून मंडळी उपस्थित होती. ( पद्म. उ. २५२, ब्रह्मवै. १२९ ). इतक्यांत अर्जुन इंद्रप्रस्थाहून आला. तो स्त्रिया व बालकें यांना घेऊन इंद्रप्रस्थास चालला असतां द्वारका समुद्रांत बुडाली ( म. मौ. ५-७; बहुलाश्व व देवकी पहा ).

कृष्ण इतर अवतारांप्रमाणें अंशावतार नसून पूर्णावतार होता (ब्रह्मवै. ४.१. ७. १००; १३. ५६). कृष्ण चतुर्भुज नसून

गास दोन हात होते ( ब्रह्मवै. ४. ४. ६९; ७, ७५; १६. ५३; ह. वं. २. ४ ). अवतार घेण्याचीं कारणें व कथा पुराणांतरीं आहेत.

पाणिनीचे वेळीं वासुदेवाला सन्मान्य समजण्यांत येत होतें. पण क्षत्रिय समजत नव्हते. कारण, सामान्य क्षत्रियवाचक शब्दावरून गोत्रक्षत्रियाख्येभ्यो बहुलं वुञ् ( पा. सू. ४. ३. ९९ ) या सूत्रानें प्रत्यय सांगितला असूनहि वासुदेव हा क्षत्रिय नसल्यामुळें वासुदेवार्जुनाभ्यां वुन् ( पा. सू. ४. ३. ९८ ) यानें पुनः वुन् सांगितला आहे. व प्रतंजलीनें हें स्पष्टीकरण केलें आहे. यावरून चंद्रवंशांतील यादव घराण्याशीं कृष्णाचा संबंध मागाहून जोडला गेला. छांदोग्योपनिषदांतहि घोर आंगिरसानें देवकीपुत्र कृष्णाला ज्ञान सांगितल्याचा उल्लेख आहे. तेहि याच्या पित्याचा उल्लेख नसून मातेचा उल्लेख आहे. भागवतांतलें बालचरित्र, भारतांतल्या कृष्णचरित्राशीं विरुद्ध आहे. कृष्ण अवतारी ठरल्यानंतर याच्याशीं संबद्ध नसणाऱ्या गोष्टींचाहि संबंध कृष्णाशीं जोडल्यामुळें हा घोंटाळा झाला आहे, असें डॉ. भांडारकर व त्यांचेमुळें डॉ. जाकोबी व अली-कर्डाल विंटरनिझ वगैरेंचेहि म्हणणें आहे. पण मातृक नांवें मातेचा व मुलाचा विशेष सन्मान दाखविण्याकरितां वापरीत असत, असें पाणिनीबद्दल पतंजलीनें वापरलेल्या दाक्षीपुत्र वगैरेवरून दिसतें. सौभद्र, द्रौपदेय, पार्थ वगैरे शब्दहि लक्षांत घेण्यासारिखे आहेत. तसेंच बहुपत्नीकत्वाच्या चालीमुळें मातेचा बोध व्हावा म्हणूनहि मातृक नांवें वापरीत. तसेंच वासुदेव व अर्जुन हे नरनारायणाचे अवतार ठरून उपास्यांतहि दाखल झाले होते. त्यामुळें यांचें क्षत्रियत्व लुप्त होऊन त्यापेक्षांहि श्रेष्ठ पदवी यांना प्राप्त झाली होती. म्हणूनच पाणिनीला स्वतंत्र सूत्र करावें लागलें. महाभारतांत दिसणारा नरनारायणाच्या उपासनेचा सांप्रदाय पाणिनिपतंजलीच्या वेळीं चालू होता. व नरनारायणाचें स्थान कृष्णार्जुनांना देण्यांत येत होतें; हेंहि तितकेंच स्पष्ट आहे. कदाचित् ययातीची जरा न स्वीकारल्यामुळें पूरुखेरीज सर्व मुलांचीं घराणीं आक्षिप्त ठरलीं व तो आक्षिप्तपणा पाणिनिपतंजलींच्या वेळेपर्यंत प्रचलित असण्याचा संभव आहे. यदुकुलावरील आक्षेप कृष्णजन्मानें धुवून निघाला व यदुकुल उज्वल झालें. ख्रिस्तपूर्वी चवथ्या शतकांत झालेल्या बौद्धनिदेशांत व ख्रिस्त पूर्वी दोनशें वर्षांच्या सुमारास लिहिलेल्या घोसुंदीच्या शिलालेखांत वासुदेवपूजेचा उल्लेख आहे. महाभारतांतहि तत्त्वज्ञानी व चतुर मुत्सद्दी एवढेंच याचें स्थान नाहीं. राजसूयांत तर इतर सर्व लोक सोडून कृष्णाला अग्रपूजेचा मान देण्यांत आला, यावरून तत्कालीन कृष्णाचा सामाजिक दर्जा केवळ मुत्सद्दीपणाचा नसून याचें विभूतिमत्वहि लोकांना वाटूं लागलें होतें, याचें तें स्पष्ट निदर्शक आहे.

२ ( स्वा. उत्तान. ) हविर्धान राजास हविर्धानी भार्येपासून झालेल्या सहा पुत्रांतील चवथा.

३ अर्जुनाच्या दहा नांवांपैकीं एक.

४ कद्रूपुत्र नागांतील एक.

५ शुक्राचार्यास पीवरीपासून झालेल्या चार पुत्रांतील एक.

६ ( आंध्र. भविष्य. ) भागवत, विष्णु, मत्स्य व ब्रह्मांड यांच्या मतें सिंधुकाचा भ्राता.

**कृष्ण आत्रेय**—यानें प्रथम आयुर्वेद पृथ्वीवर आणला ( म. शां. २१०. २१ ). आत्रेयानेंच अग्निवेश भेड, हारित इत्यादि सहा शिष्यांना आयुर्वेद प्रथम शिकविला, असें चरकसंहितेंत सांगितलें आहे.

**कृष्ण द्वैपायन**—बादरायण व हा एकच ( मत्स्य. १४. १४-१६ ).

**कृष्ण पराशर**—पराशरकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि व त्याचें कुल. याच्या कुलांत कार्ष्णायन, कपिमुख, काकेयस्थ, अंजःपाति आणि पुष्कर हे मुख्य ऋषि होते ( पराशर पहा ).

**कृष्ण हारित**—ऐतरेय आरण्यकांत ( ३.२.६ ) याचा आचार्य म्हणून उल्लेख आहे व यानें आपल्या शिष्याला वाग्देवतेसंबंधीं उपासनेचा एक प्रकार सांगितल्याबद्दल उल्लेख आहे. सांख्यायन आरण्यकांत ( ८.१० ) कृष्णहारित असा पाठ आहे. कृष्णहारित नामक महर्षीनें कालात्मक प्रजा उत्पन्न केली. त्यामुळें याचे अवयव विकल झाले. पण यानें आपलें शरीर छंदांनीं बलसंपन्न केलें. त्यामुळें छंदःसंहिता आहे असा तात्त्विक अर्थ यानें सांगितला ( ऐ. आ. ३.२.१४ ).

**कृष्णदत्त लौहित्य**—श्यामसुजयंत लौहित्याचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३.४२.१; त्रिवेद पहा ).

**कृष्णधृति सात्यकि**—सत्यश्रवसाचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३.४२.१ ).

**कृष्णरात लौहित्य**—श्यामजयंत लौहित्याचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३.४२.१; त्रिवेद पहा ).

**केकय**—याला एकदां अरण्यांत राक्षसानें धरिलें. तेव्हां यानें आपल्या राज्यांत लोक कसे धार्मिक आहेत याचें वर्णन केलें व माझे राज्यांत अशी स्थिति असल्यामुळें मला राक्षसाचें भय वाटत नाहीं असें सांगितलें. तेव्हां राक्षसानेंहि याला सोडून घरीं जाण्याविषयीं सांगितलें ( म. शां. ७७; अश्वपति कैकय पहा ).

२ ( सो. अनु. ) शिबिराजाच्या पांच पुत्रांतील चवथा.

३ भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय व दुर्योधनपक्षीय राजे ( म. उ. १७१; १९५ ).

४ केकय नांवाच्या सूताधिपाला मालवी नांवाच्या स्त्रीपासून कीचकादि पुत्र झाले. याची दुसरी बायको मालवीची दुसरी

बहीणच होती. तिची मुलगी सुदेष्णा. हीच विराटाची भार्या होय ( म. वि. २१.१३ कुं. ).

**केतव**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील वायुमतें शाकपूर्ण रथीतराचा शिष्य ( व्यास पहा ).

**केतु**—( स्वा. ) ऋषभदेव व जयंती यांच्या १०० पुत्रांतील एक. याच्या बापानें जंबुद्वीपाच्या नऊ वर्षांतील अजनाभ वर्षाचे नऊ खंड केले व त्यांपैकीं एक यास दिला.

२ तामसमनूच्या पुत्रांतील एक ( भा. ८. १). हें तपोधन याचें नामांतर असावें.

३ दनु व कश्यप यांचा पुत्र. हाच केतुनामक ग्रह असावा.

४ ऋषींच्या एका संघाचें नांव ( म. शां १९. १६ कुं. ).

५ ब्रह्मदेवानें प्रजा फार वाढते म्हणून एक मृत्यु नांवाची कन्या निर्माण केली. तिला प्रजेचा संहार करण्यास सांगितलें असतां ती रडूं लागली. तेव्हां तिच्या अश्रूंपासून हजारों रोग उत्पन्न झाले. म्हणून तिनें तप केलें. त्या तपामुळें तिला वर मिळाला कीं, तुझ्या निमित्तानें कोणालाच मृत्यु येणार नाहीं. तेव्हां तिनें एक दीर्घ सुस्कारा सोडला. त्यापासून केतु उत्पन्न झाला. त्या केतूला एक शिखा होती. याला केतु अगर धूमकेतु असें म्हणतात ( विष्णुधर्म. १. १०६ ).

६ वाज्यऋषीचा शिष्य. याचा शिष्य कौहळ (वं. ब्रा. १ ).

७ (सो.) हा मत्स्यमतें द्रुह्युपुत्र होय.

**केतु आग्नेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.१५६ ).

**केतुजाति**—पराशरकुलांतील ऋषिगण.

**केतुमत्**—दनुपुत्र दानवांतील एक.

२ ( सो. क्षत्र ) धन्वंतरीचा पुत्र. यास भीमरथ ऊर्फ भीमसेन नांवाचा एक पुत्र होता.

३ हा एकलव्याचा पुत्र होय. निषधदेशाचा राजा. हा दुर्योधनाच्या बाजूनें लढला. भीमानें कलिंगास मारिल्यानंतर यास मारिलें ( म. भी. ५६४ ). मयसभेंत आलेल्या क्षत्रियांतील केतुमान् हाच असावा.

४ ( सू. इ. ) पृथुराजानें नेमलेल्या दिक्पालांपैकीं तिसरा म्हणजे पश्चिमेचा दिक्पाल ( पृथु पहा ).

५ ( सू. नाभाग. ) भागवतमतें अंबरीषाचा पुत्र.

६ प्रतर्दनदेवांतील एक.

७ सुतार नांवाच्या शिवाच्या अवताराचा शिष्य.

८ दारुक नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**केतुमती**—सुमाली राक्षसाची स्त्री. रावणाची मातामही.

**केतुमाल**—( स्वा. ) आग्नीध्र राजाच्या नऊ पुत्रांतील कनिष्ठ. याची स्त्री मेरुकन्या देववीति असून, याचा वर्ष याच्याच नांवानें प्रसिद्ध आहे ( भा. ५. २ ). याच्या आईचें नांव उर्पाचति.

**केतुवर्मन्**—त्रिगर्ताधिपति सूर्यवर्म्याचा भ्राता. यास अर्जुनानें मारिलें ( म. आश्व.७४ ).

**केतुवीर्य**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**केतुशृंग**—त्रिधामन् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**केदार**—एक राजर्षि ( दे. भा. ९. ४२ ).

**केदारेश्वर**—हा एक शिवाचा अवतार आहे. नरनारायणांनीं याला पृथ्वीवर आणिलें. हा त्या भागाचा अधिपति आहे ( शिव. शत. ४२ ). याचें उपलिंग भूतेश होय ( शिव. कोटि. १ ).

**केरल**—कश्यपगोत्री गोत्रकार गण.

**केलि**—ब्रह्मधानाचा पुत्र.

**केवल**—(सू. दिष्ट.) नर राजाचा पुत्र. याचा पुत्र बंधुमत्.

२ स्वायंभुव मन्वंतरांतील अजितदेवांपैकीं एक.

३ व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडाप्रमाणें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य ( व्यास पहा ).

**केवलबर्हि**—( सो. यदु. ) हा भागवतमतें अंधकपुत्र.

**केश**—ब्रह्मदेवाचें पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत असलेला ऋषि ( पद्म. सृ. ३४ ).

**केशलंब**—तप नांवाच्या शिवाच्या अवताराचा शिष्य.

**केशिध्वज**—( सू. निमि. ) कृतध्वज जनकाचा पुत्र. याचा पुत्र भानुमत् जनक ( खांडिक्य पहा ).

**केशिन्**—हा दनु व कश्यप यांचा पुत्र (ह. वं. १.३). यानें प्रजापतीच्या देवसेना व दैत्यसेना नांवाच्या दोन प्रसिद्ध कन्या पळवून नेल्या. त्यांपैकीं दैत्यसेना यास वश झाली. पण देवसेना आक्रोश करूं लागली व ' कोणी तरी सोडवा ' म्हणून ओरडूं लागली. इतक्यांत कोणीतरी देवसेनेचें आधिपत्य स्वीकारील असा सेनापति शोधण्याकरितां निघालेला इंद्र त्या ठिकाणीं मानस पर्वतावर आला व त्यानें या केशी दानवाशीं युद्ध करून देवसेनेस सोडविलें ( म. व. २२५ ). पुढें कांहीं दिवसांनीं यानें चित्रलेखा व ऊर्वशी या अप्सरांस पळवून नेलें तें पुरूरव्यानें ( बुधपुत्रानें ) पाहिलें, म्हणून त्यानें या दानवाशीं युद्ध करून चित्रलेखा व ऊर्वशी यांस सोडविलें ( मत्स्य. २४ ).

२ वसुदेवास कौशल्येपासून झालेला पुत्र.

३ कंसानें श्रीकृष्णास मारण्याकरितां त्यावर केशी नांवाचा दैत्य पाठविला होता. यानें घोड्याचें रूप घेऊन कृष्णावर चाल केली. पण घोड्यानें खाण्याकरितां वासलेल्या तोंडांत हात घालून कृष्णानें यास ठार मारिलें ( भा. १०.३७; म. स. ५३.२९ कुं. ). हा ऋष्यमूकपर्वतावर राहत असे ( गर्ग. सं. १.६ ).

**केशिन् दार्भ्य** किंवा **दाल्भ्य**—एक राजा. उच्चैःश्रवस् कौपयेयाच्या बहिणीचा मुलगा ( जै. उ. ब्रा. ३. २९. १ ). पांचाल हें याचे प्रजाजन होते. म्हणून केशिन् ही त्यांचीच एक शाखा असावी ( क. सं. ३०. २; बौ. श्रौ. २०. २५ ). धार्मिक विधीचे बाबतींत याचें खंडिकाशीं पटत नसे ( मै. सं. १.४.१२; श. ब्रा. ११.८.४.१ ). हा एका सामाचा द्रष्टा आहे ( पं. ब्रा. १३.१०.८ ). दीक्षेचें महत्त्व याला सुवर्णपक्ष्यानें शिकविलें ( सां. ब्रा. ७.४; केशिन् सात्यकामि पहा ). उच्चैःश्रवस् कौपयेय मेला म्हणून केशिन् दार्भ्य त्या दुःखानें अरण्यांत भटकत असतां पुनः उच्चैःश्रवस् याला धूम्ररूपांत भेटला. यानें विचारतां त्यानें मेल्यावर धूमशरीर कसें प्राप्त झालें हें सांगितलें. हा प्रेमानें भेटूं लागला असतां याला तें हातीं लागेना ( जै. उ. ब्रा. ३. २९-३० ).

**केशिन् सात्यकामि**—यानें केशिन् दार्भ्याला सप्तपदा शाक्वरी या मंत्राची विशेष माहिती सांगितली ( तै. सं. २.६. २.३; मै. सं. १.६.५ ).

**केशिनर**—( सू. इ. ) भविष्यमतें सुनक्षत्राचा पुत्र.

**केशिनी**—कश्यप व प्राधा यांच्या कन्यांपैकीं एक अप्सरा ( म. आ. ६६. २० कुं. ).

२ सगराच्या दोन स्त्रियांपैकीं एक ( म.व. १०५.१०कुं. ) हिला शैब्या, भानुमती व सुमति अशीं ठिकठिकाणीं नामांतरें आहेत. सुमति हें हिच्या सवतीस नांव होतें ( भा. ६. ८.१५ ). सगरानें या दोन्ही स्त्रियांसह जाऊन पुत्रांकरितां तप केलें व शंकराजवळून पुत्रप्राप्तीचा वर मिळविला. हिजपासून सगरास असमंजस् पुत्र झाला ( सगर पहा ).

३ ( सो. पूरु. ) सुहोत्राचा पुत्र अजमीढ, याच्या तीन स्त्रियांपैकीं एक. हिला जन्हु, जन व रुपिन् असे तीन पुत्र झाले ( म. १०१.२० कुं. ).

४ विश्रवाऋषीची पत्नी. हिला रावण, कुंभकर्ण व बिभीषण असे तीन पुत्र झाले ( भा. ४. १. ३७; ७. १. ४३ ).

५ दमयंतीचा नलानें त्याग केल्यानंतरची तिची माहेरची दूती. हिला दमयंतीनें चार वेळां बाहुकाकडे पाठवून प्रथम त्याची माहिती, दुसऱ्यानें त्याची बारीक चौकशी, तिसऱ्यानें नलानें शिजविलेल्या मांसापैकीं थोडेंसें मांस इ. आणविलें व चवथ्यानें हिजबरोबर आपल्या दोन्ही अपत्यांस पाठविलें व काय हकीगत घडते ती सविस्तर आणविली.

६ कोणी एक अप्रतिम लावण्यवती राजकन्या. हिनें आपलें स्वयंवर मांडिलें होतें. त्यांत अंगिराऋषीचा पुत्र सुधन्वा व प्रल्हादपुत्र विरोचन हे आले होते. त्यांच्यांत जो श्रेष्ठ असेल त्यास मी वरीन असें केशिनी म्हणाली. तेव्हां श्रेष्ठत्वाबद्दल परस्परांत वाद उपस्थित झाला. प्राणाचा पण लावून निकालाकरितां ते प्रल्हादाकडे गेले. प्रल्हादानें सुधन्व्याचा पक्ष सत्य असें सांगितलें. सुधन्व्यानें उदार अन्तःकरणानें प्रल्हादाचे मागणीवरून विरोचनास सोडून दिलें व या केशिनीनें विरोचनास वरिलें ( म. स. ६८; उ. ३५ ). ही कथा उद्योगपर्वांत, सख्य असतांनाच वादविवाद झाला व सभापर्वांत भांडत असतां झाला व प्रह्लादानें कश्यपास विचारून निकाल दिला, अशा दोन स्वरूपांत आहे. ही कथा विदुरानें धृतराष्ट्रास उद्योगपर्वांत भूमीकरतां असत्य बोलूं नये हें सांगण्याकरितां सांगितली व द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळेस असद्धर्मानें न वागतां कोणीं प्रश्न विचारिला असतां योग्य व खरा तो निकाल द्यावा व "वदतां सत्य कधींहि न धरावी लाज भीड वा भीति" हें स्पष्ट करण्याकरितां सांगितली.

७ कश्यप व खशा यांची कन्या.

**केसरप्राबंधा**—वैतहव्यांनीं हिची एक शेळी मारून शिजविली व त्या पातकांतून ते पार पडले, असा हिच्या संबंधीं निर्देश आहे ( अ. वे. ५. १८. ११ ). भृगूला ठार करून उत्कर्षाच्या शिखराला पोहोंचलेले वैतहव्य संजय नष्ट झाले ( अ. वे. ५. १९.१ ).

**केसरिन्**—एक वानर. अंजनीचा पति ( वा.रा.उ. ६६ ). हा गोकर्णनामक पर्वतावर राहत असे. याला अंजनी व मार्जारास्या अशा दोन बायका होत्या. एकदां शंबसादन नामक एक असुर बलाढ्य होऊन त्यानें कित्येक ऋषीस त्रास दिला. त्यावरून ऋषीच्या आज्ञेनें यानें त्याशीं युद्ध करून त्याचा वध केला. तेव्हां ऋषींनीं संतुष्ट होऊन यास आशीर्वाद दिला कीं, तुला एक सुस्वभावी, भगवद्भक्त आणि बलाढ्य असा पुत्र होईल. त्याप्रमाणें यास मारुति झाला ( वा. रा. सुं. ३५ ).

२ गद्गद वानराचा पुत्र. जांबवानाचा कनिष्ठ भ्राता.

**कैकय**—( अश्वपति कैकय व सुमित्रा पहा ).

२ ( सो. अनु. ) हा भागवत व विष्णु यांच्या मतें शिबिपुत्र होय.

**कैकरसप**—कश्यपकुलांतील एक गोत्रकार ( मत्स्य. १९९ ).

**कैकसी**—सुमाली राक्षसाची कन्या. विश्रवाऋषीची पत्नी. हिला मागणी घातली असतां सुमाली कांहींतरी कारण सांगून मागणी नाकारीत असे. त्याचा परिणाम असा झाला कीं, कोणीहि मागणी घालिनासें झालें. तेव्हां शेवटीं कन्येची यौवनावस्था कमी होत चालली असें पाहून पित्यानें हिला आपणहून विश्रव्याला वरण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें ही वेळेचा विचार न करितां भर तिनीसांजा विश्रव्यापुढें जाऊन उभी राहिली. ऋषीनें हिचें मनोगत ओळखिलें; आणि क्रूर वेळ असल्यामुळें हिला पहिलीं तीन वाईट व हिच्या इच्छेप्रमाणें चवथें चांगलें अशीं मुलें झालीं. त्यांचीं नांवें अनुक्रमें

रावण, कुंभकर्ण, शूर्पणखा व बिभीषण होत ( वा. रा. उ. ९; स्कंद. ३.१.४७ ).

**कैकेयी**—ही केकय देशांतील अश्वपति राजाची कन्या व दशरथ राजाची सर्वांत धाकटी पण अत्यंत आवडती पत्नी. हिचा पुत्र भरत होय. भरताकरितांच हिनें रामाला वनवासाला पाठविलें व त्यामुळें दशरथाला मृत्यु आला.

दशरथ देवदानवांचे युद्धांत देवांना साहाय्य करण्यास गेला असतां त्याच्या रथाचा आंस मोडला. त्या वेळीं कैकेयीनें आपला हात तेथें घालून राजास वांचविलें. म्हणून राजानें हिला दोन वर देऊं केले होते ( ब्रह्म. १२३ ). यावरून ही प्रत्यक्ष युद्धांत असावी ( कलहा पहा ). रामाला यौवराज्याभिषेक होण्याचे दिवस जवळ आले व गांव शृंगारूं लागले, तेव्हां मंथरेला अभिषेकाची बातमी कळली व तिनें ती कैकेयीला सांगितली. दशरथ सारखा कैकयीच्या महालांत पडून असूनहि त्यानें हिला ही बातमी लागूं दिली नव्हती. मंथरेनें बातमी दिल्यानंतर राजानें कैकेयीला अभिषेकाची बातमी कळविली. रामाच्या यौवराज्याभिषेकाची बातमी ऐकून हिनें आनंदच प्रदर्शित केला आहे. एवढेंच नव्हे, तर भरत आणि राम मला सारखेच असें सांगितलें. व ती बातमी सांगणाऱ्या मंथरेला बक्षिस देऊं केलें. मंथरेनें हिच्या मनांत विष पेरलें. रडण्याच्या वेळीं हंसतेस काय? असें ती हिला म्हणाली ( वा. रा. अयो. ८.३ ). तिनें रामाच्या ऐश्वर्याचें व भरताच्या हीनतेचें चित्र कैकेयीच्या पुढें उभें केल्याबरोबर सामान्य स्त्रीस्वभावाला अनुसरून हिचें चित्त मत्सरानें भडकूं लागलें. देवासुरयुद्धाच्या वेळच्या राहिलेल्या वरांच्या मागणीची कल्पनाहि मंथरेचीच. मंथरेच्या सल्ल्याप्रमाणें कैकेयीनें दशरथापाशीं पूर्वीच्या दोन वरांचें स्मरण देऊन रामाचा वनवास व भरताला राज्य मागितलें. त्याप्रमाणें राजानें हिला दोनहि वर दिले. वास्तविक रीत्या कैकेयीच्या बापानें ही व्यवस्था पूर्वीच करून ठेविली होती. म्हाताऱ्या नवऱ्याला मुलगी देतांना हिच्या मुलास राज्य मिळावें अशी त्याची अट होती व तिला दशरथानें संमति दिली होती. पण ह्या गोष्टीचा कैकेयीला पत्ताहि नव्हता.

भरतानें ह्या खटाटोपाबद्दल हिची निर्भर्त्सना केल्यावर हिचा सर्वच व्यूह ढांसळला. भरतानें हिचें वर्णन क्रुद्ध, अविचारी, गर्विष्ठ, स्वतःला भाग्यवती मानणारी, ऐश्वर्यलुब्ध, दुर्जन असून सज्जनासारखी दिसत असलेली, दुष्ट आणि पापबुद्धि असें केलें आहे ( वा. रा. अयो. ९२.१६ ). पुढें रामाला आणण्याकरितां भरतानें सपरिवार वनांत जाण्याचें ठरविलें. तेव्हां सुमित्रा व कौसल्या यांच्याबरोबर ही वनांत निघाली ( वा. रा. अयो. ८३.६ ).

**कैटभ**—मधुदैत्याचा अनुज. यास विष्णूनें मारिलें ( भा. १०.४०; म. व. २०६ कुं; दुर्गा पहा ).

२ एक राक्षस. याला दोन मुलें, एक अश्वत्थ व दुसरा पिप्पल. अश्वत्थ हा वृक्षाचें रूप धारण करून व पिप्पल हा सामग ब्राह्मणाचें सोंग घेऊन ब्राह्मण खात असे. अगस्त्यानें द्वादशवार्षिक सत्र आरंभिलें होतें. त्या वेळीं ऋषींनीं सौरि शनैश्वराच्या मदतीनें त्या दोघांचा नाश केला ( ब्रह्म. ११८ ).

**कैतव**—शकुनीचा पुत्र उलूक याचें नामांतर ( म. उ. १६३ ).

२ शकुनि ( म. स. ८५ कुं. ).

**कैरात**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**कैराति**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**कैरिशय**—सुत्वन्चें पैतृक नांव.

**कैलासक**—एक सर्प ( म. उ. १०३ कुं. ).

**कैशोर्य**—काप्याचें पैतृक नांव.

**कोक**—सत्रासह नामक पंचाल राजाचा पुत्र ( श. ब्रा. १३. ५. ४.१७ ).

**कोचरश**—एक राजा. याची भार्या सुप्रज्ञा. ही एकादशीव्रताचे दिवशीं विष्णूसमोर जागरण करीत असतां शौरी नामक ब्राह्मण तेथें आला. तेथें राजा व राणी दोघेंहि आनंदानें देवासमोर नाचतांना पाहून त्या ब्राह्मणास आनंद वाटला. राणीनें आपलें पूर्वकथन केलें. मी पूर्वजन्मीं एक वेश्या व हा ( राजा ) एक शूद्र होता. एका एकादशीचे दिवशीं मला माझ्या आजारीपणांत सहज उपवास व जागरण घडलें व देवाचीं नांवें तोंडीं आलीं. त्यामुळें आतां राजकुलांत जन्म पावलें. हें वृत्त ऐकून ब्राह्मणहि एकादशीव्रत करूं लागला व शेवटीं ही तिघें वैकुंठास गेलीं ( पद्म. उ. २३ ).

**कोटरक**—एक सर्प ( म. आ. ३५ कुं. ).

**कोटरा**—बाणासुराची माता. ही बाणासुराच्या प्राणाचें रक्षण करण्यासाठीं कृष्णापुढें केश मोकळे सोडून नग्न उभी राहिली होती ( भा. १० ६३.२०; बाण पहा ).

**कोटिक** किंवा **कोटिकास्य**—( सो. अनु. ) सुरथाचा पुत्र. यानें जयद्रथाकरितां द्रौपदीची चौकशी केली. नंतर जयद्रथानें द्रौपदी पळविल्यावर पांडवांशीं झालेल्या युद्धांत याला भीमानें मारिलें ( म. व. २६६; २६७; २७२. २६ कुं. )

**कोटिश**—एक सर्प ( म. आ. ५७ कुं. ).

**कोपचय**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**कोपवेग**—युधिष्ठिराच्या सभेंतील एक ऋषि ( म. स. ४ कुं. ).

**कोमलक**—जनमेजयाच्या सर्पसत्रामधील एक सर्प (म. आ. ५७ कुं.).

**कोरकृष्ण**—वसिष्ठकुलांतील ऋषिगण. कौरकृष्ण असा पाठभेद आहे.

**कोरग्य**—कश्यपकद्रूंचा पुत्र (म. आ. ३५)

**कोल**—कुशिक गोत्रांतील मंत्रकार.

**कोलद**—वायु व ब्रह्मांड यांच्या मतें व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील लांगलीचा शिष्य. याबद्दल कोहळ असा पाठ आहे.

**कोलासुर**—कहोडाचा पिता पिप्पलाद दुग्धेश्वराजवळ तपश्चर्या करीत असे. एकदां तो ध्यानस्थ असतां कोलासुर दैत्य त्यास पीडा देण्यास आला. तेव्हां कहोडानें एक कृत्या निर्मून तिचे हातून कोलासुराचा वध करविला (पद्म. उ. १५७).

**कोलाहल**—(सो. अनु.) हा मत्स्यमतें सभानरपुत्र, कालनर, कालानर व कालानल हे सर्व एकच.

**कोष**—एक आचार्यकुल (श. ब्रा. १०. ५. ५. ८; सुश्रवस् पहा).

**कोहळ**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें लांगलीचा शिष्य. कोलद असा पाठभेद आहे (व्यास पहा). जनमेजयाच्या सर्पसत्रांतील एक सदस्य (म. आ. ५३ कुं.).

**कौकुर**—कुकुरवंशोत्पन्न कारस्कर राजा.

**कौकुरुंडि**—उत्तम मन्वंतरांतल्या सप्तर्षींतील एक.

**कौकूस्त**—यानें यज्ञांत विपुल दक्षणा दिल्याचा निर्देश आहे (श. ब्रा. ४. ६. १. १३).

२ तामस मन्वंतरांतील योगवर्धनांपैकीं एक (कौकुरुण्डि पहा).

**कौचकि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**कौचहस्तिक**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**कौंच**—देवांच्या हिरण्याक्षाशीं झालेल्या युद्धांत यास वायूनें ठार केलें (पद्म. सृ. ७५).

**कौटिल**—भृगुकुलोत्पन्न गोत्रकार.

**कौटिल्य**—(चाणक्य पहा).

**कौणकुत्स्य**—एक ऋषि (म. शा. ८ कुं.).

**कौणप**—एक सर्प (म. आ. ५७ कुं.).

**कौणपाशन**—कद्रूपुत्र सर्प.

**कौठरव्य**—एक आचार्य (ऐ. ब्रा. ३. २, सां. आ. ७. १४; ८. २).

यानें अक्षरोपासना अथवा अक्षरासंबंधीं माहिती प्रचारांत आणिली (ऐ. आ. ३. २. २).

**कौंडिन्य**—याचा हिरण्यकेशिशाखेच्या पितृतर्पणांत उल्लेख आहे. हा वृत्तिकार होता, पण वृत्ति कशावर केली हें सांगतां येत नाहीं (स. श्रौ. २०. ८. २०).

२ हकाराला कवर्ग होतो, असें सांगण्याकरितां सन्मानार्थ घेतलेल्या अनेक आचार्यांच्या नांवांत याचेंहि नांव घेतलें आहे (तै. प्रा. ५. ३८).

३ हा शांडिल्याचा शिष्य व याचा शिष्य कौशिक (बृ. उ. २. ६. १. ४; ६. १; विदर्भिन् पहा).

४ एक ब्रह्मर्षि. हा कुंडिनकुलोत्पन्न होय (म. स. ४). युधिष्ठिराच्या अश्वमेधांतील एक सदस्य (जै. अश्व. ६३). हा स्थावर (थेउर) येथें राहत असे. याची बायको आश्रमा. दुर्वांकुर माहात्म्याकरितां याची कथा आली आहे (गणेश. १.६३).

५ या ऋषीचा आश्रम हस्तिमती व साभ्रमती नद्यांच्या संगमीं बांधला होता. एकदां फार पाऊस पडून पाणी आश्रमांत आलें, म्हणून यानें नदीस कोरडी होण्याचा शाप दिला व स्वतः विष्णुलोकीं गेला (पद्म. उ. १४५).

**कौतस्त**—पहिला अरिमेजय व जनमेजय यांचें पैतृक नांव.

**कौत्स**—हा महित्थिचा शिष्य व याचा शिष्य मांडव्य (श. ब्रा. १०. ६. ५.९; बृ. उ. ६. ५. ४). निरुक्तांत (१.१५) वेद अनर्थक आहेत या कौत्साच्या मताचा निषेध दाखविला आहे (आ. श्रौ. १०. २०. १२). एक आचार्य (आश्व. श्रौ. १. २. ५, ७. १, १९; आ. ध. १. १९. ४. २८. १).

२ भृगुकुलांतील गोत्रकार.

३ अंगिराकुलांतील गोत्रकार.

४ विश्वामित्राचा शिष्य. विश्वामित्र नको म्हणत असतां यानें रघुराजाकडून चौदा कोटी मोहोरा आणून त्यास दक्षिणा दिली (स्कंद. २. ८.५). रघुवंशांत वरतंतुशिष्य कौत्साची अगदीं अशीच गोष्ट आहे (र. वं. ५).

५ एक ब्रह्मर्षि. भृगुवंशीय भगीरथ राजानें यास आपली कन्या हंसी दिली होती (म. अनु. २०० कुं; दुर्मित्र व सुमित्र पहा).

**कौत्सायन**—मंत्रद्रष्टा (मैत्र्यु. ५.१).

**कौथुम पाराशर्य**—वायु व ब्रह्मांड यांच्या मतें व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील एक.

**कौथुमिन्**—हिरण्यनाभ नामक ब्राह्मणाचा पुत्र. एकदां हा जनकाच्या आश्रमीं गेला असतां यानें तेथील ब्राह्मणसमूहाशीं वाद केला व कोपाविष्ट होऊन त्यांतील एका ब्राह्मणाचा वध केला. पुढें यास महारोग व कुष्ठ झालें आणि ब्रह्महत्त्या यामागें लागली. सर्व तीर्थें फिरला तरी ती यास सोडीना. पुढें पित्याच्या सल्ल्यानुसार यानें श्राव्यसंज्ञक सूक्ताचा सूर्यापुढें सदोदित जप व पुराणश्रवण हीं केल्यानें हा उद्धरून गेला (भवि. ब्राह्म. २११).

**कौपयेय**—उच्चैःश्रवस्‌चें पैतृक नांव.

**कौबेरक**—कश्यपकुलांतील गोत्रकारगण.

**कौञ्जायनि**—मौञ्जायनिबद्दल पाठभेद.

**कौमानरायण**—कौलायनबद्दल पाठभेद.

**कौभ्य**—हें बभ्रूचें पैतृक नांव आहे.

**कौरकृष्ण**—कौरकृष्णाबद्दल पाठभेद.

**कौरयाण**—पाकस्थामन्‌चें पैतृक नांव.

**कौरव्य**—कुरुंतील एक राजा. परीक्षिताच्या अमलाखालीं आपल्यासह सुखानें राहत होता ( अ. वे. २०. १२७. ८; खिल. ५. १०. २; सां. श्रौ. १२. १७. २; वैतानसू. ३४. ९ ). राजा बाल्हिक प्रातिपीय यास कौरव्य म्हटलें आहे ( श. ब्रा. १२. ९. ३. ३ ). एका आख्यायिकेंत आर्ष्टिषेण व देवापि हे सुद्धां कौरव्य नांवानें संबोधिले आहेत ( नि. २. १० ). वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

२ ऐरावतकुलोत्पन्न एक नाग. उलूपीचा पिता. जनमेजयकृत सर्पसत्रांत याच्या कुलांतील एरक, कुंडल, वेणिन्, वेणिन्स्कंध, कुमारक, बाहुक, शृंगबेर, धूर्तक, आतक आणि प्रातर हीं कुलें दग्ध झालीं ( म आ. ५७. ).

**कौरव्यायणीपुत्र**—खं शब्दाचा आकाश ह्या अर्थाबद्दल याचें मत घेतलें आहे ( बृ. उ. ३. ५. १. १ ).

**कौरिष्ठ**—कश्यपकुलांतील ऋषिगण.

**कौरुक्षेत्रिन्**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**कौरुपति**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**कौरुपथि**—शांत्युदक करितांना कोणता मंत्र वापरावा विषयीं याचें मत आलें आहे ( कौ. ९. १० ).

**कौरुपांचाल**—आरुणीला हा शब्द त्या प्रान्तांतील म्हणून लावीत असत ( श. ब्रा. ११. ४. १. २ ). याचा धंदाहि याच शब्दानें दर्शविला जातो ( श. ब्रा. १. ७. २. ८ ).

**कौलकावती**—या नांवाच्या दोघां ऋषींनीं रथप्रोत दार्भ्य याच्याकडून एक विशिष्ट याग करविला ( मै. सं. २. १. ३ ).

**कौलायन**—वसिष्ठकुलांतील ऋषि. कौमानरायण असा पाठभेद आहे.

**कौलितर**—एक दास ( ऋ. ४. ३०. १४ ). हें शंबराचें नांव असावें. येथें याचा अर्थ कुलितराचा पुत्र असा होतो.

**कौशल**—ह्या नांवाच्या राजांचा एक वंश. हे सात होते.

**कौशल्य**—अगस्त्यकुलांतील गोत्रकारगण.

२ अंगिराकुलांतील गोत्रकारगण.

३ आश्वलायन कुलांतील एक. पिप्पलादाचा शिष्य.

४ सुकर्म ब्राह्मणाचा शिष्य. यानें सामवेदाचें अध्ययन केलें ( भा. १२. ६ ).

५ जटीमालिन् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**कौशापि**—भृगुकुलांतील गोत्रकार गण.

**कौशांबेय**—प्रोतीचें पैतृक नांव.

**कौशिक**—हा कौण्डिण्याचा शिष्य होता व याचे शिष्य गौपवन व शांडिल्य होत ( बृ. उ. २.६.१; ४.६.१ ). व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य ( व्यास पहा ). एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ). एक ऋषि ( मत्स्य. १४५. ९२-९३ ). अथर्ववेदाचें गृह्यसूत्र करणारा कौशिक नांवाचा आचार्य होता. शांत्युदकाला कोणता मंत्र घ्यावा याविषयीं याच्या मताचा उल्लेख आहे ( कौ. ९.१०; युवा कौशिक पहा ). याच्या नांवावर पुढील ग्रंथ उपलब्ध आहेत. १ कौशिकगृह्यसूत्र, २ कौशिकस्मृति, या स्मृतीचा उल्लेख हेमाद्रीनें परिशेषखंडांत केला आहे ( १.६.३१; ६.३.७ ). त्याचप्रमाणें नीलकंठानेंहि या स्मृतीचा उल्लेख श्राद्धमयूखांत केला आहे. याच्या नांवावर एक शिक्षाहि आहे. कौशिकपुराण यानेंच केलें ( C. C. ).

२ ( सो. अमा. ) कुशांक, गाधिन्, विश्वामित्र वगैरेंना सामान्य नांव. विश्वामित्र ब्राह्मण झाल्यावर त्याच्या कुलांत उत्पन्न झालेला एक ऋषि. यास हैमवती नांवाची स्त्री होती ( म. उ. ११७ ).

३ एक सत्यवचनी ब्राह्मण. हा गांवाजवळ संगमावर तपश्चर्या करी. पण सत्य सांगतांना अवश्य असणारें तारतम्य याला नव्हतें. एकदां कांहीं पांथस्थ, चोर आपल्यावर हल्ला करीत आहेत असें पाहून याच्या आश्रमाच्या मागें लपले. चोर चौकशी करण्यास आले असतां यानें खरें तें सांगितलें. तेव्हां चोरांनीं त्यांचा वध केला. त्यामुळें हा ब्राह्मण अधोगतीला गेला. ही गोष्ट अर्जुनास सत्याविषयीं तारतम्य ठेवावें म्हणून कृष्णानें सांगितली ( म. क. ६९ ).

४ हा एक गवई होता. पण हा विष्णुशिवाय कोणाचेंहि गुणगायन करीत नसे. याचे अनेक शिष्य होते. याची कीर्ति ऐकून कलिंग देशचा राजा तेथें आला व म्हणूं लागला कीं, ‘ माझी कीर्ति गा. ’ तेव्हां कौशिकानें सांगितलें कीं, मी विष्णुशिवाय कोणाचेंहि गुणगायन करीत नाहीं. सर्व शिष्यांनींहि याच्या म्हणण्यास रुकार दिला. तेव्हां राजानें आपल्या नोकरांस आपले गुणगायन करावयास सांगितलें असतां विष्णुशिवाय इतरांचें गुणगायन ऐकावयाचें नाहीं म्हणून, कौशिकानें आपले कान झांकून घेतले. याच्या शिष्यांनींहि तसेंच

केलें. शेवटीं यानें बारीक लांकडाच्या टोंकानें आपले कान फोडून घेतले व जीभ छेदून घेतली. अशा एकनिष्ठ गायनानें ईश्वराची सेवा करून हा वैकुण्ठाला गेला (अ. रा. ५).

५ सावर्णि मन्वंतरांत होणाऱ्या सप्तर्षींतील एक. हें गालवाचें नामांतर आहे.

६ भीष्म शरपंजरीं पडला असतां त्याच्याकडे आलेला एक ऋषि (भा. १. ९. ७).

७ एका झाडाखालीं हा तपश्चर्या करीत असतां झाडावर बसलेल्या एक बगळीनें याचे अंगावर आपली विष्ठा टाकली. त्यामुळें क्रोधानें यानें वर पाहिलें. वर पाहिल्याबरोबर तपःप्रभावानें बगळी निर्जीव होऊन खालीं पडली. आपल्या हातून वाईट गोष्ट घडली, असें पाहून याला वाईट वाटलें. पुढें हा गांवांत भिक्षेकरितां गेला असतां एका पतिव्रतेच्या घरीं गेला. तेथें पतिकार्यामुळें तिला भिक्षा वाढण्यास वेळ लागला. तिनें त्याबद्दल क्षमा मागितली असतांहि हा तिच्यावर रागावला. तेव्हां तिनें, मी कांहीं बगळी नव्हे, असें सांगून, तुला अजून धर्म समजलेला नाहीं; तो समजावून घेण्यासाठीं तूं मिथिलेंतल्या धर्मव्याधाकडे जा, असें यास सांगितलें. त्यालाहि तें पटलें व याचा राग शांत झाला. पुढें धर्मव्याधाकडे हा गेला असतां त्यानें याला अनेक प्रकारें धर्म सांगितला व यानेंहि तो ऐकून त्याच्याप्रमाणें आपल्या मातापित्यांची हा शुश्रूषा करूं लागला. मार्कंडेयाला पतिव्रतामाहात्म्य विचारिलें असतां, त्यानें युधिष्ठिराला हें वनवासांत सांगितलें (म. व २०८-२१९ कुं.).

८ कुरुक्षेत्रांत राहणारा ब्राह्मण. पितृवर्ती इ. सात पुत्रांचा पिता (पितृवर्ती पहा).

९ जरासंधाच्या हंस नांवाच्या सेनापतीचें हें उपनाम किंवा नामांतर असावें (म. स. २२.४२ कुं.).

११ या नांवाचा एक राजा होता. हा रात्रीं कोंबडा होई. याची स्त्री विशाला नामक होती. तिला सर्व अनुकूल असतां रात्रीं पति कोंबडा होतो हें पाहून वाईट वाटे. तेव्हां ती गालव ऋषीकडे गेली असतां त्यानें याचा पूर्ववृत्तांत सांगितला कीं, पूर्वीं (जन्मांत) यानें शक्ति येण्याकरितां पुष्कळ कोंबडे खाण्याचा सपाटा लाविला. तेव्हां ही गोष्ट कुकुटराजा ताम्रचूड यास कळतांच त्यानें यास शाप दिला कीं, तूं रात्रीं कुकुट होशील. असो. आतां राजानें ज्वालेश्वरलिंगाच्या पूर्वेस असलेल्या लिंगाची पूजा करावी म्हणजे तो मुक्त होईल. त्याप्रमाणें यानें केल्यावर हा मुक्त झाला व त्या लिंगाला तेव्हांपासून कुकुटेश्वर म्हणूं लागले (स्कंद. ५.२.२१).

१३ (सो. यदु.) मत्स्य, विष्णु व वायु यांच्यामतें विदर्भपुत्र.

१४ (सो. वृष्णि.) हा विष्णु व मत्स्य यांच्यामतें वैशालीच्या ठायीं झालेला वसुदेवपुत्र व वायुमतें वैशाखीचे ठायीं झालेला वसुदेवपुत्र.

१५ (गाधिन् पहा).

१६ प्रतिष्ठान नगरांतील एक ब्राह्मण. हा कुष्ठरोगी होता तरी याची भार्या याची अत्यंत सेवा करी. हा व्यसनी ब्राह्मण आपल्या बायकोच्या खांद्यावर बसून वेश्येकडे जात असतां सुळावर चढविलेल्या मांडव्य ऋषीस याचा धक्का लागला. तेव्हां त्यानें धक्का लावणारास सूर्योदयापूर्वीं मृत्यु येईल, असा शाप दिला. पण याच्या पत्नीच्या पातिव्रत्यानें सूर्य उगवेना. तेव्हां देवांनीं तिला संतुष्ट केलें व अनुसूयेकडून तिचा पति जिवंत करविला (मार्कं. १६. १४-८८; गरुड. १. १४२).

**कौशिकायनि**—एक आचार्य. हा घृतकौशिकाचा शिष्य. याचे शिष्य वैजपायन व सायकायन (बृ. उ. २. ६. २; ४.६.२).

**कौशिकी**—जमदग्नीची माता सत्यवती. तिचें नदींत रूपांतर झालें, त्या काळीं पडलेलें नांव (वा. रा. बा. ३४; म. आ. २३५; व. ८२;१११; भी. ९ कुं.).

**कौशिकीपुत्र**—आलंबीपुत्र व वैयाघ्रपदीपुत्र यांचा शिष्य. याचा शिष्य कात्यायनीपुत्र (बृ. उ. ६.५.१).

**कौशिल्य**—सामवेदी श्रुतर्षि.

**कौशीतक**—या ऋषीनें बकुलासंगमावर परमेश्वरसेवा केली (पद्म. उ. १६८).

**कौशीति**—ऋग्वेदी ब्रह्मचारी.

**कौश्रेय**—सोमदक्षाचें पैतृक नांव.

**कौषाख**—मैत्रेयाचें पैतृक नांव.

**कौषीतकि**—याच्या नांवावर कौषीतकि ब्राह्मण, आरण्यक, उपनिषद, सांख्यायन, श्रौत व गृह्य सूत्रें इ. ग्रंथ आहेत. त्यांतून याचें नांव घेऊन कांहीं मतें येतात. कौषीतकि किंवा कौषीतकेय हें कहोडाचें पैतृक नांव आहे (श. ब्रा. २.४. ३. १; छां. उ. ३. ५. १). लुशाकपीनें यास व याच्या शिष्यांस शाप दिला आहे (पं. ब्रा. १७. ४. ७. ३). याच्यांत दोन अध्यापक होते. एक कहोड व दुसरा सर्वजित् (सां. ब्रा. १४. २४. ७१). यालाच सांख्यायन म्हणतात. हा प्राणास ब्रह्म मानी (कौषी. २. १). याचा शिष्य सर्वजित् (कौषी. २. ७). यानें पुत्रास उपदेश केला (छां. उ. १. ५. २; कुषीतक सामश्रवस पहा).

**कौषीतकेय**—कहोलाचें पैतृक नांव.

२ यानें सोमतीर्थीं तपश्चर्या करून शंकर प्रसन्न झाल्यावर तेथें सोमेश्वर नांवाचें शिवलिंग स्थापिलें (पद्म. उ. १६१).

**कौषेय**—एक ब्रह्मर्षि (वा. रा. उ. १. ४).

**कौष्ठिकि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार ऋषि.

**कौष्य**—सुश्रवसचें पैतृक नांव.

**कौसला**—कृष्णपत्नी सत्या हिचें हें दुसरें नांव.

**कौसल्य**—आश्वलायन, पर आट्णार व हिरण्यनाभ यांना हें नांव लावलें आहे.

**कौसल्या**—ही कोसलदेशांतील भानुमान् राजाची कन्या व दशरथ राजाची पट्टराणी होय. हिला हजार गांवें स्त्रीधन म्हणून माहेराहून मिळालीं होतीं ( वा. रा. अयो. ३१.२२-२३ ). हिचा मुलगा रामचंद्र. ही दशरथाची पहिली बायको होती. रामाला यौवराज्याभिषेक करण्याचें ठरलें, ही बातमी कौसल्येला रामाच्या द्वारां कळली. कैकेयीस सांगण्यास राजा स्वतः गेला होता. भरताच्या भाषणावरून कैकेयीशीं कौसल्या बहिणीप्रमाणें वागत असे (वा. रा. अयो. ७३. १०). हिचा कैकेयी आणि तिचा परिवार यांकडून वारंवार अपमान होत असे (वा. रा. अयो. २०.३९) व कैकेयी हिला मर्मभेदक शब्दांनीं टोंचीत असे (वा. रा. अयो. २०.४४). राम हिजकडे वनवासाला जाण्याकरितां अनुज्ञा मागण्यास गेला असतां लक्ष्मणानें पित्याचा निग्रह करून राज्य बळकावण्याचा उपाय सुचविला. त्या वेळीं कौसल्येनें प्रच्छन्न संमतीच दिली आहे ( वा. रा. अयो. २१..२१ ). कदाचित् निरुपाय म्हणून हिनें संमति दिली असेल. आपण गेल्यानंतर आपल्या आईला कोणीं विचारणार नाहीं याची कल्पना रामाला होती ( वा. रा. अयो. ३१. ११). पंधराव्या वर्षी राम परत आला तरी भरत राज्य व कोश सोडून देईल असा संभव दिसत नव्हता ( वा. रा. अयो. ६१. ११). राम वनवासाला गेल्यानंतर ही दशरथाला टोंचून बोलूं लागली. त्या वेळीं दशरथ अगदीं केंविलवाणा होऊन त्यानें कौसल्येपुढें हात जोडले. तेव्हां कौसल्येला आपली चूक ध्यानीं आली व पुत्रशोकानें व्याकुळ झाल्यामुळें मी कांहीं-तरी बोलल्यें, असें हिनें कबूल केलें (वा. रा. अयो. ६२. १४). ही स्वभावानें मृदु होती. पतिसुख नसून सवतीकडून जाच होत असतां ही उदासीन वृत्तीनें राहत असे व हिच्या त्या वृत्तीचा रामचरित्रावर बराच परिणाम झाला. रामाच्या चरित्रांतील महत्त्वाचा धार्मिकतेचा भाग हिच्याकडून रामाला मिळाला होता.

२ काशीराजाची कन्या अम्बिका हीस कौसल्या असें नांव होतें ( म. आ. १०६ ).

३ कृष्णाचा बाप वसुदेव, त्याच्या एका बायकोचें नांव.

**कौसि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**कौसुरबिंदु**—हें प्रोतीचेंच पैतृक नांव असावें.

**कौसुरुबिंदि**—प्रोति कौशंबेयाचें पैतृक नांव.

**कौहल**—मित्रविंद व प्रातरह् यांचें पैतृक नांव.

**क्रतु**—स्वायंभुव मन्वंतरांत हा ब्रह्मदेवाच्या अपानापासून उत्पन्न झाला. स्वायंभुव दक्षाचा हा जांवई. सती व शंकर यांना दक्षानें न बोलावल्यामुळें सतीनें आपणाला जाळून घेतलें; व त्या रागानें शंकरानें दक्षासुद्धां सर्वांना जाळून टाकिलें. याची बायको दक्षाची कन्या संतति. याला वालखिल्य नांवाचे साठ हजार पुत्र झाले. ते सर्व ऊर्ध्वरेते असल्यामुळें त्यांना वंश नाहीं. ते अरुणाच्या पुढें सूर्याबरोबर असतात. याच्या दोन बहिणी पुण्या व सत्यवती होत. त्या दोघी पूर्णमाससुत पर्वशाच्या सुना होत ( ब्रह्मांड. २. १२. ३६–३९ ). हा शिववरानेंच वैवस्वत मन्वंतराच्या आरंभीं उत्पन्न झाला.

ब्रह्मदेवानें प्रजा निर्माण करण्यासाठीं जे मानसपुत्र निर्माण केले त्यांत हा होता ( मत्स्य. ३.६–८ ). हा जे प्रमुख प्रजापति झाले त्यांतील एक होता ( मै. उ. २.३; मत्स्य. १७१.२७-२८; ३. ६–८; वायु. २. ४. २२; विष्णु. १. ७.४–५; १०; म. स. ११. १९; आ. ६६. १०; ६७.४; शां. २०७ कुं. ). हा ब्रह्मदेवाच्या हातापासून उत्पन्न झाला ( भा. ३. १२ ). कर्दम प्रजापतीच्या नऊ कन्यांपैकीं क्रिया ही याची बायको असून तिच्यापासून याला साठ हजार पुत्र झाले. हे वालखिल्य ऋषि असून अंगुष्ठाएवढे होते. हे वाल-खिल्य ब्रह्मर्षि असून त्यांना चित्रकेतु, सुरोचि, विरजा, मित्र, उल्बण, वसुभृद्यान व द्युमान अशीं नांवें होतीं. याप्रमाणेंच याच्या दुसऱ्या स्त्रीला शक्तिआदिकरून पुत्र झाले ( भा. ४.१ ). सन्नति नांवाच्या स्त्रीपासून वालखिल्य झाले (विष्णु. १.१०. १०–१५ ).

२ वैवस्वत मन्वंतरांत याला बायकामुलें नव्हतीं ( वायु. ३. ९. ६६; ब्रह्मांड . ३. ८; लिंग. १.६३. ६८; कूर्म. १. १९ ). यानें अगस्त्याचा मुलगा इध्मवाह हा दत्तक घेतला होता व त्याच्या नांवावरून क्रतूच्या वंशजांना आगस्त्य नांव पडलें ( मत्स्य. २०२ ). याच्यापासून ब्राह्मणांची उत्पत्ति झाली नाहीं, असें कांहीं पुराणांत सांगितलें आहे ( वायु. २..४. ४९–५०; ब्रह्मांड ३. १. ४९–५१ ).

३ पांचालांतील एक क्षत्रिय. याला कर्णानें ठार मारिलें ( म. क. ५६ ).

४ एक राक्षस. याची स्त्री वैश्वानरकन्या हयशिरा ही होय ( भा. ६.६. ३४ ).

५ भृगु ऋषीनें उत्पन्न केलेल्या बारा भार्गव देवांपैकीं एक ( वायु. २. ४. ८७ ). याच्या आईचें नांव पौलोमी ( मत्स्य. १९५. १३–१४ ).

६ दहा विश्वेदेवांपैकीं एक.

७ श्रीकृष्णास जांबवतीपासून झालेला पुत्र ( भा. १० ६१. १२ ).

८ फाल्गुन महिन्यांत पर्जन्य नांवाच्या सूर्याबरोबर फिरणारा यक्ष ( भा. १२.११.४० ).

९ उल्मूक व पुष्करिणी यांच्या सहा पुत्रांतील चौथा (भा. ४. १३. १७ ).

१० हा वैवस्वत मन्वंतरांत होऊन गेला. हा आयु नांवानें पौष महिन्यांतील सूर्याबरोबर फिरतो.

११ स्वायंभुव मन्वंतरांतील जितदेवांपैकीं एक.

१२ स्वायंभुव मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

१३ अगस्त्यकुलांतील गोत्रकार.

१४ अमिताभ देवांपैकीं एक.

**ऋतुजित् जानकि**—डोळे अधू असलेल्या रजनकोणेयाची दृष्टि साफ होण्याकरतां यानें त्याजकडून एक त्रिहविष्का नामक इष्टि करविली ( तै. सं.२. ३. ८. १ ). हा रजनकोणेयाचा उपाध्याय ( क. सं. ११. १; ऋतुविद् पहा ).

**ऋतुविद्**—विश्वंतराच्या सोमयज्ञांत श्यापर्णांचा प्रवेश झाल्यावर त्यांनीं सांगितलेल्या सोमाच्या विशिष्ट परंपरेंत अरिंदमानें ऋतुविदाला उपदेश केला व यानें जानकीला केला ( ऐ. ब्रा. ७.३४ ).

**ऋथ**—शुक्तिमान् पर्वताच्या पूर्वेकडील एक राजा. हा भारतीय युद्धांत दुर्योधनाकडे होता.

२ (सो. क्रोष्टु.) विदर्भ राजाच्या चार पुत्रांतील एक. याचा पुत्र कुंति किंवा कृति. भविष्यांत क्राथ असा पाठभेद आहे.

**ऋथक**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**ऋथन**—अमृताचें रक्षणकर्ता एक देव ( म. आ. ३२. १८ कुं. ).

२ एक असुर ( म. स. ९.१७ कुं. ).

३ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

४ वरुणलोकांतील असुरविशेष.

५ रामसेनेंतील या नांवाचे दोन वानराधिपति ( वा. रा. यु. २६. ४२ ).

६ कश्यप व खशा यांचा पुत्र.

**ऋथल**—एक ऋग्वेदी ब्रह्मचारी.

**ऋमजित्**—एक क्षत्रिय ( म. स. ४.३४ कुं. ).

**क्रातुजातेय**—पहिल्या रामाचें पैतृक नांव.

**क्राथ**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. याला भीमसेनानें युद्धांत मारिलें ( म. क. ४६.१७ कुं. ).

२ एक क्षत्रिय ( म. आ. ६८.४० कुं. ).

३ एक राजा. याच्या पुत्रास भारतीय युद्धांत अभिमन्यूनें ठार मारिलें.

**क्रिया**—स्वायंभुव मन्वंतरांतील दक्षप्रजापतीची मुलगी. धर्म ऋषीची स्त्री (म. आ. ६७.१४ कुं.). हिचा पुत्र योग. हिला साठ हजार वालखिल्य झाले.

२ कर्दमऋषीच्या नऊ कन्यांतील एक. क्रतुऋषीची स्त्री.

३ द्वादशादित्यांतील अंशुमान् आदित्याची स्त्री.

**क्रिवि**—व्यक्तीकरतां वापरलेला देशवाचक शब्द. सायण विहीर असा अर्थ करितो ( ऋ. ८. २०. २४; २२.१२; क्रैव्य पांचाल पहा ).

**क्रीत वैतहोत्र**—याचा कुरूंशीं संबंध होता ( मै. सं. ४. २. ६ ).

**क्रुंच आंगिरस**—सामाचा द्रष्टा ( पं. ब्रा. १३. ९. ११; ११. २० ). याचें दोन साम असून त्यामुळें याला आवश्यक असणारा साहवा दिवस मिळत असे.

**क्रैव्य पांचाल**—क्रिवींचा राजा. या राजानें परिवक्रेवर अश्वमेध केला ( श. ब्रा. १३. ५. ४. ७; क्रिवि पहा ).

**क्रोडोदय**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**क्रोडोद्रायण**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**क्रोध**—हा ब्रह्मदेवाचे भृकुटीपासून उत्पन्न झाला ( भा. ३. ९. २२ ). एकदां जमदग्नि श्राद्ध करीत असतां हा तेथें गेला. जमदग्नीनें होमधेनूच्या दुधाची खीर केली होती. तीवर यानें सर्परूप धारण करून गरळ टाकलें. पण जमदग्नि रागावला नाहीं. कारण त्यानें हा क्रोध आहे हें जाणिलें होतें. तेव्हां क्रोध भिऊन त्यास शरण गेला व म्हणाला कीं, मला अशी माहिती मिळाली होती कीं, सगळे भार्गव रागीट आहेत. पण आतांच्या अनुभवावरून भार्गव क्षमाशील आहेत असें मला कळलें; तरी मला अभय असावें. जमदग्नीनें यास अभय दिलें. पण पितरांच्या कोपाचें तूंच पाहून घे, असें सांगितलें. पितरांनीं रागावून यास शाप दिला. त्यामुळें क्रोधास नकुलयोनि प्राप्त झाली. पुढें यानें पितरांस संतुष्ट करून त्यांच्याजवळ उःशापाची याचना केली. तेव्हां यास तूं ज्या वेळीं धर्माच्या सभेंत कृष्णासमीप उंच्छवृत्ति ब्राह्मणाची गोष्ट सांगशील, त्या वेळीं तुला मुक्ति मिळेल असा त्यांनीं उःशाप दिला ( जै. अ. ६७; उंच्छवृत्ति पहा ).

२ हा ब्रह्मदेवपुत्र अधर्म याच्या वंशांतील लोभ व निकृति यांचा पुत्र. यास हिंसा नांवाची बहीण होती. तिजपासून क्रोधास कलि व दुरुक्ति [illegible] आपलें झालीं ( भा. ४. ८. ३ ).

३ अष्टभैरवांपैकीं एक.

४ काला व कश्यप यांचा पुत्र ( म. आ. ६६ ).

**क्रोधदान**—( सू. इ. ) भविष्यमतें शाक्यवर्धनाचा पुत्र.

**क्रोधन**—कौशिक ऋषीच्या सात पुत्रांतील एक.

२ ( सो. कुरु. ) अयुत राजाचा पुत्र. याचा पुत्र देवातिथि.

**क्रोधनायन**—पराशरकुलांतील गोत्रकार.

**क्रोधवश**—कश्यप व क्रोधा ऊर्फ क्रोधवशा यांच्या पुत्रांतील ज्येष्ठ (म. आ. ६५). क्रोधेच्या सर्व पुत्रांस क्रोधवश

हेंच सामान्य नाम होतें. यांचे वंशजासहि हेंच नांव होतें. या वंशजांपैकीं कांहींना कुबेरानें सौगंधिक नांवाच्या सरोवराचे रक्षणार्थ ठेविलें होतें. यांतीलच कांहीं सौगंधिक नांवाचीं कमळें भीम नेण्यास आला असतांना यांनीं त्याला कुबेराचे परवानगीखेरीज हात लावूं देण्याचें नाकारिलें. यामुळें भीमाचें यांच्याशीं युद्ध होऊन भीमानें यांचेपैकीं बऱ्याचजणांस ठार मारिलें ( म. व. १५३-१५४ ).

२ इंद्रजिताचा राक्षस अनुयायी. हा व आणखी कांहींजण वानरांशीं अदृश्यत्वानें युद्ध करीत असतां अंतर्धानविद्यापटु बिभीषणानें यास दृश्य केलें. तेव्हां वानरांनीं यास ठार मारिलें ( म. व. २८५ ).

३ महातलांतील सर्पविशेष. हे सर्व कद्रूचे वंशज होत. हे गरुडास फार भितात म्हणून क्वचित् प्रसंगीं तापद होतात ( भा. ५.२४ ).

**क्रोधवशा**—( क्रोधा पहा ).

**क्रोधशत्रु**—काला व कश्यप यांचा पुत्र.

**क्रोधहंतृ**—काला व कश्यप यांचा पुत्र.

२ पांडवपक्षीय एक रथी ( म. उ. १७१ कुं. ). हाच सेनाबिंदु असावा.

**क्रोधा**—ही दक्षप्रजापतीची कन्या व कश्यपाची स्त्री होय. हिला क्रोधवशा असें नामांतर आहे. हिच्या पुत्रांनाहि क्रोधवश असें म्हणतात ( म. आ. ६६ कुं. ).

**क्रोधिन्**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**क्रोष्टकि**—( कौष्टुकि पहा ).

**क्रोष्टाक्षिन्**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**क्रोष्टु**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

२ ( सो. यदु. ) यदूचा पुत्र. याचा पुत्र वृजिन(नि)वान्. ब्रह्म, हरिवंश व पद्मपुराण यांत यालाच वृष्णि म्हटलें आहे. क्रोष्टुकुलांत ज्यामघ, भजमान, वृष्णि व अंधक हे [illegible] झाले.

**क्रौंच**—हिमवान् पर्वतास मेनेपासून झालेला पुत्र. याच्याच मुळें हा ज्या द्वीपांत आहे, त्यास क्रौंचद्वीप असें नांव पडलेलें आहे. हा मैनाकाचा पुत्र ( ह. वं. १.१८ ).

२ विष्णुमतें व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील शाकपूर्णीचा शिष्य ( व्यास पहा ).

**क्रौंचिकीपुत्र**—हा वैदभृतीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य भालुकीपुत्र. हे दोन असावेत ( बृ. उ. ६.५.२ ).

**क्रौंची**—कश्यप व ताम्रा यांची कन्या.

**क्रौष्टुकि**—एक आचार्य. यानें द्रविणोदस् शब्दाचा इंद्र असा अर्थ मानला आहे ( नि. ८.२ ). एक वैयाकरण ( बृहद्दे. ४.१३७; छंदस. ५ ). यालाच क्रोष्टकि असेंहि म्हटलेलें आढळतें ( अथर्वपरि. ).

**क्षत्तृ**—विदुराचें नांव. दासीपुत्र म्हणून या नांवानें उल्लेखितात ( म. आ. २ कुं. ).

**क्षत्र**—मनस, यजत व अवत्सार यांजबरोबर या माणसाचा ऋग्वेदांत उल्लेख आला आहे ( ऋ. ५.४४.१० ).

**क्षत्रंजय**—( सो. नील. ) धृष्टद्युम्नाचा पुत्र ( म. द्रो. १०.३ कुं. ). हा द्रोणाकडून मारिला गेला ( म. द्रो. १५६. १४ कुं. ).

**क्षत्रदेव**—( सो. नील. ) हा शिखंडीचा पुत्र होय. हा उत्तम रथी होता ( म. उ. १७१.१०; भी. ९३.१४; द्रो. २३.७ कुं. ). ह्यास दुर्योधनाचा पुत्र लक्ष्मण यानें मारिलें ( म. क. ३.२ कुं. ).

**क्षत्रधर्मन्** ( क्षत्रवर्मन् )—धृष्टद्युम्नाचा पुत्र ( म. उ. १७१ ). द्रोणाचार्यांकडून याचा वध झाला ( म. द्रो. १२५. ६७ कुं. ).

**क्षत्रबंधु**—एक राजा. हा दिसण्यांत क्रूर व हिंसक होता. पण हा ज्ञानी असल्यामुळें उद्धरून गेला ( पद्म. उ. ८० ).

**क्षत्रवर्मन्**—( क्षत्रधर्मन् पहा ).

**क्षत्रवृद्ध**—( सो. पुरूरवस्. ) आयुराजाचा दुसरा मुलगा. हे एकंदर पांच बंधु. हा नहुष राजाचा लहान भाऊ. याचा मुलगा सुहोत्र. याच्यापासून काश्यवंश सुरू झाला.

२ रैच्य मन्वंतरांतील एक मनुपुत्र.

**क्षत्रोपेक्ष**—( सो. यदु. ) श्वफल्क यादवाच्या तेरा पुत्रांतील एक.

**क्षत्रौजस्**—( शिशु. भविष्य. ) वायुमतें अजातशत्रूचा पुत्र. विष्णु व ब्रह्मांड यांच्या मतें क्षेमधर्माचा पुत्र.

**क्षपाविश्वकर**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**क्षम**—सुधामन् देवांतील एक.

**क्षमा**—दक्षकन्या व पुलहाची स्त्री.

२ ब्रह्मवानाची कन्या.

**क्षमावत्**—रैवलऋषीचा पुत्र.

२ प्रत्यूषनामक वसूचा नातू.

**क्षय**—( सू. इ. भविष्य. ) वायुमतें बृहत्क्षयाचा पुत्र.

**क्षान्ति**—तामस मनूचा पुत्र.

**क्षाम**—सुधामन् देवांतील एक.

**क्षितिमुखाविद्ध**—( विदा पहा ).

**क्षिप्रप्रसादन**—( स्वा. प्रिय. ). प्रियव्रताच्या मुलाचें नांव ( गणेश २. ३३. २८ ).

**क्षीर**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**क्षुद्रक**—( सू. इ. भविष्य. ) प्रसेनजिताचा मुलगा.

**क्षुद्रभृत**--मरीचि ऋषीच्या सहा पुत्रांतील एक. हा स्वायंभुव मन्वंतरांत होता.

२ कृष्णजन्मापूर्वी देवकीस झालेल्या मुलांपैकीं एक होता. हा कंसाच्या हातून मरण पावला ( भा. १०.८५ ).

**क्षुधि**--कृष्णाचा पुत्र. हा मित्रविंदेपासून झाला. हा शेवटचा म्हणजे दहावा पुत्र होय ( भा. १०. ६१. ).

**क्षुप**—एका प्रजापतीचें नांव. याची जन्मकथा अशी आहे कीं, एकदां ब्रह्मदेवाला यज्ञ करण्याची इच्छा झाली. परंतु स्वतःला योग्य असा ऋत्विज कोणी दिसेना. तेव्हां त्यानें पुष्कळ वर्षे एक गर्भ मस्तकांत धारण केला. या गोष्टीस हजार वर्षे झालीं असतां शिंकेमुळें तो गर्भ खालीं पडला. हाच क्षुप प्रजापति होय. हा ब्रह्मदेवाच्या यज्ञांत ऋत्विज् होता ( म. शां. १२२ ).

२ (सू. दिष्ट.) खनित्रपुत्र. नारदानें युधिष्ठिराला यमसभेचें वर्णन सांगितलें. त्यांतील राजांच्या मालिकेंत याचें नांव आलें आहे ( म.स. १३. ८; अनु. १७७. ७३ कुं. ).

३ हा एक क्षत्रिय राजा होता. याचा दधीचि ऋषीशीं ब्राह्मण श्रेष्ठ कीं क्षत्रिय श्रेष्ठ याविषयीं वाद झाला. त्यानंतर दधीचि ऋषीवर यानें चढाई केली. परंतु शेवटीं शिवभक्तिप्रभावानें दधीचीनें याचा पराभव केला (लिंग. १.३४–३५ ).

**क्षुभ्य**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**क्षुलिक**—( कुलक पहा ).

**क्षुव**—यानें विष्णूचा पराजय केला होता (शिव रुद्र.स.३८).

**क्षेत्रज्ञ**—( शिशु. भविष्य.) भागवतमतें क्षेमधर्मन्चा पुत्र.

**क्षेम**—( स्वा. प्रिय. ) इध्मजिह्वाचा पुत्र. याच्या वर्षास हेंच नांव आहे ( भा. ५. १ ).

२ स्वायंभुव मन्वंतरांतलि धर्मऋषीपासून तितिक्षेस झालेला पुत्र.

३ दुर्योधनपक्षांतील एक राजा. हा क्रोधवंशांपैकीं एका राक्षसाचा अंशावतार होय ( म. आ. ६७ ).

४ ( सो. मगध. भविष्य. ) भविष्य, भागवत, मत्स्य, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें शुचीचा पुत्र. यास विष्णुमतें क्षेम्य म्हटलें आहे. यानें अठ्ठावीस वर्षे राज्य केलें.

५ सत्य देवांतील एक.

६ ब्रह्मधानाचा पुत्र.

**क्षेमक**—पांडवपक्षीय एक राजा (म. स. ४. २७ कुं.).

२ ( सो. पूरु. भविष्य. ) भविष्य व मत्स्य यांच्या मतें हा निरमित्रपुत्र, मतवायुें निरामित्रपुत्र, भागवतमतें निमिपुत्र व विष्णुमतें हा खंडपाणिपुत्र. हा पांडववंशांतील शेवटचा राजा होऊन गेला.

३ कद्रूपुत्र सर्पविशेष.

४ एक राक्षस. हा निर्जन वाराणसींत राहत असे (ब्रह्मांड. ३. ६७. २७; वायु. २. ३०. २४). या राक्षसास अलर्कानें ठार करून पुनः ती नगरी वसविली ( ब्रह्मांड. ३. ६७. ७२; वायु. २. ३०. ६९ ).

**क्षेमंकर**—सोमकांत राजाचा मंत्री ( गणेश. १. २९ ).

२ पश्चिम त्रिगर्तदेशीय राजा ( जयद्रथ पहा ). जयद्रथकृत द्रौपदीहरणानंतर झालेल्या संग्रामांत क्षेमंकराचें नकुलाशीं युद्ध होऊन त्यांत हा ठार झाला ( म. व. २७१ ).

**क्षेमजित्**—( शिशु. भविष्य. ) मत्स्यमतें क्षेमधर्माचा पुत्र. यास भागवतांत क्षेत्रज्ञ, विष्णु, वायु व ब्रह्मांड यांच्यामध्यें क्षत्रौजस् म्हटलें आहे.

**क्षेमदर्शिन्**—उत्तर कोसलदेशाचा राजा. हा राज्यभ्रष्ट व दुर्बल होऊन कालकवृक्षीय नामक ऋषीकडे आला. ऋषीनें याला कपटनीति व सुनीति सांगितली. शेवटीं याची सद्धर्माकडे वृत्ति पाहून त्यानें विदेहवंशीय जनक राजाशीं याची मैत्री घडवून आणिली. विदेहाधिपतीनें याची योग्यता जाणून यास जेत्याप्रमाणें आपल्या घरीं ठेवून घेतलें व याचा सत्कार केला. हें कथानक संकटकालीं राजानें कसें वागावें असें विचारिलें असतां भीष्मानें धर्माला सांगितलें ( म. शां. १०४–१०६ ).

**क्षेमधन्वन्**—( क्षेमधृत्वन् पौण्डरिक पहा ).

२ धर्मसावर्णि मनूचा पुत्र. क्षेमधर्मा असेंहि याचें नांव आढळतें.

**क्षेमधर्मन्**—( शिशु. भविष्य. ) भागवत, मत्स्य, ब्रह्मांड व विष्णु यांच्यामतें काकवर्णाचा पुत्र. वायुमतें यास क्षेमवर्मन् म्हटलें आहे ( २ क्षेमधन्वन् पहा ).

**क्षेमधी**—( सू. निमि. ) चित्ररथ जनकाचा पुत्र. विष्णुमतें यास क्षेमारि म्हटलें आहे

**क्षेमधूर्ति**—हा साल्वाचा सचिव आणि सेनापति होता. याचा सांबानें पराजय केला (म. व. १६.११ कुं.). भारतीय युद्धांत हा दुर्योधनपक्षाकडे असतां याचा बृहत्क्षत्रानें वध केला ( म. द्रो. १०७.१८ कुं. ).

२ एक क्षत्रिय. हा करुष देशाचा अधिपति होता. भीमसेनानें याचा वध केला ( म. क. ९. ३२-४५ कुं. ).

३ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र ( क्षेममूर्ति पहा ).

४ एक क्षत्रिय. बृहन्ताचा बंधु. याचें सात्यकीबरोबर युद्ध झालें ( म. द्रो. २०.२५–४८ कुं. ).

**क्षेमधृत्वन् पौण्डरिक**—(सू. इ. ) हें नांव 'क्षेमधन्वन्' असें पुराणांत आहे. यानें सुदामन् नदीच्या तीरावर यज्ञ केला ( पं. ब्रा. २२.१८.७ ).

**क्षेमभूमि**—(शुंग. भविष्य.) वायुमतें भागवताचा पुत्र.

**क्षेममूर्ति**— धृतराष्ट्रपुत्र. हा भीमसेनाच्या हातून मारिला गेला. क्षेमधूर्ति असाहि पाठभेद कुंभकोण प्रतींत सांपडतो ( म. आ. ६८.१००. ).

२ पुलह व श्वेता यांचा पुत्र (ब्रह्मांड. ३.७.१८०-१८१).

**क्षेमवर्मन्**— ( क्षेमधर्मन् पहा ).

**क्षेमवृद्धि**—हा साल्व राजाचा सेनापति होता ( म. व. १६. ११ कुं. ).

**क्षेमशर्मन्**—दुर्योधनपक्षाचा एक राजा. भारतीय युद्धांत द्रोणाचार्य सेनापति असतां त्यानें आपल्या सैन्याची रचना सुपर्णाकार केली. त्यांत गरुडाच्या मानेच्या ठिकाणीं कलिंग, सिंहल इत्यादि राजांबरोबर हा राजा जय्यत तयारीनें उभा होता ( म. द्रो. २०.७ कुं. ).

**क्षेमा**—एक अप्सरा. कश्यप व मुनि यांची कन्या.

**क्षेम्य**—( सो. पूरु. ) उग्रायुध राजाचा पुत्र. याला सुवीर नांवाचा मुलगा होता.

२. ( ४ क्षेम पहा ).

**क्षैमि**—सुदक्षिणाचें पैतृक नांव.

२ श्याम पराशरकुलोत्पन्न एक ऋषि.

---

# ख

**खगण**—( सू. इ. ) भागवतमतें वज्रनाभाचा पुत्र. याचा पुत्र विधृति. विष्णुमतें शंखनाभ व वायुमतें शंखण हाच असावा.

**खगम**—एक तपस्वी ब्राह्मण. एकदां हा अग्निहोत्र कर्मांत निमग्न असतां विनोदानें एका सहस्रपाद् नांवाच्या मित्रानें तृणाचा सर्प याच्या अंगावर टाकिला. त्यायोगें हा मूर्च्छित पडला. जरा वेळानें सावध झाल्यावर यानें त्या ब्राह्मणाला ज्या प्रकारचा सर्प करून मला भिवविलेंस, त्याच प्रकारचा तृणतुल्य सर्प तूं होशील असा शाप दिला. हा शाप ऐकल्यावर तो मित्र दुःखविव्हल होऊन त्यानें करुणा भाकिली असतां खगमानें त्याला उःश्शाप दिला कीं, भृगुकुलामध्यें प्रमतीला रुरु नामक पुत्र होईल, त्याची तुझी भेट झाली असतां तुझ्या शापाचा अंत होऊन तुला पूर्वरूप प्राप्त होईल ( म. आ. ११ ).

**खंज**—हा दनूवंशांतील होय. हा ब्रह्मदेवाच्या वरानें महापराक्रमी झाला होता. याचा अर्जुनानें वध केला ( पद्म. सृ. ६ ).

**खट्वांग**—(सू. इ.) विश्वसह राजाचा पुत्र. हा देवदैत्यांच्या युद्धांत देवांना मदत करण्याकरितां स्वर्गांत गेला होता. तेथें युद्धसमाप्तीनंतर देवांनीं यास वर मागण्यास सांगितलें असतां यानें आपलें आयुष्य किती अवशेष आहे असें विचारिलें. तेव्हां मुहूर्तमात्र आहे असें त्यांनीं सांगितलें. त्याबरोबर कांहीं एक न मागतां शीघ्रगामी विमानांतून हा त्वरेनें अयोध्येस आला आणि आपल्या दीर्घबाहु नामक पुत्रास गादीवर बसवून आत्मस्वरूपीं लीन झाला ( भा. ९.९ ). ब्रह्मपुराण व हरिवंश पहिल्या दिलीपाला खट्वांग म्हणतात ( ब्रह्म. ८; ह. वं. १.१५ ). दुसऱ्या दिलीपास खट्वांग म्हणावयास पाहिजे. भविष्यमतें मनुवंशीं नियज्ञाचा पुत्र. परम विष्णुभक्त. यानें ३००० वर्षें राज्य केलें ( दिलीप पहा ).

**खड्गधर**—सौराष्ट्रामधील एक राजा. याच्या एका माजलेल्या हत्तीचा गीतेच्या १६ व्या अध्यायाचें पठनसामर्थ्यानें एका ब्राह्मणानें मद उतरविला (पद्म. उ. १९० ).

**खड्गबाहु**—याच्या पुत्राचा दुःशासन नांवाचा सेनापति होता. तो एके दिवशीं माजलेल्या हत्तीवर बसला असतां पडून मरण पावला. पुढील जन्मीं तो हत्ती झाला. सिंहलदेशच्या राजानें तो हत्ती खड्गबाहूस दिला. खड्गबाहूनें एका कवीला व कवीनें तो मालवदेशच्या राजास दिला (पद्म. उ. १९१ ).

**खड्गहस्त**—दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

**खड्गिन्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. भारतीय युद्धांत याचा भीमानें वध केला ( म. क. ८८. १९-२३ कुं. ).

**खंडपाणि**—( सो. कुरु. भविष्य. ) भविष्य व विष्णु यांच्या मतें हा अहीनपुत्र होय. याबद्दल इतर पुराणांत दंडपाणि असा पाठ आहे.

**खंडिक औद्भारि**—हा केशिन्चा गुरु. केशिन्च्या यज्ञांत वाघानें गाय मारिली. प्रायश्चित्त विचारिलें असतां सर्वांनीं त्याला याच्याकडे पाठविलें. यानें सभा बोलावून विचार केला व प्रायश्चित्त सांगितलें ( श. ब्रा. ११. ८. ४.१ ). एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ). हा केशिन्चा प्रतिस्पर्धी होता. खंडिक व खांडिक्य एक असावेत ( मै. सं. १. ४.१२ ).

**खनक**—विदुराचा मित्र. हा खोदकामामध्यें अत्यंत कुशल होता. पांडवांना मारण्याकरितां दुर्योधनाच्या सांगण्यावरून पुरोचनानें तयार केलेल्या लाक्षागृहामध्यें पांडव राहत

असतां एके दिवशीं खनक विदुराच्या आज्ञेनें खणेकरितां त्याची अंगठी घेऊन युधिष्ठिराकडे आला व यानें विदुरानें सांगितलेलें सर्व वृत्त त्याला कळविलें. नंतर युधिष्ठिर संतुष्ट होऊन त्यानें याला पुरोचनास न समजतां सर्व पांडवांची लाक्षागृहांतून मुक्तता करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें यानें लाक्षागृहाच्या मध्यापासून खंदकापर्यंत एक विवर तयार केलें (म. आ. १५९.१ कुं.).

**खनपान**—( सो. अनु. ) भागवतमतें अंगराजाचा पुत्र, विष्णुमतें पारपुत्र, मत्स्य व वायु यांच्या मतें दधिवाहनपुत्र, यास अपानद्वार नसल्यामुळें अनपान म्हणत. याचा पुत्र दिविरथ.

**खनित्र**—( सू. दिष्ट. ) भागवतमतें प्रमति राजाचा पुत्र. याचा पुत्र चाक्षुष. विष्णु व वायु यांच्या मतें हा प्रजानिपुत्र होय. याचा पुत्र क्षुप.

**खनिनेत्र**—( सू. दिष्ट. ) हा भागवतमतें रंभपुत्र, वायु व विष्णु यांच्या मतें विविंशपुत्र. वायुमतें याचा पुत्र करंधम व विष्णुमतें अतिभूति.

याला एकंदर चौदा भ्राते होते. हा अत्यंत दुष्ट असल्यामुळें यानें आपल्या सर्व भावांना नागवून स्वतः एकट्यानेंच राज्य केलें. परंतु हा प्रजेला अप्रिय असल्यामुळें लवकरच पदच्युत होऊन याचा पुत्र सुवर्चा गादीवर आला ( म. आश्व. ४ ).

**खर**—विश्रवा ऋषीला राकेपासून झालेला पुत्र. शूर्पणखा ही सख्खी बहीण व रावण याचा सावत्र भाऊ होय ( म. व. २७६. ८ कुं. ). दूषणहि भाऊच होता असें शूर्पणखेच्या भाषणावरून दिसतें ( वा. रा. अर. १७. ). हा ब्राह्मणीं वेदवेत्ता, शूर व उत्कृष्ट सदाचारी असून पित्यासह गंधमादन पर्वतावर राहत असे. हा दक्षिणेंतील रावणाचा मुख्य संरक्षक अधिकारी होता ( वा. रा. अर. ३१ ). याच्या हाताखालीं चौदा सेनापति व एकंदर चौदा हजार सैन्य होतें ( वा. रा. अर. १९; २२ ). प्रथम सहजगत्या लक्ष्मणाकडे येऊन शूर्पणखेनें प्रेमयाचना केली. तेव्हां रामाच्या सांगण्यावरून लक्ष्मणानें तिचें नाक व कानहि कापिले. तेव्हां ती आक्रोश करीत जनस्थानांत खराकडे आली. खरानें आपले चौदा सेनानायक चौदा हजार सैन्यासह रामावर पाठविले. पण रामानें त्यांना ठार केलें. नंतर आपला सेनापति दूषण याच्या नेतृत्वाखालीं सैन्य तयार करवून स्वतः हा रामावर चालून गेला. रामानें लक्ष्मणाला सीतेला घेऊन संरक्षणतेकरितां पर्वताच्या एका गुहेंत जाऊन बसण्यास सांगितलें. व तीं गेल्यावर स्वतः कवच घालून हा युद्धाला सज्ज झाला. युद्ध सुरू झाल्यानंतर दूषण, शिरस व खर यांना धनुष्याच्या साहाय्यानें रामानें सैन्यासह ठार केलें. हें युद्ध मुहूर्तांत झालें, यांपैकीं प्रेक्षक म्हणून सुरक्षित असलेल्या व पळून गेलेल्या अकंपनानें लंकेंत रावणाला हें सर्व वृत्त कळविलें ( वा. रा. अर. १८–३१ ). या युद्धांत प्रामुख्यानें राम धनुष्यानें युद्ध खेळत आहे व राक्षसांच्याकडे धनुष्य नाहीं हें स्पष्ट दिसतें. याला मकराक्ष नांवाचा मुलगा होता. यानें जनस्थानांतील ऋषींना अत्यंत त्रास दिलेला असल्यामुळें तेथील ऋषींना या कृत्यानें फारच आनंद झाला व रामाची त्यांनीं अत्यंत वाहवा केली ( वा. रा. अर. ३० ).

२ रावणपक्षीय दुसरा एक राक्षस ( म. व. २८६. २ कुं. ).

३ लंबासुराचा एक भ्राता, असुर ( मत्स्य. १७६.७ ).

४ विजराचा पुत्र.

**खरवाच्**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**खरपुरंजय**—वायुमतें मथुरेंत राज्य करणारा एक राजा.

**खलीयस**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील शालीयाबद्दल पाठभेद.

**खल्यायन**—धूम्रपराशराच्या कुलांत प्रसिद्धीस आलेल्या पांच ऋषींपैकीं एक व गण.

**खशा**—ही प्राचेतस दक्षप्रजापति व असिक्नी यांची कन्या. ही कश्यप प्रजापतीस दिली होती. हिला यक्षराक्षसादि झाले.

**खांडव**—भृगुकुलांतील मित्रयुकुलांत जन्मास आलेला एक ब्रह्मर्षि.

२ पौंडवाबद्दल पाठभेद.

**खांडवायन**—परशुरामानें एक मोठा यज्ञ केला व पृथ्वी व दहा वाव लांब आणि नऊ वाव उंच अशी सुवर्णमय वेदिका कश्यपास अर्पण केली. कश्यपाच्या अनुमतीनें इतर ब्राह्मणांनीं तिचे तुकडे करून ते विभागून घेतले. यामुळें ते ब्राह्मण खांडवायन नांवानें प्रसिद्ध झाले ( म. व. ११७ ).

**खांडिक्य**—( सू. निमि. ) हा भागवतमतें मितध्वजपुत्र होय. हा क्षत्रिय असून याला खांडिक्यजनक असें म्हटलें आहे. केशिध्वज हा याचा चुलतभाऊ. खांडिक्य कर्ममार्गामध्यें अत्यंत प्रवीण असून केशिध्वज हा आत्मविद्याविशारद होता. या उभयतांस परस्परांस जिंकण्याची इच्छा उत्पन्न होऊन केशिध्वजानें खांडिक्याला राज्याबाहेर हांकलून दिलें. तेव्हां हा मंत्री व पुरोहित यांसमवेत अरण्यांत निघून गेला ( भा. ९.१३ ).

इकडे ज्ञाननिष्ठ केशिध्वजानें कर्मबंधनांपासून पार पडण्याकरितां पुष्कळ यज्ञ केले. पुढें एकदां तो यज्ञ करीत असतां निर्जन वनामध्यें एका व्याघ्रानें त्याची गाय मारिली. तेव्हां त्याच्याबद्दलचें प्रायश्चित्त त्यानें ऋत्विजांस विचारिलें असतां, त्यांनीं त्याला कशेरूकडे पाठविलें. कशेरूनें भृगूस व भृगूनें शुनकास प्रायश्चित्त विचारण्यास त्यास सांगितलें. शेवटीं

शुनकाच्या सांगण्यावरून तो अरण्यांत खांडिक्याकडे गेला. खांडिक्य त्याला पाहतांच त्याची निर्भर्त्सना करून त्याचा वध करण्यास उद्युक्त झाला. परंतु केशिध्वजानें याला वस्तुस्थिति निवेदन केल्यावर खांडिक्यानें त्याला धेनुवधाबद्दल यथाशास्त्र प्रायश्चित्त सांगितलें. त्याप्रमाणें केशिध्वज यज्ञभूमीचे ठिकाणीं जाऊन त्यानें यज्ञ सिद्धीस नेला. परंतु खांडिक्याला गुरुदक्षिणा द्यावयाची शिल्लक राहिल्यामुळें तो परत खांडिक्याकडे आला असतां, खांडिक्य पुनः त्याला मारण्यास उद्युक्त झाला. तेव्हां केशिध्वजानें मी तुझा वध करण्याकरितां आलों नसून गुरुदक्षिणा देण्याकरितां आलों आहे, तरी तूं ती माग, असें याला सांगितलें. खांडिक्यानें सर्व दुःखापासून मुक्तता होण्याचा मार्ग त्याला विचारिला. यावरून केशिध्वजानें याला देहाची नश्वरता व आत्म्याचें चिरंतनत्व यांचें महत्त्व पटवून दिल्यावर सर्व दुःखांचा नाश होण्यास योगावांचून दुसरा मार्ग नाहीं असें सांगितलें. नंतर खांडिक्यानें योगमार्ग कथन करण्यास त्याला सांगितलें असतां, केशिध्वजानें याला परब्रह्माचा उपदेश करून मोक्षपदाप्रत नेणारा योग सांगितला (विष्णु. ६. ६-७; नारद. १. ४६-४७; केशिन् दार्भ्य पहा).

**खांति**—तामस मनूचा पुत्र.

**खादिर**—द्राह्यायणाचें दुसरें नांव (द्राह्यायण पहा).

**खार्गलि**—लुशाकपीचें पैतृक नांव.

**खालीय**—व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील शालीयाबद्दल पाठभेद.

**खिलि व खिलिखिलि**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार व प्रवर.

**खुर्दक**—(ऐति.) भविष्यकालीन तिमिरलिंगाच्या वंशांतील म्लेच्छ राजा (भवि. प्रति. ४.२२).

**खेल**—एक राजा. याची बायको विश्पला. तिचा पाय लढाईंत तुटला असतां अश्वींनीं एका रात्रींत लोखंडी पाय बसवून तिला दुसऱ्या दिवशीं पुनः लढण्यास सज्ज केलें (ऋ. १.११६.१५). याचा पुरोहित अगस्त्य होता.

**ख्याति**—(स्वा. उत्तान.) भागवतमतें उल्मुक व पुष्करिणी यांचा पुत्र.

२ (स्वा.) भागवतमतें कर्दम व देवहूती यांची कन्या व भृगुपत्नी.

३ तामस मनूचा पुत्र.

४ उरु व षडाग्नेयी यांचा पुत्र.

**ख्यातेय**—नीलपराशरकुलांमधील एक ऋषि.

## ग

**गगनमूर्धन्**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**गंगा**—एक स्वर्गीय देवता. एके समयीं सर्व देव ब्रह्मदेवाकडे गेले. त्यांबरोबर गंगा व इक्ष्वाकुकुलोत्पन्न महाभिषहि गेला होता. तेथें एकाएकीं वाऱ्यानें हिचें वस्त्र उडालें. हें पाहून सर्वांनीं माना खालीं घातल्या; परंतु महाभिष निःशंकपणें हिच्याकडे पाहत राहिला. हें पाहून ब्रह्मदेवानें त्यास शाप दिला कीं, "मृत्युलोकीं जन्म घेशील व गंगा तुझी स्त्री होईल. ती तुला अप्रिय अशीं कृत्यें करील आणि जेव्हां तुला तिच्या कृत्यांचा राग येईल तेव्हां तूं मुक्त होऊन या लोकीं येशील." याप्रमाणें शाप ऐकिल्यावर महाभिषानें प्रतीपाच्या पोटीं जन्म घेण्याचें ठरविलें. वाटेंत वसिष्ठशापानें मृत्युलोकीं येणारे अष्टवसु हिला भेटले. त्यांनीं हिचे पोटीं जन्म घेण्याचें ठरविलें. यामध्यें त्यांनीं एक अट घातली ती अशी कीं, मुलगा होईल तो पाण्यांत टाकून द्यावयाचा. परंतु हिनेंहि एक अट घातली कीं, मी ज्याच्याशीं विवाह करणार त्यास पुत्रेच्छा असणार. तेव्हां त्याच्याकरितां एक मुलगा तरी राहिला पाहिजे. त्याप्रमाणें अष्टवसूंनीं आपल्यांपैकीं प्रत्येकाच्या वी[illegible] पासून एक मुलगा देण्याचें कबूल केलें. तसेंच तो वीर्य[illegible] पण निपुत्रिक होईल असें सांगितलें. हिला भगीरथानें स्व[illegible] वरून आपल्या पितरांच्या मोक्षार्थ खालीं आणिलें. ही समु[illegible] कडे जात असतां वाटेंत जन्हूनें पिऊन पुनः हिला सो[illegible] दिलें (भगीरथ व जह्नु पहा). एकदां प्रतीप ध्यान[illegible] बसला असतां गंगा पाण्याच्या बाहेर आली व त्या[illegible] उजव्या मांडीवर जाऊन बसली. तें पाहून त्यानें हि[illegible] इच्छेबद्दल पृच्छा केली. हिनें आपला स्वीकार करण्यास सांगित[illegible] तेव्हां त्यानें ही उजव्या मांडीवर बसली म्हणून हिचा [illegible] म्हणून स्वीकार करण्याचें कबूल केलें. त्या वेळीं गंगेनें [illegible] अट घातली कीं, मी आपली सून झाल्यें म्हणजे मी जें जें क[illegible] त्यासंबंधानें आपल्या मुलानें बिलकूल वाटाघाट करूं [illegible] जोंपर्यंत ही अट पाळिली जाईल तोंपर्यंत मी आपल्या सु[illegible] सहवास पत्करीन व सुख देईन. त्याला पुण्यवान् [illegible] होतील व त्यांच्या बरोबरच त्याला स्वर्ग मिळेल.

२ ( सो. यदु. ) भागवतमतें श्वफल्काच्या तेरा पुत्रांतील एक.

**गंधमोक्ष**—( सो. यदु. ) विष्णुमतें श्वफल्काचा पुत्र.

**गंधर्व**—कद्रूपुत्र एक सर्प.

**गंधर्वराज**—( नारद पहा ).

**गंधर्वसेन**—अग्निवंशांतील देतदूताचा पुत्र. यानें ५० वर्षे राज्य केल्यानंतर हा तपश्चर्येला निघून गेला ( भवि. प्रति. १. ७; ४. १ ).

**गंधर्वसेना**—ही कैलासावरील स्वयंप्रभा नगरींत राहणाऱ्या धनवाहन नांवाच्या गंधर्वाची मुलगी. ही सोमवार-व्रतानें कुष्टरहित झाली ( स्कंद. ७.१.२४–२५ ).

**गंधर्वायण बालेय आग्निवेश्य**—एक पांचाल ( बौ. श्री. २०.२५ ).

**गंधवती**—सत्यवतीचें नामांतर ( म. आ. ६४ कुं ).

**गभस्तिनी**—लोपामुद्रेची बहीण व दध्यच् ऋषीची स्त्री ( ब्रह्म. ११०. ७ ). हिलाच नातिथेयी असें म्हटलें आहे ( ब्रह्म. ११०. ६१ ).

**गंभीर**—( सो. आयु. ) हा रसभ राजाचा पुत्र असून याचा पुत्र अक्रिय (भा. ९. १७. १० ).

२ भौत्य मनूचा पुत्र. याला गभीर असेंहि नांव आहे.

**गंभीरबुद्धि**—इंद्रसावर्णि मनूच्या होणाऱ्या पुत्रांतील एक ( मनु पहा ).

**गय**—( स्वा. उत्तान. ) भागवतमतें उल्मुक व पुष्करिणी यांचा पुत्र.

२ ( स्वा. उत्तान. ) भागवतमतें हा हविर्धानपुत्र होय.

३ ( स्वा. प्रिय. ) विष्णु व भागवत यांच्या मतें हा नक्त व द्रुति यांचा पुत्र होय. याची स्त्री गयंती. चित्ररथ, सुगति व अवरोधन असे यास तीन पुत्र होते ( भा. ५. १५. ६ ).

४ ( सो. आयु. ) आयूचा पुत्र ( म. आ. ६९. २८ कुं. ).

५ ( सो. पुरूरवस्. ) अधूर्तरजसाचा अथवा अमूर्तरयाचा पुत्र ( म. स. ८; श. ३९ कुं. ). हा मोठा धर्मात्मा व यज्ञयाग करणारा होता. सतत शंभर वर्षे हा यज्ञ करीत होता. गयदेशामध्यें हा राजा यज्ञयाग करीत असतां सरस्वती नदीला आमंत्रण दिल्यावर प्रादुर्भूत झालेल्या सरस्वतीस विशाला म्हणूं लागले ( म. व. ९५;१२१ ).

६ ( सू ) इल अथवा सुद्युम्न राजाचा मध्यम पुत्र. हा गयापुरीमध्यें राज्य करीत होता ( भा. ९. १. ४१; पद्म. सृ. ८; गयासुर पहा ).

७ दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

८ उरु व षडाग्नेयी यांचा पुत्र.

**गय आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५.९-१० ).

**गय प्लात**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ६३-६४ ). गय हा प्लतीचा मुलगा ( ऐ. ब्रा. ५. २ ). यानें एका ठिकाणीं आपल्या सूक्तांत 'नहुषपुत्र ययातीच्या यज्ञांत जाणारे देव मला धन देवोत' असा उल्लेख केला आहे ( ऋ. १०. ६३. १७ ). असित व कश्यपाबरोबर याचा उल्लेख आला आहे ( अ. वे. १. १४ ).

**गयंती**—नक्तपुत्र गयाची स्त्री.

**गयासुर**—दैत्य. विष्णूनें याचा कैकट देशांत नाश केला. याचा देह पांच कोस व डोकें एक कोस लांब होतें ( स्कंद. ५. १.५९ ).

हा शरीरानें अत्यंत अवाढव्य होता. हा विष्णुभक्त असल्यामुळें याचा पवित्र देह ब्रह्मदेवानें यज्ञाकरितां मागितला. यानें आपला देह लोकोपकारार्थ दिला. मग ब्रह्मदेवानें याला कोलाहल पर्वतापाशीं दक्षिणोत्तर उत्तरेकडे डोकें करून निजवला व तो हालूं नये म्हणून आदि गदाधराची यावर स्थापना केली व याला सर्वांना उद्धारणारे वर दिले ( वायु. २.४४ ). हें स्थान कीकट देशांत आहे. याचे पाय प्रभासक्षेत्रीं आहेत.

**गर**—सुबाहूचा पुत्र. हा फारसा धार्मिक नव्हता. हैहय, तालजंघ, शक, यवन, पारद, कांबोज व पल्लव या निरनिराळ्या राजांनीं एकजुटीनें याचें राज्य हरण केलें. म्हणून हा आपल्या कुटुंबासह भार्गव ऋषीच्या आश्रमांत जाऊन राहिला होता. तेथें आल्यानंतर अल्पच कालानें हा मरण पावला. याची स्त्री कल्याणी व पुत्र सगर ( पद्म. उ. २० ).

२ एका सामाचा कर्ता व इंद्राचा मित्र ( पं. ब्रा. ९; २. १६ ).

३ ( वीरभद्र पहा ).

**गरिष्ठ**—एक ऋषि. हा इंद्रसभेंत हजर होता ( म. स. ७ कुं. ).

**गरुड**—कश्यप व विनता यांचा पुत्र. अरुणाचा कनिष्ठ बंधु. अरुणानें आपले आईस शाप दिला होता ( ३ अरुण व १ विनता पहा ). त्याप्रमाणें ती कद्रू नामक सवतीचे दास्यत्वांत गुंतली होती. इकडे गरुड अंड्यांतून बाहेर पडला व भराभर वाढून उडून गेला ( म. आ. २३. ६६; स. ९. ५३; उ. ११२ कुं. ). वालखिल्यांनीं इंद्र उत्पन्न करण्याकरितां केलेल्या तपाचें फळ कश्यपास दिलें, तेंच पुण्य कश्यपानें विनतेस दिलें. तेव्हां तिनें एक अंडें घातलें, तेंच या गरुडाचें होय ( म. आ. ३१; अनु. २१ ). ज्या वेळीं हा उडून जाऊं लागला, त्या वेळीं गरुडास पक्षांचा इंद्र म्हणून वालखिल्यांनीं अभिषेक केला. उडतांना हा इतका प्रखर व तीव्र भासूं लागला कीं, अग्नीनें जसे लोकांचे जीव कासावीस होतात, तसे त्या वेळीं होऊं लागले. तेवढ्यावरून लोक यासच अग्नि समजून याची स्तुति करूं लागले.

यानें हें जाणून आपलें तेज संकुचित केलें. पुढें यानें आपला थोरला बंधु अरुण यास पाठीवर घेऊन पूर्वदिग्भागीं नेऊन ठेविलें ( म. आ. २३; अरुण पहा ).

नंतर हा आपली आई विनता कद्रूकडे होती तेथें गेला. तेव्हां ती अतिदुःखीकष्टी असल्याचें याला दिसलें. इतक्यांत कद्रूनें नागांचे उपवनांत जाण्याचें ठरवून ती विनतेच्या खांद्यावर बसली व तिनें सर्पांना खांद्यावर घेण्यास गरुडास सांगितलें. त्याप्रमाणें हा उडून जात असतां इतका उंच गेला कीं, सूर्याच्या उष्णतेमुळें सर्व सर्प गळून खालीं पडले. तेव्हां कद्रूनें इंद्राची स्तुति केली असतां त्यानें पाऊस पाडिला. पुढें पुनः नाग त्यांना वाटतील ते हुकूम फर्मावूं लागले. तेव्हां गरुडानें आईकडे तक्रार केली. विनतेनें यास दासीभवनाची सर्व हकीगत सांगून नागांचें कपटहि सांगितलें. तेव्हां गरुडानें कद्रूस आईच्या दास्यत्वमुक्तेचा उपाय विचारिला असतां कद्रूनें दास्यत्वाऐवजीं अमृत मागितलें ( म. आ. २५ ).

अमृत आणण्याकरितां आईची परवानगी विचारिली व क्षुधा-निरसनास काय म्हणून विचारितां तिनें यासा निषादांना खाण्यास सांगितलें. पुढें खातां खातां निषाद म्हणून यानें एक ब्राह्मण व त्याची कोळीण पत्नी खाल्ली. त्यामुळें याचा घसा इतका भाजला कीं, यानें त्यांस सोडिलें (म. आ. २८). ब्राह्मणास बाहेर टाकितांना कांहीं निषादहि बाहेर टाकिले, ते म्लेच्छ झाले (पद्म. सृ. ४७). इतक्यांत याचा बाप ज्या ठिकाणीं तपस्येस बसला होता त्या ठिकाणीं हा आला. आणि क्षुधानिवारणार्थ यानें कांहीं मागितलें. तेव्हां कश्यपानें यास एका सरोवरांत भांडत असलेले एक कांसव व एक हत्ती—हे पूर्वजन्मीं सख्खे भाऊ होते, पण एकमेकांचे वैरी होते—अशा दोघांस खाण्यास सांगितलें. व यास शुभाशीर्वाद देऊन मार्गीं लाविलें. गरुडानें कश्यपानें सांगितलेल्या सरोवरांत भांडत असलेले हत्ती व कांसव पाहिले व भांडत असतांनाच त्यांस आपले पंजानें उचलून घेऊन हा उडून गेला, व एका शंभर योजनें लांब व तिच्या लांबीच्या मानानेंच जाड अशा वडाच्या फांदीवर बसला. इतक्यांत ती फांदी मोडली. याच फांदीला वालखिल्य उलटे टांगून घेऊन तप करीत होते. हें पाहून ती फांदी यानें चोंचींत धरिली व त्या तिघांसह उडून हा पुनः कश्यपाकडे आला. तेव्हां कश्यपानें वालखिल्यांस कुशल प्रश्नांनीं संतुष्ट करून त्यांचा होणारा कोप टाळला. पुढें ते वालखिल्य त्या फांदीपासून सुटून हिमालयावर गेले व कश्यपाच्या सांगण्यावरून ती फांदी एका पर्वतशिखरा-वर यानें नेऊन ठेविली. तेथेंच त्या हत्तीस व कांसवास खाऊन पुढें हा अमृतार्थ निघाला.

अमृताकरितां गरुड इकडेच निघाला, असें जाणून देवांनीं याच्याशीं लढण्याची तयारी चालविली. पुढें याचें यक्ष, गंधर्व व देव यांशीं युद्ध झालें; पण त्यांत त्यांचा पराभव झाला. याच वेळीं इंद्रानें याजवर आपलें वज्र टाकिलें, परंतु यास कांहींच इजा झाली नाहीं. यानें इंद्राच्या व ज्याच्या हाडांचें वज्र केलें होतें त्या दधीचीच्या मानाकरितां एक पीस टाकिलें. नंतर हा अमृतगुहेकडे वळला. तेथें सुदर्शनचक्रासारखेंच एक चक्र त्या गृहाचें रक्षण करीत होतें व चोहों बाजूंस अग्नीचा कोट होता ( यो. वा. १. ९ ).

तेव्हां अतिसूक्ष्म रूप धारण करून त्या चाकाच्या मध्यभागीं असलेल्या तुंब्याच्या भोंकांतूनच यानें प्रवेश केला. पण अमृताच्या दोहों बाजूंस दोन नाग होते. त्यांच्या दृष्टीस जें जें पडे तें तें सर्व भस्म होई. यानें मात्र आपण त्यांच्या दृष्टीस पडून भस्म होऊं नये म्हणून त्यांच्या डोळ्यांत धूळ टाकून त्यांस डोळे मिटावयास लाविलें व आपण तें अमृताचें भांडें घेऊन निघाला. इतक्यांत याची व विष्णूची गांठ पडली. तेव्हां सर्वच्या सर्व भांडें जवळ असूनहि यानें एका थेंबाससुद्धां स्पर्श केला नाहीं, हें पाहून विष्णु यावर प्रसन्न झाला व त्यानें यास दोन वर देऊं केले. त्या दोन वरांनीं, “ मी तुझ्या वरच्या बाजूस असावें व अमृताखेरीज मी अमर असावें,” असें यानें मागून घेतले. आपण तुझी कोणत्या प्रकारें सेवा करावी हें विचारिलें. त्यानें तूं माझें वाहन व्हावेंस, व तुझ्या बरोबर मी ज्या वेळीं रथांत असेन त्या वेळीं तूं माझ्या ध्वजावर बसावेंस, असें सांगितलें ( म. आ. ३२-३३ ). पुढें हा पुनः बदरिकाश्रमीं कश्यपाजवळ आला व यानें त्यास झालेली हकीगत सांगितली. तेव्हां कश्यप व तत्रस्थ ऋषि यांनीं यास नारायणमाहात्म्य निवेदिलें. यानंतर याचें व इंद्राचें सख्य झालें. व अमृत नेण्याचें कारण यानें त्यास सांगितलें तें ज्याअर्थी तुझे आईस कपटानें त्यांनीं दासी केलें, त्याअर्थी आपणहि कपटानेंच तिला सोडवूं असें इंद्र म्हणाला व सख्यत्व दर्शविण्याकरितां त्यानें सर्प तुझें भक्ष्य होवोत म्हणून यास वर दिला. पुढें यानें तें अमृताचें भांडें दर्भावर ठेवून सर्पांस स्नानादि करून मग भक्षिण्यास सांगितलें. याचे सांगीप्रमाणें ते सर्प स्नानास गेले असतां इंद्रानें येऊन तें अमृत पळविलें. अशा तऱ्हेनें त्या सर्पांना ठकवून यानें आपल्या आईची सुटका केली. याच्या बायका भासी, क्रौंची, शुकी, धृतराष्ट्री व श्येनी ( ब्रह्मांड. ३. ७. ४४८-४४९ ).

पुढें एकदां इंद्रानें सुमुख नांवाच्या नागास अमरत्व दिलें, तेव्हां गरुड संतापून त्याजकडे गेला व माझ्या तोंडचें अन्न कां काढतोस वगैरे बोलून, मी विष्णूला पाठीवर सहज वाहून नेतों, त्याअर्थी मी सर्वांत म्हणजे विष्णूपेक्षांहि बलवान् आहे, इत्यादि वल्गना करूं लागला. तेव्हां विष्णूनें याचा गर्व हरण

...रण्याकरितां याचे शरीरावर आपला एक हात सहज टाकिला. ...यामुळें याचा जीव कासावीस होऊन हा विष्णूस शरण गेला. ...हा विष्णूनें त्या सुमुख नागास अंगठ्यानें उडवून गरुडाचे छातीवर ठेविलें. तेव्हांपासून तो सुमुख गरुडाचे छातीवर आहे (म. उ. १०५).

गालव नांवाचा ऋषि याचा मित्र होता. गालव गुरुदक्षिणेच्या विवंचनेंत असतांना गरुड त्याजपाशीं आला व त्यास ...करितां म्हणून यानें त्यास पाठीवर घेऊन चोहोंकडे फिरवून आणिल्यावर ऋषभ पर्वतावर एका शांडिली नामक ...चे आश्रमांत हे उतरले. पुढें हा व गालव असे दोघे ...च्या आश्रमांत वामकुक्षी करीत असतां गरुडाचे मनांत आलें ..., ही ब्राह्मणी इतकी तपोनिष्ठ आहे त्याअर्थी तिला आपण ... व अशा तऱ्हेनें अंशतः तरी तिजवर उपकार .... पण त्या ब्राह्मणीस हा याचा विचार पापविचार असा वाटला तिनें याचे पंख योगबलानें तोडून टाकिले. पण यानें तिची क्षमा मागितली, तेव्हां यास पूर्वीपेक्षांहि उत्कट असे पंख फुटले. पुढें हे दोघे जात असतां मध्येंच गालवाचा गुरु विश्वामित्र भेटला व त्यानें दक्षिणेचा तगादा लाविला. तेव्हां गरुडानें त्वरा करून प्रथम द्रव्य मिळवूं असें म्हणून त्यास ययाति राजाकडे नेलें. पण ययातीनें जवळ द्रव्य नसल्यामुळें आपली अल्पवयी कन्या माधवी ही एका अटीवर ...यास दिली. ती अट म्हणजे तिला होणाऱ्या पुत्रांवर ययातीचे ...र्थक म्हणून ययातीचा हक्क असावा. गालवास सांगितलें कीं, हिला कोणताहि राजा तुझी इच्छित किंमत देऊन घेईल. पुढें गुरुदक्षिणार्थ अश्वप्राप्तीचें साधन मिळतांच यानें गालवाची परवानगी घेतली व हा स्वस्थानीं परतला (म. उ. १०७–११३).

यास सुमुख, सुनामन्, सुनेत्र, सुवर्चस्, सुरुच् व सुबल असे सहा पुत्र होते (म. उ. १०१). याच अध्यायांत आणखी एक नामावलि दिली आहे. या नामावलीचे आरंभीं याचे कुलांतील इतर सांगतों असें म्हटलें आहे व शेवटीं हे सर्व गरुडपुत्रांपैकीं आहेत असें म्हटलें आहे. सुवर्णचूड, नागाशिन्, दारुण, चंडतुंडक, अनिल, अनल, विशालाक्ष, कुंडलिन्, पंकजित्, वज्रविष्कंभ, वैनतेय, वामन, वातवेग, दिशाचक्षु, निमेष, अनिमिष, त्रिराव, सप्तराव, वाल्मीकि, दीपक, दैत्यद्वीप, सद्द्वीप, सारस, पद्मकेतन, सुमुख, चित्रकेतु, चित्रबर्ह, अनघ, मेषहृत्, कुमुद, दक्ष, सर्पान्त, सोमभोजन, गुरुभार, कपोत, सूर्यनेत्र, चिरांतक, विष्णुधर्मन्, कुमार, पतिबर्ह, हरि, सुस्वर, मधुपर्क, हेमवर्ण, ..., ..., ..., दिवाकर. हा ज्या वेळीं इंद्राशी ... दिल्यावरून भांडण्यास गेला होता, त्या वेळीं, मी श्रुतश्री, श्रुतसेन, विवस्वान्, रोचनामुख, प्रस्तुत व कालकाक्ष असले राक्षस मारून अचाट कर्मे केलेलीं आहेत, असें यानें स्वतःच इंद्रास सांगितलें होतें (म. उ. १०५).

यास याच्या निरनिराळ्या कृत्यांवरून अनेक नांवें पडलीं. त्यांपैकीं काश्यपि हें पैतृक नांव, वैनतेय हें मातृक नांव, सुपर्ण हें दधीचीच्या मानाकरितां टाकिलेल्या सुंदर पर्णा( पिसा )मुळें पडलें. तसेंच यास आणखीं नांवें होतीं. तार्क्ष्य ( बापावरून ), सितानन (तोंडाच्या पांढऱ्या रंगावरून), रक्तपक्ष ( पंखांच्या तांबड्या रंगावरून ), सुवर्णकाय ( अंगाच्या सुवर्णकांतीवरून ), गगनेश्वर, खगेश्वर ( आकाशांतील फिरण्यावरून ), नागांतक, पन्नगाशन, सर्पाराति ( भक्ष्यावरून ), विष्णुरथ ( विष्णूचा वाहन असल्यामुळें ), अमृताहरण, सुधाहर ( अमृतहरणामुळें ), सुरेंद्रजित् ( इंद्रास जिंकल्यामुळें ), वज्रजित् ( वज्राचा कांहींएक परिणाम न होण्यामुळें ), गरुत्मत् ( पंखवाला म्हणून ), तसेंच आणखी तरस्विन्, रसायन, कामचारिन् कामायुष, चिराद वगैरे अनेक नांवें आहेत. याचें रूप फार विचित्र होतें. याचें मस्तक, पंख, चोंच व नखें हीं गरुडपक्ष्याप्रमाणें होतीं. शरीर व अवयव माणसासारखीं होतीं.

याच्याच वंशांतील पिंगाक्ष निबोध, सुपुत्र व सुमुख यांनीं जैमिनीच्या भारतावरील शंकांचें निरसन केलें ( मार्क. ४ ). हे चौघेजण श्वास न सोडितां वेदपठण करीत असतात ( मार्क. ४. ४; गरुत्मत् पहा ). गरुडपुराण यानेंच कश्यपाला सांगितलें ( गरुड. १. २ ). याची उपासना बरीच प्राचीन आहे. याची गायत्री प्रसिद्ध आहे ( महाना. ३. १५, गरुडोपनिषद् पहा ).

**गरुंड**—पुराणांत भविष्यकालीं होणारा म्हणून दिलेला राजवंश. यांत दहा राजे आहेत. भविष्यपुराणांत लार्ड ले दहावा गरुंड होता असें म्हटलें आहे. यावरून इंग्रजांना गरुंड म्हटलें असावें असें दिसतें ( भा. १२. १. भवि. प्रति. ४. २३. ८७; मत्स्य. २७३; ब्रह्मांड. ३. ७४ ). मरुंड असेंहि आढळतें ( वायु. २. ३७. ).

**गरुत्मत्**—गरुडाचें नांव ( भा. ३. १९. ११ ). ऋग्वेदांत गरुत्मत्नें अमृत व सोम आणिल्याचा अनेक ठिकाणीं निर्देश आहे ( श्येन पहा ).

**गर्ग**—( सो. काश्य. ) दिवोदासपुत्र प्रतर्दनाच्या दोन मुलांतील एक ( ह. वं. १. ३० ).

२ हा यादवांचा सुप्रसिद्ध पुरोहित होता. यानेंच श्रीकृष्णाचें नामकरण व उपनयन हे संस्कार केले ( भा. १०. ८ ). देवकीला मूल ... मारिल्याचा कंसानें सपाटा चालविला, तेव्हा वसुदेवानें याला पुत्र दीर्घायु होण्याला उपाय विचारला

म्हणून यानें देवीभागवत श्रवण करण्याचा उपाय त्यांना सांगितला. पण तें तुरुंगांत शक्य नाहीं, म्हणून गर्गमुनीनें स्वतः देवीभागवत वाचिलें. त्यामुळें देवीनें लवकरच कृष्णावतार होईल असा वर दिला ( दे. भा. १.२ ). गर्गानें चवसष्ट कलांवर ग्रंथ केला असावा ( म. अनु. ४९.३८ कुं. ). गर्गस्मृतीचे उतारे हेमाद्रि व माधवाचार्य यांनीं घेतले आहेत.

हा प्रसिद्ध ज्योतिषी होता. यानें कृष्णजन्माचें भविष्य बरोबर वर्तविलें होतें. गर्गसंहिता नांवाचा १२ हजार श्लोकांचा श्रीकृष्णचरित्रपर ग्रंथ उपलब्ध आहे, तो याच गर्गाचा आहे, असें म्हणतात. इतिहासावरील या ग्रंथाप्रमाणें ज्योतिषावरहि एक गर्गसंहिता पूर्वी असावी. आतां बृहद्गार्गीय संहिता म्हणून एक अलीकडील ग्रंथ मिळतो. गर्गाचे वारिशास्त्र व मयूरचित्रक असे आणखीहि दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. या दोन्ही ग्रंथांत पावसाच्या भविष्यासंबंधीं सविस्तर माहिती म्हणजे वायुविद्या आहे. मयूरचित्रक हा गर्ग व भागुरि यांचा संवादरूप ग्रंथ आहे ( कविचरित्र ). गर्गानें वास्तुशास्त्रावर ग्रंथ केला होता ( मत्स्य. २५२ ).

३ हा कलिंगदेशांत राहणारा असून मुखानें विश्वनाथाचें नांवे घेत खांद्यावर गंगेची कावड घेऊन जात होता. वाटेंत ब्रह्मराक्षस झालेल्या सोमदत्त व कल्माषपाद यांची गांठ पडली. त्यांच्यावर तुलसीमिश्र गंगोदक फेकिल्यावर सोमदत्त उद्धरून गेला व कल्माषपादास पश्चात्ताप होऊन सरस्वतीनें आश्वासन दिल्यावर सहा महिने काशीस राहून तो राज्यांत परत गेला (नारद. १. १४१ ).

४ आंगिरसवंशमालिकेंतील एक प्रख्यात ऋषि.

५ ( सो. पूरु. ) मन्यु राजाचा पुत्र. याचा पुत्र शिनि.

६ एक ऋषि ( पितृवर्ती पहा ). यानें भीष्मपंचकव्रत केलें होतें ( पद्म. उ. २४ ).

७ अंगिराकुलांतील गोत्रकार.

८ ऋषभ नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

९ लकुलिन् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**गर्ग भारद्वाज**—सूक्तद्रष्टा ( ऋ ६. ४७ ).

**गर्गभूमि**—( सो. क्षत्र. ) हा वायुमतें गार्ग्यपुत्र.

**गर्दभीमुख**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**गर्दभीमुख शांडिल्यायन**—एक आचार्य. याचा गुरु उदरशाण्डिल्य ( वं. ब्रा. २ ).

**गर्दभील**—भागवत व मत्स्य यांच्या मतें एक भविष्यकालीन राजाचा वंश.

**गर्दभीविपीत**—गौतमकुलामध्यें जन्मलेला एक ऋषि.

२ भारद्वाजकुलामध्यें जन्मलेला एक ऋषि.

३ यानें श्रोत्र ब्रह्म असल्याबद्दल सांगितल्याचें जनक याज्ञवल्क्याला सांगत आहे ( बृ. उ. ४. १. ५ ). याला विभीत असेंहि म्हणत असत.

**गर्भ**—( सो. तुर्वसु. ) हा मत्स्यमतें तुर्वसुपुत्र होय.

**गर्भकर्तृ**—( त्वष्टृ पहा ).

**गर्व**—धर्मऋषीचा पुत्र. याची माता पुष्टि.

**गलूनस आर्क्षाकायण**—एक आचार्य. याचा व जैवलीचा सामाविषयीं संवाद झाला आहे ( जै. उ. ब्रा. १. ३८.४ ).

**गवय**—हा रामसेनेंतील वानर असून रामानें यज्ञ केला तेव्हां अश्वाच्या रक्षणार्थ शत्रुघ्नाबरोबर याला पाठविलें होतें ( म. व. २८४; पद्म. सृ. ३८; पा. ११ ).

**गवल्गन**—हा सूत असून संजयाचा पिता होय.

**गववर्मन्**—बौद्धजेता व अथर्ववेदपरायण परिहाराच्या वंशांतील राजा भोजवर्मा याच्या मागून हा गादीवर आला. यानें भोजराष्ट्रामध्यें एकंदर ५० वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४.४ ).

**गवाक्ष**—शकुनीचा भ्राता. हा भारतीय युद्धांत इरावानाकडून मारिला गेला ( म. भी. ९०. ३०–३९ कुं. ).

२ रामसेनेंतील एक वानराधिपति (म. व. २८४.४ कुं.).

३ भारतीय युद्धांत भीमानें मारिलेला एक राजा (म. द्रो. १५८. २३ कुं. ).

**गविजात**—एक ब्रह्मर्षि ( म. अनु. ८४ कुं.; च्यवन पहा ).

**गविष्ठ**—कश्यप व दनु यांचा पुत्र. एक दानव.

२ अंगिरसपुत्र देवांपैकीं एक.

**गविष्ठिर आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. १. १२; १०. १५०.५; आश्व. श्रौ. १२. १४. १; ब्रह्मांड. २. ३२ ). हा अत्रिगोत्राचा प्रवर आहे.

२ दत्ताचा पुत्र.

**गवेषण**—( सो. वृष्णि. ) अक्रूराच्या मुलांतील एक.

**गवेष्टिन्**—दनुपुत्र.

**गाध्र**—( सो. पुरूरवस्. ) हा वायुमतें भुवन्मन्युपुत्र होय. याच्या मुलांना गाध्र असें सामान्य नांव दिलें आहे. इतर पुराणांवरून पाहतां हे गर्ग असावेत.

**गांगेय**—भीष्माचें मातृक नांव (म.आ.१०७.९६ कुं.).

२ पार्वतीनें शरीरमलापासून गजाननाची मूर्ति केली व ती गंगेंत सोडिली असतां सजीव झाली. तेव्हां देवांनीं त्याला गांगेय असें नांव देऊन गणांचें आधिपत्य दिलें ( पद्म. सृ. ४३ ).

**गांगोदधि**—अंगिराकुलोत्पन्न गोत्रकार. गंगोदधि असें याला नामांतर आहे.

**गांग्यायनि**—हें चित्राचें पैतृक नांव आहे. गार्गायणि असेंहि पाठांतर आहे.

**गातु आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५.३२ ).

**गातु गौतम**—हा संवर्गजित् लामकायनाचा शिष्य ( वं. ब्रा. २ ).

**गात्र**—उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**गात्रवत्**—श्रीकृष्णाला लक्ष्मणेच्या ठिकाणीं झालेला पुत्र ( भा. १०. ६१. १५ ).

**गाथिन्**—हें विश्वामित्राच्या बापाचें आणि कुशिकाच्या मुलाचें नांव सर्वानुक्रमणींत आढळतें. गाथिन् कौशिक हा कांहीं ऋचांचा द्रष्टा आहे ( ऋ. ३. १९-२२ ). विश्वामित्रानें शुनःशेपाला दत्तक घेतल्यानें तो मूळच्या आणि गाथिन्च्या वंशांत यज्ञयागादि दैवकर्मांत आणि मंत्रसाध्यकर्मांत प्रामुख्य घेण्यास योग्य झाला ( ऐ. ब्रा. ७.१८ ). येथें विश्वामित्राच्या वंशाला उद्देशून गाथिन् हा बहुवचनी शब्द वापरिला आहे ( आश्व. श्रौ. ७.१८ ). हा अंगिराकुलांतील गोत्रकार व इंद्राचा अवतार होता ( वेदार्थदीपिका ३ ). यालाच पुराणांत गाधि म्हणतात ( विश्वामित्र पहा ).

**गाधि**—( सो. अमा. ) हा वायुमतें कुशाश्वपुत्र, भागवत व विष्णु यांच्या मतें कुशांबुपुत्र होय; यालाच कौशिक म्हणतात. हा कान्यकुब्ज देशाचा अधिपति असून याची माता पुरुकुत्साची कन्या. याला एक सत्यवती नामक कन्या होती. ती ऋचीक-ऋषीनें याजवळ मागितली. तेव्हां यानें मुलीबद्दल त्याकडून एक हजार श्यामकर्ण घेऊन सत्यवती त्याला दिली. पुढें याला ऋचीकऋषीनें दिलेल्या चरूच्या प्रभावानें विश्वामित्र झाला ( ऋचीक पहा; म. आ. १९१; व. ११६; शां. ४८; अनु. ७ कुं. भा. ९. १५. ४; १६. २८; ह. वं. १. २७ ).

२ कोसल देशांत राहणारा एक ब्राह्मण. हा श्रोत्रिय व बुद्धिमान् असून लहानपणापासून विरक्त होता. कांहीं इष्टकार्य-सिद्धीसाठीं हा बांधवांस सोडून तप करण्यास अरण्यांत एका सरोवराच्या कांठीं गेला; व यानें विष्णूचें दर्शन होईपर्यंत त्या सरोवराच्या पाण्यांत तप करण्याचा निश्चय केला. शेवटीं विष्णूनें यास वर मागण्यास सांगितलें. तेव्हां यानें भ्रामक संसारमाया दाखवावी म्हणून प्रार्थना केली आहे.

पुढें एके दिवशीं स्नान करितांना यानें हातांत दर्भ घेऊन पाणी ढवळण्यास सुरवात केली, तों सोसाट्याच्या वाऱ्यामुळें एखादा वृक्ष उपटून पडावा, त्याप्रमाणें आपला देह मरून पडला असून आप्तेष्ट रडत आहेत, व शरीर शुष्क झालें असून लवकरच तें चितेंत घालून जाळूनहि टाकण्यांत आलें असें दृश्य यास दिसलें. पुढें भूतमंडळ देशाच्या सीमेवरील एका गांवांत एका चांडाल स्त्रीच्या उदरांत गर्भवासांतील नरकयातनेंत असल्याचें यास दिसून आलें. पुढें क्रमाक्रमानें वाढत जाऊन हा विषयलोलुप बनला. यानें चांडालकन्येशीं विवाह केला. तेथें यास संतति होऊन हा म्हातारा झाला. पुढें हा अरण्यांत राहूं लागला. कांहीं काळानंतर याच्या घरांतील माणसें मरूं लागल्यामुळें हा भ्रमिष्टासारखा रानांत भटकूं लागला. तेव्हां फिरतां फिरतां हा कीर लोकांच्या राजधानीस आला. त्या वेळीं त्या देशाचा राजा मरण पावला होता. हत्तीनें या चांडाळाला सोंडेंत धरून गंडस्थळावर बसविलें. यामुळें लोकांनीं यास राजा केलें. अशा तऱ्हेनें गवल या नांवानें यानें कीर देशाचें राज्य आठ वर्षें केलें. पुढें आपला राजा चांडाळ आहे, असें समजतांच तेथील नागरिकांनीं अग्निप्रवेश केला. त्यांच्या दुःखामुळें हा अग्निप्रवेश करण्यास सिद्ध झाला व अग्निराशीवर पडला. याच्या अवयवांनीं पेटहि घेतला. त्याच वेळीं तिकडे सरोवराच्या पाण्यामध्यें अघमर्षण करीत असलेला गाधि ब्राह्मण या दीर्घस्वप्नांतून जागा झाला.

चार घटकांनीं याचा भवभ्रम नष्ट झाला व स्वप्नांतील सर्व गोष्टींची आठवण होऊन हा विचार करूं लागला. यानंतर गाधीनें दीड वर्ष तप केलें. तेव्हां विष्णूनें दर्शन देऊन यास तुला दिसलेली सर्व माया आहे, असें सांगितलें. ही माया आहे, अशी खात्री करून घेण्यासाठीं पुनः हा कीर देशांत गेला व यानें आपली खात्री करून घेतली. विष्णूनें याचें मोहनिरसन केल्यावर हा जीवन्मुक्त झाला ( यो. वा. ५. ४४–४९ ).

**गानबंधु**—वाराहकल्पापूर्वीच्या घोरकल्पांत हा अत्यंत प्रसिद्ध असा गायनाचार्य होता. याच्या पासून तत्कालीन नारद गायन शिकला. पुढें कांहीं कारणांमुळें याला उलूकयोनि प्राप्त झाली ( अ. रा. ७ ).

**गांदम**—एकयावनाचें हें पैतृक नांव आहे.

**गांदिनी**—ही काशी राजाची कन्या असून यदुवंशांतील श्वफल्काला दिली होती. अक्रूर वगैरे हिचे पुत्र होत ( भा. १०. ४१ ). ही अनेक वर्षें गर्भांत होती. त्याचें कारण, हिला हिच्या पित्यानें विचारिलें असतां तूं माझ्याकडून प्रत्यहीं गोदान करीत असल्यास मी जन्माला येईन, असें ही म्हणाली. त्याप्रमाणें पित्यानें कबूल केलें ( वायु. २. ३४; ह. वं. १.३४ ).

**गांधार**—( सो. द्रुह्यु. ) भागवतमतें आरब्धाचा, विष्णु-मतें सेतुपुत्राचा किंवा आरद्वान्चा, मत्स्यमतें शरद्वान्चा व वायुमतें अरुद्धाचा पुत्र. हें नांव गांधार देशच्या राजांना, विशेषतः शकुनीस होतें ( गांधार नग्नजित् पहा ).

**गांधार नग्नजित्**—एक गांधार राजा. याला सोमविषयक ज्ञान मिळालें होतें ( ऐ. ब्रा. ७. ३४ ). शतपथब्राह्मणांत याचा किंवा स्वर्जिन्नाग्नजित याचा नग्नजित असा उल्लेख आहे. एकदां यानें प्राण शब्दाच्या अर्थाविषयीं मत दिलें असतां, हा राजन्यबंधु असल्यामुळें याचें मत नापसंत करण्यांत आलें ( श. ब्रा. ८. १. ४. १०. ) सायणाचार्य गांधार व नग्नजित् ह्या दोन वेगळ्या व्यक्ति मानितात ( ऐ. ब्रा. भाष्य ).

**गांधारकायन**—अगस्त्यकुलांतील एक गोत्रकार.

**गांधारी**—गांधार देशाधिपति सुबल राजाची कन्या ( म. आ. ६३.५८ कुं. ). हिनें बाल्यावस्थेंत रुद्राचें आराधन केलें. त्यामुळें हिला शंभर पुत्र होतील असा वर मिळाला. यामुळेंच भीष्मादिकांनीं गांधारीस धृतराष्ट्राकरितां मागणी घातली. ( म. आ. ११९. १० कुं. ). कारण कुरुवंशांत संततीचा अभाव होता. मागणीप्रमाणें सुबलानें धृतराष्ट्रास गांधारी दिली. ही मोठी पतिव्रता होती. धृतराष्ट्र आंधळा म्हणून ही स्वतः आपल्या डोळ्यांवर पडदा बांधून अंधत्व पाळीत होती व परपुरुषाचें दर्शनहि घेत नव्हती ( म. आ. ११८ कुं. ). वरप्रदानाप्रमाणें हिच्या पोटीं गर्भ राहिला. इतक्यांत कुंतीस युधिष्ठिर झाल्याची बातमी हिला समजली. त्यामुळें आपल्याला पुत्र लवकर व्हावा म्हणून हिनें बलात्कारानें गर्भ बाहेर काढला ( म. आ. १२९. ५ कुं. ). पण त्यामुळें एक मृतप्राय मांसाचा गोळा बाहेर आला. इतक्यांत व्यास तेथें आला. तो प्रकार पाहून त्याला हिची कींव आली व त्यानें शंभर तुकडे करवून घृतकुंभ आणवून त्यांत ते गर्भ ठेवण्यास सांगून पूर्ण काळ होतांच ते व्यवस्थित होतील असें सांगितलें. त्याप्रमाणें योग्य कालानंतर ते गर्भ व्यवस्थित व सजीव झाले ( म. आ. १२६.५२ कुं. ). याच संधीस कुंतीस भीम झाला ( म. आ. १२९. ५२ कुं. ). याप्रमाणें गांधारीला दुर्योधनादि शंभर कौरव व दुःशला अशीं एकशें एक अपत्यें झालीं ( धृतराष्ट्र पहा ). दुर्योधनानें पांडवांशीं वैर आरंभिलें, त्या वेळीं गांधारीनें त्याला हितोपदेश केला असतां त्याचा उपयोग झाला नाहीं ( म. उ. १२९ ). पुढें दुर्योधनाच्या मृत्युसमयीं श्रीकृष्णानें हिचें सांत्वन केलें ( म. श. ६४ ). गांधारी रणक्षेत्रांत आली व पुत्रशोकामुळें संतप्त होऊन हिनें कृष्णास उपेक्षापूर्वक सर्वांचीं प्रेतें दाखवून छत्तीस वर्षांनीं तुझा कुलक्षय होईल असा शाप दिला. त्या वेळीं कृष्णानें हंसून हें मला माहीत आहे असें सांगितलें ( म. स्त्री. २५ ). यानंतर व्यासादिकांनीं हिचें सांत्वन केलें. भीमाशीं दुर्योधनवध व दुःशासनाचें रक्त पिणें यावर हिचा संवाद झाला. त्यांत भीमानें दुःशासनाचें रक्त दांत व ओंठ यांच्या आंत मुळींच गेलें नाहीं इ सांगितलें ( म. स्त्री. १४ कुं. ). एकदां हिची दुःखसंतापपूर्ण दृष्टि धर्माच्या पायांचे बोटांवर पडली, त्यामुळें त्याच्या पायाची नखें सुंदर होतीं तीं फारच विद्रूप झालीं ( म. स्त्री. १५. कुं. ). द्रौपदी व कुंती आपल्या पुत्रादिकांबद्दल शोक करीत असतां गांधारीनें त्यांचें समाधान केलें ( म. स्त्री. १५-१७ ).

यापुढें गांधारी धृतराष्ट्रासह पांडवांकडेच होती. कारण युधिष्ठिर हा सुस्वभावी असून यांना कोणतेंहि कमी पडूं देत नसे. परंतु भीम मात्र कठोर बोले. त्यामुळें, हिला वैराग्य उत्पन्न होऊन विदुर, धृतराष्ट्र व कुंती यांच्या बरोबर ही वनांत गेली. तेथें पतीबरोबर हिनें देहत्याग केला ( भा. १. १३. २७; ९. २२-२६; म. आश्र. १७. ३९. कुं. ).

२ क्रोष्टूची बायको. हिला सुमित्र अथवा अनमित्र या नांवाचा मुलगा होता ( ब्रह्म. १४. २; ३४; ह. वं. २. ३४ ).

३ अजमीढाची तिसरी बायको.

४ कश्यप व सुरभि यांची कन्या.

**गायत्री**—पूर्वीं चाक्षुष मन्वंतरांत ब्रह्मदेवानें यज्ञास आरंभ केला, तेव्हां शंकर, विष्णु इत्यादि देव व भृगु इत्यादि ऋषि आले होते. यज्ञदीक्षेस्तव देवांनीं स्वरानामक पत्नीस हांक मारिली. पण ती कांहीं कामांत असल्यामुळें व मुहूर्त भरल्यामुळें त्यांनीं गायत्रीस हांक मारिली, तेव्हां ही आली व बसली. नंतर स्वरा मंडपांत आली व आपल्या स्थानीं बसलेली गायत्री पाहून तिनें रागानें सर्वांस तुम्ही जड व्हाल असा शाप दिला. तेव्हां गायत्रीनेंहि तिला तोच शाप दिला. पुढें देवांनीं जड म्हणजे जलरूपें राहून प्रत्येक नदीनें देवता व्हावें असें ठरलें. सावित्री व गायत्री पश्चिमवाहिनी झाल्या. विष्णु कृष्णेचा व शंकर वेणेचा स्वामी झाला ( पद्म. उ. १११ ). सावित्रीनें देवांना शाप दिले व गायत्रीनें शापाचा कसा उपयोग होईल हें सांगितलें ( पद्म. सृ. १७ ).

तेव्हां ब्रह्मदेवानें इंद्रास एखादि स्त्री स्वतःकरितां आणण्यासाठीं आज्ञा केली. इंद्रानें एका आधिराजाची ( गवळ्याची ) कन्यका उचलून आणिली व तिची ब्रह्मदेवाचें शेजारीं स्थापना केली. तेव्हां हिचा ब्रह्मदेवानें गांधर्वविधीनें स्वीकार केला ( पद्म. सृ. १६-१७; सावित्री; बुडिल व २ अश्वपति पहा ).

गायत्रीमंत्र व गायत्रीछंद यांची प्रशंसा ब्राह्मण, उपनिषदें व महाभारतादि पुराणें यांत आढळते ( छां. उ. ३. १२. १ ).

गायत्रीला वेदमाता म्हटलें आहे ( म. शां. ९९. २४ कुं. ). गायत्रीला सूर्यमंत्र म्हणून सावित्री म्हणतात ( बृ. उ. ५. १४. ५ ). जै. उ. ब्रा. ला गायत्रोपनिषद् म्हणतात

( जै. उ. ब्रा. ४.१७ ). यांत गायत्र सामाची अत्यंत प्रशंसा आली आहे.

**गायन**—भृगुकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**गार्ग**—विश्वामित्राचा पुत्र.

**गार्गिहर**—गार्ग्यहरीबद्दल पाठभेद.

**गार्गी वाचक्नवी**—ही वचक्नुऋषीची कन्या असल्यामुळें हिला गार्गी वाचक्नवी म्हणतात. ही अत्यंत ब्रह्मनिष्ठ असून परमहंसाप्रमाणें असे. दैवराति जनकाच्या सभेमध्यें याज्ञवल्क्याशीं हिचा वाद झाला ( बृ. उ. ३. ६. १; ८. १; आश्व. गृ. ३. ४. ४; सां. गृ. ४. १०; अथर्वपरि. ४३. ४. २३ ). ही ऋग्वेद्यांच्या ब्रह्मयज्ञांगतर्पणांत येते.

**गार्गीय**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**गार्ग्य**—हा एक गर्विष्ठ तत्त्वज्ञानी होता ( २ अजातरिपु पहा ). हा गार्ग्य व गौतम यांचा शिष्य व याचा शिष्य आग्निवेश्य होय ( बृ. उ. ४. ६. २ ). याचें नांव सौर्यायणि असें होतें ( प्र. उ. १. १ ).

२ एक ऋषि. रुद्रानें ययातीला एक सोन्याचा रथ दिला होता. तो रथ त्याच्या घराण्यांत पहिल्या जनमेजय पारीक्षितापर्यंत होता. पण याचा एक अल्पवयी मुलगा कांहीं बोलल्यामुळें जनमेजयानें ठार केला. त्यामुळें गार्ग्यानें त्याला शाप दिला व तो रथ याच्याकडून चेदिपति वसूकडे गेला. तो रथ जरासंध, भीम व शेवटीं कृष्ण यांच्याकडे आला ( वायु. २. ३१; ह. वं. १. ३० ). सामवेदाच्या परंपरेंत शर्वदत्ताचें हें पैतृक नांव आहे. हा सामवेद्यांच्या उपाकर्मांगतर्पणांत आहे ( जैमिनि पहा ). अथर्ववेदाच्या कौशिकसूत्रांत शांत्युदक करितांना कोणता मंत्र घ्यावा याबद्दल याच्या मताचा निर्देश आहे ( कौ. ९. १०; १३.७ ). तसेंच मधुपर्क गाईनें करावा असें हा म्हणतो ( कौ. १७. २७ ). हा अंगिराकुलांतील गोत्रकार व मंत्रकार आहे. पण याचे मंत्र ऋग्वेदांत नाहींत. पूरुवंशांतील गर्ग व शिनि यांच्या संततीस हें सामान्य नांव आहे. हे क्षत्रिय असून तपानें ब्राह्मण झाले होते ( भा. ९. २१. १९; विष्णु. ४.९ ). या नांवाचा केकयदेशाधिपति युधाजित् राजाचा पुरोहित होता. हाच युधाजिताकडून गंधर्वदेश जिंकण्याविषयीं रामाकडे आला होता व त्याप्रमाणें यानें तक्ष व पुष्कल यांना घेऊन तें काम पार पाडिलें ( वा. रा. यु. १०० ).

हा धर्मशास्त्रकार असल्याबद्दल वृद्धयाज्ञवल्क्यांतील एक श्लोक विश्वरूपाच्या विवरण नामक ग्रंथांत सांपडतो (१.४–५). त्याचप्रमाणें गार्ग्याच्या ग्रंथांतलें एक सूत्र घेतलें आहे त्यावरून गार्ग्याचा धर्मशास्त्रावर एकादा ग्रंथ उपलब्ध होता असें दिसतें. अपरार्क, स्मृतिचंद्रिका, मिताक्षरा वगैरे ग्रंथांत याच्या ग्रंथांतील श्राद्ध, प्रायश्चित्त व आह्निक वगैरे विषयांवरील उतारे घेतले आहेत. पाराशरधर्मसूत्रांतहि हा धर्मशास्त्रकार असल्याबद्दल उल्लेख आहे. अपरार्कांत याच्या ग्रंथांतले ज्योतिषविषयक श्लोकहि घेतले आहेत. ज्योतिषशास्त्रावरील गर्गसंहितेचे कांहीं भाग सांपडले आहेत. स्मृतिचंद्रिकेंत ज्योतिर्गार्ग्य व बृहद्गार्ग्य या दोन ग्रंथांचा उल्लेख झाला आहे. नित्याचार प्रदीपांत गर्ग व गार्ग्य हे दोघे स्मृतिकार भिन्न असल्याचा उल्लेख आहे. एक व्याकरणकार गार्ग्याचा यास्क ( १. ३ १२; ३. १३ ) व पाणिनि ( ७. ३ ९९; ८३. २०; ४. ६७ ) यांनीं उल्लेख केला आहे. तसाच एक ज्योतिषी म्हणून याचा हेमाद्रीनें उल्लेख केला आहे ( C. C. ).

३ विश्वामित्राच्या मुलांपैकीं एकाचें नांव ( म. अनु. ७. ५५ कुं. ).

४ वृकदेवी नांवाची त्रिगर्त राजाची मुलगी शिशिरायण गार्ग्याला दिली होती. तिनें गार्ग्य पुरुष आहे किंवा नाहीं हें पाहण्याचा प्रयत्न केला, पण बारा वर्षांच्या कडक तपश्चर्येमुळें याचें वीर्य स्खलित झालें नाहीं. त्यामुळें हा षंढ आहे, अशी सर्वांची समजूत झाली. पुढें दक्षिणेंत जाऊन यानें शंकराची आराधना केली व यादवांचा पराजय करणारा पुत्र मागून घेतला. त्याप्रमाणें त्याला गवळ्याची मुलगी गोपाली हिचे ठिकाणीं कालयवन नांवाचा महापराक्रमी मुलगा झाला ( विष्णु. ५. २३; ब्रह्म. १४. ४६–५२; ह. वं. १. ३५ ). आणखीहि बऱ्याच ठिकाणीं या कथेचा उल्लेख आला आहे ( कालयवन पहा ). याला क्वचित् गर्ग म्हटलें आहे. याला यादवांचा उपाध्याय म्हटलें आहे. यादवांच्या उपाध्यायाला गर्ग व कुलनाम गार्ग्य हीं दोन्हीं लावीत ( वृद्धगर्ग व वृद्धकन्या पहा ). यानें धर्माला धर्मरहस्य सांगितलें ( म. अनु. १९०. ९ कुं. ).

५ ( सो. काश्य. ) हा वायुमतें वेणुहोत्रपुत्र. भर्ग व भार्ग अशीं यास नामान्तरें आढळतात.

**गार्ग्यहरि**—अंगिराकुलांतील गोत्रकार. गार्गिहर असा पाठभेद आहे.

**गार्ग्यायण**—उद्दालकायनाचा शिष्य व याचा शिष्य पाराशर्यायण ( बृ. उ. ४. ६.२ ).

२ भृगुकुलांतील गोत्रकार.

**गार्ग्यायणि**—( गांग्यायनि पहा ).

**गार्त्सप्रद**—( आंगिरस, शौनहोत्र व पश्चाद् पहा ).

**गार्दभि**—विश्वामित्राच्या पुत्रांपैकीं एक. गर्दभि असाहि पाठ आहे ( म. अनु. ७. ५९ कुं. ).

२ भृगुकुलांतील गोत्रकार.

**गार्ह्यायण**—भृगुकुलोत्पन्न एक गोत्रकार ऋषि.

**गाल**—एक राजा. यानें नील पर्वतावर एक मंदिर बांधविलें होतें. इंद्रद्युम्नानें जगन्नाथक्षेत्र याच्या ताब्यांत दिलें ( स्कंद. २. २. २६ ).

**गालव**—हा विदर्भीकौण्डिन्याचा शिष्य व याचा शिष्य कुमारहारित ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ).

२ विश्वामित्राचा एक शिष्य ( म. उ. १०६–११८ ). यानें गुरूची अत्युत्कृष्ट सेवा करून पूर्ण कृपा संपादन केली होती. परंतु यानें विशेष आग्रह धरिल्यामुळें विश्वामित्रानें किंचित् रोषानें आठशें श्यामकर्ण अश्व गुरुदक्षिणा मागितली ( म. उ. १६ ). तें ऐकून हा भयभीत झाला. तेव्हां यानें विष्णूची आराधना केली. ह्याच्या निस्सीम भक्तीनें विष्णु संतुष्ट होऊन त्यानें गरुडास याच्याकडे पाठविलें व गालव सांगेल तें कार्य कर, अशी त्याला आज्ञा केली. त्याप्रमाणें गरुड गालवाकडे गेला व याची इच्छा ऐकून त्यानें यास सर्व दिशा दाखविल्या. जातां जातां यास ययातीकडे नेलें. या वेळीं ययातीची स्थिति समाधानकारक नव्हती. तो स्वतः अरण्यांत राहत होता. गालवाची संभावना करण्याइतकें त्याच्या जवळ द्रव्यहि नव्हतें. अशा वेळीं गालवास आठशें अश्व त्याकडून मिळणें शक्य नव्हतें. तरीहि यास त्यानें आपली कन्या माधवी तिच्या पुत्रांवर हक्क ठेवून दिली व तिच्या जोरावर यानें गुरुदक्षिणा पुरी केली ( म. उ. १०६–११९; माधवी पहा ).

याचा आश्रम जयपूरपासून तीन मैलांवर होता. याचा दुसरा एक आश्रम चित्रकूटपर्वतावर होता.

३ व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य ( व्यास पहा ).

४ विश्वामित्राचा मुलगा. यास हें नांव पडण्याचें कारण, सत्यव्रताच्या निंद्य आचरणानें जिकडेतिकडे दुष्काळ पडले. त्या वेळीं विश्वामित्र आपलीं तीन मुलें व बायको यांस टाकून व त्यांचें पुढें कसें होईल, याची काळजी न करितां तपश्चर्या करण्यास निघून गेला. पुढें त्याच्या स्त्रीनें बराच काळपर्यंत मुलें कसेंतरी करून जगविलीं. परंतु एकदां असें झालें कीं, निर्वाहास कांहींच मिळेना. मुलें भुकेनें तळमळून रडूं लागलीं. तेव्हां नाइलाज होऊन तिनें या पुत्राच्या गळ्यास दर्भरज्जूनें बांधून ती याला विकण्यासाठीं घेऊन चालली. इतक्यांत सूर्यवंशी इक्ष्वाकुकुलोत्पन्न सत्यव्रत राजा तिला रस्त्यांत भेटला. त्यानें विचारिल्यावरून तिनें आपली सर्व हकीकत सांगितली. तेव्हां त्यानें तिला ‘ विश्वामित्र येईपर्यंत मी तुला रोज थोडें मांस देईन, त्यावर निर्वाह कर ’ असें सांगितलें. म्हणून मुलाला विकण्याचा विचार तिनें रहित करून ती स्वगृहीं गेली. तेव्हांपासून या मुलास गालव असें नांव पडलें ( ह. वं. १. १२; वायु. २.२७. ८३-९२; ब्रह्म. ७. १०२-१०९; म. अनु. ७. ५२ कुं. ब्रह्मांड. ३. ६३. ८६-८९; ६६. ७२ ). एक व्याकरणकार ( नि. ४. ३; पा. सू. ६. ३.६१; ७. १. ७४; ३.९९; ८. ४. ६७ ). याच्या स्मृतीचा हेमाद्रि वगैरेंनीं उल्लेख केला आहे.

५ कुंतल राजाचा पुरोहित. यानें राजास अरिष्टाध्याय ऐकवून लवकर मृत्यु असल्याचें दर्शविलें व राजकन्या चंपकमालिनीचें चंद्रहासाशीं लग्न लावण्यास संमति दिली ( जै. अ. ५१ ).

६ सावर्णि मन्वंतरांत होणाऱ्या सप्तर्षींतील एक ( भा. ८. १३. १५ ).

७ अंगिराकुलांतील गोत्रकार.

**गालवि**—अंगिराकुलांतील गोत्रकार. याचें गालविन् असें नामांतर आहे.

**गावल्गणि**—संजयाचें नांव ( ८ संजय पहा ).

**गिरिका**—कोलाहलपर्वतापासून शुक्तिमती नदीचे ठिकाणीं एक जुळें झालें. त्यांतील ही कन्या असून शुक्तिमती नदीनें उपरिचरवसु राजाला दिली. पुढें राजानें हिच्याशीं स्वतः लग्न लाविलें. हीपासून त्याला बृहद्रथादिक सहा पुत्र व काली अथवा मत्स्यगंधिनी नामक कन्या झाली ( म. आ. ६४ ).

**गिरिक्षत्र**—(सो. वृष्णि.) विष्णुमतें श्वफल्काचा पुत्र.

**गिरिक्षित्**—दुर्गहाचा पुत्र. याचा पुत्र पुरुकुत्स ( ऋ. ४. ४२. ८ ). याच्या कुलांत त्रसदस्यु झाला (ऋ. ५. ३३. ८).

**गिरिक्षित् औच्चामन्यव**—याचा अभिप्रतारिन् काक्षसेनी याच्या बरोबर गायत्रसामाबद्दल संवाद झाल्याचा उल्लेख आहे ( पं. ब्रा. १०. ५. ७ ).

**गिरिज बाभ्रव्य**—सत्रांतील यज्ञीय पशूचे अवयव सर्व ऋत्विजांनीं कसकसे वांटून घ्यावेत, याची माहिती याला एका गंधर्वापासून मिळाली व ती यानें सर्व लोकांना सांगितली ( ऐ. ब्रा. ७. १ ). याच्या पूर्वी ती माहिती देवभागाला होती. पण त्यानें मरेपर्यंत कोणाला सांगितली नाहीं.

**गिरिजा**—शंकराची स्त्री. तारकासुराच्या वधाकरितां शंकरानें गिरिजेशीं लग्न केलें ( भवि. प्रति. ४. १४; दुर्गा पहा ).

**गिरिश**—ऋषभ नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**गिरिशर्मन्**—शेषावतार देवदत्त याचा पुत्र. यानें मोठमोठ्या विद्वानांना जिंकिलें होतें. शेवटीं हा परम शंकरभक्त झाला ( भवि. प्रति. ४. ११ ).

**गिरिशर्मन् कांठेविद्धि**—हा ब्रह्मवृद्धीचा शिष्य (वं. ब्रा. १ ).

**गीतविद्याधर**—एक नामांकित गंधर्व. पुलस्त्यास याच्या गाण्यापासून त्रास होऊं लागला. यानें त्यास डुकराचें सोंग

घेऊन आणखी त्रास दिला म्हणून, यास त्यानें शापानें डुकर बनविलें. पण याच्या विनंतीवरून इक्ष्वाकूनें मारिल्यावर पूर्ववत् होशील असा उःशाप दिला. त्याप्रमाणें हा पुढें पूर्ववत् झाला (पद्म. सृ. ८६).

**गुंगु**—ऋग्वेदांत हे अथितिग्वाचे मित्र म्हणून आले आहेत (ऋ. १०. ४८. ८).

**गुणकेशी**—इंद्रसारथि मातली व त्याची स्त्री सुधर्मा यांची कन्या. हिला वर पाहत असतां कोठेंहि अनुरूप वर मिळेना. शेवटीं नागलोकांतील चिकूर नागाचा पुत्र सुमुख हा वर पसंत केला. पण त्याचें गरुडाशीं वैर असल्यामुळें मातलीनें सुमुखाला इंद्राजवळ नेऊन त्यास अमृत पाजवून अमरत्व देवविलें व विष्णूनें गरुडास सांगून वैरभाव नाहींसा करून सुमुखाशीं गुणकेशीचा विवाह करविला (म. उ. ९७–१०५).

**गुणनिधि**—श्रोत्रिय यज्ञदत्ताचा मुलगा. हा अत्यंत दुर्गुणी व व्यसनी होता. पण शिवपूजा पाहिल्यानें व शिवदीप सरसा केल्यानें मुक्त झाला (शिव. रुद्र. सृ. १८). नंतर कुबेरानें याला उत्तर दिशेचा अधिपति केलें (स्कंद. ४. १. १३).

**गुणवती**—सिंहलद्वीपच्या चंद्रसेन राजाची भार्या.

२ (सत्राजित् पहा).

**गुणवर्धन**—(सोमकांत पहा).

**गुणशेखर**—गौड देशचा राजा. याला अभयानंदानें जैन बनविलें होतें (भवि. प्रति. २. १०).

**गुणाकर**—प्लक्षद्वीपांतील एक वैभवशाली राजा. याला सुशीला नामक पत्नी असून सुलोचना नांवाची कन्या होती (पद्म. कि. ५).

२ पुलह व श्वेता यांचा पुत्र.

**गुप्त**—वैपश्चित दार्ढजयंति गुप्त लौहित्य असें याचें नांव आहे (जै. उ. ब्रा. ३. ४२).

**गुप्तक**—पांडवांच्या वेळचा सिंधुदेशांतील एक राजा.

**गुरु**—मरीचि प्रजापतीची सुरूपा नांवाची मुलगी आङ्गिरसाला दिली होती. तिला देवाचार्य बृहस्पति मुलगा झाला, यास गुरु असें म्हणतात. हा महाबुद्धिमान् व वेदवेदाङ्गपारंगत होता (विष्णुधर्म. १. १०६; बृहस्पति पहा).

२ (सो. पुरूरवस्.) भागवतमतें संकृतिपुत्र. मत्स्यांत यास गुरुधि, विष्णूंत रुचिरधि व वायूंत गुरुवीर्य म्हटलें आहे. हाच गुरुवीत व गौरवीति असावा. अंगिराकुलांतील गोत्रकार हाच असावा (सांकृति पहा).

३ भौत्य मनूचा पुत्र.

**गुरुक्षेप**—(सू. इ. भविष्य.) विष्णुमतें बृहत्क्षणाचा पुत्र.

**गुरुंड**—(गरंड पहा).

**गुरुधि**—(सो. पुरूरवस्.) हा मत्स्यमतें संकृतिपौत्र व महायशसूचा पुत्र (२ गुरु पहा).

**गुरुभार**—गरुडपुत्र.

**गुरुवीत**—अंगिराकुलांतील मंत्रकार (२ गुरु पहा).

**गुरुवीर्य**—(सो. पुरूरवस्.) हा वायुमतें सांकृतिपुत्र (२ गुरु पहा).

**गुर्वक्ष**—बलि दैत्याच्या शंभर पुत्रांपैकीं एक.

**गुह**—कार्तिकेयाचें नांव (भा. ३.१.२२).

२ शृंगवेर नामक पुरीचा किराताधिपति. हा दशरथाचा परममित्र होता. राम अयोध्येहून निघून दंडकारण्यांत चालला असतां एक रात्र गुहाचे येथें राहिला होता. त्या वेळीं गुहानें त्याचें चांगलें आदरातिथ्य केलें. गुहानें रामास वनवासाचीं बारा वर्षे तेथेंच घालविण्याची विनंति केली. गुहानें आणिलेल्या फलादिकांस रामानें स्पर्श करून परान्न घेत नसल्याचें दर्शविलें व तेथें राहण्याचेंहि नाकारिलें. त्या दिवशीं सीता व राम हीं दर्भ आंथरून त्यावर निजलीं व गुह रामाचे संरक्षणार्थ उभा राहिला. त्या वेळीं याच्या मनांत रामाच्या विचित्र प्रारब्धगतीविषयीं विचार घोळत होते. आणि यासंबंधीं याचें लक्ष्मणाशीं संभाषणहि झालें (वा. रा. अयो. ५०–५१). पुढें दुसरे दिवशीं गुहानें रामाच्या आज्ञेवरून गंगेपलीकडे दक्षिणतीरीं त्यांना उतरविलें (वा. रा. अयो. ५२). राम चित्रकूटपर्वतावर असतांना भरत मोठ्या सैन्यासह त्याला परत आणण्यासाठीं गेला. त्या वेळीं भरत रामनाशार्थ जात असावा, असा यास संशय येऊन यानें आपलें सैन्य सज्ज केलें. परंतु भरताचा खरा हेतु कळतांच यानें त्यास ससैन्य गंगेपलीकडे पोहोंचविलें. हा भरताबरोबर स्वतः चित्रकूटापर्यंत गेला होता (वा. रा. अयो. ८४–८७).

**गुहवासिन्**—वाराहकल्पांतील वैवस्वत मन्वंतराच्या सतराव्या चौकडींतील हा शंकराचा अवतार आहे. याचें स्थळ हिमालयावरील महोत्तुंगक्षेत्र होय. याला अनुक्रमें पुढीलप्रमाणें चार पुत्र आहेत. उतथ्य, वामदेव, महायोग व महाबळ (शिव. शत. ५).

**गुहिल**—व्यूह नामक यवनाच्या वंशांतील राजा. याचा पुत्र वाप्यकर्मा. यानें एकंदर ५० वर्षे राज्य केलें (भवि. प्रति. ४. ३).

**गृत्समद**—हें एका व्यक्तीचें व त्यावरूनच कुलाचेंहि नांव आहे. हा आंगिरसकुलांतील शुनहोत्राचा पुत्र होय (सर्वानुक्रमणी पहा). गृत्समद शब्दाची व्युत्पत्ति ऐतरेय आरण्यकांत आली आहे (ऐ. आ. २. २. १). गृत्स म्हणजे प्राण आणि मद म्हणजे अपान होय. याचे ठिकाणीं प्राणापानांचा समुच्चय होता, म्हणून यास गृत्समद असें म्हणतात.

हा व याच्या कुलांतील व्यक्ति ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडळाचे द्रष्टे आहेत ( ऐ. ब्रा. ५. २. ४; ऐ. आ. २. २. १; सर्वानुक्रमणी पहा ). एकदां तपःप्रभावानें याला इंद्राचें स्वरूप प्राप्त झालें. तेव्हां धुनि व चुमुरि यांनीं याला इंद्र समजून वेढा दिला. मी इंद्र नाहीं हें दाखविण्याकरितां यानें इंद्राचें उत्कृष्ट वर्णन करणारें ' स जनास इन्द्रः ' ( ऋ. २. १२ ) हें पालुपद असलेलें सूक्त म्हणावयास सुरुवात केली. इंद्रादिक देव वैन्याच्या यज्ञांत गेले. गृत्समदहि तेथें होता. दैत्य इंद्राला ठार करण्याच्या उद्देशानें तेथें आले. इंद्रानें गृत्समदाचें रूप घेऊन पलायन केलें. असुरांनीं गृत्समदाला वेढा देतां यानें एका सूक्तानें इंद्राचें बहारदार वर्णन केलें ( ऋ. २. १२ ). गृत्समदाच्या घरीं आलेल्या एकट्या इंद्राला पाहून शत्रूंनीं वेढा दिला. तेव्हां इंद्र गृत्समदाचें रूप घेऊन पळून गेला. आणि घरांतील गृत्समदाला त्यांनीं इंद्र म्हणून पकडिलें. तेव्हां यानें हें सूक्त म्हणून इंद्राचें वर्णन केलें ( ऋ. २. १२ ). अशा तीन आख्यायिका यासंबंधीं आहेत. ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडळांत गृत्समदाचा वारंवार उल्लेख येतो ( ऋ. २. ४. ९; १९.८ इ. ). यास शुनहोत्र असेंहि म्हटलें आहे ( ऋ. २. १८. ६; ४१. १४; १७ ). दुसऱ्या मंडळांतील ऋचांचा गार्त्समद ऋचा म्हणून उल्लेख आढळतो ( सां. आ. २२. ४; २८. २ ). हा भृगुकुलांतील गोत्रकार, प्रवर व मंत्रकार आहे. गृत्समद भार्गव शौनक सूक्तद्रष्टा आहे ( ऋ. २. १-३; ८-४३; ९. ८६; ४६-४८ ). एकदां चाक्षुष मनूचा पुत्र वरिष्ठ इंद्राच्या सहस्रवार्षिक सत्रांत आला व साम अशुद्ध म्हटल्याबद्दल याला दोष देऊन रूक्ष अरण्यांत क्रूर पशु होशील, म्हणून त्यानें याला शाप दिला. पण त्यांतून शंकराच्या कृपेनें हा मुक्त झाला ( म. अनु. १८ ). गृत्समदाचा भृगुवंशांत उल्लेख आहे ( मत्स्य. १९५. ४४-४५ ). गृत्समदाला शौनक असें पैतृक नांव आहे. हा शुनहोत्राचा औरसपुत्र असून शुनकाचा दत्तकपुत्र होता. म्हणजे प्रथम हा आंगिरसकुलांतील असून पुढें भृगुकुलांत गेला ( ऋष्यनुक्रमणी २ ).

२ एक ऋषि. भृगूच्या सांगण्यावरून वीतहव्य ब्राह्मण झाल्यावर त्यास झालेला पुत्र. याचा पुत्र सुचेतस्.

३ दंडकारण्यांत राहणारा एक ऋषि. यास शंभर मुलगे होते ( अ. रा. ८ ).

४ ( सो. क्षत्र. ) हा विष्णु व वायु यांच्या मतें सुनहोत्रपुत्र. आयुकुलांतील सुहोत्र किंवा सुतहोत्र राजाच्या तीन पुत्रांतील कनिष्ठ. यास शुनक नांवाचा मुलगा होता ( ब्रह्मांड. ११. ३२. ३४; ह. वं. १. २९ ).

५ भीष्म शरपंजरीं पडला असतां त्याचेकडे आलेला एक ऋषि ( भा. १. ९. ७ ).

६ इंद्राला मुकुंदेपासून झालेला मुलगा. एकदां रुक्मांगद बाहेर गेल्यावर मुकुंदा काममोहित झाली. तेव्हां इंद्रानें रुक्मांगदाचा वेष घेऊन तिच्याशीं संग केला. त्यामुळें गर्भ राहून मुकुंदेला जो मुलगा झाला, त्याचें नांव गृत्समद होय. हा पुढें मोठा विद्वान् होऊन वादांत कोणाला हरेना. एकदां मगधदेशच्या राजाच्या घरीं वसिष्ठादि मुनि श्राद्धाकरितां जमले असतां अत्रीनें याला तूं पंक्तिपावन नाहींस, म्हणून हिणविलें. तेव्हां यानें आईकडे येऊन चवकशी केली. तेव्हां मुकुंदेनें यास जन्माची हकीगत निवेदन केली. यानें मुकुंदेला तूं कंटकवृक्ष होशील असा शाप दिला व तिनेंहि तुला दैत्य पुत्र होईल, असा याला उलट शाप दिला. पुढें यानें ' गणानां त्वा ' या मंत्राचें अनुष्ठान करून गणपति प्रसन्न करून घेतला. त्या मंत्राचें ऋषित्व संपादन करून ब्राह्मण्यहि संपादन केलें ( गणेश. १. ३७ ).

**गृध्र**—श्रीकृष्णाला मित्रविंदा स्त्रीच्या ठिकाणीं झालेला पुत्र ( भा. १०. ६१. १६ ).

**गृध्रिका**—ही कश्यप व ताम्रा यांची कन्या.

२ ही अरुणाची स्त्री. हिचे पुत्र संपाति व जटायु ( ब्रह्मांड ३. ७. ४४६ ).

**गृहपति**—नर्मदेच्या कांठीं नर्मपुरांत विश्वानर नांवाचा एक मुनि ब्रह्मचर्यानें वेदाध्ययन करीत राहत असे. त्याचें गोत्र शांडिल्य होतें. त्याच्या बायकोचें नांव शुचिष्मती असें होतें. तो अत्यंत आचारशील होता. पण त्याला पुत्र नव्हता. स्त्रीच्या इच्छेनुरूप त्यानें काशीस जाऊन वीरेश्वरापाशीं कडक तप केल्यावर त्याला एके दिवशीं प्रत्यक्ष दर्शन होऊन अभिलाषाष्टक म्हटल्यावर ' लवकरच मुलगा होईल ' असा वर मिळाला. पुढें त्याला गृहपति नामक मुलगा झाला. याला नववें वर्ष लागलें असतां एकदां नारद आला व त्यानें याला बाराव्या महिन्यांत विद्युत् किंवा अग्नि यापासून भय आहे, असें सांगितलें. तेव्हां यानें तप करून शंकराला प्रसन्न करून घेतलें. शंकरानें याला अग्नीची पदवी दिली. यानें स्थापिलेल्या लिंगास काशींत अग्नीश्वर असें नांव आहे ( शिव. शत. १५ ).

२ ( अग्नि पहा ).

**गृहेषु**—धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**गैरिक्षित**—त्रसदस्यूचें व यास्काचें हें पैतृक नांव आहे.

**गो**—मानस नांवाच्या पितरांची कन्या.

२ ( सो. पूरु. ) ब्रह्मदत्त राजाची भार्या व देवल ऋषीची कन्या. हिला सरस्वती अथवा सन्नति असेंहि म्हणतात.

३ ही शमीकऋषीची भार्या. शृंगीऋषि हिचा पुत्र.

४ वरुणाचा सेनापति ( वा. रा. उ. २३ ).

५ हिला गो असें नामांतर आढळतें. विधिमानसपुत्र पुलस्त्यऋषि याच्यापासून हिला वैश्रवण नामक सामर्थ्यसंपन्न पुत्र झाला ( म. व. २७४ ).

६ शुकाची बायको.

**गो आंगिरस**—हा एका सामाचा कर्ता आहे ( पं. ब्रा. १६. ७. ७; ला. श्रौ. ६. ११. ३ ).

**गोकर्ण**—सातव्या वाराहकल्पांत वैवस्वत मन्वंतराच्या सोळाव्या चौकडींत गोकर्ण नांवानें शिवाचा अवतार होईल. हा राहील त्या वनालाहि गोकर्ण असें नांव पडेल. याला चार पुत्र असतील. काश्यप, उशनस्, च्यवन व बृहस्पति ( शिव. शत. ५ ).

२ ( आत्मदेव पहा ).

**गोखल**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील विष्णुमतें वेदमित्राचा; भागवत, वायु आणि ब्रह्मांड यांच्यामतें देवमित्राचा शिष्य. भागवतांत गोखल्य असा पाठ आहे.

**गोखल्य**—हा शाकल्यऋषीचा शिष्य असून त्यानें याच्याकडून ऋग्वेदाच्या एका शाखेचें अध्ययन करविलें ( भा. १२. ६. ५७; गोखल पहा ).

**गोणायनि**—गोणीपतीबद्दल पाठभेद.

**गोणीपति**—आंगिराकुलांतील गोत्रकार.

२ अत्रिकुलांतील गोत्रकार.

**गोतम**—कश्यपकुलोत्पन्न एक ऋषि ( भवि. प्रति. ४. २१ ).

२ ( व्यास पहा ).

३ गोतम राहूगणाचीं बरींच सूक्तें आहेत ( ऋ. १. ७४–९३; ९. ३१; ६७. ७–९; १०. १३७. ३ ). ऋग्वेदांत याचा अनेक ठिकाणीं उल्लेख आहे ( ऋ. १. ६२. १३; ७८. २ इ. ). याचा आंगिरसाशीं वरचेवर संबंध येतो ( ऋ. १. ६२. १; ७१. २ ). याचें राहूगण हें पैतृक नांव ऋग्वेदांत व इतरत्र सांपडतें ( ऋ. १. ७८. ५; श. ब्रा. १. ४. १. १०; ११. ४. ३. २० ). हा माथव विदेहाचा पुरोहित होता ( श. ब्रा. १. ४. १. १० ). हा वैदेह जनक व याज्ञवल्क्य यांचा समकालीन होता. तसेंच हा एका स्तोमाचा कर्ता आहे ( श. ब्रा. १३. ५. १. १; आश्व. श्रौ. ९. ५. ६ ). इतरत्रहि याचा उल्लेख आहे ( अ. वे. ४. २९. ६; १८. ३. १६; बृ. उ. २. २. ६ ). याला वामदेव व नोधस् असे दोन मुलगे होते ( आश्व. श्रौ. १२. १० ).

याचें भद्र नांवाचें एक साम आहे. या सामानें गोतमाला थोर पदवी प्राप्त झाली. त्यामुळें याच्या पूर्वीचे व पुढचे सर्व लोक गोतम नांवानें प्रसिद्ध झाले ( पं. ब्रा. १३. १२. ६-८ ). याचें एक गौतम नांवाचें साम आहे ( पं. ब्रा. १२. ३. १४ ).

**गोतमीपुत्र**—भारद्वाजीपुत्राचा हा शिष्य होता ( बृ. उ. ६. ५. १ ).

**गोत्रवत्**—कृष्ण व लक्ष्मणा यांचा पुत्र.

**गोधा**—मंत्रद्रष्टी ( ऋ. १०. १३४. ६-७ ).

**गोपति**—कश्यप व प्राधा यांचा पुत्र.

२ पांडवपक्षीय पांचाल देशचा राजा ( म. द्रो. २२ ).

३ शिबिपुत्र. यास गाईंनीं रक्षिलें होतें. हा माझ्या संरक्षकांपैकीं एक असावा असें पृथ्वीनें कश्यपाजवळ मागितलें. त्याप्रमाणें कश्यपानें यास अभिषेक केला ( म. शां. ४९ ). यास कृष्णानें इरावतीकांठीं मारिलें ( म. व. १२ ).

४ विश्वभुज् नामक अग्नीचें नामांतर. याची स्त्री नदी ( म. व. २२१. २७ कुं. ).

**गोपद**—तुषित देवांतील एक.

**गोपन**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**गोपवन आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ७३-७४ ). ऋग्वेदांतहि याचा उल्लेख असून आंगिरसाशीं याचा प्रत्यक्ष संबंध दिसतो ( ऋ. ८.७४.११ ).

**गोपायन**—गौपायनाबद्दल पाठभेद.

**गोपालि**—गौरपराशरकुलांतील एक.

**गोपाली**—एक अप्सरा.

२ ( कालयवन पहा ).

**गोबल वार्ष्ण**—यानें नचिकेताग्नीकरितां पांच दिशांना पांच पांच विटा मांडिल्यामुळें याला पशूंची प्राप्ति झाली ( तै. ब्रा. ३. ११. ९ ३ ). याचा आचार्य म्हणून उल्लेख आहे ( तै. सं. ३ ११.९.३; जै. उ. ब्रा. १.६.१ ).

**गोभानु**—( सो. तुर्वसु. ) विष्णु व वायु यांच्या मतें वह्निपुत्र. मत्स्यमतें गर्भपुत्र.

**गोभिल**—ऋतमित्राचा शिष्य ( वं. ब्रा. ३ ). गोभिल असें कुलनाम अनेकांना लाविण्यांत येतें ( पूषमित्र, अश्वमित्र, वरुणमित्र, मूलमित्र, वत्समित्र, गौल्गुलवीपुत्र व बृहद्वसु पहा ). कश्यपकुलांतील एक गोत्रकार. यानें केलेले ग्रंथ—गोभिलगृह्यसूत्र, गोभिलगृह्यकारिका, गोभिलपरिशिष्ट इ. ग्रंथ याचे आहेत ( C.C. ). यांपैकीं गोभिलगृह्यसूत्र छापून प्रसिद्ध झालेलें आहे. हें सामवेदाचें आहे. गोभिलस्मृति ही आनंदाश्रम संग्रहांत छापून झालेली आहे. तिच्यांत तीन प्रपाठक आहेत. हिचें नांव कर्मप्रदीप असावें असें आरंभ व शेवट यांवरून दिसतें. हिच्यांत श्राद्धकर्मादि लक्षणें, नित्यकर्म, संस्कार इत्यादिकांचें निरूपण आहे.

ही स्मृति गोभिलगृह्यसूत्राचे स्पष्टीकरणार्थ आहे. गोभिलाला हेमाद्रीनें राणायनीय व कौथुमशाखेचा सूत्रकार मानिलें आहे ( द्राह्यायण पहा ). गोभिलसूत्र व खादिलसूत्र यांत अत्यंत साम्य आहे.

२ विदर्भदेशांतील सत्यकेतु राजाची कन्या व उग्रसेनाची स्त्री पद्मावती ह्या एके दिवशीं जलक्रीडा करीत असतां विमानांतून गोभिल नांवाचा कुबेराचा दूत आकाशमार्गें जात होता. हा पद्मावतीचें सौंदर्य पाहून मोहित झाला व ती कोण हें अंतर्ज्ञानानें ओळखून तिच्या प्राप्तीसाठीं उग्रसेनाचें रूप यानें धारण केलें आणि जवळच एका वृक्षाखालीं हा गात बसला; त्यायोगें ती मोहित होऊन फसली गेली ( पद्म. भू. ४९ ).

**गोम**—शंभूचा पुत्र.

**गोमत्**—कश्यप व मुनि यांचा गंधर्वपुत्र.

**गोमतीपुत्र**—( आंध्र. भविष्य. ) भागवत व विष्णु यांच्या मतें शिवस्वातीचा पुत्र.

**गोमयान**—कश्यपकुलांतील गोत्रकार. निध्रुव वंशमालिकेंतील हा एक होता.

**गोमुख**—हा मातलीचा पुत्र. इंद्रपुत्र जयंताचा सारथि ( म. उ. १००. १८ कुं. ).

**गोमेदगंधिक**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**गोरख**—एक योगी. याचा गुरु मच्छिंद्र ( भवि. प्रति. ४. १२ ). कृष्णांशानें हिमालयावरील वीरसिंह नगरास वेढा दिला. त्या वेळीं गोरखानें नगराचें रक्षण केलें. तेथील राजाचा कनिष्ठ बंधु प्रवीर याच्याबरोबर कृष्णांशाचें युद्ध झालें. युद्धांत मेलेले प्रवीराकडील सर्व वीर गोरख संजीवनीमंत्रानें जिवंत करी. तेव्हां कृष्णांशास जय मिळेना. पुढें त्यानें गोरखास प्रसन्न करून ती विद्या घेतली. नंतर यानें या जगताचा त्याग करून हा गुप्त झाला ( भवि. प्रति. ३. २४ ).

**गोरथ**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**गोलभ**—एक गंधर्व. सतत पंधरा वर्षें याचें वालीशीं युद्ध चाललें होतें. शेवटीं वालीनें याचा वध केला (वा. रा. कि. २२. २७–३७ ).

**गोवासन**—हा क्षत्रिय असून शैब्य या नांवानें प्रसिद्ध आहे. भारतीय युद्धांत हा कौरवांच्या बाजूनें लढायला होता ( म. द्रो. ९५.३९ कुं. ). द्रोण सेनापति असतां एके दिवशीं यानें एक हजार वीरांनिशीं विजयी काशिराजपुत्रांस अडथळा केला.

**गोविंदशर्मन्**—भास्करांश निंबादित्याचा पिता ( भवि. प्रति. ४. ७ ).

**गोवृषध्वज**—कृपाचार्यांचें नांव (म.द्रो.१०५.१४ कुं.).

**गोशर्य**—हा अश्वींच्या कृपेंतला आहे ( ऋ. ८. ८.२० ). येथें याला गोशर्य शयु म्हटलें आहे. पक्थ, कण्व व त्रसदस्यु यांच्याबरोबर याचा उल्लेख येतो ( ऋ. ८.४९ १; ५०.१० ).

**गोश्रु जाबाल**—एक यज्ञकर्ता. सुदक्षिण क्षैमि, प्राचीनशालि व शुक्रजाबाल हे सर्व याचे समकालीन होते ( जै. उ. ब्रा. ३. ७. ७ ).

**गोश्रुति वैयाघ्रपद्य**—सत्यकाम जाबालानें याला वाणी, श्रोत्र, मन व प्राण यांचें महत्त्व तारतम्यपूर्वक सांगितलें आहे व प्राणाचें महत्त्व कथन केलें. पुढें महत्त्व प्राप्त करून घेण्याबद्दल एक व्रत सांगितलें ( छां. उ. ५. २.३ ).

**गोषूक्तिन् काण्वायन**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. १४-१५ ). याच्या नांवावर एक गोषूक्त-साम प्रसिद्ध आहे ( पं. ब्रा. १९. ४. ९ ). या सामानें प्रतिग्रहामुळें आलेला याचा दोष नष्ट झाला ( गौषूक्ति पहा ).

**गोष्ठायन**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**गौडिनि**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ( जौडिलि पहा ).

**गौतम**—अरुण, आग्निवेश्य, उद्दालक आरुणि, कुश्रि, साति व हारिद्रुमत यांचें हें पैतृक नांव आहे. शांडिल्य, आनभिम्लात, भारद्वाज, आग्निवेश्य, मांटि सैतव आणि गार्ग्य हे गौतमाचे शिष्य आहेत.

हा दीर्घतमा व प्रद्वेषी यांचा पुत्र होय. याच्या आईचें नांव प्रद्वेषी असें होतें ( म. आ. १०४; स. ४; ११ ). याचा बाप आंगिरसकुलांतील असून ( म. शां. ९०; अनु. १५४ ) तो बृहस्पतीच्या शापानें जन्मांध झाला होता ( ऋ. १.१४७). कांहीं ठिकाणीं दीर्घतमा यानेंच गौतम असें नांव धारण केलें, असें दिसतें ( बृहद्दे. ३. १२३; म. शां. ३४३; मत्स्य. ४८. ५३. ८४ ). गौतम ह्या नांवावरून गौतमाच्या पशुतुल्य वर्तनाचा बोध होतो ( वायु. २.३८.४७–६१; ८८–९२; ब्रह्मांड. ३. ७४. ४७–६१; ९०–९४; मत्स्य. ४८. ४३–५६; ७९–८४ ). गौतमाला औशीनरी नामक शूद्रस्त्रीपासून कक्षीवत वगैरे पुत्र झाले ( दीर्घतमस् पहा ).

हा वैवस्वत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक होता. ब्रह्मदेवाची मानसकन्या अहल्या याची स्त्री होय ( अहल्या पहा ). जनकाचा पुरोहित शतानंद याचा पुत्र होय ( म. व. १८५ ). याचें अंगिरसाशीं नदीमाहात्म्यासंबंधीं संभाषण झालें होतें ( म. अनु. २५ ). याच्या नांवावरूनच गोदावरीस गौतमी असें नांव पडलें ( दे. भा. ११. ९ ). अन्नाचा दुष्काळ पडला म्हणून वृषादर्भि राजा दान करीत असतां ज्या सप्तर्षींनीं तें नाकारिलें त्यांत गौतम होता ( म. अनु. ९३ ). गौतमाला एक उत्तंक नांवाचा शिष्य होता. त्यासच गौतमानें आपली कन्या दिली

होती. उत्तंकानें सौदास राजाकडून कुंडलें आणून तीं गुरुपत्नीस गुरुदक्षिणा म्हणून दिलीं ( म. आ. ५६-५७ ).

गौतमाचा आश्रम पारियात्र पर्वताजवळ होता. यानें तेथें साठ हजार वर्षे तप केलें. तेव्हां स्वतः यम तेथें आला. त्या वेळीं गौतमानें पितरांचें ऋण कसें फेडावें असा त्यास प्रश्न केला असतां, यमानें सत्य, धर्म, तप व शुचिर्भूतपणा यांचा अवलंब करून मातापितरांचें पूजन करावें, म्हणजे दुर्लभ व पवित्र लोकांची प्राप्ति होते असें सांगितलें ( म. शां. १२९ ). गौतमानें बारा वर्षे दुष्काळ पडला असतां, ऋषींस भोजन देऊन वांचविलें ( नारद. २. ७३ ). देवीभागवतांत हीच हकीकत देऊन शक्तिउपासनेची महती सांगितली आहे ( दे. भा. १२. ९; शिव. कोटि. २५-२७ ). गौतम व भगीरथ यांनीं तप करून शंकरास प्रसन्न केलें व गंगा मागितली. तेव्हां शंकरानें गौतमास गंगा दिली. तीच गौतमी या नांवानें प्रसिद्ध झाली ( पद्म. उ. २६८. ५२-५४ ). गौतमानें केलेली एक शिक्षा प्रसिद्ध आहे. हा व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य होय ( व्यास पहा ). न्यायशास्त्र करणाऱ्या गौतमाचा निर्देश आहे (शिव. उमा. २. ४३-४७). हा अंगिराकुलांतील एक ऋषि व प्रवर आहे. वैवस्वत मन्वंतराच्या पर्यायांतील हा व्यासहि आहे ( व्यास पहा ). त्र्यंबकेश्वराचा अवतार याच्या करितां झाला ( शिव. शत. ४३ ).

एक धर्मशास्त्रकार. हा सामवेदाच्या राणायनि शाखेच्या नऊ उपशाखांपैकीं एका शाखेचा होता ( द्रा. श्रौ १.४.१७ ). गौतमाचा आचार्य म्हणून उल्लेख आहे ( ला. श्रौ. १.३.३; ४.१७ ). त्याचप्रमाणें सामवेदाच्या गोभिलगृह्यसूत्रांतहि गौतमाचा उल्लेख बरेच वेळां आला आहे. गौतमस्मृति हा ग्रंथ गद्यमय आहे. त्यांत ग्रंथकर्त्यानें केलेला अगर बाहेरून घेतलेला असा एकहि श्लोक आढळून येत नाहीं. या ग्रंथाचे एकंदर अठ्ठावीस विभाग केलेले आहेत. कलकत्ता प्रतींत एक विभाग जास्त आहे. पण हरदत्तानें केलेल्या मिताक्षरेंत या विभागाचा मुळींच उल्लेख नसल्यानें हा भाग प्रक्षिप्त असावा, असें दिसतें. वेंकटेश्वर प्रत कलकत्ता प्रतीवरून घेतली आहे. गौतमधर्मसूत्रांत, चातुर्वर्णियांचे वागण्याचे नियम, उपनयनादि संस्कार, विवाह व त्याचे प्रकार, प्रायश्चित्त, राजधर्म, स्त्रियांचीं कर्तव्यें, नियोग, महापातकें व उपपातकें यांच्याबद्दल प्रायश्चित्तें, कृच्छ्र, अतिकृच्छ्र वगैरे प्रकार, यांचा विचार केला आहे. गौतमधर्मसूत्रांत संहिता, ब्राह्मण, पुराणें, वेदांगें, यांमधील बरेच उल्लेख आले आहेत. गौतमानें तैत्तिरीय आरण्यकांतील पंचवीस उतारे व कित्येक मतें आपल्या ग्रंथांत घेतलीं आहेत.

गौतमधर्मशास्त्राचा पहिला उल्लेख बौधायनधर्मसूत्रांत केलेला आढळतो. तसेंच वसिष्ठधर्मशास्त्र, अपरार्क, तंत्रवार्तिक, वेदांतावरील शांकरभाष्य वगैरे ग्रंथांत गौतमधर्मसूत्रांतील बरेच उतारे घेतले आहेत. मनुस्मृतींत गौतमाचा उतथ्यपुत्र म्हणून उल्लेख केला आहे ( मनु. ३. १६ ). भविष्यपुराणांतहि गौतमाचा सुरापाननिषेधाबद्दल एक उल्लेख आहे. गौतमधर्मसूत्राचा उल्लेख बौधायन, वसिष्ठ वगैरे धर्मशास्त्रकारांनीं केला आहे. यावरून तें वसिष्ठ व बौधायन यांच्या पूर्वीचें असावें. यवनांचा उल्लेख आला आहे व बुल्हरच्या मतें यवन हा शब्द अलेक्झांडरच्या स्वारीच्या वेळीं ( इ. स. पूर्वी ३२२ ) हिंदुस्थानांत प्रचलित झाला, त्याअर्थी गौतमधर्मसूत्र हें इ. स. पूर्वी ३२२ च्या सुमारास झालें असावें. परंतु हें मत चुकीचें दिसतें. कारण यवन शब्दाचा अर्थ क्षत्रियांस शूद्रीपासून झालेली संतति असा स्वतः गौतमानेंच दिला आहे व त्या अर्थानें तो शब्द गौतमधर्मसूत्रांत आला आहे ( ४. १७ ). यावरून क्षत्रिय व शूद्र यांच्या मिश्रणानें बनलेली यवनजात ग्रीक लोक हिंदुस्थानांत येण्याच्या पूर्वीहि असूं शकेल व तेवढ्यावरूनच गौतमाचा काल निश्चित करणें अशक्य आहे. तरी पण गौतम साधारणतः इ.स. पूर्वी ६००-४०० या कालांत होऊन गेला असावा. गौतमधर्मसूत्रावर हरदत्तानें मिताक्षरा नांवाची एक टीका आणि मस्करी व असहाय यांनीं भाष्यें लिहिलीं आहेत. परंतु तीं बरीच अलीकडील असावींत. मिताक्षरा, स्मृतिचंद्रिका वगैरे ग्रंथांत, श्लोकगौतम त्याचप्रमाणें अपरार्कांत व दत्तकमीमांसेंत वृद्धगौतम व बृहद्गौतम या दोन ग्रंथांचा उल्लेख आहे. तसेंच जीवानंदानें एक १७०० श्लोकांची गौतमस्मृति छापविली आहे. ती स्मृति कृष्णानें धर्मास चातुर्वर्ण्याचें धर्मकथन करण्याकरितां सांगितली, असा त्या स्मृतींतच उल्लेख आहे. परंतु ती स्मृति महाभारतांतील आश्वमेधिकपर्वांतून घेतली असावी. कारण , पराशरमाधवीयांत व दुसऱ्या कित्येक ग्रंथांत या स्मृतींतील श्लोक आश्वमेधिकपर्वांतून घेतले आहेत. आह्निकसूत्र, पितृमेधसूत्र व दानचंद्रिका यांशिवाय गौतमाचे ग्रंथ न्यायसूत्र, गौतमीशिक्षा वगैरे आहेत.

२ हा एकत, द्वित आणि त्रित यांचा पिता होय ( म. श. ३६; त्रित पहा ).

३ यास चिरकाली नांवाचा पुत्र होता. यानें त्याला पापकर्मी मातेस ठार मारिण्यास सांगितलें, पण त्याच्या अनियमितपणानें तें काम राहिलें ( म. शां. २६६ ).

४ पूषानामक सूर्याबरोबर फिरणारा एक ऋषि ( भा. १२. ११. ३९ ).

५ मध्यदेशांत राहणारा एक ब्राह्मण. याला वेदज्ञान बिलकूल नव्हतें. हा एका गांवीं एका श्रीमंत शूद्राकडे गेला असतां

त्यानें यास एक विधवा स्त्री दिली. तिच्यासह कालक्रमण करीत असतां याजकडे याचा एक मित्र आला व त्यानें गौतमास निंद्याचरणापासून परावृत्त केलें. तेव्हां गौतम तेथून निघाला तों वाटेंत नाडिजंघ नांवाच्या कश्यपाच्या मुलाकडे आला. तो राजधर्मा नांवानें प्रसिद्ध होता. त्यानें गौतमाचा यथोचित सत्कार करून आपला राजा विरूपाक्ष याकडे याला नेलें. राजानें यास विचारिल्यावरून गौतमानें सर्व हकीकत सांगितली. राजाच्या येथें हजार ब्राह्मणांबरोबर याला भोजन व मोठी दक्षिणा मिळाली. संपत्तीचें ओझें डोक्यावर घेऊन हा एका वटवृक्षाच्या खालीं बसला. तेथें राजधर्म्याला ठार मारिण्याचा विचार यास सुचला. त्याप्रमाणें त्याचा यानें वध करून त्यास जाळून हा संपत्तीसह तेथून निघाला. पण लौकरच विरूपाक्षानें यास राक्षसांकरवीं धरून आणिलें व याचे तुकडे करून शबरास खाण्यास दिले. पण यास कोणी खाईना. कारण, हा कृतघ्न होता. पुढें बकराज राजधर्मा जिवंत झाल्यावर त्यानें गौतमास जिवंत केलें व द्रव्य देऊन याच्या घरीं पोहोंचविलें. गौतमानें शूद्रस्त्रीपासून पापकर्म करणारे अनेक पुत्र निर्माण केले. तेव्हां देवांनीं यास शाप दिला कीं, हा दुष्ट विधवा स्त्रीपासून प्रजोत्पादन करून नरकास जाईल (म. शां १६८-१७३).

६ अत्रिकुलांतील एक ब्रह्मर्षि. वैन्य राजास विधाता म्हटल्याबद्दल यानें अत्रिऋषीस जाब मागितला होता (म. व. १८५). यानें द्युमत्सेनास सत्यवान् जिवंत आहे असें सांगून धीर दिला होता (म. व. २९८).

७ ब्रह्मदेवाचा पुत्र (वायु. २. ४४. ३८).

८ (व्यास पहा).

९ दारुक नामक शिवावताराचा शिष्य (नोधस् वामदेव पहा).

**गौतम आंध्र**—(आंध्र. भविष्य.) वायुमतें हा शिवस्वामीचा पुत्र.

**गौतम आरुणि**—याच्याशीं चैकितानेय वासिष्ठाचा ब्रह्मज्ञानाबद्दल संवाद झाला आहे (जै. उ. ब्रा. १. ४२. १).

**गौतम कूष्मांड**—कक्षीवताच्या संततीला हें सामान्य नांव आहे (ब्रह्मांड. ३.७४.९९). कूष्मांडाबद्दल वायूंत कृष्णांग असा पाठभेद आहे (वायु. २. ३७. ९७) कूष्मांडाचा देवसदृश म्हणून गृहस्थांच्या नित्यतर्पणांत समावेश आहे (विष्णु. ३. ११. ३२; ५. ३०. ११).

**गौतमी**—अश्वत्थाम्याची माता (भा. १ ७. ४७).

२ एक वृद्ध ब्राह्मण स्त्री (अर्जुनक पहा). हिनें आपल्या पुत्रांस मारणाऱ्या सर्पास भूतदयेनें सोडून दिलें.

**गौतमीपुत्र**—हा भारद्वाजीपुत्राचा शिष्य व याचे शिष्य कात्यायनीपुत्र व आत्रेयीपुत्र (बृ. उ. ६. ५. १-२).

**गौतमीपुत्र आंध्र**—(आंध्र. भविष्य.) मत्स्यमतें शिवस्वातीचा पुत्र.

**गौपवन**—गोपवनाचा वंशज. पौतिमाष्य व कौशिक यांचा शिष्य (बृ. उ. २. ६. १; ४. ६. १).

**गौपायन**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार. गोपायन असा पाठभेद आहे.

२ सुबंधु वगैरे बंधु गौपायनवंशांतले होते. असमाति ऐक्ष्वाकाचे हे पुरोहित होते. यांना टाकून राजानें दुसरे पुरोहित बोलाविले. तेव्हां हे राजावर मंत्रतंत्र करूं लागले. त्यामुळें रागावून त्या पुरोहितांनीं सुबंधूला ठार केलें (ऋ. सायणभाष्य. १०. ५७; बृहद्दे. ७. ८३; पं. ब्रा. १३. १२. ५; जै. ब्रा. ३. १६७).

**गौपालायन**—शुचिवृक्षाचें पैतृक नांव (औपोदिति पहा.)

**गौपालेय**—हें उपोदितीचें पैतृक नांव आहे.

**गौर**—शुक व पीवरी यांचा पुत्र.

२ विकुंठ देवांतील एक.

**गौरग्रीव**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**गौरजिन**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**गौरपराशर**—हा एक ऋषि असून याच्या कुलांत कांडूषप, वाहनप, जैह्मप, भौमतापन आणि गोपालि असे प्रसिद्ध ऋषि होऊन गेले.

**गौरपृष्ठ**—एक राजर्षि.

२ हा क्षत्रिय असून यमसभेंत हजर असल्याचा उल्लेख आहे (म. स. ८. २१ कुं.).

**गौरप्रभ**—शुक व पीवरी यांचा पांचांपैकीं एक पुत्र.

**गौरमुख**—उग्रसेनाचा उपाध्याय. याचा सांबाशीं सूर्यविषयक संवाद झाला होता (भवि. ब्राह्म. १३९).

२ शमीक ऋषीचा शिष्य. यानें गुरूच्या आज्ञेवरून परीक्षित् राजाला त्याचा मृत्यु कळविला (म. आ. ४२. ५० कुं.).

३ यानें सुप्रतीकपुत्र दुर्जयाला चिंतामणीच्या सहाय्यानें सैन्यासुद्धां सर्वांना मेजवानी दिली. ते याचें वैभव पाहून मोहित झालेल्या दुर्जयानें तो मणि गौरमुखाजवळ मागितला. परंतु त्याला न मिळाल्यामुळें त्यानें गौरमुखाशीं युद्ध केलें. त्यायोगें त्याचा सर्वस्वीं नाश झाला (वराह. ११-१५).

**गौरवर्मन्**—बौद्धजेता व अथर्ववेदपरायण परिहर याचा पुत्र. पित्याच्या मागून हा गादीवर आला. यानें गौडदेशामध्यें एकंदर बारा वर्षें राज्य केलें (भवि. प्रति. ४. ४).

**गौरवाहन**—पांडवांच्या वेळचा एक राजा (म. स. ३७.१५ कुं.).

**गौरवीति**—अंगिराकुलांतील गोत्रकार व प्रवर.

**गौरशिरस्**—एक ऋषि (म. स. ७. ११ कुं.).

**गौराश्व**—हा क्षत्रिय असून यमसभेंत हजर होता (म. स. ८.१८ कुं.).

**गौरिक**—(सू. इ.) हा वायुमतें युवनाश्वपुत्र. मांधात्याचें मूळ नांव.

**गौरिवीति**—सूक्तद्रष्टा (ऋ. ५.२९; ९. १०८. १; २; १०. ७३; ७४; ऐ. ब्रा. ३.१९; ८. २; ३.७; १३.५-४.१५; पं. ब्रा. ११. ५;१२.१३; २५.७). विभिंदुकीयांनीं केलेल्या सत्रांत हा प्रस्तोतृ होता (जै. ब्रा. २. २३३); हा शक्तीचा पुत्र, असें म्हटलें आहे. यावरून पराशर व हा एकच असावा. गौरिवीति शाक्त्याचें एक साम गौरीवित या नांवानें प्रसिद्ध आहे (पं. ब्रा. ११. ५. १३–१५). ऋषभ याज्ञतुराचा हा पुरोहित होता (श. ब्रा. १२.८.३.७). ऋषभ याज्ञतुराची गाथा गौरिवीति शाक्त्यानें केली असावी (श. ब्रा. १३. ५. ४-१५).

**गौरी**—ही मत्स्यमतें अंतिनारकन्या होय. ही मांधात्याची माता (युवनाश्व व प्रसेनजित् पहा).

२ (दुर्गा पहा).

**गौरुंडि**—उपाकर्मांगतर्पणांत याचा संग्रह आहे (जैमिनि पहा).

**गौर्गुलवि**—उपाकर्मांगतर्पणांत याचा संग्रह आहे (जैमिनि पहा).

**गौल्गुलवीपुत्र गोभिल**—याचा पिता बृहद्वसु, त्याच्या-पासून हा सामवेद शिकला (वं. ब्रा. ३).

**गौश्र**—गुश्रीचा वंशज. याला मधुक नांवाच्या एका ऋषीनें सोमवल्लीची देवता कोण असा प्रश्न विचारिला होता (सां. ब्रा. १६. ९; २३. ५).

**गौश्रायणि**—चित्राचें पैतृक नांव. हा जाबालसत्रांत पुरोहित होता (सां. ब्रा. २३. ५).

**गौश्ल**—यानें बुलिल आश्वतर याच्या यज्ञांतील शस्त्रें म्हणण्याचा सांप्रदाय चुकीचा ठरवून आपल्या पद्धतीनें शस्त्रें म्हणावयास लाविलें (ऐ. ब्रा. ६ ३०; गो. ब्रा. २. ६. ९).

**गौषूक्ति**—इष श्यावाश्वीच्या शिष्याचें नांव (जै. उ. ब्रा. ४. १६. १; पं. ब्रा. १९. ४. ९).

**ग्रंथिक**—द्रौपदीसहित पांडव अज्ञातवासांत असतां विराट-गृहीं नकुलानें धारण केलेलें नांव (म. वि. १२. १० कुं.).

**ग्रसन**—तारकासुराचा सेनापति. तारकासुराचें इंद्राशीं युद्ध झालें. त्या वेळीं हा त्याच्या बरोबर होता (पद्म. सृ. ४२). पुढें यमाशीं झालेल्या तारकासुराच्या संग्रामांत हा विष्णूकडून मारिला गेला (मत्स्य. १५०).

**ग्रामद**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**ग्राम्यायणि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**ग्रावा**—कश्यपप्रजापतीची स्त्री व दक्षप्रजापतीच्या कन्यां-पैकीं एक.

**ग्रावाच्यवन**—ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत हा होतृगणांतील एक ऋत्विज होता (पद्म. सृ. ३४).

**ग्रावाजिन**—स्वायंभुव मन्वंतरांतील अजित् देव.

**ग्लाव मैत्रेय**—बक दाल्भ्य व हा एकच (छां. उ. १. १२. १.३; गो. ब्रा. १. १. ३१). पंचविंश ब्राह्मणां-तील सर्पसत्रांत हा प्रस्तोतृ होता. याचा उल्लेख षड्विंश-ब्राह्मणांतहि आहे (१. ४).

## घ

**घटजानुक**—एक ऋषि (म. स. ४. १९ कुं.).

**घटोत्कच**—(सो. कुरु.) हा भीमापासून झालेला हिडिंबेचा पुत्र होय. हा जन्मला त्या वेळीं याचें मस्तक घटा-प्रमाणें होतें, परंतु त्या मस्तकाला केंस बिलकुल नसल्यामुळें याला (घट + उत्कच) घटोत्कच असें नांव पडलें. या नांवाशिवाय भीमावरून, भैम्य किंवा भैमसेनी व माता हिडिंबा हिच्या नांवावरून याला हैडिंब किंवा हैडिंबेय असें म्हणत असत (म. आ. १५५). तुम्ही स्मरण करितांच हजर होईन असें यानें आपली आजी कुंती हिला म्हटलें होतें (म. आ. १६५). याचें बालपणचें सर्व शिक्षण माते-

करून झालें. तिनें याला सर्व राक्षसीविद्येंत प्रवीण केलें. एकदम नाहींसें होणें, वाटेल तें रूप घेणें, कोणीं स्मरण केलें असतां एकदम प्रगट होणें इत्यादिकांत हा कुशल होता. पांडव ऋषींसह वनवासांत असतां एकदां गंधमादन-पर्वतावर चढत होते. चढतां चढतां भीमाशिवाय सर्व मंडळी थकून गेली. भीम फक्त पांडवांना नेण्यास समर्थ होता, परंतु सर्वांना घेऊन जाण्यास तो असमर्थ असल्यामुळें त्यानें घटोत्कचाचें स्मरण केलें. तेव्हां तात्काल प्रगट होऊन यानें ऋषींसह सर्वांना वर नरनारायणाश्रमीं नेऊन पोहोंचविलें (म. व. १४५).

पुढें एकदां घटोत्कचास याच्या मातेनें यानें पितृसेवा करावी म्हणून पांडवांकडे पाठविलें. धर्मराजानें याचा गौरव करून याचें लग्न करण्याचें ठरविलें. श्रीकृष्णानें मुरु दैत्याची कन्या मौर्वी (कामकंटका) घटोत्कचास योग्य असल्याचें सांगितलें. ती भगदत्त राजाच्या प्राग्ज्योतिषपुरांत असून 'मला बुद्धींत व बलांत जो जिंकील त्याला मी वरीन' असा तिनें पण केल्याचेंहि कथन केलें. शेवटीं सर्वांच्या संमतानें घटोत्कचानें तिला बुद्धींत, राक्षसीविद्येंत व शारीरबलांत जिंकिलें. तेव्हां ती इंद्रप्रस्थांत आली व तिचा घटोत्कचाशीं विवाह झाला (स्कंद. १. २. ५९–६०). राजसूययज्ञाच्या वेळीं दक्षिणदिग्विजयांत हा करभार घेण्यासाठीं लंकेंत गेला होता (म. स. ३२. ८०; ३४. ८ कुं.). ही लंकेला गेल्याची हकीगत फक्त कुंभकोणप्रतींतच आहे. ग. कृ. प्रतींत फक्त सहदेवानें लंकेला दूत पाठविल्याचा उल्लेख आहे. तो दूत हाच असावा.

महाभारतांत, घटोत्कच मोठा झाल्यावर हिडिंबा याला घेऊन कुंतीकडे आली. त्या वेळीं याचें लग्न झालें असून याला अंजनपर्वा व मेघवर्ण असे दोन पुत्र होते, असें आढळतें. परंतु याच्या स्त्रीसंबंधीं माहिती नाहीं. तथापि स्कंदपुराणांत याच्या लग्नाची माहिती आली असून याची स्त्री मौर्वी (मुरुदैत्याची कन्या कामकंटका) व तिजपासून बर्बरिक नांवाचा पुत्र झाल्याची हकीगत आहे (स्कंद. १. २ ५९-६०). कामेच्या कृपेनें ती अजिंक्य होती, पण तिला एक चमत्कारिक प्रश्न विचारून यानें ताब्यांत आणिलें व नखांतून सैन्य उत्पन्न करून जिंकिलें.

भारतीय युद्धांत हा पांडवांकडे होता. याचा रथ आठ चाकांचा असून तो ओढण्यास १०० घोडे लागत. याच्या रथावर गृध्रपक्षाचा ध्वज असून याचा सारथि विरूपाक्ष नांवाचा राक्षस होता. हातांत पौलस्त्य धनुष्य वागवी (म. द्रो. २३). द्रोण प्रति असतां एकदां रात्रीं युद्ध झालें, त्या वेळीं कर्णानें भयंकर युद्ध केलें. कर्णाजवळ वासवी शक्ति असल्यामुळें अर्जुन त्याच्याशीं युद्ध करण्यास धजेना. तेव्हां श्रीकृष्णानें घटोत्कचास, तुला रात्रीं युद्ध करण्यास अधिक बळ असतें, असा यथार्थ गौरव करून युद्ध करण्यास सांगितलें. घटोत्कचानेंहि भयंकर युद्ध केलें. दुर्योधनाच्या आज्ञेने बकासुराचा भाऊ अलायुध व अलंबुष नांवाचा दैत्य युद्ध करण्यास आले, तेव्हां घटोत्कचानें त्यांचा वध करून अलंबुषाचें शिर तोडून तें हातांत घेऊन हा दुर्योधनाकडे गेला व 'रिक्तपाणिर्न पश्येत् राजानम्' राजाला रिक्तहस्तानें भेटावयास जाऊं नये, असें म्हणून यानें अलंबुषाचें मस्तक दुर्योधना-पुढें ठेविलें व आतां कर्णाचेंहि मस्तक घेऊन भेटीला येतों असें चेष्टेनें खिजवीत हा मागें फिरला. या वार्तेनें कर्णहि मनांत घाबरला व शेवटीं नाइलाजानें घटोत्कचाच्या भयंकर युद्धानें त्यानें याच्यावर पाशवी शक्ति सोडिली. ती आपला प्राण घेणार असें पाहून घटोत्कचानें मरतां मरतां पर्वतप्राय शरीर धारण केलें व ती शक्ति लागतांच कौरव सेनेवर पडून शत्रुसैन्याच्या एका भागाचा चिरडून नाश केला. अशा रीतीनें भयंकर युद्ध करून अर्जुनास वासवी शक्तीपासून निर्भय केलें (म. द्रो. १७४–१७९). मार्गशीर्ष वद्य एकादशीस मध्यरात्रीस यास मारिलें (भारतसावित्री).

घटोत्कच दिसण्यांत भयंकर व शरीरानें धिप्पाड होता. शरीरबलानें, बापसे बेटा सवाई होता, हें गंधमादन प्रसंगावरून उघड दिसतें. शिवाय बुद्धि, समयसूचकता, मातृ-पितृभक्ति व आनंदीवृत्ति इत्यादि गुण याच्या चरित्रावरून व्यक्त होतात. याचे नेत्र विद्रूप असून कान शंकूच्या आकाराचे होते. तोंड मोठें, ओष्ठप्रांत आरक्तवर्ण आणि दाढा तीक्ष्ण होत्या. नासिका लांबट असून वक्षःस्थल विशाल होतें. पोटऱ्या वांकड्या-तिकड्या व जाड होत्या. एकंदर आकृति अक्राळविक्राळ असून आवाज फारच भयजनक होता. हा मनुष्यापासून जरी जन्मला तरी अमानुष होता. लहानपणीं मोठमोठ्या राक्षस-पिशाचांस हा आवरला जात नसे. बाल्यदशेंतहि हा लहान दिसत नव्हता. हा उपजतांच अस्त्रविद्येंत प्रवीण व कामरूपधर होता. उपजतांच यानें मातपित्यांचे पाय धरिले.

**घटोदर**—रावणपक्षीय एक राक्षस (वा. रा. उ. २७; म. स. ९. १७ कुं.).

**घंट**—वसिष्ठकुलांतील एक ब्राह्मण. यानें बिल्वदलानें शंकराची १०० वर्षे सेवा केली. पुढें देवल ऋषींच्या नातीला यानें मागणी घातली, तथापि हा कुरूप आहे, हें कळतांच मुलीनें याला नाकारिलें. तथापि यानें तिला पळवून तिच्याशीं गांधर्व-विवाह केला. हें पाहून तिच्या बापानें याला शाप दिला. परंतु नवीन नातें लक्षांत घेऊन निशाचर म्हणजे राक्षस न होतां

उलूक होशील व इंद्रद्युम्नास साह्य केल्यावर मुक्त होशील असा उःशाप दिला ( स्कंद. १. २. ८ ).

**घंटाकर्ण**—शिवाचा एक गण. शंकराचें नांव किंवा गुणानुवाद यांशिवाय कांहींच कानावर येऊं नये, म्हणून हा कानाला घंटा बांधीत असे. त्यामुळें याला घंटाकर्ण असें नांव पडलें. हा एक स्कंदाचा पार्षद होता ( म. श. ४६.२४ कुं. ).

**घंटामुख**—( विभावसु पहा ).

**घंटेश**—मंगळाचा पुत्र.

**घन**—लंकेंतील एक राक्षस ( वा. रा. सुं. ६ ).

**घर्म तापस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ११४ ).

**घर्म सौर्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १८१. ३ ).

**घुश्मेश्वर**—हा शंकराचा बारावा अवतार असून देवशैलाजवळ ( वेरुळला ) आहे. घुश्म्याच्या संरक्षणार्थ हा तेथें आला ( शिव. शत. ४२ ). याचें उपलिंग व्याघ्रेश्वर होय ( शिव. कोटि. १ ).

**घूर्णिका**—देवयानीच्या दाईचें नांव ( म. आ. ७२. ३५ कुं. ).

**घृणि**—स्वायंभुव मन्वंतरांतलि सहा मरीचिपुत्रांतील एक ( मरीचि पहा ).

२ ( सू. इ. ) धुंधुमाराचा पुत्र ( पद्म. सृ. ८ ).

**घृतकौशिक**—हा पाराशर्यायणाचा शिष्य. याचा शिष्य कौशिकायनि ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ).

२ ( विश्वामित्र पहा ).

**घृतपृष्ठ**—( स्वा. प्रिय. ) हा भागवतमतें प्रियव्रताला बर्हिष्मतीपासून झालेला पुत्र होय. क्षीरोदानें वेष्टित असणाऱ्या क्रौंचद्वीपाचा हा अधिपति होता. यानें आपल्या द्वीपाचे वर्ष-संज्ञक सात भाग केले होते. आम, मधुरुह, मेघपृष्ठ, सुधामा, भ्राजिष्ठ, लोहितार्ण आणि वनस्पति अशा आपल्या सात पुत्रांस त्यांचींच नांवें त्या त्या भागास देऊन ते विभागून दिले होते ( भा. ५. १. २५; २०. २० ).

**घृताची**—कश्यपाची स्त्री प्राधा, तिला झालेल्या अप्सरांतील एक ( म. आ. १८०.२ कुं. ). ही प्रतिमाघमासीं सूर्याबरोबर फिरत असते ( भा. १२. ११.३९ ).

हिला पाहून भरद्वाजाचें रेतःस्खलन झालें व त्या रेतापासून द्रोणाचार्याची उत्पत्ति झाली ( म. आ. १४०.३६ कुं. ). मार्गालप्रमाणेंच हिच्यामुळें व्यासाला शुक झाला ( म. शां. ३३२ कुं. ). हिच्यापासूनच प्रमतिऋषीला रुरु झाला ( म. आ. ५. ९ कुं. ). रौद्राश्वाची स्त्री. हिला ऋतेयु वगैरे दहा पुत्र झाले ( भा. ९.२०.२० ).

**घृताशिन्**—एक ऋषि. यानें गोपीमोहन कृष्णाचें ध्यान केलें म्हणून यास एका सुंदर गोपीचा जन्म आला ( पद्म. पा. ७२ ).

**घृतेयु**—( सो. पुरूरवस्. ) हा विष्णु, वायु व मत्स्य यांच्या मतें रौद्राश्वपुत्र होय.

**घोर**—हिरण्याक्षाचे सैन्यांतील एक असुर. यास कार्तिकेयानें मारिलें ( पद्म. सृ. ६५ ).

**घोर आंगिरस**—मंत्रद्रष्टा ( ऋ. ३. ३६.१० ). दुसऱ्या वैदिक ग्रंथांत याचा उल्लेख आहे ( सां. ब्रा. ३०.६; छां. उ. ३.१७.६; आश्व. श्रौ. १२.१० ). छांदोग्यांत यानें देवकीपुत्र कृष्णाला ब्रह्मज्ञानाचा उपदेश केल्याचा उल्लेख आहे. कठसंहितेंत अश्वमेधाच्या भागांत याचा उल्लेख आहे ( २६.७). अथर्ववेदाचा भिषजशीं संबंध असून आंगिरस वेदाचा घोराशीं संबंध आहे ( आश्व. श्रौ. १०-७; सां. श्रौ. १६.२ ).

२ वैवस्वत मन्वंतरांतील अंगिराऋषींच्या आठ पुत्रांतील एक ( म. अनु. १३२.४३ कुं.; अंगिरा पहा ). लकेंतील एक राक्षस. लंकादहनाच्या वेळीं मारुतीनें याचें घर जाळिलें ( वा. रा. सुं. ५४ ).

**घोरवर्मन्**—परिहाराचा पुत्र ( भवि. प्रति. ४. ४ ).

**घोष**—सर्वानुक्रमणीप्रमाणें कक्षीवान् पुत्री घोषा हिचा हा पुत्र. याचा पज्रिय कक्षीवानाचा उल्लेख असलेल्या सूक्तांत उल्लेख येतो ( ऋ. १. १२०. ५ ; घोषा पहा ).

२ वैवस्वत मन्वंतरांतील धर्मऋषीस लंबा नामक स्त्रीपासून झालेला पुत्र.

३ ( शुंग. भविष्य. ) मौर्यवंशानंतर झालेल्या शुंगघराण्यांतील पुलिंद राजाचा पुत्र. याचा पुत्र वज्रमित्र. हा सहावा राजा होता ( भा. १२.१.१७ ). वायु व ब्रह्मांड यांच्या मतें पुलिंदकाचा पुत्र. विष्णुतमें घोषवसु असें नांव आहे (शुंग पहा).

**घोषा**—ही कक्षीवानाची मुलगी ( ऋ. १०. ३९–४० ). ह्या दोनहि सूक्तांची हीच द्रष्टी आहे. कुष्ठासारखा रोग असल्यामुळें हिला बापाच्या घरीं अविवाहित स्थितींत खितपत पडावें लागलें. पुढें अश्वींच्या कृपेनें हिचें कोड बरें झालें ( ऋ. १०. ३९. ३. ४. ५ ) व हिला नवराहि मिळाला ( ऋ. १. ११७. ७ ). ही रोगग्रस्त असल्यामुळें साठाव्या वर्षापर्यंत अविवाहित स्थितींत बापाच्या घरीं राहिली व पुढें बापाप्रमाणें अश्वींना प्रसन्न करून घेऊन हिनें निरोगीपणा व नवराहि मिळविला ( बृहद्दे. ७. ४३. ४८). हिच्या नवऱ्याचें नांव स्पष्टपणें आढळत नसलें तरी हिला घोष व सुहस्त्य नांवाचे मुलगे होते ( बृहद्दे. ७. ४८; सुहस्त्य पहा ). हिनें आईबाप पुत्राला शिक्षण देतात, त्याप्रमाणें आपणांला ते

मिळावें म्हणून अश्वींची प्रार्थना केली ( ऋ. १०. ३९. ६ ). तसेंच शत्रूंशीं लढण्यास समर्थ करण्याविषयींहि हिची प्रार्थना आहे ( ऋ. १०. ४०. ५ ).

**घोर**—( काण्व प्रगाथ पहा ).

**घोषेय**—( घोष व सुहस्त्य पहा ).

**घ्राण**—तुषित देवांपैकीं एक.

# च

**चक्र**—सर्पसत्रामध्यें उन्नेतृत्व नामक आर्त्विज्य करणारा हा एक ऋत्विज होता. याच्या बरोबर पिशंगाचा उल्लेख आला आहे ( पं. ब्रा. २५. १५. ३ ).

**चकोर**—( आंध्र. भविष्य. ) सुनंदनाचा हा पुत्र. याला वायुमतें सातकर्णि, विष्णुमतें चकोरशातकर्णि व ब्रह्मांडमतें शातकर्णि म्हटलें आहे.

**चक्र**—रावणाच्या सैन्यांतील लंकेमधील राक्षस (वा. रा. सुं. ६. २४ ).

**चक्रक**—विश्वामित्राचा एक पुत्र.

**चक्रदेव**—एक यादव ( म. स. १४. ६० कुं. ).

**चक्रधनु**—कपिल ऋषीचें नामांतर.

**चक्रधर्मन्**—विद्याधराचें नामांतर ( म. स. १०. २८ कुं. ).

**चक्रपाणि**—सिंधु दैत्याच्या बापाचें नांव ( गणेश २. ७३. ५ ).

**चक्रमालिन्**—रावणाच्या सचिवांपैकीं एकाचें नांव.

**चक्रवर्तिन्**—अंगिरसकुलांतील मंत्रकार.

**चक्रवर्मन्**—बलाचा पुत्र. हाच कर्णाचा पूर्वजन्म होय.

**चक्रवात**—तृणावर्त राक्षसाचें नामांतर.

**चक्रायण**—उषस्त मुनींचा पिता.

**चक्रिक**—एक चांडाळ व्याध. हा मातपितृभक्त व विष्णुभक्त होता. विष्णूस अर्पण करावयाच्या फळांपैकीं नेहमीं-प्रमाणें एकाची चव घेत असतां याच्या घशांत तें अडकलें. तें विष्णूस अर्पण करण्याकारितां बाहेर निघावें म्हणून स्वतःच आपली मान यानें कापिली. तेव्हां विष्णूनें यास पूर्ववत् करून दर्शन दिलें. पुढें द्वारकाक्षेत्रीं जाऊन मरण पावल्यामुळें हा मुक्त झाला ( पद्म. क्रि. १६ ).

**चक्रिन्**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**चक्षु**—( स्वा. उत्तान. ) भागवतमतें सर्वतेजस् व आकूति यांचा पुत्र. याची स्त्री नड्वला. हा सहावा मनु झाला.

२ ( सो. नील. ) हा विष्णुमतें पुरुजानुपुत्र, भागवतमतें अर्क, मत्स्यमतें पृथु व वायुमतें रिक्ष, हे सर्व एकच.

३ तुषित देवांपैकीं एक.

४ ( सो. अनु. ) यास भागवतमतें अनुपुत्र, विष्णुमतें व मत्स्यमतें चाक्षुष, ब्रह्मांडमतें कालचक्षु व वायुमतें पक्ष म्हटलें आहे.

**चक्षुस् मानव**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. १०६. ४-६ ).

**चक्षुस् सौर्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १५८ ).

**चंचला**—एक वेश्या. हिनें विष्णूच्या देवळाच्या भिंतीस सहज एक चुन्याचें बोट लाविलें. त्या पुण्याईनें ही वैकुंठास गेली ( पद्म. ब्र. ६ ).

**चंचु**—( सू. इ. ) हा विष्णु, वायु व भविष्य यांच्या मतें हरितपुत्र होय. भागवतमतें यास चंप म्हटलें आहे. भविष्यमतें यानें ३००० वर्षे राज्य केलें. यानें चंपानगरी वसाविली

**चंचुलि**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**चंड**—एक व्याध. शिवरात्रीच्या दिवशीं सहज शिवावर बिल्वपत्र टाकिल्यानें हा मुक्त झाला ( पद्म. उ. १५४; स्कंद. १. १. ३३ ).

२ त्रिपुरासुराचा अनुयायी. त्रिपुर व शंकर यांच्या युद्धसमयीं याचें व नंदीचें युद्ध झालें ( गणेश. १. ४३ ).

३ शुंभासुरानुयायी. शुंभ व शंकर यांचें युद्ध चालू असतां शुंभानें यास जालंधराचे शोधार्थ पाठविलें होतें ( पद्म. उ. १६ ). यापूर्वी हा शुंभाबरोबर देवसेनेशीं लढत होता ( पद्म. उ. १२ ). चण्ड व मुण्ड हे शुंभनिशुंभ यांचे अनुयायी होत. हे दोघे सहज क्रीडा करीत एके ठिकाणीं गेले असतां यांना कोणी एक सुंदर स्त्री दिसली. तिची बातमी यांनीं शुंभनिशुंभास सांगितली. पुढें तिला वश करण्याकरितां शुंभनिशुंभांनीं यांचीच योजना केली व स्वतः लढण्यास जाण्यापूर्वी यांस तिच्याशीं लढण्यास पाठविलें. तेव्हां कालिकादेवीनें यांना ठार केलें ( दे. भा. ५. २१ ). ती देवी चंडा होय. हीच हकीगत थोड्या फरकानें अन्यत्र आली आहे (वायु. १. ५५).

४ विष्णूच्या पार्षदांपैकीं एक.

५ अष्टभैरवांपैकीं एक.

६ बाष्कलाचा पुत्र.

७ कश्यप व सुरभि यांचा पुत्र ( शिव. शत. १८ ).

**चंडकौशिक**—कक्षीवान् ऋषीचा पुत्र. याच्या प्रसादानें बृहद्रथाला जरासंध झाला ( म. स. १७.२४ कुं. ).

**चंडतुंडक**—गरुडपुत्र ( म. उ. १०१.९ कुं. ).

**चंडबल**—रामाच्या सैन्यांतील प्रख्यात वानर. कुंभकर्णानें याचा वध केला.

**चंडभार्गव**—च्यवनाच्या वंशांतील एक ऋषि. जनमेजयाच्या सर्पसत्रांत हा होता होता ( म. आ. ५३.५ कुं. ).

**चंडमुंड**—शुंभनिशुंभांचे सेनापति ( चंड पहा ).

**चंडश्री**—( आंध्र. भाविष्य. ) मत्स्यमतें विजयाचा पुत्र. याबद्दल चंद्रविज्ञ, चंद्रश्री व दंसश्री अशीं नांवें आढळतात.

**चंडा**—( गंडा पहा ).

२ ( चंड पहा ).

**चंडाश्व**—( सू. इ. ) कुवलाश्वाचा पुत्र. याचें नामांतर भद्राश्व.

**चंडिक**—वर्दरिकाचें नामांतर.

**चंडिका**—पद्मिनीनें चंडिकेची आराधना केली, तेव्हां चंडिकेनें ' हीम् फट् घे घे ' हा मंत्र लक्षणास देऊन अभय दिलें ( भवि. प्रति. ३. ३; दुर्गा पहा ).

**चंडी**—उद्दालकाची पत्नी. हिची गोष्ट कलहेसारखी आहे (जै. अ. १६ ).

**चंडीश**—रुद्रगणांपैकीं एक. यास चंडी, चंड, चंडेश्वर, चंडघंट इत्यादि नांवें आहेत. दक्षयज्ञविध्वंसनाच्या वेळीं यानें पूषा नामक ऋत्विजास बांधिलें होतें ( भा. ४. ५. १७; पद्म. उ. १२ ).

**चंडोदरी**—अशोकवनांतील एक राक्षस स्त्री(वा. रा. सुं. ४).

**चतुरंग**—( सो. अनु. ) हा भागवत व विष्णु यांच्या मतें चित्ररथ अथवा रोमपाचा पुत्र. ऋश्यशृंगानें पुत्रकामेष्टि केल्यामुळें याचा जन्म झाला. याचा पुत्र पृथुलाश्व ( भा. ९. २३. १० ).

**चतुर्मुख**—कमलांतून ब्रह्मदेवाचा जन्म झाल्याबरोबर त्यानें चारी दिशांकडे पाहिलें. त्याबरोबर त्याला चार मुखें प्राप्त झालीं. त्यांवरून त्यास हें नांव पडलें ( भा. ३. ८. १६; ब्रह्मन् पहा ).

**चतुर्वेदिन्**—काश्यप व आर्यावती यांच्या दहा पुत्रांपैकीं एक. याला सरस्वतीनें आपली कन्या दिली होती. तीपासून याला कश्यप, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि, वसिष्ठ, वत्स, गौतम, पराशर, गर्ग, अत्रि, भृगु, अंगिरा, शृंगी, कात्यायन व याज्ञवल्क्य असे सोळा पुत्र झाले. ते सर्व गोत्रकार होते ( भवि. प्रति. २.६; ४.२१ ).

**चंद्रभट्ट**—भूमिराजाचा मंत्री. यानें भूमिराजास उदयसिंहापासून चार दिव्य अश्व हरण करण्याची वैष्णवी देवीची आज्ञा सांगितली ( भवि. प्रति. ३. २४ ).

**चंद्र**—पूर्वी अत्रीला अनुसूयेचे ठिकाणीं शंकराच्या अंशानें झालेला मुलगा. अत्रीनें दाही दिशांपासून याला उत्पन्न केलें (विष्णुधर्म. १. १०६; स्कंद. ४.१.१४). हा अमृतमंथनांतून निघाला. याची सोम ह्या नांवानें प्रसिद्धी आहे ( भा. ४. १३; म. शां. २०८ ). अत्रीला डोळ्यांपासून झाला ( ह. वं. १. २५; वायु. २. २८. ५ ). याला सूर्य व भद्रा यांचा पुत्र असें म्हटलें असून यानें एक तप केलें, त्या वेळीं याच्या डोळ्यांतून सोमरस गळूं लागला. त्यामुळें सर्व औषधि उत्पन्न झाल्या ( स्कंद. ७. १. २० ). याला दक्ष प्रजापतीनें आपल्या सत्तावीस मुली स्त्रिया म्हणून दिल्या होत्या. सत्तावीस नक्षत्रांचीं नांवें हीं त्यांचीं सत्तावीस नांवें (म. आ. ६७. १६कुं; ह. वं. १२५; स्कंद. ७.१. २०). हा स्वायंभुव मन्वंतरामध्यें होऊन गेला (म. आ. ६७. १५ कुं.). यानें अनाथ मारिषेचें अमृत देऊन रक्षण केलें.

चंद्राच्या सत्तावीस स्त्रियांचीं नांवें पुढें नक्षत्रांना पडलीं. चंद्राचें रोहिणीवर विशेष प्रेम असल्यामुळें हा तिच्याकडे विशेष राही. तेव्हां इतर स्त्रियांनीं आपल्या पित्याकडे तक्रार केली. दक्षानें चंद्राला समजावून सर्वांच्याकडे सारखें लक्ष ठेवावयास सांगितलें; पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. तेव्हां दक्षानें चंद्राला, तुला क्षयरोग होईल असें सांगितलें. त्याप्रमाणें चंद्र क्षयानें खंगत चालला. पण त्याचा परिणाम औषधी वनस्पतींवर होऊन देवांना दक्षाकडे मध्यस्थी करणें भाग पडलें. तेव्हां दक्षानें पंधरा दिवस क्षय व पंधरा दिवस वृद्धि होईल; पण त्याकरितां यानें सर्व स्त्रियांशीं सारखें वागावें व पश्चिम समुद्राजवळ समुद्राच्या मुखाशीं स्नान करावें, असें सांगितलें. त्याप्रमाणें स्नान केल्यावर चंद्रास पुनः पूर्ववत् कांति प्राप्त झाली, म्हणून त्या क्षेत्रास प्रभास असें नांव पडलें ( म. श. ३६ ). शशपानतीर्थावर देवदैत्य अमृत प्याले. त्या ठिकाणीं हा उशिरा गेल्यामुळें यास अमृत मिळालें नाहीं. पण तें तीर्थ यास प्यावयास देवांनीं सांगितलें. तें तीर्थ एक ससा पीत होता, त्यासहि यानें खाल्लें. तो अद्याप याच्या पोटांत आहे. यानें तें तीर्थ पुनः उकरण्यास सांगून पूर्ववत् केलें, त्यामुळें हा पूर्ववत् झाला ( स्कंद. ७. १. २५८ ).

पुढें अत्रिपुत्र सोम फारच बलिष्ठ झाला. यानें राजसूय करून त्रैलोक्य जिंकिलें व जबरीनें बृहस्पतीची तारा नांवाची स्त्री पळविली. तिच्याकरितां मोठें तारकामय नामक युद्ध झालें. ब्रह्मदेव मध्यें पडला, तेव्हां यानें तारा परत केली. पण ती गर्भार होती.

गर्भाचा त्याग करण्यास बृहस्पतीनें सांगितल्यावरून तारेनें तो एका मोळाच्या झाडावर टाकिला. पण तो गर्भ तेजस्वी पाहून हा व बृहस्पति भांडूं लागले. तारेनें गर्भ चंद्राचा असें सांगितल्यावरून तो चंद्राला देण्यांत आला. तो बुध होय. तेथून चंद्रवंश सुरू झाला (भा. ९. १४; ह. वं. १. २५; पद्म. पा. १२; ब्रह्म.९; मत्स्य. २३; दे. भा.१.११; वायु. २.२८-२९).

भविष्यमतें सोमवंशांतील पहिला राजा. यानें १८००० वर्षें राज्य केलें. याची स्त्री रोहिणी. याची राजधानी प्रयाग होती. मायादेवीच्या प्रसन्नतेकरितां यानें शंभर यज्ञ केले. यानें चंद्रेश्वरीं तप केलें ( पद्म. उ. १५६; सोम व पुरूरवस् पहा ).

यानें बदरिकाश्रमीं तपःश्चर्या करून ग्रहाधिपत्य मिळविलें ( स्कंद. २. ३. ७. ). यानें उमेसह सोमाची आराधना केल्यामुळें सोम हें नांव प्राप्त केलें ( स्कंद. ४. १. १४. ).

धर्म प्रजापतीला वसु नांवाच्या स्त्रीपासून झालेल्या अष्टवसूं- पैकीं एकाचें नांव सोम असें आहे ( म. आ. ६७. १८ कुं; लिंग. ६१ ). हा वैवस्वत मन्वंतरांतील होय. हा सोमवंशाचा मूळ होय. मागील सर्व गोष्ट याची असावी.

२ ( सू. इ. ) हा भागवतमतें विश्वरंध्रीचा पुत्र ( इंदु पहा ).

३ ( सू. इ. ) भानु राजाचा पुत्र. यास श्रुतायु नांवाचा पुत्र होता.

४ दाशरथि रामाच्या सूज्ञ नामक मंत्र्याच्या पुत्रांतील एक. यास कुशानें अश्वमेधाचा घोडा परत मिळविण्याकरितां झालेल्या लढाईंत ठार मारिलें ( वा. रा. उ. १ ).

५ कृष्ण व नाग्नजिती यांच्या पुत्रांतील एक ( भा. १०. ६१. १३ ).

६ कश्यप व दनु यांचा पुत्र.

७ एक ब्राह्मण. याच्या पत्नीचें नांव शुभांगी ( पद्म. ब्र. ५ ).

**चंद्रकला**—सुबाहूची स्त्री. ही एका तळ्यांत स्नान करीत असतां विक्रमपुत्र माधव यानें हिला पाहिलें व तो मोहित झाला. पण हिनें त्यास प्लक्षद्वीपांतील गुणाकराची कन्या सुलोचना हिच्याशीं विवाह करण्यास सांगितलें. तेव्हां त्यानें हिचा नाद सोडिला ( पद्म. क्रि. ५ ).

**चंद्रकांत**—एक गंधर्व. याची कन्या सुतारा ( पद्म. स्व. २२; उ. १२८ ).

**चंद्रकांति**—ही पूर्वजन्मीं एक वेश्या होती. पुढें पुण्य- प्रभावामुळें बाणकन्या उषा झाली व हिनें अनिरुद्धाशीं लग्न केलें. पुढील जन्मीं जंबुक राजाची विजयैषिणी नामक कन्या झाली. तेव्हां बलखानीनें हिला ठार मारिलें ( भवि. प्रति. ३. २२ ).

**चंद्रकेतु**—हंसध्वज राजाचा बंधु.

२ ( सू. इ. ) वायुमतें लक्ष्मणपुत्र होय.

३ दुर्योधनपक्षीय क्षत्रिय राजा. हा कृपाचार्याचा चक्ररक्षक असून भारतीय युद्धांत अभिमन्यूनें याचा वध केला ( म. वि. ६१. १६; द्रो. ४८. १५ कुं. ).

**चंद्रगिरि**—(सू. इ. ) हा मत्स्य व पद्म यांच्या मतें तारापीडपुत्र होय ( पद्म. सृ. ८ ).

**चंद्रगुप्त**—( मौर्य. भविष्य. ) नंदघराणें नष्ट झाल्यावर हा मौर्यवंशीय राजा गादीवर आला. शेवटच्या नंदाला मुरा नामक शूद्रीपासून हा झाला, म्हणून या घराण्याला मौर्य असें नांव पडलें असें म्हणतात. आर्यचाणक्यानें सर्व नंदांचा समूळ नाश केल्या- वर याला गादीवर बसविलें. यानें एकंदर चोवीस वर्षें राज्य केलें. याला वारिसार नामक पुत्र होता ( भा. १२. १. १३ ). भविष्यपुराणामध्यें असें सांगितलें आहे कीं, हा काश्यपाचा वंशज असून पट्टण येथील राज्य करीत होता. हा बुद्धिसिंहाचा पुत्र. हा बौद्धधर्मी असून यानें पौरसाधिपति सुलूनाच्या यावनी कन्येशीं विवाह केला होता. यानें एकंदर साठ वर्षें राज्य केलें. याचा पुत्र बिंदुसार ( भवि. प्रति. १. ७ ).

२ अजमीर देशचा राजा चपहानि, याच्या वंशांतील महा- सिंहाचा पुत्र. यानें एकंदर पन्नास वर्षें राज्य केलें. याचा पुत्र प्रतापवान् ( भवि. प्रति. ४.२ ).

३ कार्तवीर्याचा प्रधान. यानें जमदग्नीचा शिरच्छेद केला ( ब्रह्मांड. ३. ३० ).

**चंद्रदेव**—पांचाल क्षत्रिय राजा. हा युधिष्ठिराचा चक्र- रक्षक असून भारतीय युद्धांत कर्णानें याचा वध केला ( म. क. ४४. २९ कुं. ).

२ दुर्योधनपक्षीय एक राजा. भारतीय युद्धांत अर्जुनानें याला मारिलें ( म. द्रो. २७ ).

३ न्यूह यवनाच्या वंशांतील महीचंद्राचा पुत्र. यानें २० वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. ४. ३ ).

**चंद्रप्रदर्शन**—सिंहिकापुत्र. यास चंद्रप्रमर्दन असें नामां- तर आहे.

**चंद्रप्रभ**—एक राजा ( पद्म. पा. ७२ ).

२ मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**चंद्रप्रमर्दन**—कश्यप व सिंहिका यांच्या पुत्रांतील कनिष्ठ.

**चंद्रभट्ट**—( ऐति. ) यानें सहोड्डीनाच्या आज्ञेवरून महीराजास मारिलें ( भवि. प्रति. ३. ३२ ).

**चंद्रभानु**—सत्यभामेच्या ठिकाणीं श्रीकृष्णाला झालेला पुत्र ( भा. १०. ६१. १० ).

**चंद्रमस्**—अत्रि व अनुसूया यांचा तिसरा पुत्र ( भा. ४. १ ).

२ कश्यप व दनु यांचा एक पुत्र.

३ समुद्राच्या दक्षिण तीरीं राहणारा ऋषि. यानें जटायूचा भाऊ संपाति यास अध्यात्मज्ञान सांगितलें व सीताशोधनार्थ वानर येतील, त्यास मार्ग सांगण्यास सांगून आपण स्वर्गी गेला.

**चंद्रराय**—अजमीरचा राजा चपहानि, याच्या वंशांतील विबुध राजाचा पुत्र. यानें पन्नास वर्षें राज्य केलें. याचा पुत्र हरिहर ( भवि. प्रति. ४. २ ).

**चंद्ररूपा**—राथंतरकल्पामध्यें झालेल्या प्रजापति नामक राजाची भार्या. हिनें त्रिरात्र तुलसीव्रत केलें होतें ( पद्म. उ. २५ ).

**चंद्रवती**—मारिषेच्या ठिकाणीं प्रचेत्यास झालेली कन्या. ही प्राचेतस दक्षाची भगिनी.

**चंद्रवर्मन्**—कांबोज देशचा क्षत्रिय राजा ( म. आ. ६८.३२ कुं. ).

**चंद्रवाह**—कुकुत्स्थ राजाचें नामांतर.

**चंद्रविज्ञ**—(आंध्र. भविष्य.) भागवतमतें विजयाचा पुत्र ( चंडश्री पहा ).

**चंद्रशर्मन्**—मायापुरींतील अग्निगोत्रज ब्राह्मण. देवशर्मन्चा शिष्य. देवशर्म्याची कन्या गुणवती ही याची स्त्री. एकदां हे सासरेजांवई अरण्यामध्यें दर्भसमिधा आणावयास गेले असतां एका राक्षसानें यांचा प्राण घेतला. परंतु हा अत्यंत धार्मिक असल्यामुळें वैकुंठास गेला. चंद्रशर्मन् कृष्णाच्या वेळीं अक्रूर म्हणून प्रसिद्धीस आला ( पद्म. उ. ८८-८९ ).

२ सूर्यवंशांतील हा राजा कुरुक्षेत्रांत राही. एकदां सूर्यग्रहणाचे वेळीं एक तुलापुरुषदान यावें असें यास वाटून यानें एका ब्राह्मणास बोलाविलें. पण तें निंद्य दान असल्यामुळें तुलापुरुषदान करितांच त्यांतून चांडाल व चांडाली हें जोडपें उत्पन्न झालें. तथापि ब्राह्मणानें गीतेच्या ९ व्या अध्यायाचा पाठ सुरू केला असल्यामुळें त्याच्या प्रत्येक अक्षरापासून एकेक विष्णुदूत उत्पन्न होऊन त्यांनीं त्या जोडप्यास पिटाळून लाविलें. तो चांडाल पाप व चांडाळीण निंदा होती ( पद्म. उ. १८३ ).

३ मागध देशांतील या ब्राह्मणानें गुरुहत्या केली होती. हा विदुरासह कलिंजर पर्वतावर भेटलेल्या सिद्धाच्या उपदेशानें सोमवती अमावास्येच्या दिवशीं पुष्करतीर्थी स्नान करून शुद्ध झाला ( पद्म. भू. ९१-९२ ).

**चंद्रशेखर**—हा पुषन्चा नातू व पौष्याचा पुत्र. पौष्यानें पुत्राकरितां शंकराची आराधना केली असतां शंकरानें त्याला एक फळ दिलें. त्या फळाचे तीन भाग करून त्यानें आपल्या तीन स्त्रियांस दिले. पुढें त्या तीनहि स्त्रियांना तीन भाग असे झाले कीं, ते एकत्र जोडले असतां एक पुत्र व्हावा. तीन भागांपासून झाल्यामुळें यास त्र्यंबक असें नांव पडलें. भोगावतीच्या सूर्यवंशीय ककुत्स्थ राजाच्या तारावती नांवाच्या कन्येशीं याचें लग्न झालें. चंद्रशेखराचें राज्य दृषद्वती नदीच्या कांठीं करवीर येथें होतें. याला दमन, उपरिचर व अलर्क असे तीन औरस पुत्र होते. या तारावतीला कपोत मुनीच्या शापानें भृंगी व महाकाळ हे भैरव व वेताळ रूपानें पुत्र झाले ( कालि. ५०-५२ ).

**चंद्रश्री**—( आंध्र. भविष्य. ) विष्णुमतें विजयाचा पुत्र ( चंडश्री पहा ).

**चंद्रसंमति**—इंद्रप्रमदिबद्दल पाठभेद.

**चंद्रसावर्णि**—चौदावा मनु ( मनु पहा ).

**चंद्रसेन**—सिंहलद्वीपाचा राजा व मंदोदरीचा पिता.

२ दुर्योधनपक्षीय एक राजा. भारतीय युद्धांत हा शल्याचा चक्ररक्षक असून युधिष्ठिराकडून मारिला गेला ( म. श. ११. ५३ कुं. ).

३ पांडवपक्षीय क्षत्रिय राजा ( म. स. ३१.२५ कुं. ). हा समुद्रसेन राजाचा पुत्र (म. आ. २०१.११ कुं.). भारतीय युद्धांत अश्वत्थाम्यानें याचा वध केला ( म. द्रो. १५७. १८३ कुं. ). हा एक उत्तम रथी होता ( म. उ. १७१ कुं. ). याच्या रथास सामुद्र अश्व जोडिले होते.

४ हंसध्वज राजाचा बंधु.

५ एक राजा. याचा पुत्र शोभन ( पद्म. उ. ६० ).

६ हा उज्जयिनींतील राजा. याचा शिवभक्तीनें उद्धार झाला (स्कंद. ३. ३. ५ ).

७ कौंडिन्यपूरचा राजा (गणेश. १. २५. १; दक्ष पहा).

**चंद्रहर्तृ**—कश्यप व सिंहिका यांचा पुत्र.

**चंद्रहास**—हा केरलदेशाधिपति सुधार्मिक राजाचा पुत्र. याचा जन्म मूळ नक्षत्रावर झालेला होता. शिवाय, दारिद्र्यदर्शक अशी सहावी अंगुली याच्या डाव्या पायास होती. या अशुभ चिन्हामुळें याचा जन्म होतांच शत्रूंनीं याच्या बापास मारिलें व आईनें सहगमन केलें. अशा प्रकारें हा अनाथ झाला असतां यास एका दाईनें सांभाळिलें. तिनें याला कौंतलकापुरींत नेलें. तेथें तीन वर्षे तिनें दळणकांडण करूनच याचें पोषण केलें. कांहीं दिवसांनीं ती मृत झाली असतां हा भिक्षान्न सेवून राहिला. कांहीं स्त्रियांनीं याचें पुढें पालन केलें. हा पांच वर्षांचा झाला, तेव्हां इतर मुलांत खेळूं लागला. यामुळें पुष्कळ स्त्रियांनीं यास न्हाऊं जेवूं घातलें. एके दिवशीं हा स्वेच्छेनें धृष्टबुद्धि प्रधानाच्या घरीं गेला. तेथें ब्राह्मणभोजन चाललें होतें. तेथें आलेल्या योगीश्वरांना व मुनींना चंद्रहासास पाहून विस्मय वाटला. त्यांनीं यासमवेत तेथें भोजन करून जातांना,

हा राजा होईल असा आशीर्वाद दिला; व तुझ्या संपत्तीचें रक्षणहि हाच करील, असें त्या प्रधानाला सांगितलें. यामुळें धृष्टबुद्धि संतप्त झाला. त्याच्या मनांत संशय उत्पन्न होऊन त्यानें या बालकास मांगांच्या स्वाधीन केलें: मांगांनीं याला ठार मारण्यासाठीं अरण्यांत नेलें. तरीहि हा हांसतच होता. वाटेंत सांपडलेला शालिग्राम यानें मोठ्या भक्तीनें तोंडांत ठेविला होता. मांगांनीं तीक्ष्ण शस्त्रें उगारितांच यानें त्यांची स्तुति केली. त्यामुळें चांडाळांच्या मनांत याच्याविषयीं दया व पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन त्यांनीं यास न मारितां याची सहावी अंगुली कापून तीच अंगुली दाखवून धृष्टबुद्धि प्रधानापासून मांगांनीं बक्षीस मिळविलें.

मांगांनीं यास सोडिल्यावर हा अरण्यांत इकडेतिकडे भटकूं लागला. त्याच वेळीं कुलिंद देशचा राजा मृगयेसाठीं त्याच अरण्यांत आला होता. या बालकास पाहून राजाचें मन दयार्द्र झालें; त्यानें याची विचारपूस केली व यास चंदनावती नगरींत नेऊन राणी मेधावतीच्या स्वाधीन केलें. राजानें याचें नांव चंद्रहास असें ठेवून यास सर्व विद्या शिकविल्या. चंद्रहासामुळें कलिंगांत सर्वत्र आनंद वावरूं लागला. चंद्रहास शिक्षण घेत असतां हरि या नामोच्चारापेक्षां निराळें कांहींच करीत नसे. त्यामुळें गुरूस राग येऊन त्यानें ही गोष्ट राजास सांगितली. पण राजानें हा वागेल त्याप्रमाणें यास वागूं द्यावें असें सांगितलें. चंद्रहासाचें पुढें आठवे वर्षी मौंजीबंधन झालें. मौंजीनंतर यानें वेदाध्ययन केलें. पुढें धनुर्विद्येंतहि हा प्रवीण झाला. पंधरा वर्षांचा होतांच यानें दिग्विजय करण्याची इच्छा दर्शविली. परंतु कुलिंद यास म्हणाला, तुला बलिष्ठ राजांस कसें जिंकितां येईल? जावयाचें असेल तर जा. कौंतल राजाचे वैरी मला नेहमीं त्रास देतात. कारण त्याचा मी अंकित आहें. अलीकडेच ते तुझें नांव ऐकून जरा शांत झाले आहेत. हें ऐकून हा दिग्विजयास गेला व यानें सर्व राजांस जिंकिलें. अशा प्रकारें हा विजयी होऊन अलोट संपत्ति घेऊन चंदनावतीस आल्याचें समजतांच कुलिंद यास सामोरा आला. या वेळीं चंद्रहासाची अलोट पितृभक्ति दिसून आली.

पुढें कुलिंदाच्या सांगण्यावरून कौंतल राजाकडे आपल्या सेवकांकरवीं चंद्रहासानें करभार पाठविला. सेवकांनीं कुलिंद सुखी असून त्याचा मुलगा चंद्रहास यानें दिग्विजय करून हें धन पाठविल्याचें सांगितलें. त्यामुळें त्यास विस्मय वाटला. व चंद्रहासास पाहण्यासाठीं चंदनावतीस तो आला. त्यानें कुलिंदाची भेट घेऊन पुत्र झाल्याचें वर्तमान मला कां कळविलें नाहींस असें त्यास विचारिलें. तेव्हां तद्विषयक सर्व कांहीं त्यानें निवेदन केलें. यामुळें त्यास चंद्रहासाची ओळख पटून तो मनांत चरकला. पुनः त्याच्या मनांत चंद्रहासास ठार मारण्याचे विचार आले व त्याप्रमाणें त्यानें आपला पुत्र मदन याला एक पत्र लिहून तें चंद्रहासास घेऊन जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें चंद्रहास कुंतल नगरीस जावयास निघाला. वाटेंत एका रम्य ठिकाणीं हा निजला असतां त्या ठिकाणीं राजकन्या चंपकमालिनी आपल्या सख्यांसह आली. तिच्याबरोबर धृष्टबुद्धि प्रधानाची कन्या विषया ही होती. तिनें चंद्रहासास सरोवराच्या कांठीं निजलेल्या स्थितींत पाहिलें. तिनें आपल्या पायांतील नूपुरें काढून हळुंहळूं ती याजवळ गेली. तेथें तिला एक पत्र दिसलें. तें वाचून पाहतां त्यांत चंद्रहासावर विषप्रयोग करण्याबद्दल मजकूर दिसला. यामुळें तिचें प्रेमी हृदय भग्न झालें. तिनें पत्रांतील "विषमस्मै" या ऐवजी "विषयास्मै" असें आंब्याच्या चिकानें लिहून तें पत्र बंद करून तें तेथेंच ठेविलें. अशा प्रकारें धृष्टबुद्धीच्या तडाक्यांतून हा पुढें वांचला. पुढें चंद्रहास तें पत्र घेऊन मदनाकडे गेला. तें पत्र वाचून मदनास अत्यंत हर्ष झाला. इकडे विषयेनेंहि देवीला, हाच पति लाभावा म्हणून आळविलें. तदनंतर मदनानें सुमुहूर्तावर चंद्रहास व विषया यांना विवाहबद्ध केलें.

याच वेळीं चंदनावतींत कुलिंदाला धृष्टबुद्धीनें बद्ध करून प्रजेवर जुलूम करून त्यानें प्रजेला छळिलें. अशा प्रकारें जुलमानें संपादिलेलें द्रव्य घेऊन तो कुंतलपुरास आला. तों तेथें वाद्यांचा सारखा गजर चालला होता. मदनानें चंद्रहासास विषया दिल्याचें वृत्त समजतांच तो संतप्त झाला. तो मदनावर फार रागावला. पण पुढें त्यानें त्याचें सांत्वन केलें. तरीहि चंद्रहासाच्या वधाची कल्पना त्याच्या मनांतून जाईना. त्यानें चंद्रहासास देवीच्या दर्शनासाठीं जाण्याची आज्ञा करून तेथें याला ठार मारण्यासाठीं दोन अंत्यज ठेविले. पण त्याहि वेळीं धृष्टबुद्धीच्या दुर्दैवानें चंद्रहासाऐवजीं मदनाचा वध झाला. याच्यापूर्वी कौंतल राजानें चंद्रहासास आपली कन्या चंपकमालिनी व सर्व राज्य दिलें; व तो वनास गेला. याच संधींत मदन एकटाच चंडिकेच्या देवालयांत गेला होता. चंद्रहास राजा झाल्याचें वर्तमान ऐकून धृष्टबुद्धि हा क्रोधानें बेभान झाला. चंद्रहासानें चंडिकेस न जातां कुलधर्म मोडला, म्हणून याजवर तो अत्यंत रागावला. तो लगबगीनें चंडिकेच्या देवळांत गेला; आणि पाहतो तों मदन मरून पडलेला. या वेळीं त्याला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला. वैष्णवांचा द्रोह केल्यामुळें असें झालें, असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें. अखेर पुत्रशोक अनावर होऊन त्यानें खांबावर डोकें आपटून प्राण दिला. मदन व धृष्टबुद्धि मरून पडलेले एका तापसानें पाहिले. तेव्हां तो चंद्रहासाकडे गेला. चंद्रहासास तें वृत्त ऐकून अत्यंत वाईट वाटलें; व हा तेथें गेला. यानें तेथें आपल्या मांसाचा होम

करून देवीस प्रसन्न केलें असतां देवीनें दोन वर दिले. त्या वरांमुळें मदन व धृष्टबुद्धि हे जिवंत झाले.

इकडे कुलिंद राजा जाचाला कंटाळून पत्नीसह अग्निप्रवेश करणार, इतक्यांत धृष्टबुद्धीनें त्यास चंद्रहासाचें वृत्त कथन करून तुष्ट केलें. पुढें चंद्रहास आपल्या पित्याच्या आज्ञेंत राहून राज्य करूं लागला.

युधिष्ठिराच्या अश्वमेधप्रसंगीं यानें श्यामकर्ण धरिला होता. परंतु श्रीकृष्णाच्या आज्ञेवरून अर्जुनानें याच्याशीं सख्य केलें. यामुळें चंद्रहासानें अश्वमेधास पुष्कळ साहाय्य केलें. चंद्रहासास विषयेपासून मकराक्ष व चंपकमालिनिपासून पद्माक्ष असे दोन पुत्र झाले ( जै. अ. ५०-५९ ).

चंद्रहासाची राजधानी चंदनावती ही कौंतलपुरापासून सहा योजनांवर होती ( जै. अ. ५२ ). चंदनावती हें बडोद्याचें प्राचीन नांव आहे. परंतु कुंतलपूर हें खेडा जिल्ह्यांतील सरनाळ असल्यामुळें बडोद्यास चंदनावती म्हणतां येणार नाहीं. शिवाय कनिंगहॅमनें कुंतलपूर ग्वाल्हेर प्रांतांत असल्याचें लिहिलें आहे.

**चंद्रा**—वृषपर्वा दानवाची कन्या व शर्मिष्ठेची भगिनी.

२ कृष्णाच्या वेळची एक गोपी ( पद्म. पा. ७७ ).

**चंद्रांगद**—( सो. ) माळव्यांतील कर्ण नगराचा राजा. यानें मागें लागलेल्या राक्षसीला भिऊन एका तळ्यांत उडी टाकिली. तेथील नागकन्यांनीं यास पाताळांत नेलें. पण इंदुमतीनें केलेल्या गणेशव्रतमाहात्म्यानें हा बारा वर्षांनीं राज्यांत परत आला ( गणेश. १. ५३-५५ ).

**चंद्रार्कभीकर**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**चंद्रावती**—(ऐति.) अनंगपाल राजाची कन्या. हिचा पुत्र जयचंद्र ( भवि. प्रति. ३. ६ ).

**चंद्रावली**—कृष्णाची आवडती स्त्री ( पद्म. पा. ७० ).

**चंद्रावलोक**—( सू. इ. ) हा मत्स्यमतें सहस्राश्वपुत्र. याचा पुत्र तारापीड.

**चंद्राश्व**—( सू. ) हा विष्णुमतें कुवलयाश्वपुत्र. भागवत, वायु व मत्स्य यांच्या मतें दंड.

**चंद्रिका**—सुप्रभ गंधर्वाची कन्या ( पद्म. उ. १२८ ).

**चंद्रोदय**—विराटाचा भाऊ ( म. द्रो. १५९.४१ कुं. ).

**चपहानि**—( ऐति. ) एका कान्यकुब्ज ब्राह्मणानें आर्बुद शिखरावर ब्रह्महोम केला. तेव्हां वेदमंत्रप्रभावानें जे चार क्षत्रिय निर्माण झाले, त्यांपैकीं हा एक होता. हा यजुर्वेदी असून राजपुत्राख्य देशांत ब्रह्मरचित स्वस्थान घेऊन अजमीरांत राहत होता. यानें आपल्या बंधूंसहवर्तमान ऐरावतकुलांतील हत्तीवर बसून अशोकास जिंकिलें; व चार लक्ष बौद्धांचा दिव्य शस्त्रांनीं नाश केला. अज म्हणजे ब्रह्मदेव, त्याची मा म्हणजे लक्ष्मी; ती रमा तेथें आली, म्हणून त्या नगरास अजमीर हें नांव ठेविलें व यास अज म्हणून म्हटलें आहे. यानें दहा वर्षें राज्य केलें. याचा पुत्र तोमर ( भवि. प्रति. २. ७; ४ २ ).

**चमस**—(स्वा. प्रिय.) हा ऋषभाला भागवतमतें जयंतीचे ठिकाणीं झालेला पुत्र. हा महायोगी होता. यानें विदेहाच्या यज्ञांत जाऊन त्याला ज्ञानोपदेश केला ( भा. ५. ४. ११; ११. ५. २ ).

**चंप**—( चंचु पहा ).

२ ( सो. अनु. ) मत्स्य व विष्णु यांच्या मतें पृथुलाक्षाच पुत्र. यानें मालिनी नगरास चंपा असें नांव दिलें.

**चंपक**—कुंडल नगरीच्या सुरथाचा पुत्र (पद्म. पा. ४९ ).

**चंपकमालिनी**—ही कौंतलक देशाच्या राजाची कन्या व चंद्रहासाची पत्नी. हिला पद्माक्ष नामक पुत्र होता.

२ दाशरथि रामाचा पुत्र कुश, याच्या चंपिका स्त्रीच्या नऊ मुलींपैकीं एक.

**चंपा**—राक्षस स्त्री चंद्रसेना हिचें नामांतर.

**चंपिका**—रामपुत्र कुश, याच्या दोन बायकांतील ज्येष्ठ. हिला चंपकमालिनी वगैरे नऊ कन्या झाल्या.

**चयत्सेन**—हा बृहत्कल्पांत इंद्र झाला. यानें गौतमपत्नी अहल्येशीं संबंध ठेविला होता ( स्कंद. ६. २. ५ ).

**चर**—मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**चरऊ**—म्लेच्छ राजा न्यूह याचा ज्येष्ठ पुत्र सीम, याच्या वंशांतील फलज राजाचा पुत्र. यानें एकंदर २३७ वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. २. ५ ).

**चरक**—वैशंपायनाच्या शिष्यांना ही संज्ञा आहे. यांनीं वैशंपायनाच्या ब्रह्महत्येकरितां व्रत केलें होतें. फक्त याज्ञवल्क्याच्या अनुयायांना हें नांव लावीत नसत. कारण, त्यांनीं वैशंपायनाकरितां प्रायश्चित्त केलें नाहीं. यांना तैत्तिरीय असें म्हणतात ( वैशंपायन व व्यास पहा ). श्यामायनि (उदीच्य), आसुरी ( मध्य ) व आलंबी ( प्राच्य ). हे चरकाध्वर्यु व तैत्तिरीय यांचे मुख्य होत. एक शाखाप्रवर्तक ( व्यास व पाणिनि पहा ). चरकाध्वर्यु याचा याज्ञवल्क्याशीं वपा व पृषदाज्य यांत आधीं अभिघार कोणास करावा, याविषयीं मतभेद आहे ( श. ब्रा. ३. ६. ३. २४ ).

**चरंत**—( सो. क्षत्र. ) वायुमतें आर्ष्टिषेणपुत्र.

**चरिष्णु**—होणाऱ्या सावर्णिमनूच्या पुत्रांपैकीं एक ( मनु पहा ).

**चर्मवत्**—शकुनीचा कनिष्ठ भ्राता. भारतीय युद्धांत इरावानानें याचा वध केला ( म. भी. ९० कुं. ).

**चर्मशिरस्**—एक व्युत्पत्ति सांगणारा आचार्य ( नि. ३. १५ ).

**चर्षणी**—वरुण नामक नवव्या आदित्याची स्त्री. हिला भृगु नामक पुत्र होता. ( भा. ६. १८. ४ ).

२ अर्यमा आदित्याला मातृकेच्या ठिकाणीं झालेल्या मुलांना नांव ( भा. ६. ६. ४२ ).

**चलकुंडल**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**चलि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**चलिक**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**चलुभि**—यजुर्वेदी ब्रह्मचारी.

**चाक्र**—एक आचार्य. याचा रेवोत्तरस् स्थपति पाटव चाक्र ( श. ब्रा. १२. ८. १. १७.) व रेवोत्तरस् पाटव चाक्र स्थपति ( श. ब्रा. १२. ९. ३. १ ) असा वेगवेगळा उल्लेख आहे. पण ह्यानें कौरव्य राजा बाल्हिक प्रातिपीय याच्या अडथळ्यास न जुमानितां दुष्टरीतूला परत दहा पिढ्यानंतर गादीवर बसविलें.

**चाक्रायण**—उषस्ताचें पैतृक नांव.

**चाक्षुष**—( क्षुप पहा ).

२ ( ४ चक्षु पहा ).

३ विश्वकर्म्याचा पुत्र. याला विश्वेदेव व साध्यगण पुत्र होते.

४ भौत्य मन्वंतरांतील देवगण.

५ ( अग्नि पहा ).

६ चक्षूचा पुत्र चाक्षुष ( भा. ८. ५. ७ ). पण भागवतांतच दुसऱ्या ठिकाणीं चक्षु हाच मनु होता, असें दिलें आहे. हा चक्षु सर्वतेजस् व आकूति यांचा पुत्र. यास नड्वला नामक स्त्री दिली आहे ( भा. ४. १३. १५. ).

हा अंगराजाचा पुत्र. हा पुलहास शरण गेला, तेव्हां त्यानें यास उपदेश दिला. या उपदेशावरून यानें विरजा नदीवर, पहिल्या वर्षी शुष्क पर्णे खाऊन, दुसऱ्या वर्षी उदक पिऊन व चवथ्या वर्षी वायु भक्षण करून बारा वर्षेपर्यंत वाग्भव मंत्राचा त्रिकाल जप केला. त्यामुळें यास देवी प्रसन्न झाली व तिनें यास मन्वंतराधिपतित्व दिलें; शिवाय दहा उत्तम पुत्र दिले. पुढें त्याप्रमाणें यानें मन्वंतराधिपतित्वाचा अधिकार चालविला ( दे. भा. १०. ९ ).

हा पूर्वी ब्रह्मदेवाच्या चक्षूपासून उत्पन्न झाला होता, म्हणून यास या जन्मींहि चाक्षुष असें नांव प्राप्त झालें. यास जन्मतःच पूर्वजन्माचें ज्ञान होतें. हा अनमित्र राजास भद्रेपासून झाला. व सात दिवसांच्या आंतच हा हंसला म्हणून तिनें यास विचारिलें कीं, तुला हंसूं कसलें आलें ? तेव्हां यानें, मला स्वार्थबुद्धीनें एक मांजरी व एक जातहारिणी अशा दोघी खाण्यास गुप्त रीतीनें टपून बसल्या आहेत व तूंहि त्यांच्याप्रमाणेंच, पुढें आपणांस हा सुख देईल या स्वार्थबुद्धीनेंच माझें पालनपोषण करीत आहेस असें सांगितलें. तेव्हां, आपण स्वार्थबुद्धि नाहीं हे दाखविण्याकरितां यास तेथेंच टाकून भद्रा चालती झाली. त्या वेळीं, जातहारिणीनें यास पळवून विक्रांतपत्नी हैमिनी ही प्रसूत झाली होती, तिचे शय्येवर नेऊन ठेविलें व तिचा पुत्र बोधनामक ब्राह्मणाचे येथें नेऊन ठेवून त्या ब्राह्मणाचा पुत्र तिनें खाल्ला. ही जातहारिणी रोज अशाच तऱ्हेनें मुलांची पळवापळवी करून क्रमानें येणारा तिसरा पुत्र ती खात असे. विक्रांतानें याचें नांव आनंद असें ठेविलें. पुढें व्रतबंध झाल्यावर यास गुरूचे स्वाधीन केलें, तेव्हां गुरूनें यास मातेस नमस्कार करून यावयास सांगितलें असतां यानें सर्व हकीगत सांगून, मी कोणत्या मातेस नमस्कार करूं, असें विचारिलें. व पुढें आपणच म्हणाला कीं, हैमिनीचा पुत्र हा विशालग्रामांत बोध नामक ब्राह्मणाच्या येथें आहे, त्यास घेऊन या. मी आतां वनांत तपश्चर्येस जातों ( विक्रांत पहा ). पुढें आपण वनांत जाऊन हा तप करूं लागला असतां त्या ठिकाणीं ब्रह्मदेव येऊन त्यानें याचें तपश्चर्येपासून निवारण करून तूं सहावा मनु होणार आहेस, तरी तूं आपले कर्तव्यास सिद्ध ऐस, असें सांगितलें. ब्रह्मयाच्या सांगण्याप्रमाणें हा कार्यतत्पर झाला. यानें उग्र राजाची कन्या विदर्भा हिला वरिलें. तिचे ठिकाणीं यास दहा पुत्र झाले ( मार्क. ७३ ). हा षष्ठमन्वंतराधिप मनु होय ( मनु पहा ). कूर्मावतार व समुद्रमंथन हीं याचेच कारकीर्दींत झालीं ( भा. ८. ५. ७-१० ).

**चाणक्य**—एक विद्वान् ब्राह्मण. शिशुनागवंशांतील शेवटला राजा महानंदिन्, याच्यानंतर शूद्रापुत्र नंद गादीवर आला. तो व सुमाल्यादि आठ अशा नऊ नंदांचा यानें संहार करून मौर्य चंद्रगुप्ताला गादीवर बसविलें. नंदांचें राज्य शंभर वर्षें झालें. त्यांपैकीं शेवटल्या बारा वर्षांत शेवटल्या सुमाल्यादि आठांचा यानें संहार केला ( भा. १२. १; विष्णु. ४. २२-२४; वायु. २. ३७; मत्स्य. २७२; ब्रह्मांड. ३. ७४ ). यालाच विष्णुगुप्त, कौटिल्य व कौटिलेय असें म्हणतात. याचा कौटिलीय अर्थशास्त्र हा सुप्रसिद्ध ग्रंथ आहे.

**चाणिक्य**—एक राजर्षि. याला शुक्रतीर्थावर तप करून सिद्धि मिळाली ( पद्म. सृ. १९. १४ ).

**चाणूर**—युधिष्ठिराच्या सभेमध्यें असलेला एक क्षत्रिय राजा ( म. स. ४. ३२ कुं. ).

२ कंसाच्या सभेंतील एक मल्ल. कृष्ण धनुर्यागनिमित्तानें मथुरेंत आला, तेव्हां त्यानें याला ठार मारिलें ( म. स. ५३. ३० कुं.; भा. १०. ४४ ).

**चातकि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**चातुर्मास्य**—सवितृ नामक पांचवा आदित्य व पृश्नि यांच्या अपत्यांपैकीं एक ( भा. ६. १८. १ ).

**चांद्रमसि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**चांधनायन**—आनंदजाचें पैतृक नांव.

**चामुंड**—देवकीचा पुत्र. हा कुलांगार निपजल्यामुळें देवकीनें याला कल्पक्षेत्र येथें कालिंदींत सोडिलें. परंतु हा वाहत असतांना पृथ्वीराजाच्या सामंत नामक पुरोहितानें यास धरिलें व याला घेऊन तो आपल्या श्वशुराच्या घरीं गेला. पुढें यानें चंडिकेची बारा वर्षे आराधना केल्यामुळें भक्ताची परीक्षा पाहण्याकरितां चंडिका मूर्तिमती झाली. नंतर सामंताच्या आज्ञेवरून रक्तबीज चामुंडानें बलखानीशीं युद्ध केलें. तेव्हां चामुंडाच्या अंगांतील रक्ताच्या थेंबांपासून अनेक वीर उत्पन्न होऊं लागले. परंतु बलखानीचा कनिष्ठ बंधु सुखखानि यानें आग्नेय शरानें त्यांस जाळून टाकिलें. शेवटीं बलखानीनें चामुंडास बांधून घरीं नेलें. परंतु ब्रह्महत्येस भिणाऱ्या त्या बलखानीनें याला स्त्रीवेष देऊन याचा शत्रु पृथ्वीराज याच्याकडे याला परत पाठवून दिलें. त्या गोष्टीची पृथ्वीराजाला चीड येऊन त्यानें महीपतीसहित चामुंडाला पुनः संश्रियाख्य नगरास वेढा देण्यास सांगितलें. बलखानि व चामुंड यांचें प्रचंड युद्ध होऊन चामुंडानें बलखानीचा वध केला ( भवि. प्रति. ३. ९; १५; २४-२५ ).

**चामुंडा**—( दुर्गा पहा ).

**चांपेय**—विश्वामित्राचा पुत्र ( म. अनु. ७. ५८ कुं. ).

**चायमान**—अभ्यावर्तिनचें पैतृक नांव.

**चारु**—रुक्मिणीच्या ठिकाणीं श्रीकृष्णास झालेला पुत्र २ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**चारुगुप्त**—रुक्मिणीच्या ठिकाणीं श्रीकृष्णास झालेला पुत्र.

**चारुचंद्र**—रुक्मिणीच्या ठिकाणीं श्रीकृष्णास झालेला पुत्र.

**चारुचित्र**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. भारतीय युद्धांत भीमानें याला मारिलें ( म. द्रो. १३६. २० कुं. ).

**चारुचित्रांगद**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**चारुदेष्ण**—हा विष्णु, भागवत व महाभारत यांच्या मतें रुक्मिणीचे ठायीं झालेला श्रीकृष्णपुत्र. याची भगिनी चारुमती. हा भोजाकडून मारिला गेला ( म. मौ. ४. ४५ कुं. ).

२ मद्रदेशीय राजपुत्र. याची पत्नी मंदोदरी.

**चारुदेह**—रुक्मिणीपासून झालेला श्रीकृष्णपुत्र ( भा. १०. ६१. ८ ).

**चारुनेत्रा**—एक अप्सरा ( म. स. १०. ११ कुं. ).

**चारुपद**—( सो. पूरु. ) भागवतमतें मनस्यूचा पुत्र. विष्णुमतें अभय, मत्स्यमतें पीतायुध व वायुमतें जयद हे सर्व एकच.

**चारुमती**—रुक्मिणीच्या ठिकाणीं श्रीकृष्णास झालेली कन्या व कृतवर्म्याचा पुत्र बलि याची भार्या.

**चारुमत्स्य**—विश्वामित्राचा एक पुत्र ( म. अनु. ७. ५९ कुं. ).

**चारुशीर्ष**—हा एक राजर्षि असून इंद्राचा प्रियमित्र होता. हा आलंब गोत्रज होता, म्हणून आलंबायन असें यास नांव आहे. यानें पूर्वी गोकर्णक्षेत्रीं शंकराची शंभर वर्षे उग्र तपश्चर्या केल्यामुळें यास लक्षायु असे शंभर तेजःपुंज पुत्र झाले ( म. अनु. १८ ).

**चारुहासिनी**—कौंडिन्यपुरांतील रुक्मांगदपिता भीम, त्याची स्त्री ( गणेश. १. १९. ७; भीम पहा ).

**चार्वाक**—कृतयुगामध्यें या राक्षसानें बदरिकाश्रमामध्यें अनेक वर्षे तपश्चर्या केली. तेव्हां ब्रह्मदेवानें याला, जोंपर्यंत तूं ब्राह्मणांचा अपमान करणार नाहींस तोंपर्यंत तुला मृत्यु येणार नाहीं, असा वर दिला. याप्रमाणें वरप्राप्ति होतांच हा देवांना अत्यंत त्रास देऊं लागला. तेव्हां देव ब्रह्मदेवाकडे गेले व त्यांनीं या राक्षसाचा नाश करण्याबद्दल त्यास विनंति केली. ब्रह्मदेवानें सांगितलें कीं, ह्याचा लवकरच नाश होईल. कारण, हा दुर्योधनाचा मित्र होऊन ब्राह्मणांचा अपमान करील व त्यांच्याच हातून दग्ध होईल.

त्याप्रमाणें हा राक्षस दुर्योधनाचा मित्र झाला. भारतीय युद्धानंतर विजयी धर्मराजाला ज्या वेळीं राज्याभिषेक झाला, त्या वेळीं हा ब्राह्मणरूपानें तेथें इतर ब्राह्मणांत येऊन बसला. हा पांडवांचा द्वेषी असल्यामुळें इतर ब्राह्मणांची अनुमती न घेतां धर्मराजास म्हणाला, तूं बंधुवध करून हें राज्य मिळविलें असून गुरूलाहि मारिलें आहेस. तेव्हां तूं नरकाला जाशील. सर्व ब्राह्मणांच्या वतीनें यानें हें भाषण केल्यामुळें इतर ब्राह्मणांना याचा राग आला. धर्मराजाहि उद्विग्न होऊन राज्यत्याग करण्यास तयार झाला. तेव्हां ब्राह्मणांनीं त्यास योग्य तो आशीर्वाद देऊन अंतीं सुस्थिति प्राप्त होईल, असें आश्वासन दिलें. ब्राह्मणांनीं अंतर्ज्ञानानें या राक्षसास ओळखिलें व त्यांनीं याची निर्भर्त्सना केली. शेवटीं ब्राह्मणांच्या तेजानें व हुंकारानें हा दग्ध झाला ( म. शां. ३७-३८ कुं. ). हा बृहस्पतीचा अवतार होता ( पद्म. उ. २३६ ).

एक नास्तिक तत्त्वज्ञानी. अवंती देशांत क्षिप्रा व चामला यांच्या संगमावर शंखोद्धार क्षेत्रीं याचा जन्म झाला. याच्या बापाचें नांव इंदुकांत व मातेचें नांव रुक्मिणी. पुष्करतीर्थी यज्ञगिरी पर्वतावर हा मृत्यु पावला. याचा जन्म युधिष्ठिर शक ६६१ प्रभवनाम संवत्सर वैशाख शुद्ध पौर्णिमा रविवारीं दुपारीं झाला व मृत्यु युधिष्ठिर शक ७२७ व्या वर्षी झाला (जैन ग्रंथ).

**चिकित्वत्**—तुषित देवांतील एक.

**चिकुर**—एक सर्प. आर्यकाचा पुत्र व सुमुखाचा पिता ( म. उ. १०३. २४ कुं. ).

**चिक्षुर**—महिषासुराचा सेनापति. याचें चिक्षुराक्ष असें नामांतर आहे ( महिषासुर पहा ).

**चिति**—स्वायंभुव मन्वंतरांतील अथर्वण ऋषीची भार्या. हिला दध्यच् नामक पुत्र असून तो अश्वमुखी होता ( भा. ४. १. ४२ ).

**चित्र**—एक सर्प ( म. स. ९. ८ कुं. ).

२ दुर्योधनपक्षीय क्षत्रिय राजा. भारतीय युद्धांत प्रतिविंध्यानें याला मारिलें ( म. क. ११. ३४ कुं. ).

३ पांडवपक्षीय चैद्य राजा. भारतीय युद्धांत कर्णानें याचा वध केला ( म. क. ५१. ४९ कुं. ).

४ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. भारतीय युद्धांत भीमसेनानें याला ठार केलें ( म. द्रो. १३७ ).

५ ( सो. वृष्णि. ) वृष्णि राजाचा पुत्र. यास भागवतमतें चित्ररथ व वायुमतें चित्रक म्हणतात. भागवतांतील दुसऱ्या वृष्णीचा पुत्र हा वायूंत पृश्निपुत्र दिला आहे ( पद्म. सृ. १३ ).

६ एक राजा. सोभरीच्या सूक्तांत याचा उल्लेख आहे ( ऋ. ८. १९-२२ ). ऋग्वेदांतील दानस्तुतीवरून पाहतां हा सोभरीचा आश्रयदाता आहे ( ऋ. ८. २१.१८ ).

७ हा द्रविडदेशांतील राजा त्रिवेणीसंगमावर स्नान करून मुक्त झाला ( पद्म. उ. १२९; चित्रगुप्त पहा ).

**चित्र गांग्यायनि** किंवा **गार्ग्यायणि**—अरुणि व श्वेतकेतु यांचा समकालीन ( कौ. उ. १. १ ).

**चित्र गौश्रायणि**—एक आचार्य ( सां. ब्रा. २३. ५ ).

**चित्रक**—( सो. वृष्णि. ) वृष्णिपुत्र ( ५ चित्र पहा ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

३ एक राजा. राजसूययज्ञांत पांडवांना यानें साह्य केलें.

**चित्रकुंडल**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**चित्रकेतु**—स्वायंभुव मन्वंतरांतील वसिष्ठ ऋषि व ऊर्जा यांचा पुत्र ( भा. ४. १. ४१ ).

२ शूरसेन देशाचा राजा. यास एक कोटि स्त्रिया होत्या. परंतु त्या अनपत्य होत्या. एकदां अंगिरा ऋषि याजकडे आला असतां याचे प्रार्थनेवरून त्यानें यज्ञ केला व त्यांत आदित्याला हविर्भाग दिल्यावर पट्टराणी कृतद्युती हिनें हुतशेष भक्षण केला. त्यामुळें तिला पुत्र झाला. पण तें तिच्या सवतींस सहन न होऊन त्यांनीं मुलास विष दिलें. त्यामुळें सर्व शोकाकुल झाले. इतक्यांत तेथें अंगिरा ऋषि व नारद प्रगट झाले. त्यांनीं त्या बालकास सचेतन केलें व त्याकडून अनित्याचा शोक करणें युक्त नव्हे, असा उपदेश करविला. तें ऐकून यानें शोक आवरून मुलाचें उत्तरकृत्य केलें व नारदाचा उपदेश घेऊन हा तपाकरितां यमुनातीरीं गेला. पुढें हा दुसऱ्या जन्मीं विद्याधरांचा राजा झाला. एकदां हा विमानांतून फिरत असतां पार्वतीला मांडीवर घेऊन शंकर सभेंत बसला आहे, हें पाहून हंसला. म्हणून पार्वतीनें याला राक्षस हो, असा शाप दिला. हा परम विष्णुभक्त असल्यामुळें उलट शाप देण्याची शक्ति असतांहि पार्वतीस शाप न देतां क्षमा मागून परत गेला. हाच पुढें वृत्रासुर झाला ( भा. ६.१४-१७ ).

३ दशरथपुत्र लक्ष्मण याच्या दोन पुत्रांतील दुसरा जो चंद्रकेतु, त्याचें नामांतर. हा चंद्रकांत नगरांत रहात असे ( भा. ९. ११. १२ ).

४ ( सो. नील. ) पांचाल देशाचा राजा. द्रुपदाचा पुत्र. द्रोणाचार्यानें याचा भाऊ वीरकेतु यास मारिल्यामुळें हा क्रोधाविष्ट होऊन द्रोणावर धावून गेला. परंतु द्रोणाचार्यानें याचा वध केला ( म. द्रो. १२२ ). याला सुकेतु नांवाचा पुत्र होता ( म. आ. १८६; क. ५४ ).

५ ( सो. वृष्णि. ) भागवतमतें देवभाग व कंसा यांचा ज्येष्ठ पुत्र.

६ ( सो. वृष्णि. ) श्रीकृष्ण व जांबवती यांचा पुत्र.

७ गरुडाचा पुत्र ( म. उ. १०१ ).

**चित्रगंधा**—गोकुलांतील एक गोपी. जाबाली ऋषीनें श्रीकृष्णाची उपासना केल्यामुळें गोकुळांतील प्रचंड नामक गोपाच्या घरीं त्याला चित्रगंधा नामक गोपीचा जन्म प्राप्त झाला ( पद्म. पा. ७२ ).

**चित्रगु**—सत्येला झालेला श्रीकृष्णपुत्र.

**चित्रगुप्त**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

२ पूर्वी कायस्थ जातींत मित्र नांवाचा गृहस्थ होता. त्याला दोन अपत्यें झालीं. चित्र नांवाचा पुत्र व चित्रा नांवाची कन्या. मित्राचा अंत होतांच त्याची स्त्री सती गेली. पुढें हीं मुलें प्रभासक्षेत्रीं येऊन सूर्याची आराधना करूं लागलीं. याचें ज्ञान पाहून यमधर्मानें चित्राला आपल्या कचेरींत लेखक या नात्यानें नेमिलें. हाच चित्रगुप्त या नांवानें प्रसिद्ध झाला ( स्कंद ७. १. १३९ ). यानें धर्माचें रहस्य यमाला सांगितलें ( म. अनु. १९३. १३ कुं. ). चित्रलेखेनें चित्रगुप्ताचें ऐश्वर्य निर्माण केलें, तें पाहून वैवस्वत मन्वंतरांत विचित्र वस्तु निर्माण करणारा विश्वकर्मा स्पर्धायुक्त झाला ( भवि. प्रति. ४. १८ ).

**चित्रचाप**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. याला भीमानें ठार केलें.

**चित्रज्योति**—पहिल्या मरुद्गणांपैकीं एक.

**चित्रदर्शन**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**चित्रधर्मन्**—क्षत्रिय राजा. हा भारतीय युद्धांत दुर्योधनाच्या पक्षाला होता.

**चित्रध्वज**—चंद्रप्रभ नामक राजाचा पुत्र. यानें कृष्णाला प्रिय असलेल्या सुंदरीची उपासना केली, त्यामुळें याला एका सुंदर अशा गोपकन्येचा जन्म मिळाला ( पद्म. पा. ७२ ).

**चित्रबर्ह**—गरुडपुत्र.

**चित्रबाण**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**चित्रबाहु**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

२ श्रीकृष्णाचा एक पुत्र. हा महारथि होता ( भा. १०. ९०. ३४ ).

**चित्रभानु**—( सो. वृष्णि. ) श्रीकृष्णाचा नातू. हा महारथि होता ( भा. १०. ९०. ३३ ).

**चित्रभानुकंज**—( सो. ) भविष्यमतें मैत्रेष्टित्रर्चनाचा पुत्र. यानें ३४०० वर्षे राज्य केलें.

**चित्रमहस् वासिष्ठ**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १२२ ).

**चित्रमुख**—हा प्रथम वैश्य असून मागाहून ब्राह्मण होऊन ब्रह्मर्षि झाला. यानें आपली कन्या वसिष्ठपुत्राला दिली होती ( म. अनु. ५३. १७ कुं. ).

**चित्ररथ**—हा तुर्वशांचा शत्रु आहे. अर्ण व चित्ररथ यांचा सुदासाकरितां इंद्रानें सरयूच्या काठीं वध केला ( ऋ. ४.३०. १८ ).

२ हें एका राजाचें नांव आहे. याच्या करितां कापेयांनीं द्विरात्र यज्ञ केला. त्यामुळें याच्या कुलास क्षत्रपतित्व येऊन बाकी आश्रित बनले. यावरून या कुलाचें श्रेष्ठत्व कळतें ( पं. ब्रा. २०.१२.५ ). याच्या कुलांत वडील राजपुत्र गादीवर बसे व त्याचे भाऊ त्याचे अनुचर होत, अशी चाल असल्याचें वर्णिलें आहे ( शौनक पहा ).

३ मुनि व कश्यप यांच्या देवगंधर्वपुत्रांपैकीं एक ( अंगारपर्ण पहा ). युधिष्ठिरानें यज्ञ केला त्या वेळीं यानें त्यास १०० अश्व दिले ( म. स. ७८. १०२ कुं. ). यानेंच त्यास चतुर्विध आश्रमांपैकीं एकाद्या आश्रमांतील मनुष्य व चातुर्वर्ण्यांपैकीं एकाद्या वर्णांतील मनुष्य कोणत्या लक्षणांवरून ओळखावा तीं लक्षणें सांगितलीं ( म. आ. १८६ कुं. ). त्याचप्रमाणें त्यास तपत्यासंवर्णाख्यान सांगून पांडव तापत्य कसे हें सांगितलें ( म. आ. १८७-१८८ कुं ).

४ ( स्वा. प्रिय. ) गयराजाला गयंती भार्येपासून झालेल्या पुत्रांतील ज्येष्ठ. यास ऊर्णा नांवाच्या स्त्रीपासून सम्राट नांवाचा पुत्र झाला ( भा. ५. १५. १४ ).

५ वीरबाहूचा पुत्र. कुशाच्या हेमा कन्येचें स्वयंवर झालें, त्या वेळीं यानें इतरांवर मोहनास्त्र टाकून हेमेस पळविलें. पण असें मुलीला चोरून नेणें बरें नव्हे, म्हणून यानें मोहनास्त्र काढून घेतलें व आपण गांवाबाहेर उभा राहिला. नंतर युद्ध झालें. त्यांत यानें सर्वांचा पराभव केला. पण लव मात्र यास ऐकेना. तेव्हां जवळच युद्ध अवलोकन करीत असलेला वीरबाहू पुढें सरसावला व त्यानें लवास मूर्छित केलें. पण कुशानें वीरबाहूस बांधून आणिलें. रामानें हा आपला स्नेही आहे असें सांगून व त्यास सोडून नंतर लवाची मूर्च्छा वगैरे उतरविल्यावर हेमेचें चित्ररथाशीं लग्न लावून रामानें वीरबाहूस सन्मानानें बोळविलें ( आ. रा. राज्य. २.३ ).

६ ( सू. निमि. ) सुपार्श्व जनकाचा पुत्र. यास विष्णुमतें संजय म्हटलें आहे. यास क्षेमधी नांवाचा पुत्र होता.

७ ( सो. अनु. ) रोमपाद राजाचें नामांतर. दशरथ याचा मित्र होता; हा निपुत्रिक होता, म्हणून दशरथानें आपली मुलगी शांता रोमपादास दत्तक दिली. ती यानें ऋश्यशृंग ऋषीस दिली; आणि त्यास आपल्या नगरींत मोठ्या युक्तीनें आणून पुत्रकामेष्टि केली व दशरथाकडूनहि करविली. त्यामुळें दोघांसहि पुत्र झाले. यास चतुरंग नांवाचा एक पुत्र झाला ( भा. ९. २३. ७-२० ).

८ दशरथाचा सारथि.

९ ( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें रुशेकूचा व मत्स्यमतें सौम्याचा पुत्र ( रुशेकु पहा ).

१० वृष्णिपुत्र ( ५ चित्र पहा ).

११ मार्तिकावतकदेशीय राजा. हा जमदग्नीच्या वेळीं होता. कारण यासच क्रीडा करीत असलेला पाहून रेणुकेस नदीवरून घरीं येण्यास उशीर झाला ( जमदग्नि पहा; म. व. ११७ कुं. ).

१२ भारतीय युद्धांतील पांडवांकडील शैब्य राजा ( म. द्रो. २३ ६२ कुं. ).

१३ ( सो. नील. ) द्रुपदपुत्र. यास द्रोणाचार्यानें मारिलें. यास वीरकेतु, चित्रवर्मा व सुधन्वा असे तीन बंधु होते ( म. द्रो. १२२ ).

१४ अंग देशाचा राजा. याची स्त्री प्रभावती ही देवशर्मा ऋषीच्या रुचि नांवाच्या स्त्रीची बहीण. रुचि प्रभावतीच्या येथें आदान समारंभास येत असतां तिनें अप्सरांनीं खालीं टाकिलेल्या फुलांपैकीं कांहीं आपल्या डोक्यांत खोविलीं. तीं फुलें पाहून प्रभावतीनें, मलाहि असलीं फुलें दे, असें म्हटलें. तेव्हां रुचीनें आपल्या भर्त्यास ती हकीगत सांगितली. तेव्हां तिच्या पतीनें तीं आपला शिष्य विपुल याकडून आणविलीं ( म. अनु. ४२ ).

१५ ( सो. ) भविष्यमतें स्वाहार्चनाचा पुत्र.

१६ ( सा. कुरु. भविष्य. ) भविष्यमतें निश्चकाचा पुत्र. यानें १००० वर्षे राज्य केलें. हाच मत्स्यमतें भूरिपुत्र, भागवतमतें उक्तपुत्र, वायु व विष्णु यांच्या मतें उष्णपुत्र.

**चित्ररूप**—रुद्रगणांपैकीं एक.

**चित्ररेखा**—कृष्णाला प्रिय असलेली एक गोपी ( पद्म. पा. ७७ ).

२ ही बाणासुराच्या कुंभांड नामक प्रधानाची कन्या असून उषेची सखी होती. चित्रकलेमध्यें ही कुशल होती. हिनें कृष्णाचा नातू अनिरुद्ध यास योगसामर्थ्यानें आणिलें. हिला चित्रलेखा असेंहि नांव आहे ( भा. १०.६२.१४ ).

**चित्ररेफ**—( स्वा. प्रिय. ) मेधातिथीच्या सप्तपुत्रांपैकीं एक. याचा खंड याच्याच नांवानें प्रसिद्ध आहे ( भा. ५.२.२५ )

**चित्रलेखा**—एक अप्सरा. पुरूरव्यानें केशी दैत्याला मारून हिची सुटका केली.

२ वाल्मीक राजाची कन्या. हिनं आह्लादपुत्र इंदुल यास मायेनें पोपट केलें. इंदुल नाहींसा झाल्याचें वर्तमान दुर्योधनांश महीपतीनें आह्लादास सांगितलें. तेव्हां त्यानें कृष्णांशास वेतानें मारून त्याचा वध करण्याची आज्ञा केली. देवसिंहानें त्याची सुटका केली. तेव्हां कृष्णांश योगीरूपानें जाऊन त्यानें जयंत ( इंदुल ) याची सुटका केली. इकडे महीपतीचें दुष्ट कारस्थान उघडकीस येऊन एक घनघोर युद्ध झालें. अखेर जयंत व चित्रलेखा यांचें लग्न झालें ( भवि. प्रति. ३.२३).

३ ( चित्रगुप्त पहा ).

४ ही पूर्वजन्मांत शतशृंगाची मुलगी होती. जन्मत: हिला बकरीचें मुख होतें. कारण त्या पूर्वीच्या जन्मांत ही बकरी असतांना फक्त धड तेवढें महीसागर संगमांत पडलें. त्यामुळें धड राजकुलांत जन्मास आलें. शिर बाजूला पडल्यामुळें तें त्याच जन्माला आलें. हिनें पुढें स्तंभतीर्थावर व्रतें, उद्यापनें केलीं व शिर शोधून काढून त्याचें भस्म करून संगमांत टाकलें. पुढें स्कंदानें बांधलेलें शिवमंदिर जीर्ण झालें होतें, तें हिनें सोन्याचें बांधून त्याचा जीर्णोद्धार केला. तेव्हां शंकरानें हिच्या कुमारी या नांवावरून मी येथें 'कुमारीश' म्हणून प्रसिद्ध होईन असें सांगितलें व हिला 'महाकाल' नांवाच्या सिद्धाला पति करण्यास सांगितलें. नंतर ही त्याच्याशीं विवाह करून रुद्रलोकीं गेली. तेथें पार्वतीनें हिला चित्रलेखा नांवाची सखी केली ( स्कंद. १. २. ३९ ).

**चित्रवती**—वसूची पत्नी.

**चित्रवर्मन्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. याला भीमानें मारिलें ( म. द्रो. १३६. २१ कुं. ).

२ ( सो. नील. ) द्रुपदपुत्र पांचाल. भारतीय युद्धांत हा द्रोणाकडून मारिला गेला (म. द्रो. १२२. ४३ कुं.). याचा बंधु वीरकेतु.

३ पांचाल सुचित्र याचा पुत्र. भारतीय युद्धांत द्रोणानें याला मारिलें ( म. क. ३.२७ कुं. ).

४ न्यूह यवनाच्या वंशांतील राजा रणवर्मा याचा पुत्र. यानें चित्रनगरी वसवून एकंदर ५० वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. ४. ३ ).

५ ( सीमंतिनी पहा ).

**चित्रवाहन**—मणलूर नगरीचा पांड्य राजा. याचा मूळ पुरुष प्रभंजन. याला मलयध्वज व प्रवीर अशीं अन्य नांवें आहेत. अर्जुन तीर्थयात्रेस निघाला, तेव्हां यानें आपली कन्या चित्रांगदा अर्जुनाच्या इच्छेवरून विवाहविधीनें त्यास दिली. पुढें अर्जुनापासून तिला बभ्रुवाहन नामक जो पुत्र झाला, तो घेऊन त्याच्याच हातीं यानें राज्यसूत्रें दिलीं ( म. आ. २३५. १७ कुं.; स. ३३. २९ कुं. ). भारतीय युद्धांत अश्वत्थाम्यानें याला मारिलें ( म. क. ५६ कुं. ).

**चित्रवेगिक**—एक सर्प ( म. आ. ५७. १८ कुं. ).

**चित्रशिखंडिन्**—मरीचि, अंगिरा, अत्रि, पुलस्त्य, पुलह, क्रतु व वसिष्ठ या सप्तर्षींच्या समुदायाला ही संज्ञा आहे ( भवि. ब्राह्म. २२; म. शां. ३४३. ३० कुं. ).

**चित्रसेन**—( सू. दिष्ट. ) हा भागवतमतें नरिष्यंतपुत्र. याचा पुत्र दक्ष.

२ देवसावर्णि मनूचा पुत्र.

३ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. भारतीय युद्धांत भीमानें याला मारिलें ( म. क. २. २४ कुं. ).

४ अभिसारपुरीचा क्षत्रिय राजा. याचा अर्जुनानें पराजय केला होता ( म. स. २८. १९ कुं. ). हा दुर्योधनपक्षीय असून भारतीय युद्धांत श्रुतकर्म्याकडून मारिला गेला ( म. क. ११. १५ कुं. ).

५ पांडवपक्षीय राजा. भारतीय युद्धांत समुद्रसेनानें याला मारिलें ( म. क. ३. १५ कुं. ).

६ कर्णपुत्र. भारतीय युद्धांत हा नकुलाकडून मारिला गेला ( म. श. ९. १९ कुं. ).

७ द्रुपदाचा पुत्र. भारतीय युद्धांत कर्णानें याला मारिलें ( म. क. ४३. १५ कुं. ).

८ जरासंधाचा सेनापति ( म. स. २२. ४२ कुं. ).

९ एक गंधर्व ( म. स. ४. १० कुं. ). विश्वावसु नामक गंधर्वाचा पुत्र. याची देवर्षींमध्यें गणना करितात. यानें देवलोकांत अर्जुनाला गांधर्वविद्या शिकविली (म.व. ४३.३८ कुं.). यानें इंद्राच्या सांगण्यावरून उर्वशीला अर्जुनाकडे पाठविलें होतें (म.व. ४४ कुं.). हा इंद्राच्या सांगण्यावरून वनामध्यें घोषयात्रेकरितां आलेल्या दुर्योधनाचा अपमान करण्याकरितां तेथें गेला होता (म.व. २४१.२१ कुं.). याच्याबरोबर कर्णाचें युद्ध झालें. शेवटीं कर्णाचा पराभव होऊन तो पळून गेला. परंतु दुर्योधनाला

मात्र बांधून यानें त्याला इंद्रलोकाला नेलें (म. व. २४३ कुं.). शेवटीं अर्जुनानें याचा पराजय केला (म. व. २४५-२४७ कुं.).

१० एक राजा. यानें अनेक पापें केलीं होतीं. एकदां हा एका वाघामागें लागून अरण्यांत गेला असतां यास कित्येक अंत्यजांच्या स्त्रिया जन्माष्टमीचें व्रत करतांना दिसल्या. राजास भूक लागल्यामुळें नैवेद्यास्तव आणिलेलें थोडेंसें अन्न यानें त्या स्त्रियांजवळ मागितलें. पण त्यांनीं यास तें व्रत सांगून अन्न दिलें नाहीं. त्यायोगें राजाची पापबुद्धि मावळून यानें तें व्रत केल्यावर हा उद्धरला (पद्म. ब्र. १३).

**चित्रसेना**—एक अप्सरा. कश्यपास प्राधेपासून झालेली कन्या.

**चित्रा**—(सो. वसु.) ही वायुमतें मदिरेच्या ठिकाणीं झालेली वसुदेवपुत्री होय.

२ सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक.

३ चित्रगुप्ताची स्त्री. वैवस्वत मन्वंतरांत विचित्र वस्तु निर्माण करणारा विश्वकर्मा चित्रलेखेनें चित्रगुप्ताची निर्माण केलेली संपत्ति पाहून स्पर्धायुक्त झाला. चित्रगुप्तानें महामाया प्रसन्न केली. तेव्हां त्याच्या चित्रानामक पत्नीच्या ठायीं ती अंशरूप झाली. तिचें नांव संज्ञा (भवि. प्रति. ४.१८).

४ वाराणशींतील सुवीर नामक वाण्याची स्त्री. ही फार दुराचारी असल्यामुळें सुवीरानें हिला हांकलून लावून स्वतः दुसरा विवाह केला. पुढें ही दुष्ट पुरुषांचे नादीं लागून हिनें कुंटिणीचा धंदा सुरू केला. ही मरण पावल्यावर हिला पुढील जन्म दिव्यादेवीचा प्राप्त झाला. हा राजकन्येचा जन्म प्राप्त होण्याचें कारण, हिनें एका संन्याशाची सेवा करून त्यास आदरानें भोजन दिलें होतें (दिव्यादेवी पहा; पद्म. भू. ८६).

५ एक अप्सरा (म. अनु. ५०.४७ कुं.).

**चित्राकुमारी**—(सो. वसु.) ही वायुमतें पौरवीला झालेली वसुदेवपुत्री.

**चित्राक्ष**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. भारतीय युद्धांत भीमानें याला मारिलें (म. द्रो. १३६.२० कुं.).

**चित्रांग**—(सो. कुरु.) धृतराष्ट्रपुत्र.

२ एक योद्धा. रामानें अश्वमेध यज्ञ केला, तेव्हां अश्वाच्या रक्षणाकरितां त्यानें ससैन्य शत्रुघ्नाला पाठविलें असतां चित्रांगानें त्याच्या सैन्यावर बाणवृष्टि केली. पुष्कल व चित्रांग यांचें अनिवार युद्ध होऊन पुष्कलानें चित्रांगाचा वध केला (पद्म. पा. २७).

**चित्रांगद**—एक गंधर्व. यानें शंतनुपुत्र चित्रांगदाचा मायेनें वध केला (म. आ. १०८. १४ कुं.).

२ सीमंतिनी नांवाच्या राजकन्येचा पिता (शिव. उमा. २).

३ (सो. कुरु.) शंतनूला सत्यवतीपासून झालेला मुलगा. शंतनु मेल्यावर हा गादीवर बसला. पण पुढें चित्रांगद गंधर्वानें हिरण्वती नदीचे तीरीं तीन वर्षे याच्याशीं युद्ध करून शेवटीं याला ठार केलें (म. आ. १०८ कुं.). याला संतति नव्हती. याचे मागून विचित्रवीर्य गादीवर बसला.

४ कलिंगदेशीय राजपूर नगरीचा राजा (म. आ. १८६). याच्या कन्येस दुर्योधनानें पळवून नेलें होतें (म. शां. ४. २ कुं.).

५ द्रौपदीस्वयंवरास गेलेल्या राजांतील एक. हा दशार्ण देशाचा राजा असून याचा अर्जुनानें पराजय केला होता (म. आश्व. ८६. ६. कुं.).

**चित्रांगदा**—चित्रवाहन राजाची कन्या व अर्जुनाची भार्या. हिचा पुत्र बभ्रुवाहन (चित्रवाहन पहा). हिनें पांडवांच्या राजसूययज्ञाकरितां खंडणी दिली होती (म. स. ३३. २५ कुं.). ही बभ्रुवाहनासहित यागाकरितां हस्तिनापुराला गेली होती (म. आश्व. ७९. ८१ कुं.). पांडवांच्या महाप्रस्थानसमयीं ही आपल्या पित्याच्या घरीं परत आली.

२ (कापोत पहा).

**चित्रायुध**—पांचाल राजा. द्रौपदीस्वयंवराकरितां जमलेल्या राजांमध्यें हा होता (म. आ. २०१. १० कुं.). भारतीय युद्धांत कर्णानें याला मारिलें (म. क. ५१. ४९ कुं.). हा महारथी होता (म. उ. १७१. १७ कुं.).

२ (सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. भारतीय युद्धांत हा भीमाकडून मारिला गेला (म. द्रो. १३६. २०१ कुं.).

**चित्राश्व**—शाल्व देशाधिपति द्युमत्सेनपुत्र व सावित्रीचा पति सत्यवान्, याचें नामांतर. लहानपणीं याला अश्व प्रिय असल्यामुळें हा अश्वांचीं मृत्तिकेचीं चित्रें तयार करी व काढीत असे. यामुळें याला हें नांव मिळालें (म. व. २९५. १३ कुं.).

२ एक राजर्षि (म. अनु. १६५).

**चित्रिणी**—कामसेन राजाची कन्या. मायावतींतील काव्यविद्यातत्पर व कामिनीप्रिय असा मित्रशर्मा नामक ब्राह्मण हिच्याकडे आला असतां, दोघांचें एकमेकांवर प्रेम जडलें व मित्रशर्मा आपणांला पति असावा, म्हणून हिनें भास्कराची एकनिष्ठेनें सेवा केली. तेव्हां भास्कर प्रसन्न झाला व हिच्या आईबापांच्या स्वप्नांत येऊन भास्करानें त्यांना बोध केला. त्याप्रमाणें कामसेनानें मित्रशर्म्याबरोबर हिचा विवाह केला (भवि. प्रति. ४. ७).

**चित्रोपचित्र**—(सो. कुरु.) धृतराष्ट्रपुत्र. भारतीय युद्धांत भीमानें याला मारिलें (म. द्रो. १३६. २० कुं.).

**चिदि**—( सो. क्रोष्टु. ) हा मत्स्य व वायु यांच्या मतें कौशिक राजाचा पुत्र. विष्णु व पद्म यांत याला चेदि म्हटलें आहे व भागवतांत उशिकाचा पुत्र म्हटलें आहे. याच्या देशास याचेंच चेदि असें नांव होतें व याच्या वंशजांस चैद्य किंवा चेदि असें म्हणत ( भा. ९. २४. २. ).

**चिद्रूप**—कोल्हार गांवचा एक वैश्य ( गणेश. १. ७-८ ).

**चिबिलक**—( आंध्र. भविष्य. ) लंबोदर राजाचा पुत्र. विष्णुमतें दिविलक व मत्स्यमतें अपीतक. याचा पुत्र मेघस्वाति.

**चिरकारिन्** किंवा **चिरकारिक**—मेधातिथि गौतम याच्या दोन पुत्रांतील कनिष्ठ. गौतम ऋषीला आपल्या स्त्रीचा व्यभिचाराबद्दल संशय येऊन त्यानें याला मातृवध करण्यास सांगितलें. परंतु चिरकारी आपल्या नांवाप्रमाणें दीर्घसूत्री असल्यामुळें हा विचार करीत बसला. पुढें ऋषीस स्त्रीला मारावयास सांगितल्याबद्दल पश्चात्ताप होऊन तो स्त्रीकडे आला. हा शस्त्र घेऊन मातृवधाला तयार होता. परंतु पित्यास पाहतांच शस्त्र टाकून यानें त्यास नमन केलें. तात्पर्य, हा विचारी असल्यामुळें याच्या हातून हत्या घडली नाहीं ( म. शां. २६६; स्कंद. १. २. ६. ).

**चिरांतक**—गरुडपुत्र ( म. उ. १०१. १३ कुं. ).

**चीरवासस्**—एक यक्ष ( म. स. १०. १९ कुं. ).

२ दुर्योधनपक्षीय क्षत्रिय राजा (म. आ. ६८. ६१ कुं.).

**चुमुरि**—इंद्रानें दभीतीकरितां धुनि व चुमुरि यांचा वध केला ( ऋ. १. ११२. २३ ).

**चूडामणि**—चूडापूरचा राजा. याला विशालाक्षी नामक पत्नी असून तिनें पुत्राकरितां शिवाची आराधना केल्यामुळें रुद्राच्या प्रसादानें चूडामणीला हरिस्वामी नामक सुंदर व बलवान् पुत्र झाला ( भवि. प्रति. २. १२ ).

**चूडाला**—शिखिध्वज राजाची भार्या. ही स्वतः आत्मनिष्ठ होती. हिनें राज्य सोडून अरण्यांत गेलेल्या आपल्या पतीला आत्मज्ञानाचा मार्ग दाखवून परत राज्य करावयास लाविलें ( यो. वा. ७७-१११ ).

**चूर्णनाभ**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**चूल भागवित्ति**—मधुक पैंग्याचा शिष्य ( बृ. उ. ६. ३. ९ ). चूड असाहि माध्यंदिनप्रतींत पाठभेद आहे.

**चूलि**—एक ऋषि. हा तप करीत असतां सोमदा नामक गंधर्वी याची सेवा करीत होती. याची तपश्चर्या संपूर्ण झाल्यावर गंधर्वीनें पुत्राची इच्छा दर्शविली. त्यावरून यानें एक मानसपुत्र निर्माण करून तिला दिला. त्याचें नांव ब्रह्मदत्त ( वा. रा. बा. ३३ ).

**चेकितान**—वृष्णिवंशीय क्षत्रिय राजा. हा पांडवांच्या पक्षाचा होता ( म. स. ७९. ९; उ. २५. २; ५७. २; १९६. २३; भी. १९. १४ कुं. ). हा भारतीय युद्धांत दुर्योधनाकडून मारला गेला ( म. श. ११. ३१ कुं. ).

२ पांडवपक्षीय यादव राजा. हा द्रौपदीस्वयंवरास गेला होता. हा भारतीय युद्धांत असून याच्या रथाचे अश्व पिंगट रंगाचे होते ( म. द्रो. २३ ). सुशर्म्याबरोबर याचें बराच काळ युद्ध झालें. पुढें द्रोणानें याला मारिलें (म. द्रो. १२५ ). याचा पार्ष्णि नामक सारथि होता.

३ एक ब्राह्मण. हा शेतकी करीत असे. एके दिवशीं हा शेतकाम करून घामाघूम होऊन घरीं आला व यानें आपल्या अंगाचा घाम देखील न पुसतां घाईघाईनें शंकराचें पूजन करून त्याला नैवेद्य दाखविला. पुढें हा मेल्यावर शिवलोकीं गेला असतां वीरभद्रानें, तूं घाम न पुसतां शिवपूजन केलेंस, म्हणून तुझ्या अंगांतून नेहमीं घामाच्या धारा वाहत राहून तुला स्वेदगण असें नांव मिळेल, असा याला शाप दिला ( पद्म. पा. ११७ ).

**चेदि**—( चिदि पहा ).

**चेदिप**—( सो. ऋक्ष. ) उपरिचर वसूचा पुत्र व चेदि देशचा राजा ( भा. ९. २२. ६ ).

**चेनातकि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**चेलक शांडिल्यायन**—हा एका विशेष उपासनेच्या प्रकाराचा ज्ञाता होता ( श. ब्रा. १०. ४. ५. ३ ).

**चैकितानेय**—वसिष्ठ चैकितानेय या नांवाचा एक साम विद्येचा आचार्य आहे ( जै. उ. ब्रा. १. ३७. ७; ४२. १; २.५२ ). सामासंबंधीं लिहितांना वसिष्ठ चैकितानेयाचा नामनिर्देश केलेला आढळतो ( बृ. उ. १. ३. २४ ). षड्विंश ब्राह्मण (४१.) व वंशब्राह्मण यांतहि याचा उल्लेख आहे ( वं. ब्रा. २ ). याचें नांव सर्वत्र चैकितानेय असें आढळतें. शंकराचार्यानें चैकितानाचा मुलगा चैकितानेय असा अर्थ केला आहे. पण वंशब्राह्मणावरील भाष्यांत चैकितानेय असेंच विशेषनाम मानलें आहे. हा वासिष्ठ आरैहण्याचा शिष्य आहे. हें ब्रह्मदत्ताचें पैतृक नांव आहे.

**चैकितायन**—दाल्भ्याचें पैतृक नांव.

**चैतन्य**—(ऐति.) याचा भविष्यपुराणांत एक महावैष्णव म्हणून निर्देश आहे.

**चैत्य**—मरुद्गणांतील पहिल्या गणापैकीं एक.

**चैत्र**—यज्ञसेनाचें पैतृक नांव.

२ स्वारोचिष मन्वंतरांतील मनूचा पुत्र.

**चैत्ररथ**—(सो. कुरु.) कुरु राजाचा पुत्र ( म. आ. १०१. ३८ कुं. ).

२ चित्ररथ राजाचा पुत्र. हा पांडवपक्षीय असून भारतीय युद्धांत होता.

**चैत्रसेनि**—चित्रसेन पांचालाचा पुत्र. हा पांडवपक्षीय असून भारतीय युद्धांत त्यांच्याकडे होता.

**चैत्रा**—ज्यामघ राजाची भार्या व शिबि राजाची कन्या. हिला शैब्या असें नामांतर आहे.

**चैत्रायण**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**चैत्रियायण**—हा यज्ञसेनाचा वंशज आहे. यानें छंदोभिद् नामक इष्टकांच्या चितीनें पशूंची प्राप्ति करून घेतली (तै. सं. ५.३.८.१).

**चैद्य**—(सो. अज.) हा मत्स्यमतें मैत्रेयपुत्र होय. शिशुपालास चैद्य म्हणत असत (कशु व चिदि पहा).

**चैद्योपरिचर वसु**—(सो. ऋक्ष.) (उपरिचर वसु पहा).

**चैल**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें शृंगीपुत्राचा शिष्य.

**चोल**—द्रमिड देशाचा क्षत्रिय राजा (म. स. ३३.२० कुं.).

२ कांतीपुरांत चोल नामक राजा होऊन गेला. यानें अनंतशयनास श्रीरंगाची मोठ्या थाटानें पूजा केली. नंतर विष्णुदास नामक ब्राह्मणानें तुलसीपत्रानें त्याची भक्तीनें पूजा केली. ती पाहून यास फार राग आला व यानें जो अधिक श्रेष्ठ विष्णुभक्त तो आधीं वैकुंठास जाईल, असें परस्परांत ठरविलें. नंतर यानें दक्षिणा, दानें, यज्ञयाग हीं सुरू केलीं व विष्णुदासानें माघ व कार्तिक व्रतें, तुलसीवनाचें पोषण, एकादशी व द्वादशाक्षर मंत्र, तसेंच विष्णुस्मरण, पूजन, नृत्य, गायन, जागरण असा क्रम सुरू केला. सरतेशेवटीं या भक्तिप्रभावानें विष्णुदास प्रथम वैकुंठास गेला. तेव्हां याला उपरति होऊन भक्तीशिवाय सर्व तुच्छ समजून यानें यज्ञांत उडी घातली. पण यास विष्णूनें झेललें व तो यास स्वर्गास घेऊन गेला. चोल व विष्णुदास यांना सुशील व पुण्यशील हीं नांवें प्राप्त होऊन हे देवाचे द्वारपाल झाले. यानें राज्य सोडल्यावर आपल्या भाचास गादीवर बसविलें (पद्म. उ. १०८-१०९; स्कंद २. ४. २६-२७).

**चौक्षि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**चौलि**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**च्यवतान**—च्यवतान, ध्वन्य, मारुताश्व आणि पुरुकुत्स हे संवरणाचे आश्रयदाते होते (ऋ. ५. ३३. ९).

**च्यवन**—ऋग्वेदांत याला च्यवान असें म्हटलें आहे. याला सर्वानुक्रमणीनें भार्गव म्हटलें आहे (ऋ. १०. १९). व हा भृगूचा पुत्रहि आहे. हा अश्वींचा उपासक होता, म्हणून याला अश्वींनीं म्हातारपणीं तारुण्य दिलें व सुंदर स्त्री दिली (ऋ. १. ११२. ६; १०; ११७. १३; ५. ७४. ५). गांवाच्या बाहेर बसलेल्या जख्खड व भेसुर दिसणाऱ्या याला पोरांनीं धोंडे मारिले, वगैरे गोष्ट पुराणाप्रमाणेंच ब्राह्मणांतहि आढळते. येथें याला दाधीच म्हटलें आहे (श. ब्रा. ४. १. ५; पं. ब्रा. १४. ६. १०). हा सामांचा द्रष्टा आहे (पं. ब्रा. १३. ५. १२; १९. ३. ६).

भृगु ऋषींची भार्या पुलोमा, तिच्या उदरीं भृगुवीर्यापासून गर्भसंभव झाला. नंतर भृगुऋषि जलाशयावर स्नानास गेला असतां त्याच्या आश्रमांत पुलोम नांवाचा एक राक्षस आला. त्यानें भृगुस्त्रीचें रूप पाहून तिला पळविलें. त्या राक्षसाला दमन असें म्हटलें आहे (पद्म. पा. १४.) ती त्याच्या भीतीमुळें वाटेंतच प्रसवली म्हणून त्या बालकास च्यवन असें नांव प्राप्त झालें. नंतर त्या च्यवनाच्या दिव्य तेजानें तो राक्षस जळून भस्म झाला व पुलोमा याला घेऊन आश्रमीं परत आली (म. आ. ४-६; ६७; पद्म. पा. १४). हा वेदवेदांगांत अतिशय निष्णात होता व यानें अतिशय मोठी तपश्चर्या केली. तपश्चर्या करीत असतां याचे अंगावर एक वारूळ वाढलें, तरी याला त्याचा पत्ताच नव्हता. त्याच रानांत राजा शर्याति हा आपल्या परिवारासह क्रीडा करण्याकरितां आला असतां त्याची रूपवती मुलगी सुकन्या ही आपल्या सख्यांसह फिरत फिरत त्या वारुळापाशीं आली, तोंच तिला आंत कांहींतरी चकाकत आहेसें दिसलें. तेव्हां तिनें तें काय आहे हें पाहण्याकरितां आंतील त्या चकाकीत पदार्थास कांट्यांनीं टोंचलें. त्यामुळें या ऋषीचे डोळे फुटले. तेव्हां यानें अतिशय संतप्त होऊन सर्व सेनेसह राजाचा मलमूत्रावरोध केल्यामुळें तो राजा हात जोडून च्यवनास शरण आला. च्यवनानें ‘ तुझी मुलगी मला दे ’ असें सांगितलें. राजा ह्या गोष्टीस कबूल झाला व सुकन्येचें वृद्ध च्यवनाबरोबर लग्न झालें (म. आ. ८; भा. ९.३; पद्म. पा. १५; दे. भा. ७. ३-७). नंतर ती त्याच रानांत आपल्या भर्त्यासमवेत राहत असतां एके दिवशीं अश्विनीकुमारांनीं तिला पाहिलें व आमच्या बरोबर चल, असें ते म्हणाले. पण तिनें आपल्या पातिव्रत्यानें त्यांस दिपवून आपल्या नवऱ्यास ‘ तारुण्य द्या ’ असें ती त्यांना म्हणाली. नंतर च्यवन हा अश्विनीकुमारांच्या प्रसादाच्या योगानें तरुण झाला (श. ब्रा. ४. १. ५.१; दे. भा. ७. ३-७; भा. ९. ३; म. व. १२२; अनु. २६१; पद्म. पा. १५; ). या उपकाराची फेड करण्याकरितां हा आपल्या श्वशुरगृहीं गेला व यानें त्याजकडून एक मोठा यज्ञ करवून त्या यज्ञांत अश्विनीकुमारांस हविर्भाग देऊं लागला. पण ही गोष्ट इंद्राला पसंत न पडून त्यानें च्यवनास मारण्याकरितां वज्र उगारतांच च्यवनानें त्याच्या नाशार्थ मद नामक राक्षस उत्पन्न केला. त्यास पाहतांच इंद्र घाबरला व त्या गोष्टीला कबूल झाला. या वेळेपासूनच अश्विनीकुमारांस यज्ञांत हविर्भाग देऊं लागले (म. व. १२१-१२५; अनु.

२६१; भा. ९. ३; दे. भा. ७. ३-७ ). एकदां च्यवनानें प्रयागक्षेत्रीं उदवास व्रतास आरंभ केला. हा रात्रंदिवस पाण्यांत जाऊन बसे व सर्व मासे याच्या भोवतीं जमा होत. एका प्रसंगीं कांहीं कोळ्यांनीं मासे धरण्याकरितां जाळें लाविलें. तें बाहेर काढतांच माशांबरोबर च्यवनहि बाहेर आला. तेव्हां सर्व कोळी घाबरून जाऊन ते राजा नहुषाकडे गेले. राजानें ऋषीची षोडशोपचारें पूजा करून तुम्हांस काय पाहिजे तें मागा असें तो म्हणाला. तेव्हां च्यवन म्हणाला, माझी योग्य किंमत करून ती तूं या कोळ्यांस दे. राजा आपलें सर्व राज्य देण्यास कबूल झाला, तरी ऋषीची योग्य किंमत होईना. तेव्हां गविजात नामक ऋषीनें राजास गोधन देण्यास सांगितलें. राजानें गाई देतांच हा अतिशय संतोषित झाला व यानें नहुषास गोधनाची महती कथन केली ( म. अनु. ८५-८७ ).

आपल्या कुळांत पुढें भिन्न जातित्वाचा दोष उत्पन्न होणार, ही गोष्ट याला तपःसामर्थ्यानें कळली व याला कारण कुशिकाचा वंश आहे, असें जाणून त्याच्या वंशाचा नाश करावा, या उद्देशानें हा कुशिकाकडे गेला व म्हणाला, ‘ हे राजा, मला तपश्चर्या करावयाची आहे, करितां तूं आपल्या भार्येसह माझी अहर्निश सेवा कर. ’ राजानें हें ऋषीचें म्हणणें कबूल केलें. नंतर च्यवनानें सुग्रास भोजन आणण्यास सांगून तें येतांच त्याचें जाळून भस्म केलें. नंतर हा राजपर्यंकीं निद्रावश झाला आणि राजा भार्येसह याचे पाय रगडित बसला. याप्रमाणें हा एकाच कुशीवर २१ दिवसपर्यंत निजला. तोंपर्यंत राजा कांहींहि न खातां तिष्ठत होता. २१ दिवसानंतर झोपेंतून जागा होऊन हा एकदम पळूं लागला, हा क्षणांत दिसे, क्षणांत नाहींसा होई. अशा स्थितींतहि राजा याच्यामागें पळत होता. नंतर च्यवन एकदम दिसेनासा होतांच राजा राजवाड्यांत परत आला व पाहतो तों च्यवन निजलेलाच. कांहीं वेळानें हा जागा झाला व परत पुनः दुसऱ्या कुशीवर २१ दिवसपर्यंत निजला. नंतर जागा होतांच च्यवनानें रथाला घोड्यांच्या ऐवजीं एका बाजूस कुशिकास व दुसऱ्या बाजूस त्याच्या भार्येस जोडलें; व आपण स्वतः हातांत चाबूक घेऊन त्यांस बडवीत अरण्यांतून रथ हाकूं लागला. येणेंप्रमाणें त्यानें कंटाळावें, आपणांविषयीं तिरस्कार दाखवावा व मग आपण त्यास जाळून भस्म करावें, म्हणून यानें त्यांचा नानातऱ्हांनीं छळ केला, पण तो कांहीं हरेना. सरतेशेवटीं प्रसन्न होऊन यानें त्या राजास, ‘ तुझ्या कुळांत ब्राह्मण उत्पन्न होईल, ’ असा वर दिला व एक बाग निर्माण करून त्यास स्वर्गसुख दाखविलें (म. अनु. ८७-९०). याला मनुपुत्री आरुषीपासून और्व नामक एक पुत्र झाला ( म. आ. ४-६ ). याचा आश्रम गयेंत होता ( वायु. २. ४६. ७६ ). च्यवन हा एक उत्कृष्ट वक्ता असून सप्तर्षीं-पैकीं एक होय ( म. अनु. ८५ ). याला प्रमति नांवाचाहि मुलगा होता ( म. आ. ४-६; ६७ ). हा भृगुगोत्री एक प्रवरहि आहे. हा ऋषि व मंत्रकार होता ( भार्गव पहा ).

हा धर्मशास्त्रकार असून अपरार्क व मिताक्षरा या ग्रंथांत याच्या धर्मशास्त्राचा उल्लेख आला आहे (अप. १. २०७. ३, २६४-२६५; मिता. ३. ३०; ३. २९२ ). गोदानाच्या वेळीं म्हणावयाचे मंत्र, कुत्रा, चाण्डाल, प्रेत, चिताधूम, मद्य, मद्यपात्र इत्यादिकांना स्पर्श झाला असतां घ्यावयाचें प्रायश्चित्त, गोवधाबद्दलचें प्रायश्चित्त इत्यादि विधींबद्दलचे याचे पुष्कळ श्लोक व सूत्रें या दोन्ही ग्रंथांत आलेलीं आहेत. भास्कर-संहितेंतील जीवदानतंत्राचा हा कर्ता आहे ( ब्रह्मवै. २. १६ ). हेमाद्रि, माधवाचार्य व मदनपारिजात या तीन ग्रंथांत याचे आधार आहेत.

२ (सो. नील.) दिवोदासाला मित्रेयु नामक एक पुत्र होता. त्याचा च्यवन हा मुलगा. या च्यवनाला पुढें सुदास या नांवाचा एक पुत्र झाला ( भा. ९. २२. १ ).

३ (सो. ऋक्ष.) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें सुहो-त्राचा पुत्र व मत्स्यमतें सुधन्व्याचा पुत्र.

४ गोकर्ण नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**च्यवान**—( १ च्यवन पहा ).

## छ

**छगल**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

२ दंडीमुंडीश्वर नामक शिवावताराचा शिष्य.

**छत्रकारिन्**—( सू. इ. ) भविष्यमतें हा दलपालाचा पुत्र. यानें १४००० वर्षे राज्य केलें.

**छंदोगमाहकि**—ब्रह्मवृद्धीचें पैतृक नांव.

**छंदोगेय**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**छंदोदेव**—मतंगाला इंद्राच्या कृपेनें हें नांव मिळालें ( मतंग पहा ).

**छाया**—संज्ञेला सूर्याचें तेज सहन होईना, म्हणून तिनें जणूं काय आपली छायाच अशी ही स्त्री उत्पन्न केली व हिला

आपल्या पतीची सेवा व मुलांचें पालन करण्यास ठेविलें. नंतर हिला तीन मुलें झालीं, त्यामुळें हिचा सापत्नभाव वाढून ही श्राद्धदेव, यम व यमुना या संज्ञेच्या मुलांना सापत्नभावानें वागवूं लागली. हें यमास सहन न होऊन त्यानें हिला लाथ मारिली. म्हणून हिनें त्यास शाप दिला. या शापामुळें ही कोण हें सूर्यास ओळखतां येऊन त्यानें संज्ञेकडे प्रयाण केलें ( विवस्वान्, संज्ञा व यम पहा ).

## ज

**जघन**—धूम्राक्षाचा पुत्र ( गणेश. २. ३१. १२ ).

**जंगारि**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**जंघ**—रावणाच्या बाजूचा एक राक्षस.

**जंघपूत**—एक ऋषि. यानें उदकांत उभें राहून गोपी-मोहन कृष्णाचें ध्यान केलें. त्यामुळें याला सुंदर गोपीचा जन्म प्राप्त झाला ( पद्म. पा. ७२ ).

**जंघाबंधु**—युधिष्ठिराच्या सभेंत उपस्थित असलेला एक ऋषि ( म. स. ४.२२ कुं. ).

**जंघारि**—विश्वामित्राचा पुत्र.

**जटायु**—हा विनतापुत्र अरुणाला श्येनीपासून झालेल्या दोन पुत्रांपैकीं एक (म.आ. ६५; वा. रा. अर. १४.३;३३). हा एक राजा असून आपल्या राज्याचें योग्य तऱ्हेनें पालन करीत असे ( वा. रा. अर. ५०.२० ). रामानें यास प्रथमच पाहिलें असल्यामुळें हा कोणीतरी राक्षस असावा, असें त्यास प्रथम वाटलें. पुढें रामास व सीतेस हा गृध्र-स्वरूपांत दिसला. रामानें ' तूं कोण ' असा प्रश्न विचारितांच हा बोलूं लागला व रामलक्ष्मण बाहेर गेले असतां मी सीतेचें रक्षण करीन, असें म्हणूं लागला ( वा. रा. अर. १४. ३; ३३-३४; ५० ). पुढें हा हितचिंतक असल्याचें दिसून आलें. हा दशरथाचा मित्र होता ( म. व. २७९; वा. रा. अर. १४. ३ ). तेव्हां आपल्या सुनेसारखी सीता रावणाच्या मांडी-वर पाहतांच याला भयंकर राग आला व हा रावणाशीं युद्ध करण्यास सिद्ध झाला. रावण सीतेस नेत असतां यानें त्यास उपदेश केला. उपदेशांत यानें रावणास वेदतत्त्वें सांगून परस्त्री-अपहाराबद्दल त्याचा निषेध केला ( वा. रा. अर. ५० ). यानें रावणास मुकाट्यानें सीतेस सोडून दे, नाहींतर परिणाम ठीक होणार नाहीं, असें बजावून सांगितलें, पण रावणानें तें ऐकिलें नाहीं. तेव्हां दोघांचें युद्ध सुरू झालें. यानें आपल्या तीक्ष्ण नखांनीं व चोचीनें रावणास घायाळ करून रक्त-बंबाळ केलें. रावणानें सोडलेले सर्व बाण यानें पंखांनीं उडवून दिले. शेवटीं रावणानें याचे पंख तोडून यास मृतप्राय केलें.

अशा प्रकारें रावण जटायूस हतबल करून व सीतेस घेऊन गेल्यानंतर रामलक्ष्मण सीतेचा शोध करीत तेथें आले. रावणानें सीतेस नेल्याबद्दलचें वृत्त जटायूनें रामास सांगितलें. सीता विन्द-मुहूर्तावर नेली असल्यामुळें ती पुनः तुला मिळेल, असें रामास आश्वासन दिलें ( वा. रा. अर. ६८. १२ ). याबद्दल रामानें यास पूज्य मानून प्रेमानें आलिंगन दिलें ( वा. रा. अर. ६७. २३; ६८. २६-३६ ). नंतर यानें प्राण सोडला. राम-लक्ष्मणांनीं यास पूज्य मानून याचें उत्तरकार्य केलें. या समयीं याचें वय साठ हजार वर्षांचें होतें ( म. व. २७९; आ. रा. सार. ७; वा. रा. अर. ५०-५२; ६८. २६-३६). जटायूची मृत्यु-वार्ता समजतांच अंगदादि वानरांच्या साहाय्यानें संपाति तेथें आला व त्यानें याचें तर्पण केलें (वा. रा कि. ५८.३३-४५). संपाति हा वडील भाऊ ( वा. रा. कि ५३ २३; म. आ. ६५ ). याला काक, गृध्र व कार्णिक असे पुत्र होते ( ब्रह्मांड. ३. ७. ४४ ).

स्वतः संपाति व जटायु यांची भावना आपण मनुष्यांहून भिन्न आहोंत, अशी नव्हती ( वा. रा. कि. ५६. ४ ).

**जटासुर**—पांडव वनवासांत असतां बदरिकाश्रमीं आले, तेव्हां ब्राह्मणवेषानें हा राक्षस त्यांच्याजवळ राहून आपणच आपल्या तपाची प्रशंसा करीत असे. याच्या मनांत पांडवांचीं शस्त्रास्त्रें व द्रौपदी यांचें हरण करण्याचा विचार होता. पण बलाढ्य भीमापुढें याचें कांहीं चालेना. भीमानें हा राक्षस असावा, हें ओळखून ठेविलें होतें. एके दिवशीं भीम अरण्यांत गेला आहे आणि अर्जुन इंद्रलोकीं गेला आहे, हें पाहून द्रौपदी, धर्म, नकुल व सहदेव यांना घेऊन हा पळूं लागला. सहदेवानें आपली सुटका करून घेतली. धर्मराजानें यास पुष्कळ उपदेश करून पाहिला, पण हा ऐकेना. इतक्यांत गदाधारी भीम तेथें आला व त्यानें याच्याशीं मल्लयुद्ध करून याचा वध केला ( म. व. १५७ ). याला अलंबुष नांवाचा पुत्र होता ( म. द्रो. १७४. कुं. ).

२ हा मद्राधिपति असून धर्मराजाच्या मयसभेंतील एक होता ( म. स. ४. ३० कुं.).

**जटिन्**—पातालांतील एक नाग. याला रावणानें जिंकिलें होतें (वा. रा. यु. ७).

**जटिल**—एक ऋषि. यानें उदकांत उभें राहून गोपीमोहन कृष्णाचें ध्यान केलें. त्यामुळें यास सुंदर गोपीचा जन्म प्राप्त झाला (पद्म. पा. ७२).

२ शंकरानें याचें रूप घेतलें होतें. सतीनें दक्षयज्ञांत देहत्याग केल्यावर हिमालयापासून मैनेचे ठिकाणीं पार्वती उत्पन्न झाली. ती शंकराकरितां तप करूं लागली असतां ब्रह्मचाऱ्याचा वेष घेऊन शंकर तेथें आला व यानें शंकराची खूप निंदा केली; व आणखीहि हा निंदा करणार, असें वाटल्यावरून पार्वतीनें आपली मैत्रीण विजया हिच्याकडून याला घालविण्याचा विचार केला. इतक्यांत शंकर प्रगट झाला. कुमारसंभवाच्या पांचव्या सर्गाशीं याचें फार साम्य आहे. याला ब्रह्मचारिन् असेंहि म्हटलें आहे (शिव. शत. ८४).

**जटिला**—गौतमाच्या वंशांतील एक स्त्री. सप्तर्षि हिचे पति होते (म. अ. २११. १४ कुं.).

**जटीमालिन्**—वाराहकल्पांत वैवस्वत मन्वंतराच्या एकोणिसाव्या चौकडींत हिमालयावर हा शिवाचा अवतार झाला. तेथें हिरण्यनामन्, कौशल्य, लोकाक्षिन्, प्रधिमि हे अनुक्रमें याचे चार पुत्र आहेत (शिव. शत. ५).

**जड**—जनस्थानामधील कौशिकगोत्री दुराचारी ब्राह्मण. हा एकदां व्यापाराकरितां गेला असतां चोरांनीं याचा प्राण घेतला. पूर्वीच्या पापांनीं हा पिशाच झाला. याचा पुत्र मोठा सदाचरणी असून पित्याचें उत्तरकार्य करण्याकरितां काशीस निघाला असतां, त्याचा बाप ज्या झाडावर पिशाच होऊन राहिला होता, तेथें आला व त्यानें गीतेच्या तिसऱ्या अध्यायाचा पाठ केला. तो अध्याय कानीं पडल्यानें यांची मुक्तता झाली (पद्म. उ. १७७). मार्कंडेय-पुराणांतहि एका जडाचा उल्लेख आहे.

**जतृण**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**जन शार्कराक्ष्य**—हा अश्वपति कैकेय, अरुण औपवेशि व त्याचा मुलगा उद्दालक आरुणि यांचा समकालीन असावा. हा उद्दालक आरुणि याच्याकडे तत्त्वज्ञान शिकण्याकरितां गेला होता (श. ब्रा. १०.६.१.१; छां. उ. ५.११.१;१५.१).

**जनक**—हें निमि किंवा विदेहवंशाचें कुलनांव आहे. यांची वंशावळहि पुराणांत अनेक ठिकाणीं सांपडते (ब्रह्मांड. ३. ६४; वायु. २. २७; भा. ९. १३; विष्णु. ४. ४; गरुड. १.१३८.). ही सूर्यवंशांतील इक्ष्वाकुपुत्र निमि यापासून निघालेली एक शाखा आहे. वंशावळ जरी अनेक ठिकाणीं दिलेली असली तरी तिच्यामध्यें एकवाक्यता नाहीं. विशेषतः भागवतादि पुराणांत कांहीं पुरुष अधिक घातलेले आहेत. विदेहवंशांतील दुसरा पुरुष मिथिजनक होय. यानेंच मिथिला नगरी स्थापन केली व जनक हें सामान्य नांवहि याचेवरून पडलें. जनक ह्या नांवानें या वंशांतील लोकांचा उल्लेख करण्याची पद्धति वैदिक व पौराणिक वाङ्मयांत आहे (श. ब्रा. ११. ३. १. २; ४. ३. २०; ६. २. १; बृ. उ. ३. १. १; ४. १. १; २. १; जै. ब्रा. १. १९. २; कौ. उ. ४. १). याज्ञवल्क्य वाजसनेय व श्वेतकेतु आरुणेय यांच्याशीं याचें अनेक विषयांवर बोलणें झालें आहे. वैदिक वाङ्मयांतहि ब्रह्मवेत्ता म्हणून महापुरुषाचें स्थान याला प्राप्त झालें आहे (तै. ब्रा. ३. १०. ९. ९). यानें सप्तरात्र नांवाचा याग केला (सां. श्रौ. १६. २. ७. ७.). वैदेह जनकाला सावित्राग्नि विद्या अहोरात्र अभिमानी देवतांनीं उपदेशिली (तै. ब्रा. ३. १०. ९. २१; भरद्वाज पहा). हा याज्ञवल्क्याशीं समकालीन होता. याज्ञवल्क्याशीं समकालीन असणाऱ्या जनकाचें नांव दैवराति असें होतें आणि तो वंशावळीप्रमाणें रामाचा सासरा जो सीरध्वज जनक त्यापेक्षां पुष्कळ पिढ्या मागचा आहे.

हा भागवत व विष्णु यांच्या मतें निमिपुत्र व वायुमतें नेमिपुत्र होय. निमीला वसिष्ठाचा शाप मिळाल्यावर त्याचा देहपात झाला असतां देवांच्या सांगण्यावरून ब्राह्मणांनीं त्याच्या देहाचें मंथन केलें, तेव्हां त्यांतून हा निर्माण झाला. याला जनक, विदेह व मिथिल अशीं अन्य नांवें असून यानें मिथिला नगरीची स्थापना केली. याचा पुत्र उदावसु. याचे वंशज जनक नांवानेंच संबोधिले जातात (भा. ९. १३. १३; ६. ३. २०). याचा पंचशिखांबरोबर अध्यात्मविषयावरील संवाद, आपल्या स्त्रीबरोबर प्रजेचें पालन करण्याला क्षत्रियांचीं कोणतीं आवश्यक कर्तव्यें आहेत याविषयीं झालेलें संभाषण, तसेंच अश्म नामक ब्राह्मणाबरोबर झालेला संवाद, वगैरे प्रसिद्धच आहे (म. शां. २२१; ३२४; १८; २७ कुं.). यानें आपल्या योध्यांना स्वर्ग व नरक हीं दाखविलीं होतीं (म. शां. ९९ कुं.). पुढें इच्छामरणी जनक प्राणत्याग करून स्वर्गाला जात असतां मार्गांत याला यमलोक लागला. तेथें अनेक जीव अनेक यातना भोगीत असलेले याच्या दृष्टीस पडले. पुण्यवान् जनकाच्या अंगावरून गेलेला वायु त्या पापी जीवांच्या अंगास लागल्यामुळें त्यांचीं सर्व दुःखें नाहींशीं झालीं व त्यांनीं जनकाला तेथेंच राहण्याचा आग्रह केला. नंतर यमानें याला सर्व नरकलोकाची माहिती करून दिल्यावर याला स्वर्गाला जाण्यास सांगितलें. परंतु जनकानें तें न ऐकतां यमाच्या सांगण्यावरून आपलें सर्व पुण्य त्या दुःखितांना देऊन सर्व पापी जीवांचा उद्धार केला (पद्म. पा. ३०).

विदेह देशचा राजा. याला चार स्त्रिया होत्या. त्यांत सुमति पट्टराणी होती. पुष्कळ कालपर्यंत पुत्रसंतान नसल्यामुळें यानें पुत्रकामेष्टि यज्ञ केला. तेव्हां दोन पुत्र व कन्या सीता ही धरणीपासून प्राप्त झाली. यानेंच नरकासुराचें १६ वर्षेपर्यंत पृथ्वीच्या सांगण्यावरून पालन केलें. त्रेतायुगाचे पूर्वार्धांतील ही गोष्ट आहे ( कालि. ३८ ).

नारदानें अमंगल ब्राह्मणाचें रूप घेऊन याचा गर्वपरिहार केला ( गणेश १.६५ ). जनक ह्या नांवावर पुष्कळच कथा असल्या तरी त्या एकाच जनकाच्या नसून निमिवंशांतील वेगवेगळ्या लोकांच्या आहेत. उदाहरणार्थ, याज्ञवल्क्याच्या वेळीं देवराति जनक होता. त्याच्या पुढें बऱ्याच कालानें रामाचा सासरा सीरध्वज जनक झाला. नरकासुराचें पालन करणारा जनक कृष्णसमकालीन बहुलाश्व असावा ( देवराति, बहुलाश्व व सीरध्वज पहा ).

२ भास्करसंहितेंतील 'वैद्यसंदेहभंजन' तंत्राचा कर्ता ( ब्रह्मवै. २.१६ ).

३ (प्रद्योत. भविष्य.) विशाखयूपाचा पुत्र.

**जनदेव**—जनकवंशीय ज्ञानी राजा. याच्या पदरीं शंभर आचार्य होते. त्यांना यानें आत्मप्राप्तीचा उपाय विचारिला असतां कोणीहि याचें समाधान करूं शकला नाहीं. पुढें एकदां पंचशिख नामक ऋषि याच्याकडे आला असतां यानें वरील प्रश्न त्याला विचारिला. तेव्हां त्यानें याला आत्मप्रतीति करून देऊन मोक्षमार्ग दाखविला ( म. शां. २१८ ). हा वंशावळींत आढळत नाहीं ( धर्मध्वज पहा ).

**जनपादप**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**जनमेजय**—( सो. पूरु. ) पूरूचा पुत्र. याला प्राचिन्वान् या नांवाचा एक मुलगा होता. याच्या बायकोचें नांव मागधी सुनंदा.

२ ( सो. अनु. ) विष्णु, वायु व मत्स्य यांच्या मतें हा पुरंजयपुत्र व भागवतमतें संजयपुत्र होय.

३ ( सो. यदु. ) भविष्यमतें हा ओघाचा पुत्र होय.

४ ( सू. दिष्ट. ) भागवतमतें सुमतीपुत्र, विष्णु व वायु यांच्या मतें सोमदत्तपुत्र होय.

५ ( सो. पूरु. ) हा पहिला जनमेजय पारीक्षित होय. ब्राह्मणग्रंथांत याची प्रसिद्धि पारीक्षित जनमेजय अशी होती ( श. ब्रा. १३.५.४.१; ऐ. ब्रा. ७.३४; ८.११.२१; सां. श्रौ. १६.८. २७ ). याच्याजवळ पुष्कळ घोडे होते. ते दमले म्हणजे त्यांना हा मधुर पेय पाजून ताजेतवाने करी. ब्रह्महत्येचा व कृत्येचा दोष जावा म्हणून यानें अश्वमेध यज्ञ केला. याच्या राजधानीचें नांव आसन्दीवत् होतें ( ऐ. ब्रा. ८.२१; श. ब्रा. १३. ५ ४. २ ). याच्या बंधूंचीं नांवें उग्रसेन, भीमसेन व श्रुतसेन अशीं आहेत. त्यांनीं अश्वमेध यज्ञ करून आपल्या पापाचें क्षालन करून घेतलें. जनमेजयाचा अश्वमेध चालविणारा पुरोहित इंद्रोत दैवाप शौनक होता. परंतु ऐतरेय ब्राह्मणाप्रमाणें तुरः कावषेय पुरोहित होता ( ऐ. ब्रा. ८. २१; ७. २७; ३४ ). जनमेजयानें यज्ञाच्या वेळीं कश्यपांना न बोलावितां भूतवीरांकडून यज्ञ करविला. परंतु नंतर असितमृगांच्या आग्रहावरून पुनः यानें कश्यपांनाच बोलाविलें ( ऐ. ब्रा. ७.२७ ). जनमेजय हा कुरु राजा होता. गोपथ ब्राह्मणांत ( १. २. ५ ) याचा दोन अग्नींशीं तत्त्वज्ञानावर संवाद झाला आहे ( परीक्षित् पहा ).

पारीक्षित जनमेजय दोन आहेत. त्यांपैकीं भारताप्रमाणें पहिल्या परीक्षितास सात पुत्र असून दुसऱ्यास चार पुत्र आहेत. त्यांपैकीं सात पुत्र असलेला परीक्षित पांडवांचा पूर्वज असून चार पुत्र असलेला पांडवांचा वंशज होय. पण दोघांनाहि विष्णुपुराणांत चारच पुत्र दिले आहेत ( ४. २०. १; २१. १ ). हरिवंशांत श्रुतसेनादि तीन जनमेजयाचे पुत्र देऊन शिवाय मणिमतीपासून सुरथ व मतिमान् नांवांचे पुत्र दिले आहेत ( ह. वं. १. ३२ ). पण शतपथ ब्राह्मणाप्रमाणें याचे भाऊ कांहीं पुराणांत आहेत ( अग्नि. २७८. ३२; गरुड. १. १४० ). महाभारतांत इंद्रोत दैवाप शौनकानें एका पारीक्षित जनमेजयाला अश्वमेधानें पापमुक्त केल्याची गोष्ट आहे. ती गोष्ट जुनी म्हणून सांगण्यांत आली आहे (म.शां.१५०-१५२). म्हणून ही गोष्ट पहिल्या जनमेजय पारीक्षिताची असावी व त्याचाच उल्लेख शतपथादि ग्रंथांत असावा. श्री. चिं. वि. वैद्य ही गोष्ट प्रक्षिप्त मानून दुसऱ्या जनमेजयाचा ब्राह्मणग्रंथांत उल्लेख आहे असें मानितात. पण ययातीला मिळालेला रथ जनमेजयापर्यंत पौरवकुलांत होता. पण जनमेजय पारीक्षितानें गार्ग्यांचा अल्पवयी मुलगा लोहगंध कांहीं बोलल्यामुळें ठार केला म्हणून गार्ग्यानें याला शाप दिला व यांच्या घराण्यांतील रथ वसु चैद्याकडे गेला. व तो रथ बृहद्रथ व जरासंध यांकडून कृष्णाकडे आला. ही कथा पहिल्या जनमेजय पारीक्षिताची आहे, दुसऱ्याची नाहीं. पुढें मुलगा मारिल्याच्या पातकांतून इंद्रोत दैवाप शौनक यानें अश्वमेध करवून याला मुक्त केलें ( वायु २. ३१. २०. २६; ब्रह्मांड ३.६८.१७-२८; ह. वं. १.३०; ब्रह्म. १२.७-१७ ). चैद्य वसूकडे जनमेजय पारीक्षिताकडून रथ गेला. हें कालदृष्ट्या पांडवांच्या पुढील जनमेजय पारीक्षिताबद्दल शक्य नाहीं.

६ ( सो. अनु. ) हा मत्स्यमतें बृहद्रथपुत्र. पण वायुमतें दृढरथपुत्र होय.

७ (सो. अज.) हा भल्लाटपुत्र होय. (वायु. २.३७; मत्स्य. ४९). याच्याकरितां उग्रायुधानें नीपांचा संहार केला. व याला ठार केलें. हाच दुर्बुद्धि जनमेजय होय ( म. उ. ७३ कुं. ).

८ ( सो. कुरु. ) हा दुसरा जनमेजय पारीक्षित होय. लोकांवर दरारा असलेला असा या शब्दाचा अर्थ होतो. हा मत्स्य, भविष्य व वायु यांच्या मतें परीक्षितपुत्र होय. पांडवश्रेष्ठ धर्मराज हा याचा पणजा होय. परीक्षित् राजानें आपली मातुलकन्या इरावती ( उत्तराची मुलगी ) इजशीं विवाह केला होता व त्याला तिजपासून जनमेजय, श्रुतसेन, भीमसेन व उग्रसेन असे चार पुत्र झाले. परीक्षित् राजा तक्षकदंशानें मरण पावला, त्या वेळीं हा वयानें फार लहान होता. तरी बुद्धीनें पोक्त असल्यामुळें सर्व नगरवासी जनांनीं एकमतानें यास हस्तिनापूरच्या गादीवर बसविलें. यानें आपल्या पित्याच्याच वेळचे मंत्री व पुरोहित कायम ठेवून त्या सर्वांच्या सल्लामसलतीनें राज्यकारभार करून प्रजेचें पुत्रवत् पालन केलें ( म. आ. ४४ ).

पुढें हा बालराजा सर्व विद्यांमध्यें पारंगत होऊन शत्रूंचें मर्दन करण्यास योग्य झाला. नंतर यानें सर्व मंत्र्यांच्या विचारानें काशीच्या सुवर्णवर्मा नांवाच्या राजाच्या वपुष्टमा (काश्या) नांवाच्या कन्येशीं लग्न केलें. हा मोठा सद्वर्तनी असून यानें परस्त्रीकडे पापदृष्टीनें कधींहि पाहिलें नाहीं ( म. आ. ४४; मत्स्य. ५०; वायु. २.३७ ).

हा एकदां कुरुक्षेत्रीं दीर्घसत्र करीत असतां सत्रमंडपांत सारमेय या नांवाचा कुत्रा आला; त्यास जनमेजयाच्या तिन्ही भावांनीं मारिलें. तेव्हां तो रडत रडत आपली आई जी देवशुनी सरमा तिजकडे गेला. देवशुनीनें, माझ्या पुत्रास तूं विनाकारण ताडण कां केलेंस, असा राजास प्रश्न विचारिला व तुला दैवी विघ्न येईल, असा यास शाप देऊन ती निघून गेली ( म. आ. ३ ).

हा दीर्घसत्र करून कुरुक्षेत्राहून हस्तिनापुरास आला. त्या वेळीं याच्यामागें कांहीं पीडा लागलेली होती. ती शांत करण्याकरितां यानें श्रुतश्रवस्‌च्या सर्पिणीपासून झालेला पुत्र सोमश्रवस् पुरोहित केला व भावांना सांगितलें कीं, ब्राह्मण मागेल तें यानें ब्राह्मणाला द्यावें, या अटीवर मी याला पुरोहित केलें आहे. तरी याच्या मर्जीबाहेर कोणीं वागूं नये. इतकें झाल्यावर आपण तक्षशिलेवर स्वारी केली व तो प्रांत जिंकून हा पुनः हस्तिनापुराला आला. ही संधि साधून उत्तंकानें तक्षकाचा सूड उगविण्याकरितां जनमेजयाला सर्पसत्र करण्याविषयीं उत्तेजन दिलें. याच्याहि मनांत तक्षकानें परीक्षिताचा वध केल्याचें शल्य डांचत होतेंच ( म. आ. ३. १३; ५३. ९ कुं.). तेव्हां यानें तक्षकासह सर्व सर्पांस मारण्याची प्रतिज्ञा केली व यज्ञमंडप उभारून सर्पसत्र सुरू केलें. इतक्यांत स्थपति ( सुतार ) नांवाचा एक गृहस्थ आला व त्यानें 'राजा, तुझ्या या यज्ञांत एक ब्राह्मण विघ्न आणील,' असें भविष्य वर्तविलें. यामुळें यानें द्वारावर पहारेकरी ठेवून त्यांस, माझ्या परवानगीशिवाय आंत कोणास सोडूं नका, अशी सक्त ताकीद दिली. पुढें कोटयवधि सर्प त्या अग्नींत येऊन भराभर पडूं लागले. तेव्हां तक्षक भिऊन इंद्राकडे पळून गेला. त्यास 'मी तुला वाचवितों' असें इंद्रानें वचन दिलें. शेवटीं ही पाळी वासुकि नांवाच्या सर्पावर आली, तेव्हां तो भीतीनें रडूं लागला. तो आपल्या जरत्कारु नांवाच्या बहिणीकडे गेला व तिचा पुत्र जो आस्तिक त्यास सर्व वृत्तान्त कथन करून त्यापासून त्यानें अभय मिळविलें. कोट्यवधि सर्प मेल्यानंतर यानें आपला खरा शत्रु जो तक्षक त्यास बोलाविण्याविषयीं ऋत्विजांस विनंति केली. तक्षक हा इंद्रगृहीं आहे, असें कळल्यानंतर ऋत्विजांनीं 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' म्हणून आहुति देतांच इंद्रासह तक्षक त्या ठिकाणीं प्रगट झाला. पण तो अग्नि पाहतांच इंद्रानें तक्षकास सोडून दिलें. इतक्यांत आस्तिक ऋषि त्या ठिकाणीं प्रगट झाला व त्यानें राजाची स्तुति केली. राजा संतुष्ट होऊन 'वर माग' असें म्हणतांच 'सत्र थांबव' असें तो बटुवेषधारी आस्तिक म्हणाला व सरतेशेवटीं नाइलाजास्तव यास सत्र थांबवावें लागलें ( म. आ. ५१-५८ ).

सर्पसत्रांतील ऋत्विजांचीं नांवें खालीलप्रमाणें होतीं. तुलनेकरितां पंचविंशब्राह्मणांतील सर्पसत्रांतील ऋत्विजांचीहि यादी दिली आहे.

१ चंडभार्गव च्यावन-( होता ), २ कौत्स जैमिनि ( उद्गाता ), ३ शार्ङ्गरव ( ब्रह्मा ), ४ पिंगल ( अध्वर्यु ), ५ व्यास ( सदस्य ), ६ उद्दालक, ७ प्रमतक, ८ श्वेतकेतु, ९ पिंगल, १० असित, ११ देवल, १२ नारद, १३ पर्वत, १४ आत्रेय, १५ कुण्ड, १६ जठर, १७ घालघट, १८ वात्स्य, १९ श्रुतश्रवस्, २० कोहळ, २१ देवशर्मन्, २२ मौद्गल्य, २३ समसौरभ (म. आ. ५३. ४–९ कुं. ). पंचविंशब्राह्मणांतील सर्पसत्रांत कोणीं कोणतें काम केलें याचा निर्देश आहे. १ जर्वर ( गृहपति ), २ धृतराष्ट्र ऐरावत ( ब्रह्मा ), ३ पृथुश्रवस् दौरेश्रवस ( उद्गाता ), ४ ग्लाव ( प्रस्तोतृ ) व ५ अजग ( प्रतिहर्तृ ), ६ दत्त तापस ( होतृ ), ७ शितिपृष्ठ) (मैत्रावरुण), ८ तक्षक वैशालेय (ब्राह्मणाच्छंसी), ९ शिख(नेष्टृ) १० अनुशिख ( पोतृ ), ११ अरुण आट ( अच्छावाक ), १२ तिमिर्घ दौरेश्रुत ( अग्नीध् ), १३ कौतस्त अरिमेजय ( अध्वर्यु ), १४ जनमेजय ( प्रतिप्रस्थातृ ), १५ अर्बुद (ग्रावस्तुत्), १६ अजिर (सुब्रह्मण्य), १७ चक्र (उन्नेतृ), १८ पिंशग, १९ षंड ( अभिगर ), २० कुषंड ( अपगर ).

या दोन्ही सत्रांचें नांव जरी एक असलें तरी त्यांचा परस्पर संबंध नाहीं. एक सर्पांच्या नाशाकरितां आहे व दुसरें सर्पांच्या सुस्थितीकरितां आहे ( पं. ब्रा. २५. १५ ).

जनमेजयास श्रीमद्व्यासाचा महाबुद्धिमान् शिष्य वैशंपायन यानें भारत कथन केलें ( म. आ. १; ८८; क. ३ ). यास काश्या नांवाच्या स्त्रीपासून दोन पुत्र झाले; एक चंद्रापीड व दुसरा सूर्यापीड (ब्रह्म. १३. १२४). यानें सर्पसत्र केलें व त्या वेळीं याचा पुरोहित तुर कावषेय होता ( भा. ९. २२. ३५ ). एकंदर ऐशीं जनमेजय राज्यावर होतील असें येथें म्हटलेलें आहे (वायु. १. ३२. ४९; मत्स्य. २७३. ७१–७३; ब्रह्मांड. ३. ७४. २६७ ).

सर्पसत्रानंतर राजा जनमेजयानें पुरोहित, ऋत्विज वगैरे गोळा करून अश्वमेधास आरंभ केला असतां, त्या ठिकाणीं व्यास प्रगट झाला. त्या वेळीं यानें त्याची यथाविधि पूजा करून त्यास कौरवपांडवयुद्धाविषयीं अनेक प्रश्न विचारिले व हा म्हणाला, 'तुम्हाला जर आधीं या युद्धाची अखेर कशी होणार हें माहित होतें, तर त्यांना तुम्हीं परावृत्त कां केलें नाहीं ?' व्यास म्हणाला, ' हे राजन्, त्यांनीं मला विचारिलें नव्हतें व विचारिल्याशिवाय मी कोणाला कांहीहि सांगत नसतों.' नंतर, तुझा हा यज्ञ इंद्र मोडील व इतःपर जगांत अश्वमेध होणार नाहीं, असें व्यासानें यास सांगितलें. यानें पृथ्वीवरील सर्व राजांना जिंकलें.

दुसरा जनमेजय पारीक्षित हा अत्यंत धार्मिक असून यानें आपल्या यज्ञांत ब्रह्मा वाजसनेयाला केलें. तेव्हां वैशंपायनानें याला शाप देऊन याच्यापुढें इतर ब्राह्मणांनीं क्षत्रियांची उपाध्यायवृत्ति बंद केली. पण वाजसनेय लोकांच्या साहाय्यानें यानें दोन अश्वमेध केले, व हा पराक्रमी असल्यामुळें इतर क्षत्रियांनीं याचा पुरस्कार केला. या वेळेपासूनच इतर लोकांनीं क्षत्रियांची वृत्ति सोडून वाजसनेयांनीं क्षत्रियांची वृत्ति स्वीकारली असावी. व वाजसनेयांचा पुरस्कार केल्यामुळेंच याला ब्राह्मणांनीं पदच्युत करून अरण्यांत घालविलें. याच्यानंतर शतानीक राजा झाला (मत्स्य. ५०. ५७-६४; वायु. २. ३७. २४५-२४८.) या वेळेपर्यंत याज्ञवल्क्यानें उत्पन्न केलेल्या वेदाला प्रतिस्पर्धी असलेल्या वैशंपायनादिकांनीं मान्यता दिली नव्हती. वाजसनेयांना राजाश्रय मिळाल्यावरोबर वैशंपायनानें खूपच गडबड करून वादविवाद करविले व वाजसनेयांचा पाडाव करण्याचा प्रयत्न केला. पण जनमेजयानें त्याला बिलकूल दाद न देतां ब्राह्मण व लोक यांच्या विरोधानें राज्यत्यागहि पत्करिला पण वाजसनेयांना समाजांत मान्यता मिळवून दिली. म्हणून याला महावाजसनेयक म्हणतात ( वैशंपायन पहा ).

**जनमेजय कौतस्त**—हा कुतस्ताचा पुत्र. याचा भाऊ पहिला अरिमेजय. हे दोघे भाऊ पंचविंशब्राह्मणांतील सर्पसत्रांत अध्वर्यु व प्रतिप्रस्थातृ होते. दुसऱ्या जनमेजय पारीक्षितानें केलेलें सर्पसत्र म्हणजे तक्षशिलेजवळच्या सर्प लोकांची कत्तल होय. पण पंचविंशब्राह्मणांतील सर्पसत्र हें सर्प लोकांनीं आपल्या स्थैर्याकरितां केलें होतें ( पं. ब्रा. २५. १३ ).

**जनश्रुत कांड्विय**—जनश्रुत हें लोकप्रसिद्ध अशा अर्थाचें पद दिसतें. हा हस्त्वाशयाचा शिष्य होय ( जै. उ. ब्रा. ३.४०.२ ). त्याच ब्राह्मणांत जनश्रुत वारक्य हा जयंताचा शिष्य असल्याचा उल्लेख आहे (जानश्रुति पहा).

**जनापीड**—(सो. तुर्वसु.) हा वायुमतें शरूथपुत्र होय. ब्रह्मांडांत याला आडीर म्हटलें आहे.

**जंतु**—(सो. क्रोष्टु.) हा मत्स्यमतें पुरुद्वताचा पुत्र.

२ (सो. नील.) हा भागवत, विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें सोमकाचा ज्येष्ठ पुत्र होय.

३ (सो. ऋक्ष.) हा विष्णुमतें सुधन्वापुत्र होय. याला भागवतमतें जहु असें म्हटलें आहे.

**जंतुधाना**—यातुधानाची पत्नी.

**जन्यु**—तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक. याला जन्य असेंहि नांव आढळतें ( पद्म. सृ. ७ ).

**जपातय**—पराशरकुलांतील गोत्रकार. याचे ऐवजीं स्यातपायन असा पाठभेद आहे.

**जबाला**—सत्यकाम जाबालाच्या आईचें नांव.

**जमदग्नि**—याचा ऋग्वेदांत अनेक वेळां निर्देश आला आहे ( ऋ. ३.६२.१८; ८.१०१.८; ९.६२.२४; ६५.२५; अ. वे.४.२९.३ ). यांत मित्रावरुण, अश्वी आणि सोम यांच्याशीं जमदग्नीचा संबंध दिसतो. सौदासाच्या यज्ञांत वसिष्ठपुत्र शक्तीनें विश्वामित्राचा वादांत पराजय केला व त्याला यज्ञांतून हाकून दिलें. तेव्हां जमदग्नीनें सूर्यापासून ससर्परी नांवाची वाणीचें सामर्थ्य वाढविणारी विद्या आणून विश्वामित्राला दिली व त्याच्या कुलाची वृद्धि केली. ससर्परी म्हणजे भाषणांतील कौशल्य. जमदग्नीला या ठिकाणीं वयोवृद्ध म्हटलें आहे ( ऋ. ३.५३. १५-१६). येथें बहुवचनी निर्देश असल्यामुळें हा कुलाचा निर्देश आहे. पुढील वाङ्मयांतहि हा विश्वामित्राच्या बाजूचा असून वसिष्ठाच्या प्रतिकूल आहे ( तै. सं.३.१.७.३ ). पण हरिश्चंद्राच्या राजसूयांत विश्वामित्र होता, वसिष्ठ ब्रह्मा व जमदग्नि अध्वर्यु होते (ऐ. ब्रा. ७.१६ ). यानें चतूरात्र नांवाचा यज्ञ केल्यामुळें याच्या वंशांत कोणी दरिद्री निपजला नाहीं ( तै. सं.७.१.९.१; पं. ब्रा. २१.१०). असित, अत्रि, कण्व व वीतहव्य यांच्या बरोबर याचा निर्देश आहे ( अ. वे. २.३२.३०; ६.१३०.१ ). हा अक्षरब्रह्माचा उपदेश करीत असे.

वेदप्रचाराकरितां व अक्षरब्रह्माच्या उपदेशाकरितां इंद्रानें याची योजना केली होती (तै. आ. १.९). इतरहि पुष्कळ ठिकाणीं याचा उल्लेख आहे ( अ. वे. ४.२९.३; ५.२८.७; ६.१३७. १;१८.३.१५-१६). हा मोठा तपस्वी होता (तै. सं.३.३. ५.२). जमदग्नि भार्गवाचीं ऋग्वेदांत बरींच सूक्तें आहेत (ऋ. ३.६२.१६-१८; ८.१०१; ९.६२; ६५; ६७.१६-१८;१० ११०; १३७.६; १६७ ). जमदग्नि शब्दाचा अर्थ नेत्र केला आहे ( वा. सं. १३.५६ महीधरभाष्य ).

भृगुकुलांतील ऋचीक नांवाच्या ऋषीस गाधिराजाची कन्या सत्यवती, हिचेपासून झालेला पुत्र ( म. आ. ६७; व. ११५; भा. ९. १५; ह. वं. १. २७; ब्रह्म. १०; स्कंद. ६. ६६; विष्णुधर्म. १. ३५; ब्रह्मवै.३.२४ ). याच्या बापाचें नांव भृगु असें दिलेलें आढळतें ( पद्म. उ. २४१ ). याला आर्चिक असें पैतृक नांव होतें. रेणुका ही याची स्त्री होती. तिच्यापासून याला रुमण्वान्, सुषेण, वसुमान्, विश्वावसु व परशुराम असे पांच पुत्र झाले ( रेणुका पहा ).

जमदग्नि हा अत्यंत रागीट होता. एकदां हा लीलेनें बाण सोडीत होता व ते बाण आणावयास रेणुकेस सांगत होता. ती वेळ कडक उन्हाची असल्यामुळें रेणुका दमली व विश्रांतीस्तव एका झाडाखालीं बसली. त्यामुळें तिला बाण परत आणण्यास उशीर झाला. तेव्हां याला राग येऊन यानें तिला उशिराचें कारण विचारिलें. रेणुकेनें उशिराचें कारण सांगतांच हा सूर्यावर संतापला व बाणानें सूर्यास वेधण्यास तयार झाला. तेव्हां सूर्य याला शरण येऊन त्यानें याला छत्री व पादत्राण दिलें. याचप्रमाणें त्यानें ' मी तुझ्या उदरीं येईन ' असें जमदग्नीस सांगितलें. पुढें तो परशुरामाच्या रूपानें जमदग्नीचे उदरीं जन्मला ( विष्णुधर्म. १. ३६ ; म. अनु. ९४-९५ ).

एकदां रेणुका सरोवरावर स्नानास गेली असतां, त्या ठिकाणीं चित्ररथ किंवा चित्रांगद आपल्या भार्यांसह क्रीडा करीत होता. त्याचें ऐश्वर्य पाहून तिच्या मनांत त्याच्या विषयीं अभिलाष उत्पन्न झाला व ती त्याची क्रीडा पाहत तेथेंच जरा वेळ उभी राहिली. त्यामुळें घरीं जाण्यास तिला जरा विलंब लागला. परंतु तेवढ्यावरून हा फार संतापला व यानें आपल्या पुत्रांस तिचा शिरच्छेद करण्यास सांगितलें. परंतु परशुरामाशिवाय इतरांनीं याचें ऐकिलें नाहीं. त्यामुळें जमदग्नीनें त्यांचाहि वध केला. पुढें परशुरामानें आपल्या मातेचा शिरच्छेद केला. तेव्हां प्रसन्न होऊन यानें परशुरामास वर मागावयास सांगितलें असतां, परशुरामानें वराच्या योगानें आपल्या मातेस व भावांस जिवंत करविलें ( म. व. ११६; भा ९. १६; विष्णुधर्म. १. ३६ ).

इतका जरी हा रागीट होता, तरी पुढें पुढें हा अत्यंत शांत बनला. एकदां हा खराच शांत बनला आहे कीं नाहीं, हें पाहण्याकरितां क्रोध सर्परूपानें पितृतिथीचे दिवशीं याच्याकडे आला. त्या दिवशीं जमदग्नीनें श्राद्धाकरितां खीर केली होती, त्या खिरींत सर्परूप क्रोधानें आपली गरळ टाकिली. परंतु हा क्रोधावर मुळींच रागावला नाहीं. तेव्हां क्रोधानें याची स्तुति केली ( जै. अ. ६८ ). स्त्रीपुत्रादिकांच्या वधाचा विचार करतां जमदग्नीस पश्चात्ताप झाला व क्रोधामुळें हा अनर्थ झाला, म्हणून यानें क्रोध सोडला ( रेणु. २७ ).

जमदग्नीनें गंगातीरीं एक हजार वर्षें तप करून इंद्रापासून कामधेनु मागून घेतली. त्याच वेळीं इंद्रानें यास एक देदीप्यमान व ईश्वरांशभूत असा पुत्र होईल, असा वर दिला. कश्यपानें याला षडक्षर मंत्र दिला होता ( पद्म. उ. २४१ ).

पुढें एकदां हैहय देशचा राजा कार्तवीर्य हा ससैन्य जमदग्नीच्या आश्रमास आला. जमदग्नीनें त्याचें कामधेनूच्या साहाय्यानें उत्तम प्रकारें आदरातिथ्य केलें. पुढें कार्तवीर्यास जमदग्नीच्या ऐश्वर्याचा हेवा वाटून त्यानें कामधेनूस बलात्कारानें ओढून चालविली. त्या वेळीं कामधेनूनें आपल्या शरीरापासून बरेच यवन उत्पन्न करवून त्यांच्याकडून कार्तवीर्याचा पराभव करविला. तेव्हां कार्तवीर्यानें जमदग्नीच्या आश्रमाचा विध्वंस करून कामधेनु हरण करून नेली. हें पुढें परशुरामास कळतांच त्यानें कार्तवीर्यास ठार मारून गाय सोडवून आणली. पण कार्तवीर्यास ठार केलें, ही गोष्ट जमदग्नीस पटली नाहीं. तेव्हां कार्तवीर्यपुत्रांनीं पित्याच्या वधाचा सूड घेण्याकरतां परशुराम आश्रमांत नाहीं हें पाहून, जमदग्नीस एकवीस बाणांनीं विद्ध करून मारून टाकिलें. पुढें परशुरामास हें कळतांच त्यानें सर्व क्षत्रियांचा एकवीस वेळां निःपात करून जमदग्निवधाचा सूड घेतला ( म. शां. ४९. ११६; भा. ९. १६; विष्णुधर्म. १. ३६; पद्म. उ.२४१; गणेश. १. ७७; ब्रम्हवै. ३.२४; ब्रम्हांड. ३. ४५; कार्तवीर्य पहा ).

कार्तवीर्यानेंच जमदग्नीस मारिल्याचाहि कांहीं ठिकाणीं उल्लेख आहे ( म. द्रो. ७०; वा. रा. बा. ७५). याला ठोसे मारून ठार केलें ( पद्म. उ. २४१ ). वैवस्वत मन्वंतरांतील हा सप्तर्षींपैकीं एक होता ( मत्स्य. ९; ब्रह्म. ५; मार्क. ७९ ).

जमदग्नीनें प्रथम श्राद्ध सुरू केलें ( म. आश्र. ९५. ३ कुं. ). हा भृगुकुलांतील गोत्रकार व प्रवरहि आहे.

२ कण्वाला देवकन्या आर्यावतीपासून जे दहा पुत्र झाले, त्यांच्या प्रत्येकाच्या षोडशपुत्रांपैकीं एक ( भवि. प्रति. ४. २१ ).

**जंबुक**—एक राजा. हा पृथ्वीराजाच्या भयानें व्याकुळ होऊन नर्मदातटीं गेला व यानें पार्थिवपूजेनें शंकराला प्रसन्न

करून त्याकडून ' तूं सर्व राजांकडून अजिंक्य होशील, ' असा वर मिळविला. पुढें यानें वत्सराज व देशराज यांना ठार केलें. हें पाहून त्याचा सूड म्हणून कृष्णांशानें जंबुक राजाचा वध केला. याला कालिय नामक पुत्र असून विजयैषिणी नांवाची कन्या होती ( भवि. प्रति. ३. ९; १३ ).

**जंबुमालिन्**—रावणमंत्री प्रहस्त याचा पुत्र. मारुतीनें अशोकवनिकेचा विध्वंस केला, तेव्हां रावणाच्या आज्ञेवरून हा तेथें गेला असतां मारुतीनें याला ठार केलें ( वा. रा. सुं. ४२-४४ ).

२ एक राक्षस. हासुद्धां मारुतीकडून मारिला गेला ( वा. रा. यु. ४३ ).

**जंबूक**—( शंबूक पहा ).

**जंभ**—बलीचा मित्र. याला जंभासुर असेंहि म्हणतात. इंद्र व बलि यांचें युद्ध सुरू होऊन इंद्राच्या वज्राघातानें बलि मूर्च्छित पडला असतां, यानें सिंहावर बसून इंद्राशीं युद्ध केलें. तेव्हां इंद्रानें याला ठार केलें ( भा. ८. ११. १३ ).

२ तारकासुराचा एक प्रमुख हस्तक. तारकासुराच्या युद्धांत विष्णूनें याला मारिलें. याची कन्या कयाधु (भा. ६. १८. १२).

३ रावणपक्षीय एक राक्षस. याचा पुत्र ताटकापति सुंद.

४ रामाच्या सैन्यांतील एक वानर ( वा. रा. यु. ४ ).

५ एक राक्षस (म. व. २८६. २ कुं. ).

६ जालंधरसेनेंतील एक राक्षस ( पद्म. उ. १२ ).

७ कश्यपत्नी दितीच्या पुत्रांतील एक ( पद्म. उ. २३० ).

८ कश्यप व दनु यांचा पुत्र.

९ संह्लादाचा पुत्र. याचा पुत्र शतदुंदुभि ( ब्रह्मांड. ३. ५. ३८-३९ ).

**जंभक**—एक क्षत्रिय ( म. स. ३२.७ कुं. ).

२ इंद्रानें मारिलेला एक दैत्य. हा तारकासुराच्या सेनेचा एक नायक होता.

**जय**—( सो. क्षत्र. ) वायुमतें विजयपुत्र. भागवतमतें कृत व विष्णुमतें यज्ञकृत अशीं याला नांवें आहेत.

२ विश्वामित्राचा पुत्र ( भा. ९. १६. ३६ ).

३ पीवरीच्या ठायीं झालेल्या शुकाचार्यांच्या पांच पुत्रांपैकीं कनिष्ठ.

४ ( स्वा. उत्तान. ) हा भागवतमतें स्वर्वीथीचे ठिकाणीं झालेला वत्सरपुत्र होय.

५ ( सो. पुरूरवस्. ) हा भागवतमतें पुरूरवस्पुत्र होय.

६ ( सू. निमि. ) भागवतमतें श्रुतपुत्र, विष्णु व वायु यांच्या मतें सुश्रुताचा पुत्र.

७ ( सो. पुरूरवस्. ) हा भागवतमतें मन्युपुत्र होय.

८ ( सो. क्षत्र.) हा भागवत व वायु यांच्या मतें संजयाचा व विष्णुमतें सृंजयाचा पुत्र होय.

९ विष्णूच्या दोन द्वारपालांपैकीं एक ( जयविजय पहा ).

१० ( सो. क्षत्र. ) हा भागवतमतें संकृतिपुत्र होय.

११ ( सो. नील. ) मत्स्यमतें भद्राश्वपुत्र. भागवतमतें संजय आणि विष्णु व वायु यांच्या मतें संजय तो हाच होय.

१२ ( सो. वृष्णि. ) भागवतमतें युयुधानपुत्र, मत्स्य व विष्णु यांच्या मतें असंग हाच होय.

१३ ( सो. यदु. ) भागवतमतें कंकास कर्णिकेपासून झालेला पुत्र.

१४ ( सो. यदु. ) भागवतमतें भद्रेच्या ठायीं झालेला कृष्णपुत्र.

१५ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. भारतीय युद्धांत भीमानें याला मारिलें (म. द्रो. १३५. ३०-३६ कुं. ).

१६ कर्णानें ठार मारिलेला पांडवपक्षीय राजा (म.क.५६).

१७ अज्ञातवासांत विराटनगरींत युधिष्ठिरानें धारण केलेलें गुप्त नांव ( म. वि. ७.६६; २७.१९ कुं. ).

१८ यमसभेमध्यें असलेला एक क्षत्रिय ( म. स. ८. १५ कुं. ).

१९ दुर्योधनपक्षीय एक राजा ( म. द्रो. ७४ ). यानें जयद्रथवधाच्या वेळीं अर्जुनाशीं सामना दिला ( म. द्रो. ९१).

२० काश्मिरांतील कैकय नामक राजाचा पुत्र (भवि. प्रति. ३. ३१ ).

२१ विकुंठ देवांतील एक.

**जय ऐन्द्र**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १८० ).

**जयक लौहित्य**—हा यशस्विन् जयंत लौहित्याचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३.४२.१ ).

**जयचंद्र**—अनंगपालाच्या चंद्रावती नामक कन्येचा पुत्र. याला सोळा राण्या होत्या, पण पुत्र झाला नाहीं. याला सुरभानवी दासीपासून संयोगिनी नामक कन्या झाली. तिनें स्वयंवरांत पृथ्वीराजाच्या पुतळ्यास माळ घातली (भवि. प्रति. ३. ६ ).

२ न्यूह म्लेच्छाच्या वंशांतील देवपालाचा पुत्र ( भवि. प्रति. ४. ३ ).

**जयत्सेन**—(सो. कुरु.) हा मत्स्य, वायु व महाभारत यांच्या मतें कैकयीपासून झालेला सार्वभौमपुत्र होय. भविष्य, भागवत व विष्णु यांच्या मतें यास जयसेन म्हटलें आहे. याला सुश्रवा नामक स्त्री असून अपराचीन हा पुत्र होता ( म. आ. ६३. १५ कुं. ).

२ ( सो. क्षत्र. ) विष्णुमतें अहीनपुत्र व वायुमतें अदीनपुत्र होय. भागवतांत यास जयसेन म्हटलें आहे.

३ (सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. भारतीय युद्धांत भीमानें याला मारिलें (म. श. २५. १० कुं.).

४ भारतीय युद्धांत पांडवांकडे असलेला राजा (म.उ.४).

५ दुर्योधनपक्षाचा मागध राजा. हा कालेयाच्या अष्टपुत्रांपैकीं प्रथम पुत्राचा अंशावतार होय. भारतीय युद्धांत याला श्वेतानें त्रस्त करून याचें धनुष्य दोनदां तोडिलें. शेवटीं अभिमन्यूनें याला मारिलें (म. भी. ४७).

६ भारतीय युद्धांतील दुर्योधनाच्या बाजूचा राजा (म.श.६).

७ विराटनगरींतील नकुलाचें गुप्त नांव (म. वि.७. ६६; २७.१९ कुं.).

**जयद्**—(सो. पूरु.) वायुमतें मनस्युपुत्र (चारुपद पहा).

**जयदेव**—(ऐति.) भगवान् सूर्यानें वंगदेशांतील कंदुकि ब्राह्मणाच्या घरीं जन्म घेतला. तोच पुढें कविशिरोमणि जयदेव नांवानें प्रसिद्धीस आला. यानें वंगदेशांतील बिल्वग्रामीं निरुक्त केलें. पांचव्या वर्षापासन हा पितृभक्ति करूं लागला. आईबाप निवर्तल्यावर हा अत्यंत विरक्त झाला व तेथील वनामध्यें राहूं लागला. पुढें तिसावे वर्षीं, एका ब्राह्मणानें आपली पद्मावती नामक कन्या याला दिली. यानें निरुक्तसंज्ञक वेदाचें अंग लिहिलें. तसेंच यानें पाणिनीचें शास्त्र शुद्ध केलें. पुढें कलीनें चोरांकडून याचें धन लुटवून हातपाय तोडविले. तेव्हां धनपाल राजानें याची ती अवस्था पहातांच यास आपल्या घरीं नेलें. पुढें यास हातपाय आले (भवि. प्रति. ४. ९.३२-७०). हा मूलतः बौद्धमार्गी होता (भवि. प्रति. ४.२०.४९).

**जयद्बल**—विराटनगरींत सहदेवानें धारण केलेलें गुप्त नांव (म. वि. ७. ६६; २७. १९ कुं.).

**जयद्रथ**—(सो. अनु.) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें बृहन्मनस्‌चा पुत्र. मत्स्यामध्यें बृहन्मनस् गाळला असून हा बृहद्भानूचा पुत्र दिला आहे. बृहन्मनस् याला दोन स्त्रिया. एक यशोदेवी व दुसरी सत्या. या दोघीहि चैद्याच्या मुली होत्या. त्यांपैकीं जयद्रथ हा यशोदेवीचा पुत्र (वायु. ९. ३७. १११). याला संभूति नांवाची स्त्री असून विजय नांवाचा पुत्र होता (भा. ९. २३. ११).

२ (सो. अज.) भागवतमतें बृहत्कायाचा, विष्णु व वायु यांच्या मतें बृहत्कर्मन्‌चा व पद्म व मत्स्य यांच्या मतें बृहदिषूचा पुत्र होय.

३ सिंधुदेशाधिपति वृद्धक्षत्राचा पुत्र. धृतराष्ट्रकन्या दुःशलेचा पति (म. आ. ६८. ११०; १३१. १८; द्रो. १४८ कुं.).

हा सिंधु, सौवीर व शिबि या देशांचा राजा होता. हा दुर्योधनपक्षाचा असल्यामुळें पांडवांचा द्वेष करीत असे. याला बलाहक, आनीक, विदारण इत्यादि सहा भाऊ होते (म. व. २६६). पांडव वनवासांत असतां हा एके काळीं आपल्या देशाहून स्वयंवराकरितां शाल्व देशास चालला होता. बरोबर याचे सहा भ्राते, शिबिकुलोत्पन्न सुरथ राजाचा पुत्र कोटिक अथवा कोटिकाश्य, त्रिगर्तराजपुत्र क्षेमंकर, इक्ष्वाकुकुलोत्पन्न सुबलपुत्र सुपुष्पित, कलिंदपुत्र आणि अंगारक, कुंजर, गुप्तक, शत्रुंजय, संजय, सुप्रवृद्ध, प्रभंकर, भ्रमर, रवि, शूर, प्रताप व कुहन असे सौवीर देशचे द्वादश राजपुत्र असून शिवाय सैन्यहि होतें. जातां जातां मार्गांत ज्या काम्यकवनांत पांडव राहिले होते, त्यांत हा उतरला. समीपच पांडवांचा आश्रम असून ते त्या वेळीं मृगयेला गेलेले होते. आश्रमांत धौम्य, द्रौपदी व तिची दासी अशीं तीनच माणसें होतीं. द्रौपदी जयद्रथाच्या दृष्टीस पडतांच ती आपणांला वश व्हावी, अशी बुद्धि याला उत्पन्न होऊन तिची चौकशी करण्याकरितां यानें कोटिकाला तिच्याकडे पाठविलें. कोटिकानें जाऊन तूं कोण व इथें कशाकरितां आलीस, वगैरे सर्व वृत्त तिला विचारिलें. द्रौपदीनें आपला सर्व वृत्तान्त त्याला सांगितल्यावर कोटिक माघारा परतला व घडलेली सर्व हकीकत त्यानें जयद्रथाला सांगितली. ती ऐकतांच हा आपल्या सैन्यांतून निघून द्रौपदीकडे गेला. द्रौपदीनें हा जयद्रथ आहे, असें ओळखून याचा चांगला आदरसत्कार केला. पुढें जयद्रथानें ती आपणांला मिळावी, याकरितां पुष्कळ प्रयत्न केले. शेवटीं द्रौपदीला याच्या त्या निर्लज्जपणाच्या कृत्याचा राग येऊन तिनें याला सत्वर चालता होण्यास सांगितलें. परंतु तिचें भाषण याला न रुचतां बलात्कारानें यानें तिला रथांत घालून पळवून नेलें. तें पाहतांच धौम्य मुनिहि यामागें लागला (म. व. २६४-२६८). इतक्यांत पांडव आश्रमीं आले. येतांच द्रौपदीच्या दासीनें झालेली सर्व हकीकत त्यांना सांगितली. लागलीच पांडव धांवत जाऊन त्यांनीं बऱ्याच अंतरावर पळत असलेल्या जयद्रथाला गांठलें. बराच काळ युद्ध होऊन कोटिक वगैरे जयद्रथाचे वीर मारले गेले. इतक्यांत आपला पराभव होत आहे, असें जयद्रथाला दिसतांच यानें पांडवांची दृष्टि चुकवून युद्धांतून पलायन केलें. पांडवांना जयद्रथ पळून गेल्याचें समजतांच अर्जुन व भीम यांनीं याचा पाठलाग सुरू केला. सर्व सैन्याचा निःपात केल्यावर धौम्य ऋषि व बाकीचे पांडव आश्रमीं परतले. इकडे भीम व अर्जुन यांनीं बऱ्याच काळानें जयद्रथाला पकडिलें. भीमानें तर याला पुष्कळ चोप दिला. परंतु ठार न मारितां याचे पांच पाट काढिले व धरून याला आश्रमीं आणलें. युधिष्ठिरानें जयद्रथाला द्रौपदीची क्षमा मागण्यास सांगून भीमाला सांगितलें कीं, याला मारूं नको, कारण दुःशला दुःखित होऊन धृतराष्ट्र व गांधारी यांसहि शोक होईल. यावरून जयद्रथाला ठार न मारतां, मी पांडवांचा दास आहें, असें याकडून कबूल करवून सोडून दिलें.

याप्रमाणें पांडवांनी याची अवस्था केली असतां, हा मनामध्यें अत्यंत खजिल होऊन व सैन्याला माघारा पाठवून आपण एकटाच गंगाद्वारास निघून गेला. तेथें तीव्र तपश्चर्येनें शंकराला प्रसन्न करून, मी सर्व पांडवांस जिंकावें, असा वर त्याजवळ मागूं लागला. तेव्हां शंकरानें सांगितलें कीं, अर्जुन नसतां बाकींच्या पांडवांचा तूं पराभव करशील. तेवढ्यानें संतुष्ट होऊन हा स्वनगरास परतला. या वराच्या योगानें यानें अभिमन्युवधकालीं पांडवांचा पराभव केला (म. व. २६८–२७२).

भारतीय युद्धांत अर्जुन संशप्तकांकडे गुंतला असतां यानें पांडवांचा पराभव केला व त्यामुळें अभिमन्यु एकटाच चक्रव्यूहांत सांपडून मारला गेला. तेव्हां अर्जुनानें, उदयिक सूर्यास्ताच्या आंत मी याला ठार मारीन, अशी घोर प्रतिज्ञा केली. तीमुळें हा घाबरून जाऊन स्वदेशास परत जाण्याविषयीं दुर्योधनास सांगूं लागला. तेव्हां दुर्योधन याला घेऊन रात्रींच्या रात्रीं द्रोणाचार्यांकडे गेला. द्रोणाचार्यांनें, मी तुझें संरक्षण करीन, असें सांगून याला राहून घेतलें (म. द्रो. ७३–७४). इकडे अर्जुन जयद्रथाला मारण्याविषयीं केलेल्या प्रतिज्ञेची पूर्तता कशी होईल, याविषयीं अत्यंत चिंताग्रस्त झालेला दिसत होता. त्याची ती अवस्था श्रीकृष्णानें पाहतांच त्याला सांगितलें कीं, तूं शंकराची आराधना करून पाशुपतप्राप्ति करून घे, म्हणजे जयद्रथाला तूं खात्रीनें मारशील. त्याप्रमाणें अर्जुनानें मनापासून रुद्राची आराधना केल्यावर रुद्र प्रसन्न होऊन रात्रीं अर्जुनाच्या स्वप्नांत आला व त्यानें अर्जुनाला पाशुपतास्त्र दिलें. दुसरे दिवशीं कृष्णार्जुन स्नानसंध्या आटपून व युधिष्ठिराचा आशीर्वाद घेऊन सेनेसहित युद्धभूमीवर आले. इकडे कौरवसेनेसहित द्रोणाचार्यहि आला होता. त्यानें शकटव्यूहाची रचना करून त्यांत पद्मव्यूह व त्याच्यांत सूचिव्यूह रचून तेथें जयद्रथास बसविलें व तो स्वतः व्यूहाच्या दारावर उभा राहिला (म. द्रो. ८०–८८).

कृष्णानें अर्जुनास सत्वर व्यूहांत प्रवेश करण्यास सांगून रथ हांकिला. इतक्यांत द्रोणाचार्य व अर्जुन यांची गांठ पडून बराच काळ युद्ध झालें. शेवटीं कृष्णाच्या सांगण्यावरून द्रोणाचार्याला तसाच सोडून देऊन अर्जुन पुढें चालला. परंतु द्रोणानें सांगितलें कीं, मला न जिंकतां तूं आंत जाणें योग्य नव्हे. हें ऐकून अर्जुनानें उत्तर केलें कीं, आचार्य, तुम्ही माझे गुरु आहां, शत्रु नाहीं; मी तुमचा शिष्य असून आपल्या मुलासारखा आहें. तुम्हांला युद्धांत जिंकील, असा पुरुष या लोकांत कोणीहि नाहीं (म. द्रो. ९१).

नंतर अर्जुन मार्गांतील अनेक योद्ध्यांना मारीत पुढें चालला. वाटेंत त्याच्या घोड्यांना अत्यंत तहान लागली, तेव्हां रथ थांबवून व जयद्रथाजवळ पोंचायला बराच वेळ आहे, असें पाहून तो तेथेंच थांबला. नंतर तेथें बाणगंगा निर्माण करून त्यानें अश्वांस पाणी पाजलें व पुढें निघाला, तो जयद्रथाच्या समीप येऊन पोंचला. इतक्यांत युधिष्ठिरानें अर्जुनाच्या साहाय्याकरितां युयुधानाला पाठविलें (म. द्रो. ११९). मागाहून युधामन्यु व उत्तमौजा हे दोघे चक्ररक्षक (म. द्रो. ९१), त्याचप्रमाणें सात्यकि व भीमसेन व्यूहाचा भेद करून तेथें पोंचले. हे सर्व एकत्र झालेले पाहतांच दुर्योधन भयभीत होऊन रक्षणाकरितां याच्या जवळ जाऊन बसला (म. द्रो. ९९–१०१). इतक्यांत जयद्रथाला बाहेर काढण्याच्या हेतूनें कृष्णानें सूर्य अस्तास जात असल्याचा उभय सैन्यांत भास उत्पन्न केला. त्या प्रसंगीं जयद्रथानें सूर्यास्त पाहण्याकरितां मान वर केली. तों श्रीकृष्णानें 'तो पहा जयद्रथ' असें अर्जुनाला संकेतानें सांगितलें. अर्जुनानें तात्काळ याचें शिर उडवून तें वृद्धक्षत्र संध्या करीत होता, त्याच्या मांडीवर जाऊन पाडिलें (म. द्रो. १४६). ही गोष्ट मार्गशीर्ष वद्य नवमीस घडली (भारतसावित्री).

पित्याच्या मांडीवर जयद्रथाचें डोकें उडविण्याचें कारण कृष्णानें अर्जुनाला पुढीलप्रमाणें सांगितलें.

जयद्रथाचा पिता वृद्धक्षत्र, याला हा पुष्कळ दिवसांनीं पुत्र झाला. त्या वेळीं आकाशवाणी होऊन तिनें राजास सांगितलें कीं, 'तुझा पुत्र कुलशीलमनोनिग्रहादि गुणांनीं युक्त होत्साता नामांकित योद्धा होईल. परंतु रणांगणामध्यें लढत असतांना ज्याकडे याचें लक्ष नाहीं, असा शत्रु याचें मस्तक छेदील.' हें ऐकून वृद्धक्षत्र म्हणाला, 'माझा पुत्र समरांगणांत लढत असतां जो कोणी त्याचें मस्तक भूमीवर पाडील, त्याचेंहि मस्तक शतधा विदीर्ण होईल!' इतकें सांगितल्यानंतर तो जयद्रथाला गादीवर बसवून व स्यमंतपंचकाच्या बाहेर वनांत जाऊन उग्र तपश्चर्या करीत आहे. तेव्हां तूं वृद्धक्षत्राच्या लक्षांत न येईल, अशा रीतीनें दिव्यास्त्रानें युद्धामध्यें जयद्रथाचें शिर उडवून त्याच्या मांडीवर टाक. जर का त्याचें मस्तक जमिनीवर पाडशील, तर तुझेंहि मस्तक शतधा विदीर्ण होईल. नंतर अर्जुनानें बाणानें जयद्रथाचें शीर तोडून संध्या करीत असलेल्या वृद्धक्षत्राच्या मांडीवर पाडिलें. त्या वेळीं तो जप करीत असल्यामुळें त्याच्या तें लक्षांत आलें नाहीं. जेव्हां तो उठूं लागला, तेव्हां तें भूमीवर पडलें. पडतांक्षणींच वृद्धक्षत्राचें मस्तक शतधा विदीर्ण झालें (म. द्रो. १४६).

याच्या एका पुत्राचा वध अर्जुनानें द्रौपदीस्वयंवराच्या वेळीं केला (म. आ. २१८). दुसरा पुत्र दुःशलेपासून

झालेला सुरथ नांवाचा. त्यानें पितृवधाची हकीकत ऐकतांच प्राण सोडिला ( म. आश्व. ७८ ).

४ धर्मसावर्णीचा पुत्र.

५ ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

**जयध्वज**—( सो. सह. ) हा भागवत, विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें सहस्रार्जुनपुत्र होय. याचा पुत्र तालजंघ. हा महारथी होता ( पद्म. सृ. १२ ).

**जयंत**—( सो. वृष्णि. ) हा मत्स्यमतें वृषभपुत्र. पण पद्ममतें ऋषभपुत्र होय ( पद्म. सृ. १३ ). या पुराणांत हें श्वफल्काचें नामांतर असावें.

२ पांचाल देशाचा क्षत्रिय राजा. हा भारतीय युद्धांत पांडवांकडे असून महारथी होता ( म. उ. १७१. ११ कुं. ).

३ इंद्राला पौलोमीपासून झालेला पुत्र ( म. आ. १२३. कुं.; भा. ६. १८. ७ ). देवासुरयुद्धांत यानें कालेय राक्षसाला ठार केलें ( पद्म. सृ. ६६ ).

४ एक यादव ( भा. १. १४. २८ ).

५ मरुत्वतीचे ठायीं धर्म ऋषीस झालेला पुत्र. हा भगवंताचा अंश असून यास उपेंद्र म्हणतात ( भा. ६. ६. ८ ).

६ दशरथाच्या अष्टप्रधानांतील एक ( वा. रा. बा. ७ ).

७ एक रुद्र व रुद्रगण.

८ विष्णूचा एक पार्षद ( भा. ८. ११. १७ ).

९ त्रेतायुगांतील परमेश्वराचें नांव ( भा. ११. ५. २६ ).

१० एक तपस्वी ब्राह्मण. यानें अमृतमय जलाचें बनलेलें व एक लक्ष वर्षे आयुष्य असलेलें फल तपःसामर्थ्यानें इंद्रापासून मिळवून एक लक्ष सुवर्णास तें भर्तृहरीस विकलें ( भवि. प्रति. २. २३ ).

११ बौद्धधर्मी न्यूनपति बौद्धसिंह याचें चीन देशांत नेत्रपालाशीं युद्ध झालें. तेव्हां जयंतानें बौद्धसिंहास सोडविलें. पुढें त्याच्या पद्मजा नांवाच्या मुलीशीं जयंताचा विवाह झाला (भवि. प्रति. ३. २९ ).

१२ काश्मीर देशांतील राजा कैकय याचा पुत्र ( भवि. प्रति. ३. ३१ ).

१३ जयंतस्वामीनें केलेली ऋग्वेदाची स्वरांकुशा शिक्षा प्रसिद्ध आहे. हिच्यामध्यें एकवीस श्लोक आहेत, असें शिक्षेंत म्हटलेलें असलें, तरी चोवीस सांपडतात. हिच्या आरंभीं हेरंब, चंडिकादिकांना नमन केलेलें आहे. कांहीं लोकांच्या मतें ही रावणकृता आहे.

१४ हें यशस्विन् लौहित्याचें नांव आहे ( जै. उ. ब्रा. ३. ४२. १; दक्ष जयंत लौहित्य पहा ).

**जयंत पाराशर्य**—एक आचार्य. विपश्चिताचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४१. १ ).

**जयंत वारक्य**—हा कुबेर वारक्याचा शिष्य. याचा आजा कंस वारक्याचा शिष्य होता (जै. उ. ब्रा. ३.४१.१). सुयज्ञ शाण्डिल्याचा शिष्य म्हणूनहि एका जयंत वारक्याचा उल्लेख आहे ( जै. उ. ब्रा. ४. १७. १ ).

**जयंती**—स्वायंभुव मन्वंतरांतील यज्ञ नामक इंद्राची कन्या व ऋषभदेव राजर्षीची भार्या. हिला भरत इत्यादि शंभर पुत्र होते ( भा. ५. ४. ८ ).

२ चालू मन्वंतरांतलि पुरंदरनामा इंद्राची कन्या व वारुणि भृगूचा पुत्र जो शुक्र, त्याची स्त्री. इंद्रानें हिला देवांचा नाश करण्याकरितां उग्र तपश्चर्या करीत असलेल्या शुक्राचार्याला विघ्न करण्याकरितां त्याच्याकडे पाठविलें. तेथें गेल्यावर जयंतीनें त्याची उत्तम प्रकारें सेवा केली. पुढें शुक्राचार्याला शंकरापासून वरप्राप्ति झाल्यावर त्यानें हिचा हेतु ओळखून हिच्यासहित तो आपल्या घरीं आला व संसाराचा उपभोग घेऊं लागला. हिच्यापासून त्याला देवयानी झाली ( मत्स्य. ४७; पद्म. सृ. १३; उशनस् पहा ).

३ सुषेण राजाची कन्या. ही त्यानें राजपुत्र माधवास दिली होती ( पद्म. क्रि. ६ ).

**जयपाल**—व्यूह म्लेच्छाच्या वंशांतील प्रजयाचा पुत्र. यानें दहा वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. ४. ३ ).

**जयरात**—कलिंग देशाच्या भानुमंत राजाचा भाऊ. हा दुर्योधनपक्षीय असून भारतीय युद्धांत भीमाकडून मारिला गेला ( म. द्रो. १५६. ३१ कुं. ).

**जयवर्मन्**—दुर्योधनपक्षीय एक राजा (म. द्रो. १५६ ).

**जयवान**—काश्मीर देशांतील राजा कैकय याचा पुत्र ( भवि. प्रति. ३. ३१ ).

**जयविजय**—हे कर्दम प्रजापतीस देवहूतीचे ठिकाणीं झाले. हे मोठे विष्णुभक्त असून नेहमीं अष्टाक्षर मंत्राचा जप व विष्णूचीं व्रतें करीत असल्यामुळें यांना विष्णूचा साक्षात्कार होत असे. तसेंच हे यज्ञकर्मांत कुशल असून एकदां मरुत राजाच्या निमंत्रणावरून त्याच्या यज्ञाकरितां गेले व त्यांत जय हा ‘ ब्रम्हा ’ व विजय ‘ याजक ’ झाला. यज्ञ समाप्त झाल्यावर राजानें यांस विपुल दक्षिणा दिली. ती घेऊन हे घरीं आल्यावर त्या दक्षिणेच्या वांटणीसंबंधानें यांचें भांडण होऊन शेवटीं जयानें विजयास ‘ तूं मगर होशील, ’ असा शाप दिला. उलट विजयानें, ‘ तूं हत्ती होशील,’ असा जयास शाप दिला. परंतु लागलींच कृतकर्माबद्दल दोघांना पश्चात्ताप होऊन हे विष्णूला शरण गेले. तेव्हां विष्णूनें यांचा शाप संपतांच उद्धार करण्याचें यांना सांगितलें. शापाप्रमाणें एक मगर व दुसरा हत्ती होऊन गंडकीच्या तीरीं राहत होते. पुढें एके दिवशीं हत्ती कार्तिकस्नानासाठीं गंडकी नदींत उतरला

असतां, मगरानें त्याचा पाय धरिला. तेव्हां त्यानें विष्णूचा धांवा केला. अर्थात् विष्णूनें येऊन या दोघांचा उद्धार केला व यांस विष्णुलोकीं नेलें. हेच जय व विजय विष्णूचे द्वारपाल झाले ( स्कंद २. ४. २८; पद्म. उ. ११० ).

पुढें यांनीं सनकादि देवर्षींना विष्णुदर्शनास जाऊं दिलें नाहीं, म्हणून हे त्यांच्या शापानें वैकुंठांतून पतन पावून असुरयोनीप्रत गेले. यांपैकीं जय हिरण्याक्षाचा जन्म पावून पृथ्वीस डोक्यावर घेऊन पातालांत गेला असतां, विष्णूनें वराहावतारीं याचा वध करून पृथ्वी सोडविली ( भा. ३. १६ ३२; पद्म. उ. २३७ ).

परंतु दुसऱ्या ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, अश्विनींनीं 'तुम्ही तीनदां पृथ्वीवर जन्म घ्याल,' असा शाप दिला होता. उलट त्यांनाहि यांनीं 'तुम्ही एकदां पृथ्वीवर जन्म घ्याल,' असा शाप दिला. शापाप्रमाणें जयविजय अनुक्रमें हिरण्याक्ष व हिरण्यकशिपूच्या जन्मास आले. नंतर रामावतारीं रावण, कुंभकर्ण व कृष्णावतारीं शिशुपाल व वक्रदंत या नांवांनीं हे प्रसिद्धीस आले.

**जयशर्मन्**—एक ब्राम्हण. इंद्रप्रस्थाचा राजा अनंगपाल यानें आपल्या चंद्रकांति नामक कन्येचा विवाह केला. तो राजोत्सव पाहतांच हिमालयावर समाधिस्थ असलेल्या या ब्राह्मणास राज्याची इच्छा उत्पन्न झाली व यानें देहत्याग करून चंद्रकांतीच्या उदरीं जन्म घेतला. हा पुढें पराक्रमी व जितेन्द्रिय असा होऊन जयचंद या नांवानें प्रसिद्धीस आला. याचा कनिष्ठ भ्राता रत्नबाहु ( भवि. प्रति ३ ५ ).

२ अवंतीनगरींतील शिवशर्मा ब्राह्मणाचा पुत्र. यानें व्यसनी असूनहि अधिक महिन्यांतील वद्य एकादशी केली. लक्ष्मीनें यास एकादशीमाहात्म्य सांगितलें ( पद्म. उ. ६२ ).

**जयसिंह**—अजमिरांतील राजा चपहानि, याच्या वंशांतील मद्रदेवाचा पुत्र. यानें आर्यदेश जिंकून एकंदर ५० वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४. २ ).

**जयसेन**—( १ व २ जयत्सेन पहा ).

२ ( सो. क्षत्र. ) हा भागवतमतें अहीनपुत्र होय ( जयत्सेन पहा ).

३ क्षत्रिय राजा मागध ( म. स. ४. ३२ कुं. ).

४ अवंत्यराजा. याला राजाधिदेवी नामक स्त्री होती. याचे पुत्र विंदानुविंद व कन्या मित्रविंदा. ती कृष्णास दिली होती.

५ व्यूह म्लेच्छाच्या वंशांतील विष्वक्सेन राजाचा पुत्र. यानें तीस वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४. ३ ).

**जयस्तोम**—हा राजा कुष्टरोगांतून सूर्याराधनेनें मुक्त झाला ( भवि. ब्राह्म. २१० ).

**जया**—कृशाश्वप्रजापतीची कन्या व पार्वतीची दासी ( स्कंद १. ३. २. १८ ). ही पार्वतीची मैत्रीण असेंहि आढळतें ( वामन. ४; पद्म. उ. १६ ).

**जयानीक**—द्रुपदपुत्र पांचाल. हा भारतीय युद्धांत अश्वत्थाम्याकडून मारिला गेला ( म. द्रो. १५७.१८१ कुं. ).

२ विराटाचा भाऊ ( म. द्रो. १५९.४१ कुं. ).

**जयावह**—मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**जयाश्व**—जयानीकाचा भ्राता. याला भारतीय युद्धांत अश्वत्थाम्यानें मारिलें ( म. द्रो. १५७. १८१ कुं. ).

२ विराट राजाचा भ्राता ( म. द्रो. १५९. ४१ कुं. ).

**जयेश**—विराटनगरींत भीमानें धारण केलेलें गुप्त नांव ( म. वि. ७.६६; २७.१९ कुं. ).

**जर**— ( २ जरा पहा ).

**जरत्कारु**—ऐरावत सर्प. एक सूक्तद्रष्टा (ऋ. १० ७६).

२ कारु म्हणजे शरीर, तें तपानें क्षीण करतो तो जरत्कारु, अशी जरत्कारु शब्दाची व्युत्पत्ति आहे ( म. आ. ४०. ३. कुं. ). हा यायावरांचा मुलगा ( म. आ. ४५. १६ कुं. ). जरत्कारु ब्रह्मचारी असून तीर्थयात्रा करीत हिंडत असतां याला वीरणक नांवाच्या गवताच्या आधारानें एका खड्ड्यांत लोंबत असलेले पितर आढळले. गवताचें मूळ उंदीर कुरतडीत असल्यामुळें त्यांचा आधार केव्हां तुटेल, याचा नेम नव्हता. त्यांना अशा अवस्थेचें कारण विचारतां, 'जरत्कारूनें लग्न न केल्यामुळें आमचा वंश खुंटला आहे व त्यामुळें आमची अशी स्थिति झाली आहे. केवळ तपाच्या जोरावर आम्ही इतके दिवस टिकलों आहोंत; पण तें तप, कालरूपी उंदीर सारखा कुरतडीत आहे. यास्तव आमच्या मुलाला कसेंहि करून विवाह करण्यास सांग,' असें त्यांनीं सांगितलें. तेव्हां यानें, मीच तुमचा पुत्र आहें. मी ब्रह्मचर्यानें राहण्याचें ठरविलें होतें. पण तुमची ही स्थिति पाहून माझा बेत बदलला आहे; माझ्याच नांवाची कन्या मला भिक्षेंत मिळाल्यास व पोषण करावें लागणार नसल्यास मी तिच्याशीं लग्न करीन, असें उत्तर दिलें. पुढें म्हातारा म्हणून याला कोणीच मुलगी देण्यास तयार होईना. शेवटीं अरण्यांत वासुकीनें आपली जरत्कारु या नांवाची भगिनी दिली व तिचें पोषण करण्याचें काम त्यानें आपल्याकडे घेतलें. पुढें विवाह झाल्यावर नवराबायको एकत्र राहूं लागलीं. मात्र यानें प्रथमच तिला बजाविलें होतें कीं, माझ्याविरुद्ध वागल्यास मी तुला टाकून देईन. पुढें एके दिवशीं हा आपल्या पत्नीच्या मांडीवर डोकें ठेवून निजला. संध्याकाळ झाल्यावर संध्यालोप होऊं नये, म्हणून तिनें नवऱ्याला जागृत केलें. तेव्हां 'काय बिशाद आहे कीं, मी निजलों असतां सूर्य अस्ताला जाईल!' असें बोलून

रागावून पुनः तप करण्यास हा निघून गेला ( म. आ. १४. ४७ कुं.). त्या वेळीं जरत्कारूच्या पोटांत गर्भ होता. तो वाढून तिला आस्तिक नांवाचा पुत्र झाला. जरत्कारूची स्त्री कश्यपकन्या मनसा हिच्यापासून आस्तिक झाला ( दे. भा. ९. ४७–४९; मनसा पहा ).

३ जरत्कारूची स्त्री ( २ जरत्कारु पहा ).

**जरद्गौरी**—आस्तिकाची आई जरत्कारु हिचें नामांतर.

**जरस्**—वसुदेवाला रथराजी स्त्रीपासून झालेला द्वितीय पुत्र. याला जर असें नामांतर आहे. हा क्षत्रिय असून दुराचरणानें व्याध झाला. याच्याच बाणानें कृष्णाचें निधन झालें. नंतर भक्तीर्थांत हा मरण पावला ( भा. ११.३०.३३; स. मौ. ५.२२-२५ कुं; स्कंद. ७.१.२३९–२४१ ).

**जरा**—एक राक्षसी. जरासंधाची उपमाता ( जरासंध पहा ). जरासंधानें कृष्णादिकांचा वध करण्याकरितां गदा फेंकली व तिचा प्रतिकार करण्याकरितां बलरामानें स्थूणाकर्ण नांवाचें अस्त्र फेकलें, त्यांत सांपडून ही मेली ( म. द्रो. १८१ ).

**जरासंध**—( सो. मगध. ) हा वायुमतें नभस्पुत्र. भागवत, विष्णु व मत्स्य यांच्या मतें हा बृहद्रथ राजाचा पुत्र. बृहद्रथ राजानें काशीराजाच्या आवळ्याजावळ्या दोन मुलींशीं विवाह केला. हा बराच काल अनपत्य असतां काक्षीवत गौतमपुत्र चंडकौशिक यानें यास पुत्रप्राप्तीस्तव प्रसाद म्हणून एक आम्रफल दिलें. 'दोन्ही पत्न्यांशीं समभावानें वागेन,' अशी त्याची प्रतिज्ञा असल्यामुळें त्याच्या पत्न्यांनीं तें प्रत्येकीं अर्धें अर्धें भक्षिलें. कांहीं कालानें दोघींस अर्धा अर्धा पुत्र झाला. तीं शकलें त्यांनीं दासीकरवीं चवाठ्यावर नेऊन ठेविलीं असतां जरा अगर गृहदेवी नामक राक्षसीनें सहज जुळविलीं. त्यामुळें एक बालक झाला. नंतर ती हा बालक खाण्याकरितां ओढून नेऊं लागली. पण या बळकट बालकास तिच्यानें ओढवेना. नंतर त्या मुलानें रोदन करण्यास आरंभ केला असतां, राजा बाहेर आला व त्याला त्या राक्षसीनें हा पुत्र देऊन टाकला. राजानें याचें नांव जरासंध असें ठेविलें (स.स.१७-१८; मत्स्य.५०). त्याच्या एकाच पत्नीला दोन शकलें झालीं व तिनें तीं चवाठ्यावर फेंकलीं. नंतर जरा राक्षसी त्या शकलांसह बसली असतां लीलेनें जिवंत हो, असें वारंवार त्यांस म्हणूं लागली. तोंच त्या जुळलेल्या शकलांत जीव आला, अशीहि कथा आहे ( भा. ९. २२ ). हा विप्रचित्ति दानवाच्या अंशानें जन्मला होता ( म. आ. ६७ ). हा मगध देशाचा अधिपति असून याच्या राजधानीचें नांव गिरिव्रज असें होतें. हा द्रौपदीच्या स्वयंवरास उपस्थित होता. पण धनुष्य उचलितांना तें गुडघ्यावर पडून फजिती झाल्यामुळें तडक आपल्या देशीं चालता झाला (म. स. १८७). हा रुक्मिणीच्या स्वयंवरासहि उपस्थित होता. यानें तेथें भीष्मकासमोर केलेलें कृष्णस्तुतिपर भाषण याच्या कृष्णद्वेषाशीं विसंगत दिसतें ( ह. वं. २. ४८ ).

यानें आपल्या दोन कन्या व सहदेवाच्या कनिष्ठ भगिनी अस्ति व प्राप्ति कंसास दिल्या होत्या. कंसवधाची वार्ता त्यांच्या मुखानें यास कळतांच यानें सैन्य घेऊन मथुरेवर चाल केली. याचें सैन्य तेवीस अक्षौहिणी ( विष्णु. ५.२२ ) अथवा वीस अक्षौहिणी होतें ( ह. वं. २. ३६. ). कृष्ण व बलराम हे नगराबाहेर येऊन याशीं युद्धास तयार झाले. नंतर त्या दोघांनीं आपल्या मूळ स्वरूपाचें स्मरण करितांच कृष्णास शार्ङ्ग धनुष्य, अक्षय भाते व कौमोदकी गदा, व बलरामास संवर्तक हल व सौनंद मुसल हीं आकाशांतून प्राप्त झालीं ( ह. वं. २. ३५; विष्णु. ५. २२ ). जरासंधानें मथुरेच्या चारी द्वारांवर चढाई करण्यास्तव राजे नेमिले ते असेः—दक्षिणेला दरद, चेदिराज व हा स्वतः; उत्तरेला पूरुकुलोत्पन्न वेणुदारि, विदर्भाधिपति सोमकराज, भोजेश्वर रुक्मिन्, सूर्याक्ष व मालवेश, अवंतिदेशचे विंद व अनुविंद, दंतवक्त्र, छागलि, पुरमित्र, विराट, कौरव्य, मालव, शतधन्वा, विदूरथ, भूरिश्रवा, त्रिगर्त, बाण व पंचनद; पूर्वेला उलूक, केतव, अंशुमान् राजाचा पुत्र एकलव्य, बृहत्क्षत्र, बृहद्धर्मन्, जयद्रथ, उत्तमौजस्, शल्य, कौरव, कैकेय, वैदिश, वामदेव व सिनी देशचा राजा सांकृति; व पश्चिमेला मद्रराजा, कलिंगपति, चेकितान, बाल्हिक, काश्मीराधिप गोनर्द, करुषेश द्रुमराज, किंपुरुष व पर्वतप्रदेशांतील अनामय ( ह. वं. २.३५ ).

यानें याप्रमाणें व्यवस्था केली; पण यादवांचें सैन्य थोडें होतें, तरी यादवांनीं याचा पराभव केला. हें युद्ध चालू असतांना जरासंधास मारण्यास एकदां बलराम प्रवृत्त झाला होता. पण आकाशवाणीनें रामास सुचविलें कीं, याचा वध कोणाकडून आहे, हें तुला माहीत आहे. यास्तव तूं यास मारूं नयेस ( ह. वं. २. ३६ ). जरासंधास बलरामानें अनेकदां जिंकिलें होतें, तरी यास मारिलें नाहीं. पण याच्या बरोबरीच्या राजांचा मात्र खरपूस समाचार घेतला ( ह. वं. २. ६२ ).

या युद्धांतील लोकांच्या तीन याद्या आल्या आहेत. पण एकीचा कांहीं दुसरीशीं फारसा मेळ नाहीं. एकींत चेदिराज शिशुपाल, तर दुसरींत चेदिराज पुरुषोत्तम, एकींत सिनिराज सांकृति, तर दुसरींत केशिराज सांकृति, तर एकाच यादींत दरद व दरदेश्वर असे दोन राजे आले आहेत. शिवाय माणसांचाहि मेळ बसत नाहीं ( ह. वं. २.३४ ).

याप्रमाणें यानें आणखी सतरा स्वाऱ्या केल्या, पण दर वेळेस याचा पराभवच होत गेला. हा निष्कारण वैर करी, म्हणून याचा त्रास चुकविण्याकरितां कृष्णानें मथुरा देश सोडून रैवतक पर्वताजवळ द्वारकेस नवें राज्य स्थापिलें. हीं अठरा युद्धें मिळून तीनशें वर्षें लोटलीं. या युद्धांत कृष्णाच्या बाजूस अठरा राजकुलें होतीं ( म. स. १४; विष्णु. ५. २२; ब्रह्म. १९५ ). अशा प्रकारें युद्धांत पराजय पावून हा परत फिरला असतां यानें आपणांस साहाय्य करण्याकरितां कालयवनास बोलाविलें ( ह. वं. २. ५३ ).

हा जरी कृष्णाशीं युद्धांत पराजित झाला, तरी फार शूर होता. याला राज्य देऊन आईबाप वनांत निघून गेल्यावर यानें अतुल पराक्रम दाखविला. भोजकुलांतील सर्व क्षत्रिय पादाक्रांत करून यानें सर्व क्षत्रियांस कबजांत आणिलें. तेव्हां सर्व राजांनीं यास सार्वभौमपदीं स्थापिलें ( म. स. १४ ). यानें गिरिव्रज राजधानींत नव्याण्णव वेळां फिरवून टाकलेली गदा नव्याण्णव योजनें लांब येऊन मथुरेजवळ पडली. याचे हंस व डिंभक हे दोन पराक्रमी भाऊ सेनापति होते ( म. स. २९ ). कर्णाचें व जरासंधाचें युद्ध होऊन त्यांत कर्णाचा जय झाला. यामुळें जरासंधाचें व त्याचें सख्य होऊन यानें मालिनी नगरी त्यास अर्पण केली ( म. शां. ५ ). जरासंधाच्याच जोरावर कंसानें बापाचें राज्य बळकाविलें ( ह. वं. २. ३४ ).

इकडे धर्मराजास राजसूय यज्ञ करावा असें वाटल्यामुळें, त्यानें कृष्णास इंद्रप्रस्थास बोलावून त्याचा सल्ला विचारला. कृष्णानें त्यास जरासंधानें श्याऐशीं राजे प्रतिबंधांत ठेवल्यामुळें यास जिंकल्याशिवाय राजसूययज्ञ सिद्धीस जाणार नाहीं, असें सांगितलें. भागवतांत २०८०० राजे दिले आहेत ( भा. १०. ७२-७३). त्या राजांस महादेवास बलि द्यावयाचें, असा याचा निश्चय होता. पण पद्मपुराणांत हा प्रत्येक कृष्णचतुर्दशीचे दिवशीं एकेक राजा भैरवास बलि देत असे, असा उल्लेख आहे ( पद्म. उ. २५२ ). म्हणून जरासंधास जिंकण्यासाठीं भीमार्जुनांस बरोबर घेऊन कृष्ण गिरिव्रजास गेला. त्यांनीं ब्राह्मणवेष धारण केले होते. भीमार्जुनांसहित कृष्ण गिरिव्रजास जाऊन पोहोंचल्यावर प्रथम त्यांनीं याच्या महाद्वारावर असलेल्या अतिशय मोठ्या तीन दुंदुभि फोडल्या व याच्या घरीं गमन केलें. जरासंधानें भेट घेऊन त्यांचा सत्कार केला व त्यांची इच्छा विचारली. तेव्हां कृष्णानें न बोलणें हें या दोघांचें व्रत असल्यामुळें आपण मध्यरात्रीनंतर बोलूं असें सांगितलें. मध्यरात्रीनंतर जरासंध त्यांचा अर्घ्यपाद्य देऊन सत्कार करूं लागला असतां तो ते ग्रहण करीनात. तेव्हां जरासंधानें त्यांच्या आकृतींकडे पाहून ते क्षत्रिय आहेत, असें ओळखिलें व त्यांस कोणत्या हेतूनें येणें केलें, असें विचारिलें. कृष्णानें आपणा तिघांचीं नांवें सांगून तुझी इच्छा असेल त्याच्याशीं युद्ध कर, असें सांगितलें. पण मधुकुलोत्पन्न पुरुषाचे हातून याचा मृत्यु नसल्यामुळें कृष्णानें याच्याशीं युद्ध करण्याचा नाद सोडला. जरासंध शंकराचे वरानें अवध्य होता, म्हणून यास मारण्यास कृष्णास कांहीं युक्ति लढवावी लागली ( पद्म. उ. २५२ ). तेव्हां जरासंधानें सहदेवास राज्याभिषेक करून व कृष्णार्जुनांस नालायक ठरवून भीमाशीं युद्ध करण्याचें ठरविलें. प्रथम यांचें गदायुद्ध सुरू झालें. पण एकमेकांच्या शरिरांवर आघात बरेच वेळां झाल्यामुळें त्या मोडून गेल्या, म्हणून द्वंद्वयुद्धास सुरवात झाली ( भा. १०. ७२-७३ ). हें युद्ध अहोरात्र चालूं असे ( म. स. २४ ) व फक्त दिवसा चाले ( भा. १०. ७२-७३). हें युद्ध कार्तिक शु. १ ते कार्तिक शु. १४ असे १४ दिवस ( म. स. २४ ), २५ दिवस ( पद्म. उ. २५२ ) व २७ दिवस ( भा. १०. ७२-७३ ) चालूं होतें. युद्धाच्या शेवटच्या दिवशीं दोघेहि थकून गेले असतां कृष्णानें उत्तेजन दिल्यामुळें भीमानें जरासंधास मारून टाकलें ( म. स. १५; क. २०-२४ ). शेवटच्या दिवशीं भीमानें जरासंधास फाडलें. तथापि, हा पुनः सांधला जाऊन युद्धास सिद्ध झाला. हें पाहून भीमास हा कसा मरेल, अशी भीति पडली. इतक्यांत कृष्णानें एक तृण हातांत घेऊन त्याचा छेद केला व उजव्या हातांतील डावीकडे व डाव्यांतील उजवीकडे फेकावें, असें सुचविलें. त्याप्रमाणें भीमानें करतांच जरासंध तात्काळ मरण पावला ( पद्म. उ. २५२; २७८ ). ही युक्ति कृष्णास उद्धवानें सुचविली होती ( भा. १०. ७२-७३ ).

जरासंध मरतांच याचा पुत्र सहदेव ( भा. ९. २२; मत्स्य. ५०; विष्णु. ४. २३; गरुड. १४० ) शरण आला, म्हणून त्यास कृष्णानें अभय दिलें व राज्यावर त्याची स्थापना करून सर्व राजांस बंदींतून सोडविलें. नंतर त्या राजांस राजसूययज्ञास आमंत्रण करून तो भीमार्जुनांसहित इंद्रप्रस्थास आला ( म. स. २४; भा. १०.७३ पद्म. उ. २५२ ). पण, हें सर्व कृत्य दिग्विजयाच्या आधीं केलें, असें भारतांत दिलें आहे, तर भागवतांत सर्वांचा दिग्विजय झाल्यावर जरासंध अजित राहिला, म्हणून ही स्वारी केली असा उल्लेख आहे. ( भा. १०. ७२-७३ ). यास बार्हद्रथि असेंहि म्हणतात.

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**जरितारि**—मंदपाल ऋषीला शार्ङ्गी जरितेपासून झालेला पुत्र ( म. आ. २५८. १; अनु. ५३. २२ कुं. ).

**जरितृ शार्ङ्ग**—मंत्रद्रष्टा ( ऋ. १०. १४२. १; २ ).

२ मंदपाल ऋषीची ही स्त्री. शार्ङ्ग ही एक पक्ष्याची जात आहे. मंदपालापासून हिला चार मुलें झालीं. त्यांचीं नांवें जरितारि, सारिसृक्क, द्रोण व स्तम्बमित्र अशीं आहेत (म.आ.२५५ कुं. ).

हींच नांवें वरील सूक्तांतील क्रमानें दोन दोन ऋचांच्या द्रष्ट्यांची आहेत. त्या मुलांना मंदपालानें हांकलून दिल्यानंतर तीं दावाग्नींत सांपडलीं. पण वरील सूक्तांतील दोन दोन मंत्रांनीं अग्नीची प्रार्थना केल्यानें तीं दावाग्नींतून सुटलीं. सायणांनीं या कथेचा अनुक्रमणीच्या आधारानें संबंध जोडिला आहे. महाभारत व अनुक्रमणी यांमध्यें पहिल्या मुलाच्या नांवांत मतभेद आहे. महाभारतांत जरितारि असें नांव दिलें असून अनुक्रमणी व बृहद्देवता यांनीं जरितृ हें पहिल्या मुलाचें नांव सांगून मातेचें नांव दिलेलें नाहीं.

**जरूथ**—हा पाण्यांत राहणारा कोणी राक्षस दिसतो ( ऋ. १०. ८०. ३ ). याला वसिष्ठानें प्रज्वलित केलेल्या अग्नीनें ठार केलें ( ऋ. ७. ९. ६ ).

**जर्वर**—सर्पसत्रांतील हा गृहपति म्हणजे यजमान होता ( पं. ब्रा. २५. १३ ).

**जल जातूकर्ण्य**—हा काशी, विदेह व कोसल या लोकांचा किंवा राजांचा पुरोहित होता ( जातूकर्ण्य पहा ).

**जलद**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**जलंधर**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

२ ह्या महागर्विष्ठ व त्रैलोक्यविजयी गृहस्थाला शिवानें अंगुष्ठरेखोत्थ चक्रानें ठार केलें ( शिव. शत. १५. १७ ).

**जलंधरा**—काशिराजाची कन्या व भीमसेनाची भार्या. हिचा पुत्र शर्वत्रात ( म. आ. ६३.७६ कुं. ).

**जलसंध**—अंगिराकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि. याचें नांव जलसंधि असें दिलें आहे.

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. भारतीय युद्धांत भीमानें याला मारिलें (म. भी. ६४. ३३; क. ८८. १९ कुं.).

३ मागध राजा. हा रथवर होता ( म. उ. १६७. २४; आ. २०१. १२ कुं. ). भारतीय युद्धांत हा दुर्योधनाच्या पक्षाचा असून सात्यकीकडून मारिला गेला. हा मोठा शूर व शुचिर्भूत असे ( म. द्रो. ११५. ५३ कुं. ).

**जलसंधि**—( १ जलसंध पहा ).

**जलापा**—ब्रह्मवादिनी. ही मानवी होती ( ब्रह्मांड. २. ३३.१७ ).

**जलाभित**—आलकीबद्दल पाठभेद.

**जलेयु**—( सो. पूरु. ) हा भागवत, विष्णु, वायु व महाभारत यांच्या मतें रौद्राश्वाच्या दहा पुत्रांपैकीं एक होय ( म. आ. ८८.९ कुं. ).

**जल्प**—तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**जव**—दंडकारण्यांतील विरोध राक्षसाचा पिता.

**जविन**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**जवीनर**—( सो. नील. ) हा मत्स्यमतें भद्राश्वपुत्र. यासच भागवतांत यवीनर, वायूंत यवीयान व विष्णूंत प्रवीर म्हटलें आहे.

**जह्नु**—( सो. ऋक्ष. ) भागवतमतें सत्यहिताचा पुत्र ( जंतु पहा ).

**जह्नवी**—कुशिकाच्या वंशास जह्नवी असें म्हटलें आहे ( जह्नु पहा ).

**जह्नु**—हा विश्वामित्राचा मूळ पुरुष दिसतो. कारण विश्वामित्रानें शुनःशेपाला आपला पुत्र मानिलें व त्याचें नांव देवरात असें ठेविलें. आपल्या मुलांत त्याला वडिलपणाचा मान दिला. त्याला जह्नूचें आधिपत्य दिलें व त्यांचे यज्ञादिकर्मे आणि वेद, यांचाहि अधिकारी बनविलें ( ऐ. ब्रा. ७. १८; आश्व. श्रौ. १२. १४; सां. श्रौ. १५. २७ ). विश्वामित्राला जाह्नव असें पैतृक नांव आढळतें ( पं. ब्रा. २१. १२; विश्वामित्र पहा ). जह्नावी हा शब्द ऋग्वेदांत दोनदां आला आहे ( ऋ. १. ११६. १९; ३. ५८. ६ ). त्याचा अर्थ जह्नूची स्त्री किंवा सायणाचार्यांच्या मताप्रमाणें जह्नूचा वंश असा असावा. जन्हू नांवानें प्रसिद्ध असलेल्या घराण्याला भरत हें नांव असावें. याला विश्वामित्र नांवाचा पुत्र होता ( पं. ब्रा. २१. १२. २ ).

२ ( सो. अमा. ) अजमीढाला केशिनीपासून झालेला पुत्र ( म. आ. १० १.२० कुं. ). भगीरथानें गंगा आणिली, त्या वेळीं हा वाटेंत यज्ञ करीत होता. तो यज्ञ गंगेच्या प्रवाहामुळें जलमय झाला, तेव्हां यानें गंगा पिऊन टाकली. पण जेव्हां भगीरथानें प्रार्थना केली, तेव्हां यानें गंगा कानावाटें सोडून दिली. म्हणून गंगेला जाह्नवी असें नांव पडलें ( वा. रा. बा. ४३; वायु. २. ३० ). याच्या मुलाचें नांव पूरु. अजमीढ किंवा अज असेंहि म्हणत असत ( म. शां. ४९ ). या जह्नूचा आश्रम अद्यापि दाखवितात.

३ मिथिलाचा पुत्र. याच्या पुत्राचें नांव सिंधुद्वीप ( म. अनु. ७. २ कुं. ).

४ ( सो. ऋक्ष. ) हा भागवत, विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें कुरुपासून झालेल्या पांच पुत्रांतील तिसरा. याचा पुत्र सुरथ. येथपासून कुरुवंश म्हणूनच संबोधिला जातो.

५ ( सो. अमा. ) हा भागवतमतें होत्रकपुत्र, विष्णु व वायु यांच्या मतें सुहोत्रपुत्र. येथून कान्यकुब्ज घराणें सुरू झालें.

६ तामस मन्वंतरांतील एक ऋषि.

**जह्नुपुत्र**—(सो.) भविष्यमतें हा कुरूचा पुत्र. यानें १२००० वर्षे राज्य केलें.

**जाजलि**—एक ऋषि. यास आपल्या तपाचा गर्व झाला होता. तो तुलाधार नामक एका धर्मात्म्या वैश्याशीं याचा संवाद होतांच नष्ट झाला. याला पश्चिमसमुद्रतीरावर मुक्ति मिळाली ( म. शां. २६१-२६४; भा. ४.३१.२ ).

२ व्यासाच्या अथर्वन्‌शिष्यपरंपरेंतील विष्णु, वायु, ब्रह्मांड व भागवत यांच्या मतें पथ्याचा शिष्य.

३ भास्करसंहितेंतील वेदांगसारतंत्राचा कर्ता ( ब्रह्मवै. २. १६ ).

४ ऋग्वेदी श्रुतर्षि.

**जाटासुरि**—जटासुराचा पुत्र अलंबुष.

**जाटिकायन**—शांत्युदक करितांना कोणता मंत्र वापरावा, याविषयीं याचें मत आलें आहे ( कौ. ९.१० ).

**जात शाकायन्य**—याचा कर्मांतील एका विशिष्ट संप्रदायाचा प्रवर्तक म्हणून उल्लेख आहे ( क. सं. २२.७ ). हा शंख कौष्याशीं समकालीन होता.

**जातूकर्ण**—(६ जातूकर्ण्य पहा).

**जातूकर्ण्य**—हें बऱ्याच लोकांचें पैतृक नांव आहे. हा आसुरायण व यास्क यांचा शिष्य आहे. याचा शिष्य पाराशर्य ( बृ. उ. २. ६. ३; ४. ७. ३ ). हा कात्यायनीचा पुत्र आहे ( सां. आ. ८. १० ). अलीकयु वाचस्पत्य व इतर ऋषि यांचा हा समकालीन होता. इतरहि बऱ्याच ठिकाणीं याचा उल्लेख आहे (ऐ. आ. ५. ३. ३; सां. श्रौ. १. २. १७; ३. १६. १४; २० .१९; १६. २९. ६; का. श्रौ. ४.१.२७; २०.३.१७; २५.७.३४; सां. ब्रा. २६.५). हा संधिनियमांविषयीं विचार करणारा एक आचार्य आहे (शु. प्रा. ४.१२३; १५८; ५.२२). सांख्यायन श्रौतसूत्रांत जल जातूकर्ण असें म्हटलें आहे.

विश्वरूपानें वृद्धयाज्ञवल्क्यांतील घेतलेल्या एका उताऱ्यांत जातूकर्ण्याचा धर्मशास्त्रकार म्हणून उल्लेख केला आहे. स्मृतिचंद्रिकेंत आलेल्या अंगिरसस्मृतींतील एका उताऱ्यांत जातूकर्ण्य हा उपस्मृतिकार होता म्हणून म्हटलें आहे. त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांचीं कर्तव्यें, परजातींतील स्त्रीशीं लग्न करण्याचा प्रतिबंध, श्राद्धकाल वगैरेसंबंधीं माहिती विश्वरूपानें जातूकर्ण्याच्या सूत्रांमधून बरेच वेळां घेतली आहे. जातूकर्ण्यानें आचार व श्राद्ध यांवर बरींच प्राचीन अशीं सूत्रें लिहिलीं, असें दिसून येतें. बारा राशींतील कन्या राशीसंबंधाचा जातूकर्ण्याचा एक श्लोक अपरार्कानें उल्लेखिला आहे. यावरून जातूकर्ण्य इ. स. २००-४०० च्या दरम्यान होऊन गेला असावा असें दिसतें. श्रौतसूत्रांतहि याचे आधार घेतले आहेत ( का. श्रौ. ४.१.२७; २०. ३.१७; २५.७.३५; सां. श्रौ. १.२.१७; ३.१४; २०.१९; १६.२९.६ ). हलायुध व हेमाद्रि यांमध्यें याचे आधार घेतले आहेत.

२ ( सू. दिष्ट. ) हा भागवतमतें देवदत्तपुत्र होय.

३ ( सू. नरि. ) अग्निवेश्याचें नांव ( भा. ९. २. २१ ). एक ऋषि ( म. स. ४.२० कुं. ).

४ व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील शाकल्यमुनीचा शिष्य. यानें शाकलसंहितेचें अध्ययन केलें (व्यास पहा ).

५ वसिष्ठगोत्री प्रवर.

६ एक व्यास ( व्यास पहा ). जातूकर्ण असा पाठ आहे. हा जरदुष्ट्राला भेटण्याकरितां इराणांत गेला होता ( दसतिर. १३.१६३ ).

७ ब्रह्मांडपुराणाच्या परंपरेंतील एक आचार्य.

**जातूष्ठिर**—याला इंद्रानें साहाय्य केलें (ऋ.२.१३.११).

**जान**—वृशाचें पैतृक नांव.

**जानकि**—हें ऋतुजिताचें ( तै. सं. २. ३. ८. १; क. सं. ११. १ ) व अयस्थूणाचें ( बृ. उ. ६. ३. १० ) पैतृक नांव आहे. उपनिषदांत याला चूल भागवित्तीचा शिष्य व सत्यकाम जाबालाचा गुरु असें म्हटलें आहे. वरील सर्व स्थलीं उल्लेखिलेला जानकि एकच किंवा अनेक हें सांगतां येत नाहीं.

२ विश्वंतराच्या सोमयागांत श्यापर्णांचा प्रवेश झाल्यावर विशिष्ट पद्धतीची एक सोमाची परंपरा सांगण्यांत आली. तीमध्यें कतुविदानें जानकीला ती परंपरा सांगितल्याचा निर्देश आहे ( ऐ. ब्रा. ७. ३४ ).

३ हा स्वर्गांत राहणाऱ्या चंद्रविनाशन दैत्याचा अंशावतार. दुर्योधनपक्षीय क्षत्रिय राजा ( म. आ. ६८. ३९ कुं. ).

**जानंतपि**—अत्यरातीचें पैतृक नांव.

**जानपदी**—जालपदी किंवा जालवतीचें नामांतर.

**जानश्रुति**—हें पौत्रायणाचें पैतृक नांव आहे ( छां. उ. ४.१.१; २.१ ). या उदार गृहस्थानें सर्वत्र अन्नछत्रें घातलीं ( रैक्व पहा ).

**जानश्रुतेय**—हें अनेकांचें मातृक अगर पैतृक नांव आहे. हें उपावि नामक ऋषीचें मातृक नांव आहे ( ऐ. ब्रा. १.२५ ). येथें उपसद नांवाच्या कर्मासंबंधीं हवि सांगतांना दुसऱ्या एका ब्राह्मणग्रंथांतील उतारा आला आहे. त्यांत श्रोत्रिय ब्राह्मणाची प्रशंसा केली आहे. शतपथांत औपावि याचें हें पैतृक नांव दिलें आहे. येथें त्यानें वाजपेयानंतर बृहस्पतिसव केल्याचा उल्लेख आहे ( श. ब्रा. ५.१.५ ). दुसरीकडे उलुक्य, नगरिन् व सायक यांचें हें पैतृक नांव आहे ( जै. उ. ब्रा. १. ६. ३; ३. ४०. २ ).

**जानुजंघ**—एक क्षत्रिय ( म. आ. १. २९१ कुं.; अनु. २७१. ५९ कुं. ).

२ तामस मन्वंतरांतील मनुपुत्र.

**जांदकार**—साहाय्य करणारा असा याचा अर्थ आहे. हा नेहमीं यमाचें कार्य करणारा असून सूर्याच्या समीप असलेल्या अठरा विनायकांपैकीं एक आहे ( सांब. १६ ).

**जाबाल**—महाशाल व सत्यकाम यांचें हें मातृक नांव आहे. हा गृहपति असलेल्या सत्राचा निर्देश आहे ( सां. ब्रा. २३.५).

२ भृगुकुलांतील गोत्रकार.

३ विश्वामित्राचा एक पुत्र.

४ विश्वामित्रकुलांतील गोत्रकार व एक ऋषिगण.

५ व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य ( व्यास पहा).

६ भास्करसंहितेंतील तंत्रसारतंत्राचा कर्ता ( ब्रह्मवै. २. १६ ).

**जाबालायन**—माध्यंदिनायनाचा शिष्य. याचा शिष्य उद्दालकायन ( बृ. उ. ४. ६. २ ).

**जाबालि**—विश्वामित्र ऋषीचा पुत्र.

२ दशरथाचा एक मंत्री. यानें रामाला पित्राज्ञा मोडून अयोध्येस येण्यास सांगितलें. पण रामानें याचा निषेध केला. रामाच्या सभेंतील एक धर्मशास्त्री. हा रामाच्या लग्नाकरितां हजर होता ( वा. रा. बा. ६९ ).

३ एक ऋषि. शिवाय जाबाल व त्याचे वंशजांस हें नांव आहे. हा मंदर पर्वतावर तपश्चर्या करीत असून याचे लक्षावधि शिष्य होते. यानें निपुत्रिक राजा ऋतंभर याला पुत्रप्राप्तीकरितां विष्णुसेवा, गोसेवा व शिवसेवा करण्यास सांगितलें. हा एके दिवशीं अरण्यांत गेला असतां एका तळ्याच्या कांठीं एक सुंदर व तरुण अशी तापसी तपश्चर्या करीत असलेली याच्या दृष्टीस पडली. तेव्हां ती कोण आहे, हें समजण्याकरितां शंभर वर्षें हा तेथें थांबला व तिची समाधि उतरल्यावर जाबालीनें तिची हकीकत तिला विचारली. नंतर तिच्यापासून श्रीकृष्णाच्या उपासनेचें रहस्य समजून घेऊन हा कृष्णाची आराधना करूं लागल्यावर गोकुळांतील प्रचंड नामक गोपाच्या घरीं चित्रगंधा नामक गोपीच्या जन्मास गेला ( पद्म. पा. ३०. ७२;१०९ ).

४ हा ऋषि एकदां घोर तपश्चर्या करीत असतां इंद्रानें रंभेला याच्याकडे पाठविलें. तिनें यास मोहित केलें असतां, याच्यापासून तिला एक मुलगी झाली. पुढें त्या मुलीला चित्रांगद राजानें पळवून नेलें. तेव्हां ऋषीनें त्यास ' तूं कुष्ठी होशील ' असा शाप दिला ( स्कंद. ६. १४३–१४४ ).

५ भृगुकुलोत्पन्न एक ऋषि ( भृगु पहा ). जाबालीनें एक स्मृति केलेली आहे. हेमाद्रि व हलायुध यांनीं याचे आधार घेतले आहेत.

**जामघ**—( सो. ) भविष्यमतें हा पारावतसुताचा पुत्र.

**जामदग्निय**—तैत्तिरियसंहितेंत जमदग्नीच्या दोन वंशजांचें म्हणून हें नांव आलें आहे ( जमदग्नि पहा ). और्व लोकांना जामदग्निय म्हटलें आहे ( पं. ब्रा. २१. १०. ६ ).

**जामदग्न्य**—जमदग्निपुत्र परशुरामाचें नांव.

२ सावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

**जामित्र**—तुषित देवांतील एक.

**जामिन्**—( यामि पहा ).

**जांबवत्**—प्रजापति व रक्षा यांचा पुत्र. याची स्त्री व्याघ्री. याची कन्या जांबवती ( ब्रह्मांड. ३. ७. ३०१ ). ब्रह्मदेवाच्या जांभयीपासून उत्पन्न झालेला ऋक्ष ( वा. रा. बा. १७ ). याला जांबवन्त असेंहि म्हणतात ( पद्म. पा. ११ ). हा ऋक्षांचा राजा होता ( वा. रा. यु. ३७ ). रामावतारीं यानें रामाला सीताशुद्ध्यर्थ पुष्कळ साहाय्य केलें ( वा. रा. यु. ७४). रावणवधानंतर रामाचा जय झाल्यावर तो जांबवानानें नगारे वाजवून लोकांस कळविला ( पद्म उ. १५० ). राम अयोध्येंत गेल्यावर त्याच्या राज्याभिषेकाकरितां यानें समुद्राचें पाणी आणिलें होतें ( वा. रा. यु. १२८ ). तसेंच राजसूय यज्ञाच्या वेळीं अश्वरक्षणार्थ शत्रुघ्नाबरोबर हा गेला होता ( पद्म. पा. ११ ). पुढें कृष्णावतारीं स्यमंतकमण्याबद्दल याचें कृष्णाशीं अठ्ठावीस दिवस युद्ध झालें. शेवटीं तो रामावतार आहे असें ओळखून यानें कृष्णाची स्तुति केली व स्यमंतकमण्यासहित आपली कन्या जांबवती त्यास दिली ( भा. १०. ५६. ३२; पद्म. सृ. १३ ). यानें दशांग पर्वतीं शंकर लिंगाची स्थापना केली म्हणून त्या लिंगास जांबवंत असें नांव पडलें ( पद्म. उ. १५ ).

**जांबवती**—ऋक्षराज जांबवत् याची कन्या व श्रीकृष्णाच्या अष्टनायिकांतील एक. हिला सांब, सुमित्र, पुरुजित्, शतजित्, सहस्रजित्, विजय, चित्रकेतु, वसुमत्, द्रविड आणि क्रतु हे पुत्र व एक कन्या होती ( म. स. ५७.२३ कुं; भा. १०. ५६. ३२; ६१. १२; विष्णु. ४. १३ ). शेवटीं हिनें अग्निप्रवेश केला ( म. मौ. ८. ७४ कुं. ).

**जायंत**—जयंतीचे ठिकाणीं ऋषभदेवास झालेल्या शतपुत्रांना संज्ञा.

**जायंतीपुत्र**—हा आलंबीपुत्राचा गुरु व मांडूकायनीपुत्राचा शिष्य ( बृ. उ. ६. ५. २ ).

**जायंतेय**—जायंत व हा एकच.

**जायद्रथ**—जयद्रथपुत्र सुरथाचें नामांतर.

**जार**—( वृष पहा ).

**जारत्कारव**—आर्तभागाचें पैतृक नांव.

**जारासंधि**—जरासंधपुत्र सहदेवाचें नामांतर.

**जार्ति**—तंतीबद्दल पाठभेद.

**जालधि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**जालपदी**—जानवतीचें नामांतर.

**जालंधर**—एकदां इंद्र शिवदर्शनासाठीं कैलासीं आला असतां, त्यानें एक भयंकर पुरुष पाहिला. तेव्हां त्यानें त्या पुरुषास ' तूं कोण? ' असें विचारूनहि त्यानें उत्तर दिलें नाहीं. तेव्हां इंद्रानें क्रोधानें त्यावर आपल्या वज्राचा प्रहार केला. तो प्रहार होतांच त्या पुरुषाचा कंठ निळा झाला व वज्र जळून गेलें. व त्या पुरुषाच्या–तो शिवच होता–तृतीय नेत्रांतून अग्नि बाहेर पडूं लागला. तें पाहून बृहस्पतीनें इंद्रास पुढें करून शंकराची स्तुति केली. नंतर इंद्राच्या सांगण्यावरून शंकरानें तो अग्नि समुद्रांत टाकून दिला. परंतु तो समुद्राजवळ पडून बालरूपानें रडूं लागला. ह्याचेंच नांव ब्रह्मदेवानें जालंधर असें ठेविलें. हा शास्त्रवेत्ता होऊन शंकराशिवाय कोणाकडूनहि मारिला जाणार नाहीं, असा यास वर दिला, व शेवटीं जेथून आला तेथें परत जाईल म्हणून सांगितलें (स्कंद. २. ४. १४; पद्म. उ. ९६-१०४ ). रुद्रनेत्रोत्थ वह्नीमुळें समुद्रांतून जालंधर उत्पन्न झाला ( शिव. रुद्र. यु. १४ ).

जालंधराच्या उत्पत्तीसंबंधीं आणखी एक कथा आढळते. स्वर्गंदी गंगा व समुद्र यांपासून जालंधर उत्पन्न झाला. जन्मतांच यानें त्रैलोक्यभेदी रोदन केलें. ब्रह्मदेवानें याला अजिंक्य व पातालासह हा स्वर्गाचें राज्य करील, असा वर दिला. समुद्रानें जालंधर देश निर्माण करून तो याला तेथें वस्ती करण्यासाठीं दिला व तेथें मयासुरानें त्याला एक नगरी बांधून दिली. याचा विद्याभ्यास शुक्राचार्यांचे हाताखालीं झाला व त्याचे जवळूनच याला संजीवनी विद्या प्राप्त झाली. पुढें याचा वृंदेशीं विवाह झाला ( पद्म. उ. ३. १८ ). जालंधर शुक्राचार्यांच्या साहाय्यानें पृथ्वीचें पालन करूं लागला.

एकदां जालंधरानें राहूकडे पाहून त्याच्या शिरच्छेदाचें कारण शुक्राचार्यांस विचारिलें. शुक्राचार्यांनें याला समुद्रमंथनापासून दैत्यपराभवापर्यंतच्या सर्व गोष्टी निवेदन केल्या. जालंधरास हें ऐकून वाईट वाटलें. याला देवांचा क्रोध येऊन यानें इंद्राशीं युद्ध केलें व देवांस जिंकिलें आणि स्वतः इंद्रासनावर आरूढ झाला. नंतर जालंधराच्या भीतीनें देवांनीं विष्णूची स्तुति केली. तेव्हां विष्णु गरुडावर बसून जालंधराशीं युद्ध करण्यास निघाला. परंतु जातांना लक्ष्मीनें माझ्या भावास मारूं नये म्हणून त्याला विनविलें. दोघांचें युद्ध झालें, त्यांत याचें अतुल सामर्थ्य पाहून विष्णु संतुष्ट झाला व त्यानें यास वर मागण्यास सांगितलें. जालंधरानें विष्णूजवळ आपण आपल्या देवादिगणांसह माझे घरीं येऊन राहावें, असा वर मागितला. विष्णूनें ' ठीक आहे ' असें म्हणून तो देवांसह जालंधराच्या नगरांत आला. पुढें जालंधरानें ब्रह्मांडावर आपली सत्ता स्थापन केली व त्रिभुवनाचा हा राजा झाला. याच्या राज्यांत अधर्म कोठेंहि नव्हता.

एकदां नारद जालंधराच्या राज्याचा थाट पाहण्यासाठीं व लक्ष्मीनारायणाची सेवा घडावी म्हणून तेथें आला व त्यानें जालंधराजवळ पार्वतीच्या सौंदर्याची सहज वाखाणणी केली. त्यामुळें हा मोहित होऊन यानें पार्वतीला आणण्यासाठीं म्हणून राहूला दूत पाठविला. राहूकडून निरोप कळतांच शंकर क्रुद्ध होऊन त्यानें आपल्या तृतीय नेत्रापासून एक पुरुष निर्माण केला व त्याकडून राहूचा पराभव करविला. नंतर राहूकडून ही हकीकत समजतांच जालंधर अनेक कोटी दैत्यसेनेसह युद्धासाठीं बाहेर पडला. देवांच्या बाजूनें शंकर, नंदी, गणपती, कार्तिकस्वामी, वीरभद्र इत्यादि मंडळी व दैत्यांच्या बाजूनें जालंधर, शुंभ, निशुंभ, कालनेमि वगैरे यांचेमध्यें घनघोर संग्राम झाला. पुढें जालंधरानें शंकर अधिक बलवान् आहे, असें पाहून शंकराला फसविण्यासाठीं गांधर्वी माया उत्पन्न केली. व शंकर मोहित होतांच आपण शंकराचें रूप घेऊन पार्वतीकडे आला. तिला पाहून हा मोहित झाला. पार्वतीला हा राक्षस आहे, असें समजतांच ती तेथें गुप्त होऊन विष्णूजवळ आली व त्याला तिनें ही हकीकत सांगितली. तेव्हां जशास तसें या नात्यानें तो जालंधराचा वेष घेऊन वृंदेजवळ आला. जालंधरपत्नी वृंदा अत्यंत कडकडीत पतिव्रता असल्यामुळें जालंधराचा पराभव होत नव्हता. तेव्हां विष्णूनें शंकराचे सांगण्यावरून जालंधराचें रूप घेऊन तिच्या पातिव्रत्याचें हरण केलें. कांहीं काळानें हा आपला पति नसून विष्णु आहे असें कळतांच तिनें त्यास शाप दिला कीं, तूं जे मायेनें मला द्वारपाल दाखविलेस तेच पुढें राक्षस होऊन तुझ्या भार्येचें हरण करतील व तूं दुःखानें पीडित होऊन शेषासह भ्रमण करशील ( आ. रा. सा. ४; शिव. रुद्र. यु. २३ ). असें सांगून विष्णु तिचें निवारण करीत असतांहि वृंदेनें अग्नींत प्रवेश केला.

प्रथमतः विष्णूनें शेषाला बरोबर घेतलें. दोघांनीं आपला वेष पालटून जटावल्कलें धारण. केलीं व जालंधर देशापासून जवळच मायेनें सुंदर आश्रम निर्माण केला. नंतर मायेनें वृंदेच्या मनांत पतिदर्शनाची उत्कंठा उत्पन्न केली व तशा स्थितींत तिचा डोळा लागला. झोंपेंत तिला भयंकर स्वप्न पडलें. त्यांत तिनें आपल्या पतीचा नाश झालेला पाहिला. जागृति येतांच ती सखीसह रथांतून रणांगणावर पतिदर्शनासाठीं निघाली. वाटेंत ती घोर अरण्यांत शिरतांच तापस वेषधारी विष्णूनें एक राक्षस उत्पन्न करून तो या दोघींना धरावयास पाठविला. त्याला भिऊन वृंदेनें विष्णूच्या गळ्यांत मिठी मारिली. त्यानें सांगितलें कीं, या आलिंगनामुळें तुझ्या पतीच्या शिराला सर्व

अवयव उत्पन्न होतील. तत्क्षणीं जालंधराचें शिर दिसूं लागलें. तें शिर हातांत धरितांच त्याला अवयव फुटून सर्वांगपरिपूर्ण जालंधर बनला व वृंदेशीं त्यानें क्रीडा केली. परंतु पुढें लवकरच तिला विष्णूची ओळख पटली. विष्णूनें केलेल्या कपटाबद्दल तिनें त्याला शाप दिला कीं, तुझीहि स्त्री अशीच हरण केली जाईल. पुढें तिनें तप करून आत्मज्ञान मिळविलें. नंतर ती मरण पावली. तिच्या देहास स्मर नामक दूतीनें अग्नि दिला व तिचें भस्म गंगेंत टाकिलें. वृंदेनें जेथें तपश्चर्या केली, त्यास वृंदावन म्हणतात (पद्म. उ. १५). इकडे जालंधरानें मायेनें पार्वती निर्माण करून शंकरापुढें आणिली व तिला निशुंभादिक दैत्य मारीत असल्याचें दाखविलें. शंकर गडबडलेला पाहून जालंधरानें त्याजवर अनेक बाण टाकिले. परंतु विष्णूनें केलेल्या सूचनेवरून त्यानें त्याची माया ओळखून आपलें रौद्र रूप धारण केलें आणि जालंधरावर सुदर्शन चक्र फेंकून याचें शिर उडविलें. तेव्हां याच्यांतील तेज निघून तें शिवतेजांत विलीन झालें (स्कंद. २.४.१४-२२).

**जालमती**—म्लेच्छ राजा बादल, याची कन्या व यशोनंदी नामक राजाची स्त्री. हिला विख्यात व नागपूजनामध्यें तत्पर असा बाह्लिक नांवाचा पुत्र झाला (भवि. प्रति. ४.२३).

**जालवती**—देवकन्या. हिला पाहतांच शरद्वताचें रेत स्खलित होऊन त्यापासून कृप व कृपी झाली (म. आ. १४० ६ कुं.).

**जाहुष**—याचें राज्य गेलें होतें. तें अश्वींच्या कृपेनें याला पुनः मिळालें. पक्थांचा राजा तूर्वयाण याच्या विरुद्ध असलेल्या च्यवनाबरोबर याचा उल्लेख आहे (ऋ. ७.७१.५).

**जाह्नव**—विश्वामित्राचें पैतृक नांव (पं. ब्रा. ११. १२; विश्वामित्र व जह्नु पहा).

**जिगीषु**—पृथुक देवांतील एक.

**जित्**—स्वायंभुव मन्वंतरामध्यें देवांना याम असें म्हणत. त्यांपैकीं एक प्रकार.

**जित**—(सो. यदु.) हा वायुमतें यदुपुत्रांपैकीं एक.

**जितकाम**—मधुवनांतील शाकुनि नामक ऋषीचा पुत्र. हा अत्यंत विरक्त असून संन्यासवृत्तीनें राहत असे (पद्म. स्व. ३१).

**जितवती**—उशीनराची एक कन्या व द्यू नामक वसूची भार्या.

**जितव्रत**—(स्वा. उत्तान.) भागवतमतें हा हविर्धानपुत्र. याची माता हविर्धानी.

**जितशत्रु**—एक क्षत्रिय (म. स. ११. २४ कुं.).

**जिताजित्**—स्वायंभुव मन्वंतरांतील या नांवाच्या देवांचा एक प्रकार.

**जितारि**—(सो.) अविक्षिताचा पुत्र (म. आ. १४१. ४१ कुं.).

**जित्वन् शैलिनि**—हा शिलीन ऋषीचा पुत्र. याचा भाऊ जिन. एका ठिकाणीं याचें शैलिन् असें नांव आलें आहे (बृ. उ. ४. १. ५; माध्य.) पण काण्वप्रतींत शैलिनी असें नांव आहे (४. १. २). जनक व याज्ञवल्क्य यांचा हा समकालीन होता. हा वाग्देवतेला ब्रह्म समजत असे.

**जिन**—(जित्वन् पहा).

२ बौद्ध मताचा पुरस्कार करणारा (बर्बरिक, अर्हत, ऋषभ व बृहस्पति पहा).

**जिष्णु**—विष्णु, इंद्र व अर्जुन यांस नांव (भा. १०. ७५. ५; म. वि. ४३. २१-३६ कुं.).

२ भौत्य मन्वंतरांतील मनूचा पुत्र.

३ पांडवपक्षीय एक राजा. यास कर्णानें वधिलें (म. क. ५६).

**जिष्णुकर्मन्**—पांडवपक्षीय एक राजा. यास कर्णानें मारिलें (म. क. ५६).

**जिह्वक**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**जिह्वावत् बाध्योग**—असित वार्षगणाचा शिष्य. याचा शिष्य वाजश्रवस् (बृ. उ. ६. ५. ३).

**जीमूत**—(सो. यदु.) हा भागवत, विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें व्योमपुत्र होय.

२ एक मल्ल. याला विराटगृहीं भीमानें मारिलें (म. वि. १५. ५३ कुं.).

३ एक विप्रर्षि. हा उशीरबीज नामक क्षेत्रामध्यें राहत असे (म. उ. १११. २३ कुं.).

४ (सो. यदु.) भीमाचा पुत्र (पद्म. सृ. १३).

५ (सो.) भविष्यमतें वियामुनाचा पुत्र.

**जीमूतवाहन**—हा पूर्वजन्मीं मध्य देशचा शूरसेन नांवाचा क्षत्रिय होता. यानें शंखचूडास जीवदान दिलें (भवि. प्रति. ३. १५).

**जीवनाश्व**—अंगिराकुलांतील गोत्रकार. याच्याबद्दल युवनाश्व असा पाठभेद आढळतो.

**जीवंति**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**जीवंती**—परशु नामक वैश्याची स्त्री. हिचा पति तरुणपणीं मरण पावल्यामुळें हिचें मन विषयाकडे वळून ही जारांच्या नादीं लागली व पित्यास न जुमानतां उघड उघड वेश्या बनली. पुढें एका पारध्याजवळचा एक पोपट हिनें विकत घेतला व ही त्याचे अत्यंत लाड करूं लागली. कांहीं काळानें त्या

पैपटास ' राम ' हीं दोन अक्षरें येऊं लागलीं. त्या ' राम ' नामोच्चारानें त्या पैपटाचें व या वेश्येचें पातक नाहींसें झालें. पुढें ही दोघेंहि मरण पावल्यावर विष्णुलोकीं गेलीं ( पद्म. क्रि. १५ ).

**जीवल**—अयोध्यापति ऋतुपर्ण राजाचा अश्वपाल. नल अज्ञातवासांत असतां हा त्याच्याबद्दल सहानुभूति दाखवीत असे ( म. व. ६७ ).

**जीवल चैलकि**—यानें अग्निहोत्र होमाची माहिती सांगितली आहे ( श. ब्रा. २.३.१.३१-३५).

**जुग्र**—न्यूह म्लेच्छाचा कनिष्ठ पुत्र याकूत त्याचा हा पुत्र (भवि. प्रति. १.५).

**जुहू**—बृहस्पतीची स्त्री ( ऋ. १०. १०९ ). ब्रह्मदेवाची स्त्री ( सर्वानुक्रमणी पहा ).

**जूज**—न्यूह म्लेच्छाच्या वंशांतील चरऊ राजाचा पुत्र. यानें २३७ वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. १.२५ ).

**जूति**—वातरशनाचा पुत्र. एका ऋचेचा कर्ता ( ऋ. १०.१३६.१).

**जृंभक**—एक यक्ष. हा धर्मारण्यांतील ऋषींना त्रास देत असे ( स्कंद. ३.२.९ ).

**जेतृ**—अमिताभ देवांपैकीं एक.

**जेतृ माधुच्छंदस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १.११ ).

**जैगीषव्य**—एक ऋषि ( म. स. ११. २४; अनु. ४९. ३७ कुं. ). याच्या स्त्रिया पर्णा ( मत्स्य.१७९ ) हिमवानाची कन्या एकपाटला ( ह. वं. १. १८ ) व योगवती आढळतात ( पद्म. सृ. ९ ). याच्या शिष्याचें नांव असित देवल असें होतें. त्याला यानें आपल्या तपाचें अद्‌भुत तेज व त्याच्या लीला दाखविल्या. याच्या अंगीं ब्रह्मलोकगमनाचें सामर्थ्य होतें ( म. श. ५० ). तसेंच असिताबरोबर झालेला याचा संवाद प्रसिद्धच आहे ( म. शां. २३६ कुं. ). अश्वशिरस् राजाच्या दरबारांत कपिलानें विष्णूचें व यानें गरुडाचें रूप घेतलें होतें (वराह. ४).

२ दुसरा एक ऋषि (दे. भा. ९. ४). याला शिकविण्याकरितां ब्रह्मदत्तपुत्र विष्वक्सेन यानें योगशास्त्रावर ग्रंथ लिहिला ( भा.९.२१.२६ ).

३ कृतयुगांतील शतकलाक नामक ऋषीचा पुत्र. यानें प्रभास क्षेत्रांत घोर तपश्चर्या केली. पूर्वकल्पांत महोदय नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या लिंगाची यानें स्थापना केली व शिव प्रसन्न झाल्यावर यानें ' ज्ञानयोग मला द्या, ' असा वर त्याजवळ मागितला. यानें स्थापिलेल्या लिंगाला हल्लीं सिद्धेश्वर म्हणतात ( स्कंद. ७.१.१४).

दुसऱ्या ठिकाणीं अशी हकीकत सांपडते कीं, हा ऋषि शिवदर्शन झाल्याशिवाय तोंडांत पाणीसुद्धां घालणार नाहीं, असा हट्ट धरून बसला होता. हा प्रकार शंकराला समजून तो पार्वतीसह आला व त्यानें याजकडून शिवलिंग स्थापवून याच्या इच्छा पूर्ण केल्या (स्कंद. ४.२.६३).

४ वाराहकल्पांत वैवस्वत मन्वंतरांतील हा शंकराचा अवतार होईल. हा काशीमध्यें दिव्यप्रदेशीं दर्भासनावर बसणारा असून महायोगी असेल. तेथें याला सारस्वत, योगीश, मेघवाह व सुवाहन असे चार पुत्र होतील ( शिव. शत. ४ ).

**जैत्यद्रौणि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**जैत्र**—कृष्णाचा एक सेवक ( भा. १०. ७१. १२ ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. याला भीमानें मारिलें (म. श. २५. १२-१३ कुं.).

**जैत्रायण सहोजित**—राजसूययज्ञ करणाऱ्या एका राजाचें हें नांव असावें (क. सं. १८.५). पण कपिष्ठलसंहितेंत विशेषनाम नसावें ( कपि. सं. २८.५). येथें इंद्राचें वर्णन चाललें आहे.

**जैमिनि**—हा कौत्सकुलोत्पन्न असून युधिष्ठिराच्या यज्ञांत ऋत्विज होता ( भा. १०. ७४. ८ ). पुढें युधिष्ठिरानें मयसभेंत प्रवेश केल्यावर मोठा समारंभ केला. त्या वेळीं हा तेथें असल्याचा उल्लेख आहे ( म. स. ४ ). तसेंच भीष्म शरपंजरीं पडला असतां हा इतर मुनिगणांसमवेत तेथें होता ( म. शां. ४७ ). पुढें जनमेजयाच्या सर्पसत्रांत हा उद्गाता होता ( म. अ. ५३ ).

कृष्ण द्वैपायन व्यासाचा सामवेदाचा शिष्य ( म. आ. ६३; व्यास पहा ).

जैमिनीनें आपली शिष्यपरंपरा कशी वाढविली, हें पुढील आधार पाहिले असतां त्यांवरून समजून येईल. त्याची एकवाक्यता नसल्यामुळें ती माहिती येथें दिली नाहीं ( विष्णु. ३. ६. २; अग्नि. १५०. २८-२९; ब्रह्मांड. १. १३; २. ३५. ३१; वायु. १.६१. २७; व्यास पहा ).

अशी एक समजूत आहे कीं, जैमिनीच्या भारतांत पांडवांचा असावा तसा गौरव नव्हता, म्हणून अश्वमेधाखेरीज भाग व्यासाच्या आज्ञेनें जैमिनीनें नष्ट केला.

जैमिनिअश्वमेध हें एक महापुराण व उपपुराण यांबाहेरील पुराण आहे. त्यांत भागवताचा पुढीलप्रमाणें उल्लेख आहे.

' भारतं हरिवंशं च पुत्रदं धनदं भवेत् ।
श्रीमद्‌भागवतं पुण्यं भुक्तिमुक्तिफलप्रदम् ॥ '

( जै. अ. ५८.९ ). जैमिनिअश्वमेधाचा काल ख्रि. पू. शंभर तरी धरावाच लागतो ( पुराणनिरीक्षण, पा. ८२ ).

सामवेदाच्या राणायनीय नांवाच्या शाखेंतील जैमिनीय नांवाचा नववा भेद यानें केला. ही संहिता कर्नाटकांत प्रसिद्ध आहे, असें महीदास चरणव्यूहभाष्यांत म्हणतो. त्याचप्रमाणें

जैमिनीयब्राह्मण व जैमिनीयोपनिषद्‌ब्राह्मण हीं सामवेदाचीं ब्राह्मणें यानें केलीं. तीं सध्यां उपलब्ध आहेत.

शिवाय जैमिनिकोशसूत्र, जैमिनिनिघंटु, जैमिनिपुराण, ज्येष्ठमाहात्म्यम्, जैमिनिभागवत, जैमिनिभारत, जैमिनिसूत्र, जैमिनिसूत्रकारिका, जैमिनिस्तोत्र, जैमिनिस्मृति इत्यादि ग्रंथ याच्या नांवावर प्रसिद्ध आहेत ( C. C. ).

हा पूर्वमीमांसासूत्राचा कर्ता असून सुमन्तु, वैशंपायन, पुलस्त्य व पुलह या चार वज्रनिवारकांप्रमाणें हा एक पांचवा वज्रनिवारक होता, असें पुराणांत वचन आहे ( शब्दकल्पद्रुम). याचा पुत्र सुमंतु ( विष्णु. ३. ६. २ ).

१ जैमिनि, २ तलवकार, ३ सात्यमुग्र, ४ राणायनि, ५ दुर्वासस्, ६ भागुरि, ७ गौरुण्डि, ८ गौर्गुलवि, ९ भगवान् औपमन्यव कारडि, १० सावर्णि, ११ गार्ग्य, १२ वार्षगण्य व १३ दैवन्त्य हे आचार्य जैमिनीनें उपाकर्मांगतर्पणांत सांगितले आहेत ( जैमिनिगृह्यसूत्र १. १४ ). हा सामवेदी श्रुतर्षि आहे. ब्रह्मांडपुराण सांगितल्याच्या परंपरेंत याचें नांव आहे.

२ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें लांगलीचा शिष्य ( व्यास पहा ).

**जैवंतायन**—रौहिणायनाचे शिष्य शौनक व रैभ्य यांच्यासह याचा उल्लेख आहे ( बृ. उ. ४. ५. २९; पा. सू. ४. १. १०३ ).

**जैवंत्यायनि**—भृगुकुलांतील गोत्रकार ( भृगु पहा ).

**जैवलि**—हें प्रवाहणाचें पैतृक नांव आहे. जैवलि म्हणून जो राजा आहे, तो हाच असावा. राजा जैवलीचा गल्नुनसाशी सामाविषयीं संवाद झाला आहे ( जै. उ. ब्रा. १. ३८. ४; प्रवाहण पहा ).

**जैह्मप**—गौरपराशरकुलीन एक ऋषि. पाठांतर समय असें आहे.

**जैह्वलायनि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**जौंडिलि**—गोडिनिबद्दल पाठभेद.

**ज्ञाति**—( सो. क्रोष्टु. ) मत्स्यमतें बभ्रूचा पुत्र. यास विष्णुमतें धृति, भागवतमतें कृति व वायुमतें आहृति अशीं नांवें आहेत.

**ज्ञानगम्य**—सोमकांत राजाचा प्रधान ( गणेश. २९ ).

**ज्ञानभद्र**—द्वापारयुगांतील सौराष्ट्र देशांत राहत असलेला एक महायोगी. एकदां दुष्काळ पडला असतां याला व याच्या पत्नीला वीस दिवस उपास पडले. तेव्हां हा एका पर्वतावर गेला व एक कोहळा घेऊन घरीं आला. इतक्यांत मोठा पाऊस पडून भिजलेला एक गोप थंडीनें कुडकुडत याच्या घरीं आला. परंतु यां दोघांनीं तो कोहळा वीस दिवस उपास पडल्यामुळें भुकेलेल्या गोपास दिला. त्यायोगें तो संतुष्ट झाला. पुढें हीं दोघें उपासामुळें एकदम मरण पावलीं. यामुळें दोघांनाहि सायुज्य मुक्ति मिळाली ( पद्म. क्रि. २५ ).

**ज्ञानश्रुति**—गोदावरीच्या कांठच्या प्रतिष्ठान शहराचा पुण्यशील राजा. यास आकाशांतून उडणाऱ्या हंसाकडून समजलें कीं, रैक्व नामक ब्रह्मवेत्ता आपल्यापेक्षां पुण्यवान् आहे. तेव्हां यानें त्या पुण्यशीलाचा शोध करण्यास सारथ्यास सांगितलें. सारथ्यानें त्याचा शोध केल्यावर राजा त्याजकडे मोठा नजराणा घेऊन गेला. पण त्यानें याचा अव्हेर केला. राजानें त्यास ही निरिच्छ वृत्ति कशानें झाली, असें विचारिल्यावर त्यानें हा सर्व गीतेच्या सहाव्या अध्यायाचा महिमा आहे, असें याला सांगितलें ( पद्म. उ. १८०; रैक्व पहा ).

**ज्ञानसंज्ञेय**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**ज्यामघ**—( सो. क्रोष्टु. ) विष्णुमतें परावृत्तपुत्र, मत्स्य व वायु यांच्या मतें रुक्मकवचपुत्र व भागवतमतें रुचक राजाच्या पांच पुत्रांतील कनिष्ठ. यास चैत्रा अथवा शैब्या नांवाची स्त्री होती. तिला संतति नव्हती. तरी तिच्या भीतीनें यास दुसरें लग्न करितां येईना. एकदां हा भोज देशांत राजकन्येचें स्वयंवर चाललें असतां तेथें गेला व पराक्रमानें राजकन्येस यानें जिंकून रथांत घालून आपल्या नगरास आणिलें. पण चैत्रेनें ही कोण असें विचारितां हा भ्याला व तिला म्हणाला, ही तुझी सून आहे. तें बोलणें तिला पुत्र नसल्यामुळें फारच लागलें परंतु पुढें लवकरच चैत्रेला विदर्भ नांवाचा पुत्र झाला. त्याचें ओजेशीं लग्न लावण्यांत आलें ( भा. ९. २३-३५; वायु. २. ३३ ). पण रुक्मेषु व पृथुरुक्म या दोघा बंधूंनीं एकी करून ज्यामघाला राज्यांतून पिटाळून लाविलें. तेव्हां हा अरण्यांत आश्रम करून तेथें शांत चित्तानें राहिला. पण तेथील ब्राह्मणांनीं याची राज्यतृष्णा जागृत करून याला दुसऱ्या नर्मदाकांठच्या प्रदेशावर स्वारी करावयास लाविलें. तेथील राजधानी मृत्तिकावती नांवाची नगरी होती. नंतर ऋक्षवान् पर्वतावर स्वारी करून ती जिंकिला व तेथील शुक्तिमती नामक नगरींत वस्ती केली. पुढें एका दुसऱ्या प्रांतावर स्वारी करून हातीं लागलेली उपदानवी नांवाची कन्या बरोबर घेऊन हा आला. ती तुझ्या मुलाकरितां आणली, अशी यानें बतावणी केली. पण पुत्र नसल्यामुळें ती साधली नाहीं. तथापि, त्या मुलीच्या तपःप्रभावानें शैब्या म्हातारपणींहि गर्भार राहून तिला विदर्भ पुत्र होऊन त्यापासून उपदानवीला क्रथ, कौशिक व लोमपाद असे तीन पुत्र झाले ( ह. वं. १. ३७; ब्रह्म. १४. १०-२०; लिंग. १. ६८. ३२-४१; मत्स्य. ४४. ३२, ब्रह्मांड. ३. ७०. ३३ ). रुक्मकवच हा विष्णुपुराणांत आजा दिला आहे. तथापि रुक्मकवच व रुचक एक असावेत. पद्मपुराणांत ज्यामघ नांवावर प्रायः हीच हकीगत आली आहे ( पद्म. सृ. १३ ).

**ज्यामहानि**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांड-मतें लांगलीचा शिष्य (व्यास पहा).

**ज्यायघ**—(ज्यामघ पहा).

**ज्येष्ठ**—एक ब्रह्मर्षि. ज्येष्ठ सामाचा कर्ता. बर्हिषदापासून सात्वत धर्म वेदपारग ज्येष्ठ ऋषीस मिळाला. याचे साम श्रीहरीला फार आवडतात. याच्यापासून हा धर्म अविकंपन राजास प्राप्त झाला (म. शां. ३४८).

**ज्येष्ठा**—(अलक्ष्मी पहा).

२ सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक.

३ शुक्राची कन्या. द्वादशादित्यांतील वरुणाची स्त्री. हिला बल, अवर्त असे पुत्र व सुरा नांवाची कन्या होती (म. आ. ६७. ५२-५३ कुं.).

**ज्योति**—स्वारोचिष मन्वंतरांतील मनूचा पुत्र.

२ वसिष्ठाचा पुत्र. स्वारोचिष मन्वंतरांतील प्रजापति (पद्म. सृ. ७).

३ वंशवर्तिन् देवातील एक.

**ज्योतिर्धामन्**—तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक (भा. ८. १. २८).

**ज्योतिर्मुख**—रामसेनेंतील एक वानर (वा. रा. यु. ३०. ७३).

**ज्योतिष्प**—कश्यप व अरिष्टा यांचा पुत्र.

**ज्योतिष्मत्**—स्वायंभुव मन्वंतरांतील मनूचा पुत्र (पद्म. सृ. ७).

२ मधुवनांतील शाकुनि नामक ऋषीचा पुत्र. हा अग्निहोत्री असून गृहकृत्यांत तत्पर होता (पद्म. स्व. ३१).

३ दक्षसावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

४ मरुतांच्या पहिल्या गणांपैकीं एक.

**ज्योतिस्**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**ज्योत्स्ना**—सोमाची कन्या व वरुणपुत्र पुष्कर याची स्त्री. हिला ज्योत्स्ना काली असें नामांतर आहे (म. उ. ९८. १३ कुं.).

**ज्वर**—कश्यप व सुरभि यांचा पुत्र.

२ एक रोग. शंकराचे घामापासून उत्पन्न झाला. हा बहिर्ससाणा व घुबड यांच्यासारखा होता. यानें सर्व देवांस त्रास दिला, तेव्हां ते महादेवाकडे गेले व त्यांनीं त्यास हें सर्व वृत्त सांगितलें. मग महादेवानें यास निरनिराळीं स्थानें दिलीं (म. शां. २८९. ३९-४७ कुं.). बाणाचें श्रीकृष्णाशीं युद्ध चालूं असतां हा बलरामावर धांवला व बलरामास यानें जर्जर केलें. कृष्णानें निरनिराळीं पुष्कळ स्थानें दिलीं, तेव्हां हा कृष्णास शरण गेला. भागवतांत याची कथा किंचित् निराळी आहे. हा शिवाचा सेवक श्रीकृष्णावरच धांवला, पण त्यावर श्रीकृष्णानें आपला शीतज्वर सेवक सोडिला. त्या दोघांचें युद्ध होऊन शीतज्वरानें यास धरून श्रीकृष्णाजवळ आणिलें. या दोन्ही ठिकाणीं यांचें रूप एकच दिलें आहे. हा तिपायी, त्रिशिर, षड्भुज व नवनेत्र होता. भागवतांत फक्त त्रिपाद व त्रिशिर असा दिला आहे (ह. वं. १. १२२; भा. १०. ६३).

**ज्वलना**—तक्षकाची कन्या व सोमवंशांतील औचेयु अथवा ऋतेयु याची स्त्री.

**ज्वलंती**—तक्षकाची कन्या व ऋक्षाची स्त्री. हिचा पुत्र अत्यंनार (म. आ. ६३.२५ कुं.).

**ज्वाला**—ही नीलध्वजाची बायको. नीलध्वजानें अर्जुनास घोडा परत दिला, हें हिला मानवलें नाहीं. हिनें नीलध्वजास अर्जुनाशीं लढण्याकरितां पुष्कळ विनविलें. परंतु हिचें कांहीं चाललें नाहीं. तेव्हां ही उल्मुक नांवाच्या भावाकडे गेली व त्याला हिनें अर्जुनाशीं लढण्यास सांगितलें. परंतु त्यानेंहि तें ऐकिलें नाहीं. नंतर ज्वाला रागावून गंगातीरीं गेली व गंगेच्या स्पर्श पायांस झाला असतां म्हणाली कीं, गंगास्पर्श जो माझ्याकडून घडला, हें मोठें पाप झालें. हें ऐकून गंगा विस्मित झाली व सुमंगला देवीच्या रूपानें प्रकट होऊन हिला म्हणाली कीं, मी पापी कशावरून ? तेव्हां ज्वाला तिला म्हणाली कीं, पूर्वी तुला झालेले सात पुत्र तूं बुडवून मारलेस. नंतर तूं शंतनूपासून जो आठवा पुत्र मागून घेतलास, त्याला अर्जुनानें रणांत मारिलें. तेव्हां तूं निपुत्रिक अतएव पापी आहेस. हें ऐकून गंगेनें अर्जुनास शाप दिला कीं, 'सहा महिन्यांनीं तुझें मस्तक तुटेल.' तेव्हां ज्वालेला, अर्जुनास शाप मिळाला हें पाहून आनंद झाला. पुढें अर्जुनाचें बभ्रुवाहनाशीं युद्ध चालूं असतां ही बभ्रुवाहनाचे भात्यांत बाणरूपानें शिरली व हिनें अर्जुनाचें मस्तक तोडिलें (जै. अ. १५).

**ज्वालायन**—गोवृक्षीचा शिष्य (जै. उ. ब्रा. ४.१६.१).

## झ

**झिल्ली**—वृष्णिवंशीय एक यादव. हा द्रौपदीस्वयंवरास उपस्थित होता (म. आ. १८६; श्लो. ११).

## ट

**टण्ड**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**टिट्टिभ**—वरुणलोकांतील एक असुर.

## ड

**डंभोद्भव**—( दंभोद्भव पहा ).

**डिबिक**—( डिंभ पहा ).

**डिंभ**—जरासंधाचा प्रधान व हंसाचा कनिष्ठ भ्राता. याला डिम्भिक अथवा डिबिक असेंहि म्हणतात ( दुर्वासस् पहा ). याला कृष्णानें यमुनेंत बुडवून ठार केलें (म.स.१४. १३कुं.).

**डिंभिक**—( डिंभ पहा ).

## त

**तंस**—( सो. ) भविष्यमतें समुत्सेसाचा पुत्र.

**तंसु**—(सो. पूरु.) अंतिनारपुत्र. यास ईलिना नांवाचा पुत्र होता. यास त्रस्नु असें नामांतर होतें ( म. आ. ८८. ६३ कुं.; अंतिनार पहा ).

**तर्किबिंदु**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**तक्ष**—( सू. इ. ) दशरथपुत्र भरत यास मांडवी-पासून झालेला पुत्र. हा आपल्या पुष्कर नांवाच्या भावासह गांधार देशावर चालून गेला. व तो देश जिंकून यानें तक्षशिला नांवाची नगरी वसाविली ( म. आ. ३; वा. रा. उ. १०१; विष्णु. ४. ४; वायु. २.२६. १८९ ).

**तक्षक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र, एक नाग ( विष्णु. १.१५; मत्स्य. ६; म. आ. ६५; ह. वं. १. ३). यास एक स्त्री असून अश्वसेन व श्रुतसेन असे दोन पुत्र होते (म. आ. ३.१४०; २५३.८ कुं.). अर्जुनानें ज्या वेळीं खांडववन अग्नीस दिलें, त्या वेळीं तक्षकाची स्त्री व अश्वसेन तेथें होतीं. दाह होऊं लागला असतां अश्वसेनाच्या आईनें त्यास तोंडांत घेतलें व ती आकाशमार्गानें जाऊं लागली. हें अर्जुनानें पाहतांच तिचा शिरच्छेद केला. पण तक्षकाच्या मैत्रीमुळें इंद्रास अश्वसेनास जिवंत राखावयाचें असल्यामुळें त्यानें अर्जुनाविरुद्ध जाऊन अश्वसेनास वांचविलें (म. आ. २५३. ८ कुं. ). या वेळीं तक्षक कुरुक्षेत्रांत होता ( म. आ. २५४.१७ कुं.; २ काश्यप पहा ). यानेंच तापसवेषानें पुढें नाग पाठवून सर्पांच्या घोळक्यांत घेऊन गळ्याला चावून परीक्षिताला ठार केलें.

पुढें वेद ऋषीचा शिष्य उत्तंक हा पौष्य राजाचे पत्नीकडे जाऊन तिचीं कुंडलें भिक्षा मागून आणीत असतां त्याचे मागून एक क्षपणक जात होता. तो क्षणांत दिसे, क्षणांत अदृश्य होई. पुढें उत्तंक कुंडलें भूमीवर ठेवून लघवीस बसला. तो अशा तऱ्हेनें गुंतलासें पाहून त्या क्षपणकानें तीं कुंडलें लांबविलीं. उत्तंक उठून आचमन वगैरे करून येतो, तों मागो-मागच असलेला क्षपणक आपलीं कुंडलें घेऊन पळत आहे, असें त्यास दिसलें. म्हणून त्यानें धांवण्यास आरंभ केला. इतक्यांत त्या क्षपणकानें आपलें मूळ तक्षकरूप धारण केलें व एका बिळावाटें पाताळांत पलायन केलें. तेव्हां उत्तंकानें तेथें खणण्यास सुरवात केली ( उत्तंक पहा ). पुढें त्यानें पाताळांत जाऊन सर्व नागांची स्तुति करून तीं कुंडलें परत मिळविलीं ( म. आ. ३. १२७ कुं.; दे. भा. २. १० ). या उत्तंकादिकांच्या सल्ल्यानें तक्षकास मारण्याकरितां जनमेजयानें सर्पसत्र आरंभिलें. त्यांत याचीं पिच्छांडक, मंडलक, पिंड-सिक्त, रभेणक, उच्छिक, शरभ, भंग, बिल्वतेजस्, विरोहण, शिली, शलकर, मूक, सकुमार, प्रवेपन, मुद्गर, शिशुरोमन्, सुरोमान् व महाहनु हीं अठरा कुळें जळालीं. शेवटीं याचीहि पाळी आली, पण हा वांचला ( म. आ. ५३. १५ कुं; आस्तिक व इंद्र पहा ).

२ ( सू. इ.) हा प्रसेनजिताचा पुत्र. याचा पुत्र बृहद्बल ( भा. ९. १२. ८ ).

**तक्षक वैशालेय**—हा विराजाचा पुत्र ( अ. वे. ७. १०.२९). सर्पसत्रांतील ब्राह्मणाच्छंसी पुरोहित ( पं. ब्रा. २५.१५.३ ).

**तक्षन्**—ऑवल ऐलकीशीं याचा कांहीं बाबतींत विरोध आला होता. ब्रह्मवर्चसकाम आरुणी हिला यानें अग्निविषयीं माहिती सांगितली आहे ( श. ब्रा. २.३.१.३१-३५).

**तंडि**—कृतयुगांत होऊन गेलेला एक अंगिरागोत्री प्रख्यात ऋषि. यानें दीर्घकालपर्यंत तप केलें व शिवसहस्र-नामाच्या योगानें शंकरास प्रसन्न करून घेतलें. सूर्यवंशोत्पन्न त्रिधन्वा राजा हा याचा शिष्य होता. शंकरानें याच्या स्तुती-मुळें प्रसन्न होऊन 'तुझा पुत्र सूक्तकार होईल,' असा यास वर दिला होता ( म. अनु. १६; लिंग. १.६५ ). शिव-पुराणांत तंडीच्या ऐवजीं दंडी असें नांव आढळतें. परंतु तो तंडीच असावा. कारण, उपमन्यूला शिवसहस्रनामाचें व्रत फक्त तंडीनेंच सांगितलें आहे ( शिव. उ. ३ ).

**ततिक्षेत्र**—( सो. ) भविष्यमतें सुमनसाचा पुत्र.

**तत्त्वदर्शिन्**—रौच्य मन्वंतरांतील एक ऋषि.

२ पितृवर्तीच्या सात भावांपैकीं जे चार भाऊ कांपिल्य नगरांतील सुदरिद्र ब्राह्मणाच्या उदरीं आले, त्यांच्यापैकीं एक ( पितृवर्तिन् पहा ).

**तत्पुरुष**—शिवाचा एक अवतार.

**तनु**—( कृश पहा ).

**तंति**—धूम्रपराशरकुलोत्पन्न एक ऋषि. याच्याबद्दल जातिं असा पाठभेद आढळतो.

**तंतिपाल**—अज्ञातवासांत असतांना सहदेवानें विराट-गृहीं धारण केलेलें नांव ( म. वि. ३ ). कुंभकोणप्रतात तंत्रीपाल असा पाठ आहे ( म. वि. ४. १५ कुं. ).

**तंत्रिपाल**—( तंतिपाल पहा ).

**तप**—तामस मनूच्या पुत्रांतील एक ( पद्म. सृ. ७ ).

२ सुख देवांपैकीं एक.

३ सुतप देवांपैकीं एक.

**तपती**—विवस्वान् सूर्यास छायेपासून झालेली कन्या (म. आ. ६३. ४१ कुं.; भा. ९. २२. ४; ६. ६. २१ ). हिला सावित्री नांवाची बहीण होती. ही अत्यंत रूपवती होती. एकदां ऋक्षपुत्र संवरण हा मृगया करीत असतां त्याचा घोडा अकस्मात् मेला. तेव्हां तो जवळच्या पर्वतावर पायींच फिरूं लागला. इतक्यांत त्या ठिकाणीं आलेली तपती त्याच्या दृष्टीस पडली. हिच्या रूपावर मोहित होऊन तो हिला आपल्याशीं गांधर्व विवाह करण्यास सांगूं लागला; पण हिनें विवाहास आपल्या पित्याची संमति पाहिजे, म्हणून त्याला सांगितलें. तेव्हां संवरणानें सूर्याराधना करून तपतीबरोबर विवाह करण्याची परवानगी मिळविली. तपतीस संवरणापासून कुरु-वंशसंस्थापक कुरु नांवाचा पुत्र झाला ( म. आ. १८७-१८९ कुं. ).

**तपन**—कर्णानें मारिलेला पांडवपक्षीय पांचाल ( म. क. ४२. १५ कुं. ).

२ एक देव. याजकडे अमृताचें रक्षण करण्याचें काम असे ( म. आ. ३२. १८ कुं. ).

३ गज वानरानें मारिलेला रावणपक्षीय एक असुर ( वा. रा. उ. ४९ ).

**तपस्**—वाराहकल्पांत वैवस्वत मन्वंतरांत अकराव्या चौकडींतील कलियुगांत गंगाद्वारीं हा शंकराचा अवतार होता. याला तेथें अनुक्रमें चार पुत्र होते. लम्बोदर, लम्बाक्ष, केशलम्ब व प्रलम्बक ( शिव. शत. ५ ).

**तपस्य**—तामस मनूच्या पुत्रांतील एक.

**तपस्विन्**—मत्स्यमतें हा चक्षुर्मनूस नड्वलेपासून झालेला एक पुत्र. पुत्रांमध्यें याचें नांव आढळत नाहीं.

**तपुर्मूर्धन् बार्हस्पत्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १८२ ).

**तपोत्सुक**—सुदरिद्र ब्राह्मणाच्या चार पुत्रांपैकीं एक ( पितृवर्तिन् पहा ).

**तपोद्युति**—तामस मनूच्या पुत्रांतील एक.

**तपोधन**—तामस मनूच्या पुत्रांतील एक.

**तपोनित्य पौरुशिष्टि**—पुरुशिष्टाचा पुत्र. उपोषण व द्रव्यदान हेंच तप होय, असें याचें मत आहे ( तै. उ. ७. ९. १ ).

**तपोभागिन्**—तामस मनूच्या पुत्रांतील एक.

**तपोमूर्ति**—रुद्रसावर्णि मन्वंतरांत होणाऱ्या सप्तर्षी-तील एक.

**तपोमूल**—तामस मनूच्या पुत्रांतील एक.

**तपोयोगिन्**—तामस मनूचा पुत्र.

**तपोरति**—तामस मनूचा पुत्र.

**तपोराशि**—तामस मनूचा एक पुत्र ( पद्म. सृ. ७ ).

**तम**—गृत्समदवंशीय श्रव ब्राह्मणाचा पुत्र. याचा पुत्र प्रकाश ( म. अनु. ८. ६३ कुं. ).

२ ( सो. क्रोष्टु. ) विष्णुमतें हा पृथुश्रव्याचा पुत्र. यास धर्म व सुयज्ञ हीं नामांतरें आहेत.

**तमौजस्**—( सो. अंधक. ) असमंजस् राजाचा पुत्र.

२ ( सो. विदू. ) मत्स्यमतें हा देवार्होचा पुत्र.

**तंबि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**तरणियक**—( सो. ) भविष्यमतें शुमणिवत्सलाचा पुत्र. यानें ३६०० वर्षें राज्य केलें.

**तरंत**—तरंत व पुरुमीळ हे दोघे श्यावाश्वाचे आश्रयदाते होते ( ऋ. ५. ६१. १० ). ध्वस्र व पुरुषन्ती यांच्यापासून या दोघांना देणग्या मिळत होत्या ( पं. ब्रा. १३. ७. १२; जै. ब्रा. ३. १३९; ऋ. ९.५८. ३ शाट्यायन ब्रा. सायण भाष्य; साम. २. ४१० ). शाट्यायनब्राह्मणानें जरी ऋग्वेदांतील ऋचेशीं याचा संबंध जोडिलेला असला, तरी

सर्वानुक्रमणीप्रमाणें अवत्सार काश्यप हा त्या ऋचेचा द्रष्टा आहे. पुरुमीह्लाप्रमाणें हाहि वैददश्वि होता कीं नाहीं, हें संशयास्पद असलें ( ऋ. ५. ६१. १० ) तरी सायणानें दिलेल्या शाट्यायनांतील आख्यायिकेवरून हे भाऊ होते. षड्गुरूचीहि याला संमति आहे. याच्या स्त्रीचें नांव शशीयसी. तरंत व शशीयसी यांना एक मुलगा होता व रथवीती दार्भ्याच्या मुलीची त्याकरतां मागणी घातल्याचा शाट्यायनांत उल्लेख आहे. पण मुलाचें नांव तेथें दिलेलें नाहीं ( बृहद्दे. ५. ५०-८१ ).

**तरस**—रामसेनेंतील एक वानर ( वा. रा. उ. ४१ ). हा हनुमंताबरोबर पश्चिमद्वाराचें रक्षण करीत होता.

**तरुक्ष**—याचा दास बल्बूथाबरोबर ऋग्वेदांत दानस्तुतींत उल्लेख आला आहे. तेथें वशाश्वयाचा हा आश्रयदाता असून तरुक्षापासून तो धन मिळाल्याचा उल्लेख करतो ( ऋ. ८. ४६. ३२ ).

**तरुणक**—एक सर्प ( म. आ. ५७. १९ कुं. ).

**तर्जे**—उत्तम मनूचा एक पुत्र.

**तर्पय**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**तर्य**—( क्रिवि पहा ).

**तर्ष**—अर्क नामक वसूचा पुत्र.

**तल**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**तलक**—( आंध्र. भविष्य. ) भागवतमतें हालेयाचा पुत्र. यास पंचपत्तलक, पत्तलक व मुंडलक अशीं नांवें आहेत.

**तलवकार**—एक शाखाप्रवर्तक (पाणिनि पहा). जैमिनिगृह्यसूत्रांत उपाकर्मांगतर्पणांत याचा उल्लेख आहे.

**तवि**—सोमतान्वि असा पाठभेद आहे.

**ताटका**—सुकेतु नांवाच्या यक्षाची कन्या. ही इच्छेप्रमाणें रूपें घेणारी असून सुकेतूला ब्रह्मदेवाच्या वरामुळें झाली होती. हिच्या अंगांत हजार हत्तींचें बल असे. ही जंभपुत्र सुंदाची स्त्री. हिला सुंदापासून मारीच व सुबाहु असे दोन पुत्र झाले. सुंदानें कांहीं अपराध केल्यामुळें अगस्त्यानें त्याला शाप देऊन ठार केलें. तेव्हां अगस्त्याचा सूड घेण्याकरितां आपल्या पुत्रांसह ताटका अगस्त्यावर धांवली. त्या वेळीं अगस्त्यानें मारीचाला राक्षस होण्याबद्दल आणि ताटकेला मनुष्यभक्षक विद्रूप राक्षसी होण्याबद्दल शाप दिला. तेव्हांपासून ही मारीचासह मलद व करूष या देशांत येऊन राहिली. तो प्रदेश उजाड होऊन ताटकावन या नांवानें प्रसिद्ध झाला. विश्वामित्राचा आश्रम जवळच होता. त्यानें यज्ञ वगैरे आरंभिले कीं, हीं मायलेक त्याच्या यज्ञाचा विध्वंस करीत. त्यामुळें विश्वामित्र त्रासून तो अयोध्येस जाऊन यज्ञसंरक्षणार्थ दशरथाचे पुत्र घेऊन आला. त्यांना ताटकेची सर्व माहिती देऊन त्यानें हिचा वध करण्यास सांगितलें. रामानें त्याप्रमाणें हिचा वध केला ( वा. रा. बा. २५-२६ ).

**ताडका**—ताटकेचें नामांतर.

**ताडकायन**—विश्वामित्राचा पुत्र (म. अनु. ७.५६ कुं. ).

**तांड**—एक ऋषि ( म. स. ७. १२ कुं. ). सामगायन करितांना गायत्रीछंदांतील मंत्राचा प्रस्ताव अष्टाक्षरी असावा, असें याचें मत होतें ( ला. श्रौ. ७. १०. १७ ). येथें याला पुराणताण्ड असें म्हटलें आहे. यानेंच सामवेदावरील तांड्यब्राह्मण केलें.

२ सामविधान ब्राह्मणांच्या शेवटीं असलेल्या वंशावरून हा बादरायणाचा शिष्य आहे. हा अंगिरागोत्राचा प्रवर आहे.

**तांडविंद** (व)—एक आचार्य ( सां. आ. ८. १० ).

**तांडिन्**—हा महाबृहती छंदाला सतोबृहती म्हणतो ( छंदःशास्त्रम् ३.३६ ).

**तांड्य**—हें एका आचार्याचें नांव आहे ( श. ब्रा. ६. १. २. २५ ). येथें याचा अग्निचितीबद्दल उल्लेख आला आहे. तांड्यब्राह्मण तांडीच्या परंपरेंतील आहे. हें विचक्षणाचें पैतृक नांव आहे ( वं. ब्रा. २ ). वैशंपायनाच्या आपल्या नऊ शिष्यांपैकीं ऋचाभ, आरुणि व तांड्य हे मध्यदेशांतील होते. यानें केलेला तांड्यब्राह्मण सामवेदाच्या कौथुमशाखेचा आहे. तांड्यब्राह्मणालाच पंचविंश व प्रौढ असेंहि म्हणतात. एक ऋषि ( म. शां. २५०. १७ कुं. ).

**तान्व**—पृथूच्या राजाबरोबर तान्वाचा उल्लेख आला आहे. अनुक्रमणींत याला पृथुपुत्र म्हटलें आहे ( ऋ. १० ९३. १५ ). याच्या नांवावर हें संपूर्ण सूक्त आहे.

**तापनीय**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**तापस**—हें दत्तानें नांव आहे. हा सर्पसत्रांत होता होता ( पं. ब्रा. २५.१५ ).

२ ( अग्नि, घर्म व मन्यु पहा ).

**तामरसा**—अत्रीची स्त्री ( ब्रह्मांड. ३८.७४.८७ ).

**तामस**—धर्म व हिंसा यांचा पुत्र.

२ ( सो. ) भविष्यमतें श्रवस्चा पुत्र.

३ ( स्वा. प्रिय. ) हा प्रियव्रताचा पुत्र व उत्तमाचा भाऊ (भा. ८. १. २७). हा प्रियव्रताचा वंशज आहे ( विष्णु. ३. १. २४ ). पण स्वराष्ट्र नांवाच्या राजास, विमर्द नामक राजानें पदच्युत केल्यावर उत्पलावतीपासून हा झाला. ती उत्पलावती मेल्यावर हरिणी योनींत जन्मली व हा पुत्र त्या हरिणीपासून स्वराष्ट्राच्या कामुकस्पर्शामुळें झाला ( मार्क. ( ७१. ४६ ). हा आपल्या मातेस तामसयोनि प्राप्त झाल्यावर झाला, म्हणून यास तामस मनु म्हणतात. पित्यानें सर्व हकीगत

सांगितल्यानंतर यानें पितृभ्रातृस्य कैद करून आणिलें (मार्क. ७१. ४७). परंतु पित्याच्या सांगण्यावरूनच यानें त्यास सोडून दिलें. अशा तऱ्हेनें यानें राज्य मिळवून स्वतः सार्वभौम बनला. हा प्रियव्रताचा तिसरा पुत्र. यानें नर्मदेच्या दक्षिणतीरीं महेश्वरीची आराधना केली, कामराजकूटाचा जप केला, वसंत व शरद् ऋतूंत नवरात्रपूजा केली. हा चतुर्थमन्वंतराधिप मनु होय ( दे. भा. १०. ८). हा आपल्या भार्येसह स्वर्गलोकीं गेला. गजेन्द्रमोक्ष याचेच काळीं झाला ( भा. ८. १; मनु पहा ).

**ताम्र**—महिषासुराचा कोशाध्यक्ष.

२ मुर दैत्याच्या सात पुत्रांपैकीं एक. कृष्णानें याच्या बापास मारिल्यामुळें हा आपल्या भावांसह कृष्णावर चालून गेला व मेला ( ३ नरक पहा ).

**ताम्रतप्त**—कृष्णास रोहिणीपासून झालेला पुत्र.

**ताम्रध्वज**—मयूरध्वजाचा पुत्र.

**ताम्रलिप्त**—वंगदेशीय एक क्षत्रिय ( म. आ. २०१. १३; स. ३१. २५ कुं. ).

**ताम्रलोचन**—एक शिवगण.

**ताम्रा**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या. ही कश्यपास दिली होती ( कश्यप पहा ).

२ वसुदेवाच्या स्त्रियांपैकीं एक. हिचा पुत्र सहदेव.

**ताम्रायण**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य ( व्यास पहा ).

**ताम्रौष्ठ**—एक यक्ष ( म. स. १०. १७ कुं. ).

**तार**—मयासुराचा एक मित्र ( मत्स्य. १७७ ).

२ रामसेनेंतील एक प्रमुख वानर ( म. व. २८५ ). सुग्रीवस्त्री रुमा याची कन्या. याला तारापिताहि म्हटलें आहे ( वा. रा. उ. ३४. ४ ).

३ मधुवनांत राहणाऱ्या शाकुनी नामक ऋषीचा एक पुत्र. हा अत्यंत तेजस्वी होता ( पद्म. स्व. ३१ ).

**तारक**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ वज्रांग व वरांगी यांस ब्रह्मदेवाच्या कृपाप्रसादानें झालेला पुत्र (वज्रांग पहा). यानें पारियात्र पर्वतावर तप केलें. त्यामुळें ब्रह्मदेवानें यास वर देऊं केला, तेव्हां यानें अमरत्व मागितलें. तें मिळणें शक्य नाहीं, असें कळल्यावर सात दिवसांच्या शिशुहस्तें मरण यावें असें सांगितलें. हें तप १०००० वर्षे चाललें होतें. पुढें या वराचे जोरावर यानें मस्त होऊन इंद्रादिकांचा पराभव केला. याचें शंकराच्या औरस पुत्राच्या हातून मरण आहे असा देवांचा संकेत होता. त्याप्रमाणें शंकरानें पार्वतीशीं लग्न केलें व त्यास स्कंद नांवाचा पुत्र झाला. स्कंदानें आपल्या सातव्या दिवशीं याचा वध केला ( मत्स्य. १३८-१३९; १४६; पद्म. सृ. ४२; २ तारेय पहा ).

त्रिपुरोत्पादक ताराक्ष ( तारकाक्ष ), कमलाक्ष व विद्युन्माली हे याचे पुत्र होत ( म. क. २४. ७ कुं; लिंग. १. ७१ ).

**तारा**—बृहस्पतीच्या दोन स्त्रियांतील दुसरी. हिलाच सोमानें पळविलें होतें. या कथेचा ऋग्वेदांतहि अस्पष्ट उल्लेख आहे ( ऋ. १०. १०९ ). सोमापासून हिच्या पोटीं बुध झाला. तो सोमवंशाचा मूळ पुरुष होय ( चंद्र पहा ).

२ सुषेण वानराची कन्या व वालीची स्त्री. हिचा पुत्र अंगद (वा. रा. किं. २२. १३). हिनें रामाच्या मदतीनें पुनः लढावयास आलेल्या सुग्रीवाशीं सख्य करण्याचा वालीला सल्ला दिला होता. हिचा पिता तारहि दिला आहे ( २ तार पहा ).

३ सूर्यवंशीय हरिश्चंद्र राजाची स्त्री. हिला तारामती असेंहि नांव असून रोहित नांवाचा पुत्र होता ( तारामती पहा ).

४ एक ब्रह्मवादिनी.

**ताराक्ष**—तारकासुराचा पुत्र. यास तारकाक्ष असें नामांतर होतें ( म. क. २४. ७ कुं ).

**तारापीड**—( सू. इ. ) मत्स्यमतें चंद्रावलोक राजाचा पुत्र. याचा पुत्र चंद्रगिरि.

**तारामती**—शैब्य देशच्या राजाची कन्या. अयोध्यापति हरिश्चंद्राची ही पत्नी होय ( मार्क. ७. ९ ). हरिश्चंद्रास शंभर स्त्रिया होत्या, त्यांत ही पट्टराणी होती. वरुणकृपेनें हिला रोहित नांवाचा पुत्र झाला ( दे. भा. ७. १४ ). विश्वामित्राची दक्षिणा पूर्ण करण्यासाठीं हरिश्चंद्रानें काशींत एका वृद्ध ब्राह्मणास पुत्रासह हिला विकलें होतें ( दे. भा. ७. २२ ). सर्पदंशानें रोहित मृत झाला असतां ही त्याला घेऊन स्मशानांत गेली. तेथें हिला पोरें खाणारी डांकीण ठरवून राजाकडे नेण्यांत आलें. राजानें चांडालास हिचा वध करण्यास सांगितलें. चांडालानें तें काम करण्याची हरिश्चंद्रास आज्ञा केली. तेव्हां त्यास हिची व पुत्राची ओळख पटली. ही अग्निप्रवेशास सिद्ध झाली असतां इंद्रानें रोहितास जिवंत केलें. तदनंतर त्याच्याच कृपेनें हिला स्वर्गलाभ झाला ( दे. भा. ७.२५-२७; हरिश्चंद्र पहा).

**तारावती**—( चंद्रशेखर पहा ).

**तारुक्ष्या**—( तार्क्ष्य पहा ).

**तारेय**—तारापुत्र अंगदाचें नामांतर.

२ तारकासुराचा पुत्र. हा हिरण्याक्षाच्या बाजूनें लढत असतां आपल्या पित्याच्या वधाचा सूड उगविण्याकरितां यानें कार्तिकेयावर अग्न्यस्त्र व रौद्रास्त्र यांचा वर्षाव केला. परंतु तीं निष्फळ ठरलीं. पुढें कार्तिकेयानें यास ठार मारिलें ( पद्म. सृ. ६९ ).

**तार्क्ष**—( ६ तार्क्ष्य पहा ).

**तार्क्षी**—कंधर व पक्षिरूपधारी मदनिका यांची कन्या. ही पूर्वजन्मींची वपु होय. ही दुर्वासशापानें पक्षीण झाली होती.

ही द्रोण नामक पक्ष्याची स्त्री. त्याजपासून हिला गर्भ राहिला. ही गर्भवती असतांना कौरवपांडवांचे युद्धक्षेत्रावरून उडत जात असतां अर्जुन व भगदत्त यांच्या युद्धासमीप आली. तेव्हां अर्जुनाच्या बाणानें हिचें उदर विदीर्ण होऊन त्यांतील चार अंडीं खालीं पडलीं. याच वेळीं सुप्रतीक नामक हत्तीच्या गळ्यांतील प्रचंड घंटा नेमकी या अंड्यांना पोकळींत घेऊन खालीं पडली व खालील गाळांत रुतली. तीं अंडीं पुढें शमीक ऋषीनें नेलीं ( मार्क. ३. ३१–४४ ). पण याच वेळीं तार्क्षी मरण पावली. हिचीं त्या अंड्यांतून बाहेर पडलेलीं मुलें पिंगाक्ष, विबोध, सुपुत्र व सुमुख होत.

**तार्क्ष्य**—एक आचार्य ( ऐ. आ. ३.१.६; सां. आ. ७. १९ ). यानें एक विशिष्ट ज्ञान संपादन करण्याकरितां गुरुगृहीं वसती करून गुरूची गाय रक्षण केली. तार्क्ष व तारुक्ष्य असे पाठभेद जरी असले, तरी सर्वत्र तार्क्ष्य असेंच आढळतें ( ऐ. आ. १.५.२; सां. श्री. ११.१४.२८; १२.११.१२; आश्व. श्री. ९.-१ ). अरिष्टनेमि तार्क्ष्य व हा एकच कीं काय हें सांगतां येत नाहीं.

२ अरिष्टनेमीचें पैतृक नांव.

३ कश्यप प्रजापतीचें नामांतर. हें नामांतर असतांना कश्यपास दक्षानें कन्या दिल्या व याचेंच सरस्वतीशीं संभाषण झालें ( म. व. १८९; कश्यप पहा ).

४ हा अत्यंत पराक्रमी होता ( ऋ. १.८९.६; १०. १७८. १ ). हा गरुड असून सोम आणण्याकडे याचा उपयोग केला आहे ( २ सुपर्ण पहा ).

५ कश्यप व विनता यांचा पुत्र. गरुडाचा भाऊ.

६ एक यक्ष. हा मार्गशीर्षमासीं अंशुमान् सूर्यासमवेत असतो ( भा. १२.११ ). याचें तार्क्ष असें नामांतर आहे.

**तार्क्ष्य वैपश्चित**—एक आचार्य ( आश्व. श्री. १०. ७).

**तार्क्ष्यपुत्र**— ( २ सुपर्ण पहा ).

**तालक**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य.

**तालकृत्**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**तालकेतु**—कृष्णानें मारिलेला एक राक्षस.

२ भीष्माचें नामांतर ( म. भी. ४७. ९; उ. १५०. ५ कुं. ).

३ कुवलयाश्वानें मारिलेला एक राक्षस ( मार्क. १८.२३).

**तालजंघ**—( सो. सह. ) कार्तवीर्याचा नातू व जयध्वजाचा पुत्र. याच्या पुत्रांनाहि तालजंघच म्हणत असत. हा परशुरामाला भिऊन सर्व भावांसह हिमालयाच्या दरींत राहिला होता. पुढें राम तपश्चर्येला गेल्यावर निर्भय होऊन आपल्या परिवारासह पुनः माहिष्मती नगरींत राहूं लागला. कांहीं कालानें अयोध्येवर स्वारी करून सगराचा पिता फल्गुतंत्र याला यानें जिंकलें ( ब्रह्माण्ड. ३. ४७ ). हे सर्व और्वाग्नीनें दग्ध झाले. फक्त वीतिहोत्र मात्र वांचला (भा. ९. २३). वीतिहोत्र, शार्यात, तुंडिकेर, भोज व अवंती या पांच वंशांना मिळून हें नांव आहे. सगरानें यांस जिंकिलें होतें. परंतु गुरूंच्या आज्ञेनें त्यानें यांना ठार न मारितां विद्रूप करून सोडून दिलें ( भा. ९. ८.५; पद्म उ. २०; वीतहव्य व बाहु पहा ).

२ (सू. शर्याति.) शर्याति राजाचा पुत्र (म. अनु ८. ८कुं.).

३ मुर दैत्याचा पिता (पद्म. उ. ३८).

**तालन**—एक कलियुगांतील राजा. यानें महावर्तावर स्वारी केली. यानें आपलें वनरस नांवाचें नगर पुत्रांस दिलें याच्या पुत्रांचीं नांवें अनुक्रमें खालीलप्रमाणें होतीं.

अलिक, अल्लामति, काल, पत्र, पुष्पोदरी, वरीकरी, नरी व सूललित. यानें म्लेच्छांच्या पूजापद्धतीनें राक्षसमय देवांची पूजा केली ( भवि. प्रति. ३. ७ ).

**तिग्म**—( सो. कुरु. भविष्य. ) मत्स्यमतें उर्वपुत्र व विष्णुमतें मृदुपुत्र. तिमि, तिग्मज्योति व हा एकच.

**तिग्मकेतु**—( स्वा. उत्तान. ) भागवतमतें वत्सरास स्वर्वीथीपासून झालेला एक पुत्र.

**तिग्मज्योति**—( सो. कुरु. भविष्य. ) भविष्यमतें मृदूचा पुत्र.

**तितिक्षा**—स्वायंभुव मन्वंतरांतील दक्ष प्रजापतीची कन्या व धर्माची स्त्री. हिचा पुत्र क्षेम.

**तितिक्षु**—(सो. अनु.) भागवत, मत्स्य व वायु यांच्या मतें महामनस् राजाचा पुत्र. विष्णुमतें महामणीचा पुत्र ( उशीनर पहा ).

**तित्तिर** किंवा **तित्तिरि**—(सो. कुकुर.) कपोतरोमन्‌च्या पुत्र याचा पुत्र बहुपुत्र (पद्म. सृ. १३; ब्रह्म. १५.४७; अग्नि. २७५ २९ ).

**तित्तिरि**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र, नाग.

२ एक ऋषि ( म. स. ४. १८ कुं. ). अंगिरसकुलांतील ऋषीच्या एका शाखेचे अंगिरस, तैत्तिरि, कापिभुव असे प्रवर आहेत. त्यांपैकीं तैत्तिरीचा बाप हा असावा. एका यजुःशाखेस तैत्तिरीय हें नांव आहे. यावरून तिचा मूळ अध्यापक हा असावा. याज्ञवल्क्य नांवाच्या एका वैशंपायनाच्या शिष्याकडून वैशंपायनानेंच कांहीं कारणावरून ती शाखा काढून घेतली. पण तीं त्याच्या बाकी ८९ शिष्यांनीं धारण केली. धारण करतेवेळीं त्यांनीं तित्तिरि पक्ष्यांचीं रूपें घेतलीं होतीं, म्हणून हें नांव पडलें (विष्णु. ३.५; भा. १२.६. ६५ ). मत्स्यमतें हाच अंगिराकुलांतील प्रवराचा एक ऋषि आहे. एक शाखाप्रवर्तक(पाणिनि पहा).

नाम्ना हिरण्यकेशान् लोकांच्या पितृतर्पणांत निर्देश आहे (स.गृ. २०.८.२०). वेगवेगळे प्रांत करून त्या प्रांतांत चरक, किंवा चरकाध्वर्यु व तित्तिरि यांची योजना असावी (चरक पहा).

**तिथि**--भृगुकुलांतील एक गोत्रकार.

२ कश्यप व क्रोधा यांची कन्या. पुलहाची स्त्री.

**तिमि**--प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या. कश्यपाची भार्या.

२ ( सो. पूरु. भविष्य. ) भागवतमतें दुर्वांचा पुत्र (तिग्म पहा).

**तिमिंगल**--एक राजा. याला सहदेवानें राजसूयाच्या वेळीं जिंकिलें. हा रामक पर्वतावर राहत असे ( म. स. ३१ ).

**तिमिध्वज**--दक्षिणेंतील दण्डकारण्यानजीकच्या वैजयन्त नगरीचा राजा. वैजयन्त हें डॉ. भांडारकरांच्या मतें विजयदुर्ग होय व देच्या मतें वनवासी शहर होय. तिमिध्वज शंबर या नांवानें प्रसिद्ध होता. देवासुरयुद्ध चालू असतां हा असुरांना मिळाला व इंद्राशीं युद्ध करूं लागला. तेव्हां इंद्रानें अयोध्येच्या दशरथाला मदतीला बोलाविलें. परंतु दशरथ युद्ध करीत असतां जखमी होऊन बेशुद्ध पडला. तेव्हां सारथ्य करणाऱ्या कैकेयीनें रथ बाजूला घेऊन दशरथाचें मोठ्या चातुर्यानें रक्षण केलें. पण तिमिध्वजाचें पुढें काय झालें, याचा उल्लेख नाहीं ( वा. रा. अयो. ९; ब्रह्म. १२३ ).

**तिमिर्घ दौरेश्रुत**--सर्पांच्या उत्कर्षाकरितां केलेल्या सर्पसत्रांतील अग्नीध्र् ऋत्विजाचें हें नांव आहे ( पं. ब्रा. २५. १५. ३ ).

**तिरश्चि आंगिरस**--सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ९५-९६ ). पंचविंशब्राह्मणांतहि याला दुजोरा मिळतो ( १२. ६. १२ ). याच्या सूक्तांत इंद्राचा धांवा केला आहे.

**तिरिंदर पारशव्य**-- एक राजा. वत्स काण्वाला तिरिंदर पारशव्याकडून देणगी मिळाली होती. यहूंचें धन तिरिंदरानें आपणांस दिलें, असें वत्स म्हणतो ( ऋ. ८. ६. ४६; सां. श्रौ. १६. ११. २० ). सायणानें तिरिंदरास पर्शूचा पुत्र म्हटलें आहे.

**तिर्यञ्च् आंगिरस**--सामांचा द्रष्टा ( पं. ब्रा. १२. ६. १२ ).

**तिलोत्तमा**--कश्यप व अरिष्टा यांची कन्या. ही पूर्वजन्मीं कुब्जा नामक बाई असून दीर्घतपानें वैकुंठाप्रत गेली. ब्रह्मदेवानें देवकार्याकरितां हिला सुंदोपसुंदांकडे पाठविलें होतें.

हिचें हें नांव पडण्याचें कारण कीं, प्रत्येक वस्तूंतील तिळतिळ सौंदर्य असेल तें सर्व हिच्या सौंदर्याकरितां घेतलें होतें. हिनें सुंदोपसुंदांस मारण्यास जाण्याचे अगोदर सर्व देवांना प्रदक्षिणा घातली. त्या वेळीं महादेव व इंद्र यांच्यासारख्यांनाहि हिजकडे पहावयाचें नाहीं, हा निश्चय पाळवेना. हिला पाहिल्याबरोबर सुंदोपसुंदांची एकमेकांत मारामारी होऊन एकमेकांस एकमेकांनीं मारिलें. म्हणून ब्रह्मदेवानें जेथें जेथें सूर्याचा प्रवेश असेल तेथें तेथें तुझाहि प्रवेश होईल व तुझे लावण्याचा प्रभाव इतका तीव्र राहील कीं, त्यामुळें तुजकडे कोणालाहि पाहवणार नाहीं असें हिला सांगितलें ( म. आ. २११-२१२; पद्म. उ. १२६ ).

ही अश्विनांत त्वष्टा सूर्याबरोबर फिरावयास असते ( भा. १२. ११ ).

**तीक्ष्णवेग**--रावणपक्षीय एक असुर.

**तीर्णक**--ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत उपस्थित असलेला ऋषि ( पद्म. सृ. १४ ).

**तीव्ररथ**--हंसध्वजाच्या सुमति नामक सचिवाचा पुत्र.

**तुक्षय**--अंगिरसकुलांतील मंत्रकार.

**तुग्र**--अश्वींची कृपा असलेल्या भुज्यूच्या पित्याचें हें नांव आहे.

२ दुसऱ्याहि एका तुग्राचा उल्लेख इंद्राचा शत्रु म्हणून आला आहे ( ऋ. ६. २०. ८; २६. ४; १०. ४९. ४ ).

**तुजि**--याच्यावर इंद्राची कृपा होती ( ऋ. ६. २६. ४; १०. ४९. ४ ). तूतुजि हें याचेंच नांव असावें ( ऋ. ६. २०. ८ ).

**तुंड**--नल वानरानें मारिलेला रावणपक्षीय एक राक्षस.

**तुंडकोश**--कश्यप व खशा यांचा पुत्र.

**तुमिंज औपोदिति**--सत्राचे वेळीं होता व संश्रवस् यांबरोबर इडेबद्दल वादविवाद करण्यांत गुंतलेल्या एका माणसाचें हें नांव आहे (तै. सं. १.७.२.१; औपोदिति पहा).

**तुंबरु**--कश्यप व प्राधा यांच्या पुत्रांतील एक. हा चैत्र महिन्यांतील धाता नामक सूर्याबरोबर असतो ( भा. १२. ११. ३३. ). यास रंभा नामक भार्या होती ( म. उ. ११७ ). हा नारदासह ब्रह्मसभेंत गायन करून भगवंताचे गुण गातो ( भा. ५. २५. ८ ). श्रीकृष्णास अभिषेक झाला, त्या वेळीं हा कृष्णाकडे आला होता ( भा. १०. २७. २४ ). हा अनुराजाचा मित्र होता ( भा. ९. २४. २०. ). हा रंभेशीं आसक्त होता, म्हणून कुबेरानें यास शाप देऊन विराध नांवाचा राक्षस बनविलें. पुढें रामलक्ष्मण यांशीं युद्ध केल्यावर हा विराध मरण पावून आपल्या मूळ रूपाप्रत पावला ( वा. रा. अर. ५; विराध पहा ).

२ मुनिकन्या सुबाहूचा पुत्र. याला मनुवंशी व सुकेशी अशा दोन कन्या होत्या ( ब्रह्मांड. ३. ७. १२ ).

३ हिरण्याक्षाशीं देवांचें युद्ध झालें, त्यांत वायूनें यास मारिलें ( पद्म. सृ. ७५ ).

**तुंबुरु**—( तुंबरु पहा ).

**तुर कावषेय**—यानें एक विशिष्ट तत्त्व प्रतिपादन केलें आहे ( श. ब्रा. १०. ६. ५. ९ ). कारोती नदीवर एक अग्नीची वेदी बांधिल्याबद्दल शांडिल्यानें याचा उल्लेख केला आहे ( श. ब्रा. ९. ५. २. १५ ). जनमेजय पारीक्षिताचा हा पुरोहित होता व ह्यानेंच त्याला राज्याभिषेक केला ( ऐ. ब्रा. ४. २७; ७. ३४; ८. ३१ ). हा पुरातन मुनि होता. याचा शिष्य यज्ञवचस् राजस्तंबायन ( बृ. उ. ६. ५. ४ ). पंचविंशब्राह्मणांत ( २५. १४. ५ ) आलेला तुर व हा एकच असावेत. यानें दुसऱ्या जनमेजय पारीक्षिताकडून सर्पसत्र करविल्याचा निर्देश आहे ( भा. ९. २२. ३५ ). भागवतांतील दुसऱ्या जनमेजय पारीक्षिताशीं जोडलेला संबंध नामसाम्यामुळें झाला आहे. वास्तविक हा पहिल्या जनमेजय पारीक्षिताचा पुरोहित असावा. म्हणूनच त्याला यानें राज्याभिषेक केला.

**तुरश्रवस्**—पारावतानें इंद्राकरितां सोमयाग केला. तेथें एला तुरश्रवस् नांवाच्या ऋषीनें दोन साम म्हणून इंद्राला प्रसन्न केलें. इंद्रानें फक्त तुरश्रवस्चा हवि स्वीकारिला ( पं. ब्रा. ९. ४. १० ).

**तुरु**—एक राक्षस. हिरण्याक्षाशीं देवांच्या झालेल्या युद्धांत वायूनें यास ठार मारिलें ( पद्म. सृ. ७५ ).

**तुरुष्क**—( तुरुष्क. भविष्य. ) भागवतमतें या वंशांत चवदा राजे झाले. इतरत्र याला तुषार म्हटलें आहे.

**तुर्व**—एका राजाचें नांव. हा मनूचा अनुयायी होता ( ऋ. १०. ६२. १० ).

**तुर्वश**—हा दाशराज्ञयुद्धांतील सुदासाचा मोठा प्रतिस्पर्धी होता. याच्यावर इंद्राची कृपा होती. पण सुदासानें याचा पराभव केला आहे ( ऋ. ७. १८. ६ ). मात्र हा यदु राजा, अनु व द्रुह्यु यांच्याप्रमाणें पाण्यांत बुडून मेला नाहीं. इंद्राच्या कृपेनें तेथून याची सुटका झाली. यानें केलेल्या इंद्राच्या स्तुतींत ‘ हे इंद्रा, तूं यदुतुर्वशांचें संरक्षण केलेंस, तसें आमचें कर ’ अशी प्रार्थना येते ( ऋ. ४. ४५. १ ). तसेंच ‘ अतिथिग्वाचें कल्याण करणारा तूं यदुतुर्वशांना ठार कर ’ ( ऋ. ७. १९. ८ ), अशाहि प्रार्थना आहेत. यदु व तुर्वश हे वेगवेगळे होते ( ऋ. ४. ३०. १७; १०. ६२. १० ). तुर्वश आणि यदु यांनीं अर्ण व चित्ररथ राजांचा सरयूच्या तीरीं वध केला ( ऋ. ४. ३०. १८ ). तुर्वश व यदु यांचें सुदासाचा बाप दिवोदास याच्याशींहि वैर होतें, असें दिसतें ( ऋ. ९. ६१ २ ). यदुतुर्वशांचे पुरोहित कण्व होते ( ऋ. ८. ४. ७. ). वृचिवंत, वरशिख आणि पार्थव यांचा तुर्वशांशीं अतिनिकट संबंध आहे. कदाचित् तुर्वश आणि हे एकच अससील. यांना अभ्यावर्तिन् चायमानानें जिंकिलें होतें ( ऋ. ६. २७. २८ ) यदुतुर्वशांत सख्य फार होतेंसें दिसतें. याचें शोण सात्रासह पांचालाशीं सख्य होतें. येथें अनेक तौर्वशांचा निर्देश आहे ( श. ब्रा. १३. ५. ४. १६ ). दैवराताला मदत करणाऱ्या वृचीवंताविरुद्ध देवरातपुत्र संजयाला तुर्वशांनीं मदत केली होती ( ऋ. ६. २७. ५-७ ).

**तुर्वसु**—( सो. पुरूरवस्. ) ययाति राजास देवयानीपासून झालेला पुत्र. यानें पित्याची जरा घेतली नाहीं म्हणून ययातीनें यास शाप दिला. त्यामुळें याला छत्रचामरें नव्हतीं व हा निंद्य आचरण करणाऱ्या म्लेच्छांचा राजा होता ( भा. ९. १८; १० ). यास वह्नि नांवाचा पुत्र होता ( भा. ९. २३ ).

याचा वंश अनेक ठिकाणीं आढळतो ( मत्स्य. ४८; ब्रह्मांड. ३.७४; वायु. २.३७; ब्रह्म. १३; ह. वं. १.३२; अग्नि. २७६; विष्णु. ४.१६; गरुड. १. १३९; भा. ९.२३). अग्निपुराणांत द्रुह्युवंशांतील गांधाराचा याच वंशांत समावेश केला आहे. विष्णु वगैरे तीन पुराणांत याचा शेवटला भाग दिला नाहीं. मरुत्त किंवा भारत यानें पौरव दुष्यंताला दत्तक घेतलें. या तऱ्हेनें हा वंश पौरवांत समाविष्ट झाला. याच वंशांतील शेवटल्या लोकांनीं दक्षिणेंत पांड्य व चोल वगैरे राज्यें स्थापिलीं ( ययाति पहा ).

**तुर्वीति**—वय्यासह ( ऋ. १. ५४. ६; २. १३. १२; ४. १९. ६ ) व एकटाच ( ऋ. १. ३६. १८; ६१. १८; ११२. २३ ) याचा ऋग्वेदांत अनेकदां उल्लेख आहे. तीन ठिकाणीं इंद्रानें याला पुरांतून वांचविलें ( ऋ. १. ६१; ११. २. १३. १२; ४. १९. ६ ).

**तुलसी**—वृंदेच्या शरीरांतून निघालेल्या घामांतून ही उत्पन्न झाली ( पद्म. उ. १५ ). ही शंखचूड नामक असुराची स्त्री. ही धर्मध्वजास माधवीपासून झाली असून अत्यंत धर्मशील व पतिव्रता होती. हिच्या पातिव्रत्याच्या योगानेंच शंखचूड देवांना अजिंक्य झालेला होता. विष्णूनें कपटानें हिच्या पातिव्रत्याचा भंग करून देवांचें कार्य केलें; म्हणून हिनें विष्णूस तूं शिलारूप होशील, असा शाप दिला. त्याप्रमाणें विष्णु शालिग्राम झाला ( ब्रह्मवै. २. २१; शंखचूड पहा ). ही कामुक होऊन एकदां गणपतीकडे गेली असतां, गणपतीनें हिला, तूं वृक्षरूप होशील, म्हणून शाप दिला. पुढें समुद्रमंथनाच्या वेळीं जें अमृत समुद्रांतून बाहेर निघालें, त्याच्यापैकीं कांहीं थेंब जमिनीवर सांडले व त्यांतूनच तुळस निघाली. नंतर ही ब्रह्मदेवानें विष्णूस दिली ( पद्म. सृ. ६१; स्कंद. २. ४. ८; वृंदा पहा ).

**तुलाधार**—वाराणसी नगरांत राहणारा एक वैश्य. जाजलि नांवाच्या एका वैश्यास आपल्या तपाचा अभिमान झाला होता, तो यानें नष्ट केला ( म. शां. २६१–२६४ ).

**तुषार**—( तुषार. भविष्य. ) कलियुगांत झालेल्या एका वंशाचें नांव. यांत चवदा राजे झाले ( मत्स्य. २७३; वायु. २. ३७; ब्रह्मांड. ३. ७४ ).

**तुषित**—स्वायंभुव व स्वारोचिष मन्वंतरांतील देवगण ( मनु पहा ).

**तुषिता**—स्वारोचिष मन्वंतरांतील वेदशिरस् ऋषीची स्त्री. हिला विभु नामक पुत्र होता ( भा. ८. १.२१ ).

**तुष्ट**—हंसध्वजाचा प्रधान.

**तुष्टि**—स्वायंभुव मन्वंतरांतील दक्षानें धर्म ऋषीस दिलेल्या दहा कन्यांतील एक ( भा. ४. १.५१ ).

**तुष्टिमत्**—कंसाचा भ्राता.

**तुहुंड**—दनुपुत्र.

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**तूतुजि**—इंद्रानें द्योतन नांवाच्या राजाकरितां तुग्र, तूतुजि, वेतसु व दशोणि यांचा पराभव केला ( ऋ. ६. २०. ८ ). तुजि आणि तूतुजि एकच होत.

**तूर्वयाण**—अतिथिग्व, आयु व कुत्स यांचा हा शत्रु होता ( ऋ. १. ५३. १०; १०. ६१. १ ).

**तृक्ष**—कश्यपाचें नामांतर ( म. व. १८४ ).

**तार्क्ष्य**—त्रसदस्यूचा मुलगा ( ऋ. ६. ४६. ८; ८. २२. ७ ).

**तृणक**—एक क्षत्रिय ( म. स. ८. १७ कुं. ).

**तृणकर्णि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**तृणबिंदु**—( सू. दिष्ट. ) भागवत व वायु यांच्या मतें बंधु राजाचा पुत्र. यास विशाल, शून्यबंधु, धूम्रकेतु व इडविडा अशीं चार अपत्यें होतीं. विष्णु व रामायण यांच्या मतें बुध राजाचा पुत्र. याची स्त्री अलंबुषा. यास विशाल व इलविला अशीं दोन अपत्यें होतीं. इलविला पुलस्त्यास दिली होती. हा त्रेतायुगाच्या तिसऱ्या पादांत राज्य करीत होता ( ब्रह्मांड ३. ८. ३६. ६१. १०; वायु. २. ८. ३१; २४. १५ ).

२ वैवस्वत मन्वंतरांतील तेविसावा व चोविसावा व्यास ( व्यास पहा ).

३ एक ऋषि. हा पांडवांबरोबर द्वैतवनांत होता ( म. व. २६४ ). हा अत्यंत धर्मशील व संयमन करणारा असा असे. प्रत्येक महिन्याला एक गवताची काडी घेऊन ती उदकांत बुडवून तिच्याबरोबर जेवढे जलबिंदु येतील तेवढेच पिऊन हा राही. या याच्या नियमामुळें याला तृणबिंदु हें नांव पडलें होतें ( स्कंद. ७. १. १३८ ).

**तृणावर्त**—कृष्णानें मारिलेला एक असुर ( पद्म. ब्र. १३ ). याष कंसानें कृष्णाला ठार मारण्याकरितां गोकुळांत पाठविलें. तेव्हां हा वावटळीच्या रूपानें गोकुळांत शिरला व सर्व गोकुळ धूलिमय करून कृष्णास घेऊन उडून गेला. परंतु कृष्णानें यास एका शिळेवर आपटून याचा प्राण घेतला ( भा. १०. ७. २६ ).

**तेज**—सुतप देवांपैकीं एक.

**तेजस्विन्**—एक इंद्र. हा पंडुपुत्र सहदेव झाला.

२ गोकुळांतील एक गोप. हा कृष्णाचा परम मित्र होता ( भा. १०. २२. ३१ ).

**तेजेयु**—एक क्षत्रिय. हा रौद्राश्वाचा पुत्र होता ( म. आ. ८८. १० कुं. ).

**तैटिकि**—एक आचार्य ( नि. ४. ३ ).

**तैत्तिरि**—तित्तिरि ऋषीचा पुत्र.

**तैत्तिरीय**—यजुःशिष्यपरंपरेंतील वैशंपायनाचें याज्ञवल्क्याखेरीज इतर कांहीं शिष्यांस सामान्य नांव. कारण, यांनीं तित्तिरि पक्ष्याचीं रूपें घेऊन याज्ञवल्क्यानें टाकिलेला वेद ग्रहण केला ( व्यास पहा ).

**तैलक**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**तैलप**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**तैलेय**—धूम्रपराशरकुलोत्पन्न एक ऋषिगण.

२ अंगिराकुलांतील गोत्रकार.

**तोंडमान्**—हा सोमकुलांतील सुवीराला नंदिनीपासून झाला. याची पत्नी पांड्य राजाची कन्या पद्मा. हा पूर्वजन्मींचा रंगदास. हा वेंकटाचलाची उपासना करून मुक्त झाला ( स्कंद. २. १. ९-१० ).

**तोशलक**—कंससभेंतील एक मल्ल. यास कृष्णानें मारिलें ( भा. १०.४४. २७ ).

**तोष**—तुषित देवांपैकीं एक.

२ ( स्वा. ) भागवतमतें यज्ञ व दक्षिणा यांचा पुत्र.

**तौग्र्य**—भुज्यूचें पैतृक नांव.

**तौरुष्य**—लकुलिन् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**तौसुक**—सौसुकाबद्दल पाठभेद.

**त्याज्य**—भृगु व पौलोमी यांचा देवपुत्र ( मत्स्य. १९५.५ ).

**त्रयी**—सविता व पृश्नि यांची कन्या ( भा. ६.१८ ).

**त्र्यारुण**—( सू. इ. ) विष्णु, मत्स्य व पद्म यांच्या मतें त्रिधन्वन्चा पुत्र. याचा पुत्र त्रिशंकु ( पद्म. सृ. ८ ).

२ एक व्यास ( व्यास पहा ). भागवतांत यास अरुण म्हटलें आहे.

३ (सो. पूरु.) उरुक्षयाचा पुत्र (३ त्र्यारुणि पहा).

**त्रय्यारुणि**—एक व्यास (व्यास पहा).

२ व्यासाच्या पुराणशिष्यपरंपरेंतील भागवतमतें रोमहर्षणाचा शिष्य.

३ (सो. पूरु.) भागवत व वायु यांच्या मतें दुरितक्षयाचा पुत्र. हा तपोबलानें ब्राह्मणत्वास पोहोंचला होता. यानें रोमहर्षणापासून पुराणांचें अध्ययन केलें होतें (भा. १२.७). विष्णुमतें यास त्रय्यारुण म्हटलें आहे.

**त्रसद्**—त्रसदस्यूचें नामांतर.

**त्रसदस्यु पौरुकुत्स्य**—(सो. पूरु.) सूक्तद्रष्टा (ऋ. ४. ४२; ५. २७; ९. ११०). हा पुरुकुत्साचा मुलगा होता (ऋ. ४. ४२. ८; ७. १९. ३; ५. ३३. ८; ८. १९. ३६). हा पुरुकुत्साला त्याची स्त्री पुरुकुत्सानी हिजपासून अतिशय दुःखद कालीं झाला (ऋ. ४. ४२. ८). याचा पौरकुत्सि (ऋ. ७. १९. ३) व पौरकुत्स्य (ऋ. ५. ३३. ८; ८. १९. ३६) या नांवांनीं उल्लेख आला आहे. याला गैरिक्षित हें पैतृक नांव आहे. हा गिरिक्षिताचा वंशज होता (ऋ. ५. ३३. ८). व पुरुकुत्स हा दुर्गह याचा वंशज होता. यावरून पुढील वंशावळ तयार होते. दुर्गह, गिरिक्षित, पुरुकुत्स व त्रसदस्यु. त्रसदस्यु हा तृक्षीचा पूर्वज होय (ऋ. ८. २२. ७). हा पूरूंचा राजा होता (ऋ. ४. ३८. १; ६. ४६. ८). दिवोदासाचें आणि पूरु लोकांचें वैर होतें. सुदासाशीं पूरु लोकांचें वैर होतें, हें दाशराज्ञयुद्धावरून आपणांस दिसतें. तथापि, ती लढाई पुरुकुत्साच्या वेळींच समाप्त झाली होती. त्रसदस्यूशीं त्या लढाईचा कांहीं संबंध नाहीं.

कालान्तरानें कुरु व पूरु हे दोन्ही लोक एक झाले, याचें उदाहरण त्रसदस्युपुत्र कुरुश्रवण हें मानितां येईल. कुरुश्रवण आणि तृक्षि (ऋ. ८. २२. ७) या दोघांनाहि 'त्रासदस्यव' असें म्हटलें आहे द्रुह्यु व पूरु लोकांबरोबरहि एके ठिकाणीं (ऋ. ६.४६ ८) तृक्षीचा उल्लेख आला आहे. 'तार्क्ष्य' हा घोडा तृक्षीचा होता कीं नाहीं, हें सांगतां येत नाहीं. विरुद्ध पुरावा दिसेतोंपर्यंत हे दोघे भाऊ होते, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कुरु लोकांचें राहण्याचें ठिकाण मध्यदेश होय. पूरु लोक सरस्वतीच्या कांठीं राहत होते असा उल्लेख येतो. ती सरस्वतीहि मध्यदेशांतीलच होय. हेंहि या कुरुपूरूंच्या संबंधावरून ध्यानांत येतें. पूरूंनीं पुढें तेथें वसती केली.

यानें सौभरि काण्वाला ५० मुली बायका म्हणून दिल्या होत्या (ऋ. ८. १९. ३६).

ऋग्वेदांत त्रसदस्यु, त्र्यरुण त्रैवृष्ण व अश्वमेध (ऋ. ५. २७. ४–६) हीं सर्व एकाच व्यक्तीचीं नांवें नाहींत (बृहद्दे. ५. १२). या ठिकाणीं उल्लेखिलेला अश्वमेध आणि ऋग्वेदाच्या आठव्या मंडलांत येणारा अश्वमेध यांचा संबंध होता कीं काय, याला कांहीं आधार नाहीं. अश्वमेधाचें नांव पूतक्रतु असावें, असें स्पष्ट दिसतें (ऋ. ८. ६८. १७).

ऋग्वेदेतर अनेक ग्रंथांत प्राचीन कालांतला प्रसिद्ध यज्ञ करणारा म्हणून त्रसदस्यु पौरुकुत्स्य याचा पर आटणार, वीतहव्य श्रायस व कक्षीवत् औशिज यांबरोबर उल्लेख आला आहे (तै. सं. ५.६.५.३; क. सं. २२.३; पं. ब्रा. १३.३). या सर्वांस पुरातन थोर राजे, असें म्हटलें आहे. (जै. उ. ब्रा. २.६.११).

हा राजा आपला पुरोहित वृश जान याला बरोबर घेऊन रथांत बसला असतां पुरोहित याचा रथ फार जोरानें चालवूं लागला. इतक्यांत रथाच्या वेगानें धक्का लागून ब्राह्मणाचा एक मुलगा मेला. तेव्हां राजा पुरोहिताला म्हणाला, 'तूं रथ हांकीत असतां मुलगा मेला, त्याअर्थीं तूं हत्या केलीस.' त्यावर पुरोहितें म्हणाला, 'रथ तुझा आहे, त्याअर्थीं तूं हत्या केलीस.' याप्रमाणें ते दोघे भांडत इक्ष्वाकु राजाला विचारावयास गेले. इक्ष्वाकु राजानें सांगितलें कीं, 'वृश जान रथ हांकीत होता, त्यापक्षीं हत्या करणारा तोच होय.' नंतर वृश जानानें वार्श साम या नांवाचें स्तोत्र म्हणून मुलाला पुनः जिवंत केलें. तरी इक्ष्वाकु राजानें पक्षपात करून वृश जानालाच दोषी ठरविलें; म्हणून इक्ष्वाकु राजाच्या घरांतून अग्नि नाहींसा झाला व यज्ञयाग होणें बंद झालें. तेव्हां विचारांतीं राजाला समजलें कीं, वृश जानाला आपण दोषी ठरविल्यामुळें अग्नि निघून गेला आहे. नंतर राजा वृश जानाजवळ गेला, तेव्हां वृश जानानें त्रसदस्यूची पत्नी बनून राहिलेल्या पिशाचीकडे पाहिलें व वार्श साम सूक्त म्हणून अग्नीचें तेज पूर्ववत् परत आणिलें. त्यामुळें राजाच्या येथील यज्ञयाग वगैरे व्यवहार पूर्ववत् सुरू झाले (ऋ. सायणभाष्यांतील शाट्यायन ब्राह्मण व तांडक ५. २. १). या गोष्टीचा ऋग्वेदाशीं (५. २) संबंध दाखविला आहे. येथें त्र्यरुण त्रैवृष्ण व त्रसदस्यु एकच मानले असून त्याला ऐक्ष्वाक म्हटलें आहे. परंतु सायणाचार्य हें मान्य करीत नाहींत (ऋ. ५.२७.३; बृहद्दे. ५.१३-२२).

याचा पुत्र कुरुश्रवण (ऋ. १०. ३३. ४), याला हिरणिन् नांवाचा एक मुलगा होता. पण 'हिरणिन्' हें सायणमतें धनवान अशा अर्थाचें विशेषण आहे (ऋ. ५. ३३. ८; ६. ६३. ९). हा अंगिरसगोत्रांतील मंत्रकार होता.

२ (सू. इ.) हा पुरुकुत्स व नर्मदा यांचा पुत्र (वायु. ८८.७४). मत्स्यांत वसुद असा पाठभेद आहे. भविष्यांत याबद्दल त्रिशदश्व असा पाठभेद आहे. नर्मदा ही त्रसदस्यूची

नानको असावा ( मत्स्य. १२.३६; ब्रह्म. ७.९५ ). हा सूर्यवंशांतील असून वरील पूरुवंशांतील असावा.

**त्रसदस्यु**—मांधात्याचें नामांतर ( भा. ९.६.३३ ).

**त्राक्षायणि**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**त्रात ऐषुमत**—हा निगड पार्णवल्कीचा शिष्य ( वं. ब्रा. १. ३ ).

**त्रासदस्यव**—तृक्षि व कुरुश्रवण यांचें हें पैतृक नांव आहे.

**त्रिंशदाश्व**—( सू. इ. ) भविष्यमतें पुरुकुत्साचा पुत्र. याचा तीस घोड्यांचा रथ असे. याचें राज्य सत्ययुगाच्या दुसऱ्या चरणांत झालें.

**त्रिककुत्**—(सो. आयु.) भागवतमतें शुचि राजाचा पुत्र.

**त्रिगर्त**—एक क्षत्रिय ( म. स. ८. २० कुं. ).

**त्रिचक्षु**—( सो. पूरु. भविष्य. ) रुचाना पुत्र. यास नृचक्षु म्हटलें आहे.

**त्रिजट**—गार्ग्यकुलांतील एक वृद्ध ब्राह्मण. हा नांगराचा फाळ, कुदळ व आकडी घेऊन नेहमीं रानांत हिंडत असे. हा जमीन नांगरून आपली उपजीविका करीत असे. रामानें लक्ष्मणाला वनवासाला जाण्यापूर्वी दानधर्म व देणग्या देण्यास सांगितल्या. त्या वेळीं हाहि आपल्या तरुण बायकोच्या सांगण्यावरून, कांहीं मिळेल म्हणून आला होता. रामानें हा वृद्ध आहे, असें पाहून याच्याशीं थोडा विनोद केला. रामानें सांगितलें कीं, ही काठी ह्या गाईंमध्यें फेक. जेथपर्यंत काठी जाईल, तेथपर्यंत गाई तुला देईन. यानें कांठी फेकली ती गाई ओलांडून सरयूच्याहि पलीकडे गेली. तेव्हां रामानें विनोद केल्याबद्दल क्षमा मागून याला त्या क्षेत्रांतील सर्व गाई तर दिल्याच, शिवाय आणखीहि धन दिलें ( वा. रा. अयो. ३२ ).

**त्रिजटा**—लंकेंतील एक राक्षसी. रावणानें सीतेच्या संरक्षणार्थ ठेविलेल्या अनेक राक्षसींपैकीं ही एक होती ( म. व. २८१. ५५ कुं. ). हिला स्वप्नांत रावणाचा नाश होऊन रामाचा उत्कर्ष होणार, असें दिसलें. तेव्हांपासून हिनें सीतेला त्रास होऊं नये, अशी व्यवस्था केली (वा. रा. सुं. २७).

**त्रित**—वैदिक वाङ्मयांतील ही एक सूक्त नसलेली देवता आहे. पण निरुक्तांत हें एका द्रष्टयाचें नांव म्हणून आलें आहे ( ४. ६ ). इंद्रानें त्रिताकरितां अर्जुनाला ठार केलें ( ऋ. २.११. २० ). त्रितानें त्रिशीर्षाला ( ऋ. १०. ८. ८ ) व त्वष्टृपुत्र विश्वरूपाला ठार केलें ( ऋ. १०. ८. ९ ). मरुतांनीं युद्धांत त्रिताचें सामर्थ्य खचूं दिलें नाहीं ( ऋ. ८. ७. २४ ). त्रितानें इंद्राकरितां सोम कुटला ( ऋ. ८. ३२. २; ३४. ६; ३८. २ ). त्रितानें सोम देऊन सूर्याला तेजस्वी केलें ( ऋ. ९. ३७. ४ ). त्रित आणि त्रित आप्त्य एक असण्याचा संभव आहे.

त्रित शब्द इंद्राला लावला आहे ( ऋ. १. १८७. २ ). त्याप्रमाणें याचा इंद्राचा भक्त म्हणूनहि उल्लेख आहे ( ऋ. ९. ३२. २; १०. ८. ७-८ ). त्रित आणि गृत्समद कुलाचा कांहीं संबंध दिसतो ( ऋ. २. ११. १९ ). त्रिताला विभूवसाचा पुत्र म्हटलें आहे ( ऋ. १०. ४६. ३ ). त्रित अग्नीचें नांव आहे ( ऋ. ५. ४१. ४ ). त्रिताचें वरुण व सोम यांच्याशीं ऐक्य दाखविलें आहे ( ऋ. ८. ४१. ६; ९. ९५. ४ ).

त्रित विहिरींत पडला होता व तेथून यानें सुटका व्हावी, म्हणून देवाचा धांवा केला. तो धांवा बृहस्पतीनें ऐकला व त्रिताची सुटका केली (ऋ. १. १०५. १७). त्रित विहिरींत पडण्याचें कारण लांडग्यांची भितीच असावी (१८). याच ऋचेच्या भाष्यांत सायणानें शाट्यायन ब्राह्मणांतील एका कथेचा उल्लेख केला आहे. एकत, द्वित आणि त्रित असे तीन बंधु होते. त्रित विहिरींत पाणी पिण्याकरितां शिरला असतां दुसऱ्या भावांनीं याला विहिरींत ढकलून दिलें व विहीर बंद करून ते चालते झाले. तेव्हां त्रितानें सुटकेकरितां देवांची प्रार्थना केली ( ऋ. १. १०५ ). हे तीनहि बंधु अग्नीला उदकापासून झालेले पुत्र होत ( श. ब्रा. १. २. १. १-२ ; तै. ब्रा. ३. २. ८. १०-११). त्रिताला आप्त्य असें विशेषण लावलेलें आहे, त्याचा अर्थ उदकपुत्र असा सायणानें केला आहे ( ऋ. ८. ४७. १५ ). हा अनेक सूक्तांचा द्रष्टा आहे ( ऋ. १. १०५; ८. ४७; ९. ३३; ३४; १०२; १०. १-७ ). एके ठिकाणीं यानें मरुदेशांतील पाणपोईप्रमाणें तूं पूरूंना धनानें तोषविणारा आहेस, अशी अग्नीची प्रार्थना केली आहे ( ऋ. १०.४ ).

गौतमाला एकत, द्वित आणि त्रित असे तीन मुलगे होते. हे सर्वच ज्ञाते होते. पण धाकटा त्रित सर्वांत श्रेष्ठ होता. त्यामुळें सर्वत्र पित्याप्रमाणें याचा सत्कार होऊं लागला. परंतु, एकत व द्वित यांचा लोकांवर प्रभाव पडत नसल्यामुळें त्यांना विशेष द्रव्य मिळत नसे. म्हणून त्यांनीं त्रिताच्या साहाय्यानें यज्ञ पार पाडून पुष्कळ गाई मिळविल्या. गाई घेऊन सरस्वती-तीरावरून चालले असतां, त्रित पुढें चालला होता व बाकी दोघे बंधु गाई हांकीत मागून चालले होते. त्या दोघांना गाई पळविण्याची इच्छा झाली. त्रित स्वस्थपणें चालला असतां समोरून एक लांडगा आला, त्याला चुकविण्याकरितां त्रित जो बाजूला सरला, तो सरस्वती कांठच्या एका विहिरींत पडला. यानें खूप ओरडा केला. पण भावांनीं ऐकूनहि लोभामुळें तिकडे दुर्लक्ष केलें. लांडग्याची भीतीहि होतीच. जलहीन

आणि गवतानें व धुळीनें भरलेल्या विहिरींत पडलेल्या त्रितानें आपण मृत्यूच्या भीतीनें बाजूस सरलों व विहिरींत पडलों, एवढ्याकरितां मृत्यूची भीति नाहीशी केली पाहिजे, असा विचार केला व त्याकरितां विहिरींत लोंबणाऱ्या वल्लीला सोम कल्पून यानें यज्ञ केला. त्यामुळें प्रसन्न झालेल्या देवांनीं याच्या इच्छेप्रमाणें सरस्वतीच्या पाण्याच्या प्रवाहानें बाहेर काढलें व त्या कूपाला जो स्पर्श करील, त्याला देवलोक प्राप्त होईल अशी व्यवस्था केली. घरीं गेल्यावर भावांना यानें शापानें लांडगे केले व त्यांची संतति माकडें, अस्वलें वगैरे केली. ही पूर्व युगांतील गोष्ट बलराम त्रिताच्या कूपावर आला, त्या वेळेस त्यास माहात्म्य म्हणून सांगण्यांत आली ( म. श. ३६; भा. १०. ७८ ). आत्रेय राजाचा पुत्र म्हणून त्रिताची हीच गोष्ट दुसरीकडे आली आहे ( स्कंद. ७. १. २५७ ).

२ चक्षुर्मनूस नड्वलेपासून झालेल्या पुत्रांतील एक.

३ अंगिरसगोत्रांतील एक मंत्रकार.

४ ब्रह्मदेवाच्या मानसपुत्रांतील एक.

**त्रिधन्वन्**—( सू. इ. ) विष्णु, वायु व भविष्य यांच्या मतें वसुमनस्‌चा पुत्र. पण मत्स्य व पद्म यांच्या मतें संभूतीचा पुत्र ( पद्म. सृ. ८ ). भागवतांत अरुणपुत्र त्रिबंधन दिला आहे, तो व हा एकच.

**त्रिधामन्**—चालू मन्वंतरांतील दहावा व्यास (व्यास पहा).

२ दहावा शिवावतार. यानें काशीस तपश्चर्या केली. यास भृंग, बलबंधु, नरामित्र व केतुशृंग हे चार शिष्य होते. याचे वेळीं भृगु हा व्यास होता ( शिव. शत. ५ ).

**त्रिनाभ**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**त्रिनेत्र**—( मगध. भविष्य. ). मत्स्यमतें निर्वृत्तीचा पुत्र. वायुमतें सुव्रत, ब्रह्मांड व विष्णु यांच्या मतें सुश्रम व भागवतमतें शम. यानें मत्स्यमतें अठ्ठावीस, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें अडतीस वर्षें राज्य केलें.

**त्रिपुर**—ही एक व्यक्ती नसून मयासुरानें ब्रह्मदेवाच्या वरप्रसादानें तीन पुरें ( नगरें ) वसविलीं, त्या प्रत्येकांत तारकासुरपुत्र तारक्ष, कमलाक्ष आणि विद्युन्माली यांना अधिपत्य दिलें, त्यांचें हें निदर्शक आहे ( लिंग. १.७०; म. द्रो. २०२; क. ३३ ). मयासुरानें सुव्यवस्थित अशीं हीं पुरें निर्माण करून तीं असुरांना दिलीं. त्या वेळीं त्यानें असुरांना असें बजाविलें कीं, तुम्ही देवांच्या वाटेस जाऊं नये व त्यांचा अनादरहि करूं नये. परंतु पुढें यांना विपरीत बुद्धि होऊन हे अधर्माचरण करूं लागले, त्यामुळें यांचा त्रिपुरांसह नाश झाला. हें अधर्माचरण विष्णूनें जिनाच्या रूपानें यांच्यांत पसरविलें (शिव. रुद्र. ५.५ ). शंकराचें यांच्याशीं युद्ध झालें त्या वेळीं शंकराच्या अंगांतून जे घर्मबिंदु पडले, ते रुद्राक्ष झाले ( पद्म. सृ. ५९ ). ज्यामुळें हे अमर होते ती अमृतकुंडें देवांनीं गोरूपांनीं पिऊन टाकलीं व शंकरानें त्रिपुराचें दहन केलें ( पद्म. सृ. १३ ). यांतच तारक्ष, कमलाक्ष आणि विद्युन्माली या असुरांचा अंत झाला ( म. द्रो. २०२; लिंग. १.७१–७२ ). त्रिपुरांत धार्मिकता असल्यामुळें यावर जय मिळवितां येईना, म्हणून विष्णूनें बुद्धाच्या रूपानें हीं पुरें धर्मरहित केलीं. आणि नंतर देवांनीं युद्धाला सुरवात केली ( मत्स्य. १३०-१३७; भा. ७.१०; म. अनु. १६१ ).

**त्रिपुरसुंदरी**—एक देवी. हिनें अर्जुनास बालविद्या दिली ( पद्म. पा. ७४ ).

**त्रिबंधन**—( सू. इ. ) भागवतमतें अरुणाचा पुत्र ( त्रिधन्वन् पहा ).

**त्रिभानु**—( सो. तुर्वसु. ) भागवतमतें भानुमान् राजाचा पुत्र. याचा पुत्र करंधम. विष्णुमतें त्रैशांब, वायुमतें त्रिसानु व मत्स्यमतें त्रिसारि व हा एकच.

**त्रिमार्ष्टि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**त्रिमूर्ति**—इंद्रप्रमतीचें नामान्तर.

**त्रिमूर्धन्**—रावणाचा एक पुत्र.

**त्रिवक्रा**—कंसदासी कुब्जा हिचें नामांतर ( भा. १०. ४.२३ ).

**त्रिवरातम**—आर्चनानसाबद्दल पाठभेद.

**त्रिवृश**—एक व्यास ( व्यास पहा ).

**त्रिवेद कृष्णरात लौहित्य**—हा श्याम जयन्त लौहित्याचा शिष्य होता ( जै. उ. ब्रा. ३.४२.१ ).

**त्रिशंकु**—एक ऋषि. हा आपणांस 'मी सर्वज्ञ, मी अज्ञ,' असें म्हणवितो ( तै. आ. १.१०.१ ). पौराणिक व हा एक नसावा.

२ ( सू. इ. ) त्रिबंधन राजाचा थोरला मुलगा. कांहीं ठिकाणीं याच्या बापाचें नांव त्र्यय्यारुण असें दिलें आहे. ( ब्रह्म. ८. ९७; ह. वं. १.१२ ). देवी भागवतांत त्र्यय्यारुण असें नांव नसून अरुण असें नांव आहे ( ७. १० ). याचें मूळचें नांव सत्यव्रत होय. पण वसिष्ठाच्या शापामुळें यास त्रिशंकु असें नांव पडलें.

वसिष्ठ हा याचा कुलोपाध्याय होता. पण हा दुर्वर्तनी असल्यामुळें याच्याबद्दल कोणाचेंहि मत अनुकूल नव्हतें. बापानें याला हद्दपार केलें होतें. हद्दपार करण्याचें कारण देवी भागवतांत दिलें आहे ( ७. १० ). यानें एका ब्राह्मणस्त्रीचा अपहार केला. याचें म्हणणें कीं, मी सप्तपदी होण्याच्या पूर्वी अपहार केला असल्यामुळें मी दोषी नाहीं. वसिष्ठावर राग असण्याचें कारणहि हेंच होय. वसिष्ठानें जर सप्तपदी

होण्याच्या पूर्वी ब्राह्मणस्त्रीचा अपहार केला, हा मुद्दा याच्या बापाला नीट समजाऊन दिला असतां तर बापानें याला हद्दपार करण्याची शिक्षा दिली नसती. बापहि मुलगा चांगला नाहीं, दुसरा चांगला मुलगा व्हावा, म्हणून तप करण्याकरतां तपश्चर्येला गेला. अयोध्येंत राजा नसल्यामुळें अंदाधुंदी माजली व भयंकर दुष्काळ पडला. दुष्काळ नऊ वर्षे ओळीनें असल्यामुळें लोकांचे फार हाल झाले. त्रिशंकु ज्या अरण्यांत होता, तेथेंच विश्वामित्राचाहि आश्रम होता. पण विश्वामित्र तपश्चर्येस गेला असल्यामुळें आश्रमांत विश्वामित्राची बायको व तीन मुलें होतीं. त्रिशंकूनें थोडेसें मांस आश्रमाबाहेरील झाडास बांधावें व त्यावर त्यांनीं आपली उपजीविका करावी असा क्रम चालला होता. एकदां इतर पशु न मिळाल्यामुळें यानें वसिष्ठाची गाय कामधेनु मारली. त्याबरोबर, तुझ्या डोक्यावर तीन शंकु उठतील, गोवध, स्त्रीहरण व पित्याचा क्रोध यांमुळें पिशाच होशील व त्रिशंकु नांवानें तुला लोक ओळखतील, असा वशिष्ठानें याला शाप दिला.

वसिष्ठाच्या ह्या शापानें त्रिशंकु व वसिष्ठ यांचें वैर जास्तच विकोपाला गेलें. प्रथम त्रिशंकु सुधारावा म्हणून याला हद्दपार करण्यांत आलें. तेथें त्रिशंकु व्रतस्थ राहातहि होता. पण गोहत्येमुळें वसिष्ठ अत्यंत रागावला. आणि त्यानें पिशाच होण्याविषयीं याला शाप दिला. पुढें देवीच्या कृपेनें पिशाचत्व नष्ट होऊन बापानें याला आपल्या गादीवर आणून बसविलें व आपण तपश्चर्येला निघून गेला ( दे. भा. ७. १२ ).

विश्वामित्र तपश्चर्येहून परत आल्यावर त्याला आपल्या कुटुंबाचें पोषण त्रिशंकूनें केलें, हें ऐकून त्रिशंकूबद्दल कृतज्ञता उत्पन्न झाली व त्यानें यास वर मागण्यास सांगितलें. तेव्हां त्रिशंकूनें सदेह स्वर्गांत जाण्याची इच्छा व्यक्त केली. नंतर विश्वामित्रानें याला राज्यावर बसवून याच्याकडून यज्ञ करविला, आणि सर्व देवता व वसिष्ठ पाहत असतां त्यानें त्रिशंकूला स्वर्गास पोंचविलें ( ह. वं. १. १३ ).

त्रिशंकूच्या मनांतील सदेह स्वर्गाला जाण्याची कल्पना यानें वसिष्ठापुढें मांडली असतां त्यानें अशक्य म्हणून उत्तर दिलें. तेव्हां हा त्याच्या पुत्रांकडे गेला. त्यांनीं पित्याकडे जाऊन, त्यानें अशक्य म्हणून सांगितल्यावर पुनः आमच्याकडे कां आलास ? म्हणून याचा निषेध केला. तेव्हां त्रिशंकु म्हणाला, मी दुसरीकडे जाऊन मार्ग काढतों. तेव्हां त्या पुत्रांनीं याला चांडाळ होशील असा शाप दिला. पुढें हा विश्वामित्राला शरण गेला. त्यानें यास सदेह स्वर्गास नेण्याचें आश्वासन दिलें व सर्वांना यज्ञाकरितां बोलावणीं धाडलीं. तेव्हां वसिष्ठाशिवाय सर्वांनीं येण्याचें कबूल केलें. वसिष्ठानें मात्र असा निरोप पाठविला कीं, जेथें यज्ञ करणारा चांडाल आहे, उपाध्याय क्षत्रिय आहे, तेथें कोण येणार आहे ? आणि तेथें स्वर्गाला तरी कोण जाणार आहे ? हा निरोप ऐकून विश्वामित्राच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यानें वसिष्ठकुल भस्मसात् केलें आणि पुढला जन्म डोंबाच्या घरीं प्राप्त होईल, असा शाप दिला.

पुढें यज्ञ सुरू झाला. विश्वामित्र अध्वर्युस्थानीं होता. देवतांना बोलावूनहि त्या येईनात; तेव्हां त्यानें आपलें तपःसामर्थ्य खर्ची घालून त्रिशंकूला सदेह स्वर्गाला नेण्यास सुरुवात केली. पाहतां पाहतां त्रिशंकु स्वर्गावर गेला असतां सर्व देवांसह इंद्रानें याला पुनः खालीं ढकललें. तेव्हां हा ‘ त्राहि त्राहि ’ करीत खालीं डोकें वर पाय करून खालीं येऊं लागला. तें ऐकून विश्वामित्राला अत्यंत राग आला व ‘ थांब थांब ’ असें तो ओरडला. त्यानें दक्षिणदिशेकडे सप्तर्षि व नक्षत्रमाला नवीन निर्माण केल्या. ‘ अन्यमिन्द्रं करिष्यामि लोको वा स्यादनिन्द्रकः ’ दुसरा इन्द्र करीन किंवा माझा स्वर्ग इंद्ररहितच असेल म्हणून देव उत्पन्न करण्यास त्यानें आरंभ केला. तेव्हां देवांत मोठी खळबळ उडाली व गुरुशाप झालेला स्वर्गास योग्य नाहीं, असें ते म्हणाले. विश्वामित्र म्हणाला, माझी प्रतिज्ञा मी खोटी करूं शकत नाहीं. तेव्हां देवांनीं त्याला मान्यता दिली. सर्व प्रसिद्ध ज्योतिश्चक्राच्या बाजूला दक्षिण बाजूस तुझीं नक्षत्रें व त्यांत त्रिशंकु राहील, असें त्यास आश्वासन दिलें व विश्वामित्राची प्रतिज्ञा शेवटास गेली ( वा. रा. बा. ५७-६१ ). तेव्हां तपोनाशक म्हणून त्रिशंकु हें मोठें विघ्न आलें, असें समजून विश्वामित्रानें आपली तपश्चर्येची जागा दक्षिणेकडची बदलून पुष्करतीर्थावर केली ( ६२ ).

स्कंदपुराणांत बरीच वेगळी हकीगत आली आहे; ती थोडक्यांत पुढें देली आहे.

सदेह स्वर्गाला नेणारा यज्ञ पाहिजे. वसिष्ठानें तें नाकबूल करून याला नवा गुरु करण्यास सांगितलें. मुलांना हा तसेंच म्हणाला. तेव्हां त्यांनीं चांडाल होण्याचा शाप दिला. तत्काल याचें शरीर काळें ठिक्कर पडून दुर्गंधयुक्त झालें. तेव्हां याला आपल्या दुराग्रहाचा वीट आला. घरीं येऊन यानें दारांतूनच मुलाला गादीवर बसविण्यास सांगितलें व आपण मृत्यु किंवा स्वर्ग याचे मार्गे लागला. याला जगन्मित्र विश्वामित्राशिवाय कोणीच दिसेना. तेथें गेल्यावर प्रथम आंत जाऊं देईनात. पण पुढें विश्वामित्राची व याची भेट झाल्यावर विश्वामित्रानें शापाची सर्व हकीगत समजाऊन घेतली व वसिष्ठाशीं असलेल्या स्पर्धेनें त्यानें त्रिशंकूला सदेह स्वर्गाला नेण्याची प्रतिज्ञा केली. प्रथम याचें चांडालत्व दूर करण्यासाठीं याला घेऊन तीर्थयात्रा करण्यास सुरुवात केली. पण राजाचें चांडालत्व दूर होईना. पुढें यांना अर्बुदाचलावर मार्कंडेय ऋषि

भेटला. त्याला राजाचा सर्व वृत्तांत व आपली प्रतिज्ञा सांगून चांडालत्व दूर होण्याचा उपाय विचारिला. त्यावर मार्कंडेयानें हाटकेश्वरक्षेत्रांत जाऊन पाताल गंगेंत स्नान व हाटकेश्वराचें दर्शन घेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें करितांच त्रिशंकूचें चांडालत्व नष्ट झालें व हा तेजस्वी झाला. त्याबरोबर त्रिशंकूला यज्ञसामग्री जमविण्यास सांगून विश्वामित्र ब्रह्मदेवाकडे गेला व म्हणाला, त्रिशंकूला सदेह तुझ्या लोकीं आणण्याकरितां मी त्याकडून यज्ञ करवीत आहें तरी आपण सर्व देवांसह तेथें येऊन यज्ञभाग स्वीकारावा. तेव्हां ब्रह्मदेवानें देहान्तराशिवाय स्वर्ग नाहीं. राजानें यज्ञ करून देहांतर (मृत) झाल्यावर स्वर्गाला यावें असें सांगितलें. तेव्हां विश्वामित्र संतप्त झाला व म्हणाला, माझ्या तपश्चर्येच्या सामर्थ्यानें हें घडवून आणतों. म्हणून त्रिशंकूकडे परत आला व आपण स्वतः अध्वर्यु होऊन शांडिल्यादिकांना त्यानें होता वगैरे ऋत्विजांचीं कामें दिलीं. यज्ञ बारा वर्षे चालून अवभृथ स्नानहि पार पडलें. पण त्रिशंकूला स्वर्गाची कांहीं आशा दिसेना. आतां याला वसिष्ठाकडून आपला उपहास होईल, हें मनांत येऊन फारच वाईट वाटूं लागलें. विश्वामित्रानें याला आश्वासन देऊन वेळ पडल्यास प्रतिसृष्टि निर्माण करीन असेंहि सांगितलें. पुढें प्रतिसृष्टि निर्माण करण्याचें सामर्थ्य यावें म्हणून शंकाराची आराधना करून तसा वरहि मिळविला व प्रतिसृष्टि निर्माण करूं लागला. तेव्हां ब्रह्मदेवानें येऊन इंद्रादि देवांचा नाश होण्यापूर्वी प्रतिसृष्टि थांबविण्यास सांगितलें. विश्वामित्रानें त्रिशंकूला सदेह स्वर्ग प्राप्त होत असल्यास प्रतिसृष्टि निर्माण करणें थांबविण्याचें कबूल केलें. त्याला ब्रह्मदेवानें अनुमति दिल्यावर निर्माण केलेली प्रतिसृष्टि अक्षय होण्याविषयीं त्यानें ब्रह्मदेवाची प्रार्थना केल्यावर तुझी सृष्टि अक्षय होईल; पण यज्ञार्ह होणार नाहीं, असें सांगून ब्रह्मदेव त्रिशंकूसह सत्यलोकीं गेला (स्कंद ५. ६. २. ७). यानें भविष्यमतें दहा हजार वर्षे राज्य केलें.

याच्या बायकोचें नांव सत्यरथा होय. तिच्यापासून यास सुप्रसिद्ध हरिश्चंद्र नांवाचा मुलगा झाला (ह. वं. १.१३).

त्रिशंकूच्या धार्मिकतेचें वर्णन रामायणांत विश्वामित्राच्या तोंडीं बरेंच आलें आहे (वा. रा. बा. ५८) व त्रिशंकूनेंहि सांगितलें आहे. यानें शंभर यज्ञ केले होते. यानें क्षत्रियधर्माची शपथ वाहून सांगितलें आहे कीं, 'मी कधीं खोटें बोललों नाहीं व बोलणारहि नाहीं. गुरूलाहि मी शील व वर्तन यांनीं संतुष्ट केलें आहे, प्रजेचेंहि धर्मानें पालन केलें आहे, असें असूनहि मला यश मिळत नाहीं. दैवयोग आहे, उद्योग निरर्थक आहे असें दिसतें, विश्वामित्राचीहि त्याच्याबद्दल खात्री होती (५९). वसिष्ठालाहि त्रिशंकूच्या [illegible] आदर आहे. जरा उच्छृंखल आहे, पण सुधारेल अशी त्याची कल्पना आहे (ह. वं. १. १३).

वनवासांत असतां याचें वर्तन चांगलें होतें. तेथें यानें विश्वामित्राच्या मुलाबाळांचें संरक्षण केलें; त्यांत याची दयाळुवृत्ति व्यक्त होते. ब्राह्मणाची मुलगी पळविण्यासंबंधीं उल्लेखाची दुसरी बाजू हरिवंश व देवीभागवतांत मांडली आहे. ती विचारसरणी त्या कालीं जुळणारी असावी. वसिष्ठाची गाय जाणून बुजून मारली हा एक आक्षेप आहे. पण वसिष्ठाशीं याचें असलेलें वैर हेंच त्याचें मुख्य कारण आहे. सदेह स्वर्गास जाण्याची इच्छा हा एक याच्या विचित्रपणाचा भाग आहे. स्वर्गास सदेह जाणें अशक्य असें वसिष्ठानें सांगितलें असलें, तरी वसिष्ठविश्वामित्रादि ऋषि स्वर्गास जाऊन परत येत असत, असें हरिश्चंद्राच्या कथेंत दिसतें. या गोष्टींतहि तसा उल्लेख आला आहे. अर्जुनानें इंद्राच्या घरीं जाऊन कांहीं दिवस पाहुणचार घेतल्याचा उल्लेख महाभारतांत आहे त्याप्रमाणें त्रिशंकूलाहि जावयास हरकत नव्हती. पण वसिष्ठानें आजिबात नाकारल्याबरोबर याला शंका आली कीं, आपलें याचें पूर्ववैर आहे म्हणून हा नाकारीत आहे. इंद्रादि देवांनींहि याला स्वर्गांत न घेण्याचें कारण गुरूचा शाप म्हणून सांगितला आहे. देहान्तर झालें पाहिजे हें सांगितलें नाहीं, यावरून सदेह स्वर्गास जाणें ही गोष्ट त्या वेळीं अशक्य नव्हती.

**त्रिशिख**—तामस मन्वंतरांतील इंद्र.

**त्रिशिरस्**—विश्वसु व चवाका यांचा पुत्र (विश्वरूप पहा).

२ दूषण राक्षसाच्या चार अमात्यांतील एक. हा रामाच्या हातून मरण पावला.

३ त्रिशीर्षाचें नामांतर (त्रिशीर्ष पहा).

४ कश्यप व खशा यांचा पुत्र.

**त्रिशिरस् त्वाष्ट्र**—एक सूक्तद्रष्टा (ऋ. १०. ८. ९).

**त्रिशीर्ष**—रावणाच्या पुत्रांतील एक. याला मारुतीनें मारिलें (वा. रा. यु. ७०).

**त्रिशोक काण्व**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८. ४५). याच्या नांवाचें एक साम आहे (पं. ब्रा. ८. १). मूळ ग्रंथांत हा शब्द अनेक वेळां आला असला, तरी तो सर्वत्र व्यक्तिवाचक असल्याबद्दल निश्चित सांगतां येत नाहीं.

**त्रिसानु** व **त्रिसारि**—(सो. तुर्वसु.) गोभानुपुत्र (त्रिभानु पहा).

**त्रिस्तनी**—अशोकवनिकेंतील सीतासंरक्षक राक्षसी.

**त्रैतन**—हा दीर्घतमस्‌चा दास व कदाचित् त्रिताचा संबंधी असावा (ऋ. १. १५८. ५).

**त्र्यारुण**—त्र्यरुणाचें पैतृक नांव (पं. ब्रा. १३.३.१२).

**त्रैपुर**—त्रिपुरीचा राजा. राजसूय यज्ञाच्या वेळीं सहदेवानें यास जिंकून याजपासून बरीच खंडणी घेतली (म. स. ३१).

**त्रैपुरि**—त्रिपुराचा पुत्र. पित्याचा शंकरानें वध केल्यामुळें हा गजाननावर चालून गेला. परंतु गजाननानें यास ठार मारिलें ( पद्म. सृ. ७४ ).

**त्रैवणि**—औपजंघनीचा शिष्य ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ).

**त्रैवृष्ण**—त्र्यरुणाचें पैतृक नांव ( ऋ. ५. २७. १ ).

**त्रैशांब**—( सो. तुर्वसु. ) गोभानूचा पुत्र ( त्रिभानु पहा ).

**त्रैशृंग**—( त्रैशृंगायण पहा ),

**त्रैशृंगायण**—वसिष्ठगोत्री ऋषि. याच्याबद्दल त्रैशृंग असा पाठभेद आहे.

**त्र्यक्षी**—अशोकवनिकेंतील एक राक्षसी.

**त्र्यम्बकेश्वर**—हा एक शिवाचा अवतार आहे. हा गोदावरीच्या तीरीं आहे. गौतमाच्या प्रार्थनेवरून पृथ्वीवर आला ( शिव. शत. ४२ ).

**त्र्यय्यारुण**—पुराणप्रवक्ता.

**त्र्यरुण त्रैवृष्ण त्रसदस्यु**—( त्रसदस्यु पहा )

**त्र्यारुण**—अत्रिकुलोत्पन्न एक ऋषि.

**त्वष्टृ**—देवांचा शिल्पी (अ. वे. १२.३.३३ ). याचा पुत्र विश्वरूप इंद्रानें मारिला, तेव्हां इंद्रविरहित सर्व कर्में करण्याचें यानें ठरविलें. तरी यानें केलेल्या सोमयागांत इंद्र आपणहून शिरला व सोम प्याला. पण त्याला तो सोम ओकून पडला. राहिलेल्या सोमानें त्वष्ट्यानें हवन केलें व इंद्रशत्रु वाढविला. त्याला वृत्र असें म्हणतात ( श. ब्रा. १.६.३.१ ). गर्भवृद्धीकरितां याची प्रार्थना करितात ( बृ. उ. ६. ४.२१; ऋ. १०. १८४.१ ). असुरांचा पुरोहित वरुत्रि, याबरोबर याचा उल्लेख आहे ( मै. सं. ४.८.१; क. सं. ३०.१ ). शुक्र व गौ यांचा हा पुत्र. याच्या बायकोचें नांव वैरोचिनी यशोधरा ( ब्रह्मांड. ३.१.८७ ). हा विश्वकर्मा व प्रजापतींपैकीं एक होता. हीं नांवें पडण्याचें कारण म्हणजे विश्वकर्मा व प्रजापति हे अधिकार यास होते. हस्तकौशल्यानें जें करावयाचें तें यानें करावें असा याचा अधिकार व त्याप्रमाणें प्रत्येक गोष्ट याजकडून करविली जाई; म्हणजे ही सर्व प्रजा याचेपासूनच उत्पन्न व्हावयाची म्हणून यास प्रजापति असें म्हणतात.

याला एकंदर तीन अपत्यें होतीं. तीं त्रिशिरस्, विश्वरूप व विश्वकर्मन् ( ब्रह्मांड. ३. १. ८६ ).

याचा पुत्र विश्वरूप ( म. उ. ९. ३ कुं; भा. ६. ६ ) हा देवांचा आचार्य होता. पण यास इंद्रानें मारिलें. तेव्हां यानें एका हवनांतून वृत्र उत्पन्न केला व त्यास इंद्रावर सोडिलें ( भा. ६. ९. म. उ. ९; ५५ कुं. ). सुंदोपसुंदांच्या वधाकरितां तिलोत्तमा नांवाची सुंदर स्त्री यानें तयार केली. पुढें त्रिपुरास मारण्याकरितां यानें, आकाश, तारांगण वगैरे सर्व जिनसा घेऊन एक शंकराकरितां रथ निर्माण केला ( म. आ. २३१. १२ कुं ).

हा शिल्पशास्त्रनिपुण असून यानें दधीचि ऋषीच्या अस्थींचें एक शस्त्र बनविलें व वृत्राच्या वध करण्याकरितां तें इंद्राला दिलें ( पद्म. सृ. १९; भा. ६. ९. ५४ ).

यानें प्रल्हादास हिरण्यकशिपूच्या म्हणण्याप्रमाणें शिकविण्याचा प्रयत्न केला होता, पण तो फसला व प्रह्लादानेंच यास चार गोष्टी शिकविल्या.

पुढें धर्मराजास अर्धराज्याभिषेक केला, त्या वेळीं श्रीकृष्णानें इंद्राची स्तुति केली, तेव्हां इंद्रानें याला पाठवून इंद्रप्रस्थ नगरी तयार करावयास सांगितली. त्याप्रमाणें ती यानें केली ( म. आ. २२७. ५९ कुं. ).

२ कश्यप व अदिति यांचा पुत्र व एक आदित्य ( भा. ६. ६. ३९). याच्या पत्नीचें नांव रचना ( ६. ६.४३). ही प्रह्लादकन्या म्हणून प्रह्लादी म्हणूनहि प्रसिद्ध आहे. हिला विरोचना असें नामान्तर आहे ( भवि. ब्राह्म. ७. ९ ). याला विश्वकर्मन् असें नामान्तर आढळतें ( भवि. ब्राह्म.७९; भा. ६. ९. ५३ ). हा प्रत्येक इष म्हणजे अश्विनमासीं प्रकाशतो ( भा. १२. ११. ४३ ). याला सन्निवेश व विश्वरूप अशीं दोन मुलें झालीं. बृहस्पतीनें टाकलें तेव्हां शत्रूच्या कन्येचा पुत्र होता तरी देवांनीं विश्वरूपाला पुरोहित केलें ( भा. ६. ६. ४४ ). विश्वरूपाची सुप्रसिद्ध कथा याच्या पुत्रावर भागवतांत घातली आहे. पण ती शुक्रपुत्राची आहे. म्हणून आम्ही दोन भिन्न केले आहेत ( संज्ञा पहा ).

३ अष्टवसूंपैकीं प्रभास व अंगिराकन्या ब्रह्मवादिनी यांचा पुत्र ( भवि. ब्राह्म. २.७९. १६-१७). हा प्रति फाल्गुनमासीं प्रकाशतो व याचीं किरणें ११०० आहेत ( भवि. ब्राह्म. ७८ ).

४ (स्वा. प्रिय.) भागवतमतें भौवन राजा व दूषणा यांचा पुत्र. विष्णूमतें मनस्यूचा पुत्र. यास विरोचना नांवाची स्त्री होती व तिजपासून यास विरज नामक पुत्र झाला (भा. ५.१५.१५).

५ अकरा रुद्रांपैकीं एक.

६ तारासुराशीं देवांच्या झालेल्या युद्धांत तारासुराचे बाजूचा एक दानव ( मत्स्य. १७२ ).

**त्वष्टाधर**—शुक्राचार्यांचा एक पुत्र. हा असुरयाजक असून अत्यंत तेजस्वी व ब्रह्मविद्येंत प्रवीण होता ( म. आ. ६५ ).

**त्वाष्ट्र**—त्वष्टृ प्रजापतीचा पुत्र (भा. ६. ९). आभूतीचें व विश्वरूपाचें पैतृक नांव.

**त्वाष्ट्री**—त्वष्टृयाची कन्या. ही आदित्यास दिलेली होती. हिला अश्विनीकुमार नांवाचे दोन पुत्र झाले (म. आ. ६७. ३५ कुं.; संज्ञा पहा).

## द

**दंष्ट्र**—लंकेंतील एक राक्षस (वा. रा. सुं. ६).

**दंष्ट्रा**—कश्यप व क्रोधा यांची कन्या व पुलहाची स्त्री.

**दक्ष**—देवता म्हणून ऋग्वेदांत थोडया ठिकाणीं याचा उल्लेख आहे. दक्ष हा अदितीचा मुलगा व अदिति ही दक्षाची मुलगी असा उलटसुलट प्रकार आढळतो (ऋ. १०. ७२. ४-५). दक्ष प्रजापतीनें प्रजा व समृद्धि प्राप्त व्हावी म्हणून यज्ञ केला, याला दाक्षायणयज्ञ किंवा वासिष्ठयज्ञ असें कांहीं लोक म्हणतात. येथें दक्षाला पार्वति म्हटलें आहे व याच्या वंशजांना त्या यज्ञानें राज्य प्राप्त झाल्याचाहि निर्देश आहे (श. ब्रा. २. ४. ४. १; ६; सां. ब्रा. ४. ४).

हा ब्रह्मदेवाच्या दक्षिण अंगुष्ठापासून झाला (म.आ.६७.१०. कुं.; विष्णु. १.१५; ह. वं. १.२; भा. ३.१२; ६३.३ कुं.). हा स्वायंभुव मन्वंतरांत होऊन गेला. स्वायंभुव मनूची मुलगी प्रसूति याची बायको होती. तिच्यापासून दक्षाला सोळा मुली झाल्या. पैकीं श्रद्धा, मैत्री, दया, शांति, तुष्टि, पुष्टि, क्रिया, उन्नति, बुद्धि, मेधा, तितिक्षा आणि मूर्ति ह्या तेरा धर्म प्रजापतीला भार्यार्थ दिल्या. स्वाहा अग्नीला, स्वधा अग्निष्वात्तांना व सोळावी सती शंकराला दिली (भा. ४. १.). ब्रह्मदेवाच्या डाव्या आंगठ्यापासून जन्मलेली स्त्री दक्षाची बायको होती. तिला एकंदर ५०० मुली झाल्या (म. आ. ६७. ११ कुं.).

एकदां सृष्टि करणाऱ्या प्रजापतींनीं यज्ञ चालू केला असतां तेथें दक्ष प्रजापति आला. त्या वेळीं शंकर व ब्रह्मदेव यांखेरीज बाकीचे सर्व देव उभे राहिले. यामुळें शंकराचा यास अत्यंत राग येऊन यानें त्यास शाप दिला. उलट नंदिकेश्वरानेंहि यास शाप दिला; व इतर ऋषींनीं दक्षाच्या शापास अनुमोदन दिल्यामुळें त्यांसहि ते जन्ममरणाचीं दुःखें सोशीत संसार करतील, असा शाप दिला. याच प्रसंगीं भृगु ऋषीनेंहि शंकराच्या शिष्यांना दुर्धर असे परत शाप दिले (भा. ४. २; ब्रह्मांड. १.१. ६४). याप्रमाणें दक्ष व शंकर या सासरे-जावयांचें वितुष्ट वाढत चाललें. यानंतर ब्रह्मदेवानें दक्षाला प्रजापतींच्या अध्यक्षपदाचा अभिषेक केला. त्यामुळें याला थोडा गर्व झाला आणि त्या गर्वभरांत यानें शंकर आदिकरून सर्व ब्रह्मनिष्ठांचा अव्हेर करून यज्ञ आरंभिला. प्रथम वाजपेय यज्ञ करून नंतर बृहस्पतीसवास प्रारंभ केला. या यज्ञांत दक्षानें सर्व ब्रह्मर्षि, देवर्षि आणि पितर यांना दक्षिणा देऊन त्यांचा त्यांच्या स्त्रियांसमवेत सत्कार केला. तेव्हां आकाशांत संचारणाऱ्या देवांकडून दक्षकन्या सतीस आपल्या माहेरीं यज्ञ चालला असल्याचें समजलें. तेव्हां तिनें शंकरास तिकडे चलावें अशी विनंति केली. पण शंकराला दक्षाच्या मर्मभेदक शब्दांची आठवण असल्यानें त्यानें येण्याचें नाकारिलें. नाइलाजानें सतीस एकटेंच जावें लागलें. तिच्याबरोबर नंदिकेश्वर, यक्ष व शिवगणहि निघाले. यज्ञमंडपांत माता व बहिणी यांखेरीज कोणीहि त्यांचें स्वागत केलें नाहीं. खुद्द दक्षानें तिचा अनादर केला. याबद्दल पित्याची तिनें पुष्कळ कानउघाडणी केली व रागांत तिनें स्वतःस अंतराग्नीनें जाळून घेतलें.

हें वर्तमान ऐकून शंकरानें वीरभद्रास निर्माण करून त्यास दक्षवध करण्यास सांगितलें. महाभारतांत वीरभद्र हा शंकराज्ञेनुसार दक्षयज्ञांत गेला व मी तुझ्या यज्ञाचा नाश करावयास आलों आहें, असें म्हणाला. लगेच दक्ष शंकरास शरण गेला (म. शां. २८५). त्यानें दक्षवध केला. दक्षवधानंतर ब्रह्मदेव शंकराकडे गेला व त्यानें त्याचें स्तवन केलें. तेव्हां दक्षास बोकडाचें डोकें बसवून त्यास सजीव केलें. लगेच दक्षानें शंकराची क्षमा मागितली (भा. ४. ३-७). दक्ष म्हणजे प्राण होय, असें वायुपुराणांत दिलें आहे (वायु. १. १०. १८). दक्षाचा यज्ञ दोनदां झाला व दोनदां ऋषि मारिले. प्रथम स्वायंभुव मन्वंतरांत व दुसऱ्यांदां चाक्षुष मन्वंतरांत (ब्रह्मांड. २. १३. ४५; ६५-७२ सती पहा).

२ सवर्णा नामक समुद्रकन्येला प्राचीनबर्हीपासून दहा मुलगे झाले. त्या सर्वांना प्रचेतस् असें नांव होतें. ते तप करीत असतां पृथ्वीवर नाना तऱ्हांचे अनेक वृक्ष वाढले. ते इतके कीं, सर्व पृथ्वी जंगलमय झाली व धान्य पिकेनासें झालें. तेव्हां ह्या दहा प्रचेतसांना राग येऊन ते वृक्षांचा नाश करूं लागले असतां वृक्षांचा राजा सोम प्रजापति त्यांच्याकडे गेला. त्यानें सर्व पृथ्वी वृक्षशून्य झाल्याचें सांगून यापुढें वृक्षनाश करूं

रक्षा, असें विनविलें. तो विष्णु प्रसन्न होऊन त्यानें मारिषेची हकीकत सांगून तिच्याशीं लग्न करा, असें त्यांस सांगितलें ( मारिषा पहा ). ती कंडु ऋषीची कन्या होय. सोमाचें अर्धे तेज व प्रचेत्यांचें अर्धे तेज हीं दोन्ही मिळून तिला दक्ष हा तेजस्वी पुत्र झाला. हाच प्राचेतस दक्ष प्रजापति होय (ह. वं. १. २; म. आ. ७५; भा. ४. ३०;६. ४; ब्रह्म. २.३४; ३९-४०; विष्णु.१.१४;१५). दक्षानें वीर्य-द्वारां व मनोद्वारां सृष्टि उत्पन्न केली. मानससृष्टीनें प्रजासृष्टि वृद्धिंगत होईना, म्हणून यानें दुष्कर तपश्चर्या केली. विंध्याचलानजीकच्या अघमर्षण तीर्थांत त्रिकाल स्नान करून श्रीहरीस प्रसन्न केलें. तेव्हां श्रीहरीनें पंचजन प्रजापतीची कन्या असिक्नी ( वीरिणी ) यास भार्यार्थ देऊन प्रजावृद्धि करण्यास सांगितलें. ह्याच स्त्रीपासून हर्यश्व नांवाचे दहा हजार पुत्र झाले. त्यांना दक्षानें प्रजा निर्माण करण्यास सांगितलें, पण नारदाच्या सांगण्यावरून त्यांनीं तें कार्य केलें नाहीं. त्यामुळें दक्षास राग आला व पुनः यानें शबलाश्व नांवाचे हजारों पुत्र उत्पन्न केले. त्यांनाहि दक्षानें संतति निर्माण करण्यास सांगितलें. पण पुनः नारदानें त्यांना प्रजोत्पादनापासून परावृत्त केलें. तेव्हां दक्षाचा नारदाविषयींचा राग अनावर होऊन यानें त्याची खूप निर्भर्त्सना केली. याच वेळीं दक्षानें ' लोकांमध्यें भ्रमण करीत असतां तुला कोठेंहि निश्चल स्थान प्राप्त होणार नाहीं;' असा नारदास शाप दिला (नारद पहा). दक्षानें नारदाला तुझा नाश होईल व तूं गर्भवासाच्या दुःखांत पडशील, असाहि शाप दिला ( ह. वं. १. ३ ). या वेळीं नारदानें उलट शाप न देतां सर्व सहन केलें. पुढें ब्रह्मदेवानें दक्षाचें सांत्वन केलें. तेव्हां पुनः यानें साठ कन्या निर्माण केल्या. त्यांपैकीं धर्माला दहा, कश्यपाला तेरा, चंद्राला सत्तावीस, भूत, अंगिरस् व कृशाश्व ह्या प्रत्येकाला दोन दोन व बाकी राहिलेल्या चार, तार्क्ष्य नांवाच्या कश्यपाला दिल्या (भा. ६. ४-६; ह. वं. १. ३; विष्णु. १. १५. ). दुसरीकडे असिक्नी ही वीरण प्रजापतीची कन्या असून तिच्यापासून दक्षाला पांच हजार पुत्र झाले, असें दिलें आहे ( विष्णु. १. १५; ह. वं. १.३; ब्रम्हांड. ३. २. ५ ). वीरिणी व असिक्नी एकच होत (म. आ. ६९. ९ कुं.). चंद्राला दक्षानें सत्तावीस नक्षत्रांच्या नांवांच्या सत्तावीस कन्या अर्पण केल्या होत्या. परंतु त्यांत चंद्राचें रोहिणीवर अत्यंत प्रेम होतें. यामुळें दक्षास राग येऊन यानें चंद्रास शाप दिला असतां तो क्षयरोगग्रस्त झाला व त्यास संतति होईना. पण पुढें दक्षानें त्यास शापमुक्त केलें (भा. ६. ६ ). हरिवंश व विष्णुपुराण यांत दक्षकन्यांची विभागणी याहून जरा भिन्न आहे. त्यांत साठ ऐवजीं मुलींची संख्या दिली आहे. त्यांपैकीं दहा धर्माला, तेरा कश्यपाला, सत्तावीस सोमाला, चार अरिष्टनेमीला, दोन भृगुपुत्राला, दोन अंगिरसाला आणि दोन कृशाश्वाला दिल्या आहेत ( ह. वं. १. ३; विष्णु. १. १५ ). विष्णुपुराणांत भृगुपुत्राच्या ऐवजीं बहुपुत्र आहे. दक्षाला सुव्रता नांवाची एक मुलगी होती. तिच्या पोटीं दक्ष, ब्रह्म, धर्म व रुद्र, यांजपासून चार मनु उत्पन्न झाले, त्यांच्या रंगावरून त्यांचें पुत्रत्व ठरविलें गेलें म्हणून त्यांस सावर्णि हें नांव पडलें ( वायु. २. ३८. ४२ ).

याज्ञवल्क्यानें याची धर्मशास्त्रकारांत गणना केलेली आहे. विश्वरूपानें याचे श्लोक दिले आहेत ( याज्ञ. १. १७; ३. ३०; ३. ६६; ३. १९१ ). ब्राह्मणानें क्षणभरसुद्धां आश्रमधर्मापासून अलिप्त राहूं नये, असें याचें मत मिताक्षरेंत दिलें आहे ( याज्ञ. १. ८९ ). आचार, अशौच, श्राद्ध व यांसारख्या कांहीं गोष्टी, यांसंबंधींचे याचे श्लोक अपरार्कानें दिले आहेत. सुवर्णदानासंबंधीं दक्षाचा एक गद्य उताराहि त्यानें दिला आहे (अपरार्क. ३६८). व्यवहारावर लिहिणाऱ्यांनीं यानें दिलेल्या नऊ अदेय वस्तूंचा उल्लेख केला आहे ( अपरार्क. ४०४ ). जीवानंदसंग्रहांत दक्षस्मृति दिली असून त्यांत सात भाग व २२० श्लोक आहेत. आह्निक, संस्कार, योग व व्यवहार यांसंबंधीं या स्मृतींत विचार केलेला आहे. ही स्मृति फार प्राचीन आहे. विश्वरूपानें केलेले दक्षाचे उल्लेख छापील दक्षस्मृतींत व इतरत्रहि आढळतात. मिताक्षरेंतील उल्लेख कलकत्ता प्रतींत सांपडतात. अपरार्कांत दक्षाचे चाळीस श्लोक आहेत. त्यांपैकीं कांहीं दक्षस्मृतींत सांपडत नाहींत. स्त्रियांसंबंधींचे दक्षाचे सुमारें दहा श्लोक स्मृतिचंद्रिकेंत दिले आहेत. ते कलकत्ताप्रतीच्या चवथ्या भागांत आढळतात. डेक्कन कॉलेजसंग्रहांत १९७ श्लोकांची दक्षस्मृति दिली आहे. त्यांत वरील मुद्यांचाच विचार केलेला आहे ( डे. कॉ. नं. १२०; इ. स. १८९५-१९०२ ). त्यांतील कांहीं श्लोक कलकत्ताप्रतींत आढळतात. मुंबई युनिव्हर्सिटीनेंहि अशी दक्षस्मृति प्रकाशित केली आहे.

३ अंगिराकुलांतील गोत्रकार.

४ अंगिरा व सुरूपा यांचा देवपुत्र ( मत्स्य. १९६.२ ).

५ भृगु व पौलोमी यांचा देवपुत्र ( मत्स्य. १९५.१३ ).

६ बाष्कलाचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ५. ३८-३९ ).

७ ( सो. कुरु. ) मत्स्यमतें देवातिथीचा पुत्र. यास विष्णु व वायु यांच्या मतें ऋक्ष व भागवतमतें ऋश्य म्हटलें आहे.

**दक्ष कात्यायनि आत्रेय**—हा शंख बाभ्रव्याचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४१. १; १७. १ ).

**दक्ष जयंत लौहित्य**—हा कृष्णरात लौहित्याचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४२. १ ).

**दक्ष पार्वति**—( १ दक्ष पहा ).

**दक्षपितर**—दक्ष प्रजापतीच्या पुत्रांचा असा उल्लेख आहे ( तै. सं. १. २. ३ ).

**दक्षसावर्णि**—हा दक्ष व त्याचीच कन्या सुव्रता यांजपासून चाक्षुषांत जन्मला ( वायु. २. ३८. ४५ ). हा नवम मन्वंतराधिप मनु होय. हा वरुणापासून होईल ( भा. ८. १३. १८ ). हा दक्षपुत्र होईल ( वायु. २. ३८ ). याला दत्तपुत्र म्हटलें आहे. पण तो दक्ष याचा अपभ्रष्ट शब्द असावा ( मार्कं. ९१; मनु पहा ). या मन्वंतराचा अधिप वैवस्वत मनुपुत्र करूष सांगितला आहे ( दे. भा. १०. १३). यास रोहित असें नामांतर आहे ( ह. वं. १. ७; वायु. २. ३८ ).

**दक्षिणा**—रुचीस आकूतीपासून झालेली कन्या. ही यज्ञास दिलेली होती. यज्ञापासून हिला तुषित नांवाचे बारा पुत्र झाले. यज्ञ हा दक्षिणेचा भाऊच होय. परंतु तो विष्णूचा अवतार असल्यामुळें त्यानें लक्ष्मीच्या रूपानें अवतरलेल्या आपल्या दक्षिणा नांवाच्या बहिणीशींच लग्न लाविलें ( भा. ४. १ ). एकदां दक्षिणा राधेच्या देखत कृष्णाच्या मांडीवर बसली असतां राधेनें रागावून हिला तेथून घालविलें. पुढें ही लक्ष्मीच्या शरीरांत शिरली व तेथून ब्रह्मयाकडे गेली. त्या वेळीं हिचें लग्न ब्रह्मयाशीं झालें ( ब्रह्मवै. २. ४२ ).

**दंड**—( सू. इ. ) इक्ष्वाकूच्या सर्व पुत्रांतील धाकटा. हा जन्मापासून मूढ, विद्याहीन व उन्मत्त असे (वा. रा. उ. ७९). हा उत्तम शूर व विद्वान होता, पण यास घोर नांवाचा दोष असल्यामुळें बापानें यास दूरचें राज्य दिलें ( पद्म. सृ. ३७ ). यास राज्य कोठें द्यावें, असा इक्ष्वाकूनें विचार करून यास विंध्याद्रि व शैवल पर्वत या दोहोंमधील प्रदेशाचें आधिपत्य दिलें ( वा. रा. उ. ७९ ). याचें राज्य विंध्य व नील या पर्वतांत होतें ( पद्म. सृ. ३७ ). यानें विंध्याच्या दोन शिखरांच्या मध्यें मधुमत्त नांवाची नगरी बसविली ( पद्म. सृ. ३४; ३७ ). नगराचें नांव मधुमंत असेंहि दिलें आहे ( वा. रा. उ. ७९ ). यानें उशनस् शुक्राला पुरोहित केलें होतें ( वा. रा. उ. ७९; पद्म. सृ. ३७ ).

हा अनेक वर्षेपर्यंत जितेंद्रिय होता. एकदां हा भार्गवाश्रमांत चैत्र महिन्यांत गेला असतां तेथें यानें गुरूची ज्येष्ठ कन्या अरजा हिला पाहिलें व तेणेंकरून हा कामातुर होऊन तिला वश होण्याविषयीं बोलूं लागला. तेव्हां ती म्हणाली, मी तुझी गुरुभगिनी आहें. तरी माझ्या पित्यास तूं मजविषयीं याचना कर आणि त्यानें दिल्यास पाणिग्रहणविधीनें मला वर. परंतु या उन्मत्तानें तिचें न ऐकतां तिजवर बलात्कार केला व तिच्याशीं संभोग करून हा स्वनगरास पळून गेला. इकडे ऋषि आश्रमीं येऊन पाहतो, तों राजानें मोठा अन्याय केला आहे, असें त्याच्या नजरेस आलें. नंतर त्यानें मुहूर्तभर थांबून क्रोधानें यास शाप दिला कीं, हा राजा, बल, कोश इत्यादिकां-सहित एका आठवड्यांत नष्ट होईल व तेथें इंद्र धुळीचा पाऊस पाडील. तसेंच त्यानें अरण्यवासी लोकांस राज्य सोडून जाण्यास सांगितलें व अरजेस तेथेंच आश्रमांत सरोवरासमीप शुध्यर्थ १०० वर्षें तप करण्यास सांगितलें. नंतर तो ऋषि निघून गेला असतां राजा नष्ट झाला व इंद्रानें तेथें १०० योजनभर ( वा. रा. उ. ८१ ), ४०० योजनभर ( पद्म. सृ. ३७ ) धुळीचा पाऊस पडून तो देश अरण्यप्राय झाला. तेव्हां त्यास दंडकारण्य हें नांव पडलें ( वा. रा. उ. ८०-८१; पद्म. सृ. ३७ ). यास दंडक असें नामांतर होतें. ही कथा रामानें दंडकारण्य निर्मनुष्य कां, असा प्रश्न केल्यावर अगस्त्यानें सांगितली आहे.

२ सूर्याचा एक पार्षद. यास दंडिन् असेंहि नांव आहे.

३ ( सू. इ. ) कुवलाश्वाचा पुत्र ( चंद्राश्व पहा. )

४ वृत्राचा धाकटा भाऊ क्रोधहंता, त्याचा हा अंशावतार ( म. आ. ६७ ). हा द्रौपदीस्वयंवरास गेला होता. हा विदंड राजाचा पुत्र होय ( म. आ. १८६ ). यास भीमानें राजसूयदिग्विजयकालीं जिंकिलें असून गिरिव्रजपुरांत कर्णावर हा त्यासमागमें चालून गेला होता ( म. स. ३१. १७ कुं. ). हा मगधाधिपति दंडधाराचा भाऊ असून भारतीय युद्धांत दुर्योधनाच्या बाजूचा होता. यास अर्जुनानें ठार मारिलें ( म. क. ५४. २० कुं. ).

५ कर्णानें मारिलेला पांडवपक्षीय राजा ( म. क. ५६ ).

६ उत्कलाच्या तीन पुत्रांतील शेवटचा. यानेंच दंडकारण्य निर्माण केलें ( ह. वं. १. १० ).

७ ( सो. आयु. ) आयूच्या पांच पुत्रांपैकीं चवथा ( पद्म. सृ. ४२ ).

**दंड औपर**—एक व्रत केल्याबद्दल याचा उल्लेख आला आहे ( तै. सं. ६. २. ९. ४; मै. सं ३. ८. ७ ).

**दंडक**—एक चोर. यानें सर्व पापें केलीं होतीं. हा विष्णु-मंदिरांत चोरी करावयास गेला असतां सर्पदंशानें मरण पावला ( पद्म. ब्र. २ ).

२ इक्ष्वाकूच्या शंभर मुलांतील तिसरा (भा. ९. ६ ३; पद्म. सृ. ८; दंड पहा ).

**दंडकर**—हा चोर असूनहि विष्णुपंचकव्रतानें मुक्त झाला ( पद्म. ब्र. २३ ).

**दंडकेतु**—पांडवपक्षीय पांड्य राजा (म. द्रो. २३. ६९ कुं.).

**दंडगौरी**—एक अप्सरा.

**दंडधार**—एक मागधी क्षत्रिय. हा क्रोधवर्धन राक्षसाचा अंशभूत होता ( म. आ. ६८. ४६ कुं. ). हा एकरथ असून

कौरवपक्षीय होता. हा हस्तियुद्धांत अत्यंत प्रवीण होता. राजसूय यज्ञाचे वेळीं भीमानें यास जिंकिलें होतें ( म. स. ३१. १७ कुं. ). भारतीय युद्धांत अर्जुनानें यास ठार मारिलें ( म. क. ५४. १५. कुं. ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राच्या शतपुत्रांतील एक. भारतीय युद्धांत यास भीमानें ठार मारिलें ( म. आ. ६८. १०३; क. ८८. १९–२३ कुं. ).

३ पांडवपक्षीय एक चैद्य राजा. यास कर्णानें ठार मारिलें ( म. क. ५१. ४९-५० कुं. ).

४ एक पांचाल. यास कर्णानें ठार मारिलें ( म. क. ४४. २९ कुं. ).

**दंडनायक**—रवीच्या वामभागीं असलेला इंद्र. यालाच दंडि असें नांव आहे. हा दंडनीतिकार असल्यामुळें याला दंडनायक हें दुसरें नांव मिळालें ( सांब. १६; पिंगल पहा ).

**दंडपाणि**—( सो. कुरु. भविष्य. ) मत्स्य व भागवत यांच्या मतें हा वहीनरपुत्र व वायुमतें मेधावीपुत्र होय ( खंडपाणि पहा ).

२ काशिराज ऊर्फ पौंड्रक वासुदेव याचा पुत्र. पित्याचा कृष्णानें शिरच्छेद केल्यावर यानें आपल्या पुरोहिताच्या सांगण्यावरून महेश्वर नांवाचा यज्ञ केला. व शंकर प्रसन्न झाल्यावर त्याजवळ कृष्णाच्या नाशास्तव एक कृत्या मागितली. त्याप्रमाणें कृत्या मोठ्यानें ओरडत द्वारकेंत गेली. परंतु कृष्णानें सुदर्शन चक्र सोडितांच ती भयानें माघारी वाराणशींत परतली. तेथें त्या चक्रानें त्या कृत्येचा, याचा व याच्या सर्व लोकांचा प्राण घेऊन नगर जाळून टाकिलें ( पद्म. उ. २५१ ).

३ ( प्रजा पहा ).

**दंडभृत्**—रामाच्या अश्वमेधप्रसंगीं अश्वाचें संरक्षण करण्याकरितां शत्रुघ्नाबरोबर गेलेला एक वीर (पद्म. पा. ११).

**दंडश्री**—( आंध्र. भविष्य. ) वायु व ब्रह्मांड यांच्या मतें विजयाचा पुत्र ( चंडश्री पहा ).

**दंडिन्**—भृगुकुलांतील गोत्रकार. याबद्दल दर्भि असा पाठभेद आहे.

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**दंडीमुंडीश्वर**—वाराहकल्पांतील वैवस्वत मन्वंतराच्या सातव्या चौकडींतील हा शिवाचा अवतार आहे. तेथें याचे अनुक्रमें पुढीलप्रमाणें शिष्य आहेत. छगल, कुंडकर्ण, कुंभांड व प्रवाहक ( शिव. शत. ५ ).

**दत्त**—सांदीपनीचा पुत्र. कृष्णानें गुरुदक्षिणा म्हणून शंखासुराच्या तडाख्यांतून यास सोडवून श्वेतसमुद्रावरून परत आणून सांदीपनीस अर्पण केलें.

२ स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक (पद्म. सृ. ७).

**दत्त आत्रेय**—अत्रि ऋषीस अनुसूयेपासून दहा पुत्र झाले, त्यांपैकीं हा एक. अत्रीनें पुत्रप्राप्तीकरितां त्र्यक्षकुल पर्वतावर तप केलें. त्याच्या घोर तपानें मस्तकांतून ज्वाला निघूं लागल्या व त्या ज्वालांमुळें त्रैलोक्याचा दाह होऊं लागला. तेव्हां सर्व देव तेथें आले व त्यांनीं ब्रह्मा, विष्णु व महेश यांचा अंशरूप पुत्र होईल, असा त्यास वर दिला. त्यामुळेंच हा वैवस्वत मन्वंतरांत दुसऱ्या युगांत ब्रह्मा, विष्णु व महेश यांच्या अंशानें अत्रीस झाला. त्यांत ब्रह्मा सोमरूप, विष्णु दत्तात्रेय व रुद्र दुर्वासरूप अशीं तीन मुलें झालीं ( शिव शत. १९; भा. ४. १. १५ ). हा विष्णूचा अवतार होय ( विष्णुधर्म. १, २६; विष्णु. ४. ११. ३; वायु. २. ३२; ४७. २४२; ब्रह्म. २१३. १०६-११० ). हा विष्णूचा सहावा अवतार होता ( भा. १. ३. ११; म. स. ४८. १ कुं. ). परंतु कांहीं ठिकाणीं हा विष्णूचा चवथा अवतार होता, असें दिलें आहे ( ब्रह्मांड. ३. ७३. ८८; मार्क. १७ ). या अवताराचा मुख्य व विशेष गुण म्हटला म्हणजे क्षमा हा होय. यानें यज्ञक्रियांसहित वेदांचें पुनरुज्जीवन केलें, चातुर्वर्ण्याची पुनर्घटना केली व सर्वत्र अधर्माचा अंधःकार होता, त्याचा समूळ नाश केला. हेंच याचें अवतारकार्य होय ( ह. वं. १. ४१; म. स. ४८ कुं.; विष्णुधर्म. १. २५; ब्रह्म. २१३; १०६-११० ). यानें संन्यासपद्धतीचा प्रसार केला ( शिव. शत. १९.२६ ). याचें निरनिराळ्या पुराणांमध्यें जें वर्णन येतें, तेथें पुढील प्राचीन श्लोक दिला आहे. ' अत्रेः पुत्रं महात्मानं शांतात्मानमकल्मषम् । दत्तात्रेयं तनुं विष्णोः पुराणज्ञाः प्रचक्षते ।' ( वायु. २. ९. ७५-७७ ). पहिल्या किंवा दहाव्या त्रेतायुगांत मार्कंडेय असतांना हा अवतार झाला ( मत्स्य. ४७. २४२; वायु. २. ३६. ८८; दे. भा. ४. १६ ). सोम व दुर्वास हे याचे बंधु होते ( वायु. २. ९. ७५-७७; दे. भा. ४. १६; ब्रह्म. १४४; २१८; कूर्म. १. १३; मार्क. १७. ५-१०; ५२. २१-२२ ). दत्तानें अत्रीला विचारिलें कीं, ब्रह्मज्ञानाची प्राप्ति मला कशी होईल ? तेव्हां त्यानें यास गौतमीवर ( गोदावरीवर ) जाऊन महेश्वराची आराधना करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें यानें आराधना करितांच शंकर प्रसन्न झाला. शंकरानें यास आत्मज्ञान, मुक्ति व भुक्ति यांचें माहात्म्य कथन करून त्या तीर्थाला आत्मतीर्थ हें नांव दिलें ( ब्रह्म. ११७ ).

गर्ग मुनीच्या सांगण्यावरून कार्तवीर्यार्जुन याच्या आश्रमांत आला व त्यानें एकनिष्ठ सेवेनें यास संतुष्ट केलें. तेव्हां दत्तानें आपल्या वर्तनाविषयीं पुढील उद्गार काढले. हा म्हणाला, ' माझें आचरण मद्यसेवनादिकांनीं निंद्य असून ही स्त्री मज-

जवळ असते. ह्या भोगामुळें मी निंद्य ठरलों आहें. व मी उपकार करण्यास असमर्थ आहें, तरी तूं एकाद्या समर्थाला भज.' परंतु त्याची अप्रतिम निष्ठा पाहून यानें त्यास वर मागण्यास सांगितलें. कार्तवीर्यानें पुढीलप्रमाणें चार वर मागितले. (१) युद्धप्रसंगीं सहस्र बाहूंची उत्पत्ति, (२) सार्वभौमत्व व योग्य प्रकारें राज्यशासन, (३) वरिष्ठ योद्ध्याच्या हातून मृत्यु व (४) अधर्मापासून परावृत्त करण्यास सज्जनांचा सदुपदेश. त्याप्रमाणें दत्तात्रेयानें हे चार वर दिले (म. स. ४८ कुं.; शां. ४९; अनु. १५२-१५३; ह. वं. १.३३; ४१; अग्नि. २७५. ५; मार्क. १७. १-७; १८. २०-२५; विष्णुधर्म. १. २५; विष्णु. ४. ११. ३; वायु. २. ३२; मत्स्य. ४३. १५-१८; ब्रह्म. २१३. १०६-११०; पद्म. पा. १२. ११८-१२७). यासाठीं कार्तवीर्यानें एक अयुत वर्षे दत्ताची आराधना केली होती (पद्म. पा. १२. ११८-१२७; ह. वं. १.३३; अग्नि. २७५. ५; म. स. ४८ कुं.). दत्तानें कार्तवीर्यास सुवर्णविमान दिलें होतें (म. व. ११५). शिवाय त्याला ब्रह्मविद्येचा उपदेशहि यानेंच केला (भा. १. ३. ११). वरप्राप्तीच्या वेळीं दत्त कार्तवीर्याकडे गेला असतां दत्ताला त्यानें आपलें सर्व वित्त दिलें; त्यामुळें त्यास हे वर मिळाले (म. अनु. १५२-१५३).

ऐलपुत्र आयूला पुत्र होईना, म्हणून तो दत्ताकडे गेला. त्या वेळीं दत्ताचें स्वरूप पुढीलप्रमाणें दिसलें. "हा बायकांसह क्रीडा करीत होता. दारूनें याचे डोळे लाल झाले होते. याच्या मांडीवर स्त्री बसली होती. गळ्यांत जानवें नव्हतें. गाणें, नाचणें हीं चालू होतीं. गळ्यांत माळा घातल्या होत्या व अंगाला चंदनादिकांच्या उटया लागल्या होत्या." आयूनें शंभर वर्षे याचें ध्यान केलें. तेव्हां दत्तानें त्यास कारण विचारिलें. त्यावर त्यानें पुत्र मागितला. तेव्हां दत्तानें आपल्या वर्तनाचें व परिस्थितीचें वरीलप्रमाणें दिग्दर्शन करून वर देण्याची शक्ति नसल्याचें सांगितलें. उलट आयूनें हा अवतार असल्याचें यास सांगितलें. नंतर दत्तात्रेय त्यास म्हणाला, "मला कपालानें दारु व मांस दे. मांस हातानें तोडून दे." त्याप्रमाणें दिल्यावर त्यास वैष्णवांश पुत्र होईल, असा वर देऊन एक श्रीफल दिलें. वराप्रमाणें आयूस नहुष नामक पुत्र झाला व त्यानें हुंडाला ठार केलें (मार्क. १६; ३७; पद्म. भू. १०३-१०४).

हा ब्रह्मनिष्ठ होता (भा. १. ३. ११). याला धर्माचें दर्शन झालें होतें (पद्म. भू. १२). याचे अलर्क, प्रल्हाद, यदु व सहस्रार्जुन हे शिष्य होते. त्यांना यानें ब्रह्मविद्येचें ज्ञान दिलें (भा. १. ३. ११; ४. १. १५). यानें अलर्कास आत्मनिरूपण, योगनिरूपण, योगधर्म, योगिचर्या, योगिसिद्धि व निष्कामबुद्धि यांसंबंधीं उपदेश केला (मार्क. ३५-३८). गिरिनगर येथें दत्ताचा आश्रम (विष्णुपद) आहे. सह्याद्रीवर मल्लकीग्रामांत दत्तात्रेयाचा आश्रम आहे. तेथें परशुरामानें जमदग्नीला जाळिलें व रेणुका सती गेली, म्हणून तेथें मातृतीर्थ आहे (रेणु. ३७). याच्या नांवावर दत्तगीता नामक एक वेदान्तविषयक ग्रंथ आहे (C. C.). सध्यां ब्रह्मविष्णुमहेशात्मक व परब्रह्मस्वरूप अशा दोन प्रकारें दत्ताची उपासना चालते. याला निमि नांवाचा पुत्र होता (म. अनु. १३८. ५ कुं.). हा सह्य पर्वतावर राहत असून तेथें यानें माहिष्मतीचा राजा सहस्रार्जुन, याला माघस्नानाचें माहात्म्य सांगितलें (पद्म. उ. १२६).

सध्यां दत्तजयंती मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीला दुपारीं व रात्रीं, पौर्णिमेला पहाटे, तिनीसांजा व रात्रीं बारा वाजतां अशी वेगवेगळी करण्याचा प्रघात आहे. दासोपंतसांप्रदाय, महानुभावसांप्रदाय, गोसावीसांप्रदाय व गुरुचरित्रसांप्रदाय असे वेगवेगळे सांप्रदाय आहेत.

**दत्त तापस**—हा सर्पसत्रांत होतृ नांवाचा ऋत्विज होता (पं. ब्रा. २५. १५. ३).

**दत्तोलि**—पुलस्त्यास प्रीति नांवाच्या पत्नीपासून झालेला पुत्र (अग्नि. २०. १३; मार्क. २२.२३).

**दधिक्रावन्**—मरीचिगर्भ देवांपैकीं एक. ऋग्वेदांत ह्या देवतेवर सूक्त आहे. पण याचा अर्थ घोडा आहे (४.४०).

**दधिमुख**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

२ रामसेनेंतील एक वानर. हा सोमपुत्र असून स्वभावानें सौम्य होता (वा. रा. यु. ३०). हा ज्या वेळीं रामास आपल्या प्रचंड सेनेसह येऊन मिळाला, त्या वेळीं वृद्ध होता (म. व. २८४. ७ कुं.). हा शत्रुघ्नाबरोबर अश्वमेधीय अश्वाचें रक्षण करणारांपैकीं एक होता (पद्म. पा. ११).

**दधिवाहन**—वाराहकल्पांतील वैवस्वत मन्वंतराच्या आठव्या चौकडींतील वसिष्ठ व्यासाला साहाय्य करण्याकरितां हा शंकराचा अवतार होय. याला पुढीलप्रमाणें अनुक्रमें चार पुत्र असतील. कपिल, आसुरि, पञ्चशिख व शाल्वलपूर्वक. हे सर्व योगी आहेत (शिव. शत. ४).

२ (सो. अनु.) मत्स्य व वायु यांच्या मतें हा अंगपुत्र होय (खनपान पहा).

३ एक राजा. शिबिरथाचा पुत्र (म. शां. ४८.८७ कुं.).

**दधीच**—दध्यच्, दधीचि व दधीच हे सर्व एकच होत. हा अथर्वकुलांतील होता. इंद्रानें दध्यच् ऋषीला प्रवर्ग्यविद्या व मधुविद्या अशा दोन विद्या शिकविल्या व ह्या विद्या कोणाला शिकविल्यास तुझा शिरच्छेद करीन असें सांगितलें.

अश्विदेवांनीं दध्यच् ऋषीचें मस्तक तोडून तेथें घोड्याचें मस्तक बसविलें व त्यापासून सर्व विद्या संपादन केल्या. तेव्हां

इंद्रानें दध्यचचें मस्तक तोडिलें. अश्वींनीं त्याचें पहिलें मस्तक त्याला जोडिलें (ऋ. १.११६.१२). ही हकीकत शतपथ ब्राह्मणांत सविस्तर दिली आहे. तें घोड्याचें डोकें इंद्र शोधीत असतां त्याला शर्यणावतांत सांपडलें (ऋ. १.८४.१३). पण सायणाचार्यांनें शाट्यायन ब्राह्मणाला अनुसरून पुढीलप्रमाणें हकीकत दिली आहे. हा दध्यच् जिवंत होता, तोंपर्यंत याला पाहूनच असुरांचा पराभव होत असे. पण हा मेल्यावर असुर सारखे वाढूं लागले. तेव्हां इंद्रानें याचा शोध केला, पण हा मेला असें त्याला कळलें. तेव्हां याचे अवशिष्ट अंगाचा शोध करितां अश्वींना मधुविद्या सांगणारें घोड्याचें तोंड शर्यणावतांत सांपडलें. त्याच्या साहाय्यानें इंद्रानें असुरांचा पराभव केला (ऋ. १.११६.१२; सायणभाष्य पहा). एक ज्ञाता आचार्य म्हणून याचा अनेक ठिकाणीं निर्देश आहे (तै. सं. ५.१.४.४; ६. ६३; श. ब्रा. ४.१.५.१८; ६.४.२.३; १४.१.१. १८-२६; बृ. उ. २.५.२२;४.५.२८; पं. ब्रा. १२.८.६; गो. ब्रा. १. ५. २१). तसेंच इंद्रानें दधीचाच्या हाडानें जय मिळविला हीहि कथा ऋग्वेदापासून सर्वत्र आहे.

स्वायंभुव मन्वंतरांतील अथर्वण ऋषीचा दध्यंच् नांवाचा पुत्र हाच होय. याच्या आईचें नांव चित्ति किंवा शांति असें होतें. याचें तोंड जन्मतःच घोड्यासारखें होतें (भा. ४. १). वैवस्वतांत च्यवन व सुकन्या यांचा पुत्र (ब्रह्मांड. ३.१.७४). यानें शंकराच्या कृपेनें वज्रास्थित्व, अदीनत्व व अवध्यत्व हीं प्राप्त करून घेतलीं (लिंग. १.३६; शिव. शत. २४).

क्षुप व दधीच यांच्यांत ब्राह्मण श्रेष्ठ कीं क्षत्रिय श्रेष्ठ असा वाद झाला असतां प्रकरण हातघाईवर येऊन प्रथम दधीचाला माघार घ्यावी लागली. पण पुढें याचा जय झाला. वज्रास्थिहि याला प्राप्त झाल्या (लिंग. १.३६). शिवपुराणांत पुढीलप्रमाणें माहिती आली आहे. दधीच व क्षुवथु यांचा श्रेष्ठत्वाविषयीं वाद झाला. क्षुवथूनें दधीचाचा पराभव केला. मृत्युंजयाच्या कृपेनें दधीचीला अमरत्व प्राप्त झालें. तेव्हां क्षुवथूनें विष्णूची आराधना केल्यावरून क्षुवथूकरितां दधीचाकडे विष्णु ब्राह्मणरूपानें आला. तेव्हां त्यांचें युद्ध होऊन दधीचीनें सर्व देव रुद्रकोपानें भस्मसात् होतील, म्हणून शाप दिला (शिव. रुद्र. स. ३९).

इंद्रानें यास ब्रह्मविद्या शिकवून असें सांगितलें होतें कीं, जर ही विद्या तूं कोणास सांगशील, तर मी तुझें मस्तक तोडीन. नंतर हा तेथून विद्या शिकून परतला असतां अल्पच कालानें अश्विनीकुमार याच्याकडे आले व ती विद्या आपणांस देण्याबद्दल त्यांनीं याची प्रार्थना केली. तेव्हां यानें त्यास इंद्राची आज्ञा सांगितली. तदनंतर ते यास म्हणाले कीं, हें तुझें प्रस्तुतचें शिर आम्ही तोडून एकीकडे ठेवितों व तुला अश्वाचें शिर जोडितों. त्या मस्तकानें तूं आम्हांस ब्रह्मविद्या सांगितलीस कीं, इंद्र हें तुझें मस्तक तोडील. तसें होतांच तुझें मूळचें मस्तक जोडून आम्ही तुला सजीव करूं. त्यास यानें अनुमोदन देतांच अश्विनीकुमारांनीं याचें मूळचें मस्तक तोडून अश्वाचें जोडिलें. यानेंहि त्या मुखानें त्यांस ब्रह्मविद्या उपदेशितांच इंद्रानें याचें मस्तक तोडिलें. तेव्हां अश्विनीकुमारांनीं याचें मूळचें मस्तक यास जोडून सजीव केलें व याचा अनुग्रह संपादून ते स्वर्लोकास परत गेले (दे. भा. ७. ३६; भा.६.९).

एकदां याची पत्नी आश्रमांत नसतां-कारण याच्या पत्नीस देव भीत असत—दैत्यांच्या युद्धांत पराभव पावून देव याच्या आश्रमाकडे वळले. तेथें बोजा न व्हावा म्हणून जवळचीं शस्त्रें टाकून ते दशदिशांस पळाले. मागाहून याची पत्नी आली व म्हणाली कीं, ‘तुम्ही अस्त्रें ठेवून घेऊं नका.’ पण तिचें यानें ऐकिलें नाहीं. मागाहून देवांचा पाठलाग करणाऱ्या दैत्यांच्या हातीं तीं देवांचीं शस्त्रास्त्रें लागूं नयेत म्हणून यानें तीं गिळून टाकिलीं (पद्म. उ. १५५). हजार वर्षें झालीं, पण देव कांहीं येईनात व अस्त्रेंहि घेऊन जाईनात. तेव्हां हीं सांभाळण्यास नकोत म्हणून यानें त्या अस्त्रांचें मंत्रयुक्त पाणी करून तें पिऊन टाकिलें (स्कंद. १.१.१७; ब्रह्म. ११०; शिव. शत. २४). दैत्यांचा पराभव करून एकदां देवांनीं सर्व अस्त्रें दधीचीजवळ ठेव म्हणून ठेविलीं. पुढें दधीचीस उत्तरेस तप करण्यास जावयाचें होतें. तेव्हां आपल्या सुभद्रा नामक दासीला तीं अस्त्रें घेऊन चलण्यास यानें सांगितलें. परंतु ती अस्त्रें नेण्यास असमर्थ आहे, असें कळतांच अस्त्रांचें वीर्य स्वतः पाण्याबरोबर प्राशन करून निकामी अस्त्रें तेथेंच टाकून दिलीं व सुभद्रेसह हा उत्तर दिशेला तप करण्यास गेला (स्कंद ७. १. ३४). नंतर पुढें वृत्राला कसें मारावें, याबद्दल देव विष्णूला विचारावयास गेले असतां विष्णूनें त्यांस सांगितलें कीं, इंद्रानें दधीचीचीं हाडें मागून त्वष्ट्याकरवीं त्याचें वज्र करून त्यास मारावें. त्या हाडांच्या बाबतींत विशेषतः अश्विनीकुमारांनीं मागणी करावी, अशी विष्णूची सूचना होती. कांहीं पुराणांत देव वृत्रास मारण्यासाठीं शस्त्रें मागण्यास आले असतां ‘मी तीं गिळून टाकलीं आहेत. यास्तव तुम्ही माझीं हाडें घ्या.’ अशी माहिती आहे. नंतर देवांनीं प्रार्थना केल्यावरून दधीचीनें योगबलानें प्राणत्याग केला (म. व. २००; श. ५१; भा. ६.९-१०; स्कंद. १.१.१७; ७. १.३४; ब्रह्म. ११०; पद्म. उ. १५५; शिव. शत. २४). पण याचीं हाडें काढण्याकरितां त्वष्टा याजवर हत्यारें चालवीना. तेव्हां गाईचें तोंड वज्रासारखें कठीण करून तिजकरवीं याचें मांस खावविलें. नंतर त्वष्ट्यानें हाडें घेऊन षट्कोणी वज्र व इतर हत्यारें बनविलीं. नंतर याची पत्नी तेथें आली. तिला

आपला पति दिसेना, तेव्हां आपला पति नष्ट झाला, असें जाणून तिनें देवांस शाप दिला कीं, तुमची संतति वाढणार नाहीं ( पद्म. उ. १५५ ). तुमचा निर्वंश होईल ( स्कंद. ५. १. १८ ). पण तिनें आपला पति कोठें आहे, म्हणून अग्नीस विचारिलें. तेव्हां त्यानें सर्व वस्तुस्थिति सांगतांच ती म्हणाली कीं, मी देवांस शाप देण्यास असमर्थ आहें. नंतर तिनें आपलें पोट फाडून आपल्या हातांनीं पोटांत असलेला गर्भ बाहेर काढला व तो पिंपळाच्या झाडाखालीं ठेविला. नंतर ती गंगेस नमन करून पतीसह स्वर्गलोकीं गेली. या पुत्राचें नांव पिप्पलाद हें होय ( ब्रह्म. ११०; स्कंद ५. १. १८ ). याच्या पत्नीचें नांव सुवर्चा, असें दिलें आहे ( शिव. शत. २४; स्कंद. ५.१.१८ ). ब्रह्मपुराणांत याची पत्नी म्हणून लोपामुद्रेची बहीण गभस्तिनी–वडवा नांवानें प्रसिद्ध असलेली–दिली आहे. हिला त्याच अध्यायांत प्रातिथेयी म्हटलें आहे. पण ती दुसरी कोणी नसून हिचेंच कुलनाम दिसतें ( ११० ).

हा महातपस्वी होता. याच्याकडे एकदां इंद्रानें अलंबुषा अप्सरेस पाठविलें असतां याचें रेत सरस्वती नदींत पतन पावलें. तो गर्भ सरस्वती नदीनें धारण केला. नंतर ऋषीनें त्या नदीस वर दिला कीं, तुझ्या उदकानें तर्पण केल्यास विश्वेदेव, पितर व गंधर्वाप्सरांचे समुदाय संतुष्ट होतील. नंतर त्या नदीस जो पुत्र झाला त्याचें नांव सारस्वत असें ठेविलें ( म. श. ५१ ).

एकदां याची दासी सुभद्रा रजस्वला असतां चौथे दिवशीं दधीचीनें नेसून टाकलेलें शुक्रमिश्रित धोतर परिधान करून नदीस स्नानास गेली. स्नान करितांना तें दधीचि ऋषीचें वीर्य तिच्यांत जाऊन ती गरोदर राहिली व तिला पिप्पलाद नामक मुलगा झाला. पुढें आपल्या पित्याच्या नाशाला देव कारणीभूत आहेत, हें जाणून पिप्पलादानें वडवा नामक कृत्या निर्माण करून देवांच्या नाशार्थ पाठविली. देवांनीं विष्णूला सांगून तिला पाण्यांत वास्तव्य दिलें. पुढें ती समुद्रांत गेली ( स्कंद. ७. १. ३४ ).

याचा आश्रम सरस्वतीतीरीं होता ( म. व. १०० ). याचा आश्रम गंगातीरीं होता ( ब्रह्म. ११० ). यास अश्वशिर नामक ब्रह्म व नारायणकवच विदित होतें ( भा. ६. ९ ). दधीचतीर्थ प्रख्यात आहे ( म. व. ३ ). हा मत्स्य व वायु यांच्या मतें भार्गवगोत्रांतील मंत्रकार होता. पण इतरत्र याबद्दल ऋचीक असें नांव आढळतें ( ब्रह्मांड २. ३२. १०४ ).

**दनायु**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्री यांची कन्या आणि कश्यपाची भार्या ( कश्यप पहा ).

**दनु**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्री यांची कन्या व कश्यपाची भार्या ( कश्यप पहा ) दनूपासून दानव झाले. वृत्र हा दनूचा पुत्र होय ( श. ब्रा. १. ६. ३. ९ ).

**दनुपुत्र**—हे कांहीं ऋचांचे द्रष्टे आहेत ( ऋ. ३. ६. १-१४; कश्यप पहा ).

**दंतक्रूर**—यास परशुरामानें मारिलें ( म. द्रो. ७० ).

**दंतवक्त्र**—करूष देशाधिपति वृद्धशर्मन् राजास श्रुतदेवीपासून झालेला पुत्र ( ब्रह्मांड. ३. ७१; ब्रह्म. १४ ). राजसूययज्ञाचे वेळीं सहदेवानें यास जिंकिलें होतें ( म. स. ३२. ३ कुं.; भा. ९. २४.३७ ). हा असुरांश असल्यानें कृष्णानें यास ठार मारिलें ( भा. १०. ७८ ). यास वक्रदंत असेंहि नांव आढळतें ( जयविजय पहा ).

**दंतिल**—मतंग ऋषीचा पुत्र. याचा भाऊ कोहल.

**दंदशूक**—कोधवशेस झालेल्या सर्पांपैकीं मुख्य.

**दभीति**—हा इंद्राच्या कृपेंतला एक गृहस्थ आहे. इंद्रानें याच्याकरितांच चुमुरि व धुनि यांना ठार केलें ( ऋ. २. १५. ९; ६. २६. ६; ७. १९. ४; १०. ११३. ९ ). याच्याकरितां इंद्रानें तीस हजार दासांना ठार केलें ( ऋ. ४. ३०. २१ ). शिवाय दस्यूंना ठार केलें ( ऋ. २. १३. ९ ). अश्वींनीं तुर्वीतीसह याच्यावर कृपा केली आहे ( ऋ. १ ११२. २३ ). दभीतिहि इंद्राची आराधना करीत असे ( ऋ. ६. २०. १३ ).

**दम**—( सू. दिष्ट. ) भागवतमतें मरुत्ताचा पुत्र. विष्णु व वायु यांच्या मतें नरिष्यंताचा पुत्र.

२ ( सो. क्रोष्टु. ) विदर्भाचा पुत्र व दमयंतीचा भ्राता.

३ अंगिराकुलांतील एक ऋषि. याबद्दल सुदमोदम व मोदम असे पाठभेद आढळतात.

४ आभूतरजस् देवांतील एक.

५ सुधामन् देवांतील एक.

६ विकुंठ देवांतील एक.

**दमघोष**—चेदिदेशचा राजा. याची पत्नी कृष्णाची आत्या श्रुतश्रवा होय. याचा पुत्र शिशुपाल ( म. व. १४.३ कुं.; प्रत्यग्रह पहा ).

**दमन**—एक ऋषि. याच्या प्रसादानें भीम राजाला दमादि चार अपत्यें झालीं होतीं ( म. व. ५०. ६ कुं. ).

२ दमयंतीचा भाऊ ( म. व. ५०. ९ कुं. ).

३ कौरवपक्षीय क्षत्रिय. हा पौरवपुत्र होता ( म. भी. ६१. २० कुं. ).

४ ( सो. वसु. ) हा मत्स्य व वायु यांच्या मतें वसुदेवास पौरवीचे ठिकाणीं झालेला पुत्र.

५ अंगिरा व सुरूपा यांचा पुत्र; एक देव.

६ वाराह कल्पांतील वैवस्वत मन्वंतराच्या तिसऱ्या चौकडींतील कलींत पुरांनिकांत हा शंकराचा अवतार होता. याला पुढीलप्रमाणें अनुक्रमें चार शिष्य होते. विशोक, विशेष, विपाप व पापनाशन. ह्या वेळीं भार्गव व्यास होता. त्याला चार शिष्यांच्या द्वारें यानें सोहाय्य केलें. हा निवृत्तिमार्गाचा उपदेशक आहे ( शिव. शत. ४ ).

७ भारद्वाजाचा पुत्र. हा मौंजीबंधनानंतर यात्रा करण्यास निघाला. वाटेंत अमरकंटकासन्निध गर्गमुनीची गांठ पडली असतां त्याच्याकडून काशीमाहात्म्य ऐकून तेथें तप करून हा मुक्त झाला ( स्कंद. ४. २. ७४ ).

८ एक राक्षस. यानेंच भृगुस्त्री पुलोमा हिला पळवून नेलें. हा व पुलोमन् एक असावा ( पद्म. पा. १४; अग्नि पहा ).

**दमनक**—एक दैत्य. मत्स्यावतारीं भगवंतानें याला चैत्र शुक्ल चतुर्दशीचे दिवशीं चिरडून पृथ्वीवर पाडिलें. भगवंताचा हस्तस्पर्श झाल्यामुळें हा सुगंधी तृण रूपानें पृथ्वीवर राहिला. यालाच आपण दवणा म्हणतों ( स्कंद. २. २. ३९ ).

**दमयंती**—विदर्भदेशाधिपति भीमराजास संतति नसल्यामुळें त्यानें आपल्या घरीं आलेल्या दमन नामक ऋषीचें स्वागत केलें. पुढें त्याच ऋषीच्या आशीर्वादानें भीमराजास तीन पुत्र व दमयंती नांवाची कन्या झाली. हिच्या भावांचीं नांवें दम, दांत व दमन अशीं होतीं ( म. व. ५३ ).

हिनें आपल्या अद्वितीय सौंदर्यानें सर्व सुंदर स्त्रियांचा गर्व हरण केला, म्हणून हिला ' दमयंती ' असें नांव पडलें. एका सुवर्णवर्ण हंसाकडून हिनें नलराजाचे गुण ऐकले व त्या हंसामार्फत हिनें आपलें प्रेम नलाला कळविलें. पुढें स्वयंवर होऊन त्यांत जमलेल्या इंद्र, अग्नि, यम, वरुण वगैरे देवांनाहि टाकून हिनें निषधाधिपति नलाला वरिलें. त्यापासून हिला इंद्रसेन व इंद्रसेना हीं दोन मुलें झालीं. पण हिला व नलाला राज्यसौख्य फार दिवस लाभलें नाहीं. कारण पुढें द्यूतामध्यें नल आपलें सर्व ऐश्वर्य व राज्य हरला. त्यामुळें नल व दमयंती यांना एक वस्त्रानिशीं वनांत जावें लागलें. या वनवासांतहि यांच्यावर अनेक संकटें आलीं. त्यामुळें वैतागून नल दमयंतीला ही निजलेली असतां सोडून गेला. पुढें हिला एका अजगरानें गिळिलें असतां एका भिल्लानें सोडविलें. पण त्यास पापवासना झाल्यामुळें तो हिच्या दृष्टीनें दग्ध झाला. पुढें ही एका सार्थवाहांच्या तांड्याबरोबर चेदीपुरास आली व सैरंध्री हें नांव धारण करून राहूं लागली. पुढें हिच्या बापानें हिच्या शोधार्थी पाठविलेल्या एका माणसानें हिला हुडकल्यावर ही आपल्या बापाच्या घरीं येऊन राहिली व नल यावा, म्हणून हिनें दुसरें स्वयंवर करण्याचें जाहीर केलें. त्याच प्रसंगीं नल व दमयंती यांचें पुनर्मीलन होऊन यांचें पुढील आयुष्य पूर्ण सुखांत गेलें ( म. व. ५४-७८; नल पहा ).

दमयंतीस भैमी असें पैतृक नांव होतें. दमयंतीनें दुसऱ्या स्वयंवराची नुसती कंडी उठवली. तें हिचें खरें स्वयंवरच नव्हतें. कारण, हिनें आपल्या बापास न कळत व इतर कोणीहि राजे न बोलावितां ऋतुपर्णास बोलाविलें. शिवाय, हिला बाहुक हा नलच कीं काय, हें ओळखावयाचें होतें.

२ ही शैब्यपुत्र सृंजय राजाची कन्या. एकदां नारद व पर्वत हे सृंजय राजाचे मित्र असणारे ऋषि फिरत फिरत पावसाळा लागल्यामुळें चार महिने सृंजय राजाच्या येथें राहावयास आले.

राजानें त्यांची योग्य व्यवस्था करून हिला त्यांच्या शुश्रूषेस दिली. पुढें हिचें नारदावर प्रेम जडून नारदापेक्षां पर्वतास ही आदरातिथ्यांत कमी करूं लागली. पर्वताला नारदाविषयीं संशय येऊन नारदास त्याविषयीं त्यानें विचारलें असतां नारदानें आपलें प्रेम दमयंतीवर जडल्याचें कबूल केलें. हें पाहून पर्वतास क्रोध आला व त्यानें नारदास ' तूं वानरमुख होशील, ' असा शाप दिला. नारदानेंहि ' तुला स्वर्गांत जातां येणार नाहीं, ' असा पर्वतास उलट शाप दिला. शापाप्रमाणें नारद वानरासारखा दिसूं लागला. तरी दमयंतीनें त्याच्या सेवेंत अंतर पाडिलें नाहीं. सृंजयानें दमयंतीकरितां वर पाहण्याचें काम चालविलें होतें. परंतु दमयंतीनें आईकडून नारदावर आपलें प्रेम असल्याचें पित्यांस कळविलें. परंतु वानरमुख भिक्षेकरी नारदास आपली कन्या देणें राजास योग्य वाटलें नाहीं व त्याप्रमाणें दमयंतीच्या आईनेंहि हिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु मूर्ख असलेल्या राजपुत्राला वरण्यापेक्षां गायनविद्या जाणणाऱ्या, गुणग्राही व मधुर संभाषण करणाऱ्या नारदालाच वरणें हितावह आहे, असें उलट उत्तर दमयंतीनें आईस दिलें. अखेर दमयंतीच्या म्हणण्याप्रमाणें हिच्या मातापित्यांनीं नारदाशीं हिचा विवाह करून दिला. कालांतरानें पर्वत मुनीनें नारदास दिलेला शाप परत घेतला व नारद पूर्ववत् दिसूं लागला. दमयंतीनेंहि हा वृत्तान्त आनंदानें जाऊन मातापित्यांस निवेदिला ( दे. भा. २.२६-२७; म. द्रो. ५५; श्रीमती पहा ).

**दमवाह्य**—अंगिरागोत्राचा प्रवर. याबद्दल चमदाह्य असा पाठभेद आहे.

**दंभ**—विप्रचित्ति दानवाचा पुत्र.

२ ( सो. पुरूरवस्. ) हा मत्स्यमतें आयुपुत्र होय.

**दंभोद्भव**—एक राजा. हा आपल्या ऐश्वर्यानें मत्त होऊन प्रत्यहीं ब्राह्मणास विचारी कीं, माझ्याहून या पृथ्वीवर श्रेष्ठ कोण

आहे ? ब्राह्मणांनीं याचा प्रश्न ऐकून याची चांगली कान-उघाडणी केली, तरी याची संवय जाईना. तेव्हां ब्राह्मणांनीं यास नरनारायणांचें नांव सांगितलें. त्यावरोबर हा ससैन्य नर-नारायणांच्या आश्रमास गेला. परंतु नरनारायणांनीं याचा पराभव करून गर्व नाहींसा केला. कृष्णशिष्टाईच्या वेळीं परशुरामानें ही हकीकत सांगितली आहे (म. उ. ९६; वि. ५३.१५.कुं.).

**दंभोलि**—दढास्याचा पुत्र. प्रथम हा अगस्त्यकुलोत्पन्न होता. परंतु याच्या बापास (दढास्यास) पुलहानें पुत्र मानिल्यानें हा अर्थातच पौलह बनला.

**दया**—कश्यप प्रजापतीची स्त्री व दक्ष प्रजापतीची कन्या ( स्कंद. १. २. १४ ). पण ही धर्मपत्नी होती, असें पुष्कळ ठिकाणीं दिलें आहे. हिला अभय नामक पुत्र होता ( भा. ४. १. ५० ).

**दरद्**—दुर्योधनपक्षीय एक बाल्हिक राजा (म. आ. ६८. ५८ कुं. ).

**दरिद्योत**—( सो. कुकुर. ) हा भागवतमतें दुंदुभीचा पुत्र होय. विष्णु व वायु यांमध्यें यास अभिजित् म्हटलें आहे.

**दरीमुख**—रामाचा सेनापति.

**दर्दुम**—गोदावरीच्या कांठच्या प्रतिष्ठान नगरींतील ब्राह्मण. हा वाटेल त्यापासून दान घेई; म्हणून मेल्यावर नरकांत जाऊन शेवटीं एका अधम ब्राह्मणकुलांत जन्मला. यानें जिच्याशीं लग्न लाविलें, ती स्त्रीहि दुराचारिणी निघाली (पद्म. उ. १७६).

**दर्प**—( स्वा. ) उन्नतीचे ठिकाणीं धर्मास झालेला पुत्र.

**दर्पणासि**—यानें मातेच्या सांगण्यावरून कारुष राजाचा म्हणजे आपल्या पित्याचा वध केला ( भवि. ब्राह्म. ८ ).

**दर्भक**—( शिशु. भविष्य. ) भागवत, विष्णु व ब्रह्मांड यांच्या मतें अजातशत्रूचा पुत्र. वायुमतें यास दर्शक व मत्स्यमतें वंशक म्हटलें आहे.

**दर्भवाह**—अगस्त्यकुलोत्पन्न एक ऋषि.

**दर्भि**—एक ऋषि. यानें सात समुद्रांस असें सांगितलें होतें कीं, तुम्ही साताहिजण एक तीर्थ उत्पन्न करा. त्यावरून त्यांनीं एक पापनाशक असें अर्धकील नामक तीर्थ उत्पन्न केलें ( म. व. ८३ ).

२ ( दार्भ्य पहा ).

**दर्वा**—उशीनराची पत्नी.

**दर्विन्**—( सो. उशी. ) विष्णुमतें उशीनरपुत्र होय.

**दर्श**—कृष्णास कालिंदीपासून झालेला पुत्र ( भा. १०. ६१. १४ ).

२ धाता नामक आदित्य व सिनिवाली यांचा पुत्र ( भा. ६. १८.३ ).

**दर्शक**—( शिशु. भविष्य. ) वायुमतें बिंबिसाराचा पुत्र.

**दर्शनीय**—मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**दल**—(सू. इ.) मंडूककन्या शोभना हिला परीक्षितापासून झालेला पुत्र ( म. व. १९५. ३८ कुं.; शल पहा ).

विष्णु व वायु यांच्या मतें पारियात्र राजाचा पुत्र. भविष्य-पुराणांत याचें दलपाल असें नांव देऊन यानें १०००० वर्षें राज्य केलें, असें दिलें आहे. भागवतांत याबद्दल बल असें नांव दिलें आहे. वंश व पुत्र यांच्या साम्यावरून परीक्षित व पारियात्र एक असावेत.

२ कश्यप व दनु यांचा पुत्र.

**दलवाहन**—गोपालक देशाचा राजा. यास देवकी व ब्राह्मी अशा दोन कन्या होत्या ( भवि. प्रति. ३. ८ ).

**दलेषु**—( वलेक्षु पहा ).

**दवशद्**—गौतम नांवाच्या शिवावताराचा पुत्र.

**दशग्व**—हा आंगिरस होता. याचा नवग्वासह अनेक ठिकाणीं उल्लेख येतो ( ऋ. १. ६२.४; ३. ३९.५ ). इंद्रानें याचें संरक्षण केल्याचा एका ठिकाणीं स्पष्ट उल्लेख आहे ( ऋ. ८. १२. २ ). आंगिरसांतील हें एक कुल असावें.

**दशज्योति**—सुभ्राजाचा पुत्र ( म. आ. १. ५७ कुं ).

**दशद्यु**—याचें तुग्राशीं युद्ध झालें. त्यांत दोघांचेंहि इंद्रानें संरक्षण केलें ( ऋ. १. ३३. १४; ६. २६. ४ ).

**दशमी**—ब्रह्मदेवाची मानस कन्या.

**दशरथ**—( सू. इ. ) अज राजाचा पुत्र. हा अतिरथि, यज्ञयाग करणारा, धर्मनिष्ठ, मनोनिग्रही व जितेंद्रिय होता ( वा. रा. बा. ६.२.४ ). याच्या पित्याचें नांव प्रजापाल असें आढळतें ( पद्म. सृ. ८ ). हा अयोध्येचा राजा होता ( पद्म. पा. ७ ). अतिविषयी असल्यामुळेंच याच्या हातारवयांतील सर्व अनर्थ ओढवले व पुत्रशोकानें याला मरावें लागलें.

याच्या कौसल्या, सुमित्रा व कैकेयी या तीन बायका प्रसिद्ध आहेत. दशरथास कौसल्या, सुमित्रा, सुरूपा व सुवेषा अशा चार बायका होत्या असेंहि म्हटलें आहे ( पद्म. पा. ११६ ). याला तीनशें पन्नास विवाहित स्त्रिया होत्या. इतक्या बायका करणाऱ्या माणसाची स्थिति जशी असावी अशी आपली कल्पना आहे, तशीच स्थिति दशरथाची होती, असें सीतेनें काढलेल्या उद्गारांवरून स्पष्ट दिसतें. सीता अनुसूयेला म्हणते, राम कौसल्येशीं ज्याप्रमाणें वागतो, त्याप्रमाणेंच इतरहि राजस्त्रियांशीं वागतो. ज्या स्त्रियां-कडे दशरथानें उपभोग्य दृष्टीनें एकदां पाहिलें आहे, त्यांशींहि राम आपल्या मातेप्रमाणेंच वर्तन ठेवितो ( वा. रा. अयो. ११८.५-६ ). लक्ष्मण, भरत व राम यांच्यासुद्धां भाषणांत यास आधार सांपडतो. राम वनवासाला जाणार वगैरे वृत्तांत कळल्यावर लक्ष्मण कौसल्येला म्हणतो, "विषयांच्या

तावडींत सांपडलेला आणि बुद्धीला विपर्यास घडलेला हा विषयी व वृद्ध राजा कैकेयी प्रेरणा करूं लागली असतां कोणती बडबड करणार नाहीं ? " ( वा. रा. अयो. २१.३ ).

कैकेयीशीं याचा विवाह हा तर याच्या विषयलंपटतेवर कळस चढविणारा आहे. कारण, कैकेयीशीं याचें लग्न तिला होणाऱ्या मुलाला यौवराज्य देण्याच्या अटीवर झालें ( वा. रा. अयो. १०७.३). रामाला यौवराज्याभिषेक करण्याचें ठरलें, त्या वेळीं कैकेयी अगदीं तरुण होती. कैकेयीशीं दशरथाचें लग्न अश्वमेधाच्या थोडें पूर्वी झालें. त्या वेळीं दशरथ साठी बुद्धि नाठी होण्याच्या बेताला आला होता.

रामाला यौवराज्याभिषेक करण्याची घाई करण्याचेंहि कारण हेंच होय. कैकेयीशीं लग्न करितांना तिच्या बापाला भलतेंच वचन दिल्याची खात्री असल्यामुळें भरत आजोळीं असतां, आजोळीं कोणालाहि कळूं न देतां इकडे यौवराज्याचा समारंभ घडवून आणण्याचा यानें घाट घातला. पण एक संकट टाळण्याकरितां यानें घाट घातला, तों कैकेयीनें दुसरेंच संकट उत्पन्न केलें. मात्र त्यामुळें सूर्यवंशाचें यश मलीन न होतां जास्त उज्ज्वल झालें.

याला एक शांता नांवाची कन्या होती. ती यानें रोमपादाला दत्तक दिली होती. ती ऋश्यशृंगाला देऊन या दोघांनीं पुत्रकामेष्टि यज्ञ केला ( भा. ९.२३.८ ).

यानें शंभर अक्षौहिणी सैन्यासह सुमानस नगरीवर चाल केली व तेथील राजा साध्य याच्याशीं एक महिना युद्ध करून त्याला यानें बंदिवान् केलें. तेव्हां त्याचा अल्पवयी पुत्र भूषण याच्याबरोबर युद्धास आला; परंतु त्याचा पराभव झाला. युद्ध संपल्यावर हा तेथें एक महिनाभर राहिला असतां साध्य व भूषण यांचें परस्परांवरील प्रेम पाहून आपणांसहि भूषणासारखेच गुणवान् पुत्र व्हावेत, असें याच्या मनांत आलें. यानें साध्य राजास पुत्रप्राप्तीचा उपाय विचारिला असतां, त्यानें याला विष्णूला संतुष्ट करण्यास सांगितलें. नंतर सुमानस नगर साध्य राजास परत देऊन हा अयोध्येस परत आला व अनेक व्रतें केल्यावर यानें पुत्रकामेष्टि नांवाचा यज्ञ केला. तेव्हां विष्णु प्रगट होऊन त्यानें यास वर मागण्यास सांगितलें असतां, यानें दीर्घायुषी, धार्मिक व लोकांवर उपकार करणारे चार पुत्र मागितले. त्याप्रमाणें विष्णूनें कौसल्या, सुमित्रा, सुरूपा व सुवेषा यांना चार पुत्र होतील, असा आशीर्वाद दिला असतां यानें विष्णूला आपला पुत्र होण्यास सांगितलें. विष्णूनें तें मान्य करून चरूमध्यें प्रवेश केला. दशरथानें त्या चरूचे चार भाग करून ते आपल्या चार स्त्रियांस दिले. नंतर कौसल्या, सुमित्रा सुरूपा व सुवेषा यांना अनुक्रमें राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न असे पुत्र झाले. ब्रह्मदेवानें त्यांचे जातकर्मादि संस्कार केले ( पद्म. पा. ११६ ).

हा पूर्वजन्मीं धर्मदत्त नांवाचा विष्णुभक्त ब्राह्मण असून यानें राक्षसयोनीप्रत गेलेल्या कलहा नांवाच्या स्त्रीचा कार्तिकव्रताचें आपलें अर्धे पुण्य देऊन उद्धार केला. या जन्मीं कलहा कैकयी नांवानें याची स्त्री झाली ( पद्म. उ. १०६-१०७).

याच्या वेळीं रोहिणीशकटाचा भेद करून शनि पुढें जाणार, असें ज्योतिष्यांनीं भविष्य वर्तविलें. शनीनें रोहिणीशकट भेद केला असतां बारा वर्षे दुष्काळ पडतो. तेव्हां हा नक्षत्रमंडळांत गेला व यानें धनुष्य सज्ज करून भयंकर असें संहारास्त्र योजिलें. तें पाहून शनि प्रसन्न होऊन त्यानें इष्ट वर मागण्यास सांगितलें असतां, यानें जोंपर्यंत पृथ्वी आहे आणि जोंपर्यंत आकाशांत चंद्रसूर्य आहेत, तोंपर्यंत तूं रोहिणीशकटभेद करूं नयेस, असा वर मागितला. नंतर त्याप्रमाणें वर मिळतांच हा स्वनगरास परत आला ( पद्म. उ. ३३ ).

शेवटीं श्रावणाच्या शापाप्रमाणें पुत्रशोकानें हा मेला (श्रावण पहा ). दशरथ मेल्यानंतर भरत येईपर्यंत याचें प्रेत टिकावें म्हणून तें तेलांत ठेविलें होतें ( आ. रा. सार. ६ ).

२ ( सू. इ. ) वरील दशरथापूर्वी एक मूलकपुत्र दशरथ होऊन गेला आहे (.मूलक पहा ).

३ ( सो. क्रोष्टु. ) भविष्य, भागवत, विष्णु, वायु व पद्म ( पद्म. सृ. १३) यांच्या मतें नवरथाचा पुत्र. मत्स्यमतें हा दृढरथ होय.

४ ( मौर्य. भविष्य. ) विष्णुमतें सुयशस्‌चा पुत्र. मत्स्यमतें शकाचा नातू. इतर पुराणांत हा गाळला आहे.

**दशव्रज**—अश्विनीं याचें संरक्षण केलें होतें ( ऋ. ८ ८.२०). इंद्रानेंहि याच्यावर कृपा केली होती ( ऋ. ८. ४९.१०; ५०. ९ ).

**दशशिप्र**—याच्या घरीं सोम पिऊन इंद्र प्रसन्न झाला होता ( ऋ. ८. ५२. २. ).

**दशारि**—( सो. क्रोष्टु. ) भविष्यमतें निरावृत्तीचा पुत्र. इतरत्र यास दशार्ह म्हटलें आहे.

**दशार्णा**—गांधारराज सुबलाची कन्या व धृतराष्ट्राची पत्नी.

**दशार्ह**—( सो. क्रोष्टु. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें निर्वृतीचा पुत्र. मत्स्यमतें निर्वृतीचा पौत्र व विदूरथाचा पुत्र होय.

**दशावर**—वरुणलोकांतील एक असुर.

**दशाश्व**—( सू.इ. ) इक्ष्वाकूच्या शतपुत्रांतील एक. (म. अनु. २. ६. कुं.). माहिष्मती नगरीचा राजा असून याला मदिराश्व नामक एक पुत्र होता.

**दशोणि**—पर्णांशीं लढाई चालू असतां इंद्रानें याला साह्य करून पर्णांना पळवून लाविलें (ऋ. ६. २०. ४). द्योतमानांशीं चाललेल्या लढाईंत दशोणीवर इंद्रानें कृपा केली (ऋ. ६. २०. ८). इतर ठिकाणीं आलेल्या दशोणि शब्दाचा अर्थ व्यक्ति नसून दहा बोटें असा आहे (ऋ. १०. ९६. १२).

**दशोण्य**—दशोण्य ही इंद्राच्या कृपेंतली स्वतंत्र व्यक्ति आहे (ऋ. ८. ५२. २).

**दस्यवे वृक**—हीं जरी दोन पदें दिसत असलीं, तरी हें एका व्यक्तीचें नांव आहे. याच्या औदार्याबद्दल वर्णन आहे (ऋ. ८. ५५. १; ५६. २). वालखिल्यांत कृश व पृषध्र यांच्या सूक्तांत हें वर्णन आहे. यावरून ते याचे आश्रयदाते असावेत. याचा ऋषि म्हणूनहि उल्लेख आहे (ऋ. ८. ५१. २). छप्पन्नाव्या सूक्तावरून याचा बाप पूतक्रतु व आई पूतक्रता होती, असा तर्क करितां येईल.

**दस्र**—अश्विनीकुमारांतील एक. सहदेव याच्याच अंशापासून झाला होता (भा. ९. २२).

**दहन**—अकरा रुद्रांपैकीं एक.

**दाकव्य** व **दाकायन**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**दाक्षपाय**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**दाक्षायण**-दाक्षायणांनीं शतानीकास सोनें दिलें होतें (अ. वे. १. ३५. १-२; वा. सं. ३४. ५१—५२; खिल. ४.७.७.८). या शब्दाचाच अर्थ सोनें असा केला आहे (श. ब्रा. २. ४. ४. ६; ऐ. ब्रा. ३. ४०). दाक्षायण ही एक राजमालिका होती. त्या मालिकेंतील राजे संस्कारविशेषामुळें ब्राह्मणकालापर्यंत उत्कर्षांत होते (दक्ष पहा).

**दाक्षायणी**—सतीचें नामांतर.

**दाक्षि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

२ अत्रिकुलांतील गोत्रकार.

**दातृ**—सुख देवांपैकीं एक.

**दात्रेय**—हें अराल शौनकाचें पैतृक नांव, म्हणून वंशब्राह्मणांत आलें आहे. कदाचित् दार्तेय असाहि पाठ असेल.

**दाधीच**—दध्यंचाचा वंशज असा याचा अर्थ होतो. च्यवनाचें हें पैतृक नांव आहे (पं. ब्रा. १४. ६; च्यवन पहा).

**दान**—पारावत देवांतील एक.

२ सुख देवांपैकीं एक.

**दानकाय**—वसिष्ठगोत्री ऋषिगण.

**दानपति**—अक्रूराचें नामांतर (भा. १०. ४९).

**दानव**—कश्यपकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**दानेन्**—सुख देवांपैकीं एक.

**दान्त**—भीमक राजाचा पुत्र व दमयंतीचा भ्राता (म. व. ५०. ९ कुं.).

२ विकुंठ देवांतील एक.

३ सुधामन देवांतील एक.

४ एक ऋषि. यानें भद्रतनु नांवाच्या ब्राह्मणाला काम, क्रोध, लोभ इत्यादिकांचीं लक्षणें सांगून त्यांचा त्याग करण्यास सांगितलें (पद्म. क्रि. १७).

**दान्ता**—एक अप्सरा (म. अनु. ५०. ४८ कुं.).

**दाम**—सुखदेवांपैकीं एक.

**दामग्रन्थिन्**—अज्ञातवासांत विराटगृहीं नकुलास असलेलें नांव (म. वि. ४.५ कुं.).

**दामघोषि**—शिशुपालास नांव.

**दामचंद्र**—एक पांडवपक्षीय राजा (म. द्रो. १५९. ३९ कुं.).

**दामोष्णीष**—एक ऋषि (म. स. ४. १९ कुं.).

**दारुक**—कृष्णाचा सारथि (म. व. २२.२० कुं.; भा. १०.५०; पद्म. उ. २५२). याचें कृष्णाशीं रथ सज्ज करण्याविषयीं झालेलें संभाषण आलें असून हा शेवटीं पांडवांकडे गेला (म. द्रो. ७९. २३—४७; मौ. ५.३ कुं.).

२ वाराहकल्पांतील वैवस्वत मन्वंतराच्या एकविसाव्या चौकडींत हा शिवाचा अवतार होता. त्यामुळें त्या स्थानाला दारुवन असें नांव पडलें. याला पुढीलप्रमाणें पुत्र होते. प्लक्ष, दार्भायणि, केतुमान् व गौतम (शिव. शत. ५).

३ एक दैत्य.

**दारुकि**—दारुकपुत्र व प्रद्युम्नाचा सारथि (म. व. १८. ३ कुं.).

**दारुण**—कश्यप व अरिष्टा यांचा पुत्र.

२ गरुडपुत्र (म. उ. १०१. ९ कुं.).

**दार्ढजयन्ति**—वैपश्चित गुप्त लौहित्य व वैपश्चित दृढजयन्त लौहित्य यांचें हें पैतृक नांव आहे.

**दार्तेय**—यज्ञासंबंधीं यथार्थ मत देणारा म्हणून याचा उल्लेख आहे (क. सं. ३१.२). दृति व वातवत् या नांवांच्या ऋषींचें हें पितृप्राप्त नांव आहे. यांनीं खांडवनांत सत्र केलें. तें वातवतानें अर्धेंच टाकिलें. पण दृतीनें पुरें केल्यामुळें दार्तेयांचा उत्कर्ष झाला (पं. ब्रा. २५.३.६; अराल पहा).

**दार्भायणि**—दारुक नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**दार्भ्य**—एका ऋचेंत याचा उल्लेख आला आहे (ऋ.५. ६१.१७). रथवीतीचें हें पैतृक नांव आहे (बृहद्दे. ५.४९. ७९). हें पैतृक नांव इतरत्रहि बरेच वेळां आलें आहे (तै. सं. २.६.२.३; मै. सं. १.४.१२; ६.५; सां. ब्रा. ७.४).

हें केशिन् व रवगीत यांनाहि लाविलें जातें ( मै. सं. २. १. ३; दाल्भ्य पहा ).

**दालकि**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील वायुमतें शाकपूर्ण रथीतराचा शिष्य.

**दाल्भि**—वकाचें पैतृक नांव ( क. सं. १०.६ ).

**दाल्भ्य**—हा दार्भ्य याचा पर्याय असावा. हें केशीचें (पं. ब्रा. १३.१७.८), चेकितानाचें ( छां. उ. १.८.१; जै. उ. ब्रा. २.३८.१ ) व बकाचें ( छां. उ. १. २. १३; १२.१.३; क. सं. ३०. २; म. व. २६; २९९. १७ कुं.) पैतृक नांव आहे. दार्भ्य व दाल्भ्य यांचा सारखा घोंटाळा आढळतो ( दार्भ्य पहा ). याचा वैयाकरण म्हणून उल्लेख आहे ( शु. प्रा. ४.१६ ).

२ हा द्युमत्सेनाचा मित्र होता.

३ उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक ( पद्म. सृ. ७ ).

**दावसु आंगिरस**—हा सामांचा द्रष्टा आहे (पं. ब्रा. २५. ५. १२.१४ ).

**दाशर्म**—आरुणीशीं समकालीन असणारा एक आचार्य ( क. सं. ७.६ ).

**दाशार्ह**—व्योमाचें पैतृक नांव. मथुरेच्या राजा. हा शिवमंत्रानें निष्पाप झाला ( स्कंद. ३.३.१ ).

२ विदूरथाचें मातृक नांव.

**दाशूर**—हा तपस्वी शरलोमाचा पुत्र असून मगध देशांतील एका पर्वतावर राहत होता. शरलोमाचा अंत झाल्यामुळें हा शोकमग्न असतां याच्यापुढें अग्नि प्रगट झाला. त्यानें वृक्षाग्रावर आसन घालून स्थिर राहतां येण्याबद्दल एक वर दिला. यानें एका कदंब वृक्षावर आसन घातलें असतां यास भोंवतालच्या दिशा स्त्रियांप्रमाणें दिसल्या तरी मानसिक यज्ञामुळें यास आत्मबोध झाला. हा कदंबदाशूर म्हणून प्रसिद्ध झाला. यास वनदेवतेपासून पुत्र झाला व त्यास यानें ज्ञानोपदेश केला ( यो. वा. ४. ४८-५१ ).

**दासवेश**—( वेश पहा ).

**दिक्पति**—सत्य देवांतील एक.

**दिंडि**—सूर्याचा प्रधान व एकादश रुद्रांपैकीं एक. हा ब्रह्मघाच्या शिरच्छेदाच्या पातकांतून सूर्यासन्निध राहून मुक्त झाला ( सांब. १६ ). सूर्याच्या अग्रभागीं रथांत बसणारा सेवक ( भवि. ब्राह्म. ५६ ).

हा महातपस्वी गणाधिपति दंडी पूर्वी ब्रह्महत्येच्या निरासास्तव सूर्याराधना करीत असतां सूर्याच्या कृपेनें मुक्त झाला व सूर्यापासून यानें क्रियायोग श्रवण केला ( भवि. ब्राह्म. ६३ ).

हा शंकराचा अवतार आहे ( भवि. ब्राह्म. ९१ ). हा सूर्याच्या पूर्वेस राहतो. रुद्र हा निरंतर भ्रमण करितो म्हणून यास हें नांव आहे ( भवि. ब्राह्म. १२४ ).

**दिति**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या. व कश्यपाची भार्या ( कश्यप पहा ). हिचा ऋग्वेदांत तीन ठिकाणीं उल्लेख आहे. पैकीं दोन ठिकाणचा उल्लेख अदितीबरोबरच आलेला आहे ( ऋ. ५. ६२. ८; ४. २. ११ ) व तिसऱ्या उल्लेखाच्या वेळीं मात्र हिचा अदितिविरहित पण अग्नि, सविता व भग यांसमवेत निर्देश आलेला आहे (ऋ. ७. १५. १२ ). हिचा देवी म्हणून उल्लेख आला आहे ( वा. सं. १८. २२; अ. वे. १५. १८. ४; १६. ६.७ ). अथर्ववेदांत हिचीं मुलें दिलीं आहेत. हे दैत्य असून देवशत्रु म्हणून आढळतात ( भा. ७. ७. १ ). यावरून दिति ही अदितीला विरोधी म्हणून आली असावी.

**दिलीप**—( सू. इ. ) अंशुमानाचा पुत्र. रामायणांत भगीरथपिता व रघूचा पणजा दिलीप एकच मानिला आहे. पण ते भिन्न आहेत. सगरांचा उद्धार करण्यासाठीं गंगा आणावी, म्हणून यानें तीस हजार वर्षे तप केलें. पण गंगा न आणितांच याला मृत्यु आला. याच्या मुलाचें नांव भगीरथ होय ( भा. ९. ९; वा. रा. बा. ४२; मत्स्य. १२. ४४; म. व. १०७. ४१-४४ कुं.; पद्म. भू. १०; ह. २१; ब्रह्म. ८. ७५ ). हा पहिला दिलीप होय.

२ ( सू. इ. ) भागवत व विष्णु यांच्या मतें विश्वसहाचा, ब्रह्मांड व वायु यांच्या मतें विश्वमहत्‌चा व मत्स्यमतें रघूचा पुत्र होय. याचा मुलगा दीर्घबाहु. मत्स्यांत अजक हा पुत्र दिला आहे. रामायणांत भगीरथपिता दिलीप व रघूचा पणजा दिलीप हे एकच मानिले आहेत. वास्तविक हे भिन्न मानिले पाहिजेत. मत्स्य, पद्म व अग्नि यांच्या क्रमांत थोडा फरक आहे. याची आई पितृकन्या यशोदा. याचा पुरोहित शांडिल्य होता. दिलीप खट्वांगाच्या प्रशंसापर एक पुरातन श्लोकहि आहे ( ब्रह्मांड. ३. १०. ९०-९२; ह. वं. १. १८; वायु. २. ११. ८४ ). हा दुलिदुहाचा पुत्र म्हणूनहि दिला आहे ( ब्रह्म. ८. ८४; ह. वं. १. १५ ). याच्या बायकोचें नांव सुदक्षिणा. याला पुष्कळ दिवस मुलगा झाला नाहीं, म्हणून हा वसिष्ठाच्या आश्रमांत गेला. राजानें विनंति केल्यावरून वसिष्ठानें यास सांगितलें कीं, "पूर्वी तूं इंद्राकडे गेला असतां तुझी पत्नी ऋतुस्नात झाली, असें तुला समजलें. तेव्हां तूं घरीं परतलास. वाटेंत कल्पवृक्षाखालीं कामधेनु उभी होती. तिला नमस्कारादि न करितांच तूं पुढें निघाल्यामुळें तिनें तुला शाप दिला. तिनें सांगितलें कीं, माझ्या मुलाची सेवा केल्याशिवाय तुला संतति होणार नाहीं. करितां

माझ्या आश्रमांत असणाऱ्या कामधेनूच्या मुलीची, नंदिनीची सेवा कर म्हणजे तुला मूल होईल." इतकें सांगत असतां, तेथें नंदिनी आली, तिला दाखवून वसिष्ठानें तुझी कार्यसिद्धि लवकरच होणार, असें सांगितलें. यानें धेनूला चारण्याकरितां अरण्यांत नेण्याचा क्रम सुरू केला. एके दिवशीं एक मायावी सिंह उत्पन्न करून नंदिनीनें याची परीक्षा पाहिली. तेव्हां यानें स्वदेहार्पण करून धेनूचें रक्षण करण्याची सिद्धता दाखविली. तेव्हां त्यामुळें धेनु प्रसन्न होऊन याला पुढें रघु नांवाचा विख्यात पुत्र झाला ( पद्म. उ. २०२-२०३ ). ही कालिदासाच्या रघुवंशाशीं तंतोतंत जुळणारी कथा आहे.

हा पृथ्वीवरचा कुबेर होता. यानें शेंकडों यज्ञ केले. प्रत्येक यज्ञांत लाखों ब्राह्मण असत. यानें सर्व पृथ्वी ब्राह्मणांना दान दिली होती. यज्ञप्रक्रिया याच्या यज्ञामुळेंच निश्चित झाली. याच्या यज्ञांत सोन्याचा यूप असे. याचा रथ पाण्यांत बुडत नसे. दिलीपाच्या घरीं वेदघोष, धनुष्याच्या दोरीचा टणत्कार, प्या, उपभोग घ्या व खा असे पांच प्रकारचे शब्द सारखे चाललेले असत ( म. द्रो. ६१; शां. २९ ). याचा सम्राट व चक्रवर्ती म्हणून निर्देश असतो. हाच खट्वांग होय.

३ ( सो. कुरु. ) भागवतमतें ऋक्षाचा, विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें भीमसेनाचा पुत्र.

**दिलीवच**—भविष्यमतें मनुवंशी दशरथाचा पुत्र. यानें २९७०० वर्षे राज्य केलें.

**दिवंजय**—उदारधी व भद्रा यांचा पुत्र.

**दिवस्पति**—रौच्य मन्वंतरांतील होणारा इंद्र.

**दिवस्पर्श**—तुषित देवांतील एक.

**दिवाकर**—गरुडाचा पुत्र ( म. उ. १०१. १४ कुं ).

२ ( सू. इ. भविष्य. ) भागवतमतें भानु राजाचा पुत्र. याचा पुत्र सहदेव. हाच वायुमतें प्रतिव्यूहपुत्र, मत्स्य व विष्णु यांच्या मतें प्रतिव्योमपुत्र आहे.

३ ( सो. ) भविष्यमतें आतिथ्यवर्धनाचा पुत्र.

४ हा पुढील जन्मीं मुकुंदशिष्य विमल होय ( भवि. प्रति. ४. २२ ).

**दिवावष्ट**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण. दिवावस व दिवावसिष्ठ असे पाठभेद आहेत.

**दिवावष्टाश्व**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**दिवावस**—( दिवावष्ट पहा ).

**दिवावसिष्ठ**—( दिवावष्ट पहा ).

**दिवि**—सत्य देवांतील एक.

**दिविरथ**—( सो. अनु. ) भागवतमतें खनपानाचा पुत्र-रथ राजाचा पिता. विष्णुमतें पारपुत्र, वायु व मत्स्य यांच्या मतें दधिवाहनपुत्र. याचा पुत्र धर्मरथ.

**दिवीलक**—( आंध्र. भविष्य. ) विष्णुमतें लंबोदराचा पुत्र. यास अपीतक व चिविलक अशीं नांवें होतीं.

**दिवोदास**—( सो. काश्य. ) भागवत व विष्णु यांच्या मतें भीमरथाचा पुत्र. विष्णुमतें हा अभिरथाचा पुत्र होय. ब्रह्म व वायु यांच्या मतें हें भीमरथालाच दुसरें नांव आहे. महाभारतांत याला काशीपति सुदेव असें म्हटलें आहे. याचा आजा हर्यश्व, बाप सुदेव किंवा भीमरथ व हा स्वतः याचा हैहय वीतहव्यानें पराभव केला. तेव्हां दिवोदास भरद्वाजाला शरण गेला व त्याकडून पुत्रकामेष्टि केल्यावर यास शत्रुनाशक प्रतर्दन नांवाचा पुत्र झाला. त्यानें हैहय वीतहव्यांचा पराभव करून वीतहव्याला भृगूच्या आश्रमांत लपावयास लाविलें ( म. अनु. ८ कुं. ). अप्रतिरथ व प्रतर्दन यांच्याशीं भारद्वाजाचा संबंध होता (क. सं. २१. १०). याच्या बायकोचें नांव दृषद्वती. याला दृषद्वतीपासूनच प्रतर्दन झाला ( ब्रह्म. ११.४०.४८). प्रतर्दन, शत्रुजित्, ऋतध्वज व कुवलयाश्व हे सर्व एकच होत ( भा. ९.१७.६ ). यास प्रतर्दन ययातिकन्या माधवीपासून झाला ही माहिती कालदृष्ट्या विसंगत आहे (म. उ. ११७. १ कुं.). हा यमसभेचा एक सदस्य होता ( म. स. ८. १२ कुं.). भास्कर-संहितेंतील चिकित्सादर्पण तंत्रांचा हा कर्ता आहे ( ब्रह्मवै. २. १६). धन्वंतरीच्या पुढें दिवोदास असा शब्द जोडण्यांत येतो तो वंशदर्शक असावा.

२ ( सो. काश्य. ) हा सुदेवपुत्र व अष्टारथपिता असावा. पण ब्रह्म व महाभारत यांखेरीज इतरत्र वंशावळींत एवढीहि माहिती मिळत नाहीं. हैहय वंशाशीं तुलना करितां काश्य वंशांत दोन दिवोदास मानणें जरूर आहे. यानें भद्रश्रेण्यापासून काशी जिंकून घेतली व तेथें आपलें राज्य थाटलें. पण याला निकुंभाच्या शापामुळें काशी सोडून गोमतीतीरावर दुसरी राजधानी स्थापावी लागली. शेवटीं हैहय व काश्य घराण्यांतील तंट्याचा शेवट, भद्रश्रेण्याचा पुत्र दुर्मदानें दिवोदासाचा पराभव करून केला (म. अनु. ३०; ब्रह्म. ११. ४८; १३. ५४; ह. वं. १. २९; ब्रह्मांड ३.६७; वायु. २. ३०. २६ ). याला अष्टारथ नांवाचा मुलगा होता ( ब्रह्म. १३.३१ ).

३ ( सो. नील. ) हा सरस्वतीच्या कृपेनें वध्र्याश्वाला झालेला पुत्र होय ( ऋ. ६. ६१. १ ). वध्र्याश्व-दिवोदास-पिजवन व सुदास अशा क्रमानें वंशावळ असावी. हा भरतांपैकीं असावा ( ऋ. ६. १६. ४; ५. १९ ). अतिथिग्व हें पद अतिथींचा सन्मान करणारें या अर्थानें सुदास व दिवोदास यांना लावीत असावेत (ऋ. १. ५१. ६; ७. १९. ८). सायणानें अतिथिग्व याचा अर्थ अतिथींगूचा पुत्र दिवोदास असाहि केला आहे ( ऋ. १०. ४८. ८ ).

यानें शंबराचा अनेक वेळां पराजय केला आहे ( ऋ. १.

५१ ६; शबर पहा ). हा वध्र्यश्वाप्रमाणें अग्नीचा उपासक होता ( ऋ. ६. १६. ५; १९ ). म्हणून अग्नीला दैवोदास अग्नि असे नांव पडलें (ऋ. ८.१०३.२). परुच्छेपाच्या सूक्तांत याचा संबंध दिसतो ( ऋ. १. १३०. १० ). भरद्वाजाच्या सहाव्या मंडळांत याचे बरेच महत्त्वाचे उल्लेख आहेत. याचा भरद्वाज पुरोहित होता. अदारसृत नांवाच्या सामाच्या प्रभावानें हा पुनः वैभवसंपन्न झाला ( पं. ब्रा. १५. ३. ७ ). भरद्वाजाचा त्याच्याशीं असलेला संबंध पुराणादिकांतहि वारंवार आला आहे. हा व दिवोदास नील एकच असावेत.

ब्रध्न्यश्वास मेनकेपासून एक मुलगा व एक मुलगी झाली. त्यांतील हा मुलगा. मुलीचें नांव अहल्या. ती शरद्वत् गौतमाला दिली होती ( ह. वं. १. ३२ ). भागवतमतें हा मुद्गलाचा, विष्णुमतें वध्र्यश्वाचा, वायुमतें ब्रध्न्यश्वाचा व मत्स्यमतें विंध्याश्वाचा पुत्र होय. प्रत्येक ठिकाणीं वरीलप्रमाणेंच माहिती आहे. पुराणांत याचा पुत्र मित्रयु दिला आहे. पण वेदांत ( ऋ. ८. ६८. १७ ) याचा पुत्र इंद्रोत दिसतो. याच्याशीं पुढील लोक समकालीन होते. ऋक्ष, अश्वमेध, पूतक्रतु, प्रस्तोक व सौभरि.

४ भृगुकुलांतील एक ऋषि. प्रवर व मंत्रकार (भृगु पहा). हा प्रथम क्षत्रिय असून नंतर ब्राह्मण झाला ( मत्स्य. १९५. ४२; परुच्छेप दैवोदासी पहा ).

५ ( दिव्यादेवी पहा ).

**दिवोदास भैमसेनी**—हा एक अरुणीचा समकालीन होता ( क. सं. ७. १. ८ ).

**दिव्य**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें सात्वताचा पुत्र. भागवत व मत्स्य यांच्या मतें अंधक असें नांव आहे. विष्णुमतें **दिव्यांधक असें नांव आहे** ( १ अंधक पहा ).

**दिव्यजायु**—पुरूरव्यास उर्वशीपासून झालेल्या अष्टपुत्रांपैकीं सहावा ( पद्म. सृ. १२ ).

**दिव्यमान**—पारावत देवांपैकीं एक.

**दिव्या**—पुलोम्याची मुलगी व भृगूची बायको. हिच्यापासूनच भृगूस बारा भृगु, देव झाले ( ब्रह्मांड. २. ३८ ).

**दिव्यादेवी**—प्लक्षद्वीपांतील दिवोदास राजाची कन्या. दिवोदासानें हिच्याकरितां रूपदेशाच्या चित्रसेन नामक राजाची वर म्हणून योजना केली. पण लग्न होत असतां हा मरण पावला. तेव्हां यानें विद्वान् ब्राह्मणांचे सांगण्यावरून रूपसेन राजाबरोबर हिचें लग्न लाविलें. परंतु तोहि मेला. अशा रीतीनें हिचे एकवीस पति मरण पावले. पुढें मंत्र्यांच्या सल्ल्यानें राजानें हिचें स्वयंवर आरंभिलें, पण तेथें आलेले राजे एकमेकांशां लढून मरण पावले. हें दिव्यादेवीस कळतांच हिला वाईट वाटलें व ही अरण्यांत गेली ( पद्म. भू. ८५ ). एकदां उज्वल नांवाचा पोपट प्लक्षद्वीपांत येऊन त्यानें शोक करीत असलेल्या दिव्यादेवीस अशून्यशयन व्रत सांगितलें. हिनें मनोभावें करून तें व्रत चार वर्षें केल्यावर विष्णूनें हिला दर्शन देऊन विष्णुलोकीं नेलें ( पद्म. भू. ८८ ). पूर्वजन्मीं ही चित्रा नांवाची एका वाण्याची स्त्री होती ( ४ चित्रा पहा ).

**दिव्यांधक**—( दिव्य पहा ).

**दिष्ट**—( सू. दिष्ट. ) वैवस्वत मनूचा पुत्र. याचा भाऊ नाभाग ( भा. ८. १३; नभग पहा ).

**दीक्षित**—कण्वास आर्यावतीपासून झालेला पुत्र व द्विविदाचा भाऊ ( भवि. प्रति. ४. २१ ).

**दीननाथ**—हा विष्णुभक्त राजा द्वापार युगांत होऊन गेला. यास संतति नव्हती. तेव्हां गालव ऋषीच्या सल्ल्यानें यानें नरयज्ञ करण्याचें ठरविलें व योग्य माणूस शोधण्यासाठीं दूत नेमिले. दूतांस दशपूर नगरींत कृष्णदेव ब्राह्मणास सुशीला नामक स्त्रीपासून झालेले तीन पुत्र आढळले. त्यांपैकीं एकहि पुत्र देण्यास तो ब्राह्मण तयार होईना. जेव्हां ते चार लक्ष मोहरा त्यास देऊन बळजबरीनें थोरला पुत्र घेऊन चालले, तेव्हां ब्राह्मणानें स्वतः येतों असें सांगितलें व प्रार्थिलें कीं, त्यास सोडा. धाकट्यास घेऊन जाऊं लागले असतां माता तसें करूं देईना. तेव्हां त्यांनीं मधल्यास जबरदस्तीनें नेलें. तेव्हां आईबापांनीं फार शोक केला. पुढें सेवकांचा मुक्काम विश्वामित्राच्या आश्रमीं पडला असतां विश्वामित्रानें स्वतःस नरमेधास बलि म्हणून नेण्यास सांगितलें. पण नोकरास तें मान्य झालें नाहीं; तेव्हां विश्वामित्र राजाकडे आला व त्यानें यास ' पूर्णाहुति देऊनहि पुत्र होतो, ' असें सांगतांच राजानें त्या पुत्रास सोडून देऊन यज्ञ केला. या मनुष्यास वांचविण्याच्या पुण्यानें विश्वामित्राचे हातीं स्वर्ग आला व दीननाथास पुत्र झाला ( पद्म. ब्र. १२; शुनःशेप पहा ).

**दीप्तलोचन**—( सो. कुरु. ) भीमानें मारिलेला एक धृतराष्ट्राचा पुत्र ( म. भी. ९६. २७ कुं. ).

**दीप्ति**—अमिताभदेवांपैकीं एक.

**दीप्तिकेतु**—दक्षसावर्णि मनूचा एक पुत्र.

**दीप्तिमत्**—सावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**दीप्तिमेधस्**—सुमेधस् देवांतील एक.

**दीर्घ**—मगधदेशीय एक क्षत्रिय. यास पांडूनें ठार मारिलें ( म. आ. १२२. २७ कुं. ).

**दीर्घजिह्व**—दनुपुत्र. दानवांतील एक.

२ शेषाचे कोषांत एक मृतसंजीवक मणि आहे, त्याच्या संरक्षकांपैकीं एक. अतिविषारी सर्प ( जै. अ. ३८ ).

**दीर्घजिह्वा**—अशोकवनिकेंतील एक राक्षसी.

**दीर्घतपस्**—( सो. काश्य ). राष्ट्राचा मुलगा ( २ दीर्घतमस् पहा ). ब्रह्मपुराणांत हा काशेयाचा पुत्र दिला आहे ( ब्रह्म. १३. ६४ ).

२ जंबुद्वीपांतील महेंद्रपर्वतावर राहणारा एक तपस्वी. यास पुण्य आणि पावन असे दोन पुत्र होते. वयाच्या शंभराव्या वर्षी हा आपल्या पत्नीसह मरण पावला. याच्या शोकामुळें पावन शोकग्रस्त झाला असतां, पुण्यानें त्यास उपदेश करून त्याचें मोहनिरसन केलें ( यो. वा. ५. १९-२१ ). तृष्णाक्षयाकरितां ही गोष्ट सांगितली आहे.

३ एक व्यास. याचा पुत्र शुक ( पद्म. पा. ७२ ).

**दीर्घतमस् औचथ्य**—हा अंगिरसकुलांतील सूक्तद्रष्टा होय ( ऋ. १.१४०. १६४). दीर्घतपस् असाहि पाठभेद आहे (वायु १.५९.९८-१०२ ). ह्या म्हाताऱ्याला संभाळून नोकर त्रासले. तेव्हां त्यांनीं हा मरावा म्हणून यास अग्नींत टाकिलें, पाण्यांत टाकिलें, शेवटीं त्रैतन नांवाच्या दासानें यांचें डोकें तोडिलें व छाती फोडिली, तरी प्रत्येक वेळीं अश्वींनीं याचें संरक्षण केलें ( ऋ. १.१५८.४–६; बृहद्दे. ४.११,१४ ). हा शंभर वर्षे जगला (ऋ. १.१५८.६; सां. आ. २.१७ ). याला खुद्द मंत्रांतहि औचथ्य व मामतेय म्हटलें आहे. हा बृहस्पतिशापानें आंधळा झाला होता. तरी याला पुनः दृष्टि प्राप्त झाली होती ( ऋ. १.१४७.३; ४.४.१३ ). पुढें याला नदींत फेंकून दिल्यावर हा अंगदेशच्या तीराला लागला व याला कक्षीवत्प्रभृति मुलें झालीं ( बृहद्दे. ४.२३ ). पुराणांत हीच हकीगत थोडयाशा फरकानें आहे ( उचथ्य व उशिज् पहा ). यानें भरत दौष्यंतीला ऐन्द्र महाभिषेक केला (ऐ.ब्रा. ८.२३ ). हा अभिषेक यमुनेच्या कांठीं झाला ( भा. ९. २०. २५; भरत पहा ).

हा उतथ्य ऋषीस ममतेपासून झाला होता. हा बृहस्पतीच्या शापानें जन्मतःच आंधळा होता ( बृहद्दे. ४. १४ ). यास गर्भावस्थेंतच सर्व वेद, वेदांगें व शास्त्रें पूर्ण अवगत होतीं ( वायु. २..४; ३७; मत्स्य. ४८; भा. ९.२०; म. आ. १०४; शां. ३४१ ). हा अंगिरसाच्या कुलांत मंत्रद्रष्टा ऋषि होता. याचें विद्येच्या जोरावर एका रूपसंपन्न प्रद्वेषी नामक स्त्रीशीं लग्न झालें. तिजपासून यास गौतमादि पुष्कळ पुत्र झाले. नंतर हा कुलाची वृद्धि व्हावी म्हणून कामधेनूच्या पुत्रांकडून गोरति विद्या शिकला व दिवसाढवळ्या सर्व लोकांसमक्ष स्त्रीसमागम करूं लागला. आश्रमांतील इतर ऋषींस तें न आवडून त्यांनीं यास हांकलून लावण्याचा विचार केला. प्रद्वेषीसहि मुलें झालीं होतीं व तिला आंधळा नवरा नको होता, म्हणून तीहि यास हांकलून देण्यास उद्युक्त झाली व मी दुसरा पति करीन असें म्हणाली. तेव्हां यानें मर्यादा घालून दिली कीं, ‘ जन्मभर स्त्रीला पति एकच असावा. तोच तिचें दैवत होय. तो जिवंत असो अगर मरो, तिला दुसरा पति करितां येणार नाहीं. दुसरा पति तिनें केला, तर ती पतित होईल. पतीशिवाय राहणाऱ्या स्त्रियाहि पातकीच होत. त्यांच्या जवळ धन असलें तरी त्या पतिशून्य स्त्रियांचे परपुरुषसंभोग व तज्जन्य संतति हीं व्यर्थ, अकीर्तिकर व निंदास्पद ठरतील. ’ पुढें आईच्या आज्ञेनें तिच्या पुत्रांनीं बापास एका ताफ्यावर बांधून तो ताफा गंगेंत सोडून दिला ( म. आ. १०४ ). हा आपल्या ज्या चुलत भावाच्या आश्रमांत राहत होता त्या शरद्वानाला हें न आवडून त्यानें यास हांकलून दिलें ( वायु. २. ३७; ब्रह्मांड. ३. ७४ ). हा सुनेशीं विषयवासनायुक्त भाषा बोलूं लागला, म्हणून तिनें यास हांकलून लाविला, असें मत्स्यपुराणांत दिलें आहे (४८).

नदींत सोडिलेला तो ताफा आनवदेशीच्या हद्दीपर्यंत वाहत वाहत आला. तेथें बलिराजा सहज आला होता. त्यानें या ऋषीस मोठ्या सन्मानानें व आनंदानें प्रजोत्पादनाकरितां आपल्या अन्तःपुरांत ठेऊन घेतलें. नंतर त्या बलि राजानें आपली राणी सुदेष्णा हिला संततिहेतु मनांत धरून या ऋषीची सेवा करण्यास सांगितलें. पण हा अंध आहे असें जाणून तिनें आपल्या शूद्रवर्णीय औशीनरी दासीस याजकडे पाठविलें. तिच्या ठिकाणीं या ऋषीनें कक्षीवानादि अकरा पुत्र उत्पन्न केले. ( मत्स्य. ४८; म. आ. १०४; म. २२. ३७ ). काक्षीवानादि असें वायुपुराणांत दिलें आहे. नंतर हे पुत्र माझे असें बलि व दीर्घतमस् हे दोघे म्हणूं लागले. दीर्घतमसूनें राजास त्याच्या पत्नीनें केलेली लबाडी सांगितली. तेव्हां ऋषीस शांत करून व बायकोचें मन वळवून बलीनें तिच्या ठायीं ऋषीकरवीं पांच पुत्र उत्पन्न करविले. त्यांचीं नांवें अंग, वंग, पुंड्र, सुम्ह व कलिंग अशीं होतीं. यांना बालेय क्षत्र व बालेय ब्राह्मण म्हणत ( ह. वं. १.३१; विष्णु. ४.१८; भा. ९. २०; २३; वायु. २.३७; मत्स्य. ४८; ब्रह्म. १३ ). नंतर परमेश्वराची केशव या नांवानें भक्ति केल्यामुळें हा डोळस झाला व याला गौतम म्हणूं लागले. कारण गो-नेत्र व तम हा प्रत्यय. म्हणून गोतम म्हणजे उत्तमनेत्रयुक्त ( म. शां. ३४१). सुरभीनें हुंगल्यावर यास दृष्टि येऊन याचें जरामृत्युभय व बार्हस्पत्य पाप नष्ट झालें असें वायुपुराणांत म्हटलें आहे (२. ३७). नंतर हा त्या काक्षीवानादि पुत्रांस घेऊन गिरिव्रज ( मत्स्य. ४८ ), गिरिव्रजा ( वायु २. ३७ ) येथें गेला. येथें यांना मानव वंशाचा आश्रय मिळाला. व तप करून ते सर्व ब्राह्मणत्वास पोहोंचले ( म. स. २१ ). यानें कक्षीवानास उदंक ऋषीकडे शिक्षणास पाठविलें ( स्कंद. ३.१. १७-१८. ).

हा इंद्रसभेंत इंद्रास रिझवितो (म. स. ७. ११. कुं.). हा पश्चिमदिशेचा आश्रय करून राहत असे (म. अनु. १६५). याला औशिज व असित म्हटलें आहे (वायु. २. ३७. ४४; मत्स्य. ४८. ८३). तें औशिज असें पाहिजे. कारण, उशिज हा याचा आजा असल्यामुळें यास औशिज असें पैतृक नांव असणें संभवनीय दिसतें. कक्षीवंताचें औशिज असें मातृक नांव धरलें, तर त्या शूद्रेचें नांव उशिज् असें असलें पाहिजे व कांहीं वैदिक ग्रंथांत त्यास आधार मिळतोहि. पण हें पैतृक नांवच असणें जास्त सयुक्तिक दिसतें. गौतम हें याचें व याच्या भावाचें पैतृक नांव मत्स्यपुराणांत दिलेलें दिसतें (४८. ५३. ८४). गौतम या नांवाचा त्याच्या पशुतुल्य आचाराशीं संबंध आहे (वायु. २. ३७; ब्रह्मांड. ७४. ३; मत्स्य. ४८). याला गौतम म्हटलें आहे. तेंहि दीर्घतमस् याच अर्थानें असावें (म. स. २१). लो. टिळकांनीं ऋग्वेदांतील दीर्घतमस् शब्दाचा अर्थ दीर्घदिवसानंतर अस्तंगत होणारा सूर्य असा केला आहे (आर्यांचें मूलस्थान, पा. १४६).

२ (सो. काश्य.) हा भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें काशिराजा राष्ट्र याचा पुत्र. यास धन्वंतरि नामक पुत्र होता. वायूंत दीर्घतपस् असा पाठभेद आहे.

३ (ऋक्षशृंग पहा).

**दीर्घनीथ**—इंद्रानें दीर्घनीथाला संपत्ति दिली (ऋ. ८.५०.१०).

**दीर्घनेत्र**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें ठार मारिलें (म. द्रो. १२७.४२ कुं.).

**दीर्घप्रज्ञ**—दुर्योधनपक्षीय राजा (म. आ. ६८. १६ कुं.).

**दीर्घबाहु**—(सू. इ.) खट्वांग राजाचा पुत्र. याचा पुत्र रघु (भा. ९.१०). हाच मत्स्य व पद्म पुराणांमध्यें अजपुत्र म्हणून दिलेला आहे (पद्म. सृ.८). भविष्यमतें यानें २००० वर्षें राज्य केलें व हा विष्णुभक्त होता. यास गादीवर बसवून खट्वांग आत्मस्वरूपीं लीन झाला. पण ब्रह्म, हरिवंश आणि शिव हीं पुराणें दीर्घबाहु हें रघूचें विशेषण मानितात. म्हणूनच रघुवंशांत दीर्घबाहु नाहीं. गरुडपुराणांत तर रघूला वगळून दीर्घबाहु दिला आहे.

२ (सो. कुरु.) भीमानें मारिलेला धृतराष्ट्रपुत्र (म. भी. ९६. २७ कुं.).

**दीर्घरोमन्**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दीर्घलोचन**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दीर्घश्रवस् औशिज**—हा दीर्घतमस् व उशिज् यांचा पुत्र. याला येथें वणिज् म्हटलें आहे. त्यावर अश्वींनीं कृपा केली (ऋ. १.११२.११). त्या राजाला हद्दपार केला असून हा तेथें उपासमारीनें मरत होता. तेंव्हां एक मास गाऊन यानें अन्न मिळविलें (पं. ब्रा. १५. ३. २५). कक्षीवानाबरोबर याचा निर्देश आहे.

**दीर्घायु**—एक क्षत्रिय. श्रुतायूचा पुत्र. अर्जुनानें यास भारतीय युद्धाचे वेळीं ठार मारिलें (म. द्रो. ९३.२९ कुं.).

**दीर्घिका**—वीरशर्मन्‌ची कन्या. ही फार उंच होती. उंच मुलीशीं विवाह लावणारा सहा महिन्यांत मृत्यु पावतो, असा शास्त्रनियम असल्यामुळें हिच्याशीं कोणी लग्न लावीना. शेवटीं ही तप करितां करितां वृद्ध झाली. तेव्हां एक कुष्ठरोगपीडित वृद्ध गृहस्थ आला व त्याच्या अटी कबूल करून हिनें त्याच्याशीं विवाह केला. पुढें पतिराजांनीं यात्रेचा हेतु कळवितांच ही त्यास खांद्यावर घेऊन चालली. शांडिली व ही एकच असावी. हिचा सुळावर चढविलेल्या मांडव्यास धक्का लागल्यामुळें रागावून मांडव्यानें हिला शाप दिला. पण पातिव्रत्याच्या जोरावर त्या शापाचा परिणाम हिच्यावर झाला नाहीं (स्कंद. ६.१३५; मांडव्य पहा).

**दुःशल**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दुःशला**—धृतराष्ट्राची कन्या. हिला दुर्योधनादि शंभर भाऊ होते. ही सिंधुराज जयद्रथ याची पत्नी (भा. ९. २२). हिचा पुत्र सुरथ होय.

**दुःशासन**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राला गांधारीपासून शंभर पुत्र झाले, त्यांतील दुःशासन हा द्वितीय पुत्र होय (म. आ. ९५). हा दुर्योधनाच्या अनुमतीनें वागत असल्यामुळें त्यानें याला यौवराज्य दिलें होतें (भा. ३.१.१४). हा पौलस्त्याचा अंशावतार होता. यानें शस्त्रास्त्रविद्या व धनुर्विद्या यांचें शिक्षण द्रोणापासून घेतलें होतें.

द्रौपदीस्वयंवराच्या वेळीं जमलेल्या राजांत दुःशासन होता (म. आ. १८६). पुढें द्रौपदीसहित पांडव द्यूतांत हरल्यावर एके दिवशीं भरसभेमध्यें कर्णाच्या चिथावणीवरून यानें द्रौपदीवस्त्रहरण केलें. परंतु द्रौपदीनें परमेश्वराचा धांवा करून स्वतःचें संरक्षण केलें. याच वेळीं भीमानें दुःशासनाला ठार मारून याचें रक्त पिण्याची घनघोर प्रतिज्ञा केली (म. स. ६८). पांडव अज्ञातवासांत असतांना त्यांना शोधून काढण्याच्या मिषानें कौरवांनीं मत्स्य देशांतील विराट् राजाच्या गौळवाड्यांची दाणादाण करून बलात्कारानें गाई हरण केल्या, त्या वेळीं त्यांच्यांत दुःशासन होता (म. वि. ३५). गोहरण करून पळून जाणाऱ्या कौरवांचा अर्जुनानें, विराटपुत्र उत्तरास आपलें सारथ्यकर्म करण्यास सांगून पाठलाग सुरू केला, तेव्हां दुःशासन, विकर्ण, दुःसह व विविंशति असे चार योद्धे त्या महाधनुर्धर अर्जुनावर तुटून पडले. दुःशासनानें उत्तराला जखमी करून अर्जुनाला छातींत जखमी केलें. परंतु लवकरच अर्जुनानें आपल्या बाणांनीं त्याला घायाळ करून पळवून लाविलें (म. वि. ६१).

भारतीय युद्धाचे वेळीं भीष्मानें राखलेली कौरवांची प्रचंड सेना भेदून भीम जेव्हां दुःशासनादिक योद्ध्यांवर चालून गेला, तेव्हां दुःशासन वगैरे वीरांनीं त्याला गराडा दिला ( म. भी. ७७ ). भीष्मार्जुनयुद्ध चालूं असतांना अर्जुन शिखंडीला पुढें घालून भीष्माशीं लढूं लागला. तें दुःशासनानें पाहतांच भीष्माच्या संरक्षणाकरितां हा अर्जुनावर चालून गेला. दोघांचें युद्ध होऊन त्यांत दुःशासन घायाळ झाला ( म. भी. ११० ). जेव्हां अर्जुन आघाडीच्या कौरवसैन्याची फळी फोडून त्यांची कत्तल करूं लागला, त्या वेळीं पुनः दुःशासन व अर्जुन यांचें युद्ध होऊन त्यांतहि दुःशासनाचा पराभव झाला ( म. द्रो. ९० ). तसेंच अभिमन्यूचा पराक्रम पाहून द्रोणानें त्याचें केलेलें कौतुक दुर्योधनास सहन न होऊन त्यानें दुःशासनादिक वीरांना त्याच्यावर तुटून पडण्यास आज्ञा केली. दुःशासन व अभिमन्यु यांचें बराच काल तुमुल युद्ध होऊन शेवटीं दुःशासन अभिमन्यूच्या बाणांनीं भयंकर जखमी झाल्यामुळें व्यथित होऊन रथांत पडला आणि याला प्रबल मूर्च्छा आली. तेव्हां सारथ्यानें याला रणांतून दूर नेलें ( म. द्रो. ३९-४० ). पुढें रणांगणांत सात्यकीशीं गांठ पडतांच भिऊन दुःशासन पळून आला. हें पाहून द्रोणाचार्यांनें याचा अत्यंत उपहास केला ( म. द्रो. १२२ ) वास्तविक सात्यकीशीं झालेल्या युद्धांतच दुःशासन मरावयाचा, परंतु भीमानें द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळीं केलेल्या प्रतिज्ञेचें सात्यकीला स्मरण होऊन त्यानें दुःशासनाला ठार केलें नाहीं ( म. द्रो. १२३ ). अशा प्रकारें घनघोर भारतीय संग्राम चालूं असतां दुःशासन भीमावर धांवून गेला. दोघांचें भयंकर युद्ध होऊन दुःशासनानें भीमाच्या प्रत्यक्ष अंगावर मृत्यूच अशी प्रचंड शक्ति सोडिली. परंतु भीमानें आपली गदा अशा रीतीनें फेंकली कीं, त्यायोगें त्या दारुण शक्तीचें विदारण होऊन ती गदा दुःशासनाच्या मस्तकावर आदळली. तात्काळ दुःशासन भूमीवर धाडकन् पडून त्याच्या मस्तकांतून रुधिरस्राव सुरू झाला. लागलींच भीमानें याच्यावर झडप घालून व याला द्रौपदीवस्त्रहरणाची, केशग्रहणाची, वनांत जात असतां ' गौर्गौः ' असें म्हटल्याची व आपण केलेल्या प्रतिज्ञेची आठवण करून देऊन याच्या नरडीवर पाय दिला आणि लागलींच त्यानें याचे दोन्ही हात पकडले. व जवळच उभे असलेल्या दुर्योधन, कर्ण, कृपाचार्य, अश्वत्थामा वगैरे वीरांकडे क्रोधानें पाहून सांगितलें कीं, ' जर कोणाच्या अंगीं सामर्थ्य असेल, तर यास सोडवावें. मी केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणें याचें आतां रक्त पिणार !' इतकें सांगून भीमानें दुःशासनाच्या वक्षस्थलाचें विदारण केलें व सर्वांसमक्ष तो घटघटां रक्त पिऊं लागला. वक्षस्थलाचा भेद झाल्याकारणानें दुःशासन तात्काळ मरण पावला ( म. क. ८३ ). हा मेल्यानंतर गांधारीनें श्रीकृष्णाजवळ, ' सिंहानें जसा एखादा मोठा हत्ती मारावा, त्याप्रमाणें भीमानें मारिलेला हा दुःशासन आपले प्रचंड बाहु पसरून निजला आहे,' अशा प्रकारचे अनेक दुःखोद्गार काढून अत्यंत शोक केला ( म. स्त्री. १८ ). दुःशासनाला अत्यंत पराक्रमी असा एक पुत्र होता. भारतीय युद्धाच्या वेळीं दौःशासनि व अभिमन्यु यांचें तुमुल युद्ध होऊन त्यात अगोदर अनेक वीरांशीं लढून दमलेला अभिमन्यु दौःशासनीच्या एका गदाप्रहारानें निश्चेष्ट पडला ( म. द्रो. ४८ ). पुढें दौःशासनीला द्रौपदीपुत्रानें ठार मारिलें ( म. क. ५ ).

दुःशासन हा सर्व शस्त्रास्त्रविद्या, सारथ्यकर्म व धनुर्विद्या यांमध्यें निपुण असून अत्यंत शूर व पराक्रमी असा होता ( म. उ. १६५ ). परंतु दुष्टबुद्धि व मत्सरी असल्यामुळें याचा सर्वस्वीं नाश झाला.

२ हा खड्गबाहूच्या पुत्राचा सेनापति. हा एकदां गर्वानें एका उन्मत्त हत्तीवर बसला असतां, त्यानें यास पायाखालीं तुडवून मारिलें. पुढें हा हत्ती झाला. सिंहलदेशाच्या नृपानें हा खड्गबाहूस दिला. त्यानें हा एका कवीस दिला. त्यानें हा मालवराजास विकिला. त्यानें याचें नीट पालनपोषण केलें तरी, हा मरायला टेकला. तेव्हां राजा स्वतः याजपाशीं आला असतां हा हत्ती त्यास मनुष्यवाणीनें म्हणाला, ' गीतेच्या १७ व्या अध्यायाचा पाठ करणारा जर कोणी मजपाशीं येईल, तर माझी मानसिक पीडा नष्ट होईल. ' असें म्हणून यानें आपलें पूर्ववृत्त राजास सांगितलें. त्यानें तसा ब्राह्मण आणिल्यावर त्याच्या हातून मंत्रविलेलें पाणी हत्तीवर शिंपडवितांच हा दिव्यदेही होऊन स्वर्गीं गेला ( पद्म. उ. १९१ ).

**दुःशीम**—तान्वानें आपल्या सूक्तांत याचा उदार म्हणून उल्लेख केला आहे ( ऋ. १०. ९३. १४ ).

**दुःसह**—धृतराष्ट्राच्या शतपुत्रांतील एक. हा भीमाकडून मारिला गेला ( म. द्रो. १३५ ).

२ लक्ष्मीची बहीण जी अलक्ष्मी तिचा पति ( लिंग. १. ६.)

३ ( सू. इ. ) पुरुकुत्साचा पुत्र. याच्या स्त्रीचें नांव नर्मदा ( पद्म. सृ. ८ ).

**दुःस्वभाव**—( दुर्बुद्धि पहा ).

**दुदर्भ**—सुहोत्र नामक शिवावताराचा शिष्य.

**दुंदुभि**—मयासुरास हेमा नांवाच्या अप्सरेपासून झालेल्या दोन पुत्रांतील दुसरा ( वा. रा. उ. १२ ).

यानें दीर्घ तप करून सहस्रावधि हत्तींचें बल प्राप्त करून घेतलें व महिषाचें रूप धारण केलें. मग युद्ध करण्याकरितां समुद्राकडे गेला, त्यानें हिमालयाकडे पाठविलें व शेवटीं हिमालयानें दुंदुभीला वालीकडे पाठविलें. वालीशीं झालेल्या युद्धामध्यें दुंदुभीचा पराभव होऊन हा पडला व एका

गुहेंत शिरला. तेथें वालीनें याला ठार मारिलें ( वा. रा. कि. ११; पद्म. पा. ११६ ). याचें शरीर वालीनें दूर फेकिलें असतां तें मतंग ऋषीच्या आश्रमांत जाऊन पडलें व जिकडे तिकडे रक्तच रक्त झालें. झाडांचीहि मोडतोड झाली. तेव्हां मतंगानें वालीस ' आपल्या आश्रमांत आल्यास मृत होशील,' असा शाप दिला. तेव्हांपासून वालीला तो आश्रम अगम्य झाला व तो सुग्रीवाचें आश्रयस्थान बनला.

रामाचें सुग्रीवाशीं सख्य झालें, तेव्हां आपलें सामर्थ्य दाखविण्याकरितां रामानें आपल्या पायाच्या आंगठ्यानें दुंदुभीच्या शरीराचा पडलेला सापळा दहा योजनें लांब उडविला ( वा. रा. कि. ११ ). या दुंदुभीनें सोळा हजार स्त्रिया बंदींत ठेवल्या होत्या. त्या रामानें सोडविल्या. एक लक्ष स्त्रियांशीं एकदम विवाह लावण्याचा याचा संकल्प होता ( आ. रा. राज्य. १. ११ ).

२ एक गंधर्वी. ही ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें अयोध्येंत कैकेयीची मंथरा नांवाची दासी झाली ( म. व. २७६ ).

३ ( सो. कुकुर. ) अनुपुत्र अंधकाचा पुत्र. याचा पुत्र अरिद्योत.

४ कश्यप व दनु यांचा पुत्र.

५ सुतार नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**दुंदुभिनिह्राद**—हा दितीचा पुत्र. प्रह्लादाचा मामा. यानें देवांचा जय होण्यास कारण ब्राह्मण आहेत, असें जाणून काशीसारखीं क्षेत्रें गांठून तेथील ब्राह्मणांना ठार मारण्यास सुरवात केली. तेव्हां शंकरानें साक्षात्कार देऊन माझें स्मरण करून जे याला विरोध करितील, त्यांच्या पुढें राक्षसाचें कांहीं चालणार नाहीं, असें सांगितलें. नंतर दुंदुभिनिह्रादाचा नाश झाला. हें काशींतील व्याघ्रेश्वराचें माहात्म्य आहे ( शिव. रुद्र. यु. ५८ ).

**दुरतिक्रम**—शिवावतार सुहोत्राचा शिष्य.

**दुराचार**—हा दुराचारी ब्राह्मण वेताळादिकांच्या पीडेंतून धनुष्कोटितीर्थ, जाबालतीर्थ व वेंकटाचलतीर्थ यांवर गेल्यानें मुक्त झाला ( स्कंद २. १. २. ५; ३. १. ३६ ).

**दुराधन**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दुराधर**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दुरासद**—हा भस्मासुराचा पुत्र. यानें शिवापासून पंचाक्षरी विद्या घेऊन तिचा जप केला. त्या जपानें संतुष्ट होऊन शंकरानें यास इच्छित वर दिला असतां हा त्या वर-प्रभावानें प्रमत्त होऊन सर्वांस पीडा देऊं लागला. परंतु लवकरच शक्तिपुत्र ढुंढी यानें यास ठार मारिलें ( गणेश. १. ३८-४५ ).

**दुरितक्षय**—( सो. पूरु. ) महावीर्य राजाचा पुत्र. यास त्र्य्यारुणि, कवि व पुष्करारुणि असे तीन पुत्र होते ( भा. ९.२१.१९ ). विष्णुमतें उरुक्षय असा पाठभेद आहे.

**दुर्ग**—हिरण्याक्षाच्या वंशांतील रुरु दैत्याचा पुत्र.

२ गुर्जर देशच्या मूलवर्मं राजाचा पुत्र (भवि.प्रति.३.३१).

**दुर्गम**—एक दैत्य. याला दुर्गादेवीनें मारिलें ( स्कंद. १. २. ६५ ).

२ रुरु दैत्याचा पुत्र. ह्यानें सर्व ब्राह्मणांचे व ऋषींचे आधार-स्तंभ जे वेद त्यांचाच नाश केला. त्यामुळें नित्यनैमित्तिक कर्में बंद पडून सर्वत्र हाहाःकार उडाला. तेव्हां चतुर्भुजा देवीनें याला ठार मारिलें ( शिव. उ. ५० ).

३ ( सो. द्रुह्यु. ) विष्णुमतें धृताचा पुत्र. याबद्दल दुर्दम, दुर्मनस् व विदुष अशीं नामांतरें आहेत.

**दुर्गमभूत**—( सो. वसु. ) विष्णुमतें हा वसुदेवास रोहिणीपासून झालेला पुत्र.

**दुर्गह**—सायणाच्या मतानें हा पुरुकुत्साचा पिता आहे. दौर्गह असें पुरुकुत्साला पैतृक नांव लाविलेलें आहे ( ऋ. ४. ४२. ८; पुरुकुत्स पहा ).

**दुर्गा**—विश्वव्यापक अशी जी आदिमाया, तिला दुर्गा, देवी वगैरे नांवें आहेत. देवी या शब्दाचा अर्थ स्त्रीदेवता असा आहे. त्यामुळें निरनिराळ्या देवांच्या स्त्रियांना हा शब्द लाविण्यांत येतो. ही सात्त्विकी, राजसी व तामसी अशा तीन प्रकारच्या शक्तींनीं युक्त आहे. म्हणून हिला त्रिगुणात्मिका असें नांव आहे. ही अत्यंत प्रभावशाली आहे. व त्यामुळें कोणत्याहि संकटाच्या प्रसंगीं देव हिला शरण जाऊन संकटमुक्त होतात. हिचा प्रभाव, रूप वगैरेंचीं सूचक अशीं हिला बरींच नांवें आहेत. उदा०—गौरी, पार्वती, उमा, काली, चंडी, भुवनेश्वरी, महामाया, मुक्तकेशी, रौद्रा, भद्रा वगैरे. हिनें देवांना संकटमुक्त करण्याकरितां निरनिराळ्या वेळीं अनेक निरनिराळे अवतार घेतले आहेत.

शिवाय खालील चवदा देवी आहेत.

१ सिद्धांबिका—स्कंदानें स्थापिली, २ तारा—दक्षिण दिशेला राहिली, ३ भास्करा—नक्षत्रांना प्रकाश देणारी, पश्चिम दिशेचें पालन करणारी, ४ योगीश्वरी—हिच्या दृष्टिपातानें सनकादिक योगी सिद्ध झाले. ही उत्तर दिशेकडे राहते, ५ त्रिपुरा—त्रिपुरा-सुराच्या वेळीं शंकरास मदत करणारी, ६ कोलंबा—पूर्वेकडे वाराहगिरीवर राहणारी, ७ कपालेशी—कोलंबेच्या दिशेला असणारी, ८ सुवर्णाक्षी, ९ चर्चिता, १० त्रैलोक्यविजया,पश्चिम-दिशा, ११ वीरा, १२ हरिसिद्धि—प्रलयदेवता, १३ चंडिका—ईशान्येस. हिनें चंडमुंडास मारिलें, १४ भूतमाला—हरि-सिद्धीच्या दक्षिणेस. ही गुहाच्या भ्रूमध्यापासून निघाली. हिचें

नांव भूतमाता (स्कंद. १.२.४७). इतरहि बऱ्याच देवता आढळतात, पण विस्तारभयास्तव येथें दिल्या नाहींत. त्यांची माहिती मूळ ग्रंथांत पहावी (स्कंद. ३.१.१७; मत्स्य. १३; दे. भा. ९).

ब्रह्मदेवाच्या वरानें महिष नामक राक्षस उन्मत्त होऊन देवांस पीडा देऊं लागला. तेव्हां आदिमायेनें देवांच्या विनंतीवरून अष्टादशभुजयुक्त असें साकार रूप घेऊन महिषास रणांगणांत ठार केलें. या कृत्याचें सूचक महिषासुरमर्दिनी व महालक्ष्मी हें नांव हिला मिळालें आहे (महिषासुर पहा). हिनें महिषासुराला मारल्यावर पापनाशनतीर्थ उत्पन्न केलें (स्कंद. १. २. ६५; ३. ३०). याशिवाय देवीचे दुसरेहि कित्येक अवतार झाले आहेत. शुंभनिशुंभ नांवाच्या दानवांनीं देवीचा वध करण्याकरितां चण्डमुण्ड नामक दोन राक्षस पाठविले होते. परंतु देवीनेंच त्या दोघांना ठार केलें व त्यामुळें हिला **चामुंडा** हें नांव पडलें. चण्डमुण्डांस मारिल्यावर देवीनें शुंभ व निशुंभ या दोघांनाहि युद्धांत ठार केलें (स्कंद. ५. १. ३८; ३ चंड पहा). ही अंधकाचें रक्त प्याली व त्याला हिनें शरण आणिलें. पूर्वी दुर्गम नामक एक असुर देवांच्या नाशाकरितां तप करीत होता. त्यानें ब्रह्मदेवास प्रसन्न करून त्याच्या वरानें प्रबल होऊन सर्व वेद चोरून नेले. अर्थात् सर्व नैमित्तिक व यज्ञयागादि कर्में बंद पडून पृथ्वीवर अनावृष्टीचें संकट ओढवलें. तेव्हां पृथ्वीवरील सर्व ब्राह्मणांनीं देवीची आराधना करून हिला संतुष्ट केलें. देवीनें शतनेत्रांनीं युक्त असें रूप घेऊन दुर्गमाचा वध केला व ब्राह्मणांना त्यांचे वेद परत मिळवून दिले. याप्रमाणें दुर्गमासुराचा वध केल्यामुळें हिला **दुर्गा** हें नांव मिळालें. त्याचप्रमाणें हिनें क्षुधित असलेल्या आपल्या भक्तांना कंद, मुळें, भाज्या वगैरे खावयास दिल्यामुळें हिला **शाकंभरी** हें नांव मिळालें (पद्म. स्व. २८; दे. भा. ७.२८).

आदिमायेनें दक्षाच्या घरीं सतीरूपानें अवतार घेतला होता. दक्षानें आपली कन्या सती, हिचें लग्न महादेवाशीं लावून दिलें. कांहीं कालानें दक्षानें एक पशुयज्ञ आरंभिला असतां सती न बोलवितां आपल्या पित्याच्या घरीं समारंभ पाहण्यास आली. त्या ठिकाणीं हिचा अपमान झाला. तेव्हां हिनें क्रोधानें यज्ञकुंडांत स्वतःस जाळून घेतलें. शंकरास हें समजतांच तो दुःखी होऊन सतीचें अर्धवट जळलेलें शरीर खांद्यावर घेऊन नाचूं लागला. त्या नृत्यानें सर्व त्रैलोक्य त्रस्त झालें असतां विष्णूनें शस्त्रानें सतीचे सर्व अवयव तोडून शंकरास नृत्यापासून परावृत्त केलें. सतीचे अवयव ज्या ज्या ठिकाणीं पडले, त्या त्या ठिकाणीं माहेश्वरीचीं एकशें आठ स्थानें प्रसिद्धीस आलीं आहेत. नंतर सतीनें हिमालयाच्या उदरीं जन्म घेतला. हिची अंगकांति काळी असल्यानें हिला **काली** हें नांव पडलें (कालि. १९; ४२). त्याचप्रमाणें हिला हैमवती हें पैतृक नांव आणि गिरिजा व पार्वती अशीं दुसरीं नांवें आहेत.

दारुक दैत्याच्या त्रासामुळें देव शंकराकडे गेले. तेव्हां शंकराच्या कंठापासून ही उत्पन्न झाली. हिनें गर्जना करितांच दारुक सैन्यासह मरण पावला. शंकरानें बालरूप घेऊन हिनें विष शोषण केलें; तेव्हां ही शान्त झाली (स्कंद. १. २. ६२).

ही पूर्वी श्यामवर्ण होती, म्हणून शंकरानें लीलेनें हिला काली म्हटलें. तें हिला सहन झालें नाहीं. हिनें आपल्या मातेची मैत्रीण कुसुमामोदिनी व शिवगणांपैकीं वीरक यांना शंकर स्त्रीलंपट असल्यामुळें कोणाहि स्त्रीचा आंत प्रवेश होऊं नये, म्हणून मंदिराच्या द्वारावर कडक पहारा करण्याकरितां ठेवून स्वतः तपश्चर्येला गेली. ही वार्ता अंधकासुराच्या आडी नामक पुत्राला समजतांच तो शंकराचा नाश करण्याच्या उद्देशानें सर्पाचें रूप घेऊन व वीरकाचा डोळा चुकवून आंत शिरला व त्यानें पार्वतीचें रूप धारण केलें. शंकरानें अंतर्ज्ञानानें त्या राक्षसाला ओळखून त्याला ठार केलें.

राक्षस आंत शिरला, हें वीरकाच्या लक्षांत आलें नाहीं, तरी कुसुमामोदिनीच्या लक्षांत येऊन तिनें वायूकडून पार्वतीला ही वार्ता कळविली. तेव्हां ही क्रोधयुक्त होऊन हिनें वीरकाला, 'तूं पृथ्वीवर शिला होऊन पडशील,' असा शाप दिला. तरी हिचें समाधान न होतां हिच्या तोंडांतून कोपरूपानें एक सिंह बाहेर पडला. त्यावरोवर त्याच्या मुखांत प्रवेश करून प्राणत्याग करण्याचा हिनें विचार केला. तोंच हिच्या तपश्चर्येच्या योगानें संतुष्ट झालेल्या ब्रह्मदेवानें हिला त्या साहसापासून परतवून हिच्या इच्छेप्रमाणें हिला गौरवर्ण दिला. त्यावरून हिला **गौरी** हें नांव पडलें (पद्म. सृ. ४४; मत्स्य. १५५-१५८; कालि. ४७). हिचा द्यूतक्रीडेंत शंकराशीं बलिप्रतिपदेच्या दिवशीं जय झाला (स्कंद. २.४.१०).

देवीवर स्वतंत्र ग्रंथ कालिकापुराण व देवीभागवत असे दोन आहेत. मार्कंडेयपुराणांत देवीमाहात्म्य म्हणून सप्तशती नांवाचा सुप्रसिद्ध ग्रंथ असलेला भाग आहे (मार्क. ७८-९०).

देवीचीं एकशेंआठ स्थानें पुढीलप्रमाणें आहेत—१ वाराणसी, २ नैमिषारण्यक्षेत्र, ३ प्रयाग, ४ गंधमादन, ५ दक्षिणमानस, ६ उत्तरमानस, ७ गोमंत, ८ मंदर, ९ चैत्ररथ, १० हस्तिनापुर, ११ कान्यकुब्ज, १२ मलयपर्वत, १३ एकाम्रपीठ, १४ पुष्करक्षेत्र, १५ विश्वक्षेत्र, १६ केदार, १७ हिमालय, १८ गोकर्ण, १९ स्थानेश्वर, २० बिल्वकक्षेत्र, २१ श्रीशैल, २२ भद्रेश्वरक्षेत्र, २३ वराहशैल, २४ कमलालय, २५ रुद्रकोटी, २६ कालंजर, २७ शालग्राम, २८ शिवलिंग, २९ महालिंग, ३० माकोटस्थान, ३१ मायापुरी, ३२ संतान, ३३ गया, ३४ पुरुषोत्तमक्षेत्र, ३५ सहस्राक्ष, ३६ हिरण्याक्ष-

थी, ३७ [illegible], ३८ [illegible], ३९ सुपार्श्व, ४० चित्रकूट, ४१ विपुलतीर्थ, ४२ मलयपर्वत, ४३ सह्याद्रिपर्वत, ४४ हरिश्चंद्र पीठ, ४५ रामतीर्थ, ४६ यमुना, ४७ कोटतीर्थ, ४८ माधववन, ४९ गोदावरी नदी, ५० गंगाद्वार, ५१ शिवकुंडतीर्थ, ५२ द्वारावति, ५३ वृंदावनक्षेत्र, ५४ मथुरा, ५५ पाताल, ५६ चित्रकूट, ५७ विंध्याद्रि, ५८ करवीरक्षेत्र, ५९ विनायकक्षेत्र, ६० वैद्यनाथक्षेत्र, ६१ महाकाल, ६२ उष्णतीर्थ, ६३ विंध्यपर्वत, ६४ मांडव्यक्षेत्र, ६५ माहेश्वरीपुरी, ६६ छगलंडक्षेत्र, ६७ अमरकंट पर्वत, ६८ सोमेश्वरक्षेत्र, ६९ प्रभासक्षेत्र, ७० सरस्वती नदी, ७१ समुद्रतीर, ७२ महालय, ७३ पयोष्णी, ७४ कुतशौचक्षेत्र, ७५ कार्तिकक्षेत्र, ७६ वर्तकतीर्थ, ७७ शोणसंगम, ७८ सिद्धवन, ७९ भारताश्रम, ८० जालंधर, ८१ किष्किंधा, ८२ देवदारुवन, ८३ काश्मीर, ८४ हिमाद्रि, ८५ विश्वेश्वरक्षेत्र, ८६ कपालमोचनतीर्थ, ८७ कायावरोहणतीर्थ, ८८ शंखोद्धारतीर्थ, ८९ पिंडारकक्षेत्र, ९० चंद्रभागा, ९१ अच्छोद, ९२ वेणातीर, ९३ बदरिकारण्य, ९४ उत्तरकुरु, ९५ कुशद्वीप, ९६ हेमकूट, ९७ कुमुदक्षेत्र, ९८ अश्वत्थक्षेत्र, ९९ कुबेरक्षेत्र, १०० वेदमुख, १०१ कैलास, १०२ सूर्यबिंब, १०३ ब्रह्मदेवाच्या सन्निध, १०४ देवलोकांत, १०५ मातृकांमध्यें, १०६ सतींमध्यें, १०७ चित्तामध्यें, १०८ सर्व स्त्रियांच्या ठिकाणीं, १०९ जीवात्म्यांत (दे. भा. ७.७; कालि. ६४). यांमध्यें चित्रकूट, हिमाद्रि वगैरे नांवें पुनः पुनः आलीं आहेत. पण मूळांतहि त्रतीं तशींच आहेत (पार्वती व सती पहा).

**दुर्जय**—दनुपुत्र दानवांतील एक.

२ (सू. इ.) दशाश्व शाखेंतील सुवीराचा पुत्र. यास **दुर्योधन नांवाचा एक पुत्र होता (म. अनु. २. ११ कुं.).**

३ एक रुद्रगण.

४ खर राक्षसाच्या बारा अमात्यांपैकीं एक.

५ (सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें मारिलें (म. द्रो. १३३. १४० कुं.).

६ पांडवपक्षीय राजा. यास कर्णानें मारिलें (म. क. ५१. ४ कुं.).

७ सुप्रतीकाचा मुलगा. यानें सर्व देश जिंकिले. यानें हेतृप्रहेतृच्या मुलीशीं लग्न केलें (हेतृप्रहेतृ पहा). पुढें गौरमुख मुनीपाशीं असलेला चिंतामणि मिळविण्याचा प्रयत्न करीत असतां याचा नाश झाला. जेथें नाश झाला त्या ठिकाणास नैमिषारण्य म्हणतात (वराह. ११).

**दुर्जयामित्रकर्षण**—(सो. सह.) हा अनंताचा पुत्र.

**दुर्दम**—(स्वा. प्रिय.) विक्रमशाली राजाचा पुत्र. याच्या आईचें नांव कालिंदी. प्रमुच नामक ऋषीची कन्या रेवती ही याची पत्नी होती.

२ (३ दुर्गम पहा).

३ (सो. सह.) रुद्रश्रेण्याचा पुत्र. याबद्दल दुर्मद असें नांव आढळतें. पद्ममतें भद्रसेनाचा पुत्र. याचा पुत्र धनक (पद्म. सृ. १२). भद्रश्रेण्याचा पुत्र (ह. वं. १. २९.३२; ब्रह्म. ११.४८). हैहय व काश्य घराण्यांच्या स्पर्धेत भद्रश्रेण्याच्या मुलांची दिवोदासानें कत्तल केली. पण अज्ञान म्हणून याला सोडिलें. पुढें यानें दिवोदासाचा पराजय करून सूड उगविला.

४ गोदावरीच्या कांठीं प्रतिष्ठान नगरींत राहणारा एक ब्राह्मण. हा वाटेल त्या माणसाकडून दानें घेत असल्यामुळें मेल्यावर नरकांत गेला (पद्म. उ. १७६).

५ पूर्वी कैलासांत वसिष्ठ, अत्रि इत्यादि ऋषि शंकराची उपासना करीत असतां, विश्वावसु गंधर्वाचा दुर्दम नांवाचा पुत्र शेंकडों स्त्रियांसह त्या ठिकाणीं आला व जवळ असलेल्या हालास्यतीर्थांत नग्नस्थितींत स्नान करूं लागला. याची ती बेफाम वृत्ति पाहून वसिष्ठानें, 'तूं राक्षस हो,' असा शाप दिला. तेव्हां याच्या स्त्रियांनीं विनवणी केल्यामुळें 'सोळा वर्षांनीं तुमचा पति मुक्त होऊन तुमच्याजवळ प्राप्त होईल,' म्हणून वसिष्ठानें सांगितलें. हा पुढें राक्षस होऊन गालव ऋषीस (गालव पहा) खावयास गेला असतां चक्रानें मरण येऊन याचा उद्धार झाला व विमानांत बसून गंधर्वलोकांत गेला (स्कंद. ३.१:४).

**दुर्दमन**—(सो. कुरु.) भविष्य व भागवत यांच्या मतें हा शतानीकपुत्र. याबद्दल उदयन व उद्यान अशीं नामांतरें आहेत.

**दुर्धर**—रावणाचा एक प्रधान (वा. रा. सुं. ४९).

२ रामसेनेंतील एक वानर. याच्या बापाचें नांव वसु (वा. रा. यु. ३०).

३ महिषासुरपक्षीय एक राजा.

४ (सो. कुरु.) भीमानें मारिलेला धृतराष्ट्राचा एक पुत्र (म. द्रो. १३५. ३० कुं.).

**दुर्धर्ष**—मारुतीनें मारिलेला रावणाचा सेनापति (वा. रा. सुं. ४६).

२ रामानें मारिलेला एक रावणपक्षीय राक्षस (वा. रा. यु. ९).

३ (सो. कुरु.) धृतराष्ट्राचा एक पुत्र.

४ हिरण्याक्षाच्या पक्षांतील एक असुर. यास यमानें ठार मारिलें (पद्म. सृ. ७०).

**दुर्धार**—अंगदेशाच्या मायावर्म राजाचा पुत्र (भवि. प्रति. ३.३१).

**दुर्बुद्धि**—धृतराष्ट्र नागाचा पुत्र. यानें आपल्या बापाच्या सांगण्यावरून बंधुसाहाय्यानें रणांत मृत झालेल्या अर्जुनाचें शिर पळवून नेलें होतें (जै. अ. ३९.६६.७६).

**दुर्बुद्धि जनमेजय**—(७ जनमेजय पहा).

**दुर्मद**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें ठार मारिलें (म. द्रो. १५६.४२ कुं.).

२ (३ दुर्दम पहा).

३ वसुदेवास पौरवीपासून झालेला पुत्र.

४ मयासुराचा पुत्र. यानें वालीस युद्धार्थ आव्हान केलें. वालीनें याचा पराभव करून हा पळूं लागला असतां पाठलाग केला; तेव्हां हा एका गुहेंत लपून बसला (आ. रा. सार. ८).

५ अंगदेशाच्या मायावर्म राजाच्या दहा पुत्रांपैकीं एक (भवि. प्रति. ३. ३१).

**दुर्मर्ष**—एक असुर. यानें समुद्रमंथनकालीं देवांशीं युद्ध केलें (भा. ८. १०. ३३).

**दुर्मर्षण**—(सो. क्रोष्टु.) वसुदेवाचा बंधु. संजयास राष्ट्रपाली नांवाच्या भार्येपासून झालेला पुत्र (भा. ९. २४. ४२).

२ (सो. कुरु.) भीमानें मारिलेला धृतराष्ट्राचा एक पुत्र (म. श. २५. ५-८ कुं.).

**दुर्मित्र**—(भविष्य.) कलियुगांतील बाल्हिकानंतर झालेल्या पुष्पमित्र राजाचा पुत्र (भा. १२. १. ३४).

२ (किलकिला. भविष्य.) भागवतमतें किलकिला नगरींतील एक राजा. यास विष्णुमतें पट्टमित्र, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें पद्ममित्र म्हणतात.

**दुर्मित्र कौत्स**—सूक्तद्रष्टा. याच्या सूक्तांतहि कुत्सपुत्र म्हणून याचा उल्लेख आहे (ऋ. १०.१०५.११).

**दुर्मुख**—पांचालदेशाचा राजा. यास बृहदुक्थानें महाभिषेक केला व समारंभाचें गुह्य सांगितलें. त्यामुळें हा सम्राट् झाला (ऐ. ब्रा. ८. २३). हाच धर्मराजाच्या सभेस आला असावा (म. स. ४. २७ कुं). याचा पुत्र जनमेजय धर्मराजाच्या बाजूनें लढत होता (म. द्रो. १५८).

२ वरुणाच्या सभेंतील एक राक्षस सभासद (म. स. ९. १७ कुं.).

३ हिरण्याक्षाच्या बाजूचा एक राक्षस. दुर्धर्षास यमानें मारिलें, म्हणून चिडून हा यमावर धांवला; पण यमानें यास खड्गानें ठार केलें (पद्म. सृ. ७०).

४ रावणपक्षीय एक राक्षस (वा. रा. यु. ९).

५ रामपक्षीय एक वानर (वा. रा. यु. ३०).

६ सुहोत्र नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

७ धृतराष्ट्राच्या शंभर पुत्रांपैकीं एक. हा द्रौपदी स्वयंवरास गेला होता (म. आ. २०१. १ कुं.). याचा सहदेवानें युद्धांत पराभव केला (म. द्रो. १०७. १७ कुं.). याला भीमानें ठार केलें (म. द्रो. १३४. २० कुं.). यास यशोधर नामक पुत्र होता (म. द्रो. १८५. ५ कुं.).

८ महिषासुराच्या बाजूचा एक असुर. ताम्र परत आल्यावर त्यानें बाष्कलाबरोबर यास देवीशीं लढण्यास पाठविलें. देवीनें यास ठार केलें (दे. भा. ५. १३). हा पूर्वजन्मीं पौलस्त्यांपैकीं एक होता (म. आ. ६७). व पुढल्या जन्मीं हा महीराजाचा मर्दन नामक पुत्र झाला (भवि. प्रति. ३. ३१)

९ मायावर्म नामक अंगपतीस प्रमदा नामक भार्येपासून देवीनें दिलेल्या वरामुळें कौरवांशानें उत्पन्न झालेल्या दहा पुत्रांपैकीं एक (भवि. प्रति. ३. ३१).

१० (५ दुर्मद पहा).

११ कश्यप व खशा यांचा पुत्र.

१२ कद्रूपुत्र सर्प.

**दुर्मुखी**—अशोकवनिकेंतील एक राक्षसी.

**दुर्मेधस्**—देवांच्या हिरण्याक्षाशीं झालेल्या युद्धांत वायूनें यास ठार मारिलें (पद्म. सृ. ७५).

**दुर्योधन**—(सो. कुरु.) धृतराष्ट्रास गांधारीपासून झालेल्या शंभर पुत्रांतील ज्येष्ठ (म. आ. ६३. ५८ कुं.). हा उत्तम रथी, शस्त्रास्त्रविद्येंत कुशल व उत्तम सारथि होता (म. उ. १६५. १९. कुं.). हा कलीच्या अंशानें जन्मला असून, याच्या निमित्तानें सर्व क्षत्रियांचा नाश झाला (म. आ. ६७). व्यासानें सत्यवतीस कुरुवंशांतील पुरुषांच्या हातून कुलक्षय होईल असें सांगितलें होतें (म. आ. १२८). गांधारीस जे शंभर पुत्र झाले, त्यांची जन्मकथा पुढीलप्रमाणें आहे. एकदां व्यास भुकेनें व्याकुल होऊन आला असतां गांधारीनें त्याची अशी उत्कृष्ट व्यवस्था ठेविली कीं, तो संतुष्ट झाला. त्या वेळीं ‘तुला काय पाहिजे तें माग,’ म्हणून व्यासानें तिला सांगितलें. तेव्हां तिनें आपल्या पतीला शोभतील असे शंभर पुत्र मागितले. त्याप्रमाणें कांहीं दिवसांनीं तिला धृतराष्ट्रापासून गर्भ राहिला. पुढें दोन वर्षें झालीं तरी ती प्रसूत होईना. इतक्यांत कुंतीला अत्यंत तेजस्वी असा मुलगा झाला. यामुळें गांधारीस अत्यंत दुःख झालें व तिनें धृतराष्ट्रास देखील कळूं न देतां स्वतःचा गर्भ पाडिला. पण व्यासानें सांगितल्याप्रमाणें केल्यावर योग्य मुदतीनें त्यापासून एकशेंएक मुलें झालीं. धर्मराज हा दुर्योधनाहून वडील होता. ज्या दिवशीं दुर्योधन जन्मला, त्याच दिवशीं भीमहि जन्मला. जन्मतःच दुर्योधन रडूं लागला. याचें रडणें गाढवाच्या ओरडण्याप्रमाणें होतें. याच्या

[illegible] गाढव, गिधाडें, कोल्हे, आणि कावळे हीं सर्वच ओरडूं लागलीं वादळें सुटलीं व दाही दिशांना गोंधळच झाला. तेव्हां धृतराष्ट्रास फार भय वाटलें. त्यानें भीष्म, विदुर, अनेक ब्राह्मण मित्रमंडळी व आप्त यांना एकत्र जमवून 'राजपुत्र युधिष्ठिर हाच वडील आणि सद्गुणी असून तो आमच्या वंशाचा विस्तार करील व राज्यहि करील. त्याबद्दल कांहीं आमचा आक्षेप नाहीं. परंतु त्याच्या पश्चात् दुर्योधन राजा व्हावयास पाहिजे. तेव्हां तो होईल किंवा नाहीं व पुढें काय घडून येण्याचा योग आहे तें मला आपण सांगा,' असें विचारिलें. इतक्यांत क्रूर व हिंस्र पशु ओरडूं लागले व सर्व बाजूंनीं भयंकर अपशकुन झाले. तेव्हां ते ब्राह्मण व विदुर म्हणाले, 'या मुलाच्या जन्मकालीं ज्याअर्थी इतके अपशकुन झाले त्याअर्थी हा कुलक्षय करील. तेव्हां याला टाकून देणें उचित आहे. म्हणून तुझ्या कुलाचें क्षेम असावें अशी जर तुझी इच्छा असेल तर याला टाकून देऊन सर्व जगाचें कल्याण कर.' (म. आ. ११५). पण तसें घडलें नाहीं. लहानपणीं कौरवपांडव एकत्र खेळत. त्यांत पांडव सरस ठरत. भीम तर कौरवांना नकोसें करून सोडी. यामुळें कौरवांच्या मनांत त्यांच्याविषयीं मत्सर उत्पन्न झाला. त्यांचें लोकोत्तर सामर्थ्य पाहून दुर्योधन त्यांचा अत्यंत द्वेष करूं लागला व सर्व ऐश्वर्य आपणांसच मिळावें असा दुर्योधनास लोभ उत्पन्न झाला. म्हणून दुर्योधनानें त्यांचा नाश करण्याचा घाट घातला. यानें भीम शहराबाहेरील बागेंत निजला असतां, त्याला गंगेंत फेंकून देण्याचें ठरवून अर्जुन व युधिष्ठिर यांस कैदेंत टाकून राज्य बळकाविण्याचें योजिलें. त्याप्रमाणें निश्चय करून हा भीमाचें वर्म शोधूं लागला. यानें भीम फार खादाड आहे हें ओळखलें. नंतर एके दिवशीं पांडव व कौरव यांसमवेत जलक्रीडेकरितां म्हणून आपल्या लव्याजम्यांसह हा गंगेवर गेला. तेथें तयार केलेल्या अन्नांत दुर्योधनानें कालकूट विष मिश्र केलें व तें अन्न मोठ्या आग्रहानें भीमास खाऊं घातलें. नंतर सर्व मिळून जलक्रीडेस गेले. तेथें जलविहारानें भीम थकून गेला व गंगेच्या कांठीं स्वस्थ पडला. तेथील गार वाऱ्यानें व त्या विषानें त्यास निश्चेष्ट पाडिलें. ही संधि साधून दुर्योधनानें त्यास गंगेंत लोटून दिलें. अशा तऱ्हेनें भीमाचा कांटा दूर झाला, हें पाहून दुर्योधनास अत्यानंद झाला. परंतु भीम पुनः परत आला व त्यानें दुर्योधनाची अधम कृति आपल्या बंधूंस सांगितली. अशा तऱ्हेनें दुर्योधनाची मसलत फसली.

दुर्योधनानें कर्ण व शकुनि यांच्या साहाय्यानें पांडवांच्या नाशार्थ खूप प्रयत्न केले, हें पांडवांसहि माहीत होतें. परंतु ते विदुराच्या सल्ल्यानें वागत. धृतराष्ट्रानेंहि हें जाणून दुर्योधनादिकांना कृपाचार्यांकडे धनुर्वेद शिकण्यासाठीं पाठविलें त्यानंतर त्यानें धनुर्विद्येंत व अस्त्रविद्येंत प्रवीण करण्यासाठीं दुर्योधनादिकांना द्रोणाचार्यांच्या स्वाधीन केलें. त्यानें कौरवपांडवांना सर्व शास्त्रांत प्रवीण केलें (म. आ. १२८–१२९). भीष्मानें द्रोणाचार्यांची योजना केली होती (म. आ. १३१ कुं.). द्रोणानें कौरवपांडवांना पूर्ण विद्यादान केल्यानंतर त्यांची परीक्षा घेतली. त्यांत त्यांचें कौशल्य पाहून सर्वांस आनंद व कौतुक वाटलें. अखेर गुरुदक्षिणेची वेळ येतांच द्रोणानें 'द्रुपदास रणांगणांत जिंकून घेऊन या,' ही दक्षिणा मागितली. त्याबरोबर दुर्योधनादि सर्व निघाले. पांडवहि गेले. दुर्योधनास पांडवांची फजिती करावीशी वाटून यानेंच प्रथम द्रुपदाचा समाचार घेण्याचें ठरविलें. परंतु त्यांत कौरवांची दुर्दशा झाली, व दुर्योधनाचा हाहि प्रयत्न फसला (म. आ. १३८). दुर्योधनास बलरामापासून गदायुद्धाचें शिक्षण मिळालें (भा. १०. ५७. २६ विष्णु. ४. १३). भीम व अर्जुन हे बलिष्ठ झालेले पाहून दुर्योधनानें कर्ण व शकुनि यांच्या संमतीनें पांडवांचा नाश करण्याचें ठरविलें. ज्या वेळीं प्रजेनें युधिष्ठिरास राज्यपद देण्याचें ठरविलें, तेव्हां तर याच्या अंगाची आग झाली. यानें धृतराष्ट्रास त्यांची वारणावताकडे रवानगी करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें धृतराष्ट्रानें यात्रेसाठीं म्हणून पांडव व कुंती यांस वारणावताकडे पाठविलें. दुर्योधनानें पुरोचनाकडून तेथें लाक्षागृह निर्माण केलें व त्यांत कुंतीसह पांडवांना जाळण्याचा प्रयत्न केला. विदुरानें हें वृत्त पांडवांना कळवून त्यांना विवर खोदवून दिलें. त्या मार्गानें पांडव निसटले. परंतु आपल्या पांच पुत्रांसह एक भिल्लीण मात्र तेथें जळून मेली. तीं सहा प्रेतें पाहून दुर्योधनास आनंद झाला. लोकांनीं मात्र यावर दोष ठेविला. या संकटांतून पांडव निभावल्यामुळें पुनः दुर्योधन खजिल झाला (म. आ. १४१-१४८). हें वर्तमान धृतराष्ट्रास समजतांच पांडवांस त्यानें इंद्रप्रस्थीं आणून ठेविलें. हें दुर्योधनास अगदीं आवडलें नाहीं.

द्रौपदीस्वयंवरास दुर्योधन हजर होता (म. आ. १८६). दुर्योधनानें कलिंग देशच्या राजा चित्रांगद याच्या कन्येचें स्वयंवराच्या वेळीं हरण केलें (म. शां. ४). काशीराजाची मुलगी दुर्योधनाची स्त्री होती (म. आ. २२७. १. कुं.). याच्या स्त्रीचें नांव भानुमती असें होतें (स्कंद. ६. ७३–७४).

धृतराष्ट्रानें पांडवांस अर्धे राज्य देऊन इंद्रप्रस्थास ठेविलें. तेथें त्यांनीं अगणित संपत्ति संपादन केली. युधिष्ठिरानें राजसूय यज्ञ केला. त्यांत हा धृतराष्ट्रासह आला होता व दुर्योधनाकडे कोशागाराचा अधिकार दिला होता. यानें अपरिमित द्रव्य खर्चिलें, पण तूट पडली नाहीं. शिवाय पांडवांची मयसभा

पाहून तर यास पांडवांचा व त्यांच्या संपत्तीचा फार हेवा वाटला ( म. आ. १५२. १० कुं. ). मयसभेच्या रचनेमध्यें पाण्याच्या ठिकाणीं जमीन व जमिनीच्या ठिकाणीं पाणी असें दिसे. त्यामुळें याची फजिती होऊन इतर स्त्रियांबरोबर द्रौपदीहि हंसली. यामुळें यास विषाद वाटला व हा हस्तिनापुरीं निघून गेला ( म. स. ७४ कुं. ). दुर्योधनाला पांडवांची संपत्ति पाहून जेव्हां वाईट वाटलें, त्या वेळीं धृतराष्ट्रानें यास शीलाचें महत्त्व निवेदन केलें ( म. शां. १२४ ). परंतु तें यास आवडलें नाहीं. पांडवांची संपत्ति हरण करण्याकरितां यानें कपटद्यूतांत पटाईत असलेल्या शकुनीमामाच्या अनुमतीनें युधिष्ठिराशीं द्यूत खेळण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें द्यूतांत पांडवांचें सर्वस्व यानें जिंकून घेतलें. त्यांत द्रौपदीचीहि यानें भरसभेंत विटंबना केली. यानें भीष्मद्रोणादिकांच्या प्रतिकारासहि जुमानिलें नाहीं, म्हणून पांडवांना बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास पत्करावा लागला. शिवाय अज्ञातवासांत प्रगट झाल्यास पुनः बारा वर्षें वनवास करावा, अशा संकेतानें त्यांस अरण्यांत घालवून त्यांच्या सर्वस्वाचा हा उपभोग घेऊं लागला. पांडव वनवासास गेल्यानंतर लोकप्रियता संपादिण्यासाठीं यानें नीतीनें राज्य केलें. पांडव कोठें असतात, काय करतात, यासंबंधीं हा गुप्त शोध करी. एकदां पांडव द्वैतवनांत आहेत असें पाहून हा घोषयात्रेच्या निमित्तानें तेथें गेला. याच्याबरोबर याचे अनुयायी कर्ण, दुःशासन वगैरे होते. गोधन अवलोकन केल्यावर हा द्वैतवनानजीक असलेल्या सरोवरावर क्रीडा करण्यास गेला. तत्पूर्वीच पांडवांचे संरक्षणासाठीं इंद्रानें चित्रसेन गंधर्वास ठेविलें होतें. त्याची व दुर्योधनाची तेथें गांठ पडली. चित्रसेन आपल्या स्त्रियांसमवेत तेथें जलक्रीडा करीत होता. तेव्हां त्यानें दुर्योधनास तेथें येण्याची मनाई केली. परंतु उलट दुर्योधनानेंच त्यास तेथून निघून जाण्यास सांगितलें. यामुळें चित्रसेनास राग येऊन त्या दोघांचें युद्ध झालें. त्यांत चित्रसेनानें कर्णास पळविलें व दुर्योधनास बद्ध केलें. ही बातमी एका सैनिकाकडून पांडवांस समजली. तेव्हां भीमास बरें वाटलें; परंतु युधिष्ठिरानें पांडवांस उपदेश करून दुर्योधनाची सुटका करविली. अर्जुनानें चित्रसेनाचा पराभव केला व दुर्योधनास सोडविलें. तेव्हां दुर्योधन धर्मास वंदन करून मानहानीनें जळफळत परत गेला. कर्णानें याचें अभिनंदन केलें. परंतु, दुर्योधनानें त्यास सर्व हकीकत निवेदन करून अर्जुनानें मुक्तता केल्याचें सांगितलें आणि याकरितांच प्रायोपवेशन करून प्राणत्याग करण्याचें यानें ठरविलें. यानें दुःशासनास कर्ण व शकुनी ह्यांच्या साहाय्यानें राज्य करण्यास सांगितलें. कर्ण व शकुनि यांनीं यास पुष्कळ समजाविलें. पण याचा निश्चय कांहीं ढळेना. यानें वल्कलें परिधान केलीं व हा दर्भासनावर बसला. यानें आथर्व मंत्र म्हणून होमहवन केलें. व यास एक स्वप्न पडलें. त्यांत याचे अनुयायी दैत्य आहेत, हें यास समजलें. एका राक्षसीच्या साहाय्यानें हा पातालांत गेला. तेथें दैत्यांनीं यास उपदेश करून परत पाठविलें व हा हस्तिनापुरीं आला. त्या वेळीं भीष्मानें यास पांडवांशीं साम करण्यास सांगितलें, परंतु यानें त्याचा उपहास केला ( म. व २.३८-२५३ ).

यानंतर कर्ण दिग्विजयास गेला. तो आल्यानंतर दुर्योधनानें राजसूय यज्ञ करण्याचा निश्चय केला. परंतु पुरोहितानें युधिष्ठिरानें तो केला असल्यामुळें आतां करतां येणार नाहीं, असें दुर्योधनास सांगितलें. तेव्हां दुर्योधनानें वैष्णवयज्ञ केला व त्या यज्ञास पांडवांस बोलाविलें. परंतु युधिष्ठिरानें आनंद प्रदर्शित करून तेरा वर्षें पूर्ण झाल्याखेरीज येतां येत नाहीं, असें सांगितलें ( म. व. २५३-२५७ ).

दुर्योधनाच्या मनांत सर्वकाल पांडवांचा नाश करण्याची इच्छा वावरत होती. एकदां दुर्वास ऋषि आपल्या अयुत-शिष्यांसह याजकडे आला. त्याची यानें अत्यंत कठीण अशी दीर्घ कालपर्यंत सेवा केली. तेव्हां तो संतुष्ट होऊन त्यानें यास वर मागण्यास सांगितलें असतां यानें कर्ण, शकुनि इत्यादिकांच्या सल्ल्यानें असा वर मागितला कीं, आपण येथें जसे अतिथि म्हणून आलां तसेंच शिष्यांसहित पांडवांकडे काम्यक वनामध्यें जावें व द्रौपदीचें भोजन झाल्यावर अन्न मागून त्यांचा छळ करावा. हें ऐकून दुर्वासास बरें वाटलें नाहीं. परंतु, निरुपायानें तो पांडवांकडे गेला व त्यानें अन्नाची याचना केली. ती त्यांनीं पुरविल्यामुळें पांडवांस दुर्वासाकडून कांहीं अपकार न होतां दुर्वास परत गेला ( दुर्वास पहा ).

पांडव बारा वर्षें वनवास संपवून विराटाच्या येथें अज्ञातवासांत असतां दुर्योधनास कीचकवधाची बातमी लागली ( म. वि. २९.२७ कुं. ). तेव्हां दुर्योधनास पांडव तेथें असल्याचा संशय आला. अशा वेळीं त्यांना ओळखून काढिल्यास त्यांना पुनः बारा वर्षें वनवास पतकरावा लागेल, असें यास वाटलें. या हेतूनें विराटाचीं गोधनें हरण करण्यासाठीं यानें सुशर्म्यास पाठविलें ( म. वि. ३२ कुं ). परंतु तेथें त्याचा पराभव झाला. नंतर भीष्मादिकांना बरोबर घेऊन हा उत्तरेकडून विराट नगरावर चालून गेला. तेव्हां याचाहि पराभव झाला.

याप्रमाणें यानें जे जे उपाय योजिले, ते ते सर्व निष्फळ होऊन पांडव प्रकट झाले व ते उपप्लव्य नगरांत राहिले. त्यांनीं कौरवांनीं आपल्यास यथान्याय अर्धें राज्य द्यावें, म्हणून द्रुपदराजाच्या पुरोहितास धृतराष्ट्राकडे धाडिलें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. उलट धृतराष्ट्रानें संजयाला युधिष्ठिराकडे पाठविलें. संजयानें पुढीलप्रमाणें धृतराष्ट्राचें म्हणणें

सांगितलें. तें असें की. तुम्ही पांडव धर्मात्मे आहां, तेव्हां हिंसारूप युद्ध न करितां भिक्षा मागून कोठें तरी स्वस्थ असावें. भिक्षेनें उपजीविका करणें क्षत्रियास निंद्य असें समजून तुम्ही युद्धास प्रवृत्त व्हाल, पण तसेंहि करण्याचें कारण नाहीं. कारण, तुमचा पाठिराखा कृष्ण असून द्रुपद राजा तुमचा श्वशुर आहे; तेव्हां तुम्ही त्याकडे राहिल्यास तो तुम्हांस नाहीं म्हणणार नाहीं. यांपैकीं एक मार्ग पतकरून राज्यविभाग न मागतां स्वस्थ रहावें (म.उ.२७). हें संजयाचें भाषण ऐकून युधिष्ठिरास आश्चर्य वाटलें व त्यानें कृष्णास धृतराष्ट्राकडे पाठविलें ( म. उ. ८५ ). तरीहि त्याचा उपयोग न होतां युद्धाचा निश्चय कायम झाला. पांडव व दुर्योधन सैन्य जमवूं लागले. मद्रदेशाचा राजा शल्य पांडवांकडे जात असतां दुर्योधनानें त्यास मोठ्या युक्तीनें आपल्याकडे आणिलें ( म. उ. ८. २० कुं. ). हा कृष्णाची मदत घेण्यासाठीं द्वारकेकडे गेला होता. तेथें अर्जुन व हा एका वेळीं गेले. अर्जुनानें कृष्ण व दुर्योधनानें यादवसैन्य आपापल्यास मागून घेतलें (म. उ. ७. ५ कुं. ).

नंतर दुर्योधन कृतवर्म्याकडे गेला. त्यानें एक अक्षौहिणी सेना दिली ( म. उ. ८ ). कृष्ण शिष्टाईसाठीं आला असतां यानें त्यास भोजनास बोलाविलें, परंतु कृष्णानें तें स्वीकारिलें नाहीं ( म. उ. ९१ ).

दुर्योधनास युद्धापासून परावृत्त करण्यासाठीं कृष्ण ( म. उ. ८५ ), परशुराम (म. उ. ९६.३कुं.), कृपाचार्य (म. श. ३), द्रोण (म. उ. १३९. २२ कुं.), भीष्म (म. भी. १२१. ५१ कुं.) व अश्वत्थामा (म. क. ९४. २०कुं.) यांनीं प्रयत्न केला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कण्वानेंहि याला पुष्कळ उपदेश केला. परंतु तो यानें न ऐकतां त्याचा उपहास मात्र केला. यामुळें कण्वानें यास शाप दिला ( म. उ. १० ). यानें कृष्णाला 'पांडवांना सुईच्या अग्रावर राहील एवढाहि पृथ्वीचा भाग दिला जाणार नाहीं,' असें सांगितलें (म. उ. १२७) व हा भरसभेंतून आपले बंधु व अनुयायी यांसह रागानें निघून गेला ( म. उ. १२८ ). याच वेळीं यानें कृष्णास कैद करण्याचा घाट घातला. पण तो उघडकीस येऊन याची फजिती झाली.

अशा तऱ्हेनें युद्धास सुरुवात झाली. प्रथम कौरवांच्या बाजूनें भीष्म सेनापति झाला. याप्रमाणें अश्वत्थाम्यापर्यंत सेनापति झाले त्यांत दुर्योधनाचा अनेक वेळां पराभव झाला.

प्रमुख प्रमुख योद्धे रणांगणांत पडल्यावर दुर्योधन फार भयभीत झाला (म. श. २४). शेवटीं तर हा जलस्तंभनविद्येच्या योगानें द्वैपायन सरोवरांत लपून बसला ( म. श. २९ ). ही बातमी पांडवांना समजली. तेव्हां ते तेथें आले. त्या वेळीं दुर्योधन बाहेर येईना, म्हणून युधिष्ठिरानें याशीं कठोर भाषण केलें (म. श. ३१). तेव्हां हा बाहेर आला ( म. श. ३२ ). पुढें भीम व दुर्योधन यांचें गदायुद्ध झालें ( म. श. ३३ ). त्या युद्धांत भीमानें आपल्या गदेनें याची डावी मांडी छिन्न केली. ही गोष्ट मार्गशीर्ष वद्य अमावस्येच्या दोनप्रहरीं दिवसा झाली (भारतसावित्री). त्या वेळीं बलरामहि तेथें आला होता. त्यास भीमाचा राग आला. पण मैत्रेय ऋषीच्या शापामुळें हें घडलें, असें कृष्णानें त्यास समजाविलें (म. श. ५८-६०). पुढें यानें अश्वत्थाम्यास सेनापति केलें. त्यानें धृष्टद्युम्न, व पांडवपुत्र वगैरेंना मारिल्यामुळें यानें त्याचा गौरव करून प्राण सोडिला (म. सौ. ९ ). याला लक्ष्मण हा पुत्र ( म. भी. ७३; द्रो. ४६ ) व लक्ष्मणा नांवाची कन्या होती ( भा. १०. ६८ ).

२ ( सू. इ. ) दुर्जय राजाचा पुत्र. याची स्त्री नर्मदा. याला सुदर्शना नांवाची मुलगी होती. तीच अग्नीची पत्नी होय ( म. अनु. २. १२–५० कुं. ).

**दुर्व**—( सो. कुरु. भविष्य. ) नृपंजय राजाचा पुत्र. मत्स्यमतें उर्व व विष्णुमतें मृदु असे याबद्दल पाठभेद आहेत.

**दुर्वाक्षी**—वसुदेवाचा भाऊ वृक, त्याची पत्नी.

**दुर्वार**—कुंडलनगराधिपति सुरथ राजाचा पुत्र. सुरथानें रामाचा अश्वमेधीय अश्व धरिल्यावर शत्रुघ्नाबरोबर झालेल्या युद्धांत हा होता ( पद्म. पा. ४९ ).

**दुर्वारण**—जालंधर दैत्याचा दूत. हा जालंधराच्या आज्ञेवरून इंद्राकडे क्षीरसागरांतून देवदैत्यांनीं काढलेलीं चवदा रत्नें मागण्याकरितां गेला होता. परंतु तीं इंद्रानें परत न देतां उलट जालंधरास युद्धास येण्याविषयीं याच्याजवळ निरोप पाठविला. त्यामुळें देवदैत्यांचा संग्राम होऊन त्यांत यमाबरोबर याचें युद्ध झालें ( पद्म. उ. ५ ). पुढें जालंधराला विष्णु किंवा शंकर यांपैकीं प्रथम कोणाशीं युद्ध करावें असा प्रश्न पडला असतां, यानें प्रथम शंकराशीं युद्ध करण्याविषयीं त्याला सल्ला दिला ( पद्म. उ. १६ ).

**दुर्वासस्**—ब्रह्ममानसपुत्र अत्रि यास अनुसूयेपासून झालेला पुत्र ( भा. ४.१; ८.५; विष्णु. १. २५; ब्रह्मांड. ३८.८४-८७ ). अत्रि पुत्रेच्छेनें त्र्यक्षकुल नांवाच्या पर्वतावर तप करण्यास गेला. तेथें त्यानें बरेच दिवस तप केलें, तेव्हां त्याच्या मस्तकापासून एक प्रखर ज्वाला निघाली व ती त्रैलोक्यास त्रास देऊं लागली. म्हणून सर्व देव अत्रि ऋषीकडे आले व त्यांनीं त्याचा मनोरथ कळतांच त्यास तिन्ही देवांच्या अंशांनीं तीन तेजस्वी पुत्र होतील, असा वर दिला. त्या वराच्या योगानें अत्रीस ब्रह्मयाचे अंशापासून सोम, विष्णूच्या अंशापासून दत्त व शंकराच्या अंशापासून दुर्वास असे तीन पुत्र झाले ( शिव. शत. १९ ). क्वचित् ठिकाणीं अर्यमा म्हणून आणखी एक पुत्र अत्रीस असल्याचा उल्लेख आहे

( म. शां. २०७. १० कुं. ). हा शिवाचा अवतार होता ( मार्क. १७; विष्णु. १. ९ ).

अंतरिक्षांत असुरांचीं रुप्यें, सोनें व लोह या तीन धातूंनीं तयार केलेलीं तीन पुरें होतीं व त्यामुळें ते सर्व देवांना अजिंक्य झाले होते. इंद्रानें त्यांचा पराभव करण्याचा बराच प्रयत्न केला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां सर्व देव शंकरास शरण गेले व असुरांचें पारिपत्य करण्यास सांगूं लागले. तेव्हां शंकरानें एक जळजळीत बाण सोडून त्यांच्या तीन पुरांचा नाश केला. त्यांना मारिल्यावर तो बाण लहान बालकाचें रूप घेऊन शंकराच्या मांडीवर बसला. हा बालक म्हणजेच दुर्वास होय ( म. अनु. १६० ).

दुर्वास अत्यंत तामसी होता. याचा वर्ण पिंगट हिरवा असून यानें आपली दाढी फार लांब वाढविली होती. हा अत्यंत कृश व पृथ्वीवरील कोणत्याहि उंच मनुष्यापेक्षां उंच होता. हा नेहमीं चिंध्या नेसत असून एक बिल्ववृक्षाची काठी घेऊन तिन्ही लोकांत स्वच्छंदपणानें फिरत असे ( म. अनु.१५९ ).

हा आपल्या तापट स्वभावास अनुसरून नेहमीं लोकांना त्रास देत असे. याच्या क्रोधाच्या अनेक गोष्टी पुराणांत येतात.

स्वयंभुव मन्वंतरांत याला एका विद्याधरानें एक पुष्पमाला अर्पण केली. ती यानें ऐरावतावर बसून जाणाऱ्या इंद्राच्या अंगावर प्रसाद म्हणून टाकिली. परंतु इंद्राचें लक्ष नसल्यानें ती ऐरावताच्या पायाखालीं पडून तिचा चुराडा झाला. आपण प्रसाद म्हणून दिलेल्या मालेची अशी दशा झाली, हें पाहून हा फार रागावला व यानें इंद्रास ‘ तुझी सर्व संपत्ति नष्ट होईल, ’ म्हणून शाप दिला. पुढें इंद्रानें क्षमा मागितल्यावर यानें उःशाप दिला नाहीं, त्यामुळें त्याचें सर्व बल व संपत्ति नष्ट झाली. शेवटीं विष्णूच्या आज्ञेवरून त्यानें समुद्रमंथन केलें ( विष्णु. १.९; पद्म. सृ.१-४). तेव्हां चाक्षुषांत इंद्राची संपत्ति समुद्रमंथनानंतर चौदा रत्नांच्या रूपानें बाहेर आली ( भा. ९. ४; विष्णु. १. ९; स्कंद. २. ९. ८-९; पद्म. सृ. ४; २३१-३३ ब्रह्मवै. २. ३६ ).

एकदां हा अंबरीष राजाकडे गेला व त्यास यानें निष्कारण त्रास दिला. परंतु त्याचें फळ याला चांगलेंच भोंवलें. शेवटीं तर विष्णुचक्रापासून जिवंत सुटण्याकरितां याला अंबरीषाचेच पाय धरावे लागले ( २ अंबरीष पहा ).

रामाच्या अश्वमेध यज्ञांतील अश्व हा दुर्वासाकडून शाप दिलेला एक दांभिक ब्राह्मण होता ( पद्म. पा. ६७ ).

दुर्वासानें एकदां एक हजार वर्षे उपवास केला होता व तो सोडण्याकरितां हा रामाकडे गेला. त्या वेळीं राम हा कालाबरोबर संभाषण करीत होता, म्हणून त्याच्या आज्ञेवरून लक्ष्मण दुर्वासास आंत जाऊं देईना. तेव्हां दुर्वास सर्वांना शाप देण्यास तयार झाला. हें पाहून लक्ष्मणानें दुर्वासास आंत सोडिलें. नंतर रामानें दुर्वासास इच्छित भोजन देऊन तृप्त केलें ( वा. रा. उ. १०५; पद्म. उ. २७१ आनंदाश्रमप्रत ).

त्याचप्रमाणें यानें श्वेतकि राजाचा यज्ञ यथासांग पार पाडिला ( म. आ. २२३ ).

यानें एकदां शिलोञ्छवृत्तीनें राहणाऱ्या मुद्गलाचें सत्त्वपरीक्षण केलें व त्याच्यावर अनुग्रह करून त्यास ‘ सदेह स्वर्गास जाशील ’ असा वर दिला ( म. व. २६० ).

एकदां हा द्वारकेस श्रीकृष्णाच्या घरीं गेला. कृष्णानें याची अनेक प्रकारें मर्जी राखली. यानें मात्र कृष्णास आपल्या सत्त्वापासून ढळवून लावण्याचा कसोशीनें प्रयत्न केला. एकदां तर यानें आपली उष्टी खीर कृष्णाच्या व रुक्मिणीच्या अंगास लावून दोघांसहि आपल्या रथास जोडून सर्व द्वारकेंत फिरविलें. रुक्मिणी वाटेंत दमली व हळुहळू चालूं लागली. तेव्हां यानें रुक्मिणीस चाबकानें मारिलें. तरीहि कृष्ण सहनशीलतेपासून किंचितहि ढळला नाहीं. तेव्हां दुर्वासानें प्रसन्न होऊन कृष्णास ‘ तूं जेवढ्या अंगास माझी उष्टी खीर लाविलीस, तेवढें तुझें अंग वज्रप्राय होऊन कसल्याहि शस्त्रास तें दाद देणार नाहीं, ’ असा वर दिला ( म. अनु. १५९ ). रथ ओढतांना रुक्मिणी दमून तिला तहान लागली म्हणून कृष्णानें पाणी प्यावयास दिलें. तेव्हां आपल्या आज्ञेशिवाय ही पाणी प्याली, हें पाहून दुर्वासानें ‘ तूं भोगावती नांवाची नदी होशील, मर्यादि पदार्थ खाशील व पतिविरही होशील, ’ असा रुक्मिणीस शाप दिला ( स्कंद ७. ४. २-३ ).

पांडव वनवासास गेले असतां दुर्वास ऋषि दुर्योधनाकडे गेला. दुर्योधनानें याची उत्कृष्ट प्रकारें सेवा केली. तेव्हां दुर्वासानें प्रसन्न होऊन त्याला वर मागावयास सांगितलें असतां दुर्योधनानें, ‘ तुम्ही पांडवांचें व द्रौपदीचें जेवण झाल्यावर त्यांच्याकडे भोजन मागावयास जा व त्यांना तुमची इच्छा पूर्ण करितां आली नाहीं म्हणजे शाप द्या,’ असें याला सांगितलें. दुर्योधनाचें हें भाषण ऐकून हा पांडवांचें सत्त्व हरण करण्यास त्यांचेकडे गेला. परंतु शेवटीं याचीच फजिती झाली. ही कथा फक्त गणपत कृष्णाजीच्या प्रतींत आहे ( म. व. २६२.२६३ ).

पुढें हा एकदां गंगेंत स्नान करीत असतां याचें वस्त्र वाहून गेलें. तेव्हां नग्न स्थितींत असल्यानें याला वर येण्याची फार लाज वाटूं लागली. द्रौपदी त्याच वेळीं वरच्या बाजूस स्नान करीत होती, तिच्या ध्यानांत दुर्वासाची अडचण येऊन तिनें आपला पदर फाडून दुर्वासाकडे पाण्याच्या ओघाबरोबर लावून दिला. तो मिळाल्यामुळें याची लज्जा संरक्षण होऊन यास द्रौपदीच्या

मानसूचक तो कौतुक वाटलें व पुढें द्रौपदीवस्त्रहरणप्रसंगी यानेंच द्रौपदीची लज्जा संरक्षण केली ( शिव. शत. १९ ).

ब्रह्मदत्ताचे पुत्र हंस व डिंभक हे मृगया करीत दुर्वासाश्रमांत आले. त्या ठिकाणीं त्यांनीं दुर्वासाश्रमाचा विध्वंस करून दुर्वासालाहि फार त्रास दिला. या वेळीं मात्र दुर्वासानें आपला नेहमींचा स्वभाव सोडून सहनशीलतेचा अवलंब केला. पुढें हंसडिंभक फारच त्रास देऊं लागले, तेव्हां यानें कृष्णाकडे गाऱ्हाणें नेऊन त्याच्याकडून त्यांचा वध करविला ( ह. वं. ३. १०७.१२९ ).

तीर्थाटन करून पुढें हा काशींत शिवाराधना करूं लागला. पुष्कळ तप केल्यावर सुद्धां शिव प्रसन्न होईना, तेव्हां हा शिवासच शाप देऊं लागला. तें पाहून शंकरास याचें कौतुक वाटलें व त्यानें यास प्रत्यक्ष दर्शन देऊन याचें समाधान केलें ( स्कंद. ४. २. ८५ ).

दुर्वास गोमतीचे तीरीं स्नानास गेला असतां त्या ठिकाणीं बरेच दैत्य आले व त्यांनीं याला खूप चोप दिला. तेव्हां दुर्वासानें राक्षसनाशार्थ श्रीकृष्णाची आराधना केली ( स्कंद. ७. ४. १८ ).

हा जप करीत असतां, याच्या तपामुळें सर्व देव भयभीत झाले व त्यांनी वपु नामक अप्सरेस याचें सत्त्वहरण करण्यास पाठविलें. दुर्वासानें तिचें मनोगत जाणून तिला ' तूं गरुड पक्षीण हो, ' असा शाप दिला ( मार्क. १ ).

दुर्वासानें कुंतीस देवहूति नांवाची विद्या दिली होती. तिच्याच योगानें तिला इंद्र, यम, वरुण, अश्विनीकुमार व सूर्य यांच्या अंशांनीं कर्णासुद्धां सहा पुत्र झाले होते ( भा. ९. २४. ३२; म. आ. ६७ ).

और्व ऋषीची कन्या कंदली ही दुर्वासाची स्त्री होती. ती फार कठोर व कटु भाषण करणारी होती. एकदां दुर्वास तिच्यावर अत्यंत संतापला व यानें तिला शापून भस्मसात् केलें ( ब्रह्मवै. ४. २३-२४ ).

जाबालोपनिषदांतहि याचा उल्लेख आहे ( जाबालोपनिषद् ६; नारद व वपु पहा ). उपाकर्मांगतर्पणांत जैमिनीनें याचा संग्रह केला आहे ( जै. गृ. उपाकर्म प्रकरण ).

याच्या नांवावर आर्याद्विशती, देवीमहिम्नस्तोत्र, पराशिवमहिमास्तोत्र, ललितास्तवरत्न, वगैरे ग्रंथांचा उल्लेख आहे ( C. C. ). वरील हकीगतीवरून ह्या व्यक्तीचा काल ठरविणें अशक्य आहे.

**दुर्विगाह**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दुर्विनीत**—पांड्यदेशांतील इध्मवाहनाचा पुत्र. हा मातागमनी असूनहि धनुष्कोटीतीर्थांत स्नान केल्यानें मुक्त झाला ( स्कंद. ३. १. ३५ ).

**दुर्विमोचन**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दुर्विरोचन**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दुर्विषह**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. हा भीमाकडून मारिला गेला ( म. श. २५. १७ कुं. ).

**दुलिदुह**—( सू. इ. ) अनमित्राचा पुत्र. हा मोठा शास्ता होता ( ब्रह्म. ८. ८४; ह. वं. १. १५ ). इतर प्रसिद्ध पुराणांत याचा निर्देश नाहीं. ( म. आ. १. २५८ कुं. ).

**दुष्कंत**—एक राजा. याला रावणानें जिंकिलें होतें.

**दुष्कर्ण**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. याला शतानीकानें जिंकिलें होतें ( म. भी. ७९. ५२ कुं. ). भारतीय युद्धांत भीमानें यास ठार मारिलें ( म. द्रो. १५६. ४३ कुं. ).

**दुष्टरीतु पौंस्यायन**—सृंजयाचा राजा. याच्या वंशांत सतत दहा पिढ्या चालू असलेल्या राज्यावरून हा च्युत झाला. पण चाक्र स्थपतीनें बाल्हिक प्रातिपीयाच्या प्रतिकारास न जुमानितां सौत्रामणी यज्ञ करवून यास पुनः गादीवर बसविलें ( श. ब्रा. १२. ९. ३. १-३; १३ ). दुष्टरीतु हा शब्द ऋग्वेदांत दोन वेळां आला आहे. पण तेथें व्यक्तिवाचक आहे कीं नाहीं हें ठरविलें पाहिजे ( ऋ. २. २१. २; ६. १. १ ).

**दुष्पण्य**—हा पशुमानाचा पुत्र. हा लोकांचीं मुलें पाण्यांत बुडवी. हद्दपार केला तरी तेथेंहि यानें तेंच केलें म्हणून ऋषीनें यास पिशाच होण्याचा शाप दिला. पण सुतीक्ष्णानें अमितीर्थावर क्रिया केल्यानें हा मुक्त झाला ( स्कंद. ३. १. २२ ).

**दुष्प्रधर्ष**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. याला भीमानें ठार केलें ( म. श. २५.१६ कुं. ).

**दुष्प्रधर्षण**—धृतराष्ट्राचा पुत्र. हा द्रौपदीस्वयंवरास उपस्थित होता. ( म. आ. २०१. १. कुं. ).

**दुष्पहर्ष**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दुष्यंत**—( सो. पूरु. ) रैभ्य राजाचा पुत्र ( भा. ९. २० ). भविष्यमतें तंसाचा पुत्र. तंसुपुत्र अनिलाचे दुष्यंतादि चार पुत्र होते ( विष्णु. ४. १९ ). हरिवंशांत तंसुपुत्र सुरोधास दुष्यन्तादि चार पुत्र दिले आहेत ( ह. वं. १.३२ ). याच्या बापाचें नांव ईलिन ( म. आ. ९४; मत्स्य. २४ ) असून त्यास दुष्यंतादि पांच पुत्र होते, असेंहि दिलें आहे. मालिन असें वायुपुराणांत आहे. जसा याच्या पित्याच्या नांवाबद्दल घोंटाळा आढळतो. तसाच याच्या मातांच्या बद्दलहि आढळतो. त्यांचीं नांवें उपदानवी ( वायु. २. ७. २४ ), रथंतरी ( म. आ. ९४-९५ ) अशीं आहेत.

यास तुर्वसुकुलोत्पन्न करंधमपुत्र मरुत्त राजानें तो अनपत्य होता; म्हणून आपला पुत्र मानून आपलें सर्व राज्य दिलें होतें ( भा. ९. २३; विष्णु. ४. १६ ). मत्स्यपुराण यास

भरत असें म्हणतें (८८). हा राज्यलोभी असल्यामुळें हानें राज्य स्वीकारून हा पुनः पौरवंशीय झाला (भा. ९.२३.१८). ययातीच्या शापानें हा मरुत्त राजाचा वंश पुरुवंशीं सामील झाला (विष्णु. ४. १६; मत्स्य. ४८). ययातीच्या शापामुळें याचा तुर्वसुवंशाशीं संबंध आला (वायु. २.३७).

ब्रह्मपुराणांत तुर्वसुवंशीय करंधमपुत्र मरुत्त यानें आपली संयता नामक कन्या संवर्तास दिल्यावर त्यास दुष्यंत पौरव झाला, असा उल्लेख आहे (१३). हरिवंशांत हकीकत जरा वेगळी आहे. मरुत्तानें यज्ञ केल्यावर त्यास सम्मता नामक कन्या झाली. ती त्यानें यज्ञदक्षिणा म्हणून ऋत्विज संवर्त याला दिली. व संवर्तानें तिला सुघोराला दिली. त्याच्यापासून तिला दुष्यंत पुत्र झाला व मरुत्तानें पुत्रिकापुत्र म्हणून आपला पुत्र म्हटला व या योगानें तुर्वसुवंश पौरवांत सामील झाला (१. ३२).

दुष्यंतानें पौरवांचें गेलेलें राज्य परत मिळविलें व वंश पुनः सुरू केला. ही स्थिति प्राप्त होण्यापूर्वी याचें दत्तकविधान झालें असलें पाहिजे. याचें राज्य शत्रूंनीं नष्ट केलें होतें, म्हणून हा राज्यच्युत राजपुत्र दत्तक घेतला गेला असला पाहिजे. पण पौरवांच्या सत्तेचें पुनरुज्जीवन करितांच हा पुनः पौरववंशीय म्हणून म्हणवूं लागला. दुष्यंतानें पौरव सत्तेचें पुनरुज्जीवन, हैहय सत्ता सगरानें नष्ट केल्यावर व सगराचें राज्य मोडल्यावरच केलें असलें पाहिजे. तसें असेल, तर हा मरुत्ताहून एक दोन पिढ्या व सगराहून दोन पिढ्यांनीं धाकटा असला पाहिजे.

हा एकदां मृगया करण्याकरितां कण्वाश्रमप्रदेशीं आला असतां यास आश्रमांत शकुंतला दृष्टीस पडली. काश्यप कण्व बाहेर गेला असल्यामुळें दोघांच्या संमतीनें त्यांचा गांधर्व विवाह झाला. तदनंतर या राजापासून शकुंतलेस गर्भ राहून भरत नांवाचा पुत्र झाला. परंतु हा विवाह लोकप्रसिद्ध नव्हता, म्हणून राजा तिचा अंगिकार करीना. पण पुढें आकाशवाणीनें सांगितल्यावर राजास तिचा स्वीकार करण्यास अडचण राहिली नाहीं (म. आ. २; ६९-७४; ९४-९५; द्रो. ६८; शां. २९; आश्व. ३; भा. ९. २०; विष्णु. ४.१९; ह. वं. १.३२; वायु. २.३७.१३१).

शकुंतलेपासून यास सर्वदमन या नामांतरानें भरत नांवाचा जो पुत्र झाला त्यास दौष्यन्ति या नांवानेंहि ब्राह्मणांत उल्लेखिलेलें दिसतें. शब्दकल्पद्रुमकार या नांवाची फोड 'दुष दोषवतीं मन्यते शकुन्तलामिति' अशी करितात. यास पौरवकुलाचा आदि संस्थापक असें म्हटलें आहे. याची राज्यशकट चालवण्याची तऱ्हा फारच चांगली असे (म. आ. ६८).

हा इलिलाचा पुत्र असून यास लक्षी नामांतरानें लक्ष्णा नामक दुसरी भार्या असून तिला जनमजय नांवाचा पुत्र होता, अशी नवी माहिती महाभारत कुम्भकोणम् प्रतींत सांपडते (म. आ. ६३. २९; ८८. १८ कुं.). याची राजधानी प्रतिष्ठान (अलाहाबाद) ही होती (म. आ. ९६. ४५ कुं.).

तंसु ते दुष्यंत या वंशांत मोठा घोंटाळा आहे. यास इलिनेचा नातु असें म्हटलें आहे (ब्रह्मांड ३. ६). पौरववंशांत तंसु ते दुष्यंत यांमधील राजांच्या बाबतींत एकवाक्यता नाहीं. दुष्यंतास दुष्मंत नांव असल्याचें वर सांगितलेंच आहे. यास दुष्यंत, दुष्मंत व दुःषंत असें म्हणत असावेत. कारण याचा पुत्र भरत यास दौष्यन्ति व दौःषति अशीं नांवें अनुक्रमें ऐतरेय व शतपथ ब्राह्मणांत आढळतात (ऐ. ब्रा. ८. २३; श. ब्रा. १३. ५. ४. ११-१४). शतपथ ब्राह्मणांतील वरील उल्लेखांत भरताचें पैतृक नांव सौद्युम्नि असें दिलें आहे. तेथें दौष्यंति पाहिजे. कारण तसेंहि म्हटलेलें आहे.

२ (सो. अज.). अजमीढाच्या दोन मुलांतील एक. याची माता नीली (म. आ. १०१. २० कुं.).

**दूरसोम**—मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**दूर्व**—गौड देशांतील एक ब्राह्मण (गणेश. १. ३६. ७६).

**दूषण**—खर राक्षसाचा भ्राता (म. व. २७८.५० कुं.). यास आणखी वज्रवेग व प्रमाथी असे दोन भाऊ होते. रामानें यास ठार मारिलें (भा. ९. १०).

२ विश्ववसु व चवाका यांचा पुत्र.

**दूषणा**—ऋषभदेवाच्या वंशांतील भौवन राजाची पत्नी. हिचा पुत्र त्वष्टा.

**दृढ**—धृतराष्ट्राच्या शतपुत्रांतील एक. यास भीमानें ठार मारिलें (म. द्रो. १३७.३०; १५८.१९ कुं.).

२ दुर्योधनपक्षीय एक राजा. यास अदृढ असेंहि नांव आढळतें (म. क. ७).

**दृढक्षत्र**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दृढच्युत आगस्त्य**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९.२५). याला आगस्ति असें पैतृक नांव दिलें आहे व हा विभिंदुकीयाच्या सत्रांत उद्गाता होता (जै. ब्रा. ३. २३३). अगस्त्य ऋषीस कृष्णेक्षणेपासून हा झाला. याचा पुत्र इध्मवाह (भा. ४. २८).

**दृढद्युम्न**—दृढस्यूला नामांतर.

२ अगस्त्यगोत्री मंत्रकार (मत्स्य. १४५. ११४-११५). याला दृढायु असें नामांतर होतें (ब्रह्मांड. २. ३२. ११९-१२०).

**दृढधनु**—(सो. अज.) विष्णु व वायु यांच्या मतें सेनजित्चा पुत्र. यास दृढरथ व दृढहनु अशीं नामांतरें आहेत.

**दृढधन्वन्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

२ एक क्षत्रिय ( म. आ. २०१.१५ कुं. ).

**दृढनेमि**—(सो. द्विमीढ. ) भागवत, वायु व मत्स्य यांच्या मतें सत्यधृतीचा पुत्र. विष्णुमतें धृतिमानाचा पुत्र.

**दृढमति**—एक शूद्र. याच्या मागें ब्रह्मराक्षस लागला होता. पण वेंकटाचलावर जाऊन हा पीडेंतून मुक्त झाला ( स्कंद. २. १. १९ ).

**दृढरथ**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

२ ( सो. क्रोष्टु.) मत्स्यमतें नवरथपुत्र (३ दशरथ पहा ).

३ (सो. अज.). मत्स्यमतें सेनजित्चा पुत्र (दृढधनु पहा).

**दृढरथाश्रय**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दृढरुचि**—प्रियव्रतपुत्र हिरण्यरेता, त्याचा पुत्र.

**दृढवर्मन्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दृढसंध**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दृढसेन**—द्रोणानें मारिलेला एक पांडवपक्षीय राजा ( म. द्रो २१. ५२ कुं. ).

२ ( सो. मगध. भविष्य. ) विष्णु व ब्रह्मांड यांच्या मतें सुश्रमाचा पुत्र व वायुमतें सुव्रताचा पुत्र. यास द्युमत्सेन असें नांव आहे.

**दृढस्यु**—अगस्त्य व लोपामुद्रा यांचा पुत्र. हा अत्यंत तपस्वी व विद्वान् होता. हा अरण्यांतून समिधांचीं मोठमोठीं ओझीं आणीत असे. म्हणून यास इध्मवाह असेंहि म्हणत असत. ऋतु ऋषि अनपत्य असल्यानें त्यानें यास आपला पुत्र मानिलें होतें. त्याचप्रमाणें पुलह व पुलस्त्य हे दोघे आपली संतति दुष्ट निपजल्यामुळें यासच आपला पुत्र मानीत होते ( म. व. ९७.३१ कुं. ). यास दृढास्यु, दृढायु व दृढद्युम्न अशीं दुसरीं नांवें होतीं.

**दृढहनु**—( सो. अज. ) भागवतमतें सेनजित् राजाचा पुत्र ( दृढधनु पहा ).

**दृढहस्त**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दृढाच्युत**—अगस्त्यपुत्र दृढास्यूला नामांतर.

**दृढायु**—( सो. ) पुरूरव्यास उर्वशीपासून झालेला पुत्र ( म. आ. ६९; पद्म. सृ. १२ ).

२ अगस्त्यपुत्र ( म. अनु. २७१. ४० कुं.; दृढस्यु पहा).

**दृढायुध**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**दृढाश्व**—( सू. इ. ) भागवत, विष्णु व भविष्य यांच्या मतें कुवलयाश्वाचा, मत्स्य व वायु यांच्या मतें कुवलाश्वाचा पुत्र. यानें ३४२०० वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. १.१ ). पद्ममतें कुवलाश्वाचा भातृ व धुंधुमाराचा पुत्र ( पद्म. सृ. ८ ).

**दृढास्य**—दृढस्यूचें नामांतर.

**दृति ऐंद्रोत**—हा इंद्रोत दैवापाचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४०. २ ). अभिप्रतारिन् काक्षसेनीबरोबर दृताचा उल्लेख आहे ( पं. ब्रा. १४. १. १२; १५ ). 'दृतिवातवन्तौ' यांतील दृतिसुद्धां हाच असावा ( पं. ब्रा. २५. ३. ६ ). महाव्रत नामक श्रौतकर्माच्या सतत आचरणानें दृतीचा उत्कर्ष झाला व तें सत्रहि याचेच नांवावर प्रसिद्ध झालें ( का. श्रौ. २४. ४. १६; ६. २५; आश्व. श्रौ. १२. ३; सां. श्रौ. १३. २३. १; ला. श्रौ. १०. १०. ७ ) दृत व दृति एकच असावेत.

**दृति ऐंद्रोत शौनक**—हा आपला पिता इंद्रोत शौनक याचा शिष्य ( वं. ब्रा. २ ).

**दृप्तबालाकि गार्ग्य**—एक आचार्य ( बृ. उ. २. १. १ ). काशीच्या अजातशत्रु नामक राजाचा हा समकालीन होता. अजातशत्रूला उपदेश करण्याकरितां हा गेला होता.

**दृभीक**—याला इंद्रानें ठार केलें ( ऋ. २. १४. ३ ).

**दृशान भार्गव**—मंत्रद्रष्टा ( क. सं. १६. ८ ).

**दृषद्वती**—( सू. इ. ) हर्यश्व राजाची पत्नी.

२ विश्वामित्राची स्त्री ( ब्रह्म. १०. ६७; ह. वं. १. २७; ब्रह्मांड. ६६. ७५; वायु. २. ३०. १०३ ).

३ काशीच्या पहिल्या दिवोदासाची पत्नी.

**दृष्टरथ**—एक मोठा राजा ( म. अनु. २७१. ५० कुं.).

**दृष्टशर्मन्**—( सो. वृष्णि. ) विष्णुमतें श्वफल्काचा पुत्र.

**देय**—सुख देवांपैकीं एक.

**देव**—एक व्यास ( व्यास पहा ).

**देवऋषभ**—वैवस्वत मन्वंतरांतील धर्म ऋषीस भानु नामक स्त्रीपासून झालेला पुत्र. याचा पुत्र इंद्रसेन ( भा. ६. ६ ).

**देवक**—( सो. कुरु. ) युधिष्ठिरास पौरवीपासून झालेला पुत्र ( भा. ९. २२. ३० ).

२ ( सो. कुकुर. ) आहुक राजाचा पुत्र. हा पूर्वजन्मीं गंधर्वपति होता. याची कन्या देवकी वसुदेवाला दिलेली होती ( म. आ. ६८.६८ कुं; भा. ९. २४; विष्णु ४.१४ ). परंतु देवकी ही याची बहीण असून तिच्यासहित आणखी सहा बहिणी यानें वसुदेवाला दिल्या होत्या. उग्रसेन हा याचा कनिष्ठ बंधु. याचे पुत्र देववान्, उपदेव, सुदेव व देवरक्षित ( पद्म. सृ. १३ ).

**देवक मान्यमान**—हा तृत्सूंचा शत्रु आणि शंबराचा मित्र आहे ( ऋ. ७. १८. २० ).

**देवकर**—( सू. इ. ) भविष्यमतें प्रतिव्योमाचा पुत्र. याचा पुत्र सहदेव.

**देवकी**—देवकाची कन्या. ही वसुदेवाची पत्नी होती. हिच्या लग्नाचे वेळीं आकाशवाणीनें हिच्या आठव्या पुत्राच्या हातून कंसाचा मृत्यु होणार असें सांगितलें होतें. त्यामुळें कंसानें हिला वसुदेवासह कारागृहांत ठेविलें. पुढें हिला कीर्तिमान्, सुषेण, भद्रसेन, ऋजु, संमर्दन, भद्र, बलराम व कृष्ण असे आठ पुत्र झाले. कृष्णजन्म झाल्यानंतर त्याला यशोदेपाशीं ठेवून तिचें अपत्य घेऊन येण्याविषयीं हिनें वसुदेवाला सांगितलें होतें ( पद्म. ब्र. १३ ).

बलराम व कृष्ण या दोघांशिवाय इतर सहाहि पुत्र कंसानें मारिले. नंतर कृष्णानें कंसास मारिल्यावर देवकीची व त्याची भेट होऊन कृष्णानें देवकीची व मृत पुत्रांची भेट करविली ( भा. ९.२४; १०.३; ४४ ). ही पूर्वजन्मींची सुतपस्पत्नी पृश्नि होय ( भा. १०. ३ ).

२ शैब्याची कन्या व युधिष्ठिराची एक स्त्री. हिचा पुत्र यौधेय ( म. आ. ६३. ७५ कुं. ).

३ ऋषभदेववंशीय उद्गीथाची पत्नी ( भा. ५. १५ ).

**देवकुल्या**—स्वायंभुव मन्वंतरांतील मरीचि ऋषीच्या पुत्राची कन्या. हिनें पूर्वजन्मीं कृष्णाचे पाय धुतले होते; त्यामुळें ही या जन्मीं स्वर्धुनी झाली ( भा. ४. १४ ).

२ ही भागवतमतें पूर्णिमाची कन्या.

**देवक्षत्र**—( सो. क्रोष्टु. ) भागवत, विष्णु, मत्स्य, वायु व पद्म यांच्या मतें देवराताचा पुत्र. भविष्यमतें देवरथाचा पुत्र. पद्म व भविष्य यांच्या मतें याला देवक्षेत्र असें म्हटलें आहे ( पद्म. सृ. १३ ).

**देवगर्भ**—ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत हा ब्रह्मगणांतील होता नांवाचा ऋत्विज होता ( पद्म. सृ. ३४ ).

**देवज**—( सू. दिष्ट. ) संयमन राजाचा पुत्र.

**देवजाति**—कश्यपकुलांतील गोत्रकार. वेदसाति असा पाठभेद आहे.

**देवजित्**—कश्यप व दनु यांचा पुत्र

२ अंगिराकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि.

**देवतरस् श्यावसायन काश्यप**—ऋश्यशृंगाचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४०. २ ). वंशब्राह्मणांतहि याचा उल्लेख आहे.

**देवताजित्**—( स्वा. प्रिय. ) सुमति व वृद्धसेना यांचा पुत्र. याची स्त्री आसुरी व पुत्र देवद्युम्न ( भा. ५. १५.२ ).

**देवदत्त**—( सू. नरि. ) भागवतमतें उरुश्रवस् राजाचा पुत्र. याचे पुत्र अग्नि, कानीन व जातूकर्ण्य.

**देवदत्त शठ**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**देवदर्श**—कबंधायनाचा शिष्य. कबंधानें याला अथर्ववेदसंहिता शिकविली होती. याचे पिप्पलाद, ब्रह्मबल, मोद व शौल्कायनि असे चार शिष्य होते ( व्यास पहा ). ब्रह्मांडांत वायूंत वेदस्पर्श असा पाठ आहे. एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ). पाणिनि देवदर्शन असें नांव देतो.

**देवदर्शन**—( देवदर्श पहा ).

**देवदास**—मगध देशांतील एक ब्राह्मण. याची स्त्री उत्तमा ही पतिपरायण असे. यांच्या मुलाचें नांव अंगद व मुलीचें वलया. वलया सासरीं सुखांत होती. अंगद व त्याची मुलगी कल्याणी संसाराचा भार शिरीं घेण्यास लायक होतीं, म्हणून या पतिपत्नींनें तीर्थयात्रेस जाण्याचें ठरविलें. वाटेंत यांस एक सिद्ध भेटला. त्यानें यांस एक उदाहरण सांगून (बदरि)तीर्थास जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें हीं दोघे इंद्रप्रस्थास गेलीं व यांनीं यमुनेचें स्नान केल्यावरोबर उद्धरून हीं स्वर्लोकीं गेलीं ( पद्म. उ. २१६ ).

२ एक सुवर्णकार ( रूपवती पहा ).

**देवद्युति**—एक ऋषि हा सरस्वतीकांठीं आश्रमांत राहत असे. याला विष्णूच्या वरानें सुमित्र नामक पुत्र झाला. देवद्युति ग्रीष्मऋतूंत पंचाग्निसाधन करी. यानें मोठ्या भक्तीनें १००० वर्षे तपश्चर्या व विष्णुभक्ति केली. त्यायोगे याला तेज प्राप्त झालें. पुढें वैशाखांत एकादशीच्या दिवशीं यानें विष्णूची स्तुति केली. तेव्हां विष्णु प्रगट झाला व त्यानें यास वर मागण्यास सांगितलें. पण हा निरिच्छ असल्यामुळें यानें त्याची भक्तीच मागितली ( पद्म. उ. १२८ ).

**देवद्युम्न**—( स्वा. प्रिय. ) भागवतमतें हा सुमतीचा पुत्र ( देवताजित् पहा ).

**देवन**—देवक्षत्रानंतरचा राजा.

**देवपति**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**देवप्रस्थ**—एक गोप. हा कृष्णाचा मित्र होता ( भा. १०. २२ ).

**देवबाहु**—( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें हृदीकाचा पुत्र.

२ रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक ( पद्म. सृ. ७ ).

**देवभाग**—( सो. क्रोष्टु.) शूरपुत्र. याची स्त्री कंसभगिनी कंसा. तिच्यापासून याला चित्रकेतु, बृहद्बल व उद्धव असे तीन पुत्र झाले होते.

**देवभाग श्रौतर्ष**—यज्ञपशूच्या शरीराचे निरनिराळे भाग कोणांस द्यावेत, हें ज्ञान श्रुताचा पुत्र देवभाग यास झालें. यानें दिवंगत होण्याचे वेळीं हें गूढज्ञान दुसऱ्या कोणास सांगितलें नाहीं. पण एका अमानुष व्यक्तीनें हें ज्ञान बभ्रूचा पुत्र गिरिज यास सांगितलें (ऐ. ब्रा. ७. १). संजय व कुरु या दोघांचा स्नेह दाक्षायण याग करून झाला. त्या वेळीं हा पुरोहित होता ( श. ब्रा. २.४. ४. ५ ). तैत्तिरीय ब्राह्मणांत याला सावित्र अग्नीच्या बाबतींत प्रमाण मानिला आहे ( तै. ब्रा. ३.

१०. ९. ११). याच्या हातून यज्ञांत चूक झाल्यामुळें सृंजयांचा नाश झाला. हा वसिष्ठ सात्यहव्याचा समकालीन होता (तै. सं. ६. ६. २. २).

**देवभूति**—(शुंग. भविष्य.) भागवत व विष्णु यांच्या मतें भागवताचा पुत्र. यास देवभूमि व क्षेमभूमि अशीं नामांतरें होतीं.

**देवभूमि**—(शुंग. भविष्य) मत्स्यमतें पुनर्भवाचा व ब्रह्मांडमतें भागवताचा पुत्र. यानें दहा वर्षे राज्य केलें.

**देवमत**—याचा नारदाशीं सृष्टिविषयक संवाद झाला आहे (म. आश्व. २४).

**देवमति**—अंगिराकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि.

**देवमलिम्लुच्**—हें रहस्यूचें नांव आहे.

**देवमानुषि**—(सो. क्रोष्टु.) भागवत व वायु यांच्या मतें शूर राजास अश्मकीचे ठिकाणीं झालेला पुत्र. यास देवमीढुष म्हटलें आहे.

**देवमित्र शाकल्य**—मांडुकेय ऋषींचा पुत्र. यानें सौभरी वगैरे शिष्यांना संहिता सांगितली. भागवतांत याचा जोडीदार शाकल्य होता असें म्हटलें आहे. पण वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हा शाकल्याचा शिष्य आहे. देवमित्र शाकल्यानें पांच संहिता, पांच शिष्यांना शिकविल्या. त्यांचीं नांवें मुद्गल, गोखल, मत्स्य, खालीय व शैशिरेय. वेदमित्र असाहि पाठभेद आहे (वेदमित्र, याज्ञवल्क्य व व्यास पहा).

जनकाच्या अश्वमेध यज्ञांत जनकानें पण लावला होता. त्यांत हजार गाई, त्यापेक्षां कितीतरी सोनें, गांवें, रत्नें आणि कितीतरी नोकर हीं जमलेल्या ब्राह्मणांतील श्रेष्ठ ब्राह्मणान घेऊन जावींत, असें ठरविलें होतें. त्याप्रमाणें तेथें अनेक ब्राह्मण स्पर्धेनें तंडूं लागले. इतक्यांत ब्राह्मवाहसुत याज्ञवल्क्य तेथें आला व आपल्या शिष्यांना म्हणाला कीं, हें धन उचला. कारण, माझ्या इतका वेदवेत्ता येथें कोणीहि नाहीं. ज्याला हें पसंत नसेल, त्याला माझें आव्हान आहे. तेव्हां ब्राह्मण वादाकरितां पुढें सरसावले व अनेक महत्त्वाच्या विषयांवर वाद झाले. सगळ्यांना जिंकल्यावर याज्ञवल्क्य शाकल्याला टाकून बोलला व म्हणाला,' ब्राह्मणांचें बल म्हणजे विद्या व तत्त्वज्ञान यांतील नैपुण्य होय. मी कोणत्याहि प्रश्नांचीं उत्तरें देण्यास तयार आहें. जो कोणी उत्तरें देईल त्याला हें धन मिळावयाचें असा राजा जनकाचा पण आहे.' त्यावरोबर शाकल्य रागानें वेडा झाला व याज्ञवल्क्याच्या म्हणण्याप्रमाणें त्याला आठ हजार प्रश्न विचारिले. त्यांचीं याज्ञवल्क्यानें उत्तरें दिलीं. याज्ञवल्क्यानें प्रश्न विचारण्याची वेळ आली, वाद रंगाला आला. याज्ञवल्क्यानें एकच प्रश्न विचारला. याचें उत्तर न दिल्यास मरण पतकरावें असें ठरलें. याज्ञवल्क्यानें प्रश्न केला परंतु, शाकल्याला उत्तर देतां येईना. शेवटीं शाकल्यानें मृत्यु पत्करिला.

देवमित्र शाकल्याच्या मृत्यूमुळें सर्व ब्राह्मणांना ब्रह्महत्येचा दोष लागला म्हणून ते पवनपुराला गेले व तेथें द्वादशार्क, वालुकेश्वर व अकरा रुद्र यांचें त्यांनीं दर्शन घेतलें. चार कुंडांत स्नान केलें व वाडवादित्याच्या प्रसादानें उत्तरेश्वराचें दर्शन घेऊन ते सर्व मुक्त झाले (वायु. १.६०).

**देवमीढ**—(सू. निमि.) भागवतमतें कृतिरथाचा व वायुमतें कीर्तिरथाचा पुत्र.

२ (सो. क्रोष्टु.) भागवतमतें हृदीकाचा पुत्र. याचा पुत्र शूर. याच्या पत्नीचें नांव ऐक्ष्वाकी (मत्स्य. ४६). देवमीढुष देवमानुषि व देवमेधस् अशीं याबद्दल नामांतरें आहेत.

३ (सो. पूरु.). द्विमीढाचें नामांतर.

४ (सो. वृष्णि.) वृष्णीच्या पांच पुत्रांपैकीं तिसरा (पद्म. सृ. १३).

**देवमीढुष**—(सो. क्रोष्टु.) विष्णुमतें हृदीकाचा पुत्र व मत्स्यमतें भजमानाचा पुत्र (२. देवमीढ पहा).

**देवमुनि ऐरंमद**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १४६). देवमुनि हें तुराचें नांव आढळतें (पं. ब्रा. २५. १४. ५).

**देवमेधस्**—(सो. क्रोष्टु.) भविष्यमतें हरिदीपकाचा पुत्र (२ देवमीढ पहा).

**देवयान**—काश्यकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**देवयानी**—शुक्राची कन्या (म. आ. ९५; मत्स्य. २४; वायु. २. ३१; ब्रह्म. १२; १४६; ह. वं. १. ३०; लिंग. १. ६६; कूर्म. १. २२; अग्नि. २७४; विष्णु. ४. १०; भा. ९. १८; पद्म. सृ. १२; वा. रा. उ.५८). हिची आई पुरंदर इंद्राची कन्या जयंती. ती शुक्राचार्यांस प्रसन्न करून त्याजपाशीं दहा वर्षे राहिल्यावर तिला ही कन्या झाली (मत्स्य. ४७; वायु. २. ३१). हिची आई प्रियव्रतपुत्री ऊर्जस्वती असाहि उल्लेख आढळतो (भा. ५.१.२५).

बृहस्पतिपुत्र कच देवांच्या सांगण्यावरून संजीवनी विद्या शिकण्यास्तव असुरगुरु शुक्राचार्यांपाशीं येऊन राहिला. देवयानीनें त्याचें लावण्य पाहून त्याच्याशीं लग्न लावण्याचें योजिलें. पण ही गुरुकन्या जाणून कचानें हिचें पाणिग्रहण केलें नाहीं. तेव्हां हिनें ' तुझी विद्या तुला फलद्रूप होणार नाहीं, ' असा त्यास शाप दिला. निरपराध असूनहि शाप दिल्यामुळे क्रुद्ध होऊन कचानें 'कोणीहि ऋषिपुत्र तुझें पाणिग्रहण करणार नाहीं, ' असा हिला उलट शाप दिला. हाच शाप हीं क्षत्रियपत्नी होण्याचें कारण होय.

कच निघून गेल्यावर एकदां ही व वृषपर्व्याची कन्या शर्मिष्ठा या आपल्या सख्यांसह क्रीडा करण्यास गेल्या होत्या.

या वनांत आपआपली वस्त्रें सोडून ठेवून जलक्रीडा करीत असतां खोडकर इंद्रानें गंमत म्हणून त्या सर्वांचीं वस्त्रें एका ठिकाणीं मिसळून ठेविलीं. जलक्रीडा संपल्यावर सगळ्याजणी एकदम बाहेर आल्या व धांदलींत जिला जें सांपडलें तें ती नेसावयास लागली. भागवतांत, शंकरपार्वती नंदीवर बसून जात असतां त्यांना लाज वाटून त्या बाहेर येऊन वस्त्रें नेसूं लागल्या, असें आलें आहे ( ९.१८ ). त्या गडबडींत शर्मिष्ठा चुकून देवयानीचें लुगडें नेसली. आपलें लुगडें शर्मिष्ठा नेसली, असें पाहून देवयानी संतापली. देवयानी म्हणाली, 'तूं माझी शिष्यीण असून माझें लुगडें काय म्हणून घेतलेंस? तुझें कधीं चांगलें होणार नाहीं!' तेव्हां शर्मिष्ठेनें उत्तर दिलें, 'मी राजाची कन्या आहें, तर तूं माझ्या पित्याचा पुरोहित जो शुक्राचार्य त्याची कन्या आहेस. तूं अशी दीन असूनहि माझ्यासारख्या मोठ्या मानाच्या स्त्रीवर रागावतेस? भिकारडे, खुशाल रागव!' याप्रमाणें त्या दोघी एकमेकींस बोलतां बोलतां द्वेषबुद्धि मनांत धरून लुगड्यांची हिसकाहिसक करूं लागल्या. शेवटीं शर्मिष्ठेनें हिला तेथेंच विहिरींत ढकलून दिली व ही मेली अशी कल्पना करून शर्मिष्ठा नगरास परत आली.

इकडे ज्या प्रदेशांत देवयानी पडली होती, त्याच प्रदेशांत कर्मधर्मसंयोगानें नहुषपुत्र ययाति राजा मृगाच्या मागून धांवत आला. उदकप्राशनार्थ तो त्या विहिरीच्या कांठीं वांकून पाहतो, तों आंत एक तेजस्वी कन्या त्याच्या दृष्टीस पडली. नंतर त्यानें ही नग्न असल्यामुळें अंगावरील उत्तरीय वस्त्र हिला नेसावयास दिलें ( भा. ९.१८ ). नंतर ययाति राजानें 'तूं कोणाची कोण?' असें हिला विचारिलें. तेव्हां हिनें सांगितलें कीं, 'मी शुक्राचार्यांची कन्या आहें.' नंतर ही ब्राह्मणकन्या आहे, असें जाणून ययातीनें हिचा उजवा हात धरून हिला बाहेर काढिलें व हिचा निरोप घेऊन तो नगरास परत गेला.

इकडे देवयानीच्या शोधाकरितां घूर्णिका नांवाची एक दासी आली. देवयानीनें तिला मी वृषपर्व्याच्या नगरांत येत नाहीं, असें पित्यास कळविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें घूर्णिका दासीनें वृषपर्व्याच्या घरीं असलेल्या शुक्राचार्यांच्या कानांवर ही हकीकत घातली. नंतर शुक्राचार्य तेथून निघून वनामध्यें आल्यावर त्यानें आपल्या दुःखित मुलीस पाहिलें व म्हणाला, 'तुझें कांहीं पूर्वजन्मींचें पाप असेल, म्हणून तुला हें प्रायश्चित्त मिळालें असावें.' तेव्हां देवयानीनें त्यास शर्मिष्ठेचे शब्द कथन केले. ते ऐकून शुक्राचार्यास राग आला. परंतु देवयानीनें मधुर शब्दांनीं त्याचें सांत्वन केलें व सांगितलें कीं, 'वृषपर्व्याच्या मुलीचे शब्द माझ्या मनास घरें पाडीत आहेत.' नंतर तो कोपाविष्ट शुक्राचार्य दैत्य राजाचा त्याग करण्यास प्रवृत्त झाला असतां वृषपर्व्यानें त्याची नम्रपणें प्रार्थना केली. तेव्हां शुक्र म्हणाला, 'देवयानीची समजूत घाला. कारण, हिला दुःख झालेलें मला खपावयाचें नाहीं.' यावर वृषपर्वा म्हणाला, 'आमच्या सर्वस्वाचे स्वामी आपण आहांत.' हें सर्व वृत्त शुक्रानें देवयानीस कळविलें. पण ती म्हणाली, 'हें सर्व खुद्द राजानें मला सांगितलें पाहिजे.' तेव्हां वृषपर्वा हिला म्हणाला, 'देवयानी, तुझी इच्छित वस्तु कितीहि दुर्लभ असली, तरी मी देईन!' देवयानीनें त्याला म्हटलें 'तुझी कन्या शर्मिष्ठा आपल्या सहस्र दासींसहवर्तमान माझी बटिक झाली पाहिजे व माझा पिता ज्याच्याशीं माझें लग्न करील, त्याजकडे तिनें माझ्यासह आलें पाहिजे,' असें मागणें मागितलें.

नंतर वृषपर्व्यानें शर्मिष्ठेस तेथें बोलावून आणविलें. पाठविलेल्या दासीनें तिला कल्पना दिलेलीच होती. देवयानीजवळ जाऊन तिनें हिची मागणी मान्य केली. तेव्हां देवयानी तिला चिडवूं लागली कीं, 'मी याचकाची कन्या! तर मग राजाची कन्या पुरोहिताच्या कन्येची दासी कशी?' तेव्हां शर्मिष्ठेनें तिला 'माझें दासीपण जर माझ्या हीनदीन झालेल्या जातिबांधवांस सुख देत आहे, तर मी सुखानें दास्य पतकरितें,' असें सांगितलें. नंतर देवयानीस संतोष झाला. पुढें नगरांत गेल्यावर हिचा विवाह ययाति राजाशीं झाला. शर्मिष्ठाहि हिची दासी होऊन गेली ( म. आ. ७८-८०; मत्स्य. २७-२९; भा. ९. १८ ).

पुढें शर्मिष्ठेस ययातीपासून पुत्र झालेला पाहून ही रागावून पित्याकडे गेली. तेव्हां पित्यानें ययातीस 'तूं म्हातारा होशील,' असा शाप दिला. व शेवटीं त्यानें फार विनविल्यावरून 'तुला तुझें वार्धक्य तारुण्य देणाऱ्या मागराच [illegible] येईल' असा उःशाप दिला. देवयानीच्या दोन्ही पुत्रांनी वृद्धता नाकारिली. तेव्हां त्यांस पित्यानें शाप दिले. देवयानीस ययातीपासून यदु व तुर्वसु या नांवांचे दोन पुत्र झाले ( म. आ. ७५; ७६; ८२; ९५; मत्स्य. २४; ३१; ३२; वायु. २. ३१; ब्रह्म. १२; १४६; ह. वं. १. ३०; लिंग. १. ६६; कूर्म. १. २२; अग्नि. २७४; विष्णु. ४. १०; भा. ९. १८; गरुड. १. १. १३९; पद्म. सृ. १२ ). रामायणांत एवढाच फक्त यदु दिला आहे ( वा. रा. उ. ५८ ).

**देवरक्षित**—(सो. कुकुर.) विष्णु, मत्स्य व पद्म यांच्या मतें देवकाचा पुत्र. यास देवरंजित व देववर्धन अशीं नांवें आहेत ( पद्म. सृ. १३ ).

२ देवक राजाची कन्या व वसुदेवाची स्त्री. हिला गद आदिकरून नऊ पुत्र होते ( भा. ९. २४ ).

**देवरंजित**—( सो. कुकुर. ) वायुमतें देवकपुत्र ( १ देवरक्षित पहा ).

**देवरथ**—( सो. ) भविष्यमतें कुशंभाचा पुत्र ( २ देवरात पहा ).

**देवराज**—( सू. इ. ) विकुक्षीचें नामांतर ( मत्स्य. १२. २६ ).

२ ( सू. निमि. ) देवरातावद्दल पाठभेद.

३ हा ब्राह्मण किरात नगरांत व्यापार करून राहत असे. हा अत्यंत लबाड व दारू पिणारा होता. एकदां तळयावर स्नानास गेला असतां शोभावती नांवाच्या वेश्येशीं याचा संबंध जडला. तिच्या नादानें यानें आईबाप व स्त्री ह्या सर्वांचा वध केला. एकदां हा प्रतिष्ठान नगरांत आला असतां तेथें शिवाचें दर्शन घेऊन व शिवकथा ऐकून एका महिन्यानें मेला. तेव्हां केवळ अल्पकाल केलेल्या शिवपूजनानें याला कैलास प्राप्त झाला ( शिवपुराणमाहात्म्य ).

**देवराज वसिष्ठ**—याच्याकरितांच त्र्य्यारुणानें सत्यव्रत त्रिशंकूला हद्दपार केलें व याच्या स्वाधीन राज्य केलें. याच्याकडूनच विश्वामित्रानें आपणांस ब्राह्मण म्हणवून घेतलें ( JRAS १९१७. पा. ४०-६७ ).

**देवराजन्**—ज्यांनीं देवांत राजसूय यज्ञ केला, त्यांना ही संज्ञा लावण्यांत येते. त्यांचीं नांवें–सिंधुक्षित्, दीर्घश्रवस्, पार्थ व कक्षीवत्, अशीं सायणानें दिलीं आहेत. मनुष्यांत ज्यांनीं राजसूय केले, त्यांना मनुष्यराजन् म्हणतात. ह्या शब्दांनीं कांहीं सामें प्रसिद्ध आहेत ( पं. ब्रा. १८. १० .५ ).

**देवरात**—( सू. निमि. ) भागवत व वायु यांच्या मतें सुकेतूचा व विष्णुमतें स्वःकेतूचा पुत्र. याच्या घरीं रुद्रानें धनुष्य ठेविलें होतें. तें सीतास्वयंवराच्या वेळीं रामानें भंगिलें ( वा. रा. अयो. ६६ ) रामायणांत हा निमीपासून सहावा सांगितला आहे ( वा. रा. बा. ७१. ३-६ ), व धनुष्याचा इतिहास सांगतेवेळीं निमीचा पुत्र म्हणूनहि सांगितला आहे ( वा. रा. बा. ६६. ८ ). इतर पुराणांवरून पहिली वंशावळ प्रमाण धरितां येईल. दुसरा सामान्य निर्देश आहे. याचा पुत्र बृहद्रथ ( देवराति पहा ).

२ ( सो. क्रोष्टु. ) भागवत, विष्णु, मत्स्य व पद्म यांच्या मतें करंभाचा पुत्र. वायुमतें करंभकाचा पुत्र. भविष्यमतें यास देवरथ म्हटलें आहे ( पद्म. सृ. १३ ).

३ भागवताप्रमाणें याचा पुत्र याज्ञवल्क्य. वायु व ब्रह्मांड यांत ब्रह्मवाह असा पाठ आहे.

४ एक गृहस्थ. याला कला या नांवाची एक कन्या होती. तिचा पति शोण. कलेला मारीच राक्षसानें ठार मारिल्यावर देवरात व शोण तिच्या शोधाकरितां विश्वामित्राकडे गेले. नंतर ते वसिष्ठाला बरोबर घेऊन शिवलोकीं गेले. कारण, मरतांना दूर केलें ना। कलेच्या सुगंधित निधानामुळें कलेला ती पार्वतीची दासी झाली होती. तेथें पार्वतीच्या सांगण्यावरून सोमव्रतास राहिल्यावर ते परत आले ( पद्म. पा. ११२ ).

५ युधिष्ठिराच्या सभेंतील एक क्षत्रिय (म.स. ४.३२ कुं.).

**देवरात वैश्वामित्र**—विश्वामित्रानें शुनःशेपाचें, त्याला मुलगा म्हणून स्वीकारिल्यावर ठेविलेलें नांव ( ऐ. ब्रा. ७.१७; सां. श्रौ. १५.२७ ). एक गोत्र व प्रवर. हा मंत्रकार होता.

**देवराति**—अंगिराकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**देवल**—एक ऋषि ( क. सं. २२. ११ ). कश्यपगोत्रांतील एक मंत्रकार व प्रवर. यानें हूहू गंधर्वास शाप दिला होता ( भा. ८. ४ ).

असितास एकपर्णेपासून देवल नांवाचा पुत्र झाला. असित देवल व देवल असे दोन्ही प्रकारचे निर्देश येतात. याचा धाकटा भाऊ धौम्य. तो पांडवांचा पुरोहित होता ( असित पहा ).

एक स्मृतिकार. याज्ञवल्क्यावरील मिताक्षरा ( १. १२८ ), अपरार्क, स्मृतिचंद्रिका वगैरे ग्रंथांत देवलाचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें देवलाच्या स्मृतींतील बरेच उतारे मिताक्षरेमध्यें घेतले आहेत ( १. १२० ). स्मृतिचंद्रिकेंत देवलाच्या स्मृतींतील ब्रह्मचाऱ्याचीं कर्तव्यें, ४८ वर्षेपर्यंत पाळावयाचें ब्रह्मचर्य व त्याचप्रमाणें पत्नीचीं कर्तव्यें यांसंबंधींचे उतारे घेतले आहेत ( १. ५२; ६३ ). त्याचप्रमाणें मिताक्षरा, हरदत्ताचा विवरण नामक ग्रंथ, अपरार्क वगैरे ग्रंथ यांमध्यें देवलस्मृतींतील आचार, व्यवहार, श्राद्ध, प्रायश्चित्त व दुसऱ्या इतर गोष्टींसंबंधीं उतारे घेतले आहेत. देवलस्मृति नामक एक नव्वद श्लोकांचा ग्रंथ आनंदाश्रमांत छापलेला आहे. त्यामध्यें फक्त प्रायश्चित्तविधीसंबंधीं सांगितलेलें आहे. परंतु, हा ग्रंथ इतर स्मृतींतील श्लोकांचा केलेला संग्रह असावा. त्याचप्रमाणें हा बराच अर्वाचीन असावा, असें दिसतें. कारण, या स्मृतींतील १७–२२ हे श्लोक व ३०–३१ हे श्लोक विष्णूचे होत असें अपरार्कांत ( ३. १२०० ) सांगितलें आहे. अपरार्क व स्मृतिचंद्रिका यांत देवलाच्या स्मृतींतील दायविभाग, स्त्रीधनावरील स्त्रीची सत्ता वगैरेसंबंधी उतारे घेतले आहेत. यांवरून देवल हा बृहस्पति, कात्यायन वगैरे स्मृतिकारांचा समकालीन असावा, असें दिसतें. याचे सर्वत्र येणारे धर्मशास्त्रपर श्लोक एकत्र करून एक तीनशें श्लोकांचा संग्रह धर्मप्रदीपांत दिला आहे. त्यावरून मूळ स्मृतीच्या वैविध्याची व विस्ताराची चांगली कल्पना येते.

२ शिवानें श्वेत नांवानें दोन अवतार घेतले. त्यांपैकीं दुसऱ्याचा शिष्य.

३ प्रत्यूषाचा पुत्र (म.आ.६७.२६ कुं.; विष्णु.१.१५.१७). याचा भाऊ असित. यानें स्वर्गात जाऊन पितरांना महाभारत निरूपण केलें होतें (म. आ. १. १२४ कुं.; असित पहा).

४ कृशाश्वास धिषणेपासून झालेला पुत्र (भा. ६.६.२०).

५ जनमेजयाच्या सर्पसत्रांतील एक सदस्य (म. आ. ५३. ८ कुं.).

६ ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत ब्राह्मणांतलि हा अग्नीध् होता (पद्म. सृ. ३४).

**देववत्**—याचा सुदास नातू होता (ऋ. ७. १८. २२). याचा रथ अप्रतिहतगति होता (ऋ. ८. ३१. १५). वध्र्यश्व, दिवोदास व सुदास असा वंशक्रम धरल्यास देववत् याचा सुदास हा नातू आईकडून मानावयास पाहिजे.

२ रुद्रसावर्णि मनूचा पुत्र (मनु पहा).

३ (सो. कुकुर.) देवकाचा ज्येष्ठ पुत्र. याचे बंधु उपदेव, सुदेव व देवरक्षित (पद्म. सृ. १३).

४ (सो. वृष्णि.) अक्रूराचा पुत्र (पद्म. सृ. १३).

५ हा पूर्वजन्मींचा केशव. हा विष्णुस्वामीमतानुयायी होता. यानें रामज्योत्स्नामय ग्रंथ केला (भवि. प्रति. ४.२२).

**देववती**—ग्रामणी गंधर्वाची कन्या व सुकेश राक्षसाची पत्नी.

**देववर**—यजुर्वेदी ब्रह्मचारी.

**देववर्णिनी**—भारद्वाज ऋषीची कन्या व विश्रवा ऋषीची पत्नी. हिला वैश्रवण नांवाचा पुत्र होता.

**देववर्धन**—(सो. कुकुर.) भागवतमतें देवकाचा पुत्र (देवरक्षित पहा).

**देववर्मन्**—(मौर्य. भविष्य.) वायु व ब्रह्मांड यांच्या मतें इंद्रपालिताचा पुत्र. यानें सात वर्षे राज्य केलें. यास सोमशर्मा असें नामांतर आहे.

**देववर्ष**—प्रियव्रत राजाचा पुत्र (भा. ५. २०. ९).

**देववात**—देववात व देवश्रवस् हे भरताचे पुत्र होत. यांचें एक संपूर्ण सूक्त आहे. दृषद्वती, सरस्वती व आपया या नद्यांच्या तीरावर यानें यज्ञ केले (ऋ. ३. २३).

**देववीति**—(स्वा. प्रिय.) मेरूच्या नऊ कन्यांतील एक व आग्नीध्रपुत्र केतुमाल याची स्त्री.

**देवव्रत**—(मालिनी पहा).

२ भीष्माचें नांव (म. आ. ६३. ५०; १०७. ७६ कुं.).

३ एक कर्मठ ब्राह्मण. एकदां एका कृष्णाच्या भक्तानें याला कृष्णाचें पूजन करून तीर्थ दिलें असतां, तें यानें अश्रद्धेनें ग्रहण केलें. त्यामुळें याला वेळूचा जन्म मिळाला. परंतु, तीर्थ घेतल्याच्या पुण्यामुळें त्या वेळूची कृष्णानें आपली मुरली केली (पद्म. पा. ७३).

**देवशर्मन्**—एक ऋषि याची स्त्री रुचि (म. अनु. ७५. ७६ कुं.).

२ जनमेजयाच्या सत्रांतील एक सदस्य (म. आ. ५३.९ कुं.).

३ व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील वायुमतें शाकपूर्ण रथीतराचा शिष्य (व्यास पहा).

४ एक सदाचारी ब्राह्मण. हा पित्याचें श्राद्ध योग्य ब्राह्मण बोलावून करीत असे. श्राद्ध केल्यावर एकदां हा अंगणांत बसला असतां, यास कुत्री व बैल यांचें भाषण ऐकूं आलें. त्यावरून यास समजून आलें कीं, हे दोघे आपले आईबाप आहेत व श्राद्धाच्या गडबडींत आपल्या हातून यांची हेळसांड झाली. त्यांना हा जन्म येण्याचीं कारणें विचारण्यास हा गेला असतां, सप्तर्षींतील वसिष्ठानें सर्व प्रकार अंतर्ज्ञानानें जाणून यास सांगितलें कीं, 'तुझी माता रजस्वला असतांना तिनें स्वयंपाक करून ब्राह्मणांस वाढिलें.' त्यास उपाय म्हणून वसिष्ठानें भाद्रपद शुद्ध पंचमीचें म्हणजे ऋषिपंचमीचें व्रत याला सांगितलें. तें यानें केल्यावर याच्या आईबापांचा उद्धार झाला (पद्म. उ. ७७).

५ एक ब्राह्मण. हा समुद्रसंगमावर प्रत्येक पर्वणीला श्राद्ध करी व त्यामुळें याचे पितर प्रत्यक्ष येऊन याला आशीर्वाद देत. हा एकदां पितरांबरोबर पितृलोकीं गेला असतां, याच्या पितरांपेक्षां सुखी असे दुसरे पितर यानें पाहिले व याचें कारण त्या पितरांचीं श्राद्धें महीसागर संगमतीर्थावर होतात, असें याला कळलें. तेव्हां तेथें आपणाहि श्राद्धें करावीत, असा निश्चय करून हा खालीं आला व इतरांच्या साहाय्यानें तसें करून यानें आपल्या पितरांचा उद्धार केला (स्कंद. १. २.३).

६ पुरंदर नामक नगरांत हा ब्राह्मण राहत असे. यानें पुष्कळ पुण्यकृत्यें केलीं, पण मनास शांति मिळेना. शेवटीं भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायानें यास मनःशांति मिळाली (पद्म. उ. १७६).

७ मायापुरांत राहणारा अत्रिकुलांतलि एक ब्राह्मण. याची कन्या गुणवती व जांवई चंद्रशर्मा. चंद्रशर्मा हा याचा शिष्य होता. एकदां हे दोघे अरण्यांत दर्भसमिधा आणावयास गेले असतां, एका राक्षसानें यांचा प्राण घेतला. यांनीं अनेक प्रकारचीं धर्माचरणें केलीं असल्यामुळें हे वैकुंठास गेले (पद्म. उ. ८८; सत्यभामा पहा).

८ कावेरी नदीच्या उत्तर तटावर हा ब्राह्मण राहत असे. यानें कार्तिक महिन्यांत आपल्या पुत्रास स्नानादि कर्मे करण्यास सांगितलें. परंतु त्यानें तें ऐकिलें नाहीं. तेव्हां यानें क्रुद्ध होऊन 'उंदीर हो,' असा त्यास शाप दिला. पुढें त्या मुलानें पित्याची विनवणी केल्यामुळें यानें 'तूं कार्तिकमाहात्म्य ऐकतांच मुक्त होशील,' असें सांगितलें. नंतर तो उंदीर होऊन अरण्यांत गेला. एकदां विश्वामित्र आवळीच्या झाडाखालीं आपल्या शिष्यांना

कार्तिकमाहात्म्य सांगत होते, तें ऐकून तो ब्राह्मणपुत्र मुक्त झाला ( स्कंद. २.४.१२ ).

९ जालंधराचें देवांशीं युद्ध झालें, त्या वेळीं वृंदा व स्मरदूति यांनीं तापस वेषधारी विष्णूला 'तूं कोण' असें विचारिल्यावरून विष्णूनें 'भारद्वाज गोत्रामध्यें माझा जन्म झाला असून माझें नांव देवशर्मा आहे व मी सर्वसंगपरित्याग करून अरण्यांत शिष्यांसह फिरत असतों,' असें सांगितलें ( पद्म. उ. १८ ).

**देवश्रवस्**—(सो. क्रोष्टु.) शूर नांवाच्या राजास मारिषेपासून झालेला पुत्र. कंसभगिनी कंका ही याची स्त्री होती. यास सुवीर व इषुमान् असे दोन पुत्र होते ( भा. ९.२४ ).

२ एक ऋषि ( म. शां. ४६.६ कुं. ). विश्वामित्रकुलोत्पन्न ऋषि व प्रवर. कुशिकगोत्रांतील मंत्रकार.

**देवश्रवस् भारत**—सूक्तद्रष्टा. हा धार्मिक दिसतो ( ऋ. ३. २३. २-३ ).

**देवश्रवस् यामायन**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १७ ). अनुक्रमणींत यास यमपुत्र असें म्हटलें आहे.

**देवश्रेष्ठ**—रुद्रसावर्णि मनूचा एक पुत्र.

**देवसावर्णि**—तेरावा मनु ( भा. ८.१३; ब्रह्मवै. २. ५४ ). या मनूचें नांव ऋतधामा असें आहे ( मत्स्य. ९; मनु पहा ).

**देवसिंह**—पांडुपुत्र सहदेव याच्या अंशानें जन्मास आलेला भीमसिंहाचा पुत्र ( भवि. प्रति. ३.२ ).

**देवसेना**—दक्ष प्रजापतीची कन्या केशी दैत्य हिला पळवून नेत असतां इंद्रानें हिला सोडविलें. पुढें हिनें कार्तिकेयास वरिलें ( म. व. २२६.१; २२९.५२ कुं. ). हें रूपक दिसतें.

**देवस्थान**—एक ब्रह्मर्षि (म. शां. २०.१; ४६.६ कुं. ).

**देवहव्य**—एक ऋषि ( म. स. ७.१९ कुं. ).

**देवहूति**—स्वायंभुव मनूची कन्या व कर्दम प्रजापतीची पत्नी ( भा. ३.१२.५४ ). हिला नऊ कन्या व कपिल नामक एक पुत्र होता (भा. ३.२४). कपिलानें हिला सांख्यशास्त्राचा उपदेश केला. नंतर देहत्याग करून ही नदीरूप बनली ( भा. ९.३३ ).

**देवहोत्र**—एक ऋषि. हा उपरिचर वसूच्या यज्ञामध्यें ऋत्विज् होता.

**देवातिथि काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ४ ). याच्या सूक्तांत रुम, रुशम, श्यावक आणि कृप यांचा उल्लेख आहे ( ऋ. ८. ४. २ ) व शेवटीं कुरुंगाची दानस्तुति केली आहे ( ऋ. ८-४.१९ ). एकदां दुष्काळ पडला असतां हा आपल्या मुलांसह धंद्यमुळें आणण्याकरितां अरण्यांत गेला. तेथें याला काकडीचीं फळें आढळलीं. यानें एक साम म्हणून त्या फळांच्या गाई केल्या ( पं. ब्रा. ९.२.१९ ).

२ ( सो. कुरु. ) क्रोधन व कंडू यांचा पुत्र. याची स्त्री वैदर्भी मर्यादा व पुत्र ऋष्य किंवा रुच ( म. आ. ६३. २२ कुं.; भा. ९.२२.११ ). विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें अक्रोधनाचा पुत्र.

**देवाधिप**—दुर्योधनपक्षीय एक राजा ( म. आ. ६७ ).

**देवानंद**—( सो. मगध. भविष्य. ) प्रियानंद राजाचा पुत्र. यानें वीस वर्षें राज्य केलें.

**देवानीक**—(सू. इ.) क्षेमधन्व्याचा पुत्र ( पद्म. सृ. ८ ).

**देवांतक**—रावणाचा पुत्र. यास मारुतीनें मारिलें ( वा. रा. यु. ६. ७० ).

२ एक राक्षस. हा हिरण्याचा मित्र असून त्याच्या बाजूनें लढत असतां यमहस्तें मृत्यु पावला ( पद्म. सृ. ७० ).

३ एक असुर. हा रौद्रकेतूचा पुत्र. यानें आपल्या कृतीनें सर्व त्रैलोक्य त्रस्त करून सोडिलें. तेव्हां विनायकानें कश्यपाच्या गृहीं अवतार घेऊन याचा नाश केला.

४ कालनेमीचा पुत्र.

**देवापि आर्ष्टिषेण**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ९८ ). याच्या सूक्तांत देवापि आर्ष्टिषेण व शंतनु यांचा उल्लेख आहे. देवापि आर्ष्टिषेण आणि शंतनु हे दोघे कुरुवंशांतील बंधु होते. देवापि वडील भाऊ व शंतनु धाकटा भाऊ होता. तथापि शंतनु गादीवर बसला. त्यामुळें राज्यांत बारा वर्षें अवर्षण पडलें. ब्राह्मण त्याला म्हणाले, 'तूं धाकटा असून गादीवर बसलास, त्यामुळें देव पाऊस पाडीत नाहीं.' तेव्हां शंतनूनें देवापीला राज्यावर बसण्याकरितां बोलाविलें. पण देवापीनें त्याला सांगितलें, 'मी तुझा पुरोहित होतों व यज्ञ करतों म्हणजे पाऊस पडेल.' तेव्हां यानें वरील सूक्त म्हटलें (नि. २.११). याला त्वग्रोग असल्यामुळें यानें राज्य नाकारिलें व हा तपाला गेला. पण शंभर वर्षें अवर्षण पडल्यामुळें भावाच्या विनंतीवरून यानें यज्ञ केला (बृहद्दे. ७. १४८; ८. ७). यावरून क्षत्रिय असूनहि यानें पौरोहित्य केलें, असें दिसतें. बृहस्पतीची स्तुति करून यानें पाऊस पाडला. यानें आपणांस औलान असें म्हणून घेतलें आहे ( ऋ. १०.९८. ११ ). पुराणांत थोड्या फरकानें हीच माहिती उपलब्ध होते.

प्रतीपाला शैब्या सुनंदी नांवाच्या स्त्रीपासून झालेला हा पुत्र ( म. आ. ६३. ४७ कुं. ). भागवत, मत्स्य, वायु व विष्णु यांत हा प्रतीपपुत्र होता, यांत मतभेद नाहीं. याला शंतनु व बाह्लिक असे दोन भाऊ होते. यानें लहानपणींच विरक्तपणा स्वीकारिला ( म. आ. १०१. ४९ कुं.; ह. वं. १. ३२ ).

हा धर्मज्ञानाच्या इच्छेनें विरक्त झाला व वनांत गेला. पुढें हा देवांचा उपाध्याय झाला. याचे पुत्र च्यवन व इष्टक होत (वायु. २. ३७. २३२; ब्रह्म. १३. ११७). हा कुष्ठी होता, म्हणून याला लोकांनीं राजा करूं देण्याचें नाकारिलें (मत्स्य. ५०. ३९).

भागवतांत वरील सर्व गोष्ट दिली आहे व शिवाय, आणखीहि थोडी भर घातली आहे. शंतनूनें जेव्हां देवापीस राज्य स्वीकारण्याविषयीं विनंति केली, तेव्हां शंतनूच्या प्रधानांनीं देवापीकडे कांहीं हुषार ब्राह्मण पाठवून याची बुद्धि पाखंडमताकडे वळविली. शेवटीं शंतनूकडे येऊन हा वेदमार्गाची निंदा करूं लागला. त्यामुळें हा पतित ठरून राज्यास अयोग्य झाला व शंतनूचा दोष गेला (विष्णु. ४. २०. ७). पुढें देवापि कलापि ग्रामांत राहिला. हा देवापि कलियुगांत सोमवंश नष्ट झाला असतां, कृतयुगारंभीं सोमवंशाची पुनः स्थापना करील (भा. ९. २२). हाच पुढें कलियुगांत वर्णाश्रमधर्म नष्ट झाल्यावर पुनः कृतयुगारंभीं वर्णाश्रमधर्माची स्थापना करील (भा. १२. २; विष्णु. ४. २०. ७; ९ सुवर्चस् पहा).

२ यानें पृथूदक तीर्थावर तप करून ब्राह्मणत्व मिळविलें (म. श. ४१. १० कुं.). येथें देवापि व आर्ष्टिषेण भिन्न आहेत.

३ चेदी देशांतील एक क्षत्रिय. याला कर्णानें ठार केलें (म. क. ५१. ४९ कुं.).

४ आर्ष्टिषेण राजाच्या उपमन्यु नांवाच्या पुरोहिताचा पुत्र (मिथु पहा).

**देवार्ह**—(सो. विदू.) वायुमतें हृदीकाचा पुत्र.

**देवावृध**—(सो. क्रोष्टु.) सात्वत राजाचा पुत्र. याचा पुत्र बभ्रु (म. क. ५६). पद्ममतें सात्वताचा दुसरा पुत्र. याला पुत्र नव्हता म्हणून, यानें पर्णाशा नदीचे तीरीं तपश्चर्या केली. तेव्हां नदीनें कन्येचें रूप धारण करून याला वरिलें व तीपासून याला बभ्रु झाला (पद्म. सृ. १३). यानें ब्राह्मणास छत्र दिलें (म. शां. २४०. २१; अनु. २००. ७ कुं.).

**देवी**—एक अप्सरा.

२ प्रल्हादपुत्र विरोचन याची स्त्री (भा. ६. १८.१६).

३ वरुणाची पत्नी. हिला बल नांवाचा पुत्र व सुरा नांवाची कन्या होती (म. आ. ६७. ५२ कुं.; दुर्गा पहा).

**देहिन्**—अमिताभ देवांपैकीं एक.

**दैत्यद्वीप**—गरुडाचा पुत्र (म. उ. १०१. ११ कुं.;).

**दैत्यसेना**—दक्ष प्रजापतीची कन्या व केशी दैत्याची स्त्री (म. व. २२६. १ कुं.).

**दैय्यांपति**—प्लक्षाचें पैतृक नांव (तै. ब्रा. ३. १०. ९. ३-५). शांडिल्यायनानें याला अग्निचितीच्या विटा मांडण्यास शिकविलें (श. ब्रा. ९. ५. १. १४).

**दैर्घतम**—(सो. काश्य.) दीर्घतम्याचा पुत्र. धन्वंतरीचें पैतृक नांव.

**दैर्घतमस**—(कक्षीवत् पहा).

**दैव**—अथर्वन्चें पैतृक नांव.

**दैवत्य**—उपाकर्मांगआचार्यतर्पणांत याचा उल्लेख आहे (जैमिनि पहा).

**दैवराति**—(सू. निमि.) देवरातपुत्र बृहद्रथ याचें पैतृक नांव. यानें केलेल्या अश्वमेधांत याज्ञवल्क्याचा शाकल्याशीं वाद झाल्यावर त्यानें यास तत्त्वज्ञानाचा उपदेश केला (म. शां. ३१५.४ कुं.).

२ (सो. क्रोष्टु.) देवरातपुत्र देवक्षत्राचें पैतृक नांव.

**दैवल**—असिताचें पैतृक नांव.

२ एक ऋषि. यानें हरिस्वामीस शाप दिला होता (भवि. प्रति. २. १२).

**दैववात**—हें सृंजयाचें दुसरें नांव आहे (ऋ. ४. १५. ४). पण हें अभ्यावर्तीचेंहि पैतृक नांव आहे (ऋ. ६. २७. ७). हें अग्नीलाहि लाविलें आहे (ऋ. ३. २३. ३).

**दैवाप**—इंद्रोताचें पैतृक नांव.

**दैवावृध**—बभ्रूचें पैतृक नांव (ऐ. ब्रा. ७. ३४). सायणानें दैवावृध व बभ्रु अशा दोन व्यक्ति मानिल्या आहेत.

**दैवोदास**—भृगुकुलोत्पन्न एक ऋषि.

**दैवोदासि**—प्रतर्दनाचें पैतृक नांव. सुदासाचेंहि हें पैतृक नांव असावें (परुच्छेप व प्रतर्दन पहा).

**दोप**—अष्टवसूंतील एक.

**दोषा**—(स्वा. उत्तान.) पुष्पार्ण राजाची स्त्री. हिला प्रदोष, निशीथ व व्युष्ट असे तीन पुत्र झाले.

**दौरेश्रवस**—पृथुश्रव्याचें पैतृक नांव.

**दौरेश्रुत**—तिमिर्घाचें पैतृक नांव.

**दौर्मुखि**—यशोधराचें पैतृक नांव.

**दौश्शालेय**—दुःशलापुत्र सुरथाचें पैतृक नांव.

**दौश्शासनि**—दुःशासनपुत्राचें पैतृक नांव. हा अभिमन्युवधास फक्त निमित्तमात्र झाला.

**दौष्वन्ति** व **दौष्यन्ति**—भरताचीं पैतृक नांवें.

**द्यावापृथिवी**—यांना ऋग्वेदांत मातापिता असें वारंवार म्हटलेलें आढळतें. द्यो हा पिता व पृथिवी ही माता असा हा संकेत आहे. ही जोडी इंद्र वगैरेंची मातापिता आहे, तसेंच सर्व लोकांचीहि मातापिता हींच होत.

**द्यु**—अष्टवसूंतील एक. एकदां सर्व वसु भार्यासह वसिष्ठाश्रमीं क्रीडा करण्याकरितां गेले असतां त्यांनीं तेथें वसिष्ठाची कामधेनु पाहिली. तिचा अभिलाष धरून त्यांनीं तिला पळवून नेण्याचें ठरविलें. द्यूनें तर आपला बेत तावडतोब अमलांत आणिला. वसिष्ठास आपली कामधेनु गेली, हें कळतांच त्यांनीं त्या सर्व वसूंना ' मनुष्ययोनींत जन्म घ्या, ' म्हणून शाप दिला. त्या शापाप्रमाणें द्यु हा गंगेच्या उदरीं येऊन भीष्म या नांवानें प्रसिद्धीस आला ( म. आ. १०६. १५ कुं. ).

**द्युत**—( धृत पहा ).

**द्युतान मारुत**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ९६; पं. ब्रा. १७. १. ७; ६. ४. २ ). इतर कांहीं ठिकाणीं वायुदेवता असा याचा अर्थ आहे ( वा. सं. ५. २७; तै. सं. ५. ५. ९. ४; ६. २. १०. ४; क. सं. १५. ७; श. ब्रा. ३. ६. १. १६ ).

**द्युति**—द्रुतीचें नामांतर.

**द्युतिमत्**—( सू. इ. ) मदिराश्व राजाचा पुत्र. याचा पुत्र सुवीर ( म. अनु. २. ९ कुं. ).

२ शाल्वदेशीय एक राजा. यानें आपलें सर्व राज्य ऋचीकास दान केलें होतें. त्यामुळें यास मरणोत्तर सद्गति मिळाली ( म. अनु. २००. २३; शां. २४० कुं. ).

३ स्वायंभुव मनूचा एक पुत्र ( पद्म. सृ. ७ ).

४ दक्षसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षीतील एक.

५ आभूतरजस् देवांतील एक.

६ सरस्वती नदीच्या कांठीं असलेल्या भद्रावती नांवाच्या नगरीचा राजा ( पद्म. उ. ४९ ).

७ मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**द्युमणिवत्सल**—( सो. ) भविष्यमतें अरुणोषणाचा पुत्र. यानें २७०० वर्षे राज्य केलें.

**द्युमत्**—स्वायंभुव मन्वंतरांतील वसिष्ठ व ऊर्जा यांचा पुत्र ( मा. ४१. ४१ ).

२ स्वारोचिष मनूचा एक पुत्र ( मनु पहा ).

३ प्रतर्दन राजाचें नामांतर ( प्रतर्दन पहा ).

४ शाल्व राजाचा प्रधान. यास कृष्णानें ठार मारिलें ( भा. १०. ६ ).

**द्युमत्सेन**—शाल्वदेशीय सत्यवान् ऊर्फ चित्राश्व याचा पिता ( सावित्री पहा ).

२ राजसूय दिग्विजयाच्या वेळीं अर्जुनानें याला जिंकिलें ( म.स. ४. ३७; २७. ११ कुं. ). हा कृष्णाकडून मारिला गेला ( म. स. ६१. ७ कुं. ).

३ ( सो. मगध. भविष्य. ) भागवतमतें शमाचा पुत्र. मत्स्यमतें त्रिनेत्राचा पुत्र ( २ दृढसेन पहा ).

**द्युम्न**—( स्वा. उत्तान. ) चक्षुर्मनु व नड्वला यांचा पुत्र ( मनु पहा ).

**द्युम्न विश्वचर्षणि आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. २३ ).

**द्युम्नीक वासिष्ठ**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ८७ ).

**द्योतन**—सायणमतें एक राजा ( ऋ. ६. २०. ८ ).

२ सुतप देवांपैकीं एक.

**द्रविड**—कृष्ण व जांबवती यांचा पुत्र.

**द्राविडा**—( सू. दिष्ट. ) वायुमतें तृणबिंदूची कन्या.

**द्रविण**—पृथु व अर्चि यांचा पुत्र (भा. ५. २३; २४).

२ धर नामक वसूचा पुत्र ( म. आ. ६७. २१ कुं. ).

३ तुषित देवांतील एक.

**द्रविणक**—अग्नीस वसोर्धारेपासून झालेला पुत्र ( भा. ६. ६.१३ ).

**द्राह्यायण ( णि )**—रुद्रभूतीचें पैतृक नांव. द्राह्यायण हा सामवेदाचें श्रौत व गृह्य सूत्र करणारा आहे. याला खादिर असेंहि म्हणतात. हा राणायनीय शाखेचा सूत्रकार होय. हेमाद्रीनें गोभिलाला राणायनीय व कौथुम शाखेचा सूत्रकार मानिलें आहे ( श्राद्धकल्प ). खादिरसूत्र शार्दूलशाखेचें असावें ( भगवद्दत्तकृत जै. उ. ब्रा. प्रस्तावना पा. १७ ).

**द्रुति**—( स्वा. प्रिय. ) नक्ताची स्त्री. हिला गय नांवाचा एक पुत्र होता ( भा. ५. १५. ६ ).

**द्रुपद**—( सो. अज. ) पृषत् राजाचा पुत्र ( म. आ. १५०; भा. ९. २२; ह. वं. १. ३२; वायु. २. ३८; मत्स्य. ५०; ब्रह्म. १३; विष्णु. ४. १९; अग्नि. २७७; गरुड. १. १४० ). पांचालाधिपति पृषत् राजास बराच कालपर्यंत पुत्र झाला नाहीं. म्हणून त्यानें पुत्रप्राप्त्यर्थ तप करावयास सुरवात केली. तप करीत असतां एकदां मेनका नांवाची अप्सरा त्या ठिकाणीं गेली, तिचें लावण्य पाहून पृषत् मोहित झाला व त्याचें वीर्य स्खलन पावलें. त्या वीर्यापासून एक बालक जन्मला, तोच द्रुपद होय ( म. आ. १५०.१० कुं. ). हा मरुद्गणांच्या अंशांनीं झाला ( म. आ. ६७ ). द्रुपदास यज्ञसेन, पांचाल व पार्षत अशीं नांवें आहेत.

द्रुपदाचें अस्त्रशिक्षण व धनुर्विद्याशिक्षण हीं द्रोणाचार्यांचा पिता जो भरद्वाज त्याच्या देखरेखीखालीं झालीं. म्हणून द्रोणाचार्य हा द्रुपदाचा गुरुबंधु होता. धनुर्विद्या पूर्ण झाल्यावर द्रुपदानें भरद्वाजास गुरुदक्षिणा दिली व ' पित्याच्या मागें मी राज्यावर बसल्यावर तुम्ही जर मदतीकरितां माझ्याकडे आलां, तर तुम्हांला लागेल ती मदत मी देईन ' असें द्रोणास सांगितलें होतें. नंतर द्रुपद स्वराज्यांत निघून गेला.

पुढें द्रुपदास राज्याधिकार प्राप्त झाल्यावर द्रोण मदतीकरितां याच्याकडे आला. पण द्रुपदानें मदांध होऊन त्याला मदत दिली नाहींच, पण उलट त्याचा उपहास केला. या अपमानाचा सूड घेण्याकरितां द्रोणानें पांडवांचें आचार्यत्व पतकरून त्यांकरवीं याचा सूड घेतला ( द्रोण पहा ). नंतर द्रोणानें याचें अर्धे म्हणजे उत्तर पांचालाचें राज्य घेऊन उरलेलें परत दिलें. पुढें द्रुपद गंगाकांठीं दक्षिण पांचालांत माकंदी येथें राज्य करूं लागला ( म. आ. १४८.७८ कुं. ). पांचाल म्हणजे सध्यांचें रोहिलखंड.

याप्रमाणें द्रोणानें शिष्यांकरवीं विटंबना केल्यामुळें द्रुपद द्रोणावर अतोनात चिडला व त्याच्या नाशाकरितां उपाय शोधूं लागला. त्याकरितां हा नेहमीं हिंडत असे. हिंडतां हिंडतां एकदां हा उपयाजाच्या सांगण्यावरून याज नांवाच्या काश्यपगोत्रीय ब्राह्मणाच्या आश्रमांत आला. तो ब्राह्मण अति लोभी असल्यानें वाटेल तें कर्म करण्यास तयार असे. द्रुपदानें त्यास उपाय विचारितांच त्यानें यास पुत्रप्राप्त्यर्थ यज्ञ करण्याचा सल्ला दिला. तेव्हां उपयाज व त्याचा भाऊ याज यांच्यासह हा आपल्या नगरास येऊन यानें यज्ञ केला. यज्ञ झाल्यावर सिद्ध केलेला चरु खाण्याकरितां याजानें द्रुपदाच्या सौत्रामणी नांवाच्या बायकोस बोलाविलें. परंतु, तिला येण्यास विलंब लागल्यामुळें उपयाजानें सिद्ध केलेला तो चरु अग्नींतच टाकिला. त्याबरोबर अग्नींतून एक कवचकुंडलधारी देदीप्यमान तरुण व एक श्यामवर्णा स्त्री अशीं दोघें बाहेर पडलीं. त्या दोघांचीं नांवें धृष्टद्युम्न व द्रौपदी अशीं ठेविलीं (म. आ. १६७).

द्रौपदी उपवर झाल्यावर द्रुपदानें तिच्या स्वयंवराची तयारी केली. त्या वेळीं मत्स्ययंत्राचा धनुष्यानें वेध करणाऱ्यास द्रौपदी द्यावयाची, असा यानें पण केला होता. तो पण अर्जुनानें जिंकिला. त्यामुळें द्रुपदानें पांडवांना द्रौपदी दिली. पांडव ब्राह्मणांचीं रूपें घेऊन स्वयंवरास आले असल्यामुळें द्रुपदानें आपला अपमान करून ब्राह्मणांनाच आपली कन्या दिली, असा सर्व राजांचा समज होऊन ते द्रुपदाशीं लढाई करण्यास प्रवृत्त झाले. परंतु पांडवांनीं त्यांचें शौर्यानें निवारण केलें. पुढें द्रुपदानें आपला पुरोहित पांडवांच्या निवासस्थानाकडे पाठविल्यावर कन्या जिंकणारे पांडवच असल्याबद्दल याची खात्री होऊन यास आनंद झाला. नंतर यानें मोठ्या समारंभानें पांच पांडवांशीं द्रौपदीचें लग्न लावून दिलें ( म. आ. २१५ ).

भारतीय युद्धांत द्रुपद पांडवांकडेसच होता. यानें आपल्या पुरोहितास धृतराष्ट्राकडे पांडवांच्या वतीनें संधि करण्याकरितां पाठविलें होतें. परंतु, समेटाचे सर्व प्रयत्न फोल ठरून जेव्हां युद्ध सुरू झालें तेव्हां, हा आपले पुत्र, बांधव व सैन्य यांच्यासह पांडवांच्या मदतीस आला. यानें युद्धांत बराच पराक्रम गाजविला. पुढें रात्रियुद्ध चालू असतां हा द्रोणाचे हातून मार्गशीर्ष वद्य. ११ ला पहाटेस मारिला गेला ( म. द्रो. १८७. ४२ कुं.; भारत-सावित्री ).

द्रुपदास द्रौपदी व धृष्टद्युम्न या दोन अपत्याखेरीज शिखंडी, सुमित्र, प्रियदर्शन, चित्रकेतु, सुकेतु, ध्वजकेतु ( म. आ. २१८. १९ कुं. ), वीरकेतु ( म. द्रो. १२२. ४० कुं. ), सुरथ व शत्रुंजय ( म. द्रो. १५७. १८० कुं. ) अशीं दुसरीं मुलें होतीं. शिखंडी हा जन्माच्या वेळेस स्त्री होता, पण पुढें एका यक्षाच्या प्रसादानें पुरुषत्व पावला. त्याला द्रुपदानें शंकराकडून भीष्मवधार्थ मागून घेतलें होतें.

**द्रुम**—अधिरथ सूताचा पुत्र व कर्णाचा भाऊ. हा भारतीय युद्धांत भीमाकडून मारिला गेला ( म. द्रो. १५६. २७ कुं. ).

२ हा राजा शिबीचा अंशभूत होता ( म. आ. ६८. ८ कुं. ).

३ गंधर्वांचा पुरोहित ( म. स. १०. ३०; ६७. १६ कुं. ).

**द्रुमसेन**—दुर्योधनपक्षीय एक राजा ( म. आ. ६८. ३५ कुं. ). हा धृष्टद्युम्नाचे हातून मारिला गेला ( म. द्रो. १७१. २२ कुं. ).

२ शल्याचा चक्ररक्षक. याला युधिष्ठिरानें ठार मारिलें ( म. श. ११. ५३ कुं. ).

**द्रुमिल**—ऋषभदेव व जयंती यांच्या शतपुत्रांतील एक. हा भगवद्भक्त होता ( भा. ५. ४; ११.४ ).

**द्रुह्य**—द्रुह्यूचें नामांतर.

**द्रुह्यु**—यालाच द्रुह्य असें [illegible] म्हटलें आहे ( ब्रह्म. १२; मत्स्य. २४; विष्णु. ४. १० ). हा शब्द एकवचनीं व अनेकवचनीं मिळून [illegible] आला आहे ( ऋ. १. १०८. ८; [illegible] ८; [illegible] १८. ६; १२; १४; ८. १०. [illegible] ). [illegible] शत्रूंपैकीं होय. दाशराज्ञ युद्धांत यांना [illegible] महत्त्वाचें स्थान होतें. हा इंद्राग्नि व अश्वी यांचा भक्त होता ( ऋ. १. १०८ ८; ८. १०. ५ ).

हा आयुपुत्र नहुष याचा पौत्र व ययाति राजाला शर्मिष्ठेपासून झालेल्या तीन पुत्रांतील एक ( लिंग. १ ६६; वायु. २. ३२; गरुड. १. १३९; अग्नि. २७४; पद्म. सृ. १२ ). अनु व पूरु हे याचे भाऊ होत. ययातीनें सर्व मुलांस एकत्र करून त्यांस आपली जरा घेण्याविषयीं विचारिलें असतां, शर्मिष्ठेपासून झालेल्या पूरु नामक पुत्रानें मात्र ती गोष्ट कबूल केली. तेव्हां राजानें इतरांना शाप देऊन पूरूलाच गादीवर बसविलें.

यानें जरा घेण्याचें नाकारिलें म्हणून याला ' तुझें कल्याण होणार नाहीं, भोगाशा तृप्त होणार नाहींत, जेथें व्यवहार नित्य नावांतून चालतो, तेथें तुला राहावें लागेल, तेथें सुद्धां तुला व तुझ्या वंशाला राज्यपद मिळणार नाहीं,'असा शाप दिला ( मत्स्य. २४; ३२; ३४; ह. वं. १.३०; ब्रह्म. १२; १४६; विष्णु. ४. १०; म. आ. ६९ कुं.; भा. ९; १८ ). याचा वंश बहुतेक पुराणांत आहे.

ययातीनें ही सप्तद्वीप पृथ्वी समुद्रासह जिंकिली होती. तिचे त्यानें पांच भाग करून ते आपल्या पुत्रांना वाटून दिले. त्यांपैकीं पश्चिमेकडील भाग द्रुह्यूला मिळाला ( ह. वं. १.३०). परंतु याचे वंशज भरतखंडाच्या उत्तरेस राज्य करीत होते. याच्या राज्यांत म्लेच्छ लोकांची पुष्कळ वस्ती होती, असें वर्णन आढळतें ( भा. ९. २३ ). द्रुह्यूला पूर्वेकडील राज्य दिलें होतें, असेंहि आढळतें ( लिंग. १. ६७ ). याला बभ्रु आणि सेतु असे दोन पुत्र होते ( ब्रह्म. १३; विष्णु. ४. १७; ह. वं. १. ३२; अग्नि. २७६ ). सेतु व केतु असेहि दोन पुत्र होते ( मत्स्य. ४८ ). शिवाय, द्रुह्यूला एकच बभ्रु नामक पुत्र होता व त्या बभ्रूला सेतु झाला, असेंहि म्हटलेलें आढळतें ( भा. ९. २३ ). हा पाण्यांत बुडून मरण पावला ( ऋ. ७. १८ ). याचे उपाध्याय भृगु होते.

२ मतिनाराचा पुत्र ( म. आ. ८८. १३ कुं. ).

**द्रोण**--आंगिरस गोत्रीय भरद्वाज ऋषीचा पुत्र. भरद्वाज गंगातीरीं तप करीत असतां, एकदां घृताची नामक अप्सरा त्या ठिकाणीं आली. तिचें लावण्य पाहून भरद्वाज मोहित झाला व त्याचें रेत स्खलन पावलें. तें त्यानें द्रोणकलश नांवाच्या यज्ञपात्रांत ठेविलें. त्यापासून पुढें एक पुत्र झाला; तोच द्रोण होय. द्रोणाची उत्पत्ति द्रोणकलशांत झाल्यामुळें याला अयोनिसंभव असें म्हणतात ( म. आ. ६४. १४८; १४०. ३९; १८०. ५ कुं. ). हा प्रत्यक्ष बृहस्पतीच्या अंशानें जन्मला होता ( म. आ. ६८. ६९ कुं. ). हा नारदाच्या अंशानें जन्मला होता ( पद्म. सृ. ७६ ). द्रोणास शोणाश्व, रुक्मरथ व भारद्वाज अशीं दुसरीं नांवें आहेत ( म. आ. १३०; उ. १६६ ).

द्रोण धनुर्वेद व ऋग्वेदादि इतर वेद यांचें अध्ययन आपल्या पित्याजवळच करीत होता. याच्या अग्निवेश नांवाच्या चुलत्यानें याला आग्नेयास्त्र दिलें ( म. आ. १४०.४३ कुं. ). पित्याजवळ शिकत असतां पृषतपुत्र द्रुपद हा द्रोणाचा सहाध्यायी होता. तप करीत असतां एकदां द्रोणास अशी बातमी लागली कीं, जामदग्न्य परशुराम हा ब्राह्मणांना संपत्ति वांटीत आहे. तेव्हां द्रोण द्रव्ययाचनार्थ परशुरामाकडे गेला. परंतु, परशुरामानें आपल्या जवळची सर्व संपत्ति पूर्वीच ब्राह्मणांस वांटून टाकिल्यामुळें परशुरामानें आपल्या जवळील अस्त्रविद्याच याला दिली. याच वेळीं द्रोणास ब्रह्मास्त्र नांवाच्या अस्त्राची प्राप्ति झाली ( म. आ. १८०. १२; १४०; १६६ कुं. ).

अशा प्रकारें द्रोण अस्त्रविद्येंत पूर्णपणें तरबेज झाला. परंतु याला कोणत्याहि तऱ्हेनें धन मिळत नसल्यानें फारच विपन्नावस्था आली होती. म्हणून हा द्रव्यसाहाय्यार्थ द्रुपदाकडे गेला. परंतु द्रुपदानें याचा अपमान केला व याला विन्मुखच परत लाविलें ( म. आ. १४८. ७३ कुं. ). तेव्हां द्रोण द्रुपदावर अत्यंत चिडला व त्याला सूड उगविण्याची संधि पाहूं लागला. त्याकरितां हा कृपाचार्याकडे हस्तिनापुरास येऊन राहिला.

एकदां धार्तराष्ट्र व पांडव विटीदांडू खेळत असतां त्यांची विटी जवळच्याच एका कूपांत पडली. ती त्यांना काढतां येईना. द्रोण जवळच बसला होता. याला त्या कुमारांनीं विटी काढून देण्याविषयीं विनंति केली. द्रोणानेंहि दर्भाच्या साहाय्यानें ती विटी काढून दिली. तेव्हां त्या कुमारांनीं तें घडलेलें वर्तमान भीष्मास सांगितलें. भीष्मास द्रोणाचें मंत्रसामर्थ्य व अस्त्रविद्यानैपुण्य हें पूर्णपणें माहीत होतें. व त्यामुळें द्रोणास मुलांस शिकविण्यास ठेवण्याचा त्याचा विचार होता. म्हणून हा हस्तिनापुरास आला आहे असें कळतांच भीष्मानें यास आपल्या वाड्यांत आणून राजपुत्रांस धनुर्विद्या शिकविण्यास सांगितलें ( म. आ. १३२ ).

नंतर द्रोण कौरवपांडवांना धनुर्वेद शिकवूं लागला असतां त्याच्या कौशल्याची कीर्ति दूरवर पसरली व त्यामुळें देशोदेशींचे राजपुत्र याच्याकडे शिक्षणार्थ येऊं लागले. एकदां एकलव्य नांवाचा एक निषादपुत्र याच्याकडे शिकावयास आला. पण तो निषादाचा पुत्र असल्यानें द्रोणानें त्यास विद्या शिकविली नाहीं.

द्रोणाकडे जरी पुष्कळ राजकुमार शिकावयास येत होते, तरी अर्जुनाची तत्परता व हुषारी पाहून त्याच्यावरच याचें सर्वांपेक्षां जास्त प्रेम होतें. एकदां सर्व शिष्यांना घेऊन द्रोण नदीवर स्नानास गेला असतां एका नक्रानें याचा पाय पकडला. तें पाहून अर्जुनाखेरीज इतर सर्व राजकुमार पळून गेले. परंतु अर्जुनानें यास नक्रापासून सोडविलें. तेव्हां द्रोणानें खुष होऊन अर्जुनास ब्रह्मास्त्र शिकविलें ( म. आ. १४२. १२ कुं. ).

नंतर द्रोणानें आपल्या सर्व शिष्यांच्या धनुर्विद्यानैपुण्याची परीक्षा करविली. तिच्यामध्यें ते चांगल्या तऱ्हेनें तरबेज झाले आहेत, असें याला दिसून आलें. तें पाहून यानें द्रुपदावर स्वारी करण्याचा निश्चय केला. बरेच दिवस मनांत असलेलें उद्दिष्ट द्रुपदाचा आपल्या शिष्यांकडून पराभव करवून सिद्धीस नेण्याची यानें तयारी केली. पुढें लवकरच पांचाल

देशावर स्वारी करून द्रोणानें द्रुपदास जिंकिलें व त्याचें अर्धें राज्य–उत्तर पांचाल– आपल्याकडे ठेवून बाकीचें त्याला देऊन टाकिलें (म. आ. १४८. १३ कुं.).

पुढें कौरवांनीं विराटाचीं गोधनें हरण करविलीं, तेव्हां विराटपुत्र उत्तर अर्जुनासह गाई सोडवावयास गेला असतां, द्रोण कौरवांच्या बाजूनें लढत होता. युद्धांत अर्जुनानें द्रोण व इतर रथी, महारथी यांचा पराभव करून गाई सोडविल्या (म. वि. ५९कुं).

अज्ञातवास पुरा होऊन पांडव यथाकालीं प्रकट झाले व त्यांनीं दुर्योधनाजवळ आपल्या राज्याची मागणी केली. त्याकरितां कृष्णास त्यांनीं शिष्टाईस पाठविलें. त्या प्रसंगीं द्रोणानें दुर्योधनास पुष्कळ उपदेश करून पांडवांचा हिस्सा त्यांना परत देण्यास सांगितलें. परंतु द्रोणाचें हें करणें कर्णादिकांस पक्षपाताचें वाटलें व त्यावरून कर्णद्रोणांची बोलाचाली होऊन प्रकरण हातघाईवर आलें. परंतु भीष्माच्या मध्यस्थीनें तो प्रसंग टळला (म. उ. १३९. २२ कुं.).

दुर्योधनानें कोणाचेंहि न ऐकल्यामुळें पुढें भारतीय युद्धाचा प्रसंग आला. त्या वेळीं द्रोण निरुपायानें कौरवपक्षाकडेच राहिला. कारण, बरेच दिवस कौरवांचेंच अन्न खाऊन त्यांना मदत करण्याचा प्रसंग आला असतां तो टाळणें हें याला प्रशस्त वाटलें नाहीं. भारतीय युद्ध चालू होऊन दहा दिवस झाले; त्या अवधींत कौरवांकडील पहिला सेनापति भीष्म मरण पावला. तेव्हां दुर्योधनानें यालाच सैनापत्य दिलें. याच्या रथाच्या ध्वजावर कृष्णाजिन व कमंडलु यांचें चिन्ह होतें (म. द्रो. २३). यानें पांच दिवस युद्ध करून पांडवसैन्यांत मोठा हाहाःकार उडवून दिला. युद्धाच्या पहिल्या दिवशीं दुर्योधनानें धर्मास जिवंत धरून आणण्याविषयीं यास विनंति केली. तेव्हां यानें अर्जुनाच्या पराक्रमाचें वर्णन दुर्योधनाजवळ केल्यामुळें दुर्योधन व कर्ण यास टोंचून बोलूं लागले कीं, 'तुमच्या मनांतच पांडव विजयी व्हावेत असें आहे. म्हणूनच तुम्ही युद्धांत इतकी कुचराई करतां', (म. द्रो. १८५). तेव्हां कोपाविष्ट होऊन 'पांडवांकडील कोणी तरी मोठा वीर उद्यां मारीन' अशी यानें प्रतिज्ञा केली व त्याप्रमाणें यानें अभिमन्यूस मारिलें (म. द्रो. ४९).

अभिमन्यूचा वध झाला, हें ऐकून अर्जुनानें संतप्त होऊन जयद्रथवधाची प्रतिज्ञा केली. तेव्हां एकांत एक असे तीन व्यूह करून द्रोणानें जयद्रथाच्या संरक्षणाची पराकाष्ठा केली, तरीहि अर्जुनानें त्याला मारलेंच. तेव्हां द्रोणानें रात्रीं व दिवसा युद्ध अव्याहत चालू ठेविण्याची प्रतिज्ञा केली व त्या दिवशीं मशालींच्या साहाय्यानें रात्रींहि युद्ध चालू ठेविलें. तो दिवस युद्ध सुरू झाल्यापासून पंधरावा म्हणजे द्रोणास सैनापत्याभिषेक झाल्यापासून पांचवा होता. दिवसास झालेल्या युद्धानें सर्व वीर दमलेले असतांहि ईर्ष्येनें [illegible] सुद्धां चांगले लढत होते. परंतु त्याच वेळीं कित्येकांस निद्रेनें घेरिलें. तेव्हां ही संधि बरी आहे, असें पाहून भीमानें इंद्रवर्म राजाचा अश्वत्थामा नांवाचा हत्ती मारिला व 'अश्वत्थामा मेला' अशी गर्जना केली. परंतु चिरंजीव असूनहि अश्वत्थामा कसा मेला, या विचारानें आश्चर्ययुक्त होऊन सत्यनिर्णयाकरितां द्रोणाचार्य युधिष्ठिराकडे गेला. युधिष्ठिरानें कृष्णाचें सांगण्यावरून अश्वत्थामा मेला, असेंच सांगितलें. कृष्णानें सांगितलें होतें तरी धर्मानें अश्वत्थामा हत्ती असा शब्द उच्चारिला. पण 'हत्ती' हा शब्द इतका हळू उच्चारिला कीं, तो द्रोणास ऐकूं गेला नाहीं. तेव्हां पुत्रशोकानें विव्हल होऊन यानें शस्त्रसंन्यास केला. इतक्यांत भरद्वाजादि द्रोणाचे पितर त्या ठिकाणीं आले व याला म्हणूं लागले कीं, 'तूं ब्राह्मण असून ज्या अर्थीं क्षत्रियांप्रमाणें युद्ध करून अस्त्रांच्या योगानें पृथ्वीस त्रास दिलास, त्या अर्थीं तूं फारच मोठें पातक केलेंस. तर विलंब न करतां शस्त्र खालीं ठेऊन योगमार्गाचें अवलंबन कर.' हें ऐकून द्रोणानें शस्त्र खालीं ठेविलें. तेव्हां ही संधि बरी आहे, हें पाहून द्रुपदपुत्र धृष्टद्युम्नानें निःशस्त्र द्रोणास खड्गानें ठार मारिलें (म. द्रो. १९२). मार्गशीर्ष वद्य द्वादशीस दुपारीं हा मारिला गेला (भारत सावित्री). याचें वय अशीतिपंचक म्हणजे चारशें वर्षांचें होतें असें नीलकंठ म्हणतो. पण त्याचा अर्थ पंच्यायशीं वर्षांचा असाहि होतो. 'अशीतिकात् परः' असा पाठभेदहि आढळतो. यावरून युद्धकालीं द्रोणाचें वय ऐशी तें पंच्यायशीं ठरतें (म द्रो. १२५. ७३).

यानें द्रुपदपुत्र शंख, (म. भी. ८२. २३ कुं.), वसुदान (म. द्रो. २१. ५५ कुं.), विराट व द्रुपद यांचा वध केला (म. द्रो. १८७. ४२ कुं.).

द्रोणास कृपाचार्याची बहीण कृपी ही दिलेली होती. तिच्यापासून यास अश्वत्थामा नांवाचा पुत्र झाला (म. आ. १४०. ४९ कुं.).

**द्रोण शार्ङ्ग**—मंत्रद्रष्टा (ऋ. १०. १४२. ३-४). एक पक्षी. हा मंदपाल ऋषीचा पुत्र. याच्या आईचें नांव शार्ङ्गी असें होतें. हा मोठा ब्रह्मवेत्ता होता. यानें खांडवदाहसमयीं अग्नीची प्रार्थना करून आपलें व आपल्या भावांचें संरक्षण केलें (म. आ. २५८. १५; कुं; अनु. ५३. २२ कुं.). यानें कंधरकन्या तार्क्षी हिच्याशीं विवाह केला [illegible] पिंगाक्ष, विबोध, सुपुत्र व सुमुख असे चार पुत्र [illegible] ३. ३२; ९. २४).

२ एक वसु. याची स्त्री धरा नांवाची होती. हेच [illegible] नंद व यशोदा झालीं (भा. १०. ८४८. ५०). द्रोणाचे [illegible] अभिमति व हर्षशोकादि पुत्रहि दिले आहेत (भा. ६. ६. ११).

**द्रौणायन**—भृगुकुलोत्पन्न एक ऋषि.

**द्रौणायनि व द्रौणि**—अश्वत्थाम्याचें सदैवचें पैतृक नांव. हा व्यास असतांना हेंच नांव वापरतात ( अश्वत्थामा पहा ).

**द्रौपदी**—सोमवंशांतील द्रुपद राजाची कन्या. ही अयोनिसंभव असून याजोपयाजांनीं केलेल्या यज्ञांत अग्नींतून निघाली होती. ही लक्ष्मीच्या अंशानें जन्मास आली होती ( म. आ. ६८; १८५ ). द्रौपदीस याज्ञसेनी व पांचाली अशीं दुसरीं नांवें होतीं. त्याचप्रमाणें हिच्या कृष्णवर्णावरून हिला कृष्णा असेंहि दुसरें नांव होतें.

द्रौपदी उपवर झाल्यावर हिच्या पित्यानें हिच्या स्वयंवराचा बेत केला. हिच्या स्वयंवरासाठीं निरनिराळ्या देशांचे राजे आले होते. परंतु, त्यांना स्वयंवरांतील मत्स्यवेधाचा पण जिंकितां येईना. शेवटीं तो अर्जुनानें जिंकिल्यामुळें हिनें अर्जुनास माळ घातली. पुढें पांडवांनीं हिला आपल्या राहण्याच्या ठिकाणीं नेलें. नंतर धर्मानें कुंतीस ‘ आम्ही भिक्षा आणली आहे, ’ असें सांगितलें. तेव्हां कुंतीस खरें वाटून तिनें त्यांना नेहमींप्रमाणें ‘ आणलेली भिक्षा पांचजणांत सारखी वाटून घ्या, ’ म्हणून सांगितलें. परंतु तिनें जेव्हां आणलेली भिक्षा द्रौपदी आहे असें पाहिलें, तेव्हां तिला आपल्या सांगण्याचा पश्चात्ताप वाटूं लागला. पण धर्मानें आईचें वचन सत्य करण्याकरितां ‘ द्रौपदी पांचांहिजणांची बायको होईल, ’ असें सांगितलें. द्रुपदाला जेव्हां हा प्रकार कळला, तेव्हां एक स्त्री पांचजणांची बायको होणें हें अशास्त्र आहे, असें त्यास वाटलें व तो विचारांत पडला. परंतु इतक्यांत व्यास मुनि त्या ठिकाणीं आला व त्यानें द्रुपदास सांगितलें कीं, ‘ तुला पांच पति होतील, ’ असा द्रौपदीस शंकराचा वर होता, तेव्हां पांचांशीं लग्न लावणें हा हिच्या बाबतींत अधर्म होत नाहीं. त्यावरून द्रुपदानें हिच्या पूर्वजन्माची हकीकत विचारितांच व्यासानें हिची हकीकत सांगण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, ‘ द्रौपदी ही पूर्वी एक ऋषिकन्या होती. हिनें आपणांस पुढील जन्मीं उत्तम पति मिळावा, म्हणून शंकराची आराधना केली. शंकरानें प्रसन्न होऊन हिला इच्छित वर मागावयास सांगितलें. तेव्हां हिनें ‘ पति द्या, ’ असें पांचदां मागितलें. तेव्हां शंकरानें ‘ तुला पांच पति होतील, ’ असा वर दिला ( म. आ. २१०–२११ कुं. ). तेव्हां पांच पांडव द्रौपदीचे पति होत आहेत. यांत कोणत्याहि तऱ्हेचा अधर्म होत नाहीं.’ हें ऐकून द्रुपदानें द्रौपदीचा पांच पांडवांशीं सुमुहूर्तावर विवाह करून दिला.

ब्रह्मवैवर्त पुराणांत द्रौपदीच्या पंचपतित्वासंबंधीं पुढील उल्लेख आहे. रामपत्नी सीता हिला रावण चोरून नेणार, असें अग्नीस माहीत होतें, म्हणून त्यानें सीतेची एक हुबेहुब प्रतिकृति आपल्या मायेच्या सामर्थ्यानें केली व खऱ्या सीतेस लपवून ठेवून मायावी सीतेसच त्यानें रामाच्या आश्रमांत ठेविलें. यामुळें सीतेस रामाचा वियोग होऊं लागला. त्यामुळें तिनें शंकराची आराधना सुरू केली. शंकरानें प्रसन्न होऊन तिला वर मागण्यास सांगतांच तिनें ‘ पतिसमागम व्हावा, ’ असें पांचदां मागितलें. त्यावरून शंकरानें ‘ तुला पुढील जन्मीं पांच पति होतील ’ असें सांगितलें ( ब्रह्मवै. २.१४ ). पांचहि पांडव एकाच इंद्राचे अंश असल्यामुळें वास्तविक द्रौपदी एकाचीच बायको होती ( मार्क. ५ ). म्हणून पांचहि पांडवांशीं हिचा विवाह झाला. हिचीं बरींच वर्षे आनंदांत गेलीं. राजसूय यज्ञ झाला व हिला प्रतिविंध्यादि मुलेंहि झालीं. परंतु या पांडवांच्या ऐश्वर्यानें दुर्योधनाचा मत्सर वाढून त्यानें द्यूताचा घाट घातला व द्यूत खेळावयास शकुनीला पुढें करून दुर्योधनानें युधिष्ठिराचें सर्व धन जिंकिलें. शेवटीं द्रौपदीहि युधिष्ठिरानें पणाला लाविली. तेव्हां सर्व वृद्ध लोकांनीं युधिष्ठिराचा धिःकार केला. विदुराला सभेंत द्रौपदीला आणावयास सांगितलें असतां, त्यानें दुर्योधनाची चांगलीच कानउघाडणी केली व द्रौपदीला सभेंत आणण्याचें काम प्रातिकामिन्‌वर सोंपविण्यांत आलें. परंतु तोहि भिऊं लागला म्हणून तें काम दुःशासनावर सोंपविलें. दुःशासन द्रौपदीला आणण्याकरितां अंतःपुरांत गेला. तेव्हां द्रौपदी बायकांकडे पळत सुटली. शेवटीं दुःशासन धांवत असणाऱ्या द्रौपदीचे केंस पकडून ओढूं लागला. दुःशासन ओढीत असतां द्रौपदी त्याला म्हणाली, ‘मी रजस्वला असून माझ्या अंगावर एकच वस्त्र आहे. अशा स्थितींत मला सभेंत नेणें योग्य नव्हे. ’ तथापि दुःशासनानें ‘ तूं कोणत्याहि स्थितींत असलीस तरी तुला द्यूतांत जिंकून आम्ही दासी बनविलें आहे, ’ असें म्हणून विसकटलेल्या केंसांची व जिचा पदर खालीं पडला आहे, अशा द्रौपदीला तो सभेंत घेऊन आला. सभेंत आल्याबरोबर द्रौपदीनें आक्रोश करीत सर्वांना प्रश्न टाकला कीं, ‘ धर्मानें आपला प्रथम पण लाविला आणि तो हरल्यावर त्यानें मला पणास लाविलें. तेव्हां मी दासी झालें किंवा नाहीं ? ’ परंतु हिच्या प्रश्नाचें उत्तर कोणालाच देतां आलें नाहीं ( म. स. ८९. २ कुं. ). भीष्मानें कानावर हात ठेविले. ही सारखा हा प्रश्न विचारीत होती आणि हिच्या प्रश्नाचें उत्तर न देतां बाकीचे लोक कानावर हात ठेवून स्वस्थ बसले होते. कर्णदुःशासनादि द्रौपदीची दासी, दासी म्हणून विटंबना करीत होते. अशा स्थितींत भीमाला राग आवरेना व त्यानें ज्या हातानें द्रौपदीला पणाला लावून द्यूत खेळलें गेलें ते धर्मराजाचे हातच जाळण्याकरितां सहदेवाला अग्नि आणावयास सांगितला. पण अर्जुनानें त्याला कसेंतरी शांत केलें. नंतर धृतराष्ट्रपुत्र विकर्ण पुढें होऊन

त्यानें द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर देण्याविषयीं भीष्मादिकांना विनंति केली. पण कोणीच कांहीं उत्तर देईना. तेव्हां विकर्णानेंच ‘पणांत जिंकिल्या गेलेल्या धर्मराजानें द्रौपदी पणाला लावलेली असल्यामुळें ही खरोखर जिंकली गेलीच नाहीं,’ असें सांगितलें. हें सांगितल्याबरोबर विकर्णाची जिकडे तिकडे वाहवा झाली. त्याबरोबर कर्ण ताडकन् पुढें आला आणि म्हणाला, ‘सर्व संपत्ति पणाला लाविल्यानंतर द्रौपदी अजित राहूंच शकत नाहीं, शिवाय द्रौपदी ही अनेक नवऱ्यांची बायको असल्यामुळें ही धर्मशास्त्राप्रमाणें पत्नी नसून दासी आहे, करितां ही सर्व संपत्तीबरोबर जिंकिली गेली आहे. हे दुःशासना, ओढ हिचें वस्त्र आणि ह्या पांडवांचींहि वस्त्रें काढून घे.’ त्याबरोबर पांडवांनीं आपलीं नेसत्या वस्त्रांखेरीज अंगावरील वस्त्रें काढून टाकिलीं. द्रौपदीचें वस्त्र ओढण्याकरितां दुःशासन पुढें धांवला. द्रौपदी असहाय्य स्थितींत परमेश्वराचा धांवा करूं लागली. भीम संतापानें लाल झाला. दुःशासनाचें रक्त पिण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. विदुर पुढें आला व त्यानें द्रौपदीच्या प्रश्नाची सभासदांना परत आठवण दिली व सुधन्व्याची कथा सांगितली ( सुधन्वन् पहा ). द्रौपदी सारखा आक्रोश करीत होती. ‘स्वयंवराच्या वेळीं मी एकदां लोकांच्या दृष्टीस पडल्यें व आज पुनः लोकांच्या दृष्टीस पडत आहें. माझ्या शरीराला वायूहि स्पर्श करूं शकला नाहीं. पण आज भरसभेंत माझी विटंबना चालू आहे.’ असा हिचा आक्रोश चालूं होता. दुःशासनाकडून वस्त्र ओढण्याचें काम चालूंच होतें. पण श्रीकृष्णकृपेनें एकापुढें एक अशीं अनेक वस्त्रें निघून द्रौपदीची अब्रू संरक्षण झाली. त्यामुळें दुःशासनाला आपल्या कृत्याची लाज वाटून तो अधोमुख होऊन आपल्या जागीं बसला ( म. स. ९०. ५३ कुं. ). शेवटीं धृतराष्ट्रानें एकंदर स्थिति पाहून दुर्योधनाची कानउघाडणी केली व द्रौपदीला इच्छित वर देऊन भर्त्यांसह दास्यापासून मुक्त केलें ( म. स. ९३ कुं. ).

पुढें द्रौपदीस युधिष्ठिराच्या द्यूतामुळें लवकरच वनांत जाण्याचा प्रसंग आला. वनवासांत असतांना एकदां दुर्वास ऋषि शिष्यांसह रात्रींच्या वेळीं पांडवांकडे भोजनार्थ आला. त्या वेळीं द्रौपदीचें जेवण झालें असल्यामुळें सूर्यानें हिला दिलेल्या स्थालीमध्यें अन्न पुनः उत्पन्न करणें अशक्य होतें. तेव्हां ऋषींना काय वाढावें, असा हिला प्रश्न पडला व ऋषि आपणांस खचित शाप देणार, असें भयहि वाटूं लागलें. तेव्हां हिनें कृष्णास आळवावयास सुरुवात केली. तेव्हां कृष्णानेंहि हिचें संकट निवारिलें ( म. व. २६४ कुं. ).

पांडव काम्यक वनांत असतां एकदां जयद्रथ त्यांच्या आश्रमास आला. त्या वेळीं पांचहि पांडव मृगयार्थ गेले होते. तेव्हां ही संधि बरी आहे, असें पाहून जयद्रथानें द्रौपदीचें हरण केलें. परंतु इतक्यांत पांडव घरीं येऊन त्यांनीं जयद्रथाला पराजित करून द्रौपदीस सोडविलें. नंतर अपमानाचा सूड म्हणून द्रौपदीनें जयद्रथाचे पांच पाट काढवून त्याला सोडून दिलें ( म. व. २६९. २३ कुं.; जयद्रथ पहा ).

वनवास संपल्यावर अज्ञातवासाकरितां पांडव विराटाच्या घरीं राहिले असतां त्यांत द्रौपदी सैरंध्री म्हणून मालिनी नांव स्वीकारून सुदेष्णेपाशीं राहिली होती. हिनें सुदेष्णेपाशीं राहतांना ‘मी कोणाचें पादसंवाहन आणि उच्छिष्ट भक्षण करणार नाहीं. जर कोणी माझा अभिलाष करील, तर तो माझ्या पांच गंधर्व पतींकडून मारिला जाईल,’ इत्यादि नियम केले होते व ‘तुझे सर्व नियम मी पाळीन,’ असें सुदेष्णेनें मान्य केलें होतें ( म. वि. १६ कुं. ). तेथें असतां कीचक नांवाच्या विराटाच्या सेनापतीनें हिच्याविषयीं पापबुद्धि धरिली. परंतु भीमानें त्याला ठार केलें ( म. वि. १५-२२ ). वनवासांत व इतर वेळींहि हिनें आपला तेजस्वीपणा व प्रौढपणा अनेक वेळां व्यक्त केला आहे ( म. व. २८; २६८; शां. १४ कुं. ).

पांडवांचा वनवास व अज्ञातवास संपल्यावर ते हस्तिनापुरास येऊन कौरवांजवळ राज्याचा हिस्सा मागूं लागले. युधिष्ठिराचा लढाई करण्याचा मानस नव्हता. त्यानें आपल्या भावांशीं सख्य करण्याकरितां दूतहि पाठविला. परंतु द्रौपदी कौरवांनीं केलेल्या अपमानानें जळत असल्यानें हिच्यानें स्वस्थ बसवलें नाहीं. हिनें सर्व पतींना व कृष्णालाहि टोंचून बोलून त्यांचा युद्धाविषयींचा बेत कायम करविला ( म. उ. ८२ ).

पुढें भारतीय युद्धानंतर पांडवांना निष्कंटक राज्य लाभलें. त्या वेळीं द्रौपदीनें बराच सुखोपभोग घेतला. नंतर युधिष्ठिर स्त्री व बांधव यांसह महाप्रस्थानास निघाला असतां, द्रौपदी वाटेंतच पतन पावली. कारण, ही अर्जुनावरच जास्त प्रेम करीत असे ( म. महा. २ ). परंतु कृष्णाचें स्मरण करितांच ही स्वर्गास गेली ( भा. १. १५. ५० ).

हिला युधिष्ठिरापासून प्रतिविंध्य, भीमापासून सुतसोम, अर्जुनापासून श्रुतकीर्ति, नकुलापासून शतानीक व सहदेवापासून श्रुतसेन नांवाचे मुलगे झाले ( म. आ. ६३. ७४; ६४. १६५-१६६; ६८. १२८; २४७. ७५-७६. कुं. ). श्रुतसेनाबद्दल श्रुतकर्मा असा पाठ आढळतो ( भा. ९. २२. २९ ).

**द्वारक**—( सू. इ. ) भविष्यमतें क्षेमधन्व्याचा पुत्र.

**छिगत भार्गव**—हा एका सामाच्या पठणानें स्वर्गास गेला व तेथून मृत्युलोकीं परत आला व पुनः गेला ( पं. ब्रा. १४. ९. ३६ ).

**द्विज**—( सो. अनु. ) हा वायुमतें शूरसेनाचा पुत्र.

**द्विजिह्व**—रावणपक्षीय एक राक्षस ( वा. रा. सुं. ६ ).

**द्वित**—ब्रह्ममानसपुत्र ( भा. १०.८४ ).

२ गौतम ऋषीचा पुत्र ( त्रित पहा ). द्वित आप्त्याच्या नांवावर एक सूक्त आहे ( ऋ. ९.१०३; सुक्तवाह पहा ).

**द्विमीढ**—( सो. पूरु. ) भागवत, मत्स्य व वायु यांच्या मतें हस्तीचा आणि विष्णुमतें हस्तीनराचा पुत्र. पद्मपुराणांत यास दवमीढ म्हटलें आहे ( पद्म. सृ. २३ ). हा एक स्वतंत्र वंश आहे. विष्णु, गरुड व भागवत यांत याविषयीं बराच मतभेद आहे.

**द्विमूर्धन्**—दनुपुत्र एक दानव. हा पृथ्वीदोहनाच्या वेळीं दोग्धा झाला होता व विरोचन वत्स झाला होता ( म. द्रो. ६९.२९ कुं. ).

**द्विविद**—सुषेण वानराचा पुत्र, सुग्रीवाचा प्रधान मैंदाचा भाऊ व नरकाचा मित्र होता. यानें रामास बरेंच साहाय्य केलें होतें. हा दहा हजार हत्तींच्या बलानें युक्त होता.

हा किष्किंधेचा राजा असून राजसूय यज्ञाच्या वेळीं यानें सहदेवास करभार दिला होता ( मैंद पहा ).

कृष्णानें नरकासुरास मारिलें, हें ऐकून हा कृष्ण व बलराम यांना त्रास देऊं लागला. पुढें बलरामाशीं याची लढाई होऊन तींत हा बलरामाच्या हातून मरण पावला ( म. व. २९०.४ कुं.; भा. १०.६७ ).

**द्विवेदिन्**—काश्यप कण्वास आर्यावतीपासून झालेला पुत्र ( भवि. प्रति. १ ६; ४. २१).

**द्वैतरथ**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें हृदीक राजाचा पुत्र.

**द्वैतवन**—भ्वसन्‌चें पैतृक नांव (श. ब्रा. १३.५.४.९).

**द्वैपायन**—पराशरपुत्र व्यास याचें नामांतर (व्यास पहा).

**द्व्यक्षी**—अशोकवनांतील एक राक्षसी.

**द्व्याख्येय**—अंगिरस्‌कुलांतील गोत्रकार.

## ध

**धनक**—( सो. सह. ) भागवतमतें भद्रसेनाचा पुत्र. विष्णु व पद्म यांच्या मतें दुर्दमाचा पुत्र ( पद्म. सृ. १२ ).

**धनंजय**—कद्रूपुत्र सर्प. हा पातालांत राहतो ( भा. ५. २४.३१ ). पूषन्‌बरोबर माघांत फिरतो ( भा. १२.११.३९).

२ वसिष्ठकुलांतील एक ब्राह्मण. यास शंभर स्त्रिया व त्याच मानानें मुलें होतीं. यानें आपलें द्रव्य त्यांस सारखें वांटून दिलें होतें. तरीहि त्या मुलांचे तंटे होतच. त्या तंट्यांस कंटाळून याचा करुण नामक पुत्र भवनाशिनीचे कांठीं राहण्यास गेला ( पद्म. पा. १०५ ).

३ हा वैश्य दक्षिणसमुद्रकांठीं सेतूजवळ राहत असे. याची माता पतीची अवज्ञा करणारी होती. पुढें ती मरण पावल्यावर तिच्या अस्थि घेऊन हा काशीस गेला. पण अस्थि नेण्यास बरोबर घेतलेल्या शबरानें तें अस्थींचें भांडें ' द्रव्याचें भांडें ' समजून लांबविलें. तेव्हां धनंजय पुनः परत त्या शबराच्या घरीं जाऊन त्याच्या स्त्रीस यथेच्छ द्रव्य देण्याचें कबूल करून यानें तें भांडें मागितलें. पण तें शबरानें रानांतच टाकिल्यामुळें याला मिळालें नाहीं ( स्कंद. ४. १. ३० ).

४ हा त्रेतायुगीं एक ब्राह्मण होता. यानें विष्णूची फार भक्ति केली. वस्त्रप्रावरण नसल्यामुळें यानें एक पिंपळाची फांदी तोडिली व त्याची हा शेकोटी करूं लागला. इतक्यांत विष्णु याजपाशीं आला. याच्या अंगावर जखमा झाल्या होत्या. त्याचें यानें कारण विचारिल्यावर विष्णूनें यास अश्वत्थाची फांदी तोडल्यामुळें त्या जखमा झाल्याचें सांगितलें. तेव्हां हा आपली मान तोडण्यास तयार झाला. तेव्हां विष्णूनें यास वर मागण्यास सांगितलें असतां, यानें त्याची भक्तीच मागितली. ( पद्म. क्रि. १२ ).

५ अत्रीच्या कुलांतील त्याची वंशवृद्धि करणाऱ्या पैकीं एक.

६ चालू मन्वंतरांतील सोळावा व्यास ( व्यास पहा ).

७ विश्वामित्रकुलांतील एक ब्रह्मर्षि. हा मंत्रद्रष्टा होता (कुशिक पहा).

८ कुमारीचा पति ( म. उ. ११७. १७ कुं. ).

**धनद**—कुबेरास नांव. तृणबिंदूची कन्या इडविडा, तिचा हा पुत्र ( म. स. ११. ५१ कुं.; भा. ९. २. ३१-३२ ).

३ मरुद्गणांपैकीं तिसऱ्या गणांतील एक.

**धनधर्मन्**—( भविष्य. ) वायुमतें मथुरा नगरींत राज्य करणारा व ब्रह्मांडमतें वैदेशांतील नागवंशी राजा. हा नखवानानंतर होऊन गेला.

**धनपाल**—अयोध्या नगरींतील एक वैश्य. यानें सूर्याचें एक दिव्य मंदिर बांधून एका पुराणिकास एक वर्षभर वेतनावर तेथें पुराण वाचण्यास सांगितलें. पुढें सहा महिन्यांतच हा मेला. तरी सूर्यानें यास विमानांतून स्वतः शेजारीं आणवून याची पूजा केली व ब्रह्मलोकीं जाण्यास सांगितलें ( भवि. ब्राह्म. ९४ ).

२ (सो.) भविष्यमतें सावित्राचा पुत्र. यानें ३००० वर्षें राज्य केलें.

३ सरस्वतीच्या कांठीं असलेल्या भद्रावती नगरींतील एक वैश्य. याला धृष्टबुद्धि नांवाचा दुर्वर्तनी पुत्र होता (धृष्टबुद्धि पहा).

**धनयाति**—(सो.) भविष्यमतें संयातीचा पुत्र.

**धनवर्धन**—कृतयुगांत पुष्करक्षेत्रीं असलेला एक सदाचारी वैश्य. हा एकदां वैश्वदेव करून भोजन करीत असतां बाहेर 'अन्न' असा आवाज ऐकून बाहेर आला. पण बाहेर येतो तों तेथें असा आवाज करणारें कोणीच नव्हतें. तेव्हां परत जाऊन यानें त्याग केलेल्या अन्नाचा पुनः स्वीकार केल्यामुळें याचे त्याच क्षणीं शंभर तुकडे झाले (भवि. ब्राह्म. ३. ४२-४७).

**धनशर्मन्**—मध्यदेशांत राहणारा एक ब्राह्मण. हा एकदां दर्भ, समिधा वगैरे आणण्याकरितां अरण्यांत गेला असतां, त्या ठिकाणीं यानें तीन पिशाचें पाहिलीं. त्यांना पाहून धनशर्म्यानें त्यांना त्यांच्या दुःस्थितीचें कारण विचारिलें. नंतर धनशर्म्यानें त्यांच्या उद्धाराकरितां तीळ व मध यांचें दान करून वैशाखस्नानाचें व्रत केलें. त्या व्रताचें पुण्य यानें त्या पिशाचांना दिलें. त्या पुण्याच्या योगानें तीं पिशाचें मोक्षास गेलीं (पद्म. पा. ९८).

**धनायु**—(सो. पुरूरवस्.) मत्स्यमतें पुरूरव्याच्या पुत्रांतील एक.

**धनिष्ठा**—सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक. ही प्राचेतस दक्षाची कन्या होती.

**धनुर्ग्रह**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

**धनुर्धर**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. हा भीमाच्या हातून मारिला गेला (म. क. ८८.१९-२३ कुं.).

**धनुर्ध्वज**—एक अंत्यज (२ पद्मावती पहा).

**धनुष**—(सो. ऋक्ष.) मत्स्यमतें सत्यधृतीचा पुत्र. याबद्दल सुधन्वन् असा पाठ आहे.

**धनुषाक्ष (धनुषाख्य)**—हा रैभ्य होता. यास वालधि ऋषीचा पुत्र मेधावी यानें त्रास दिला, म्हणून यानें त्याचा नाश करण्याकरितां शाप दिला. पण तो परिणामकारक होईना; तेव्हां त्याकरितां यानें पर्वत पाडून टाकिला व त्याला ठार केलें. कारण, पर्वत पाडल्याशिवाय त्याला मृत्यु नव्हता (म. व. १३७. ५०; शां. ३४४. ७. कुं.).

**धनेयु**—(सो. पुरूरवस्.) विष्णुमतें रौद्राश्वाचा पुत्र. याबद्दल इतरत्र धर्मेयु म्हटलें आहे.

**धनेश्वर**—अवंती नगरांत हा पापी ब्राह्मण राहात असे. हा निषिद्ध पदार्थांचा व्यापार करी. एकदां हा माहिष्मतीस व्यापारास्तव गेला. तो कार्तिक महिना असल्यामुळें याचा अनेक पुण्यात्म्यांशीं व कीर्तन, पुराण, गायन, भजन यांशीं संबंध येई. त्रिपुरी पौर्णिमेचा दिपोत्सवहि यास दिसला. त्याच रात्रीं हा सर्पदंशानें मेला. यास यमानें कल्पपर्यंत नरकांत ठेवण्यास सांगितलें; पण यास अग्निकुंडांतहि त्रास होईना. पुढें नारदानें याचें कारण यमास सांगितलें. नंतर यास नरकदर्शन करविलें व शेवटीं नारदाच्या सूचनेनुसार यास यक्षयोनींत घातलें. तेथें हा कुबेरसेवक झाला (पद्म. उ. ११३-११४; स्कंद. २.४.२९).

**धन्या**—उत्तानपादपुत्र ध्रुव याची पत्नी.

**धन्वन्तरि**—हा समुद्रमंथनाच्या वेळीं समुद्रापासून उत्पन्न झाला. हा सर्व वेदांत निष्णात व मंत्रतंत्रांतहि विशारद होता. हा वैतनेया (गरुडा) चा शिष्य आणि शंकराचा उपशिष्य होता (ब्रह्मवै. ३. ५१). दुर्वासानें इंद्रास शाप देऊन वैभवहीन केलें. तेव्हां तें पुनरपि मिळविण्याच्या हेतूनें देवदैत्यांनीं क्षीरसागराचें मंथन केलें. त्यांतून जीं चौदा रत्नें निघालीं, त्यांत धन्वन्तरि हातांत अमृतकलश घेऊन बाहेर पडला (विष्णु. १. ९; वायु. २. ३०; भा. १. ३. १३; ८.८.३५; दे. भा. ९. ४१; म. आ. १८.५३ कुं.). हा विष्णूचा अवतार होय (भा. १.३.१३; ८.८.३५). हा आयुर्वेदप्रवर्तक देव होता (भा. ८. ८). समुद्रमंथनांतून उत्पन्न झाल्यावर यानें विष्णूपुढें यज्ञांत हविर्भाग मिळावा अशी इच्छा व्यक्त केली. पण विष्णूनें 'ही गोष्ट आतां शक्य नसून पुढें काश्यवंशांत जन्मास आल्यावर होईल, असें सांगितलें (ह. वं. १.२९; ब्रह्मांड. ३.६७). त्याप्रमाणें याला वैश्वदेवांत आहुति आहे.

धन्वंतरीच्या मूर्तीसंबंधीं दक्षिणेकडील व उत्तरेकडील असे दोन पाठ सध्यां उपलब्ध आहेत व त्या तऱ्हांच्या मूर्तीहि केलेल्या आढळतात. दक्षिणेकडील धन्वंतरीची मूर्ति आचार्यांनीं मद्रास येथें प्रसिद्ध केली आहे. उत्तरेकडे काशींत गीर्वाणेन्द्र सरस्वतीकृत प्रपंचसारग्रंथानुसार मूर्ति वैद्य त्र्यंबकशास्त्रीकडे आहे. दोन्ही ठिकाणच्या मूर्तींची तुलना करितां असें आढळून येतें कीं, दोन्ही मूर्ति सारख्या नाहींत. एवढेंच नव्हे तर उजवीकडच्या वस्तु डावीकडे आणि डावीकडच्या वस्तु उजवीकडे असा फरक आढळतो. उदाहरणार्थ—दक्षिणेकडील मूर्तींत उजव्या वरच्या हातांत चक्र आहे, तर काशीच्या मूर्तीच्या हातांत शंख आहे. उजव्या खालच्या हातांत दक्षिणेकडील मूर्तींत जळवा आहेत तर काशीच्या मूर्तीच्या हातांत अमृतकुंभ आहे. याच प्रकारें डाव्या बाजूचीहि स्थिति आहे.

२ (सो. काश्य.) दीर्घतमा राजाचा पुत्र. हा विष्णूचा अवतार असून आठहि प्रकारच्या आयुर्वेदांचा कर्ता होता. याच्या

स्मरणानें सर्व दुःखाचा परिहार होतो. केतुमान हा याचा मुलगा होय ( ब्रह्म. १३. ६५ ). याला यज्ञांत हविर्भाग मिळेल असा वर होता ( विष्णु. ४.९.४ ) पण धन्वंतरीला वैश्वदेवांखेरीज यज्ञांत हविर्भाग आहे असें दिसत नाहीं.

दुसऱ्या युगपर्यायांतील द्वापारांत विष्णुवरानें झालेला सौनहोत्र काशीराजाचा पुत्र. हा गर्भांत असतांनाच याला अणिमादिसिद्धि प्राप्त झाल्या होत्या. यानें आयुर्वेद सुरू केला. यानेंच भारद्वाजापासून भिषक्क्रियेसह आयुर्वेद शिकून त्याचे आठ भाग केले व ते शिष्यांना दिले. हा याच शरिरानें देवत्व पावला. याला केतुमान हा मुलगा होता ( वायु. २. ३०; ब्रह्मांड. ३. ६७ ). काश्यवंशांत धन्वंतरीचा पौत्र किंवा प्रपौत्र दिवोदास आहे. दिवोदास धन्वन्तरीनें सुश्रुतादिकांना सध्याची सुश्रुतसंहिता सांगितली. या नांवानें बरेच वैद्य संबोधिले जातात. पैकीं भेल, दिवोदास, पालकाप्य हे होत. विक्रमादित्याच्या दरबारांतील नऊ रत्नांतहि एक धन्वंतरि होता.

सर्पदेवता मनसा व वैद्यविद्यासंपन्न धन्वंतरि राजा यांजमधील विरोधासंबंधीं हकीकत ब्रह्मवैवर्त पुराणांत आली आहे.

एके दिवशीं धन्वंतरि आपल्या शिष्यांसह कैलासास चालला असतां, वाटेंत तक्षक सर्प रागानें आपले विषारी फूत्कार टाकीत याच्या अंगावर येऊं लागला. याच्या शिष्यांपैकीं एकास औषधि माहीत असल्यामुळे तो मोठ्या अभिमानानें पुढें झाला व त्यानें त्या तक्षकास धरून त्याच्या डोक्यावरील मणि काढून तो जमिनीवर फेंकून दिला. ही बातमी सर्पांचा राजा वासुकि यांस समजतांच त्यानें हजारों विषारी सर्प द्रोण, कालीय, कर्कोट, पुंडरीक आणि धनंजय यांच्या नेतृत्वाखालीं पाठविले. त्यांच्या श्वसोच्छ्वासानें बाहेर आलेल्या विषारी वायूनें धन्वंतरीचे शिष्य मूर्च्छित झाले. धन्वंतरीनें वनस्पतिजन्य औषधानें त्यांना सावध करून त्या सर्पांना अचेतन केलें. हें वासुकीस समजतांच त्यानें शिवशिष्या मनसा हिला पाठविलें. ती आणि गरुड हीं शिवभक्त असून धन्वंतरि हा गरुडाचा अनुयायी होता. मनसा धन्वंतरि होता तेथें आली व तिनें याच्या सर्व शिष्यांस अचेतन केलें. या वेळीं धन्वंतरीस शिष्यांस सावध करितां आलें नाहीं. तिनें खुद्द धन्वंतरीसहि मंत्रतंत्रानें अपाय करण्याचा प्रयत्न केला पण तो निष्फळ झाला. तेव्हां ती शिवानें दिलेला त्रिशूल घेऊन याच्यावर फेंकणार, तोंच शिव आणि ब्रह्मा हे तेथें आले आणि त्यांनीं तें भांडण मिटविलें. शेवटीं मनसा व धन्वंतरि यांनीं एकमेकांची पूजा केली. यानंतर सर्व सर्प, देव, मनसा आणि धन्वंतरि हे आपापल्या स्थळीं गेले ( ब्रह्मवै. ३. ५१ ).

धन्वंतरीसंबंधीं याशिवाय इतरहि कांहीं गोष्टी सांपडतात, त्या पुढें दिल्या आहेत.

३ हा सूर्यांशानें काशींत कल्पदत्त ब्राह्मणाचे पोटीं आला. कलिकृत व्याधींचा नाश करण्यासाठीं हा जन्मला होता. यानें काल्प ( काल्प म्हणजे रोगानें क्षीण झालेला देह ) वेद रचिला. सुश्रुत राजपुत्र व वृद्ध ब्राह्मण याचे शिष्य होते. काल्पवेदाच्या दर्शनानें रोग नाहींसे होत. सुश्रुतानें त्याचें पठण करून शंभर अध्यायांचें अश्रुत तंत्र केलें ( भवि. प्रति. ४. ९.१६-२३ ). धन्वंतरि कृष्णचैतन्याकडे गेला व प्रकृतिपेक्षां पुरुष श्रेष्ठ असें म्हणाला. पण कृष्णचैतन्यानें दोन्हींहि श्रेष्ठ सांगितलीं. तेव्हां हें यास पटून हा त्याचा शिष्य झाला. याला पुष्कळ शिष्य होते. यानें सुश्रुताला आयुर्वेद सांगितला ( भवि. प्रति. ४. २०; अग्नि. २७९. १ ). विष्णूनें गरुडाला आयुर्वेद शिकविला ( गरुड. १. १९७.५५ ).

४ महर्षि गालव लांकडें आणि दर्भ आणण्याकरितां वनांत गेला असता, पुष्कळ फिरल्यामुळें त्याला अत्यंत तहान लागली. इतक्यांत त्याला एक मुलगी पाणी नेत असलेली दिसली. त्यानें तिला पाणी मागितल्याबरोबर तिनें त्यास तें दिलें. तेव्हां त्यानें तिला 'चांगला पुत्र होईल,' असा आशीर्वाद दिला. तिनें सांगितलें कीं, 'माझें अद्यापि लग्न झालें नाहीं.' कोण, कोणाची असे प्रश्न करितां तिनें सांगितलें कीं, 'मी वैश्याची मुलगी असून माझें नांव वीरभद्रा असें आहे.' तिला घेऊन गालव ऋषिसमुदायांत आला. तेव्हां सर्वांनीं त्याचें अभिनंदन करून वीरभद्रा नांवाच्या वैश्येचे ठिकाणीं धन्वंतरि होईल, असें भविष्य वर्तविलें. आणि दर्भाचा पुरुषाच्या आकृतीचा एक पुतळा करून तिच्या हातांत देऊन त्याची प्राणप्रतिष्ठा केली. तेव्हां त्यापासून तिला एक सुंदर पुत्र झाला. तो ब्राह्मणानें वैश्य स्त्रीचे ठिकाणीं उत्पन्न केला, म्हणून अम्बष्ठ जातीचा झाला व त्याचें नांव अमृताचार्य असें ठेवण्यांत आलें. तोच धन्वंतरि होय ( अम्बष्ठाचारचन्द्रिकोध्दृतपुराणवचनानि ).

धन्वंतरीनें आयुष्यभर इंद्रापाशीं अध्ययन केलें आणि हा काशींत बाहुजाच्या घरीं अवतीर्ण झाला. तेथें याचें नांव दिवोदास असें होतें. बालपणींच हा विरक्त होता. मोठ्या प्रयत्नानें याला काशीचा राजा बनविलें ( भावप्रकाश १. १ ).

धन्वंतरीच्या नांवावर खालील ग्रंथ प्रसिद्ध आहेत. १ चिकित्सातत्त्वविज्ञान, २ चिकित्सादर्शन, ३ चिकित्साकौमुदी, ४ अजीर्णामृतमंजरी, ५ रोगनिदान, ६ वैद्यचिंतामणि, ७ वैद्यप्रकाशचिकित्सा, ८ विद्याप्रकाशचिकित्सा, ९ निघंटु,

१० चिकित्सासारसंग्रह, ११ भास्करसंहितेंतील चिकित्सातत्त्वविज्ञानतंत्र ( ब्रह्मवै. २. १६ ). यानें वृक्षायुर्वेद, अश्वायुर्वेद व गजायुर्वेद सांगितला आहे ( अग्नि. २८२ ).

**धन्विन्**—तामस मनूचा एक पुत्र.

**धमति**—अंगिराकुलांतील ऋषि. धूनति असा पाठभेद आहे.

**धमनि**—ह्राद नामक असुराची स्त्री. हिचे पुत्र इल्वल व वातापी ( भा. ६. १८.१५ ).

**धम्मिल्ला**—अनुशाल्व राजाची स्त्री ( जै. अ. ६१ ).

**धर**—धर्म व वसु यांचा पुत्र. याची स्त्री मनोहरा. याचे पुत्र द्रविण, हुतहव्यवह, शिशिर, प्राण, रमण ( विष्णु. १. १५ ) व रज ( ब्रह्मांड. ३. ३. २१-२९ ) यास फक्त द्रविण व हुतहव्यवह असे दोन पुत्र होते ( म. आ. ६७. २१ कुं. ).

२ सोमाचा पुत्र.

३ पांडवपक्षीय एक राजा ( म. द्रो. १५९. ३८ कुं. ).

**धरापाल**—विदिशा नामक नगरीचा राजा. पूर्वी देवीनें आपल्या एका गणाला ‘ तूं कोल्हा होशील, ’ असा शाप दिला. त्यानें वेतसी व वेत्रवती या नद्यांच्या संगमीं प्राणत्याग केल्यावर त्यास नेण्याकरितां विमान आलें. हें पाहून धरापालानें तेथें एक विष्णूचें देऊळ बांधिलें व त्यांत एका पुराणज्ञ माणसास पुराण सांगण्यास नेमिलें. नंतर तो मेल्यावर त्यास यमधर्मानें विमानांतून स्वर्गांत आणिलें ( पद्म. उ. २८ ).

**धरिणी**—अग्निष्वात्तादि पितरांची मानसकन्या. हिला वयुना नामक एक बहीण होती.

**धरुण आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. १५ ).

**धर्म**—स्वायंभुव मन्वंतरांत ब्रह्मदेवाच्या उजव्या स्तनापासून उत्पन्न झालेला मानसपुत्र (मत्स्य. ३. १०; भा. ३. १२. २५ ). हा बुद्धीपासून झाला. हा एक प्रजापति होता. धर्माला दक्ष प्रजापतीनें आपल्या तेरा कन्या भार्यार्थ दिल्या होत्या. त्यांचीं नांवें अनुक्रमें श्रद्धा, मैत्री, दया, शांति, तुष्टि, पुष्टि, क्रिया, उन्नति, बुद्धि, मेधा, तितिक्षा, ह्री आणि मूर्ति. यांपैकीं बारा स्त्रियांना अनुक्रमें प्रत्येकीस शुभ, प्रसाद, अभय, सुख, मुद, स्मय, योग, दर्प, अर्थ, स्मृति, क्षेम प्रश्रय असे पुत्र, आणि मूर्तीस नरनारायण या नांवाचे ऋषि झाले ( भा. ४. १; ब्रह्मांड. २. ९. ५० ). याच्या स्त्रिया—कीर्ति, लक्ष्मी, धृति, मेधा, पुष्टि, श्रद्धा, क्रिया, बुद्धि, लज्जा व मति ( म. आ. ६७. १४ कुं. ). याला सत्या या नांवाची मुलगी होती. ती यानें शंयु नामक अग्नीस दिली (म. व. २२१. १२ कुं.).

२ भागवतांत पुनः दुसऱ्या ठिकाणीं निराळी माहिती आली आहे. तेथें धर्मास भानु, लंबा, ककुप्, यामी (जामि), विश्वा, साध्या, मरुत्वती, वसु, मुहूर्ता आणि संकल्पा या दहा स्त्रियांपासून देवऋषभ, विद्योत, संकट, स्वर्ग, विश्वेदेव, साध्यगण, मरुत्वान्, जयंत, मुहूर्ताभिमानी देवगण, संकल्प, द्रोण, प्राण, ध्रुव, अर्क, अग्नि, दोष, वसु, आणि विभावसु हे पुत्र झाले ( भा. ६. ६. ४-१०; मत्स्य. ५; २०३; विष्णु. १. १५. १०६-११० ). ही माहिती पूर्वीचा धर्म महादेवाच्या शापानें नाश पावला, तो पुनः वैवस्वत मन्वंतरांत ब्रह्मदेवानें उत्पन्न केला त्या वेळची आहे ( वायु. १. ४ ). ककुप्च्या ऐवजीं अरुंधती असें नांव आढळतें (ब्रह्मांड. ३. ३. १.४४; वसु पहा ). धर्म वगैरे दर युगांत उत्पन्न होत व लय पावत युगभेदानें माहितींत फरक असल्यामुळें घोटाळा वाटतो असें पुराणांतहि म्हटलें आहे ( विष्णु. १. १५. ८४; १०६-११०; पितर पहा ).

३ यमाचें नांव ( भा. ९. २२. २७ ).

४ ( सो. वृष्णि. ) लिंगमतें अक्रूराचा पुत्र.

५ ( सो. द्रुह्यु. ) गांधाराचा पुत्र. याचा पुत्र धृत.

६ ( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें पृथुश्रव्याचा पुत्र ( तम पहा ).

७ ( सो. सह. ) हैहय राजाचा पुत्र. यास धर्मतत्त्व व धर्मनेत्रहि म्हटलें आहे.

८ एक ब्रह्मर्षि. याची स्त्री धृति (म. उ. ११७. १५. कुं.).

९ उत्तम मन्वंतरांतील सत्यसेन अवताराचा पिता. याची स्त्री सूनृता ( भा. ८. १. २५ ).

१० चाक्षुष मन्वंतरांतील अवतार. याचे पुत्र नरनारायण ( दे. भा. ४. १६ ).

११ सुतप देवांपैकीं एक.

१२ ( भविष्य. ) विष्णुमतें रामचंद्राचा पुत्र.

१३ ( सो. मगध. भविष्य. ) विष्णुमतें सुव्रताचा पुत्र व इतरत्र यास धर्मनेत्र, धर्मसूत्र व सुनेत्र अशीं नांवें आहेत.

१४ ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांतील सदस्य ( पद्म. सृ. ३४ ).

१५ एक धार्मिक वैश्य. हा गिऱ्हाइकांशीं फारच सचोटीनें वागे ( नरोत्तम पहा; पद्म. सृ. ५० ).

१६ एक व्यास ( व्यास पहा ).

१७ ( सो. क्षत्र. ) वायुमतें दीर्घतम्याचा पुत्र.

**धर्मकेतु**—( सो. क्षत्र. ) भागवतमतें सुकेतनाचा आणि विष्णु व वायु यांच्या मतें सुकेतूचा पुत्र.

**धर्मगुप्त**—सोमवंशीय नंद राजाचा पुत्र. हा एकदां अरण्यांत गेला असतां, संध्याकाळीं एका उंच शिलातलावरच्या झाडावर बसला. तेव्हां तेथें एक अस्वल आला. त्याच्या पाठीमागें सिंह लागला होता. तो या राजाला म्हणाला, 'तुला भिण्याचें कांहीं कारण नाहीं. मी सिंहाच्या भीतीनें येथें आलों आह. तरी ही रात्र आपण दोघे येथें काढूं. अर्धी रात्र तूं जाग व अर्धी मी जागून तुझा सांभाळ करीन.' त्याप्रमाणें राजा निजला असतां खालीं असलेला सिंह त्या अस्वलाला म्हणाला कीं, 'तूं राजाला खालीं टाकून दे.' त्यानें तें नाकारिलें व 'विश्वासघात करणें हें मोठें पाप आहे' असें तो म्हणाला. पुढें राजाला त्यानें उठविलें व आपण निजला. तेव्हां सिंह राजाला म्हणाला कीं, 'तूं अस्वलाला टाकून दे.' राजाला दुर्बुद्धि होऊन यानें अस्वलाला खालीं ढकलिलें. इतक्यांत अस्वल सावध होऊन झाडांतच सावरला गेला. त्यानें क्रोधानें राजाची निंदा केली व 'तूं वेडा होशील' असा शाप देऊन तो म्हणाला, 'मी भृगुकुलांतील ऐच्छिक रूप धारण करणारा ध्यानकाष्ठ नांवाचा ऋषि आहें. मला तूं विश्वासघातानें ढकलून देत होतास म्हणून मी तुला हा शाप दिला आहे.' सिंहालाहि तो म्हणाला, 'अरे, तूं भद्र नांवाचा यक्ष असून तूं कुबेराचा सचिव होतास. गौतम ऋषीच्या आश्रमासमोर निर्लज्जपणें स्त्रीसह क्रीडा केल्यामुळें, गौतमानें तुला, 'सिंह होशील,' म्हणून शाप दिला. हें ऐकून सिंह पुनः यक्ष झाला व त्याला 'ध्यानकाष्ठ ऋषीचा संवाद झाल्यावर तूं मुक्त होशील,' असें गौतम ऋषीचें वाक्य आठवलें. नंतर तो सिंह अलकापुरीस विमानांतून गेला. पुढें राजा वेडा झाल्याचें ऐकून नंद राजा राजधानीस आला व त्यानें जैमिनि ऋषीस मुलाच्या वेडाबद्दल उपाय विचारिला. त्यानें पुष्करणी तीर्थावर स्नान करण्यास सांगितल्यावर राजानें त्याप्रमाणें केलें. त्यामुळें त्याच्या मुलाचें वेड गेलें व पुनः तो तप करण्यास वनांत गेला (स्कंद. २. १. १३).

**धर्मजालिक**—(बाल पहा).

**धर्मतत्त्व**—(सो. सह.) वायुमतें हा हैहयपुत्र (७ धर्म पहा).

**धर्मदत्त**—एक ब्राह्मण. हा करवीर नगरांत राहत असे. हा एकदां पूजासाहित्य घेऊन देवळांत जात असतां याला कलहा नांवाची एक राक्षसी भेटली. तिला पाहातांच हा भीतीनें गर्भगळित झाला; परंतु तितक्यांतच थोडासा धीर धरून यानें जवळचें पूजासाहित्य त्या राक्षसीच्या तोंडावर मारिलें. तेव्हां तिच्या अंगावर त्या पात्रांतील तुलसीपत्र पडलें व त्यामुळें तिला आपल्या पूर्वजन्माचें स्मरण होऊन तिनें आपला क्रूर स्वभाव टाकिला व दुष्ट अशा राक्षसयोनींतून सुटण्यास तिनें धर्मदत्ताला उपाय विचारिला. तेव्हां धर्मदत्तास तिची दया येऊन यानें आपलें कार्तिकव्रताचें पुण्य तिला दिलें. त्यायोगानें तिचा उद्धार झाला (पद्म. उ. १०६–१०८; स्कंद. २. ४. २४–२५). कार्तिकव्रतानें पुढल्या जन्मीं हा दशरथ झाला व कलहा त्याच्या अर्ध्या पुण्यामुळें कैकेयी झाली (आ. रा. सार. ५).

२ कश्यपाचा स्नेही. हा कश्यपपुत्र गजाननास नेहमीं आपल्या घरीं भोजनास नेत असे (गणेश. २. १४).

**धर्मदृश**—(सो. वृष्णि.) विष्णुमतें श्वफल्काचा पुत्र.

**धर्मद्रवा**—ब्रह्मदेवाच्या सात भार्यांतील एक. हीच गंगा. हिला ब्रह्मदेवानें आपल्या कमंडलूंत ठेविलें होतें. वामनावतारीं देवांस निर्भय केल्यावर ब्रह्मदेवानें विष्णूच्या पायांवर ही घातली. ही हेमकूट पर्वतावर पडली असतां, शंकरानें जटेंत धारण केली. भगीरथानें ऐरावतास विनंति केल्यावरून त्यानें आपल्या दांतांनीं हेमकूटास तीन भोकें पाडली व त्या मार्गानें गंगा आली म्हणून तिला त्रिस्रोता असें म्हणतात (पद्म. सृ. ६२).

**धर्मध्वज**—रथध्वज राजाचा पुत्र. यास तुलसी नांवाची कन्या होती.

२ (सू. निमि.) भागवतमतें कुशध्वज जनकाचा पुत्र. यास कृतध्वज व मितध्वज असे दोन पुत्र होते. हा पंचशिखाचा शिष्य होता (म. शां. ३२५. ४-२४ कुं.). हाच जनदेव असावा.

**धर्मध्वजिन्**—जनककुलांतील एक क्षत्रिय. यास असितानें पृथ्वीगीता सांगितली (विष्णु. ४. २४). पण देवलानें सांगितली असेंहि आहे (पद्म. उ. १९७).

**धर्मन्**—(सू. इ. भविष्य.) विष्णुमतें हा बृहद्राजाचा पुत्र. याबद्दल धर्मिन् व बर्हि अशीं नांवें आहेत.

**धर्मनारायण**—एक व्यास (व्यास पहा).

**धर्मनेत्र**—(सो. सह.) विष्णु, मत्स्य व पद्म यांच्या मतें हैहयाचा पुत्र (पद्म. सृ. १२; ७ धर्म पहा).

२ (सो. मगध. भविष्य.) वायुमतें भुवनाचा पुत्र व ब्रह्मांडमतें सुव्रताचा पुत्र. यानें पांच वर्षें राज्य केलें (१३ धर्म पहा).

**धर्मपाल**—दशरथाचा अमात्य (वा. रा. अयो. ७).

२ (सो) भविष्यमतें आनंदवर्धनाचा पुत्र. यानें २७०० वर्षें राज्य केलें.

**धर्मबुद्धि**—एक चोलवंशीय राजा. पुढें नास्तिकांच्या नादीं लागल्यानें याला मेंढ्याचा जन्म आला. त्या जन्मीं सुलोचनेनें याला मारिलें. या वेळीं सुलोचना वीरवर नांवानें पुरुष वेशांत होती. तो मेंढा गंगासागरसंगमतीर्थीं मेल्यानें उद्धरला व विष्णुदूतांबरोबर जात असतां वाटेंत

वीरवररूपी सुलोचनेस ' तुझी पतीशीं गांठ पडेल ' असा यानें वर दिला ( पद्म. क्रि. ६ ).

**धर्मभृत्**—दंडकारण्यांत राहणारा एक ऋषि. यानें रामास पंचाप्सर सरोवराची माहिती व तेथें होणाऱ्या चमत्कृतिजनक आवाजाचें कारण सांगितलें ( वा. रा. अर. ११ ).

२ मत्स्यमतें अक्रूराचा पुत्र व वायुमतें श्वफल्काचा पुत्र.

**धर्ममूर्ति**—बृहत्कल्पांतील एक राजा. याची स्त्री भानुमती. शिवाय याला दहा हजार स्त्रिया होत्या. याचा कुलगुरु वसिष्ठ. पूर्व जन्मीं हा एका वेश्येच्या येथें सोनार असून यानें केलेला सुवर्णवृक्ष त्या वेश्येनें ब्राह्मणांना दान केला, म्हणून या जन्मीं हा भार्येसहित वैभवसंपन्न राजा झाला. पूर्वी हा शूद्र नंतर खेकडा वगैरे जन्म पावून स्वर्गद्वारेश्वरासमोर मेल्यामुळें पुढें वैभवसंपन्न राजा झाला अशीहि हकीकत आढळते ( पद्म. सृ. २१; स्कंद. ५. २. २२ ).

**धर्मरथ**—( सो. अनु. ) दिविरथ राजाचा पुत्र. याचा पुत्र चित्ररथ ऊर्फ रोमपाद किंवा लोमपाद.

२ ( सू. इ. ) सगराचा एक पुत्र. हा कपिलाच्या शापांतून वांचला होता ( पद्म. उ. २० ).

**धर्मराज**—गौडाधिपति गुणशेखराचा पुत्र. यानें जैन धर्माचे वैदिक धर्मावर हल्ले सुरू असतां स्वतः वैदिक धर्माचा स्वीकार केला व आपल्या कृतीनें त्याचें श्रेष्ठत्व सर्वांस दाखवून दिलें. त्याचप्रमाणें यानें आपल्या पित्यास उद्धरिलें ( भवि. प्रति. २. १० ).

**धर्मवर्ण**—हा ब्राह्मण कलियुगाच्या शेवटीं आनर्त देशांत राहत असे. हा पितृलोकीं गेला असतां तेथें याचे पितर दूर्वांच्या टोकांच्या आधारांवर लोंबत असलेले याला दिसले. त्यांनीं आपल्या उद्धाराकरितां याला विवाह करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें यानें करून पुत्र झाल्यावर हा गंधमादनावर गेला ( स्कंद. २. ७. २२ ).

**धर्मवर्मन्**—( सो. वृष्णि. ) मत्स्यमतें अक्रूराचा पुत्र.

**धर्मवल्लभ**—पुण्यपूरचा राजा. याचें आपल्या सत्यप्रकाश नांवाच्या मंत्र्याबरोबर अध्यात्माविषयीं संभाषण झालें ( भवि. प्रति. २. ११ ).

**धर्मवृद्ध**—( सो. वृष्णि. ) श्वफल्काच्या पुत्रांपैकीं एक ( भा. ९. २४. १६ ).

२ (सो. क्षत्र. ) वायुमतें हा आयूचा पुत्र. यालाच क्षत्रवृद्ध म्हणत असावेत. कारण, वायूमधील क्षत्रवृद्ध वंशास धर्मवृद्ध या नांवानेंच आरंभ केला आहे.

**धर्मव्याध**—मिथिला नगरींत राहणारा एक व्याध. यानेंच तपानें गर्वित झालेल्या कौशिक ब्राह्मणास उपदेश केला ( म. व. २०६–२१६ ). याला अर्जुन व अर्जुनी अशीं दोन अपत्यें होतीं. अर्जुनी प्रौढ झाल्यावर मतंग ऋषीचा पुत्र प्रसन्न याच्याशीं तिचा विवाह झाला. धर्मव्याध अत्यंत धार्मिक होता. याचीं पंचमहायज्ञ, अग्निपरिचर्या व श्राद्धादि कर्में कधींहि चुकत नसत. परंतु हीं सर्व हा मृगयेवर करीत असे. एकदां अर्जुनीची सासू तिला लागून बोलली कीं, ' ही जीवघात करणाराची कन्या आहे, हिला तप करणारांचे आचार काय कळणार आहेत ?' हें धर्मव्याधाला समजल्यावर यानें मतंगाला ' तूं शाकाहारी असलास तरी जीवघातकच आहेस, ' हें समजाविलें. व जगांतील एक सिद्धांत प्रसिद्ध केला कीं, 'सासुसासऱ्यांवर सुना कधींहि विश्वास ठेवणार नाहींत व तीं असावींत असेंहि कधीं इच्छिणार नाहींत' ( वराह. ८ ).

पूर्वजन्मीं हा एक व्याध होता. यानें वसूस पूर्वजन्माची आठवण दिली, म्हणून याला याच्या पूर्वजन्मीं काश्मिराधिपति वसु राजानें 'तूं पुढल्या जन्मीं धर्मव्याध होशील,' असा वर दिला होता ( वराह. ६ ).

पूर्वजन्मीं हा वेद पारग असा एक ब्राह्मण होता. पण एका राजाच्या संगतीनें धनुर्विद्येंत हा मोठा पटाइत झाला. एकदां त्या राजाबरोबर हाहि शिकारीस गेला असतां, याच्या हातून नकळत एका ऋषीचा वध झाला व त्यानें याला 'शूद्रयोनींत व्याध होशील', असा शाप दिला. पण त्याची यानें अजाणतां गोष्ट घडली म्हणून पुष्कळ विनवणी केल्यामुळें त्यानें याला 'व्याध असून धर्मज्ञ होशील; पूर्वजन्माचें स्मरण असेल; आईबापांची सेवा करशील,' वगैरे उःशाप दिला ( म. व. २१५; ७ कौशिक पहा ). अशा याच्या पूर्वजन्मींच्या दोन कथा आहेत.

**धर्मव्रता**—धर्माला धर्मवतीपासून झालेली कन्या. ही ब्रह्मपुत्र मरीचि याची स्त्री. एकदां तो निजला असतां, ब्रह्मदेव त्याच्या घरीं आला. त्याचा हिनें सत्कार केला. पण शंका आल्यावरून मरीचीनें हिला 'शिला हो,' असा शाप दिला. त्या शिलेवर गयेमधील विष्णूची मूर्ति आहे. हिला देवव्रता असेंहि नांव आढळतें ( अग्नि. ११४ ).

**धर्मशर्मन्**—कश्यपकुलांतील विद्याधर ब्राह्मणाच्या तीन पुत्रांतील धाकटा. याचे वडील भाऊ वसुशर्मा व नामशर्मा हे विद्वान् होते. यास लहानपणीं शिकण्याचा फार कंटाळा होता. यास म्हातारपणीं पश्चात्ताप झाला. एका सिद्धाच्या उपदेशावरून यास गुरुकृपेनें ज्ञान प्राप्त झालें. एक पोपट याचें मनोरंजन करीत असे. पुढें त्यास मांजरानें खाल्ल्यावर याला

फार वाईट वाटून हा मरण पावला. तेव्हां याला शुकाचा जन्म प्राप्त होऊन हा जन्मतःच आत्मज्ञानी झाला (पद्म. भू. १-३).

२ व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील वायुमतें शाकपूर्ण रथीतराचा शिष्य ( व्यास पहा ).

**धर्मसख**—केकयवंशांतील एक राजा. याला शंभर स्त्रिया होत्या, परंतु संतान नव्हतें. शेवटीं वृद्धपणीं याला सुचंद्रा नांवाच्या ज्येष्ठ स्त्रीपासून एक पुत्र झाला. परंतु इतर स्त्रियांना संतान नव्हतें. तेव्हां त्यांचें तें दुःख पाहून यानें मंत्र्यांच्या सल्ल्यावरून दक्षिण समुद्राशेजारील हनुमत्कुंडाजवळ पुत्रकामेष्टि यज्ञ केला. त्यामुळें याच्या शंभरहि स्त्रियांना पुत्र झाले ( स्कंद. ३. १. १५ ).

**धर्मसारथि**—( सो. आयु. ) त्रिककुत् राजाचा पुत्र. याचा पुत्र शांतरथ.

**धर्मसावर्णि**—धर्म व दक्षकन्या सुव्रता यांना चाक्षुष मन्वंतरांत झालेला पुत्र. हा अकराव्या मन्वंतराचा अधिपति होईल. वायुपुराणांत हा दहाव्याचा अधिपति होईल, असें म्हटलें आहे ( मनु पहा ). देवी भागवतांत या मन्वंतराचें नांव सूर्यसावर्णि असें देऊन याच्या अधिपाचें नांव नाभाग असें दिलें आहे. तो नाभाग वैवस्वत मनूचा पुत्र होय ( दे. भा. १०.१३ ).

**धर्मसूत्र**—( सो. मगध. भविष्य. ) भागवतमतें सुव्रताचा पुत्र ( १३ धर्म पहा ).

**धर्मसेतु**—आर्यक व वैधृता यांच्यापासून धर्मसावर्णि मन्वंतरांत होणारा विष्णूचा अवतार ( भा. ८. १३. २६ ).

**धर्मसेन**—( सू. इ. ) मांधातापुत्र अंबरीषाचें नामांतर.

**धर्मस्व**—एक ब्राह्मण. हा एकदां गंगेची कावड घेऊन घरीं चालला होता. कांहीं वाट चालून गेल्यावर रत्नाकर व्यापाऱ्याच्या कापकल्प नामक नोकराला एका बैलानें ठार मारिलें. तो फार पापी होता. धर्मस्वास त्याची दया येऊन यानें त्याच्या अंगावर तुलसीपत्रानें गंगोदक शिंपडिलें. त्यायोगानें तो उद्धरून गेला. हें पाहून धर्मस्वानेंहि गंगेची भक्ति केली व तिजपासून ‘ तुझें नांव घेत असतां मृत्यु यावा ’ असा वर प्राप्त करून घेतला ( पद्म. क्रि. ७ ).

**धर्माकर**—एक धार्मिक गृहस्थ. याच्यापाशीं एका राजपुत्रानें आपली सुरूप भार्या सहा महिने सुखरूप रहावी म्हणून ठेविली असतां, याच्या मनांत तिजविषयीं कामवासना उत्पन्न झाली नाहीं. सहा महिन्यांनीं राजपुत्र परत आल्यावर कुटाळ लोकांनीं कुत्सितपणानें राजपुत्राचें मन धर्माकराविषयीं बिघडविण्याचा यत्न केला. पण तो साधला नाहीं. पुढें लोकनिंदेस कंटाळून हा चिताप्रवेश करूं लागला असतां चितेपासून याला कांहीं त्रास न होतां याच्या निंदकांच्या तोंडांवर कोड उठलें.

देवांनीं यास ‘ सज्जनाद्रोहक ’ अशी पदवी दिली होती ( पद्म. सृ. ५० ).

**धर्मांगद**—विदिशा नगरीच्या ऋतुध्वजपुत्र रुक्मभूषणाचा संध्यावली भार्येपासून झालेला पुत्र. यानें पित्याची इच्छा तृप्त करण्याकरितां आपलें मस्तक मोहिनीस अर्पण केलें. हाच धर्मांगद पुढील जन्मीं सुव्रत झाला ( पद्म. भू. ९२ ).

**धर्मात्मन्**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य.

२ ऋग्वेदी ब्रह्मचारी.

**धर्मारण्य**—एक ब्राह्मण ( म. शां. ३७१. ५ कुं. ). यानें पद्मनाभ नांवाच्या नागापासून अध्यात्मविद्या घेतली व त्यामुळें हा कृतार्थ झाला.

**धर्मिन्**—( सू. इ. भविष्य. ) वायुमतें हा भरद्वाजाचा पुत्र होय ( धर्मन् पहा ).

**धर्मेयु**—( सो. पूरु. ) भागवत, मत्स्य व वायु यांच्या मतें रौद्राश्वाचा पुत्र ( म. आ. ८८. १० कुं.; धनेयु पहा ).

**धातकि**—प्रियव्रतपुत्र वीतिहोत्राचा पुत्र. याला वीतिहोत्रानें पुष्करद्वीपाचा अर्धा भाग दिला होता ( भा. ५. २०. ३१ ).

**धातु**—मरुतांच्या तिसऱ्या गणांतील एक.

**धातृ**—वैवस्वत मन्वंतरांतील एक आदित्य ( भा. ६. ६. ३९; पद्म. सृ. ६ ). हा कार्तिकमासीं प्रकाशतो. याचे किरण अकराशें आहेत ( भवि. ब्राह्म. १. ७८ ). हा चैत्रांत ( मधुमासीं ) प्रकाशतो ( भा. १२. ११. ३३; विवस्वत् पहा ). याला कुहू, सिनीवाली, अनुमति व राका अशा चार स्त्रिया असून त्यांना प्रत्येकीं एक एक याप्रमाणें अनुक्रमें सायंकाल, दर्श, पूर्णमास व प्रातःकाल असे चार पुत्र झाले ( भा. ६. १८. ३ ).

२ भृगु ऋषीला ख्यातीपासून झालेला पुत्र. याचीं भावंडें विधाता व श्री ( लक्ष्मी ). मेरूची कन्या आयति ही याची स्त्री. तिजपासून यास मृकण्ड नामक पुत्र झाला ( भा. ४.१. ४३-४४ ).

३ भृगूचा पुत्र.

**धातृयाजिन्**—( सो. ) भविष्यमतें हैरण्यवर्धनाचा पुत्र. यानें २६०० वर्षें राज्य केलें.

**धातृशर्मन्**—एक ब्राह्मण. यानें सूर्योपासना करून सायुज्यमुक्ति मिळविली ( भवि. प्रति. ४. ७ ).

**धात्र**—द्वादश संग्रामांतील धात्र नांवाचा एक संग्राम आहे. त्यांत धात्र किंवा यानें अशी कोणी व्यक्ति असावी ( मत्स्य. ४७. ४४-४५ ).

**धात्रेय**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**धानंजय्य**—अंशूचें पैतृक नांव.

२ या पैतृक नांवानेंच एका आचार्याचा उल्लेख येत असतो ( ला. श्रौ. १. १. २५; २. १. २; ९. १० ).

**धानाक**—( लुश पहा ).

**धान्यमालिनी**—रावणाची स्त्री. हिचा पुत्र अतिकाय ( वा. रा. सुं. २२ ).

२ एक अप्सरा. ही शापाच्या योगानें मगर झाली होती. कालनेमि राक्षसाच्या वधकालीं मारुतीनें हिचा उद्धार केला.

**धान्यायनि**—अंगिराकुलांतील एक ऋषि.

**धान्व** किंवा **धान्वन**—असिताचें पैतृक नांव.

**धाम**—एका ऋषिसमुदायाचें नांव. हे ऋषि उत्तर दिशेकडील गंगाद्वाराचें रक्षण करीत असतात ( म. उ. १११. १७ कुं. ).

**धामन्**—अमिताभ देवांतील एक.

२ तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**धारण**—हा चंद्रवत्सांपैकीं असून याच्या दुर्वर्तनामुळें याचा व आप्तेष्टांचा नाश झाला ( म. उ. ७३.१६ कुं. ).

**धारिणी**—( स्वा. ) स्वधेच्या ठिकाणीं पितरांपासून झालेली कन्या. ही अविवाहित असून ब्रह्मनिष्ठ होती ( भा. ४.१. ६४ ).

**धार्मिक**—रामचंद्राच्या सुज्ञ नामक मंत्र्याचा पुत्र.

**धार्ष्टक**—( १ धृष्ट पहा ).

**धियांत**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें हृदीकाचा पुत्र.

**धिषणा**—कृशाश्व ऋषीची स्त्री.

**धिष्ण्य**—प्रतर्दन देवांतील एक.

२ ( अग्नि धिष्ण्य ऐश्वर पहा ).

**धीमत्**—( सो. पुरूरवस्. ) पुरूरव्यास उर्वशीपासून झालेला पुत्र ( म. आ. ६९. २७ कुं. ).

२ तामस मन्वंतरांत झालेल्या सप्तर्षींतील एक.

३ अगस्त्याचा पुत्र. यास पुलस्त्यानें दत्तक घेतला होता. हा अगस्त्यगोत्री होता.

**धीर शातपर्णेय**—महाशालाचा शिष्य ( श. ब्रा. १०. ३. ३. १ ).

**धीरधी**—काशींतील एक विष्णुभक्त ब्राह्मण. हा शिवध्यानीं सदा रत असल्यामुळें चालतांनाहि शिव यास हात देई. याचें शिवगणांनीं आश्चर्य प्रगट केलें असतां शिवानें सांगितलें कीं, 'हा पूर्वी एक हंस होता. एका सरोवरावरून हा चालला असतां याची गति कुंठित झाली व एकदम जमिनीवर पडून काळाकुट्ट झाला. काळाकुट्ट होण्याचें कारण तेथील पूर्वजन्मीं सरोजवदना असलेल्या एका कमलिनीनें सांगितलें. व तिनें यास गीतेचा दाहवा अध्याय म्हणून दाखवून एक पुष्प मला वाहण्यास दिलें. हा हंस त्याच्या पूर्वजन्मीं एक ब्राह्मण होता. पण गुरुच्या गुरूस पादस्पर्श झाल्यामुळें हंस झाला. दहाव्या अध्यायाच्या योगानें हा पुनः ब्राह्मण जन्म पावला व जन्मतःच जीवन्मुक्त झाला. मी यास सांवरतों व हा मला मुक्त करतो. ( पद्म. उ. १८४ ).

**धुनि**—इंद्राच्या एका शत्रूचें नांव. हें ऋग्वेदांत अनेक वेळां येतें ( इंद्र पहा ).

**धुंधकार**—मथुरेचा राजा. हा सोमेश्वरास कीर्तिमालिनीपासून झाला होता ( भवि. प्रति. ३. ५. ).

**धुंधु**—मधुकैटभांचा पुत्र. हा उदकराक्षस होता ( म. व. २०७. १ कुं. ). देवांबरोबर झालेल्या हिरण्याक्षाच्या युद्धांत हा होता ( पद्म. सृ. ६५ ). हा उज्जालक नामक वालुकामय प्रदेशांत स्वतःस वाळूंत पुरून घेऊन रहात असे. ब्रह्मदेवानें यास याच्या तपानें संतुष्ट होऊन अवध्यत्व दिलें होतें. परंतु त्यामुळें हा उन्मत्त होऊन सर्व लोकांस त्रास देऊं लागला. तेव्हां उत्तंक ऋषीच्या प्रेरणेनें सूर्यवंशीय कुवलाश्वानें यास ठार मारिलें ( वायु. २. २६; विष्णुधर्म. १. १६; ब्रह्मांड. ३. ६३.३१; ब्रह्म. ७.५४; ८६; विष्णु. ४.२; ह. वं. १.११; भा. ९.६; कुवलाश्व पहा ). याला अरूचा पुत्रहि म्हटलें आहे ( ब्रह्मांड. ३. ६.३१ ).

२ मांस न खाणारा राजा ( म. अनु. १७७. ७३ कुं. ).

३ ( सो. पुरूरवस्. ) मत्स्यमतें पीतायुधपुत्र व वायुमतें जयदपुत्र.

**धुंधुकारिन्**—आत्मदेवाचा पुत्र. हा अत्यंत दुर्वर्तनी निघाल्यामुळें आत्मदेव सर्वस्वाचा त्याग करून अरण्यांत गेला ( पद्म. उ. १९६; धुंधुली पहा ).

**धुंधुमत्**—( सू. दिष्ट. ) विष्णुमतें केवलाचा पुत्र. याला बंधुमत् असें म्हणत.

**धुंधुमार**—धुंधु दैत्यास मारिल्यामुळें कुवलाश्वास पडलेलें नांव. पद्मपुराणांमध्यें याला कुवलाश्वाचा पुत्र म्हटलें आहे ( पद्म. सृ. ८ ). याला दृढाश्व, घृण ( भद्राश्व ) व कपिलाश्व असे तीन पुत्र होते. धुंधूशीं झालेल्या लढाईंत एक हजार एकवीसांपैकीं एवढे तीन पुत्र शिल्लक राहिले ( वायु. २.२६; म. व. २०५. ५; २०७. ३७ कुं.; भा. ९.६. २३.). यानें वरूथिनी एकादशीचें व्रत केलें होतें. त्यायोगानें यास स्वर्गप्राप्ति झाली ( पद्म. उ. ४८; कुवलाश्व व धुंधु पहा ).

**धुंधुमूक**—मेघवाहन कल्पांत तिसऱ्या त्रेतायुगांत हा झाला. याच्या बायकोचें नांव विशल्या. तिच्या पोटीं अत्यंत वार्धक्य वेळीं यास एक पुत्र झाला. या मुलाचा विवाह झाला असूनहि तो शूद्रस्त्रीचे ठिकाणीं रत झाला व पुढें त्यानें तिचा वध केला. तिच्या भावानें धुंधुमूकाचा व विशल्येचा

वध केला. शूद्रस्त्रीच्या भावानें खून केला म्हणून त्याहि घराण्याचा राजानें नाश केला. पण पुढें याच्या दुराचारी मुलास एकापासून लिंगपूजाव्रत मिळालें. शिवपंचाक्षरमंत्र ( शिवतराय ) व शिवषडक्षरमंत्र (ॐ नमःशिवाय) मिळाला. त्यामुळें याचा व सर्व मृतांचा उद्धार झाला ( लिंग. २.८ ).

**धुंधुर**—एक दैत्य. हा कश्यपगृहीं अवतरलेल्या विनायकाचा नाश करण्यासाठीं पोपटाचें रूप घेऊन आला होता. परंतु विनायकानें याचा नाश केला ( गणेश. २. ८ ).

**धुंधुली**—आत्मदेवाची स्त्री.आत्मदेवाला एका सिद्धानें पुत्र-प्राप्तीकरितां एक फल दिलें असतां तें त्यानें भक्षिण्याकरितां हिला दिलें. परंतु हिनें तें न खातां आपल्या बहिणीच्या सल्ल्यावरून गाईला घातलें. व स्वतः गरोदरपणाचें सोंग घेतलें. पुढें बहिणीला झालेला पुत्र स्वतः घेऊन आपणांस पुत्र झाल्याचें हिनें खोटेंच नवऱ्याला सांगितलें. पुत्राचें नांव धुंधुकारी ( पद्म. उ. १९६ ).

**धूमती**—अंगिराकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि.

**धूमिनी**—( सो. ) अजमीढ राजाची एक स्त्री. हिचा पुत्र ऋक्ष ( म. आ. १०१. २० कुं. ).

**धूमोर्णा**—यमाची पत्नी (म. अनु. २७१. ११ कुं. ).

२ मार्कंडेयाची पत्नी ( म. अनु. २४८. ४ कुं. ).

**धूम्र**—रामसेनेंतील गद्गद नांवाच्या वानराचा पुत्र.

**धूम्र पराशर**—पराशरकुलोत्पन्न एक कुल.

**धूम्रकेतु**—( स्वा. प्रिय. ) भरत व पंचजनी यांचा पुत्र.

२ (सू.दिष्ट.) भागवतमतें तृणबिंदु व अलंबुषा यांचा पुत्र.

**धूम्रकेश**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ (स्वा. प्रिय.) वेनपुत्र पृथु व वेनकन्या अर्चि यांच्या पांच पुत्रांपैकीं तिसरा ( भा. ४. २२. ५४ ). भावांच्या वांटणींत पृथु मेल्यानंतर ज्येष्ठ पुत्र विजिताश्वानें यास दक्षिण दिशा दिली ( भा. ४. २४. २ ).

३ कृशाश्व व दक्षकन्या अर्चि यांचा पुत्र (भा. ६.६.२०).

**धूम्रलोचन**—शुंभनिशुंभ दैत्यांचा एक प्रधान. यास कालिकेनें ठार मारिलें.

**धूम्रा**—धर्म नांवाच्या वसूची पत्नी. हिला धर व ध्रुव असे दोन पुत्र होते ( म. आ. ६७. १९ कुं. ).

**धूम्राक्ष**—धूम्राश्वाचें नामांतर.

२ रावणाचा प्रधान. याला मारुतीनें ठार मारिलें ( वा. रा. यु. ५२. १; म. व. २८७.१४ कुं. ).

३ ( सू. दिष्ट. ) भागवतमतें हा हेमचंद्राचा पुत्र. इतरत्र यास धूम्राश्व म्हटलें आहे.

**धूम्रानीक**—( स्वा. प्रिय. ) मेधातिथीचा पुत्र.

**धूम्राश्व**—(सू. दिष्ट.) सुचंद्र राजाचा पुत्र. याला धूम्राक्ष असेंहि म्हणत.

**धूम्रित**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**धूर्त**—प्रियव्रत राजाचा प्रधान (गणेश. २.३२.१४ ).

२ एक प्राचीन क्षत्रिय ( म. आ. १. २६३ कुं. ).

**धृत**—( सो. द्रुह्यु. ) धर्माचा पुत्र. याबद्दल घृत व द्युत असे पाठभेद आहेत.

**धृतक**—( सू. इ. ) वायुमतें हा रुरुकपुत्र होय. या-बद्दल वृक असा पाठभेद आहे.

**धृतदेवा**—( सो. वृष्णि. ) देवक राजाची कन्या. ही वसुदेवास दिली होती. हिला विपृष्ट नांवाचा एक पुत्र होता ( भा. ९.२४ ).

**धृतधर्मन्**—प्रतर्दन देवांतील एक.

**धृतराष्ट्र**—( सो. पूरु. ) विचित्रवीर्य निपुत्रिक मरण पावला असतां, पूरुकुलाचा क्षय होऊं नये म्हणून सत्यवतीच्या आज्ञेवरून व्यासानें अंबिकेच्या ठिकाणीं याला उत्पन्न केला. गर्भाधानप्रसंगीं अंबिकेला व्यासाचें तेज सहन न होऊन तिनें डोळे मिटले. त्यामुळें धृतराष्ट्र हा जन्मांध झाला. हा हंस नामक गंधर्वअंशानें जन्मला होता ( म. आ. ६७; १०५-१०६; भा. ९. २२. २५ ).

धृतराष्ट्राचें पालनपोषण व विद्याभ्यास हीं भीष्माच्या खास देखरेखीखालीं झालीं. धृतराष्ट्र हा जात्याच बुद्धिमान् असल्या-मुळें लवकरच वेदशास्त्रांत निष्णात झाला. शिक्षणक्रम पुरा झाल्यावर भीष्मानें सुवल राजाची कन्या गांधारी हिच्याशीं याचा विवाह करून दिला. याशिवाय याला पुढील स्त्रिया आढळतात. सत्यव्रता, सत्यसेना, सुदेष्णा, संहिता, तेजःश्रवा, सुश्रवा, निकृति, शंभ्वठा व दशार्णा ( म. आ. ११९. २३-२४ कुं. ). गांधारीपासून धृतराष्ट्रास दुर्योधनादि शंभर पुत्र व दुःशला नांवाची एक कन्या झाली. त्याचप्रमाणें युयुत्सु म्हणून याचा एक दासीपुत्र होता. यांत दुर्योधन, दुःशासन, विकर्ण व चित्रसेन हे प्रमुख होते ( म. आ. ६३. ५८ कुं. ).

धृतराष्ट्राच्या मुलांचें व पांडूच्या मुलांचें आपसांत फारच वैर होतें. पांडु हा ऋषींच्या शापामुळें मरण पावला असतां पांडवांना राज्य मिळणार, हें पाहून दुर्योधनानें इतर भावांच्या मदतीनें त्यांना अत्यंत छळ आरंभिला. या कृत्यास धृतराष्ट्रानें कोणत्याहि तऱ्हेचा विरोध केला नाहीं. दुर्योधनानें पांडवांस वारणावतांत जाळून मारण्याचा घाट घातला. परंतु तो फसून पांडव सुखरूप बाहेर पडले. पांडव दग्ध झाले हें ऐकून धृतराष्ट्रानें बराच वरपंगी शोक केला ( म. आ. १६२ कुं. ). पुढें पांडव जिवंत राहिले, हें पाहून लोकलज्जेस्तव यानें

त्यांना अर्धें राज्य दिलें. परंतु दुर्योधनास तें न मानवून त्यानें पांडवांशीं द्यूत खेळून त्यांचें राज्य घेण्याचा विचार केला. या दुर्योधनाच्या कृत्यास याची पूर्ण संमति होती असें दिसतें. कारण दुर्योधनानें पांडवांना जिंकिलें, हें ऐकून याला पराकाष्ठेचें सुख वाटलें. त्याचप्रमाणें द्रौपदीची विटंबना करीत असतां दुर्योधनादिकांस तीपासून यानें परावृत्त केलें नाहीं ( म. आ. १५०. ७१ कुं.). पण द्यूतांतील पणाप्रमाणें दास झालेल्या पांडवांना द्रौपदीच्या मागण्यावरून यानें दास्यत्वापासून मुक्त केलें ( म. स. ९३ कुं. ).

पांडवांचा वनवासाचा काल संपल्यावर कृष्णानें पांडवांकरितां त्यांना त्यांचा राज्यांतील योग्य हिस्सा द्यावा, म्हणून दुर्योधनाशीं बोलणें लाविलें व राज्य न दिल्यास युद्ध करूं म्हणून धमकी दिली. तथापि धृतराष्ट्रानें त्या वेळीं युधिष्ठिरासच असा उपदेश केला कीं, ‘ तूं आपल्या तेरा वर्षांच्या तपश्चर्येचा नाश करून न घेतां दुर्योधनाबरोबर युद्धास प्रवृत्त होऊं नकोस. दुर्योधनानें कांहींहि दिलें नाहीं, तरी भिक्षेनें उपजीविका कर.’ परंतु पांडवांचा युद्धाबद्दल निश्चय झाल्यामुळें व त्याचप्रमाणें धृतराष्ट्राच्या उपदेशांतील स्वार्थ व जंबूकवृत्ति हीं दोन्ही त्यांच्या दृष्टीस पडल्यामुळें त्यांनीं धृतराष्ट्राचें म्हणणें ऐकिलें नाहीं. याला कृष्णानें शिष्टाईच्या सभेंत विश्वरूपदर्शनापुरते डोळे दिले होते ( म. उ. १३१ ).

पुढें थोड्याच कालानें भारतीय युद्धास सुरवात झाली. धृतराष्ट्र हा आंधळा असल्यानें याला युद्धांत भाग घेतां आला नाहीं; किंवा युद्धप्रसंग प्रत्यक्ष पाहतां आले नाहींत. त्यामुळें यास युद्धांत घडलेल्या सर्व गोष्टी संजयाच्या तोंडून ऐकाव्या लागल्या. भीष्मद्रोणादिकांचा व त्याचप्रमाणें इतर पुष्कळ योद्ध्यांचा वध झालेला ऐकून याला कुरुकुलाचा थोडक्याच दिवसांत क्षय होणार, हें कृष्णाचें भाकित खरेंच होणार, असें वाटूं लागलें. तेव्हां कोठें हा सावध होऊन दुर्योधनास युद्धापासून परावृत्त होऊन पांडवांस त्यांचा योग्य हिस्सा देण्याविषयीं सांगूं लागला. परंतु ही बुद्धि याला फारच उशिरां सुचल्याकारणानें व त्याचप्रमाणें दुर्योधन पूर्णपणें ह्रास पेटला असल्यामुळें धृतराष्ट्राचे सांगण्याचा कांहींहि उपयोग झाला नाहीं. पुढें भारतीय युद्धांत याचे दुर्योधनादिक शंभर पुत्र व इतर बरेच रथीमहारथी मेले. फक्त अश्वत्थामा, कृप व कृतवर्मा एवढेच कौरवसैन्यापैकीं मोठे योद्धे शिल्लक राहिले. तें ऐकून धृतराष्ट्र पुत्रशोकानें विव्हळ झाला. त्या वेळीं पांडवांचा याला अतिशय राग आला व त्या रागाचे भरांत यानें भीमाचा सूड घेण्याकरितां कपटानें त्याला आलिंगनार्थ बोलाविलें. परंतु कृष्णानें याचें कपट ओळखून भीमाऐवजीं एक लोखंडी मूर्ति धृतराष्ट्रापुढें ठेविली. धृतराष्ट्रानें त्या मूर्तीला क्रोधानें आलिंगन देऊन तिचें पीठ केलें. परंतु आपली झालेली फसवणूक पाहून हा फारच लज्जित झाला. पुढें हा लोकलज्जेस्तव पांडवांशीं प्रेमानें वागूं लागला ( म. स्त्री. १२ ).

पुढें युधिष्ठिर हस्तिनापुरचें राज्य करूं लागला. त्या वेळीं धृतराष्ट्र त्याचेजवळ बरेच दिवस राहिला. त्या वेळीं यानें त्याला राजनीतीचा उपदेश केला आहे ( म. आश्र. ६. ४८. कुं. ). परंतु भीमाच्या दुरुत्तरांस कंटाळून यानें वनवास स्वीकारिला. वनांत जातांना यानें गांधारी, कुंती व विदुर इत्यादिकांना आपल्याबरोबर नेलें होतें. वनांत भ्रमण करीत असतां याला व्यास भेटला. त्या वेळीं व्यासानें धृतराष्ट्राच्या प्रार्थनेवरून त्या सर्वांस मृत लोकांचें दर्शन करविलें. नंतर धृतराष्ट्रानें उग्र तपास आरंभ केला व तप करीत असतां हा एका मोठ्या वाणव्यांत सांपडून मरण पावला (म. आश्र. ३९. ३१ कुं.; भा. १.१३. ५६ ), व पुढें कुबेरलोकांत गेला ( म. आश्र. २२. ११ कुं. ).

धृतराष्ट्राचे मृत्यूसमयीं याच्या औरस पुत्रांतील कोणीहि जिवंत नव्हता. त्यामुळें याच्या मृत्यूनंतर पांडवांच्या कुलास सुरुवात झाली. याची कन्या दुःशला ही सिंधुदेशच्या जयद्रथाला दिली होती.

याच्या मुलांचीं नांवें अकारादि क्रमानें आधारसुद्धां खालीं दिलीं आहेत. आरंभीं दिलेला आंकडा क्रमाचा आहे.

९० अनाधृष्य, ७६ अनुयायिन्, १३ अनुविंद, ५७ अनूदर, ६५ अपराजित, ८७ अभय, ४२ अयोबाहु, ८६ अलोलुप, ७३ आदित्यकेतु, ८२ उग्र, ६२ उग्रश्रवस्, ६३ उग्रसेन, ५०उग्रायुध, २२ उपचित्र, ३३उपनंदक, ३० ऊर्णनाभ, ९७ कनकांगद, ५२ कनकायु, २० कर्ण, ७७ कवचिन्, ९८ कुंडज, ९१ कुंडभेदिन्, ३६ कुंडोदर, ६४ क्षेमसूर्ति, ९५ चारुचित्रांगद, २१ चित्र, ९९ चित्रक, ४४ चित्रचाप, ३८ चित्रबाहु, ३९ चित्रवर्मन्, २३ चित्राक्ष, ५८ जरासंध, ९ जलसंध, ८० दंडधार, ७९ दंडिन्, ९४ दीर्घबाहु, ९३ दीर्घलोचन, ६७ दुराधन, १४ दुर्धर्ष, १८ दुर्मख, २५ दुर्मद, १७ दुर्मर्षण, ६ दुर्मुख, १ दुर्योधन, ४१ दुर्विरोचन, ५ दुःशल, ३ दुःशासन, १९ दुष्कर्ण, १६ दुष्प्रधर्षण, २६ दुष्प्रधर्ष, ४ दुःसह, ५५ दृढक्षत्र, ८४ दृढरथ, ५४ दृढवर्मन्, ५९ दृढसंध, ६९ दृढहस्त, ५३ दृढायुध, ८१ धनुर्ग्रह, ३२ नंद, ७५ नागदत्त, ७८ निषंगिन्, ६६ पंडितक, ३१ पद्मनाभ, ७पर, ४८ बलाकिन्, ७४ बह्वाशी, ४७ भीमबल, ८३ भीमरथ, ४९ भीमविक्रम, ४६ भीमवेग, ५१ भीमशर, ९५ महाबाहु, ८३ महाबाहु, ३७ महोदर, २ युयुत्सु, ८८ रौद्रकर्मन्, ७१ वातवेग, २८ विकट, ९ विकर्ण, १२ विंद, ९२ विराविन्, २७ विवित्सु, ८ विविंशति, ६७ विशालाक्ष, ८५ [illegible]

८५ वीरबाहु, ९६ व्यूढोरु, ६० सत्यसंध, २९ सम, ६१ सहस्वाक, ४५ सुकुंडल, १५ सुबाहु, ११ सुलोचन, ७२ सुवर्चस्, ४० सुवर्मन्, ३५ सुषेण, ७० सुहस्त, ३४ सेनापति, ५६ सोमकीर्ति, १०० दुःशला ( कन्या ), १०१ युयुत्सु ( वैश्यापुत्र ), ( म. आ. ६८. ९३–१०६ कुं. ).

७८ अग्रयायिन्, ९१ अनाधृष्य, १० अनुविंद, ५७ अनूदर, ६७ अपराजित, ८८ अभय, ४० अयोबाहु, ८७ अलोलुप, ७५ आदित्यकेतु, ८४ उग्र, ६३ उग्रश्रवस्, ६४ उग्रसेन, ४७ उग्रायुध, २४ उपचित्र, ३५ उपनंदक, ३२ ऊर्णनाभ, १०० कनकध्वज, १७ कर्ण, ७९ कवचिन्, ४९,८२ कुंडधार, ९२ कुंडभेदिन्, ६८ कुंडशायिन्, १०१ कुंडाशिन्, ८१ कुंडिन्, ८० क्रथन, २६ चारुचित्र, २३ चित्र, ४२,९४ चित्रकुंडल, ३६ चित्रबाण, ३७ चित्रवर्मन्, २५ चित्राक्ष, ४१ चित्रांग, ५० चित्रायुध, ५९ जरासंध, ६ जलसंध, ९८ दीर्घबाहु, ९७ दीर्घरोमन्, ७० दुराधर, ११ दुर्धर्ष, २८ दुर्मद, १४ दुर्मर्षण, १५ दुर्मुख, १ दुर्योधन, २९ दुर्विगाह, ३९ दुर्विमोचन, ५ दुःशल, ३ दुःशासन, ४ दुःसह, १६ दुष्कर्ण, ६६ दुष्पराजय, १३ दुष्प्रधर्षण, ५५ दृढक्षत्र, ९० दृढरथाश्रय, ५४ दृढवर्मन्, ५८ दृढसंध, ७१ दृढहस्त, ८३ धनुर्धर, ३४ नंद, ७७ नागदत्त, ५१ निषंगिन्, ५२ पाशिन्, ९५ प्रमथ, ९६ प्रमाथिन्, ४६ बलवर्धन, ४५ बलाकिन्, ७६ ब्रह्माशी, ४४ भीमबल, ८५ भीमरथ, ४३ भीमवेग, २ युयुत्सु, ८९ रौद्रकर्मन्, ७३ वातवेग, १३ विकटानन, १९ विकर्ण, ९ विंद, १०२ विरजस्, ९३ विराविन्, ३० विवित्सु, १८ विविंशति, ६९ विशालाक्ष, ८६ वीरबाहु, ५३ वृंदारक, ९६ व्यूढोरस्, २७ शरासन, २० शल, ६० सत्यसंध, २१ सत्व, ६१ सद, ७ सम, ८ सह, ३३ सुनाथ, १२ सुबाहु, २२ सुलोचन, ७४ सुवर्चस्, ३८ सुवर्मन्, ६२ सुवाक, ४८ सुषेण, ७२ सुहस्त, ६५ सेनानी, ५६ सोमकीर्ति व १०३ दुःशला ( कन्या ) ( म. आ. १३१. २–१४ कुं. ).

अनाधृष्टि, अयोभुज. अलंबु, उपनद, करकायु, कुंडक, कुंडभेदिन्, कुंडलिन्, क्राथ, खड्गिन्, चित्रदर्शन चित्रसेन, चित्रोपचित्र, जयत्सेन, जैत्र, तुहुंड, दीप्तलोचन, दीर्घनेत्र दुर्जय, दुर्धर, दुर्वर्षण, दुर्विषह, दुष्प्रधर्ष, दृढ, नंदक, पंडित, बाहुशालिन्, भीम, भीमवेगरव, भूरिबल, मकरध्वज, रवि, वायुवेग, विराज, विरोचन, शत्रुंजय, शत्रुसह, श्रुतर्वन्, श्रुतायु, श्रुतांत, संजय, सुचारु, सुचित्र, सुजात, सुदर्शन, सुलोचन.

यांचे उल्लेख द्रौपदीस्वयंवर, घोषयात्रा, उत्तरगोग्रहण, भारतीय युद्ध इ. प्रसंगीं आले आहेत ( म. आ. २०१; भी. ६४; ७७; ७९; ८८; द्रो. १५७; १५८; वि. ३७; क. ८८; श. २५ कुं. ).

यांत कांहीं नांवें पुनः पुनः आलीं आहेत. कांहीं तदर्थक दुसरा शब्द वापरून आलीं आहे. एकूण संख्याहि शंभरांपेक्षां अधिक भरते. पण निर्णय करण्यास कांहीं साधन नाहीं.

२ हा वासुकीपासून झालेल्या नागकुलांतील एक नाग होता. अर्जुनाचें मस्तक बभ्रुवाहनानें तोडिलें, तेव्हां त्याला जिवंत करण्याकरितां मृतसंजीवक मणि पाहिजे होता. तो बभ्रुवाहनानें शेषाजवळ मागितला. परंतु तो धृतराष्ट्रानें त्याला घेऊं दिला नाहीं. पुढें युद्ध होऊन बभ्रुवाहनास तो मणि मिळाला. तेव्हां अर्जुन जिवंत होणार, हें पाहून धृतराष्ट्रास वाईट वाटलें व यानें आपल्या पुत्रांकडून पार्थाचें शिर चोरून आणविलें व तें बक दाल्भ्याचे आश्रमांत फेंकून दिलें ( जै. अ. ३९ ).

३ कश्यप व कद्रू यांच्या नागपुत्रांपैकीं एक.

४ कश्यप व दनु यांचा पुत्र.

५ पहिल्या जनमेजय पारीक्षिताचा पुत्र. हा जनमेजयानंतर गादीवर आला ( म. आ. १०१. ४५ कुं. ). पांडु, बाह्लिक, निषध, जांबूनद, कुंडोदर, पदाति व बसाति असे एकंदर हे आठ भाऊ होते ( म. आ. १०१. ४४-४५ कुं. ). याचा पुत्र कुंडिक.

**धृतराष्ट्र ऐरावत**—एका नागाचें नांव. हा सर्पसत्रांतील ब्रह्मा होता ( पं. ब्रा. २५. १५. ३; जै. उ. ब्रा. ४. १५ २६ ).

**धृतराष्ट्र वैचित्रवीर्य**—कठसंहितेंत याचा उल्लेख आहे ( क. सं. १०. ६ ). शतानीक सात्राजितानें याच्या अश्वमेधाचा घोडा पळविला. हा धृतराष्ट्र काशीचा राजा होता. शतानिक सात्राजित पांचाल होता ( श. ब्रा. १३. ५. ४. १८-२३ ). परंतु या ठिकाणीं धृतराष्ट्रास वैचित्रवीर्य म्हटलें नाहीं. हा दुर्योधनपिता धृतराष्ट्र असण्याचा संभव आहे.

**धृतराष्ट्रिका**—( धृतराष्ट्री पहा ).

**धृतराष्ट्री**—ताम्रेची मुलगी व हंसांची आई ( म. आ. ६७. ५८ कुं. ). ही गरुडाची पत्नी.

**धृतवर्मन्**—सूर्यवर्मा नामक त्रिगर्तांचा भ्राता ( म. आश्व. ७४. २२ कुं. ). हा अत्यंत पराक्रमी असून कौरवपक्षाकडील एक महारथी होता.

**धृतव्रत**—स्वायंभुव मन्वंतरांतील अर्थवण ऋषीस चित्ति नांवाच्या भार्येपासून झालेला पुत्र.

२ चक्षुर्मनूस नड्वलेपासून झालेला पुत्र.

३ ( सो. अनु. ) धृति राजाचा पुत्र. याचा पुत्र सुकर्मा.

४ अंगिरा ऋषीच्या पुत्रांना अशी संज्ञा आहे ( म. आ. ६७. ५ कुं. ).

**धृतसेन**—दुर्योधनपक्षीय एक राजा (म. श. ५. ३ कुं.).

**धृतायुध**—भारतीय युद्धांतील कौरवपक्षीय एक राजा (म. श. ७).

**धृति**—धर्म ऋषीची स्त्री.

२ सावर्णि मनूचा पुत्र ( मनु पहा ).

३ ( सो. अनु. ) भागवत व विष्णु यांच्या मतें विजयाचा पुत्र.

४ ( सू. निमि. ) वीतहव्य जनकाचा पुत्र. याचा पुत्र बहुलाश्व.

५ ( सो. कुकुर. ) वायुमतें आहुकाचा पुत्र.

६ ब्रह्मधानाचा पुत्र.

७ सृष्टि व छाया यांचा पुत्र.

८ सुतप देवांपैकीं एक.

९ सुधामन् देवांतील एक.

१० (सो. कुकुर.) मत्स्यमतें वृष्णीचा व पद्ममतें वृष्टीचा पुत्र ( पद्म. सृ. १३ ).

११ कृष्ण व रोहिणी यांचा पुत्र सारण. सारणास सत्य व धृति असे दोन किंवा सत्यधृति असा एकच पुत्र होता.

१२ ( सो. क्रोष्टु. ) विष्णुमतें रोमपादपुत्र बभ्रुचा पुत्र ( ज्ञाति पहा ).

१३ ( सू. निमि. ) महाधृतीचें नामांतर.

१४ कुशद्वीपाचा राजा व ज्योतिष्मानाचा पुत्र. याचा देश याच्याच नांवानें प्रसिद्ध होता ( विष्णु. २. ४ ).

१५ मनु नांवाच्या रुद्राची स्त्री.

**धृतिमत्**—रैवत मनूचा पुत्र.

२ सुदरिद्र ब्राह्मणाचा पुत्र ( पितृवर्तिन् पहा ).

३ ( सो. पुरूरवस्. ) मत्स्य व पद्म यांच्या मतें पुरूरव्याला उर्वशीपासून झालेल्या पुत्रांतील एक ( पद्म. सृ. १२ ).

४ ( सो. द्विमीढ. ) यवीनराचा पुत्र. भागवतांत यास कृतिमत् म्हटलें आहे.

५ ( सू. निमि. ) वायुमतें हा महावीर्य जनकाचा पुत्र. याबद्दल सत्यधृति व सुधृति अशीं नांवें आहेत.

६ ( सो. ) भविष्यमतें चित्ररथाचा पुत्र. यानें एक हजार वर्षे राज्य केलें.

**धृतिवर्मन्**—परिहरवंशीय कलिवर्मा राजाचा पुत्र. यानें दहा वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४. ४ ).

**धृष्ट**—वैवस्वत मनूचा एक पुत्र (भा. ८.१३. २). हा क्षत्रिय असतांहि याची संतति तपोबलानें ब्राह्मणत्व पावली (भा. ९. २.१७). याला धृष्टकेतु, स्वधर्मन् व रणधृष्ट असे तीन पुत्र होते ( पद्म. सृ. ८ ). याला धृष्णु म्हटलें असून याच्यापासून धार्ष्टक नांवाचे लोक निर्माण झाले ( ह. वं. १. १० ). हे वैश्य किंवा वैष्णव झाले (गरुड. १. १३८. १५).

२ हिरण्यकशिपूच्या सभेंतील एक दैत्य ( भा.७.२.१८ ).

३ ( सो. सह. ) मत्स्यमतें सहस्रार्जुनाचा पुत्र.

४ ( सो. क्रोष्टु. ) वायु व मत्स्य यांच्या मतें कुंति राजाचा पुत्र. याबद्दल धृष्टि व वृष्णि अशीं नांवें आहेत.

५ ( सो. कुकुर. ) विष्णुमतें हा कुकुर राजाचा पुत्र. यास वह्नि, वृष्टि व वृष्णि म्हटलें आहे.

**धृष्टकेतु**—( सो. ऋक्ष. ) चेदी देशाचा पराक्रमी राजा. शिशुपालाचा पुत्र. याची राजधानी शुक्तिमती. याचे पुत्रहि अतिशय शूर होते ( म. उ. १७१ ). याच्याशीं रणांत युद्ध करण्याची कोणाची छाती नव्हती (म. उ. ७९). हा पांडवांच्या सैन्याच्या प्रमुखांपैकीं एक होता. यानें अर्जुनाच्या रथाचें चक्ररक्षण फार उत्तम तऱ्हेनें केलें ( म. भी. १९ ). युद्धामध्यें यानें कांबोज देशचे उत्तम प्रकारचे घोडे आणिले होते. या घोड्यांच्या अंगावर टिपके होते (म. द्रो.२३). युद्धांत एकदां हा व बृहत्क्षत्र हे द्रोणावर चालून जात असतां याला वीरधन्व्यानें अडविलें. तेव्हां त्याची व याची फारच मोठी लढाई झाली. तींत याचें धनुष्य वीरधन्व्यानें बाण सोडून मोडून टाकिलें. तेव्हां यानें तें धनुष्य टाकून देऊन सुवर्णाचा दांडा असलेली एक पोलादि महावीर्यशाली शक्ति दोन्ही हातांनीं धरून एकदम नेमानें वीरधन्व्याच्या रथावर फेंकिली. त्या शक्तीच्या भयंकर तडाक्यानें त्याचें हृदय विदीर्ण होऊन तो तत्काळ रथांतून खालीं जमिनीवर पडला (म. द्रो. १०७). महारथी बृहत्क्षत्र द्रोणाशीं लढतांना मरण पावल्यावर यानें आपल्या सारथ्यास त्याचे जागेवर रथ घेऊन जाण्यास सांगितलें. व ज्याप्रमाणें पतंग अग्नीवर झडप घालतो, त्याप्रमाणें हा द्रोणावर धांवून गेला. पण द्रोणानें याच्या छातीवर एक तीक्ष्ण बाण मारून यास स्वर्गाची वाट दाखविली (म. द्रो. १२५). याची कन्या रेणुमती नकुलाला दिली होती (म. आ. ६३. ७८ कुं.). याच्या मुलाचें नांव वीतिहोत्र ( गरुड. १. १३९ ).

२ ( सू. निमि. ) विष्णुमतें सत्यधृतिपुत्र. भागवत व वायु यांच्या मतें सुधृतिपुत्र.

३ ( सो. काश्य. ) भागवतमतें सत्यकेतूचा आणि विष्णु व वायु यांच्या मतें सुकुमाराचा पुत्र ( गरुड. १. १३९ ).

४ ( सो. अज. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें धृष्टद्युम्नपुत्र. हा भारतीय युद्धांत पांडवांकडे होता. याला द्रोणानें ठार केलें व येथें पांचालवंश संपला.

५ केकय देशाचा राजा. याची स्त्री श्रुतकीर्ति. याचे पुत्र संतर्दन ( विष्णु. ४. १४; भा. ९. २४. ३८ ), चेकितान, बृहत्क्षत्र, विंद व अनुविंद ( वायु. २. ३४. १५६ ).

६ (सू.) वायु, मत्स्य व पद्म यांच्या मतें वैवस्वत मनूचा पुत्र धृष्ट, त्याचा हा पुत्र (पद्म. सृ. ८).

७ नृगाचा पुत्र (लिंग. १. ६६. ४६).

**धृष्टद्युम्न**—(सो. अज.) पृषत् अथवा जंतु राजाचा नातू व द्रुपद राजाचा पुत्र. हा अयोनिसंभव होता. द्रुपदानें याला द्रोणाचा सूड उगविण्याकरितां याजोपयाज नांवाच्या मुनींकडून यज्ञ करवून अग्नीपासून मागून घेतलें होतें (द्रुपद पहा).

द्रौपदी ही पांडवांना दिली होती. द्रौपदीचे स्वयंवरप्रसंगीं पांडव ब्राह्मणवेषानें स्वयंवरास आले होते. पुढें अर्जुनानें लक्ष्यभेद केल्यामुळ द्रौपदी अर्थातच अर्जुनास मिळाली. परंतु ब्राह्मणानें क्षत्रियकन्या नेली, हे पाहून सर्व राजमंडळांत असंतोष उत्पन्न झाला व युद्धापर्यंत मजल आली. तें पाहून धृष्टद्युम्नानें ब्राह्मणरूपानें आलेले ते पांडव होते, अशी सर्वांची खात्री करून युद्धप्रसंग टाळला (म. आ. २०७ कुं.).

धृष्टद्युम्न हा अत्यंत पराक्रमी होता. यास द्रोणाचार्यांनेंच धनुर्विद्या शिकविली. भारतीय युद्धांत हा पांडवांकडेच होता. प्रथम हा पांडवसैन्यांत एक अतिरथि होता. परंतु याचें युद्धचापल्य पाहून युधिष्ठिरानें यास कृष्णाच्या सल्लयानें सेनापति केलें (म. उ. १५१ कुं.).

धृष्टद्युम्नानें सर्व युद्ध होईपर्यंत मोठ्या कुशलतेनें आपली बाजू सांभाळिली होती. पुढें द्रोण सेनापति असतां भीमानें अश्वत्थामा नांवाचा एक हत्ती मारिला, व 'अश्वत्थामा मेला' अशी हूल उठविली. त्यामुळें द्रोणाचार्यांस पुत्रवधाची बातमी खरी वाटून त्यानें उद्विग्न मनानें शस्त्रसंन्यास केला. तेव्हां ही संधि बरी आहे हें पाहून धृष्टद्युम्नानें द्रोणाचा शिरच्छेद केला (म. द्रो. १९२; १९३. ६४ कुं.).

धृष्टद्युम्नानें द्रोणाचार्यांचा असहाय स्थितींत असतां वध केला, हें पाहून सात्यकीनें याची बरीच निंदा केली. तेव्हां दोघांमध्यें युद्ध होण्याचा प्रसंग आला, परंतु तो श्रीकृष्णानें टाळला. पुढें युद्धाच्या अठराव्या रात्रीं हा शिबिरांत निद्रित असतां अश्वत्थाम्यानें पितृवधाचा सूड म्हणून यास ठार मारिलें (म. सौ. ८. २४ कुं.). ही गोष्ट मार्गशीर्ष वद्य अमावास्येस घडली (भारतसावित्री).

धृष्टद्युम्नास क्षत्रंजय, क्षत्रवर्मन्, क्षत्रधर्मन् व क्षत्रदेव असे चार पुत्र व धृष्टकेतु नांवाचा पांचवा पुत्र होता. परंतु, ते सर्व द्रोणाचार्यांचे हातून मेले. त्यांच्यापैकीं धृष्टकेतु हाच फक्त जिवंत राहिला होता. परंतु त्यालाहि द्रोणानें मारिल्यामुळें पांचालवंशाचा निर्वंश झाला (म. द्रो. १५६ कुं.; ४ धृष्टकेतु पहा). क्षत्रधर्मन्लाहि द्रोणानेंच मारिलें (म. द्रो. १२५. ६७ कुं.).

**धृष्टबुद्धि**—हा भद्रावतींतील वैश्य वैशाख शुक्ल एकादशी केल्यानें मुक्त झाला (पद्म. उ. ४९).

**धृष्टसुत**—(सो. क्रोष्टु.) वायुमतें कुंति राजाचा पुत्र. 'धृतः सुतः' याबद्दल चुकून धृतसुत असें पडलें आहे. (४ धृष्ट पहा).

**धृष्टि**—दशरथाचा एक प्रधान (वा. रा. अयो. ७).

२ (सो. क्रोष्टु.) भागवतमतें कुंति राजाचा पुत्र. याचा पुत्र विदूरथ (४ धृष्ट पहा).

**धृष्णि**—अंगिरस् व पथ्या यांचा पुत्र. याचा पुत्र सुधन्वा (ब्रह्मांड. ३. १).

**धृष्णु**—वैवस्वत मनूचा पुत्र (म. आ. ६९. १८ कुं.).

२ वारुणि कवीचा एक पुत्र.

३ (४ धृष्ट पहा).

**धेनुक**—एक असुर. हा तालवनांत राहत असे. जे वनांतील फळें नेत त्यांना हा मारीत असे. एकदां कांहीं गोपाल आपल्या गाई घेऊन त्या वनासमीप गेले असतां त्या वनांतील वासामुळें त्यांना तीं फळें तोडून खाण्याची इच्छा झाली. तेव्हां बलरामानें तेथील फळें चोरलीं. इतक्यांत वनाचें रक्षण करणारा धेनुक एका गर्दभाचें रूप घेऊन बलरामाच्या अंगावर चालून आला. तेव्हां बलरामानें यास आपटून ठार केलें (भा. १०. १५).

**धेनुमती**—(स्वा. प्रिय.) देवद्युम्न राजाची स्त्री. हिचा पुत्र परमेष्ठी (भा. ५. १५. ३).

**धौतमूलक**—चीन देशाचा राजा. यानें आपल्या दुर्वर्तनानें आपला व आपल्या कुलाचा नाश करून घेतला (म. उ. ७३. १४ कुं.).

**धौंधुमारि**—धुंधुमार कुवलाश्वाच्या पुत्रांना पैतृक नांव.

**धौम्य**—देवल ऋषीचा कनिष्ठ भाऊ व अपोद ऋषीचा पुत्र. याचा बाप केवळ जलपान करूनच जगला होता; म्हणून त्यास अपोद असें नांव पडलें. धौम्य हा अपोद ऋषीचा पुत्र म्हणून यास आपोद असें म्हणत असत (म. आ. ३. २१ कुं.). यालाच आग्निवेश्य असेंहि म्हणतात (म. आश्व. ६४. ९ कुं.).

अर्जुन आपल्या भावांसहवर्तमान लाक्षागृहांतून सुटून द्रौपदीस्वयंवरास जात असतां वाटेंत त्यास चित्ररथ गंधर्व भेटला. त्यानें अर्जुनास 'राजानें पुरोहिताशिवाय कोठेंहि जाऊं नये. म्हणून तुम्ही देवल मुनीचा धाकटा बंधु उत्कोचकतीर्थावर तपश्चर्या करीत आहे, त्यास पुरोहितत्व स्वीकारण्याविषयीं विनंति करा' असें सांगितलें. त्याप्रमाणें अर्जुनानें यास विनंति करून पुरोहित केलें (म. आ. १८३). हा पांडवांजवळच राहत असे (म. स. २). युधिष्ठिर वनांत जाण्याकरितां निघाला असतां, धौम्यहि त्याज-

बरोबर निघाला. तेव्हां धर्मास अतिशय वाईट वाटलें. तो म्हणाला, ' गुरुजी, वनांत आपण येऊं नये. आपणांला तेथें आम्ही काय द्यावें ? ' तेव्हां धौम्य म्हणाला, ' राजा, भिऊं नकोस. मला सूर्यस्तवन येत आहे, तें मी तुला सांगतों. तूं त्याचें अनुष्ठान कर, म्हणजे सूर्य प्रसन्न होऊन तो तुझी सर्व काळजी नाहींशी करील. ' नंतर धर्मानें सूर्यस्तुति केली. त्यामुळें सूर्यनारायण प्रसन्न होऊन त्यानें त्यास एक तांब्याची स्थाली देऊन सांगितलें, ही तूं पांचालीजवळ दे, म्हणजे तुला कधींच अन्नाचा तोटा येणार नाहीं. ' नंतर युधिष्ठिरानें धौम्यास झालेला वृत्तांत सांगितला व स्थाली द्रौपदीजवळ दिली ( म. व. ३ ). पुढें पांडव वनवासांत गेले. तेव्हां अर्जुन अस्त्रें मिळविण्याकरितां इंद्रलोकीं गेला असतां युधिष्ठिरास सारखी तळमळ लागली व त्यास कांहीं सुचेना; तेव्हां धौम्यानें त्यास नाना तीर्थांचीं, देशांचीं, पर्वतांचीं व प्रदेशांचीं वर्णनें सांगितलीं व हा म्हणाला, ' तूं तीर्थयात्रा कर, म्हणजे तुझ्या अंतःकरणाला शांति प्राप्त होईल ' ( म. व. ८६-९० ).

हा पांडवांबरोबर त्यांचे अग्निहोत्ररक्षणार्थ वनांत राहत होता ( म. वि. ६. १३ कुं. ).

बाराहि वर्षे वनवासांत धौम्य पांडवांबरोबर होता. परंतु, वनवास संपून अज्ञातवासास सुरुवात झाल्यानंतर धर्मानें मोठ्या कष्टानें, ' हे आमचे अज्ञातवासाचे दिवस आहेत, करितां आम्हांला तुमच्याजवळ राहतां येणें शक्य नाहीं, ' असें सांगून परवानगी घेतली. या वेळीं धौम्यानें युधिष्ठिरास केलेला उपदेश अतिशय मौल्यवान् आहे. यानें आरंभीं दैवानें देवांस सुद्धां कसें छळिलें, याचीं उदाहरणें सांगून त्याचें सांत्वन केलें व त्यास राजदरबारीं कसें वागावें, याचें फारच मार्मिकतेनें वर्णन करून सांगितलें.

हा धर्मराजाबरोबर भीष्माच्या निर्याणसमयीं त्याच्या भेटीस गेला होता. युद्ध संपल्यानंतर श्रीकृष्ण द्वारकेस जातांना हा तेथें होता ( भा. १. ९ ). भारतीय युद्धानंतर युधिष्ठिर सैन्यासह धृतराष्ट्राच्या भेटीस गेला असतां यानें मागें नगराचें उत्तम प्रकारें रक्षण केलें ( म. आश्र. २३ ).

देवरहस्य वर्णन करितांना धौम्य सांगतो कीं, ' फुटकीं भांडीं, मोडक्या खाटा, कोंबडीं, कुत्रीं हीं घरांत ठेवणें व वृक्ष लावणें, हें अप्रशस्त होय. फुटक्या भांड्यांत कलि राहतो, मोडक्या खाटेंत अवदसा वास करते व वृक्षाच्या कांठीं जंतु असतात; यास्तव या सर्वांविषयीं जपलें पाहिजे, ' ( म. अनु. १९९ ). धौम्यस्मृति म्हणून एक ग्रंथ यानें रचिला आहे ( C. C. ).

२ व्याघ्रपाद ऋषीच्या दोन पुत्रांतील कनिष्ठ व उपमन्यूचा कनिष्ठ भ्राता.

३ एक ऋषि. सत्यवानाचा पिता द्युमत्सेन हा आपल्या प्रिय पुत्राचा व सुनेचा शोध करीत करीत या ऋषीच्या आश्रमांत आला होता. त्या वेळीं 'तुझा पुत्र लवकरच स्नुषेसह जिवंत परत येईल,' असें यानें त्यास भविष्य सांगितलें ( म. व. २९८ ).

४ एक मध्यमाध्वर्यु.

**धौम्र**—एक ऋषि ( म. शां. ४६. १२ कुं. ).

**ध्यानकाष्ठ**—भृगुकुलोत्पन्न एक ऋषि ( धर्मगुप्त पहा ).

**ध्युषिताश्व**—( सू. इ. ) वायुमतें हा शंखणपुत्र. यास भागवतमतें विधृति व विष्णुमतें व्युत्थिताश्व म्हटलें आहे.

**ध्रुक**—( शुंग. भविष्य. ) वायुमतें वसुमित्राचा पुत्र. याबद्दल अंतक, आर्द्रक, भद्र व भद्रक अशीं नांवें आहेत.

**ध्रुव**—( स्वा. उत्तान. ) उत्तानपाद राजाला सुनीति व सुरुचि अशा दोन राण्या होत्या. पैकीं सुनीति किंवा सुनृता ही नावडती असून सुरुचि ही आवडती होती. सुनीतीच्या पोटीं ध्रुवाचा जन्म झाला. एकदां उत्तानपाद राजा आपली आवडती राणी जी सुरुचि, तिचा मुलगा उत्तम यास मांडीवर घेऊन खेळवीत होता. तें पाहून ध्रुवालाहि बापाच्या मांडीवर बसण्याची इच्छा झाली व हा मांडीवर चढूं लागला; पण राजानें याचें कौतुक केलें नाहीं. इतक्यांत गर्विष्ठ सुरुचीनें तें पाहिलें. तिच्या मनांत मत्सर उत्पन्न होऊन ती ध्रुवाला राजासमक्ष हिणवून बोलली. ती म्हणाली, 'ईश्वराची आराधना करून माझ्या पोटीं ये, म्हणजे तुला राजाच्या मांडीवर बसतां येईल.'

हें सावत्र आईचें कठोर भाषण ऐकून ध्रुव खिन्न झाला. ह्या वेळीं राजानें अवाक्षर देखील काढिलें नाहीं. तेव्हां ध्रुव रडत रडत आपल्या आईकडे गेला. सुनीतीनें याला मांडीवर घेतलें आणि याकडून सवतीचें कठोर भाषण ऐकिल्यावर तिला अत्यंत दुःख झालें. तिला या दुःखाचा शेवट कसा होईल हें कळेना.

नंतर ईश्वराराधनेचा निश्चय करून ध्रुव पित्याच्या नगरांतून बाहेर निघाला. ही गोष्ट नारदास समजली. तेव्हां ध्रुवानें काय करावयाचें ठरविलें आहे, तें जाणून घेतल्यावर त्यानें आपला वरदहस्त याच्या मस्तकावर ठेविला. ध्रुवाचें क्षात्रतेज व मानी स्वभाव पाहून नारदास आश्चर्य वाटलें. नारद म्हणाला, ' तूं लहान आहेस, तुला मानापमान यांतील भेद कळत असला, तरी त्याबद्दल असंतोष मानण्याचें कारण नाहीं. कारण, असंतोषास मोहाशिवाय दुसरें कारण नाहीं. हें सर्व ईश्वराच्या आधीन आहे. दैवानें मिळेल, त्यांतच संतोष मानावा. तुझा ईश्वराधनेचा निश्चय फार अवघड आहे. मोठमोठ्यांनीं हात टेंकले आहेत, तेव्हां हा मार्ग सोडून तूं घरीं जा. '

हें नारदाचें भाषण ऐकून ध्रुव म्हणाला कीं, ' मी निष्ठुर क्षत्रिय वंशांत जन्मलों आहे व त्यामुळें माझ्या स्वभावांत विनय नाहीं. सुरुचीच्या अपशब्दानें माझें हृदय भग्न झालें आहे. यावर आपला हा उपदेश ठसणें शक्य नाहीं. मी त्रिभुवनांतील श्रेष्ठ पद मिळण्याची अपेक्षा करीत असून तें मिळण्याचा मला मार्ग सांगा. कारण, आपण लोकांकरितां त्रैलोक्यांत फिरतां, हें मला माहीत आहे. '

हें ध्रुवाचें भाषण ऐकून नारदाच्या अंतःकरणांत दया उत्पन्न झाली. तो म्हणाला, ' तूं मातेच्या आज्ञेप्रमाणें श्रीहरीची कृपा संपादन कर. त्याकरितां तूं यमुनेच्या तीरीं मधुवनांत जा. तेथें इंद्रियदमन कर.' असें सांगून याला 'ॐ नमो भगवते वासुदेवाय ' हा द्वादशाक्षरी गुप्त मंत्र दिला व आशीर्वाद देऊन तो निघून गेला. हा उपदेश सप्तर्षींनीं केला असें स्कंद व विष्णु पुराणांमध्यें आहे. मागाहून उत्तानपादाला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला. पण नारदानें उत्तानपादाला भेटून ' तुझा पुत्र लवकरच महत्कार्य करून परत येईल' असें सांगितलें.

ध्रुवानें तपाला सुरवात केली. हा फलाहार, उदकपान व वायुभक्षण हीं क्रमाक्रमानें करून एका पायावर उभा राहून ब्रह्मदेवाची आराधना करूं लागला. याच्या आंगठ्याच्या भारानें पृथ्वी लवूं लागली. इंद्रादिकांचे श्वास कोंडून जाऊन ते विष्णूस शरण गेले. तेव्हां विष्णूनें ध्रुवास तपश्चर्येपासून परावृत्त करण्याचें त्यांना आश्वासन दिलें. यामुळें सर्व देव आनंदी होऊन स्वस्थानीं परत गेले.

त्याप्रमाणें विष्णु गरुडावर बसून मधुवनांत आला व त्यानें ध्रुवास दर्शन दिलें. ध्रुव त्याचें गुणवर्णन करूं लागला, पण तें कसें करावें हें यास समजेना. तेव्हां विष्णूनें याच्या गालाला वेदस्वरूपी शंखानें स्पर्श केला. त्या वेदमय वाणीनें विष्णूचें यानें स्तवन केलें. यामुळें विष्णु प्रसन्न होऊन त्यानें याला इच्छित मागण्यास सांगितलें. ध्रुवानें अढळ स्थान द्यावें, अशी इच्छा दर्शविली. त्यावर विष्णूनें याला ' उत्तानपाद राजा तुला गादीवर बसवून वनांत जाईल व तूं छत्तीस हजार वर्षे राज्य करशील आणि तदनंतर अढळ स्थान पावशील, उत्तम हा मृगयेस गेला असतां नाश पावेल व त्याची माता सुरुचि त्याच्या ठिकाणीं आसक्त झाल्यामुळें अरण्यांत वणव्यांत प्रवेश करील. तूं अनेक यज्ञ करून सर्वांना वंद्य व संसारमुक्त होशील, ' असें सांगितलें. यानंतर विष्णूची ध्रुवानें पूजा केली व हा परत स्वनगराला आला.

ध्रुव येत आहे, असें उत्तानपाद राजाला समजलें. पण ~~तें त्यास खरें वाटेना.~~ परंतु नारदानें हा परत येण्याबद्दल सांगितलें होतें, हें त्यास आठवलें. तेव्हां त्यास अतिशय हर्ष होऊन त्यानें वार्ताहराला एक बहुमोल हार दिला. नंतर मोठ्या सन्मानानें शृंगारलेल्या हत्तिणीवर त्याला उत्तमासह बसवून नगरांत आणिलें, व त्याचें मस्तक अवघ्राणिलें. नंतर दोघीं मातांना ध्रुव भेटला. सुरुचीनें यास ' चिरंजीव हो,' असा आशीर्वाद दिला. पुढें ध्रुव आपल्या माता, पिता व बंधु यांसमवेत सुखानें कालक्रमणा करूं लागला. पुढें यास राजानें राज्याभिषेक करविला व तो वनांत निघून गेला. ध्रुवानें शिशुमार प्रजापतीच्या भ्रमी नामक कन्येशीं विवाह केला. तसेंच वायूची इला नामक कन्या याची दुसरी भार्या होती.

ध्रुवाचा सावत्र भाऊ पर्वतावर मृगयेस गेला असतां एका बलाढ्य यक्षानें त्याचा वध केला. हें ऐकून यास अतिशय क्रोध आला व हा यक्षाचें पारिपत्य करण्यासाठीं विजयशाली रथांत बसून यक्षनगरी अलकेवर चालून गेला. तेथें घनघोर युद्ध झालें. पण यक्षानें माया पसरून ध्रुवास निर्बल केलें. तेव्हां ऋषींनीं ध्रुवास शत्रूचा निःपात होईल, असा आशीर्वाद दिला. पुढें नारायणास्त्राच्या योगानें ध्रुवानें तें मायापटल दूर करून यक्षांची दाणादाण केली. अशा तऱ्हेनें गुह्यकांचा ध्रुव नाश करीत असतां, स्वायंभुव मनूस त्यांची दया येऊन त्यानें आपला नातू ध्रुव यास युद्धापासून व गुह्यकांच्या हननापासून परावृत्त केलें. शिवाय, यक्षवधामुळें रागावलेल्या कुबेराला प्रसन्न करून घेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें यानें युद्ध बंद केलें. हें पाहून कुबेर तेथें आला. ध्रुवानें आजोबांच्या सांगण्यावरून वैर सोडिलेलें पाहून त्यास संतोष झाला व त्यानें याला वर मागण्यास सांगितलें. तेव्हां ' श्रीहरीचें अखंड स्मरण घडावें,' असा यानें वर मागितला. पुढें छत्तीस हजार वर्षे राज्य करून हा आपल्या मुलास गादीवर बसवून बदरिकाश्रमीं गेला. नंतर यास नेण्याकरितां एक विमान आलें. त्यांत बसण्यास हा सिद्ध झाला असतां मृत्यु तेथें आला. त्यानें ' देह ठेवून जा, ' असें सांगितलें. पण ध्रुवास तें मान्य न होतां हा त्याच्या डोक्यावर पाय देऊन विमानांत बसला. स्वर्गास जातांना सुनीति मातेची यास आठवण झाली व तींसह जावें, असें यास वाटलें. इतक्यांत सुनीति स्वर्गास जात असलेली यानें पाहिली.

ध्रुवास भ्रमी( भूमि )पासून कल्प व वत्सर असे दोन पुत्र झाले व वायुकन्या इला हिजपासून याला उत्कल नामक पुत्र झाला ( भा. ४. ८. १३; विष्णु. १. १२; मत्स्य. ४; लिंग. १. ६२; स्कंद. ४. १. १९-२१; ह. वं. १. २ ).

ध्रुव पूर्वजन्मीं ब्राह्मण होता. यानें मातापितरांची योग्य शुश्रूषा केली व धर्मपालनहि केलें. त्यामुळें याचा एक राजपुत्र मित्र झाला. त्याचें वैभव पाहून यास राजपुत्र व्हावेंसें वाटलें. त्यामुळें हा उत्तानपाद राजाच्या पोटीं आला ( विष्णु.

१. ११-१२ ). यानें पक्षवर्धिनी एकादशीचें व्रत केलें होतें ( पद्म. उ. ३६ ).

२ ( सो. पुरूरवस्. ) नहुषाचा पुत्र व ययातीचा भाऊ.

३ हा क्षत्रिय असून पांडवांच्या पक्षाचा होता. कृपाचार्यानें कर्णाला कृष्णार्जुन असतील तिकडे जय होईल, असें सांगतांना ज्या शूरांचीं नांवें सांगितलीं, त्यांतच हें नांव आहे ( म. द्रो. १५. ३८ कुं. ).

४ सुख देवांपैकीं एक.

५ विकुंठ देवांतील एक.

६ लेख देवांतील एक

७ धर्म व वसु यांचा पुत्र.

८ धर्मास धूम्रेपासून झालेला पुत्र.

९ मधुवनांतील शाकुनि ऋषीच्या नऊ पुत्रांतील ज्येष्ठ.

१० भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय एक राजा ( म. द्रो. १५९. २८. कुं. ).

**ध्रुव आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १७३ ). याच्या सूक्तांत राष्ट्र व राजा यांसंबंधीं प्रजासत्ताक राज्यांत असणारे विचार आढळतात.

**ध्रुवाक्षिति**—लेख देवांतील एक.

**ध्रुवसंधि**—(सू. इ.) कोसल देशच्या पुष्य राजाचा पुत्र. यास पौष्य असेंहि नांव आहे. याला लीलावती व मनोरमा अशा दोन स्त्रिया होत्या. एकदां हा ससैन्य मृगयेस गेला असतां, याची व एका क्रूर सिंहाची झटापट लागली, तींत हा ठार झाला. लीलावतीपासून शत्रुजित् व मनोरमेपासून सुदर्शन असें याला दोन पुत्र झाले ( दे. भा. ३. १४ ). भविष्यांत ध्रुवसिधि असा पाठ आहे. यानें दहा हजार वर्षें राज्य केलें.

**ध्रुवसंधि**—( ध्रुवसंधि पहा ).

**ध्रुवाश्व**—( सू. इ. ) भानुमान् राजाचें नामांतर.

२ ( सू. इ. भविष्य. ) मत्स्यमतें सहदेवाचा पुत्र. याबद्दल इतरत्र बृहदश्व असें नांव आहे.

**ध्वज**—प्रधानाचें नांव ( ३ सांब पहा ).

**ध्वजकेतु**—द्रुपदाचा पुत्र ( म. आ. २१८. १९ कुं. ).

**ध्वजग्रीव**—रावणपक्षीय एक राक्षस ( वा. रा. सुं. ६ ).

**ध्वजवती**—हरिमेधा ऋषीची कन्या ( म. उ. ११० ).

**ध्वानि**—सुधामन् देवांतील एक.

**ध्वन्य**—लक्ष्मणाचा पुत्र. प्रजापतिपुत्र संवरणानें देणगी दिल्याबद्दल याची प्रशंसा केली आहे ( ऋ. १५. ३३. १० ). त्रसदस्यु व मारुताश्व हेहि ध्वन्याचे आश्रयदाते होते.

**ध्वसन् द्वैतवन**—सरस्वतीतीरावर यज्ञ करणाऱ्या मत्स्य लोकांच्या राजाचें हें नांव आहे ( श. ब्रा. १३. ५. ४. ९. ).

**ध्वसन्ति**—हा इंद्राचा शत्रु आहे. याच्याबरोबर पुरुषंतीचा उल्लेख असून हे दोघे कश्यपकुलांतील अवत्साराचे आश्रयदाते होते. सूक्तद्रष्टा अवत्सार हा ध्वसंति व पुरुषंति यांच्यापासून धन मिळाल्याचा उल्लेख करितो ( ऋ. ९. ५८. ३ ). अश्वींनीं यास मदत केल्याचा उल्लेख आहे ( ऋ. १. ११२. २३ ). ध्वस्र व ध्वसंति हे एक असण्याचा संभव आहे. ध्वस्राचा सुद्धां पुरुषन्तीबरोबर उल्लेख आहे ( ऋ. ९. ५८. ३; साम. २. ४०९ ). ध्वस्रे असें स्त्रीलिंगी द्विवचन आढळतें (पं. ब्रा. १३. ७. १२ ). हीं स्त्रियांचीं नांवें आहेत कीं काय, हें सांगतां येत नाहीं ( ध्वस्र पहा ).

**ध्वस्र**—ध्वस्र व पुरुषन्ति यांच्यापासून विपुल संपत्ति मिळाल्याचा अवत्सार काश्यपानें उल्लेख केला ( ऋ. ९. ५८. ३-४ ). यानें तरंत व पुरुमिहळ यांना देणग्या दिल्याचा उल्लेख आहे ( पं. ब्रा. १३. ७. १२; जै. ब्रा. ३. १३९ ). सायणानेंहि शाट्यायन ब्राह्मणाचा उतारा देऊन या गोष्टीचा उल्लेख केला आहे ( ऋ. ९. ५८. ३ ). यांचा उल्लेख द्विवचनीं येतो. स्त्रीलिंग सायणाच्या मताप्रमाणें आर्ष आहे. ध्वस्र व ध्वसंति एकच असावेत.

# न

**नकवत्**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें हा हृदीकपुत्र आहे.

**नकुल**—( सो. कुरु. ) हा पांच पांडवांतील एक असून पांडूला माद्रीपासून झालेल्या आवळ्याजावळ्या मुलांतील वडील मुलगा होय. अश्विनीकुमारांच्या अंशानें हा झालेला होता. याचा जन्म शतशृंगावर झाला. शतशृंग हें हिमालयाच्या एका शिखराचें नांव आहे ( म. आ. १२४ ). याचें शिक्षण द्रोणाचार्यापाशींच झालें.

याला दोन स्त्रिया होत्या. एक द्रौपदी व दुसरी शिशुपालाची कन्या व धृष्टकेतूची बहीण रेणुमती किंवा करेणुमती ( म. आ. ६३. ७० कुं. ). राजसूय यज्ञाच्या वेळीं हा पश्चिम दिशेला

दिग्विजय करण्याकरितां गेला होता. त्या दिशेला जाऊन यानें तिकडील राजे जिंकिले.

हा खांडवप्रस्थांतून बाहेर पडल्यावर कार्तिकेयाला प्रिय असणाऱ्या रोहितक पर्वतावर गेला. तेथें यानें मत्तमयूरकांशीं युद्ध केलें. मत्तमयूरकांना जिंकून मरुभूमि, बहुधान्यक, शैरीषक व महेत्थ हे देश जिंकिले. आक्रोश नांवाच्या राजर्षीचा पराभव केला. नंतर दशार्ण, शिबि, त्रिगर्त, अम्बष्ठ, मालव, कर्पट, मध्यमकेय, वाटधान व द्विज या देशांना जिंकून हा परत फिरला. पुढें पुष्करच्या रानांतील लोक, उत्सवसंकेतगण, सिंधूच्या तीरावरील ग्रामणीय, सरस्वतीच्या तीरावरील मत्स्याहारी, शूद्र व आभीर, पंचनद, अमरपर्वत, उत्तरज्योतिष, दिव्यकटपूर, द्वारपाल, रामठ, हारहूण व पश्चिमेकडील राजे, भगवान् श्रीकृष्ण, मद्रदेशांतील शाकल नगरींत राहणारा शल्यमामा यांना आपली सत्ता मान्य करावयास लावून त्यांच्यापासून करभार घेतला. पुढें समुद्रकांठीं राहणाऱ्या पल्हव, बर्बक, किरात, यवन व शक यांच्याकडून करभार घेऊन हजारों उंटांवरून संपत्ति वाहून इंद्रप्रस्थाला आणिली (म. स. ३५ कुं.; भा. १०. ७२). विराटगृहीं असतांना नकुलाचें गुप्त नांव जयत्सेन असें होतें (म. वि. ७. ६६ कुं.), आणि विराटाच्या दरबारांत प्रत्यक्ष व्यवहाराकरितां ग्रंथिक किंवा दामग्रंथिक असें नांव यानें घेतलें होतें (म. वि. ४. ५ कुं.).

हा अश्वविद्येंत कुशल होता. त्या विद्येचा विराटाच्या दरबारांत उपयोग झाला. घोडयांचे रोग बरे करणें, खोडया नाहींशा करणें व त्यांस शिकविणें हीं कामें येत असल्यामुळें विराटानें आपली सर्व अश्वशाला याच्या ताब्यांत दिली होती.

पुढें कृष्ण शिष्टाईला जाण्याचा प्रसंग आला, तेव्हां यानें 'शिष्टाई फलदायी होईल व संधि होऊन युद्ध थांबेल, याची शक्यता मानून, तसाच कृष्णानें प्रयत्न करावा,' असा सल्ला दिला (म. उ. ७९ कुं.).

युद्ध सुरू झाल्यावर नकुलाचें दुर्योधनाशीं युद्ध झालें. युद्ध करितांना नकुलानें दुर्योधनाला उजवी घातली व शेकडों बाण सोडले. दुर्योधनाला ती गोष्ट सहन न होऊन त्यानें नकुलाला उजवी घालण्याचा प्रयत्न केला, पण नकुलानें मोठ्या हुषारीनें सर्व बाजू रोखल्यामुळें दुर्योधनाला उजवी घालतां आली नाहीं. तेव्हां नकुलानें 'दुर्योधना, उभा रहा,' असें म्हणून दुर्योधनाचा उपहास केला (म. द्रो. १८८. ५३. कुं.). पण कर्णाला मात्र याला जेरीस आणतां आलें नाहीं. कर्णानें याला ठारच केलें असतें, पण कुंतीच्या वचनाला जागून त्यानें याला पळतां भुई थोडी केली (म. क. १५. ५३ कुं.).

पुढें धर्मानें अश्वमेध केला. त्या वेळीं नकुल दक्षिण दिशा जिंकीत असतां, साभ्रमतीचे तीरीं आला व तेथें यानें पांडुरार्या नांवाच्या तीर्थाची स्थापना केली (पद्म. उ. १६६). शेवटीं पृथ्वीप्रदक्षिणेकरितां पांडव निघाले असतां उत्तरेकडे वळले व हिमालय ओलांडून पलीकडे गेले. तेथें त्यांना वालुका-समुद्र लागला. तेथून वेगानें चालले असतां द्रौपदीनंतर नकुल मृत्यु पावला. अर्जुनानें धर्माला नकुलाच्या मध्येंच मत्यूचें कारण विचारिलें. तेव्हां धर्मानें सांगितलें कीं, नकुल 'मीच एक सुंदर आहें' असा अहंकार बाळगीत असे, म्हणून हा मध्येंच मृत्यु पावला (म. महा. २). या वेळीं याचें वय १०५ वर्षांचें होतें (युधिष्ठिर पहा) हा कान्यकुब्ज देशांत बलभानूच्या लक्ष्मण नांवाच्या पुत्राच्या रूपानें पुनः जन्मास आला (भवि. प्रति. ३. १). याला द्रौपदीपासून शतानीक व रेणुमतीपासून निरमित्र असे दोन पुत्र झाले (म. आ. ६३.७८; ६४. १६४ कुं.; भा. ९. २२. २९-३२). हा रूपानें फारच सुंदर होता (म. आ. १२४; आश्र. २५). हा एकरथी होता (म. उ. १६९.५ कुं.). तसेंच हा अश्वविद्येंत फार निपुण होता. याच्या शंखाचें नांव सुघोष (म. भी. २५. १६ कुं.).

याच्या नांवावर वैद्यकसर्वस्व नामक एक ग्रंथ आहे (ब्रह्मवै. २. १६).

**नकुलीश**—पाशुपतदर्शनकार. याचा कारावनाशीं संबंध आला होता.

**नक्त**—(स्वा. प्रिय.) पृथुषेण राजाचा पुत्र. याच्या आईचें नांव आकूति. यास द्रुतीपासून गय नांवाचा पुत्र झाला (भा. ५. १५).

**नखवत्**—(भविष्य.) वायुमत मथुरा नगरींत राज्य करणारा एक राजा.

२ (भविष्य.) ब्रह्मांडमतें वैदेशांतील नागवंशीय एक राजा.

**नग**—शत्रुघ्नाच्या सेनापतीचें नांव.

**नगरिन् जानश्रुतेय**—हा उदित होमवादी एक आचार्य होता (ऐ. ब्रा. ५. ३०). नगरिन् जानश्रुतेय काण्डिय असें याचें नांव आढळतें (जै. उ. ब्रा. ३. ४०. २). नगरिन् याचा अर्थ नगरांत राहणारा, असा सायण करतात. याचा ऐकादशाक्ष मानुतंतव्याशीं संबंध आला होता.

**नग्रहू**—(नग्नहू पहा).

**नग्नक**—गरुडानें खाल्लेले निषाद बाहेर टाकिले असतां ते म्लेच्छत्व पावले. त्यांपैकीं आग्नेयीस पडलेले नग्नक होते (पद्म. सृ. ४७).

**नग्नजित्**—विश्वंतराच्या सोमयागांत श्यापर्णांचा प्रवेश झाल्यानंतर त्यांनीं प्रतिपादलेल्या सोमविषयक मताची परंपरा सांगतांना याचा उल्लेख आला आहे. ती परंपरा वैदर्भीकडून

नग्नजिताकडे आली व नग्नजिताकडून गांधाराकडे गेली ( ऐ. ब्रा. ७. ३४ ). याच्या मुलाचें नांव स्वर्जित्. यानें एक धार्मिक विधि सांगितला ( श. ब्रा. ८. १. ४. १० ). नग्नजितानें केलेला वास्तुशास्त्रावर एक ग्रंथ आहे ( मत्स्य. २५२ ).

नग्नजित् गांधार असें व्यक्तीचें नांव शतपथब्राह्मणांत दिलें आहे. ऐतरेयब्राह्मणांत नग्नजित् गांधार असा एकत्र उल्लेख असूनहि सायणाचार्य नग्नजित् व गांधार वेगळे मानितात. वास्तविक तो सगळा परिच्छेद अनेक व्यक्तींच्या नांवांचा असून तेथें तेथील प्रत्येक व्यक्ति वेगळी मानून केलेला अर्थ चुकीचा असावा.

२ कृष्णाची स्त्री सत्या, हिचा पिता. हा इषुपात् नामक असुराच्या अंशानें जन्मला होता. कर्णानें दिग्विजयाच्या वेळेस याला जिंकिलें होतें. भारतीय युद्धांत हा कौरवपक्षाकडे होता ( म. आ. ६८. २१; व. २५५. २१ कुं.; भा. १०. ५८. ३२ ).

**नग्नहू**—( नग्रहू पहा ).

**नग्रहू**—हा एक ऋषिक होता ( वायु. १. ५९. ९२–९४). यालाच नग्नहू (मत्स्य.१४५. ९५–९९) व नगृहू अशीं नांवें आहेत ( ब्रह्मांड. १. ३२. १०१–१०३ ).

**नचक्षु**—( सो. ) भविष्यमतें मषपालाचा शिष्य.

**नचिकेतस्**—सायणाचार्यांनीं या नाचिकेतसूच्या गोष्टीला धरून एका सूक्ताचा अर्थ केला आहे. पण ऋग्वेदांत तसा स्पष्ट उल्लेख नाहीं ( ऋ. १०. १३५ ). उद्दालकाचा नचिकेतस् हा मुलगा होय. कठोपनिषदांत नचिकेतसूला वाजश्रवस म्हणजे वाजश्रवस्‌चा पुत्र ( १. १ ) व औद्दालकि आरुणि असेंहि म्हटलें आहे ( १. ११ ). उद्दालकानें विश्वजित् यज्ञ करून आपलें सर्वस्व ऋत्विजांना देऊन टाकलें, त्या वेळीं नचिकेतस् कुमारावस्थेंत होता. पण बुद्धीनें चलाख असल्यामुळें आणि वयाला अनुरूप श्रद्धा असल्यामुळें यज्ञ योग्य प्रकारें व्हावा, असें याला वाटत होतें. विश्वजित यज्ञांत सर्वस्व दान करावें लागतें. नचिकेताला वाटलें कीं,सर्वस्व द्यावयाचें, तर माझ्या बापाला माझेंहि दान करावयास पाहिजे: कारण, त्याच्या सर्वस्वांत माझा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. जिज्ञासा याला स्वस्थ बसूं देईना. बाप अनेक प्रकारचीं दानें देत होता. पण कठोपनिषदांत ( १.४ ) तो चांगल्या गाईंच्या ऐवजीं रोडक्या बिनदुधाच्या गाई देत होता. त्यामुळें यज्ञ यथासांग न होतां आपल्या पित्यास दोष लागेल व त्याचें प्रायश्चित्त पित्याबरोबर आपणांसहि भोगावें लागेल, या दृष्टीनें नचिकेतानें पित्याला तशा दानापासून निवारण करण्याच्या इच्छेनें विचारलें कीं, 'कस्मै मां दास्यसि?' बाप हा पोर म्हणून त्याकडे दुर्लक्ष करीत होता. परंतु नचिकेतसनें त्याचा पिच्छा पुरविला. तेव्हां उद्दालक याला रागावून म्हणाला कीं, ' तुला मी मृत्यूला देऊन टाकतों.' त्या वेळीं आकाशवाणी झाली कीं, ' हे गौतमकुमारा नचिकेता, तुझ्या पित्याचा उद्देश असा आहे कीं, तूं मृत्यूच्या घरीं जावेंस. पण तूं असें कर कीं, यम घरीं नसून प्रवासास गेला असल्याची बातमी ठेवून तूं यमाच्या घरीं जा. यम घरीं नसल्यामुळें त्याच्या बायकामुलांनीं जेवणाची विनंति केली असतांहि तूं उपाशी रहा. यम घरीं आल्यावर विचारील, तेव्हां तीन रात्री झाल्या, असें सरळ उत्तर दे. त्यानें पहिल्या दिवशीं काय खाल्लेंस, असा प्रश्न केला असतां ' तुझी प्रजा खाल्ली ' असें उत्तर दे. त्या योगानें एक दिवस अतिथि आपल्या घरां उपोषित राहिला, तर आपल्या प्रजेचा क्षय होतो, ही गोष्ट त्याच्या लक्षांत येईल. दुसऱ्या व तिसऱ्या दिवसांबद्दलहि तो असाच प्रश्न विचारील तेव्हां ' तुझे पशु व तुझें सुकृत खाल्लें, ' असें उत्तर दे. त्यायोगें घरीं आलेला अतिथि दुसऱ्या व तिसऱ्या दिवशीं उपाशी राहिल्यास आपल्या पशूंची व सुकृताची हानी होते, हें त्याच्या ध्यानांत येईल.' आकाशवाणीनें सांगितल्याप्रमाणें नचिकेतस् यमाचे घरीं गेला व यम घरीं आल्यावर त्यास यानें उत्तरें दिलीं. तेव्हां यमाच्या ध्यानांत आलें कीं, हा मोठा अधिकारी आहे. याला मारणें योग्य नाहीं. यम आदरानें नचिकेतसला म्हणाला, 'भगवन्, मी प्रसन्न झालों आहें. तुला वाटेल ते वर मागून घे.' नचिकेतसूनें खालीलप्रमाणें तीन वर मागून घेतले. १ मी जिवंत परत जाऊन आपल्या बापास भेटावें; २ माझ्या हातून घडणारीं श्रौतस्मार्त कर्में अक्षय्य व्हावीत; ३ मृत्यूवरहि जय मिळावा. हे वर मिळाल्यावर नाचिकेतस् घरीं परत आला ( तै. ब्रा. ३. ११. ८ ). याच्या नांवावर नाचिकेत-चयनाचा उल्लेख आहे. कठोपनिषदांतहि दुसऱ्या वरानें अग्नीचें ज्ञान व चयन मृत्यूनें नचिकेतसूला सांगितलें व हा अग्नि तुझ्याच नांवानें लोक ओळखतील, असें सांगितलें आहे. 'एतमग्निं तवैव प्रवक्ष्यन्ति जनासः ' ( १. १९ ). आकाश-वाणीची हकीगत कठोपनिषदांत नाहीं. बाप रागानें बोलला आणि बापाचें बोलणें खरें करावें, म्हणून नचिकेतस् यमाकडे गेला व तेथें याचा अत्यंत वक्तृत्वपूर्ण संवाद झाला, तो कठोप-निषदांतून सर्व लोकांत पसरला आहे. हीच नचिकेतसची गोष्ट वराहपुराणांत ( १७०-१७६ ) व महाभारतांत ( अनु. १०६. २; ४. २३ कुं. ) आली आहे. महाभारतांत याला औद्दालकि आरुणि नाचिकेतस असें म्हटलें आहे. व गोष्टींत तत्त्वांतच फरक आढळतो. एकदां उद्दालक नदीवरून परत आला, पण स्नान व वेदाध्ययन यांत निमग्न झाल्यामुळें नदी-

तीरावरून समिधा, दर्भ, कलश, भोजनसामग्री वगैरे आणण्याचें विसरला. तेव्हां त्यानें ती सर्व सामग्री आणण्यास याला सांगितलें. बापाच्या आज्ञेप्रमाणें हा नदीच्या कांठीं गेला. पण तेथील सर्व वस्तु पाण्यानें वाहून गेल्या होत्या. त्यामुळें यास तेथें कांहींच सांपडलें नाहीं. त्याप्रमाणें पित्यास सांगतांच श्रमानें व क्षुधेनें व्याकुल झालेल्या उद्दालकीच्या तोंडून 'मर' असे शब्द निघाले. त्याबरोबर शापानें नचिकेतस् मृत झाला. व उद्दालक अत्यंत शोकाकुल झाला. अशाच शोककारक स्थितींत तो दिवस व रात्र उद्दालकीनें घालविली. दुसरे दिवशीं नचिकेतस् जागा झाल्यावर यानें यमानें सांगितलेलें गोदानमाहात्म्य पित्यास सांगितलें. गोदानमाहात्म्य सांगण्याकरितां पुरातन इतिहास म्हणून ही गोष्ट भीष्मानें धर्माला सांगितली आहे.

हा आंगिरस असावा. याला नचिकेतस् किंवा नचिकेत असें नांव असावें.

**नड नैषध**—शतपथब्राह्मणांत (२. ३. ४-१-२) हें नांव आलें आहे व तें दाक्षिणेकडील राजाचें नडाचें विशेषण म्हणून आलें आहे. याच नांवाचें पुढें प्रचारांत आलेलें रूप नैषध होय. नड व नल हे एकच होत. 'डलयोरभेदः' असा नियम आहेच. कदाचित् याला निषध देशाचा राजा म्हणून नैषिध म्हटलें असावें. कदाचित् नैषिध हेंच रूप बरोबर असावें. नड नैषध हा राजा असावा व यानें जे विजय संपादिले, त्यामुळें याची यमाशीं तुलना केली असावी. याच ब्राह्मणग्रंथांत याला दक्षिणेकडील यज्ञांतील अग्नि असें म्हटलें आहे. त्यावरून दक्षिणेकडील राजा जसा यम तसा हाहि दक्षिणेकडील राजा असावा. नड व दमयंतीपति नल हे एकच असावेत.

**नडायन**—भृगुकुलांतील एक गोत्रकार. नवप्रभ असा पाठभेद आहे.

**नड्वला**—वीरण प्रजापतीची कन्या व चक्षुर्मनूची पत्नी (भा. ४. १३. १६).

**नदाकि**—जिह्वकाचें नामान्तर.

**नंदिवर्मन्**—परिहरवंशीय शांतिवर्म्याचा पुत्र (भवि. प्रति. ४. ४).

**नंद**—कृष्णाचा पालक पिता. याची पत्नी यशोदा. हा गोकुलांतील गोपांचा मुख्य असून द्रोण नांवाच्या वसूच्या अंशानें जन्मास आला होता (भा. १०.८.४८; पद्म. सृ. १३; ब्र. १३). वसुदेवानें कृष्णाला गुप्त रीतीनें याचेकडे ठेविलें होतें (भा. १०. ३. ५१). हा एकदां वसुदेवाला अकस्मात् भेटला होता (भा. १०. ४६. २७-३०). हा पाण्यांत बुडाला असतां कृष्णानें याला काढिलें (भा. १०. २८. २-९). हा स्यमंतपंचकक्षेत्रीं गेला होता (भा. १०. ८२. ३१). हा इंद्रयाग करीत असे. त्याऐवजीं कृष्णानें याकडून कार्तिक शुद्ध प्रतिपदेस अन्नकूट करविला (भवि. प्रति. ४. १९. ६४-६८). कृष्णविरहानें हा व्याकुल झाला असतां उद्धवानें याचें सान्त्वन केलें (भा. १०. ४६. २७-३०). हा मधुपुरी ऊर्फ मथुरा हिच्या आसपास असणाऱ्या महावनांतील आभीरभानु नांवानें गोपांचा मुख्य होता. आभीरभानु-चंद्रसुरभि-सुश्रवस्-कालमेदु-चित्रसेन असा वंशवेल आहे. चित्रसेनाला नऊ मुलें होतीं. १ सुनंद, २ उपनंद, ३ महानंद, ४ नंदन, ५ कुलनंद, ६ बंधुनंद, ७ केलिनंद, ८ प्राणनंद, ९ नंद (आदि. ११).

२ एक विष्णुभक्त राजा. याच्या भक्तीनें संतुष्ट होऊन विष्णूनें यास एक सुंदर विमान दिलें होतें. एकदां दैवयोगानें यास मानससरोवरांतील सुवर्णकमलांचा अपहार करण्याची बुद्धि झाली. त्याबरोबर याचें विमान वगैरे सर्व नष्ट होऊन हा कुष्ठी बनला. परंतु वसिष्ठाच्या सांगण्यावरून यानें प्रभासक्षेत्रीं तप केलें व हा मुक्त झाला (स्कंद. ७. १. २५६).

३ वसुदेवास मदिरेपासून झालेला पुत्र (भा. ९. २४. ८).

४ (सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

५ (नंद. भविष्य.) शिशुनागवंशाचा महानंदीच्या वेळीं शेवट होऊन शूद्रापुत्र नंद गादीवर आला. यानें महानंदीस ठार केलें व राज्य बळकावलें. याच्या वंशांतील सुमाल्यादि आठ पुरुषांनीं शंभर वर्षे राज्य केलें. कौटिल्यानें आठ नंदवंशजांना मारून चंद्रगुप्ताला गादीवर बसविलें. यांतील पोट तपशील मिळत नाहीं (भा. १२. १.).

सुमाल्यादीच्या ऐवजीं सुकल्पादि असा पाठ आहे (विष्णु ४. २२-२४; वायु. २. ३७. ब्रह्मांड ३. ७४). नंदाच्या वेळींच कौटिल्याचा विरोध सुरू होऊन नंद व त्याचीं आठ मुलें कौटिल्याच्या कारस्थानास बळी पडलीं व नव नंदांचा नाश होऊन चंद्रगुप्त गादीवर आला (मत्स्य. २७२).

कलीचीं तीन हजार तीनशें दहा वर्षे झाल्यावर नंदराज्य सुरू झालें (स्कंद. १. २. ४०.).

६ हा पिशाचयोनीप्रत गेला असतां मुनिशर्मा ब्राह्मणानें याचा उद्धार केला (पद्म. पा. ९४).

७ विष्णूचा एक पार्षद (भा. ४. १२. २२).

**नंदक**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

२ वसुदेवास वृकदेवीपासून झालेला पुत्र.

३ दुर्योधनपक्षीय योद्धा (म. भी. ६४).

**नंदन**—(सो. क्रोष्टु.) वायुमतें हा मधुवंश राजाचा पुत्र

२ हिरण्यकशिपूचा पुत्र. हा श्वेतद्वीपांत राज्य करीत असे. हा शंकराच्या वरानें सर्वांस अजिंक्य झाला होता. यानें

दहा हजार वर्षे राज्य केलें व नंतर हा कैलासास जाऊन शिवगण झाला ( शिव. उ. २ ).

३ माणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**नंदनोदरदुंदुभि**—( सो. कुकुर. ) नलाचें नामांतर. हें नामांतर पडण्याचें कारण दिलें आहे ( ब्रह्म. ४४. ६३ ).

**नंदपाल**—न्यूहवंशीय चंद्रदेव राजाचा पुत्र. याचा पुत्र कुंभपाल ( भवि. प्रति. ४. ३. ).

**नंदभद्र**—एक धार्मिक वैश्य. याला बरेच दिवस मूल झालें नाहीं. याची कपिलेश्वरावर अत्यंत भक्ति होती. पुढें वृद्धापकाळीं याला एक पुत्र झाला. पण तो लग्न झाल्यावर थोडयाच दिवसांत मरण पावला. त्यामुळें याला वैराग्याची इच्छा होऊन हा अध्यात्मज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न करूं लागला. कांहीं दिवसांनीं यास एक सात वर्षांचा बालक भेटला व त्यानें याची अध्यात्मपिपासा दूर केली. नंतर हा सूर्य व रुद्र यांची उपासना करून स्वर्गास गेला ( स्कंद. १. २. ४६ ).

**नंदवर्धन**—मागधवंशीय उदपाश्व राजाचा पुत्र. याचा पुत्र नंदसुत ( भवि. प्रति. २. ६ ).

२ ( प्रद्योत. भविष्य. ) भागवतमतें जनकाचा पुत्र. याबद्दल नंदिवर्धन व वर्तिवर्धन अशीं नांवें आढळतात.

**नंदसुत**—( १ नंदवर्धन पहा ).

**नंदा**—धर्म प्रजापतिपुत्र हर्षाची स्त्री ( म. आ. ६७. ३३ कुं. ).

२ पातालांतील कपोत नागाची कन्या ( मार्क. ६८ ).

**नंदायनीय**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील वायुमतें बाष्कलि भारद्वाजाचा पुत्र व शिष्य.

**नंदि**—धर्माचा पौत्र व स्वर्गाचा पुत्र ( भा. ६. ६. ६).

२ उत्कल देशाचा राजा. यानें सुरथाच्या कोला नगराला वेढा दिला व सुरथाला जिंकिलें. पुढें पराजय पावून पळून जात असतां पुष्पभद्रा नदीतीरावर एका वैश्याची गांठ पडली. त्याला घेऊन हा मेधसाश्रमाला गेला असतां, तेथें याला मंत्रोपदेश घडला ( ब्रह्मवै. २. ६२; भा. ५. ३२-३५ ).

**नंदिन्**—शालंकायनाचा पुत्र जो शिलाद त्याचा हा पुत्र. यास शैलादि असेंहि पैतृक नांव आहे. शिलाद निपुत्रिक असल्यामुळें त्यानें पुत्रप्राप्तीकरितां तप केलें. त्या तपानें प्रसन्न होऊन शंकरानें त्याला इच्छापूरक वर दिला. पुढें यज्ञाकरितां जमीन नांगरीत असतां त्यास एक तीन डोळ्यांचा, चार हातांचा व जटामुकुटधारी असा शंकररूप असलेला मुलगा सांपडला. हाच नंदी होय. शिलादानें याला घरीं आणिलें, त्याबरोबर हा इतर मनुष्यांसारखा झाला. पुढें नंदी आठ वर्षांचा झाल्यावर याला आपण अल्पायु आहोंत, असें मित्रावरुणांच्या सांगण्यावरून कळलें; तेव्हां अपमृत्यु चुकविण्याकरितां यानें शंकराची आराधना करून अमरत्व मिळविलें. तसेंच याच्या तपानें संतुष्ट होऊन शंकरानें यास आपला पुत्र मानून याला पार्षदगणांतील एक गण म्हणून म्हटलें आहे. नंदीनें मरुतांची कन्या सुयशा हिच्याशीं लग्न केलें ( शिव. पा. ७ ). दक्षयज्ञविध्वंसाच्या वेळेस यानें भग ऋत्विजास बद्ध केलें होतें ( भा. ४. ५ १७) व दक्षास तत्त्वविमुखतेचा शाप दिला ( भा. ४. २.२१ ). यानें रावणास शाप दिला होता ( वा. रा. उ. ५० ). यानें आपला पितामह शालंकायन यापासून स्कंदपुराणांतील अरुणाचलमाहात्म्य ऐकिलें व तें मार्कंडेयास सांगितलें ( स्कंद १. ३. २. १६ ). रामाच्या अश्वमेधप्रसंगीं याचें मारुतीबरोबर युद्ध झालें होतें ( पद्म. पा. ४३ ).

२ इंद्रग्रामांत राहणारा एक ब्राह्मण. यास एका महाकाल नामक किराताच्या भक्तियोगानें शिवदर्शनाचा लाभ घडल्यामुळें हा उद्धरून शिवाचा गण झाला ( पद्म. उ. १५२ ). यास वैश्य म्हटलेलें आहे ( स्कंद. १.१.५ ).

३ कश्यपास मुनि नामक स्त्रीपासून झालेला पुत्र.

**नंदियशस्**—(नाग. भविष्य.) वायुमतें मथुरा नगरींतील मधुनंदाचा व ब्रह्मांडमतें वैदेशांतील भूतिनंदाचा पुत्र. विष्णुमतें एक राजा.

**नंदिवर्धन**—( सू. निमि. ) उदावसूचा पुत्र याचा पुत्र सुकेतु जनक.

२ ( प्रद्योत. भविष्य. ) भागवतमतें राजकाचा, मत्स्यमतें सूर्यकाचा व ब्रह्मांडमतें अजकाचा पुत्र. यानें मत्स्यमतें तीस व ब्रह्मांडमतें वीस वर्षे राज्य केलें.

३ ( शिशु. भविष्य. ) भागवतमतें अजयाचा, विष्णुमतें उदयनाचा, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें उदयिनाचा व मत्स्यमतें उदासीनाचा पुत्र. यानें चाळीस वर्षे राज्य केलें.

**नंदीश**—वास्तुशास्त्रावरील एक ग्रंथकार ( मत्स्य. २५२ ).

**नभ**—स्वारोचिष मनूचा पुत्र.

२ उत्तम मनूचा पुत्र.

३ चाक्षुष मनूचा पुत्र.

४ वैवस्वत मनूचा पुत्र.

५ काश्यपकुलांतील गोत्रकार.

६ भार्गवकुलांतील मंत्रकार.

७ ( सू. इ. ) भागवतमतें निषधाचा व वायुमतें नलाचा पुत्र. याचा पुत्र पुंडरीक.

**नभःप्रभेदन वैरूप**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ११२ )

**नभग**—वैवस्वत मनूचा पुत्र. याचा पुत्र नाभाग ( भा. ८. १३.२; ९. ४. १ ). पहिल्या नाभाग शब्दावर दिलेली गोष्ट शिवपुराणांत याच्या नांवावर आहे ( शिव. शत. २९ ). नभग, नाभाग, नाभागारिष्ट, नाभानेदिष्ट इत्यादि प्रकारें हें नांव आढळतें.

**नभस्**—( सू. इ. ) विष्णु, मत्स्य व पद्म यांच्या मतें नलाचा पुत्र ( पद्म. सृ. ८ ). भागवत व वायु यांच्या मतें यास नभ असेंहि म्हटलें आहे.

२ उत्तम मनूचा पुत्र.

३ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

**नभस्य**—स्वारोचिष मनूचा पुत्र.

२ उत्तम मनूचा पुत्र.

**नभस्वत्**—मुर दैत्याचा एक पुत्र. याला कृष्णानें मारिलें ( भा. १०. ५९. १२ ).

**नभस्वती**—( स्वा. उत्तान. ) विजिताश्व राजाची पत्नी. हिचा पुत्र हविर्धान ( भा. ४. २४. ५ ).

**नभाक**—यानें केलेल्या ऋचांनीं देवांनीं वलाकडील गाई सोडविल्या ( ऐ. ब्रा. ६. २४ ). परंतु ऋग्वेदांत अनुक्रमणीप्रमाणें नभाकाच्या नांवावर एकहि सूक्त नसून नाभाक काण्वाच्या नांवावर दोन सूक्तें आहेत ( ऋ. १०. ३९; ४२ ).

**नभाग व नभागदिष्ट**—( नभग पहा ).

**नभोग**—ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

**नमस्यु**—( सो. पूरु. ) भागवतमतें प्रवीर राजाचा पुत्र. याचा पुत्र चारुपद ( मनस्यु पहा ).

**नमी साप्य**—इंद्राचे पराक्रम सांगतांना याचें संरक्षण केल्याचा उल्लेख आहे. हा इंद्राला नमुचीचें डोकें उडवितांना उपयोगी पडला ( ऋ. १. ५३. ७; ६. २०. ६; १०. ४८. ९ ). हा एक ऋषि होता, असें सायण म्हणतो. पण पंचविंशब्राह्मणावरून हा विदेहाचा राजाच असावा ( पं. ब्रा. २५. १०. १७ ).

**नमुचि**—इंद्राचा शत्रु. याला इंद्रानें फेंसानें मारिलें. पौराणिक नृसिंह अवताराचें मूळ वैदिक नमुचिइंद्राच्या युद्धांत आहे ( ऋ. ८. १४. १३ ). श्री. श्री. दा. सातवळेकर म्हणतात, फेंसानें बरा होणारा हा रोग असावा.

दनुपुत्र दानव. हिरण्यकशिपूचे वेळीं देवादिकांचा ज्या स्वारींत पराभव झाला, त्या स्वारीच्या वेळचा एक सैन्याधिपति ( म. स. ५१ कुं. ). हा वृत्रासुराचा अनुयायी होता ( भा. ६.१०.१९. ). यास स्वर्भानूची कन्या सुप्रभा भार्या होती ( भा. ६. ६.३२; १०.१९ ). हा एकदां भय पावून सूर्याचे किरणांत शिरला व यानें इंद्राशीं सख्य केलें. त्या वेळीं इंद्रानें यास प्रश्न विचारिल्यावरून संकटांमुळें होत असलेलें दुःख भगवंताच्या चिंतनानें कसें नाहींसें होतें, या विषयावर दोघांचें संभाषण झालें ( म. शां. २३३ कुं. ). पुढें इंद्रानें यास तूं आर्द्र किंवा कोरड्या अशा कोणत्याहि शस्त्रानें मरणार नाहींस, असें वचन दिलें. पण पुढें त्यानें समुद्रांतील पाण्याच्या फेंसानें याचा शिरच्छेद केला. त्यामुळें याचें नुसतें शीरच त्याचे पाठीस लागलें. तेव्हां ब्रम्ह्याचें सांगिवरून पूर्वी नमुचीनें ज्या तीर्थांत गुप्तपणें येऊन स्नान केलें होतें, त्याच अरुणा नामक तीर्थांत इंद्रानें स्नान केलें. त्या वेळीं इंद्राचे पाठोपाठ नमुचीचें शीरहि त्यांत पडलें व त्यामुळें नमुचीला इच्छित असा अक्षय्य लोक प्राप्त झाला ( म. श. ४४. ३३ कुं. ). यास बलीबरोबर वामनानें पातालांत ठेविलें ( म. स. ४७. २४ कुं. ).

२ तेरा सैंहिकेयांतील एक. विप्रचित्ति व सिंहिका यांचा पुत्र. यास परशुरामानें मारिलें ( ब्रह्मांड. ३. ६. १८-२२ ).

३ हिरण्याक्षाचा सेनापति. यानें इंद्रास मूर्छित करून ऐरावत खालीं पाडिला व मायेनें अनेक जंतु उत्पन्न केले. ते जंतु विष्णूनें आपल्या चक्रानें नाहींसे केले व इंद्रानें यास वज्रानें ठार केलें ( पद्म. सृ. ६७ ).

४ आणखी एक हिरण्याक्षाचा सेनापति. यानें इंद्रावर पांच बाण सोडिले. पण ते इंद्रानें मध्येंच तोडिले. पुढें यानें आपल्या मायेनें काळोख उत्पन्न केला. पण तो इंद्रानें आपल्या एका अस्त्रानें नाहींसा केला. नंतर यानें लगट करून ऐरावताचे दांत धरून त्यासह इंद्रास खालीं पाडिलें. पण हा या कामांत गुंतलासें पाहून इंद्रानें आपल्या खड्गानें याचें शिर कापिलें ( पद्म. सृ. ७१ ).

**नय**—रौच्य मनूचा पुत्र.

२ तुषितसाध्य देवांपैकीं एक.

**नर**—( नरनारायण पहा ).

२ तामस मनूचा पुत्र.

३ ( सू. दिष्ट. ) सुधृति राजाचा पुत्र.

४ ( सो. अनु. ). विष्णुमतें उशीनराचा पुत्र. याबद्दल नवनत असा पाठ आहे.

५ शंकरानें ब्रह्मदेवाचें पांचवें मस्तक तोडिलें; तेव्हां शंकरास शिक्षा करण्यासाठीं ब्रह्मदेवानें आपल्या घामापासून एक उग्र पुरुष निर्माण केला. त्यानें शंकरास सळो कीं पळो करून सोडिलें. तेव्हां शंकरानें विष्णूची रक्षणार्थ प्रार्थना केली. विष्णूनें आपलें बोट कापून त्यापासून गळणाऱ्या रक्ताचा एक पुरुष निर्माण केला. त्यालाच नर हें नांव आहे. यानें ब्रह्मस्वेदनिर्मित पुरुषास ठार मारून शंकरास निर्भय केलें ( पद्म. सृ. १४; भवि. ब्राह्म. २३ ).

६ तुषितसाध्य देवांपैकीं एक.

७ (स्वा. नाभि.) विष्णुमतें गयाचा पुत्र.

८ (सो. पूरु.) भागवतमतें मन्युपुत्र. विष्णु, वायु व मत्स्य यांच्या मतें भुवन्मन्युपुत्र होय.

**नर भारद्वाज**—सूक्तद्रष्टा (ऋ. ६. ३५. १६). भरद्वाजाच्या पांच पुत्रांतील एक. भरद्वाजाला भरतानें दत्तक घेतलें असल्यामुळें बृहस्पति व भरत असे दोन याला आजे होते (ऋग्वेद वेदार्थदीपिका ६. ५२).

**नरक**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ तेरा सैंहिकेयांतील एक. विप्रचित्ति दानव व दितिकन्या सिंहिका यांचा पुत्र.

३ हा भूमिपुत्र म्हणून याला भौमासुर असेंहि नांव होतें. भूदेवीनें विष्णूस प्रसन्न करून त्यापासून नरकासुराकरितां वैष्णवास्त्र संपादिलें होतें. याच अस्त्राच्या योगानें हा बलाढ्य व अवध्य झालेला होता. पुढें हेंच अस्त्र यानें आपला पुत्र भगदत्त यास दिलें (म. द्रो. २९).

हा प्राग्ज्योतिषपूरचा राजा होता. याचें राज्य नीलसमुद्राकडे होतें. याच्या राजधानीस मूर्तिलिंग असेंहि म्हणत. यानें उत्तमोत्तम रत्नें व विविध वस्त्रें विविध ठिकाणांहून हरण करून आणिलीं होतीं. परंतु यानें त्यांपैकीं कशाचाहि उपभोग घेतला नव्हता. त्याचप्रमाणें, यानें गंधर्व, देव यांच्या व अप्सरांच्या साती समुदायांतील मिळून एकंदर सोळा हजार एकशें कन्या हरण करून आणिल्या होत्या. त्या सर्व स्त्रियांना यानें अलकानगरीनजीक असलेल्या मणिपर्वतावर ठेविलें होतें. त्या सर्व स्त्रिया कुमारिका असून अव्यभिचारिणी राहिल्या होत्या. कारण, नरकासुरानें त्या भोगिल्या नव्हत्या. मरु दैत्याच्या दहा कन्या व नरकासुराचे प्रमुख नैर्ऋत त्यांचेवर नजर ठेऊन त्यांची सेवा करीत. एके समयीं, नरकासुर कशेरु नामक स्थळीं त्वष्टयाच्या कन्येपाशीं गेला व त्या चौदा वर्षांच्या मुलीस यानें हत्तीचें रूप घेऊन धरिलें. हा इंद्राचा कट्टा वैरी असून यानें सर्व देवांना सळो का पळो करून सोडिलें होतें. शिवाय यानें इंद्राचा ऐरावत व उच्चैःश्रवा घोडा हरण केला होता (पद्म. स्व. २४९). देव व ऋषि यांचे उलट याचें वर्तन असे. यानें एकदां कृष्णालाहि प्रतिबंध केला होता. यानें अदितीचीं कुंडलें घेऊन तिचा अपमान केला. हयग्रीव, निसुंद, पराक्रमी पंचनंद आणि सहस्र पुत्रांनीयुक्त असलेला वरदत्त व असुरश्रेष्ठ गुरु असे याचे रणामध्यें दुर्जय असलेले द्वारपाल होते.

एके समयीं सर्व यादव दाशार्हि सभेंत बसले असतां, सर्व देवांसह इंद्र तेथें आला. व त्यानें पापी नरकासुराचा वध करण्याची विनंति केली. कारण, हा ब्रह्मदेवाच्या वरानें मस्त झाला होता. तेव्हां कृष्णानें याचा वध करण्याची प्रतिज्ञा केली आणि लागलीच सत्यभामेसह गरुडावर बसून इंद्राबरोबर प्राग्ज्योतिष नगराकडे गेला. कृष्णानें दुरूनच तेथील परिस्थिति अवलोकन केली. तेथें द्वाराजवळच चतुरंग सैन्य व गुरुदैत्यानें केलेले वस्तऱ्यासारखे सहा सहस्र तीक्ष्ण पाश त्याच्या दृष्टीस पडले. तेथें गुरुदैत्य रक्षण करीत होता. त्यास व आणखी कित्येक दैत्यांस कृष्णानें ठार मारिलें व सर्व पाश मोडून टाकिले. पुढें निसुंद, हयग्रीव, विरूपाक्ष आणखी आठ लक्ष दानव यांना ठार मारून प्राग्ज्योतिष पुरीवर तो चालून गेला. प्रथम त्यानें पंचनद दैत्यास ठार मारिलें. नंतर श्रीकृष्णानें पांचजन्य शंख वाजविला. तो शंखध्वनि ऐकून नरकासुराला अत्यंत क्रोध आला. तेव्हां हा रथांत बसून युद्धार्थ निघाला. याचा रथ अत्यंत विस्तृत, मौल्यवान् व अजस्र होता. याच्या रथाला हजार घोडे जुंपिले होते. अशा तऱ्हेनें नरकासुर सज्ज होऊन आला व याचें कृष्णाशीं तुंबळ युद्ध झालें. त्यांत श्रीकृष्णानें आपल्या सुदर्शन चक्रानें याचें शीर उडविलें, तेव्हां याची आई कृष्णाकडे आली व तिनें कुंडलें व राज्य त्यास अर्पण केलें (ह. वं. २. ६३; भा. १०. ५९). नरकासुरवधानंतर कृष्णानें याच्या वाड्यांत शिरून यानें बंदींत ठेविलेल्या सोळा हजार एकशें स्त्रियांचा स्वीकार केला (पद्म. उ. २४९) आणि बरीच संपत्ति द्वारकेस नेली (भा. १०. ५९).

नरकासुरवधाची दुसरी हकीकत आढळते. नरकासुरानें अध्ययन व तप करून तपःसिद्धि मिळविली होती. तेव्हां इंद्रास याचें फार भय वाटलें व त्यानें नरकासुरास मारण्यासाठीं कृष्णास विनंति केली. तेव्हा श्रीकृष्णानें या तपःसिद्ध नरकासुराला हस्तलाघवानें प्रहार करून ठार केलें. हा मरणोन्मुख होऊन भूमीवर पडला असतां यानें कृष्णाची स्तुति केली. तेव्हां कृष्णानें याला वर मागण्यास सांगितल्यावर यानें 'आजच्या तिथीस जे मंगलस्नान करतील त्यांना नरकाची पीडा होऊं नये,' असा वर मागितला. हा आश्विन वद्य चतुर्दशीस मेल्यामुळें तिला नरकचतुर्दशी म्हणण्याचा प्रघात तेव्हांपासून पडला व मंगलस्नान करण्याचा क्रम सुरू झाला (पद्म. उ. २४९). लोमश ऋषीबरोबर पांडव तीर्थाटनास गेले होते. तेव्हां ते अलकनंदा नदीवर गेले असतां त्यांस पांढरें शुभ्र पर्वतासारखें दिसत असलेलें शिखर लोमशानें दाखविलें. त्या नरकासुराच्या अस्थि होत्या (म. व. १४२; ग. कृ. प्रत.). वरुणाच्या सभेंत नरकासुरास स्थान होतें (म. स. ९). नरकासुराच्या वधानंतर याच्या मातेच्या सांगण्यावरून कृष्णानें याच्या पुत्रास भगदत्तास अभयदान दिलें व त्याच्यावर वरदहस्त ठेवून त्यास राज्य दिलें (भा. १०. ५९). हीच हकीकत कालिकापुराणांत पुढीलप्रमाणें आढळते.

त्रेतायुगाचे उत्तरार्धांत हा वराहरूपी विष्णूपासून भूमीचे ठिकाणीं झाला. याचे विदेह देशचा राजा जनक यानें सोळा वर्षे पालन केलें. यानें प्राग्ज्योतिष देशांत किरातांबरोबर युद्ध करून त्यांचा नाश केला. व त्या देशचें राज्य हा करूं लागला. पुढें राज्यश्रीनें मदोन्मत्त झाला असतां, द्वापारयुगांत कृष्णानें याचा नाश केला. याचा पुत्र भगदत्त (कालि. ३९-४०).

**नरनारायण**—हे चाक्षुष मन्वंतरांत उत्पन्न झाले ( दे. भा. ४. १६ ). धर्मास दक्षकन्या मूर्ति हिचे पोटीं झालेले अवतार तेच हे होत ( भा. २. ७ ). शिवाय धर्मास कला नामक स्त्रीचे पोटीं हे झाले असेंहि आहे. हा चवथा अवतार होय. यांनीं पूर्ण शांति मिळण्यासाठीं दुर्घट तप केलें ( भा. १. ३ ). यांच्या दुर्घट तपामुळें इंद्रास भय वाटलें. तेव्हां त्यानें तपोभंगासाठीं कांहीं अप्सरा पाठविल्या. हें पाहून नारायण शाप देण्यास सिद्ध झाला. पण नरानें त्याचें सांत्वन केलें ( दे. भा. ४.१६; भा. २.७; पद्म. सृ. २२ ). नारायणानें मांडीपासून उर्वशी नामक अप्सरा निर्माण केली व ती इंद्रास दिली ( भा. ११. ४. ७ ). इंद्रानें पाठविलेल्या अप्सरांना पुढील अवतारीं विवाह करण्याचें आश्वासन देऊन यांनीं परत लाविलें ( दे. भा. ४. १६ ). हेच पुढें कृष्ण व अर्जुन रूपांनीं अवतरले. कृष्णार्जुनांना यांनीं दर्शन देऊन उपदेशहि केला ( दे. भा. ४.१७; भा. १०.८९. ६० ). हे बदरिकाश्रमांत राहतात ( भा. ११. ४. ७ ). यांचे अनेक संवाद येतात.

एके दिवशीं हिरण्यकशिपूचा पुत्र प्रल्हाद हा ससैन्य तीर्थयात्रा करीत नरनारायणांचे आश्रमाजवळ आला. त्या ठिकाणीं त्यानें बाण, भाते वगैरे युद्धोपयोगी जिन्नस पाहिले. त्यावरून त्याला या आश्रमांतील मुनि शांत नसून दांभिक असावेत असें वाटलें व त्याप्रमाणें तो यांना बोललाहि. त्यावरून बोलाचाली होऊन प्रकरण युद्धापर्यंत आलें. तेव्हां नरनारायण व प्रल्हाद यांचें तुमुल युद्ध पुष्कळ दिवसपर्यंत झालें. परंतु कोणीहि हार जाईना. यांच्या युद्धामुळें सर्वांस अतिशय त्रास होऊं लागला. तें पाहून विष्णूनें मध्यस्थी केली व हें युद्ध थांबविलें ( दे. भा. ४. ४. ९. ).

हीच नरनारायणांची उपासना पुढें चालू होऊन कृष्णार्जुनांनाहि यांत स्थान मिळालें. पाणिनीनेंहि यांच्या भक्तिसांप्रदायाचा निर्देश केला आहे.

**नरवाहन**—कुबेराचें नांव.

**नरसिंह**—गौडदेशचा राजा. याचा सेनापति सरभभेरुंड गीतापाठानें मुक्त झाला ( सरभभेरुंड पहा ).

**नरांतक**—अंगदानें मारिलेला रावणपुत्र ( भा. ९. १. १८; वा रा. यु. ६९ ).

२ रावणाचा प्रधान असलेल्या प्रहस्ताचा हा पुत्र. हा द्विविद वानराच्या हातून मारिला गेला (वा. रा. यु. ५८).

३ रौद्रकेतु दैत्याचा पुत्र. यानें आपल्या दुष्कृत्यांनीं सर्व जनतेस अत्यंत त्रास दिला. पुढें कश्यपगृहीं अवतरलेल्या विनायकाचे हातून आपला मृत्यु आहे, असें यास कळलें. तेव्हां यानें विनायकनाशार्थ बराच प्रयत्न केला. परंतु तो निष्फल होऊन शेवटीं विनायकानें याला ठार मारिलें ( गणेश. २. ६१ ).

४ कालनेमीचा पुत्र. हिरण्याक्षाबरोबर देवांच्या झालेल्या संग्रामांत जयंतानें याचा चांगलाच समाचार घेतला होता ( पद्म. सृ. ७५ ).

**नरामित्र**—त्रिधामन् नामक शिवावताराचा शिष्य.

**नरि**—( सो. कुकुर. ) बहुपुत्राचा पुत्र. याचा पुत्र अभिजित् ( पद्म. सृ. १३ ).

**नरिन्**—बनरस नगराच्या तालन राजाचा पुत्र ( भवि. प्रति. ३. ७ ).

**नरिष्यंत**—वैवस्वत मनूचा एक पुत्र. याचा पुत्र शुक (पद्म. सृ. ८ ). शिवाय, यास चित्रसेन व दम असे दोन पुत्र होते ( भा. ९. २. १९ ). याच्याच कुलांत पुढें अग्निवेश्यायन ब्राह्मण झाले ( भा. ९. २. २३ ). याचे पुत्र शक दिले आहेत ( ब्रह्म. ७.२४ ).

२ (सू. दिष्ट.) वायु व विष्णु यांच्या मतें हा मरुत्ताचा पुत्र.

**नरोत्तम**—एक ब्राह्मण. यानें मातापितरांचा अनादर करून तीर्थयात्रादिकांच्या योगानें पुष्कळ पुण्य संपादन केलें. याचीं ओलीं वस्त्रें आकाशांत अधांत्रीं वाळत. पुढें यानें एका बगळ्यास शाप दिल्यामुळें याचें बरेंचसें पुण्य व दैवी सामर्थ्य नष्ट झालें. इतक्यांत यास वाईट वाटलें असतां, एक आकाशवाणी ऐकूं आली कीं, 'तूं मूक नामक धार्मिक चांडालाकडे जा. तो तुला धर्माचा उपदेश करील.' पुढें हा त्या चांडालाकडे गेला असतां तो आपल्या मातापितरांची सेवा करीत असल्यामुळें व यास थांबण्यास वेळ नसल्यामुळें त्यानें याला एका पतिव्रतेकडे जाण्यास सांगितलें. इतक्यांत ब्राह्मणरूपधारी विष्णु त्याच्या घरांतून बाहेर येऊन त्यानें याला त्या पतिव्रतेकडे नेलें. पण ती पतिसेवा करण्यांत गढून गेल्यामुळें तिनें यास राहण्यास सांगितलें. पण याला वेळ नसल्यामुळें तिनें यास धर्मवैश्याकडे जाण्यास सांगितलें. तो गिऱ्हाइकास माल देण्यांत दंग असल्यामुळें त्यानें याला धर्माकराकडे जाण्यास सांगितलें. त्यानें एका वैष्णवाकडे जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें हा गेला असतां, त्यानें यास सांगितलें कीं, 'तुला साक्षात् विष्णूचें दर्शन झालें असलें पाहिजे. आतां तुझ्या छाव्या पूर्वीप्रमाणें अधांत्रीं वाळतील.' पण नरोत्तमानें 'आपणांस विष्णूनें दर्शन दिलें नाहीं,'

असें त्याला सांगतांच त्या ब्राह्मणानें यास देवघरांत नेऊन सर्वांचीं घरें दाखविणारा ब्राह्मण कमलासनावर बसलेला दाखविला. तेव्हां नरोत्तम त्यास शरण गेला असतां त्यानें यास मातापितरांची सेवा करण्यास सांगितलें. तशी सेवा यानें करितांच हा स्वर्गलोकीं गेला ( पद्म. सृ. ५०-५६ ).

**नर्मदा**—सोमप नामक पितरांची मानसकन्या.

२ एक गंधर्वी. हिनें आपल्या तीन कन्या सुकेश राक्षसाच्या तीन पुत्रांना दिल्या होत्या ( वा. रा. अर. ५ ).

३ ( सू. इ. ) मांधात्याची सून व पुरुकुत्साची पत्नी ( भा. ९. ७ ). ही सर्पकन्या असून सर्पांनीं पुरुकुत्साला दिली होती ( विष्णु. ४. ३. १२-१३; भा. ९. ७. २ ). पण ही पुरुकुत्सपुत्र त्रसदस्यूची स्त्रीहि दिली आहे.

४ एक नदी. हिला इक्ष्वाकुकुलोत्पन्न दुर्योधनास वरण्याची इच्छा झाली, तेव्हां हिनें मनुष्यरूप घेऊन त्याला वरिलें ( म. अनु. २. १८ कुं. ).

**नर्य**—इंद्रानें याचें संरक्षण केलें होतें ( ऋ. १.५४. ६; ११२.९ ).

**नल**—निषधदेशाधिपति वीरसेन राजाचा पुत्र ( पद्म. सृ. ८; लिंग. १. ६६. २४–२५; वायु. २. २६; १७८; मत्स्य. १२. ५६; ह. वं. १. १५; ब्रह्मांड २. ६३. १७३-१७४ ). मत्स्य व पद्म यांच्या मतें वीरसेनपुत्र व निषधपुत्र हे दोन्ही इक्ष्वाकुवंशांतील आहेत. पण लिंग, वायु, ब्रह्मांड व हरिवंश यांत वीरसेनपुत्र नलाचा वंश दिलेला नाहीं.

दमयंतीच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून यानें हंसद्वारां आपलें मनोगत कळविलें व तिनेंहि आपलें मनोगत उलट कळविलें ( म. व. ५३ ).

कांहीं कालानें दमयंतीचें स्वयंवर आहे, असें ऐकतांच नल तिकडे जाण्यास निघाला. इकडे नारदमुखें दमयंतीस्वयंवराची हकीकत इंद्रादि लोकपालांस समजल्यामुळें तेहि स्वयंवरास निघाले होते. त्यांनीं नलास पाहतांच त्याच्या सौंदर्यानें आश्चर्य पावून दमयंतीची आशा सोडिली. नंतर त्यांनीं नल राजास साह्य करण्याच्या वचनांत गुंतवून त्यास दूत होण्यास व दमयंतीस 'लोकपाल वरूं इच्छितात,' असें सांगण्यास सांगितलें. पुढें इंद्राच्या आशीर्वादाचे योगानें कोणासहि न दिसतां हा कुंडिनपुरांत दमयंतीचे मंदिरीं गेला. तेथें हा दमयंती व तिच्या सख्या यांशिवाय कोणासहि दिसला नाहीं. अशा रीतीनें याचा दमयंती होती तेथपर्यंत सुखानें प्रवेश झाला. नलाचा दमयंतीच्या मंदिरांत प्रवेश होतांच तिच्या सर्व सख्या तटस्थ झाल्या व दमयंतीहि मोहित झाली. पुढें नलानें दमयंतीनें विचारिल्यावरून आपलें नांव तिला सांगून देवांचा निरोपहि कळविला ( म. व. ५४-५५ ). तथापि तिचा निश्चय ढळला नाहीं. निरोप कळला होता तरी दमयंतीची परीक्षा पाहण्यासाठीं नलासारखींच रूपें धारण करून देव याच्याजवळ सभेंत येऊन बसले. स्वयंवराकरितां आलेल्या सहस्रावधि राजांस दमयंतीनें न वरितां जेथें नल बसला होता, तेथें ती आली आणि पहाते तों एकसारख्या रूपाचे पांच पुरुष ओळीनेंच बसले आहेत. तेव्हां आतां कसें करावें ? असा तिला विचार पडला. नंतर तिनें म्हटलें कीं, 'जर नलराजावांचून इतरांस माझ्या मनानें स्पर्श केला नसेल, तर माझा पति मला गोचर होवो.' असें म्हणतांच या तिच्या पातिव्रत्यबलानें घाम नसलेले, दृष्टि स्तब्ध असलेले, प्रफुल्ल पुष्पमाला धारण करणारे, शरीरास धूळ न लागणारे व भूमीस स्पर्श न होतां उभे राहिलेले देव तिच्या दृष्टीस पडले. नंतर तिला सहज नलास वरितां आलें. दमयंतीनें नलास वरिल्यामुळें देवांस आनंद झाला व त्या चौघांनींहि यास दोन दोन वर दिले. इंद्रानें यास वर दिले कीं, यज्ञांत आपलें प्रत्यक्ष दर्शन होईल व सद्गति मिळेल. अग्नीनें वाटेल त्या स्थळीं आपली उत्पत्ति व आपल्यासारख्या तेजस्वी लोकांची प्राप्ति होईल असें सांगितलें. यमानें अन्नरस व धर्मावर अतिशय निष्ठा; तसेंच वरुणानें इच्छित स्थळीं जल उत्पन्न होणें व उत्कृष्ट प्रकारच्या सुगंधी पुष्पमाला हीं दिलीं. या शेवटच्या वराऐवजीं तुजजवळील फुलें सर्वकाळ नूतन व सुगंधित राहतील, असा वर लोकसमाजांत रूढ आहे. तसेंच हा प्रवेश करितांच यास मुबलक जागा मिळत असे, असाहि वर रूढ आहे. असे वर देऊन देव गेले असतां भीमराजानें दमयंतीच्या स्वयंवराचा मोठा समारंभ केला व नलास बरेच दिवस ठेवून घेतल्यावर दमयंतीसह त्यानें यास निषधदेशीं पोहोंचतें केलें. नल राजा आपल्या देशीं आल्यावर यानें उत्तम प्रकारें प्रजेचें पालन केलें व अश्वमेधादिक अनेक यज्ञ करून देवांसहि तृप्त केलें. कांहीं कालानें यास दमयंतीचे ठायीं इंद्रसेन नामक पुत्र व इंद्रसेना नामक कन्या अशीं दोन अपत्यें झालीं ( म. व. ५६–५७ ). एकदां देवांनीं केलेली नलाची स्तुति कलीस सहन न होऊन तो इंद्रादि देव गेल्यावर द्वापरास म्हणाला कीं, 'जर तूं मला फाशांत प्रवेश करून साह्य करशील, तर मी नलास राज्यभ्रष्ट करीन' ( म. व. ५८ ).

द्वापरानें होय म्हटल्यावर कलि त्यास घेऊन निषधदेशीं गेला व तेथें याच्या शरिरांत प्रवेश करण्याची संधि पाहत गुप्त रूपानें अनेक वर्षें राहिला. एकदां हा मूत्रोत्सर्ग करून पादप्रक्षालन न करितां तसाच संध्योपासना करण्यास बसला. ही संधि पाहून तत्काल कलि याच्या शरिरांत शिरला. कलि प्रवेशानंतर नलास द्यूत खेळावेंसें वाटूं लागलें. ती इच्छा यास इतकी अनावर झाली कीं, लागलीच यानें पुष्कर नामक भ्रात्यास बोलाविलें. पुष्करानें शेजारीं वृषभाचें रूप

घेऊन उभा राहिलेल्या कलीचा पण लावून खेळण्याचें आह्वान केलें. दमयंतीदेखत केलेलें हें पणाचें आह्वान सहन न होऊन नलानें पण लावून खेळण्यास सुरुवात केली. हें वर्तमान नागरिकजनांस कळतांच त्यांनीं, मंत्र्यांनीं व स्वतः दमयंतीनें याचें हरएक प्रकारानें निवारण केलें. परंतु अंगांतील कलीच्या प्रादुर्भावानें यानें कोणाचेंहि न ऐकल्यामुळें याची संपत्ति, सुवर्ण, वाहनें, रथाचे घोडे व वस्त्रें प्रतिपक्षीयानें जिंकून घेतलीं. राजा आपलें व कोणाचेंहि ऐकत नाहींसें पाहतांच आपल्यामुळें आपल्या मुलांस कष्ट होऊं नयेत, म्हणून दमयंतीनें आपलीं दोन्ही मुलें वार्ष्णेय नामक सारथ्यासमागमें रथांत बसवून कुंडिनपुरास आपल्या पित्याकडे पाठवून दिलीं ( म. व. ५९–६० ).

पुष्करानें नलाचें सर्व राज्य हरण करितांच यास एक वस्त्र नेसावयास देऊन नगराबाहेर घालविलें. याच्याबरोबर दमयंतीहि याच्याचप्रमाणें एका वस्त्रानें निघाली. नगराच्या बाहेर नल तीन दिवस राहिला. पुष्करानें, ‘ जे कोणी नलाचा सत्कार करतील किंवा याच्याशीं चांगुलपणानें वागतील ते वधाच्या शिक्षेस पात्र होतील,’ अशी दौंडी पिटविली. त्यामुळें यास कोणीं मदत केली नाहीं. तेव्हां या दोघांनीं अरण्याचा रस्ता धरिला. पुढें पुष्कळ दिवस गेल्यावर क्षुधेची पीडा होणाऱ्या या नलाला सुवर्णासारखे पंख असणारे कांहीं पक्षी दिसले. ते पक्षी खाण्याकरितां व धनाकरितां धरावेत, असें यास वाटलें म्हणून यानें त्यांस आपल्या वस्त्रांत धरिलें. परंतु ते फांसेच पक्षी होऊन आले होते; म्हणून ते तें वस्त्र घेऊन उडून गेले. सारांश नलाचें जें एक वस्त्र होतें, तें जाऊन हा नग्न झाला व पुढें चालूं लागला. जातां जातां नलानें दमयंतीस कोसल व विदेह देशीं जाणारा मार्ग दर्शविला. त्यावरून दमयंतीनें विदर्भ देशास जावें असा याचा अभिप्राय जाणून ‘ आपण दोघेंहि विदर्भ देशास जाऊं,’ असें म्हटलें. परंतु तें यास न रुचल्यामुळें यानें तिला कांहींच उत्तर दिलें नाहीं. मार्गांत यांस एक घर आढळलें. दोघेंहि त्या घरांत गेलीं. दमयंतीस फार श्रम झाल्यामुळें तिला तत्काल निद्रा लागली. हें पाहून आतां हिला टाकून आपण एकटेंच कोणीकडे तरी जावें, असें यानें मनांत आणलें व हळूच तिचें अर्धें वस्त्र तेथें सांपडलेल्या तरवारीनें कापून घेऊन तें यानें परिधान केलें व मुकाट्यानेंच तिला तेथें टाकून हा निघून गेला ( म. व. ६१–६२; दमयंती पहा ). पुढें दमयंती चेदि देशांत जाऊन सुबाहु राजाच्या पत्नीची सैरंध्री म्हणून राहिली व तिनें आपले अनिष्ट दिवस काढले.

दमयंतीस सोडून नल निघाला असतां एके स्थलीं यानें दावाग्नि प्रदीप्त झालेला पहिला व त्यांतून ‘ हे नला, माझें संरक्षण कर, ’ असा दीन स्वर यास ऐकूं आला. त्यावरून त्या अग्नींत सांपडलेल्या कर्कोटक नागास यानें बाहेर काढिलें. तेव्हां तो नाग प्रसन्न होऊन नलास म्हणूं लागला कीं, ‘ तूं एक दोन या क्रमानें पावलें मोजीत चल, म्हणजे माझ्या मनांतून तुझें कल्याण करावयाचें आहे, तें करून मी मुक्त होईन, ’ असें ऐकतांच नल पावलें मोजीत चालतां चालतां दहावें पाऊल टाकतांना यानें ‘ दश ’ असें म्हटलें. त्याबरोबर कर्कोटक नाग यास येऊन चावला. तें पाहून नलानें ‘ हें तूं काय केलेंस ?’ असें आश्चर्यानें त्याला विचारिलें. तेव्हां कर्कोटक म्हणाला, ‘चिंता करूं नकोस, माझ्या विषाची तुला बाधा न होतां तुझ्या निकृष्ट स्थितीस कारणीभूत असलेल्या शरीरस्थ कलीला त्याची बाधा होईल व तूं कुरूप व कृष्णवर्ण झाल्यानें तुला कोणी ओळखणार नाहीं, म्हणून मीं असें केलें आहे. आतां तूं असें कर कीं, आपणांस बाहुक असें नामांतर धारण करून अयोध्येंतील ऋतुपर्ण राजाकडे जाऊन रहा. आणि जेव्हां तुला पूर्ववत् सुरूप व्हावेंसें वाटेल, तेव्हां माझें स्मरण कर व मी देत असलेली वस्त्राची जोडी पांघर म्हणजे तूं सुरूप होशील.’ इतकें बोलून कर्कोटक अंतर्धान पावला ( म. व. ६६ ).

कर्कोटक गेल्यावर नलराजा अयोध्येस जाण्यास निघाला व दहा दिवसांनीं तेथें पोहोंचून ऋतुपर्णास भेटून त्यास आपणांस अश्वविद्या व सारथ्य इत्यादिकांचें चांगलें परिज्ञान असल्याचें व आश्रय दिल्यास राहण्यास तयार असल्याचें यानें सांगितलें. त्यावरून ऋतुपर्णानें यास आपल्या आश्रयास ठेविलें व आपले जुने सारथी वार्ष्णेय व जीवल यांस याचे हस्तक केलें. वार्ष्णेय नल वनवासाला गेल्यावर ऋतुपर्णाकडे नोकरीकरितां आला होता. ऋतुपर्णाकडे असतां यास दररोज आपली स्त्री दमयंती, कन्या व पुत्र यांचें स्मरण होऊन हा विलाप करीत असे. एके दिवशीं जीवलानें याबद्दल प्रश्न केला असतां, यानें ‘ अशी एक गोष्ट झालेली मी पाहिली, ’ इत्यादि निमित्त सांगून हा स्तब्ध राहिला.

नलाच्या वार्ष्णेय सारथ्यानें दमयंतीच्या आज्ञेवरून तिचीं दोन्ही मुलें कुंडिनपुरास भीमराजाकडे पोहोंचविलीं व नल द्यूतासक्त झाल्याचें कळविलें. त्यानंतर भीमास असें समजलें कीं, नल राज्यभ्रष्ट होऊन दमयंतीसह अरण्यांत गेला. म्हणून त्यानें उभयतांच्या शोधाकरितां देशोदेशीं ब्राह्मण पाठविले. त्यांतून सुदेव नांवाचा ब्राह्मण फिरत फिरत चेदि देशांत आला असतां, तेथें त्यानें दमयंतीस तिच्या कपालावर पिंपळपानासारखा तांबडा डाग होता त्यावरून ओळखिलें व ‘ मी तुझ्या पित्याकडून तुझा शोध करीत हिंडत आहें ’ म्हणून सांगितलें. त्यावरून दमयंतीस इतकें रडें कोसळलें कीं, तें तिला आवरेना. तें

वर्तमान सुनंदेनें मातेस कळवितांच ती तेथें आली व सुदेवाच्या मुखानें वर्तमान ऐकून तिलाहि अनिवार शोक झाला. कारण, ती दमयंतीची मावशी होती. नंतर दमयंतीचा तिच्या मावशीनें मोठा सत्कार करून व समागमें सेना देऊन पालखींतून तिला कुंडिनपुरास पोहोंचतें केलें. त्यावरून भीम राजास फार हर्ष झाला. कारण, दमयंतीचा शोध लागल्यानें दुहेरी काळजींतील एका काळजींतून तो मुक्त झाला. पुढें दमयंतीनें खुणेचीं वाक्यें सांगून नलाच्या शोधासाठीं अनेक देशीं अनेक ब्राह्मण पाठविले (म. व. ६७-६९).

त्यांत पर्णाद नांवाचा ब्राह्मण कोसल देशीं अयोध्येस गेला होता. तो तेथें जाऊन जागोजाग दमयंतीनें सांगितलेलीं ओळख पटण्यासारखीं पूर्वस्मृतीचीं व कर्तव्यबुद्धि जागृत करणारीं वाक्यें म्हणत नगरांत हिंडत असतां तीं वाक्यें ऐकून बाहुकास अतिशय वाईट वाटलें व तो एकांतीं पर्णादास गांठून म्हणाला कीं, 'मी हीन स्थितींत असल्यामुळें पत्नीचा त्याग केला. त्याबद्दल तिनें मला दोष देतां कामा नये.' इतकें झाल्यावर पर्णाद जो तेथून त्वरेनें निघाला, तो कुंडिनपुरास येऊन त्यानें तें वृत्त दमयंतीस कळविलें. रूपावरून हा नलच असेल असा निश्चय तिला करितां येईना, म्हणून तिनें गुप्तपणें केवळ आईच्या संमतीनें स्वयंवराचा ऋतुपर्णाकडे पुढील निरोप पाठविला. 'उद्यां सूर्योदयीं दमयंती—नल जिवंत आहे का मृत आहे हें न समजल्यामुळें—आपलें दुसरें स्वयंवर करीत आहे. यास्तव इच्छा असल्यास आपण तेथें यावें' (म. व. ७०).

ऋतुपर्णानें बाहुकाला विचारतां इतक्या थोड्या अवधींतहि त्याला कुंडिनपुरीं पोंचविण्याचें यानें कबूल केलें व रथ हांकारिला. रथ वेगानें चालला असतां ऋतुपर्णाचें उत्तरीय वस्त्र मार्गांत पडलें. तेव्हां तें घेण्याकरितां त्यानें बाहुकास रथ उभा करण्यास सांगितलें असतां बाहुकानें त्यास सांगितलें कीं, 'आपलें वस्त्र एक योजनभर मागें राहिलें आहे!' पुढें मार्गांत ऋतुपर्णानें आपलें गणितज्ञान बाहुकास एका बेहड्याच्या झाडाचीं पानें व फळें यांची संख्या सांगून दर्शविलें. तेव्हां नलानें त्याची संख्या मोजून पाहिली. ती बरोबर भरतांच याला फार आश्चर्य वाटलें. पुढें ऋतुपर्णानें याजपासून अश्वहृदयविद्या घेऊन यास अक्षहृदयविद्या दिली. अशा रीतीनें ते दोघे परममित्र झाले (ह. वं. १. १५; वायु. २. २६; विष्णु. ४. ४. १८; ब्रह्म. ८. ८०). अक्षहृदयविद्या प्राप्त होतांच कलि बाहुकाच्या शरिरांतून बाहेर पडला. त्यास पाहून नल शाप देण्यास उद्युक्त झाला असतां, त्यानें याची प्रार्थना केली कीं, 'पुण्यश्लोका, मी तुला शरण आहें, यास्तव आतां मला शाप देऊं नकोस. कारण कर्कोटक नागाच्या विषानें माझा देह दग्ध झाला आहे, शिवाय दमयंतीच्याहि अभिशापानें मी पीडित आहें. कर्कोटक, दमयंती, नल व ऋतुपर्ण यांचें नामसंकीर्तन करणारास कलीची बाधा होणार नाहीं (म. व. ७९), असें म्हणत कलि बेहड्याच्या झाडांत शिरला व नल गेल्यावर मार्गस्थ झाला. तेव्हांपासून बेहड्याचें झाड अपवित्र झालें (म. व. ७२).

पुढें सायंकाळ झाला नाहीं, तोंच रथ कुंडिनपुरांत बाहुकानें आणून पोहोंचविला. पण तेथें स्वयंवराचा कांहींच प्रकार नव्हता. भीमाशीं ऋतुपर्णानें सहज आलों म्हणून बतावणी केली. दमयंतीस आलेल्या मंडळींत नल दिसला नाहीं, पण ज्याअर्थी ऋतुपर्णाचें येणें एका दिवसांत झालें, त्याअर्थी हें कृत्य नलाचेंच अशी तिची खात्री झाली व तिनें बाहुकाकडे केशिनी नामक दासीस पाठविलें. त्या दासीनें दमयंतीकरितां फारच खुबीचीं प्रश्नोत्तरें करून याकरवीं बरीच माहिती काढिली व सरतेशेवटीं अयोध्येंत दिलेलीं उत्तरें याकडून पुनः वदविलीं. तेव्हां याला न राहवून हा अश्रू गाळूं लागला. हें सर्व वृत्त केशिनीनें दमयंतीस कळविलें (म. व. ७३-७४).

पुढें तिनें केशिनीस नलाच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यास सांगितलें. तिनें यास अग्नि व उदक न देववितां इतर पाकाचें साहित्य देवविलें. तें घेऊन जल व अग्नि उत्पन्न करून यानें पाक केला, तो तिनें पाहिला. तसेंच याच्या ठायीं त्या दासीस पुष्पविद्या (फुलें चुरगळलीं तरी तीं न सुकणें) व आकृतिविद्या (लहान वस्तु मोठी होणें) याहि खुणा दिसल्या. पुढें दमयंतीनें तिजसमवेत मुलें पाठविलीं. तेव्हां तर नलास शोक आवरेना. पुढें माझीं मुलेंहि अशींच आहेत, असें यानें त्या दासीस उडवाउडवीचें उत्तर दिलें. नंतर दमयंतीनें आपल्या मातेस कळविलें कीं, 'नलाच्या बहुतेक खुणा बाहुकाच्या ठायीं दिसतात. पण रूपावरून थोडा संशय पडतो. आज्ञा होईल तर त्यास इकडे बोलावावें व परीक्षा करून पहावी.' तिनें आज्ञा देतांच ती बाहुकास म्हणूं लागली कीं, 'पतिव्रता व निरपराधी अशा स्त्रीस एकाकी अरण्यांत सोडून जाणारा नलराजावांचून दुसरा कोणी पृथ्वीवर नाहीं.' असें ऐकतांच बाहुक म्हणाला कीं, 'पति सदाचारवती व विद्यमान असतां स्वयंवर करणारी तरी तुझ्याशिवाय दुसरी कोण आहे?' त्यावरून उभयतांची ओळख पटून दमयंतीनें उत्तर दिलें कीं, 'हा सर्व उपक्रम तुजकरितांच आहे. स्वयंवर करावयाचेंच असतें, तर मी अन्य राजे कां बोलाविले नसते?' असें बोलून ती स्वस्थच राहिली. इतक्यांत दमयंती निष्पाप असल्याची वायूची आकाशवाणी ऐकून नलानें कर्कोटकाचें स्मरण करितांच व तीं दिव्य वस्त्रें अंगावर परिधान करितांच

हा कुरूप दिसूं लागला. तें पाहून नलानें दमयंतीस व मुलांस आलिंगन दिलें ( म. व. ७५-७६ ).

सर्व गूढ उकलल्यावर व ऋतुपर्ण परत अयोध्येस गेल्यावर भीमराजानें एक महिना नलास आपणापाशीं ठेवून घेऊन यास दमयंती व मुलें यांसहित निषधदेशीं मार्गस्थ केलें. तेव्हां नल तेथें जातांच यानें पुष्करास बोलाविलें व त्याच्याशीं द्यूत खेळून आपलें राज्य परत मिळविलें ( म. व. ७८ ).

हा पूर्वजन्मांत गौडदेशाच्या पलीकडील देशांत पिप्पल नगरांत एक वैश्य होता. संसारास कंटाळून हा एकदां अरण्यांत गेला असतां, यानें एका ऋषीच्या उपदेशानुसार गणेश-व्रत केलें म्हणून हा नल राजा झाला ( गणेश. २. ५२ ). गतजन्मीं नलदमयंती हीं आहुक-आहुका नामक भिल्ल-भिल्लीण होतीं. शिवप्रसादानें हीं राजकुलांत जन्म पावलीं. शंकरानें हंसाचा अवतार घेऊन यांस साहाय्य केलें ( यतिनाथ पहा ).

याचे पाकशास्त्रावरील व अश्वविद्येवरील ग्रंथ बरेच प्रसिद्ध आहेत.

२ ( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें यदुपुत्र. यास नील असें नांव आहे.

३ ( सो. कुकुर.) विलोमापुत्र (नंदनोदरदुंदुभि पहा).

४ ( सू. इ. ) दलाचें नामांतर.

५ तेरा सैंहिकेयांतील एक ( ब्रह्म. ३ ).

६ ( सू. इ. ) निषध राजाचा पुत्र. याचा पुत्र नभ किंवा नभस् ( ह. वं. १. १५; ब्रह्म. ८; पद्म. सृ. ८ ).

७ ( सू. इ. ) वीरसेन राजाचा पुत्र ( पद्म. सृ. ८; मत्स्य. १२. ५६ ).

८ ( सू. इ. ). ऋतुपर्णाचा पुत्र. यास सुदास नांवाचा पुत्र होता. याचें मूळ नांव सर्वकर्मन् किंवा सर्वकाम होय ( लिंग. १. ६६. १ ).

९ रामसैन्यांतील एक वानर. हा ऋतुध्वज मुनीच्या शापानें वानररूपधारी विश्वकर्म्याकडून घृताची अप्सरेच्या ठायीं गोदावरी तीरीं झाला ( वामन. ६२ ). हा अग्नीचा पुत्र असेंहि म्हटलें आहे ( स्कंद. ३. १. ४२ ). 'हवी ती वस्तु निर्माण करितां येईल,' असा यास पित्यानें वर दिला होता ( वा. रा. यु. २२ ). यानें रामाज्ञेनें सेतु बांधिला. तो रामसेतु अगर नलसेतु या नांवानें प्रसिद्ध आहे ( म. व. २८३ ). यानें जान्हवी नदींत एका ब्राह्मणाचे अनेक शालीग्राम विसर्जन केल्यामुळें त्या ब्राह्मणानें 'तुझ्या हातून दगड तरतील,' असा याला वर दिला होता. म्हणून हा सेतु बांधूं शकला. यानें गणपतीची व नवग्रहांची सेतु बांधतांना प्रथम पूजा केली ( आ. रा. सार. १० ). यानें प्रतपनाशीं, अकंपनाशीं व प्रहस्ताशीं युद्ध करितांना मोठा पराक्रम केला होता ( वा. रा. यु. ४३; ५५; ५८ ). यास कुश-लवांनीं जिंकिलें होतें ( कुशलव पहा ). अश्वमेधप्रसंगीं अश्वाचे रक्षणार्थ हा शत्रुघ्नाबरोबर गेला होता ( पद्म. सृ. ११ ).

**नलकूबर**—कुबेराचा पुत्र ( म. स. १० ). याला मणिग्रीव नांवाचा थोरला भाऊ होता. एकदां हे दोघे भाऊ कैलासपर्वताच्या उपवनांत गंगेंत स्त्रियांसह क्रीडा करीत होते. दारूच्या निशेमुळें कोणासच वस्त्र नव्हतें. त्याच मार्गानें नारद आला. नारदाला पाहिल्याबरोबर स्त्रिया बाहेर आल्या आणि त्यांनीं वस्त्रें परिधान केलीं. कारण, त्यांना शापाची भीति वाटली. पण नलकूबर व मणिग्रीव हे फारच बेहोष होते. यांनीं देवर्षीची अगदींच मर्यादा ठेविली नाहीं. नग्न असणाऱ्या या दोघांना नारदानें वठणीवर आणण्याचें ठरविलें. ज्यांना आपलें वस्त्र आहे कीं नाहीं याचाहि पत्ता नाहीं, ते वृक्षयोनींतच जाण्यास योग्य, असें नारदाच्या मनानें घेतलें. व त्याप्रमाणें त्यानें या दोघांना दिव्य शंभर वर्षें वृक्ष होण्याचा शाप दिला. नारदाच्या कृपेनें त्या स्थितींतहि यांचें पूर्वस्मरण कायम राहिलें व कृष्णसान्निध्यानें यांची सुटका होऊन हे कृष्णभक्त बनले.

एकदां यशोदेनें, फार खोड्या करतो म्हणून कृष्णाला उखळीला बांधिलें. कृष्ण उखळी ओढीत हळुहळू चालला, तो अंगणांत जोडीनें असणाऱ्या अर्जुन वृक्षाच्या मधून जाऊं लागला. तेव्हां उखळी दोन्ही वृक्षांत अडकली. कृष्णानें जोरानें ओढल्याबरोबर ते दोन्ही वृक्ष मुळांसकट कोसळले. त्यामुळें नलकूबर व मणिग्रीव वृक्षयोनींतून मुक्त झाले ( भा. १०. ९-१०; ह. वं. २. ७; पौलस्त्य पहा ).

**नव**—( सो. अनु. ) मत्स्यमतें हा उशीनरपुत्र होय ( ४ नर पहा ).

**नवक**—विर्भिंदुकीयाच्या सत्रांत यानें बायकोची इच्छा केल्याबद्दल निर्देश आहे ( जै. ब्रा. २. २३३ ).

**नवग्व**—अंगिरसांपैकीं एका वर्गाचें नांव. यांनीं इंद्राची स्तुति केली आहे ( ऋ. ५. २९. १२ ). हे नऊ महिन्यांनीं यज्ञ समाप्त करीत म्हणून यांना नवग्व म्हणत ( ऋ. १०. ६२. ४-६ ).

**नवतन्तु**—विश्वामित्राचा एक पुत्र.

**नवप्रभ**—( नडायन पहा ).

**नवरंग**—(ऐति.) दिल्लीचा अधिपति, एक म्लेच्छ राजा. यानें आपल्या पित्यास व बंधूंस कैद करून राज्य घेतलें व सनातन धर्मीयांच्या पूज्य मूर्तींचा उच्छेद केला. हा पूर्व-

जन्मीं अंधकासुर होता. यानें एकंदर ४९ वर्षे राज्य केलें. ( भवि. प्रति. ४. २२ ). हा बहुतेक मोंगलवंशीय शहाजहानचा पुत्र अवरंगजेब असावा.

**नवरथ**—( सो. क्रोष्टु. ) भागवत, विष्णु, मत्स्य व पद्म यांच्या मतें भीमरथाचा पुत्र; वायु व ब्रह्मांड यांच्या मतें रथवराचा पुत्र.

**नववास्त्व**—घोरपुत्र कण्वानें याला आपल्याकडे आणण्याविषयीं अग्नीची प्रार्थना केली आहे (ऋ. १.३६.१८). भरद्वाजानें इंद्राकडून याला ठार करून उशनस्‌चा पुत्र परत दिला ( ऋ. ६. २०. ११ ). तिसऱ्या ठिकाणीं नववास्त्व बृहद्रथ असें नांव आहे. इंद्रानें याचा नाश केला ( ऋ. १०. ४९. ६ ).

**नहुर**—न्यूहवंशीय ताहर राजाच्या तीन पुत्रांतील एक ( भवि. प्रति. २.५ ).

**नहुष्**—हा सामान्य मनुष्यवाचक शब्द म्हणून निरुक्तांत दिला असला तरी कांहीं ठिकाणीं व्यक्तिवाचक असावा ( ऋ.१. १२२. १५ ).

**नहुष**—एक राजा किंवा पृथुश्रवस् कानीताचा कोणी संबंधी असावा ( ऋ. ८. ४६. २७; नाहुष पहा ).

२ पुरुरव्याचा नातू, आयूचा पुत्र व ययातीचा पिता ( अग्नि. २७४. १६; लिंग. १. ६६; ब्रह्म. ११; पद्म. सृ. १२; मत्स्य. २४; गरुड. १३९; म. आ. ६९. ३३. कुं; भा. ९.१७). हा आयूला राहुकन्या प्रभा (स्वर्भानवी) हिच्यापासून झाला ( ह. वं. १. २८; म. आ. ६९ ). पण आयूची पत्नी इंदुमती, हिला श्रीदत्तकृपेंकरून महापराक्रमी नहुष झाला ( पद्म. भू. १०५ ). आयूला विरजेपासून हा झाला ( वायु. २. ३२; ब्रह्म. १२. ३४ ). सुस्वधा पितरांची कन्या विरजा ही याची पत्नी होय. तिच्यापासून यास ययाति झाला ( मत्स्य. १५.२३ ). आयुपत्नी इंदुमती ही दत्तकृपेनें गरोदर असतां हुंडाची कन्या आपल्या सख्यांसह नंदनवनांत क्रीडा करण्याकरितां गेली. तेथें तिनें आयुपुत्र नहुष याच्या हातून आपला पिता मरणार, असें सिद्धचारणांच्या तोंडून भविष्य ऐकिलें. तिनें लगेच घरीं जाऊन आपल्या बापास घडलेली हकीकत सांगितली. तेव्हां तो दुष्ट दैत्येंद्र इंदुमतीच्या गर्भाचा नाश करण्याच्या उद्देशानें एका अमंगल दासीच्या देहांत शिरला. व हा जन्मतांच याला रात्रींच्या वेळीं आपल्या घरीं घेऊन आला. नंतर त्यानें यास आपल्या विपुला नामक भार्येस देऊन म्हटलें कीं, 'हा माझा शत्रु आहे, करितां यास शिजवून याचें मांस तूं मला आणून दे.' विपुलेनें या बालकास आचाऱ्याच्या स्वाधीन केलें. परंतु आचाऱ्यास या बालकाची दया येऊन त्यानें यास न मारितां वसिष्ठगृहीं पोहोंचतें केलें व हुंडास हरणाचे मांस शिजवून खावयास दिलें. वसिष्ठाच्या दृष्टीस हें बालक पडतांच त्यास दिव्यदृष्टीनें सर्व प्रकार समजला व त्यानें याचें नहुष असें नांव ठेविलें. क्रमानें उपनयन करून यास वेद व धनुर्विद्या हीं शिकविलीं. नंतर वसिष्ठाच्या सांगण्यावरून हा हुंडावर चालून गेला. त्या वेळीं सर्व देवांनीं यास मदत करून हुंडास युद्धांत ठार केलें. पुढें वसिष्ठाच्या अनुज्ञेनें यानें याच्याकरितां रात्रंदिवस तळमळत असलेल्या अशोकसुंदरीशीं विवाह केला व हा परत आपल्या राजधानीस आला ( पद्म. भू. १०५-११७ ).

कोळयांच्या जाळ्यांत सांपडलेल्या च्यवनाला मुक्त करण्याकरितां यानें कोळयांना गाई दिल्या ( म. अनु. ८६. ५ कुं. ). नहुषानें घरीं आलेल्या त्वष्टयाच्या सन्मानाकरितां गवालंभन केलें ( म. शां. २७४.६ कुं. ). इंद्रानें त्रिशिराला मारल्यामुळें त्याच्या हातून ब्रह्महत्येचें पातक घडलें. त्या पापामुळें तो वेडा होऊन लोकवस्ती सोडून हिंडूं लागला व इंद्रपद रिकामें पडलें. तेव्हां सर्व देव व ऋषि यांनीं नहुषास आपल्या तपश्चर्येचें बल देऊन 'तूं ज्याकडे पाहशील, त्याचें सर्व तेज हरण करशील' असा वर दिला व इंद्रपदीं बसविलें. कांहीं दिवस यानें धर्मानें राज्य केलें. स्वर्गाचें राज्य मिळाल्यानंतरसुद्धां हा दीपदान, प्रणिपात, देवांची पूजा इत्यादि विधि करीत असे; पण पुढें ज्या वेळीं, मी देवेंद्र आहें असें समजून यास गर्व उत्पन्न झाला, तेव्हां यानें तें सर्व सोडलें, याची बुद्धि चळली व हा विषयलंपट बनला. रोज निरनिराळया बागेंत निरनिराळ्या स्त्रियांशीं हा क्रीडा करूं लागला. याप्रमाणें कांहीं दिवस जातांच एके दिवशीं इंद्राणी याचे दृष्टीस पडली. तिचें तें मोहक स्वरूप पाहतांच हा कामोत्सुक झाला व 'तिला मजकडे घेऊन या' असें यानें सर्व देवांस सांगितलें. ती पळून बृहस्पतीकडे गेली व 'तुझें मी रक्षण करितों,' असें त्यानें तिला अभिवचन दिलें. नंतर सर्व देवांच्या सांगण्यावरून ती नहुषाकडे जाऊन म्हणाली, 'मला कांहीं अवधी द्यावा, तितक्या वेळांत मी इंद्राचा तपास करित्यें.' राजानें ही अट कबूल करितांच ती देवीच्या प्रसादानें इंद्राला भेटली व त्याला सर्व वर्तमान तिनें निवेदन केलें. तेव्हां इंद्र म्हणाला, 'तूं नहुषाकडे जाऊन त्यास सांग कीं,' तुम्ही जर पालखींत बसून पालखीला सप्तर्षि वाहनाकरितां लावलेत, तर मी तुम्हांस वरीन.' नंतर इंद्राणी परत नहुषाकडे आली व तिनें यास वरील अट सांगितली. नहुषानें ही अट मोठ्या खुषीनें कबूल केली, त्याकरितां यानें सप्तर्षींस वाहनास लाविलें व आपण पालखींत बसून तिच्या भेटीकरितां जाऊं लागला. मार्गांत

यानें अगस्त्य ऋषीच्या डोक्याला पाय लावून 'सर्प सर्प' म्हणजे लवकर चला, लवकर चला, असें म्हटलें. तेव्हां अगस्त्य ऋषि रागानें यास म्हणाला, 'मदोन्मत्ता, तूंच पृथ्वीवर दहा हजार वर्षेपर्यंत सर्प होऊन पड,' असें म्हणतांच हा तात्काल सर्परूपानें पालखींतून पडूं लागला. तेव्हां अगस्त्य ऋषीस दया येऊन त्यानें यास 'तुझी मुक्तता युधिष्ठिर करील,' असा उःशाप दिला (म. उ. ११-१७; अनु. १५६-१५७ कुं.; भा. ६. १३; दे. भा. ६. ७-८; विष्णुधर्म. १. २४). या ठिकाणीं अशी एक शंका उद्भवते कीं, अगस्त्य हा सप्तर्षींपैकीं नसून त्यास यानें वाहनास कसें जोडलें?

राजा नहुषाला 'तूं ज्याकडे बघशील, त्याचें सर्व तेज हरण करशील,' असा सर्व देवांनीं व ऋषींनीं वर दिला होता; यामुळें अगस्त्य ऋषीचें सर्व तेज नहुषानें हरण केलें होतें; पण त्याच्या जटेंत भृगु ऋषि गुप्तपणें बसला होता; त्यास नहुषानें न पाहिल्यामुळें त्याचें तेज कायम होतें, व त्यास लाथ लागतांच त्यानें शाप दिला (म. अनु. १५७ कुं.).

पुढें सरस्वती नदीच्या तीरावरील द्वैतवनांत पांडव येऊन राहिले असतां एके दिवशीं भीमसेन हातांत धनुष्य घेऊन तीं वनें अवलोकन करूं लागला. यामुनागिरीवर हिंडत असतां त्यानें गुहेच्या तोंडाशीं एक चित्रविचित्र रंगाचा अजगर पाहिला. भीमाला पाहतांक्षणींच त्या अजगरानें त्याच्यावर झडप घालून त्याचे दोन्ही बाहु घट्ट धरिले. दशनागसहस्रबली भीम पण त्याचें त्या अजगरापुढें कांहीं चालेना; तेव्हां भीमानें विचारिलें, 'सर्पराज, तूं कोण आहेस? व माझें सर्व तेज तूं कसें हरण केलेंस तें सांग.' तेव्हां अजगर म्हणाला, 'मी नहुष या नांवाचा एक राजर्षि आहें. मी अनेक विद्या, यज्ञ, कुलीनता व पराक्रम यांच्या जोरावर त्रैलोक्याचें आधिपत्य संपादन केलें; परंतु माझ्या अंगांत मद उत्पन्न होऊन मी सप्तर्षींना माझी पालखी वहावयास लावली, म्हणून अगस्त्य ऋषीनें मला शाप देऊन या स्वरूपाप्रत आणिलें. परंतु मी उःशाप मागतांच त्यानें मला 'तूं ज्या प्राण्यावर झडप घालशील, त्याची सर्व शक्ति हरण करशील व आत्मानात्मविवेकाचें ज्ञान असलेला जो पुरुष तुझ्या प्रश्नांचीं उत्तरें देईल, तो तुला शापमुक्त करील,' असा उःशाप दिला.'

नंतर त्याच ठिकाणीं धर्मराज भीमाचा शोध करीत करीत आला. त्यानें भीमाला धरिलेलें पाहतांच 'तूं कोण? व यास कां धरिलेंस?' असा त्या सर्पास प्रश्न केला. तेव्हां अजगरस्वरूपी नहुष म्हणाला, 'मी तुझा पूर्वज असून आयु नामक राजाचा पुत्र आहें. तूं जर माझ्या प्रश्नांचीं उत्तरें देशील, तर यास सोडितों.' नंतर ब्रह्म व ब्राह्मण कोण? असा प्रश्न विचारितांच त्यास धर्मानें योग्य उत्तर दिलें, तेव्हां हा खुष होऊन यानें भीमास सोडिलें व हा उद्धरून स्वर्गी गेला (म. व. १७८-१८१).

नहुषाचीं मुलें देतांना पुराणांत एकवाक्यता नाहीं. बहुतेक पुराणांत पांच पण कांहीं पुराणांत सहा व कांहींत तर सातहि दिलीं आहेत. यति, ययाति, संयाति व आयति किंवा अयति हीं चार मुलें पुष्कळ ठिकाणीं आढळतात (कूर्म. १. २२; गरुड. १. १. १३९; वायु. २. ३१; ब्रह्म. १२; विष्णु. ४. १०; लिंग. १. ६६; म. आ. ७५; ह. वं. १. ३०; भा. ९. १८). पण कांहीं ठिकाणीं संयातीबद्दल शर्याति आहे (पद्म. सृ. १२; अग्नि. २७४). अश्वक (कूर्म. १. २२), पार्श्वक (ब्रह्म. १२), अंधक (लिंग. १. ६६), शिवाख्य वियति (विष्णु. ४. १०; भा. ९. १८; पद्म. सृ. १२) असा पांचवा पुत्र दिसतो. चवथ्या आयतीबद्दल उद्धव असें कांहीं ठिकाणीं आढळतें (मत्स्य. २४; पद्म. सृ. १२; अग्नि. २७४). सहावा ध्रुव (म. आ. ७५), सुयाति (ह. वं. १. ३०; ब्रह्म. १२), कृति (विष्णु. ४. १०), विजाति (लिंग. १. ६६), वियाति (मत्स्य. २४), सातवा मेघजाति (मत्स्य. २४), किंवा मेघपालक (अग्नि. २७४) आढळतो.

३ कश्यप व कद्रू यांच्या पुत्रांपैकीं एक.

४ वैवस्वत मनूचा पुत्र.

**नहुष मानव**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९. १०१. ७-९).

**नाक**—दक्षसावर्णि मनूचा पुत्र (मनु पहा).

**नाक मौद्गल**—याचा आचार्य म्हणून अनेक ठिकाणीं उल्लेख येतो (जै. उ. ब्रा. ३. १३. ५; श. ब्रा. १२. ५. २. १; तै. उ. १. ९. १). इतक्या ठिकाणीं जरी नाकाचा निर्देश असला तरी नाक मौद्गल असा स्पष्ट निर्देशहि एका ठिकाणीं आहे (बृ. उ. ६. ४. ४). याचा ग्लाव मैत्रेयाशीं वादविवाद झाला होता (गो. ब्रा. १. १. ३१). हे सर्व एकच असावेत.

**नाकुरय**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**नाकुलि**—भृगुकुलांतील एक गोत्रकार. लिंबुकि असा पाठभेद आढळतो.

२ नकुलपुत्राचें नामांतर.

**नाग**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र. हा मेरुकर्णिकेंत राहतो (भा. ५. १६. २६). हा वरुणाच्या सभेंतील सभासद आहे (म. स. ९; सर्प पहा).

कश्यपापासून खालील प्रमुख सर्प उत्पन्न झाले. अनंत, वासुकि, तक्षक, कर्कोटक, पद्म, महापद्म, शंख व कुलिक. हे प्रजेस फार उपद्रव देऊं लागल्यामुळें ब्रह्मदेवानें यांस 'जनमेजय सत्रांत व सापत्न बंधु गरुड यांजकडून तुमचा नाश

होईल ' असा शाप दिला. पण हे पुढें शरण आल्यावर यांना उःशाप दिला. पुढें जनमेजययज्ञांतहि आपणांवर कांहीं विघ्न येऊं नये, म्हणून हे एके ठिकाणीं गेले तेथें नागतीर्थ उत्पन्न झालें. ज्या दिवशीं हे ब्रह्मदेवाचे भेटीस गेले तो दिवस नागपंचमी होय ( पद्म. सृ. ३१ ).

| नांव | वर्ण | रंग | खूण | दिशा | चिन्ह |
|---|---|---|---|---|---|
| अनंत | ब्राह्मण | शुक्ल | पुच्छ | पूर्व, | पद्म |
| वासुकी | क्षत्रिय | आरक्त | डाव्या बाजूस | आग्नेय | उत्पल |
| तक्षक | वैश्य | पीत | उजवीकडे | दक्षिण | स्वस्तिक |
| कर्कोटक | शूद्र | कृष्ण | मागें | नैर्ऋत्य | कमल |
| पद्म (नाभ) | शूद्र | कृष्ण | पंचकल | पश्चिम | पद्म |
| महापद्म | वैश्य | पीत | खालीं | वायव्य | शुक्ल |
| शंखपाल | क्षत्रिय | आरक्त | वारंवार निश्चित | उत्तर | छत्र |
| कुलिक (कंबल) | ब्राह्मण | शुक्ल | सर्वांसारखी | ईशान्य | अर्धचंद्र |

यांच्या देशादिकांची माहितीहि ग्रंथें दिली आहे ( भवि. ब्राह्म. ३३-३६ ).

२ एक वंश ( भोगी पहा ).

**नागदत्त**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. हा भीमाचे हातून मारिला गेला ( म. द्रो. १५८. १७-१९ कुं. ).

**नागदत्ता**—एक अप्सरा.

**नागवाह**—अजमेरच्या चपहनि वंशांतील श्वेतरायाचा पुत्र. याचा पुत्र लोहधार ( भवि. प्रति. ४.२ ).

**नागवीथी**—धर्म ऋषीस यामीपासून झालेली कन्या.

**नागेय**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**नागेश्वर**—हा एक शंकराचा अवतार आहे. दारुक नांवाच्या राक्षसाला मारून यानें सुप्रिय नांवाच्या वैश्यनाथाचें संरक्षण केलें. हाच औढ्या नागनाथ होय ( शिव. शत. ४२ ). याचें उपलिंग भूतेश्वर आहे ( शिव. कोटि. ४.१ ).

**नाग्नजित**—स्वर्जिताचें पैतृक नांव.

**नाग्नजिती**—( ५ सत्या पहा ).

**नाचिक ( कि )**—विश्वामित्राचा पुत्र.

**नाचिकेत**—नचिकेतस् ऋषीचें नामांतर.

**नाडपिती**—हें शकुंतलेला लाविलेलें विशेषण आहे. पण त्याचा अर्थ निश्चित समजत नाहीं ( श. ब्रा. ८.५.४.१३ ).

**नाडयनीय**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें लौकाक्षीचा शिष्य ( व्यास पहा ).

**नाडायन**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**नाडीजंघ**—( ५ गौतम पहा ).

**नाड्वलायन व नाड्वलेय**—नड्वलेच्या पुत्रास मातृक नांव.

**नाथ**—विकुंठ देवांतील एक.

**नाथशर्मन**—मच्छिंद्रास रंभेपासून झालेला पुत्र. हा शंकराचार्यांचा शिष्य होता ( भवि. प्रति. ४.१२ ).

**नाद**—चाक्षुष मन्वंतरांतील एक सप्तर्षि.

२ अमिताभ देवांतील एक.

**नादर**—( ऐति. ) एक म्लेच्छ राजा. यानें दिल्लीवर स्वारी करून दिल्लीच्या महंमद नांवाच्या राजास जिंकिलें व बरीच संपत्ति लुटून हा खुराज देशाकडे निघून गेला. याचा पुत्र महामत्स्य ( भवि. प्रति. ४. २२ ). नादर हा दिल्लीस महंमद नामक मोंगल बादशहा राज्य करीत असतांना म्हणजे इ. स. १७३९ त हिंदुस्थानावर स्वारी करणारा नादिरशहा होय.

**नान्यादृश**—मरुद्गणांतील सहाव्या गणांपैकीं एक.

**नाभ ( नाभाग )**—नाभागाचें नांव.

२ चाक्षुष मन्वंतरांतील एक ऋषि.

३ ( सो. ) भविष्यमतें नलाचा पुत्र. यानें दहा हजार वर्षें राज्य केलें.

**नाभाक**—सूक्तद्रष्टा (ऋ.८.३९.४२). सूक्तांतहि सूक्तकार असल्याचा स्पष्ट निर्देश आहे (ऋ. ८.४१.२). हा सूर्यवंशी असून अंगिरस् असावा. कारण याच्या सूक्तांत तसा निर्देश आहे. तसेंच हा मांधातृवत् स्तुति करतो असें म्हणत असल्यामुळें हा मांधात्याच्या पुढचा होय. म्हणजे वंशावळीप्रमाणें वायु, भागवत व विष्णुमतें श्रुताचा पुत्र होय. व मत्स्यांतें भगीरथाचा पुत्र. मत्स्यांत फक्त श्रुत गाळला आहे. भागवत यास नाभ म्हणतो. विष्णु व वायु कच्या ऐवजीं ग उच्चारतात.

**नाभाग**—वैवस्वत मनूच्या दहा पुत्रांतील नभग नांवाचा पुत्र होता, त्या नभगाचा हा पुत्र होय ( भा. ९.४; म. आ. ६९.२० कुं. ). पद्मपुराणांमध्यें हा वैवस्वत मनूचा पुत्र दिला आहे ( पद्म. सृ. ८ ). हा गुरुगृहीं असतां इतर भावांनीं वांटणी करून घेतली. याच्या वांट्याला फक्त बाप ठेविला. बापानें याला सांगितलें कीं, ' तूं बांढून घेतलेल्या

धनाची इच्छा करूं नकोस, मी तुझी दुसरी व्यवस्था करितों. अंगिरस सत्र करीत आहेत, पण सहावा दिवस आला की, त्यांना कांहीं तरी भ्रम होतो. त्यांना तूं दोन वैश्वदेवसूक्तें वेळेवर सांग, म्हणजे त्यांचें सत्र पार पडेल व ते सत्राकरितां जमविलेलें धन तुला देतील. त्याप्रमाणें केल्यावर हा धन घेऊं लागला असतां एक काळ्या रंगाचा पुरुष तेथें आला व तें अवशिष्ट द्रव्य माझें आहे, असें म्हणूं लागला व आपल्या हक्काबद्दल नाभागास पित्यास विचारावयास सांगितलें. तेव्हां पित्यानें यज्ञशेष द्रव्यावर रुद्राचा हक्क, असें सांगितलें. तें म्हणणें नाभागानें रुद्रास जसेंच्या तसेंच सांगितलें. त्या याच्या सत्यनिष्ठमुळें रुद्र संतुष्ट झाला. व ती सर्व संपत्ति नाभागाला दिली व शिवाय ब्रह्मविद्याहि दिली. यास अंबरीष नांवाचा पुत्र होता (भा. ९.४; पद्म. उ. ८). अगदीं हीच गोष्ट नाभानेदिष्ठाच्या नांवावर प्राचीन वैदिक ग्रंथांत दिली आहे (ऋ. १०.६१.६२). व तीं सूक्तें म्हणजे नाभाक काण्वाच्या नांवावर असलेलीं दोन सूक्तें होत (ऋ. ८. ३९-४२; नि. १०.५). याचा वंश बारा पुराणांत दिला आहे (वायु. २.२७; विष्णु. ४.२; अग्नि. २७२; ब्रह्मांड. ३. ६३; ब्रह्म. ७; मत्स्य. १२; ह. वं. १.१०; भा. ९.४). हें राजघराणें वैशालीला होतें.

२ (सू. दिष्ट.) वैवस्वत मनूचा पुत्र दिष्ट त्याचा पुत्र नाभाग. नाभागाचा भलंदन. विष्णुमतें नेदिष्टाचा व भागवत-मतें दिष्टाचा पुत्र. वायुमतें मनूचा पुत्र.

३ (सू. इ.) विष्णु, वायु व भागवत यांच्या मतें श्रुताचा पुत्र. मत्स्यमतें भगीरथ राजाच्या दोन पुत्रांतील कनिष्ठ. यास भागवतांत नाभ असेंहि म्हटलेलें असून पुत्र अंबरीषच होता. परंतु रामायणांत याच्या पूर्वी अंबरीष घातला आहे.

नाभागारिष्ट, नाभानेदिष्ट व नाभागदिष्ट हीं सर्व नभगाचीं नामांतरें होत (अग्नि. २७२.१७१; नभग पहा).

**नाभानेदिष्ट मानव**-सूक्तद्रष्टा (ऋ. १०.६१-६२). नाभागावरील गोष्ट वैदिक ग्रंथांत याच्यावर आहे (ऐ. ब्रा. ५.१४; तै. सं. ३.१.९. ४-६; सां. ब्रा. २८.४; ३०.४; सां. श्रौ. २६. ११. २८-३०). दुसरीकडे नाभानेदिष्ठीय म्हणून याच्या ऋग्वेदांतील सूक्ताचा निर्देश आहे (पं. ब्रा. २०.९.२).

**नाभि**--प्रियव्रतपुत्र आग्नीध्रास पूर्वचित्ति अप्सरेपासून झालेला पुत्र. यास मेरुदेवी नामक पत्नी असून तिच्यापासून याला ऋषभदेव नामक पुत्र झाला. याच्या वर्षास अजनाभ असें नांव आहे (भा. ५.२.१९; ४.२).

**नाभिगुप्त**--प्रैयव्रत हिरण्यरेत्याचा पुत्र (भा. ५. २०. १४).

**नायकि**--अंगिरसकुलांतील गोत्रकार.

**नायु**--दक्ष व असिक्री यांची कन्या. कश्यपाची स्त्री.

**नारद**--ब्राह्मणानें वशा धेनूचें मांसभक्षण करावें किंवा नाहीं यासंबंधीं याचा उल्लेख आला आहे (अ. वे. ५.१९.९; १२. ४.१६; २४;४१). पुरुषमेध करण्याविषयीं यानेंच हरिश्चंद्राला सल्ला दिला (ऐ. ब्रा. ७.१३). नारद व पर्वत यांनीं आंबाष्ठ्य व युधांश्रौष्टि यांना ऐंद्रमहाभिषेक केला (ऐ. ब्रा. ८.२१). हा सोमकाचा सोमविधींतील गुरु होता (ऐ. ब्रा. ७.३४). मैत्रायणीसंहितेंत आचार्य म्हणून व दुसरीकडे बृहस्पतीचा शिष्य म्हणून याचा निर्देश आहे (मै. सं. १.५.८; सां. ब्रा. ३.९). यानें सर्व विद्या संपादन केल्या होत्या तरी ब्रह्मज्ञान मिळविण्याकरितां हा सनत्कुमाराकडे गेला होता (छां. उ. ७.१.१).

याच्या नांवावर सामवेदाची एक शिक्षा प्रसिद्ध आहे. ही प्रायः श्लोकमय आहे. हिच्यावर भट्टशोभाकराचें एक भाष्य आहे.

२ हा ब्रह्मदेवाच्या मांडीपासून उत्पन्न झाला (भा. ३. १२. २८) ब्रह्मदेवाचा मानस पुत्र (मत्स्य. ३. ६-८). हा विष्णूचा तिसरा अवतार होता (भा. १. ३. ८). यानें व्यासास भागवत रचण्यास सांगितलें (भा. १. ५.८). हा नरनारायणांचा उपासक होता (भा. १. ३). यानेंच सावर्णि मनूस 'पंचरात्रागम' तंत्राचा उपदेश केला (भा. ५. १९. १०). यानें दक्षपुत्र हर्यश्व व शबलाश्व यांस प्रजोत्पादन करण्यापासून परावृत्त केलें, म्हणून रागावून दक्षानें यास शाप दिला (विष्णु. १. १५). या शापामुळें हा ब्रह्मचारी राहून नेहमीं भटकत राहिला व भांडणें लावूं लागला (भा. ६. ५.३७-३९). हा शाप यास जन्मजन्मांतरीं होता, असें दिसतें. इतर पुराणांत हा शाप निरनिराळा आढळतो. 'तूं नाश पावून पुनः गर्भवास पतकरशील' (ह. वं. १. १५). परमेष्ठीनें ब्रह्मर्षींना पुढें करून नारदावर थोडी कृपा करण्यास विनविलें. तेव्हां दक्ष परमेष्ठीला म्हणाला कीं, 'मी आपली मुलगी तुला देईन व तिजपासून तुला नारद होईल' (वायु. २. ४. १३५-१५०; ब्रह्मांड ३.२.१८). परमेष्ठीला मुलगी दिली तिच्या पासून नारद झाला (ब्रह्म. १२.१२-१५). 'तुझा नाश होऊन तूं गर्भवासी होशील व पुढें माझाच पुत्र होशील.' त्याप्रमाणें हा नाश पावून दक्षास वीरिणीचे ठिकाणीं झाला (दे भा. ७. १).

हा ब्रह्मदेवाच्या इतर मानसपुत्रांप्रमाणें प्रजापति होता. पुढें महादेवानें मानसपुत्रांस शाप दिला. त्यांत हाहि मरण पावला (वायु. २. ४.९). हा पूर्वी एका ऋषीचा दासीपुत्र होता. हा त्या ऋषीची नेहमीं सेवा करी. तेव्हां याचे

कानावर ऋषिसान्निध्यामुळें ब्रह्मविद्या पडली, त्यामुळें यास उत्तम ज्ञान प्राप्त झालें.

३ हा कश्यप प्रजापतीचा पुत्र. या वेळीं यास अरुंधती व पर्वत अशीं दोन भांवडें होतीं (वायु. २. ९. ७८-८०). पण नारदाचा पर्वत हा भाचा होता असें आढळतें (म. शां. २९; दे. भा. ६. २७). याचे उत्पत्तीची कथा ब्रह्मवैवर्तांत निराळी आहे. द्रुमिल नांवाच्या शूद्राची कलावती नामक स्त्री होती. तिनें नवऱ्याच्या परवानगीनें मुलाकरितां कश्यपाचें वीर्य प्राशन केलें. द्रुमिलानें पुढें देहत्याग केला व कलावती एका ब्राह्मणाचे घरीं प्रसूत झाली व तिला पुत्र झाला. त्याचें नांव नारद ठेविलें. पुढें कश्यपास हा अर्पण केला. हा कृष्णतत्त्वानें शापमुक्त झाला. कारण, हा शापामुळेंच शूद्रस्त्रीचे ठिकाणीं झाला होता (ब्रह्मवै. १. १३). यास ब्रह्मदेवानें सृष्टि करण्यास अनुज्ञा दिली होती; पण ती यानें नाकारली. हा चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक होता.

एकदां लक्ष्मीसमोर गायन झालें, त्या वेळीं यास गायन येत नसल्यामुळें लक्ष्मीनें यास दासींकरवीं हांकून देऊन व वेतांनीं मारून याचा अपमान केला. व तुंबरूचा सन्मान केला. हा अपमान सहन न होऊन यानें लक्ष्मीला ‘ तूं राक्षसाची मुलगी होशील, थोडथोडें मडक्यांत सांठविलेलें रक्त प्यालेल्या स्त्रीचे उदरीं त्या रक्ताचे आधारें तुझा जन्म होईल व त्यामुळें तूं घराबाहेर टाकिली जाशील,’ असा शाप दिला. पुढें हा गायन शिकण्याकरितां गानबंधूंकडे गेला, तेथें यास सर्व म्हणजे छत्तिस दशसहस्र, छत्तीस सहस्र व छत्तीसशें स्वरांचा भेद कळला व हा तुंबरूकडे आला. यास तेथें रागिण्या भेटल्या. त्या अगदीं अंगभंग-विकल झाल्या होत्या. त्या वेळीं यानें त्यांस या अंगभंगाचें कारण विचारिलें. तेव्हां त्या म्हणाल्या कीं, ‘ तुझ्या गायनामुळें आम्ही अशा झालों आहोंत. आतां ज्या वेळीं तुंबरु गाईल, त्या वेळीं आम्ही चांगल्या होऊं.’ तेव्हां हा लज्जित होऊन श्वेतद्वीपांत गेला. तेथें यानें विष्णूची स्तुति केली. त्या स्तुतीनें प्रसन्न झाल्यावर श्रीविष्णूनें यास सांगितलें कीं, ‘ मी तुला कृष्णावतारीं गायन शिकवीन.’ त्याप्रमाणें नारद कृष्णाकडे गेला. तेव्हां जांबवती, सत्यभामा, रुक्मिणी व नंतर स्वतः कृष्ण यांनीं यास गायनांत पूर्णपणें पारंगत केला. श्रीकृष्णाकडे यावयाच्या अगोदर हा पुनः तुंबरूकडे गेला होता, पण तेथें धैवतांसह षड्जादि सहा देवकन्यांना तेथें पाहून हा लाजून निघून गेला (अ. रा. ७). यानें एकदां विष्णूस आपली माया दाखविण्यास सांगितली. ती कथा निरनिराळ्या पुराणांतून निरनिराळी आहे. एकदां श्वेतद्वीपांत जाऊन नारदानें श्रीविष्णूची स्तुति केली. व त्यानें वर देऊं केला असतां ‘ मला आपली माया दाखवा,’ असें त्यास हा म्हणाला. तेव्हां विष्णूनें यास गरुडावर बसवून आपल्याबरोबर कान्यकुब्ज देशांत नेलें व यास एका सरोवरांत स्नान करावयास सांगितलें. स्नानार्थ बुडी मारतांक्षणींच यास आढळलें कीं, आपण काशीराजाची कन्या सुशीला झालों आहोंत. पुढें या सुशीलेस विदर्भ राजा सुधर्म्यानें वरिलें. पण कांहीं कारणावरून काशीराजा व सुधर्मा यांच्यांत युद्ध होऊन त्यांत दोघांचा नाश झाला. जनककुल व भर्तृकुल यांचा नाश झालासें पाहून हिनें दुःखसंतापामुळें चितेंत उडी टाकिली. इतक्यांत हा पाण्यांतून वर आला. पण या मायेची खूण म्हणून एक भाजल्याचा फोड याच्या मांडीवर राहिला व यास सारखी तळमळ लागली. इतक्यांत तीरस्थ विष्णूचें दर्शन झाल्यामुळें ती तळमळ शमली (ब्रह्म. २२८). देवीभागवतांत तालजंघाशीं संबंध येऊन यास वीस मुलें झालीं असें आहे (दे. भा. ६.२८-३०). वृंदेनें सांगितल्यावरून सरोवरांत स्नान केल्यानें नारदाची नारदी होऊन कृष्णाशीं समागम घडला व पुनः दुसरीकडे स्नान केल्यानें नारद पुरुष झाला असें आहे (नारद. २.८०; पद्म. पा. ७५).

एकदां मधुर आवाज ऐकून नारदानें हा आवाज कोठून कसा आला असें वृंदेला विचारिलें. त्यावरून तिनें यास कुब्जेचा सर्व वृत्तांत सांगितला, कारण तो आवाज कुब्जेचाच होता (नारद. २. ८०). नारदाचें लग्न झाल्याचें पुष्कळ ठिकाणीं आढळून येतें (ब्रह्मवै. ४. १३०. १०-१५). एकदां नारद व याचा भाचा पर्वत, असे दोघेजण सहज फिरत फिरत शैब्यपुत्र संजय राजाचे येथें आले. तेथें यांनीं रहावयाची इच्छा दर्शविली. संजयानें आपली मुलगी सेवेसाठीं नेमिली. त्या वेळीं नारदपर्वतांत असा करार झालेला होता कीं, ‘ ज्याचे मनांत जें येईल तें—मग तें चांगलें असो अथवा वाईट असो—एकमेकांस सांगावयाचें. दोघांपैकीं कोणीहि कोणापासून कांहीं चोरून ठेवावयाचें नाहीं, व जो चोरून ठेवील त्यास दुसऱ्यानें शाप द्यावा.’ याप्रमाणें कांहीं दिवस गेले; पण पुढें संजयकन्या दमयंती हिजवर नारदाचें मन गेलें. द्रोणपर्वांत हिजवर दोघेहि भुलले असें आहे. नारदाचें मन गेलें हें पर्वतानें ओळखून व त्यानें ही गोष्ट आपणांजवळून चोरून ठेविली, हें पाहून यास शाप दिला कीं, ‘ ही कन्या तुला निःसंशय मिळेल व तुझें मुख वानरासारखें होईल. इतरांना तूं साक्षात् मृत्यूच भासशील.’ हा शाप ऐकून नारदानेंहि त्यास ‘ तुला स्वर्गप्राप्ति व्हावयाची नाहीं,’ असा उलट शाप दिला. द्रोणपर्वांत नारदानें दमयंतीबद्दल मागणी केली असतां पर्वत म्हणाला, ‘ मी तिला मनानें वरिली आहे व तूं माझी अवज्ञा करून तिला वरिलेंस, तेव्हां तुझी स्वेच्छेनें स्वर्गी जाण्याची गति कुंठित होईल’. तेव्हां नारदानें त्यास उलट शाप दिला कीं, ‘ तुलाहि माझ्याखेरीज स्वर्गी जातां यावयाचें नाहीं. ’ पुढें नारदास पर्वत

दीन होऊन शरण आला व आपला शाप परत घेण्यास सांगू लागला, तेव्हां नारदानें त्यास आपला शाप परत घेण्यास सांगितलें व एकमेकांनीं आपापले शाप परत घेतले. पुढें एकदां हे दोघे संजयाच्या सेवेनें संतुष्ट होऊन 'त्यास वर माग,' असें म्हणाले. संजयानें सर्वगुणसंपन्न असा पुत्र मागितला व त्याप्रमाणें त्यास कांहीं दिवसांनीं एक पुत्र झाला. द्रोणपर्वांत 'मला ज्याचे मूत्रपुरीषादि उत्सृष्ट पदार्थ सोन्याचे आहेत, असा पुत्र व्हावा,' असें म्हटलें असून शांतिपर्वांत ही अफवा उठल्याचें म्हटलें आहे. तसेंच शांतिपर्वांत हा पुत्र पर्वताचे वरामुळें व द्रोणपर्वांत नारदाचे वरामुळें झाल्याचें म्हटलें आहे. नंतर वरील अफवेनें अगर गुणांमुळें त्या मुलास चोरांनीं नेऊन फाडिलें व मारिलें. पण त्याचेपासून इच्छिल्याप्रमाणें सुवर्ण न मिळाल्यामुळें ते संतापून आपआपसांत हाणामाऱ्या करून मरण पावले (म. द्रो. ५५). शांतिपर्वांत हा पुत्र दीर्घायु होणार नाहीं असें पर्वतानें म्हटलें. हा पुत्र इंद्राचा पराजय करणारा व्हावा असें संजयास वाटत होतें. तेव्हां संजयाचें दीनवदन पाहून नारद म्हणाला कीं, 'जर तो पुत्र मृत झाला तर पुनः आमचें स्मरण कर, म्हणजे मी त्याचें तुला पुनः दर्शन घडवून त्याच्याच स्वरूपाचा दुसरा पुत्र देईन.' नंतर हे दोघे स्वर्गीं गेले. पुढें तो पुत्र जन्मला, पण इंद्रानें तो आपल्या पराभवास प्रवृत्त होईल हें जाणून त्याचे पाठीमागें आपलें वज्र पाठविलें. नंतर एकदां एका दाईबरोबर तो एका सरोवराकडे गेला असतां त्यास वाघानें ठार केलें. या पुत्राचें नांव सुवर्णष्ठेवी असें होतें. नंतर पुढें नारदानें संजयानें स्मरण केल्यावरून तेथें येऊन त्यास त्याच्या शोकहरणार्थ बराच उपदेश केला. हा उपदेश करतेवेळीं यानें मरुत्त, सुहोत्र, पौरव, शिबि, दाशरथी राम, भगीरथ, दिलीप, मांधातृ, ययाति, अंबरीष, शशबिंदु, गय, रंतिदेव, भरत, पृथु, परशुराम इत्यादिकांच्या गोष्टी सांगितल्या. नंतर त्याचा शोक दूर झाल्यावर त्यास त्याचा पुत्र परत दिला (म. शां. ३१; द्रो. ५५-७१).

देवीभागवतांत दमयंतीचा बाप संजय दिला आहे व त्याच्या मुलाच्या जननमरणांच्या हकीगतीखेरीज नारद-दमयंती लग्नाची हकीगत पुष्कळांशानें शांतिपर्वांतील हकीगतीप्रमाणेंच आहे. त्यांत दमयंतीहि लुब्ध झाली होती व त्याप्रमाणें तिनें दासीकरवीं आईस सांगितल्यावरून संजयानें हें लग्न करून दिलें असें आहे (दे. भा. ६. २६-२७; श्रीमती पहा).

रामाचा अश्वमेधीय अश्व वीरमणीनें धरिला, त्या वेळीं तेथें नारद प्रगट होऊन यानें शत्रुघ्नाला मोठ्या सावधपणें युद्ध करण्यास सांगून अतिशय कष्टानें जय मिळेल असें सांगितलें, व हा अंतर्धान पावला (पद्म. पा. ४०).

एकदां पुष्करक्षेत्रीं ऋषींचें सत्र चाललें होतें. तेथें अनेक चर्चा चालल्या होत्या. त्यांत कलियुगांत फलप्राप्ति लवकर होते, म्हणून त्याची प्रशंसा चालली होती. इतक्यांत तेथें नारद एका हातांत शिश्न व दुसऱ्या हातांत जीभ धरून आला व म्हणाला कीं, 'हीं दोन इंद्रियें अनिवार्य आहेत. तरी तुम्ही या पाखंडप्रचुर भारताचा त्याग करून दुसरीकडे चला.' तें ऐकतांच ऋषींनीं सत्र संपविलें व ते तेथून निघून गेले (स्कंद. २. ७.२२). ब्रह्मदेवानें ज्या वेळीं सत्र केलें त्या वेळीं ब्रह्मगणांमध्यें हाहि होता (पद्म. सृ. ३४). यानें कोटितीर्थ, जयादित्य, नवदेवी, भद्रादित्य वगैरे तीर्थें स्थापिलीं (स्कंद. १. ४३-४७).

एकदां हा नंदाच्या घरीं आला असतां, कृष्ण हा प्रत्यक्ष विष्णूच असल्यामुळें त्याची पत्नी लक्ष्मी ही सुद्धां येथेंच कोठें तरी जन्मास आली असावी असा विचार करून यानें तिचा शोध चालविला, तों भानु नामक गोपाची ती लुली, बहिरी, व आंधळी अशी लहान कन्या असल्याचें यास आढळून आलें (पद्म. पा. ७१). प्रथम कंस देवकीचीं मुलें मारीत नव्हता; पण याच्या सांगण्यावरून कंसानें देवकीचें प्रत्येक मूल मारण्यास सुरवात केली (भा. १. १. ६४).

कृष्णानें नरकाच्या बंदीशाळेंतील सोळा सहस्र स्त्रियांशीं एका मुहूर्तावर निरनिराळ्या मंडपांत लग्नें केलीं, हें ऐकून नारदास आश्चर्य वाटलें व त्याची सत्यता पटवून घेण्याकरितां हा त्याजकडे गेला व त्यानें त्याच्या प्रत्येक स्त्रीचे घरांत जाऊन पाहिलें, त्या वेळीं यास प्रत्येक स्त्रीचे घरांत कृष्ण कोणत्याना कोणत्या तरी उद्योगांत निमग्न असून तो उद्योग अर्धाअधिक झालेला आहे, असें यास आढळून आलें (भा. १०. ५९-४२ १-८).

श्रीकृष्ण रुक्मिणीजवळ बसला असतांना, नारदानें त्यास स्वर्गांतील पारिजातक पुष्प दिलें, तें सहजच श्रीकृष्णानें रुक्मिणीस दिलें. त्यामुळें सत्यभामा व श्रीकृष्ण यांचें भांडण लागलें (ह. वं. २. ६५-७३; विष्णु. ५. ३०). तसेंच नवऱ्याचें दान केलें असतां तोच नवरा जन्मोजन्मीं मिळतो इत्यादि सांगून यानें स्वतःच श्रीकृष्णाचें दान घेतलें व नंतर कृष्ण व पारिजातकाचें झाड यांच्या भारंभार सोनें घेऊन तो परत दिला (पद्म. उ. ८८). यानें पुष्कळांस उपदेश केला व पुष्कळ लोकांशीं निरनिराळ्या विषयांवर वादविवाद केले, त्यांवरून याचा मान व याची विद्वत्ता फार मोठी होती हें सहजच दृष्टोत्पत्तीस येतें. यानें हिमालयाला पार्वती शंकराला देण्याविषयीं सल्ला दिला होता (पद्म. सृ. ४३).

इंद्र अप्सरांसह एकदां बसला असतां तेथें नारद गेला. यास उत्थापनानें योग्य मान दिल्यावर इंद्रानें नारदास विचारिलें कीं, 'कोणत्या अप्सरेस मी नृत्य करावयास सांगूं?' नारदानें म्हटलें, 'जी स्वतःला गुणरूपांनीं अधिक समजत असेल तिनें नृत्य करावें,' तेव्हां 'मी अधिक,' असें म्हणून त्या एकमेकींत भांडूं लागल्या. हें पाहून इंद्रानें त्यांस अधिक कोण हें नारदासच विचारावयास सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं विचारितांच यानें म्हटलें कीं, 'तप करीत असलेल्या दुर्वासास जी क्षोभ आणील ती अधिक.' यास वपु नामक एकच अप्सरा तयार झाली (मार्कं. १. ३०–४७).

यानें पंचरात्रागमतंत्राचा सावर्णि मनूस उपदेश केला (भा. १.३.८; ५.१९). यानें नारायणास आत्मतत्त्वाचा उपदेश केला. यास पांचरात्र म्हणतात. हेंच ब्रह्मदेवास व व्यासास यानें ऐकविलें होतें (म. शां. ३३९; भा. १२. ४. ७). याला सृष्टिविषयक ज्ञान सनत्कुमारानें सांगितलें (म. अनु. ३८ कुं.). याचा भागवतमाहात्म्यावरहि संवाद झाला आहे (पद्म. उ. १९३-१९५). यानें समुद्रतीरीं ब्रह्मसत्र करीत बसलेल्या ज्ञानी प्रचेत्यांना उपदेश केला (भा. ४. ३१). शुकाला यानेंच ज्ञानोपदेश केला (म. शां. ३२९-३३२). यानें देवलास सृष्टीच्या उत्पत्तिलयाची माहिती सांगितली (म. शां. २७५). समंगाशीं याचा ज्ञानविषयक संवाद झाला आहे (म. शां. २९२ कुं.). यानें प्राचीनबर्हीस ज्ञानोपदेश केला (भा. ४.२५.३०). यानें व्यासालाहि ज्ञान सांगितलें (म. शां. ३२८), यानें वसुदेवास भागवतधर्माची बरीच माहिती सांगितली (भा. ११. २). यानें पंचचूडेपासून स्त्रीस्वभाव समजावून घेतला (म. अनु. ७३ कुं.). पुत्रशोक करणाऱ्या अकंपनाला यानें मृत्यूची कथा सांगून शांत केलें (म. शां. २६२ कुं.). श्रीकृष्णास पूज्य कोण हें यानें समजावून दिलें (भा. १०.३७.९). यानें मार्कंडेयाला धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान यांतील पुष्कळच माहिती सांगितली (म. अनु. ५४-६३ कुं.). यानें पुंडरीकास नारायणमाहात्म्य सांगितलें (म. अनु. १८६ कुं.; पद्म. उ. ८०). यानें गालवास शास्त्रश्रवणानें कल्याण होतें असें सांगितलें (म. शां. २९३ कुं.). यानें देवमतास प्राणापानापैकीं प्रथम काय उत्पन्न होतें हें सांगितलें (म. आश्व. २५ कुं.). धृतराष्ट्रास यानें अनेक प्राचीन तपस्वी लोकांच्या गोष्टी सांगितल्या (म. आश्व. २१ कुं.). यानें शतयूपेला स्वर्गांतील धृतराष्ट्रविषयक माहिती सांगितली (म. आश्व. २०). यानें पांडवांस सुंदोपसुंदकथा (म. आ. २२८-२२९ कुं.), राजनीति (म. उ. ५.२० कुं.) व कर्णविषयक माहिती दिली (म. शां. १-४). धर्मराजाला यानें उपदेश केला (भा. १.१३). यांशिवाय अनेक स्थलीं याचा संबंध येतो (नलकूबर, प्रल्हाद, रुद्रकेतु, शेष व वृंदा पहा) यानें नारदपुराण सारस्वतकल्पांत सांगितलें (नारद. २. ८२).

व्यवहारावर याचे लघु व बृहत् असे दोन ग्रंथ आहेत. मनु आणि नारद यांच्या मतांत बरेंच साम्य आहे. याज्ञवल्क्यानें व पराशरानें याचा प्राचीन धर्मशास्त्रकार म्हणून उल्लेख केलेला नाहीं. विश्वरूपानें अनेक वेळां वृद्ध याज्ञवल्क्याचा, (याज्ञ. १. ४-५), एक श्लोक दिला असून त्यांत नारदाचा दहांपैकीं पहिला धर्मशास्त्रकार म्हणून उल्लेख केला आहे. विश्वरूपानें, (याज्ञ. २. १९०; १९६; २२६; ३. २५२), याचा उल्लेख केला आहे.

मेधातिथीनें याचा एक गद्य उतारा दिला असून, अनेक वेळां उल्लेख केला आहे. अग्निपुराणांत नारदस्मृतींतील पुष्कळसा भाग आलेला आहे. स्मृतिचंद्रिका, हेमाद्रि, पराशरमाधवीय इत्यादि ग्रंथांत नारदाचे पुष्कळसे श्लोक आलेले आढळतात.

नारद याज्ञवल्क्यानंतर झाला असावा. नारदानें सात प्रकारचीं दिव्यें दिलीं आहेत. तर याज्ञवल्क्यानें पांचच दिलीं आहेत. नारदानें न्यायशास्त्राचें सुसंगत विवेचन केलेलें नाहीं. याज्ञवल्क्यानें मात्र तें व्यवस्थितपणें लिहिलें आहे.

नारद कोणत्या प्रदेशांत होऊन गेला हें सांगणें कठिण आहे. यानें कार्षापणा(नाणें)चा उल्लेख केला आहे. हें नाणें पंजाबमध्यें चालू होतें. हा नेपाळमधील असावा असें कांहीं म्हणतात.

भट्टोजीनें ज्योतिर्नारदाचा उल्लेख केला आहे (चतुर्विंशतिमत ११) रघुनंदनानें बृहन्नारदाचा व निर्णयसिंधु आणि संस्कारकौस्तुभ यांत लघुनारदाचा उल्लेख केला आहे. उघड केलेल्या पातकांपेक्षां गुप्त पातकाला प्रायश्चित्त कमी आहे. कारण त्यांत धर्मभीरुता असते असें याचें मत आहे (नारद. १३.२७).

महाभारतांत नारदाचीं मतें दिलीं आहेत (म. अनु. १७७. १४; म. स. ७३.१० कुं.). याच्या नांवावर नारदसंहिता नामक एक संगीतशास्त्रावरील ग्रंथ आहे (C. C.). नारदाचा वास्तुशास्त्रावर एक ग्रंथ आहे (मत्स्य. २५२).

४ विश्वामित्र ऋषीचा पुत्र.

५ रामाच्या सभेंतील एक धर्मशास्त्री. यानेंच शूद्र असून तपश्चर्या करणाऱ्या शंबूकाला रामाकडून ठार मारवून अकालीं मेलेल्या ब्राह्मणपुत्राला जिवंत केलें (वा. रा. उ. ७४).

**नारद काण्व**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८.१३; ९.१०४-१०५).

**नारदिन्**—विश्वामित्राचा पुत्र.

**नारदी**—नारदानें एकदां वृंदारण्यांत कौमुम सरोवरांत स्नान केलें. त्यामुळें त्याचें पुरुषत्व नष्ट होऊन तो स्त्री बनला. त्या वेळीं त्यास नारदी असें म्हणत (नारद. उ. ८०; नारद पहा).

**नारायण**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ९० ).

२ धर्म ऋषीचा पुत्र ( नरनारायण पहा ). हा पुष्कर-क्षेत्रामध्यें झालेल्या ब्रह्मदेवाच्या यज्ञांतील उद्गातृगणांमधील एक प्रतिहर्ता होता ( पद्म. सृ. ३४ ).

३ तुषितसाध्य देवांपैकीं एक.

४ (कण्व. भविष्य.) भागवत व विष्णु यांच्या मतें भूमि-त्राचा, वायुमतें भूतिमित्राचा आणि मत्स्य व ब्रह्मांड यांच्या मतें भूमिमित्राचा पुत्र.

५ परिहरवंशीय सुरसेन राजाचा पुत्र. यानें दहा वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४. ४ ).

**नारायणि**—आंगिराकुलांतील गोत्रकार. याबद्दल पर-स्परायणि असा पाठभेद आहे.

**नारायणी**—मुद्गल ऋषीची स्त्री. हिलाच इंद्रसेना म्हणत असत.

२ दुर्गेचें एक नांव. हिचें माहात्म्य आढळतें (मार्क. ८८).

**नारी**—मेरूची कन्या व आग्नीध्रपुत्र कुरूची स्त्री ( भा. ५.२.२३ ).

२ अंगिराकुलांतील गोत्रकार.

**नारीकवच**—( सू. इ. ) अश्मक राजाचा पुत्र. यास मूलक असेंहि नामांतर आहे ( १ मूलक पहा ).

**नार्मर**—याचा सहवसूबरोबर उल्लेख आहे ( ऋ. २. १३. ८ ).

**नार्मेध**—सूक्तद्रष्टा ( शकपूत पहा ).

**नार्य**—वैयाश्वाला देणगी देणारा ( ऋ. ८.२४. २९ ).

**नार्षद**—कण्वाचें पैतृक नांव.

**नालबिंदु**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**नालायनी**—इंद्रसेनेचें नामांतर.

**नालीजंघ**—( नाडजिंघ पहा ).

**नाविक**—विदुराचा मित्र. यानें लाक्षागृहांतून सुटल्यावर पांडवांना नौकेंतून गंगेच्या पार केलें ( म. आ. १६१. १२ कुं. ).

**नाहुष**—सूक्तद्रष्टा ( ययाति पहा ).

२ एक राजा. याच्या जवळ चांगले घोडे होते ( ऋ. ८. ६. २४ ).

**निकुंत**—भविष्यमतें शोणाश्वाचा पुत्र.

**निकुंभ**—कृष्णानें मारिलेला एक दानव (षट्पुर पहा ).

२ प्रह्लादाचा पुत्र. यास सुंद व उपसुंद असे दोन पुत्र होते ( म. आ. २२९. ३ कुं. ).

३ ( सू. इ. ) हर्यश्व राजाचा पुत्र. यास संहताश्व नामक एक पुत्र होता (पद्म. सृ. ८; क्षेमक पहा ). फक्त भागवतांत याच्या पुत्राचें नांव बर्हणाश्व आहे.

४ वाराणसींत गणपतीला नवस करूनहि दिवोदासाच्या सुयशा राणीला मूल झालें नाहीं, म्हणून यानें देऊळ व गणपति उध्वस्त केला. गणपतीनें वाराणसीच उध्वस्त होण्याचा शाप दिला ( ब्रह्मांड. ३. ६७ ३०-५५; वायु. २. ३०. २७-५२; ब्रह्म. ११.४३ ). निकुंभ म्हणजे गणपति होय.

५ कुंभकर्णास वृत्रज्वालेपासून झालेल्या दोन पुत्रांतील दुसरा ( भा. ९. १०. १८ ). यास मारुतीनें मारिलें ( वा. रा. यु. ७५ ).

६ एक रावणपक्षीय राक्षस. यास नील वानरानें मारिलें ( वा. रा. यु. ४३ ).

७ दुर्योधनपक्षीय एक योद्धा ( म. द्रो. १५६ ).

**निकुंभक**—( सू. ) भविष्यमतें दृढाश्वाचा पुत्र. यानें ३३,२०० वर्षे राज्य केलें.

**निकुंभनाभ**—बलीचा पुत्र.

**निकुषज**—ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

**निकृतज**—कश्यपकुलीन एक ब्रह्मर्षि. यास निकृतिज असेंहि नांव आहे.

**निकृति**—सुबलाची कन्या, गांधारीची बहीण व धृतराष्ट्राची भार्या ( म. आ. ११९. २३ कुं. ).

२ दंभ व माया यांची कन्या ( भा. ४. ८. ३ ).

**निकृतिज**—( निकृतज पहा ).

**निकोथन भायजात्य**—हा प्रतिथि दैवतरथाचा शिष्य ( वं. ब्रा. २ ).

**निक्षुभा**—एक अप्सरा. सूर्याचा शाप झाल्यानें ही मृत्यु-लोकीं जन्म पावली व मिहिरगोत्रीय सदाचारी सुजिह्व नामक धर्मपुत्राची कन्या झाली. ही नेहमीं पित्याच्या आज्ञेवरून अग्नि आणीत असे. एके दिवशीं अग्नि आणीत असतां तो पेटला, तेव्हां ही सूर्याच्या दृष्टीस पडली. मनुष्यरूपानें सूर्यानें हिचें पाणिग्रहण करून हिला गर्भस्थापन झाल्याचें सांगितलें. तेव्हां आपण पतित होऊं या भीतीनें सुजिह्वानें 'तुझ्या ठिकाणचा गर्भ अग्नीनें आवृत असल्यामुळें लोकांस अपूज्य होईल,' असा हिला शाप दिला. पण सूर्यानें अग्निरूपानें सांगितलें कीं, 'जरी अपूज्य तरी ते सद्विप्र, सदाचारी, निपजतील व त्यांस माझ्या पूजेचा अधिकार राहील.' पुढें हिला अनेक पुत्र झाले. ते मग, द्विजातीय, भोजक अशा नांवांनीं प्रख्यात होते. ते शाकद्वीपांत राहत. तेथून त्यांना आणून सांबानें आपल्या जंबुद्वीपस्थ मंदिरांत पूजाअर्चा करण्यास ठेविलें. त्यांचीं १८ कुलें यांसह आलीं व सांबानें त्यांस भोजवंशोत्पन्न कन्या अर्पण केल्या (भवि. ब्राह्म. १३९-१४०; मग पहा).

**निखर्वट**—रावणपक्षीय एक राक्षस. यास तार नामक वानरानें ठार मारिलें.

**निगड पार्णवल्कि**—हा गिरिशर्मन् काण्ठेविद्धीचा शिष्य ( वं. ब्रा. १ ).

**निघ्न**—(सू. इ.) अनरण्य राजाचा पुत्र. याचा पुत्र अनमित्र व रघूत्तम ( पद्म. सृ. ८ ).

२ ( सो. वृष्णि. ) विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें अनमित्राचा पुत्र. यास निम्न असें म्हटलें आहे.

**निचक्नु**—( सो. कुरु. भविष्य. ) विष्णुमतें हा अधिसामकृष्णाचा पुत्र ( निमिचक्र पहा ).

**निचंद्र**—दनुपुत्र दानव.

**नितान मारुत**—एक मनुष्य ( क. सं. २५. १० ).

**नित्य**—मरीचिकुलोत्पन्न एक ऋषि.

२ कश्यपकुलांतील मंत्रकार.

३ शांडिल्यकुलांतील एक ऋषि. हा मंत्रद्रष्टा होता.

**नित्यानंद**—शुक्रदत्ताचा पुत्र. हा जगन्नाथ पंडिताचा शिष्य होता ( भवि. प्रति. ४. २१ ).

**निदाघ**—कश्यपकुलांतील गोत्रकार. हा भृगु ऋषीचा शिष्य होता.

२ पुलस्त्याचा पुत्र. हा ब्रह्मपुत्र ऋभूचा शिष्य होता. ( नारद. १. ४९ ).

**निदात**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें शूर राजाचा पुत्र.

**निद्राधर**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**निधि**—सुख देवांपैकीं एक.

**निध्रुव काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ६३ ). हा कश्यपवंशांतील वत्साराचा पुत्र. च्यवन व सुकन्या यांची कन्या सुमेधस् ही याची बायको होती. हिचे कुंडपायिन् हे पुत्र होत ( ब्रह्मांड. ३. ८. ३१; वायु. २. ९. २७ ).

**निंदिताश्व**—मेध्यातिथीचा आश्रयदाता ( ऋ. ८. १. ३० ).

**निबंध**—( सू. इ. ) भविष्यमतें अतिथीचा पुत्र. यानें १००० वर्षें राज्य केलें.

**निबंधन**—( सू. इ. ) अरुण राजाचा पुत्र. यास त्रिशंकु नांवानें प्रसिद्ध असणारा सत्यव्रत नांवाचा पुत्र होता. याला त्रिबंधन असेंहि म्हणत असत ( भा. ९.७.४; त्रिधन्वन् पहा ).

२ एक ऋषि. याचा आपल्या भोगवती नामक मातेशीं झालेला अध्यात्मविषयक संवाद मननीय आहे ( म. शां. २०५. २ कुं. ).

**निमि**—हा अयोध्याधिपति इक्ष्वाकूचा बारावा पुत्र होय ( वा. रा. उ. ५५; म. स. ८ कुं. ). यानें गौतम ऋषीच्या आश्रमाजवळ अमरावतीसारखी नगरी स्थापन केली. त्या नगरीचें नांव वैजयंत होय. वैजयंत नगराचा उल्लेख अयोध्याकाण्डांत आला आहे. तेथें हें नगर दक्षिणेंत दण्डकारण्यांत असून तेथें तिमिध्वज राजा राज्य करीत होता असें म्हटलें आहे ( वा. रा. अयो. ९.१२). हें डॉ. भाण्डारकरांच्या मतें विजयदुर्ग होय. पण श्री. नंदलाल देच्या मतें वनवासी शहर होय. हा विदेहवंशाचा मूळपुरुष होय.

एकदां निमीनें सहस्र वर्षें चालणारें सत्र आरंभिलें. वसिष्ठाची होत्याच्या स्थानीं योजना केली. तेव्हां वसिष्ठ म्हणाला कीं, ‘ माझी इंद्रानें पांचशें वर्षें चालणाऱ्या यज्ञांत पूर्वींच योजना केली आहे. तोंपर्यंत तूं थांबावेंस. नंतर येऊन मी तुझा ऋत्विज होईन. ’ यावर निमि कांहींच बोलला नाहीं. पण वसिष्ठाची समजूत अशी झाली कीं, निमीस आपलें म्हणणें मान्य आहे. त्याप्रमाणें वसिष्ठ इंद्राच्या यज्ञास गेला व तो संपवून निमीकडे आला. तेथें गौतम याचें यज्ञकर्म चालवीत आहे, असें त्याच्या नजरेस आलें. याची भेट घ्यावी, असें त्यास वाटलें. पण हा निजला असल्यामुळें याची भेट होऊं शकली नाहीं. तेव्हां हा झोपेंत असतांच वसिष्ठानें ‘ तुझा देहाशीं वियोग होईल ’ असा यास शाप दिला. हा जागा होतांच झोपेंत शाप देणाऱ्या दुष्ट गुरूस यानें तसाच शाप दिला व हा अचेतन होऊन पडला. याचें शरीर सुगंधि तैलादिकांच्या योगानें उत्तम ठेवण्यांत आलें होतें. व यज्ञ चालू करून यज्ञाच्या शेवटीं हविर्भाग ग्रहण करण्याकरितां आलेल्या देवांना यजमानास आशीर्वाद देण्याविषयीं सर्वांनीं विनंति केली. देवांनीहि निमीस मागणी करण्याची इच्छा उत्पन्न केली असतां हा म्हणाला, ‘ शरीर व प्राण यांचा वियोग होण्याइतकी दुःखद गोष्ट कोणतीहि नाहीं; म्हणून मी शरीर ग्रहण करूं इच्छित नाहीं. मी सर्व लोकांच्या डोळ्यांत राहूं इच्छितों. ’ त्याप्रमाणें देवांनीं याची डोळ्यांत स्थापना केली. त्यामुळें लोक डोळ्यांची उघडझांप करूं लागले ( भा ९.१३; वा. रा. उ. ५५-५७; मत्स्य. २००; विष्णु. ४.५; विष्णुधर्म. १.११७ ).

हा शापांचा प्रकार, निमि स्त्रियांशीं द्यूत खेळत असतां वसिष्ठ तेथें एकाएकीं आला व निमीनें त्याला उत्थापन वगैरे कांहीं दिलें नाहीं, म्हणून घडला, (पद्म. पा. ५.२२ ), असें शब्दकल्पद्रुमांत मत्स्यपुराणांतीलच (५५) एक आधार देऊन दाखविलें आहे. पण मत्स्यपुराणाच्या कलकत्ता प्रतींत तसा मजकूर नाहीं.

निमि वायुस्वरूपानें ब्रह्मदेवाकडे गेल्यावर ब्रह्मदेवानें याला डोळ्यांच्या पापण्यांवर राहण्यास सांगितलें व त्यामुळेंच नेत्रांच्या उघडझांपीस निमिष असें नांव पडलें (मत्स्य. २००).

निमीला पुत्र नव्हता. अराजक ठेवणें इष्ट नव्हतें; म्हणून याचा देह अरणी केला. समंत्रक होम करून याच्या देहरूपी

अरणीचें मंथन केलें. तेव्हां एक तेजस्वी पुरुष निर्माण झाला. तो मंथनापासून झाला म्हणून त्यास मिथी असें म्हणूं लागले ( वायु २.२८ ). त्याचा जन्म आईशिवाय केवळ बापापासून झाला, म्हणून त्यास जनक म्हणूं लागले. आणि देहरहित विदेह राजापासून झाला, म्हणून त्यास वैदेह म्हणूं लागले ( वा. रा. उ. ५७ ).

निमीला नेमि असेंहि नांव आढळतें ( वायु. २.२७.३ ). यास विदेह असें म्हणतात ( वायु. २.२८; विष्णु. ४.५ ). याचें अत्रि ऋषीबरोबर संभाषण झालें ( म. अनु. १३८ कुं.).

२ एक विदर्भ देशचा राजा. यानें अगस्त्यास राज्य व कन्या दिलीं होतीं ( म. अनु. १३७ ).

३ ( सो. क्रोष्टु. ) विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें हा सात्वत (अंधकबंधु) भजमानाचा पुत्र आहे. भागवतांत यास निम्लोचि म्हटलें आहे.

४ दत्तात्रेयपुत्र एक तपोधन. यानें प्रथम मृतांकारितां श्राद्ध सुरू केलें ( म. अनु. १३८. १-१० कुं. ).

५ ( सो. कुरु. भविष्य. ) भागवतमतें हा दण्डपाणिपुत्र.

**निमिचक्र**—(सो. कुरु. भविष्य.) अधिसामकृष्ण राजाचा पुत्र. हा हस्तिनापुरांत असतांना नदीनें तें पुर वाहविलें, म्हणून यानें आपली राजधानी बदलून कौशांबीस नेली. याचा पुत्र चित्ररथ ( भा. ९. २२ ). याबद्दल निचक्नु, निर्वक्र व विवक्षु अशीं नांवें आहेत.

**निमिष**—अमृतरक्षक देव. यांचें गरुडाशीं युद्ध झालें होतें ( म. आ. ३२. १९ कुं. ).

**निमेष**—गरुडाचा एक पुत्र.

**निम्न**—( सो. वृष्णि. ) भागवतमतें अनमित्राचा पुत्र ( निघ्न पहा ).

**निंबादित्य**—गोविंदशर्म्याचा पुत्र. हा तैलंग देशांत राहत असे. एकदां याचेकडे कांहीं वैष्णव आले व त्यांनीं ' सूर्य मावळण्याचे आंत आम्हांस भोजन घाल ' असें सांगितलें. हा अतिथींचे सेवेस नेहमीं तत्पर असे. अतिथींचे भोजनकालीं सूर्य अस्तास जाऊन कांहीं काल गेला असतांहि यानें सूर्यास पुनरपि बोलावून निंब वृक्षाच्या उंचीइतकें वर आणिलें; म्हणून यास निंबादित्य म्हणत ( भवि. प्रति. ४.७. ७१-७८ ). यानें कृष्णखंड नामक एक ग्रंथ केला. हा ग्रंथ पुराणांचें अंग होय. हा कृष्णचैतन्याचा शिष्य होता ( भवि. प्रति. ४. १९. ३७-४४ ). हाच निंबार्क होय. गर्गसंहितेंत, हा पुढें होईल असें सांगितलें आहे ( गर्ग. १०. ६१. २४ ).

**निम्लोचि**—( ३ निमि पहा ).

**नियंस**—( सू. इ. ) हा विश्वसहाचा पुत्र. याच्या वेळीं अधार्मिकतेमुळें अनावृष्टि होऊन राज्य नष्ट झालें. राणीच्या सांगण्यावरून वसिष्ठानें यज्ञ केला. यज्ञामुळें खट्वांग उत्पन्न झाला व पुनः समृद्धि झाली ( भवि. प्रति. १.१ ).

**नियति**—मेरूची कन्या व स्वायंभुव मन्वंतरांतील विधात्याची स्त्री ( भा. ४. १२ ).

२ रौच्य मनूचा पुत्र.

३ ( सो. आयु. ) नहुषाचा कनिष्ठ पुत्र ( पद्म. सृ. १२).

**नियम**—सुख देवांपैकीं एक.

२ आभूतरजस् देवांतील एक

**नियुतायु**—श्रुतायूचा पुत्र. भारतीय युद्धांत हा कौरवांकडे होता. यास अर्जुनानें ठार मारिलें (म. द्रो. ९३. २७ कुं.).

**नियुत्सर्पि**—शिव नांवाच्या रुद्राची पत्नी ( भा. ३. १२. १३ ).

**नियुत्सा**—प्रस्ताव राजाची स्त्री. हिला विभु नामक एक पुत्र होता.

**निरताल**—मध्यमाध्वर्यु.

**निरमित्र**—( सो. कुरु. ) पांडुपुत्र नकुलाचा पुत्र. याची आई रेणुमती ( म. आ. ७८ कुं. ).

२ सहदेवानें मारिलेला त्रिगर्तदेशीय एक क्षत्रिय. याच्या बापाचें नांव वीरधन्वन् ( म. द्रो. १०७. २६ कुं. ).

३ ( सो. मगध. भविष्य. ) भागवत व विष्णु यांच्या मतें अयुतायूचा पुत्र. पण निरामित्र असा पाठभेद आहे.

**निरय**—गरुडानें खाल्लेले निषाद ओकून टाकिल्यावर ते सर्व म्लेच्छ बनले. त्यांपैकीं ईशान्य दिशेस पडलेले निरय नांवाचे म्लेच्छ होत ( पद्म. सृ. ४७ ).

**निराकृति**—दक्षसावर्णि मनूचा पुत्र. निरामय असा पाठभेद आहे.

**निरामित्र**—ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

२ ( सो. मगध. भाविष्य. ) मत्स्यमतें अप्रतीपिन्चा पुत्र. वायु व ब्रह्मांड यांच्या मतें अयुतायूचा पुत्र. मत्स्य व ब्रह्मांड यांच्या मतें यानें शंभर वर्षें राज्य केलें, पण वायुमतें चाळीस वर्षें राज्य केलें ( ३ निरमित्र पहा ).

३ ( सो. पूरु. भविष्य. ) मत्स्य व वायु यांच्या मतें दंडपाणीचा पुत्र.

**निराव**—वसुदेवास पौरवीपासून झालेला पुत्र.

**निरावृत्ति**—( सो. ) भविष्यमतें हा वृष्णीचा पुत्र, यानें ५००० वर्षें राज्य केलें.

**निरुक्तकृत्**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील विष्णुमतें शाकपूर्णीचा निरुक्ताध्यायी शिष्य.

**निरुत्सुक**—रैवतमनूचा एक पुत्र ( पद्म. सृ. ७ ).

२ रौच्य मनूचा एक पुत्र.

**निरुद्ध**—ब्रह्मसावर्णि मवंन्तरांतील देवगण.

**निर्ऋता**—कश्यप व खशा यांची कन्या.

**निर्ऋति**—कश्यप व सुरभि यांचा पुत्र.

२ एकादश रुद्रांपैकीं एक ( पद्म. सृ. ४० ). हा नैर्ऋत, भूत, राक्षस व दिग्पाल यांचा अधिपति आहे. शत्रुनाशेच्छूंनीं याची उपासना करावी ( भा. २. ३.९ ).

३ वरुणपुत्र अधर्माची भार्या. हिचे पुत्र भय, महाभय व मृत्यु ( म. आ. ६७. ५२ कुं. ).

**निर्भय**—रौच्य मनूचा पुत्र.

**निर्मित्र**—( सो. ) भविष्यमतें हा अहीनराचा पुत्र.

**निर्मोक**—सावर्णि मनूच्या पुत्रांपैकीं एक.

२ देवसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**निर्मोह**—रैवत मनूचा पुत्र.

२ सावर्णि मनूचा पुत्र.

३ रौच्य मन्वंतरांतील एक ऋषि.

४ मधुवनांतील शाकुनि ऋषीचा पुत्र. हा मोठा विरक्त असून संन्यासवृत्तीनें राहत असे.

**निर्वक्र**—( सो. कुरु. भविष्य. ) वायुमतें हा अधिसामकृष्णाचा पुत्र होय ( निमिचक्र पहा ).

**निर्वृत्ति**—( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें धृष्टीचा, मत्स्य व वायु यांच्या मतें धृष्टाचा, विष्णुमतें वृष्णीचा व पद्ममतें सृष्टाचा पुत्र.

२ ( सो. मगध. भविष्य. ) मत्स्यमतें सुनेत्राचा पुत्र. याबद्दल नृपति असा पाठभेद आहे. यानें ५८ वर्षें राज्य केलें.

**निल**—बिभीषणाचा एक प्रधान.

**निवात**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें शूराचा पुत्र.

**निवातकवच**—एक संघ. प्रह्लादभ्राता जो संह्राद, त्याच्या पुत्रांना नांव. हे इंद्रासहि अजिंक्य होते. हे राक्षस रावणाचे मित्र होते ( वा. रा. उ. २३ ). अर्जुनानें यांचा वध केला ( म. व. १७०. ११; १७४. २ कुं.; भा. ५. २४; ६. ६; पद्म. सृ. ६ ). हे साठ किंवा चक्र्याहत्तर हजार होते.

२ कश्यपपुत्र पौलोम व कालकेय यांसहि निवातकवच म्हणतात ( कश्यप पहा ).

**निवावरी**—सूक्तद्रष्टा ( सिकता पहा ).

**निशठ**—एक यादव ( भा. ११. ३०. १७; म. आ. २३९. १० कुं. ). हा राजसूयाला आला होता ( म. स. ३७.१९ कुं. ).

**निशाकर**—गरुडाचा पुत्र ( म. उ. १०१. १४ कुं. ).

**निशाचर**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**निशीथ**—( स्वा. उत्तान. ) भागवतमतें पुष्पार्ण राजास दोषेपासून झालेला पुत्र.

**निशुंभ**—शुंभासुराचा भ्राता ( शुंभनिशुंभ पहा ). अमरावती जिंकून झाल्यावर जालंधरानें यास यौवराज्याभिषेक केला होता ( पद्म. उ. ८ ). याला कृष्णानें ठार केलें ( म. स. ५५. २९ कुं. ). याला चण्डिकेनें ठार केलें (मार्क. ८६. ३२ ).

**निश्चक्र**—( सो. ) भविष्यमतें यज्ञदत्ताचा पुत्र. यानें १००० वर्षें राज्य केलें.

**निश्चर**—धर्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ निश्च्यवनाचें नामांतर.

**निश्च्यवन**—बृहस्पतीस तारेपासून झालेला पुत्र. याचा पुत्र विपाप्मन् किंवा निष्कृति ( म. व. २२१. २० कुं. ).

२ स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**निषङ्गिन्**—( सो. कुरु.) धृतराष्ट्रपुत्र. याला भीमसेनानें ठार केलें ( म. क. ८८.२३ कुं. ).

**निषध**—( सू. इ.) अतिथि राजाचा पुत्र.

२ ( सो. पूरु. ) हा पहिल्या जनमेजय पारीक्षिताचा पुत्र ( म. आ. १०१. ४४ कुं. ).

**निषधाश्व**—( सो. अज. ) भागवतमतें कुरूचा पुत्र.

**निषाद**—( स्वा. उत्तान. ) वेन राजाचा मृत देह मंथन केला असतां, त्यांतून एक ऱ्हस्वाकार व कृष्णवर्ण पुरुष निघाला. त्यास निषाद असें म्हणतात. ऋषींनीं त्याला बैस (निषीद) म्हणून सांगितलें. त्यामुळेंच त्याला निषाद हें नांव मिळालें ( भा. ४.१४. ४५ ).

**निष्कम्प**—रौच्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**निष्कृति**—विश्वनपुत्र विपाप्म्याचें नामांतर. यांचा पुत्र स्वन ( म. व. २२१.२२ कुं. ).

**निष्टानक**—कद्रूपुत्र सर्प.

**निष्ठुर**—एक व्याध. चंद्रशर्म्याकडून कार्तिकांतील दीपमाहात्म्य ऐकून हा मुक्त झाला ( स्कंद. २. ४. ७ ).

२ अत्रिकुलांतील मंत्रकार. याला गविष्ठिर असेंहि म्हणतात.

**निष्प्रकम्प**—रौच्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**निसंदि**—एक असुर ( वा. रा. उ. २२. ३५ ).

**निह्राद**—जालंदरसेनेंतील एक राक्षस. यास कुबेरानें ठार केलें ( पद्म. उ. ६ ).

**नीतिन**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**नीप**—( सो. पूरु. ) भागवत, वायु व विष्णु यांच्या मतें पहिल्या पाराचा पुत्र. मत्स्यमतें पौराचा पुत्र होय. याला शंभर पुत्र होते व ते नीप या नांवांनींच प्रसिद्ध होते. त्यांचा मुख्य कीर्तिवर्धन होता. पुढें यांना यांच्याच वंशांत

झालेल्या भल्लाटपुत्र जनमेजयांच्या दुर्वर्तनामुळें उग्रायुधानें ठार केलें. पण जनमेजयाचें नक्की काय झालें तें समजत नाहीं ( मत्स्य. ४९; ह वं. १. २०; वायु. २. ३७. १७८ ). विष्णुपुराणांत हा वंश शेवटीं द्विमीढांत सामील झाला आहे. याच्या बायकोचें नांव कृती अथवा कीर्तिमती. पुत्र ब्रह्मदत्त ( भा. ९. २१. २४ ).

२ ( सो. द्विमीढ. ) हा भागवतमतें कृतीचा पुत्र व याचा पुत्र भल्लाट. इतर पुराणांत येथें नीप गाळलेला आहे. हा तीक्ष्ण शस्त्रधारी होता ( भा. ९.२१.२८ ).

**नीपातिथि काण्व**—मंत्रद्रष्टा ( ऋ. ८.३४.१;१५ ). एकदां इंद्रानें याचें संरक्षण केल्याचा दाखला प्रस्कण्वानें स्वतःकरितां घेतला आहे ( ऋ. ८. ४९. ९ ). दुसऱ्या ठिकाणीं श्रुष्टिगूनें याच्या घरीं इंद्र सोम प्यालाचा उल्लेख केला आहे ( ऋ. ८.५१.१ ). यानें एक साम केलें होतें ( पं. ब्रा. १४.१० ४ ).

**नील**—विश्वकर्म्याच्या अंशानें जन्मलेला रामसेनेंतील वानर ( भा. ९. १०. १६; म. व. २८८. २८ कुं. ).

२ कद्रूपुत्र नाग.

३ ( सो. ) यदुपुत्रांपैकीं तिसरा.

४ ( सो. पूरु. ) अजमीढ व नलिनी यांचा पुत्र. याचा पुत्र शान्ति. याच्यापासून उत्तर पांचालाचें राज्य सुरू झालें.

५ भृगुकुलांतील गोत्रकार.

६ द्रौपदी स्वयंवरास आलेला एक राजा ( म. आ. २०१. १० कुं.; नीलध्वज पहा ).

७ ( सो. सह. ) अनूपदेशचा राजा. हा भारतीय युद्धांत पांडवांचे बाजूस होता ( म. आ. २०१. १० कुं. ). याचें अश्वत्थाम्याशीं दोन वेळ युद्ध झालें. पहिल्या वेळीं अश्वत्थाम्यानें यास त्यांत जखमी करून घायाळ केलें ( म. भी. ९४. १० कुं. ) व दुसऱ्या वेळीं ठार केलें ( म. द्रो. ३१. २५ कुं. ).

८ हा एक वानर अग्न्यंशानें जन्मला होता (वा. रा. कि. ३१ ). यानें निकुंभ, प्रहस्त व महोदर यांच्याशीं युद्ध केलें, त्यांत यानें प्रहस्त व महोदर यांस ठार केलें ( वा. रा. यु. ४३; ५८; ७० ). पुढें रामाच्या अश्वमेधाचे प्रसंगीं अश्वाचे रक्षणार्थ हा शत्रुघ्नाबरोबर गेला होता ( पद्म. पा. ११ ).

तसेंच राम बिभीषणाला भेटण्याकरितां लंकेकडे चालला असतां मध्यंतरीं तो किष्किंधा नगरीपाशीं उतरला. तेव्हां हा अत्यंत उत्सुकतेनें त्याच्या दर्शनास आला होता ( पद्म. सृ. ३८ ).

९ भृगुकुलांतील ब्रह्मर्षि.

१० एक दुर्योधनपक्षीय राजा.

**नीलकंठ**—समुद्रांतून निघालेलें हलाहल शंकरानें प्राशन केल्यामुळें त्याचा कंठ भाजून नीलवर्ण झाला म्हणून त्यास हें नांव पडलें ( भा. ८. ७ ).

**नीलध्वज**—हस्तिनापूरच्या दक्षिणेस नर्मदेच्या कांठीं असणाऱ्या माहिष्मती पुरीचा राजा. याच्या बायकोचें नांव सुनंदा व पुत्राचें नांव प्रवीर होय. प्रवीरानें पांडवांनीं सोडलेला अश्वमेधाचा घोडा धरिला, तेव्हां अश्वरक्षणार्थ असणाऱ्या वृषकेतुला यानें मूर्छित केलें व अनुशाल्वालाहि प्रवीरानें चांगलाच हात दाखविला. पण अनुशाल्वानें प्रवीराचा पराभव केला तेव्हां नीलध्वज तेथें आला. नीलध्वजाचें व अर्जुनाचें युद्ध सुरू झालें. नीलध्वजाचा जांवई अग्नि, त्याच्या साहाय्यानें यानें अर्जुनाचें सैन्य जाळण्यास सुरुवात केली. परंतु अर्जुन अग्नीस शरण आला. तेव्हां अग्नीनें नीलध्वजाचें व अर्जुनाचें सख्य केलें. मग नीलध्वज अर्जुनाला साहाय्य करण्याकरितां अर्जुनासह दक्षिणेस गेला ( जै. अ. १४.१४ ). सहावा नील व हा एकच असावा. सहदेवाच्या दिग्विजयाचे वेळींहि यानें सहदेवाचा पराजय केला होता. पण सहदेवानें स्तुति करून अग्नीस प्रसन्न केलें ( म. स. ३२.४३ कुं. ). भारतीय युद्धांत हा कौरवांच्या बाजूस होता ( म. उ. १९. २४. कुं. ).

**नीलपराशर**—पराशरकुलोत्पन्न एक ऋषिगण ( पराशर पहा ).

**नीलरत्न**—रामाच्या अश्वमेधप्रसंगीं अश्वाचे संरक्षणार्थ शत्रुघ्नाबरोबर गेलेला एक वीर ( पद्म. पा. ११ ).

**नीला**—कपिल व केशिनी यांची कन्या. हिच्या ठायीं आलंबेयानें नैल उत्पन्न केले. हिला विकचा नांवाची एक कन्या होती ( ब्रह्मांड. ३. ७. १४७-१४९ ).

२ ( ५ सत्या पहा ).

**नीलिनी**—अजमीढाची एक पत्नी.

**नीली**—अजमीढाची पत्नी. हिचे पुत्र दुष्यन्त व परमेष्ठिन् ( म. आ. १०१. २० कुं. ).

**नृग**—( सू. ) वैवस्वत मनूच्या दहा पुत्रांतील दुसरा. याचा पुत्र सुमति.

२ (सू. इ.) भागवत व विष्णु यांच्या मतें इक्ष्वाकुपुत्र (म. स. ८. ८; वि.५३. १४ कुं.). यानें पुष्करतीर्थीं कोट्यावधि गोप्रदानें केलीं. त्यांतील एक गाय पुनः चुकून राजाच्या गाईंत आली व पुनः दुसऱ्या ब्राह्मणास दिली गेली. त्यामुळें त्या दोन ब्राह्मणांत तंटा सुरू होऊन तो निर्णयाकरितां पुनः याच्याकडे आला. यानें तें प्रकरण दिरंगाईवर टाकिल्यामुळें ब्राह्मण त्रासला व त्यानें राजास 'सरडा होशील,' असा शाप दिला. यानें प्रार्थना करून उःशाप मागितला. तेव्हां 'कृष्णाच्या हस्तें तुझा उद्धार होईल,' असा याला उःशाप मिळाला.

नंतर हा आपल्या वसु नांवाच्या मुलास गादीवर बसवून अरण्यांत गेला व तेथें सरडा होऊन पडला. पुढें कृष्णाच्या हस्तस्पर्शानें याचा उद्धार झाला ( म. अनु. ७०; भा. १०. ६४; वा. रा. उ. ५३–५४ ).

३ ( सो. अनु. ) विष्णु, ब्रह्मांड व मत्स्य यांच्या मतें हा उशीनर राजाचा पुत्र होय. वायुमतें यास मृग म्हटलें आहे.

**नृचक्षु**—(सो. पूरु. भविष्य.) भागवत व मत्स्य यांच्या मतें सुनीथाचा व विष्णुमतें ऋचाचा पुत्र (त्रिचक्षु पहा).

**नृपंजय**—( सो. द्विमीढ. ) वायु व विष्णु यांच्या मतें हा सुवीरपुत्र, आणि मत्स्यमतें हा सुनीथपुत्र होय.

२ (सो. पूरु. भविष्य.) विष्णु, भागवत व भविष्य यांच्या मतें मेधावीचा पुत्र. यास पुरंजय म्हटलें आहे.

**नृपति**—( सो. मगध. भविष्य. ) वायु व ब्रह्मांड यांच्या मतें धर्मनेत्राचा पुत्र. यानें ५८ वर्षें राज्य केलें (निर्वृत्ति पहा).

**नृमेध आंगिरस**—याला अग्नीनें संतति दिली ( ऋ. १०. ८०. ३). याचा मुलगा शकपूत. मित्रावरुणांनीं नृमेधाचें संरक्षण केल्याचा यानें उल्लेख केला आहे ( ऋ. १०. १३२. ७ ). तेथें सुमेधाचाहि उल्लेख आहे. हा परुच्छेपाचा शत्रु आहे ( तै. सं. २. ५. ८. ३ ). हा एक आंगिरस असून सामांचा द्रष्टाहि होता ( पं. ब्रा. ८. ८. २१ ). हा ऋग्वेदांतल्या अनेक सूक्तांचा द्रष्टा आहे ( ऋ. ८. ८९; ९०; ९८; ९९; ९. २७; २९ ).

**नृषद्**—नृषदापासून झालेला शब्द नार्षद. नार्षद हें कण्वाचें पैतृक नांव आहे.

**नृसिंह**—हिरण्यकशिपूच्या नाशासाठीं देवांच्या विनंतीवरून विष्णूनें घेतलेला अवतार ( ब्रह्म. २१३; ह. वं. १. ४१ ). हिरण्यकशिपूनें अकरा हजार पांचशें वर्षें तप करून ब्रह्मदेवास तुष्ट केलें व त्यापासून अमरत्व मागून घेतलें. त्यामुळें तो देव, ऋषि व ब्राह्मण यांना डोईजड व त्रासदायक झाला. त्याचा मुलगा प्रह्लाद हा भगवद्भक्त होता; त्यासहि त्यानें छळिलें (विष्णु. १. १७–२० ). तेव्हां त्याच्या संरक्षणार्थ हा खांबांतून प्रकट झाला ( नृसिंह. ४४.१६; भा. ७. ८ ). नृसिंहाचें अर्धें शरीर मनुष्याचें व अर्धें सिंहाचें होतें ( भा. ७. ८; ब्रह्म. १४९; २१३. ७६–७९ ). हा चवथ्या युगांत झाला ( दे. भा. ४. १६ ) असून चवदावा अवतार होय ( भा. १. ३. ). या अवतारीं विष्णूनें हिरण्यकशिपूचा संध्याकाळीं वध केला ( भा. २. ७; ह. वं. १.४१; लिंग. १. ९४; मत्स्य. ४७. ४६; पद्म. उ. २३८ ). हिरण्यकशिपूच्या वधानें हा बेभान होऊन गेला, तेव्हां शिवानें शरभाचा अवतार घेऊन याचा वध केला ( लिंग. १. ९५ ). या अवतारासंबंधीं तैत्तिरीय आरण्यकांत माहिती आली आहे. वेदांतील नमुचीच्या कथेशीं नृसिंहाची कथा सदृश आहे. प्रह्लादाचा छळ व खांबांतून उत्पत्ति हा प्रकार कांहीं ठिकाणीं नाहीं (म. स. ४३. ५५; २७३. ६१ कुं.; ह. वं. ३. ४२–४७; मत्स्य. १६१–१६४; ब्रह्मांड. ३. ५; वायु. २. ६. ६६ ). गंगेच्या उत्तर तीरावर हिरण्यकशिपूचा वध करून हा ( दक्षिणेंत ) गौतमीच्या ( गोदावरीच्या ) तीरीं आला व तेथें दण्डकाधिपति अम्बर्याचा वध केला ( ब्रह्म.१४९ ). नृसिंहतापिनी नांवाचें एक उपनिषद् आहे.

२ बौद्धजेता परिहर याच्या वंशांतील एक राजा. याच्या बापाचें नांव राजेश्वर होतें. यानें दहा वर्षें राज्य केलें. यास कलिवर्मा नांवाचा मुलगा होता ( भवि. प्रति. ४. ४ ).

**नृहरि**—महिराजास दुःशासनाच्या अंशानें झालेला पुत्र ( भवि. प्रति. ४. १७ ).

**नेतिष्य ( नेतिण्य )**—भृगुकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि.

**नेत्र**—( सो. सह. ) भागवतमतें धर्माचा पुत्र.

**नेदिष्ठ**—वैवस्वत मनूचा पुत्र.

**नेम भार्गव**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. १०० ).

**नेमि**—बलिपक्षीय एक दैत्य ( भा. ८. ६. २२ ).

२ (सू. इ. ) वायुमतें इक्ष्वाकूच्या मुलांतील एक. हाच इतर पुराणांतील निमि होय.

**नेमिकृष्ण**—( आंध्र. भविष्य. ) वायुमतें पटुमानाच्या पुत्र. यानें पंचवीस वर्षें राज्य केलें.

**नेमिचक्र**—( सो. पूरु. भविष्य. ) असीमकृष्णाचा पुत्र. हस्तिनापुर वाहून गेल्यावर हा कौशांबींत राहूं लागला. याचा पुत्र चित्ररथ ( भा. ९. २२. ३९ ).

**नैकजिह्व**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**नैकदृश**—विश्वामित्राचा पुत्र.

**नैकशि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**नैगमेय**—अनलवसूचा पुत्र.

**नैद्राणि**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**नैध्रुव**—कश्यपकुलांतील मंत्रकार. कश्यपाचा पौत्र व अवत्साराचा पुत्र ( कश्यप पहा ).

**नैध्रुवि**—काश्यपाचें पैतृक नांव.

**नैर्ऋत**—सूक्तद्रष्टा ( कपोत नैर्ऋत पहा ).

**नैल**—ऋग्वेदी श्रुतर्षि.

२ ( १ नील पहा ).

**नैषध**—दुर्योधनपक्षीय निषध देशाचा एक राजा. यास धृष्टद्युम्नानें ठार मारिलें ( म. द्रो. ३२ ).

**नैषादि**—द्रोणशिष्य एकलव्याचें नांव ( म. द्रो. १८२. १८ कुं. ).

२ त्या नल नैषधाच्या वंशांतील नळ राजांना मेघ म्हणत. हे कोमळा नगरींत राहत असत.

**नैषिध**—नडाचें पैतृक नांव.

**नोधस्**—सूक्तद्रष्टा ( एकद्यू पहा ).

**नोधस् गौतम**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. १. ५८–६४; ८. ८८; ९. ९३ ). हा कक्षीवताचा वंशज आहे ( पं. ब्रा. ७. १०. १०; २१. ९. १२; ऐ. ब्रा. ४. २७; ६. १८; ८. १२. १७; अ. वे. १५. २. ४. ४-४ ).

**न्यग्रोध**—( सो. कुकुर. ) उग्रसेनाचा पुत्र. कृष्णानें धनुर्यागकालीं कंसास मारिल्यावर त्याचा सूड घेण्याकरितां हा धांवला असतां बलरामानें परिघानें यास ठार मारिलें ( भा. १०.४४.१० ).

**न्यूह**—म्लेच्छ वंशाचा मूळपुरुष. याची पत्नी आर्यावती. स्वप्नांत विष्णूनें यास प्रलयकाल समीप आला आहे, असें सांगितल्यावरून यानें एक मजबूत नौका केली व तींत हा परिवारासह बसला. परंतु विष्णूनें यास निर्भय केलें व कलीच्या वृध्द्यर्थ आर्यभाषा अपशब्दरूप बनविण्यास सांगितलें ( भवि. प्रति. २. ५ ).

## प

**पक्थ**—दाशराज्ञयुद्धांत हा सुदासाच्या विरुद्ध होता ( ऋ ७. १८. ७ ). अश्वींनीं याच्यावर कृपा केली होती ( ऋ. ८. २२. १० ). शिवाय याच्यावर इंद्रानेंहि कृपा केली होती ( ऋ. ८. ४९. १० ).

**पक्ष**—मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

२ ( सो. अनु. ) वायुमतें अनूचा पुत्र ( चक्षु पहा ).

**पक्षगंत**—ऋग्वेदी श्रुतर्षिगण.

**पंचकर्ण वात्स्यायन**—मनुष्याच्या मस्तकांत असलेले सप्त प्राण हे सप्त सूर्य होत, असें कांहीं विद्वानांचें मत आहे. ते सप्त सूर्य मी प्रत्यक्ष पाहिले, असें हा म्हणत असे ( तै. आ. १. ७. २ ). कामशास्त्रावरील सूत्राचा कर्ता हाच असावा.

**पंचचूडा**—एक अप्सरा. हिचा नारदाशीं स्त्रीस्वभावाविषयीं संवाद झाला होता ( म. अनु. ३८ ).

**पंचजन**—हा एक प्रजापति असून यास असिक्री नांवाची कन्या होती. तीच प्राचेतस दक्षाची पत्नी ( भा. ६. ४. ५१ ).

२ संह्लाद दैत्याचा पुत्र. हा शंखरूप धारण करून समुद्रांत राहत असे. श्रीकृष्ण सांदीपनीच्या मृतपुत्रास समुद्रांत आणण्यास गेला असतां त्यानें यास मारून याच्या अस्थींचा शंख करून घेतला. तोच पांचजन्य होय ( भा. ६. १८. १४; १०. ४५. ४० ).

३ कपिलशापांतून वांचलेल्या चार सगरपुत्रांतील एक ( पद्म. उ. २०; ब्रह्म. ८. ६३ ).

४ ( सो. नील. ) संजयाचा पुत्र. याचा पुत्र सोमदत्त ( ब्रह्म. १३. ९८; ह. वं. १. ३२ ). अग्निपुराणांत पंचधनुष असा पाठभेद आहे ( अग्नि. २७८. १३ ). कांहीं पुराणांत हीं दोन तीन नांवें गाळलीं आहेत. कांहींत च्यवन असें नांव आहे. वेदांतील हा पिजवन असावा.

**पंचजनी**—ऋषभदेवपुत्र भरत याची स्त्री. हिला सुमति, राष्ट्रभृत्, सुदर्शन, आवरण व धूम्रकेतु असे पांच पुत्र होते ( भा. ५. ७. १-३ ).

**पंचधनुष**—( सो. नील. ) ( ४ पंचजन पहा ).

**पंचपत्तलक**—( आंध्र. भविष्य. ) ब्रह्मांडमतें हालाचा पुत्र ( तलक पहा ).

**पंचम**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य ( व्यास पहा ).

**पंचमेढ्र**—एक राक्षस. याला पांच इंद्रियें, पांच पाय, दहा हात व आठ डोकीं होतीं. आहारहि भयंकर होता; म्हणून वालीला खाण्यासाठीं हा त्याच्याशीं युद्ध करीत असतां यानें त्यास गिळून टाकिलें. त्याचप्रमाणें वालीचा बंधु सुग्रीव व दधीचि, कश्यपादि ऋषि यांनाहि यानें गिळंकृत केलें होतें. परंतु वीरभद्रानें याच्याशीं युद्ध केलें व याचें पोट फाडून त्यांना बाहेर काढिलें ( पद्म. पा. १०६ ).

**पंचयाम**—विभावसूच्या पुत्रांतील आतपाचा पुत्र. याच्या योगानें सर्व प्राणी कर्मप्रवृत्त होतात ( भा. ६. ६. १६ ).

**पंचशिख**—याच्या आईचें नांव कपिला. हा आसुरीचा पहिला शिष्य होता. याला पंचकोशाचें पूर्ण ज्ञान असून

कोशाव्यतिरिक्त असणारें ब्रह्म हा शिखेप्रमाणें जाणत असल्यामुळें यास पंचशिख म्हणतात. हा चिरंजीव आहे. संन्यास व तत्त्वज्ञान यांचें यास पूर्ण ज्ञान असून हा मोठा ब्रह्मनिष्ठ होता. कपिलास ब्रह्मदेवाचा अवतार मानणारे सांख्यशास्त्रज्ञ याला कपिलाचा अवतार मानीत. यानें एक हजार वर्षेपर्यंत मानसयज्ञ केला होता. याच्या अंगीं ऊहापोहशक्ति होती. पंचरात्रसंज्ञक यज्ञांत हा निष्णात होता (म. शां. २१८; नारद. १. ४५). हा कपिली नांवाच्या ब्राह्मणीचें दूध पिऊन वाढल्यामुळें याला कापिलेय असें म्हणूं लागले.

जनदेव नांवाच्या जनकाशीं याचा नास्तिकपणाविषयीं संवाद झाला होता (नारद. १. ४५). यानें जनकास सांख्यशास्त्र सांगितलें (म. शां. २१८-२१९). शुक्लयजुर्वेदीयांच्या ब्रह्मयज्ञांगतर्पणांत याचा उल्लेख आहे (पा. गृ. परिशिष्ट; मत्स्य. १०२.१८; वायु. २. ३९). सांख्यशास्त्रावर याचा एक ग्रंथ असावा (योगसूत्रव्यासभाष्य. १.४; २.१३; ३.१३).

२ दधिवाहन नामक शिवावताराचा शिष्य.

**पंचहस्त**—दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

**पंचाल**—(सो. नील.) भद्राश्वाच्या पांच मुलांना सामान्य संज्ञा. यांच्यावरून देशाला पंचाल असें नांव पडलें.

**पंचालचंड**—वार्णानेंच सर्व संहित केलें जातें, असें मत असलेला एक आचार्य (ऐ. आ. ३.१.६; सां. आ. ७.१८).

**पज्र**—अंगिरसाचें व कक्षीवानाचें कुलनाम.

**पज्रिय व पज्रय**—अंगिरस व कक्षीवान् यांचें पैतृक नांव.

**पटच्चर**—एक राक्षस. यास शूरतर राजानें मारिलें (म. द्रो. २३).

**पटवासक**—सर्पसत्रांत मेलेला धृतराष्ट्रकुलांतील एक सर्प (म. आ. ५७.१८ कुं.).

**पटुमत्**—(आंध्र. भविष्य.) विष्णुमतें मेघस्वातीचा, ब्रह्मांडमतें आपोलवाचा व वायुमतें आपादबद्धाचा पुत्र. यास भागवतमतें अटमान म्हटलें आहे. यानें २४ वर्षे राज्य केलें.

**पटुमित्र**—(किलकिला. भविष्य.) विष्णुमतें एक राजा.

**पटुश**—पनस वानरानें मारिलेला रावणपक्षीय राक्षस.

**पट्टमित्र**—(भविष्य.) ब्रह्मांड व वायु यांच्या मतें पुष्पमित्रानंतरचे तेरा राजे.

**पठर्वन्**—अश्वींच्या कृपेंतला एक राजा (ऋ. १. ११२.१७).

**पड्गृभि**—इंद्रानें श्रुतर्वनकरितां पड्गृभीचा पराभव केला (ऋ. १०.४९.५).

**पणव**—(सो. क्रोष्टु.) वायुमतें भजमानाचा पुत्र.

**पणि**—यांचा ऋग्वेदांत अनेक स्थळीं उल्लेख आहे. सायणाचार्य यास्काला अनुसरून कोठें कोठें वणिज् असा अर्थ करतात (ऋ. १. ३३. ३; १२४. १०; १८०. ७; नि २. १७). अत्यंत गूढ अंधारांत पणि जाऊन पडोत, अशी वामदेवानें प्रार्थना केली आहे (ऋ. ४. ५१. ३). आपल्या विरुद्ध लोकांना इंद्रशत्रु, अयज्वन् वगैरे म्हणण्याची सूक्तकारांची पद्धत आहे. त्याप्रमाणें यानाहि म्हटलें आहे. यांना कंजूष, घाणेरडे असेंहि म्हटलें आहे. हा सूक्तद्रष्टाहि आहे (ऋ. १०. १०८). पणि म्हणजे इंद्राच्या विरुद्ध असणारा संघ किंवा व्यक्ति असावी. अथर्वन् अंगिरस् हे इंद्राला स्फूर्ति देणारे. त्यांनींच प्रथम अग्नि उत्पन्न केला व हवि दिला. त्यामुळें पणींची सर्व संपत्ति अंगिरसांना प्राप्त झाली (ऋ. १. ८३. ४). हे नेहमीं गाई पळवून लपवितात (ऋ. १. ३२. ११). सरमापणिसंवादांत एक कथा ग्रथित केली आहे. तिचें तात्पर्य असें कीं, पणींनीं इंद्राच्या गाई पळवून नेल्या. त्या परत देण्याविषयीं सरमेनें पणींना धमकी दिली आहे (ऋ. १०. १०८). यांचा बृबु हा राजा होता (ऋ. ६. ४५. ३१-३३; बृबु पहा).

२ पातालांतील असुर (भा. ५. २४. ३०).

**पण्डक**—धर्मसावर्णि मन्वंतरांतील मनुपुत्र.

**पण्डित**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. याला भीमानें मारिलें (म. भी. ८८. २४ कुं.).

**पाण्डितक**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

**पतंग**—स्वायंभुव मन्वंतरांतील मरीचि ऋषीच्या सहा पुत्रांतील चवथा. हाच पुढें कृष्णाच्या सहा भावांत जन्मला होता (भा. १०. ८५. ५१).

**पतंग प्राजापत्य**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १७७). हा प्रजापतीचा आवडता पुत्र होता. यानें सांगितलेल्या [illegible] उच्चैःश्रवस् कौपेयाला मरणानंतर धूम्रशरीर प्राप्त झालें (जै. उ. ब्रा. ३. ३०. ३०).

**पतंगी**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या. तार्क्ष्य कश्यपाची भार्या (कश्यप पहा).

**पतंचल काप्य**—भुज्यु लाह्यायनीनें याज्ञवल्क्यास केलेल्या प्रश्नांत भुज्यूनें मद्र देशांत फिरत असतां पतंचलाच्या घरीं गेल्याचा उल्लेख केला आहे. याच्याच मुलीच्या अंगांत सुधन्वा आंगिरस नांवाचा गंधर्व येत असे व त्यानें एक विशिष्ट ज्ञान भुज्यूला सांगितलें होतें. तें दिव्य ज्ञान याज्ञवल्क्याला असणें शक्य नाहीं; म्हणून याज्ञवल्क्याला जिंकण्याकरितां तोच प्रश्न भुज्यूनें केला (बृ. उ. ३. ३. १; ७. १).

**पतंजलि**—कद्रूपुत्र नाग.

२ अंगिराकुलोत्पन्न एक गोत्रकार.

३ एक व्याकरणकार. हा बुद्धिमान् उपाध्याय असून बहुतेक सर्व शास्त्रांत पारंगत होता. तरी यास काशींत कात्यायनानें पराजित केलें. प्रथम हा विष्णुभक्त होता. नंतर यानें देवीची उपासना केली, त्यामुळें यानें कात्यायनाचा पुढें पराभव केला यानें कृष्णमंत्राचा घरोघर प्रचार सुरू केला. यानें महाभाष्य सांगितलें. शेवटीं विष्णुमायेच्या योगानें हा चिरंजीव झाला ( भवि. प्रति. २. ३५ ).

यानें महाभाष्यांत पुष्पमित्रसभा, चंद्रगुप्तसभा असे उल्लेख केले आहेत व यवनांनीं साकेताला वेढा दिल्याचाहि निर्देश केला आहे. यावरून याचा काल ख्रि. पू. १५० हा निश्चित होतो.

याच्या नांवावर महाभाष्य, सांख्यप्रवचन, योगसूत्र, छंदोविचिति व वैद्यकांतील एक असे ग्रंथ आहेत ( C. C. ).

४ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें कौथुम पाराशर्याचा हा शिष्य ( व्यास पहा ).

**पतन**—रावणपक्षीय राक्षस ( म. व. २८६. २. कुं. ).

**पत्तलक**—( आंध्र. भविष्य. ) विष्णुमतें हालाचा पुत्र ( तलक पहा ).

**पत्र**—नालनाचा पुत्र. यास दोन पुत्र होते ( भवि. प्रति. ३.७ ).

**पथिन् सौभर**—अयास्य आंगिरसाचा शिष्य व वत्सनपात् बाभ्रवाचा गुरु ( बृ. उ. २.६.३; ४.६.३ ).

**पथ्य**—व्यासाच्या अथर्वन्‌शिष्यपरंपरेंतील विष्णु, वायु, भागवत व ब्रह्मांड यांच्या मतें कबंधाचा शिष्य (व्यास पहा).

**पथ्यवत्**—रौच्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक

**पथ्या**—मनूची कन्या. अथर्वन् आंगिरसाची पत्नी. हिचा पुत्र धृष्णि ( ब्रह्मांड. ३. १. १०५ ).

**पदाति**—प्रथम पारीक्षित जनमेजयाचा पुत्र ( म. आ. १०१. ४४ कुं ).

**पद्म**—कद्रूपुत्र नाग. यास संवर्तक व पद्मनाभ अशीं नामान्तरें आहेत ( म. आ. ३५. १०; शां. ३६५. ४ ). हा मोठा धार्मिक असून वरुणाच्या सभेंतील सभासद आहे ( म. स. ९. ९ कुं. ). हा सूर्याचा रथ ओढण्यास गेला होता ( म. शां. २६७. ८ कुं. ).

२ ऐरावताचा पुत्र. याचें नामांतर मंद असून हा ऐलविलाचें वाहन होय ( ब्रह्मांड. ३. ७. ३३१ ). हा रंगानें पांढरा होता.

३ मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**पद्मकेतन**—गरुडाचा पुत्र.

**पद्मगंधा**—हिच्या पूर्वजन्मीं ही कौंची असतां हिचीं हाडें गंगेंत पडून ही इंद्राच्या मर्जीतील दासी झाली ( ११ जयन्त पहा ).

**पद्मचित्र**—कद्रूपुत्र नाग.

**पद्मजा**—बौद्धसिंहाची कन्या व जयंताची पत्नी ( भवि. प्रति. ३. २९; ११ जयंत पहा ).

**पद्मनाभ**—एक ब्राह्मण. याला खाण्याकरितां एक राक्षस आला असतां विष्णूच्या चक्रानें याचें रक्षण केलें व त्यापासून चक्रतीर्थ उत्पन्न झालें ( स्कंद. २. १. २३ ).

२ कद्रूपुत्र नाग. हा आत्मज्ञानी होता. याचा शिष्य धर्मारण्य.

३ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा एक पुत्र.

४ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**पद्ममित्र**—( किलकिला. भविष्य. ) विष्णुमतें एक राजा.

**पद्मवर्ण**—मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**पद्महस्त**—नल राजाचा अमात्य (गणेश १. ५२. ९).

**पद्माकर**—बिंदुगढचा राजा शारदानंद (कामपाल) याचा पुत्र ( भवि. प्रति. ३. २५ ).

**पद्माक्ष**—चंद्रहास राजाचा कनिष्ठ पुत्र.

**पद्मावती**—विदर्भनृप सत्यकेतूची कन्या. माथुर देशांतील मथुरा नगरीच्या उग्रसेन राजाची स्त्री. या दंपत्याचें परस्परांवर फार प्रेम असे. पुढें एकदां हिला माहेरीं धाडली असतां गोभिल नामक कुबेराच्या दूतापासून ही गर्भवती झाली. त्याच्यापासून उत्पन्न होणाऱ्या गर्भास नष्ट करण्यासाठीं हिनें खूप प्रयत्न केले. शेवटीं तो गर्भ म्हणाला, ‘ कालनेमि दैत्यास विष्णूनें मारिलें. त्याचा सूड घेण्यास मी येत आहे.’ पुढें ही प्रसूत झाली व कंसाचा जन्म झाला ( पद्म. सृ. ४८–५१ ). गोभिलाच्या ऐवजीं द्रुमिल असें नांव आढळतें ( ह. वं. २. २८ ).

२ प्रणिधी नामक श्रीमान वैश्याची स्त्री. एकदां तो वैश्य व्यापारास्तव बाहेरगांवीं गेला असतां व ही स्नानास बसली असतां धनुर्ध्वज नांवाच्या अंत्यजानें हिला पाहिलें व हिच्याविषयीं पापी वासननें त्यानें हिजविषयीं चौकशी चालविली. हिच्या सख्यांनीं त्याचा निषेध केला, पण तो ऐकेना. म्हणून त्यांनीं त्याला ‘ गंगायमुनासंगमांत जीव दिलास तर हिची प्राप्त होईल,’ असें थट्टेनें सांगितलें. तो संगमामध्यें गेला व त्यानें प्राण दिला. त्याबरोबर त्याचें रूप प्रणिधीसम झालें. नंतर तो व खरा प्रणधी घरीं आल्यावर खरा पति कोणता असा हिला प्रश्न उपस्थित झाला. त्याबरोबर विष्णु प्रगट होऊन त्यानें हिला दोघांशींहि पतिभावानें राहण्यास सांगितलें. पण हिनें हें भूमंडलावर निषिद्ध आहे, असें सांगतांच त्यां तिघांस विष्णु वैकुंठीं घेऊन गेला (पद्म. क्रि. ४).

३ सत्यव्रताची कन्या व सूर्यांश जयदेवाची पत्नी ( भवि. प्रति. ४. ९ ).

**पद्मिनी**—बिंदुगढच्या राजा शारदानंद याची कन्या. हिनें स्वयंवरांत लक्षणाला वरिलें; त्या वेळीं पृथ्वीराज व इतर राजे यांशीं युद्ध झालें. कृष्णांशानें हिला जयचंद्राकडे नेलें ( भवि. प्रति. ३. ३० ).

२ ( श्रीनिवास पहा ).

**पनस**—रामसेनेंतील वानर. याचें पट्टशाशीं युद्ध झालें ( म. व. २८४. ६; २८६. ९ कुं. ). राम बिभीषणाच्या भेटीकरितां लंकेकडे चालला असतां मध्यंतरीं किष्किंधा नगरीपाशीं उतरला. तेव्हां हा मोठ्या उत्सुकतेनें त्याच्या दर्शनास आला होता ( पद्म. सृ. ३८ ).

२ बिभीषणाच्या अमात्यांपैकीं एक.

**पन्नग**—ऋग्वेदी श्रुतर्षि.

**पन्नगारि**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें बाष्कली भरद्वाजाचा शिष्य.

२ अकरावा गुरुंड राजा. यानें आर्यदेशावर चाळीस वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४. २२ ).

३ वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार. याबद्दल पर्णागारि असा पाठभेद आहे.

**पयोद**—विश्वामित्रकुलोत्पन्न गोत्रकार ऋषिगण.

**पर**—विश्वामित्राचा एक पुत्र.

२ ( सो. पूरु. ) वायुमतें हा समराचा पुत्र.

३ ( सो. आयु. ) नहुषाचा पुत्र.

**पर आट्णार**—यज्ञ करून पुत्र मिळविणारा एक प्राचीन राजा ( तै. सं. ५. ६. ५. ३; क. सं. २२. ३; पं. ब्रा. २५. १६. ३; जै. उ. ब्रा. २. ६. ११ ). एका ग्रंथांत याला हैरण्यनाभ असें आणखी एक नांव जोडलें आहे ( श. ब्रा. १३. ५. ४. ४ ) व वैदेहहि लावलेलें आढळतें. हा ऋषि आहे असें सायणाचार्य म्हणतात.

**परंजय**—( सू. इ. ) विष्णुमतें हें विकुक्षिपुत्राचें नामांतर. भागवतमतें पुरंजय असें नामांतर आहे.

**परण्यस्त**—अंगिराकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**परंतप**—तामस मनूच्या दहा पुत्रांपैकीं एक.

**परपक्ष**—( सो. अनु. ) वायुमतें हा अनूचा पुत्र. यास परमेक्ष, परमेषु, परोक्षप, व पराक्ष अशीं नामांतरें आहेत.

**परम**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**परमेक्ष**—( सो. अनु. ) विष्णुमतें हा अनूचा पुत्र ( परपक्ष पहा ).

**परमेषु**—( सो. अनु. ) मत्स्यमतें हा अनूचा पुत्र ( परपक्ष पहा ).

**परमेष्ठिन्**—सूक्तद्रष्टा ( प्रजापति पहा ). हा ब्रह्माचा शिष्य. याचा शिष्य सनग ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ). हा प्रजापतीचा शिष्य होता ( जै. उ. ब्रा. ३. ४०. २; नारद पहा ).

२ ( स्वा. प्रिय. ) भागवतमतें देवद्युम्न व विष्णुमतें इंद्रद्युम्न राजास धेनुमतीपासून झालेला पुत्र. यास सुवर्चला नांवाच्या स्त्रीपासून प्रतीह नांवाचा पुत्र झाला ( भा. ५. १५. ३ ).

३ ( सो. ) भविष्यमतें आत्मपूजकाचा पुत्र. यानें २७०० वर्षे राज्य केलें.

४ ( सो. अज. ) अजमीढाला नीलीपासून झालेला पुत्र.

**परवीराक्ष**—खर राक्षसाच्या बारा अमात्यांतील एक.

**परशु**—उत्तम मनूचा पुत्र.

२ एक राक्षस. हा शाकल्याला खाण्यास आला असतां विष्णुकृपेनें मुक्त झाला ( ब्रह्म. १६३ ).

**परशुचि**—उत्तम मनूचा पुत्र.

**परशुबाहु**—क्षिप्रसादनाचें दुसरें नांव. यास काशीक्षेत्रीं धुंडीराजानें आपल्या हातांतील परशु दिला व हें नांव ठेविलें ( गणेश. २. ४९-५६; प्रियव्रत पहा ).

**परशुराम**—राम भार्गवेयाचें एक सूक्त ऋग्वेदांत आहे (ऋ. १०. ११०). सर्वानुक्रमणीप्रमाणें हा परशुरामच होय. श्यापर्णांतहि एक राम मार्गवेय आहे. पण त्याचा परशुरामाशीं कांहीं संबंध दाखवितां येत नाहीं. कार्तवीर्यानें जमदग्नीची गाय जबरीनें नेण्याचा प्रयत्न केला, त्यामुळें पुढें त्याचा व त्याच्या वंशजाचा पराभव झाला. याचा निर्देश अथर्ववेदांत संक्षेपानें आहे ( अ. वे. ५. १८. १० ).

जमदग्नीला इक्ष्वाकु वंशांतील रेणु राजाच्या कामली रेणुका नांवाच्या कन्येपासून झालेला धाकटा पुत्र. हा धनुर्विद्येंत व सर्व विद्यांत निष्णात होता ( ब्रह्म. १० ). हा विष्णूचा अवतार होता (पद्म. उ. २४८; मत्स्य. ४७. २४४; वायु. २. २९. ८८; ३६. ९० ). याचा जन्म वैशाख शुद्ध तृतीयेला झाला ( रेणु. १४ ) हा एकोणिसाव्या त्रेतायुगांत झाला ( दे. भा. ४. १६ ). त्रेता व द्वापर यांच्या संधिकालांत परशुरामाचा अवतार झाला (म. आ. २. १ कुं.). हा उपनयनानंतर शालग्राम पर्वतावर गेला. तेथें याला कश्यपानें मंत्रोपदेश केला ( पद्म. उ. २४१ ). शिवाय तेथें यानें शंकराला प्रसन्न करून धनुर्वेद, शस्त्रास्त्रविद्या, मंत्रप्रयोग इत्यादिकांचें ज्ञान मिळविलें ( रेणु. १५; ब्रह्मांड. ३. ३२. ५६-६० ). परत येतांना वाटेंत शालग्राम शिखरावर शांताचा पुत्र नरसापासून सोडवून यानें बरोबर आणिला. तो अकृतव्रण या नांवानें परशुरामाचा शिष्य म्हणून प्रसिद्ध आहे. जमदग्नीचा आश्रम नर्मदेच्या तीरावर होता ( ब्रह्मांड ३. २३; २६ ). एकदां

रेणूकेच्यावर रागावल्यामुळें जमदग्नीनें रेणुकेस ठार मारण्याची आज्ञा केली असतां केवळ परशुरामानेंच ती आज्ञा पार पाडली. तेव्हां जमदग्नीनें प्रसन्न होऊन याच्या इच्छेप्रमाणें आईस जिवंत केलें व याला 'अजिंक्य होशील' असा वर दिला (रेणुका पहा). शिवाय याला इच्छामरणी केलें (विष्णुधर्म १. ३६.११). याला पुढील अस्त्रें येत होतीं. १ ब्रह्मास्त्र, २ वैष्णव, ३ रौद्र, ४ आग्नेय, ५ वासव, ६ नैर्ऋत, ७ याम्य, ८ कौबेर, ९ वारुण, १० वायव्य, ११ सौम्य, १२ सौर, १३ पार्वत, १४ चक्र, १५ वज्र, १६ पाश, १७ सर्व, १८ गान्धर्व, १९ स्वापन, २० भौत, २१ पाशुपत, २२ ऐशीक, २३ तर्जन, २४ प्रास, २५ भारुड, २६ नर्तन, २७ अस्त्ररोधन, २८ आदित्य, २९ रैवत, ३० मानव, ३१ अक्षिसंतर्जन, ३२ भीम, ३३ जृम्भण, ३४ रोधन, ३५ सौपर्ण, ३६ पर्जन्य, ३७ राक्षस, ३८ मोहन, ३९ कालास्त्र, ४० दानवास्त्र, ४१ ब्रह्मशिरस्. (विष्णुधर्म. १. ५०).

याच्या तपश्चर्येच्या कालात इकडे जमदग्नीपाशीं इंद्रानें ठेव म्हणून ठेवलेल्या कामधेनूस देण्याचें नाकारल्यावरून कार्तवीर्यानें जमदग्नीस बुक्क्या मारून ठार केलें होतें. हें याला समजतांच यानें कार्तवीर्याच्या सैन्याचा पराभव करून कार्तवीर्याला ठार केलें (म. द्रो. ७०) व मामाच्या कुलाखेरीज सर्व क्षत्रियांचा संहार केला (पद्म. उ. २४१).

जमदग्नीला कार्तवीर्यानें (रेणु. ३७), किंवा कार्तवीर्याच्या चंद्रगुप्त नांवाच्या प्रधानानें (ब्रह्मांड. ३. २९.१४) ठार केलें, असे वेगवेगळे उल्लेख आहेत. या वेळीं परशुराम वनांत गेला होता. परत आल्यावर आक्रोश करीत रेणुकेनें याला सर्व कथन करून एकवीस वेळां उर बडवून घेतला, म्हणून यानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा केली. पण पुढें भृगूनें संजीवनीविद्येच्या साहाय्यानें जमदग्नीला जिवंत केलें (ब्रह्मांड. ३. ३१. ३०). पण यासंबंधीं थोडी पुढील निराळी माहिती रेणुकामाहात्म्यांत आढळते. कार्तवीर्यानें जमदग्नीचा वध केल्यावर राम और्ध्वदेहिक संस्कार करण्याकरितां एका कावडींत जमदग्नीचें प्रेत व रेणुका यांना ठेवून कावड स्कंदावर घेऊन कान्यकुब्जाश्रमांतून निघाला, तो अनेक तीर्थें, क्षेत्रें व अरण्यें ओलांडून दक्षिणमार्गानें सह्याद्रीवर असलेल्या मल्लकी नामक दत्तात्रेयक्षेत्रांत आला. क्षणभर विश्रांति घेऊन निघणार, इतक्यांत 'येथेंच अग्निसंस्कार कर,' अशी आकाशवाणी झाली. आकाशवाणीच्या सांगण्यावरून यानें दत्तात्रेयाच्या अनुमतीनें जमदग्नीच्या देहाला अग्निसंस्कार दिला. त्या वेळीं रेणुका सती गेली. पुढें रामानें मातृपितृप्रेमानें त्यांना हाक मारली असतां तीं दोघेंहि त्या ठिकाणीं प्रत्यक्ष उत्पन्न झालीं. या स्थानाला मातृतीर्थ असें नांव मिळालें. या मातृतीर्थांत रेणुका प्रत्यक्ष वास करीत असते. येथें रेणुकेनें 'कार्तवीर्याचा नाश कर,' अशी परशुरामाला आज्ञा दिली. नर्मदाकाठीं मार्कंडेय ऋषीचा आश्रम होता. ह्या आश्रमाला यानें भेट दिली. नंतर हा कार्तवीर्यावर चालून गेला व यानें त्याचा नाश केला (रेणु. ३७-४०). पण इतर पुराणांत वेगळी माहिती आहे.

या वेळीं जमदग्नि जिवंत असून त्याला जेव्हां कार्तवीर्याचा वध करण्याची प्रतिज्ञा समजली, तेव्हां त्यानें कार्तवीर्याच्या वधापासून परशुरामाला निवृत्त करण्याचा प्रयत्न केला व ब्राह्मणाला तर हें काम अत्यंत अयोग्य असें सांगितलें. पण परशुरामानें दुष्टांना शासन न केल्यास त्याचा परिणाम वाईट होईल असें सांगितलें. तेव्हां जमदग्नीनें ब्रह्मयाची व ब्रह्मयानें शंकराची संमति घ्यावयास सांगितलें. त्याप्रमाणें संमति मिळवून तेथून हा सरस्वतीच्या तीरीं अगस्त्याकडे आला व त्याच्या आज्ञेनें गंगेच्या उगमावर जाऊन यानें तपश्चर्या केली. देवाची कृपा संपादन करून परशुराम नर्मदेच्या तीरावर आला व तेथून कार्तवीर्याकडे दूत पाठवून यानें त्यास युद्धाचें आव्हान दिलें. कार्तवीर्यानेंहि युद्धाचें आव्हान स्वीकारून सेनापतीस सैन्य सज्ज करावयास सांगितलें. त्याप्रमाणें अनेक अक्षौहिणींसहित आलेल्या कार्तवीर्याशीं नर्मदेच्या उत्तरेस परशुरामानेंहि तोंड दिलें. कार्तवीर्याच्या बाजूनें प्रथम मत्स्य राजानें जोरानें हल्ला केला. पण परशुरामानेंहि त्याला सावधगिरीनें ठार केलें. बृहद्बल, सोमदत्त, विदर्भ, मिथिलेश्वर, निषधाधिपति व मगधाधिपति यांना ठार केलें. सात अक्षौहिणी व एक लक्ष क्षत्रियांसह आलेल्या सूर्यवंशज सुचंद्राला भद्रकालीच्या कृपेनें ठार करून त्याचा पुत्र पुष्कराक्ष यालाहि डोक्यापासून पायापर्यंत कापून ठार केलें. पुढें प्रत्यक्ष कार्तवीर्याशीं व त्याच्या शंभर मुलांशीं युद्ध झालें. कार्तवीर्यानें एकदां परशुरामाला बेशुद्धहि केलें; पण यानें कार्तवीर्य व त्याचीं मुलें यांचा शंभर अक्षौहिणी सैन्यासह नाश केला (ब्रह्मांड. ३.४.४०-४१). शेवटीं कार्तवीर्याचे शूर, वृषास्य, वृष, शूरसेन व जयध्वज हे पुत्र पळून हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या अरण्यांत गेले व रामहि युद्ध संपवून नर्मदेंत स्नान करून शंकराकडे आला. तेथें गणपतीनें शंकराकडे जाण्याची वेळ नाहीं असें म्हटल्यामुळें परशूनें यानें गणपतीचा दांत पाडिला (ब्रह्मांड. ३. ४२); व तेथून जमदग्नीकडे येऊन त्याला सर्व निवेदन केलें. पण जमदग्नीनें क्षत्रहत्येच्या दोषांचें बारा वर्षें तप करून प्रायश्चित्त करण्यास सांगितल्यावरून हा प्रायश्चित्त करण्याकरितां महेंद्रावर गेला. त्यामुळें असें झालें कीं, हा जिकडून जाई तिकडचे क्षत्रिय लपून बसत. इतर जयजयकार करीत (ब्रह्मांड. ३. ४४). हा तपाला गेल्यावर इकडे राहिलेल्या कार्तवीर्याच्या

मुलांनीं जमदग्नीला ठार केलें व त्याचें मुंडकें नेलें. ही गोष्ट परशुरामाला बारा वर्षांनंतर तपाहून परत येत असतां वाटेंत कळली. पण मत्स्यपुराणांत या वेळीं कैलासावर गणपतीची आराधना करण्याकरितां हा गेला होता असें आहे (मत्स्य. ३६). रेणुकेनेंहि पतीबरोबर सहगमन केलें होतें. तेव्हां परशुरामाचा क्रोध अनिवार होऊन त्यानें 'एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करीन' ह्या प्रतिज्ञेची पूर्ति करण्याचा निश्चय केला व माहिष्मतीच्या बाहेर यानें अगस्त्याचें स्मरण केलें. त्याबरोबर अगस्त्यानें अश्वांसहित उत्तम रथ व आयुधें दिलीं. सहसाह सारथि झाला. रामानें रुद्रानें दिलेला अमित्रजित् शंख फुंकला. तेव्हां कार्तवीर्याच्या शूरसेनादि पांच मुलांनींहि इतर राजांच्या साहाय्यानें तोंड देण्याचा प्रयत्न केला पण परशुरामानें त्यांना ठार करून इतर क्षत्रियांना मारण्याचा सपाटा चालविला. माहिष्मती जाळून टाकिली. एवढ्यांत हैहयांपैकीं वीतिहोत्र तेवढा पळाला. इतकें करून हा पुनः महेन्द्रावर तपाला गेला. याप्रमाणें पुनः क्षत्रिय उत्पन्न झाले कीं, हा त्यांच्यावर चालून जाऊन त्यांना ठार करी. क्षत्रिय नष्ट होऊं नयेत म्हणून क्षत्रिय स्त्रियांचे ठिकाणीं ब्राह्मणांनीं क्षत्रिय निर्माण केले. त्यांचीहि यानें कत्तल केली. सामान्यतः हा दहा वर्षे महेन्द्रावर तपश्चर्या करी व उत्पन्न झालेल्या क्षत्रियांचीं दोन वर्षे सतत कत्तल करी. अशी यानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली (ब्रह्मांड. ३. ४६). शिवाय, याच्या प्रतिज्ञेचें कारण थोडें निराळें आढळतें. यानें आपला बाप व वासरूं यांना त्रास दिला म्हणून कार्तवीर्य व चौसष्ट कोटी क्षत्रिय ठार केले. त्यांमध्यें चौदा कोटी तर ब्राह्मणांचा द्वेष करणारेच होते. इतरहि पुष्कळ क्षत्रियांना शिक्षा केल्या. दंतक्रूराला ठार केलें. एक हजार वीर मुसळानें ठार केले. हजारांना तलवारीनें छाटलें. हजारांना झाडाला टांगून मारिलें. आणि तितक्यांनाच पाण्यांत बुडविलें. हजारांचे दांत उपटून नाकें व कान कापून टाकिले. सात हजारांना तिखटाची धुरी दिली. राहिलेल्यांस बांधून, मारून व मस्तकें फोडून धुळीस मिळविलें. गुणावतीच्या उत्तरेस व खांडवारण्याच्या दक्षिणेस ज्या टेंकड्या आहेत त्यांच्या पायथ्याशीं याचें युद्ध झालें. तेथें दहा हजार वीरांना यानें ठार केलें. तेथून पुढें यानें काश्मीर, दरद, कुंति, क्षुद्रक, मालव, अंग, वंग, कलिंग, विदेह, ताम्रलिप्त, रक्षोवाह, वीतिहोत्र, त्रिगर्त, मार्तिकावत, शिबि इत्यादि अनेक देशांच्या राजांचा यानें किड्यांप्रमाणें संहार केला. रानटी लोकांचा संहार केला. नंतर बत्तीस हात उंचीची सोन्याची वेदी करून पृथ्वी कश्यपाला दान दिली (म. शां. ४८ कुं.). अशा तऱ्हेनें यानें बारा हजार मूर्धाभिषिक्त राजांचीं डोकीं उडविलीं. नंतर हजारों राजे घेऊन हा कुरुक्षेत्रांत आला व तेथें यानें पांच डोह खणून ते त्या राजांना मारून त्यांच्या रक्तानें भरले व त्यांत स्नान करून पितरांचें तर्पण केलें. त्या तीर्थांना समंतपंचक असें म्हणतात. पुढें गयेंत जाऊन चंद्रपाद नांवाच्या ठिकाणावर श्राद्ध केलें (पद्म. स्व. २६). या रीतीनें परशुराम अद्भुत कर्म करून प्रतिज्ञेंतून पार पडला. पण पितरांना ही क्षत्रियहत्या पसंत पडली नाहीं. त्यांनीं याला या कर्मापासून निवृत्त होण्यास सांगून पापमुक्तीकरितां प्रायश्चित्त करण्यास सांगितलें (म. आ. २. १-१५ कुं.). हाहि पितरांचीं आज्ञा स्वीकारून अकृतव्रणासहित सिद्धवनाकडे गेला. रथ, सारथि, धनुष्य वगैरेंना पुनः योग्य वेळीं येण्याची सूचना देऊन निरोप दिला. सर्व तीर्थांवर स्नान करून तिनदां पृथ्वीप्रदक्षिणा केली व महेन्द्रावर कायमचें ठाणें दिलें व अश्वमेधाचा बेत ठरवून पुढील लोकांना यज्ञांतील अधिकार दिले.

काश्यप (अध्वर्यु), गौतम (उद्गातृ), विश्वामित्र (होतृ), व मार्कंडेय (ब्रह्म). भरद्वाज, अग्निवेश्यादिकांनीं इतर कामें केलीं. याप्रकारें यज्ञ समाप्त करून महेन्द्रपर्वताखेरीज सर्व पृथ्वी काश्यपाला दान दिली. दीपप्रतिष्ठाख्य नांवाचें व्रत केलें (ब्रह्मांड. ३. ४७).

परशुरामाच्या तडाख्यांतून कोण कोण क्षत्रिय वांचले याची माहिती पुढीलप्रमाणें आढळते. हैहयकुलांतील कांहीं क्षत्रिय बायकांत दडून जगले. पौरवकुलांतील विदूरथपुत्र ऋक्षवान् ऋक्षवानपर्वतावर अस्वलांनीं वांचविला. पराशरानें शूद्राप्रमाणें सेवा करून सौदासाच्या सर्वकर्मा नांवाच्या वंशजाचें संरक्षण केलें. शिबिपुत्र गोपतीचें गाईंनीं संरक्षण केलें. प्रतर्दनपुत्र वत्साचें गोवत्सांनीं संरक्षण केलें. दधिवाहनपौत्र व दिविरथपुत्र अंगाचें गंगातीरावर गौतमानें संरक्षण केलें. गृध्रकूट पर्वतावर तेजस्वी बृहद्रथाचें वानरांनीं संरक्षण केलें. इंद्रासारखे शूर मरुत्तवंशज समुद्रांनीं रक्षिले. हे क्षत्रिय म्हणून प्रसिद्ध असून तेथें तेथें शिल्पकार व सुवर्णकार वगैरेंचे धंदे करीत होते. अशी परशुरामाच्या वर्तनामुळें सर्वत्र अराजक स्थिति झाली असल्यामुळें ही कश्यपानें नष्ट केली व जागोजागचे क्षत्रिय शोधून आणून त्यांना राज्याभिषेक केले (म. शां. ४८ कुं.).

अशा वर्तनामुळें परशुरामाबद्दल लोकांत एक प्रकारचा तिरस्कार उत्पन्न झाला होता. पुढें बऱ्याच दिवसांनीं विश्वामित्रपौत्र व रैभ्युपुत्र परावसूनें चार लोकांत याला खिजविलें व तो म्हणाला कीं, 'तूं पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा केलीस, पण ययातीच्या यज्ञाकरितां जमलेले हे प्रतर्दनप्रभृति लोक क्षत्रिय नाहींत वाटतें? तूं कांहीं तरी बकवा करतोस झालें. वास्तविक सर्वत्र पसरलेल्या क्षत्रिय वीरांच्या भीतीनें तूं रानांत तोंड लपवून बसला आहेस.'

यामुळें परशुरामानें संतापानें पुनः शस्त्र हातात घेतलें व पूर्वी निरपराधी म्हणून सोडिलेल्या क्षत्रियांनाहि ठार मारून लहानथोर हा विचार न करितां गर्भांचाहि नाश केला. एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करून अश्वमेध केला. शेवटीं सर्व पृथ्वी कश्यपाला दान करून आपण समुद्रापासून मिळविलेल्या महेन्द्रपर्वतावर राहण्यास गेला ( म. द्रो. ७० ). ही गोष्ट अभिमन्यूच्या मृत्यूनें शोकग्रस्त झालेल्या युधिष्ठिरास नारदानें सांगून शांत केलें.

परशुरामाला सगर व त्याचा पिता बाहु किंवा फल्गुतंत्र यांचें साहाय्य होतें. कारण, कार्तवीर्यानें बाहूचा पराजय करून त्याला देशोधडीस लाविलें असतां त्याचा और्वाश्रमांत देहान्त झाला; त्याच्या मृत्यूनंतर सगर झाला व परशुरामाच्या पाठोपाठ तालजंघादिकांचा सगरानें समाचार घेऊन त्यांना वसिष्ठाच्या सांगण्यावरून विद्रूप करून सोडून दिलें. पुढें विदर्भकन्या केशिनीशीं सगराचें लग्न झालें. सगरपुत्रांनीं समुद्र खणल्यावर गोकर्ण समुद्रांत जाऊं लागलें, म्हणून शुक वगैरे ब्राह्मणांनीं महेन्द्रावर जाऊन परशुरामाकडे तक्रार केली. परशुरामानें अयोध्येच्या राजकुलावर वक्रदृष्टि न करितां समुद्रास मागें हटावयास लाविलें व शूर्पारक निर्माण केलें ( ब्रह्मांड. ३. ५८. १७ ).

शूर्पारक प्रान्त निर्माण करण्याचीं कारणें भिन्नहि आढळतात. पूर्वी समुद्र पिऊन टाकिल्यामुळें शुष्क असणारीं ठिकाणें गंगा समुद्राला मिळाल्याबरोबर पाण्यांत बुडूं लागलीं. पण परशुरामानें आर्तत्राणार्थ पुनः शस्त्र धारण करून समुद्र हटवून समुद्रकाठीं दक्षिणोत्तर चारशें योजनें लांबीचा शूर्पारक प्रांत निर्माण केला ( ब्रह्मांड. ३. ५६. ५१-५७ ).

यानें कश्यपाला अश्वमेध करून सर्व पृथ्वी दान केली व नवीन भाग निर्माण करून त्यांत हा रहावयास गेला. कारण अवशिष्ट क्षत्रिय टिकावेत म्हणून कश्यपानें याला दक्षिणसमुद्राच्या तीराकडे जाण्यास सांगितलें व त्याप्रमाणें शूर्पारक देश समुद्राकडून घेऊन परशुराम तेथें राहिला. कश्यपहि मिळालेल्या देशांत ब्राह्मणांची वसाहत करवून आपण तपार्थ वनाला गेला ( म. शां. ४८. ६४-६९ कुं. ).

परशुरामाचें हें हत्याकांड कश्यपाला पृथ्वीदान केल्यानंतर थांबलें असें दिसतें. पण पूर्वी जशी यानें एकदां उचल खाल्ली त्याप्रमाणें आणखीहि कांहीं वेळां उचल घेतली असावी व शेवटीं सौभपति शाल्वाशीं प्रसंग आला असतां शंभर वर्षें युद्ध चालूनहि परशुरामाला माघार घ्यावी लागली. व मग मात्र रथ, शस्त्रास्त्रें वगैरें टाकून परशुरामानें केवळ तपाला सुरवात केली ( म. स. ४९ कुं. ). शेवटीं त्या सौभपति शाल्वाचा वध कृष्णानें केला. करवीरच्या शृगालाच्या उन्मत्तपणाचेंहि वर्णन परशुरामानेंच रामकृष्णाला सांगितलें व त्याचा वधहि कृष्णानें केला ( ह. वं. २. ४४ ). सैंहिकेय साल्वाचा वध केल्यावर शंकरानें याला अनेक अस्त्रें दिलीं व शंकरगीता सांगितली ( विष्णुधर्म. १. ५२-६५ ) अशी निराळीच माहिती मिळते. जरासंधानें मथुरेवर स्वाऱ्या करून अत्यंत त्रास देण्यास सुरवात केली, तेव्हां रामकृष्ण समुद्रकांठीं सुरक्षित स्थान पाहत हिंडत असतां त्यांची याच्याशीं शूर्पारकांत गांठ पडून यानेंच रामकृष्णांना गोमन्तपर्वतावर जाण्यास सांगितलें. कृष्णाला जरासंधाशीं गोमन्तावर राहून दुर्गयुद्धपद्धतीनें युद्ध करण्याचा यानें सल्ला दिला ( ह. वं. २. ३९ ).

धर्मराज वनवासांत पूर्वसमुद्रावरून फिरत असतां महेन्द्रपर्वतावर याच्या नियमाप्रमाणें चतुर्दशीस त्याला परशुराम भेटला. हा अष्टमी व चतुर्दशी याच दिवशीं फक्त अभ्यागतांची भेट घेत असे ( म. व. ११५ ). नंतर धर्मराज गोदावरीच्या मुखाकडे आला ( म. व. ११७-११८ ). यावरून परशुराम भूमिदान केल्यावरहि महेन्द्रपर्वतावरच राहत असे असें दिसतें. पण सगराच्या पुत्रांनीं समुद्र खणल्यामुळें गोकर्णक्षेत्र समुद्रांत जाऊं लागलें म्हणून तेथील ब्राह्मणांनीं तक्रार केली; तेव्हां महेन्द्रपर्वतावरून येऊन समुद्राकडून तें क्षेत्र परत मिळवून दिलें व आपण शूर्पारक उत्पन्न करून तेथें राहिला ( ब्रह्मांड. ३. ५८ ).

वरील हकीगतींत दोन महेन्द्र पर्वतांचा निर्देश येत आहे. एक पूर्वसमुद्रावरील व दुसरा पश्चिम समुद्रावरील. पश्चिम समुद्रकांठीं शूर्पारक असून तेथेंहि एक महेन्द्रपर्वत आहे, असें हरिवंशावरून दिसतें. पूर्वसमुद्रावरील महेन्द्र पर्वत हें परशुरामाचें नेहमींचें राहण्याचें ठिकाण होतें. कश्यपाला महेन्द्राखेरीज पृथ्वी दान केली असें ब्रह्मांडांत आहे. पण इतर ठिकाणीं महेन्द्रासुद्धां दिली व शूर्पारक राहण्याकरितां समुद्राकडून घेतला असें आहे. ब्रह्मांडांत शूर्पारक निर्माण करण्याचें कारण वेगळें आहे. धर्मराजाला परशुराम पूर्वसमुद्रावरील महेन्द्रावर भेटला, असें दिसतें. पण तें बरोबर नाहीं. दोन महेन्द्र असल्यामुळें हा घोटाळा झाला आहे. कश्यपाला पृथ्वी दान केव्हां केली याचा उलगडा त्यानें स्थापन केलेल्या राजांच्या नांवांवरून होतो ( म. शां. ४८ कुं. ). ब्रह्मांडांत शूर्पारक उत्पन्न केले, तेव्हां सगर राजा होता असें दिलें आहे.

परशुराम चिरंजीव आहे अशी समजूत आहे. त्याप्रमाणें हा कांहीं वेळां दृग्गोचर झाला आहे. शिवधनुष्याचा भंग केल्यामुळें सीतेनें रामाला वरिलें. त्या वेळीं हा गुरूच्या धनुष्याचा भंग केल्यामुळें रामाशीं लढण्यास आला होता. भीष्मानें परशुरामाकडे विद्या संपादन केली होती. शिवाय अंबेला

भीष्मानें वरावें म्हणूनहि गुरुशिष्यांची लढाई झाली होती. पण महिनाभर लढाई चालून परशुरामाचाच पराजय झाला (म. भी. १८५. ८ कुं.). परशुरामाच्या क्षत्रियहिंसेच्या बढाईलाहि भीष्मानें स्पष्ट उत्तर दिलें आहे. कर्णानेंहि ब्राह्मण म्हणून याच्याकडून विद्या संपादन केली होती. पण कर्ण ब्राह्मण नाहीं असें कळल्यावर त्याला यानें शापहि दिला. यानें द्रोणाला ब्रह्मास्त्र दिलें. यानें दुर्योधनाला दंभोद्भवाची गोष्ट सांगून युद्धनिवृत्त करण्याचा प्रयत्न केला होता ( म. उ. ९६ कुं. ). मुंबईच्या वाळुकेश्वराची स्थापना परशुरामानें केली ( स्कंद. सह्याद्रि. २. १ ).

परशुरामसूत्र नांवाचा एक तंत्रग्रंथ याच्या नांवानें प्रसिद्ध आहे. परशुरामशक सध्यां मलबारांत चालूं आहे. याचें वर्ष सौर असून सिंहमासापासून वर्षारंभ होतो. या शकाचें हजाराचें एक चक्र असतें. सध्यां चवथें चक्र चालूं आहे. पण हजारावरहि संख्या आहे. या शकाला कोलमआंडु ( पश्चिमेकडील वर्ष ) म्हणतात (भा. ज्यो. ३७७ ).

परशुरामानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा केली व ती पारहि पाडली. इतकें घोर कर्म करण्यास प्रवृत्त होण्याला केवळ गोहरणापेक्षां अधिक भयंकर कारण घडलें असण्याचा संभव आहे. केवळ चार पायाच्या गाईवरून हा तंटा झाला नसावा. जमदग्नीच्या आश्रमांतील स्त्री कार्तवीर्यानें पळविली असावी व पुढें जमदग्नीसारख्या सत्त्वस्थ ब्राह्मणाचा एकाकी स्थितींत खून केला म्हणून हा भयंकर युद्धाचा वणवा पेटला असावा, असें श्री. शामशास्त्री यांनीं ' एव्होल्यूशन ऑफ इंडियन पॉलिटि ' या ग्रंथांत प्रतिपादन केलें आहे.

**परस्परायणि**— अंगिराकुलांतील ब्रह्मर्षि ( नारायणि पहा ).

**पराक्ष**—(सो. अनु.) ब्रह्मांडमतें अनुपुत्र (परपक्ष पहा).

**परातंस**—( सो. ) भविष्यमतें प्रतंसाचा पुत्र.

**परानंद**—नंदसुतास शूद्र स्त्रीपासून झालेल्या प्रनंदाचा पुत्र. हा मगध देशाचा राजा होता. यानें दहा वर्षे राज्य केलें. याचा पुत्र समानंद ( भवि. प्रति. १. ६ ).

**परायण**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें कौथुम पाराशर्याचा शिष्य ( व्यास पहा ).

**परावसु**—एक गंधर्व ( भा. ८. ११. ४१ ).

२ रैभ्य ऋषीचा पुत्र व विश्वामित्राचा पौत्र. यानें हरिण समजून आपल्या बापाचा वध केला व बृहद्युम्नाच्या यज्ञांत आपला बंधु अर्वावसु यास सांगितलें कीं, ' तुझ्या हातून यज्ञ पार पडणार नाहीं. मी यज्ञ चालवतों आणि तूं ब्रह्महत्येचा दोष जाण्याकरितां व्रत कर. ' त्याप्रमाणें तो व्रत करून परत आला असतां, यानें त्यास ब्रह्मघ्न म्हणून राजाकडून हांकून दिलें व यानें बृहद्युम्न राजाचा यज्ञ पार पाडिला. यवक्रीतानें याच्या भार्येचा बलात्कारानें उपभोग घेतला होता ( म. व. १३७-१४० कुं. ). यानेंच परशुरामाला क्षत्रिय सर्वत्र दिसत असतां निःक्षत्रिय पृथ्वी करणारा म्हणून व्यर्थ बढाई मारतोस, असें खिजविल्यामुळें परशुरामानें पुनः क्षत्रियसंहाराचें काम सुरू केलें ( म. द्रो. ७० ).

**परावृत्**—( सो. क्रोष्टु. ) पद्म व विष्णु यांच्या मतें हा रुक्मकवचाचा पुत्र.

**पराशर**—ऋग्वेदांत पराशर हा शब्द एकदां इंद्राला उद्देशून व एकदां वसिष्ठ व शतयातु यांच्याबरोबर आला आहे. कदाचित् शतयातु हें विशेषण असून पराशरवसिष्ठ हें एकाच व्यक्तीचें नांव संभवतें. सुदासाच्या विजयासंबंधींच्या महत्त्वाच्या सूक्तांत हा उल्लेख आला आहे ( ऋ. ७. १८. २१ ). ऋग्वेदांतील कांहीं सूक्तें पराशराच्या नांवावर आहेत ( ऋ. १. ६५; ७३; ९. ९७; ३१-४४ ). कात्यायनकृत सर्वानुक्रमणींत सूक्तद्रष्टा पराशर शक्तिपुत्र होता, असें म्हटलें आहे. निरुक्तांत ' पराशीर्णस्य स्थविरस्य जज्ञे ' ( ६. ३० ) अशी पराशर शब्दाची व्युत्पत्ति दिली आहे. तिचा अक्षरशः अर्थ घेऊन पराशर हा वसिष्ठाचा मुलगा असा अर्थ कांहीं लोकांनीं केला आहे, तो बरोबर नाहीं. सर्व मुलें मेल्यामुळें निराधार झालेल्या वृद्ध वसिष्ठाला याचा आधार उत्पन्न झाला, असा पुढील कथेवरून निश्चय होतो. तोच बरोबर दिसतो. म्हणूनच महाभारतांत तसाच अर्थ घेतला आहे. वैदिक ग्रंथांत येणाऱ्या पाराशर्य शब्दावरून याचा संबंध अनुमानितां येईल.

एकदां वसिष्ठ वैतागून आश्रमांतून बाहेर पडला. तेव्हां शक्तीची विधवा पत्नी अदृश्यन्तीहि न कळत त्याच्या मागोमाग चालली होती. वसिष्ठाच्या कानावर वेदध्वनि येऊं लागला; तेव्हां त्यानें मागें वळून पाहिलें, तों अदृश्यन्तीच्या पोटांतून वेदध्वनि येत आहे, असें त्यास आढळून आलें. व अजून आपला वंश आहे, असें समजून तो आश्रमांत परत आला. पुढें कांहीं दिवसांनीं अदृश्यंतीला पराशर झाला. याच्या आजोबानें म्हणजे वसिष्ठानें याचें पालनपोषण केलें. हा वसिष्ठासच बाप समजत असे व नेहमीं ' बाबा ' ' बाबा ' म्हणून त्याच्या मागें लागे. वसिष्ठाला 'बाबा' म्हणून हांक मारली कीं, अदृश्यन्तीच्या डोळ्यांस साहजिकच पाणी येत असे. अदृश्यन्तीनें किती तरी वेळां पराशराला सांगितलें असेल कीं, तूं वसिष्ठांना बाबा न म्हणतां आजोबा म्हण. पण पराशराला त्याचा अर्थच समजत नसे. पराशराला समजूं लागल्यावर अदृश्यन्तीनें याला राक्षसाकडून झालेल्या आपल्या नवऱ्याच्या मृत्यूची हकीकत समजावून सांगितली. त्याबरोबर पराशराच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. याला इतका क्रोध आला

का, हा जगाचा नाश करण्यास प्रवृत्त झाला. पण वसिष्ठानें और्वाची गोष्ट सांगून पराशराला लोकांचा नाश करण्यापासून निवृत्त केलें. तथापि राक्षसांविषयींचा राग याच्या मनांतून जाईना. यानें सर्व आबालवृद्ध राक्षसांचा वध करण्याच्या हेतूनें राक्षससत्र आरंभिलें. वसिष्ठ पहिल्याप्रमाणें पुनः याला आडवा आला नाहीं. पण इतर ऋषींमध्यें मात्र खळबळ होऊन राक्षसांच्या संरक्षणाकरितां अत्रि, पुलह, पुलस्त्य, क्रतु, महाक्रतु इत्यादि मोठमोठे मुनि तेथें आले. त्यांतील महामुनि पुलस्त्य पुढें झाला आणि त्यानें पराशरास राक्षससत्रापासून निवृत्त करण्याचा प्रयत्न केला. पुलस्त्यानें अनेकदृष्टया राक्षस निरपराधी व निरुपद्रवी असल्यामुळें त्यांचा वध करणें योग्य नव्हे, असें याला सांगितलें. तेव्हां वसिष्ठानें मध्यस्थी करून नातवास राक्षससत्रापासून निवृत्त केलें. राक्षससत्र थांबविल्यावर पुलस्त्यानें पराशरास 'सकलशास्त्रपारंगत व पुराणवक्ता होशील ' असे दोन वर दिले ( विष्णु. १. १ ). पराशरानें राक्षससत्र करण्याकरितां सिद्ध केलेला अग्नि हिमालयाच्या उत्तरेस एका अरण्यांत टाकला. तो अग्नि अद्यापिहि पर्वदिवशीं राक्षस, पाषाण व वृक्ष भक्षण करितांना दृष्टीस पडतो (म. आ. १७८-१७९; १८१; विष्णु. १. १; लिंग. १. ६४).

एकदां पराशर तीर्थयात्रेस गेला असतां यमुनेवर सत्यवती याच्या दृष्टीस पडली. तिच्या अंगाला मत्स्यासारखा वास येत होता. पराशर कामुक होऊन तिची प्रेमयाचना करूं लागला. तेव्हां भोंवतालच्या ऋषींचा अडथळा होऊं नये म्हणून पराशरानें धुकें उत्पन्न करून तो अडथळा दूर केला. तिनें कन्याभाव दूषित होईल अशी शंका काढली. त्याचें यानें निराकरण करून तिच्या अंगाचा दुर्गंध घालविला व एक योजनपर्यंत अंगाचा सुगंध येईल, अशी व्यवस्था केली. यापासून तिला वेदव्यास नांवाचा मुलगा झाला. यमुनेच्या द्वीपांत जन्म झाला म्हणून व्यासाला द्वैपायन असें म्हणूं लागले ( म. आ. ६३; १०५; भा. १. ३ ). पराशराला काली नांवाची बायको होती व तीपासून कृष्णद्वैपायन झाला (वायु. २. १०. ८४). काली व सत्यवती एकच होय.

महाभारतांत याच्या धर्मविषयक मतांचा सन्मानानें उल्लेख आला आहे (म. अनु. १४६-१५२ कुं ). यानें युधिष्ठिराला रुद्राचें माहात्म्य कथन केलें आहे ( म. अनु. १८ ). हा परीक्षिताच्या प्रायोपवेशनसमयीं गंगातटाकीं आला होता ( भा. १. १९. ९ ). त्याचप्रमाणें हा इंद्रसभेंत असल्याचा उल्लेख आहे ( म. स. ७ ).

याच्या वंशांत वसिष्ठ, मित्रावरुण आणि कुंडिन या तीन प्रवरांचे गौरपराशर, नीलपराशर, कृष्णपराशर, श्वेतपराशर, श्यामपराशर व धूम्रपराशर असे सहा भेद झाले होते ( मत्स्य. २०० ).

पराशरानें जनकाला केलेल्या तत्त्वज्ञानाच्या उपदेशाचा अनुवाद भीष्मानें धर्मराजाला सांगितला आहे. त्यालाच पराशरगीता असें म्हणतात ( म. शां. २९१-२९९ ). सारस्वतानें पराशराला व पराशरानें मैत्रेयाला विष्णुपुराण सांगितलें. हा इतिहासपुराणज्ञ होता ( विष्णु. १. १ ). पण भागवतांत सांख्यायन ऋषीनें भागवतपुराण पराशर व बृहस्पति यांस सांगितलें. पुढें तें पराशरानें मैत्रेयाला सांगितलें असें दिलें आहे ( भा. ३. ८ ). तथापि त्यांना सर्वत्र महर्षिव्यासप्रणित असेंच म्हणतात. याला गौरीवीति असेंहि नांव असावें.

याशिवाय पराशराच्या नांवावर खालील ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

( १ ) बृहत्पाराशर होराशास्त्र ( १२००० श्लोकांचा ज्योतिषग्रंथ ).

( २ ) लघुपाराशरी.

( ३ ) बृहत्पाराशरीय धर्मसंहिता ( ३३०० श्लोकांची ).

( ४ ) पाराशरधर्मसंहिता ( स्मृति ).

( ५ ) पाराशरोदितं वास्तुशास्त्रम् ( विश्वकर्म्यानें याचा उल्लेख केला आहे ).

( ६ ) पाराशरसंहिता ( वैद्यकशास्त्र ).

( ७ ) पराशरोपपुराण ( माधवाचार्यांनीं यांतील उतारे घेतले आहेत ).

( ८ ) पराशरोदितं नीतिशास्त्रम् ( याचा विष्णुशर्म्यानें व चाणक्यानें उल्लेख केला आहे ).

( ९ ) पराशरोदितं केवलसारम्.

पराशरानें आपल्या ज्योतिषग्रंथांत वसंतसंपाताची स्थिति दिली आहे. त्यावरून पाहतां हा इ. स. पूर्वी तेराव्या अगर चवदाव्या शतकांत झाला असावा ( संस्कृत कविचरित्र ).

हा एक स्मृतिकार होता. याची स्मृति जीवानंदसंग्रहांत ( २. १—५२ ) आणि 'बॉम्बे संस्कृत सिरीज 'मध्यें दिली आहे. ती याज्ञवल्क्याप्रमाणें प्राचीन असून धर्मशास्त्रासंबंधीं लिहितांना पुष्कळ लेखकांनीं तिचा आधार घेतलेला आहे. गरुडपुराणांत या स्मृतीचा सारांश दिला आहे ( १. १०७. १ ). कौटिल्यानें राजधर्माविषयीं लिहितांना याचा उल्लेख केला आहे. या स्मृतींत १२ अध्याय असून त्यांत ५९२ श्लोक आहेत. यांत आचार व प्रायश्चित्त यांचा विचार केला आहे. क्षत्रियांच्या कर्तव्याविषयीं यानें बरेंच विवेचन केलें आहे ( परा. १. ६-८ ). ही स्मृति कलियुगाकरितां आहे. त्यांत कृत, त्रेता, द्वापर आणि कलि या युगांत अनुक्रमें मनु, गौतम, शंखलिखित आणि पराशर हे धर्मरक्षण करतील, असें दिलें आहे. यानें औरस, क्षेत्रज, दत्त आणि कृत्रिम असे

पुत्रांचे चार प्रकार दिले आहेत ( ४. १४ ). सतीच्या चाली-संबंधींहि यानें आपलें मत प्रगट केलें आहे ( ४ ). याच्या स्मृतींत मनु आदिकरून धर्मशास्त्रकारांचा उल्लेख आहे ( पराशर. १; ४; ८; बौ. ध. १. ४. २; मनु. ४. २२३ ). सर्व शास्त्रें जाणणारा म्हणून मनूचा यानें निर्देश केला आहे. याचे कांहीं श्लोक वसिष्ठाच्या नांवावर हरदत्तानें दिले आहेत ( गौ. २२.१८). उशनस् ( १२.४९ ), प्रजापति ( ४.३; १३ ) व शंख ( ४. १५ ) यांचा यानें उल्लेख केला आहे. वेद, वेदांगें, धर्मशास्त्र व स्मृति यांचाहि यानें विचार केला आहे ( ६. २३ ). अकराव्या अध्यायांत यानें कांहीं वैदिक मंत्र दिले आहेत. त्यांतील कांहीं ऋग्वेदांत व कांहीं शुक्लयजुर्वेदांत आढळतात. मिताक्षरा, अपरार्क, स्मृतिचंद्रिका, हेमाद्रि इत्यादिकांत याचा कित्येक वेळां उल्लेख आढळतो. विश्वरूपानेंहि याचा बरेच वेळां उल्लेख केला आहे ( याज्ञ. ३. १६; २५७ ). यावरून नवव्या शतकाच्या पूर्वार्धांत या स्मृतीचा आधार प्रमाणभूत मानीत असत हें उघड आहे. मनुस्मृतीच्या उल्लेखावरून ही स्मृति इ. स. १००–५०० च्या दरम्यान असावी. जीवानंदसंग्रहांत बृहत्पराशर-संहिता आहे. त्यांत बारा अध्याय असून ३३०० श्लोक आहेत. ही पराशरानें सुव्रतास सांगितलेली आहे. सध्यांची पराशरस्मृति सुव्रतानें संक्षेपानें दिलेली असावी. बृहत्पराशर हा ग्रंथ या स्मृतीनंतरचा असावा. अपरार्कानें वृद्धपराशराचा उल्लेख केला आहे ( याज्ञ. २. ३१८ ). माधवानेंहि याचा उल्लेख केला आहे ( प. रा. मा. १. १. २३० ). हेमाद्रि ( चतुर्वर्गचिंतामणि. ३. २. ४८ ) व भट्टोजी यांनींहि ज्योतिः-पराशराचा निर्देश केला आहे.

पराशरगोत्रांत पांच पोटभेद आहेत.

गौरपराशर—कांडशय ( कांडूशय ), गोपालि, जैह्मप ( समय ), भौमतापन ( समतापन ), वाहनप ( वाहयौज ).

नीलपराशर—केतुजातय, खातेय ( ग ), प्रपोहय (ग), वाह्यमय, हर्यश्वि.

कृष्णपराशर—कपिमुख ( कपिश्रवस् ) ( ग ), काकेयस्थ ( काकेय ) ( ग ), कार्ष्णायन ( ग ), जपातय ( ख्यातपायन) ( ग ), पुष्कर.

श्वेतपराशर—इषीकहस्त, उपय ( ग ), बालेय ( ग ), श्राविष्ठायन, स्वायष्ट ( ग ).

श्यामपराशर—कौश्नायन, क्षैमि, बादरि, वाटिका, स्तंब.

धूम्रपराशर—खल्यायन ( ग ), तान्ति ( जर्ति ), तैलेय, यूथप, वार्ष्णायन.

या सर्वांचे प्रवर पराशर, वसिष्ठ व शक्ति असे तीन आहेत ( मत्स्य. २०१ ).

२ व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील हा बाष्कलाचा शिष्य. याचे नांवावरून याच्या शाखेस पाराशरी असें नांव पडलें. हा ऋग्वेदी श्रुतर्षि व ऋषिक आहे. हा ब्रह्मचारीहि आहे.

३ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य. ब्रह्मांडांत पाराशर्य असा पाठभेद आहे.

४ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील कुथुमीचा शिष्य.

५ व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य ( व्यास पहा ).

६ ऋषभ नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

७ जनमेजयाच्या सर्पसत्रांत मेलेला धृतराष्ट्रकुलांतील एक सर्प ( म. आ. ५७.१९ कुं. ).

८ ( सर्वकर्मन् पहा ).

**परिकूट**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**परिकृष्ट**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य.

**परिक्षित्**—( ५ परीक्षित् पहा ).

**परिक्षित**—हा एक कौरव्य राजा होता. याच्या समृद्धीचें वर्णन आढळतें ( अ. वे. २०. १२७. ७–१० ). याच्या ऋचांना पारिक्षिती असें म्हटलें आहे ( ऐ. ब्रा. ६. ३२; गो. ब्रा. २६. १२ ). प्रशंसेकरितां इतर देवतांशींहि याची तुलना आहे. परिक्षित व परीक्षित् भिन्न आहेत.

**परिघ**—( सो. क्रोष्टु. ) मत्स्य व वायु यांच्या मतें हा रुक्मकवचाचा पुत्र. यास पालित व पुरुजित् म्हणतात. पद्ममतें रुक्मकवचाचा पौत्र व परावृत्‌चा पुत्र (पद्म. सृ. १३).

**परिप्लव**—( सो. कुरु. भविष्य. ) विष्णुमतें हा सुखीबलपुत्र होय. पण भागवतमतें सुखीनलाचा पुत्र आहे. याबद्दल परिष्णव व परिप्लुत असे पाठभेद आहेत.

**परिप्लुत**—( परिप्लव पहा ).

**परिबर्ह**—गरुडाचा पुत्र.

**परिमति**—भव्य देवांतील एक.

**परिमल**—( सो. ) मथुरेचा राजा धुंधुकार याचा प्रद्योत नांवाचा एक बलाढ्य क्षत्रिय मंत्री होता, त्याचा हा पुत्र. याचें त्या राजाकडून सर्व शिक्षण झालें. हा एक लक्ष सैन्याचा अधिपति होता. पृथ्वीराजानें हा असंतुष्ट म्हणून यास हांकून दिलें. तेव्हां हा पृथ्वीराजाचा मावसभाऊ जयचंद्र याजकडे प्रद्योत, विद्योत व भीष्मसिंह यांच्यासहित गेला व त्यांनीं जयचंद्रास पृथ्वीराजाकडून अनंगपालाच्या राज्याचा अर्धा भाग मागण्यास सांगितलें. अशा तऱ्हेनें त्या दोघांत वैर उत्पन्न झालें ( भवि. प्रति. ३. ५ ). याला रुद्रप्रसादानें रोजीं एकभार सोनें देणारें लिंग मिळालें ( भवि. प्रति. ३. ७ ).

**परिप्रल:**—इंद्रप्रस्थ्याच्या प्रद्योत राजाची दुःशलेच्या अंश असलेली कन्या. हिनें स्वयंवर होऊन हिचा कच्छप राजाचा पुत्र कमलापति याशीं विवाह झाला. हिला जगनायक नांवाचा पुत्र झाला ( भवि. प्रति. ३. २७ ).

**परिश्रवस्**—( २ प्रतीप पहा ).

**परिष्णव**—(सो. कुरु. भविष्य.) मत्स्यमतें सुखीबलाचा पुत्र ( परिप्लव पहा ).

**परिष्वंग**—स्वायंभुव मन्वंतरांतील मरीचिऋषीला ऊर्णेपासून झालेल्या सहा पुत्रांतील एक. हा कृष्णाच्या सहा बंधूंत पुनः जन्मून कंसाच्या हातून मरण पावला ( भा. १०. ८५. ५१ ).

**परिहर**—हा चित्रकूटानजीक कलिंजर नगरांत राहत होता. हा बौद्धहिंसक होता ( भवि. प्रति. ११. ७ ). हा बौद्धजेता असून अथर्वपरायण होता. यानें बारा वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४.४ ).

**परीक्षित्**—( सो. कुरु. ) अर्जुनाचा पौत्र आणि अभिमन्यु व उत्तरा यांचा पुत्र. अश्वत्थाम्यानें सोडलेल्या ब्रह्मास्त्राच्या योगानें हा उत्तरेच्या गर्भामध्यें होरपळूं लागला. त्या वेळीं उत्तरेनें भगवंताचा धांवा केला असतां तिच्या गर्भाचें विष्णूनें रक्षण केलें, म्हणून याचें नांव विष्णुरात असें ठेवण्यांत आलें. शिवाय, हा गर्भामध्यें आपलें रक्षण करणारा पुरुष दृष्टीस पडावा, म्हणून जन्मल्यानंतर चहूंकडे पाहूं लागला. त्यावरून याला परीक्षित् ( परि+ईक्ष् ) म्हणूं लागले. या वेळीं भारतीय युद्ध संपून फारच थोडे दिवस झाले होते. पुढें श्रीकृष्ण निजधामास गेल्यावर व युधिष्ठिरानें छत्तीस वर्षे राज्य केल्यावर याला गादीवर बसविण्यांत आलें. नंतर द्रौपदीसहित सर्व पांडव महाप्रस्थानाला निघून गेले. राज्याभिषेकसमयीं याचें वय छत्तीस वर्षांचें होतें. याची स्त्री भद्रवती. गणपत कृष्णाजीप्रतींत माद्रवती आढळते. भागवतामध्यें मातुलकन्या इरावती—उत्तराची कन्या—ही याची स्त्री होती, असें आढळतें. तिच्यापासून याला जनमेजय, श्रुतसेन, उग्रसेन व भीमसेन असे चार पुत्र झाले ( म. आ. ६३; आश्व. ६९; महा. १. ७ कुं.; भा. १. १२. १६; ९. २२ ).

यानें कृपाचार्याला गुरु करून भागीरथीच्या तटाकीं तीन अश्वमेध यज्ञ केले. याच्या यज्ञांत देव प्रत्यक्ष आपला हविर्भाग घेण्यास आले होते. हा कुरुजांगल देशांत राज्य करीत असतां, आपल्या राज्यामध्यें कलीचा प्रवेश झाला आहे, असें ऐकतांच त्याचा निग्रह करण्याकरितां चतुरंग सेना बरोबर घेऊन निघाला. भारत, केतुमाल, उत्तरकुरु, भद्राश्व इत्यादि खंडें जिंकून तेथील राजांपासून यानें करभार वसूल केला. पुढें सरस्वतीच्या कांठीं गाईचें रूप घेतलेल्या पृथ्वीबरोबर एका पायावर लंगडत चालणाऱ्या वृषभरूपी धर्माचा चाललेला संवाद याचे कानी पडला. त्यांत 'श्रीकृष्ण निजधामाला गेल्यामुळें सर्व लोकांमध्यें कलि प्रविष्ट झाला असून भूमि दुःख करीत आहे व कलि शूद्ररूप घेऊन तो गाईबैलांना यांना मारीत आहे,' असा प्रकार याला आढळला. त्यामुळें हा खिन्न होऊन कलीला देहांतशासन करण्यास तयार झाला. परंतु कलि याला शरण आला. त्या वेळीं परीक्षितानें त्याला राज्यांतून बाहेर जाण्याची आज्ञा केली. कलीनें ती गोष्ट कबूल करून 'मला राहण्याला जागा कोणती?' असें विचारिलें, तेव्हां जुगार, मद्य, व्यभिचार, हिंसा व सुवर्ण हीं पांच स्थानें यानें कलीला नेमून दिलीं. वृषभाचें तप, शुद्धता व दया हे तीन पाय जोडिले म्हणजे हे धर्म पृथ्वीवर चालू केले. यामुळें धर्माचें व पृथ्वीचेंहि समाधान झालें ( भा. १. १६-१७ ).

एकदां हा मृगयेकरितां वनांत गेला असतां फार श्रम झाल्यामुळें अत्यंत तृषाक्रांत होऊन पिण्याकरितां जल शोधूं लागला, पण तें न मिळाल्यामुळें शमीक ऋषीच्या आश्रमांत शिरला. या वेळीं शमीक ध्यानस्थ असल्यामुळें उदकार्थ यानें केलेली याचना त्यानें ऐकिली नाहीं. पण याला राग येऊन यानें धनुष्याच्या टोंकानें एक मृत सर्प उचलून तो शमीक ऋषीच्या कंठांत घातला व हा आपल्या नगरास परत आला. लवकरच जवळ खेळत असणाऱ्या शमीक ऋषीच्या शृंगी नामक पुत्राला हा प्रकार कळतांच त्यानें रागानें शाप दिला कीं, 'ज्यानें मृत सर्प खांद्यावर टाकून माझ्या पित्याचा अपमान केला, त्या परीक्षित् राजाला आजपासून सातवे दिवशीं मी प्रेरणा केलेला तक्षक दंश करील' या ऋषिपुत्राचें नांव गविजात आढळतें. मागाहून शमीकाला तो शाप कळतांच त्यानें पुत्राची निर्भर्त्सना करून आपला शिष्य गौरमुख याजकडून परीक्षितास तो शाप कळविला ( शमीक पहा ). शाप ऐकतांच परीक्षिताला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला आणि सुरक्षिततेकरितां सात मजली, एकखांबी वाडा तयार करवून व त्यांत औषधी, मंत्र वगैरे जाणणारे लोक ठेवून हा तेथें जाऊन राहिला. भागवतांत असें सांगितलें आहे कीं, शाप ऐकतांच याला वैराग्य उत्पन्न होऊन हा गंगातटाकीं प्रायोपवेशनाचे विचारानें ईश्वराचें ध्यान करीत बसला असतां, अत्रि, अरिष्टनेमि आदिकरून अनेक ऋषि तेथें आले. नंतर यानें जनमेजयाला राज्याभिषेक केला. पण महाभारतांत हा मेल्यावर जनमेजयाला राज्याभिषेक झाला असें आहे. ऋषींबरोबर संवाद चालला आहे, तोंच षोडश वर्षांचा शुकाचार्य त्या ठिकाणीं सहजगत्या आला. त्याबरोबर सर्वांनीं उत्थापन देऊन परीक्षितानें त्याला उच्च आसनावर बसविलें. नंतर विनयपूर्वक त्याची पूजा करून यानें मरणोन्मुख पुरुषाचें निश्चित

कर्तव्य कोणतें आणि त्याची सिद्धि कोणत्या मार्गानें होईल, याविषयीं प्रश्न केले व शुकाचार्य याला याच्या प्रश्नांचीं उत्तरें देऊं लागला (भा. १. १७-१९; २. ८). याप्रमाणें शुकाचार्यांकडून समग्र भागवत श्रवण केल्यानंतर हा पूर्ण ज्ञानी होऊन याची तक्षकदंशाची भीति नष्ट झाली व शुकाचार्यहि तेथून निघून गेला.

नंतर पूर्वी शाप दिल्याप्रमाणें सातवे दिवशीं ऋषिपुत्रानें पाठविलेला तक्षक परीक्षिताला दंश करण्याकरितां निघाला असतां मार्गामध्यें काश्यप नांवाचा मांत्रिक राजाचें विष उतरून द्रव्य मिळविण्याच्या इच्छेनें राजाकडे जात होता, त्याला त्यानें पाहिलें व विपुल द्रव्य देऊन माघारा पाठविलें (२ काश्यप पहा). पुढें तक्षकानें आपल्यापैकीं कांहीं नागांना फलें, मूलें, दर्भ, उदक वगैरे देऊन तापसवेषानें परीक्षिताकडे पाठविलें. तक्षक स्वतः कीटकरूपानें फळांमध्यें शिरला. तापसवेषधारी नाग राजाद्वारापाशीं येऊन 'आम्ही राजाला अथर्वण मंत्रांनीं आशीर्वाद देऊन अभिषेक करण्याकरितां व राजाला उत्कृष्ट फलें देण्याकरितां आलों आहोंत,' असें सांगूं लागले. नंतर परीक्षितानें त्यांच्या जवळचीं फळें घेऊन तीं सुहृदांना खाण्याकरितां वाटलीं व त्यांतील मोठें फळ स्वतः फोडलें. त्यांतून एक सूक्ष्म अळी बाहेर पडली. तिचा वर्ण लाल व डोळे काळे होते. तिला पाहून परीक्षित् मंत्र्यांना म्हणाला, 'आज सातवा दिवस आहे, सूर्य अस्ताला चालला आहे; असें असूनहि मला विषापासून अद्याप भय प्राप्त झालें नाहीं. यास्तव ही अळीच तक्षक होवो आणि मला दंश करून मुनिवाक्य खरें ठरो.' असें म्हणून ती अळी यानें मानेवर ठेविली. तत्काल तक्षकानें भयंकर स्वरूप धारण करून याला वेढून टाकिलें व त्याच्या मुखांतून निघणाऱ्या विषमय ज्वालांना याचा देह दग्ध होऊन गेला. तक्षकहि आकाशमार्गानें चालता झाला (म. आ. ४०-४४; ४९-५१ कुं.; दे. भा. २. ८-१०).

तक्षकानें ब्राह्मणरूपानें राजगृहांत प्रवेश करून परीक्षिताला दंश केला. त्यायोगें हा मरण पावला (भा. १२.६). मरणसमयीं याचें वय शहाण्णव वर्षांचें होतें. म्हणजे यानें साठ वर्षे राज्य केलें (दे. भा. २. ८).

परिक्षिताच्या जन्मापासून नंदाचा पहिला महापद्म याला अभिषेक होईपर्यंत एक हजार पन्नास वर्षे झालीं (मत्स्य. २७३.३६). पण एक हजार पंधरा वर्षे किंवा 'ज्ञेयं 'च्या ऐवजीं 'शतं 'असा पाठभेद घेतल्यास अकराशें पंधरा वर्षे असा काल दिलेला आढळतो (विष्णु. ४. २४. ३२).

२ इक्ष्वाकुकुलोत्पन्न अयोध्येचा राजा. मंडूकांचा राजा आयु याची कन्या सुशोभना ही याची स्त्री. तिच्यापासून याला शल, दल व बल असे पुत्र झाले (म. व. १९५ कुं.). पुराणांतील दलपिता पारियात्र व हा एकच असावेत.

३ (सो. कुरु.) कुरूच्या पांच पुत्रांतील ज्येष्ठ.

४ (सो. पूरु.) अनश्वन् व अमृता यांचा पुत्र. याची स्त्री मगधदेशाची राजकन्या सुवेषा. तिजपासून याला भीमसेन नांवाचा पुत्र झाला (म. आ. ६३. ४४-४५ कुं.).

५ (सो. पूरु.) अविक्षिताचा पुत्र. याला शबलाश्व, आदिराज, विराज, शाल्मली, उच्चैःश्रवा, भंगकार व जितारि असे बंधु आणि जनमेजय, कक्षसेन, उग्रसेन, चित्रसेन, इंद्रसेन, सुषेण व भीमसेन असे सात पुत्र होते (म. आ. १०१. ४०-४३ कुं.). परीक्षिताबद्दल परिक्षित् असाहि पाठभेद आढळतो.

६ त्रेतायुगांतील सिंहलद्वीपाचा राजा. यास भानुमती नांवाची सूर्योपासक कन्या होती. नारदानें तिला स्वतःशीं विवाह करण्याविषयीं विचारिलें असतां, तिनें शरीराचें बीभत्स वर्णन करून सांगितलें. त्यामुळें नारद ओशाळला. सूर्यानें अवतार घेऊन तिच्याशीं विवाह केला (भवि. प्रति. ४. ९).

**परुच्छेप दैवोदासि**—सूक्तद्रष्टा (ऋ. १. १२७-१३९). याविषयीं इतर ठिकाणींहि उल्लेख आहे (ऐ. ब्रा. १०. १२-१३; सां. ब्रा. २३. ४). याला कांहीं शब्द पुनः पुनः वापरण्याची संवय आहे. (नि. १०.४२). नृमेध व परुच्छेप यांच्यामध्यें मंत्रसामर्थ्याविषयीं स्पर्धा उत्पन्न होऊन नृमेधानें ओल्या लांकडांत धूर उत्पन्न केला व यानें तर लांकडाशिवाय अग्नि उत्पन्न केला (तै. सं. २. ५. ८. ३).

**परुष**—खर राक्षसाच्या बारा अमात्यांतील एक.

**परोक्ष**—(सो. अनु.) भागवतमतें अनुराजाच्या तीन पुत्रांतील कनिष्ठ (परपक्ष पहा).

**पर्जन्य**—ऋग्वेदांत ह्या देवतेचें वर्णन तीन सूक्तांत आहे. याला वृषभ (ऋ. ५. ८३. १; अ. वे. ४. १५. १), वशा (ऋ. ७. १०१. ३), पिता (ऋ. ९. ८२. ३; अ. वे. ४. १५. १२), पृथ्वी माता व पर्जन्य पिता असें आढळतें (अ. वे. १०. १०. ६). येथें वशा ही पत्नी दिली आहे. याचें इंद्राशीं साम्य आहे (ऋ. ८. ३. १).

२ रैवत मन्वंतरांतील एक सप्तर्षि.

३ फाल्गुन महिन्यांत फिरणारा सूर्य (भा. १२. ११. ४०). ऋतु नांवाचा यक्ष, वर्चस् नांवाचा राक्षस, भरद्वाज नांवाचा ऋषि, विश्वा नांवाची अप्सरा, सेनजित नांवाचा गंधर्व, व ऐरावत नांवाचा नाग हे याचेबरोबर असतात.

४ कश्यप व मुनि यांच्या पुत्रांतील एक देवगंधर्व.

**पर्णजंघ**—विश्वामित्रपुत्र.

**पर्णय**—इंद्रानें अतिथिग्वाकरितां पर्णयाचा वध केला ( ऋ. १. ५३. ८; १०. ४८. ८ ).

**पर्णवि**—अत्रिकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**पर्णा**—( एकपाटला पहा ).

**पर्णागारि**—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार ( ३ पन्नगारि पहा ).

**पर्णाद**—दमयंतीनें नलराजाच्या शोधार्थ दूत म्हणून पाठविलेला ब्राह्मण ( म. व. ७० ).

२ मयसभेंतील एक ऋषि ( म. स. ४. १९ कुं. ).

**पर्णिन्**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य ( व्यास पहा ).

**पर्णिनी**—एक अप्सरा ( ब्रह्मांड. ३. ७. १८-२४ ).

**पर्युषित**—प्रेतयोनीप्रत गेलेल्या या माणसाचा पृथु नामक ब्राह्मणानें उद्धार केला ( पद्म. सृ. ३२ ).

**पर्वण**—रावणपक्षीय राक्षस ( म. व २८६. २ कुं. ).

**पर्वत**—कश्यपाचा मानसपुत्र ( ब्रह्मांड ३. ८. ८६ ). नारद ऋषीचा भाचा ( म. स. ४. २१; ७. १०; १०. २७; शां. २९. २६ कुं. ). जनमेजयाच्या सर्पसत्रांत हा सदस्य होता. भीष्म शरपंजरीं पडला असतां हा त्याचेकडे आला होता ( भा. १. ९. ६ ). यानें नारदाला वानराप्रमाणें मुख होईल, असा शाप दिला होता ( नारद पहा; म. शां. २९. २५ कुं. ). सप्तर्षि हिंडत असतांना ब्रह्मसरोवरावर वसिष्ठानें कांठावर आणून ठेविलेलीं कमळें चोरीस गेल्यामुळें त्यानें प्रत्येकाकडून शपथ घेवविली. त्यांत यानेंहि शपथ घेतली होती ( म. अनु. १४३. ३४ कुं. ).

**पर्वत काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. १२; ९. १०४; १०५ ). नारदाबरोबर याचा अनेक वेळां उल्लेख आला आहे ( ऐ. ब्रा. ७. १३; ३४;८. २१; सां. श्रौ. १५. १७. ४ ). हा एक देवहि आहे.

**पर्वतायु**—बाल्धि ऋषीचा पुत्र. मेधावीचें नामांतर.

**पर्वतेश्वर**—विंध्य देशचा राजा. यानें प्रजेस त्रास दिल्यामुळें व द्रव्याचा फार लोभ केल्यामुळें यास प्रथम यमानें घोर नरकांत घातलें. पुढें यास वानराचा जन्म प्राप्त झाला. याचा पुरोहित अपहाराच्या योगानें सारस पक्षी झाला. एकदां हा वानर त्यास धरावयास गेला असतां त्या सारस पक्ष्यानें यास गतजन्म सांगून पुढें तूं व मी हंस होणार असून त्यापुढें मनुष्याचा देह प्राप्त होईल असें याला सांगितलें ( पद्म. उ. १२९ ).

**पर्शु**—सायणमतें पर्शूचा मुलगा तिरिंदिर ( ऋ. ८. ६. ४६ ). दुसरीकडे तिरिंदिराला पारशव्य म्हटलें आहे ( सां. श्रौ. १६. ११. २० ). पृथुपर्शूनीं सुदासाला साहाय्य केलें. पण येथील पृथुपर्शू शब्दाचा अर्थ निश्चित करावयास पाहिजे ( ऋ. ७. ८३. १ ). आयुधजीविसंघवाचक पर्शूंचा पाणिनीनें उल्लेख केला आहे ( पा. सू. ५. ३. ११७ ).

**पर्शु मानवी**—सायणमतें ही मृगी होती. हिला एके वेळीं वीस मुलें झालीं ( ऋ. १०. ८६. २३ ). दुसरीकडेहि असा एक निर्देश आहे ( तै. ब्रा. ३. २. २. २ ). पण कात्यायनानें आपल्या वार्तिकांत स्त्रीवाचक पर्शूचा निर्देश केला आहे ( ४. २. २३. २ ).

**पलस्तिजमदग्नि**—यानें सूर्यापासून ससर्परी विद्या आणून विश्वामित्राला दिली. सायणानें याचा अर्थ दीर्घायुषी जमदग्नि असा केला आहे ( ऋ. ३. ५३. १६ ).

**पलांडु**—यजुर्वेदी श्रुतर्षि.

**पलिगु**—याचा हिरण्यकेशीशाखेच्या पितृतर्पणांत उल्लेख आहे ( स. गृ. २०. ८. २० ).

**पलिगुप्त लौहित्य**—श्यामजयन्त लौहित्याचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४२. १ ). पलि शब्द प्राचीन वाङ्मयांत नाहीं.

**पवन**—उत्तम मनूच्या पुत्रांतील एक.

**पवमान**—अग्नीस स्वाहे पासूनच झालेल्या तीन पुत्रांतील एक. याचा पुत्र हव्यवाह. हा अरणीपासून उद्भवलेला गार्हपत्य अग्नीचा अंश असून हा गृहस्थास पूज्य आहे ( मत्स्य. ५१. ३ ).

२ ( स्वा. उत्तान. ) विजिताश्व राजाच्या तीन पुत्रांतील दुसरा. हा पूर्वजन्मीं अग्नि असून वसिष्ठशापानें मनुष्यजन्मास आला होता ( भा. ४. २४. ४ ).

३ ( स्वा. प्रिय. ) मेधातिथीच्या सात पुत्रांतील तिसरा. याचा खंड याच्या नांवानें प्रसिद्ध आहे ( भा. ५. २०. २५ ).

**पवित्र**—एक ब्राह्मण. याची बायको बहुला. अनपत्यपति हा ब्राह्मण याचा मित्र होता. त्या दोघांनीं विचारल्यावरून लोमशानें यांना अतिथिधर्म सांगितला. पुढें पवित्रानें एका उंदरास एक तीक्ष्ण टोकाचें हत्यार मारलें तेव्हां तो मरणार, असें पाहतांच यानें त्याचे अंगावर तुलसीपत्रें ठेवलीं व नारायणनामाचा गजर केला. तेव्हां तो उंदीर उद्धरून गेला ( पद्म. क्रि. २५ ).

२ भौत्यमन्वंतरांतील देवगण.

३ इंद्रसावर्णि मन्वंतरांतील देव.

**पवित्र आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ६७. २२-३२; ७३; ८३ ).

**पवित्रपाणि**—एक ब्रह्मर्षि ( म. स. ४. २१; ७. १२ कुं. ).

**पवीरु**—श्रुष्टिगूनें इंद्राच्या कृपेनें याला संपत्ति प्राप्त झाल्याचा उल्लेख केला आहे ( ऋ. ८. ५१. ९ ). पण आयुधवान् अशा अर्थाचें हें विशेषणहि मानिलें आहे ( वा. सं. ३३. ८२ ).

**पशु**—सविता नांवाच्या पांचव्या आदित्यास पृश्नि नांवाच्या स्त्रीपासून झालेल्या आठ अपत्यांपैकीं एक ( भा. ६. १८. १ ).

**पशुमत्**—( दुष्पण्य पहा ).

**पशुसख**—हा पशूंचा मित्र असल्यामुळें याला हें नांव मिळालें ( म. अनु. १४२.४३ कुं. ). सप्तर्षीचा एक सेवक. हा शूद्र होता. याच्या बायकोचें नांव गंडा असें होतें. ( म. अनु. १४१. ५. कुं ). वसिष्ठ ऋषीच्या कमळाच्या चोरीमध्यें यालाहि शपथ घ्यावी लागली ( म. अनु. १४३. ४०. कुं. ).

**पशुहन्**—वृषाचा पुत्र.

**पह्लव**—हरिश्चंद्राच्या कुलांतील गर राजाचें राज्य घेणाऱ्या राजांपैकीं एक. याला गराचा मुलगा सगर यानें जिंकून दाढी राखण्याच्या अटीवर सोडून दिलें ( पद्म. उ. २० ).

**पाक**—इंद्रानें मारिलेला एक असुर. याच्यामुळेंच इंद्रास पाकशासन हें नांव मिळालें ( भा. ७. २. ४; ८ ११. २२ ).

**पाकस्थामन् कौरयाण**—मेध्यातिथि काण्वानें याच्या औदार्ययुक्त देणगीचा गौरव केला आहे ( ऋ. ८. ३. २१-२४ ).

**पाचि**—( सो. पूरु. ) मत्स्यमतें नहुषाचा पुत्र.

**पांचजनी**—असिक्नीचें नामांतर.

**पांचाल**—दुर्मुख व शोण यांना पंचाल देशचे राजे म्हणून हा शब्द लावला आहे. केवळ ह्याच शब्दाचाहि उपयोग केलेला आहे ( जै. उ. ब्रा. ३. २९. १ ).

पांचाल देशाच्या राजाचा केवळ पांचाल ह्या शब्दानेंहि निर्देश करितात. पांचाल देशाचे दक्षिण व उत्तर असे गंगा नदीनें पडलेले दोन भाग आहेत व त्यांच्या दोन वंशावळीहि आहेत. दक्षिणेकडे राज्य करणाऱ्या वंशाला अजमीढवंश म्हणतात व उत्तरेकडे राज्य करणाऱ्या वंशाला नीलवंश म्हणतात.

२ ऋग्वेदाचा क्रमपाठ प्रथम बाभ्रव्य गोत्रांतील पांचालानें रचला ( म. शां. ३५२. ३६-३८ कुं.; पितृवर्तिन् पहा ).

**पांचालचंड**—संहितेचा तत्त्वज्ञानपर अर्थ लाविनांना वाच् ही संहिता होय. असें याचें मत आहे ( ऐ. आ. ३. १. ६ ).

**पांचाली**—द्रुपदाची कन्या द्रौपदी ( आ. १. ७. ३८ ).

**पांचाल्य**—आरुणि नांवाचा ऋषि ( म. आ. ३. १७ कुं. ).

**पांचि**—सोमयज्ञांत वेदि तीन अंगुळें करण्याचा प्रघात यानें सुरू केला ( श. ब्रा. १. २. ५. ९ ). आणखीहि उल्लेख आहे ( श. ब्रा. २. १. ४. २७ ).

**पाटल**—एक वानर. राम बिभीषणाच्या भेटीकरितां लंकेकडे चालला असतां, मध्यंतरीं किष्किंधा नगरीपाशीं उतरला होता. त्या वेळीं हा मोठ्या उत्सुकतेनें त्याच्या दर्शनास आला होता ( पद्म. सृ. ३८ ).

**पाटव**—चाक्राचें पैतृक नांव.

**पाटिक**—श्यामपराशरकुलोत्पन्न ऋषि.

**पाठक**—काश्यपास ( कण्वास ) आर्यावतीपासून झालेला तृतीय पुत्र ( भवि प्रति. १. ६ ). सरस्वती कन्येपासून याला सोळा पुत्र झाले. हे गोत्रकार होते. कश्यम, भारद्वाज, विश्वामित्र, गोतम, जमदग्नि, वसिष्ठ, वत्स, गौतम, पराशर, गर्ग, अत्रि, भृगु, अंगिरा, शृंगी, कात्यायन व याज्ञवल्क्य हीं त्यांचीं नांवें होत ( भवि. प्रति. ४. २१ ).

**पाड्क**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें हिरण्यनाभाचा शिष्य. ब्रह्मांडमतें मांडूक असा पाठभेद आहे.

**पाणिक**—अंगिराकुलांतील एक ऋषि.

**पाणिन**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**पाणिनि**—हा पाणिपुत्र पाणिन ऋषीचा पुत्र. याच्या आईचें नांव दाक्षी. याचें गांव शालातुर ( पा. सू. ४. ३. ९४. ). याच्या गुरूचें नांव वर्ष. हा प्रथम जडबुद्धि होता. त्यामुळें इतर मित्र याची थट्टा करीत तेव्हां कंटाळून हा हिमालयावर गेला व तेथें शंकरापासून याला एक व्याकरण प्राप्त झालें. तेंच सध्याचें पाणिनीय व्याकरण होय. वररुचि, व्याडि वगैरे याचे सहाध्यायी होत ( कथासरित्सागर ४७. ७०-७५ ). शेषानें पाणिनीला विद्या दिली असाहि निर्देश आहे ( ब्रह्मवै. प्र. ४ ). कात्यायन कणाद वगैरेबरोबर पाणिनीचा उल्लेख आहे ( ब्रह्मवै. ग. २३. १४ ). विश्वामित्राच्या कुलांतील गोत्रकारांत एक पाणिनि आहे ( मत्स्य. १९८ ). हे सर्व एक असण्याचा संभव आहे.

याचें व्याकरण आठ अध्याय असल्यामुळें अष्टाध्यायी या नांवानें प्रसिद्ध आहे. याशिवाय गणपाठ, धातुपाठ लिंगानुशासन हेहि ग्रंथ याचेच होत. शिक्षा याच्या एखाद्या अनुयायानें लिहिली असावी. शिवाय पातालविजय(जांबवती विजय) नांवाचें एक नाटकहि याचे नांवावर मोडतें. याच्या अष्टाध्यायीचें महत्त्व अपूर्व आहे. हा ग्रंथ अत्यंत प्राचीन असूनहि क्लिष्ट पण थोडक्यांत आहे. कात्यायन, पतंजलि व काशिकाकार यांनीं त्यावर विस्तृत ग्रंथ करून तें पूर्ण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वत्र अबाधित प्रसार असल्यामुळें हें व्याकरण ज्याला

परिचित नाहीं त्याला पदोपदीं अडचण भासते. इतका याचा संस्कृत वाङ्मयाशीं तादात्म्यसंबंध आहे.

याचे गणपाठादि ग्रंथ नित्य पठनपाठनांत नसल्यामुळें व त्यांवर भाष्यवार्तिकादिकांनीं विशेष लक्ष न टाकिल्यामुळें शुद्ध स्वरूपांत राहिलेले नाहींत.

पाणिनीच्या सूत्रांत खालील देशांचा निर्देश आहे. कंबोज (४. १. १७५), मद्र (४. २. १०८; ७. ३. १३), कारस्कर (६.१.१५६), कापिश्या=काबूल (४. २. ९९), वाह्लीक (४. २. ११७), उशीनर (४. २. ११८), साल्वेय, गांधार (४. १. १६९), साल्व (४.१. १७३; २.७६), युगंधर, त्रिगर्त (४.२. १३०; ५. ३. ११६), प्रत्यग्रथ, कलकूट, भर्ग व यौधेय (४. १. १७३; १७८), मगध, कलिंग, सूरमस (४. १. १७०), कोसल (४. १.१७१), कुरु (४. १. १७२; १७६; २. १३०), अवंति, कुंति (४. १.१७६), सौवीर (४. २. ७६), भौरिक्य, ऐषुकाय (४. २. ५४), धूम (४. २.१२७). पंजाबमधील बारीकसारीक निर्देशांवरून त्या प्रांताशीं पाणिनीचा निकट परिचय दिसतो (४. २. ७४-७७). पाणिनि प्राचाम् (४. १. १७) व उदीचाम् (४. १. १५३) असा निर्देश करितो. त्याचा अर्थ पुढील सांप्रदायिक श्लोकांत स्पष्ट केला आहे.

प्रागुदञ्चौ विभजते हंसः क्षीरोदके यथा। विदुषां शब्दसिध्यर्थं सा नः पातु शरावती (काशिका १. १. ७५)॥ शरावत्यास्तु योऽवधेः। देशः प्राग्दक्षिणः प्राच्यः उदीच्यः पश्चिमोत्तरः (अमरकोशः ५७०).

पाणिनीच्या सूत्रांत खालील गांवांचा उल्लेख आहे. विपाशा (४. २. ७४), संकल (४. २. ७५), सुवास्तु (४.२. ७७), अजस्तुन्द, कास्तीर (६.१.१५५).

वर्णु नदाचा उल्लेख आहे (४. २. १०३).

याच्या ग्रंथांत खालील आचार्यांचीं मतें नमूद केलीं आहेत. चाक्रवर्मन् (६. १. १३०), भारद्वाज (७. २. ६३), काश्यप (८. ४. ६७), आपिशलि (६. १. ९२); गार्ग्य, गालव (६. ३. ६१; ७. १. ७४; ३. ९९; ८. ३. २०; ४.६७), शाकटायन (३. ४. १११; ८. ३. १८; ४. ५०), शाकल्य (१.१. १६; ६.१.१२७; ८. ३. १९; ४. ५१), सेनक (५. ४. ११२), स्फोटायन (६. १. १२३).

याच्या ग्रंथांत पुढील वेदांच्या शाखाप्रवर्तकांचा उल्लेख आहे.

१ अश्वपेज, २ उख, ३ कठ, ४ कठशाठ, ५ कलापिन्, ६ कषाय (कशाय, का.), ७ काश्यप, ८ कौशिक, ९ खंडिक, १० खाडायन, ११ चरक, १२ छगल, १३ तल, १४ तलवकार, १५ तित्तिरि, १६ दंड, १७ देवदर्शन, १८ देवदत्तशठ, १९ पुरुषांसक (पुरुषासक), २० रज्जुकंठ, २१ रज्जुभार, २२ वरतंतु, २३ वाजसनेय, २४ वैशंपायन, २५ शापेय, २६ शाष्पेय (शाखेय, का.), २७ शार्ङ्गरव (सांगर, का.), २८ शौनक, २९ सापेय, ३० स्कंद, ३१ स्कंध, ३२ स्तंभ (स्कंभ, का.) (पा. सू. ४. ३. १०२-१०९ गणासहित)

यांपैकीं फक्त तलवकार व वाजसनेय ब्राह्मण उपलब्ध आहेत. इतरांचे काय ग्रंथ होते हें सांगणेंहि अशक्य आहे.

उलप, तुंबरु व हरिद्रु हीं नांवें काशिकेंत अधिक आहेत.

याशिवाय खालील ग्रंथांचा पाणिनीच्या सूत्रांत निर्देश आहे. छन्दस् (१. २. ३६ इ.), निगम (७. २. ६४), मंत्र (२. ४. ८०), ऋच् (४. १. ९), यजुस् (६. १. ११७), काठक (७. ४. ३८), साम (१. २. ३४), आथर्वणिक (६. ४. १७४), संहिता (१. २. ३९), ब्राह्मण (२. ३. ६०), उपनिषद् (१. ४. ७९), अनार्ष (१. १. १६), क्रमपद-शिक्षामीमांसा (४ २. ६१), अनुब्राह्मण (४. २.६२), अनुप्रवचनादि (५. १. १११), भिक्षुनटसूत्र (४. ३.११०). आरण्यक हा वैदिक ग्रंथविभाग पाणिनीला माहीत नसल्यानें पाणिनीचा काल बराच प्राचीन ठरतो (४ २. १२९).

याशिवाय कर्मन्द व पाराशर्य यांनीं केलेलीं भिक्षुसूत्रें, कृशाश्व व शिलालिन् यांनीं केलेलीं नटसूत्रें व त्यांचे अनुयायी प्रसिद्ध होते (४. ३. ११० १११).

भक्तिसंप्रदाय पाणिनीच्या वेळीं मान्य असून वासुदेवार्जुन ऊर्फ नरनारायण यांची उपासना सुरू होती व क्षत्रियजाती-पलीकडील ईश्वरभाव त्यांचे ठिकाणीं आला होता (पा. सू. ४. ३.९५; ९८).

पाणिनीच्या वेळीं आढक व खारी हीं मापें होतीं (पा. सू. ५. १. ३३; ५३).

संवत्सर, परिवत्सर हीं कालपरिमाणें होतीं (पा. सू. ५. १. ९२).

शेवटीं पाणिनीला सिंहानें मारिलें (पंचतंत्र). पण त्याला दुजोरा नाहीं.

आजपर्यंत पाणिनीच्या कालनिर्णयाचे प्रयत्न पुष्कळ लोकांनीं केले आहेत. त्यांपैकीं कै. वि. का. राजवाडे व त्र्यं. गु. काळे यांचे प्रयत्न विशेष ध्यानांत घेण्यासारखे आहेत. कै. राजवाडे यांनीं इ. स. पू. १२००-९०० असा काळ ठरविला आहे. पण कै. काळे यांनीं पिंगल हा पाणिनीचा भाऊ होता व तो जनमेजयाच्या सर्पसत्रांत सदस्य होता. जनमेजय व वैशंपायन यांचा पाणिनीनें निर्देश केला आहे. यावरून हा त्यानंतर थोड्याच

दिवसांत झाला असावा असा तर्क केला आहे. पण यामुळें पाणिनीचा काळ इ. स. पू. ७०० पर्यंत नक्की मागें गेला, असें शास्त्रज्ञ मानितात ( भा. इ. सं. मं. इतिवृत्त १८३२; पुराणनिरीक्षण पा. २९१ ).

पाणिनि हा यास्काच्याहि पूर्वीचा आहे, असें परः संनिकर्षः संहिता ( नि. १. १७; पा. सू. १. ४. १०९ ), पृषोदरादीनि यथोपदिष्टम् ( पा. सू. ६. ३. १०९ यावरील भाष्य ) व एके शब्दांनीं निर्दिष्ट मतें इत्यादिवरून कांहीं लोक मानितात ( निरुक्तसमालोचनं पा. ११० पहा ).

पितृशर्मन्‌चें विष्णुयशस्कन्या ब्रह्मचारिणीशीं लग्न झालें ब्रह्मचारिणीला ऋच्, यजुस्, सामन् व अथर्वन् असे चार पुत्र झाले. या चारांना अनुक्रमें व्याडि, मीमांस, पाणिनि व वररुचि असे पुत्र झाले. यांपैकीं पाणिनीचा मागधेश चंद्रगुप्ताच्या सभेंत काणभूतीच्या प्रशिष्यांनीं पराजय केला. म्हणून पाणिनीनें अठ्ठावीस दिवस तप करून शंकराकडून 'अइउण्' वगैरे शिवसूत्रें मिळविलीं ( भवि. प्रति. ४. ३०-३१ ). परंतु या माहितीला ऐतिहासिक महत्त्व नाहीं. तसेंच पाणिनिकुलांत शलंकाला दाक्षीपासून झालेला हा पुत्र असून याचें नांव आह्निक असें होतें. पाणिनि या कुलनामानें याची प्रसिद्धि झाली. ही त्रिकांडशेष व केशव यांवरून माहिती मिळते. हरचरित चिंतामणीच्या सत्ताविसाव्या सर्गांत नंदाच्या पाटलिपुत्रांत शंकरस्वामीच्या वर्ष नांवाच्या मुलापासून हा विद्या शिकला अशी माहिती मिळते.

**पांड**--कण्वाचा पुत्र. यास सरस्वतीकन्येपासून सोळा पुत्र झाले. ते गोत्रकार होते ( भवि. प्रति. ४. २१; पाठक पहा ).

**पांडर**--सर्पसत्रांत दग्ध झालेला ऐरावत कुलांतील एक सर्प ( म. आ. ५७. ११ कुं. ).

**पांडु**--( सो. कुरु. ) हा हस्तिनापूरचा राजा होता. शंतनुपुत्र विचित्रवीर्य हा लवकर मेल्यामुळें त्याची पत्नी अंबालिका निपुत्रिक होती. तेव्हां तिची सासू सत्यवती, व्यासाची आई, हिनें तिला ज्येष्ठ दीर व्यास याच्यापासून तूं पुत्रोत्पादन करून घे, असें सांगितलें त्याप्रमाणें कोणी राजा नसल्यानें सत्यवतीनें व्यासास अंबालिकेपासून पुत्रोत्पादन करण्याची आज्ञा केली. ती मातृआज्ञा प्रमाण मानून व्यास विद्रूप रूप घेऊन अंबालिकेच्या मंदिरांत गेला. तेव्हां तिचा मुखचंद्र भीतीनें पांढरा फटफटीत झाला. तें पाहून 'तूं पांढरी झालीस, म्हणून तुझा मुलगा पांढ्या रंगाचा होईल व त्याचें नांवहि पांडु असेंच ठेवतील,' असें तिला व्यास म्हणाला. पुढें अंबालिका प्रसूत होऊन तिला पांढरा परंतु देदीप्यमान पांडु या नांवाचा मुलगा झाला ( म. आ. १. १३०; ६३; ६४. १५५; स. ८. २५; वि. ५३. १७ कुं. ).

पांडूचें भीष्मानें पुत्रवत् पालन केलें. त्यानें सर्व संस्कार यथाशास्त्र करून याकडून ब्रह्मचर्यास विहित अशीं व्रतें व अध्ययन करविलें. हा श्रुतिस्मृतींमध्यें पंडित व व्यायामांत पटाईत झाला. चार वेद, धनुर्वेद, गदाखड्गयुद्धशास्त्र, गजशिक्षा, नीतिशास्त्र, इतिहास, पुराणें, कला व तत्त्वज्ञान यांमध्यें हा पारंगत झाला ( म. आ. ११८.१८-२० कुं. ).

कुंतिभोज राजानें आपली कन्या पृथा हिचें स्वयंवर केलें. तेथें कुंतीनें पांडूला वरिलें व तिच्यासह पांडु हस्तिनापुरी आला. नंतर पांडूचें दुसरें लग्न करावें, असें शांतनुपुत्र भीष्माच्या मनांत आलें आणि त्याप्रमाणें तो मंत्री, ब्राह्मण, ऋषि व चतुरंग सेना घेऊन मद्र राजाच्या नगराला गेला. तेव्हां वाह्लीकराजा शल्य त्यास सामोरा गेला. नंतर भीष्मानें त्याच्या बहिणीस पांडु राजाकरितां मागणी घातली. शल्यानें तें स्थळ पसंत केलें. परंतु आपल्या घराण्यांतील चाल पुरी केली पाहिजे, अशी त्याला अट घातली. त्या चालीप्रमाणें भीष्मानें सोन्याचे दागिने, सोनें व अनेक प्रकारचीं रत्नें शल्यास दिलीं. तसेंच हत्ती, घोडे, रथ, वस्त्रें, अलंकार, मणि, मोत्यें, प्रवाळ वगैरे देणग्या दिल्या. तें सर्व द्रव्य घेऊन शल्य संतुष्ट झाला आणि त्यानें आपली बहीण माद्री हिला यथास्थित अलंकार घालून भीष्माच्या स्वाधीन केलें. भीष्म माद्रीसह हस्तिनापुरीं आला. तेथें सुमुहूर्तावर पांडूनें तिचें पाणिग्रहण केलें ( म. आ. १२१-१२२ कुं. ).

धृतराष्ट्र आंधळा असल्यामुळें व विदुर शूद्र असल्यामुळें याला राज्याभिषेक होऊन हा हस्तिनापूरचा राजा झाला ( म. आ. ११८ कुं. ). माद्रीच्या पाणिग्रहणापासून एक महिन्यानंतर पांडु सर्व पृथ्वी जिंकण्याच्या उद्देशानें बाहेर निघाला. यानें बरोबर मोठें सैन्यहि घेतलें. प्रथम पर्वतांचा आश्रय करून राहणारे लुटारू दशार्ण यांना जिंकून त्यांचीं निशाणें व सैन्य यानें घेतलें. पुढें अनेक राजांना लुटून उन्मत्त झालेला मगधाधिपति दीर्घास त्याच्या राजवाड्यांत ठार करून त्याचा खजिना व वाहनें घेतलीं. पुढें मिथिलेच्या विदेहाला जिंकलें. अशाच रीतीनें काशी, सुह्म व पुण्ड्र या देशांत कौरवांचा झेंडा उभारला. नंतर सर्व पृथ्वीवरील राजांनीं यास राजेंद्र म्हणून मान्य केलें व पुष्कळ प्रकारचे नजराणे दिले. अशा तऱ्हेनें अनेक देश व राजे पादाक्रांत करून हा दिग्विजयी राजा हस्तिनापुरीं आला ( म. आ. १२२ कुं. ).

हा एकदां मृगयेसाठीं वनांत गेला असतां यानें मृगरूप धारण करून मैथुन करीत असलेल्या किंदम मुनीस मृग समजून त्याच्यावर बाण मारिले. त्यामुळें मुनीचा मैथुनभंग होऊन त्यानें

प्राणोत्क्रमण झालें. मरणापूर्वी त्यानें 'तूंहि मैथुनप्रसंगीं मरशील' असा पांडूस शाप दिला ( म. आ. १२३.७ कुं. ). त्यामुळें याला पश्चात्ताप व उपरति होऊन यानें वानप्रस्थाश्रम स्वीकारिला. याच्याबरोबर याच्या स्त्रियांनींहि तपाचरण करण्याची इच्छा दर्शविली. कुंती व माद्री यांसह तपश्चर्या करण्याचें ठरवून हा हिंडत हिंडत नागशत पर्वत, चैत्ररथवन, कालकूट, हिमालय व गंधमादन पर्वत या ठिकाणीं आला. तेथून इंद्रद्युम्न सरोवरावर गेला; व तेथून हंसगिरी पर्वत ओलांडून शतशृंग गिरीवर जाऊन तप आचरूं लागला ( म. आ. १२४ कुं. ).

एकदां कांहीं ऋषि ब्रह्मदेवाच्या भेटीस जाण्याकरितां निघाले. तेव्हां पांडुहि निघाला. पण ऋषींनीं 'तुला येतां येणार नाहीं,' असे यास सांगितलें. तेव्हां 'निपुत्रिकास स्वर्गप्राप्ति होत नाहीं; व मी तर निपुत्रिक आहें. शिवाय, मी जरी देव, ऋषि व मानव यांना तुष्ट केलें आहे, तरी पितरांना केलें नाहीं, अशा स्थितींत संततीकरितां मी काय करावें ? माझी जशी व्यासापासून उत्पत्ति झाली, तशी माझ्या स्त्रियांपासून होईल काय ?' असें त्या ऋषींस पांडूनें विचारिलें. ऋषींनीं 'उत्तम कर्मानें संतति येथेंच प्राप्त करून घे.' असें यांस सांगितलें. तेव्हां यानें कुंतीस पुत्रोत्पादन करण्यास सांगितलें. पुत्रांचे बारा प्रकार तिला सांगून स्वजातियापासून अगर श्रेष्ठ जातीपासून संतानप्राप्ति करून घेण्याची पूर्वी शारदंडायनीनें आज्ञा केल्याचें वृत्तहि सांगितलें. आणि पूर्वजांस व आपल्यास अधोगति न मिळावी, म्हणून तपोनिष्ठ ब्राह्मणांपासून पुत्रोत्पादन करण्यास सांगितलें. त्याचा कुंतीनें निषेध केला. तिनें भद्रेस व्युषिताश्व राजाच्या शवापासून पुत्र झाल्याचें सांगून त्याप्रमाणें पुत्रोत्पादन झाल्यास बरें असें दर्शविलें. तेव्हां पांडूनें 'पतीनें पुत्रोत्पादनासाठीं समागम करण्यास सांगितलें असतां, जी स्त्री त्याप्रमाणें वागणार नाहीं, तिला भ्रूणहत्येचें पातक लागेल' अशी उद्दालकपुत्र श्वेतकेतूची मर्यादा तिला सांगितली. या मर्यादेप्रमाणें सौदासानें आपली पत्नी दमयंती हिचा वसिष्ठाशीं समागम करवून अश्मक नांवाचा पुत्र प्राप्त करून घेतला. शिवाय 'माझा जन्म व्यासापासून झाला,' असेंहि पांडूनें कुंतीस निवेदिलें.

तेव्हां कुंतीनें दुर्वास ऋषीनें आकर्षक मंत्र दिल्याचें पांडूस सांगितलें. 'तो मंत्र जपून देवाचें स्मरण केलें कीं, मनोरथ पूर्ण होतील' असा दुर्वासानें वर दिलेलाहि तिनें निवेदिला. याप्रमाणें राजाज्ञेनें त्या मंत्राचें तीन वेळां स्मरण करून युधिष्ठिर, भीम व अर्जुन हे अनुक्रमें यमधर्म, वायु व इंद्र यांच्या समागमानें तिला पुत्र झाले. यानंतर पुत्रोत्पादन करण्याचें तिनें नाकारिलें कारण तो व्यभिचार होईल असें ती म्हणाली. पुढें राजाज्ञेनें कुंतीनें माद्रीस मंत्र दिला. तिला अश्विनीकुमारांच्या प्रभावानें नकुलसहदेव असे जुळे पुत्र झाले ( म. आ. १२६-१२९ कुं. ).

एकदां वसंत ऋतूंत हा भार्यांसह अरण्यांत हिंडूं लागला. तें सुशोभित अरण्य पाहून याच्या मनांत कामोद्भव झाला. माद्री एकटीच याच्या मागें चालली होती. यौवनावस्थेंत असलेल्या व पातळ वस्त्र परिधान केलेल्या माद्रीस पाहून ती नको नको म्हणत असतां तिच्याशीं बलात्कारानें यानें संग केला. परंतु पूर्वोक्त शापाप्रमाणें मैथुनप्रसंगीं यास मरण आलें व माद्रीनें सहगमन केलें. पांडवांनीं पांडु व माद्री यांचा प्रेतसंस्कार योग्य तऱ्हेनें केला (म. आ. १३४; १३६ कुं. ).

२ धातापुत्र ( वायु. १. २८ ).

३ ( सो. कुरु. ) पहिल्या जनमेजय पारीक्षिताचा पुत्र. यास धृतराष्ट्रादि सात भाऊ होते ( म. आ. १०१ ४४ कुं. ).

४ अंगिराकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**पांडुरोचि**—भृगुकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**पांड्य**—हा द्रविड देशचा राजा होता. यास चित्रांगदा नांवाची एक कन्या होती. याला प्रवीर, चित्रवाहन व मलयध्वज अशीं नांवें होतीं. हा भारतीय युद्धांत पांडवपक्षाकडे होता. याचा अश्वत्थाम्यानें वध केला ( म. क. २० ). हें घराणें तुर्वशापासून निघालें ( वायु. २. ३७. ६; ब्रह्मांड. ३. ७४. ६ ).

२ हा प्रदोषसमयीं शिवपूजा करीत असतां एक मोठा आवाज झाला. त्याबरोबर अर्धीच पूजा टाकून हा बाहेर आला व आलेल्या शत्रूच्या प्रधानाचा यानें शिरच्छेद केला. मागाहून शिवपूजा समाप्त न करितां यानें भोजन केलें. त्यामुळें पुढील जन्मीं हा सत्यरथ होऊन याला शाल्वानें ठार केलें ( शिव. रुद्र. ३१. ४७-५५ ).

**पातालकेतु**—जालंधर सेनेंतील एक असुर ( पद्म. उ. १२ ).

२ ( ऋतध्वज पहा ).

**पाथ्य**—वृषन्‌चें पैतृक नांव.

**पादप**—वसिष्ठकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**पादपायन**—( पालंकायन पहा ).

**पापनाशन**—दमन नामक शिवावताराचा शिष्य.

**पायु**—अंगिराकुलांतील एक ऋषि.

**पायु भारद्वाज**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ६. ७५. ८७ ). हा दिवोदासाचा आश्रित होता. ( अश्वथ पहा ). याचा आणखी एके ठिकाणीं उल्लेख आहे ( ऋ. ६. ४७. २४ ). याचें एक युद्धांतील शस्त्रास्त्राचें वर्णन करणारें व राजाला युद्धाकरितां सज्ज करणारें सूक्त आहे ( ऋ. ६. ७५ ). हें

अभ्यावर्तिन् चायमानाकरितां यानें म्हटलें आहे, असें बृहद्देवते-वरून दिसतें.

**पार**—( सो. पूरु. ) भागवत, विष्णु व मत्स्य यांच्या मतें पृथुसेनाचा; व वायुमतें पृथुषेणाचा पुत्र. मत्स्यांत याला पौर म्हटलें आहे. याच्या पुत्रास नीप अशी संज्ञा आहे.

२ ( सो. पूरु ) विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें समराचा पुत्र.

वंशावळ उलट क्रमानें पाहूं लागलें असतां भागवतांतील पार इतरांच्या विभ्राजाबरोबर येतो. म्हणून पारास विभ्राज नामांतर असावें अशी समजूत होते.

| भागवत | इतर पुराणें |
|---|---|
| पार | विभ्राज |
| नीप | अणुह |
| ब्रह्मदत्त | ब्रह्मदत्त |

पण सुलट क्रमानें पाहतां सर्व पुराणांत पार भागवतांतील पाराच्याच जोडीला येतो. नीपानंतर अणुहापर्यंतचे राजे भागवतांत गाळल्यामुळें हा घोटाळा होतो.

३ ( सो. अनु. ) विष्णुमतें अंगाचा पुत्र.

४ दक्षसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

**पारःकारिरेव**—पारिकारारिरेवबद्दल पाठभेद.

**पारण**—अगस्त्यकुलोत्पन्न गोत्रकार ऋषिगण.

**पारद**—हरिश्चंद्राच्या कुलांतील गर राजाचें राज्य जिंकणाऱ्यांपैकीं एक. याला गराचा मुलगा सगर यानें जिंकून याच्या डोक्याचे सर्व केंस काढून सोडून दिलें ( पद्म. उ.२० ).

**पारशवी**—देवराजाची कन्या व विदुराची बायको.

**पारशव्य**—तिरिंदिराचें पैतृक नांव.

**पारस्कर**—यानें पारस्करगृह्यसूत्र व स्मृति केली. कात्यायन व हा एक असावा.

**पारावत**—कोणी परवतच्या लोकांना पारावत म्हणत असें सायण म्हणतो. हे यमुनेच्या काठीं असत. यांचा पुरोहित तुरश्रवस् होता ( पं. ब्रा. ९. ४. १० ). यानें दिलेल्या देणग्यांचा वसुरोचिषूनें उल्लेख केला आहे ( ऋ. ८.३४.१८). पारावतघ्नी असें सरस्वतीला म्हटलें आहे ( ऋ. ६.६१. २ ).

२ हे बारा असून वासिष्ठ आहेत. अजिह्म, अजेय, आयु, दिव्यमान, प्रचेतस्, महाबल, महामान, दान, यज्वत्, विश्रुत, विश्वदेव व समंज ( ब्रह्मांड. २. ३६. १३-१५ ).

३ स्वारोचिष मन्वंतरांतील देवगण.

४ सर्पसत्रांत दग्ध झालेला ऐरावतकुलांतील एक सर्प ( म. आ. ५७. ११ कुं. ).

**पारावतसुत**—( सो. ) भविष्यमतें कमलांशूचा पुत्र.

**पाराशर**—पाराशरानें एकशेंसाठ श्लोकांनीं युक्त अशी पाराशरी शिक्षा लिहिली. ही शुक्लयजुर्वेदाची शिक्षा आहे. शुक्लयजुर्वेदाचे म्हटले जाणारे स्वर, अनुनासिक, विसर्ग वगैरेंचें सध्यां प्रचलित असल्याप्रमाणें वर्णन या शिक्षेंत आढळतें. याज्ञवल्की, वासिष्ठी, कात्यायनी, पाराशरी, गौतमी, मांडव्यी व पाणिनि या शिक्षांचा उल्लेख या शिक्षेंत सांपडतो ( श्लो. ७७-७८ ). त्यावरून ही शिक्षा बरीच अलीकडची असावी. ही शिक्षा म्हणणाराला वैष्णवपद मिळेल असें शेवटीं फळ सांगितलें आहे ( श्लो. १६९ ).

**पाराशरीकौंडिनीपुत्र**—गार्गीपुत्राचा शिष्य ( श. ब्रा. १४. ९. ४. ३० ).

**पाराशरीपुत्र**—कात्यायनीपुत्राचा (बृ. उ. ६. ५. १), औपस्वतीपुत्राचा ( बृ. उ. ६. ५. १. ), वात्सीपुत्राचा (बृ. उ. ६. ५. २), व वार्कारुणीपुत्राचा ( श. ब्रा. १४. ९. ४. ३१ ) हा शिष्य. याचे शिष्य भारद्वाजीपुत्र, औपस्वतीपुत्र व वात्सीपुत्र होत.

**पाराशर्य**—भारद्वाज, वैजवापायन व जातूकर्ण्य यांचा हा शिष्य ( बृ. उ. २. ६. २; ४. ६. ३ ). वैजवापायनाचा शिष्य असल्याबद्दल इतरत्र दुजोरा मिळतो ( तै. आ. १. ९. २ ). व्यास पाराशर्य हा विष्वक्सेनाचा शिष्य होता ( जै. उ. ब्रा. ३. ४१. १ ). याचे शिष्य पाराशर्यायण, सैतव, प्राचीनयोग्य व भरद्वाज हे होत. पाणिनीच्या सूत्रांत भिक्षुसूत्र करणाऱ्या पाराशर्याचा निर्देश आहे (४.३.११०).

२ युधिष्ठिराच्या सभेंतील एक ऋषि (म. स. ४.१९कुं).

**पाराशर्य कौथुम**—वायु व ब्रह्मांड यांच्या मतें व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील एक. हा कुथुमीचा शिष्य असावा.

**पाराशर्यायण**—हा पाराशर्याचा शिष्य व याचा शिष्य घृतकौशिक ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ).

**पारिकारारिरेव**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**पारिक्षित**—जनमेजयाचें पैतृक नांव. कांहीं मंत्रांना पारिक्षितिऋचा असें नांव आहे (ऐ. ब्रा. ६.३२; सां. ब्रा. ३०. ५; गो. ब्रा. २.६.१२). ते मंत्र अथर्ववेदांत आहेत(२०.१२७. ७-१० ). पारिक्षित पुढें नामशेष झाले असावेत. कारण, पुढें पारिक्षित कोठें आहेत याला आध्यात्मिक उपपत्ति जोडलेली आढळते ( बृ. उ. ३.३.१). हा शब्द पारिक्षित व पारीक्षित असा दोन्ही प्रकारें आढळतो.

**पारिजात**—नारदाबरोबर मयसभेंत आलेला एक ऋषि ( म. स. ५. १४ कुं. ).

२ पुलह व श्वेता यांचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ७. १८०-१८१ ).

**पारिप्लव**—रैवत मन्वंतरांतील भूतरजसांतील एक देवगण.

**पारिभद्र**—( स्वा. प्रिय. ) प्रियव्रतपुत्र यज्ञबाहूच्या सात पुत्रांतील पांचवा.

**पारियात्र**—( सू. इ. ) भागवतमतें अनीहाचा, वायुमतें अहीनगूचा, विष्णुमतें रुरूचा व भविष्यमतें कुरूचा पुत्र. यानें भविष्यमतें दहा हजार वर्षे राज्य केलें.

२ सर्पसत्रांत दग्ध झालेला ऐरावतकुलांतील एक सर्प ( म. आ. ५७. ११ कुं. ).

**पारुच्छेप**—अनानताचें पैतृक नांव.

**पार्णशल्क**—निगदाचें पैतृक नांव.

**पार्थ**—( अर्जुन व पार्थ्य पहा ).

**पार्थव**—( अभ्यावर्तिन् पहा ).

**पार्थिव**—अंगिराकुलांतील गोत्रकारगण.

**पार्श्रुश्रवस**— धृतराष्ट्राचें पैतृक नांव ( जै. उ. ब्रा. ४. २६. १५ ).

२ शांत्युदक करितांना कोणता मंत्र घ्यावा याविषयीं याचें मत आलें आहे ( कौ. सू. ९. १० ). मधुपर्क गाईनें करावा, असें हा म्हणतो ( कौ. सू. १७.२७ ).

**पार्थ्य**—रामानें याच्यापाशीं देणग्या मागितल्याचा उल्लेख आहे ( ऋ. १०. ९३. १५ पहा ). पार्थ्य नसून पार्थ आहे व तें तान्वाचें नांव आहे, असें सर्वानुक्रमणीवरून दिसतें. आश्वलायन श्रौतसूत्रांतहि पार्थच आहे ( १२.१०; तान्व पहा ).

**पार्वणि**—( कार्षणि पहा )

**पार्वति**—दक्षाचें पैतृक नांव.

**पार्वती**—हिमालय व मेना यांची कन्या. नारदाच्या सांगण्यावरून हिमालयानें ही शंकरास दिली. एकदां ही व शंकर क्रीडा करीत असतां हिनें शंकराचे नेत्र झांकिले. तेव्हां सोम, सूर्य व अग्नि हे शिवनेत्रांत राहत असल्यामुळें सगळीकडे अंधार पडून क्षय सुरू झाला. तेव्हां ऋषींच्या सांगण्यावरून यांनीं क्रीडा थांबविली. नंतर हिनें शंकराच्या सांगण्यावरून अरुणाचलावर तपश्चर्या केली. गौतमानें हिला अरुणाचलाचें माहात्म्य सांगितलें ( स्कंद. १. ३. ३-१२ ).

पूर्वी ही काळी असून अनरकेश्वर तीर्थांत स्नान करून तेथील लिंगापुढें दीपदान केल्यामुळें गौरवर्ण झाली ( स्कंद. ५. १. ३० ). हिनें गौरीव्रत निर्माण केलें व त्याचा महिमा धर्मराजास सांगितला ( भवि. ब्राह्म. २१ ).

एकदां ही कल्पवृक्षाखालीं बसून हिनें सुंदर स्त्रीची इच्छा केल्यामुळें अशोकसुंदरी उत्पन्न झाली. तिला पार्वतीनें आपली कन्या मानून 'तूं सोमवंशांतील नहुषाची पत्नी होशील,' असा वर दिला ( अशोकसुंदरी पहा ).

हिला अंगाच्या मळापासून गजानन व शंकरापासून कार्तिकेय हे पुत्र झाले. शिवाय बाण व वीरभद्र यांना हिनें पुत्र मानिलें होतें.

हिनें दुष्टांचा संहार करण्याकरितां देवांच्या विनंतीवरून अनेक अवतार घेतले व त्यांवरून हिला अनेक नांवें पडलेलीं आहेत ( दुर्गा व सती पहा ).

**पार्वतीय**—दुर्योधनाचा मामा शकुनि याचें नांव.

**पार्षत**—सुखखानि नांवानें दलवाहनास ब्राह्मीचे पोटीं झाला ( भवि. प्रति. ३.९ ).

**पार्षद्वाण**—हा प्रस्कण्वाचा आश्रयदाता होता. पुष्टिगूच्या सूक्तांत याचा उल्लेख आला आहे ( ऋ. ८. ५१. २ ).

**पार्ष्ण शैलन**—एक आचार्य (जै. उ. ब्रा. २. ४. ८).

**पार्ष्णि**—चेकितान राजाचा सारथि.

**पालक**—( प्रद्योत. भविष्य. ) प्रद्योताचा पुत्र. यानें मत्स्यमतें अठ्ठावीस, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें चोवीस वर्षे राज्य केलें.

**पालकाप्य**—यानें अंगराजाला हत्तींचा आयुर्वेद शिकविला ( अग्नि. २९२. ४४ ).

**पालंकायन**—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार. याबद्दल पादपायन असा पाठभेद आहे ( मत्स्य. २०० ).

**पालित**—( सो. क्रोष्टु. ) विष्णुमतें परावृताचा पुत्र ( परिघ पहा ).

**पालिशय**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**पावक**—(स्वा. उत्तान.) विजिताश्वाचा पुत्र. वसिष्ठाच्या शापानें मनुष्ययोनींत जन्मला ( भा. ४. २४. ४ ).

२ स्वाहेचे ठायीं अग्नीपासून झालेला पुत्र. व सूक्तद्रष्टा ( अग्नि व अग्नि पावक पहा ).

**पावकाक्ष**—रामसेनेंतील एक वानर (वा. रा. यु. ७३).

**पावन**—मित्रविंदेपासून कृष्णास झालेला पुत्र ( भा. १०. ६१. १६; ह. वं. २. १०३ ).

२ दीर्घतपा ऋषीचा कनिष्ठ पुत्र ( पुण्य पहा ).

**पावमान्य**—हे कांहीं ऋचांचे द्रष्टे आहेत ( ऐ. आ. २. २.२ ). आश्वलायनांच्या तर्पणांत यांचा उल्लेख आहे.

**पाशद्युम्न वायत**—पाशद्युम्नाचें वायत हें पैतृक नांव आहे. याच्या यज्ञांत गेलेल्या इंद्राला वसिष्ठानें आपल्या प्रभावानें सुदासाकडे आणिलें ( ऋ. ७. ३३. २ ).

**पाशिन्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**पाष्यजिति**—( पौषाजिति पहा ).

**पिंग**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**पिंगल**—वेदांग छंदःशास्त्र यानें केलें यालाच पिंगलाचार्य किंवा पिंगलनाग असें म्हणत (भट्ट हलायुधटीका). पण सध्यां उपलब्ध असणाऱ्या छंदःशास्त्रांत लौकिक व वैदिक असे दोनहि छंद सांगितले आहेत. वैदिक छंद फक्त चवथ्या अध्यायाच्या सातव्या सूत्रापर्यंत सांगितले आहेत. पण वैदिकाचा सांप्रदाय लौकिकछंदांसुद्धां वेदांग मानण्याचा आहे. छंदःशास्त्रकर्ता पिंगल हा पाणिनीचा अनुज म्हणजे धाकटा भाऊ होता, असें पिंगलकृत पण पाणिनीय व वेदांग म्हणून प्रसिद्ध असलेल्या शिक्षेवरील भावप्रकाश टीकेच्या आरंभीं लिहिलें आहे. सर्वानुक्रमावरील भाष्यांतहि षड्गुरूनें तसाच उल्लेख केला आहे (परिभाषा ७. ९). पण प्राकृतापर्यंत पिंगलाचा संबंध दिसत असल्यामुळें हें बरोबर वाटत नाहीं. भाष्यकार पतञ्जलि व पिंगल हे एक असण्याचीहि शक्यता दिसत नाहीं. कारण प्राकृताचा उदय इसवी सनानंतर मानितात.

पिंगलाच्या छंदःशास्त्रांत खालील आचार्यांचा उल्लेख आढळतो. क्रौष्टुकि (३. २९), यास्क (३. ३०), ताण्डिन् (३. ३६), आग्निवेश्य, काश्यप, गौतम, आंगिरस, भार्गव, कौशिक, वासिष्ठ (३.६६), सैतव (५. १८), रात व माण्डव्य (७. ३४).

२ सूर्यवरानें मत्त होऊन दैत्यांनीं देवांना त्रास देण्याचा उपक्रम सुरू केला. तेव्हां त्या दैत्यांचा नाश व्हावा, एतदर्थ ब्रह्मादि देवांनीं एकत्र जमून जे अठरा विनायक नांवाचे सशस्त्र अनुचर सूर्याजवळ ठेविले, त्यांपैकीं हा एक आहे. सूर्याचे दक्षिण बाजूला अग्नीची योजना केली. हा अग्नि पिंगल असल्यामुळें याला वरील नांव मिळालें (साम्ब. १६; भवि. ब्राह्म. ५६; ७६; ११७).

३ पुरुकुत्स नगरांत हा आचारहीन ब्राह्मण राहत असे. याची स्त्री व्यभिचारिणी असल्यामुळें तिनें यास ठार मारिलें. पुढें ती मेल्यावर तिला पोपटिणीचा व यास गिधाडाचा जन्म प्राप्त झाला. पूर्व वैर स्मरून यानें तिला ठार मारिलें. ती एका कवचींतील पाण्यांत पडली. पुढें एका व्याधानें या गिधाडास ठार मारिलें, तेव्हां हाहि त्या कवचींतील पाण्यांत पडला. ती कवची बटु नामक गंगातीरीं राहणाऱ्या व गीतेचा पांचवा अध्याय पाठ करणाऱ्या शुचिर्भूत ब्राह्मणाची असल्यामुळें या दोघांस पितृलोक प्राप्त झाला (पद्म. उ. १७९).

४ भीमनामक व्याध उत्सवाप्रीत्यर्थ शिकार करीत होता; त्याच्यामागें पिंगल नामक एक राक्षस लागला. तेव्हां भीम शमीच्या झाडावर चढत असतां खालीं असलेल्या गणपतीवर शमीची डहाळी सहज पडली. त्यामुळें दोघांचा उद्धार झाला (गणेश. २. २६).

५ कद्रूपुत्र सर्प.

६ भृगुकुलांतील एक ऋषि. हा जनमेजयाच्या सर्पसत्रांत सदस्य होता (म. आ. ५३. ६ कुं.).

७ सूर्याचा एक अनुचर व लेखक (भवि. ब्राह्म. ५६, ७६; १२४).

८ आपल्या सर्व कन्यांचे विवाह केल्यावर ब्रह्मदेवानें अकरा पुत्र निर्माण केले. ते एकादश रुद्र होत. त्यांपैकीं एकाचें नांव (पद्म. सृ. ४०). यासच शिवपुराणांत कश्यप व सुरभि यांचा पुत्र म्हटलें आहे (शिव. रुद्र. १८).

**पिंगलक**—एक यक्ष (म. स. १०. १८ कुं.).

**पिंगला**—अवंति नगरींतील एक वेश्या. मंदर नांवाचा ब्राह्मण हिच्यावर आसक्त होता. ऋषभयोग्याची सेवा केल्यामुळें मेल्यावर ही चंद्रांगद राजाच्या सीमंतीनी स्त्रीच्या उदरीं जन्मली व कीर्तिमालिनी नांवानें प्रसिद्ध होऊन भद्रायूची पत्नी झाली (भद्रायु पहा).

२ मिथिला नगरींतील एक वेश्या. एके दिवशीं ही नेहमींप्रमाणें परपुरुषाची मार्गप्रतीक्षा करीत बसली असतां मध्यरात्रींपर्यंत कोणीहि न आल्यामुळें हिला वैराग्य उत्पन्न होऊन ही ईश्वरप्राप्तीला अधिकारी झाली (भा. ११. ८). अवधूतानें हिला गुरु केलें होतें (भा. ११. ७. ३४). हिची गोष्ट भीष्मानें युधिष्ठिराला सांगितली आहे (म. शां. १७३. ५९-६४ कुं.).

३ ही विषयोपभोगाच्या इच्छेनें रामाकडे गेली असतां, रामानें एकपत्नीव्रतामुळें हिचा स्वीकार न करतां 'तूं कृष्णावतारीं कंसाची कुब्जा नांवाची दासी झाल्यावर मी तुझा स्वीकार करीन' असें हिला आश्वासन दिलें. सीतेला हे कळल्यावर तिनें हिला 'तूं तीन ठिकाणीं वांकडी होशील' असा शाप दिला. परंतु हिनें उःशापाची याचना केली असतां सीतेनें 'कृष्ण तुझा उद्धार करील' असा उःशाप दिला (आ. रा. विलास. ८).

४ सूर्याची शक्ति व नासत्याची कनिष्ठ स्त्री. हिचे पति पुढें शूद्रयोनीमध्यें जन्म पावून एक सोमाची कन्या इडा हिचा पति व दुसरा पिंगलेचा पति झाले. पिंगलेचा पति रैदास नांवानें प्रसिद्ध झाला (भवि. प्रति. ४.१८).

**पिंगलाक्ष**—शिवाच्या रुद्रगणांतील एक.

**पिंगा**—(ऐतरेय पहा).

**पिंगाक्ष**—एक शबर. हा परोपकार करितांना मेल्यामुळें निर्ऋति लोकाचा अधिपति झाला (स्कंद. ४. १. १२).

२ मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**पिपच्छल**—सर्पसत्रांत दग्ध झालेला वासुकिकुलांतील एक सर्प (म. आ. ५७. ६ कुं.).

**पिजवन**—पैजवन असे सुदासाला पैतृक नांव लावण्यांत येतें ( ऋ. ७. १८. २२; २३; २५; ऐ. ब्रा. ८. २१ ) पण निरुक्तांत हा सुदासाचा बाप होता, असें म्हटलें आहे (२.२४). पिजवन व पंचजन एकच असा कांहींचा तर्क आहे.

**पिंजक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**पिठर**-वरुणसभेंतील एक असुर (म. स. ९. १७ कुं.).

**पिठरक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**पिठीनस**—याला इंद्रानें रजि नांवाची स्त्री दिली होती ( ऋ. ६. २६. ६ ).

**पिंडसेक्तृ**—सर्पसत्रांत दग्ध झालेला तक्षककुलांतील एक सर्प ( म. आ. ५७. ८ कुं. ).

**पिंडारक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

२ द्रौपदीस्वयंवरास आलेला एक यादव ( म. आ. २०१. २० कुं. ).

३ ( सो. वसु. ) मत्स्यमतें रोहिणीस व वायुमतें पौरवीस वसुदेवापासून झालेला पुत्र.

४ सर्पसत्रांत दग्ध झालेला धृतराष्ट्रकुलांतील एक ( म. आ. ५७. १७ कुं. ).

**पितरः**—ब्रह्मयाने देव उत्पन्न केले. पण देवांनीं यज्ञ करण्याचें नाकारिलें. तेव्हां ब्रह्मयानें देवांना शाप देऊन मूढ बनविलें. पण त्यामुळें लोकांचा नाश होऊं लागला म्हणून ब्रह्मयानें देवांना त्यांचे पुत्रांकडे जावयास सांगितलें. तेव्हां देव आपल्या पुत्रांकडे आले व त्यांनीं त्यांना प्रायश्चित्त विचारिलें. तेव्हां देवपुत्रांनीं देवांना प्रायश्चित्तें समजावून दिलीं. तीं ऐकून देव आपल्या मुलांना म्हणाले कीं 'असा बोध करणारे तुम्ही खरोखर पितर आहांत.' देव हे सत्यवाक् असल्यामुळें तेव्हांपासून देवपुत्र पितर या नांवानें प्रसिद्ध झाले व स्वर्गांत देवहि आपल्या पुत्रांची म्हणजे पितरांची उपासना करूं लागले ( वायु. २. १०; ब्रह्मांड. ३. ९ ). असे हे देव व पितर परस्परांचे पितर आहेत. पण हे ब्रह्मयाचे पुत्र असें सामान्यतः दिलेलें असतें ( विष्णु. १. ५. ३३ ). हे पितर दोन प्रकारचे आहेत. अमूर्त व मूर्त; देवदेव आणि संतानक ( सांतानिक ); भावमूर्ति व सूक्ष्ममूर्ति; दैवी व मानुष; स्वर्गस्थ व पातालस्थ अशीं निरनिराळ्या प्रकारचीं नांवें, त्यांचे उगम, आकार, दर्जा व वसतिस्थान यांवरून पडलीं आहेत. पहिल्या प्रकारांत तीन गण आहेत. त्यांस वैराज, अग्निष्वात्त व बर्हिषद अशीं नांवें आहेत. यांची उपासना देव करितात. दैत्य, यक्ष, राक्षस, किन्नर, गंधर्व, अप्सरा, भूतें, पिशाचें, सर्प आणि नाग हे फक्त कांहींच्या मतें बर्हिषदांची व कांहींच्या मतानें अग्निष्वात्तांची उपासना करितात. दुसऱ्याचे चार गण आहेत. हविष्मत् ( काव्य ), सुस्वधा ( उपहूत ), आज्यप, सोमप ( सुकाल ) अशीं यांचीं नांवें सांपडतात. यांची उपासना अनुक्रमें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र करितात.

भागवत, भारत व मत्स्य यांत सातहि गण दिलेले नाहींत व मार्कंडेयांत एकंदर ३१ दिले आहेत. अग्निष्वात्त, बर्हिषद, सौम्य, आज्यप, साग्नि, अनग्नि हे अंगिरस व स्वधा यांचे पुत्र. यांची स्त्री दक्षकन्या स्वधा व यांच्या मुली वयुना व धारिणी ( भा. ६. ६. १९ ). पितरांस पिंड संज्ञा आहे ( म. शां. ३५५.२० कुं.). यांचे अग्निष्वात्त फेनप, ऊष्मप, सुधावान् व बर्हिषद असे गण आहेत ( म. स. ८. ३० कुं.), हे देवांपेक्षां आद्य आहेत. अग्निष्वात्त हे पूर्व दिशेचे, बर्हिषद हे दक्षिणेचे, आज्यप पश्चिमेचे, व सोमप उत्तरेचे आहेत. विश्व, विश्वभुज्, आराध्य, धर्म, धन्य, शुभानन, भूतिद, भूतिकृत् व भूति या नांवाचा एक गण; कल्याण, कल्यताकर्ता, कल्यतराश्रम, कल्यताहेतु व अनघ यांचा एक गण; वर, वरेण्य, वरद, पुष्टिद, तुष्टिद, विश्वपाता, धाता हे एका गणांतील; महान्, महात्मा, महित, महिमावत् व महाबल येवढयांचा एक गण आणि सुखद, धनद, धर्मद व भूतिद यांचा एक, असे पांच गण होते. यांपैकीं शुभ्र रंगाच्या पितरांची उपासना विप्र, आरक्तांची क्षत्रिय, सुवर्णीयांची वैश्य व कृष्णांची शूद्र करितात ( मार्कं. ९२-९४ ).

वर जे सात गण दिले आहेत त्या प्रत्येक गणास एकेक स्वतंत्र लोक राहवयास आहे. विरजस् ( सत्य, सनातन ), वैभ्राज ( विरजस् ), सोमपथ ( सोमपद ), मरीचिगर्भ, कामग ( कामधुक् ), मानस ( सुमनस् ) व सनातन (स्वर्ग) हे ते लोक होत. या सर्वांस प्रत्येकीं एकेक मानस कन्या होती. त्यांचीं नांवें मेना, अच्छोदा, पीवरी, गो, यशोदा, विरजा ( अष्टका) व नर्मदा अशीं होतीं. या सात गणांचा सप्तर्षींशीं त्यांपैकीं कुणाचे तरी हे पुत्र आहेत असें सांगून संबंध दाखविलेला आहे. यांच्या दर्जांत " मानुषी पितर आपल्या धर्मकृत्यांनीं देवांच्या जोडीचे होतात. देवपितर पुढें आपल्या योगसाधनांनीं सनकादिक बनतात." असे फरक होऊं शकतात.

प्राचीनावीतीनें स्वधा म्हणून दिलेलें अन्न व सोम हे योगमार्गानें खातात. यांस गेंड्याचें मांस, भात, सांवे, साळी, जव, देवभात, मूग, उंस, पांढरीं फुलें, फळें, दर्भ, उडीद, साठकीचा भात, गाईचें दूध, तूप, मध हे पदार्थ फार आवडतात. मसूर, तागाचें बीं, पावटे, राजमाष, कुळीथ, कमळें, बेल, रुई, धोतरा, कडुनिंब, अडुळसा, शेळी व मेंढी यांचें दूध हीं यांस आवडत नसावींत. कारण हीं श्राद्धांस निषिद्ध आहेत. यांस लोभ, मोह व भय हे विकार होतात; पण शोक होत नाहीं. यांस होत असलेली इच्छा व्यक्त करितां

येत नाहीं. हे मनाच्या वेगानें व मनाप्रमाणें वाटेल तेथें जाऊं शकतात. यांचा स्वामी यम आहे. हे कल्पांतीं शापानें नष्ट होतात व उःशापानें कल्पारंभीं उत्पन्न होतात ( ब्रह्मांड. ३. ९-१०; वायु. २. ११; पद्म. सृ. ९; ह. वं. १. १६-१८; मत्स्य. १३-१५; १४१; १४४; १४७ ). पितृलोकांत जाण्याकरितां स्मशानचिति करण्यास सांगितलें आहे ( तै. सं. ५. ४. ११ ).

**पितामह**—एक स्मृतिकार. याच्या स्मृतींत विशेषतः व्यवहाराचा विचार केला आहे. स्मृतिचंद्रिकेंत आह्निक, व्यवहार व श्राद्ध या विषयांत याचीं वचनें घेतलीं आहेत. विश्वरूपानें शौचासंबंधीं याचें मत घेतलें आहे. वेदांगांसह वेद, मीमांसा, स्मृति, पुराण, न्यायशास्त्र हीं धर्मशास्त्रें आहेत असें याचें मत आहे ( अपरार्क ६०१; याज्ञ. १. ३ ). कोणतीहि तक्रार प्रथम ग्रामपंचायतीकडे जावी, अशा प्रकारें यानें बराच बारकाईनें विचार केला आहे. यानें बृहस्पतीचा उल्लेख केला आहे. म्हणून हा बृहस्पतीनंतर म्हणजे इ. स. ४००-७०० च्या दरम्यान होऊन गेला असावा.

**पितृ**—याची स्त्री दक्षकन्या स्वधा.

**पितृवती**—हिनें सूर्योपासना केली म्हणून हिला सात पुत्र झाले व रोज एक शेर सोनें मिळूं लागलें ( भवि. प्रति. ४. ७ ).

**पितृवर्तिन्**—कुरुक्षेत्रांतील कौशिक ब्राह्मणाच्या सात पुत्रांतील कनिष्ठ. याला स्वसृप ( खसृम ), क्रोधन, हिंस्र, पिशुन, कवि व वाग्दुष्ट असे भाऊ होते. हे सातहि बंधु गर्गाकडे शिष्यत्वानें राहिले होते. हरिवंशांत यांचा पिता कौशिक विश्वामित्र हा यांना शाप देऊन वेगळा झाल्यावर हे गार्ग्याचे शिष्य झाले, असें आढळतें. पुढें पितृनिधनानंतर मोठा दुष्काळ पडला. तेव्हां एके दिवशीं हे सात भाऊ गर्गाची कपिला गाय वत्सासहित अरण्यांत घेऊन गेले असतां क्षुधाशांतीस्तव यांनीं गाईला मारून भक्षिण्याचें ठरविलें. कवि व खसृम यांनीं या गोष्टीला विरोध केला; परंतु श्राद्धकर्मनिपुण पितृवर्तीनें सांगितलें कीं, ' जर गोवध करायचा असेल, तर पितृश्राद्धार्थ करावा; म्हणजे त्यायोगें गाईला सद्गति मिळून आम्हांला पाप लागणार नाहीं. ' हें याचें भाषण सर्वांना मान्य झाल्यावर यानें दोघां भावांना देवस्थानीं, तिघांना पितृस्थानीं व एकाला अतिथि म्हणून स्थापून स्वतः यजमान झाला आणि गाईचें प्रोक्षण करण्यांत आलें. संध्याकाळीं गर्गाश्रमीं परत आल्यावर वत्स गुरूच्या स्वाधीन करून धेनु व्याघ्रानें खाल्ल्याचें यांनीं त्याला सांगितलें.

कालांतरानें हे सातहि बंधु मरण पावल्यावर पूर्वीचें क्रूर कर्म व गुरूशीं केलेलें असत्य भाषण यांच्या योगानें दाशार्णांत व्याधकुलामध्यें जन्मले. या योनींतील यांचीं नांवें, निर्वैर, निर्वृत्ति, शांत, निर्मन्यु, कृति, वैधस व समावर्ती अशीं होतीं. पितृतर्पण केल्यामुळें हे या जन्मीं जातिस्मर असून यांनीं मातृपितृभक्तींत वैराग्यपूर्वक काल घालविला व अंतीं देहत्याग केल्यावर हे कालंजर पर्वतावर मृगयोनींत जन्मले. या योनींतील यांचीं नांवें पुढीलप्रमाणें होतीं. उन्मुख, नित्यवित्रस्त, स्तब्धकर्ण, विलोचन, पण्डित, घस्मर व नादी. अद्यापि, यांचीं पाऊलें कालंजर पर्वतावर उमटलेलीं दृष्टीस पडतात. हा कालंजरचा पर्वत म्हणजे बुंदेलखंडांत बांदा जिल्ह्यांत बदौसा तालुक्यांत असलेला कालंजरचा पर्वत असावा. तिसऱ्या जन्मीं हे शरद्वीपांत चक्रवाक पक्षी झाले. त्या वेळचीं यांचीं नांवें हरिवंश, पद्मपुराण व मत्स्यपुराण यांत अनुक्रमें पुढीलप्रमाणें आढळतात. निस्पृह, निर्मम, क्षांत, निर्द्वंद्व, निष्परिग्रह, निर्वृत्ति व निभृत; सुमना, कुसुम, वसु, चित्तदर्शी, सुदर्शी, ज्ञाता व ज्ञानपारग; आणि सुमना, कुमुद, शुद्ध, छिद्रदर्शी, सुनेत्रक, सुनेत्र व अंशुमान्. चवथ्या जन्मीं हे मानससरोवरावर हंसपक्षी झाले. त्या वेळचीं यांचीं नांवें हरिवंशांतच परंतु निरनिराळ्या अध्यायांत निरनिराळीं आढळतात. तीं पुढीलप्रमाणें. सुमना, शुचिवाच्, शुद्ध, पंचम, छिद्रदर्शन-सुनेत्र व स्वतंत्र. शिवाय, पद्मगर्भ, अरविंदाक्ष, क्षीरगर्भ, सुलोचना, उरुबिंदु, सुबिंदु व हेमगर्भ. पद्मपुराण व मत्स्य, पुराण यांत यांचीं हंसयोनि दिलेली नाहीं. परंतु या पुराणांतील चक्रवाक योनींतील यांचीं कांहीं नांवें व हरिवंशांत हंस-योनींतील प्रथम दिलेल्या सातांपैकीं कांहीं नांवें यांत बरेंच साम्य आढळतें.

पुढें हे सातहि बंधु मानससरोवरावर तपश्चर्या करीत असतां एके दिवशीं कांपिल्या नगरांतील पुरुकुलोत्पन्न नीपांचा राजा विभ्राज स्त्रीसहित तेथें येऊन क्रीडा करूं लागला. पद्मपुराणामध्यें अणुह राजा जलक्रीडेकरितां आलेला आढळतो. राजाची ती क्रीडा पाहतांच स्वतंत्र ( पितृवर्ती ), छिद्रदर्शन ( कवि ) व सुनेत्र ( स्वसृप ) यांना ऐश्वर्याविषयीं अभिलाषबुद्धि उत्पन्न झाल्यामुळें इतर भावांचा शाप मिळून यांपैकीं स्वतंत्र हा विभ्राजपुत्र अणुह व त्याची स्त्री कृत्वी यांच्या उदरीं ब्रह्मदत्त नांवानें जन्मला. या सात बंधूंनीं मारिलेली कपिला देवलकन्या होऊन सन्नति नांवानें याची स्त्री झाली; व यांच्या उदरीं विभ्राज राजानें विष्वक्सेन म्हणून जन्म घेतला. या ब्रह्मदत्ताला सर्व प्राण्यांच्या भाषा समजत असून, हा वेद-वेदांगनिपुण होता ( ब्रह्मदत्त पहा ). छिद्रदर्शन व सुनेत्र हे वत्स व बाभ्रव्य वंशांत जन्मून पांचाल (पांचाल्य, पांचिक ) व कण्डरीक नांवांनीं प्रसिद्ध होऊन ब्रह्मदत्ताचे मित्र झाले. यांचीं नांवें पद्मपुराणांत पुंडलीक व सुबालक आणि

मत्स्यपुराणांत कण्डरीक व सुबालक अशीं दिलीं असून हे मंत्रिपुत्र झाले. पैकीं पांचाल (कवि) हा ऋग्वेदामध्यें प्रवीण असून यानें आचार्यत्व पत्करिलें. यानें वेदांचा क्रम लावून देऊन व शिक्षा नामक ग्रंथ निर्माण करून योगाचार्य ही पदवी मिळविली. कण्डरीक हा सामवेद व यजुर्वेद यांत निष्णात असून यानें छंदोगत्व व अध्वर्युत्व स्वीकारिलें. उरलेल्या चौघांनीं कांपिल्य नगरींतच सुदरिद्र ब्राह्मणाच्या उदरीं धृतिमान्, सुमनस्, विद्वान् व सत्यदर्शी या नांवांनीं जन्म घेतला. मत्स्यपुराणांत यांचीं नांवें धृतिमान्, तत्त्वदर्शी, विद्याचंड व तपोत्सुक अशीं आढळतात. पुढें यांनीं अरण्यांत तपश्चर्या करण्याचा बेत ठरवून वृद्ध पित्याजवळ जाण्याविषयीं आज्ञा मागितली. परंतु तो यांना जाऊं देईना. तेव्हां यांनीं त्याला उपजीविकेकरितां ब्रह्मदत्त राजाकडे जाण्यास सांगून तेथें खालीं दिलेले श्लोक म्हणण्यास सांगितलें व हे चौघेहि बंधु तपश्चर्येला निघून गेले.

सप्त व्याधा दशार्णेषु मृगाः कालिंजरे गिरौ ॥
चक्रवाकाः शरद्वीपे हंसाः सरसि मानसे ॥ १ ॥
तेऽभिजाताः कुरुक्षेत्रे ब्राह्मणा वेदपारगाः ॥
प्रस्थिता दीर्घमध्वानं यूयं किमवसीदथ ॥ २ ॥

या श्लोकांत निरनिराळ्या ठिकाणीं फरक आढळतो.

हा श्लोक त्या ब्राह्मणानें ब्रह्मदत्ताकडे जाऊन म्हणतांच ब्रह्मदत्त, पांचाल्य व कण्डरीक यांना पूर्वजन्मांचें स्मरण होऊन हे मूर्च्छित पडले. नंतर त्या ब्राह्मणाला विपुल धन देऊन व विष्वक्सेनाला राज्याभिषेक करून ब्रह्मदत्त, स्त्री व प्रधान यांसहित तपश्चर्येला गेला.

या सात बंधूंनीं पित्रार्चन केल्यामुळें यांना प्राप्त झालेल्या सर्व योनींत जातिस्मरत्व राहून यांनीं उग्र तपश्चर्या केली. त्यामुळें उत्तरोत्तर यांना उच्च प्रतीचा जन्म प्राप्त होऊन अंतीं हे मोक्षाला गेले. या सर्व योनींत यांना पडलेलीं नांवें यांच्या कर्मानुरूपच होतीं. तथापि, सर्व ठिकाणीं यांच्या सर्वच योनि व नांवें आढळत नाहींत. शिवाय, त्या त्या जन्मांत प्राप्त झालेल्या नांवांमध्यें एकवाक्यता नसून द्विरुक्तीहि झालेली आढळते.

श्राद्धमाहात्म्याकरितां मार्कंडेयानें भीष्मास ही गोष्ट सांगितली असून श्राद्धसमयीं या कौशिकपुत्रांविषयीं श्लोक म्हटले जातात (ह. वं. १. २१-२४; मत्स्य. २०-२१; पद्म. सृ. १०).

**पितृवर्धन**—(सो.) भविष्यमतें श्राद्धदेवाचा पुत्र.

**पितृशर्मन्**—एक ब्राह्मण. ब्रह्मचारिणी ही याची पत्नी. याला ऋच्, यजुष्, सामन् व अथर्वन् असे चार पुत्र झाले (भवि. प्रति. २. ३०; पाणिनि पहा).

**पिनाकिन्**—एकादश रुद्रांतील एक (म. आ. ६७. २ कुं.). पिनाक धनुष्य धारण करण्यानें शिवास हें नांव प्राप्त झालें. यानें त्रिपुराचें भस्म करून शशमंडलाचें राज्य घेतलें (भवि. प्रति. ३. ८).

**पिप्पल**—मित्र नामक आदित्य व रेवती यांच्या तीन पुत्रांतील कनिष्ठ (भा. ६. १८. ६).

२ अगस्त्याचें द्वादशवार्षिक सत्र चालू असतां ब्राह्मण खाणारा एक राक्षस (ब्रह्म. ११८).

३ एक ब्राह्मण. सुकर्म्यानें याचा गर्वपरिहार केला (सुकर्मन् पहा).

**पिप्पलाद**—(पिप्पल + अद्) पिंपळाचीं फळें खाऊन जगलेला, अशी याची व्युत्पत्ति आहे.

भरद्वाज, गार्ग्य व आश्वलायन यांनीं पिप्पलादास अध्यात्मज्ञानासंबंधीं कांहीं प्रश्न विचारिले. तेव्हां यानें त्यांना एक वर्ष राहण्यास सांगितलें व नंतर प्रश्नांचीं उत्तरें दिलीं (प्रश्न. उ. १. १). अनेक ऋषींबरोबर याचा उल्लेख आला आहे (शिखा. उ. १). हा आंगिरस होता (ब्रह्म. उ. १). मोक्ष शास्त्राला पैप्पलाद म्हणण्याची पद्धत आहे (गर्भ. उ. ). अथर्ववेदाची पिप्पलाद नांवाची एक शाखा उपलब्ध आहे. या शाखेचा प्रवर्तक कदाचित् हाच असावा. व्यासाच्या अथर्वन्शिष्यपरंपरेंतील हा देवदर्शाचा शिष्य होता (व्यास पहा). अथर्ववेदाच्या या पैप्पलादसंहितेचा कांहीं भाग छापून प्रसिद्ध झाला आहे. याच्या आईबापांच्या नांवांमध्यें व हकीकतींत पुष्कळ फरक आहे. हा दधीचि ऋषीची भार्या प्रातिथेयी—वडवा किंवा गभस्तिनी नांवानें प्रसिद्ध असलेली—हिजपासून त्याला झालेला पुत्र. शिवाय, याच्या मातांचीं नांवें सुवर्चा व सुभद्रा अशींहि आढळतात. सुभद्रा ही दधीचीची दासी होती. यावरून हा दासीपुत्र असल्याचें सिद्ध होतें. अन्यत्र याज्ञवल्क्य व त्याची बहिण यांचा हा पुत्र दिला आहे. तथापि, दधीचि ऋषीचा हा पुत्र असल्याबद्दल प्रसिद्धि आहे. असो. दधीचि मृत झाला त्या वेळीं त्याची भार्या प्रातिथेयी किंवा सुवर्चा परठिकाणीं असून गरोदर होती. पति मृत झाल्याचें वर्तमान ऐकतांच तिनें मुद्दाम उदरविदारण करून गर्भ बाहेर काढला व तो पिंपळाच्या झाडाखालीं ठेवून ती सती गेली. त्या गर्भाचें वृक्षांनीं संरक्षण केलें. नंतर त्या गर्भांतून एक बालक बाहेर पडला. हाच पिप्पलाद होय.

पशुपक्ष्यांनीं याचें संरक्षण केलें व सोमानें याला सर्व विद्या शिकविल्या. नंतर आपल्या दुःखाला कारण शनि आहे, हें ओळखून यानें त्याला खालीं पाडिला. परंतु तो शरण आल्यामुळें त्याला ' बारा वर्षांच्या आंतील मुलांस

त्रास देऊं नकोस, ' असें सांगून सोडून दिलें. बारा ऐवजीं सोळा वर्षांचीहि मर्यादा घातलेली आढळते. गाधि, कौशिक व पिप्पलाद यांचें स्मरण केलें असतां शनीची पीडा होत नाहीं ( शिव. शत. २४-२५ ). पुढें याला आपल्या पित्याचा राग येऊन यानें एक कृत्या निर्माण केली व ती याज्ञवल्क्यावर सोडिली. तेव्हां याज्ञवल्क्य शंकरास शरण गेल्यामुळें शंकरानें तिचा नाश करून याज्ञवल्क्य व पिप्पलाद यांचें सख्य घडविलें ( स्कंद. ५. ३. ४२ ).

आपल्या आईबापांच्या मृत्यूला कारण देव आहेत, असें याला समजतांच त्यांचा सूड उगविण्याकरितां यानें शंकराची आराधना करून त्यापासून एक कृत्या निर्माण करविली व ती देवांवर सोडिली. परंतु शंकराच्या मध्यस्तीनें देवांशीं याचें सख्य झालें. अशीहि हकीकत आढळते. पुढें आपल्या आई-बापांस पाहण्याची याला इच्छा झाल्यामुळें देवांनीं याला स्वर्गांत दधीचीजवळ नेलें, तेव्हां दधीचीनें याला लग्न करण्यास सांगितलें. पुढें स्वर्गांतून परत आल्यावर यानें गौतमाच्या कन्येशीं लग्न केलें ( ब्रह्म. ११०.२२५ ).

एकदां हा पुष्पभद्रा नदीवर स्नानास चालला असतां याला अनरण्य राजाची कन्या पद्मा दिसली. यानें तिच्याकरितां मागणी घातली. तेव्हां शापभयानें अनरण्यानें ती याला दिली. तिजपासून याला दहा मुलें झालीं ( शिव. शत. २४-२५ ).

दधीचीनें जेथें देहत्याग केला, तेथें कामधेनूनें आपली दुधाची धार सोडिली. त्यास दुग्धेश्वर असें नांव पडून पिप्पलाद तेथें तपश्चर्या करीत असे. एकदां हा ध्यानस्थ बसला असतां कोलासुर नांवाचा दैत्य याला पीडा देण्याकरितां तेथें आला. तेव्हां याचा पुत्र कहोड यानें एक कृत्या निर्माण करून तिच्याकडून कोलासुराचा वध करविला. या ठिकाणास पिप्पलादतीर्थ असें नांव पडलें ( पद्म. उ. १५५;१५७ ). हा नर्मदेच्या कांठीं तपश्चर्या करीत असून तेथें पिप्पलादतीर्थ आहे ( स्कंद. ५.३.४२ ).

भीष्माच्या निर्याणसमयीं हा इतर मुनिगणांसमवेत तेथें होता ( म. शां. ४७ ).

२ परीक्षित् राजाकडे आलेला एक ऋषि ( भा १. १९. १० ).

**पिप्पलायन**—( स्वा. प्रिय. ) ऋषभदेवाच्या जयंती नामक स्त्रीचे ठायीं झालेल्या नऊ सिद्ध पुत्रांतील एक ( भा. ५.४. ११; ११.३.३५ ). हा भगवद्भक्त होता.

**पिप्पल्य**—कश्यपकुलांतील एक गोत्रकार.

**पिप्रु**—ऋजिश्वन्‌करितां इंद्रानें पिप्रूचा पराजय केला ( ऋ. १.१०१.१-२; ४.१६.१३ ). याचे कांहीं किल्ले होते ( ऋ. १. ५१.५; ६.२०.७ ). याला दास ( ऋ. ८.३२.२ ) व असुर ( ऋ. १०.१३८.३ ) असेंहि म्हटलें आहे. हा स्वतः काळा होता ( ऋ. १. १०१. १ ). याचा काळ्या लोकांशीं संबंध होता ( ऋ. ४.१६.१३ ).

**पिलि**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**पिशंग**—हा सर्पसत्रांत उन्नेता होता ( पं. ब्रा. २५. १५.३ ).

२ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

३ सर्पसत्रांत दग्ध झालेला धृतराष्ट्रकुलांतील एक सर्प ( म. आ. ५७. १७ कुं. ).

**पिशाच**—ऋग्वेदांत पिशाचि असा निर्देश आहे ( ऋ. १.१३३.५ ). या नांवाचे लोक पुलहापासून निर्माण झाले. हे लोक कोणच्या प्रांतांत राहत असत वगैरे ठरविलें पाहिजे ( मत्स्य. २०२; भूत पहा ). यांचा अधिपति रुद्र होय. हे राक्षसापेक्षां कमी दर्जाचे आहेत ( ब्रह्मांड. ३. ७. १६५ ).

**पिशाचि**—( पिशाच पहा ).

**पिशुन**—कौशिक ऋषीच्या सात पुत्रांतील एक. हा इतर बंधूंसहित शिष्यत्वानें गर्गाकडे राहिला होता (पितृवर्तिन् पहा).

**पीठ**—कृष्णानें मारिलेला नरकासुराचा सेनापति ( भा. १०. ५९. १४ ).

**पीडापर**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**पीतहव्य**—वीतहव्याचें नामांतर.

**पीतायुध**—( चारुपद पहा ).

**पीवर**—तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**पीवरी**—अग्निष्वात्त पितरांची कन्या व व्यासपुत्र शुकाची स्त्री. हिला कृष्ण, गौर, प्रभु, शंभु व भूरिश्रुत असे पांच मुलगे व कीर्तिमती नांवाची मुलगी अशीं अपत्यें झालीं. कीर्तिमती ही अणुहाची स्त्री व ब्रह्मदत्ताची आई होय ( ब्रह्मांड. ३. १०. ८०-८१ ). कृत्ति नांवाची कन्या व कृष्ण, गौर आणि शंभु असे पुत्र दिलें आहेत ( पद्म. सृ. ९; २ पुलह पहा ).

**पुंजिकस्थला**—एक अप्सरा ( म. आ. १३२.४६; स. १०.११ कुं. ). हीच शापामुळें अंजना झाली होती ( वा. रा. कि. ६६ ).

**पुंजिकस्थली**—वैशाखांत सूर्याबरोबर असणारी अप्सरा ( भा. १२. ११.३४ ).

**पुंडरीक**—( सू. इ. ) नभ राजाचा पुत्र. याला पुंडरिकाक्ष म्हणत ( पद्म. सृ. ८ ). याचा पुत्र क्षेमधन्वन्. भविष्यमतें नाभाचा पुत्र. यानें १०००० वर्षें राज्य केलें.

२ पातालांतील एक नाग ( बभ्रुवाहन पहा ).

३ यमसभेंतील एक सभासद ( म. स. ८.१४ कुं. ).

४ एक ब्राह्मण. याचा नारदाशीं सर्वोत्तमत्वाविषयीं संवाद झाला होता ( म. अनु. १८६. ३ कुं.; पद्म. उ. ८० ).

५ हा व अंबरीष हे दोघे मित्र होते. यांनीं अधर्माचरण केलें. पण पुढें उपरति होऊन यांनीं जगन्नाथाची आराधना केल्यामुळें यांना सगुणदर्शन होऊन मोक्ष मिळाला ( स्कंद. २.२. ४-५ ).

६ नागपूरचा नाग राजा ( पद्म. उ. ४७ ).

७ ( पितृवर्तिन् पहा ).

८ विदर्भ नगरांतील मालव नांवाच्या ब्राह्मणाचा भाचा. हा मोठा भगवद्भक्त असून प्रत्यक्ष विष्णु याच्या घरीं एक महिनाभर राहिला होता. याचा भाऊ भरत. तो अत्यंत दुर्वर्तनी असूनहि मेल्यावर यानें त्याचे उत्तर संस्कार केल्यामुळें त्याचा उद्धार झाला ( पद्म. उ. २१८-२१९ ).

**पुंडरिका**—कश्यप व मुनि यांची कन्या, एक अप्सरा.

**पुंडरिकाक्ष**—( १ पुंडरीक पहा ).

**पुंडलिक**— ( पितृवर्तिन् पहा ).

**पुंड्र**—( सो. अनु. ) बलीच्या सहा पुत्रांपैकीं एक ( अंग व बलि पहा ).

२ वसुदेवास सुतनूपासून झालेल्या दोन पुत्रांतील ज्येष्ठ.

३ व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य ( व्यास पहा ).

**पुण्य**—महेन्द्रावरील दीर्घतपस्चा पुत्र. याला पावन नांवाचा एक अज्ञानी भाऊ होता. मातापित्यांच्या मृत्यूनंतर यानें पावनाला उपदेश करून शोकमुक्त केलें ( यो. वा. ५. १९-२१ ).

२ ( सो. ऋक्ष. ) मत्स्यमतें पुण्यवानाचा पुत्र.

**पुण्यजन**—एक राक्षस. यानें ककुद्मिन् रैवताच्या गैरहजेरींत कुशस्थळी ( द्वारका ) आपल्या ताब्यांत घेतली होती. याच्या भीतीनें रैवताचे शंभर भाऊ देशोधडीस लागले व त्यांचे वंशज सर्वत्र पसरले ( विष्णु. ४. २. १-२ ).

२ प्रयागमधील दरिद्री वैष्णव. नारदानें 'हा भगवद्भक्त असून दरिद्री कां?' असा विष्णूस प्रश्न केला. तेव्हां विष्णूनें हा माझ्या प्रिय देवांस भजत नाहीं, असें उत्तर दिलें. नंतर विष्णूनें नारदाकडून ग्रास वर देवविला. याच्या पत्नीनें राज्ञीपद मागितलें. परंतु तिनें आपणांस सोडून राज्ञीपद मागितलें म्हणून यानें रागानें तिला कोल्ही बनविलें. परंतु पुत्राच्या इच्छेवरून नारदानें तिला पूर्ववत् केलें. नंतर शंकराच्या कृपेनें पुण्यजनाला वैभव प्राप्त झालें. हा १००० वर्षें जगला ( भवि. प्रति. ४. ११ ).

**पुण्यजनी**—मणिभद्राची स्त्री.

**पुण्यनिधि**—मथुरेचा चंद्रवंशीय राजा. यानें रामेश्वरीं तप केलें. तेव्हां विष्णु प्रसन्न होऊन सेतुमाधव नांवानें तेथें राहिला ( स्कंद. ३. १.५१ ).

**पुण्यवत्**—( सो. ऋक्ष. ) मत्स्यमतें वृषभाचा पुत्र. यास पुष्यवत् म्हटलें आहे.

**पुण्यशील**—गोदावरीकांठचा एक ब्राह्मण. यानें एकदां एका वंध्यापति ब्राह्मणाला श्राद्धाला बसविल्यामुळें याचें तोंड गाढवासारखें दिसूं लागलें. पण वेंकटाचलावरील स्वामितीर्थांत व आकाशगंगातीर्थांत स्नान केल्यानें हा पूर्ववत् झाला ( स्कंद. २. १. २२ ).

**पुण्यश्रवस्**—एक ऋषि. हा कृष्णभक्त असल्यानें नंदाच्या भावाच्या उदरीं लवंगा नांवाच्या गोपीच्या जन्माला आला ( पद्म. पा. ७२ ).

**पुत्र**—स्वारोचिष मनूचा पुत्र.

**पुत्रक**—(सो. ऋक्ष.) वायुमतें कुरूचा पुत्र. यास प्रजन असें नामांतर आहे.

**पुत्रप**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**पुत्रसेन**—एका माणसाचें नांव ( मै. सं. ४. ६. ६ ).

**पुत्रिकषेण**—( आंध्र. भविष्य. ) वायुमतें पांच सप्तकांनंतरचा राजा. यास पुरींद्रसेन, पुरीषभीरु व प्रविल्लसेन अशीं नांवें होतीं. यानें एकवीस वर्षे राज्य केलें.

**पुनर्दत्त**—एका आचार्याचें नांव ( सां. आ. ८. ८ ).

**पुनर्भव समाभाग**—( शुंग. भविष्य. ) हा मत्स्यमतें वज्रमित्राचा पुत्र.

**पुनर्वत्स काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ७ ).

**पुनर्वसु**—सोमाची पत्नी व दक्षाची कन्या.

२ ( सो. कुकुर. ) भागवतमतें दरिद्योताचा, वायु व विष्णु यांच्या मतें अभिजित्‌चा, व मत्स्यमतें नल किंवा नंदनोदकदुंदुभीचा पुत्र. याला आहुक व आहुकी अशीं दोन मुलें होतीं.

**पुनर्वसु आत्रेय**—यानें पृथ्वीवर प्रथम आयुर्वेदाची परंपरा सुरू केली.

**पुरंजन**—एक राजा. नारदानें प्राचीनबर्हीला उपदेश करितांना या राजाचें रूपक करून ब्रह्मज्ञान सांगितलें ( भा. ४. २५-२९ ).

**पुरंजय**—( सू. इ. ) विकुक्षिपुत्र. याला इंद्रवाह व कुकुत्स्थ अशींहि नांवें होतीं ( भा. ९. ५. ११ ).

२ ( सो. अनु. ) विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें सृंजयाचा पुत्र. मत्स्यपुराणांत याला वीर असें दुसरें नांव आहे.

३ ( सो. पूरु. भविष्य. ) मत्स्यमतें हा मेधावीचा पुत्र ( नृपंजय पहा ).

४ विंध्यशक्तीच्या पुत्रांपैकीं एक. विष्णुमतें किलकिलेंतील, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें मथुरेंतील नागवंशीय राजा.

५ ( सो. मगध. भविष्य. ) भागवतमतें जरासंधकुलांतील शेवटचा राजा. याचा प्रधान शुनक यानें पुरंजयाचा वध करून प्रद्योत वंशाची स्थापना केली ( भा. १२.१.२; रिपुंजय पहा ).

६ ( भविष्य. ) मागधवंशीय विश्वस्फूर्जि राजाचें नामांतर. हा पापबुद्धि असून पराक्रमी होता. याची राजधानी पद्मावती. गंगाद्वारापासून प्रयागपर्यंतचा प्रदेश याच्या राज्यांत होता. यानें पुलिंद, यदु व मद्रक हे दुसरे वर्ण स्थापन केले व वर्णाश्रमव्यवस्था नष्ट केली ( भा. १२. १. ३६-४० ). हा वंशावळींत नाहीं.

**पुरंदर**—वैवस्वत मन्वंतरांतील इंद्र ( इंद्र पहा ). यानें वास्तुशास्त्रावर एक ग्रंथ केला आहे ( मत्स्य. २५२ ).

**पुरय**—एक राजा. भरद्वाज एका सूक्तांत पुरयाकडून घोडे मिळाल्याचा उल्लेख करितो ( ऋ. ६. ६३. ९ ).

**पुराण**—एका ऋषीचें नांव ( क. सं. ३९. ७ ).

२ कुशिककुलांतील मंत्रकार. याला पूरण असेंहि म्हणतात.

**पुरीन्द्रसेन**—( आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें मंडुलकाचा पुत्र ( पुत्रिकषेण पहा ).

**पुरीमत्**—( आंध्र. भविष्य. ) भागवतमतें बहुसंज्ञक राजांतील गोमतीपुत्राचा पुत्र. यास पुलीमत् व पुलोम अशीं नांवें आहेत.

**पुरीषभीरु**—( आंध्र. भविष्य. ) भागवतमतें तलकाचा व ब्रह्मांडमतें पंचपत्तलकाचा पुत्र ( पुत्रिकषेण पहा ).

**पुरीष्य**—विधाता नामक आठवा आदित्य व क्रिया यांपासून झालेल्या पंचचित अग्नीचें नांव ( भा. ६. १८. ४ ).

**पुरु**—मयसभेंतील एक क्षत्रिय ( म. स. ४. ३३ कुं. ).

२ वसुदेव व सहदेवा यांचा पुत्र.

**पुरुकुत्स**—याला दौर्गह असें विशेषण लाविलें आहे. त्यावरून हा दुर्गहाचा पुत्र असावा ( ऋ. ४. ४२.८ ). याच्या बायकोचें नांव पुरुकुत्सानी. हा कांहीं कारणानें तुरुंगांत पडला असतां पुरुकुत्सानीला सप्तर्षींच्या कृपेनें अर्धदेव असा त्रसदस्यु नांवाचा पुत्र झाला. हा पूरूंचा राजा होता ( त्रसदस्यु पहा ).

२ ( सू. इ. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें मांधाता व बिंदुमती यांचा पुत्र. याची पत्नी नागकन्या नर्मदा. यानें नागशत्रु गंधर्वांचा निःपात केल्यामुळें ' तुझ्या स्मरणानें सर्पभय नष्ट होईल,' असा नागांनीं यास वर दिला होता ( भा. ९. ६. ३८; ९. ७. ३ ). हा यमसभेंत असे ( म. स. ८. १३ कुं. ). याला वसुद, त्रसदस्यु व अनरण्य असे तीन पुत्र होते. याला धर्मसेतु, मुचकुंद व शक्तमित्र हे भाऊ, शिवाय दुःसह नांवाचा पुत्र होता ( पद्म. सृ. ८ ) [illegible] मतें यास पुरुकृत् म्हटलें आहे.

३ अंगिराकुलांतील कुत्साचा प्रवर. हा मंत्रद्रष्टा होता. ( अंगिरा पहा ). यानें भविष्यमतें ३००० वर्षे राज्य केलें.

**पुरुकुत्स कान्य**—हा क्षत्रिय असून तपानें ब्राह्मण झाला होता ( वायु. २. २९. ११४ ).

**पुरुकुत्सानी**—पुरुकुत्साची स्त्री ( ऋ. ४. ४२. ९ ).

**पुरुकृत्**—( सू. इ. ) मत्स्यमतें मांधात्याचा पुत्र ( २ पुरुकुत्स पहा ).

**पुरुज**—( सो. नील. ) भागवतमतें सुशांतीचा पुत्र. विष्णु, वायु व मत्स्य यांत यास पुरुजानु म्हटलें आहे. यास पुरुजातिहि म्हटलेलें आहे ( ह. वं. १. ३२; ब्रह्म. १३. ९३ ).

**पुरुजाति व पुरुजानु**—( पुरुज पहा ).

**पुरुजित्**—( सू. निमि. ) भागवतमतें अज नामक जनक राजाचा पुत्र. याचा पुत्र अरिष्टनेमि.

२ ( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें रुचक राजाच्या पांच पुत्रांपैकीं ज्येष्ठ.

३ ( सो. कुकुर. ) वसुदेवाचा भाऊ आनक व कंका यांच्या दोन पुत्रांपैकीं कनिष्ठ ( भा. ९. २४. ४१ ).

४ श्रीकृष्ण व जांबवंती यांचा एक पुत्र.

५ कुंतिभोज राजाचा पुत्र व कुंतीचा भाऊ. भारतीय युद्धांत हा पांडवांकडे होता ( म. उ. १७२. २; भी. २५. ५ कुं. ). याच्या रथाचे अश्व इंद्रधनुष्याच्या रंगाचे असत ( म. द्रो. २३ ). याला द्रोणानें ठार केलें ( म. क. ३. २२ कुं. ).

**पुरुणीय शातवनेय**—शतवनीचा पुत्र. याचा व भारद्वाजाचा निकट संबंध होता ( ऋ. १. ५९. ७ ).

**पुरुंड**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**पुरुदम**—हा शब्द बहुवचनीं असून स्तोत्याचें नांव असावें ( अ. वे. ७७. ७३. १ ).

**पुरुद्वत्**—( सो. क्रोष्टु. ) मत्स्यमतें पुरुवसाचा व वायुमतें महापुरुवशाचा पुत्र.

**पुरुपंथ**—यानें भारद्वाजाला देणग्या दिल्या ( ऋ. ६. ६३. १० ).

**पुरुमाय्य**—याचा ऋग्वेदांत उल्लेख आहे ( ऋ. ८. ६८. १० ). सायणमतें हें प्रियमेधाचें विशेषण आहे.

**पुरुमित्र**—याची मुलगी कमद्यू ( ऋ. १. ११७. २०; १०. ३९. ७ ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

३ एक क्षत्रिय. भारतीय युद्धांत हा दुर्योधनपक्षाकडे होता ( म. भी. ५७. ३१ कुं. ).

**पुरुमिह्ळ आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ७१ ).

**पुरुमिह्ळ वैददश्वि**—( तरन्त पहा ).

**पुरुमिह्ळ सौहोत्र**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ४.४३; ४४ ). हाच पूरुवंशांतील पुरुमीढ असावा.

**पुरुमीढ**—( सो. पूरु. ) मत्स्य, वायु व भागवत यांच्या मतें हस्तीच्या व विष्णुमतें हस्तिनराच्या तीन पुत्रांतील कनिष्ठ. याला संतति नव्हती. भारतमतें भुमन्युपुत्र सुहोत्राचा हा मुलगा ( म. आ. १०१.१८ कुं. ). महाभारतांत मधल्या कांहीं पिढ्या गाळलेल्या आहेत.

**पुरुमेध आंगिरस**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८.८९-९०).

**पुरुयशस्**—पांचाल देशांत राज्य करणाऱ्या भूरियशाचा पुत्र. याजोपयाज हे याचे गुरु असून त्यांच्या उपदेशानें यानें वैशाखधर्माचें अनुष्ठान केल्यामुळें याला राज्यवैभव प्राप्त झालें ( स्कंद. २. ७. १५-१६ ).

**पुरुवस**—( सो. क्रोष्टु. ) मत्स्यमतें मधूचा पुत्र. यास कुरुवश व कुरुवत्स अशीं नांवें आहेत.

**पुरुवसु**—एक स्तोता ( ऋ. ५.३६.३ ).

**पुरुष**—चाक्षुष मनूचा पुत्र.

२ मरुतांच्या सहाव्या गणांतील एक.

**पुरुषन्ति**—अश्विनीं याच्यावर कृपा केली ( ऋ. १. ११२.२३ ). दुसऱ्या ठिकाणीं हा एक राजा असून यानें खूप दान केल्याबद्दल अवत्सार काश्यप याची व ध्वस्राची स्तुति करीत आहे ( ऋ. ९.५८.३-४ ).

**पुरुषासक**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**पुरुहन्मन्**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८.७० ). याला अनुक्रमणींत आंगिरस म्हटलें आहे. याला वैखानस म्हटलें आहे ( पं. ब्रा. १४.९.२९ ).

**पुरुहोत्र**—( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें अनूचा पुत्र. पद्ममतें कुरुवशाचा पुत्र. याचा पुत्र अंशु ( पद्म. सृ. १३ ). विष्णुमतें अनुरथाचा पुत्र. भविष्यमतें कुरुवत्साचा पुत्र. यासच पुरुवस असें नांव आहे.

**पुरुद्वर**—धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**पुरुद्वह**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें पुरुद्वताचा पुत्र.

**पुरूरवस्**—उर्वशीपुरूरवस्‌चा सुप्रसिद्ध प्रणयसंवाद वैदिक ग्रंथांत प्रसिद्ध आहे ( ऋ. १०. ९५; श. ब्रा. ११.५.१ ). याला ऐल असें ऋग्वेदांत म्हटलें आहे (ऋ. १०. ९५.१८). अग्नीनें पुरूरव्यावर अनुग्रह केला होता ( ऋ. १. ३४ ).

बुधास इलेपासून झालेला पुत्र ( म. आ. ६९. ६३ कुं.; मत्स्य. १२; २४; वायु. ९. ३०; पद्म. सृ. ८; १२; ब्रह्म. १०; विष्णु. ४. ७; दे. भा. १. १३; भा. ९. १५; ह. वं. २. १० ). हा सोमवंशाचा मूळ पुरुष आहे.

पुरूरव्याची राजधानी प्रतिष्ठानपुरी होती ( मत्स्य. १२०; ब्रह्म. ७. २२; ह. वं. १. १० ). हा काशीचा राजा होता. शिवाय, यानें प्रयाग प्रांतावर राज्य केल्याचा उल्लेख आहे ( वा. रा. उ. ५६; ह. वं. २. १० ). हा सप्तद्वीपाचा राजा असून यानें शंभर अश्वमेध केले ( मत्स्य. २४ ).

एकदां नारदानें पुरूरव्याच्या गुणांची देवसभेंत स्तुति केली. ती ऐकून उर्वशी नामक अप्सरा पुरूरव्याच्या गुणांवर अत्यंत लुब्ध झाली. त्या वेळीं मित्रावरुणांचा तिला भूतलीं जाण्याबद्दल शाप झाला. तेव्हां उर्वशी भूतलावर आली. पृथ्वीवर येतांच ती केशी नांवाच्या दैत्याच्या दृष्टीस पडली व त्यानें तिला पळवून नेलें. इतक्यांत तिकडून पुरूरवा येत होता. तेव्हां पुरूरव्यानें उर्वशीस केशीपासून सोडविलें ( पद्म. पा. १२ ). नंतर पुरूरव्यानें तिच्या रूपावर मोहित होऊन तिच्याशीं लग्न करण्याची इच्छा प्रदर्शित केली. उर्वशीनें याची मागणी कबूल केली, परंतु यास तीन चमत्कारिक अटी घातल्या. त्या अशा—( १ ) ‘ माझे हे तीन ( दोन ) पुत्रवत् पाळलेले मेंढे आहेत, त्यांचें तूं काळजीपूर्वक रक्षण केलें पाहिजेस, ( २ ) तूं मैथुनाखेरीज नग्न स्थितींत माझ्या दृष्टीस पडतां कामा नये व ( ३ ) तूप हाच फक्त माझ्या आहाराचा जिन्नस असावा. ’ हरिवंशांमध्यें तिसरी अट भिन्न दिलेली आहे. ती अशी—‘ तूं फक्त तूपच खाऊन राहिलें पाहिजेस ’ ( ह. वं. १. २६ ). यानें तिच्या सर्व अटी मान्य करून तिच्याशीं लग्न लाविलें. उर्वशी ही गंधर्वांची अत्यंत आवडती असल्यामुळें त्यांनीं उर्वशीस परत स्वर्गांत आणण्याकरितां एक युक्ति योजिली. एके रात्रीं पलंगाला बांधलेले मेंढे गंधर्व चोरून घेऊन चालले असतां उर्वशीनें ओरडा केला. तेव्हां हा उर्वशीकरितां नागवाच धांवला. तों विजेचा लकलकाट होऊन हा नग्न स्थितींत उर्वशीच्या नजरेस पडला. तेव्हां उर्वशी करार मोडला गेल्यामुळें पुरूरव्यास सोडून निघून गेली. उर्वशीच्या वियोगानें पुरूरवा अत्यंत वेडा होऊन वाटेल तिकडे भटकूं लागला. पुढें उर्वशी याच्या दृष्टीस पडली. तेव्हां तिनें पुरूरव्यास ‘ गंधर्व तुम्हांस वर देणार आहेत, तर त्यांच्यापासून माझें कायमचें सख्य मागून घ्या, ’ असें सांगितलें. पुढें गंधर्वांनीं यास वर मागावयास सांगितलें असतां, यानें गंधर्वत्व मागितलें. तेव्हां गंधर्वांनीं यास एक अग्नीसहित असलेली स्थाली दिली. परंतु उर्वशी नाहीं, तेव्हां ही स्थाली देऊन गंधर्वांनीं आपणास फसविलें असें वाटून यानें ती स्थाली तेथेंच टाकून दिली व हा घरीं निघून आला. परंतु घरीं आल्यावर याचा बेत फिरला व स्थाली आणावयास हा परत अरण्यांत गेला. परंतु यास स्थालीचे ठिकाणीं एक अश्वत्थाचें झाड दिसलें. तेव्हां हा अश्वत्थ अग्निरूप आहे, असें समजून यानें त्या अश्वत्थाची मंथा व अरणी केली; व तींपासून यानें

अग्नि उत्पन्न केला. नंतर त्या अग्नीचे दक्षिणाग्नि, आहवनीय व गार्हपत्य असे तीन विभाग करून त्यांमध्यें यानें उत्कृष्ट प्रकारचें हवन केलें. तेव्हां गंधर्वांनीं प्रसन्न होऊन यास सालोक्य दिलें ( श. ब्रा. ११.५.१. १३-१७; विष्णु. ४. ६. १; वायु. २. २९; दे. भा. १.१३; भा. ९. १५; ह.वं. १.२६ ).

एकदां धर्म, अर्थ व काम हे तीन पुरुषार्थ मानवी रूपें धारण करून याचें सत्त्व पाहण्याकरितां आले. यानें सर्वांचा सत्कार केला; परंतु धर्मास जास्त मान दिला. त्यामुळें अर्थ व काम यांनीं यास ' तुझा लोभामुळें नाश होईल ' असा शाप दिला ( पद्म. सृ. १२; मत्स्य. २४ ).

गंधर्वलोकांत हीं दोघें तुंबरूला हसल्यामुळें यांना त्यानें ' तुमचा वियोग होऊन दुःख होईल ' असा शाप दिला. परंतु त्याच्या उःशापाप्रमाणें गंधमादन पर्वतावरील साध्यामृत तीर्थांत स्नान केल्यामुळें हीं मुक्त झालीं ( स्कंद. ३. १-२८).

हा दर महिन्याच्या अमावास्येला पितरांना तृप्त करीत असे ( वायु. १. ५६ ).

नैमिषारण्यांत द्वादशवार्षिक सत्र चालू असतां हा राजा होता. समुद्रांतील अठरा द्वीपें यानें जिंकलीं होतीं. तथापि संपत्तीचा लोभ याला सोडीना. उर्वशी यावर मोहित झाली होती. तिच्यासह पुरूरव्यानें त्या सत्रावर हल्ला चढविला. अग्नीपासून गंगेला जो गर्भ राहिला होता त्याची वार पर्वतावर टाकल्याबरोबर ती सोन्याची झाली. त्यामुळें त्या यज्ञाची वेदि सोन्याची करण्यांत आली होती. बृहस्पति तेथें स्वतः उपाध्याय होता. ऐल पुरूरवा तेथें मृगया करीत आला. यानें यज्ञवेदि सोन्याची पाहिल्याबरोबर याला आश्चर्य वाटलें व हा लोभानें वेडा होऊन सोनें हरण करूं लागला. तेव्हां सर्व ऋषि संतापले व त्यांनीं दर्भरूपी वज्रानें याला ठार केलें. तेव्हां उर्वशीपासून झालेला याचा पुत्र गादीवर बसविण्यांत आला. त्याचें नांव आयु होय. त्याचा पुत्र नहुष. त्यानें सर्वांना शांत करून सत्राला पुनः आरंभ करविला ( ब्रह्मांड. १. २. १४-२३; वायु. १.२ ).

याचा वायूबरोबर ब्राह्मणादि चारी वर्णांची उत्पत्ति व त्यांचे अधिकार आणि कश्यपाबरोबर या चारी वर्णांनीं परस्परांशीं कसें वागावें यांविषयीं संवाद झाला होता (म. शां. ७२-७३).

पूर्वी यानें उपवास करून द्वादशीस तेल खाल्लें म्हणून याचा देह कुरूप झाला होता. त्यामुळें यास वाईट वाटून यानें तीन महिने उपवास करून विष्णूची आराधना केली. पुरूरव्यानें पूर्वी सात जन्म तपश्चर्या केली होती, म्हणून विष्णु संतुष्ट झाला व त्यानें यास इतका सुंदर देह दिला कीं, स्वर्गातील उर्वशी यावर मोहित झाली ( पद्म. उ. १२५ ). माहात्म्यात्मक गोष्टींतहि याला आणलें आहे ( ब्रह्म. १०१ ).

पूर्वजन्मीं हा द्विजग्रामांतील ब्राह्मण असून यानें द्वादशीचे दिवशीं उपवास करून राज्यप्राप्तीच्या इच्छेनें जनार्दनाची पूजा केली. त्यामुळें या जन्मीं याला मद्र देशाचें राज्य मिळालें. परंतु उपवासाच्या दिवशीं अभ्यंगस्नान केल्यामुळें हा रूपहीन झाला. तेव्हां सुरूपप्राप्तीकरितां हिमालयावर तपश्चर्येला गेला ( मत्स्य. ११५ ).

पुरूरव्याचा पुरोहित वसिष्ठ होता ( ब्रह्म. १५१. ८-१०; पद्म. भू. १०८ ). याचा हिमालयाशीं विशेष संबंध दिसतो ( ह. वं. १. २६ ).

ऐलाच्या मूलस्थानासंबंधीं पुरूरव्याच्या चरित्रावरून बराच बोध होतो. पुरूरव्याचा बाप जो इल त्याच्याच नांवावरून असलेला इलावृत देश ( मत्स्य. १२. १४; पद्म. सृ. ८ ). हा हिंदुस्थानच्या उत्तरेकडच्या बाजूस आहे. शिवाय पुरूरव्याच्या जन्मासंबंधींच्या कथाहि त्याच भागाशीं पुरूरव्याचा संबंध दाखवितात. ऐलांच्या सत्तेचा उगम जरी प्रयाग ( अलाहाबाद ) येथें झाला असला, तरी त्यांचा संबंध हिमालयाच्या मध्यभागाशीं व त्यापलीकडच्या देशांशीं होता, ह्याविषयीं अनेक उदाहरणें आहेत. पुरूरव्याच्या नेहमींच्या परिचयाच्या जागा म्हणजे मंदाकिनी नदी, अलका, चैत्ररथ आणि नंदनवन, गंधमादन आणि मेरु पर्वत व कुरूंचा प्रांत म्हणून असणारा गंधर्वांचा प्रदेश ह्या होत. उत्तर कुरूंच्या प्रांताशीं गंधर्व निगडित असल्याचें निश्चित आहे (मत्स्य. ११४. ८२; वायु. १. ३५;४१;४७; म.आ. ११३;११४;१२१ ).

पुरूरव्याची बायको उर्वशी ही गंधर्वांच होती व याच्या वंशजांनींहि गंधर्वांच्या मुलींशींच लग्नें केलीं होतीं ( कूर्म. १. २३.४६). व शेवटीं हा स्वतः गंधर्वांशींच एक होऊन राहिला.

याला उर्वशीपासून एकंदर सहा पुत्र झाले ( वायु. २.२९; विष्णु. ४. ७; गरुड. १.१३९ ). परंतु कांहीं ठिकाणीं आठ पुत्र दिले आहेत ( मत्स्य. २४. ३३; पद्म. पा. १२; अग्नि. २७३) व कांहीं ठिकाणीं सात पुत्र दिले आहेत ( ब्रह्म. १०; लिंग.१. ६६; ह.वं. १. २६). भागवतांत यानें अग्नीसहि पुत्र मानिल्याचें दिलें आहे ( भा. ९. १५ ).

पुरूरव्याच्या पुत्रांचीं नांवें:—१ आयु, २ श्रुतायु, ३ सत्यायु, ४ हय, ५ विजय व ६ जय. कांहीं ठिकाणीं हय, विजय व जय यांचे ऐवजीं धीमान्, अमावसु व विश्वावसु असा फरक केला आहे ( विष्णु. ४. ७ ). परंतु अमावसु व आयु हे दोनच पुत्र राज्यकर्ते झाले व त्यांचीं नांवें बहुतेक पुराणांत एकमतानें दिलेलीं आहेत.

याच्या पुत्रांपैकीं आयु यास प्रतिष्ठान नगरांत राज्य मिळालें व अमावसु ( विजय ) हा कनौजचा अधिपति झाला. याच्या

पुत्रांचीं जीं सात किंवा आठ नांवें कांहीं पुराणांत सांपडतात, तीं एकाच व्यक्तीस एकापेक्षां अधिक नांवांनीं संबोधण्यांत आल्यामुळें असावीत.

हा क्षत्रिय जातीचा असून मंत्रकार आहे (ऋ. १०.९५; मत्स्य. १४५. ११५-११६; ब्रह्मांड. २.३२.१२०-१२१).

२ दीताक्ष नांवाच्या लोकांचा राजा. हा कुलांगार असल्यामुळें याच्या सुहृद्बांधव वगैरेंसह याचा नाश झाला (म. उ. ७३. ११-१४ कुं.).

**पुरोचन**—म्लेच्छविशेष. हा दुर्योधनाचा मित्र व मंत्री होता. यानें दुर्योधनाच्या सांगण्यावरून पांडवांचा नाश करण्यासाठीं वारणावतांत लाक्षागृह निर्माण केलें. नंतर पांडवांबरोबर हा तेथें राहावयाच्या उद्देशानें गेला. त्या वेळीं याच्या रथास खर जोडले होते. पण हाच त्या लाक्षागृहांत जळून मेला (म. आ. १४४; १४८).

**पुरोजव**—(स्वा. प्रिय.) भागवतमतें मेधातिथीच्या सात पुत्रांतील पहिला.

२ प्राण नामक वसु व ऊर्जस्वती यांचा कनिष्ठ पुत्र (भा. ६.६.१२).

३ अनिल नामक वसूचा पुत्र.

**पुरोद्भव**—धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**पुलक**—मृगरूपी एक दैत्य. यानें तप करून शंकराला प्रसन्न केलें व अद्भुत सौगंध्य प्राप्त व्हावा, म्हणून त्याजवळ वर मागितला. पुढें त्या सुगंधानें हा देवस्त्रियांना मोहित करून जगाला त्रास देऊं लागला. तेव्हां देवांच्या विनंतीवरून शंकरानें याला 'तूं हा असुर देह सोडून दे' म्हणून सांगितलें. यानें तें कबूल केलें. परंतु 'हा सुगंध आपण सतत धारण करूं' असें सांगितलें (स्कंद. १. ३. १. १३).

२ मत्स्यमतें शुनकाचें नामांतर.

**पुलस्त्य**—स्वायंभुव मन्वंतरांत ब्रह्मदेवाच्या उदानापासून उत्पन्न झाला. हा स्वायंभुव दक्षाचा जांवई व शंकराचा साडू. दक्षानें अपमान केल्यामुळें शंकरानें याला जाळून मारिलें. दक्षकन्या प्रीति याची बायको. याला प्रीतीपासून दानाग्नि नांवाचा मुलगा झाला. देवबाहु मधला व अत्रि धाकटा मुलगा होय व सद्वती नांवाची सर्वांत धाकटी मुलगी झाली. सद्वतीला अग्नीपासून पर्जन्य झाला. पण पौलस्त्यवंश दानाग्नि व सुजंघी यांच्यापासून पुढें वाढला (ब्रह्मांड. २.१२.२६-२९).

हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र असून त्याच्या कानापासून उत्पन्न झाला (म. आ. ६६. १० कुं; मत्स्य. ३. ६-८; वायु. २. ४. २२; भा. ३. १२. २४). ब्रह्मदेवानें जे प्रजापति निर्माण केले त्यांत हा एक होता (मत्स्य. १७१. २६-२७; भा. ३. १२). याची स्त्री कर्दम प्रजापतीची मुलगी हविर्भुवा किंवा हविर्भुक् ही होती. तिच्यापासून अगस्त्य व विश्रवा हे दोन पुत्र झाले (भा. ४. १. ३६). याला प्रीति या नांवाच्या स्त्रीपासून पूर्वजन्मीं दंभोलि नांवाचा पुत्र झाला. हाच अगस्त्य होय (विष्णु. १. १०). शिवाय पुलस्त्याला प्रतीच्या स्त्री होती (म. उ. ११७) संध्या अशी पत्नी दिलेली असली तरी ती चूक असावी. यानें भीष्माला पृथ्वीप्रदक्षिणेच्या फलाचें माहात्म्य सांगितलें होतें (म. व. ८१). त्याचप्रमाणें यानें सृष्टीची उत्पत्ति त्याला कथन केली (पद्म. सृ. २). पराशरानें राक्षससत्र सुरू केलें, तेव्हां यानें 'तें सत्र करून माझ्या संततीचा नाश करूं नको,' असें त्यास सांगितलें व त्याप्रमाणें राक्षससत्र बंद झालें (म. आ. १८१). पुलस्त्यापासून राक्षस, वानर, किन्नर व यक्ष यांची उत्पत्ति झाली (म. आ. ६६).

महादेवाच्या शापानें जे ब्रह्ममानसपुत्र मृत झाले, त्यांत हा एक होता (मत्स्य. १९५).

२ मृत झालेले मानसपुत्र पुनः वैवस्वत मन्वंतरांत ब्रह्मदेवानें उत्पन्न केले. त्यांत हा अग्नीच्या पिंगट केसांपासून उत्पन्न झाला. यानें अगस्त्यपुत्र धीमान् यास दत्तक घेतलें (मत्स्य. २०२). हा मेरू पर्वतावर तप करीत असतां गंधर्वकन्या याला त्रास देत. म्हणून जी कन्या येथें येईल, ती गरोदर होईल' असा यानें त्यांस शाप दिला. तृणबिंदु राजाची कन्या गौ नकळत चुकून तेथें गेली, तोंच ती गरोदर झाली. पुढें तिचा पुलस्त्याशीं विवाह झाला. हिच्यापासून विश्रवा हा पुत्र झाला (म. व २७४; वा. रा. उ. २). यावरून याचा काळ ठरतो. याचा दक्षिणेकडेहि विशेष संबंध दिसतो. हा नर्मदेच्या तीरींहि राहत असे (म. व. ८७. ४-५ कुं.).

यानें महीसागर संगमतीर्थाला गर्व केल्यामुळें स्तंभगर्व असें नांव दिलें (स्कंद. १.२. ५८). हा ब्रह्मदेवाच्या पुष्करतीर्थावरील यज्ञांत अध्वर्यु होता (पद्म. सृ. ३४). याचा वंश बऱ्याच ठिकाणीं दिलेला आहे (वायु. २. ९; ब्रह्मांड. ३. ८; लिंग. १. ६३; मत्स्य. २०२; भा. ४.१.३६).

३ युधिष्ठिरास तीर्थयात्रा ज्यानें सांगितली तो ऋषि (म. व. ८० कुं.).

४ वृद्ध याज्ञवल्क्यानें याचा स्मृतिकार म्हणून उल्लेख केलेला आहे. शारीरशौचावर विश्वरूपानें याचा एक श्लोक दिला आहे (याज्ञ. १. १७). 'ब्राह्मणानें श्राद्धाच्या वेळीं शाकाहार, क्षत्रिय व वैश्य यांनीं मांस आणि शूद्रांनीं मध यांचा उपयोग करावा' या अर्थाचा याचा श्लोक मिताक्षरेंत आहे (याज्ञ. १. २६१). मिताक्षरेंत (याज्ञ. ३. २५३) पुलस्त्याचे दोन श्लोक दिले आहेत. त्यानंतर अकरा मादक पदार्थांचीं नांवें दिलीं

असून बारावें अतिशय वाईट म्हणून दारूचा उल्लेख केला आहे. संध्या, श्राद्ध, अशौच, संन्यासधर्म, प्रायश्चित्त, यांसंबंधींचे याचे श्लोक अपरार्कानें दिले आहेत. ज्ञानकर्मसमुच्चयासंबंधीं याचे दोन श्लोक आहेत (अपरार्क. याज्ञ. ३. ५७, ९११). त्यांपैकीं पहिला योग याज्ञवल्क्याच्या नांवावर दिला आहे. याचे आह्निक व श्राद्ध यांसंबंधींचे चाळीस श्लोक स्मृतिचंद्रिकेंत आहेत. रविवार, मंगळवार व शनिवार या दिवशीं स्नान केल्यास काय फळ मिळतें, तें स्मृतिचंद्रिकेंत दिलें आहे. राम, परशुराम, नृसिंह आणि त्रिविक्रम यांच्या जपासंबंधींहि त्यांत उल्लेख आहे. याचा चंडेश्वराच्या दानरत्नाकरांत मृगाजिनदानासंबंधीं एक गद्य उतारा आहे. पुलस्त्य-स्मृति इ.स. च्या चवथ्या व सातव्या शतकांच्या दरम्यान लिहिली असली पाहिजे.

५ चैत्र महिन्यांत धाता नामक आदित्याबरोबर असणारा एक ऋषि (भा. १२. ११. ३३).

**पुलह**—ब्रह्मयाचा मानसपुत्र व प्रजापति (म. आ. ६६. ६७; स. ७. ११ कुं.). हा ब्रह्मयाच्या नाभीपासून झाला (भा. ४. १. ३८). हा स्वायंभुव मन्वंतरांत ब्रह्मयाच्या व्यानापासून झाला. हा स्वायंभुव दक्षाचा जांवई व शंकराचा साडू. दक्षानें अपमान केल्यामुळें याला शंकरानें जाळून मारिलें. दक्षकन्या क्षमा याची बायको. क्षमेपासून यास कर्दम, उर्वरीवान्, सहिष्णु व कनकपीठ असे पुत्र पीवरी नांवाची कन्या अशीं अपत्यें झालीं. कर्दमाला आत्रेयी श्रुति दिली होती. तिला शंखपद व काम्या अशीं दोन अपत्यें झालीं. शंखपद दक्षिणेचा प्रजापति होता. काम्या प्रियव्रताला दिली व तिच्यापासून प्रियव्रताला दहा मुलगे व दोन मुली झाल्या. त्या दहा मुलांनीं क्षत्रियत्व सुरू केलें. कनकपीठाला यशोधरेपासून सहिष्णु व कामदेव अशीं दोन मुलें झालीं (ब्रह्मांड. २. १२. ३०-३५). भागवतांत याची पत्नी गति व विष्णूंत क्षमा दिली आहे. पहिल्यांत पुत्र कर्मश्रेष्ठ, वरीयान् व सहिष्णु व दुसऱ्यांत कर्दम, उर्वरीवान् व सहिष्णु असे दिले आहेत (भा. ३. १२. २४; २४. ३३; विष्णु. १. १०).

२ महादेवाच्या शापानें मरण पावलेल्या सर्व मानसपुत्रांना ब्रह्मदेवानें पुनः सजीव केलें, त्या वेळीं हा ब्रह्मदेवाच्या स्वतःच्या यज्ञांत अग्नीच्या लांब केसांपासून निर्माण झाला. यास संध्या नांवाची स्त्री व कर्दम नांवाचा मुलगा होता (म. उ. ११७). शिवाय याला क्रोधेच्या बारा मुली बायका होत्या. त्यांचीं नांवें—मृगी, मृगमंदा, हरिभद्रा, इरावती, भूता, कपिशा, दंष्ट्रा, रिषा, तिर्या, श्वेता, सरमा व सुरसा. यांची संतति मनुष्येतर प्राणी होत.

पुलहानेंहि अगस्त्यपुत्र दृढास्यास दत्तक घेतलें होतें. याचे वंशज सर्व अगस्त्यगोत्रीयच होत (मत्स्य. २०२). दत्तक घेण्याचें कारण याचे पुत्र दुर्वर्तनी होते व ते याला आवडत नसत. दंभोलिहि पौलह होता.

३ ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत हा प्रत्युद्गाता होता (पद्म. सृ. ३४).

४ वैशाखांत अर्यमा नांवाच्या अर्याबरोबर फिरणारा ऋषि (भा. १२. ११. ३४).

**पुलिन**—अमृतरक्षक देव (म. आ. ३२. १९ कुं.).

**पुलिन्द**—(शुंग. भविष्य.) ब्रह्मांडमतें भद्राचा, वायुमतें शुकाचा, मत्स्यमतें अंतकाचा व भागवतमतें भद्रकाचा पुत्र. यास विष्णुमतें आर्द्रकपुत्र पुलिंदक म्हटलें आहे.

**पुलिमत्**—(आंध्र. भविष्य.) विष्णुमतें गोमतीपुत्राचा पुत्र (पुरीमत् पहा).

**पुलुष प्राचीनयोग्य**—हति ऐन्द्रोत शौनकाचा शिष्य (जै. उ. ब्रा. ३. ४०. २).

**पुलोमत्**—एक राक्षस (म. आ. ५.१५; पुलोमा पहा).

२ दनुपुत्र दानवांपैकीं एक.

३ हिरण्यकशिपु व वृत्रासुर यांचा अनुयायी (भा. ६. ६. ३१; १०. २०; ७. २. ५).

४ प्रहेतिपुत्र. याचे पुत्र मधु, पर, महोग्र व लवण हे होत.

५ (आंध्र. भविष्य.) मत्स्यमतें गौतमीपुत्राचा पुत्र. यानें अठ्ठावीस वर्षें राज्य केलें.

६ (आंध्र. भविष्य.) मत्स्यमतें चण्डश्रीचा पुत्र. यानें सात वर्षें राज्य केलें. यास पुलोवा, पुलोमारि, पुलोमाचि सलोमाचि अशीं मुलें होतीं.

७ (भविष्य.) कालिकत येथें राहणारा विकटावती राणीचा नवरा (भवि. प्रति. ४. २२).

**पुलोमजा**—पुलोम दैत्याची मुलगी. ही शिवव्रतप्रभावानें शची झाली (स्कंद. ४.२.८०).

**पुलोमा**—ब्रह्ममानसपुत्रांपैकीं वारुणि भृगूची पत्नी (विष्णुधर्म. १.३२; गणेश. ५.२९). हिच्या बापानें प्रथमतः हिच्या बालपणीं भिवविण्याकरितां म्हणून सहज 'राक्षसा, हिला घेऊन जा रे' असें म्हटलें. कर्मधर्मसंयोगानें बाहेर पुलोमा नांवाचा एक राक्षस होता. त्यानें हें बोलणें ऐकिलें व हिला मनोभावें वरिलें. पण हिच्या बापाला अर्थात् हें माहित नसल्यामुळें त्यानें हिला भृगूस अर्पण केलें. पुढें ही एकदां गरोदर असतांना तो पुलोमा राक्षस त्याच्या आश्रमापाशीं आला. त्या वेळीं भृगु बाहेर स्नानार्थ गेलेला होता. आपलें अतिथिसत्कार हें कर्तव्य समजून हिनें त्याचा सत्कार करण्याच्या हेतूनें त्यास कंदफलादि दिलें. पुढें त्या राक्षसानें हिला पळविण्याच्या हेतूनें अगोदर खात्री करण्याकरितां अग्नीस विचारिलें कीं, 'ही खरी स्त्री

कोणाची? ' तेव्हां ... ' तूं हिला मनानें वरिलेंस, पण भृगूनें हिला मंत्रसमंत्र विधीनें वरिलें आहे. ' ' तूं मनानें वरिलेंस, ' एवढ्याच शब्दांचा आधार घेऊन त्यानें वराहरूप धारण करून हिला पळवून नेलें. पण हिच्या पोटांतील गर्भास राग येऊन तो बाहेर आला व त्यानें त्या वराहरूप राक्षसाला दग्ध केलें. हिला एकंदर एकोणीस पुत्र झाले. त्यांपैकीं बारा देव व सात ऋषि होत. त्यांचीं नांवें भृगूवर पहा ( म. आ.५-६ ). हिला पौलोमी असें नामांतर आहे ( विष्णु. ७. ३२ ).

२ वैश्वानर दानवाच्या कन्यांपैकीं एक. हिच्याशीं ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून प्रजापति कश्यपानें लग्न केलें हिजपासून जी असंख्यात संतति झाली, तींस पौलोम असें म्हणतात (भा.६. ६. ३३-३६ ). पौलोम व कालकंज यांस मिळून निवातकवच म्हणतात. हे निवातकवच संख्येनें ६०००० होते. हे हिरण्यपुरांत राहत असत (२ निवातकवच पहा; म. व. १७५ कुं.).

**पुलोमारि**—( आंध्र. भविष्य. ) ब्रह्मांडमतें दंडश्रीचा पुत्र ( ६ पुलोमत् पहा ).

**पुलोमार्चि**—( आंध्र. भविष्य. ) विष्णुमतें चंद्रश्रीचा पुत्र ( ६ पुलोमत् पहा ).

**पुलोवा**—( आंध्र. भविष्य. ) वायुमतें दंडश्रीचा पुत्र ( ६ पुलोमत् पहा ).

**पुष्कर**—सोमकन्या ज्योत्स्ना काली. तिचा पति ( म. उ. ९८. १२ कुं. ).

२ कृष्णपराशरकुलांतील गोत्रकार.

३ ( १ पुष्कल पहा ).

४ नलाचा चुलत भाऊ. यानें नलाचें राज्य द्यूतांत जिंकून घेतलें ( म. व. ५९ ). अज्ञातवासानंतर नलानें पुनः याच्याशीं द्यूत खेळून राज्य घेतलें ( म. व. ७८ ).

५ ( सू. इ. ) रामपुत्र कुशकुलांतील सुनक्षत्र राजाचा पुत्र. याचा पुत्र अंतरिक्ष ( भा. ९.१२.१२ ). यास किन्नर व किन्नराश्व अशीं नामांतरें आहेत.

६ वसुदेवाचा भाऊ वृक व दुर्वाक्षी यांचा पुत्र ( भा. ९. २४. ४३ ).

७ कृष्णाचा एक पुत्र ( भा. १०.९०.३४ ).

**पुष्करमालिन्**—अष्टावक्राच्या वादाच्या वेळीं ऐन्द्रद्युम्न, उग्रसेन व पुष्करमालिन् अशीं जनकाचीं नांवें येतात. त्यांपैकीं नांव व विशेषण कोणतें यांतील फरक सांगतां येत नाहीं. पुराणांतील वंशावळींत यांपैकीं कोणीच आढळत नाहीं. त्यामुळें या वेळचा जनक कोणता हें सांगणें कठीण आहे ( म. व. १३५. ५; १४; १३६. १ कुं. ).

**पुष्करमालिनी**—विदर्भ देशांतील उञ्छवृत्तीनें राहणाऱ्या सत्य ऋषीची पत्नी. ही शापभयानें पतीच्या स्वभावानुरूप वागत असे. पशुयज्ञ करणें हिला मान्य नव्हतें. ही व्रतस्थ असल्यामुळें कृश व पवित्र झाली. हिच्या अंगावर आपोआप गळून पडलेल्या मोराचे पिसांनीं गुंफिलेलें वस्त्र असे ( म. शां. २७२ ).

**पुष्करारुणि**—( सो. पूरु. ) भागवतमतें दुरितक्षय राजाच्या तीन पुत्रांतील कनिष्ठ. हा तपानें ब्राह्मण झाला ( भा. ९. २१. २० ). यास पुष्करिन् म्हटलें आहे.

**पुष्करिणी**—व्युष्ट राजाची स्त्री. हिला सर्वतेजस् नांवाचा मुलगा होता ( भा. ४. १३.१४ ).

२ उल्मुक राजाची स्त्री. हिला अंग, सुमनस्, ख्याति, क्रतु, अंगिरा व गय हे पुत्र होते ( भा. ४. १३. १७ ).

३ भूमन्यूची भार्या ( म. आ १०१. १३ कुं. ).

**पुष्करिन्**—( सो. पूरु. ) वायुमतें उभक्षयाचा व विष्णुमतें उरुक्षयाचा पुत्र ( पुष्करारुणि पहा ).

**पुष्कल**—( सू. इ. ) हा दशरथपुत्र भरतास मांडवीपासून झालेल्या दोन पुत्रांतील कनिष्ठ. ( वायु. २. २६; ब्रह्मांड. ३. ६३. १९०; विष्णु. ४. ४७; अग्नि. ११. ७-८ ९. ११. १२ ). रामाच्या अश्वमेधाच्या वेळीं हा शत्रुघ्नाबरोबर अश्वाचें रक्षण करीत होता ( पद्म. पा. ११ ). याचें सुबाहुपुत्र दमन याच्याशीं युद्ध होऊन दमनाचा पराभव झाला ( पद्म. पा. २६ ). याचें चित्रांगाशीं युद्ध होऊन चित्रांगाचा वध झाला ( पद्म. २७ ). विद्युन्माली व उग्रदंष्ट्र या राक्षसांशीं याचें घनघोर युद्ध झालें ( पद्म. पा. ३४ ). याचें रुक्मांगद व वीरमणि यांच्याशीं युद्ध झालें ( पद्म. पा. ४१-४५ ). लवानें घोडा अडवून याचा पराभव केला (पद्म. पा. ६१ ).

यानेंच गांधार देश जिंकिला व तेथें पुष्कलावती किंवा पुष्कलावत नगर स्थापून राजधानी केली( वा. रा. उ. १०१ ). याच्या बायकोचें नांव कांतिमती (पद्म. पा. ६७).

२ ( सू. इ. भविष्य. ). मत्स्यमतें बुद्धोनदाचा पुत्र. यास राहुल, रातुल व लांगलिन् अशीं नांवें आहेत.

**पुष्टि**—स्वायंभुव मन्वंतरांतील दक्षकन्या. हिचा पुत्र स्मय ( भा. ४. १. ४९-५१ ). धर्माची पत्नी ( म. आ. ६७. १४ कुं. ).

२ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें हिरण्यनाभाचा शिष्य.

३ ( सो. वसु. ) वायुमतें वसुदेवास मदिरेपासून झालेला पुत्र.

४ धर्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**पुष्टिगु काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ५० ). याचा ( ऋ. ८. ५१. १ ) मंत्रांत उल्लेख आहे.

**पुष्टिद**—पितरांपैकीं एक.

**पुष्प**—( सू. इ. ) विष्णुमतें हिरण्यनाभाचा पुत्र ( पुष्य पहा ).

**पुष्पदंष्ट्र**—कद्रूपुत्र सर्प.

**पुष्पदंत**—विष्णूचा एक पार्षद ( भा. ८. २१. १७ ).

२ एक गंधर्व. याचा पुत्र माल्यवान् ( पद्म. उ. ४३ ). यानें शिवमहिम्नस्तोत्र केलें असावें ( दे. भा. ९. २० ).

३ एक रुद्रगण ( पद्म. उ. १२ ).

४ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**पुष्पदंती**—चित्रसेन गंधर्वाची नात. इंद्रसभेंत नृत्य करीत असतां माल्यवानावर मोहीत झाल्यामुळें नृत्य व गायन बेताल झालीं. यामुळें इंद्रास राग येऊन त्यानें शाप देऊन दोघांस पिशाच केलें. परंतु जया नांवाच्या एकादशीव्रतामुळें तीं दोघें पुनः स्वर्गास आलीं ( पद्म. उ. ४३ ).

**पुष्पधन्वन्**—मदनास पुष्पांचें धनुष्य घेतल्यामुळें मिळालेलें नांव.

**पुष्पमित्र**—( भविष्य. ) कलियुगांतील बाह्लीक राजांनंतर झालेला राजा. याचा पुत्र दुर्मित्र (भा. १२. १. ३४).

२ ( शुंग. भविष्य. ) फक्त भागवतांत याचें नांव नाहीं. शुंगांतील हा पहिला राजा. हा शेवटल्या मौर्य बृहद्रथाचा सेनापति होता. पुढें तेंच राज्य यानें बळकाविलें. यानें मत्स्यमतें ३६ वर्षें, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें ६० वर्षें राज्य केलें.

३ ( भविष्य. ) ब्रह्मांडमतें वैदेशांतील एक राजवंश. यांत भागवतमतें अठरा व ब्रह्मांडमतें सहा राजे होते.

४ ( किलकिला. भविष्य. ) एक राजा. वायुमतें याला पुष्यमित्र म्हणतात.

**पुष्पयशस् औद्व्रजि**—संकर गौतमाचा शिष्य. याचा शिष्य भद्रशर्मन् ( वं. ब्रा. ३ ).

**पुष्पवत्**—( सो. ऋक्ष. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें ऋषभाचा पुत्र.

**पुष्पवती**—कृष्णांशाची पत्नी व मकरंदाची बहीण ( भवि. प्रति. ३. २१ ).

**पुष्पवाहन**—रथंतर कल्पांतील एक राजा. याची स्त्री लावण्यवती. याला दहा हजार पुत्र होते. यानें पूर्वजन्मीं मीठाचें दान करणाऱ्या वेश्येला दानावरील विष्णूस वाहण्यास कमळें मोफत दिलीं. म्हणून या जन्मीं हा राजा झाला. 'या जन्मींहि द्वादशी व्रत कराल तर मुक्त व्हाल' असें भृगूनें यास सांगितलें होतें ( पद्म. सृ. २० ).

**पुष्पसेन**—( सू. ) भविष्यमतें स्वर्णनाभीचा पुत्र. यानें दहाहजार वर्षें राज्य केलें.

**पुष्पान**—एक यक्ष ( म. स. १०. १८ कुं. ).

**पुष्पान्वेषि**—अंगिराकुलोत्पन्न गोत्रकार.

**पुष्पार्ण**—( स्वा. उत्तान. ) ध्रुवाचा पौत्र. वत्सरास स्वर्वीथीपासून झालेल्या सहा पुत्रांतील ज्येष्ठ. यास प्रभा नामक स्त्रीपासून प्रातः, सायं व मध्याह्न आणि दोषा नामक स्त्रीपासून प्रदोष, निशीथ व व्युष्ट असे पुत्र झाले ( भा. ४. १३.१२-१४ ).

**पुष्पोत्कटा**—सुमालि व केतुमती यांची कन्या ( वा.रा. उ. ५.४० ). ही विश्रव्याची पत्नि व रावणकुंभकर्णांची आई ( म. व. २७६.७ कुं. ).

**पुष्पोदरी**—वनरस नगराचा राजा तालन याची कन्या ( भवि. प्रति. ३७ ).

**पुष्य**—( सू. इ. ) भागवत व वायु यांच्या मतें हिरण्यनाभाचा पुत्र. याचा पुत्र ध्रुवसन्धि (दे. भा. ३. १४). वायु व विष्णु यांच्या मतें याला पुष्प असें दुसरें नांव आहे.

**पुष्यमित्र**—यज्ञाशानें याला निर्माण केला. हा जन्मतः सादेसोळा वर्षांचा होता. यानें शंभर वर्षें राज्य केलें. अयोध्या, मथुरा, कांची, काशी, अवंतिका, पुरी, द्वारावती व माया यां नगरींचा यानें पुनरुद्धार केला ( भवि. प्रति. ४. २३ ).

२ ( २ पुष्पमित्र पहा. )

३ ( किलकिला. भविष्य. ) विष्णुमतें बाह्लीकानंतरचा एक राजा ( ४ पुष्पमित्र पहा ).

**पुष्यश्रवस्**—एक ऋषि. याला नंदाच्या भावाच्या पोटीं लवंगा नांवानें गोपांचा जन्म मिळाला ( पद्म. पा. ७२ ).

**पूजनी**—( १ ब्रह्मदत्त पहा ).

**पूतक्रता**—पूतक्रतूची बायको ( ऋ. ८. ५६. ४ ). पाणिनीच्या व्याकरणाप्रमाणें हें रूप पूतक्रतायी असें होतें ( ४.१.३६ ).

**पूतक्रतु**—ही एक स्वतंत्र व्यक्ति असावी असें सायणास वाटत नाहीं. अतिथिग्व, इंद्रोत, अश्वमेध व हा हे एकच असण्याचा संभव आहे ( ऋ. ८.६८.१७ ). याचा पुत्र दस्यवेवृक ( ऋ. ८.५६.२ ).

**पूतदक्ष आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८.९४ ).

**पूतना**—ही कंसाची बहीण होती. कंसानें हिला कृष्णाचा नाश करण्याकरितां गोकुळांत नंदाचे घरीं पाठविलें. गोकुळांत आल्यावर हिनें तरुण स्त्रीचें रूप घेतलें व आपल्या स्तनांस विष लावून त्यांतील विषयुक्त दूध ही गोकुळांतील मुलांस पाजूं लागली. त्यामुळें बरींच मुलें मरण पावलीं. परंतु हिचें हें कपट कोणासहि समजलें नाहीं. पुढें ही नंदाचे घरीं गेली व कृष्णास आपलें विषयुक्त दूध पाजूं लागली. कृष्णानें हिचें कपट पूर्णपणें ओळखिलें होतें. त्यानें हिच्या स्तनांतील

विषाचें प्राशन करितां करितां हिचें प्राणहि आकर्षण करण्यास सुरुवात केली. त्यामुळें पूतनेनें वेदनाव्याकुल होऊन प्राण सोडिला ( म. स. ५२ कुं; भा. १०. ६; पद्म. ब्र. १३; विष्णु. ५.५ ब्रह्मवै. ४. १० ).

ही कंसाची दाई असून पक्षिणीचें रूप घेऊन गोकुळांत आली होती. दिवसभर पडून राहून सर्व निजानीज झाल्यावर कृष्णाचे मुखांत हिनें आपला स्तन दिला. तेव्हां कृष्णानें दुधाबरोबर प्राणहि शोषून हिला ठार मारिलें ( ह. वं. २. ६).

ही कंसपत्नीची मैत्रीण. कैतवी राक्षसीची कन्या. हिला वृकोदरी नांवाची बहीण होती. कंसाच्या आज्ञेवरून गोकुळांत येऊन १०।१२ दिवसांच्या आंतील मुलांना हिनें कालकूटयुक्त स्तन्य पाजून त्यांचा नाश केला. पुढें कृष्णनाशार्थ यशोदागृहीं ही आली असतां कृष्णानें हिचा नाश केला ( आदि. १८ ).

ही पूर्वजन्मीं रत्नमाला नांवाची बलीची मुलगी होती. बलीच्या यज्ञसमयीं वामन त्याच्याकडे भिक्षा मागण्यास आला असतां, त्याचें सुंदर रूप पाहून ' हा आपला मुलगा व्हावा व त्यास स्तनपान करवावें ' अशी हिला इच्छा झाली. वामनानें तें जाणून कृष्णजन्मीं हिचें स्तनपान केलें व हिला मुक्ति दिली ( ब्रह्मवै. ४. १० ).

हिला राक्षसयोनि प्राप्त होण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वी सरस्वतीचे कांठीं कक्षीवान् नांवाचा ऋषि तपश्चर्या करीत असे. तेथें एकदां कालभीरु ऋषि आपली चारुमती नांवाची कन्या घेऊन आला. कक्षीवानाचें स्वरूप पाहून त्याला त्यानें शास्त्रोक्त विधीनें कन्यादान केलें, पुढें कक्षीवान् व चारुमती त्या ठिकाणीं गार्हस्थ्य विधीनें राहून श्रीकृष्णाची उपासना करीत. एकदां कक्षीवान् तीर्थयात्रेला गेला असतां, एका शूद्रानें त्या आश्रमांत येऊन हिला वश केलें. पुढें कक्षीवान् आल्यावर आपली स्त्री अनाचार करीत असल्याचें त्याला समजलें. तेव्हां त्यानें तात्काल शाप दिला कीं, ' तूं राक्षसी होशील. ' उःशाप मागितल्यावर त्यानें ' कृष्णापासून तुला मुक्ति मिळेल, ' असें तिला सांगितलें. पूतनेचा पति घटोदर होय ( आदि. १८ ).

२ स्कंदाच्या सप्तमातांपैकीं एक.

**पूतिमाष**—अंगिराकुलोत्पन्न ऋषि.

**पूरण वैश्वामित्र**—हा विश्वामित्र कुलांतील गोत्रकार, सूक्तकार व प्रवर आहे ( ऋ. १०. १६०; २ पुराण पहा ). या नांवाचा एक ऋषिहि आहे ( म. शां. ४७ ).

**पूरु**—ऋग्वेदांत पूरुचा एकवचनी व अनेकवचनी अनेक वेळां उल्लेख आला आहे. ज्या ठिकाणीं एकवचन आहे, त्या ठिकाणीं हा शब्द व्यक्तिवाचक आहे. पूरु दाशराज्ञ युद्धांतील सुदासाच्या शत्रूंपैकीं होत ( ऋ. ७. १८. १३ ). बहुवचनीं येणारे निर्देश संघवाचक असून यांच्या विजयांचे उल्लेख आहेत व यांच्यासारखे विजय मिळावेत अशी मागणीहि आहे ( ऋ. १. १३१. ४; ६. २०. १०; ४६. ८ ).

या पूरूंपैकीं प्रामुख्यानें येणारा पुरुकुत्स हा होय. पुरुकुत्साची सुदासास नेहमीं मदत असे ( ऋ. १. ६३. ७ ). त्याचप्रमाणें भरत व पूरु यांचें वैमनस्य दृष्टास पडतें ( ऋ. ७.८.४ ). परंतु दाशराज्ञ युद्धांत पूरु हे सुदासाचे शत्रु म्हणून प्रामुख्यानें उल्लेखिलेले आहेत. कदाचित् पुरुकुत्स हा पूरु नसावा किंवा पूरुमधून वेगळा निघालेला असावा. पूरूंनीं ज्या लोकांना जिंकिलें, ते काळ्या रंगाचे होते ( ऋ. ७. ५. ३ ). काळ्या लोकांविरुद्ध लढणारा पूरु गौरवर्ण असावा. हिंदुस्तानच्या मूळ रहिवाशांना उद्देशून हें काळ्या लोकांचें वर्णन आहे कीं काय हें सांगणें कठीण आहे. हे सरस्वतीच्या कांठीं राहत होते ( ऋ. ७. ९६. २ ). हा सुदासाचा शत्रु खरा पण ज्या ऋचेंत सुदासानें जय मिळविल्याचा उल्लेख आहे, त्याच ऋचेंत इंद्रानें पूरूंचाहि उत्कर्ष केल्याचा निर्देश आहे ( ऋ. १. ६३. ७ ). सुदास, पौरुकुत्सि त्रसदस्यु व पूरु यांचे युद्धांत इंद्रानें संरक्षण केल्याचा एकाच ऋचेंत वसिष्ठानें निर्देश केला आहे ( ऋ. ७. १९. ३ ). इंद्राच्या हा कृपेंतला होता ( ऋ. १. १०८. ८; ८. ६४. १०. ). पूरूला असुररक्षस म्हटलें आहे ( श. ब्रा. ६. ८. १. १४). पण येथें पुरु असा शब्द आहे.

ययातिराजास शर्मिष्ठेपासून झालेल्या तीन पुत्रांपैकीं धाकटा ( म. आ. ९४ ). पूरूची राजधानी प्रतिष्ठान येथें होती. पुढें याच्या राज्याभिषेकप्रसंगीं हा सर्वांत धाकटा असल्यामुळें यास सार्वभौमत्व देऊं नये, याबद्दल त्या वेळच्या विद्वानांत बरीच गडबड सुरू झाली. परंतु ययातीनें ' जो बापास अनुसरतो तोच पुत्र होय ' असें सांगून यास राज्याभिषेक करविला. इतरांना वेगवेगळीं राज्यें मिळालीं. पण याला मात्र पित्यानें सार्वभौमत्व मिळालें ( भा. ९. १९. २३ ).

याला दोन बायका होत्या. कौसल्या व पौष्टी. कौसल्येपासून याला जनमेजय नांवाचा पुत्र झाला व पौष्टीपासून प्रवीर, ईश्वर व रौद्राश्व असे तीन पुत्र झाले. याच्या पुत्रांपैकीं जनमेजय हाच गादीवर बसला ( म. आ. ६३. ८९ कुं. ). प्रवीर पुढें वंश चालविणारा झाला ( म. आ. ८८.४ कुं. ). पण भागवतांत प्रवीर हा नातू दिला आहे ( भा. २०. २ ). पूरूलाहि वंशकर म्हटलें आहे ( म. आ. ६९. ५९ कुं. ).

यानें पित्याची जरा घेऊन त्यास आपलें तारुण्य दिलें. यावरून संतुष्ट होऊन ययातीनें आपलें सार्वभौमत्व याला

दिलें. पुढें ययातीस विषयोपभोगाचा कंटाळा येऊन त्यानें याला याचें तारुण्य परत दिलें ( ह. वं. १. ३१; मत्स्य. ३२; ब्रह्म. १२; वायु. २. ३१; विष्णु. ४. १० ).

२ ( स्वा. उत्तान. ) चक्षुर्मनूस नड्वलेपासून झालेल्या पुत्रांतील ज्येष्ठ. यास पूरुष असेंहि नांव आढळतें ( भा. ८. ५.७ ). हा शब्द पुरु असाहि आहे ( भा. ४. १३.१६ ).

३ ( सो. अमा. ) भागवतमतें जह्नूचा पुत्र. यास अज अथवा अजमीढ असें नामांतर होतें. याचा पुत्र बलाकाश्व.

४ अर्जुनाचा सारथि ( म. स. ३६. ३० कुं. ).

**पूरु आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. १६-१७ ).

**पूर्ण**—कश्यप व प्राधा किंवा क्रोधा यांच्या पुत्रांतील एक.

२ वासुकीच्या कुलांतील एक. सर्पसत्रांत हा दग्ध झाला ( म. आ. ५७. ५ कुं. ).

**पूर्णभद्र**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

२ गंधमादन पर्वतावरील रत्नभद्र यक्षाचा पुत्र ( स्कंद. ४.१.३२ ). यास हरिकेश ऊर्फ पिंगल या नांवाचा पुत्र होता ( हरिकेश पहा ). पण तो शर्वाची भक्ति करीत असल्यामुळे पूर्णभद्रानें हरिकेशास हांकून दिलें होतें. पण शेवटीं शंकराच्या कृपेनें तो गणेश झाला ( मत्स्य. १८० ). हा कुबेराच्या अनुचरांपैकीं एक होता ( दे. भा. १२. १० ). पण स्कंदपुराणांत हाहि शिवभक्त असल्याचें दिलें आहे.

३ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**पूर्णभद्र वैभांडकि**—याच्या कृपेनें चंप राजाला हर्यंग नांवाचा मुलगा झाला. यानें हर्यंगाच्या यज्ञांत इंद्राचा ऐरावत आणला होता ( ह. वं. १. ३१; ब्रह्म. १३. ४४; मत्स्य. ४८. ९८ ).

**पूर्णमास**—एक ब्रह्मर्षि ( अगस्त्य पहा ).

२ कृष्णास कलिंदीपासून झालेला पुत्र.

३ धाता नामक आदित्य व अनुमति यांचा पुत्र ( भा. ६. १८. ३ ).

४ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**पूर्णमुख**—धृतराष्ट्रकुलांतील सर्पसत्रांत दग्ध झालेला एक सर्प ( म. आ. ५७. १६ कुं. ).

**पूर्णरसा**—कृष्णाची प्राणसखी ( पद्म. पा. ७४ ).

**पूर्णांश**—कश्यप व क्रोधा यांचा पुत्र.

**पूर्णांगद**—धृतराष्ट्रकुलांतील सर्पसत्रांत दग्ध झालेला एक सर्प ( म. आ. ५७. १६ कुं. ).

**पूर्णामल**—पट्टणचा राजा. यानें आपली मुलगी विद्वन्माला महीराजपुत्र भीम यास दिली ( भवि. प्रति. ३. ३१ ).

**पूर्णायु**—कश्यप व प्राधा यांचा पुत्र.

**पूर्णिमत्**—मरीचि ऋषि व कर्दमकन्या कला यांच्या दोन पुत्रांतील कनिष्ठ. यास विरग व विश्वग हे दोन पुत्र व देवकुल्या नांवाची कन्या होती ( भा. ४. १. १४ ).

**पूर्णिमागतिक**—भृगुकुलांतील गोत्रकार. पौर्णिमागतिक असा पाठ आहे.

**पूर्णोत्संग**—( आंध्र. भविष्य. ) विष्णुमतें शातकर्णीचा, मत्स्यमतें श्रीमल्लकर्णीचा व भागवतमतें श्रीशांतकर्णीचा पुत्र. यानें अठरा वर्षें राज्य केलें. यास भागवतांत पौर्णमास असें नामांतर आहे.

**पूर्व**—कश्यपकुलांतील एक गोत्रकार.

**पूर्वचित्ति**—स्वायंभुव मन्वंतरांतील एक अप्सरा ( म. आ. १३२ ४७ कुं. ) ही प्रियव्रतपुत्र अग्नीध राजाची पत्नी. हिला ब्रह्मदेवानें त्याचेकडे पाठविली होती. हिला नाभि, किंपुरुष, हरिवर्ष, इलावृत, रम्यक, हिरण्मय, कुरु, भद्राश्व व केतुमाल असे नऊ पुत्र होतांच ही पुनः ब्रह्मदेवाकडे निघून गेली ( भा. ५. २. ३-२० ).

२ वैवस्वत मन्वंतरांतील प्राधेच्या अप्सराकन्यांतील एक. ही पौष महिन्यांत भग नामक सूर्याबरोबर फिरते ( भा. १२. ११. ४२ ).

**पूर्वपालिन्**—भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय राजा ( म. उ. ४. १७ कुं. ).

**पूर्वा**—सोमाच्या सत्तावीस स्त्रियांपैकीं एक.

**पूर्वा भाद्रपदा**—सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक.

**पूर्वातिथि**—अत्रिकुलोत्पन्न प्रवर. हा मंत्रद्रष्टा आहे.

**पूर्वेन्द्र**—पूर्वकल्पांत पांडवरूपानें जन्मलेले पांच इंद्र.

**पूषन्**—ऋग्वेदांत आठ सूक्तांनीं वर्णिलेली देवता. रुद्राप्रमाणें याला जटा व दाढी आहे ( ऋ. ६. ५५.२; १०. २६. ७ ). याच्याजवळ सोन्याचा भाला आहे ( ऋ. १. ४२. ६ ). याचा एक अंकुश आहे ( ऋ. ६. ५३ .९ ). याला उत्तम सारथि म्हटलें आहे ( ऋ. ६. ५६. २ ). याच्या गाडीला बोकड जोडलेले असतात ( ऋ. १. ३८. ४ ). हा दंतहीन असून पेज किंवा पिठाचे मऊ पदार्थ खातो ( ऋ. ६. ५६. १; श. ब्रा. १. ७. ४. ७ ). हा एका वेळीं सर्व प्राणी पाहतो ( ऋ. ३. ६२. ९ ). हा सर्व चराचरांचा स्वामी आहे ( ऋ. १. ११५.१ ). हा मातेची (रात्रीची) व भगिनीची (उषेची) प्रेमयाचना करणारा आहे ( ऋ. ६. ५५. ५). सूर्याची बायको ( ऋ. ६. ५८. ४ ). याला नववधूला आशीर्वाद देण्याविषयीं विनंति आहे (ऋ. १०. ८५. ३७). हा आपल्या सुवर्णनौकेंत बसून आकाशांत फिरतो ( ऋ. ६. ५८. ३ ).

हा द्युलोकांत राहतो ( ऋ. २.४०. ४-५ ). हा मार्गज्ञ व मृत यांना योग्य ठिकाणीं पोहोंचविणारा आहे (ऋ.१.४२. १-३ ). यानें पापांतून मुक्त करावें ( अ. वे. ६.११२. ३ ), शत्रूंना पिटाळून लावावें, लूट मिळावी ( ऋ. ६.५३.४ ), शत्रूंना दूर करावें, मार्ग चांगले करावेत व चांगल्या कुरणांत घेऊन जावें ( ऋ. १.४२. ७-८ ), अशी याची प्रार्थना आहे. हा वाटाड्या आहे (वा. सं. २२.२०). वाटेंत सुरक्षिततेकरितां याला बळी देतात ( ऋ. ६.५३ ). हा मार्गज्ञ असल्यामुळें हरविलेला माल सांपडून देववितो ( ऋ. ६. ४८. १५; आश्व. गृ. ३.७.९ ). हा गुरांचें रक्षण करितो; त्यांना रोगांतून व संकटांतून वांचवितो ( ऋ. ६.५४. ५-७ ). याला लाविलीं जाणारीं कांहीं विशेषणें अजाश्व, विमुचोनपात्, पुष्टिंभर, अनष्टपशु, अनष्टवेदस्, करंभाद व पशुप हीं होत. हें सूर्याच्या एखाद्या अवस्थेचें वर्णन असावें.

हा स्वायंभुव मन्वंतरांतील दक्षाच्या यज्ञांत ऋत्विज होता. याला शंकराच्या गणांपैकीं चंडीशानें बांधलें व याचे दांत पाडिले. कारण हा शंकराला हंसला होता ( भा. ४. ५. २१-२२ ). पुढें शंकराच्या वरानें यजमानाच्या दांतांनीं खाणारा हा पिष्टभुज् झाला. यज्ञांतील हात तुटलेल्यांचीं कामें पूषन्च्या हातांनीं होतात ( भा. ४. ७. ४-५ ).

रुद्रानें कन्येशीं संग करणाऱ्या प्रजापतीला विद्ध केलें. त्या यज्ञांतील भाग पूषन्नें भक्षण केला म्हणून पूषन् दंतहीन झाला ( श. ब्रा. १ ७.४.७ ). रुद्राला यज्ञांतून वगळिलें म्हणून त्यानें यज्ञाचा वेध केला. पण देवानें यज्ञसिद्धीकरितां त्याला प्रसन्न केलें व हवींचा थोडा भाग पूषन्ला दिला. त्यामुळें याचे दांत पडले ( तै. सं. २.६.८.२-७ ).

२ बारा आदित्यांपैकीं एक ( भा. ६. ६.३९; पद्म. सृ. ६; म. आ. ६६.१५ कुं. ). हा तपस ( माघ ) महिन्यांत प्रकाशतो ( भा. १२.११.३४ ). पण हा पौषांत प्रकाशतो ( भवि. ब्राह्म. ७ ८ ). दक्षयज्ञांतील पूषन् व हा एकच असें भागवतावरून दिसतें (भा. ६.६.४३). पण द्वादशादित्य स्वायंभुव मन्वंतरांत नव्हते. दक्षानें यज्ञ करून वैवस्वत मन्वंतरांत हे सर्व उत्पन्न केले.

३ कांचीच्या सत्यदत्त राजाच्या ज्योतिषशास्त्रज्ञाचा पुत्र ( भवि. प्रति. ४.८ ). हाच पुढल्या जन्मीं रुद्रपशूच्या घरीं मिहिराचार्य झाला.

**पूषमित्र गोभिल**—हा अश्वमित्र गोभिलाचा शिष्य. याचा शिष्य भगर ( वं. ब्रा. ३ ).

**पूथ**—रौच्य मनूचा पुत्र.

**पृश्निमाव**—चाक्षुष मन्वंतरांतील एक देवगण.

**पृथवान**—याचा दुःशीमाबरोबर ऋग्वेदांत उल्लेख आहे ( ऋ. १०.९३.१४ ).

**पृथा**—शूरसेन यादवापासून कुंति अथवा कुंतिभोज राजानें दत्तक घेतलेली कन्या. हीच पांडवांची माता कुंति होय ( भा. ९. २४. ३९; पद्म. सृ. १३ ).

**पृथाश्व**—यमसभेंतील एक राजर्षि (म. स. ८.१३ कुं.).

**पृथि वैन्य**—( १ पृथु पहा ).

**पृथिवी**—या देवतेवर ऋग्वेदांत अनेक सूक्तें आहेत. हिला सर्वत्र माता म्हटलें आहे ( द्यावापृथिवी पहा ).

**पृथिवींजय**—वरुणसभेंतील एक असुर ( म. स. ९. १६ कुं. ).

**पृथु**—याचें अश्वींनीं रक्षण केलें ( ऋ. १.११२.१५ पृथि ). याला वैन्य असें विशेषण लाविलें आहे ( ऋ. ८.९.१० ) शतपथब्राह्मणांत पृथु असें असलें तरी सायणभाष्यांत पृथिन् असें सर्वत्र म्हटलें आहे. जगांत प्रथम याला राज्याभिषेक झाला. यामुळें राज्याभिषेकाच्या पूर्वोत्तरांग-भूत होमास पार्थहोम असें म्हणतात. हा राज्याभिषेक व होम केल्यामुळें ग्राम्यच काय पण आरण्यक पशूंहि यास ताब्यांत घेतां आले ( श. ब्रा. ५. ३.५.४ ). पृथिन् वैन्यानें पार्थ नांवाचें साम म्हणून ग्राम्य व आरण्य पशूंवर आधिपत्य मिळविलें ( पं. ब्रा. १३.५.२० ). हा पहिला राजा होता (श. ब्रा. ५.३.५.४; क. सं. ३७.४; तै. ब्रा. २.७.५.१). यानें पृथ्वीदोहन केल्याची कथा पुराणांप्रमाणेंच अथर्ववेदांतहि आहे ( ८.२८.११ ). येथेंहि पृथिन् असा पाठ आहे. हा उदार दाता होता ( ऋ. १०. ९३. १४ ). आत्रबुभ्नाकरितां इंद्रानें याला ठार केलें होतें ( ऋ. १०. १७१. ३ ). पण या नांवाच्या ऋषीनें इंद्राची स्तुतीहि केली आहे ( ऋ. १०. १४८. ५ ). हा तत्त्वज्ञानी होता ( जै. उ. ब्रा. १. १०.९ ).

याला वैन्य, किंवा वैण्य असें म्हणतात. चक्षुर्मनूच्या वंशांतील वेन राजाचा पुत्र ( पद्म. सृ. २ ). वेन राजा अत्यंत दुष्ट असल्यानें सर्व प्रजेला अत्यंत त्रास होऊं लागला. तेव्हां त्या वेळच्या महर्षींनीं त्यास नीट वागण्याविषयीं बराच उपदेश करून पाहिला. पण तो निष्फळ झाल्यामुळें त्यांनीं वेनास ठार मारिलें. परंतु राजाचे अभावीं भूमि अराजक झाल्यामुळें लोकांना चोरांपासून त्रास होऊं लागला. तेव्हां सर्व ऋषींनीं मिळून वेनाच्या उजव्या बाहूचें व विष्णुमतें उजव्या मांडीचें मंथन केलें.

तेव्हां मंथनामुळें प्रथम विंध्यनिवासी निषाद व धीवर उत्पन्न झाले. तरी ऋषींनीं आपलें मंथन पुढें चालूच ठेविलें. नंतर कांहीं वेळानें पृथूची व अर्चि नामक कन्येची वेनाच्या बाहूच्या ठिकाणीं उत्पत्ति झाली. पृथु हा विष्णूचा

अंश असून जन्मतःच कवच व धनुष्य यांसह उपजला. पृथूस पाहिल्यावर सर्व ऋषींना आनंद होऊन त्यांनीं यास सम्राट् केलें ( पद्म. सृ. ८ ).

याला आदिराजा म्हणत असत. तसेंच हा योद्धयांचा प्रथम होय ( ब्रह्म. ४. ११७ ). यानें दिशा व वनस्पति वगैरेंचे अधिपति नेमिले ( मत्स्य. ८ ).

पृथूचे राज्याभिषेकप्रसंगीं यास निरनिराळ्या देवांनीं निरनिराळ्या देणग्या दिल्या. कुबेरानें सुवर्णासन दिलें. वायूनें तेजस्वी छत्र दिलें. इंद्रानें सुवर्णमुकुट दिला. यमानें दंड दिला. बृहस्पतीनें कवच दिलें. विष्णूनें सुदर्शन चक्र दिलें. रुद्रानें चंद्रबिम्बांकित तरवार दिली. त्वष्ट्यानें रथ दिला व समुद्रानें शंख दिला.

राज्यावर बसल्यावर पृथूनें शंभर अश्वमेध यज्ञ करण्याचा संकल्प केला. याचे नव्याण्णव यज्ञ पुरे झालेले पाहून इंद्रास 'हा आपलें पद तर घेणार नाहीं ना?' अशी शंका वाटून त्यानें पृथूचा यज्ञीय अश्व चोरून नेला. परंतु पृथूचे पुत्रानें तो परत आणला. तेव्हां इंद्रानें कापालिकाचा वेष घेऊन याचा यज्ञ होऊं दिला नाहीं. त्यामुळें पृथु इंद्रास ठार मारण्यास उद्युक्त झाला. त्या वेळीं बरेंच रण माजणार हें पाहून बृहस्पति व विष्णु यांनीं मध्यस्थी करून पृथु व इंद्र यांमध्यें सलोखा घडवून आणिला.

पृथु हा अत्यंत धर्मशील राजा होता. लोकांस सुख देण्याकरितां यानें उंचसखल असलेली भूमि सपाट केली व त्याचप्रमाणें प्रजेच्या पोटापाण्याची कायमची सोय करण्याकरितां हा भूमीच्या मागें धनुष्यबाण घेऊन लागला. तेव्हां पृथ्वीनें भयभीत होऊन गाईचें रूप धारण केलें व 'माझें दोहन करून सर्व प्रकारची संपत्ति मिळीव' अशी तिनें पृथूस विनंति केली. पृथूनें ती मान्य केली. नंतर जेव्हां पृथ्वीचें दोहन झालें त्यावेळीं दोहनकर्ता कोण होता, दूध कोणता पदार्थ होतें व वत्स कोण होता तें पुढें दिलें आहे.

भूमीचें दोहन केल्यामुळें भूमीस पृथ्वी हें नांव मिळालें ( कपिल पहा; विष्णु. १. १३; मत्स्य १०; पद्म. भू. २८; ब्रह्म. ४; ब्रह्मांड. २.३७; भा. ४. १८; म. शां. २८. १४० कुं. ).

पृथूची कारकीर्द सर्व जनतेस अत्यंत सुखावह झाली. याची राजधानी यमुनातीरीं होती. याच्याच कारकीर्दीत सूत व मागध उपन्न झाले. दोघांचाहि धर्म स्तुति करणें हाच होता. पृथूनें सूतांना व मागधांना कलिंग देश बक्षिस दिला ( पद्म. भू. २८-३०; ब्रह्म. ४ ).

पुष्कळ कालपर्यंत राज्य केल्यावर पृथूस वनांत जाण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणें हा आपल्या अर्चि नांवाच्या भार्येबरोबर वनांत गेला व त्या ठिकाणीं अत्यंत उग्र तप करून मरण पावला. याचेबरोबर याची भार्या सती गेली ( भा. ४. २३ ).

पृथूस अर्चीपासून विजिताश्व( अंतर्धान ), हर्यक्ष, धूम्रकेश, वृक व द्रविणस असे पांच पुत्र झाले ( भा. ४. १३.२४ ). याला अंतर्धान व पालित असे दोनच पुत्र होते ( विष्णु. १. १४ ). महाभारतांतहि याची कथा आली आहे ( म. द्रो. ६९; शां. ५८. १२२ कुं. ). याला महारण्यांत म्हणजे दण्डकारण्यांत राज्याभिषेक केल्याचा निर्देश आहे ( म. शां. २८. १३७ कुं. ).

| वर्ग | दोहन करणारा | वत्स | पात्र | दूध |
|---|---|---|---|---|
| असुर | द्विमूर्धा | विरोचन | लोह | माया |
| पितर | अन्तक | यम | रौप्य | स्वधा |
| मनुष्य | पृथुवैन्य | वैवस्वतमनु | पृथ्वी | कृषि व सस्य |
| ऋषि | बृहस्पति | सोम | छंदस | तप आणि वेद |
| देव | रवि | इंद्र | सुवर्ण | बल |
| गंधर्व | वसुरुचि | चित्ररथ | कमळ | सुगंध |
| यक्ष | रजतनाभि | कुबेर | सूक्ष्म | अंतर्धान |
| सर्प | धृतराष्ट्र | तक्षक | भोपळा | विष |
| राक्षस | जातुनाभ | सुमाली | कपाळ | रक्त |
| वृक्ष | शाल ( राळ करतात तो ) | पिंपरी | पळस | तोडिलें तरी पुनः फुटणें |
| पर्वत | मेरु | हिमालय | दगड | महौषधि आणि रत्न |

अथर्ववेदाप्रमाणें हें कोष्टक दिलें आहे. ब्रह्मादि पुराणांत यांत थोडा फरक असून राक्षस, वृक्ष व पर्वत हे जास्त दिलेले आहेत.

२ ( स्वा. नाभि. ) विष्णुमतें प्रसाराचा पुत्र.

३ दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

४ तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

५ तामस मनूचा पुत्र.

६ ( सू. इ. ) भागवत व विष्णु यांच्या मतें अनेनस् नांवाच्या राजाचा पुत्र. मत्स्यमतें सुयोधनाचा पुत्र. पण वायुमतें अनेनसूला पृथुरोमन् असें नामांतर आहे. यानें शंभर यज्ञ केले होते. याच्या पुत्राचें नांव विश्वगश्व असें होतें ( म. व. २०५. २ कुं. ). पण रामायणांत पिढ्यांच्या व नांवांच्या दृष्टीनें फारच फरक आहे. हा अनरण्य नांवाच्या राजाचा पुत्र. याच्या मुलाचें नांव त्रिशंकु होतें ( वा. रा. बा. ७०. २४ ).

७ (सू. इ.) भविष्यमतें ककुत्स्थाचा पुत्र. यानें ३५६०० वर्षें राज्य केलें.

८ ( सो. अज. ) विष्णु व मत्स्य यांच्या मतें दुसऱ्या पाराचा पुत्र. यास वृषु असें नामांतर होतें.

९ ( सो. नील. ) मत्स्यमतें पुरुजानूचा पुत्र ( २ चक्षु पहा ).

१० ( सो. वृष्णि. ). भागवतमतें चित्ररथाचा पुत्र.

११ ( सो. वृष्णि. ) मत्स्यमतें अक्रूरास अश्विनीपासून झालेला पुत्र.

१२ ( सो. क्रोष्टु.) भागवतमतें रुचकाचा पुत्र. हा द्रौपदी-स्वयंवराला ( म. आ. २०१. १८ कुं. ) व रैवतक पर्वता-वरील उत्सवाला गेला होता ( म. आ. २३९. १० कुं. ). यास पृथुरुक्म असें भागवतांतील पृथु व रुक्म एकत्र करून म्हटलेसें दिसतें.

१३ द्युआदीकरून अष्टवसूंतील एक. यानें भावाच्या सांगण्या-वरून वसिष्ठाची गाय चोरिली. त्यामुळें वसिष्ठानें यास व याच्या इतर भावांस ' तुम्ही मनुष्यजन्म पावाल ' म्हणून शाप दिला. पुढें हा गंगेचे पोटीं आपल्या भावांबरोबर शंतनूपासून उत्पन्न झाला. परंतु द्युशिवाय इतर वसूंना बालपणींच जलांत बुडवून टाकिल्यामुळें हा पुनः वसूंच्या जन्मास आला ( म. आ. १०६. ११ कुं. ).

१४ सदाचारसंपन्न असा एक ब्राह्मण. हा एकदां तीर्थ-यात्रेस जात असतां यास पांच भयानक पुरुष दिसले. त्या प्रत्येकास एकेक व्यंग होतें. पर्युषित बेढब होता; सूचिमुख सुईसारखा होता; शिघ्रग पांगळा होता; रोहकास मान उंच करतां येत नसे व लेखकास चालतांना फार श्रम पडत. पुढें या ब्राह्मणानें त्यांस नीति ऐकविली तेव्हां ते सर्व उद्धरून गेले ( पद्म. सृ. ३२ ).

१५ राज्यपुत्रसंज्ञक देशाचा राजा. हा ८००० शूद्रांचा राजा होता. मागध हा याचा पुत्र ( भवि. प्रति. १. ६ ). हा कश्यपसेवक होता. याला कश्यपानें क्षत्रिय केलें व राजपुत्रनगर दिलें ( भवि. प्रति. ४.२१ ).

१६ दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

**पृथुक**—रैवत मन्वंतरांतील देवगण. यांत आठ देव होते. अजित, ओजिष्ठ, जिगीषु, वानहृष्ट, विजय, शकुन, सत्कृत व सत्यदृष्टि ( ब्रह्मांड. २. ३६. ७३ ).

**पृथुकर्मन्**—( सो. क्रोष्टु. ) विष्णुमतें शशबिंदूचा पुत्र.

**पृथुकीर्ति**—( सो. क्रोष्टु. ) मत्स्य, विष्णु व वायु यांच्या मतें शशबिंदूचा पुत्र.

२ श्रुतदेवेचें नामान्तर.

**पृथुग**—चाक्षुष मन्वंतरांतील देवगण.

**पृथुग्रीव**—खर राक्षसाचा एक अमात्य. यास पृथुश्याम असेंहि नांव होतें.

**पृथुजय**—( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें महाभोजाचा पुत्र. विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें शशबिंदूचा पुत्र.

**पृथुतेजस्**—( सो. क्रोष्टु. ) शशबिंदूचा नातू ( पद्म. सृ. १३ ).

**पृथुदर्भ**—( सो. अनु. ) औशीनर शिबिपुत्र बृहद्दर्भाचें नामांतर.

**पृथुदात**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें शशबिंदूचा पुत्र.

**पृथुदान**—( सो. क्रोष्टु. ) विष्णुमतें शशबिंदूचा पुत्र.

**पृथुधर्मन्**—( सो. क्रोष्टु. ) मत्स्य व वायु यांच्या मतें शशबिंदूचा पुत्र.

**पृथुपर्शु**—एका संघाचें नांव असावें (ऋ. ७. ८३. १).

**पृथुमनस्**—( सो. क्रोष्टु. ) मत्स्यमतें शशबिंदूचा पुत्र

**पृथुयशस्**—( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें महाभोजाचा व विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें शशबिंदूचा पुत्र. पण शशबिंदूचा नातू दिला आहे ( पद्म. सृ. १३ ).

**पृथुरश्मि**—इंद्रानें यतींना ठार केल्यावर त्यांच्यापैकीं हा जिवंत राहिला. पुढें इंद्रानें याचें पालनपोषण केलें व याच्या इच्छेप्रमाणें इंद्रानें याला क्षत्रियाचें सामर्थ्य दिलें. पार्थुरश्म नांवाचीं सामें आजहि प्रसिद्ध आहेत. तीं म्हटलीं असतां क्षत्रियांचें सामर्थ्य वाढतें ( पं. ब्रा. १३. ४. १७ ).

**पृथुरुक्म**—( सो. क्रोष्टु. ) विष्णु व पद्म यांच्या मतें परावृताचा पुत्र. पण मत्स्य व वायु यांच्या मतें रुक्मकवचाचा पुत्र.

**पृथुरोमन्**—( २ पृथु पहा ).

**पृथुलाक्ष**—( सो. अनु. ) चतुरंग राजाचा पुत्र. यास बृहद्रथ, बृहत्कर्मन्, बृहद्भानु आणि चंप असे चार पुत्र होते ( भा. ९. २३. ११; म. स. ८. १० कुं. ).

**पृथुवेग**—यमसभेंतील एक राजर्षि ( म. स. ८. १२ कुं.).

**पृथुश्याम**—पृथुग्रीवाचें नामांतर.

**पृथुश्रवस्**—दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

२ (सो. क्रोष्टु.) शशबिंदू राजाचा नातू (पद्म. सृ. १३). विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें शशबिंदूचा व भागवतमतें महाभोजाचा पुत्र.

३ द्वैतवनांत पांडवांबरोबर असलेला ऋषि.

४ यमसभेंतील एक क्षत्रिय (म. स. ८. १२ कुं.).

**पृथुश्रवस् कानीत**—वश अश्व्याचा हा उदार दाता होय (ऋ. ८. ४३. २४). अश्वींनीं याच्यावर कृपा केल्याचा उल्लेख आहे (ऋ. १. ११६. २१).

**पृथुश्रवस् दौरेश्रवस**—सर्पसत्रांत हा उद्गात्याचें काम करीत होता (पं. ब्रा. २५. १५. ३).

**पृथुषेण**—(स्वा. प्रिय.) विभु राजाचा पुत्र. याची स्त्री आकुति व पुत्र नक्त (भा. ५. १५. ६).

**पृथुसेन**—(सो. अज.) भागवतमतें रुचिराश्वाचा नातू व पाराचा पुत्र. पण विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें रुचिराश्वाचा पुत्र.

२ (सो. अनु.) मत्स्यपुराणांत हाहि एक कर्णाचा पुत्र दिला आहे (मत्स्य. ४८).

**पृथ्विराज**—धृतराष्ट्राचा पुनर्जन्म (भवि. प्रति. ३.१). यानें प्रद्योत, परिमल, विद्योत व भीष्मसिंह यांना ते असंतुष्ट म्हणून घालवून दिले. त्यांच्या सांगण्यावरून जयचंद्राचें याच्याशीं वैर झालें (भवि. प्रति. ३. ५). जयचंद्रकन्या संयोगिनी हिचें यानें स्वयंवरांत हरण केलें व हा दिल्लीस गेला. पुढें पृथ्विराजाचें जयचंद्राशीं सहा दिवस घनघोर युद्ध झालें (भवि. प्रति. ३. ६).

**पृश्नि**—सविता नामक आदित्याची पत्नी (भा. ६. १८. १).

२ ही मरुतांची आई होय. हिच्याकरितां एक सूक्तहि आहे (ऋ. ६. ४८).

३ स्वायंभुव मन्वंतरांतील सुतपा प्रजापतीची पत्नी. हीच देवकी झाली होती (भा. १०. ३. ३२). हिचा पुत्र पृश्निगर्भ.

४ (सो. वृष्णि.) हा वायु व विष्णु यांच्या मतें अनमित्राचा पुत्र. यास वृष्णि व वृषभ अशीं नामांतरें आहेत.

**पृश्निगर्भ**—पृश्निपुत्र. हा विष्णूचा अवतार होय. ही त्रेतायुगांतील उपास्यदेवता आहे (भा. १०. ३. ३५; ११. ५. २६; म. शां. ३५०. ४६ कुं.).

**पृश्निगु**—पुरुकुत्स व पृश्निगु यांचा अश्वींनीं कृपा केली म्हणून एकत्र निर्देश आहे (ऋ. १. ११६. ७).

**पृश्निमेधस्**—सुमेधस् देवांपैकीं एक

**पृषत्**—(सो. नील.) विष्णु व वायु यांच्या मतें सोमकाचा पुत्र. पण भागवतमतें हा जंतूचा पुत्र. याचा पुत्र द्रुपद (म.आ. १८०.६ कुं; ह. वं. १. ३२). नीप राजा जनमेजय यास उग्रायुधानें ठार करून त्याचें राज्य हरण केलें. पुढें भीष्मानें उग्रायुधाला ठार केलें. तेव्हां इतके दिवस कांपिल्यांत असलेल्या यानें दक्षिणपांचाल (आपले वंशाकडील अहिच्छत्राचें राज्य) आपल्या ताब्यांत घेतलें. हा भीष्माच्या तंत्रानें वागत असे म्हणून भीष्मानें यास आडकाठी केली नाहीं. याच्याच राज्यांत गंगाद्वारीं भरद्वाजाचा आश्रम होता. शिवाय भरद्वाज याचा मित्र होता. म्हणून द्रुपद भरद्वाजाकडे द्रोणाबरोबर रहावयास व शिकावयास येत असे. यामुळें द्रुपदाचें व द्रोणाचें प्रथम सख्य होतें. पुढें द्रुपदाकडून त्याचें सर्व राज्य जिंकून अर्जुनानें द्रोणास दिलें. द्रोणानें दक्षिण पांचाल द्रुपदास देऊन आपणाकरितां उत्तर पांचाल ठेविला (ह. वं. १. २०.; म. आ. १४०. ४३ कुं.).

**पृषदश्व**—(सू. नाभाग.) भागवत, विष्णु व ब्रह्मांड यांच्या मतें विरूपाचा पुत्र. याचा पुत्र रथीतर. हा अंगिरा ऋषीच्या सेवेनें ब्राह्मण होऊन त्याच गोत्राचा मंत्रकार झाला.

२ (सू. इ.) विष्णुमतें अनरण्याचा पुत्र. याला वायूंत त्रसदश्व म्हटलें आहे.

३ यमसभेंतील एक क्षत्रिय (म. स. ८. १३ कुं.).

**पृषध्र**—वैवस्वत मनूस संज्ञा नांवाच्या स्त्रीपासून झालेला पुत्र (भा. ९. १. १२; म. आ. ६९. १९ कुं.; ह. वं. १. १०; पद्म. सृ. ८). याचा गुरु च्यवन.

हा लहानपणापासूनच अडाणी व विरक्त असल्यामुळें बापानें यास गुरुगृहीं गाई राखण्याचें काम दिलें. हा तें मन लावून करीत असे. एकदां एक वाघ गाईच्या गोठ्यांत शिरला व एक गाय तोंडात धरून तो ती नेऊं लागला. इतक्यांत पृषध्र हातांत खड्ग घेऊन गाईचे रक्षणार्थ धांवला. परंतु त्या वेळीं संध्याकाळ असल्यानें यास वाघ नीट दिसला नाहीं. परंतु यानें वाघाला मारण्याकरितां खड्ग फेकलें तें वाघाच्या तोंडांतील गाईस लागून ती तत्काल मेली. दुसऱ्या दिवशीं पृषध्राचें कृत्य याच्या गुरूस कळतांच त्यानें पृषध्रास 'तूं शूद्र होशील' म्हणून शाप दिला (भा. ९. २; ह. वं. १. ११; वायु. २. २४.२; ब्रह्मांड. ३. ६१. २; ब्रह्म. ७. ४३; लिंग. १. ६६. ५२; मत्स्य. १२. २५; अग्नि. २७२. १८; विष्णु. ४. १. १३; गरुड. १. १३८. ५; पद्म. सृ. ८). पुढें पृषध्र शूद्र होऊन वनांत फिरत असतां वणव्यांत सांपडून मरण पावला.

पृषध्रास दहा भाऊ होते. श्राद्धदेव (सावत्र भाऊ), इक्ष्वाकु, नृग, शर्याति, दिष्ट, धृष्ट, करूषक, वरिष्यंत, नभग व कवि.

२ सावर्णि मनूचा पुत्र.

३ दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

४ पांडवांकडील एक राजा. भारतीय युद्धांत अश्वत्थाम्याचे हातून हा मारिला गेला (म. द्रो. १५७. १८ कुं. ).

**पृषध्र काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ५९ ). याच्याकरितां इंद्राची आयूनें प्रार्थना केली आहे ( ऋ. ८.५२.२ ). याला सांख्यायन श्रौतसूत्रांत प्रस्कण्वाचा आश्रयदाता म्हटलें आहे. तेथें याला पृषध्र मेध्य मातरिश्वन् असें म्हटलें आहे. परंतु ऋग्वेदांत या व्यक्ति वेगळ्या मानिल्या असल्यामुळें ते चुकीचें दिसतें. दस्यवेवृकाचा याला आश्रय असावा.

**पृष्ठ**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें हिरण्यनाभाचा शिष्य.

**पेदु**—याला अश्वींनीं घोडा दिल्याचा अनेक वेळां उल्लेख आहे ( ऋ. १. ११७. ९; ११८. ९; ११९. १०). हा राजा असावा (ऋ.१०.३९.१०).

**पेरुक**—हा भरद्वाजाचा आश्रयदाता होता. भरद्वाजानें याच्यापासून धन मिळविलें ( ऋ. ६.६३.९ ).

**पैंगलायनि**—भृगुकुलोत्पन्न ऋषि व पिंगलाचा वंशज.

**पैंगीपुत्र**—शौनकीपुत्राचा शिष्य.

**पैंग्य**—हा याज्ञवल्क्याचा शिष्य ( बृ. उ. ३.७. ११ ). याचा शिष्य चूड भागवित्ति. हें मधुकाचें पैतृक नांव आहे. सांख्यायनब्राह्मणांत अनेक ठिकाणीं यज्ञकर्मांत याच्या मताचा स्वीकार केला आहे ( २६. ४ ). याच्या मताला पैंग्यमत असेंच म्हटलें आहे. याच्या अनुयायांना निदानसूत्रांत ( ४. ७ ) आणि अनुपदसूत्रांत ( १. ८ ) पैंगिन् असें म्हटलें आहे. आपस्तंब श्रौतसूत्रांत याचा पैंगायणीब्राह्मण असा उल्लेख आहे ( ५. १५. ८ ). आश्वलायन गृह्यसूत्रांत ब्रह्मयज्ञांगतर्पणांत याचा उल्लेख आहे. पौर्णिमा इष्टि व अमावास्या इष्टि यांवर पैंग्य व कौषीतकी यांचीं मतें निरनिराळीं आहेत ( ऐ. ब्रा. ७. १० ). याच्या नांवाशीं जुळणारे खालील ग्रंथ आढळतात. १ पैंगलोपनिषद्, २ पैंगिरहस्यब्राह्मण, ३ पैंग्यस्मृति, ४ पैंग्यायन ( नि ) ब्राह्मण. हा प्राणाला ब्रह्म मानी ( कौ. उ. २. २ ). युधिष्ठिराच्या सभेंतील एक ऋषि ( म. स. ४.२३ कुं. )

**पैज**—व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील भागवतमतें जातूकर्ण्याचा शिष्य. ( व्यास पहा).

**पैजवन**—सुदासाचें पैतृक नांव.

२ एक शूद्र. याला वेदाचा अधिकार नव्हता म्हणून यानें ऐन्द्राग्नविधानानें दक्षिणा दिल्याची प्रसिद्धी आहे ( म. शां. ५९. ३७–४२ कुं. ).

**पैठीनसि**—एक स्मृतिकार. याचा याज्ञवल्क्यस्मृतींत उल्लेख नाहीं. तरीहि हा बराच प्राचीन असावा. हा अथर्ववेदी असावा. कारण याच्या धर्मशास्त्रांतील श्राद्धासंबंधीं सांगितलेले कांहीं विधि हे अथर्ववेदांतील कांहीं विधींशीं जुळतात. स्मृतिचन्द्रिका, अपरार्क, मिताक्षरा व दुसऱ्या कित्येक ग्रंथांत पैठीनसीचे उतारे घेतले आहेत.

**पैप्पल**—कश्यपकुलोत्पन्न गोत्रकार.

२ वसिष्ठकुलोत्पन्न गोत्रकार.

**पैल**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

२ भृगुकुलांतील गोत्रकार व पिली ऋषीचा वंशज ( म. आ. ६४. १३२ कुं. ).

३ ऋक्शाखेचें अध्ययन करणारा कृष्णद्वैपायन व्यासाचा शिष्य. हा वसु ऋषीचा पुत्र असून पांडवांच्या राजसूय यज्ञांत होता नामक ऋत्विज होता ( भा. १. ४. २१; १२. ६. ५२ ). व्यासानें याला ब्रह्मांडपुराण सांगितलें ( ब्रह्मांड. १. १. १४ ). याचे शिष्य इंद्रप्रमति व बाष्कल ( व्यास पहा ).

४ व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें शाकवैण रथीतराचा शिष्य.

५ भास्करसंहितेंतील निदान तंत्राचा कर्ता ( ब्रह्मवै. २. १६ ).

६ ऋग्वेदी श्रुतर्षि.

**पैलमौलि**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**पोतक**—कश्यपाचा पुत्र (म.उ. १०३.११-१७ कुं. ).

**पोद्द**—अमिताभ देवांपैकीं एक.

**पौंस्यायन**—दुष्टरीतूचें पैतृक नांव.

**पौडव**—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार. याबद्दल खांडव असा पाठभेद आहे.

**पौंडरिक**—क्षेमधृत्वन्चें पैतृक नांव.

**पौंड्र**—पौंड्रक वासुदेवाचें नामान्तर ( भा. ११. ५. ४८ ).

**पौंड्रक**—धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

२ कुंभकर्णाच्या निकुंभ नामक पुत्राची स्त्री रामरावणाच्या युद्धप्रसंगीं गरोदर असल्यामुळें माहेरी गेली होती. रावणादिकांचा निःपात झाल्यावर ती प्रसूत झाली व तिला पौंड्रक नांवाचा पुत्र झाला. यानें मायापुरींत राहणाऱ्या शतमुखी रावणाच्या साहाय्यानें बिभीषणाला पदच्युत करून मारून टाकण्याचीहि भीति घातली होती. रामानें याला जिवंत पकडून बिभीषणाच्या स्वाधीन केलें व शतमुखी रावणाला ठार मारिलें ( आ. रा. राज्य. ५ ).

**पौंड्रक मात्स्यक**--भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा.

**पौण्ड्रक वासुदेव**--करुष देशाचा राजा. याच्या बापाचें नांव वसुदेव असावें ( म. आ. २०१.१२ कुं.). पौण्ड्रक हें दैशिक नांव वासुदेवकृष्णाहून भिन्नता दाखविण्याकरितां याच्या आरंभीं जोडिलें जातें. चेदि देशांत पुरुषोत्तम नांवानें हा प्रसिद्ध होता. याला वासुदेव असेंहि तेथें म्हटलें आहे. हा जरासंधाला जाऊन मिळाला होता. हा मूर्ख व अविचारी असून कृष्णाचीं चिन्हें धारण करीत असे. वंग, पुंड्र व किरात या देशांत याची प्रबल सत्ता होती. राजसूयाचे वेळीं कौशिक नदीच्या तीरीं राहणाऱ्या याच्यापासून भीमानें करभार घेतला होता.त्या वेळीं यानें कृष्णाच्या त्रासानें युद्ध न करण्याचें ठरवून मुकाट्यानें कर दिला (म.स.३१.२२-२३ कुं.). 'परमात्मा वासुदेव तो तूंच' असें लोकांनीं चढविल्यावरून अभिमानानें यानें आपला दूत कृष्णाकडे पाठविला व त्याला कळविलें कीं, 'लोकांवर अनुग्रह करून त्यांचा उद्धार करण्याकरितां मी पृथ्वीवर वासुदेव नांवानें अवतीर्ण झालों आहें. तूं मूढपणानें माझें नांव व माझीं चिन्हें धारण करून लोकांमध्यें प्रसिद्धीस आला आहेस, तर तें वासुदेव नांव व चिन्हें अतःपर धारण करण्याचें सोडून दे व मला शरण ये. नाहींतर,युद्धाला तयार हो !' कृष्णानेंहि 'मी तुझें पारिपत्य करून तुझा गर्वपरिहार करणार आहे' असा निरोप पाठविला. नंतर हा आपला मित्र काशिराजा याची मदत मिळविण्यासाठीं काशी नगराला गेला. कृष्णानें पौण्ड्रकाला शासन करण्याचा निश्चय केला व तो स्वतः रथामध्यें बसून काशी नगराला गेला. कृष्ण आपल्यावर चालून येत आहे असें पाहून पौण्ड्रक स्वतःचें दोन अक्षौहिणी सैन्य घेऊन निघाला. याचा मित्र काशिराजा आपलें तीन अक्षौहिणी सैन्य घेऊन समरभूमीवर याच्या मदतीस आला. या वेळीं पौण्ड्रकानें शंख, चक्र, गदा, शार्ङ्ग-धनुष्य, वनमाला, रेशमी पिवळा पितांबर, उत्तरीयवस्त्र, मौल्यवान भूषणें इत्यादि धारण केलीं असून गरुडावर आरोहण केलें होतें. एखाद्या नटाप्रमाणें हुबेहुब आपला वेष घेणाऱ्या या कपटी पौण्ड्रकाला पाहून कृष्णाला हंसूं आलें. शेवटीं युद्धांत याचा मित्रांसह वध करून कृष्ण द्वारका नगरीला परत गेला ( भा. १०. ६६ ).

**पौतक्रत**--पूतक्रतेचा पुत्र. पृषध्राच्या सूक्तांत याचा उल्लेख आहे. दस्यवेवृकाचें हें मातृक नांव आहे ( ऋ. ८. ५६. २ ).

**पौतिमाषीपुत्र**--एक आचार्य ( बृ. उ. ६. ५. १ ). हा कात्यायनीपुत्राचा शिष्य.

**पौतिमाष्य**--गोपवनाचा शिष्य असलेल्या एका आचार्याचें नांव ( बृ. उ. २. ६. १; ४. ६. १ ). याचा शिष्य गोपवन.

**पौत्रायण**--( जानश्रुति पहा ).

**पौत्रि**--अत्रिकुलांतील एक प्रवर.

**पौर**--रुम व रुशम यांच्याबरोबर पौराचा उल्लेख आला आहे ( ऋ. ८. ३. १२ )

२ भृगुकुलोत्पन्न एक गोत्रकार.

३ ( सो. पूरु. ) मत्स्यमतें पृथुसेनाचा पुत्र.

४ ( भविष्य. ) विष्णुमतें एक राजवंश. यांत अकरा राजे झाले.

**पौर आत्रेय**--सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ७३-७४ ).

**पौरव**--विश्वामित्र ऋषीचा एक पुत्र.

२ पूरुकुलांतील महा दानशूर राजा ( म. द्रो. ५७ ).

३ एक महारथि ( म. आ. ६८. २८; उ. १६७. १९; भी. ११६. १५; द्रो. ३७. ६; २०१. ८२ कुं ). अभिमन्यूनें याचा वध केला ( म. द्रो. १४. ६२ कुं. ). याचा पुत्र दमन ( म. भी. ६१. २० कुं ).

४ अश्वत्थाम्यानें रथशक्ति फेंकून मारिलेला पांडवपक्षीय राजा ( म. द्रो.२०० ).

**पौरवी**--युधिष्ठिराची पत्नी. हिचा पुत्र देवक ( भा. ९. २२. ३० ).

२ वसुदेवाच्या स्त्रियांतील एक ( पद्म सृ. १३ ) हिला सुभद्र, भद्रवाह, दुर्मद, भद्र असे पुत्र झाले ( भा. १२. ११. ३५ ).

**पौरा**--( पौरुकुत्सा पहा ).

**पौरुकुत्स**--आंगिराकुलांतील मंत्रकार.

**पौरुकुत्सा**--गाधीची आई ( रेणुका. ७ ). हिचे पौरा असेंहि नांव आढळतें ( ब्रह्म. १०. २८ ).

**पौरुकुत्स्य**--( त्रसदस्यु पहा ).

**पौरुशिष्टि**--( तपोनित्य पौरुशिष्टि पहा ).

**पौरुषेय**--ज्येष्ठ मासांतील सूर्यासमागमें असणारा राक्षस ( भा. १२. ११. ३५ ).

२ यातुधानाचा पुत्र. क्रूर, विकृत, रुधिराद, मेदाश व वपाश हे याचे पुत्र ( ब्रह्मांड. ३. ७. ९४ ).

**पौर्णिमास**--अगस्त्यकुलांतील गोत्रकार.

२ ( पूर्णोत्संग पहा ).

**पौर्णिमागतिक**--( पूर्णिमागतिक पहा ).

**पौलकायनि**--आंगिराकुलोत्पन्न गोत्रकार.

**पौलस्त्य**--पुलस्त्य ऋषीचा पुत्र विश्रवा ऋषि ( पुलस्त्य पहा ).

२ भृगुकुलोत्पन्न एक गोत्रकार.

३ अगस्त्यकुलोत्पन्न गोत्रकार.

४ भौत्य मनूचा पुत्र.

**पौलह**--दक्षसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ अगस्त्यकुलांतील एक गोत्रकार ( पुलह पहा ).

**पौलि**--वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**पौलुषि**--सत्ययज्ञाचें पैतृक नांव.

**पौलोम**--पुलोमेचे पुत्र. हे हिरण्यपुरांत राहत असत ( भा. ६. ६. ३५; म. व. १७५. १२-६३ कुं. ). हे ब्रह्मदेवाच्या वरानें मग्न झाले असतां अर्जुनानें यांचा वध केला ( पद्म. स. ६; निवातकवच पहा ).

**पौलोमी**--द्वादशादित्यांतील शक्र नामक आदित्याची स्त्री. हिचे पुत्र जयंत, ऋषभ व मीढुष ( भा. ६. १८. ७ ). ही पुलोमीची कन्या असावी (अध्या. रा. अयो. १.१५; शची पहा).

२ ( पुलोमा पहा ).

**पौषाजिति**--अंगिराकुलांतील गोत्रकार व ऋषि. याबद्दल पौषाजिति व पाष्यजिति असे पाठभेद आहेत.

**पौष्करसादि**--उपनयन झाल्यापासून तीन दिवसांनीं गायत्री उपदेश न करितां तत्काल करावा, असें याचें मत आहे ( म. श्री. १९. २. ५ ). ह्याप्रमाणें सध्यां लोक चालतात.

एक आचार्य ( सां. आ. ७. १७; आप. ध. १. ६. १९. ७; १०. २८. १ ). वैय्याकरण म्हणून येणारा व हा एकच असेल काय ? ( तै. प्रा. ५. ३७-३८; पा. सू. वार्तिक ८. ४. ४८ ).

**पौष्टी**--पूरूची पत्नी ( म. आ. ८८. ४ कुं ).

**पौष्णायन**--भृगुकुलांतील गोत्रकार.

**पौष्पिण्डय**--सामविधानब्राह्मणांतील शेवटल्या वंशावरून हा जैमिनीचा शिष्य दिसतो ( पौष्यंजि पहा ).

**पौष्य**--पूषन्‌चा पुत्र. याला तीन स्त्रिया असूनहि पुत्र नव्हता. पुढें शंकराच्या आराधनेनें चंद्रशेखर नांवाचा पुत्र झाला. पौष्याची राजधानी ब्रह्मावर्तांत दृषद्वतीच्या कांठीं करवीर नगरीं होती ( कालि. ४९ ).

२ पुष्यपुत्र ध्रुवसंधीचें नामांतर. याच्या स्त्रीनें गुरुदक्षिणे-निमित्त उत्तंक ऋषीस आपल्या कानांतील दिव्य कुंडलें दिलीं होतीं ( म. आ. ३. ८२ कुं. ).

**पौष्यंजि**--व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील सुकर्मन्‌चा शिष्य ( व्यास पहा ). हा सामवेदी श्रुतर्षीहि आहे. याला जैमिनीचा शिष्यहि म्हटलें आहे ( सामविधानब्रा. ). यानें सामवेदाच्या पांचशें संहिता केल्या. यानें उदीच्यसाम शाखा सुरू केली. यानें याज्ञवल्क्याला योग शिकविला ( ब्रह्मांड. २. ३५. ३८ )

**पौष्यायन**--भृगुकुलांतील गोत्रकार.

**प्रकाम**--काश्मीर देशाधिपति कैकय राजाचा द्वितीय पुत्र ( भवि. प्रति. ३. ३१ ).

**प्रकालन**--वासुकिकुलांतील सर्पसत्रांत दग्ध झालेला एक सर्प ( म. आ. ५७. ६ कुं. ).

**प्रकाश**--तम ऋषीचा पुत्र. याचा पुत्र वागींद्र ( म. अनु. ८. ६३ कुं. ).

**प्रकाशक**--रैवत मनूचा पुत्र.

**प्रकृति**--रैवत मन्वंतरांतील देवगण.

**प्रगाथ काण्व**--प्रगाथ नांवाच्या मंत्रविशेषाचे हे द्रष्टे आहेत (ऋ. ८. १. १-२ इ.; ऐ. आ. २. २. २ ). प्रगाथ मिश्र जातीच्या छंदाचें नांव आहे. त्याचे कर्ते म्हणून हें नांव पडलें. आश्वलायनाच्या ब्रह्मयज्ञांगतर्पणांत यांचा उल्लेख आहे. हा अनुक्रमणीप्रमाणें दुर्गहाचा समकालीन दिसतो.

**प्रगाथ घौर**--( १ कण्व पहा ).

**प्रघस**--मारुतीनें मारिलेला रावणपक्षीय राक्षस ( वा. रा सुं. ४६; म. व. २८६. २ कुं. ).

२ सुग्रीवानें मारिलेला एक राक्षस ( वा. रा. यु. ४३ ).

**प्रघसा**--अशोकवनांतील सीतारक्षणार्थ असलेली राक्षसी ( वा. रा. सुं. २४ ).

**प्रघास**--लेख देवांपैकीं एक.

**प्रघोष**--श्रीकृष्ण व लक्ष्मणा यांचा एक पुत्र ( भा. १० ६१. १५ ).

**प्रचंड**--त्रिपुरासुर व शंकर यांच्या युद्धांत कार्तिकेया-बरोबर युद्ध करणारा एक राक्षस ( गणेश. १. ४३ ).

२ एक गोप. याच्या येथें जाबालीनें चित्रगंधा गोपीचा जन्म घेतला ( पद्म. पा. ७२ ).

३ विष्णूचा एक पार्षद.

**प्राचिन्वत्**--( सो. पूरु. ) भागवत व विष्णु यांच्या मतें पहिल्या जनमेजयाचा पुत्र. यास प्राचिन्वत् असें नामांतर होतें.

**प्रचेतस्**--हा एक ब्रह्ममानसपुत्र असून प्रजापति होता ( वायु. २. ४.५३ ). हा भार्गवकुलांतील मंत्रकार आहे.

२ प्राचीनबर्हीला सवर्णा नामक समुद्रकन्येपासून झालेले दहा पुत्र ( २ दक्ष पहा ). भागवतांत शतद्रुतीपासून झाल्याचें दिलें आहे ( भा. ४. २४. १३ ).

एक स्मृतिकार. पराशरानें दिलेल्या स्मृतिकारांच्या यादींत याचें नांव आहे. याज्ञवल्क्यानें याचा उल्लेख केलेला नाहीं. नित्यकर्में, श्राद्ध, अशौच व प्रायश्चित्त यांसंबंधांचे प्रचेतसाचे गद्य उतारे मिताक्षरा आणि अपरार्क यांत दिले आहेत. ' आचारी, शिल्पकार, वैद्य, दासदासी, राजे व

राजाचे अधिकारी यांनीं अशौच पाळूं नये. ' या अर्थाचा याचा श्लोक मिताक्षरेंत ( याज्ञ. ३. २७ ) दिला आहे. या श्लोकाचा मेधातिथीनें स्मृति म्हणून उल्लेख केला आहे ( मनु. ५.६० ). पण त्यांत प्रचेतसाचें नांव दिलें नाहीं. यावरून मनु, विष्णु वगैरेंप्रमाणेंच यालाहि मेधातिथीनें मान दिला आहे. अशौच आणि प्रायश्चित्त यांसंबंधीचे बृहत्-प्रचेतसाचे श्लोक मिताक्षरा (याज्ञ. ३. २०. २६३-२६४), हरदत्त (गौतम. २२-१८) आणि अपरार्क यांत आलेले आहेत. वृद्ध-प्रचेतसाचेहि श्लोक मिताक्षरा आणि अपरार्क यांत आले आहेत. स्मृतिचंद्रिका आणि हरदत्त ( गौतम. २३ ) यांत प्रचेतसाचे गद्य उतारे सांपडतात.

३ लेख देवांतील एक.

४ पारावत देवांतील एक.

५ प्रसूत देवांतील एक.

६ ( सो. द्रुह्यु. ) भागवतमतें दुर्मनाचा, विष्णुमतें दुर्गमाचा व मत्स्यमतें दुर्दमाचा पुत्र. हा या वंशांतील शेवटचा राजा होय. याचे प्राचेतस संज्ञक शंभरपुत्र उत्तरेस जाऊन म्लेच्छपति झाले. याला सुचेतस् असें नामान्तर आढळतें.

७ वरुणाचें नांव (भा. ७. १२. २८; म. स. ७. १६ कुं.).

**प्रचेतस् आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १६४ ).

**प्रचेष्ट**—राजपुत्र माधवाचा सेवक ( पद्म. क्रि. ५ ).

**प्रजंघ**—अंगदानें मारिलेला रावणपक्षीय राक्षस ( वा. रा. यु. ७५ ).

२ रामपक्षीय वानर. यानें संपाति राक्षसास मारिलें ( वा. रा. यु. ४३ ).

**प्रजन**—( सो. ऋक्ष. ) मत्स्यमतें कुरु राजाच्या पांच पुत्रांतील कनिष्ठ.

**प्रजय**—राष्ट्रपालाच्या दोनपुत्रांतील दुसरा. हा आईबापांस सोडून गंगातीरीं गेला. तेथें बारा वर्षे तप करून यानें शारदेचें पूजन केलें. तेव्हां देवीनें यास एक नगर दिलें. तेंच कान्याकुब्ज होय ( भवि. प्रति. ४.३ ).

**प्रजा**—एक ब्राह्मण. यानें पूर्वजन्मीं भिल्ल असतां विष्णुपूजेकरितां ब्राह्मणास कमळ दिल्यामुळें हा शुचिर्भूत ब्राह्मणकुलांत जन्मला ( पद्म. क्रि. १३ ).

**प्रजागरा**—एक अप्सरा.

**प्रजाति**—स्वायंभुव मन्वंतरांतील जित् देवांपैकीं एक.

**प्रजादर्प**—एक मध्यमाध्वर्यु.

**प्रजानि**—( सू. दिष्ट. ) विष्णु व वायु यांच्या मतें प्रांशूचा पुत्र. भागवतांत यास प्रमति म्हटलें आहे.

**प्रजापति**—ब्राह्मणग्रंथ व उपनिषदें यांत प्रजापति नांव यज्ञ, बारा महिने, वैश्वानर, अन्न, वायु, सामे व आत्मा इत्यादिकांना लाविलें आहे. यावरून महत्त्व वर्णन करण्याकरितां कोणालाहि प्रजापति शब्द लावितात, असें दिसतें. शिवाय हा एक स्वतंत्र देवताहि आहे. सामांचें महत्त्व वर्णन करण्याकरितांहि त्यांचा याच्याशीं संबंध जोडला आहे ( पं. ब्रा. ७. ५-६ ). याच्या वेदांत अनेक गोष्टी आहेत, त्यांपैकीं कांहीं पुढें दिल्या आहेत.

प्रजापतीचे सांधे खिळखिळे झाले, तेव्हां देवांनीं यज्ञ करून यास बरें केलें ( श. ब्रा. १. ६. ३. ३५ ).

प्रजापति प्रथम एकटाच होता. यानें प्रजोत्पत्तीची इच्छा करून आपल्या शरीरांतील मांस काढून त्याची अग्नींत आहुति दिली. तेव्हां अग्नीपासून शृंगविहीन असा बोकड उत्पन्न झाला ( तै. सं. २. १. १ ).

पुढें प्रजा उत्पन्न केल्यावर सर्व प्राणी वरुणाकडे गेले, तेव्हां प्रजापतीनें त्यांना परत बोलाविलें. परंतु वरुण कबूल होईना. नंतर प्रजापतीनें जेव्हां एक पांढरा खूर असलेला असा कृष्ण पशु त्यास देण्याचें ठरविलें, तेव्हां वरुणानें सर्व प्राण्यांची मालकी सोडिली ( तै. सं. २. १. २ ).

पृथ्वी उत्पन्न झाल्यावर देवांना प्रजोत्पादनाची इच्छा झाली तेव्हां त्यांनीं प्रजापतीच्या सांगण्यावरून तपश्चर्या करून अग्नीच्या आश्रयानें एका गाईची उत्पत्ति केली. त्या गाईकरितां सर्व देवांनीं प्रयत्न करून अग्नीस संतुष्ट केलें व नंतर गाईपासून प्रत्येकास ३३३ देव झाले व अशा रीतीनें असंख्यात प्रजा उत्पन्न झाली ( तै. सं. ७. १. ५ ).

पूर्वी प्रजापतीनें यज्ञाची व छंदांची वांटणी केली. त्या वेळीं यानें आपला अनुष्टुप् छंद अच्छावाकीय ऋचेला दिला. त्या वेळीं अनुष्टुप् रागावून प्रजापतीस दोष देऊं लागला, तेव्हां प्रजापतीनें सोमयाग करून अनुष्टुप् छंदास आद्यस्थान दिलें. तेव्हांपासून अनुष्टुप् छंदाचा उपयोग सर्व सवनांत प्रथमतः करितात.

प्रजापतीची प्रजा प्रजापतीला टाकून जाऊं लागली तेव्हां अग्नीच्या साहाय्यानें यानें ती प्रजा परत मिळविली ( ऐ. ब्रा. ३. १२ ). यानें अग्निष्टोम करून देवांना आत्मदान केलें ( पं. ब्रा. ७. २ . १ ).

प्रजापतीनें एकदां मनुष्य असूनहि देवत्व पावलेल्या ऋभूंना तृतीयसवनांत सोमपान करवेलें व आपणहि त्यांच्यासह सोम प्याला. तेव्हां अग्न्यादि देवांनीं प्रजापतीची खूप निर्भर्त्सना केली ( ऐ. ब्रा. ३. ३० ).

पूर्वी राक्षसांच्या उग्र तपानें प्रजापति तुष्ट झाला व राक्षसांच्या जवळ येऊन त्यांना म्हणाला 'वर माग' राक्षस म्हणाले, ' सूर्याशीं आमची लढाई व्हावी. ' प्रजापति म्हणाला, ' ठीक आहे. तुम्ही सूर्याबरोबर लढा. ' तेव्हांपासून राक्षस दररोज

सूर्य उगवल्यापासून मावळेपर्यंत सूर्याशीं लढत असतात. त्यांचें निवारण करण्याकरितां ब्रह्मनिष्ठ लोक पूर्वेकडे अर्ध्य देतात. त्या पाण्याचे बिंदु वज्र बनून सूर्याशीं लढणाऱ्या राक्षसांना लागतात व त्यामुळें पराभूत झालेल्या राक्षसांचा देश जो ‘अरुणद्वीप’ त्या ठिकाणीं राक्षस पळून जातात ( तै. आ. २. २ ).

प्रजापतीनें देव व असुर उत्पन्न केले, परंतु राजा उत्पन्न केला नाहीं, मग देवांच्या विनंतीवरून इंद्र निर्माण केला. इंद्राच्या हातांत त्रिष्टुप् देवतेच्या अनुग्रहानें १५ धारांचें एक वज्र उत्पन्न झाले आणि त्या वज्रानें इंद्रानें असुरांचा पराभव केला. देवांना स्वर्गाची प्राप्ति झाली, पण स्वर्गांत देवांना खावयास मिळेना. त्यांनीं विचार केला कीं, स्वर्ग ही भोगभूमि आहे कर्मभूमि नव्हे. यासाठीं भूलोकांमध्यें कर्मे करून आपल्याला हविर्भाग देण्यासाठीं ‘अयास्य’ ह्या आंगिरस गोत्रातील ऋषीस भूमीवर एका यज्ञाच्या अनुष्ठानाची कल्पना देऊन पाठविला. नंतर त्या अयास्यानें भूलोकावर यज्ञानुष्ठान करून देवास हविर्भाग देण्याचा प्रचार सुरू केला ( तै. ब्रा. २. २. ७ ).

इंद्रानें वृत्राला जिंकण्याकरितां कसोशीनें प्रयत्न चालविला. तेव्हां वृत्रानें सर्वांस भिवविण्याकरितां जोरानें श्वास सोडिला. त्याबरोबर सर्व पळाले. पण मरुतांनीं इंद्राची पाठ सोडिली नाहीं. त्यामुळें इंद्राला जोर आला व त्याच्या ध्यानांत आलें कीं, मरुत् आपले खरे स्नेही आहेत. वृत्राला ठार केल्यावर इंद्राला वाटलें कीं, प्रजापतीचा मान आपणांस मिळावा. तेव्हां प्रजापतीनें त्याला महेंद्र पदवी दिली ( ऐ. ब्रा. ३. २०-२२ ).

पुढें प्रजापतिप्रमुख देवांनीं इंद्रास साम्राज्याभिषेक केला, त्यामुळें अभीष्ट वस्तु प्राप्त करण्याची इंद्राला शक्ति आली. शेवटीं त्यानें मृत्यूवर सुद्धां जय मिळविला ( ऐ. ब्रा. ८. १२; १४).

एकदां प्रजापतीनें स्वतःच होतृत्व पत्करून यज्ञास आरंभ केला. त्या वेळीं ‘मला उद्देशून आरंभ करावा’ अशी प्रत्येक देवतेस इच्छा झाली. तेव्हां कोणास उद्देशून आरंभ करावा असा प्रजापतीस पेंच पडला. यानें सर्व देवतांचा उपक्रम एकदम होईल असा ‘आपो रेवतीः’ (ऋ. १०.३०.१२) मंत्र म्हटला. आप व रेवती या शब्दांनीं सर्व देवतांचा निर्देश होत असल्यानें प्रत्येक देवतेस ‘मलाच उद्देशून यज्ञास आरंभ केला’ असें वाटून समाधन झालें ( ऐ. ब्रा. २. १६ ).

यानें आपलीं मुलें असणाऱ्या देव, मनुष्य व असुर यांना एका द वर्णानेंच दमन, दान व दया यांचा उपदेश केला ( बृ. उ. ५. १-३ ).

प्रजापतीच्या मनांत जग उत्पन्न करावें असें आलें. तेव्हां त्याच्या मनापासून धूर उत्पन्न झाला. नंतर अग्नि, ज्योति ज्वाळा, प्रभा वगैरे उत्पन्न झालें. हीं सर्व मिळून एक घट्ट गोळा झाला. हाच प्रजापतीचा बस्ति म्हणजे मूत्राशय होय. पुढें तो बस्ति परमेश्वरानें फोडिला, तेव्हां समुद्र निर्माण झाला. मूत्राशयापासून समुद्राची उत्पत्ति असल्यामुळें त्याचें पाणी खारट असतें व तें कोणी पीत नाहीं. जलमय अशा समुद्रापासूनच प्रजापतीनें पृथ्वी, अंतरिक्ष व द्यौ हीं अनुक्रमें उत्पन्न केलीं. मग प्रजापतीनें आपल्याच शरीरांतून असुर निर्माण केले. मग दिवसरात्र व अहोरात्राचा संधिकाल निर्माण केला. अशा रीतीनें सर्व प्रकारची प्रजा प्रजापतीनें निर्माण केली ( तै. ब्रा. २. २. ९ ).

प्रजापतीनें देव उत्पन्न केले व त्या देवांच्या मागून सर्व देवांत धाकटा इंद्र उत्पन्न केला. नंतर प्रजापति त्याला म्हणाला कीं, ‘हे इंद्रा, तूं स्वर्गांत जा, तेथें देव आहेत; त्यांच्यावर तूं माझ्या आज्ञेनें आधिपत्य कर.’ त्याप्रमाणें इंद्र देवाकडे गेला. असतां देवांनीं विचारिलें, कीं, ‘आम्ही तुझ्यापेक्षां मोठे आहोंत. मग तूं आमचा अधिपति कसा होणार? आमचा तुझ्यापासून फायदा तरी काय होणार?’ त्यानें परत येऊन प्रजापतीस सर्व सांगितलें. तो म्हणाला, ‘तुझ्या जवळचें तें विशेष तेज मला दे.’ तेव्हां प्रजापति म्हणाला, ‘तें तेज दिल्यावर मला कोण ( कः ) विचारणार?’ इंद्र त्याला म्हणाला, ‘तूं ‘क’ या नांवानें प्रसिद्ध होशील. मला तेज दिलें तरी तुझें प्रजापतित्व कायम राहील.’ नंतर प्रजापतीनें आपल्या तेजाचें एक पदक तयार करून इंद्राच्या मस्तकावर बांधिलें. तेव्हां तो इंद्र देवाचें आधिपत्य करण्यास समर्थ झाला ( तै. ब्रा. २. २. १० ).

प्रजापतीनें सोम, तीन वेद आणि सीतासावित्री नांवाची एक कन्या उत्पन्न केली. सोमानें तीनहि वेद आपल्या मुठींत झांकून ठेविले होते. सीतासावित्रीच्या मनांत सोमाशीं लग्न करावयाचें होतें, पण सोमाच्या मनांत प्रजापतीच्या श्रद्धा नांवाच्या मुलीशीं विवाह करावा असें होतें. प्रजापतीस हें सर्व ठाऊक होतें. पुढें सीतासावित्री जेव्हां याच्याकडे आली, तेव्हां यानें तिला एक वशीकरणाचा प्रयोग सांगितला. स्थागर नामक एक सुगंधि वनस्पति उगाळून तिचें गंध तयार केलें व मंत्रांनीं भारिलें. त्या गंधाचा सीतासावित्रीच्या कपाळीं टिळा लावला. मग सीतासावित्री सोमाकडे गेली. सोम तिला पाहतांच मोहित होऊन तिच्याशीं लाडीगोडीनें वागूं लागला. पण त्याच्या प्रेमाची पारख करण्याकरितां ‘माझ्याशिवाय कोणालाहि भोगूं नये, अशी अट तिनें घातली व मुठींत काय आहे तें स्पष्ट सांगावयास सांगितलें. तें सर्व कबूल केल्यावर लग्न झालें व उभयतां सुखानें राहूं लागलीं. हा वशीकरणप्रयोग जे करतील त्यांनाहि अशीच सिद्धि प्राप्त होईल ( तै. ब्रा. २. ३. १० ).

प्रजापतीनें आपली कन्या सूर्यासावित्री ही सोमाला दिली. तिच्या स्वयंवरप्रसंगीं सर्व देव आले होते. त्या प्रसंगीं प्रजापतीनें सहस्र ऋचात्मक एक आश्विनशस्त्र तयार करून तें देवांच्या पुढें ठेविलें. तें पाहून सर्व देवांना त्याबद्दल अभिलाष उत्पन्न झाला. तेव्हां हें कोणाला द्यावें असा सर्वांना विचार पडला. त्यावर ' जो कोणी गार्हपत्य अग्नीपासून आदित्यापर्यंत सर्वांत आधीं धांवून जाईल त्याला तें शस्त्र ( स्तोत्र ) मिळेल ' अशी तोड निघाली. पुढें अश्विनींनीं तो पण जिंकून तें शस्त्र मिळविलें ( ऐ. ब्रा. ४. ७ ).

प्रजापतीला आपल्या मुली ' द्यौ व उषा ' पाहून कामवासना उत्पन्न झाली. त्यांनीं रोहित मृगीचीं रूपें धारण केलीं म्हणून प्रजापतीनें ऋष्यमृगाचें रूप धारण केलें. सर्व देवांनीं हा निंद्य असें दुहितृगमन करीत आहे. हें जेव्हां पाहिलें तेव्हां प्रजापतींतील पापीपुरुष ठार करण्याकरितां देवांनीं आपलीं भयंकर स्वरूपें एकत्र करून ' भूतवान् ' नामक भीषण पुरुष उत्पन्न केला. त्यानें प्रजापतीचा पापी मृगदेह मारिला. तोच मृगदेह आपणांस मृग नक्षत्राच्या रूपानें आकाशांत दिसत असतो. रोहिणीचा ताराहीच प्रजापतीची कन्या होय व व्याध हाच रुद्र असून त्याच्या बाणाचें टोंक, मध्य व फाळ हीं देखील आपणांस सध्यां आकाशांत दिसतात. त्या वेळीं प्रजापतीचें जें रेत पडलें, त्यानें निरनिराळ्या प्राण्यांची उत्पत्ति झाली. प्रजापतीनें जग निर्माण करण्याकरितां तप केलें व अग्नि, वायु, आदित्य, तीन वेद, भूःभुवःस्वः, अ उ म् अशा क्रमानें सर्व उत्पन्न केले ( ऐ. ब्रा. ३. ३३; ५.२ ).

एकदां प्रजापति आपल्या कन्येस पाहून मोहित झाला व यानें तिच्याशीं मृगरूप धारण करून मैथुनक्रिया केली. परंतु या निंद्य कृत्याबद्दल प्रजापतीस शासन करण्यास कोणीहि समर्थ नव्हता. तेव्हां सर्व देवांनीं आपल्या शरीरांतील उग्र अंश एकत्र करून त्याचा एक भयंकर पुरुष बनविला. तोच रुद्र होय. रुद्रानें नंतर प्रजापतीस बाणांनीं विद्ध करून पाडिलें. याच्या अर्धवट पडलेल्या रेतापासून अग्निमारुत उक्थ झाले. पुढें देवांचा राग शांत होऊन त्यांनीं प्रजापतीला अभिषेक केला. हा प्रजापति म्हणजे यज्ञ होय ( श. ब्रा. १. ७. ४ ).

प्रजापतीनें आपल्या कन्येच्या ठिकाणीं जें रेत सिंचन केलें तें इतस्ततः धावूं लागलें. तेव्हां मरुतांनीं त्याचा एक पिंड बनविला. त्यापासून आदित्य व वारुणि भृगु यांची उत्पत्ति झाली. नंतर उरलेले रेतपिंड दग्ध होऊन निखाऱ्याप्रमाणें झाले व त्यांपासून अंगिरसांची उत्पत्ति झाली; जे निखारे विझून कोळशांप्रमाणें झाले, त्यांपासून कृष्णवर्ण पशूंची उत्पत्ति झाली व विस्तवाच्या संयोगानें पृथ्वीचा जो भाग ( तापून ) लाल झाला, त्याच्यापासून रक्तवर्णीय पशु निर्माण झाले ( ऐ. ब्रा. ३. ३४ ). शेवटला ऐतरेयब्राह्मणांतला भाग शतपथ ब्राह्मणांत जरा वेगळा आहे.

हा ब्रह्मन्चा शिष्य. याचा शिष्य मृत्यु ( वं. ब्रा. २ ). हाहि मंत्रद्रष्टा आहे ( ऋ. ९. १०१.१३-१६ ).

ब्रह्मदेवानें सृष्टि उत्पन्न केली, त्यांत त्यानें आपले मानसपुत्र म्हणजे शरीरावयवापासून झालेले पुत्र हे उत्पन्न केले. मूळ हेतु प्रजोत्पादन हा असल्यामुळें त्यानें निर्माण केलेल्या सर्व पुत्रांना प्रजा निर्माण करावयास सांगितलें. म्हणून त्यांना प्रजापति म्हणतात. प्रजापति ह्या शब्दाची व्याख्या संतति निर्माण करणारें अशी आहे.

लोकस्य संतानकरास्तैरिमा वर्धिताः प्रजाः ।
प्रजापतय इत्येवं पठ्यन्ते ब्रह्मणः सुताः ॥ ( वायु. २. ४.४८).

विश्वे प्रजानां पतयो येभ्यो लोका विनिःसृताः । ( मत्स्य. १७१. २५ ). प्रजापतींनीं ज्याप्रमाणें प्रजा निर्माण करावयाची, त्याचप्रमाणें निर्णय देण्याचें कामहि त्यांना करावें लागत होतें. तत्त्वज्ञानासंबंधीं कांहीं अडचण उपस्थित झाल्यास देव, दैत्य किंवा मनुष्य प्रजापतीकडे जात व तिचें निवारण करून आपलें समाधान करून घेत ( छां. उ. ८. ७. १. ३.; ऐ. ब्रा. ५. ३; श्वेत. ४. २ इ. ).

प्रजापतींच्या संख्येविषयीं कोठेंहि एकवाक्यता आढळून येत नाहीं. सात, तेरा, चवदा, एकवीस, अशा निरनिराळ्या संख्या निरनिराळ्या पुराणांत आढळतात. प्रथम प्रजापति कांहीं ठिकाणीं मूळ ईश्वर मानिला असून इतरत्र ब्रह्मदेव मानिलेला आढळतो. रोहिणी नक्षत्राची देवता प्रजापति आहे. प्रजापतीला शनीची पीडा झाली असतां लोकक्षय होतो ( पद्म. उ. ३३ ).

मरीचि, अत्रि, अंगिरस्, पुलस्त्य, पुलह, क्रतु, दक्ष, वसिष्ठ, भृगु, नारद हे सर्वत्र प्रजापति या नांवाखालीं आढळतात. वायु, ब्रह्मांड, गरुड, मत्स्य व महाभारत यांत अन्ये, अपरे, बहवः म्हणून अधिक दिलेले आहेत. पण ज्यांची संतति विस्तृत आहे, अशांचींच नांवें तेथें दिलेलीं आहेत. तीं अशीं-कर्दम, कश्यप, शेष, विक्रांत, सुश्रवस्, बहुपुत्र, कुमार, विवस्वत् अरिष्टनेमि, बहुल, कुशोच्चय, वालखिल्य, संभूत, परमर्षय, मनोजव, सर्वगत, सर्वभोग ( वायु, ब्रह्मांड ). धर्म, रुद्र, मनु, सनक, सनातन, सनत्कुमार, रुचि, श्रद्धा, पितर, बर्हिषद, अग्निष्वात्त, कव्यादान, दीप्यान, आज्यपान ( गरुड ). गौतम, हस्तींद्र, सुकृत, मूर्ति, अप्, ज्योति, अय, स्मय(मत्स्य). मत्स्यांतील जास्त सांगितलेले स्वारोचिष मन्वंतरांतील होते. ब्रह्मन्, बृहस्पति, स्थाणु, मनु, क, परमेष्ठिन्, दक्ष, सप्तपुत्र, कश्यप, कर्दम, प्रह्लाद, सनातन, प्राचीनबर्हि, दक्ष-

प्राचेतस, सोम, अर्यमन, शशबिंदुपुत्र व गौतम (महाभारत). (म. स ११; शां. २०८; अनु. १३२; भा. ३. १२; मत्स्य. ९.९; १७१, २७; वायु. २. ४; ब्रह्मांड. २. ९. २१; ३.१; गरुड. १.५; पद्म. उ. २३०). हे दर कल्पांत सृष्टि उत्पन्न करितात. स्वायंभुव मन्वंतरांत यांची प्रजा वाढेना, तेव्हां ब्रह्मदेवानें स्वतः कन्या निर्माण करून दक्षाला दिली आणि दक्षानें पुष्कळ कन्या उत्पन्न करून इतर प्रजापतींना दिल्या. पण दक्षयज्ञांत शंकरानें सर्वांना जाळिलें (ब्रह्मांड २. ९. ३१-६७). हा एक व्यास होता (व्यास पहा).

बौधायन धर्मसूत्रांत (२. ४. १५; २. १०. ७१) याचें मत ग्राह्य धरिलें आहे. वसिष्ठानें कित्येक वेळां याच्या श्लोकांचा निर्देश केला आहे (३. ४७; १४. १६-१९, २४-२५, ३०-३२). हे श्लोक मनुस्मृतींत आढळतात. यावरून बौधायन व वसिष्ठ, मनु आणि प्रजापति हे एकच समजत असावेत.

आनंदाश्रम-संग्रहांत (९०-९८) प्रजापतींची श्राद्धविषयक एक स्मृति दिली आहे. तींत १९८ श्लोक आहेत. यांतील श्लोक अनुष्टुप्, इंद्रवज्रा, उपजाति, वसंततिलका आणि स्रग्धरा या वृत्तांत आहेत. या स्मृतीत कल्पशास्त्र, स्मृति, धर्मशास्त्र आणि पुराणें यांचा विचार केलेला आहे. कन्या आणि वृश्चिक राशीसंबंधींचा या स्मृतींत एक श्लोक असून हाच श्लोक कार्ष्णाजिनीनेंहि दिला आहे. अशौच आणि प्रायश्चित्त यासंबंधींचे प्रजापतीचे श्लोक मिताक्षरेंत (याज्ञ. ३. २५. २६०) दिले आहेत. पदार्थशुद्धि, श्राद्ध, साक्षीदार, दिव्यें आणि अशौच यासंबंधींचे याचे श्लोक अपरार्कानें दिले आहेत. हे श्लोक छापील प्रजापतिस्मृतीमध्यें आढळत नाहीत. परिव्राजकासंबंधीं अपरार्कानें याचा एक गद्य उतारा दिला आहे (अपरार्क. ९५२). मामाच्या गोत्रानें मुलानें मातेस पिंडदान करावें, असें प्रजापतीचें मत दर्शविणारा श्लोक लौगाक्षीनें दिला आहे. हाच श्लोक अपरार्कानेंहि दिला आहे (अपरार्क. ५४२). अपरार्क, स्मृतिचंद्रिका, पराशरमाधवीय आणि दुसऱ्या कांहीं ग्रंथांत याचे व्यवहारावरील श्लोक दिले आहेत. साक्षीदाराचे कृत आणि अकृत असे दोन प्रकार आहेत. हे यानें नारदस्मृतींतून घेतले असावेत (ऋणादान. श्लो. १४९; अपरार्क.६६६; स्मृतिच.व्य. ८०). प्रतिवादीच्या ग्राह्य उत्तराचें यानें विवेचन केले असून त्याच्या चार प्रकारांच्या व्याख्याहि दिल्या आहेत (स्मृतिच. व्य. ९८; परा. मा. ३. ६९-७३) वेश्यासंबंधीं याचे श्लोक पराशरमाधवीयांत आहेत. निपुत्रिक विधवेचा नवऱ्याच्या संपत्तीवर हक्क असून नित्य त्याचें मासिक व वार्षिक श्राद्ध करण्याचा हक्क आहे. शिवाय तिनें याप्रसंगीं नवऱ्याच्या आप्तांना मानहि दिला पाहिजे असें याचें मत आहे (परा. मा. ३. ५३६).

२ रथंतर कल्पांतील एक राजा. याची स्त्री चंद्ररूपा. हिनें त्रिरात्र तुलसीव्रत केलें होतें (पद्म. उ. २५).

**प्रजापति परमेष्ठिन्**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १२९).

**प्रजापति वाच्य**—सूक्तद्रष्टा (ऋ. ३. ३८; ५४-५६; ९. ८४).

**प्रजापति वैश्वामित्र**— सूक्तद्रष्टा (ऋ. ३. ३८; ५४-५६).

**प्रजावत् प्राजापत्य**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १८३; ऐ. ब्रा. १. २१). प्रवर्ग्य नामक अनुष्ठानांत याचें सूक्त पठन केलें म्हणजे संतति होते, असें तेथें म्हटलें आहे. याला आईच्या नांवावरून सौपर्णेय असेंहि म्हणत असत (तै. आ. १०. ६३),

**प्रज्ञ**—अमिताभ देवांतील एक.

**प्रज्योति**—अमिताभ देवांतील एक.

**प्रणित**—मरीचिगर्भ देवांपैकीं एक.

**प्रणिधि**—(२ पद्मावती पहा).

**प्रतंस**—(सो.) भविष्यमतें अवतंसाचा पुत्र.

**प्रतपन**—नलानें मारिलेला रावणपक्षीय राक्षस (वा. रा. यु. ४३).

**प्रतर्दन**—(सो. काश्य.) वेदांत याला काशिराज दैवोदासि म्हटलें आहे व हा सूक्तद्रष्टा आहे (ऋ. ९. ९६; १०. १७९. २).याचा पुत्र भरद्वाज (क. सं. २१.१०). दैवोदासि प्रतर्दनानें यज्ञांतील दोष काढून टाकण्याविषयीं नैमिषारण्यांतील सत्रांत चर्चा केली होती (श. ब्रा. २. ६. ५). याला मरणानंतर इंद्र लोक मिळाला. तेथें इंद्राची इच्छा नसतांहि मोठ्या खुबीनें इंद्राला वचनांत गुंतवून यानें त्याकडून ब्रह्मविद्या संपादन केली (कौ. उ. ३. १).

दिवोदासास ययातिकन्या माधवी हिच्यापासून झालेला पुत्र (म. स. ८; व २०१; उ. ११७;अनु. २७१ कुं.). ययातीशीं दिलेला हा संबंध कालदृष्ट्या विसंगत आहे. याचा आजा भीमरथ होय. हा अत्यंत पराक्रमी असून यानें आपल्या पराक्रमाचे जोरावर द्युमान्, शत्रुजित्, कुवलयाश्व, ऋतध्वज, वत्स इत्यादि नांवें संपादन केली होतीं (विष्णु. ४. ८). काशिराज दिवोदास हा यास भारद्वाजाच्या प्रसादानें झाला होता. दिवोदासाच्या आजास (हर्यश्वास) हैहय नांवाच्या राजांनीं बराच त्रास दिला होता व त्याचें राज्यहि बळकाविलें होतें. हर्यश्वाचा मुलगा सुदेव व नातू दिवोदास या दोघांकडूनहि हैहयांचा पराभव झाला नाहीं. त्यामुळें दिवोदासानें हैहयांचा

पराभव करणारा असा प्रतर्दन नांवाचा मुलगा भारद्वाजाकडून मागून घेतला. प्रतर्दन हा जन्मतःच तेरा वर्षांचा वाढलेला असून सर्व विद्येत पारंगत होता. याला पित्याच्या दुःखाचें कारण कळतांच यानें वीतहव्य व त्याचे पुत्र हैहय यांचा पराभव केला. व हैहयांना ठार केलें. सर्व पुत्र मेलेले पाहतांच वीतहव्य घाबरून भार्गवाचे आश्रयास गेला. तेव्हां भार्गवानें ‘हा ब्राह्मण असल्यामुळें अवध्य आहे’ असें यास सांगून वीतहव्यास प्रतर्दनापासून सोडविलें (म. अनु. ३०). प्रतर्दन हा अत्यंत दानशील होता. यानें आपला पुत्रहि एकदां ब्राह्मणाला दान केला होता (म. अनु. १३७). एकदां हा नारदासह रथांत बसून जात असतां एका ब्राह्मणानें याच्या रथाचे घोडे मागून नेले. त्यामुळें हा स्वतःच रथ ओढून नेऊं लागला. पुढें आणखी ब्राह्मण आले. त्यांनीं याचेजवळ घोडे मागितले. परंतु त्या वेळेस एकहि घोडा नसल्यानें यास ब्राह्मणांची मागणी पुरी करितां येईना. या वेळेस ब्राह्मणांना हा त्रासून अपशब्द बोलला. त्यामुळें हा आपल्या भावाबरोबर स्वर्गात जात असतां अर्ध्या वाटेंतून खालीं पडला (म.व. १९८). यास अलर्कादि बरेच पुत्र होते. परंतु याचे मागून अलर्क हाच गादीवर बसला (भा. ९. १७. ६). ययाति स्वर्गातून पडला असतां यानें आपलें पुण्य त्याला दिलें व पुनः स्वर्गाला पाठविलें (म. आ. ८६ कुं.).

प्रतर्दन एकच आहे. पण महाभारत व पुराणें यांची वंशावळ भिन्न आहे. त्यामुळें वेगवेगळे दोन दिवोदास असावेत असें दिसतें. महाभारतांत दोनहि दिवोदासांच्या माहितीची भेसळ झाली आहे. दुसऱ्या दिवोदासाचा पुराणांत पत्ता नाहीं; व पहिल्याचा महाभारतांत उल्लेख नाहीं. प्रतर्दनाचा संबंध महाभारताप्रमाणें वंशावळ असणाऱ्या दुसऱ्या दिवोदासाशी असावा.

२ उत्तम मन्वंतरांतलि देवगण. हे बारा आहेत—अवध्य, अवरति, ऋतु, केतुमान्, धिष्ण्य, धृतधर्मन्, यशास्विन्, रथोर्मि, वसु, वित्त, विभावसु व सुधमस् (ब्रह्मांड.२. ३६. ३०-३१).

३ शिव देवांतलि एक.

**प्रताप**—जयद्रथाचा भाऊ असावा (म. व. २६६. ११ कुं.).

**प्रतापवत्**—(भविष्य.) चपहानिवंशांतील चंद्रगुप्ताचा पुत्र. यानें पन्नास वर्षे राज्य केलें. यास मोहन नांवाचा पुत्र होता (भवि. प्रति. ४. २).

**प्रतापाग्र्य**—शत्रुघ्नाबरोबर अश्वरक्षणार्थ गेलेला एक योद्धा (पद्म. पा. ११). याचें दमनाशीं युद्ध होऊन हा मूर्च्छित झाला (पद्म. पा. २३).

**प्रतापिन्**—कुंडलपूरच्या सुरथ राजाच्या दहा पुत्रांपैकी एक (पद्म. पा. ४९).

**प्रतापेंद्र**—(सो.) भविष्यमतें शकहोत्राचा पुत्र. यानें अयोध्येंत १०००० वर्षे राज्य केलें.

**प्रति**—(सो. क्षत्र.) भागवतमतें कुशाचा पुत्र. यास प्रतिक्षत्र व प्रतिपक्ष अशीं नामांतरें आहेत.

**प्रतिक्षत्र**—(सो. क्रोष्टु.) विष्णु व मत्स्य यांच्या मतें शमीचा पुत्र. यास प्रतिक्षिप्त म्हटलें आहे.

२ (सो. क्षत्र.) विष्णुमतें क्षत्रवृद्धाचा पुत्र (प्रति पहा).

**प्रतिक्षत्र आत्रेय**—सूक्तद्रष्टा (ऋ. ५. ४६).

**प्रतिक्षिप्त**—(सो. क्रोष्टु.) वायुमतें शर्मीचा पुत्र (१ प्रतिक्षत्र पहा).

**प्रतिक्षेत्र**—(सो. क्रोष्टु.) शोणाश्वाचा पुत्र. याचा पुत्र भोज (पद्म. सृ. १३).

**प्रतित्वक**—(सू. निमि.) वायुमतें मरूचा पुत्र. यास प्रतिबंधक, प्रतीपक, प्रतींधक व प्रदीपक अशीं नांवें होतीं.

**प्रतिथि देवतरथ**—हा देवतरस् श्यावसायन ऋषीचा शिष्य. याचा शिष्य निकोथन (वं. ब्रा. २).

**प्रतिपक्ष**—(सो. क्षत्र.) वायुमतें धर्मवृद्धाचा पुत्र (प्रति पहा).

**प्रतिप्रभ आत्रेय**—सूक्तद्रष्टा (ऋ. ५. ४९).

**प्रतिबंधक**—(सू. निमि.) विष्णुमतें मरूचा पुत्र (प्रतित्वक पहा).

**प्रतिबाहु**—(सो. वृष्णि.) भागवतमतें श्वफल्क व गांदिनी यांचा एक पुत्र. यास प्रतिवाह म्हटलें आहे.

२ कृष्णाचा प्रपौत्र, वज्राचा पुत्र व सुबाहूचा पिता.

**प्रतिभानु**—श्रीकृष्ण व सत्यभामा यांचा पुत्र.

**प्रतिभानु आत्रेय**—सूक्तद्रष्टा (ऋ. ५. ४८).

**प्रतिमेधस्**—सुमेधस् देवांतील एक.

**प्रतिरथ**—(सो. पूरु.) मतिनाराचा पुत्र. याचा पुत्र कण्व (अग्नि. २७७. ५; गरुड. १४०. ४).

**प्रतिरथ आत्रेय**—सूक्तद्रष्टा (ऋ. ५. ४७).

**प्रतिरूपा**—अग्नीध्रपुत्र किंपुरुषाची स्त्री. ही मेरूची कन्या होय (भा. ५. २. २३).

**प्रतिवाह**—(सो. वृष्णि.) श्वफल्काच्या पुत्रांपैकीं एक (१ प्रतिबाहु पहा).

**प्रतिविंध्य**—(सो. कुरु.) युधिष्ठिरास द्रौपदीपासून झालेला पुत्र (भा. ९. २२. २९; म. आ. ६३; ६४; ६८). हा विंध्यपर्वतासारखा अचल असा जन्मकालीं दिसला; म्हणून यास हें नांव होतें (म. आ. २४७. ७७ कुं.)

भारतीय युद्धांत याच्या रथाचे अश्व शुभ्र असून त्यांचा कंठ निळा असे. हा निद्रित असतां यास अश्वत्थाम्यानें मारिलें (म. द्रो. २३; सौ. ८. ६० कुं.). याच्या मृत्यूचा हा दिवस मार्गशीर्ष अमावास्येचा होय ( भारतसावित्री ).

२ शाकलदेशचा राजा. याला राजसूयाच्या वेळीं अर्जुनानें जिंकिलें ( म. स. २७. १४ कुं. ). हा पांडवाकडे यावा म्हणून दूत गेला होता ( म. उ. ४. १३ कुं. ).

**प्रतिवेश्य**—हा बृहद्दिवाचा शिष्य (सां. आ. १५. १).

**प्रतिव्यूह**—वायुमतें वत्सव्यूहाचा पुत्र. यास प्रतिव्योम म्हणतात.

**प्रतिव्योमन्**—( सू. इ. भविष्य. ) भागवतमतें वत्सवृद्धाचा, विष्णुमतें वत्सव्यूहाचा व मत्स्यमतें वत्सद्रोहाचा पुत्र ( प्रतिव्यूह पहा ).

**प्रतिश्रवस्**—प्रतीपाचें नामांतर ( १ प्रतीप पहा ).

**प्रतिश्रुत**—वसुदेवास शांतिदेवेपासून झालेला पुत्र ( भा. ९. २४. ५० ).

**प्रतिहर्तृ**—( स्वा. प्रिय. ) प्रतीह राजास सुवर्चलेपासून झालेल्या तीन मुलांतील ज्येष्ठ. हा यज्ञकर्मात निपुण असे. याच्या स्त्रीचें नांव स्तुति असून तिजपासून याला अज व भूमन् हे दोन पुत्र झाले ( भा. ५. १५. ५ ). विष्णुमतें नाभिवंशीं प्रतिहाराचा पुत्र.

२ मरुद्गणांतील सहाव्या गणापैकीं एक.

**प्रतिहार**—( स्वा. नाभि. ) विष्णुमतें परमेष्ठिन्चा पुत्र.

**प्रतीक**—( सू. नृग. ) वसु राजाचा पुत्र. याला ओघवान् नांवाचा पुत्र होता ( भा. ९. २. १८ ).

**प्रतीकाश्व**—( सू. इ. भविष्य.) भागवतमतें भानुमान् राजाचा पुत्र. प्रतीताश्व व प्रतीपाश्व अशीं यास नामांतरें आहेत.

**प्रतीच्या**—पुलस्त्याची पत्नी (म. उ. १७७. १६कुं.).

**प्रतीत**—प्रथिताचें नामांतर.

**प्रतीताश्व**—( सू. इ. भविष्य. ) वायुमतें भानुरथाचा पुत्र ( प्रतीकाश्व पहा ).

**प्रतीदर्श श्वैक्न**—यानें दाक्षायण यज्ञ किंवा वसिष्ठ यज्ञ केल्यामुळें लोकांनीं याला पदच्युत केला असूनहि हा पुनः लोकप्रिय राजा झाला ( श. ब्रा. २. ४. ४. ३–४ ). हा पांचलराज सुप्लन् सार्ञ्जयाचा समकालीन होता.

**प्रतीन्धक**—प्रदीपकाचें नामांतर.

**प्रतीप**—(सो. कुरु.) भागवत, विष्णु, मत्स्य, भविष्य व वायु यांच्या मतें भीमसेनाचा प्रपौत्र व दिलीपाचा पुत्र. पण महाभारतांत भीमसेनास कैकयराजकन्या सुकुमारीपासून झालेला पुत्र असें आहे. याच्या स्त्रीचें नांव सुनंदा. याला परिश्रवस् असें नामांतर होतें ( म. आ. ६३. ४६ कुं. ). हा बराच वृद्ध झाला, तरी यास मुलींच पुत्र नव्हता. तेव्हां यानें पुत्रप्राप्त्यर्थ तप करण्यास आरंभ केला. तप करीत असतां एकदां गंगा स्त्रीरूपानें येऊन याच्या दक्षिणांकावर बसली. तें पाहून प्रतीपानें गंगेस आपली सून होण्यास सांगितलें. तपश्चर्या संपतांच हा स्वदेशीं परत आला. पुढें कांहीं कालानें यास शांतनु, देवापि व बाह्लीक असे तीन पुत्र झाले. याचें शांतनूवर फार प्रेम होतें व यानें मरतांना शांतनूस सांगितलें कीं, 'जी स्त्री तुला अरण्यांत भेटेल व तुला वरण्याची इच्छा करील, तिच्याशीं तूं बिनदिक्कत लग्न लाव,' ( म. आ. १०३ कुं. ).

२ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**प्रतीप प्रातिसुत्वन**—हें एका मनुष्याचें नांव आहे ( अ. वे. २०. १२९. २ ).

**प्रतीपक**—( प्रतित्वक पहा ).

**प्रतीपाश्व**—( सू. इ. भविष्य. ) मत्स्यमतें ध्रुवाश्वाचा पुत्र ( प्रतीकाश्व पहा ).

**प्रतीबोध**—बोधाबरोबर याचा उल्लेख आहे (अ. वे. ५. ३०. १०; ८. १. १३ ).

**प्रतीर**—भौत्य मनूचा पुत्र.

**प्रतीह**—( स्वा. प्रिय. ) परमेष्ठिन्चा पुत्र. याच्या आईचें व स्त्रीचें नांव सुवर्चला असें होतें. यास प्रतिहर्तृ, प्रस्तोतृ आणि उद्गातृ असे तीन पुत्र होते ( भा. ५. १५. ३ ).

**प्रतृद**—हें तृत्सूंचें दुसरें नांव आहे (ऋ. ७. ३३.१४).

**प्रतोष**—यज्ञ व दक्षिणा यांचा पुत्र.

२ स्वारोचिष मन्वंतरांतील एक देव.

**प्रत्यग्र**—( सो. ऋक्ष. ) भागवत व विष्णु यांच्या मतें उपरिचर वसूच्या पुत्रांपैकीं एक ( म. आ. ६४. ४४ कुं. ). यास वायुमतें प्रत्यग्रह व मत्स्यमतें प्रत्यश्रवस् अशीं नांवें आहेत ( वा. रा. बा. ३२. १–११). यापुढें चैद्य घराण्याचा वंश आढळत नाहीं. फक्त दमघोष, शिशुपाल व धृष्टकेतु हीं तीन माणसें भारतीय युद्धाच्या सुमारास आढळतात.

**प्रत्यग्रह**—( प्रत्यग्र पहा ).

**प्रत्यश्रवस्**—( प्रत्यग्र पहा ).

**प्रत्यह**—( प्रत्यूह पहा ).

**प्रत्यूष**—अष्टवसूंपैकीं एक. याचा पुत्र देवल. हा पुढें नानकाच्या रूपानें अवतरला ( भवि. प्रति. ४. १७ ).

**प्रत्यूह**—भृगुकुलांतील गोत्रकार. याबद्दल प्रत्यह असा पाठ आहे.

**प्रथ वासिष्ठ**—मंत्रद्रष्टा ( ऋ. १०. १८१. १ ).

**प्रथित**—स्वारोचिष मनूचा पुत्र.

**प्रदीपक**—( प्रतित्वक पहा ).

**प्रदोष**—( स्वा. उत्तान. ) पुष्पार्ण राजास दोषा नामक स्त्रीच्या ठायीं झालेला ज्येष्ठपुत्र ( भा. ४. १३. १४ ).

**प्रद्युम्न**—चक्षुर्मनूपासून नड्वलेस झालेल्या बारा पुत्रांतील एक. यास सुद्युम्न असेंहि म्हणत असत ( भा. ४. १३. १६ ).

२ ( सू. निमि. ) वायुमतें भानुमानाचा पुत्र.

३ ( सो. क्रोष्टु. ) कृष्णास रुक्मिणीपासून झालेला पुत्र. हा सनत्कुमाराचा अंश होय ( म. आ. ६८. १५२ कुं. ). पूर्वजन्मीं शंकराचे हातून मारिला गेलेला हा मदनच होता. याचे हातून शंबरासुराचा मृत्यु असल्यानें शंबरासुरास जेव्हां कळलें कीं, मदन हा रुक्मिणीचे उदरीं प्रद्युम्नरूपानें येणार आहे, तेव्हां शंबरासुरानें प्रद्युम्नास सहावे दिवशींच सूतिकागृहांतून उचलून आणिलें व समुद्रांत फेंकून दिलें. तेव्हां याला एका माशानें गिळिलें. परंतु दैवयोगानें प्रद्युम्न त्या माशाच्या पोटांत जिवंत राहिला. पुढें तो मासा एका कोळ्यास सांपडून त्यानें तो शंबरासुरास नजर केला. शंबरानें तो मासा आपल्या मायावती नांवाच्या भार्येजवळ नेऊन दिला. मायावतीनें तो चिरतांच त्यांतून एक दिव्य बालक बाहेर पडलें. त्या बालकास पाहतांच हा कोण असावा, अशी मायावतीस शंका आली. इतक्यांत त्या ठिकाणीं नारद प्रकट होऊन त्यानें ' हा साक्षात् मदनच असून प्रद्युम्नरूपानें रुक्मिणीचे उदरीं आला होता व तूं मदनपत्नी रति असल्यामुळें प्रद्युम्नाची भार्या आहेस, म्हणून तूं याची सेवा कर ' असें सांगितलें. हें ऐकून मायावतीस आनंद झाला व तिनें यास नीट तऱ्हेनें वाढवून बऱ्याच विद्या शिकविल्या. पुढें हा मोठा झाल्यावर यास शंबराचें सर्व कृत्य कळलें. तेव्हां यानें क्रोधानें शंबराशीं लढाई करून त्यास ठार केलें व नंतर भार्येसह हा रुक्मिणीच्या भेटीस गेला ( विष्णु. ५. २६; ह. वं. २. १०४–१०७; भा. १०. ५५ ). हरिवंशांत मुलगा समुद्रांत न फेंकतां मायावतीला पुत्र नसल्यामुळें तिला दिला असें आहे.

ब्रह्मवैवर्तपुराणांत वरील कथेहून थोडी भिन्न कथा आहे. ती अशीः—शंबरानें प्रद्युम्नास सूतिकागृहांतून उचलून नेलें. परंतु याला समुद्रांत न टाकितां आपल्या मायावती नांवाच्या बायकोजवळ नेऊन दिलें. मायावतीसहि मुलगा नसल्यामुळें तिनें आनंदानें या बालकास वाढविलें. पुढें प्रद्युम्न मोठा झाल्यावर एके दिवशीं सरस्वती मायावतीकडे आली व तिनें तिला सर्व वृत्तांत कळविला. पुढें प्रद्युम्नास शंबराचीं दुष्ट कृत्यें कळल्यावर यानें शंबरास ठार मारिलें ( ब्रह्मवै. ४. ११२ ). प्रद्युम्नास मायावतीशिवाय रुक्मीची मुलगी रुक्मवती ही दुसरी स्त्री होती ( भा. १०. ६१. १८ ). त्याचप्रमाणें यानें वज्रनाभाची कन्या प्रभावती हिलाहि हरण करून तिच्याशीं लग्न केलें होतें. यास रुक्मवतीपासून अनिरुद्ध हा पुत्र व प्रभावतीपासून दुसरा एक पुत्र असे दोन पुत्र झाले ( विष्णु. ५. २८. ७; भा. १०. ९०; ह. वं. २.३६ ).

यास शतद्युम्न असें नामांतर होतें. यानें वज्रनाभाला मारून त्याची प्रभावती नांवाची कन्या पळवून आणिल्यामुळें वज्रनाभबंधु निकुंभाशीं याचें युद्ध झालें. हा मायावी युद्धांत मोठा कुशल होता. भानु यादवाची कन्या भानुमती निकुंभ दानवानें पळवून नेली, तेव्हां कृष्णार्जुनांसह हा निकुंभाशीं लढण्यास गेला होता. तेथें यानें आपलें मायावी युद्धकौशल्य चांगलें दाखविलें. शेवटीं कृष्णानें निकुंभाला ठार केलें. या वैराचें कारण हाच होता ( ह. वं. २.९०-९१ ).

हा यादवसैन्यांतील एक महारथी होता ( भा. १०. ९०. ३३ ). एकदां शाल्व कृष्णाचा सूड उगविण्याकरितां द्वारकेवर चालून आला असतां प्रद्युम्नानें मोठ्या शौर्यानें त्याचा पराभव केला ( भा. १०.७६. १३ ). याचा सारथि दारुकपुत्र सौति हा होता (म. व. १८. ३कुं.). प्रद्युम्नानें पांडवांच्या अश्वमेधप्रसंगीं त्यांना बरीच मदत केली. हा अश्वरक्षणाकरितां ससैन्य अर्जुनादिकांच्या बरोबर होता ( जै. अ. १२ ).

पुढें सर्व यादव प्रमत्त होऊन भांडत असतां त्या यादवींतच प्रद्युम्न मरण पावला ( म. मौ. ८. कुं.; भा. ११. ३०.१६; गणेश. १.९ ).

**प्रद्योत**—कुबेरसभेंतील एक यक्ष ( म. स. १०. १६ कुं. ).

२ ( प्रद्योत. भविष्य. ) सूर्यवंशांतील शेवटच्या राजा रिपुंजय किंवा अरिंजय त्याचा प्रधान शुनक त्यानें रिपुंजयाला ठार करून आपला मुलगा प्रद्योत गादीवर बसविला. शुनकाच्या ऐवजीं सुनीक असा वायुपुराणांत पाठ आहे. या वंशांत प्रद्योत, पालक, विशाखयूप, जनक अथवा अजक आणि नंदवर्धन किंवा नंदिवर्धन किंवा वर्तिवर्धन असे पांच राजे झाले. त्यांनीं एकशें अडतीस वर्षें राज्य केलें ( भा. १२. १; विष्णु. ४. २२-२४; वायु. २. ३७ ). हे सुमारें ख्रि. पू. ७४५ ते ६९० पर्यंत राज्य करीत असावेत. पाठभेद फक्त वायुपुराणांत आढळतात.

भविष्यमतें क्षेमकाचा पुत्र. क्षेमक आणि शुनक एकच होत. याच्या बापाला म्लेच्छानें मारिल्यामुळें यानें नारदाच्या सांगण्यावरून म्लेच्छयज्ञ केला. त्या वेळीं सोळा कोसांचें यज्ञकुंड केलें होतें. यानें हारहूण, बर्बर, गुरुंड, शक, खस, यवन, पल्लव, रोमज, खरसंभव द्वीपांतून आलेले कामरु व सागराच्या मध्यभागीं असलेले चीन या जातींच्या म्लेच्छांना वेदमंत्रांच्या साह्यानें आवाहान करून भस्म करून टाकिलें. यामुळें याला म्लेच्छहंता असें नांव पडलें (भवि. प्रति. १.४).

२ परिमलाचा पिता ( परिमल पहा ).

**प्रद्वेषी**—दीर्घतमा ऋषीची पत्नी. दीर्घतमा अंध असल्यामुळें ही पुनर्विवाह करणार होती. परंतु त्यानें एकच पति असावा असा नियम घालून दिला. तरी हिनें त्याचा त्याग केलाच ( म. आ. ११३. ३२ कुं. ). हिचीं मुलें गौतमादि होत.

**प्रधान**—हा एक राजर्षि असून याची सुलभा नामक कन्या ब्रह्मनिष्ठत्वानें प्रसिद्ध होती ( म. शां. ३२५. १८३ कुं. ).

**प्रधिमि**—जटीमालिन् नामक शिवावताराचा शिष्य.

**प्रनंद**—नंदसुतास शूद्र स्त्रीपासून झालेला पुत्र. यानें मगधाचें दहा वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. १.६; ५ नंद पहा).

**प्रपोहय**—पराशरकुलातील एक गोत्रकार ऋषिगण.

**प्रबल**—कृष्णास लक्ष्मणेपासून झालेला मुलगा ( भा. १०. ६१. १५ ).

२ विष्णूचा एक पार्षद ( भा. ८. २१. १६ ).

३ गुर्जर देशाधिपति मूलवर्म्याचा द्वितीय पुत्र ( भवि. प्रति. ३. ३१ ).

**प्रबुद्ध**—( स्वा. प्रिय. ) ऋषभदेवाच्या नऊ सिद्ध पुत्रांपैकीं एक. यानें निमीला उपदेश केला होता ( भा. ५. ४. ११; ११. ३ १८ ). हा भगवद्भक्त होता.

**प्रभ**—रामसेनेंतील एक वानर ( वा. रा. उ. ३६ ).

**प्रभंकर**—जयद्रथाचा भाऊ ( म. व. २६६. ११ कुं. ).

**प्रभंजन**—मणिपूरचा राजा. याला पुत्र नव्हता, म्हणून यानें शंकराची आराधना केली. तेव्हां शंकरानें यास प्रसन्न होऊन वर दिला कीं, 'तुझ्या वंशांत एकच अपत्य होऊन तें राज्य चालवील.' या वराप्रमाणें चित्रवाहनापर्यंत राजे झाले. परंतु चित्रवाहनास चित्रांगदा नांवाची एक मुलगीच झाल्यामुळें तिच्याद्वारांच चित्रवाहनाचा वंश पुढें चालावयाचा होता. त्यामुळें चित्रवाहनानें तिला होणारा पुत्र आपल्यास देण्याच्या अटीवर ती अर्जुनास दिली. पुढें चित्रांगदेस अर्जुनापासून बभ्रुवाहन नांवाचा पुत्र झाला. तो पुत्र चित्रवाहनानें घेऊन त्यानें त्यास मणिपूरचें राज्य दिलें ( म. आ. २१५ ).

२ गंधवती नगरींत राहणारा राजा. यानें दहा हजार वर्षें शिवाराधना करून दिक्पालत्व संपादिलें. याला पूतात्मा नांवाचा पुत्र होता ( स्कंद. ४. १. १३ ).

३ क्षत्रियकुलोत्पन्न एक राजा. यानें बालकांस स्तनपान करीत असलेल्या हरिणीवर बाण सोडला असतां तिनें याला शंभर वर्षेंपर्यंत व्याघ्रदेह होण्याविषयीं शाप दिला. त्याप्रमाणें हा व्याघ्रयोनिप्रत गेला असतां, नंदा नांवाच्या गाईच्या उपदेशानें याचा व्याघ्रदेह नष्ट होऊन याला पूर्ववत् राजदेह प्राप्त झाला ( पद्म. सृ. १८ ).

**प्रभद्रा**—कर्णपुत्र वृषकेतूची स्त्री. हिला भद्रावती असेंहि म्हणत ( जै. अ. ६३ ).

**प्रभव**—भृगु व पौलोमी यांचा पुत्र, एक देव.

**प्रभस**—रावणपक्षीय राक्षस ( म. व. २८५ ).

**प्रभा**—विवस्वान् आदित्याची स्त्री. ही संज्ञा व राज्ञी यांची सवत असून हिला प्रभात नांवाचा पुत्र होता ( पद्म. सृ. ८ ).

२ देवमातांपैकीं एक ( म. स. ११. ४१ कुं ).

३ एक अप्सरा ( म. अनु. ५०. ४८ कुं.).

४ ( स्वा. उत्तान. ) पुष्पार्ण राजाच्या दोन स्त्रियांपैकीं एक ( भा. ४. १३. १३ ).

५ स्वर्भानूची कन्या. आयूची पत्नी हिचा पुत्र नहुष ( ब्रह्मांड. ३. ६. २६ ).

६ सगराच्या सुमति नांवाच्या ज्येष्ठ पत्नीचें नामांतर. हिलाच सगरापासून साठ हजार मुलें झालीं ( मत्स्य. १२. ३९–४२ ).

७ ( ३ प्रियव्रत पहा ).

**प्रभाकर**— अत्रिकुलांतील एक महत्त्वाचा ऋषि. याला रौद्राश्व किंवा भद्राश्वाच्या दहा मुली दिल्या होत्या. त्यांचीं नांवें- १ रुद्रा, २ शूद्रा, ३ भद्रा, ४ मलदा, ५ मलहा, ६ खलदा, ७ नलदा, ८ सुरसा, ९ गोचपला, १० स्त्रीरत्नकूटा. एकदां सूर्यग्रहण लागलें असतां हा सूर्याला उद्देशून 'स्वस्ति' असें म्हणाला; तेव्हां सूर्य पुनः प्रकाशित झाला. त्यामुळें यास प्रभाकर असें नांव पडलें. याच्यामुळें अत्रिवंशानें महत्त्व फार वाढलें ( ह. वं. १. ३१ ).

२ कद्रूपुत्र नाग.

३ सुतप देवांपैकीं एक

४ ( सो. ) भविष्यमतें दिवाकराचा पुत्र. यानें ४६०० वर्षें राज्य केलें.

**प्रभाता**—प्रत्यूष व प्रभास यांची आई, धर्मपत्नी ( म. आ. ६७. २० कुं. ). हें वसूचेंच कल्पभेदानें नांव आहे.

**प्रभानु**—श्रीकृष्ण व सत्यभामा यांचा पुत्र ( भा १०. ६१. १० ).

**प्रभावती**—स्वयंप्रभेचें नामांतर ( म. व. २८३. ४१ कुं.).

२ यौवनाश्व राजाची पत्नी.

३ हंसध्वज राजाचा मुलगा सुधन्वा याची पत्नी.

४ देवशर्म्याच्या बायकोची ज्येष्ठ भगिनी व अंगराज चित्ररथाची पत्नी ( म. अनु. ७७. ८. कुं. ).

५ बलाची पत्नी ( ८ बल पहा ).

६ वज्रनाभ दानवाची कन्या. वज्रनाभाला मारून प्रद्युम्नानें हिच्याशीं लग्न लाविलें ( ह. वं. २. ९० ).

७ गुर्जराधिपति मूलवर्म्याची कन्या ( भवि. प्रति. ३.३१ ).

**प्रभास**—धर्म व वसु यांचा मुलगा. याचे पुत्र विश्वकर्मन् ( प्रजापति ), अजैकपात्, अहिर्बुध्न्य, रुद्र, हर, बहुरूप, त्र्यम्बक, अपराजित, वृषाकपि, शम्भु, कपर्दिन् रेवत, मृगव्याध, शर्व व कपालिन् ( विष्णु. १. १५ ). यास बृहस्पति-भगिनी वरस्त्री किंवा भुवनेपासून विश्वकर्मन् नांवाचा पुत्र झाला ( म. आ. ६७. २७ कुं.; ब्रह्मांड. ३. ३. २१-२९ ).

२ सुतप देवांपैकीं एक.

**प्रभु**—भग व सिद्धि यांचा मुलगा ( भा. ६. १८. २ ).

२ तुषित देवांपैकीं एक.

३ साध्य देवांपैकीं एक.

४ सुमेधस् देवांतील एक.

५ अमिताभ देवांपैकीं एक.

६ ब्रह्मसभेंतील एक ऋषि.

७ अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

८ शुक व पीवरी यांचा पुत्र.

**प्रभुवसु आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ३५-३६; ९. ३५-३६ ).

**प्रभुसुत**—( २ प्रसुश्रुत पहा ).

**प्रभूत**—चाक्षुष मन्वंतरांतील देवगण.

**प्रभूति**—मरीचिगर्भ देवांपैकीं एक.

**प्रमगंद**—हा कीकटांचा राजा आणि सुदासाचा शत्रु होय ( ऋ. ३. ५३. १४ ). याला नैचाशाख असें विशेषण लावण्यांत आलें आहे.

**प्रमतक**—जनमेजयानें केलेल्या सर्पसत्रांतील एक सदस्य ( म. आ. ५३. ७ कुं. ).

**प्रमति**—चाक्षुष मन्वंतरांतील शेवटच्या कलियुगांतील विष्णूचा अवतार ( मत्स्य. १४३ ).

२ प्रयागांतील शूर ब्राह्मणाचा पुत्र. याला कृतयुगाच्या शेवटीं सेनापति करून ब्राह्मणांनीं क्षत्रियाचा पराजय केला ( विष्णुधर्म. १. ७४ ).

३ बिभीषणाच्या चार अमात्यांपैकीं एक ( वा. रा. यु. ३७ ).

४ च्यवनाचा मुलगा. याची माता सुकन्या. याला घृताची नांवाच्या अप्सरेपासून झालेला पुत्र रुरु होय ( म. व. ५८. ३१. कुं. ) याला प्रमिति असेंहि म्हटलें आहे ( म. आ. ८. २; अनु ८. ६४. कुं. ).

५ ( सू. दिष्ट. ) वायुमतें जनमेजयाचा पुत्र. यास विष्णुमतें स्वमति म्हणत ( प्रजानि पहा ).

६ अमिताभ देवांपैकीं एक.

**प्रमत्त**—अंगदेशाधिपति मायावर्म्याचा द्वितीय पुत्र ( भवि. प्रति. ३. ३१ ).

**प्रमथ**—एक रुद्रगण.

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

३ चपहानिवंशज बलांग राजाचा पुत्र. यानें पन्नास वर्षें राज्य केलें. यास अंगराग नांवाचा मुलगा होता ( भवि. प्रति. ४. २. १७ ).

**प्रमद**—हा वसिष्ठाचा पुत्र असून उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक होता ( भा. ८. १. २४ ).

२ कश्यप व दनु यांचा पुत्र.

**प्रमदा**—अंगदेशाच्या मायावर्म्याची पत्नी. हिला एका वर्षांत दहा मुलें झालीं. मत्त, प्रमत्त, उन्मत्त, सुमत्त, दुर्मद, दुर्मुख, दुर्धर, बाहु, सुरथ व विरथ. हिला मदिरेक्षणा नांवाची एक मुलगीहि होती ( भवि. प्रति. ३. ३१ ).

**प्रमद्वरा**—मेनकेस विश्वावसु गंधर्वापासून झालेली मुलगी. स्थूलकेश ऋषीनें हिचें पालन करून रुरु ऋषीस ही दिली होती ( म. आ. ८. २; १३; अनु. ८. ६५ कुं. ).

**प्रमंथु**—( स्वा. प्रिय. ) वीरव्रत राजास भोजेपासून झालेल्या दोन पुत्रांतील कनिष्ठ ( भा. ५. १५. १५ ).

**प्रमंदनी**—एका अप्सरेचें नांव ( अ. वे. ४. ३७. ३ ). पण हिचा लता असा अर्थ आहे ( कौ. सू. ८. १७ ).

**प्रमंधु**—एक यक्ष. हरिश्चंद्रानें याला धनरक्षणार्थ ठेविलें होतें. याच्या शरीराचा दुर्गंध विश्वामित्रानें तीर्थोदकानें घालविला ( स्कंद. २. ८. ७ ).

**प्रमर**—ब्रह्महोमापासून निर्माण झालेल्या चार क्षत्रियां-पैकीं पहिला. हा अवंतींत अंबा नगरींत राहत होता ( भवि. प्रति. १.६ ). यानें सहा वर्षे राज्य केलें (भवि. प्रति. ४. १)

**प्रमाथ**—दूषणाच्या अमात्यांपैकीं एक राक्षस ( वा. रा. अर. २३. ३३ ). यास रामानें ठार केलें ( वा. रा. अर. २६. २१ ). येथें याला प्रमाथिन् म्हटलें आहे.

२ रामसेनेंतील एक वानर.

**प्रमाथि**—विश्रवा ऋषीपासून बलाका राक्षसीस झालेला पुत्र व दूषणाचा भाऊ. यास नील वानरानें मारिलें ( म. व. २८६ ).

**प्रमाथिनी**—एक अप्सरा ( म. आ. १३२. ४५ कुं. ).

**प्रमाथिन्**—( १ प्रमाथ पहा ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. याचा भीमानें वध केला ( म. द्रो. १५८. १९ कुं. ).

**प्रमाद**—वसिष्ठपुत्र. उत्तम सावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षी-पैकीं एक.

**प्रमिति**--(भविष्य.) बुद्धानंतर ४४०० वर्षांनीं म्लेच्छ व पाखंड यांचा नाश करणारा राजा ( स्कंद. १.२. ४० ).

२ ( ४ प्रमति पहा ).

**प्रमिला**—स्त्रीराज्याची स्वामिनी. पांडवांचा अश्वमेधाचा घोडा हिचे राज्यांत आला असतां तो हिनें धरिला. तेव्हां अश्वरक्षणाकरितां सज्ज असलेला अर्जुन हिच्याशीं युद्ध करूं लागला. त्या वेळीं प्रमिलेनें बराच पराक्रम करून अर्जुनास जर्जर केलें. अशा प्रकारें त्यांचें युद्ध चालूं असतां आकाशवाणी झाली कीं, ' हे अर्जुना, तूं हिचा पराभव करण्यास असमर्थ आहेस, तर तूं हिच्याशीं लग्न करून सख्य कर व आपला अश्व परत मिळव. ' तेव्हां अर्जुनानें हिच्याशीं लग्न केलें ( जै. अ. २१-२२ ).

**प्रमुचि**—दाशरथि रामास भेटण्यास अयोध्येस आलेला एक ऋषि ( वा. रा. उ. १ ).

**प्रमोद**—ब्रह्मदेवाच्या कंठापासून झालेला मुलगा. याला हर्ष असेंहि नांव होतें ( मत्स्य. ३. ११ ).

२ ( सू. इ. ) मत्स्यमतें दृढाश्वाचा पुत्र. याला हर्यश्व नांवाचा पुत्र होता.

३ जनमेजयाच्या सर्पसत्रांत दग्ध झालेला एक नाग ( म. आ. ५७. ११ कुं. ).

**प्रमोदन**—एक ब्रह्मर्षि ( वा. रा. उ. ९० ).

**प्रमोदा**—विसेनाची कन्या व विक्रमाची पत्नी ( भवि. प्रति. ४. ३ ).

**प्रमोदिनी**—सुसंगित नामक गंधर्वाची कन्या ( पद्म. उ. १२८ ).

**प्रम्लोचा**—चालूं मन्वंतरापूर्वीची अप्सरा. हिला कण्डु ऋषीच्या तपोभंगाकरितां इंद्रानें पाठविली होती. हिची मुलगी मारिषा, सोम व वृक्ष यांनीं संरक्षण करून ती प्रचेतसांना दिली होती ( भा. ४. ३०. १३ ).

२ चालूं मन्वंतरांतील अप्सरा ( भा. १२. ११. ३७; म. आ. १३२. ४७; स. १०. १२ कुं. ).

**प्रयस्वत आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. २० ).

**प्रयुत**—कश्यप व मुनि यांचा पुत्र.

**प्रयोग भार्गव**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. १०२; तै. सं. ५. १. १०.२; क. सं. १९. १० ).

**प्ररुज**—अमृत रक्षण करणारा एक देव. याचें व गरुडाचें युद्ध झालें होतें ( म. आ. ३२. १९ कुं. ).

२ रावणपक्षीय एक राक्षस ( म. व. २८६. २ कुं. ).

**प्रलंब**—कश्यप व दनु यांच्या पुत्रांतील एक. इंद्रादि देवांचा पराभव झाला, त्या वेळच्या दैत्यदानवसैन्यांतील एक सेनाधिपति ( म. स. ५१. ७ कुं. ).

२ एक असुर. यास कंसानें कृष्णास मारण्याकरितां पाठविलें होतें. यानें गोपवेष घेतला व कृष्णादिकांशीं खेळतां खेळतां कृष्ण आटोपावयाचा नाहीं, हें जाणून बलरामासच खांद्यावर घेतलें व गोपवेष टाकून आपलें प्रचंड रूप धारण करून हा चालूं लागला. तेव्हां बलरामानें परिस्थिति ओळखून याच्या मस्तकावर मुष्टिप्रहार केला व यास ठार केलें ( ह. वं. २. १४; भा. १०. १८; विष्णु. ५. ९ ).

**प्रलंबक**—तप नामक शिवावताराचा शिष्य.

**प्रलंबायन**—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार ऋषिगण.

**प्रवरिक**—( किलकिला. भविष्य. ) एक राजा. भूतनंदीचा द्वितीय पुत्र जो यशोनंदी त्याचा हा मुलगा. यानें अकरा वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४. २३ ).

**प्रवहण**—उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ तामस मन्वंतरांतील एक योगवर्धन.

**प्रवालक**—कुबेराच्या सभेंतील एक यक्ष ( म. स. १०. १८ कुं. ).

**प्रवाहक**—दंडीमुंडी नामक शिवावताराचा शिष्य.

**प्रवाहण जैवलि**—पाञ्चाल देशचा राजा. श्वेतकेतु आरुणेय तत्त्वज्ञानचर्चेत याला जिंकण्याकरितां पाञ्चालांच्या परिषदेंत आला होता. पण यानें विचारिलेल्या पांच प्रश्नांपैकीं एकाचेंहि उत्तर श्वेतकेतूला देतां आलें नाहीं. त्यामुळें श्वेतकेतु खजील होऊन घरीं गेला व बापावर रागावला. पण बापालाहि तें ज्ञान नव्हतें; म्हणून श्वेतकेतु व गौतम हे बापलेक प्रवाहणाकडे आले व त्यांनीं ब्राह्मण असूनहि क्षत्रियांपासून ब्रह्मविद्या संपादन केली ( बृ. उ. ६. १. ७; छां. उ. ५. ३). कारण ही विद्या आतांपर्यंत क्षत्रियांकडे होती. यानेंच प्रथम ब्राह्मणाला ब्रह्मविद्या दिली. शिलक शालावत्य, चैकितायन दाल्भ्य व याची उद्गीथाच्या उपासनेविषयीं चर्चा झाली होती ( छां. उ. १. ८; बृ. उ. ६. २. १ ). जै. उ. ब्रा. मध्यें आलेला जैवलि व हा एकच असावा (१. ३८. ४).

**प्रवाहित**—उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**प्रवीण**—भौत्य मनूचा पुत्र.

**प्रवीर**—हरिश्चंद्रास विकत घेणाऱ्या काशींतील वीरबाहु चांडालाचें नामांतर.

२ ( सो. पूरु. ) भागवत, विष्णु व भविष्य यांच्या मतें प्राचिन्वत्चा पुत्र. पण महाभारतांत हा पूरूचा पुत्र म्हणून दिला आहे. याच्या पत्नीचें नांव शूरसेनी. नमस्यु हा याचा पुत्र ( म. आ. ८८.४ कुं. ).

३ ( सो. नील. ) विष्णुमतें हर्यश्वाचा पुत्र (जवीनर पहा).

४ नीलध्वज राजाचा मुलगा.

५ पाण्ड्य देशचा राजा. याची कन्या चित्रांगदा. यास मलयध्वज व चित्रवाहन अशीं नांवें होतीं. याला अश्वत्थाम्यानें मारिलें ( म. क. ५६. १.४४ कुं. ).

६ (भविष्य.) ब्रह्मांडमतें कांचनकापुरींत राज्य करणारा राजा व विंध्यशक्तींचा पुत्र. याला चार मुलें होतीं.

**प्रवीरक**—(किलकिला. भविष्य. ) मौन घराण्यांतील राजे नष्ट झाल्यावर किलकिला नगरींत हा राजा होऊन गेला ( भा. १२. १. ३३ ).

**प्रशमी**—एक अप्सरा ( म. अनु. ५०.४८ कुं. ).

**प्रश्रय**—स्वायंभुव मन्वंतरांतील धर्मऋषीस ह्री नांवाच्या स्त्रीपासून झालेला पुत्र.

**प्रश्रुत**—प्रसुश्रुत राजाचें नामांतर.

**प्रसन्न**—सेनजित् राजाचें नामांतर.

**प्रसभ**—रामसेनेंतील एक वानर.

**प्रसाद**—स्वायंभुव मन्वंतरांतील धर्म ऋषीस मैत्री नांवाच्या स्त्रीपासून झालेला पुत्र.

**प्रसार**—( स्वा.·नाभि.) विष्णुमतें उद्गीथाचा पुत्र.

**प्रसुश्रुत**—(सू. इ.) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें मरूचा मुलगा. याबद्दल प्रभुसुत व प्रश्रुत असे पाठभेद आहेत.

**प्रसूत**—रैवत मन्वंतराच्या शेवटीं होऊन गेलेला एक आठ देवांचा गण. यांतील देव प्रचेतस्, महायशस्, मुनि, वनेन, श्येनभद्र, श्वेतचक्षु, सुप्रचेतस् व सुमनस् हे होत ( ब्रह्मांड. २. ३६. ७० ).

२. चाक्षुष मन्वंतरांतील देवगण.

**प्रसूति**—स्वायंभुव मनूच्या तीन मुलींपैकीं एक. ही दक्ष प्रजापतीस दिली होती (भा. ३. १२. ५४; ४. १.१. ).

**प्रसूच**—( सू. ) भविष्यमतें मरुपालाचा पुत्र. यानें १००००० वर्षें राज्य केलें.

**प्रसृति**—स्वारोचिष मनूचा पुत्र.

**प्रसेन**—( सो. वृष्णि. ) निम्न राजाचा दुसरा पुत्र. पण विष्णु, मत्स्य, पद्म व वायु यांच्यामतें निघ्नाचा पुत्र. व सत्राजिताचा धाकटा भाऊ. स्यमंतक मणि धारण करून हा गेला असतां सिंहानें याला मारिलें. नंतर जांबवानानें सिंहाचा वध करून याच्या जवळ असलेला स्यमंतक मणि काढून घेतला ( पद्म. सृ. १३; भा. ९. २४. १३; १०. ५६. १३; दे. भा. माहात्म्य २ ). मधली सिंहाची कथा पद्मांत नसून तेथें याला जांबवानानें मारिल्याचें आढळतें. याला प्रसेनजित् असेंहि म्हणत.

२ कर्णाचा मुलगा. याचें केकयसेनापति उग्रकर्मन्शीं युद्ध झालें होतें. याला सात्यकीनें मारिलें ( म. क. ८२ ).

३ ठाठंगांवचा राजा. वीरसेनाचा द्वितीय पुत्र ( भवि. प्रति. ३. २२ ).

**प्रसेनजित्**—एक लाख सवत्स गाई ब्राह्मणास देणारा प्रख्यात राजर्षि ( म. शां. ४०.३६ कुं. ).

२ ( सू. इ. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें कृशाश्वाचा पुत्र. याची बायको गौरी (१ युवनाश्व पहा). भविष्यमतें संकटाश्वाचा पुत्र. यानें ३१२०० वर्षें राज्य केलें.

३ जमदग्नीचा सासरा रेणु, त्याचें नामांतर (म.व. ११७. २ कुं. ).

४ ( सू. इ. ) भागवतमतें विश्वसाह्वाचा पुत्र.

५ ( सू. इ. भविष्य. ) भागवतमतें लांगलाचा, विष्णुमतें रातुलाचा, मत्स्यमतें पुष्कलाचा व वायुमतें राहुलाचा पुत्र.

६ प्रसेनाचें नामांतर.

**प्रस्कण्व**—( सो. पूरु. ) भागवतमतें मेधातिथीचा पुत्र. प्रस्कण्वादिक पुढें ब्राह्मण झाले ( भा. ९. २०. ७ ).

**प्रस्कण्व काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १. ४४–५०; ८. ४९; ९. ९५ ). यानें पृषध्र, मेध्य व मातारिश्वन् यांच्यापासून देणग्या घेतल्या होत्या ( सां. श्रौ. १६-२. २९ ).

**प्रस्ताव**—( स्वा. प्रिय. ) भूमन् राजास देवकुल्या स्त्रीपासून झालेला पुत्र. याच्या स्त्रीचें नांव नियुत्सा असून तिला विभु या नांवाचा पुत्र होता ( भा. ५. १५. ६ ).

२ ( स्वा. प्रिय. ) भागवतमतें उद्गीथाचा पुत्र.

**प्रस्तोक सार्ञ्जय**—भरद्वाजपुत्र गर्गानें याच्याकडून देणग्या मिळाल्याचा उल्लेख केला आहे ( ऋ. ६. ४७. २२; सां. श्रौ. १६. ११.११; बृहद्दे. ५. १२४ ). दिवोदास, अश्वथ व अतिथिग्व हीं याचींच नांवें आहेत असें सायणाचार्य म्हणतात.

**प्रस्तोतृ**—( स्वा. प्रिय. ) प्रतीह व सुवर्चला यांचा दुसरा पुत्र. हा यज्ञकुशल होता.

**प्रहरण**—श्रीकृष्ण व भद्रा यांचा पुत्र.

**प्रहस्त**—सुमाली राक्षसास केतुमतीपासून झालेला पुत्र ( वा. रा. उ. ५ ). हा रावणाचा मामा व मंत्री होता ( वा. रा. उ. ११ ). तसेंच हा रावणसेनेचा अधिपति होता ( वा. रा. सुं. ४९; भा. ९. १०. १८ ). हा फार पराक्रमी असून यानें कैलास पर्वतावर मणिभद्राचा पराभव केला होता ( वा. रा. यु. १९. ११ ). रामरावणयुद्धांत यानें बराच पराक्रम गाजविला. हा नेहमीं रावणाच्या जवळ त्याच्या मदतीकरितां असे. युद्धाच्या पांचव्या दिवशीं रावणाकडील नरांतकादि बहुतेक प्रमुख योद्धे युद्धांत पडल्याचें पाहून हा नील नांवाच्या वानरावर चालून गेला, परंतु नीलानें यास ठार

मारिलें (वा. रा. यु. ५८). भारतांत प्रहस्त बिभीषणाचे हातून मारिला गेल्याचा उल्लेख आहे ( म. व. २८६ ).

प्रहस्तास अकंपन, विकट, कालिकामुख, दंड, धूम्राक्ष, सुपार्श्व, संह्लादिन्, प्रघस व भासकर्ण असे भाऊ होते. राका, कैकसी, कुंभीनसी व पुष्पोत्कटा या चार बहिणी होत्या ( वा. रा. उ. ५ ).

२ विश्रवस् व पुष्पोत्कटा यांचा पुत्र.

**प्रहास**—वरुणाचा मंत्री ( वा. रा. उ. २३ ).

२ सर्पसत्रांत मेलेला धृतराष्ट्रकुलांतील एक नाग (म. आ. ५७.१६ कुं. ).

**प्रहासक**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**प्रहेति**—राक्षसांचा आदिपुरुष. यास हेति नांवाचा एक कनिष्ठ भाऊ होता ( वा. रा. उ. ४ ).

२ वृत्रासुराचा अनुयायी राक्षस ( भा. ६.१०.२० ).

३ वैशाखांत अर्यमा सूर्याबरोबर फिरणारा राक्षस. वैश्रवणाचा सेवक वज्रधाता याचा पुत्र होय ( भा. १२. ११. ३४ ).

४ युयुधानाचा पुत्र. माल्यवत्, सुमालिन् व पुलोमत् हे याचे पुत्र होत ( ब्रह्मांड. ३. ७. ९१ ).

**प्रह्लाद**—कयाधू, प्रह्लाद व विरोचन यांचा देवासुरयुद्धनिमित्तानें वेदांतहि निर्देश आहे ( तै. ब्रा. १. ५. ९ ) हा हिरण्यकशिपु व कयाधू यांचा पुत्र ( म. आ. ६६. १९ कुं.; भा. ७. ४; विष्णु. १. १६ ). हिरण्यकशिपु व हिरण्याक्ष ह्यात असतांनाच देवांशीं युद्ध चालूं होतें त्या वेळीं यास विश्वरूपदर्शन घडलें. पुढें विष्णूनें यास ठार केलें, म्हणून याची आई अतिशय शोक करूं लागली. तेव्हां तेथें नारद आला व त्यानें तिला ' शोक करूं नकोस. हाच प्रह्लाद तुझे उदरीं येईल व परम विष्णुभक्त होईल, तसेंच हा इंद्रत्वासहि जाईल. हें माझें भविष्य गुप्त ठेव, ' असें सांगितलें ( पद्म. भू. ५ ). या ठिकाणीं कयाधूचे ऐवजीं कमला असें नांव आहे. कयाधूचे पोटीं प्रह्लाद दोनदां आला असावा असें दिसतें. नारदानें कयाधूस केलेला उपदेश प्रह्लादानें आईचे उदरांत असतांच ऐकिला, म्हणून यास इतकें ज्ञान प्राप्त झालें होतें ( कयाधू पहा ). यानें भगवद्भक्तीचें प्रस्थ फारच माजविलें, असें हिरण्यकशिपूस वाटून त्यानें याचा छळ आरंभिला. तेव्हां यानें नृसिंहाची अतिशय प्रेमानें व भक्तीनें स्तुति केली. त्यामुळें परमेश्वरानें यावर कृपा करून याचे पित्यास ठार केलें व याला कांहीं वर देऊं केले, पण यानें त्याच्या भक्तीखेरीज कांहींएक मागितलें नाहीं ( भा. ७.६-१० ). याला अवधूतानें उपदेश केला होता ( भा. १. ३. ११ ). यास पृथ्वीदोहनकालीं दैत्यांनी वत्स केलें होतें ( भा. ४. १८. १६ ). यावरून याचें श्रेष्ठत्व ध्यानांत येतें. याचें विष्णूवर आपल्या प्राणापलीकडेहि प्रेम होतें. हिरण्यकशिपूनें यास ठार करण्याकरितां खालील उपायांची योजना केली होती. शेवटीं हा मरावयास तयार झाला; पण भगवदुपासना सोडावयास तयार झाला नाहीं.

हत्तीकडून तुडविणें, सर्प डसविणें, कड्यावरून ढकलणें, खड्ड्यांत पुरणें, विष पाजणें, वारुणीपाशानें बांधणें, शस्त्रप्रहार करणें, जाळणें, कृत्या सोडणें, माया सोडणें, संशोषक वायु सोडणें, समुद्राचे तळाशीं पुरणें इत्यादि उपाय हिरण्यकशिपूनें यास मारावयास केले ( भा. ७. ५; विष्णु. १. १७. ).

इतके हाल केले तरी यानें भगवद्भक्ति सोडली नाहीं. परंतु पुष्कळ ठिकाणीं ही प्रह्लादाच्या छळाची हकीकत नाहीं (नृसिंह पहा ). याच याच्या भगवद्भक्तीमुळें प्रत्यक्ष विष्णूवरहि याचें इतकें वजन राहिलें होतें कीं, हिरण्यकशिपूस मारल्यावरहि नृसिंहाचा भयंकर कोप याच्या नुसत्या समोर जाण्यानें नाहींसा झाला. हा इतका निरिच्छ होता कीं, याला नृसिंहानें वर माग म्हटलें असतां यानें मला कांहीं नको असें सांगितलें. याची पितृभक्तिहि अलौकिक होती. कारण पित्यानें मारण्याचा कितीहि घाक घातला तरी यानें त्यास सौम्यपणेंच उपदेश केला. तसेंच पित्याचा उद्धार व्हावा, येवढ्याकरितां यानें नृसिंहाची प्रार्थना केली व आपल्या एकवीस पूर्वपिढ्यांचा उद्धार झाला, असें नृसिंहाच्या तोंडचें ऐकल्यावर यास बरें वाटलें ( भा. ७. १० ). हा नृसिंहोपासक अर्थात् महाभागवत होता ( भा. ६. ३. २० ). हा हरिवर्षांत राहून नृसिंहोपासना करीत असतो ( भा. ५. १८. ७ ).

नृसिंहानें हिरण्यकशिपूचा वध केला, तेव्हां यानेंच सर्व दैत्यांचें सांत्वन केलें. विष्णूचा पराक्रम व स्वजनक्षेम यांसंबंधी विचार केल्यामुळें याची विष्णूवर भक्ति बसली. दानवांनीं विष्णुभक्ति आरंभिलेली पाहून देवांना आश्चर्य वाटलें व त्यांनीं विष्णूस त्याचें कारण विचारिलें. तेव्हां विष्णूनें ' प्रह्लादाचा हा अखेरचा जन्म असून मोक्षाला योग्य झालेला आहे ' असें त्यांना सांगितलें. हरिभक्तीमुळें प्रह्लादाच्या मनांत विवेकादि गुणांचा उदय झाला. विष्णूनें यास ज्ञान दिलें. त्यामुळें हा सद्विचारसंपन्न होऊन समाधिसुखांत निमग्न झाला असतां विष्णूनें पांचजन्य शंखानें यास जागृत करून राज्याभिषेक केला व आपण क्षीरसागरांत निघून गेला. त्याच वेळीं विष्णूनें यास 'षड्रिपूंचा तुजवर पगडा बसणार नाहीं, ' असा वर दिला होता ( यो. वा. ५. ३०-४२ ).

खालील संवादावरून याची विद्वत्ताहि दिसून येते. याचा हंस नामक ऋषीशीं ' सत्यासत्य भाषणें ' यावर संवाद

झाला. त्यांत हंस ( सुधन्वा ) व प्रल्हादपुत्र विरोचन यांनी भांडणाचा निकाल लावावयाचा होता. पण यानें आपल्या पुत्राची बाजू म्हणून असत्य बाजू न धरितां सत्य तोच निर्णय दिला. यामुळें सुधन्वा खूष झाला व त्यानें विरोचनास जीवदान दिलें ( म. उ. ३५. ३२ कुं.; विरोचन पहा ). याचा व याचा नातू बलि यांचा संवाद झाला. त्यांत बलीनें विचारिल्यावरून क्षमाशील केव्हां असावें व कडकपणा केव्हां धारण करावा याचें फार मार्मिकपणें यानें विवेचन केलें ( म. व. २८ ). एकदां याच्या ज्ञानाची परीक्षा पाहण्याकरितां इंद्र याजकडे आला असतां, त्यास यानें शीलाचें महत्त्व समजावून दिलें ( म. शां. १२४. १९ कुं. ). त्याचप्रमाणें इंद्रास ज्ञानाबद्दलहि बरेंचसें सांगितलें ( म. शां. २२९ कुं. ).

एकदां अजगरवृत्तीनें राहणाऱ्या एका मुनीजवळून ज्ञान मिळवावें, म्हणून त्यास यानें कांहीं प्रश्न विचारिले. त्यांचीं त्यानें फार समर्पक उत्तरें देऊन यास अजगरव्रत स्वीकारण्याविषयींहि सांगितलें होतें ( म. शां. १७७ कुं. ). हा इंद्र होता ( इंद्र पहा ).

बलीनें ज्या वेळीं वामनाची अवहेलना केली, त्या वेळीं क्रुद्ध होऊन यानें बलीस शाप दिला होता कीं, ' तुझें सर्व राज्य नष्ट होईल.' नंतर वामनानें ज्या वेळीं बलीस सुतलांत जाऊन राहण्यास सांगितलें, त्या वेळीं बलीनें आपल्या आजोबासहि आपलेबरोबर तेथें राहवयास नेलें ( वामन. ३१ ). याचा पुत्र विरोचन ( भा. ६. १८. १६; म. आ. ६६; विष्णु. १. २१ ). कन्या रचना व ( भा. ६. ६ ). शिवाय महाभारतांत कुंभ व निकुंभ हे पुत्र दिले आहेत.

हा पूर्वजन्मीं सोमशर्मा नांवाचा ब्राह्मण असून शिवशर्मा ब्राह्मणाचा पुत्र होता ( पद्म. भू. ५ ).

पूर्वजन्मीं हा ब्राह्मणपुत्र असून याचें नांव वसुदेव होतें. त्या जन्मीं यानें नृसिंहाचें व्रत केलें होतें (पद्म. उ. १७४ ).

हा शब्द प्रहाद असाहि लिहिलेला आढळतो.

२ कद्रूपुत्र एक सर्प.

**प्रांशु**—चाक्षुष मनूचा पुत्र.

२ वैवस्वत मनूचा पुत्र.

३ ( सू. दिष्ट. ) भागवतमतें वत्सप्रीतीचा, विष्णुमतें वत्सप्रीचा व वायुमतें भलंदनाचा पुत्र.

**प्रांशुवर्मन्**—एक ब्राह्मण कलीनें यास त्रास दिला असतां यानें ऋग्वेदांतील स्तोत्रांनीं भास्कराची स्तुति केली. तेव्हां कलि हरिरूप आहे, अशी आकाशवाणी होऊन तिनें याला कलिंजर नगरांत राहण्याची आज्ञा केली ( भवि. प्रति. ४. ८ ).

**प्राक्शृंगवत्**—( वृद्धकन्या पहा ).

**प्रागर्हि**—यज्ञांतील कांहीं कर्म करावयाचें राहिल्यास तें अंतरित कर्म केव्हां करावें, याबद्दल विचार करणारा आचार्य ( सां. ब्रा. २६. ४ ).

**प्रागाथ**—अंगिराकुलांतील एक ब्रह्मर्षि ( कलि, घर्म व हर्यत पहा ).

**प्रागाथम**—( प्रागावस पहा ).

**प्रागायण**—कश्यपकुलांतील एक गोत्रकार ऋषिगण.

**प्रागावस**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार. पाठभेद प्रागाथम.

**प्राचिन्वत्**—( प्राचीन्वत् पहा ).

**प्राचीनगर्भ**—सारस्वत ऋषीचें नामान्तर.

२ सृष्टि व छाया यांचा पुत्र.

**प्राचीनबर्हि**—स्वायंभुव मन्वंतरांतील एक राजा. दक्ष प्रजापतीच्या यज्ञांत सतीनें देहत्याग केला, त्या वेळीं हा भरतखंडाचा राजा होता.

२ (स्वा. उत्तान.) हविर्धान राजास हविर्धानीपासून झालेल्या पुत्रांतील ज्येष्ठ. याचें नांव बर्हिषद ( बर्हिषद पहा ). याने एकामागून एक केलेल्या यज्ञांतील पूर्वाग्र दर्भांनीं पृथ्वी व्याप्त झाल्यामुळें यास हें नांव मिळालें. याची स्त्री समुद्रकन्या शतद्रुति अथवा सवर्णा असून दहा प्रचेतस् हे याचे पुत्र होते ( भा. ४. २४. ८-१३; ह. वं. १. २; विष्णु. १. १४ ). यास नारदानें अजामिलाचें आख्यान सांगितलें व उपदेश केला ( भा. ४. २५-२९ ).

**प्राचीनयोग**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें शृंगीपुत्राचा शिष्य ( व्यास पहा ).

**प्राचीनयोगीपुत्र**—हा सांजीवीपुत्राचा शिष्य याचा शिष्य कार्षकेयीपुत्र ( बृ. उ. ६. ५. २ ). पण याचा शिष्य भालुकीपुत्रहि दिला आहे ( श. ब्रा. १४. ९. ४. ३२ ).

२ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें कौथुम पाराशर्यांचा शिष्य.

**प्राचीनयोग्य**—तत्त्वज्ञानातील एक आचार्य म्हणून याचा अनेक ठिकाणीं उल्लेख येतो ( छां. उ. ५. १३. १; तै. उ. १. ६. २; जै. उ. ब्रा. १. ३९. १ ). याचा शिष्य गौतम. हा पाराशर्याचा शिष्य ( बृ. उ. २. ६. २ ). हा उद्दालकाचा समकालीन होता (श. ब्रा. ११. ५. ३. १; ८). प्राचीनयोग्य शौचेय असें याचें नांव आहे.

**प्राचीनशाल औपमन्यव**—एक आचार्य. सत्ययज्ञ, इन्द्रद्युम्न वगैरेंशीं समकालीन असणारा एक तत्त्वज्ञ ( छां. उ. ५. ११. १ ). एक उद्गाता ( जै. उ. ब्रा. ३. १०. १ ).

**प्राचीनशालि**—या तत्त्वज्ञाचा अनेक वेळां निर्देश येतो (जै. उ. ब्रा. ३. ७. २; ३; ५; ७).

**प्राचीन्वत्**—(सो. पूरु.) पहिल्या जनमेजयाचा पुत्र. याला अश्मकी यादवी नामक स्त्रीपासून शय्याति नांवाचा मुलगा झाला. यानें एका रात्रींत पूर्व दिशा जिंकली, म्हणून यास प्राचीन्वत् असें नांव पडलें (म. आ. ६३. १०-१२ कुं.).

**प्राचेतस**—वाल्मीकि ऋषीचें नांव (भा. ९. ११. १०). यानें अघमर्षण तीर्थावर दीर्घ काळपर्यंत तपश्चर्या केली होती (भा ६. ४). हा भृगुकुलांतील होता (वा. रा. उ. ९३. १६-१८; ९४. २५; मत्स्य. १२. ५१; म. शां. ५७). रामायणांत याला भार्गव व प्राचेतस असें संबोधिलें आहे.

२ (सो. द्रुह्यु.) प्रचेतस् राजाच्या शंभर पुत्रांचें नांव. हे उत्तरेकडे म्लेच्छांचे अधिपति झाले.

३ प्राचीनबर्हिच्या दहा पुत्रांचीं नांवें (मनु, प्रचेतस् व २ दक्ष पहा).

**प्राचेय**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**प्राजापत्य**—दक्षिणा, पतंग, परमेष्ठिन्, प्रजावत्, यक्ष्मनाशन, यज्ञ, विमद, विष्णु, संवरण, सौपर्णेय, हिरण्यगर्भ, पहा.

**प्राण**—स्वायंभुव मन्वंतरांतील भृगुपुत्र विधाता व नियति यांचा पुत्र. यास वेदशिरस् नांवाचा मुलगा होता (भा. ४. १. ४४).

२ स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ अष्टवसूंपैकीं दुसरा.

४ अंगिरा व सुरूपा यांचा एक पुत्र, देव.

५ साध्य देवांपैकीं एक.

६ तुषित देवांपैकीं एक.

**प्रातर्**—(स्वा. उत्तान.) पुष्पार्ण व प्रभा यांचा ज्येष्ठ पुत्र.

२ धाता नांवाच्या सातव्या आदित्यास राका नांवाच्या स्त्रीपासून झालेला पुत्र (भा. ६. १८. ३).

३ सर्पसत्रांत दग्ध झालेला कौरव्यकुलांतील सर्प (म. आ. ५७. १३ कुं.).

**प्रातरह्न कौहल**—केतुवाज्याचा शिष्य. याचा शिष्य सुश्रवस् वार्षगण्य (वं. ब्रा. १).

**प्रातर्दन**—संयमनाचें पैतृक नांव (कौ. उ. ३.५).

**प्रातर्दनि**—क्षत्रश्रीचें दुसरें नांव (ऋ. ६. २६. ८).

**प्रातिकामिन्**—हा दुर्योधनाचा सारथि होता. द्रौपदीला सभेंत आणण्यास हाच प्रथम गेला होता. पण भीमाच्या भीतीनें यानें पुनः जाण्याचें नाकारिलें (म. स. ८९. १४ कुं.). हा भारतीय युद्धांत मारिला गेला (म. श. ३३. ४९ कुं.).

**प्रातिथेयी**—(वडवा व गभस्तिनी पहा).

**प्रातिपीय**—प्रतिवेश्याचा शिष्य (सां. आ. १५. १). बाह्लीकाचें हें पैतृक नांव आहे.

**प्रातिवेश्य**—बृहद्दिवाचा शिष्य (सां. आ. १५.१).

**प्रातीबोधीपुत्र**—एका आचार्याचें नांव (ऐ. ब्रा. ३. १; सां. श्रौ. ७. १३).

**प्रातृद**—एका आचार्याचें नांव (बृ. उ. ५. १२.१) हें भालाचें पैतृक नांव आहे.

**प्राधा**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या व कश्यपाची भार्या (कश्यप व अरिष्टा पहा).

**प्राध्वंसन**—हा प्रध्वंसनाचा शिष्य. याचा शिष्य अथर्वन् दैव होय (बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३).

**प्राप्ति**—जरासंधाची कन्या व कंसाची पत्नी (भा. १०. ५०.१). हिला प्रास्ति असें म्हटलें आहे, तें चुकीचें दिसतें (म. स. १४. ३२ कुं.).

२ धर्मपुत्र शमाची पत्नी (म. आ. ६७.३२ कुं.).

**प्रामति**—ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**प्रायण**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**प्रावरेय**—गर्भाचें पैतृक नांव (क. सं. १३.१२).

**प्रावहि**—यज्ञविधींत कर्मविपर्यासाबद्दल प्रायश्चित्त सांगणारा (सां. ब्रा. २६. ४).

२ अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**प्रावाहणि**—बबराचें पैतृक नांव.

**प्रावेणि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**प्राश्नीपुत्र**—असुरायणाचा शिष्य. याचा शिष्य सांजवीपुत्र (बृ. उ. ६. ५. २). पण याचा शिष्य काशीकेयीपुत्र व हा आसुरिवासिन्चा शिष्य (श. ब्रा. १४. ९. ४. ३३).

**प्रास्ति**—(१ प्राप्ति पहा).

**प्रास्त्रवण**—अवत्साराचें पैतृक नांव.

**प्रियंवदा**—राधिकेची सखी. हिनें अर्जुनीचें पुरश्चरण संपेपर्यंत तिचें संरक्षण केलें (पद्म. पा. ७४).

**प्रियदर्शन**—द्रुपदाचा पुत्र. याला कर्णानें द्रौपदी-स्वयंवरानंतर झालेल्या युद्धांत मारिलें (म. आ. २१८. ३० कुं.)

**प्रियनिश्चय**—भव्य देवांतील एक.

**प्रियमेध आंगिरस**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८.२.१-४०; ६८; ६९; ८७; ९. २८). याच्या सूक्तांत अतिथिग्वपुत्र इंद्रोत, आश्वमेध व ऋक्षपुत्र यांचा उल्लेख येतो. हे प्रियमेधाचे आश्रयदाते होते (ऋ. ८. ६८. १५-१९). अश्वींनीं याचें

**प्राचीनशालि**—या तत्त्वज्ञाचा अनेक वेळां निर्देश येतो ( जै. उ. ब्रा. ३. ७. २; ३; ५; ७ ).

**प्राचीन्वत्**—( सो. पूरु. ) पहिल्या जनमेजयाचा पुत्र. याला आश्मकी यादवी नामक स्त्रीपासून शय्याति नांवाचा मुलगा झाला. यानें एका रात्रींत पूर्व दिशा जिंकली, म्हणून यास प्राचीन्वत् असें नांव पडलें ( म. आ. ६३. १०-१२ कुं.).

**प्राचेतस**—वाल्मीकि ऋषीचें नांव ( भा. ९. ११. १० ). यानें अघमर्षण तीर्थावर दीर्घ काळपर्यंत तपश्चर्या केली होती ( भा ६. ४ ). हा भृगुकुलांतील होता ( वा. रा. उ. ९३. १६-१८; ९४. २५; मत्स्य. १२. ५१; म. शां. ५७ ). रामायणांत याला भार्गव व प्राचेतस असें संबोधिलें आहे.

२ ( सो. द्रुह्यु. ) प्रचेतस् राजाच्या शंभर पुत्रांचें नांव. हे उत्तरेकडे म्लेच्छांचे अधिपति झाले.

३ प्राचीनबर्हीच्या दहा पुत्रांचीं नांवें ( मनु, प्रचेतस् व २ दक्ष पहा ).

**प्राचेय**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**प्राजापत्य**—दक्षिणा, पतंग, परमेष्ठिन्, प्रजावत्, यक्ष्मनाशन, यज्ञ, विमद, विष्णु, संवरण, सौपर्णेय, हिरण्यगर्भ, पहा.

**प्राण**—स्वायंभुव मन्वंतरांतील भृगुपुत्र विधाता व नियति यांचा पुत्र. यास वेदशिरस् नांवाचा मुलगा होता ( भा. ४. १. ४४ ).

२ स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ अष्टवसूंपैकीं दुसरा.

४ अंगिरा व सुरूपा यांचा एक पुत्र, देव.

५ साध्य देवांपैकीं एक.

६ तुषित देवांपैकीं एक.

**प्रातर्**—( स्वा. उत्तान. ) पुष्पार्ण व प्रभा यांचा ज्येष्ठ पुत्र.

२ धाता नांवाच्या सातव्या आदित्यास राका नांवाच्या स्त्रीपासून झालेला पुत्र ( भा. ६. १८. ३ ).

३ सर्पसत्रांत दग्ध झालेला कौरव्यकुलांतील सर्प ( म. आ. ५७. १३ कुं. ).

**प्रातरह्न कौहल**—केतुवाज्याचा शिष्य. याचा शिष्य सुश्रवस् वार्षगण्य ( वं. ब्रा. १ ).

**प्रातर्दन**—संयमनाचें पैतृक नांव ( कौ. उ. ३.५ ).

**प्रातर्दनि**—क्षत्रश्रीचें दुसरें नांव ( ऋ. ६. २६. ८ ).

**प्रातिकामिन्**—हा दुर्योधनाचा सारथि होता. द्रौपदीला सभेंत आणण्यास हाच प्रथम गेला होता. पण भीमाच्या भीतीनें यानें पुनः जाण्याचें नाकारिलें ( म. स. ८९. १४ कुं. ). हा भारतीय युद्धांत मारिला गेला ( म. श. ३३. ४९ कुं. ).

**प्रातिथेयी**—( वडवा व गभस्तिनी पहा ).

**प्रातिपीय**—प्रतिवेशाचा शिष्य ( सां. आ. १५. १ ). बाह्लीकाचें हें पैतृक नांव आहे.

**प्रातिवेश्य**—बृहद्दिवाचा शिष्य ( सां. आ. १५.१ ).

**प्रातीबोधीपुत्र**—एका आचार्याचें नांव ( ऐ. ब्रा. ३. १; सां. श्रौ. ७. १३ ).

**प्रातृद**—एका आचार्याचें नांव ( बृ. उ. ५. १२.१ हें भाल्लाचें पैतृक नांव आहे.

**प्राधा**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या कश्यपाची भार्या ( कश्यप व अरिष्टा पहा ).

**प्राध्वंसन**—हा प्रध्वंसनाचा शिष्य. याचा शिष्य अथर्वन दैव होय ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ).

**प्राप्ति**—जरासंधाची कन्या व कंसाची पत्नी ( भा. १० ५०.१ ). हिला प्रास्ति असें म्हटलें आहे, तें चुकीचें दिसतें ( म. स. १४. ३२ कुं. ).

२ धर्मपुत्र शमाची पत्नी ( म. आ. ६७.३३ कुं. ).

**प्रमति**—ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**प्रायण**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**प्रावरेय**—गर्भाचें पैतृक नांव ( क. सं १३. १२ ).

**प्रावहि**—यज्ञविधींत कर्मविपर्यासाबद्दल प्रायश्चित्त सांगणारा ( सां. ब्रा. २६. ४ ).

२ अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**प्रावाहणि**—बबराचें पैतृक नांव.

**प्रावेपि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**प्राश्नीपुत्र**—असुरायणाचा शिष्य. याचा शिष्य सांजवीपुत्र ( बृ. उ. ६. ५. २ ). पण याचा शिष्य काशकेयीपुत्र व हा आसुरिवासिन्‌चा शिष्य ( श. ब्रा. १४. ९. ४. ३३ ).

**प्रास्ति**—( १ प्राप्ति पहा ).

**प्रास्रवण**—अवत्साराचें पैतृक नांव.

**प्रियंवदा**—राधिकेची सखी. हिनें अर्जुनीचें पुरश्चरण संपेपर्यंत तिचें संरक्षण केलें ( पद्म. पा. ७४ ).

**प्रियदर्शन**—द्रुपदाचा पुत्र. याला कर्णानें द्रौपदी-स्वयंवरानंतर झालेल्या युद्धांत मारिलें ( म. आ. २१८. ३० कुं. )

**प्रियनिश्चय**—भव्य देवांतील एक.

**प्रियमेध आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. २. १-४०; ६८; ६९; ८७; ९. २८ ). याच्या सूक्तांत अतिथिग्वपुत्र इंद्रोत, आश्वमेध व ऋक्षपुत्र यांचा उल्लेख येतो. हे प्रियमेधाचे आश्रयदाते होते ( ऋ. ८. ६८. १५-१९ ). अश्वींनीं याचें

११ ).

**प्लक्ष**—दारुक नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**प्लक्ष दय्यांपति**—याला अत्यंहस् अरुणीनें आपल्या शिष्यांकडून सावित्राग्निसंबंधीं कुत्सित भावनेनें कांहीं प्रश्न केले होते ( तै. ब्रा. ३. १०. ९. ३ ).

**प्लति**—गयाचा पिता.

**प्लवंग**—रामसेनेंतील एक वानर ( वा. रा. उ. ४० ).

याचा प्लाक्षि...

**प्लाक्षि**—विसर्गसं... होतो असें सांगणारा म्हणून याचा ... ३८; ९. ६; सप्तकर्ण पहा ).

**प्लात**—सूक्तद्रष्टा. गयाचें पैतृक नांव ( गय प्लात ...

**प्लायोगि**—सूक्तद्रष्टा. आसंगाचें पैतृक नांव ( आसं... पहा ).

---

## फ

**फलकक्ष**—एक यक्ष ( म. स. १०. १७ कुं. ).

**फलज**—न्यूह म्लेछाच्या वंशांतील इस्राचा पुत्र. यानें दोनशें चाळीस वर्षें राज्य केलें. याचा पुत्र चरक ( भवि. प्रति. १. ५ ).

**फलपुरुष**—( भविष्य. ) तिमिरलिंगाच्या वंशांतील अलोमाचा पुत्र. यानें एकंदर दहा वर्षे राज्य केलें. याचा पुत्र महामद ( भवि. प्रति. ४. २२ ).

**फलहार**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**फलोदक**—एक यक्ष ( म. स. १०. १७ कुं. ).

**फल्गुतंत्र**—सगराचा पिता. तालजंघादि हैहयांनीं याच्या वृद्धावस्थेंत अयोध्येला वेढा देऊन अयोध्येंतून याला घालवून दिलें. पुढें हा स्त्रीसह और्वाश्रमांत राहिला व तेथेंच मृत झाला. त्या वेळीं याची स्त्री गरोदर होती. पुढें ती प्रसूत झाल्यावर जो पुत्र झाला, तोच सगर होय ( ब्रह्मांड. ३. ४७; बाहु पहा ).

**फूज**—न्यूह म्लेच्छाचा द्वितीय पुत्र हाम, त्याचा पुत्र. ( भवि. प्रति. १. ५ ).

**फेन**—( सो. उशी. ) उषद्रथाचा मुलगा. याचा पुत्र सुतप. हा औशीनर बलीचा आजोबा होता ( ह. वं. १. ३१ ).

**फेनप**—गाईच्या दुधाचा जो फेंस, त्यावर उपजीविका करणारे ऋषि ( म. उ. १०२. ५; अनु. ४५. ४१ कुं. ).

२ भृगुकुलांतील एक गोत्रकार. याची कथा भीष्मानें युधिष्ठिराला गोमाहात्म्याकरितां सांगितली आहे. हा त्रिशिखर पर्वतावर कुलजा नदीच्या तीरावर राहत असून हा गाईच्या दुधाचा फेंस खाऊन राहत असे, म्हणून यास फेनप असें नांव पडलें. याचें मूळ नांव सुमित्र ( म. अनु. १२०-१२३ कुं. ).

३ पितरांपैकीं एक.

---

## ब

**बक**—कंसपक्षीय असुर. यास कंसानें कृष्णवधार्थ गोकुळांत पाठविलें होतें. त्यावरून हा बगळ्याचें रूप घेऊन गोकुळांत आला व सवंगड्यांसह क्रीडा करीत असलेल्या कृष्णास यानें गिळून टाकिलें. परंतु कृष्णानें याच्या अंगाचा दाह करण्यास सुरुवात केली. तेव्हां यानें कृष्णास जमिनीवर ओकून टाकिलें व हा त्यास चोंचीनें मारूं लागला. परंतु कृष्णानें याचा जबडा चिरून यास ठार मारिलें ( भा. १०. ११ ).

हा पूर्वजन्मीं सहोत्र नांवाचा गंधर्व होता. हा दुर्वास ऋषीचा भक्त असून यानें कृष्णप्राप्त्यर्थ बरेंच तप केलें होतें. एकदां यानें कृष्णपूजेकरितां पार्वतीच्या तळ्यांतील कमळें तोडिलीं. तेव्हां तेथील रक्षकांनीं यास बांधून शिवासमोर नेलें.

...शन होईल, ( ब्रह्मवै. ४. १६ ).

...रांचा अधिपति असून वेत्रवनांत ...सून पीडा होऊं नये, म्हणून तेथील लोकांनीं ...ल्या पाळीप्रमाणें दररोज तीस मण तांदुळांचा भात, ... मनुष्य व दोन रेडे एवढें प्रत्येक कुटुंबानें द्यावें, असें ठरविलें होतें. कांहीं काळानें हा कर देण्याची पाळी एका गरीब ब्राह्मण कुटुंबावर आली. या ब्राह्मणाच्या घरांतच पांडव लाक्षागृहांतून निसटल्यानंतर कुंतीसह राहत होते. त्यांना त्य ब्राह्मणावरील संकटाचें कारण कळल्यावर त्यांनीं भीमास बकवधार्थ पाठविलें. भीम एका गाड्यांत थोडें अन्न घेऊन बकाच्या वेत्रकी वनांत गेला व त्यानें तें सर्व अन्न बकादेखत खाऊन टाकिलें. त्यामुळें बकास क्रोध येऊन बकाची व भीमाची कुस्ती सुरू झाली. शेवटीं भीमानें बकास ठार मारून टाकिलें ( म. आ. ६१. २९; १७१–१७८ कुं. ).

**बक दाल्भ्य**—एक ऋषि. हा दाल्भ्याचा भाऊ होता ( म. स. ४. १७; २६. ५; १९६. ४ कुं. ). कदाचित् हा दाल्भ्याचा भाऊ असावा, कदाचित् दल्भपुत्र असावा. निश्चित असा पुरावा कोठेंच मिळत नाहीं. कारण, कांहीं ठिकाणीं बकदाल्भ्यौ असा पाठ आढळतो, तर दुसऱ्या कांहीं ठिकाणीं बको दाल्भ्यः असा उल्लेख आढळतो. याचा, फार दिवस जगणाऱ्यास सुखदुःखें कोणतीं असतात, याविषयीं इंद्राशीं संवाद झालेला आहे. त्यांत इंद्रानें याला एक लक्ष वर्षें होऊन गेल्याचा उल्लेख केला आहे ( म. व. १९६ कुं. ). रामाला जेव्हां समुद्रोल्लंघन करण्याचा विचार पडला, तेव्हां तो उपाय विचारण्याकरितां जवळच असलेल्या बक दाल्भ्याच्या आश्रमांत गेला. बक दाल्भ्यानें त्याला विजया एकदशीचें व्रत करण्यास सांगितलें. तें केल्यामुळें रामानें रावणाचा वध केला ( पद्म. उ. ४४ ).

बलराम तीर्थयात्रा करीत असतां बक दाल्भ्याच्या आश्रमांत आला होता. तेथें त्याला बक दाल्भ्यासंबंधीं पुढील गोष्ट कळली. बक दाल्भ्य तेथें असल्याचा प्रत्यक्ष उल्लेख नाहीं. त्यावरून हा त्या वेळीं तेथें नसावा.

पूर्वी एकदां नैमिषीय ऋषींचें द्वादशवार्षिक सत्र व विश्वजित् यज्ञ संपल्यानंतर हा ऋषि तेथून निघून पंचाल देशास गेला. तेथील राजास दक्षिणा मागतां त्यानें चांगल्या एकवीस गाई दक्षिणा म्हणून दिल्या. तेव्हां बक दाल्भ्य ऋषींना म्हणाला, ‘ तुम्ही या गाई घ्या. मी सार्वभौमाकडे जाऊन भिक्षा मागेन. ’ त्याप्रमाणें धृतराष्ट्राकडे भिक्षा मागतां त्यानें रागानें यास कांहीं साहजिक मेलेलीं गुरें घेऊन जाण्यास सांगितलें. हें यानें ते मृत पशु स्वीकारून त्यांच्या हवनान ... राष्ट्राचा नाश करण्यास सुरुवात केली. तेव्हां राष्ट्राची स्थिति कुऱ्हाडीनें तुटत असलेल्या वनासारखी झाली. ज्योतिष्याच्या सांगण्यावरून धृतराष्ट्र राष्ट्राचा नाश थांबविण्याकरितां बक दाल्भ्याला शरण गेला. तेव्हां राष्ट्राची व सम्राटाची दया येऊन राष्ट्राच्या मुक्ततेकरितां यानें आहुति दिल्या व राष्ट्र मुक्त केलें. नंतर आपण फक्त दक्षिणा म्हणून पुष्कळ पशु घेऊन नैमिषारण्यांत निघून गेला ( म. श. ४१ ).

हा युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञांतील ब्रह्मा होता. पांडवांच्या अश्वमेधाचा घोडा फिरत फिरत याच्या आश्रमाजवळ आला. तेव्हां अश्वसंरक्षणार्थ असणाऱ्या अर्जुनानें याचें दर्शन घेतलें व मस्तकावर वटपत्र घेण्याचें कारण विचारलें. तेव्हां ‘ सावलीकरितां ’ म्हणून यानें उत्तर दिलें. ‘ घर कां बांधीत नाहीं ? ’ असें विचारतां ‘ आयुष्य थोडें ’ असें उत्तर दिलें. वय विचारतां ‘ ब्रह्मदेवाचीं वीस अहोरात्रें पाहिलीं ’ असें उत्तर दिलें. नंतर अर्जुनानें याला शिबिकेंत बसवून अश्वमेधार्थ नेलें ( जै. अ. ६० ).

यानें ब्रह्मघाला ‘ मी तुझ्यापेक्षांहि वडील आहें ’ असें म्हणून झिडकारिलें असतां ब्रह्मघानें अनेक प्राचीन ब्रह्मदेव दाखवून याचा गर्वपरिहार केला ( जै. अ. ६१ ).

**बकनख**—विश्वामित्राचा पुत्र.

**बकवाहन**—एक दुष्ट राक्षस. यास पुण्यपूरच्या धर्मवल्लभ राजानें ठार मारिलें ( भवि. प्रति. २.११ ).

**बकी**—पूतना राक्षसी.

**बटु**—एक सच्छील ब्राह्मण. गीतेचें नित्य पठन केल्यामुळें हा अत्यंत पुण्यवान् झाला होता. हा मेल्यावर स्वर्गलोकीं गेला. पण याचें शरीर मात्र तसेंच पडून राहिलें. तेव्हां एका पक्ष्यानें याचें मांस खाऊन हाडें शिल्लक ठेविलीं. पुढें पाऊस पडल्यावर याच्या मस्तकाच्या कवटींत पाणी सांठलें. त्या पाण्याचा स्पर्श एका पापी मनुष्यास होऊन तो उद्धरून गेला ( पद्म. उ. १७९ ).

**बध्यश्व**—( सो. नील. ) वायुमतें सुमहायशस् राजाचा पुत्र ( वध्र्यश्व पहा ).

**बंदिन्**—हा वरुणाचा पुत्र होता. पण याला सूतपुत्र असें जागोजागीं म्हटलें आहे. यानें ऐंद्रद्युम्नि जनकाच्या वेळीं अनेक ब्राह्मणांना वादांत जिंकून पाण्यांत बुडविलें. शेवटीं अष्टावक्रानें याचा वादांत पराभव केला व याला पाण्यांत बुडविलें ( अष्टावक्र पहा ).

**बंधु**—( सू. दिष्ट. ) भागवतमतें वेगवान् राजाचा पुत्र. इतरत्र यास बुध म्हटलें आहे.

**बंधु गौपायन** अथवा **लौपायन**—सूक्तद्रष्टा (ऋ. ५. २४. ४; १०. ५७-६० ).

**बंधुपालित**—( मौर्य. भविष्य. ) वायुमतें कुनालाचा व ब्रह्मांडमतें कुशालाचा पुत्र. यानें आठ वर्षे राज्य केलें.

**बंधुमत्**—( सू. दिष्ट. ) भागवत व वायु यांच्या मतें केवलाचा पुत्र. याचा पुत्र वेगवान् ( धुंधुमत् पहा ).

**बबर प्रावाहणि**—आपण मोठा वक्ता व्हावें, असें याच्या मनांत होतें. त्याप्रमाणें याला भाषासौंदर्यशक्ति, साहित्यज्ञान व वक्तृत्वकला पंचविंश नामक यज्ञामुळें मिळालीं ( तै. सं. ७. १. १०. २ ).

**बभ्रु**—याला दैवावृध म्हटलें आहे. सायणाचार्य दोन वेगळाल्या व्यक्ति समजतात. याला सहदेव साञ्जयानें सोमाची विशेष परंपरा सांगितली. हा व आठवा एक असावा ( ऐ. ब्रा. ७. ३४ ).

२ कश्यपकुलोत्पन्न संपातीचा ज्येष्ठ पुत्र. याचा भ्राता शीघ्रग ( पद्म. सृ. ६ ).

३ विश्वामित्र ऋषीच्या पुत्रांतील एक. याचे वंशज बाभ्रव्य नांवानें प्रसिद्ध आहेत ( म. आ. ७. ५० कुं.; ब्रह्म. १०. ६१-६३; वायु. २. ३०. ९७-१०२ ).

४ हा आंगिरस ऊर्फ शुनकाचा शिष्य. याला आंगिरसानें अथर्वसंहिता दिली ( भा. १२. ७. १-३ ).

५ ऋषभ पर्वतावर राहणारा गंधर्व.

६ ( सो. पुरूरवस् ) ययातीचा पौत्र आणि द्रुह्यूचा पुत्र. याचा पुत्र सेतु. बभ्रुलाच बभ्रुसेतु म्हणतात.

७ (सो. क्रोष्टु.) रोमपादाचा पुत्र. याचा पुत्र कृति. याला लोमपादाचा पुत्र म्हटलें असून धृति नांवाचा पुत्र दिला आहे ( पद्म. सृ. १३ ).

८ ( सो. क्रोष्टु. ) देवावृधाचा पुत्र. याच्यामुळें याच्या कुलांतील अनेकांचा उद्धार झाला ( भा. ९. २४. १० ).

९ विराटाचा पुत्र ( म. उ. ५७. ३३ कुं. ).

१० अक्रूराचें नामांतर ( ब्रह्मांड. ३. ७१. ८१ ). यादवी होऊन सर्वांचा संहार झाल्यावर चोरट्यांनीं धनलोभानें हल्ला करूं नये, म्हणून कृष्णानें याला व दारुकाला स्त्रियांचें संरक्षण करण्यास सांगितलें. परंतु तितक्यांत हा मुसळाच्या तडाख्यानें मृत्युमुखीं पडला ( म. मौ. ५ ). याची बायको शिशुपालानें पळविली होती ( म. स. ६८. १८ कुं. ). हा एक मंत्री होता ( म. स. १४. ६३ कुं. बाभ्रव्य पहा ).

**बभ्रु आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५.३० ). ऋणंचय हा याचा आश्रयदाता होता. अश्वींनीं याचें संरक्षण केलें ( ऋ. ८.२२.१०; बृहद्दे. ५. ३३, ३३; ३४ ). एक स्मृतिकार. याच्या नांवावर बभ्रुस्मृति नामक एक ग्रंथ उपलब्ध आहे ( C. C. ).

**बभ्रु कौम्भ्य**—सामद्रष्टा ( पं. ब्रा. १५. ३. १३ ).

**बभ्रुमालिनी**—युधिष्ठिराच्या सभेंतील एक ऋषि ( म. स. ४. २२ कुं. ).

**बभ्रुवाहन**—अर्जुनास मणिपूरच्या चित्रवाहन राजाच्या चित्रांगदा नांवाच्या मुलीपासून झालेला पुत्र. यास चित्रवाहनानें मणिपूरचें राजघराणें पुढें चालू ठेवण्याकरितां अर्जुनापासून मागून घेतल्यामुळें चित्रवाहनानंतर हाच मणिपूरचा राजा झाला. बभ्रुवाहनाची राजधानी मणलूरपूर दिलेली आहे (म. आ. ३. ८१; २३७. ३४ कुं.). राजसूयाच्या वेळीं यानें सहदेवास करभार दिला होता ( म. स. ३३. २८. कुं. ), पण हें गणपत कृष्णाजी प्रतींत नाहीं. पांडवांनीं अश्वमेध यज्ञ करण्यास सुरुवात केली व त्याप्रमाणें त्यांनीं अर्जुनास अश्वमेधीय अश्वासह दिग्विजयाकरितां पाठविलें. कांहीं कालानें तो अश्व फिरत फिरत बभ्रुवाहनाच्या राज्यांत आला असतां यानें तो धरिला. परंतु हा आपल्या बापाचाच घोडा आहे असें कळतांच यानें तो घोडा व बराच नजराणा अर्जुनाकडे पाठविला. परंतु अर्जुनानें तो न स्वीकारितां याची बरीच निर्भर्त्सना केली. तेव्हां बभ्रुवाहनानें आपल्या सुबुद्धि नांवाच्या मंत्र्याबरोबर त्या घोड्यास परत नगरांत पाठविलें व हा आणि याचा सेनापति सुमति हे दोघे ससैन्य अर्जुनावर चालून गेले. त्या युद्धांत बभ्रुवाहनानें बराच पराक्रम केला व शेवटीं अर्जुनास ठार मारिलें. नंतर हा विजयानंदानें नगरांत गेला व आईस अर्जुनास ठार मारून जय मिळविल्याचें वृत्त सांगूं लागला. परंतु बभ्रुवाहनानें स्वतःच्या बापास ठार मारलें, हें ऐकून चित्रांगदा पतीबरोबर सती जाण्यास सज्ज झाली. तेव्हां आपल्या अज्ञानानें आपण मातापित्यांच्या मरणास कारण झालों, हें पाहून बभ्रुवाहनहि प्रायोपवेशन करून देहत्याग करूं लागला. परंतु उलूपी नांवाच्या याच्या सावत्र आईनें याचें व चित्रांगदेचें सांत्वन करून अर्जुनास जिवंत करण्याकरितां सर्पांजवळील मृतसंजीवक मणि आणावयास बभ्रुवाहनास सांगितलें. सर्पांचा राजा शेष आपल्या अनुयायांच्या सांगण्यावरून तो मणि देईना. तेव्हां बभ्रुवाहनानें त्यांच्याशीं युद्ध करून मणि आणविला. परंतु अर्जुनाजवळ येऊन पहातो तों त्याचें शीरच कोणीं तरी चोरून नेलेलें याला दिसलें. परंतु श्रीकृष्णानें तें शीर आपल्या पुण्यप्रभावानें परत आणविलें व अर्जुनास जिवंत केलें. पितापुत्रांच्या भेटी होऊन अर्जुन पुढें निघून गेला ( जै. अ. २१-४० ).

बभ्रुवाहनानें उलूपीच्या उत्तेजनानें अर्जुनाशीं युद्ध केलें व त्यांत उलूपीच्या मोहिनी अस्त्रानें अर्जुन पडला. नंतर

चित्रांगदेच्या उपरोधिक बोलण्यावरून तिनें संजीवनी मण्याचें स्मरण करितांच मणि प्राप्त झाला व नंतर तिनें अर्जुनास उठविलें ( म. आश्व. ७९-८१; उलूपी पहा ). हा युधिष्ठिराच्या अश्वमेधाकरितां हस्तिनापुरांत आला होता ( म. आश्व. ८९. १ कुं.; प्रभंजन पहा ).

२ कृतयुगांतील एक राजा. हा मृगयेस गेला असतां एका सुदेवाच्या भूतानें यास आपला पूर्वजन्म सांगितला (गरुड. २.९).

**बभ्रु आजद्विष**—एक आचार्य ( जै. उ. ब्रा. २. ७. २-६ ).

**बंबाविश्वावयस्**—या समासग्रथित शब्दाचा तै. सं.त उल्लेख आहे. या दोघांनीं एका विशिष्ट देवतेला सोमरस अर्पण करण्याचा नवा संप्रदाय सुरू केला. यांनीं कांहीं संस्कार शोधून काढले ( तै. सं. ६. ६. ८. ४; क. सं. २९. ७ ).

**बरु**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ९६; ऐ. ब्रा. ६. २५; सां. ब्रा. २५. ८ ).

**बर्कु वार्ष्ण**—एका अध्यापकाचें नांव ( श. ब्रा. १. १. १. १०; बृ. उ. ४. १. ४; ५. १. ८ ).

**बर्बर**—सगरानें यांचा पराजय केला व यांना गुरूच्या आज्ञेवरून ठार न करितां विकृतवेष करून सोडून दिलें ( सगर पहा ).

**बर्बरिक**—हा घटोत्कचाला मौर्वीपासून झाला. हा पूर्वजन्मीं सूर्यवर्चस् या नांवाचा यक्ष होता. सर्व देव भूभार हरण करण्याविषयींची विनंति करण्याकरितां विष्णूकडे गेले असतां हा दर्पोक्तीनें म्हणाला कीं, ' मी एकटा सर्वांचा नाश करीन. ' तेव्हां ब्रह्मदेवानें ' तूं कृष्णाच्या हातून मरशील ' असा यास शाप दिला. पुढें कृष्णानें यास देवीची आराधना करण्यास सांगितलें व याचें सुहृदय असें नांव ठेविलें. नंतर यानें विजय नांवाच्या ब्राह्मणाच्या साहाय्यानें देवी प्रसन्न केली. यानें महाजिह्वा नांवाच्या बलिष्ठ राक्षसीस मारिलें. रेपलेंद्र राक्षसास मारिलें. दुहद्रु रासभी व जैन यांच्याहि विघ्नांना निवारिलें. विजयानें यास मर्मस्थान ओळखण्याचें भस्म दिलें. एकदां भीम तीर्थांत स्नान करीत असतां त्यानें यास न ओळखतां मल्लयुद्धांत पाडिलें. तेव्हां यास वाईट वाटून हा जलसमाधि घेणार इतक्यांत देवीनें यास ' कृष्णहस्तें मर ' म्हणून सांगितलें. भारतीय युद्धांत हा पांडवांकडे होता व यानें आपला पराक्रम दाखविण्याकरितां भस्म सोडिलें. तें पांडव, कृप, अश्वत्थामा यांखेरीज सर्वांच्या मर्मस्थानीं लागलें. व कृष्णाच्या पायांच्या तळव्यांना लागलें. त्याबरोबर कृष्णानें सुदर्शनानें याचें डोकें उडविलें. परंतु देवीनें प्रसन्न होऊन यास जिवंत केलें. युद्धानंतर हा कृष्णाज्ञेवरून गुप्तक्षेत्रांत राहिला ( स्कंद. १. २. ६०-६६ ). यानें चंडिका कुल्यांमध्यें भीमाशीं युद्ध केल्यामुळें हा चंडिल नांवानें प्रसिद्ध झाला.

**बर्हकेतु**—दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

**बर्हणाश्व**—( सू. इ. ) भागवतमतें निकुंभाचा पुत्र. विष्णु, वायु व मत्स्य यांच्या मतें याचें नांव संहताश्व आहे.

**बर्हि**—कश्यप व प्राधा यांचा पुत्र गंधर्व.

२ ( सू. इ. भविष्य. ) अंतरिक्ष शाखेंतील बृहत् अथवा बृहद्राजाचा पुत्र ( धर्मिन् पहा ).

३ कश्यपकुलांतील एक गोत्रकार ऋषिगण.

**बर्हिकेतु**—मयूरध्वजाचें नामांतर.

**बर्हियोग**—कश्यपकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि.

**बर्हिषद**—हा हविर्धानाला आपल्या हविर्धानी नामक भार्येपासून झाला. हा कर्मकांडामध्यें व योगाभ्यासांत अतिशय निष्णात होता. याला गय, शुक्ल, कृष्ण, सत्य आणि जित्व्रत असे पांच भाऊ होते. यानें अनेक यज्ञ केले. प्रत्येक यज्ञ निरनिराळ्या ठिकाणीं केला. यानें ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून शतद्रुति नामक समुद्रकन्येशीं विवाह केला. या रूपवान् भार्येपासून बर्हिषदाला प्रचेतस् नांवाचे दहा पुत्र झाले. त्या सर्वांनीं अतिशय मोठी तपश्चर्या केली ( भा. ४. २४; २ प्राचीनबर्हि पहा ). याला ब्रह्मदेवानें श्रीविष्णूच्या मुखांतून ऐकलेला सनातनधर्म सांगितला ( म. शां. ३४८ ).

२ हा शब्द सगळीकडे बहुवचनीं वापरलेला आढळतो. ( मनु. ३. १०९; ह. वं. १. १८; म. आ. ६४ ). हे स्वायंभुव मन्वंतरांतील पितर होत. पितरांचे जे मूर्तिवान् आणि अमूर्तिवान् असे दोन प्रकार आहेत, त्यांपैकीं हे दुसरे होत. यांना निश्चितसें रूप नाहीं, म्हणून यांना अशरीरी असें म्हणतात. यांना वाटेल तेव्हां वाटेल तें रूप घेतां येतें. हे गण मोठे देदीप्यमान् असून सनातन लोकांत राहतात. स्वर्गाच्या याच भागाला वैभ्राज देश असें म्हणतात. हे सर्व अत्रि ऋषीचे पुत्र होत. हे सर्व पुलस्त्याचे पुत्र दिले असून यांना पीवरी नांवाची मानसकन्या होती. तीच पुढें शुकाची भार्या झाली ( पद्म. सृ. ९ ). दक्ष प्रजापतीनें आपली कन्या स्वधा ही यांना व इतर अग्निष्वात् सोमप इत्यादि पितरांना दिली. या सर्वांच्यापासून स्वधेला वयुना व धारिणी अशा दोन मुली झाल्या. शिवाय यांना अच्छोदा या नांवाची एक कन्या होती. तीच पुढील जन्मीं मत्स्यगंधा या नांवानें प्रसिद्ध झाली. हे गण अमित तेजस्वी व मोठे तपस्वी होते. सर्व देव, यक्ष, गंधर्व, राक्षस, नाग, सर्प व सुपर्ण यांना पूज्य मानितात ( भा. ४. १; म. आ. ६४; ह. वं. १. १८ ). हे पितर यमसभेंत बसत. यांच्याजवळ विमानें होतीं ( मत्स्य. १५ ).

**बर्हिष्मती**—स्वायंभुव मनूचा ज्येष्ठ मुलगा प्रियव्रत, त्याची ही पत्नी. ही स्वायंभुव मन्वंतरांतील प्रजापतीची कन्या होती ( भा. ५.१.२४ ).

**बर्हिसादि**—अंगिराकुलोत्पन्न गोत्रकार.

**बल**—कश्यप व दनायु यांच्या पुत्रांतील एक ( स्कंद. १.४. १४; म. आ. ६५ ). हा हिरण्याक्षाच्या तर्फे इंद्राबरोबर लढत असतांना यानें इंद्राला ऐरावतासह खालीं पाडून मूर्च्छित केलें. शेवटीं इंद्रानें याला मारिलें ( पद्म. सृ. ६७ ).

२ दितीनें शंभर वर्षें तपश्चर्या केल्यावर तिला झालेला पुत्र. हा मोठा झाल्यावर कश्यपानें याचा व्रतबंध करून, ब्रह्मचर्याचा उपदेश केला. यानें शंभर वर्षें ब्रह्मचर्यव्रतानें राहून तप केलें. तेव्हां दितीनें याला स्वर्गावर चढाई करण्यास सांगितलें. हें वर्तमान अदितीला समजतांच तिनें इंद्राला सावध केलें. पुढें लवकरच एके दिवशीं हा समुद्रतीरीं जप करीत बसला असतां इंद्रानें वज्रप्रहार करून याला ठार मारिलें ( पद्म. भू. २३ ).

३ वामनावतारीं बलीच्या यज्ञमंडपांत बलीचे अनुयायी उसळले, त्या वेळीं ज्या विष्णुपार्षदांनीं त्या राक्षसांचें निवारण केले, त्यांपैकीं एक ( भा. ८. २१. १६ ).

४ कुशिककुलांतील मंत्रकार. याला उद्दल असेंहि म्हणतात.

५ वायुमतें भृगुवंशीं श्रीचा पुत्र.

६ वरुण व ज्येष्ठा यांचा पुत्र ( म. आ. ६७. ५२ कुं.).

७ रामसैन्यांतील एक वानर. यास कुंभकर्णानें खाल्लें ( म. व. २८७ ).

८ मयासुराचा पुत्र. हा अतल नामक पातालांत राहतो. यानें शहाण्णव प्रकारच्या माया निर्माण केल्या असून त्यांपैकीं कांहींचा उपयोग कांहीं मायावी दैत्य करीत असतात. एकदां यानें अशी एक जांभई दिली कीं, त्यायोगें स्वैरिणी, कामिनी व पुंश्चली अशा तीन प्रकारच्या दुःशील स्त्रियांचे गण उत्पन्न झाले. त्या स्त्रियांजवळ हाटक नांवाचा एक रस आहे. तेथें येणाऱ्या पुरुषाला तो रस पाजून त्या संभोगास समर्थ करितात व त्याशीं त्या विलासादि उपभोग घेतात. त्या रसाच्या पानानें पुरुष अति मदोन्मत्त होतो ( भा. ५. २४. १६ ). यानें जालंधराच्या बाजूनें इंद्राशीं लढून त्याला जेरीस आणिलें. तेव्हां इंद्रानें याची स्तुति केली. यानें त्यास वर मागावयास सांगितलें असतां इंद्रानें ' तूं आपलें शरीर मला दे,' असें सांगितलें. यानें इंद्राला आपल्या शरीराचे तुकडे करून ते घेण्यास सांगितलें, तेव्हां इंद्रानें याचे तुकडे करून ते जिकडे तिकडे फेंकून दिले. ते तुकडे जेथें पडले, त्या ठिकाणीं रत्नांच्या खाणी उत्पन्न झाल्या. हा मेल्यावर याची स्त्री प्रभावती शोक करीत शुक्राकडे आली व तिनें बलास जिवंत करण्याविषयीं त्याची प्रार्थना केली. परंतु शुक्रानें फक्त तिला आपल्या मंत्रप्रभावानें बलाचा शब्द ऐकविला. त्यांत बलानें तिला 'माझ्या देहांत तुझा देहत्याग कर' असें सांगितलें. त्याप्रमाणें तिनें करतांच तिचा पूर्व देह नष्ट होऊन ती एक नदी बनली ( पद्म. उ. ६ ).

९ ( १ दल पहा ).

१० गरुड व शुकी यांचा पुत्र.

११ अनायुषेचा पुत्र.

१२ श्रीकृष्ण व लक्ष्मणा यांचा एक पुत्र.

१३ बलरामाचें नामान्तर.

**बलक**—तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ कश्यप व दनु यांचा पुत्र.

३ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**बलखानि**—वत्सर राजाचा पुत्र. हा युधिष्ठिराचा अंशभूत होता ( भवि. प्रति. ३. १ ).

**बलबन्धु**—रैवत मनूचा पुत्र.

२ त्रिधामन् नामक शिवावताराचा शिष्य.

**बलमित्र**—वीरमणिपुत्र रुक्मांगद याचा मावसभाऊ. रामाच्या अश्वमेधप्रसंगीं शत्रुघ्नाबरोबर झालेल्या वीरमणीच्या युद्धांत हा होता ( पद्म. पा. ४० ).

**बलमोदक**—सुरथाचा पुत्र. सुरथानें रामाचा अश्वमेधीय अश्व धरिल्यावर शत्रुघ्नाबरोबर झालेल्या युद्धांत हा होता ( पद्म. पा. ४९ ).

**बलराम**—(सो. वृष्णि.) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र. वसुदेव व देवकी कंसाच्या तुरुंगांत असतांना याचा गर्भ प्रथम देवकीच्या उदरीं राहिला. नंतर तो सातव्या महिन्यांत मायेनें रोहिणीच्या उदरांत गेला. रोहिणी या वेळीं गोकुळांत होती. हा शेषांशानें जन्मास आला ( म. आ. ६८. १५२ कुं; भा. ९. २४. ४६; १०. २. ८; पद्म. उ. २४५ ).

बालपणीं हा सदैव कृष्णाबरोबरच असे. त्या वेळीं यानें धेनुकासुर ( म. स. ५३. १६ कुं; विष्णु. ५. ८ ), प्रलंबासुर ( भा. १०. १८; विष्णु. ५. ९; ह. वं. २. १४. ६२), मारिले.

सांदीपनीपासून वेदविद्येबरोबर ब्रह्मविद्याहि संपादन केली. याची स्त्री सूर्यवंशी ककुद्मीकन्या रेवती ( भा. ९. ३; ब्रह्म ७; विष्णु. ५. २५ ). गदायुद्धांत हा अतिनिपुण होता. त्यामुळें कृष्णानें जरासंधाचा सत्रा वेळां पराभव केला. हा आपल्या सासऱ्याच्या आनर्त देशांत विशेष राहत असे. पुढें जरासंधाच्या त्रासाकरितां कृष्णानेंहि तिकडेच द्वारकेस राजधानी नेली. एकदां हा नंदयशोदेस भेटण्याकरितां गोकुळांत गेला. तेथें त्यांनीं यास दोन महिने राहवून घेतलें. हा दारू पिणारा असल्यामुळें दारूचीहि व्यवस्था त्यानें केली होती. आपल्या इच्छेस्तव यानें

यमुनेचा प्रवाह आपल्या इच्छेनुरूप वळविला ( म. आ. १०. ६५ कुं.; विष्णु. ५. २५ ) व सांबविवाहसमयीं दुर्योधन सांबास सोडीना म्हणून हस्तिनापुरास आपल्या हलानें ओढून हस्तिनापूरची ठेवणहि बदलली ( विष्णु. ५.३५; २ लक्ष्मणा पहा ).

कृष्णानें शतधन्व्यास मारिलें, पण स्यमंतक मणि मिळाला नाहीं असें सांगितलें. तेव्हां लोभानें त्यानेंच मणि आपणाजवळ ठेवून आपणांस मात्र नाहीं म्हणून सांगितलें असें समजून यानें त्याची निंदा केली व रागानें मिथिलेस गेला. तेथें यानें दुर्योधनास गदायुद्ध शिकविलें ( विष्णु. ४. १३; भा. १०. ५७). पण बलराम रागावल्याचा निर्देश भागवतांत नाहीं.

दुर्योधन व भीम हे दोघेहि याचेच शिष्य. आपसांत लढून त्यांपैकीं एकानें मरावें हें पाहवणार नाहीं म्हणून, कृष्णाला यानें ‘ दोघेहि आपणांस सारखेच’ तेव्हां ‘कौरवांना मदत कर,’ असें सांगितलें असतां, त्यानें ऐकिलें नाहीं म्हणून रागानें, व ‘मी कुणालाच मदत करणार नाहीं,’ असें दुर्योधनास तो मदतयाचनार्थ आला असतां सांगितलें होतें, म्हणून हा तीर्थयात्रेस गेला ( म. उ. ७; १५७; श. ३५ ).

तीर्थयात्रा करीत करीत प्रभास पृथूदक, बिंदुसर, त्रितकूप, सुदर्शन, विशाल, ब्रह्मतीर्थ, चक्रतीर्थ, सरस्वती, यमुना व गंगाकांठचीं तीर्थें करून हा नैमिषारण्यांत आला. तेथें पुराणचर्चा चालू होती. ती ऐकत असलेल्या सर्व मुनींनीं यास उत्थापन देऊन मान दिला. पण रोमहर्षणानें तसें केलें नाहीं, म्हणून रागावून व दारूच्या धुंदींत यानें त्याला ठार केलें. पण तत्रस्थ सर्व मुनींनीं यास दोष दिला. तेव्हां त्याचा पुत्र उग्रश्रवस् सौति पुराणें सांगेल असें म्हणाला, व यानें त्यांना त्रास देणाऱ्या बल्वलास ठार केलें व तेथून निघून गेला. या वेळीं वरील ब्रह्महत्येबद्दल यानें प्रायश्चित्त घेतलें ( मार्क. ६; रोमहर्षण पहा ). नंतर सरयू, हरिद्वार, गोमती, गंडकी, विपाशा, शोणभद्र, गया, परशुरामक्षेत्र, सप्त गोदावरी, वेणा, पंपा, भीमरथी, शैलपर्वत, वेंकटगिरी, कामोष्णी, कांची, कावेरी, श्रीरंग, मथुरा, सेतुबंध, कृतमाला, ताम्रपर्णी, अगस्त्याश्रम, दुर्गादेवी, अनंतपूर, पंचाप्सरा, केरल, त्रिगर्त, गोकर्ण, आर्यादेवी, शूर्पारक, तापी, पयोष्णी, निर्विंध्या, दंडकारण्य, नर्मदा, मनु इतक्या क्षेत्रांवरून हा कुरुक्षेत्रीं आला. भारताप्रमाणें सरस्वती तीरावरील तीर्थांनाच गेला होता ( म. श. ३५-५५) तेथें दुर्योधन व भीम यांचें गदायुद्ध चालू होतें. त्यांचें यानें निवारण केलें. पण ते ऐकेनात म्हणून हा द्वारकेस गेला ( भा. १०. ७८-७९ ). पण गदायुद्धाचे नियम मोडून दुर्योधनाचे मांडीवर भीमानें गदा मारिल्यामुळें हा चिडला व भीमास मारण्यास धांवला. पण कृष्णानें भीमाच्या प्रतिज्ञा व मैत्रेयाचा दुर्योधनास शाप हीं निवेदन करून याचें निवारण केलें, असें आहे ( म. श. ६० ). अनिरुद्धविवाहसमयीं रुक्मी द्यूतांतील याचा जय नाकबूल करूं लागला. तेव्हां यानें त्यास ठार केलें ( भा. १०. ६१; ह. वं. २. ६१ ). सांब हा दुर्योधनकन्या हरण करीत असतां त्यास सर्व राजांनीं वेढिलें होतें. पण त्या सर्वांचा यानें पराभव केला. भीमासहि एकदां यानें बाहुयुद्धांत जिंकिलें होतें ( ह. वं. २. ६२ ). यानें द्विविद वानरास ठार केलें ( विष्णु. ५. ३६ ). सर्व यादवांचा नाश झाल्यावर यानें प्रभासक्षेत्रीं योगानें देहत्याग केला ( म. मौ. ४; भा. ११. ३० ). तेव्हां रेवतीनें सहगमन केलें ( पद्म. उ. २५२ ). कृष्णापेक्षां हा तीन महिन्यांनीं मोठा होता (म. आ. २३४ कुं.).

याचें वस्त्र निळें असे; हें व कमलमाला यमुनाकर्षणकालीं लक्ष्मीनें यास दिली ( विष्णु. ५. २५ ). हा नेहमीं दारू पीत असे. याचे देखणेपणामुळें राम, बलिष्ठत्वामुळें बल, एका गर्भांतून दुसऱ्या गर्भांत जाण्यामुळें संकर्षण, याचीं आयुधें हल व मुसल म्हणून हली, हलायुध, सीरपाणि, मुसली व मुसलायुध असें यास म्हणत.

**बलवत्**—गुर्जरदेशच्या मूलवर्मन् राजाचा पुत्र. यास बलादि नऊ भाऊ व प्रभावती नामक बहीण होती ( भवि. प्रति. ३.३१ ).

**बलवर्धन**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**बला**—अत्रीची स्त्री.

**बलाक**—( सो. अमा. ) भागवतमतें पूरूचा पुत्र वायु व विष्णु यांच्या मतें हा बलाकाश्व असून अजकाचा पुत्र आहे.

२ व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील विष्णुमतें शाकपूर्णाचा शिष्य व भागवतमतें जातुकर्ण्याचा शिष्य.

३ एक चाण्डाल. हा श्वापदें मारून आपल्या आईबापांची व इतर आश्रितांची उपजीविका चालवी. एकदां यानें एक अंध असलेलें हिंस्र श्वापद चुकून मारिलें. तेव्हां आपल्या हातून अंध श्वापद मारिल्याचें पाप घडलें, हें पाहून यास फार वाईट वाटलें. पण तें श्वापद जनांस पीडाकारक असल्यामुळें मारण्यांत कोणत्याहि तऱ्हेचा अधर्म नाहीं, असें यास कळलें तेव्हां याच्या मनास समाधान वाटलें ( म. क. ६९ ).

**बलाकाश्व**—सिंधुद्वीपाचा पुत्र. याचा पुत्र कुशिक ( म. अनु. ७. ४ कुं. ).

२ ( १ बलाक पहा ).

**बलाकिन्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

२ आंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**बलांग**—( भविष्य. ) अजमेरच्या चपहानि कुलांतील वसंतरायाचा पुत्र. याचा पुत्र प्रमथराय. यानें पन्नास वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४. २ ).

**बलाढ्य**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**बलानीक**—द्रुपद राजाचा एक पुत्र. हा अश्वत्थाम्याकडून मारिला गेला ( म. द्रो. १५७. १८१ कुं. ).

२ विराट राजाचा भाऊ ( म. द्रो. १५९. ४१ कुं. ).

**बलायु**—पुरूरव्याला उर्वशीपासून झालेल्या अष्टपुत्रांपैकीं एक ( पद्म. सृ. १२ ).

**बलारक**—( वल्गूतक पहा ).

**बलाहक**—एक राजा. याला शंकरानें गोवत्सरूपानें साक्षात्कार दिला. पुढें गोवत्साच्या जागीं उत्पन्न झालेलें लिंग रोज अणुप्रमाणांत वाढूं लागलें. पण एका कर्मचांडालाच्या दर्शनानें लिंगाची वाढ खुंटली ( स्कंद. ३. २. २७ ).

२ कश्यप व कद्रू यांचा पुत्र एक नाग.

३ वृद्धक्षत्राचा पुत्र व जयद्रथाचा भाऊ ( म. व. २६६. १३ कुं. ).

**बलि**—हा प्रह्लादपुत्र विरोचनाला देवी नांवाच्या भार्येपासून झाला (म. आ. ६५; स. ९; शां. २२५; अनु. ९८; भा. ६. १८; ८. १३; वामन. २३; ७७). सुरुर्चापासून झाला असेंहि आढळतें ( स्कं. १. १. १८ ). यास वैरोचन अथवा वैरोचनि असें म्हणत असत. हा मोठा बलाढ्य असून यास विंध्यावली नांवाची एक स्त्री होती ( भा. ८. २०. १७; मत्स्य. १८७. ४० ). याला अशना नांवाची आणखी एक भार्या असून तिजपासून यास बाणप्रभृति शंभर पुत्र झाले ( भा. ६. १८ ). बाणासुराची आई म्हणून कोटरा नामक एका बाईचें नांव सांपडतें ( भा. १०. ६३; २ बाण पहा ).

हा दैत्यांचा राजा होता ( वामन. २३ ). पुढें विष्णूनें देवांचा त्याग केल्यामुळें शुक्राचार्यानें याला उपदेश केला कीं, ' तूं देवांना जिंक. ' तदनंतर बलि स्वर्गावर चालून गेला असतां देवांनीं आपलीं रूपें पालटलीं व ते आपलीं स्थानें सोडून परागंदा झाले. नंतर बलीनें तीं स्थानें जिंकून पातालांत असणाऱ्या आपल्या आजोबास म्हणजे प्रह्लादास स्वर्गांत बोलावून आणिलें व त्यास स्वर्गीय दिव्य पद स्वीकारण्याची विनंति केली. प्रह्लादानें तें स्वीकारलेंसें करून बलीस राज्याभिषेक केला. नंतर बलीनें ' मी राज्य कसें चालवूं ? ' असें विचारिलें असतां प्रह्लादानें यास मोठा उपदेश करून ' धर्मानें राज्य चालव. ' असें सांगितलें ( वामन. ७४ ). पण देवांना त्रास दिल्याबद्दल प्रह्लादास राग येऊन त्यानें यास शाप दिला कीं. ' तुझा लवकर नाश होईल ' ( वामन. २९ ). यानंतर बलीनें शांततेनें व सौख्यानें स्वर्गसुखाचा मनमुराद उपभोग घेतला ( वामन. ७५ ).

बलीनें इंद्राची संपत्ति हरण केली, पण ती नेत असत समुद्रांत पडली. ती बाहेर काढण्याकरितां विष्णूच्या सूचनेवरून देव याला शरण आले व ' आपण सर्व मिळून समुद्रमंथन करूं ' असें नम्रपणें म्हणाले. तेव्हां बलीहि तयार झाला ( भा. ८. ६; स्कंद. १. १. ९ ).

समुद्रमंथनाला दुसरेंहि कारण आढळतें. देवांचा युद्धांत अत्यंत संहार होई, व असुर मात्र शुक्राकडून संजीवनीनें पुनः उठविले जात. त्यामुळें विष्णूच्या सूचनेवरून अमृताकरितां देवदैत्यांनीं मंथन केलें. त्या वेळीं चाक्षुष मन्वंतर व मंत्रद्रुम नांवाचा इंद्र होता ( भा. ८. ८; विष्णु. १. ९; मत्स्य. २५०-२५१ ).

समुद्रमंथन एकादशीस सुरू होऊन द्वादशीस संपलें. एकादशीस त्यांतून कालकूट निघालें. तें शंकरानें पिऊन टाकिलें. पुढें अलक्ष्मी निघाली. तिचें उद्दालक ऋषीशीं विष्णूनें लग्न लावून दिलें. नंतर ऐरावत हत्ती, उच्चैःश्रवा घोडा, धन्वंतरि, पारिजातक, कामधेनु व अप्सरा हीं रत्नें उत्पन्न झालीं. द्वादशीस लक्ष्मी उत्पन्न झाली. तिचा विष्णूनें स्वीकार केला. नंतर चंद्र व अमृत यांची उत्पत्ति झाली. अमृतापासून तुळस निर्माण झाली ( पद्म. ब्र. ९-१० ).

मंथनापासून निघालेल्या रत्नांचीं नांवें, संख्या व क्रम चोहींकडे सारखीं नाहींतः १ लक्ष्मी, २ कौस्तुभ, ३ पारिजातक, ४ धन्वंतरि, ५ चंद्र, ६ कामधेनु, ७ ऐरावत, ८ अश्व ( सप्तमुख ), ९ अमृत, १० रंभा, ११ शार्ङ्ग धनुष्य, १२ पांचजन्य शंख, १३ महापद्मनिधि व १४ हालाहल विष ( स्कंद. ५.१.४४).

१ हालाहल विष, २ चंद्र, ३ सुरभि धेनु, ४ कल्पवृक्ष, ५ पारिजातक, ६ आम्र, ७ संतानक, ८ कौस्तुभ रत्न ( चिंतामणि ), ९ उच्चैःश्रवा, १० चौसष्ट हत्तींच्या कळपासह ऐरावत, ११ मदिरा, १२ विजया, १३ भांग, १४ लसूण, १५ गाजर, १६ धोतरा, १७ पुष्कर, १८ ब्रह्मविद्या, १९ सिद्धि, २० ऋद्धि, २१ माया, २२ लक्ष्मी, २३ धन्वंतरि, २४ अमृत, ( स्कंद. १. १. ९-१२ ).

नंतर अमृताचे बाबतींत दैत्य फसल्यावर देव व दैत्य यांचें मोठें युद्ध झालें. त्यांत बलि मयासुरानें निर्माण केलेल्या वैहानस नामक विमानांत बसून युद्ध करीत होता. नंतर जेव्हां इंद्र व बलि यांची गांठ पडली, तेव्हां बलीनें राक्षसी मायेचा अंगिकार करून युद्ध केलें. पण त्याच वेळीं भगवान् विष्णु तेथें प्रगट झाल्यामुळें ती माया नष्ट झाली. पुढें इंद्रानें याजवर वज्र फेंकून यास ठार मारिलें. नंतर नारदाच्या आज्ञेनें अवशिष्ट दैत्यांनीं बलीला अस्ताचलावर नेलें. तेथें शुक्राचार्यांच्या

स्पर्शानें व मंत्रानें बलि जिवंत झाला ( भा. ८. १०-११ ). जिवंत झाल्यावर शुक्राचार्यांनें ऐंद्र महाभिषेकानें यास अभिषेक केला. तदनंतर याजकडून विश्वजित् यज्ञ करविला. तेव्हां यज्ञनारायणानें प्रसन्न होऊन याला इंद्ररथासारखा दिव्य रथ, सुवर्ण धनुष्य, दोन अक्षय्य भाते व दिव्य कवच दिलीं. प्रह्लादानें यास न सुकणारी माळ व शुक्रानें दिव्य शंख दिला. याला ब्रह्मदेवानेंहि एक माळ दिली होती ( म. शां. २३०. २८ कुं. ). नंतर बलीनें पुनः स्वर्ग जिंकिला व देवहि त्या वेळीं आपल्यास काल इष्ट नाहीं, असें पाहून निघून गेले. नंतर यानें शंभर अश्वमेध केले ( भा. ८. १५).

पुढें याच्या राज्यांत देव, ब्राह्मण व भूमि इत्यादिकांस त्रास व्हावयास लागल्यामुळें देव भगवान् विष्णूस शरण गेले व ' आमची ही विपत्ति दूर कर ' असें त्यांनीं त्यास विनविलें. तेव्हां विष्णूनें सांगितलें कीं, ' बलि हा माझा भक्त आहे. पण जर तुम्हांस त्रास होत असेल तर मी लवकरच बटुरूपी वामनाचा अवतार घेईन' (ब्रह्म. ७३). पुढें दैत्य हळुहळूं निस्तेज होऊं लागले. तेव्हां हा प्रह्लादास भेटण्यास गेला व यानें त्यास याचें कारण विचारिलें असतां प्रह्लाद म्हणाला, ' श्रीहरि विष्णु वामन अवतार घेण्यास्तव म्हणून हल्लीं गर्भी वास्तव्य करीत आहे. म्हणून दैत्य निस्तेज झाले आहेत.' तेव्हां बलि म्हणाला कीं, ' त्या हरीपेक्षां माझे दैत्य बलिष्ठ आहेत. ' हें ऐकून व विशेषतः याच्या तोंडून विष्णूची निंदा ऐकून प्रह्लादास राग आला व त्यानें शाप दिला कीं, 'तुझ्या राज्याचा नाश होईल.' तेव्हां हा शरण आला असतां प्रह्लादानें सांगितलें कीं, 'मला शरण येण्यापेक्षां तूं विष्णूला शरण जा ' (वामन. ७७).

नर्मदेच्या उत्तर तीरावर भृगुकच्छ नामक प्रदेशीं याचा शेवटचा अश्वमेध चालूं असतां विष्णु वामन रूप घेऊन याकडे आला. तेव्हां यानें त्याची पूजा करून कांहीं तरी मागावें अशी त्याला विनंति केली. वामनानें राजपाशीं तीन पावलें जमीन मागितली. शुक्रानें बलीस खूप सांगितलें कीं, ' हा परमेश्वर आहे, तूं याला कांहींहि देऊं नकोस. हा तुझा नाश करील.' पण बलि ऐकेना. हा म्हणाला कीं, 'परमेश्वर मजकडे अतिथिरूपानें आला, मग मी त्यास इच्छित दान कां देऊं नये ?' ( वामन. ९१ ). नंतर वामनानें याची व याच्या पूर्वजांची प्रशंसा केली. परंतु शुक्रानें बलीचें उत्तर ऐकून याला शाप दिला कीं, ' तूं स्वतःला शहाणा समजतोस व माझ्या आज्ञेचा उपमर्द करतोस त्याअर्थी लवकरच ऐश्वर्यभ्रष्ट होशील.' नंतर बलीनें वामनाच्या हातावर उदक सोडतांच वामनानें मोठें रूप धारण करून दोन पावलांत ब्रह्मांड व्यापिलें. तीन पावलांत ब्रह्मांड व्यापिलें, असें महाभारतांत दिलें आहे ( म. स. ४७ कुं. ). आपल्या धन्यास वामनानें फसविलें, हें पाहून कित्येक सैनिक वामनराव चालून जाऊं लागले, पण बलीनें त्यांना उपदेश केला कीं, 'सध्यां आपणांस काल उलट आहे.' तदनंतर गरुडानें भगवंताची इच्छा जाणून बलीला वरुणपाशानें बद्ध केलें (वामन. ९२ ). या वेळीं पुनः शुक्रानें दान देण्यास यास विरोध केला व हा ऐकेना, तेव्हां शुक्र झारीच्या तोंडांत जाऊन बसला. बलीनें दर्भानें झारीचें तोंड साफ करितांच ह्याचा डोळा फुटला. तेव्हांपासून शुक्रास एकाक्ष असें नांव पडलें ( नारद. ११ ).

नंतर वामन म्हणाला कीं, ' तूं मला तिसऱ्या पावलाची जमीन दिली नाहींस. तस्मात् तूं आपलें वचन पूर्णपणें पाळलें नाहींस.' तेव्हां बलि म्हणाला कीं,'तूं कपटानें मोठा झालास तरी माझें वचन सत्यच आहे.'असें म्हणून त्याच्या तिसऱ्या पावलास आपलें मस्तक दिलें ( पद्म. पा. ५३ ). नंतर विंध्यावलीनें ईश्वराची प्रार्थना केल्यावर त्यानें शुद्ध सत्त्व पाहून याला वर दिला कीं, ' तूं सावर्णि मन्वंतरांत इंद्र होशील. तरी सध्यां तूं सुतलांत रहा. तेथें मी तुझा द्वारपाल होईन व माझें चक्र तुझें संरक्षण करील. ' नंतर यास वामनानें वरुणपाशांतून मुक्त केलें. तेव्हां बलीनें ब्रह्मा, विष्णु व महेश यांस नमस्कार केले व हरीची स्तुति केली. बलि सुतलांत गेला व विष्णूच्या आज्ञेनें शुक्रानें यज्ञाची समाप्ति केली ( भा. ८. १३. १८-२३; म. स. ४७ कुं.; वामन. ३१; ब्रह्म. ७३ ). बलीचें पृथ्वीवरील राज्य वामनानें मनुपुत्रास देऊन दैत्यांस अन्यत्र हांकून दिलें ( स्कंद. ७. २. १९ ).

कृतयुगापूर्वी कार्तिक शुद्ध प्रतिपदेस बलीनें वामनास दान दिलें.तेव्हां वामनानें ' ही बलिप्रतिपदा म्हणून ओळखली जाईल व त्या दिवशीं लोक तुझी पूजा करतील ' असा बलीस वर दिला ( स्कंद. २. ४.१० ).

पुढें बलीला जिंकण्याकरितां रावण पातालांत आला असतां तेथें बलि बायकांशीं फांसे खेळत होता. बराच वेळ रावणाकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. पण शेवटीं यानें दूर उडालेला फांसा आणण्यास रावणास सांगितलें असतां त्याला तो हालेना. तेव्हां बायकांनीं रावणाची विटंबना करून तेथून हांकलून दिला ( आ. रा. सार. १३ ). याशिवाय पुढील माहितीहि आढळते.

एकदां रावण याच्याकडे येऊन यास म्हणाला कीं, ' मी तुझी मुक्तता करण्याकरितां आलों आहें.' तें ऐकतांच बलीनें त्यास अग्नीसारखें चकाकणारें हिरण्यकशिपूचें कुंडल उचलून आणावयास सांगितलें. रावण तेथें गेला, पण तें जागचें हलेना. एवढेंच नव्हे तर रावण रक्त ओकत जमिनीवर बेशुद्ध पडला. नंतर बलीनें त्यास सावध करून सांगितलें कीं, ' तें कुंडल हिरण्यकशिपूचें होतें. जें कुंडल तुला उचललें नाहीं तें कानांत घालणाऱ्या वीराला ज्या नृसिंहानें मारिलें, त्या रामरूप विष्णूस

तूं कसा जिंकणार ?' नंतर बलीनें त्यास विष्णूची लीला वर्णन करून सांगितली ( वा. रा. उ. प्रक्षिप्तसर्ग १ ).

यास इंद्रसेन असेंहि नामांतर आढळतें ( भा. ८ २२. ३३ ). राज्यापासून भ्रष्ट झालेला बलि गर्दभ झाला. तेव्हां ब्रह्मदेवानें इंद्राला गर्दभ झालेल्या बलीचा तपास करण्यास सांगितलें, पण ब्रह्मदेवाच्याच आज्ञेनें इंद्रानें यास मारिलें नाहीं. ब्राह्मणांशीं उन्मत्तपणा व मद दाखविल्यामुळें लक्ष्मीनें याचा त्याग केला ( म. शां. २२३–२२५ ).

दक्षिणाशून्य कर्मांचा भोग बलि घेतो. अश्रोत्रियास श्राद्धासंबंधीं पदार्थदान, श्रद्धारहित दान, शूद्रापति ब्राह्मणास पूजाद्रव्यदान, अधम ब्राह्मणकृत यज्ञ, अपवित्र पुरुषपूजन, अभक्त शिष्यकृत गुरुसेवा यांतील पुण्यांश ज्याचा त्याला प्राप्त न होतां बलि हरण करतो ( दे. भा. ९. ४५ ). याचा व शुक्राचा फुलें व धूपदीपदानाविषयीं संवाद झाला होता (म. अनु. ९८). राजा नष्ट कशानें होतो, याविषयीं याचा इंद्राशीं संवाद झाला होता ( म. शां. २३० कुं. ).'क्षमा श्रेष्ठ कीं तेज श्रेष्ठ' याबद्दल याचा व प्रह्लादाचा संवाद झाला होता ( म. व. २८ ). हा वरुणसभेंत अधिष्ठित असतो ( म. स. ९ ). यानें अनेक यज्ञ केले होते ( वामन. २३ ). यानें तीस लक्ष साठ हजार वर्षे राज्य केलें ( पद्म. सृ. १३ ). हा पूर्वजन्मीं कितव होता ( स्कंद. १. १. १८; बाष्कलि पहा ). हा सप्तचिरंजीवांतील एक आहे. यास महाबलि असें नामांतर असून याच्या राजधानीचें नांव महाबलिपूर असें होतें.

याला शंभर पुत्र होते. त्यांपैकीं १ बाण, २ कुंभगर्त, ३ दय, ४ भोज व ५ कुंचि हे प्रसिद्ध होते. शकुनि व पूतना अशा दोन मुली होत्या ( ब्रह्मांड. ३. ५. ४२-४४; भा. ६.१८.१७).

अनासक्ति प्रतिपादन करण्याकरितां वेदान्तांत याच्या कथेचा उपयोग केला आहे ( यो. वा. ५. २२. २९. ).

२ ( सो. अनु. ) सुतपा राजाचा पुत्र. हा पूर्वजन्मींचा बलि दैत्य, प्रजेच्या इच्छेनें पुनः जन्म पावला होता ( ह. वं. १. ३१; मत्स्य. ४८; ब्रह्म. १३ ). हा पूर्व आनव प्रदेशाचा राजा होता. दीर्घतमस् ऋषीच्या पुत्रांनीं आईच्या आज्ञेनें दीर्घतमसूला ताफ्यावर बांधून सोडून दिलें असतां तो ताफा वाहत वाहत पूर्व आनव देशीं आला. तो बलीनें भूमीवर घेऊन त्या ऋषीचा सन्मान केला व त्याजकडून आपल्या सुदेष्णा राणीच्या ठायीं अंग, वंग, सुह्म, पुंड्र व कलिंग हे पांच पुत्र उत्पन्न करविले ( ब्रह्मांड. ३. ७ ). भागवतांत एक जास्त आंध्र म्हणून दिला आहे ( ९. २३ ). हरिवंशांत सुह्मऐवजीं सुस दिला आहे ( १. ३१ ). याचे वंशजांस बालेय क्षत्र व बालेय ब्राह्मण म्हणूं लागल ( मत्स्य. ४८; विष्णु. ४. १८; ब्रह्म. १३.३१ ). पुढें बलीचें भारताच्या पूर्व भागास असणारें राज्य याच्या पुत्रांत वांटलें गेलें व त्या त्या पुत्रांवरून त्या त्या देशांचीं नांवें पडलीं ( भा. ९. २३; म. आ. १०४ ). आनव प्रदेश म्हणजे हल्लींचा मोंघीर व भगलपूर प्रांत होय व यासच पुढें अंग म्हणूं लागले.

याला ब्रह्मदेवानें प्रसन्न होऊन वर दिले होते कीं, 'तूं महायोगी होशील, तूं कल्पपर्यंत जिवंत राहशील, तूं युद्धांत अजिंक्य राहशील, धर्मविचारांत तुझ्या मताला वरिष्ठ मान मिळेल, त्रैलोक्यांतील सर्व वर्तमान तुला कळेल, तुझ्या अर्ध्या वचनांत लोक राहतील, तुझी शक्ति अतुल असेल, धर्मांतील अंतरंग रहस्यांचा अपरोक्ष साक्षात्कार तुला होईल, तूं चातुर्वर्ण्याची मर्यादेनें स्थापना करशील' (ह. वं. १. ३१; मत्स्य. ४८; ब्रह्म. १३ ). कल्पांतीं हा देह ठेवून पूर्वस्थानीं गेला.

हा व असुर बलि यांचा सर्वजण घोंटाळा करितात. एवढेंच नव्हे तर या राजास दानव, वैरोचन असेंहि म्हटलें आहे ( ब्रह्मांड. ३. ७४.६६; मत्स्य. ४८.२३ ). तरीहि याची वंशावळ आनव राजा म्हणून दिली जाते व याच्या पूर्वजांत कोणाचेंहि नांव विरोचन नाहीं. हा व असुर बलि वेगळे आहेत.

३ अत्रिकुलांतील गोत्रकार.

४ आंगिरसकुलांतील मंत्रकार.

५ रैवत मनूचा पुत्र.

६ कृतवर्मसुत बलि. रुक्मिणीची मुलगी चारुमती याची पत्नी होय ( भा. १०. ६१; विष्णु. ५. ८ ).

७ हा जितेंद्रिय व वेदवेदांगपारग ऋषि मयसभेंत धर्मराजासन्निध बसला होता व त्यास पुण्यकारक कथा निवेदन करीत होता ( म. स. ४ ).

८ वाराहकल्पांतील वैवस्वत मन्वंतराच्या तेराव्या चौकडींत बलि नांवाचा शंकराचा अवतार गंधमादन पर्वतावर वालखिल्याश्रमांत झाला. याचे सुधामन्, काश्यप, वासिष्ठ व विरजस् असे चार पुत्र होते ( शिव. शत. ५ ).

९ ( आंध्र. भविष्य. ) भागवतमतें पहिला राजा. यास शिप्रक, शिशुक व सिन्धुक अशीं नामान्तरें होतीं.

१० गुर्जर देशच्या मूलवर्मा राजाच्या अकरा मुलांतील पांचवा ( भवि. प्रति. ३. ३१ ).

११ यानें मिश्र देशांत म्लेच्छ जातींत संस्कृत प्रचलित केलें. यानें सुकंदर म्लेच्छपतीस मयासुर मदत पाठविला. त्यामुळें सर्व म्लेच्छ आले. त्यांना रामानंदाच्या शिष्यांनीं वैष्णव केलें ( भवि. प्रति. ४. २०-२१ ).

१२ सावर्णि मन्वंतरांतील इंद्र.

**बलिभद्र**—रुद्रगणांपैकीं एक.

**बलिवाक**—युधिष्ठिराच्या मयसभेंतील एक ऋषि ( म. स. ४. २० कुं. ).

**बलिविंध्य**—रैवत मनूचा पुत्र.

**बलीमुख**--रामसेनेंतील एक वानर ( वा. रा. उ. ४).

**बलीह**—एक जात किंवा वंश. यांच्यांत एक अर्कज नांवाचा कुलांगार राजा निपजला. त्याच्यामुळें यांचा नाश झाला ( म. उ. ७३ ).

**बलेक्षु**—वसिष्ठकुलोत्पन्न एक गोत्रकार ऋषिगण. या-बद्दल दलेशु असा पाठभेद आहे.

**बलोन्मत्त**--रुद्रगणांपैकीं एक.

**बल्गूतक**—( वल्गूतक पहा ).

**बल्बूथ**--हा दास आहे. वश अश्व्यानें याचा दान देणारा म्हणून गौरवानें उल्लेख केला आहे. कारण याच्याकडून त्याला पुष्कळ संपत्ति मिळाली होती ( ऋ. ८. ४६. ३२ ).

**बल्लव**—अज्ञातवासांतील पांडुपुत्र भीमसेनाचें नांव ( भीम पहा ).

**बल्लाळ**—गणेशाचा एक निस्सीम भक्त. हा कल्याण नामक वैश्याचा मुलगा होता. याला लहानपणापासूनच गणपति-पूजेचा नाद होता. हा लहान लहान दगड गोळा करून त्यांनाच देव समजून त्यांची पूजा करी. याच्या आईबापांनीं याला त्यापासून परावृत्त करण्याचा बराच प्रयत्न केला, पण तो निष्फल झाला. एकदां त्यांनीं बल्लाळास झाडास टांगून मारिलें; पण हा कांहीं आपला नाद सोडीना. शेवटीं याच्या भक्तीनें हा ज्या ठिकाणीं पूजा करीत असे, त्या ठिकाणीं बल्लाळेश्वर अगर बल्लाळविनायक नामक गणपतीचें स्थान झालें ( गणेश. १. २२ ).

**बल्वल**—विप्रचित्ति दानवाचा पुत्र जो इल्वल त्याचा पुत्र. नैमिषारण्यांतील ऋषींस हा अतिशय त्रास देई, म्हणून बलरामानें यास ठार मारिलें ( भा. १०. ७८; स्कंद. ३. १. १९ ).

**बल्हिक प्रातिपीय**—एका कौरव राजाचें नांव ( श. ब्रा. १२. ९. ३. ३). दुष्टरीतु पौंस्यायन पुनः राजा होऊं नये म्हणून यानें बराच प्रयत्न केला. पण रेवोत्तरस पाट व चाक्र स्थपति यांच्या मदतीनें दुष्टरीतु आपल्या पूर्वजांच्या गादीवर बसला. महाभारतांत याला देवापि व शंतनु यांचा भाऊ मानिलें आहे व बाह्लीक असा शब्द लिहिला आहे ( म. आ. ६३. ४७ कुं. ).

**बस्त रामकायन**—एक आचार्य ( मै. सं. ४. २. १० ).

**बहुगव**—( सो. पूरु. ) भागवतमतें सुद्यूचा व विष्णुमतें [illegible]नाचा पुत्र. बहुगविन् व बहुविध असें यास म्हटलें आहे.

**[illegible]गविन्**—धुंधु दैत्याच्या पुत्रांतील एक.

[illegible] ( सो. पूरु. ) वायुमतें धुंधूचा पुत्र ( बहुगव पहा ).

**बहुदंष्ट्र**—रावणपक्षीय एक राक्षस ( वा. रा. सुं. ६ ).

**बहुपुत्र**—हा एक ब्रह्ममानसपुत्र असून प्रजापति होता ( वायु. २.४. ५४ ).

२ ( सो. कुकुर. ) तित्तिराचा पुत्र. याचा पुत्र नरि.

**बहुमूलक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र, एक नाग.

**बहुरथ**—( सो. द्विमीढ. ) भागवतमतें रिपुंजयाचा पुत्र. यास विष्णुमतें बृहद्रथ, मत्स्यमतें विरथ व वायुमतें वीरथ अशीं नांवें आहेत. हा या वंशांतील शेवटचा राजा होय.

**बहुरूप**—एकादशरुद्रांपैकीं एक.

२ ( स्वा. प्रिय. ) प्रियव्रताचा पौत्र व मेधातिथीचा पुत्र.

**बहुल**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र एक नाग. हा प्रजापति होता ( वायु. २.४. ५४ ).

२ तालजंघांपैकीं एक. याच्या दुर्वर्तनामुळें याच्या ज्ञाति-बांधवांचा व आप्तेष्टांचा नाश झाला ( म. उ. १३. ११-१३ कुं. ).

**बहुलध्वज**—ताम्रध्वज राजाचा प्रधान.

**बहुला**—ही विदुर नांवाच्या ब्राह्मणाची पत्नी. विदुर वेश्यागमन करणारा होता. पण तो मेल्यावर हिनें गोकर्ण-क्षेत्रीं पुराणश्रवण करून दोष घालविला ( स्कंद. ३. ३. २२ ).

**बहुलाश्व**—( सू. निमि. ) धृति जनकाचा पुत्र. श्रीकृष्ण यास भेटण्याकरितां आला होता. याचा पुत्र कृति नामक जनक ( भा. १०. ८६. १६ ).

**बहुविध**—( सो. पूरु. ) मत्स्यमतें धुंधूचा पुत्र ( बहुगव पहा ).

**बहुवीति**—अंगिराकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**बह्वाशिन्**—(सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. हा भीमाकडून मारिला गेला ( म. भी. ८८. २९ कुं. ).

**बह्वीच**—कश्यप व क्रोधा यांचा पुत्र.

**बाडबी( भी )कार**—वर्णविकाराविषयीं मत प्रतिपाद-णारा ( तै. प्रा. १४. १३ ).

**बाडेयीपुत्र**—बाडेयीचा मुलगा. मौषिकीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य गर्गीपुत्र ( श. ब्रा. १४. ९. ४. ३० ).

**बाण**—कश्यप व दनु यांच्या पुत्रांतील दानव.

२ वैरोचन बलि व अशना यांच्या १०० पुत्रांतील ज्येष्ठ. याला महाकाल असें नांव असून हा रुद्राचा अनुचर होता ( म. आ. ६६. २१ कुं. ).

यास अनौपम्या ( पद्म. १४ ) आदिकरून बऱ्याचशा स्त्रिया होत्या ( मत्स्य. १८७. २५ ). विंध्यावली अनौपम्येची सासू होती ( मत्स्य. १८७.४० ).

हा त्रिपुरांतील शाश्वतपुरांत असे. कार्तिकेयाला लोहित-पुरांत याचे संगतीत ठेविलें होतें. यावरून लोहितपूर तेंच हें शोणितपूर होय. हें पहिल्या त्रिपुरांतील एक पुर होय. हीं त्रिपुरें याच्या स्त्रियांच्या पतिसेवेच्या प्रभावामुळें आकाशांत संचार करीत व निर्भेद्य असत. पुढें देव, ऋषि इत्यादिकांना याचा त्रास फार होऊं लागला म्हणून त्यांनीं शंकराची विनवणी केली व याचा नाश करण्यास त्यास सिद्ध केलें. शंकरानें जरा विचार केल्यावर नारदाचें स्मरण केलें. नारद स्मरण-गामी असल्यामुळें तो तात्बडतोब तेथें आला. तेव्हां शंकरानें नारदास याच्या स्त्रियांचें लक्ष पतिसेवेपासून फिरविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें नारद त्यांचेकडे गेला व त्यानें याच्या स्त्रियांस त्रयोचशीं व्रतेंवैकल्यें सांगून त्यांचें लक्ष त्यांकडे फिरविलें. अशा तऱ्हेनें त्यांच्या प्रभावामुळें कमकुवत झालेल्या त्रिपुरावर शंकरानें तीन टोंकांचा बाण टाकिला. त्यामुळें तीं शहरें विद्ध झालीं. अग्नीनेंहि शंकराचे सांगण्यावरून त्या शहरांस जाळण्यास सुरुवात केली. पण अशा संकटाचे वेळींहि हा आपलें नित्य उपास्य दैवत व नित्यपूजेचें शिवलिंग बरोबर घेऊन नगराबाहेर पडला. पुढें तोटकछंदानें त्याची पूजा केल्यावर शंकरानें प्रसन्न होऊन यास एक शहर राहण्यास ठेविलें. बाकीचीं जाळिलीं. तीं जळत जळत अनुक्रमें शैल व अमरकंटक यांवर पडलीं. या दोन्ही ठिकाणीं दोन तीर्थें झालीं (मत्स्य. १८७. १८८; पद्म. स्व. १४-१५). पुढें यानें खेळत असलेल्या कार्तिकस्वामीला पाहिलें. तेव्हां याचप्रमाणें आपण शंकराचा पुत्र व्हावें असें म्हणून यानें मोठी कडक तपश्चर्या केली. तेव्हां शंकरानें प्रसन्न होऊन वर देऊं केला. त्या वरानें यानें 'मला आपल्या सांगण्यावरून पार्वतीमातेनें पुत्रत्वानें ग्रहण करावें' असें मागणें मागितलें. शंकरानें त्याप्रमाणें पार्वतीस सांगितलें व पूर्वी कार्तिकेय ज्या ठिकाणीं उत्पन्न झाला, त्या ठिकाणचें आधिपत्य यास कायमचें दिलें (ह. वं. २. ११६). हा एकदां गौतमाश्रमीं गेला होता (पद्म. पा. ११४).

भागवतांत हा वर शंकरानें आपल्या तांडवनृत्याचे वेळीं यानें वाद्य वाजविलें, त्यायोगें खूष होऊन दिल्याचें आहे (१०. ६२). व शिवपुराणांत हा वर याच्या तांडवनृत्यानें संतुष्ट होऊन दिला असें आहे. याच वेळीं आणखी 'माझेजवळ सर्व परिवारासह राहून मला आनंद द्यावा व माझें रक्षण करावें' हाहि वर मिळविला (शिव. रुद्र. यु. ५१). कार्तिकस्वामीनें यास अतितेजस्वी ध्वज व मयूर वाहन दिलें होतें (ह. वं. २. ११६). याचा ध्वज माणसासारखें डोकें असलेल्या मोरासारखा होता (शिव. रुद्र. यु. ५३).

या वरादिकांच्या जोरावर यानें इंद्रादि देवांस पुष्कळ वेळां जिंकिलें. हा इतका प्रबल होता कीं, आतां देवांना मुकाट्यानें हा ठेवील त्या स्थितींत राहण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. पुढें यानें एकदां शंकरास विचारिलें कीं, 'आतां मला गप्प बसवत नाहीं. माझ्या हजार बाहूंची रग जिरविण्याकरितां मी दिग्गजांशीं युद्धास गेलों, पण ते पळून गेले. तरी आतां मला युद्धप्राप्ति केव्हां होईल?' तेव्हां शंकरानें यास असें सांगितलें कीं, 'ज्या वेळीं तुझा ध्वज भंगेल त्यानंतर लवकरच तुला युद्धप्राप्ति होईल.' लवकरच इंद्राचें वज्र याच्या ध्वजावर पडून याचा ध्वज भंगला.

इतक्यांत यानें अति बंदोबस्तांत ठेवलेल्या याच्या उषा नामक कन्येस पुरुषाचा समागम घडला असावा असा पहारेकऱ्यास संशय आला व त्यानें तसें बाणास सांगितलें. त्या बातमीमुळें बाण संतप्त झाला व तिच्या महालांत आला तों ती कोणा पुरुषाशीं द्यूत खेळत असलेली याच्या दृष्टीस पडली. तेव्हां यानें सर्व शस्त्रास्त्रांसहित व गणांसहित त्याजवर हल्ला केला. पण तो पुरुष (अनिरुद्ध) यांना ऐकेना. तेव्हां यानें गुप्त राहून त्याजवर नागपाश सोडिले. त्या नागांनीं अनिरुद्धास चोहोंकडून गच्च बांधिलें व उषेसह त्यास कोंडून ठेविलें. यामुळें लवकरच कृष्ण यादवांसह याजवर चालून आला. कृष्णानें शोणितपुरास वेढा दिला. या वेळीं एक घनघोर रणसंग्राम झाला, अनेक हल्ले झाले, त्यांत प्रथमतः बाणाचे बाजूचा जय होई; पण शेवटीं याचा पराजय होई. प्रत्यक्ष शंकर, कार्तिकेय व गणपति यांसह या युद्धाच्या वेळीं बाणाच्या बाजूनें लढला. या युद्धांत गणपतीचा एक दांत पडल्यामुळें त्यास एकदंत असें नांव पडलें (पद्म. उ. २५०, ह. वं. २. ११८; भा. १०. ६२). प्रथमतः बाणाचें पद्मपुराणमतें बलरामाशीं व भागवत व शिवपुराण यांच्या मतें सात्यकीशीं युद्ध झालें व पुढें सर्वांचे मतें कृष्णाशीं झालें. त्या वेळीं मात्र बाणाचे सर्व प्रयत्न निष्फल झाले.

पुढें यास मारण्याकरितां कृष्णानें याजवर चक्र फेंकण्याचें ठरविलें. त्या वेळीं देवांच्या आज्ञेनें पार्वती आपला अष्टमावतार जो लंबा त्या रूपानें आपल्या पुत्राच्या रक्षणार्थ पुनः नग्न धांवून आली. तिचें नांव कोटरा असें दिलें आहे (भा. १०. ६३). पुनः म्हणण्याचें कारण याच युद्धांत कार्तिकेयाचे रक्षणार्थ ती अशीच नग्न धांवून आली होती. तेव्हां कृष्णानें तिला बाजूला होण्यास सांगितलें. त्या वेळीं तिनें 'मी पुत्रवान् व्हावें म्हणून याचे रक्षणार्थ आलें आहें, तरी यास जिवंत सोड,' असें म्हटलें. तेव्हां कृष्णानें सांगितलें कीं, 'याचे मी दोन हात ठेवून बाकीचे छेदून टाकितों. कारण यास त्या हातांचा फार गर्व आहे.' तेव्हां लंबा दूर झाली. कृष्णानें याचे दोन हात ठेविले व बाकीचे छेदून टाकिले (ह. वं. २. १२६; पद्म. उ. २.

५०; भा. १०.६३). भागवत व शिवपुराण यांत यास चार हात शिल्लक ठेविल्याचें दिलें आहे. तसेंच शंकरानेंहि कृष्णास मागची आठवण देऊन सांगितलें कीं, ' माझ्या आज्ञेखेरीज तूं दधीचि, रावण व तारकासुर यांवरहि शस्त्र टाकिलें नाहींस. यासहि मीं अमरत्व दिलें असल्यामुळें तूं यास मारूं नयेस. ' त्याप्रमाणें कृष्णानें यास सोडून दिलें. पुढें शंकरानें या युद्धानंतर बाणास आणखी वर दिले व त्यायोगानें यास अक्षय्य गाणपत्य, बाहुयुद्धांतील अग्रणित्व, निर्विकार शंभुभक्ति, शंभुभक्तावर प्रेम राहणें, देवांशीं त्यांतल्यात्यांत विष्णूशीं निर्वैरत्व, देवसाम्यत्व (अजरत्व व अमरत्व) हीं मिळालीं ( शिव. रुद्र. यु. ५९). त्याचप्रमाणें जो भक्त असेल त्यास पुत्रप्राप्ति व्हावी, बाहु तुटल्यामुळें होत असलेल्या वेदना शांत व्हाव्यात व त्यामुळें झालेली विद्रूपताहि नाहींशी व्हावी ( ह.वं. २.१२६; विष्णु. ५. ३० ) इ. वर देऊन शंकर तेथेंच गुप्त झाला.

कृष्णानें यास जिवंत सोडिलें याचें कारण त्यानें पूर्वी प्रह्लादाला वर दिला होता कीं, ' मी तुझ्या कोणत्याहि वंशजाचा वध करणार नाहीं. ' फक्त याचा गर्व नाहींसा करावा म्हणून याचे हस्त छेदून टाकिले. पण, जे याचे चार हात राहिले ते जरामरणरहित होतील व हा बाणासुर शंकराचा प्रमुख सेवक होईल, असा यास वर दिला ( भा. १०. ६३ ). याचें अनिरुद्धाशीं युद्ध होऊन त्यांत याचा पराभव झाला ( पद्म. उ. १५९). पुढें कृष्णादिकांचें यानें स्वागत केलें व उषेचें अनिरुद्धाशीं लग्न लावून त्यास बोळविलें व उषेच्या पुत्रास आपल्या मागें राज्याचा वारस ठरविलें. यावरून यास पुत्र नव्हता ( शिव. रुद्र. यु. ५९ ). पण ब्रह्मांडमतें यास लोहिनी नामक स्त्रीपासून इन्द्रधन्वन् नांवाचा पुत्र होता ( ३. ५. ४५ ).

**बादरायण**—एक आचार्य. यानेंच ब्रह्मसूत्रें केलीं. हा व बादरि भिन्न होत. कारण बादरायणाचे विरुद्ध असलेल्या बादरीच्या मताचा ब्रह्मसूत्रांत उल्लेख आहे. बादरि देहाचा अभाव मानितो. बादरायण हा देहाचा भाव व अभाव हे दोन्ही मान्य करितो. यावरून हे दोघे भिन्न होत ( ब्र. सू. ४. ४. १०-१२ ). जैमिनीच्या सूत्रांतहि याचा निर्देश आहे ( १. १. ५; २. १९; १०. ८. ४४; ११.१. ६४).

गर्भाधानसंस्कार प्रथम ऋतूचे वेळीं करावा असें याचें मत आहे ( स. गृ. १९. ७. २५; व्यास पहा ).

**बादरायणि**—शुकास नांव.

**बादरि**—एक आचार्य ( जै. सू. ३. १. ३; ६. १. २७; ८. ३. ६; का. श्रौ. ४. ३. १८ ब्र. सू. ४. ४ ११; बादरायण पहा ).

२ श्याम पराशर-कुलोत्पन्न गोत्रकार.

**बाध्यश्व**—भार्गवकुलांतील मंत्रकार.

**बाध्योग**—( जिह्वावत् पहा ).

**बाभ्रव**—अभ्यासाचे विषय वेद, छंद, शरीर व महापुरुष हे होत असें म्हणणारा आचार्य ( ऐ. आ. ३. २. २ ).

**बावर**—( ऐति. ) तिमिरलिंगाच्या वंशांतील सरुषाचा पुत्र. याचा पुत्र होमायु ( भवि. प्रति. ४. २२ ).

**बाभ्रव**—वत्सनपाताचें हें पैतृक नांव आहे ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३. ). कापिलेय आणि बाभ्रव हे शुनःशेपाचे वंशज आहेत ( ऐ. ब्रा. ७. १७ ).

**बाभ्रव्य**—गिरिज ( ऐ. ब्रा. ७. १ ) व शंख ( जै. उ. ब्रा. ३. ४१. १; १७. १ ) यांचें हें पैतृक नांव आहे. क्रम म्हणण्याची पद्धति सुरू करणारा ( ऋ. प्रा. ११. ३३ ). म्हणूनच आश्वलायनगृह्यसूत्रांतील ब्रह्मयज्ञांगतर्पणांत याचा समावेश असावा.

हा बह्वृच होता ( ह. वं. १. २३ ). हा सर्वशास्त्रज्ञ होता. यानें शिक्षा करून तिचा पुरस्कार करविला. यानें क्रमाचा अभ्यास करून तिचाहि पुरस्कार होईलशी व्यवस्था केली ( मत्स्य. २१. ३०; पद्म. पा. १०; ह. वं. १. २०; २४; शा. ३५२. ३७. कुं. ). पाणिनीनें क्रम व बाभ्रव्य यांचा निर्देश केला आहे ( पा. सू. ४. १'१०६; २. ६१ ). यानें कामशास्त्र रचिलें ( मत्स्य. २१.३१ ).

२ विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**बाभ्रव्यायणि**—विश्वामित्राचा पुत्र.

**बाभ्रवाश्व्य**—सूक्तद्रष्टा ( सुमित्र पहा ).

**बार्हत्सामा**—या शब्दाचा अर्थ बृहत्सामन्‌ची कन्या असा आहे. हिचा उल्लेख सुलभ गर्भधारणेविषयीं आला आहे ( अ. वे. ५. २५. ९ ).

**बार्हदिषु**—अजमीढवंशांतील अजमीढपुत्र बृहदिषुपासून भल्लाटपर्यंतच्या शाखेला बार्हदिषवः असें म्हणतात ( भा. ९. २१. २६ ).

**बार्हद्रथ**—बृहद्रथाचे वंशज मगधराजे यांनीं मगध देशावर राज्य केलें. याची राजधानी गिरिव्रज होती. हे एकंदर बत्तीस किंवा बावीस राजे होऊन त्यांनीं हजार वर्षें राज्य केलें ( बृहद्रथ पहा ).

**बार्हस्पत्य**—शंयु, विदथिन् व भरद्वाज यांचें पैतृक नांव.

**बाल**—एक ब्राह्मण. हा अत्यंत पापी व पाखंडमतप्रवर्तक होता. पुनः नरयोनींत आल्यावर पापनाशनार्थ यानें सरस्वती मंत्राचा जप केला. तेव्हां हा निष्पाप होऊन मृत्यूनंतर मैत्रेय नांवाचा एक सद्वर्तनी ऋषि झाला ( स्कं. २. ४६ ).

२ वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार.

**बालखिल्य**—( वालखिल्य पहा ).

**बालंडि**—अंगिराकुलोत्पन्न गोत्रकार.

**बालधि**—यानें आपणांस अमर पुत्र व्हावा म्हणून तप केलें. परंतु सृष्टींतील प्रत्येक वस्तु नाशवंत आहे, यास्तव अमर दुर्लभ म्हणून अमर असा पुत्र देतां येत नाहीं, असें देवांनीं यास सांगितलें. तेव्हां बालधीनें देवाजवळ वर मागितला कीं, ‘ समोर जो पर्वत दिसत आहे, तो जितके दिवस टिकेल तितके दिवस आयुष्य असणारा पुत्र मला द्यावा. नंतर देवांच्या कृपेनें यास इच्छेनुरूप पुत्र झाला. बालधि त्या मुलास ‘पर्वतायु’ असें लाडानें म्हणत असे. पर्वतायु मोठा झाल्यावर तो आपल्या वरप्रभावानें अत्यंत उर्मट बनला. एकदां धनुषाक्ष नामक महर्षींचा त्यानें विनाकारण अपमान केला. तेव्हां ‘ भस्म हो ’ म्हणून त्यानें पर्वतायूस शाप दिला. तरीहि तो जिवंत राहिला. तें पाहून धनुषाक्षास अचंबा वाटला. पण लवकरच दिव्यदृष्टीच्या योगानें त्यास पर्वतायूच्या वराची हकीकत कळतांच त्यानें आपल्या तपोबलानें एक महिष निर्माण करून त्याच्याकडून तो पर्वत खणवून काढिला. तेव्हां पर्वतायूहि तत्क्षणींच मेला ( म. व. १३४ ).

**बालंदन**—वत्सप्रीचें पैतृक नांव. भालंदन व हा वेगळा.

**बालपि**—भृगुकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**बालवय**—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार.

**बालाकि**—गर्गगोत्रीय बलाक ऋषीचा पुत्र. याला आपल्या ब्रह्मज्ञानाचा अभिमान होऊन हा बऱ्याच ठिकाणीं आपल्या ज्ञानाची प्रौढी मिरवीत हिंडला. एकदां हा काशीराज अजातशत्रु याचेकडे गेला व त्याला म्हणाला, ‘ मी तुला ब्रह्म म्हणजे काय तें सांगतों. ’ अजातशत्रूनें त्याबद्दल याला हजार गाई देऊं केल्या. नंतर बालाकीनें आपल्या प्रतिपादनास सुरुवात केली. परंतु अजातशत्रूनें याच्या सर्व मुद्यांचें खंडन केलें. तेव्हां बालाकीस आपल्या गर्वाची लाज वाटून यानें अजातशत्रूची ब्रह्मज्ञान सांगण्याविषयीं प्रार्थना केली. परंतु ‘ अध्यापन हें क्षत्रधर्माविरुद्ध आहे, याकरितां तूं माझें सिंहासन स्वीकार व मी राज्यत्याग करतों, म्हणजे मी अध्यापनास योग्य होईन, ’ असें अजातशत्रूनें बालाकीला सांगितलें. त्याप्रमाणें केल्यावर अजातशत्रूनें बालाकीस ब्रह्मविद्येचें दान केलें ( कौ. उ. ४ ). याला दृप्तबलाकि म्हणत ( श. ब्रा. १४. ५. १ ).

२ भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**बालायनि**—बाष्कलीनें याला वालखिल्यसंहिता शिकविली ( भा. १२. ६. ६० ).

**बालावती**—कण्व ऋषीची कन्या. हिनें पति मिळावा म्हणून तपश्चर्या केली. एकदां सूर्य अतिथिरूपानें येऊन त्यानें हिला बोरें दिलीं व तीं शिजविण्यास सांगितलें. नंतर ही बोरें शिजविण्यास लागली, पण लांकडें संपलीं, तरी बोरें शिजेनात. तेव्हां हिनें आपले पाय चुलींत घातले. तें पाहून सूर्य संतुष्ट झाला व त्यानें ‘ तुझ्या इच्छा पूर्ण होतील,’ असा वर दिला. तेव्हांपासून त्या स्थानास बालाप असें नांव पडलें ( पद्म. उ.१५२; २ अरुंधती पहा ).

**बालिशय**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**बालिशायनि**—अंगिराकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**बालेय**—गंधर्वायणाचें हें पैतृक नांव आहे.

२ पराशरगोत्रांतील एक ऋषिगण.

३ बलीपासून बालेय ब्राह्मण व क्षत्रिय झाले.

**बाष्कल**—हिरण्यकशिपूचा पुत्र.

२ अनुह्लादाचा पुत्र.

३ प्रह्लादाचा पुत्र ( १ बाष्कलि पहा ).

४ महिषासुराचा एक पुत्र ( मार्क. ७९. ४२ ).

५ संह्लादाचा पुत्र. याचे पुत्र चंड, दक्ष व सुर.

६ व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील पैलाचा शिष्य. याबद्दल बाष्कलि असाहि पाठ सांपडतो ( व्यास पहा ).

**बाष्कलि**—प्रह्लादाचा पुत्र ( पद्म. सृ. ६ ).

२ एक दैत्य. यानें आपल्या तपःप्रभावानें सर्व त्रैलोक्य जिंकिलें व इंद्रपदहि हरण केलें. तेव्हां विष्णूनें वामनावतार घेऊन, बाष्कलीपाशीं यज्ञशाळेकरितां तीन पाउलें भूमि मागितली. बाष्कलीनें दानाचें उदक वामनाच्या हातावर सोडितांच वामन वाढून मोठा झाला व त्यानें एका पाउलानें संपूर्ण ब्रह्मांड, दुसऱ्यानें सूर्यमंडल व तिसऱ्यानें ध्रुवमंडल हीं व्यापून बाष्कलीचें सर्व ऐश्वर्य हिरावून घेतलें. ब्रह्मांडावर पाऊल टाकिल्यावर तें फुटलें व त्यापासून गंगा उत्पन्न झाली. हा त्रिविक्रमावतार होय ( विष्णुधर्म. २१. १; पद्म. सृ. ३० ). वैरोचन बलि व बाष्कलि एकच असावा.

३ अंगिराकुलोत्पन्न एक गोत्रकार व मंत्रकार ऋषि. यानें वालखिल्यसंहिता रचून ती बालायनि, भज्य व कासार या शिष्यांस शिकविली ( भा. १२. ६. ५९ ).

४ ऋग्वेदी श्रुतर्षि व यजुर्वेदी ब्रह्मचारी.

**बाष्कलि भरद्वाज**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें सत्यश्रीचा शिष्य.

**बाष्किह**—शुनस्कर्णाचें पैतृक नांव ( पं. ब्रा. १७. १२. ६ ). शिबीचा वंशज ( बौ. श्रौ. २१. १७ ).

**बाहु**—( सू. इ. ) मत्स्य व विष्णु यांच्या मतें वृकाचा व वायुमतें धृतकाचा पुत्र. भागवतांत याला वृकपुत्र म्हटलें असून बाहुक असा पाठ आहे. ब्रह्मांडांत याचें नांव फल्गुतंत्र असें आहे. याचा शक, कांबोजादिकांच्या साहाय्यानें तालजंघानें

पराभव केला होता. पराभव झाल्यानंतर हा और्वाचे आश्रमांत जाऊन राहिला व तेथेंच मरण पावला ( मत्स्य. १२. ४०; पद्म. सृ. ८; लिंग. १. ६६. १५; विष्णुधर्म. १. १६ ). यास दोन पत्न्या होत्या. याचा पुत्र सगर. हा व्यसनी होता. यास असितहि म्हणत ( वा. रा. बा. ७०. ३०; अयो. ११०. १८ ). हा कृतयुगांत होऊन गेला ( ब्रह्मांड. ३. ६३. १२१; वायु. २. २७. १२३; ह. वं. १. १३. १४; ब्रह्म. ८. ३०; शिव. धा. ६१. २३ ). यानें सप्तद्वीपांत सात अश्वमेध केले ( नारद. १. ७१. ५; सगर पहा ).

२ ( स्वा. उत्तान. ) पृथूचा पुत्र.

३ एक क्षत्रिय. पांडवांनीं यांजकडे दूत पाठविला होता ( म. उ. ४. २२ कुं. ).

४ इंद्रसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

५ अंगराज मायावर्मन् व प्रमदा यांच्या पुत्रांतील एक ( भवि. प्रति. ३. ३१ ).

६ स्वारोचिष मनूचा एक पुत्र.

७ सुंदरवंशांतील एक. याच्या दुराचारामुळें यानें आपल्या आतेष्टांचा व ज्ञातिबांधवांचा नाश करून घेतला ( म. उ. ३. ११-१५ कुं. ).

**बाहुक**—भागवतमतें वृकाचा पुत्र ( १ बाहु पहा ).

२ ऋतुपर्ण राजाच्या घरचें नलाचें नांव ( म. व. ६६. ७६ कुं. ).

**बाहुका**—परीक्षिताची बायको ( सुवेषा पहा ).

**बाहुगर**—( सो. ) भविष्यमतें सुद्युम्नाचा पुत्र.

**बाहुरि**—( वाग्ग्रंथि पहा ).

**बाहुवृक्त**—एक ऋषि. यानें शत्रूंना ठार केलें ( ऋ. ५. ४४. १२ ).

**बाहुवृक्त आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ७१-७२ ).

**बाहुशालिन्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**बाह्य**—अंगिराकुलांतील एक ऋषि.

२ ( सो. क्रोष्टु. ) वायुमतें भजमानाचा पुत्र.

**बाह्यकर्ण**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र एक नाग.

**बाह्यका**—सात्वतपुत्र भजमानाची स्त्री.

**बाह्यकुंड**—मातलीला वर म्हणून नारदानें दाखविलेला नाग ( म. उ. १० ३. १० कुं. ).

**बाल्हीक**—( सो. पूरु. ) प्रतीपाचा पुत्र. याचा पुत्र सोमदत्त. भीष्मपिता शांतनु हा याचा कनिष्ठ भ्राता होय ( भा. ९. २२ ). यास भारतीय युद्धांत भीमानें ठार मारिलें ( म. द्रो. १५८. १५ कुं. ). हा अतिरथि होता ( म. उ. १६७. २८ कुं. ) आईच्या बापाला दुसरा कोणी वारस नसल्यामुळें हा तिकडचा राज्याधिकारी झाला. बाल्हिक प्रातिपीय व हा एक असावा. हा शब्द बाह्लीक, बाह्लिक व बल्हिक असा तीनहि प्रकारें लिहिलेला आढळतो.

२ ( सो. पूरु. ) जनमेजयाचा पुत्र.

३ ( किलकिला. भविष्य. ) किलकिलेचा राजा.

**बिडाल**—महिषासुराचा एक प्रधान.

**बिडालज**—( विराध पहा ).

**बिडौजस्**—विष्णूच्या वरानें अदितीला झालेला पुत्र ( पद्म. भू. ५ ).

**बिद**—भृगुकुलांतील एक गोत्रकार व मंत्रकार.

**बिन्दु**—कश्यप व दनु यांचा पुत्र. एक दानव.

२ अंगिरसकुलांतील गोत्रकार.

**बिन्दुग**—बाष्कल ग्रामांत बिन्दुग नांवाचा ब्राह्मण होता. याच्या बायकोचें नांव चंचुला. बिन्दुग वेश्यासक्त असल्यामुळें, प्रथम चंचुला सदाचारी होती तरी पुढें तिचें पाऊल वांकडें पडलें. बिन्दुगाच्या लक्षांत ही गोष्ट आली, तेव्हां बिन्दुगाला पैसे आणून देण्याच्या अटीवर चंचुला वेश्यावृत्ति करूं लागली. मेल्यावर हीं दोघेंहि विन्ध्य पर्वतावर पिशाच झालीं. चंचुला पुढें शिवपुराणश्रवणानें व शिवभजनानें मुक्त झाली व तिनें सांगितल्यावरून पार्वतीनें तुंबरुद्वारां विन्ध्याचलावर बिन्दुगास शिवकथा ऐकविली व त्यामुळें बिन्दुगहि मुक्त झाला ( शिवपुराणमाहात्म्य अ. ४ ).

**बिन्दुपाल**—ब्रह्महोमवंशीय शंभुदत्ताचा पुत्र ( भवि. प्रति. ४. १ ).

**बिन्दुमत्**—(स्वा. प्रिय.) भागवतमतें मरीचि व बिंदुमती यांचा पुत्र. सरघेपासून यास मधुर नामक एक पुत्र झाला.

**बिन्दुमती**—( स्वा. प्रिय. ) मरीचि राजाची स्त्री. हिचा पुत्र बिन्दुमत्.

२ ही शशबिंदूची मुलगी व युवनाश्वपुत्र मांधात्याची स्त्री. हिला अंबरीष, पुरुकुत्स व मुचुकुंद असे तीन पुत्र होते. हिला चैत्ररथीहि म्हणत. ही आपल्या भावंडांत ज्येष्ठ होती ( वायु. २. २७. ८०; ब्रह्मांड. ३. ६३. ७० ).

३ मदनाचा पुनर्जन्म झाल्यानंतर रतीच्या डाव्या डोळ्यांतील आनंदाश्रूपासून झालेली मुलगी. हिनें तारुण्य प्राप्त झाल्यावर ययातीशीं लग्न केलें. ही गर्भार असतां हिला सर्व लोक पाहण्याचे डोहाळे झाले. तेव्हां ययातीनें पूरूला राज्य देऊन हिचे डोहाळे पुरविले. पण संतति काय झाली तें दिलें नाहीं ( पद्म. भू. ७७-८२ ). हिला अश्रुबिंदुमती असेंहि म्हणतात.

**बिन्दुरस**—अजमेरच्या चपहानि वंशांतील वीरसिंहाचा पुत्र. यास वांपविघातक नामक पुत्र व वीरा नामक कन्या, अशीं दोन अपत्यें होतीं ( भवि. प्रति. ४. २ ).

**बिंदुसार**—( विष्णु. भविष्य. ) विष्णुमतें क्षत्रौजसाचा पुत्र. यास निधिसार, बिंबिसार व विंध्यसन अशीं नामांतरें आहेत. ( मौर्य. भविष्य. ) विष्णु व भविष्य यांच्या-मतें पट्टणच्या चंद्रगुप्ताचा पुत्र. हा बौद्धधर्मी होता. यानें पौरसाधिपति जो सुलूव त्याच्या कन्येशीं लग्न केलें ( भवि. प्रति. २. ७ ). यास वारिसार व भद्रसार अशीं नांवें आहेत.

**बिभीषण**—विश्रवस् व कैकसी (वा. रा. उ. ९), केशिनी ( भा. ४. १. ३७ ) किंवा मालिनी (म. व. २७. २७६. ८ कुं.) यांचा पुत्र. वनपर्वांत विश्रवाच्या सेवेला तीन राक्षसी होत्या व त्यांत बिभीषणाची आई मालिनी होती असें आहे. हा अत्यंत सुशील होता. यानें उग्र तप करून ब्रह्मदेवास प्रसन्न केलें व त्याचेपासून ' माझी बुद्धि नेहमीं सद्धर्मीं रत असावी,' असा वर मागून घेतला. तेव्हां ब्रह्मदेवानें प्रसन्न होऊन यास अमरत्व व ब्रह्मास्त्र हीं दिलीं ( वा. रा. उ. १० ).

बिभीषणास शैलूष गंधर्वानें आपली सरमा नांवाची कन्या दिली होती ( वा. रा. उ. १२ ). याच्या बायकोचें नांव महामूर्ति असेंहि आढळतें ( पद्म. पा. ६७ ).

बिभीषण आपल्या भावाच्या येथेंच लंकेंत राहत असे. परंतु याचें स्वभावभिन्नत्वामुळें भावाशीं कधींहि पटत नसे. राम अरण्यांत असतां, रावणानें सीतेस चोरून आणिलें. त्या वेळीं बिभीषणानें तिला परत पाठवावें, असा पुष्कळ आग्रह धरिला. परंतु इतरांपुढें याचें कांहीं चाललें नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं मारुति सीताशोधार्थ लंकेंत आला असतां, इंद्रजितानें सेवकां-कडून मारुतीस पकडून आणविलें व तो रावणाचे सांगण्यावरून मारुतीस ठार मारूं लागला. परंतु बिभीषणानें ' दूतास मारणें योग्य नाहीं, फार तर त्याला विरूपता येईल असें करा,' असें सांगून त्याचें निवारण करून मारुतीस वांचविलें ( वा. रा. सुं. ५२ ).

नंतर कांहीं काळानें राम स्वतः सीतेस सोडविण्याकरितां वानरसैन्यासह लंकेंत आला. तेव्हां बिभीषणानें सीता परत देऊन युद्धाचा अनर्थ टाळावा, याविषयीं रावणास बराच उपदेश केला. परंतु तो निष्फळ झाल्यामुळें हा रामास मिळाला. यानें रामास रावणाकडील सैन्याची व युद्धव्यवस्थेची पूर्ण माहिती देऊन रामाच्या विजयाचा मार्ग सोपा करून ठेविला ( वा. रा. यु. १४-१८ ). नंतर रामानें यास ' तुला लंकेचा राजा करीन,' असें वचन दिलें ( वा. रा. यु. १९ ).

रामरावणयुद्धांत बिभीषणानें बराच पराक्रम गाजविला. यानें धूम्राक्ष, प्रहस्त वगैरेंशीं युद्ध करून त्यांना ठार केलें व इतर बरेच राक्षस मारिले.

यानें युद्धप्रसंगीं कुंभकर्णवृत्त रामास सांगितलें ( वा. रा. यु. ६१ ). यानें आपले अमात्य गुप्त रीतीनें रावणाकडे ठेविले होते व त्यांकरवीं हा माहिती मिळवी. यानें [त्यांच्या] मुखीं ऐकिलेली लंकारक्षणव्यवस्था रामास सांगितली ( वा. रा. यु. ३७ ). यानें इंद्रजिताच्या यज्ञाची हकीकत सांगून ' यज्ञ पूर्ण होण्यापूर्वीं त्याचा वध कर' असें लक्ष्मणास सांगितलें.

रावणाला मारिल्यानंतर रामाज्ञेवरून लक्ष्मणानें यास राज्याभिषेक केला ( वा. रा. यु. ११२ ). याची बायको सरमा ( सीता रावणाच्या कैदेंत असतांना ) सीतेच्या सेवेंत होती. पुढें याच्या सांगण्यावरून रामानें सेतूचे दोन भाग केले ( पद्म. सृ. ३८ ).

एकदां हा रामेश्वराचें पूजन करण्यास गेला असतां, यानें एका वृद्ध ब्राह्मणास मारिलें. तेव्हां सर्व द्रविडांनीं यास कैद केलें व ते यास मारूं लागले; पण हा मरेना. रामाला ही बातमी कळतांच तो तेथें गेला व याकडून दान करवून त्यानें याची मुक्तता केली ( पद्म. पा. १०४ ).

**बिम्ब**—वायुमतें वसुदेव व भद्रा यांचा पुत्र.

**बिम्बादित्य**—गोविन्दशर्म्यास सूर्यांशानें झालेला पुत्र ( भवि. प्रति. ४. ७ ).

**बिल्व**—आदिकल्पामध्यें ब्रह्मदेवानें बिल्व वृक्ष उत्पन्न केला. त्यालाच ' श्रीवृक्ष ' म्हणतात. त्या वृक्षाच्या मुळाशीं राहणाऱ्या पुरुषाचें ब्रह्मदेवानें बिल्व असें नांव ठेविलें. पुढें इंद्रानें यास पृथ्वीवर राज्य करण्यास सांगितलें असतां यानें त्याजवळ त्याचें वज्र मागितलें. तेव्हां 'ज्या वेळीं तूं आठवण करशील त्या वेळीं वज्र तुला मिळेल' असें आश्वासन मिळालें. पुढें याचा कपिल नांवाचा ब्राह्मण मित्र झाला. त्यांच्यांत तप श्रेष्ठ कीं कर्म श्रेष्ठ हा वाद होऊन तो विकोपास गेला. त्या भरांत बिल्वानें कपिलावर वज्रप्रहार केला व मस्तकाचे दोन तुकडे केले. तरी कपिलानें तपःसामर्थ्यानें शंकराकडे जाऊन अमरत्व मिळविलें. इकडे बिल्व विष्णूकडे जाऊन प्रत्येकानें आपल्यापासून भिण्याचा वर मिळविला. परंतु या वराचा कांहीं फायदा झाला नाहीं. तेव्हां बिल्व महाकाल वनांत जाऊन लिंगाची आराधना करतांच कपिल तेथें आला. त्याला शिवरूप पाहतांच दोघांचा समेट झाला ( स्कंद. ५. २. ८३ ).

**बिल्वक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**बिल्वतेजस्**—सर्पसत्रांत दग्ध झालेला तक्षककुलांतील नाग ( म. आ. ५७. ९ कुं. ).

**बिल्वपत्र**—मातलीला नारदानें वर म्हणून दाखविलेला नाग ( म. उ. १०३. १४ कुं. ).

**बिल्वपांडुर**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**बिलिव**—भृगुकुलोत्पन्न एक गोत्रकार. याबद्दल भलि असा पाठ आहे.

**बीज**—विश्वेदेवांपैकीं एक.

...)—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**...आश्वतराश्वि**—अनेक ज्ञात्यांबरोबर आत्म्या...नें विचार केला व रयि म्हणजे आत्मा असा विचार मांडला ( छां. उ. ५. ११. १. ). हा गायत्रीवेत्ता असून प्रतिग्रह घेण्याबद्दल यास जनकानें दोष दिला ( बृ. उ. ५. १४. ८ ). हा अश्वपति केकयाचा समकालीन असावा ( श. ब्रा. १०. ६. ११ ). बुलिल आश्वतर आश्वि व हा एकच असण्याचा संभव आहे. यास वैयाघ्रपद असें पैतृक नांव आहे ( छां. उ. ५. १६. १ ).

**बुद्बुदा**—एक अप्सरा ( म. आ. २१६. २० स. १०. १३ कुं. ). ही मगरी झाली असतां अर्जुनानें हिचा उद्धार केला.

**बुध**—बृहस्पतिपत्नी तारा हिला चंद्रापासून झालेला पुत्र ( पद्म. सृ. ८२ ). कश्यपास धनु नांवाची एक स्त्री होती. तिच्यापासून त्यास रज नांवाचा मुलगा झाला. पुढें वरुणानें आपली वारुणी नांवाची कन्या रजास दिली. परंतु वारुणी लवकरच पाण्यांत बुडाली. नंतर तिच्या शोधाकरितां चंद्र पाण्यांत शिरला. तेव्हां पाणी खूप खवळावयास लागलें. त्याबरोबर त्या पाण्यांतून एक बालक बाहेर पडलें. तोच बुध होय. पुढें या बुधाचें गुरुपत्नी तारेनें संरक्षण केलें. परंतु तिला सांभाळतां येईना; तेव्हां तिनें हा चंद्रपत्नी दाक्षायणीस दिला ( विष्णुधर्म. १. १०६ ).

बुध हा चंद्रापासून झाला, म्हणून यास चंद्रवंशोत्पादक व बृहस्पतिपत्नीचा पुत्र म्हणून बृहस्पतिपुत्र असेंहि म्हणतात ( पद्म. उ. २१५ ). भविष्यमतें चंद्र व रोहिणी यांचा पुत्र. बुधास इलेपासून पुरुरवस् नांवाचा पुत्र झाला. तोच सोमवंशाचा मूल पुरुष होय ( पद्म. सृ. ८; १२; दे. भा. १. १३ ). बृहस्पतीनें याचे जातकर्मादि संस्कार केले. हा महाविद्वान् असून हस्तिशास्त्रामध्यें निपुण होता ( पद्म. सृ. १२ ). हा भास्करसंहितेंतील सर्वसार तंत्राचा कर्ता आहे ( ब्रह्मवै. २. १६ ). हा ग्रहमालेंत शुक्राच्या वर दोन लक्ष योजने आहे. हा प्रायः शुभ ग्रह आहे. पण हा जेव्हां सूर्याचें उल्लंघन करितो, तेव्हां अनावृष्ट्यादि भय सुचवितो ( भा. ५. २२ ).

२ ( सू. दिष्ट. ) विष्णु व वायु यांच्या मतें वेगवत्चा पुत्र ( बंधु पहा ).

३ एक स्मृतिकार. अपरार्क, कल्पतरु, जीमूतवाहनाचा कालविवेक वगैरे ग्रंथ याचा उल्लेख करितात. याचें धर्मशास्त्र बरेंच लहान असून मुख्यत्वेंकरून त्यांत उपनयन, विवाह व त्यांचे प्रकार, गर्भाधानापासून उपनयनापर्यंत सर्व संस्कार, पंचमहायज्ञ, श्राद्ध, पाकयज्ञ, हविर्यज्ञ, सोमयाग, ब्राह्मणादिकांचीं कर्तव्यें व संन्याशांचीं आणि राजांचीं कर्तव्यें यांचें विवेचन केलें आहे.

बुधाचें धर्मशास्त्र फार पुरातन नसावें. हें इतर मोठाल्या धर्मशास्त्रांमधील थोडी थोडी माहिती जमवून तयार केल्यासारखें दिसतें. याच्या नांवावर कल्पयुक्ति नामक एक ग्रंथ आहे ( C.C ).

४ हेमसदन व अंजनी यांचा पुत्र. हा राजा मगधांत शकानंतर ३६०० वर्षांनीं होऊन गेला (स्कंद. १. २. ४०).

५ पुलह व श्वेता यांचा पुत्र.

६ सुतप देवांपैकीं एक.

७ गौड देशांत राहणाऱ्या दुर्व व शाकिनी यांचा पुत्र. हा अत्यंत दुराचारी व दुर्व्यसनी होता. एके दिवशीं हा मद्य पिऊन एका वेश्येचे घरीं धुंद होऊन पडला असतां, याचा बाप याचा शोध काढीत त्या ठिकाणीं आला व याची निर्भर्त्सना करूं लागला. तेव्हां बुधानें आपल्या बापास लाथा मारून ठार केलें. नंतर हा घरीं आला. घरीं येतांच याच्या आईनें याच्या व्यसनाबद्दल याची कानउघाडणी केली. तेव्हां तिलाहि यानें ठार केलें. कांहीं दिवसांनीं यानें बायकोचाहि खून केला. नंतर याची स्वैर वृत्ति अधिकच वाढली. पुढें एके दिवशीं यानें कालभी ऋषीच्या सुलभा नांवाच्या पत्नीवर बलात्कार केला. तेव्हां तिनें क्रुद्ध होऊन यास 'तूं कुष्ठी होशील,' असा शाप दिला. नंतर हा कुष्ठी होऊन हिंडत असतां शूरसेन राजाचे नगरांत गेला. त्या ठिकाणीं शूरसेन आपल्या नगरासह विमानांत बसून स्वर्गांत जाण्याच्या तयारींत होता. परंतु कुष्ठी झालेला बुध त्या ठिकाणीं गेल्यामुळें त्याचें विमानच जमिनीवरून हालेना. तेव्हां देवदूतांनीं यास हाकलून लाविण्यास सांगितलें. परंतु शूरसेनानें, गजानन, या चतुरक्षरी मंत्रानें याच्या पापाचें क्षालन करून यासहि स्वानंदपुरास नेलें ( गणेश. १. ७६ ).

८ द्रविड देशांत राहणारा एक ब्राह्मण. याची स्त्री अत्यंत दुराचारी होती. परंतु दीपदानाचे योगानें तिच्या सर्व पापांचा क्षय झाला ( स्कंद. २ ४. ७ ).

९ मधुवनांतील शाकुनि नामक ऋषीचा पुत्र. हा अग्निहोत्री होता ( पद्म. स्व. ३१ ).

**बुध आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. १ ).

**बुध सौमायन**—यानें यज्ञदक्षिा घेतली होती ( पं. ब्रा. २४. १८. ६ ).

**बुध सौम्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १०१ ).

**बुधकौशिक**—एक ब्रह्मर्षि. यानेंच रामरक्षा स्तोत्र केलें आहे.

**बुद्ध**—देव दैत्यांचे त्रासानें गांजून गेल्यामुळें ते विष्णूस शरण गेले. तेव्हां विष्णूनें दैत्यांना मोहित करण्याकरितां एक मायावी पुरुष उत्पन्न केला. हा मस्तकाचें मुंडण करणारा, नग्न व मोरांचीं पिसें धारण करणारा असा होता. यानें दैत्यांना वैदिकधर्माविरुद्ध असणारीं बरींच भलभलतीं शास्त्रें सांगून त्यांना सद्धर्मपराङ्मुख केलें. तेव्हां धर्माचा आधार सुटल्यामुळें दैत्यांचा लवकरच नाश झाला. हा ज्ञानी आहे असें समजून दैत्य यास 'बुद्ध' असें म्हणूं लागले ( विष्णु. ३. १८ ).

हा जिनपुत्र होय ( गरुड. १. १ ). इतर ठिकाणीं बुद्धासंबंधीं पुढील माहिती आढळते. कीकट देशांत विष्णूनें वैदिक मंत्रांचे योगानें यज्ञ करणाऱ्या शूद्र लोकांच्या बुद्धीस मोह पाडण्याकरितां घेतलेला अवतार ( ह. वं. १. ४१ ). याच्या मतास बौद्धमत असें नांव आहे ( भा. १. ३. २४ ).

पूर्वी त्रिपुर नांवाचा असुर प्रबल होऊन शंकरास त्रास देऊं लागला, तेव्हां त्याचे नाशाकरितां विष्णूनें शंकराचे विनंतीवरून अवतार घेतला. व त्रिपुर आणि त्याचे अनुयायी यांना भलभलतीं शास्त्रें सांगितलीं. तेव्हां ते वैदिक धर्मापासून पराङ्मुख झाले असतां त्यांचा नाश झाला ( पद्म. उ. २५२; शिव. रुद्र. यु. ४; लिंग. २.७१ ).

बुद्धाच्या बापाचें नांव शुद्धोदन ( अग्नि. १६ ) व आईचें नांव मायावती किंवा मायादेवी असें होतें. यानें गोदावरीकांठीं गौतमाश्रमांत तप केलें होतें ( नारद. २. ७२ ). दैत्य यास 'आपण धर्म प्रतिपादन करण्यास योग्य आहांत' असें म्हणत. त्यावरून हा आपणास अर्हत् म्हणवून घेई व आपल्या अनुयायांस आर्हत म्हणत असे ( विष्णु. ३.१८; अग्नि. १६; अर्हत् व जिन पहा ).

**बुद्धसिंह**—पट्टणच्या शाक्यसिंह राजाचा पुत्र. याचा पुत्र चंद्रगुप्त ( भवि. प्रति. २.७ ).

**बुद्धि**—दक्ष प्रजापतीची कन्या व धर्म ऋषीची स्त्री.

२ इंद्रसावर्णि मनूचा पुत्र.

३ तुषित देवांपैकीं एक.

**बुध्न**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**बुलिल आश्वतर आश्वि**—याचा विश्वजित् यागांत म्हणावयाच्या शस्त्रासंबंधीं गौश्लाशीं संवाद झाला ( ऐ. ब्रा. ६.३०; बुडिल व अश्वतर अश्वि पहा ).

**बृबु तक्षन्**—हा पणींचा मुख्य होता. याच्याकडून भरद्वाजाला विपुल संपत्ति मिळाली (ऋ. ६. ४५. ३१-३३). हा हीन जातीचा असल्यामुळें भरद्वाजाला दोष लागण्याचा संभव होता, पण भरद्वाज मुलांबाळांसह निर्जन अरण्यांत असल्यामुळें त्याला गाईचें दान घेणें भाग पडलें, म्हणून दोष लागला नाहीं ( मनु. १०. १०७; बृबु तक्षन् पहा ). इतरत्रहि याचा निर्देश आहे ( सां. श्रौ. १६. ११. ११ ).

**बृसय**—सायणमतें भरद्वाज आपल्या सूक्तांत त्वष्टा-वृत्र-पिता असें यास म्हणतो व याच्या मुलाला-वृत्राला ठार करण्याची सरस्वतीला प्रार्थना करितो ( ऋ. ६. ६१. ३). दुसऱ्या ठिकाणीं अग्निसोमांनीं बृसयाच्या वंशजांना ठार केलें म्हणून त्यांची प्रशंसा केली आहे ( ऋ. १. ९३. ४ ). पणी व हा एकत्र येत असला तरी यांचा निश्चित संबंध काय होता हें ठरविणें मोठें कठीण आहे.

**बृहच्छुक्र**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**बृहच्छ्लोक**—उरुक्रम आदित्य व कीर्ति यांचा मुलगा. याचे सौभाग्यादि पुत्र होत ( भा. ६. १८. ८ ).

**बृहज्जिह्व**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**बृहज्ज्योति**—अंगिरा ऋषीचा पुत्र.

**बृहत्**—स्वायंभुव मन्वंतरांतील जिताजित् देवांपैकीं एक.

२ अंगिराकुलांतील गोत्रकार.

३ ( सो. पूरु. ) हस्तीचें नामांतर ( ब्रह्म. १३. ८० ).

४ बृहद्राजाचें नामांतर.

५ दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

**बृहती**—देवसावर्णि मन्वंतरांतील विष्णूची माता. ही देवहोत्राची पत्नी ( भा. ८. १३. ३२ ).

**बृहत्कर्मन्**—( सो. अनु. ) भागवतमतें पृथुलक्षाचा पुत्र. विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें भद्ररथाचा पुत्र.

२ ( सो. पूरु. ) विष्णुमतें बृहद्वसूचा व वायुमतें महाबलाचा पुत्र. यास बृहत्काय म्हटलें आहे.

३ (मगध. भविष्य.) ब्रह्मांड व विष्णु यांच्या मतें सुक्षत्राचा, वायुमतें सुकृत्ताचा व मत्स्यमतें सुरक्षाचा पुत्र. मत्स्य, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें यानें २३ वर्षे राज्य केलें. यास भागवतमतें बृहत्सेन असें म्हणत.

**बृहत्काय**—( सो. पूरु. ) भागवतमतें बृहद्धानूचा पुत्र.

**बृहत्कीर्ति**—अंगिरा ऋषीचा पुत्र.

**बृहत्केतु**—एक प्राचीन क्षत्रिय ( म. आ. १. २६२ कुं. ).

**बृहत्क्षण**—( १ बृहत्क्षय पहा ).

**बृहत्क्षत्र**—( सो. पूरु. ) भागवतमतें मन्यूचा, विष्णु व वायु यांच्या मतें भुवन्मन्यूचा पुत्र. यास बृहत्क्षेत्र असेंहि म्हणत.

२ केकयाधिप ( म. आ. २०१. २१; द्रो. ३२. ६५ कुं. ). हा भारतीय युद्धांत पांडवपक्षीय होता. यानें क्षेमधूर्तीस मारिलें व यास द्रोणाचार्यांनें मारिलें ( म. द्रो. १२५. २२ कुं. ).

३ निषाद देशचा राजा. भारतीय युद्धांत हा कौरवांकडे होता. यास धृष्टद्युम्नानें मारिलें ( म. द्रो. ३२. ६५ कुं. ).

**बृहत्क्षय**—( सू. इ. भविष्य. ) वायुमतें बृहद्बल राजाचा पुत्र. यास भागवतमतें बृहद्रण व विष्णुमतें बृहत्क्षण म्हटलें आहे. हा भारतीय युद्धांत असावा.

**बृहत्क्षेत्र**—( १ बृहत्क्षत्र पहा ).

**बृहत्सामन्**—हा एक आंगिरस होता. याला क्षत्रियांनीं अत्यंत त्रास दिला. परंतु शेवटीं क्षत्रियांचा नाश झाला ( अ. वे. ५. १९. २ ).

**बृहत्सेन**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय एक राजा. याची कन्या लक्ष्मणा ही कृष्णाची स्त्री होती.

२ ( ३ बृहत्कर्मन् पहा ).

३ श्रीकृष्णास भद्रेपासून झालेला एक पुत्र.

४ नारदानें यास व यानें इंद्राला ब्रह्मविद्येची परंपरा सांगितली ( गरुड. २. १ ).

**बृहत्सेना**—दमयंतीची विश्वासू पारिचारिका व दाई ( म. व. ६० ).

**बृहदनु**—( सो. पूरु. ) मत्स्यमतें अजमीढाचा पुत्र ( १ बृहदिषु पहा ).

**बृहदश्व**—( सू. इ. ) श्रावस्त राजाचा पुत्र. याची राजधानी श्रावस्ती. यानें दीर्घकाळपर्यंत उत्तम तऱ्हेनें राज्य केलें व वृद्धापकाळीं हा आपल्या कुवलाश्व नांवाच्या पुत्रास राज्यावर बसवून वनवासास निघाला. परंतु हा वनवासास जाणार हें कळतांच उत्तंक ऋषि याचेकडे येऊन याला वनवासास जाण्यापासून परावृत्त करूं लागला. कारण धुंधु नांवाचा दैत्य उत्तंकाचे आश्रमास त्रास देत होता. त्याचें पारिपत्य बृहदश्वानें अजून केलें नव्हतें. तेव्हां बृहदश्वानें आपल्या कुवलाश्वास धुंधूचें पारिपत्य करण्यास सांगितलें ( म. व. २०२-२०३; वायु. २. २६; विष्णुधर्म. १. १६ ).

२ पांडवांकडे द्वैतवनांत आलेला एक ऋषि. यानें युधिष्ठिरास अनेक कथा सांगितल्या व अक्षविद्या दिली ( म. व. ७९ ). हा भीष्म शरपंजरीं पडला असतां त्याच्याकडे आला होता ( भा. १. ९. ६ ).

३ अंगिराकुलांतील गोत्रकार.

४ शिवानें श्वेत नांवाचे जे दोन अवतार घेतले, त्यांपैकीं दुसऱ्या श्वेताचा शिष्य.

५ ( सू. इ. भविष्य. ) महदेवाचा पुत्र. मत्स्यमतें यास ध्रुवाश्व म्हटलें आहे.

**बृहदिषु**—(सो. अज.) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें अजमीढाचा पुत्र. मत्स्यमतें अजमीढाचा प्रपौत्रपुत्र जो बृहद्धनु त्याचा हा पुत्र. मत्स्याखेरीज इतर पुराणांत मधले पुरुष पुढें घातले आहेत.

२ ( सो. नील. ) भागवतमतें भर्म्याश्वाचा, विष्णुमतें हर्यश्वाचा, मत्स्यमतें भद्राश्वाचा व वायुमतें रिक्षाचा पुत्र.

**बृहदुक्थ**—एक ऋषिक व अंगिराकुलांतील मंत्रकार. यास बृहदुत्थ व बृहद्वक्षस् अशीं नामांतरें आहेत.

२ ( ३ बृहद्रथ पहा ).

**बृहदुक्थ वामदेव**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ५४-५६ ). बृहदुक्थ हा वामदेवाचा पुत्र किंवा वंशज असावा. वव्रीच्या सूक्तांत एकदां मधुर स्तुतीबद्दल याचा उल्लेख आहे ( ऋ. ५. १९. ३ ). याच्या सूक्तांतहि याचा उल्लेख आहे ( १०. ५४. ६ ). याच्या मुलाचें नांव वाजिन्. तो मेला असतां त्याच्या शरीरांतील भाग घेऊन जाण्याविषयीं यानें देवांना प्रार्थना केली ( ऋ. १०. ५६ ). बृहदुक्थानें पांचाल देशच्या दुर्मुख नांवाच्या राजाला राज्याभिषेक केला ( ऐ. ब्रा. ८. २३. ). सर्वानुक्रमणींत याला वामदेव्य म्हटलें आहे. याला शतपथ ब्राह्मणांत आधार सांपडतो ( श. ब्रा. ८. २. २. १४ ). वाम्नेय असें यास म्हटलें आहे ( पं. ब्रा. १४. ९. ३७. ३८ ).

**बृहदुक्थ**—( ३ बृहद्रथ पहा ).

**बृहदुत्थ**—( १ बृहदुक्थ पहा ).

**बृहदैशान**—( सू. इ. ) भविष्यमतें बृहद्बलाचा पुत्र.

**बृहद्गर्भ**—( सो. उशी. ) शिबि राजाचा पुत्र. एकदां शिबीकडे एक अतिथि आला व बृहद्गर्भाचें मांस खाण्यास मागूं लागला. त्या वेळीं शिबीनें मुळींच न कचरतां याचा वध करून अतिथीस इच्छाभोजन दिलें ( शिबि पहा ).

**बृहद्गिरि**—इंद्रानें यतींना लांडग्यांकडून खावविल्याची गोष्ट वेदांत प्रसिद्ध आहे. त्यांतलि अवशिष्ट तीन यतींनी 'आतां आमचें संरक्षण कोण करील?' असे उद्गार काढले. 'तुमचें रक्षण मी करतों' असें इंद्र त्यांना म्हणाला. इंद्रानें त्या तिघांना आपल्या जवळ ठेवून वाढविलें व एकेकाला ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या विद्या शिकविल्या. त्या तिघांपैकीं एकाचें नांव बृहद्गिरि असें आहे व हा इंद्रापासून ब्रह्मविद्या शिकला ( पं. ब्रा. १३. ४. १५-१७ ).

**बृहद्गुरु**—एक प्राचीन राजा ( म. आ. १. २५८ कुं. ).

**बृहद्दिव आथर्वण**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १२० ). हा आपणास अथर्वन् असें म्हणवून घेतो ( ऋ. १०. १२०. ९ ). याच्या सूक्ताचा याच्याच नांवानें उल्लेख आला आहे ( ऐ. ब्रा. ४. १४ ). हा सुम्नयूचा शिष्य होय ( सां. आ. १५. १ ).

**बृहद्धनु**—( सो. पूरु. ) बृहन्मनस्चा पुत्र.

**बृहद्बल**—( सू. इ. ) भागवतमतें तक्षकाचा, पण इतर पुराणांच्या मतें विश्रुतवानाचा पुत्र. याला राजसूयाच्या वेळीं भीमानें जिंकिलें होतें ( म. स. ३१. १ कुं. ) पांडवांनीहि याच्याकडे आपल्या बाजूस येण्याकरितां दूत धाडला होता ( म. उ. ४. २२ कुं. ). तरी हा शेवटीं कौरवांना मिळाला. हा भारतीय युद्धांत अभिमन्यूकडून मारिला गेला ( म. द्रो. ४७.२४ कुं; भा. ९. १२ ).

२ ( सो. क्रोष्टु. ) वसुदेवभ्राता देवभाग व कंसा यांचा पुत्र ( भा. ९. २४. ४० ).

३ गांधारराज सुबलाचा पुत्र. शकुनीचा भाऊ ( म. आ. २०१. ५ कुं. ).

४ ( सो. अनु. ) विष्णुमतें बृहत्कर्म्याचा पुत्र.

**बृहद्बलध्वज**—हा कुष्ठ रोगांतून सूर्याराधनेनें मुक्त झाला ( भवि. ब्राह्म. २१० ).

**बृहद्ब्रह्मन्**—अंगिरसाचा पुत्र ( म. व. २२१. २कुं. ).

**बृहद्भानु**—एक देव. यांचा पुत्र (म. आ. १.५५ कुं.).

२ ( सो. अनु. ) भागवतमतें पृथुलाक्षाचा पुत्र. विष्णु व मत्स्य यांच्या मतें बृहत्कर्म्याचा पुत्र.

३ ( सो. पूरु. ) भागवतमतें बृहदिषूचा पुत्र. यासच विष्णुमतें बृहद्वसु व वायुमतें बृहद्विष्णु म्हणतात.

४ श्रीकृष्ण व सत्यभामा यांच्या पुत्रांपैकीं एक.

५ इंद्रसावर्णि मन्वंतरांतील होणारा अवतार. सत्रायणि व विताना यांचा पुत्र.

**बृहद्भास**—अंगिरा ऋषीचा पुत्र.

**बृहद्भासा**—सोमपुत्री भानु नांवाच्या अग्नीची भार्या ( म. व. २२३. ९ कुं. ).

**बृहद्युम्न**—एक राजा. यानें अर्वावसु व परावसु या दोघांकरवीं एक यज्ञ केला होता ( म. व. १३८ रैभ्य व परावसु पहा ).

**बृहद्रण**—( बृहत्क्षय पहा ).

**बृहद्रथ**—बृहद्रथ व नववास्त्व हे एकत्र येतात. वैकुण्ठ इंद्रानें याचा नाश केला ( ऋ. १०. ४९. ६ ). यदुतुर्वशांसह कण्वानें याचा उल्लेख केला आहे ( ऋ. १. ३६. १८ ).

याला काशिराजाच्या दोन जुळ्या मुली बायका होत्या ( म. स. १७. १७ कुं. ).

२ ( सो. ऋक्ष. ) उपरिचर वसूचा पुत्र ( म. आ. ६४. ४३ कुं. ). हा बराच कालपर्यंत निपुत्रिक होता. यानें पुत्रप्राप्त्यर्थ पुत्रकामेष्टि यज्ञहि केला. परंतु यास पुत्र झाला नाहीं. तेव्हां आपल्या दोन पत्न्यांसह तीर्थयात्रा करीत हिंडत असतां याची व चंडकौशिक नांवाच्या ऋषीची गांठ पडली. चंडकौशिकानें याच्या मनांतील दुःखाचें कारण जाणून यास एक आम्रफल दिलें व तें आपल्या स्त्रियांस खावयास द्यावयास सांगितलें. तेव्हां बृहद्रथानें तें फल आपल्या दोघी स्त्रियांस अर्धें अर्धें वांटून दिलें. पुढें याच्या स्त्रिया गर्भवती होऊन प्रसूत झाल्या. परंतु दोघींसहि मनुष्यशरिराचें एक एक शकल झालें. तेव्हां राजानें तीं दोन्ही शकलें वनांत नेऊन टाकिलीं. त्या ठिकाणीं जरा नांवाच्या राक्षसीनें तीं दोन्ही शकलें जुळविलीं. त्याबरोबर त्यांपासून एक सजीव बालक झालें. तेव्हां बृहद्रथानें त्या बालकास जरेपासून घेऊन त्याचें जरासंध असें नांव ठेविलें ( मत्स्य. ५० ). भागवतांतहि याच्या दोन बायका दिल्या आहेत. पण जरासंध मात्र एकाच भार्येपासून दोन शकलें होऊन झाला असें आहे ( भा. ९. २२ ). याच्यापासून बार्हद्रथ वंश सुरू झाला ( बार्हद्रथ पहा ).

हा अत्यंत पराक्रमी होता. यानें ऋषभ नांवाच्या राक्षसास मारून त्याच्या कातड्याचे दोन मोठाले नगारे करून ते आपल्या राजधानीच्या महाद्वारावर ठेविले होते ( म. स. १७–१८ ).

३ ( सू. निमि. ) देवरात जनकाचा पुत्र. यास दैवराति, विष्णुमतें बृहदुक्थ व वायुमतें बृहदुच्छ अशीं दुसरीं नांवें आहेत. यानें अध्यात्मज्ञानप्राप्तीकरितां शाकल्य, याज्ञवल्क्य वगैरे ऋषि बोलाविले व याज्ञवल्क्य हा अत्यंत ब्रह्मनिष्ठ आहे असें जाणून त्याच्यापासून यानें उपदेश घेतला. यास महावीर्य नांवाचा पुत्र होता. तो याच्या मागून गादीवर बसला ( म. शां. ३१०; भा. ९. १३; याज्ञवल्क्य पहा ).

४ ( सो. अनु. ) भागवतमतें पृथुलाक्षाचा, वायुमतें बृहत्कर्मन्चा व विष्णुमतें भद्ररथाचा पुत्र. यास बृहत्कर्मन् व बृहद्भानु हे दोन भाऊ होते.

५ ( सो. अनु. ) मत्स्यमतें जयद्रथाचा पुत्र.

६ ( बहुरथ पहा ).

७ याचा तत्त्वज्ञानी म्हणून उल्लेख आहे ( मै. उ. १. २; २. १ ).

८ ( ३ इंदुमती पहा ).

९ एक राजा. यास गोलांगूल वानरानें गृध्रकूट पर्वतावर परशुरामाचे भयानें लपवून ठेविलें होतें. पुढें परशुरामानें कश्यपास पृथ्वी दिल्यावर हा निर्भय होऊन आपल्या देशांत परत आला ( म. शां. ४९ ).

१० दुर्योधनपक्षीय राजा ( म. उ. १९५. १० कुं. ).

११ ( सो. पूरु. भविष्य. ) भविष्यमतें तिग्मज्योतीचा, मत्स्य व विष्णु यांच्या मतें तिग्माचा व भागवतमतें तिमीचा पुत्र.

१२ ( मौर्य. भविष्य. ) भागवत, विष्णु व मत्स्य यांच्या मतें शतधन्वन्चा व ब्रह्मांडमतें शतधनूचा पुत्र. यानें मत्स्यमतें सत्तर व ब्रह्मांडमतें सात वर्षे राज्य केलें. मत्स्यखेरीज इतरत्र हा शेवटचा मौर्य राजा होय.

१३ दक्ष सावर्णि मनूचा पुत्र.

**बृहद्राज**—( सू. इ. भविष्य. ) भागवत व भविष्य यांच्या मतें अमित्रजित् राजाचा, विष्णुमतें मित्रजिताचा व मत्स्यमतें सुमित्राचा पुत्र. यास बृहत् व भरद्वाज नामांतरें आहेत.

**बृहद्रक्षस्**—पहिल्या बृहदुक्थाचें नामांतर.

**बृहद्वपु**—सत्य देवांपैकीं एक.

**बृहद्वसु**—एक आचार्य ( वं. ब्रा. ३. ).

२ वशवर्तिन् देवांपैकीं एक.

३ ( ३ बृहद्भानु पहा ).

**बृहद्विष्णु**—( ३ बृहद्भानु पहा ).

**बृहद्ध्वज**—एक राक्षस. हा परस्त्रियांचें हरण करीत असे. एकदां भीमकेश राजाची स्त्री याचे दृष्टीस पडली. तेव्हां हा तिच्यापाशीं आला व यानें तिची चौकशी केली. तिनें उत्तर दिलें कीं, 'मी भीमकेशाची केशिनी नामक स्त्री आहें. पण माझा पति मला आवडत नसल्यामुळें मी येथें आलें आहें.' तेव्हां या राक्षसानें तिला तिच्या संमतीनें आपल्या रथांत घेतलें. पुढें तीं दोघें गंगासागरसंगमीं आल्यावर तेथें तिच्या पतीचें राज्य असल्यामुळें केशिनी भीतीनें मरण पावली. तिच्या दुःखानें राक्षसहि मेला. पण यांस पुण्यस्थलीं मृत्यु आल्यानें हीं दोघें विष्णुलोकीं गेलीं ( पद्म. क्रि. ४ ).

**बृहन्त**—उलूक देशाचा राजा. हा द्रौपदीस्वयंवरास आला होता ( म. आ. २०१. ७ कुं. ). राजसूय यज्ञापूर्वी अर्जुनानें उत्तर दिशेस दिग्विजय करीत असतां, याच्याशीं युद्ध करून याला जिंकिलें व याला घेऊन पुढें अर्जुन सेनाबिंदूवर गेला ( म. स. २८. ६-१० कुं. ). याला पांडवांनीं भारतीय युद्धाकरितां बोलाविलें होतें ( म. उ. ४. १३ कुं. ). यास दुःशासनानें मारिलें ( म. क. ३.१२.कुं. ).

२ ( सो. पूरु. ) मत्स्यमतें बृहदनूचा पुत्र.

**बृहन्नला**—( अर्जुन पहा ).

**बृहन्माति आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ३९-४० ).

**बृहन्मनस्**—( सो. अनु. ) भागवत व वायु यांच्या मतें बृहद्रथाचा पुत्र. यास यशोदेवी व सत्या अशा दोन स्त्रिया होत्या. पैकीं यशोदेवीस जयद्रथ व सत्येस विजय असे दोन पुत्र होते.

२ अंगिरा ऋषीचा एक पुत्र.

३ ( सो. पूरु. ) मत्स्यमतें बृहन्ताचा पुत्र.

**बृहन्मन्त्र**—अंगिराऋषीचा पुत्र.

**बृहन्मेदस्**—( सो. अनु. ) हा वसुष्मत्चा मुलगा. याचा मुलगा श्रीदेव ( कूर्म. १. २४. ६-१० ).

**बृहस्पति**—एक ऋषि. बृहती म्हणजे वाणी, तिचा पति, अशी बृहस्पति या शब्दाची व्युत्पत्ति आहे (बृ. उ. १.३.२०-२१). त्याचप्रमाणें यानें बृहत् म्हणजे मोठें तप केलें, म्हणून याला बृहस्पति हें नांव मिळालें ( स्कंद. ४. १. १७ ). ऋग्वेदांत बृहस्पतीचा उल्लेख ही एक महत्त्वाची देवता म्हणून बरेच वेळां आला आहे. त्याचप्रमाणें हा ( ऋ. १०. ७१-७२ ) या सूक्तांचा कर्ताहि आहे. बृहस्पति आकाशांत उत्पन्न होतो आणि हा सप्तमुख व सप्तरश्मि आहे ( ऋ. ४. ५०. ४ ). याला तीक्ष्णशृंग म्हटलें आहे ( ऋ. १०. १५५. २ ). त्याचप्रमाणें धनुष्य, बाण, सुवर्ण-परशु हीं याचीं आयुधें असून ( ऋ. २. २४. ८; ७. ९७. ७ ) याच्या रथास तांबडे घोडे असतात ( ऋ. ७. ९७. ६ ).

बृहस्पति अत्यंत पराक्रमी होता. यानें इंद्रास बलाचा पराजय करण्याचे वेळीं मदत केली व गाई सोडविल्या ( ऋ. २. २३. १८ ). यानें शत्रूंचे दुर्ग फोडले व त्यांचा पराभव केला ( ऋ. ६. ७३. २ ). लढाईंत हा कोणाससहि हार जात नसे, म्हणून युद्धप्रसंगीं याची प्रार्थना करीत ( ऋ. १. ४०. ८; २. २३. १३ ).

बृहस्पति हा अत्यंत परोपकारी आहे. स्तवन करणाऱ्यांवर हा कृपा करतो (ऋ. २. २५. १). शुद्धाचरणी माणसास सर्व संकटांतून मुक्त करून धन देतो ( ऋ. २.२३. ४-१० ). यानें विहिरींत पडलेल्या एका त्रित नांवाच्या मनुष्याची प्रार्थना ऐकून त्यास तेथून सोडविलें ( ऋ. १. १०. ५१७ ). याच्या परोपकारीपणामुळें यास 'पिता' असें म्हटलें आहे (ऋ. ४. ५०. ६; ६. ७३. १). बृहस्पति हा गृहपुरोहित असून याचेशिवाय यज्ञकर्में सांग होत नाहींत ( ऋ. १ १८. ७; ४. ५०. ११ ). इतर पुरोहितांना यानेंच स्तुतींची स्फूर्ति दिली ( ऋ. १०. ९८. २७ ).

बृहस्पतीस ब्रह्मणस्पति, सदसस्पति, ज्येष्ठराज व गणपति अशीं दुसरीं नांवें दिलेलीं आढळतात ( ऋ. १. १८. ६-९; २. २३. १ ). लोकपुत्र म्हणून एक बृहस्पति सूक्तद्रष्टा आहे ( ऋ. १०. ७२ ).

चतुर्विंशतिरात्र व इतर याग यान्या नांवावर मोडितात (तै. सं. ७. ४. १). याची पत्नी धेना (गो. ब्रा. २. ९). धेना म्हणजे वाणी होय. याच्या नांवावर कांहीं सामें आहेत (छां. उ. १.२.११). या सामांनीं गायन क्रौंच पक्षाच्या शब्दासारखें असतें. यानें याज्ञवल्क्यास तत्त्वज्ञान सांगितलें (जाबाल. उ. १; रामोपतापिनी. १). जुहू हीहि याची पत्नी आहे. वेदोत्तर वाङ्मयांत यास देवांचा पुरोहित म्हटलें आहे (म. आ. ७६;. २१७;उ. ११; मत्स्य. ४९). हा स्वायंभुव मन्वंतरांतील अंगिरा ऋषि व सुरूपा यांचा पुत्र होय (भा. ४. १; म. आ. ६६; आश्व. ५; ब्रह्मांड. ३. ३. १). हा अंगिरा ऋषीस अग्नीपासून झाला होता (म. व. २१७. १८). बृहस्पतीस तारा व शुभा अशा दोन बायका होत्या. शुभेस भानुमती, रागा, अर्चिष्मती, महामती, महिष्मती, सिनिवाली, व हविष्मती अशा सात कन्या होत्या. व तारेस शंयु, निश्चवन, विश्वभुज्, विश्वजित्, वडवाग्नि व स्विष्टकृत् अशीं अग्नींची नांवें असलेले सात पुत्र व स्वाहा नांवाची एक कन्या होती (चंद्र पहा). कुशध्वज नांवाचाहि एक पुत्र होता (कच पहा).

बृहस्पतीस संवर्त व उतथ्य असे दोन भाऊ होते. यानें एकदां उतथ्यभार्या ममता हिच्याशीं ती गरोदर असतांहि संभोग केला व तिचा उदरस्थ गर्भ यास प्रतिबंध करीत होता म्हणून यानें त्या गर्भास 'जन्मांध होशील' म्हणून शाप दिला. तोच दीर्घतमस् होय. यास ममतेपासून भरद्वाज म्हणून पुत्र झाला (म. आ. १०४; मत्स्य. ४९; वेदार्थदीपिका ६. ५२). त्याच भरद्वाजाला पुढें दुष्यन्तपुत्र भरतानें दत्तक घेतलें.

बृहस्पतीचें व संवर्त नांवाच्या याच्या भावाचें नेहमीं वांकडें असे. बृहस्पति हा मरुत्तपुरोहित होता. परंतु एकदां इंद्रानें यास आपला यज्ञ चालविण्याकरतां बोलाविलें. त्यावरून हा इंद्रपुरोहित होऊन स्वर्गास गेला व तेथील विलास वगैरे पाहून स्वर्गातच राहिला. तेव्हां मरुत्तानें बृहस्पतीच्या भावास आपला उपाध्याय करून तो त्याचेकडून आपला यज्ञ चालवूं लागला. तेव्हां मरुत्तानें आपला अवमान करून आपल्या भावास पौरोहित्य दिलें, हें पाहून बृहस्पतीस राग आला व यानें मरुत्ताचा यज्ञ बंद पाडण्याची इंद्रास आज्ञा केली. त्यावरून इंद्र ससैन्य मरुत्तावर चालून गेला. परंतु संवर्तानें आपल्या ब्रह्मतेजानें इंद्रास पराजित केलें व मरुत्ताचा यज्ञ निर्विघ्न पार पाडला (म. आश्व. ५-९). एकदां इंद्रानें याचा अपमान केला म्हणून यानें देवांना सोडिलें. पण याच्या वांचून चालेना, म्हणून देवांना याला परत आणणें भाग पडलें (भा. ६. ७).

देव व दानव यांमध्यें युद्ध होऊन देवांचा पूर्ण पराभव झाला व दानव देवांना अत्यंत त्रास देऊं लागले. तेव्हां देवांचें संरक्षण करण्याकरितां शुक्राचार्याला शंकरापासून वरप्राप्ति झाल्यावर तो जयंतीच्या नादांत आहे असें पाहून शुक्राचार्याचें रूप घेऊन हा दैत्यांत मिसळला व यानें त्यांच्यांत नास्तिक मताचा फैलाव करून कित्येक दैत्य धर्मभ्रष्ट केले व त्यांचा पराभव केला (पद्म. सृ. १३; उशनस् पहा). तसेंच यानें नहुषापासून शचीचें संरक्षण केलें (म. उ. ११).

उपरिचर वसूनें बोलाविल्यावरून बृहस्पति त्याच्या यज्ञांत गेला व त्या ठिकाणीं यानें होत्याचें काम स्वीकारलें. उपरिचर हा कट्टा विष्णुभक्त होता. विष्णूनें तेव्हां स्वतः येऊन पुरोडाश भक्षण केला. परंतु बृहस्पतीस हें खरें न वाटून 'उपरिचर वसूनेंच आपला अपमान करण्याकरितां पुरोडाश घेतला असला पाहिजे' असें याला वाटलें व हा वसूला शाप देण्यास तयार झाला. परंतु एकत, द्वित व त्रित यांनीं बृहस्पतीचा क्रोध शांत केला (म. शां. ३३६).

ब्रह्मदेवांच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत हा अध्वर्युगणांतील नेष्टा होता (पद्म. सृ. ३४).

बृहस्पतीनें इंद्रास भूपतीचीं कर्तव्यें सांगितलीं. त्या वेळीं यानें साम, दाम, दंड व भेद यांपैकीं सामावरच विशेष जोर दिला होता (म. शां. ८४). त्याचप्रमाणें यानें कोसलाधिपति वसुमनस् यास उपदेश केला होता (म. शां. ६८).

पृथ्वीदोहनाचे वेळीं देवांनीं बृहस्पतीस वत्स केलें होतें (भा. ४. १८. १४). यानें प्रभासक्षेत्रांतील सोमेश्वराजवळ एक हजार वर्षे शिवाची आराधना करून त्यास प्रसन्न करून घेतलें व ग्रहत्व मिळविलें (स्कंद. २. ४. १. १७). व त्याच ठिकाणीं बृहस्पतीश्वर नांवाचें लिंग स्थापिलें (स्कंद. ७. १. ४८).

यानें युधिष्ठिराला प्राण्याचे जननमरणादि प्रकार कथन केले (म. अनु. १७३. ११ कुं.).

याला एक ब्राह्मणवादिनी भुवना बहीण असून ती प्रभास वसूला दिली होती. तिचा पुत्र विश्वकर्मन् होय.

बृहस्पतीनें धर्मशास्त्र, नीतिशास्त्र व अर्थशास्त्र यांवर लिहिलेले ग्रंथ असावेत. पण सध्यां फक्त ऐशीं श्लोक असलेली एक स्मृति आनंदाश्रमांत छापलेली मिळते. जीवानंदाच्या संग्रहांतहि एक स्मृति आहे. तींत दानप्रशंसा व इतर कांहीं किरकोळ विषय आहेत. पण याचे मिताक्षरादि ग्रंथांत येणारे उतारे पाहिले असतां याची स्मृति फार महत्त्वाची व विस्तृत असावी. दिवाणी व फौजदारी असा विभाग यानें प्रथम पाडला. निपुत्रिक विधवांचा वारसा यानें मान्य केला आहे (याज्ञ. २ १३५). यानें नाणक दीनार वगैरेची माहिती दिली आहे वीर. ३८३; स्मृतिचं. ९९). ब्रह्मदेवानें केलेला विस्तृत

ग्रंथ बाहुदंतक यानें तीन हजार अध्यायांत संक्षिप्त केला (म. शां. ५८. ९२ कुं.). त्याला बार्हस्पत्यशास्त्र म्हणतात. इतरत्रहि याच्या नीतीचा वारंवार उल्लेख येतो. कामशास्त्रांतहि याला दुजोरा मिळतो. राजाला सोळा प्रधान असावेत असें याचें मत होतें (कौ. अर्थशास्त्र). अपरार्क व दानरत्नाकर यांत दानबृहस्पतीचा निर्देश आहे. कात्यायन व अपरार्क यांनीं याचीं मतें घेतलीं व दीनार वगैरे नाण्याचे निर्देशावरून हा इ. स.च्या दुसऱ्या शतकानंतर झाला असावा. यानें स्वप्नाध्याय या नांवाचा एक ग्रंथ लिहिला (C. C.).

बृहस्पति, अंगिरस्, नारद, भृगु यांनीं मनुस्मृतीचे चार भाग केल्याचा उल्लेख आहे. बृहस्पतीनें मनूस सर्वस्वीं अनुकूल असेंच प्रतिपादन केलें. बृहस्पतीनें वास्तुशास्त्रावरहि एक ग्रंथ केला आहे (मत्स्य. २५२; व्यास पहा).

अंगिरा व सुरूपा यांचा पुत्र व अंगिरा व श्रद्धा यांचा पुत्र. हे अनुक्रमें स्वायंभुव व वैवस्वत मन्वंतरांतले आहेत.

२ जनमेजयाचे सर्पसत्रांत आलेला एक ऋषि (भा. १२. ६).

**बैजभृत**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**बैजवाप**—एक आचार्य (श. ब्रा. १४.५.५.२०).

**बैजवापायन**—एक आचार्य (श.ब्रा. १४.५.५.२०).

**बैजवापि**—बीजवापाचा वंशज (मै. सं. १.४.७).

**बैद**—धौम्याचा एक शिष्य (म. आ. ३. ७८ कुं.).

**बोध**—(बौध्य पहा).

२ एक ऋषि. याचा प्रतिबोधाबरोबर निर्देश आहे (अ. वे. ५. ३०. १०; ८. १. १३).

**बोधप**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार, ऋषिगण.

**बोध्य**—याचा ययातीबरोबर संवाद झाला होता (म. शां. १७८; बौध्य पहा).

**बोपदेव**—तोताद्रीवर राहणारा एक ब्राह्मण. व्यासानें केलेलें भागवत याला विष्णुकृपेनें मिळालें. विष्णूनें याला भागवतमाहात्म्य सांगितलें (भवि. प्रति. २. ३२).

**बौद्ध**—(बुद्ध पहा).

**बौद्धक**—एक व्यास व व्यास व यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**बौधायन**—(१) कल्पसूत्रकार, (२) ब्रह्मसूत्रावरील वृत्तिकार. हे दोघेहि प्राचीन ग्रंथकार होते. पण हे एकच होते कीं भिन्न होते, हें कळत नाहीं. रामानुजाचें श्रीभाष्य बौधायनवृत्तीला अनुसरून आहे, हा शंकराचार्याहून प्राचीनतर आहे. हा बहुधा द्रवीड ग्रंथकार असावा. कल्पसूत्रकार व वृत्तिकार बौधायन हे बहुधा एकच असण्याचा संभव आहे. कल्पसूत्रकार बौधायनानें संपाताची स्थिति वेदांग ज्योतिषाप्रमाणेंच दिलेली आहे. यावरून हा इ. स. पूर्वी १२०० च्या सुमाराचा ग्रंथकार आहे (कविचरित्र). याच्या नांवावर श्रौतसूत्र, गृह्यसूत्र, धर्मसूत्र व स्मृति आहेत. बौधायनश्रौतसूत्रांत याचा अनेक स्थळीं निर्देशहि आहे (बौ. श्रौ. ५. २१).

हा आचार्य कृष्णयजुर्वेदी आहे. बौधायन शाखेचे लोक हे सध्यां कृष्णेचे मुखापाशीं जास्त आढळतात. गृह्यसूत्रांत बौधायनास प्रवचनकार असें नांव दिलेलें आढळतें. दक्षिणेंतील पल्लव राजांनीं नवव्या शतकांत बऱ्याच प्रवचनकारांना देणग्या दिल्याचा उल्लेख आहे (I. A. ८. २७३). बौधायनानें दक्षिणेंतील लोकांच्या कांहीं चालीरीतींचाहि उल्लेख केला आहे.

बौधायनधर्मसूत्र हें चार प्रश्नांमध्यें विभागलें आहे. त्यांत चातुर्वर्ण्याकरितां वागण्याचे नियम, पंचमहायज्ञ व यज्ञासंबंधीं लागणाऱ्या वस्तु, विवाहाचे प्रकार, प्रायश्चित्त, नियोगाचे नियम, श्राद्ध, प्राणायाम, अघमर्षण, जप वगैरेसंबंधीं विचार केला आहे. या सूत्रांत आलेल्या ऋषितर्पणांमध्यें कण्व-बौधायन, आपस्तंब व हिरण्यकेशी अशा क्रमानें नांवें आलीं आहेत. त्यांवरून कण्वबौधायन हा आपस्तंबाच्या पूर्वीचा असावा. सूत्रकार बौधायन हा कण्वाचा कोणी तरी वंशज असला पाहिजे. बौधायन हा काण्वायन असल्याबद्दल टीकाकार गोविंदस्वामी यानें म्हटलें आहे.

सध्यां प्रचलित असलेलें बौधायनधर्मसूत्र हें बौधायनानें केलेल्या धर्मसूत्रांत बराच प्रक्षिप्त मजकूर घालून केलेलें आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं पुनरुक्ति झाली आहे व इतर बराच भाग (उदा. ३ प्रश्न.) गौतमधर्मसूत्र व विष्णुधर्मसूत्र यांतून बौधायन-धर्मसूत्रांत घातला आहे.

बौधायनधर्मसूत्रांत वेद, तैत्तिरीय संहिता, तै. ब्राह्मण, तै. आरण्यक, शतपथ ब्राह्मण, उपनिषदें व निदान वगैरे ग्रंथांमधील उतारे घेतले आहेत. ऋग्वेदांतील अघमर्षण व पुरुषसूक्त हीं दोन सूक्तेंहि बौधायनानें घेतलीं आहेत. तसेंच बौधायनानें औपजंघनि, कात्य, काश्यप, प्रजापति वगैरे धर्मशास्त्रकारांचा उल्लेख आपल्या ग्रंथांत केला आहे.

बौधायनधर्मसूत्राचा उल्लेख शबर, कुमारिल, मेधातिथि वगैरे टीकाकार आपल्या ग्रंथांत करितात. त्याचप्रमाणें विश्वरूपाच्या आचारांमध्यें व मिताक्षरेमध्यें बौधायनाच्या चवथ्या प्रश्नांतील कित्येक सूत्रें आलीं आहेत.

बौधायनधर्मसूत्रांत गौतमधर्मसूत्रांतील उतारे दोन ठिकाणीं आले आहेत. त्यांवरून हें धर्मसूत्र गौतमाच्या नंतरचें असावें. त्याचप्रमाणें तर्पणांतील आपस्तंबाच्या उल्लेखावरून हा आपस्तंबाच्या पूर्वीचा असावा असें वाटतें. त्याचप्रमाणें

आपस्तंबधर्मसूत्रांतील व बौधायनधर्मसूत्रांतील बऱ्याच मतांचें एकमेकांशीं साम्य असलें तरी आपस्तंबाचीं नियोग, दायविभाग वगैरेसंबंधीं मतें बरीच कडक आहेत व त्यामुळें आपस्तंबधर्मसूत्र हें थोडें अलीकडील असावें. परंतु या गोष्टींचा बौधायनाचा काल ठरविण्यास फारसा उपयोग होत नाहीं. तरी पण बौधायन हा गौतमानंतरचा व बराच जुना म्हणजे अदमासें इ. स. पूर्वी ५००-२०० या कालांत होऊन गेला असावा.

बौधायनधर्मसूत्रांत गणपतीची पूजा व त्याचीं लम्बोदर, विनायक वगैरे नांवें सांपडतात. त्याचप्रमाणें तर्पणांमध्यें नवग्रहांचा उल्लेख केलेला आढळतो. परंतु यावरून बौधायनाचा काल ठरवितां येणार नाहीं. कारण गणपतीच्या पूजेचा विधि मानवगृह्यसूत्रांतहि आढळतो.

बौधायनधर्मसूत्रावर गोविंदस्वामीची एक टीका आहे. आनंदाश्रम-स्मृतिसमुच्चयांत याची एक स्मृति दिली असून ती एकंदर ८ अध्यायांची आहे. प्रत्येक अध्यायांतून ३१४ प्रश्न विचारिले आहेत व त्या प्रश्नांचीं उत्तरेंहि दिलेलीं आहेत.

**बौधीपुत्र**—शालंकायनीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य कौत्सीपुत्र ( श. ब्रा. १४. ९. ४. ३१ ).

**बौधेय**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**बौध्य**—व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील बोध्याबद्दल विष्णुमतें पाठभेद. हा ऋक्शिष्यपरंपरेंतील बाष्कलीचा शिष्य असून याबद्दल बोध्य व बोध असे पाठभेद आहेत ( व्यास पहा ).

**ब्रध्न**—भौत्य मनूचा पुत्र.

**ब्रध्नश्व**—एक राजा. अगस्त्य ऋषि एकदां याच्याकडे द्रव्ययाचनार्थ आला असतां त्या वेळीं यानें आपला आयव्ययांचा त्याला हिशेब दाखविला. त्यावरून आयव्यय हे दोन्हीहि समान असल्याचें अगस्त्यास दिसून आल्यामुळें अगस्त्यानें याच्याकडून द्रव्य घेतलें नाहीं ( म. व. ९८; अगस्त्य पहा ).

**ब्रह्मकृतेजन**—( ब्राह्मपुरेयक पहा ).

**ब्रह्मगार्ग्य**—हा कृष्णाचा पुरोहित होता ( पद्म.सृ.२३ ).

**ब्रह्मचारिन्**—स्कंदाचें नामांतर.

२ कश्यप व अरिष्टा किंवा क्रोधा यांच्या पुत्रांपैकीं एक.

**ब्रह्मजित्**—कालनेमीचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ५. ३८ ).

**ब्रह्मतन्वि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**ब्रह्मदत्त**—( सो. पूरु. ) हा भागवतमतें नीपाचा पुत्र. पण विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें अणुहाचा पुत्र. याची आई शुकाचार्यांची कन्या कीर्तिमती किंवा कृत्वी. भागवत व विष्णु यांमध्यें याचा मुलगा विष्वक्सेन दिला आहे. मत्स्यांत युगदत्त व वायूंत युगसूनु देऊन नातू विष्वक्सेन दिला आहे. याची पत्नी देवलकन्या सन्नति होय ( ह. वं. १.२३ ). पण भागवतांत पत्नीचें नांव गो दिलें आहे ( ९. २२. २५ ). याच्या अन्तःपुरांत राहणाऱ्या पूजनी नांवाच्या चिमणीचें पिल्लू याचा मुलगा सर्वसेन यानें ठार मारिलें, म्हणून पूजनीनें सर्वसेनाचे डोळे फोडले. तेव्हां राजानें आश्वासन दिल्यावरहि शत्रुत्व असलेल्या घरांत पूजनीनें राहण्याचें नाकारिलें ( म. शां. १३९ कुं.; ह. वं. १. २० ). यानें जैगीषव्यापासून योग शिकून योगतंत्र नांवाचा ग्रंथ लिहिला ( भा. ९. २२. २६ ). यानें अथर्ववेदाचा व कण्डरीकानें सामवेदाचा क्रम केला ( म. शां. ३५२. ३८ कुं. ). यानें शंखनिधि दिला होता ( म. शां. २३४; अनु. १३७ ). संहितेचा पदपाठ व शिक्षा यानें केल्या. योगाचार्य गालव याचा मित्र असून कंडरीक याचा मंत्री होता. याला सर्व प्राण्यांची भाषा समजत होती ( ह. वं. १. २०; २३ ).

२ उर्मिलेची कन्या सोमदा गंधर्वी हिला चूलि महर्षींच्या कृपेनें झालेला पुत्र. सोमदेच्या सेवेनें संतुष्ट होऊन चूलीनें सोमदेला हा मानसपुत्र दिला. हा कांपिल्य नगरीचा राजा होता. याला कुशनाभानें वायूनें वांकड्या असलेल्या आपल्या शंभर मुली दिल्या. त्या यानें सरळ केल्या ( वा. रा. बा. ३३ ).

३ या सूर्यवंशांतील राजानें साबरमतीतीरीं तपश्चर्या करून आपल्या नांवानें शंकराची स्थापना केली ( पद्म. उ. १३५ ).

**ब्रह्मदत्त चैकितानेय**—कुरुवंशांतील अभिप्रतारिन् यानें याला आश्रय दिला होता ( जै. उ. ब्रा. १. ३८. १; ५९. १ ). यानें शपथपूर्वक प्राणविद्या कथन केली होती ( बृ. उ. १. ३. २६; चैकितानेय पहा ).

**ब्रह्मदेव**—पांडवपक्षीय राजा ( म. उ. १९६. २५ कुं. ).

**ब्रह्मधना**—ही रक्षस्‌ची पत्नी. हिला अंबुक, केलि, क्षम, धृति, ब्रह्मापेत, यज्ञहा, यज्ञापेत, श्वात व सर्प असे पुत्र व अपहारिणी, क्षमा, महाजिह्वा व रक्तकर्णी अशा कन्या होत्या ( ब्रह्मांड. ३.७.९८ ).

**ब्रह्मधातृ**—प्रहेति राक्षसाचा एक पुत्र. हा कुबेराचा सेवक होता.

**ब्रह्मन्**—परमेष्ठिन् ब्रह्मथाचा शिष्य ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ). हा सर्व सृष्टीच्या आधीं उत्पन्न झाला ( मुं. उ. १.१.१ ). यानें अथर्वन्‌ला ब्रह्मविद्या सांगितली ( मुं. उ. १. १. २ ). तसेंच यानें नारदाला ब्रह्मविद्या दिली ( गरुडोप. १-३ ). प्रसिद्ध ब्रह्मोपनिषदाशिवाय एक

ब्रह्मोपनिषद नांवाचा भाग छांदोग्यांत आला आहे. तो ब्रह्मानें प्रजापतीला व प्रजापतीनें मनूला सांगितला ( छां. उ. ३. ११. ३-४ ). हें सृष्टीचें आदितत्त्व मानिलें आहे. यज्ञांत या नांवाचा प्रमुख ऋत्विजहि असतो.

२ भगवंतानें पृथ्वीरूप कमल निर्माण केलें, त्यांत ब्रह्मा उत्पन्न झाला ( मत्स्य. १६९. २; म. व. २७३. ४५ कुं.; भा. ३. ८. १५ ). विष्णु सृष्टीचा विचार करीत असतां जो अहंकार उत्पन्न झाला त्यापासून ब्रह्मा झाला ( म. शां. ३५७. २१ कुं. ). एक अण्डें उत्पन्न झालें व त्यापासून हा झाला ( म. आ. १. ४५ कुं.; स्कंद. ५. १. ३ ). विश्वाच्या उत्पत्त्यादिकांस कारणीभूत अनेक अज्ञात शक्ति आहेत. या शक्ति म्हणजेच भगवान् व तोच ब्रह्मा. हा उत्पत्त्यादिरहित असल्यामुळें उत्पन्न झाला हें म्हणणें नुसतें औपचारिक होय ( विष्णु. १. ३ ). ब्रह्मयाचे एकंदर बरेच जन्म झाले. मानस, कायिक, चाक्षुष, वाचिक, श्रवणज, नासिकाज, अंडज किंवा पद्मज म्हणजे सध्यांचा पाद्म असे याचे सात जन्म झाले ( म. शां. ३५७. ४०-४३ कुं. ). सृष्टीच्या उत्पत्तिकालीं हा ब्रह्मा, विष्णु व रुद्र अशीं रूपें धारण करतो. अर्थात् पूर्वीच्या मत्स्यादि रूपाप्रमाणेंच या वेळीं वराहरूप धारण केलें तें यानेंच. व पृथ्वीचा उद्धारहि केला यानेंच. हा मूलतः एकच मुखाचा असावा. पण यास सर्वत्र चतुर्मुख हें विशेषण असतें. कारण यानें आपल्या अर्धांगापासून जी शतरूपा नांवाची स्त्री उत्पन्न केली ती अतिशय रूपवती होती. ती यास प्रदक्षिणा घालूं लागली. तेव्हां याचे मानसपुत्र याच्या सभोंवतीं बसले असल्यामुळें त्या प्रदक्षिणा घालणाऱ्या स्त्रीकडे तोंड वळवून पाहण्याची यास लाज वाटली. पण पाहण्याची इच्छा अनावर होऊन यानें आपणांस चारहि बाजूंस चार तोंडें उत्पन्न केलीं. व ती आकाशमार्गानें चालली त्या वेळीं मध्यभागीं वर एक जटाधारी पांचवें शिर उत्पन्न केलें. तें पुढें शंकरानें तोडिलें. नंतर या याच्या शतरूपेकडे पाहण्यानें पुत्रप्राप्त्यर्थ केलेल्या तपाचा नाश झाला ( मत्स्य. ३. ३०-४० ). यानें चार मुखांपेक्षां अधिक मुखांचे प्राचीन ब्रह्मदेव दाखवून दाल्भ्याचा प्राचीनत्वाचा गर्वपरिहार केला ( जै. अ. ६०-६१ ).

सृष्टयुत्पत्तीस्तव हा व नारायण उत्पन्न झाले असतां 'श्रेष्ठ कोण' याबद्दल तंटा लागला. त्याचा निकाल लावून घेण्याकरितां हे दोघे शंकराकडे गेले. तेव्हां शंकरानें आपल्या लिंगाच्या आयंतांचा शोध लावावयास सांगितलें व जो शोध लावील त्यास श्रेष्ठ समजावयाचें असें ठरविलें. त्याप्रमाणें हा ऊर्ध्व मार्गानें शोधास गेला व तेथें यानें गाय व केतकी यांस खोट्या साक्षी द्यावयास सांगून आपण शोध लावल्याचें खोटेंच सांगितलें. त्यामुळें हा कनिष्ठ व अपूज्य ठरला. पण गंधमादनावर शिवाचे सांगीवरून यज्ञ केल्यानंतर श्रौतस्मार्तकर्मांत यास पूज्यत्व मिळालें ( स्कंद. १. १. ६; १. ३. २. ९-१५; ३. १. १४ ).

ब्रह्मदेवानें प्रथम तमोगुणी, नंतर रजोगुणी, नंतर सत्त्वगुणी अशी प्रजा उत्पन्न केली. यानें प्रथम पांच प्रकारची तमोगुणी सृष्टि निर्माण केली. पुढें नाग, तिर्यक् ( पशु ), ऊर्ध्वस्रोतस् ( देव ), अर्वाक्स्रोतस् ( नर ), अनुग्रह, भूत, प्राकृत, वैकृत, कौमार अशी प्रजा उत्पन्न केली ( पद्म. सृ. ३ ). यानंतर क्षुधा, क्रोध, यक्ष, राक्षस, सर्प, भूत, गंधर्व, पशु, पक्षी व भूरुह उत्पन्न केले. याचे पूर्वेकडील मुखापासून गायत्री छंद, ऋग्वेद, त्रिवृत, रथंतर, अग्निष्टोम; दक्षिणेकडील मुखापासून यजुर्वेद, पंचदशऋक्समूह, बृहत्साम, उक्थयज्ञ; पश्चिमेकडील मुखापासून सामवेद, सप्तदश ऋक्समूह, वैरूपसाम व अतिरात्र यज्ञ आणि उत्तरेकडील मुखापासून अथर्ववेद, एकविंश ऋक्समूह, आप्तोर्याम, अनुष्टुप् छंद व वैराज साम उत्पन्न झाले. असे वेद उत्पन्न करण्याचे अगोदर यानें पुराणांचें स्मरण केलें. वेदादिकांनंतर मरीचि, अत्रि, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, क्रतु, दक्ष, भृगु व वसिष्ठ या ब्रह्मे म्हणून प्रसिद्ध असलेल्या मानसपुत्रांस उत्पन्न केलें. नंतर पुनः अवयवांपासून धर्म, रुचि, भृगु, दक्ष, मरीचि, रुद्र, अंगिरस्, अत्रि, पुलस्त्य, पुलह, व वसिष्ठ यांस उत्पन्न केलें ( ब्रह्मांड. २. ९ ). उजव्या आंगठ्यापासून दक्ष, हृदयापासून मदन, अधरापासून लोभ, अहंकारापासून मद, डोळ्यांपासून मृत्यु, स्तनाग्रांपासून धर्म, भ्रूमध्यापासून क्रोध, बुद्धीपासून मोह, कंठापासून प्रमोद, तळहातापासून भरत व देहापासून शतरूपा यांस उत्पन्न केलें. या सर्वांस अथान् माता नाहींत. शतरूपेसच सावित्री, सरस्वती, गायत्री, ब्रह्माणी म्हणतात. पुत्रांस प्रजोत्पत्तीकरितां जाण्यास सांगून आपण सावित्रीशीं रममाण झाला. तेव्हां यास स्वायंभुव मनु झाला. ब्रह्मदेव सर्व वेदांचा अधिष्ठाता असून याजपासूनच गायत्री झाली. हें जोडपें साक्षात् किंवा अमूर्त कसेंहि असतें. गायत्री यास कधींहि सोडून जात नाहीं. ब्रह्मा हा वेदराशि असून त्यांत सावित्री बसली आहे म्हणून यास सावित्रीगमनाचा दोष नाहीं ( मत्स्य. ३ ). सावित्रीगमनानें लज्जित होऊन यानें मदनास शाप दिला कीं, 'तुला रुद्र जाळून टाकील.' पण मदनानें आपण आपलें कर्तव्य केलें, हें यास समजावून देऊन उःशाप मिळविला ( मत्स्य. ४. ३-२० ).

उःशापाचें कारण जरा निराळें देऊन त्यास राहण्यास स्त्रियांचे नेत्रकटाक्ष, मांड्या, स्तन, नाभि, स्कंद, अधरोष्ठ, वसंतऋतु, कोकिलरव, चंद्रिका, वर्षाऋतु, चैत्रमास व वैशाख-मास हीं द्वादशस्थानें दिलीं ( स्कंद. ५. २. १२ ).

एकदां ब्रह्मानें ८ व्या वर्षी प्रभासक्षेत्रीं यज्ञ केला. त्या वेळीं यज्ञांतील कामें इंद्रादिकांकडे सोंपविलीं होतीं. ब्राह्मणसेवा इंद्राकडे, दक्षिणा देणें कुबेराकडे व मुख्य व्यवस्था विष्णूकडे होती. ऋत्विजांत ब्रह्मगणांत ब्रह्मा, ब्राह्मणाच्छंसी, होता, आग्नीध्र असे अनुक्रमें नारद, गौतम (गर्ग), देवगर्भ (व्यास), देवल (भरद्वाज), उद्गातृगणांत उद्गाता, प्रत्युद्गाता (प्रस्तोता), प्रतिहर्ता, सुब्रह्मण्य हे अनुक्रमें अंगिरस् मरीचि (गोभिल), पुलह (कौथुम), नारायण (शांडिल्य), अत्रि (अंगिरस्), होतृगणांत होता, मैत्रावरुण (ऋत्विज्), अच्छावाच्, ग्रावा (ग्रावस्तुद्) हे अनुक्रमें भृगु, वसिष्ठ (मैत्रावरुण), क्रतु (मरीचि), च्यवन (गालव), अध्वर्युगणांत अध्वर्यु, प्रतिष्ठिता (प्रस्थाता), नेष्टा व उन्नेता हे अनुक्रमें पुलस्त्य, शिबि (अत्रि), बृहस्पति (रैभ्य), अंशपायन (सनातन); व बाकीचे ऋषि सदस्य होते. ब्रह्मानें दीक्षा घेऊन यज्ञास आरंभ करण्याकरितां सावित्रीस बोलाविलें. पण ती कांहीं कामांत असल्यामुळें तिला थोडा उशीर झाला. दुसरें कारण असें कीं, पुरुषसमुदायांत तिला एकटीस येण्यास लाज वाटून ती लक्ष्म्यादि स्त्रियांस बोलावण्यास गेली. यामुळें हा रागावला व यानें इंद्रास दुसरी स्त्री आणावयास सांगितलें. त्यानें एका गवळ्याची पोर आणिली. तीच गायत्री नांवानें ब्रह्मदेवाची स्त्री झाली. यज्ञ चालू असतां तेथें अपवित्र रूप धारण करून शंकर आला आणि त्यानें आपलें कपाल तेथेंच मंडपांत ठेविलें. तें फेंकून देण्याचा प्रयत्न ऋत्विजांपैकीं एकानें केला. पण त्या जागीं लाखों कपालें उत्पन्न झालीं! तेव्हां हें कृत्य शंकराचें असें वाटून त्यांनीं त्याची स्तुति करून कृपा संपादन केली. या वेळीं ब्रह्मास त्यानें वर देऊं केला. पण यज्ञदीक्षा घेतल्यामुळें वर घेतां येत नाहीं म्हणून आपणच शंकराला वर देऊन आपल्या उत्तरेस जागा दिली. दुसऱ्या दिवशीं एका बटूनें सहज यज्ञमंडपांत एक सर्प सोडिला व त्यानें होत्यांस वेढा घातला. तेव्हां सर्व सदस्यांनीं बटूस 'सर्प हो' असा शाप दिला. पण तो बटु शंकराराधनेनें मुक्त झाला. तिसऱ्या दिवशीं एक विद्वान् अतिथि आला व त्यानें 'आपण सर्वांपासून गुण तेवढे घेतले म्हणून विद्वान् झालों' असें सांगितलें. त्यामुळें त्याचा ब्रह्मदेवानें सत्कार केला. पुढील कामें यथासांग झालीं. हा यज्ञ सहस्रयुग म्हणजे याचें सुमारें अर्धे वर्ष चालू होता (स्कंद. ६. १९४). यज्ञसमाप्तीच्या सुमारास सावित्री तेथें आली व तिनें एकंदर प्रकार पाहून रागानें तेथल्या सर्वांना शाप दिले. ब्रह्मदेवास तुझी पूजा कोणी करणार नाहीं (स्कंद. ७.१.१६५), इंद्रास त्याचा नेहमीं पराजय होईल व कारागृहवास भोगावा लागेल. विष्णूस भृगु शाप देईल, स्त्रीस राक्षस हरण करील व पशूचें दास्य करावें लागेल, रुद्रास ब्राह्मण शाप देऊन पौरुष नष्ट होईल, अग्नीस अपवित्र पदार्थांनीं ज्वाला अधिक भडकतील, ब्राह्मणांस लोभी व परान्नपुष्ट होतील, पाप्यांकडेहि यज्ञास जातील व द्रव्य गांठीं बांधण्याचा प्रयत्न करतील, असे प्रमुखांस शाप देऊन ती परतली. तिजबरोबर इतर देवस्त्रिया जाईनात म्हणून तिनें त्यांनाहि शाप दिला कीं, तुम्ही वांझ व्हाल. शिवाय लक्ष्मीस चंचल राहून मूर्ख, म्लेच्छ, आग्रही व अभिमानी अशा लोकांची संगति करशील, व इंद्राणीस तुझ्या मागें नहुष लागेल व तेवढ्याकरितां बृहस्पतीच्या येथें लपून बसावें लागेल, असे शाप देऊन ती निघून गेल्यावर गायत्रीनें त्या सर्वांस वर दिले. ब्रह्मदेवाची पूजा करणारास सर्व सुखें व मोक्ष प्राप्त होईल. इंद्राचा शत्रूंनीं पराभव केला तरी ब्रह्मदेवाच्या मदतीनें पूर्वावस्था प्राप्त होईल. विष्णूस मनुष्यजन्म घेऊन पत्नीविरह सहन करावा लागला तरी शत्रूंचा तो निःपात करील व लोकांत पूज्य होईल. शंकराची पूजा करणारांचा उद्धार होईल. अग्नि तृप्त झाला कीं, देव तृप्त होतील. लक्ष्मी सर्वांस हवीशी वाटेल. तिच्या योगानें लोक तेजस्वी होतील. देवस्त्रियांस संतति नसतांहि वाईट वाटणार नाहीं (पद्म. सृ. १७).

यानें शंकरप्रसादानें पुलोमा दैत्यास ठार केलें (स्कंद. ५.२.६६). शंकरानें याचें पांचवें मस्तक तोडिलें. याचीं कारणें अशीं:—शंकराची स्तुति करून त्यास यानें आपला पुत्र होण्यास सांगितलें. त्यामुळें रागावून शंकरानें यास 'तुझा पुत्र होईन पण तुझें पांचवें मस्तक तोडीन' असा शाप दिला. याजपासून उत्पन्न झालेल्या नीललोहिताची यानें इतर सृष्टयुत्पत्तीपूर्वी स्तुति केली नाहीं म्हणून 'तुझें पांचवें शिर लवकरच तुटेल' असा शाप मिळाला. याच्या पांचव्या शिरानें सर्व देवांचें तेज हरण केलें. 'मी तुझा जन्म जाणतों' असें म्हणून आपण श्रेष्ठ व शंकर कनिष्ठ, असें यानें त्यास दाखविण्याचा प्रयत्न केला, म्हणून रागावून शंकरानें याचें पांचवें मस्तक आपल्या आंगठ्याच्या नखानें खुडून टाकिलें (मत्स्य. १८३. ८४-८६). पण यामुळें त्यास ब्रह्महत्या लागली. तिचा नाश त्यानें तें कपाल कपालीतीर्थांत टाकल्यामुळें झाला. आपलें पांचवें मस्तक तुटल्याचें पाहून चारी कपालांचा घाम यानें भूमीवर झाडला व त्यापासून एक पुरुष उत्पन्न करून शंकरावर सोडिला. त्यानें त्यास विष्णूकडे नेलें व विष्णूचे स्वाधीन केलें (पद्म. सृ. १५; स्कंद. ५. १. ३-४).

तारकासुर जेव्हां देवांस अतिशय त्रास देऊं लागला त्या वेळीं सर्व देवांच्या त्रासाचें निराकरण व्हावें म्हणून स्कंदाची माता, हिमवताची कन्या व शंकरपत्नी होण्यास आपणांपासून

पूर्वीच उत्पन्न झालेल्या निशा उर्फ विभावरी हिला यानें पाठविलें ( मत्स्य. १५४. ४७-७२ ).

दक्षकन्या सती हिच्या रूपानें हा मोहित झाल्यामुळें शंकर यास मारण्यास प्रवृत्त झाला, पण विष्णूनें त्यास निवारिलें. पण ब्रह्मयास रुद्रशिर असें स्वरूप प्राप्त होऊन विरूपतेमुळें जगावर अपूज्यत्व आलें ( शिव. रुद्र. स. २० ).

रुद्रानें आपली मुलगी संध्या ही दाखवून ब्रह्मयास मोहित करून याच्या पुत्रांकडून याची फजिती करविली. ती सहन न होऊन शंकरास मोहित करण्याकरितां सतीस उत्पन्न करवून त्याचा दक्षादिकांकडून यानें अपमान करविला. यानें विष्णु, रुद्र वगैरेंप्रमाणें अनेक तीर्थें व क्षेत्रें स्थापन केलीं. ब्रह्मयानें इंद्रद्युम्नाच्या विनंतीवरून जगन्नाथक्षेत्राची स्थापना केली ( स्कंध. २. २. २३ ).

याची मुलगी सरस्वती ही याचे दर्शनार्थ रोज येत असे. एकदां पुरूरवाहि याच्या दर्शनास आला होता. तो तिला पाहून कामातुर झाल्यामुळें ऊर्वशीकडून तिला आणवून तिजशीं संगत झाला. हें पाहून ब्रह्मयानें तिला नदी होण्याचा शाप दिला. पुनः ऊर्वशीच्या मध्यस्थीनें पुण्यनदी होण्याबद्दल उःशाप मिळाला ( ब्रह्म. १०१ ).

त्रिपुरासुराचा वध करण्याकरितां निघालेल्या शंकराचें सारथ्य यानें केलें होतें ( म. क. २७. १९ कुं. ). याचें आयुर्मान शंभर वर्षें आहे. या वर्षाचें कोष्टक येणेंप्रमाणें आहे.

१७२८००० वर्षें = कृतयुग
१२९६००० वर्षें = त्रेतायुग
८६४००० वर्षें = द्वापरयुग
४३२००० वर्षें = कलियुग
कृत, त्रेता, द्वापर व कलि = पर्याय
१००० पर्याय = ब्रह्मयाचा दिवस अथवा कल्प.
हे ३६० दिवस = १ वर्ष

अशीं सध्यां याचीं पन्नास वर्षें म्हणजे १ परार्ध निघून गेलें आहे व दुसरें सुरू आहे ( पद्म. स. ३; स्कंद. ७. १. १०४ ). याचा रात्रीचा काल म्हणजेच नैमित्तिक प्रलयाचा काल ( भा. ३. ११. २२-३५; १२. ४. २; विष्णु. १. ३. ११-२६; मत्स्य. १४२ ). कल्पाचे आरंभीं जो यानें अवतार घेतला असेल तेंच त्या कल्पाचें नांव असतें. ब्रह्मदेवाचें एक वर्ष म्हणजे विष्णूचा एक दिवस. याचप्रमाणें विष्णूचें एक वर्ष झालें कीं शंकराचा एक दिवस होतो ( स्कंद. ६. १९४ ).

याचा एक वास्तुशास्त्रावर ग्रंथहि आहे ( मत्स्य. २५२. २ ). दंडनीति नांवाचाहि एक लक्ष अध्यायांचा एक ग्रंथ यानें केला होता. तो पुढें दहा हजार अध्याय करून शंकरानें संक्षिप्त केला व वैशालाक्ष नांवाचा झाला. इंद्रानें पांच हजारांत आणून बाहुदन्तक असें नांव ठेविलें. बृहस्पतीनें त्याचे तीन हजार अध्याय करून ते आणखी संक्षिप्त केले. त्यानंतर शुक्रानें तो एक हजार अध्यायांत आणिला. पुढें त्याचें आणखीहि संक्षिप्त स्वरूप झालें आहे ( म. शां. ५८. ८१ कुं.; प्रजापति पहा ).

**ब्रह्मबल**—ब्रह्मबलीचें नामांतर.

२ वसिष्ठकुलोत्पन्न एक गोत्रकार.

३ ऋग्वेदी ब्रह्मचारी.

**ब्रह्मबलि**—व्यासाच्या अथर्वन्शिष्यपरंपरेंतील देवदर्शाचा चारांपैकीं एक शिष्य.

**ब्रह्मबलिन्**—वसिष्ठकुलांतील एक ऋषि.

**ब्रह्मभक्त**—( सो. ) भविष्यमतें धर्मपालाचा पुत्र. यानें २७०० वर्षें राज्य केलें.

**ब्रह्ममालिन्**—वसिष्ठकुलांतील गोत्रकारगण.

**ब्रह्मरात**—याज्ञवल्क्याचा पिता ( विष्णु. ३.५.२; ३ देवरात पहा ).

२ शुकाचें नामान्तर ( भा. १.९.८ ).

**ब्रह्मराति**—याज्ञवल्क्याचें पैतृक नांव.

**ब्रह्मवत्**—भृगुकुलांतील ऋषि व मंत्रकार.

**ब्रह्मवादिनी**—प्रभास नामक वसूची स्त्री.

**ब्रह्मवाह**—याला सुप्रसिद्ध याज्ञवल्क्य नांवाचा पुत्र होता ( वायु. १.६०.४१ ).

**ब्रह्मवृद्धि छंदोगमाहकि**—मित्रवर्चस् स्थैरकायनाचा शिष्य ( वं. ब्रा. १ ).

**ब्रह्मशत्रु**—रावणपक्षीय एक राक्षस ( वा. रा. सुं. ५. ५४ ).

**ब्रह्मसावर्णि**—एक मनु. हा ब्रह्म व दक्षकन्या सुव्रता यांचा पुत्र. हा चाक्षुष मन्वंतरांत जन्मला ( वायु. २. ८. ४२; दक्ष पहा ). भागवतांत हा उपश्लोकाचा पुत्र असें म्हटलें आहे ( भा. ८. १३. २१ ). मार्कंडेयपुराणांत हा ब्रह्मयाचा पुत्र होईल असें म्हटलें आहे ( ९१. ११ ). हा दहाव्या मन्वंतराचा अधिपति मनु होय. देवीभागवतांत हें मेरुसावर्णि मन्वंतर म्हटलें असून याचा अधिपति वैवस्वताचा पुत्र पृषध्र हा दिला आहे ( १०.१३ ).

**ब्रह्मसूनु**—अकराव्या मन्वंतराचा अधिपति मनु ( मत्स्य. ९; मनु पहा ).

**ब्रह्महत्या**—शंकरानें उत्पन्न केलेली स्त्री. भैरवानें ब्रह्मदेवाचें मुण्डकें उडविलें, तेव्हां ही शंकरानें उत्पन्न केली व हिला भैरवाच्या मागें जाण्यास सांगितलें. हिचा उत्सव फक्त काशींत

होत नाहीं बाकी पवित्र होतो. अर्थात् हें अलंकारिक वर्णन आहे ( शिव. शत. ८ ).

**ब्रह्महन्**—अनायुषापुत्र वृषाचा पुत्र.

**ब्रह्मातिथि काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ५ ).

**ब्रह्मानंद**—परिमलाचा पुत्र. हा अर्जुनाचा अंश होता ( भवि. प्रति. २. १ ).

**ब्रह्मापेत**—अश्विन महिन्यांत सूर्याबरोबर फिरणारा एक राक्षस ( भा. १२. ११. ४३ ). हा ब्रह्मधानाचा पुत्र होय ( ब्रह्मांड. ३. ७.९८ ).

**ब्रह्मावर्त**—( स्वा. प्रिय. ) ऋषभ व जयंती यांचा पुत्र ( भा. ५. ४. १० ).

**ब्रह्मिष्ठ**—( सो. नील. ) मत्स्य व वायु यांच्या मतें मुद्गलाचा पुत्र. याची स्त्री इंद्रसेना.

**ब्रह्मेष्टिवर्धन**—भविष्यमतें ब्रह्मभक्ताचा पुत्र. यानें २७०० वर्षें राज्य केलें.

**ब्राह्मण**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**ब्राह्मपुरेयक**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण. याबद्दल ब्रह्मकृतेजन असा पाठ आहे.

**ब्राह्मी**—गोपालक देशच्या दलवाहन राजाची कन्या. हिला देवकी नांवाची एक बहीण होती. ही वत्सराजास दिलेली होती ( भवि. प्रति. ३. ९ ).

## भ

**भक्षक**—एक शूद्र. हा अत्यंत पापी होता. एकदां तहानेनें व्याकुल झाला असतां हा तुळशीच्या आळ्यांतलें पाणी प्याला. त्या पुण्यानें याचा उद्धार झाला. त्याच वेळीं यास एका व्याधानें ठार केलें. हा पूर्वजन्मीं एक राजा होता. त्या वेळीं यानें एका सुंदर स्त्रीचें हरण केलें. यामुळें पुढें यानें या लोकीं बऱ्याच यातना भोगल्या होत्या ( पद्म. ब्र. २२ ).

**भग**—रुद्रानें प्रजापतीचा वेध केला, तेव्हां त्या यज्ञांतील भाग दक्षिणेकडे असलेल्या याच्याकडे आणिला असतां त्याकडे पाहिल्यानें याचे डोळे गेले ( श. ब्रा. १. ७. ४ ). ही एक ऐश्वर्याची देवता आहे ( ऋ. ७. ४१ ). उषा ही याची बहीण आहे ( ऋ. १. १२३.५ ).

दक्षाच्या यज्ञांतील ऋत्विज. यानें शिवाची निंदा करणाऱ्या दक्षास डोळ्यांनीं खुणवून ' ठीक करतोस ' असें सुचविलें; म्हणून याचे नेत्र वीरभद्रानें बाहेर काढिले ( भा. ४.५ १७–२० ). रुद्रानें याचे नेत्र फोडले (म. अनु. २६५.१८ कुं.). हा शंकरास शरण गेल्यावरून ' तूं मित्राच्या डोळ्यांनीं पाहशील' असा यास वर मिळाला ( भा. ४. ७. ३; विवस्वत् पहा ). याची स्त्री सिद्धि. तिजपासून यास महिमा, विभु, प्रभु हे पुत्र व आशि नामक कन्या झाली ( भा. ६. १८.२; ६.६ ३९ ).

२ एक आदित्य ( म. आ. ६६. १५ कुं. ). हा माघांत प्रकाशतो व याचीं किरणें ११०० आहेत ( भवि. ब्राह्म. १. ७८ ). पण हा पौषमासीं प्रकाशतो व त्याबरोबर स्फूर्ज, राक्षस, अरिष्टनेमि गंधर्व, ऊर्ण, यक्ष, आयु ऋषि, कर्कोटक नाग व पूर्वचित्ति अप्सरा हीं असतात ( भा. १२.११.४२ ).

३ एकादश रुद्रांपैकीं एक

**भगदत्त**—प्राग्ज्योतिष देशाचा अधिपति नरकासुर भौमासुर व भूमि यांचा पुत्र ( म. द्रो. २९. १ कुं. ). एकदां भौमासुरानें इंद्राचीं कवचकुंडलें हरण करून नेलीं. तेव्हां कृष्णाचें व याचें युद्ध होऊन कृष्णानें यास व याच्या सात पुत्रांस ठार मारिलें; परंतु भूमीनें कृष्णापासून भगदत्तास अभय मागितलें. त्यामुळें भगदत्त जिवंत राहिला ( भा. १०. ५९ ).

हा बापाचे मागून प्राग्ज्योतिष देशाचा अधिपति झाला. याच्या राजधानीचें नांव प्राग्ज्योतिषपुर असें होतें. भगदत्तास चीन, किरात इ. देशांचा आश्रय असे. पांडवांच्या राजसूय यज्ञाचे वेळीं अर्जुनानें यास जिंकून याच्याकडून बरीच संपत्ति आणली ( म. स. २७ कुं. ). याचा कर्णानें कर्णदिग्विजयाचे वेळीं पराजय केला ( म. व. २५४; म. द्रो. २६. १९; म. भी. ६४.२० कुं. ). यानें भीमाबरोबर युद्ध केलें. चीन व किरात यांच्यासह भारतीय युद्धांत भगदत्त कौरवांकडे होता ( म. उ. १९.१६ कुं. ). हा गजयुद्धांत प्रवीण होता. यानें बराच पराक्रम केला व अर्जुनाशीं पुष्कळ लढून त्याच्यावर वैष्णवास्त्र सोडिलें. परंतु अर्जुनानें त्या अस्त्राचा नाश करून याच्या पापण्यांचा पट्टा तोडून यास ठार मारिलें ( म. द्रो. २९ ). वृद्धपणामुळें याच्या पापण्या अतिशय मोठ्या झाल्यामुळें याला तोलत नसत, म्हणून हा पापण्यांना पट्टा लावून डोळे उघडी. ही गोष्ट मार्गशीर्ष वद्य दशमीस झाली ( भारतसावित्री ).

भगदत्तास कृतप्रज्ञ व वज्रदत्त असे दोन पुत्र होते. कृतप्रज्ञ भारतीय युद्धांत नकुलाचे हातून मरण पावला ( म. क. २ ). व वज्रदत्तानें अर्जुनाशीं युद्ध केलें ( म. आ. ७५ ).

प्राग्ज्योतिष म्हणजे हल्लींचा आसाम देश होय. आसामांत सध्यांहि बरेच हत्ती आहेत. त्यामुळें भगदत्त गजयुद्धनिपुण होता, यांत मुळींच आश्चर्य दिसून येत नाहीं. यासच भौमासुर असें मातृक नांव असावें. परंतु यालाच भौमासुरपुत्र असें म्हटलें आहे ( भा. १०. ५९ ). हा पांडूचा मित्र होता (म. स. १४. १५ कुं.; घटोत्कच पहा ).

**भगधर**—( सो. ऋक्ष. ) वायुमतें वियोपरिचराचा पुत्र.

**भगपाद**—अत्रिकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**भगवत्**—तुषित देवांपैकीं एक.

**भगवत् औपमन्यव कारडि**—जैमिनिगृह्यसूत्रांतील उपाकर्मांग तर्पणांत याचा निर्देश आहे. हा सामवेदी आचार्य असावा ( जै. गृ. १. १४ ).

**भगीरथ**—( सू. इ. ) दिलीपाचा पुत्र. याच्या बापाचें नांव अंशुमान् असें आहे. सगराच्या साठ हजार पुत्रांना सद्गति मिळाली नव्हती. तेव्हां त्यांच्या उद्धारार्थ कपिलाचे सांगण्यावरून गंगा पृथ्वीवर आणण्याकरितां अंशुमान् व दिलीप यांनीं तप केलें. परंतु त्यांचा प्रयत्न अर्धवटच राहिला. म्हणून भगीरथानें हिमालयावर जाऊन गंगाप्राप्त्यर्थ कडकडीत तपश्चर्या आरंभिली. तींत याला यश येऊन गंगेनें यास दर्शन दिलें व तिनें स्वर्गावरून पृथ्वीवर पडणारा गंगाप्रवाह धारण करण्याकरितां शंकरास प्रसन्न करून घेण्यास सांगितलें. तेव्हां भगीरथानें शंकराची आराधना करून त्यास प्रसन्न करून घेऊन आपल्या जटेंत गंगाप्रवाह धारण करावयास लाविलें. नंतर त्यानें एक केंस तोडून गंगाप्रवाहास वाट दिली. गंगेच्या या प्रवाहास ‘ अलकनंदा ’ म्हणतात. नंतर भगीरथानें गंगेस आपल्या मागून येण्यास सांगून ज्या ठिकाणीं कपिल मुनीनें दग्ध केलेल्या पितरांची राख पडली होती, त्या ठिकाणीं गंगाप्रवाहास नेऊन पितरांचा उद्धार केला ( म. व. १०८ कुं; वा. रा. बा. १. ४२–४४; भा. ९. ९; वायु. १. ४७; २. २६. १६८; ब्रह्म. ७८; पद्म. उ. २१; विष्णु. ४. ४); यामुळें भागीरथी ही याची कन्या समजतात ( ह. वं. १. १५; नारद. १. १५; ब्रह्मवै. १. १० ). नारदानें संजयाला याचें चरित्र सांगितलें आहे ( म. द्रो. ६०; शां. २८. ६३-७० कुं. ).

‘ भगीरथानें आणलेला गंगाप्रवाह शंकराच्या जटेंत अडकून बसला व तो सगरानें शंकरप्रार्थना करून त्या ठिकाणापासून खालीं काढविला ’ ( पद्म. उ. २१ ), हें चूक असावें.

गंगा पृथ्वीवर आणल्यावर भगीरथ पुनः पूर्ववत् राज्य करूं लागला. हा अत्यंत धार्मिक व दानशील होता. यानें हंसी नांवाची आपली कन्या कौत्स नांवाच्या एका ब्राह्मणास दान केली होती ( म. अनु. २००. २६ कुं. ).

भगीरथास नभ अथवा नाभाग व श्रुत असे दोन पुत्र होते. याच्या मागून श्रुत गादीवर बसला ( भा. १२. ३. ). भगीरथ ऐक्ष्वाक व हा एक असावा. हा शिवभक्त होता. यानें ३०६०० वर्षें राज्य केलें.

यानें भागीरथीच्या तीरावर घाट बांधले. यानें हजारों सालंकृत कन्या ब्राह्मणांस दान दिल्या. हा यज्ञ करून अपार दक्षिणा देत असे. याच्या यज्ञाला देव येत असत ( म. द्रो. ६० कुं. ). यानें हजारों गाई दिल्याचा निर्देश आहे ( म. अनु. २००. २७ कुं. ). याचा एका ब्राह्मणाबरोबर धर्मविषयक संवाद झाला ( म. अनु. १६० कुं. ).

२ हा द्रौपदीस्वयंवरास आला होता ( म. आ. २०१. २१ कुं. ).

**भगीवसु**—वसिष्ठकुलांतील प्रवर. याबद्दल भार्गिवसु असा पाठ आहे.

**भगेरथ ऐक्ष्वाक**—यानें यज्ञ आरंभला व ‘ काय जाणलें असतां सर्व जाणल्यासारखें होतें ’ असा प्रश्न केला. तेव्हां याला कुरुपंचालांपैकीं बकदाल्भ्य यानें उत्तर म्हणून गायत्रीची माहिती सांगितली ( जै. उ. ब्रा. ४. ६-७ ).

**भङ्ग**—सर्पसत्रांत दग्ध झालेला तक्षककुलांतील सर्प ( म. आ. ५७. ९ कुं. ).

**भङ्गकार**—अविक्षिताचा पुत्र (म. आ. १०१. ४१ कुं.).

२ ( सो. वृष्णि. ) मत्स्यमतें शक्तिसेनाचा पुत्र. वायुमतें शक्रजिताचा पुत्र. याची स्त्री द्वारवती ( म. आ. २३९. ११ कुं.; वायु. २. ३५. ३–६ ). यास सत्यभामा व्रतिनी व पद्मावती ( प्रस्वापिनी, तपस्विनी ) अशा तीन मुली होत्या ( ह. वं. १. ३८; मत्स्य. ४५. १९-२१ ). याची स्त्री वीरवती ( मत्स्य. ४५. १९; ब्रह्मांड. ३. ७१. ५४-५६). यास सभाक्ष व नावेय किंवा तारेय असे दोन पुत्र होते ( ह. वं. १. ३८; ब्रह्म. १६. ४८ ).

**भङ्गश्रवस्**—एक आचार्य ( क. सं. ३८. १२ ). भज्ञश्रवस् व हा एक असण्याचा संभव आहे.

**भङ्गाश्विन**—ऋतुपर्णाच्या पित्याचें नांव ( बौ. श्रौ. २०. १२ ). ऋतुपर्ण कयोवधि हेच भंग्याश्विनौ होत (आप. श्रौ. २१. २०. ३ ). याला भांगासुरि ( म. स. ८. १५ कुं. ) व भागस्वरि असें ऋतुपर्णाला म्हटलें आहे (म. व. ६८-२; ६९. १३ कुं. ).

**भङ्गास्वन**—एक राजर्षि. यास पुत्र नव्हता म्हणून यानें पुत्रप्राप्त्यर्थ अग्निष्टोम यज्ञ केला. या यज्ञांत अग्नि हीच देवता मुख्य असून इंद्रास कोणत्याहि तऱ्हेनें हविर्भाग मिळत नसल्यानें इंद्रास आपला अपमान करण्याकरितांच मुद्दाम यानें

अग्निष्टोम यज्ञ केला. तस पाहून इंद्र भंगास्वनाचा सूड घेण्याची संधि पाहूं लागला. कांहीं कालानें याला अग्निप्रसादानें शंभर पुत्र झाले.

एकदा भंगास्वन ससैन्य शिकारीस गेला असतां वाट चुकून एका अरण्यांत शिरला. त्या ठिकाणीं एक सुंदर सरोवर पाहून याला स्नान करण्याची इच्छा झाली व हा सरोवरांत उतरला. ही संधि बरी आहे असें पाहून इंद्रानें याला एकदम स्त्रीरूप केलें. तेव्हां आपण विकृतरूप झालों असें पाहून याला वाईट वाटलें व हा पुत्रांवर राज्यभार टाकून वनांत गेला.

वनांत गेल्यावर स्त्रीरूप भंगास्वनानें एका तपस्व्याशीं लग्न केलें व त्याच्याबरोबर हा आनंदानें संसार करूं लागला. पुढें याला त्या तपस्व्यापासून शंभर पुत्र झाले. त्या पुत्रांना यानें आपल्या पहिल्या पुत्रांकडे पाठविलें व त्यांना राज्यांतील योग्य विभाग देवविला. याप्रमाणें बराच काल आनंदांत गेला. पण भंगास्वन, आपण पीडा दिली तरीहि आनंदांतच आहे हें इंद्रास पाहवलें नाहीं व त्यानें ब्राह्मणवेषानें याच्या राज्यांत जाऊन याच्या दोनशें मुलांत कलह उपस्थित करून त्यांचा नाश करविला. आपले सर्वहि पुत्र नष्ट झाले हें ऐकून याला अतिशय दुःख झालें व हा आक्रोश करूं लागला. ब्राह्मणवेषधारी इंद्र तेथें जवळच उभा होता. त्याला याची दया येऊन त्यानें यास प्रत्यक्ष दर्शन दिलें. तेव्हां हा इंद्रास शरण गेला व इंद्रानें याच्या विनंतीवरून याचे दोनशेंहि पुत्र जिवंत केले. पुढें इंद्रानें 'तुझें पूर्वीचें पुरुषत्व पाहिजे का?' म्हणून विचारिलें असतां, यानें 'स्त्रियांच्या अंगीं कोमलता व मोहकपणा हे दोन गुण वास करीत असल्यानें मला स्त्रीत्वच जास्त प्रिय आहे,' असें सांगितलें व मरणापर्यंत हा स्त्रीरूपच राहिला ( म. अनु. १२ ). याला भांगस्वन असें नामांतर आहे.

**भंग्यश्रवस्**—कदाचित् हा राजा असावा ( तै. आ. ६. ५. २ ).

**भज**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें शाकवैण रथीतराचा शिष्य ( व्यास पहा ).

**भजमान**—( सो. क्रोष्टु. ) सत्वताचा पुत्र. भजमानपिता अंधकाचा भाऊ. यास बाह्यका व सृंजया अशा दोन स्त्रिया होत्या. पैकीं बाह्यकेस शताजित्, सहस्राजित् व अयुताजित् असे तीन पुत्र होते व सृंजयेस निम्लोचि, वृष्णि, व किंकिण असे तीन पुत्र होते ( भा. ९. २४. ६-८ ).

२ ( सो. क्रोष्टु. ) सत्वतपुत्र सात्वत किंवा अंधक याचा हा पुत्र.

३ ( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें विदूरथाचा पुत्र.

**भजिन्**—( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें सात्वताचा पुत्र.

**भजेरथ**—अगस्त्य, असमाति व इक्ष्वाकु यांच्यासह याचा उल्लेख आला आहे ( ऋ. १०. ६०. २ ). हा असमातीचा शत्रु अथवा पूर्वज आहे ( ऋ. १०. ६०. ५ सायण ).

**भज्य**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील बाष्कलीचा शिष्य. बाष्कलीनें याला वालखिल्यसंहिता शिकविली (भा. १२. ६. ६० ).

**भट्टादित्य**—सूर्यदेवता नारदभट्टानें पृथ्वीवर लोकांकरितां आणिली, म्हणून हिला भट्टादित्य म्हणतात ( स्कंद. २. ४३ ).

**भट्टोजी**—कृष्णचैतन्याचा शिष्य. यानें सिद्धांतकौमुदी लिहिली. हा शैव होता. वेदशर्म्याच्या येथें यानें कार्यगुण नांवानें जन्म घेतला. सूत्रपाठाचें खंडन करणारे, धातुपाठाचें अध्ययन निराळ्याच तऱ्हेनें करणारे व स्वर आणि वर्ण याचा अर्थभ्रंश करणारे यांचा यानें पराभव केला ( भवि. प्रति. ४. ८. १०४; २०. १-१० ).

**भद्र**—कश्यप व दनु यांच्या पुत्रांपैकीं एक(धर्मगुप्त पहा).

२ तुषितदेवांपैकीं एक.

३ उत्तम मन्वंतरांतील एक देव.

४ वसिष्ठकुलोत्पन्न इंद्रप्रमति ऋषीचा पुत्र. याचा पुत्र उपमन्यु.

५ ( सो. अनु. ) भागवतमतें शिबि राजाच्या पांच पुत्रांपैकीं एक. यास भद्रक व मद्रक असें म्हटलें आहे.

६ ( सो. वसु. ) भागवतमतें वसुदेव व पौरवी यांचा एक पुत्र.

७ ( सो. वसु. ) वसुदेव व देवकी यांच्या पुत्रांतील एक.

८ चेदि देशचा पांडवपक्षीय राजा. यास कर्णानें ठार मारिलें ( म. क. ५१. ४९ कुं. ).

९ कृष्ण व कालिंदी यांचा एक पुत्र (भा. १०. ६१. १४).

१० ( शुंग. भविष्य. ) ब्रह्मांडमतें वसुमित्राचा पुत्र. यानें दोन वर्षे राज्य केलें.

११ नागशर्मा ब्राह्मणाच्या १०० पुत्रांपैकीं एक. पूर्वजन्मीं हा शूद्र होता. पण द्रव्य चोरण्याच्या निमित्तानें यानें कार्तिकांत एके दिवशीं सूर्यमंदिरीं दिवा लाविला. तथापि द्रव्य चोरावयास मिळालें नाहीं. पण दिवा लावण्याच्या पुण्यानें याला हा जन्म आला ( भवि. ब्राह्म. ११८ ).

**भद्रक**—( ५ भद्र पहा ).

२ ( शुंग. भविष्य. ) भागवतमतें वसुमित्राचा पुत्र.

३ एक आचारभ्रष्ट ब्राह्मण. यानें तीन दिवस प्रयागांत माघस्नान केलें. हा अवंती नगरींत आला. पुढें यास व अवंतीच्या वीरसेन नामक राजास एकाच दिवशीं मृत्यु आला. तेव्हां तो सोळा

अश्वमेध करणारा राजा व हा आचारभ्रष्ट पण तीन दिवस माघस्नात ब्राह्मण हे एकाच विमानांतून स्वर्गी गेले ( पद्म. उ. १२८ ).

**भद्रकल्प**—( सो. वसु. ) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

**भद्रगुप्ति**—( सो. वसु. ) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

**भद्रचारु**—श्रीकृष्ण व रुक्मिणी यांचा पुत्र.

**भद्रज**—( सो. वसु. ) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

**भद्रतनु**—एक दुराचारी ब्राह्मण. हा दान्ताच्या कृपेनें विष्णुभक्त होऊन मुक्त झाला ( पद्म. कि. १७ ).

**भद्रदेह**—( सो. वसु. ) विष्णुमतें वसुदेव व देवकी यांचा पुत्र.

**भद्रबाहु**—हिरण्यक्षाशीं देवांचें जें युद्ध झालें, त्यांत अग्नीनें दग्ध केलेल्या सात दैत्यांतील एक ( पद्म. सृ. ७५ ).

२ ( सो. वसु. ) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

**भद्रमति**—एक दरिद्री ब्राह्मण. एकदां यानें भूमिदान-माहात्म्य ऐकिलें, तेव्हां याला भूमिदान करण्याची इच्छा झाली. पण याच्याजवळ भूमि नसल्यानें हा कौशांबी नगरीस जाऊन तेथील राजापाशीं यानें ब्राह्मणांना देण्याकरितां भूमि मागितली व तिचें दान केलें. याला सहा बायका व दोनशेंचाळीस पुत्र होते ( नारद. १. ११ ). भूमिदान करून शिवाय वेंकटाचला-वरील पापनाशन तीर्थांत यानें स्नान करून हा मुक्त झाला ( स्कंद. २. १. २० ).

**भद्रमनस्**—कश्यप व क्रोधा यांच्या नऊ कन्यांपैकीं एक. हिला ऐरावत नांवाचा देवांचा हत्ति हा पुत्र होता ( म. आ. ६७.६० कुं. ).

**भद्ररथ**—( सो. वसु. ) वायुमतें वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

२ ( सो. अनु. ) हर्यंग राजाचा पुत्र.

**भद्रवती**—पहिल्या परीक्षिताची भार्या. हिचा पुत्र जनमेजय ( म. आ. ६३.८६ कुं. )

**भद्रवाह**—( सो. वसु. ) भागवतमतें वसुदेव व पौरवी यांचा पुत्र.

**भद्रविघ्न**—( सो. वसु. ) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

**भद्रविद्**—कंसानें मारिलेल्या वसुदेव व देवकी यांच्या पुत्रांपैकीं एक.

**भद्रशर्मन् कौशिक**—पुष्पयशस् औदत्रजीचा शिष्य. याचा शिष्य अर्यमभूति ( वं. ब्रा. ३ ).

**भद्रश्रवस्**—भद्राश्वखंडांतील धर्म ऋषीचा पुत्र. हा हयग्रीव मूर्तीची उपासना करीत असे ( भा. ५. १८.१).

**भद्रश्रेण्य**—( सो. सह. ) विष्णु व वायु यांच्या मतें महिष्मत् राजाचा पुत्र ( २ दिवोदास पहा). यानें दिवोदासाचा पराभव केला. पण दिवोदासानें यावर पुनः स्वारी करून याच्या दुर्दम नांवाच्या पुत्राखेरीज यासुद्धां सर्वांना ठार केलें. यास शंभर पुत्र होते ( ह. वं. १. २९; ३२ ). यास भद्रसेनक व रुद्रश्रेण्य म्हणत.

**भद्रसार**—( मौर्य. भविष्य.) वायु व ब्रह्मांड यांच्या मतें चंद्रगुप्ताचा पुत्र ( २ बिंदुसार पहा ).

२ (सो. वसु.) वसुदेवास रोहिणीपासून झालेला एक पुत्र.

३ काश्मीर देशाचा राजा. यास सुधर्मा नांवाचा पुत्र होता. तो तारक नांवाच्या प्रधानपुत्राच्या संगतीनें नेहमीं शिवभजनांत रत असे. यानें आपल्या पुत्रास शिवभक्तीपासून परावृत्त करण्याचा बराच प्रयत्न केला. पण तो निष्फळ झाला. एकदां पराशर याकडे आला असतां यानें पराशरास आपल्या पुत्राच्या विरक्तीचें कारण विचारिलें. तेव्हां पराशरानें याचा पूर्वजन्म सांगितला. नंतर पराशरानें याच्याकडून रुद्राभिषेक करविला व सुधर्म्यास आशीर्वाद देऊन तो निघून गेला. पुढें कांहीं कालानें हा सुधर्मास राज्यावर बसवून प्रधानाबरोबर वनांत निघून गेला ( स्कंद. ३. ३. २०–२१ ).

**भद्रसेन**—( स्वा. प्रिय. ) ऋषभदेवजयंती यांचा एक पुत्र.

**भद्रसेन आजातशत्रव**—याचा नाश होण्यासाठीं उद्दालक आरुणीनें अभिचाररूप याग केला ( श. ब्रा. ५. ५. ५. १४ ).

**भद्रसेनक**—( भद्रश्रेण्य पहा ).

**भद्रा**—मेरूची कन्या व प्रियव्रतपौत्र भद्राश्व याची स्त्री ( भा. ५. २. २३ ).

२ अत्रीची स्त्री ( ब्रह्मांड. ३. ८. ७४-८७ ).

३ कुबेराची स्त्री ( म. आ. २१६. ६ कुं. ).

४ सोमाची कन्या व उचथ्याची पत्नी. हिला एकदां वरुणानें पळवून नेलें होतें ( म. अनु. २५९. १० कुं. ).

५ वसुदेवाची एक स्त्री ( म. मौ. ८. १८ कुं.; भा. ९. २४. २५ कुं. ).

६ केकयाधिपति धृष्टकेतु व श्रुतकीर्ति यांची कन्या. ही कृष्णास दिली होती. ही कृष्णाची आतेबहीण होती ( भा. १०.५८. ५६ ). हिला संग्रामजित्, बृहत्सेन, शूर, प्रहरण, अरिजित, जय, सुभद्र, वाम, आयु आणि सत्यक हे दहा पुत्र व एक कन्या होती ( भा. १०. ६१. १ ).

७ व्युषिताश्व राजाची पत्नी.

**भद्रायु**—हा एक राजाचा मुलगा होता. याला कुष्ठ असल्यामुळें हा जिवंत असूनहि मेल्यासारखा होता. याला सोळावें वर्ष लागल्यावर याच्या घरीं ऋषभ नांवानें शंकराचा अवतार झाला. त्यानें याला राजधर्माचा उपदेश

...ऊन, खड्ग आणि शंख हीं याला दिलीं व याला भस्म लाविलें. याला बारा हजार हत्तींचें बल दिलें. त्यामुळें यानें अनेक शत्रु जिंकिले. याच्या बायकोचें नांव कीर्तिमालिनी ( शिव. शत. ४. २७ ). ऋषभ अवतार प्रवृत्तिमार्गी दिसतो. हा राज्य करीत असतां एका ब्राह्मणाची स्त्री शंकरानें वाघाचें रूप घेऊन पळविली. पण यानें आपली स्त्री ब्राह्मणास देऊन हा अग्निप्रवेश करूं लागला असतां शंकरानें प्रसन्न होऊन यास वर दिला ( स्कंद. ३. ३. १४ ). हा पूर्वजन्मींचा मंदर व कीर्तिमालिनी पिंगला होय. शेवटीं याला राज्यहि मिळालें ( स्कंद. ३. ३. १२; ९. १३ ).

**भद्रावती**—वृषकेतूची पत्नी भद्रा हिचें नामांतर.

**भद्राश्व**—( स्वा. प्रिय. ) अग्नीध्र व उपचित्ति यांचा पुत्र. मेरूची कन्या भद्रा याची स्त्री ( भा. ५. २. १९ ).

२ ( सू. इ. ) भागवत व महाभारत ( व. २०७. ३७ कुं. ) यांच्या मतें कुवलाश्वाचा पुत्र.

३ ( सो. नील. ) मत्स्यमतें पृथूचा पुत्र. यास हर्यश्व व भर्म्याश्व हीं नामांतरें आहेत.

४ ( सो. वसु. ) विष्णु व वायु यांच्या मतें वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

५ ( सो. पू. ) मत्स्यमतें अहंवर्चाचा पुत्र. यास रौद्राश्व असें नामांतर आहे. याच्या दहा मुली प्रभाकर ( आत्रेय ) यास दिल्या होत्या.

**भद्रेश्वर**—मध्य देशांत हा राजा होता. याच्या डाव्या हातावर कुष्ठ उत्पन्न झालें. तें यानें व याच्या प्रजेनें सूर्योपासना करून नष्ट केलें व यानें आपला उद्धार करून घेतला ( पद्म. सृ. ७९ ).

**भनस्यु**—( सो. ) भविष्यमतें प्रवीराचा पुत्र.

**भय**—अधर्म व निर्ऋति यांचा पुत्र.

२ द्रोण नामक वसु व अभिमति यांचा पुत्र ( भा. ६. ६. ११ ).

**भयंकर**—गुर्जर देशच्या मूलवर्मन् राजाचा पुत्र ( भवि. प्रति. ३. ३१ ).

**भयद आसमात्य**—एका राजाचें नांव ( जै. उ. ब्रा. ४. ८. ७ ).

**भयमान वार्षागिर**—एक राजा व मंत्रद्रष्टा ( ऋ १. १००. १७ ).

**भया**—हेति नामक राक्षसाची पत्नी. हिला विद्युत्केश नामक एक पुत्र होता ( वा. रा. उ. ४ ).

**भयानक**—जालंधर पक्षाकडील एक दैत्य ( पद्म. उ. ९ ).

**भर**—आर्ष्टिषेण व जया यांचा पुत्र. याच्या बायकोचें नांव सुप्रभा.

**भरणी**—प्राचेतस दक्षाची कन्या. ही सोमास दिली होती.

**भरत**—हें एखाद्या समाजाचें नांव असावें, असें ऋग्वेदांत येणाऱ्या बहुवचनी निर्देशावरून वाटतें ( ऋ. ३. ३३. ११-१२; ७. ३३. ६ ). विश्वामित्राचा भरताशीं चांगला संबंध दिसतो ( ऋ. ३. ५३. १२; ऐ. ब्रा. ७. ३ ). विश्वामित्रानें भरतांना विपाट्शुतुद्रीच्या संगमांतून वाट काढून दिली आहे ( ऋ. ३. ३३. ११ ). वसिष्ठ व भरद्वाज यांचाहि भरताशीं संबंध आहे. सुदास व दिवोदास हे भरत असावेत ( ऋ. ६. १६. १९ ). पण हे सूर्यवंशी असतीलच असें म्हणणें कठीण आहे. लोकांचें पोषण करणाऱ्या मनूला भरत म्हटलें असून त्यावरून देशाला व लोकांना भारत नांव पडल्याबद्दल दिलें आहे ( वायु. १. ४५. ७६ ).

२ ( स्वा. नाभि. ) नाभिपुत्र ऋषभाला इंद्रकन्या जयंतीचे पोटीं शंभर पुत्र झाले. त्यांत हा सर्वांत वडील होता. हा महायोगी असून गुणवान् होता. याच्याच नांवावरून या देशाला भारतवर्ष हें नांव पडलें ( भा. ५. ४; वायु. १. ३३. ५२; ब्रह्मांड २. १४. ६२; लिंग. १. ४७. २४; विष्णु. २. १. ३२ ). पुढें ऋषभ याला राज्याभिषेक करून वनांत गेला. बापानें राज्य करण्याची अनुज्ञा देतांच यानें विश्वरूपाची कन्या पंचजनी हिला वरिलें. यानें आपल्या बापाप्रमाणें प्रजेचें दयाळूपणानें पालन केलें. याची प्रजाहि आपापल्या धर्मानें वागे. यानें सर्व यज्ञकर्मांच्या प्रकृतिविकृतींचें पूर्ण ज्ञान संपादून व मोठमोठे यज्ञ करून यज्ञपुरुषाची आराधना केली. याप्रमाणें हा भक्तिमार्गावलंबी झाला व एक कोटि वर्षें राज्य करून हा तपाकरितां पुलहाश्रमीं गेला ( भा. ५. ७. ८ ).

त्यानंतर गंडकी नदीच्या तीरावरील पुलहाश्रमांत भरत सूर्यमंत्राचा जप करूं लागला. असें नित्य चालूं असतां एके दिवशीं एक हरिणी तृषाक्रान्त होऊन तेथें आली. ती मोठ्या घाईनें पाणी पीत आहे तोंच सिंहाची गर्जना झाली. तेव्हां भयानें कावरीबावरी झाल्यामुळें त्या हरिणीला देहभान राहिलें नाहीं. व ती नेत्र गरगर फिरवून एकदम उडी मारून चालती झाली. त्या वेळीं ती गरोदर होती. त्या उडीमुळें तिचा गर्भ नदीच्या प्रवाहांत पडला. तेव्हां त्या पाडसास भरतानें काढून आपल्या आश्रमांत नेलें. भरताच्या ध्यानींमनीं तें पाडस दिसूं लागलें. त्यामुळें याचा पूर्वक्रम अजिबात बंद पडला. अशा प्रकारें भरत कालक्रमणा करीत असतां एके दिवशीं मरण पावला. मरते वेळीं तें हरीण याच्या जवळच होतें. तेव्हां त्याचें

कसें होईल असा विचार याच्या मनांत येऊन हा शोकाकुल झाला. हरिणाच्या निदिध्यासामुळें याला मृगजन्म घ्यावा लागला.

याला पंचजनीपासून सुमति, राष्ट्रभृत, सुदर्शन, आवरण आणि धूम्रकेतु असे पांच पुत्र झाले ( भा. ५. ७. १-३ ). त्यांना यानें आपलें राज्य वांटून दिलें होतें. भरतापूर्वी या देशाला अजनाभवर्ष असें नांव होतें. पण भरतानंतर भारतवर्ष असें नांव पडलें.

या जन्मांत याला मागील जन्माची आठवण होती, म्हणून मागल्याप्रमाणें वेडेपणा न करितां हा आईबापांना सोडून पुलहाश्रमीं आला; आणि शाल वृक्षाच्या राईंत मृत्यूची वाट पाहत बसला. अखेरीस आपला मृत्युकाल जवळ आला असें कळतांच तीर्थोदकांत आकंठ बसून यानें मृगशरिराचा त्याग केला.

यानंतर अंगिराकुलांतील एका सद्गुणसंपन्न ब्राह्मणाच्या दुसऱ्या स्त्रीच्या पोटीं हा जडभरत म्हणून जन्माला आला. हा याचा शेवटचाच जन्म होय. याहि जन्मीं याला पूर्वजन्मींचें विस्मरण झालें नव्हतें. यापुढें जन्म येऊं नये म्हणून हा आपल्या बंधूंपासून अलिप्त राहूं लागला. कोणावरहि आपण प्रेम ठेविलें तर आपला नाश होईल, असें जाणून हा आपलें आचरण असें ठेवूं लागला कीं, लोकांनीं यास वेडा, मंदबुद्धि, अंध व बहिरा असें म्हणावें. यानें ईशचिंतन करून कर्मबंधाचा नाश केला. असें आचरण करीत असतांहि याच्या बापानें याच्या गृहस्थाश्रमापर्यंतच्या संस्कारांची योजना केली होती. प्रथम याचा उपनयनविधि केला. वेदशास्त्राचें शिक्षण देण्याचें ठरविलें. पण त्याचा उपयोग न होतां विनाकारण कालक्षेप होऊन याचा पिता प्राणास मुकला. त्या वेळीं भरताच्या आईनें सहगमन केलें. पुढें याच्या भावांनीं हा जडबुद्धि समजून याच्या शिक्षणाचा नाद सोडिला. कोणीहि याकडून काम करून घेई. हा कधीं वेठीला जाई, कधीं मजुरी करी, कधीं भिक्षा मागे व आपला उदरनिर्वाह करी. एके वेळीं राजदूतांनीं याला बलि देण्यासाठीं नेलें. पण देवीनें याची योग्यता ओळखून याचें संरक्षण केलें व चोरांचा नाश केला (भा. ५. ५-९; विष्णु. २. १३-१६). एकदां सिंधुसौवीर देशाचा राजा रहूगण हा कपिलाश्रमास ब्रह्मज्ञानाचा उपदेश ऐकण्याकरितां जात होता. तो इक्षुमती नदीच्या कांठावर येऊन पोहोंचला; तेव्हां तेथील अधिपतीला राजाची पालखी पुढें नेण्याकरितां भोई वेठीस धरणें प्राप्त झालें. त्यांत जडभरत सांपडला. कांहींहि कुरकुर न करितां हा पालखी वाहूं लागला. तेव्हां याची चाल इतर वाहकांच्या चालीशीं जमेना. हा कीड, मुंगी मरूं नये म्हणून लक्षपूर्वक पाहून पाऊल टाकी. त्यामुळें राजास हिसके बसूं लागले. तेव्हां राजानें वाहकास सूचना करितां इतर वाहकांनीं जडभरताचा दोष त्याच्या दृष्टोत्पत्तीस आणिला. त्या वेळीं राजा व जडभरत यांच्यांत आत्मबोधासंबंधी विवेचन झालें. याच वेळीं यानें आपल्या पूर्वजन्मांच्या हकीगती त्यास निवेदन केल्या (भा. ५. ९-१३; नारद. १. ४८. ४९; विष्णु. २. १३-१६).

३ (सो. पूरु.) दुष्यन्त राजास शकुंतलेपासून झालेला पुत्र ( म. आ. ६३. ३४; ८८. १८ कुं. ). याला सौद्युम्नि म्हटलें आहे ( श. ब्रा. १३. ५. ४. १० ). यास दमन अथवा सर्वदमन असेंहि नांव होतें (भा. ९. २०; म. आ. ७४). कण्व ऋषींच्या आश्रमांत शकुंतला राहत असतां दुष्यन्तानें तिच्याशीं गांधर्वविवाह केला होता. पुढें भरत तीन वर्षांचा झाल्यावर यौवराज्याभिषेक करण्यासाठीं कण्वानें आपले शिष्य शकुंतलेबरोबर देऊन पुत्रासह तिची रवानगी प्रतिष्ठानाकडे केली. पण दुष्यन्तानें तिला न ओळखल्यासारखें करून तिचा तिरस्कार केला. या वेळीं शकुंतलेनें राजाची पुष्कळ कानउघाडणी केली, पण उपयोग झाला नाहीं. पुढें आकाशवाणीनें ओळख पटून भरतास राज्य मिळालें. भरतानें दीर्घतमस् मामतेय ऋषीला पुरोहित करून गंगेच्या तीरावर पंचावन व यमुनेच्या तीरावर अठ्ठ्याहत्तर अश्वमेध यज्ञ केले. आणि मष्णार नांवाच्या देशांत ( कर्मात ) काळ्या वर्णाचे शंभर कोटि एकशें हत्ती अलंकारांसह दान दिले. हा आपल्या रथाला तेहतीसशें घोडे जोडून सर्वांना आश्चर्यचकित करी. मष्णार हा देश नसून कर्म आहे व हत्ती दिले नसून गाई दिल्या. अश्वमेधाच्या संख्येंतहि फरक आढळतो. हा मतभेद भागवतांत आहे ( ऐ. ब्रा. ८.२३ ). यानें सरस्वतीच्या कांठीं यज्ञ केले ( म. द्रो. ६८; शां. २९ ). हा सम्राट् होता ( वायु. १.४५.८६ ). दिग्विजय करून शक, म्लेच्छ व दानव यांचा नाश करून देवस्त्रियांना त्यांच्या बंदींतून यानें सोडविलें. यानें सत्तावीस हजार वर्षे राज्य केलें. यास विदर्भकुलांतील तीन स्त्रिया होत्या. त्यांना पुत्र झाले. पण ते वाईट निघाल्यास भरत आपला त्याग करील या भीतीनें त्यांनीं त्यांना मारून टाकिलें (ब्रह्म. १३. ५८; ह. वं. १. ३२; भा. ९. २०. ३४ ). शेवटीं यानें पुत्राकरितां मरुत्स्तोम यज्ञ केला. तेव्हां मरुतांनीं यास बृहस्पतिपुत्र भरद्वाज नांवाचा पुत्र दत्तक दिला. त्याचें नांव वितथ असून तो मागाहून गादीवर बसला ( भा. ९. २०; मत्स्य. ४९. ३२-३४; वायु. २. ३७. १५४ ). पण यानें बृहस्पतिपुत्र भरद्वाजाला दत्तक घेतलें ( ऋ. ६. ५२ वेदार्थ. ). येथें मरुत्त राजा व मरुत् यांचा घोंटाळा झाला असावा ( मरुत्त पहा ). कांहीं ठिकाणीं वितथ हा भरद्वाजाचा पुत्र दिला आहे ( वितथ पहा ). कण्व हा भरताचा पुरोहित होता (म.आ.७४).

याला सुनंदा काशेयी सार्वसेनी ही बायको होती. हिचा पुत्र भूमन्यु ( म. आ. ६३. ३४ कुं. ). येथें वितथ भरद्वाजाची पिढी गाळली आहे.

भविष्यमतें याचे आयुष्य छत्तीस वर्षे होतें. तें छत्तीस हजार वर्षे झालें. याच्या नांवामुळें भरतखंड असें नांव पडलें. यानें भूमीचा देशविभाग केला. यानें देवांचीं शंभर वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. १. ३ ).

८ ( सू. इ. ) हा दशरथ व कैकेयी यांचा पुत्र. याची पत्नी कुशध्वज जनकाची कन्या मांडवी. शत्रुघ्नासह हा आपल्या मामाच्या घरीं असतां दशरथानें रामाला यौवराज्याभिषेक करण्याचा घाट घातला. पण याला राज्य मिळावें म्हणून याच्या आईनें तो प्रयत्न हाणून पाडला. रामाला वनवासाला जावें लागलें व दशरथ पुत्रवियोगानें मेला. अशी परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें तेथें भरत असणें अत्यंत आवश्यक झालें. म्हणून सिद्धार्थ नावाच्या मंत्र्यास भरताला आणण्याकरितां पाठविलें. दुःस्वप्नें पडल्यामुळें हा अगदीं सचिंत स्थितींत होता. अशा वेळीं सिद्धार्थ जाऊन पोहोंचला.

सिद्धार्थानें कोणाला कांहीं विशेष न कळवितां भरताला अयोध्येस आणिलें. कैकेयीची भेट झाल्यावर याच्या सर्व कांहीं ध्यानीं आलें.

आपल्याला राज्य मिळावें म्हणून आईनें केलेल्या कार्याची याला अत्यंत चीड आली व भविष्यकालीं आपल्याकडे लोक कोणत्या दृष्टीनें पाहतील याचेंहि स्पष्ट चित्र याच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. त्याबरोबर अत्यंत संतापून जाऊन यानें आईची अत्यंत निर्भर्त्सना केली व हा तडक कौसल्येकडे गेला. कौसल्येलाहि भरताला भेटण्याची इच्छा होती. भरताची संमति घेऊन कैकेयीनें हा सर्व व्यूह रचिला आहे, अशी कौसल्येची समजूत होती. त्यामुळें तिनें भरतावर वक्रोक्तींचा गहजब केला. तेव्हां भरताला हात जोडून शपथपुरःसर 'यांत माझा कांहींएक संबंध नाहीं' हें सांगणें भाग पडलें. असाच एक दिवस निघून गेल्यावर वसिष्ठानें भरताला दशरथाची उत्तरक्रिया करण्याविषयीं सुचविलें. त्याप्रमाणें भरतानेंहि अग्निहोत्राग्नीनें दशरथाला अग्नि दिला. भरत येईतोंपर्यंत दशरथाचें प्रेत सुरक्षित रहावें म्हणून तेलाच्या कढईंत ठेवण्यांत आलें होतें. तें यानें बाहेर काढून वसिष्ठाच्या संमतीनें सर्व विधि केला ( वा. रा. अयो. ७०-७७). चवदा दिवसांचा उत्तरक्रियेचा विधि यथासांग पार पडल्यावर सर्व राजकारणी लोकांनीं भरताला राजा होण्याविषयीं विनंति केली. तेव्हां भरतानें परंपरेप्रमाणें वडील बंधु रामाला राज्याभिषेक होणें उचित, [illegible] ...लें. रामाला जेथें असेल तेथें राज्याभिषेक करण्याचें [illegible] साहित्य घेऊन यानें रामाकडे [illegible] ...शित करण्याचे [illegible] उलट यानें असा निश्चय जाहीर केला कीं, 'राम परत आला नाहीं तरीसुद्धां मी राज्याचा स्वीकार न करितां लक्ष्मणाप्रमाणें वनवास पत्करीन.'

पुढें यानें आपला परिवार व नागरिक यांसह अयोध्येहून निघून पहिला मुक्काम शृंगबेरपुरापाशीं गंगेवर केला. तेथें गुहाची व भरताची भेट होऊन भरताला रामासंबंधीं पुष्कळच हकीगत कळली. त्यानें दिलेल्या कोळ्यांच्या साहाय्यानें हा आपल्या परिवारासह गंगा उतरून भरद्वाजाच्या आश्रमाकडे जाण्यास निघाला. वाटेंत हा सर्व परिवारासह मैत्रमुहूर्तावर प्रयागवनांत पोहोंचला. तेथें थोडा वेळ विश्रांति घेऊन सर्व परिवार तेथेंच ठेविला व आपण कांहीं निवडक लोकांसह भरद्वाजाच्या दर्शनाला गेला. गुहाप्रमाणें भरद्वाजाचेंहि मन याच्याविषयीं प्रथम साशंक होतें. 'रामाचा कांटा कायमचा दूर करावा म्हणून तर पाठलाग करीत भरत आला नाहींना?' असें त्याच्या मनांत आलें. भरद्वाज भरताला स्पष्ट तसें म्हणालाच. शेवटीं वसिष्ठानें मध्यस्ती केल्यावर भरद्वाजानें राम चित्रकूटावर आहे असें सांगितलें व सैन्यासह याला उत्कृष्ट भोजन दिलें. भरद्वाजाच्या इच्छेवरून आपल्या मातांची ओळख करून देतांना कौसल्येसंबंधीं भरतानें पुढीलप्रमाणें माहिती दिली. 'शोक आणि उपवास ह्यांच्या योगानें कृश व दीन झालेली व देवतेप्रमाणें दिसणारी माझ्या पित्याची पट्टाभिषिक्त स्त्री आपण पाहत आहां. हिनेंच सिंहाप्रमाणें पराक्रमी असणाऱ्या रामाला जन्म दिला.' कैकेयीसंबंधीं हा म्हणाला, 'ही क्रुद्ध, अविचारी, गर्विष्ठ, स्वतःला भाग्यवती मानणारी, ऐश्वर्यलुब्ध, सज्जनासारखी दिसणारी पण दुर्जन, दुष्ट आणि दुर्बुद्धि अशी माझी माता कैकेयी आहे.' एक दिवस तेथें राहिल्यावर दुसरे दिवशीं भरद्वाजांनीं भरताला निरोप दिला. निरोप देतांना चित्रकूटावरील रामाच्या पर्णकुटिकेकडे जाणारा यमुनेच्या कांठचा रस्ताहि समजावून दिला (वा. रा. अयो. ९२).

भरद्वाजानें सांगितल्याप्रमाणें मार्ग आक्रमून गेल्यावर हा चित्रकूटावर आला. तेथें भरताच्या येण्यानें लक्ष्मणाला शंका आली. पण रामानें त्याला शांत केलें. भरतानें रामाला घरची सर्व हकीकत सांगून राज्य स्वीकारण्याविषयीं अत्याग्रह केला. जाबालि व वसिष्ठ यांनींहि मध्यस्ती केली. पण रामानें पित्याचें वचन खरें करण्याकरितां 'मला राज्य स्वीकारितां येत नाहीं' असें सांगितलें. शेवटीं राम येईतोंपर्यंत त्याच्या आश्रमापाशीं धरणें धरून बसण्याचा यानें मार्ग पत्करण्याचें ठरविलें. पण रामानें याला हा क्षत्रियांचा मार्ग नव्हे, ब्राह्मणांचा आहे असें सांगून निवृत्त केलें. शेवटीं [illegible] ...सांगितलें कीं—

लक्ष्मीश्चन्द्रादपेयाद्वा हिमवान् वा हिमं त्यजेत् ।
अतीयात् सागरो वेलां न प्रतिज्ञामहं पितुः ।
कामाद्वा तात लोभाद्वा मात्रा तुभ्यमिदं कृतम् ।
न तन्मनसि कर्तव्यं वर्तितव्यं च मातृवत् ॥

इतकें झाल्यावर भरतानें रामाच्या पादुका घेतल्या आणि रामाला सांगितलें कीं, ' मी ह्या पादुकांच्या नांवानें राज्य चालवीन. वनवासांत असणाऱ्या तुझ्याप्रमाणें जटावल्कलादि धारण करीन. फलमूलांशिवाय दुसरें कांहीं खाणार नाहीं. चवदा वर्षेपर्यंत तुझी वाट पाहत गांवाच्या बाहेर राहीन. चवदा वर्षे संपल्यावर जर तुम्ही आलां नाहीं तर मी अग्नींत प्रवेश करीन.' इतकें सांगून रामाची आज्ञा घेऊन भरत परत आला व रामाच्या पादुका घेऊन गांवाबाहेर नन्दिग्रामांत राहिला. रामाची ठेव म्हणून यानें राज्यकारभार चालविला. कोणतेंहि राजोपचार हा घेत नसे. छत्र, चामरें, नजराणे वगैरे सर्व पादुकांना दिले जात असत.

अशीं रामाच्या वनवासाचीं चवदा वर्षे यानें काढिलीं. शेवटीं रामानें हनुमानाला पाठवून आपल्या येण्याची बातमी याला कळविली. त्या वेळीं हनुमानाला भरत, वल्कलें व कृष्णाजिनें पांघरून राहिलेला, आश्रमवासी, दीन, कृश, जटाधारण केलेला, शरीराची निगा न ठेवणारा, फलमूलाशी, तपस्वी, असा दिसला. हनुमानाकडून राम येण्याची बातमी ऐकल्याबरोबर याला साहजिकच आनंद झाला व यानें मारुतीला अनेक बक्षिसें दिलीं. त्यांत सोळा सुंदर स्त्रिया बायका म्हणून दिल्याचा उल्लेख आहे. पुढें भरत व शत्रुघ्न यांनीं सर्व नगर उत्तम प्रकारें शृंगारून रामाचें स्वागत केलें व मोठ्या समारंभानें रामाला राज्याभिषेक करून यानें त्याला आपल्याजवळ ठेवीसारखें असलेलें राज्य परत केलें व रामानें, लक्ष्मणानें नाकारिल्यामुळें भरताला यौवराज्याभिषेक केला ( वा. रा. यु. १२५-१२८; पद्म. पा. १-२ ).

संपूर्ण आयुष्यांत भरतावर युद्धाचा प्रसंग एकदांच आल्यासारखा दिसतो. राम राज्यावर असतां भरताच्या केकयदेशाधिपति मामाकडून गंधर्वांचें पारिपत्य करण्याविषयीं निरोप आला. तेव्हां रामानें याच्या नेतृत्वाखालीं याच्या दोघा मुलांना गंधर्वांचें पारिपत्य करण्यास पाठविलें. त्या मुलांचीं नांवें तक्ष व पुष्कल अशीं होतीं. हे गंधर्व सिंधूच्या दोन्ही बाजूंस असलेल्या सुपीक प्रदेशांत राहत होते. तेथें जाऊन भरतानें गंधर्वांचा पराजय केला व दोन नगरें वसविलीं. एका नगरीचें नांव तक्षशिला ठेवून तेथें तक्षाची स्थापना केली. दुसऱ्या नगरीचें नांव पुष्कलावती ठेवून तेथें पुष्कलाची स्थापना केली. यामध्यें भरताचीं पांच वर्षें गेलीं. मग भरत अयोध्येस परत आला.

शेवटीं या थोर पुरुषानें रामानंतर अयोध्येपासून दोन कोसांवर असलेल्या गोप्रतारतीर्थी देह ठेविला (वा. रा. उ. १०१)

५ बृहस्पतीचा मुलगा शंयु नामक जो अग्नि, त्याचा हा दुसरा मुलगा ( म. व. २१९ ). याच्या आईचें नांव सत्या असें होतें ( म. व. २१८ ).

६ नाट्यशास्त्रप्रणेता एक ऋषि. याच्या नांवावर संगीतनृत्याकर नामक एक ग्रंथ आहे ( C. C. ). उर्वशीला यानें अभिनय चुकल्यामुळें शाप दिला होता ( मत्स्य. २४; उर्वशी. पहा ).

७ मगधाधिपति इंद्रद्युम्नाच्या दरबारांतील एक धर्मात्मा ऋषि. यानें इंद्रद्युम्नाच्या विनंतीवरून इंद्रब्राह्मणास गणांशीं व्यभिचार केल्याबद्दल शाप दिला व नष्ट केलें ( यो. वा. ३. ९० ).

८ वाराणसी क्षेत्राचा रहिवासी एक योगी. यानें गीतेच्या चवथ्या अध्यायाचा पाठ ऐकवून दोन बोरी झालेल्या अप्सरांचा उद्धार केला ( पद्म. उ. १७८ ).

९ एक शूद्रवृत्तीनें राहणारा ब्राह्मण. हा अत्यंत दुराचारी होता. याचा भाऊ पुंडरीक. एका प्रेताला अग्नि दिल्यामुळें हा मुक्त झाला ( पद्म. उ. २१८-२१९ ).

१० भौत्य मनूचा पुत्र.

**भरती**—भरत नामक अग्नीची कन्या.

**भरद्वसु**—वसिष्ठकुलांतील मंत्रकार.

**भरद्वाज**—पूर्वी भरद्वाज ऋषीनें सर्व वेदांचें अध्ययन करण्याचा प्रयत्न केला, पण यास यश न आल्यामुळें यानें इंद्राला प्रसन्न करून घेतलें, १००।१०० वर्षांचे तीन जन्म इंद्राकडून मिळविले आणि हा गुरुकुलात सारखा वेदाध्ययन करीत राहिला. तिसऱ्या जन्मांत भरद्वाज अंथरुणाला खिळला असतां तेथें इंद्र आला व म्हणाला कीं, ' एक जन्म जर आणखी दिला तर काय करशील ? ' तेव्हां भरद्वाज म्हणाला, ' वेदाध्ययनच करीन. ' तेव्हां इंद्रानें योगसामर्थ्यानें वेदाचे पर्वताएवढे तीन ढीग केले. व त्यांपैकीं एक एक मूठ घेऊन यानें त्यांतील एकेक कण म्हणजे एक एक वेद होय असें सांगितलें. तात्पर्य, वेद अनंत आहेत. तेव्हां सर्व वेदांचें अध्ययन करण्याचा हट्ट तूं सोडून दे. तूं तीन जन्मांत केलेलें अध्ययन माझ्या तीन मुठीइतकेंच होय. बाकीचे पर्वतप्राय वेद तुला ठाऊकसुद्धां नाहींत. त्यांचें अध्ययन अशक्य आहे [illegible] वेदांच्या अध्ययनाचें श्रेय पाहिजे [illegible] चयन ' करावें [illegible]

पायु, रजि, सुमिहूळ, साप्य, पेरुक व पुरुणीथ शातवनेय हीं माणसें भरद्वाजाच्या निकटचीं होत. पुरुपन्थ हा भरद्वाजाचा आश्रयदाता होता. भरद्वाज व याच्या कुलांतील पुरुष सूक्तद्रष्टे होते (ऋ. ६; ९. ६७. १-३; १०. १३७-१ सर्वानुक्रमणी; बृहद्दे. ५. १०२; ऐ. ब्रा. ६. १८; ८. ३). भरद्वाज वैशालीहून काशीस गेला व तेथें सुदेवपुत्र दिवोदासाचा उपाध्याय झाला. नंतर हैहयांनीं दिवोदासाचा पराभव केल्यावर तो याचा आश्रय घेण्यास आला व त्यास यानें आश्रय दिला. नंतर या ऋषीनें दिवोदासास्तव यज्ञ करून प्रतर्दन राजपुत्र निर्माण केला व त्या राजपुत्रानें हैहयांचा पराभव केला ( म. अनु. ३० ). प्रतर्दनांनीं केलेला वीतहव्यांचा व ऐलांचा पराभव हा उपाध्याय भरद्वाजामुळें झाला ( म. अनु. ३४).

यानें प्रतर्दनास राज्य मिळवून दिलें ( पं. ब्रा. १५. ३. ७; क. सं. २१. १० ). यास भरद्वाज बार्हस्पत्य म्हणजे बृहस्पतीचा पुत्र असें म्हटलेलें ठिकठिकाणीं आढळतें ( बृहस्पति पहा ). भरद्वाज उंच, कृश व फिकट रंगाचा होता ( ऐ. ब्रा. ३ ४९ ). हा अत्यंत दीर्घायुषी तपस्वी व विद्वान् होता ( ऐ. आ. १. २.२,६; बाष्कलि भरद्वाज पहा ). याचा इतरत्र उल्लेख आहे ( बृ. उ. २. २. ४; रामोत्तरतापिनी १; ५ ). याचा याज्ञवल्क्याशीं संवाद झाला आहे.

ब्रह्मदेवाच्या पुष्कर क्षेत्रांतील यज्ञांत हा उपस्थित होता ( पद्म. सृ. ३४ ).

हा आपल्या पुत्रासह निर्जन वनांत क्षुधार्त होऊन भटकत असतां बृबु नांवाच्या सुतारापासून यानें बऱ्याच गाई घेतल्या ( मनु. १०. १०६ ).

हा बृहस्पतीस ममतेपासून झाल्यावर दोघेंहि एकमेकांस याला 'संभाळ' ( भरद्वाजमिमम् ) असें म्हणूं लागलीं व तीं दोघें तशींच या बालकास टाकून निघून गेलीं म्हणून याला भरद्वाज असें नांव पडलें. सर्वांचें भरण करणारा तो भरद्वाज अशीहि व्युत्पत्ति दिली आहे ( म. अनु. १४२. ३१ कुं. ). याचे आईबाप गेल्यानंतर मरुतांनीं यास उचलून घेतलें व दुष्यन्तपुत्र भरत पुत्रप्राप्तीस्तव मरुत्स्तोम यज्ञ करीत होता त्याला हा अर्पण केला ( भा. ९. २०; विष्णु. ४. १९; मत्स्य. ४९; वायु. २. ३; ३७. १५१; ब्रह्मांड. २. ३८ ). भरद्वाजास जन्मतांच भरतास पुत्र म्हणून दिलें. वास्तविक हा ऋषि भरतापेक्षां एकदोन पिढ्यांनीं वडील होता. यानें भरताचा यज्ञ करून त्यास भूमन्यु नामक पुत्र मिळवून दिला व तोच भरतामागें वारस झाला (म. आ. ९४). भरद्वाजाचा पुत्र भुवन्मन्यु दिला आहे ( विष्णु. ४. १९ ). याला वितथ असें नांव होतें. कारण भरताच्या पुत्रांचे जन्म वितथ म्हणजे निष्फळ झाल्यावर मरुतांनीं भरद्वाज भरतास दिला व म्हणून यास वरील नांव पडलें ( विष्णु. ४. १९ ). वितथ हा भरद्वाजाचा पुत्र आहे ( वायु. २. ३७.; मत्स्य. ४९; ३ रेवती ).

अहिविषानें मृत झालेल्या प्रमद्वरेस पाहून रुदन करणाऱ्या स्थूलकेशासमीपच्या अनेक ऋषींत हा एक होता ( म. आ. ८ ). याचा भृगूशीं जगत्सृष्टिप्रकार याबद्दल संवाद झाला होता ( म. शां. १८२ ). हा त्रेतायुगारंभीं होता. हा अंगिरस् व वसिष्ठ कुलांतील सूक्तद्रष्टा आहे. यानें धन्वंतरीला आयुर्वेद शिकविला ( ब्रह्मांड. ३. ६७ ).

२ अंगिराकुलोत्पन्न एक गोत्रकार व प्रवर. रैभ्य ऋषीचा मित्र व यवक्रीताचा पिता. रैभ्यानें निर्माण केलेल्या कृत्येनें मारिलेल्या आपल्या मुलाच्या शोकानें यानें अग्निप्रवेश केला. तेव्हां यास अर्वावसूनें जिवंत केलें व नंतर हा स्वर्गास गेला ( म. व. १३५-१३८ ).

३ कोणी एक ऋषि. घृताचीला पाहून याचें मन चंचल झालें व वीर्य स्खलन पावलें. त्या वीर्यापासून उत्पन्न झालेली मुलगी श्रुतावती ( म. श. ४८ ). हा पूर्व मन्वंतरांतील ब्रह्मर्षि होय.

४ हा वाल्मीकि ऋषीचा शिष्य होता. याच्या समक्षच वाल्मीकि मुनींच्या तोंडून 'मा निषाद' इत्यादि श्लोकबद्ध वाणी बाहेर पडली (वा. रा. बा. २). पूर्वरामायणांतील कथा प्रथम भरद्वाजाला वाल्मीकीनें दिल्या ( यो. वा. १. २ ). हा प्रयागमध्यें राहत असे. दाशरथि राम दंडकारण्यांत चालला असतां याच्या दर्शनास आला होता. तेव्हां यानें त्याचा सत्कार केला. नंतर 'मला राहण्यास एकादें स्थळ सांगा ' असा रामानें याला प्रश्न केला असतां, 'माझ्या आश्रमांतच रहा' असें यानें प्रथम सांगितलें. पण ' येथें राहण्यापासून हें ठिकाण अयोध्येपासून बरेंच जवळ असल्यामुळें मला नागरिकांकडून त्रास होईल, तरी दुसरी एकादी जागा सांगा,' असें रामानें पुनः विचारितांच 'यानें येथून दहा कोसांवर चित्रकूट पर्वत आहे. तेथें जाऊन रहा' असें सांगितलें व त्यास तिकडचा मार्ग सांगितला. तेव्हां राम तिकडे राहण्यास गेला (वा. रा. अयो. ५४-५५).

तसाच भरत रामास परत आणण्याच्या उद्देशानें चालला असतां एकटाच सर्व सैन्य बाजूस ठेवून याच्या दर्शनास आला. तेव्हां भरतास निष्कंटक राज्य पाहिजे म्हणून हा रामाकडे जातो आहे कीं काय ? अशी शंका येऊन यानें त्यास तसें विचारिलें. तेव्हां भरताच्या डोळ्यांत अश्रु आले व त्यानें

आपला शुद्ध हेतु यास निवेदन केला. तेव्हां याची खात्री पटून यानें भरताचें सैन्यासहवर्तमान चांगलें आदरातिथ्य केलें. आदरातिथ्याची तयारी करण्याकरितां यानें देवतांना आव्हान करून उपस्थित केलें. त्या वेळीं मेजवानीचा थाट फार सुंदर केला होता. नंतर दुसरे दिवशीं भरतानें रामाचा पत्ता विचारिल्यावरून यानें त्यास 'राम येथून अडीच योजनांवर राहतो' असें सांगून रस्ता कळविला. नंतर यानें विचारिल्यावरून यास भरतानें आपल्या मातांची ओळख करून दिली ( वा. रा. अयो. ९०. ९२ ).

नंतर भरत नन्दिग्रामीं जाऊन राहिल्यावर व रामानें रावण-वधादिक कृत्यें आटोपल्यावर राम पुनः अयोध्येंत परत येत असतां त्यानें याची भेट घेतली होती. त्या वेळीं यानें त्याचें अभिनंदन केलें व वाटेंतील वृक्ष वसंतऋतूसारखे 'फलपुष्पांनीं भरून जातील' असा रामास वर दिला ( वा. रा. यु. १२४ ).

अश्वमेधानंतर गौतमी नदीच्या तीरीं असलेल्या भरद्वाज ऋषीच्या आश्रमीं राम पुनः आला. सर्व ऋषींसह राम आपल्याकडे पाहुणा आला हें पाहून भरद्वाज ऋषीनें त्या सर्वांस आपल्याकडे भोजनास राहण्याची विनंति केली. याच्या आश्रमांत रामानें विचारिल्यावरून शंभूनें श्राद्धनिर्णय, शिवपूजाविधि व भस्ममाहात्म्यकथा सांगितली ( पद्म. पा. १०५ ).

५ अंगिराकुलोत्पन्न ऋषि ( म. आ. १३० ). हा गंगाद्वारीं राहत असे. तेथून हविर्धानामध्यें संचार करून हा गंगेवर स्नानास जात असतां घृताची नांवाची अप्सरा याच्या दृष्टीस पडली. ती नुकतीच स्नान केलेली व तारुण्यानें मुसमुसलेली अप्सरा पाहतांच या ऋषीचें अमोघ वीर्य पर्वतदरींत स्खलन पावलें व तें यानें एका द्रोणांत ठेविलें. त्यापासून यास द्रोण नांवाचा मुलगा झाला. याचा मित्र पृषत नांवाचा राजा होता ( म. आ. ६३; १६६ ). बृहस्पतीनें भरद्वाजाला दिलेलें आग्नेयास्त्र यानें अग्निपुत्र अग्निवेशाला दिलें ( म. आ. १३०; १७० ).

६ धर्मकन्या सत्या व शंयु नामक अग्नि यांना झालेल्या दोन पुत्रांतील पहिला. याच्या पत्नीचें नांव वीरा असून पुत्राचें नांव वीर असें होतें ( म. व. २२१ कुं ). हाच भरद्वाज चालू मन्वंतरांतील सप्तर्षींतील एक असावा. प्रतिवर्षी फाल्गुन-मासींच्या सूर्यासमागमें संचार करणारा तोहि हाच असेल.

७ हा भीष्म शरपंजरीं पडला असतां त्याकडे आला होता ( भा. १. ९ ).

८ वागव्या व एकोणसाव्या युगांतील व्यास.

९ ग्रंथकार. मुंबई युनिव्हर्सिटी लायब्ररींत दहा प्रश्नांचें याचें एक श्रौतसूत्र आहे. त्यांत आलेखन व आश्मरथ्य यांचा उल्लेख आहे. विश्वरूपावरून याचें धर्मसूत्र उपलब्ध असावें असें दिसतें. याचा एक गद्य उतारा विश्वरूपानें दिला आहे. त्यांत म्लेच्छ भाषा शिकूं नये असें दिलें आहे ( याज्ञ. १. १५. ). याचा इतरत्र विश्वरूपानें उल्लेख केलेला आढळतो ( याज्ञ. १. ३२, १८५, २३६ ). याचा प्रायश्चित्तासंबंधीं गद्य उतारा अपरार्कानें ( ११५५ ) दिला आहे. याच्या स्मृतींतील कांहीं श्लोक स्मृतिचंद्रिका व हरदत्त यांत दिलेले आढळतात.

अर्थशास्त्रकार म्हणून याचा कौटिल्यानें सात वेळां उल्लेख केला आहे. यांतच कणिक भारद्वाजाचा उल्लेख आहे ( कौटिल्य. ५. ५ ). यांत राजानें कसें वागावें हें सांगितलें आहे. तेंच भारतांत आढळतें ( म. शां. ६७ ) सौवीर शत्रुंजय व भारद्वाज यांचा संवाद झाला आहे. ( म. शां. १४० ) त्यांत दण्डनीतीचें महत्त्व वर्णन केलें आहे. याचा राजशास्त्रकार म्हणून उल्लेख आहे ( म. शां. ५७. ३ ) यांवरून भारद्वाजाचा गद्यपद्यात्मक राजकीय ग्रंथ दहाव्या शतकांत होता असें दिसतें.

पराशरमाधवीय सरस्वतिविलास यांत याचा उल्लेख आला आहे.

पंचरात्रसंप्रदायाची जी भरद्वाजसंहिता आहे तींत चार अध्याय आहेत.

भरद्वाजस्मृति. हिचा पद्मपुराणांत उल्लेख आहे. हिचे हेमाद्रि, विज्ञानेश्वर इत्यादिकांनीं उतारे घेतलेले आहेत. याच्यावर बालंभट्टी टीका आहे.

यानें वास्तुतत्त्व व वेदपादस्तोत्र नामक ग्रंथ रचिले आहेत. ( C. C. ).

१० ( सो. ) भविष्यमतें महाबलाचा पुत्र.

११ ( सू. इ. भविष्य. ) हा वायुमतें अमित्रजित् पुत्र.

**भरद्वाज बार्हस्पत्य विदथिन्**—यास पांच मुलें होतीं. सुहोत्र, शुनहोत्र, नर, गर्ग व ऋजिश्वन् ( सर्वानुक्रमणी ६. ५२ ).

**भरद्वाजि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**भरुक**—( सू. इ. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें विजय राजाचा पुत्र. यास रुचक व रुरुक अशीं नामांतरें आहेत.

**भर्ग**—एकादश रुद्रांपैकीं शेवटचा. याला शिव हें नांव आहे.

२ ( सो. तुर्वसु. ) भागवतमतें वह्नि राजाचा पुत्र. याचा पुत्र भानुमत्.

३ ( सो. काश्य. ) भागवतमतें वीतिहोत्राचा पुत्र. याच्या भार्ग व गार्ग्य अशीं नांवें आढळतात.

**भर्ग प्रागाथ**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ६०-६१ ).

**भर्गभूमि**—( सो. काश्य. ) भागवतमतें भर्गाचा पुत्र.

**भर्तृहरि**—भर्तृहरीनें आणिलेलें अमृतफळ यानें एक लक्ष सुवर्णास विकत घेऊन त्याचा उपभोग घेतला व हा योगारूढ होऊन वनास गेला ( भवि. प्रति. १. २४. १५-१६ ).
एक व्याकरणकार. याच्या लक्ष श्लोकात्मक संग्रहग्रंथाचा पंतजलीनें निर्देश केला आहे ( पा. सू. २. ३. ६६; ७. ४. ९२ ).

**भर्स्थे**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**भर्म्यश्व**—( सो. नील. ) अर्क राजाचा पुत्र. यास मुद्गलादि पांच पुत्र होते. याचे पांचहि पुत्र याच्याप्रमाणें पराक्रमी असल्यानें ' माझें राज्यरक्षण करण्यास माझे पांच पुत्र समर्थ ( अलम् ) आहेत, ' असें हा नेहमीं म्हणत असे आणि त्यामुळेंच त्यांना पांचाल ही संज्ञा प्राप्त झाली ( भा. ९. २१ ).

**भलंदक**—( २ भलंदन पहा ).

**भलंदन**—अत्रिकुलोत्पन्न गोत्रकार.

२ ( सू. दिष्ट. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें नाभागाचा पुत्र. याचा पुत्र वत्सप्रीति. वैश्यजातींतील मंत्रद्रष्टा एक ऋषि ( मत्स्य १४५. ११६; ब्रह्मांड. २. ३२. १२१). हा कर्मानें वैश्य झाला होता ( मार्क. ११३. ३; ब्रह्म. ७. २६; विष्णु. ४. १. १५; भा. ९. २. २३ ). भलंदक असा मत्स्यांत पाठ आहे. हा पुनः ब्राह्मण झाला (ब्रह्म. ७. ४२).

**भलानस्**—दाशराज्ञयुद्धांतील एक सुदासाचा शत्रु ( ऋ. ५. १८. ७ ).

**भल्लाविन्**—लांगलीभीम नामक शिवावताराचा शिष्य.

**भल्लाट**—( सो. पूरु. ) मत्स्यमतें विश्वक्सेनपुत्र व वायुमतें हा उदक्सेनपुत्र आहे. यास भागवतमतें भल्लाद असें नामान्तर आहे.

**भल्लि**—भृगुकुलांतील एक गोत्रकार ( बिल्वि पहा).

२ ( सो. कुकुर. ) विष्णुमतें हा विलोमापुत्र होय. याला नंदनोदकदुंदुभि असेंहि म्हणत असत. याचा पुत्र अभिजित्.

३ वसुदेव व रथराजि यांचा पुत्र.

४ रौच्य मनूचा पुत्र.

**भव**—कश्यप व सुरभि यांचा पुत्र.

**भवत्रात शायस्थि**—कुस्तुक शार्कराक्ष्याचा शिष्य. याचा शिष्य बृहस्पतिगुप्त शायस्थि ( वं. ब्रा. १ ).

**भवद्**—( सो. ) भविष्यमतें भनस्याचा पुत्र.

**भवनंदि**—कश्यपकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**भवन्मन्यु**—( सो. पूरु. ) विष्णुमतें वितथाचा पुत्र. यास पुत्र चार. बृहत्क्षत्र, नर, गर्ग, महावीर्य ( विष्णु. ४ १९. २ ). यास भागवतमतें मन्यु असें म्हटलें असून वरच्यांत जय मिळवून पुत्र दिले आहेत ( भा. ९.२१. १ ).

**भव्य**—हा आठ देवांचा गण असून रैवतांत होऊन गेला. परिमति, प्रियनिश्चय, मति, मन, विचेतस्, विजय, सुजय व स्योद ( ब्रह्मांड. २. ३६. ७१-७२ ).

२ चाक्षुष मन्वंतरांतील एक देव.

३ ( स्वा. उत्तान. ) ध्रुव व भूमि यांचा पुत्र.

४ दक्षसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**भस्मासुर**—शिवाच्या भस्मांतील एका खड्यापासून उत्पन्न झालेला एक असुर. ' ज्याच्या मस्तकीं हा हात ठेवील तो तत्काल भस्मीभूत होईल ' असा शंकराचा यास वर असल्यानें हा फार उन्मत्त होऊन सर्व प्राणिमात्रांस पीडा देई. तेव्हां विष्णूनें मोहिनीचें रूप घेऊन यास मोह पाडिला व याच्याच डोक्यावर याचा हात ठेवविला. तेव्हां भस्मासुर तत्काळ मरण पावला ( कालपृष्ठ व वृक पहा ). ही कथा मराठी शिवलीलामृतांत आहे ( अ. १२ ). मूळ पुराणग्रंथांत कालपृष्ठ व वृक यांच्या कथा या कथेसारख्या आहेत.

**भागलि**—शांत्युदक करतांना कोणता मंत्र घ्यावा, याविषयीं यानें मत आहे ( कौ. सू. ९.१० ). गाईनें मधुपर्क करूं नये असेंहि हा म्हणतो ( कौ. सू. १७. २७).

**भागवत**—( शुंग. भविष्य. ) वायुमतें विक्रमित्राचा व इतरत्र वज्रमित्राचा पुत्र.

**भागवित्तायन**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण. याबद्दल भागवित्रासन असा पाठ आहे.

**भागवित्ति**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें कुथुमीचा शिष्य. याला ब्रह्मांडांत नाभवित्ति म्हटलें आहे ( व्यास पहा ).

२ चूड अथवा चूल नांवाच्या आचार्याचें हें पैतृक नांव आहे ( बृ. उ. ६. ३. ९-१० ).

३ भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**भागवित्रासन**—( भागवित्तायन पहा ).

**भागस्वरि**—( भांगासुरि पहा ).

**भागान्य**—हा क्षत्रिय असून तपानें ब्राह्मण व ऋषि झाला ( वायु. २. २९. ११४ ).

**भागिल**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**भागुरि**—युधिष्ठिराच्या अश्वमेधांतील एक सदस्य ( जै. अ. ६३ ) व आचार्य ( जै. गृ. १. १४ ). एक व्याकरणकार, ज्योतिषी व स्मृतिकार ( C. C. )

**भाङ्गस्वन**—भंगास्वनाचें नामांतर.

**भाङ्गासुर**—दशार्णाधिपति ऋतुपर्णाचें नामांतर. यास भागस्वरि असें दुसरेंहि नांव आहे ( म. स. ८ ).

**भाजिर** ( भ्राजिर )—भौत्य मन्वंतरांतील एक देव.

**भाडितायन**—शाकदासाचें पैतृक नांव.

**भाण्डायनि**—एक ऋषि ( म. स. ७. १२ कुं. ).

**भात**—( आंध्र. भविष्य. ) वायुमतें सिंधुकाचा पुत्र. हा कृष्णाबद्दल चुकीचा पाठभेद असावा ( ६ कृष्ण पहा ).

**भानु**—स्वारोचिष मनूच्या पुत्रांतील एक.

२ उत्तम मन्वंतरांतील देवगण.

३ सुतप देवांपैकीं एक.

४ कश्यप व प्राधा किंवा क्रोधा यांच्या पुत्र.

५ दक्षाची कन्या व धर्माची पत्नी. हिचा पुत्र देवऋषभ ( भा. ६. ६. ५ ).

६ एक अग्नि. हा अंगिराचा पुत्र. यास बृहद्भानु असें नामांतर असून यास बृहद्भासा नांवाची स्त्री होती. ती सोमाची कन्या होय. शिवाय यास सुप्रजा नांवाची आणखी एक भार्या होती. याला बृहद्भासेपासून बल, मन्युमान, विष्णु ( धृतिमान् ) व सुप्रजेपासून आग्रयण, वैश्वदेव व स्तुभ असे एकेक भार्येचे तीन तीन पुत्र झाले ( म. व. २२३. ८ कुं. ).

७ एक यादव. याची मुलगी भानुमती. ती सहदेवाची बायको होती.

८ श्रीकृष्ण व सत्यभामा यांचा पुत्र. हा महारथी होता.

९ ( सू. इ. भविष्य. ) भागवतमतें प्रतिव्योम राजाचा पुत्र. याचा पुत्र दिवाक ऊर्फ दिवाकर ( भा. ९. १२ ).

**भानुदत्त**—सुबल राजाचा पुत्र व शकुनीचा भाऊ. भारतीय युद्धांत भीमानें यास ठार मारिलें ( म. द्रो. १५८. २४ कुं. ).

**भानुदेव**—कर्णानें मारिलेला एक पांडवपक्षीय पांचाल ( म. ४३. १५ कुं. ).

**भानुमत्**—( सू. निमि. ) भागवतमतें केशिध्वजाचा, विष्णु व वायु यांच्या मतें सीरध्वजाचा पुत्र.

२ ( सो. तुर्वसु. ) भागवतमतें भर्गाचा पुत्र. याचा पुत्र त्रिभानु.

३ कोसल देशचा राजा. याचीच कन्या कौसल्या दशरथास दिली होती ( वा. रा बा. १३ ).

४ कृष्ण व सत्यभामा यांचा पुत्र.

५ दुर्योधनपक्षीय कलिंगदेशचा राजा. यास भीमानें ठार केलें ( म. भी. ५४. ३९ कुं. ).

६ ( सू. इ. भविष्य. ) भागवतमतें बृहदश्वाचा पुत्र. यास विष्णु व वायु यांच्या मतें भानुरथ म्हटलें आहे.

**भानुमत् औपमन्यव**—आनन्दज चान्धनायनाचा शिष्य. याचा शिष्य ऊर्जयत् औपमन्यव ( वं. ब्रा. १ ).

**भानुमती**—( धर्ममूर्ति पहा ).

२ सगराची स्त्री. हिचा पुत्र असमंजस्.

३ बृहस्पतीस शुभेपासून झालेली कन्या.

४ कृतवीर्याची कन्या. ही अहंयातीस दिली होती. हिचा पुत्र सार्वभौम ( म. आ. ६३. १४ कुं. ).

५ धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाची स्त्री. हिनें हाटकेश्वरीं शिवलिंगाची स्थापना केली ( स्कंद. ६. ७३-७४ ).

६ भानु यादवाची मुलगी व सहदेव पांडवाची पत्नी. हिला निकुंभ दानवानें पळवून नेलें. पण अर्जुन, कृष्ण व प्रद्युम्न यांनीं त्याला ठार करून हिला सोडवून आणिलें ( ह. वं. २. ९० ).

७ ( ६ परीक्षित् पहा ).

**भानुरथ**—( ६ भानुमत् पहा ).

**भानुविंद**—एक यादव ( भा. १०. ६, १४ ).

**भानुश्चंद्र**—( सू. इ. ) मत्स्यमतें हा चंद्रगिरीचा पुत्र.

**भानुसेन**—कर्णाचा पुत्र. यास भीमानें ठार मारिलें ( म. क. ४८ ).

**भायजात्य**—निकोथकाचें पैतृक नांव ( वं. ब्रा. ४. ३७३ )

**भारत**—( अश्वमेध, देववात व देवश्रवस् पहा ).

**भारद्वाज**—शुष्क वाहेयाला भारद्वाज म्हटलें आहे. हा सामवेदी श्रुतर्षि आहे (ऋजिश्वन्, गर्ग, नर, पायु, वसु, शास, शिरिंबिठ, शुनहोत्र, सप्रन व सुहोत्र पहा). अंगिरस गोत्रांतील मंत्रकार व गोत्रकार व एक ऋषिक होता ( वायु. १. ५९ ९२–९४ ). याला भरद्वाज म्हटलेलेंहि आढळतें ( मत्स्य. १४५. ९५–९९; ब्रह्मांड. २. ३२. १०१–१०३ ). वैवस्वतांतील सप्तर्षींपैकीं एक. याचे शिष्य पाराशर्य, गौतम, आंगिरस् व आसुरि हे होत. हा भारद्वाजाचा, पाराशर्याचा व आत्रेयाचा शिष्य ( बृ. उ. २. ६. २–३; ४. ६. ३ ). सत्यवाह, सुकेशस् यांचें भारद्वाज हें पैतृक नांव आहे याच्या नांवावरील ग्रंथः—भारद्वाजप्रयोग, भारद्वाजशिक्षा व भारद्वाजसंहिता, श्रौतसूत्र व वृत्तिसार ( C. C. ).

**भारद्वाजायन**—यानें सत्र आरंभिलें त्यांत नव्येन दिवसाच्या अनुष्ठानाचें फल विचारिलें गेलें ( पं. ब्रा. १०. १२. १ ).

**भारद्वाजि**—भारद्वाज ऋषीचा पुत्र.

**भारद्वाजी**—( रात्रि पहा ).

**भारद्वाजीपुत्र**—हा पाराशरीपुत्राचा शिष्य व याचा शिष्य गौतमीपुत्र ( बृ. उ. ६. ५. १ ). पण हा वात्सीमाण्डवीपुत्राचा शिष्य म्हणून दिला आहे ( श. ब्रा. १४ ९. ४. ३० ).

२ याचा शिष्य हारिकर्णीपुत्र. हा पैङ्गीपुत्राचा शिष्य होय ( श. ब्रा. १४. ९. ४. ३० ).

२ हा पाराशरीपुत्राचा शिष्य व याचा शिष्य वात्सीपुत्र (श. ब्रा. १४. ९. ४. ३१).

**भारुकच्छ**—एक क्षत्रिय (म. स. ७८. ३६ कुं.).

**भार्ग**—(सो. काश्य.) विष्णुमतें वैनहोत्राचा पुत्र (३ भर्ग पहा).

**भार्गभू**—(सो. काश्य.) विष्णुमतें भार्गाचा पुत्र. यास भागवतांत भार्गभूमि व वायूंत गर्गभूमि म्हटलें आहे.

**भार्गभूमि**—(भार्गभू पहा).

२ (सो. पूरु.) विष्णु व वायु यांच्या मतें अमावसूचा पुत्र.

**भार्गव**—हें एका कुलाचें नांव आहे. च्यवन, गृत्संमद इत्यादिकांना हें कुलनाम आढळतें.

वैवस्वत मन्वंतरांतील तिसरा व सव्विसावा व्यास; ऋषभ नामक शिवावताराचा शिष्य (कवि, क्रतु, गृत्समद, च्यवन, जमदग्नि, नेम, प्रयोग, प्राचेतस, भृगु, वाल्मीकि, वेन, सोमाहुति व स्यूमरश्मि पहा).

सध्यां भार्गव नांवाचे ब्राह्मण मडोचला असून त्यांनीं परशुरामाला निःक्षत्रिय पृथ्वी केल्यानंतर अवभृथ स्नानाचा संकल्प सांगितला होता.

२ भौत्य मनूचा पुत्र व सप्तर्षींपैकीं एक.

**भार्गवत**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**भार्गायण**—सुत्वनचें पैतृक नांव.

**भार्गेय**—भृगुकुलांतील गोत्रकार (मार्गेय पहा).

**भार्म्यश्व**—मुद्गलाचें पैतृक नांव.

**भालंदन**—वत्सप्रीचें पैतृक नांव.

**भालुकि**—एक ऋषि. हा पांडवांबरोबर द्वैतवनांत गेला होता (म. स. ४. २१; व. २६.२२ कुं.). व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें लांगलीचा शिष्य. यानें योगशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला आहे. हठप्रदीपिकेंत याचा आधार घेतला आहे (C C.).

**भालुकीपुत्र**—हा क्रौंचिकीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य राथीतरीपुत्र (बृ. उ. ६. ५. २).

२ हा प्राचीनयोगीपुत्राचा शिष्य व याचा शिष्य वेदभृतीपुत्र (श. ब्रा. १४. ९. ४. ३२).

**भाल्ल प्रातृद**—एक आचार्य (जै. उ. ब्रा. ३. ३१.४).

**भाल्लवि**—यांच्या एका आचाराचा निर्देश आहे (पं. ब्रा. २.२.८). सायणानें हें शाखावाचक नांव घेतलें आहे.

**भाल्लविन्**—एक शाखाप्रवर्तक. याचा उताराहि घेतलेला आढळतो (बौ. ध. १ २. ११). याचा बहुवचनीं निर्देश आहे (जै. उ. ब्रा. २. ४. ७).

**भाल्लवेय**—इंद्रद्युम्नाचें पैतृक नांव (श. ब्रा. १०.६. १. १; छां. उ. ५. ११. १; १४.१.).

**भावन**—उत्तम मन्वंतरांतील एक देवगण.

२ भृगूचा पुत्र, एक देव.

**भावयव्य**—स्वनयाचें पैतृक नांव.

**भाववर्मन्**—परिहरवंशीय शिवशर्म्याचा पुत्र (भवि. प्रति. ४. ४).

**भावास्यायनि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**भाव्य**—स्वनयाचें पैतृक नांव.

**भास**—सह्याद्रीवरील अत्रीच्या आश्रमांत राहणाऱ्या तपस्व्याचा मुलगा व विलासाचा परम स्नेही.

**भासकर्ण**—मारुतीनें मारिलेला रावणपक्षीय एक राक्षस (वा. रा. सुं. ४६).

**भासा**—अयुतानायीची स्त्री.

**भासी**—कश्यप व ताम्रा यांच्या कन्यांपैकीं एक. हिजपासून भासउलूकादि पक्षी झाले.

२ कश्यप व प्राधा किंवा अरिष्टा यांच्यापासून झालेली एक अप्सरा.

**भासुर**—तुषित देवांपैकीं एक.

**भास्करि**—भीष्मनिर्याणाच्या वेळीं आलेला एक ऋषि (म. शां. ४६. १२ कुं.).

**भास्वदात्मन्**—(सो.) भविष्यमतें प्रभाकराचा पुत्र. यानें ४५०० वर्षें राज्य केलें.

**भिक्षु आंगिरस**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. ११७).

**भिक्षुवर्य**—शंकराचा एक अवतार (सत्यरथ पहा).

**भिषज् आथर्वण**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. ९७).

**भीम**—तिसऱ्या मरुद्गणांपैकीं एक.

२ विकुंठ देवांतील एक.

३ एकादश रुद्रांपैकीं एक.

४ पांचजन्य ऊर्फ तप नामक अग्नीचा पुत्र.

५ कश्यप व मुनि यांचा पुत्र, एक गंधर्व.

६ कश्यप व खशा यांच्या पुत्रांपैकीं एक.

७ हिरण्याक्षाशीं देवांचें युद्ध झालें, त्या वेळीं अग्नीनें मारलेला एक राक्षस (पद्म. सृ. ७५).

८ (सो. अमा.) भागवतमतें विजयाचा पुत्र. विष्णु व वायु यांच्या मतें अमावसूचा पुत्र.

९ (सो. क्रोष्टु.) हरिवंश व ब्रह्म यांच्या मतें ज्यामघाचा पुत्र. महाभारतांत यास निमि म्हटलें आहे. हें कथाचें नामांतर असावें.

१० ( सो. पूरु. ) इलिनाचा पुत्र व दुष्यन्ताचा भाऊ ( म. आ. ८८. १७ कुं. ).

११ ( सो. क्रोष्टु. ) दाशार्ह ऊर्फ विदूरथाचा पुत्र ( पद्म. सृ. १३ ).

१२ ( सो. पूरु. ) वायुमतें महावीर्याचा पुत्र.

१३ विदर्भ देशाधिपति एक राजा. हा बहुत कालपर्यंत अनपत्य असतां एकदां दमन ऋषि याच्याकडे आला; तेव्हां यानें बरेच दिवस त्याला घरीं ठेवून घेऊन स्त्रीसहित त्याची उत्तम सेवा केली. त्यावरून प्रसन्न होऊन तुला 'उत्तम तीन पुत्र व एक कन्या अशीं अपत्यें होतील' असा त्यानें यास वर दिला. पुढें दमन गेल्यावर लवकरच यास एक कन्या व तीन पुत्र झाले. यानें कन्येचें नांव दमयंती आणि पुत्रांचीं दम, दान्त व दमन अशीं नांवें ठेविलीं. हीच दमयंती पुढें नल राजाची स्त्री झाली ( म. व. ५३ ). दमयंतीनें दुसऱ्या स्वयंवराची जी रचना केली, ती तिनें यास कळूं दिली नव्हती ( दमयंती पहा ). हा व चेदी देशचा राजा वीरबाहु हे समकालीन होते.

१४ (सो. क्रोष्टु.) सत्वताचा पुत्र. याचा पुत्र अंधक. हा रामाचा समकालीन होता. हा आनर्तांचा ( गुजराथचा ) राजा. शत्रुघ्नानें मधूला मारून मथुरा स्थापन केली. ती त्यानंतर यानें जिंकून घेतली ( ह. वं. २. ३८ ).

१५ लंकेंतील रावणपक्षीय एक राक्षस. लंकेंत आल्यावर मारुति प्रथम याच्या घरावर उतरला ( वा. रा. सुं. ६ ).

१६ ( सो. कुरु. ) मत्स्यमतें रुचिराचा पुत्र.

१७ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. यास पांडुपुत्र भीमानें मारिलें ( म. भी. ६४. ३६ कुं. ).

१८ (सो. कुरु.) पांडु व कुन्ती यांचा पुत्र. हा वायूचा दुसरा अवतार होय. जन्मला त्या वेळीं 'हा बलवानांचा राजा आहे' अशी आकाशवाणी झाली (म. आ. १२९ कुं.). हा इतका बलवान् होता कीं, एकदां आईचे मांडीवरून शिळेवर पडला व त्याचप्रमाणें दुसऱ्यांदां उंच ठिकाणीं उभ्या असलेल्या आईचे कडेवरून मोठ्या कडथावर पडला; पण दोन्ही वेळां दगडांचाच चुरा झाला. याला कोणत्याहि प्रकारची इजा झाली नाहीं ( म. आ. १२९ कुं. ). पुढें वसुदेवास कृष्णाकडून पांडवांची हकीगत कळल्यावरून त्यानें आपला पुरोहित काश्यप यास शतशृंगावर पाठविलें व पांडवांचें उपनयन करविलें. नंतर शर्यातीच्या शुक्र नांवाच्या पहिल्या मुलानें पांडवांस धनुर्वेदादिकांचें शिक्षण दिलें. भीमास विशेषतः गदायुद्धाचें शिक्षण दिलें ( म. आ. १३३ कुं. ). पण पांडवांचें उपनयन पांडूच्या मृत्यूनंतर हस्तिनापुरांत झालें, असें गणपत कृष्णाजीच्या प्रतींत आहे ( म. आ. १२८ ). पांडु मरण पावला त्या वेळीं हे सर्व हैमवत पर्वतावरील शतशृंग नामक अरण्यांत राहत असत. नंतर पांडु मरण पावला, म्हणून शतशृंगांत राहणाऱ्या ऋषींनीं पांडवांना हस्तिनापुरीं आणून पोहोंचविलें व त्यांच्या जन्म वगैरेची हकीगत सांगून त्यांना भीष्मादिकांच्या स्वाधीन केलें (म. आ. १२५ कुं. ). नंतर पांडूचें और्ध्वदेहिक होऊन ते हस्तिनापुरींच राहूं लागले. त्या वेळीं धृतराष्ट्राचे पुत्र व पांडव हे एकत्र खेळत. पण हा सर्वांत बलवान् असल्यामुळें सर्वांस आपले बळाचे जोरावर धाकांत ठेवीत असे. हें दुर्योधनास न खपून त्यानें यास नाहींसें करण्याचा विचार केला. व त्याप्रमाणें एकदां अतिशय उंचावरून झोंपेत असतांना त्यानें याला खालीं ढकलून दिलें, सर्प डसविले व विषमिश्रित अन्नादिक खावयास घातलें. पण त्याचा किंचित्हि उपयोग नाहीं ( म. आ. १३७ कुं. ).

एकदां भीमास मारण्याकरितां दुर्योधनानें विष चारण्याची पुनः नवीन युक्ति काढिली. जलविहार करण्याच्या मिषानें जलगृहें निर्माण करून गंगेंत उभीं केलीं व तेथें जलक्रीडा करीत कौरवपांडव फळफळावळ खाऊं लागले. खातांखातां ते एकमेकांस चारूंहि लागले. त्यांत विषपूर्ण अशीं फळें दुर्योधनानें भीमास चारिलीं. पुढें पाण्यांत खेळतांना अतिशय श्रमल्यामुळें भीम कांठावर येऊन झोंपला. ही संधि साधून दुर्योधनानें भीमास लतापल्लवांनीं आंवळून नदींत टाकलें. पण भीम तळाशीं जाऊन नागलोकीं गेला. तेथें हा ज्या ठिकाणीं गेला, त्या ठिकाणीं याचे शरीरभाराखालीं पुष्कळ नागांचीं पिलें चेंगरलीं व मेलीं. तेव्हां इतर नाग चिडले व यास डसले. पण त्या सर्पांच्या डसण्यामुळें याचे अंगांत भिनलेलें विष उतरलें व हा जागा झाला. जागा झाल्यावर तडातड सर्पांना मारूं लागला. तेव्हां कांहीं सर्प भिऊन पळाले व त्यांनीं ही हकीगत वासुकीस जाऊन सांगितली. वासुकीनें यास ओळखून आपलेबरोबर घरीं नेलें ( आर्यक पहा ) व हजार नागांचें बळ ज्यांत सांठविलें आहे अशा अमृताच्या कुंडांतून यास दाखवून त्यांपैकीं लागतील तितक्या प्यावयास सांगितलें. यानें आठ कुंडथा आठच घोंटांत गट्ट केल्या. पुढें यास यथेच्छ झोंप घ्यावयास सांगितली. त्याप्रमाणें हा झोंपला व आठव्या दिवशीं उठला. नंतर हा 'रणांत कधींहि दमणार नाहीं' असा वर घेऊन हस्तिनापुरीं निघून आला व घडलेली हकीगत यानें आपल्या आईला सांगितली. आईनें 'ही गोष्ट कोठेंहि उच्चारूं नकोस' असें सांगितलें. नंतर भीष्मानें कौरवपांडवांच्या शिक्षणाकरितां कृपाचार्यांची योजना केली, व तेहि त्याजवळ शिकूं लागले ( म. आ. १३९ कुं. ). नंतर द्रोणाचार्यांची शिक्षक म्हणून योजना झाली. शिक्षण आपल्या मनाप्रमाणें झाल्यावर त्यांची परीक्षा झाली. भीम व दुर्योधन यांची गदायुद्धाची परीक्षा चालली असतां ते एकमेकांशीं युद्धास [illegible] झाले. पण [illegible]

सांगण्यावरून अश्वत्थाम्यानें त्यांचें निवारण केलें. अशाच तऱ्हेचा अर्जुन व कर्ण यांमध्ये प्रसंग आला असतां, भीम कर्णाला बराच टाकून बोलला होता ( म. आ. १४२; १४३; १४७ कुं. ). द्रोणानें अर्जुनाबरोबर भीमासहि द्रुपदावर पाठविलें होतें. भीमानें गजसैन्याचा पाडाव केला व हा राजधानी उध्वस्त करणार, पण अर्जुनानें याचें निराकरण केलें ( म. आ. १३८ कुं. ). युधिष्ठिरास यौवराज्याभिषेक झाल्यावर भीमास बलरामापासून खड्ग, गदा व रथ यांविषयीं अपुरें राहिलेलें शिक्षण पूर्णपणें मिळालें ( म. आ. १५१ कुं. ).

पुढें कणिक ब्राह्मणानें सांगितलेल्या नीतीवरून व दुर्योधनाच्या दुराग्रहावरून पांडवांस दूर करण्याचा विचार धृतराष्ट्राच्या मनांत आला. त्यानें 'वारणावतास फार उत्तम यात्रा भरते,' वगैरे कंडी पिकवून पांडवांचें तिकडे मन ओढेल अशी व्यवस्था केली व पुढें त्यांस तेथें जाण्यास अनुमोदन देऊन वारणावतास पाठविलें ( म. आ. १५५ कुं. ). पुढें दुर्योधनानें वारणावतांत त्यांना राहण्याकरितां व जाळण्याकरितां जलद जळणाऱ्या पदार्थांचें एक घर बनविलें व त्यांत त्यांची राहण्याची व्यवस्था करविली. ही सर्व हकीगत विदुरानें धर्मराजास म्लेच्छभाषेंत सांगितली व ती त्यानें आपल्या आईस आणि भावांस सांगितली. तेव्हां भीमानें दुसरीकडे राहण्यास जाण्याची सूचना केली. पण तें नाकारून युक्तीनें सुटून जाण्याचें धर्मानें ठरविलें. पुढें विदुराच्या मित्रानें त्या घरांतून एका अरण्यांत जाईल असें एक भुयार तयार केलें. पुढें एके दिवशीं एक दुष्ट स्त्री आपल्या दुष्ट पांच पुत्रांस घेऊन दारूनें धुंद होऊन त्या घरांत अन्नार्थ आली व अन्न वगैरे घेऊन तेथेंच राहिली असतां भीमानें स्वतःच त्या घरास आग लाविली व पांडव भुयारांतून पळून गेले. त्या वेळीं दुर्योधनाचा हस्तकहि दारूनें धुंद व बेसावध असल्यामुळें मरण पावला ( म. आ. १५६-१६० कुं. ). पुढें हे गंगेच्या तीरावर आले असतां विदुराच्या हस्तकानें त्यांस गंगापार केलें. पुढें भीम आपण लवकर लांबचा पल्ला गांठावा या हेतूनें आईस खांद्यावर, नकुलसहदेवांस कडेवर व धर्मार्जुनांस हातीं धरून वेगानें एका गहन अरण्यांत गेला. पांडव व कुंती अगदीं दमून जाऊन तहानेलीं झालीं होतीं, म्हणून भीमानें त्या सर्वांस एका मोठ्या झाडाखालीं ठेवून आपण पाणी आणावयास गेला. पाणी घेऊन येऊन पाहतो तों तीं सर्व झोंपीं गेलीं होतीं. त्या वेळीं याला फार वाईट वाटलें. पण हा तेथेंच त्यांचें रक्षण करीत व त्यांच्या उठण्याची वाट पाहत राहिला. इतक्यांत जवळच राहणाऱ्या हिडिंब नांवाच्या राक्षसास यांचा वास येऊन त्यानें आपली बहिण हिडिंबा हिला यांना आणण्यास पाठविलें. पण ती भीमास पाहून मोहित झाली व यास आपला स्वीकार करून पळून जाण्यास विनवूं लागली. पण भीमानें तिचें ऐकिलें नाहीं. आपल्या बहिणीस यावयास उशीर झाला म्हणून हिडिंब स्वतः आला. शेवटीं भीमाची व त्याची बाचाबाची होऊन दोघांचें युद्ध जुंपलें. तेव्हां यांच्या द्वंद्वयुद्धांत होणाऱ्या आवाजामुळें कुंती इतर व पांडव जागे झाले. ते जागे झाल्यावर त्यांस हिडिंबा दिसली. कुंतीनें विचारिल्यावरून तिनें सर्व हकीगत सांगितली. पुढें भीमानें हिडिंबास ठार केलें व ते आपला मार्ग आक्रमूं लागले. हिडिंबाहि त्यांचे पाठोपाठ जाऊं लागली, पण भीमानें तिला ठार मारण्याचा धाक घातला. तेव्हां कुंती व हिडिंबा यांचा बराच संवाद झाल्यावर धर्म व कुंती यांनीं भीमास तिचें पाणिग्रहण करण्यास सांगितलें. तेव्हां भीमानें तिजकडून 'एक पुत्र प्राप्त होईपर्यंतच तुजशीं रममाण होईन' ही अट कबूल करवून घेऊन तिचे विनंतीस रुकार दिला. रुकार मिळाल्यावर ती रोज यास निरनिराळ्या रम्य ठिकाणीं नेऊन याच्याशीं रमे व संध्याकाळीं यास परत आणून पोंहोंचवी. पुढें तिला घटोत्कच झाला. नंतर व्यासाचे सांगण्यावरून हे एकचक्रा नगरींत गेले व तेथें भीमानें बकाचा वध केला.

पुढें जवळच द्रुपद राजाची कन्या द्रौपदी ऊर्फ कृष्णा हिचें स्वयंवर असल्याचें समजलें. तेव्हां हे सर्व स्वयंवरास गेले. तेथें अर्जुनानें पण जिंकिल्यावर अर्जुन व भीम यांचें इतर राजांशीं, त्यांतल्या त्यांत भीमाचें शल्याशीं, घनघोर युद्ध झालें. कारण धर्म, नकुल व सहदेव हे ताबडतोब निघून गेले होते. पुढें अर्जुन व भीम हे घरीं आल्यावर यांनीं 'आई, भिक्षा आणिली' असें थट्टेनें म्हटलें. पण ही थट्टा न समजून तिनें 'सर्वजण मिळून घ्या' असें सांगितलें. पुढें पुष्कळ वाटाघाटीनंतर द्रुपदानें द्रौपदीचें प्रत्येकाशीं निरनिराळ्या दिवशीं लग्न लाविलें. त्या वेळीं दुसऱ्याशीं लग्न करते वेळीं द्रौपदी कन्याच म्हणजे कुमारी असे. या स्वयंवराचे वेळीं कृष्णानें पांडवांस ओळखून तसें बलरामास सांगितलें होतें व स्वयंवराहून परत जात असतां ते दोघे भेटावयास आले होते ( म. आ. २०४-२०६; २१५ कुं. ). नंतर पांडव द्रौपदीसह हस्तिनापुरीं आले. तेव्हां भीष्मादिकांनीं पूर्ण विचारांतीं यांस अर्धे राज्य देऊन टाकिलें. पुढें अर्जुनानें खांडवदाहांतून सोडविलेल्या मयानें यांना प्रत्युपकारार्थ राजसूय यज्ञाकरितां एक भव्य सभा बांधून दिली. या सभेकरितां वृषपर्व्याचे सभेंतून सामान आणिलें. त्यांत वृषपर्व्याची गदा आणून ती त्यानें भीमास दिली. पुढें धर्मराजानें राजसूय यज्ञ केला. त्या वेळीं प्रथमतः कृष्णाचे सल्ल्यानें युधिष्ठिरानें अर्जुन व भीम यांस श्रीकृष्णाबरोबर जरासंधावर पाठविलें. तेथें हे ब्राह्मणवेषानें गेले व 'आमच्यांतील एकाशीं युद्ध कर' असें म्हणाले.

त्याप्रमाणें जरासंधाचें भीमाशीं दहा दिवस युद्ध झालें. त्यांत दहा दिवसांनीं जरासंध दमल्यावर कृष्णानें खुणेनें सांगितल्या-वरून भीमानें त्यास उभें फाडून फेंकून दिलें. पण तो पुनः सांधला गेला. तेव्हां कृष्णानें पुनः केलेल्या खुणेवरून भीमानें त्यास फाडलें व उजवा भाग आपले उजवीकडे व डावा भाग आपले डावीकडे फेंकून दिला. यामुळें मात्र तो पुनः सांधला गेला नाहीं (म. स. २० कुं.). नंतर धर्मानें याला पूर्व दिशा जिंकिण्याकरतां पाठविलें. याच्या साहाय्यार्थ म्हणून मद्रक राजे याचेबरोबर होते (भा.१०.७२. ४४). यानें पांचाल, विदेह, गण्डक, दशार्ण, अश्वमेध अशा क्रमानें पूर्वेकडील देश जिंकिले आणि दक्षिणेकडील पुलिन्द नगरावर यानें स्वारी केली. तेथील राजाला जिंकून हा चेदिराज शिशुपालाकडे वळला व तेथें एक महिना राहून यानें कुमार देशांतील श्रेणिमन्त जिंकिलें. कोसलाधिपति बृहद्बल, अयोध्येचा दीर्घयज्ञ, गोपालकक्षदेश, उत्तर कोसल, मल्लाधिप, हिमालयाजवळचा जलोद्भवदेश, भल्लाट, शुक्तिमान् पर्वत, काशिराज सुबाहु, सुपार्श्व, राजपति क्रथ, मत्स्यदेश, मलद, अभयदेश, पशुभूमि, मदधारपर्वत आणि सोमधेयांना जिंकून हा उत्तरेकडे वळला. नंतर वत्सभूमि, भर्गाधिप, निषादाधिपति, मणिमत्प्रमुख राजे, दाक्षिणमल्ल, भोगवान् पर्वत, शर्मक, वर्मक, वैदेहक जनक, यांना शांततेनें जिंकिलें. शक व बर्बर यांना कपटानें जिंकिलें. शिवाय इंद्र पर्वताजवळचे सात किराताधिपतींना सुह्म, प्रसुह्म, मागध, दण्डराजा, दण्डधार राजा, जरासन्धाचें गिरिव्रजनगर यांना जिंकिल्यावर त्यांच्या साहाय्यानें कर्ण व पर्वतवासी राजे जिंकून मोदागिरिवरील राजाचा वध करून पुंड्राधिप वासुदेवावर स्वारी केली. नंतर कौशकीच्या वाळवंटांतील राजाला जिंकून वंगराजावर स्वारी केली. नंतर समुद्रसेन, चन्द्रसेन, ताम्रलिप्त, कर्वटाधिपति, सुह्माधिपति, सागरवासी सर्व म्लेच्छ, लौहित्य हे जिंकिले व हा इंद्रप्रस्थास परत आला (म. स. ३०-३१ कुं.).

चौघां पांडवांनीं चारी बाजूंकडून दिग्विजय करून बरेंचसें द्रव्यादि आणिल्यानंतर धर्मराजानें राजसूय यज्ञ केला. त्या वेळीं निरनिराळ्या गृहस्थांकडे निरनिराळीं कामें होतीं. त्यांत भीमाकडे पाकशालाधिपतित्व दिलें होतें (भा. १०. ७२. ४४). हा यज्ञ ज्या मयसभेंत झाला, तिची रचना फारच चातुर्याची व चमत्कारिक पण फसवी असल्यामुळें दुर्योधनाची फजिती होई व त्या फजितीला हा हंसे. त्यामुळेंच पुढें भयंकर प्रसंग ओढवला. पुढें मयसभेंत पहावयास सांपडलेल्या ऐश्वर्याचा हेवा वाटून तें हिरावून घेण्याकरितां दुर्योधनानें धर्मास द्यूत खेळावयास बोलाविलें व आपल्या ऐवजीं शकुनीस खेळावयास बसवून धर्माकडून सर्व हरण करून घेतलें. द्रौपदीहि हिरा-वली गेली. पुढें द्रौपदीस जिंकिलें म्हणून तिला सभेंत आणिलें व तिचें वस्त्र दुःशासन फेडूं लागला, तेव्हां भीमानें 'याचें रक्त प्राशन करीन' म्हणून प्रतिज्ञा केली. तसेच दुर्योधनानें आपलें डावें अंग नग्न केलें व तो द्रौपदीसमोर उभा राहिला तेव्हां भीमानें त्याची डावी मांडी फोडण्याची प्रतिज्ञा केली (म. स. ८४-९२ कुं.).

वनवास भोगावयाचा ठरल्यावर पांडव अरण्यांत जाण्यास निघाले व तीन दिवसांनीं एका घोर अरण्यांत शिरले. त्या अरण्यांत बकाचा भाऊ किर्मीर राहत होता. त्याची व धर्माची बोलाचाली होऊन लढाईपर्यंत पाळी आली. तेव्हां भीमानें त्याच्याशीं युद्ध करून त्यास ठार केलें (म. व. ११ कुं.). यानंतर एकदां द्रौपदीनें धर्मास आपली संन्यासवृत्ति टाकून देऊन राज्य परत मिळविण्याची खटपट करण्यास सांगितलें असतां भीमानें तिच्या म्हणण्यास दुजोरा येईल असेंच भाषण केलें. पण धर्मराजाच्या युक्तिवादापुढें यांचें कांहीं चालेना (म. व. ३३-३५ कुं.). एकदां भीम व द्रौपदी गप्पा मारीत बसलीं असतां वाऱ्याच्या झोताबरोबर द्रौपदीपुढें एक हजार पाकळ्यांचें कमळ येऊन पडलें. तसलींच आणखी पुष्कळ फुलें आपणास हवीं असल्याचें यास सांगून आपण तें फूल धर्मास देण्यास निघून गेली. आपल्या प्रियेचें प्रिय करण्याकरितां भीम तसलीं फुलें आणण्याकरितां गंधमादन पर्वतावर जाण्यास निघाला. हा निघाल्याचें याच्या चालतांना झालेल्या गर्जनेवरून मारुतीनें ओळखिलें व हा पुढें गेल्यावर यास कोणी शाप वगैरे देईल या भीतीनें मार्ग अडवून तो वाटेंत बसला व त्यानें रस्त्यावर आपलें शेंपूट पसरलें. हा रस्ता अरुंद होता म्हणून भीमानें मारुतीस बाजूस होण्यास सांगितलें. पण तो ऐकेना. शेवटीं मारुतीनें याचा गर्वमद उतरविण्याकरितां 'आपलें शेंपूट बाजूला कर व मग पुढें जा' असें सांगितलें. तेव्हां भीम रागावला व त्यानें त्या माकडास याची शेपटी धरून भिरकावून द्यावें असा विचार करून शेपटी उचलूं लागला. पण तो यास उचलेना. तेव्हां हा मारुतीस शरण गेला. तेव्हां आपण कोण आहों तें यास सांगून यानें हट्ट धरल्यावरून समुद्रोल्लंघनकालीं धारण केलेलें विराटरूप त्यानें धारण केलें व भीमास दाखविलें. पण भीमास तें पाहवेना. पुढें मारुतीनें याला आशीर्वाद देऊन 'तूं रणांत ज्या वेळीं सिंहनाद करशील त्या वेळीं मी आपल्या स्वनादानें तुझा नाद दीर्घकाल टिकवीन व अर्जुनाचे रथावर बसून तुमचें रक्षण करीन' असा वर देऊन यास पुढें जाण्यास सांगितलें. व सौगंधिक कमलांचें सरोवर जवळच असून त्याचा मार्ग कोठून आहे तें भीमास सांगून मारुति गुप्त झाला (म. व. १४८. १५३ कुं.). नंतर भीमानें सौगंधिकवनांत प्रवेश केला.

त्यांतून व फेलासांचे पाययाशी गेला असतां सौगंधिक कमलांचें एक सरोवर याच्या दृष्टीस पडलें. तें कुबेराचे ताब्यांत होतें. व त्या सरोवराचे संरक्षणार्थ क्रोधवश नांवाचे राक्षस त्यानें ठेविले होते. भीम कमलांच्या उद्देशानें चालला असतां क्रोधवशांनीं कुबेराची परवानगी आणण्यास भीमास सांगितलें. पण भीमानें तें नाकारिलें. तेव्हां त्यांनीं भीमाशीं युद्ध आरंभिलें. भीमानें त्या सर्वांस पळवून लाविलें. तेव्हां ते कुबेराकडे गेले. कुबेरानें भीमास कमलें नेण्यास अनुमोदन दिलें व भीमानेंहि यथेच्छ विहार करीत तेथील फुलें घेतलीं. इतक्यांत तिकडे धर्मास अपशकुन झाल्यामुळें तो घटोत्कचाचे साहाय्यानें तेथें आला. तेव्हां त्या सर्वांचें कुबेरानें स्वागत केलें व त्यांस तेथेंच राहवून घेतलें. नंतर ते गंधमादन पर्वतावर जाऊन अर्जुनाची वाट पाहत राहिले ( म. व. १५५-१५७ कुं. ). पुढें यानें जटासुराला ठार केलें ( म. व. १५८ कुं. ). पुनः भीम कुबेराच्या वाटेस गेला. तो प्रसंग असा कीं, द्रौपदीनें भीमास जवळपासचा सर्व मुलूख निर्भय करून टाकण्यास सांगितलें असतां भीम तावडतोब निघाला व यानें बरेच क्रोधवश मारिले. तसेंच कुबेराचा मित्र मणिमान् यासहि ठार केलें. कांहीं क्रोधवश पळून गेले; ते थेट कुबेराकडे गेले. कुबेर रागावून तेथें आला, पण तेथें येतांच ही सर्व गोष्ट अगस्त्याच्या शापामुळें झाल्याची त्यास आठवण झाली व त्यामुळें तो न रागावतां त्यानें भीमास याच्या बंधूंसह आपल्या तेथें कांहीं दिवस राहवून घेतलें. कारण कुबेर यावयाच्या अगोदर थोड्या वेळापूर्वी धर्मादिक तेथें येऊन भीमास उपदेश करीत बसले होते ( म. व. १६१ कुं. ). कुबेराच्या येथून निघाल्यावर त्यांनीं मेरूचें दर्शन घेतलें व ते परत गंधमादनावर येऊन राहूं लागले.

एकदां शिकार करीत हा गहन अरण्यांत शिरला, तेथे एका अजगरानें यास गिळिलें. हा अजगर पूर्वजन्मींचा नहुष होय. पुढें धर्मास अपशकुनावरून शंका येऊन तो तेथें आला. त्यास अजगरानें कांहीं प्रश्न विचारिले. त्यांचीं त्यानें योग्य उत्तरें दिलीं. यामुळें तो अजगर मुक्त झाला व भीमहि सुटला ( म. व. १७८-१८३ कुं.; २ नहुष पहा ).

आपल्या संपत्तीचें प्रदर्शन दाखवून पांडवांस खिजविण्याकरितां कौरव आपआपल्या स्त्रियांसह द्वैतवनांत आले. पण इंद्राज्ञेवरून चित्रसेन गंधर्वानें त्यांस पकडून इंद्राकडे चालविलें असतां दुर्योधनाच्या मंत्र्यानें येऊन हें धर्मास सांगितलें. तेव्हां धर्मानें आपल्या भावांना त्यांस सोडवून आणण्याकरितां पाठविलें. भीम या गोष्टीच्या विरुद्ध होता, पण धर्मानें समजूत घातल्यावर हाहि गेला. यानें त्यांस सोडवून चित्रसेनासह धर्मापुढें आणिलें व धर्मानें त्यांना सोडून दिलें.

एकदां सर्व पांडव मृगयेस गेले असतां आश्रमांतून जयद्रथानें द्रौपदी व धौम्य यांस पळविलें. हें कळल्यानंतर अर्जुन, भीम वगैरेंनीं जयद्रथाच्या सैन्याचा पराभव करून द्रौपदीस सोडविलें. बराच वेळ भीम त्याशीं लढत होता. शेवटीं जयद्रथास खालीं पाडून त्याचे डोक्यावर भीमानें लाथ मारिली व नंतर त्यास बांधून धर्मापुढें आणिलें. पण धर्मानें त्यास सोडून दिलें ( म. व. २७१-२७२ कुं. ). एकदां धर्मराजादिक सर्व तहानेनें व्याकुल झाले असतां पाणी आणण्यास नकुल गेला, पण तेथील यक्षरूपानें राहिलेल्या यमधर्मानें त्यास पाणी पिण्याची मनाई केली व 'माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दे' असें म्हटलें. पण तें त्यानें ऐकिलें नाहीं. नंतर पाणी पितांच तो तेथेंच मरून पडला. हीच स्थिति याचे आज्ञेवरून आलेल्या सहदेव, अर्जुन व भीम यांची झाली. पण पुढें धर्मानें येऊन प्रश्नांचीं उत्तरें देऊन वर मिळवून या सर्वांस जिवंत केलें ( म. व. ३१४ कुं. ). वनवास संपल्यानंतर विराटाचे येथें राहण्याचें ठरल्यावर भीमानें आपण आचारी व मल्ल म्हणून राहणार असें ठरविलें ( म. वि. ३ कुं. ). नंतर आचाऱ्याचा वेष घेतला आणि वल्लव हें प्रसिद्ध व जयेश हें प्रच्छन्न नांव स्वीकारलें. नंतर यानें विराटाच्या सभेंत प्रवेश करून घेतल्यावर यानें आपण धर्माकडे आचारी होतों वगैरे सांगून तेथील पाकशाळेच्या अधिपतीची जागा पटकावली ( म. वि. १० कुं. ). पुढें एकदां विराटानें शंकरोत्सव केला. त्या वेळीं कांहीं मल्लांच्या कुस्त्या झाल्या. त्यांत जीमूत नांवाचा एक अति बलाढ्य मल्ल होता, त्याच्याशीं खेळावयास कोणीच उठेना. तेव्हां त्यानें भीमास बोलाविलें. आपणांस कोणी ओळखील या भीतीनें प्रथमतः यानें कांकूं केलें, पण पुढें कुस्ती करून यानें जीमूतास ठार केलें ( म. वि. १५ कुं. ). गणपत कृष्णाजीच्या प्रतींत पौरोगव बल्लव असें नांव दिलें आहे ( बल्लव पहा ).

विराट राजाचा मेहुणा कीचक द्रौपदीवर मोहित होऊन त्यानें तिजवर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां द्रौपदीनें त्या दिवशींच रात्रीं पाकशाळेंत जाऊन भीमास उठवून सर्व हकीकत सांगून कीचकास ठार करण्यास तिनें भीमास विनविलें. तेव्हां यानें तिला 'कीचकाशीं गोडीनें वागून रात्रीचे दुसऱ्या प्रहरीं नर्तनागारांत पाठीव, म्हणजे मी त्याचा समाचार घेतों' असा संकेत करून हा नर्तनागारांत जाऊन निजला. त्या ठिकाणीं नटूनथटून कीचक आला होता. तेव्हां दोघांचें भयंकर युद्ध होऊन कीचकास भीमानें ठार केलें. सकाळीं कीचकाचे बंधु तेथें आले. त्यांनीं, द्रौपदीमुळें कीचक मेला, तेव्हां द्रौपदीस याचेबरोबर जाळण्याची शिक्षा देवविली. ते द्रौपदीस जाळण्याचा

प्रयत्न करीत आहेत, तोंच आपणांस ओळखूं नये म्हणून तोंडावर केश ओढून हातांत वृक्ष घेऊन हा तेथें आला. हा द्रौपदीचा गंधर्वपति आला असें वाटून कीचक पळून जाऊं लागले. पण भीमानें त्यांस ठार केलें. नंतर भीम व द्रौपदी निरनिराळ्या मार्गांनीं नगरांत आलीं (म. वि. २०-२७ कुं.).

युद्धारंभीं कृष्णशिष्टाईचे वेळीं सामदामादि केले गेले त्या वेळीं भीमानें कृष्णास साम करण्यास सांगितलें. तेव्हां, हें तूं आपल्या स्वभावाचे विरुद्ध कसें सांगतोस? असें विचारतां यानें योग्य असें त्यास उत्तर दिलें. तेव्हां कृष्ण चकित झाला (म. उ. ७५).

युद्ध सुरू झाल्यानंतर दुसरे दिवशीं युद्धारंभींच भानुमान कलिंग, केतुमान नैषादि व श्रुतायु हे भीमावर धांवले. भीमहि चेदि, मत्स्य व करुष यांसह धांवला. नंतर थोडयाच वेळानें भीमाखेरीज सर्व परतले. परंतु भीमानें एकट्यानें भानुमानाचा पुत्र शक्रदेव यास ठार केलें. नंतर भानुमानास, नंतर त्याचे चक्ररक्षक सत्य व सत्यदेव यांस व नंतर केतुमान् यास ठार केलें. पण पुनः कलिंग तयारीनें आले. तेव्हां भीमाच्या मदतीला शिखंडी, धृष्टद्युम्न व सात्यकि आले. ही गडबड पाहून भीष्मानें सैन्यरचना योग्य तऱ्हेनें करून भीमाकडे धूम ठोकली. सात्यकीनें भीष्माचा सारथि मारिला. त्यामुळें त्याचा रथ उधळला व तो कोणीकडे तरी गेला (म. भी. ५४. कुं.). इतकें होतें तों त्या दिवसाचा पूर्वार्ध संपला (म. भी. ५५. १ कुं.). शल्य व धृष्टद्युम्न यांचें जें युद्ध चवथे दिवशीं झालें त्या वेळीं शल्यास व धृष्टद्युम्नास दहा दहा मदतनीस होते. त्यांत अनुक्रमें दुर्योधन व भीष्म होते. दुर्योधनावर भीमानें चाल केली व दुर्योधनानें आणलेल्या सर्व गजांचा चुराडा केला. तेव्हां दुर्योधनाच्या आज्ञेनें त्याचें सर्व सैन्य भीमावर धांवलें. पण भीमानें त्या सर्वांस चीत केलें, हें पाहून भीष्म यावर धांवला. पण इतक्यांत सात्यकीनें त्याच्याशीं युद्ध सुरू केलें. नंतर दुर्योधन आपल्या बांधवांसह एकवटला आहे ही संधि साधून भीम त्यांवर धांवला. थोड्या वेळानें भीमाचे छातींत बाण मारून दुर्योधनानें यास घायाळ केलें. पण पुनः उठल्यावर भीमानें सेनापति, जलसंध, सुषेण, उग्र, वीरबाहु व त्याचा सारथि भीम, भीमरथ व सुलोचन यांस ठार केलें. पण पुढें भगदत्तानें भीमास मूर्च्छित केलें (म. भी. ६२-६४ कुं.).

सहावे दिवशींहि यानें अतिशय पराक्रम करून विळ्यानें गवत कापावें अगर दांडक्यानें मातीचे गोळे फोडावे तद्वत् आपल्या गदेनें सर्व शत्रुसैन्य चिरडिलें. पण शत्रूंच्या असंख्य बाणांनीं विद्ध होऊन हा घायाळ झाला असतां द्रुपदपुत्रानें याला रथांत घालून परत नेलें (म. भी. ७७ कुं.).

आठवे दिवशीं भीष्म संतापून आला असतां, त्याचा सारथि भीमानें मारिला. त्यायोगानें भीष्माचा रथ उधळला. नंतर धृतराष्ट्रपुत्र सुनाभ्य मारिला. त्यामुळें तें सहन न होऊन त्याचे सात भाऊ आदित्य, केतु बव्हाशी, कुंडधार, महोदर, अपराजित, पंडितक व विशालाक्ष हे भीमावर धांवले. पण भीमानें त्या सर्वांस ठार केलें. पुढें याच दिवशीं मध्याह्नीं भीमानें खूप पराक्रम केला (म. भी. ८८-८९ कुं.). याच दिवशीं संध्याकाळीं भीमानें अनाधृष्टि, कुंडली कांडभेदी, विराज, दीप्तलोचन, दीर्घबाहु. सुबाहु व मकरध्वज इ. धृतराष्ट्राचे बरेच पुत्र ठार केले (म. भी. ७६ कुं.).

नवव्या दिवशीं भगदत्त व श्रुतायु यांनीं गलबला घेऊन भीमास कोंडिलें. पण भीमानें त्या सवांचा पुरा हडविला (म. भी. १०२ कुं.).

दहावे दिवशीं भगदत्त, कृप, शल्य, कृतवर्मा आवन्त्य, बंधु, जयद्रथ, चित्रसेन, विकर्ण व दुर्मर्षण एवढ्यांशीं भीमाचें युद्ध झालें. भीम या दहांशीं लढत असतांहि याचा पराभव झाला नाहीं. अर्जुन शिखंडीला पुढें घालून भीष्मावर जात असतां तेथें हा आला व या दोघांनीं त्या रावांना मोड केला (म. भी. ११३. ११ कुं.).

अकराव्या दिवशीं अभिमन्यूनें शल्याचा सारथि मारिला. तेव्हां शल्यानें त्यास गदायुद्धास बोलाविलें. पण अभिमन्यूस बाजूला सारून हा स्वतः त्याशीं गदायुद्ध करूं लागला. बऱ्याच वेळानें भीमानें शल्यास मूर्च्छित केलें (म. द्रो. १४ कुं.).

चवदाव्या दिवशीं अर्जुन जयद्रथाचे वधार्थ गेला होता. पण तो परत येईना. तेव्हां धर्मानें भीमास तिकडे जावयास सांगितलें. त्याप्रमाणें हा जात असतां दुःशल, चित्रसेन, कुंडभेदी, विविंशति, दुर्मुख, दुःसह, विकर्ण, शल, विंद, अनुविंद, सुमुख, दीर्घबाहु, सुदर्शन, वृंदारक, सुहस्त, सुषेण, दीर्घलोचन, अभय, रौद्रकर्मन्, सुवर्मन् व दुर्विमोचन हे याजवर धांवून आले. पण त्यांस ओलांडून हा पुढें गेला. तेव्हां यास द्रोण आडवा आला. या वेळीं मानापमानावरून दोघांची बोला-चाली झाली व भीमानें चिडून त्याचा रथ मोडिला. नंतर दुःशासनाचा पराभव केला. पुढें कुंडभेदी, अभय व रौद्रकर्मन् यांस ठार मारिलें. नंतर आणखी धृतराष्ट्राचा पुत्र वृंदारक यास मारिलें. यानंतर पुनः द्रोण आडवा आला. तेव्हां भीमानें पादचारी होऊन द्रोणाचे एकामागून एक असे आठ रथ भिरकावून दिले. शेवटीं आणखी सैन्य ओलांडीत हा अर्जुनाजवळ पोहोंचला (म. द्रो. १२६-१२८ कुं.). नंतर अर्जुन भेटल्याची

खग म्हणून यानें आपला शंख वाजविला व मोठमोठ्यानें हा गर्जू लागला. हें पाहून कर्ण याजवर धांवला. तेव्हां भीमानें कर्णाच्या रथाचे घोडे मारिले; म्हणून कर्ण वृषसेनाच्या रथावर चढून परत गला. याच वेळीं भीमानें दुःशलास ठार केलें ( म द्रो. १२९ कुं. ). कर्णानें भीमास युद्धास पुनः आव्हान केलें. पण युद्धांत कर्णास मूर्च्छा आली व तो पळून गेला. पुनः कर्ण तयार होऊन रथांत बसून आला असतां भीमानें त्यावर चाल केली. त्यास भीमानें पुष्कळ वेधिलें, रथहीन केलें व शेवटीं पळवून लाविलें. या वेळीं भीमानें दुर्मुखास ठार केलें ( म. द्रो. १३४. २० कुं. ). कर्णाचा पराभव झालेला पाहून भीमावर दुर्मर्षण, दुःसह, दुर्मद, दुर्धर व जय हे धांवले. पण त्यांस भीमानें ठार केलें. यानंतर कर्ण व भीम यांचें पुनश्च युद्ध झालें. त्यांत कर्णाचा पराजय होतोसा पाहून दुर्योधनानें आपले बंधु शत्रुंजय, शत्रुसह, चित्र, चित्रायुध, दृढ, चित्रसेन व विकर्ण यांस मदतीस पाठविलें, पण भीमानें त्या सर्वांस ठार केलें. आणखी चित्रवर्मा, चित्राक्ष व शरासन यांसहि ठार केलें. विकर्ण हा भीमाचा आवडता असल्यामुळें भीम यानें त्याजबद्दल बराच शोक केला ( म. द्रो. १३५-१३७ कुं. ). नतर कर्ण व भीम यांचें पुनः युद्ध झालें. पण कर्णानें लवकरच याशीं लढण्याचें सोडून दिलें ( म. द्रो. १३९ कुं. ). नुकत्याच झालेल्या युद्धांत कर्णानें भीमास ' खादाड स्वयंपाकी ' वगैरे म्हटलें त्याचा राग येऊन अर्जुनास आपली प्रतिज्ञा लवकर पूर्ण करण्यास यानें सांगितलें ( म. द्रो. १४८ कुं )

त्याच दिवशीं रात्रीं आपल्या पित्यास मारिल्याचा सूड उगविण्याकरितां भानुमान कलिंगाचा पुत्र भीमावर धांवला. त्या वेळीं भीमानें एका बुक्कीसरसा त्याचा चुराडा केला. नंतर रथावरून ध्रुवाच्या रथांत जाऊन यानें त्यासहि मुष्टिप्रहारानेंच ठार केलें. नंतर जयराताचे रथांत जाऊन त्यास एका चपराकीनेंच परलोक दाखविला. तसेंच दुष्कर्षणाचा चेंदामेंदा केला ( म. द्रो. १५६ कुं ). नंतर बाल्हीकाशीं भीमाचें युद्ध झालें. त्यांत बाल्हीकाचे पुत्रास मूर्च्छित केलें. पण बाल्हीकानें भीमास घायाळ केलें. त्यांतून हुषार होतांच भीमानें दृढरथ, नागदत्त, विरजा, सुहस्त यांस ठार केलें ( म. द्रो. २५.८ कुं. ). नंतर कांहीं वेळ भारद्वाजांजवळ लढत असणारा दुर्योधन भीमावर धांवला. त्यांत दुर्योधनाचा पराभव झाला ( म. द्रो. १६७-१६८ कुं. ). द्रुपद व विराट ठार झाले हें पाहून भीम व धृष्टद्युम्न द्रोणावर धांवले. नंतर भीमाचें कर्णाशीं युद्ध झालें, त्यांत त्यांनीं एकमेकांचे रथ, धनुष्य वगैरे निरुपयोगी करण्याचा तडाखा चालविला. याचा रथ निरुपयोगी झाला, तेव्हां यानें नकुलाचे रथांत उडी घेतली ( म. द्रो. १८७ कुं. ).

पंधरावा दिवस सुरू झाला, तरी द्रोण आवरत नाहीं हें पाहून कृष्णानें मसलत दिली कीं, अश्वत्थामा मेल्याचें द्रोणास कळल्यास द्रोण शस्त्र खालीं ठेवील व तेणेंकरून त्यास मारणें फार सोपें जाईल. तें ऐकून यानें आपल्याच सैन्यांतील इंद्रवर्म्याचा हत्ती गदेनें मारून हा द्रोणाजवळ येऊन 'अश्वत्थामा मेला' असें ओरडला; व म्हणूनच पुढें द्रोणास मारणें सोपें गेलें ( म. द्रो. १९१ कुं. ). द्रोणाचार्य मेल्यावर वैतागानें अर्जुन आत्महत्येचा विचार करीत होता; तेव्हां भीम त्यास लागेल असें बोलला ( म. द्रो. १९८ कुं. ).

पुढें भीम व अश्वत्थामा यांचें युद्ध जुंपलें. त्यांत अश्वत्थाम्यानें भीमावर नारायणास्त्र सोडिलें. तेव्हां पांडवांकडील लोक हतवीर्य झाले व शस्त्रास्त्रें टाकून रथांतून पायदळी झाले. अर्जुनानें त्या नारायणास्त्राचे भोंवतीं वारुणि अस्त्र पसरिलें व त्यास रथाखालीं ओढून शस्त्रहीन केलें. तेव्हां तें अस्त्र शमलें. नंतर पुनः तयारी करून पांडव आले असतां अश्वत्थाम्यानें याच्याशीं युद्ध करून याच्या सारथ्यास घायाळ करून पळविलें ( म. द्रो. २००-२०१ कुं. ).

कर्णार्जुनांनीं सोळाव्या दिवशीं व्यूहरचना केल्यावर थोड्या वेळानें भीम व क्षेमधूर्ति यांचें हत्तींवरून युद्ध झालें. त्यांत भीमानें क्षेमधूर्तीचा पाडाव करून हत्ती मारून त्यास खालीं उतरविलें व नंतर त्यास ठार केलें ( म. क. ९ कुं. ). नंतर कांहीं वेळानें भीम व अश्वत्थामा यांचें युद्ध झालें. त्यांत दोघेहि एकमेकांच्या शरांनीं व्याप्त होऊन मूर्च्छित पडले. तेव्हां त्यांस त्यांच्या सारथ्यांनीं एकीकडे नेलें ( म. क. १२ कुं. ).

सतराव्या दिवशीं लोकांचा फारच धुव्वा उडत असलेला पाहून दुर्योधनानें आपल्या सैन्यास प्रोत्साहन दिलें व तो स्वतः भीमावर धांवला. पण त्यांत भीमानें त्याचा पराभव करून त्याची सबंध गजसेना ठार केली ( म. क. ४० कुं. ). नंतर थोड्या वेळानें कर्ण व भीम यांचें युद्ध झालें. त्यांत कर्ण विन्मुख होऊन पळून जाण्याचा विचार करीत आहे, तोंच दुर्योधनानें आपल्या भावांस याच्यावर पाठविलें. पण श्रुतर्वा, दुर्धर, क्राथ, विवित्सु, विकट, सम, निषंगी, कवची, पाशी, नंद, उपनंद, दुष्प्रधर्ष, सुबाहु, वातवेग, सुवर्चस्, धनुर्ग्रह, शल व सह या धांवून आलेल्या धृतराष्ट्रपुत्रांपैकीं विवित्सु, विकट, सह, क्राथ, नंद व उपनंद यांस यानें ठार केलें. इतक्यांत पुनः कर्ण तयार होऊन आला. तेव्हां भीमानें त्यास एका बाणानें आरपार छेदिलें. पण पुढें कर्णानें रागावून याचा ध्वज उडवून व सारथि मारून यास विरथ केलें ( म. क. ४६ कुं. ). कर्णाच्या बाणांनीं धर्मराज विंधिला जाऊन हैराण झाला होता. हें भीमाकडून कळल्यावर

अर्जुन धर्माच्या समाचारास निघून गेला ( म. क. ६८ कुं.). नंतर थोड्या वेळानें यानें दुर्योधनाच्या सैन्याचा संहार चालविला. तेव्हां दुर्योधनाच्या सांगण्यावरून शकुनि भीमावर चालून आला. पण भीमानें त्याला भूमीवर लोळविलें. तेव्हां दुर्योधनानें त्यास रथांत घालून परत नेलें ( म. क. ७७ कुं. ). पुढें घनघोर संग्राम सुरू झाला, तेव्हां दुःशासन भीमावर धांवला; पण भीमानें त्याचे घोडे व सारथि मारले. शेवटीं त्यास जमिनीवर पाडून आपणहि पादचारी झाला व त्याचा हात तोडून शिवाय, छाती फोडून त्यांतील रक्त प्याला आणि त्या रक्तानें भरलेल्या हातांनींच यानें दुःशासनानें मोकळे केलेल्या द्रौपदीच्या केसांची वेणी घातली ( पद्म. उ. १४९ ). अशा तऱ्हेनें यानें आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. याच सुमारास यानें आणखी अलंबु, कवचिन्, खड्गिन्, दण्डधार, धनुर्धर, निषंगि, वातवेग, सुवर्चा इ. धृतराष्ट्रपुत्रांना ठार मारिलें ( म. क. ८७-८८ कुं. ).

अठराव्या दिवसाच्या युद्धांत कृतवर्म्यानें भीमाचे घोडे मारिले. तेव्हां यानें दुसरे अश्व जोडिले. ते अश्वत्थाम्यानें मारिले. परंतु भीमानें कृतवर्म्याचा रथ तोडिला व पुढें शल्याशीं युद्ध केलें. त्यांत शल्याच्या सारथ्यास मारिलें व नंतर दोघांचें प्रत्यक्षपणें गदायुद्ध सुरू झालें. त्यांत याला मूर्च्छा आली; पण पुनः सावध होऊन हा कौरवसेनेशीं लढूं लागला ( म. श. १२ कुं. ).

भीमानें गजसैन्याचा धुव्वा उडविल्याचें पाहून भीमावर दुर्मर्षण, श्रुतांत, जैत्र, भूरिबल, रवि, जयत्सेन, सुजात, दुर्विषह, दुर्विमोचन, दुष्प्रधर्ष व श्रुतर्वा धांवले. पण भीमानें या सर्वांस ठार केलें ( म. श. २६ कुं. ). त्यानंतर यानें सुदर्शनावर धांवून जाऊन त्याला ठार केलें ( म. श. २७ ).

नंतर ह्रदप्रविष्ट दुर्योधनास युधिष्ठिरानें ‘ आमच्यापैकीं एकास मारून तूं खुशाल राज्योपभोग घे ’ असें म्हटल्यावर तो बाहेर आला व लढूं लागला. भीमाचें व त्याचें घनघोर युद्ध झालें. त्यांत अर्जुनानें कृष्णाचे सांगण्यावरून आपली डावी मांडी थोपटून भीमास खूण केली. ती पाहून भीमानें त्याच्या मांड्या फोडून त्यास खालीं पाडिलें व पूर्वीच्या उखाळ्यापाखाळ्या काढून भीमानें त्याचे डोक्यांत डावी लाथ हाणली. त्यामुळें लवकरच दुर्योधन मरण पावला. हें अधर्मयुद्ध केलें, म्हणून बलराम रागावला व भीमावर धांवला. पण कृष्णानें त्याचें सांत्वन केलें ( म. श. ५७. ६० कुं. ).

पुत्रशोकानें संतप्त झालेल्या द्रौपदीनें धर्मराजास अश्वत्थामा मेलेला ऐकावा अशी इच्छा प्रदर्शित केली. पण धर्म तिची समजूत घालूं लागला. तेव्हां ती भीमाकडे आली व ‘ अश्वत्थाम्यास मारून त्याचा मणि आणा ’ असें यास ती म्हणाली. तेव्हां भीमानें तिचें म्हणणें मान्य करून [illegible] मणि आणण्याकरितां गेला. याचे रक्षणार्थ अर्जुनहि गेला. तेथें तुंबळ युद्ध झालें. शेवटीं अश्वत्थाम्यानें आपला मणि काढून दिला ( म. सौ. ११. १२–१६. कुं. ).

पुढें हस्तिनापुरांत आल्यावर धृतराष्ट्रानें युधिष्ठिरास आलिंगिल्यानंतर भीमास बोलाविलें. तेव्हां धृतराष्ट्राची चर्या जाणून कृष्णानें भेटावयास चाललेल्या भीमास बाजूस सारून पूर्वीच चेष्टेनें दुर्योधनानें करून ठेविलेला लोहभीम धृतराष्ट्रापुढें ठेविला. धृतराष्ट्रानेंहि क्रोधांध होऊन त्याचा चुरा केला. ही गोष्ट ज्या वेळीं धृतराष्ट्रास कळली, तेव्हां त्यास पाण्यांत पडल्यासारखें झालें. नंतर कृष्णानें त्याची चांगलीच कानउघाडणी केली ( म. स्त्री. १२-१३ ).

नंतर हा गांधारीस भेटण्यास गेला. त्या वेळीं कौरव बलाढ्य होते, वगैरे प्रशंसा भीमानें केलेली ऐकून गांधारी शांत झाली ( म. स्त्री. १५ कुं. ).

भीमानें धर्मास उद्देशून ‘ आपलें कर्म करीत असावें ’ या विषयावर अनुपमेय भाषण केलें आहे ( म. शां. १० कुं. ). त्याचप्रमाणें यानें धर्मास पापनाशार्थ अश्वमेध करण्याची सल्ला दिली ( म. शां. १६ ). धर्मानें भीमाला युवराज म्हणून अभिषेक केला होता ( म. शां. ४०. ९ कुं. ).

पुढें पांडवांचे धृतराष्ट्राशीं प्रेमळ वर्तन होतें. पण भीमाचें मात्र तसें नव्हतें. ते एकमेकांवर नेहमीं जळत असत. भीम इतरांना न कळत धृतराष्ट्रास टोंचून बोले. तेव्हां धृतराष्ट्रानें तपार्थ वनांत जाण्याचें ठरविलें. अगोदर सर्वांचें श्राद्ध करावें असें मनांत आल्यावरून त्यानें धर्माजवळ द्रव्याची मागणी केली. पण भीम आडवा आल्यावरून त्यानें व अर्जुनादिकांनीं आपल्या खाजगींतून त्यास द्रव्य दिलें ( म. आश्र. १२.१३ कुं. ).

एकदां व्यासानें याला निर्जला एकादशीचें माहात्म्य सांगितलें. तेव्हां यास फार वाईट वाटलें. पण ही एकादशी मुळींच पाणीहि न पितां केल्यास दुसरे कोठलेहि उपवास करावयास नकोत, असें समजल्यापासून भीम तो उपवास करूं लागला. म्हणून दुसरे दिवशींच्या द्वादशीस म्हणजे ज्येष्ठ शुद्ध द्वादशीस पांडवद्वादशी म्हणतात. यास उपवास मुळींच झेपत नसत. पण हा उपवास अति मेटाकुटीनें करी ( पद्म. उ. ५१ ). अश्वत्थामादिकांस शिबिरांत जाण्यास कृष्णानें रक्षणार्थ ठेविलेल्या शिवानें परवानगी दिली. हें कळल्यावर पांडवांनीं त्यास शस्त्रादिकांनीं ताडिलें. त्यामुळें ‘ तुम्ही पुनः जन्म घ्याल ’ असा शिवानें पांडवांना शाप दिला. त्यांत भीम हा वीरण या नांवाचा म्लेच्छ राजा होऊन वनरसा नामक नगरीचा राजा झाला. ( भवि. प्रति. ३. १). वनरसा हें बनारस असून वीरण हा मीरन असावा असें वाटतें.

कौरव-पांडव युद्ध झाल्यानंतर एकदां पांडव मंडळी बसली असतां युद्धाचें सर्व श्रेय कृष्णास दिलेलें पाहून भीमास राग आला व हा अहंकारानें, मीच सर्वांचा नाश करण्यास कारणीभूत आहें, असें म्हणूं लागला तेव्हां कृष्ण गरुडावर बसून भीमासह आकाशमार्गानें दक्षिण दिशेला निघाला. नंतर त्यानें समुद्र व सुवेल पर्वत ओलांडून लंकेजवळ जाऊन बारा योजनें विस्ताराचें एक सरोवर यास दाखविलें व 'त्याचा तळ काढून आण' म्हणून सांगितलें. भीम चार कोस खालीं गेला. परंतु यास पत्ता न लागतां कांहीं प्राणी अंगावर येऊं लागल्यामुळें हा धापा टाकीत मागें फिरून यानें कृष्णास ती हकीकत सांगितली. तें ऐकून कृष्णानें एका आंगठ्याच्या योगानें तें सरोवर फेंकून दिलें. तेव्हां यानें विचारतांच कृष्णानें, ही रामानें मारिलेल्या कुंभकर्णाच्या डोक्याची कवची व त्याला धरणारे सरोगेय नामक प्राणी असुर होत, असें सांगितलें. हा चमत्कार पाहून भीमानें त्याची क्षमा मागितली ( स्कंद. १. २. ६६ ).

पुढें बरेंच वर्षें राज्योपभोग घेतल्यावर अग्नीचे सांगण्यावरून पांडवांनी शस्त्रसंन्यास केला. ते उत्तर दिशेनें वनांत चालले. त्याच दिशेनें जात जात मेरुपर्वत चढूं लागले असतां अनुक्रमें द्रौपदी, सहदेव, नकुल व अर्जुन हीं पतन पावलीं. पुढें भीमाहि पडला. तेव्हां आपण पडण्याचें कारण काय हें यानें धर्मास विचारलें. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, तूं आपणास बलाढ्य समजून इतरांस तुच्छ लेखीत होतास व फार खादाड असल्यामुळें पतन पावलास ( म. महा. २ ). या वेळीं याचें वय एकशें सात वर्षांचें होतें ( युधिष्ठिर पहा ).

यास तीन बायका होत्या. पैकीं पहिली हिडिंबा, तिजपासून यास घटोत्कच झाला. नंतर मुख्य भार्या द्रौपदी. तिजपासून यास सुतसोम नांवाचा पुत्र झाला ( म. आ. ६४. १६४ कुं. ). तिसरी स्त्री काशिराजाची कन्या जलंधरा. ती यानें स्वयंवरांत जिंकिली होती. तिजपासून यास शर्वत्रात नांवाचा पुत्र झाला ( म. आ. ६३. ७६ कुं. ). भागवतांत द्रौपदी व भीम यांच्या पुत्राचें नांव श्रुतसेन असें दिलें आहे व तिसऱ्या स्त्रीचें नांव काली असून पुत्राचें नांव सर्वगत असें दिलें आहे ( भा. ९. २२. २७-३१ ).

याचें शरीर भव्य असून अंगकांति सुवर्णासारखी होती. याच्या ध्वजावर सिंह असून रथाचे घोडे अस्वली रंगाचे होते. याच्या धनुष्याचें नांव वायव्य व शंखाचें पौंड्र होतें. याचें मुख्य आयुध गदा होय. यानें धृतराष्ट्राचे शंभरच्या शंभर पुत्र मारिले, असें भागवतांत दिलें आहे (भा. १.१५. १५ ). याची धृतराष्ट्रास फार भीति वाटे, असें सर्व ठिकाणीं आढळतें.

१९ दूर्व नामक ब्राह्मणाचा एक अंत्यज मित्र ( गणेश. १. ७६; दूर्व पहा ).

२० एक शूद्र. द्वापरयुगांत हा होऊन गेला. यानें अतिशय ब्रह्महत्या केल्या. वेश्येच्या संगतींत यास फार आनंद होई. एकदां एका ब्राह्मणाच्या घरीं चोरीस्तव हा गेला असतां कांहीं कारण पाहिजे म्हणून यानें त्याजवळ भिक्षा मागितली. पण आपण एकटा असल्याचें सांगून त्यानें यास तांदूळ वाढण्याचें कबूल केलें. पण यानें आपणहि एकटेच असल्याचें सांगून त्याची सेवा करण्याच्या निमित्तानें हा तेथेंच राहिला. पुढें कांहीं दिवसांनीं दुसरेच चोर तेथें येऊन त्यांनीं हा रक्षक असावा, असें समजून यास ठार मारिलें. पण यानें निदान कांहीं दिवस ब्राह्मणाची सेवा केली होती, म्हणून याचा उद्धार झाला ( पद्म. ब्रह्म. १४ ).

२१ एक खाटिक. शमीमाहात्म्याकरितां याची कथा आली आहे ( गणेश. १.२६ ).

२२ तोण्डमान् नामक राजाच्या राज्यांत कुर्व नांवाच्या गांवीं एक भीम नामक कुंभार राहत होता. हा रोज श्रीनिवासाची पूजा करी ( स्कंद. २. १. १० ).

२३ विदर्भांतील कौंडिण्य नगरचा राजा. याच्या बापाचें नांव चित्रसेन. हा निपुत्रिक असल्यामुळें यानें आपलें राज्य मनोरंजन व सुमंतु या प्रधानांचे ताब्यांत देऊन अरण्याचा मार्ग धरिला. प्रधानांस 'कदाचित् माझें काम झालें तर मी परत येईन' असें सांगितलें होतें. पुढें रानांत यास विश्वामित्र भेटला व त्यानें यास प्रथमदर्शनींच 'तुला पुत्र होईल' असा वर दिला. नंतर यास याचे वंशांत गणेश हें दैवत कसें आलें तें सांगून यास गणेशोपासना करण्यास सांगितलें. पुढें गणेशाच्या प्रसादानें यास पुत्र झाला. त्याचें नांव रुक्मांगद (गणेश.१. १९-२७).

२४ गुर्जरदेशीय मूलवर्मा राजाचा पुत्र ( भवि. प्रति. ३. २१ ).

२५ महीराज नामक देहलीपति राजास विविंशति कौरवाच्या अंशानें झालेला पुत्र. यास विद्वन्माला नामक स्त्री होती. ती पट्टणाधिपति पूर्णीमलाची कन्या. यास ब्रह्मानंदानें ठार केलें ( भवि. प्रति. ३. १७. ३१ ).

**भीम वैदर्भ**—श्यापर्णाचा यज्ञांत प्रवेश झाल्यानंतर जी सोमाची विशिष्ट परंपरा सांगण्यांत आली, त्यांत दैवावृधानें ती परंपरा भीमाला सांगितली व भीमानें वैदर्भाला सांगितली. सायणाचार्य या दोन व्यक्ति मानितात, पण एकच व्यक्ति असावी ( ऐ. ब्रा. ७.३४ ).

**भीमक**—भीष्मकाचें नामांतर.

**भीमकाय**—त्रिपुरासुराचा एक सेवक. कांहीं कालपर्यंत त्रिपुरानें पृथ्वीचें राज्य यास दिलें होतें (गणेश. १.३९.१३).

**भीमकी**—रुक्मिणीचें नामांतर.

**भीमकेश**—( बृहध्वज पहा).

**भीमपायन**—( भौतपायन पहा ).

**भीमबल**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**भीमरथ**—( सो. क्रोष्टु. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें विकृति राजाचा पुत्र. मत्स्यमतें विमलपुत्र.

२ ( सो. क्षत्र. ) भागवत व वायु यांच्या मतें केतुमत्‌चा पुत्र. यास विष्णूंत अभिरथ म्हटलें आहे. याला महाभारतांत भीमसेन म्हटलें आहे.

३ युधिष्ठिराच्या सभेंतील राजा ( म. स. ४. ३२ कुं. ).

४ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. याचा भीमसेनानें वध केला ( म. भी. ६४. ३६ कुं. ).

**भीमवर्मन्**—एक क्षत्रिय. हा पापी असल्यामुळें मरणोत्तर अधम योनीप्रत गेला. त्या ठिकाणीं यानें चंडिकेची उपासना केली. त्यामुळें हा पुढील जन्मीं महानंदी नामक सच्छील राजा झाला ( भवि. प्रति. २. ३४ ).

**भीमविक्रम**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**भीमवेग**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**भीमवेगरव**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**भीमशंकर**—हा सह्याद्रिवरील डाकिनी येथें आहे. यानें कामरूपेश्वर सुदक्षिणाचें भीमाला मारून रक्षण केलें ( शिव. शत. ४२ ). याचें उपलिंग भीमेश्वर आहे ( शिव. कोटि. १). हेंच पुणें जिल्ह्यांतील खेडजवळील भीमाशंकर होय.

**भीमशर**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**भीमसेन**—जनमेजय पारीक्षिताच्या भावाचें हें नांव आहे ( श. ब्रा. १३. ५. ४. ३ ). शौनकांनीं भीमसेनाकडून यज्ञ करविला होता ( सां. श्रौ. १६. ९. ३; भा. ९. २२; विष्णु. ४. २०; म. आ. ३. १ कुं. ).

२ कश्यप व मुनि यांचा पुत्र.

३ ( सो. ऋक्ष. ) विष्णु व वायु यांच्या मतें ऋक्षाचा पुत्र. मत्स्यमतें दक्षाचा पुत्र.

४ ( सो. कुरु. ) अनश्वपुत्र पारीक्षित् व सुवेषा यांचा पुत्र. याची भार्या केकयराज घराण्यांतील कुमारी ऊर्फ सुकुमारी. याचा पुत्र प्रतिश्रवस् ऊर्फ परिश्रवस् ( म. आ. ६३. ४५ कुं. ).

५ गालवानें ज्या दिवोदासास माधवी दिली होती, त्याचा पिता. दिवोदासाला भैमसेनि म्हटलें आहे ( म. उ. ११७. १ कुं.; क. सं. ७. ८; २ भीमरथ पहा ).

**भीरु**—माणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**भीषण**—बकासुराचा पुत्र. आपल्या पित्यास पांडवांनीं मारिलें ही गोष्ट मनांत ठेवून यानें पांडवांचा यज्ञीय अश्व आपल्या पुरोहिताच्या सांगण्यावरून धरिला. परंतु अर्जुनाचें व याचें युद्ध होऊन त्यांत हा मरण पावला ( जै. अ. ७२ ).

२ एक असुर. यास मारुतीनें जिंकिलें ( पद्म. उ. २०६ ).

३ ( सो. विदूरथ. ) मत्स्यमतें हृदीकाचा पुत्र.

**भीष्म**—( सो. कुरु. ) शंतनूस गंगेपासून अष्टवसूंच्या अंशानें झालेला पुत्र ( म. आ. ६३. ५० कुं. ). ब्रह्मदेवाच्या शापामुळें गंगा शंतनूची पत्नी झाली होती. वसिष्ठाच्या शापामुळें व इंद्राच्या आज्ञेमुळें अष्टवसूंनीं गंगेच्या पोटीं जन्म घेतला. त्यांपैकी सात पुत्र गंगेनें नदींत बुडविले. आठवा पुत्र द्यु नांवाच्या वसूचा अंश होता. त्यास बुडवीत असतां शंतनूनें विरोध केला म्हणून हा वांचला. परंतु 'हा निपुत्रिक होईल,' असें वसूंनीं सांगितलें होतें. अशा तऱ्हेनें शंतनूनें गंगेस विरोध केल्यामुळें ती भीष्मासह अंतर्धान पावली. गंगेनें वसिष्ठाकडून याचें वेदाध्ययन करविलें. तसेंच बृहस्पति व शुक्राचार्य यांजकडून याचें शास्त्राध्ययन झालें. क्षत्रियविरोधी परशुरामाकडून यास धनुर्वेदहि शिकविला. परशुरामानें अस्त्रविद्येबरोबरच यास राजधर्म व अर्थशास्त्र यांचें ज्ञान दिलें ( म. आ. ६८. ७४-७६; १०७. ४० कुं. ). शिवाय याला, च्यवनभार्गव, वसिष्ठ, मार्कंडेय, परशुराम यांच्यापासून धर्मज्ञान प्राप्त झालें ( म. शां. ३६.७.१३; ८५ कुं.). याला गंगेचा पुत्र म्हणून गांगेय असें नांव मिळालें. शिवाय जाह्नवीपुत्र व भागीरथीपुत्र असाहि निर्देश येतो. याचें मूळचें नांव देवव्रत असें होतें.

गंगा आपला पुत्र भीष्म यास घेऊन गेल्यानंतर सुमारें छत्तीस वर्षांनीं शंतनु मृगयेकरितां म्हणून एका अरण्यांत आला. त्यानें एका हरिणाचा वेध करून त्याच्यामागें तो धावूं लागला. इतक्यांत तो भागीरथीच्या कांठानें पळत असतां त्यास भागीरथीचें पाणी कमी झाल्याचें दिसलें. त्या वेळीं 'ही नदी आज वाहत का नाहीं?' असें तो स्वतःशीच पुटपुटला. तेथें एक सुंदर मुलगा त्याच्या दृष्टीस पडला. तो मुलगा बाणावर बाण सोडून गंगेचा प्रवाह अडवीत होता. त्याचें अचूक शरसंधान व लोकोत्तर कृति पाहून शंतनूला आश्चर्य वाटलें.

हा मुलगा म्हणजे शंतनुपुत्र भीष्म होता. शंतनूनें यास फक्त जन्मकालींच पाहिलें असल्यामुळें त्यास याची ओळख पटली नव्हती. इतक्यांत यानें आपल्या पित्यास पाहिलें, व आपल्या मोहक दृष्टीनें त्यास मोहित करून हा अंतर्धान पावला. हा अद्‌भुत चमत्कार पाहून 'हा आपला तर मुलगा नसेल ना?' असा विचार त्याच्या डोक्यांत आला. हा आपलाच पुत्र असावा असा संशय आल्यामुळें तो गंगेस उद्देशून 'तो बालक मला पुनः दाखीव' असें म्हणाला. त्याबरोबर गंगा स्त्रीरूप धारण करून, शुभ्र वस्त्र परिधान करून व बहुमोल अलंकार घालून तेथें हजर झाली. तिच्या उजव्या हातांत हा बालक

होता. तथापि राजास या बालकाची ओळख पटेना. तेव्हां गंगेनें शंतनूस पूर्ववृत्त मात्र कथन करून या बालकास त्याच्या स्वाधीन केलें. जातांना गंगेचें मातृहृदय उचंबळून आलें. तिनें याचें पालनपोषण, शिक्षण इत्यादि महत्त्वाच्या बाबतींत कसें लक्ष घातलें, याबद्दल सर्व कांहीं राजास सांगितलें. यापुढें गंगा या बालकास शंतनूचें स्वाधीन करून अंतर्धान पावली. शंतनूनें गांगेयास आपली राजधानी जें हस्तिनापूर तेथें आणिलें व क्रमानें सुमुहूर्तावर यौवराज्याभिषेक केला. अशा तऱ्हेनें सर्व राज्यसूत्रें भीष्माच्या हातांत आलीं. भीष्मानें आपल्या पित्यास, कुरुकुलांतील इतर पुरुषांस व प्रजाजनांस संतुष्ट ठेवून राज्य केलें. गंगेच्या विरहामुळें शंतनूस कांहीं सुचेनासें झालें होतें. एके दिवशीं तो मृगयेसाठीं दूर अरण्यांत गेला असतां, त्यास एक प्रकारचा सुगंध येऊं लागला. तो सुगंध धीवरकन्या सत्यवती हिचा येत होता तेव्हां तो सुगंध कोठून येतो, याचा शोध करितांना शंतनूस तरुण सत्यवती दिसली. तेव्हां त्यानें तिला मागणी घातली. परंतु धीवरानें भीष्म असल्यामुळें सत्यवतीस होणाऱ्या पुत्रास राज्य मिळणार नाहीं, या समजुतीनें राजास नकार दर्शविला. त्यानें राज्य सत्यवतीस होणाऱ्या पुत्रास देण्याच्या अटीवर मागणी कबूल करण्याचें आश्वासन दिलें. परंतु शंतनूस तें करणें पसंत पडेना. कारण, भीष्मासारखा नेता राज्यापासून अलग करणें हें त्यास पटेना. यामुळें तो खिन्न होऊन परत गेला. या निराशेनें त्याचें मन व्याप्त झालें व त्याचें शरीरस्वास्थ्यहि नष्ट झालें. भीष्मानें पित्यास काळजीचें कारण विचारिलें. परंतु शंतनूस लज्जेस्तव तें सांगतां आलें नाहीं. अखेर भीष्मास याचा सुगावा लागला. पितृसुखासाठीं स्वार्थत्याग करण्याचें ठरवून हा त्या धीवराकडे गेला व यानें सत्यवतीस पित्यासाठीं मागणी घातली. तेव्हां धीवरानें पूर्वोक्त अटी यास निवेदन केल्या. त्याप्रमाणें भीष्मानें आजन्म ब्रह्मचारी राहून राज्यलोभ सोडण्याची प्रतिज्ञा केली. याच प्रसंगीं याला भीष्म हें नांव मिळालें व हा सत्यवतीस घेऊन आला. यामुळें शंतनूस आनंद होऊन त्यानें यास 'तूं इच्छामरणी होशील' असा आशीर्वाद दिला. पुढें सत्यवतीस चित्रांगद व विचित्रवीर्य असे दोन पुत्र झाले. त्यांपैकीं चित्रांगदास भीष्मानें गादीवर बसवून आपण राज्य चालविलें.

शंतनु मृत झाल्यावर भीष्माची सापत्न माता सत्यवती हिचा अभिलाष धरून उग्रायुधानें तिला पाठवून देण्याविषयीं भीष्मास निरोप पाठविला. त्यामुळें याला राग येऊन यानें आपल्या सेनापतीस सैन्याची सिद्धता करण्याचा हुकूम दिला. परंतु मंत्र्यांनीं पित्याच्या सुतकांत असतां असलें कार्य करूं नये असें सांगून सामदामादि प्रकारांनीं प्रयत्न केला; पण तो दुष्टबुद्धि ऐकेना. तेव्हां भीष्मानें तीन दिवस त्याच्याशीं युद्ध करून त्याचा वध केला (ह. वं. १. २०; म. शां. २६.१० कुं.).

पुढें चित्रांगद गंधर्वाशीं लढत असतां मेला; तेव्हां सत्यवतीच्या अनुमतीनें यानें विचित्रवीर्यास गादीवर बसविलें. या वेळीं विचित्रवीर्य वयानें लहान होता. तो भीष्मास योग्य तो मान देई. तो वयांत आल्यावर भीष्मानें त्याचा विवाह करण्याचें ठरविलें. इतक्यांत काशिराजाच्या तीन मुलींचे स्वयंवराची बातमी यास समजली. त्याप्रमाणें भीष्म तेथें गेला; व तेथें जमलेल्या सर्व राजांस आव्हान करून त्या तिन्ही मुली घेऊन आला त्यांचा विचित्रवीर्याशीं विवाह करण्याचें ठरवून मुहूर्तहि ठरविला तेव्हां त्या तीन कन्यांपैकीं ज्येष्ठ अंबा भीष्माकडे आली व तिनें 'मीं मनानें शाल्वास वरिलें आहे' असें सांगितलें. तेव्हां भीष्मानें तिला तसें करण्यास मोकळीक दिली. परंतु शाल्वानें तिचा स्वीकार केला नाहीं. तेव्हां ती तप करूं लागली. अंबिका व अंबालिका यांचा विचित्रवीर्याशीं विवाह झाला.

अंबा तप करीत असतां एके दिवशीं तिचा मातामह आजोबा होत्रवाहन सृंजय याची तिच्याशीं गांठ पडली. तिनें त्यास भीष्मानें केलेलें हरण व शाल्वानें केलेला त्याग याची इत्थंभूत माहिती सांगितली. पुढें त्याच्या सांगण्यावरून ती तेथेंच आलेल्या परशुरामास शरण गेली व तिनें भीष्माचा वध करावा अशी त्यास विनंति केली. तेव्हां परशुरामानें 'ब्राह्मणकार्याकरितां शस्त्र धरीन' असा पण केला असल्यामुळें त्यानें इतर साधनांनीं तिचें कार्य करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यानें गुरु या नात्यानें भीष्मास तिचा स्वीकार करण्यास सांगितलें. पण तिनें मनानें दुसऱ्यास वरिलें, या सबबीवर भीष्मानें भावास सांगण्याचें नाकारिलें. तेव्हां परशुरामानें यास युद्धाचें आव्हान दिलें. भीष्मानें पुष्कळ समजूत करून पाहिली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर दोघांचें द्वंद्वयुद्ध होण्याचें ठरून ते सज्ज झाले. तेव्हां गंगेनें भीष्मास युद्धापासून परावृत्त होण्यास सांगितलें. परंतु भीष्मानें सर्व सत्य हकीकत निवेदन करून 'रामासच परावृत्त कर' असें तिला विनविलें. तेव्हां पुत्रप्रेमाकरितां गंगा परशुरामाकडे गेली व तिनें त्यास 'युद्ध करूं नका' अशी विनंति केली. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर चार दिवस युद्ध होऊन (म. उ. १७७-१८७), भीष्मानें रामास पराभूत केलें (म. उ. १८६. ४ कुं.). हें कार्य प्रस्वाप अस्त्राच्या योगानें झालें. हें अस्त्र इतर कोणासहि माहीत नव्हतें. भीष्माच्या नाशार्थ अंबेनें तप केलें. तेव्हां गंगेस राग येऊन तिला 'वांकडीतिकडी नदी होशील' असा तिनें शाप दिला. महादेवानें 'तुझ्या हातून भीष्मवध होईल' असा वर दिला. पुढल्या जन्मीं ती शिखंडी होऊन तिनें भीष्मवध केला (म. उ. १७३-१९२).

परंतु सात वर्षांनंतर अतिविषयोपभोगामुळें विचित्रवीर्यास राजयक्ष्मा रोग होऊन तो मेला. त्या वेळीं त्याला संतति नव्हती. तेव्हां सत्यवतीनें भीष्मास संतति निर्माण करण्यास सांगितलें. परंतु भीष्मानें प्रतिज्ञाभंग करण्याचें नाकारिलें. पुढें व्यासापासून संतति निर्माण करविण्यांत आली (म. आ. १००-१०२).

विचित्रवीर्यानंतर धृतराष्ट्र अंध म्हणून पांडूस भीष्मानें गादीवर बसविलें. पण पांडु मेल्यावर धृतराष्ट्र राज्यव्यवस्था पाहूं लागला. परंतु पुढें धृतराष्ट्रपुत्र व पांडुपुत्र यांचें वितुष्ट आलें. त्यांचें ऐक्य घडविण्यासाठीं द्रुपदाचा पुरोहित भीष्माकडे आला. त्याचें भीष्मानें योग्य तें स्वागत केलें; व पांडवांच्या हक्काची आम्हांस जाणीव असल्याचें सांगितलें (म. उ. २१). या वेळीं यानें कर्णास उपहासून अर्जुनाची स्तुति केली. तेव्हां कर्ण रागावून 'अर्जुनापेक्षांहि श्रेष्ठ आहें' असें दाखविण्याकरितां दिग्विजयास गेला होता (म. व. २५४ २५५ ग. कु. प्रतींतच फक्त). भीष्मानें पांडवांशीं सख्य करण्याबद्दल दुर्योधनास सांगितलें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर पांडवांविरुद्ध लढण्यासाठीं कौरवसेनेचा अधिपति म्हणून भीष्मास उभें रहावें लागलें (म. उ. १५०). सैनापत्य पत्करितांना यानें 'पांडवसेनेचा नाश करीन, पण त्यांचा वध करणार नाहीं; कर्ण किंवा मी यांपैकीं एक लढेल,' या अटी दुर्योधनास सांगितल्या होत्या (म. उ. १५६). भीष्मानें युद्धापूर्वी आपलें बल व युद्धनीति यांची माहिती दुर्योधनास दिली. त्यांत यानें 'एक महिन्यांत शत्रूसैन्याची रांगोळी करीन' असें सांगितलें होतें (म. उ. १९३). युद्धांत पहिले दहा दिवस यानें युद्ध केलें (म. आ. २). त्यांत पांडवांना यश मिळण्याचें चिह्न दिसेना. 'मी युद्धांत शस्त्र हातांत धरणार नाहीं' अशी कृष्णानें प्रतिज्ञा केली होती. तेव्हां यानें 'मी कृष्णास शस्त्र घ्यावयास लावीन' अशी प्रतिज्ञा केली. त्याप्रमाणें याचें व अर्जुनाचें युद्ध चाललें असतां यानें अर्जुनास हतबल करून मूर्च्छित केलें. अर्थात् कृष्णास राग आला व तो हातांत चक्र घेऊन याच्यावर धांवून आला. तेव्हां यानें शस्त्रें खालीं ठेवून प्रत्यक्ष परमात्मा वध करतो आहे, याबद्दल कृष्णाचें स्तवन केलें. इतक्यांत अर्जुन सावध होऊन त्यानें कृष्णास परतविलें (म. भी. ५९). हा प्रसंग तिसऱ्या दिवशीं झाला. पुनः नवव्या दिवशीं कृष्णाला शस्त्र धरावें लागलें (म. भी. १०६).

दहावे दिवशीं दुर्योधनाच्या वाक्ताडणानें त्रस्त होऊन भीष्मानें 'आज मी किंवा पांडव रणांत पडूं' असें सांगितलें (म. भी. १०९). 'निष्पांडवी पृथ्वी करीन' अशी घोर प्रतिज्ञा ऐकून पांडव फारच घाबरले. त्यांना भीष्माचें फारच भय वाटे. तेव्हां धर्मादि पांडव व कृष्ण याच्याकडे याचा वधोपाय विचारण्याकरितां आले. यांनी त्यांचें योग्य तें आतिथ्य करून मोठ्या प्रेमानें त्यांस जवळ बसविलें. पुढें धर्मानें यास याच्या प्रतिज्ञेची आठवण देऊन 'तुझा वध कसा होईल' असें विचारिलें. तेव्हां यानें 'ज्याच्या रथाचा कळस अभद्र असेल, त्याच्याशीं अगर एखाद्या हीनाशीं किंवा स्त्रीशीं मी युद्ध करणार नाहीं' असें सांगितलें. नंतर 'द्रुपदपुत्र शिखंडी हा पूर्ववयांत स्त्री असून पुढें पुरुष झाला असल्यामुळें शिखंडीला पुढें करून अर्जुनानें माझ्याशीं लढावें, म्हणजे माझें कांहीं चालणार नाहीं व तुमचा विजय होऊन सुखानें राज्य घ्याल,' असेंहि सांगितलें (म. भी. १०७). दुसरे दिवशीं भीष्माच्या सांगण्याप्रमाणें पांडवांनीं शिखंडीस पुढें करून भीष्माला पराजित केलें (म. भी. ११८-११९). हा दिवस म्हणजे मार्गशीर्ष वद्य सप्तमी होय. या दिवशीं नक्षत्र फल्गुनी होतें (भारतसावित्री). या वेळीं याच्या सर्वांगास बाण लागले होते. त्यामुळें हा रथाखालीं पडतांच शरशय्येवर पडल्यासारखा दिसला. फक्त याचें डोकें मात्र खालीं लोंबत राहिलें. तेव्हां अर्जुनानें तीन बाण मारून याला योग्य अशी उशी तयार केली. तसेंच याला अतिशय तहान लागली असतां, अर्जुनानें एक बाण मारून गंगेचा प्रवाह याच्या मुखांत जाईल असें केलें. त्यामुळें भीष्म अत्यंत संतुष्ट झाला (म. भी. १२०). याच वेळीं भीष्मानें कौरवपांडवांचें वैर भीष्मवधानें थांबावें असा अत्याग्रहाचा उपदेश दुर्योधनाला केला. यानंतर कोणी जवळपास नाहीं हें पाहून कर्ण भीष्माला भेटण्यास आला. त्या वेळीं एकमेकांनीं एकमेकांचीं मनें मोकळीं करून एकमेकांस दृढालिंगन दिलें. तेव्हां यानें कर्णास 'पांडवांची बाजू घेऊन लढ अगर कौरवपांडवांचें सख्य कर' असा उपदेश केला. परंतु मित्रकार्याकरितां तनमनधन खर्च करण्यास तयार झालेल्या कर्णानें तें नाकारून युद्धाकरितां अनुज्ञा मागितली. भीष्मानेंहि त्यास ती दिली (म. भी. १२१-१२२). भारतीय युद्धानंतर युधिष्ठिर कुलक्षय झालेला पाहून खिन्न झाला होता. तेव्हां त्यास समाधान प्राप्त व्हावें एवढ्यासाठीं भीष्मानें धर्मोपदेश केला. कृष्णाच्या कृपेनें भीष्मास शरीरस्वास्थ्य मिळून धर्मोपदेश करतां आला (म. शां. ५२; भा. १.९; ९.२२.१९). या वेळीं भीष्माचें शरीर अगदीं निःसत्त्व व दुलें झालें होतें. त्या वेळीं दक्षिणायन असल्यामुळें यानें आपलें प्राणविसर्जन केलें नाहीं. अखेर दक्षिणायन संपून उत्तरायण लागतांच भीष्मानें प्राणविसर्जन केलें (म. अनु. २७४ कुं.; भा. १. ९). हा दिवस माघ शुद्ध अष्टमी आहे (निर्णयसिंधुः पा. १६३). हा इच्छामरणी असल्यामुळें यास असें करतां आलें. अशा तऱ्हेचा वयोवृद्ध, बहुश्रुत व ज्ञानी पुरुष निजधामास चालला असतां शत्रु व मित्र मोठ्या उत्कंठेनें याचें दर्शन घेत.

सत्यवती व शंतनु यांचा ज्या वेळीं विवाह झाला त्या वेळीं सत्यवती व भीष्म यांचीं वयें सारखीं होतीं. सत्यवतीस कौमार्यावस्थेंत व्यास झाला असल्यामुळें तो भीष्माहून लहान होता. याच्या ध्वजावर ताडाचें चिन्ह होतें ( म. वि. ५६; भी. ४७. ९; उ. १५०. ५; २४ कुं. ).

भीष्म हा वयानें वृद्ध, ज्ञाता, न्यायी व करारी होता. पण कौरवपांडवांच्या कपटी द्यूताला यानें प्रतिबंध केला नाहीं. द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळीं तात्त्विक मुद्यांत घोटाळून निर्णयाबद्दल कानावर हात ठेवले, आपल्याला शिखंडीच्या द्वारां मारण्याचा धर्माला सल्ला दिला, दुर्योधनाची बाजू अन्यायाची आहे असें अनेकवार बोलूनहि राजा व अन्नदाता म्हणून त्याच्या बाजूनें लढावयास उभा राहिला या गोष्टी याच्या चारित्र्यांत मतभेदाच्या आहेत. कृष्णानेंहि याबद्दल दोष दिला आहे, असें महाभारताच्या उपसंहारांत दिलेल्या कांहीं प्रतींत सांपडणाऱ्या महत्त्वाच्या श्लोकांवरून दिसतें (उपसंहार पा. ३२३–३२४ ). म्हाताऱ्या बापाची विषयलालसा पुरविण्याकरितां आजन्म ब्रह्मचर्य पाळण्याच्या प्रतिज्ञेविषयींहि अलीकडे विरुद्ध मत प्रदर्शित करण्यांत आलें आहे. भीष्म व बिभीषण यांची तुलना करितांना भीष्माचें वर्तन श्रेष्ठ ठरविण्यांत येतें. हा मृत्युसमयीं १८६ वर्षांचा असावा.

**भीष्मक**—विदर्भ देशाचा राजा. याची राजधानी कुंडिनपुर. यास रुक्मी, रुक्मरथ, रुक्मबाहु, रुक्मकेश आणि रुक्ममाली असे पांच पुत्र व रुक्मिणी नांवाची एक कन्या होती ( भा. ३. ३. ३; १०. ५२ ). रुक्मिणीला कृष्णानें वरिलें होतें. भीष्मकाला हिरण्यरोमन् व भमिक अशीं दुसरीं नांवें होतीं ( म. उ. १५८ ). युधिष्ठिराच्या मयसभेंत हा आला होता ( म. स. ४. ३७ कुं ).

सहदेव दक्षिण दिशा जिंकण्याकरितां निघाला असतां भोजकटच्या भीष्मकाबरोबर सहदेवाचें दोन दिवस युद्ध होऊन त्यानें याला जिंकिलें ( म. स. ३२ १३ कुं. ).

विदर्भांची कुंडिनपुर ही मूळची राजधानी असून नंतर रुक्मीनें भोजकट हें राजधानी केलें.

**भुजकेतु**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा.

**भुजंगम**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र, एक नाग.

**भुजातपूर**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**भुज्यु**—हा तुग्राचा पुत्र म्हणून यास तौग्र्य, तुग्र्य व तुग्रिय असें म्हणत. याच्यावर कांहीं कारणानें बापाचा राग झाला, म्हणून परद्वीपस्थ शत्रूवर बापानें याला पाठविलें ( ऋ. १. ११६. ३-५; ११७. १४-१५; ११९. ४ ). पण वाटेंत याची नाव फुटून हा अत्यंत संकटांत सांपडला. परंतु शंभर वल्हयांच्या नावेनें अश्वींनीं याला तीरावर सुरक्षित आणून पोंचविलें. ही कथा अश्वींचा पराक्रम म्हणून ऋग्वेदांत वारंवार आली आहे ( ऋ. १. ११२. ६; ६. ६२. ६–७. ६८. ७; १०. ४०. ७; ६५. १२; १४३. ५ ).

**भुज्यु लाह्यायनि**—याज्ञवल्क्याशीं समकालीन असणाऱ्या एका आचार्याचें नांव. याला पतंचल काप्याच्या मुलीच्या अंगांत येणाऱ्या सुधन्वा आंगिरसापासून विशेष प्रकारचें ज्ञान झालें होतें. त्या जोरावर यानें याज्ञवल्क्यास जिंकण्याचा प्रयत्न केला ( बृ. उ. ३. ३. १ ).

**भुमन्यु**— ( सो. कुरु. ) पहिल्या जनमेजयाचा पौत्र व धृतराष्ट्राचा पुत्र ( म. आ. १०१. ४७ कुं. ).

२ ( सो. पूरु. ) भरत दौष्यन्तीचा पुत्र.

**भुव**— ( स्वा. नाभि. ) विष्णुमतें प्रतिहर्त्याचा पुत्र.

**भुवत**—( ४ सुव्रत पहा ).

**भुवन**—कश्यप व सुरभि यांचा पुत्र.

२ भृगु व पौलमी यांचा पुत्र देव.

**भुवन आप्त्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ १०. १५० ).

**भुवना**—बृहस्पतीची बहिण व विश्वकर्मन्ची आई. अष्टवसूंपैकीं प्रभासाची स्त्री ( ब्रह्मांड ३. ३. २१-२९ ).

**भुवन्मन्यु व भुवमन्यु**—( सो. पूरु. ) हीं भवन्मन्यूचीं नामांतरें आहेत.

**भूत**—प्राचीन हिंदुस्थानांतील मानवजात चार प्रकारची आहे—धर्मप्रजा ( ब्रह्मांड. २. ३. २-३४ ), ईश्वरप्रजा ( ब्रह्मांड. १. ३२. ८८-९८ ), काश्यपीय प्रजा व पुलहप्रजा ( ब्रह्मांड २. ७ ). त्यांपैकीं भूतें ही पुलहप्रजा होय. हीं प्रथम रानटी स्थितींत होतीं. नंतर हलके हलके सुधारणा होऊन हीं युद्धकला व राजनीति शिकलीं व यांनीं आपल्यास योग्य अशी एकंदर व्यवस्था स्थापिली. यांचा असुर व देव यांच्याबरोबर संबंध विशेष येतो. पुराणें यांचा चवथ्या प्रकारच्या प्रजाजनांत समावेश करतात. यावरून हिंदुस्थानांतील प्रथम आलेली जात हीच होय. पुराणें अगदीं पूर्वकालीन मन्वंतराबद्दल सांगतांना तीं हिमालयाच्या उत्तर भागाचा व हिमालयाचा उल्लेख करितात. नंतर चाक्षुष मन्वंतराबद्दल सांगतांना हिमालय व त्याच्या आसपासच्या प्रदेशाची माहिती देतात. आणि नंतरच्या मन्वंतरांबद्दल सांगतांना उत्तरहिंदुस्थान वर्णितात. यांवरून पुराणांतील भारतवर्ष हा हल्लीचा हिंदुस्थान नव्हे. भूतांबद्दल सांगतांना स्वायंभुव मन्वंतराच्या पूर्वकालाबद्दल माहिती मिळते.

भूततत्त्वापासून झालेलीं, वर्णानें कपिश व ज्यांचें खाद्य पिशित, तीं सर्व भूतें होत ( ब्रह्मांड. २. ८. ३९-४० ). ब्रह्मानें नीललोहित रुद्रास प्रजा उत्पन्न करावयास सांगितली.

तेव्हां त्यानें सतीचे ठायीं आपल्यासारखींच ( किंचितहि कमी नाहीं व जास्तहि नाहीं अशीं ) पिंगल, सनिषंग, कपर्दी व नीललोहित, अन्न व पिशित खाणारीं, आज्य व सोम पिणारीं लाखों भूतें उत्पन्न केलीं ( ब्रह्मांड. २. ९. ६८-७८ ). रुद्राचे अनुचरप्राणी भूतें होत ( ब्रह्मांड. ३. ७. ३५९ ). सर्व भूतपिशाचांचें आधिपत्य रुद्रास दिलें ( ब्रह्मांड. २. ७. ४११ ). यांचीं रूपें कृशाक्ष, लंबकर्ण, प्रलंबोष्ठ, दंष्ट्रिन्, नखिन्, लम्भस्फिक्, स्थूलपिंडक, बभ्रुव, हरिकेश, मुञ्जकेश, नीललोहित, पिंगल, वामन, स्थूल अशीं होतीं. हीं विवास, कृत्तिवास व चित्रवास असत. त्यांचीं खाणीं-पिणीं पिशित, मेद, अन्न, सुरा, सोम व आज्य होत. हे शबल, गानविरोधी, भवपरिषद, सर्पयज्ञोपवीत, चित्रमाल्यानुलेपन, कपालिन् व कपर्दिन् असत. यांचीं हत्यारें शूल, धनु, निषंग, वरूथ व असि असत. हीं ऊर्ध्वरेतस् असत. यांस स्त्रियाहि नसत ( यांच्यांत विवाहपद्धति नव्हती ). यांच्या सर्वसाधारण गुणांवरून यांचे कांहीं गण झाले होते. उ० शूलधर, कृत्तिवास, कपर्दिन्, कपालिन्, मुंजकेश व नीललोहित वगैरे. यांच्यांत असुरांच्या आगमनानंतर सुधारणा झाल्या. असुर आल्यावर यांचे व त्यांचे खटके उडत. त्यांत भूतांचा पराभव जरी होत नव्हता, तरी यांना विंध्याच्या उतरणीपर्यंत यावें लागलें. रुद्रास भूतनायक, गणनायक व भूतांस रुद्रानुचर व भवपरिषद् म्हटलें आहे. रुद्र हा यांचा राजा नव्हता. पण ही रुद्राची जागा बलवान् माणूस निवडून त्यास दिलेली असे. सिंहमुख नांवाच्या गणांचा मुख्य वीरभद्र होता ( वामन. ४. १७ ). दुसऱ्या गणांत नंदिकेश्वर (मत्स्य. १८१. २) शैलादि मुख्य होता. यांना रुद्र असें सामान्य नांव होतें. यांची संख्या अकरा कोटि होती. यांच्यांत स्कंद, शाख व भैरव यांच्या हाताखालीं लढणारे अनेक गण होते. आयुधें व रूप हीं सुद्धां चमत्कारिक असत. यांचीं मुखें, वानरास्य, मृगेन्द्रवदन या शब्दांनीं वर्णिलीं आहेत. आयुधांत भस्म, खट्वांग वगैरेहि दिलीं आहेत ( वामन. ६७. १–२० ). यांचे गण असून त्यांच्या मुख्यास गणपति म्हणत. ध्वज व वाहन या दोन शब्दांपूर्वी पशूच्या अगर पक्ष्याच्या नांवाचा उल्लेख केलेला सांपडतो. पण त्या सर्वांचा अर्थ ध्वजावरील ती खूण असाच असावा.

अंधकासुर-युद्धांत नंदी व विनायक या दोन गणपतींनीं प्रमुख भाग घेतला. प्रथम विनायकास पाठविलें. पण अंधक ज्या वेळीं त्यास आवरेना त्या वेळीं नंदीस पाठविलें. या दोघांनीं अंधकाला शरण आणिलें. तो शरण आल्यावर रुद्रानेंहि त्यास आपल्या एका भूतगणाचा नायक करून भृंगी असें त्याचें नांव ठेविलें. या युद्धास कारण स्कंदानें तारकामय युद्धांत तारकासुरास मारिलें, त्याचा सूड हें होय.

महिषासुर व शुंभनिशुंभ यांच्याशीं झालेल्या युद्धांत रुद्राणी रुद्राऐवजीं यांच्या सेनाधिपतिस्थानीं होती. त्यांत भूतांचाच विजय झाला. हीं सर्व युद्धें देवीमाहात्म्याचीं असल्यामुळें तीं वामन, मार्कंडेय व देवीभागवत यांतच येतात. आतांपर्यंतचीं युद्धें असुरांशीं झालीं; पण दक्षयज्ञांत यांचें देवांशीं युद्ध झालें ( वायु. १.३०.८९.१०१ ). त्यांत देवांस पळून जावें लागलें. आणि हीं जरी अशा तऱ्हेनें देवासुरांपेक्षां बलिष्ठ असत, तरी यांस आपली वस्ती मार्गेमार्गे नेत नेत दक्षिणेंत यावें लागलें. ही सर्व कथा वैवस्वत मन्वंतरापर्यंतची होय ( Coronation Oriental Research Society Series, No. 5. पतंचल काप्य पहा ).

२ एक हैहयवंशांतील राजा. याचा मुलगा शंख ( ४ शंख पहा ).

३ ( सो. वसु. ) भागवतमतें वसुदेव व पौरवी यांचा पुत्र.

४ भृगुपुत्र एक ब्रह्मर्षि.

**भूतकर्मन्**—शतानीकानें मारिलेला दुर्योधनपक्षीय एक राजा ( म. द्रो. २५.२३ कुं. ).

**भूतकेतु**—दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

**भूतज्योति**—( सू. नृग. ) सुमतीचा पुत्र. याचा मुलगा वसु.

**भूतधामन्**—ऋतधामन् इंद्रास नामान्तर असावें.

**भूतनन्द**—( किलकिला. भविष्य. ) एक राजा. यानें ५० वर्षें राज्य केलें.

**भूतनय**—रैवत मन्वंतरांतील एक देव.

**भूतरजस्**—रैवत मन्वन्तरांतील देवगण. याबद्दल भूतरय व भूतरज असें पाठान्तर आहे.

**भूतवीर**—विश्वंतरानें सोमयोग करण्याचें ठरविलें. पण श्यापर्णांना त्यानें बोलाविलें नाहीं. तेव्हां आमंत्रण नसतांहि ते विश्वंतराच्या यज्ञमंडपांत येऊन बसले. पण विश्वंतरानें आपल्या नोकरांकडून त्यांना उठविलें. तेव्हां श्यापर्णांनीं आपल्या अनुयायांना उत्तेजनादाखल सूचक अशी एक पुरातन गोष्ट सांगितली. जनमेजय पारीक्षितानें कश्यपांना सोडून भूतवीरांकडून यज्ञ आरंभिला. पण कश्यपांपैकीं असितमृग नांवाच्या कश्यपानें याच्याकडून पुनः जबरदस्तीनें पौरोहित्य मिळविलें. ‘ असा कोणी आमच्यांत नाहीं काय ? ’ असें विचारितांच राम मार्गवेय पुढें आला ( ऐ. ब्रा. ७.२७ ).

**भूतशर्मन्**—दुर्योधनपक्षीय एक राजा ( म. द्रो. २०.७ कुं. ).

**भूतसंतापन**—हिरण्याक्षाचा एक पुत्र ( भा. ७. २. १९ ).

**भूता**—कश्यप व क्रोधा यांची कन्या व पुलहाची स्त्री.

**भूतांश काश्यप**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १०६ ). याला मूल होत नव्हतें म्हणून यानें एक अत्यंत क्लिष्ट सूक्त केलें. शेवटच्या ऋचेंत अश्वींचा निर्देश असल्यामुळें तें सूक्त अश्वींच्या स्तुतिपर आहे, असें समजतात ( बृहद्दे. ८. १८. २१ ). या सूक्ताचा अर्थ अद्यापि लागला नाहीं व पुढेंहि लागण्याचा संभव कमी आहे.

**भूति**—विश्वामित्रपुत्र.

२ अंगिराचा शिष्य. हा अत्यंत क्रूर व रागीट असे ( मार्क. ९६ ).

३ ( सो. वृष्णि. ) वायुमतें सात्यकीच्या पुत्रांतील एक.

४ पितरांपैकीं एक.

**भूतिकृत् व भूतिद**—पितरांपैकीं एक.

**भूतिनंद**—( नाग. भविष्य. ) ब्रह्मांड वायु यांच्या मतें मथुरेचा राजा.

**भूतिमित्र**—( कण्व. भविष्य. ) वायुमतें वसुदेवाचा पुत्र. ब्रह्मांड व मत्स्य यांच्या मतें भूमिमित्र आणि भागवत व विष्णु यांच्या मतें भूमित्र अशीं यास नामांतरें आहेत.

**भूमन्**—( स्वा. प्रिय. ) प्रतिहर्तृ व स्तुति यांचा पुत्र. यास ऋषिकुल्या व देवकुल्या अशा दोन स्त्रिया होत्या. ऋषिकुल्येपासून उद्गीथ व देवकुल्येपासून प्रस्ताव असे याला दोन पुत्र झाले ( भा. ५. १५.१५ ).

**भूमिंजय**—उत्तराचें नामांतर ( म. वि. ३७. ९ कुं. ).

**भूमित्र**—( भूतिमित्र पहा ).

**भूमिनी**—अजमीढाची एक स्त्री.

**भूमिपाल**—भारतीय युद्धाकरितां पांडवांनीं याजकडे दूत पाठविला होता ( म. उ. ४. १६ कुं. ).

२ प्रमरवंशीय कामवर्म्याचा पुत्र. याला अंगपाल म्हणून एक पुत्र होता ( भवि. प्रति. ४. १ ).

**भूयसि**—अंगिराकुलोत्पन्न गोत्रकार.

**भूयोमेधस्**—सुमेधस् देवांतील एक.

**भूरि**—( सो. कुरु. ) सोमदत्ताचा पुत्र. यास भूरिश्रवस् व शल असे दोन भाऊ होते. हा कौरवपक्षीय असून सात्यकीचे हातून रात्रियुद्धांत मरण पावला ( भा. ९. २२. १८; म. द्रो. १६७. १२ कुं. ).

२ ( सो. कुरु. भविष्य. ) मत्स्यमतें विविक्षूचा पुत्र. विष्णु व वायु यांच्या मतें यास उष्ण व भागवतमतें उक्त म्हटलें आहे.

**भूरिकीर्ति**—एक राजा. याची एक नात चंपिका ही कुशाला व दुसरी सुमति ही लवाला दिली होती ( आ. रा. विवाह. १ ).

**भूरितेजस्**—भारतीय युद्धाकरितां पांडवांनीं याजकडे दूत पाठविला होता ( म. उ. ४. १७ कुं. ).

**भूरिद्युम्न**—वीरद्युम्न राजाचा पुत्र ( म. स. ८. १९; शां. १२७. १४ कुं.; कृश अथवा कृशतनु पहा ).

२ कृष्णभक्त ऋषि ( म. उ. ८२. २७ कुं. ).

३ दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

४ ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

**भूरिबल**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. हा भीमाकडून मारिला गेला ( म. श. २५. ५ कुं. ).

**भूरियशस्**—पांचाल देशीय एक राजा (पुरुयशस् पहा).

**भूरिश्रवस्**—( सो. कुरु. ) सोमदत्ताचा पुत्र ( म. आ. २०१. १५ कुं. ). हा शूर होता. याचें सात्यकीसह युद्ध चालू असतां सात्यकीला वांचविण्याकरितां अर्जुनानें न कळत याचा हात तोडिला ( म. द्रो. १४२. ८६ कुं. ). तेव्हां हें न्याय्य कीं अन्याय्य याविषयीं अर्जुनाचें व याचें बोलणें होऊन भूरिश्रव्यानें आपला तुटलेला हात अर्जुनाकडे फेंकून दिला व आपण प्रायोपवेशन केलें. पण सात्यकीनें तशाहि स्थितींत याचें डोकें उडविलें ( म. द्रो. १४३. ६८ कुं. ). याला यूपकेतु हें नामांतर होतें ( म. द्रो. २५. ५६ कुं. ). हा अग्निहोत्री होता ( म. द्रो. १४३ ). भूरिश्रव्यानें सात्यकीचे दहा पुत्र ठार केले होते, म्हणून भूरिश्रव्यावर सात्यकीचा इतका राग असावा ( म. भी. ७४. २५ कुं. ). याच्या प्रेताचें गांधारीनें वर्णन केलें आहे ( म. स्त्री. २४. १ कुं. ). याला भूरि व शल असे दोन भाऊ होते.

२ शुक व पीवरी यांचा पुत्र.

३ मेरुसावर्णि मनूचा पुत्र.

४ मध्यमाध्वर्यूंपैकीं एक.

**भूरिश्रुत**—शुकपुत्र भूरिश्रव्याचें नामांतर.

**भूरिषेण**—ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

२ ( सू. शर्याति. ) भागवतमतें शर्यातीचा पुत्र.

**भृगवाण**—प्राचीन सूक्तद्रष्टा ( ऋ. १. १२०. ५ ). याचा कक्षीवानाशीं काय संबंध होता हें नीट सांगतां येत नाहीं. इतर ठिकाणीं हा शब्द विशेषण आहे ( ऋ. १. ७१. ४; ४. ७. ४ ).

**भृगु**—हे अनेक असून यांनीं दिव्य जन्म प्राप्त होण्याकरितां हवन केलें ( ऋ. १. ५८. ६; १२७. ७; १४३. ४; ४. ७. १; ६. १५. २ ). भृगूंना अग्नि प्रथम सांपडला ( ऋ. २. ४. २; १०. ४६. २; तै. सं. ४. ६. ५. २ ).

भृगुप्रमाणें इतर अग्नीची स्तुति करीत असत ( ऋ. ८०. ४३.१३ ). हे सुदासाच मांडलिक असावेत (ऋ. ७.१८.६). यांनीं मखाला ठार केलें (ऋ. ९. १०१. १३ ). यांचा एकवचनींहि निर्देश आहे ( ऋ. १. ६०. १; ८. ३. ९ ).

प्रजापतीच्या रेताचे तीन भाग होऊन त्यांतून आदित्य, भृगु व अंगिरस् उत्पन्न झाले ( ऐ. ब्रा. ३. ३४ ). पण हे वरुणाच्या तिसऱ्या भागापासून झाल्याचाहि निर्देश आहे (पं. ब्रा. १८.९. १ ). हा वरुणपुत्र असून यानें वरुणापासून ब्रह्मज्ञान मिळविलें म्हणून यास वारुणि भृगु म्हणतात ( तै. उ. १. ३. १. १; श. ब्रा. ११. ६. १. १; तै. आ. ९. १ ). हा सूक्तद्रष्टा आहे ( ऋ. ९. ६५; १०. १९ ).

सृष्टि निर्माण करण्याच्या हेतूनें ब्रह्मदेव तपश्चर्या करीत असतां त्याच्या अंगांतील घाम जमिनीवर पडला. त्यांत त्यानें आपलें प्रतिबिंब पाहिलें व त्याचें रेतस्खलन झालें. नंतर त्या रेताचे दोन भाग झाले. एक भाग शांत, पेय व स्वादु झाला व दुसरा खारट, अपेय व अस्वादु झाला. या दोन भागांतून अनुक्रमें भृगु व अंगिरस् हे ऋषि निर्माण झाले. व पुढें अथर्वणापासून दहा आणि अंगिरसापासून दहा असे अथर्वन् आंगिरस नामक वीस ऋषि निर्माण झाले. भृगूनें उच्चारिलेल्या शब्दांवरून याला अर्थवन् ही संज्ञा प्राप्त झाली. अर्थवन् ऋषीपासून ब्रह्मदेवाला जे मंत्र दृष्ट झाले त्या मंत्रांचा आथर्वण वेद झाला. अंगिरा ऋषीपासून दृष्ट झालेल्या मंत्रांचा आंगिरस वेद बनला ( गो. ब्रा. १. २–८ ).

२ हा स्वायंभुव मन्वंतरांत ब्रह्मदेवाच्या हृदयापासून झाला. हा स्वायंभुव मनूचा जांवई व शंकराचा साडू. दक्षानें शिवाचा अपमान करून यज्ञ केला. त्या वेळीं भृगूहि त्या यज्ञांत होता. यानें दक्षानें केलेल्या शिवाच्या निंदेंत भाग घेतला होता. पुढें शिवास हें कळतांच त्यानें प्रथम नंदीस दक्षाच्या पारिपत्यार्थ पाठविलें. परंतु भृगूनें त्यास शाप देऊन हुसकून लाविलें. तेव्हां शिवानें वीरभद्रास पाठविलें. वीरभद्रानें दक्षयज्ञाचा विध्वंस केला व सर्व देवऋषींना विद्रूप करून टाकिलें. त्यानें याची दाढी जाळली. पुढें सर्व ऋषींनीं व देवांनीं शंकराची स्तुति केली. त्याच वेळीं शंकरानें प्रसन्न होऊन यास बोकडाची दाढी लावली ( भा. ४. ५. १७–१९ ).

दक्षानें अपमान केल्यामुळें शंकरानें याला जाळून टाकिलें. दक्षकन्या ख्याति याची बायको. याला लक्ष्मी, धातृ व विधातृ अशीं अपत्यें झालीं. लक्ष्मीनें नारायणाला वरिलें व त्यापासून बल व उन्माद असे पुत्र झाले. बलाचा पुत्र तेज व उन्मादाचा संशय. भृगूच्या मनापासून इतर पुष्कळ पुत्र झाले व ते सर्व आकाशसंचारी असून देवांचीं विमानें वाहतात. विधातृला आयति व धातृला नियति अशा बायका होत्या. यांचे पुत्र प्राण व मृकंड. मृकंडाला मनस्विनीचे ठिकाणीं मार्कंडेय झाला. मार्कंडेयाला धूम्रेपासून वेदशिरस् झाला. वेदशिरस्ला पीवरीचे ठिकाणीं मार्कंडेय नांवानें प्रसिद्ध होणारे ऋषि झाले. प्राणाला पुंडरिकेचे ठिकाणीं द्युतिमान् झाला. द्युतिमानाला उन्नत व स्वनवात असे दोन पुत्र झाले. हे भार्गव म्हणून प्रसिद्ध आहेत (ब्रह्मांड. २. ११. १-१०; १३.६२). इतरत्रहि याचा वंश दिलेला आहे ( भा. ४. १. ४५; विष्णु. १. १०; म. आ. ६७. ५० कुं.; कवि व उशनस् पहा).

दैत्यांचें देवांपुढें कांहीं चालेना, तेव्हां शुक्र संजीवनी मिळविण्याकरितां गेला व भृगूहि तपश्चर्येस गेला, तेव्हां भृगुपत्नी देवांशीं युद्ध करूं लागली. त्या वेळीं ही स्त्री हा विचार न करतां विष्णूनें चक्र फेंकून तिला ठार केलें.

भृगूस जेव्हां हें कळलें, तेव्हां संजीवनीमंत्रानें यानें पत्नीस जिवंत केलें व विष्णूस 'तुला गर्भवासजन्य दुःख भोगावें लागून पृथ्वीवर अवतार घ्यावा लागेल ' असा शाप दिला ( दे. भा. ४. ११-१२ ). ही भृगुपत्नीवधाची कथा रामायणांत विशेष प्रसंगीं स्त्रीवध दोषावह नाहीं हें दाखविण्याकरितां ताटकावधाचे वेळीं रामाला विश्वामित्रानें सांगितली आहे ( वा. रा. बा. २५ ).

विष्णूस भृगूकडून शाप मिळाल्याची दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, विष्णूनें पूर्वी भृगूस ' मी तुझ्या यज्ञाचें रक्षण करीन ' असें वचन दिलें होतें. परंतु इंद्राच्या बोलण्यावरून तो आपलें वचन मोडून इंद्राकडे गेला. पुढें विष्णु नाहीं असें पाहून दैत्यांनीं भृगूच्या यज्ञाचा नाश केला. तेव्हां भृगूनें विष्णूस ' तुला मृत्युलोकीं दहादां जन्म घ्यावा लागेल, ' असा शाप दिला ( पद्म. भू. १२१ ).

एकदां स्वायंभुव मनूनें एक यज्ञ केला. त्या वेळेस ' ब्रह्मा', विष्णु व महेश यां तिघांपैकीं श्रेष्ठ कोण ? ' असा वाद उपस्थित झाला. तेव्हां सर्वांनीं भृगूस त्याचा निकाल लावण्यास सांगितलें. भृगु प्रथम कैलासावर शंकराकडे गेला. त्या ठिकाणीं नंदीनें यास मज्जाव केला व शंकर याची दाद न घेतां पार्वतीशीं क्रीडा करीत राहिला. तेव्हां ' तुला लिंगत्व प्राप्त होऊन तुझें तीर्थ कोणी प्राशन करणार नाहीं ' असा यानें शंकरास शाप दिला. पुढें हा ब्रह्मदेवाकडे गेला. परंतु ब्रह्मदेवानें याला नमस्कार केला नाहीं व उत्थापनहि दिलें नाहीं. तेव्हां यानें ब्रह्मदेवास शाप दिला कीं, ' तुझें पूजन कोणीहि करणार नाहीं. ' पुढें हा विष्णूकडे गेला. त्या वेळीं विष्णु निद्रित होता. भृगूनें एकदम आंत जाऊन त्याच्या छातीवर

लाथ मारली. परंतु विष्णूनें यत्किंचितहि न रागावतां उलट भृगूसच नमस्कार केला. तेव्हां भृगूनें म्हटलें ' तूंच सर्वांत श्रेष्ठ असा देव आहेस ' ( पद्म. उ. २५५ ). भृगूची लागलेली लाथ विष्णूनें श्रीवत्सचिह्न म्हणून धारण केली ( भा. १०. ८९ ). हा स्वायंभुव व चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक आहे.

३ वैवस्वत मन्वंतरांत हा वरुणापासून झाला म्हणून यास वारुणि भृगु असें म्हणतात ( म. आ. ५.७, अनु. १३२. ३६ कुं.; ब्रह्मांड. ३. २. ३८ ).

नहुषाच्या जाचानें सर्व देव व ऋषि त्रस्त झाले. तेव्हां भृगु व अगस्त्य यांनीं नहुषाचें पारिपत्य करावयाचा विचार केला. पुढें नहुषानें सप्तर्षींना आपल्या रथास जोडलें असतां भृगु अगस्त्याच्या जटेंत कोणास न कळत शिरला. रथ चालू लागल्यावर नहुषानें अगस्त्याच्या डोक्यावर लाथ मारिली. ती यास लागतांच यानें नहुषास शाप देऊन इंद्रपदापासून च्युत केलें ( म. अनु. १५६ कुं. ).

एकदां हिमालय व विंध्य या दोन पर्वतांमध्यें दुष्काळ पडला असतां हा हिमालयावर राहण्यास गेला. तेथें यास एक दुःखी असलेलें विद्याधराचें दांपत्य आढळलें. त्यांच्या दुःखाचें कारण नवऱ्याला वाघाचें तोंड होतें हें होय. तेव्हां भृगूनें पौष शुद्ध एकादशीचें व्रत त्यांना सांगून त्यांचें दुःख निवारण केलें ( पद्म. उ. १२५ ).

भृगु ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांमध्यें होता होता व तुंगकारण्यीं झालेल्या देवांच्या यज्ञांत हा आचार्य होता. यानें भीष्मपंचकव्रत केलें होतें ( पद्म. सृ. ३४; स्व. ३९; उ. १२४ ). याला संजीवनीविद्या येत होती. यानें जमदग्नीस पुनः जिवंत केलें ( ब्रह्मांड. १. ३० ). यानें भरद्वाजाला सृष्टीच्या उत्पत्तीविषयीं माहिती सांगितली ( म. शां. १८०. ११ कुं. ). यानें वीतहव्याला ब्राह्मण बनविलें व गृत्समदवंश सुरू केला ( म. अनु. ८. ५८-६७ कुं. ). यास शिवकृत यज्ञांत अग्नीतून निघालेल्या कवीचा पुत्र म्हटलें आहे ( म. अनु. ८५). हा भाद्रपद महिन्यांत विवस्वान् सूर्याबरोबर असतो ( भा. १२. ११ ). यानें सोमकान्त राजाला गणेशपुराण सांगितलें ( गणेश. १. ९ ). हा गोत्रकार आणि मंत्रकारहि आहे ( मत्स्य. १९४ ).

भृगूला दिव्या व पौलोमी अशा दोन स्त्रिया होत्या. दिव्येला शुक्र, शुक्राला वरत्रिन्, त्वष्ट्, शंड व मर्क असे यापासून झाले. वरत्रिनला रजत, पृथुरश्मि व बृहदंगिरस् असे तीन ब्रह्मिष्ठ व असुरयाजक असे पुत्र झाले. त्वष्ट्याला त्रिशिरस् विश्वरूप व धाकटा विश्वकर्मन् अशीं दोन मुलें झालीं. शिवाय भृगूला दिव्येपासून बारा देवहि झाले. त्यांचीं नांवें— भुवन, भावन, अन्त्य, अन्त्यायन, क्रतु, शुचि, स्वमूर्धन्, व्याज, वसुद, प्रभव, अव्यय व अधिपति. हे सर्व शुक्रापेक्षां धाकटे होते. शिवाय च्यवन, वज्रशीर्ष, और्व, वरेण्य इत्यादि सात पुत्र होते ( म. अनु. १३२. १४० कुं. ). दुसऱ्या पौलोमी नांवाच्या स्त्रीला च्यवन झाला. च्यवनाला सुकन्येपासून आप्रवान व दधीच झाले. दधीचाला सरस्वतीपासून सारस्वत झाला व आप्रवानाला ऋची नाहुषीपासून और्व झाले. अशा क्रमानें हजारों भार्गव व परशुराम वगैरे उत्पन्न झाले. भार्गवांत सात भार्गवगण प्रमुख आहेत. १ वत्स, २ विद, ३ आर्ष्टिषेण, ४ यस्क, ५ वैन्य, ६ शौनक व ७ मित्रेयु ( ब्रह्मांड. ३. १. ७४-१००; १ पुलोमा पहा ). इतरहि कांहीं ठिकाणीं याचा वंश आढळतो ( मत्स्य. १९५; वायु. २. ४; म. आ. ५-९ ).

प्रथम भृगु व अंगिरस् भिन्न असून त्यांचे ग्रंथहि भिन्न होते. पण पुढें दोनहि एक होऊन भृग्वंगिरस् किंवा अथर्वांगिरस् या नांवानें त्याला सध्यांच्या अथर्वसंहितेचें स्वरूप देण्यांत आलें. असें एकरूप देण्यांत आलें तरी मूळचे वेदमार्गी भृगु व अंगिरस् व मंत्रतंत्र करणारे अथर्वन् व अंगिरस् यांची भिन्नता प्रवर-विचारावरून अद्यापि अनुमानितां येते. सध्यां विवाहप्रसंगीं गोत्रप्रवरांचा विचार करितांना प्रवरसाम्य असूनहि विवाह होतो, अशीं हीं दोन गोत्रें आहेत. केवल भृगुगणांतील गोत्रांत व केवल अंगिरस् गणांतील गोत्रांत अनुक्रमें भृगु व अंगिरा हे प्रवर असूनहि त्यांच्यांत परस्पर विवाह होतात. इतर कोणत्याहि गोत्रांत समान प्रवर असतांना विवाह होत नाहीं. भृगूमध्यें केवळभृगु व जामदग्न्यभृगु असे भेद आहेत. तसेंच आंगिरसामध्येंहि आंगिरस, भरद्वाजांगिरस व गौतमांगिरस असे भेद आहेत. यांत भृगु व अंगिरा हीं दोन नांवें सारखीं असलीं तरी मूळ व्यक्ति भिन्न असल्यामुळें विवाह होण्यास हरकत धरीत नसावेत. परंतु मूळ व्यक्तींची भिन्नता पौराणिक वाङ्मयांत स्पष्टपणें वेगळी दाखवितां येत नसली तरी स्वायंभुव भृगु व वारुणि भृगु असा हा फरक असावा. अंगिरसासंबंधींहि असेंच म्हणावें लागतें. पण अथर्ववेदाचें जारणमारणात्मक स्वरूप जाऊन त्याला त्रयी विद्येंत स्थान मिळाल्यावर या वंशांत दाखविणें अशक्य झालें.

याच्या नांवावरील ग्रंथ—भृगुस्मृति, भृगुगीता (वेदान्तविषयक ), भृगुसंहिता, भृगुसिद्धान्त व भृगुसूत्र ( C. C. ).

यानें वास्तुशास्त्रावर ग्रंथ केला आहे ( मत्स्य. २५२; मनु पहा ).

भृगुकुलांतील गोत्रकार—अनंतभागिन्, अनुमति, आप्नुवान, आलुकि ( जलाभित ), आवेद ( आंबाज ), उपरिमंडल, ऐलिक, और्व, कार्षणि ( पार्वणि ), कुत्स, कौचहास्तिक, कोटिल, कौत्स, कौसि, क्षुभ्य, गायन, गार्ग्यायण, गार्हायण, गोष्ठायन, चलकुंडल, चातकि, चांद्रमसि, च्यवन, जमदग्नि, जविन् ( ग ), जालधि, जिह्वक ( जिह्मक, नदाकि ), दर्भि ( दर्भि ), देवपति, नडायन ( नवप्रभ ), नाकुलि, नीतिन्(ग), नील, नेतिष्य, नैकजिह्व, पांडुरोचि, पूर्णिमागतिक ( पौर्णिमागतिक ), पैंगलायनि, पैल, पौर, फेनप, बालाकि, भृगु, भ्राष्ट्रकायणि, मंड ( मुंड ), मांकायन ( कार्मायन ), मार्कंड, मार्गेय ( भार्गेय ), मांडव्य, मांडूक, मालयनि, मृग ( सूत ), मौद्गलायन, यज्ञपिंडायन (यद्मामिलायन व याज्ञ), योज्ञेयि, रौहित्यायनि, ललाटि ( ललाटि ), लिंबुकि, लुब्ध, लौलाक्षि, लौक्षिण्य, लौहवैरिण, वांगायनि, वात्स्य ( वत्स्य ), वाह्ययन (महाभाग), विरूपाक्ष, विष्णु, वीतिहव्य, वैकर्णिनि (वैकर्णेय), वैगायन, वैशंपायन, वैश्वानरि, वैहीनरि, व्याधाज्य, शारद्वतिक, शार्कराक्षि, शार्ङ्गरव, शिखावर्ण, शौनक, शौनकायन-जीवन्ति ( शौनकायन जीवंतिक ), रुकौवाक्षि ( सकौगाक्षि ), सगालव, सांकृत्य, सात्यायनि, सार्पि, सावर्णिक, सौक्ति, सौचाक, सौधिक, सौह, स्तनित व स्थलपिंड. हे सर्व आप्नवान, और्व, च्यवन, जमदग्नि व भृगु या पंचप्रवरांचे आहेत.

उभयजात, और्वेय(ग), कायनि, जमदग्नि, पौलस्त्य, बिद, बैजभृत, मारुत ( ग ), शाकटायन. हे सर्व आप्नवान, च्यवन व भृगु या तीन प्रवरांचे आहेत.

आपस्तंबि, आर्ष्टिषेण, आश्वायनि, कटायनि, कपि, कार्दमायनि, गार्दभि, ग्राम्यायणि, नेकशि, बिल्वि ( भल्ली ), भृगुदास, मार्गपथ व रूपि हे आप्नवान, आर्ष्टिषेण, च्यवन, भृगु व रूपि या पांच प्रवरांचे होत.

काश्यपि, कौशापि, गार्गीय, चलि, जाबालि, जिवन्त्यायनि, तिथि, दम ( मोदम, सदमोदम ), पिलि, पौष्णायन, बालपि, भागवित्ति, भागिल, मथित ( माधव ), मौंज, यस्क, रामोद, वीतिहव्य, श्रमदागेपि व सौर हे भृगु, वैवस, वीतिहव्य व श्रैवस या प्रवरांचे होत.

अपिकायनि, अपिशि ( अपिशली ), खांडव, द्रौणायन, मैत्रेय, रौक्मायणि ( रौक्मायण ), शाकटाक्ष, शालायनि व हंसजिह्व हे सर्व दिवोदास, भृगु व वध्र्यश्व या तीन प्रवरांचे होत.

एकायन, कार्दमायनि, गृत्समद, चौक्षि, प्रत्यह ( प्रत्यूह ), पत्स्यगंध, यज्ञपति, शाकायन, सनक व सैरि हे गृत्समद व भृगु या दोन प्रवरांचे होत ( मत्स्य. १९५ ).

भृगुकुलांतील मत्रकार.

| वायु. | मत्स्य. | ब्रह्मांड. |
| --- | --- | --- |
| १. ५९. ९५-९७; | १४५. ९८-१००; | २. ३२. १०४-१०६. |
| अरप | | |
| आत्मवत् | आत्मावत् | आत्मवत् |
| आर्ष्टिषेण | आर्द्रिषेण अथवा आर्ष्टिषेण | आर्ष्टिषेण |
| और्व | ऊर्व | और्व |
| काव्य | | काव्य |
| गृत्समत् | गृत्स | गृत्स |
| | च्यवन | |
| जमदग्नि | जमदग्नि | जमदग्नि |
| दधीच | दधीच | ऋचीक |
| दिवोदास | दिवोदास | दिवोदास |
| नभ | | |
| प्रचेतस् | प्रचेतस् | प्रचेतस् |
| प्रश्वार | ब्रह्मवत् | वाध्यश्व |
| भृगु | भृगु | भृगु |
| | युधाजित् | |
| वीतहव्य | वीतहव्य | वीतहव्य |
| वेद अथवा विद | वेद | विद |
| वैन्य | वैन्य | वैन्य |
| | शौनक | शौनक |
| सारस्वत | सारस्वत | सारस्वत |
| सुमेधस् | सुवेधस् | सुवर्चस् |

४ कश्यपकुलांतील गोत्रकार पहा.

**भृगुदास**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**भृग्वंगिरस्**—अथर्ववेदवेत्त्यांना ही संज्ञा अनेक ठिकाणीं लाविली आहे (गो. ब्रा. १. ३. १; श. ब्रा. १ २. १. १३). अंगिरस, अथर्वन् व भृगु हे भिन्न असल्याचा निर्देश आहे ( ऋ. ५. १३. ६ ). अथर्वन् व अंगिरस् हे भृगुचे डोळे आहेत व त्यामुळें भृग्वंगिरस् म्हणजे अथर्ववेद असें म्हटलेलें आढळतें (गो. ब्रा. १. २ २२). अथर्वांगिरस् व भृग्वंगिरस् हे शब्द एकच अर्थानें वापरले आहेत. इतर वेदांतहि हे शब्द जोडीनें येतात. राजपुरोहित अथर्वांगिरसांत कुशल असला पाहिजे ( याज्ञ. १.३१३ ). वसिष्ठाला अथर्वनिधि म्हटलें आहे. अथर्ववेदाला क्षत्र म्हटलें आहे ( श. ब्रा. १४. ८. १४.४ ). अथर्ववेद जारणमारण करणारा असल्यामुळें अथर्ववेदाला समाजांत योग्य मान नसे ( मनु. ११.३३ ).

**भृंग**—त्रिधामन् नामक शिवावतारांचा शिष्य.

**भृंगिन्**—शिवगणांपैकीं एक ( पद्म. उ. १२ ).

**भृत**—भृगुकुलांतील एक गोत्रकार ( भृत पहा ).

**भृतकीर**—कुशिक कुलांतील मंत्रकार.

**भृम्यश्व**—(सो.नील.) मुद्गलाच्या बापाचें नांव (नि. ९. २४). यास बाह्याश्व (ह. वं. १. ३२; ब्रह्म. १३.९५-९६), भर्म्याश्व (भा. ९.२१.३२–३३), हर्यश्व(विष्णु.४.१९.१५), भद्राश्व ( मत्स्य. ५०.४ ) म्हणत. यास एकंदर पांच मुलें होतीं. मुद्गल, सृंजय किंवा सूंजय, बृहदिपु, यवीनर, कांपिल्य किंवा कपिल किंवा कृमिलाश्व.

**भृशाश्व**—एक ऋषि. याचा पुत्र देवप्रहरण.

**भृशुंडिन्**—एक कोळी. हा दंडकारण्यांत वाटमारीचा धंदा करून उपजीविका करीत असे. एकदां मुद्गल ऋषि दंडकारण्यांतून जात असतां त्याला यानें अडविलें. पण मुद्गलाच्या तेजापुढें हा हतबल झाला. नंतर मुद्गलानें यास उपदेश करून गजाननाचें ध्यान करावयास सांगितलें. त्या ठिकाणीं यानें बरेच दिवस तप केलें. कांहीं कालानें याला भुवयांमध्यें एक सोंड फुटली व हा गजाननस्वरूप झाला ( गणेश. १. ६७ ). इंद्र याचे दर्शनास आला होता ( गणेश. १. ५७ ).

**भेत्तृ**—विकुंठ देवांतील एक.

**भेद**—सुदासाच्या दहा शत्रूंपैकीं एक. सायणाचार्य याला व्यक्ति समजत नाहींत. भेद शब्दाचा अर्थ ते नास्तिक असा करतात. अज व शिग्रु यांचा पक्ष यानें घेतला असावा ( ऋ. ७.१८.१९; ३३.३; ८३.४).

**भेरुंड**—जटायूचा पुत्र.

**भैमसेन**—एक मनुष्य ( मै. सं. ४.६.६ ).

**भैमसेनि**—दिवोदासाचें पैतृक नांव ( क. सं. ७.८ ).

२ घटोत्कचाचें नामान्तर (म. भी. ८३. ३३ कुं. ).

**भैरव**—विष्णु आणि ब्रह्मा हे शंकराशीं गर्वानें वागूं लागले असतां शंकराच्या क्रोधामुळें भैरव उत्पन्न झाला. याला काळभैरव, आमर्दक, पापभक्षण, काळराज असेंहि म्हणतात. यानें उत्पन्न झाल्याबरोबर डाव्या बोटाच्या नखानें ब्रह्मदेवाचें पांचवें शिर तोडलें. कारण त्याच तोंडानें त्यानें शंकराची निन्दा केली होती. विष्णु आणि ब्रह्मा गर्वरहित झाल्यावर शंकरानें भैरवाला ब्रह्महत्येच्या दोषापासून मुक्त करण्याकरितां आणि लोकांना वळण लागावें म्हणून ब्रह्मदेवाचें कपाल हातांत घेऊन यास भिक्षा मागण्यास व ब्रह्महत्या नांवाची स्त्री निर्माण करून तिला याच्या मागें जाण्यास सांगितलें. 'काशींत तेवढा ब्रह्महत्येला प्रवेश होणार नाहीं. इतर सर्व ठिकाणीं हिंडेल' असें सांगून भैरवास ब्रह्मा व विष्णु यांस मानण्यास सांगितलें. शिवाय 'श्रीविष्णूला तूं वरद होशील' असा वर दिला. त्यानें अनेक तीर्थांवर भ्रमण केलें. परंतु मागची ब्रह्महत्या गेली नाहीं. जेव्हां हा काशींत शिरला, तेव्हां ब्रह्महत्या गेली. तेथें हातांतील कपाल गळून पडून कपालमोचन-तीर्थ झालें ( शिव. शत. ८-९; स्कंद. ३. १. २४; वीरभद्र पहा). भैरवमंत्रासंबंधीं बरीच माहिती आढळते (कालिका.५४).

काशीपुरीचा क्षेत्रपाल. एक रुद्रगण ( रुद्र पहा ). खाण्डवी नगरी मोडून खाण्डववन करणारा वाराणसीचा विजय राजा याच्याच वंशांतील होता (कालिका; ९२. वेताल पहा ). येथें याचा वंशहि सविस्तर दिला आहे.

असितांग, रुरु, चंड, क्रोध, उन्मत्त, कुपति अथवा कपालिन्, भीषण आणि संहार हे अष्टभैरव होत.

२ सर्पसत्रांत दग्ध झालेला एक नाग ( म. आ. ५७. १७ कुं. ).

**भोग**—भोगवतीचा भाऊ.

**भोगवती**—( २ निबंधन पहा ).

२ परिहरवंशीय कारवर्मा राजाची कन्या. ही विक्रमास दिलेली होती. हिला भोग नांवाचा एक भाऊ होता ( भवि. प्रति. ४. ५ ).

**भोगिन्**—( भविष्य. ) वायु व ब्रह्मांड याच्या मतें मथुरेंतील शेष नामक राजाचा पुत्र.

**भोज**—भोज नांवाचे लोक सुदासाचे अनुचर होते. ' सुदासानुचर भोज हे मला अश्वमेधामध्यें मदत करीत ' असें विश्वामित्र म्हणत असे ( ऋ. ३. ५३. ७ ). पुराणांतहि महाभोजाच्या वंशजांना भोज असें सामान्य नांव आहे ( भा. ९. २४. ११ ).

२ कश्यपकुलोत्पन्न गोत्रकार ऋषिगण.

३ ( सो. विदू. ) मत्स्यमतें प्रतिक्षत्राचा पुत्र. इतर पुराणांत याला स्वयंभोज म्हटलें असून क्रोष्टुवंशांत घातलें आहे.

४ प्रमरवंशीय वत्स राजाचा पुत्र. याचा पुत्र शंभुदत्त ( भवि. प्रति. ४.१ ).

५ एक कान्यकुब्जांतील राजा. याला एक हरिणमुखी स्त्री आढळली. शोध करितां पूर्वजन्मीं हरिण असतां जेवढें शरीर तीर्थांत पडलें, तेवढें मनुष्यजन्म पावल्याचें यास समजलें. पुढें तिचें मुखहि शोधून तीर्थांत टाकितांच ती सुंदर मुखाची स्त्री झाली. तिच्याशीं याचें लग्न झालें ( स्कंद. ७.२.२ ).

६ मृत्तिकावतचे राजे व लोक.

७ शालिवाहनाचे वंशांतील दहावा राजा. याचे जवळ सुप्रसिद्ध कालिदास कवि होता. यानें दिग्विजय करून गांधारांतील म्लेंच्छांस व काश्मीरांतील शठ नारवास कोशासह जिंकिलें.

यानें मंत्रसामर्थ्यानें महामदाला ठार केलें. त्या महामदाची मदहीनेला (मदिनेला) कबर आहे. महामदानें याजवळ आर्यधर्माचा मोठेपणा मान्य केला होता. यानें संस्कृत भाषेला उत्तेजन दिलें (भवि. प्रति. ३. ३).

**भोजक**—सूर्यपूजक (भवि. ब्राह्म. १.११७).

**भोजपायन**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**भोजवर्मन्**—परिहरवंशीय रुद्रवर्मन् राजाचा पुत्र. यानें भोजराष्ट्र वसविलें. याचा पुत्र गववर्मा (भवि. प्रति. ४. ४).

**भोजा**—वीरव्रत राजाची स्त्री.

२ आर्यक नागाची कन्या. हिला मारिषा असें म्हणत असत. ही शूर राजाची स्त्री. हिला वसुदेवादि पुत्र होते.

३ ज्यामघानें हरण करून आणलेली कन्या व त्याच्या विदर्भ नामक पुत्राची स्त्री.

४ सौवीराची कन्या व सात्यकीची स्त्री.

**भौजपायन**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण. याबद्दल भीमपायन असा पाठभेद आहे.

**भौत्य**—हा भूति नामक ऋषीस त्याच्या शांति नामक शिष्यानें त्याजकरितां अग्नीपासून मिळविलेल्या वरामुळें झालेला पुत्र होय (मार्क. ९६). हा चवदावा मनु होय. यास इंद्रसावर्णि व चंद्रसावर्णि अशीं नांवें होतीं (मनु पहा).

**भौम**—(२ मंगल पहा).

२ विप्रचित्तीला सिंहिकेपासून झालेला पुत्र. यास परशुरामानें मारिलें (ब्रह्मांड. ३. ६. १८-२२).

३ प्रमरसवंशीय शंभुदत्त राजाचा पुत्र. याचा पुत्र वत्स.

**भौमतापन**—गौरपराशरकुलांतील गोत्रकार.

**भौमन**—विश्वकर्मनूचें नांव.

**भौमासुर**—नरकासुराचें नामान्तर.

**भौरिक**—हिरण्याक्षाशीं देवांचें जें युद्ध झालें, त्यांत अग्नीनें दग्ध केलेल्या सात दैत्यांतील एक (पद्म. सृ. ७५).

**भौवन**—(विश्वकर्मन् पहा).

२ (स्वा. प्रिय.) मंथु व सत्या यांचा पुत्र.

३ भृगु व पौलोमी यांचा पुत्र, गोत्रकार.

४ गौतमीच्या दक्षिणतीरावरील गिरिशिखरावर भौवन शहर आहे, तेथील राजा (ब्रह्म. १७०. १-२).

**भौवायन**—कपिवनाचें पैतृक नांव. हा अतिरात्र यज्ञ केल्याच्या योगानें समृद्ध झाला (पं. ब्रा. २०. १३. ४).

**भ्रमर**—जयद्रथाचा भाऊ (म. व. २६६. ११ कुं.).

**भ्रमि**—शिशुमार प्रजापतीची कन्या. ही उत्तानपादपुत्र ध्रुवास दिलेली होती (भा. ४. १०. १).

**भ्राजिष्ठ**—(स्वा. प्रिय.) घृतपृष्ठाचा पुत्र.

**भ्रामरी**—एक राक्षसी. ही जंभासुराच्या सांगण्यावरून कश्यपगृहीं अवतरलेल्या विनायकास मारण्याकरितां अदितीचें रूप घेऊन आली व हिनें विनायकास विषमिश्रित मोदक खावयास दिले. पण विनायकानें हिचे विषाचे मोदक खाऊन हिला आपल्या मुष्टिमोदकाच्या योगानें ठार केलें (गणेश. २. २१).

**भ्राष्ट्रकायणि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**भ्राष्ट्रकृत्**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

# म

**मकरकेतु**—प्रद्युम्नाचें नामान्तर.

**मकरध्वज**—मारुतीच्या घामापासून दक्षिण समुद्रांतल्या एका मगरीस झालेला पुत्र (आ. रा. सार. ११; हनुमत् पहा).

२ (सो. कुरु.) धृतराष्ट्राच्या शतपुत्रांपैकीं एक. हा भीमाकडून मारिला गेला (म. भी. ९६. २७ कुं.).

३ चंद्रहास राजाचा ज्येष्ठ पुत्र.

**मकरंद**—कृष्णांशाची पत्नी पुष्पवती, तिचा भ्राता. महामदउपासक शोभा नामक वेश्येनें मायेनें कृष्णांशास पोपट केलें. तेव्हां मकरंदानें तिची ती माया नाहींशी करून कृष्णांशास सोडविलें (भवि. प्रति. ३.२१.२८).

**मकराक्ष**—जनस्थानांत राहणाऱ्या खर नामक राक्षसाचा पुत्र. यास रामानें ठार मारिलें (वा. रा. यु. ७८).

**मक्षव्य**—संहितेचा तत्त्वज्ञानपर अर्थ लावणारा एक आचार्य (ऐ. आ. ३. १. १).

**मखापेत**—कार्तिक महिन्यांतील विष्णु नांवाच्या सूर्याबरोबर फिरणारा दैत्य (भा. १२. ११. ४४).

**मग**—हे शाकद्वीपांतील वेदवेत्ते ब्राह्मण आहेत. सूर्यानें प्रसन्न होऊन आपली प्रत्यक्ष तेजोमयी मूर्ति सांबाला पूजेकरितां दिली. उपास्य मूर्ति मिळाल्यामुळें सांबाला आनंद झाला व त्यानें सूर्याच्या आज्ञेवरून चंद्रभागेच्या तीरावर मनोहर देवालय बांधिलें. तेथें देवस्थानच्या पूजाअर्चादि

व्यवस्थेकरितां हे सूर्यभक्त 'मग' नांवाचे ब्राह्मण सांबानें शाकद्वीपांतून आणिले. तेथें सांबाच्या निमंत्रणावरून मगांचीं अठरा घराणीं राहिलीं ( सांब. २६; भवि. ब्राह्म. ११७ ). भविष्यांतील भ्रग हा पाठ चुकीचा आहे.

**मगध**—कश्यपाचा सेवक पृथु याला कण्वप्रसादानें राजकन्या नामक स्त्रीपासून झालेला पुत्र. याला कण्वानें मागध नांवाचें ग्राम दिलें ( भवि. प्रति.४. २१ ).

**मघवन्**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ इंद्राचें नामान्तर ( पद्म. भू. ६ ).

**मघा**—दक्ष प्रजापतीनें सोमास दिलेल्या सत्तावीस कन्यांतील एक.

**मंकुण**—दरिद्री ब्राह्मण ( आकथ पहा ).

**मंकणक**—एक ब्रह्मर्षि. मातरिश्वन् व सुकन्या यांचा मुलगा. हा कश्यपाचा मानसपुत्र असेंहि वर्णन सांपडतें ( वामन. ३८ ). यानें बालब्रह्मचारी असतांनाच सरस्वती नदीच्या तीरीं सप्तसारस्वत तीर्थावर जाऊन स्वाध्यायपूर्वक हजारों वर्षे तप करण्यांत घालविलीं. एकदां याच्या हातास दर्भानें जखम होऊन त्यांतून शाकरस वाहूं लागला. तेव्हां याला आश्चर्य वाटून हा आनंदानें नाचूं लागला व त्याबरोबर स्थावरजंगम जगहि नाचूं लागलें. म्हणून सर्व देवांनीं शंकराची प्रार्थना केली कीं, 'हा नाचणार नाहीं असें करा. नाहींतर ह्याच्या प्रभावानें सर्व जग नाचूं लागून लवकरच रसातळास जाईल.' हें ऐकून शंकरानें ब्राह्मणाचें रूप घेऊन याला याच्या हर्षाचें व नाचण्याचें कारण विचारिलें. त्यावर मंकणकानें उत्तर दिलें कीं, 'माझ्या हातांतून जो हा रस वाहत आहे त्याचें मला मोठेंच आश्चर्य वाटून माझ्या तपाला सिद्धि प्राप्त झाली म्हणून आनंद झाला आहे.' त्यावर शंकरानें आपल्या आंगठ्यास बारीक जखम करून त्यांतून बर्फाप्रमाणें शुभ्र असें किती तरी भस्म वहावयास लाविलें. हा चमत्कार पाहून हा आपल्यावरहि ताण करणारा परमेश्वर शंकरच असला पाहिजे, असें समजून यानें शंकरास नमस्कार घातला. त्यावर शंकरानें 'तुला जें इष्ट असेल तें माग,' असें सांगितल्यावरून यानें 'स्वतःस पुनः असा हर्ष होऊन तपाचा व्यत्यय येणार नाहीं असें कांहीं तरी करा,' असें शंकरास विनविलें. तेव्हां 'माझ्या प्रसादानें तुझें तप सहस्रगुणित होईल,' असें सांगून शंकर याच्या आश्रमांत राहिला ( म. व. ८३; श. ३८; पद्म. सृ. १८; स्व. २७; स्कंद. ७. १. ३६; २७० ).

एकदां हा तप करीत असतां सरस्वतींत स्नानास उतरला. तेथें जवळच स्नान करीत असलेली एक सुंदर स्त्री याच्या दृष्टीस पडली. तिला पाहतांच याचें वीर्य स्खलित झालें. तेव्हां यानें तें आपल्या तांब्यांत धरलें व त्याचे सात भाग केले. त्यापासून वायुवेग, वायुबल, वायुहा, वायुमण्डल, वायुज्वाल, वायुरेत आणि वायुचक्र असे सात पुत्र निर्माण झाले. सात मरुद्गण किंवा मरुतांचे जनिते ते हेच होत ( म. श. ३८; मरुत् पहा ).

**मंकन**—एक न्हावी. दुसरा दिवोदास काशींत राज्य करीत असतां शंकराला काशी निर्जन पाहिजे होती; म्हणून शंकरानें गणपतीची (निकुंभाची) योजना केली. गणपतीनें या न्हाव्याच्या स्वप्नांत जाऊन नगराच्या सीमेवर आपलें मंदिर बांधविलें. पण इतरांना पावत असून आपणास पुत्र दिला नाहीं म्हणून दिवोदासानें गणपतीचें देऊळ उध्वस्त केलें. तेव्हां गणपतीनें वाराणशी ओस पडण्याचा शाप दिला ( वायु. २. ७०.३८; ब्रह्मांड. ३. ६७. ४३ ).

**मंकि**—कौषीतकाचा पुत्र. हा वैदिक, अग्निहोत्री व वैष्णव होता. याला सरूपा व विश्वरूपा या नांवाच्या दोन बायका होत्या; तथापि यास पुत्र नसल्यामुळें यानें गुरूच्या आज्ञेवरून साबरमती नदीवर जाऊन चार वर्षे तपश्चर्या केली. त्या जागेला मंकितीर्थ असें म्हणतात. पुढें याला अनेक पुत्र झाले. ही गोष्ट त्रेतायुगांत घडली. याला सप्तसारस्वत असें नांव होतें; आणि द्वापरांत याला पांडवांनीं सप्तधार असें नांव दिलें ( पद्म. उ. ६. १४३ ).

२ पूर्वी मंकी या नांवाचा एक द्रव्यलोभी शेतकरी होता. परंतु याच्या मनाप्रमाणें कोणतीच गोष्ट होत नसे. पुढें यानें एकदां दोन बैल विकत घेतले व त्या दोहोंना एकाच जुवाला जुंपून कामाला लाविले. ते बैल धांवतच निघाले; परंतु त्यामुळें त्यांना खालीं बसलेला उंट दिसला नाहीं. ते जेव्हां त्याच्या खांद्याजवळ आले, तेव्हां उंट उठून उभा राहिला व तराजूप्रमाणें दोन्ही बैल मानेवर घेऊन पळूं लागला. तेव्हां त्या बैलांची ती स्थिति पाहून मंकीस अतिशय वाईट वाटलें व पश्चात्तापानें याच्या मुखांतून पुढील उद्गार बाहेर पडले: 'मनुष्याच्या दैवांत जर कांहीं नसेल तर त्यानें कितीहि प्रयत्न केला तरी कांहींहि होणें शक्य नाहीं.' यानें वृषभवधप्रसंगीं केलेलें भाषण अतिशय श्रेष्ठ दर्जाचें आहे. यास या गोष्टीमुळें वैराग्य उत्पन्न झालें व पुढें ब्रह्मप्राप्ति झाली ( म. शां. १७७ ). 'नशिबानें देणेंघेणें' हें तत्त्व समजावण्याकरितां भीष्मानें धर्मास ही हकीगत सांगितली.

**मंगल**—एक आचार्य ( बौ. श्रौ. २६.२ ).

२ दक्षयज्ञांत सतीस मृत्यु आल्यानें शंकर सतीविरहानें पीडित होऊन तिच्या प्राप्तीकरितां तप करीत असतां त्याच्या मस्तकांतून एक घर्मबिंदु खालीं पडला. त्याचा एक मुलगा झाला, तोचि मंगल होय. पुढें शंकरानें याची नवग्रहांत

स्थापना केली. पृथ्वीनें याचें पालन केलें, म्हणून यास भीम असेंहि नांव आहे ( शिव. रुद्र. २.१०; स्कंद. ४. १. १७ ).

हा शंकराच्या अश्रुबिंदूपासून उत्पन्न झाला असेंहि आढळतें ( स्कंद. ७.१.४५ ). शंकरानें हिरण्याक्षाच्या विकेशी नामक कन्येशीं लग्न केलें होतें. पुढें शंकर विकेशीशीं संभोग करणार इतक्यांत अग्नि त्या ठिकाणीं आला. तेव्हां शंकर रागावला व त्यामुळें त्याचे डोळे क्रोधानें लाल होऊन त्यांतून अश्रुबिंदु गळूं लागले. त्यांतील एक तेजोमय अश्रु विकेशीच्या मुखांत पडला व ती गरोदर राहिली. पण शंकरतेजानें युक्त असलेला तो गर्भ तिला सहन करवेना. तेव्हां तिनें तो बाहेर टाकिला. पुढें त्याचा एक पुत्र होऊन त्यास पृथ्वीनें स्तनपान करविलें. त्यालाच मंगल हें नांव आहे. अग्नीच्या सान्निध्यानें उत्पन्न झाला म्हणून यास अंगारक असेंहि नांव आहे ( विष्णुधर्म. १.१.६; पद्म. सृ.८१ ). शिवपार्वती रतिक्रीडा करीत असतां पडलेल्या रक्तबिंदूपासून हा झाला ( भवि. ब्राह्म.३१ ). हा भारद्वाजाचा पुत्र असून गणेशकृपेनें ग्रह बनला ( गणेश.१.६० ).

२ स्वायंभुव मन्वंतरांतील जित् नामक देवांपैकीं एक.

**मंगला**—एक देवी. हिनें त्रिपुरवधाच्या वेळीं शंकरास वर दिला होता ( ब्रह्मवै. ३. ४४ ).

**मचकुक**—एक यक्ष ( म. व. ८१. २०० कुं. ).

**मच्छिंद्र**—हा गोरखाचा गुरु. याच्या मुखांत पिनाकीचें अंशरूपी तेज गेलें व हरिद्वारीं रंभेपासून याला नाथशर्मा पुत्र झाला ( भवि. प्रति. ४. १२; योगेश्वर पहा ).

**मंजुघोषा**—शुकाची स्त्री ( भवि. प्रति. ३.२९ ).

**मणि**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र. यानें शिवाची स्तुति करून गरुडापासून भय नसावें असा वर मिळविला ( ब्रह्म. ९० ).

२ ब्रह्मदेवाच्या सभेंतील एक ऋषि (म.स. ११.२४ कुं.).

**मणिकंधर**—कुबेराचा सेनापति.

**मणिकार्मुकधर**—कुबेराचा सेनापति.

**मणिकुंडल**—हा व याचा मित्र वृद्धगौतम हे व्यापाराकरितां गेले असतां पैज लावून वृद्धगौतमानें याचें सर्व जिंकिलें आणि याला आंधळा व थोटा बनविलें. पण बिभीषणाच्या मुलानें याला पुनः पूर्ववत् केलें. नंतर याचें महाराजाच्या मुलीशीं लग्न झालें व त्याचें राज्य याला मिळालें ( ब्रह्म. १७० ).

**मणिग्रीव**—नलकूबराच्या भावाचें नांव (नलकूबर पहा).

**मणिधर**—लोहित पर्वतावर राहणारा एक यक्ष.

**मणिभद्र**—रजतनाभ व मणिवरा यांचा पुत्र. याची स्त्री ऋतुस्थकन्या पुण्यजनी. याचे पुत्र असोम, ऋतुमत्, चंद्रप्रथ, दर्शनीय, दुरसोम, द्युतिमत्, नंदन, पद्म, पिंगाक्ष, भीरु, मणिमत्, मंडक, महाद्युति, मेघवर्ण, रुचक, वसु, शंख, सर्वानुभूत, सिद्धार्थ, सुदर्शन, सुभद्र, सुमक व सूर्यतेजस् ( ब्रह्मांड. ३.७.१२२-१२५ ). शिवगणांपैकीं एक ( पद्म. उ. १७ ).

२ कुबेराचा एक सेनापति. रावणाचा सेनापति प्रहस्त यानें याचा कैलास पर्वतावर पराभव केला होता ( वा. रा. यु. १९.११ ).

**मणिभूष**—कुबेराचा एक सेनापति.

**मणिमत्**—मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

२ पातालांतील एक नाग ( म. स. ९. १० कुं. ).

३ कुबेरसेनापति. अगस्त्य ऋषीचा यास 'तूं लवकरच मरशील' असा शाप होता. पुढें पांडव वनांत गेले असतां फिरत फिरत ते हिमवान् पर्वतावरील कुबेरवनांत गेले. नंतर भीम त्या वनांतील कमळें आणावयास गेला असतां त्याचें व याचें युद्ध होऊन हा मरण पावला (म. व. १६ ).

४ द्रौपदीस्वयंवरार्थ आलेला एक क्षत्रिय ( म. आ. २०१. ७ कुं. ).

५ एक क्षत्रिय. याला सौमदत्ति यूपकेतूनें ठार केलें ( म. द्रो. २५ ).

**मणिमंत्र**—मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**मणिवक्र**—आप नामक वसूचा पुत्र.

**मणिवर**—रजतनाभ व मणिवरा यांचा पुत्र. याची स्त्री ऋतुस्थकन्या देवजनी.

याचे पुत्र गुह्यक या साधारण नांवानें प्रसिद्ध होते. त्यांचीं नांवें—अहित, कुमुदाक्ष, कुसु, कृत, चर, जयावह, पक्ष, पद्मनाथ, पद्मवर्ण, पिंशंग, पुष्पदंत, पूर्णभद्र, पूर्णमास, बलक, मणिमंत्र, महामुद, मानस, वर्धमान, विजय, विमल, विवर्धन, श्वेत, सवीर, सारण, सुकमल, सुगंध, सुचंद्र, स्थूलकर्ण, हिरण्याक्ष व हैमवंत (ब्रह्मांड. ३.७.१२७–१३१).

**मणिवरा**—रजनाभाची स्त्री.

**मणिवाहन**—( सो. ऋक्ष. ) महाभारतमतें कुशांबास व वायुमतें कुशास नामान्तर. मत्स्यांत याबद्दल हरिवाहन म्हटलें असून कुश वेगळा दिला आहे.

**मणिस्थक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**मणिस्रग्विन्**—कुबेराचा सेनापति.

**मंड**—भृगुकुलांतील गोत्रकार. मुण्ड असा पाठभेद आहे.

**मंडक**—मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**मंडलिक**—( सो. ) भविष्यमतें प्रतापेंद्राचा पुत्र. यानें दहा हजार वर्षें राज्य केलें.

**मंडूक**—यानें एक अथर्ववेदाची शिक्षा केली आहे. तिच्यांत १७९ श्लोक आहेत.

२ ( ५ आयु पहा ).

मतंग—हा बापाच्या यज्ञाकरितां समिधा व दर्भ आणण्याकरितां एकदां रथास गाढवी व तिचा पुत्र जोडून वनांत चालला होता. पण जोडीपैकीं मुलगा लहान असल्यामुळें आईबरोबर चालेना. तेव्हां यानें त्याच्या नाकावर चाबकाचे बरोबर फटकारे लगाविले. तेव्हां आईनें नाकाला लागलेल्या मुलाचें सांत्वन पुढीलप्रमाणें केलें, ‘चाण्डाल असे क्रूर असतात, ब्राह्मण दयाळु असतात. हा आपल्या जातीवर गेला आहे.’ हें गाढवीचें बोलणें मतंगाला समजलें. तेव्हां गर्दभीला मतंगानें ‘माझें ब्राह्मण्य जाऊन चाण्डालत्व मला कसें आलें?’ असें विचारिलें. तेव्हां तिनें याला ‘तूं न्हाव्यापासून ब्राह्मण स्त्रीच्या ठिकाणीं झाला आहेस, त्यामुळें तुझें ब्राह्मण्य नष्ट झालें. असें सांगितल्याबरोबर हा घरीं आला. मुलगा यज्ञाची तयारी करण्याचें सोडून परत आलेला पाहून बापानें याच्याजवळ चवकशी केली. तेव्हां यानें सरळ कारण सांगून तपाला जाण्याचें ठरविलें. पुढें याच्या तपानें इंद्र प्रसन्न झाला. तेव्हां त्याला ब्राह्मण्य मिळविण्याकरितां तप करीत असल्याचें यानें सांगितलें. इंद्रानें चांडालयोनींत उत्पन्न झालेल्यास पवित्र ब्राह्मण्य प्राप्त होणें अशक्य आहे असें समजाविलें. तेव्हां यानें एका पायावर उभें राहून शंभर वर्षे तप केलें. पुनरपि इन्द्रानें याला सांगितलें कीं, ‘तूं अप्राप्य गोष्टीची इच्छा करीत आहेस. ब्राह्मण्य हें सहज प्राप्त होत नसून अनेक जन्मांनंतर प्राप्त होत असतें.’ यानें पुनः एक हजार वर्षे तप केलें. पुनः आणखी गयेला जाऊन आंगठ्यावर उभें राहून शंभर वर्षे तपश्चर्या केली. फक्त अस्थिचर्म राहिलें. शेवटीं इंद्रानें याला समजावून दिल्यावर यानें ब्राह्मण्याखेरीज कामविहारी, कामरूपी, आकाशगामी, ब्राह्मणक्षत्रियांच्या अविरोधानें पूजनीयता व अक्षय्य कीर्ति असे वर मागितले. ते देऊन शिवाय ऐश्वर्याकरितां स्त्रिया तुझी पूजा करितील व छन्दोदेव म्हणून स्त्रियांना पूज्य होशील, असेहि वर दिले. पुढें मतंगानें आपला देहत्याग करून वरानें मिळालेलें स्थान प्राप्त केलें. ब्राह्मण्य जन्मावर अवलंबून आहे हें सांगण्याकरितां ही कथा आली आहे (म. अनु. २७-२९).

मतंगाश्रम (म. व. ८२.१०० कुं.), मतङ्गकेदार (म. व. ८३.१७ कुं.) या स्थलांशीं ह्या मतंगाचा कांहीं संबंध दाखविण्याला पुरावा नाहीं.

२ हा दाशरथि रामास फळें देणाऱ्या शबरीचा गुरु होता (वा. रा. अर. ७४).

३ त्रिशंकूचें नामांतर (म. आ. ९२.४३–४६ कुं.).

मति—स्वायंभुव मन्वंतरांतील जित् नामक देवांपैकीं एक.

२ आभूतरजस् देवांतील एक.

३ भव्य देवांतील एक.

मतिनार—(सो. पूरु.) अंतिनाराचें नामांतर. यास आणखी रंतिनार व रंतिभार अशींहि नामांतरें आहेत.

मतोच्छील—विष्णूच्या मलापासून जो अदम नांवाचा पुरुष उत्पन्न झाला, त्याच्या वंशांतील म्लेच्छ हनूकाचा पुत्र. यानें नऊशें सत्तर वर्षे राज्य केलें. याचा पुत्र लोमक (भवि. प्रति. १.४).

मत्त—लंकेंतील एक बलाढ्य राक्षस. यास ऋषभ नामक वानरानें ठार मारिलें (वा. रा. उ. ७०).

२ महापार्श्वाचें नामांतर.

३ अंगदेशच्या मायावर्म राजाचा पुत्र. याची माता प्रमदा (भवि. प्रति. ३. ३१).

मत्तिल्ल—(सो. कुरु.) उपरिचर वसु व गिरिका यांचा पुत्र (म. आ. ६४. ४४ कुं.).

यास गणपत कृष्णाजी प्रतींत व विष्णुपुराणांत मावेल्ल व वायूंत माथैल्य म्हटलें आहे.

मत्स्य—सूर्यवंशांतील मनुप्रजापति प्रातःकाळीं संध्या करीत बसला असतां अर्घ्यांत एक मत्स्य आला. अर्घ्य सोडणार तोंच मत्स्यानें मनूला भावी प्रळयाची साग्र हकीगत सांगून त्यास उत्तरगिरि पर्वतावर सुरक्षित पोहोंचविण्याचें आश्वासन दिलें. व आपल्यास मोठें होईतों संभाळण्याची विनंति केली. मनूनें हा मत्स्य मोठा झाल्यावर महासागरांत सोडिला. पुढें जलप्रलय झाल्यावर पृथ्वीवरील सर्व प्राणी वाहून गेले. मनूला मत्स्याचें साहाय्य झाल्यानें तो उत्तरगिरीवर गेला. पाणी उतरल्यावर त्या ठिकाणीं तो वसाहत करून आपण स्वतःच यज्ञापासून उत्पन्न केलेल्या मानवी इडादेवीबरोबर विवाह करून यज्ञदेवतेस संतुष्ट करून त्यानें प्रजोत्पादन केलें. म्हणूनच मनुष्यास मानव अशी संज्ञा प्राप्त झाली (श. ब्रा. १. ८. १.१).

विष्णूनें वेदोद्धारासाठीं घेतलेला हा दहावा अवतार होय (म. व. १९०; भा. १. ३). हा अवतार काश्मीरांत झाला. शंखासुरानें वेद पळविल्यामुळें विष्णूला मत्स्यावतार घ्यावा लागला (पद्म. उ. ९०-९१).

कश्यपाची बायको दिति हिचा मुलगा जो मकर दैत्य त्यानें ब्रह्मदेवाला फसवून वेद उपटले व ते घेऊन तो पातालांत गेला. तेव्हां अनाचार माजला; म्हणून ब्रह्मदेव विष्णूस शरण गेला. तेव्हां विष्णूनें मत्स्यावतार घेऊन त्याचा वध केला व वेद परत मिळविले. हे वेद दैत्यानें मिसळले म्हणून व्यासरूपानें विष्णूनें पुनः अवतार घेतला (पद्म. उ. २३०). पंचविसाव्या कल्पाच्या शेवटीं ब्रह्मदेवाची रात्र सुरू झाली. तेव्हां तो निद्रित झाला. त्या वेळीं प्रलय होऊन स्वर्ग, पृथ्वी आदिकरून सर्व लोक बुडाले. निद्रावस्थेंत ब्रह्मदेवाच्या तोंडांतून वेद गळून पडले. ते हयग्रीव नामक

दैत्यानें हरण केले. असें होणार हें ब्रह्मदेवास माहीत होतें. ईश्वरानें त्याच्या नाशाकरितां सूक्ष्म मत्स्यरूप धारणहि केलें व कृतमाला नदींत प्रसंगाची वाट पाहूं लागला. याच नदीतीरावर वैवस्वत मनु तप करीत होता. भागवतांत द्रविड देशाधिपति सत्यव्रत राजा असें आहे. एके दिवशीं तो तर्पण करीत असतां त्याच्या ओंजळींत एक लहानसा मासा आला. तेव्हां तो त्याला परत पाण्यांत सोडूं लागला. त्याबरोबर माशानें 'माझें रक्षण कर' अशी त्याची प्रार्थना केली. तेव्हां दयाळु सत्यव्रतानें यास कलशांत ठेविलें, पण हा उत्तरोत्तर वाढूं लागला. तेव्हां राजानें याच्या सांगण्यावरून याला सरोवरांत सोडिलें. तरीहि हा वाढत होता. सत्यव्रत कंटाळून यास समुद्रांत सोडूं लागला. तेव्हां यानें 'मला तेथें इतर बलाढ्य जलचर खाऊन टाकतील. तरी मला तेथें सोडूं नकोस' अशी विनंति केली. त्यामुळें राजा आश्चर्यचकित होऊन म्हणाला, 'तुझ्यासारखा सामर्थ्यवान् जलचर मीं कधीं पाहिला नाहीं व ऐकिलाहि नाहीं. तूं एका दिवसांत शंभर योजनें लांबरुंद वाढलास, यावरून तूं कोणी तरी अपूर्व प्राणी आहेस. तूं परमेश्वर असून हा मत्स्यावतार धारण केलेला असावा.' हें भाषण ऐकून मत्स्य म्हणाला, 'आज-पासून सातवे दिवशीं सर्वत्र प्रलय होऊन जलमय होईल. तेव्हां तूं येणाऱ्या नौकेंत सप्तर्षि, औषधें, बीजें वगैरे घेऊन बैस. कदाचित् नौका हेलकावे खाऊं लागल्यास वासुकीची दोरी करून माझ्या शिंगास बांध.' त्याप्रमाणें त्यानें केलें; व मत्स्यानें हयग्रीवास ठार करून वेद परत मिळविले. यानंतर सत्यव्रतास परमेश्वरानें वैवस्वत मनु केलें व त्यास मत्स्य-पुराणसंहितेचा उपदेश केला (मत्स्य. १; २; २१-२४; भा. १. ३. १५; ५. ५. १८; २४; ८. २४). भविष्यकालीन सप्तर्षि पृथ्वीवर होते. त्यांना मत्स्यरूपधर विष्णूनें शृंगी होऊन नौकेमधून हिमालयाच्या शिखरावर पोहोंचविलें (विष्णुधर्म. १. ७७; म. व १८७).

ही गोष्ट चाक्षुष मन्वंतरांतील प्रलयांत घडली (भा. १. ३. १५). मत्स्यानें सत्यव्रताला 'तूं वैवस्वतांत कृतयुगापासून राजा होशील' असें सांगितलें (मत्स्य १. ३४).

२ (सो. ऋक्ष.) उपरिचर वसूपासून मत्स्यीच्या उदरांत झालेल्या मिथुनांतील पुत्र. मत्स्यगंधेचा भ्राता (म. आ. ६४. ७८ कुं.).

३ वायुमतें व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील देवमित्राचा शिष्य. वात्स्याबद्दल पाठभेद.

**मत्स्यकाल**—(सो. ऋक्ष.) वायुमतें हा इन्द्रसख ऊर्फ उपरिचर वसु याचा पुत्र. याचीं इतरत्र मत्स्य व काली अशीं दोन नांवें करून तीं बहीण भाऊ दाखविलीं आहेत.

**मत्स्यगंध**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**मत्स्यगंधा**—उपरिचर वसूच्या वीर्यानें एका मत्स्यीस झालेली मुलगी. ही कृष्णद्वैपायन व्यासाची माता. हिला सत्यवती असेंहि म्हणत असत. ही पूर्वजन्मीं पितरांची कन्या अच्छोदा होती.

**मत्स्यदग्ध**—अंगिराकुलोत्पन्न एक प्रवर.

**मत्स्याच्छाद्य**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**मत्स्येन्द्रनाथ**—हा पूर्वी मासा होता. पण ब्रह्मदेवानें ज्ञान देऊन यास मनुष्य केलें व हा हिमालयावर तपश्चर्येस गेला (स्कंद. ६. २६३).

**मथन**—विष्णूनें मारिलेला तारकासुरपक्षीय एक असुर (मत्स्य. १५१).

**मथित**—भृगुकुलोत्पन्न गोत्रकार. याबद्दल माथव असा पाठभेद आहे.

**मथित यामायन**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०, १९).

**मद**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ ब्रह्मदेवाचा मानसपुत्र. हा त्याच्या अहंकारापासून झाला (मत्स्य. ३. ११).

३ रुद्रगणांपैकीं एक.

४ रामचंद्राच्या सुज्ञ नामक मंत्र्याचा पुत्र.

५ एक राक्षस. अश्वींना देव सोमपानास घेईनात म्हणून त्यांनीं च्यवनाची मदत मागितली. च्यवनानें मंत्रांनींच देवांचा पराभव केला व इन्द्र रागावल्याचें पाहून त्यानें अग्नींतून एक राक्षस उत्पन्न केला. त्याचें मुखच इतकें मोठें होतें कीं, त्यांत सर्व देव मावले. तेव्हां आपण त्याच्या जिभेवर आहोंत हें पाहून इन्द्र सर्व देवांसह च्यवनास शरण गेला व त्यानें त्याला अश्विनांसह सोमपान करीत जाऊं असें कबूल केलें (म. अनु. २६१. २०-३० कुं.).

**मद्गल**—ऋग्वेदी ब्रह्मचारी.

**मदन**—ब्रह्मपुत्र कामाचें नामांतर.

२ धृष्टबुद्धि प्रधानाचा पुत्र.

**मदनमंजरी**—नीलध्वजपुत्र प्रवीराची स्त्री.

२ लहराची कन्या व सुखखानीची पत्नी (भवि. प्रति. ३. २०).

**मदनसुंदरी**—कृष्णाला प्रिय असलेली एक गोपी (पद्म. पा. ७७).

**मदनावती**—काश्मीर देशच्या कैकय राजाची कन्या (भवि. प्रति. ३. ३१).

**मदनिका**—मेनकेची कन्या व विद्युद्रूप राक्षसाची स्त्री. पण गरुडवंशी कंधरानें विद्युद्रूपास मारिल्यामुळें ही कंधराची पत्नी झाली. कंधरापासून हिला तार्क्षी नांवाची कन्या झाली (मार्क. २).

**मदयन्ती**—कल्माषपादाची स्त्री. हिचा पुत्र अश्मक ( कल्माषपाद पहा ).

२ कृष्णाची सखी ( पद्म. पा. ७४ ).

**मदालसा**—ऋतुध्वज राजाची स्त्री. अलर्क राजाची माता. ही अत्यंत ब्रह्मनिष्ठ होती. पातालकेतु राक्षसानें हिला पळवून नेलें असतां ऋतुध्वजानें हिला सोडवून आणिलें ( ऋतुध्वज पहा ).

**मदिरा**—समुद्रमंथनाच्या वेळेस समुद्रांतून निघालेली एक स्त्री. हिला सुरा असेंहि म्हणत असत. समुद्रांतून बाहेर आल्यावर दैत्यांनीं हिचा स्वीकार केला, म्हणून त्यांना असुर म्हणतात ( पद्म. सृ. ४ ).

२ वसुदेवाची एक स्त्री ( भा. ९. २४ ).

**मदिराश्व**—( सू. इ. ) दशाश्व राजाचा पुत्र. याला द्युतिमान् नामक पुत्र ( म. अनु. २. ८ कुं. ) व सुमध्यमा नामक एक कन्या होती. ती त्यानें हिरण्यहस्त ऋषीस दिली होती ( म. शां. २४०-३५; अनु. २००. २४ कुं. ).

२ विराटाचा भाऊ. हा भारतीय युद्धांत पांडवांकडे होता. हा द्रोणाकडून मारिला गेला ( म. वि. ३३ ). याला मदिराक्ष असेंहि म्हणतात ( म. उ. १७१. १५ कुं. ).

**मदिरेक्षणा**—अंगदेशाच्या मायावर्म राजाला प्रमदा नामक स्त्रीच्या ठायीं झालेली कन्या. हिचा कितव नामक दैत्याशीं विवाह झाला. परंतु तो दैत्य हिला पीडा देत असल्यामुळें सुखखानीनें हिच्या पित्याच्या सांगण्यावरून त्याला ठार केलें. सुखखानीला हिनें मनानें वरिलें होतें. परंतु महीपतीच्या उपदेशानें हिचा तारकाशीं विवाह ठरला ( भवि. प्रति. ३. ३१ )

**मदोत्कट**—एक शिवगण.

**मद्र**—( मद्रक पहा ).

२ स्वारोचिष मन्वंतरांतील देव.

**मद्रक**—( सो. अनु. ) विष्णु व वायु यांच्या मतें हा शिबीचा पुत्र होय. यास मद्र असेंहि म्हणतात.

**मद्रगार शौंगायनि**—साति औष्ट्राक्षीचा शिष्य. याचा शिष्य कांबोज औपमन्यव ( वं. ब्रा. १ ).

**मद्रदेव**—अजमीरचा राजा चपहानि याच्या वंशांतील शार्ङ्गदेवाचा पुत्र. यानें पन्नास वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. ४. २. ).

**मद्रा**—अत्रीच्या दहा स्त्रियांपैकीं एक. हिचा पुत्र सोम ( ब्रह्मांड. ३. ८. ७४-८७ ).

**मधु**—उत्तम मनूचा पुत्र.

२ चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ कश्यप व खशा यांचा पुत्र.

४ ( मधुकैटभ पहा ).

५ ( स्वा. प्रिय. ) भागवतमतें बिंदुमत् व सरघा यांचा पुत्र. याच्या मुलाचें नांव वीरजन.

६ ( सो. क्रोष्टु. ) भागवत व भविष्य यांच्या मतें देवक्षत्राचा, विष्णुमतें क्षत्राचा, मत्स्यमतें दैवक्षत्राचा व वायुमतें देवनाचा पुत्र होय.

७ ( सो. सह. ) हा विष्णुमतें वृषाचा व भागवतमतें सहस्रार्जुनाचा पुत्र होय.

८ कृतयुगांतील दितिपुत्र. याच्या बायकोचें नांव कुम्भीनसी. याला लवण नांवाचा मुलगा होता. याच्या तपश्चर्येनें व सदाचारानें प्रसन्न होऊन यास शंकरानें त्रिशूल दिला होता. तो जवळ असेतोंपर्यंत याचा पराभव होणार नव्हता. पण याचा पुत्र लवण दुराचारी निघाल्यामुळें शत्रुघ्नानें त्याला ठार केलें ( वा. रा. उ. ६१; ह. वं. १. ५४ ). या मधूचा यादवांशीं शरीरसंबंध आहे व यादव मधूला दैत्य म्हटलें आहे व लवण निपुत्रिक मेल्यामुळें मधुपुरी भीमाकडे आली. यावरून हा मधु यादवांपैकींच असावा असें वाटतें (ह. वं. २. ३८).

९ कृष्णाच्या पौत्रांतील एक.

१० मुकुंद ब्राह्मणाचा शिष्य. मुकुंद अकबर या नांवानें प्रसिद्धीस आल्यावर मधु मध्वाचार्यांच्या कुळामध्यें वैष्णव झाला. याचें नांव हरिदास असून हा सर्व रागांमध्यें निपुण होता ( भवि. प्रति. ४. २२ ).

**मधुक पैंग्य**—एक आचार्य ( श. ब्रा. ११. ७. २. ८; सां. ब्रा. १६. ९ ). हा याज्ञवल्क्याचा शिष्य. याचा शिष्य चूड भागवित्ति ( बृ. उ. ६. ३. ८-९ ).

**मधुकैटभ**—ब्रह्मदेवाच्या घामापासून मधु व कैटभ या दोन असुरांची उत्पत्ति झाली ( विष्णुधर्म. १. १५ ). यांची उत्पत्ति ब्रह्मदेवाच्या तमोगुणापासून झाली (पद्म. सृ. ४०). हे विष्णूच्या कर्णमलापासून उत्पन्न झाले असेंहि आढळतें ( दे. भा. १. ४ ). यांनीं तपश्चर्या करून आजिंक्यत्व मिळविलें. पुढें हे आपल्या स्वभावानुसार सर्व लोकांस त्रास देऊं लागले असतां विष्णूनें यांना ठार मारिलें ( दे. भा. १. ४ ).

विष्णु योगनिद्रेंत व ब्रह्मा नाभिकमळीं असतां विष्णूच्या कानांतील मळापासून मधु व कैटभ उत्पन्न झाले व ते ब्रह्म्यांस मारूं लागले. ब्रह्मदेवाच्या स्तुतीनें विष्णूनें त्यांजबरोबर पांच हजार वर्षेंपर्यंत युद्ध केलें. पण हे मरेनात. शेवटीं विष्णूनें यांना मोहीत करून 'तुम्ही मरा' असा वर मागितला व नंतर मांडीवर घेऊन यांचा वध केला ( पद्म. क्रि. २; मार्कं. ७८

ह. वं. १. ५५; ९४; ). यांच्या मेदापासून पृथ्वी झाली म्हणून पृथ्वीला मेदिनी असें नांव पडलें ( म. स. ४४; शां. ३५७ कुं. ).

**मधुच्छंदस् वैश्वामित्र**—ऋग्वेदांतील पहिल्या मंडळापैकीं पहिल्या दहा सूक्तांचा कर्ता ( ऐ. आ. १. १. ३; सां. ब्रा. २८. २ ). हा विश्वामित्राचा एकावन्नावा मुलगा ( ऐ. ब्रा. ७. १८ ). शुनःशेपाचें ज्येष्ठ भ्रातृत्व पहिल्या पन्नास भावांनीं कबूल केलें नाहीं; पण पुढल्या पन्नास भावांनीं मान्य केलें. धाकट्या पन्नासांचा मधुच्छंदस् मुख्य होता. त्यामुळें विश्वामित्र त्यांच्यावर खूष झाला व त्यानें त्यांना चांगले आशीर्वाद दिले. यांच्या प्रउगशस्त्राचा उल्लेख आहे ( श. ब्रा.१३.५.१.८). प्रउगशस्त्र म्हणजे सकाळीं गावयाचे मंत्र. प्रउगशस्त्र कोणत्या छंदांत असावें यांत मतभेद आहे. पण याच्या मतें गायत्रीछंदांत असावें ( ऐ. आ. १. १. ३ ). हा शर्यातीचा पुरोहित होता ( शर्याति पहा ).

२ प्रमतिपुत्र सुमतीचा पुरोहित ( ब्रह्म. १७१. २५ ). हा योगानें मुक्त झाला (म. अनु ७; पद्म. सृ. १५). हा विश्वामित्र गोत्राचा एक प्रवर आहे व कुशिक गोत्री मंत्रकार आहे.

**मधुनंद**—( भविष्य. ) वायुमतें मथुरेंत राज्य करणाऱ्या भूतिनंदाचा पुत्र.

**मधुप**—स्वायंभुव मन्वंतरांतील आजित् देवांपैकीं एक.

२ कृष्णांशाचा शत्रु याचा पुत्र वीरसेन ( भवि. प्रति. ३. २२).

**मधुपर्क**—गरुडाचा एक पुत्र.

**मधुपिंग**—लांगली भीम नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**मधुमती**—गुणाधीप राजा हरिशर्मा याच्या पुरोहिताची कन्या. हिच्याकरितां हिच्या बापानें, भावानें व हिनें स्वतः असे तीन वर पसंत केले. लग्नसमयीं ते तिघेहि हजर असतां ही सर्पदंशानें मेली. तेव्हां त्या तिघांपैकीं एकानें हिच्या अस्थि नेल्या व दुसऱ्यानें हिची रक्षा नेली. परंतु तिसऱ्यानें लक्ष्मणपुरींतील रामशर्मा याजवळून संजीवनी मंत्र घेऊन हिला जिवंत केलें. त्यामुळें तो प्राणदाता ठरला. अस्थि नेणारा भाऊ ठरला व रक्षा नेणारा स्वतः नियोजिलेला पुरुष तिचा पति ठरला ( भवि. प्रति. २.२ ).

**मधुरावह**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**मधुरुह**—( स्वा. प्रिय. ) घृतपृष्ठाचा पुत्र.

**मधुवल**—कृष्णांशाचा शत्रु. वीरसेनाचा पुत्र ( भवि. प्रति. ३. २२ ).

**मधुव्रती**—मुकुंद ब्राह्मणानें अकबराच्या नांवानें जन्म घेतल्यावर त्याच्या अनेक शिष्यांपैकीं हा मधुव्रती कीलक या नांवानें प्रसिद्धीस आला. यानें रामाची लीला करून रामानंदाच्या मताचा स्वीकार केला ( भवि. प्रति. ४. २२ ).

**मधुष्पन्द**—विश्वामित्राचा एक पुत्र.

**मध्य**—कश्यप व अरिष्टा यांचा पुत्र.

**मध्यंदिन**—( स्वा. उत्तान. ) भागवतमतें पुष्पार्ण व प्रभा यांचा पुत्र.

**मध्वाचार्य**—(ऐति.) याचा गरुडपुराणांत व गर्गसंहितेंत उल्लेख आहे (गरुड. १०.१९. ४४; गर्गसं. १०. ६१. २८).

लिंगावरून बळित्था ( ऋ. १. १४१ ) हें सूक्त मध्वाचार्यांचा उल्लेख असलेलें आहे असें मानितात.

२ रविपूजक शक्तिशर्मा त्रेतायुगांत अयोध्येस आला व एक हजार वर्षें जगून सूर्य झाल्यावर ब्रह्मलोकीं गेला. त्याच्या तेजानें मध्वाचार्य झाला. वृंदावनस्थ माधवाचा पुत्र. याचें मूळगांव मधु. याच्या अंगीं वैष्णवी शक्ति वागत होती ( भवि. प्रते. ४. ८; १९ ).

**मन**—भव्य, तुषित व साध्य देवांतील एक.

**मनस्**—सायणमतानें एक ऋषि (ऋ. ५. ४४. १०).

**मनसा**—( आस्तिक पहा ).

२ सिंधु दैत्याची बायको.

**मनस्यु**—( सो. पूरु.) वायुमतें हा अविद्धाचा, भागवत व विष्णु यांच्या मतें प्रवीराचा व मत्स्यमतें प्राचीन्वत्‌चा पुत्र. याची स्त्री शूरसेन राजाची कन्या ( म. आ. ८८. ५ कुं. ).

२ ( स्वा. नाभि. ) महान्ताचा पुत्र. विष्णुमतें मनस्यु व नमस्यु एकच होत.

**मनस्विनी**—चंद्राची आई ( म. आ. ६७ ).

२ ऋतेयुपुत्र अंतिभार राजाची स्त्री ( मत्स्य. ४९.७ ).

३ उत्तानपाद व सूनृता यांची कन्या.

**मनावी**—मनूची बायको असा ह्या शब्दाचा अर्थ आहे ( क. सं. ३०. १; श. ब्रा. १. १. ४. १६ ).

**मनु**—हा अखिल मानवजातींचा पिता आहे ( ऋ. १. ८०. १६; ११४. २; २. ३३. १३; ८. ६३. १; अ. वे. १४. २. ४१; तै. सं. २. १. ५. ६ ). वैवस्वत मनु आपणांस मनूच्या मार्गापासून ढळण्याचा प्रसंग येऊं नये अशी प्रार्थना करीत आहे ( ऋ. ८. ३०. ३ ). मनूच्या वाक्याची महती आढळते ( तै. सं. २. २. १०. २; पं. ब्रा. २३. १६. ७ ). मनूनें आपली संपत्ति आपल्या मुलांमध्यें विभागिली. त्यांत नाभानेदिष्ठ नांवाच्या मुलास वगळिलें होतें ( तै. सं. ३. १. ९. ४–५; ऐ. ब्रा. ५. १४ ).

निरुक्तात मुलामुलींच्या हक्कांचें विवेचन केलें आहे. त्यांत स्वायंभुव मनूचे श्लोक आहेत. हे श्लोक म्हणजे स्मृति होत (नि. ३. ४). यास्काच्या पूर्वी याची स्मृति असून त्यांत मनूचा स्मृतिकार म्हणून उल्लेख आहे. गौतम आणि वसिष्ठ यांना मनूची मते दिलीं आहेत. आपस्तंबानें मनूचा श्राद्धाशीं संबंध दाखविलेला आहे (आप. ध. २. ७. १६. १).

हा पहिला यज्ञकर्ता आहे (ऋ. १०. ६३. ७; तै. सं. १. ५. १. ३; २. ५. ९. १; ६. ७. १; ३. ३. २. १; ५. ४. १०. ५; ६. ६. ६. १; ७. ५. १५. ३). सावर्णि मनूच्या दाक्षिणेची प्रशंसा असून त्याला दीर्घायुष्य चिंतिलें आहे व त्याला यदुतुर्वशांनीं नजराणे दिले आहेत (ऋ. १०. ६२. ९-११). वैवस्वत मनु हा राजा होता (ऋ. ८. ५२. १; श. ब्रा. १३. ४. ३. ४). मनूपासून ऋषभ झाला (श. ब्रा. १. १. ४. १४). मनूला मत्स्यानें प्रलयाच्या वेळीं तारल्याची गोष्टहि सविस्तर आढळते (श. ब्रा. १. ८. १. १). याची नौका नावप्रभ्रंशन या हिमालयाच्या शिखराला लागली. महाभारतांत नौबंधन असें नांव असून मत्स्यपुराणांत तर याच्या तपश्चर्येचें स्थान मलय पर्वत दिलें आहे. आणि भागवतांत याचें नांव सत्यव्रत दिलें असून याला द्रविडाधिपति म्हटलें आहे.

रजन, पृथुरश्मि व बृहदांगिरस् यांनीं मनूचा आश्रय करून यज्ञधर्म नष्ट करण्याचा घाट घातला. पण इंद्रानें मनूला हवि देण्याचें कबूल करून रजतादि वरत्रिपुत्रांना पाळवून दिले व मनुपत्नीच्या अंगांतील भूत इंद्रानें घालविलें (ब्रह्मांड. ३.१.७९-८२).

याची यज्ञकर्मानें भरभराट झाली होती. याची यज्ञांतील अग्नीसंबंधीं एक गोष्ट आली आहे. देवदैत्यांचें युद्ध चालू असतां देवांनीं सर्व ऐश्वर्य व धन सुरक्षित राहावें म्हणून अग्नींत ठेविलें. अग्नीला लोभ उत्पन्न होऊन तो संपत्तीसह पळून गेला. देवांनीं त्याचा पाठलाग केला व ठेव परत देण्याविषयीं त्याला त्रास दिला. अग्नि रडूं लागला, त्या वेळीं त्यास रुद्र ही संज्ञा प्राप्त झाली. त्या वेळीं खालीं पडलेल्या अश्रूंपासून रुप्याची उत्पत्ति झाली. म्हणून रुपें ही धातु दानकर्मास अप्रशस्त मानतात. अशा रीतानें देव ऐश्वर्य परत नेऊं लागले असें पाहून अग्नीनें कांहीं भाग देण्याविषयीं प्रार्थना केली. तेव्हां देवांनीं अग्नीस पुनराधान दिलें. व त्यामुळें पूषन्, त्वष्ट्र, मनु व धातृ वगैरेंनीं यज्ञकर्में करून आपली भरभराट करून घेतली (तै. सं. १. ५. १). यानें वासिष्ठाला ब्रह्मविद्या सांगितली व तीमुळें वसिष्ठ ब्रह्मनिष्ठ बनला (जै. उ. ब्रा. ३. १५. २.). याचा पुढील उपनिषदांमध्यें उल्लेख आहे (छां. उ. ३. ११. ४; ८ १५. १; बृ. उ. १. ४. १०; नृ. उ. ४. ३). हा मानवजातीचा मूळ पुरुष आहे. पुराणांतील सर्व वंश याच्या पासूनच सुरू झाले आहेत. हा धर्मनियमांचा प्रवर्तक आहे. ही कल्पनाहि अत्यन्त प्राचीन आहे. यावरून वेगवेगळ्या कालविभागांच्या प्रथम असणाऱ्या पुरुषालाहि मनु असेंच म्हणतात.

स्वायंभुव मनूनें एक लाख श्लोकांचें धर्मशास्त्र निर्माण केलें (म. शां. ३४३. ४० कुं.). प्रजापतीनें एक लक्ष श्लोकसमूह तयार केला व मनु आदिकरून लोकांनीं त्यांचा संक्षेप केला (मनु. १. ५८; कुल्लूकभाष्य पहा). याच आधारावर उशनस् आणि बृहस्पति यांनीं शास्त्रें रचिलीं. मनूनें एक लक्ष श्लोक करून ते १०८० अध्यायांत आणि २४ प्रकरणांत गोंवून ते नारदास दिले. नारदानें त्यांचें १२००० श्लोकांत रूपांतर करून ते मार्कंडेयाला शिकविले. त्यानें त्यांचा ८००० श्लोकांत संक्षेप करून ते सुमतिभार्गवास सांगितले. सुमतिभार्गवानें ४००० श्लोकांत त्यांचें रूपांतर केलें. मनुस्मृतींत नवव्या प्रकरणांत व्यवहारासंबंधीं विवेचन आहे (नारद गद्यस्मृति प्रस्तावना). ब्रह्मदेवापासून मनु झाला. याच्यापासून भृगुनारदादि ऋषि उत्पन्न झाले. ब्रह्मदेवानें मनूस शास्त्रज्ञान दिलें; व मनूनें तें मरीच्यादि दहा ऋषींना शिकविलें (मनु. १. ३४-३५; ५८). याच्याकडे येऊन मोठमोठ्या ऋषींनीं याला धर्मविषयक प्रश्न विचारिले. तेव्हां यानें 'भृगु सर्व निवेदन करील' असें त्यांना सांगितलें (मनु; १. ५९-६०). ऋषि भृगूस प्रश्न विचारीत व त्यांचीं उत्तरें हा देत असे (५. १-२; १२. १-२). मनूचा नांवानें पुष्कळ वेळां उल्लेख आलेला आहे (८. १३९, ९. १५८; २७९; २३९; १०. ७८).

संस्कार-मयूख (पा. २), चतुर्वर्गचिंतामणि (दान. पा. ५२८) आणि इतर कांहीं ग्रंथांत भृगु, नारद, बृहस्पति व आंगिरस यांनीं स्वायंभुवशास्त्र रचिल्याचें दिलें आहे. विश्वरूपानें स्वायंभुव मनूचे म्हणून मनुस्मृतींतील श्लोक दिले आहेत (याज्ञ. २. ७३, ७४; ८३; ८५). विश्वरूपानें भृगूचे म्हणून दिलेले श्लोक मनुस्मृतींत आढळत नाहींत (याज्ञ. १. १८७, २५२). अपरार्कानें दिलेले भृगूचे श्लोकहि मनुस्मृतींत आढळत नाहींत. मनूचें मत प्रदर्शित करणारा भृगूचा श्लोक अपरार्कानें दिला आहे (याज्ञ. २. ९६).

मानवधर्मसूत्रावरून मनुस्मृति लिहिली गेली असें मॅक्स मुल्लर म्हणतो (S. B. E., Vol. 25, P. xviii). स्वायंभुव मनूनें (म. शां. २१. १२ कुं.) व प्राचेतस मनूनें (म. शां. ५७. ४३; ५८.२ कुं.) राजधर्म लिहिला व अर्थविद्या यांचा उल्लेख करितांना नुसता मनु म्हणून उल्लेख आहे. धर्मशास्त्र व

अर्थशास्त्र यांवर निरनिराळे मनूंचे ग्रंथ असणें संभवनीय आहे. कौटिल्यानें प्राचेतस मनूचा उल्लेख केलेला आहे. राजशेखरानेंहि मनूच्या अर्थशास्त्राचा उल्लेख केला आहे. कौटिल्यानें दिलेलीं मनूचीं मतें अक्षरशः मनुस्मृतींत सांपडत नाहींत.

मनूच्या वेळीं बरेंच वाङ्मय उपलब्ध असावें. यानें तीन वेद दिले असून अथर्ववेदाचा अथर्वांगिरस्श्रुति म्हणून उल्लेख केला आहे ( मनु ११. ३३ ). यानें आरण्यकाचा उल्लेख केला आहे. ( मनु ४. १२३ ). याला सहा वेदांगें माहीत होतीं ( मनु. २. १४१; ३ १८५; ४. ९८ ). यानें धर्मशास्त्र ( मनु. २. १० ) केलें असून याला पुष्कळ धर्मशास्त्रें माहीत होतीं ( मनु. ३. २३२ ). धर्माचा अभ्यास केलेल्या मनुष्यास यानें धर्मपाठक म्हटलें आहे ( मनु. १२. १११ ). अत्रि, गौतम, भृगु, शौनक ( ३. १६ ), वसिष्ठ ( ८. १४० ), वैखानस ( ६. २१ ) यांचा धर्मशास्त्रकार म्हणून यानें उल्लेख केला आहे. आख्यानें, इतिहास, पुराणें यांचा यानें उल्लेख केलेला आहे ( मनु. ३. २३२ ). वेदान्तांतील ब्रह्माचें यानें वर्णन केलें आहे (मनु. ६. ८३;९४). यांत यानें उपनिषदांचा विचार केला असावा. यानें कांहीं वेदाबाह्य व कुदृष्टि स्मृतींचा उल्लेख केलेला आहे ( मनु. १२. ९५ ), यानें बौद्ध, जैन यांना उद्देशून लिहिलें असावें. यानें पाखंडी ( ४. ३०; ६१ ), वेदनिन्दा ( ४. १६३ ) आणि भाषा ( ४. २५६ ) यांचें विवेचन केलें आहे. यानें अप्रत्यक्ष रीतीनें दुसऱ्यांचीं मतें उद्धृत केलेलीं आहेत ( मनु. ३. २६१; ९. ३२; १०. ७० ).

अस्पृश्य व शूद्र लोक यांजविषयीं याचे नियम अगदीं कडक आहेत ( मनु. १०. ५०-५६; १२९ ). याचें कारण या जातींनीं बुद्धादि धर्मांना दिलेला पाठिंबा हें असावें.

इ. स. ९०० च्या सुमारास मेधातिथीनें मनुस्मृतीवर भाष्य केलें. विश्वरूपानें मनुस्मृतींतील २०० श्लोकांचा उल्लेख केला आहे. शंकराचार्यांनीं वेदांतसूत्रभाष्यामध्यें मनुस्मृतींतील श्लोक दिले आहेत ( वे. सू. १. ३. २८; २. १. ११; ४. २. ६; ३. १. १४; ३. ४. ३८ ).

गौतमाच्या धर्मसूत्रापेक्षां मनुस्मृतीस शंकराचार्य जास्त मान देतात. अपराधी ब्राह्मणास देहान्तप्रायश्चित्त न देतां हाकून द्यावें असें याचें मत आहे ( मनु. ३८० ). धरसेनाच्या शिलालेखांत मनुस्मृतीप्रमाणें वागणाऱ्या एका राजाचा उल्लेख आहे. इ. स. ५७१ च्या सुमाराची ही गोष्ट आहे. इ. स. ५०० पूर्वी होऊन गेलेल्या शबरस्वामिन् यानें मनूचा उल्लेख केला आहे.

दुसऱ्या शतकानंतरचे लेखक मनूचीं मतें ग्राह्य धरितात. यावरून यापूर्वी याला बरींच शतकें झालीं असावींत. या स्मृतींत अर्वाचीन व प्राचीन मतें घुसडल्यामुळें परस्परविरोधी विधानें पुष्कळ दृष्टोत्पत्तीस येतात ( मनु. ३. १२-१३; २३-२६; ९. ५९-६३; ६४-६९ ). तिसऱ्या शतकापूर्वी या स्मृतींत बराच भरणा झाला असावा, असें बृहस्पतीनें केलेल्या उल्लेखावरून वाटतें.

याज्ञवल्क्यस्मृतीपूर्वी ही स्मृति झाली. तिसऱ्या शतकापूर्वी कांहीं शतकें हा हिचा काल असावा. मनुस्मृतींत यवन, कांबोज, शक, पह्लव, चीन, ओड्र, द्रविड, मेद, आंध्र यांचा उल्लेख आहे ( मनु. १०. ४४; ४८ ).

यावरून इ. स. पूर्वी ३०० च्या पेक्षां अलीकडचा काल धरणें अव्यवहार्य होईल. म्हणून इ. स. पूर्वी २०० ते इ. स. २०० च्या दरम्यान ही स्मृति झाली असावी. मॅकडोनेलांच्या मतें ही भारतांतून घेतली. इ. स. पूर्वी ४०० मध्यें स्वायंभुव मनूचें श्लोकबद्ध धर्मशास्त्र होतें. याच काळीं प्राचेतस मनूचेंहि राजधर्मशास्त्र उपलब्ध होतें. उपलब्ध मनुस्मृतींत २७०० श्लोक आहेत. नारदानें वृद्ध मनु आणि बृहन्मनु यांचा उल्लेख केला आहे.

मनुसंहिता नामक एक तन्त्रविषयक ग्रंथहि याच्या नांवावर आहे ( C. C. ).

ब्रह्मदेवाच्या अहोरात्रीस एक कल्प असें म्हणतात. पैकीं ब्रह्मयाच्या दिवसाचे चवदा भाग कल्पिले आहेत. या प्रत्येक भागास मन्वंतर म्हणतात. याला मन्वंतर म्हणण्याचें कारण म्हणजे तेवढ्या काळांत सृष्टीचें नियमन करणारा तो मनु व या मनूच्या अधिकाराची जी कालमर्यादा तें मन्वंतर. हा मन्वंतराचा काल म्हणजे चतुर्युगांच्या एकाहत्तर फेऱ्या व आणखी कांहीं वर्षे होत. चतुर्युगांचा एकंदर काल ४३२०००० मानुषी वर्षे होय. या मनूस मदतनीस म्हणून सप्तर्षि, देवतागण, इंद्र, अवतार व या मनूचे पुत्र असतात. सप्तर्षींनीं प्रजोत्पादन करावें व या प्रजेचें पालन मनु व त्याचे पुत्र यांनीं भूपाल होऊन करावें, या भूपालास देवतागणांनीं सल्लामसलत देऊन प्रत्यक्ष कामांतहि हातभार लावावा आणि इंद्रानें भूपालास येणाऱ्या अडचणी नाहींशा कराव्या व इंद्राला जी गोष्ट अशक्य होईल ती गोष्ट विष्णूनें अवतार घेऊन पार पाडावी, अशा कामाच्या वांटण्या केलेल्या आहेत. सर्व व ब्रह्मा हे विष्णूचे अंश असून कल्पान्तींच्या प्रलयकालीं विष्णूंत विलीन होतात व कल्पारंभीं पुनः उत्पन्न होतात ( विष्णु. १. ३ ).

मनु एकंदर चवदा आहेतः १ स्वायंभुव, २ स्वारोचिष, ३ उत्तम ( औत्तम-मि-मी ), ४ तामस, ५ रैवत, ६ चाक्षुष,

७ वैवस्वत, ८ सावर्णि (अर्कसावर्णि), ९ दक्षसावर्णि, १० ब्रह्मसावर्णि, ११ धर्मसावर्णि, १२ रुद्रसावर्णि, १३ रौच्य, १४ भौत्य.

स्वायंभुव मन्वंतरांतील **सप्तर्षि**—अंगिरस् (भृगु), अत्रि, क्रतु, पुलस्त्य, पुलह, मरीचि, वसिष्ठ. **देवगण**—याम किंवा शुक्र यांचे जित, अजित् व जिदाजित् असे तीन भेद होते. प्रत्येकांत बाराबारा व्यक्ति होत्या (वायु. १. ३१. ३-९). याच्यांत ऋचीक, गृणान्, जनिमत् जर, जविष्ठ, दुह, बृहच्छुक्र, मितवत्, विभाव, विभु, विश्वदेव, श्रुति, सोमपायिन् अशा व्यक्ति होत्या (ब्रह्मांड. २. १३). यांत तुषित नांवाचा बारा देवांचा आणखी एक गण होता (भा. ४. १. ८). **इंद्र**-विश्वभुक्. भागवतमतें यज्ञ. **इंद्राणी**-दक्षिणा (भा. ८. १). **अवतार**-विष्णुमतें व भागवतमतें यज्ञ व कपिल. **पुत्र**-(अग्निबाहु अग्निमित्र अनिबाहु), अग्नीध्र (आग्नीध्र), ज्योतिष्मत्, द्युतिमत्, पुत्र (वपुष्मत्, सत्र, सह), मेधस् (मेध्र, मेध्य), मेधातिथि, वसु (बाहु), सवन (सवल), हव्य (भव्य). मार्कंडेयमतें पहिले सात भूपाल होते. भागवत व वायु यांच्या मतें प्रियव्रत व उत्तानपाद असे दोनच पुत्र होते. त्यांपैकीं प्रियव्रतास वरील दहा पुत्र झाले.

स्वारोचिष मन्वंतरांतील **सप्तर्षि**— अर्ववीर (उर्वरीवान् ऊर्ज, और्व), ऋषभ (कश्यप, काश्यप), दत्त (अत्रि), निश्चयवन (निश्चर-ल), प्राण, बृहस्पति (अग्नि, अलि), स्तंब (ऊर्जस्तंब, ऊर्जस्वल). ब्रह्मांडांत कुलनामें देऊन स्वायंभुवांतील सप्तर्षींशीं यांचा वडिलोपार्जित संबंध दाखविला आहे. **देवगण**-तुषित इडस्पति इध्म, कवि, तोष, प्रतोष, भद्र, रोचन, विभु, शांति, सुदेव, (स्वह्न) व पारावत. **इंद्र**-विप. श्चित्. भागवतमतें यज्ञपुत्र रोचन. **अवतार**-तुषितपुत्र अजित (विभु). **मनुपुत्र**-अयस्मय आपोमूर्ति (आपमूर्ति), ऊर्ज, किंपुरुष, कृतान्त, चैत्र, ज्योति (रोचिष्मत् रवि), नभ, (नव, नभस्य), प्रतीत (प्रथित, प्रसृति, बृहदुक्थ), भानु, विभृत, श्रुत, सुकृति (सुषेण), सेतु, हविघ्न (हविर्घ्न) अशीं कांहीं निरनिराळीं नांवें सांपडतात. पण एकंदर ९ किंवा १० च संख्या सांगतात. **मनूचें नांव**-द्युतिमत् व स्वारोचिष् असें होतें. या मन्वंतरांत मत्स्यमतें ऋषींस मदतर्नास म्हणून सात प्रजापति होते, ते वसिष्ठपुत्र होते. पण तीं सर्व नांवें मनुपुत्रांच्या नांवांशीं जुळणारीं आहेत (आप, ज्योति, मूर्ति, रय, सुकृत, स्मय व हस्तींद्र).

उत्तम मन्वंतरांतील **सप्तर्षि**-हे सर्व वासिष्ठपुत्र असून त्यांस वासिष्ठ असें सामान्य नाम होतें. अनघ, ऊर्ध्वबाहु, गात्र, रज, शुक्र (शुक्ल), सवन सुतपस्. हे पूर्वी हिरण्यगर्भाचे ऊर्ज नामक पुत्र होते. **देवगण**-प्रतर्दन, (भद्र, भानु, भावन, मानव), वशवर्तिन् (वेदश्रुति), शिव, सत्य, सुधामन् हे सर्व बाराबारांचे गण होते. **इंद्र**-सुशांति (सुकीर्ति, सत्यजित्). **अवतार**-सत्येचा पुत्र सत्य किंवा धर्म व सुनृता यांचा पुत्र सत्यसेन हा होता. **पुत्र**-अज अप्रतिम, (इष, ईष), ऊर्ज, तनूज (तनूर्ज, तर्ज), दिव्य, (दिव्यौषधि, देवांबुज), नभ (नय), नभस्य (पवन, परशु, परशुचि), मधु, माधव, शुक्र, शुचि (शुति, सुकेतु).

तामस मन्वंतरांतील **सप्तर्षि**—अकपि (अकपिवत्), अग्नि, कपि (कपीवत्), काव्य (कवि, चरक), चैत्र, (जन्यु, जह्नु, जल्प), ज्योतिर्धर्मन् (ज्योतिर्धामन्, धनद), धातृ (धीमत्, पीवर), पृथु. **देवगण**-वीर, वैधृति, सत्य (सत्यक, साध्य), सुधी, सुरूप, हरि. हे एकंदर सत्तावीस आहेत, असें मार्कंडेयमत आहे व इतरत्र हे सर्व सत्तावीसांचे एकएक गण आहेत. **इंद्र**-शिखि (त्रिशिख, शिबि) हा होता. **अवतार**-हरिमेध व हरिणी यांचा पुत्र हरि. एके ठिकाणीं हर्येचा पुत्र असें म्हटलें आहे. **पुत्र**—अकल्मष (अकल्माष), कृतबंधु, कृशाश्व, केतु, क्षांति, ख्याति (ख्याति), जानुजंघ, तन्वीन्, तपस्य, तपोद्युति (द्युति), तपोधन, तपोभागिन्, तपोमूल, तपोयोगिन्, तपोरति, दृढेषुधि, दान्त, धन्विन्, नर, परंतप, परीक्षित्, पृथु, प्रस्थल, प्रियभृत्य, शतहय, शांत (शांति), शुभ, सनातन, सुतपस्. **योगवर्धन** कौकुरुण्डि, दाल्भ्य, प्रवहण, शङ्ग, शिव, सस्मित, सित. योगवर्धन फक्त याच मन्वंतरांत सांपडतात.

रैवत मन्वंतरांतील **सप्तर्षि**-ऊर्ध्वबाहु (सोमप), देवबाहु (वेदबाहु), पर्जन्य, महामुनि (मुनि, वसिष्ठ, सत्यनेत्र), यदुध्र, वेदशिरस्, (वेदश्री, सप्ताश्व, सुधामन्, सुबाहु, स्वधामन्), हिरण्यरोमन् (हिरण्यलोमन्). **देवगण**—आभूतरजस् (भूतनय, भूतरजय) याचे रैभ्य व पारिप्लव (वारिप्लव) असे भेद दोन आहेत. शिवाय अमिताभ, प्रकृति, वैकुंठ, शुभ, या प्रत्येकांत चवदा व्यक्ति आहेत. **इंद्र**विभु **अवतार**-विष्णुमतें संभूतिपुत्र मानस व भागवतमतें शुभ्र व विकुंठा यांचा पुत्र. वैकुंठ **पुत्र**-अव्यय (हव्यप), अरण्य (आरण्य), अरुण, अर्जुन, कवि (कपि), कंबु कृतिन्, तत्त्वदर्शिन् धृतिव्रत्, धृतिमत्, निरामित्र, निरुत्सुक, निर्मोह, प्रकाश (प्रकाशक), बलबंधु, बाल, महावीर्य, युक्त, वित्तवत्, विंध्य शुचि, शृंग, सत्यक, सत्यवाच्, सुयष्टव्य (सुसंभाव्य), हरहन्.

चाक्षुष मन्वन्तरांतील **सप्तर्षि**–अतिनामन्, उत्तम (उन्नत, भृगु ), नभ ( नाभ, मधु ), विरजस् ( वीरक ), विवस्वत् ( हविष्मत् ), सहिष्णु, सुधामन्, सुमेधस्. **देवगण**– आद्य ( आप्य ), ऋभ, ऋभु, पृथग्भाव (प्रथुक–ग, यूथग), प्रसूत, भव्य ( भाव्य ), वारि किंवा वारिमूल, लेख. **इंद्र**— भवानुभव किंवा मनोजव ऊर्फ मंत्रद्रुम. **अवतार**–-विष्णुमतें विकुंठापुत्र वैकुंठ व भागवतमतें वैराज व संभूति यांचा पुत्र अजित्. **पुत्र**–अग्निष्टुत, अतिरात्र, अभिमन्यु, ऊरु ( रुरु ), कृति, तपस्विन्, पुरु (पुरुष, पूरू ), शतद्युम्न, सत्यवाच्, सुद्युम्न.

वैवस्वत हें चालूं असलेलें मन्वंतर होय. यांतील **सप्तर्षि**– अत्रि, कश्यप ( काश्यप, वत्सर ), गौतम (शरद्वत्), जमदग्नि, भरद्वाज ( भारद्वाज ), वसिष्ठ ( वसुमत् ), विश्वामित्र. **देवगण**–१० आंगिरस, २ अश्विनी, १२ आदित्य, १०भृगु-देव, ४९ मरुत्, ११ रुद्र, ८ वसु, १० विश्वेदेव, १२ साध्य. **इंद्र**–ऊर्जस्विन् किंवा तेजस्विन् किंवा पुरंदर किंवा महाबल. **अवतार**–वामन. **पुत्र**–अरिष्ट ( दिष्ट, नाभागारिष्ट, नाभा-नेदिष्ट, रिष्ट, नेदिष्ट, उद्दिष्ट ), इक्ष्वाकु, इल ( सुद्युम्न), करूष, कुशनाभ, धृष्ट ( धृष्णु ), नभ ( नभग, नाभ, नाभाग ), नृग, पृषध्र, प्रांशु, वसुमत्, शर्याति.

सावर्णि मन्वंतरांतील **सप्तर्षि**–अश्वत्थामन् ( द्रौणि ), और्व ( काश्यप, रुरु, शृंग ), कृप ( शरद्वत्, शारद्वत ), गालव ( कौशिक ), दीप्तिमत्, राम ( परशुराम जामदग्न्य ), व्यास ( शतानंद, पाराशर्य ). **देवगण**– अमिताभ ( अमृतप्रभ ), मुख्य ( सुख, विरज ), सुतप ( सुतपस्, तप ). **इंद्र**–बलि ( वैरोचन ) इंद्र होणार. पण त्याची इंद्रपदावर आसक्ति नसल्यामुळें तें पद तो सोडून सिद्धगतीस जाईल. **अवतार**–देवगुह्य व सरस्वती यांचा पुत्र सार्वभौम होणार व बलीच्या पश्चात् हा त्याचा कारभार पाहणार. **पुत्र**–अधृष्ट ( अधृष्णु ), अम्बरीवत् ( अवरीयस्, अर्ववीर, उर्वरीयस्, वीरवत् ), अपि, अरिष्ट ( चरिष्णु, विष्णु ), आज्य, ईड्य, कृति, ( धृति, धृतिमत् ), निर्मोह, यवसस्, वसु, वरीयस्, वाच् ( वाजवाजिन्, विरज, विरजस्क ), वैरिश्मन, शुक्र, सत्यवाच्, सुमति.

दक्षसावर्णि मन्वंतरांतील **सप्तर्षि**-ज्योतिष्मत्, द्युतिमत्, मेधातिथि ( मेधामृति, माधातिथि ), वसु, सत्य ( सुतपस्, पौलह ), सबल ( सवन, वसित, वसिन ), हव्यवाहन ( हव्य, भव्य ). **देव**–दक्षपुत्रहरित यान्ची मुलें **देव** होणारआहेत. ते निर्मोह, पार ( पर, संभूत ), मरीचिगर्भ, सुधर्म सुधर्मस्, सुशर्माण, प्रत्येकीं बारा व्यक्ती आहेत. **इंद्र**–ज्यास कार्तिकेय म्हणतात तोच पुढें अद्भुत या नांवानें इंद्र होणार आहे. **अवतार**–आयुष्मत् व अंबुधारा यांचा पुत्र ऋषभ होणार आहे. **पुत्र**–अनीक ( ऋचीक, अर्चिष्मत्, नाक ), खड्गहस्त ( पंचहस्त, पंचहोत्र, शापहस्त ), गय, दीप्तिकेतु ( दासकेतु, बर्हकेतु ), धृष्टकेतु ( धृतिकेतु, भूतकेतु ), निराकृति ( निरामय ), पृथुश्रवस् ( पृथुश्रवस् ), बृहत् ( बृहद्रथ, बृहद्यश ), भूरिद्युम्न.

ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील **सप्तर्षि**–अपांमूर्ति ( आपोमूर्ति ), अप्रतिम ( अप्रतिमौजस्, प्रतिम, प्रामति ), अभिमन्यु ( नभस, सप्तकेतु ), अष्टम ( वसिष्ठ, वाशिष्ट, सत्य, सद्य ), नभोग ( नाभाग ), सुकृति ( सुकीर्ति ), हाविष्मत्. **देव**— अर्चि ( सुखामन, सुखासीन, सुधाम, सुधामान, सुवासन ), धूम ( निरुद्ध, विरुद्ध ). **इंद्र**—शांति नांवाचा इंद्र होणार आहे. **अवतार**—विष्वक्सेन नांवाचा अवतार विश्वसृज्याच्या घरीं विषूचीचे उदरीं होणार आहे. **पुत्र**—अनमित्र ( निरामित्र ), उत्तमौजस्, जयद्रथ, निकुषंज, भूरिद्युम्न, भूरिषेण, भूरिसेन, वीरवत् ( वीर्यवत् ), वृषभ, वृषषेन, शतानीक, सुक्षेत्र, सुपर्वन्, सुवर्चस्, हरिषेण.

धर्मसावर्णि मन्वंतरांतील **सप्तर्षि**—अग्नितेजस्, अनघ ( तनय, नग, भग ), अरुण ( आरुणि, तरुण, वारुणि ), उदधिष्णन् ( उरुधिष्ण्य, पुष्टि, विष्टि, विष्णु ), निश्चर, वपुष्मत् ( ऋष्टि ), हविष्मत्. **देव**—३० कामग ( कामगम, कामज ), ३० निर्माणरत, (निर्वाणरति, निर्वाणरुचि ), ३० मनोजव ( विहंगम ). **इंद्र**—वृष ( वृषन्, वैधृत ) हा इंद्र होणार आहे. **अवतार**—धर्म किंवा आर्यक व वैधृति यांचा पुत्र धर्मसेतु हा अवतार होणार आहे. **पुत्र**— आदर्श, क्षेमधन्वन् ( क्षेमधर्मन्, हेमधन्वन् ), गृहेषु (दृढायु), देवानीक, पुरुद्वह ( पुरोवह ), पौण्ड्रक ( पंडक ), मत्त ( मनु, मरु ), संवर्तक ( सर्वग, सर्वत्रग, सर्ववेग, सर्वगामी ), सर्वधर्मन् ( सुधर्मन्, सुशर्मन् ).

रुद्रसावर्णि मन्वंतरांतील **सप्तर्षि**–तपस्विन्, तपोधन, ( तपोनिधि. तपोशन ), तपोधृति ( तपोमति ), तपोमूर्ति, तपोरति ( तपोरवि ), द्युति ( अग्निध्रक, कृति ), सुतपस्. **देव**—रोहित ( लोहित ), सुकर्मन् ( सुवर्ण ), सुतार ( तार, सुधर्मन्, सुपार ), सुमनस्. **इंद्र**—ऋतधामन् नामें इंद्र होणार आहे. **अवतार**—सत्यसहस् व सूनृता यांचा पुत्र स्वधामन् हा अवतार होईल. **पुत्र**—उपदेव ( अक्रूर ), देववत् ( देववायु ), देवश्रेष्ठ, मित्रकृत् ( अमित्रहा मित्रहा ), मित्रदेव ( चित्रसेन, मित्रबिंदु, मित्रविंद ), मित्रबाहु, मित्रवत्, विदूरथ, सुवर्चस्.

रौच्य मन्वंतरांतील **सप्तर्षि**–अव्यय ( पथ्यवत्, हव्यप ), तत्त्वदर्शिन्, धृतिमत्, निरुत्सुक, निर्मोक, निष्प्रकंप, निष्कंप,

सुतपस्. देव—सुकर्मन्, सुत्रामन् (सुशर्मन्), सुधर्मन् हे प्रत्येकीं ३० व्यक्ति मिळून होतील. इंद्र—दिवस्पति ऊर्फ दिवस्वामिन् असेल. अवतार—देवहोत्र व बृहती यांचा पुत्र योगेश्वर हा अवतार असेल. पुत्र—अनेक क्षत्रबद्ध (अनेक क्षत्रविद्ध, क्षत्रविद्धि, क्षत्रवृद्धि), चित्रसेन, तप (नय, नियति), धर्मभृत, (धर्मभृत सुव्रत), धृत (भव), निर्भय, पृथ (दृढ), विचित्र, सुतपस् (सुरस), सुनेत्र.

भौत्य मन्वंतरांतील सप्तर्षि-अग्निबाहु (अतिबाहु), अग्नीध्र (आग्नीध्र), अजित, भार्गव (मागध, माधव, श्चाजित), मुक्त (युक्त), शुक्र, शुचि. देव—कनिष्ठ, चाक्षुष, पवित्र, भाजित (भाजिर, भ्राजिर), वाचावृद्ध (धारावृक). या प्रत्येकांत पांच देव आहेत. इंद्र—शुचि नांवाचा इंद्र या वेळीं होईल. अवतार—सत्रायण व विताना यांचा पुत्र बृहद्भानु हा अवतार होईल. पुत्र—अभिमानिन् (श्रीमानिन्), उग्र (ऊरु, अनुग्रह), कृतिन् (जिष्णु, विष्णु), गभीर (तरंगभीरु), गुरु, तरस्वान् (बुद्ध, बुद्धि, अन्न), तेजस्विन् (ऊर्जस्विन्, ओजस्विन्), प्रतीर (प्रवीण), शुचि, शुद्ध, सबल (सुबल).

मन्वंतर प्रलय होऊन ब्रह्मा विष्णूचे नाभिकमलाचे ठायीं योगनिद्रा घेईल (ह. वं. १. ७; मार्क. ५०-९७; विष्णु. ३. १-२; ब्रह्मवै. २. ५४; स्कंद. ७.१.१०५; भवि. ब्राह्म. २; मध्य. १; मत्स्य. ९; भा. ८. १-१३; वायु. १. ३१; २. ३८; ब्रह्मांड. २. ३६; ३. १; ब्रह्म. ५; पद्म. सृ. ७).

२ अग्निविशेष. हा तप नामक अग्नीचा पुत्र. यास वैश्वानर, विश्वपति, स्विष्टकृत् व कर्म असे पुत्र होते (म. व. २२३ कुं.).

३ एकादश रुद्रांपैकीं एक.

४ कृशाश्व व धिषणा यांचा पुत्र (भा. ६. ६. २०).

५ कश्यप व प्राधा यांची अप्सरा कन्या.

६ (सो. क्रोष्टु.) वायुमतें मधूचा पुत्र. याचा पुत्र मनुवश.

७ (सो. क्रोष्टु.) मत्स्यमतें लोमपादाचा पुत्र. याचा पुत्र ज्ञाति.

८ (सू. इ.) शीघ्राचा पुत्र. याचा पुत्र प्रसुश्रुत.

९ धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

१० अंगिराकुलांतील गोत्रकार.

**मनु आप्त्य**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९. १०१. १०-१२).

**मनु प्राचेतस**—हा प्रचेत्याचा मुलगा असून यानें राजधर्मावरील दोन श्लोक सांगितले आहेत (म. शां. ५७). यानें राजधर्म नांवाचा ग्रंथहि केलेला आहे.

**मनु वैवस्वत**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८. २७. ३१).

**मनु सांवरण**—मंत्रद्रष्टा (ऋ. ९. १०६. ७-९).

**मनुज**—दहा विश्वेदेवांतील एक.

**मनुवश**—(सो. क्रोष्टु.) वायुमतें मनुपुत्र होय.

**मनुष्यधर्मन्**—कुबेरास नामान्तर.

**मनुसुत**—ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

**मनोजव**—(स्वा. प्रिय.) मेधातिथीचा पुत्र.

२ चाक्षुष मन्वंतरांतील इंद्र.

३ अनिलवसु व शिवा यांचा पुत्र.

४ लेख देवांतील एक.

५ धर्मसावर्णि मन्वंतरांतील देव.

६ एक सोमवंशीय राजा. हा मंगलतीर्थांत स्नान करून उद्धरला (स्कंद. ३. १. १२).

**मनोभद्र**—एक राजा. गंगामाहात्म्य ऐकल्यानें याचा उद्धार झाला (पद्म. क्रि. ३).

**मनोभवा**—कश्यप व मुनि यांची कन्या.

**मनोभुव**—चाक्षुष मन्वंतरांतील एक इंद्र.

**मनोरमा**—कश्यप व प्राधा यांची कन्या.

२ ध्रुवसंधीची स्त्री व सुदर्शन राजाची माता.

३ (इंदीवराक्ष व स्वरोचि पहा).

**मनोहरा**—एक देवांगना. हिला शिशिर, प्राण व रमण असे तीन पुत्र होते (म. आ. ६७. २२ कुं.).

**मंत्रद्रुम**—चाक्षुष मन्वंतरांतील इंद्र.

**मंथरा**—विरोचन दैत्याची कन्या. ही सर्व पृथ्वीचा नाश करावयास उद्युक्त झाली असतां इंद्रानें हिला ठार केलें. प्रसंगीं स्त्रीवधहि दोषावह नाहीं, हें रामाला ताटकावधाचे वेळीं सांगण्याकरितां ही कथा आली आहे (वा. रा. बा. २५).

२ कैकेयीच्या माहेरची दासी. ही कृष्णावतारीं कुब्जा झाली होती. पूर्वजन्मीं ही दुंदुभि नामक एक गंधर्वी होती. हिनेंच कैकेयीला रामाला वनाला धाडण्याला उद्युक्त केलें. वास्तविक कैकेयीचें रामावर निस्सीम प्रेम होतें व रामराज्याभिषेक होणार हें ऐकून तिला आनंदहि झाला. पण या दुष्ट मंथरेनें तिच्या मनांत मत्सर उत्पन्न करून दशरथाकडून वर मागविले व रामाला वनांत पाठविलें. ही कुबडी होती (वा. रा. अयो. ७-९).

**मंथु**—(स्वा. प्रिय.) वीरव्रत राजाचा पुत्र.

**मंद**—रावणपक्षीय एक राक्षस.

**मंदपाल**—(जरितृ पहा).

**मंदर**—पिंगला वेश्येच्या ठिकाणीं आसक्त असणारा एक ब्राह्मण. हा ऋषभयोग्याची सेवा केल्यामुळें पुढील जन्मीं भद्रायु नांवानें राजकुलांत जन्मला (भद्रायु पहा).

**मंदाकिनी**—पुलस्त्यपुत्र विश्रव्याच्या दोन स्त्रियांपैकीं एकीचें नांव. हिला शंकराच्या प्रसादानें कुबेर हा पुत्र झाला ( पद्म. पा. ६ ).

**मंदाकिन्य**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**मंदार**—धौम्य ऋषीचा मुलगा व और्वाचा जामात ( गणेश. ९. ३४. १३; ३ और्व पहा ).

**मंदीर**—याच्या गाई गंगेचें पाणी प्याल्या नाहींत ( का. श्रौ. १३. ३. २१ ).

**मंदुलक**—( आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें हालाचा पुत्र.

**मंदोदरी**—रावणाची स्त्री व मयासुरास रंभा किंवा हेमा नामक अप्सरेपासून झालेली कन्या ( स्कंद. ५. ३. ३५; ब्रह्मांड. ३. ६. २८-३० ). सीता हिची कन्या होती.

२ सिंहलद्वीपचा चंद्रसेन व गुणवती यांची कन्या. चंद्रसेनानें हिच्या विवाहाची तयारी करून इंद्रदेशच्या सुधन्वन् राजास वर योजिलें. पण हिनें 'पुरुष कपटी असतात म्हणून मी लग्नच करणार नाहीं' असें पित्यास कळविलें. तेव्हां मंदोदरीचा विवाह रहित झाला.

कांहीं कालानें हिच्या कनिष्ठ बहिणीचा विवाह निघाला असतां त्या वेळीं समारंभास हजर असलेल्या चारुदेष्ण नामक राजपुत्रावर मंदोदरीचें मन बसून हिनें त्यास वरिलें. पण पुढें थोड्याच कालानें पुरुषांविषयीं केलेलें भविष्य हिच्याच अनुभवास आलें ( दे. भा. ५. १७-१८ ).

**मंधातृ**—( मांधातृ पहा ).

**मंधातृ यौवनाश्व**—एका सम्राटाचें नांव ( गो. ब्रा. १. २-१० ). कबन्ध आथर्वणाचा मुलगा विचारिन् हा याचा मदतनीस होता.

**मन्यु**—ही एक देवता आहे ( ऋ. १०. ८३-८४ ). देवदानवयुद्धांत देवांचा जय होईना म्हणून त्यांनीं गौतमीतीरीं तपश्चर्या केल्यावर शंकराच्या तृतीयनेत्रापासून हा उत्पन्न झाला व यानें दैत्यांचा पराभव केला ( ब्रह्म. १६२ ).

२ ( सो. पूरु. ) भरद्वाजाचा पुत्र. यास बृहत्क्षयादि पांच पुत्र होते ( भा. ९. २१ ). भविष्यमतें हा मन्युमान होय. यानें १८००० वर्षें राज्य केलें.

**मन्यु तापस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ८३-८४ ).

**मन्यु वासिष्ठ**—मंत्रद्रष्टा ( ऋ. ९. ९७. १०-१२ ).

**ममता**—उचथ्याची बायको व दीर्घतमस्ची आई (मामतेय पहा). भरद्वाजाच्या एका सूक्तांत ममतेव असा उल्लेख आहे. सूक्तकार म्हणतो कीं, ममतेचीं स्तोत्रें ऐकिलीस त्याप्रमाणें माझीं ऐक. यावरून ममता ही भरद्वाजाला मान्य असणारी उपासक असावी ( ऋ. ६. ५०; उचथ्य, दीर्घतमस्, भरद्वाज व बृहस्पति पहा ).

**मय**—हा दनुपुत्र दानवांतील एक. रामायणांत यास दितिपुत्र म्हटलें आहे ( वा. रा. उ. १२. ३ ). पण तें चूक आहे. याला नमुचि नामें एक भाऊ होता ( म. आ. २५४. ३९ कुं. ). नमुचि हा एक दानव व दुसरा सैंहिकेयांपैकीं होता. मय हा दानव आहे ( मत्स्य. ६; ब्रह्मांड. ३. ६ ). पण हा सैंहिकेय असल्याचें कोठेंच नाहीं. यावरून मय हा नमुचि दानवाचाच भाऊ. हिरण्याक्ष-हिरण्यकशिपूचे वेळीं जें दैत्य-देवांचें युद्ध झालें त्यांत हा दैत्यांचे बाजूस होता.

रामायणांत हेमेपासून मंदोदरी, मायाविन् व दुंदुभि हीं झालीं असें आहे ( वा. रा. उ. १२ ). यास देवांनीं हेमा नांवाची अप्सरा दिली होती. यास उपदानवी व कुहू नांवाच्या दोन मुली होत्या. मत्स्यपुराणांत मंदोदरी, कुहू व उपदानवी अशा तीन आहेत. पण त्या यास कुणापासून झाल्या हें आढळत नाहीं. कुहू ही धात्याची स्त्री होय ( भा. ६. १८ ) व उपदानवी ही वैश्वनरनामें दानवाची कन्या ( भा. ६. ६ ). याची स्त्री रंभा; तिचे ठायीं यास सहा आपत्यें झालीं:—अजकर्ण, कालिक, दुंदुभि, महिष, मायाविन् व मंदोदरी (कन्या) ( ब्रह्मांड ३. ६. २८-३० ).

यानें वृषपर्व्यास होमाकरितां एक सभा निर्माण करून दिली होती. या सभेंत वृषपर्व्यानें एक सत्र केलें. ही सभा कैलासपर्वताचे उत्तरेस मैनाकगिरीपाशीं बिन्दुसरोवराजवळ होती. या सभेचें काम झाल्यावर उरलेलें सामान तेथेंच कोशागारांत ठेविलें होतें ( म. स. १; ३ कुं. ). याचे मित्र ताराक्ष, कमलाक्ष व विद्युन्माली. त्यांचे सांगण्यावरून यानें तीन शहरें तयार केलीं. हीं आकाशमार्गानें वाटेल तिकडे जात असत. यांपैकीं एक सोन्याचें, एक रुप्याचें व एक लोखंडाचें होतें ( म. क. २४ कुं.; लिंग. १. ७१ ). अग्नीस ज्या वेळीं कृष्णार्जुनांनीं खांडववन दिलें, त्या वेळीं त्या वनांत मय अडकला होता. हा बाहेर पडत असतां कृष्ण यास मारणार इतक्यांत यानें अर्जुनास शरण जाऊन आपला प्राण वांचविला ( म. आ. २५४. ३९ कुं. ). या उपकाराचे फेडीकरितां यानें त्यास कृष्णाचे सांगण्यावरून एक सभा तयार करून दिली ( म. स. १. २५ कुं. ). त्या सभेकरिता लागलेली सामग्री वृषपर्व्याचे कोशागारांत ठेविलेली यानें आणविली होती. ही सभा फारच उत्कृष्ट होती. हिची अशी आख्यायिका आहे कीं, जलाचे ठिकाणीं जमीन व जमिनीचे ठिकाणीं जल, द्वाराचे ठिकाणीं भिंत व भिंतीचे ठिकाणीं द्वार दिसे व याच तिच्या वैचित्र्यामुळें दुर्योधनाचा द्वेष अतिशय बळावला ( म. स. १; ३ कुं. ). याच वेळीं वृषपर्व्याचे कोशांतील गदा यानें आणून भीमास दिली. ही वृषपर्व्यास मयानेंच दिली असावी. त्याच ठिकाणीं असलेला वरुणाचा देवदत्त

नांवाचा शंख यानें अर्जुनास दिला ( म. स. ३ कुं. ). याचें देवांसह युद्ध झालें होतें ( म. स. ५१. ७ कुं. ).

कांहीं कामाकरितां हेमा स्वर्गी गेली असतां हा एक रत्नमय वाडा बांधून विरहांत काल घालवूं लागला. पुढें तेरा वर्षांनीं मंदोदरी यानें रावणास अर्पण केली. व मिळविलेली अमोघ शक्तिहि तिजबरोबर त्यास दिली ( वा. रा. उ. १२ ).

आपला ज्येष्ठ बंधु नमुचि यास इंद्रानें मारिलें असें पाहून यानें तपास सुरवात केली व नानाप्रकारच्या देवांच्या माया मिळविल्या. त्यामुळें इन्द्रास भीति वाटून त्यानें ब्राह्मणरूपानें याजकडे येऊन याजजवळ वर मागितला. यानें 'दिला' असें म्हणतांच त्यानें याजजवळ याचें सख्य मागितलें. तेव्हां मय म्हणाला, 'तुझ्याशीं माझें वैर नसतां तूं माझ्याशीं सख्य कां मागत आहेस?' तेव्हां इन्द्र प्रगट झाला. पुढें दोघांचें सख्य झालें व एकमेकांनीं एकमेकांस आपापल्या माया दिल्या ( ब्रह्म.१२४). यानें वास्तुशास्त्रावर एक ग्रंथ केला ( मत्स्य. २५२ ). तसेंच शिल्प व ज्योतिषशास्त्रांवरहि याचे ग्रंथ आहेत (C. C.). यानें दैत्यांच्या रक्षणाकरितां युद्धसामग्रीसह त्रिपुर उत्पन्न केलें. परंतु शंकरानें आंतील सर्व दैत्यांस ठार मारिलें, तेव्हां यानें स्वतः अमृतकुंड उत्पन्न करून सर्व दैत्यांना जिवंत केलें. त्या वेळीं विष्णु गाईच्या रूपानें व ब्रह्मदेव वत्साच्या रूपानें आंत शिरून अमृत प्याले ( भा. ७.१० ). यास बलीनें कलियुग लागल्यानंतर सत्तावीसशें वर्षांनीं भूलोकीं पाठविलें. या ठिकाणीं यास शाक्यसिंहगुरु व गौतमाचार्य अशीं नांवें प्राप्त झालीं.

२ एक असुर. याला बलीनें भूलोकीं पाठविलें होतें. हा अनेक प्रकारच्या माया उत्पन्न करणारा असून याला शाक्यसिंह, गुरु किंवा गौतमाचार्य असेंहि म्हणतात. हा दैत्यबुद्धि करी. यानें सर्व तीर्थांमध्यें यंत्रें स्थापिलीं व त्यांच्याखालून जे लोक जात ते सर्वहि बौद्ध होत. याप्रमाणें यानें दहा कोटि आर्य बौद्धपंथी केले.

पुढें बलीनें सुकंदर म्लेच्छपतीच्या मदतीला याला पाठविलें. तेव्हां यानें सर्व म्लेच्छांस उत्तम रेखागणित शिकविलें. त्याचे एकवीस अध्याय असून त्यास कलवेद म्हणतात. या म्लेच्छांनीं पुष्कळ लोकांना म्लेच्छ केलें (भवि. प्रति. ४. २१).

**मयूरध्वज**—रत्न नांवाच्या नगरचा राजा. युधिष्ठिराच्या अश्वमेधाचा घोडा बभ्रुवाहनाच्या मणिपूराहून याच्या नगरास आला. त्या वेळीं यानें नर्मदातीरीं आठवा अश्वमेध सुरू केला होता. या अश्वमेधांतील अश्वाचें संरक्षणार्थ याचा पुत्र सुचित्र अथवा ताम्रध्वज आपल्या बहुलध्वज प्रधानासह गेला होता. परत येतांना त्याला युधिष्ठिराचा अश्व भेटला. तो त्यानें धरला. त्यामुळें त्याचें कृष्णार्जुनांशीं युद्ध झालें. त्यांत तो कृष्णार्जुनांस मूर्च्छित करून अश्व घेऊन नगरांत आला.

इकडे कृष्णार्जुन मूर्च्छेंतून सावध झाल्यावर कृष्णानें ब्राह्मणाचें रूप घेतलें आणि अर्जुनानेंहि ब्राह्मणबालकाचें रूप घेऊन दोघेहि मयूरध्वजाच्या रत्नपुरांत आले; व याच्याकडे येऊन याला ( कृष्ण ) ब्राह्मण म्हणाला, 'मी धर्मपुराहून माझ्या मुलाच्या विवाह करण्याकरितां कृष्णशर्मा, नांवाच्या तुझ्या पुरोहिताकडे येत होतों. वाटेंत लागणाऱ्या रानांत माझ्या मुलाला सिंहानें धरिलें. तेव्हां मीं नृसिंहाचें स्मरण केलें. नृसिंह कांहीं प्रगट झाला नाहीं; पण सिंहानें हंसत हंसत मला सांगितलें कीं, ' मयूरध्वजाचें अर्धें शरीर मला आणून देशील तर मुलाला मी सोडीन.' ब्राह्मणानें अशी मागणी करतांच मयूरध्वज आपलें अर्धें शरीर सुताराकडून कापून देऊं लागला. याची बायको कुमुद्वती म्हणाली कीं, 'राजाचें वामांग मी आहें. करितां मला घेऊन जावें.' पण ब्राह्मणानें 'सिंहानें उजवें अंग आणावयास सांगितलें आहे, असें सांगितलें. शरीर कापूं लागले असतां याच्या डाव्या डोळ्यांतून पाणी आलें. तेव्हां ब्राह्मण म्हणाला, 'दुःखानें दिलेलें दान मला नको आहे.' तेव्हां हा म्हणाला, 'उजवा भाग जसा कारणीं लागला तसा डावा लागला नाहीं, म्हणून डोळ्यांतून पाणी आलें आहे, शरीर दुःखानें नव्हे.' तेव्हां कृष्णानें आपलें रूप प्रगट करून याचें शरीर पूर्ववत् केलें व याला आलिंगन दिलें. नंतर आपला यज्ञ पूर्ण करून हा कृष्णार्जुनांबरोबर त्यांच्या अश्वाच्या संरक्षणास गेला ( जै. अ. ४१-४६ ).

२ बलवर्धनाचा पुत्र. यानें मयूरनगर वसविलें ( भवि. प्रति. ३. २० ).

**मयूरेश्वर**—मोरगांव येथील गणपतीचा अवतार.

**मयोभुव**—अगस्त्यकुलांतील एक गोत्रकार व प्रवर.

**मरण**—अंगिराकुलांतील गोत्रकार. यालाच मरणाशन म्हणतात.

**मरीचि**—हा स्वायंभुव मन्वंतरांत ब्रह्मदेवाच्या डोळ्यापासून उत्पन्न झाला. हा दक्षाचा जांवई व शंकराचा साडू. दक्षानें शंकराचा अपमान केल्यामुळें शंकरानें याला जाळून ठार मारिलें. दक्षकन्या संभूति याची बायको. याला संभूतीपासून पूर्णमास हा पुत्र व कृष्टि, वृष्टि, त्विषा आणि उपचिति अशा कन्या झाल्या. पूर्णमासाला सरस्वतीपासून विरज, पर्वश, यजुर्धान वगैरे झाले ( ब्रह्मांड. २. ११ ).

या वेळीं यास दोन बायका होत्या ( भा. ३. १२ ). त्या कर्दमकन्या कला व दुसरी ऊर्णा. यास कले-

पासून दोन पुत्र झाले. एक कश्यप व दुसरा पूर्णिमा. ऊर्णेपासून स्मर, उद्गीथ, परिष्वंग, क्षुद्रभृत व घृणी होते (भा. १०.८५; दे. भा. ४.२२). अग्निष्वात्त नामक पितर तेहि याचे पुत्र होते.

वैवस्वत मन्वंतरांत यांनाच अग्नीपासून ब्रह्मदेवानें उत्पन्न केलें. त्या वेळीं यास कश्यप हा पुत्र व सुरूपा ही कन्या अशीं दोन अपत्यें झालीं. हा स्वतः याचा मुलगा कश्यप व अवत्सार, असित, नैध्रुव, नित्य व देवल असे मिळून एकंदर सात मंत्रद्रष्टे होते (कश्यप पहा; मत्स्य. १४४). हा प्रजापति होय (वायु. २. ४. ५३–५४). याला इंद्रप्रस्थांतील सात तीर्थांत स्नान केल्यानें सात पुत्र झाले (पद्म. उ. २२२.).

हा धर्मशास्त्रकार असून आह्निक, आशौच, श्राद्ध, प्रायश्चित्त आणि व्यवहार यांसंबंधींचे याचे उतारे मिताक्षरा, अपरार्क आणि स्मृतिचंद्रिका यांत दिले आहेत. अपरार्कानें तर्पणा-संबंधीं याचे कित्येक श्लोक दिले आहेत (अपरार्क. १३२; २३५; स्मृतिचं. आह्निक. १२३). स्थावर मिळकतीचें खरेदी-खत, गहाणखत, वांटणीपत्र अगर बक्षीसपत्र हे लेखी झाल्या-खेरीज व्यवहार पूर्ण होत नाहीं (परा. मा. ३.१२८; स्मृतिचं. ६०). जर एकायानें व्यापाऱ्यांसमोर, सरकारी अधिकाऱ्यांच्या संमतीनें, दिवसा एखादी मालमत्ता खरेदी केली तर ती मालमत्ता दुसऱ्याची आहे असें समजून येतांच त्याचे पैसे त्यास परत मिळतील. हे पैसे वसूल न होतील तर ते मूळ मालक व विकत घेणारा यांत विभागले जातील असें याचें प्रतिपादन आहे (अपरार्क. ७७५). अपरार्कानें याचा आशौचावर एक गद्य उतारा दिला आहे (अपरार्क. ९०८).

एक ज्योतिषि. नारदसंहितेंत याचा उल्लेख आला आहे (C. C.).

२ (स्वा. प्रिय.) ऋषभदेवाच्या वंशांतील सम्राटास उत्कलेपासून झालेला पुत्र. यास बिंदुमती नामक एक स्त्री व बिंदुमत् नांवाचा पुत्र होता (भा. ५. १५).

३ एक अप्सरा (म. आ. १३२. ४४ कुं.).

४ कश्यप व दनु यांचा पुत्र.

**मरीचिगर्भ**—दक्षसावर्णि मन्वंतरांतील देव.

**मरीचिप**—हें एका ऋषिसंघाचें नांव आहे (म. अनु. ४५.४१ कुं.).

**मरु**—(सू. इ.) शीघ्राचा पुत्र. याचा पुत्र प्रसुश्रुत. यानें योगसिद्धिद्वारां चिरंजीवित्व प्राप्त करून घेतलें होतें. हा कलियुगाच्या शेवटीं सूर्यवंशाचें पुनरुज्जीवन करणारा होईल (भा. ९.१२.६; १२. २. ३७; सुवर्चस् पहा).

२ (सू. निमि.) हर्यश्व जनकाचा पुत्र. याचा पुत्र प्रतींधक (भा. ९.१३.१५.).

३ (नरकासुर पहा).

**मरुक**—या नांवाचे लोक आहेत (म. स. ४८. ९७ कुं.).

**मरुत्**—हा एक देवतांचा संघ आहे. त्यामुळें यांचा नेहेमीं बहुवचनींच उल्लेख येतो. यांची संख्या एकवीस आहे (ऋ. १. १३३. ६). यांचा साता सातांचा एक संघ असतो (ऋ. ५.५२. १७). यांचा बाप रुद्र असून पृश्नि ही माता आहे (ऋ. ५. ५२. १६). यांसंबंधींच्या पुराणप्रसिद्ध दोन आख्यायिका वेदार्थदीपिकेंत दिल्या आहेत (२. ३३).

हे सर्व तरुण व अलंकार घातलेले असतात. 'मा रोदीः' म्हटल्यामुळें किंवा मृत्युयोग असल्यामुळें यांना मरुत् असें नांव पडलें. शंकरानें तुकडे झाल्यावरहि यांना जिवंत ठेवलें किंवा रुद्रानें वृषभरूपानें यांना पृश्नीचे ठिकाणीं निर्माण केलें म्हणून यांना रुद्रपुत्र म्हणतात (वेदार्थदीपिका. २. ३३).

यांच्या रथाला ठिपक्याठिपक्यांचे हरीण जोडलेले असतात (ऋ. १. ३९. ४; ५. ५३. १.). हे वेगानें धांवत असतात तेव्हां पर्वत कांपूं लागतात; वृक्ष मोडून पडतात (ऋ. १. ३९. ५; ५. ५३-५४). सर्व झाडरून सोडतात (ऋ. ५. ५७. २).

यांच्या हातांत धनुष्य, बाण व भाले असतात (ऋ. ५.५२. १३). यांच्याजवळ वज्र व सोन्याची कुऱ्हाड असते (ऋ. ८.८.३२). यांचा रथ सोन्याचा असतो (ऋ. ५. ५७. १). हे इंद्राचे मित्र आहेत (ऋ. ८.७.३१).

इंद्राणीचे हे मित्र आहेत (ऋ. १०. ८६. ९.). यांच्या सूक्तांत अगस्त्य व इंद्र यांच्याशीं झालेला यांचा तत्त्व-ज्ञानपर संवाद आहे (ऋ. १. १६५). पर्जन्यवर्षाव करणें हें यांचें मुख्य काम आहे (ऋ. १. ३८. ९). मेघ, विद्युल्लता व सोसाट्याचा वारा यांच्याशीं यांचा निकट संबंध दिसतो. हें पर्जन्यकालीन स्थितीचें वर्णन आहे.

हे संख्येनें एकंदर एकुणपन्नास आहेत. हे दिति व कश्यप यांचे पुत्र होत. दितीचे पुत्र विष्णूनें मारिले, म्हणून दितीनें नवऱ्याजवळ वर मागितला कीं, 'अमर व इंद्रास मारील असा एक पुत्र मला व्हावा.' त्याप्रमाणें कश्यपानें वर दिला, पण तिची बुद्धि पालटावी म्हणून तिला एक व्रत आचरण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ती व्रताचरणानें राहूं लागली. त्या वेळीं जो तिला गर्भ राहिला तो आपल्याला मारणारा होणार या भीतीनें इंद्र तिच्याजवळ साधुवेषानें राहिला व तिच्या व्रतांत न्यून पाहूं लागला. त्याप्रमाणें एके दिवशीं न्यून सांपडतांच तो योगबलानें तिच्या पोटांत शिरला व त्या गर्भाचे सात तुकडे

केलें. अशा तऱ्हेनें तुकडे करूनहि ते जित राहिले म्हणून त्यानें आणखी प्रत्येकाचे सात असे एकंदर एकूणपन्नास भाग केले. त्या वेळी हे रडूं लागले. तेव्हां इंद्र यांस " मा रोदीः " असें म्हणाला. म्हणून यांचें मरुत् असें नांव पडलें. इतकें करूनहि हे मरत नाहींत असें पाहून हे देवांश असावेत असें त्यास वाटलें. इतक्यांत यांनीं त्यास ' मारूं नको ' म्हणून विनविलें. तेव्हां यांना 'तुम्ही माझे भाऊ आहांत' असें सांगून हे जन्मल्यावर यांस तो स्वर्गी घेऊन गेला. ' मी एकाच पुत्राकरितां हें सर्व केलें व मला एकूणपन्नास मुलें कशीं झालीं ' म्हणून तिनें साधू ( इंद्रा )स विचारिलें. तेव्हां त्यानें खरा खरा प्रकार सांगितला व ' तुझ्या तपःप्रभावामुळें हे वांचले ' असें सांगितलें. पुढें यांना स्वर्गी नेण्याचें व यांस हविर्भाग देवविण्याचें कबूल करून त्यानें तिची क्षमा मागितली ( म. आ. १३२. ५३; शां. २०७. २ कुं.; भा. ६. १८; मत्स्य. १४६ ). रामायणांत थोडी निराळी कथा आहे. ती अशी कीं, दितीनें इंद्राच्या सेवेमुळें संतुष्ट होऊन त्यास सांगितलें होतें कीं, तुला मारण्याकरितां जो मुलगा मी उत्पन्न करूं इच्छितें तोच मी तुला मदत करणारा निपजवीन. इंद्र तिच्या गर्भाला मारूं लागला, तेव्हां ती म्हणाली कीं, ' मारूं नको. ' तेव्हां तो सात तुकडे करून बाहेर आला व वृत्तान्त सांगून क्षमा मागूं लागला. तेव्हां ती म्हणाली, ' माझाच अपराध आहे. तरी आतां माझ्या पुत्रांनीं वायूच्या सात प्रवाहांत संचार करावा अशी माझी इच्छा आहे.' तेव्हां तसा वर देऊन तीं मायलेंकरें स्वर्गाप्रत गेलीं ( वा. रा. बा. ४७ ).

दितिजवळ गर्भाचे तुकडे केल्याचें कबूल केलें, तेव्हां तिनें त्याच्या सत्यनिष्ठेबद्दल त्याच्या इच्छेवरून हे मित्र होतील असा वर दिला ( स्कंद. ६.२४; विष्णु. १. २१; ३.४०; पद्म. सृ. ७; भू. २६ ).

पहिला गण—१ चित्रज्योतिस्, २ चैत्य, ३ ज्योतिष्मत्, ४ शक्रज्योति, ५ सत्य, ६ सत्यज्योतिस्, ७ सुतपस्.

दुसरा गण—१ अमित्र, २ ऋताजित्, ३ सत्यजित्, ४ सुतमित्र, ५ सुरमित्र, ६ सुषेण, ७ सेनजित्.

तिसरा गण—१ उग्र, २ धनद, ३ धातु, ४ भीम, ५ वरुण.

चवथा गण—१ अभियुक्ताक्षिक, २ साहूय.

पांचवा गण—१ अन्यादृश्, २ ईदृश्, ३ द्रुम, ४ मित, ५ वृक्ष, ६ समित्, ७ सरित्.

सहावा गण—१ ईदृश्, २ नान्यादृश्, ३ पुरुष, ४ प्रतिहर्तृ, ५ समचेतन, ६ समवृत्ति, ७ संमित.

सातवा गण—देव दैत्य-मनुष्यांपैकीं. पण नांवें दिलीं नाहींत ( ब्रह्मांड. ३. ५. ९१-९८ ).

प्रत्येक गणांत सात नांवें असावयास पाहिजेत, पण सर्व नांवें आढळत नाहींत. यांच्या स्थानांसंबंधीं पुढील माहिती आढळते.

पहिला पृथ्वीवर मेघापर्यंत, दुसरा मेघापासून सूर्यापर्यंत, तिसरा सूर्यावर व सोमाच्या खालपर्यंत, चवथा सोमावर व नक्षत्रांच्या खालपर्यंत, पांचवा नक्षत्राच्या वरपासून ते ग्रहांपर्यंत, सहावा ग्रहांपासून ऋषींपर्यंत व सातवा ऋषींपासून ध्रुवापर्यंत असे फिरतात. यांचीं ठिकाणें—पहिल्याचें पृथ्वी, दुसऱ्याचें सूर्य, तिसऱ्याचें सोम, चवथ्याचें ज्योतिर्गण, पांचव्याचें ग्रह, सहाव्याचें सप्तर्षिमंडळ व सातव्याचें ध्रुव अशीं आहेत ( ब्रह्मांड. ३. ५. ७९-८८ ).

**मरुत्त**—( सो. तुर्वसु. ) करंधमाचा पुत्र. हा अनपत्य असल्यामुळें यानें रैभ्यपुत्र दुष्यंतास पुत्र मानलें होतें ( भा. ९. २३. १७ ). यास मत्स्यमतें भरत असें नामांतर आहे.

२ ( सो. क्रोष्टु. ) हा मत्स्यमतें तितिक्षुपुत्र व वायुमतें उशनापुत्र होय.

३ (सू. दिष्ट.) अविक्षित्‌पुत्र. याला मरुत्त आविक्षित असें नांव असून हा कामप्रीचा पुत्र सांगितला आहे ( ऐ. ब्रा. ८. २१. १२ ). ' याला ' अयोगव जातीचा म्हणत ( श. ब्रा. १३. ५. ४. ६ ). हा इंद्रसभेंत व यमसभेंत उपस्थित असे ( म. स. ७८ ). अंगिरसपुत्र बृहस्पतीचा भ्राता संवर्त याच्याकडून याला राज्याभिषेक झाला ( ऐ. ब्रा. ८. २१. १२ ). बृहस्पति याचा पुरोहित होता. इंद्राची व याची नेहमीं स्पर्धा चालूं असे. शेवटीं याच्यावर इंद्राला सरशी करतां येईना, तेव्हां त्यानें बृहस्पताकडून याचें पौरोहित्य न करण्याचा करार करून घेतला. हें याला समजतांच हा बृहस्पतीकडे गेला व त्याला यज्ञाचें ऋत्विजत्व स्वीकारण्यास विनवूं लागला. तथापि, त्यानें तें नाकारल्यावरून मरुत्त उद्विग्न होऊन परत फिरला. परंतु रस्त्यांत नारदाची गांठ पडून यानें त्याला घडलेला सर्व वृत्तान्त कथन केला. नंतर नारदाच्या सांगण्यावरून हा वाराणसीमध्यें संवर्ताकडे गेला व मोठ्या आग्रहानें ऋत्विज् म्हणून त्याला घेऊन आला. पुढें इंद्रानें याच्या यज्ञांत विघ्न उपस्थित करण्याचे अनेक प्रयत्न केले. प्रथम त्यानें ' तुझ्या यज्ञाचें याजन बृहस्पति करील ' अशा प्रकारचा निरोप अग्नीबरोबर पाठविला. परंतु त्याचा कांहींएक उपयोग न होतां संवर्ताच्या शापभीतीनें अग्नि परत गेला. पुनः इंद्रानें धृतराष्ट्र नामक गंधर्वाबरोबर अशाच प्रकारचा निरोप पाठवून त्याला वज्रप्रहार करण्याची धमकी दिली. परंतु मरुत्ताला संवर्ताचा पूर्ण पाठिंबा असल्यामुळें यानें आपला निश्चय कायमच ठेवला. इतक्यांत इंद्राच्या वज्राचा शब्द ऐकूं येऊन त्यायोगें मरुत्त भयभीत झाला. परंतु संवर्तानें याला धीर दिला. हा यज्ञ यमुना

नदीच्या तीरावरील प्लक्षावतरणतीर्थी झाला ( म. व. १२९). उशीरबीज नामक देशामध्यें हा याग झाला ( वा. रा. उ. १८). या यज्ञांतील सर्व वस्तु सोन्याच्या होत्या. नंतर मरुत्तानें इंद्र, बृहस्पति आदिकरून सर्व देवांनीं येऊन आपापल्या स्थानापन्न व्हावें व हवन केलेल्या सोमाचा स्वीकार करावा, असें इच्छिल्यावरून संवर्तानें आपल्या मंत्रप्रभावानें त्यांना विकलांग करून यज्ञाच्या ठिकाणीं आणलें. मरुत्तानें त्यांचा उत्तम सन्मान करून विधिपूर्वक पूजन केलें. तेव्हां इंद्रानें याच्याशीं सख्य केलें.

पुढें याच्या यज्ञांत विघ्न करावें म्हणून रावण आला होता. त्या वेळीं रावणाशीं युद्ध करण्यास हा तयार झाला. परंतु यानें यज्ञदीक्षा घेतली असल्यामुळें यास उठतां आलें नाहीं. तेव्हां रावण आपण होऊन निघून गेला ( वा. रा. उ. ८ ). याच्या यज्ञांत विश्वेदेव सभासद असून मरुत्त व साध्य, शिवाय मरुद्गण हे वाढप्ये होते. इंद्रानें स्वतः सदस्याचें काम केलें. संवर्त यज्ञवेदीवर बसून हविर्द्रव्याचें मंत्रपुरःसर हवन करीत होता. याच्या यज्ञासारखा यज्ञ दुसऱ्या कोणाचाच झाला नाहीं. पुढें मरुद्गणांनीं यथेष्ट सोमपान केल्यावर ते तृप्त होत्साते मरुत्ताचा निरोप घेऊन स्वस्थानीं परत गेले.

नंतर मरुत्तानें सुवर्णाच्या राशि करून ब्राह्मण, गंधर्व इत्यादिकांना अपरिमित द्रव्य वांटलें. गुरूची आज्ञा घेऊन हा परत आपल्या राजधानीस आल्यावर समुद्रवलयांकित अशा सर्व पृथ्वीचें राज्य करूं लागला. याप्रमाणें एक हजार वर्षे राज्य केल्यावर हा मृत्यु पावला. याला दम या नांवाचा एकुलता एक पुत्र होता. तोच पिता मेल्यावर गादीवर बसला. मरुत्त पराक्रमी, धार्मिक व जितेंद्रिय राजा होता ( म. द्रो. ५५; शां. २८; आश्व. ४-१० कुं.; भा. ९. २ ). याचा मैत्र्युपनिषदांत उल्लेख आहे ( १. ४ ).

**मरुत्वत्**—( मरुत्वती पहा ).

**मरुत्वती**—प्राचेतस दक्षाची कन्या व धर्म ऋषीची पत्नी. हिला मरुत्वत् व जयंत असे दोन पुत्र होते ( भा. ६. ६. ४-८; पद्म. सृ. ४० ).

**मरुदेव**—( सू. इ. भविष्य. ) भविष्यमतें सुप्रतीकाचा व मत्स्यमतें सुप्रतीपाचा पुत्र. याचा पुत्र सुनक्षत्र.

**मरुद्गण**—कश्यपापासून दितीला मरुद्गण झाले ( भवि. प्रति. ४. १७ ).

**मरुपाल**—( सू. इ. ) भविष्यमतें शीघ्रगंत्याचा पुत्र. यानें १०००० वर्षे राज्य केलें.

**मर्क**—( शंडमर्क पहा ).

**मर्कटप**—अंगिराकुलांतील गोत्रकार. याबद्दल कटक असा पाठभेद आहे.

**मर्दन**—महीराजाचा पुत्र. हा दुर्योधनाचा भाऊ दुर्मुख याचा अंश होता ( भवि. प्रति. ३. १७ ).

**मर्यादा**—अपराचीनाची पत्नी. हिला अरिह नामक एक पुत्र होता ( म. आ. ६३. १७ कुं. ).

२ देवातिथीची स्त्री. हिचा पुत्र ऋच.

**मलदा**—अत्रीची स्त्री ( ब्रह्मांड. ३. ८. ७४-८७ ).

**मलय**—ऋषभदेवाचा एक पुत्र ( भा. ५. ४ ).

**मलयध्वज**—( चित्रवाहन पहा ).

**मलिन**—( सो. पूरु. ) वायुमतें हा बहुपुत्र होय ( इलिल पहा ).

**मल्ल**—दाशरथि रामाच्या सुज्ञ नामक मंत्र्याचा पुत्र.

२ धर्माच्या सात पुत्रांपैकीं एक. याला मार्तंडभैरवानें ठार मारिलें ( मल्लारिमाहात्म्य ).

**मल्लशर्मन्**—हा घाटपुरचा राहणारा. गोत्र उपमन्यु. याच्या बापाचें नांव वाक्पति. हा कान्यकुब्ज देशांत राहत असे. याच्या शिक्षेंत पासष्ट श्लोक आहेत. यानें श्रावण ( ऊर्ज ) महिन्यांत चंद्रवस्वगभूमिषु म्हणजे १८७१ त एकादशीचे दिवशीं लिहिली. यावरून ही फारच अलीकडील आहे.

**मल्लिकार्जुन**—हा शंकराचा अवतार श्रीशैलावर आहे. मुलाचें दर्शन व्हावें म्हणून स्तुति केली असतां श्रीशैलावर गेला ( शिव. शत. ४२ ). याचें उपलिंग रुद्रेश्वर होय ( शिव. कोटि. १ ).

**मशक गार्ग्य**—स्थिरक गार्ग्याचा पुत्र व शिष्य आणि एक आचार्य. याचा शिष्य आतिधन्वन ( वं. ब्रा. २ ). तसाच हा कल्पसूत्रकर्ता आहे ( ला. श्रौ. ७. ९. १४; अनुपदसूत्र. ९९ ). मशककल्पसूत्र अथवा आर्षेयकल्पसूत्र हें यानें केलें. तें सामवेदाचें आहे.

**मशर्शार**—कक्षीवानानें याचे चार मुलगे मला त्रास देतात अशी तक्रार केली आहे ( ऋ. १. १२२.१५ ).

**मषपाल**—भविष्यमतें सुनीथाचा पुत्र.

**मसक**—न्यूह म्लेच्छाचा कनिष्ठ पुत्र. याकूत, त्याचा हा पुत्र ( भवि. प्रति. १. ५ ).

**मसृण**—कश्यपकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**महत्**—कश्यपकुलांतील एक गोत्रकार.

२ ( स्वा. नाभि. ) विष्णुमतें विराटाचा पुत्र.

३ अमिताभ देवांपैकीं एक.

४ पितरांपैकीं एक.

**महन्पौरव**—( सो. द्विमीढ. ) वायुमतें हा सार्वभौमपुत्र होय. याला मत्स्यांत महापौरव म्हटलें आहे.

**महद्गुल**—विष्णूच्या राजापासून उत्पन्न झालेला जो अदम नांवाचा पुरुष, त्याच्या वंशांतील म्लेच्छ कीनाशाचा पुत्र. यानें ८९५ वर्षें राज्य केलें. यानें ज्या ठिकाणीं राज्य केलें, त्याला मासगार असें म्हणूं लागले ( भवि. प्रति. १. ४ ).

**महस्वत्**—( सू. इ. ) भागवतमतें अमर्षणाचा व विष्णुमतें अमर्षाचा पुत्र. वायुमतें यास सहस्वत् म्हटलें आहे.

**महाकपाल**—दूषण राक्षसाचा अमात्य ( वा. रा. अर. २३. ३३ ).

**महाकपि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**महाकर्ण**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

२ वसिष्ठकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**महाकर्णि**—अम्बुवीचाचा प्रधान ( म. आ. २२३. १९ कुं. ).

**महाकाय**—एकादश रुद्रांपैकीं एक.

२ रावणपक्षीय एक राक्षस.

**महाकाल**—उज्जयनींतील हा शंकराचा अवतार आहे. दूषण नांवाचा असुर केवळ हुंकारानें यानें भस्मसात् केला (शिव. शत. ४२). याचें उपलिंग दुग्धेश होय (शिव. कोटि. १). यानें ब्रह्मदेवाचें पांचवें मस्तक तोडिलें ( स्कंद. ५.१. ३ ). रुद्रगणांतील एक ( पद्म. उ. १२ ).

४ बाणासुरास नांव.

**महाकाली**—महादेवाची शक्ति ( दे. भा. ६.६ ).

**महागिरि**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**महाचक्रि**—कश्यपकुलांतील एक गोत्रकार.

**महाजानु**—कश्यपकुलांतील एक गोत्रकार.

**महाजिह्वा**—ब्रह्मधानाची कन्या.

२ ( बर्बरिक पहा ).

**महातपस्**—एक ऋषि. यानें सुप्रभ राजास विष्णूची उपासना करण्याचा उपदेश केला होता ( वराह. १७ ).

**महातेजस्**—एक रुद्र.

२ अंगिराकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

३ प्रथम पारीक्षित जनमेजयाचा पुत्र ( म. आ. १०१. ४४ कुं. ).

**महात्मन्**—पितरांपैकीं एक.

**महात्मवत्**—( सो. अनु. ) मत्स्यमतें हा महद्भानुपुत्र.

**महादंष्ट्र**—रावणपक्षीय राक्षस.

**महादेव**—भविष्यपुराणाचा कर्ता ( भवि. प्रति. ३. २८. १५ ).

२ अजमीरच्या चपहानिपुत्र सामलदेवाचा पुत्र. यानें सात वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. ४. २ ).

**महादेवा**—वायुमतें ही देवकाची कन्या होय.

**महाद्युति**—अकरा रुद्रांपैकीं एक.

२ मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**महाधृति**—( सू. निमि. ) हा भागवतमतें विसृताचा आणि विष्णु व वायु यांच्या मतें विबुधाचा पुत्र.

**महानंद**—मागध देशचा राजा मागध, त्याच्या वंशांतील मौर्यानंदाचा पुत्र. यानें दहा वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. १. ६ ).

**महानंदा**—ही वेश्या असून मोठी शिवभक्त होती. हिच्यापाशीं एक माकड आणि कोंबडा होता. त्यांना ही रुद्राक्षांनीं भूषित करी. ही शिवभजनांत मग्न असे. तेव्हां तेहि हिच्या बरोबर नृत्य करीत असत. एकदां वैश्याचें रूप घेऊन शंकर स्वतः हिची परीक्षा करण्याकरितां आला. वैश्याजवळ एक रत्नकंकण होतें, तें पाहून महानन्देस वाटलें कीं, तें आपणास असावें. वैश्यानें हिला 'मूल्य देशील का?' म्हणून विचारिलें असतां हिनें त्याच्या मोबदल्यांत तीन दिवस त्याच्याजवळ पत्नीत्वानें राहण्याचें कबूल केलें. वैश्यानें कबूल करून आपलें रत्नमय लिंग तिच्याजवळ ठेवावयास दिलें. परंतु रात्रीं आग लागून तें लिंग जळून गेलें. तेव्हां वैश्यानें जीव देण्याची तयारी केली व त्याप्रमाणें त्यानें देहत्याग केला. महानन्दाहि आपली तीन दिवसांची प्रतिज्ञा लक्षांत घेऊन सहगमन करण्यास उद्युक्त झाली असतां शंकर प्रगट होऊन हिचें त्यानें निवारण केलें व हिच्या इच्छेप्रमाणें सर्व लोकांसह हिला मुक्त केलें ( शिव. शत. २६; वैश्येश्वर पहा ).

**महानंदिन्**—( शिशु. भविष्य. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें नंदिवर्धनाचा पुत्र. हा या कुलांतील शेवटचा पुरुष होय (५ नंद पहा). यानें मत्स्य, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें ४३ वर्षें राज्य केलें.

२ ( भीमवर्मन् पहा ).

**महानाद**—प्रहस्ताचा एक अमात्य ( वा. रा. यु. ५८. ३० ).

**महानाभ**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ हिरण्याक्ष व रुषाभानु यांच्या पुत्रांपैकीं एक.

**महानील**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**महानुभाव**—चाक्षुष मन्वंतरांतील देवविशेष.

**महापद्म**—(नंद. भविष्य.) वायु व मत्स्य यांच्या मतें शिशुनागवंशांतील शेवटल्या महानंदीचा शूद्रीपासून झालेला पुत्र. हा नंदवंशाचा पहिला राजा. यासच नंदहि म्हणत असावेत. यानें मत्स्य व ब्रह्मांड यांच्या मतें ८८ वर्षें व वायुमतें २८ वर्षें राज्य केलें. याजपासून नंदवंश सुरू झाला.

**महापद्म**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र, नाग.

**महापार्श्व**—विश्रवा ऋषीस पुष्पोत्कटेपासून झालेला पुत्र. यास मत्त असेंहि नांव आहे. हा रावणाचा अमात्य होता. हा अंगदाच्या हातून रामरावणयुद्धकालीं मरण पावला (वा. रा. यु. ९९).

**महापुरुवश**—(सो. क्रोष्टु.) वायुमतें हा नंदनपुत्र होय.

**महापौरव**—(सो. द्विमीढ.) मत्स्यमतें हा सार्वभौमपुत्र होय. यास वायूंत महत्पौरव म्हटलें आहे व हरिवंशांत यास महत् म्हटलें आहे.

**महाबल**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ (सो. पूरु.) वायुमतें बृहद्विष्णूचा पुत्र.

३ विष्णुपार्षदांपैकीं एक.

४ शिवपार्षदांपैकीं एक.

५ वैवस्वत मन्वंतरांतलि इंद्र.

६ गुहावासिन् नामक शिवावताराचा शिष्य.

७ भविष्यमतें भरताचा पुत्र. यानें दिव्य शंभर वर्षे राज्य केलें.

८ पितरांपैकीं एक.

**महाबाहु**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ (सो. कुरु.) धृतराष्ट्राच्या पुत्रांपैकीं एक. यास भीमानें मारिलें (म. द्रो. १५८. १७ कुं.).

३ (सो. मगध. भविष्य.) वायुमतें श्रुतंजयाचा पुत्र. यास भागवत व विष्णु यांच्या मतें विप्र, मत्स्यमतें विभु व ब्रह्मांडमतें रिपुंजय म्हटलें आहे. यानें पस्तीस वर्षे राज्य केलें.

**महाभय**—अधर्मास निर्ऋतीपासून झालेला पुत्र.

**महाभाग**—(वाह्यन पहा).

**महाभागा**—कश्यप व खशा यांची कन्या.

**महाभिष**—(सू. इ.) एक राजा. पूर्वजन्मीं यानें एक हजार अश्वमेध व शंभर राजसूय यज्ञ केले व त्या पुण्याच्या योगानें हा स्वर्गास गेला. एकदां हा ब्रह्मलोकीं गेला असतां त्या ठिकाणीं यानें सर्व देव व ऋषि एकत्र जमलेले पाहिले. त्या ठिकाणीं सर्व नद्यांसह महानदी गंगा ही सुद्धां आली होती. इतक्यांत गंगेचें अंगावरील वस्त्र वाऱ्यानें उडालें. तें पाहून सर्वांनीं माना खालीं घातल्या; परंतु महाभिष निःशंकपणें तिच्याकडे पहातच राहिला. हें पाहून गंगाहि सप्रेम दृष्टीनें याच्याकडे पाहूं लागली. अशा प्रकारें दोघांना एकमेकांवर अनुरक्त झालेले पाहून ब्रह्मदेवास राग आला व त्यानें दोघांनाहि 'मृत्युलोकीं जन्म घ्या' म्हणून शाप दिला. पुढें या दोघांनीं ब्रह्मदेवाची क्षमा मागितली; तेव्हां त्यानें 'पुष्कळ पुण्य संपादन केल्यावर तुम्ही परत स्वर्गलोकीं याल,' असें यांना सांगितलें. त्याप्रमाणें शाप झाल्यावर महाभिष सोमवंशांत उत्पन्न होऊन शंतनु या नांवानें प्रसिद्ध झाला व गंगा याची पत्नी झाली (म. आ. १०२. १. कुं.; दे. भा. २. ३; भा. ९.२२; शांतनु पहा). कुंभकोण प्रतींत महाभिषज् असें हें नांव आहे.

गंगा प्रतीपालाच 'तूं माझा नवरा हो,' असें म्हणाली. पण प्रतीपानें 'माझ्या पुढें होणाऱ्या मुलाची तूं भार्या हो,' असें सांगितलें (दे. भा. २. ३).

**महाभोज**—(सो. क्रोष्टु.) सात्वताचा पुत्र. याच्या वंशजांस भोज अशी संज्ञा आहे (भा. ९.२४. ७-११).

**महाभौज**—(सो. पूरु.) अरिहाचा पुत्र. याची आई आंगी. यास सुयज्ञेपासून अयुतानायिन् पुत्र झाला (म. आ. ६३. १८ कुं.).

**महामख**—सवितृ व पृश्नि यांचा पुत्र (भा. ६. १८.१).

**महामणि**—(सो. अनु.) विष्णुमतें जनमेजयाचा पुत्र. यास महामनस् नामक एक पुत्र होता.

**महामती**—अंगिरसूच्या सात कन्यांतील एक (म. व. २२१. ८ कुं.).

**महामत्स्य**—(ऐति.) तिमिरलिंगाच्या वंशांतील महामद मरण पावल्यावर त्याच्या राष्ट्रांत नादर नांवाचा दैत्य आला. त्याचा हा पुत्र. यानें पित्याचें राज्य पांच वर्षे चालविलें. याला तालनाच्या वंशांतील मराठ्यांनीं मारिलें (भवि. प्रति ४. २२).

**महामद**—एक म्लेछ. हाच त्रिपुर राक्षसाचा अंशभूत असून पिशाचकृतीमध्यें तत्पर असे. यानें भोजराजास मोहित केलें होतें. परंतु भोजराजाच्या पदरीं असलेल्या कालिदासानें जपानें याचें भस्म केलें. तथापि पुनः यानें देह धारण करून आर्यधर्म श्रेष्ठ आहे, असें कबूल केलें. यानें लिंगच्छेद करणारे, दाढीवाले, शिखाहीन, पैशाचधर्मी, डुकरांखेरीज इतर पशूंचे मांसभक्षक मुसलमान निर्माण केले (भवि. प्रति. ३. ३).

२ प्रमराचा ज्येष्ठ पुत्र. याला महामर असेंहि नांव आहे. यानें तीन वर्षे राज्य केलें. याचा पुत्र देवापि (भवि. प्रति. १. ७; ४. १).

**महामनस्**—(सो. अनु.) महाशालाचा पुत्र. विष्णुमतें हा महामणिपुत्र. वायु व मत्स्य यांच्या मतें हा महाशालपुत्र आहे. यास उशीनर व तितिक्षु असे दोन पुत्र होते (भा. ९.२३).

**महामर**—प्रमराचा पुत्र. यानें तीन वर्षे राज्य केलें (भवि. प्रति. ४. १).

**महामान**—पारावत देवांतील एक.

महाभालिन्—खर राक्षसाचा एक अमात्य ( वा. रा. अर. २३. ३२ ).

२ रावणपक्षीय एक असुर.

महामुद्—मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

महामुनि—रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

महामूर्ति—बिभीषणाची स्त्री. हिनें पतीसहित सरयूवर जाऊन रामाच्या अश्वमेधीय अश्वाला स्नान घालण्याकरितां सरयूचें उदक आणिलें. त्या उदकानें रामानें घोड्यास स्नान घातलें ( पद्म. पा. ६७ ).

महामूल—गुर्जरदेशाधिपति मूलवर्म्याचा पुत्र ( भवि. प्रति. ३. ३१ ).

महायशस्—प्रसूत देवांतील एक.

२ लेख देवांतील एक.

३ ( सो. पूरु. ) मत्स्यमतें हा संकृतिपुत्र होय.

महायोग—गुहवासिन् शिवावताराचा शिष्य.

महारथ—विश्वामित्राचा एक पुत्र.

२ ( सो. ऋक्ष. ) उपरिचर वसूचा पुत्र बृहद्रथाचें नामांतर.

महारव—एक यादव ( म. आ. २३९.११ कुं. ).

महाराज—( सू. इ. ) भागवतमतें अज राजाचा पुत्र.

२ ( मणिकुंडल पहा ).

महारोमन्—( सू. निमि. ) कृतिरात जनकाचा पुत्र. याचा पुत्र स्वर्णरोमन्.

महालक्ष्मी—( दुर्गा व लक्ष्मी पहा ).

महावशिन्—( सू. निमि. ) भागवतमतें कृतीचा पुत्र.

महावायु—विश्वकर्म्यानें निर्माण केलेल्या भ्रमियंत्रापासून म्लेंछांचा नाश करणारा महावायु उत्पन्न झाला. या महावायूपासून वातीच्या ठायीं वात्स नामक पुत्र झाला ( भवि. प्रति. ४. २४ ).

महावीर—प्रियव्रत व बर्हिष्मती यांचा पुत्र. यास धृतोदा असें म्हणतात. हा ब्रह्मचारी असून लहानपणापासून यानें आत्मज्ञानार्थ अभ्यास केला. शेवटीं संन्यास घेतला व श्रीकृष्णभक्तीनें ज्ञानसंपन्न होऊन हा ब्रह्मत्वास पावला (भा. ५. १).

२ रामानें अश्वमेध केला, त्या वेळीं अश्वाचें रक्षण करण्याकरितां हा शत्रुघ्नाबरोबर गेला होता. हा उत्तम शस्त्रज्ञ व पराक्रमी होता ( पद्म. पा. ११ ).

महावीर्य—( सू. निमि. ) दैवराति बृहद्रथाचा पुत्र. याचा पुत्र सुधृति.

२ ( सो. पूरु. ) भागवतमतें मन्यूचा पुत्र. याचा पुत्र दुरितक्षय. मत्स्यमतें हा कृमिपुत्र होय.

३ वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

महाव्रत—विश्वामित्राचा एक पुत्र.

महाश—कृष्ण व मित्रविंदा यांचा पुत्र.

महाशक्ति—श्रीकृष्ण व लक्ष्मणा यांचा पुत्र.

महाशंख—कद्रूपुत्र नाग ( मत्स्य. ६ ). हा पाताळांत असतो ( भा. ५. २४. ३१ ). हा मार्गशीर्ष मासींच्या सूर्याबरोबर असतो ( भा. १२. ११. ४१ ).

महाशाल—( सो. अनु. ) मत्स्य व वायु यांच्या मतें हा जनमेजयाचा पुत्र होय.

महाशाल जाबाल—एक आचार्य. याचा शतपथब्राह्मणांत दोनदां उल्लेख आला आहे. पहिल्यांदां हा धीर शातपर्णेय ह्याला शिकवीत असतां व दुसऱ्यांदां अश्वपति कैकेयापासून ज्ञान मिळविणाऱ्या ब्राह्मणांपैकीं एक म्हणून ( श. ब्रा. १०. ६. १.१ ). छांदोग्योपनिषदांत मात्र हा शब्द विशेषनाम नसून विशेषण आहे. तेथें महाशाल शब्दाचा अर्थ संपन्न असा आहे ( छां. उ. ५. ११. १; ३; ६. ४. ५ ). इतर ठिकाणींहि अशाच अर्थानें हा शब्द आला आहे ( मुं. उ. १. १. ३; ब्रह्मो. १ ).

महाशिरस्—युधिष्ठिरसभेंतील ब्रह्मर्षि ( म. स. ४. १६ कुं. ).

२ वरुणसभेंतील सर्प ( म. स. ९. १८ कुं. ).

३ कश्यप व दनु याचा पुत्र.

महाश्व—यमसभेंतील एक क्षत्रिय ( म.स.८.१९ कुं. ).

महासत्त्व—( सो. कुरु. ) वायुमतें हा आराधिपुत्र होय.

महासिंह—( ऐति. ) अजमीरांतील चपहानीच्या वंशांतील माणिक्याचा पुत्र. यानें शंभर वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. ४. २ ).

महासेन—कृष्णांशाचा शत्रु व वीरसेनाचा पुत्र ( भवि. प्रति. ३. २२ ).

महासुर—कश्यप व दनु यांचा पुत्र.

महाहनु—( सो. वसु. ) मत्स्यमतें वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

२ सर्पसत्रांत दग्ध झालेला एक नाग ( म. आ. ५७. २० कुं. ).

महाहय—( सो. क्रोष्टु. ) शतजित्चा पुत्र.

महित—पितरांपैकीं एक.

महिदास ऐतरेय—महीदास असाहि पाठ आढळतो. ऐतरेय म्हणजे इतरा नांवाच्या स्त्रीचा मुलगा. याचा ऐतरेय आरण्यकांत वारंवार उल्लेख येतो ( ऐ. आ. २. १. ८; ३. ७ ). हा एकशें सोळा वर्षें जगला व रोगानें याला त्रास दिला, पण ' मी तुझ्या त्रासानें मरणार नाहीं, ' असें यानें

रोगाला सांगितलें (छां. उ. ३. १६. ७; जै. उ. ब्रा. ४. २. ११ ). ऐतरेय ब्राह्मण व ऐतरेय आरण्यक हे याचे ग्रंथ होत.

**महिनेत्र**—( सो. मगध. ) मत्स्यमतें शुमत्सेनाचा पुत्र.

**महिमत्**—भग नामक आदित्यास सिद्धीपासून झालेला पुत्र ( भा. ६. १८. २ ).

**महिमावत्**—पितरांपैकीं एक.

**महिष**—मय व रंभा यांचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ६. २८-३० ).

**महिषासुर**—रंभासुराचा पुत्र. रंभासुरानें तपश्चर्या करून शंकराला प्रसन्न केलें; आणि वर मागितला कीं, ' ईश्वरा, मी अपुत्र आहें. तुम्ही माझे पुत्र व्हा. ' शंकरानें ' तथास्तु ' म्हटलें. एके दिवशीं त्याला रस्त्यांतून जातांना चित्रवर्णाची तीन वर्षांची सुंदर महिषी दिसली. तेव्हां त्यानें तिच्या ठिकाणीं वीर्यस्थापना केली. त्यायोगें हा शंकरांशानें महिषासुर उत्पन्न झाला. या महिषासुरानें देवीची आराधना करून शाश्वत स्थान मिळविलें ( कालि. ६२ ).

यानें तपानें ब्रह्मदेवास प्रसन्न करून त्यापासून ' मला पुरुषाकडून मृत्यु नसावा ' असा वर मागितला. नंतर या वरानें प्रमत्त होऊन हा त्रिभुवनास त्रास देऊं लागला. तेव्हां देवीनें अष्टादशभुजयुक्त रूप धारण करून यास ठार केलें ( दे. भा. ५. १६; पार्वती पहा; मार्कं. ८० ). अरुणाचलावर पार्वती तपश्चर्या करीत असतां हा तेथें मृगयार्थ गेला होता. तिचें सौंदर्य पाहून यानें वृद्ध अतिथीचें रूप घेऊन तिला ' तूं येथें कां तपश्चर्या करीत आहेस ? ' म्हणून विचारिलें असतां, ' बलवान् शंकरासाठीं मी तप करीत आहें ' असें ती म्हणाली. तेव्हां यानें ' मी बलवान् असून मला वर ' म्हणून सांगितलें. शेवटीं 'बल दाखव' असें पार्वतीनें म्हणतांच पार्वतीचें व याचें युद्ध होऊन हा मारिला गेला ( स्कंद. १. ३; १० ११; शिव. उ. ४६ ). जेथें देवीनें याचा प्राण घेतला, तेथें देवीपुरतीर्थ आहे असें म्हणतात ( स्कंद. ३. १. ६-७ ).

**महिष्मत्**—( सो. सह. ) भागवतमतें सोहंजीचा व विष्णुमतें साहंजीचा पुत्र. याचा पुत्र रुद्रश्रेण्य. मत्स्य व वायु यांच्या मतें याच्या बापाचें नांव अनुक्रमें संहत व संज्ञेय असें दिलें आहे. यानें माहिष्मती नगरी वसविली ( ह. वं. १. ३३ ).

**महिष्मती**—बृहस्पति व शुभा यांची कन्या.

२ अंगिरसाची मुलगी ( म. व. २२१. ७ कुं. ).

**मही**—ही धृतव्रत ब्राह्मणाची पत्नी. हिचा पुत्र सनाज्जात. हिला वैधव्य प्राप्त झाल्यामुळें व निराश्रित असल्यामुळें ही वेश्यावृत्ति करूं लागली. पुत्राशींहि हिचा समागम घडला. पण गंगास्नानानें यांचा उद्धार झाला ( ब्रह्म. ९२ ).

**महीचंद्र**—म्लेच्छाच्या वंशांतील यशोविग्रहाचा पुत्र. यानें वीस वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४. ३ ).

**महीजित्**—द्वापरयुगांतील माहिष्मतीचा राजा. याला श्रावणशुद्ध किंवा पुत्रदा एकादशीच्या पुण्यानें पुत्र झाला ( पद्म. उ. ५५ ).

**महीनर**—अग्निवंशांतील राजा राजपाल याचा पुत्र. यानें बिंदुखंडांत पन्नास वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४. १ ).

**महीपति**—बौद्धजेता व अथर्ववेदपरायण परिहर नामक बौद्ध राजाच्या वंशांतील धृतिवर्म्याचा पुत्र. हा दुर्योधनाचा अंश असून यानें उर्वीमाया नगरी वसविली. कुरुक्षेत्रीं चंद्रवंशीय क्षत्रिय मेले, तेव्हां हा महावतीचा राजा झाला. याच्या नंतर सहोद्दीनानें राज्य केलें ( भवि. प्रति. ३. २२; ४. ४ ).

**महीरथ**—एक राजा. यानें वैशाखस्नानाच्या पुण्यानें आपला व इतरांचा उद्धार केला ( पद्म. पा. ९९-१०१; स्कंद. २. ७. ४ ).

**महीराज**—अजमीरांतील चपहानीच्या वंशांतील सोमेश्वर राजाला कीर्तिमालिनी नामक स्त्रीपासून झालेला तृतीय पुत्र. हा देहलीपति होता. याला धुंधकार व कुमार असे दोघे भ्राते, तसेंच तारक, नृहरि, रदन, मर्दन, सूर्यवर्मन्, विविंशति व वर्धन असे सात पुत्र होते. हे सर्व कौरवांचे अंशभूत असून वेला नामक कन्या द्रौपदीची अंशभूत होती. हा अत्यंत पराक्रमी होता. परंतु सहोद्दीन राजाला वश झाल्यामुळें मरण पावला. याच्यानंतर कुतुकोद्दीन दिल्लीचा राजा झाला ( भवि. प्रति. ३. १७; २३; ४. २; ६ ).

**महेंद्र**—अगस्त्यकुलोत्पन्न एक ऋषि.

**महेश**—एक शंकराचा अवतार ( वेताळ पहा ).

**महोदक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**महोदय**—वसिष्ठ ऋषीचा पुत्र. त्रिशंकूनें विश्वामित्रास ऋत्विज् करून एक यज्ञ केला. तेव्हां त्यांत त्यानें महोदयासहि बोलाविलें होतें. परंतु ' चांडाल त्रिशंकु व चांडाल याजक विश्वामित्र या दोघांच्या यज्ञांत मी येणार नाहीं. ' असा महोदयानें उलट निरोप पाठविल्यावरून विश्वामित्रानें यास ' निषाद हो ' म्हणून शाप दिला ( वा. रा. बा. ५९ ).

**महोदर**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

२ घटोत्कच ज्या वेळीं प्राग्ज्योतिषपुरांत कामकटंकेस जिंकण्यास निघाला होता, त्या वेळचा त्याचा एक अनुचर राक्षस ( स्कंद. १. २. ५९-६० ).

३ धृतराष्ट्राच्या पुत्रांपैकीं एक. यास भीमानें छातींत एक नाराच बाण मारून ठार केलें ( म. भी. ८८. २७ कुं. ).

४ एक ऋषि. रामानें उडविलेलें एका राक्षसाचें मुंडकें याच्या पायास चिकटलें. तेव्हां हा औशनस तीर्थावर स्नान करितांना मुक्त झाला ( म. शां. ४०. २० कुं. ).

५ रावणाचा पुत्र. याचें प्रथम अंगदाशीं व नंतर नीलाशीं युद्ध झालें. त्यांत नीलानें यास ठार केलें ( वा. रा. यु. ७० ).

६ रावणाचा प्रधान (वा. रा. उ. १४. १). यानें कुंभकर्णाला 'तूं एकटा युद्धार्थ जाऊं नकोस,' असें सांगितलें होतें व रावणास असा सल्ला दिला कीं, 'आम्ही द्विजिह्व, कुंभकर्ण, संह्रादिन् व वितर्दन असे युद्धास जातों. आम्ही युद्धाहून परत येतांना राम मेला, म्हणून ओरडत येऊं. नंतर तसें तूं सीतेस सांगून तिला वश करून घे' (वा. रा. यु. ६४). नंतर ते युद्धास गेले. याचें सुग्रीवाशीं युद्ध होऊन हा त्याच्या हस्तें मरण पावला ( वा. रा. यु. ९७ ).

७ सुमालि राक्षसाचा अनुचर. हा सुमालीबरोबर पातालांतून बाहेर आला होता ( वा. रा. उ. ११ ).

८ विश्रवस् व पुष्पोत्कटा यांचा पुत्र.

**महौजस्**—भारतीय युद्धांतील कौरवपक्षीय राजा ( म. आ. ६८. ५२ कुं. ).

२ पांडवपक्षीय एक क्षत्रिय ( म. उ. ४. २२. कुं ).

३ वसुदेवास भद्रेच्या ठिकाणीं झालेला पुत्र.

४ तुषित देवांतील एक.

**महौदवाहि**—ऋग्वेदी पितृतर्पणांतील एक आचार्य ( आश्व. गृ. ३. ४. ४ ).

**माक्षति**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**माक्षव्य**—मक्षु नांवाच्या महर्षीचा पुत्र. यानें संहिता शब्दाचा तात्त्विक अर्थ लावला आहे. याच्या मताप्रमाणें द्यौ व पृथिवी यांची संहिता वायु नसून आकाश आहे ( ऐ. आ. ३. १. १ ).

**मागध**—भौत्य मन्वंतरांतील देवविशेष.

२ भौत्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा. याला मगधदेशाधिपति असें म्हटलें आहे. याला अभिमन्यूनें मारिलें ( म. भी. ६२.४८ कुं. ).

४ जरासंधाचें दुसरें नांव ( भा. ३. ३. १० ).

५ राज्यपुत्रसंज्ञक देशाचा व आठ हजार शूद्रांचा राजा. पृथूच्या समागध नामक पुत्राचा हा पुत्र. यानें आर्यदेश भिन्न केला. हा कश्यपाच्या आगून मागध देशचा राजा झाला. याचा पुत्र ऋतु ( भवि. प्रति. १. ६ ).

**मांकायन**—भृगुकुलांतील एक गोत्रकार. याच्याबद्दल कामायन असा पाठ आहे.

**मांगलिन्**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील भागवतमतें पौष्यंजीचा शिष्य ( व्यास पहा ).

**माचाकीय**—एक व्याकरणज्ञ. यकारवकाराचा लोप कोठें होतो, हें यानें सांगितलें आहे ( तै. प्रा. १०. २२ ).

**माजूज**—न्यूह नामक म्लेच्छाचा कनिष्ठ पुत्र जो याकूत त्याचा हा पुत्र ( भवि. प्रति. १. ५ ).

**माठर**—हें मृत्यूचें नांव आहे. हा नेहमीं सूर्याचे दक्षिण दिशेला राहतो. अष्टादश विनायकांपैकीं हा एक आहे ( साम्ब. १६ ). इंद्रानें सूर्याचे सेवेकरितां याला पारिपार्श्वक नेमिला आहे ( भवि. ब्राह्म. ५३ ).

२ एक आचार्य. अष्टकाकर्मांत तंत्र करावें असें याचें मत आहे ( कौ. १३८. १६ ). सांख्यकारिकेची वृत्ति एका माठराच्या नांवावर आहे.

३ कश्यप व भृगु यांच्या कुलांतील एक गोत्रकार.

**माठरीपुत्र**—हें नांव काश्यपीबालाक्यामाठरीपुत्र असें येतें ( श. ब्रा. १४.९. ४. ३१-३२ ).

**माणिक्य**—अजमीरांतील चपहानि राजाच्या वंशांतील वीरविहात्तकाचा पुत्र. यानें शंभर वर्षें राज्य केलें ( भवि. प्रति. ४. २ ).

**माणिचार**—याला माणिभद्र असेंहि म्हणतात ( वा. रा. उ. १५ ). याचा इतरत्रहि निर्देश आहे ( म. आ. ६४. २७; स. १०. १६ कुं. ). हा मंदर पर्वताच्या शिखरावर राहणारा एक यक्ष असून कुबेराचा अत्यंत प्रिय असा सचिव होता ( म. व. १३९ ). पुढें रावणाचें कुबेराशीं युद्ध झालें, त्या वेळीं हा युद्धांत सामील असून यानें धूम्राक्षाला गदाप्रहारानें मूर्च्छित पाडिलें. हें रावणानें अवलोकन करितांच मोठ्या त्वेषानें तो माणिचारावर धांवला व उभयतांचें प्रचंड युद्ध होऊन त्यांत माणिचाराचा पराभव झाला ( वा. रा. उ. १५ ).

**माणिभद्र**—( माणिचार पहा ).

**माणिवर**—एक यक्ष ( म. व. १४१. ५ कुं. ).

**मांटि**—गौतमाचा शिष्य. याचा शिष्य आत्रेय ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ).

२ ( कालभीति पहा ).

**मांडकर्णि**—दंडकारण्यांत राहणारा एक ऋषि. यानें वायु भक्षण करून जलाशयामध्यें दहा हजार वर्षें तीव्र तप केल्यामुळें अग्निप्रभृति सर्व देव भिऊन गेले व याचा तपोभंग करण्यासाठीं त्यांनीं पांच अप्सरा याच्याकडे पाठविल्या. त्यांना हा लुब्ध होऊन यानें तप सोडिलें व आपल्या तपःसामर्थ्यानें उत्पन्न केलेल्या पंचाप्सर नामक सरोवरांत एक गुप्त गृह निर्माण करून त्या अप्सरांसहित हा क्रीडा करीत राहिला. रामलक्ष्मण दंडकारण्यामध्यें आले, त्या वेळीं त्या सरोवरांतून

वाद्याचा व गायनाचा ध्वनि ऐकूं येत होता. तेव्हां रामानें प्रश्न केल्यावरून धर्मभृत ऋषीनें त्याला ही गोष्ट सांगितली (वा. रा. अर. ११).

**मांडवी**—कुशध्वजाची कन्या. ही दशरथपुत्र भरतास दिलेली होती (वा. रा. बा. ७३).

२ (वात्सीमांडवीपुत्र पहा).

**मांडव्य**—संहितेचा तात्त्विक अर्थ बसविणारा एक आचार्य (ऐ. आ. ३. १. १; ऋ. प्रा. प्रस्तावना). एक आचार्य (श. ब्रा. १०. ६. ५. ९; सां. आ. ७. २). पितृतर्पणांत याचा समावेश आहे (आश्व. गृ. ३. ४. ४). यानें शुक्लयजुर्वेदाची शिक्षा केली आहे. तिचा पाराशरीसंहितेंत निर्देश आहे (श्लो. ७७–७८). हा कौत्साचा शिष्य. याचा शिष्य मांडूकायनि (बृ. उ. ६. ५. ४).

हा ब्रह्मर्षि मोठा तपस्वी होता. एकदां याच्यावर चोरीचा आळ आला होता. त्या चोरीच्या आळाबद्दल निरनिराळ्या पुराणांत निरनिराळी माहिती सांपडते. मार्कंडेयपुराण व गरुडपुराण यांत फक्त चोरीच्या संशयावरून मांडव्याला राजानें सुळावर दिलें असें आहे (मार्कं. १६; गरुड. १. १४२). पद्मपुराणांत राजा सुलक्षण हा शिकारीकरितां अरण्यांत गेला असतां त्याचा एका झाडास बांधलेला घोडा चोरीला गेला; तेव्हां राजदूतानें समाधिस्थ मांडव्य बोलत नाहीं, असें पाहून यानेंच तो घोडा चोरीला असावा, असें समजून यास सुळावर चढविलें, असें आहे (पद्म. उ. १४१). राजाचा कांहीं माल चोरीला गेला; म्हणून याला शिक्षा झाली, असेंहि आहे (पद्म. उ. ५१). देवपत्न राजाची मुलगी कामप्रमोदिनी हिला शंबर राक्षसानें पळवून नेली व तिचे दागिने मांडव्याश्रमाजवळ टाकिले; दूतांना शोधाअंतीं मांडव्याश्रमाजवळील दागिने दिसले. त्यावरून यानेंच मुलगी नेली, असें वाटून राजानें यास सुळीं दिला; परंतु पुढें शंबरासुरानें मुलगी परत आणून देतांच राजानें तिचें लग्न मांडव्याबरोबर केलें (स्कंद. ५. ३. १६९-१७२). मांडव्य ऋषि तीर्थयात्रा करीत करीत विश्वामित्रतीर्थाचे ठिकाणीं आला. त्या ठिकाणीं कांहीं चोर राजद्रव्य टाकून पळून गेले होते. तेथें राजद्रव्याजवळ मांडव्य ऋषीस पाहून दूतानें यास चोर म्हणून पकडिलें व सुळीं दिलें (स्कंद. ६. १३७).

मी शुद्धवर्तनी असतां मला अशी भयंकर शिक्षा कां झाली, हें विचारण्याकरितां लिंगदेहानें हा यमाकडे गेला व त्यास वरील प्रश्न विचारतांच तूं बाल्यावस्थेंत एका कीटकास सुईनें टोंचल्यामुळें तुला ही शिक्षा मिळाली, असें यमानें यास सांगितलें. त्या कीटकाची जात पतंग (म. आ. ११८), बगळा (स्कंद. ६. १३६), टोळ (पद्म. उ. १४१), भिंगरी (पद्म. सृ. ५२) इत्यादि आढळतात.

हें उत्तर ऐकतांच मांडव्यानें बारा, चौदा वर्षांपर्यंत केलेल्या पापाला दोष नाहीं असा नियम केला व 'तूं शूद्र कुलांत जन्म घेशील' असा यमाला शाप दिला. तोच विदुर होय (म. आ. ११७. १७ कुं.; भा. ३. ५. २०).

पुढें खरा चोर सांपडल्यामुळें राजानें यास सोडून दिलें. तरी पण किंचित् शूलाग्र याच्या शरिरांत राहिल्यामुळें यास अणिमांडव्य असें नांव प्राप्त झालें (पद्म. उ. १४१).

हा सुळावर असतां मध्यरात्रीं कौशिककुलांतील सर्व अंगाला कुष्ठ झालेला ब्राह्मण आपल्या बायकोच्या खांद्यावर बसून वेश्येकडे जात असतां अंधारांत चुकून त्याचा पाय याला लागला. त्याबरोबर 'तूं सूर्योदय होतांच मरशील,' असा यानें त्यास शाप दिला. त्या पतिव्रता स्त्रीचें नांव शांडिली किंवा दीर्घिका आहे (स्कंद. ६. १३५).

त्या पतिव्रता स्त्रीनें आपल्या पातिव्रत्याच्या जोरावर सूर्याला उगवूंच दिलें नाहीं. परंतु पुढें अनसूयेच्या सांगण्यावरून तिनें सूर्याला उगवूं दिलें व मेलेला नवरा देवांच्या कृपेनें मदनतुल्य शरिरानें मिळविला (म. आ. १०७-१०८; गरुड. १. १४२; मार्कं. १६; स्कंद. ५. ३. १६९-१७२; ६ १३५; पद्म. सृ. ५१). हा एक ज्योतिषी असून याच्या नांवावर मांडव्यसंहिता नामक एक ग्रंथ उपलब्ध आहे (C. C.). हा भृगुकुलोत्पन्न गोत्रकार आहे.

**मांडूक**—भृगुकुलोत्पन्न गोत्रकार.

**मांडूकायनि**—एक आचार्य. हा मांडव्याचा शिष्य व याचा शिष्य सांजीवीपुत्र (श. ब्रा. १०. ६. ५. ९; बृ. उ. ६. ५. ४)

**मांडूकायनीपुत्र**—मांडूकीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य जायंतीपुत्र (बृ. उ. ६. ५. २).

**मांडूकि**—ऋग्वेदी श्रुतर्षि.

**मांडूकीपुत्र**—शाण्डिलीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य मांडूकायनीपुत्र (बृ. उ. ६. ५. २).

**मांडूकेय**—मंडूक नामक महर्षीचा पुत्र. पृथिवी पूर्वरूप, द्यौरुत्तररूप व वायु ही द्यौ व पृथिवी यांस जोडणारी संहिता आहे, असें मांडूकेयाचें मत आहे (ऐ. आ. ३. १. १; ऋ. प्रा. १. ४). शूरवीरादिकांचें हें पैतृक नांव आहे (सां. आ. ७. २; ८–९; १०; १२; ८. ११). ब्रह्मयज्ञांगतर्पणांत याचा उल्लेख आहे (आश्व. गृ. ३. ४. ४) स्वरांविषयीं मतभेद दर्शविणारा एक आचार्य (ऋ. प्रा. २००). विष्णु, ब्रह्मांड व भागवत यांच्या मतें व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील इंद्रप्रमतीचा शिष्य. याचा शिष्य व पुत्र सत्यश्रवस्.

**मातंग**—' उद्योग करावा, मागे सरूं नये ' हें याचें तत्त्व दुर्योधनानें प्रतिपादिलें आहे ( म. उ. १२७.२० कुं. ).

२ कश्यप व खशा यांचा पुत्र.

**मातंगिन्**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**मातंगी**—कश्यप व क्रोधा यांच्या नऊ कन्यांपैकीं एक. हिला मातंग नांवाचे पुत्र झाले ( म. आ. ६७. ६१-६६ कुं. ).

**मातरिश्वन्**—एक देवता. अग्नीचें नांव म्हणून हा शब्द आला आहे ( ऋ.१. ९-६. ४; ३. ५. ९; २६.२ ). एकाच परब्रह्माला अग्नि, यम व मातरिश्वन् असें म्हणतात ( ऋ. १. १६४. ४६ ). मातरिश्वन् व विवस्वत् यांना अग्नि प्रथम दिसला ( ऋ. १. ३१. ३.). मातरिश्वन्नें अग्नि प्रदीप्त केला ( ऋ. ३. ५. १० ). मातरिश्वन्नें दुरून सूर्यापासून अग्नि आणिला (ऋ. १. १२८. २; ३. ५. ९; ६. ८. ४ ). इंद्राची मातरिश्वन्शीं कुशल कारागीर म्हणून तुलना आहे ( ऋ. १०. १०५. ६ ). पतिपत्नींचीं अन्तःकरणें जोडण्याकरितांहि याचा निर्देश आहे ( ऋ. १०, १०९. १ ).

मेध्य व हा पृषध्राबरोबर इंद्राकरितां सोम तयार करीत होते ( ऋ. ८. ५२. २ ). दध्यङ्ला मातरिश्वपुत्र म्हटलें आहे ( ऋ. १०. ४८.२; सां. श्रौ. १६.११. २६ ). इतर कांहीं ठिकाणीं मातरिश्वन् शब्द वायु अर्थानें आला आहे ( नि. ७. २६; ऋ. १. ६०. १; ३. २९. ११; जै. उ. ब्रा. ४. २०. ८ ).

२ गरुडाचा पुत्र ( म. उ. १०१. १४ कुं. ).

**मातरिश्वन् काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ५४ ).

**मातलि**—इंद्राचा सारथि. यास सुधर्मा नांवाची स्त्री असून तिच्यापासून गोमुख नामक पुत्र व गुणकेशी नामक कन्या अशीं दोन अपत्यें झालीं ( म. उ. ९७. १९-२० कुं. ).

यानें रामरावणयुद्धप्रसंगीं रामाला आपलें सारथ्य दाखविलें व रामानें याच्याच रथांतून रावणाचा वध केला ( म. व. २१.३० कुं. ). इंद्राज्ञेवरून यानें अर्जुनाला स्वर्गांत आणिलें होतें ( म. व. ४२ कुं. ).

हा गरुडाच्या साहाय्यानें वरसंशोधनार्थ पातालांतहि गेला होता ( म. उ. ९८. ८ कुं. ).

**मातृका**—अर्यमा नामक आदित्याची स्त्री ( भा. ६. ६. ४२ ).

**मातेय**—वसिष्ठकुलोत्पन्न गोत्रकार ऋषिगण.

**मात्स्य**—अथर्ववेदांत याचा उल्लेख आला आहे ( १९. ३९. ९ ). तैत्तिरीय ब्राह्मणांत उल्लेखिलेला मत्स्य व हा एकच असावा ( तै. ब्रा. १. ५. २. १ ). यानें कोणतेंहि यज्ञकर्म शुभवेळीं सुरूं करण्याचा संप्रदाय शतद्युम्नाकडून सुरूं केला ( ध्वसन् द्वैतवन पहा ).

**माथव**—विदेघाचें पैतृक नांव.

**माथैल्य**—( सो. ऋक्ष. ) उपरिचर वसूचा पुत्र ( मत्सिल्ल पहा ).

**मादि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**मादी**—न्यूह नामक म्लेच्छाचा कनिष्ठ पुत्र जो याकूत त्याचा हा पुत्र ( भवि. प्रति. १. ५ ).

**माद्री**—ही मद्रदेशचा राजा शल्य याची बहीण होय. हिच्या बापाचें नांव ऋतायन. रावी व चिनाब या नद्यांमधील पंजाबचा भाग म्हणजेच मद्र देश होय. या देशाची राजधानी शाकल होती ( म. स. ३५. १४ कुं. ). मद्र देशच्या राजकन्यांस माद्री हें नांव सर्वसाधारण दिलेलें आहे. पांडु राजाकरितां भीष्मानें हिची मागणी केली. तेव्हां त्या देशांतल्या रीतीप्रमाणें शल्यानें वैभव व दागदागिने घेऊन माद्रीस भीष्माच्या स्वाधीन केलें. पुढें भीष्मानें हस्तिनापुरीं पांडूचा माद्रीशीं विवाह केला (म. आ. ११३). पांडूला किंदम मुनीनें शाप दिल्यानंतर पांडूबरोबर माद्रीहि वनांत राहण्यास गेली. तेथें ऋषींच्या सांगण्यावरून पांडूनें कुंतीस पुत्रोत्पादन करण्यास सांगितलें. तिनें दुर्वासाच्या आकर्षणमंत्रप्रभावानें तीन मुलें उत्पन्न केलीं. तदनंतर पुत्रोत्पादन करण्याचें तिनें नाकारिलें. तेव्हां माद्रीच्या विनंतीवरून पांडूनें माद्रीला तो मंत्र कुंतीकडून देवविला. त्या मंत्रानें स्मरण केल्यामुळें हिला अश्विनीकुमारांपासून नकुल व सहदेव असे दोन पुत्र झाले ( भा. ९. २२. २८ ). पुढें एके दिवशीं ही एकटीच मृगया करणाऱ्या पांडूबरोबर हिंडत होती. त्या वेळीं वसंत ऋतु होता व ही अतिशय सुंदर दिसत होती. शिवाय त्या वेळीं ही पातळ नेसली होती. अशा समयीं पांडूस कामेच्छा उत्पन्न होऊन त्यानें हिला ही नको नको म्हणत असतां आलिंगन दिलें. अर्थात् शापाप्रमाणें पांडूस मृत्यु आला. त्या वेळीं कुंतीला आपल्या मुलांस सांभाळण्यास सांगून हिनें सहगमन केलें ( म. आ. १३३-१३४ कुं. ).

२ ( २ लक्ष्मणा पहा ).

३ सोमवंशांतील क्रोष्टूची बायको. हिच्या मुलांचीं नांवें युधाजित् व देवमीढुष. वृष्णि व अन्धक अशींहि आणखी दोन मुलें हिला दिलीं आहेत ( ब्रह्म. १४. १-३ ).

४ सात्वतपुत्र वृष्णीची स्त्री.

**माधव**—उत्तम मनूचा एक पुत्र.

२ भौत्य मनूचा एक पुत्र.

३ ( मथित पहा ).

४ मध्वाचार्यांचा पिता.

५ तालध्वज नगरांतील विक्रम राजाचा पुत्र. एकदां हा चंद्रकला नामक क्षत्रिय स्त्रीवर लुब्ध झाला असतां, तिनें यास सुलोचना या सुंदर राजकन्येची माहिती पुरवली व तिच्याशीं लग्न लावण्यास सांगितलें. तेव्हां माधव आपल्या दिव्य घोड्याच्या साहाय्यानें समुद्र ओलांडून लक्षद्वीपांत त्या राजकन्येच्या नगरींत आला. हा आला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं तिचा एका विद्याधराशीं विवाह व्हावयाचा होता. पण पुढें पत्रोपपत्रीं त्या राजकन्येचें याच्यावर प्रेम बसलें व तिनें यास लग्नमंडपांत आपलें पाणिग्रहण करण्यास सांगितलें. पण लग्नसमयीं यास झोंप लागल्यामुळें तिचें हरण प्रचेष्ट नामक याच्या सेवकानें केलें. पुढें सुलोचनेनें त्याच्या हातावर तुरी देऊन सुषेण राजाकडे वीरवर नामक पुरुषाचे वेषानें नोकरी धरिली. व तेथें तिनें एक गेंडा मारिला ( धर्मबुद्धि पहा ). पुढें तिनें प्रचेष्ट व विद्याधर गंगातीरीं प्राण द्यावयास आले असतां त्यांस प्रतिबंधांत ठेविलें. पुढें माधवहि हिच्या शोधाविषयीं निराश होऊन जीव द्यावयास आला असतां तिनें याचें निवारण करून यास आपली ओळख दिली. पुढें यांचा विवाह होऊन माधव प्रख्यात विष्णुभक्त झाला ( पद्म. कि. ५-६ ).

६ एक धार्मिक ब्राह्मण. यानें होमाकरितां एक बोकड आणिला होता. त्याचा हा वध करणार, इतक्यांत त्या बोकडानें मनुष्य-वाणीनें यास आपला पूर्वजन्म सांगून स्वतःस दुःखमुक्त करण्या-साठीं गीतेचा नववा अध्याय म्हणावयास सांगितला. माधवानें तो म्हणतांच बोकड उद्धरून गेला ( पद्म. उ. १८३ ).

**माधवी**—ही नहुषकुलोत्पन्न ययाति राजाची कन्या ( म. उ. ११५ ). ही अल्पवयी होती. हिला एका ब्रह्म-निष्ठानें ' ही कितीदांहि प्रसूत झाली, तरी प्रसूतिअंतीं हिची यौवनहानि न होतां ही कुमारीच राहील,' असा वर दिला होता. गुरुदक्षिणा देण्यास मदत करण्याकरितां गरुडानें आपला मित्र ययाति राजा याजकडे गालवाला आणिलें. त्या वेळीं आपला सर्व पैसा धर्मकार्यांत खर्च केल्या-कारणानें त्याजवळ पैसा नव्हता; परंतु गालवाला विन्मुख परत कसा पाठवावा, या विचारानें ययातीनें माधवीला त्याच्या हवालीं करून ' हिच्याबद्दल दुसरे राजे तुला पैसे देतील, इतकेंच नव्हे तर राज्यसुद्धां देतील, ' असें सांगितलें ( म. उ. ११६ ).

ही अतिसुंदर व सुलक्षणी कन्या होती. हिला घेऊन गालव ऋषि इक्ष्वाकुकुलोत्पन्न हर्यश्व राजाकडे गेला. हर्यश्व राजास पुत्रसंतान नव्हतें व त्याकरितां त्यानें पुष्कळ प्रयत्न केले. माधवीला पाहतांच तो काममोहित झाला. पण माधवीची किंमत देण्याइतके ८०० अश्व एका कानानें काळे व चंद्रासारखी प्रभा असलेले त्याजवळ नव्हते. तशा प्रकारचे फक्त दोनशेंच अश्व त्याजवळ होते. तेवढेच देऊन व कांहीं कालानें पुत्रप्राप्तीनंतर माधवीला परत करण्याचा करार करून हर्यश्व राजानें माधवीला ठेवून घेतलें. गालव ऋषीचें कार्य करण्याकरितां माधवीनें स्वतःला चार राजांस देण्यास सांगून आपल्याला मिळालेल्या वराची हकीगत सांगितली. माधवीपासून हर्यश्वाला वसुमनस् नांवाचा पराक्रमी पुत्र झाला. त्रिकालज्ञ गालव ऋषि ह्यानंतर कराराची मुदत संपतांच हर्यश्वाकडे आला. राजानें आपल्या वचनाप्रमाणें माधवीस गालवाचे स्वाधीन केलें व माधवीहि राज्यवैभवाच्या मोहास न गुंततां त्याबरोबर खुषीनें निघाली. ब्रह्मनिष्ठाचे वराप्रमाणें माधवी पुनः कुमारी झाली.

पुढें गालव माधवीला घेऊन दिवोदास राजाकडे गेला. दिवोदासानें गालवाला दोनशें अश्व दिले व हर्यश्व राजाप्रमाणेंच करार करून माधवीला पुत्रोत्पत्तीकरितां ठेवून घेतलें. तिच्या-पासून दिवोदासाला प्रतर्दन नांवाचा पुत्र झाला. कराराची मुदत संपतांच गालव दिवोदासाकडे आला व माधवीला घेऊन गेला. शेवटीं गुरुदक्षिणेच्या पूर्तीकरितां गालवानें माधवीला भोजनगरीच्या उशीनर राजाकडे नेलें. वरीलप्रमाणेंच करार करून राजानें गालवाला दोनशें अश्व देऊन माधवीला ठेवून घेतलें. उशीनराला हिच्यापासून शिबि नांवाचा पुत्र झाला. करार संपल्यावर उशीनरापासून माधवीला घेऊन गालव चालला असतां, त्याला गरुड भेटला. त्यानें यापुढें तसले अश्व मिळणें शक्य नाहीं, करितां मिळालेले सहाशें अश्व व बाकीच्या दोनशें अश्वांबद्दल माधवीलाच गुरुपुढें ठेवून गुरुदक्षिणेच्या ऋणांतून मुक्त करण्यास विश्वामित्राला विनंति करण्याला याला सांगितलें. त्याप्रमाणें गालवानें विश्वामित्राकडे जाऊन मिळालेल्या सहाशें अश्वांचा स्वीकार करण्याकरितां व बाकीच्या दोनशें अश्वांबद्दल माधवीला घेऊन तिच्या ठिकाणीं पुत्र उत्पन्न करण्याकरितां विनंति केली. विश्वामित्रानें तें कबूल करून अश्वांना आश्रमा-भोंवतीं सोडण्यास सांगितलें व आपण माधवीच्या ठिकाणीं रममाण झाला. पुढें विश्वामित्राला माधवीच्या ठायीं अष्टक नांवाचा पुत्र झाला. नंतर माधवीला गालवाचे स्वाधीन करून विश्वामित्र तपाकरितां तपोरण्यांत निघून गेला.

गालवालाहि गुरुदक्षिणा दिल्याकारणानें संतोष झाला व ज्या कन्येमुळें आपलें संकट नाहींसें झालें, त्या माधवीला ययातीकडे पोहोंचवून आपण तपश्चर्येकरितां वनांत निघून गेला ( म. उ. ११५-१२० ).

पुढें ययातीनें हिचें स्वयंवर करण्याचें ठरवून रथांतून हिला देशभर हिंडविलें. परंतु हिनें सर्व राजपुत्रांची उपेक्षा करून वनच पसंत केलें व तपश्चर्येकरितां ही अरण्यांत निघून गेली.

ययाति राजा मरणानंतर इहलोकच्या पुण्यकर्मानें स्वर्गांत गेला असतां, त्याच्या मनांत देव, ऋषि, ब्राह्मण यांच्याविषयीं तिरस्कार उत्पन्न झाल्यामुळें त्याला देवांनीं स्वर्गांतून खालीं ढकलिलें. पण त्याच्या विनंतीवरून सत्संग मिळावा, म्हणून त्यांनीं त्याला त्याचे पौत्र-माधवीचे मुलगे-वसुमनस्, प्रतर्दन, शिबि आणि अष्टक ज्या ठिकाणीं यज्ञ करीत होते, त्या नैमिषारण्यांत टाकिलें. त्या चौघांनीं स्वर्गांतून पडलेल्या ययाति राजाला आपल्या यज्ञाचें व धर्माचरणाचें फळ घेण्यास विनंति केली. इतक्यांत माधवी त्या ठिकाणीं आली. तिच्याकडून त्या चौघांना, ययाति राजा आपला आजा आहे, असें कळलें. नातवांच्या पुण्याईचें फळ हक्कानें पूर्वजांना घेतां येतें, असें सांगून आपल्या चारी मुलांच्या यज्ञाचें पुण्य घेऊन स्वर्गीं जाण्याला तिनें ययातीला सांगितलें. अशा रीतीनें सुकन्या माधवीनें गालवाला संकटांतून मुक्त करून आपल्या मुलांच्या पुण्याईनें स्वर्गच्युत अशा आपला बापाला पुनः स्वर्गांत चढविलें ( म. उ. १०६-१२० ). ययातीला तारल्याची व ययाति या चौघांचा मातामह असल्याबद्दलची कथा मत्स्यपुराणांत आहे. पण तेथें माधवीचा निर्देश नाहीं ( मत्स्य. ३५-४२ ). माधवीची कथा तत्त्वप्रतिपादनार्थ असल्यानें तिच्यांत कालविपर्यास दिसून येतो.

२ धर्मध्वज राजाची स्त्री व तुलसीची माता.

३ पूरुपुत्र जनमेजयाची स्त्री.

**माधुकि**—एक आचार्य ( श. ब्रा. २. १. ४.२७ ).

**माधुच्छंदस**—विश्वामित्रकुलोत्पन्न गोत्रकार ( अघमर्षण व जेतृ पहा ).

**माध्यंदिन**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

२ व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याच्या पंधरा शिष्यांपैकीं एक. हा शाखाप्रवर्तक होता.

यानें शुक्लयजुर्वेदाची एक शिक्षा केली आहे. हिच्यामध्यें चाळीस श्लोक आहेत. आणखी दुसरी लघुमाध्यंदिन नांवाची एक शिक्षा याच्या नांवावर आहे. ती सुद्धां शुक्लयजुर्वेदाची आहे व तिच्यामध्यें अठ्ठावीस श्लोक आहेत.

**माध्यंदिनायन**—सौकरायणाचा शिष्य. याचा शिष्य जाबालायन ( बृ. उ. ४. ६. २ ).

**माध्यम**—एक आचार्य. ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडळाच्या द्रष्ट्यांना हें नांव सामान्यपणें लाविलेलें आढळतें ( सां. आ. १२. ३; ऐ. आ. २. २. १ ). आश्वलायन गृह्यसूत्राच्या ब्रह्मयज्ञांगतर्पणांतहि याचा उल्लेख आहे.

**मान**—अगस्त्याचें हें दुसरें नांव आहे ( ऋ. ७. ३३. १३ ). मान्याचा पिता हाच असावा. अगस्त्य व मान्य हे दोघेहि मैत्रावरुण या पैतृक नांवानें संबोधिले जातात.

**मानदंतव्य**—एक आचार्य ( खा. गृ. २. १. ५; गो. गृ. १. ६. १ ) मानुतंतव्य व हा एक असावा.

**मानदास**—एक चांभार. याचा पुत्र रैदास.

**मानव**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

२ उत्तम मन्वंतरांतील देवविशेष.

३ नाभानेदिष्ठाचें ( ऐ. ब्रा. ५. १४. २ ) व शार्यांताचें हें पैतृक नांव आहे ( श. ब्रा. ४. १. ५. २; चक्षुस् व नाहुष पहा ). याच्या नांवावर पुढील ग्रंथ आढळतात—मानव उपपुराण ( दे. भा. ३. ३), मानवधर्मसूत्र, आदित्यपुराण, मानववास्तुलक्षण.

**मानवी**—हें इडेचें ( श. ब्रा.१. ८. १. २६; तै. सं. २. ६. ७. ३ ) आणि पर्शु या स्त्रीचेंहि पैतृक नांव आहे ( ऋ. १०. ८६. २३ ).

**मानस**—ज्योतिर्भास लोकांत राहणारे पितर (पितर पहा).

२ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

३ वशवर्तिन् देवांतील एक.

**मानारि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**मानिनी**—( राज्यवर्धन पहा ).

**मानुतंतव्य**—ऐकादशाक्षाचें हें पैतृक नांव आहे ( ऐ. ब्रा. ५. ३० ). दोन सौमाप मानुतांतव्यांचा शतपथ ब्राह्मणांत उल्लेख आहे ( १३. ५. ३. २ ).

**मान्दार्य मान्य**—अगस्त्यानें आपणांस लावून घेतलेलें हें पैतृक नांव असावें. अगस्त्याच्या सूक्ताच्या शेवटल्या ऋचेंत सूक्तकाराला हीं विशेषणें लाविलेलीं असतात ( ऋ. १. १६५. १५; १६६. १५; १६७. ११; १६८. १० ).

**मांधातृ**—(सू. इ.) याच्या अग्नीचा मोठा लौकिक होता ( ऋ. ८. ३९. ८; १०. २. २ ). नाभाकानें मी याच्याप्रमाणें स्तुति करीत असल्याचें लिहिलें आहे ( ऋ. ८. ४०. १२ ). याला राज्य मिळवितांना अश्वींचें साहाय्य होतें ( ऋ. १. ११२. १३ ). पण या सर्व ठिकाणीं मांधातृ असा शब्द नसून मंधातृ असा शब्द आहे. विचारिन् कावंधि पैसे मिळविण्याकरितां याच्याकडे आला होता ( गो. ब्रा. १.२.१० ).

युवनाश्व राजाचा पुत्र होय. यास यौवनाश्व असेंहि नामांतर आहे. याचें वायुमतें मूळ नांव गौरिक होय. युवनाश्वास शंभर स्त्रिया होत्या. परंतु त्यांतील एकीलाहि पुत्र झाला नाहीं. त्यामुळें युवनाश्व नेहमीं दुःखी असे. एकदां स्त्रियांसह अरण्यांत हिंडत असतां तो एका आश्रमांत गेला. तेथील ऋषींनीं युवनाश्वाकडून पुत्रप्राप्त्यर्थ एक यज्ञ करविला. यज्ञ झाल्यावर भोजन होऊन सर्वजण झोंपी गेले असतां युवनाश्वास तहान लागली. तेव्हां त्यानें ऋषींनीं राजपत्न्यांकरितां तयार केलेलें व ज्यामध्यें पुत्रोत्पादनाचें सामर्थ्य आहे, असें

जल ( पृषदाज्य ) पिऊन टाकिलें. पुढें त्या जलाच्या योगानें युवनाश्वाच्या उदरांत गर्भ राहिला व त्याची पूर्ण वाढ झाल्यावर ऋषींनीं युवनाश्वाच्या कुक्षीचा भेद करून त्याच्या उदरांतील बालकास बाहेर काढिलें. परंतु या बालकाचें पोषण कोण करणार अशी सर्वांस चिंता पडली. इतक्यांत प्रत्यक्ष इंद्र त्या ठिकाणीं आला व त्यानें ' हा मला पिईल ' असें म्हणून आपली अमृतपूर्ण करांगुली याला पिण्यास दिली. त्यामुळें या बालकाचें नांवहि मांधातृ असेंच ठेवण्यांत आलें ( म. व. १२७; द्रो. ६२; शां. २८. ८१ कुं.; भा. ९. ६; विष्णु. ४. २; दे. भा. ७. ९-१० ).

याला इंद्रहस्ताचें पान घडल्यामुळें हा अतिशय बलवान् झाला व झपाट्यानें वाढूं लागला. बारा दिवसांचा असतांच हा बारा वर्षांच्या मुलाएवढा दिसूं लागला. नंतर हा सर्व विद्यांत प्रवीण होऊन तप करूं लागला. आपल्या तपःसामर्थ्यानें यानें अजगव नांवाचें धनुष्य व इतर दिव्यास्त्रें मिळविलीं. त्यायोगें हा अजिंक्य झाला व अंगार, मरुत्त, गय, बृहद्रथ वगैरेंना यानें जिंकिलें. यानें एका दिवसांत सर्व पृथ्वी पादाक्रान्त केली व जयसूचक असे शंभर राजसूय व अश्वमेध यज्ञ केले. याच्या पराक्रमाविषयीं असें म्हटलें आहे कीं—

यावत्सूर्य उदेति स्म यावच्च प्रतितिष्ठति ।
सर्वं तद्यौवनाश्वस्य मांधातुः क्षेत्रमुच्यते॥ विष्णु. ४. २.

मांधाता अत्यंत दानशूर होता. हा दस्यूंपासून लोकांचें रक्षण करी, म्हणून त्रसद्दस्यु असें याचें नांव पडलें. यानें रावणाचा पराजय केला होता ( भा. ९. ६६. ३२ ). यानें शशबिंदूची कन्या बिंदुमती इच्याशीं विवाह केला. तिच्यापासून याला मुचकुंद, अम्बरीष व पुरुकुत्स असे तीन पुत्र झाले. याला पुरुकुत्स, धर्मसेतु, मुचकुंद व शक्रमित्र असे चार पुत्रहि दिलेले आहेत ( पद्म. सृ. ८ ).

याला पन्नास कन्या होत्या. एके दिवशीं सौभरी नांवाचा एक ऋषि याच्याकडे आला व याची एक कन्या भार्यार्थ मागूं लागला. परंतु जख्ख झालेल्या त्याला आपली मुलगी देणें याला प्रशस्त वाटलें नाहीं. म्हणून यानें ऋषीस सांगितलें कीं, ' तुम्ही माझ्या कन्यांच्या अंतर्गृहांत जा व जिला तुमची भार्या होणें इष्ट वाटत असेल, ती स्वखुषीनें तुम्हांस माळ घालील. तिचा तुम्ही स्वीकार करा. ' सौभरीनें मांधात्याचें कपट ओळखून उत्तम रूप घेतलें व तो अंतःपुरांत गेला. त्याला पाहिल्याबरोबर ' हा माझा पति ' असें म्हणत सर्वहि कन्या त्याला वरण्याची इच्छा करूं लागल्या. तेव्हां अर्थात् मांधात्याला त्या सर्व कन्या सौभरीस देणें भाग पडलें ( भा. ९. ६; पद्म. उ. २६२; विष्णु. ४. २; गरुड. १. १३८ ). यानें आपलें रक्तहि अतिथीस दिल्याची आख्यायिका आहे.

हा राज्य करीत असतां एकदां बराच काल अवर्षण पडून याच्या राज्यांत हाहाःकार उडाला व वेदाध्ययनादि कर्में बंद पडलीं. यानें पुष्कळ विचार केला, परंतु दुष्काळाचें कारण याला समजलें नाहीं. पुढें आंगिरस ऋषि याच्याकडे आला असतां यानें त्यास दुष्काळाचें कारण विचारतां, आंगिरसानें सांगितलें कीं, ' तुझ्या राज्यांत एक वृषल तप करीत आहे. त्याचा तूं वध करशील, तर दुष्काळ नाहींसा होईल. ' परंतु मांधात्यानें तपस्व्याचा वध करण्याचें नाकारून स्वतःच दुष्काळनिवारणार्थ उग्र तप केलें व पद्मा नांवाची एकादशी केली. त्यामुळें पाऊस पडून दुष्काळनिवारण झालें ( पद्म. उ. ५७ ). हा इंद्राचा मित्र असल्याचा उल्लेख आहे. यास वसुदमानें दंडनीतीची माहिती सांगितली ( म. शां. १२२ कुं. ). याला उतथ्यानें राजनीति सांगितली. ती उतथ्यगीता या नांवानें प्रसिद्ध आहे ( म. शां ९० कुं. ). यानें वरूथिनी एकादशी केली होती ( पद्म. उ. ४८ ).

पुढें दैवयोगानें याला आपल्या पराक्रमाचा गर्व होऊन स्वर्ग जिंकण्याची व इंद्राच्या अर्ध्या आसनावर बसण्याची दुर्बुद्धि होऊन यानें इंद्राला युद्धार्थ बोलाविलें. परंतु इंद्रानें याला लवणासुराशीं लढण्यास सांगितल्यावरून हा लवणाकडे गेला. नंतर लवणाशीं याचें युद्ध होऊन त्यांत हा मारिला गेला ( वा. रा. उ. ६७ ). हा क्षत्रिय असून ब्राह्मण झाला होता ( वायु. २. २९. ११४ ).

**मान्य**—( मान्दार्य मान्य पहा ).

**मान्य मित्रावरुण**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ६७ ).

**मान्यमान**—देवकाचें पैतृक नांव.

**मान्यवती**—ही भीमाची कन्या व कांधमपुत्र अविक्षिताची स्त्री. त्यानें स्वयंवरांत हिला पळविलें ( मार्क. ११९. १७ ).

**मामतेय**—दीर्घतमस्चें मातृक नांव.

**मांधुधि**—कुशिककुलांतील मंत्रकार.

**माया**—अधर्म व मृषा यांची कन्या ( भा. ४. ८. २ ). ब्रह्मदेवानें सृष्टि निर्मितांना हिचें साहाय्य घेतलें व तें हिनें सप्तरूपांनीं दिलें.

१ गायत्री—हिच्यापासून सर्व वेद, व वेदांपासून सर्व जगत् उत्पन्न झालें.

२ सत्यवती—हिच्यापासून सर्व औषधी व जीवपोषक वनस्पति झाल्या.

३ ज्ञानविद्या—हिच्यापासून सर्व शास्त्रें उत्पन्न झालीं.

४ लक्ष्मी—हिजपासून वस्त्रें व भूषणें निर्माण झालीं.

५ उमा—हिनें शंकराच्या आश्रय करून शास्त्रांचा प्रसार केला, म्हणून हिलाच ज्ञानमाता म्हणतात.

६ वर्णिला—हिनें सर्व जगाच्या पालनसंहाराचें काम आपल्याकडे घेतलें व हिनेंच मधु, कैटभ व रुरु हे दैत्य मारिले.

७ धर्मद्रवा—हीच गंगा.

**मायामोह**—विष्णूनें दैत्यवंचनार्थ घेतलेला पाखंडमतप्रवर्तक अवतार (विष्णु. ३. १८; बुद्ध पहा).

**मायावती**—मदनस्त्री रतीस शम्बरगृहीं पडलेलें नांव. शंकरानें मदनाचा नाश केल्यावर ही शंबरासुराकडे राहिली होती. पुढें प्रद्युम्न मदनरूपानें अवतरल्यावर हिनें प्रद्युम्नाकडून शंबराचा वध करविला व त्याच्याशीं लग्न केले (भा. १०. ५५. १६; विष्णु. ५. २७).

२ (बुद्ध पहा).

**मायावर्मन्**—अंगदेशचा राजा. याला प्रमदा नामक स्त्री असून तीपासून मत्त, प्रमत्त, उन्मत्त, सुमत्त, दुर्मद, दुर्मुख, दुर्धर, बाहु, सुरथ व विरथ असे दहा पुत्र व मदिरेक्षणा नामक कन्या झाली (भवि. प्रति. ३. ३१).

**मायाविन्**—मयासुरास हेमेपासून झालेला पुत्र. हा वालीच्या हातून मरण पावला (वा. रा. उ. १२). याच्या आईचें नांव रंभा असें आढळतें (ब्रह्मांड. ३. ६. २८-३०).

**मायु**—तान्व व पार्थ यांच्यासह याचा उल्लेख आला आहे (ऋ. १०. ९३. १५).

**मारिषा**—प्रचेत्यांची स्त्री. हिला प्राचेतस दक्ष हा पुत्र होता. ही कंडूपासून प्रम्लोचेच्या ठिकाणीं उत्पन्न झाली. जन्मतः हिला आईनें एका झाडाखालीं टाकून दिलें; तेव्हां ही भुकेनें रडूं लागली असतां, सोमाला करुणा येऊन त्यानें आपली तर्जनी हिच्या तोंडांत घातली त्या तर्जनींतून स्रवत असलेल्या अमृतावरच हिचा निर्वाह झाला (विष्णु. १. १५; ब्रह्म. १७८). ही वृक्षकन्या म्हणून हिला वार्क्षी म्हणत असावेत (भा. ४. ३०. ४७; म. आ. २११. १५ कुं.).

**मारीच**—सुंदापासून ताटकेस झालेल्या दोन मुलांतील वडील मुलगा (वा. रा. बा. २५). याच्या अंगांत दहा हजार हत्तींचें बल होतें. सुमालि राक्षसाच्या चार अमात्यांपैकीं हा एक होता. हा आपल्या आईसह मलद व करूष देशांत राहत असून तेथून जवळच होणाऱ्या विश्वामित्राच्या यज्ञास त्रास देत असे; म्हणून विश्वामित्रानें यज्ञसंरक्षणार्थ रामाला आणिलें. रामानें सुबाहूला ठार केलें व हा बाणाच्या पिसाऱ्यानें उडून समुद्रांत जाऊन पडला (म. स. ५०. ५ कुं.). पुढें हा लंकेंत रावणाच्या आश्रित बनून राहिला.

पुढें सीतेसह रामलक्ष्मण पंचवटींत येऊन राहिले, हें याला रावणानें यांचें वैर जागृत होऊन हा दोन राक्षसांसह तेथें आला व हरणाचें रूप घेऊन भोंवतीं फिरूं लागला. रामानें हें जाणून बाण टाकिले. त्यामुळें बरोबरचे दोघे मेले. हा मात्र जीव घेऊन पळाला (वा. रा. अर. ३८-३९).

पुढें रावणाला सीता पळविण्याची बुद्धि झाली. तेव्हां तो याजकडे आला व म्हणूं लागला कीं, 'तूं मला साहाय्य कर.' पण याला रामाची फारच दहशत बसली होती. र हें अक्षर येणारे राजीव, रत्न, रमणी हे शब्द ऐकले तरीसुद्धां याला धडकी भरे. त्याप्रमाणें रावणालाहि यानें सांगितलें. पण रावणानें याला साहाय्य न केल्यास मारण्याचा धाक दाखविल्यामुळें याचा निरुपाय झाला (वा. रा. अर. ४०-४१). पुढें पंचवटींत आल्यावर यानें सुंदर मृगाचें रूप धारण करून सीतेला, अशा हरणाच्या कातड्याची आपल्याला चोळी असावी, असा लोभ उत्पन्न केला. त्यामुळें राम याचे मागें लागून त्यानें यास ठार केलें (वा. रा. अर. ४३-४५; म. व. २७९. २१ कुं.; ब्रह्मांड. ३. ५. ३६). पण मरतांना 'लक्ष्मणा धांव' असा रामासारखा आवाज यानें काढिला. त्यामुळें रामावर कांहीं संकट आलें आहे, असें समजून सीतेनें लक्ष्मणाला रावणाच्या संरक्षणार्थ पाठविलें व इकडे रावणानें सीता पळविली. याला ब्रह्मदेवाकडून देवांना अवध्य असा वर होता (वा. रा. अर. ३८).

हा यक्षिणीपासून झाला. परंतु आपल्या पित्याला मारलेलें पाहून हा अगस्त्य ऋषीवर धांवला. तेव्हां 'तूं राक्षस हो' असा याला शाप मिळून हा या जन्मीं राक्षस झाला होता (वा. रा. बा. २५).

२ कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**मारीचि**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**मारुत**—भृगुकुलोत्पन्न गोत्रकार ऋषिगण.

२ अंगिराकुलांतील गोत्रकार.

३ नितान व द्युतान यांचें पैतृक नांव.

**मारुतन्तव्य**—विश्वामित्र ऋषीचा पुत्र.

**मारुताश्व**—विदथाचें पैतृक नांव (ऋ. ५. ३३. ९).

**मार्कट**—(२ मार्कंड पहा).

**मार्कटि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**मार्कंड**—भृगुकुलांतील गोत्रकार.

२ अंगिराकुलांतील गोत्रकार. मार्कट असा ह्याबद्दल पाठभेद आहे.

**मार्कंडेय**—मृकंडाचा पुत्र (पद्म. सृ. ३३; अग्नि. २०. १०; विष्णु. १. १०. ३; म. व. १३०. ७ कुं. नारद. १. ४; भा. ४. १). मार्कंडेय भृगुवंशांतील एक गोत्रोत्पादक होता (मत्स्य. १९५. २०). मार्कंडापासून मार्कंडेय अशी संज्ञा उपयोगांत आणलेली आहे (मत्स्य. १०३. १३-१५). याचा दीर्घायुषी व प्रसिद्ध ऋषि म्हणून जागोजाग उल्लेख आढळतो (म. व. ८८;

१८३). पूर्वी मार्कंडेय या नांवाचा वंश होऊन गेला असावा. तरी याचा दीर्घायुषी म्हणून उल्लेख येतो; व हा अमर असल्याचें दिलें आहे (भा. १२. ८; म. व. १८३; पद्म. सृ. ३३). मार्कंडेय हा दहाव्या त्रेतायुगांत झाला. याला धूमोर्णा नांवाची बायको होती (म. अनु. २४८ कुं.). हा प्रारंभीं अल्पायुषी होता, पण पुढें दीर्घायुषी झालेला आहे. यास फक्त सहा महिन्यांचें आयुष्य होतें. परंतु पांच महिने व चोवीस दिवस गेल्यावर पंचविसावे दिवशीं यास सप्तर्षींचें दर्शन झालें. त्यांनीं याला 'दीर्घायुषी हो' असा आशीर्वाद दिला. त्याप्रमाणें ब्रह्मदेवानेंहि यास कल्पान्तापर्यंत आयुष्य, पुराणरचयितृत्व व ऋषिश्रेष्ठत्व दिलें (नारद. १. ५; पद्म. सृ. ३३). हा ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत होता (पद्म. सृ. ३४). याला कल्पांतींच्या वटवृक्षाचें व प्रलयाचें दर्शनहि झालें होतें (ब्रह्म. ५२–५३). देवानें त्या वेळीं याला पोटांत ठेविलें होतें. तेथें याला अंत लागेना, तेव्हां देवाचें यानें स्तवन केलें. त्यामुळें यास भगवद्दर्शन झालें (ब्रह्म. ५४-५६). याची पांचवे वर्षी मुंज झाली (भा. १२. ८; नारद. १. ५; पद्म. सृ. ३३). सप्तर्षींनीं याला यज्ञोपवीत व दंड दिला होता (पद्म. सृ. ३३). यानें आपला एक आश्रम स्थापिला होता. यासंबंधीं सर्व माहिती पुलस्त्यानें रामास सांगितली (नारद. १. ५). मयसभेंत पांडवांनीं प्रवेश केला, त्या वेळीं हा तेथें होता (म. स. ४. २१ कुं.). ब्रह्मसभेंत पांडव गेले, त्या वेळींहि हा तेथें होता (म. स. ११. २२ कुं.). धर्म मार्कंडेयाश्रमीं गेला असतां लोमश ऋषीनें त्यास मार्कंडेयचरित्र सांगितलें (म. व. १३०. कुं.). धर्मराज वनवासांत असतां हा त्यास भेटण्यास गेला होता. त्या वेळीं श्रीकृष्णहि तेथें होता. नारदाच्या सांगण्यावरून यानें पांडवांस पारलौकिक गति, भूपतीचें महत्त्व, तार्क्ष्य-सरस्वतीसंवाद, वैवस्वत मनुचरित्र, युगनिरूपण, विष्णुदर्शन, विष्णुउदरप्रवेश व निर्गमन, विष्णुस्वरूपकथन, कलियुगवृत्त, कल्कीअवतार व कृतयुगप्रारंभ यांसंबंधीं सर्व निवेदन केलें (म. व. १८३-१९३). यानें धर्मराजास प्रयागमाहात्म्य सांगितलें (मत्स्य. १०३–११२). नारदानें यास चार युगें व भार्याधर्म यांचें निवेदन केलें (म. अनु. ५४; ५७ कुं.). याची व पांडवांची भेट झाली असतां यास रामाची आठवण होऊन यानें 'सामर्थ्य असतां अधर्म आचरूं नये,' असा उपदेश केला (म. व. २५. ४ कुं.). यानें हेममालीस व्रत देऊन त्यास शापापासून मुक्त केलें (पद्म. पा. ५२). यानें भद्रतनु ब्राह्मणास दान्तापासून उपदेश घेण्यास सांगितलें (पद्म. क्रि. १७).

मार्कंडेयानें अत्यंत घोर तप केलें. तें सहा मन्वंतरें चाललें होतें. तेव्हां पुरंदर नामक इंद्रानें याला मोहित करण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले. प्रथम वसंतऋतु उत्पन्न केला. नंतर अप्सरा, गंधर्व यांसह मदन पाठविला. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर यास नरनारायणांचें, मायेचें, बालमुकुंदाचें व शंकराचेंहि दर्शन झालें. शंकरानें यास खालील वर दिला. 'तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतील, यश अविच्छिन्न राहील, त्रिकालज्ञान प्राप्त होईल, आत्मनात्मविचार उत्तम समजेल. श्रेष्ठ पुराणिक होऊन कल्पसमाप्तीपर्यंत अजरामर होशील' (भा. १२. ८-१०). शंकरानें यास चवदा कल्पांचें आयुष्य दिलें (भा. ४. १. ४५; म. व. १३०. ३२ कुं.). याचा पुत्र वेदशिरस् (विष्णु. १. १०. ४). याच्या नांवावर पुढील ग्रंथ आढळतात. १ मार्कंडेयस्मृति, २ मार्कंडेयसंहिता. तसेंच यानें एक मार्कंडेयस्तोत्र नामक शिवाचें स्तोत्रहि केलें आहे (C. C.). यानें तामसपुराणांपैकीं मार्कंडेय व वाराह हीं पुराणें रचिलीं (भवि. प्रति. ३. २८. १३).

२ हा दशरथाच्या उपऋत्विजांपैकीं एक असून (वा. रा. बा. ७) दाशरथि रामाच्या आठ धर्मशास्त्र्यांतील एक होता (वा. रा. उ. ७४. ४). यानें रामाला अवियोगद कूप दाखविला (पद्म. सृ. ३३). सीतास्वयंवरप्रसंगीं हा रामाच्या बाजूनें मिथिलेस गेला होता (वा. रा. बा. ६९. ४).

३ व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील इंद्रप्रमतीचा शिष्य. वायुमतें मांडुकेयावद्दल पाठभेद आहे (व्यास पहा).

**मार्गणप्रिया**—कश्यप व प्राधा यांची कन्या.

**मार्गपथ**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**मार्गवेय**—हें रामाचें मातृक नांव (राममार्गवेय पहा).

**मार्गेय**—भृगुकुलांतील गोत्रकार. भार्गेय असा पाठ आहे.

**मार्जार**—जांबवानाचा पुत्र. यापासून मांजर जात झाली (ब्रह्मांड ३. ७. ३०६).

**मार्जारास्या**—केसरी वानराची पत्नी. हिला निर्ऋतीपासून घर्घरस्वन नांवाचा पुत्र झाला (आ. रा. सार. १३).

**मार्जारि**—(सो. मगध. भविष्य.) भागवतमतें जरासंधाचा पौत्र व सहदेवाचा पुत्र. याचा पुत्र श्रुतश्रवस्. यास इतर पुराणांत सोमाधि किंवा सोमापि म्हटलें आहे.

**मार्तंड**—द्वादशादित्यांपैकीं आठवा (म. आ. ६९. १५ कुं.; भा. ५. २०. ४४; ब्रह्मांड. ३. ७. २७८-२८८). याचा अर्थ मृत असा होतो. जेथें सूर्य सात महिने क्षितिजावर असतो व आठव्या महिन्यांत अस्तंगत होतो, त्याचें हें निदर्शक आहे (आर्यांचें मूलस्थान, पा. १३३). कामधेनूचा पति (म. अनु. ११७. ११ कुं.).

**मार्तिकावतक**—शाल्वाचें नामांतर (म. द्रो. ४८.८ कुं.).

२. चित्ररथ गंधर्वाचें नांव ( म. व. ११७. ६ कुं. ).

**मार्दमर्षि**—विश्वामित्राचा पुत्र.

**मार्दपिंगालि**—अंगिराकुलोत्पन्न गोत्रकार.

**मार्ष्टि**—( सो. वसु. ) विष्णुमतें सारणाचा पुत्र.

**मार्ष्टिमत्**—(सो. वसु.) विष्णुमतें हा सारणाचा पुत्र.

**मालती**—शत्रुघातिन् राजाची पत्नी.

२ अश्वपति राजाची स्त्री. हिच्याबद्दल मालवी असा पाठभेद आढळतो ( सावित्री पहा ).

**मालय**—गरुडाचा एक पुत्र ( म. उ.१०१.१४ कुं.).

**मालयनि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**मालव**—विदर्भ नगरींतील एक विष्णुभक्त ब्राह्मण ( पद्म. उ. २१८ ).

**मालवी**—( २ मालती पहा ).

**मालाधर**—सिद्धेश्वर नामक राजाचा पुत्र. याची स्त्री श्यामबाला ( पद्म. ब्र. ११ ).

**मालावती**—कुशध्वजाची स्त्री व वेदवतीची माता.

२ ( नारद पहा ).

**माली**—सुकेश राक्षसास देववतीपासून झालेला पुत्र. वसुदा नामक गंधर्वी ही याची स्त्री होती. तिच्यापासून यास अनल, अनिल, हर व संपाति असे चार पुत्र झाले. त्यांना मालेय अशी संज्ञा आहे. यानें पुष्कळ काल तप करून चिरंजीवित्व व अजिंक्यत्व मिळविलें होतें. विश्वकर्म्यानें यास राहण्याकरितां लंका नगरी दिली होती. हा विष्णूच्या हातून मरण पावला ( वा. रा. उ. ५ ).

**मालिनी**—या दुर्वर्तनी ब्राह्मण स्त्रीला कुत्रीचा जन्म आला असतां वैशाख शुद्ध द्वादशीला त्याच द्वादशीव्रताचें पुण्य मिळाल्यानें मुक्ति मिळाली व ही उर्वशी झाली (स्कंद. २.७.२४).

२ वीरवर्मन् राजाची कन्या ( वीरवर्मन् पहा ).

३ बिभीषणाच्या आईचें नांव ( म. व. २७६. ८ कुं. ).

४ द्रौपदीचें अज्ञातवासांतील नांव (म. वि १४. ४५कुं.).

५ एक अप्सरा ( म. वि. १४. ३२ कुं. ).

६ पुष्करापासून प्रम्लोचेस झालेली कन्या. ही प्रम्लोचेनें रुचीस दिली होती. हिजला त्यापासून रौच्य झाला. हाच तेरावा मनु होणार आहे ( मार्क. ९. ५ ).

**मालेय**—हे बिभीषणाचे अमात्य होते ( वा. रा. उ. ५. ४३ ).

**माल्य**—हें आर्यांचें गोत्रनाम आहे. यानें शर्करी छंदांतील मंत्र महत्वाच्या प्राचीन गोष्टीला उद्देशून रजन कौणेय व अलंम पारिजानत यांचा संवाद झाला आहे ( पं. ब्रा. १३. ४. ११ ).

**माल्यपिंडक**—नारदानें मातलीस वर म्हणून दाखविलेला सर्प ( म. उ. १०३. १३ कुं. ).

**माल्यवत्**—सुकेश राक्षसाला देववतीपासून झालेल्या तीन पुत्रांपैकीं ज्येष्ठ. सुमालि व मालि यांचा ज्येष्ठ भ्राता. हा रावणाचा मातामह होता. हे तिघे बंधु मोठे झाल्यावर नर्मदा नामक गंधर्वीनें आपल्या कन्या या तिघांना दिल्या होत्या. त्यांपैकीं सुंदरी नामक ज्येष्ठ कन्या माल्यवानाची स्त्री होय. पुढें आपल्या पित्याला तपःसामर्थ्यानें ऐश्वर्य प्राप्त झालें, हें ऐकून हा आपल्या उभय बंधूंसहित घोर तप करूं लागला. लवकरच तपश्चर्येच्या जोरावर यानें ब्रह्मदेवाला प्रसन्न केल्यावर त्यापासून वरप्राप्ति करून घेऊन त्रिकूट पर्वताच्या शिखरावरील तीस योजनें रुंद व शंभर योजनें लांब, शिवाय सुवर्णमंडित अशी लंका नामक नगरी मिळविली; व हा सपरिवार तींत जाऊन राहिला.

पुढें कांहीं कालाने हा व याचे भ्राते अत्यंत उन्मत्त होऊन हे देवादिकांस फार पीडा देऊं लागले. शेवटीं देव शंकराच्या सांगण्यावरून आपल्या भयनाशार्थ विष्णूकडे गेले. तेव्हां विष्णूनें या राक्षसांचा वध करण्याची प्रतिज्ञा करून त्यांना निर्भय केलें. विष्णूची प्रतिज्ञा याला समजतांच हा अत्यंत भयभीत होऊन तें वृत्त यानें आपल्या भ्रात्यांस निवेदन केलें. परंतु ते न डगमगतां त्यांनीं याला धीर देऊन देवांशीं युद्ध करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें राक्षस व देव यांचें युद्ध होऊन त्यांत विष्णूशीं यांचें प्रचंड युद्ध झालें. शेवटीं विष्णूनें मालीचा वध केल्यावर हा विष्णूच्या भयानें सुमालीसह पातालांत जाऊन राहिला.

इकडे लंकेमध्यें वैश्रवणानें आपलें वास्तव्य केलें होतें. पुढें कांहीं कालानें सुमालि पातालांतून बाहेर येऊन मर्त्यलोकामध्यें संचार करूं लागला असतां वैश्रवण आपला पिता जो विश्रवस् त्याच्या दर्शनासाठीं पुष्पक विमानामध्यें बसून जात असलेला त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्याच्या वैभवानें तो आश्चर्यचकित होऊन तशा प्रकारचें ऐश्वर्य आपणास प्राप्त व्हावें, म्हणून त्यानें आपली कन्या कैकसी विश्रव्याला दिली. थोड्याच काळांत तिला विश्रव्यापासून रावण इत्यादिक पुत्र झाले ( सुमालि पहा ). पुढें रावणाच्या हातीं लंकेचें राज्य आल्यावर माल्यवान् व सुमालि पातालांतील सर्व राक्षस परिवारासह लंकेमध्यें येऊन राहिले ( वा. रा. उ. ५-११ ).

पुढें रावणानें सीतेचें हरण केल्यावर तिला रामाच्या स्वाधीन करून अधर्माचा त्याग करण्याविषयीं यानें रावणाला अत्यंत हिताचा व कळकळीचा उपदेश केला ( वा. रा. यु. ३५ ). याला सुंदरी नामक स्त्रीपासून वज्रमुष्टि, विरूपाक्ष, दुर्मुख,

सुप्तघ्न, यज्ञकोप, मत्त व उन्मत्त हे पुत्र व अनला नांवाची कन्या झाली ( वा. रा. उ. ५ ).

२ पुष्पदंत नामक गंधर्वाचा पुत्र. एकदां इंद्रसभेमध्यें अनेक गंधर्व नृत्यगायन करण्याकरितां आले असतां त्यांमध्यें माल्यवान् व चित्रसेनाची नात पुष्पदंती हीं सुद्धां हजर होतीं. हीं दोघेंहि अत्यंत सुंदर असल्यामुळें परस्परांवर अनुरक्त झालीं, त्यामुळें यांच्या नृत्यांमध्यें व्यत्यय येऊन हीं बेताल गाऊं लागलीं. हें इंद्राच्या लक्षांत येतांच त्यानें यांना पिशाच होण्याविषयीं शाप दिला. पुढें हीं दोघें पिशाच होऊन पुष्कळ काळ लोटल्यावर एकदां माघ महिन्यांतील दशमीच्या दिवशीं यांचें भांडण झालें. व पिशाचयोनि प्राप्त झाल्यामुळें हीं एकमेकांस त्रास देऊं लागलीं. तथापि त्या योनींतून मुक्त होण्यासाठीं यांनीं तेव्हांपासून कोणतेंहि पापकर्म न करण्याचा निश्चय केला. दुसऱ्या दिवशीं उपास करून रात्रीं हीं उभयतां एका पिंपळाच्या झाडाखालीं बसून राहिलीं. त्यामुळें साहजिकच यांच्याकडून जागरण होऊन जया एकादशीचें व्रत घडलें. तेव्हां त्या पुण्याच्या जोरावर हीं शापमुक्त होऊन पूर्वस्थितीप्रत गेलीं. नंतर इंद्राच्या आज्ञेनें हीं दोघें पति-पत्नी होऊन सुखानें राहूं लागलीं ( पद्म. उ. ४३ ).

३ प्रमराच्या वंशांतील इंद्रपालाचा पुत्र. यानें माल्यवती नामक नगरी वसवून तेथें पन्नास वर्षें राज्य केलें (भवि. प्रति. ४.१).

**मावेल्ल**—( मत्सिल्ल पहा ).

**माषशरावय**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**मासकृत**—सुतप देवांपैकीं एक.

**माहाचमस्य**—यानें महः या व्याहृतीचा पुरस्कार केला ( तै. आ. ७. ५. १ ).

**माहित्थि**—हा वामकक्षायणाचा शिष्य. याचा शिष्य कौत्स ( बृ. उ. ६. ५. ४; श. ब्रा. १०. ६. ५. ९ ). यज्ञांतील आचारांचा तज्ज्ञ म्हणून याच्या मताचा अनेक ठिकाणीं निर्देश आहे ( श. ब्रा. ६. २. २. १०; ८. ६. १६. २०; ९. ५. १. ५७).

**माहिष्मत**—एक राजा. हा चंपावतीमध्यें राज्य करीत असे. याला पांच पुत्र होते. त्यांतील ज्येष्ठ पुत्र अत्यंत दुराचारी असल्यामुळें त्याला लुंपक हें नांव पडून बापानें त्याला नगराबाहेर घालवून दिलें होतें ( पद्म. उ. ४ ).

**मिचकृत**—रुद्रसावर्णि मनूचा पुत्र.

**मिंजिक व मिंजिका**—हे दोघे श्वेत पर्वतावर रुद्राच्या वीर्यापासून झाले ( म. व. २३१. १०-१६ कुं. ). मुलांचें आरोग्य इच्छिणारांनीं यांना नमस्कार करावा.

**मित**—( सो. पूरु. ) जयाचा पुत्र.

२ मरुतांच्या पांचव्या गणांपैकीं एक.

**मितध्वज**—( सू. निमि. ) भागवतमतें धर्मध्वज जनकाचा पुत्र. याचा पुत्र खांडिक्य जनक.

**मिति**—उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**मित्र**—द्वादशादित्यांपैकीं एक ( विवस्वत् पहा ). हा मार्गशीर्ष मासीं प्रकाशतो. याचीं किरणें ११०० आहेत ( भवि. ब्राह्म. ७८ ). पण भागवतांत हा ज्येष्ठ मासीं प्रकाशतो असें दिलें आहे ( १२. ११. ३५; वरुण पहा ). यास रेवती नामक स्त्री असून तिजपासून यास उत्सर्ग, अरिष्ट व पिप्पल असे तीन पुत्र झाले ( भा. ६. १८. ६ ).

२ लकुलिन् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

३ वसिष्ठ व ऊर्जा यांचा पुत्र.

**मित्रघ्न**—रामानें मारिलेला रावणपक्षीय एक असुर ( वा. रा. यु. ४३ ).

**मित्रजित्**—( सू. इ. भविष्य. ) विष्णुमतें सुवर्ण राजाचा पुत्र. भागवत, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें यास अमित्रजित् व मत्स्यमतें सुमित्र म्हटलें आहे.

**मित्रदेव**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय एक त्रैगर्त राजा. यास अर्जुनानें मारिलें (म. क. १८. ११ कुं.).

२ रुद्रसावर्णि मनूचा पुत्र.

**मित्रबाहु**—रुद्रसावर्णि मनूचा एक पुत्र.

**मित्रभू काश्यप**—विभांडक काश्यपाचा शिष्य. याचा शिष्य इंद्रभू काश्यप ( वं. ब्रा. २ ).

**मित्रभूति लौहित्य**—कृष्णदत्त लौहित्याचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४२. १ ).

२ व्यासाच्या पुराणशिष्यपरंपरेंतील विष्णु, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें रोमहर्षणाचा शिष्य.

**मित्रयु**—(सो. नील.) दिवोदासाचा पुत्र. यास मत्स्य व वायु यांत मित्रयु म्हटलें आहे. भागवत व विष्णु यांच्या मतें मित्रेयु असें नांव असून याचा पुत्र च्यवन. गरुडामध्येंहि असेंच आहे ( १. १४. २२ ). पण वायु व मत्स्यमतें मैत्रेय हा पुत्र होता. यापासून मैत्रेय ब्राह्मण व मैत्रायणी शाखा सुरू झाली ( ह. वं. १. ३२ ).

२ भृगुकुलांतील एक ऋषि. याची कन्या मैत्रेयी.

**मित्रवत्**—एक तपस्वी. हा सौपुरांत राहत असे. यानें शंकराच्या देवालयामध्यें जाऊन गीतेच्या दुसऱ्या अध्यायाचा पाठ केल्यामुळें याच्या मनाला पूर्ण शांति प्राप्त झाली होती. देवशर्मा नामक एक ब्राह्मण मनाला शांति प्राप्त व्हावी, म्हणून सुक्तकर्मा नामक तपस्व्याच्या सांगण्यावरून याच्याकडे आला होता. त्याला यानें गीतेच्या दुसऱ्या अध्यायाचें पठन करण्यास सांगितलें ( पद्म. उ. १७६ ).

२ रुद्रसावर्णि मनूचा पुत्र.

**मित्रवर्चस् स्थैरकायण**—सुप्रतीत औलुण्ड्याचा शिष्य. याचा शिष्य ब्रह्मवृद्धि छांदोग्य माहकि ( वं. ब्रा. १ ).

**मित्रवर्मन्**—अर्जुनानें मारिलेला दुर्योधनपक्षीय राजा ( म. क. २७ ).

**मित्रविंद ( विंदु )**—रुद्रसावर्णि मनूचा पुत्र.

**मित्रविंद कौहल**—सुनीथ कापटवाचा शिष्य. याचा शिष्य केतु वाज्य ( वं. ब्रा. १ ).

**मित्रविंदा**—अवंतीदेशीय जयसेन व वसुदेवभगिनी राजाधिदेवी यांची कन्या. विंद व अनुविंद यांची बहीण. स्वयंवराचे वेळीं कृष्णानें हिचें हरण केलें. ही कृष्णाची आतेबहीण होती. हिला वृक, हर्ष, अनिल, गृध्र, वर्धन, उन्नाद, महाश, पावन, वह्नि आणि क्षुधि हे दहा पुत्र होते ( भा. १०. ५८ ).

**मित्रसह**—कल्माषपादाचें मूळ नांव (कल्माषपाद पहा).

**मित्रसेन**—अर्जुनानें मारिलेला दुर्योधनपक्षीय एक राजा ( म. क. २७ ).

२ रुद्रसावर्णि मनूचा पुत्र.

**मित्रहन्**—रुद्रसावर्णि मनूचा पुत्र.

**मित्रा**—( २ मैत्रेय पहा ).

**मित्रातिथि**—कुरुश्रवणाचा पिता आणि उपमश्रवस्चा आजा ( ऋ. १०. ३३. ७ ).

**मित्रावरुण**—वसिष्ठकुलांतील प्रवर. यांचे पुत्र अगस्ति व वसिष्ठ ( भा. ६. १८. ५; वरुण पहा ).

**मित्रेयु**—( १ मित्रयु पहा ).

**मिथि**—निमीच्या मृतदेह मंथन केला असतां त्यापासून निघालेला पुरुष. यानें मिथिला नगरी स्थापिली. याचा पुत्र उदावसु ( वायु. २. २८. १-६; ब्रह्मांड. ३. ६४. १-६ ). याला मिथिलहि म्हटलें आहे ( भा. ९. १३. १३ ).

**मिथिल**—हा भरतवंशांतील होय. याचा पुत्र जह्नु ( म. अनु. ७. २ कुं. ).

२ ( मिथि पहा ).

**मिथु**—एक शूर दानव. यानें सरस्वतीच्या तीरावर चाललेला अश्वमेध यजमान व पुरोहित यांसह पातालांत नेला. पण पुरोहित असणाऱ्या उपमन्यूच्या देवापि नांवाच्या मुलानें शंकराचे कृपेनें सर्व परत आणिलें ( ब्रह्म. १२७ ).

**मिश्रकेशी**—कश्यप व प्राधा यांची कन्या.

२ हिला वसुदेवाचा भ्राता वत्सक याजपासून वृकादि पुत्र झाले ( भा. ९. २४.४३; म. आ. ६६ कुं. ). हिला रौद्राश्व राजापासून दहा पुत्र झाले. त्यांचीं नांवें अकरा आढळतात. अन्वग्भानु, ऋचेयु, कक्षेयु, कृकणेयु, स्थंडिलेयु, वनेयु, जलेयु, तेजेयु, सत्येयु, धर्मेयु व संततेयु ( म. आ. ८८. ७ कुं. ).

**मिहिराचार्य**—हा पूषा नामक सूर्याचा अंश असून उज्जयिनीतील रुद्रपशु ब्राह्मणाचा पुत्र होय. हा मूलगंडांतामध्यें अशुभ करणाऱ्या अभिजियोगावर जन्मल्यामुळें पित्यानें यास जन्मतःच टोपल्यांत घालून नदींत सोडून दिलें. तेव्हां हा वाहत समुद्रामध्यें गेला असतां राक्षसींनीं याचें रक्षण केलें. पुढें यानें लंकेंत येऊन वेदशास्त्राचें अध्ययन केलें. नंतर हा बिभीषणाला शरण गेल्यावर त्यानें यास परत याच्या जन्मभूमीस पाठविलें. तेव्हां म्लेच्छाकडून नष्ट झालेल्या ‘ज्योतिषां गतिः’ या वेदांगाचा यानें पुनरुच्चार केला ( भवि. प्रति. ४. ८ ).

**मीढुष**—शक्र नामक आदित्याचा पुत्र ( १ पौलोमी पहा ).

**मीढ्वस्**—( सू. नरि. ) भागवतमतें दक्षाचा पुत्र. याचा पुत्र कूर्च.

**मीनरथ**—( सू. निमि. ) विष्णुमतें अनेनस्चा पुत्र. भागवतमतें समरथ हाच असावा.

**मीमांस**—पितृशर्मा नामक ब्राह्मणाला ब्रह्मचारिणीपासून चारी वेदांचे ऐक्य करणारे असे चार पुत्र झाले. त्यांपैकीं यजुषाचा हा पुत्र ( भवि. प्रति. २. ३० ).

**मुकुंद**—याच्या अस्थि यमुनेंत पडल्यानें हा मुक्त झाला ( पद्म. उ. २०९-२१० ).

**मुक्त**—भौत्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**मुक्तकर्मन्**—( मित्रव्रत् पहा ).

**मुख्य**—सावर्णि मन्वंतरांतील देवविशेष.

**मुचि**—नमुचीचा धाकटा भाऊ. आपल्या भावास मारिल्याबद्दल हा इंद्रावर चालून गेला असतां, इंद्रानें यासहि ठार केलें ( पद्म. सृ. ६८ ).

**मुचुकुंद**—( सू. इ. ) यालाच मुचकुंद असें कांहीं ठिकाणीं म्हटलें आहे ( म. उ. १३२; शां. ७४; भा. ९. ६; १०. ५१ ). मांधाता नामक राजास बिंदुमतीपासून झालेल्या तीन पुत्रांतील कनिष्ठ ( ब्रह्मांड. ३. ६३.७२; मत्स्य. १२. ३५; ब्रह्म. ७. ९५ ). हा दाशरथि रामाच्या पूर्वीचा सुमारें ४१ वा पुरुष होय. याला पुरुकुत्स व अंबरीष असे दोन भाऊ होते ( भा. ९. ६; वायु. २. २६. ७२; विष्णु. ४. १ ). याला ५० बहिणी होत्या. त्या सर्व बहिणींनीं एकट्या सौभरि ऋषीलाच वरिलें ( भा. ९. ६; गरुड. १. १३८. २५; विष्णु. ४. २ ). हा मोठा गुणवान् असून ब्राह्मणांचा भक्त होता. एकदां यानें स्वबलाची परीक्षा पाहण्याकरितां कुबेरावर स्वारी केली. तेव्हां कुबेरानें राक्षस निर्माण करून याच्या सैन्याचा फडशा उडविला. आपली फजिती झालेली पाहून हा आपल्या

पुरोहिताची निंदा करूं लागला. तेव्हां धर्मज्ञ व श्रेष्ठ वसिष्ठानें उग्र तपश्चर्या करून राक्षसांचा वध केला. त्या वेळीं कुबेर याला म्हणाला, ' तूं आपल्या शौर्यानें मजशीं लढ. ब्राह्मणांची मदत कशाला घेतोस ? ' यानें सांगितलें कीं, ' तप आणि मंत्र यांचें बल ब्राह्मणांजवळ व अस्त्रविद्या क्षत्रियांजवळ असते. म्हणून या दोहोंचाहि उपयोग करून राजानें राष्ट्राचें कल्याण केलें पाहिजे.' या भाषणानें कुबेर संतुष्ट झाला व यास पृथ्वीचें राज्य देऊं लागला; पण तें यानें नाकारून ' मी आपल्या बाहुबलानें राज्य मिळवीन, ' असें त्यास उत्तर दिलें व त्याप्रमाणें यानें स्वबाहुबलानें पृथ्वीचें राज्य संपादन केलें ( म. उ. १३२.९–११; शां. ७४ कुं. ).

याला भार्गवानें शरणागताचे रक्षणाविषयींची कपोताची गोष्ट सांगितली ( म. शां. १४३. ६ कुं. ).

हा अतिशय पराक्रमी असल्यामुळें देवांनीं दैत्यांच्या विरुद्ध लढण्याकरितां याची मदत घेतली व यानें देवांना साहाय्य करून दैत्यांचा पराभव केला. कार्तिकस्वामी सेनापति होण्याच्या पूर्वी यानेंच देवांचें रक्षण केलें. नंतर सर्व देव प्रसन्न होऊन ' वर माग ' म्हणतांच हा अतिशय दमलेला असल्यामुळें यानें झोंपेची अपेक्षा केली व ' माझी झोंप जो दुष्ट मोडील, तो मी त्याकडे अवलोकन करतांच जळून खाक व्हावा, व नंतर मला श्रीविष्णूचें दर्शन व्हावें ' असा वर मागितला. हा एका पर्वताच्या गुहेंत बरींच वर्षे निद्रासुख अनुभवीत होता. परंतु कृष्णानें कालयवनाला याच गुहेंत आणिलें व याच्या अंगावर आपला शेला घालून आपण पलीकडे उभा राहिला. कालयवन आंत येतांच त्यास कृष्ण शेला पांघरून निजला आहे असें वाटून त्यानें यास एक जोरानें लाथ मारिली; लगेंच हा जागा होऊन रागानें कालयवनाकडे पाहतांच कालयवन तेथल्या तेथें जळून भस्म झाला. नंतर कृष्णानें याला दर्शन देऊन राज्याकडे जाण्यास सांगितलें. व ' तूं पुढच्या जन्मीं सर्व भूतांचा मित्र असा श्रेष्ठ ब्राह्मण होशील व नंतर तूं मुक्त होशील ' असा वर दिला. पण आपलें राज्य कोणीतरी घेतलें आहे व सर्व माणसें आकारानें लहान झालीं आहेत, असें पाहतांच, हें कलियुग सुरू झालें, असें यास समजलें; तेव्हां हा हिमालय पर्वतावरील बदरिकाश्रमीं तपश्चर्येकरितां निघून गेला. तेथें कांहीं दिवस तपश्चर्या केल्यानंतर राजर्षि मुचुकुंद विष्णुपदास गेला ( भा. १०. ५१; विष्णु. ५. २३; ब्रह्म. १९६; ह. वं. १. १२; २. ५७ ).

२ याची कन्या चंद्रभागा व जांवई शोभन ( पद्म. उ. ६० ).

**मुंज**—एक ऋषि. हा द्वैतवनांत पांडवांसमागमें होता ( म. व. २६. २३ कुं. ).

**मुंज सामश्रवस**—एक आचार्य ( जै. उ. ब्रा. ३. ५. २; ष. ब्रा. ४. १ ).

**मुंजकेतु**—युधिष्ठिराच्या सभेंत असलेला एक राजा ( म. स. ४. २७ कुं. ).

**मुंजकेश**—व्यासाच्या अथर्वन्‌शिष्यपरंपरेंतील वायुमतें सैंधवायनाचा शिष्य. यानें पांच ग्रंथ केले. इतर मतें बभ्रु व हा एकच.

२ युधिष्ठिरानें युद्धाला येण्याकरितां याच्याकडे दूत पाठविला होता ( म. उ. ४. १८ कुं. ).

**मुंड**—शुंभनिशुंभांचा सेनापति ( चंड पहा ).

२ ( मंड पहा ).

**मुंडवेदांग**—जनमेजयाच्या सर्पसत्रांत दग्ध झालेला धृतराष्ट्रकुलांतील सर्प ( म. आ. ५७. १७ कुं. ).

**मुंडिभ औदन्य**—अश्वमेधांत होणाऱ्या अनेक भ्रूणहत्यादि पातकांचा नाश होण्यासाठीं अवभृथापूर्वी यानें प्रायश्चित्ताहुति घालावयास सांगितल्या आहेत ( तै. ब्रा. ३. ९. १५. ३; श. ब्रा. १३. ३. ५. ७ ).

**मुद**—स्वायंभुव मन्वंतरांतील धर्म ऋषि व तुष्टि यांचा पुत्र.

**मुदावती**—विदूरथाची मुलगी. हिला कुजंभानें पळविली. परंतु वत्सप्रीनें कुजंभाला मारून हिजशीं लग्न केलें. हिला सौनंदा असें नांव होतें ( मार्कं. ११३ ).

**मुदित**—रामसेनेंतील एक वानर.

**मुद्गर**—जनमेजयाच्या सर्पसत्रांत दग्ध झालेला तक्षककुलांतील सर्प ( म. आ. ५७. १ कुं. ).

**मुद्गरपर्णक**—नारदानें मातलीस दाखविलेला वर ( म. उ. १०३. १३ कुं. ).

**मुद्गरपिंडक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**मुद्‌गल**—(सो. अज.) भर्म्याश्व अथवा भद्राश्व राजाचा पुत्र. एकदां एका म्हाताऱ्या बैलाखेरीज याचे सर्व गाईबैल चोरांनीं चोरून नेले. तेव्हां तो म्हातारा बैल आणि लांकडी भरीव मुद्गर गाडीस जुंपून हा युद्धास गेला व यानें मुद्गर चोरांवर टाकून चोरांचा पराभव केला व गाईबैल परत आणिले (ऋ.१०.१०२; नि.९.२३; बृहद्दे. ६. ४६; ८. १२-९०). इंद्रसेना नांवाच्या याच्या स्त्रीनें युद्धांत याचें सारथ्य केलें ( ऋ. १०. १०२. ५ ). हा व याचे वंशज क्षत्रियधर्मांचा आश्रय करणारे ब्राह्मण होते. त्यांना मुद्गल म्हणत ( भा. ९. २१; वायु. २. ३७. १९०-१९४; ब्रह्मवै. ३. ४३. ९७; मत्स्य. ५०. ५-७; ह. वं. १. ३२; ३ मौद्गल्य पहा ).

२ अंगिरसकुलांतील एक गोत्रकार व दत्ताचा पुत्र.

३ आंगिरसकुलांतील गोत्रकार, मंत्रकार व प्रवर.

४ कुरुक्षेत्रांत शलोञ्छवृत्तीनें राहणारा एक सत्त्वशील ब्राह्मण. दुर्वासालाहि याला सत्त्वापासून ढळवितां आलें नाहीं. तेव्हां दुर्वासानें याला स्वर्ग दिला, पण यानें स्वर्ग अशाश्वत म्हणून नाकारिला ( म. व. २६०.६१ कुं. ).

५ व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील देवामित्राचा शिष्य ( मौद्गल पहा ). याची एक स्मृतीहि आहे (C. C.). मुक्तिकोपनिषदांत याचा निर्देश आहे ( १. ३५ ).

६ हा चोल राजाचा पुरोहित होता. याकडून त्यानें विष्णुयाग करविला; पण त्याचा उपयोग झाला नाहीं. म्हणून राजानें जीव दिला व यानें आपली शिखा उपटून घेतली. तेव्हांपासून मुद्गलगोत्रांतील लोक शेंडी ठेवीत नाहींत ( पद्म. उ. १०८; स्कंद. २. ४. २७ ). सध्यांहि मुद्गलगोत्रांतील लोक शेंडी ठेवीत नाहींत. याच्या बायकोचें नांव भागीरथी ( २ मौद्गल्य पहा ). द्वादशीव्रतमाहात्म्याकरितां एका मुद्गलाची गोष्ट आली आहे ( पद्म. उ. ६६ ). क्षीरकुंडमाहात्म्याकरितां याची कथा आली आहे ( स्कंद. १. ३. ३७ ). एक गणेशभक्त ( दक्ष पहा ). गणेशपर असणारें मुद्गलपुराणहि प्रसिद्ध आहे.

**मुद्गला**—एक ब्रह्मवादिनी.

**मुद्गलानी**—पहिल्या मुद्गलाची बायको. हिचें नांव इंद्रसेना नालायनी ( म. व. ११४. २४ कुं. ).

**मुद्गलायन**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**मुनि**—प्राचेतस् दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या. कश्यपाची भार्या ( कश्यप पहा ).

२ रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ दहा विश्वेदेवांपैकीं एक.

४ वैवस्वत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

५ प्रसूत देवांपैकीं एक.

६ अमिताभ देवांतील एक.

७ अहन्‌चा मुलगा ( म. आ. ६७. २३ कुं. ).

८ ( सू. निमि. ) वायुमतें प्रद्युम्नाचा पुत्र. विष्णु व भागवत यांच्या मतें हा शुचि होय.

९ ( हरिमेध व सुमेध पहा ).

१० द्युतिमत्च्या सात पुत्रांपैकीं एक. याचें वर्ष याच्याच नांवाचें होतें ( मार्कं. ५.२४ ).

**मुनिशर्मन्**—एक विष्णुभक्त ब्राह्मण. यानें पिशाचयोनीप्रत गेलेल्या परंतु पूर्वजन्मीं वरिवाहन, चंद्रशर्मा, वेदशर्मा, विदुर व नंद या नावांनीं प्रसिद्ध असलेल्या माणसांचा उद्धार केला ( पद्म. पा. ९४ ).

**मुर**—हा ब्रह्मदेवाचे वंशांत जन्मलेल्या तालजंघ दैत्याचा पुत्र. हा देवांना भारी झाला, एवढेंच नव्हे, तर विष्णूलाहि भारी झाला. तेव्हां विष्णु पळाला व बदरिकाश्रमामधील सिंहावती नामक गुहेंत योगमायेचा आश्रय करून निजला. तेथेंहि मुर गेला. तेव्हां विष्णूच्या योगमायेनें निर्माण झालेल्या एकादशी देवीनें यास मारिलें. विष्णूनें तिला सर्व पापांचा नाश करण्याचें सामर्थ्य व एकादशी असें नांव दिलें (पद्म. उ. ३८).

२ हा नरकासुराचा एक अनुयायी होता. याला ताम्र, अंतरिक्ष, श्रवण, विभावसु, वसु, नभस्वान् व अरुण असे सात पुत्र होते ( भा. १०. ५९.३-१० ). याला कृष्णानें मारिलें ( म. स. ५५. २९ कुं. ).

**मुरु**—एक यवनाधिप. जरासंधाचा मांडलिक ( म. स. १४. १४ कुं.; घटोत्कच पहा ).

२ कश्यप व दनु यांचा पुत्र. हा ज्याला स्पर्श करील तो मृत होईल असा यास वर होता. याची व कृष्णाची लढाई श्वेतद्वीपांत झाली. शेवटीं कृष्णानें यास स्वतःच्याच छातीवर हात ठेवावयास लावून यास ठार केलें ( वामन. ६०-६१ ). हा व दुसरा मुर एकच.

**मुष्कवत्**—( इंद्र पहा ).

**मुष्टिक**—वसिष्ठ ऋषींचा महोदय नामक पुत्र विश्वामित्राच्या शापानें निषाद झाला असतां त्यास व इतरांस पडलेलें सामान्य नांव ( वा. रा. बा. ५९. २०-२१; ६०. १).

२ बलरामानें मारिलेला कंससभेंतील एक मल्ल ( भा. १०. २४. ४४ ).

**मुसल**—विश्वामित्राचा पुत्र.

**मुहूर्त**—धर्म ऋषि व मुहूर्ता यांचे अनेक पुत्र.

**मुहूर्ता**—प्राचेतस दक्षाची कन्या व धर्म ऋषीची पत्नी. मुहूर्त नांवाचे देव हिचे पुत्र होत ( भा. ६. ६. ४-९ ).

**मूक**—सुंद व ताडका यांचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ५. ३६९ ). वराहरूप धारण करून इंद्रकील पर्वतावर तप करीत असलेल्या अर्जुनास यानें त्रास दिला असतां, यास अर्जुनानें ठार मारिलें. हा किरातरूपी शंकर व अर्जुन यांच्या युद्धास कारणीभूत झाला होता. मूकाला शंकर व अर्जुन यांनीं उलटसुलट असे बाण मारिले कीं, ते दोनहि बाण याच्या वराहशरीरांतून आरपार जाऊन जमिनींत घुसले. त्यामुळें याला कोणीं मारिलें, याबद्दल दोघांत तंटा होऊन युद्ध झालें ( शिव. शत. ४१; म. व. ३९ कुं. ).

२ एक चांडाल. हा फार मातृपितृभक्त होता ( पद्म. सृ. ५०; नरोत्तम पहा ).

३ जनमेजयाच्या सर्पसत्रांत दग्ध झालेला तक्षककुलांतील सर्प ( म. आ. ५७.९ कुं. ).

**मूढ**—कृत्तिका नांवाच्या भक्तिणीकरितां शंकरानें याला ठार केलें ( शिव. कोटि. ७ ).

**मूर्तय**—( सो. अमा.) कुश राजाचा पुत्र. यानें धर्मारण्य नामक एक नगर वसविलें ( वा. रा. बा. ३२; २ अमूर्तरयस् पहा ).

**मूर्ति**—प्राचेतस दक्षानें धर्मास दिलेल्या सोळा कन्यांतील एक व नरनारायणांची आई ( भा. ४. १ ).

२ वसिष्ठपुत्र व स्वारोचिष मन्वंतरांतील एक प्रजापति.

३ स्वारोचिष मनूचा पुत्र.

४ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**मूर्तिमत्**—कान्यकुब्ज देशच्या अमूर्तरजस् राजाचें नामांतर.

२ ( सो. पूरु. ) मत्स्यमतें अंतिनाराचा पुत्र.

**मूर्धन्**—भृगु व पौलोमी यांचा पुत्र, देव.

**मूर्धन्वत् आंगिरस** अथवा **वामदेव्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ८८ ).

**मूल**—सोमाच्या पत्न्यांतील एक.

**मूलक**—( सू. इ. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें अश्मक राजाचा पुत्र. हा परशुरामाच्या भयानें स्त्रियांत लपून राहत असे, म्हणून यास नारीकवच असें नांव आहे. याच्यापासूनच सूर्यवंशाची वृद्धि झाली. यास दशरथ नांवाचा पुत्र होता.

२ कुंभकर्णाचा पुत्र. हा मूल नक्षत्रावर जन्मला, म्हणून कुंभकर्णानें यास टाकून दिलें; पण मधमाशांनी मध पाजून यास वाढविलें. मोठा झाल्यावर हा अतिबलाढ्य होऊन सर्वांस त्रास देऊं लागला, म्हणून रामानें सीतेकडून यास ठार करविलें ( आ. रा. राज्य. ५-६ ).

**मूलचारिन्**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें लौगाक्षीचा शिष्य.

**मूलमित्र गोभिल**—वत्समित्र गोभिलाचा शिष्य. याचा शिष्य वरुणमित्र गोभिल ( वं. ब्रा. ३ ).

**मूलवर्मन्**—गुर्जर देशचा राजा. याला बल, प्रबल, सबल, बलवान्, बलि, सुमूल, महामूल, दुर्ग, भीम व भयंकर असे दहा पुत्र असून प्रभावती नामक कन्या होती. ती यानें महिराजपुत्र व्हहर यास वेदोक्तविधीनें दिली ( भवि. प्रति. ३.३१ ).

**मूलहर**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**मूशा**—म्लेच्छांचा आचार्य. याच्या मताचा सरस्वतीतीर व ब्रह्मावर्त यांखेरीज सर्वत्र प्रसार झाला. यानें देवार्चन व वेदभाषा नष्ट केली ( भवि. प्रति. १.५ ).

**मूषकाद** अथवा **मूषिकाद**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**मृकंड**—हा धात्यास आयतीपासून झाला. याच्या स्त्रीचें नांव मनस्विनी व पुत्राचें नांव मार्कंडेय होय ( भा. ४. १. ४३-४४; वायु. १. २८. ५; ब्रह्मांड. २. १-६; मार्कं. ४९. २० ). यानें एक अयुत युगपर्यंत शालिग्राम तीर्थावर तप केलें ( नारद. १.४ ). नारद, वायु व मार्कंडेय पुराणांत मृकंडु असा पाठभेद आहे.

**मृकंडु**—( मृकंड पहा ).

**मृक्तवाहस् द्वित आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५.१८ ).

**मृग**—सोमाची एक पत्नी.

२ भृगुकुलांतील एक गोत्रकार. मृत असा पाठभेद आहे.

**मृगकेतु**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**मृगचारिन्**—एक मुनिसंघ (म. अनु. ४५.४१ कुं॰).

**मृगमंदा**—कश्यप व क्रोधा यांची कन्या. पुलहाची भार्या. हिला पशु वगैरे प्राणी झाले.

**मृगय**—इंद्रानें श्रुतर्वणाकरितां मृगयाला जिंकिलें ( ऋ. १०. ४९. ५ ).

२ कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**मृगवती**—( अलंबुसा पहा ).

**मृगव्याध**—एकादश रुद्रांपैकीं एक. आकाशांत हा मृगरूपानें दिसतो ( ऐ. ब्रा. ३. ३३ ).

**मृगी**—कश्यप व क्रोधा यांची कन्या. पुलहाची भार्या. हिला मृग झाले.

**मृगेन्द्रस्वातिकर्ण**—( आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें स्कंदस्वातीचा पुत्र. यानें तीन वर्षें राज्य केलें.

**मृत्यु**—ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालेली जगत्संहारकर्त्री देवता. ब्रह्मदेवानें हिला जगत्क्षय कालानुरूप करीत जा, म्हणून सांगितलें असतां हिनें प्राण्यांना दुःख देणारें कृत्य आपण करणार नाहीं म्हणून सांगितलें व तप आरंभिलें. तपान्तीं ब्रह्मदेवानें प्रसन्न होऊन हिला वर मागावयास सांगितलें असतां हिनें ' पूर्ववत् जगत्संहाराचें काम आपल्याकडे नसावें ' म्हणून मागितलें. तेव्हां ब्रह्मदेवानें 'जगत्क्षयास तूं प्रत्यक्ष कारण होणार नाहींस, रोगच तुझें संहाराचें काम करतील ' असा हिला वर दिला ( म. द्रो. ५३. १७; शां. २६३-२६४ कुं. ). हिनें नाचिकेतस्‌ला ब्रह्मविद्या सांगितली ( क. उ. ३. १६; ६. १८ ). मृत्युविषयक तात्त्विक विवेचन आढळतें ( म. उ. ४२ कुं. ). याचा इक्ष्वाकूशीं संवाद झाला आहे ( म. शां. १९७ कुं. ). मृत्यूहि परतंत्र आहे (म. अनु. १. ७३ कुं.).

२ प्रजापतीचा शिष्य. याचा शिष्य वायु ( वं. ब्रा. २ ).

३ अधर्मास निर्ऋतीपासून झालेला पुत्र.

४ कलि व दुरुक्ति यांची कन्या.

५ एक व्यास ( व्यास पहा ).

**मृदु**—( सो. वृष्णि. ) विष्णुमतें श्वफल्काचा पुत्र.

**मृदु**—( सो. कुरु. भविष्य. ) विष्णुमतें नृपंजयाचा पुत्र.

**मृदुर**—( सो. वृष्णि. ) वायु व भागवत यांच्या मतें श्वफल्काचा पुत्र.

**मृदुविद्**—( सो. वृष्णि. ) भागवतमतें श्वफल्काचा पुत्र.

**मृलिक**—स्वायंभुव मन्वंतरांतील जिदाजित् देवांपैकीं एक.

**मृळीक वासिष्ठ**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ९७. २५-२७; १०. १५० ).

**मृषा**—अधर्माची पत्नी. हिला दंभ व माया हीं अपत्यें होतीं ( भा. ४. ८. २ ).

**मेकल**—(भविष्य.) वायुमतें पद्ममित्रानंतर झालेले राजे.

**मेखलमणि**—या राणीनें वेणींत ठेवलेल्या गुप्त शस्त्राचे योगानें शुभध्वज राजाचा वध केला ( भवि. ब्राह्म. ८ ).

**मेघ**—तारकासुरपक्षाकडील एक असुर.

२ स्वायंभुव मनूचा पुत्र.

३ ( भविष्य. ) ब्रह्मांडमतें कोमलनगरींत राज्य करणाऱ्या नऊ राजांचा वंश. हे राजे वायुमतें सात होते.

**मेघजाति**—( सो. पुरूरवस्. ) वायुमतें पुरूरव्याचा पुत्र.

**मेघनाद**—( १ इंद्रजित् पहा ).

२ ( १ मेघवर्ण पहा ).

**मेघनिनाद**—( १ मेघवर्ण पहा ).

२ ( १ इंद्रजित् पहा ).

**मेघपृष्ठ**—( स्वा. प्रिय. ) घृतपृष्ठाचा पुत्र.

**मेघमालिन्**—खर राक्षसाचा एक अमात्य.

**मेघवत्**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**मेघवर्ण**—घटोत्कचाचा पुत्र. हा पांडवांच्या अश्वमेध-कालीं अश्वरक्षणार्थ अर्जुनाबरोबर होता. यास मेघनाद व मेघनिनाद अशीं नांवें सांपडतात.

२ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**मेघवासस्**—वरुणसभेंतील एक असुर ( म. स. ९. १८ कुं. ).

**मेघवाह**—जैगीषव्य नामक शिवावताराचा शिष्य.

**मेघवाहन**—एक दैत्य. हा विष्णूच्या लत्ताप्रहारानें मेला ( स्कंद. ७. १. ८४ ).

**मेघवेग**—अभिमन्यूनें मारिलेला दुर्योधनपक्षीय एक राजा ( म. द्रो. ४८. १६ कुं. ).

**मेघशर्मन्**—एक सूर्यभक्त. शंतनूच्या राज्यांत एकदां अनावृष्टि झाली असतां यानें सूर्याच्या जपानें अतिशय पाऊस पाडिला ( भवि. प्रति. ४. ८ ).

**मेघसंधि**—( सो. मगध. भविष्य. ) जरासंधाचा पौत्र व सहदेवाचा पुत्र. हा द्रौपदीस्वयंवरास गेला होता ( म. आ. २०१. ८ कुं. ). पांडवांचा अश्वमेधाचा अश्व यानें अडविला. पण अर्जुनानें याचा पराभव केल्यामुळें याला अश्व परत देऊन शिवाय खंडणी द्यावी लागली ( म. आश्व. ८२ ). पुराणांत इतरत्र याचें नांव मार्जारि, सोमाधि किंवा सोमापि असें आहे.

**मेघस्वाति**—(आंध्र. भविष्य.) भागवतमतें चिबीलकाचा, विष्णुमतें दिवीलकाचा व मत्स्यमतें अपीतकाचा पुत्र.

**मेघहंतृ**—सुमेधस् देवांतील एक.

**मेघहास**—राहूचा पुत्र. राहूचा शिरच्छेद केल्याचें ऐकल्यावर यानें गौतमीतीरीं तप करून पित्यास ग्रहत्व व आपणांस नैर्ऋताधिपत्य मिळविलें ( ब्रह्म. १४२ ).

**मेदशिरस्**—( आंध्र. भविष्य. ) भागवतमतें पुरीमत्-पुत्र.

**मेदोहन्**—भीषण राक्षसाचा पुरोहित.

**मेध**—याचा कण्व व दीर्घनीथादिकांबरोबर उल्लेख आला आहे ( ऋ. ८. ५०. १० ).

२ ( स्वा. प्रिय. ) प्रियव्रताचा पुत्र ( मार्क. ५०. १६ ).

**मेधज**—सुमेधस् देवांतील एक.

**मेधस्**—स्वायंभुव मनूचा पुत्र.

२ सुमेधस् देवांतील एक.

**मेधा**—दक्षाची कन्या व धर्माची स्त्री. हिचा पुत्र स्मृति.

**मेधातिथि**—( स्वा. प्रिय. ) प्रियव्रत व बर्हिष्मती यांचा पुत्र. हा दधिसमुद्रवेष्टित शाकद्वीपाचा अधिपति होता. यानें आपल्या द्वीपाचे सात भाग करून ते आपल्या पुरोजव, मनोजव, पवमान, धूम्रानीक, चित्ररेफ, बहुरूप आणि विश्वाधार या सात पुत्रांस दिले ( भा. ५. १. २०-२५ ). याचें द्वीप प्लक्ष होय. तें यानें आपल्या शाकभव, शिशिर, सुखोदय, आनंद, शिव, क्षेमक व ध्रुव यांना, त्यांच्याच नांवांचे भाग करून, दिलें ( मार्क. ५.२९-३१ ).

२ वसिष्ठस्त्री अरुंधतीचा पिता. याचा आश्रम चंद्रभागेच्या कांठीं असून यानें ज्योतिष्टोम यज्ञ केला होता ( कालि. २२).

३ वैवस्वत मन्वंतरांतील सतरावा व्यास.

४ उपरिचर वसूच्या यज्ञांतील एक ऋषि (म. शां. ३३६).

५ इंद्रसभेंतील एक राजर्षि ( म. स. ७ ).

६ सुमेधस् देवांतील एक.

७ ( गौतम पहा ).

८ परीक्षिताच्या मरणाच्या वेळीं हा तेथें आला होता ( भा. १. १९. १० ).

९ दक्षसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**मेधातिथि काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १. १२-२३; ८. १.३-२९; २. ४१-४२; ९. २ ). यानें आपणांस काण्व मेध्यातिथि म्हणवून घेतलें आहे ( ऋ. ८. २. ४० ). आसंगानें धन दिलें म्हणून यानें त्याची स्तुति केली आहे ( ऋ. ८. २. ४१-४२ ). यानें आपल्या सामांनीं विभिंदुकीयांच्या यज्ञांतून गाई मिळविल्या ( पं. ब्रा. १५. १०. ११).

**मेधाविन्**—बालधि ऋषीचा पुत्र. यास पर्वतायु असेंहि नांव आहे ( बालधि व धनुषाक्ष पहा ).

२ यानें आपल्या अध्ययनशील पित्यास जगाची क्षणिकता सांगून मोक्षधर्माकडे वळविलें, असा जुना इतिहास आहे ( म. शां २७८ ).

३ ( सो. कुरु. भविष्य. ) विष्णु, वायु व भागवत यांच्या मतें सुनयपुत्र व मत्स्यमतें सुतपापुत्र होय.

४ च्यवन ऋषीचा पुत्र. हा एकदां चैत्ररथवनांत गेला. तेथें याची व मंजुघोषा अप्सरेची गांठ पडली. तेव्हां हा कित्येक वर्षें तिच्या नादांत गुरफटला. यांच्या समागमास पंचावन वर्षें, नऊ महिने, तीन दिवस झाले होते, तरी यांस एक रात्रहि झालीसें वाटेना. हा आपल्यास शाप देईल, या भीतीनें ती याजपाशीं आणखी कांहीं दिवस राहिली. एकंदर सत्तावन वर्षें झालीं, तरी मेधावी ताळ्यावर येईना, म्हणून त्या अप्सरेनें यास कालाची आठवण करून दिली. तेव्हां यास तपाच्या क्षयाची कल्पना आली व यानें त्या अप्सरेस ' तूं पिशाचयोनी पावशील ' असा शाप दिला; परंतु तिनें करुणा भाकल्यावर यानें तिला चैत्र कृष्णपक्षांतील पापमोचनी एकादशीचें व्रत सांगितलें. पुढें याचे पित्यानें तपक्षयाचा उपाय म्हणून यासहि हेंच व्रत सांगितलें ( पद्म. उ. ४६ ).

**मेधाविनी**—कुलिंद राजाची स्त्री व चंद्रहासाची माता.

**मेध्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ५३; ५४; ५७; ५८ ). याचा ऋग्वेदांत उल्लेख आहे ( ऋ. ८. ५२. २ ).

२ स्वायंभुव मनूचा पुत्र.

**मेध्यातिथि काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ३; ३३; ९. ४१-४३; मेधातिथि काण्व पहा ).

**मेनका**—प्राधेच्या अप्सरा कन्यांतील एक व ऊर्णायु गंधर्वाची स्त्री. हिच्या लावण्याच्या योगानें पृषत् राजा मोहित होऊन त्याचें वीर्य स्खलन पावलें व त्यापासून द्रुपद राजाची उत्पत्ति झाली. इंद्रानें विश्वामित्राच्या तपाचा भंग करण्याकरितां हिला पाठविलें होतें. तेव्हां हिनें विश्वामित्रास मोह पाडून त्याचा तपोभंग केला. विश्वामित्रापासून हिला शकुंतला नामक कन्या झाली. शिवाय ही वध्यश्वाची स्त्री होती.

२ मेनेचें नामांतर.

३ मेनेची कन्या.

**मेना**—( वृषणश्व पहा ).

२ आग्य नांवाच्या पितरांची मानसी कन्या व हिमवताची पत्नी. मैनाक व क्रौंच असे दोन पुत्र व अपर्णा, एकपर्णा, एकपाटला व मेनका ही हिचीच संतति होय ( भा. ४. ७; ह. वं. १. १८; मार्क. ५०.१६ मत्स्य. १३ ). पण वैराजांची मानसी कन्याहि आहे.

**मेरु**—एक पर्वत. याच्या नऊ मुलींशीं आग्नीध्राच्या नऊ मुलांनीं लग्नें केलीं. त्यांचीं नांवें—१ मेरुदेवी, २ प्रतिरूपा, ३ उग्रदंष्ट्री, ४ लता, ५ रम्या, ६ श्यामा ७ नारी, ८ भद्रा, ९ देववीति ( भा. ५. २. २३ ). धातृ व विधातृ यांना आयति व नियति या याच्या मुली दिल्या होत्या ( भा. ४. १. ४४ ).

**मेरुदेवी**—मेरूची कन्या व आग्नीध्रपुत्र नाभि राजाची पत्नी. हिचा पुत्र ऋषभदेव ( भा. १. ३. १३; ५. २ ).

**मेरुसावर्णि** किंवा **मेरुसावर्ण**—एक ऋषि ( म. अनु. २५५. ४४ कुं. ).

२ या नांवाचीं दक्षाच्या मुलीचीं चार मुलें होतीं. यांनीं मेरूवर तप केलें ( ब्रह्मांड. १. २४ ). नऊ ते बारा मन्वंतरांचे हे अधिपति होते ( मार्क. ५० ). हें नवव्या व दहाव्याचेंच नांव आहे ( दे. भा. १०. १३; वायु. २.३८ ). दक्ष, ब्रह्म, धर्म आणि रुद्र यांना मेरुसावर्णि हें सामान्य नांव आहे.

**मेषकीरिटकायन**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**मेषप**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**मेषहृत्**—गरुडाचा पुत्र.

**मैत्रावरुण** किंवा **मैत्रावरुणि**—वसिष्ठ व अगस्त्य यांचें नामांतर ( वसिष्ठ पहा ).

**मैत्रि**—एक ऋषि. मित्रेचा पुत्र ( मै. उ. २. १ २ )

**मैत्री**—स्वायंभुव मन्वंतरांतील धर्म ऋषीस दक्षानें दिलेल्या तेरा कन्यांतील एक. हिचा पुत्र प्रसाद.

**मैत्रेय**—( सो. नील. ) हा दिवोदासाचा पुत्र जो मित्रेयु, त्याचा पुत्र. मित्रेयु हा ब्राह्मण होता. परंतु मैत्रेय ब्रह्मक्षत्रिय होता. पुढें हा भृगुवंशांत सामील झाला ( वायु.२. ३६; मत्स्य. ५०. १३; ब्रह्म. १३; ह. वं. १. ३२ ), म्हणून याची गणना भृगुवंशांत झाली आहे ( मत्स्य. १९५ ).

२ अत्रिकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**मैत्रेय कौषारव**—यानें सुत्वन् कैरिशय राजाला ' ब्रह्मण परिमरा'ची माहिती सांगितली ( ऐ ब्रा.८.२८.१८ ). हें नांव ग्लावाला सुद्धां लाविल्याचें आढळतें ( छां. उ. १. १२. १, गो. ब्रा. १. १. ३१ ).

हा कुषारु व मित्रा यांचा पुत्र (भा. ३.४.३६; ३६). धर्मराजाच्या मयसभाप्रवेशप्रसंगीं उपस्थित होता (म. स. ४. १६ कुं.). पांडव वनवासांत असतां हा धृतराष्ट्राकडे गेला होता. त्या वेळीं यानें दुर्योधनास पांडवांचें सामर्थ्य सांगून 'तूं प्रबल पांडवांचा द्रोह करूं नकोस' असा व्यासांच्या इच्छेवरून उपदेश केला. तेव्हां दुर्योधन हंसला व त्यानें मांडीवर थाप मारिली. आपल्या भाषणाचा दुर्योधनाकडून अनादर झालेला पाहून याला त्याचा अत्यंत राग आला व यानें दुर्योधनास 'तुझी मांडी भीमाच्या गदेनें भग्न होईल' असा शाप दिला. परंतु दुर्योधन पांडवांशीं जर सख्य करील, तर हा शाप बाधणार नाहीं, असेंहि यानें सांगितलें (म. व. १० कुं.; भा. ३. १. १). यानें विदुरास उपदेश केला होता. भीष्मानें देहत्याग केला, त्या वेळींहि हा हजर होता (म.शां. ४६. ७ कुं.). हा परीक्षित् राजाकडेहि गेला होता (भा. १. १९. १०; ३. १. १). मैत्रेय गुप्तपणें वाराणशीस राहत असतां व्यासानें यास दर्शन दिलें. त्या वेळीं यानें व्यासाची योग्य प्रकारें पूजा करून भोजनहि करविलें. त्यामुळें व्यास तृप्त होऊन हंसला. त्यावर मैत्रेयानें हंसण्याचें कारण विचारिलें असतां व्यासानें याच्या व इतरांच्या कृतींतील महदंतर सांगितलें. यानंतर मैत्रेयानें तप, दान व विद्या यांचें व्यासापुढें विवेचन केलें. शेवटीं व्यासानें तप व दान यांचें यास आचरण करण्यास सांगून उत्तम आशीर्वाद दिले (म. अनु. १८२-१८४ कुं.). पराशरानें याला विष्णुपुराण सांगितलें (विष्णु. १. १. ४-५).

**मैत्रेयी**—हें याज्ञवल्क्याच्या दोन बायकांपैकीं एकीचें नांव आहे. ही ब्रह्मवादिनी होती (बृ. उ. ४. ५. १). हिचा याज्ञवल्क्याशीं संवाद करितांना अनेक वेळां उल्लेख आहे (बृ. उ. २. ४. १-२; ४. ५. १५; सुलभा मैत्रेयी पहा).

**मैनाक**—हिमालय व मेनका किंवा मेना यांचा पुत्र (ह. वं. १. १८). इतर पर्वतांचे पंख तोडिले, तेव्हां हा इंद्राच्या भयानें समुद्रांत लपला होता. तों मारुति लंकादहनार्थ जात असतां समुद्राच्या सांगण्यावरून बाहेर आला व आपल्या शिखरावर बसण्याविषयीं यानें मारुतीस विनंति केली. याचा पुत्र क्रौंच (वा. रा. सुं. १. १०५).

**मैंद**—सुषेण वानराच्या दोन पुत्रांतील ज्येष्ठ. द्विविदाचा हा ज्येष्ठ बंधु होय. हे दोघे अंगदाचे मातुल होते. यानें रामास साहाय्य केलें (भा.१०. ६७.२;वा.रा.किं.४१). वालीवधानंतर सीताशुद्धीसाठीं जे वानर सुग्रीवानें पाठविले, त्यांत हाहि होता (वा. रा. किं. ४१). यानें मुष्टीनें वज्रमुष्टीस ठार मारिलें (वा. रा. यु. ४३). यानें यूपाक्षाला मारिलें (वा.रा. यु. ७६). इंद्रजिताशीं झालेल्या युद्धांत रामलक्ष्मण मूर्च्छित झाले असतां त्यांस सुग्रीवानें सावध केलें. त्या वेळीं बिभीषणानें कुबेरानें पाठविलेलें उदक सर्वांस लावण्यास दिलें. तें डोळ्यांस लावतांच अंतर्धान पावलेले प्राणी दिसूं लागले. हें उदक यानेंहि आपल्या डोळ्यांना लाविलें होतें (म. व. २८९). मैंद व द्विविद यांचें सात दिवसपर्यंत किष्किंधेजवळ सहदेवाशीं युद्ध झालें. पण यांना संतोष होऊन यांनीं पांडवांस रत्नें व करभार दिला व 'धर्मराजाचें इच्छित सफल होवो' अशी इच्छा प्रदर्शित केली (म. स. ३१).

**मोद**—हिरण्याक्षाच्या पक्षांतील एक असुर. हिरण्याक्षाशीं देवांच्या झालेल्या युद्धांत यास वायूनें मारिलें (पद्म. सृ. ७५).

२ सर्पसत्रांत दग्ध झालेला ऐरावतकुलांतील सर्प (म. आ. ५७. ११ कुं.).

३ वायु व ब्रह्मांडमतें मौद्राचें नांव.

**मोदसिंह**—न्यूह नामक म्लेच्छाच्या वंशांतील विसेनाचा कनिष्ठ पुत्र. यानें पन्नास वर्षें राज्य केलें. याचा पुत्र सिंधुवर्मन् (भवि. प्रति. ४. ३).

**मोदोष**—व्यासाच्या अथर्वन्‌शिष्यपरंपरेंतील विष्णुमतें वेददर्शाचा शिष्य (व्यास पहा).

**मोह**—ब्रह्मदेवाच्या छायेपासून उत्पन्न झालेला पुत्र (भा. ३. २०). हा ब्रह्मदेवाच्या बुद्धीपासून झाला असाहि उल्लेख आहे (मत्स्य. ३. ११).

**मोहक**—रामाचा परमभक्त सुरथ राजा, त्याचा हा पुत्र. सुरथानें रामाचा अश्वमेधीय अश्व धरिला, त्या वेळीं हा सैन्यासह युद्धांत होता (पद्म. पा. ४९).

**मोहन**—अजमीरच्या चपहानि राजाच्या वंशांतील प्रतापवानाचा पुत्र. यानें तीस वर्षें राज्य केलें. याचा पुत्र श्वेतराय (भवि. प्रति. ४. २).

**मोहना**—सुग्रीवाची पत्नी. रामाच्या अश्वमेधीय अश्वाला स्नान घालण्याकरितां हिनें पतीसहित सरयूवर जाऊन तिचें उदक आणिलें होतें (पद्म. पा. ६७).

**मोहिनी**—एक वेश्या. मरतांना गंगोदक प्याल्यामुळें ही पुढल्या जन्मीं द्रविड देशच्या वीरवर्मा राजाची पट्टराणी झाली (पद्म. उ. २२०).

२ समुद्रमंथन करून जीं चौदा रत्नें निघालीं, त्यांत अमृतहि निघालें. देव आणि दानव यांनीं मंथन केलें असल्यामुळें त्यांना अमृत प्राशन करण्याचा हक्क प्राप्त झाला. त्याप्रमाणें ते एकत्र जमले. अमृतकलश दानवांनीं आपल्या ताब्यांत घेतला. अमृताच्या ठिकाणीं अमर करण्याची अद्भुत शक्ति होती. देवांना अमर होण्याची इच्छा होती. पण त्याबरोबरच दानवांना अमृतपान करूं देऊं नये हीहि इच्छा होती. अशा वेळीं विष्णूनें मोहिनीरूप धारण करून दानवांना भुरळ पाडिली,

देवांनीं अमृतपान केलें. हा अवतार चाक्षुष मन्वंतरांत झाला ( भा. १. ३; ८. ८-१२; म. आ. १८. ५५ कुं.; भस्मासुर पहा ).

**मौजवत्**—( अक्ष पहा ).

**मौंज**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**मौंजकेश**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**मौंजवृष्टि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**मौंजायन**—युधिष्ठिराच्या सभेंतील एक ऋषि ( म. स. ४. १९ कुं. ).

**मौंजायनि**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार. कौब्जायनि असा पाठभेद आहे.

**मौद्**—व्यासाच्या अथर्वन्‌शिष्यपरंपरेंतील भागवतमतें देवदर्शाचा शिष्य. याबद्दल मोद व मोदोष हीं नांवें आहेत.

**मौद्गल**—वेदमित्राचा शिष्य. मुद्गल असा पाठभेद आहे ( व्यास पहा ).

**मौद्गलायन**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**मौद्गल्य**—नाक, शतबलाक्ष, लांगलायन व एकादशाक्ष यांचें हें पैतृक नांव आहे.

२ मुद्गल व भागीरथी यांचा पुत्र. याची स्त्री जाबाला ( ब्रह्म. १३६. २-३ ). यानें विष्णूच्या आज्ञेनें गरुडानें आणून दिलेलें कणीस गौतमीच्या तीरावर दान केल्यामुळें हा समृद्ध झाला ( ब्रह्म. १३६ ).

३ नालायनी इन्द्रसेना नांवाच्या स्त्रीनें आपला वृद्ध व कुष्ठी असणारा मौद्गल्य नांवाचा पति सेवा करून प्रसन्न ठेविला होता. एकदां यानें नालायनीच्या इच्छेवरून तिच्याशीं पांच प्रकारचीं रूपें घेऊन क्रीडा केली. पुढें याला कंटाळा येऊन हा विरक्त झाला. पण नालायनी अतृप्त राहिल्यानें यानें तिला पुढील जन्मीं द्रौपदी होण्याचा शाप दिला ( म. आ. २१२-२१३ कुं. ). याला दुसरीकडे मुद्गल म्हटलें आहे ( म. व. ११४. २४ कुं. ). गणपत कृष्णाजीच्या प्रतींत ही कथा सविस्तर नसली तरी दोघांच्या नांवांचा निर्देश आहे.

४ अंगिराकुलांतील प्रवर.

५ रामाच्या सभेंतील एक मंत्री ( वा. रा. उ. ७४. ४ ).

६ जनमेजयाच्या सर्पसत्रांतील एक सभासद ( म. आ. ५३. ९ कुं. ).

७ शतद्युम्नानें याला एक घर दिलें होतें ( म. शां. २४०. ३९; अनु. २००. २१ म. कुं. ). याला दुसऱ्या ठिकाणीं मुद्गल म्हटलें आहे.

**मौन**—अणीचिन्‌चें पैतृक नांव.

२ ( ऐति. भविष्य. ) भागवत व ब्रह्मांड यांच्या मतें भविष्यकालीन अकरा राजांचा हा एक वंश आहे. यांचीं वर्षें ब्रह्मांड व भागवत यांच्या मतें तीनशें आहेत. हेच पंजाबचे मयु असावेत ( भा. इ. सं. मं. १८३५ इ. ले. ५८ ).

**मौनवेपग**—सर्पसत्रांत दग्ध झालेला धृतराष्ट्रकुलांतील सर्प ( म. आ. ५७. १७ कुं. ).

**मौर्य**—( ऐति. ) चंद्रगुप्तादि दहा राजे. यांनीं १३७ वर्षें राज्य केलें.

**मौर्वी कामकटंकटा**—मुरु दैत्याची मुलगी. हिला कामादेवीकडून अजिंक्यत्व मिळालें होतें. कृष्णानें मुरूला मारिल्यावर हिनें कृष्णाशीं तीन दिवस युद्ध केलें. तें युद्ध कामादेवीनें थांबविलें. पुढें प्राग्ज्योतिषपुरांत राहत असतां हिचें लग्न घटोत्कचाशीं झालें ( स्कंद. १. २. ५९-६० ).

**मौलि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

२ बाभ्रव्याचा पिता. बाभ्रव्यानें पृषध्रास शूद्रहत्येचा शाप दिला. तेव्हां त्या दोघांचें लागलेलें भांडण यानें मिटविलें ( मार्कं. १०९ ).

**मौषिकीपुत्र**—हारिकर्णीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य बाडेयीपुत्र ( श. ब्रा. १४. ९. ४. ३० ).

**मौहूर्तिक**—धर्म ऋषि व मुहूर्ता यांचे पुत्र, देव.

**म्लेच्छहन्तृ**—( २ प्रद्योत पहा ).

## य

**यक्ष**—देवयोनींतील एक जात किंवा व्यक्ति. ब्रह्मदेवानें कांहीं प्राणी उत्पन्न केल्यावर त्यांनीं 'किं कुर्मः' असें विचारिलें असतां ब्रह्मयानें 'रक्षध्वं' असें सांगितलें. त्यांत कांहींनीं यक्षाम आणि कांहींनीं रक्षाम असें उत्तर दिलें. हे अनुक्रमें यक्ष व राक्षस झाले. यांचा राजा कुबेर. हे विद्याधरांच्या निवासस्थानाच्या खालीं जेथपर्यंत वायु वाहतो त्या मेरु पर्वतापर्यंत राहतात ( भा. ५. २४. ५ ). अगस्तीनें शाप दिला ( म. व. १६२. ६४ कुं. ) म्हणून यांना भीमानें ठार केलें.

२ हा कश्यप व खशा यांचा थोरला पुत्र. हा आपले आईस खाऊं लागला. पण रक्षसानें त्याचें निवारण केलें.

हा दिलोहित, एककर्ण, मुंजकेश, हस्वास्य, दीर्घजिह्व, बहुदंष्ट्र, महाहनु, रक्तपिंगाक्षपाद, चतुष्पाद, दोन गतींचा,

र्वांगावर केस असलेला, चतुर्भुज, नाक सुरेख, मोठें पोट, मोठें डोकें, मोठा कान, शितिकंठ, मोठ्या पायाचा, मोठ्या तोंडाचा असा हा संध्याकाळीं झाला (ब्रह्मांड. ३. ७. ४२) याची स्त्री शंठकन्या जंतुधना (ब्रह्मांड. ३. ७. ८६). यास तिचे ठायीं यातुधान झाले.

यानें क्रतुस्थलेशीं वसुरुचि गंधर्वाचें रूप घेऊन संभोग केला. तीपासून यास रजतनाभ नांवाचा मुलगा झाला(ब्रह्मांड. ३. ७. १-१२). यानें पुढें तिला अप्सरागणांत पोहोंचविलें.

यमानें यक्षाचें रूप घेऊन धर्मास कांहीं प्रश्न विचारिले. धर्मानें समाधानकारक उत्तरें दिल्यावरून यानें त्याचे चारी बंधु जिवंत केले ( युधिष्ठिर पहा; म. व. ३१४.४७ कुं. ).

३ एक व्यास ( व्यास पहा ).

**यक्षु**—ही एक दाशराज्ञयुद्धांतील सुदासाच्या विरुद्ध बाजूची व्यक्ति आहे. इंद्रानें भेदाला मारिल्यावर हा इंद्राला नजराणा घेऊन शरण गेला. अज व शिग्रु यांच्या बरोबर होते. हे सर्व यमुनेच्या कांठीं झाले (ऋ. ७. १८. ६; १९).

**यक्षेश्वर**—समुद्रमंथन केल्यानंतर अमृत उत्पन्न झालें. तें प्राशन केल्यामुळें देवांना जय प्राप्त होऊन गर्व उत्पन्न झाला. तेव्हां यक्षेश्वराचा अवतार झाला. यानें देवांकडे जाऊन त्यांच्यापुढें एक गवताची काडी ठेवून ती हलविण्यास सांगून देवांची परीक्षा पाहिली. देवांना ती हलवितां येईना. तेव्हां देवांचा गर्वपरिहार झाला व आकाशवाणीहि झाली कीं, 'हा शिवाचा अवतार आहे' (शिव. शत. ३६). अशीच केनोपनिषदांत गोष्ट आहे.

**यक्ष्मनाशन प्राजापत्य**—सूक्तद्रष्टा (ऋ.१०.१६१).

**यंकणा**—रंकणाची स्त्री.

**यजत**—एक यज्ञकर्ता ( ऋ. ५. ४४. १०–११ ). याचा अनेकांसह निर्देश येतो. यजत आत्रेय सूक्तद्रष्टा व हा एक असतील ( ऋ. ५. ६७-६८ ).

**यजत आत्रेय**—( यजत पहा ).

**यज्ञु**—(सो. क्रुष्ट.) हा मत्स्यमतें उपरिचर वसूचा पुत्र.

**यज्ञुदाय**—( सो. वसु. ) हा वायुमतें देवकीपासून वसुदेवाला झालेला पुत्र.

**यज्ञ**—स्वायंभुव मन्वंतरांत रुचि ऋषि व आकूति यांचेपासून झालेला विष्णूचा सातवा अवतार. याच्या पत्नीचें नांव दक्षिणा असून यास तुषित नांवाचे बारा पुत्र होते. यास स्वायंभुव मनूनें पुत्रिकापुत्रधर्मानें घेतलें होतें. हा स्वायंभुव मन्वंतरात इंद्र होता ( भा. १. ३. १२; ४. १. ८; ८. १. १८; विष्णु. ३. १. ३६ ). यज्ञाचें डोकें शंकरानें उडविलें व तें धन्वंतरीनें अश्विनीकुमारांच्या साह्यानें चिकटविलें, अशी कथा मधुतसंहितेच्या प्रारंभीं वैदिक म्हणून दिली आहे. यास सुयज्ञ या नांवानें संबोधिल्याचें आढळतें ( भा. २. ७. २ ).

२ ( आंध्र. भविष्य. ) ब्रह्मांडमतें गौतमीचा पुत्र.

**यज्ञ प्राजापत्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १३० ).

**यज्ञकृत्**—( सो. क्षत्र. ) विष्णुमतें विजयाचा पुत्र.

**यज्ञकोप**—रामानें मारिलेला रावणपक्षीय राक्षस ( वा. रा. यु. ९. ४३ ).

**यज्ञदत्त**—कांपिल्य नगरांतील अग्निहोत्री ब्राह्मण. याचा पुत्र गुणनिधि ( शिव. रुद्र. सृ. १८ ).

२ भगदत्ताचा पुत्र. गणपत कृष्णाजीप्रतींत यास वज्रदत्त असें नांव आहे ( वज्रदत्त पहा ).

३ वसिष्ठकुलांतील ब्राह्मण. हा यज्ञकर्मांत निष्णात असून यामुन पर्वताच्या पायथ्याशीं राहत असे ( पद्म. पा. ९६ ).

४ ( सो. कुरु. भविष्य. ) भविष्यमतें शतानीकाचा पुत्र.

५ ( नंद. भविष्य. ) भविष्यमतें देवानंदाचा पुत्र. याचा पुत्र मौर्यानंद. यानें दहा वर्षें राज्य केलें (भवि. प्रति. १.६).

**यज्ञदेव**—( सुमति पहा ).

**यज्ञपति**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**यज्ञपिंडायन**—भृगुकुलांतील गोत्रकार. यद्यामिलायन असा पाठभेद आहे.

**यज्ञबाहु**—(स्वा. प्रिय.) भागवतमतें बर्हिष्मतीचे ठिकाणीं झालेला प्रियव्रतपुत्र. हा शाल्मली द्वीपांत राज्य करी. यानें त्या द्वीपाचे आपल्या पुत्रांइतकेच म्हणजे सात भाग करून त्यांस त्यांचीच नांवें ठेवून तेथील व्यवस्था त्यांच्याकडेच सोंपाविली ( भा. ५. १. २५ ). याचे पुत्र सुरोचन, सौमनस्य, रमणक, देववर्ष, पारिभद्र, आप्यायन आणि अविज्ञात ( भा. ५. २०. ९; १ मेधातिथि पहा ).

**यज्ञवचस् राजस्तंबायन**—एक आचार्य ( श. ब्रा. १०. ४. २. १; मै. सं ३. १०. ३; ४. ८. २ ). तुर कावषेयाचा हा शिष्य. याचा शिष्य कुश्रि (बृ. उ. ६. ५. ४).

**यज्ञवराह**—वराहरूप विष्णु (म. स. ४५. १२ कुं.).

**यज्ञवाह**—अगस्त्यकुलांतील गोत्रकार.

**यज्ञशत्रु**—लंकेंतील खरानुयायी एक राक्षस ( वा. रा. अर. २३. ३१ ).

**यज्ञशर्मन्**—पूर्वी द्वारकेंत शिवशर्मा या नांवाचा एक महातपस्वी ब्राह्मण राहत असे. त्याला यज्ञशर्मा, वेदशर्मा, धर्मशर्मा, विष्णुशर्मा व सोमशर्मा अशीं पितृभक्त मुलें होतीं. एकदां आपल्या पुत्रांची भक्ति पाहण्याकरितां म्हणून शिवशर्म्यानें मायेनें ज्वर उत्पन्न केला. त्यांत याची बायको मरण पावली असतां त्यानें यज्ञशर्म्यास 'तिचे तुकडे

फेंकून दे ' असें सांगितलें. बापाची आज्ञा ऐकतांच या पितृभक्तानें मातेचे तुकडे तुकडे केले व ते टाकून दिले. पण पुढें तिला यानें जिवंत केलें ( पद्म. भू. १ ).

**यज्ञश्री**—( आंध्र. भविष्य.) भागवत व विष्णु यांच्या मतें शिवस्कंदाचा पुत्र. पण वायुमतें गौतमाचा, ब्रह्मांडमतें गौतमीपुत्राचा पुत्र व शिवस्वातीचा पौत्र. मत्स्यमतें यासच शिवश्री म्हटलें आहे.

**यज्ञसेन**—पृषत्‌पुत्र द्रुपदाचें नामांतर.

**यज्ञसेन चैत्र** किंवा **चैत्रियायण**—एक आचार्य ( तै. सं. ५. ३. ८. १; क. सं. २१. ४).

**यज्ञहन्**—ब्रह्मधनेचा पुत्र.

२ आठव्या वृषाचा पुत्र.

**यज्ञहोत्र**—उत्तम मनूचा पुत्र.

**यज्ञापेत**—ब्रह्मधनेचा मुलगा.

**यज्ञेषु**—याचा मात्स्य नांवाचा एक पुरोहित होता. मात्स्याला यज्ञ करण्याची वेळ बरोबर समजत असे. त्यानें याला भरभराटीस आणिलें ( तै. ब्रा. १. ५. २. १ ).

**यज्वन्**—पारावत देवांतील एक.

**यति**—या लोकांचा ऋग्वेदांत उल्लेख आहे ( ऋ. ८.३. ९ ). हे लोक यज्ञविरोधी होते, म्हणून इंद्रानें यांना जाणून बुजून लांडग्यांच्या भक्ष्यस्थानीं पाडिलें. पण यांच्यापैकीं, पृथुरश्मि, बृहद्गिरि व रायोवाज हे शिल्लक राहिले. यांचें संरक्षण इंद्रानेंच केलें व क्रमानें क्षत्रविद्या, ब्रह्मविद्या व वैश्यविद्या यांना दिल्या ( पं. ब्रा. १३. ४. १७-१८; क. सं. ७. ५). पण जाणून ब्रह्महत्या केली असतां प्रायश्चित्त घेण्यास इंद्राचें हें उदाहरण आहे ( मनु. ११. ४५ कुल्लूकभाष्य ).

२ ( सो. पुरूरवस्. ) नहुषाचा पुत्र. याची पत्नी ककुत्स्थकन्या गौ ( ब्रह्म. १२. ३; वायु. २. ३०. १४; ह. वं १. ३० ). हा आपल्या भावांत वडील होता, तरी यानें ययातीला राज्य देऊन आपण योगमार्गाचा अवलंब केला ( म. आ. ६९. ३३ कुं.; भा. ९. १८. १-२; पद्म. सृ. १२.; मत्स्य. २४. ५१).

३ ब्रह्मदेवाचा मानसपुत्र ( भा. ४. ८. १ ).

४ विश्वामित्राचा पुत्र.

५ शिव देवांतील एक.

**यतिनाथ**—शंकराचा अवतार. अबूच्या पहाडांत आहुक-आहुका नांवाचें भिल्लांचें एक जोडपें होतें. तेंच यांच्या कृपेनें पुढल्या जन्मीं नलदमयन्ती झालें (शिव. शत. २८).

**यतीश्वर**—शिखंडिन् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**यदु**—दाशराज्ञयुद्धांत सुदासाचा हा प्रमुख शत्रु होता [illegible] १९. ८ ). याचा तुर्वशांशीं निकट संबंध दिसतो. हा सुदासाचा शत्रु असला, तरी इंद्राचा उपासक होता ( ऋ. १. १०८. ८; १७४. ९; ५. ३१. ७ ). हे दाशराज्ञयुद्धांत अर्ण व चित्ररथाप्रमाणें पाण्यांत बुडून मरत होते. पण इंद्रानें यदुतुर्वशांना पाणउतार दाखवून पार पाडिलें (ऋ. ४. ३०. १७ ). यांचा ऋग्वेदांत एकवचनीं व अनेकवचनींहि फार वेळां उल्लेख आहे. यदुतुर्वशांना इंद्रानें सुदासाच्या ताब्यांत यावें, अशी वसिष्ठानें प्रार्थना केली आहे ( ऋ. ७. १९. ८ ) व पुढें इंद्रानें यांना सुदासाच्या ताब्यांत दिलें ( ऋ ९. ६१. २ ).

यदुतुर्वश हे सुदासाचे शत्रु असून पुढें मित्र झाले असावेत ( ऋ. ४. ३०. १७; ६. २०. १२; ४५. १ ). यदूच्या वंशजांना याद्व म्हटलें आहे ( ऋ. ७. १९. ८ ). यदूबरोबर उग्रदेव, नर्य, तुर्वीति, वय्य इत्यादींचीं नांवें आहेत ( ऋ. १. ३६. १८; ५४. ६ ). पण या गोष्टींचा पौराणिक ग्रंथांत मागमूसहि नाहीं.

२ (सो. आयु.) हा आयुपुत्र ययाति राजास देवयानीपासून झालेला ज्येष्ठ पुत्र ( ह. वं. १. ३०; म. आ. ८२; मत्स्य. ३१ ). शुक्राचार्यांच्या शापानें ययातीचें तारुण्य नष्ट झालें, तेव्हां ययातीनें यदूला जरा घेऊन तारुण्य देण्यास सांगितलें. यदूनें तें मान्य केलें नाहीं. तेव्हां ययातीस राग येऊन त्यानें ' तुझ्या मुलास राज्याचा कांहींहि अंश मिळणार नाहीं ' असें सांगितलें ( म. आ. ८४ ). सर्व पुत्रांत यदु हा ज्येष्ठ होता. हा ययातीचा अत्यंत लाडका होता, परंतु जरा घेण्याचें यानें नाकारिलें. याचें कारण यास असें वाटलें कीं, आपल्या तारुण्यग्रहणानें आपल्या मातेशीं आपला पिता रममाण होणार व ह्यामुळें पित्राज्ञा पाळण्याचें जरी श्रेय मिळालें, तरी मात्रागमनाचें पापहि लागेल. याकरितां यानें राज्य व सार्वभौमपद यांचा लोभ सोडून दिला. पण ययातीनें याला राज्याचा थोडा भाग दिला व यदूनेंहि तो घेतला ( वायु. २.३१; भा. ९. १९. २३ ). ययातीनें यदूला हजार वर्षें जरा घ्यावयास सांगितलें, असा उल्लेख आहे. हरिवंश व ब्रह्मपुराणांत ही जरा शापानें मिळाली नसून कालनियमानुरूप होती, व यदूनें 'मी एका ब्राह्मणास कांहीं देण्याचें वचन दिलें असल्यामुळें जरा घेऊं इच्छित नाहीं'असें सांगितलें आहे ( ह. वं. १. ३०; ब्रह्म. १२ ). ययातीच्या या व इतर पुत्रांस राज्याधिकार नव्हता ( विष्णु. ५. ३ ) व म्हणूनच कृष्णादि यादवांस गवळी व अनुवंशज कर्णादिकांस सूत म्हणत असावेत. यानें अवधूताची कृपा संपादन करून ब्रह्मविद्या प्राप्त करून घेतली ( भा. ११. ७. २५ ). हा जरी सार्वभौम नव्हता तरी याची मान्यता सर्व राजांत मोठी

असे. यदूच्या संततीविषयीं निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळी माहिती दिली आहे. भागवतांत क्रोष्टु, सहस्रजित्, नल आणि रिपु असे चार पुत्र आहेत ( ९. २३ ). नील, अंतिक व लघु ( मत्स्य. ४३. ७ ); जित व लघु ( वायु. २. ३२ ); हरिवंशांत सहस्रद व पयोद ( १. ३३ ) असून, विष्णुपुराणांत फक्त क्रोष्टु असा एकच मुलगा दिला आहे ( ४. ११ ). पद्मपुराणांत भोज, भीमक, अंधक, कुजर, वृष्णि, श्रुतसेन, श्रुताधार, कालदंष्ट्र आणि कालजित् असे याचे वेगळे पुत्र दिले आहेत ( सृ. १०९ ). यदूपासून यादवांची उत्पत्ति झाली. मौसल युद्धांत याच्या वंशाचा क्षय झाला ( म. मौ. ४. ३६ कुं.; भा. ११. ३० ). याच्या राज्यांत चर्मण्वती, वेत्रवती व शुक्तिमती या नद्यांच्या कांठचा प्रदेश मोडत होता ( ययाति पहा ).

३ विदर्भ देशचा एक राजा. यानें आपली प्रभा किंवा सुमती नांवाची कन्या सूर्यवंशीय सगराला दिली होती.

४ ( सो. ऋक्ष. ) उपरिचर वसूचा पुत्र ( म. आ. ६४. ४४ कुं. ).

५ स्वायंभुव मन्वंतरांतील जित देवांपैकीं एक.

**यदुध्र**—रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**यज्ञाग्निलायन**—( यज्ञाग्निलायन पहा ).

**यम**—याचा पिता विवस्वत् ( ऋ. १०. १४.५ ) व माता सरण्यू ( ऋ. १०. १७. २ ). ऋग्वेदांत यमयमी नांवाच्या बहिणभावांचा संभोगप्रार्थना असलेला संवाद आला आहे ( ऋ. १०. १० ). याला पहिला मनुष्य म्हटलें आहे ( अ. वे. ८. ३. १३ ). याला राजाहि म्हटलें आहे ( कौ. उ. ४. १५ ). यमाच्या राज्याचा उल्लेख आहे ( मै. उ. ६. ३६ ). याला देवताहि मानिलें आहे ( बृ. उ. १. ४. ११; ३. ९. २१ ). नचिकेतसला, यानेंच ज्ञानोपदेश केला ( कठोपनिषद् ). याला वैवस्वत असें पैतृक नांव मिळालें आहे ( ऋ. १०. १४. १; ५८. १; ६०. १०; १६४. २ ). हा दक्षिणेकडील राजा होता ( श. ब्रा. २. २. ४. २ ). याचें राहण्याचें स्थान तीन द्युलोकांपैकीं सर्वांत उंच असलेलें एक आहे ( ऋ. १.३५.६ ). याचे दूत उलूक, कपोत ( ऋ. १०. १६५.४ ) व दोन कुत्रे ( ऋ. १०. १४. १० ) आहेत.

अग्नि ( तै. सं. २. ३. ८. ३), वायु ( नि. १०. २०. २ ) व सूर्य ( ऋ. १०. १३५. १ ) यांना यम म्हटलें आहे. पहिल्या ठिकाणच्या उताऱ्यावरून यमयमीसंवाद म्हणजे अग्नि व पृथ्वी यांचा संवाद होय.

विवस्वत् व संज्ञा यांचा पुत्र ( ह. वं. १. ९; मार्क. ७४.७; भा. ६. ६. ४०; मत्स्य. ११.९; विष्णु. ३.२. ४; पद्म. सृ. ८; वराह. २०. ८; भवि. प्रति. ४. १८). संज्ञेस सूर्याचें तेज सहन होत नसे, म्हणून ती तो समोर येतांच नेत्र मिटीत असे. त्यावरून त्यानें तिला 'तुझे पोटीं प्रजासंहारक यम होईल' असा शाप दिला. तोच हा यम ( मार्क. ७४.४ ). यम व यमी हीं जुळीं मुलें होत ( पद्म. सृ. ८ ). पुढें छाया नामक आपले सापत्न मातेस यानें निर्भर्त्सनार्थ लाथ मारिली ( ब्रह्म. ६ ); उजवा पाय उचलून निर्भर्त्सना केली ( मत्स्य. ११. ११; पद्म. सृ. ८; वायु. २. २२ ); पाय उचलिला ( ह. वं. १. ९ ). म्हणून छायेनें यास एकदम रागानें शाप दिला कीं, 'हा तुझा पाय गळून पडेल ( ह. वं.१. ९; वायु. २. २२. ६२; पद्म. सृ. ८ ), त्यांत पू, रक्त व किडे होतील. ' ( मत्स्य. ११. १२ ). यानंतर यम आपल्या पित्याकडे गेला, व झालेली सर्व हकीकत यानें सांगितली; तेव्हां याचे पित्यानें यास उःशापवजा वर दिला. त्यांतहि बरींच मतांतरें आहेत. तीं अशीं:—पाय हाडासकट गळून न पडतां, पायांचें मांस किडे खातील ( ह. वं. १. ९; वायु. २. २२. ६२; ब्रह्म. ६ ); पू, रक्त इत्यादि किडे खातील व पाय पूर्ववत् होईल ( मत्स्य. ११. १७ ); एक तांबड्या पायांचें पांखरूं पाय खाईल व नंतर पाय आंखूड पण सुंदर होईल. ' नंतर याला वैराग्य उत्पन्न होऊन यानें तपश्चर्या केली, तेव्हां ब्रह्मदेवानें याला पितरांचें स्वामित्व व जगांतील पापपुण्यांवर नजर ठेवण्याचें काम दिलें ( पद्म. सृ. ८ ). एकदां मांडव्य ऋषीस निरपराधी असतांना फांशीं दिलें होतें. त्या वेळीं मांडव्यानें याला शाप दिला कीं, 'तूं शूद्रयोनींत जन्म पावशील. ' त्याप्रमाणें यानें विदुररूपानें शूद्रयोनींत जन्म घेतला ( भा. १. १३. १५; म. आ. ६४. १३८; ११५. ४४; ११७. १७ कुं.; ). एकदां कुंतीनें यास उद्देशून मंत्र उच्चारिला. त्या मंत्रोच्चारामुळें यास तिजकडे जावें लागलें. पुढें तिचे मागणीवरून यानें तिचे उदरीं एक पुत्र उत्पन्न केला. तोच युधिष्ठिर होय (म. आ. १२९. २० कुं.).

अर्जुनास यानें एक अस्त्र दिलें होतें (म. व.४१. ९ कुं.). सावित्रीनें सत्यवानाला यापासून सोडविलें. यानें गौतमाला मातृपितृऋणांतून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला ( म. शां. १२९ कुं. ). यानें, धर्मानें आपल्या प्रश्नांचीं योग्य उत्तरें दिल्यामुळें, एका सरोवरावर मृत झालेल्या पांडवांस जिवंत केलें व अज्ञातवास पार पडण्याचा त्यांस वर दिला ( म. व. ३१४-३१५ कुं.).यानें केलेला उपदेश हिरण्यकशिपूनें आपल्या स्त्रियांस सांगितला ( भा. ७. २. ३६ ). याच्या स्त्रीचें नांव

धूमोर्णा ( म. अनु. २७१. ११ कुं.). याची नगरी मानसोत्तर पर्वतावरील संयामिनी ( भवि. ब्राह्म. ५३ ). यानें जनकाच्या विनंतीवरून वार्तेतील लोकांस त्रास न देण्याचें ठरविलें ( पद्म. पा. ३० ). याच्याकडे दूतानें एकदां यज्ञदत्ताऐवजीं त्यासारखाच दुसरा मनुष्य आणिला, पण त्यास यानें परत पाठविलें ( पद्म. पा. ९६ ). यानें रामभक्त सुरथाची रामनिंदा करून परीक्षा पाहिली व त्यास रामदर्शनाखेरीज मृत्यु येणार नाहीं असा वर दिला ( पद्म. पा. ३९ ).

यमुनेनें यमाला कार्तिक शुद्ध द्वितीयेस भोजन दिलें होतें; म्हणून जे त्या दिवशीं बहिणीच्या हातचें भोजन करतील त्यांना सदैव सौख्य प्राप्त होईल असा यानें वर दिला ( स्कंद. २. ४. ११ ).

यास हर्षणानें पिता विश्वरूप व माता विष्टि यांचीं भीषण स्वरूपें जाऊन सौम्य स्वरूपें होण्यास उपाय विचारिला असतां यानें गंगास्नानादि व्रतें सांगितलीं ( ब्रह्म. १६५ ).

एकदां यानें तपश्चर्या चालू केली असतां इंद्रानें वर्धनी नांवाची अप्सरा पाठविली. पण तिनें 'हा इंद्रपदाकरितां तपश्चर्या करीत नाहीं' असें इंद्रास कळविलें. पुढें यानें शंकराची वसति असलेला धर्मारण्य नांवाचा प्रदेश मिळविला ( स्कंद. ३. २. ४ ).

हा व याचा दूत यांच्यामध्यें झालेला संवाद *यमगीता* या नांवानें प्रसिद्ध आहे. ही गीता जातिस्मरानें कालिंगक ब्राह्मणास सांगितली. त्यानें ती भीष्मास आणि भीष्मानें नकुलास सांगितली ( विष्णु. ३. ७ ). यास धर्म हें नांव होतें ( ब्रह्म. ९४. १६-३२ ).

यमच्या नांवावर उपलब्ध असलेले ग्रंथ—१ यमसंहिता, २ यमस्मृति ( C. C. ).

याज्ञवल्क्यानें दिलेल्या धर्मशास्त्रकारांच्या यादींत याचें नांव आहे ( १. ५ ). वसिष्ठधर्मसूत्रांत यमाचे श्लोक आले आहेत. जीवानंदसंग्रहांत प्रायश्चित्त प्रतिपादन करणारी ७८ श्लोकांची स्मृति आहे. आनंदाश्रमांतील स्मृतिसमुच्चयांत ९९ श्लोकांची याची स्मृति आढळते. लग्नामध्यें स्त्री नवऱ्याच्या गोत्रांत जाते, असें याचें मत आहे ( याज्ञ. १. २५४ ). बृहद्यमाचीहि स्मृति आनंदाश्रमांतील संग्रहांत आहे. तीमध्यें शातातप ( ३. ४२; ५. २० ) व यम यांच्या नांवानें वारंवार उल्लेख आहे. विश्वरूप, विज्ञानेश्वर, अपरार्क, स्मृतिचंद्रिका वगैरे ग्रंथांत यांचे सुमारें तीनशें श्लोक आज उपलब्ध आहेत. यानें नचिकेताला दानासंबंधीं सांगितलेल्या गाथा प्रसिद्ध आहेत ( म. अनु. १६१.७६ कुं. ). व्यवहार व व्यभिचार यांसंबंधीं यानें बरीच महत्त्वाची माहिती दिली आहे. बृहद्यम ( मिता. ३. २५५ ), लघुयम किंवा स्वल्पयमहि आढळतात.

**यमक**—हे लोक युधिष्ठिराच्या दारांत नजराणे घेऊन उभे होते ( म. स. ७८. ८८ कुं. ).

**यमदूत**—विश्वामित्र ऋषीचा पुत्र.

**यमराज**—भास्कर संहितेंतील ज्ञानार्णव-तंत्राचा कर्ता ( ब्रह्मवै. २. १६ ).

**यमिन**—स्वायंभुव मन्वंतरांतील जिदाजित् देवांतील एक.

**यमी वैवस्वती**—सूक्तद्रष्ट्री ( ऋ. १०. १० ). विवस्वत् आदित्यास संज्ञेचे ठिकाणीं झालेली कन्या. हिच्या भावाचें नांव यम ( भा. ६. ६. ४०; ८. १३. ९ ). हिनें आपल्या भावाला भाऊबीज करून वर मागून घेतला हिला यमुना म्हटलें आहे. सरण्यू माता असल्याचेंहि आढळतें ( यम पहा ).

**यमुना**—( यमी वैवस्वती पहा ).

**ययाति**—( सो. आयु. ) प्राचीन यज्ञकर्ता व नाहुष्य राजा ( ऋ. १. ३१. १७; १०. ६३. १ ). कांहीं ऋचांचा हा द्रष्टाहि आहे ( ऋ. ९. १०१. ४-६ ). पण याचा पुराणाशीं संबंध दाखविणारा पुरावा नाहीं. ययातीचा वंश अग्नि, चंद्र व सूर्य यांपासून उत्पन्न झाला (म. आ. १. ५९ कुं. ). हा प्रजापतीपासून दहावा होता ( म. आ. ७६ ). हा नहुषास ( म. आ. ७५; ८९; ९५; उ. ११४; द्रो. १४४; अनु. १४७; वा. रा. उ. ५८; भा. ९. १८; विष्णु. ४. १०; गरुड. १. १३९. १८; पद्म. सृ. १२; अग्नि. २७४; मत्स्य. १५. २८ ) सुस्वधा संज्ञक पितरांची कन्या विरजा हिच्या ठायीं झालेल्या पुत्रांतील दुसरा होय (वायु. २. ३१; ह. वं. १. ३०; ब्रह्म. १२; कूर्म. १ २८, लिंग. १. ६६ ). हा नहुषास अशोकसुंदरीचे ठायीं झाला, असें पद्मपुराणांत दिलें आहे ( भू. १०९ ). याच्या भावांचीं नांवें व संख्या वेगळाली दिली आहे ( नहुष पहा ).

याचा ज्येष्ठ भ्राता यति विरक्त असल्यामुळें ( अग्नि. २७४ ) व नहुष अजगर झाल्यामुळें ( भा. ९. १८ ) हाच राज्याधिकारी झाला. एके काळीं मृगयेनिमित्त हा अरण्यांत गेला असतां, तृषाक्रान्त होऊन पाणी शोधीत असतां यानें तेथें एका विहिरींत शुक्रकान्त देवयानी पडलेली होती, तिला पाहिलें. ती नग्नावस्थेंत असल्यामुळें यानें आपलें अंगावरील उत्तरीय वस्त्र तिला नेसावयास दिलें. त्या वेळीं यानें 'तूं कोण व या कूपांत कशी पडलीस?' वगैरे तिची विचारपूस केल्यावर ती दैत्यगुरु शुक्राची कन्या देवयानी आहे असें जाणून

यानें तिच्या उजवा हात धरून तिला झटकन् बाहेर काढिलें आणि तिला विचारून हा आपल्या नगरास परत आला ( म. आ. ७८; भा. ९. १८ ).

पुनः एकदां यानें देवयानी व शर्मिष्ठा यांस पाहून त्या दोघींचीं नांवे विचारिलीं. तेव्हां देवयानीनें आपलें व शर्मिष्ठेचें नांव सांगून 'शर्मिष्ठा ही माझी दासी. जिकडे मी जाईन तिकडे ती यावयाची आहे,' असें सांगितलें. राजानेंहि आपली माहिती सांगितली. नतर यानें देवयानीची अनुज्ञा मागितली असतां देवयानीनें 'दोन सहस्र दासी व शर्मिष्ठा यांसह मीं आपलें तनमनधनानें दान केलें आहे, म्हणून मला आपली भार्या करावी,' अशी याच्याजवळ याचना केली. तेव्हां प्रतिलोम विवाह सरसहा रूढ नव्हता, म्हणून यानें तिचें म्हणणें नाकारिलें. तेव्हां तिनें, 'क्षत्रियकुलाचा संहार झाला असतां, ब्राह्मणवीर्यापासूनच क्षत्रियांची उत्पत्ति झाली. लोपामुद्रादि क्षत्रियकुमारिकांचाहि ब्राह्मणांशीं विवाह झाला आहे. शिवाय तुम्ही मागणी न करितां मला जर बाबांनीं तुम्हांला दिली, तर आपल्याला कोणताहि दोष अगर पाप लागणार नाहीं,' असें सांगितलें. महाभारतांत देवयानीनें ययातीस कचानें दिलेल्या 'तुला ब्राह्मण वरणार नाहीं' या शापाची माहिती सांगितलेली नाहीं. पण भागवतांत (९. १८) तिनें कचानें दिलेला शाप साद्यंत कथन केलेला आहे. नंतर देवयानीच्या इच्छेस अनुसरून शुक्राचार्यानें याला देवयानी विवाहविधीनें दिली. तेव्हां शुक्रानें याला उपदेश केला कीं, 'माझी प्रिय कन्या मीं तुला दिली आहे. तिला तूं पट्टराणी कर. या विवाहापासून तुला कांहींएक पाप लागणार नाहीं. ही दुसरी वृषपर्व्याची कन्या शर्मिष्ठा दासी होऊन प्रतिज्ञेप्रमाणें हिच्याबरोबर येत आहे, ही राजकुलीन आहे, म्हणून हिची योग्य व्यवस्था ठेव. पण केव्हांहि हिला शयनीय कर्मासाठीं हांक मारूं नको.' नंतर शुक्रानें याला अपार संपत्ति दिल्यावर हा देवयानी, शर्मिष्ठा व दोन हजार दासी यांसमवेत स्वनगरास आला.

नंतर यानें अशोकवनिकेजवळच शर्मिष्ठेची व तिच्या दासीगणांची योग्य व्यवस्था लावून दिली. पुढें हा नीतिपूर्वक राज्य करून देवयानीशीं रममाण होत असतां देवयानीस यदु व तुर्वसु असे दोन सुंदर पुत्र झाले. तुर्वसूला वैदिक वाङ्मयांत तुर्वश म्हटलें आहे. इकडे शर्मिष्ठेलाहि यौवनदशा व ऋतु हीं प्राप्त झालीं. शुक्राची आज्ञा होती तरी राजाला तिची विनंति नाकारितां आली नाहीं. क्रमानें शर्मिष्ठेसहि अनु, द्रुह्यु व पूरु असे पुत्र झाले.

शर्मिष्ठेस तीन पुत्र झाले, हें देवयानीस समजतांच ती रागानें बापाच्या घरीं निघून गेली. देवयानीनें जातांच राजाचें कृत्य पित्याला निवेदन केलें व सांगितलें कीं, 'मी पट्टराणी असून मला दोनच मुलें व त्या शर्मिष्ठा दासीला तीन मुलें! असा या आपल्या धर्मनिष्ठ जामातानें माझा गळा कापला!' तें ऐकून शुक्राचार्यांस अनिवार क्रोध आला व तो मागोमाग आलेल्या राजास म्हणाला, 'तूं धर्माधर्म जाणत असतांहि हें पातक जोडलेंस, त्याअर्थी तूं अकालीं म्हातारा होशील.' पण यानें विनंति केल्यावर शुक्राचार्य म्हणाला, 'माझें भक्तिपुरःसर स्मरण केलेंस म्हणजे ही जरा तूं कोणाशाहि देऊं शकशील. जो मुलगा तुला आपलें तारुण्य देईल—तो ज्येष्ठ असो वा नसो—तूं त्याला आपलें राज्य खुशाल दे. तो तारुण्य देणारा पुत्र दीर्घायुषी, कीर्तिवान् व अनेक अपत्यांचा पिता होईल व त्याचा वंश प्रसिद्ध होईल' (भा. ९. १८; ब्रह्म. १४६ ). याप्रमाणें जरा घेऊन ययाति राजाची स्वारी स्वनगरीस परत आली ( म. आ. ७७. ५२ कुं. ).

नंतर यानें ज्येष्ठ यदूला आपली 'वृद्धता व चित्तदुर्बलता हजार वर्षे घेऊन तारुण्य देतोस का?' म्हणून विचारिलें. पण त्यानें 'मला नको. तुम्हांस बरींच मुलें आहेत, तेव्हां माझ्यापेक्षां आपल्या आवडत्या मुलांस द्या' म्हणून सांगितलें. हरिवंशांत व ब्रह्मपुराणांत ही जरा शापानें प्राप्त झालेली नसून कालनियमानुरूप होती व यदूनें 'मी एका ब्राह्मणास कांहीं देण्याचें वचन दिलें असल्यामुळें मी जरा स्वीकारूं इच्छित नाहीं' असें सांगितल्याचें दिलें आहे (ह. वं. १. ३०; ब्रह्म. १२ ). तेव्हां ययाति रागावून म्हणाला, 'तुझ्या पुत्रांस मी राज्याचा वांटाच देत नाहीं.' नंतर तुर्वसूस तोच प्रश्न विचारिला असतां त्यानेंहि कानावर हात ठेविला. तेव्हां त्याला 'तुझ्या संततीचा नायनाट होईल व अव्यवस्थित आचाराच्या व धर्माच्या आणि उच्च वर्णांतील स्त्रियांशीं जेथें नीच वर्णाचे पुरुष रमतात, अशा अभक्ष्यभक्षक अंत्यजांचा तूं राजा होशील, तुला पापी व नतभ्रष्ट म्लेच्छ जातींत रहावें लागेल,' असा शाप दिला. नंतर शर्मिष्ठेचा ज्येष्ठ पुत्र द्रुह्यु यास विनवितांच तोहि 'नको' म्हणाला. त्यालाहि 'तुझें कधींहि कल्याण होणार नाहीं. भोगाशा तृप्त होणार नाहींत. जेथें व्यवहार नित्य नावांतून चालतो, तेथें तुला रहावें लागेल. येथें सुद्धां तुला व तुझ्या वंशाला राज्यपद मिळणार नाहीं,' असा शाप दिला. नंतर अनूनेंहि नाकारिल्यावर त्याला 'तूं आतांच म्हातारा होशील. तुझीं कारटीं भरज्वानींत मरतील व तुझ्या हातून श्रौत अगर स्मार्त अग्नीची सेवा न होतां तूं नास्तिक बनशील,' असा शाप दिला. नंतर यानें सर्वांत कनिष्ठ पुत्रास बोलाविलें व त्यास तोच प्रश्न विचारिला. त्यानें तो अनुग्रहच समजून सहस्र वर्षांचीहि मर्यादा न घालतां जरा घेण्याची तयारी दाखविली. तेव्हां ययातीचा आनंद गगनांत मावेना. यानें त्यास 'माझें सर्व राज्य तुला व तुझ्या मुलांस मिळेल,' असा आशीर्वाद दिला. यानंतर शुक्राचार्यांचें स्मरण करून यानें

पूरूच्या शरीरांत आपल्या जरेचें संक्रमण करून त्याचें तारुण्य आपण घेतलें. पुढें यानें अनेक प्रकारच्या आवडत्या विषयांचा उपभोग घेण्यास आरंभ केला. अनेक यज्ञ केले, दानें दिलीं व राजनीतीस अनुसरून प्रजेस सुखी केलें. देवयानीशीं व शर्मिष्ठेशीं विषयसुख घेतलें. नंतर विश्वाची अप्सरेसह नंदनवनांत व उत्तरस्थ मेरु पर्वतावरील अलका नामक कुबेरनगरींत यानें अनेक प्रकारचें विलाससुख भोगिलें. गौ नांवानें प्रसिद्ध असलेल्या विश्वाची अप्सरेसह चैत्ररथवनांतहि विलास केले. पण याची कामतृप्ति कांहीं हजार वर्षांत सुद्धां झाली नाहीं. हें पाहून याला फार वाईट वाटलें व विषयांचा वीट आला. यानें देवयानीस आपल्याच कथानकाचें एक रूपक सांगितलें. ‘एक बोकड दोन बकऱ्यांशीं बहुत काल रममाण झाला होता. पण त्याची कांहीं तृप्ति झाली नाहीं’ (भा. ९. १९). याच्या विरक्तीचे श्लोक अद्यापि लोकांत प्रसिद्ध आहेत (बृहद्दे. ६. २०-२४; म. शां. २६). नंतर यानें जरा परत घेऊन पूरूस राज्याभिषेक केला. हा स्वतः वानप्रस्थाश्रमाची दीक्षा घेऊन व भावावर भार टाकून तपस्वी ब्राह्मणांसह वनवासाला निघून गेला.

ययातीनें वनवासास जाण्यापूर्वी प्रत्येक मुलास वेगवेगळाले प्रदेश नेमून दिले. तुर्वसूला आग्नेय; यदूला नैर्ऋत्य; द्रुह्यूला पश्चिम; अनूला उत्तर व पूरूला मध्यप्रदेश (वायु. २. ३१; कूर्म. १. २२). मतभेदहि खालीं दिल्याप्रमाणें आहेत; यदूला ईशान्य (ह. वं. १. १०); पूर्व (ब्रह्म. १२); दक्षिण (विष्णु. ४. ३०; लिंग. १. ६६); द्रुह्यूला आग्नेय; यदूला दक्षिण; तुर्वसूला पश्चिम व अनूला उत्तर (भा. ९. १९).

यानें भृगु पर्वतावर तप केलें. सरतेशेवटीं हा आपल्या भार्यांसह स्वर्गलोकीं गेला. यास माधवी नामक एक कन्याहि होती. शिवाय यास सुकन्या नामक कन्या आढळते (विष्णुधर्म. १. ३२; माधवी पहा).

पण सुकन्या ययातीची मुलगी नसून वैवस्वत मनुपुत्र शर्यातीची मुलगी असावी, असें इतर पुराव्यांवरून उघड दिसतें.

हा स्वर्गांत गेला असतां याचा मानीपणा व इतरांचा अपमान करण्याची प्रवृत्ति यायोगानें हा लवकरच निस्तेज झाला व इंद्रानें यास स्वर्गांतून भौमनरकीं ढकलून दिलें. पण याच्या इच्छेनुरूप नैमिषारण्यीं माधवीपुत्र प्रतर्दन, वसुमनस्, शिबि व अष्टक याग करीत होते, तेथें हा पडला. तेव्हां माधवीनें आपलें अर्धे पुण्य व गालवानें ⅛ पुण्य यास दिलें. नंतर तेथें पांच सुवर्णरथ आले व त्यांत बसून हा व याचे चारहि नातू स्वर्गी निघाले. सर्व द्रव्य परमार्थी खर्च केल्यामुळें शिबीचा रथ सर्वांच्या पुढें होता. नंतर स्वर्गलोकीं गेल्यावर ब्रह्मदेवानें यास ‘तुझें पतन होण्याचें कारण तुझा अभिमान होय. पण तूं आतां स्वर्गांत आला आहेस, तर येथें अभिमान सोडून स्वस्थतेनें रहा,’ असें सांगितलें (म. आ. ८६-९३; उ. १२०-१२३; मत्स्य. ३४-४२).

रामायणांत व पद्मपुराणांत याच्या कथा वेगळ्या असल्यामुळें खालीं दिल्या आहेत. ययातीस शर्मिष्ठा जास्त आवडती व देवयानी नावडती होती. आपल्या मुलीशीं ययाति नीट वागत नाहीं, असें कळल्यावर शुक्रानें यास म्हातारा होण्याचा शाप दिला. शर्मिष्ठेस पूरु व देवयानीस यदु असे दोन पुत्र होते. नंतर यदूनें जरा घेण्याचें नाकारिलें. पण पूरु जरा घेण्यास तयार झाला. तेव्हां यानें पूरूस राजा करण्याचें आश्वासन दिलें व यदूस शाप दिला कीं, ‘तूं राक्षस व यातुधान उत्पन्न करशील. सोमकुलांत तुझी संतति राहणार नाहीं व ती उद्धट होईल.’ पूरु हा काशीदेशीं प्रतिष्ठान राजधानींत राजा झाला व यदूला क्रौंचवन नामक वनांत हजारो यातुधान झाले (वा. रा. उ. ५८-५९).

हा धर्मानें राज्य करीत असल्यामुळें इंद्रास हा आपलें इंद्रपद घेईल कीं काय अशी भीति पडून त्यानें मातलीस यास स्वर्गी आणण्याला पाठविलें. याचा व मातलीचा एक परमार्थपर संवाद झाला, पण हा स्वर्गी गेला नाहीं. तेव्हां इंद्रानें गंधर्वांकरवीं ययातीपुढें वामनावताराचें नाटक करविलें. त्यांत रतीची भूमिका पाहून हा खूष झाला. हा एकदां मलमूत्रोत्सर्ग करण्यास गेला असतां पाय न धुतां प्रयोग पाहण्यास बसला. त्यायोगें जरा व मदन हे दोघे ही संधि साधून याच्या शरीरांत घुसले. पुढें एकदा हा रानांत शिकारीस गेला असतां याला अश्रुबिंदुमती नामक एक सुंदरी दिसली. तिची सखी विशाला हिनें यास तिची अशी माहिती सांगितली कीं, ‘मदनदहनानंतर रतीच्या शोकानें दयाळू होऊन देवांनीं अनंग मदन निर्माण केला. त्यास पाहून रतीच्या डाव्या डोळ्यांतून जे आनंदाश्रु पडले, त्यांपासून ही उत्पन्न झाली व आतां ही स्वयंवर करूं इच्छिते.’ यानें तिला ‘माझ्याशीं लग्न लाव’ असें म्हणतांच तिनें ‘तुम्ही दुसऱ्यास जरा देऊन तारुण्य घ्याल, तर मी तुम्हांशीं लग्न लावीन,’ अशी अट घातली. तेव्हां यानें शर्मिष्ठेच्या तुरु नामक पुत्रानें तारुण्य देण्याचें नाकारिल्यामुळें त्यास शाप दिला कीं, ‘तूं धर्मभ्रष्ट होशील. तूं व तुझी संतति म्लेच्छत्व पावेल.’ दुसऱ्या यदूनेंहि नकार देतांच ‘तूं व तुझी संतति राज्यपदास योग्य होणार नाहीं व तुमचें क्षात्रतेज नष्ट होईल.’ तिसरा कुरु फार लहान असल्यामुळें त्याचें तारुण्य राजानें मागितलेंच नाहीं. चवथ्या पूरूनें मात्र बापास तारुण्य दिलें व आपण जरा घेतली. पुढें अश्रुबिंदुमतीनें दुसऱ्या

सवतीशीं संबंधहि न ठेवतां सर्व सत्ता मागितली. तीहि यानें दिली. पुढें यानें तिच्यासह वीस हजार वर्षे क्रीडा केली; व तिच्यासाठीं म्हणून यानें अश्वमेध केला. या नव्या सवतीबद्दल शर्मिष्ठा व देवयानी यांस मत्सर वाटूं लागल्यामुळें यानें यदूस त्यांचा वध करण्यास सांगितलें. पण तें त्यानें न ऐकिल्यामुळें 'तुझ्या वंशांतील पुरुष मातुळकन्यापरिणय करतील व मातृद्रव्याचे वांटेकरी होतील,' असा शाप दिला. पुढें इंद्रानें मेनकेकरवीं सुचविल्यावरून तिनें स्वर्गस्थ लोक पाहण्याची इच्छा दर्शविली. तिच्या आग्रहास्तव यानें पुरूस राज्य देऊन व राजनीतीचा उपदेश करून सर्व प्रजेसह वैकुंठीं गमन केलें व विष्णूपाशीं त्याचें दास्य मागितलें (पद्म. भू. ६४; ८३). यास कुरु, पुरु, रुरु व यदु असे चार पुत्र होते (पद्म. भू. ६४; १०९). यानें ८० हजार वर्षे सुखानें राज्य केलें. भविष्यमतें यानें १००००० वर्षे राज्य केलें.

ब्रह्मदेवानें निर्माण केलेलें दिव्य खड्ग यास नहुषानें दिलें होतें व यानें तें पूरूस दिलें (म. शां. १६६). इंद्रानें यास एक कांचनाचा रथ दिला होता. या रथानें यानें सहा रात्रींत सर्व पृथ्वी जिंकली; व हा सर्व देव, दानव व मनुष्यें यांत अजिंक्य ठरला (ह. वं. १. ३०). यानें सहा दिवसांत (ब्रह्म. १२) किंवा सहा महिन्यांत पृथ्वी जिंकली (लिंग. १. ६६). लिंगपुराणांत तो रथ राजास शुक्रानें दिला व त्यासह अक्षय्य भातेहि दिले, असें आहे (१. ६६). याची राजधानी प्रतिष्ठान (अलाहाबाद). एकदां सर्व राजर्षि व महर्षि तीर्थयात्रा करीत चालले असतां अगस्त्य ऋषीचें एक कमळ चोरीस गेलें. तेव्हां आपला निरपराधीपणा सिद्ध करण्यास्तव अनेकांनीं शपथा घेतल्या. त्यांत यानेंहि शपथ घेतली (म. अनु. ९४). याचे पांच पुत्र पांच वंशांचे जनक झाले. यदु-यादव; तुर्वसु-तुर्वसु; द्रुह्यु-द्रुह्यु; अनु-आनव; पूरु-पौरव (म. आ. ९५). यदु-यादव; तुर्वसु-यवन; द्रुह्यु-भोज; अनु-म्लेच्छ; पूरु-पौरव (म. आ. ८५).

ययाति शुक्राचार्यांची योग्यता जाणून होता (म. आ. ७८). याच्या नांवापुढें 'सम्राट्,' 'सार्वभौम' ह्या पदव्या ठिकठिकाणीं लाविलेल्या दिसतात. जरी सबंध आयुष्यभर हा कामुक दिसतो, तरी धर्मास सोडून हा कधींच वागला नाहीं. एवढेंच नव्हे, तर पूरूनें दिलेल्या तारुण्यकालांतहि यानें शेंकडों यज्ञ केले व हजारों गाई व दानें ब्राह्मणांस दिलीं व राजनीतीस अनुसरून प्रजापालन केलें (म. आ. ८९; शां. २९; अनु. ८१). हा यमसभेंत अधिष्ठित असतो (म. स. ८). याची विस्तीर्ण यज्ञभूमि लोमशानें धर्मास दाखविली (म. व. १२९). अर्जुनानें अज्ञातवासाच्या अखेरीस केलेलें युद्ध पाहण्यास हा देवांसह विमानांत बसून आला होता (म. वि. ५६). याला काशीपति म्हटलें आहे (म. उ. ११५).

हा यज्ञ करूं लागला म्हणजे सरस्वती व इतर नद्या, सप्तसागर व पर्वत यास दूध व तूप पुरवीत (म. श. ४१). देवासुरयुद्धांत यानें देवांस साहाय्य केलें (म. द्रो. ६३; शां. २९). सरस्वतीनदीतीरीं ययात या नांवाचें प्रसिद्ध तीर्थ आहे, तें नांव याच्याच नांवावरून पडलें (म. श. ४१). हा शंकराचा मोठा भक्त होता (लिंग. १. ६६). ययातिकाळीं याचें राज्य मध्यदेशापर्यंत आलें होतें.

हा मोठा दानशूर होता (म. व. २००. ग. कु. प्रत). पुढील वेगळी कथाहि आढळते:—

जेव्हां हा जरा परत मागूं लागला, तेव्हां पूरूनें 'मी ही कशी टाकूं? झालें, तें झालें' असें ययातीस सांगितलें. नंतर तो म्हणाला कीं, 'ही जरा मी आतां तपानें नष्ट करतों, पण मी कांहीं ती तुम्हांला परत देत नाहीं.' असें बोलून तो गंगेवर गेला. तेथें गौतमीच्या दक्षिणतीरीं त्यानें तप केलें. तपानें संतुष्ट होऊन शंकर तेथें प्राप्त झाला व त्यानें 'वर माग' असें सांगितलें. तेव्हां पूरूनें 'ही जरा नष्ट कर व माझ्या भावांस पित्यानें दिलेल्या शापांपासून मुक्त कर,' असें विनविलें. तेव्हां शंकरानें दोनहि वर त्यास दिले. त्या तपाच्या जागीं कालंजरतीर्थ उत्पन्न झालें (ब्रह्म. १४६).

२ स्वायंभुव मन्वंतरांतील जित देवांपैकीं एक.

**यवक्री**—(यवक्रीत पहा).

**यवक्रीत**—'यव देऊन विकत घेतलेला' असा याचा अर्थ होतो. भरद्वाज ऋषीचा पुत्र (म. व. १३७. १३ कुं.). हा व याचा पिता हे दोघे केवळ तपोनिष्ठ होते, म्हणून ब्राह्मण लोक या उभयतांचा सत्कार करीत नसत.म्हणून वेदज्ञान मिळविण्यासाठीं यानें भयंकर तप करण्याचें ठरविलें व प्रचंड अग्नि प्रज्वलित करून हा आपलें शरीर तापवून घेऊं लागला. त्या कृत्यानें इंद्राचा संताप होऊं लागला; तेव्हां इंद्र याजवळ आला व म्हणाला, 'हें उत्कृष्ट तप तूं कोणत्या उद्देशानें करीत आहेस?' त्यावर यानें इंद्रास आपला हेतु निवेदन केला. तेव्हां इंद्र म्हणाला, 'हा वेदप्राप्तीचा मार्ग नव्हे. गुरूकडूनच वेदांचें अध्ययन कर.' असें म्हणून इंद्र निघून गेला; तरी पुनः यानें भयंकर तप करून इंद्रास संतप्त केलें. पुनरपि इंद्रानें तेथें येऊन याचा निषेध केला व म्हटलें कीं, 'तूं ही अशक्य गोष्ट आरंभिलेली आहेस. तुझ्या पित्याला अथवा तुला वेदांची स्फूर्ति कधींहि व्हावयाची नाहीं.' यवक्रीत म्हणाला, 'जर माझा मनोरथ तूं पूर्ण करीत नसशील, तर अधिक खडतर तप करीन व प्रत्येक अवयव छिन्न करून त्याचा अग्नींत होम करीन.' याचें निवारण करण्यासाठीं इंद्रानें

एका दुर्बल व म्हाताऱ्या ब्राह्मणाचें रूप धारण केलें व त्यानें याच्या स्नानसंध्येच्या घाटासमीप भागीरथींत मूठमूठ वाळू टाकून पूल करण्यास आरंभ केला. हें कृत्य पाहून यवक्रीत हंसला व म्हणाला, 'हे ब्रह्मन्, हें काय चाललें आहे? आपला प्रयत्न फार मोठा पण निरर्थक आहे.' त्यानें 'लोकांच्या सोयीसाठीं सेतु बांधीत आहें,' म्हणून उत्तर देतांच हा त्यास म्हणाला, 'प्रवाहास प्रतिबंध करणें तुला शक्य नाहीं. शक्य गोष्टच तूं करूं लाग.' ब्राह्मण म्हणाला, 'ज्याप्रमाणें तूं वेदप्राप्तींस्तव तप करीत आहेस, त्याचप्रमाणें मीं हा कार्यभाग शिरावर घेतला आहे.' तें ब्राह्मणाचें भाषण ऐकून यानें हा इंद्र आहे असें ओळखिलें व त्यास हा म्हणाला, 'मला दुसरे वर देऊन माझी योग्यता इतरांहून अधिक कर.' तें ऐकून यानें मागितलेले सर्व वर इंद्रानें यास दिले व म्हटलें, 'तुझ्या पित्याला व तुला इतरांस प्राप्त न झालेल्या वेदांची स्फूर्ति होईल व तुझे मनोरथ पूर्ण होतील' (म. व. १३५).

पुढें हा पित्याकडे येऊन झालेलें वर्तमान पित्यास कळवून म्हणाला कीं, 'आतां आपण वेदांच्या स्फूर्तीनें इतरांहून श्रेष्ठ होऊं.' त्यावर भरद्वाजास हा गर्वाच्या योगानें फुगून जाऊन लवकरच नाश पावेल, असें वाटून त्यानें याचा गर्व झाडावा म्हणून यास बालधि ऋषि व त्याचा पुत्र मेधाविन् यांचा इतिहास सांगितला. तो ऐकून यानें केलेला विचार तात्परता रहित केला.

यवक्रीत व याचा पिता हे उभयतां जेथें राहत असत, त्यासमीपच विश्वामित्र ऋषीचा पुत्र रैभ्य ऋषि आश्रम करून आपले दोघे पुत्र अर्वावसु व परावसु व एक स्नुषा—परावसूची स्त्री यांसहवर्तमान राहत असे. इकडेतिकडे फिरतां फिरतां निर्भय व दुसऱ्यास पीडा देऊन आनंद पावणारा असा यवक्रीत वैशाखमासीं रैभ्याच्या आश्रमाकडे गेला. तेथें यानें रैभ्याची सुंदर सून पाहिली. तेव्हां हा मदनानें बेफाम व निर्लज्ज होऊन तिला 'माझ्याजवळ ये,' असें म्हणूं लागला. तिनें याचा निषेध केला; पण पुढें हा शाप देईल हें लक्षांत आणून व रैभ्याचा तेजस्वीपणा आठवून तिनें याच्याशीं समागम केला. पुढें रैभ्य आश्रमांत आला, तेव्हां रडणाऱ्या सुनेचें सांत्वन करून तो शोकाचें कारण विचारूं लागला. तेव्हां तिनें यवक्रीतानें केलेला बलात्कार त्यास कळविला.

हें यवक्रीताचें वर्तन कळतांच त्या कोपिष्ट तापसानें दोन जटा उपटून त्यांचा होम करून एक राक्षस व एक सुंदर स्त्री निर्माण केली. नंतर त्यांस अशी आज्ञा केली कीं, 'तुम्हीं यवक्रीताचा वध करावा.' पुढें त्या कृत्यारूपी स्त्रीनें यास मोहित करून याचा कमंडलु काढून घेतला. कमंडलु हिरावून घेतल्यानंतर उच्छिष्ट यवक्रीतावर तो राक्षस शूल घेऊन धांवून गेला. त्या राक्षसास पाहतांच यवक्रीत सरोवरावर गेला. पण तेथील पाणी नाहींसें झालेलें पाहून सर्व नद्यांवरहि फिरला. पण त्याहि साऱ्या कोरड्याच! तेव्हां हा भयभीत होऊन पित्याच्या होमशाळेंत शिरूं लागला. पण आश्रमाचें संरक्षण करणाऱ्या एका अंध शूद्रानें प्रतिबंध केल्यामुळें हा दारांतच उभा राहिला. नंतर राक्षसानें प्रहार केला असतां हा वक्षस्थल फुटून मेला. नंतर राक्षस व कृत्या रैभ्याच्या अनुज्ञेनें त्याजपाशीं राहिलीं (म. व. १३६).

यवक्रीताची विद्या वरानें मिळविली होती, पण रैभ्याची विद्या श्रमपूर्वक संपादन केलेली होती. त्यामुळें याच्या विद्येंत रैभ्याइतकें सामर्थ्य नव्हतें. पुढें ब्रह्मयज्ञ करून भरद्वाजमुनि आश्रमांत आला. परंतु प्रत्यहींच्या पाठाप्रमाणें त्या दिवशीं अग्नीनें दर्शन दिलें नाहीं. ह्यामुळें होमशाळेंत कांहीं बिघाड झाला, असें समजून त्यानें गृहरक्षक शूद्राला विचारिलें 'तूं आज पूर्वींसारखा दिसत नाहींस? माझा क्षुद्रबुद्धि पोर रैभ्याकडे तर गेला नव्हता ना?' तेव्हां तो म्हणाला, 'तुझा मुलगा रैभ्याकडे गेला होता खास व म्हणूनच बलाढ्य राक्षसानें त्यास ठार मारिलें व हा भूमीवर पडून राहिला आहे.' असें म्हणून त्यानें भरद्वाजास स्वतः केलेलें सर्व कृत्य सांगितलें. तेव्हां भरद्वाज म्हणाला, 'बाळा, तूं ब्राह्मणांच्या हितास्तव वेद प्राप्त करून घेतलेस. पण पुढें कठोर वनलास व मीं निषेध केला, तरी तूं रैभ्याच्या आश्रमास गेलास. रैभ्यानेंहि मला एकच अपत्य आहे, हें माहीत असतां कोपानें तुला मारलें. तरी रैभ्याला त्याचा ज्येष्ठ पुत्र ठार करील.' नंतर पश्चात्ताप पावून तो म्हणाला, 'जे पुत्रशोकानें व्याकुल झाल्यामुळें दुःखाकुल अशा आपल्या इष्टमित्रांस शाप देतात, त्याहून अधिक पातकी असा दुसरा कोण आहे?' ह्याप्रमाणें विलाप करून त्यानें पुत्राचें दहन केलें व नंतर आपण अग्नीमध्यें प्रवेश केला (म. व. १३७).

भरद्वाजाच्या शापाप्रमाणेंच पुढें कांहीं कारणानें रैभ्य ऋषीचा वध परावसु नामक त्याच्या पुत्राच्या हातून झाला असतां, रैभ्याचा परम सुशील असा दुसरा पुत्र अर्वावसु यानें उग्र तप करून सूर्यास व देवास प्रसन्न केलें, व त्यांच्या वरानें भरद्वाज, यवक्रीत व रैभ्य या तिघांस सजीव करून पितृहत्येच्या दोषांपासून बंधूंस मुक्त केलें व पित्यास वधाचें स्मरण राहूं नये व आपणांस मिळालेल्या सूर्यमंत्रप्रकाशक वेदाची गुरुपरंपरेनें अध्ययनप्रवृत्ति व्हावी, असे वरहि मागून घेतले. त्यांवरून परस्परांचा स्नेह अधिक वृद्धिंगत झाला. नंतर इंद्रादि देवांनीं 'रैभ्यानें गुरुपासून वेदांचें अध्ययन केलें असल्यामुळें तो सामर्थ्यानें तुजपेक्षां श्रेष्ठ आहे' असें सांगितलें. तेव्हां पुत्रासहवर्तमान भरद्वाज ऋषि, अर्वावसूच्या उपकाराचें अभिनंदन करून आपल्या आश्रमास गेला (म. व. १३८).

आरा यवनों असेंहि म्हटलेलें क्याच ठिकाणीं आढळतें. याचा आश्रम स्थूलशिरा नामक ऋषीच्या आश्रमापाशीं होता ( म. व. १३५-१३८ ).

**यवन**—कृष्णानें मारिलेला एक राजा ( म. व. १२. ३३ कुं.; कालयवन पहा ).

२ दैत्य राजाचा एक जोडीदार. याचा सगरानें पराभव केला; परंतु हा वसिष्ठाला शरण गेल्यामुळें त्यानें याला फक्त डोक्याचे केंस काढून टाकावे व दाढी राखावी एवढीच शिक्षा दिली ( पद्म. उ. २० ).

३ ( भविष्य. ) भागवत, वायु, मत्स्य व ब्रह्मांड यांच्या मतें राजाचा एक वंश.

४ एक संकरज जात. क्षत्रिय व शूद्र यांच्या मिश्रणानें ही झाली ( गौतम पहा ).

**यवस**—सावर्णि मनूच्या पुत्रांतील एक. परंतु पद्म-पुराणांत सावर्णि मनूच्या पुत्रांची यादी दिली आहे, तींत याला यवसु म्हटलें आहे ( सृ. ७ ).

२ इध्मजिह्वाचा मुलगा.

**यवसु**—सावर्णि मनूचा पुत्र ( १ यवस पहा ).

**यविष्ठ**—स्वायंभुव मन्वंतरांतील जिदाजित देव.

२ ( अग्नि पहा ).

**यवीनर**—( सो. द्विमीढ. ) मत्स्यमतें अजमीढाचा, भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें द्विमीढाचा पुत्र. याचा पुत्र कृतिमत्.

२ ( सो. नील. ) भागवतमतें भर्म्यश्वाचा पुत्र.

**यवीयस्**—( सो. नील. ) वायुमतें रिक्षपुत्र.

२ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य.

**यश**—सुतप देवांपैकीं एक.

२ विकुंठ देवांतील एक.

**यशस्कर**—शिव देवांतील एक.

**यशस्विन्**—प्रतर्दन देवांतील एक.

**यशस्विन् जयंत्य लौहित्य**—कृष्णरात त्रिवेद लौहित्याचा शिष्य ( वं. ब्रा. ३ ).

**यशोदा**—हविष्मत् पितरांची कन्या ( ह. वं. १. १८ ). विश्वमहतूची स्त्री ( ब्रह्मांड. ३. १०. ९०; वायु. ७. ११. ८१ ). अंशुमतूची स्त्री ( मत्स्य. १५. १८ ). पण दोघांच्याहि मुलांचें नांव दिलीप असल्यामुळें मत्स्यपुराणांत घोटाळा केला आहे.

२ हस्तिवर्म्याची स्त्री. हिचा पुत्र विकुंठन ( म. आ. ६३. १७ कुं. ).

३ ही मत्स्यमतें देवकन्या होय. नंदाची स्त्री व कृष्णाची आई ( पद्म. ब्र. १३; पा. ८३ ). हिनें कृष्णाचें पालन केलें ( भा. १०. २. ९ ). ही द्रोणवसूची पत्नी धरा, तिचा अवतार ( भा. १०. ८. ५० ).

**यशोधर**—दुर्मुख पांचालाचा पुत्र. यास दौर्मुखि असेंहि नांव आहे ( म. द्रो. १८५. ५ कुं. ).

**यशोधरा**—ही विरोचनाची मुलगी म्हणून हिला वैरोचनी यशोधरा असें म्हणतात. ही त्वष्ट्याची पत्नी. हिला त्वष्ट्यापासून त्रिशिरस् विश्वरूप व विश्वकर्मन् ( संनिवेश ) अशीं दोन मुलें झालीं ( ब्रह्मांड. ३. १. ८६-८७ ). रचना व ही एक.

२ ही देवकन्या ( मत्स्य. ४४. ७३ ).

**यशोनंदिन्**—(किलकिला. भविष्य.) भूतनंदीचा पुत्र व शिशुनंदीचा भाऊ. याची स्त्री बादलराजकन्या जालमती व पुत्र बाल्हिक. यानें २५ वर्षे राज्य केलें ( भवि. प्रति. ४. २३ ).

**यशोभद्र**—हा मनोभद्राचा पुत्र. याला वीरभद्र नांवाचा भाऊ होता. याला पूर्वजन्मीं गंगास्नान घडल्यानें हा जन्म राजकुलांत आला ( पद्म. क्रि. ३ ).

**यशोमेधस्**—सुमेधस् देवांतील एक.

**यशोवती**—( एकवीर पहा ).

**यशोवसु**—( सो. अमा. ) वायुमतें कुशपुत्र. यास विष्णुमतें अमावसु व भागवतमतें वसु म्हटलें आहे.

**यस्क**—गिरिक्षिताचा वंशज ( क. सं. १३. १२ ).

२ भृगुकुलांतील गोत्रकार. याबद्दल यस्कावर असा पाठभेद आहे. पाणिनीनें एका यस्काचा निर्देश केला आहे ( पा. सू. २. ४. ६३; ४. १. ११२ ). आश्वलायनश्रौत-सूत्रांतील गोत्रप्रवरांच्या यादींत एक यस्क दिला आहे ( ६. १०. १० ).

**याज**—काश्यपकुलांतील ऋषि. याचा उपयाज हा भाऊ होय. हे यमुनातीरीं राहत असत ( द्रुपद पहा ). यानें द्रुपदाचा पुत्रप्राप्तीस्तव यज्ञ केला ( म. आ. १८१. ३२ कुं. ).

**याजक**—( पुरूयशस् पहा ).

**याज्ञ**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**याज्ञतुर**—ऋषभाचें पैतृक नांव.

**याज्ञदत्त**—( ३ याज्ञवल्क्य पहा ).

**याज्ञवल्क्य**—हा उद्दालकाचा शिष्य असून याचा शिष्य आसुरि होय ( श. ब्रा. १४.९. ४. ३३ ). ही परंपरा काण्व व माध्यांदिन प्रतींत सारखीच आहे.

२ हा उद्दालक आरुणीचा शिष्य. याचा शिष्य मधुक पैंग्य. यास वाजसनेय म्हटलें आहे ( बृ. उ. ६. ३. ७-८; ६. ... ३; श. ब्रा. १४. ९. ४. ३३ ). महीधरानें

वाजस निपुत्र केला आहे. माध्यंदिन म्हणण्याचें कारण मध्यंदिनानें याच्या वेदाचा विशेष प्रचार केला हें होय. सामश्रवस् याचा शिष्य होता. त्यालाच यानें जनकाच्या येथील वादविषयक संपत्ति नेण्यास सांगितली व इतरांना याज्ञवल्क्यस्मृति सांगाव्यास सांगितली. यानें ऋग्वेदादिकांबरोबर स्वतःच्या संहितेचीहि अक्षरसंख्या शतपथांत दिली आहे (श. ब्रा. १०.४. २.२३-२४). याज्ञवल्क्यशाकल्यवादाची आख्यायिका बृहदारण्यकोपनिषदांत पुढीलप्रमाणें आढळते. विदग्ध शाकल्यानें ‘कति देवाः’ इत्यादि प्रश्न यास केले असतां यानें सर्व प्रश्नांचीं उत्तरें देऊन विदग्ध शाकल्याला गप्प बसविलें. शेवटीं त्यास मृत्यूहि पत्करावा लागला; फार काय त्याच्या अस्थीसुद्धां शिष्यांना मिळाल्या नाहींत (बृ. उ. ३.९.२६). हीच गोष्ट पुराणांत विस्तारानें दिली आहे.

याला मैत्रेयी व कात्यायनी अशा दोन बायका होत्या. पण स्कन्दपुराणांत मैत्रेयीऐवजीं कल्याणी दिली आहे (स्कंद.६. १३०-१३१). वैदिक ग्रंथांपैकीं जाबालोपनिषद व शतपथब्राह्मण यांतच याचा उल्लेख येतो (श. ब्रा. १-४; १०-१४).

हा ब्रह्मराताचा पुत्र व वैशंपायनाचा शिष्य (विष्णु. ३.५.२). पित्याचें नांव ब्रह्मवाह (वायु. १.६०.४१), देवरात (भा. १२.६.६४) असेंहि आढळतें. याला ब्रह्मराति म्हटलें आहे (वायु. १. ६१. २१; ब्रह्मांड. २. ३५. २४). हा ब्रह्मदेवाच्या अंगापासून उत्पन्न झाला (वायु. १. ६०. ४२) असें गौरवार्थ लिहिलें आहे. हा वैशंपायनाचा भाचा व शिष्यहि होता (म. शां. ३२३. १७-१८ कुं.).

दैवराति जनकानें अश्वमेध यज्ञ आरंभिला व त्या निमित्तानें शेंकडों ऋषि बोलाविले व यज्ञांत सर्व एकत्र झाल्यावर हजार गाई, त्यापेक्षां कितीतरी सोनें, गांवें, रत्नें व नोकर पुढें ठेवून जो कोणी श्रेष्ठ असेल, त्यानें तें सर्व घेऊन जावें असें जाहीर केलें. कोणीच उठेना. तेव्हां ब्रह्मवाहसुत याज्ञवल्क्य पुढें आला व आपल्या शिष्याला म्हणाला, कीं, ‘ही संपत्ति उचल. कारण, माझ्याइतका वेदवेत्ता येथें कोणीहि नाहीं. ज्याला माझा मोठेपणा पटत नसेल त्याला माझें आह्वान आहे.’ तेव्हां मोठी गडबड उडाली व अनेक ब्राह्मण वादाकरितां सरसावले. अनेक महत्त्वाच्या विषयांवर वाद सुरू झाले. सगळ्यांना जिंकिल्यावर वाद करणाऱ्या देवमित्र शाकल्याला हा म्हणाला कीं, ‘भरलेल्या भात्यासारखा स्वस्थ काय बसला आहेस? बोल!’ अशी निंदा ऐकल्याबरोबर शाकल्यानें एकट्या याज्ञवल्क्यानें धन नेल्याबद्दल तक्रार केली. तेव्हां याज्ञवल्क्य म्हणाला, ...णांचें बल म्हणजे विद्या व तत्त्वज्ञान यांतील नैपुण्य होय. ... प्रश्नांचीं उत्तरें देण्यास तयार आहें. जो कोणी उत्तरें देईल, त्याला हें धन मिळावयाचें आहे, असें राजानें जाहीर केलें आहे. अर्थातच मी हें सर्व एकटा नेण्यास पात्र आहें.’ हें उत्तर ऐकून देवमित्र शाकल्य रागानें वेडा झाला. त्यानें याज्ञवल्क्याला हजार प्रश्न विचारिले. त्यांचीं उत्तरें याज्ञवल्क्यानें दिलीं. आतां याज्ञवल्क्यानें प्रश्न विचारिण्याची वेळ आली. याज्ञवल्क्यानें एकच प्रश्न विचारिला. परंतु उत्तर न देतां आल्यामुळें देवमित्र शाकल्यानें मरण पत्करलें.

देवमित्र शाकल्याच्या मृत्यूनें सर्व ब्राह्मणांना ब्रह्महत्येचा दोष लागला. म्हणून सर्व पवनपुराला गेले व तेथें त्यांनीं द्वादशार्क, वालुकेश्वर, एकादश रुद्र यांचें दर्शन घेतलें. चारी कुण्डांत स्नान केलें. उत्तरेश्वराचें दर्शन करून वाडवांच्या प्रसादानें ते सर्व त्या हत्यादोषांतून मुक्त झाले (वायु. १. ६०). हा वादविवाद दैवराति जनकाच्या अश्वमेध यज्ञांत झाला (म. शां ३२३. ९५ कुं.). वंशावळीप्रमाणें दैवराति जनक म्हणजे दाशरथि रामाच्या पुष्कळच पूर्वीचा आहे.

एकदां सर्व ऋषींनीं ठराविक वेळीं, मेरुपृष्ठावर एकत्र जमण्याचें ठरविलें व जो वेळेवर येणार नाहीं, त्यास ब्रह्महत्या लागेल असें प्रसिद्ध केलें. वैशंपायनास वेळेवर येणें शक्य न झाल्यामुळें ब्रह्महत्येचा दोष लागला. त्या दोषाच्या निराकरणार्थ त्यानें शिष्यांना प्रायश्चित्त करावयास सांगितलें. पण याज्ञवल्क्यानें ‘सगळ्या शिष्यांची काय जरूर? मी एकटाच प्रायश्चित्त करितों.’ अशी बढाई मारिल्यामुळें वैशंपायनास राग येऊन त्यानें यास आपल्यापासून शिकलेला वेद परत करण्यास सांगितला. त्याप्रमाणें याज्ञवल्क्यानें वेद परत करून सूर्यापासून स्वतंत्र वेद मिळविला (म. शां. ३२३ कुं.; विष्णु. ३. ५; भा. १२. ६; वायु. १. ६१; ब्रह्मांड. २. ३५). विष्णुपुराणाप्रमाणें त्याची वेळ चुकल्यापासून सात दिवसांच्या आंत वैशंपायनाचा पाय लागून बहिणीचा मुलगा मेला (विष्णु. ३. ५. ९). वैशंपायन व याज्ञवल्क्य यांच्या विरोधाचें हेंहि कारण असावें. याज्ञवल्क्यानें सूर्यापासून वेद स्वीकारितांना घोड्याचें रूप घेतलें होतें म्हणून देवाला व शिष्याला ‘वाजिन्’ असें म्हणतात (वायु. १. ६१). इतरत्र वेद देतांना सूर्यानें घोड्याचें रूप घेतलें होतें असें आहे (भा. १२. ६. ७३; ब्रह्मांड. २.३५. २६. ७४).

गुरूच्या शापानें स्मृतिहीन व विद्याहीन झाला, पण सरस्वतीच्या कृपेनें सूर्यापासून वेद शिकला (दे. भा. ९.५). हा शाकल्याचा शिष्य होता. याला एकदां राज्याभिषेकाकरितां शाकल्यानें जाण्यास सांगितलें. पण राजा उद्दाम असल्यानें यानें जाण्याचें नाकारिलें. तेव्हां शाकल्यानें आथर्वणमंत्रप्रभावानें याची विद्या परत घेतली. पण यानें सूर्यापासून वेद मिळवून तो जनक, कात्यायन वगैरेंना शिकविला (स्कंद.

६. १२९ ). यानें राजा शतानीकाला वेद शिकविला ( विष्णु. ४. २१. २ ). यावरून याज्ञवल्क्य, कृप, शौनक व शतानीक हे समकालीन ठरून काल निश्चित होतो. कारण कृप व शौनक यांनीहि शतानीकास विद्या शिकविली आहे. याज्ञवल्क्य व शाकल्य यांच्या वादाचा उल्लेख बृहदारण्यकोपनिषदांत व कांहीं पुराणांत आहे. हा वाद दैवराति जनकाच्या अश्वमेधांत झाला, असें महाभारतांत म्हटलें आहे. पण वैशंपायनशिष्य याज्ञवल्क्याचा काल निश्चित झालेला आहे. त्या वेळीं दैवराति जनक असणे शक्य नाहीं. त्या वेळीं कोणता जनक असावा, हें निश्चितपणें उल्लेखित नसलें तरी शतानीक, जनमेजयादि याज्ञवल्क्याशीं समकालीन असणाऱ्या राजांवरून त्या वेळचा जनक उग्रसेन असावा ( पुष्करमालिन् पहा). याची कुष्ठ-रोगांतून मुक्तता सूर्योपासनेमुळें झाली ( भवि. ब्राह्म. २१० ). याज्ञवल्क्याचा जनक व विश्वावसु गंधर्व यांच्याशीं झालेला पुरातन संवाद फार महत्त्वाचा म्हणून धर्मानें भीष्माला सांगितला आहे ( म. शां. ३१६-३२३ कुं. ).

याला कात्यायनीपासून कात्यायन व बहिणीपासून झालेला पिप्पलाद असे दोन पुत्र होते (स्कंद.५.३.४२; १ पिप्पलाद पहा ). शिवाय याला शंभर शिष्य असल्याबद्दल निर्देश आहे ( म. शां. ३२३. १७ कुं.; व्यास पहा).

यानें शुक्लयजुःसंहिता ( श. ब्रा. १४. ९. ४. ३३ ), शतपथब्राह्मण व योगसूत्रें केलीं (म. शां. ३२३. १०-१२; २३ कुं. ). यानें याज्ञवल्क्यस्मृति, बृहदारण्यक उपनिषद केलें (याज्ञ.३.११०).याची एक शिक्षा व गीता प्रसिद्ध आहे. याच्या एका शिक्षेत दोनशें बत्तीस श्लोक आहेत व दुसऱ्या शिक्षेचें नांव मनःस्वार असून हस्तस्वरापेक्षां तिच्यांतील विचार वेगळ्या स्व-रूपाचा आहे. याला योगशास्त्र हिरण्यनाभ कौशल्यानें शिकविलें ( ब्रह्मांड. ३. ६३. २०८; वायु. २. २६. २०७; विष्णु. ४. ४. ४७; भा. ९. १२. ४ ). बृहद्याज्ञवल्क्य व बृहद्योगी याज्ञवल्क्य असे याचे ग्रंथ आढळतात. याची स्मृति व्यवस्थित म्हणून प्रसिद्ध आहे. तिच्या आरंभीं पूर्वींच्या स्मृतिकारांची यादी दिलेली आहे. या स्मृतींत १०१० श्लोक आहेत. अग्नि-पुराणांतील व्यवहारविषयक भाग या स्मृतीशीं जुळता आहे. याच्या स्मृतींतील वेदान्तविषयक भाग शंकराचार्यांसारखा आहे ( याज्ञ. ३. ६४; ६७; ६९; १०९; ११९; १२५; १४०; २०५ ). वारांना अनुसरून ग्रहांचा क्रम, ताम्रपट वगैरेंच्या माहितीवरून याची सध्यां उपलब्ध असलेली स्मृति इ.स.च्या सुमाराची असावी ( याज्ञ. १. २९६; ३१५ ). पाणिनि याज्ञवल्क्यकृत ब्राह्मणग्रंथ इतर ब्राह्मणग्रंथांच्या मानानें अली-कडील समजत असे असें त्याच्या टीकाग्रंथावरून दिसतें ( पा. सू. ४. ३. १०५ ).

३ विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

४ वसिष्ठकुलांतील गोत्रकार. याज्ञदत्त असा पाठ आढळतो.

५ व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील बाष्कलाचा शिष्य. याचे नांवावरून याचे शाखेस याज्ञवल्क्या असें नांव पडलें.

६ ( विष्णुयशस् व कल्कि पहा ).

**याज्ञसेनि**—शिखंडीचें दुसरें नांव ( म. भी. ११२. १९ कुं. ).

**याज्ञेयि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**यातुधान**—सुरसा व कश्यप यांचे पुत्र व त्यांचे वंशज.

२ हेति, प्रहेति, उग्र, पौरुषेय, वध, विद्युत्, स्फूर्ज, वात, आप, व्याघ्र, सूर्य हे यातुधान या सामान्य नांवानें ओळखिले जातात. यांची माता जंतुधना ( ब्रह्मांड. ३. ७. ९०; रक्षस् पहा ).

**यातुधानी**—एक कृत्या ( वृषादर्भि पहा ).

**याद्व**—हा यदूंचा उल्लेख असावा ( ऋ. ७. १९. ८ ). दुसऱ्या एका ठिकाणीं याद्वांच्या संपत्तीचा उल्लेख आहे. तेथें तिरिंदर व पर्शु यांच्याशीं याचा संबंध आहे ( ऋ. ८. ६. ४६). तिरिंदरानें याद्वांना दास म्हणून दिले (ऋ.८.६.४८). आणखी एका ठिकाणीं आसंग प्लायोगीनें याद्वांच्या पशुसंपत्तीचा निर्देश केला आहे ( ऋ. ८. १. ३१ ). तिरिंदरांचें व याद्वांचें वांकडें होतें व याद्वांची संपत्ति तिरिंदरांकडून वत्स काण्वानें मिळविली, हें सायणाचार्यांचें म्हणणें योग्य दिसतें.

**यान**—वसिष्ठाचा पुत्र.

**याम**—स्वायंभुव मन्वंतरांतील देव ( भा. ८. १. १८ ). यदु, ययाति, विवध, स्रासत, मति, विभास, क्रतु, प्रयाति, विश्रुत, द्युति, वायव्य व संयम हे देव स्वायंभुव मन्वंतरांत होऊन गेले ( ब्रह्मांड. २. १३. ९२. ).

**यामायन**—( ऊर्ध्वकृशन, कुमार, देवश्रवस्, मथित, शंख व संकसुख पहा ).

**यामिनी**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या व तार्क्ष्य कश्यपाची भार्या ( कश्यप पहा ). हिचे पुत्र शलभ ( भा. ६. ६. २१ ).

**यामी**—दक्षाची कन्या व धर्माची स्त्री. हिचा पुत्र स्वर्ग व कन्या नागवीथी. हिला जामि असेंहि म्हणतात.

**यामुनि**—कश्यपकुलांतील गोत्रकार. याबद्दल सामुकि असा पाठभेद आहे.

**याम्य**—स्वायंभुव मन्वंतरांतील एक देव.

**यायावर**—हें एका माणसाचें नांव असावें ( तै. सं.५. २. १. ७; क. सं. १९. १२ ).

२ हे जरत्कारु ऋषीचे पितर होत. यांनीं 'आम्ही आमचा पुढें वंश नसल्यामुळें स्वर्गापासून च्युत झालों आहोंत, म्हणून

तूं लग्न करून आम्हांला मुक्त कर,' असें जरत्कारूला सांगितलें ( म. आ. १३. १८; ४५. १६ कुं.).

**यास्क**—यस्क ऋषीच्या वंशजांना म्हणतात. प्रजापति कश्यपानें केलेल्या निघंटूवर यांचें विस्तृत भाष्य आहे. याचा महाभारतामध्यें उल्लेख आलेला आहे. त्यावरून नष्ट झालेलें निरुक्त विष्णूच्या प्रसादानें याला मिळालें, असें दिसतें ( म. शां. ३५२. ६-८ कुं. ).

निरुक्ताच्या शेवटीं ' नमो पारस्कराय नमो यास्काय ' असें म्हटलें आहे. त्यावरून यास्क पारस्कर देशांत असावा, असें दिसतें. बृहदारण्यकोपनिषदांत व पिंगलाच्या छंदसूत्रांत ( ३. ३० ) याचा उल्लेख आहे. याचा शिष्य जातूकर्ण्य ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ). भारद्वाज याचा शिष्य होता ( श. ब्रा. १४. ५. ५. २१ ). पाणिनीनें यास्क शब्द सिद्ध करण्याचा प्रयत्न केला असल्यामुळें पाणिनीपूर्वी यास्क झाला असावा, असें दिसतें ( पा. सू. २. ४. ६३ ). ऋक्प्रातिशाख्यांत याचा निर्देश आहे ( शौनक पहा ).

**युक्त**—रैवत मनूचा पुत्र.

२ स्वायंभुव मन्वंतरांतील अजित देवांपैकीं एक.

३ भौत्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**युक्ताश्व आंगिरस**—यानें नुकतींच जन्माला आलेलीं दोन मुलें पळविलीं व ठार केलीं. त्यामुळें याला येत असलेले वेद हा विसरला. ते वेद यावेत म्हणून यानें तप केलें, तेव्हां याला एक साम सुचलें. त्यामुळें याला वेद पुनः येऊं लागले ( पं. ब्रा. ११. ८. ८ ).

**युगदत्त**—( सो. पूरु. ) मत्स्यमतें ब्रह्मदत्तपुत्र. वायुमतें यास योगसूनु म्हटलें आहे.

**युगंधर**—( सो. वृष्णि. ) हा भागवतमतें कुणीचा, विष्णुमत तूणीचा, मत्स्यमतें द्युम्नीचा व वायुमतें भूतीचा पुत्र.

२ (सो. वृष्णि.) सात्यकीचा मुलगा. हा पांडवांच्या बाजूनें युद्ध करीत असतां द्रोणाकडून मारिला गेला ( म. द्रो. १६. ४२ कुं. ).

**युगादिदेव**—गया नदींत स्नान केल्यानें या राजाचा उद्धार झाला ( स्कंद. ५. १. ५७ ).

**युद्धतुष्ट**—(सो. कुकुर.) वायुमतें उग्रसेनपुत्र. यास वायु व विष्णु यांच्या मतें युद्धमुष्टि व भागवतमतें सृष्टि म्हटलें आहे.

**युद्धमुष्टि**—( युद्धतुष्ट पहा ).

**युद्धोन्मत्त**—रावणाच्या बाजूचा एक राक्षस (वा.रा.सुं.६.)

**युधांश्रौष्टि औग्रसैन्य**—याला पर्वत व नारद यांनीं ऐंद्र महाभिषेक केला ( ऐ. ब्रा. ८. २१. ७ ).

**युधाजित्**—केकय देशाचा राजा अश्वपति. त्याचा हा पुत्र ( २ अश्वपति कैकय पहा ). दशरथस्त्री कैकेयी हिचा भ्राता. पुढें अयोध्येस गेल्यावर यानें भरत व शत्रुघ्न या उभयतांस स्वदेशीं नेलें होतें ( वा. रा. बा. ७७ ).

२ सूर्यवंशीय ध्रुवसंधि राजाची दुसरी स्त्री लीलावती तिचा पिता. हा अवंति देशचा राजा होता ( ९सुदर्शन पहा ).

३ ( सो. क्रोष्टु. ) हा क्रोष्टूस माद्री नामक स्त्रीचे ठायीं झाला ( ब्रह्म. १४; ह. वं. १. ३८ ). हा वृष्णीस माद्रीपासून झाला असाहि उल्लेख आहे ( पद्म. सृ. १३; वायु. २. ३४; मत्स्य. ४५; विष्णु. ४. १३; भा. ९. २४). यास शिनि व अनमित्र असे दोन पुत्र असून यान्याच वंशांत पुढें जन्मलेल्या श्वफल्क व चित्ररथ या दोघांपासून वेगळे वंश सुरू झाले ( भा. ९. २४ ).

४ भृगुकुलांतील मंत्रकार.

**युधाजित**—( सो. वृष्णि. ) अनमित्रास पृथ्वीपासून झालेला पुत्र ( मत्स्य. ४५. २५; पद्म. सृ. १३ ).

**युधामन्यु**—भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय पांचाल. हा महाधनुर्धर, महारथी व गदा आणि धनुष्य या दोहोंनींहि युद्ध करण्यांत फार पटाईत होता ( म. उ. १७०; १९६ ). हा स्यमंतपंचकक्षेत्रीं एकदां सूर्यग्रहणानिमित्त गेला होता. त्या ठिकाणीं श्रीकृष्णानें याचें प्रेमपूर्वक स्वागत केलें ( भा. १०. ८२ ). सारंगी रंगाच्या अश्वांनीं युक्त असा याचा रथ होता ( म. द्रो. २३ ). याचें व द्रोणाचें युद्ध झालें व त्याचप्रमाणें दुर्योधनाबरोबरहि बरेंच मोठें युद्ध झालें ( म. द्रो. १३०. २९ कुं. ). रात्रीं पांडवांच्या शिबिरांत इतर योद्ध्यांबरोबर हा निद्रित असतां यास द्रोणपुत्र अश्वत्थाम्यानें धरून जमिनीवरच लोळविलें. त्या समयीं यानें गदेचा एक प्रहार अश्वत्थाम्याच्या छातीवर केला, पण सरतेशेवटीं त्याचा उपयोग न होऊन यास अश्वत्थाम्यानें ठार केलें ( म. सौ. ८. ४३ कुं. ).

**युधिष्ठिर**—( सो. कुरु. ) पांडुपत्नी कुंतीस यमधर्मापासून झालेला ज्येष्ठ पुत्र (भा. ९.२२.२७; म. आ. ६३.३५ कुं.). सर्वच पांडव इंद्रांश होते ( मार्क. ५.२०-२६ ). याचा जन्म सूर्य तूळ राशीस व चंद्र ज्येष्ठा नक्षत्रीं असतां, आठव्या अभिजित् मुहूर्तावर पंचमीचे दिवशीं दोन प्रहरीं झाला ( म. आ. १२३ ). याचे संस्कार शतशृंगावर झाले कीं, हस्तिनापुरांत झाले, याविषयीं भारताच्या दोन प्रतींत मतभेद आहे.

हा शर्यातिपुत्र शुक्र यापाशीं धनुर्वेद शिकला. हा तोमर चालविण्यांत मोठा निष्णात होता ( म. आ. १३३ कुं. ). प्रथम कृपानें व नंतर द्रोणानें यास शस्त्रास्त्रविद्या शिकविली (म. आ. १२८-१३०; १३२). द्रोणानें कौरवपांडवांची परीक्षा घेतली, त्यांत यानें आपलें कौशल्य दाखवून सर्वांना आनंदित केलें ( म. आ. १३४ ). यानें भीमार्जुनांच्या साहाय्यानें गुरुदक्षिणेची फेड केली ( म. आ. १३८ ). नंतर धृतराष्ट्रानें

याला यौवराज्याभिषेक केला (म. आ. १३९). पांडवांचें वाढतें ऐश्वर्य पाहून दुर्योधन मनांत जळत असे. पांडवांचा समूळ नाश करण्याचा दुर्योधनानें उद्योग आरंभिला. त्यास धृतराष्ट्राची अनुमति होती (म. आ. १५४. ३२-३५ कुं.). नंतर वारणावतीच्या यात्रेचें निमित्त करून यांना कुंतीसह वारणावतास नेलें. तेथें पुरोचनाकडून लाक्षागृहांत यांना जाळण्याचा प्रयत्न केला. परंतु विदुराच्या मदतीनें पांडव त्यांतून निभावले. युधिष्ठिर वारणावताकडे जात असतां सर्व नागरिक लोकांना फार वाईट वाटलें. त्यांच्या मनांत कौरवांबद्दल अत्यंत अनादर होता. हें दुर्योधनास फार झोंबत होतें (म. आ. १४१-१४८).

लाक्षागृहांतून विवरमार्गानें युधिष्ठिर अरण्यांत गेला, तों यास एक नदी आडवी आली. परंतु विदुरानें एक नांव तयार ठेविली होती. तींत बसून हा पैलतीरावर गेला. पुढें यास हिडिंबासुर भेटला, त्यास भीमानें मारिलें व त्याची बहीण हिडिंबा हिच्याशीं लग्न केलें (म. आ. १५०–१५५). यानंतर पांडवांना व्यास भेटला. त्यानें 'युधिष्ठिर हा राजा होऊन राजसूयादि यज्ञ करील' असें सांगून एक महिनाभर धर्मराजास तेथें राहण्यास सांगितलें (म. आ. १५६). नंतर पांडव एकचक्रा नगरींत जाऊन राहिले. तेथें भीम कुंतीच्या सल्ल्यानें बकासुरावर गेला, पण याला तें पसंत पडलें नाहीं (म. आ. १६२). पुढें पांडवांनीं द्रुपद राजाकडे जाण्याचें ठरविलें, त्याच वेळीं व्यास त्यांना भेटला व त्यानें द्रौपदीचा वृत्तान्त कथन केला (म. आ. १६८-१६९). द्रौपदीस्वयंवरानंतर धृतराष्ट्रानें पांडवांना मोठ्या सन्मानानें हस्तिनापुरास आणविलें व त्यांना राज्याचा अर्धा भाग देवविला, व यानें इंद्रप्रस्थ शहर बसवून राज्य केलें (म. आ. २०७). इंद्रप्रस्थास मयासुरानें एक अत्यंत सुंदर अशी सभा निर्माण करून यास दिली. त्यांत पांडवांनीं आपल्या लवाजम्यासह प्रवेश केला (म. स. ३-४). याच वेळीं नारदानें याला राजनीति सांगितली. इंद्रसभा, यमसभा, वरुणसभा, कुबेरसभा व ब्रह्मसभा यांची माहिती सांगून पांडूनें 'राजसूय यज्ञ करण्यास सांगितलें आहे' असा निरोप यास सांगितला (म. स. ५-१२). त्याप्रमाणें यानें कृष्णाच्या मदतीनें राजसूय यज्ञ करून पित्यास संतुष्ट केलें (भा. १०.७१; ७४). राजसूय यज्ञांत द्वैपायन व्यास स्वतः ब्रह्मा झाला; सुसामन् सामग झाला; ब्रह्मिष्ठ याज्ञवल्क्य अध्वर्यु झाला; वसुपुत्र पैल व धौम्य होते झाले (म.स. ३६.३२-३६ कुं.). यांशिवाय वेगळी व विस्तृत अशी ऋत्विजादिकांची यादी आढळते (जै.अ.४.६३.५०.५५). या वेळीं यानें दुर्योधनास त्याच्या अनुयायांसह बोलाविलें व त्याला कोशागारावर नेमिलें. त्यानें अगणित संपत्ति खर्च केली, तरी तूट पडली नाहीं. हें एकंदर वैभव पाहून त्यास पांडवांबद्दल फार द्वेष उत्पन्न झाला. शिवाय भीष्माच्या अनुमतीनें कृष्णाची अग्रपूजा केली, हें कारण पुढें करून त्यानें उघड वैर संपादिलें (म. स. ३८ कुं.; भा. १०. ७४). पांडवांची अलोट संपत्ति व अलौकिक सामर्थ्य पाहून दुर्योधन अत्यंत खेद पावत असे. त्यास पांडवांना अठराविश्वे दारिद्र्यांत कसें लोटावें हा विचार राहून राहून येत असे. त्याची धृतराष्ट्रानें पुष्कळ समजूत केली. पण तो 'युद्ध किंवा द्यूत याशिवाय तिसरा मार्ग पांडवांचें सर्वस्व हरण करण्यास उपयोगी पडणार नाहीं,' असें म्हणाला. त्याच वेळीं शकुनीनें 'द्यूतांत आपण सर्व जिंकूं,' असें त्यास आश्वासन दिलें. तेव्हां नाइलाजानें धृतराष्ट्रानें विदुराकडून याला द्यूतक्रीडेला निमंत्रण केलें. पुढें शकुनीनें दुर्योधनासाठीं युधिष्ठिराशीं द्यूतक्रीडा केली. त्यांत पांडवांचें सर्वस्व गेलें. द्रौपदीसुद्धां यानें पणास लाविली. पुढें धृतराष्ट्रानें द्रौपदी व पांडव यांस मुक्त केलें. परंतु पुनः द्यूत खेळून पराजित झाल्यावर बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास पांडवांनीं पत्करिला. अज्ञातवासांत प्रगट झाल्यास पुनः बारा वर्षें वनवास, अशा नियमानें युधिष्ठिरादिकांस अरण्यांत घालविलें. या वेळीं इतर माणसें विदुराकडे राहिलीं (म. स. ७९).

यानंतर पांडव अरण्यांत जावयास निघाले असतां सर्व नगरवासी लोक शोकाकुल होऊन युधिष्ठिराबरोबर वनवासास निघाले. यानें पुष्कळ समजूत करून त्यांना परत जाण्यास सांगितलें. कारण, अरण्यांत उपजीविका करतां येणें फार दुष्कर होतें. युधिष्ठिराबरोबर धौम्य मुनि होता. शिवाय, आणखी इतर पुष्कळ लोक होते. पुढें युधिष्ठिरानें सूर्याची प्रार्थना करून अक्षय्य अन्न पुरविणारी थाळी मिळविली. व अशा तऱ्हेनें उपजीविकेचा प्रश्न सोपा केला (म. व. १-४). एकदां हा आपल्या बंधूंसह आश्रमाकडे जात असतां किर्मीर राक्षसानें यास अडविलें. तेव्हां भीमानें त्याशीं युद्ध करून त्याचा वध केला. वनांत मार्कंडेय व बक यांनीं याला उपदेश केला व द्वैपायनादि ऋषींनीं याचा सन्मान केला. द्रौपदीनें प्रह्लाद व बलि यांचा संवाद सांगून दुर्योधनाचा वध करून राज्य घेण्याबद्दल युधिष्ठिरास सांगितलें. परंतु धर्मानें क्षमाशीलत्वाचा अंगिकार केला. यावर युधिष्ठिरास भीमानेंहि द्रौपदीप्रमाणेंच सांगितलें. परंतु याचा निश्चय ढळला नाहीं. नंतर धर्मानें अर्जुनास अस्त्रप्राप्तीसाठीं इंद्राकडे पाठविलें (म. व. ३७). द्वैतवनांत यास व्यासानें प्रतिस्मृति विद्या दिली व एकाच ठिकाणीं न राहण्याची सूचना दिली (म. व. २६). नंतर हा कांहीं काल काम्यकवनांत राहून (म. व.

२३–३६ ) नंतर द्वैतवनांत गेला ( म. व. ३६. ४१ कुं ). तेथें बृहदश्व ऋषीनें यास वनवासांतील दुःखपरिहारार्थ नल चरित्र कथन केलें, अनेक कथा सांगितल्या व अक्षविद्या दिली. याकडून तीर्थयात्रा करविली ( म. व. ४७ ) व याला अनेक प्राचीन इतिहास ऐकविले ( लोमश पहा ).

ऋषीनें युधिष्ठिरास नाना तीर्थें व क्षेत्रें यांचीं माहात्म्यें सांगून पुलस्त्य ऋषीनें यास तीर्थयात्रांचें वर्णन सांगितलें ( म. व. ८२–८५ ). धौम्यानेंहि यास तीर्थयात्रांचें वर्णन सांगितलें ( म. व. ८६–९० ). याची व इंद्राची भेट होऊन ' तूं पुनः राज्य करशील,' असें त्यानें सांगून अर्जुनास अस्त्रें दिल्याबद्दल वृत्त सांगितलें ( म. व १६६ ). एका अजगरानें भीमास विळखे घातले, त्या वेळीं अजगर आणि युधिष्ठिर यांचीं प्रश्नोत्तरें झालीं. तो अजगर पूर्वजन्मीं नहुष होता. त्यानें प्रश्नांचीं उत्तरें दिल्यास भीमास सोडण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें उत्तरें देऊन यानें भीमास मुक्त केलें ( म. व. १८०–१८१ ). हा काम्यकवनांत असतां कृष्णानें तेथें येऊन याच्या आचरणाचा गौरव केला. शिवाय, मार्कंडेय मुनीनेंहि तेथें येऊन यास पारलौकिक गति, भूपतीचें महत्त्व वगैरे उपदेशात्मक भाषणांनीं तुष्ट केलें ( म. व. १८३–२३२; पद्म. सृ. ४०–४९ ). चित्रसेनानें दुर्योधनाला पकडिलें असतां यानें त्याला सोडविलें ( ९ चित्रसेन पहा ) नंतर दुर्योधनानें पांडवांस छळण्याच्या बुद्धीनें दुर्वासास यांचें सत्त्वहरण करण्यासाठीं पाठविलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं ( म. व. २६३. ). नंतर काम्यकवन सोडून पुनः द्वैतवनांत पांडव राहूं लागले. एकदां एका ब्राह्मणाची अरणि व मंथा ह्यांवर एक हरीण आपलें शिंग घासूं लागला. यामुळें तीं त्याच्या शिंगांस अडकलीं व तो हरीण वेगानें निघून गेला. तेव्हां तो ब्राह्मण पांडवांकडे आला व त्यानें त्या मृगास घेऊन येण्यास त्यांस सांगितलें. तेव्हां हा आपल्या बंधूंसह त्याच्या शोधार्थ निघाला. वाटेंत तृषार्त झाल्यामुळें हा एका वृक्षाखालीं बसला. तदनंतर यानें नकुलाला एका वृक्षावर चढून पाण्याचा शोध करण्यास सांगितलें. तोंच नकुलाला पाण्याचा सुगावा लागला. अर्थात् तो पाणी आणण्यासाठीं तिकडे गेला व तो पाणी पिणार इतक्यांत त्यास पाणी न पिण्याबद्दल सांगणारा एक आवाज ऐकूं आला. त्यांत ' माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दे व मग पाणी पी, नाहींतर मरशील, असें स्पष्ट उच्चारिलें होतें. तरी पण तो अतिशय तहानेलेला असल्यामुळें पाणी प्याला व सरोवराच्या कांठीं निश्चेष्ट पडला. इकडे हा वाट पहात होता. नकुल येईना म्हणून यानें सहदेवास पाठविलें; तरी पुनः तेंच. असे चारी बंधु गेले ते तिकडेच राहिले. तेव्हां हा स्वतः तेथें गेला. आपले मेलेले बंधु पाहून याचे डोळे शोकाश्रूंनीं भरून गेले. यानें तेथें अत्यंत शोक केला. याला दुर्योधनानें त्या पाण्यांत विष कालविलें असावें, असा संशय आला. इतक्यांत यास एक आवाज ऐकूं आला. त्यानें प्रश्नांचीं उत्तरें न दिल्यामुळें त्या चौघांची झालेली स्थिति सांगून ' तुझीहि तशीच होईल ' असें सांगितलें. त्यानें विचारिलेल्या प्रश्नांचीं उत्तरें त्या बकरूपी यक्षास यानें दिलीं. त्यामुळें तो संतुष्ट झाला. व त्यानें चौघांपैकीं कोणास सजीव करूं, असें याला विचारिलें. तेव्हां यानें माद्रीपुत्र नकुलास जिवंत करण्यास सांगितलें. तेव्हां यक्षास याच्या निःपक्षपातीपणाचें कौतुक वाटून त्यानें सर्वांस सजीव केलें. याच वेळीं ' अज्ञातवासांत असतां तुम्हांस कोणी ओळखणार नाहीं, ' असा त्यानें यास वर दिला. तो यक्ष म्हणजे प्रत्यक्ष यमधर्मच होता. त्यानें याला विराटनगरींत राहण्यास सांगितलें व ब्राह्मणाच्या अरणीहि यास दिल्या. शिवाय आणखीहि एक वर याला मिळाला. ' लोभ, क्रोध व मोह यांना जिंकून दान, तप व सत्य यांची आसक्ति असणें 'हाच तो वर होय ( म. व. ३११-३१४ ). यानंतर त्या ब्राह्मणाची अरणि यानें त्यास परत दिली; व झालेला वृत्तान्त आपल्या बंधूंना सांगितला. नंतर बारा वर्षांच्या वनवासानंतरचें अज्ञातवासाचें वर्ष घालविण्यासंबंधीं हा विचार करूं लागला आणि गुप्त रीतीनें यानें जय हें नांव ( म. वि. ७. ६६ कुं. ). व उघड कंक हें नांव धारण केलें (म. वि. २. २८; ९. १५ कुं.). त्याप्रमाणें प्रत्येक कोण होणार व काय करणार हेंहि यानें प्रत्येकास विचारिलें. त्या वेळीं राजदरबारीं कसें वागावें, याबद्दल धौम्यानें पांडवांस उपदेश केला. नंतर युधिष्ठिरानें विराटनगराकडे प्रयाण केलें. तेथें सर्वांनीं शस्त्रें एका शमी वृक्षावर ठेविलीं व दुर्गेची स्तुति केली. तेव्हां याला दुर्गेचें प्रत्यक्ष दर्शन झालें. तिनें ' तुम्ही विराटाच्या येथें ओळखिले जाणार नाहीं ' असा वर दिला. नंतर युधिष्ठिर विराटाकडे गेला. तेव्हां राजानें याची माहिती ऐकून यास मत्स्य देशाचें राज्य देऊं केलें. पण युधिष्ठिरानें तें न घेतां नुसतें पदरीं राहण्याचें ठरविलें ( म. वि. ९ कुं. ). यानें विराटाच्या द्यूतांत धन जिंकावें व नकळत तें भावांच्या स्वाधीन करावें, असा क्रम ठेविला ( म. वि. १३ ). विराट आणि सुशर्मा यांचें युद्ध झालें; त्यांत विराटाचा पराभव होऊन तो कैद झाला. परंतु भीमानें उलट सुशर्म्याचा पराभव करून त्यालाच बद्ध करून आणिलें. तेव्हां युधिष्ठिरानें त्यास जीवदान दिलें ( म. वि. ३३ ). उत्तरगोग्रहणप्रसंगीं उत्तरानें बृहन्नलेच्या मदतीनें कौरवांचा पराभव केला. त्या वेळीं यानें विराटाला बृहन्नलेची थोरवी सांगितली. विजयाच्या आनंदांत विराट युधिष्ठिराशीं द्यूत खेळला. तेव्हां पुनः बृहन्नलेची थोरवी यानें सांगितली. त्यावरोबर विराटास राग येऊन त्यानें

जोरानें एक फांसा यांच्या नाकावर मारला. त्यामुळें यांच्या नाकांतून रक्त वाहूं लागलें, तें द्रौपदीनें पदरानें पुसलें. इतक्यांत उत्तर आला. त्यानें तो प्रकार पाहून विराटाला कंकाची क्षमा मागण्यास सांगितलें ( म. वि. ६८ ). या प्रकारानंतर पांडव दोन तीन दिवसांनीं प्रकट झाले. पुढें त्यांनीं द्रुपदाच्या पुरोहितास राज्यार्ध मागण्यासाठीं धृतराष्ट्राकडे पाठविलें ( म. उ. ६ ). पुरोहितानें धृतराष्ट्रास पांडवांचें म्हणणें सांगितलें. त्यास भीष्मद्रोणादिकांनीं पाठिंबा दिला. तेव्हां धृतराष्ट्रानें संजयास " धृतराष्ट्र पांडवांशीं सख्य करूं इच्छितो " हा निरोप देऊन याकडे धाडिलें. त्याप्रमाणें संजय युधिष्ठिराकडे आला. युधिष्ठिरानें त्याचा योग्य सत्कार करून त्यास कौरवांचें कुशल विचारिलें. अखेर कृष्णास पाठवून यानें कौरवांशीं साम करण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. युधिष्ठिरानें युद्धाचें भयंकर सत्र होण्यापूर्वीं कौरवहनन टाळण्यासाठीं अर्धराज्याऐवजीं १ अविस्थल, २ वृकस्थल, ३ माकन्दी, ४ वारणावत, ५ कोणतेंहि ( म. उ. ७१. २३ कुं.) अशीं पांच गावें मागितलीं. पण दुर्योधनानें सुईच्या अग्रावरची मातीहि देण्याचें नाकारिलें ( म. उ. १२७. २५ कुं. ). शेवटीं कुरुक्षेत्रांत हिरण्वतीच्या कांठीं खंदक खणून यानें आपली सेना आणिली ( म. उ. १५२. १ कुं. ). उलूकाच्या द्वारें पुनः एकदां निरोपप्रतिनिरोप झाले ( म. उ. १६० ). युद्धाच्या वेळीं कौरवसैन्य पाहून याला फार विषाद वाटला. कारण त्यांत सर्व आप्तेष्टांचा भरणा होता ( म. भी. २१ ). अज, अभिमन्यु, अर्जुन, उत्तमौजस्, उत्तर, काशिक, काश्य, कुंतिभोज, कृष्ण, केकय ( पांच बंधु ), क्षत्रदेव, क्षत्रधर्मन्, घटोत्कच, चंद्रसेन, चित्रायुध, चेकितान, जयंत ( अमितौजस्, सत्यजित् ), द्रुपद, द्रौपदेय ( पांच द्रौपदीपुत्र ), धृष्टकेतु, धृष्टद्युम्न, नील, पांचाल, पांड्य, पुरुजित्, भोज, मदिराश्व, युधामन्यु, रोचमान, वसुदान, वार्धक्षेमि, विराट, व्याघ्रदत्त, शंख, शिखंडिन्, श्रेणिमत्, सत्यजित्, सत्यधृति, सात्यकि, सुकुमार, सूर्यदत्त, सेनाबिंदु वगैरे पांडवांचे बाजूस अर्धरथ, रथ, महारथ, अतिरथ, रथोत्तम, रथयूथपयूथप अशा निरनिराळ्या दर्जांचे लोक होते. यांचा धृष्टद्युम्न हा मुख्य होता. याचे बाजूस विराट व द्रुपद हे दोघेच वृद्ध होते. याचेकडे सात अक्षौहिणी सैन्य होतें व त्यांवर एकेकें अधिपति होता. ते द्रुपद, विराट, धृष्टद्युम्न, धृष्टकेतु, शिखंडिन्, सहदेव व सात्यकी हे होत ( म. उ. १५७. ११ कुं.). वरील दर्जांचा क्रम समजत नाहीं. पण दर्जास कांहीं तरी व्यवस्थित स्वरूप होतें ( म. उ. १७०-१७२ कुं. ).

अचल, अनुविंद, अलंबुस, अश्वत्थामन्, उग्रायुध, कर्ण, कृतवर्मन्, कृप, जयद्रथ, जलसंध त्रिगर्त ( पांच बंधु ), दुर्धर्ष, दुर्योधन, दौःशासनि, द्रोण, नील, पौरव, बाह्लीक, बृहद्बल, भगदत्त, भीष्म, भूरिश्रवस्, लक्ष्मण, विंद, वृषक, वृषसेन, शकुनि, शल्य, सत्यश्रवस्, सुदक्षिण वगैरे दुर्योधनाच्या बाजूस होते. यांसहि वरील दर्जावाचक विशेषणें जोडलेलीं आहेत. यांचे सेनापति भीष्म, द्रोण, कर्ण, शल्य, अश्वत्थामन् असे होऊन गेले. भीष्म, द्रोण व कृप हे वृद्ध होते ( म. उ. १६५-१६८ कुं. ).

याचे अक्षौहिणीपति कृप, द्रोण, शल्य, जयद्रथ, सुदक्षिण, कृतवर्मन्, अश्वत्थामन्, कर्ण, भूरिश्रवस्, शकुनि व बाह्लीक असे अकरा, अकरा अक्षौहिणींवर होते ( म. उ. १५५. ३२-३३ कुं. ).

युद्धाच्या वेळीं यानें भीष्मादिकांचे आशीर्वाद घेतले ( म. भी. ४३ ). दुर्योधनानें भीष्माचे मागून द्रोणास सेनापति केलें. त्या वेळीं द्रोणानें संतुष्ट होऊन वर मागण्यास सांगितला तेव्हां दुर्योधनानें युधिष्ठिरास जिवंत धरून आणण्यास सांगितलें, त्यावरून द्रोणानें अर्जुन नसतां यास धरण्याची प्रतिज्ञा केली.

याला जिवंत धरून द्यूत खेळावयास लावून पुनः सर्व पांडवांना वनवासास लावावें, हा दुर्योधनाचा हेतु होता. यावर अर्जुनानें धर्माला ही प्रतिज्ञा निष्फळ करण्याचें आश्वासन दिलें ( म. द्रो. १२. १४ कुं. ). पुढें याला द्रोणानें विरथ करून हतबल केलें म्हणून हा पळून गेला ( म. द्रो. १०६ ). यानें ' अश्वत्थामा मेला ' असें खोटें भाषण केलें, यामुळें द्रोणवध झाला ( म. द्रो. १९० ). धृष्टद्युम्नास युधिष्ठिरानें आपला सेनापति केला होता. द्रोणाचार्य सेनापति झाल्यावर अर्जुन संशप्तकाकडे गुंतला असतां अभिमन्यूचा वध झाला. यामुळें याला अनिवार दुःख झालें. त्या वेळीं व्यासानें याला अनेक अनिवार दुःखें सोसून प्रसंगीं मरणहि पत्करिलेल्या राजांचा इतिहास सांगून मृत्यु अनिवार्य आहे व अभिमन्यूविषयीं शोक करणें व्यर्थ आहे, असें सांगून व्यास गुप्त झाला ( म. द्रो. ५२-७१ ). द्रोणाचार्यानंतर कर्ण सेनापति असतां कर्णाकडून यास पीडा झाली. कर्णानें याचा पराभव करून याची निर्भर्त्सना केली ( म. क. ४९; ६३ ) व यास कर्णानें न मारितां सोडून दिलें. तेव्हां हा लज्जित होऊन शिबिरांत आला असतां कृष्णार्जुन याच्या शोधासाठीं निघाले होते, त्यांची भेट झाली. युधिष्ठिरानें ते कर्णवध करून आले, या समजुतीनें त्यांचें अभिनंदन केलें. परंतु अर्जुनानें खरी वस्तुस्थिति सांगतांच यानें त्याचा धिःकार केला व त्याची खूप निर्भर्त्सना केली. शिवाय, त्यास ' गांडीव धनुष्य खालीं ठेव ' म्हणून सांगितलें. त्यामुळें अर्जुनास अत्यंत क्रोध आला. याचें कारण, जो असें म्हणेल त्याचा वध करण्याची त्यानें प्रतिज्ञा केली होती. परंतु कृष्णाच्या चातुर्यानें तो

अतिप्रसंग टळला व नंतर अर्जुनानें कर्णवध केला ( म. क. ६३-७१ ). गांधारीनें कर्णाच्या भयानें युधिष्ठिराला वनवासांतील तेरा वर्षें झोंपसुद्धां आली नाहीं असें कर्णाचें प्रेत पाहून म्हटलें आहे ( म. स्त्री. २१. ७ कुं. ). यानें शल्याचा वध केला. भीमानें दुर्योधनाचा वध केल्यावर त्याच्या डोक्यावर लाथ मारिली. याबद्दल याला फार वाईट वाटलें. यानें त्याबद्दल भीमास फार दोष दिला. कृष्णासमुद्धां या कृत्याबद्दल वाईट वाटून त्यानें त्याबद्दल धर्मास विचारिलें ( म. श. ६० ). अश्वत्थाम्यानें राहिलेल्या पांडवपक्षीयांचा क्रूरपणें अपरात्रीं वध केला. त्यांत पांडवपुत्रांचाहि संहार होऊन त्यांचीं फक्त सात माणसें शिल्लक राहिलीं. ही बातमी याला समजतांच अनिवार दुःख झालें. नंतर यानें द्रौपदीस आणविलें. तिनें झालेला प्रकार अवलोकन करितांच अश्वत्थाम्यासह त्याच्या सहकाऱ्यांना ठार मारण्याचा आग्रह धरिला. तेव्हां यानें तो अरण्यांत गेला असल्याचें सांगितलें. मग द्रौपदीनें ‘ अश्वत्थाम्यास मारून त्याचा मणि युधिष्ठिराच्या मस्तकावर पाहीन, तरच देह ठेवीन, नाहींतर प्राणत्याग करीन, ’ असें सांगितलें व भीमास त्याचा वध करण्याची विनंति केली. त्याच्या मदतीस कृष्ण, युधिष्ठिर व अर्जुन हे तिघेहि गेले. नंतर अर्जुनानें अश्वत्थाम्याचा मणि काढून तो द्रौपदीनें म्हटल्याप्रमाणें युधिष्ठिरानें आपल्या मस्तकावर धारण केला ( म. सौ. ९-१६ कुं. ). पुढें युधिष्ठिर गांधारीकडे गेला असतां तिच्या दृष्टीस याच्या हाताचीं बोटें पडलीं. तीं तात्काल निस्तेज व हीन झालीं ( म. स्त्री. १५ ). आतेष्टांचीं उत्तर कार्यें करीत असतां कर्ण हा वडील भाऊ असल्याचें यास कुंतीनें सांगितलें. तेव्हां यास अत्यंत दुःख होऊन यानें स्त्रियांस ‘ त्यांच्या मनांत कांहीं गुप्त राहणार नाहीं, ’ असा शाप दिला. कर्णवधामुळें हा विरक्त होऊन तपास जाण्यास सिद्ध झाला. परंतु भीम, अर्जुन, नकुल, सहदेव, द्रौपदी व व्यास यांच्या सांगण्यावरून हा राज्य करण्यास सिद्ध झाला ( म. शां. ६-२० कुं. ). युद्धांत प्राणहानि झाल्यामुळें यास बरें वाटेना. कृष्णास विचारावें तर युद्धाची उभारणी त्यानेंच केलेली. धृतराष्ट्रास विचारावें तर त्याचे शतपुत्र मृत झालेले. व्यासास विचारावें तर त्याच्या कुलाचा नाश झालेला. म्हणून हा तळमळ करीत असतां वाराणसीस मार्कंडेयानें अंतर्ज्ञानानें हें जाणिलें; व यास तीर्थयात्रेचें महत्त्व व प्रयागमाहात्म्य सांगितलें. पुढें कृष्णानें यास राज्याभिषेक करून मार्कंडेयाच्या म्हणण्यास दुजोरा देऊन युधिष्ठिराकडून प्रयागयात्रा करविली ( पद्म. स्व. ४०-४९ ). हस्तिनापुरांत आल्यावर ( म. शां. ३६ ) राज्याभिषेकाच्या वेळीं दुर्योधनाचा मित्र चार्वाक राक्षस ब्राह्मणवेषानें तेथें आला व त्यानें युधिष्ठिराची निंदा केली. पण तो ओळखिला जाऊन त्याचा वध झाला ( म. शां. ३८ ). भीष्मानें यास केलेला उपदेश शांति व अनुशासन पर्वांत नमूद आहे. याचा बृहस्पतीबरोबर अध्यात्मविषयावर संवाद झाला होता ( म. अनु. १११ ). हा भीष्मास तिलांजलि देत असतां प्रत्यक्ष भागीरथी वर येऊन तिनें भीष्माचें वर्णन केलें ( म. अनु. १६८ ). युधिष्ठिरास बंधुवधामुळें मनःस्वास्थ्य नव्हतें. तेव्हां कृष्ण, व्यास व धृतराष्ट्र यांनीं यास उपदेश करून उत्साही केलें ( म. आश्व. १-३ ). या पापमोचनासाठीं व्यासाच्या आज्ञेवरून यानें अश्वमेध करण्याचा विचार केला व त्याप्रमाणें यानें तीन अश्वमेध केले ( म. आश्व. ३; ८९ कुं.; भा. १. १२; जै. अश्वमेध ) अश्वमेधासाठीं द्रव्य नव्हतें म्हणून यानें हिमवत् पर्वतावरील मरुत्ताचें अवशिष्ट द्रव्य आणिलें ( जै. अ. २ ). महाभारतांत याज्ञवल्क्य व पैल यांशिवाय ऋत्विजांचीं नांवें नाहींत ( म. आश्व. ७२. ३ कुं. ). अश्वमेध यज्ञांतील ऋत्विज वगैरेंचीं बरींच नांवें जैमिनि अश्वमेधांत दिलीं आहेत ( ६३ ). अश्वमेधांत व्यास आचार्य होता. बकदाल्भ्य ब्रह्मा व वामदेवादि सोळा ऋत्विज आणि मित्रादि आठ द्वारपाळ होते. यज्ञसमाप्तीनंतर अन्नसंतर्पण व दक्षिणा दिल्यानंतर एक चमत्कार घडला. पूर्वीं एका ब्राह्मणानें अन्नदान केल्यानंतर सोडलेल्या उदकांत लोळल्यानें अर्धांग सुवर्णयुक्त झालेला मुंगूस तेथें आला. तो धर्मास म्हणाला कीं, ‘ तुझ्या यज्ञांत माझें राहिलेलें अर्धांग सुवर्णाचें होईल, या आशेनें मी आलों होतों. परंतु तें कांहीं झालें नाहीं. ’ यामुळें युधिष्ठिराचा मी यज्ञकर्ता हा अभिमान नष्ट झाला व मुंगुसाचें अर्धांग सुवर्णाचें झालें ( उंछवृत्ति पहा; म. आश्व. ९०-९२; जै. अ. ६६ ).

नंतर यानें धृतराष्ट्राच्या अनुमतीनें राज्यकारभार सुरू केला ( म. आश्व. १ ). व्यासाच्या आज्ञेवरून धृतराष्ट्राच्या वनगमनास यानें संमति दिली ( म. आश्व. २-४ ). धृतराष्ट्रानें जातांना याला बहुमोल उपदेश केला ( म. आश्व. ५-७ ). हा धृतराष्ट्रास भेटण्यासाठीं शतयूपाश्रमांत गेला होता ( म. आश्व. २४-२५ ). विदुराच्या निर्याणप्रसंगीं हा त्याच्याजवळ होता. त्याची प्राणज्योत याच्या देहांत येऊन हा सतेज झाला ( म.आश्व. २६ ). यानें शेवटीं परीक्षितास राज्याभिषेक करून ( भा. १. १५-३७. ४० ) वैश्यापुत्र युयुत्सूस राज्यकारभारी नेमिलें; व हा सर्व बंधु व द्रौपदी यांसह स्वर्गगमनास निघाला. वाटेंत ते सर्व पतन पावले व हा स्वतः स्वर्गास गेला. याचे बंधु व पत्नी यांना अशुभ स्थान मिळालें, पण याला मात्र उच्च स्थान मिळालें. तरी याची

बंधुप्रीति जागृत असल्यामुळें यानें बंधूंचा समागमच पसंत केला ( म. महा. १-३ कुं. ). याला धर्म श्वानरूपानें भेटला होता. यानें ' नरो वा कुंजरो वा ' म्हणण्याचें पातक केलें, त्याबद्दल याला प्रथम नरकदर्शन घडविण्यांत आलें ( म. स्व. ३. १७ कुं. ) व तेव्हांपासून याचा रथ अधांतरीं चालेनासा झाला ( म. द्रो. १९० ).

याच्या आप्तांना नरकवास प्राप्त झाल्याचें देवदूतानें याला दाखविलें ( म. स्व. २. १४ कुं. ). नंतर यानें गंगेंत आपला मनुष्यदेह विसर्जन केला ( म. स्व. ३ ).

युधिष्ठिरास द्रौपदीपासून प्रतिविन्ध्य व पौरवीपासून देवक असे दोन पुत्र झाले ( भा. ९. २२. २७-३० ). महाभारतांत याच्या दुसऱ्या बायकोचें नांव देवकी व तिचा पुत्र यौधेय असें दिलें आहे ( म. आ. ६३. ७५ कुं. ).

हा राजा असतां भीम युवराज व अर्जुन सेनापति होता. हा शरीरानें कृश असून सुवर्णाप्रमाणें गौर होता. नाक मोठें व नेत्र आरक्त असून विशाल होते ( म. आश्र. २७. ५ कुं. ). याच्या धनुष्याचें नांव माहेंद्र, शंख अनंतविजय व रथाचे अश्व काळ्या शेपटाचे व हस्तिदंती रंगाचे होते. याच्या रथावर नक्षत्रयुक्त चंद्र असलेला सुवर्णध्वज होता. त्यावर यंत्रानें वाजणारे नंद व उपनंद नांवांचे दोन मृदंग असत ( म. द्रो. २३ ).

हा सोळाव्या वर्षीं प्रथम हस्तिनापुरीं आला. तेथें तेरा वर्षें गेल्यानंतर सहा महिने जतुगृहीं, सहा महिने एकचक्रेंत, एक वर्ष द्रुपदाच्या येथें, नंतर पांच वर्षें दुर्योधनादिकांबरोबर, इकडे तिकडे व मग इंद्रप्रस्थांत तेवीस वर्षें यानें घालविलीं. पुढें द्यूतांत जिंकला गेल्यामुळें बारा वर्षें वनवासांत घालवून एक वर्ष अज्ञातवासांत घालविलें. पुढें युद्ध होऊन नंतर यानें छत्तीस वर्षें राज्य केलें. अशीं एकंदर याच्या वयाचीं एकशें आठ वर्षें होतात. याचे बंधु यापेक्षां क्रमानें एकेक वर्षानें धाकटे होते ( म. आ. १३४. २-८ कुं. ). ही वयाची माहिती फक्त महाभारताच्या कुंभकोण प्रतींतच आहे. नऊ वर्षें राज्य केल्याची माहिती चुकीची दिसते ( गर्गसं. १०. ६०. ९ ).

पांडव वनवास व अज्ञातवास मिळून तेरा वर्षें पुरीं करून प्रगट झाले. तेव्हां ते अज्ञातवासांत प्रगट झाल्यामुळें त्यांनीं ठरलेला पण योग्य प्रकारें पाळला नाहीं म्हणून दुर्योधनानें तक्रार करून निर्णय देण्याकरितां भीष्माला विनंति केली. तेव्हां भीष्मानें चांद्रवर्षानुसार पांडवांनीं आपला पण पुरा केला, असा निर्णय दिला. यावरून तेव्हां चांद्रमास चालू असावा असें दिसतें ( म. वि. ४७. ३-६; ५२ कुं. ).

द्यूताची मिति आश्विन वद्य अष्टमी असून पांडव प्रगट होण्याची मिति ज्येष्ठ वद्य अष्टमी ठरते. उत्तरेचें लग्न ज्येष्ठ वद्य एकादशीस झालें व मार्गशीर्ष वद्य (अष्टमीला) एकादशीला अभिमन्यु मेला ( महाभारत उपसंहार, पा. ११३ ). उत्तरेनें अभिमन्यूशीं सहाच महिने सहवास घडल्याचा निर्देश केला आहे ( म. स्त्री. २० ).

. याच्या नांवाचा एक शक चालू होता, व तो ख्रि. पू. ३१०२ च्या सुमारास सुरू झाला, असें परंपरेवरून कळतें. परंतु या शकाचा उल्लेख बृहत्संहितेपर्यंत कोणींहि केलेला नाहीं. बृहत्संहितेचा कर्ता वृद्धगर्ग याचा काल इ. स. च्या सुमारास आहे. पांचव्या शतकांतील वराहमिहिरानेंहि तो श्लोक उध्दृत केला आहे. परंतु मधल्या ३१०२ वर्षांच्या काळांत युधिष्ठिरशकाचा उल्लेख कोठेंच कां नसावा? भारतीय युद्धोत्तरकालीन राजे, राज्यकाल, यांची वर्षवार माहिती पुराणांत सर्वत्र दिलेली आढळते. परंतु कोठेंहि युधिष्ठिरशकाचा उल्लेख नाहीं. यामुळें तर्क करण्यास वाव मिळून युधिष्ठिरशक बनावट आहे, असें युरोपियन संशोधकांनीं प्रतिपादिलें आहे; व त्यांनीं उपलब्ध वंशावळींतील पिढ्यांचा संदर्भ पुराव्यादाखल दिला आहे. आमच्या इकडील कै. त्र्यं. गु. काळे, श्री. दप्तरी, फार काय लो. टिळक यांनीं सुद्धा पिढ्यांवरच जोर देऊन परंपरित माहिती चुकीची ठरविली व ख्रि. पू. तेरा ते पंधराव्या शतकांत भारतीय युद्ध झाल्याचें ठरविलें. पुराणामध्यें कालदर्शक म्हणून दिलेल्या कांहीं श्लोकांचे अर्थ लावण्याचा कै. काळे वगैरेंनीं प्रयत्न केला ( पुराणनिरीक्षण ). परंतु कै. राजवाडे यांनीं त्याच श्लोकांवरूनहि युधिष्ठिरशकच कसा बरोबर ठरतो, हें दाखविलेलें आहे. तथापि, त्या वचनांचा अर्थ जरी नीट लागला, तरी पिढ्यांच्या दृष्टीनें इतक्या वर्षांची संगति लावितां येत नाहीं. युद्धोत्तरकालीन पुराणांतील वंशावळींत कांहीं पिढ्या गळल्या आहेत, असें सिद्ध व्हावयास पाहिजे ( भा.इ. सं. मं. इ. १८३५ ). युधिष्ठिराचा वंशवाचक शब्दहि युधिष्ठिर असाच होतो ( पा. सू. २.४.६६ ).

**युध्यामधि**—दाशराज्ञयुद्धांत सुदासानें याला ठार केलें ( ऋ. ७. १८. २० ).

**युयुत्सु**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

२ धृतराष्ट्रास वैश्यस्त्रीपासून झालेला पुत्र ( म. आ. ६४. १६२; २०१. २ कुं. ). हा प्रथम कौरवपक्षाचा होता ( म. भी. ४३. १०२ कुं. ). नंतर यानें पांडवांच्या बाजूनें उलूकाशीं युद्ध केलें. परंतु उलूकानें याचा पराजय केला (म. क. १६ कुं.). शेवटीं युधिष्ठिरानें महाप्रस्थानास जातांना परीक्षितास राज्याभिषेक करून याला कारभारी नेमिलें ( म. महा. १.

६-७ कुं. ). याचे घोडे पिवळट, भिष्पाड व स्थूल असत ( म. द्रो. २३ ).

**युयुध**—( सू. निमि. ) हा वस्वनन्ताचा पुत्र. याचा पुत्र सुभाषण ( भा. ९. १३. २५ ).

**युयुधान**—( सो. वृष्णि. ) शिनीचा पुत्र जो सत्यक, त्याचा हा पुत्र ( म. आ. २३९. ११ कुं.; भा. ९. २४ ). यास शिनीचा मुलगा असें म्हटलें आहे ( म. द्रो. १४४ ). हा मरुद्गणांपासून अवतरला ( म. आ. ६८. ७९ कुं. ). हा द्रौपदीच्या स्वयंवरास गेला होता ( म. आ. १८६ ). हा पित्यासहित रैवतक पर्वतावरील उत्सव साजरा करण्यास गेला होता. हा अर्जुनापासून धनुर्विद्या शिकला ( भा. ३. १; म. द्रो. ९८; १४१ ). यानें एकदां पांडव वनवासांत असतांना रामकृष्णांना सल्ला दिला होता कीं, पांडवांना वनवास पुरा करूं द्यावा. व आपण धृतराष्ट्रपुत्रांना ठार करून अभिमन्यूला गादीवर बसवावें. पण ' दुसऱ्यानें जिंकलेलें राज्य धर्म स्वीकारणार नाहीं ' या मुद्यावर कृष्णानें तसें करण्याचें नाकारिलें. तेथें यास माधव म्हटलें आहे (म. व. १२१. २४ कुं. ). संधि करण्यास कोण पाठवावें, यास्तव भरलेल्या सभेंत बलराम म्हणाला कीं, कौरवांकडे जाणारानें नमून वागावें. तेव्हां तसें म्हणणाऱ्या बलरामाची यानें चांगली खरडपट्टी काढली व धर्माची मागणी न्याय्य आहे हें दाखवून दिलें ( म. उ. ३). हा कौरवांशीं पांडवांच्या बाजूनें युद्ध करण्यास फार उत्सुक होता. यानें सहदेवानें कृष्णासमीप केलेल्या भाषणास संमति दिली व इतर वीरांनीं यास प्रोत्साहन दिलें. स्वतः द्रौपदीनेंहि याच्या भाषणाची वाखाणणी केली. कृष्ण शिष्टाईस निघाला, तेव्हां यानें स्वतः त्याचा रथ सज्ज करून त्यासह हा गेला ( म. उ. ८१-८३ ). हा अतिरथी होता, असें भीष्मानें दुर्योधनास सांगितल्यावरून दिसतें ( म. उ. १७० ). हा युधिष्ठिराच्या सात पोट सेनापतींपैकीं एक होता ( म. उ. १५७. ११ कुं. ).

युद्धांत एकदां याच्या रथाचे गांधारांनीं शस्त्रांनीं तिळतिळ तुकडे करून टाकिले. तेव्हां हा अभिमन्यूच्या रथावर चढला व शकुनीच्या सैन्याची यानें वाताहात उडविली (म. भी.५८). भीमाचें संरक्षणार्थ हा शत्रुसैन्याला ठार करीत भीष्मावर तुटून पडला. तसेंच अलंबुस व भूरिश्रवा यांच्याशीं याचें घनघोर युद्ध झालें ( म. भी. ६३-६४). याचे सर्व पुत्र भूरिश्रव्यानें मारिले. तेव्हां चिडून दोघांनीं एकमेकांला विरथ केलें. नंतर अनुक्रमें भीम व दुर्योधन यांनीं त्यांस रथ पुरविले ( म. भी. ७४ ). हा द्रोणावर चालून गेलेल्यांतील एक होता ( म. द्रो. २३ ). यानें एकदां धृष्टद्युम्नास द्रोणापासून वांचविलें. याचें द्रोणाशीं तुमुल युद्ध होऊन यानें द्रोणाचीं १०१ धनुष्यें लागोपाठ तोडलीं. तेव्हां द्रोणानेंहि याचें युद्धकौशल्य वाखाणून याचा गौरव केला ( म. द्रो. ९७-९८ ). नंतर याचा द्रोणाशीं घनघोर युद्धप्रसंग झाला, पण युधिष्ठिरानें अर्जुन दिसत नसल्यामुळें ' कांहीं वरें वाईट झालें कीं काय ? ' अशी भीति प्रदर्शित केली व यास त्याचे मदतीस जावयास विनविलें ( म. द्रो. ११० ). तो दिवस जयद्रथवधाचा असल्यामुळें कांहीं विशेष होईल, या शंकेनें अर्जुनानें यास युधिष्ठिराचे रक्षणास ठेविलें होतें. तसें यानें युधिष्ठिरास सांगितलें व शंका प्रदर्शित केली कीं ' मी येथून गेल्यास तुमचें रक्षण कोण करील ? ' पण युधिष्ठिरानें गळच घातल्यामुळें यास अर्जुनाच्या रक्षणास जाणें भाग पडलें. जातांना यानें भीमास युधिष्ठिराच्या संरक्षणाची आज्ञा केली. याचें वाटेंत द्रोणाशीं युद्ध होणार होतें, पण तें यानें टाळलें व कृतवर्म्याचा पराभव केला ( म. द्रो.१११-११३). पुढें पुनः यानें कृतवर्म्याचा व द्रोणाचा पराभव केला. त्या कालीं यानें सर्वांचें निवारण करून एक बाणानें सात-सात आठआठ यवनवीर मारिले. तेव्हां यास सुतानें प्रोत्साहन दिलें. त्यायोगें जोर चढून यानें दुर्योधनाचा पराभव केला. तसेंच पाषाणयोधि वीरांशीं युद्ध होऊन यानें दुःशासनादिकांचा पराभव केला (म. द्रो. ११९-१२१). पुढें यानें अलंबुष व जलसंध यांस ठार मारिलें. नंतर याचें भूरिश्रव्याशीं युद्ध झालें. त्यांत हा पराभव पावला असतां भूरिश्रवा यास फरफरां ओढूं लागला व याचा वध करणार, तोंच त्याचे हात अर्जुनानें मागून तोडले. नंतर भूरिश्रवा प्रायोपवेशन करून बसला असतां यानें त्यास ठार मारिलें ( म. द्रो. १४०-१४३; १९८). कारण पूर्वी याचा दहा मुलें त्यानें ठार केलीं होतीं.

दुर्योधनाची व याची बालपणापासून चांगली मैत्री होती. तरी त्याशीं यानें तुमुल युद्ध केलें ( म. द्रो. १८९ ). धृष्टद्युम्नानें द्रोणाचा गैरसावध स्थितींत वध केल्यानें यानें त्याची मनसोक्त निंदा केली. तेव्हां थोडी बाचाबाची झाली. पण भीमानें धृष्टद्युम्नावर धांवून जाणाऱ्या याला आवरल्यावर व धर्म आणि वासुदेव यांनीं उपदेश केल्यावर दोघेंहि शांत झाले ( म. द्रो. १९८ ). यानें कर्णपुत्र प्रसेनाला ठार केलें ( म. क. ८२ ). यानें क्षेममूर्तीचा वध केला व कृत-वर्म्याचा पराभव केला ( म. श. २१ ). हा भारतीय युद्धांत वांचून पुढें पुष्कळ दिवस जिवंत होता.पुढें जेव्हां सर्व यादव-संहाराची वेळ आली, तेव्हां सर्व यादव मैरेयक नांवाचें मद्य प्याले. नंतर कृतवर्मा व हा उखाळ्यापाखाळ्या काढूं लागले. तेव्हां कृष्णानें कृतवर्म्याकडे रोखून पाहिलें. तेव्हां सत्राजिताच्या स्यमंतक मण्याची कथा यानें त्यास ऐकविली. नंतर यानें शपथ वाहून आपण कृतवर्म्याचा वध करणार

असल्यानें सांगितलें. नंतर हा कृतवर्म्याचा वध करून रथांचे वध करीत सुटला. कृष्णानें यास शांत करण्याचा प्रयत्न केला, पण इतरांनीं यावर झोड उठविल्यामुळें प्रद्युम्न मदतीस आला. परंतु यांच्यावर उष्ट्या भांड्यांचा मारा केल्यामुळें हे दोघेहि गतप्राण झाले (म. मौ. ३). अनिरुद्धाशीं याचें युद्ध होऊन हा मरण पावला, असें भागवतांत म्हटलें आहे (११. ३०. १६). यानें कृष्णापासून ब्रह्मविद्या प्राप्त करून घेतली होती (भा. ३. १). याच्या रथाचे अश्व शुभ्र रुपेरी रंगाचे होते (म. द्रो. २३;९८; १४०). याच्या पुत्रास यौयुधानीस अर्जुनानें सरस्वती-काठच्या प्रदेशाचा राजा केलें (म. मौ. ७; ५ सरस्वती पहा). यास जय नामक पुत्र होता (भा. ९.२४). विष्णुपुराण व मत्स्यपुराण यांत असंग व वायूंत भूत पुत्र दिला आहे. यास मधु यादवांचा वंशज म्हणून माधव (म. उ. १७०; द्रो. ९८; ११३), शिवाय सात्वत (द्रो.९८) व दाशार्ह (म. द्रो. १४२) असें म्हटलेलें आढळतें. हा कृष्णार्जुनांचा परमप्रिय मित्र होता. हा सत्यप्रिय, राग़ीट, निर्भय, शूर, दृढनिश्चयी व मित्रांस अभय देणारा असा होता.

**युवन् कौशिक**—शांत्युदकप्रकरणांत याच्या मताचा उल्लेख आहे (कौ. सू. ९. ११).

**युवानस्**—लेख देवांतील एक.

**युवनाश्व**—अंगिरसकुलांतील मंत्रकार.

**युवनाश्व**—(स्वा. प्रिय.) भागवतमतें पृथूचा पुत्र.

२ (सू. इ.) भागवतमतें चंद्राचा, विष्णुमतें आर्द्राचा, मत्स्यमतें इंदूचा व वायुमतें आंध्राचा पुत्र होय. याचा पुत्र श्रावस्त.

३ (सू. इ.) हा विष्णु व वायु यांच्या मतें प्रसेनजिताचा, मत्स्यमतें रणाश्वाचा व भागवतमतें सेनजिताचा पुत्र. याला सौद्युम्नि असेंहि म्हणत असत. याला शंभर स्त्रिया होत्या, पण पुत्र नव्हता. याच्या एका बायकोचें नांव गौरी. भृगूच्या यज्ञकुंडांतील उदक रात्रीं चुकून प्याल्यामुळें याला गर्भ राहून सुप्रसिद्ध मांधाता मुलगा झाला (मांधातृ पहा; म. व. २०५. ३ कुं.; भा. ९. ६). युवनाश्वाच्या शापानें राजकन्या कावेरी नदी झाली. ही कावेरी दक्षिणेकडील कावेरी नदी नसून नर्मदेला मिळालेली कावेरी नदी असावी (मत्स्य. १८९. २-६). यानें गौरीला शाप दिल्यानें ती बहुदा नदी झाली (वायु. २. २६. ६६; ब्रह्मांड. ३. ६३. ६७; ब्रह्म ७. ९१; ह. वं. १. १२). याच्या पोटीं गंगा कावेरी रूपानें आली होती (ह. वं. १. २७). यानें स्वतःच्या प्रिय स्त्रिया व सुंदर घरहि दान केलें होतें (म. शां. २४० २५).

४ (सू. इ.) विष्णु व वायु यांच्या मतें हा मांधातृपुत्र अंबरीषाचा पुत्र. हा अंगिरसांपैकीं असून सूक्तद्रष्टा आहे (ऋ. १० १३४).

५ शूलिन् नामक शिवावताराचा शिष्य.

**यूथग**—चाक्षुष मन्वंतरांतील देवगण.

**यूथप**—धूम्रपराशरकुलोत्पन्न एक ऋषि.

**यूपकेतु**—शत्रुघातिन्‌चें दुसरें नांव (शत्रुघातिन् पहा).

२ (१ भूरिश्रवस् पहा).

**यूपध्वज**—भूरिश्रवस्‌चें नामांतर (म. स्त्री. २४.५ कुं.).

**यूपाक्ष**—एक राक्षस. याला मारुतीनें मारिलें. हा रावणाचा सेनापति होता (वा. रा. सुं. ४६).

२ मैंद वानरानें मारिलेला एक राक्षस (वा. रा. यु. ७५-७६)

**योग**—धर्म व क्रिया यांचा पुत्र (भा. ४. १. ५१).

**योगगद्यायन**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**योगवती**—मेनेची तृतीय कन्या व जैगीषव्याची पत्नी (जैगीषव्य पहा).

**योगसूनु**—(सो. पूरु.) हा वायुमतें ब्रह्मदत्तपुत्र होय (युगदत्त पहा).

**योगीश**—जैगीषव्य नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**योगेश्वर**—हा शिवाचा पहिला अवतार आहे. हा वैवस्वत् मनूचा पुत्र. हा वाराहकल्पांतील वैवस्वत मन्वंतराचे पहिले चौकडींतील द्वापारयुग सुरू होण्याच्या पूर्वी झाला (शिव. शत. ४).

२ रैच्य मनूंतील अवतार.

३ देवसावर्णि मन्वंतरांतील होणारा विष्णूचा अवतार (भा. ८. १३. ३२).

४ कलीच्या श्वेतकली नांवाच्या पहिल्या भागांतील योगेश्वर (१) रुद्र, (२) सुतार, (३) तारण, (४) सुहोत्र, (५) कंकण, (६) लोक, (७) जैगीषव्य, (८) दधिवाहन, (९) ऋषभ, (१०) उग्र, (११) अत्रि, (१२) गौतम, (१३) वेदशीर्ण, (१४) गोकर्ण इत्यादि (स्कंद. १. २. ४०).

कवि, हरि, अन्तरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल, चमस, करभाजन (भा. ५. ४. ११; ११. २. २१). हे भागवतधर्मांचे ज्ञाते असून सुप्रसिद्ध योगी होते. हेच पुढें मत्स्येंद्रादि रूपांनीं अवतरले.

**योजनगंधा**—(सत्यवती पहा).

**योधयान**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**यौधेय**—हा युधिष्ठिराला शैब्यकन्या देवकीपासून झाला (म. आ. ६३. ७५ कुं.).

२ (सो. कुरु.) हा मत्स्यमतें प्रतिविंध्यपुत्र होय.

**यौयुधान किंवा यौयुधानि**—सात्यकीचा पुत्र. हा यादव-संहारांतून वांचला. याला युधिष्ठिरानें सरस्वतीतीरीं स्थापिलें (म. मौ. ८. ७२ कुं.; ५ सरस्वती पहा).

**यौवनाश्व**—(मांधातृ पहा).

२ (श्वेतपर्ण पहा).

३ (सू.इ.) भागवतमतें अंबरिषाचा पुत्र. याला याच्या आजानें म्हणजे मांधात्यानें प्रवर म्हणून स्वीकारलें होतें (भा. ९. ७. १).

**यौवनाश्वि**—(मांधातृ पहा).

## र

**रक्तकर्णी**—ब्रह्मधनेची कन्या.

**रक्तबीज**—शुंभनिशुंभांचे पक्षाचा एक असुर. यास रुद्रानें असा वर दिला होता कीं, याच्या देहापासून जेव्हां भूतलावर रक्तबिंदु पडेल, तेव्हां रूपानें व पराक्रमानें याच्याच-सारखे असंख्य दैत्य उत्पन्न होतील; व त्या दैत्यांपासूनहि पुढें अनेक दैत्य निर्माण होतील. हा शुंभनिशुंभांचे बाजूनें अंबिकेशीं लढण्यास आला असतां यानें देवीस शुंभनिशुंभांची पत्नी होण्यास विनविलें. पण ती शिष्टाई फुकट गेल्यावर हा तिच्याशीं लढूं लागला. तेव्हां याच्या रक्तापासून असंख्य राक्षस निर्माण होऊन युद्ध करूं लागले. असें पाहून चामुण्डेनें विक्राळ रूप धरून याचें व याच्यापासून उत्पन्न झालेल्या राक्षसांचें रक्त—बिंदु भूमीवर पडूं न देतां—सर्व प्राशन केलें व तदनंतर अम्बिकेनें यास व तज्जन्य राक्षसांना ठार मारिलें (दे. भा. ५. २७-२९; मार्क. ८५; शिव. उमा. ४७).

**रक्तासुर**—महिषासुरपुत्र. हा हिरण्याक्षासारखा परा-क्रमी होता. रक्तासुराचे बल व अतिबल या नांवाचे पुत्र होते. यांनीं इंद्राला जिंकलें. याच्या हजार अक्षौहिणी सैन्यावर एक एक अधिपति होता (स्कंद. ७. १. ११९). त्यांपैकीं धूम्रा-क्षादि तेहेतीस नांवें मुळांत आढळतात.

**रक्ष**—एक व्यास (व्यास पहा).

**रक्षस्**—हा खशा आणि कश्यप यांचा धाकटा पुत्र. तीन डोकीं, तीन पाय, तीन हात, काळे डोळे, उभे केंस, पिवळ्या मिशा, शिलासंहनन, भक्कम पण लहान शरीर, प्रबाहु, मोठा आवाज, कानापर्यंत फाटलेलें तोंड, बलवान्, फेंदरें नाक, आठ दांत, जिह्मास्य, शंकुकर्ण, पिंगलोद्वृत्तनयनं, जटिल, मोठे खांदे, महोरस्क, पृथुघोण, कृशोदर, अस्थूल, लंबमेढ्राण्डपिंडक, असा हा विद्रूप असून सकाळीं जन्मला (ब्रह्मांड. ३. ७. ४७). याची पत्नी ब्रह्मधना (ब्रह्मधना पहा).

**रक्षा**—ऋक्षाची बहीण व प्रजापतीची स्त्री. हिचा पुत्र जांबवत् (ब्रह्मांड. ३. ७. २९९-३००).

**रक्षिता**—एक अप्सरा (म. आ. ६६. ५० कुं.). ही कश्यपास प्राधेपासून झाली.

**रक्षोहन् ब्राह्म**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १६०).

**रघु**—(सू. इ.) हा भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें दीर्घबाहुपुत्र. पण मत्स्य व पद्म यांच्या मतें निघ्न-पुत्र होय (पद्म. सृ. ८). पण पद्मपुराणांतच नंदिनी काम-धेनूच्या कृपेनें दिलीपास हा झाला, असें रघुवंशांत घेतलेलें कथानक दिलें आहे (पद्म. उ. २०३; र. वं. २). हा उत्तम राजा असल्यामुळें यास अयोध्येचा पहिला राजा असें म्हटलें आहे (ह. वं. १. १५). यानें दिग्विजय करून विपुल संपत्ति आणिली व गुरूच्या आज्ञेनें विश्वजित् याग केला. त्यामुळें हा अगदीं निष्कांचन झाला असतां विश्वामित्रशिष्य कौत्स गुरु-दक्षिणा मागण्याकरितां याच्याकडे आला. पण याजनक कांहींच नसल्यानें यानें कुबेरावर स्वारी करून त्याला सोन्याचा पाऊस पाडावयास लावला. तेव्हां कौत्सानें १४ कोटि मोहरा दक्षिणा घेतली व गुरूस दिली (स्कंद. २. ८. ४). ही कौत्साची कथासुद्धां रघुवंशांत अशीच आहे (र. वं. ५).

**रंगदास**—एक शूद्र. हा वेंकटाचलावरील श्रीनिवासाचा भक्त होता. यानें तेथील देवालय वगैरे बांधिलें (स्कंद. २. १. ९).

**रंगवेणी**—सारंग गोपाची कन्या (हरिधाम पहा).

**रचना**—एक दैत्यकन्या व त्वष्टृ नामक प्रजापतीची स्त्री (यशोधरा पहा).

**रज**—वसिष्ठ व ऊर्जा यांचा पुत्र. हा सप्तर्षींपैकीं एक आहे (मार्क. ४९).

२ धराचा पुत्र.

३ (स्वा. नाभि.) विष्णुमतें विरजाचा पुत्र.

**रजत**—वरत्रिनचा पुत्र.

**रजतनाभ**—यक्षस् व क्रतुस्थला यांचा पुत्र. याची स्त्री अनुह्रादकन्या मणिवरा. हिचे ठायीं यास मणिवर व माणिभद्र असे दोन पुत्र झाले (ब्रह्मांड. ३. ७. ११२-१२०).

**रजन कौणेय** किंवा **कौणेय**—एक आचार्य ( तै. सं. २. ३. ८. १; क. सं. २७. २ ). याला दृष्टि येण्याकरितां क्रतुजित् जानकीनें यज्ञ केला ( क. सं. ११. १; ). याचा मुलगा उग्रदेव राजनि ( पं. ब्रा. १३. ४. २१ ).

**रजि**—( सो. पुरूरवस्. ) हा आयूला स्वर्भानवी प्रभेपासून झाला (म.आ. ६९. २८ कुं.). हा अत्यंत पराक्रमी असल्यानें हा ज्याच्या पक्षाला असेल त्यास जय येई. इंद्रपद देण्याच्या अटीवर हा देवाकडून लढला. सांभाळतां येईना म्हणून इंद्रानेंहि स्वर्ग व इंद्रपद याला देऊन टाकलें. पण रजीला शेंकडों मुलें होतीं, तरी त्यांच्यांत याचा वकूब नव्हता. शिवाय ते इंद्रपद परत करीनात. तेव्हां इंद्रानें बृहस्पतीच्या सल्लयानें मुलांना भ्रष्टबुद्धि करून त्यांचा नाश केला व इंद्रपद परत घेतलें ( भा. ९. १७; वायु. २. ३०.७६-१००; ब्रह्म. ११; ह.वं. १. २८; मत्स्य. २४. ३४-४९ ).

हा विष्णूचा अवतार होय. यानें देवांच्या साहाय्यानें सर्व दानवांना कोलाहल पर्वतावर जिंकलें ( वायु. २.३५. ८६ ).

२ ही इंद्रानें विठीनसाला दिली होती ( ऋ. ६. २६. ६).

**रजेयु**—( सो. पूरु. ) हा वायुमतें रौद्राश्वपुत्र होय. भागवत व विष्णु यांच्या मतें ऋतेयु व मत्स्यमतें औचेयु हाच होय.

**रज्जुकंठ**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**रज्जुवाल**—जटायूच्या पुत्रांतील एक.

**रज्जुभार**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**रण**—हिरण्याक्षाशीं देवांच्या झालेल्या युद्धांत यास वायूनें मारलें ( पद्म. सृ. ७०५ ).

**रणक**—( सू. इ. भविष्य. ) भागवतमतें क्षुद्रकाचा पुत्र. यास कुलक असेंहि नांव आहे.

**रणंजय**—( सू. इ. भविष्य. ) वायुमतें कृतंजयपौत्र व्रातपुत्र व भागवत, विष्णु व भविष्य यांच्या मतें कृतंजय पुत्र. मत्स्यांत यास रणेजय म्हटलें आहे.

**रणधृष्ट**—वृष्टाचा कनिष्ठ पुत्र ( पद्म. सृ. ८ ).

**रणाश्व**—( सू. इ. ) हा मत्स्य व पद्म यांच्या मतें संहताश्वपुत्र होय.

**रणेजय**—मत्स्यमतें कृतंजयपुत्र ( रणंजय पहा ).

**रता**—एक देवस्त्री. हिच्या मुलाचें नांव अहन् ( म. आ. ६७. २० कुं. ).

**रति**—कामाची पत्नी ( म. आ. ६७. ३३ कुं.; भा. १०. ५५. ७ ). हिची दक्षप्रजापतीच्या घामापासून उत्पत्ति झाली ( कालि. ३; शिव. रुद्र. स. ४ ). मदनदहनानंतर ही शोक करीत असतां शंकरानें हिचें सांत्वन केलें ( पद्म. सृ. ४३ ).

२ एक अप्सरा ( म. अनु. ५०. ४८ कुं. ).

३ ऋषभदेववंशीय विभु राजाची स्त्री (भा. ५. १५. १६).

४ कृष्णपुत्र प्रद्युम्नाची स्त्री ( पद्म. पा. ७० ). हीच मायावती होय. हिचें वय नवऱ्यापेक्षां अधिक होतें ( पद्म. भू. १०३ ).

**रतिकला**—कृष्णाची एक प्राणसखी ( पद्म. पा. ७४ )

**रतिगुण**—कश्यप व प्राधा यांचा पुत्र.

**रतिनार**—( रंतिभार पहा ).

**रतिविदग्धा**—हस्तिनापुरांतील एक वेश्या. हिनें ब्राह्मणांना अन्नदान केल्यामुळें मेल्यावर ही वैकुंठास गेली ( पद्म. क्रि. २० ).

**रतिसर्वस्वा**—कृष्णाची एक प्राणसखी (पद्म.पा.७४).

**रत्नकूटा**—अत्रीची स्त्री ( ब्रह्मांड. ३. ७४-८७ ).

**रत्नग्रीव**—कांची नगरीचा राजा. यानें नील पर्वतावरील विष्णूची पूजा करून स्तुति केल्यामुळें विष्णु प्रसन्न झाला व त्यानें याला प्रसाद दिला. तो ग्रहण करितांच याला सरूपता मुक्ति प्राप्त होऊन हा विष्णुलोकीं गेला ( पद्म. पा. १७-२२).

**रत्नचूड**—( रत्नावलि पहा ).

**रत्ना**—अक्रूराच्या स्त्रियांतील एक.

**रत्नाकर**—एक व्यापारी. याचा नोकर कालकल्प. याला बैलानें ठार केलें असतां मरतांना त्याच्या अंगावर धर्मस्व नांवाच्या एका ब्राह्मणानें गंगोदक शिंपडिल्यामुळें हा विष्णुलोकीं गेला ( पद्म. क्रि. ७ ).

**रत्नांगद**—( वज्रांगद पहा ).

**रत्नावलि**—हिनें रत्नेश्वरापुढें नृत्य केल्यानें पाताळांतील रत्नचूडाशीं हिचें लग्न झालें ( स्कंद. ४. २. ६७ ).

**रथकृत**—धातृ नामक आदित्याबरोबर चैत्र महिन्यांत फिरणारा यक्ष ( भा. १२. ११. ३३ ).

**रथध्वज**—कुशध्वज राजाचा पिता ( वेदवती पहा ).

**रथध्वान**—( ७ वीर पहा ).

**रथन्तरी**—इलिलाची स्त्री. हिला दुष्यन्तादि पांच पुत्र होते ( म. आ. ६३. २९ कुं. ). त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत. दुष्यन्त, शूर, भीम, प्रवसु व वसु ( म. आ. ८८. १६ कुं. ).

**रथप्रभु**—( ७ वीर पहा ).

**रथप्रोत दार्भ्य**—राजा या अर्थानें व गुरु या नात्यानें याचा उल्लेख आला आहे (मै. सं. २.१.३).

**रथराजी**—वसुदेवाच्या स्त्रियांतील एक.

**रथवर**—( सो. क्रोष्टु. ) हा वायुमतें भीमरथपुत्र होय.

**रथवाहन**—विराटाचा भाऊ ( म. द्रो. १५९. ४१कुं.).

**रथवीति दार्भ्य**—ह्यानें आपली मुलगी तरंताच्या सांगण्यावरून श्यावाश्वाला दिली होती. श्यावाश्व हा अर्चनानस्

आत्रेयाचा पुत्र. अर्चनानसानें आपल्या यज्ञांत हौत्र करण्याकरितां रथवीति दार्भ्याला बोलाविलें. तेव्हां याच्या शेजारीं बसलेल्या याच्या मुलीस अर्चनानसानें श्यावाश्वाकरितां मागणी घातली. पण तिचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां यानें श्यावाश्वाला यज्ञांतून घालवून दिलें. पण पुढें अनेक प्रयत्नांनीं रथवीतीला आपली मुलगी देणें भाग पडलें. हा हिमालयाच्या टेंकड्यांत राही व अनेकांना आश्रय देत असे ( ऋ. ५. ६१ सायणभाष्य ).

**रथसेन**—पांडवांकडील एक क्षत्रिय (म.द्रो.२३.६२कुं.). याचे घोडे कृष्णछटा, पांढरे ठिपके व तांबडे पट्टे असलेले होते ( म. द्रो. २३ ).

**रथस्वन**—मित्र नामक सूर्याबरोबर ज्येष्ठ महिन्यांत फिरणारा यक्ष ( भा. १२. ११. ३५ ).

**रथाग्रणी**—रामाच्या अश्वमेधीय अश्वाचें संरक्षण करण्याकरितां शत्रुघ्नाबरोबर गेलेला एक वीर (पद्म. पा. ११).

**रथीतर**—( सू. इ. ) नभगकुलोत्पन्न पृषदश्वाचा पुत्र. याला संतति नसल्यामुळें यानें अंगिरसकडून आपल्या स्त्रीचे ठिकाणीं संतति उत्पन्न करविली. यामुळें येथून पुढील संतति ब्रह्मक्षत्रमिश्रित झाली. त्यांना आंगिरस म्हणत ( भा. ९. ६. ३ ). म्हणून हे क्षत्रिय असून ब्राह्मण झाले असें म्हणतात ( वायु. २. २९. ११४ ). हा अंगिरस्कुलांतील गोत्रकार व प्रवर आहे.

२ एक आचार्य ( बौ. श्रौ. २२. ११; बृहद्दे. १. २६; ३. ४० ).

३ व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील विष्णुमतें स्वमतीचा शिष्य. वायु व ब्रह्मांड यांच्या मतें सत्यश्रीचा शिष्य. विष्णुमतें शाकपूर्णि, वायुमतें शाकपूर्ण व ब्रह्मांडमतें शाकवैण अशीं विशेषणात्मक नांवें यास दिलीं आहेत.

**रथोर्मि**—प्रतर्दन देवांतील एक.

**रंति**—( रंतिभार पहा. ).

**रंतिनार**—( रंतिभार पहा ).

**रंतिदेव**—( सो. पूरु.) मत्स्य, भागवत व विष्णु यांच्या मतें संकृतिपुत्र. वायूंत त्रिदेव असें नांव आहे. हा रंतिभाराच्या बराच पुढला असून औदार्याचीं सुप्रसिद्ध कथानकें याचीं आहेत. याच्या आईचें नांव मत्स्याप्रमाणें सत्कृति असावें.

यानें अतिथींची व्यवस्था ठेवण्याकरितां दोन लक्ष आचारी नेमिले होते. स्वर्गप्राप्तीच्या इच्छेनें पशु आपणहून याच्या यज्ञाकरितां याच्याकडे येत असत. एकदां गाईंनीं असा यज्ञ करण्यास याला भाग पाडलें. पण यानें एका गाईच्या नाखुषीनरून गाईंची हत्या बंद केली. या यज्ञांतील कातड्यांमधून निघालेल्या प्रवाहास चर्मण्वती नदी म्हणतात ( म. अनु. १२३ कुं. ). याचा दानधर्म अविश्रान्त चाललेला. ... यानें आपली सर्व संपत्ति ब्राह्मणादिकांस देऊन टाकिली ( म. ... ६७; शां. २८. १२०-१२८ कुं.). अतिथीला विन्मुख करावयाचें नाहीं, या याच्या वृत्तीमुळें याच्या कुटुंबाचे सुद्धां फार हाल होत. एकदां तर अठ्ठेचाळीस दिवस सर्वांना उपवास घडला. तरीहि यानें पुढें आलेलें अन्नपाणी शूद्रचांडालादिक अतिथींना देऊन टाकलें ( भा. ९. २१ ). हस्तिन् व हा चुलतेपुतणे होते. हा अत्यंत थोर राजा असून चर्मण्वतीच्या (चंबळेच्या) काठीं दशपुर (मेघदूत १.४९) ही याची राजधानी होती. याचे वंशज आंगिरस झाले होते ( वायु. २. ३७ १६० ). यानें वसिष्ठास यथाविधि अर्घ्य दिला (म.शां.२... १७; अनु. २००. ६ कुं. ).

**रंतिभार**—( सो. पूरु.) भागवत व विष्णु यांच्या मतें हा ऋतेयूचा पुत्र असून रंतिभार व रंतिनार अशीं अनुक्रमें नांवें आहेत. मत्स्यांत औचेयुपुत्र अन्तिनार व वायूंत रजेयुपुत्र रंति असें म्हटलें आहे.

**रभस**—रामसेनेंतील एक वानर (वा. रा. यु. ४ ३६ ).

२ रावणपक्षीय एक राक्षस ( वा. रा. यु. ९. १ ).

३ ( सो. पुरूरवस् ) आयुपुत्र रंभाचा पुत्र.

**रमण**—धर नांवाच्या वसूच्या पुत्रांतील एक.

**रमणक**—प्रियव्रतपुत्र यज्ञबाहूच्या सात पुत्रांतील तिसरा. याच्या वर्षास याचेंच नांव आहे (भा. ५. २०. ...).

२ प्रियव्रतपुत्र वीतिहोत्राच्या दोन पुत्रांतील ज्येष्ठ ( भा. ५. २०. ३१ ).

**रंभ**—( रंभकरंभ पहा ).

२ ( सू. दिष्ट.) भागवतमतें त्रिनेत्र राजाचा पुत्र. याचा पुत्र खनित्र.

३ रामसेनेंतील एक वानर ( वा. रा. यु. ...६ )

४ (सो. पुरूरवस्.) भागवत व विष्णु यांच्या मतें पुरूरव्याचा पौत्र व आयूच्या पुत्रांतील चौथा.

**रंभकरंभ**—हे दोघे दनुपुत्र होत. हे दोघे तप करीत असतां इंद्रानें करंभाला मगराच्या रूपानें पाण्यांत ठार केलें. तेव्हां रंभ आत्महत्या करूं लागला. तेव्हां अग्नीनें याचें निवारण करून 'त्रैलोक्यविजयी पुत्र होईल' असा वर दिला तोच महिषासुर होय. रंभाला एका महिषानें मारिलें ( दे. भा. ५. २; शिव. उ. ४६ ).

**रंभा**—कश्यप व प्राधा यांची कन्या. हिला इंद्रानें विश्वामित्राचे तपाचा भंग करण्यास पाठविलें. पण तें विश्वामित्रानें ओळखून हिला हजारों वर्षे पाषाण होशील, असा शाप दिला ( म. अनु ६. ११ कुं. ) व तुझा उद्धार ब्राह्मण करील असा उःशाप दिला ( वा. रा. बा. ६४ ).

हा कार्तिक महिन्यांत गणद्वयोबरोबर फिरावयास असते ( भा. १२. ११ ). श्वेत मुनींचें व एका राक्षसीचें युद्ध झालें. त्या वेळीं श्वेत मुनीच्या वाग्बाणानें हिची शिळा व ती राक्षसी या दोघी कपितीर्थांत उडाल्या. त्यामुळें या दोघींचा उद्धार झाला. ती राक्षसी एक वारांगना होती ( स्कंद. ३. १. ३९).

ही तुंबरूची स्त्री होती असें वाटत असलें ( म. उ. ११. ९ कुं. ) तरी तिच्याशीं संबंध ठेविल्यानें शाप मिळून हा विराध राक्षस झाला, या कथेवरून हा तिचा पति नसावा ( वा. रा. अर. ४. १९ ).

**रम्यक**—( स्वा. प्रिय. ) हा भागवतमतें अग्नीध्रपुत्र होय. याची पत्नी रम्या. याच्या आईचें नांव पूर्वचित्ति. हा रम्यकवर्षाचा अधिपति होता.

**रम्या**—मेरूच्या नऊ कन्यांतील पांचवी. ही रम्यकाची स्त्री होय ( भा. ५. २. ६३ )

**रय**—( सो. पुरूरवस. ) हा भागवतमतें पुरूरवापुत्र होय.

२ स्वारोचिष मन्वंतरांतील वसिष्ठाचा पुत्र, एक प्रजापति.

**रवि**—जयद्रथाचा भाऊ ( म. व. २६६. ११ कुं. ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. हा भीमानें ठार केला ( म श. २५. ५ कुं. ).

**रशादु**—(सो. क्रोष्टु. ) विष्णु व वायु यांच्या मतें स्वाहिपुत्र, भागवतमतें श्वाहिपुत्र व मत्स्यमतें स्वाहपुत्र. भागवतांत रुशेकु आणि विष्णु व मत्स्य यांत रुषद्गु असें याला नांव आहे.

**रश्मि**—सुतप देवांपैकीं एक.

**रश्मिकेतु**—रावणपक्षीय एक राक्षस ( वा. रा. सुं. ६; यु. ९ ). हा रामाच्या हातून मेला ( वा. रा. यु. ४७ ).

**रस**—तुषित देवांपैकीं एक.

**रसप्रीति**—( हरप्रीति पहा ).

**रसपासर**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें कुथुमीचा पुत्र व शिष्य. याबद्दल ब्रह्मांडांत पराशर असा पाठभेद आहे.

**रसमंथरा, रसवल्लरी, रसालया**—कृष्णाच्या प्राणसख्या ( पद्म. पा. ७४ ).

**रसिप**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**रहस्युदेव मलिम्लुच**—यानें मुनिमरण नांवाच्या स्थलीं वैखानसांना मारिलें ( पं. ब्रा. १४. ४. ७ ).

**रहूगण**—हें गोतमाचें कुलनाम आहे. एके ठिकाणीं सूक्तद्रष्टा गोतम ' आम्ही रहूगण अग्नीसाठीं मधुर स्तोत्रें करीत आहों,' असा उल्लेख करितो ( ऋ. १. ७८. ५; ३ गोतम पहा). विदेघ देशच्या माथव राजाचा गोतम राहूगण हा उपाध्याय होता ( श. ब्रा. १. ४. १०-१९ ). रहूगण आंगिरसाचीं दोन सूक्तें आहेत ( ऋ. ९. ३७-३८ ). हा शब्द ऋग्वेदांत रहूगण असा आला असून शतपथादि ग्रंथांत राहूगण असें पैतृक नांव आलें आहे.

**राका**—ही भागवतमतें श्रद्धेचे ठिकाणीं झालेली अंगिरस्‌कन्या होय ( मार्क. ४९. ४४ ).

२ खर व शूर्पणखा यांची आई.

३ द्वादशादित्यांतील धाता आदित्याची स्त्री.

४ सुमाली राक्षसास केतुमतीपासून झालेली कन्या. ही विश्रवा ऋषीस दिली होती.

**रागकर्णि**—( राहुकर्णि पहा ).

**रागा**—बृहस्पतीपासून शुभेस झालेल्या सात कन्यांतील एक.

**राजक**—( प्रद्योत. भविष्य.) भागवतमतें विशाखयूपाचा पुत्र. याचा पुत्र नंदिवर्धन. यास वायु व ब्रह्मांड यांच्या मतें अजक, विष्णुमतें जनक व मत्स्यमतें सूर्यक अशीं नांवें आहेत. यानें वायुमतें ३१ वर्षें, मत्स्य व ब्रह्म यांच्या मतें २१ वर्षें राज्य केलें.

**राजकेशिन्**—अंगिराकुलोत्पन्न ऋषि.

**राजधर्मन्**—नाडीजंघाचें नांव ( ५ गौतम पहा ).

**राजन्**—सूर्याच्या दोन द्वारपालांतील एक ( भवि. ब्राह्म. ७६ ).

**राजनि**—हें उग्रदेवाचें पैतृक नांव आहे.

**राजवर्तप**—कश्यपकुलांतील गोत्रकार. राजवल्लभ असा कांहीं ठिकाणीं पाठभेद आढळतो.

**राजवल्लभ**—( राजवर्तप पहा ).

**राजस्तम्बायन**—यज्ञवचस्‌चें हें पैतृक नांव आहे.

**राजस्रवस् वेन**—एक व्यास.

**राजाज**—शंभूचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ५. ४० ).

**राजाधिदेव**—( सो. विदू. ) हा मत्स्यमतें व पद्ममतें विदूरथाचा पुत्र. याचा पुत्र शोणाश्व ( पद्म. सृ. १३ ). वायूंत राज्याधिदेव असा पाठभेद आहे.

**राजाधिदेवी**—सोमवंशीय शूर राजास मारिषेपासून झालेल्या पांच कन्यांतील कनिष्ठ. ही अवंत्य राजा जयसेन यास दिली होती ( भा. ९. २४. ३१; १०. ५८. ३१ ).

**राजिक**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य.

**राज्ञ**—सूर्याचा द्वारपाल ( भवि. ब्राह्म. १२४ ).

**राज्ञी**—रैवत मनूची कन्या व विवस्वान् आदित्याच्या तीन स्त्रियांतील दुसरी. हिला रेवत नांवाचा पुत्र होता (पद्म.सृ. ८).

**राज्यवर्धन**—( सू. दिष्ट. ) हा दमाचा पुत्र. याची स्त्री विदूरथकन्या मानिनी. 'आपणांस आतां लवकरच मृत्यु

येणार' इत्यादि यानें लोकांस सांगून तप करण्याकरितां वनांत जाण्याचा बेत ठरविला. तेव्हां अमात्यादिकांसह प्रजेनें सूर्याराधनेनें त्यापासून ' दहा हजार वर्षें रोगरहित, जितशत्रु, कोशपूर्ण व स्थिरयौवन असा आमचा राजा राहो, ' हा वर मिळविला. पण आपण इतके दिवस जगल्यास आपणांस पुत्रपौत्रादिकांचे व प्रजेचे मृत्यु पहावे लागतील "आणि प्रजेनें केलेल्या उपकाराबद्दल तिचें उतराई व्हावें लागेल या उद्देशानें यानें तप केलें व प्रजा, पुत्रपौत्र व भृत्य इत्यादिकांस दहा हजार वर्षें आयुष्य मिळविलें ( मार्क. १०६-१०७ ).

**राज्याधिदेव**—( राजाधिदेव पहा ).

**राड**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें कृतीचा शिष्य.

**राडवीय**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें हिरण्यनाभाचा शिष्य.

**राणायनि**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील लोकाक्षीचा शिष्य. सामवेदी लोकांच्या तर्पणांतहि याचा समावेश आहे (जै. गृ. १. १४; गोभिल व द्राह्यायण पहा ).

**राणायनीपुत्र**—एक आचार्य ( ला. श्रौ. ६. ९. १६ ).

**रातहव्य आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ६५-६६ ).

**रात्रि भारद्वाजी**—सूक्तद्रष्ट्री ( ऋ. १०. १२७ ).

**राथीतर**—सत्यवचस्‌चें हें कुलनाम आहे ( तै. उ. १. ९. १ ). याच्या मताचा कांहीं ठिकाणीं उल्लेख आढळतो. ( बौ. श्रौ. ७. ४ ).

**राथीतरीपुत्र**—हा भालुकीपुत्राचा व ( बृ. उ. ६. ५. १. ) कौश्रिकीपुत्राचा व ( श. ब्रा. १४. ९. ४. ३२ ) याचा शाण्डिलीपुत्र शिष्य होता.

**राध गौतम**—याचा पिता गातु. हा गौतमाचा शिष्य ( वं. ब्रा. २ ).

**राधा**—कृष्णावतार घेण्याचे वेळीं विष्णूनें देवांस पृथ्वीवर जाण्याची आज्ञा केली. पुढें राधेला विष्णूनें आपला मृत्युलोकीं जाण्याचा उद्देश कळविला. तेव्हां हिनेंहि पृथ्वीवर येण्याचें कबूल केलें. भाद्रपद शुद्ध अष्टमीस रविवारीं पहांटेस ज्येष्ठा नक्षत्राच्या चतुर्थ चरणावर राधा पृथ्वीवर आली ( आदि. ११ ). वृषभानु राजा यज्ञास्तव पृथ्वी शुद्ध करीत असतां राधा त्यास सांपडली. ही त्यानें जणूं काय आपली कन्याच असें समजून रक्षिली ( पद्म. ब्र. ७ ).

ही मृत्युलोकीं दुसऱ्याच कारणानें आली, असें इतर पुराणांत म्हटलें आहे. तें कारण असें: एकदां विरजा नामक गोपीस विष्णूनें रासमंडलीं नेलें होतें. तें ऐकतांच राधा क्रोधानें तेथें गेली, पण तीं दोघें गुप्तच झालीं. पुढें एकदां सुदाम्यासह कृष्ण हिच्या दृष्टीस पडतांच हिनें कृष्णाची निंदा केली. त्या निंदेनें चिडून सुदाम्यानें राधेची निंदा केली. तेव्हां राधेनें त्यास उलट शाप दिला कीं, ' तूं दानवी योनीप्रत जा ' ( दे. भा. ९. १९ ). पुढें राधेला सुदाम्यानें ऊर्फ श्रीदाम्यानें शाप दिला कीं, ' तूं मानवयोनींत जन्म घे ' ( नारद. २. ८१; ब्रह्मवै. २. ४९ ). नंतर सुदाम्यानें हिची क्षमा मागितल्यावरून कृष्णानें उःशाप देऊन एक मन्वंतर म्हणजे गोलोकांत अर्धा क्षण ( दे. भा. ९. १९ ) किंवा १०० वर्षें ( नारद. २. ८१ ) पर्यंतच सुदामा पृथ्वीवर राहील असें सांगितलें आहे. राधेनें शाप दिल्यामुळें कृष्ण शंखचूड झाला ( ब्रह्मवै. २. ४९ ). ही वैश्य वृषभानु यास कलावती नामक भार्येपासून झाली ( ब्रह्मवै. २. ४९; नारद. २. ८१ ). कृष्णाची राधा अत्यंत आवडती असून ही त्याच्या वामांगापासून उत्पन्न झाली ( ब्रह्मवै. २.१२ ). लक्ष्मीचीं दोन स्वरूपें एक राधा व दुसरी लक्ष्मी. कृष्णाचीं दोन रूपें एक द्विभुज व दुसरें चतुर्भुज. द्विभुज कृष्ण गोलोकांत आहे. तेथें राधा पत्नी आहे म्हणून राधा ही कृष्णाची पत्नी असें म्हणतात. वैकुंठांत कृष्ण चतुर्भुज व तेथें पत्नी लक्ष्मी आहे ( ब्रह्मवै. २.३५; दे. भा. ९.१; आदि. ११ ). वैशाख शुद्ध तृतीयेस रोहिणी नक्षत्रावर हिचें लग्न झालें (आदि. ११). रायाण हिचा पति होय (ब्रह्मवै.४.३). रामानें सगुणा दासीला राधा होण्याचा वर दिला होता ( आ. रा. उ. ९ ).

राधा ही सृष्टयुपकारक पांच विष्णुशक्तींतील एक आहे ( दे. भा. ९.१; नारद. २.८१ ). ही संपत्तीची अधिदेवता असून हिला कांता, अतिदांता, शांता, सुशीला, सर्वमंगला अशीं अनेक नांवें असून ही वैकुंठीं पतिसेवा करण्यांत दक्ष आहे ( दे. भा. ९.१८ ). कण्वशाखेंत राधेचें आख्यान आहे ( ब्रह्मवै. २. ४८ ). राधाकृष्ण परस्परांची आराधना करीत असतात.

राशब्दोच्चारणाद्भक्तो राति मुक्तिं सुदुर्लभाम् ।
धाशब्दोच्चारणाद् दुर्गे धावत्येव हरेः पदम् ॥
रा इत्यादानवचनो धा च निर्वाणवाचकः ।
ततोऽवाप्नोति मुक्तिं च येन राधा प्रकीर्तिता॥(ब्रह्मवै. २.४८).

राधाकृष्ण असें न उच्चारितां उलट उच्चारिल्यास नरकप्राप्ति होते ( ब्रह्मवै. २. ४९ ).

२ ( सो. अनु. ) अधिरथ सूताची स्त्री. हिला कुंतीनें नदींत सोडलेला पुत्र कर्ण मिळाला होता. त्याचें नांव हिनें वसुषेण ठेविलें. कर्ण हिला सांपडल्यानंतर मग औरस मुलें झालीं ( म. आ. ६७; व. ३०९ ). हिला राधिका असें नामांतर आढळतें.

**राधिक**—( सा. कुरु. ) हा भागवतमतें जयसेनपुत्र होय. यास विष्णुमतें आरावी, वायुमतें आरावि व मत्स्यमतें रुचिर असें म्हटलें आहे.

**राधेय**—हें एका आचार्याचें मातृक नांव आहे ( सां. आ. ७. ६ ).

२ ( १ कर्ण पहा ).

३ राधेचे चार औरस मुलगे. एक अभिमन्यूनें (म. द्रो. १४ ४ कुं. ) व तीन अर्जुनानें ठार केले (म. द्रो. ३२.६३ कुं.).

**रापाण**—हा गोकुळांतील गवळी असून त्याची पत्नी राधा होय. याला रायाण असेंहि म्हणत ( ब्रह्मवै. ४. ३ ).

**राम**—हें एका राजाचें नांव आहे ( ऋ. १०. ९३. १४ ). हें मायवाचें पैतृक नांव आहे की काय, हें सांगतां येणार नाहीं ( ऋ. १०. ९३. १५ ). सूक्तद्रष्ट्या तान्वानें आपणांस मिळालेल्या दानाचें वर्णन पृथवान्, दुःशीम, वेन व राम यांच्यापुढें केलें आहे ( ऋ. १०. ९३. १४ ).

२ अनुक्रमणीप्रमाणें जामदग्न्य रामाच्या नांवावर ऋग्वेदांत एक सूक्त आहे ( ऋ. १०. ११० ).

३ ( सू. इ. ) दशरथास कौसल्येपासून झालेला ज्येष्ठ पुत्र. हा विष्णूचा अवतार होता.

हा वैवस्वत मन्वंतरांतील चोविसाव्या त्रेतायुगांत झाला (ह. वं. १. ४१; वायु. २. ९. ४८; ब्रह्मांड. ३. ८. ५४; ब्रह्म. २१३. १२८; मत्स्य. ४७. २४५ ). अठ्ठाविसाव्या त्रेतायुगांत झाला ( म. स. ५०. १ कुं. ). केवळ त्रेतायुगांत झाल्याचा निर्देश आहे ( भा. ९. १०. ५२; पद्म. पा. ३६ ). हा महाभारताप्रमाणें मार्कंडेयपुरःसर व हरिवंशाप्रमाणें विश्वामित्रपुरःसर होता. रामलक्ष्मण हे नरनारायणाचे अवतार होते ( दे. भा. ४. १६; मत्स्य. ४७ ). दशरथानें पुत्रकामेष्टि केल्यानें यज्ञपुरुषाकडून मिळालेला पायस किंवा चरु भक्षण केल्यानें दशरथास चार मुलें झालीं. त्यांतील हा ज्येष्ठ होय. यज्ञसमाप्तीनंतर वर्षानें चैत्र शुद्ध नवमीचे दिवशीं दुपारीं बारा वाजतां पांच ग्रह उच्च असतां याचा जन्म झाला. नक्षत्र पुनर्वसु, लग्न कर्क व लग्नीं गुरुचंद्रयोग होता ( वा. रा. बा. १८. ८–९ ).

याचें नामकरण व व्रतबंध झाल्यावर वसिष्ठाकडून शास्त्रें व शस्त्रें यांचें शिक्षण याला मिळालें (पद्म. पा. ११६; वा. रा. बा १८. ३६-३७ ). याला यजुर्वेद येत होता ( वा. रा. सुं. ३५. १४ ). नंतर विश्वामित्रानें आपल्या यज्ञाच्या संरक्षणार्थ याला पाठविण्याविषयीं दशरथाजवळ मागणी केली. परंतु पंधरा-सोळा वर्षांच्या मुलाला पाठविण्यास दशरथ तयार नव्हता. पण वसिष्ठाच्या सांगण्यावरून दशरथानें रामलक्ष्मणांना निरोप दिला. त्यांना विश्वामित्राकडून अनेक विद्या, अस्त्रें व कथा यांचा लाभ रामलक्ष्मणांना झाला. वाटेंत रामानें मद व करूपक देश उजाड करणाऱ्या ताटकेचा वध केला व यज्ञाचें संरक्षण केलें. पुढें सुबाहूला ठार करून मारीचाला उडवून लाविलें. नंतर यज्ञाच्या निमित्तानें सर्व ऋषींबरोबर रामलक्ष्मण जनकाकडे निघाले. वाटेंत कान्यकुब्ज देश, शोणनद, भागीरथी या स्थलांवरून विशाला नगरीस आले. तेथें दिष्टवंशांतील सुमतीची भेट झाली. तेथून पुढें जात असतां एका अरण्यांत गौतमपत्नी अहल्येचा याच्या चरणधूलीनें उद्धार झाला. पुढें ईशान्येकडे वळून हे मिथिलेस येऊन पोहोंचले ( वा. रा. बा. २७-४९ ). अहल्योद्धाराची कथा भागीरथी उतरण्याच्या पूर्वी दिलेली आढळते (अध्या. रा. बा. ६). मिथिलेस आल्यानंतर जनकाच्या पणाप्रमाणें पूर्वी कोणालाहि चढवितां न आलेलें धनुष्य यानें हजारों राजांच्या सभेंत दोरी चढवितांना मध्येंच मोडलें. तेव्हां सीतेनें याला माळ घातली. पुढें जनकानें दशरथाला बोलावून रामाला सीता, लक्ष्मणाला उर्मिला व भरतशत्रुघ्नांस मांडवी व श्रुतकीर्ति दिल्या. अयोध्येस परत येतांना वाटेंत परशुराम आडवा आला. रामानें धनुर्भंग केल्यानें तो संतापून गेला होता. पण रामापुढें त्याचें कांहीं चालेना. रामबाण निष्फळ होत नसल्यानें यानें त्याचा परलोक बंद केला व हा अयोध्येस परत आला ( वा. रा. बा. ७६-७७ ). पुढें दशरथ वृद्ध झाल्यानें याला यौवराज्याभिषेक करण्याचें त्यानें मनांत आणिलें. पण कैकेयीच्या लग्नाच्या वेळीं कैकेयीच्या मुलाला राज्य देण्याचा केलेला करार आडवा येण्यासारखा होता. म्हणून दशरथानें भरत मामाकडे गेला असतां चैत्रांत पुष्यनक्षत्रावर एकाएकीं रामाला यौवराज्याभिषेक करण्याचें ठरविलें ( वा. रा. अयो. ३. ४ ). पण त्यांतहि कैकेयी-कडून विघ्न येऊन पित्याचा शब्द खरा करण्याकरितां याला चवदा वर्षें वनवासाला जावें लागलें. नागरिकांच्या जमावांत राम पायींच संध्याकाळीं तमसेवर आला. तेथें संध्या करून रात्रीं निद्रा घेतली व पहाटेसच लोकांना चुकवून वेदश्रुति, स्यंदिका, गोमती वगैरे नद्या ओलांडीत रथानें राम दक्षिणेकडे चालला ( वा. रा. अयो. ४९ ). कोसल देशाच्या सीमेवर जातांच यानें अयोध्येस व तेथील देवतांस नमन केलें. शृंगवेर-पुरांतून भागीरथी उतरवून गुहानें याला दक्षिणेकडे पोंचविलें. रामानें लक्ष्मणाला पुनः एकदां सांगून पाहिलें, पण त्याचा रामाबरोबर येण्याचा निश्चय अढळ होता (वा. रा. अयो. ५३). नंतर राम प्रयागांत येऊन भरद्वाजाला भेटला. तेथून पुढें चित्रकूटावर पर्णकुटिका बांधून राहिला. तेथें याला भरत भेटला व दशरथाच्या मृत्यूची वार्ता समजली. पण हा आपल्या निश्चयापासून ढळला नाहीं. पुढें लोकांचा संपर्क होऊं लागल्यामुळें तीहि जागा हा सोडून दक्षिणेस निघाला.

प्रथम अत्रि व अनसूया यांचें दर्शन घेऊन अनेक आश्रम यानें पाहिले. पुढें निबिड अरण्य लागलें. तेथें विराधाला ठार केलें. शरभंगाच्या आश्रमांतून सुतीक्ष्णाच्या आश्रमाकडे जात असतां यास राक्षसांनीं मारिलेल्या तापसांच्या हाडांचे ढीग दाखविण्यांत आले. तेव्हां यानें 'राक्षसांचा नाश करीन' असें आश्वासन दिलें (वा. रा. अर. ७). असा हिंडत दहा वर्षांनीं हा पुनः सुतीक्ष्णाच्या आश्रमांत अगस्त्यलोपामुद्रा यांचें दर्शन घेऊन पंचवटीकडे निघाला. वाटेंत याची व जटायूची भेट झाली (वा. रा. अर. ११-१४).

पंचवटीमध्यें हा राहिल्यावर शूर्पणखेचें लक्ष्मणानें नाककान कापिलें. तिच्याकरितां चाल करून आलेल्या खरादिकांना यानें ठार केलें. इकडे शूर्पणखेनें व अकंपनानें रावणास सर्व सांगितल्यावर रावणानें मारीचाच्या साहाय्यानें सीता पळविली. जटायु आडवा आला, त्यास रावणानें मृतप्राय करून टाकिलें. पुढें रामलक्ष्मण सीताशोधार्थ निघाले. तेव्हां जटायूनें सीता रावणानें पळविल्याचें सांगितलें व प्राण सोडिला. यानें जटायूचा दहनसंस्कार केला. नंतर अगस्त्याश्रमांत जाऊन मतंगाश्रमाकडे वळला. वाटेंत अयोमुखीचे नाककान कापिले. कबंधाला ठार केलें. मतंगाश्रमांत शबरीच्या आतिथ्याचा स्वीकार केला. पुढें सप्तसागरतीर्थावर जाऊन पंपासरोवराकडे प्रयाण केलें. पंपेवरून ऋष्यमूकापाशीं आला. तेव्हां सुग्रीवानें शंकित मनानें मारुतीला याच्याकडे पाठविलें. मारुतीनें मोठ्या कौशल्यानें बोलून रामलक्ष्मणांना खांद्यावर घेऊन सुग्रीवाकडे आणिलें. दोघांचीं संभाषणें होऊन रामसुग्रीवांचें अग्निसाक्षिक सख्य झालें व रामानें वालीच्या वधाची प्रतिज्ञा केली. पुढें वालिसुग्रीव लढत असतां यानें वालीस बाणानें ठार केलें व सुग्रीवास किष्किंधेंत राज्याभिषेक केला. नंतर पावसाळा म्हणजे श्रावण ते कार्तिक संपेपर्यंत यानें प्रवर्षण पर्वतावर वसती केली (वा. रा. किं. २६. १४-१७). पावसाळा संपला तरी सुग्रीव परत येईना, म्हणून यानें लक्ष्मणाला पाठविलें. लक्ष्मण आल्यानंतर सुग्रीवानेंहि सीतेच्या शोधार्थ अनंग, नील, सुहोत्र, शरारि, शरगुल्म, गज, गवाक्ष, गवय, वृषभ, सुषेण, मैंद, द्विविद, गंधमादन, उल्कामुख, जांबवत् आणि हनुमत् इत्यादि वानर अंगदाबरोबर देऊन त्यास दक्षिणेकडे पाठविलें (वा. रा. किं. ४१). हे सर्व समुद्रकांठीं गेल्यावर मारुतीनें समुद्रोल्लंघन करून सीतेकडील सर्व वृत्त रामास कळविलें.

सीतेचा शोध लाविल्याबद्दल मारुतीचा गौरव केला व त्याच्याकडून लंकेचें वर्णन समजावून घेतलें. नंतर नीलास सेनापति करून सुमुहूर्तावर लंकेकडे प्रयाण करून हा समुद्रतीरीं येऊन पोहोंचला (वा. रा. यु. १-५).

लंकेंत मारुति सीतेला भेटून गेल्यावर रावणाच्या मंत्रिमंडळांत बरीच गडबड उडाली. बिभीषणानें 'सीता परत करावी' असा रावणाच्या विरुद्ध सल्ला दिल्यानंतर रावणानें बिभीषणाचा अत्यंत धिःकार केला. त्याबरोबर आपल्या अनल, पनस, संपाति आणि प्रमति या चार प्रधानांसह बिभीषण याला शरण आला. वालिवधामुळें बिभीषणाची खात्री झाली होती कीं, राम रावणापेक्षां श्रेष्ठ आहे. रामानेंहि मारुति, सुग्रीवादिकांच्या विचारें बिभीषणास अभय दिलें व रावणास मारून लंकेचा राजा करण्याचेंहि आश्वासन दिलें. त्यानेंहि रावणवधास साहाय्य करण्याविषयीं रामास आश्वासन दिलें (वा. रा. यु. १७-१९). यानंतर सुग्रीवास फोडण्याचा रावणाच्या शुक नांवाच्या हेरानें प्रयत्न केला, पण त्यास सुग्रीवानें दाद दिली नाहीं (वा. रा. यु. २०).

पुढें रामानें समुद्र तरून जाण्याकरितां नीलास सेतु बांधावयास सांगितला. त्यावरून नीलानें चवदा, वीस, एकवीस, बावीस, तेवीस अशा क्रमानें पांच दिवसांत शंभर योजनें सेतु बांधिला. व राम सेनेसहित लंकेंत जाऊन सुवेलाचलासमीप याच्या सेनेचा तळ पडला (वा. रा. यु. २१-२४; म. व. २८३-२८४).

या संधीस शुक, सारण, शार्दूल इत्यादि राक्षस रामसैन्यांत वानरवेषानें मिसळले व रामसैन्याची गणना करूं लागले. तेव्हां बिभीषणानें त्यांना पकडिलें. पण शरण आल्यामुळे त्यांना सोडण्यांत आलें. तेव्हां ते लंकेंत परत गेले (वा. रा. यु. २५-२९). नंतर रामानें सैन्यरचना करून सुवेलपर्वतावरून लंकेची पहाणी केली (वा. रा. यु. ३७-३१). त्याच वेळा रावणहि गोपुरावर चढून पहाणी करीत होता. त्यास [illegible] करून सुग्रीवानें त्याशीं दोन हात केले (वा. रा. यु. ४०).

सर्व सज्जता झाल्यावर रामानें रीतीप्रमाणें रावणाकडे अंगदाला साम करण्याकरितां पाठविलें. त्यानें रावणास पुष्कळ सांगून पाहिलें; पण कांहींहि उपयोग न होतां उलट रावणानें त्याला पकडण्याची राक्षसांना आज्ञा केली. पण त्यानें उड्डाण करितांच राक्षस खालीं पडून मेले. शेवटीं हा रावणाच्या प्रासादाचें शिखर पाडून रामाकडे आला. रामानें साम होत नाहीं असें पाहून युद्धास आरंभ केला (वा. रा. यु. ४१-४२; म. व. २८५). युद्धारंभीं अंगदानें इंद्रजिताशीं युद्ध सुरू केलें. प्रजंघानें संपातीला ठार केलें; मारुतीनें जंबुमाली, नलानें प्रतपन, सुग्रीवानें प्रघस, लक्ष्मणानें विरूपाक्ष, रामानें अग्निकेतु, रश्मिकेतु, मित्रघ्न व यज्ञकोप, मैंदानें वज्रमुष्टि, नीलानें निकुंभ, द्विविदानें अशनिप्रभ, सुषेणानें विद्युन्मालिन् व गजवरानें तपन यांस ठार केलें (वा. रा. यु. ४३). सायंकाळीं युद्ध संपलें; पण राक्षसांनीं पुनः युद्ध सुरू केलें. त्यांत यज्ञशत्रु, महापार्श्व, महोदार, वज्रदंष्ट्र, शुक व सारण

याचा त्यानें पराभव केला. इंद्रजिताचा अंगदानें पराभव केल्यानें त्यानें गुप्त होऊन रामलक्ष्मणांना नागपाशानें बांधिलें व सुषेण, नील आदिकरून वानरांना मूर्च्छित करून रावणापुढें आपली बढाई सांगितली ( वा. रा. यु. ४४-५५ ). परंतु रामलक्ष्मणांना गरुडानें नागपाशांतून सोडविलें ( वा. रा. यु. ४६-४५ ).

दुसरे दिवशीं धूम्राक्षाला मारुतीनें मारिलें ( ५१-५२ ). तिसरे दिवशीं अंगदानें वज्रदंष्ट्रादिकांस ठार केलें ( ५३-५४). चवथे दिवशीं अकंपनादिकांस मारुतीनें यमसदनास पाठविलें ( ५५-५६ ). पांचवे दिवशीं रावणाचा मुख्य प्रधान प्रहस्त नीलानें मारिला ( ५७-५८ ). सहावे दिवशीं स्वतः रावण अतिकायादि राक्षसांसह युद्धास आला. बिभीषणानें रामाला सर्वांची माहिती करून दिली. सुग्रीव, गवाक्षादिकांनीं रावणावर हल्ला चढविला. मारुति व नील यांशीं रावणाचें मुष्टियुद्ध झालें. लक्ष्मणानें रामाच्या अनुज्ञेनें रावणावर जोराचा हल्ला चढविला. पण रावणानें निरुपायानें त्यावर ब्रह्मदत्त शक्ति टाकिली. त्यामुळें लक्ष्मण मूर्च्छित पडला. त्यास रावण उचलून नेण्याचा प्रयत्न करीत असतां मारुतीनें रावणाला मूर्च्छित केलें व लक्ष्मणास रामाजवळ आणिलें. रामानें रावण गाठंत होतांच त्याचा किरीट छेदून त्याला भूमीवर पाडून त्याची अत्यंत निर्भर्त्सना केली. तेव्हां रावण लंकेंत परतला ( वा. रा. यु. ५९ ). पुढें कुंभकर्ण आला असतां रामानें त्यास ठार केलें. सातवे दिवशीं देवान्तक, नरान्तक, त्रिशिरस् व अतिकाय हे रावणाचे चार पुत्र, महापार्श्व व महोदार हे रावणाचे भाऊ, यांना वानरांनीं ठार केलें ( ६९-७१ ).

आठव्या दिवशीं इंद्रजित् अदृश्यरूपानें युद्धास आला व एका प्रहरांत सदुसष्ट कोटि वानरांस मारून व रामलक्ष्मणांस मूर्च्छित करून लंकेंत परतला ( ७३ ). रात्रीं बिभीषण व मारुति चुडी घेऊन जिवंत कोण व मेले कोण हें पाहत हिंडत असतां जांबवान् आढळला. त्यानें मारुतीस हिमालयाच्या ऋषभ शिखरावर जाऊन तेथील संजीवनी, विशल्यकरिणी, सुवर्णकरिणी व संधानी या चार औषधि आणावयास सांगितल्या. त्याप्रमाणें त्या आणल्यावर जांबवानानें सर्व सैन्य सजीव केलें ( ७४ ).

नवव्या दिवशीं वानरांनीं लंकेंत शिरून धुमाकूळ घातला व कुंभ, निकुंभ, यूपाक्ष इत्यादिकांना ठार केलें ( ७५-७७ ). मकराक्षाला रामानें ठार केलें ( ७८-७९ ).

पुढें इंद्रजितानें मायामय सीतेचा वानरांपुढें वध केला. इंद्रजित निकुंभिलेस अनुष्ठान करूं लागला असतां त्याला लक्ष्मणानें ठार केलें. मृत, मूर्च्छित व जखमी वानरांना सुषेणानें पुनः पूर्ववत् केलें ( ९१ ). नंतर सुपार्श्वानें सीताहननापासून रावणास निवृत्त करून वद्य चतुर्दशीस तयारी करून अमावास्येस युद्धास निघण्याचा सल्ला दिला (वा. रा. यु. ९२. ६२). युद्धांत रामानें दृष्टिभ्रम उत्पन्न करून राक्षसांची कत्तल केली (९३). पुढें सारखा पराजय होऊं लागल्यानें जयाकरितां रावण हवनास बसला असतां, वानरांनीं त्याला विघ्न केलें. मग रावणानें महोदर, महापार्श्व व विरूपाक्ष यांसह युद्धास आला. रामाचें व त्याचें घनघोर युद्ध झालें. रावणानें बिभीषणावर टाकलेली शक्ति लक्ष्मणानें तोडून टाकिली. पुनः टाकिली असतां लक्ष्मण मूर्च्छित पडला. ती शक्ति शेवटीं रामानें उपटून काढली व वानरांना संरक्षणास ठेवून आपण रावणाशीं युद्धास गेला (वा. रा. यु. १०० ). तेव्हां सुषेणानें लक्ष्मणास व वानरांस पुनः सजीव केलें ( १०२ ). हें ऐकून रावण निराशेनें पुनः युद्धास आला. रामहि इंद्रानें पाठविलेल्या रथांत बसून लढूं लागला. रामानें सारथ्यास सावधगिरीची सूचना दिली. शेवटीं रामानें सोडलेल्या अगस्त्याच्या बाणानें रावणाचें हृदय फुटून तो गतप्राण झाला ( वा. रा. यु. ११०; म. व. २९० ).

पुढें रामानें बिभीषणाचें सान्त्वन करून त्यास उत्तरक्रिया करावयास सांगितली (१११). मंदोदरी वगैरे स्त्रियांचें सान्त्वन करून त्यांना लंका नगरींत रवाना केलें ( ११२-११३ ). उत्तरक्रिया झाल्यावर रामानें लक्ष्मणाकडून बिभीषणास लंकेंत राज्याभिषेक केला. सीतेस वृत्त कळावें म्हणून मारुतीला तिकडे धाडिलें ( ११४ ). बिभीषणानें सीतेला मंगलस्नान घालून रामाकडे आणिली असतां रामानें तिच्याशीं कठोर भाषण केल्यानें तिनें अग्निप्रवेश केला. अग्निप्रवेश करूनहि सुरक्षित राहिल्यानें तिच्या पावित्र्याबद्दल सर्वांची खात्री पटली ( ११६-११९ ).

नंतर सर्व मेलेल्या वानरांना इंद्राकडून सजीव करवून सर्वांना निरोप दिला. पण अयोध्येस रामराज्याभिषेकाला येण्याची इच्छा दर्शविल्यावरून राम त्यांसुद्धां विमानांत बसून अयोध्येकडे निघाला ( १२१-१२३ ). रामानें सीतेला वाटेंतील युद्धभूमि, सेतु वगैरे स्थळें विमानांतून दाखविलीं. मध्यें सुग्रीवादिकांच्या स्त्रिया विमानांत घेतल्या. पूर्वपरिचित स्थळें दाखवीत असतां अयोध्या दिसूं लागली. तेव्हां सीतेनें अयोध्येस नमस्कार केला. वनवासाचा एक दिवस शिल्लक असल्यानें पंचमीस भरद्वाजाश्रमांत मुक्काम केला व मारुती भरताला निरोप सांगण्यास रवाना झाला. दुसरे दिवशीं पुष्य नक्षत्रावर नंदिग्रामीं रामभरतभेट होऊन घरीं माता, वसिष्ठ वगैरेंचें दर्शन घेतलें ( वा. रा. यु. १२६. ५४ ). भरताला मंगलस्नान घालून आपण मंगलस्नान केलें. नंतर याला राज्याभिषेक झाला व भरताला यौवराज्य देण्यांत आलें. मोठा समारंभ झाल्यावर सुग्रीवादिकांना सहा महिने ठेवून

घेऊन रामानें निरोप दिला. यानें इतकें नीतीनें राज्य केलें कीं, रामराज्य हा शब्द अद्यापि विशेष अर्थानें रूढ आहे ( १३० ).

रामास राज्याभिषेक झाला, त्या वेळीं समारंभास सीरध्वजादिक आप्त, प्रतर्दनादिक मित्र, शिवाय तीनशें मांडलिक आले होते. त्यांचा सन्मान करून रामानें त्यांना निरोप दिला (वा. रा. उ. ३८). बिभीषणानें रामास दिलेलें पुष्पक विमान रामाच्या मार्गें कुबेराकडे गेलें (वा. रा. उ. ४१). पुढें सीता गरोदर असतां तिला अरण्यांत जाण्याचे डोहाळे झाले व याच वेळीं सीतेविषयीं लोकांनीं काढलेले दुष्ट उद्गार भद्र नांवाच्या हेराकडून रामाच्या कानावर आले ( वा. रा. उ. ४३ ). रामानें लोकांचीं बोलणीं स्वतःच ऐकिलीं ( भा. ९. ११. १८ ). तेव्हां रामानें लक्ष्मणाकडून सीतेस गंगेच्या पलीकडे एकटीला सोडून दिलें. परटाच्या आक्षेपावरून यानें सीतात्याग केला ( पद्म. पा. ५६–६० ). लक्ष्मणानें मोठ्या दुःखानें सीतेला रामानें लोकापवादभीतीनें टाकल्याचें सांगितलें ( वा. रा. उ. ४८ ). नंतर वाल्मीकीच्या आश्रमांत तिला लवकुश झाले. यानंतर रामानें शत्रुघ्नाकडून लवणाचें पारिपत्य केलें ( वा. रा. उ. ६९ ). वर्णाश्रमधर्माविरुद्ध तप करणाऱ्या शंबूकास मारून ब्राह्मणपुत्रास जिवन्त केलें ( वा. रा. उ. ७६ ) व लंकेवर संकट येऊं नये, म्हणून याच वेळीं सेतु मोडिला ( पद्म. सृ. ३८ ). रावण हा ब्राह्मण असल्यानें त्याच्या वधानें ब्रह्महत्या घडली म्हणून अगस्त्याच्या सांगण्यावरून रामानें अश्वमेध केला ( पद्म. पा. ८-१०; शत्रुघ्न. पहा ). यज्ञार्थ पत्नी पाहिजे म्हणून सीतेची सुवर्णप्रतिमा करवून जवळ बसविली. रामाचा अश्वमेध चालूं असतांच कुशलवासह वाल्मीकि आला व त्यानें कुशलवांकडून रामायण गाऊन दाखवून कुशलव व राम यांची ओळख करून दिली (कुशलव पहा). पुढें सीतेनें रामाची भेट घेऊन पृथ्वीत प्रवेश केला ( वा. रा. उ. ९७ ) व कौसल्या, सुमित्रा, कैकेयी स्वर्गीं गेल्या ( ९९ ). मात्र सीता रामाजवळ पुनः येऊन राहिल्याचें पद्मपुराणांत आहे ( पा. ६८ ).

पुढें लक्ष्मणानें देह ठेविला. कुशाला कोसल देशीं व उत्तर कोसलांत लवाला राज्याभिषेक करून रामानेंहि देह ठेविला ( वा. रा. उ. १०९ ).

पुढील मितिवार माहिती थोडी कल्पना येण्याकरितां दिली आहे.

| | |
|---|---|
| वैशा. शु. १ | वनवास प्रथम दिवस |
| वैशा. शु. २ | चित्रकूटावर गमन |
| वैशा. शु. ६ | भरतभेट ( १२ वर्षे, ६ महिने पंचवटींत निवास ) ( अब्द रामायण ). |
| कार्ति. कृ. १० | शूर्पणखेचें नाककान कापणें |
| माघ. शु. ८ | रावणकृत सीताहरण (दहा महिन्यांनंतर ) |
| मार्ग. शु. ९ | संपाति व वानर यांची भेट |
| मार्ग. शु. ११ | महेंद्रावरून मारुतीचें उड्डाण |
| मार्ग. शु. १२ | सीता व मारुति यांची भेट |
| मार्ग. शु. १३ | अक्षादिकांचा वध व अशोकवनध्वंस |
| मार्ग. शु. १४ | मारुतिबंधन व लंकादहन |
| मार्ग. शु. १५ | मारुतिप्रत्यागमन |
| मार्ग. व. १-५ | प्रवास |
| मार्ग. व. ६ | वानरभेट व मधुवनध्वंस |
| मार्ग. व. ७ | राममारुतिभेट |
| मार्ग. व. ८ | रावणवधप्रतिज्ञा. उत्तराफाल्गुनी नक्षत्र व विजययोग यांवर दक्षिणेकडे प्रयाण |
| मार्ग. व. ९-३० | समुद्रतीरापर्यंत सैन्यासह प्रवास |
| पौष शु. ४ | बिभीषण रामाकडे आला |
| पौष शु. ५ | समुद्रतरणविचार |
| पौष शु. ६-९ | प्रायोपवेशन |
| पौष शु. १०-१३ | सेतुबंधन |
| पौष शु. १४ | रामाचें सुवेलाचलावर आगमन |
| पौष शु. १५-२ | सैन्य पलीकडे गेलें |
| पौष व. ३-१० | लंकेस वेढा |
| पौष व. ११ | शुक व सारण हे रावणाचे वकील रामाकडे आले |
| पौष व. १२ | रामसैन्यगणना |
| पौष व. १३-३० | रावणसैन्यगणना |
| माघ शु. १ | अंगदशिष्टाई |
| माघ शु. २-८ | युद्ध |
| माघ शु. ९ | रामलक्ष्मणांना इंद्रजितानें नागपाशांनीं बांधिलें |
| माघ शु. १० | त्यांना गरुडमंत्रानें मारुतीनें सोडविलें |
| माघ शु. ११-१२ | धूम्राक्षवध |
| माघ शु. १३ | अकंपनवध |
| माघ शु. १४-१ | नीलकृत प्रहस्तवध |
| माघ व. २-४ | रामरावणयुद्ध, रावणपलायन |
| माघ व. ५-८ | कुंभकर्णाला जागें करणें |
| माघ व. ९-१४ | कुंभकर्णाशीं युद्ध व वध |
| माघ व. ३० | युद्धविराम |
| फाल्गु. शु. १-४ | इंद्रजितादिकांशीं युद्ध |
| फाल्गु. शु. ५-७ | अतिकाययुद्ध |
| फाल्गु. शु. ८-१२ | कुंभनिकुंभाशीं युद्ध |
| फाल्गु. शु. १३-२ | मकराक्षादिकांशीं युद्ध. लक्ष्मणमूर्च्छा |
| फाल्गु. व ३-७ | युद्धविराम. औषधि आणणें |

| | |
|---|---|
| फाल्गु. व. ८-१३ | लक्ष्मणाचें इंद्रजिताबरोबर युद्ध व इंद्रजित्-[वध |
| फाल्गु. व. १४ | रावणयज्ञ |
| फाल्गु. व. ३० | रावण युद्धास आला |
| चैत्र. शु. १-५ | राक्षसवध |
| चैत्र. शु. ६-८ | महापार्श्वादिकांचा वध |
| चैत्र. शु. ९ | लक्ष्मणास शक्ति लागली, द्रोणाचल आणिला |
| चैत्र. शु. १० | युद्ध बंद |
| चैत्र शु. ११ | इंद्राकडून मातलि रथासह येतो |
| चैत्र शु.१२-व.१४ | रामरावणयुद्ध व रावणवध |
| चैत्र व. ३० | रावणप्रेतसंस्कार |
| वैशा. शु. २ | बिभीषणराज्याभिषेक |
| वैशा. शु. ३ | रामसीता भेट |
| वैशा. शु. ४ | राम विमानांत बसला |
| वैशा. शु. ५ | वनवासाचीं चवदा वर्षे संपलीं. भरद्वाजाश्रमीं गमन |
| वैशा. शु. ६ | रामभरत भेट |
| वैशा शु. ७ | रामराज्याभिषेक. |

सीता रावणाचे बंदींत अकरा महिने चवदा दिवस होती. राज्याभिषेकाचे वेळीं राम व सीता यांचीं वयें अनुक्रमें बेचाळीस व तेहतीस वर्षांचीं होतीं. स्कंदपुराणांतहि प्रायः अशीच मितीवार माहिती सांपडते (स्कंद. ३. २. ३०; पद्म. पा. ३६ ). लग्नाचे वेळीं राम पंधरा वर्षांचा व सीता सहा वर्षांची होती. राम सत्ताविसाव्या वर्षी वनवासास गेला ( पद्म. पा. ३६ ). या माहितीचा वाल्मीकिरामायणाशीं मेळ नाहीं.

ही पद्मपुराणांतील माहिती उपेक्षणीय ठरवून रामायणाच्या तिलकटीकेंत कतक व तीर्थ यांच्या मताप्रमाणें चैत्र शुद्ध दशमीस वनवास प्रथमदिन, माघ शुद्ध प्रतिपदेस युद्धारंभ, अश्विन शुद्ध प्रतिपदेस रावणयुद्धास प्रारंभ व नवमीस रावणवध असा निश्चय केलेला आढळतो. कालिकापुराणांत याप्रमाणेंच माहिती असून उत्तर हिंदुस्थानांतील रामलीला वगैरे उत्सव या धोरणानेंच चालू आहेत. याप्रमाणें राम अयोध्येंत अश्विन वद्य षष्ठीस आला असावा. चांद्रमासाप्रमाणें अधिकमास-विरहित गणना केल्यास ही गणना जुळवितां येते ( वा. रा. यु. १११ तिलकटीका कुं.; कालिका. ६२. २३-३८ ). ही माहिती वाल्मीकिरामायणाशीं जुळती आहे.

राम अयोध्येंत वनवासांतून आला, तेव्हां त्यानें ताम्रपटावर आपल्या पराक्रमाचें वर्णन करून कांहीं नियम लिहून ठेविले व त्या ताम्रपटाची श्रीमातास्थान, बकुलार्क व धर्मस्थान येथें स्थापना केली व ५० गांवें ब्राह्मणांस दिलीं ( स्कंद. ३.२.३४ ). यानें रावणयुद्धानंतर बिभीषणाजवळची वासुदेवाची मूर्ति नेली ( ब्रह्म. १७६.४४-४५ ).

रामाची कथा पुराणग्रंथांत सर्वत्र आढळते. महाभारताच्या वनपर्वांत व पद्मपुराणाच्या पातालखंडांत ती विस्तृतपणेंच आली आहे. दुसऱ्या कांहीं ठिकाणीं प्रसंगतः आली आहे ( भा. ९. १०-११; अग्नि. २-१२; नृसिंह. ४७-५२; नारद. १. ७९. ७-२६; २. ७५; वायु. २. २६. १८३-१९७; पद्म. उ. २४२-२४४ ). कांहीं पुराणांत माहात्म्याकरितां रामकथेचा उपयोग केला आहे ( शिव. रुद्र. सं. २४-२६; दे. भा. ३. २८-३०; स्कंद. ३ २. ३०; ब्रह्म. १२३; १५४; लिंग. २. ५ ).

रामचरित्रावर दोष दाखवितांना स्त्री असूनहि ताटकेचा वध, खराशीं युद्ध खेळतांना तीन पावलें मागें सरणें ( वा. रा. अर. ३०. २३ ), छपून बसून वालीचा वध ( उत्तर-राम. ५ ), सीतात्याग व अहिरावणपत्नीच्या महालांत जाणें, हे दोष दाखविण्यांत येतात. त्यांपैकीं ताटकावधाचें विश्वामित्राच्या संमतीनें व तिच्या क्रूरकृत्यानें समर्थन करितां येतें. खराशीं चाललेल्या युद्धांत शरसंधान करण्याकरितां मागें सरल्यामुळें सदोषत्व नष्ट होतें. वालिवधाचें समर्थन रामानें शाखामृग म्हणून केलें आहे. सुग्रीवपत्नी रुमेच्या अपहाराचें शासन हेंहि कारण दाखविलें आहे. वालीनें रामाला 'मी दुसऱ्यांशीं लढत असतां माझ्यावर शरसंधान कां केलें?' असा प्रश्न विचारिला आहे. वास्तविक रामायणांतल्या वर्णनावरूनहि त्याला शाखामृग म्हणतां येत नाहीं. स्त्रीच्या अपहाराचा प्रश्न दोन्ही बाजूंस आहे. सात्यकीच्या संरक्षणार्थ अर्जुनानें भूरिश्रव्याचा उगारलेला हात न कळत तोडिला व समर्थनार्थ आश्रितसंरक्षणाचा मुद्दा पुढें मांडिला. तसेंच समर्थन येथें कांहीं लोक करितात. पण पुढें अर्जुनानेंच आश्रितसंरक्षणाचा मुद्दा सोडून संकुल-युद्धांत एकाचें एकाशींच युद्ध अशक्य असल्याचें प्रतिपादन करून स्वतःचें समर्थन केलें आहे. येथें तर संकुलयुद्ध नसून वालिसुग्रीवांचें व्यक्तिशः युद्ध चालू आहे. अशा युद्धांत रामानें बाण मारून केलेल्या वालिवधाचें समर्थन करणें अशक्य दिसतें. सीतात्यागाचा मुद्दाहि व्यक्तिधर्म व राजधर्म यांतील कोडेंच आहे. शेवटला मुद्दा अनैतिहासिक म्हणून सोडून देतां येईल.

४ ( सो. पुरुरवस्. ) वायुमतें सेनजित्पुत्र. हा इतरत्र सांपडत नाहीं.

५ सावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

**राम औपतस्विनि**—एक आचार्य ( श. ब्रा. ४. ६. १. ७ ).

**राम ऋतुजातेय वैयाघ्रपद्य**—शंग शात्यायनि आत्रेयाचा हा शिष्य असून एक आचार्य होता ( जै. उ. ब्रा. ३. ४०. १; ४. १६. १ ).

**राम मार्गवेय**—श्यापर्णाच्या कुटुंबांतील एक पुरोहित. यानें विश्वंतर नामक राजाला क्षत्रियांनीं यज्ञामध्यें सोमाऐवजीं उदुंबरफुलाचा उपयोग करावा, असें सांगितलें ( ऐ. ब्रा. ७. २७ ). व विश्यापर्णांना पौरोहित्य सोडावयास लावून विश्वंतराकडून आपलें पौरोहित्य पुनः मिळविलें. तेथें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचा सोम यानें सांगितला आहे. ब्राह्मणांकरितां सोमवल्ली, क्षत्रियांना वडाच्या पारंब्या, उंबर, पिंपळ व लक्ष, वैश्यांना दहि व शूद्रांना जल हा सोम सांगितला आहे.

**रामकृष्ण**—रामकृष्णांनीं केलेली षोडशश्लोकी शिक्षा प्रसिद्ध असून हिच्यांत वर्णोच्चारांचा फक्त विचार केलेला आहे. ही शंकराच्या मुखांतून निघाली, असें हींत म्हटलेलें आहे.

२ एक मुनि. याच्या तपानें वेंकटाचलावर एक तीर्थ प्रसिद्ध झालें ( स्कंद. २. १. १५ ).

**रामचंद्र**—( पौर. भविष्य ) विष्णुमतें पुरंजयाचा पुत्र.

२ ( मधुमती पहा ).

**रामचंद्र सिद्धेश्वर**—यानें वेदपरिभाषासूत्रशिक्षा नांवाचा एक ग्रंथ केलेला आहे. हा बराच अलीकडचा असावा. वेदपरिभाषाकारिका नांवाची आणखी एक शिक्षा याच्या नांवावर आहे.

**रामानुज**—याला भक्तीनें ईश्वरप्राप्ति होईल, असा श्रीनिवासानें वर दिला ( स्कंद. २. १. २१; गर्ग. सं. १०. ६१. २४ ).

**रामेश्वर**—हा शंकराचा अवतार रामेश्वरीं आहे. हा रामचंद्राकरितां अवतरला ( शिव. शत. ४२ ). याचें उपलिंग गुप्तेश्वर आहे ( शिव. कोटि. १ ).

**रामोद**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**रायाण**—( रापाण पहा ).

**रायोवाज**—सामांचा द्रष्टा ( पं. ब्रा. ८. १. ४; १३. ४. १७; १ यति पहा ).

**रावण**—हा पुलस्त्यपुत्र विश्रवसाचा पुत्र. याच्या आईचें नांव केशिनी ( भा. ४. १. ३७ ). पुष्पोत्कटा ( म. व. २७६. ७ कुं. ) किंवा कैकसी ( वा. रा. उ. ९ ) असें आढळतें. एकदां याचा सापत्न भाऊ कुबेर आपल्या पुष्पक विमानांत बसून पित्याच्या भेटीस जात होता. तेव्हां कैकसीनें यास कुबेरासारखा ऐश्वर्यवान् होण्यास उत्तेजन दिलें. तेव्हां हा तपश्चर्या करण्याकरितां गोकर्णक्षेत्रांत गेला व तेथें दहा हजार वर्षें यानें तपश्चर्या केली. प्रत्येक हजार वर्षांच्या शेवटीं हा आपलें एकएक मस्तक अग्नींत हवन करीत असे. शेवटीं ब्रह्मदेव प्रसन्न होऊन त्यानें मनुष्येतर प्राण्यापासून यास अवध्यत्व दिलें ( वा. रा. उ. ९; पद्म. पा. ६; म. व. २७६. १५ कुं. ). हा वर यास शंकरानें दिला असेंहि आहे (पद्म. उ. २४२). शंकरानें यास एक तलवार दिली ( ब्रह्म. १४३. १५ ). पुढें कुबेराच्या लंकेंत आपण राहण्याचें ठरवून यानें कुबेराला कैलासावर जाण्यास भाग पाडिलें ( वा. रा. उ. ११ ). त्याचें विमानहि जबरीनें हरण केलें. वेदवतीवर जबरी करण्याचा प्रयत्न केला ( वा. रा. उ. १७ ). मरुत्तादि अनेक राजांना जिंकिलें. अनरण्याचा पराजय केला. इंद्रादि देवांना जिंकिलें. पुढें अश्म नगरांतील कालकेयाशीं युद्ध करीत असतां याचा मेहुणा—शूर्पणखेचा पति—याचे हातून मेला ( वा. रा. उ. १८-२४ ). पाताळांत गेला असतां बलीनें याचा गर्वपरिहार केला ( वा. रा. उ. प्र. १-५ ). मधु दैत्यानें याची बहीण कुंभीनसी हिला पळविलें. पण यानें बहिणीच्या विनंतीवरून मधूशीं सख्य केलें (वा. रा. उ. २५). रंभा नलकूबराकडे चालली असतां यानें तिचा जबरीनें संभोग घेतला. त्यामुळें नलकूबरांनीं यास पुनः 'जबरीसंभोग केल्यास मृत्यु येईल' असा शाप दिला ( वा. रा. उ. २६; आ. रा. सार. १३ ).

हा कार्तवीर्य अर्जुनाकडे युद्धार्थ गेला असतां त्यानें यास धनुष्याच्या दोरीनें बांधून टाकिलें ( म. स. ९६. ३७-४४ कुं. ). परंतु पुलस्त्यानें रदबदली करून यास सोडविलें व दोघांनें सख्य केलें ( वा. रा. उ. ३१-३३ ). किष्किंधेंत वालीकडे गेला असतां तेथें त्यानें यास काखेंत मारून चारहि समुद्रांवर नेलें. शेवटीं त्याच्या सामर्थ्यानें हा थक्क होऊन दोघांचें अग्निसाक्षिक सख्य झालें ( वा. रा. उ. ३४ ).

असाच हा फिरत असतां कैलासपर्वतानजीकच्या शरवनापाशीं याचें विमान कुंठित झालें. शरवनांत प्रवेश झाल्यास स्त्रीत्व प्राप्त होत असे. तेथें रखवालीस असणाऱ्या नंदीचा यानें उपहास केला, म्हणून नंदीनें यास वानरांकडून पराजय होण्याचा शाप दिला. त्याबरोबर संतापून यानें कैलासपर्वत हलविण्यास सुरुवात केली. पण शंकरानें पायाच्या अंगठ्यानें दाबतांच याचे हात पर्वताखालीं सांपडून हा ओरडूं लागला. शेवटीं सामगायनानें शंकराला प्रसन्न केल्यावर त्यानें यास रावण हें नांव व चंद्रहास नांवाचें खड्ग दिलें ( वा. रा. उ. १६ ). एकदां हा नारदाच्या सांगण्यावरून श्वेतद्वीपांत गेला असतां तेथील माणसांनीं यास किडमुंगीसारखें वागविलें. शेवटीं हा एका बाईच्या हाताला डसला असतां तिनें हात झाडल्यावर हा समुद्रांत येऊन पडला ( वा. रा. उ. १० प्रक्षिप्त ). याचे प्रमुख सहा प्रधान होतेः १ महोदर, २ प्रहस्त, ३ मारीच, ४ शुक, ५ सारण, ६ धूम्राक्ष ( वा. रा. उ. १४. १ ). या सर्व कथानकांत कालाची संगति दिसत

नहीं. यावरून रावण नांवचें राजघराणें असावें असें वाटतें ( कार्तवीर्य पहा ).

हा सीतेच्या स्वयंवराला गेला होता, यानें धनुष्यहि उचलिलें, पण तोलतां न आल्यानें तें छातीवर पडलें. त्यांतून रामानें यास सोडविलें ( आ. रा. सार. ३ ).

एकदां अकंपनानें याला राम, लक्ष्मण व सीता दंडकारण्यांत आल्याचें कळविलें व शूर्पणखेनेंहि लक्ष्मणानें विरूप केल्याची हकीगत कळविली. तेव्हां सीतेचें वर्णन ऐकून मारीचाला सुवर्णमृग बनावयास लावून आपण अतिथिरूपानें सीता पळविली व आडवा आलेल्या जटायूचा पंख उपटून ठार केलें. नंतर सीतेला लंकेंत आणून अशोकवनिकेंत ठेविलें ( वा. रा. अर. ४३-५४; पद्म. उ. २४२; भा. ९. १०. २३; म. व २७९. ४४ कुं. ).

बिभीषणानें यास सीता सोडून देण्याविषयीं उपदेश केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. रामाशीं युद्ध होण्यापूर्वीं रावणाकडून शुकाला रामसैन्याची माहिती कळण्याकरितां पाठविण्यात आलें व सुग्रीवानें रामास मदत करूं नये असा निरोपहि रवाना झाला ( वा. रा. यु. २० ).

यानें सीतेला वश करण्याचे अनेक उपाय चालविले होते. पण सीतेनें निर्भयपणें त्यांचा धिक्कार केला ( वा. रा. यु. ३१-३२ ). माल्यवानादिकांनींहि उपदेश केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं ( वा. रा यु. ३५ ).

प्रहस्त, महापार्श्व, महोदार व इंद्रजित् यांना लंकेच्या चारहि द्वारावर नेमिलें. मध्यभागीं विरूपाक्षाला नियोजित केलें व आपण शुकसारण व सेना यांसह उत्तरद्वारीं राहिला (वा. रा. यु. ३६ ). युद्धाच्या पहिल्या दिवशीं रामलक्ष्मणांना नागपाशांनीं बद्ध केलें व त्रिजटेकडून सीतेस तें दृश्य दाखविलें. दुसरे दिवशीं धूम्राक्ष, वज्रदंष्ट्र, अकंपन, प्रहस्त वगैरे याच्याकडील राक्षस ठार झाले. सहाव्या दिवशीं रावण स्वतः गेला, पण पराजित झाला. याप्रमाणें कुंभकर्ण व इंद्रजित् हेहि मेले. सीतावधापासून इतरांनीं याला निवृत्त केलें. पुढें शुक्राच्या सांगण्यावरून हा जयप्रापक मंत्राचा जप करीत बसला. पण बिभीषणाकडून हें कळतांच रामाकडील वानरांनीं मंदोदरीची विटंबना करून अर्ध्या अनुष्ठानांतून यास युद्धार्थ आणिलें ( अध्या.रा. यु. १० ). शेवटीं हा मारिला गेला( वा. रा. यु. १०८; म. स. ५०. २३; व. २९१.२९; द्रो. ५९. ७ कुं. ).

हा ब्राह्मण होता ( पद्म. पा. १० ). याला मंदोदरीशिवाय हजार स्त्रिया होत्या ( वा. रा. अयो. १२३. १४ ). याचे पुत्र इंद्रजित्, देवांतक, नरांतक, त्रिशिरस् आणि अतिकाय हे होत ( वा. रा. यु. ६९ ).

एकदां यानें आईच्या पूजेकरितां शिवाचें आत्मलिंग आणिलें असतां लघुशंका लागली म्हणून जमिनीवर ठेवल्यानें तें जमिनींत शिरलें. तेंच गोकर्ण येथील लिंग होय ( आ. रा. सार. ९ ). शंकरानें यास पार्वतीहि दिली होती. पण मंदोदरी मिळाल्यानें पार्वती सुटली. यानें ' माझ्या कन्येचा मी अभिलाष केल्यास मला मृत्यु यावा ' असा वर मिळविला होता. सीता याची मुलगी होती ( अ. रा. ८ ).

रावणाला दहा तोंडें व वीस हात होते, अशी समजूत आहे व तसें कांहीं ठिकाणीं वर्णनहि आहे (आ. रा. सार. ३; वा. रा. उ. २५. ४ ). पण रामायणांतच रावणाला दोन हात व एक तोंड असल्याचें वर्णन आहे ( वा. रा. सुं. १५. २२; यु. ४०.१३; १०७.५४-५७; १०९.३; ११०. ९-१०; १११.३४-३७ ).

रावणानें वेदाचीं खंडें केलीं अशी प्रसिद्धी असून रावणकृत पदपाठ नुकताच सांपडला आहे. रावणकृत ऋग्वेदभाष्यहि सांपडतें. पण हा रावण वेगळा असावा.

**रावण शतमुख**—( २ पौंड्रक पहा ).

**रावण सहस्रमुख**—पुष्करद्वीपांतील सहस्रमुखांचा एक राक्षस. याला सीतेनें मारिलें ( अ. रा. १७ ).

**राष्ट्र**—( सो. क्षत्र. ) हा वायुमतें काशिपुत्र होय.

**राष्ट्रपाल**—( सो. वृष्णि. ) उग्रसेनाच्या नऊ पुत्रांतील एक व कंसाचा भाऊ.

**राष्ट्रपाला** किंवा **राष्ट्रपालिका**—ही विष्णु व मत्स्य यांच्या मतें उग्रसेनकन्या होय. वायुपुराणांत हिला राष्ट्रपाला असें म्हटलें आहे. ही वसुदेवबंधु संजयाची पत्नी. हिचे पुत्र वृकदुर्मर्षणादि ( भा. ९. २४. २५; ४२ ).

**राष्ट्रपिंड**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**राष्ट्रभृत्**—एक अप्सरा ( तै. आ. २. ४ ).

२ (स्वा. प्रिय.) भागवतमतें भरत व पंचजनी यांचा पुत्र.

**राष्ट्रवर्धन**—दशरथाचा अर्थसचिव ( वा. रा. बा. ७ ).

२ राज्यवर्धनाचें नामांतर.

**राहु**—कश्यप व दनु यांच्या पुत्रांतील एक ( पद्म. सृ. ८ ). कश्यप व सिंहिका यांचा पुत्र ( म. आ. ६६. ३१ कुं.; पद्म. सृ. ४०; विष्णुधर्म. १. १०६ ). विप्रचित्ति व सिंहिका यांचा ज्येष्ठ पुत्र ( भा. ६. ६. ३७; १८. १३; ब्रह्मांड. ३. ६. १८-२० ). यासच ब्रह्मांडांत व महाभारतांत ' चंद्रार्कप्रमर्दन ' हें विशेषण लाविलेलें आहे. हा शिशुमार चक्राच्या गळ्याचे ठिकाणीं आहे ( भा. ५. २३. ७ ). समुद्रमंथनानंतर देवांनीं अमृतपान केलें, तेव्हां यानेंहि प्रच्छन्नरूपानें अमृतपानास सुरुवात केली. परंतु अमृत गळ्यापर्यंत जातांच चंद्रसूर्यांनीं हा दैत्य असल्याचें

सांगितलें. तेव्हां विष्णूनें याचा शिरच्छेद केल्यामुळें याचें धड व शिर भूमीवर पडलें ( म. आ. १९. ५-८ कुं. ). शिराचा केतु बनला. या दोघांस विष्णूच्या भीतीनें पळून जावें लागलें. पण चंद्रसूर्यांशीं द्वेषभावानें वागून अद्यापहि त्यांस हे ग्रासतात. हींच ग्रहणें होत (पद्म. ब्र. १०). हा वर्तुलाकार असून याचा व्यास बारा हजार योजनें व परीघ बेचाळीस हजार योजनें आहे ( म. भी. १२ ). जालंधराचें शंकराशीं युद्ध झालें, त्यांत जालंधराचे वतीनें हा शिष्टाईकरितां शंकराकडे गेला होता ( पद्म. उ. १० ). पुढें युद्धांत शंकराच्या क्रोधाग्नीला भिऊन पळून गेला (पद्म. उ. १८). याची कन्या सुप्रभा ( पद्म. सृ. ६ ). ही मुलगी स्वर्भानूची दिली आहे ( भा. ६. ६. ३२ ). याची मुलगी सांगतांना याचें नांव स्वर्भानु सांगून प्रभा हें मुलीचें नांव दिलें आहे ( ब्रह्मांड. ३. ६. २३; विष्णु. १. २१ ). वेदांत व क्वचित् पुराणांत याबद्दल स्वर्भानु हा शब्द वापरिला आहे ( स्वर्भानु पहा ).

**राहुकर्णि**—अंगिराकुलांतील गोत्रकार. याबद्दल रागकर्णि असा पाठभेद आहे.

**राहुल**—( सू. इ. भविष्य. ) हा वायुमतें शुद्धोदनपुत्र होय ( २ पुष्कल पहा ).

**राहूगण**—गोतमाचें पैतृक नांव ( ३ गोतम व रहूगण पहा ).

**रिक्ष**—( सो. नील. ) वायुमतें पुरुजानुपुत्र ( २ चक्षु पहा ).

**रिपु**—( सो. द्रुह्यु. ) वायुमतें बभ्रुपुत्र.

२ ( सो. पुरूरवस्. ) भागवतमतें यदुपुत्र.

**रिपुंजय**—( सो. द्विमीढ. ) भागवतमतें सुवीरपुत्र. यास इतरत्र नृपंजय म्हटलें आहे.

२ (स्वा. उत्तान.) ध्रुवपुत्र शिष्टास सुच्छायेपासून झालेल्या चार पुत्रांतील एक.

३ ( सो. मगध. भविष्य. ) ब्रह्मांडमतें श्रुतंजयाचा पुत्र ( ३ महाबाहु पहा ).

४ ( सो. मगध. भविष्य. ) विष्णुमतें विश्वजिताचा व मत्स्यमतें अचलाचा पुत्र. वायु व ब्रह्मांड यांत याला अरिंजय म्हटलें आहे. भागवतांत यास पुरंजय म्हटलें आहे. यानें पन्नास वर्षें राज्य केलें. याला शुनक नांवाच्या प्रधानानें मारून प्रद्योतवंशाची स्थापना केली.

५ उदारधी व भद्रा यांचा पुत्र.

६ सुरथाचा पुत्र. सुरथानें रामाचा अश्वमेधीय अश्व धरिल्यावर शत्रुघ्नाबरोबर झालेल्या युद्धांत हा होता ( पद्म. पा. ४९ ).

७ यास काशिक्षेत्रांत दिवोदास नांवानें राज्य करण्यास सांगितलें. एकदां काशींतून अग्नि नष्ट झाला असतां यानें स्वतः अग्नीचें कार्य केलें ( स्कंद. ४. २. ३९-५८ ).

**रिपुताप**—रामाच्या अश्वमेधीय अश्वाचें संरक्षण करण्याकरितां शत्रुघ्नाबरोबर गेलेला एक वीर (पद्म. पा. ११).

**रिपुवार**—वीरमणीचा सेनापति. वीरमणीनें रामाचा अश्वमेधीय अश्व धरिल्यावर शत्रुघ्नाबरोबर झालेल्या लढाईंत हा होता ( पद्म. पा. ४० ).

**रिषा**—कश्यप व क्रोधा यांची कन्या. धर्माची स्त्री.

**रिष्ट**—वैवस्वत मनूचा एक पुत्र.

२ यमसभेंतील एक राजा ( म. स. ८. १५ कुं. ).

**रुक्म**—( सो. क्रोष्टु. ) हा भागवतमतें रुचकपुत्र होय. इतरत्र याचा बंधु पृथु याच्या सुद्धां पृथुरुक्म असें एकच नांव दिलें आहे.

**रुक्मकवच**—( सो. क्रोष्टु. ) हा मत्स्य व वायु यांच्या मतें कंबलबर्हिषपुत्र. विष्णु व पद्म यांच्या मतें शिनेयुपुत्र, आणि भागवतमतें रुचकाचा पुत्र.

**रुक्मकेश**—विदर्भदेशाधिपति भीष्मक राजाच्या पांच पुत्रांतील चवथा ( भा. १०. ५२. २२ ).

**रुक्मबाहु**—विदर्भदेशाधिपति भीष्मक राजाच्या पांच पुत्रांतील तिसरा ( भा. १०. ५२. २२ ).

**रुक्मभूषण**—( धर्मांगद पहा ).

**रुक्ममालिन्**—विदर्भदेशाधिपति भीष्मक राजाच्या पांच पुत्रांतील पांचवा ( भा. १०. ५२. २२ ).

**रुक्मरथ**—विदर्भदेशाधिपति भीष्मक राजाच्या पांच पुत्रांतील दुसरा ( भा. १०. ५२. २२ ). हा द्रौपदी-स्वयंवरकालीं पांचालपुरांत होता ( म. आ. २०१. १४ कुं. ).

२ मद्रदेशाधिपति शल्य राजाचा ज्येष्ठ पुत्र (म. भी. ४७. ४८ कुं. ). ह्याला अभिमन्यूनें वंधूंसह मारिलें (म. द्रो. ४५. १३ कुं. ). पण सहदेवानें वध केला, असें दुसऱ्या ठिकाणीं आहे ( म. क. २. २९ कुं. ). दुसऱ्या ठिकाणीं शल्यपुत्र रुक्मांगदाला मारिलें असावें.

३ ( सो. द्विमीढ. ) हा मत्स्यमतें महावीरपुत्र होय.

४ द्रोणाचार्याचें नांव ( म. द्रो. १३. २३ कुं. ).

**रुक्मवती**—ही भीष्मकपुत्र रुक्मीची मुलगी. हिला रुक्मीनें रुक्मिणीच्या प्रेमाकरितां प्रद्युम्नास दिलें होतें ( भा. १०. ६१. २३ ).

**रुक्मांगद**—( सू. इ. ) हा ऋतुध्वजाचा मुलगा. ( नारद. २. १२. २० ). याच्या बायकोचें नांव विंध्यावली व मुलाचें नांव धर्मांगद. रुक्मांगदाची एकादशीव्रतावर विशेष श्रद्धा होती. त्या व्रतापासून याला भ्रष्ट करण्याचें काम

रुक्मांगदानें मोहिनीच्या आग्रहावरून मोहिनी मंदर पर्वतावर आली व हा ही शिकारीच्या निमित्तानें तेथें आला असतां गात असलेल्या मोहिनीची व याची भेट झाली व दोघांनीं विवाहबद्ध होण्याचें ठरविलें. एक स्त्री असून दुसरी स्त्री कर्तव्य असतां पहिलीची संमति घ्यावी किंवा तिच्या विवाहास आलेल्या खर्चाच्या दुप्पट पैशाची दागदागिन्यांसह फेड करावी किंवा ज्येष्ठ राणीस दुप्पट पैसे द्यावेत, म्हणजे पूर्वविवाहित स्त्रीच्या ऋणांतून तो मुक्त होतो, असा येथें नियम दिला आहे ( नारद. २. १८. ३१ ). एकदां दशमीची दोंडी ऐकतांच याला एकादशीव्रत मोडण्याचा तिनें आग्रह केला. तेव्हां यानें एकादशी मोडण्याचें नाकारिलें. तेव्हां तिनें पुत्रशिराची मागणी केली. यानें तें कबूल केलें व हा तलवार चालवणार, इतक्यांत विष्णूनें यास प्रत्यक्ष दर्शन दिलें ( नारद. २. ३६ ).

२ शल्याचा पुत्र. द्रौपदीस्वयंवरास गेलेल्या राजांतील एक ( म. आ. २०१. १४ कुं.; २ रुक्मरथ पहा ).

३ वीरमणीचा पुत्र. यानें रामाचा अश्वमेधीय अश्व धरिला. त्यामुळें झालेल्या संग्रामांत पुष्कलाबरोबर याचें युद्ध होऊन हा मूर्च्छित पडला ( पद्म. पा. ३९-४५ ).

४ कौंडिण्यपुरांतील भीम राजाचा मुलगा. याच्या आईचें नांव चारुहासिनी. याचें कुष्ठ चिंतामणिक्षेत्रीं जाऊन स्नान केल्यानें नाहींसें झालें ( गणेश. १. २७-३५ ).

**रुक्मिणी**—विदर्भाधिपति भीष्मक अथवा हिरण्यरोमन् राजास लक्ष्मीच्या अंशानें झालेली कन्या ( म. उ. १५८; ह. वं. २.५९ ). ही उपवर झाली असतां एकदां हिनें नारदानें केलेलें कृष्णाचें रूप, गुण व सामर्थ्य यांचें वर्णन श्रवण करून कृष्णासच वरण्याचा निश्चय केला ( भा. १०. ५२ ). हिचें रूप व गुण ऐकून कृष्णास हिजविषयीं प्रीति उत्पन्न झाली व त्यानें हिच्याविषयीं हिच्या पित्याजवळ मागणी घातली. पण हिचा ज्येष्ठ भ्राता रुक्मी हा जरासंधपक्षीय असून कंसवधापासून कृष्णावर संतापला असल्यामुळें त्यानें आपल्या जोरावर ही मागणी नाकारिली. नंतर जरासंधानें शिशुपालाचे वतीनें हिला मागणी घातली असतां, जरासंधाचे दाब्यास मान देऊन भीष्मक हिला शिशुपालास देण्यास तयार झाला. हिच्या भावानें विवाहाची सिद्धता केली. तेव्हां हिनें निश्चयपूर्वक सुशील नामक ब्राह्मणास पुढील अर्थाचें पत्र देऊन द्वारकेस पाठविलें. ‘विवाहाच्या आदल्या दिवशीं आमच्या नगराबाहेर असणाऱ्या अंबिकेच्या दर्शनास नवऱ्या मुलीस जावें लागतें. त्या वेळीं तुम्ही गुप्तरूपानें विदर्भ देशास येऊन, मला घेऊन जा.’ अशा मजकुराचें पत्र घेऊन ब्राह्मण द्वारकेस कृष्णाकडे गेला व त्यानें सर्व हकीकत कृष्णास सविस्तर सांगितली. ती ऐकतांच ब्राह्मणासहित कृष्ण रथांत बसून आनर्त देशांतून कुंडिनपुरांत एका रात्रींत पोहोंचला. कृष्ण एकटाच गेलेला पाहतांच युद्धप्रसंग जाणून बलराम व यादवसेनाहि त्याच्या मागून निघाली. विदर्भ नगरींत रामकृष्ण आल्यावर क्रथ व कैशिक देशाच्या राजांनीं त्यांचें स्वागत केलें ( ह. वं. २. ५९ ). भीष्मकानें त्याचें स्वागत केलें, असें भागवतांत दिलें आहे (१०. ५३). कृष्ण शिशुपालाचा विवाह पाहण्यास आला होता, असें विष्णुपुराणांत दिलें आहे ( ५. २६ ). चेदिराज, शिशुपाल व रुक्मिणी यांचा विवाह निर्विघ्न पार पडावा म्हणून जरासंधानें दंतवक्त्रपुत्र सुवक्त्र, पौंड्राधिपति वासुदेवपुत्र सुदेव, एकलव्यपुत्र, पांड्यराजपुत्र, कलिंगराज, वेणुदारि, अंशुमान्, क्राथ, श्रुतधर्मा, कालिंग, गांधाराधिपति, कौशांबीराज या राजांनासेनांसहित पाचरण केलें होतें. शिवाय भगदत्त, शल, शाल्व, भूरिश्रवा व कुंतिवीर्य हे व इतर राजेहि उपस्थित होते. लग्नाच्या आदल्या दिवशीं रुक्मिणी कुलाचाराप्रमाणें शहराबाहेरील भवानीच्या दर्शनास गेली व आपणांस कृष्ण पति मिळावा, अशी तिनें देवीची प्रार्थना केली. ही इंद्रइंद्राणीच्या दर्शनास गेली होती ( ह. वं. २. ५९ ). दर्शनानंतर ही बाहेर येऊन कृष्णास पाहूं लागली. तेव्हां कृष्णानें सर्व शत्रु पहात असतां हिला आपल्या रथांत घातली व यादवसेनेवर त्या अनेक राजांच्या सैनांची विल्हेवाट लावण्याचें काम सोंपवून आपण द्वारकेकडे निघाला. बलरामादि यादववीरांनीं इतर सैन्याचा पराभव केला. पुढें रुक्मिणीचा ज्येष्ठ भाऊ रुक्मी हा कृष्णास शासन करण्यास व नर्मदा नदीतीरानें पाठलाग करीत आला. त्यानें कृष्ण व रुक्मिणी शेजारीं बसलेलीं पाहिलीं. तेव्हां अतिशय संतापून त्यानें कृष्णाशीं युद्ध केलें. दारुण संग्रामानंतर कृष्णानें रुक्मीचा पराभव केला व त्यास तो ठार मारणार, तों रुक्मिणीनें त्यास जीवदान मागितल्यावरून त्यानें त्यास फक्त विरूप करून सोडून दिलें. भावास विरूप केलें, म्हणून ही रडूं लागली असतां बलरामानें कृष्णास रागें भरून नंतर हिचें समाधान केलें. द्वारकेंत गेल्यानंतर हिचा थाटानें विवाहसमारंभ झाला (म. उ. १५८; भा. १०. ५४; ८३; ह. वं. २. ६०; विष्णु. ५. २६; पद्म. उ. २४७-२४९ ).

लग्नानंतर कांहीं दिवसांनीं हिला प्रद्युम्न नामक पुत्र झाला. तो लहान असतांच शंबरासुरानें हिरावून नेल्यामुळें हिनें फार शोक केला. रुक्मिणीच्या प्रीतीस्तव रुक्मीनें आपली कन्या रुक्मवती हिचें प्रद्युम्नाशीं लग्न लाविलें. श्रीकृष्णनिधनानंतर हिनें व इतर चौघींनीं कृष्णासह अग्निप्रवेश केला.

रुक्मिणीस कृष्णापासून प्रद्युम्न, चारुदेष्ण, सुदेष्ण, चारुदेह, सुचारु, चारुगुप्त, भद्रचारु, चारुचंद्र, विचारु आणि चारु हे पुत्र व चारुमती नामक कन्या मिळून अकरा मुलें

झाली. कृष्णास जेवढ्या स्त्रिया होत्या, त्या सर्वांत ही प्रमुख होती ( भा. १०. ६१; ह. वं. २. ६० ).

उज्जानक प्रदेशाशेजारीं रुक्मिणीचा आश्रम प्रसिद्ध आहे. या ठिकाणीं क्रोधाचा निग्रह करून ही शांत झाली ( म. व. १३२. १८ कुं. ). हिचा भाग्यश्रीशीं भाग्यश्रीच्या स्थानास्तव कृष्णासमोर संवाद झाला होता ( म. अनु. १३० ). हिचा व कृष्णाचा प्रेमकलह भागवतांत फार मार्मिकतेनें रंगविला आहे ( १०. ६० ). आपलें स्वयंवरवृत्त हिनें द्रौपदीस सांगितलें ( भा. १०. ८३ ). हिला भैष्मी ( भा. १०.६० ) असें म्हटलेलें आढळतें. त्यावरून हिच्या बापाचें नांव भीष्मक कीं भीष्म असा घोंटाळा पडतो. पण त्यास भीष्म असेंहि नामांतर असावें ( भा. १०. ५३ ). पण इतरत्र मात्र भीष्मक असें नांव आढळतें. तसेंच हिला वैदर्भी असेंहि म्हटलें आहे ( भा. १०. ५५ ).

**रुक्मिन्**—विदर्भ देशाचा अधिपति भीष्मक ऊर्फ हिरण्यरोमन् याच्या पांच पुत्रांतील ज्येष्ठ. हा भोजवंशोद्भव होता (म. आ. ६८. ६२; व. २५५. ११ कुं.). हा दंतवक्त्राच्या अंशानें जन्म पावला होता ( म. आ. ६७ ). हा रुक्मिणीचा ज्येष्ठ भ्राता होय. यानें रुक्मिणीस तिच्या इच्छेविरुद्ध शिशुपालास देण्याचा विचार केला असतां द्वारकेहून कृष्णानें येऊन तिचें हरण केलें. तें पाहून हा अत्यंत क्रुद्ध झाला व जमलेल्या राजांसहित यानें बापापाशीं अशी प्रतिज्ञा केली कीं, ' मी कृष्णास मारून रुक्मिणीस माघारीं घेऊन येईन, नाहींतर कुंडिनपुरास कधींहि परत येणार नाहीं. ' पुढें एक अक्षौहिणी सेनेसह याचें व कृष्णाचें तुमुल युद्ध होऊन त्यांत कृष्णानें यास धरिलें व तो खड्गानें याचा शिरच्छेद करूं लागला; इतक्यांत रथांत असलेल्या रुक्मिणीनें भावाची दुर्धर दशा पाहून कृष्णास विनंति करून यास सोडविलें. तरी सुद्धां कृष्णानें यास विरूप करून सोडिलें असतां ( भा. १०. ५२-५४ ) हा प्रतिज्ञेप्रमाणें कुंडिनपुरांत न जातां दुसरेंच एक भोजकट नामक नगर वसवून तेथें राहिला.

पांडव वनवासांत गेल्यावर दुर्योधनाच्या वतीनें कर्ण दिग्विजय करण्यास गेला असतां याचें व कर्णाचें युद्ध झालें. त्यांत हा कर्णाच्या पराक्रमावर प्रसन्न झाल्यामुळें यानें त्यास खंडणी व देणग्या देऊन मार्गस्थ केलें ( म. व. २५५ कुं. ).

पुढें यानें बलाढ्य होण्याच्या महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन गंधमादन पर्वतावर राहणाऱ्या द्रुम नामक किन्नरापासून दीक्षा, संग्रह, सिद्ध व प्रयोग या चतुष्पादांनीं युक्त धनुर्वेद व इंद्राचें विजय नामक धनुष्य हीं संपादन केलीं ( म. उ. १५८ ). शिवाय यानें परशुरामापासून ब्रह्मास्त्र शिकून घेतलें. त्याच्या योगानें हा मोठा बलिष्ठ झाला. कांहीं कालानें भारतीय युद्ध सुरू झालें, त्या वेळेस हा मोठ्या गर्वानें एक अक्षौहिणी सैन्य घेऊन प्रथम पांडवांकडे आला व सभेंत अर्जुनास म्हणूं लागला कीं, ' तूं या युद्धाचें भय बाळगूं नको. मी एकटा शत्रूंचा निःपात करून आयतीच सर्व पृथ्वी तुझ्या हातीं आणून देतों. ' हें ऐकून अर्जुन, धर्म व कृष्ण यांजकडे पाहून नेत्रानें खुणवून मित्रबुद्धीनें हंसल्यासारखें करून म्हणाला, ' मला शत्रूची भीति वाटते, असें मी म्हणेन तरी कसें? मला कोणाच्याहि साहाय्याची जरूरी नाहीं. ' तेव्हां हा हिरमुष्टी होऊन दुर्योधनाकडे गेला व त्यालाहि साहाय्य करण्याविषयीं बोलूं लागला. पण स्वतःच्या शौर्याचा घमेंड असलेल्या दुर्योधनानें यास वारण्याच्या अक्षता लाविल्या तेव्हां हा स्वनगरास परत आला ( म. उ. १५८ ).

यास एक रुक्मवती ( ह. वं. २. ६१. ) अथवा शुभांगी नामक कन्या होती. तिनें स्वयंवरांत रुक्मिणीपुत्र प्रद्युम्नास वरिलें. रोचना नांवाची आपली नात यानें अनिरुद्धाला दिली. विवाहप्रसंगीं यानें बलरामाबरोबर कपटानें द्यूत खेळून बलरामाची निंदा केली. तेव्हां रागावून बलरामानें यास द्यूताच्या सुवर्णपटानें किंवा परिघानें मारिलें ( ह. वं. २. ६१; भा. १०. ६१ ).

**रुक्मेषु**—( सो. क्रोष्टु. ) हा भागवतमतें रुचकपुत्र, विष्णु व पद्म ( सृ. १३ ) यांच्या मतें परावृत्पुत्र, मत्स्य व वायु यांच्या मतें रुक्मकवचपुत्र होय.

**रुक्ष**—उरुक्षयाचें नामांतर.

**रुच**—( सो. कुरु. भविष्य. ) वायुमतें सुनीथपुत्र. ऋच व हा एकच ( नृचक्षु पहा ).

**रुचक**—( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें उशनापुत्र होय.

२ ( सू. इ. ) भरुक राजाचें नामांतर.

३ मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**रुचि**—हा प्रजापति ब्रह्मदेवाच्या मनापासून झाला. स्वायंभुव मनूनें आपली आकूति नांवाची कन्या यास पुत्रिकाधर्मानें दिली होती. तीपासून यास यज्ञ व दक्षिणा असें मिथुन झालें. तें मिथुन यानें मनूस दिलें ( भा. ३. १२. ५६; ४. १. २; पद्म. सृ. ३; ब्रह्मांड. १. १. ५८ ).

२ एक प्रजापति. हा प्रथम ब्रह्मचारी होता. विवाह करण्याची याची इच्छा नव्हती. पण पितरांनीं याचा निर्देश करून यास विवाह करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें यानें प्रम्लोचा नांवाच्या अप्सरेच्या मानिनी नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. मानिनी वरुणपुत्र पुष्कराची मुलगी होय ( गरुड. १. ८९-९०; मार्क. ९२ ).

३ एक अप्सरा ( म. अनु. ५०. ४७ कुं. ).

४ रुशसम्यांनी नायकी. हिच्यावर इंद्र आसक्त झाला होता ( म. अनु. ५५. ४१ कुं. ).

५ नहुषाची कन्या व आप्नवानाची स्त्री.

**रुचिपर्वन्**—कृति राजाचा पुत्र. दुर्योधनपक्षीय राजा. यास सुवर्च्यानें ठार केलें ( म. द्रो. २६. ५३ कुं. ).

**रुचिर**—( सो. कुरु. ) मत्स्यमतें जयत्सेनाचा पुत्र ( राधिक पहा ).

**रुचिराश्व**—( सो. पुरूरवस्. ) विष्णुमतें संकृतिपुत्र ( २ गुरु पहा ).

**रुचिराश्व**—( सो. अज. ) सेनजिताचा पुत्र.

**रुचीक**—गुहवासिन् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**रुतिमत्**—( सो. पूरु. भविष्य. ) वायुमतें शुचिद्रथाचा पुत्र ( वृष्णिमत् पहा ).

**रुद्र**—एक देवता. ऋग्वेदांत यावर तीन सूक्तें आहेत. हा पिंगट रंगाचा असून जटाधारी आहे. हा मोठा बळकट, पराक्रमी व शत्रूंना ठार करणारा आहे ( ऋ. २. ३३ ). याची लोकांना फार भीति वाटते. हा प्राण्यांचा जीव घेतो. आमचा जीव घेऊं नये म्हणून याची प्रार्थना आहे ( ऋ. १. ११४. ७-८ ). याच्याजवळ औषधें असतात व रोग बरे करण्यांत हा कुशल आहे ( ऋ. १. ११४. ५; २. ३३. २-७ ). केवळ माणसांचा हा संहार करीत नसून प्राण्यांचाहि संहार करतो ( ऋ. १. ११४. १० ). हा धनुष्यबाण ( ऋ. २. ३३. १०; ५. ४२. ११; १०. १२६. ६ ) व वज्र धारण करतो ( ऋ. २. ३३. ३ ). हा कृत्तिवासस् आहे ( वा. सं. ३.६१; १६. ५१ ). हा मूजवत् पर्वतावर राहतो ( वा. सं. ३. ६१ ).

अग्नीला रुद्र म्हटलें असून ( श. ब्रा. ६. १. ३. १०; तै. सं. ५. ४. ३. १ ) शर्व, भव, पशुपति असेंहि म्हटलें आहे ( श. ब्रा. १. ७. ३. ८ ). याला त्र्यंबक म्हटलें आहे ( ऋ. ७. ५९. १२ ). भूतमत् व पशुमत् असेंहि यास म्हटलें आहे ( ऐ. ब्रा. ३. ३३ ). प्रजापतीनें जेव्हां दुहितृगमन केलें, तेव्हां त्याला शिक्षा करणारा रुद्र उत्पन्न झाला. यानें पशुपतित्व स्वीकारिलें व मृगरूपानें पळणाऱ्या प्रजापतीला वेधिलें. तेच मृग, मृगव्याध व रोहिणीरूपानें आकाशांत दिसतात ( ऐ. ब्रा. ३. ३३; श. ब्रा. १. ७. ४. १-३; ब्रह्म. १०२ ).

अग्नीला रुद्र म्हटलें असून त्याला मखघ्न हें विशेषण लाविलें आहे ( तै. सं. ३. २ ४; तै. ब्रा. ३. २. ८.३ ). हें दक्षयज्ञविध्वंसाच्या कथेचें मूळ असावें. त्रिपुरदाहाच्या कथेचें मूळहि अंधुक आढळतें ( श. ब्रा. ३. ४. ४. ४; २४; ऐ. ब्रा. १.२५ ). रुद्रानें तीन नगरें फोडून असुरांना पळवून लाविलें ( तै. सं. ६. २. ३ ).

सनंदनादि ब्रह्मपुत्र प्रजापति प्रजोत्पादन करीनात, हें पाहून ब्रह्मदेवास क्रोध आला. त्यामुळें त्याची भ्रुकुटि रागानें वक्र झाली. या वक्र भ्रुकुटीपासून रुद्र झाला. हा अर्धनारीनरदेही होता ( विष्णु. १. ७. १०-११ ). क्रोधापासून हा झाला ( पद्म. सृ. ३ ). प्रजा उत्पन्न करण्याकरितां ब्रह्मदेवानें सावित्रीचें ध्यान केलें, त्यामुळें त्याच्या शरीराचे दोन भाग झाले. स्त्रीरूपास शतरूपा म्हटलें असून पुरुषरूप ब्रह्मा होय ( मत्स्य. ३. ३०-३१ ). पण पुढें रुद्राचें अर्धनारीनरदेहीरूपहि वर्णिलें आहे ( मत्स्य. २६० ). पुरुष भागाचे अकरा रुद्र झाले ( विष्णु. १. ७; पद्म. सृ. ३ ). इतरांची प्रजा वाढेना, म्हणून त्यानें आपला देह नाहींसा करून एक पुरुष व दुसरी स्त्री असे दोन देह उत्पन्न केले ( ब्रह्मांड. २. ९. ४७ ). पण हा अभिमानापासून ( ब्रह्मांड. २. ९. २३ ), ललाटापासून ( भवि. ब्राह्म. ५७ ), मनापासून ( मत्स्य. ४. २७ ), क्रोधापासून ( भा. ३. १२. १० ) झाला. ब्रह्मा प्रजोत्पादनार्थ चिंतन करीत असतां त्याच्या मांडीवर अगोदर तांबडा असलेला, पण नंतर निळा झालेला पुत्र प्रकट झाला ( विष्णु. १. ८ २ ). पण हा शंकराच्याच वरानें त्याच्या मस्तकापासून झाला. यास पांच मुखें, दहा हात आणि तीन नेत्र होते ( स्कंद. ५.१.२ ).

हे कश्यप व सुरभि यांचे पुत्र ( ह. वं. १.३; ब्रह्म. ३. ४७-४८; शिव. रुद्र. १७ ). भूतकन्या सुरूपा हिचे पुत्र ( भा. ६. ६. १७ ). प्रभास व बृहस्पतिभगिनी यांचे पुत्र ( विष्णु. १. १५. २३ ). फक्त बाकींच्या ठिकाणीं नुसते एकादश रुद्र म्हणून संबोधिलें आहे ( म. आ. ६७. १०; १३२. ५; शां २०७. २१; अनु. २५५. १२ कुं.; भवि. ब्राह्म. १५९; स्कंद. ६. २७७; ७. १. ८७; पद्म. सृ. ४० ). हा रडत इकडे तिकडे धांवूं लागला. नंतर याच्या मागणीवरून ब्रह्मदेवानें यास पुढील नांवें व स्थानें दिलीं. अष्टरुद्र, त्यांचीं स्थानें, स्त्रिया व मुलें अनुक्रमें पुढें दिलीं आहेत. रुद्र, भव, शर्व, पशुपति, भीम, ईशान, उग्र, महादेव. स्थानें— सूर्य, जल, मही, वायु, अग्नि, आकाश, यज्ञीय ब्राह्मण व चंद्र. स्त्रिया—सुवर्चला, उषा ( उमा ), विकेशी, शिवा, स्वाहा ( स्वधा ), दिशा, दीक्षा व रोहिणी. संतति—शनैश्चर, शुक्र, मंगळ, मनोजव, स्कंद, स्वर्ग, संतान, बुध. याच ठिकाणीं पुनः रुद्राची स्त्री सती दिली आहे ( विष्णु. १.८; मार्क. ४९; पद्म.सृ. ३; वायु. १.२७; श. ब्रा. ६. १. ३ ). स्कंदांत वरील रुद्र कृतयुगांतले आहेत. भूतेश, नीलरुद्र, कपालिन, वृषवाहन, त्र्यंबक, महाकाल, भैरव, मृत्युंजय, कामेश व योगेश हे कलींतील अकरा रुद्र होत. हे रुद्र म्हणजे प्राण, अपान, व्यान, उदान, समान, नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय हे दहा वायु व अकरावा आत्मा मिळून झालेले होत ( स्कंद. ७. १. ८७ ).

यापेक्षां अगदीं वेगळीं नांवें आढळतात ( भा. ३. १२ ). शिवपुराणांत विष्णूप्रमाणेंच याचे दशावतार दिले असून त्यांच्या दहा स्त्रियाहि त्याच नांवाच्या दिलेल्या आहेत—महाकाल, तार, भुवनेश, श्रीविद्येश, भैरव, छिन्नमस्तक, भूमवत्, बगलामुख, मातंग, कमल ( रुद्र. १६ ). याचे एकंदर शंभर अवतार असून ते निरनिराळ्या कल्पांत झाले. प्रत्येक वेळीं त्याच्या वस्त्रादिकांचे रंग निरनिराळे असून पुत्रांचीं नांवेंहि निरनिराळीं दिलीं आहेत ( शिव. शत. ५; शिव पहा).

एकंदर रुद्र अकरा आहेत. पण या अकरांचीं सर्व पुराणांतील नांवें एकमेकांशीं जमत नाहींत. खालीं दिलेलीं नांवें फार ठिकाणीं सांपडतात. कंसांत त्यांबद्दल वापरलेलीं किंवा अंदाजानें वाटत असलेलीं नांवें दिलीं आहेत.

अजैकपात् ( अज, एकपात्, आपात् ), अहिर्बुध्न्य, ईश्वर ( सुरेश्वर, विश्वेश्वर, अपराजित, शास्तृ, त्वष्टृ ), कपालिन्, कपर्दिन्, त्र्यंबक ( दहन, दमन, उग्र, चण्ड, महातेजस् , विलोहित, हवन ), बहुरूप ( निंदित, निर्ऋति, महेश्वर ), पिनाकिन् ( भीम ), मृगव्याध ( रैवत, परंतप ), वृषाकपि ( विरूपाक्ष, भग ), स्थाणु ( शंभु, रुद्र, जयंत, महत् , अयोनिज, हर, भव, शर्व, ऋत, सर्वसंज्ञ, संध्य, सर्प ). कंसाबाहेर दिलेलीं नांवें कोणत्याहि एका यादींत सांपडणाऱ्याचीं नाहींत. पण तीं नांवें निदान पांचसहा ठिकाणीं तरी सांपडतात. बाकीचीं दोनतीन ठिकाणीं सांपडतात.

यास दक्षानें आपली कन्या सती ही दिली होती. तिच्या मागें यानें तिनेंच जन्म घेतलेल्या हिमाद्रिकन्या पार्वतीशीं लग्न केलें. यानें त्रैलोक्यांतील गंधर्व, किन्नर यांच्या स्त्रियांवर मोहिन्यस्त्रप्रयोग करून त्यांसह कैलासावर क्रीडा केली. हें पार्वतीनें जाणून क्षेमकरीच्या वेषानें येऊन त्या स्त्रियांस तिनें चोपलें व शाप दिला. त्यामुळें त्या चांडाळ व म्लेच्छ योनींत जन्मल्या (पद्म. सृ. ५६). एकदां ब्रह्मधानें एक सुंदर अप्सरा निर्माण केली. त्यामुळें हा मोहित झाला. पण पार्वती जवळ असल्यानें यास वळून पाहतां येईना, म्हणून दर्शनसुखाकरितां याला चारहि दिशांस चार तोंडें फुटलीं. हें नारदाकडून पार्वतीस कळलें, तेव्हां पार्वतीनें याचे डोळे झांकले. पण यास तृतीय नेत्र आला. म्हणून यास त्रिनेत्र व त्र्यंबक हीं नांवें मिळालीं ( स्कंद. ६. १५३ ). गंधमादन पर्वतावर पडत असलेली गंगा यानें जटेंत धारण केली ( पद्म. स्व. ३ ), म्हणून ही याची स्त्रीच असें लोक मानितात. सूर्याच्या प्रसादानें यास भवानी प्राप्त झाली ( भवि. ब्राह्म. ६३ ). यानें दक्षयज्ञाचा विध्वंस वीरभद्राकरवीं केला. ब्रह्मधाच्या पांचव्या मस्तकाचा भैरवाकरवीं उच्छेद केला ( शिव. वि. ग्या. १.८ ). हा उच्छेद यानें आपल्या डाव्या पायाच्या अंगठ्यानें केला. त्यामुळें यास ब्रह्महत्येचा दोष लागला, पण तो काशीस मार्गीस्थ झाला ( पद्म. सृ. १४ ). ब्रह्मधाच्या यज्ञांत हा कपाल घेऊन गेला व त्यामुळें यास तेथें अटकाव झाला. पण याच्या प्रभावामुळें यास यज्ञांत हविर्भाग मिळून शिवाय यास ब्रह्मधाच्या उत्तरेस जागा मिळाली ( पद्म. सृ. १७ ). समुद्रमंथनांतून निघालेलें हालाहल, पृथ्वीचा नाश होऊं लागला म्हणून हा प्याला. त्यामुळें याचा घसा निळा झाला व शांत वाटावें म्हणून त्या मंथनांतूनच निघालेला चंद्र यानें जटेंत धारण केला. त्यामुळें यास नीलकंठ व चंद्रशेखर हीं नांवें मिळालीं. विष्णूनें सांगितल्यावरून यानें कणाद, गौतम, शक्ति, उपमन्यु, जैमिनि, कपिल, दुर्वास, मृकंडु, बृहस्पति, भार्गव व जामदग्न्य या ऋषींच्या मनोवृत्ति तामसी केल्या. अमंगळ पदार्थ धारण करून कंकाल, शैव, पाषंड, महादेव हे पंथ निर्मिले ( पद्म. उ. २३५ ). ब्राह्मणांचा नाश करण्याच्या हेतूनें एक दैत्य हत्तीच्या रूपानें वाराणसींत आला; पण यानें त्यास ठार करून त्याचें कातडें वस्त्रासारखें पांघरिलें, म्हणून यास कृत्तिवासस् म्हटलें आहे ( पद्म. स्व. ३४ ). बलिप्रतिपदेच्या दिवशीं द्यूतांत पार्वतीनें यास जिंकिलें ( स्कंद. २. ४. १२ ). यानें आपल्या सात मुखांपैकीं अजमुख ब्रह्मधास व पितृमुख पितरांस दिलें ( स्कंद. ७. १. ५९ ). याच्या जाण्यायेण्यांनीं, स्नानादिकांनीं, यास उद्देशून कांहींनीं तपश्चर्या केल्या त्या ठिकाणीं व यानें कांहींचा उद्धार केल्यानें, त्या त्या स्थलीं हजारों तीर्थें उत्पन्न झालीं. देवांच्या यज्ञांत यास भाग न मिळाल्यामुळें यानें भगास एकाक्ष केलें, पूषास दंतहीन केलें, पुरोडाश खाल्ला आणि यज्ञास हरिणरूप घेऊन पळावयास लाविलें. पण ब्रह्मधाच्या मध्यस्थीनें यानें पुनः त्या सर्वांवर कृपा करून अभय दिलें ( विष्णुधर्म. १. २३४ ). यानें देवांच्या सेनापतित्वावर कार्तिकेयास अभिषेक केला ( विष्णुधर्म. १. २३३ ). तसेंच कांहीं कारणामुळें याचा मदन, भस्मासुर, वीरभद्र, त्रिपुर, अंधक, आडि, मणि, मल्ल, मार्कंडेय, जालंधर, दुर्वास बाण, परशुराम, राम, शत्रुघ्न, कृष्ण, जयद्रथ, अर्जुन यांशीं संबंध आलेला आहे. यानें त्रिमूर्तींतील दुर्वासाचा, नृसिंहाचा पराभव करण्याकरितां शरभाचा, मणिमल्लवधाकरितां मल्लारीचा असे आणखीहि अवतार घेतले. याच्या रूपासंबंधीं बरीच माहिती आहे. शंकराचें पंचमुखी, चतुर्मुखी ( विष्णुधर्म. ३. ४८; ४८; ५५; ११५ ) व अर्धनारीश्वर रूप आढळतें ( मत्स्य. २६० ). हा भूतपिशाचांचा अधिपति आहे. हा स्मशानांत राहतो. हा त्रिनेत्री, वृषभवाहन ( ध्वज ) आहे ( म. अनु. २०५-२०७ कुं. ). भूतपिशाचांचे जे गण आहेत, त्यांचे अधिपति, वीरभद्रादि हे सर्व याचेच पुत्र होत. यास पुष्कळ ठिकाणीं महाकाल म्हटलें असून पत्नी काली असें सांगतात.

ब्रह्मयानें प्रजोत्पादन करण्यास सांगितल्यावरून यानें अकाळ-विकाळ व आत्मसम अशी प्रजा उत्पन्न केली. शेवटीं ब्रह्मयानें अशी प्रजा निर्माण करण्यापासून यास निवृत्त केलें ( विष्णु. १. ७. ८; ब्रह्मांड. २. ९. ७९ ). याच्या भोळेपणाचीं उदाहरणेंहि बाण, भस्मासुर व रावण यांच्या बाबतींत दिसून येतात. लढाईंत मात्र हा सर्वदा मदतगार म्हणून देवांच्या बाजूनें असे. तरी पण याचीं नारायण, कृष्ण व सर्व देव यांच्याशीं तीन वेळां आपले हक्क प्रस्थापित करण्याकरितां युद्धें झालीं.

याचें मूळ वसतिस्थान मेरुपर्वत म्हणजे उत्तरध्रुव होय. याला मेरुधामा म्हणतात ( म. अनु. ४८. ९१ कुं. ). कृष्ण द्वैपायन व कैलासावर राहणारा कुबेर यांनीं मेरूवर याची उपासना केली ( म. अनु. ४९. २ कुं. ). पण कैलासाच्या पलीकडे असणाऱ्या मुंजवान् किंवा मूजवत् पर्वतावर हा राहत असे ( वायु. १. ४७. १९; वा. सं. ३. ६१). तसेंच कैलास व हिमालय यांवर हा राहत असे ( म. सौ. ६. ४२ कुं.; ब्रह्म. ३९. २२ ). हिमालय व मेरु एकच होत ( विष्णु. २. २ ).

२ वैवस्वत मनूंतील एक देवगण.

**रुद्रकेतु**—याच्या पुत्रांच्या देवांतक व नरांतक यांच्या पराक्रमानें संतुष्ट होऊन नारदानें याला पंचाक्षरी महाविद्येचा उपदेश केला. याच्या बायकोचें नांव शारदा (गणेश. क्री. २).

**रुद्रभूति द्राह्यायण**—हा त्रात ऐकमताचा शिष्य. याचा शिष्य शर्वदत्त गार्ग्य ( वं. ब्रा. १ ).

**रुद्रश्रेण्य**—( सो. सह.) हा मत्स्यमतें महिष्मत्‌चा पुत्र होय.

**रुद्रसावर्णि**—हा रुद्राचा पुत्र बाराव्या मन्वंतराचा अधिप होईल ( मार्क. ९१; विष्णु. ३. १ ). देवी भागवतानें हा तेरावा मनु दिला असून याचा अधिपति वैवस्वत मनुपुत्र पर्याति दिला आहे ( दे. भा. १०. १३; मनु पहा ). हा भव व दक्षकन्या सुव्रता यांचा पुत्र ( दक्ष पहा ). हा चाक्षुष मन्वंतरांतच जन्मला ( वायु. २. ३८. ४२ ). यास चवथा मेरुसावर्णिहि म्हटलें आहे.

**रुद्रसेन**—भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय राजा ( म. द्रो. १५८. ३८ कुं. ).

**रुधिक्रा**—याचा पिप्रुबरोबर उल्लेख आला आहे. याला इंद्रानें ठार केलें ( ऋ. २. १४. ५ ).

**रुधिराक्ष**—लवणासुराचा मामा ( कुशलव पहा ).

**रुधिराशन**—खर राक्षसाच्या बारा अमात्यांतील एक ( वा. रा. अर. २३. ३२ ).

**रुन्द्र**—हा क्षत्रिय असून ब्राह्मण झाला ( वायु. २. २९. ११४ ).

**रुम**—हें लोकांचें नांव असावें. यांचा राजा ऋणंचय नांवाचा होता. रुशम, श्यावक आणि कृप यांच्याबरोबर याचा उल्लेख आला आहे ( ऋ. ८. ४. ३ ).

**रुमण**—रामसेनेंतील नामांकित वानर.

**रुमण्वत्**—जमदग्नीपासून रेणुकेस झालेल्या पांच पुत्रांतील ज्येष्ठ. परशुरामाचा ज्येष्ठ भ्राता ( म. व. ११७. ११ कुं. ).

**रुमा**—पनस वानराची कन्या व सुग्रीवाची पत्नी (ब्रह्मांड. ३. ७. २२१ ). हिचें वालीनें हरण केलें होतें ( पद्म. पा. ११६ ). राम बिभीषणाला भेटण्याकरितां लंकेकडे चालला असतां मध्यंतरीं किष्किंधेंत उतरला. त्या वेळीं ही मोठ्या उत्सुकतेनें इतर वानरस्त्रियांसहित रामदर्शनास आली होती ( पद्म. सृ. ३८ ).

**रुरु**—भृगुकुलोत्पन्न प्रमिति ऋषीपासून घृताची अप्सरेला झालेला पुत्र ( म. अनु. ८. ६५ कुं. ). याच्या बायकोचें नांव प्रमद्वरा. एकदां ती झोंपेंत असतां सर्पदंश होऊन मरण पावली. तिला यानें आपलें अर्धें आयुष्य देऊन सजीव केलें. पण तेव्हांपासून साप पाहिला कीं मारावा, असा क्रम यानें सुरू केला. पुढें डुंडुभ नांवाच्या निर्विष सर्पाला हा मारूं लागला असतां त्यानें यास 'सर्प विषारी आहे कीं नाहीं याचा विचार करून तूं त्याला मारीत जा' असें सांगितलें. तो डुंडुभ पूर्वीचा सहस्रपात् ऋषि होता. शापानें ह्या योनीला आला होता. रुरूच्या दर्शनानें तो मुक्त झाला ( म. आ. ८-१२; दे. भा. २. ९ ). याचा पुत्र शुनक.

२ अष्टभैरवांतील दुसरा.

३ हिरण्याक्षाच्या वंशांतील एक असुर. याचा पुत्र दुर्गमासुर.

४ एक दैत्य. हा ब्रह्मदत्तवरानें महापराक्रमी होऊन पुढें यानें देवांवर चाल केली. तेव्हां देव पळाले व त्यांनीं शंकराच्या जटेपासून निघालेली एक शक्ति नीलपर्वतावर तप करीत होती, तेथें येऊन तिला रक्षणाची विनंति केली. मागून रुरुहि पाठलाग करीत आला. पुढें त्या शक्तीच्या हास्यापासून अनेक डाकिणी निर्माण झाल्या व त्यांनीं इतर सर्व दैत्यांचा नाश केला. रुरूला मात्र देवीनें पायाच्या अंगठ्याच्या नखानें ठार केलें. शिवानें ह्या डाकिनींना अनेक वर दिले व लोक त्यांना माता म्हणतील असें सांगितलें ( पद्म. सृ. ३१ ). रथंतरकल्पांत यानें त्रास दिल्यामुळें ऋषींपासून निघालेल्या कुमारींनीं याचा वध केला ( स्कंद. ७. १. २४२-२४७ ).

५ चाक्षुष मनूचा पुत्र.

६ सावर्णि मन्वंतरांतील कश्यपकुलोत्पन्न एक ऋषि.

७ ( सू. इ. ) विष्णुमतें अहीनगुपुत्र.

**रुरुक**—( सू. इ. ) हा विष्णु व वायु यांच्या मतें विजयपुत्र होय. अर्थशास्त्र व राजनीति यांत हा प्रवीण होता ( ह. वं. १. १३ ).

**रुशती**—ही अश्विनीं श्यावाला दिली होती ( ऋ. १. ११७. ८ ).

**रुशदश्व**—वसुमनस्‌चा पिता.

**रुशद्रथ**—( सो. अनु. ) भागवतमतें तितिक्षूचा पुत्र. यास मत्स्यांत वृषद्रथ व विष्णु आणि वायु यांत उषद्रथ म्हटलें आहे.

**रुशम**—इंद्राचा आश्रित ( ऋ. ८. ३. १३; ४. २; ५१. ९ ). ऋणंचय हा या लोकांचा राजा होता ( ऋ. ५. ३०. १२-१५ ). कौरम हा यांचा राजा होता असाहि उल्लेख आहे ( अ. वे. २०. १२७. १ ).

**रुशेकु**—( रुशाडु पहा ).

**रुशंगु**—( उशंगु पहा ).

**रुषद्गु**—( रुशाडु पहा ).

**रुशाडु**—यमसभेंतील एक राजा ( म. स. ८. १३ कुं. ).

**रुषाभानु**—हिरण्याक्षाची पत्नी ( भा. ७. २. १९ ).

**रुषार्द्धिक**—सुराष्ट्रांपैकीं एक. याच्या दुर्वर्तनामुळें यानें आपल्या आप्तेष्टांचा व ज्ञातिबांधवांचा नाश करून घेतला ( म. उ. ७३. ११-१४ कुं. ).

**रूपक**—एक राक्षस. याचा पुत्र संपति. हे दोघे अन्यायानें द्रव्य मिळवून त्याचा उपयोग शिवपूजेकडे करीत. त्यामुळें हे मेल्यावर यांना 'तुम्ही चोर व्हाल, परंतु शिवभक्ति घडून तुमचा उद्धार होईल,' असें वीरभद्रानें सांगितलें ( पद्म. पा. ११७ ).

**रूपवती**—त्रेतायुगामधील एक वेश्या. हिचा देवदास नांवाचा सोनार प्रियकर होता. वैशाखस्नानानें दोघेंहि मुक्त झालीं ( पद्म. पा. ९७ ).

**रूपि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**रेणु**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ७०; ८९ ). विश्वामित्राचा पुत्र ( ऐ. ब्रा. ७. १७. ७; सां. श्रौ. १५. २६. १ ). हा कुशिकगोत्री मंत्रकार होता.

२ ( सू. इ. ) प्रसेनजित्, प्रसेन व रेणु एकच होत. याची कन्या रेणुका. जमदग्नीची पत्नी होय ( भा. ९. १५. १२; म. व. ११७. कुं. ).

३ विश्वामित्राची स्त्री.

**रेणुका**—जमदग्नीची स्त्री व इक्ष्वाकुवंशीय रेणूची कन्या ( भा. ९. १५. १२; ह. वं. १. २७ ). इक्ष्वाकूला अनाव्रतु म्हटलें आहे ( रेणु. ५ ). दुसऱ्या ठिकाणीं ही सुवेणाची कन्या, असें सांगितलें आहे. हिला कामली असें नामांतर होतें (वायु. २. २९. ८७; ब्रह्म. १०.५१). भारतामध्यें पद्मापासून हिची उत्पत्ति झाली असून रेणु हा हिचा भ्राता व सोमप हा हिचा पिता, असा उल्लेख आढळतो ( म. अनु. ५३. २७ कुं. ). या ठिकाणीं सोमपानें हिचें पालन केलें, म्हणून तो हिचा पिता असावा असें वाटतें. रेणूनें कन्याकामेष्टि केली असतां ही यज्ञकुंडांतून उत्पन्न झाली ( रेणु. ३ ). अन्य ठिकाणीं प्रसेनजित् हिचा पिता होता, असें सांगितलें आहे ( म. व. ११६ ). ही विदर्भ राजाची मुलगी ( कालि. ८६ ). ही पूर्वजन्मीं अदिति होती, म्हणून इंद्रानें स्वयंवरप्रसंगीं हिला कामधेनु, कल्पतरु, चिंतामणि व परीस दिले ( रेणु. १३ ). हिनें भागीरथीक्षेत्रीं स्वयंवरांत जमदग्नीस वरिलें ( रेणु. ११ ).

हिला एकंदर पांच पुत्र होते. रुमण्वान्, सुषेण, वसु, विश्वावसु व परशुराम ( म. व. ११६; भा. ९. १६ ). रुमण्वान् व सुषेण यांच्या ऐवजीं बृहद्भानु व बृहत्कर्मन् अशींहि नांवें आहेत ( रेणु. १३ ). रुमण्वान्‌च्या ऐवजीं मरुत्वान् आहे ( कालि. ८६ ).

**रेणुमती**—( करेणुमती पहा ).

**रेपलेंद्र**—एक दैत्य ( वर्बरिक पहा ).

**रेभ**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ९७ ). कश्यपाच्या अवत्सार नामक पुत्राच्या पुत्रांतील कनिष्ठ ( अवत्सार पहा ). असुरांनीं याला बांधून विहिरींत टाकिलें होतें ( ऋ. १. ११२. ५ ). याला बांधून नऊ दिवस आणि दहा रात्री पाण्यांत टाकिलें होतें; तेथून अश्वींनीं यांचा उद्धार केला ( ऋ. १. ११६. २४ ). पाण्यांत पडलेल्या रेभाचा उद्धार केला (ऋ. १. ११७. ४). गुहेंत ठेवल्यामुळें हा मरावयास टेंकला होता ( ऋ. १०. ३९. ९ ).

**रैव**—( सू. शर्याति. ) हरिवंश, भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें आनर्ताचा पुत्र, पद्मांत याला आनर्ताचा नातू व रोचमानाचा पुत्र म्हटलें आहे. भागवत व विष्णु यांत यास रेवत म्हटलें आहे. याला रैव म्हटलें आहे ( ब्रह्म. ७. २८ ). याला ककुद्मिन् रैवत वगैरे शंभर पुत्र झाले. यानें समुद्रामध्यें कुशस्थली नांवाची नगरी स्थापून आपली राजधानी केली ( भा. ९. ३. २८ ). तीच पुढें द्वारका झाली.

**रैवत**—( सो. कुकुर. ) हा वायुमतें कपोतरोमापुत्र होय.

२ ( रैव पहा ).

३ एकादश रुद्रांपैकीं एक.

**रेवती**—ऋतवान् मुनीस तो अत्यंत धर्मशील असूनहि रेवती नक्षत्रावर एक पुत्र झाला. तो दुःशील जन्मला. तेव्हां त्यानें गर्गास याबद्दल विचारिलें. कारण कळतांच ऋतवाच्नें रेवतीनक्षत्रास शापून खालीं पाडिलें. त्याचें एक सरोवर बनलें. त्यापासून एक कन्या झाली. हिचें प्रमुच मुनीनें पालन केलें; व त्यानें ही विक्रमशील व कालिंदी यांचा पुत्र दुर्गम यास दिली. ही लग्नसमयीं रेवती नक्षत्रावरच ' माझें लग्न करावें ' असें म्हणाली. त्याप्रमाणें तपःप्रभावानें प्रमुचानें त्या नक्षत्रीं हिचा विवाह केला व ' मन्वंतराधिप व धर्मवेत्ता पुत्र होईल ' असा अशीर्वाद दिला. पुढें हिला रैवत नामक मनु झाला ( मार्क. ७२ ).

२ भरद्वाजाची बहीण. भरद्वाजानें आपल्या कठ नांवाच्या शिष्यास ही दिली ( ब्रह्म. १२१ ).

३ रेवतपुत्र ककुद्मीची कन्या व बलरामाची पत्नी. ही बलरामापेक्षां वयानें मोठी होती ( पद्म. भू. १०३ ).

४ मित्र आदित्याची पत्नी ( भा. ६. १८. ६ ).

**रेवन्त**—संज्ञा व सूर्य यांचा अश्वावस्थेंतील पुत्र. याला गुह्यकांचें आधिपत्य दिलें ( मार्क. १०३ ). याला अश्वांचें आधिपत्य दिलें ( भवि. ब्राह्म. ७९; १२४ ).

**रैवाग्नि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**रेवोत्तरस्**—पाटव चाक्र स्थपतीचें हें नांव आहे.

**रैक्व**—एक ज्ञानी ब्राह्मण. जानश्रुति पौत्रायणाला आपल्या दानशूरत्वामुळें गर्व झाला होता; पण दोन हंसांच्या संवादांत सर्व श्रेष्ठ म्हणून रैक्काचें नांव त्याच्या कानावर आलें. तेव्हां जानश्रुतीचा गर्वपरिहार होऊन तो रैक्काला शोधीत असतां त्याला हा गांवांत किंवा नदीकांठीं न आढळतां एका गाडीखालीं खरूज खाजवीत बसलेला आढळला. जानश्रुतीनें याला दक्षिणा दिली. पण ती न स्वीकारितां उलट यानें स्वतःची गाडी जानश्रुतीला दिली. पण पुष्कळ दक्षिणा व मुलगी पत्नी म्हणून दिल्यावर जानश्रुतीला यानें तत्त्वज्ञान सांगितलें. रैक्काला जानश्रुतीनें दिलेले गांव महाव्रृष देशांत रैक्कपर्ण नांवानें प्रसिद्ध होते ( छां. उ. ४. १. २; स्कंद. ३. १. २६ ). यानें गीतेच्या सहाव्या अध्यायाच्या पठनानें शांति प्राप्त केली म्हणून यानें जानश्रुतीला त्याचें पठन करण्यास सांगितलें ( पद्म. उ. १८० ).

**रैभ्य**—एक आचार्य. पौतिष्यायण व कौण्डिन्यायन हे याचे गुरु होते ( श. ब्रा. १४. ७. ३. २८ ). हा कश्यपगोत्री मंत्रकार होता.

२ विश्वामित्राचा पुत्र ( म. शां. ४८. ५७ कुं. ). हा भरद्वाजाचा मित्र असून याला अर्वावसु व परावसु नांवाचे दोन पुत्र होते ( म. व. १३७. १२-१३ कुं. ). याचा मुलगा परावसु यानें रैभ्याला मृग समजून ठार केलें. पण याला पुनः त्यानें जिवंत केलें ( म. व. १४० कुं.; स्कंद. ३. १. ३३ ). युधिष्ठिर याच्या आश्रमांत गेला होता (म. व. १३७.९ कुं.).

३ ( सो. पुरूरवस्. ) हा भागवतमतें सुमतिपुत्र होय.

४ हा ब्रह्मपुत्र होय. यानें वसु व अंगिरस् यांसह बृहस्पतीकडे जाऊन कर्मानें मोक्ष मिळतो कीं ज्ञानानें असा खुलासा विचारिला. नंतर गयेस यानें तपश्चर्या केली. याची सनत्कुमारांशीं गांठ पडली होती ( वराह. ७ ). उर्वशी याच्या तपाला विघ्न करण्यास आली असतां यानें कुरूप होण्याचा तिला शाप दिला व योगिनीकुंडांत स्नान केल्यावर पूर्वरूपप्राप्तीचा वर दिला. त्यामुळें योगिनीकुंड उर्वशीकुंड झालें (स्कंद. २. ८. ७).

५ रैवत मन्वंतरांतील भूतरजसांतील एक देवगण.

**रैवत**—(स्वा. प्रिय.) भागवतमतें हा प्रियव्रताचा पुत्र व तामसाचा भाऊ. विष्णुपुराण यास प्रियव्रताचा वंशज म्हणतें ( विष्णु. ३. १. २४; १ रेवती पहा ). बीजमंत्राचा जप करून यानें वर्णाश्रमधर्माचे विभाग व व्यवस्था केली. शेवटीं हा इंद्रलोकीं गेला ( दे. भा. १०.८). हा पंचम मन्वंतराधिप मनु होय ( मनु पहा ).

२ एकादश रुद्रांतील एक.

३ ( सू. शर्याति. ) हा रेवताचा पुत्र. यालाच ककुद्मिन् असें नांव आहे.

**रैवस**—भृगुकुलांतील प्रवर.

**रोचन**—हा भागवतमतें यज्ञ व दक्षिणा यांचा पुत्र होय. स्वारोचिषांत हा इंद्र होता.

२ तुषित देवगणांतील एक.

**रोचना**—देवक राजाची कन्या व वसुदेवाची पत्नी. हिचे पुत्र हेम व हेमांगद ( भा. ९. २४. ४५ ).

२ रुक्मीची नात व अनिरुद्धाची पत्नी. हिचा पुत्र वज्र. हिच्या विवाहांत भोजकटपुरास उभयपक्षांचीं माणसें जमलीं असतां कलिंगानें रुक्मीस द्यूत खेळण्यास उत्तेजन दिलें. बलरामाला द्यूताचा नाद भारी. खोटें खेळून रुक्मीनें बलरामाचें सर्व जिंकिलें. पण शेवटीं एकदां बलरामानें जिंकिलें असूनहि कलिंगादि नाहीं म्हणूं लागले. तेव्हां बलरामानें कलिंगाचे दांत पाडिले व रुक्मीला ठार केलें (भा.१०.६५).

**रोचनामुख**—या राक्षसास गरुडानें ठार केलें ( म. उ. १०५ ).

**रोचमान**—उरगपुरचा राजा. अर्जुन राजसूय यज्ञाच्या वेळीं दिग्विजयार्थ गेला असतां त्यानें याचा पराजय केला होता ( म. स. २८. १९ कुं. ).

२ ( सो. वसु. ) हा मत्स्यमतें वसुदेवाला उपदेवीचे ठिकाणीं झालेला पुत्र होय.

३ अश्वमेध नगराचा राजा. एक पांचाल. हा द्रौपदीस्वयंवरास आला होता ( म. आ. २०१. १० कुं.). यास राजसूयकालीं भीमानें जिंकिलें होतें ( म. स. ३०.८ कुं. ). हा भारतीय युद्धांत पांडवांकडे होता ( म. उ. १७२. १ कुं. ). याला कर्णानें ठार केलें ( म. क. ५१. ५० कुं. ). याचे घोडे निळ्या रंगाचे व पांढऱ्या ठिपक्यांचे होते ( म. द्रो. २३ ). याचा पुत्र हेमवर्ण ( म. द्रो. २३. ६८ कुं. ).

४ ( सू. शर्याति. ) आनर्ताचा पुत्र.

५ या नांवाचे दोन राजे द्रोणानें ठार केले ( म. क. ६ ).

६ विश्वेदेवांपैकीं एक.

**रोचिष्मत्**—स्वारोचिष मनूच्या पुत्रांतील एक.

**रोधक**—पर्युषित, सूचक ( सूचिमुख ), शीघ्रग ( शीघ्रक ), रोधक ( रोहक ), लेखक, वाग्दुष्ट, विदैवत व नित्यवाचक अशीं दुष्कर्मे करणाऱ्या पुरुषांना पिशाचयोनींत प्राप्त झालेली हीं नांवें आहेत. यांपैकीं पहिल्या पांचांचा पृथुनामक वेदवेत्त्या ब्राह्मणाच्या नीतीपर भाषणानें उद्धार झाला. शिवाय दुसरी हकीकत अशी आहे कीं, या आठहि जणांचा मुनिशर्मा ब्राह्मणानें यांना वैशाखस्नान घालून उद्धार केला ( पद्म. स. ३२; पा. ९४ ).

**रोमपाद**—( सो. अनु. ) धर्मरथ अथवा बृहद्रथ राजाचा पुत्र. यास लोमपाद अथवा चित्ररथ अशींहि नांवें आहेत. हा महाधनुर्धारी असून अंगदेशाचा राजा होता ( वा. रा. बा. १३ ). हा दशरथाचा परम स्नेही होता ( म. व. १११ ). रोमपादास चतुरंग नांवाचा पुत्र व शांता नांवाची एक कन्या होती. ती शांता यानें ऋष्यशृंगास दिली होती ( म. व. ११४; शां. २४०. ३४; अनु. २००. २५ कुं.). याची राजधानी चंपा (म. व. ११४. १५ कुं.). याला दशरथ असें नामांतर होतें ( ह. वं. १.३१ ).

२ ( सो. क्रोष्टु. ) विदर्भ राजाच्या तीन पुत्रांतील कनिष्ठ.

**रोमशा**—कक्षीवताचा आश्रयदाता भाव्य किंवा भावयव्य याची ही स्त्री. रोमशा-भावयव्यसंवाद ऋग्वेदांत आला आहे. तेथें हिच्या अंगावर मेंढीसारखे केंस असल्याचें वर्णन आहे ( ऋ. १. १२६; बृहद्दे. ३. १५६ ).

**रोमहर्षण**—पुराणें सांगणारा सूतकुलोत्पन्न मुनि. हा क्षत्रियापासून विप्रकन्येला झाला. हा आपल्या वक्तृत्वशक्तीनें श्रोत्यांच्या अंतःकरणास सद्गदित करून शरीरावर रोमांच उभे करीत असे, म्हणून यास रोमहर्षण किंवा लोमहर्षण हें नांव पडलें. याबद्दल पुढील श्लोक आढळतो—

लोमानि हर्षयांचक्रे श्रोतॄणां यत् सुभाषितैः ।
कर्मणा प्रथितस्तेन लोकेऽस्मिँल्लोमहर्षणः॥ वायु. १. १. १३

हा व्यासाचा आवडता पांचवा शिष्य होता; म्हणून व्यासानें यास इतिहास व पुराण हीं संपूर्ण शिकविलीं. त्यांत यानें चांगलें प्रावीण्य मिळविलें; हें यास लावण्यांत आलेल्या पुराणिक ( म. आ. १; वायु. १. ४५; २. ४ ), पौराणिकोत्तम ( लिंग. १. ७१; ९९ ), या पदव्यांवरून दिसतें. व्यासानें दिलेल्या ज्ञानाची यानें चांगली जोपासना केली व इतिहास व पुराण समग्र शिकून त्यांचा प्रसार केला ( भा. १. ४. २२; विष्णु. ३. ४. १०; वायु. १. ६०. १६; पद्म. सृ. १; अग्नि. २७१; ब्रह्मांड. २. ३४; कूर्म. १. ५२ ).

यानें सहा पुराणसंहिता केल्या. याचे सहा शिष्य अग्निपुराणांत दिले आहेत. सुमति, अग्निवर्चस्, मित्रेयु, शिंशपायन, कृतव्रत व सावर्णि. या सहा शिष्यांनीं पुराणसंहिता केल्या ( २७१. ११-१२ ). आत्रेय सुमति, काश्यप अकृतव्रण, भारद्वाज अग्निवर्चस्, वासिष्ठ मित्रेयु, सावर्णि सोमदत्ति व सुशर्मन् शांशपायन, यांना रोमहर्षणानें स्वतः सहा भागांत विभागून केलेली पुराणसंहिता शिकविली. त्यांतील तिघांनीं म्हणजे काश्यप, सावर्णि व शांशपायन यांनीं निराळ्या संहिता केल्या. जेव्हां व्यासानें एक मोठें आदिपुराण रचिलें, तेव्हां तें रोमहर्षणानें आपला पुत्र उग्रश्रवस् याला शिकविलें ( व्यास, सूत व सौति पहा ). या सहा शिष्यांतील पांच ब्राह्मण असावेत. व्यासानें आदिपुराणाची सुरुवात केली असावी आणि हा व याचे शिष्य यांनीं तें संपविलें असावें.

मयसभाप्रवेशकालीं हा पुत्रासह धर्मराजापाशीं उपस्थित असून त्यास कथा सांगत होता ( म. स. ४ ).

एकदां नैमिषारण्यांत याच्या नेतृत्वाखालीं एका सत्रांत पुराणचर्चा चालू असतां तेथें तीर्थयात्रा करीत बलराम आला, त्याला सर्वांनीं उत्थापन दिलें. पण हा व्रतस्थ असल्यामुळें यानें दिलें नाहीं; तेव्हां बलरामानें 'हा ब्राह्मणांहून नीच व प्रतिलोमज असून इतका अहंमन्य कां?' असें म्हणून त्यानें यास ठार मारिलें. नंतर 'आतां पुराण कोण सांगणार?' असा ऋषिमंडळींनीं प्रश्न विचारिला असतां 'हा उग्रश्रवा पित्याऐवजीं पुराण सांगेल' असें बलरामानें सांगितलें ( भा. १०. ७८-७९ ).

याला बलरामानें आषाढ शुद्ध द्वादशीला मारिलें. पहिल्या सूतानें साडेदहा पुराणें सांगितलीं व त्याच्या मृत्यूनंतर दुसऱ्या सूतानें साडेसात सांगितलीं. याच्यापासून शुक, विष्णुभागवत शिकला ( पद्म. उ. १९८ ).

यानें व्यासापासून पुराणांचें अध्ययन केलें होतें व प्रत्यक्ष व्यासाशीं याचा संबंध होता; म्हणून कुरुक्षेत्रांतील दीर्घसत्रांत

हा आला असतां इतर मुनींनीं याचा गौरव केला आहे (वायु. १. ४. २; ब्रह्मांड. १. ३३). पण नैमिषारण्यांत साठ हजार लोक एकत्र झाले असतां शौनकानें याची थोरवी गाईल्यावरून याच्या सिद्धाश्रमांत सर्व आले. तेथें याचा अग्निष्टोम यज्ञ चालू होता. तेथें यानें नारदानें सनत्कुमाराला सांगितलेलें पुराण सांगितलें (नारद. १. १-२). व्यासाकडून मिळालेलें गरुडपुराण यानें शौनकादिकांस सांगितलें (गरुड. १. १). ब्रह्मवैवर्तमात्र सौतीनें सिद्धाश्रमांतून नारायणाला जातांना नैमिषारण्यांत सांगितलें आहे (ब्रह्मवै. १. १. ३८). नैमिषारण्यांत कुरुक्षेत्रांत दृषद्वतीच्या कांठीं दीर्घसत्रांत येऊन यानें वायु व ब्रह्मांड सांगितलें (वायु. १. १. ११-१२. ब्रह्मांड. १. १. १७). नैमिषारण्यांतील द्वादशवार्षिक सत्रांत ऋषींनीं प्रश्न केला म्हणून यानें ब्रह्मपुराण सांगितलें (ब्रह्म. १.).

वरील माहितीवरून पुराण सांगण्याचें स्थल व आश्रम याचीहि कल्पना येते. भारतीय युद्ध चालू असतां बलराम तीर्थयात्रा करीत होता व त्याच वेळीं त्यानें रोमहर्षण सूतास मारिलें यामुळें द्वादशवार्षिक सत्र, भारतीय युद्ध व पुराणकथन हें सर्व एकाच कालीं व स्थलीं चालू होतें असा अर्थ निघतो. कोणता राजा राज्य करीत असतां पुराण लिहिलें गेलें हें वायु वगैरे कांहीं पुराणांत नमूद आहे. त्याशीं हें जमत नाहीं. तसेंच व्यासाचें प्रत्यक्ष दर्शन घडल्याबद्दल रोमहर्षणाचें केलेलें कौतुकहि व्यास असतांना चमत्कारिक वाटतें (व्यास पहा).

वैन्य पृथूच्या यज्ञांत सुत्येच्या दिवशीं प्रथम मिश्र जातीचा सूत उत्पन्न झाला. ऐन्द्र हवींत बृहस्पतीचा हवि एकत्र केला आणि तो इन्द्राला अर्पण केला, त्या दोषामुळें सूताची उत्पत्ति झाली. कारण शिष्याच्या हवींत गुरूचा हवि मिसळला गेल्यामुळें दोष उत्पन्न झाला. त्यामुळें क्षत्रियापासून ब्राह्मण स्त्रीचे ठिकाणीं सूताची उत्पत्ति झाली. याचा क्षत्रियवृत्तीनें राहणें हा मध्यम प्रतीचा धर्म आहे. रथ, हत्ती व घोडे यांवर काम करणें हा अधम धर्म धरला आहे. याचें मुख्य काम—

स्वधर्म एष सूतस्य सद्भिर्दृष्टः पुरातनैः ।
देवतानामृषीणां च राज्ञां चामिततेजसाम् ।
वंशानां धारणं कार्यं श्रुतानां च महात्मनाम् ।
इतिहासपुराणेषु दिष्टा ये ब्रह्मवादिभिः ।
न हि वेदेष्वधीकार कश्चित् सूतस्य दृश्यते ।

(वायु. १. १.२६-२८; पद्म. सृ. २८).

याला उद्देशूनच हें लिहिलें आहे. सूत हे अत्यंत प्राचीन लोकांकरितां असून मागध मृताकरितां व बंदिन् हा वर्ग वर्तमान लोकांकरितां आहे (जै. अ. ५५. ४४-४१).

**रोहक**—(रोधक पहा).

**रोहिणी**—प्राचेतस दक्षाच्या साठ कन्यांतील ही एक असून सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक. हिच्यावर सोमाचें अत्यंत प्रेम असे. त्यामुळें इतर स्त्रिया स्वाभाविकच याबद्दल तक्रार करीत. दक्षानेंहि सोमाला समजाविलें. पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. हिला सोमापासून बुध नांवाचा पुत्र झाला. तेव्हां सवतींच्या तक्रारींवरून दक्षानें सोमाला 'क्षयरोगी होशील' म्हणून शाप दिला (म. श. ३६.५ कुं.). अशीच गोष्ट शिवपुराणांतहि आहे (कोटि. १४). हिला गौरीव्रतानें आकाशांत अक्षय्यस्थान मिळालें (भवि. ब्राह्म. २१). हिला सुरूपा, हंसकाली, भद्रा व कामदुघा अशा चार कन्या होत्या.

२ वसुदेवाच्या स्त्रियांतील एक. हिच्या मुलाचें नांव बलराम (म. मौ. ८. १८ कुं.; भा. ९. २४. ४५; पद्म. सृ. १३). देवकीच्या उदरांतील गर्भ योगमायेनें हिच्या उदरांत घातला होता. ही त्या वेळीं गोकुळांत राहत असे (भा. १०. ५. ७; वसुदेव पहा).

३ कृष्णाच्या स्त्रियांपैकीं एक.

४ कश्यप व सुरभि यांची कन्या. हिचीं अपत्यें द्विशफ प्राणी व रुद्र हीं होत.

**रोहित**—(सू. इ.) हरिश्चंद्राचा पुत्र. याला विष्णुमतें रोहिताश्व व मार्कंडेयमतें रोहितास्य म्हटलें आहे (मार्क. २. ७-९). याच्या आईचें नांव तारामती. वैदिक ग्रंथांतहि शुनःशेपाच्या प्रसिद्ध गोष्टींत हरिश्चंद्राच्या मुलाचें हें नांव आहे (ऐ. ब्रा. ७. १४; सां. श्रौ. १५. १८. ८). वरुणाच्या कृपेनें तारामतीला हा पुत्र झाला. याच कारणाकरितां वरुणाला हा बलि देण्याचें हरिश्चंद्रानें कबूल केलें होतें. परंतु त्यानें टाळाटाळ केली. हें याला समजतांच आपलें धनुष्य घेऊन हा रानांत पळून गेला. परंतु वरुणाच्या अवकृपेनें बापास उदररोग झाला असतां हा परत आला. तथापि यास देवराज वसिष्ठानें हांकून दिलें. अशीं बावीस वर्षें गेल्यावर यानें अजीगर्त ऋषीचा मधला मुलगा शुनःशेप यास आपल्याऐवजीं बलि देण्याकरितां १०० गाई देऊन विकत घेतला (शुनःशेप पहा).

लहानपणीं मरणाच्या भयानें पळून जावें लागल्यामुळें याचीं पहिलीं बावीस वर्षें फुकट गेलीं. त्या अवधींत हा उपाशीतापाशीं रानोमाळ भटकत होता. पण पुढें शुनःशेप बलि देण्यासाठीं आणून दिल्यावर घरीं आला.

विश्वामित्राची दक्षिणा पुरी करण्यासाठा हरिश्चंद्रानें यास काशींत एका वृद्ध ब्राह्मणास विकिलें होतें (मार्क. ७). हरिश्चंद्राच्या सत्त्वपरीक्षेंत यास सर्पदंशानें मरण आलें. परतु देवकृपेनें हा जिवंत झाला (दे. भा. ७.२६).

याचें लग्न चंद्रवतीशीं झालें. हा हरिश्चंद्राचे मागून अयोध्येचा राजा झाला. यानें किल्ला असलेलें रोहितपूर या

नांवाचें एक शहर वसविलें. तेथें बरींच वर्षे राज्य करून सुखोपभोगहि पुष्कळ घेतला. शेवटीं वैराग्य उत्पन्न होऊन यानें रोहितपूर ब्राह्मणास देऊन टाकिलें व हा स्वर्गास गेला. याचा पुत्र हरित ( ह. वं. १. १३ ).

२ लोहित ऋषि ( विश्वामित्र पहा ).

**रोहितक**—लोहितक देशाचा यवन राजा. यास कर्णानें दिग्विजयप्रसंगीं जिंकिलें होतें ( म. व. २५४ ).

**रोहिताश्व**—( सो. वसु. ). हा वसुदेवाला रोहिणीचे ठिकाणीं झालेला पुत्र.

२ ( १ रोहित पहा ).

**रोहितास्य**—( रोहित पहा ).

**रौक्मायण** ( णि )—एक ब्रह्मर्षि ( ३ भृगु पहा ).

**रौक्मिणेय**—हा द्रौपदीस्वयंवरास उपस्थित होता ( म. आ. २०१. १७ कुं. ).

**रौक्षक**—विश्वामित्राच्या कुलांतील ऋषि व त्याचें कुल.

**रौच्य**—रुचि व मालिनी यांचा पुत्र. ( मार्के. ९५. ७; मनु. पहा ). याला देवसावर्णिहि म्हणतात ( ब्रह्मवै. २. ५४; भा. ८. १ ).

**रौद्र**—शुक्राचार्याच्या चार पुत्रांतील एक.

**रौद्रकर्मन्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. याला भीमानें ठार मारिलें ( म. द्रो. १२७. ४४ कुं. ).

**रौद्रकेतु**—अंगदेशाचा ब्राह्मण. याची बायको शारदा; पुत्र नरान्तक व देवान्तक.

**रौद्राश्व**—(सो. पुरूरवस्.) पूरूचा पुत्र. याच्या आईचें नांव पौष्टी. याला प्रवीर व ईश्वर असे दोन भाऊ होते. याला मिश्रकेशी अप्सरेचे ठिकाणीं ऋचेयुप्रभृति दहा पुत्र झाले ( म. आ. ८८. ४-११ कुं. ). याची स्त्री घृताची अप्सरा ( वायु. २. ३७. ११९; ह. वं. १.३१; मत्स्य. ४९. ४; भा. ९. २०. ५ ).

२ ( सो. पुरूरवस्. ) वायुमतें संजातिपुत्र पण भागवत व विष्णु यांच्या मतें अहंयाति पुत्र.

३ कात्यायनाचा शिष्य. महिषासुर स्त्रीरूपानें याच्या तपाला विघ्न करूं लागल्यानें यानें त्यास ‘ स्त्री तुझा वध करील ’ असा शाप दिला ( कालि. ६२ ).

**रौपसेवकि**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**रौरालय**—( शैलालय पहा ).

**रौहिण**—विश्वामित्रकुलांतील एक ऋषि व त्याचा वंश.

२ इंद्राच्या शत्रूंपैकीं एक राक्षस ( ऋ. १. १०३. २; २. १२. १२; अ. वे. २०. १२८. १३ ).

**रौहिण वासिष्ठ**—रोहिणी नक्षत्रावर जन्मलेला वसिष्ठाचा वंशज ( तै. आ. १. १२. ५ ).

**रौहिणायन**—प्रियव्रताचें हें पैतृक नांव आहे ( श. ब्रा. १०. ३. ५. १४ ). शौनकाचा शिष्य असलेल्या आचार्याचें नांव म्हणूनहि हा शब्द आला आहे ( श. ब्रा. १४. ७. ३. २६ ).

**रौहिण्यायनि**—अंगिराकुलांतील गोत्रकार गण.

**रौहित्यायनि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**रौहिदश्व**—( वसुमनस् पहा ).

# ल

**लकुलिन्**—वाराहकल्पांत वैवस्वत मन्वंतराच्या अठ्ठाविसाव्या चौकडींत पराशरसुत हरि द्वैपायन हा व्यास असतां व वसुदेवाचा पुत्र कृष्ण षष्ठांशानें अवतरला असतां, कलीच्य आरंभीं लकुलिन् नांवाचा शिवाचा अवतार होय हा स्मशानांत टाकलेल्या एका प्रेताच्या शरीरांत योगमायेनें प्रवेश करील; व दिव्य अशा मेरु पर्वताच्या गुहेंत विष्णूसह राहील. तेथें कायावतार नांवाचें सिद्धक्षेत्र बनेल. तेथें याचे पुढीलप्रमाणें चार शिष्य असतील:—१ कुशिक, २ गर्ग, ३ मित्र, ४ रौरुष्य. हे जातीनें ब्राह्मण, वेदवेत्ते आणि ऊर्ध्वरेते असतील ( शिव. शत. ५ ).

**लक्षणा**—दुष्यंताची पहिली स्त्री ( म. आ. ८८. १८ कुं. ). हिला लाक्षी असें दुसरें नांव असून जनमेजय नांवाचा पुत्र होता ( म. आ. ६३. ३० कुं. ).

२ एक अप्सरा ( म. आ. १३२. ४४ कुं. ).

३ कृष्णाची स्त्री. मद्राधीशकन्या ( २ लक्ष्मणा पहा ).

**लक्ष्मण**—(सू. इ.) हा दशरथाला सुमित्रेपासून झालेला वडील मुलगा. याच्या धाकट्या भावाचें नांव शत्रुघ्न ( म. व. २७५. ६-८ कुं. ). विश्वामित्रानें यज्ञसंरक्षणार्थ रामाबरोबर यालाहि नेलें होतें. वाटेंत त्यानें यांना आदर्श क्षत्रिय बनविण्याकरितां अनेक शस्त्रास्त्रांचें शिक्षण दिलें.

सीरध्वज जनकाच्या उर्मिला नांवाच्या कन्येशीं याचें लग्न झालें ( वा. रा. बा. १८; ७३ ).

वनवासाला निघते वेळींच यानें रामाला सांगितलें होतें कीं ' मी धनुष्य सज्ज ठेवून व कुदळखोरें बरोबर घेऊन तुम्हांला मार्ग दाखविण्याकरितां तुमच्या पुढें राहीन. वनांतील कंद, मुळें, फळें व तपस्व्यांना होमाकरितां लागणारे पदार्थ तुम्हांला नित्य आणून देत जाईन. तुम्ही जागे असतां व निजल्यावरहि मी सर्व कांहीं करीन ' ( वा. रा. अयो. ३१. २५-२७ ).

पुढें खरादिकांशीं रामाचें युद्ध झालें, त्या वेळीं हा सीतेला घेऊन एका गुहेंत जाऊन बसला होता. तसेंच मायामृगाचे शोधार्थ राम गेला, त्या वेळीं पर्णकुटिकेंत हा सीतेच्या संरक्षणार्थ राहिला. सीता याला फारच टाकून बोलल्यामुळें हा रामाकडे निघून गेला व इकडे रावणाला सीता पळविणें सोईचें झालें ( वा. रा. अर. ४६. ३५ ). बाकी यानें एकंदर भोंवतालचें राक्षसांचें प्राबल्य पाहून हें भविष्य पूर्वीच वर्तविलें होतें ( वा. रा. अर. ४५. ३४ ). याच्या अंगचा धोरणीपणा मायामृग ओळखण्याच्या कामीं चांगलाच प्रत्ययास आला.

यमुना नदीवरून पलीकडे जातांना यमुनाउतार आढळेना. तेव्हां यानें झाडाच्या फांद्या तोडून एक तर तयार केली व त्यावरून सर्व यमुना पार झाली. चित्रकूटावरील पर्णशाला यानें स्वतः बांधिली होती. तसेंच पंचवटींतील विस्तृत पर्णशाला यानेंच बांधिली. चित्रकूटावरील आश्रमापासून पाणी लांब होतें. तें आणतांना मार्ग चुकूं नये म्हणून यानें वृक्षावर खुणेकरितां वल्कलें बांधून ठेवलीं होतीं ( वा. रा. अयो. ९९. १० ).

पुढें सीताशोधार्थ हा व राम निघाले असतां ऋष्यमूकपर्वतावर आल्यावर सीतेनें आपल्या उत्तरीयांत बांधून टाकलेले अलंकार वानरांनीं जपून ठेविले होते, ते याला दाखवितां, यास फक्त तिचीं नूपुरें तेवढीं ओळखीचीं दिसलीं. ' नाहं जानामि केयूरे, नाहं जानामि कुंडले । नूपुरे त्वभिजानामि नित्यं पादाभिवंदनात् ।।' ( वा. रा. किं. ६ ). ' मला कर्णभूषणें किंवा बाहुभूषणें ओळखतां येत नाहींत, पण दररोज नमस्कार करितांना पाहिल्यामुळें पादभूषणें तेवढीं मी ओळखतों.' यावरून लक्ष्मणाच्या वागण्याची पद्धत ध्यानीं येते.

रामरावणयुद्ध सुरू झाल्यावर इंद्रजिताशीं युद्ध करीत असतां हा शरबंधांत बद्ध झाला होता. त्या वेळीं रामानें यासंबंधीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेतः ' अहो, शोधूं लागलें असतां या मर्त्य लोकामध्यें सीतेसारखी स्त्री मिळणें शक्य आहे; परंतु युद्धामध्यें निपुण असून मंत्र्यासारखें काम करणारा लक्ष्मणासारखा भ्राता मात्र मिळणें शक्य नाहीं ' ( वा. रा. यु. ४९. ६ ). शेवटीं यानेंच इंद्रजितास मारिलें ( म. व. २९० कुं. ):

हा अयोध्या सोडल्यापासून आहारनिद्रारहित होता. बारा वर्षें आहारनिद्रारहित असणाऱ्या मनुष्याकडून इंद्रजिताला मृत्यु येण्याचा ब्रह्मदेवाकडून वर असल्यामुळें तसा असणारा लक्ष्मण त्याला मारूं शकला ( आ. रा. सार. ११ ).

शिवाय याचें अतिकाय, विरूपाक्ष आणि रावण यांच्याशीं प्रत्यक्ष युद्ध झालें. पहिल्या दोघांना तर यानें युद्धांत ठार केलें. विशेषतः इंद्रजित् मारिल्यानें यानें युद्धाचा भार पुष्कळच हलका केला. इंद्रजित् एका वटवृक्षाखालून निकुंभिलेच्या मंदिरांत होम करून निघाल्यावर त्याच्यावर जय मिळविणें अशक्य होतें ( वा. रा. यु. ८५-८७. ). पण बिभीषणाच्या साहाय्यानें यानें त्याला वटवृक्षाखालील अनुष्ठान पुरें होण्यापूर्वीच गांठून ठार केलें. निकुंभिलेचें मंदिर एखाद्या वटवृक्षाखालीं असावें असें दिसतें. त्यामुळें एकदां निकुंभिलेचें मंदिर आणि पुढें दुसऱ्यांदां वटवृक्ष असा उल्लेख आला आहे.

कुंभकर्णाला रामानें मारिलें असें रामायणांत आहे, पण महाभारतांत यानें त्याला मारिलें असें आहे ( वा. रा. यु. ६७; म. व. २८७ ).

तसेंच युद्धांत रावणानें बिभीषणावर प्राणघातक हल्ला चढविला असतां यानें त्याला वांचविलें. पण त्यामुळें रावणानें क्रुद्ध होऊन एक शक्ति याच्यावर फेंकली. त्यामुळें हा मूर्च्छित पडला. मग मारुतिसुषेणादिकांच्या साहाय्यानें हा शुद्धीवर येऊन रामावरचा एक दुर्धर प्रसंग टळला ( वा. रा. यु. १०२ ).

याच्या तापटपणाचे प्रसंग रामायणांत तीनचार आले आहेत. ( १ ) रामाला वनवासाला धाडतो, म्हणून दशरथाचा निग्रह करण्यास हा प्रवृत्त झाला; ( २ ) भरत दुर्बुद्धीनें येत असावा असें समजून हा त्यावर शरसंधान करण्यास प्रवृत्त झाला; वरील दोनहि प्रसंगीं याला रामानें शांत केलें. ( ३ ) सुग्रीव रामाला दिलेलें वचन विसरून ऐश्वर्यांत मग्न झाला असतां रामाचा निरोप घेऊन हा सुग्रीवाकडे धनुष्याचा टणत्कार करीत गेला. पण समयसूचकतेनें तारेनें पुढें येऊन याचा राग शांत केला.

याच्या स्वभावाचें वर्णन अशोकवनिकेंत सीतेनें मारुतीपाशीं पुढीलप्रमाणें केलें आहे. लक्ष्मण वृद्धांची सेवा करणारा असून समर्थ परंतु मितभाषी आहे. हा स्वभावानें सौम्य असून पवित्र आचरणाचा आहे व सर्व कार्यांत दक्ष असून रामाला प्रिय आहे (वा. रा. सु. ३८. ५९-६२).

आश्रमांत सीता नाहीं, असें पाहून राम क्रुद्ध होऊन त्रैलोक्य दग्ध करण्यास उद्युक्त झाला. तेव्हां यानें रामास

त्यापासून परावृत्त केलें ( वा. रा. अर. ६६. ११-१४ ). सीतेच्या शोधाविषयीं निराश झालेल्या रामाला यानें पंपातीरीं अतिप्रेमाचे परिणाम मोठ्या मार्मिकपणें समजावून दिले ( वा. रा. किं. १. १६-१७ ). रामालाहि यानें दिलेल्या धीराची चांगली कल्पना होती ( वा. रा. यु. १०१. २१ ). सीतेनें तर याला राजा दशरथाची उपमा दिली असून हा बरोबर असल्यामुळें 'रामाला आपल्या पित्याचें स्मरण होत नाहीं' असें सांगितलें आहे ( वा. रा. सुं. ३८. ५९-६१ ). लोकापवादामुळें सीता गर्भिणी असतांहि तिचा त्याग करण्याचा प्रसंग रामावर आला असतां सीतेला वनांत सोडण्याचें काम यानें पार पाडिलें. पण परत येऊन पाहतो तों राम रुदन करीत असलेला याच्या नजरेस पडला. त्या वेळींहि यानें रामाला मोठा मार्मिक उपदेश केला व शेवटीं सांगितलें कीं, 'पुत्र, स्त्रिया, मित्र व संपत्ति यांचा वियोग केव्हां तरी होतोच. तुझ्यासारखे पुरुषश्रेष्ठ अशा प्रसंगीं कधीं गोंधळून जात नाहींत' ( वा. रा. उ. ५२ ).

याला उर्मिलेपासून अंगद व चंद्रकेतु अशीं दोन मुलें झालीं ( वा. रा. उ. १०२ ). रामानें कारुपथ देशांत अंगदाला अंगदीया नांवाची नगरी स्थापून दिली व मल्लभूमींत चंद्रकेतूकरितां चन्द्रकान्त नगर स्थापन केलें. हा अंगदाच्या अंगदीया नगरींत एक वर्ष राहून अंगदाचें स्थिर-स्थावर झाल्यावर अयोध्येस परत आला.

एकदां काल तपस्व्याच्या वेषानें रामाकडे आला व त्यानें रामाला अशी अट घातली कीं, 'तुझा व माझा संवाद चालू असतां तुझ्या व माझ्याशिवाय तेथें कोणीहि असतां उपयोगी नाहीं.' हें ऐकिल्यावर रामानें याला द्वारावर राहावयास सांगून 'जो कोणी आंत येईल, त्याचा वध केला जाईल' अशी आज्ञा केली. थोड्याच वेळांत तेथें दुर्वास मुनि आला व रामाला निरोप सांगण्याविषयीं याला सांगूं लागला. तेव्हां याला शाप देऊन अयोध्यादि नष्ट करण्याचा धाक त्यानें घातल्यामुळें याचा उपाय चालेना. शेवटीं सर्वनाशापेक्षां स्वतःचा नाश पत्करून यानें रामाला निरोप सांगितला. परंतु वचनाला जागण्याकरितां रामानें याचा वध म्हणजे त्याग केला व यानेंहि सरयूच्या तीरीं जाऊन प्राणनिरोध करून देहत्याग केला ( वा. रा. उ. १०६ ). तेथें सहस्रधारा तीर्थ आहे ( स्कंद. २. ८. २ ).

अद्भुत रामायणांत यानें शरीरजन्य उष्णतेनें समुद्र शोषून टाकिला व समुद्राला वाट देण्यास भाग पाडिलें. परंतु रामानें सीताविरहज अश्रूंनीं पुनः समुद्र जलमय करून टाकिला, अशी एक अतिशयोक्तीची हकीगत दिली आहे ( अ. रा. १६ ).

वनवासांत पुष्करक्षेत्रीं असतां याला रामाची सेवा करूं नये अशी बुद्धि झाली व यानें पुष्करींच राहण्याचें मनांत आणिलें. पण रामाच्या करुणास्पद भाषणानें याचा बेत बदलला ( पद्म. सृ. ३३ ).

हिमालयाच्या पायथ्याशीं याचें एक मंदिर असून लक्ष्मणझूला नांवाचा प्रसिद्ध पूल आहे. तेथें यानें इंद्रजिताला म्हणजे आपल्या जांवयाला मारिल्याच्या दोषाची निष्कृति व्हावी म्हणून एक हजार वर्षेंपर्यंत वायुभक्षण करून तप केलें. त्याच जागीं सध्याचें लक्ष्मणमंदिर आहे असें म्हणतात.

इंद्रजिताची बायको ही शेषाची मुलगी व लक्ष्मण हा शेषाचा अवतार म्हणून हें सासराजांवयाचें नातें असावें.

२ दुर्योधनाचा पुत्र ( म. उ. १६६. १४ कुं. ). याने अभिमन्यूशीं युद्ध होऊन अभिमन्यूनें याचा पराजय केला होता ( म. भी. ५५. ८; ७३. ३२-३८ कुं. ) शेवटीं अभिमन्यूनेंच याला ठार केलें ( म. द्रो. ४६. १८ कुं. ). याच्या प्रेताचें वर्णनहि सांपडतें ( म. स्त्री. २०. ३४ कुं. ).

२ अंगिरसगोत्रांतील एक मंत्रकार.

**लक्ष्मणा**—कश्यप व मुनि यांची कन्या; एक अप्सरा.

२ मद्रदेशच्या राजाची कन्या व कृष्णाची पत्नी ( पद्म. सृ. १३; म. स. ५७. २८ कुं. ). हिनें द्रौपदीला आपल्या विवाहाचा वृत्तान्त सांगितला होता. त्यांत कृष्णानें मत्स्ययंत्राचा भेद करून हिचें हरण केलें, असें दिलें आहे. त्या वेळीं जरासंध, अंबष्ठ, शिशुपाल, भीम, दुर्योधन व कर्ण यांनीं प्रयत्न केला, परंतु त्यांना यश आलें नाहीं; व अर्जुनाचा बाण मत्स्यास स्पर्श करून गेला ( भा. १०.८३ ). हिला प्रघोष, गात्रवत्, सिंह, बल, प्रबल, ऊर्ध्वग, महाशक्ति, सह, ओज व अपराजित असे दहा पुत्र होते ( भा. १०. ५८. ५७; ६१. १५ ). हिला लक्षणा असेंहि म्हणत ( म. स. ५७. २८ कुं. ).

३ दुर्योधनाची कन्या. स्वयंवरांत कृष्णपुत्र सांबानें हिचें हरण केलें ( भा. १०. ६८. १ ).

**लक्ष्मण्य**—हें ध्वन्याचें पैतृक नांव आहे. हा संवरणाचा आश्रयदाता होता ( ऋ. ५. ३३. १० ).

**लक्ष्मी**—दक्ष प्रजापतीची कन्या व धर्म प्रजापतीची स्त्री ( म. आ. ६७. १४ कुं. ).

२ ही सागरांतून समुद्रमंथनाचे वेळीं उत्पन्न झाली. ही उत्पन्न होतांच देवांचें तेज वाढलें. ही ब्रह्मदेवानें विष्णूला दिली. हीच पुनः भृगुपासून ख्यातीचे उदरीं जन्म पावली. पुढें हिनें लक्ष्मीनगर वसवून भृगूस दिलें. पुढें लक्ष्मी तें नगर परत मागूं लागली, पण तो देईना, तेव्हां हिच्यातर्फे विष्णूनें मध्यस्थी केली. म्हणून भृगु 'तुला भूमीवर दहा जन्म घ्यावे

लागतील व तुला भार्येपासून वियोग भोगावा लागेल ' असा विष्णूला शाप दिला. विष्णूनेंहि तुला ' मुलांबाळांपासून सुख मिळणार नाहीं,' असा उलट शाप दिला ( पद्म. सृ. ४ ). धाता व विधाता हे हिचे भाऊ होत ( विष्णु. १. ८ ). हिला शापानें हत्तीचें मुख प्राप्त झालें असतां तें ब्रह्मदेवानें नाहींसें केलें व महालक्ष्मी असें नांव दिलें ( स्कंद ६. ८५ ).

हिचा अलक्ष्मीशीं संवाद झाला, त्यांत श्रेष्ठ कोण हा विषय होता. शेवटीं या दोघी गंगेकडे गेल्या. गंगेनें लक्ष्मीच श्रेष्ठ असा निर्णय दिला ( ब्रह्म. १३७ ).

लक्ष्मीचे अवतार—१ वामन–कमलासंभव लक्ष्मी, २ परशुराम-भूमि, ३ राम–सीता, ४ कृष्ण–रुक्मिणी ( विष्णु. १. १०; भा. ५. १८. १५; ८. ८. ८ ). हिनें आपलीं स्थानें सांगितलीं आहेत ( म. अनु. ३२ कुं.; सुभद्रा पहा ).

३ वीर ब्राह्मणाची स्त्री ( तोण्डमान् पहा ).

**लक्ष्मीनिधि**—सीतेचा भाऊ ( पद्म. पा. ११ ).

**लगध**—यानें ऋग्वेदी वेदांग ज्योतिष केलें. आरंभीं व मध्यें तसा उल्लेख आहे. यांत ३६ श्लोक आहेत. यजुर्वेद ज्योतिषांत ४३ श्लोक आहेत. त्यांपैकीं ३० ऋग्वेद ज्योतिषांतील असून तेरा वेगळे आहेत ( शेष पहा ). अथर्ववेद ज्योतिष अगदीं भिन्न आहे. कै. ज. बा. मोडक यांनीं ऋग्वेद व यजुर्वेद ज्योतिषांचें मराठी भाषांतर इ. स. १८८५ मध्यें छापलें आहे. प्रो. थिबो यानें १८७९चे सुमारास इंग्रजींत भाषांतरासह हें छापलें. वेदांग ज्योतिषाचा काल मॅक्समुल्लर ख्रि. पू. तिसरें शतक व वेबर ख्रि. पू. पांचवें शतक मानतात. पण हा काल चुकीचा मानून दीक्षित पाणिनि व यास्क यांच्या पूर्वी म्हणजे सुमारें ख्रि. पू. चवदाशेंच्या सुमारास मानितात ( भा. ज्यो. पा. ८८; पाणिनि पहा ). याचें जन्मस्थळ ३४।४६ किंवा ३४।५५ अक्षांशावर असावें ( वे. ज्यो. ७-२२ ). वेदांग ज्योतिषाचा काल टिळकांच्या मतें, ख्रि. पू. १२६९–११८१ हा आहे ( ओरायन पा. ३७-३८ ). लगड असा पाठ चुकीचा आहे, असें दीक्षित म्हणतात ( भा. ज्यो. पा. ७२ ). याचे सर्व श्लोक अद्यापि लागले नाहींत.

याचा काल ख्रि. पू. १४०० किंवा १२०० ( चिं. वि वैद्य महाभारत उ. ५७ ). ख्रि. पू. ११८१ ( काळे पु. नि. २५०. ) ख्रि. पू. १४०० ( दीक्षित भा. ज्यो. पृ. ८८ ).

**लघु**—( सो. यदु. ) हा वायुमतें यदुपुत्र होय.

**लघिन्**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**लज्जा**—दक्ष प्रजापतीची कन्या व धर्म प्रजापतीची पत्नी.

**लता**—एक अप्सरा. ही शापानें सुसर झाली होती. परंतु हिला अर्जुनानें मुक्त केलें ( म. आ. २३६. २० कुं. )

२ मेरूची कन्या व आग्नीध्रपुत्र इलावृताची पत्नी ( भा. ५. २. २३ ).

**लपिता**—मंदपालाची दुसरी भार्या. हिला जरितृ नांवाची एक सवत होती ( म. आ. २५५. १७ कुं. ).

**लब ऐन्द्र**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ११९ ).

**लंबन**—ज्योतिष्मत्च्या सात पुत्रांपैकीं एक. याचें वर्ष कुशद्वीपांत असून याच्याच नांवानें प्रसिद्ध होतें ( मार्कं. ५० ).

**लंबा**—प्राचेतस दक्षाची कन्या व धर्म ऋषीची पत्नी. हिचा पुत्र विद्योत ( भा. ६. ६. ४ ). शिवाय घोषसंज्ञक पुत्र होता.

**लंबाक्ष**—तप नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**लंबायन**—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार.

**लंबासुर**—खर दैत्याचा भाऊ ( मत्स्य. १७३. २२ ).

**लंबोदर**—( आंध्र. भविष्य. ) भागवतमतें पौर्णमासाचा आणि विष्णु व मत्स्य यांच्या मतें शातकर्णीचा पुत्र.

२ तप नामक शिवावताराचा शिष्य.

**ललाटाक्षी**—सीतेच्या संरक्षणार्थ असलेली लंकेंतील एक राक्षसी.

**ललाटि**—( लालाटि पहा ).

**ललित**—एक गंधर्व. हा शापानें राक्षस झाला असतां कामदा एकादशी केल्यानें पूर्ववत् झाला ( पद्म. उ. ४७ ).

**ललिता**—सतीचें नामांतर ( पद्म. सृ. २९ ).

२ कृष्णाची एक स्त्री ( पद्म. पा. ७४ ).

**ललित्थ**—( सो. अज. ) हा वायुमतें इंद्रसख किंवा विद्योपरिचरवसु यांचा पुत्र होय.

२ भारतीय युद्धांत हा राजा दुर्योधनाच्या बाजूस होता ( म. द्रो. ३७ ).

**लव**—रामाचा कनिष्ठ पुत्र ( कुशलव पहा ).

**लवंगा**—एक गोपी ( पुण्यश्रवस् पहा ).

**लवण**—मधु व कुंभीनसी यांचा पुत्र. याला रुद्रप्रसादानें शूल प्राप्त झाला होता. तो शूल जवळ असतां याला मारतां येणें अशक्य होतें, म्हणून शत्रुघ्नानें शूलरहित गांठून याला ठार केलें. हा मधुवनांत राहत असे ( शत्रुघ्न पहा ).

२ हरिश्चंद्राच्या वंशांतील राजा. राजसूय केल्याच्या अभिमानानें याच्या हातून अनेक गोष्टी घडल्या ( यो. वा. ३.१०४-११५ ).

**लवणाश्व**—पांडवांबरोबर अरण्यांत असलेला एक ऋषि ( म. व. २६. २३ कुं. ).

**लह्य**—भृज्यु ऋषीचा पिता.

**लाक्षी**—( लक्षणा पहा ).

**लांगलायन**—ब्रह्मन् मौद्गल्याचें हें पैतृक नांव आहे (ऐ. ब्रा. ५. ३. ८).

**लांगलि**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील विष्णु, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें पौष्यंजीचा शिष्य. हा शतशाखाध्यायी होता. भागवतांत मांगली असा पाठ आहे. यास शालिहोत्र म्हटलें आहे. यास सामवेदी श्रुतर्षीहि म्हटलें आहे.

**लांगलिन्**—(सू. इ. भविष्य.) भागवतमतें शुद्धोदाचा पुत्र (२ पुष्कल पहा).

**लांगुलिन् भीम**—वाराहकल्पांतील वैवस्वत मन्वंतराच्या बाविसाव्या चौकडींतील कलींतील हा शिवाचा अवतार. याच्या हातांत नांगर हें हत्यार असून याचे अनुक्रमें भल्लविन्, मधु, पिंग व श्वेतकेतु पुत्रहि दिले आहेत (शिव. शत. ५). हें नांव लांगलिन् असेंहि आहे.

**लाट्यायन**—लाट्यायनश्रौतसूत्राचा कर्ता.

**लातव्य**—इंद्रानें प्रजापतीला ओंकारासंबंधीं माहिती विचारली. तेव्हां त्यानें ओंकाराचें गोत्र लातव्य असल्याचें सांगितलें (गो. ब्रा. १. १. ३५). हा एक आचार्य असावा.

२ कुशाम्ब स्वायवाचें हें पैतृक नांव आहे.

**लामकायन**—हा कांहीं सूत्रांत यज्ञकर्मासंबंधीं यथार्थ मत सांगणारा म्हणून आला आहे (ला. श्रौ. ४. ९. २२; द्रा. श्रौ. ४. ३८. ४; निदानसूत्र ३. १५. २३; संवर्गजित् पहा.).

**लार्डल**—(ऐति.) गुरुंड वंशांतील दहावा राजा. यानें ३२ वर्षें राज्य केलें. हा सर्वांस हितकर असून धार्मिकहि असे. यानंतर मौनवंश सुरू झाला (भवि. प्रति. ४. २२).

**लालवि**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**लालाटि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**लालावि**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**लावकि**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**लावकृत**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**लावण्यवती**—पुष्पवाहन राजाची स्त्री (पद्म. सृ. २०).

**लाह्यायन** किंवा **लाह्यायनि**—भुज्यूचें हें पैतृक नांव आहे (बृ. उ. ४. ५. १. २).

**लिखित**—जैगीषव्यास एकपर्णेपासून झालेल्या दोन पुत्रांपैकीं एक. हा आपल्या शंख नांवाच्या भावासह बाहुदा नदीच्या तीरावर निराळा आश्रम करून राहत असे. एकदां हा सहज शंखाचे आश्रमांत गेला असतां त्या ठिकाणीं यानें कांहीं पक्व फलें पाहिलीं. तीं घेऊन हा भक्षण करीत आहे, इतक्यांत शंख तेथें आला. त्याला आपल्या भावानें आपल्या नकळत आपलीं फलें घेतलीं आहेत, असें कळतांच तो याला रागानें म्हणाला, 'ज्याअर्थीं तूं माझीं फलें चोरलींस त्याअर्थीं तूं स्वतः राजाकडे जाऊन आपल्या गुन्ह्याबद्दल शिक्षा करवून घे.' हें ऐकून हा सुद्युम्न राजाकडे गेला व त्याला आपण केलेल्या चोरीबद्दल शिक्षा करण्यास सांगूं लागला. परंतु यानें आपला अपराध कबूल केला, म्हणून यास शिक्षेचें कारण उरलें नाहीं, असें समजून सुद्युम्न याला शिक्षा करीना. तेव्हां यानें स्वतःच आपले हात तोडून घेतले. नंतर हा नदीवर स्नानास गेला व स्नानानंतर तर्पण करूं लागला. तों याचे हात पूर्ववत् झाले. याच्या नांवावर लिखितस्मृति व शंखलिखितस्मृति असे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. या दोन्ही स्मृति प्रायः सारख्याच आहेत (म. शां. २३; अनु. २००. १९ कुं.).

२ चंपकापुरीच्या हंसध्वज राजाचा पुरोहित. यास शंख म्हणून एक भाऊ होता. तोहि हंसध्वजाचा पुरोहितच होता. हे दोघेहि स्वभावानें दुष्ट होते. पांडवांचा अश्वमेधीय घोडा हंसध्वजानें अडविल्यामुळें हंसध्वज व अर्जुन यांची लढाई होण्याची वेळ आली. हंसध्वजानें असा नियम केला होता कीं, 'सर्व सैनिकांनीं सूर्योदयापूर्वीं सैन्यांत हजर असलें पाहिजे; व हा नियम मोडणारास उकळत्या तेलाच्या कढईंत टाकलें जाईल.' दुसरे दिवशीं सूर्योदयापूर्वीं सर्व सैनिक जमले. परंतु हंसध्वजाच्या सुधन्वा नामक मुलासच उशीर झाला. तेव्हां सुधन्व्यावर अर्थातच शिक्षा भोगण्याची पाळी आली. परंतु सुधन्व्यास शिक्षा देण्यास राजाचें मन थोडें कचरूं लागलें व त्यानें याला सुधन्व्याला शिक्षा देऊं कीं नको म्हणून विचारिलें. त्यावर यानें शिक्षा देण्यास सांगतांच सुधन्व्यास तेलाच्या कढईंत टाकण्यांत आलें. परंतु त्याला कांहींहि झालें नाहीं. तें पाहून यास कढईंतील तेल तापलेंच नसावें, असें वाटून यानें त्यांत एक नारळ टाकिला. त्याबरोबर त्या नारळाचे दोन तुकडे होऊन एक याच्या व दुसरा शंखाच्या कपाळांत बसला (जै. अ. १७).

३ एकपाटलेचा पुत्र. याला अयोनिज असें म्हटलें आहे.

**लिंबुकि**—(नाकुलि पहा).

**लील**—वीरवर्म्याचा पुत्र.

**लीला**—ही पद्मराजाची स्त्री. हिनें आपला पति मेल्यावरहि सरस्वतीकृपेनें पुनः प्राप्त करून घेतला (यो. वा. ३. १५-५९).

**लीलाढ्य**—विश्वामित्राचा पुत्र.

**लीलावती**—ध्रुवसंधि राजाची एक स्त्री. हिचा पुत्र शत्रुजित् (ध्रुवसंधि पहा).

२ मयूरध्वज राजाची पत्नी (जै. अ. ६३).

३ साधु वाण्याची स्त्री. सत्यनारायण करण्याचा नवस न फिटल्यामुळें हिला वाईट दशा आली (सत्यनारायण-कथा ३).

४ वीर राजाची कन्या. ही अविक्षितास वरावयास तयार नव्हती. पण त्यानें हिला आपल्या बाहुबलानें जिंकून वरावयास लाविलें (मार्क. ११९. १७).

५ ही स्त्री राधाष्टमीच्या व्रतानें उद्धरली (पद्म. ब्र. ७).

६ एक वेश्या. हिनें पुष्करक्षेत्रांत चतुर्दशीचे दिवशीं लवणाचल व सुवर्णवृक्ष यांची पूजा करून ते ब्राह्मणास दान केले. त्यामुळें मेल्यानंतर ही शिवलोकीं गेली (पद्म. सृ. २१).

७ हारीत ब्राह्मणाची स्त्री.

**लुब्ध**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**लुंपक**—चंपावतींतील माहिष्मत राजाच्या पांच पुत्रांतील ज्येष्ठ. हा सफला एकादशी केल्यानें मुक्त झाला (पद्म. उ. ४०).

**लुश धानाक**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. ३५-३६; ३८). कुत्स आणि लुश या दोघांनीहि स्पर्धेनें इंद्राला बोलाविलें होतें, तेव्हां इंद्र पूर्वीच्या स्नेहामुळें कुत्साकडे गेला. पण इंद्र लुशाकडे जाईल असें वाटल्यानें कुत्सानें त्याला शंभर वाद्यांनीं वृषणाला बांधिलें. तशाहि स्थितींतून येण्याविषयीं लुशानें इंद्राची प्रार्थना केली (ऋ. १०. ३८. ५; पं. ब्रा. ९. २. २२; जै. ब्रा. १. १२८).

**लुशाकपि खार्गलि**—केशिन् दाल्भ्याचा हा समकालीन होता (क. सं. ३०. २; कुशीतक सामश्रवस पहा).

**लेख**—हा रैवत मन्वंतरांतील देवगण असून यांत पुढील आठ देव आहेत. ध्रुव, ध्रुवक्षिति, प्रघास, प्रचेतस्, बृहस्पति, मनोजव, महायशस् व युवनस् (ब्रह्मांड. २. ३६. ७६).

२ चाक्षुष मन्वंतरांतील देवगण.

**लेखक**—सूर्याचा एक प्रिय अनुचर (भवि. ब्राह्म. ५६).

**लेश**—(सो. क्षत्र.) विष्णुमतें सुनहोत्रपुत्र. वायूंत यासच शल म्हटल आहे.

**लैद्राणि**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**लैंद्राणि**—अंगिरसकुलांतील गोत्रकार.

**लोकप्रकालेन**—ध्रुवाचा पुत्र.

**लोकाक्षि**—वाराहकल्पांतील वैवस्वत मन्वंतराच्या या नांवाचा वेदविभाग करणाऱ्या मृत्यु नांवाच्या व्यासाला साहाय्य करणारा शंकराचा अवतार. हा निवृत्तिमार्गी होता. याचे शिष्य पुढीलप्रमाणें होते. सुधामन् विरजस्, संजय व विजय (शिव. शत. ४).

२ (लौगाक्षि पहा).

३ जटिमालिन् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**लोपामुद्रा**—मंत्रद्रष्ट्री (ऋ. १. १७९. १-२). ही विदर्भ राजाची कन्या. हिला सत्यवती असेंहि दुसरें नांव आहे (म. व. ९४. २९ कुं.). अगस्त्य पितरांच्या इच्छेवरून विवाह करण्यास सिद्ध झाला; पण मुलगी पसंत पडेना. तेव्हां तपोबलानें कन्या निर्माण करण्याचा त्यानें संकल्प केला. व संकल्पानें सुंदर स्त्री निर्माण करून पुत्राकरितां तप करणाऱ्या विदर्भ राजाला दिली. त्यानें तिचें नांव लोपामुद्रा असें ठेविलें (म. व. २४). पुढें लग्नाचा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हां अगस्त्यानें हिला मागणी घातली. अगस्त्यासारख्या ऋषीला मुलगी देण्याची विदर्भाची इच्छा नव्हती. पण शापाच्या भीतीनें नकार देण्याची छातीहि नव्हती. ही बापाची स्थिति जाणून लोपामुद्रेनें आपणहूनच अगस्त्याला आपणांस द्यावें, असें विदर्भास सांगितलें व त्याप्रमाणें विदर्भानें हिचें अगस्त्याशीं लग्न करून दिलें. लग्न झाल्यानंतर राजकन्या असूनहि हिला अगस्त्याच्या इच्छेनुसार वल्कलें व अजिन परिधान करावीं लागलीं. नंतर गंगाद्वारावर जाऊन अगस्त्यानें उग्र तपश्चर्या केली. तप करणाऱ्या अगस्त्याची सेवा करून हिनें अगस्त्याला प्रसन्न केलें. तेव्हां हिचें रूप, पवित्रता, इंद्रिय-निग्रह व कांति यांनीं प्रसन्न झालेल्या अगस्त्यानें हिच्याशीं संभोगाची इच्छा केली. तेव्हां हिनें ' राजैश्वर्य असावें, वल्कलाजिनें नसावींत, उत्तम वस्त्रभूषणें असावींत ' वगैरे इच्छा व्यक्त केली. याकरितां तपःसामर्थ्य खर्च करावें लागणार होतें, तरी केवळ हिच्या इच्छेवरून अगस्त्यानें इल्वलाकडून संपत्ति आणूनहि दिली व हिच्या इच्छेप्रमाणें हिला एकच गुणवान् दृढस्यु नांवाचा मुलगा झाला. त्याला इध्मवाह असेंहि म्हणत असत (म. व. ९४-९७ कुं.).

हिच्याजवळ हिचें भोजन होण्याचे पूर्वी भरपूर अन्न पुरवणारी एक स्थाली होती (आ. रा. विवाह. ५).

हिला कृष्णेक्षणा म्हटलें असावें. मलयध्वज नांवाच्या पांड्य राजानें वैदर्भीला स्वयंवरांत वरिलें व मयलध्वजाला कृष्णेक्षणा नांवाची एक कन्या व द्रविड देशाचे राजे झालेले सात पुत्र झाले. ह्या कृष्णेक्षणेशीं अगस्त्य ऋषीनें विवाह केला. हिला अगस्त्यापासून दृढच्युत नांवाचा पुत्र झाला. दृढच्युताचा पुत्र इध्मवाहन (भा. ४. २८).

**लोभ**—ब्रह्मदेवाच्या खालच्या ओंठापासून उत्पन्न झाला (मत्स्य. ३. १०). अधर्मपुत्र दंभ व माया यांचा पुत्र (भा. ४. ८. ३).

**लोभालोभ**—ऋग्वेदी ब्रह्मचारी.

**लोमगायनि** किंवा **लोमगायिन**—व्यासाच्या साम-शिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें लांगलीचा शिष्य.

**लोमपाद**—(१ रोमपाद पहा).

**लोमश**—एक ब्रह्मर्षि. याच्या अंगावर लोम म्हणजे केंस पुष्कळ असल्यामुळें याला हें नांव पडलें. प्रत्येक कल्पाच्या वेळीं याच्या अंगावरचा फक्त एक केंस गळून पडत असे. इतकें याचें आयुष्य होतें ( पद्म. उ. ५५ ). हा एकदां सहज फिरत स्वर्गांत इंद्राकडे गेला. तेथें इंद्राच्या अर्घ्यासनावर अर्जुन बसलेला याला आढळला. इंद्रानें लोमशाला सांगितलें कीं, 'हा साधा क्षत्रिय नसून नारायणाचा अवतार आहे. हा शस्त्रास्त्रांचें शिक्षण घेऊन लवकरच पृथ्वीवर येईल. तरी उगाच काळजी करूं नका, असें युधिष्ठिराला तूं जाऊन सांग. व पांडवांबरोबर राहून त्यांना अनेक स्थळें दाखीव.' त्याप्रमाणें हा काम्यकवनांत युधिष्ठिराला येऊन मिळाला ( म. व. ४७ ). त्यांना यानें इंद्राचा निरोप व अर्जुनाची खुशाली सांगून आपल्याबरोबर तीर्थयात्रेला चलण्याविषयीं सुचविलें. त्याप्रमाणें बराचसा परिवार कमी करून लोमशासह पांडव तीर्थयात्रेला निघाले. वाटेंत आलेल्या तीर्थादिकांचीं माहात्म्यें, कथा वगैरे यानें सांगून, त्यांकडून स्नानादि करविलीं. महेन्द्राचलावर आल्यावर चतुर्दशीस परशुरामाचें दर्शन घेऊन ते प्रभासक्षेत्रीं गेले. तेथून यमुनेच्या कांठानें कैलास पर्वताच्या जवळ आले ( म. व. ९१-१३९ ). नंतर गंधमादन पर्वताच्या पायथ्याशीं सुबाहु नांवाच्या किराताधिपतीचा सत्कार घेऊन गंधमादनावर चढण्यास सुरुवात केली. पण बहुतेक मंडळी थकल्यामुळें भीमानें घटोत्कचाच्या साहाय्यानें सर्वांना नरनारायणाश्रमीं आणून पोहोंचविलें (म. व. १४०-१४५). नंतर सर्व तेथून सतरा दिवसांनीं वृषपर्व्याच्या आश्रमांत जाऊन पोहोंचले व तेथून चवथ्या दिवशीं आर्ष्टिषेणाच्या आश्रमाला गेले (म. व. १५८). तेथें धौम्यानें युधिष्ठिराला सूर्यचंद्राच्या गतीविषयीं माहिती दिली ( म. व. १६३ ). इतक्यांत इंद्रानें तेथें अर्जुनास पोहोंचविलें ( म. व. १६४ ). अर्जुन गंधमादन पर्वतावर आल्यावर लोमश ऋषि तेथें चार वर्षे राहिला. त्या वेळीं पांडवांचीं वनवासाचीं दहा वर्षे भरलीं होतीं ( म. व. १७६ ). पुढें लोमश पांडवांना घेऊन पुनः नरनारायणाश्रमीं आला. नंतर पुनः किराताधिपति सुबाहूच्या घरीं एक महिना काढून यामुनगिरीवरील विशाखयूपावरून द्वैतवनांत आले. तेथें सरस्वतीतीरावर पावसाळा घालवून पौर्णिमा होतांच लोमशानें पांडवांना काम्यकवनांत आणून सोडिलें व आपण निघून गेला (म. व. १८१-१८२). लोमशानें धर्मरहस्य म्हणून दानाची प्रशंसा केली आहे ( म. अनु. १९१ कुं. ).

यानें दुर्दम राजाला देवीभागवत पांच वेळां वाचून दाखविल्यामुळें मन्वंतराधिपति रैवत नांवाचा मुलगा झाला ( दे. भा. माहात्म्य ५ ).

सुशाला, सुस्वरा, सुतारा व चंद्रिका या गंधर्वकन्या आणि वेदनिधि ऋषीचा पुत्र हीं पिशाचयोनींत गेलीं असतां लोमशानें त्यांना नर्मदेचें स्नान घालून त्यांचा उद्धार केला ( पद्म. सृ. २३ ). याच्या नांवावर लोमशसंहिता व लोमशशिक्षा नामक ग्रंथ उपलब्ध आहेत ( C. C. ).

हा देह क्षणभंगुर आहे म्हणून, झोंपडी बांधीत नसे. यानें १०० वर्षे कमळांनीं शिवपूजा केली. त्यामुळें शंकर प्रसन्न होऊन 'तुझा प्रत्येक कल्पांतीं एक एक केंस गळेल व प्रलयकाळीं तूं मुक्त होशील,' असा याला वर दिला ( स्कंद. १.२.१३ ).

याची श्लोकबद्ध शिक्षा आठ खंडात्मक असून सामवेदाची आहे. ही संवत् १९४९ मध्यें लिहिली असा लेखनाचा काल मुद्रित पुस्तकांत दिला आहे. पहिल्या श्लोकांत उल्लेखिलेला लोमशाचा गर्गाचार्याशीं असलेला संबंध नीट ध्यानांत येत नाहीं.

३ लंकेंतील एक रावणपक्षीय राक्षस ( वा. रा. सुं. ६ ).

**लोमहर्षण**—( रोमहर्षण पहा ).

**लोमायन**—वसिष्ठकुलांतील गोत्रकारगण. ब्रह्मांडपुराणाच्या शिष्यपरंपरेंतील हा एक आहे.

**लोल**—सिद्धवीराचा पुत्र. हा स्वसृश्राच्या मृगीरूपांतल्या उत्पलावती नामक स्त्रीस त्याच्या कामुक स्पर्शामुळें सुतपस्च्या उःशापानें झाला ( मार्क. ७१ ).

**लोलजिह्व**—या राक्षसानें धर्मारण्य जाळण्याचा विचार केला असतां विष्णूनें याला ठार केलें ( स्कंद. ३. २. ११ ).

**लोला**—मधु नांवाच्या राक्षसाची माता ( वा. रा. उ. ६१ ).

**लोलाक्षि**—भृगुकुलांतील गोत्रकारगण.

**लोहगंध**—हा गार्ग्य होता. याला पहिल्या पारीक्षित जनमेजयानें मारिलें म्हणून त्याला लोकांनीं हद्दपार केलें (वायु. २. ३१. २०-२५). याच्या मृत्यूमुळें लागलेल्या दोषनिरसनार्थ इंद्रोत शौनकानें जनमेजयाकडून अश्वमेध करविला. पण ब्रह्महत्येमुळें याच्या घराण्यांतील रथ चेदिपति वसूकडे गेला. जरासंधाला मारून भीमानें तो कृष्णाला दिला.

वास्तविक लोहगंध गार्ग्य नसून पहिल्या दुर्बुद्धि जनमेजयाला म्हणत असत. कारण त्याच्या अंगाला रक्ताची घाण येत असे. पण इंद्रोत शौनकानें त्याला ब्रह्महत्येंतून मुक्त केलें व त्याच्या अंगाची घाणहि घालविली ( ब्रह्मांड. ३. ६८. २३-२६; ह. वं. १. ३०; म. शां. १४१. ११ कुं. ).

**लोहलय**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**लोहवैरि**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**लोहासुर**—एक दैत्य. याच्या नांवाचें तीर्थ झालें ( स्कंद. ३. २. २९ ).

२ एक असुर. पांडवांनीं शस्त्रें खालीं ठेवल्यावर हा त्यांच्यावर धांवला. पण देवानें यास आंधळा करून पाडला. त्या स्थलास लोहणपूर म्हणतात (स्कंद. १. २. ६५).

**लोहित**—विश्वामित्राचा पुत्र.

२ रुद्रसावर्णि मन्वंतरांतील एक देवगण.

३ एक स्मृतिकार (C.C.).

**लोहिताक्ष**—जनमेजयाच्या सर्पसत्रांतील स्थपति नांवाच्या ऋत्विजाचे जागीं असलेला ऋषि. यानें स्थलशुद्धि करीत असतांच जनमेजयास सांगितलें होतें कीं, 'एक ब्राह्मण येऊन हें सत्र मध्येंच पुरें करावयास लावील' (म. आ. ५१. १५; ५६. ६; ५८. १२ कुं.).

**लोहितार्ण**—(स्वा. प्रिय.) घृतपृष्ठाच्या सात पुत्रांतील एक. याचा वर्ष याचेच नांवानें प्रसिद्ध आहे.

**लोहिताश्व**—(रोहिताश्व पहा).

**लौक्य**—(बृहस्पति पहा).

**लौक्षि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**लौक्षिण्य**—भृगुकुलांतील एक गोत्रकार. याबद्दल लौगाक्षि असा पाठभेद आहे.

**लौगाक्षि**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील पौष्यंजीचा शिष्य. भागवतांत हा शतशाखाध्यायी आहे, असें सांगितलें आहे. हा सामवेदी आहे (लौक्षिण्य पहा).

मिताक्षरेंत (याज्ञ. ३. १-२, २६०, २८८) अशौच आणि प्रायश्चित्त यांसंबंधीं असलेले याचे श्लोक दिले आहेत. अपरार्कानेंहि याचे संस्कार, वैश्वदेव, चातुर्मास्य, द्रव्यशुद्धि, श्राद्ध, अशौच आणि प्रायश्चित्त यांसंबंधीं गद्यपद्यात्मक उतारे दिले आहेत. यानें प्रजापतीचे मतास मान्यता दिली आहे (अपरार्क. ५१२). मिताक्षरादि सर्व व्यवहारविषयक ग्रंथांत योग आणि क्षेम यांचा अर्थ दिलेला व त्यांचें ऐक्य सांगणारा लौगाक्षीचा श्लोक आला आहे.

याच्या नांवावर उपलब्ध असलेले ग्रंथ—आर्षाध्याय, उपनयनतंत्र, काठकगृह्यसूत्र, प्रवराध्याय, श्लोकतर्पण.

२ (लौक्षिण्य पहा).

**लौपायन**—(बंधु, विप्रबंधु, श्रुतबंधु, सुबंधु, व गौपायन पहा).

**लौमहर्षणि**—(रौमहर्षणि पहा).

**लौहवैरिण**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**लौहित्य**—हें एका कुलाचें व आचार्याचें नांव आहे. (सां. आ. ७-२२). (कृष्णदत्त, कृष्णरात, जयक, त्रिवेद कृष्णरात, दत्तजयन्त, पल्लिगुप्त, मित्रभूति, यशस्विन् जयन्त, विपश्चित् दृढजयन्त, विपश्चित दार्ढजयन्ति, वैपश्चित दार्ढजयन्ति, श्यामजयन्त, श्यामसुजयन्त व सत्यश्रवस् पहा).

**लौहि**—विश्वामित्राचा पौत्र. अष्टकाचा पुत्र.

२ (शिशु. भविष्य.) अजातशत्रुपुत्र.

---

# व

**वंशक**—(१ वत्सक पहा).

**वंशा**—कश्यप व प्राधा यांची कन्या.

**वक दाल्भ्य**—एक आचार्य (छां. उ. १. २. १३; १२. १). याचा धृतराष्ट्राबरोबर संस्काराविषयीं विवाद झाला आहे (क. सं. ३०. २). बक दाल्भ्य व हा वेगळा आहे.

**वक्र**—वक्रदंताचा भाऊ.

**वक्रदंत**—(दंतवक्त्र पहा).

**वक्राक्ष**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**वक्षेयु**—(सो. पूरु.) वायुमतें रौद्राश्वपुत्र.

**वक्षोग्रीव**—विश्वामित्राचा पुत्र.

**वंग**—(सो. अनु.) बलिपुत्र (२ अंग व २ बलि पहा).

**वंगिरि**—(किलकिला. भविष्य.) भागवतमतें एक राजा.

**वंगृद**—हा अतिथिग्वाचा शत्रु. इंद्रानें अतिथिग्वासाठीं वंगृदाचा शिरच्छेद केला (ऋ. १. ५३. ८).

**वचक्नु**—एक ऋषि. गार्गीचा पिता.

**वज्र**—विश्वामित्राचा पुत्र (५ वज्रनाभ पहा).

२ अनिरुद्धास रुक्मीच्या नातीपासून झालेला मुलगा. यादवीनंतर अर्जुनानें यास इंद्रप्रस्थास नेलें व तेथें यास गादीवर बसविलें. याचा मुलगा प्रतिबाहु (म. मौ. ७).

**वज्रकाय**—लंकेंतील एक राक्षस (वा. रा. सुं. ६).

**वज्रज्वाला**—कुंभकर्णाची स्त्री. ही विरोचनपुत्राची नात होय (वा. रा. उ. १२. २४).

**वज्रदंष्ट्र**—त्रिपुर दैत्याचा सेनापति. यानें पाताल लोक जिंकिला म्हणून, त्रिपुरानें गांव, वस्त्रें, वगैरे देऊन याचा गौरव केला (गणेश. १. ४).

२ रावणपक्षीय राक्षस ( वा. रा. यु. ९ ). याला अंगदानें ठार केलें ( वा. रा. यु. ५३-५४ ).

**वज्रदत्त**—हा भगदत्ताचा पुत्र. हा प्राग्ज्योतिषपुर येथें राज्य करीत होता. पांडवांनीं अश्वमेध यज्ञाकरितां सोडलेला श्यामकर्ण अश्व यानें धरिला व अर्जुनाशीं तीन दिवसपर्यंत अतिशय शौर्यानें युद्ध केलें. परंतु सरतेशेवटीं त्यांत याचा पराभव झाला ( म. आ. ७५-७६ ). याला यज्ञदत्त असेंहि म्हणत.

**वज्रनाभ**—( सू. इ. ) भागवतमतें स्थलाचा, विष्णुमतें उक्थाचा व वायुमतें औकाचा पुत्र.

२ पहिल्या निकुंभाचा भ्राता. याचा वध करून कृष्णपुत्र प्रद्युम्नानें नाटक मंडळी काढून याच्या गांवीं गमन केलें व नटाच्या मिषानें याच्या प्रभावती नांवाच्या कन्येशीं लग्न लाविलें. या वैरामुळें निकुंभानें हल्ला केला असतां कृष्णानें निकुंभाला ठार केलें ( ह. वं. २. ९० ). याची राजधानी वज्रपूर.

३ एक दुष्ट राक्षस. हा ब्रह्मदेवाच्या हातांतील कमलानें मेला ( पद्म. सृ. १५ ).

४ मथुरेंतील एक राजा. याला परीक्षित् भेटावयास आला होता पुढें शांडिल्यानें सांगितल्याप्रमाणें वृंदावनांत कृष्णभवनाचे वेळीं उद्धव आला व त्यानें याला भागवतमाहात्म्य सांगितलें ( स्कंद. २. ६. १-६ ).

**वज्रबाहु**—रामसेनेंतील एक वानर. याला कुंभकर्णानें भक्षिलें ( म. व. २८७ ).

**वज्रमित्र**—( शुंग. भविष्य. ). भागवत व ब्रह्मांड यांच्या मतें घोषाचा, विष्णुमतें घोषवसूचा व मत्स्यमतें पुलिंदाचा पुत्र. वायूंत यास विक्रमित्र म्हटलें आहे.

**वज्रमुष्टि**—मैंद वानरानें मारिलेला एक राक्षस ( वा. रा. यु. ४३ ).

**वज्रवेग**—मारुतीनें मारिलेला एक राक्षस ( म. व. २८८. २७ कुं. ).

**वज्रशीर्ष**—भृगु ऋषीचा पुत्र व च्यवनाचा भ्राता.

**वज्राक्ष**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**वज्रांग**—कश्यप व दिति यांचा पुत्र. मरुतांना इंद्रानें नेलें म्हणून दितीनें यास इंद्राचें पारिपत्य करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें हा इंद्रास मारूं लागला असतां ब्रह्मदेव आडवा आला. शेवटीं वरांगी नांवाच्या याच्या पत्नीनें इंद्राचें पारिपत्य करणारा मुलगा याकडून मागून घेतला. तोच तारकासुर होय ( मत्स्य. १४५-१४६; पद्म. सृ. ४२; शिव. रुद्र. स. ३.१४ ).

**वज्रांगद**—पांड्य देशचा राजा. यानें अरुणाचलेश्वराची पूजा करून आपला उद्धार करून घेतला ( स्कंद. १.३.२.२४ ).

**वंचुलि**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**वंजुल**—एक वैश्य. हा कलिंजर पर्वतावरील वाराणसीतीर्थांत सोमवती अमावास्येला स्नान केल्यानें उद्धरला ( पद्म. भू. ९१-९२ ).

**वंजुलि**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**वडवा**—सूर्याची स्त्री संज्ञा, हिनें अश्विनीचें रूप धारण केलें असतां तिला पडलेलें नांव. हिलाच पुढें अश्वरूपी सूर्यापासून अश्विनीकुमार झाले ( भा. ६. ६. ४० ).

**वडवा प्रातिथेयी**—ब्रह्मचर्यव्रतानें राहणारी एक ब्राह्मणकन्या (गभस्तिनी पहा ). हिचा ब्रह्मयज्ञांगतर्पणांत निर्देश आहे ( आश्व. गृ. ३.३ ).

**वतंड**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**वत्स**—( सो. पूरु. ) सेनजितपुत्र.

२ ( स्वा. उत्तान. ) हा भागवतमतें नड्वलेच्या ठिकाणीं झालेला चक्षुपुत्र होय.

३ ( सो. क्षत्र. ). वायुमतें प्रतर्दनपुत्र. परशुरामाच्या भीतीनें लपलेला एक राजपुत्र. हा गायींच्या वत्सांत वाढला, म्हणून यास वत्स असें म्हणतात ( म. शां. ४८. ८६ कुं. ).

४ ( सू. इ. भविष्य. ) विष्णुमतें गुरुक्षेपपुत्र. यास वत्सद्रोह, वत्सवृद्ध व वत्सव्यूह म्हटलें आहे.

५ कोसल देशीय एक राजा. हा द्रौपदीस्वयंवरास आला होता ( म. आ. १८६$\frac{*}{3}$ ).

६ सोम नामक शिवावताराचा शिष्य.

७ कंसपक्षीय एक दैत्य. हा वत्सरूपानें कृष्ण नाशाकरितां आला असतां, कृष्णानें यास कवठाच्या झाडावर आपटून मारिलें ( भा. १०. ११. ४२ ). याला वत्सक म्हटलें आहे ( भा. १०. ४३. ३० ).

८ एक वैश्य. हा मंत्रकार होता ( ब्रह्मांड. २. ३२. १२१ ).

९ व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य ( व्यास पहा ).

१० व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील देवमित्राचा शिष्य. वात्स्य असा पाठभेद आहे.

**वत्स आग्नेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १८७; कुमार आग्नेय पहा ).

**वत्स काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ६. ११ ). हा कण्वपुत्र आहे ( ऋ. ८. ८. ८ ). यानें आपल्यास तिरिंदरापासून धन मिळाल्याचा उल्लेख केला आहे ( ऋ. ८. ६.

४६; सां. श्रौ. १६. ११. २०). मेध्यातिथीनें याला शूद्रपुत्र म्हटल्यामुळें वाद झाला होता. पण यानें आपली जातिविषयक शुद्धता अग्नींत दिव्य करून सिद्ध केली (पं. ब्रा. १४. ६. ६). विष्णूनें भूमि व आकाश इत्यादिकांना धारण केलें आहे असें याचें तत्त्वज्ञान होतें (तै. आ. १. ८). यानें चरकाध्वर्युसूत्र केलें आहे. याचा हेमाद्रीच्या परिशेषखंडांत उल्लेख आहे.

**वत्सक**—(सू. इ.) मत्स्यमतें हा श्रावस्तपुत्र व बृहदश्व राजाचा भ्राता. पुराणांतरीं यास वंशक असें म्हटलें आहे.

२ (सो. क्रोष्टु.) हा शूर राजास मारिषेपासून झाला. याला नऊ भाऊ होते. याला मिश्रकेशी अप्सरेपासून वृकादिक पुत्र झाले (भा. ९. २४. २९–४३).

३ (७ वत्स पहा).

**वत्सद्रोह**—(सू. इ. भविष्य.) मत्स्यमतें उरुक्षयाचा पुत्र (४ वत्स पहा).

**वत्सनपात् बाभ्रव्य**—हा सौभर पथिन्चा शिष्य. याचा शिष्य विदर्भिन् कौंडिन्य (बृ. उ. २.५ २२; ४.५.१५).

**वत्सनाभ**—पावसांत इंद्रानें महिषरूपानें याचें रक्षण केलें; पण कृतघ्न होऊन महिषास खाण्याची यास इच्छा झाली. पण शेवटीं हा पश्चात्ताप पावला (म. अनु. ३३ कुं). हा शंखतीर्थांत स्नान करून उद्धरला (स्कंद. ३. १. २५.).

**वत्सपाल**—(सू. इ. भविष्य.) भविष्यमतें उरुक्षेपाचा पुत्र.

**वत्सप्रि भालंदन**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९. ६८; १०. ४५-४६; तै. सं. ५.२. १. ६; क. सं. १९. १२; मै. सं. ३.२.२.). हा एका सामाचा द्रष्टा आहे (पं. ब्रा. १२.११. २५). याचा वात्सप्र साम किंवा सूक्त प्रसिद्ध आहे (श. ब्रा. ६. ७. ४. १.). वात्सप्र सामानें प्रजा दीर्घायुषी झाल्या.

२ (सू. दिष्ट.) विष्णुमतें भलंदनपुत्र. भागवतांत वत्सप्रीति असें नांव आहे. याचा पुत्र प्रांशु. यानें कुजृंभास ठार करून विदूरथकन्या सौनंदा ऊर्फ मुदावती हिच्याशीं लग्न केलें (मार्क. ११३).

**वत्सप्रीति**—(२ वत्सप्रि भालंदन पहा).

**वत्समित्र गोभिल**—गोल्गुलवीपुत्र गोभिलाचा शिष्य. याचा शिष्य मूलमित्र गोभिल (वं. ब्रा. ३).

**वत्सर**—(स्वा. उत्तान.) ध्रुव व भ्रमी यांचा पुत्र. ध्रुवाच्या मागून हाच गादीवर बसला. कारण याचा ज्येष्ठ भ्राता उत्कल हा विरक्त व अंतर्निष्ठ होता. यास स्वर्वीथी नांवाची एक भार्या होती. तिला याचेपासून पुष्पार्ण, तिग्मकेतु, इष, ऊर्ज, वसु आणि जय असे सहा पुत्र झाले (भा. ४. १०. १; १३. ११).

२ कश्यपकुलांतील प्रवर.

**वत्सराज**—हा द्रौपदीस्वयंवरास आला होता (म. आ. २०१.२२ कुं.).

**वत्सला**—मराठींतील ग्रंथांत हिची कथा आहे.

२ कृष्णाची गोपी (पद्म. भू. ७७).

**वत्सवालक**—(सो. क्रोष्टु.) विष्णुमतें शूरपुत्र.

**वत्सवृद्ध**—(सू. इ. भविष्य.) भागवतमतें उरुक्रियपुत्र होय (४ वत्स पहा).

**वत्सव्यूह**—(सू. इ. भविष्य) हा वायुमतें क्षयपुत्र होय (४ वत्स पहा).

**वत्सार**—कश्यप ऋषीचा पुत्र. यास अवत्सार असें म्हणतात. हा कश्यपकुलांतील मंत्रकार आहे. पण ऋग्वेदांत याच्या नांवावर मंत्र नाहीं. याचे पुत्र निध्रुव व रेभ्य हे होत.

**वत्स्य**—(वात्स्य पहा).

**वदान्य**—एक ऋषि. याची कन्या सुप्रभा. ती अष्टावक्रास दिली होती (म. अनु. ५०.११ कुं.).

**वध**—यातुधानाचा पुत्र. याचे पुत्र विघ्न व शमन (ब्रह्मांड. ३. ७. ९४).

**वध्रिमती**—एका बाईचें नांव. हिच्या नवऱ्याला पुरुषत्व अश्वींच्या कृपेनें मिळालें. पुढें हिला हिरण्यहस्त नांवाचा पुत्र झाला (ऋ. १. ११६. १३; ११७.२४; ६. ६२. ७; १०. ३९. ७; ६५. १२). परंतु लो. टिळकांनीं अशा अश्वींच्या कथांचें तात्पर्य उत्तरध्रुवावरील त्यांच्या सिद्धान्ताच्या दृष्टीनें लाविलें आहे (आर्यांचें मूलस्थान पा. २२८).

**वध्र्यश्व**—(सो. नील.) हा मुद्गलपुत्र होय. सरस्वतीनें वध्र्यश्वाला दिवोदास नामक पुत्र दिला (ऋ. ६. ६१. १; अ. वे.४.२९. ४). फक्त मत्स्यपुराणांत ब्रह्मिष्ठ, इंद्रसेन व विंध्याश्व अशा पिढ्या मानिल्या असून विंध्याश्वाचा पुत्र दिवोदास दिला आहे. बध्यश्व, वध्रश्व, वध्रयाश्व व विंध्याश्व असे याबद्दल पाठभेद आढळतात. वायूंत यास ब्रह्मिष्ठपुत्र म्हटलें आहे. याची पत्नी मेनका होय. यास मेनकेपासून दिवोदास व अहल्या झालीं (मत्स्य. ५०. ७; वायु. २. ३७. १९५; ह. वं. १.३२). मत्स्यांत इंद्रसेन हा शब्द इंद्रसेना याबद्दल चुकीनें आला असावा.

२ भृगुकुलांतील गोत्रकार.

**वध्र्यश्व आनूप**—सामद्रष्टा (पं. ब्रा. १३. ३. १७).

**वन**—(सो. अनु.) भागवतमतें उशीनरपुत्र. याबद्दल नववत् व नर असे पाठ आहेत.

**वनजात**—(सो. विदू.) मत्स्यमतें हृदीकाचा पुत्र होय.

**वनस्पति**—घृतपृष्ठाच्या सात पुत्रांतील एक (भा. ५. २०. २१).

**वनायु**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ पुरूरव्याचा उर्वशीपासून झालेला पुत्र ( म. आ. ६९. २८ कुं. )

**वनार्ह**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें हृदीकपुत्र होय.

**वनेन**—प्रसूत देवांतील एक.

**वनेयु**—( सो. पुरूरवस्. ) हा भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें रौद्राश्वपुत्र होय. मत्स्यमतें विनेयु असा पाठ आहे.

**वंदन**—अश्वींनीं कूपांत पडलेल्या वंदनास बाहेर काढिलें (ऋ. १. ११६. ११; ११७. ५; १०. ३९. ८ ). जुना रथ दुरुस्त करावा, त्याप्रमाणें अश्वींनीं याला तरुण केलें (ऋ. १. ११९. ७ ), याचें आयुष्य वाढविलें ( ऋ. १. ११६. ६ ) व याचा उद्धार केला ( ऋ. १. ११८. ६ ). विहिरींत पडण्याचें कारण बायकोचा वियोग असें सायणाचार्य म्हणतात.

**वंदिन्**—याबद्दल गणपतकृष्णाजीच्या महाभारताच्या प्रतींत बंदिन् असा पाठ आहे ( बंदिन् पहा ).

**वपु**—एक अप्सरा. ही दुर्वासाचा तपोभंग करण्याकरितां गेली असतां शाप मिळून कंधरास मेनकेपासून झाली. त्या वेळीं हिचें नांव तार्क्षी होतें ( मार्क. १. ४९-५६; २. ४१ ).

**वपुष्टमा**—सुवर्णवर्म्याची कन्या व जनमेजयाची स्त्री. हिला शतानीक नांवाचा पुत्र झाला ( म. आ. ४४. ८ कुं. ).

**वपुष्मत्**—स्वायंभुव मनूचा पुत्र.

२ धर्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ विदर्भराज संक्रंदनाचा पुत्र. यानें दमपिता नरिष्यंतास दमावर सूड उगविण्याकरितां ठार केलें. तेव्हां नरिष्यंतपत्नी व दममाता इंद्रसेना हिनें पुत्रास झालेली हकीगत कळवून ती सती गेली. दमानें निरोप येतांच यावर स्वारी केली व यास ठार केलें. आणि याचे रक्तानें पितृतर्पण व मांसानें पिंडदान करून तें राक्षसकुलोत्पन्न ब्राह्मणांस खावयास घातलें ( मार्क. १३३; १ सुमनस् पहा ).

**वपुष्मती**—सिंधुराजकन्या. मरुत्तस्त्री ( मार्क. १२८).

**वप्रिन्**—( व्यास पहा ).

**वमक**—तामस मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**वम्र**—हा सोमयज्ञ करणारा असून याच्यावर अश्वींनीं कृपा केली होती ( ऋ. १. ११२. १५ ).

**वम्र वैखानस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ९९ ). बाराव्या ऋचेंत वम्रक असा याचा निर्देश आहे.

**वम्रक**—( वम्र वैखानस पहा ).

**वय**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**वयस्य**—अंगिरसाचा मुलगा (म. अनु. १३२. ४२ कुं.).

**वयुन**—कृशाश्वास धिषणेपासून झालेला पुत्र ( भा. ६. ६. २० ).

**वयुना**—भागवतमतें ही स्वधेच्या ठायीं पितरापासून झाली.

**वय्य**—तुर्वीतिबरोबर याचा उल्लेख येतो. अश्वींनीं याचें संरक्षण केलें ( ऋ. १. ११२. ६ ).

**वर**—पितरांपैकीं एक.

**वरंवरा**—कश्यप व मुनि यांची कन्या, एक अप्सरा.

**वरतंतु**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**वरद**—पितरांपैकीं एक.

**वरयु**—महौजसांपैकीं एक. आपल्या दुर्वर्तनामुळे यानें आपल्या ज्ञातिबांधवांचा व आप्तेष्टांचा नाश करून घेतला ( म. उ. ७३. ११-१५ कुं. ).

**वराग्नि**—शुक्राच्या चार पुत्रांपैकीं एक. याचीं मुलें पृथुरश्मि, बृहदंगिरस् व रजत हे यज्ञधर्म नष्ट करूं लागले म्हणून यांना इंद्रानें ठार मारिलें. तेव्हां यांच्या डोक्यापासून खजूरीचीं झाडें झालीं ( ब्रह्मांड. ३. १. ८३-८४ ).

**वररुचि**—नाट्यशास्त्रप्रणेता एक ऋषि ( मत्स्य. १०. २५ ).

२ एक वैयाकरण. याज्ञवल्क्यपुत्र कात्यायनाचा पुत्र. गणपतिप्रसादानें यानें व्याकरण केलें ( स्कंद. ६. १३०-१३१ ). यानें पाणिनिसूत्रांवर वार्तिकें केलीं. प्राचीन ग्रंथकार सुप्रसिद्ध वार्तिककार कात्यायन व हा एकच होत, असें बऱ्याच विद्वानांचें मत आहे. ऐंद्र नामक एका प्राचीन व्याकरणशाखेचा हा अनुयायी होता, अशी आख्यायिका आहे. उणादि सूत्रांचें कर्तृत्व, विमलसरस्वतीनें याच्याकडे दिलेलें आढळतें. याशिवाय कातंत्रकृत्प्रकरण ग्रंथहि यानेंच लिहिला, अशी आख्यायिका आहे. याच्या नांवावर अनेक ग्रंथांचें कर्तृत्व लादण्यांत येतें; परंतु त्यांपैकीं बरेच अर्वाचीन व याच्या नंतर झालेले आहेत. त्रिभाष्यरत्नांत ( १. १८; २. १४ ) याच्या संबंधींचे उल्लेख आलेले आहेत. विक्रमादित्याच्या पदरीं असलेल्या नवरत्नांत वररुचीचें नांव आढळतें. परंतु तो निराळा असावा.

**वरशिख**—अभ्यावर्तिन् चायमानाला जिंकण्याकरितां इंद्रानें याचीं मुलें मारलीं ( ऋ. ६. २७. ४-५ ).

**वरस्त्री**—बृहस्पतीची बहीण व प्रभासवसूची स्त्री ( म. आ. ६७. २६ कुं.; वायु. २. २२. १५ ).

**वरा**—हेमधर्मकन्या. हिनें अविक्षितास स्वयंवरांत वरिलें ( मार्क. ११९. १६ ).

**वरांग**—(पौर. भविष्य.) विष्णुमतें धर्माचा पुत्र.

**वरांगना**—ही उग्रसेनकन्या होय.

**वरांगिन्**—दिवंजयाचा पुत्र ( ब्रह्मांड. २. ३६.१०१).

**वरांगी**—वज्रांगाची स्त्री (मत्स्य. १४५; वज्रांग पहा). हिला ब्रह्मदेवानें वज्रांगाकरितां उत्पन्न केली ( पद्म. सृ. ४२ ). हिला वरांगाहि म्हटलें आहे.

२ त्रिशंकूची कन्या व शंयातीची भार्या.

**वराह**—हा एक विष्णूचा अवतार आहे. वेदांतहि या कथेचें मूळ सांपडतें. इंद्रानें वराहाला मारिल्याचा ऋग्वेदांत उल्लेख आहे (ऋ. १०. ९९. ६). पृथ्वीच्या उत्पत्तीपूर्वी येथें केवळ पाणी होतें; तेव्हां प्रजापति वायुरूपानें फिरत असतां त्याला पाण्याच्या पोटांत पृथ्वी दिसली. ती पृथ्वी प्रजापतीनें वराहरूपानें पाण्यांत जाऊन वर आणिली व कोरडी केली. तिच्यावर मग प्रजापतीनें देव वगैरे निर्माण केले ( तै. सं. ७. १. ५. १ ). प्रजापतीनें कमलाच्या देठाला आधारभूत असणारा चिखल वराहरूपानें वर आणिला व तो कमलाच्या पानावर पसरला. तीच पृथ्वी होय ( तै. ब्रा. १. १. ३ ).

बहुतेक पुराणांत याच अवतारापासून विष्णूचे अवतार सांगण्यास सुरवात होते. हिरण्याक्षानें पृथ्वी पाताळांत पळविली असतां विष्णूनें वराहरूप घेऊन आपल्या दांतावर धरून पृथ्वी पुनः पाण्याच्या बाहेर आणिली व शेषाच्या मस्तकावर तिची स्थापना केली ( म. व. १४४.२९; २७३. ५३; शां. २०७ कुं.; मत्स्य. ४७. ४७; भा. १. ३; २. ७; ३.१३; लिंग. १.९४; वायु. २. ३५; ह. वं. १.४१; पद्म. उ. १६९; २३७ ). याला यज्ञवाराह असें म्हणतात. हा पुष्करांत झाला, म्हणून यास पौष्करिक म्हणतात ( म. स. ४५ कुं. ). यानें श्राद्ध केलें (म. शां. ३५५.१२-१७ कुं.). याचें चतुर्बाहु, चतुष्पाद, चतुर्नेत्र व चतुर्मुख असें वर्णन आढळतें. हा वाराहकल्पाच्या आरंभीं झाला ( वायु. १.२३. ९५-१०० ). यानें जेथें पृथ्वीचा उद्धार केला, त्या ठिकाणास वराहतीर्थ म्हणतात ( म. व. ८१.१८ कुं ; पद्म. उ. १६९ ). वराहक्षेत्र किंवा कोकामुखक्षेत्र ( बंगाल्यांत नाथपूरनजिक ) त्रिवेणी नदीजवळ आहे ( वराह. १४० ). गंगानदीच्या कांठीं (सोरोन) येथें वराहलक्ष्मीचें देऊळ आहे ( वराह. १३७ ).

२ युधिष्ठिराच्या सभेंतील एक ऋषि (म. स. ४.१३ कुं.).

**वराहक**—सर्पसत्रांत दग्ध झालेला धृतराष्ट्रकुलांतील एक सर्प ( म. आ. ५७.१८ कुं. ).

**वराहकर्ण**—कुबेराच्या सभेंतील एक यक्ष ( म. स. १०.१७ कुं. ).

**वराहध्वज**—जयद्रथाचें नांव (म. द्रो. १०५.२० कुं.).

**वराहमिहीर**--विक्रमादित्याच्या पदरीं जीं प्रसिद्ध नऊ रत्नें होतीं, त्यांपैकीं हा एक ज्योतिषी होय. यानें बृहत्संहिता व बृहज्जातक हीं दोन पुस्तकें लिहिलीं. हा कृष्णचैतन्याचा शिष्य. यानें कांहीं क्षुद्र तंत्रें केलीं आहेत ( भवि. प्रति. ४. १९.१०-२२ ). कांचीपुरचा सत्यदत्त नांवाचा एक राजा होता त्याचे पदरीं एक रुद्रशर्मन् नामक ज्योतिषी होता. त्याचा हा पुत्र ( भवि. प्रति. ४. ८ ). यानें वराहसंहितांहि लिहिली आहे ( भवि. प्रति. ४.२० ).

**वरीयस्**—(स्वा.). भागवतमतें गतीचे ठिकाणीं झालेला पुलहपुत्र होय.

२ सावर्णिमनूचा पुत्र.

**वरु आंगिरस**--सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.९६ ).

**वरुण**—मंत्रद्रष्टा ( ऋ. १०. १२४. १.५-९ ). मित्रावरुणांचे अगस्त्य व वसिष्ठ पुत्र होत ( विवस्वत् पहा ).

हा पश्चिम दिशेचा, जलाचा व नागलोकाचा अधिपति आहे ( म. स. ९. ८-१३; उ. ९८ कुं. ). याच्या बायका वारुणी म्हणजे गौरी ( म. स. ९. ६-७ कुं. ). याचा सुनाभ हा मंत्री व गो नांवाचा पुत्र होता ( म. स. ९. ३२-३३ कुं. ). शुक्राचार्यांची मुलगी ज्येष्ठा ही याची पत्नी असून यास बल, सुरा व अधर्म ( म. आ. ६७. ५२-५३ कुं. ), पुष्कर ( म. उ. ९८. १२ कुं. ), शिवाय कहोलादिकाशीं वाद करणारा बंदिन् हे याचे पुत्र होत ( म. व. १३६. २४ कुं. ). सोमकन्या भद्रेचा विवाह याच्याशीं होणार होता, पण ती उचथ्याला दिली. तिला यानें पळविलें ( म. अनु. २५९. १३ कुं. ). देवांनीं याला जलाधिपत्याचा अभिषेक केला ( म. श. ४८. ११ कुं. ). यानें रावणाच्या घरून सुटका झाल्यावर रामाला सीतेच्या निर्दोषीपणाविषयीं खात्री दिली ( म. व. २९२. २९ कुं. ). अर्जुनाला यानें अस्त्र दिलें ( म. व. २९; ४१. ५ कुं. ). याला शीततोया नांवाच्या स्त्रीपासून श्रुतायुध नांवाचा पुत्र झाला ( श्रुतायुध पहा ). पूर्वी रुद्रानें यज्ञ केला त्यांत भृगु, अंगिरस् व कवि निर्माण झाले, त्यांतील भृगूचा यानें पुत्र म्हणून स्वीकार केला ( म. अनु. १३२. ३६ कुं.; भृगु पहा ). याची मानसोत्तर पर्वताच्या मागें निम्लोचिनी नांवाची नगरी होती ( भा. ५. २१. ७ ).

२ एक आदित्य. हा श्रावणांत प्रकाशतो. याचीं किरणें १४०० आहेत ( भवि. ब्राह्म. ७८ ). भागवतांत याचा प्रकाशण्याचा महिना शुचि ( आषाढ ) दिला आहे (भा. १२. ११ ). याला चर्षणीचे ठिकाणीं भृगु झाला (भा. ६.१८.४).

३ मरुतांच्या तिसऱ्या गणांतील एक.

४ कश्यप व मुनि यांचा पुत्र.

**वरुणमित्र गोभिल**—मूलमित्राचा शिष्य ( वं. ब्रा. ३ )

**वरुत्रिन्**—शुक्राचार्यांच्या चार पुत्रांपैकीं एक.

**वरूथ**—कर्दबेचा पिता. यानें आपली मुलगी कंदवा दुर्गमास दिली होती ( मार्क. ७२. ४५ ).

२ कश्यप व अरिष्टा यांचा पुत्र.

**वरूथप**—एक गवळी ( भा. १०. २२. ३१ ).

**वरेण्य**—वारुणि भृगूचा पुत्र. यास विभु असें म्हणतात.

२ पितरांपैकीं एक.

३ कश्यप व अरिष्टा यांचा पुत्र.

४ माहिष्मतीचा राजा ( गणेश. २. १३१-१४८ ).

**वर्कु**—वृष्णीचा पुत्र. यासच वार्ष्णि म्हणतात.

**वर्गा**—एक अप्सरा. ही शापानें मगरी झाली (अर्जुन पहा).

**वर्चस्**—सोम नामक वसूचा पुत्र ( म. आ ६७.१२. कुं. ). हाच अभिमन्यु झाला.

२ एक राक्षस ( भा. १२. ११. ४० ).

३ सुचेतस् ऋषीचा पुत्र. याचा पुत्र विहव्य ( म. अनु. ३०. ग. कु. प्रत).

**वर्चिन्**—हा शंबराचा सहकारी. इंद्रानें याला ठार केलें ( ऋ. ७. ९९. ५. ).

**वर्चोधामन्**—सत्यदेवांतील एक.

**वर्णिका**—( माया पहा. )

**वर्तिवर्धन**—( प्रद्योत. भविष्य. ) वायुमतें अजकाचा पुत्र ( २ प्रद्योत पहा ).

**वर्धन**—कृष्ण व मित्रविंदा यांचा पुत्र ( भा. १०. ६१. १६).

**वर्धमान**—( सो. वसु. ) हा मत्स्यमतें उपदेवीचे ठायीं झालेला वसुदेवपुत्र होय.

**वर्मक**—एक राजा व लोक. यांचा भीमानें पराभव केला ( म. स. ३१. १३ ).

**वर्वरि**—अट्टहास नामक शिवावताराचा शिष्य.

**वर्ष**—वसुदेवास उपदेवेपासून झालेला पुत्र.

२ ( सो. सह. ) हा वायुमतें सहस्रार्जुनपुत्र होय.

३ पाणिनीचा गुरु.

**वल**—अंगिरस्च्या उत्तेजनानें इंद्रानें याला वर्षाच्या शेवटीं ( परिवत्सरे ) ठार केलें ( ऋ. १०. ६२. २ ).

**वलया**—मगध देशांतील देवदास नांवाच्या ब्राह्मणाची कन्या ( पद्म. उ. २१६ ).

**वलल**—भीमसेनाचें अज्ञातवासतील नांव ( म. वि. ३. ८ कुं. ). गणपत कृष्णाजीच्या प्रतींत पौरोगव बल्लव असें नांव आहे.

**वल्गुजंघ**—विश्वामित्र ऋषीचा पुत्र.

**वल्गूतक**—अत्रिकुलांतील मंत्रकार. यासच ववल्गु, वल्गूतक व बलारक म्हणत.

**वल्लभ**—( हेमप्रभा पहा )

**वल्लिक**—देवयुद्धांत अग्नीनें दग्ध केलेला राक्षस ( पद्म. सृ. ७५ ).

**ववल्गू**—( वल्गूतक पहा ).

**वव्रि आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. १९ ).

**वश अश्व्य**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८. ४६). याला प्रत्यहीं हजारों प्रकारानें धन मिळावें असें अश्वींनीं केलें होतें ( ऋ. १. ११६. २१ ). पृथुश्रवा कानीतानें याला पुष्कळ धन दिलें होतें ( ऋ. ८. ४६ ). वश राजा होता असें सायणाचार्य म्हणतात (ऋ. १०. ४०. ७; सां. श्रौ. १६. ११. १३).

**वशवर्तिन्**—उत्तम मन्वंतरांतील देवगण. हे दहा आहेत. ज्योति, बृहद्वसु, मानस, विभास, विरजस्, विश्वकर्मन्, विश्वधा, विश्वायु, समितार, सहस्रधार ( ब्रह्मांड. २. ३६. २९-३० ).

**वश्यायु**—पुरूरव्याला उर्वशीपासून झालेला पुत्र ( पद्म. सृ. १२ ).

**वश्याश्व**—एक ऋषिक(ब्रह्मांड.२. ३२. १०१-१०३).

**वसित**—दक्षसावर्णि मन्वन्तरांतील एक ऋषि.

**वसाति**—दुर्योधनपक्षीय एक राजा. यानें अभिमन्यु चक्रव्यूहांत शिरला असतां त्यास मी मारीन, नाहीं तर मी स्वतः प्राणत्याग करीन, अशी प्रतिज्ञा केली होती. अभिमन्यूला मारण्याकरितां हा त्याच्या पुढें जातांच अभिमन्यूनें यास ठार मारिलें ( म. द्रो. ४४ ).

२ प्रथम पारिक्षत जनमेजयाचा पुत्र ( म. आ. १०१ ४४ कुं. ).

**वसिष्ठ**—हा उर्वशीमुळें मित्रावरुणांच्या रेतानें कमलांत किंवा कुंभांत झाला( ऋ. ७.३३.१०-१३; बृहद्दे.५.१३४). हा ऋग्वेदाच्या सातव्या मंडळाचा द्रष्टा आहे. यानें सूक्त केलें असा मंत्रांत निर्देश आहे ( ऋ. ७.१८.२३ ). हा सुदासाचा पुरोहित होता. ह्या पौरोहित्यामुळेंच वसिष्ठविश्वामित्रांचा तंटा होता व त्याचा ऋग्वेदांतहि उल्लेख आहे ( ऋ. ३. ५३ १५; १६; २१-२४ ). शेवटल्या चार ऋचा ‘ वसिष्ठद्वेषिण्यः ’ म्हणून प्रसिद्ध आहेत. बृहद्देवतेंत तसा उल्लेख आहे. म्हणूनच वसिष्ठगोत्री दुर्गाचार्यानें त्यांचा अर्थ केला नाहीं (नि. ४. १४). वसिष्ठपुत्र शक्तीला विश्वामित्रानें मारविलें (ऋ. ७. ३२ षड्गुरुभाष्य, सायणभाष्य; १ शक्ति व विश्वामित्र पहा). वसिष्ठसुदासांचा संबंध चांगला होता. वसिष्ठानें सुदास पैजवनाला सोमाचा विशिष्ट सांप्रदाय सांगितला; व त्यामुळें तो थोर पदवीला चढला ( ऐ. ब्रा. ७. ३४; ८. २१ ). हरिश्चंद्राच्या राजसूयांत हा ब्रह्मा होता ( ऐ. ब्रा. ७.१६; सां. श्रौ. १५. २१. ४; श. ब्रा. १२.६.१.४१;४.६.६.५. ). वसिष्ठ हेच एके काळीं

यज्ञाला योग्य असे ब्राह्मण होते. पण पुढें कोणीहि ब्राह्मण यज्ञांत कामें करूं लागले (श. ब्रा. १.५). वसिष्ठ व जमदग्नि यांची स्पर्धा आवर्जून होती (तै. सं. ३.१.७.३). [illegible] वसिष्ठाचा मुलगा (पराशर पहा). एकदां बुभुक्षेत वसिष्ठानें तीन उपोषणें घडल्यावर चवथ्या दिवशी वरुणाच्या घरांत शिरण्याचा प्रयत्न केला. कुत्र्यांना झोप यावी, म्हणून कांहीं ऋचाहि म्हटल्या (ऋ. ७.५५). वसिष्ठांना तृत्सु म्हणत (ऋ. ७. ८३. ८). एक महर्षि म्हणून याचा वैदिक वाङ्मयांत विशेष उल्लेख येतो.

वसिष्ठ शेंडी उजव्या बाजूस ठेवीत असत (ऋ. ७. ३३. १). दत्तक घेण्याच्या पद्धतीवर वसिष्ठानें खरपूस कोरडे ओढले आहेत (ऋ. ७. ४. ७-८).

महामृत्युंजय मंत्र वसिष्ठाच्या ऋचांतच आला आहे (ऋ. ७. ५९. १२). वसिष्ठावर नानातऱ्हांचे वाईट आरोप कोणी करीत आहेत आणि वसिष्ठ ते जोरजोरानें नाकारीत आहे. असें म्हणणारांना शिव्याशाप देत आहे वगैरे राक्षोघ्न सूक्तांत दिसतें (ऋ. ७. १०४). बृहद्देवतेनें याचा संबंध वसिष्ठविश्वामित्रांच्या तंट्याशीं लाविला आहे (६. २८-३४).

वसिष्ठविश्वामित्रांच्या तंट्याशीं संबंध जोडल्यास सातव्या मंडळांतील बऱ्याच गोष्टींचा उलगडा होतो. वसिष्ठविश्वामित्रांचा तंटा पौराणिक नसून वैदिक आहे, हें बऱ्याच ठिकाणावरून स्पष्ट दिसतें (शुनःशेप व विश्वामित्र पहा). कदाचित् पिढ्यानपिढ्या हा तंटा चालला असेल.

एकोनपंचाशद्रात्र याग याच्या नांवानें प्रसिद्ध आहे (तै. सं. ७.४.७). स्तोमभाग नांवाच्या मंत्राचा हा प्रवर्तक आहे (तै. सं. ३.५.२). याचा विपाश नदींत वसिष्ठशिला नांवाचा आश्रम आहे व दुसरा कृष्णशिला नांवाचा आहे. तेथें यानें तप केलें (गो. ब्रा. १.२.८). इंद्राच्या कृपेनें हा सर्व लोकांचा पुरोहित झाला (गो. ब्रा. १.२.१३).

२ स्वायंभुव मन्वन्तरांतील ब्रह्मदेवाच्या दश मानसपुत्रांतील वसिष्ठ हा एक होता. हा ब्रह्मदेवाच्या प्राणवायूपासून उत्पन्न झाला (भा. ३.१२.२३). याला दोन बायका होत्या. एक कर्दम प्रजापतीच्या नऊ कन्यांपैकीं आठवी अरुन्धती आणि दुसरी ऊर्जा होय. ऊर्जेपासून याला चित्रकेतु वगैरे सहा पुत्र झाले (भा. ४. १. ४१). शिवाय हवीन्द्र वगैरे सात पुत्र होते; याशिवाय सुकाल नांवाचे पितर याचेच पुत्र होत (ह. वं. १. १८).

हा स्वायंभुव मन्वन्तरांत ब्रह्मयाच्या समानापासून उत्पन्न झाला. हा दक्षाचा जांवई व शंकराचा साडू. दक्षानें अपमान केल्यामुळें शंकरानें याला ठार केलें. दक्षकन्या ऊर्जा याची बायको. ऊर्जेपासून याला १ पुंडरिका, २ दक्ष (रत्न), ३ गर्त, ४ ऊर्ध्वबाहु, ५ सवन, ६ पवन, ७ सुतपस्, ८ शंकु अशी संतति झाली. मुलें सप्तर्षि झालीं. पुंडरिका प्राणाची पट्टराणी व द्युतिमताची आई होय. रत्नाला मार्कंडेयीपासून पश्चिमेकडे केतुमत् प्रजापति झाला (ब्रह्मांड. २. १२. ३९-४३).

हा प्रजापति असतांना याला अयोनिसंभव शतरूपा नांवाची कन्या झाली. हिनें जन्मतःच दहा हजार वर्षें तप केलें. संतति व्हावी म्हणून ती वसिष्ठ प्रजापतीजवळ येऊन राहिली. तेव्हां वसिष्ठापासून तिला वीर नांवाचा मुलगा झाला. वीराला कर्दमप्रजापतीकन्या काम्येपासून प्रियव्रत व उत्तानपाद झाले. उत्तानपादाला अत्रीनें दत्तक घेतलें. पुढें त्याच काम्येला प्रियव्रतापासून सम्राट्, कुक्षि, विराट व प्रभु हे पुत्र झाले (ह. वं. १. २).

३ महादेवाच्या शापानें ब्रह्मदेवाचे मानसपुत्र दग्ध झाले होते, ते चाक्षुष मन्वंतरांच्या आरंभीं ब्रह्मदेवानें पुनः उत्पन्न केले. तेव्हां हा अग्नीच्या मध्यापासून उत्पन्न झाला. येथें यास अक्षमाला नांवाची स्त्री असावी (म. उ. ११७). हा निमीचा कुलोपाध्याय असून त्यांचा तंटा होऊन दोघेहि मृत झाले (निमि पहा).

४ निमीनें शाप दिल्यानंतर वसिष्ठ वायुरूपानें ब्रह्मयाकडे गेला व ब्रह्मयाच्या इच्छेवरून उर्वशीला पाहून स्खलित झालेल्या मित्रावरुणांच्या रेतानें कुंभांत उत्पन्न झाला (वा. रा. उ. ५७; मत्स्य. ६०. २०-४०; २००). याची पत्नी नारदभगिनी अरुन्धती होय.

कामधेनूच्या साहाय्यानें विश्वामित्राचें वसिष्ठानें आश्रमांत उत्कृष्ट आतिथ्य केलें, तेव्हां त्यानें कामधेनु मागितली. शेवटीं बलात्कारानें नेण्याचा प्रयत्न केला असतां धेनूच्या शरिरापासून शक, पल्लव वगैरे म्लेच्छ उत्पन्न झाले व त्यांनीं विश्वामित्राचा पराभव केला. तेव्हां क्षत्रियबलापेक्षां ब्राह्मणबल श्रेष्ठ आहे, असें त्याच्या प्रत्ययास येऊन त्यानें तपश्चर्येस सुरुवात केली. याच्याकडून ब्रह्मर्षि म्हणवून घेण्याचा त्यानें अत्यंत प्रयत्न केला. ही कथा पांचव्या वसिष्ठाची असावी.

पुढें विश्वामित्रानें रागानें याचे शंभर पुत्र राक्षसाकडून खावविले. त्यामुळें वैतागून स्वतःला बांधून घेऊन यानें नदींत जीव दिला; पण हा त्यांतून वांचला, म्हणून त्या नदीस विपाशा असें नांव पडलें (म. व. १३०). शतद्रु नांव पडण्याचें कारणहि असेंच आहे (म. आ. १९३. १० कुं.). ही कथा दहाव्या वसिष्ठाची असावी.

विश्वामित्रानें याच्यावर शंभर मुलें भक्षिल्याचा आरोप केल्यावरून यानें पैजवनापुढें शपथपुरस्सर ती गोष्ट नाकारिली

( मनु. ८. १० ). पण ही कथा कालदृष्ट्या विसंगत आहे ( शक्ति पहा ).

कक्षसेनानें यास आपली संपत्ति दिली होती ( म. अनु. २००. १५ कुं.). यानें पक्षवर्धिनी एकादशीचें व्रत केलें होतें ( पद्म. उ. ३६ ). यानें बकुलासंगमीं परमेश्वराची सेवा केली होती ( पद्म. उ. १३८ ). यास इंद्रप्रस्थांतील सप्ततीर्थ-प्रभावानें महापवित्र पुत्र झाले ( पद्म. उ. २२२ ). ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञांत हा होतृगणांतील ऋत्विज् होता ( पद्म. सृ. ३४ ). यानें भीष्मपंचक व्रत केलें होतें ( पद्म. उ. १२४ ). हा एक व्यास आहे (व्यास पहा).

याची एक ३० अध्यायांची स्मृति आनंदाश्रमाच्या स्मृति-समुच्चयांत आहे. तिच्यांत आचार, प्रायश्चित्त, संस्कार, रजस्वला, संन्यासी, आततायी वगैरेंकरितां नियम दिलेले आहेत. त्याचप्रमाणें दत्तकप्रकरण, साक्षीप्रकरण, प्रायश्चित्त इत्यादि विषयांचेंहि विवेचन केलेलें आहे. व्यंकटेश्वरप्रतींत वरील विषयांचें विवेचन करणारीच स्मृति याचे नांवावर आहे. परंतु ती फक्त २१ अध्यायांची आहे. ती व जीवानन्दसंग्रहांतील प्रायः एकच आहेत, दोन्ही प्रतींतील श्लोक बहुतेक सारखेच आहेत. याची ९-१० अध्यायांचीहि पण एक स्मृति आहे. तिच्यांत वैष्णवांच्या रोजच्या कर्तव्याविषयींचें विवेचन केलेलें आहे ( C. C. ).

वसिष्ठधर्मसूत्र हें गौतमधर्मसूत्रांतील सूत्रांशीं बऱ्याच बाबतींत जुळतें. त्याचप्रमाणें बौधायनधर्मसूत्रांतील पुष्कळ सूत्रांशीं वसिष्ठधर्मसूत्रांतील सूत्रांचें साम्य आहे. वसिष्ठधर्म-सूत्र ऋग्वेदाचें आहे. तन्त्रवार्तिकांतहि वसिष्ठ हा पुरातन गृह्यसूत्रकार म्हणून उल्लेख आहे ( १. ३. २४ ).

मिताक्षरादि ग्रन्थांत वसिष्ठाच्या धर्मशास्त्रांतील उतारे घेतलेले आहेत. त्याचप्रमाणें बृहदारण्यकोपनिषदाच्या श्रीशंकराचार्यांच्या भाष्यांतहि वसिष्ठाच्या धर्मसूत्रांतील बरींच सूत्रें घेतलीं आहेत. वसिष्ठानें आपल्या ग्रंथांत वेद व संहिता यांमधील उतारे घेतले आहेत. त्याचप्रमाणें निदानामधील भाल्लविनाची एक गाथाहि वसिष्ठानें आपल्या ग्रंथांत दिलेली आहे. शिवाय मनु, हारीत, यम, गौतम यांचीं मतें बरेच वेळां दिलेलीं आहेत. वसिष्ठस्मृतीचा उल्लेख मनुस्मृति, याज्ञवल्क्य-स्मृति यांत आहे.

वसिष्ठस्मृतीशिवाय वृद्ध वसिष्ठाचा विश्वरूप ( १. १९ ) व मिताक्षरा ( २. ९१ ) यांमध्यें उल्लेख सांपडतो. स्मृति-चंद्रिकेंतहि ज्योतिर्वसिष्ठांतले कांहीं श्लोक आले आहेत.

याशिवाय खालील ग्रंथहि याचे म्हणून प्रसिद्ध आहेत— ( १ ) वसिष्ठकल्प, ( २ ) वसिष्ठतंत्र, ( ३ ) वसिष्ठपुराण, ( ४ ) वसिष्ठलिंगपुराण, ( ५ ) वसिष्ठशिक्षा, ( ६ ) वसिष्ठ-श्राद्धकल्प, ( ७ ) वसिष्ठसंहिता, ( ८ ) वसिष्ठहोमप्रकार ( C. C. ). विश्वामित्राच्या विनंतीवरून वसिष्ठानें रामाला योग-वासिष्ठ नांवाचा सुप्रसिद्ध वेदांतपर ग्रंथ सांगितला (यो. वा. २. ३ ). याचा एक वास्तुशास्त्रावर ग्रंथ आहे ( मत्स्य. २५२ ).

वसिष्ठाची वंशावळ–वसिष्ठ-अरुंधती, शक्ति-स्वागज किंवा सागर, पराशर–काली, कृष्णद्वैपायन–अरणी, शुक-पीवरी, भूरि-श्रवस्, प्रभु, शंभु, कृष्ण, गौर, कीर्तिमती ( ब्रह्मदत्त स्त्री ). वसिष्ठ घृताचीपासून कुणीति ( कुशीति ) ऊर्फ इंद्रप्रमति; त्यापासून वसु, वसूपासून पृथुसुतेला उपमन्यु अशी आढळते ( ब्रह्मांड. ३. ८०. ९०-१००; वायु. २. ५. ८८-९०; लिंग. १. ६३. ७८-९२; कूर्म. १. १९, मत्स्य. २००. ). वसिष्ठास व्याघ्रीपासून व्याघ्रपाद, मन्द, जाद[illegible] जाबालि मन्यु, उपमन्यु, सेतुकर्ण इत्यादि गोत्रकार असे [illegible] पुत्र झाले ( म. अनु ५३. ३०-३२ कुं. ).

वसिष्ठकुलांतील गोत्रकार—अलब्ध, आप[illegible]ण ( ग ), उपावृद्धि, औपगव ( अपगवन, ग ), औपलाम ( [illegible] ग ), कठ ( ग ), कपिष्ठल ( ग ), गोपायन (गोपाय[illegible] ग) गौडिनि ( जौडिलि ), चौलि, दाकव्य ( ग ), [illegible]शय ( ग ), पौडव ( खांडव ), पौलि, बा[illegible]शय ( ग ), बोधप ( ग ), ब्रह्मबल, ब्राह्मपुरेयक ( ब्रह्म[illegible]तेजन, ग, ) याज्ञवल्क्य ( याज्ञदत्त ), लोमायन ( ग ), वा[illegible] वाह्नि ( ग ), वाडोहलि, वाह्यक ( ग ), वैक्लव ( ग ), वौलि, व्याघ्रपाद ( ग ), शठ ( ग ), ( षटाकुर, शठकट ), शांडिलि, शाद्वलायन ( ग ), शीतवृत्त ( ग ), श्रवस ( श्रवण ), [illegible] ( ग ), स्वस्तिकर ( ग ). हे सर्व वसिष्ठ या एकाच प्रवराचे आहेत.

उद्वाह (उद्घाट, ग ), उपलप ( ग ) उहाक (ग), औपमन्यव, कपिंजल ( ग ), काण्व ( ग ), कालशिख, कौ[illegible]कृष्ण ( कौरकृष्ण, ग ) कौरव्य, कौलायन ( कौमाल-रायण ), कौंडोदरायण, कौधिन, गोर[illegible] ( ग ), नपैथ, दाकायन, पन्नागारि ( पर्णागारि ), पालंकायन, ( [illegible] ), प्रलंबायन ( ग ), बलेक्षु ( दलेषु, ग ), बालवय, ब्रह्म-मालिन् ( ग ), भागवित्तायन ( ग ), ( भागवित्रासन ), महाकर्ण, मातेय ( ग ), माषशरावय ( ग ), लंबायन (ग), वाकय ( ग ), वालखिल्य ( ग ), वेदशेरक (ग), शाकधिय, शाकायन ( ग ); शाकाहार्य ( ग ), शैलालय ( रौरालय, शैवलेय), श्यामवय, सांख्यायन, सुरायण. हे इंद्रप्रमदि (चंद्र-संमति), भगीवसु ( भार्गीवसु ) व वसिष्ठ या त्रिप्रवरांचे आहेत.

औपस्थल, (जपस्वस्थ, ग ), कुंडिब, त्रैशृंगायण (त्रैशृंग-(ग ), पैप्पलादि, बाल ( घब ), माक्षति ( ग ), माध्यंदिन, लोहलय (हाल-हलबद्दल पाठभेद ). विचक्षुप् ( विवर्धक ),

सैवल्क ( सर्व मैलाव ), स्वरचले (ग), हल, झाल हे कुंडिन, मित्रावरुण व वसिष्ठ, या त्रिप्रवरांचे आहेत.

आलंब, ( ग ), कौंडोदय, दानकाय ( ग ), नागेय (ग), परम ( ग ), पादप, महावीर्य (ग) वय, वायन, शिवकर्ण ( शलकर्ण ) हे अत्रि, जातूकर्ण्य व वसिष्ठ या प्रवरांचे होत (मत्स्य. २००).

वसिष्ठकुलांतील मंत्रकार.

| वायु. | मत्स्य | ब्रह्मांड. |
|---|---|---|
| १.५९.१०५-१०६; | १४५.१०९-११०; | २.३२.११५-११६ |
| इंद्रप्रमति | इंद्रप्रतिम | इंद्रप्रमति |
| कुंडिन | कुंडिन | कुंडिन |
| पराशर | पराशर | पराशर |
| बृहस्पति | | |
| भरद्वसु | भरद्वसु | भरद्वसु |
| भरद्वाज | | |
| मैत्रावरुण | मित्रावरुण | मैत्रावरुणि |
| वसिष्ठ | वसिष्ठ | वसिष्ठ |
| शक्ति | शक्ति | शक्ति |
| उपमन्यु | | |

यांचा वसिष्ठ या सामान्य नांवानें पुरोहित म्हणून इक्ष्वाकुकुलाशीं संबंध आहे व त्याप्रमाणें जागोजाग निर्देश येतात. पण सामान्य नांवामुळें कालक्रमाचें अवधान न राहतां याचा संबंध जोडला जातो. म्हणून वंशावळीप्रमाणें वसिष्ठहि अनेक मानणें जरूर आहे. साधारणतः पुढील व्यक्तींशीं संलग्नतेनें निर्दिष्ट होणारे वसिष्ठ वेगळे दिसतात. त्रिशंकु–हरिश्चंद्र, बाहु–सगर, मित्रसह कल्माषपाद, खट्वांग दिलीप, दाशरथि राम इत्यादि ठिकाणचा वसिष्ठ वंशावळीच्या तुलनेनें भिन्न दिसतो. पौरव संवरण व पांचाल सुदास यांच्याशीं संबंध असलेला वसिष्ठ समकालीनतेमुळें एक असण्याचा संभव आहे. व तोच ऋग्वेदांतील असावा (विश्वामित्र, शक्ति व सुदास पहा).

५ ( त्रिशंकु, हरिश्चंद्र, रोहित, शुनःशेप व १ विश्वामित्र पहा ).

६ ( सगर पहा ).

७ ( कल्माषपाद पहा ).

८ ( २ दिलीप पहा ).

९ ( ३ राम पहा ).

१० पूरुवंशातील ऋक्षपुत्र संवरणास वसिष्ठानें राज्य मिळवून दिलें; तपती प्राप्त करून दिली व राष्ट्रांत बारा वर्षे दुष्काळ पडला असतां त्यांतून राष्ट्राचा बचाव केला ( म. आ. ९४; १७१-१७४ ). तारकामय संग्राम झाल्यानंतर अनावृष्टीमुळें दुष्काळ पडला असतां, इंद्रादि सर्व देव अत्यंत चिंतातुर झाले. तेव्हां यानें फलमूलऔषधी उत्पन्न करून सर्व लोक वांचविले ( वायु. २. ९. ८१-८२; ब्रह्मांड. ३. ८-९; म. शां. २४०. २७; अनु. २००. १३ कुं. ). ही कथा बहुधा संवरणाच्या वेळच्या दुष्काळांतील असावी.

११ रैवत मन्वंतरांतील एक ऋषि.

१२ सावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

१३ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

१४ धर्मनारायण नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**वसिष्ठ चैकितानेय**—याचा स्थिरक गार्ग्य शिष्य आहे ( वं. ब्रा. २ ). गौतम आरुणीशीं ज्याचा संवाद झाला तो चैकितानेय वासिष्ठ व हा एकच असावा ( जै. उ. ब्रा. १. ४२. १ ).

**वसिष्ठ वैडव**—वीडुपुत्र वसिष्ठानें वासिष्ठ सामानें उत्कर्ष प्राप्त केला ( पं. ब्रा. ११. ८. १४ ).

**वसिष्ठा**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या; कश्यपाची भार्या.

**वसु**—( सो. पुरूरवस्. ) मत्स्यमतें पुरूरवस्पुत्र. अमावसु असा इतरत्र पाठ आहे.

२ ( सू. नृग. ) भागवतमतें सुमतिपुत्र.

३ ( सो. वसु. ) भागवतमतें श्रीदेवीच्या ठायीं झालेला वसुदेवपुत्र.

४ ( स्वा. उत्तान. ) भागवतमतें स्वर्वीथीचे ठिकाणीं झालेला वत्सरपुत्र.

५ ( सो. अमा. ) भागवतमतें कुशपुत्र. विष्णूंत यास अमावसु व वायूंत यशोवसु म्हटलें आहे. यानें गिरिव्रज नांवाचें शहर वसविलें. तें रामायणकालीं वसुमती नांवानें प्रसिद्ध होतें ( वा. रा. बा. ३२. ७ ).

६ ( सो. अज. ) भागवतमतें कृतिपुत्र. विष्णुमतें कृतकपुत्र ( उपरिचर पहा ).

७ वैवस्वत मन्वंतरांतील देवगण.

८ दक्षसावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

९ भृगु व पौलोमी यांचा पुत्र.

१० प्रतर्दन देवांतील एक.

११ कुणीति व पृथुकन्या यांचा पुत्र.

१२ उत्तानपाद व सुनृता यांचा पुत्र.

१३ आद्य देवांतील एक.

१४ मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

१५ प्राचेतस दक्षाची कन्या व धर्म ऋषीची स्त्री. हिलाच कल्पभेदांनीं धूम्रा वगैरे नांवें दिलीं आहेत ( म. आ. ६७. १९ कुं. ).

धर्म व वसु यांच्या आठ पुत्रांस वसु म्हणतात. त्यांचीं नांवें अनल, अनिल, आप, धर, ध्रुव, प्रत्यूष, प्रभास व सोम हीं होत. अनलाचे पुत्र १ स्कंद, २ शाख, ३ विशाख, ४ नैगमेय. अनिलाची स्त्री शिवा व पुत्र १ मनोज व २ अविज्ञातगति. पण हीं स्त्री व मुलें मत्स्यांत श्लोकार्धस्थलांतरामुळें अनलाचीं दाखविलीं गेलीं आहेत. शिवाय कल्याणिनी स्त्री आणि रमण व शिशिर हे पुत्र दिले आहेत. आपाचे पुत्र—१ वैतड्य, मत्स्यमतें दंड; २ श्रम, मत्स्यमतें शांब; वायु, भारत व ब्रह्मांड यांच्या मतें शम; ३ श्रांत, ब्रह्मांड, वायु, ह. वं. व विष्णु यांच्या मतें शांत; ४ मुनि, विष्णुमतें ध्वनि, मत्स्यमतें मणिवक्र; वायु व ब्रह्मांडांत हा नाहीं. धराचा पुत्र—द्रविण. मत्स्यांत हव्यवाह अधिक दिला आहे. इतरत्र तें विशेषण आहे. यास मनोहरा नांवाच्या स्त्रीपासून शिशिर, प्राण व रमण झाले. पण वायु व ब्रह्मांडांत हे नाहींत. ध्रुवाचा पुत्र काल. प्रत्यूषाचा देवल. प्रभासाची स्त्री बृहस्पतीची बहीण वरस्त्री ऊर्फ आंगिरसी व पुत्र विश्वकर्मन्. सोमाचा पुत्र वर्चस्, ब्रह्मांड व वायु यांत १ बुध, २ धर (धारं), ३ ऊर्मि, ४ कालिल असे आणखी पुत्र दिले आहेत (ब्रह्मांड. ३. ३. २१-२९; वायु. २. ५. २०-२८; विष्णु. १. १५. १११-१२०; मत्स्य. ५. १७-२७; ब्रह्म. ३. ३६-४४; ह. वं. १. ३). महाभारतांत खालील माहिती आहे. धर व ध्रुव धूम्रेचे, चंद्र मनस्विनीचा, श्वसन अथवा अनिल श्वासेचा, अनल शांडिल्येचा आणि प्रभास व प्रत्यूष हे प्रभातेचे पुत्र होत. वरील आठांतील म्हणूनच रतेचा अह दिला आहे व पुत्र सांगतांना वरील यादीपैकीं वगळलेला आप दिला आहे. अहाचे व आपाचे पुत्रहि सारखेच दिसतात. अहाचे पुत्र १ ज्योति, २ शम, ३ शांत व ४ मुनि हे होत (म. आ. ६७. १८-२८ कुं.). भागवतांतील माहिती अगदीं निराळी आहे. ती वसु, त्याची स्त्री व पुत्र या क्रमानें दिली आहे. १ द्रोण—अभिमति—हर्ष, शोक, भय, इ.; २ प्राण—ऊर्जस्वती—सह, आयु, पुरोजव; ३ ध्रुव—धरणी—पुरस्य देवता; ४ अर्क—वासना—तर्ष, वगैरे; ५ अग्नि—१ वसोर्धारा-द्रविणक, २ कृत्तिका—स्कंद विशाख, इ.; ६ दोष—शर्वरी—शिशुमार; ७ वसु—अंगिरसी—विश्वकर्मन्; ८ विभावसु—उषा—व्युष्ट, रोचिष, आतप, पंचयाम (भा. ६. ६. ११-१६).

१६ दहा विश्वेदेवांतील तिसरा देव.

१७ हिरण्यरेत्याचा पुत्र (भा. ५ २०. १४).

१८ पैलऋषीचा पिता. हा आंगिरस होता (स. स. ३२).

१९ भद्र ऋषीचा पुत्र. याचा पुत्र उपमन्यु.

२० भूतज्योति राजाचा पुत्र. याचा पुत्र प्रतीक (भा. ९. २. १७).

२१ (स. इ.) नृग राजाचा पुत्र.

२२ कुशिकपुत्र.

२३ कृष्णास सत्येपासून झालेला पुत्र.

२४ मुर दैत्याचा पुत्र. याला कृष्णानें मारिलें (भा. १०. ५९. १२).

२५ सावर्णि मनूचा पुत्र (मनु पहा).

२६ स्वायंभुव मनूचा पुत्र (मनु पहा).

२७ हा चाक्षुष मनूच्या कालीं ब्रह्मधाचा मुलगा होता. यानें 'कर्मानें मोक्ष मिळतो कीं ज्ञानानें?' असें रैभ्याकडून बृहस्पतीला विचारिलें. 'ज्ञानपूर्वक कर्मानें मोक्ष मिळतो' असें याला सांगण्यांत आलें, अशी आख्यायिका आहे. याला विवस्वत् नांवाचा मुलगा होता. हा काश्मीर देशचा राजा होता. यानें पुष्करतीर्थावर तपश्चर्या केली. याला व्याधानें पूर्वजन्माचें स्मरण दिलें, म्हणून यानें 'तूं जन्मांतरीं धर्मव्याध होशील,' असा त्याला वर दिला. याला पुंडरिकाक्षपर स्तोत्रानें मोक्ष मिळाला (वराह. ५-६).

२८ जमदग्निपुत्र (म. व. ११७. ११ कुं.).

२९ हा ब्राह्मण केरल देशांत राहत असे (पद्म. उ. १२९). हा पिशाच्च झाला असतां गंगोदकानें मुक्त झाला.

३० वेंकटाचलावरील निषाद. याला चित्रवतीपासून वीर झाला. तो विष्णूला नैवेद्य दाखवून मुक्त झाला (स्कंद. २. १. ९).

३१ जंबुद्वीपाचा राजा. याच्या वीर्यापासून मत्स्याच्या पोटांत सत्यवती झाली (स्कंद. ५. ३. ९७).

३२ क्रमी नांवाची एक जात किंवा वंश होता, त्यांतील हा एक दुर्वर्तनी पुरुष आहे. यानें आपल्या दुर्वर्तनामुळें आपल्या ज्ञातिबांधवांचा व आप्तेष्टांचा नाश करून घेतला (म. उ. ७३. ११; १३ कुं.).

३३ कुणीति व पृथुकन्या यांचा पुत्र. याचा पुत्र उपमन्यु.

**वसु भारद्वाज**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९. ८०-८२).

**वसुकर्ण वासुक्र**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. ६५-६६).

**वसुकृत् वासुक्र**—सूक्तद्रष्टा (ऋ. १० २०-२६).

**वसुक्र ऐंद्र**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. २७-२९). पण ह्या सूक्तांची द्रष्ट्री याची बायको असल्याबद्दल इतरत्र उल्लेख सांपडतो (ऐ. आ. १. २. २; सां. आ. १. ३). एकदां इंद्र वसुक्र यज्ञ करीत असतां तेथें गुप्तपणें आला. पण वसुक्रपत्नीनें त्याबद्दल दुःख केल्यामुळें इंद्र प्रगट झाला. त्यानें वसुक्राशीं केलेला संवाद ऋग्वेदांत आहे. (ऋ. १०. २८).

**वसुक्र वासिष्ठ**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९. ९७. २८-३०).

**वसुक्रपत्नी**—मंत्रद्रष्ट्री (ऋ. १०. २८. १).

**वसुचंद्र**—पांडवपक्षीय एक राजा ( म. द्रो. १५८ ).

**वसुज्येष्ठ**—( शुंग. भविष्य. ) मत्स्यमतें पुष्यमित्राचा पुत्र. भागवत, विष्णु व ब्रह्मांड यांत सुज्येष्ठ म्हटलें आहे. यानें ७ वर्षें राज्य केलें.

**वसुद**—भृगु व पौलोमी यांचा देवपुत्र.

२ ( सू. इ. ) मत्स्यमतें पुरुकुत्स व नर्मदा यांचा पुत्र; हाच त्रसदस्यु होय.

**वसुद** किंवा **वसुदत्त**—हा गतजन्मींचा सुव्रत होय. याला विष्णूरानें इंद्रत्व प्राप्त झालें ( पद्म. सृ. २२; भू. ५).

**वसुदा**—मालि राक्षसाची स्त्री.

२ अंगिरसाची भार्या ( म. व. २२१. १ कुं. ). हिला गणपत कृष्णाजीच्या प्रतींत सुभा म्हटलें आहे ( शिवा पहा ).

**वसुदान**—विष्णु व भविष्य यांच्या मतें शिवदेवांतील एक.

२ हिरण्यरेतस्पुत्र ( भा. ५. २०. १४ ).

३ भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय अतिरथि राजा. याला द्रोणानें मारिलें ( म. द्रो. १९०; क. ६ ).

४ पांडवपक्षीय दुसरा एक राजा. यासहि द्रोणाचार्यानें मारिलें ( म. द्रो. २१ ).

५ पांडवकालीन पांसुदेशाधिपति (म.स.७८. १०६ कुं.).

६ ( सो. कुरु. भविष्य. ) विष्णुमतें बृहद्रथपुत्र. हाच मत्स्यमतें वसुदामन् व भागवतमतें सुदास.

**वसुदेव**—( सो. वृष्णि. ) शूर राजाच्या दहा पुत्रांतील ज्येष्ठ. याच्या जन्मकालीं देवांनीं दुंदुभी वाजविल्यामुळें यास आनकदुंदुभि असें म्हणत असत ( भा. १०. १; म. स. २३. ३ कुं.; वायु. २. ३०; ब्रह्म. १४; ह. वं. २. २५ ). याच्या बायका आणि संतति यांसंबंधीं आम्हीं सहा पुराणांची तुलनात्मक माहिती दिली आहे; त्यावरून पाहतां एकवाक्यता आढळत नाहीं. याचा नारदाबरोबर भक्तिपर संवाद झाला आहे ( भा. ११. २. ४ ). यानें स्यमंतपंचकक्षेत्रीं यज्ञ केला ( भा. १०. ८४. ४३ ). द्वारकेंत प्रभातक्षेत्रीं रामकृष्ण परलोकीं गेल्यानंतर हा परलोकीं गेला. याचें प्रेत मूल्यवान् गाडींतून स्मशानांत नेलें. याच्याबरोबर याच्या देवकी, भद्रा, रोहिणी व मदिरा ह्या चार स्त्रिया सती गेल्या. याच्या अत्यंत प्रिय असणाऱ्या स्थानीं यास जाळण्यांत आलें ( म. मौ. १५. २५ कुं; भा. ११. ३१. १९ ). यानें अश्वमेध केला असतां याचा घोडा शिशुपालानें पळविला होता (म. स. ६८. १७ कुं.). हा कंसाच्या तुरुंगांत असतां यास कृष्ण झाला. त्यास यानें रात्रीं गुप्तपणें यमुनापार जाऊन गोकुळांत नेलें व तेथें एका दासीकरवीं यशोदेकडे पोंचविलें. यशोदादेवकींचा हा संकेत पूर्वींच हाळविला होता ( दे. भा. ४.२३ ). याचीं देवकीशिवाय इतर पुत्रांचीहि मुलें कंसानें मारिलीं आहेत.

याच्या स्त्रियाः—१ रोहिणी, २ मदिरा, इंदिरा ( ह. वं. ), ३ भद्रा, ४ वैशाखी, वैशाली ( विष्णु. ); व ५ सुनाम्नी ह्या सर्व पूरुकुलोत्पन्न होत ( ह. वं. ). पैकीं रोहिणी बाह्लीक-(वायुमतें वाल्मीक ) कन्या होय ( ह. वं.; ब्रह्मांड.; वायु. ). वैशाखी व सुनाम्नी भागवतांत नाहींत. पण रोचना व इला अशा दोन निराळ्याच स्त्रिया दिल्या आहेत. विष्णूंत सुनाम्नी नाहीं. यास आणखी देवककन्या १ सहदेवा, २ शांतिदेवा, शार्ङ्गदेवा ( वायु. ), श्राद्धदेवा ( मत्स्य. ), ३ श्रीदेवा, ४ देवरक्षिता, ५ वृकदेवा (धृतदेवा), ६ उपदेवा, ७ देवकी अशा सात स्त्रिया होत्या; व १ सुगंधा, सुतनु ( ह. वं. ), २ वनराजी, रथराजी ( मत्स्य. ), वडवा ( ह. वं. ) या दोघी भोगांगना होत्या. या भागवत व विष्णु यांत नाहींत. पुत्र सांगतांना वैशाखीपुत्र कौशिक हा वैश्येचा, तसाच वैशाखीचा (ब्रह्मांड.) व श्राद्धदेवीचा (मत्स्य.) दिला आहे. केशिन् असा कौसल्येचा ( भागवत ) पुत्र आहे.

रोहिणीपुत्र—१ राम, २ सारण, ३ दुर्दम, दुर्मद (विष्णु. व भागवतांत दोनदां ), ४ शठ, गद ( भागवत ), निशव (वायु), ५ दमन, ६ शुभ्र, सुभ्रु ( मत्स्य. ), श्वभ्र (ह. वं.), ७ पिंडारक, ८ कुशीतक, उशीनर ( ह. वं. ), महाहनू ( मत्स्य.). कन्या—१ चित्रा, २ सुभद्रा (ह. वं.), मत्स्यांत दोन चित्राक्षी दिल्या आहेत. भागवत व विष्णु यांत पांचव्या-पासून पुढचे तीन निराळे आहेत. सर्वत्र हिला आठ पुत्र असल्याचें सांगितलें आहे. पण भागवतांत बारा असल्याचें सांगितलें आहे. व विष्णूंत सातांचीं नांवें देऊन वगैरे म्हटलें आहे. फरक असलेलीं नांवें क्रमानें पुढें दिलीं आहेत—५ विपुल, ६ ध्रुव, ७ कृत, ८ सुभद्र, ९ भद्रबाह, १० दुर्मद, ११ भद्र, १२ भूत. आठपासून पुढचे पौरवीचे म्हणून सांगितले आहेत ( भागवत ). ५ भद्राश्व, ६ भद्रबाहु, ७ दुर्गमभूत ( विष्णु. ).

मदिरापुत्र—१ नंद, २ उपनंद, ३ कृतक, स्थित (वायु.) हे ह. वं. व मत्स्याखेरीज सर्वत्र आहेत. ४ कुक्षिमित्र, ५ मित्र, ६ पुष्टि, ७ चित्र, ८ उपचित्र, ९ बेल, १० तुष्टि. पैकीं वायूंत चित्रा व उपचित्रा अशा दोन कन्या देऊन ९ व १० हे पुत्र दिले नाहींत. चारपासून पुढचे दुसरे कोठेंहि नाहींत. पण भागवतांत पुढें शूर इत्यादि दिले आहेत.

भद्रापुत्र—१ बिंब, २ उपबिंब, ३ सत्वदंत, ४ महौजस् ( वायु. व ब्रह्मांड. ), १ उपनिधि व २ गद ( विष्णु. ).

वैशाखी किंवा वैश्या—कौशिक, यास भागवतांत कौसल्यापुत्र केशिन् म्हटलें आहे.

सुनाम्नीपुत्र—वृकदेव व गद ( ह. वं. ).

सहदेवापुत्र—१ पूर्व (ब्रह्मांड.), १ पुरु, २ विश्रुत, इत्यादि ( भागवत ), १ भयासख ( वायु. ).

शांतिदेवापुत्र—१ जनस्तंब (ब्रह्मांड.), जनस्तंबु (वायु.), १ भोज व २ विजय ( ह. वं. ), १ श्रम २ प्रतिश्रुत इ. ( भागवत ).

श्रीदेवापुत्र—१ वसु, २ हंस, ३ सुवंश ( भागवत ), १ मंदक (ब्रह्मांड.).

देवरक्षितापुत्र—१ उपासंग, २ वसु ( ब्रह्मांड. व वायु.), उपासंगधर ( ह. वं. ), १ गद इ. ( भागवत ), मत्स्यांत आणखी एक कन्या सांगितली असून तिला कंसानें मारिलें. वायूंत दोन्ही मुलांस कंसानें ठार केलें असें म्हटलें आहे.

वृकदेवापुत्र—१ अगावह (ह.वं.; ब्रह्मांड.), १ स्वगाहष, २ आगाहिन् ( वायु. ), १ आवगाह, २ नंदक ( मत्स्य. ), १ विपृष्ठ ( भागवत ).

उपदेवापुत्र—१ विजय, २ रोचन, रोचमत् ( मत्स्य. ), ३ वर्धमत्, ४ देवल ( मत्स्य.) असें मत्स्य व वायु यांत दिलें आहे. पण भागवतांत फक्त १ कल्प व २ वृक्ष दिले आहेत.

देवकीपुत्र—१ सुषेण, २ कीर्तिमत्, ३ भद्रसेन. चार, पांच व सहा हीं नांवें पुढील फरकानें आढळतात. ४ भद्रविदेह, ५ ऋषिदास, ६ दमन (मत्स्य.); ४ भद्रविदेक, ५ यजुदाय, ६ तदय (वायु.); ४ भद्रदेव, ५ ऋजुदाय, ६ उदर्षि (ब्रह्मांड.); ४ भद्रदेह, ५ ऋभुदास, ६ उदापि ( विष्णु. ); ४ भद्र, ५ ऋजु, ६ संमर्दन ( भागवत ). या सर्वांस कंसानें मारिलें. यानंतर हिला भागवत, विष्णु, संकर्षण व इतरांच्या मतें कृष्ण व सुभद्रा हीं झालीं. सुभद्रा, भागवत व विष्णु यांत नाहीं. तसेंच हिला गवेषण नांवाचा एक मुलगा झाला.

ताम्रापुत्र—सहदेव.

सुगंधापुत्र—१ पुंड्र, हा राजा झाला, २ कपिल हा वनांत गेला.

वनराजीपुत्र—जरस् नांवाचा एक धनुर्धारी निषाद झाला ( ब्रह्मांड. ३. ७१; वायु. २.३४; मत्स्य. ४६; भा. ९. २४; विष्णु. ४. १५; ह. वं. १. ३५ ).

२ ( सू. इ. ) विष्णुमतें चंचुपुत्र. वायु व भागवत यांच्या मतें यास सुदेव म्हणतात.

३ (कण्व. भविष्य.) कण्ववंशांतील एक राजा.

४ हा दुराचारी ब्राह्मण भक्तीनें पुढल्या जन्मीं प्रह्लाद झाला ( पद्म. उ. १७४ ).

**वसुभृद्यान**—( स्वा. ) स्वायंभुवांतील वसिष्ठ व ऊर्जा यांचा पुत्र ( भा. ४. १. ४१ ). वसुभृत् व यान अशींहि हीं पदें असणें शक्य आहे.

**वसुमत्**—वैवस्वत मनूचा पुत्र.

२ एक जनक ( म. शां. ३१४. २ कुं.). हा वंशावळींत आढळत नाहीं.

३ ( सो. पुरूरवस्. ) भागवतमतें श्रुतायुपुत्र.

४ जमदग्नीला रेणुकेपासून झालेला पुत्र (१ जमदग्नि पहा).

५ कृष्णाला जांबवतीपासून झालेला पुत्र.

६ युधिष्ठिराच्या सभेंतील राजा (म. स. ४. ३८ कुं. ).

७ ( सू. इ. ) वायुमतें हर्यश्वाचा पुत्र. विष्णुमतें यास वसुमनस् म्हटलें आहे ( १ वसुमनस् पहा ).

**वसुमनस्**—( सू. इ. ) वायुमतें हर्यश्वास ययातिकन्या माधवीपासून झाला. यास वामदेव ऋषीनें राजनीति सांगितली होती ( म. शां. ९२-९४; ७ वसुमत् पहा ).

२ एक राजा. याला बृहस्पतीनें राजनीति सांगितली ( म. शां. ६७ कुं. ).

**वसुमनस् रौहिदश्व**—मंत्रद्रष्टा (ऋ. १०. १७९. ३).

**वसुमित्र**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा (म. आ. ६८. ४१ कुं. ).

२ ( शुंग. भविष्य. ) भागवत, विष्णु व ब्रह्मांड यांच्या मतें सुज्येष्ठाचा, वायुमतें पुष्पमित्राचा व मत्स्यमतें वसुज्येष्ठाचा पुत्र.

**वसुरुच**—एक आचार्य ( ऋ. ९. ११०. ६ ).

**वसुरुचि**—कश्यप व अरिष्टा यांचा पुत्र.

**वसुरोचिष् आंगिरस**—मंत्रद्रष्टा ( ऋ. ८. ३४. १६-१८). हे हजार असून यांनीं इंद्राकडून संपत्ति मिळविली.

**वसुश्रुत आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ३-६ ).

**वसुषेण**—कर्णाचें मूळ नांव.

२ दुर्योधनपक्षीय राजा ( म. क. ३० ).

**वसुहोम**—अंगदेशचा प्राचीन राजा. हा मुंजपृष्ठ पर्वतावर तप करीत असतां मांधात्याचा व याचा संवाद होऊन यानें त्यापासून दंडनीति मिळविली. याला वसुहुम असें नांव होतें ( म. शां. १२२ ).

**वसूयव आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. २५-२६ ).

**वसोर्धारा**—अग्निवसूची पत्नी.

**वस्तु**—(सो. क्रोष्टु.) वायुमतें लोमपादपुत्र (७ बभ्रु पहा).

**वस्वनंत**—( सू. निमि. ) भागवतमतें उपगुप्तपुत्र.

**वहीनर**—( सो. कुरु. भविष्य. ) मत्स्यमतें उदयनपुत्र व भागवतमतें दुर्दमनपुत्र होय. विष्णुमतें हाच अहीन होय.

२ यमसभेंतील क्षत्रिय ( म. स. ८. १५ कुं. ).

**वह्नि**—शिव देवांतील एक.

२ ( सो. तुर्वसु. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें तुर्वसुपुत्र. मत्स्यमतें यास गर्भ म्हणतात.

३ ( २ और्व पहा ).

४ रामसेनेंतील एक वानर.

५ ( सो. कुकुर. ) भागवतमतें कुकुरपुत्र (५ पृष्ट पहा).

६ कृष्णास मित्रविंदेपासून झालेला पुत्र.

**वाकय**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**वाका**—माल्यवानाची मुलगी व विश्रव्याची पत्नी.

**वाक्पति**—सत्य देवांतील एक.

**वागायनि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**वागींद्र**—प्रकाश ऋषीचा पुत्र. याचा पुत्र प्रमति ( वीतहव्य पहा; म. अनु. ८. ६४ कुं. ).

**वाग्ग्रंथि**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार. याबद्दल वाहुरि असा पाठभेद आहे.

**वाग्दुष्ट**—कौशिक ऋषीचा पुत्र ( पितृवर्तिन् पहा ).

**वाग्भूत**—दत्ताचा पुत्र.

**वाचःश्रवस्**—एक व्यास.

२ शिखंडिन् नामक शिवावताराचा शिष्य.

**वाचू**—सावर्णि मनूचा पुत्र.

**वाच् आम्भृणी**—सूक्तद्रष्ट्री ( ऋ. १०. १२५ ). 'जें ज्ञान देव व मनुष्य यांनीं अनुभवलें, तें मी स्वतः सांगतें, कोणालाहि मी थोर बनवतें, ब्राह्मण करतें, ऋषि करतें, बुद्धिमान करतें, ब्रह्मद्वेष्ट्या खाष्ट शत्रूंना ठार करण्याकरितां मी रुद्राचें धनुष्य सज्ज करतें, ' असे हिचे विचार तेजस्वी आहेत ( ऋ. १०. १२५. ५-७ ).

**वाचक्नवी**—वचक्नुकन्या गार्गीचें पैतृक नांव.

**वाचावृद्ध**—भौत्य मन्वंतरांतील देवगण.

**वाच्य**—( प्रजापति वाच्य पहा ).

**वाज** किंवा **वाजिन्**—सावर्णि मनूचा पुत्र.

**वाजंभर**—( सप्ति पहा ).

**वाजरत्नायन**—सोमशुष्मन्चें पैतृक नांव.

**वाजश्रवस्**—हा जिह्वावत् बाध्योगाचा शिष्य. याचा शिष्य कुश्रि ( बृ. उ. ६. ५. ३ ). हा ऋषिक होता ( वायु. १. ५९. ९२-९४; ब्रह्मांड. २. ३२. ९५-९९ ). याबद्दल वाजिश्रवस् असा पाठभेद आहे ( मत्स्य. १४५. ९९; वाजश्रवस पहा ). हा अंगिरस्कुलांतील मंत्रकार होता. याला वाजिश्रवस् असेंहि म्हणत. एक व्यास होता ( व्यास पहा ).

**वाजश्रवस**—कुश्रीचें ( श. ब्रा. १०. ५. ५. १ ) व नाचिकेतस्चें पैतृक नांव ( तै. ब्रा. ३. ११. ८. १ ). हे गौतम होते ( तै. ब्रा. ३. ११. ८ ). हे पूज्य मानले जात ( तै. ब्रा. १. ३. १०३ ).

**वाजसनि** व **वाजसनेय**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील याज्ञवल्क्याच्या पंधरा शाखांच्या ब्राह्मणांस म्हणत ( व्यास पहा). एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ). याच्या नांवावर पुढील ग्रंथ आढळतात—वाजसनेयसंहिता, वाजसनेयशिक्षा, वाजसनेयपरिशिष्टनिगम ( C. C ).

**वाजिजि**—मेरीचिगर्भ देवांपैकीं एक.

**वाजिन्**—(वाज पहा.)

**वाजिश्रवस्**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**वाज्य**—केतूचें पैतृक नांव ( वं. ब्रा. १ ).

**वाटिक**—पराशरकुलांतील गोत्रकार.

**वाडोहवि**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**वात**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें शूरपुत्र.

२ यातुधानपुत्र. याचा पुत्र विरोध ( ब्रह्मांड. ३. ७. ९६ ).

**वातघ्न**—विश्वामित्र ऋषीचा पुत्र.

**वातजूति वातरशन**—मंत्रद्रष्टा ( ऋ १०.१३६.२ ).

**वातपति**—द्रौपदीस्वयंवरास आलेला क्षत्रिय ( म. आ. २०१. २० कुं. ).

**वातरशन**—हें नग्न मुनींचें वर्णन आहे ( ऋ. १०. १३६. १-२; तै. आ. १. २३. २; २४. ४; २. ७. १ ). सध्यांच्या नग्न गोसाव्यांचा इतिहास इतका पुरातन आहे ( ऋष्यशृंग, एतश, करिकत, जूति, वातजूति, विप्रजूति व वृषाणक पहा ).

**वातवत्**—एका ऋषीचें नांव. दृतीसह यानें एक सत्र आरंभिलें. पण यानें तें मध्येंच मोडल्यामुळें याच्या संततीला अत्यंत निकृष्ट दशा प्राप्त झाली ( पं. ब्रा. २५.३.६ ).

**वातवेग**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा एक पुत्र.

२ गरुडाचा पुत्र ( म. उ. १०१. १० कुं. ).

**वातस्कंध**—एक देव ( म. स. ७. १४ कुं. ).

**वाताधिप**—एक राजा. यास सहदेवानें राजसूयकालीं जिंकिलें होतें ( म. स. ३१ ).

**वातापि**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ विप्रचित्ति व सिंहिका यांचा पुत्र. यास परशुरामानें मारिलें ( ब्रह्मांड. १०. ६. १८–२२ ).

३ ह्राद व धमनी यांचा पुत्र ( २ इल्वल पहा ). भागवतांत ऱ्हाद व धमनी यांचा पुत्र अगस्त्यानें ठार केला, असें आहे व ब्रह्मांडांत परशुरामानें तेरा सैंहिकेयांतील मारिला असें दिलें आहे ( ३. ६. १८–२२ ).

**वातायन**—उलाचें पैतृक नांव.

**वातावत**—वृष शुष्मन्चें पैतृक नांव.

**वात्सतरायण**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**वात्सप्र**—यकारवकारांच्या सूक्ष्म उच्चारणाविषयीं याचें मत आलें आहे ( तै. प्रा. १०. २३ ).

**वात्सि**—सर्पीचें पैतृक नांव.

**वात्सीपुत्र**—पाराशरीपुत्राचा शिष्य. एक आचार्य (बृ. उ. ६. ५. २ ). याचा शिष्य पाराशरीपुत्र.

**वात्सीमांडवीपुत्र**—याचा शिष्य भारद्वाजीपुत्र. हा पाराशरीपुत्राचा शिष्य ( श. ब्रा. १४. ९. ४. ३० ).

**वात्स्य**—एक आचार्य ( सां. आ. ८. ३ ).

२ कुश्रीचा शिष्य. याचा शिष्य शांडिल्य (बृ. उ.६.५.४).

३ शांडिल्याचा शिष्य ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३). याचा शिष्य गौतम. याचा निर्देश इतरत्रहि आहे ( श. ब्रा. ९. ५. १. ६२; १०. ६. ५. ९ ).

४ वत्स्य ऋषीचा पुत्र.हा जनमेजय याच्या सर्पसत्रांत सदस्य होता ( म. आ. ५३. ९ कुं. ). भीष्माच्या देहत्यागाच्या वेळीं हा आला होता ( म. शां. ४६. ६ कुं. ). हा एक ज्योतिषी होता ( C. C. ).

५ व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

६ व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील भागवतमतें शाकल्याचा शिष्य ( व्यास पहा ).

७ भृगुकुलांतील गोत्रकार. याबद्दल वत्स्य असा पाठभेद आहे.

**वात्स्यायन**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

२ एक ज्योतिषी ( C. C. ).

३ पंचकर्णाचें पैतृक नांव. यानें कामसूत्र केलें असावें.

**वात्स्यायनि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**वाद**—अमिताभ देवांतील एक.

**वादुलि**—विश्वामित्राचा पुत्र.

**वाधूल**—एक आचार्य. याचें एक श्रौतसूत्र होतें असें वैजयंतीकार महादेवानें म्हटलें आहे. वाधूलवृत्तिरहस्य व वाधूलगृह्यागमवृत्तिरहस्य या ग्रंथांचा उल्लेख आहे. याची एक स्मृतीहि होती.

**वाध्र्यश्व**—यमसभेंतील एक राजा ( म. स. ८. १२ कुं. ). हें वध्र्यश्वपुत्राचें पैतृक नांव असावें ( वध्र्यश्व पहा ).

**वानहृष्ट**—पृथुक देवांतील एक.

**वान्दन दुवस्यु**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १०० ).

**वाम**—कृष्ण व भद्रा यांचा पुत्र.

२ एकादश रुद्रांपैकीं एक.

**वामकक्षायण**—वात्स्याचा शिष्य ( श. ब्रा. १०. ६. ५. ९ ).

२ शांडिल्याचा शिष्य ( बृ. उ. ६. ५. ४ ).

**वामदेव**—याच्या जन्माची अस्पष्ट हकीकत ऋग्वेदांत आली आहे. याला गर्भांत असतांनाच ज्ञान प्राप्त झालें होतें ( ऋ. ४. १८; २६. १.; ऐ. आ. २. २. १; २. ५; बृ. उ. १. ४. १०; ऐ. उ. ४.५). तेव्हां याला वाटलें कीं, आपण इतर लोकांप्रमाणें जन्मास येऊं नये. शेवटीं यानें पोट फाडून बाहेर येण्याचें ठरविलें. हें आईच्या ध्यानांत येऊन तिनें अदितीचें ध्यान केलें. तेव्हां इंद्रासह अदिति तेथें आली व त्यांच्याशीं याचा संवाद झाला ( ऋ. ४. १८ वेदार्थदीपिका ). दुसऱ्या एका ठिकाणीं योगसामर्थ्यानें ससाण्याचें रूप घेऊन हा पोटांतून बाहेर पडल्याचा उल्लेख आहे ( ऋ. ४. २७. १ ). चवथ्या मंडलांतील ४२-४४ सूक्तें खेरीज करून बाकी सर्व सूक्तांचा वामदेवच द्रष्टा आहे. या मंडळांत वामदेवाचा उल्लेख फक्त एका ठिकाणीं आला आहे ( ऋ. ४. १६. १८ ).

या मंडळांतील बहुतेक सूक्तांत सुदास, दिवोदास, सृंजय, अतिथिग्व, कुत्स इत्यादि व्यक्तींचा उल्लेख आला आहे. ४२-४४ सूक्तांचा त्र्यरुण त्रसदस्यु हा द्रष्टा आहे. त्यावरून, त्यांच्याशीं याचा संबंध व्यक्त होतो. ऋग्वेदांतील कांहीं सूक्तांचा हा कर्ता आहे. याला इतरत्र दुजोरा मिळतो (क. सं. १०.५; मै. सं. २. १. २; ३. १. २६ ). यासंबंधीं दोन अर्धवट आख्यायिका आहेत (बृहद्दे. ४. १२६. १३१ ). त्यांत यानें इंद्राला विकावयास काढल्याचीहि कथा आहे ( ऋ. ४. २४. १० ).

२ एकादश रुद्रांपैकीं एक.

३ गुहावासिन् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

४ शंकराचा गुरु. यानें पार्वतीस विष्णुसहस्रनामाचा पाठ सांगितला ( पद्म. भू. २५४ ). हा मनूस शतरूपेपासून जे मरिच्यादि सात पुत्र झाले त्यांपैकीं एक होय. याच्या मुखापासून ब्राह्मण उत्पन्न झाले. हा त्रिशूलधारी होता ( मत्स्य. ४. २७-२८ ).

५ अंगिरस् व स्वराट् यांचा मुलगा. याचा मुलगा बृहदुक्थ ( ब्रह्मांड. ३. १ ). हा अंगिराकुलांतील एक गोत्रकार, मंत्रकार व ऋषि आहे. हा एकदां स्यमंतपंचकक्षेत्रीं आला होता ( भा. १०. ८४. ५ ). यानें दिलेल्या भस्मानें एका ब्रह्मराक्षसाची बुद्धि पालटून त्याचा उद्धार झाला ( स्कंद. ३. ३. १५-१६ ). यानें बकुलासंगमीं तपश्चर्या केली ( पद्म. उ. १३८ ). रथंतरकल्पांत मेरूच्या कुमारशिखरावर याचा कार्तिकेयाशीं संवाद झाला ( शिव. कै. २२ ). कृतयुगांत केवळ इच्छेनें पाप लागत होतें. यानें एकदां कुत्र्याचें मांस खाण्याची इच्छा केली. पण क्षुधार्त असल्यामुळें याला दोष लागला नाहीं ( मनु. १०. १०६ ).

६ ( स्वा. प्रिय. ) हिरण्यरेतसचा एक पुत्र ( भा. ५. २०. १४ ).

७ दाशरथि रामाच्या सभेतील एक.

८ मोदापूरचा राजा. अर्जुनानें राजसूय यज्ञाचे वेळीं याचा पराभव केला ( म. स. २७; मूल पहा ).

**वामदेवी**—क्रौंच ऋषीची भार्या (म. आ. ६३. २४कुं.).

**वामदेव्य**-- ( अंहोमुच्, बृहदुक्थ व मूर्धन्वन् पहा ).

**वामन**--वेदांत या अवताराचे मूलभूत उल्लेख सांपडतात. यानें तीन पावलांत त्रैलोक्य आक्रमण केलें ( ऋ. १. २२. १८; १०. ८८. १० ).

विष्णूचीं तीन पदें अनेक ठिकाणीं आढळतात ( ऋ. १. २२. १७-१८; १५४. २ ). यासंबंधीं यास्कानें और्णनाभ व शाकपूणि यांची मतें नमूद केलीं आहेत. त्यांत तीन पावलें कुठें ठेवलीं याचा खुलासा आहे (नि. १२. १९). पृथ्वी, अंतरिक्ष व आकाश असें शाकपूणि म्हणतो, तर और्णनाभ उदयगिरि ( समारोहण ), खस्वस्तिक ( विष्णुपद ) व अस्तगिरि ( गयाशिरस् ) अशीं स्थानें देतो. विष्णूनें पहिलें पाऊल उदयगिरीच्या शिखरावर ठेविलें ( वा. रा. कि. ४०. ६९ ), दुसरें मेरूवर व तिसरें मेरूच्या शिखरावर ठेविलें. विष्णु म्हणजे सूर्य होय. हा इंद्राचा मोठा मित्र असून यानें इंद्राला बलीनें घेतलेलें राज्य परत मिळवून दिलें ( तै. सं. २. ४. १२. २ ).

देवासुरयुद्धांत देवांचा पराभव झाल्यामुळें ते पळून गेले. तेव्हां असुरांनीं आपसांत पृथ्वीची वांटणी करण्याचें ठरविलें. तेव्हां देवांनाहि वांटणी मिळावी अशी इच्छा झाली. यज्ञस्वरूपी विष्णुदेवतेस अग्रेसर करून देवांनीं असुरांकडे पृथ्वीची मागणी केली. परंतु असुरांना मत्सर उत्पन्न झाल्यामुळें वामनस्वरूपी विष्णूनें आक्रमिलेल्या प्रमाणाइतकीच भूमि देवांस देण्याचें त्यांनीं ठरविलें. परंतु विष्णूनें विराट्स्वरूप धारण करून सर्व पृथ्वी व्यापिली व अशा रीतीनें देवांना त्रैलोक्य मिळालें ( श. ब्रा. १. २. २. १-५ ).

देवदैत्यांचें ह्या तिन्ही लोकांकरितां भांडण झालें, तेव्हां विष्णूनें आपल्या वामनस्वरूपाची आपणांस आहुति देऊन तिन्ही लोक जिंकिले ( तै. सं. २.१.३ ).

कश्यप व अदिति यांचा पुत्र ( भा. ८. १३; म. स. ४७ कुं.; पद्म. उ. ५३; ६१; १६०; वामन. २८ ). बलीनें इंद्रपद घेतल्यावर हा झाला. त्या वेळीं वैवस्वताचा सातवा पर्याय असून त्रेतायुग चालू होतें ( भा. १. ३ ). हा अत्यंत खुजा होता, म्हणून यास वामन म्हणत. हा जेथें बलि यज्ञ करीत होता तेथें गेला व यानें त्याजवळ तीन पावलें भूमि मागितली. शुक्र यास विरोध करीत असतांहि त्यानें तीन पावलें भूमि यास दिली. पण यानें मोठें रूप घेऊन दोन पावलांतच सर्व आक्रमिलें. तेव्हां बलीनें शब्द सत्य करण्याकरितां आपलें मस्तक पुढें केलें व तेथें तिसरें पाऊल ठेवावयास सांगितलें. तेव्हां यानें प्रसन्न होऊन बलीस अनेक वर दिले ( भा. ८. २० ).

अविधि होणाऱ्या कर्मांचें फळ बलीला पोंचतें. यानें त्याची योग्यता जाणून स्वतः त्याचें द्वारपालत्व स्वीकारिलें. बलीस पातालांत घातल्याची मिति आषाढ शु. १२ होय ( वामन. ३१; स्कंद. १. १. १८-१९; मत्स्य. २४५-२४६ ).

२ कश्यप व कद्रू यांचा पुत्र

३ कश्यप व दनु यांचा पुत्र.

४ गरुडाचा पुत्र.

५ इरावतीचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ७. २९२ ).

**वामरथ्य**--अत्रिवंशांतील एक गोत्रकार व प्रवर.

**वायत**--पाशद्युम्नाचें पैतृक नांव.

**वाह्यन**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**वाम्नेय**--( बृहदुक्थ वामदेव पहा ).

**वायु**--एक ब्रह्मर्षि ( म. शां. ४७ ).

२ मृत्यूचा शिष्य. याचा शिष्य इंद्र ( वं. ब्रा. २ ).

**वायुचक्र**--मंकणक ऋषीचा पुत्र ( मंकणक पहा ).

२ युधिष्ठिरसभेंतील एक ऋषि (म. स. ४. १९ कुं. ).

**वायुमंडल व वायुरेतस्**--मंकणक ऋषीचा पुत्र ( मंकणक पहा ).

**वायुवेग**—मंकणक ऋषीचा पुत्र ( मंकणक पहा ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. हा द्रौपदीस्वयंवरास आला होता ( म. आ. २०१. २ कुं. ).

**वायुहन्**—मंकणक ऋषीचा पुत्र ( मंकणक पहा ).

**वाय्य सत्यश्रवस्**—आत्रेय सत्यश्रवस्नें वाय्य सत्यश्रवसवर अनुग्रह करण्याची उषेला प्रार्थना केली आहे ( ऋ. ५. ७९. १ ).

**वारक्य**—( कंस, कुबेर, जनश्रुत, जयंत व प्रोष्ठपद पहा ).

**वारकि**—कंसाचें पैतृक नांव ( जै. उ. ब्रा. ३. ४१. १ ).

**वारण**—( सो. अनु. ) मत्स्यमतें चंपाचा व वायुमतें चित्ररथाचा पुत्र.

**वाराह**—एक असुर ( मत्स्य. १७२ ).

**वाराहि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

२ अंगिराकुलांतील दुसरा गोत्रकार, ऋषि.

**वारिप्लव**—रैवत मन्वंतरांतील पारिप्लवाचें नामांतर.

**वारिमूल**—चाक्षुष मन्वंतरांतील देवगण.

**वारिसार**—( मौर्य. भविष्य. ) भागवतमतें चंद्रगुप्ताचा पुत्र.

**वाराही**—सप्तमातृकांपैकीं एक.

**वारिसेन**—यमसभेंतील राजा ( म. स. ८. २० कुं. ).

**वारुणि**—धर्मसावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

२ कश्यप व विनता यांचा पुत्र.

३ वरुणपुत्र अगस्त्याचें नांव.

४ वरुणपुत्र वसिष्ठाचें नांव.

५ भृगूचें पैतृक नांव.

**वारुणी**—स्वायंभुव मन्वंतरांतील वरुणाची स्त्री.

**वार्क्षी**—( मारिषा पहा ).

**वार्कलि** किंवा **वार्कलिन्**—एक आचार्य ( श. ब्रा. १२. ३. २. ६; ऐ. आ. ३. २. २ ). आरण्यकांत वार्कलिन् असा पाठ आहे.

**वार्कारुणीपुत्र**—हा आर्तभागीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य दुसरा वार्कारुणीपुत्र.

२ हा पहिल्या वार्कारुणीपुत्राचा शिष्य. याचा पाराशरीपुत्र हा शिष्य होय ( बृ. उ. ६. ४. ३१ ).

३ यमसभेंतील एक राजा ( म. स. ८. १० कुं. ).

**वाजिनीवत**—स्वाहीचें पैतृक नांव.

**वार्द्धक्षत्रि**—जयद्रथाचें पैतृक नांव ( म. व. ३६४ ).

**वार्धक्षेमि**—हा भारतीय युद्धांत पांडवपक्षीय होता ( म. उ. १७१. १७ कुं. ). याचे घोडे कृष्णवर्ण व शृंगारलेले असत ( म. द्रो. २३. १७ कुं. ). याचेंहि नांव सुशर्मन् असून हा पांचाल्यच असावा. यास कर्णानें मारिलें ( म. क. ५१. ४५. कुं. ).

२ ( १ सुशर्मन् पहा ).

**वार्षगण**—असिताचें पैतृक नांव.

**वार्षगणीपुत्र**—हा गौतमीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य शालंकायनीपुत्र ( श. ब्रा. १४. ९. ४. ३१ ).

**वार्षगण्य**—उपाकर्मांतील तर्पणांत जैमिनीनें याचा उल्लेख केला आहे ( जै. गृ. १. १४ ). सांख्ययोगाचार्य ( योगसूत्रावरील व्यासभाष्य. ३. ५३ ).

२ सुश्रवस्चें पैतृक नांव.

**वार्षागिर**—( अंबरीष, ऋज्राश्व, भयमान, सहदेव व सुराधस् पहा ).

**वार्ष्टिहव्य**—( उपस्तुत पहा ).

**वार्ष्ण**—गोबल, बर्कु व ऐक्ष्वाक यांचें हें पैतृक नांव आहे. याचा व याज्ञवल्क्याचा देवयजनाबद्दल संवाद झाला ( श. ब्रा. ३. १. १. ४ ). वाष्र्ण्य असा सयकार पाठहि आढळतो.

**वार्ष्णायन**—धूम्रपराशरकुलोत्पन्न एक गोत्रकार.

**वार्ष्णिवृद्ध**—उल्काचें पैतृक नांव.

**वार्ष्णेय**—शूषाचें पैतृक नांव.

२ नल राजाचा सारथि. नलाच्या वनवासकालीं हा ऋतुपर्णाचा सारथि झाला.

**वार्ष्यायणि**—एक वैयाकरण ( नि. १. २ ).

**वालखिल्य**—प्रजा उत्पन्न करण्याकरितां तप करणाऱ्या प्रजापतीच्या केशापासून हे उत्पन्न झाले ( तै. आ. १. २३. ३ ). क्रतूची बायको सन्नति किंवा क्रिया हिला अंगठ्याच्या पेराएवढे सूर्याप्रमाणें तेजस्वी व पूर्ण ब्रह्मचारी असे ६०००० पुत्र झाले. त्यांना वालखिल्य म्हणतात ( विष्णु. १. १०; भा. ४. १; गरुड पहा ). ऋग्वेदांत वालखिल्य नांवाचीं सूक्तें आहेत. पण त्यांचा वालखिल्य नांवाच्या ऋषींशीं कांहीं संबंध नाहीं. त्यांचे ऋषि अनुक्रमणींत वेगळेच दिले आहेत ( ऋ. ८. ४९–५९ ). यांनीं आकाशादित्याचें माहात्म्य सांगितलें (स्कंद. २. ४. ७).

**वालायनि**—( ६ बाष्कलि पहा ).

**वालिन्**—वरुण लोकांतील एक असुर ( म. स. ९ ).

२ हा ऋक्षपत्नी विरजेला महेंद्रापासून झाला ( ब्रह्मांड. ३. ७. २१४; भा. ९. १०. १३; ऋक्षरजस् पहा ). वालीचा अमात्य तार, त्याची कन्या तारा ही वालीची बायको ( वा. रा. उ. ३४; म. व. २८१. १७ कुं. ). तारा ही सुषेणकन्या, असाहि उल्लेख आहे (वा. रा. कि. २२; ब्रह्मांड. ३. ७. २१८ ). यानें आपला भाऊ सुग्रीव याला यौवराज्य दिलें होतें ( वा. रा. उ. ३४ ).

एकदां वालीनें सात ताडफळें ऋष्यमूक पर्वतावरील गुहेंत आणून ठेविलीं होतीं. तीं एका सर्पानें पाहिल्यावर तो त्याच्याजवळ जाऊन बसला. तेव्हां वालीनें त्याला शाप दिला कीं, ‘ तुझ्या अंगावर यांचे सात ताडवृक्ष होतील. ’ सर्पानें, ‘ या सात ताडांना जो कोणी तोडील, तोच तुला मारील, ’ असा उलट शाप दिला. नंतर ऋष्यमूक पर्वतावर रामलक्ष्मण आले असतां, रामानें ते सात ताडवृक्ष एका सरळ रेषेंत आणून एका बाणानें तोडून टाकिले ( आ. रा. ८ ). म्हणून रामाकडून पुढें वाली मारिला गेला.

हा पंचमेढ्र नामक राक्षसाबरोबर युद्ध करीत असतां त्यानें याला गिळून टाकिलें. परंतु वीरभद्रानें त्या राक्षसाला उभा चिरून याला सोडविलें ( पद्म. पा. १०७ ). याच्याशीं रावण युद्धास आला असतां यानें त्याला आपल्या सामर्थ्यानें चकित केलें. तेव्हां रावणानें याच्याशीं सख्य केलें ( ब्रह्मांड. ३. ७. २६४; वा. रा. उ. ३४ ).

त्याचप्रमाणें गोलभ गंधर्वाशीं सतत १५ वर्षे युद्ध करून यानें त्याला ठार मारिलें ( वा. रा. कि. २२ ). यानें दुंदुभीला मारून त्याचें प्रेत दूर फेंकलें. त्यामुळें दुंदुभीचे

नष्ट मातंगाचे आश्रमात उडून मातंगानें 'ऋष्यमूकावर आल्यास मरशील' असा यास शाप दिला (वा. रा. कि. ११).

दुंदुभीचा ज्येष्ठ पुत्र मायावी याचें आणि वालीचें स्त्रीकरितां मोठें वैर पडलें होतें. यानें मायाविनूला ठार मारल्यावर तो गुहेवर चालून आला. हा त्याला सामोरा जातांच तो पळून जाऊं लागला. लागलीच वाली आणि सुग्रीव या दोघांनीं त्याचा पाठलाग सुरू केल्यावर तो एका गुहेंत शिरला. वालीहि सुग्रीवाला द्वाररक्षण करण्यास सांगून आंत शिरला. बराच काळ लोटला, तरी वाली गुहेंतून बाहेर न येतां, त्या गुहेंतून रक्ताचा मोठा लोट बाहेर आला. तें पाहून मायावीनें वालीस मारिलें, अशी सुग्रीवाची समजूत झाली. नंतर गुहेच्या तोंडावर एक शिला ठेवून आणि वालीचें उत्तरकार्य करून तो किष्किंधेला परत आला. सुग्रीवानें वालीवधाची हकीकत सांगितल्यावर मंत्र्यांनीं सुग्रीवाच्या इच्छेविरुद्ध त्याला राज्याभिषेक केला. इतक्यांत मायावीला ठार मारून वाली परत आला. सुग्रीवाला पाहतांच वाली अत्यंत क्रोधयुक्त होऊन यानें सुग्रीवाची पुष्कळ निंदा केली. सुग्रीवानें याची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. तथापि, राज्य मिळावें, या इच्छेनें सुग्रीव परत आला, अशी समजूत करून घेऊन यानें त्याला हांकलून दिलें व रुमा नांवाची त्याची स्त्रीहि हरण केली. तेव्हां सुग्रीव ऋष्यमूक पर्वतावर निघून गेला (वा. रा. कि. ९).

पुढें ऋष्यमूक पर्वतावर रामलक्ष्मण आले असतां त्यानें वालीला मारण्याविषयीं त्यांना विनंति केली. तेव्हां राम, लक्ष्मण, हनुमान व सुग्रीव किष्किंधेला आले. सुग्रीवाचें वालीशीं युद्ध सुरू झालें, परंतु सुग्रीव कोणता व वाली कोणता, हें न समजल्यामुळें रामानें वालीवर बाण सोडला नाहीं. शेवटीं सुग्रीव पराभव पावून ऋष्यमूक पर्वतावर पळून गेला. वालीनें तेथपर्यंत त्याचा पाठलाग केला, परंतु मातंगाच्या शापामुळें हा मागें परतला (वा. रा. कि. १२).

रामाच्या आज्ञेवरून, सुग्रीव कोणता हें समजावें याकरितां हनुमानानें दिलेली पुष्पमाला गळ्यांत घालून सुग्रीव पुनः रामलक्ष्मणांसहित वालीशीं युद्ध करण्याकरितां किष्किंधेला आला व त्यानें वालीला युद्धार्थ आव्हान केलें (वा. रा. कि. १३-१४). सुग्रीवाचा शब्द दुःसह होऊन युद्धोत्सुक वाली अंतःपुरांतून बाहेर पडला. तेव्हां तारेनें 'सुग्रीवाला रामलक्ष्मणांचा पाठिंबा असल्यामुळें रामाशीं विरोध करून सुग्रीवाशीं युद्ध करणें तुला योग्य नाहीं,' असें वालीला परोपरीनें सांगितलें. परंतु वालीनें तिचा निषेध करून व कंठांत सुवर्णमाला घालून युद्धार्थ गमन केलें. उपरिनिर्दिष्ट सुवर्णमाला वाली सुग्रीवाबरोबर युद्ध करण्याला निघण्यापूर्वीच चोरीला गेलेली होती (आ. रा. ८).

पुढें सुग्रीव व वाली यांचें घनघोर युद्ध होऊन रामानें याच्या वक्षःस्थलावर शरप्रहार करून याला निश्चेष्ट स्थितींत भूमीवर पाडिलें. कांहीं वेळानें सावध झाल्यावर यानें जवळच उभा असलेल्या रामाची अधर्मानें स्वतःचे प्राण घेतल्याबद्दल अनेक प्रकारें निंदा केली. रामानेंहि, 'तूं अधर्म केल्यामुळें अर्थात् धर्मानेंच मीं तुझा वध केला आहे,' असें सांगून याची समजूत घातली. तेव्हां रामाला विनाकारण दोष दिल्याबद्दल याला पश्चात्ताप होऊन यानें रामाची क्षमा मागितली व अंगदाचें रक्षण करण्याविषयीं त्याची प्रार्थना केली (३ राम पहा). भर्त्याची निधनवार्ता ऐकतांच अंगदासहित तारा युद्धभूमीवर आली व मूर्च्छित पतीला पाहतांच तिनें अत्यंत शोक केला (वा. रा. कि. १६-१९).

बऱ्याच वेळानें सावध झाल्यावर वालीनें सुग्रीवाला 'अंगदाला आपला औरसपुत्र समजून त्याचें संरक्षण करण्यास सांगून, त्याचप्रमाणें तारेच्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास आणि रामाच्या इच्छित कार्यांत मदत करण्यास उपदेश करून कंठांतील सुवर्णमाला त्याला अर्पण केली. नंतर अंगदाकडे वळून सुग्रीवाच्या मताप्रमाणें वागण्यास सांगितल्यानंतर याचें प्राणोत्क्रमण झालें (वा. रा. कि. २२-२३).

नंतर रामाच्या आज्ञेवरून सुग्रीवानें वानरांकडून वालीचा और्ध्वदेहिक संस्कार केला. लौकरच हनुमानानें सुग्रीवाला राज्याभिषेक करून वालीपुत्र अंगदाला यौवराज्य दिलें (वा. रा. कि. २५-२६).

**वालिशय**--वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**वालिशिख**--कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**वालिशिखायनि**--एक आचार्य (सां. आ. ७.२१).

**वाल्मीकि**--एक ब्रह्मर्षि. सुमति नांवाच्या एका ब्राह्मणाचा पुत्र. हा लहान असतांनाच याचे आईबाप याला एका किराताजवळ पालन करण्यास ठेवून तप करण्यास निघून गेले. पुढें हा किराताच्याच संमतीनें आपलें ब्राह्मण्य विसरून चोरी करूं लागला. त्याचप्रमाणें इतर लोकहि याला कोळी म्हणूं लागले. एकदां कांहीं महर्षि याच्या वसतिस्थानावरून जात असतां त्यांना यानें लुटावयास आरंभ केला. परंतु त्या ऋषींनीं याला उपदेश केला; तेव्हांपासून याला उपरति झाली व यानें त्या ऋषींनीं दिलेल्या राममंत्राचा जप सुरू केला. पुढें बराच कालपर्यंत एकाच जागीं तप केल्यामुळें याच्या अंगावर वारूळ वाढलें. नंतर याच महर्षींनीं यास त्या वारुळांतून बाहेर काढिलें व 'वाल्मीकि' असें याचें नांव ठेविलें (स्कंद. ५. १.२४; ७. १. २७८).

स्कंदपुराणांत याच्यासंबंधीं दुसरी कथा आढळते; ती अशीः पूर्वी एक कणु नामक ब्राह्मण होता. त्यानें बरीच वर्षे तप केलें. तप पूर्ण झाल्यावर त्याला आपल्या स्त्रीचें स्मरण झालें व त्यामुळें त्याचें वीर्य स्खलन पावलें. तें एका वनचरीनें गिळलें. त्यामुळें तिला एक पुत्र झाला. नंतर त्या पुत्रावर महर्षींचा प्रसाद होऊन त्याला ब्राह्मण्य लाभलें व तो पुढें वाल्मीकि या नांवानें प्रसिद्धीस आला ( स्कंद. २. ७. २१ ).

याची पुढें ऋषींमध्यें गणना होऊं लागली. नंतर यानें तमसेच्या तीरावर आश्रम करून त्या ठिकाणीं आपलें अध्यापनाचें काम चालू ठेविलें. याची शिष्यशाखा बरीच मोठी होती. परंतु सर्वांत भरद्वाज ऋषि मुख्य होता. एकदां भरद्वाजासह हा नदीवरून स्नान करून परत येत असतां एक व्याध मैथुनासक्त असलेल्या क्रौंच पक्षाच्या जोडींतील एकाला मारीत असलेला याला दिसला. त्याबरोबर याला त्या पक्षाची कींव येऊन याच्या तोंडांतून

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः
यत्क्रौञ्चमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥

अशी छंदोबद्ध शापवाणी बाहेर पडली. अकस्मात् तोंडांतून निघालेल्या शब्दांचा एक अनुष्टुप् वृत्तबद्ध श्लोक बनलेला पाहून यास परमाश्चर्य वाटलें. परंतु ' आपण त्या निषादाला शाप दिला, हें वाईट केलें, असें वाटून हा चिंताग्रस्त होऊन विचारमग्न झाला असतां ब्रह्मदेवानें स्वतः येऊन ' तूं म्हटलेला श्लोक यशोरूपच होईल. ' असें सांगून यास धीर दिला व रामचरित्र लिहावयास स्फूर्ति दिली. नंतर यानें रामचरित्राचा चोवीस सहस्र श्लोकांचा एक ग्रंथ लिहिला ( वा. रा. बा. २ ).

रामानें सीतेचा त्याग केल्यावर तिला यानेंच सांभाळिलें. त्या वेळीं सीता गरोदर होती. पुढें यथाकालीं प्रसूत होऊन तिला लव आणि कुश असे दोन पुत्र झाले. त्यांचें संगोपन यानेंच केलें व पुढें त्यांचा विद्याभ्यास याच्याकडूनच झाला. नंतर यानें त्यांना स्वतः केलेलें रामायण पढविलें. सीतात्यागानंतर रामानें अश्वमेध यज्ञ केला. त्या वेळीं यज्ञसमारंभास हा आपल्या शिष्यांसह गेला होता. एकदां एका ऋषीबरोबर पाखंडवाद केल्यामुळें याला ब्रह्महत्येचा दोष लागून महादेवाच्या उपासनेनें त्याचें निरसन झालें ( म. अनु. १८ ).

' वाल्मीकि ऋषि हा जातीनें शूद्र असून पुढें ऋषिप्रसादानें ब्राह्मणत्व पावला, याचें पूर्वीचें नांव वाल्या कोळी असें होतें; या प्रचलित दंतकथेस कोठेंच आधार नाहीं. उलट वाल्मीकि विद्वान् ब्राह्मण होता, हीच गोष्ट ज्या ज्या ठिकाणीं रामायणांत वाल्मीकीचा उल्लेख आलेला आहे, त्या त्या ठिकाणीं तपस्वी, मुनिपुंगव, द्विज या व याचसारख्या इतर विशेषणांनीं प्रामुख्यानें सांगितलेली आहे. त्याचप्रमाणें खुद्द वाल्मीकिनेंच आपली उत्पत्ति कोणापासून झाली, हें पुढील श्लोकांत सांगितलें आहे.

प्राचेतसोऽहं दशमः पुत्रो राघवनंदन (वा.रा.उ.९६.१८). पण महर्षिप्रचेतस्‌ला वंश नसल्यामुळें हा प्रचेतस् दुसरा असावा.

वाल्मीकीस ब्रह्मदेवाच्या वरामुळें रामजन्मापूर्वीच रामचरित्र लिहितां आलें, असा पुष्कळांचा समज आहे व रामचरित्रावर जे ग्रंथ झाले, त्यांच्यामध्यें याच समजुतीचा अनुवाद केला असल्यानें ही समजूत दृढ होत चालली आहे. परंतु ती अगदीं निराधार आहे. कारण, रामायणांतील सर्व पदें भूतकालाचीं असून राज्यांतील पुढें होणारी स्थिति मात्र भविष्यकालीन म्हणून वर्णिली आहे. पुढें होणाऱ्या मनुष्याचें वर्णन भूतकालीन पदें घालून करणें हें असंभवनीय दिसतें. तेव्हां वाल्मीकि हा रामाच्या वेळीं अगर रामानंतर होऊन गेला असावा. रामायण हें काव्य रामानंतरच्या एखाद्या वाल्मीकि नांवाच्या मनुष्यानें लिहिलें असून तें रामकालीन वाल्मीकीच्या नांवावर दिलें असावें.

याच्या नांवावरील इतर ग्रंथ-वाल्मीकिसूत्र, वाल्मीकिशिक्षा, वाल्मीकिहृदय, गंगाष्टक (C. C.). ब्रह्मदेवानें भरद्वाजाबरोबर येऊन यास रामायण संपूर्ण करण्यास सांगितलें ( यो. वा. १. २ ).

२ एक व्यास ( व्यास पहा ).

३ विसर्ग-संधिविषयीं मत सांगणारा एक आचार्य ( तै. प्रा. ५. ३६; ९. ४; १८. ६ ).

**वासना**—अर्क नामक वसूची पत्नी.

**वासाश्व**—वैश्य जातीचा मंत्रद्रष्टा ऋषि ( सत्य. १४५. ११६-११७ ).

**वासिष्ठ**—( इंद्रप्रमति, उपमन्यु, कर्णश्रुत, चित्रमहस्, चैकिताशेय, द्युम्नीक, प्रथ, मन्यु, मृळीक, रौहिण, वसुक्र, वृषगण, व्याघ्रपात् व शक्ति सात्यहव्य, पहा.) वासिष्ठांचा स्वतंत्र आचार्य म्हणूनहि निर्देश आहे ( जै. उ. ब्रा. ३. १५. २).

**वासुकि**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र. हा सर्पांचा अधिपति आहे. याच्या स्त्रीचें नांव शतशीर्षा ( म. उ. ११७. ७-१७ कुं. ). जनमेजयाच्या सर्पसत्रांत याचीं पंधरा कुळें दग्ध झालीं. त्यांचीं नांवें—१ कोटिश, २ मानस, ३ पूर्ण, ४ शल, ५ पाल, ६ हलीमक, ७ पिच्छल, ८ कौणप, ९ चक्र, १० कालवेग, ११ प्रकालन, १२ हिरण्यबाहु, १३ शरण, १४ कक्षक व १५ कालदंतक. हा शंकराच्या शरीरावर

असता. याची बहीण जरत्कारु ऋषीची पत्नी जरत्कारु होय ( म. आ. ३८. २० कुं. ).

**वासुक्र**--वसुकर्ण व वसुकृत् यांचें पैतृक नांव.

**वासुदेव**--यानें एक वास्तुशास्त्रावर ग्रंथ केला आहे ( मत्स्य. २५२ ).

**वास्नु**--विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**वास्य**--व्यासाच्या ऋकशिष्यपरंपरेंतील विष्णुमतें वेदमित्राचा शिष्य. याबद्दल वत्स, वात्स्य व मत्स्य असे पाठभेद ( व्यास पहा ).

**वाहन**--व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य.

**वाहनप**--गौरपराशर कुलांतील गोत्रकार. याबद्दल वाहयोज असा पाठभेद आहे.

**वाह्निक**--हा वेद शिकलेला ब्राह्मण असूनहि मीठ विकून निर्वाह करी. यानें कोष्ट्याची विधवा स्त्री ठेविली होती. शेवटीं हा वाघाकडून मारिला गेला. परंतु याचें मांस गिधाडाच्या तोंडांतून गंगेंत पडल्यामुळें याचा उद्धार झाला ( स्कंद. २. ४. १. २८ ).

**वाहिनीपति**--अंगिराकुलांतील गोत्रकार.

**वाह्यक**--वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**वाह्यमय**--नीलपराशरकुलांतील गोत्रकार.

**वाह्ययन**--भृगुकुलांतील गोत्रकार. याबद्दल महाभाग असा पाठभेद आहे.

**विंश**--(सू. दिष्ट.) विष्णु व वायु यांच्या मतें क्षुपाचा पुत्र.

**विकट**--रुद्रगणांतील एक.

२ एक राक्षस. याला अंगदानें मारिलें (वा. रा. यु. १२५).

३ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. हा द्रौपदीस्वयंवरांत उपस्थित होता. याला भीमानें मारिलें ( म. क. ४६. १६ कुं. ).

४ एक राक्षस. यानें शरभाचे भोई खाल्ले व कमंडलूंतील गंगोदक हा प्याला. म्हणून यास सुबुद्धि सुचली व हा निर्गमोद्बोधकतीर्थी राहूं लागला. एके दिवशीं तेथील चिखलांत रुतलेली एक गाय काढीत असतां एका पाणहत्तीनें यास डोहांत बुडविलें. पण त्या पुण्यतीर्थांत मृत्यु आल्यानें यास स्वर्गप्राप्ति झाली ( पद्म. उ. २०४-२०५ ).

**विकटा**--अशोक वनांतील सीतासंरक्षणार्थ असलेल्या दोन राक्षसी ( वा. रा. सुं २३. १४ ).

**विकटानन**--( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**विक्टावती**--( ऐति. ) ही पश्चिम द्वीपांत राहून अष्टप्रधानांच्या( कौंसिल )द्वारां येथील राज्य करी. हिचा पति पुलोमार्चि ( भवि. प्रति. ४. २२; गरुड पहा ). व्हिक्टोरिया राणीचें हें भविष्य होय.

**विकंपन**--रुद्रगणांपैकीं एक.

२ रावणपक्षीय एक राक्षस ( भा. ९. १०. १८ ).

**विकर्ण**--( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. हा द्रौपदीस्वयंवरास गेला होता ( म. आ. १८६ ). हा महारथि असून मोठा न्यायी होता. द्रौपदीला सभेंत धरून आणल्यानंतर हा अन्याय होत आहे, असें विदुराबरोबर हाहि म्हणाला. याचा युद्धांत नकुलानें पराभव केला ( म. द्रो. १०७. ३० कुं. ) व सरतेशेवटीं भीमानें यास मारिलें ( म. द्रो. १३७. ३० कुं. ).

**विकर्तन**--या सूर्यवंशांतील राजाचें कुष्ट साभ्रमतींत स्नान केल्यानें गेलें. त्या स्थानास राजखड्ग म्हणतात ( पद्म. उ. १३५ ).

**विकुक्षि**--( सू. इ. ) इक्ष्वाकूच्या पुत्रांतील ज्येष्ठ. याला शशाद म्हणत असत ( शशाद पहा ).

**विकुंजन** किंवा **विकुंठन**-- ( सो. पूरु. ) हस्तीचा पुत्र. याच्या बायकोचें नांव सुंदरा व मुलाचें नांव अजमीढ ( म. आ. ६३. ३८ कुं. ).

**विकुंठ** किंवा **वैकुंठ**--हे देव चवदा आहेत. हे रैवत मन्वंतरांत होऊन गेले. यांचीं नांवें--अजेय, कृश, गौर, जय, भीम, भेत्तृ, दम, दांत, ध्रुव, नाथ, यश, विद्वस्, वृष, व शुचि ( ब्रह्मांड. २. ३६. ५७ ).

**विकुंठा**--रैवत व चाक्षुष मन्वंतरांतील वैकुंठ नामक अवताराची माता व शुभ्राची स्त्री.

**विकुंडल**--हा निषध नगरांतील हेमकुंडलाचा पुत्र. याला श्रीकुंडल नांवाचा भाऊ होता. हे दुराचारी असून यमुनास्नानानें मुक्त झाले ( पद्म स्व. ३० ).

**विकुंभ**--कश्यप व दनु यांचा पुत्र.

**विकृत**--एक ब्राह्मण. याचा व विरूपाचा संवाद झाला होता ( म. शां. १९७. ५ कुं. ).

**विकृति**--रुद्रगणांपैकीं एक.

२ ( सो. क्रोष्टु. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मते जीमूत राजाचा पुत्र. यालाच मत्स्यमतें विमल असें नांव आहे.

**विक्रम**--(भविष्य.) हा विक्रमादित्य व विक्रम वेताळ हे एक असावेत ( पद्म. उ. १८८ ).

**विक्रम वेताळ**--( विक्रम पहा ).

**विक्रमादित्य**--( भविष्य. ) चाणक्यानंतर ३३२० वर्षांनीं राज्य करणारा राजा ( स्कंद. १. २. ४० ).

**विक्रमित्र**--( वज्रमित्र पहा ).

**विक्रमशील**--याची स्त्री कालिंदी व पुत्र दुर्गम ( मार्क. ७२ ).

**विक्रांत**--( सू. दिष्ट. ) वायुमतें दमपुत्र.

२ एक प्रजापति ( वायु. २. ४. ५३ ).

**विक्षम**--कश्यपकुलांतील मंत्रकार.

**विक्षर**--कश्यप व दनायु यांचा पुत्र.

**विक्षोभण**--कश्यप व दनु यांचा पुत्र.

**विख्यात**--तेरा सैंहिकेयांतील एक.

**विगाहन**--मुकुटवंशांतील एक. यानें आपल्या दुर्वर्तनामुळें आपल्या ज्ञातिबांधवांचा व आप्तेष्टांचा नाश करून घेतला ( म. उ. ७३. ११; १६ कुं. ).

**विघन**--रावणपक्षीय एक राक्षस ( वा. रा. सुं. ६ ).

**विचकाश्व**--मांसाशन सोडणारा राजा ( म. अनु. १७७. ७१ कुं. ).

**विचक्षण ताण्ड्य**--हा गर्दभीमुख शांडिल्यायनाचा शिष्य. याचा शिष्य शाकदास भाडितायन ( वं. ब्रा. १ ).

**विचक्षुष**--वसिष्ठकुलांतील गोत्रकार. याबद्दल विवर्धक असा पाठभेद आहे.

**विचख्नु**--भीष्मानें युधिष्ठिराला याची अहिंसेचा उपदेश करणारी गीता सांगितली आहे. हा शब्द कुंभकोणं प्रतींत विचख्यु असा आहे ( म. शां. २७१. ३ ).

**विचारिन् काबंधि**--एक आचार्य. हा मांधात्याच्या यज्ञांत गेला होता ( गो. ब्रा. १. २. १०; १८ ).

**विचारु**--कृष्णाला रुक्मिणीपासून झालेला पुत्र.

**विचित्र**--रौच्य मनूचा पुत्र.

२ भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा.

३ यमाचा एक लेखक ( स्कंद. ७. १. १४३ ).

**विचित्रवीर्य**--( सो. पूरु. ) शंतनूपासून सत्यवतीचे ठिकाणीं झालेल्या दोन पुत्रांतील दुसरा. याचा थोरला भाऊ चित्रांगद. गंधर्वयुद्धांत चित्रांगद मेल्यामुळें भीष्मानें याला गादीवर बसविलें ( म.आ. १०८.१६ कुं.). भीष्मानें काशीराजाच्या अम्बा, अम्बिका व अम्बालिका ह्या तीन कन्या जिंकून आणिल्या. त्यांपैकीं अम्बा परत गेली. बाकीच्या दोघींशीं याचा विवाह झाला. पण कांहीं अपत्य न होतांच अल्पवयांत हा क्षयानें मरण पावला ( म. आ. १११. ९ कुं. ). पुढें भीष्म व सत्यवती यांनीं विचार करून कृष्ण द्वैपायन व्यासाकडून नियोगपद्धतीनें अंबिकेचे ठिकाणीं धृतराष्ट्र व अम्बालिकेचे ठिकाणीं पांडु उत्पन्न करविला. अम्बिकेच्या दासीचे ठिकाणीं विदुर झाला ( म. आ. ६३. ५४ कुं. ).

२ शिवव्रतानें मुक्त झालेला पुरुष ( स्कंद. १. ३३ ).

**विचेतस्**--भव्य देवांतील एक.

**विजय**--( १ बृहन्मनस् पहा ).

२ ( सू. निमि. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें जयपुत्र होय.

३ ( सो. क्षत्र. ) भागवत व विष्णु यांच्या मतें संजयाचा पुत्र. वायुमतें संजयपौत्र व जयाचा पुत्र.

४ ( सो. पुरूरवस्. ) भागवतमतें पुरूरवापुत्र. यास इतरत्र अमावसु म्हणतात.

५ (सो. वसु.) मत्स्यमतें वसुदेव व उपदेवी यांचा पुत्र.

६ ( सो. अनु. ) हा भागवत, विष्णु, वायु व मत्स्य यांच्या मतें जयद्रथपुत्र.

७ (सू. इ.) भागवतमतें चंपाचा, वायु, विष्णु व भविष्य यांच्या मतें चंचूचा पुत्र.

८ विष्णूचा द्वारपाल ( जयविजय पहा ).

९ कृष्णाला जांबवतीपासून झालेला पुत्र.

१० विष्णूचा पार्षद ( भा. ८. २१. १६. ).

११ ( आंध्र. भविष्य. ) यज्ञाचा किंवा यज्ञश्रीचा पुत्र.

१२ दाशरथि रामाच्या अष्टप्रधानांपैकीं एक.

१३ रामाच्या सभेंतील एक हास्यकार.

१४ भव्य देवांतील एक.

१५ पृथुक देवांतील एक.

१६ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

१७ मगध देशांतील एक ब्राह्मण ( बर्बरिक पहा ).

१८ लोकाक्षि नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

१९ भैरववंशांतील वाराणसीचा राजा. यानेंच खाण्डवा नगरी मोडून खांडववन केलें व तें इंद्राला क्रीडा करण्याला दिलें. याला तेरा पुत्र होते. त्यांत उपरिचर हा बलवान् असून धार्मिक होता. वाराणसीक्षेत्रांत या उपरिचरानें एक लक्ष यज्ञ केले ( कालि. ९२ ).

**विजया**--शल्य राजाची कन्या व सहदेवाची भार्या. हिचा पुत्र सुहोत्र ( म. आ. ६३. ७९ कुं.; भा. ९. २२. २. ).

२ कृष्णाची स्त्री ( पद्म. सृ. १३ ).

३ पार्वतीची सखी. ही पार्वतीबरोबर तपश्चर्येला गेली होती ( पार्वती पहा ).

**विजर** किंवा **विज्वर**--अनायुषेचा पुत्र. याचे पुत्र कालक व खर.

**विजिताश्व**--पृथूस अर्चीपासून झालेल्या पुत्रांतील एक. पृथूनें शंभर अश्वमेधांचा निश्चय करून त्याप्रमाणें नव्याण्णव अश्वमेध पुरे केले. तेव्हां इंद्रास स्वपदच्युतीची भीति वाटून त्यानें पृथूचा अश्व चोरून नेला. तो यानें बराच पराक्रम करून सोडवून आणिला; त्यामुळेंच यास हें नांव पडलें. तसेंच यांच्या अंगीं गुप्त होण्याची शक्ति होती; त्यामुळें यास अंतर्धान असें म्हणत. यास शिखंडिनी व नभस्वती या दोन स्त्रिया होत्या. पैकीं पहिलीस पावक, पवमान व शुचि असे

तीन पुत्र होते. दुसरीस त्रिधर्मन नांवाचा एक पुत्र होता (भा. ४. १८-१९).

**वितंड**—द्रौपदीस्वयंवरास आलेला राजा (म. आ. २०१. १९ कुं.).

**वितत्य**—दिहव्य ऋषीचा पुत्र. याचा पुत्र सत्य (म. अनु. ३०).

**वितथ**—(सो. पूरु.) दुष्यंतपुत्र भरताचा पुत्र. याला वितथ भरद्वाज म्हणत असत. हा वास्तविक बृहस्पतिवीर्यज असून भरतानें दत्तक घेतला होता. हा ब्राह्मण असून क्षत्रिय झाला. हा भरद्वाजाचा वंशज असावा. कारण याला गादीवर बसवून भरद्वाज वनांत गेला (ब्रह्म. १३. ५९-६१; ह. वं. १. ३२).

**वितर्दन**—एक राक्षस (वा. रा. सु. ६४).

**वितस्त्य**—सावैनस ऋषीचा पुत्र. याचा पुत्र शिव (म. अनु. ८. ६२ कुं.).

**विताना**—भौत्य मन्वंतरांतील बृहद्भानूची माता.

**विति**—तुषित किंवा साध्य देवांपैकीं एक.

**विद**—प्रतर्दन देवांपैकीं एक.

२ सुख देवांपैकीं एक.

**विदग्ध शाकल्य**—यानें याज्ञवल्क्याशीं वाद केला व शेवटीं वादांत पराजित होऊन याला मरावें लागलें (बृ. उ. ३. ९. १; ४. १. ७; देवमित्र शाकल्य पहा).

२ व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य (व्यास पहा).

**विदंड**—द्रौपदीस्वयंवरास आलेला एक राजा (म. आ. १८६).

**विदथिन्**—भरद्वाजास या नांवानें संबोधिलेलें सांपडतें. हा अंगिरसगोत्री आहे. वितथ व हा एक असावा.

**विदन्वत् भार्गव**—सामद्रष्टा (पं. ब्रा. १३. ११. १०).

**विदद्श्व**—तरंत व पुरुमीढाचा पिता (बृहद्दे. ५. ५०-८१; ऋ. ५. ६१).

**विदर्भ**—(स्वा. प्रिय.) ऋषभदेवाच्या नवखंडाधिपति नऊ पुत्रांतील एक. याच्या खंडास विदर्भखंड असें नांव आहे. याची कन्या लोपामुद्रा असावी (भा. ५. ४. १०).

२ (सो. क्रोष्टु.) ज्यामघ राजास शैब्या अथवा चैत्रा हिच्यापासून झालेला पुत्र. याचें याच्या जन्मापूर्वी बापानें जिंकून आणलेल्या भोज्या किंवा उपदानवी नांवाच्या मुलीशीं लग्न झालें. तिच्यापासून यास कथा कौशिक व लोमपाद नांवाचीं तीन मुलें झालीं (ह. वं. १. ३६).

याच्या केशिनी व सुमति नांवाच्या दोन मुली सगराला दिल्या होत्या. याला नारदपुराणांत काश्यप असें म्हटलें आहे (नारद. १. ८. ६३).

**विदर्भिन् कौण्डिन्य**—हा वत्सनपात् बाभ्रवाचा शिष्य. याचा शिष्य गालव (बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३).

**विदल**—याला व उत्पलाला पार्वतीनें काशींत चेंडूनें मारिलें. तेथील लिंगास कंदुकेश्वर म्हणतात (शिव. रुद्र यु. ५९).

२ सूर्यवंशीय ध्रुवसंधीचा प्रधान.

**विदारण**—सिंधुदेशीय जयद्रथाचा भाऊ (म. व. २६५)

**विदारुण**—चंपक नगरांतील दुष्ट राजा. ब्राह्मण व वेद यांच्या निंदेनें उत्पन्न झालेलें याचें कुष्ठ वेत्रवतीच्या स्नानानें नष्ट झालें (पद्म. उ. १३५).

**विदुर**—व्यासापासून विचित्रवीर्याची स्त्री अंबिका हिच्या दासीचे ठिकाणीं झालेला पुत्र (म. आ. १०६. ६७ कुं.; ब्रह्म. १५४; भा. ९. २२). विचित्रवीर्य निपुत्रिक मरण पावल्यामुळें त्याच्या मृत्यूनंतर कौरववंश पुढें चालू राहणार नाहीं, या भीतीनें सत्यवतीनें आपला पुत्र व्यास, याच्याकडून आपल्या अंबिका व अंबालिका या दोन सुनांच्या ठिकाणीं पांडु व धृतराष्ट्र असे पुत्र उत्पन्न करविले. परंतु एक आंधळा व दुसरा रोगी असल्यामुळें सत्यवतीनें अंबिकेस पुनः व्यासाकडे पुत्रोत्पादनार्थ पाठविलें. पण तिनें स्वतः न जातां दासीस पाठविलें. तिच्या ठिकाणीं व्यासास एक तेजस्वी व बुद्धिमान् पुत्र झाला; तोच विदुर होय (म. आ. १०६).

हा दासीपासून झाला म्हणून यास क्षत्ता असें संबोधीत. हा प्रत्यक्ष यमधर्माच्याच अंशानें पृथ्वीवर जन्मला होता (म. आ. १०७-१०८; पद्म. उ. १४२; मांडव्य पहा).

विदुराची प्रवृत्ति ल्हानपणापासूनच धर्माकडे व सत्याकडे होती. त्याचप्रमाणें हा पांडवांवर अतिशय प्रेम करी व त्यांना जिवापलीकडे जपत असे. यानें पांडवांचें अनेक वेळां रक्षण केलें होतें. हा अत्यंत धोरणी व निःस्पृह असा असल्यामुळें धृतराष्ट्र याच्याहून वडील असूनसुद्धां याच्या सल्ल्यानेंच वागत असे. धृतराष्ट्रानें पांडवांस वनवासास पाठविलें, हें याला न आवडून यानें धृतराष्ट्रास तसें स्पष्ट सांगितलें. तेव्हां धृतराष्ट्र यास बरीच दुरुत्तरें बोलला. त्यावरून हा पांडवांकडे वनांत निघून गेला. पण धृतराष्ट्रास याच्याशिवाय चैन पडेना, तेव्हां त्यानें याची क्षमा मागून यास परत बोलावून आणिलें.

पांडव वनांतून परत आल्यावर त्यांचें राज्य त्यांना परत देण्याविषयीं यानें धृतराष्ट्रास पुष्कळ सांगून पाहिलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याच वेळीं यानें धृतराष्ट्रास पुष्कळ उपदेश केला; तो विदुरनीति म्हणून प्रसिद्ध आहे (म. उ. ३१-४०).

समेटाचे सर्व प्रयत्न फोल ठरून भारतीय युद्धास सुरुवात झाली. परंतु युद्धांत कोणत्याहि प्रकारें भाग न घेतां हा तीर्थयात्रेस निघून गेला. नंतर पांडवांना राज्यप्राप्ति झाल्यावरहि कांहीं दिवस हा हस्तिनापुरांतच होता; पण पुढें धृतराष्ट्रादिकांबरोबर पुनः वनांत गेला ( म. आश्र. १७). कांहीं कालानें यास उद्धवाचें दर्शन होऊन त्याच्या सांगण्यावरून यानें मैत्रेयाचा उपदेश घेतला व तेव्हांपासून हा पिशाचवृत्तीनें अरण्यांत हिंडूं लागला ( भा. ३. ५ ).

पुढें युधिष्ठिर धृतराष्ट्रादिकांस भेटण्यास वनांत गेला असतां, त्यास याला पाहण्याची इच्छा उत्पन्न झाली. याच्या शोधार्थ तो हिंडत असतां एका झाडास टेंकून उभा असलेला हा त्याला दिसला. यानें युधिष्ठिरास पाहतांच याच्या दृष्टीस आपली दृष्टि लावून हा आपल्या देहाचा त्याग करून युधिष्ठिराच्या शरीरांत शिरला ( म. आश्र. २८ ). भागवतांत यानें प्रभासक्षेत्रीं देहत्याग केला असें म्हटलें आहे ( भा. १. १५ ). मांडव्यानें दिलेल्या शापाची मुदत संपतांच हा साभ्रमती-धर्मावती संगमीं गेला व तेथें स्नान करितांच शापमुक्त होऊन स्वर्गास गेला ( पद्म. उ. १४१ ).

यानें देहत्याग केल्यावर युधिष्ठिर यास जाळूं लागला, पण आकाशवाणीनें त्यास मनाई केली (म.आ.२८.३१-३३ कुं.).

२ पांचाल देशांतील क्षत्रिय. सोमवती अमावस्येला प्रयागांत स्नान करून हा ब्रह्महत्येंतून शुद्ध झाला (पद्म. उ. ९१-९२).

३ ( बहुला पहा ).

**विदुला**—सौवीर देशच्या राजाची पत्नी. हिचा पति मरण पावला, तेव्हां पुत्र लहान असल्यामुळें सिंधुदेशच्या राजानें हिचें राज्य घेतलें. पुढें तो पुत्र मोठा झाल्यावर हिनें आपल्या क्षत्रियोचित उपदेशानें त्याच्या अंगांत वीरश्री उत्पन्न केली व राज्य परत घेवविलें. विदुलेच्या पुत्राचें नांव संजय असें होतें ( म. उ. १३३-१३६ ). कुंतीनें युधिष्ठिराला युद्धाला प्रवृत्त करण्याकरितां विदुलापुत्रसंवाद पुरातन इतिहास म्हणून सांगितला आहे.

**विदुष**—( सो. द्रुह्यु. ) मत्स्यमतें धृतपुत्र.

**विदूरथ**—( सो. पूरु. ) परशुराम पृथ्वी निःक्षत्रिय करीत असतां याच्या आईनें यास ऋष्यवान् पर्वतावर ऋषीच्या आश्रमांत ठेवून लपविलें. तेथें याचें संरक्षण एका अस्वलानें केलें. परशुराम शूर्पारकांत स्वस्थ बसल्यावर हा पुढें झाला व यानें पूरूचा वंश वृद्धिंगत केला ( म. शां. ४९ ).

२ ( सो. कुरु. ) कुरु व दाशार्ही शुभांगी यांचा पुत्र. याची स्त्री मधुकुलांतील संप्रिया व पुत्र अनश्वन् ( म. आ. ६३. ४२ कुं. ).

३ ( सो. क्रोष्टु. ) भजमानाचा पुत्र.

४ ( सो. वृष्णि. ) भागवतमतें चित्ररथाचा पुत्र.

५ ( सो. पूरु. ) सुरथाचा पुत्र.

६ वृद्धशर्मन् व वसुदेवभगिनी श्रुतदेवा यांचा पुत्र. वक्रदंताचा भाऊ. हा रुक्मिणी व द्रौपदी ( म. आ. १८६ ) यांच्या स्वयंवरप्रसंगीं उपस्थित होता. शिशुपाल शाल्वादिकांचा वध झाल्यावर मित्रकार्य म्हणून यानें कृष्णावर स्वारी केली. पण त्यानें यास ठार केलें ( भा. १०. ५३.१७ १०. ७८ ).

७ हंसध्वजाचा भाऊ.

८ दक्षिणेंतील राजा. यानें आपली कन्या मानिनी राज्यवर्धनास दिली होती ( मार्कं. १०६. १० ).

९ एक राजा. भलंदनाचा मित्र. याचे पुत्र सुनीति व सुमति. हा एकदां मृगयेकरितां गेला असतां यास भूमीत एक मोठें थोरलें विवर दिसलें. जवळच सुव्रत मुनि बसलेला याच्या दृष्टीस पडला. त्याजवळ चवकशी करितां—कुजंभाच्या जांभईनें पडलेल्या विवरांपैकीं तें एक आहे. कुजंभाजवळ सौनंद नांवाचें मुसळ आहे. त्याच्या जोरावर तो अजिंक्य आहे—ही हकीकत कळल्यावर हा नगरांत गेला व सर्व हकीकत यानें मंत्र्यांस सांगितली. तों याची कन्या मुदावती हिनेंहि ऐकली होती. लवकरच तिला त्या कुजंभानें उपवनांतून पळविलें. तेव्हां सुनीति व सुमति यांनीं त्यावर स्वारी केली. पण त्यांचें सर्व सैन्य मारून त्यांना कुजंभानें कैद केलें. नंतर यानें दवंडी पिटविली व त्यास मारून आपल्या मुलांस सोडविणारास मुदावती देण्याचें जाहीर केलें. भलंदनपुत्र वत्सप्रीनें युद्धास जाण्याचें ठरवून यास सांगितलें व त्या दैत्यास ठार मारून लवकरच मुदावतीशीं लग्न केलें ( मार्कं. ११३ ).

१० ( सो. क्रोष्टु. ) लोमपादाच्या शाखेंतील विकृतीचा पुत्र. यास उदर्क व दाशार्ह हीं नांवें होतीं ( अग्नि. २७५. १९-२० ). पद्मांत हा निवृत्तीचा पुत्र व यास दाशार्ह असें दुसरें नांव असल्याचें दिलें आहे ( पद्म. सृ. १३ ).

**विदेघ माथव**—हा राजा आपल्या तोंडांत अग्नि ठेवी. रहूगण गौतम हा याचा पुरोहित होता. गौतमानें विचारिलें असतां, अग्नि आपल्या मुखांतून निघून जाईल म्हणून विदेघ कांहींच उत्तर देत नसे. गौतमानें अग्नीची पुष्कळ स्तुति केली पण व्यर्थ! एकदां गौतमाच्या तोंडून घृत असा शब्द निघाल्याबरोबर अग्नि बाहेर प्रसार पावूं लागला. विदेघ व गौतम यांनाहि अग्नि जाळूं लागला. तेव्हां विदेघानें अग्नीचा ताप शांत व्हावा म्हणून सदानीरा नदींत बुडी मारिली. अग्नीनें सगळ्या नद्या कोरड्या पाडल्या. परंतु उत्तर दिशेकडून वाहणाऱ्या सदानीरा नदीपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. म्हणून

तिला सदानीरा असें नांव पडलें. या नदीच्या पूर्वेकडील प्रदेशांत पवित्र ब्राह्मणसमुदाय राहत असतो व त्यामुळें आतां देखील सदरहू स्थान अति पवित्र मानलें जातें ( श. ब्रा. १. ४. १. १०-१७ ). सध्यांहि ही नदी कोसल व विदेह यांची मर्यादा आहे असें सायणाचार्य म्हणतात.

**विदेह**—( ३ निमि पहा ).

२ ( सो. वसु. ) मत्स्यमतें वसुदेव व देवकी यांचा पुत्र.

**विदैवत**—नास्तिकमतामुळें याला पिशाचयोनि लाभली. हा पूर्वजन्मीं हरिवीर नांवाचा क्षत्रिय असून दहा हजार गांव याच्या ताब्यांत होते ( पद्म. पा. ९५; ९८ ).

**विद्य**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार व प्रवर. याबद्दल शितिमुखाविद्ध असा पाठभेद आहे.

**विद्या**—एकदां विद्या ब्राह्मणाकडे आली व त्यास म्हणाली कीं, मी तुझा शेवधि ( ठेवा ) आहे. मला असूया करणाऱ्या शिष्यास अर्पण करूं नकोस व जो नियमनिष्ठ, पवित्र, ब्रह्मचारी, निधिरक्षक व अनवधानशून्य असेल त्याच ब्राह्मणास मजला अर्पण कर ( वैदिकमंत्र सायणाचार्य ऋग्वेद प्रस्तावना ).

**विद्याचंड**—कौशिक ब्राह्मणाचा पुत्र (पितृवर्तिन् पहा).

**विद्याधीश**—सोमकांत राजाचा प्रधान.

**विद्यापति**—इंद्रद्युम्नाचा उपाध्याय (स्कंद. २. २. ८).

**विद्युच्छत्रु**—मार्गशीर्षांत सूर्याबरोबर फिरणारा एक ऋषि ( भा. १२. ११.३१ ).

**विद्युज्जिह्व**—शूर्पणखेचा पति. यास रावणानें मारिलें.

२ रावणाचा एक प्रधान. यानें रामाचें शिर व धनुष्य हीं मायेनें निर्माण करून तीं सीतेस दाखविलीं व तिला 'रावणाला वश हो,' असें हा म्हणाला. पण सीता वश झाली नाहीं.

३ विश्रवस् व वाका यांचा पुत्र.

४ अमृत रक्षण करणारे दोन सर्प (म. आ. ६३.५-६ कुं.).

**विद्युत्**—यातुधान पुत्र. याचा पुत्र रसन ( ब्रह्मांड. ३. ७.९५ ).

**विद्युत**—सहिष्णु नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**विद्युता**—एक अप्सरा ( म. अनु. ५०. ४८ कुं. ).

**विद्युत्केश**—हेति राक्षस व मयकन्या यांचा पुत्र. यानें संध्येची कन्या सालकटंकटा इजबरोबर विवाह केला व हा तिच्याशी रममाण होऊं लागला. पुढें तिनें आपला गर्भ मंदर पर्वतावर टाकिला. त्याचें शंकरानें पालन केलें (वा. रा. उ. ४).

**विद्युत्पर्णा**—कश्यप व प्राधा यांची कन्या.

**विद्युत्प्रभ**—एक ऋषि ( म. अनु. १८८. ४३ कुं. ).

**विद्युत्प्रभा**—एक अप्सरा ( म. उ. १११. २१ कुं. ).

**विद्युद्दंष्ट्र**—रामसेनेंतील एक वानर (वा. रा. यु. ७३).

**विद्युद्रूप**—लंकेंतील एक राक्षस ( वा. रा. सुं. ६ ).

२ एक कुबेरसेवक राक्षस. हा कैलास पर्वतावर मद्यपान करीत स्त्रीसह एका दगडावर बसला होता. तेथें कंक नांवाचा गरुडवंशी पक्षी आला असतां, याची त्याची थोडी बाचाबाची होऊन विद्युद्रूपानें कंकावर खड्ग फेकून यानें त्यास ठार केलें. त्यामुळें रागावून कंकाचा भाऊ कंधर यानें याशीं युद्ध करून यास ठार केलें. हें पाहून याची स्त्री मेनकाकन्या मदनिका ही मिळून कंधराची पत्नी झाली ( मार्क. २. ४-२८ ).

**विद्युन्मालिन्**—तारकासुराचा पुत्र व त्रिपुरांतील एका पुराचा अधिपति ( म. क. ३३; लिंग. १. ७१ ).

२ हा एक महापराक्रमी राक्षस रावणाचा मित्र असून पातालांत राहत होता. यानें रावणवधाचा सूड उगविण्याकरितां रामाचा घोडा पळविला. तेव्हां शत्रुघ्नानें याचा वध करून घोडा परत आणिला ( पद्म. पा. ३४ ).

३ सुषेणानें मारिलेला एक रावणपक्षीय राक्षस ( वा. रा. सुं. ६; यु. ४३ ).

**विद्योत**—धर्म व लंबा यांचा पुत्र.

**विद्रावण**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**विधातृ**—एक आदित्य. हा प्रत्येक आषाढांत प्रकाशतो (भवि. ब्राह्म. ७८). हा सहस् ( मार्गशीर्ष मासीं ) प्रकाशतो (भा. १२. ११). यास क्रिया नांवाची भार्या होती. तिजपासून यानें पंचचित अग्नि उत्पन्न केले ( विवस्वत् पहा ).

२ भृगु ऋषीचा ख्यातीपासून झालेला पुत्र. यास धाता व श्री अशीं दोन भावंडें होतीं. मेरुकन्या नियति ही याची स्त्री. तिजपासून यास प्राण नांवाचा पुत्र झाला (भा. ४. १).

**विधान**—सुख देवांपैकीं एक.

**विधिसार**—( शिशु. भविष्य. ) भागवतमतें क्षेत्रज्ञाचा व ब्रह्मांडमतें क्षत्रौजसचा पुत्र. यास बिंदुसार, विंध्यसेन व विंविसार अशीं नांवें आहेत.

**विधुम**—अष्टवसूंपैकीं एक ( अलंबुसा पहा ).

**विधृत**—या दुष्ट राजाचा प्रहर शब्दांतील हर या उच्चारानें उद्धार झाला ( पद्म. पा. १११ ).

**विधृति**—( सू. इ. ) भागवतमतें खगणपुत्र.

२ तामस मन्वंतरांतील देवांची माता ( भा. ८.१.२९ ).

३ आभूतरजस् देवांतील एक.

**विनत**—रामसेनेंतील एक वानर. याच्या सेनेंत साठ लक्ष वानर होते ( वा. रा. यु. २६ ).

२ इलाचा पुत्र.

३ पुलहास श्वेतेपासून झालेला पुत्र.

**विनता**—प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांच्या कन्या व अरिष्टनेमि कश्यपाची भार्या (अरुण, कद्रू, कश्यप व गरुड

पहा ). अरुण व गरुड यांशिवाय तार्क्ष्य, अरिष्टनेमि, गरुड, अरुण व आकर्णि हे हिचे पुत्र होत ( भवि. ब्राह्म. १५९ ).

**विनताश्व**—( इल पहा ).

**विनायक**—एक रुद्रगणाधिपति ( भूत पहा ).

**विनाशन**—कश्यप व काला यांचा पुत्र.

**विनिताश्व**—या राजाला स्वर्ग प्राप्त होऊनहि अन्नदान न केल्यानें त्रास झाला ( पद्म. सृ. ३४ ).

**विंद**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. भीमानें यास ठार मारिलें ( म. द्रो. १२७. ४८ कुं. ).

२ भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा. केकय देशाधिपतीचा पुत्र. याला सात्यकीनें मारिलें (म.क. १०.६ कुं.).

३ आवन्त्य राजाचा पुत्र. दुर्योधनपक्षीय राजा ( म. स. ३२. ११; उ. १६६. ६ कुं. ). याचें प्रथम कुंतिभोज राजाशीं युद्ध झालें ( म. भी. ४५ ). पण पुढें यास अर्जुनानें मारिलें ( म. द्रो. ९९. २७ कुं. ).

**विन्दु आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८.९४; ९.३० ).

**विंध्य**—रैवत मनूचा पुत्र.

**विंध्यशक्ति**—( पौर. भविष्य. ) एक राजा.

**विंध्यसेन**—(शिशु.भविष्य.) मत्स्यमतें क्षेमजिताचा पुत्र.

**विंध्यावली**—बलि दैत्याची स्त्री ( १ बलि पहा ).

२ रुक्मांगदाची स्त्री.

**विंध्याश्व**—( सो. अज. ) मत्स्यमतें इंद्रसेनपुत्र.

**विपक्र**—मरीचिगर्भ देवांपैकीं एक.

**विपश्चित्**—स्वारोचिष मन्वंतरांतील इंद्र.

२ एक राजा. याची स्त्री विदर्भराजकन्या पीवरी. तिच्याशीं यानें ती ऋतुस्नात असतां संभोग न करतां कैकयीशीं केला, त्यामुळें यास मरणोत्तर नरक प्राप्त झाला ( मार्क. १३. १३-१५ ).

**विपश्चित् दृढजयंत लौहित्य**—हा दक्ष जयंत लौहित्याचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४२. २ ).

**विपश्चित् शकुनिमित्र पाराशर्य**—एक आचार्य. हा आषाढ उत्तर पाराशर्याचा शिष्य. याचा शिष्य जयंत पाराशर्य ( जै. उ. ब्रा. ३. ४१. १ ).

**विपाट**—कौरवपक्षीय राजा. याला अर्जुनानें मारिलें ( म. द्रो. ३२. ६१ कुं. ).

**विपाठा**—दुर्गमपत्नी ( मार्क. ७२. ४६; १ रेवती पहा).

**विपाद**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**विपाप**—दमन नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**विपाप्मन्**—निश्चवन नामक अग्नीचा पुत्र. वास्तुकार्यांत याचें प्राधान्य असतें.

२ ( सो. पुरूरवस्. ) मत्स्यमतें आयुपुत्र.

**विपुल**—( सो. वसु. ) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

२ देवशर्म्याचा शिष्य. यानें गुरुपत्नीचें इंद्रापासून संरक्षण केलें, पण तें गुरूला न सांगितल्यामळें याला पाप लागलें होतें. गुरूला तें निवेदन करून त्यांतून हा मुक्त झाला ( म. अनु. ४०-४५ कुं. ).

३ सौवीर देशाचा एक यवन राजा. पांडूनें याला जिंकण्याचा प्रयत्न केला होता; पण त्याला यश आलें नाहीं. शेवटीं अर्जुनानें याला ठार केलें. याचें सुमित्र असें नांव असून दत्तामित्र या नांवानें याची प्रसिद्धी होती असें दिसतें ( म. आ. १७१. ४४ कुं. ).

**विपुलस्वान्**—एक ऋषि. यास सुकृष व तुंबुरु असे दोन पुत्र होते ( मार्क. ३. १५ ).

**विपूजन शौराकि** किंवा **सौराकि**—एक आचार्य ( क. सं. २७. ५; मै. सं. ३. १. ३ ).

**विपृथु**—( सो. वृष्णि. ) विष्णु व वायु यांच्या मतें चित्रकाचा पुत्र. हा द्रौपदीस्वयंवरास आला होता. अर्जुनानें सुभद्रेचें हरण केलें, त्या वेळीं यानें अर्जुनाबरोबर युद्ध केलें ( म. आ. २०१. १८; २३९. १०; स. ४. ३६ कुं. ).

**विपृष्ठ**—(सो. वसु.) वसुदेव व धृतदेवी यांचा पुत्र.

**विप्र**—(सो. मगध. भविष्य. ) भागवतमतें श्रुतंजयाचा व विष्णुमतें श्रुतंजयाचा पुत्र ( ३ महाबाहु पहा ).

**विप्रचित्ति**—एक आचार्य. हा व्यष्टीचा शिष्य व याचा शिष्य एक ऋषि होय ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ).

२ कश्यप व दनु यांचा पुत्र. याची स्त्री हिरण्यकशिपुकन्या सिंहिका. हिरण्यकशिपु व वृत्र यांचें बाजूनें हा देवांशीं लढला ( म. स. ५१. ७ कुं.; भा. ६. ७० ). हा वरुणाच्या सभेंतील एक सभासद होता ( म. स. ९. १६ कुं. ). यास राहु व १०० केतु असे १०१ पुत्र होते ( भा. ६. ६ ). पण इतरत्र तेरा ही संख्या सांगितली असून विष्णु व ब्रह्मांड यांत १२ व हरिवंशांत १४ आहे. ब्रह्म आणि मत्स्य यांत तेरा आहे. पण मत्स्यांतहि शंभु नांवाचा पुत्र दुसरीकडेच सांगितला आहे ( मत्स्य. १७७. ७ ). हरिवंशांतील यादी पुढें दिली आहे व तिच्याशीं इतर पुराणांतील बहुतेक नांवें जुळतीं असून तीं कंसांत दिलीं आहेत:—अंजिक ( अजन, अंजक, सुपुंजिक ), इल्वल, कालनाभ, खसृम ( शलभ, श्वसृप ), नभ ( नल, भौम ), नमुचि, नरक ( कनक ), राहु (पोतरण, सरमाण, स्वर्भानु), वज्रनाभ ( कालवीर्य, चक्रयोधिन्, बल ), वातापि, व्यंश ( वंश्य, व्यंस, सव्यसिव्य ), शुक ( विख्यात, केतु, शंभु )

( ह. वं. १. ३; मत्स्य. ६; विष्णु. १. २१; ब्रह्म. ३; ब्रह्मांड. ६. १८. २२ ).

**विप्रजूति वातरशन**–मंत्रद्रष्टा(ऋ. १०. १३६. ३०).

**विप्रबंधु गौपायन** अथवा **लौपायन**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. २४. ४; १०. ५७. ६० ).

**विबुध**—( सू. निमि. ) विष्णुमतें कृतिपुत्र. यास भागवतांत विरुत व इतरत्र विश्रुत म्हटलें आहे. वायुमतें हा देवमीढाचा पुत्र.

**विभा**—कावेरीची कन्या, दुर्गमाची पत्नी (१ रेवती पहा).

**विभांड**—एक ब्रह्मर्षि ( म. शां. ४७ ).

**विभांडक**—काश्यपकुलांतील एक ऋषि. हा ऋष्यशृंगाचा पिता ( म. व. १११. ११ कुं. ). याचा आश्रम कौशिकी नदीवर होता.

**विभांडक काश्यप**—ऋष्यशृंगाचा पुत्र व शिष्य. याचा शिष्य मित्रभू काश्यप ( वं. ब्रा. २ ).

**विभाव**—जिताजित् देवांपैकीं एक.

**विभावरी**—ब्रह्मदेवाची कन्या. हीच पार्वती झाली ( ब्रह्मन् पहा ).

**विभावसु**—प्रतर्दन देवांतील एक.

२ विवस्वानाचा पुत्र. (म. आ. १. ५५ कुं.).

३ मुर दैत्याचा पुत्र. यास कृष्णानें मारिलें ( मुर पहा ).

४ पांडवांसमागमें द्वैतवनांत असणारा एक ऋषि ( म व. २६. २४ कुं. ).

५ सुप्रतीक नामक ऋषीचा भाऊ. भावाच्या शापामुळें हा कूर्म योनींत पडला असतां त्या ठिकाणीं यास गरुडानें भक्षिलें ( म. आ. २९. १६ कुं. ).

६ एक वैश्य. हा रोज दान करी व ब्राह्मणास भोजन घाली. परंतु शंकराची पूजा करितांना अपवित्र घंटा होती, ती वाजवी. त्यामुळें याला मरणानंतर घंटेच्या आकाराचें मुख प्राप्त झालें. म्हणून यास घंटामुख असें म्हणतात ( पद्म. पा. ११७ ).

**विभास**—जित् देवांपैकीं एक.

२ अमिताभ देवांतील एक.

३ वशवर्तिन् देवांतील एक.

**विभिंदु**—एक राजा. काण्व मेधातिथीनें याच्या दातृत्वाची प्रशंसा केली आहे. याच्या येथें अठ्ठेचाळीस हजार मिळाले असें त्यानें सांगितलें ( ऋ. ८. २. ४१-४२ ). पण दुसरीकडे गाई असें त्याचें स्पष्टीकरण आहे. पण विभिंदूच्या ऐवजीं विभिंदुक असें म्हटलें आहे ( पं. ब्रा. १५. १०. ११ ).

**विभिंदुक**—( विभिंदु पहा ).

**विभीषण**—एक यक्ष ( म. स. १०. १८ कुं. ).

**विभु**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ यज्ञ व दक्षिणा यांचा पुत्र.

३ ( स्वा. ) प्रस्ताव व नियुत्सा यांचा पुत्र. याची स्त्री रति व पुत्र पृथुषेण ( भा. ५. १५. ६ ).

४ ( सो. क्षत्र. ) सत्यकेतूचा पुत्र. याचा पुत्र सुविभु.

५ रात्रियुद्धांत भीमानें मारिलेला शकुनीचा भ्राता ( म. द्रो. १५८. ९-२३ कुं. ).

६ वारुणि भृगूचा पुत्र. यास वरेण्य असें नामांतर होतें.

७ साध्य देवांतील एक.

८ तुषित देवांतील एक.

९ रैवत मन्वंतरांतील इंद्र.

१० स्वारोचिष मन्वंतरांतील विष्णूचा अवतार.

११ भव व सिद्धि यांचा पुत्र.

१२ जिताजित् देवांपैकीं एक.

१३ (सो. मगध.) श्रुतंजयाचा पुत्र (३ महाबाहु पहा).

१४ ( स्वा. प्रिय. ) पृथु व अर्चि यांचा पुत्र.

१५ स्वायंभुव मनूचा पुत्र ( पद्म. सृ. ७ ).

**विभूति**—विश्वामित्राचा पुत्र.

**विभ्राज**—( सो. पूरु. ) विष्णु व वायु यांच्या मतें सुकृतिपुत्र. मत्स्यमतें सुकृतपुत्र ( २ पार पहा ).

**विभ्राज सौर्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १७० ).

**विमद ऐन्द्र** किंवा **प्राजापत्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. २०-२६ ). याच्यावर इंद्रानें व अश्वींनींहि कृपा केली होती ( ऋ. १. ११२. १९; ११६. १; ११७. २०; १०. ३९. ७; ६५. १२ ). पुरुमित्राची तरुण कन्या कमद्यु याची बायको होती ( ऋ. १. ११७ २० सायण-भाष्य; १०. ६५. १२ ). हा, इंद्र व प्रजापति यांचा मुलगा म्हणून यास ऐन्द्र व प्राजापत्य म्हणत. कमद्यूनें स्वयंवरांत याला वरिलें. तेव्हां निराश झालेल्या इतर राजांनीं याच्याशीं युद्ध सुरू केलें. अश्वी देवांनीं याला साहाय्य केलें व कमद्यूला रथांत घालून याच्याकडे पोंचतें केलें ( अ. वे. ४. २९. ४; ऐ. ब्रा. ५. ५. १ ).

**विमनुष्या**—कश्यप व मुनि यांची कन्या.

**विमर्द**—या किरातराजाचा शिवपूजेनें उद्धार झाला ( स्कंद. ३. ३. ४ ).

**विमल**—इल राजाचा कनिष्ठ पुत्र.

२ विकृति राजाचें दुसरें नांव.

३ हिमालयाच्या पायथ्याशीं राहणारा एक ब्राह्मण. याला हरिदत्त या नांवाचा एक मुलगा होता. त्याचें उपनयन झाल्या-वर तो गुरुगृहीं गेला व अभ्यास संपवून संन्याशी झाला.

तेव्हां त्याच्या मातेला फार वाईट वाटलें व ‘ वंशवृद्धीकरितां तप करा, ’ असें ती याला म्हणाली. परंतु ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून हा द्वारकेस गेला. तेव्हां आकाशवाणीनें सांगितलें कीं, ‘ तुला पुत्र होईल ’ ( पद्म. उ. २०७ ).

४ रत्नातट नगरांतील राजा. यानें रामाच्या अश्वमेधाकरितां शत्रुघ्नाला मदत केली होती ( पद्म. पा. १७ ).

५ ( सो. क्रोष्टु. ) मत्स्यमतें जीमूतपुत्र. यास इतरत्र विकृति म्हणतात.

६ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**विमलपिंडक**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**विमुख**—एक ब्रह्मर्षि. हा दक्षिण दिशेला आश्रय धरून राहत असे ( वा. रा. उ. १ ).

• **विमौद्गल**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**वियति**—( सो. पुरुरवस्. ) भागवत व विष्णु यांच्या मतें नहुषपुत्र.

**विरज**—( स्वा. नाभि. ) हा त्वष्टयास विरोचनेपासून झाला. याची भार्या विषूचि. याला शंभर पुत्र व एक कन्या होती.

२ चाक्षुष मन्वंतरांतील एक ऋषि.

३ सावर्णि मन्वंतरांतील देवगण.

४ सावर्णि मनूचा पुत्र.

५ ( स्वा. ) भागवतमतें पूर्णिमापुत्र.

६ व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील जातूकर्ण्याचा शिष्य.

**विरजस्**—स्वायंभुव मन्वंतरांतील वसिष्ठ व ऊर्जा यांचा पुत्र.

२ नारायण नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

३ लोकाक्षि नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

४ चाक्षुष मन्वंतरांतील एक ऋषि.

५ वशवर्तिन् देवांपैकीं एक.

६ कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

७ वारुणि कवीच्या सात पुत्रांतील एक.

८ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. याला भीमानें ठार मारिलें ( म. द्रो. १५८. १७-१९ कुं. ).

**विरजा**–शुकपुत्र ऋक्षाची स्त्री व ब्रह्मयाची कन्या. हिचे ठायीं इंद्रानें वाली व सूर्यानें सुग्रीव असे दोन प्रख्यात वानर उत्पन्न केले ( ब्रह्मांड. ३. ७. २११-२१५ ). इतरत्र हे ऋक्षरजसला स्त्रीस्वरूपांत झाल्याचें दिलें आहे.

२ सुस्वधा नांवाच्या पितरांची कन्या. नहुषाची पत्नी व ययातीची माता ( मत्स्य. १५. २३ ).

३ एक राक्षसी. ही अदितिपुत्र महोत्कटास खाऊन अंतरिक्षांत गेली. पण हिला तहान फार लागल्यामुळें ही पुनः भूलोकीं आली. इतक्यांत महोत्कट हिचे पोटांत वाढला असल्यामुळें हिचें पोट फुटलें व तो वर आला. त्यामुळें ही मेली. पण महोत्कटरूपी गणपतीच्या दर्शनस्पर्शादिकांनीं हिला मुक्ति मिळाली ( गणेश. २. ७ ).

४ कृष्णाची राधेप्रमाणेंच एक आवडती स्त्री. राधेनें हिला ‘ तूं नदी हो, ’ असा सवतीमत्सरामुळें शाप दिला. त्याप्रमाणें ही विरजा नदी झाली. क्षारसमुद्रादि अष्ट समुद्र हिचेच पुत्र होत ( ब्रह्मवै. ४. २ ).

**विरजस्क**—सावर्णि मनूचा पुत्र.

**विरजामित्र**—स्वायंभुव मन्वंतरांतील वसिष्ठपुत्र. विरजस् व मित्र अशीं हीं पदें असावींत.

**विरथ**—( सो. द्विमीढ. ) मत्स्यमतें नृपंजयपुत्र ( बहुरथ पहा ).

**विराज्**—( स्वा. नाभि. ) विष्णुमतें नराचा पुत्र.

२ स्वायंभुव मनूसहि हें नांव आहे ( मत्स्य. ३. ४५; ब्रह्मांड. २. ९. ३९ ).

**विराज**—अविक्षिताचा पुत्र ( म. आ. १०१.४०कुं. ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. यास भीमानें मारिलें ( म. भी. ९६. २७ कुं. ).

**विराट**—आनंदाचा मानसपुत्र ( १ आनंद पहा ).

२ सुतप देवांपैकीं एक.

३ मत्स्य देशाधिपति क्षत्रिय राजा ( म. वि. ३१ ). हा मरुद्गणाचा अंश होता ( म. आ. ६७ ). विराट ही याची राजधानी. याची प्रथम भार्या सुरथा. तिला श्वेत व शंख असे दोन पुत्र. दुसरी स्त्री केकय नामक सूत राजाची कन्या सुदेष्णा. तिचा पुत्र भूमिंजय अथवा उत्तर ( म. वि. २१ कुं. ). सुदेष्णा ही याची पट्टराणी होती ( म. वि. ९ ). याचे एकंदर अकरा भ्राते असून त्यांपैकीं शतानीक, मदिराक्ष अथवा मदिराश्व व सूर्यदत्त हे सुशर्म्यांबरोबर झालेल्या युद्धांत होते ( म. वि. ३१ ); आणि शतानीक, सूर्यदत्त, श्रुतानीक, श्रुतध्वज, बलानीक, जयानीक, जयाश्व, रथवाहन, चंद्रोदय व समरथ हे भारतीययुद्धांत पांडवांच्या बाजूनें लढायला होते ( म. द्रो. १५८ ). हा आपल्या शंख व उत्तर या पुत्रांसह द्रौपदीस्वयंवरास गेला होता ( म. आ. १८६ ).

शमीवृक्षावर शस्त्रन्यास केल्यावर आपलीं नांवें व रूपें बदलून अज्ञातवास काढण्यासाठीं पांडव विराटाच्या नगरींत राहिले होते. पुढें लवकरच विराटाचा सेनापति कीचक भीमाकडून मारिला गेला ( म. वि. २२ ). हें पाहून त्रिगर्तांचा राजा सुशर्मा, यानें विराटावर सूड उगविण्याकरितां

याच्या दक्षिणेकडील गौळवाडा लुटला. ही बातमी विराटाला कळतांच बरोबर शतानीक व मदिराक्ष हे भ्राते, शंख नामक पुत्र, कंक (युधिष्ठिर), बल्लव (भीम), ग्रंथिक अथवा दामग्रंथि (नकुल), तंतिपाल अथवा अरिष्टनेमि (सहदेव) शिवाय मत्स्य वीर यांना घेऊन यानें सुशर्म्यावर चाल केली. बराच काल युद्ध होऊन त्यांत सुशर्म्यानें विराटाला जिवंत धरिलें. हें युधिष्ठिरानें पाहतांच विराटाला सोडवून आणण्याकरितां त्यानें नकुलसहदेव यांना चक्ररक्षक म्हणून बरोबर देऊन भीमाला पाठवून दिलें. लवकरच भीमानें सुशर्म्याला गांठलें व त्याच्याशीं युद्ध करून हा व याच्या गाई यांना सोडविल्यावर त्यानें सुशर्म्याला बांधून युधिष्ठिराकडे आणिलें. परंतु युधिष्ठिराच्या सांगण्यावरून भीमानें त्यास सोडून दिलें. तेव्हां तो भीमाच्या हातून सुटल्याबद्दल विराटास वंदन करून आपल्या देशास निघून गेला (म. वि. ३०-३४).

विराट सुशर्म्याकडे गुंतला असतां इकडे सुशर्म्याच्याच सांगण्यावरून दुर्योधनादि कौरवांनीं मत्स्य देशांतील गौळवाड्याची दाणादाण करून बलात्कारानें गाई हरण केल्या (म. वि. ३५). तेव्हां बृहन्नडेला सारथ्यकर्म देऊन उत्तर कौरवांवर चालून गेला (म. वि. ३७).

इकडे सुशर्म्याला जिंकून गाईसहवर्तमान विराट नगरीं परत आला, तों उत्तरहि कौरवांचा पराभव करून गाई परत घेऊन येत असल्याची बातमी याला कळली. त्याबरोबर यानें उत्तराच्या स्वागताकरितां सैन्य रवाना केलें. नंतर विराटानें सैरंध्रीला फांसे आणण्यास सांगून कंकाशीं द्यूत खेळण्यास सुरवात केली. खेळतांना विराट कंकाजवळ कौरवांवर मिळविलेल्या जयाबद्दल उत्तराच्या शौर्याची स्तुति करूं लागला. तेव्हां कंक म्हणाला, 'ज्याचा सारथि बृहन्नडा, त्याला जय मिळालाच पाहिजे.' त्याबरोबर यांत आपला उपमर्द झाला, असें याला वाटून यानें कंकाच्या मुखावर जोरानें फांसा मारिला. तत्क्षणीं कंकाच्या नाकांतून रक्तस्राव सुरू होऊन तो त्यानें आपल्या ओंजळींत धरिला. तेव्हां जवळच असलेल्या सैरंध्रीनें पाण्यानें भरलेलें तस्त आणून त्यांत तें रक्त धरिलें. इतक्यांत उत्तर तेथें आला. त्यानें कंकाच्या नासिकेंतून वाहत असलेला रुधिरस्राव पाहतांच विराटाला अगोदर कंकाला प्रसन्न करण्यास सांगून त्याची क्षमा मागण्यास लाविलें (म. वि. ६८).

पुढें पांडवांनीं आपला पूर्ववेष धारण केल्यावर तो युधिष्ठिर आहे, असें समजतांच याला फार वाईट वाटलें. तो पांडवांच्या उपकारानें लीन होऊन यानें आपली कन्या उत्तरा दिला अर्जुनानें वरावें, म्हणून त्याला पुष्कळ आग्रह केला. परंतु अर्जुनानें तें अमान्य केल्यावर त्याच्या सांगण्यावरून अभिमन्यूशीं उत्तरेचा विवाह लागला (म. वि. ७१-७२).

भारतीय युद्धांत हा बंधुपुत्रांसमवेत पांडवांच्या बाजूला होता. पुढें जयद्रथवधानंतर रात्रियुद्ध होऊन द्रोणाचार्याकडून हा मारिला गेला (म. द्रो. १८६). ही वेळ मार्गशीर्ष वद्य एकादशीची पहांट होती (भारतसावित्री).

याला एकंदर श्वेत, शंख, उत्तर व बभ्रु असे चार पुत्र असून उत्तरा नामक कन्या होती. त्यांपैकीं शंख हा सुशर्म्या-बरोबर झालेल्या युद्धांत होता (म. वि. ३१); आणि उत्तर व बभ्रु हे भारतीय युद्धांत पांडवांकडे होते (म. उ. ५७).

**विराडप**—अंगिराकुलांतील गोत्रकार. बिडालज असा याबद्दल पाठभेद आहे.

**विराध**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ क्रौंचावट वनांतील राक्षस. जव व शतहदा यांचा पुत्र. याला रामानें मारिलें व लक्ष्मणानें खड्डा खणून गाडून टाकिलें. पूर्वजन्मीं हा तुंबुरु होता. शापानें या योनीस आला होता (वा. रा. अर. २. ४; म. स. ५०. १४ कुं.).

**विराव**—अमिताभ देवांतील एक.

**विराविन्**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

**विरुद्ध**—ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

**विरूप**—एक असुर (म. स. ९. १८ कुं.).

२ कृष्णाच्या पौत्रांतील एक. हा महारथि होता (भा. १०. ९०. ३४).

३ (विकृत पहा).

४ (सू. नाभाग.) भागवतमतें अंबरीषाचा पुत्र.

**विरूप आंगिरस**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८. ४३; ४४; ७५). याचा प्रत्यक्ष मंत्रांत निर्देश आहे (ऋ. १. ४५. ३; ८. ७५. ६). हा अंगिराकुलांतील मंत्रकार व प्रवर आहे. याला अंगिराचा पुत्र असेंहि म्हटलें आहे (म. अनु. १३२. ४२ कुं.).

**विरूपक**—आलंबेयादि रुद्राच्या गणांचा अधिपति. याची स्त्री विकचा. तिचे ठिकाणीं यास दंष्ट्रकरालादि अनेक राक्षस झाले (ब्रह्मांड. ३. ७. १४०-१४३; १५३).

**विरूपाक्ष**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ (५ गौतम पहा).

३ रावणपक्षीय राक्षस. याचें सुग्रीवाशीं युद्ध झालें (म. व. २८६. ९ कुं.; वा. रा. यु. ९).

४ घटोत्कचाचा सारथि. घटोत्कचानें फेंकलेली शक्ति कर्णानें उळटवली असतां हा मेला (म. द्रो. १७६ कुं.).

५ अकरा रुद्रांपैकीं एक.

६ महिषासुराचा मंत्री ( दे. भा. ५. ११ ).

७ भृगुकुलांतील गोत्रकार व अंगिरसांतील मंत्रकार.

८ रावणाचा सेनापति. यास मारुतीनें मारिलें ( वा. रा. यु. ४३ ).

९ सुमालीचा अमात्य. यास सुग्रीवानें मारिलें ( वा. रा. यु. ९६ ).

**विरोचन**—प्रल्हाद दैत्याचा पुत्र. याला भागवतांत देवी नांवाची स्त्री दिली आहे ( ६. १८. १६ ). याला विशालाक्षी नांवाची स्त्री होती ( नारद. २. ३२ ). यशोधरा याची मुलगी ( ब्रह्मांड. ३. १. ८६ ). विरोचना नांवाची याला बहीण होती ( वायु. २. २२. १९; यशोधरा पहा ).

एकदां केशिनी नामक राजकन्येनें विरोचन व अंगिरस् ऋषीचा पुत्र सुधन्वा यांना 'तुम्हांपैकीं जो कोणी श्रेष्ठ असेल, त्याला मी वरीन,' असें सांगितलें होतें. तेव्हां या उभयतांमध्यें श्रेष्ठ कोण, याविषयीं वाद उपस्थित होऊन जो कोणी श्रेष्ठ ठरेल, त्यानें दुसऱ्याच्या प्राणाचा धनी व्हावें असें ठरलें. शेवटीं हे दोघे न्याय तोडण्याकरितां प्रल्हादाकडे गेले. परंतु प्रल्हादाला यांचा निर्णय न लावतां आल्यामुळें हे कश्यपाकडे गेले. व त्याच्या सांगण्यावरून प्रल्हादानें सुधन्व्याला श्रेष्ठ ठरविलें आणि विरोचनाला सांगितलें कीं, 'सुधन्वा ह्याच तुझ्या प्राणाचा धनी आहे, त्यानें तुझ्या प्राणाचें कांहीं केलें तरी तूं सहन केलें पाहिजेस.' प्रल्हादाचें हें निस्पृहपणाचें उत्तर ऐकून सुधन्वा प्रसन्न झाला व त्यानें विरोचनाच्या प्राणावरचें स्वामित्व सोडून देऊन हा शतायु व्हावा, अशी इच्छा दर्शविली ( म. स. ६८ ).

पुढें हा आत्मज्ञानाची प्राप्ति व्हावी, म्हणून सत्यलोकास प्रजापतीकडे गेला. इतक्यांत इंद्रहि त्याच हेतूनें तेथें आला. नंतर उभयतांनीं ब्रह्म म्हणजे काय, तें सांगण्याविषयीं प्रजापतीला प्रार्थना केली. तेव्हां त्यानें ब्रह्मविद्येस हे खरोखरच अधिकारी आहेत किंवा काय, हें पाहण्याकरितां संकेतानें ब्रह्मोपदेश करून यांना त्याचा विचार करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें या दोघांनीं बत्तीस वर्षेपर्यंत ब्रह्मचर्यानें राहून विचार केला. त्यांपैकीं इंद्राला वरचेवर शंका उत्पन्न होऊन तो प्रजापतीकडे जाई. शेवटीं तो आत्मसाक्षात्कार पावून कृतार्थ झाला. परंतु यानें तसा कांहीं विचार न करितां निराळा सिद्धान्त बांधला व त्याप्रमाणें यानें आपल्या अनुयायांना शिकवण देऊन त्यांच्याहि बुद्धीस मोह उत्पन्न केला ( छां. उ. ८. ७. २; ८. ९. २ ).

गणेश पुराणामध्यें पुढीलप्रमाणें हकीकत सांपडते. एकदां यानें सूर्याची तीव्र आराधना करून त्यापासून एक मुकुट मिळविला. तो देतांना सूर्यानें यास असें बजाविलें होतें कीं, 'जर हा मुकुट दुसऱ्याच्या हातीं लागला, तर तुझा नाश होईल.' पण यानें देवांना त्रास दिल्यावर विष्णूनें स्त्रीरूप घेऊन यास मोहून टाकिलें आणि मुकुट हस्तगत करून याचा नाश केला ( गणेश. २. २९ ). नारदपुराणामध्यें असें सांगितलें आहे कीं, याची स्त्री विशालाक्षी. तिचा, रोज एका ऋषीचें चरणतीर्थ घ्यावें, असा नियम होता. त्याचा फायदा घेऊन युक्तीनें ब्राह्मणरूपी विष्णूनें याचें जीवित हरण केलें (नारद. २.३२).

देवांशीं झालेल्या तारकामय संग्रामांत हा एका संघाचा नायक होता ( म. स. ५१ कुं. ). हा इंद्राच्या नाशाचा नेहमीं उद्योग करीत असल्यामुळें इंद्रानें तारकामय युद्धांत याचा वध केला ( पद्म. सृ. १३ ).

कुंभ व निकुंभ हे याचे कनिष्ठ भ्राते. परंतु आयुष्मान्, शिबि व बाष्कली असे तीन भ्राते असल्याचें आढळतें. याचा पुत्र बलि ( म. आ. ६५; भा. ६. १८. १६; पद्म. सृ. ६ ). मंगळाच्या माहात्म्याकरितांहि याची कथा आली आहे ( पद्म. सृ. २४ ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. हा द्रौपदीस्वयंवरास उपस्थित होता ( म. आ. १८६ ).

**विरोचना**—त्वष्टयाची स्त्री व प्रल्हादाची मुलगी. विरज राजाची माता ( भा. ५. १५. १५; वायु. २. २२. १९ ). त्रिशिरस् विश्वरूप मुनीची माता.

**विरोध**—व्रातपुत्र. याचा पुत्र जनांतक ( ब्रह्मांड. ३. ७. ९६ ).

**विलास**—सह्याद्रीवरील तपस्व्याचा पुत्र. याच्या मित्राचें नांव भास असें होतें. यांना विमल ज्ञानाची प्राप्ति होऊन हे मुक्त झाले ( यो. वा. ५. ६५-६७ ).

**विलोमन्**—( सो. कुकुर. ) भागवतमतें वह्निपुत्र व विष्णुमतें कपोतरोमन् पुत्र.

**विलोहित**—कश्यप व सुरभि यांचा पुत्र, एक रुद्र.

२ कश्यप व खशा यांचा पुत्र.

**विवक्षु**—( सो. कुरु. भविष्य. ) अधिसीमकृष्णाचा पुत्र ( निमिचक्र पहा ).

**विवर्धक**—( विचक्षुष् पहा ).

**विवर्धन**—युधिष्ठिराच्या सभेंतील राजा ( म. स. ४. २७ कुं. ).

२ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**विवस्वत्**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १३ ). ऋग्वेदांत विवस्वताकरितां स्वतंत्र सूक्त नसलें तरी इतर देवतांबरोबर ही स्वतंत्र देवता म्हणून आली आहे. याला अश्विनींचा ( ऋ. १०. १७. २ ) व यमाचा पिता ( ऋ. १०. १४. १; ५८. १. ) असें म्हटलें आहे. सर्व

देव ही विवस्वताचीं अपत्यें असेंहि म्हटलें आहे ( ऋ. १०. ६३. १ ). त्वष्ट्याची कन्या सरण्यू ही विवस्वताची पत्नी होय ( ऋ. १०. १७. १-२ ). एके ठिकाणीं मातरिश्वाला ( ऋ. ६. ८. ४ ) व इतर सर्वत्र अग्नीला विवस्वताचा दूत म्हटलें आहे ( ऋ. १. ५८. १; ४. ७. ४; ८. ३९. ३; १०. २१. ५ ).

ऋग्वेदांत इतर देवतांशींहि विवस्वताचा संबंध दाखविला आहे. विवस्वताच्या स्तवनानें इंद्राला आनंद होतो ( ऋ. ८. ६. ३९ ). विवस्वताची कन्या म्हणजे बोटें सोमाला स्वच्छ करतात ( ऋ. ९. १४. ५ ). सोम विवस्वतासन्निध राहतो ( ऋ. ९. २६. ४ ). अश्विन्‌हि याच्या बरोबर असतात ( ऋ. १. ४६ १३ ). वरुण व इतर देव यांच्याबरोबरहि विवस्वताचा उल्लेख आहे ( ऋ. १०. ६५. ६ ). कांहीं ठिकाणीं भक्ताला, अग्नीला व उषेला विवस्वत् म्हणजे तेजस्वी किंवा सेवा करणारा असा विशेषणार्थी शब्द जोडला आहे. ब्राह्मणग्रंथांत विवस्वतालाच आदित्य म्हटलें आहे.

पुढील वाङ्मयांत ही देवता कमी होत गेली आहे. व्युत्पत्त्यर्थावरून व अश्विन्, अग्नि व सोम यांच्याशीं असलेल्या संबंधावरून विवस्वत् म्हणजे उदयकालचा सूर्य असावा असें वाटतें.

विवस्वताला जरी अदितीचा पुत्र असें प्रत्यक्ष म्हटलेलें नसलें तरी सूर्याला मात्र अदितीचा पुत्र म्हणून आदित्य किंवा आदितेय असें नांव आहे ( ऋ. १. ५०. १३; ८. १०१. ११; १०. ८८. ११ इ. ). तथापि आदित्य व सूर्य निराळे असेंहि एका ठिकाणीं म्हटलें आहे ( ऋ. ८. ३५. १३-१५). आदित्य, सूर्य, विवस्वत्, पूषन्, अर्यमन्, वरुण, मित्र, भग वगैरे देवता ऋग्वेदांत वेगळ्या मानिल्या असल्या तरी तीं सूर्याचींच वेगवेगळीं रूपें होत ( ऋ. ५. ८१. ४; १०.१३९.१ ).

सूर्याची उत्पत्ति करणारे म्हणून कांहीं देवांचे उल्लेख आले आहेत. इंद्रानें सूर्याला उत्पन्न केलें ( ऋ. २. १२. ७ ). मित्रावरुण यांनीं सूर्याला आकाशांत स्थापन केलें ( ऋ. ४. १३. २ ). सोमानें सूर्यामध्यें प्रकाश ठेविला ( ऋ. ६. ४४. २३). इंद्र-सोम यांनीं सूर्याला त्याच्या प्रकाशासह आणिलें ( ऋ. ६. ७२. २ ). इंद्र व विष्णु यांनीं सूर्याला उत्पन्न केलें ( ऋ. ७. ९९. ४). इंद्रवरुण यांनीं सूर्याला आकाशांत चढविलें (ऋ. ७. ८२. ३ ). अग्नीनें सूर्याला आकाशांत चढावयास लाविलें. धात्यानें सूर्य आणि चंद्र यांस उत्पन्न केलें (ऋ. १०. १९०. ३ ). अंगिरसानें आपल्या विधानीं सूर्याला आकाशांत स्थान दिलें ( ऋ. १०. ६२. ३ ). याप्रमाणें अलंकारिक रीत्या सूर्यबिंबाचीं वर्णनें बरींच आहेत. हा रोग बरे करतो व आयुष्य वाढवितो असें पुष्कळ ठिकाणीं वर्णन आहे ( ऋ. ८. ४८. ७; १०. ३७. ७ ). सूर्यावर सर्व प्राणी अवलंबून आहेत ( ऋ. १. १६४. १० ). याला विश्वकर्मन् म्हणजे विश्वाला उत्पन्न करणारा असें म्हटलें आहे ( ऋ. १०. १७०. ४ ). हा देवांचा पुरोहित आहे ( ऋ. ८. १०१. १२ ). हा उगवतो तेव्हां 'मित्र, वरुण आणि इतर देवांना आम्ही निष्पाप असल्याबद्दलचें सांग' अशी देव याची प्रार्थना करितात ( ऋ. ७. ६०. १; ६२. २ ). सूर्याबद्दल कथा आहे कीं, इंद्रानें याला एकदां जिंकिलें ( ऋ. १०. ४३. ५ ) व याचें चक्र चोरिलें ( ऋ. १. १७५. ४; ४. ३०. ४ ). वादळांत सूर्य दिसेनासा होतो त्या प्रसंगावरून वरील कल्पना केली असावी. वैदिक स्वर् ह्या शब्दापासून सूर्य शब्द बनला. ऋग्वेदांतील बहुतेक वर्णन सूर्यबिंबाला उद्देशून असलें तरी मनुष्यत्वाशीं संलग्न असणारें तेवढें वर्णन वर दिलें आहे. याला मृत्यूचें भय वाटल्याचीहि कथा आहे.

यांच्यामुळें जग जगतें ( ऋ. १. ११५. १ ). संध्येसारख्या कर्मांत याला अर्घ्य देऊन जगाला त्रास देणाऱ्या असुरांविरुद्ध मदत करण्याचें कारणहि हेंच होय ( तै. आ. २. २; ष. ब्रा. ४. ४ ).

विवस्वत् व सूर्य हे एकच, असें समजण्यास हरकत नाहीं. परंतु व्यवहारांत सूर्य व विवस्वत् शब्द विशिष्ट वेळींच वापरतात म्हणून संशय येणें स्वाभाविक आहे. उदाहरणार्थ, कुन्ती, हनुमान्, सुग्रीव, कर्ण यांचा संबंध सूर्याशींच दाखवितात. शनैश्वर सूर्याचाच पुत्र समजतात. मनुला सूर्यपुत्र असें न म्हणतां वैवस्वत मनु म्हणतात. यावरून विवस्वत् व सूर्य एक कीं भिन्न असा संशय येतो. वास्तविक सूर्य हें सामान्य नांव व विवस्वत् हें बारा आदित्यांतील पहिल्या आदित्याचें नांव आहे. परंतु विवस्वत् शब्द विशेष अर्थानेंच वापरलेला नाहीं. म्हणून आम्हीं सूर्य व विवस्वत् शब्दावरील माहिती एकत्रच दिली आहे.

कश्यप प्रजापति व अदिति यांचा पुत्र. हा कनिष्ठ पुत्र होय ( अदिति, मार्तंड व आदित्य पहा ).

यास त्वष्ट्याची मुलगी संज्ञा, रैवताची मुलगी राज्ञी व प्रभा अशा तीन स्त्रिया होत्या ( मत्स्य. ११ ). यांशिवाय द्यौ, राज्ञी, पृथ्वी व निक्षुभा आहेत ( स्कंद. ७. १. ११ ). इतरत्र यास फक्त संज्ञा नांवाचीच स्त्री होती, असें आहे ( वायु. २.२२. ३९; विष्णु. ३. २; ब्रह्म. ६; ह. वं. १. ९; म. आ. ६७. ३५ कुं. ). ब्रह्मयानें आपली मुलगी यास दिली ( ब्रह्म. १०२. ८ ).

देव अमृत पीत असतां राहु नांवाचा दैत्य त्यांत मिसळल्याचें यानें ओळखून उघडकीस आणलें. म्हणून राहु यास त्रास देऊं लागला.

संज्ञेपासून यास तीन अपत्यें झाल्यावर तिला याचें तेज सहन होईना. म्हणून तिनें (आपल्यासारखीच) छाया किंवा सवर्णा स्त्री आपल्या शरीरापासून उत्पन्न करून तिला आपल्या पुत्रांचें पालन व पतीची सेवा करावयास सांगितली व आपण आपल्या पित्याकडे राहावयास गेली. पुढें या स्त्रीस सूर्यापासून श्रुतश्रवस् (सावर्णि मनु), श्रुतकर्मन् (शनि) व तपती अशीं तीन मुलें झालीं. तेव्हां छायेचे मनांत सापत्नभाव आला. हा सापत्नभाव संज्ञापुत्र यमास सहन न होऊन त्यानें एके दिवशीं तिची निर्भर्त्सना करण्याकरितां पाय उचलिला. तेव्हां तिनें त्यास शाप दिला. पुढें यम बापाकडे गेला व आपल्यास मिळालेल्या शापाचें निरसन करून घेतलें. यमास शाप दिला म्हणून विवस्वानास शंका येऊन यानें छायेजवळ चौकशी करून व आपण योगबलानें जाणून हा त्वष्टयाकडे गेला. त्वष्ट्यानें याची पूजा वगैरे करून यास सांगितलें कीं, ती मजकडे १००० वर्षें राहिली व पुढें मीं तिला तुजकडे जावयास सांगितलें असतां ती वडवा (घोडी)-रूपानें पृथ्वीवर उत्तर कुरुदेशांत जाऊन तेथें तुला सुंदर रूप प्राप्त व्हावें म्हणून तप करीत आहे. यांत तिचा कांहींएक दोष नाहीं. तरी मी तुला उत्तम स्वरूप देतों. तेव्हां सूर्यानें ते कबूल केलें व विश्वकर्म्यानें त्यास सुंदर रूप दिलें. तें मात्र कंबरेपर्यंतच दिलें. कारण खालील भागास त्याला स्वरूप देतांच येईना. तो भाग अतिशयच तेजःपुंज असल्यामुळें तो कोणासच दिसत नाहीं, व म्हणूनच कोणच्याहि सूर्याचे प्रतिमेंन पाय नसतात.

पुढें हा कामोत्सुक होऊन अश्वरूपानें संज्ञेकडे गेला व तिजशीं रममाण झाला. पण तिला हा परका अशी शंका येऊन तिनें तें रेत नाकावाटे बाहेर टाकिलें. त्यापासून अश्विनीकुमार (नासत्य व दस्र) झाले. पुढें आपल्या पतीची ओळख पटून तिनें पूर्वरूप धारण केलें व त्यासह रममाण झाली. तेव्हां तिला रेवन्त नांवाचा पुत्र झाला (विष्णु. ३. २; भवि. ब्राह्म. ७९; रेवन्त पहा). व नंतर ते विमानांतून स्वर्गी गेले. मार्कंडेयपुराणांत हीच माहिती थोड्या फरकानें आहे (मार्क. ७५).

याला संज्ञेचे ठिकाणीं वैवस्वत मनु (श्राद्धदेव) यम व यमुना, छायेचे ठिकाणीं सावर्णि मनु, शनि, तपती व मत्स्यमतें विष्टि, अश्विन्[illegible] ठिकाणीं अश्विनीकुमार व विष्णु व भविष्य यांच्या मतें रेव[illegible] मत्स्यमतें प्रभेचे ठिकाणीं प्रभात व राज्ञीचे ठिकाणीं रेवत अशीं मुलें झालीं. यम व यमुना आणि अश्विनीकुमार दोघे आवळेजावळे आहेत. त्यांपैकीं पहिल्याचें नांव नासत्य व दुसऱ्याचें दस्र होय (मत्स्य. ११; पद्म. सृ. ८, विष्णु. ३. ५; ब्राह्म. ६; भवि. ब्राह्म. ७९; म. आ. ६७; भा. ८. १३). यानें छायेचा तिरस्कार केला म्हणून शनि व सावर्णि यांनीं याचा पराभव केला. तेव्हां हा संज्ञेकडे गेला. तेथें यास इलापति व पिंगलापति असे दोन पुत्र झाले (भवि. प्रति. ४ १८; पद्म. सृ. ८). रेवतानें याचा आठवा अश्व नेला, पण तो याला अद्यून परत नेतां आला नाहीं.

(आदित्य, ऋक्षरजस्, कर्ण, कुन्ती, जमदग्नि, द्रौपदी, याज्ञवल्क्य, वसिष्ठ, संवरण पहा.)

सूर्याची स्त्री (संज्ञा) द्यौः, तिची छाया (निक्षुभा) पृथ्वी व त्यांचीं मुलें अनुक्रमें जल (पाणी) व सस्य (धान्य) हीं होत. सूर्य उन्हाळ्यांत पाणी शोषून घेतो व त्यांतून पाणी जमिनीवर पडल्यावर धान्य उत्पन्न होतें. हा अशा तऱ्हेनें सर्व जगाचा पिता आहे. (भवि. ब्राह्म. ७९.).

याचे राजा व श्रोष हे दंडधारी होत. याचा लेखक (कारकून) पिंगल होय व द्वारपाल कल्माष व पक्षी हे आहेत. याचा अरुण हा ज्येष्ठ भ्राता होय. चंद्र, नक्षत्रें वगैरे सर्व याजपासूनच निर्माण झालीं (भवि. ब्राह्म. ७९).

हा भीम द्वादशीचें व्रत करून नक्षत्रांचा राजा झाला (पद्म. सृ. २३).

या ब्रह्मदेवाच्या वंशांतील मरीचीचा पुत्र (भवि. ब्राह्म. १५५). यानें मंदेहसंज्ञक प्रख्यात राक्षसांचा [illegible] केला (भवि. ब्राह्म. १५७). देवांचा दैत्यांनीं पराभव केल्यावर चक्रतीर्थावर यज्ञ केला. त्यांत सूर्यानें चुकून प्राशित्र नांवाचा पुरोडाश ग्रहण केल्यानें याचे दोनहि हात गळून पडले. तेव्हां अष्टावक्राच्या सांगण्यावरून सूर्यानें चक्रतीर्थी स्नान केल्यानें सोन्याचे हात झाले (स्कंद. ३. १. २३).

हा अवयवहीन असल्यामुळें यास मार्तंड व देवांच्याहि आधीं असल्यामुळें आदित्य म्हणूं लागले (भवि. ब्राह्म. ७९). पुढें याच्या तेजानें सर्व विश्व नाश पावूं लागलें असतां सर्व देवांनीं याची स्तुति केली व याचें तेज तासून काढिलें.

याच्या तेजानें सुदर्शन, शंकराचा शूल, वसुसंज्ञक आठ देव, विष्णु व शंकर यांचीं चक्रें, कार्तिकेयाची शक्ति, कुबेराची पालखी इ. अनेक शस्त्रें निर्माण केलीं. हा नंतर आपल्या ऋग्वेदस्वरूपी तेजानें पृथ्वी, यजुर्वेदरूपी तेजानें आकाश व स्वतः सामवेदरूप होऊन उत्तरकुरूंत संज्ञानामक पत्नीकडे गेला. यास ब्रह्मदेवाचा पुत्र असें याच अध्यायांत म्हटलें आहे (भवि. ब्राह्म. १२३).

५ हा प्रति ज्येष्ठमासीं प्रकाशत असतो. याचीं किरणें १४०० आहेत ( मत्स्य. १. ७८ ). पण भागवतांत हा नभस्य ( भाद्रपद ) मासीं प्रकाशतो, असें दिलें आहे ( भा. १२. ११ ). हा वायुपुराणांतील प्रजापतीचे यादींत आहे ( वायु. २. ४. ५३-५४ ).

३ चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

४ गरुडानें मारिलेला एक असुर.

**विविंश**—( सू. दिष्ट. ) विष्णु, वायु व भारत यांच्या मतें विंशपुत्र (म. आश्व. ४०.५ कुं.). भागवतमतें चाक्षुषपुत्र.

२ क्षप व विदर्भकन्या नंदिनी यांचा पुत्र. याची कारकीर्द सुखाची झाली ( मार्क. ११६ ).

**विविंशति**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. हा द्रौपदी-स्वयंवरास गेला होता ( म. आ. २०१. १ कुं. ). याला भीमानें मारिलें ( म. क. २. ९ कुं. ). हा गोग्रहणकालीं दुर्योधनाबरोबर होता ( म. वि. ३७. ३ कुं. ).

**विविक्त**—हिरण्यरेत्याचा पुत्र ( भा. ५. २०. १४ ).

**विवित्सु**—(सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. याला भीमानें मारिलें ( म. क. ४६. १२ कुं. ).

**विविद**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**विविंध्य**—एक साल्वपक्षीय असुर. याला चारुदेष्णानें मारिलें ( म. व. १६. २६ कुं. ).

**विविसार**—( शिशु. भविष्य. ) वायुमतें क्षत्रौजसूचा पुत्र ( विधिसार पहा ).

**विव्रि काश्यप**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १६३ ).

**विशत**—त्रित देवांपैकीं एक.

**विशद**—( सो. पुरूरवस्. ) भागवतमतें जयद्रथपुत्र.

**विशाख**—इंद्रसभेंतील एक ऋषि (म. स. ७. १४ कुं.).

२ ( सो. पुरूरवस्. ) आयूचा पुत्र ( पद्म. सृ. १२ ).

३ स्कंदाचा धाकटा भाऊ ( १५ वसु पहा ).

**विशाखयूप**—( प्रद्योत. भविष्य. ) पालकाचा पुत्र. यानें वायु व ब्रह्मांड यांच्या मतें ५० वर्षें व मत्स्यमतें ५३ वर्षें राज्य केलें.

**विशाखा**—सोमाच्या स्त्रियांतील एक.

**विशाल**—(सू. दिष्ट. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें तृणबिंदुपुत्र. यानें वैशाली नगरी स्थापन केली ( भा. ९. २. ३३; वायु. २. २३. १७; ब्रह्मांड. ३. ६१. १२ ). पण ही नगरी इक्ष्वाकुपुत्रानें स्थापिली असें रामायणांत आहे ( वा. रा. बा. ४७. १२ ).

२ लंकेंतील एक राक्षस ( वा. रा. सुं. ६ ).

३ कृष्णाचा एक मित्र.

४ इक्ष्वाकुला अलंबुषेचे ठिकाणीं झालेला पुत्र.

५ ( वैशालिनी पहा ).

**विशालक**—कुबेरसभेंतील यक्ष (म. स. १०. १७ कुं.).

२ एक राजा. यानें आपली कन्या भद्रा वसुदेवास दिली. पण शिशुपालानें करूशाच्या रूपानें तिला पळविली होती ( म. स. ६८. २१ कुं. ).

**विशाला**—वरुणाची कन्या. अश्रुबिंदुमती हिची सखी ( पद्म. भू. ७७ ).

२ ( ११ कौशिक पहा ).

३ महावीर्यपुत्र भीमाची पत्नी. हिचीं मुलें त्र्यारुणि, पुष्करिन् व कपि ( वायु. २. ३७. १५८ ).

**विशालाक्ष**—गरुडाचा पुत्र.

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. याला भीमानें मारिलें ( म. भी. ८८. २६ कुं. ).

३ विराट राजाचा भ्राता. कीचकाच्या वधानंतर हा सेनापति होता ( म. वि. ३२ ). याला कुंभकोणप्रतींत मदिराश्व म्हटलें आहे ( १ मदिराश्व पहा ).

४ युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञांतील एक राजा ( भा. १०. ८२ ).

५ वास्तुशास्त्रावरील एक ग्रंथकर्ता ( मत्स्य. २५२. २ ).

**विशालाक्षी**—( हैमवती पहा ).

**विशिख**—गरुड व शुकी यांचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ७. ४५० ).

**विशिशिप्र**—सदापृणाच्या सूक्तांत मनूनें याला जिंकल्याचा उल्लेख आहे ( ऋ. ५. ४५. ६ )

**विशेष**—दमन नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**विशोक**—केकय राजाचा पुत्र. पांडवपक्षीय राजा. याला कर्णानें मारिलें ( म. क. ८२. ३ ग. कु. प्रत ).

२ कृष्ण व त्रिशोका यांचा पुत्र ( भा. १०. १०३ विजयीध्वजीप्रत ). भीमाचा सारथि ( म. स. ३६. ३०; भी. ७७. २४ कुं. ). याचें व भीमाचें रथावरील बाणसंग्रहाबद्दल संभाषण झालें आहे ( म. क. ८० कुं. ).

३ दमन नांवाच्या शिवावताराचा शिष्य. विशेषाचें नामांतर.

**विश्पला**—खेलाच्या पत्नीचें नांव. हिचा पाय युद्धांत तुटला असतां अश्वींनीं लोखंडी पाय बसविला व एका रात्रींत हिला युद्धास सिद्ध केली ( ऋ. १. ११२. १०; ११७. ११; ११८. ८; १०. ३९. ८ ).

**विश्रवस्**—( स्वा. ) भागवतमतें हविर्भूचे ठायीं झालेला पुलस्त्यपुत्र. हा अगस्त्य ऋषीचा भाऊ होय. तृणबिंदुकन्या इडविडा (द्रविडा) याची पत्नी. तिच्यापासून कुबेर झाला. याची दुसरी स्त्री केशिनी. तिला रावण, कुंभकर्ण व बिभीषण हे पुत्र झाले (भा. १. ४. ३; ४. १. ३६; ९. २. ३२). यांशिवाय

याला पुष्पोत्कटा, राका, बलाका या स्त्रिया होत्या. त्यांपासून खर, दूषण, विद्युज्जिह्व इ. पुत्र व शूर्पणखा कन्या झाली (म. व. २७५). याची आई द्रविडा (वायु. २. २४. १६). इडविडा किंवा द्रविडा ही बायको कीं आई असा येथें घोटाळा आहे. याच्या स्त्रिया पुढीलप्रमाणेंहि आढळतात—देववर्णिनी, पुष्पोत्कटा, वाका व कैकसी (ब्रह्मांड. ३. ८. ३८). मंदाकिनी व कैकसी (पद्म. पा. ६).

हा ऋषि होता (वायु. १. ५९. ९०-९१; ब्रह्मांड. २. ३२. ९८-१००).

२ (सू. दिष्ट.). तृणबिंदूचा पुत्र.

**विश्रुत**—भागवतमतें वसुदेव व सहदेवी यांचा पुत्र.

२ अमिताभ देवांपैकीं एक.

३ पारावत देवांपैकीं एक.

**विश्रुतवत्**—(सू. इ.) वायुमतें सहस्वत्पुत्र.

**विश्व**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा (म. आ. ६८. ३६ कुं.).

२ फाल्गुनांत पर्जन्य सूर्याबरोबर फिरणारा एक यक्ष (भा. १२. ११. ४०).

३ सत्य देवांतील एक.

४ पितरांपैकीं एक.

**विश्वक कार्ष्णि**—हा कृष्णाचा पुत्र असून सूक्तद्रष्टा आहे (ऋ. ८. ८६). याला कृष्णिय म्हटलें आहे. याला अश्वींनीं विष्णापु नांवाचा मुलगा दिला (ऋ. १. ११६. २३; ११७. ७; ८. ८६. १; १०. ६५. १२).

**विश्वकर्मन्**—स्वायंभुव मन्वंतरांतील प्रजापति. याला एक बर्हिष्मती नामक कन्या होती (भा. ६. ६. १५).

२ विश्वकर्मन् भौवन याचें ऋग्वेदांत देव म्हणून वर्णन आलें आहे. हा देव सर्वत्र पाहूं शकणारा, सर्वत्र तोंड असलेला, चहूंकडे हात व पाय असलेला व ज्यानें पायांनीं स्वर्ग व हातांनीं पृथ्वी उत्पन्न केली असा परमेश्वर आहे (ऋ. १०. ८१. ३).

यानेंच सर्व देवांचीं नांवें ठेविलीं (ऋ. १०. ८२. ३). वैदिककालीं याजकरितां यज्ञसुद्धां करीत असत असें दिसतें (ऋ. १०. ८२. ४).

हा सूक्तद्रष्टा आहे (ऋ. १०. ८१-८२). याला कश्यपानें ऐन्द्र महाभिषेक केल्यानें हा सम्राट् झाला. पुढें यानें कश्यपाला भूमिदान केलें असतां भूमीनें जाण्याचें नाकारिलें (ऐ. ब्रा. ८. २१). सर्वस्व दान करण्याचा विश्वजित् याग केल्यावरहि अशीच स्थिति झाली (श. ब्रा. १३. ७. १. १५). यानें सर्व प्राण्यांचा व शेवटीं स्वतःचाहि होम केला (ऋ. १०. ८१. १; ऐ. ब्रा. ८. १०; नि. १०. २६).

प्रभास वसु व वरस्त्री किंवा भुवना यांचा पुत्र (१५ वसु पहा). देवांचीं विमानें, शहरें वगैरे निर्माणकर्ता हाच होय. याची कन्या संज्ञा विवस्वत्‌ची स्त्री. तिला याचें तेज सहन होईना म्हणून तिनें आपल्या स्थानीं छायेची योजना करून पित्याचा आश्रय घेतला. नंतर विवस्वतास हें समजल्यावर तो याकडे आला. तेव्हां यानें त्याचें तेज तिला सहन होईल इतकें ठेवून बाकी काढून घेतलें व ती तपश्चर्येस गेल्याचें सांगितलें. वरील तेजाचीं यानें आयुधें तयार केलीं व तीं सुदर्शन विष्णूला, त्रिशूल शंकराला, वज्र इंद्राला अशीं दिलीं (पद्म. सृ. ८). यानें धृतराष्ट्राकरितां इंद्रप्रस्थ (म. आ. २२७.५९ कुं.), कृष्णाकरितां द्वारका (भा. १०. ५०; ह. वं. २. ९८), वृंदावन (ब्रह्मवै. ४. १७), इंद्राकरितां लंका (वा. रा. उ. ५), तिलोत्तमा अप्सरा (म. आ. २३१), त्रिपुरदाहसमयींचा रुद्राचा रथ (म. क. २६) व दधीचीच्या हाडांचीं वज्रादि हत्यारें (भा. ६. १०) निर्माण केलीं. यानें ब्रह्मशाचे यज्ञांत त्याचें मुंडन केलें (पद्म. सृ. १६). याचा वास्तुशास्त्रावर एक ग्रंथ आहे (मत्स्य. २५२).

३ घृताची नांवाच्या अप्सरेशीं याचा संबंध असतां तिला 'पृथ्वीवर शूद्रघरीं जन्माला येशील' म्हणून शाप दिला. त्याप्रमाणें गोपाच्या घरीं ती जन्माला आली. तिला पूर्वजन्माचें स्मरण असल्यामुळें तिनें लग्न केलें नाहीं. विश्वकर्म्यालाहि ब्रह्मदेवाच्या कृपेनें ब्राह्मणाच्या घरीं जन्म प्राप्त झाला. पुढें प्रयागांत एक दिवस गंगेवर घृताचीची भेट झाली. पूर्वस्मरण असल्यामुळें दोघांच्यापासून माळी, कासार, शिल्पाचें काम करणारे, शिंपी, कुंभार, सुतार, सोनार व पाथरवट वगैरे लोक निर्माण झाले (ब्रह्मवै. १. १०).

४ त्वष्टृ व वैरोचनी यशोधरा यांचा पुत्र.

५ वशवर्तिन् देवांतील एक.

**विश्वकाय**—हिरण्यकशिपूच्या सभेंतील एक राक्षस (पद्म. सृ. ४५).

**विश्वग**—(स्वा.) भागवतमतें पूर्णिमापुत्र.

**विश्वगश्व**—(सू. इ.) विष्णु व मत्स्य यांच्या मतें पृथूचा पुत्र. यालाच विश्वरंधि आणि वृषदश्व, विष्टराश्व व विश्वग हीं नांवें आहेत.

**विश्वचर्षणि**—(द्युम्न विश्वचर्षणि आत्रेय पहा).

**विश्वचित्ति**—हिरण्यकशिपूच्या दरबारांतील एक राक्षस (पद्म. सृ. ४५).

**विश्वजित्**—(सो. पूरूरवस्.) वायुमतें बृहद्रथपुत्र व विष्णुमतें जयद्रथपुत्र. मत्स्यांत यास अश्वजित् म्हटलें आहे.

२ बृहस्पतीचा तिसरा पुत्र. याची गणना अग्नींमध्यें आहे ( म. व. २२१. १४ कुं. ).

३ ( सो. मगध. भविष्य. ) भागवत, विष्णु व ब्रह्मांड यांच्या मतें सत्यजिताचा पुत्र. यास वायूंत वीरजित् म्हटलें आहे.

**विश्वदत्त**—सोमवंशांतील एक राजा. यानें बकुलासंगमीं तपश्चर्या केली म्हणून हा गणपतीच्या गणांत मुख्य झाला ( पद्म. उ. १३८ ).

**विश्वदेव**—जिताजित् देवांपैकीं एक.

२ पारावत् देवांतील एक.

**विश्वधा**—वशवर्तिन् देवांतील एक.

**विश्वन्तर सौषद्मन**—एक राजा. यानें आपल्या श्यापर्ण नांवाच्या पुरोहितांना टाळून दुसऱ्या पुरोहिताकडून यज्ञ आरंभिला. पण श्यापर्णांपैकीं राम मार्गवेयानें मोठ्या खुबीनें श्यापर्णांना पुनः पौरोहित्य मिळवून दिलें ( ऐ. ब्रा. ७. २७; ३४ ).

**विश्वपात्**—पितरांपैकीं एक.

**विश्वपाल**—व्युत्थिताश्वाचा पुत्र. विष्णु व वायु यांत यास विश्वसह म्हटलें आहे.

**विश्वभुज्**—बृहस्पतीस तारेपासून झालेला पुत्र. याची गणना अग्नींत करतात ( म. व. २२१. २५ कुं. ).

२ पितरांपैकीं एक.

**विश्वमनस् वैयश्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८.२३-२६ ). हा व्यश्वाचा पुत्र. वरोसुषामन्‌ला धन प्राप्त होण्याविषयीं यानें प्रार्थना केली आहे (ऋ.८.२३. २८ ) सायणमतें येथें वरोसुषामन् हें व्यक्तीचें नांव नाहीं.

**विश्वमहत्**—( सू. इ. ) वायुमतें कृतशर्मापुत्र. विष्णु व भागवत यांच्या मतें यास विश्वसह म्हटलें आहे.

**विश्वंभर**—विराध नगरांतील व्यापारी. लोमशानें यास अनेक तीर्थमाहात्म्यें सांगितलीं ( गरुड. २. ६ ).

**विश्वरथ**—विश्वामित्राचें नांव ( ब्रह्म. १०. ५६ ).

**विश्वरंधि**—( सू. इ.) भागवतमतें पृथूचा पुत्र ( विश्वग पहा ).

**विश्वरूप**—त्वष्टयाचा पुत्र. हा देवांचा पुरोहित व विरोचनाचा भागिनेय होता. यज्ञांत देवांना समक्ष व असुरांना गुप्तपणें हा हविर्भाग देत असे. हा इंद्रपद बळकावील, ह्या भीतीनें इंद्रानें याचीं तिन्ही शिरें आपल्या वज्रानें कापिलीं व याचा वध केला. तेव्हां सर्व प्राणी इंद्रास ब्रह्मघ्न म्हणूं लागले. आपणांवरील दोषाचे तीन भाग करून त्यानें पृथ्वी, वृक्ष व स्त्रिया यांमध्यें सडणें, खुडणें व रजस्राव होणें या तीन रूपांनीं वांटून दिला. याकरितां रजस्वला स्त्रीबरोबर कधींहि सहवास करूं नये. नाहीं तर त्याची संतति दोषयुक्त होईल ( तै. सं. २. ५. १ ). याला त्रितानें मारून इंद्राला ब्रह्महत्येंतून वांचविलें ( श. ब्रा. १.२.३.२ ).

हा प्रजापति त्वष्टयाचा दुसरा पुत्र ( भा. ६. ५; म. उ. ९. ४ कुं.; शां. २०७. २० कुं. ). याच्या आईचें नांव यशोधरा, वैरोचनी, विरोचना किंवा रचना होय. ही विरोचना किंवा रचना प्रह्लादाची मुलगी व विरोचनाची धाकटी बहीण ( भा. ६. ६; वायु. २. २२. १९; ब्रह्मांड. ३. १. ८३; गणेश. १. ६६. १२ ).

याला तीन डोकीं होतीं. म्हणून याला त्रिशिरस् असेंहि म्हणत. हा एका मुखानें अन्न भक्षण करी (अन्नाद ), एकानें सोमपान करी (सोमपीथ) व एकानें सुरापान (सुरापीथ) करी. इंद्रानें गर्वानें बृहस्पतीचा अपमान केल्यामुळें तो देवसभेंतून निघून गेला. तेव्हां देवांचा पराभव झाला. इंद्रानें शोध केला तथापि त्याचा पत्ता लागला नाहीं, म्हणून देवांनीं आत्मज्ञानी अशा विश्वरूपाला पुरोहित केलें. पण विश्वरूपाचा ओढा देव व असुर ह्या दोघांच्याकडेहि असल्यानें यानें मोठ्यांदां देवांना व हळूंच असुरांना आहुति देण्याचा क्रम स्वीकारिला. ही गोष्ट इंद्राच्या ध्यानांत आली. तेव्हां याचीं तिन्ही डोकीं त्यानें उडविलीं. तेव्हां सोमपीथ मस्तकापासून कपिंजल, सुरापीथ मस्तकापासून कलविंक व अन्नाद मस्तकापासून तित्तिर नांवाचे पक्षी उत्पन्न झाले.

हा भयंकर तपश्चर्या करूं लागला. त्यामुळें इंद्राला आपलें पद हा घेईल, म्हणून भय वाटूं लागलें. तेव्हां त्यानें याला वश करण्याकरितां अप्सरा पाठविल्या. परंतु त्यांचें विश्वरूपाच्या कडक तपापुढें कांहीं चालेना. तेव्हां इंद्रानें याला वज्र फेंकून ठार केलें. पण हा जिवंत आहे असें वाटल्यामुळें घाबरलेल्या इंद्रानें यज्ञांतील हविर्भागाच्या लालचीनें तक्षन्‌ला याचीं मस्तकें तोडण्यास भाग पाडिलें (भा. ६. ६-९; म. उ. ९.४० कुं.).

याची स्त्री सूर्यकन्या विष्टि. यापासून तिला गण्ड, रक्ताक्ष, क्रोधन, व्यय, दुर्मुख व हर्षण असे भीषणस्वरूपी पुत्र झाले ( ब्रह्म. १६५ ). हा देवांचा प्रबल शत्रु होता ( ब्रह्म. १७३ ). हा मेल्यावर त्वष्टयानें वृत्र उत्पन्न केला.

२ (स्वा. प्रिय.) ऋषभदेवाचा पुत्र भरत. त्याच्या पंचजनी नामक स्त्रीचा पिता ( भा. ५. ७. १ ).

३ अजित् देवांपैकीं एक.

**विश्ववार**—यज्ञकर्ता. यज्ञ व मायिन् यांच्या बरोबर याचा निर्देश आहे ( ऋ. ५. ४४. ११ ).

**विश्ववारा आत्रेयी**—एक सूक्तद्रष्ट्री ( ऋ. ५. २८ ).

**विश्ववेदिन्**—विश्ववेदिन् हा शौरीचा मंत्री होता. खनित्र, शौरि, उदावसु, सुनय व महारथ हे प्रजापतिपुत्र. हे अनुक्रमें पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर या ठिकाणीं

राज्य करीत व यांचा ज्येष्ठ बंधु खनित्र हा त्यांचा अधिपति राहून सर्व पृथ्वीचें राज्य करी. त्या चौघांचे चार अत्रिकुलोत्पन्न सुहोत्र, गौतमकुलोत्पन्न कुशावर्त, कश्यपकुलोत्पन्न प्रमति व वसिष्ठ असे क्रमानें पुरोहित होते. शौरीचे मनांत नसतांहि त्यास व त्याच्या तीन भावांस आपणांकडे वळवून व खनित्राच्या लोकांत फितुरी करून यानें त्यास खनित्राची जागा मिळवून देण्याची खटपट चालविली. खनित्रांविरुद्ध दैवी घातक उपाय योजण्याकरितां वरील पुरोहितास यानें सांगितलें. त्याप्रमाणें चार कृत्या उत्पन्न झाल्या व त्यांनीं खनित्रावर हल्ला चढविला. पण खनित्राच्या शुद्धाचरणामुळें त्यांस परत फिरावें लागलें. पण त्यांनीं त्यांस उत्पन्न करणाऱ्या चौघांहि पुरोहितांस व यांस खाऊन टाकिलें ( मार्कं. ११४ ).

**विश्वसह**—भागवतमतें ऐडविडपुत्र व विष्णुमतें इलवीलपुत्र.

२ ( सू. इ. ) विष्णुमतें व्युत्थिताश्वपुत्र व वायुमतें ध्युषिताश्वपुत्र. याचा पुत्र हिरण्यनाभ ( विश्वपाल पहा ).

३ ( सो. क्रोष्टु. ) लोमपादाच्या वंशांतील श्वेताचा पुत्र.

**विश्वसामन् आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. २२ ). हा स्वतः आपणांस अग्नीच्या उपासनेविषयीं प्रेरणा करीत आहे.

**विश्वसाह्व**—( सू. इ. ) भागवतमतें महस्वानपुत्र.

**विश्वसृज्**—हा शब्द सृष्टिकर्त्यांना लावला असून यांनीं सहस्रसंवत्सर चालणारें एक सत्र केलें व सृष्टि उत्पन्न केली ( पं. ब्रा. २५. १८ ). येथें संवत्सर शब्दाचा दिवस असा अर्थ दिला आहे ( भाष्य पहा ).

२ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील अवताराचा पिता.

**विश्वस्फणि** व **विश्वस्फूर्ति**—( मगध. भविष्य. ). मगधदेशाचा राजा. यानें सर्व राजे जिंकिले होते. यानें नवीन वर्णविभाग केला. त्यांत कैवर्त, मद्रक, पुलिंद व ब्राह्मण यांचा संग्रह केला. यानें नवे क्षत्रिय निर्माण केले. हा नपुंसकासारखा दिसत असे ( ब्रह्मांड. ३. ७४. १९१-१९३ ). हा गंगातीरीं मेला ( वायु. २. ३७. ३७२-३७६; ६ पुरंजय पहा ).

**विश्वा**—प्राचेतस दक्ष व असिक्नी यांच्या दोन कन्या; एक धर्मास व दुसरी कश्यपास दिली होती.

**विश्वाची**—प्राधेची अप्सरा कन्या ( म. स. १०.१२ कुं. ). ही ययातीबरोबर रममाण झाली होती ( म. आ. ७९ कुं. ).

**विश्वाधार**—मेधातिथिपुत्र ( भा. ५. २०. २५ ).

**विश्वानर**—याला शंकराच्या कृपेनें शुचिष्मतीपासून गृहपति नांवाचा मुलगा झाला. गृहपतीनें तीन वर्षांत सांगत वेदांचें अध्ययन करून विश्वेश्वराकडून दीर्घायुष्य मिळविलें ( स्कंद. ४. १. ११ ).

**विश्वामित्र**—( सो. अमा. ) इषीरथाला कुशिक नांवाचा मुलगा होता. त्यानें इंद्रासारखा मुलगा व्हावा, म्हणून तप केलें. इंद्राला वाटलें कीं, आपल्यासारखा दुसरा कोणी होऊं नये. म्हणून त्यानें स्वतःच त्याचा पुत्र होण्याचें ठरविलें. तेव्हां इंद्रच कुशिकाचा मुलगा झाला आणि गाथिरूप इंद्रापासून विश्वामित्र उत्पन्न झाला. म्हणजे हा वंशवेल असा होतो. इषीरथ, कुशिक, गाथिन् ( इंद्र ), विश्वामित्र ( वेदार्थदीपिका ३. १ ).

वाल्मीकि रामायणांतील विश्वामित्राचा वंशवेल—प्रजापति, कुश, कुशनाभ, गाधि, विश्वामित्र ( वा. रा. बा. ५१ ). गाधीस विश्वामित्र झाला ( १ ऋचीक पहा ).

एकदां हा वसिष्ठाच्या आश्रमांत गेला असतां त्यानें याचा कामधेनूच्या साहाय्यानें उत्कृष्ट सत्कार केला. तेव्हां यानें वसिष्ठास कामधेनु मागितली. वसिष्ठ देईना, म्हणून हा बलत्कारानें नेऊं लागला. पण त्या धेनूपासून शक, यवन, पल्हव, बर्बर, किरात उत्पन्न होऊन त्यांनीं याचा पराभव केला. तेव्हां पुत्राला राज्यावर बसवून यानें तप करून अस्त्रें संपादन केलीं. पण वसिष्ठापुढें त्यांचेंहि चालेना. शेवटीं यानें क्षत्रियसामर्थ्याऐवजीं ब्राह्मणसामर्थ्य मिळविण्याचा प्रयत्न केला (वा. रा. बा. ५१-५६). त्रिशंकूला सदेह स्वर्गास नेण्याचा यानें प्रयत्न केला. पण तो सिद्धीस गेला नाहीं ( त्रिशंकु, महोदय व माधवी पहा ). पण तपास मात्र व्यत्यय आला, म्हणून हा पुष्करतीर्थावर येऊन तप करूं लागला. तेथेंहि शुनःशेपानें येऊन वांचविण्याविषयीं गळ घातल्यामुळें यानें त्याला वांचविलें. तपोभंगानें पश्चात्ताप पावून यानें पुनः कौशिकीतीरावर तपश्चर्येस प्रारंभ केला. तेव्हां महर्षिपद याला मिळालें. पण जितेन्द्रिय नसल्यानें ब्रह्मर्षिपद मिळेना. देवांनीं तपोभंगाकरितां रंभा पाठविली असतां तिला ओळखून रागानें यानें तिला शिला बनविलें. पण राग आवरण्याकरितां यानें पुनः तपास आरंभ केला. व हा जितेन्द्रिय ठरल्यावर वसिष्ठानेंहि याला ब्रह्मर्षि म्हटलें ( वा. रा. बा. ६३-६६; स्कंद. ६. १. १६७-१६८ ). ब्रह्मर्षिपद प्राप्त झाल्याबरोबर इंद्राबरोबर सोमपान करण्याचा यास मान मिळाला ( म. आ. १०१.६० कुं. ).

सत्यव्रत त्रिशंकूला विश्वामित्रानें राज्य मिळवून दिलें व आपण त्याचा पुरोहित झाला व स्वतःचें ब्राह्मणत्वहि मान्य करून घेतलें. पण हरिश्चंद्र गादीवर आल्यावर पुनः वसिष्ठ पुरोहित झाला व विश्वामित्राला निघून जावें लागलें. त्या वेळीं विश्वामित्र पुष्कराकडे तपश्चर्येला गेला. पण हरिश्चंद्राला त्यामुळें

फारच त्रास झाला. स्वप्रांत दिलेल्या राज्यावर दक्षिणा देण्याकरितां तो काशीस गेला असतां विश्वामित्रानें त्याचा अतोनात छळ केला ( मार्क ७-८ ). हरिश्चंद्रानें पुत्र व्हावा म्हणून वरुण देवतेला बलि देण्याचा नवस केला होता, तो बावीस वर्षे लांबणीवर टाकल्यावर अजीगर्तपुत्र शुनःशेपाला त्यानें बळी देण्याचें ठरविलें. तेथें हा गेला व यानें यज्ञांत भाग घेऊन शुनःशेपाला–तो विश्वामित्राचा भाचा होता–वांचविलें; व त्याला दत्तक घेऊन त्याचें नांव देवरात असें ठेविलें.

एकदां याची परीक्षा पाहण्याकरितां धर्म वसिष्ठरूपानें याच्याकडे आला व याजवळ भोजन मागितलें. पण भात होईपर्यंत वाट न पाहतां तो दुसरीकडे गेला. विश्वामित्रानें भात तयार करून तेथें आणिला असतां त्यानें यास उभें राहण्यास सांगून आपण निघून गेला. पण विश्वामित्रानें शांति सोडिली नाहीं. तेथेंच उभा राहून वाट पहात असतां शंभर वर्षांनीं वसिष्ठ आला व त्यानें याचा भात खाऊन याला ब्रह्मर्षि म्हटलें ( म. उ. १०६ ). याच्या चरित्रांतील त्रिशंकुकथा, रंभेला शाप, कुत्र्याचें मांसभक्षण वगैरे गोष्टी एकत्राहि दिल्या आहेत (म. अनु. ३).

यानें कंबुतीर्थी तप केल्यानें यास उत्तम संतति झाली ( पद्म. उ. १४२ ). यानें कृतयुगांत पुष्कळ तप केलें. पण शेवटीं ब्रह्मदेवाला प्रिय असणाऱ्या प्रतिपदेचें उपोषण केल्यामुळें ब्रह्मदेवानें यास देहान्तराशिवाय ब्राह्मणत्व दिलें ( भवि. ब्राह्म. १६ ). हा हिरण्यासंगमीं स्नान करून शिवलोकीं गेला ( पद्म. उ. १४० ). यानें दुष्टांना शासन न करणाऱ्या शंकराला कलियुग संपेपर्यंत गुप्त होण्याचा शाप दिला (पद्म. उ. १५४).

विश्वामित्राचा आश्रम ताटकवनाच्या जवळच होता. तेथेंच वामनानें बलीकडून त्रिपादभूमि घेतली. त्याला सिद्धाश्रम ( बक्सार ) असें म्हणत. पूर्वीचा इतिहास लक्षांत घेऊन स्थानमाहात्म्यामुळें हा तेथें राहत असे ( वा. रा. बा. २७-२९ ). दुसरा आश्रम सरस्वतीच्या पश्चिमतीरावर कुरुक्षेत्रांतील स्थाणुतीर्थाच्या समोर असावा (म. श. ४२). याशिवाय देवकुंड किंवा वेदगर्भपुरी व कौशिकी नदीचें तीर येथेंहि याचे आश्रम होते.

धर्मसंबंधीं लिहिणाऱ्यांपैकीं हा एक होता. असें वृद्धयाज्ञवल्क्यानें दिलें आहे असें विश्वरूप म्हणतो. अपरार्क, स्मृतिचंद्रिका, जीमूतवाहनकृत कालविवेक आणि इतर कांहीं ग्रंथांत व्यवहाराखेरीज पंच महापातकें, श्राद्ध, प्रायश्चित्त इत्यादिकांवर याचीं मतें उद्धृत केलेलीं आढळतात. नऊ अध्यायांची श्लोकबद्ध विश्वामित्र-स्मृति असल्याचें मद्रासरकारनें प्रसिद्ध केलेलें आहे ( मद्रास गव्हर्नमेंट हस्तलिखितांचा कॅटलॉग, पान १९८५, नं. २७१७ ).

याला शंभर मुलें होतीं. त्यांपैकीं मधुच्छन्दस् मधला होता. यानें शुनःशेपाला हरिश्चन्द्राच्या यज्ञांतून सोडवून देवरात असें नांव ठेविलें. आपल्या मुलांना त्याला ज्येष्ठपणाचा मान द्यावयास यानें सांगितलें असतां वडील पन्नास मुलांनीं तसें करण्याचें नाकारिलें. म्हणून यानें त्यांना म्लेंच्छ होण्याचा शाप दिला. पण धाकट्या पन्नासांनीं त्याला योग्य मान देण्याचें कबूल केलें. तेव्हां त्यांना यानें आशीर्वाद दिला. थोरल्यांचें गोत्र विश्वामित्र असून पुढल्यांना कुशिक म्हणूं लागले. कुशिकांतच देवरात प्रवर येतो ( भा. ९. १६. २८-३७ ). विरुद्ध वागणाऱ्यांना यानें अश्व, पुण्ड्र, शबर, पुलिन्द, मूतिब बनविलें ( ऐ. ब्रा. ७.१८; रैभ्य पहा. ).

याचे पुत्र–अक्षीण, अंभोरुद, अरालि, असुरायण, आग्निक, आश्वलायन, उज्जयन, उदापेक्षिन् उपगहन, उलूक, ऊर्जयोनि, कपिल, कारीष, कालपथ, कूर्चामुख, गार्ग्य, गार्दभि, गालव, चक्रक, चांपेय, चारुमत्स्य, जंगारि, जाबालि, तंतु, ताडकायन, देवरात ( शुनःशेप ), नवतंतु, नाचिक, नारद, नारदिन्, नैकदृश्, पर, पर्णजंघ, पौरव, बकनख, बभ्रु, बाभ्रवायणि, भूति, मधुच्छंदस्, मारुतंतव्य, मार्दम, मुसल, यति, यमदूत, याज्ञवल्क्य, लीलाढ्य, वक्षोग्रीव, वज्र, वातघ्न, वादुलि, विभूति, शकुन्त, शिरीशिन्, शिलायूप, शुचि, श्यामायन, संश्रुत्य, सालंकायन, सित, सुरकृत्, सुश्रुत, सूत, सेयन, सैंधवायन, स्थूण, हिरण्याक्ष ( म. अनु. ७ कुं. ). रामायणांत फक्त दृढनेत्र, मधुष्पंद, महारथि व हविष्पंद दिले आहेत. (वा. रा. बा. ५७). हे सर्व विश्वामित्राचे ब्राह्मणवंशविवर्धक व गोत्रकार होते. तसेंच यास कवि, क्रोधन, खसृम (स्वसृप), पितृवति( पितृवर्तिन् ), पिशुन, वाग्दुष्ट, हिंस्र असे सात पुत्र होते ( ह. वं. १. २१; पद्म. सृ. १० ). यापासून माधवीचे ठायीं अष्टक झाला ( गालव पहा ). गणपत कृष्णाजीच्या प्रतींत पर्णजंघाऐवजीं वल्गुजंघ दिला आहे (म. अनु. ४). याशिवाय पुढीलहि आढळतात. हिरण्याक्ष, देवश्रवस् ( देवरात, शुनःशेप ), कति, रेणु ( रेणुक, रेणुमत् ), सांकृति, गालव, मधुच्छंदस्, जय ( नय ), देवल ( देव ), कच्छप, हरित ( हारित ), अष्टक, कृत, ध्रुव, पूरण. यांत शुनःशेप सर्वांत श्रेष्ठ होय. पहिले तीन शालावतीचे पुत्र. दुसऱ्या व तिसऱ्याबद्दल ब्रह्म. व ह. वं. १. ३२ यांत स्पष्टता नाहीं. पुढील नऊपर्यंतचे पुत्र रेणूचे ठायीं झाले. ह. वं. १. ३२ मध्यें तसें स्पष्ट म्हटलें नाहीं. ब्रह्मांत रेणु ही स्त्रीच दिलेली नाहीं. पण पुत्रांचीं नांवें मात्र जमतात. यानंतरचे तीन दृषद्वतीचे ठायीं झालेले पुत्र होत. पण ब्रह्म, वायु व ब्रह्मांड यांत तिचा पुत्र फक्त अष्टकच दिला आहे. वायु व ब्रह्मांड यांत बाकीचे व मधुच्छंदस्, नय, देव हीं नांवें एकंदर पुत्र

म्हणून एकदम सांगितलीं आहेत. तेथें स्त्रियांच्या अनुक्रमानें पुत्र दिले नाहींत. ब्रह्म १३ त सांकृति नांवाचा पुत्र नसून स्त्री दिली आहे व तिला मौद्गल्य व गालव झाले. कतीचा पुत्र कात्यायन व अष्टकाचा लौहि. ह. वं. २७ मध्येंच फक्त हिरण्याक्षास सहा पुत्र दिले आहेत ( ह. वं. १. २७; ३२; ब्रह्म. १०; १३; वायु. २. २९; ब्रह्मांड. ३. ६६ ).

याच्या कुलांतील गोत्रें—१ पणिन ( पाणिन् ), २ बभ्रु, ३ ध्यानजाप्य, ४ पार्थिव, ५ देवरात, ६ शालंकायन, ७ लौहित ( लौहिण्य ), ८ यमदूत ( यामदूत, यामभूत ), ९ कारूषक, ( कारीषय, कारीषव ), १० बाष्कल ( वास्कल ), ११ सौश्रव (सोश्रुत, सोश्रुम), १२याज्ञवल्क्य, १३ समर्षण, १४ उदुंबर, १५ वाताज्य ( उदुम्लान ), १६ तालकायन ( तारक ), १७ चांद्रव (यमसुंचत), १८ रेणव, १९ श्यामायन ( शालावत्य ), २० हिरण्याक्ष, २१ सांकृत ( स्यंकृत ), २२ गालव, २३ देवल, २४ लालाव्य ( ददाति ), २५ बादर, २६ कौशिक. पैकीं १० वा व १२ पासून पुढील ब्रह्माच्या १३ व्या अध्यायांत नाहींत व ११ पासून पुढील दहाव्या अध्यायांत नाहींत ( ब्रह्म. १०; १३; वायु. २. २९; ब्रह्मांड. ३. ६६ ).

विश्वामित्र कुलांतील गोत्रकार—अभय, अयतायन, उलूप (ग उलप ), औपवह ( ग ), करीष ( ग ), खरवाच, जनपादप (ग), जाबाल (ग), देवरात, पयोद (ग), बाभ्रव्य (ग), याज्ञवल्क्य (ग), वतंड, वास्तुकौशिक (ग), विश्वामित्र, वैकृतिगालव (वैकलिनायन), शलंक, श्यामायन (ग), संश्रुत (ग), संश्रुत्य (ग), साधित (ग), सैंधवायन (ग), हलयम (ग), हे सर्व उद्दाल देवरात, विश्वामित्र या तीन प्रवरांचे आहेत.

कारुकायण ( कामुकायन ग ), कुशिक, देवश्रवस्, वैदेहरात, वैदेहजात, वैदहनात, वैदेवराज (ग), सुजातेय, सौमुक ( तौसुक ).

[ कपर्देय, धनंजय, परिकूट, पाणिनि हे त्रिप्रवरी आहेत, आद्य, माधुच्छंदस, विश्वामित्र हे त्रिप्रवरी आहेत. हे त्रिप्रवर म्हणजे अघमर्षण, मधुच्छंदस् व विश्वामित्र हे होत ].

अश्मरथ्य (ग), कामलायनिज, वंजुलि हे अश्वरथ वंचुलि व विश्वामित्र या प्रवरांचे होत.

पूरण व विश्वामित्र हे पूरण व विश्वामित्र या दोन प्रवरांचे होत.

अष्टक, लोहित हे अष्टक, विश्वामित्र व लोहित या तीन प्रवरांचे होत.

उदरेणु, उदवहि व कथक हे ऋणवत, गतिन् व विश्वामित्र या तीन प्रवरांचे होत.

उदुंबर, करीराशिन् त्राक्षायणि, मौंजायनि ( कौञ्जायनि ), लावकि, शाठथायनि (कात्यायनि), शालंकायनि, सैषिरिटि, हे खिलिखिलि, विद्य, विश्वामित्र ( खिलि, क्षितिसुखाविद्ध, विश्वामित्र ) या तीन प्रवरांचे होत ( मत्स्य. १९८ ).

२ शकुंतलेचा पिता विश्वामित्र दुष्यंतसमकालीन असल्यामुळें त्रिशंकुकालीनापेक्षां वेगळा दिसतो.

३ रामाच्या वेळचा विश्वामित्र व त्रिशंकूच्या वेळचा विश्वामित्र हे भिन्न होत, हें रामायणावरूनहि स्पष्ट आहे (वा. रा. बा. ५७ ).

४ हा सुदासाचा पुरोहित आणि वसिष्ठाशीं स्पर्धा करणारा होता. ऋग्वेदाचें तिसरें मंडळ यानें व याच्या कुलांतील लोकांनीं केलें आहे. या मंडळांत प्रत्यक्ष विश्वामित्राच्या नांवावर बरींच सूक्तें आहेत. विश्वामित्रानें सुदासाकडून यज्ञ करविला होता ( ऋ. ३. ५३. ९ ). यानें सुदासाच्या अश्वमेधाकरितां घोडा सोडिला होता ( ऋ. ३. ५३. ११ ) विश्वामित्राच्या कुलास कुशिक असें नांव आहे. त्याप्रमाणें हा आपणांस 'कुशिकस्य सूनुः' ( ऋ. ३. ५३. ९ ) म्हणवितो. विश्वामित्रकुलाचा 'विश्वामित्राः' अशा बहुवचनी पदांनीं उल्लेख आले आहेत ( ऋ. ३. ५३. १३; १०. ८९. १७).

विश्वामित्र व वामदेव यांच्यामध्यें 'संपात ऋचा' कोणीं पाहिल्या याबद्दल वाद आहे. विश्वामित्रानें त्या ऋचा पाहिल्या. पण वामदेवानें त्या सर्व लोकांस माहीत केल्या. तेव्हां विश्वामित्रास दुसऱ्या कांहीं ऋचा दिसल्या ( ऐ. ब्रा. ६. १८ ).

नदीपार होण्याकरितां वाट मिळावी म्हणून विश्वामित्राचा विपाट् शुतुद्री ( बियास व सतलज ) या नांवांच्या नद्यांशीं झालेला संवाद प्रसिद्ध आहे. यावेळीं पैजवन सुदासाकडून संपत्ति मिळवून हा आला होता ( ऋ. ३. ३३ ).

विश्वामित्र गाथिनाची ऋग्वेदांत अनेक सूक्तें आहेत ( ऋ. ३. १-१२; २४; २५; २६ ( १-६, ८, ९ ); २७-३२; ३३ (१-३, ५,७, ९, ११-१३); ३४; ३५, ३६ ( १-९, ११), ३७-५३; ५७-६२; ९. ६७. १३-१५; १०.१३७. ५; १६७). हा कुशिकगोत्रांतील मंत्रकार होता, असें पुराणांतहि म्हटलें आहे.

याच्या वसिष्ठद्वेषिणी म्हणून कांहीं ऋचा शौनकाच्या वेळेपासून अद्यापपर्यंत प्रसिद्ध आहेत. त्या अद्यापि वसिष्ठगोत्री लोक म्हणत नाहींत. दुर्गाचार्यानेंहि स्वतः वसिष्ठगोत्री असल्यामुळें त्यावर व्याख्या केली नाहीं ( ऋ. ३. ५३. २०-२४; नि. १०. १४ ). वसिष्ठपुत्र शक्तीनें याला सुदासाच्या यज्ञांतील वादांत गप्प बसविलें होतें. पण विश्वामित्रानें जमदग्नीपासून ससर्परी विद्या मिळवून वाद-

कौशल्यानें शक्तीचा पराजय केला ( ऋ. ३. ५३. १५-१६ वेदार्थदीपिका ). मौनी विश्वामित्राला वसिष्ठानें बांधून नेलें, असें यानें प्रौढीनें सांगितलें आहे ( ऋ. ३. ५३. २३ ).

ऋग्वेदांत याचा भरताशीं संबंध दिला असून हा भरताकडे गेला असतां याची सौदन्ति लोकांशीं भेट झाली होती ( पं. ब्रा. १४. ३ ).

विश्वाचा मित्र अशी विश्वामित्र शब्दाची व्युत्पत्ति दिली आहे ( ऐ. आ. १. २. २; पा. सू. ६. ३. १३०; पहिला व दहावा वसिष्ठ पहा ).

**विश्वायु**—( सो. पुरूरवस्.) विष्णु व वायु यांच्या मतें पुरूरवसपुत्र.

२ वशवर्तिन् देवांतील एक.

**विश्वावसु**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १३९ ). एक गंधर्व ( तै. सं. १. १. ११. १. ). यानें गायत्रीनें स्वर्गातून आणलेला सोम चोरिला ( श. ब्रा. ३. २. २. २ ).

२ कश्यप व प्राधा यांच्या पुत्रांतील एक हा प्रति श्रावणांत इंद्र सूर्याबरोबर फिरावयास असतो ( भा. १२. ११-३७ ). यास पृथ्वी-दोहनकालीं गंधर्व व अप्सरा यांनीं वत्स केलें होतें ( भा. ४. १८. १७ ). हा युद्धांत इंद्राबरोबर होता ( भा. ८. ११. ४१ ). हा ब्राह्मणांच्या शापांनीं कबंध नांवाचा राक्षस झाला होता. पुढें जटायुभेटीनंतर रामलक्ष्मणांस हा वाटेंत भेटला. याचे हात रामलक्ष्मणांनीं छेदिले ( म. व. २७९ ). याचा पुत्र चित्रसेन. याचा याज्ञवल्क्याशीं संवाद झाला होता ( म. शां. ३२४-२६ कुं.).

३ जमदग्नि व रेणुका यांचा चवथा पुत्र. यास जमदग्नीनें इतर चार पुत्रांबरोबर पाषाण केलें होतें. परंतु परशुरामानें जमदग्नीजवळ वर मागून घेतले. त्यांत यांसह चवघा भावंडांस पूर्वस्थिति प्राप्त करून दिली ( म. व. ११६ ).

४ मधुपत्नी कुंभीनसीचा पिता. या विश्वावसूला अनला नामक एक पत्नी होती. ही माल्यवान् राक्षसाची कन्या होय ( वा. रा. उ. ६१ ).

**विश्वेदेव**—धर्म ऋषि व विश्वा यांचे दहा पुत्र-क्रतु, दक्ष, वसु, सत्य, कालकाम, मुनि, कुरज, मनुज, बीज आणि रोचमत् (भा. ६.६.७; मत्स्य. २०२). धुरि, लोचन, आर्द्रव व पुरुरवस् असे चार वरीलपैकीं शेवटल्या चारांबद्दल आहे. ( साम्ब. १८ ). हे चालूं मन्वंतरांत सप्त विश्वदेवांत आहेत ( भा. ८. १३. ४ ). हे मरुत्तयज्ञांत सभासद होते ( भा. ९. २. २८ ). यांनीं हरिश्चंद्राला छळीत असतां विश्वामित्राचा तिरस्कार केला म्हणून हे त्याचे शापानें द्रौपदीचे पांच पुत्र झाले व अश्वत्थाम्याकडून मेले ( मार्क. ६२-६९ ).

**विश्वेश्वर**—हा एक शंकराचा अवतार काशींत आहे ( शिव. शत. ४२ ). याचे अविमुक्तेश्वर असें नांव आहे ( शिव. कोटि. १ ).

२ एकादश रुद्रांपैकीं एक.

**विष**—शिवदेवांतील एक.

**विषया**—धृष्टबुद्धि प्रधानाची कन्या ( चंद्रहास पहा ).

**विषाणिन्**—दाशराज्ञ युद्धांतील सुदासाचा शत्रु असावा ( ऋ. ७. १८. ७ ).

**विषूची**—विरज राजाची स्त्री ( भा. ५. १५. १५ ).

२ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील विष्णूची माता.

**विष्टराश्व**—( विश्वगश्व पहा ).

**विष्टि**—धर्मसावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

२ छाया व विवस्वत् यांची कन्या. हिची आकृति भीषण असल्यानें भीषणस्वरूपाच्या त्वष्टपुत्र विश्वरूपानें हिला स्वीकारलें ( ब्रह्म. १६५ ).

**विष्णापु**—हे कृष्णीय विश्वकाच्या मुलाचें नांव आहे. हा नाहींसा झाला असतां अश्विनांनीं यास पुनः आणून दिला ( ऋ. १. ११६. २३; ११७. ७; ८. ८३. ३; १०. ६५. १२ ).

**विष्णु**—फारच थोड्या सूक्तांत याचें वर्णन आहे (ऋ. १. १५४; १५६; ७. १०० ). विष्णूनें तीन पावलांत त्रैलोक्य आक्रमण केलें. याचें शरीर फारच मोठें होऊं शकतें. लोकांना फक्त दोनच लोक ठाऊक आहेत. पण ह्याला तिसराहि लोक ठाऊक आहे. याच्या लोकांत भक्त आनंदांत असतात. हा सर्वांवर कृपा करतो. याच्या लोकांत अमृताचा झरा आहे. हा सर्वांचा उत्पादक असून आधार आहे, असें वरील सूक्तांत यांचें सुंदर वर्णन आहे. विष्णूचें हें वर्णन सूर्याचा उदय, मध्य व अस्त यांच्याशीं जुळतें आहे, असें और्णवाभाचें मत आहे ( नि. १२. १९ ). गरुत्मत्, सुपर्ण यांचा वैदिक अर्थ सूर्य असा आहे. पण पुढें हे शब्द विष्णूच्या वाहनास म्हणजे गरुडास लावलेले आढळतात. सूर्याच्या माध्याह्नकाळच्या स्थानाला विष्णुपद असें और्णवाभ म्हणतो ( नि. १२. १९ ). लोकांना संकटमुक्त करणें ( ऋ. ६. ४९. १३ ). लोकांना पृथ्वी राहण्यास योग्य करणें, हाच तीन पावलें टाकण्यांत विष्णूचा हेतु होता.

विष्णु हा इंद्राचा संबंधी होता. विष्णूनें त्रैलोक्य आक्रमण केलें, तेव्हां इन्द्रानें आपला रथ हाकारला ( ऋ. ८.१२. २७ ). हा गर्भधारण व संरक्षण करणारा आहे. वामन, वराह, मत्स्य, कूर्म व हयग्रीव अवतारांचे मूळ संहितादि वैदिक ग्रंथांत सांपडतें ( यज्ञ व सुयज्ञ पहा ). उपनिषदांतहि प्रायः हेंच वर्णन आहे ( बृ. उ. ६. ४. २१; तै. उ.

१. १. १; क. उ. ३.९ ). विष्णु म्हणजे यज्ञ ही शतपथांतील कल्पना यज्ञ म्हणजे विष्णु अशी पुढें फिरली ( मै. उ. ६. १६ ). ब्रह्म, विष्णु, महेश्वर असे त्रैरूप्य निश्चित झाले ( मै. उ. ४. ५; शिखा. २ ). ॐकारांपैकीं उकार ही दुसरी मात्रा विष्णूची निदर्शक आहे ( नृसिंहोत्तरतापिनी ३ ). विष्णु हा आदित्यांपैकीं प्रमुख आहे ( भ. भी. ३४. २१ ). विष्णु गायत्री दिली आहे ( वासु. उ. २ ). विष्णुचंदन म्हणजे गोपीचंदन होय ( वासु. उ. १ ).

हे अनादि व अनंत अशा परमेश्वराचें नांव आहे. हा सत्वगुणप्रधान असून पृथ्वीच्या पालनाचें काम याच्याकडे आहे. म्हणूनच हा वेळोवेळीं अवतार घेऊन दुष्टांचा संहार व पृथ्वीचें पालन करतो. याला चार हात असून त्यांत शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें असतात. त्यांच्या क्रमामुळें केशवादि नांवांच्या विष्णूच्या चोवीस मूर्ति बनतात. शार्ङ्ग-धनुष्य व नंदन खड्ग हीं याचींच होत. पीताम्बर, वनमाला, किरीटकुंडलें, व श्रीवत्स हीं याचीं भूषणें होत. लक्ष्मी ही स्त्री व स्थान वैकुंठ आहे. कधीं कधीं हा शेषावर समुद्रांत शयन करतो. या गोष्टींचीं निदर्शक अशीं हजारांवर नांवें असलेलें विष्णुसहस्रनाम प्रसिद्ध आहे.

एका दैत्यानें कूर्मरूपानें सर्व तीर्थें पळविलीं असतां यानें तीं परत आणलीं ( पद्म. स्व. ३८; कूर्म पहा ). यानें हजार कमलानें काशीविश्वेश्वराचें पूजन चालू केलें असतां एक कमल कमी आलें म्हणून आपला डोळा काढून शंकरास वाहिला ( स्कंद. २. ४. ३२-३५ ). कृष्ण हा विष्णूचा व माया ही पार्वतीचा अवतार होय ( पद्म. ब्र. १३ ). जगन्नाथपुरीच्या अन्नाला दोष नाहीं. तेथें वेताच्या काठ्यांचे वळ अंगावर उठल्यास फार भाग्याचें होय ( पद्म. ब्र. १३ ). विष्णूच्या बारा महिन्यांतील बारा मूर्ति, बारा जातींचीं फुलें व फळें पुढीलप्रमाणें आढळतातः—१ विष्णु ( अशोक, डाळिंब ); २ मधुसूदन ( मोगरा, नारळ ); ३ त्रिविक्रम ( पाटली, आंबा ); ४ श्रीधर ( कलंब, फणस ); ५ हृषीकेश ( करवीर, खजूर ); ६ पद्मनाभ ( जाई, ताडफळ ); ७ दामोदर ( माल्ती, राय-आवळा ); ८ केशव ( सूर्यकमळ, बेलफळ ); ९ नारायण ( चंद्रविकासी कमळ, नारिंग ); १० माधव ( जुई, सुपारी ); ११ गोविंद ( उंडली, करवंद, १२ ? ( जायफळ ) ( स्कंद. २. ४४ ). शंकरानें याचें चक्र गिळल्याची एक कथा आहे ( ब्रह्म. १०९ ).

याचे अवतार महाभारत, भागवत, हरिवंश, ब्रह्म, देवीभागवत व मत्स्य या पुराणांत ओळीनें एकत्र दिलेले आहेत. पैकीं हरिवंश व ब्रह्म या दोन ठिकाणीं सारखे आहेत. मत्स्य व देवीभागवत या ठिकाणचे थोडे सारखे आहेत. देवीभागवतांत काल संदिग्ध दिला आहे. मत्स्यांत निश्चित काल देऊन पुरोहितहि दिले आहेत. नांवें—वराह, सुयज्ञ, कपिल, दत्त, सनक, सनातन, सनंदन, सनत्कुमार, नर, नारायण, ऋषभ, हयग्रीव, मत्स्य, कूर्म, नृसिंह, वामन, हंस, धन्वंतरि, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध, कल्कि ( भा. २. ७ ). वराह, नृसिंह, वामन, दत्त, परशुराम, राम, कृष्ण, कल्कि ( ह. वं. १. ४१; ब्रह्म. २१३ ). चाक्षुषांत नरनारायण, वैवस्वतांत दुसऱ्या युगांत दत्तात्रेय, चवथ्या युगांत नरसिंह, वामन; एकोणिसाव्या त्रेतायुगांत परशुराम, त्रेतायुगांत राम, अठ्ठाविसाव्या त्रेतायुगांत कृष्णार्जुन ( दे. भा. ४. १६ ). चाक्षुषांत नारायण ( ब्रह्मन् ), त्रेतायुगांत चवथ्या युगांत नृसिंह ( रुद्र ) व सातव्या त्रेतांत वामन ( धर्म ) झाला. हे तिन्ही दिव्य जन्माचे होते. युगानुक्रमावरून पुढील अवतार वैवस्वतांतले असावेत असें वाटतें. पण ते मानुष जन्माचे व शापामुळें उत्पन्न झालेले होत. उपरिनिर्दिष्ट शेवटचे दोन वैवस्वतांतलेच असावेत. परंतु दिव्यजन्माचे म्हणून अनुक्रमानें न सांगतां अगोदर सांगितले. पहिल्या त्रेतांत दत्त ( मार्कंडेय ), पंधराव्या त्रेतांत मांधातृ ( उत्तंक ), एकोणिसाव्या त्रेतांत जामदग्न्य ( विश्वामित्र ), चोविसाव्या युगांत राम ( वसिष्ठ ) अठ्ठाविसाव्या द्वापरांत वेदव्यास ( जातुकर्ण्य ), कलींत बुद्ध ( द्वैपायन ) व तेंच युग संपूर्ण होते समयीं व संध्याकाल शिल्लक असतांना विष्णुयशस् नांवानें कल्की ( पाराशर्य ) होईल ( मत्स्य. ४७. २३७-२५९ ). येथेंच पुढें हा याज्ञवल्क्यासह होईल असें म्हटलें आहे. पण महाभारतांत पुढील प्रमाणें अवतार दिले आहेतः—मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, रामकृष्ण, बुद्ध, कल्किन् ( म. शां. ३४८. २ कुं. ). बुद्ध गाळून आरंभीं हंस दिला आहे ( म. शां. ३४८. ५५ कुं ).

२ याची एक स्मृति आहे. तिच्यामध्यें संस्कार व आश्रमधर्मांचें प्रतिपादन केलेलें आहे. ही स्मृति कलाप नगरांत त्रेतायुगांत सांगितलेली आहे. ही पांच अध्याय असून व्यंकटेश्वर प्रेसच्या अष्टादश स्मृतिमध्येंहि छापिली आहे.

वृद्धविष्णुस्मृतीचा विज्ञानेश्वरानें उल्लेख केला आहे व संस्कारकौस्तुभांतहि निर्देश आहे.

३ एक अग्नि ( म. व २२३. १२ कुं. ).

४ आभूतरजस् देवांपैकीं एक.

५ कार्तिक महिन्यांत अश्वतर नाग, रंभा अप्सरा, गंधर्व व यक्ष इत्यादिबरोबर फिरणारा सूर्य ( भा. १२. ११. ४४; उरुक्रम पहा ).

६ भृगुकुलांतील गोत्रकार.

७ पांडवपक्षीय राजा. याला कर्णानें मारिलें ( म. क. ५१.४९ कुं. ).

८ सावर्णि मनूचा पुत्र.

९ धर्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षीपैकीं एक ऋषि.

१० भौत्य मनूचा पुत्र.

**विष्णु प्राजापत्य**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १८४ ).

**विष्णुदास** ( २ चोल पहा ).

**विष्णुधर्मन्**—गरुडाचा पुत्र.

**विष्णुयशस्**—एक ब्राह्मण. यापासून कल्क्यवतार होणार आहे ( भा. १. ३. २५; १२. २. १८ ).

हा अवतार याज्ञवल्क्यपुरस्सर होणार आहे. ब्रह्म व ब्रह्मांड पुराणांत विष्णुयशस् व कल्कि एकच मानिला आहे. याचा शेवट गंगायमुनांच्या संगमापाशीं होणार असला तरी हा हिंदुस्थानभर म्लेच्छांचा संहार करील ( ब्रह्मांड. ३. ७३. १०४-११० ). हा बुद्धधर्माचा शेवट करील ( ह. वं. १. १४; कल्किन् पहा ).

**विष्णुरात**—परीक्षिताचें नांव ( भा. १. १२. १६ ).

**विष्णुवृद्ध**—( सू. इ. ) त्रसदस्यूचा पुत्र. हा अगोदर क्षत्रिय असून पुढें तपानें ब्राह्मण झाला ( ब्रह्मांड. ३. ६३. ८८; वायु. २. २९. ११४ ).

**विष्णुशर्मन्**—शिवशर्मन्चा पुत्र. यानें इंद्रास शरण आणिलें ( पद्म. भू. ३ ). हा निगमोद्बोधकतीर्थांत स्नान करून मुक्त झाला ( पद्म. उ. २००-२०५ ).

**विष्णुसावर्णि**—भौत्य मनूचें नामान्तर.

**विष्णुसिद्धि**—अंगिराकुलांतील गोत्रकार. हा विष्णुवृद्धाबद्दल पाठभेद आहे.

**विष्णुहरि**—एक विष्णुभक्त ( स्कंद. २. ८. १ ).

**विष्वक्सेन**—नारदाचा शिष्य.

२ विष्णुपार्शद ( भा. ८. २१. २६; म. स. ७. १९ कुं. ).

३ ( सो. पूरु. ) वायुमतें योगसनूचा, मत्स्यमतें युगदत्ताचा आणि भागवत व विष्णु यांच्या मतें ब्रह्मदत्ताचा पुत्र. यानें जैगीषव्याला शिकविण्याकरितां योगशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला. याचा पुत्र उदक्स्वन ( भा. ९. २१. २५ ).

४ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील होणारा अवतार.

५ चौदावा मनु. शिवाय भौत्य दिला आहे ( मत्स्य. ९ पद्म. सृ. ५ ).

**विष्वग्ज्योति**—( स्वा. नाभि. ) विष्णुमतें शततीचा पुत्र.

**विसृत**—( सू. निमि. ) भागवतमतें देवमीढपुत्र. विष्णु व वायु यांच्या मतें यास विबुध म्हणतात.

**विस्फूर्जन**—कश्यप व खशा यांचा पुत्र

**विहंगम**—धर्मसावर्णि मन्वंतरांतील एक देवगण.

२ खर राक्षसाचा अमात्य ( वा. रा. अर. २३. ३१ ).

**विहव्य**—वर्चस् ऋषीचा पुत्र. याचा पुत्र वितत्य ( म. अनु. ३० ग. कु. प्रत ).

**विहव्य आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १२८ ).

**विहुंड**—हुंडाचा पुत्र. हुंडाचा नाहुषानें वध केल्यामुळें त्यावर हा संतापला होता. नाहुषाच्या नाशाकरितां हा तप करीत असतां सुंदर स्त्रीच्या वेषानें विष्णु तेथें आला. व त्यानें यास कामोद वृक्षाच्या सुवासिक पुष्पांनीं शंकराची पूजा करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें यानें तिच्या हास्यापासून उत्पन्न होणारीं पिवळीं फुलें न आणतां रडण्यापासून निघणारीं तांबडीं फुलें आणून शंकरास वाहिलीं. तेव्हां पार्वतीच्या रागानें हा मेला ( पद्म. भू. १०१-१२१ ).

**वीतहव्य**—( सू. निमि. ) विष्णु व वायु यांच्या मतें सुनयपुत्र. भागवतमतें शुनकपुत्र.

२ ( सो. सह. ) कार्तवीर्याचा पुत्र जयध्वज. जयध्वजाचा तालजंघ. तालजंघाला शंभर मुलें होतीं. त्यांनाहि तालजंघच म्हणत. त्यांत वडील वीतिहोत्र किंवा वीतहव्य होता. परशुरामाच्या भयानें हा पळत असतां वाटेंत परशुरामाच्या बाणानें दग्ध झालेला तालजंघ याला आढळला. त्याला रथांत घेऊन हा हिमालयाच्या दरींत लपला. पुढें परशुराम युद्धनिवृत्त झाल्यावर यानें आपली माहिष्मती पुनः स्थापिली व अयोध्येवर स्वारी करून सगरपिता फल्गुतंत्राचा पराभव केला ( ब्रह्मांड. ३. ४. ७ ). पण यांचें पुढें काशीच्या राजाशीं बऱ्याच पिढ्या युद्ध चालू होतें. महाभारतांतील माहितींत खालीलप्रमाणें थोडा फरक आहे.

यास तालजंघ नांवाचा भ्राता होता. याचें हैहय असें नामांतर होतें. यास दहा स्त्रिया होत्या. व त्या प्रत्येकीस दहा पुत्र झाले. त्या पुत्रांनीं काशीचे राजे हर्यश्व, सुदेव व दिवोदास यांचा पराभव केला. पुढें दिवोदासास भरद्वाज मुनीच्या प्रसादानें प्रतर्दन नांवाचा पुत्र झाला. त्या प्रतर्दनानें याच्या पुत्रांस ठार केलें. तेव्हां हा भृगूच्या आश्रमांत लपला. भृगूकडे जाऊन प्रतर्दनानें याला आपल्या स्वाधीन करावयास भृगूस सांगितलें. भृगूनें येथें कोणी क्षत्रियच नाहीं, असें सांगितलें. आपली क्षत्रिय जात टाकून हा ब्राह्मण झाल्याचें पाहून निदान जात बदलावयास लाविली, एवढेंच प्रतर्दनानें समाधान मानिलें. पुढें यानें क्षत्रियत्व वमनद्वारा टाकून दिलें व हा ब्रह्मर्षि बनला. ब्राह्मण झाल्यानंतर यास गृत्समद नांवाचा पुत्र झाला ( म. अनु. ८ कुं. ).

भार्गवगोत्री वीतहव्य मंत्रकार होता ( केसरप्राबंधा; २ संवर्त पहा ). एका जीवन्मुक्त वीतहव्याची कथा वसिष्ठानें रामास सांगितली ( यो वा. ५. ८२-९० ). वेदांतील वीतहव्य आंगिरस व हा एकच.

**वीतहव्य आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ६. १५ ). वीतहव्य व भरद्वाज यांचा एकत्र उल्लेख आहे ( ऋ. ६.१५. ३ ). सुदासाशींहि जोडून हा वीतहव्य शब्द आला आहे. पण अथर्ववेदांत एक गाय किंवा ब्राह्मण स्त्री पळविल्यामुळें वैतहव्यांचा पराभव झाल्याची अर्धवट गोष्ट आली आहे. तेथें जमदग्नि व असित यांच्याशीं त्या गाईचा किंवा ब्राह्मण स्त्रीचा संबंध दिसतो ( अ. वे. ५. १७. ६-७; १८.१०-१२ ). या वैतहव्यांचा मुख्य संजय होता व त्यानें भृगूला ठार केलें होतें ( अ. वे. ५. १९. १ ). हा उल्लेख परशुरामानें पृथ्वी निःक्षत्रिय करण्याकरितां कारण झालेल्या कथानकाचा असावा. हा व दुसरा वीतहव्य एक असावा.

**वीतहव्य श्रायस**—एक राजा ( तै. सं. ५.६.५.३; क. सं. २२.३ ). संतति देणाऱ्या यज्ञाच्या प्रशंसेकरितां याचा निर्देश आहे. तो यज्ञ केल्यानें याला हजार मुलें झालीं.

**वीति**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**वीतिमत्**—दहाव्या रैवताचा ज्येष्ठ पुत्र ( पद्म. सृ. ७).

**वीतिहोत्र**—( २ वीतहव्य पहा ).

२ ( स्वा. प्रिय. ) भागवतमतें प्रियव्रत व बर्हिष्मती यांचा पुत्र.

३ ( सू. नरि. ) भागवतमतें इंद्रसेनपुत्र.

४ (सो. क्षत्र.) भागवतमतें सुकुमारपुत्र. यास विष्णुमतें वैनहोत्र व वायुमतें वेणुहोत्र म्हणतात.

५ युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञांतील एक ऋषि.

**वीर**—( सो. अनु. ) भागवतमतें शिबिपुत्र.

२ तामस मन्वंतरांतील देव.

३ कृष्णपत्नी सत्येचा पुत्र.

४ कृष्ण व कालिंदी यांचा पुत्र.

५ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

६ ( तोण्डमान् पहा ).

७ कश्यप व दनु यांचा पुत्र.

८ कश्यप व दनायु यांचा पुत्र.

९ ( ४ लीलावती पहा ).

१० भरद्वाज अग्नि व वीरा यांचा पुत्र (म. व. २२१.१३ कुं.). यास रथप्रभु, रथध्वान व कुम्भरेतस् अशीं नामांतरें होतीं. यास सरयू नामक एक भार्या असून सिद्धि नामक पुत्र होता (म. व. २२१. १९ कुं.). आग्नेय हव्यानंतरचा हवि सोमाबरोबर यालाच मिळतो ( म. व. २२१. १७ कुं. ).

**वीरक**—( वीरभद्र व आडि पहा ).

२ चाक्षुष मन्वंतरांतील ऋषि.

**वीरकेतु**—पांडवपक्षीय पांचाल. याला द्रोणानें मारिलें ( म. द्रो. १२२.४१ कुं. ).

२ हंसध्वज राजाच्या सुमति प्रधानाचा पुत्र.

**वीराजित्**—( सो. मगध. भविष्य. ) वायुमतें सत्याजिताचा पुत्र ( ३ विश्वजित् पहा ).

**वीरण**—हा चाक्षुष मन्वंतरांतील एक प्रजापति होता. याची मुलगी असिक्नी दक्षाला दिली होती ( विष्णु. १. १५ ). यानें सनकादिकांपासून ब्रह्मविद्या संपादन केली ( म. शां. ३४८ ).

**वीरणि**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**वीरद्युम्न**—भूरिद्युम्नाचा पिता. याचा तनुविप्रावरोबर संवाद झाला होता (म. शां. १२७. १४ कुं.; कृशतनु पहा).

**वीरधन्वन्**—दुर्योधनपक्षीय एक त्रैगर्त राजा. याला धृष्टकेतूनें मारिलें ( म. द्रो. १०७. १८-१९ कुं. ).

**वीरधर्मन्**—पांडवपक्षीय एक राजा (म.उ. ४.१६कु.).

**वीरबाहु**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. याला भीमानें मारिलें ( म भी. ६४. ३५ कुं. ).

२ चेदि देशचा राजा. याचा पुत्र सुबाहु. याच्या घरीं नलपत्नी दमयंती वनवासांत असतां राहिली होती. यालाच सुबाहु असें कुंभकोणम् प्रतींत म्हटलें आहे.

३ रामसेनेंतील एक वानर ( वा. रा. कि. ३३ ).

४ कांपिल्य नगरीचा राजा. याला मागल्या जन्मीं एकादशीचें पुण्य नातवानें दिल्यामुळें हा राजा झाला ( स्कंद २. ५. ४ ).

**वीरभद्र**—स्वायंभुव मन्वंतरांतील दक्ष प्रजापतीचा यज्ञ झाला, तेव्हां त्या प्रजापतीवर रागावलेल्या शंकरानें जटा आपटतांच निर्माण झालेला शिवपार्षद ( भा. ४. ५; स्कंद. १. १. ३; शिव. रुद्र. ३२ ). शंकर रागानें असतां त्याच्या डोक्यांतून जो घामाचा थेंब पडला, त्यापासून हा निर्माण झाला, असेंहि म्हटलें आहे ( पद्म. सृ. २४ ) हा महादेवाच्या मुखापासून झाला, असें महाभारतांत दिलें आहे ( शां. २८४). हा शंकराच्या कोपापासून झाला, असें वायुपुराणांत आहे ( १. ३० ). भविष्यपुराणांत शंकर स्वतःच वीरभद्र झाला, असें म्हटलें आहे ( प्रति. ४. १० ).

यानें उत्पन्न होतांच 'काय काम आहे?' असें विचारलें असतां शंकरानें यास दक्षयज्ञविध्वंस करण्यास सांगितलें. तेव्हां हा कालिका व इतर रुद्रगण बरोबर घेऊन तेथें गेला व रुद्राच्या वरानें देवांशीं झालेल्या झटापटींत याला यश येऊन देवांस

हार खाऊन पळून जावें लागलें. नंतर यानें दक्षास पकडलें. भृगु ऋषींच्या दाढीमिशा, उपटल्या, भगाचे डोळे काढले, पूषा ऋत्विजाचे दांत पाडले व दक्ष प्रजापतीचें शीर खड्गानें तुटेना म्हणून बुक्या मारून त्याचें शीर धडावेगळें केलें व तें अग्नीत टाकलें. तदनंतर हा कैलासीं निघून गेला (भा. ४. ५; पद्म. सृ. २४; स्कंद. १. १. ३-५; म. शां. २८४; कालि. १७; शिव. रुद्र. स. ३२-३७). मृग होऊन यज्ञ व दक्ष पळत असतां व्याध होऊन यानें त्या मृगांचा नाश केला व दक्षाचें डोकें ठोकरीनें उडविलें (भवि. प्रति. ४. १०, लिंग. १. ९६; वायु. १. ३०). दक्षयज्ञविध्वंसनकार्याच्या आनंदामुळें यानें आपला अंश बाजूस काढून ठेवला व तोच पुढें ब्राह्मणाच्या घरीं शंकराचार्यांच्या रूपें अवतरला (भवि. प्रति. ४. १०).

तदनंतर मदानें धुंद होऊन वीरभद्रानें त्रिभुवनविध्वंसास प्रारंभ केला. तेव्हां शंकरानें याचा निषेध केला व यास अंगारक ऊर्फ मंगळ म्हणून ग्रहांत श्रेष्ठ स्थान दिलें व जे कोणी तुझी पूजा करतील त्यांस रूप, आरोग्य व ऐश्वर्य प्राप्त होईल असा वर दिला (पद्म. सृ. २४).

शंकर व शत्रुघ्न यांचें जें युद्ध झालें, त्यांत हा पुष्कलासह लढत होता व पुष्कलाचें यानें पांचवे दिवशीं मस्तक कापिलें. यानें त्रिपुराचे सैनिक एका क्षणांत ठार केले (पद्म. पा. ४३). जालंधराशीं शिवासहवर्तमान जे शिवगण लढले त्यांत हा होता (पद्म. उ. १७). एकदां शौकटपर्वतावर कश्यपादि सर्व ऋषि व सर्व देव वणव्यांत सांपडून भस्म झाले, तेव्हां सरस्वतीचा विरोध असतांहि हा तो अग्नि प्याला व समंत्रक भस्मानें यानें त्या सर्वांस जिवंत केलें. पुढें एकदां एका सर्पाशींहि एक वर्षभर युद्ध करून यानें त्याचे दोन फाळके केले व सर्वांस त्या संकटांतून मुक्त केलें. तसेंच पंचमेंढ्र राक्षसाशीं दोन वर्षें खड्ग व गदायुद्ध करून यानें त्यास ठार मारिलें व त्यानें खाल्लेल्या सर्व देवांस, ऋषींस व वाली-सुग्रीवास भस्म मंत्रून उठविलें. त्या राक्षसास जटेपासून जन्म झालेल्या माणसाच्या हातूनच मरण यावें असा वर होता. या कार्याबद्दल शंकरानें यास शाबासकी दिली व देवांस व ऋषींस तीनदां जिवंत केल्याबद्दल याच्या भस्मास त्र्यायुष असें नांव पडलें (पद्म. पा. १०७). पुढें देवांनीं याची स्तुति केली (लिंग. १. ९६).

एकदां पार्वतीनें एक लहान पार्षद पाहिला व त्याला तिनें पुत्र मानलें. यास वीरक असेंहि म्हटलेलें दिसतें. पुढें पार्वतीस शंकरानें काळी म्हणून चिडवतांच ती गोरी व्हावयास निघाली. तेव्हां तिनें यास शंकरावर नजर ठेवण्यास ठेविलें (पद्म. सृ. ४३-४४).

लिंगपुराणांत निराळीच हकीगत दिली आहे. ती अशी– शंकराचें भैरवरूप तोच वीरभद्र होय. नृसिंह जेव्हां विश्व-संहार करूं लागला, तेव्हां शंकरानें यास नृसिंहाची रग जिरवण्याचें कार्य सांगितलें. यानें नृसिंह शांत होण्यास्तव त्याची स्तुति केली. तिनें तो शांत होईना, तेव्हां त्यास यानें सपाटून शासन केलें. नंतर नृसिंहानें याची स्तुति केल्यावर तो अदृश्य झाला (लिंग. १. ९६).

शिमग्यांत निघणाऱ्या वीरांचा याच्याशींच कांहीं संबंध असावा. एलिफण व वेरुळ येथील लेण्यांत याचे पुतळे कोरलेले आहेत व तेथें यास आठ हात दाखविले आहेत. याच्या नांवावर वीरभद्रकालिकाकवच व वीरभद्रतंत्र हे ग्रंथ आहेत.

२ सोमवंशीय मनोभद्र राजाच्या दोन पुत्रांतील एक. याच्या बापानें या दोघांना सारखें राज्य वांटून दिलें असतां राजदरबारांत एका गृध्रानें याचा पूर्वजन्म सांगितला (गर पहा; पद्म. क्रि. ३).

३ (यशोभद्र पहा).

४ या राजाची कन्या निभा. तिनें अविक्षितास स्वयंवरांत वरिलें (मार्क. ११९. १७).

**वीरभद्रक**—गौडदेशीय राजा. याच्या स्त्रीचें नांव चंपकमंजरी. हा शिकारीस गेला असतां तहान लागल्यामुळें खणतांच पाणी लागलें. नंतर बुद्धिसागर प्रधानाच्या सांगण्या-वरून यानें तेथें एक ५० धनुष्यें औरस चौरस लांब तळें बांधिलें (नारद. १. १२).

**वीरमणि**—याची पत्नी श्रुतवती (पद्म. पा. ६७). एक मोठा शिवभक्त. याच्याकरितां खुद्द शंकर योगिनींशीं लढला. पण शेवटीं त्यांत याचा पराजय झाला (पद्म. पा. ३९-४६).

२ (३ रुक्मांगद पहा).

**वीररथ**—(सो. द्विमीढ.) वायुमतें नृपंजयपुत्र (बहुरथ पहा).

**वीरवत्**—सावर्णि मनूचा पुत्र.

२ ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

३ बारा साध्य देवांतील एक.

**वीरवर**—सुलोचनेचें पुरुषवेषांतील नांव (५ माधव पहा.).

**वीरवर्मन्**—सारस्वत नगरीचा राजा. याची मुलगी मालिनी. ती यमपत्नी होती. पांडवांचा अश्वमेधीय अश्व याच्या नगरासमीप आला असतां तो यानें पुत्रांकडून धरविला. त्याबद्दल याचें व कृष्णार्जुनांचें मोठें युद्ध झालें. पण यमानें यास साहाय्य केल्यामुळें अर्जुनाचा पराभव झाला. मग

कृष्णानें याची मैत्री संपादन केली; तेव्हां हा अर्जुनाच्या साहाय्यार्थ गेला. यास सुभाल, सुरभ, लील, कुवल आणि सरस असे पांच पुत्र होते ( जै. अ. ४७-४९ ).

२ द्रविड देशचा राजा. याची बायको हेमांगी ही पूर्वजन्मींची मोहिनी होय ( पद्म. उ. २२० ).

**वीरवाहन**—एक राजा. ब्रह्महत्येमुळें हा अतिशय दीन व दुःखी झाला होता ( मुनिशर्मन् पहा ).

२ विराध नगरींतील एक राजा. याची वसिष्ठाबरोबर धर्माच्या बाबतींत चर्चा झाली होती ( गरुड. २. ६ ).

**वीरविक्रम**—एक शूद्र. यानें शब्दाकरितां चांडालाला मुलगी दिली. पण कृष्णानें चांडालाचा व कन्येचा उद्धार केला ( पद्म. ब्र. २६ ).

**वीरव्रत**—( स्वा. प्रिय. ) भागवतमतें मधु व सुमनस् यांचा पुत्र. याची स्त्री भोजा व पुत्र मंथु व प्रमंथु होत.

**वीरसिंह**—वीरमणीचा पुत्र व रुक्मांगदाचा भ्राता. यानें शत्रुघ्नाशीं युद्ध केलें ( पद्म. पा. ४० ).

**वीरसेन**—नलाचा पिता ( १ नल पहा ).

२ मांसाशन सोडणारा राजा (म. अनु.१७७. ७२ कुं.).

३ अवंति नगरांतील एक राजा. यानें तीन राजसूय व सोळा अश्वमेध यज्ञ केले ( पद्म. उ. १२८ ).

४ दक्ष राजाचा सासरा, याला आपली कन्या दक्षास द्यावी, असा स्वप्नांत दृष्टांत झाला होता ( गणेश. १. २६.२७ ).

**वीरहोत्र**—( सो. सह. ) वायुमतें तालजंघपुत्र ( २ वीतहव्य पहा ).

**वीरा**—वीर्यचंद्रकन्या, करंधमाची स्त्री आणि अविक्षिताची माता ( मार्कं. ११९. २ ). हिला सर्पत्रस्त ऋषि शरण गेले. तेव्हां हिनें मरुत्तास निरोप पाठवून सर्पांस जाळून टाकविण्याचा प्रयत्न केला. पण सर्प वैशालिनीस शरण गेले व त्यांनीं अविक्षिताकरवीं मरुत्तापासून आपलें रक्षण करून घेतलें ( मार्कं. १२६ ).

२ भारद्वाज नामक अग्नीची स्त्री (म. व. २२१.१७ कुं.).

**वीरिणी**—वीरण प्रजापतीची कन्या व प्राचेतस दक्षाची स्त्री. ही ब्रह्मदेवाच्या डाव्या पायाच्या अंगठ्यापासून जन्माला आली ( म. आ. ६७. ११; ६९. ९ कुं. ).

२ पीवरीचें दुसरें नांव.

**वीर्यचंद्र**—वीरेचा पिता ( १ वीरा पहा ).

**वीर्यवत्**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**वृक**—पृथु व अर्चि यांचा कनिष्ठ पुत्र ( भा. ४. २२. ५४ ).

२ हिरण्यकशिपूचा एक अनुयायी ( भा. ७. २. १८ ).

३ ( सू. इ. ) भरुक राजाचा पुत्र. याचा पुत्र बाहुक. ( भा. ९. ८. २ ).

४ शूर व मारिषा यांचा पुत्र. याची स्त्री दुर्वाक्षी आणि पुत्र तक्ष व पुष्कर होत ( भा. ९. २४. २९; ४३ ).

५ कृष्णास मित्रविंदेपासून झालेला एक पुत्र.

६ वत्सक यादव व मिश्रकेशी अप्सरा यांचा पुत्र.

७ ( स्वा. उत्तान. ) शिष्ट व सुच्छाया यांचा पुत्र.

८ द्रौपदीस्वयंवरांत आलेल्या क्षत्रिय राजांपैकीं एक ( म. आ. २०१. १० कुं. ). हाच कौरवपक्षीय असावा. नकुलाच्या पराजयानंतर जे पांडवपक्षीय अकरा वीर आले, त्यांविरुद्ध जाणाऱ्यांपैकीं हाहि होता ( म. क. ८९. ९ कुं. ).

९ हरित राजाचें नामांतर.

१० ( सू. इ. ) रोहितपुत्र.

११ सृष्टि व छाया यांचा पुत्र.

१२ यानें कार्तिक महिन्यांत मांस वर्ज केलें ( म. अनु. १७७. ७० कुं. ).

१३ पांडवपक्षीय राजा. द्रोणाचा युद्धवेग अडवीत हा धांवला असतां द्रोणानें यास सारथि व घोडा यांसुद्धां ठार केलें ( म. द्रो. २१. १६ कुं. ).

**वृकदेवा** किंवा **वृकदेवी**—विष्णु व वायु यांच्या मतें देवककन्या होय. ही वसुदेवाची स्त्री. हिला अवगाहक व नंदक असे दोन पुत्र होते ( वसुदेव पहा ).

**वृकरथ**—अधिरथ सूताचा पुत्र व कर्णाचा भाऊ. याला रात्रियुद्धांत भीमानें मारिलें ( म. द्रो. १५८. २१ कुं. ).

**वृकल**—सृष्टि व छाया यांचा पुत्र.

२ अक्रूराचा मुलगा.

**वृकासुर**—शकुनीचा पुत्र. यानें भस्मासुराप्रमाणें, ज्याच्या डोक्यावर हात ठेवीन, त्याला भस्म करण्याचा शंकरापासून वर मिळविला. पण शंकराच्याच डोक्यावर हा हात ठेवण्यास प्रवृत्त झाला. तेव्हां शंकर पळाला. पण विष्णूनें त्या वराबद्दल याच्या मनांत संशय उत्पन्न करून स्वतःच्या डोक्यावर हात ठेवून वराची परीक्षा पाहण्यास याला प्रवृत्त केलें. तेव्हां हा आपल्याच हातानें मेला ( भा. १०. ८८ ).

**वृकोदर**—भीमाचें दुसरें नांव.

**वृकोदरी**—पूतनेची बहीण ( आदि. १८. १०१ ).

**वृचया**—कक्षीवत्‌ची पत्नी.

**वृचीवत्**—दैववात आणि संजय यांचें युद्ध सुरू झालें, तेव्हां संजयाला तुर्वश मिळाले व दैववाताला वृचीवत् मिळाले ( ऋ. ६. २७. ७ ).

**वृजिनवत्**—( सो. क्रोष्टु. ) क्रोष्ट्याचा पुत्र. याचा पुत्र श्वाहि.

वृत्रस्थला—एक अप्सरा.

वृत्त—कश्यप व कद्रू यांचा पुत्र, एक सर्प.

२ (स्वा. उत्तान.) शिष्ट व सुच्छाया यांचा पुत्र.

वृत्ति—मनु नामक रुद्राची पत्नी (भा. ३. १२. १३).

२ अमिताभ देवांतील एक.

वृत्र—या शब्दाचा अर्थ मेघ, असुर असा आढळतो; पण वृत्र ही कोणीहि व्यक्ति नसून इंद्रवृत्रयुद्ध वगैरे केवळ सृष्टिचमत्काराचें वर्णन आहे, असेंहि लिहिलेलें आढळतें (नि. १. १५).

याच्या आईचें नांव दानु (ऋ. १. ३२. ९). याला हातपाय नाहींत (ऋ. ३. ३०. ८), पण तोंड आहे (ऋ. १. ५२. १०; १५; ८. ६. ६; ७६. २) व दोन हनुवटी आहेत (ऋ. १. ५२. ६). देवांनीं याला ठार करण्याकरितां इंद्र उत्पन्न केला (ऋ. ३. ४९. १; ४. १९. १).

इंद्र व वृत्रासुर यांचें युद्ध त्रिककुद पर्वतावर झालें. वृत्राच्या मरणाची बातमी वायूनें चहूंकडे पोंचविली. वेद व वेदविद्या प्रथम असुरांनीं आपल्या हस्तगत करून घेतली, परंतु पुढें देवांना असुरांपासून फार त्रास होऊं लागल्यामुळें विश्वकर्म्याचा मुलगा वृत्र नांवाचा ब्राह्मण यापासून तीनहि (ऋक्, यजु, साम) प्रकारचे मंत्र देवांनीं हिरावून घेतले. कारण, त्या जोरावरच असुरांनीं देवावर जय मिळविला होता (श. ब्रा. १. १. ३. ४; ३. ९. ३. १२; ४. १. ३.१; ५. ५. ५. १).

ऋग्वेदांत वृत्राचे विशेषतः चार पराक्रम वर्णन केलेले आहेत. पाणी अडविणें (ऋ. २. १५ ६), गाई पळविणें (ऋ. २. १९. ३), सूर्य लपविणें (ऋ. २. १९ ३) व उषा होऊं न देणें (ऋ. ४. १९. ८). हेंच कार्य, शंबर, वल, अहि वगैरे करितात. हें युद्ध होतें त्याची मितिहि ठरविण्याचा आश्चर्यकारक प्रयत्न लो. टिळकांनीं केला आहे. त्यांनीं प्रतिवार्षिक आक्टोबर १० ही तारीख दिली आहे (आर्यांचें मूलस्थान २०८).

त्वष्ट्यानें यज्ञ केला, तेव्हां आपल्या पुत्राला मारणाऱ्या इंद्राखेरीज सर्वांना सोम पाजला व राहिलेला अग्नींत टाकला. त्यापासून वृत्र झाला. वृत्रानें सर्व जग व्यापिलें, तेव्हां भयानें विष्णूनें आपले तीन भाग केले व तीन लोकांत ठेविले. इंद्रानें विष्णूच्या तीन भागांच्या साहाय्यानें याला वाढूं दिलें नाहीं. तेव्हां वृत्र इंद्राच्या संमतीनें त्याचें पोट झाला. पण तेथेंहि यानें भूकेचें रूप घेऊन सर्वांना त्रास देण्यास सुरवात केली (तै. सं. २. ४. १२). यापासून विदेह देशांतील गाई उत्पन्न झाल्या. त्यांतून काळ्या मानेचा बैल उत्पन्न झाला. तो अग्नीला दिल्यावर अग्नीनें इंद्राला बलिष्ठ केलें व वृत्राचा पराजय झाला (तै. सं. २. १. ४).

विश्वरूपास इंद्रानें कपटानें मारिलें म्हणून त्वष्ट्यानें दक्षिणाग्नींत अथर्ववेदानें (दे. भा. ६. १. ६) बटेचें हवन केल्यानें हा उत्पन्न झाला. पण बलास मारिलें म्हणून दितीच्या विनंतीवरून कश्यपानें बटेचें हवन केल्यानें हा झाला असेंहि आहे. यास उत्पन्न करण्याचा उद्देश इंद्रास मारणें हा होय. हा अजस्र देही (पद्म. उ. ९) व रोज बाणाच्या फेंकीइतका सर्व बाजूंनीं वाढणारा होता (भा. ६. १६). पित्राज्ञेवरून यानें तप केलें व ब्रह्मापासून 'लोह किंवा काष्ठ, आर्द्र किंवा शुष्क, यांनीं दिवसा किंवा रात्रीं मरण येणार नाहीं,' असा वर मिळविला (दे. भा. ६. १. ६). पुढें कश्यपाच्या आज्ञेवरून यानें इंद्रास जिंकून इंद्रपद मिळविलें (वा. रा. उ. ८४-८६). हा ब्राह्मण होता (भा. ६. ९; पद्म. भू. २५). रंभेकरवीं मोह पाडून इंद्रानें यास सुरा पाजिली व त्या निशेंत आहे तोंच (पद्म. भू. २५), व्रतरहित समुद्रतीरीं झोंपला असतांना स्वतः व्रतस्थ राहून (वा. रा. उ. ८४-८६), तप करीत असतांनाच (स्कंद. १. १. १६); याच्याशीं सप्तर्षींकरवीं वरील वरांतील अटीवर साम केला. व यास अर्धें इंद्रपद दिलें व गैरसावध पाहून एके दिवशीं कपटानें (दे. भा. ६. १.६; पद्म. भू. २४), युद्ध चालू असतांना (भा. ६. ९), दधीचीच्या हाडाच्या वज्रानें (पद्म. पा. १९. म. व. १००), त्यावरून समुद्राचा फेंस लपेटून (दे. भा. ६. १. ६; म. उ. १०) ठार केलें. ही वेळ संध्याकाळची होती. वरील युद्धसमयीं याचे बाजूस अनर्वन्, अंबर, अयोमुख, उत्कल, ऋषभ, नमुचि, पुलोमत, प्रहेति, विप्रचित्ति, वृषपर्वन्, शंकुशिरस्, शंबर, हयग्रीव, हेति, इ. (भा. ६. ९) व पातालांतील कालेय ऊर्फ कालकेय राक्षस (स्कंद. १. १. १६) होते (पद्म. पा. १९). यास मधुर नांवाचा एक पुत्र होता (वा. रा. उ. ८४. १०). वृत्र विष्णूचा परमस्नेही होता. म्हणून त्यानें इंद्रास अप्रत्यक्षपणें मदत केली (वा. रा. उ. ८४-८६). युद्धसमयीं यानें इंद्रास भागवतधर्म फार सुंदर रीतीनें समजावून दिला (भा. ६. ९). यास सनत्कुमारांनीं उपदेश केला व यानें योगज्ञान झाल्यावर आत्मा ब्रह्मांडीं विलीन करून घेतला (म. शां. २८१). यानें एक महागंभीर नांवाचा खंदक खणला होता तेथून वेत्रवती उगम पावते (पद्म. उ. ११४). हा पूर्वजन्मीं चित्रकेतु होता.

२ यानें हिरण्याक्षाच्या बाजूनेंहि सेनापति म्हणून युद्ध केलें. यास इंद्रानें शेंडी धरून तलवारीनें ठार केलें (पद्म. भू. ७३).

३ कश्यप व दनायु यांचा पुत्र.

४ अनायुषेचा पुत्र. याचे पुत्र बक.

**वृद्धकन्या**—कुणिगर्गाची मानसकन्या. हिच्या पित्यानें हिला एके ठिकाणीं देऊं केली होती. पण हिला तें स्थळ आवडलें नाहीं. त्यामुळें पुढेंहि योग्य पति न मिळाल्यामुळें ही एकांतांत पितृदेवार्चन करीत देह झिजवीत राहिली. पण नारदानें संस्कार न झालेल्या तुला उत्तम लोक कोठून मिळणार? असें सांगितल्यामुळें हिनें विवाह करण्याचें योजिलें. अर्धे तप देण्याच्या अटीवर फक्त गालवाच्या आश्रमांतील शृंगवान् नामक ऋषि हिच्याशीं विवाह करण्यास सिद्ध झाला. त्यानेंहि 'एक रात्रच तुझ्यासह पति म्हणून राहीन,' असें सांगितलें. पण तें कबूल केल्यावर दोघांचा विवाह झाला. एक रात्र हिनें त्याच्याशीं संग केला व ठरावाप्रमाणें अर्धे तप दिलें. पुढें ही लवकरच परलोकीं गेली (म. श. ५२).

**वृद्धकौशिक**—याचा पुत्र गौतम (मणिकुंडला पहा).

**वृद्धक्षत्र**—(३ जयद्रथ पहा).

**वृद्धगर्ग**—अत्रीचा व यांचा अद्भुत गोष्टींच्या फलाविषयीं संवाद झाला होता (मत्स्य. २२९. ३८).

**वृद्धगार्ग्य**—याचा पितराशीं पितरांची तृप्ति कशानें होते याविषयीं संवाद झाला आहे (म. अनु. १८८. ७३ कुं.).

**वृद्धगौतम**—हा गौतमाचा पुत्र. हा बुद्धीचा जड होता पण वृद्धा नांवाच्या स्त्रीनें तपानें यास बुद्धिमान् केलें व स्वतः तरुण झाली (ब्रह्म. १०७).

**वृद्धद्युम्न आभिप्रतारिण**—एक राजा. यानें शुचिवृक्ष गौपालायन नांवाच्या पुरोहिताच्या म्हणण्याप्रमाणें केल्यामुळें याची भरभराट झाली (ऐ. ब्रा. ३. ४८). यानें त्रिष्टोमक्षत्रधृति नांवाचा यज्ञ केला. पण याच्या पुरोहिताच्या मनांत राजानें फक्त 'क्षत्रधृतियज्ञ' करावा असें होतें. त्यामुळें पुरोहितानें कुरूंचें कुरुक्षेत्रांतून उच्चाटन होईल असा शाप दिला व त्याप्रमाणें पुढें घडून आलें (सां. श्रौ. १५. १६. १०-१३). याचा अभिप्रतारिन् काक्षसेनेशीं कांहीं संबंध आहे कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं.

**वृद्धशर्मन्**—(सो. पुरूरवस्.) हा मत्स्यमतें आयुपुत्र होय. यासच क्षत्रधर्मन् नांव होतें.

२ करुषदेशीय राजा. याची स्त्री वसुदेवभगिनी श्रुतदेवा व पुत्र दंतवक्र (भा. ९. २४. ३७).

**वृद्धसेना**—सुमति राजाची स्त्री व देवताजिताची माता (भा. ५. १२. ५).

**वृद्धा**—आर्ष्टिषेणपुत्र ऋतध्वजापासून सुदयामेस वृद्धा झाली. मातेनें जातांना हिला सांगितलें होतें कीं, 'जो या गुहेंत शिरेल तोच तुझा नवरा होईल.' नंतर हिचें वृद्धगौतम तेथें आल्यामुळें त्याशीं लग्न झालें (ब्रह्म. १०७).

**वृधु तक्षन्**—याचा हीनजातित्वामुळें प्रतिग्रह घेणें अयोग्य असतांहि भरद्वाजानें क्षुधार्त असल्यामुळें याच्याकडून गाईचें दान घेतलें. पण त्याला दोष लागला नाहीं. कारण तो क्षुधार्त होता (मनु. १०. १०७). हा ऋग्वेदांतील बृबु तक्षन् असावा.

**वृंदा**—कालनेमि व स्वर्णा यांची कन्या (पद्म. उ. ४; शिव.रुद्र.यु.१४). जालंधराची पत्नी. हिनें अग्निप्रवेश केल्यावर विष्णूचें मन अस्वस्थ झालें, तेव्हां अग्निप्रवेशस्थलीं गौरी, लक्ष्मी व स्वरा यांच्या अंशानें आवळी, तुळसी व मालती या वनस्पति उत्पन्न झाल्या व विष्णूचें मन स्थिर झालें (जालंधर पहा; पद्म. उ. १०५).

**वृंदारक**—दुर्योधनपक्षीय राजा. यास अभिमन्यूनें मारिलें (म. द्रो. ४७. १२ कुं.).

२ (सो. कुरु.). धृतराष्ट्राचा पुत्र.

**वृश जान** किंवा **वैजान**—हा आपल्या त्र्यरुण नांवाच्या राजाबरोबर रथांत बसून चालला असतां वाटेंत त्र्यरुणाच्या हातांतील लगाम वृशानें आपल्या हातांत घेतला. पुढें रथाचा धक्का लागून एक मुलगा मेला. तेव्हां राजा व पुरोहित मुलाच्या हत्येचा दोष एकमेकांवर लोटूं लागले. पण शेवटीं लगाम वृशाच्या हातांत असल्यामुळें वृशच दोषी ठरला. तेव्हां वृशानें वार्श साम म्हणून मेलेल्या मुलाला जिवंत केलें. याचा उल्लेख पंचविंश ब्राह्मण (१३. ३. १२), शाट्यायन (ऋ. सायणभाष्य ५. २), भाल्लविब्राह्मण व (बृहद्देवता) यांत आला आहे. ऋग्वेदांतहि या गोष्टीचा उल्लेख असावा (ऋ. ५. २). पंचविंशब्राह्मणाच्या भाष्यांत वैजान असें याचें पैतृक नांव मानिलें आहे.

**वृष**—शिवाचा एक अवतार. समुद्रमंथन केल्यानंतर अमृतापासून उत्पन्न झालेल्या सुंदर स्त्रियांशीं विष्णु कामासक्त झाला व तो त्यांच्यासह पातालांत जाऊन राहिला व त्यानें शेंकडों पुत्र उत्पन्न केले. ते पृथ्वीला कंपित करूं लागले, तेव्हां शंकरानें वृषाचा (बैलाचा) अवतार घेतला. व विष्णूचा पराभव करून त्याचें चक्र हरण केलें व त्याला स्वर्लोकीं पाठविलें. जातांना पातालांत जाण्याविषयीं विष्णु आपल्या मुलांना सांगत असतां शंकरानें शाप दिला कीं, शान्तवृत्तीचे मुनि किंवा माझे अंशभूत असणारे दानव यांचेखेरीज जो कोणी पातालांत जाईल त्याला मृत्यु प्राप्त होईल. तेव्हांपासून लोक पातालांत जाईनासे झाले (शिव. शत. २२-२३).

२ विकुंठ देवांतील एक.

३. अनायुषेचा पुत्र. याचे श्राद्धाद, यज्ञहन्, ब्रह्महन् व पशुहन् असे पुत्र होते (ब्रह्मांड. ३. ७).

४ (सो. क्रोष्टु.) विष्णुमतें शिबीचा पुत्र (वृषादर्भि पहा).

५ (सो. सह.) विष्णुमतें भारतपुत्र होय.

६ सृंजय व राष्ट्रपाली यांचा पुत्र.

७ कृष्ण व सत्या यांचा पुत्र.

८ कृष्ण व कालिंदी यांचा पुत्र.

९ कर्णाचें नांव (म. व. ३०९).

१० धर्म सावर्णि मन्वंतरांतील इंद्र.

**वृषक**—सुबल राजाचा पुत्र. याचा इरावतानें पराभव केला (म. भी. ९० ३०-५० कुं.). हा द्रौपदीस्वयंवरास गेला होता (म. आ. २०१. ५ कुं.). याला अर्जुनानें मारिलें (म. द्रो. ३०. १२; क. २. ४३ कुं.).

**वृषकंड**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**वृषकेतु**—एक कर्णपुत्र. हा युधिष्ठिराच्या अश्वसंरक्षणार्थ गेला असतां बभ्रुवाहनाच्या हातून मेला (जै. अ. ३०).

**वृषगण वासिष्ठ**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९. ९७. ७-९).

**वृषजार**—सूक्तद्रष्टा (ऋ. ५. २).

**वृषण**—(सो. सह.) विष्णुमतें सहस्रार्जुनपुत्र. भागवतमतें यास वृषभ व वायुमतें वर्ष म्हणतात.

**वृषणश्व**—इंद्र याच्या घरीं याची स्त्री मेना झाला होता (ऋ. १. ५१. १३; जै. ब्रा. २. ७९; श. ब्रा. ३. ३. ४. १८; श. ब्रा. १. १. १६; तै. आ. १. १२. ३).

**वृषदर्भ**—एक नीतिमान् राजा. याचा मित्र सेदुक. एकदां एक ब्राह्मण सेदुकाकडे आला आणि आशीर्वाद देऊन त्यानें एक हजार घोड्यांची दक्षिणा मागितली. तेव्हां तो म्हणाला, ' ही दक्षिणा देणें माझ्यानें शक्य नाहीं, परंतु माझा मित्र वृषदर्भ याकडे तुम्ही जा, तो तुम्हांस ही दक्षिणा देईल ' सेदुकाच्या सांगण्यावरून ब्राह्मण वृषदर्भाकडे गेला व दक्षिणा मागूं लागला. तेव्हां वृषदर्भानें त्यास चाबकानें मारिलें. ' मी निरपराधी, मला कां मारतां ? मी सेदुकाच्या सांगण्यावरून तुजकडे आलों आहें, ' असें सांगतांच यानें त्यास त्या दिवसाचें आलेलें उत्पन्न दिलें व मार्गस्थ केलें. तें उत्पन्न सहस्र अश्वांच्या मौल्याहून अधिक होतें. यानें ब्राह्मणास सुवर्ण आणि रौप्य यांशिवाय दान द्यावयाचें नाहीं असें व्रत केलें होतें (म. व. १९९). ही कथा फक्त गणपत कृष्णाजीच्या प्रतींतच आहे (वृषादर्भि पहा).

**वृषदश्व**—(सू. इ.) हा वायुमतें पृथुरोमन् किंवा अनेनस्‌चा पुत्र.

**वृषध्वज**—एक राजर्षि. याचा पुत्र रथध्वज. हा जनकवंशांतील सीरध्वज जनकाच्या पूर्वीचा असावा. पण हा वंशावळींत आढळत नाहीं (दे. भा. ९. १५).

२ वृषकेतूस दुसरें नांव.

३ प्रवीरांपैकीं एक. यानें दुर्वर्तनामुळें आपल्या ज्ञातिबांधवांचा व आप्तेष्टांचा नाश केला (म. उ. ७३. ११; १६कुं.).

**वृषन् पाद्य**—एक अग्नीचा उपासक (ऋ. १. ३६. १०; ६. १६. १५).

**वृषपर्वन्**—कश्यप व दनु यांचा पुत्र. हा ययातीचे वेळीं दैत्यांचा अधिपति होता. यास शर्मिष्ठा व चंद्रा अशा दोन कन्या होत्या (मय व ययाति पहा). यानें दमाला धनुर्वेद शिकविला (मार्क. १४०).

२ वृत्राचा एक अनुयायी (भा. ६. १०. १९).

३ अंगिराकुलांतील प्रवर.

**वृषभ**—(सो. सह.) भागवतमतें सहस्रार्जुनपुत्र.

२ (सो. अज) मत्स्यमतें कुशाग्रपुत्र.

३ (सो. वृष्णि.) मत्स्यमतें अनमित्रपुत्र.

४ रामसेनेंतील एक वानर (वा. रा. कि. ४१).

५ कृष्णमित्र एक गोप (भा. १०. १८. २३).

६ भारतीय युद्धांत मरण पावलेला शकुनीच्या भ्रात्यांतील एक (म. भी. ९०).

७ ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

८ सृष्टि व छाया यांचा पुत्र.

**वृषभानु**—एक राजा. हा यज्ञाकरितां पृथ्वी शुद्ध करीत असतां यास राधा दिसली. यानें तिला आपल्या राणीजवळ नेऊन दिलें (पद्म. ब्र. ७).

**वृषवाहन**—एकादश रुद्रांपैकीं एक.

**वृषशुष्मन् वातावत**—उदित होम पक्षाचा एक आचार्य (सां. ब्रा. २. ९). यानें उदितहोम पक्षाचें चांगलें समर्थन केलें आहे (ऐ. ब्रा. ५. २९; तै. ब्रा. ५. २९. १). हा निकोसक भायजात्याचा शिष्य. याचा शिष्य इंद्रोत शौनक (वं. ब्रा. २).

**वृषसेन**—कर्णाचा पुत्र. याची पत्नी भद्रावती. कर्ण सेनापति असतां अर्जुनानें यास ठार केलें (म. क. ८५). त्या दिवशीं मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी होती (भारतसावित्री).

२ ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

**वृषाकपि**—एकादश रुद्रांपैकीं एक.

**वृषाकपि ऐन्द्र**—मंत्रद्रष्टा (ऋ. ७. १३. २३; १०. ८६. ३). याच्याशीं इंद्रइंद्राणीचा संवाद आहे. पण मंत्रांत याचा एकदांच निर्देश आहे (ऋ. १०. ८६. ५.). लो. टिळकांच्या मतानें वृषाकपि म्हणजे दक्षिणायन बिन्दुजवळचा सूर्य किंवा ध्रुवोपपत्तीप्रमाणें दीर्घ काळोखाच्या आरंभीं क्षितिजाखालीं उतरणारा सूर्य होय (आर्यांचें मूलस्थान २५१).

**वृषाणक वातरशन**—मंत्रद्रष्टा (ऋ. १०.१३६. ४).

**वृषादर्भ**—( सो. अनु. ) भागवतमतें शिबिपुत्र. (वृषादर्भि पहा ).

२ आंगिराकुलांतील गोत्रकार.

**वृषादर्भि**—( सो. अनु. ) शिबि राजाचा पुत्र. महाभारतांतच फक्त यास काशीचा राजा म्हटलें आहे ( अनु. ६७. ३७ कुं. ). सप्तर्षि पृथ्वीची प्रदक्षिणा करीत असतां यानें यज्ञांत त्यांस आपला पुत्र दक्षिणा म्हणून दिला. पण त्यांनीं अल्पायुष्यामुळें मृत झालेल्या त्या पुत्रास दुष्काळ असल्यामुळें खाद्यार्थ शिजत ठेविलें. यानें त्यांस या गोष्टीपासून परावृत्त केलें. हा त्यास गुप्त व उघड दान देण्याचा प्रयत्न करूं लागला, परंतु तेंहि त्यांनीं घेतलें नाहीं. तेव्हां संतापून त्यांस ठार करण्याकरितां यानें एक कृत्या उत्पन्न केली. तिचें नांव यानें यातुधानी ठेवून सप्तर्षींकडे जातांना मनसा हें नांव धारण करण्यास सांगितलें. पण तिच्या ध्यानांत सप्तर्षींचीं नांवें राहीनात. तिला सप्तर्षींबरोबर असलेल्या शुनःसखानें ( इंद्रानें ) ठार केलें ( म. अनु. १४१–१४२ कुं. ). एका कपोताचें रक्षण करण्याकरितां यानें आपलें मांस ससाण्यास दिलें होतें ( म. अनु. ६७. ४ कुं. ). यानें ब्राह्मणांस रत्नें ( म. शां. २४०. २५ कुं. ) व घर ( म. अनु. २००. १० कुं. ) दिलीं. यास भागवतांत वृषादर्भ, मत्स्यांत पृथुदर्भ व वायूंत वृषदर्भ म्हटलें असून विष्णूंत याबद्दल वृष व दर्भ अशी फोड करून दोन नांवें दिलीं आहेत. महाभारतांत वृषदर्भ ( अनु. ६७ कुं. ), वृशदर्भि ( अनु. १४१ १२; २००. १० कुं. ) व वृषादर्वि ( शां. २४०. २५ कुं. ) अशीं नांवें दिलीं आहेत.

**वृषामित्र**—पांडवांसमागमें द्वैतवनांत असणारा एक ऋषि ( म. व. २६. २४ कुं. ).

**वृषु**—( सो. पुरूरवस्. ) वायुमतें पाराचा पुत्र ( ८ पृथु पहा ).

**वृष्टि**—( सो. कुकुर. ) वायुमतें कुकुरपुत्र (५ धृष्ट पहा ).

२ सावर्णि मनूचा पुत्र.

**वृष्टिनेमि**—अक्रूरपुत्र.

**वृष्टिमत्**—( सो. कुरु. भविष्य. ) भागवतमतें कविरथपुत्र.

**वृष्टिहव्य**—( उपस्तुत पहा ).

**वृष्ण्याद्य**—( सो. सह. ) वायुमतें सहस्रार्जुनपुत्र.

**वृष्णि**—विष्णुमतें धृष्टाचें नामांतर ( ४ धृष्ट पहा ).

२ (सो. क्रोष्टु.) भजमानाचा पुत्र. यास क्रोष्टुहि म्हणतात ( ह. वं. १. ३८; ब्रह्म. १४. १; १६. ९ ). वृष्ण्यंधक व्रात्य आहेत, असें भूरिश्रव्यानें म्हटलें आहे ( म. द्रो. १४३. १५ कुं. ).

३ भागवतमतें पृश्नीचें नांव ( ४ पृश्नि पहा ).

४ मत्स्यमतें धृष्टाचें नांव ( ५ धृष्ट पहा ).

५ ( सो. सह. ) मधूच्या पुत्रांतील ज्येष्ठ.

**वृष्णिमत्**—( सो. कुरु. भविष्य. ) विष्णुमतें शुचिरथाचा व मत्स्यमतें हा शुचिद्रथाचा पुत्र. भागवतांत यास वृष्टिमत् वायूंत स्तिमत् म्हणतात.

**वृहदंगिरस्**—मनु व वरस्त्री यांचा पुत्र.

**वेगदर्शिन्**—रामसेनेंतील एक वानर. यानें रामाच्या राज्याभिषेकाकरितां समुद्रानें उदक आणिलें होतें (वा. रा. यु. ४; ३०; १२८).

**वेगवत्**—( सू. दिष्ट. ) विष्णुमतें बुंधुमत्चा, भागवत व वायु यांच्या मतें बंधुमत्चा पुत्र.

२ कृष्णास सत्येपासून झालेला पुत्र.

३ कश्यप व दनु यांचा पुत्र.

४ हा शाल्व राजाच्या बाजूनें कृष्णाशीं लढत असतां यास सांबानें मारिलें ( म. व. १६. २० कुं. ).

**वेणु**—( सो. सह. ) विष्णुमतें शतजित्पुत्र. हा व याचा बंधु हय हीं दोन्ही नांवें एकत्र करून वेणुहय असें इतरत्र याचें नांव आहे. या ठिकाणीं विष्णुपुराण गद्यांत असून त्यांतील तिसरा बंधु लुप्त झाला असावा. इतरत्र हय, हैहय व वेणुहय असे हे तीन भाऊ आढळतात.

**वेणुजंघ**—युधिष्ठिरसभेंतील एक ऋषि ( म. स. ४. २४ कुं. ).

**वेणुदारि**—दक्षिणेकडील अश्मक देशाधिपति एक यादव (ह. वं. २. ६१). याच्या मुलाचा कर्णानें दिग्विजयकालीं पराभव केला ( म. स. ६१. १६; व. २५५. १५ कुं. ).

**वेणुहय**—( वेणु पहा ).

**वेणुहोत्र**—( सो. क्षत्र.) वायुमतें धृष्टकेतुपुत्र (४ वीतिहोत्र पहा ).

**वेतसु**—हा द्योतन व कुत्स यांचा विरोधी होता. इंद्रानें याचा कुत्साकरितां पराभव केला ( ऋ. १०. ४९. ४). द्योतनाकरितांहि केला ( ऋ. ६. २०. ८ ). याला ठार करणें हा इंद्राचा एक पराक्रम आहे ( ऋ. ६. २६. ४ ).

**वेताल** किंवा **वेताळ**—एकदां शंकरपार्वती क्रीडा करीत असतां तशाच उन्मत्त वेशांत पार्वती दाराशीं आली. तेव्हां तेथें हा द्वारपालाचें काम करीत होता. तिला स्त्रीदृष्टीनें पाहून हा काममोहित झाला व तिला बाहेर जाण्यास प्रतिबंध करूं लागला, तेव्हां 'तूं पृथ्वीवर मनुष्य होशील' असा पार्वतीनें याला शाप दिला. म्हणून हा वेताळाच्या रूपानें पृथ्वीवर आला व

शंकरानेंहि याचे लोभानें पृथ्वीवर अवतार घेतला. त्या वेळीं शंकराचें नांव महेश आणि पार्वतीचें नांव शारदा असें होतें (शिव. शत. १४). हा एक रुद्रगण असून पिशाचांचा नायकहि आहे (भा. १०. ६३. १०).

वेताळ व भैरव हे पूर्व जन्मींचे भृंगी व महाकाल नामक शिवदूत होत. पार्वतीच्या शापानें यांना मनुष्यलोकांत जन्म घ्यावे लागले. हे तारावतीला शंकरापासून झाले. यांचा पालक पिता चंद्रशेखर राजा (चंद्रशेखर पहा). या चंद्रशेखर राजाला औरस तीन पुत्र होते. त्यांना सर्व संपत्ति राजानें वाटून दिल्यामुळें वेताळ व भैरव अरण्यांत गेले. पुढें शंकराची प्राप्ति होण्यासाठीं 'वसिष्ठाला संध्याचल पर्वतावर शरण जा' असें तेथें सांगून कपोत मुनि निघून गेला. पुढें वसिष्ठप्रसादानें शिवदर्शन होऊन श्रीकामाख्यादेवीचे उपासनेनें यांना देवगणत्व प्राप्त झालें. वेताळाच्या वंशहि आढळतो (कालिका ५३).

**वेद्**--भृगुकुलांतील मंत्रकार. वायुपुराणांत विद असा पाठ आहे.

२ धौम्याचा शिष्य. यास वैद असें नामांतर होतें.

३ सिंधुद्वीपाचा भाऊ. हा शिवभक्त होता (ब्रह्म. १६९).

**वेददर्श**--भागवतमतें देवदर्शाचें नांव.

**वेदनाथ**--ब्राह्मणाच्या द्रव्याचा अपहार केल्यामुळें हा वानर झाला. पण सिंधुद्वीपाच्या सांगण्यावरून धनुष्कोटि-तीर्थांत स्नान केल्यानें हा मुक्त झाला (स्कंद. १. ३. १८).

**वेदबाहु**--कृष्णाच्या पौत्रांतील एक (भा. १०. ९०. ३४).

२ रैवत मन्वंतरांतील एक ऋषि.

**वेदमित्र**--विष्णुमतें व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील मांडूकेयाच्या शिष्यांपैकीं एक. हा शाकलगोत्री होता. यास पांच शिष्य होते. देवमित्र असा याबद्दल पाठभेद आहे (व्यास पहा). हा स्थानाविषयीं मतभेद दर्शविणारा एक आचार्य आहे (ऋ. प्रा. ५२).

**वेदवती**--कुशध्वज जनकास मालावतीचे ठिकाणीं झालेली कन्या. हिनें जन्मतःच वेदध्वनि केला, म्हणून हिला वेदवती असें नांव पडलें. कुशध्वजानें हिला विष्णूस देण्याचें ठरवून सर्वांस नकार देण्यास सुरवात केली. एकदां शंभु नांवाच्या राक्षसाला नकार दिला असतां त्यानें कुशध्वजास ठार केलें. तेव्हां वेदवतीच्या मातेनें सहगमन केलें. व वेदवतीनें पुष्करतीर्थीं जाऊन तप केलें. आकाशवाणीनें हिला कळलें कीं, तुला पुढील जन्मीं विष्णु नवरा मिळेल. पुढें ही गंधमादनावर येऊन राहिली. तेथें एकदां रावण हिच्या आश्रमांत आला व आपल्याला वरण्याविषयीं बोलूं लागला. हिनें त्याला झिडकारिलें. तेव्हां तो हिच्यावर बलात्कार करून हिचे केश धरून ओढूं लागला. तेव्हां हिनें आपले केस तोडून त्याच्या हातून ही निसटली, व तपोभ्रष्ट होईल म्हणून शाप न देतां अग्निसिद्धि करून त्यांत प्रविष्ट झाली. हिच्यावर केलेल्या बलात्काराची रावणाला शेवटीं आठवण झाली (ब्रह्मवै. २. १४. ५२).

**वेदवृद्ध**--व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें कौथुम पाराशर्याचा शिष्य (व्यास पहा).

**वेदशर्मन्**--शिवशर्म्याचा पितृभक्त पुत्र.

२ (मुनिशर्मन् पहा).

३ हा विदुरासह कलिंजर पर्वतावर आल्यावर तेथें भेटलेल्या सिद्धाच्या उपदेशानुरूप सोमवती अमावास्येच्या दिवशीं अघादि तीर्थीं स्नान करून शुद्ध झाला (पद्म. भू. ९१-९२).

४ (सो. विदू.) मत्स्यमतें शोणाश्वाचा पुत्र.

**वेदशिरस्**--वाराहकल्पांत वैवस्वत मन्वंतराच्या पंधराव्या चौकडींतील शिवाचा अवतार. सरस्वतीच्या उत्तरतीरावर हिमालयाच्या वेदशीर्ष नांवाच्या भागावर हा अवतार झाला. महावीर्य हें याचें अस्त्र होय. तेथें याचे पुढीलप्रमाणें पुत्र झाले:--कुणि, कुणिबाहु, कुशरीर व कुनेत्रक (शिव. शत. ५).

२ वायुमतें भृगुवंशांतील मार्कंडेयाचा पुत्र. याच्या आईचें नांव धूम्रा. याच्या पत्नीचें नांव पीवरी. याच्या वंशजांना मार्कंडेय म्हणतात (ब्रह्मांड. २. ११. १. १०).

याच्या तपाला विघ्न करावयास आलेल्या शुचि नांवाच्या अप्सरेपासून या मुनीला एक मुलगी झाली. तिच्यावर यमधर्म मोहित झाला असतां यानें त्यास नद होण्याचा शाप दिला. तोच काशींतील धर्मनद होय (स्कंद. ४. २. ५९).

३ (स्वा.) भागवतमतें प्राणपुत्र.

४ स्वारोचिष मन्वंतरांतील विभु इंद्राचा पिता.

५ रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

६ कृशाश्व ऋषीस धिषणेपासून झालेला पुत्र. हा पातालांत गेल्यावर विष्णुपुराण सर्वांना प्राप्त झालें (विष्णु. ६. ८).

**वेदशेरक**--वसिष्ठकुलांतील गोत्रकार गण.

**वेदश्री**--रैवत मन्वंतरांतील एक ऋषि.

**वेदश्रुत**--उत्तम मन्वंतरांतील देव.

**वेदस्पर्श**--देवदर्शाबद्दल वायूंतील पाठभेद. कबंधानें अथर्ववेद याला सांगितला.

**वेधस्**--अंगिरागोत्रांतील मंत्रकार.

**वेन**--(स्वा. उत्तान.) अंग राजास यमकन्या सुनीथेपासून झालेला पुत्र. अंगाचे मागून सर्व ऋषींनीं वेनास

गादीवर बसविलें. वेन हा आधींच दुर्वृत्त. तशांत एका जैन क्षपणकानें उपदेश केल्यामुळें हा पुरा वेदविरोधी बनला व यानें राज्यांतील सर्व यज्ञयाग बंद पाडिले.

एकदां सर्व ऋषि याच्याकडे गेले व याच्याजवळ यज्ञ करण्याची परवानगी मागूं लागले. परंतु कांहीं केल्या हा परवानगी देईना, तेव्हां मरीच्यादि महर्षि रागावले व त्यांनीं याचें स्तंभन करून यास ठार मारिलें (ह. वं. १. ५; वायु. २. १; भा. ४. १४; विष्णुधर्म. १. १०८; विष्णु. ४. १३; ब्रह्म. ४; मत्स्य. १०. १-१० ). वेनाला ऋषींनीं ठार मारिलें असें नसून तोच ऋषींच्या भयानें वारुळांत दडला ( पद्म. भू. ३६-३८ ).

वेनाला मारल्यावर राज्यांत अराजकता उत्पन्न होऊन सगळीकडे चोऱ्या, लुटालुटी वगैरे सुरू झाल्या. तेव्हां सर्व ऋषींनीं मिळून याच्या उजव्या हाताचें (कांहीं ठिकाणीं उजव्या मांडीचें असें आहे) मंथन करण्यास सुरुवात केली. त्याबरोबर याच्या अंगांतून एक कपिलवर्ण खुजा पुरुष उत्पन्न झाला. हाच निषाद होय. हा वेनाच्या सर्व पापांपासून झाला होता. हा वेनाच्या शरिरांतून बाहेर पडल्यावर वेन निष्पाप झाला.

वेन निष्पाप झाल्यावर हा तृणबिंदु ऋषीच्या आश्रमात गेला व तेथें त्यानें विष्णूस प्रसन्न करून घेतलें ( पद्म. भू. ३९-४०; १२३-१२५ ). लो. टिळकांच्या मतें हा एक ग्रह आहे.

**वेन भार्गव**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ८५; १०. १२३ ).

**वेन वाजश्रवस**—बाविसावा व्यास.

**वेन्य**—पृथूचें पैतृक नांव.

**वेश**—इंद्रानें आयूकरितां याचा पराभव केला ( ऋ. ७. १८. ११ ). दासवेश व हा एकच असावा ( ऋ. २. १३. ८ ).

**वैकर्ण**—हे दोन आहेत. दाशराज्ञ युद्धांतील हे सुदासाचे शत्रु आहेत ( ऋ. ७. १८. २१ ).

**वैकर्णिक**—( वैकर्णेय पहा ).

**वैकर्णिनि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**वैकर्णेय**—कश्यपकुलोत्पन्न गोत्रकार गण. याबद्दल वैकर्णिक असा पाठ सांपडतो.

**वैकलिनायन**—( वैकृति गालव पहा ).

**वैकुंठ**—चाक्षुष व रैवत मन्वंतरांतील अवतार.

२ रैवत मन्वंतरांतील एक देवगण.

३ ( इंद्र पहा ).

४ दीपमाहात्म्याकरितां या ब्राह्मणाची कथा आली आहे ( पद्म. ब्र. ३ ).

**वैकृति गालव**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार. याबद्दल वैकलिनायन असा पाठभेद आहे.

**वैक्लव**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**वैखानस**—चंपक नगराचा राजा. यानें मार्गशीर्ष शुद्ध एकादशीचें पुण्य पितरांना देऊन त्यांचा उद्धार केला ( पद्म. उ. ३९ ).

२ एक धर्मशास्त्रकार. याचें धर्मशास्त्र वैखानसधर्मप्रश्न या नांवानें प्रसिद्ध आहे. मनुस्मृतींत याच्या मताचा उल्लेख आला आहे ( मनु. ६. २१ ). याच्या ग्रंथांत चार वर्ण, चार आश्रम, त्याचप्रमाणें त्यांचीं कर्तव्यें, संध्या, ब्रह्मयज्ञ, स्नान, आचमन वगैरेंचे विधि, गृहस्थांचीं कर्तव्यें व प्रत्येक वर्णाचीं उपजीविकेचीं साधनें यांच्याबद्दल विचार केला आहे.

३ योग्यांचा प्रकार. ययातीचा भाऊ यति हा वैखानस योगी झाला ( ब्रह्मांड. ३. ६८. १४; ब्रह्म. १२. ३; ह.वं. १. ३०; मत्स्य. २४. ५१; वायु. २ ३२. १४ ).

४ सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ६६ ). हे शंभर होते. यांच्यापैकीं एकाचें नांव पुरुहन्मन् असें होतें ( तै. आ. १. २३. ३; १४. ९. २९ ). हे रहस्यु देवमलिम्लुच्‌कडून मुनिमरण नांवाच्या स्थलीं मारिले गेले ( पं. ब्रा. १. ४. ८. ७ ). हे ब्रह्मदेवाचे नखांपासून उत्पन्न झाले ( तै. आ. १. २३ ).

**वैगायन**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**वैजभृत**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**वैजान**—वृशाचें पैतृक नांव.

**वैडक**—वसिष्ठाचें पैतृक नांव.

**वैणव**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**वैतंडय**—( सो. आयु. ) आयूचा पुत्र.

**वैतरण**—वितरणाच्या नांवावरून पडलेलें अग्नीचें नांव. पण हें सायणाचार्यांना मान्य नाहीं ( ऋ. १०. ६१. १७ ).

**वैतहव्य**—( अरुण, वैतहव्य व केसरप्राबंधा पहा ).

**वैताल**—भागवतमतें व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील जातुकर्ण्याचा शिष्य. वैतालिक असा पाठभेद आहे.

**वैतालिक**—विष्णुमतें व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील शाकपूणीचा शिष्य. भागवतमतें वैताल असा पाठ आहे.

**वैद**—हिरण्यदंताचें पैतृक नांव.

**वैदथिन**—ऋजिश्वनूचें पैतृक नांव.

**वैददश्वि**—तरंत व पुरुमीह्ळ यांचें पैतृक नांव.

२ या राजानें आपली कन्या अगस्त्यास दिली होती ( म. अनु. २००. ११ कुं. ).

**वैदभृतीपुत्र**—हा कार्शकेयीपुत्राचा शिष्य व याचे शिष्य दोन कौचिकीपुत्र ( बृ. उ. ६. ५. २ ). पण हा भालुकीपुत्राचा शिष्य दिला आहे ( श. ब्रा. १४. ९. ४. ३२ ).

**वैदर्भ**—( भीम वैदर्भ पहा ).

**वैदर्भि**—भार्गवाचें पैतृक नांव.

**वैदर्भी**—विदर्भ राजाच्या कन्यांना नांव. विशेषेंकरून लोपामुद्रा, रुक्मिणी, दमयंती, सगरपत्नी केशिनी व मलयध्वजपत्नी इत्यादींना हें नांव आहे.

**वैदेह**--(सू. निमि.) विष्णुमतें निमिपुत्र. शिवाय, निमि राजाच्या वंशजांना हें नांव आहे (भा. ९. १३. ३).

२ जनक व नीमि साम्य यांना वैदेह म्हणतात.

**वैदेहरात**—विश्वामित्रकुलोत्पन्न ऋषिगण. याबद्दल देवराज शर्मा पाठभेद आहे.

**वदेही**—जनमेजयपुत्र शतानकाची स्त्री.

**वैद्य**--मुख देवांपैकीं एक.

**वैधग**--अंगिरसगोत्रांतील मंत्रकार.

**वैद्यनाथ**—एक शिवाचा अवतार. हा चिताभूमींत रावणाकरितां प्रगट झाला (शिव. शत. ४२). हा परळीचा वैजनाथ होय.

**वैधस**—हरिश्चंद्राचें पैतृक नांव.

**वैधृत**--धर्मसावर्णि मन्वंतरांतील इंद्र.

**वैधृति**--तामस मन्वंतरांतील देवगण.

२ धर्मसावर्णि मन्वंतरांतील इंद्र.

३ धर्मसावर्णि मन्वंतरांतील धर्मसेतु अवताराची माता.

४ तामस मन्वंतरांतील देवांची माता.

**वैधेय**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**वैन**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें शृंगीपुत्राचा शिष्य.

**वैनहोत्र**--(सो. क्षत्र.) विष्णुमतें धृष्टकेतुपुत्र होय (वीतिहोत्र पहा).

**वैन्य**—भृगुकुलांतील मंत्रकार.

२ वैनकुलोत्पन्न राजर्षि (अत्रि, पृथि व पृथु पहा).

**वैपश्चित**—तार्क्ष्याचें पैतृक नांव. वैपश्चितबद्दल वैपश्यत असा पाठभेद आढळतो (श. ब्रा. १३. ४. ३. १२).

**वैपश्चित दार्ढजयन्ति गुप्त लौहित्य**—हा वैपश्चित दार्ढजयन्ति दृढजयन्त लौहित्याचा शिष्य (जै. उ. ब्रा. ३.४२.१).

**वैपश्चित दार्ढजयन्ति दृढजयंत लौहित्य**--एक आचार्य. हा विपाश्चित् दृढजयंत लौहित्याचा शिष्य (जै. उ. ब्रा. ३. ४२. १).

**वैभांडक** किंवा **वैभांडकि**—पूर्णभद्राचें पैतृक नांव (हर्यंग पहा).

**वैभीषणि**—बिभीषणाचा पुत्र (मणिकुंडल पहा).

**वैमृग**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**वैयश्व**—(विश्वमनस् पहा).

**वैयाघ्रपद्यीपुत्र**—हा काण्वीपुत्राचा व कापीपुत्राचा शिष्य याचा शिष्य कौशिकीपुत्र (बृ. उ. ६. ५. १).

**वैयाघ्रपद्य**—युधिष्ठिराचें अज्ञातवासांतील नांव (म. वि. ३६. ११ कुं.).

२ हें इंद्रद्युम्न भाल्लवेय, बुडिल आश्वतराश्वि, गोश्रुति व राम क्रतुजातेय यांचें पैतृक नांव आहे.

३ एक आचार्य (ला. श्रौ. ४. ९. १७).

**वैयासकि**--शुकाचें पैतृक नांव.

**वैयास्क**—छंदःशास्त्रज्ञ आचार्य (ऋ. प्रा. १७. २५).

**वैरपरायण**--अंगिराकुलांतील गोत्रकार.

**वैराज**--वैराज नांवाचे पितर प्रथम योगभ्रष्ट तपस्वी होते. योगपूर्णता न झाल्यामुळें हे मुक्तीस न जातां केवळ सनातन ब्रह्म-लोकास जातात. तेथें ब्रह्म्याचा एक दिवस ब्रह्म्याबरोबर राहून पुढील कल्पारंभीं त्याच्याचपासून उत्पन्न होतात. त्या वेळीं यांस पूर्वजन्मस्मृति प्राप्त होऊन पूर्वजन्मींच्या योगाभ्यासास लागतात. अशा रीतीनें ब्रह्मज्ञानी होऊन शाश्वत पदास जातात. योगाभ्यासेच्छूंस हे मदत करतात. यांची कन्या मेना होय (पितरः पहा).

**वैरूप**--(अष्ट्रादंष्ट्र, नभप्रभेदन, शतप्रभेदन व सध्रि पहा).

**वैरोचन**--बलीचें पैतृक नांव.

**वैवशप**—कश्यपकुलांतील गोत्रकार गण.

**वैवस**—भृगुकुलांतील प्रवर.

**वैवस्वत**—हा शब्द ऋग्वेदांत बरेच वेळां आला असून तेथें हें यमाचें पैतृक नांव आहे. वैवस्वत राजा असलेल्या ठिकाणीं मेल्यावर अमर करण्याविषयीं प्रार्थना आहे (ऋ. ९. ११३. ८).

**वैवस्वत मनु**—विवस्वत् व संज्ञा यांचा पुत्र. याचे पुत्र इल अथवा सुद्युम्न, इक्ष्वाकु, नरिष्यंत, नाभाग, धृष्ट अथवा धृष्णु, शर्याति, करूष (रूषक) अथवा शशक, पृषध्र अथवा पृषध्रक, नृग, दिष्ट, प्रांशु हे होत (मनु पहा). यानें अयोध्या नगरी वसविली (वा. रा. बा. ५.६; अयो. ७१. १८). यानें सुवर्णास पूजेबद्दल माहिती सांगितली (म. अनु. १५५ कुं.). तसेंच बृहस्पतीस कर्मगति, संसारचक्र, आत्म्याचें अस्तित्व, मोक्ष, आत्मप्राप्ति, ब्रह्मप्राप्ति, इत्यादि विषयांचें यानें संपूर्ण ज्ञान दिलें (म. शां. २०१-२०६ कुं). हा पूर्वजन्मीं सत्यव्रत होता. सत्यव्रतानें मत्स्याचें पालनपोषण करून त्याच्या कृपेनें हा जन्म मिळविला (सत्यव्रत पहा).

श्वेतवाराहकल्पांत ब्राह्मवर्षाच्या तिसऱ्या दिवशीं सातव्या मुहूर्तांत वैवस्वत मनु झाला. हा कृतयुगांतील म्हणून दिला आहे (भवि. प्रति. १; मनु व यम पहा). हा क्षत्रिय-

जातीचा मंत्रकार होता ( ब्रह्मांड. २. ३२. १२०-१२१; मत्स्य. १४५. ११५-११६ ).

**वैवस्वती**—( यमी पहा ).

**वैशंपायन**—श्रौतकर्मातील सात होते, हे सात सूर्य होत, असें 'सप्त दिशो नाना सूर्याः' (ऋ. ९. ११४.३) यावरून म्हणतां येईल. पण वैशंपायन हजारों सूर्य असल्याबद्दल यद्याव 'इंद्र सहस्रं सूर्या अनु' (ऋ. ८.७०.५) या मंत्रावरून म्हणतो ( तै. आ. १. ७ ).

विशंपाचा वंशज म्हणून यास वैशंपायन म्हणत असावेत. कृष्णद्वैपायन व्यासानें वेदाचे चार भाग केले व ते आपल्या चार शिष्यांस दिले. वैशंपायन त्या चारांपैकीं एक असून यास त्यानें संपूर्ण यजुर्वेद दिला ( म. आ. ६०; शां. ३२९; ३४२; ३५१; वायु. १. ६०. १२-१५; ब्रह्मांड. २. ३४. १२-१५; विष्णु. ३. ४. ७-९; लिंग. १. ३९. ५६-६०; कूर्म. १. ५२. ११-१३; भा. १२. ६. ५२ ). यानें यजुर्वेदाच्या ८६ शाखा केल्या व त्या तितक्याच शिष्यांस दिल्या (वायु. १. ६१. ५-१०; २३-२६; ब्रह्मांड. २. ३५. ८-१३; २६-३०; भा. १२. ६. ६१-७४ ). पण इतरत्र सत्तावीस शाखा व सत्तावीस शिष्य असा उल्लेख आहे ( विष्णु. ३. ५. १३; अग्नि. १५०. २७ ).

वैशंपायनानें शहाऐंशी संहिता केल्या व त्या आपल्या शिष्यांना दिल्या. शिष्यांची संख्या कोठेंच दिली नाहीं. पण शहाऐंशी असण्याचा संभव आहे. त्यांपैकीं एक याज्ञवल्क्य फुटला म्हणजे सुमारें पंचाऐंशी शिष्य शिल्लक राहतात. याज्ञवल्क्यानें टाकलेला वेद इतर शिष्यांनीं पुढें चालवला. तीच सध्यांची तैत्तिरीय शाखा होय. बाकी उपलब्ध असलेल्या मैत्रायणी, कठ, कापिष्ठलादि शाखा मूळ पंचाऐंशीपैकीं अद्यापि अवशिष्ट आहेत. अशा कृष्णयजुर्वेदाच्या शहाऐंशी व शुक्लयजुर्वेदाच्या पंधरा मिळून यजुर्वेदाच्या एकरों एक शाखा आहेत ( ब्रह्मांड. २. ३५. ३०; वायु. १. ६१. २६; महाभाष्य ९ पान ).

एकदां सर्व ऋषिगणांनीं नियम केला कीं, आज जो मेरुपर्वतावर सभेस येणार नाहीं त्याचे हातून सात दिवसांत ब्रह्महत्या घडेल. या नियमाचें उल्लंघन फक्त वैशंपायनानेंच केलें. त्यामुळें याच्या पायाचा स्पर्श होऊन बहिणीच्या मुलाची हत्या घडली ( विष्णु. ३. ५. ५ ).

भागवतांत फक्त हत्या व भारतांत ब्रह्म व बालहत्या घडल्याचा उल्लेख आहे. पण कां व कशी घडली याचा उल्लेख नाहीं (भा. १२.६.६१; म. अनु.९.३९ कुं.). या हत्येच्या प्रायश्चित्ताच्या बाबतींत गुरुशिष्यांत विरोध येऊन याज्ञवल्क्यानें याची विद्या परत केली. वैशंपायनानें आपल्या शहाऐंशी शाखांचे पुनः तीन भाग केले व तिघांच्या प्रमुखत्वाखालीं दिले. त्या तिघांस त्यांच्या भौगोलिक परिस्थित्यनुरूप नांवें ठेविलीं. त्या तिघांचे मुख्य निरनिराळे असून त्यांचीं नांवें अनुक्रमें श्यामायनि ( उत्तर ), आसुरि ( मध्यदेशीय ), आलंबि (पूर्व ) अशीं होतीं (ब्रह्मांड. २. ३५. ८-१३; वायु. १. ६१. ५-३० ).

हा कृष्णद्वैपायनाचा शिष्य असून त्यानें यास जनमेजयास महाभारत सांगण्यास सांगितलें. त्याप्रमाणें यानें सांगितलेंहि ( म. आ. १.२६; ६०.२१ कुं. ). हा जनमेजयाचा मित्र होता. जनमेजयानें अश्वमेध आरंभिला त्या वेळीं यास न जुमानतां वाजसनेय ब्राह्मणास त्यानें ब्रह्मा केलें. यामुळें वैशंपायनाचा व त्याचा तंटा झाला. वाजसनेय ब्राह्मणाचा पुरस्कार केल्यामुळें व याच्या विरोधामुळें शेवटीं मात्र त्याला राज्यत्याग करावा लागला ( मत्स्य. ५०. ५७-६४; वायु. २. ३७. २४५-२४८; ८ जनमेजय पहा ).

स्वायंभुव व्यासशिष्य व कृष्ण द्वैपायन व्यासशिष्य सारखेच दिसतात. आश्वलायन ( ३. ३ ) व हिरण्यकेशी लोकांच्या पितृतर्पणांत याचा उल्लेख आहे ( स. गृ. २०. ८. २० ). यानें भारत केलें व सौतीनें महाभारत केलें. पण व्यासानें भारत व यानें महाभारत केल्याचा निर्देश आहे तोहि वरील अर्थानेंच होय ( भवि. ब्राह्म. १; सौति पहा ).

वैशंपायनाच्या नीतिप्रकाशिकेंत बंदुकीची दारु वगैरेची माहिती आहे. त्याचें इंग्रजी भाषान्तर डॉ. ओपर्ट यानें केलें आहे. याच्या नांवावरील ग्रंथ—वैशंपायनसंहिता, वैशंपायननीतिसंग्रह, वैशंपायनस्मृति. ( C. C. ).

२ भृगुकुलांतील गोत्रकार.

**वैशालिनी**—ही विशालाची कन्या. अविक्षितानें हिला बलात्कारानें वरिलें असतां इतर राजांनीं याचा पराभव करून हिचें पुनः स्वयंवर आरंभिलें, पण अविक्षित्‌पित्यानें (करंधम) सर्वांचा पराभव करून हिला पळविलें. पित्याच्या इच्छेवरून हिचें अविक्षितशीं लग्न झालें. हिला मरुत्त झाला. हिनें सर्पांना अभय दिलें होतें ( मार्कं. ११९-१२६ ). अविक्षितास आणखी हेमधर्मकन्या वरा, सुदेवकन्या गौरी, बलिकन्या सुभद्रा, वीर-कन्या लीलावती, वीरभद्रकन्या विभा, भीमकन्या मान्यवती व दक्षकन्या कुमुद्वती अशा स्त्रिया होत्या ( मार्कं. ११९. १६-१७ ).

**वैशाख्य**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें कौथुम पाराशर्याचा शिष्य.

**वैशाल**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य. ब्रह्मांडमतें वैशालिन् असा पाठभेद आहे.

**वैशालि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**वैशालेय**—तक्षकाचें पैतृक नांव.

**वैश्वेश्वर**— शंकराचा अवतार ( महानंदा पहा ).

**वैश्रवण**—विश्रवस् व देववर्णिनी यांचा पुत्र. याचें रूप राक्षसासारखें व बल असुरांसारखें होतें. यास तीन पाय, मोठें शरीर, अवजड डोकें, महाहनु, आठ दांत, भुर्के केश, शंकुकर्ण, ताम्रस, ह्रस्व व जाड बाहु, पिंगट, भयानक, वैवर्तज्ञानसंपन्न व जन्मापासून ज्ञानी असा हा होता. असें याचें शरीर वाईट असल्यामुळें यास कुबेर असें म्हणत ( ब्रह्मांड. ३. ८. ४०-४४; कुबेर पहा ).

**वैश्वानर**—कश्यप व दनु यांचा पुत्र. यास चार कन्या होत्या. उपदानवी, हयशीरा, पुलोमा व कालका. पैकीं शेवटच्या दोघींशीं ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें प्रजापति कश्यपानें लग्नें केलीं ( भा. ६. ६ ).

**वैश्वानरि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**वैश्वामित्र**—( अष्टक, ऋषभ, कत, देवरात, पूरण, प्रजापति, मधुच्छंदस् व रेणु पहा ). केवळ याच शब्दांनीं विश्वामित्रपुत्रांचा उल्लेख आहे ( ऐ. ब्रा. ७. १७ ).

**वैसृप**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**वैहीनरि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**वोढु**—एक आचार्य. शुक्लयजुर्वेदी लोकांच्या ब्रह्मयज्ञांगतर्पणांत याचा निर्देश आहे ( पा. गृ. परिशिष्ट; मत्स्य. १०२. १८ ). याला सिद्धि प्राप्त झाली होती ( वायु. २. ३९. ३३८; ब्रह्मांड. ४. २. २७३; कूर्म. १. ५३. १५).

**वोहलि**—एक ऋषि ब्रह्मयज्ञांगतर्पणांत यास घेतलें आहे ( दे. भा. ११. २० ).

**वौलि**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**वौषडि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**व्यंस**—हा इंद्राचा शत्रु असून इंद्रानें याचा वध केला. पण सायणाचार्य ही व्यक्ति मानीत नाहींत ( ऋ. २.१४. ५ ).

**व्यश्व**—एक राजर्षि ( म. स. ८. १२ कुं. ). वैयश्व अथवा विश्वमनस् यांचा हा पिता होय ( ऋ. ८. २३. २३-२४; ९. ६५. ७ ).

**व्यश्व आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. २६ ). सामद्रष्टा ( पं. ब्रा. १४. १०. ९ ).

**व्यष्टि**—हा सनारूचा शिष्य व याचा शिष्य विप्रचित्ति ( बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३ ).

**व्याघ्र**—एक यक्ष. हा भाद्रपदांत सूर्याबरोबर असतो.

२ यातुधानपुत्र. याचा पुत्र ऋतुविघ्नकारक निरानंद होय ( ब्रह्मांड. ३. ७. ९६ ).

**व्याघ्रकेतु**—पांडवपक्षीय एक राजा. याला कर्णानें मारिलें ( म. क. ५१. ४६-४७ कुं. ).

२ दुर्योधनपक्षीय एक राजकुमार. याला सात्यकीनें मारिलें ( म. द्रो. १०७. ३१ कुं. ).

**व्याघ्रदत्त**—मगधदेशीय राजपुत्र. हा भारतीययुद्धांत दुर्योधनाकडे होता. याला सात्यकीनें मारिलें ( म. द्रो. १०७. ३२ कुं. ).

२ द्रोणानें मारिलेला पांडवपक्षीय पांचाल ( म. उ. १७१. १९; म. द्रो. १६. ४९ कुं. ). याच्या घोडयांचा रंग गर्दभाप्रमाणें मळकट असून पाठीच्या कण्यांचा रंग मात्र मूषकाप्रमाणें मळकट पांढरा असे ( म. द्रो २३ ).

**व्याघ्रपद**—वसिष्ठाचा पुत्र. हा व्याघ्रयोनींत जन्मास आला ( म. अनु. ५३. ३० कुं. ).

**व्याघ्रपाद**—सूक्तद्रष्टा (ऋ. ९. ९७.१६-१८). वसिष्ठकुलांतील गोत्रकार गण. याचे पुत्र उपमन्यु आणि धौम्य ( म. अनु. ४५. २९ कुं ). याच्या नांवावर एक स्मृति दिलेली आहे ( C. C. ).

**व्याघ्रहन्**—ऊर्ध्वेष्टीचा पुत्र. याचा पुत्र शरभ ( ब्रह्मांड. ३. ७. २०७ ).

**व्याज**—भृगूचा पुत्र. एक देव.

२ तुषित देवांपैकीं एक.

**व्याडि**—एक व्याकरणकार. याचा संग्रह नांवाचा व्याकरणावर एक ग्रंथ होता. ऋक्प्रातिशाख्यांत स्वरांविषयीं याचें मत घेतलें आहे ( २०९; २१४ ). याचा 'संग्रह' ग्रंथ लुप्त झाला म्हणून पतंजलीनें महाभाष्य लिहिलें ( भर्तृहरि ). शौनक, पतंजलि व भर्तृहरि यांनीहि याचा उल्लेख केला आहे. यानेंच विकृतिवल्ली लिहिली. याचा गुरु प्रातिशाख्यादि ग्रंथ करणारा शौनक होय ( शौनक पहा ). यानें व्याडिपरिभाषा व व्याडिशिक्षा असे दुसरेहि ग्रंथ लिहिले आहेत ( C. C. ). हा रत्नविद्येंत निष्णात होता, असें गरुडपुराणावरून दिसतें ( १. ६९. ३७ ).

**व्याधाज्य**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**व्यास**—यानें मृत्यु शब्दाच्या अर्थाविषयीं विचार केला आहे ( तै. आ. १. ९. २ ). हा विष्वक्सेनाचा शिष्य (सामविधान ब्राह्मण). येथें याची गुरुशिष्यपरंपराहि सांपडते. याशिवाय वेदांत याचा निर्देश नाहीं. हा पराशर व सत्यवती यांचा मुलगा. याचा जन्म यमुनाद्वीपांत झाला ( म. आ. ६०. २ कुं.), म्हणून यास द्वैपायन असें नांव मिळालें. याला पाराशर, पाराशर्य (म. आ. ६४.१२६ कुं. ), कृष्ण-द्वैपायन (भा. ४. ४० ), सत्यवतीसुत, बोरीच्या वनांत झाला म्हणून बादरायण (भा. १. ७. ३; ९.२२. ३५) आणि पुराणप्रवक्ता या नांवांनीं संबोधिलें आहे ( वायु. १. १; १. ६०. ११-२१; २. ९. ८४; विष्णुधर्म. १. ७४). 'विव्यास वेदान्

यस्मात्स तस्माद्व्यास इति स्मृतः' अशी व्यास या शब्दाची व्याख्या आहे ( म. आ. ६४. १३० कुं. ). प्रत्येक द्वापरांत एकेक व्यास उत्पन्न होतो. त्याप्रमाणें हल्लीं वैवस्वत मन्वंतरांत कृष्ण-द्वैपायन हा अठ्ठाविसावा व्यास आहे. प्रत्यक्ष विष्णु अंशरूपानें अवतार घेऊन हें कार्य करीत असतो ( मत्स्य. ५२. ३-११; २००. ३१-३२; लिंग. १.२४). आतांपर्यंत झालेल्या सत्तावीस व्यासांचीं नांवें पुराणभेदांप्रमाणें निरनिराळीं आहेत.

हीं नांवें पुढें दिलीं असून त्या त्या व्यासास मदत करणारे शंकराचे अवतार त्यांच्या चारचार शिष्यांसह शिव शब्दावर शिवावतार या सदरीं दिलीं आहेत.

व्यासानें सूत व शुक यांना पुराणांचा उपदेश केला होता ( दे. भा. १. ३; म. आ. ६४. १३१ कुं. ). नारदाच्या उपदेशावरून यानें भागवत रचिलें ( भा. १. ७ ). नारदानें व्यासास पुराणसंहिता सांगितल्या ( भा. १२. ४ ). ब्रह्मकुंडाजवळ सरस्वतीमध्यें स्नान केल्यामुळें याला पुराणादिकांचें ज्ञान झालें ( स्कंद. २. ३. ७ ). यानें सतरा पुराणें केली, तरी यास समाधान होईना, म्हणून नारदाच्या आज्ञेवरून भागवत रचून यानें तें सूतास पढविलें ( पद्म. उ. १९८ ). यानें जातूकर्ण्यापासून धर्मशिक्षण घेऊन भारत तयार केलें. वेदांच्या शाखा करून अठरा पुराणें केलीं ( वायु. १. १; ब्रह्म. २६ ). वेदविभागामुळें यास गर्व झाला व पुराणें तयार करण्याच्या तयारींत असतां गणेशस्मरण केलें नाहीं, म्हणून चित्तांत भ्रांति उत्पन्न झाली. शेवटीं हा ब्रह्मदेवाकडे गेला. ब्रह्मदेवानें यास मंत्रोपासना व गणेशपुराण देऊन गणेशास उद्देशून तप करण्यास सांगितलें. याप्रमाणें यानें करतांच पुराणरचनेचें काम निर्विघ्नपणें पार पडलें ( गणेश. १. १२ ). यानें अठरा पुराणें, ब्राह्म, ऐन्द्र, याम्य, रौद्र, वायव्य, वारुण, सावित्र व वैष्णव हीं आठ व्याकरणें केलीं ( भवि. ब्राह्म. १. ६० ). वसिष्ठकुलांत व्यास होऊन गेला असें दिलें आहे ( विष्णुधर्म. १. ७४. २२ ). यानें भविष्यपुराण सुनंदापर्यंत सांगितल्यावर सगळें म्लेच्छमय होणार म्हणून अठ्ठयाऐशीं हजार ऋषि हिमालयावर गेले. तेव्हां याला श्रोता कोणीच राहिला नाहीं. म्हणून मनच श्रोता करून यानें भविष्यपुराण सांगितलें. आदम व हव्यावती हें जोडपें याच्या नंतर व क्षेमकाच्या वेळींच झालें ( भवि. प्रति. १. ४ ). हा एक लक्ष शिष्यांसह काशींत राहत असतां भिक्षा मिळेना म्हणून हा शंकरास शाप देण्यास तयार झाला. परंतु पार्वतीनें याच्या सर्व शिष्यांस जेवावयास घालून याचें समाधान केलें. हें शंकरास समजतांच त्यानें यास शिष्यांसह हांकून दिलें ( स्कंद. ४.९६ ). तेव्हां हा काशीच्या बाहेर व्यासकाशींत जाऊन राहिला.

एकदां याला गृहस्थाश्रमी व्हावें अशी इच्छा होऊन यानें जाबालि ऋषीच्या वटिका मुलीशीं विवाह केला. तिचे ठिकाणीं याला शुक नांवाचा मुलगा झाला ( स्कंद. ६.१४७-१४८ ). पण वायुपुराणांत तो अरणीचे ठायीं झाला असें आहे ( २.१०.८५ ). शिवाय तो दीर्घतपस् व्यासाचा पुत्र होय, असेंहि दिलें आहे ( पद्म. पा ७२ ). महाभारताप्रमाणें तो घृताचीपुत्र होता ( म. आ. ३३२. ६४. १३१; शां. कुं. ).

शुक सदेह स्वर्गास गेल्यावर हा शोकानें आक्रोश करूं लागला. तेव्हां रुद्रानें येऊन याचें सान्त्वन केलें व सांगितलें कीं, शुकाची छाया तुला सर्वत्र दिसेल ( म. शां. ३४१ ). यानें धृतराष्ट्रादिकांस मृतदर्शन करविलें होतें ( म. आश्र. ३० ). यानें आपल्या मातेच्या आज्ञेवरून धृतराष्ट्र, पांडु व विदुर यांस उत्पन्न केलें. कृष्णद्वैपायन-व्यासाखेरीज इतरांची नामोल्लेखापलीकडे माहिती मिळत नाहीं.

प्रत्येक द्वापरांत एकेक व्यास होतो. वैवस्वत मन्वंतरांत आतां पर्यंत अठ्ठावीस द्वापर युगें होऊन गेलीं. त्याप्रमाणेंच व्यासहि अठ्ठावीस झाले आहेत. प्रथम विष्णुपुराणांतील यादी दिली आहे. ती अशीः—१ स्वयंभु, २ प्रजापति, ३ उशनस्, ४ बृहस्पति, ५ सवितृ, ६ मृत्यु, ७ इंद्र, ८ वसिष्ठ, ९ सारस्वत, १० त्रिधामन्, ११ त्रिवृषन्, १२ भरद्वाज, १३ अंतरिक्ष, १४ वप्रिन्, १५ त्र्य्यारुण, १६ धनंजय, १७ कृतंजय, १८ ऋणज्य, १९ भरद्वाज, २० गौतम, २१ उत्तम-हर्यात्मन्, २२ वेन राजश्रवस, २३ शुष्मायण सोम अथवा तृणबिंदु, २४ वाल्मीकि ऊर्फ ऋक्ष भार्गव, २५ शक्ति, २६ पराशर, २७ जातूकर्ण, २८ कृष्ण-द्वैपायन, २९ द्रौणि. या नांवांत खालील फरक आहेत. कंसांतील शब्द आधारदर्शक आहेत. १ प्रभु ( शत. ), ऋभु ( वायुसं. ), क्रतु ( स्कंद. ), वायूंत नांवच नाहीं. २ सत्य, ३ भार्गव, ४ अंगिरस्, ७ शतक्रतु, ११ निवृत्त, १२ शततेजस्, १३ धर्म-नारायण ( शत., वायुसं., वायु., स्कंद ), १४ धर्म ( दे. भा., लिंग. ), रक्ष ( शत. ), स्वरक्षस् ( वायुसं. ), सुरक्षण ( वायु. ), १५ आरुणि ( वायुसं., वायु., स्कंद. ), १६ देव ( शत. ), कृतंजय ( वायुसं. ), संजय ( वायु. ), ऋतंजय ( स्कंद. ), १७ मेधातिथि, १८ व्रतिन् ( दे. भा., लिंग. ), ऋतंजय ( शत., वायु. ), १९ अत्रि ( दे. भा., लिंग. ), २० वायूंत नाहीं. पण पुढें वाचःश्रवसनंतर वाचस्पति हा जास्त आहे. २१ शत., वायुसं., वायु., स्कंद. यांत नाहीं. यामुळें पुढल्यांचा क्रमांक एकानें कमी होत गेला आहे. २२ वेन वाजश्रवस् ( दे. भा. ), वाजश्रवस् ( लिंग., स्कंद. ), वाचःश्रवस् ( शत. वायुसं., वायु. ), २३ सोम आमुष्यायण ( दे. भा. ), आमुष्यायण ( लिंग. ),

तृष्णायण ( शत. ), सूक्ष्मायणि ( वायु. सं. ), शुक्रायन ( वायु. ), यांतील तृणबिंदु निराळा केला व तो लगेच पुढें दिला आहे. यामुळें क्रमांक पुनः जुळता झाला आहे. पण देवीभागवत व लिंग यांमध्यें एकानें वाढला आहे. २४ यास वासिष्ट असें विशेषण जोडलें आहे (वायु.) भार्गव ( दे. भा., लिंग.), यक्ष( शत. ), कृष्ण. २५ शक्तिय ( वायु. सं. ) देवीभागवत व लिंग यांत नाहीं म्हणून क्रमांक सर्वांचे जुळले. २९ शेवटच्या चारांत नाहीं. ( विष्णु. ३.३; दे. भा. १.३; लिंग. १. २४, शिव. शत. ५; वायुसंहिता ८; वायु. १. २३; स्कंद. १.२.४० ). पुढील द्वापरांत व्यास अगस्त्य होणार आहे ( स्कंद. ४. १. ५ ).

द्वापरांत व्यास होतो व त्याचें कार्य पार पडेनासें झालें कीं, पुढें कलीच्या आरंभीं शिव अवतरतो तो आपल्या चार शिष्यांकडून व्यासाचें कार्य पार पाडण्याची खटपट करतो ( शिव. शत. ४-५; वायुसंहिता ८-९; वायु. १.२३ ).

व्यासाच्या ऋग्वेदाचा शिष्य पैल यानें दोन शाखा इंद्रप्रमति व बाष्कल यांना दिल्या. विष्णूंत बाष्कलास बाष्कलि म्हटलें व वायु आणि भागवत यांत दोन्ही नावांचा विकल्प केला आहे. बाष्कलास चार शिष्य होते. विष्णु व भागवत यांत सात दिले आहेत. १ बोध्य ( वायुमतें बोध व विष्णुमतें बौध्य ), २ अग्निमाठर, भागवतमतें अग्निमित्र व ब्रह्मांडमतें (अग्निमातर), ३ याज्ञवल्क्य, ४ पराशर, ५ कालायनि ( बालायनि ), ६ गार्ग्य ( भज्य ), ७ कथाजव (कासार). कंसांतील नांवें भागवतांतील आहेत.

इंद्रप्रमतीचा मांडूकेय शिष्य होय. वायूंत त्यास मार्कंडेय म्हटलें आहे. फक्त विष्णुपुराणांतच दुसरा शिष्य शाकपूणि-रथीतर हा दिला आहे. पण ब्रह्मांड व वायु यांत तो बराच पुढें सत्यश्रीचा शिष्य म्हणून दिला आहे. मांडूकेयाचा शिष्य सत्यश्रवस्, सत्यश्रवस्चा सत्यहित, व त्याचा सत्यश्री इतकी शिष्यपरंपरा फक्त वायु व ब्रह्मांड यांतच आहे. सत्यश्रीचे शिष्य–ब्रह्मांडमतें १ देवमित्र शाकल्य, २ शाकवैण रथीतर व ३ बाष्कलि भरद्वाज. पैकीं देवमित्र शाकल्य हा भागवतांत मांडूकेयाचा शिष्य असून, तेथें देवमित्र व शाकल्य असे दोघे वेगळे आहेत. भागवतांत देवमित्राचे सौभरि इ. शिष्य दिले आहेत. देवमित्र शाकल्याचे शिष्य पुढीलप्रमाणें पांच होते–१ मुद्गल, २ गोखल ( भागवतमतें गोखल्य, वायुमतें गोलक ), ३ शालीय ( वायुमतें खालीय, ब्रह्मांडमतें खलीयस् ) ४ वत्स ( वायुमतें मत्स्य, भागवतमतें वात्स्य व विष्णुमतें वात्स्य ) ५ शैशिरेय (भागवत व विष्णु यांच्या मतें शिशिर ); भागवतांतच ६ वा जातूकर्ण्य दिला आहे.

शाकवैण रथीतराबद्दल विष्णूंत मांडूकेयशिष्य शाकपूर्ण रथेतर व वायूंत एकदां रथांतर व नंतर शाकपूर्ण रथीतर म्हटलें आहे. भागवतांतील जातूकर्ण्य हाच होय. यास शिष्य चार–विष्णुमतें १ क्रौंच, २ वैतालिक, ३ बलाक व ४ निरुक्तकृत; भागवतमतें पैज, वैताल, बलाक व विरज; ब्रह्मांडमतें पैल, इक्षलक, शतबलाक व गज आणि वायुमतें केतव, दालकि, धर्मशर्मन् व देवशर्मन्.

बाष्कलि भरद्वाजास शिष्य तीन-१ नंदायनीय, ब्रह्मांडमतें अपनाप, २ पन्नगारि, ३ अर्जव ( वायुमतें अर्थव-विष्णु. ३. ४. १६-२६; भा. १२. ६. ५४-५९; वायु. १. ६०. २४-६६; ब्रह्मांड. २. ३४-३५. ).

कांहीं पुराणें व महाभाष्य यांमध्यें ऋग्वेदाच्या एकवीस शाखांचा निर्देश आहे. पण त्यांचीं नांवें एकत्र दिलेलीं आढळत नाहींत. व्यासाची विस्तृत शिष्यपरंपरा आम्हीं उध्दृत केली आहे. पण शाखा व शिष्य भिन्न आहेत. चरणव्यूहांत ऋग्वेदाच्या पांच शाखा दिल्या आहेत. त्यांचीं नांवें–१ शाकल ( शैशिरीय ), २ बाष्कल, ३ आश्वलायन, ४ शांखायन, ५ मांडूकायन. यांपैकीं आश्वलायन व शांखायन या शाखांचा संबंध कोणत्याच नांवाशीं जोडतां येत नाहीं. मात्र आश्वलायन व शांखायन या शाखांचा निर्देश अग्निपुराणांत आहे ( २७१.२ ). शिवाय सध्यां उपलब्ध होणारी सायणभाष्य असलेली ऋग्वेदसंहिता आश्वलायन शाखेची आहे. हें चरणव्यूहाच्या महीधरभाष्यावरून सिद्ध करितां येतें. सत्यव्रतसामाश्रमीनें ऐतरेयालोचनांत चांगल्या तऱ्हेचें हें प्रतिपादन केलें आहे. शांखायनीखेरीज वरील शाखा शाकल्याच्या शिष्यांनीं सुरू केल्या असल्यामुळें त्यांना सामान्य शाकल असेंहि नांव लावण्यांत येतें (वेदार्थदीपिका प्रस्तावना).

व्यासापासून वैशंपायनानें यजुर्वेद मिळविला व त्यापासून यजुर्वेदाच्या शाखांचा विस्तार झाला. वैशंपायनानें सत्तावीस ( विष्णु. ) किंवा श्याऐंशीं ( वायु. ब्रह्मांड. ) संहिता केल्या व त्या तितक्याच शिष्यांस दिल्या. पैकीं याज्ञवल्क्यानें आपली संहिता परत दिली व ती बाकींच्या शिष्यांनीं घेतली. तेव्हांपासून त्यांचें तैत्तिरीय असें व नंतर चरकाध्वर्यु असें नांव पडलें ( विष्णु. ३. ५; भा. १२. ६ ). यांचे एकंदर तीन भेद होते व त्या तीन भेदांचे प्रत्येकीं तीन भेद असे एकंदर नऊ भेद झाले होते, व ते उदीच्या मध्यदेश व प्राच्य या नांवांनीं संबोधिले जात. उदीच्यांमध्यें श्यामायनि प्रमुख झाला. मध्यदेशांतील पहिला आसुरि हा शाखाप्रस्थापक झाला व प्राच्य तेरा असून त्यांचा मुख्य आलंबि हा झाला. याज्ञवल्क्यानें नंतर सूर्यापासून वेद मिळ-

विला. त्यास वाजिन किंवा वाजसनेय म्हणत. त्याचे त्यानें पंधरा विभाग केले व ते पंधरा शिष्यांस दिले.

वायूंतील फरकांचीं नांवें कंसांत दिलीं आहेत—१ कण्व, २ बौधेय ( विदग्ध ), ३ मध्यंदिन, ४ सापत्य ( शापेयिन् ), ५ वैधेय, ६ आद्ध ( आप्य ), ७ बौद्धक ( उद्दल ), ८ तापनीय ( ताम्रायण ), ९ वत्स ( वात्स्य ), १० जाबाल ( गालव ), ११ केवल ( शैशिरिन् ), १२ आवटिन् ( आटविन् ), १३ पुंड्र ( पर्णिन् ), १४ वैण ( वीरणिन् ), १५ पराशर ( परायण ), वायूंत शालिन् हें एक नांव जास्त दिसतें ( ब्रह्मांड. ३. ३५. ८-३०; वायु. १. ६१.५-२६ )

जैमिनीनें व्यासापासून सामवेद मिळवून आपला शाखाविस्तार केला. यानें आपला पुत्र सुमंतु व सुमंतूनें आपला पुत्र सुत्वान् ( वायु ), सुन्वान् ( भागवत, ब्रह्मांड ) यास व त्यानें आपला पुत्र सुकर्मन् यास दिला. विष्णूंत सुन्वान् अगर सुत्वान् नाहीं. यानें एक हजार संहिता शिष्यांस सांगितल्या. पण ते अनध्यायाच्या दिवशीं शिकत म्हणून इंद्रानें त्यांना ठार केलें असें वायु व ब्रह्मांड यांत आहे. पुढें याचेपासून त्यांपैकीं पांचशें पौष्यंजीनें व पांचशें हिरण्यनाभ कौशल्य ( वायूंत कौशिक्य म्हटलें आहे ) राजानें घेतल्या. पौष्यंजीच्या शिष्यांस उदीच्य-सामग म्हणत व राजाच्या शिष्यांस प्राच्य-सामग म्हणत. हे प्रत्येक पंधरा पंधरा होते, असें विष्णूंत आहे. पण पुनः हिरण्यनाभ-कौशल्य यानें आपल्या कृत ( विष्णूंत कृति ) नांवाच्या शिष्यास दिल्या व त्यानें त्याच्या चोवीस संहिता करून आपल्या शिष्यप्रशिष्यांस दिल्या. या चोवीस शिष्यांचीं नांवें फक्त वायु व ब्रह्मांड यांत आहेत——१ राडि ( राड ), २ राडवीय (महवीर्य), ३ पंचम, ४ वाहन, ५ तलक (तालक), ६ मांडुक ( पांडक ), ७ कालिक, ८ राजिक, ९ गौतम, १० अजब, ११ सोमराजायन ( सोमराज ), १२ पुष्टि ( पृष्टघ्न ), १३ परिकृष्ट, १४ उलूखलक, १५ यवीयस्, १६ शालि ( वैशाल ), १७ अंगुलीय, १८ कौशिक, १९ शालिमंजरिपाक ( सालिमंजरिसत्य ), २० शधीय ( कापीय ), २१ कानिनि ( कानिक ), २२ पाराशर्य ( पराशर ), २३ धर्मात्मन्. २४ वें नांव नाहीं.

पौष्यंजीस चार शिष्य—( भागवतांत पांच दिले आहेत ). त्यांचीं नांवें—१ लौगाक्षि ( लौकाक्षि असें विष्णूंत व लोकाक्षिन् असें वायूंत आहे ), २ कुथुमि ( हें नांव भागवतांत नाहीं ), ३ कुशीदि याबद्दल भागवतांत कुसीद व विष्णूंत कुसीदि असें आहे व ४ लांगलि याबद्दल भागवतांत मांगलि म्हटलें आहे. लांगलीस ब्रह्मांड व वायु यांत शालिहोत्र असें विशेषण आहे. भागवतानें कुल्य व कुक्षि अशीं आणखी निराळींच दोन नांवें देऊन हे प्रत्येकीं शंभर संहिता शिकले असें दिलें आहे. यांचा पुढील शाखाविस्तार फक्त वायु व ब्रह्मांड यांतच आहे. त्यांत कुशीदीस शिष्य नव्हता. लांगलीस सहा शिष्य होते. ते ब्रह्मांड व वायु या क्रमानें देत आहे. १ हालिनी (भालुकि), २ ज्यामहानि ( कामहानि ), ३ जैमिनि, ४ लोमगायनि ( लोमगायिन ), ५ कंडु ( कंड ), ६ कोहल ( कोलह ). यांस लांगल किंवा लांगलिन् असें सामान्य नांव होतें. लौगाक्षीस नाडायनीय, सहतंडिपुत्र, वैन, सकोतिपुत्र, सुसहस् व सुनामन् ( ब्रह्मांड ), राणायनीय, सहितंडिपुत्र, मूलचारिन, सकोतिपुत्र व सहसात्यपुत्र ( वायु ) असे पांच शिष्य होते. यांपैकीं राणायनीयाचे शिष्य शौरिद्यु ( शोरिद्यु ) व शृंगीपुत्र असे दोन होते. पैकीं शृंगीपुत्रास तीन शिष्य, १ वैन ( चैल ), २ प्राचीनयोग व ३ सुबाल हे होत.

कुथुमी अथवा कुथुमीस शिष्य तीन—औरस ( पाराशर्य गोत्री ), नाभिवित्ति ( ब्रह्मांड ), औरस, रसपासर व भागवित्ति (वायु.). यांपैकीं पाराशर्यकौथुमास ( म्हणजे औरस असेल) सहा शिष्य होते व त्यांस त्यानें सहा संहिता सांगितल्या. शिष्यांची आसुरायण, वैशाख्य, वेदवृद्ध, परायण, प्राचीनयोगपुत्र, पतंजलि हीं नांवें दोन्हीं ठिकाणीं जुळतात. या सामगांपैकीं पौष्यंजि व कृत हे दोघे श्रेष्ठ असून तेच सामसंहिताविकल्पक होते ( ब्रह्मांड. २. ३५. ३१-५५; वायु. १. ६१. २७-४८. )

अथर्ववेदाचा व्यासाचा शिष्य सुमंतु, सुमंतूचा कबंध, कबंधाचे शिष्य दोन—१ पथ्य, २ देवदर्श, ( यांस भागवतांत वेददर्श व वायूंत वेदस्पर्श म्हटलें आहे ). वेददर्शास शिष्य चार पण वायु व भागवत यांत नांवें पांच दिसतात. १ शौल्कायनि—वायूंत शौकायनि, २ पिप्पलाद—भागवतांत पिप्पलायनि, ३ ब्रह्मबल—विष्णु व भागवतांत ब्रह्मबलि, ४ मोद—भागवतांत मोदोष, व विष्णूंत मौद्ग, ५ ब्रह्मांडांत तपसिस्थित व वायूंत तपन.

पथ्यास शिष्य तीन—१ जाजलि, २ कुमुदादि,—भागवतांत कुमुद, ३ शौनक—भागवतांत शुनक. शौनकास शिष्य दोन, १ बभ्रु—ब्रह्मांडांत मुंजकेश्य व वायूंत मुंजकेश अशीं यास विशेषणें आहेत. २ सैंधवायन. या प्रत्येकानें दोन दोन संहिता केल्या. या वेदांचे नक्षत्रकल्प, वेदकल्प, संहिताकल्प, अंगिरसकल्प आणि शांतिकल्प असे पांच कल्प आहेत. वेदकल्पास वायु व ब्रह्मांड यांत वैतान हें नांव आहे. भागवतांत वेदकल्प नाहीं ( विष्णु. ३. ६. ९-१४; भा.१२. ७. १-४; वायु. १. ६१. ४९-५४; ब्रह्मांड. २. ५. ५५-६२ ).

व्यासानें पुराणसंहिता रोमहर्षणास दिल्या व त्या त्यानें १ सुमति आत्रेय, २ अकृतव्रण काश्यप, ३ अग्निवर्चस्

भारद्वाज, ४ मित्रयु वासिष्ठ, ५ सोमदत्ति सावर्णि यांस दिल्या. याशिवाय शांशपायन हा आणखी एक आढळतो. भागवतात १ ला त्र्यारुणि, २ रा कश्यप देऊन शिवायअकृतव्रण दिला असून ४ था सावर्णि दिला आहे. तसेंच वैशंपायन, हस्ति व सूत अशी आणखी तीन नांवें दिलीं आहेत. विष्णूंत वरील यांचें पैतृक नांवाविरहित दिलीं असून सुशर्मन् शांशपायनाबद्दल मात्र शांतपायन दिला आहे ( विष्णु. ३. ६. १५–१८; भा. १२. ६; वायु. १. ६१. ५५ ५७; ब्रह्मांड. २. ३५. ६३–६६ ).

याच्या ब्रह्मसूत्राचे चार अध्याय, सोळा पाद व एकशें ब्याण्णव अधिकरणें असून त्यांत सूत्रें पांचशेंपंचावन आहेत. त्यांत बृहदारण्यक, छांदोग्य, कौषीतकी, ऐतरेय, मुंडक, प्रश्न, श्वेताश्वतर, जाबाल व आथर्वणिक ( उपलब्ध नाहीं ). इतक्या ग्रंथांतील वाक्यांचा विचार केला आहे. आत्रेय, आश्मरथ्य, औडुलोमि, काशकृत्स्न, कार्ष्णाजिनि, जैमिनि व बादरि या पूर्वाचार्यांचीं मतें सूत्रांत नांवांनीं ग्रथित केलेलीं आहेत. त्यांत बादरीचा चार सूत्रांत, औडुलोमीचा तीन सूत्रांत, आश्मरथ्य दोन सूत्रांत व बाकीच्यांचा एकाएका सूत्रांत निर्देश आहे. बादरायणाचीं मतें आठ सूत्रांत आलीं आहेत. हीं सूत्रें उपनिषदांचा समन्वय करण्याकरितां आहेत. तथापि महाभारत मनुस्मृति, व भगवद्गीता, यांना उद्देशूनहि कांहीं सूत्रें आहेत. हीं सूत्रें भाष्यावांचून समजणें अशक्य आहे. कांहीं सूत्रांचे शंकराचार्यांनीं दोन दोन अर्थ लाविले आहेत ( १.१.१२-१९; ३१; ३.२४; ४.३; २.२.३९-४० इ. ). पाठभेदहि क्वचित् दिसतो ( १.२.२६; ४.२६ ). प्रथम सिद्धान्त व नंतर पूर्वपक्ष अशी प्रतिलोमव्यवस्थाहि दिसते ( ४.३.७-११ ). गीतेप्रमाणें या सूत्रांतहि आपआपलें तत्त्वज्ञान दाखविण्याची जुनी परंपरा आहे.

आनंदाश्रम, व्यंकटेश्वरप्रेस व जीवानंदस्मृतिसंग्रह या तिन्ही ठिकाणीं याची चार अध्यायांची व अडीचशें श्लोकांची प्रायः एकच असणारी स्मृति छापलेली आहे. ही काशींत सांगितलेली आहे. तींत वर्णाश्रमधर्म, नित्यकर्म, स्नानभोजन, दानधर्म इत्यादि विषय आहेत. अपरार्क, स्मृतिचंद्रिका वगैरे ग्रंथांत याचे व्यवहारविषयक श्लोक येतात. ते महाभारतांतलि दिसतात. स्मृतिचंद्रिकेंत गद्यव्यास, अपरार्कांत वृद्धव्यास, मिताक्षरेंत बृहद्व्यास, यांशिवाय दानसागरांत लघुव्यास, महाव्यास व दानव्यासाचाहि निर्देश आहे. यानें भारत केलें व वैशंपायनानें महाभारत केलें (भवि. ब्राह्म. १). पण यानें जय ग्रंथ केला. वैशंपायनानें भारत व सौतीनें महाभारत केलें असें सर्वमान्य आहे.

बादरायण व पाराशर्य व्यास एकच असावेत अशी समजूत आहे. पण सामविधानब्राह्मणांतील आचार्यपरंपरेंत हे भिन्न मानिले असून त्यांत चार पिढ्यांचें अंतरहि आहे. तांडि व शाट्यायनि हे व्यासाचे नसून बादरायणाचे शिष्य आहेत. बादरायण अंगिरसापैकीं असून (आप. श्रौ. २४. ८. १०) व्यास पाराशर्य हा वसिष्ठगोत्री होता.

वैष्णव भागवतांत कृष्ण द्वैपायन व बादरायण एकच मानिले आहेत (भा. ३. ५. १९). अपांतरतम सारस्वत हा नववा व्यासच. हा पुढें कृष्ण द्वैपायन व्यासरूपानें अवतरला ( म. शां. ३५९ कुं.; ब्र. सू. ३. ३.३२ शांकरभाष्य ).

खुद्द शंकराचार्यहि ब्रह्मसूत्रें बादरायणकृतच मानितात, असें शेवटल्या सूत्राच्या अवतरणावरून दिसतें ( ब्र. सू. ४. ४. २२ ) पण ब्रह्मसूत्रें मूळ जैमिनीनें केलेलीं असून कृष्णद्वैपायनानें त्यांवर कांहीं संस्कार केलेला असावा. कारण सुरेश्वराचार्यांनीं तसा उल्लेख केला आहे (नैष्कर्म्यसिद्धिः १.९०). छांदोग्योपनिषद् वाक्यांवरच सूत्रें फार आहेत. द्रमिडाचार्यांनीं श्रीभाष्यश्रुतप्रकाशिकेंत जैमिनीला नमस्कार केला आहे. पण कृष्ण द्वैपायनाचें नांवहि काढिलें नाहीं. यावरून जैमिनीचीं सूत्रें असावींत याला पुष्टि मिळते.

**व्याहृति**—सवितृ व पृश्नि यांची कन्या.

**व्युत्थिताश्व**—( व्युषिताश्व पहा ).

**व्युषिताश्व**—( सो. पूरु. ) एक राजा. याची बायको काक्षीवती भद्रा. याला शाल्वमद्र इ. सात पुत्र होते ( म. आ. १२७.१७ कुं. ).

**व्युष्ट**—( स्वा. उत्तान. ) पुष्पार्ण व दोषा यांचा पुत्र. २ विभावसु व उषा यांचा पुत्र ( भा. ६. ६. १६ ).

**व्यूढोरस्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**व्यूढोरु**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**व्योमन्**—( सो. क्रोष्टु. ) हा भागवत, विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें दशार्हपुत्र होय ( दाशार्ह पहा ).

**व्योमासुर**—मयासुराच्या वंशांतील एक असुर. यास कृष्णानें मारिलें ( भा. २. ७. ३१; १०. ३७. २८ ).

**व्रज**—उरु व षडाग्नेयी यांचा पुत्र.

**व्रत**—( स्वा. उत्तान. ) चक्षु व नड्वला यांचा पुत्र. २ अभूतरजस् देवांपैकीं एक.

**व्रतिन्**—चालू मन्वंतरांतील अठरावा व्यास.

**व्रतेयु**—( सो. पुरूरवस्. ) भागवतमतें रौद्राश्वपुत्र.

**व्रात**—( सू. इ. भविष्य. ) वायुमतें कृतंजयपुत्र.

# श

**शंयु**—याला एक विशिष्ट यज्ञसंस्था माहीत होती. ती हा स्वर्गास गेल्यावर नष्ट झाली. पुढें ती पुनः मिळविण्याचा इतरांनीं प्रयत्न केला ( श. ब्रा. १. ९. १. २४ ). याचा वैदिक वाङ्मयांत अनेक ठिकाणीं अग्नि म्हणून निर्देश आहे (तै. सं. २. ६. १०. १; ५. २. ६. ४; तै. ब्रा. ३.३.८.११; तै. आ. १.५.२ ). हा बृहस्पति व तारा यांचा पुत्र असून एक अग्नि आहे ( वायु. २.१०.३७; ब्रह्मांड. ३. ९. ३८). याची पत्नी सत्या. यास भरत व भरद्वाज असे दोन पुत्र झाले. शिवाय तीन कन्याहि झाल्या ( म. व. २२१. १२ कुं. ). हा सूक्तद्रष्टा आहे ( ऋ. ६. ४४-४६; ४८ ). हा व शम्यु एकच असावा.

**शंखपि**—अंगिराकुलांतील गोत्रकार ( शंखमत् पहा ).

**शक**—कलियुगारंभापासून एक लाख एकशें वर्षांनीं होणारा राजा ( स्कंद. १. २. ४० ). सगर राजानें यास जिंकिलें होतें ( भा. ९.८.५ ). शक व यवन हे हैहयाचे मदतनीस होते. सगरानें हैहयास जिंकिलें, तेव्हां हे शकयवन वसिष्ठास शरण गेले (पद्म. उ.२०). पतंजलीनें यांचा निर्देश केला आहे ( पा. सू. २. ४. १० भाष्य. ). सध्यांच्या हिंदुस्थानच्या वायव्येकडील पूर्वीचा एक देश व त्यांतील मूळचे लोक. हे मूळचे अनार्य होते. हे सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी हिंदुस्थानाकडे वळले व प्रथम शकस्थानांत ( हल्लींच्या सीस्थानांत ) राहिले. नंतर सुराष्ट्र ( काठेवाड ) इत्यादि प्रांतांत यांनीं आपलीं राज्यें स्थापिलीं.

२ ( मौर्य. भविष्य. ) मत्स्यमतें बृहद्रथाचा पुत्र.

**शकट**—कृष्णानें मारिलेला कंसपक्षीय असुर ( म. स. ५२. १७ कुं.; भा. १०. ७. ८; ह. वं. २. ६; विष्णु. ५. ६; पद्म. ब्र. १३; उ. २४५ ).

२. अगस्त्यकुलांतील गोत्रकार गण.

**शकपूत**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.१३२ ). याला अनुक्रमणींत नृमेधपुत्र म्हटलें आहे. सूक्ताच्या शेवटल्या ऋचेंत नृमेधाप्रमाणें मित्रावरुणांनीं माझें संरक्षण करावें अशी हा प्रार्थना करीत आहे ( नृमेध आंगिरस पहा ).

**शकुन**—पृथुक देवांतील एक.

**शकुनि**—हिरण्याक्षाचा पुत्र ( भा. ७. २. ५ ).

२ धृतराष्ट्रनागाचा पुत्र ( म. आ. ५७. १६ कुं. ).

३ इक्ष्वाकूच्या शंभर पुत्रांपैकीं एक. हा दुसऱ्या पन्नासांमध्यें ज्येष्ठ होता.

४ ( सू. निमि. ) वायुमतें सुतद्वाजाचा पुत्र. याचा पुत्र स्वागत. विष्णुमतें यास कुणि म्हणतात.

५ ( सो. क्रोष्टु. ) भागवत व विष्णु यांच्या मतें दशरथाचा, वायुमतें एकादशरथाचा व मत्स्यमतें दढरथाचा पुत्र.

६ गांधारदेशाधिपति सुबलाचा पुत्र व दुर्योधनाचा मामा. यानें दुर्योधनाकरितां द्यूत खेळून पांडवांना जिंकिलें व वनवासाला धाडिलें. हा कपटानें द्यूत खेळणारा होता (म.वि. ५०. ३६ कुं. ). हा भारतीय युद्धांत दुर्योधनाकडे असून शल्य सेनापति असतां सहदेवानें यास ठार केलें ( म. श. २७. ६० कुं.). हा मार्गशीर्ष वद्य अमावस्येस मारिला गेला ( भारतसावित्री). याचा पुत्र उलूक. याचे भाऊ पुढील होतः वृषक, बृहद्बल, अचल, सुभग, विभु, भानुदत्त, गज, गवाक्ष, चर्मवत्, आर्जव, शुक.

**शकुनिमित्र**—( विपश्चित पाराशर्य शकुनिमित्र पहा ).

**शकुंत**—विश्वामित्र ऋषीचा पुत्र.

**शकुंतला**—हिला नाडपिती अप्सरा म्हटलें आहे ( श. ब्रा. १३. ५. ४. १३ ). विश्वामित्र तप करीत असतां तपोभंगार्थ आलेल्या मेनकेचे ठायीं विश्वामित्रापासून शकुंतला झाली. हिला तसेंच टाकून देऊन मेनका स्वर्गीं गेली. तेव्हां हिचें पालन प्रथम शकुंत पक्ष्यांनीं व नंतर कण्वानें केलें. व हिला शकुन्तांनीं ( पक्षांनीं ) रक्षिलें म्हणून, शकुंतला असें नांव ठेविलें. पुढें एकदां शिकारीला आलेला दुष्यंत, कण्व बाहेर गेला असतां त्याच्या आश्रमांत त्याच्या दर्शनार्थ आला. पण तेथें शकुंतलेखेरीज दुसरें कोणी नसल्यामुळें हीच भेटली, व हिनें दुष्यंतानें विचारिल्यावरून कण्वमुखांतून ऐकिलेली आपल्या जन्माची हकीगत सांगितली. या प्रथम मीलनानंतर हीं दोघें एकमेकांवर अनुरक्त झालीं व यानें 'आपल्या पुत्रास यौवराज्याभिषेक व्हावा' या हिच्या अटीवर गांधर्वविवाह केला. आणि नेण्यास लवाजमा पाठविण्याचें आश्वासन देऊन दुष्यंत निघून गेला. घरीं आल्यावर कण्वानें झालेल्या गोष्टीस अनुमोदन देऊन हिला आशीर्वादहि दिला. पण पुढें बरेच दिवस दुष्यंत आला नाहीं. इकडे शकुंतला प्रसूत होऊन हिला भरत झाला. तेव्हां यौवराज्याभिषेकार्थ शकुंतला व भरत यास कण्वानें शिष्यांकरवीं दुष्यंताकडे पाठविलें. पण दुष्यंतानें जनलज्जेस्तव हिचा व आपला संबंध नसल्याचें दर्शवून हिची निर्भर्त्सनाहि केली. म्हणून ही 'भरत तुझ्याशीं वैर धरून सर्व राज्य आक्रमील' असा शाप देऊन निघून चालली. इतक्यांत आकाशवाणीनें दुष्यंतास हिचा व पुत्राचा स्वीकार करण्यास सांगून लोकापवाद टाळिला. तेव्हां त्यानें हिचा स्वीकार केला ( वायु. २. ३७. १३१). त्या वेळीं 'लोकापवादास्तव आपण असें केलें' असें

सांगून शकुंतला व जनता यांचें शानें समाधान केलें ( म. आ. ८९-१२० कुं., भा. ९. २० ). दुर्वासाचा शाप, शक्रावतारीं आंगठी हरवणें, राजाची विस्मृति, मत्स्यगर्भातील आंगठीमुळें झालेलें स्मरण इ. शाकुंतल नाटकांतील कविकल्पना आख्यान. पण पद्मपुराणाच्या बंगाली प्रतींत कालिदासाच्या आख्यानाशीं जुळती कथा आहे.

**शक्ति**—हा वसिष्ठाला अरुंधतीपासून झालेला ज्येष्ठ पुत्र होय ( भा. ४. १. ४१; म. आ. १९२. ११ कुं. ). हा कांहीं मंत्रांचा द्रष्टा आहे ( ऋ. ७. ३२; ९. ९७. १९-२१; १०८. ३; १४-१६ ). याच्या मंत्रकर्तृत्वाचा पुराणांतहि उल्लेख आहे. याच्या बायकोचें नांव अदृश्यन्ती. सायणभाष्यांत यासंबंधीं शाट्यायन ब्राह्मणांतील आख्यायिका दिली आहे. शक्तीनें सौदासाच्या घरीं यज्ञांत विश्वामित्राचा पराजय केला, तेव्हां जमदग्नीनें सूर्यापासून ससर्परी नांवाची विद्या मिळविली व विश्वामित्राला पुनः सामर्थ्य उत्पन्न केलें ( ऋ. ३. ५३. १५-१६ ) व मग विश्वामित्रानें सौदासाच्या साहाय्यानें याला जाळिलें. ऋग्वेदांतील एका ऋचेसंबंधीं आख्यायिकेवरून असें दिसतें कीं, हा विश्वामित्राच्या उद्यानांत गेला असतां तेथील नोकरांनीं यास जाळून मारिलें ( ऋ. ७. ३२. २६ वेदार्थदीपिका ). २६ व्यांतला पहिला चरण यानें केला. पण पुराणाप्रमाणें कल्माषपाद राजानें वसिष्ठाचे शंभर पुत्र भक्षिले त्यांत याचाहि भक्षण केलें ( म. आ. १९२. ४९ कुं. ). हा मेला तेव्हां अदृश्यन्ती गरोदर होती. पुढें तिला पराशर नांवाचा सुप्रसिद्ध मुलगा झाला. चालू मन्वंतरांत सव्विसावा शक्ति नांवाचा व्यास आहे. शक्तिवर्धन असेंहि नांव होतें ( मत्स्य. १४५. ९२-९३ ). चुकीनें सुदासाची गोष्ट कल्माषपाद सौदासाशीं जोडिली गेली असें दिसतें. हा एक प्रवर आहे. याला राक्षसानें भक्षण केलें, तरी हा शिवभक्तीनें स्वर्गांत गेला ( पद्म. पा. ११० ).

२ यापासून दम सांग वेद शिकला ( मार्कं. १३० ).

**शक्तिवर्धन**—( १ शक्ति पहा ).

**शक्तिसेन**—( सो. वृष्णि. ) मत्स्य व पद्म यांच्या मतें निघ्नपुत्र. विष्णु व भागवत यांच्या मतें हा सत्राजित् व मत्स्यमतें शक्रजित् होय.

२ ( सो. विदू. ) मत्स्यमतें शोणाश्वाचा पुत्र.

**शक्तिहस्त**—या राक्षसास जयंतानें ठार केलें ( पद्म. सृ. ७७ ).

**शक्र**—एक आदित्य ( १ इंद्र पहा ).

**शक्रज्योति**—मरुतांच्या पहिल्या गणांतील एक.

**शक्रदेव**—कालिङ्गराज भानुमताचा पुत्र. हा भीमसेनाकडून मारला गेला ( म. भी. ५४.२४ कुं. ).

**शक्रमित्र**—( सू. इ. ) मांधात्याचा कनिष्ठ पुत्र.

**शक्रय**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**शक्रशर्मन्**—त्रेतायुगांत अयोध्येस आला. हा रविपूजक होता. त्यामुळें हा १००० वर्षें जगून सूर्य झाला. याच्या तेजानें मध्वाचार्य झाले ( भवि. प्रति ४.८ ).

**शक्रहोम**—भविष्यमतें यज्ञहोत्राचा पुत्र. यावर इंद्र प्रसन्न होऊन याला स्वर्गांत घेऊन गेला. पुढें हा अयोध्येचा राजा झाला.

**शंकमान**—ब्रह्मांडमतें वैदेशांतील नागवंशी एक राजा.

**शंकर**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ यानें ब्रह्मयाची दंडनीति संक्षिप्त केली. या ग्रंथाचें नांव वैशालाक्ष. ही दहा हजार अध्यायांची आहे ( म. शां. ५८. ८९. कुं.; रुद्र; शिव पहा ).

३ एक चांडाल. याच्या बायकोनें मांस सोडलें व कार्तिकस्नान केलें म्हणून हा मुक्त झाला ( पद्म. ब्र. २० ).

४ गौतमाचा शिष्य. हा उन्मत्ताप्रमाणें वागे. याला वृषपर्व्यानें ठार केलें. पण शंकरानें याला पुनः जिवंत केलें ( पद्म. पा. ११४ ).

५ रामनाथतीर्थमाहात्म्याकरितां याची कथा आहे ( स्कंद. ३. १. ४८ ).

**शंकराचार्य**—यांचा पुराणग्रंथांत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असा बऱ्याच ठिकाणीं निर्देश आहे ( सूतसंहिता १; कूर्म. ३०. ३३-३४; पद्म. उ. २९६ ).

**शंकु**—( सो. कुकुर. ) भागवत व मत्स्य यांच्या मतें उग्रसेनाच्या नऊ पुत्रांपैकीं पांचवा. विष्णुमतें यास संकु व वायुमतें कद्रशंकु म्हणतात.

२ कृष्ण व सत्या यांचा पुत्र.

**शंकुकर्ण**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ शिवपार्षदांपैकीं एक

३ रावणानें नेमिलेल्या अशोकवनरक्षकांपैकीं एक राक्षस ( वा. रा. सुं. १८ ).

४ ( सो. कुरु. ). जनमेजय व वपुष्टमा यांचा पुत्र ( म. आ. ६३. ८७ कुं. ).

५ गीतेचा सातवा अध्याय म्हणून मुक्त झालेला ब्राह्मण ( पद्म. उ. १८१ ).

६ शंकराचा ब्राह्मणरूपांत झालेला अवतार. यानें एका पिशाचास शिवभक्ति व तीर्थस्नान करावयास सांगून मुक्त केलें ( पद्म. स्व. ३५ ).

**शंकुरथ**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**शंकुरोमन्**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**शंकुशिरस्**--कश्यप व दनु यांचा पुत्र. हा इंद्रवृत्र-युद्धांत होता (भा. ६. ६. ३०; १०. १९; विष्णु. १.१५).

**शंकुशिरोधर**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**शंख**—एक असुर. हा समुद्राचा पुत्र होता. हा अत्यंत पराक्रमी असून समुद्रांतच राहत असे (म. स. ९.१७ कुं.). यानें आपल्या पराक्रमानें सर्व देवांना व लोकपालांना सुवर्णपर्वताच्या गुहेंत हांकून लाविलें. पण पुढेंमागें हे बलाढ्य होतील, या भीतीनें यानें चारी वेद–ज्यांच्या जोरावर सर्व देव वगैरे अवलंबून होते ते—नष्ट करण्याचा निश्चय केला. व विष्णु निद्रित असल्यामुळें तर याचें चांगलेंच फावलें. पुढें यानें वेदांवर हल्ला केला असतां वेद समुद्रांत लपले. वेद नष्ट झाल्यामुळें सर्व नैमित्तिक कर्में बंद पडलीं व सर्व जनतेस त्रास होऊं लागला. तेव्हां ब्रह्मदेव विष्णूकडे गेला व त्यानें विष्णूस उठवून सर्व हकीगत सांगितली. पुढें विष्णूनें मत्स्य-रूप धरून याच्या भयानें समुद्रांत लपलेल्या वेदांना याला मारून बाहेर काढिलें. याच्या मृत्यूचा दिवस कार्तिक शुद्ध एकादशी हा होता. त्यामुळें विष्णूस कार्तिक महिना व विशेषतः कार्तिकी एकादशी हीं अत्यंत प्रिय आहेत (पद्म. सृ.१; उ. ९०-९१). शंखासुरास आषाढी एकादशीस मारून नंतर विष्णूनें योगनिद्रेस सुरुवात केली (स्कंद. ४.२.३३).

२ एक ब्राह्मण. याला लुटणाऱ्या व्याधानें यास पादत्राण परत दिलें व यानें त्यास वैशाखमाहात्म्य सांगितलें म्हणून दोघेहि मुक्त झाले (स्कंद. २.७.१७–२१).

३ मत्स्य-देशाधिपति विराट व सुरथा यांचा पुत्र. हा भारतीययुद्धांत पांडवांच्या बाजूनें होता. हा द्रोणाच्या हातून मरण पावला (म. भी. ८२.२३ कुं.).

४ हैहय वंशांतील भूत राजाचा पुत्र. यास जगन्नाथाचें प्रत्यक्ष दर्शन होऊन हा मुक्त झाला (स्कंद. २. १. ३८). हा वंशावळींत आढळत नाहीं.

५ सदाचारी माणसाच्या पायधुळीनें मुक्त झालेला राजा (पद्म. क्रि. २१).

६ एक ऋषि. हा जैगीषव्य व एकपर्णा यांचा पुत्र. याच्या भावाचें नांव लिखित असें होतें (१ लिखित पहा). याच्या नांवावर 'शंखस्मृति' नांवाचा एक ग्रंथ उपलब्ध आहे. आनंदाश्रमाच्या स्मृतिसमुच्चयांत ७१ श्लोकांची लघुशंखस्मृति असून वेंकटेशप्रेसनें अठरा अध्यायांची शंखस्मृति प्रसिद्ध केली आहे. दोन्हींमधील विषय अगदीं भिन्न आहेत. त्याचप्रमाणें शंखलिखितस्मृति म्हणून दुसराहि एक ग्रंथ शंख व लिखित या दोघांच्या नांवावर सांपडतो.

७ कश्यप व कद्रू यांच्या नागपुत्रांपैकीं एक.

८ मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

९ एकपाटलेचा पुत्र. हा अयोनिज होता.

१० उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

११ ब्रह्मदत्तानें आपलें सर्व द्रव्य यास दिलें (म. शां. २४०. २९; अनु. २००. १७ कुं.).

**शंख कौप्य**—यज्ञांतील कर्मांसंबंधीं विशेष मताचा प्रवर्तक व जात शाकायन्याचा समकालीन (क. सं. २२. ७).

**शंख बाभ्रव्य**—राम क्रातुजातेय वैयाघ्रपद्याचा शिष्य (जै. उ. ब्रा. ३. ४१. १; ४. १७. १).

**शंख यामायन**—सूक्तद्रष्टा (ऋ. १० १५.).

**शंखचूड**—रामसेनेंतील एक वानर. रामाचे सांगण्यावरून सुग्रीवाची यावर कृपादृष्टि होती (वा. रा. उ. ४०).

२ विप्रचित्तीचा पौत्र व दंभाचा पुत्र. याची स्त्री तुलसी. पद्मिनी व विरजा हीं नांवेंहि देवीभागवतांत आढळतात. यास एक पुत्रहि होता. यानें तुलसीशीं गांधर्व पद्धतीनें विवाह केला. याने देवादिकांचें राज्य हरण केलें होतें. याचे गळ्यांत विष्णुकवच असे. तुलसी महापतिव्रता होती, म्हणून हा सर्वांस अवध्य होता. पुढें विष्णूनें कपटानें तिचें पातिव्रत्य भंगून एक बल नाहींसें केलें व दुसरें बल ब्राह्मणरूपानें विष्णुकवच मागून घेऊन नाहींसें केलें. नंतर यास शंकरानें विष्णूकडून मिळालेल्या शूलाच्या साहाय्यानें याचा वध केला. युद्धारंभीं चित्ररथ किंवा पुष्पदंत दूत म्हणून पाठविले होते. या युद्धांत शंकराकडून काली व शंखचूडाकडून राक्षसी अशा स्त्रियाहि युद्ध करीत होत्या. हा पूर्वी सुदामन् नामक विष्णूचा पार्षद होता (दे. भा. ९.१८). याच्या हाडांचे शंख बनले, यांनीं शंकराखेरीज इतरांवर घातलेलें उदक पवित्र व तीर्थोदकाप्रमाणें आहे. याचा शब्दहि शुभ असून यावरील व शालिग्रामावरील तुलसीपत्र वि‍द्ध करणें अशुभ आहे (दे. भा. ९. १७-२५; ब्रह्मवै. २.१६-२०; शिव. रुद्र. यु. २७-४०).

३ कुबेराचा एक सेवक. वनांत रामकृष्णांसह क्रीडा करण्यांत दंग असलेल्या गोपींस पळवून नेत असतां कृष्णानें यास ठार केलें व याच्या डोक्यांतील मणि बलरामास दिला (भा. १०.३४.२५).

४ (जीमूतवाहन पहा).

५ पातालांतील एक नाग ((भा. ५.२४.३१).

**शंखण व शंखनाभ**—(खगण पहा).

**शंखपाद (ल)**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र. हा भाद्रपदांत सूर्याबरोवर फिरतो (भा. १२. ११. ३८).

**शंखपिंड**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**शंखमत्**—एक ऋषि. याबद्दल शंखपाद व शंशपा असा पाठ आहे.

**शंखमुख**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**शंखमेखल**—यमसदस्य ब्रह्मर्षि (म. स. ८.२४ कुं.).

**शंखरोमन्**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**शंखलिखित**—हे दोघे भाऊ होते. पण या दोघांच्या नांवावर एक स्मृति उपलब्ध आहे. आनंदाश्रमांत छापलेल्या शंखलिखितस्मृतींत अवघे बत्तीस श्लोक आहेत. त्यांतहि पराधभोजन, अतिथिपूजनाप्रारख्या विषयांचा विचार आहे.

**शंखशिरस्**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र, एक सर्प.

**शंग**—तामस मन्वंतरांतील योगवर्धन.

**शंग शाट्यायनि आत्रेय**—नगरिन् जानश्रुतेयाचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४०. १ ).

**शची**—शची पौलोमीचें एक सूक्त आहे ( ऋ. १०. १५९ ). यांत सवतीचा नाश होण्याबद्दल प्रार्थना आहे. पुलोम्याची कन्या. हिचा पुत्र जयंत ( ब्रह्मांड.३.६. २६.). हिचा सूर्याशीं संवाद झाला आहे ( म. अनु. १४. ५-६ कुं.; २ नहुष पहा ).

**शठ**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ ( सो. वसु. ) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

३ एक राक्षस. चक्रानंतर याचे घरावर मारुतीनें सीता शोधण्याकरितां उडी मारिली (वा. रा. सुं. ६ ).

४ वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार ऋषिगण.

**शंड**—( शंडामर्क पहा ).

२ अज व शंड नांवाचे दोन कपिपुत्र पिशाच होते. यांना दोन मुली होत्या. पैकीं एकीचें नांव जंतुधना व दुसरीचें नांव ब्रह्मधना. जंतुधना यक्षास व ब्रह्मधना ही रक्षसला दिली होती. यांचा वंशविस्तारहि बराच दिला आहे ( ब्रह्मांड ३. ७. ७४-९७ ).

**शंडामर्क**—शंड व मर्क ह्या दोन व्यक्ति आहेत. पण यांचा उल्लेख ‘ शण्डामर्क ’ असा एकत्र येतो. यांचा असुरांचे पुरोहित म्हणून उल्लेख येतो ( तै. सं. ६. ४. १०. १; मै. सं. ४. ६. ३; तै. ब्रा. १. १. १. ५; श. ब्रा. ४. २. १. ४-६ ). या दोन व्यक्तींचा वेगवेगळाहि उल्लेख येतो ( वा. सं. ७. १२-१३; १६-१७ ). शुक्रामंथिग्रह ग्रहण करण्याचा प्रचार शंडामर्कांकरितां पडला ( तै. सं. ६. ४. १० ).

बृहस्पति जसा देवांचा पुरोहित तसे शंड व मर्क हे असुरांचे पुरोहित होते. दोनहि बाजूस हुषार पुरोहित असल्यामुळें कोणीच कोणाचा पराभव करूं शकेना. तेव्हां देवांनीं सोमाची लालूच दाखवून शंडामर्कांना फितविलें व असुरांचा पराजय केला. पुढें देवांचा यज्ञ सुरू होतांच सोमाच्या आशेनें शंडामर्क दाखल झाले. पण देवांना सोम दिला, तरी यांना आपल्यांत दाखल करून घेणें इष्ट नव्हतें, म्हणून देवांनीं यांना सोम न देतां फजित करून हुसकून दिलें ( तै. सं. ६. ४. १०; तै. ब्रा. १. १. १).

शुक्रास गो नांवाची पत्नी होती. तिचे ठिकाणीं त्याला त्वष्ट्रा, वरुत्रि, शंड व मर्क नांवाचे चार पुत्र झाले. यांच्यामुळें असुरांचा जय होतो आहे, असें पाहून देवांनीं यांना हविर्भागाचें आमिष दाखवून आपल्याकडे वळविलें व त्यामुळें देवांचा जय झाला ( वायु. २.३६. ६२-६७; मत्स्य. ४७. ५४; २२९. ३३; ब्रह्मांड. ३. ७२-७३ ). यांनीं प्रह्लादाला योग्य शिक्षण देण्याची जबाबदारी हिरण्यकशिपूकडून आपल्याकडे घेतली होती. पण ती यांना पार पाडतां आली नाहीं ( भा. ७. ५. १ ).

**शंडिल**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

२ एक व्यास ( व्यास पहा ).

**शतकिलाक**—जैगीषव्याचा पिता.

**शतगाभि**—जटायूच्या पुत्रांतील एक ( पद्म. सृ. ६ ).

**शतगुण**—कश्यप व क्रोधा यांचा पुत्र.

**शतग्रीव**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**शतचंद्र**—एक क्षत्रिय. सुबल गांधाराचा हा पुत्र. हा भीमसेनाकडून मारला गेला ( म. द्रो. १५८. २३ कुं. ).

**शतजित्**—( स्वा. प्रिय.) विरज व विषूची यांचा पुत्र.

२ आश्विनमासांतील सूर्याबरोबर फिरणारा यक्ष.

३ ( सो. सह. ) सहस्रजिताचा पुत्र. यास महाहय, वेणुहय आणि हैहय असे तीन पुत्र होते.

४ कृष्ण व जांबवती यांचा पुत्र.

**शतज्योति**—सुभ्राजाचा पुत्र ( म. आ. १. ५७ कुं.).

**शततारका**—सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक.

**शतति**—( स्वा. नाभि.) विष्णुमतें रजाचा पुत्र. याच्या शंभर पुत्रांमध्यें विश्वज्योति हा प्रमुख होता.

**शततेजस्**—( व्यास पहा ).

**शतदंष्ट्र**—कश्यप व खशा यांचा पुत्र.

**शतदुंदुभि**—जंभाचा पुत्र ( ९ जंभ पहा ).

**शतद्युम्न**—याला मत्स्यानें यज्ञेषुबरोबर भरभराटीस आणिलें ( तै. ब्रा. १. ५. २. १ ).

२ ( सू. निमि. ) हा विष्णु व भागवत यांच्या मतें भानुमताचा पुत्र होय. वायुमतें हा प्रद्युम्न होय. हा एक राजर्षि असून यानें मुद्गल ऋषीला आपलें सोन्याचें घर दिल्यामुळें याला उत्तम लोकांची प्राप्ति झाली ( म. शां. २४०. ३२; अनु. २००. २१ कुं. ).

३ चाक्षुष मनूचा पुत्र.

**शतद्युति**— सवर्णा व ही एकच होय.

**शतधनु**—(१ शतधन्वन् पहा).

२ ( मौर्य. भविष्य. ) ब्रह्मांडमतें देववर्मन्चा पुत्र. यास विष्णु, भागवत व मत्स्य यांच्या मतें सोमशर्मन्‌पुत्र, शतधन्वन् व वायुमतें शतधर म्हणत.

**शतधन्वन्**—(सो. क्रोष्टु.) हृदीकाचा पुत्र. हा कृतवर्मन् इत्यादिकांचा भ्राता होय. यास भागवत व विष्णु यांच्या मतें शतधनु म्हणत. कलिङ्ग देशाच्या राजकन्येच्या स्वयंवरार्थ हा गेला होता ( म. शां. ४. ७ कुं. ). अक्रूरादिकांच्या सांगण्यावरून सत्राजिताचा वध करून हा मणि घेऊन पळाला ( भा. १० ५७. ५-२० ). मिथिलेजवळ याची विज्ञातहृदया या नांवाची चलाख घोडी मेली. तेव्हां कृष्णानें याला गांठून ठार केलें ( ह. वं. १. ३९; सत्राजित् पहा. ).

२ हंसध्वजाचा प्रधान. सुमतीचा हा एक पुत्र होय.

३ ( २ शतधनु पहा ).

**शतपर्वन्**—शुक्राचार्याची स्त्री ( म. उ. ११७. १३ कुं. ).

**शतबल**—रामसेनेंतील वानराधिपति (वा. रा. कि. ४३).

**शतबलाक**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें शाकवैण रथीतराचा शिष्य.

**शतबलाक्ष मौद्गल्य**—याच्या मृत्यु शब्दाच्या निरुक्तीचा निर्देश आला आहे ( नि. ११. ६ ).

**शतबाहु**—हिरण्यकशिपूचा अनुयायी असुर.

**शतभेदन वैरूप**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ११३ ).

**शतमाय**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**शतमुख**—एक असुर ( म. अनु. १४. ८६ कुं. ). याला रुद्रापासून वरप्राप्ति झाली ( म. अनु. ४५. ६८ कुं. ).

**शतमुखी रावण**—( पौंड्रक पहा ).

**शतयातु**—वसिष्ठाचा पुत्र असावा (ऋ. ७. १८. २१-२२.).

**शतयूप**—हा केकय देशाचा राजा. हा हिमालयावर असतांना धृतराष्ट्र गांधारीसह तेथें आला ( म. आश्र. १९ ).

**शतरथ**—( सू. इ. ) मूलक राजाचा नातू व दशरथाचा पुत्र. वायुमतें याला मूलकाचा पुत्र म्हटलें आहे. त्यास इलविल किंवा इडविड असें म्हणत असत. त्याच्या ह्या नांवावरून त्याच्या पुत्रास ऐलविल किंवा ऐडविड असें म्हटलेलें आहे ( म. द्रो. ६१ ).

**शतरूप**—सुतार नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**शतरूपा**—ही स्वायंभुव मनूची स्त्री होय. ही ब्रह्मदेवाच्या वामांगापासून झाली होती. हिला सरस्वती असेंहि म्हटलेलें आहे ( भा. ३. १२. ५२ ). हिच्यापासून मरीच्यादि सात पुत्र व त्यांच्यापासून वामदेव व सनत्कुमार आले (मत्स्य. ४. २४-३० ).

**शतर्चिन्**—ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळांतील कांहीं सूक्तांचे कर्ते ( ऐ. आ. २. २. १. ). वास्तविक हें संघाचें नांव आहे (आश्व. गृ. ३३). हा संघ सोळा ऋषींचा आहे ( आर्षानुक्रमणी १. ५ ).

२ ( हेमकान्त पहा ).

**शतशीर्षा**—वासुकि नागाची स्त्री.

**शतहय**—तामस मनूचा पुत्र.

**शतह्रदा**—जवपत्नी व विराधमाता.

**शतशाद**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**शताजित्**—( सो. क्रोष्टु. ) भजमानाला बाह्यकेपासून झालेला पुत्र.

**शतानंद**—गौतम व ब्रह्ममानसकन्या दिवोदासभगिनी अहल्या यांचा पुत्र. हा जनकाचा पुरोहित होता. रामाच्या लग्नांतहि हा त्याचें पौरोहित्य करावयास होता. याचा पुत्र सत्यधृति ( वा. रा. बा. ५१; मत्स्य. ५० भा. ९. २१. ३४ ).

२ सावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**शतानीक**—मत्स्यराज विराटाचा धाकटा भाऊ ( म. वि. ३३. १९ कुं. ). याला भीष्मानें ठार केलें ( म. भी. ११८ २७ कुं. ). तथापि याला द्रोणानें मारल्याचा उल्लेख आहे ( म. द्रो. २१. २८ कुं. ). पुनः शल्यानें याशीं युद्ध केल्याचा निर्देश आहे ( म. द्रो. १६८. २९ कुं. ). श्रुतानीक व शतानीक वगैरेसारख्या नांवांचा घोटाळा झाल्यामुळें एका व्यक्तीला तीन ठिकाणीं मृत्यु आल्याचा चमत्कारिक निर्देश येत असावा.

२ एक प्राचीन कौरवराजा. यानेंच दानानें मोक्ष मिळविला असावा ( पद्म. उ. ७४ ).

३ ( सो. कुरु. ) भागवत व विष्णु यांच्या मतें नकुलपुत्र. मत्स्यमतें सहदेवपुत्र ( म. आ. २४७. ८० कुं. ). भारतीय युद्धांत अठराव्या दिवशीं रात्रीं छाप्यांत अश्वत्थाम्यानें वध केला ( म. सौ. ८. ६४ कुं. ). याचे घोडे शालपुष्पाप्रमाणें तांबूसपिवळे व बालरवीच्या तेजाचे होते ( म. द्रो. २३ ).

४ ( सो. कुरु. ) शेवटल्या पारीक्षित जनमेजयाचा पुत्र ( म. आ. ६३. ८७ कुं. ). याच्या आईचें नांव वपुष्टमा व बायकोचें नांव वैदेही ( म. आ. ६१. ८४ कुं. ). हा याज्ञवल्क्यापासून वेद, कृपापासून अस्त्रविद्या व शौनकापासून तत्त्वज्ञान शिकला (विष्णु. ४. २१. २; भा. ९. २२. ३९). याच्याकडे ऋषि आले असतां यास व्यासाज्ञेनें सुमन्तुकरवीं भविष्यपुराण ऐकावयास मिळालें ( भवि. ब्राह्म. १ ).

५ ( सो. कुरु. भाविष्य. ) भागवतमतें सुदासाचा, विष्णुमतें वसुदानाचा व मत्स्यमतें वसुदामनूचा पुत्र होय.

६ ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

**शतानीक सात्राजित**—हा सत्राजिताचा मुलगा असावा. यास वाजरत्नाचा मुलगा सोमशुष्म यानें ऐन्द्र महाभिषेक केला (ऐ. ब्रा. ८.२१). यानें काशीचा राजा धृतराष्ट्र याचा घोडा पळविला होता (श. ब्रा. १३.५.४.१८-२३). 'दाक्षायणानें शतानीकाला बांधलें त्याप्रमाणें आम्ही तुला सुवर्णानें बांधतों' असें आढळतें (अ. वे. १. ३५.१). पण याचा अर्थ स्पष्ट समजत नाहीं.

**शतायु**—(सो. पुरूरवस्.) हा विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें पुरूरवस्-पुत्र होय. भागवतमतें यास सत्यायु म्हणतात.

**शत्रि**—हा अग्निवेशाचा पुत्र असून संवरण प्राजापत्यानें याचा औदार्याबद्दल स्तुति केली आहे (ऋ. ५.३४.९).

**शत्रुघातिन्**—(सू. इ.) शत्रुघ्नास श्रुतकीर्तिपासून झालेल्या दोन पुत्रांतील ज्येष्ठ (वा. रा. उ. १०८. ११). यास यूपकेतु असें म्हणत. भागवतांत याला श्रुतसेन म्हटलें आहे (भा. ९.११.१३). हा वैदिश नामक नगरींत राहत असे. कंबुकंठ राजाच्या मुली मदनसुंदरी व शिवकान्ति स्वयंवरांत यूपकेतूला मिळाल्या होत्या (आ. रा. विवाह. ८). मालतीहि याची एक पत्नी होती (आ. रा. विवाह. ७).

**शत्रुघ्न**—(सू. इ.) दशरथ व सुमित्रा यांचा मुलगा. हा भरताबरोबर भरताच्या आजोळीं असतांनाच यौवराज्याभिषेकाच्या मुहूर्तावर रामाला वनवासाला जावें लागलें. हा अयोध्येस परत आल्यावर सर्व अनर्थांचें मूळ मन्थरा आहे, असें यास समजलें. तेव्हां क्रोधानें संतप्त होऊन यानें मन्थरेला फरफरा ओढलें व हा तिला ठार करणार तों भरत मध्यें पडला. रामाला वनवासाला पाठवितांना लक्ष्मण पित्याच्या विरुद्ध न जातां स्वस्थ बसला, म्हणून यानें लक्ष्मणाला दोष दिला; व बायकोच्या नादीं लागून मुलाला वनवासास पाठविणाऱ्या बापालाहि यानें दोष देण्यास कमी केलें नाहीं (वा. रा. अयो. ७८.२-४).

यानें लवणाचें पारिपत्य केलें. अयोध्येहून निघाल्यानंतर चवथ्या रात्रीं शत्रुघ्न उजाडतांच मधुपुराच्या रोखानें निघाला. त्याच वेळीं लवणासुर आपला शूल घरींच ठेवून भक्ष्य आणण्याकरितां बाहेर पडला होता. शत्रुघ्न आला तो मधुपुराचें द्वार रोंखून बसला. मग दोघांचेंहि युद्ध होऊन शत्रुघ्नानें लवणासुराला ठार मारिलें.

नंतर शत्रुघ्नानें मधुवनांतील मधुपुरी किंवा मधुरा हीच आपली राजधानी करून तिचें नांव मथुरा असें ठेविलें (ब्रह्मांड. ३. ६३. १८६; वायु. २.-२६. १८४) व मधुवनाचें नांव शूरसेन असें ठेविलें. (वा. रा. उ. ६२-७२; भा. ९. ११. १४). नंतर बारा वर्षें तेथें राहून सर्व व्यवस्था लाविली व हा बारा वर्षांनीं रामाच्या भेटीस आला. पण, रामानें याला शूरसेन देशाचें राज्य देऊन पुनः तिकडेच पाठविलें. परत जातांना वाल्मीकीच्या आश्रमांत याला कुशलवांच्या तोंडून रामायण ऐकावयास मिळालें होतें.

रामानें अश्वमेध केला, त्या वेळीं अश्वाच्या संरक्षणार्थ शत्रुघ्न बरोबर गेला होता. घोडा पाताळांत गेला असतां हाहि पाताळांत गेला. तेथें यानें योगिनीपासून शक्ति मिळविली (पद्म. पा. ३८).

शत्रुघ्नाबरोबर अश्वाच्या संरक्षणार्थ खालील वीर निघाले होते. प्रतापाग्र्य, नीलरत्न, लक्ष्मीनिधि, रिपुताप, उग्रहय, शस्त्रवित्, महावीर, रथाग्रणी व दंडभृत् (पद्म. पा. ११).

अश्वमेधाच्या घोड्याबरोबर हा खालील देशांत फिरला:—पांचाल, कुरु, उत्तरकुरु, दशार्ण, श्रीविशाल, अहिच्छत्रनगर, पयोष्णी, रत्नातटनगर, नीलपर्वत, चक्रांकनगर, (पूर्व दिशेस) तेजःपूर, नर्मदातीर, (नर्मदेंतून) पाताळांत, विन्ध्यपर्वतावरील देवपूरनगर, हेमकूटपर्वत (भारतवर्षाच्या पलीकडे), या पर्वतावर घोडा दगडासारखा झाला, अंग, वंग, कलिंग, कुंडलनगर, गंगातीर अथवा वाल्मीकि—आश्रम (पद्म. पा. १-६८). शंकर व शत्रुघ्न यांचें युद्ध अश्वाचें संरक्षण करीत असतांच झालें (पद्म. पा. ४३).

पुढें रामानें आपले दिवस संपत आले, असें समजून कुशलवांना गादीवर बसविलें व शत्रुघ्नाला बोलावून घेतलें. शत्रुघ्नहि प्रसंग जाणून आपल्या मुलांपैकीं सुबाहूला मथुरेंत व शत्रुघातीला वैदिश नगरांत राज्याभिषेक करून अयोध्येस आला. नंतर अयोध्येच्या पश्चिमभागीं सरयूतीरावर गोप्रतार तीर्थी रामाबरोबर यानें देह ठेविला (वा.रा.उ.१०९).

२ लंकेंतील रावणपक्षीय राक्षस (वा. रा. यु. ४३).

३ श्वफल्क यादवाच्या तेरा पुत्रांतील एक.

४ अक्रूर यादवाच्या पुत्रांतील एक.

५ (१ सांब पहा).

**शत्रुजित्**—(सो. विदू.) शोणाश्वाचा पुत्र होय.

२ (सू. इ.) मत्स्यमतें मांधात्याचा पुत्र होय. भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें हा अंबरीष होय.

३ (सू. इ.) ध्रुवसंधि व लीलावती यांचा पुत्र.

४ प्रतर्दन राजाचें नामान्तर

५ कुवलयाश्वाचें नामान्तर (भा. ९.१७.६).

**शत्रुंजय**—(सो. कुरु.) धृतराष्ट्रपुत्र. हा भीमाकडून मारिला गेला (म. द्रो. १३७.३० कुं.).

२ कर्णपुत्र. याम अर्जुनानें मारिलें (म. द्रो. ३२. ६१ कुं.).

३ अश्वत्थाम्याच्या हातून मरण पावलेला द्रुपदपुत्रांतील एक (म. द्रो. १५७.१८१-१८२ कुं.).

४ अभिमन्यूनें मारिलेला एक कौरवपक्षीय राजपुत्र ( म. द्रो. ४८. १५ कुं. ).

५ एक क्षत्रिय. जयद्रथाचा भ्राता ( म व. २६६. ११ कुं. ).

**शत्रुंतप**—कर्णाचा भ्राता. अर्जुनानें उत्तरगोग्रहणाच्या वेळीं ह्याला मारिलें ( म. वि. ५८. १८ कुं.).

**शत्रुमर्दन**—ऋतुध्वज व मदालसा यांचा तिसरा पुत्र ( मार्कं. २३.२६ ).

**शत्रुसह**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. हा भीमाकडून मारिला गेला ( म. द्रो. १३७. ३० कुं. ).

**शत्रुसूदन**—सुद्याचा पुत्र.

**शधीय**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें हिरण्यनाभाचा शिष्य ( व्यास पहा ).

**शनि**—सूर्याला छायेपासून सावर्णि व शनि असे दोन मुलगे झाले ( विष्णुधर्म. १. १०६ ). हा सूर्यपुत्र असून सतीविरहानें शंकराच्या नेत्रांतून पडलेल्या अश्रूंनीं काळा झाला ( कालि. १८). हा लोकांना त्रास देऊं लागला म्हणून शंकरानें याला मेषादि राशि नेमून दिल्या व पूजा करणाऱ्यांस सुख देण्यास सांगितलें ( स्कंद. ५. २. ५० ). हा सूर्याच्या आज्ञेनें ग्रह झाला ( मार्कं. १०५.२५ ). अश्वत्थ व पिप्पल हे अगस्त्यास त्रास देऊं लागले म्हणून शनीनें त्यांना मारिलें ( ब्रह्म. ११८ ).

दशरथ राजाचे वेळीं रोहिणीशकटाचा भेद करून शनि पुढें जाणार, असें ज्योतिष्यांनीं भविष्य वर्तविलें. वसिष्ठानें सांगितलें कीं, रोहिणीनक्षत्राची प्रजापति देवता आहे. प्रजापतीला शनीची पीडा झाल्यास लोकक्षय झाल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां रोहिणीशकटभेद होऊं नये म्हणून दशरथानें ग्रहमंडलावर स्वारी केली. तेव्हां शनीनें राजास आश्वासन दिलें. दशरथानें शनीची स्तुति केली. तेव्हां शनीनें मला प्रिय वस्तूंचें दान करणारांचे रक्षणाविषयीं आश्वासन दिलें ( पद्म. उ. ३३ )

**शंतनु**—( शांतनु पहा ).

**शबर**—कीकट देशांतील अन्त्यज. ह्याला यमदूत त्रास देत असतां शालीग्राम शिलेवरील तुळसीपत्रांनीं व तीर्थानें ह्याची सुटका झाली ( पद्म. पा. २० ). हा शिवभक्त असून चिताभस्म शंकराला वाहण्याचा याचा नेम असे. चिताभस्माकरितां हा आपलें शरीर जाळून घेऊं लागला असतां याच्या बायकोनें आपणांस जाळून घेतलें ( स्कंद. ३. ३. १७ ).

२ अमिताभ देवांतील एक.

**शबर काक्षीवत**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १६९ ).

**शबरी**—एक भिल्लीण. पंपासरोवराच्या पश्चिमतीरीं राहणाऱ्या मातंग ऋषींची व त्याच्या शिष्यांची परिचारिका. हिनें रामलक्ष्मणांचें उत्तम आतिथ्य केलें. नंतर रामानें तें वन पाहण्याची इच्छा दर्शविल्यावरून मातंग मुनींची समंत्रक यज्ञाची जागा, प्रत्यक्स्थली नामक वेदी, सप्तसागर नांवाचें तीर्थ वगैरे प्रसिद्ध ठिकाणें हिनें रामाला दाखविलीं. हें सर्व आटपल्यानंतर हिनें अग्नि प्रदीप्त केला व नंतर रामाची अनुज्ञा घेऊन अग्नीमध्यें आपलें हवन केलें. त्यायोगें ही स्वर्गाला गेली ( वा. रा. अर. ७४ ).

**शबल**—दक्षाचा पुत्र.

२ कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

३ सरमेचा पुत्र व यमाचा अनुचर (ब्रह्मांड ३.७.३१२).

**शबलाश्व**—(सू. दिष्ट. ) अविक्षिताचा पुत्र ( म. आ. १०१.४० कुं. ).

**शम**—धर्मप्रजापतीचा पुत्र. याच्या भार्येचें नांव प्राप्ति.

२ (सो. मगध. भविष्य.) धर्मसूत्र राजाचा पुत्र. याच्या पुत्राचें नांव द्युमत्सेन होय. विष्णु व ब्रह्मांड यांच्या मतें यास सुश्रम व वायुमतें सुव्रत म्हणतात.

३ अहर्नामक वसूचा पुत्र.

४ आयूचा पुत्र.

५ सुखदेवांपैकीं एक.

६ नंदिवेग नांवाचे लोक किंवा वंश होता. त्यांत एक शम नांवाचा पुरुष होऊन गेला. तो दुर्वर्तनी व कुलांगार असल्या मुळें नंदिवेगांचा नाश झाला ( म. उ. ७३.११; १६ कुं. ).

**शमठ**—गयशीर पर्वतावर ब्रह्मसर नामक सरोवराच्या समीप राहणारा ऋषि. यानें पांडवांना गयाची कथा सांगितली.

**शमन**—सावर्णि मनूचा पुत्र.

**शमि**—( सो. उशी. ) भागवतमतें उशीनरपुत्र.

**शमिन्**—( सो. विदू. ) मत्स्यमतें शोणाश्वाचा पुत्र.

२ ( सो. क्रोष्टु. ) हा वायु व विष्णु यांच्या मतें शूरपुत्र. याच्या आईचें नांव गारिषा. विष्णु, मत्स्य व भागवत यांच्या मतें हा सत्यप्रिय होता. याची पत्नी सुदामिनी. ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रांतील यज्ञास हा होता ( पद्म. सृ. ३४ ).

**शमीक**—अंगिरसकुलांतील ऋषि. याची स्त्री गौ व पुत्र शृंगी. एकदां मृगया करून दमलेला परीक्षित् याच्या आश्रमांत आला. हा ध्यानस्थ असल्यामुळें कांहीं बोलला नाहीं. पण गोठ्यांत मौनव्रतानें फेस पीत असल्यामुळें बोलला नाहीं असें भारतांत आहे. यानें हें सोंग केलें आहे, असें वाटून त्यानें एक मृत सर्प याच्या गळ्यांत टाकिला. ही गोष्ट कृशसामक याच्या शिष्यानें शृंगीस कळविली. शृंगीनें हकीगत ऐकून परीक्षितास तक्षक सात दिवसांत यमसदनीं पाठवील असा शाप दिला. याची समाधि उतरल्यावर शृंगीस पुष्कळ सांगून

पाहिलें, पण तो ऐकेना. तेव्हां यानें गौरमुखाकरवीं राजास हें वर्तमान कळविलें ( म. आ. ४०–४२ कुं.; भा. १.१८ ). भारतीययुद्धांत सुप्रतीक हत्तीच्या गळ्यांतील घंटेखालीं गरुडवंशी पिंगाक्ष, विबोध, सुपुत्र व सुमुख हे पक्षी सांपडले; पण त्यामुळें त्या धुमश्चक्रींतून ते बांचले. यानें ते घरीं आणून त्यांची हकीकत ऐकून त्यांस सोडून दिलें ( मार्क. २. ४४–३.८६ ).

**शंपाक**—हस्तिनापुरांत राहणारा एक विरक्त व ज्ञानी ब्राह्मण. याच्यावर भीष्माची मोठी भक्ति असे. याला शम्याक असेंहि म्हणत ( म. शां. १७६ ). यानें शंपाकगीता सांगितली ( शम्याक पहा ).

**शंबर**—इंद्राचा शत्रु ( ऋ. १. ५१. ६; ५४. ४ ). याचे बरोबर शुष्ण, पिप्रु व वर्चिन् यांचीं नांवें आलीं आहेत. याला कौलितर म्हणजे कुलितराचा मुलगा ( ऋ. ४. ३०. १४ ) व दास असें म्हटलें आहे ( ऋ. ६. २६.५ ). याचे डोंगराळ मुलखांत नव्वद (ऋ. १. १३०. ७ ), नव्याण्णव (ऋ. २. १९. ६) किंवा शंभर ( ऋ. २. १४. ६ ). नगरें किंवा किल्ले होते. इंद्रानें याचीं नव्याण्णव नगरें मोडून शंभरावें राहण्यायोग्य केलें ( ऋ. ४. २६. ३ ). शंबर हा शब्द शंबराणि असाहि आला असून त्याचा अर्थ मेघ असा सायणांनीं केला आहे ( ऋ. २. २४. २ ). याचा मुख्य शत्रु दिवोदास अतिथिग्व होय. दिवोदास अतिथिग्वानें इंद्राच्या मदतीनें याचा पराभव केला व याला ठार केलें ( ऋ. १. १३०. ७ ). अश्वींनीहि दिवोदासाला याच्या करितां मदत केली होती ( ऋ. १. ११२. १४ ). हें आधिभौतिक घटनेचें वर्णन असून पुढें याला आसुरी रूप देण्यांत आलें असावें. याचा ऋग्वेदांत तीन, आठ व दहा या मंडलांखेरीज सर्वत्र उल्लेख आहे.

एक वृत्रानुयायी असुर ( भा. ६.१०.१९ ). यानें इंद्रास ब्राह्मणमाहात्म्य पटविलें ( म. अनु. ३६ ). यास इंद्रानें ठार केलें ( म. सौ. ११ ). धर्मानें याच्या मताचा आपल्या समर्थनार्थ उपयोग केला ( म. उ. ७१.३० कुं. ). यावरून हा राजनीतिज्ञ व ग्रंथकार असावा. ब्रह्मात्मभाव समजविण्याकरितां याची कथा आली आहे (यो. वा. ४.२५ ).

२ ( तिमिध्वज पहा ).

३ कश्यप दनु यांचा पुत्र. याची स्त्री मायावती. यानें आपला शत्रु प्रद्युम्न यास सात दिवसांचा असतांच चोरून नेलें व मायावतीच्या स्वाधीन केलें. पण पुढें मायावतीच्या शिक्षणामुळें समर्थ होऊन त्यानें यास पुत्र, अमात्य व सेनापतीसह ठार मारिलें. मायावती अपुत्रा होती. आणि यास शंभर पुत्र होते. यावरून त्यास आणखीहि स्त्रिया असाव्यात ( प्रद्युम्न व मायावती पहा ).

४ शालिग्रामतीर्थानें मुक्त झालेला कीकटांतील वाटमाऱ्या अंत्यज ( पद्म. पा. २० ).

**शंबसादन**—केसरी वानरानें मारिलेला एक असुर.

**शंबुक** किंवा **शंबूक**—एक शूद्र. यानें त्रैवर्णिकांची सेवा करण्याचा आपला धर्म सोडून तपश्चर्येला सुरुवात केली. समाजांत ज्याचें कर्तव्य त्यानें न केल्यामुळें एका ब्राह्मणाच्या मुलाला अकालीं सोळा वर्षांचा असतांच मृत्यु आला. त्या मुलाच्या बापानें या दोषाचे जबाबदार रामाला धरून रामाच्या दरबारांत मुलाचें प्रेत आणून टाकिलें व रामाला दोष दिला. रामानें दोष स्वीकारिला. पण, आपलें काय चुकतें हें त्यास समजेना. तेव्हां आकाशवाणीनें ह्या शूद्रमुनीच्या तपश्चर्येची हकीगत रामास सांगितली. तें ऐकून राम विमानांत बसून जनस्थानांत गेला व तेथें तप करणाऱ्या ह्या शूद्रमुनीचा त्यानें वध करून ब्राह्मणपुत्रास जिवंत केलें. यालाच जंबुक म्हटलें आहे. ( म. शां. १५२. ६७. कुं.; वा. रा. उ. ७६ ). हा शब्द रामायणांत शंबुक असा असून महाभारतांत शंबूक असा आहे. अशीच एक कथा मांधात्यासंबंधीं आली आहे. पण मांधात्यानें याचा वध करण्याचें नाकारिलें व स्वतःच्या तपानें दुष्काळ नाहींसा केला ( मांधातृ पहा ).

बुद्धधर्मामुळें सर्वच लोक उद्योग सोडून संन्यासमार्ग स्वीकारण्यास लागल्यामुळें समाजांतील ज्ञात्या लोकांनीं तपश्चर्येसारख्या अनुत्पादक व्यवहारांत राष्ट्राचें सर्वच सामर्थ्य खर्च पडूं नये, म्हणून अशा कथा निर्माण केल्या. पण ही जाणीव नष्ट झाल्यावर भक्तिमार्ग उत्पन्न होण्याच्या काळांत पद्मपुराणांतील मांधात्याची कथा जुळविली गेली.

२ सहिष्णु नामक शिवावताराचा शिष्य.

३ कश्यप व दिति यांचा पुत्र.

**शंभु**—कश्यप व सुरभि यांचा पुत्र.

२ सत्य देवांतील एक.

३ सुख देवांपैकीं एक.

४ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील इंद्र.

५ ( सू. नभग. ) भागवतमतें अंबरिषाचा कनिष्ठ पुत्र.

६ एक राक्षस ( वेदवती पहा ).

७ शुक्राचार्य व पीवरी यांचा पुत्र.

८ तप नामक अग्नीचा पुत्र ( म. व. २२३.५ कुं. ).

९ पुराणावरून शलाका प्रश्न सांगणारा एक ब्राह्मण ( पद्म. पा. १०४ ).

१० संह्रादाचा पुत्र. याचे पुत्र राजाज व गोम ( ब्रह्मांड ३.५.४० ).

११ यानें रामास श्राद्धविधि, भस्ममाहात्म्य व शिवपूजाविधि हीं सांगितलीं ( पद्म. पा. १०६ ).

**शरम्बठा**—सुबल राजाची कन्या. गांधारीची बहीण व धृतराष्ट्राची पत्नी ( म. आ. ११९. २४ कुं. ).

**शंमद्**—हा अंगिरस्‌गोत्रांतील असून यानें सामानें स्वर्ग मिळविला ( पं. ब्रा. १५.५.१०-११ ).

**शम्याक**—शंपाकाबद्दल कुंभकोणप्रतींतील पाठभेद.

**शम्यु बार्हस्पत्य**-एक आचार्य (श.ब्रा. १.९.१.२५)

**शयु**—याला अश्विनींनीं वांझ गाय दुभती करून दिली ( ऋ. १. ११२. १६; ११६. २२ ).

**शय्याति**—( शर्यात पहा ).

**शर शौचत्क**—एक ऋषि. याला अश्विनींनीं खोल विहिरींतून पाणी काढून दिलें ( ऋ. १. ११६. २२ ).

**शर शौरदेव्य**—एक राजा असावा. याच्या दानाची स्तुति आली आहे ( ऋ. ८. ७०. १३-१५ ).

**शरगुल्म**—रामसेनेंतील एक वानर (वा. रा. कि. ४१).

**शरण**—सर्पसत्रांत दग्ध झालेला वासुकिकुलांतील सर्प ( म. आ. ५७.६ कुं. ).

**शरद्वत्**—( सो. नील. ) गौतम व अहिल्या यांचा पुत्र सत्यधृति, त्याचा हा पुत्र. याचे पुत्र कृप व कृपी होत.

२ सावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ अंगिराचा पुत्र, मंत्रकार व गोत्रकार.

४ वैवस्वत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

५ (सो. द्रुह्यु.) मत्स्यमतें सेतूचा पुत्र ( अंगार पहा ).

**शरद्वसु**—शूलिन् नामक शिवावताराचा शिष्य.

**शरभ**—इंद्रानें शरभाला धन दिल्याचें नेमानें वर्णिलें आहे ( ऋ. ८. १००. ६ ).

२ नृसिंहावतार जगाचा नाश करण्यास प्रवृत्त झाला. तेव्हां शंकराची क्रोधमूर्ति वीरभद्र यानें शरभाचा अवतार घेतला व नृसिंहाचा पराजय केला; व नृसिंहाचें कातडें काढून तें अंगावर पांघरण्यास घेतलें. तेव्हांपासून शंकराला 'नृसिंहकृत्तिवसन' असें म्हणूं लागले ( शिव. शत. १२ ).

३ यमाच्या सभेंतील एक राजर्षि ( म. स. ८. १४ कुं. ).

४ यमाच्या पांच पुत्रांपैकीं एक.

५ साल्वेय पर्वतावरील रामपक्षीय वानर ( वा. रा. यु. २६. ३० ).

६ शकुनीच्या भ्रात्यांपैकीं एक. यास भीमानें रात्रियुद्धांत ठार केलें ( म. द्रो. १५८. २३ कुं. ).

७ शिशुपालाचा पुत्र. हा शुक्तिसा नगरींत राज्य करीत होता. यानें अर्जुनाचा अश्वमेधीय अश्व अडवून युद्ध केलें. पण पुढें करभार अर्पण करून यानें पूजा केली (म.आश्व.८४.३ कुं.).

८ जनमेजयसत्रांत दग्ध झालेला ऐरावत कुलांतील सर्प ( म. आ. ५७. ११ कुं. ).

९ एक वानर. व्याघ्राचा पुत्र. याचा पुत्र शुक ( ब्रह्मांड ३. ७. २०८ ).

१० याला निगमोद्बोधकतीर्थांत स्नान केल्यानें शिवकर्मन् नांवाचा मुलगा झाला ( पद्म. उ. २०१; २०४-२०५; ४ विकट पहा ).

**शरभंग**—गौतमकुलोत्पन्न एक ब्रह्मर्षि ( म. व. २७८. ४७ कुं. ). हा दंडकारण्यांत राहून तप करीत असे. विराधानें सांगितल्यावरून राम याच्या आश्रमांत गेला. तेव्हां तेथें स्वर्गावरून इंद्र आला होता. तो परत जातांना रामादि तिघांच्या नजरेस पडला. व रामानें इंद्राच्या आकाशगामी रथाची व अश्वाची कल्पना लक्ष्मण व सीता यांना दि[illegible]. नंतर शरभंगाकडे सर्व गेले. त्यांना विचारतां तपानें संपादन केलेल्या ब्रह्मलोकीं मला न्यावें म्हणून इंद्र आला होता; पण तुझ्या सारख्याचें आतिथ्य केल्याशिवाय जाऊं नये, असें ठरवून मी येथें राहिलों आहें. इतकें बोलून शरभंग मुनीनें तपानें संपादन केलेले स्वर्गलोक व ब्रह्मलोक रामाला स्वीकारण्याविषयीं आग्रह केला. पण रामानें स्वतःच तपानें ते लोक संपादन करण्याचें ठरविलें असल्यानें सांगितलें व शरभंगाला तसें तप करण्यास योग्य अशी जागा दाखविण्याबद्दल फक्त विनंति केली. तेव्हां गंगेच्या उलट दिशेनें सुतीक्ष्णाच्या आश्रमांत जाण्याविषयीं यानें रामाला सांगितलें. नंतर रामासमक्ष शरभंगानें आपला देह अग्नींत समर्पण केला ( वा. रा. अर. ५ ). याचा आश्रम दण्डकारण्यांत गोदावरीच्या तीरीं होता (म. व. २७८. ४६ कुं.). परंतु रामायणांत मात्र मंदाकिनी असा नदीचा उल्लेख आहे. हा शब्द गोदावरीला उद्देशून असण्याचा जास्त संभव आहे.

**शरयु**—वीर नामक अग्नीची स्त्री.

**शरारि**—मारुतीबरोबर सीताशोधार्थ निघालेले वानर ( वा. रा. कि. ४१ ).

**शरासन**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. हा भीमसेनाकडून मारिला गेला ( म. द्रो. १३६.२० कुं. ).

**शरूथ**—( सा. तुर्वसु. ) वायुमतें दुष्कृतपुत्र. सरूथ्य असें यास ब्रह्मांडांत नांव आहे.

**शर्कर**—( १ शिशुमार पहा ).

**शर्मिष्ठा**— ही वृषपर्वा नामक दैत्यांच्या राजाची कन्या. ही ययातीची धाकटी बायको असून त्याची अत्यंत आवडती होती ( देवयानी व ययाति पहा ).

हिचा व देवयानीचा कलह होऊन हिनें देवयानीस कूपांत ढकलिलें होतें. पण पुढें ज्ञातीच्या कल्याणास्तव हिनें तिचें दास्य पत्करलें ( म. आ. ७८-८०; भा. ९. १८; मत्स्य.

२७-२९ ). हिच्या मुलांचीं नांवें अनु, द्रुह्यु व पूरु. पण पूरु हा एकटाच पुत्र, रामायण व वायुपुराण यांत दिला आहे. वा. रा. उ. ५८. ५९; वायु. २. ७ ).

**शर्यात**—अश्विनींनीं युद्धांत याला मदत केली होती ( ऋ. १. ११२. १७). पुराणांतील मनुपुत्र शर्यातीची गोष्ट वेदांत बहुतेक तशीच सांपडते ( श. ब्रा. ४. १. ५. २ ). शतपथांत व इतरत्र याला मानव हें पैतृक नांव लावलेलें आढळतें ( जै. उ. ब्रा. ४. ५. १; ८. ३. ५ ). शतपथांत हा आपल्या गांवासह हिंडत असे, असें आहे.

शार्याताच्या घरीं सोम पिऊन इंद्र अत्यंत प्रसन्न झाला होता ( ऋ. १.५१.१२; ३.५१.७ ). यासंबंधीं सांख्यायनाच्या ग्रंथांत स्पष्टीकरण असल्याचें सायणानें लिहिलें आहे. त्यांत च्यवनाशींहि संबंध दाखविला आहे. शार्यात मानव हा एका सूक्ताचा द्रष्टा आहे ( ऋ. १०. ९२ ). शतपथब्राह्मणांत शर्यात असा पाठ आहे. पण मुलीला शार्याती सुकन्या म्हटलें आहे.

भृगु ऋषीचा पुत्र च्यवन महर्षि यानें याला राज्याभिषेक केला. त्यामुळें साम्राज्य प्राप्त करून यानें अश्वमेध केला आणि देवांच्या यज्ञांत सुद्धां गृहपतीचा मान मिळविला ( ऐ. ब्रा. ८.२१ ). याला पुराणांत शर्याति म्हटलें आहे.

वैवस्वत मनूचा पुत्र. याची स्त्री स्थविष्ठा. हा शूर असून वेदवेदांगांत इतका पारंगत होता कीं, यानें अंगिरा ऋषीच्या सत्रांत दुसऱ्या दिवशींचें कर्म स्वतः केलें. यास उत्तानबर्हि, आनर्त, भूरिषेण हे तीन मुलगे होते ( भा. ९. ३ ). शर्याति राजानें देवीसंबंधीं तप केलें आहे ( दे. भा. १०. १३ ). मधुच्छंदस् वैश्वामित्र याचा पुरोहित होता. हा एकदां आपल्या पुरोहितासह शिकारीस गेला असतां पुरोहितानें परत फिरण्याविषयीं आग्रह चालविला, तेव्हां राजा परत फिरला.पण स्त्रीची परीक्षा पाहण्याकरितां राजा रसातलांत 'दिग्विजयार्थ जात असतां राक्षसांनीं त्यास व त्याच्या पुरोहितास ठार केलें ' अशी कंडी यानें पिकाविली. ती ऐकतांच या दोघांच्याहि स्त्रिया एकदम मरण पावल्या, हें दूतानें येऊन सांगतांच दोघांना अतिशय वाईट वाटलें. पण गोतमीतीरीं तप केल्यानें पुनः स्त्रिया मिळाल्या ( ब्रह्म. १३८ ). याची कन्या सुकन्या. तिनें च्यवनास वरिलें (च्यवन पहा ). वेदांतील शर्यात व पुराणांतील शर्याति एकच होत. शर्यात, शार्यात, शर्याति व शय्याति हे सर्व एकच असावेत.

२ ( सो. पूरु. ) क्षत्रिय राजा. प्राचीन्वताचा हा मुलगा होय. याच्या आईचें नांव अश्मकी. त्रिशंकूची दुहिता ती याची बायको. याच्या मुलाचें नांव अहंयाति होय (म. आ. ६३. १२ कुं.). येथें हा शब्द शय्याति असा आहे.

३ ( सो. आयु. ) मत्स्यमतें नहुषाचा पुत्र.

४ ( सो. वृष्णि. ) अक्रूरपुत्र एक यादव.

**शर्याति**—( १ शर्यात पहा ).

**शर्व**—शततेजस् नामक शिवावताराचा शिष्य.

२ एकादश रुद्रांपैकीं एक.

**शर्वदत्त गार्ग्य**—रुद्रभूति द्राह्यायणाचा शिष्य ( वं. ब्रा. १ ).

**शर्वरी**—दोष वसूची पत्नी.

**शल**—विप्रचित्ति व सिंहिका यांचे पुत्र. परशुरामानें मारिले त्यांपैकीं एक.

२ सुयज्ञ प्रधानाचा पुत्र.

३ ( सू. इ. ) परीक्षित् व सुशोभना यांचा प्रथम पुत्र. एका शिकारींत स्वतःचे घोडे दमले, तेव्हां सारथ्यानें वामदेवाच्या चपळ घोड्यांचें वर्णन केल्यावरून त्याजवळून कामापुरते परत बोलीनें यानें दोन घोडे आणिले. पुढें त्याच्या मागणीवरून ते परत तर नाहींच दिले, पण ते आपलेच असल्याचें हा सांगूं लागला. तेव्हां वामदेवानें चार राक्षस उत्पन्न करून त्यांकरवीं यास ठार मारिलें ( म. व. १९५. ३८-४२ कुं.; श्येनजित्; २ परीक्षित् पहा ).

४ सोमदत्तपुत्र. भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय योद्धा. यास द्रौपदीपुत्रांनीं ठार केलें ( म. द्रो. १०८. १-११ कुं.; भा. ९. २२. १९ ).

५ कृष्णानें मारिलेला कंसाचा मल्ल ( भा. १०.४४.२७).

**शलकर**—तक्षककुलांतील एक सर्प ( म. आ. ५७. ९. कुं. ).

**शलंक**—विश्वामित्रकुलांतील एक गोत्रकार.

**शलभ**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ यामिनी व तार्क्ष्य कश्यप यांचे पुत्र.

३ पांडवपक्षाकडील चैद्य राजा. हा कर्णाकडून मारिला गेला ( म. क. ५१. ५० कुं. ).

४ विप्रचित्ति व सिंहिका यांचा पुत्र. यास परशुरामानें मारिलें.

**शलभा**—अत्रीची स्त्री ( ब्रह्मांड. ३. ८. ७४-८७ ).

**शल्य**—मद्रदेशाधिपति. ऋतायनाचा पुत्र ( म. भी. ६२.१४ कुं. ). नकुल–सहदेवांची माता माद्री याची बहीण होय. यास एक भाऊहि होता. रुक्मांगद व रुक्मरथ या पुत्रांसह हा द्रौपदीस्वयंवराला गेला होता ( म. आ. २०१. संजयास व व्यासांनींहि धर्मराजास सांगितलेल्या षोडश-

१४ कुं. ). या वेळीं भीमाचें याशीं युद्ध झालें व त्यांत शल्याचा पराभव झाला ( म. आ. २०५. ३५ कुं. ). हा अतिरथ असून प्रत्येक युद्धांत कृष्णाशीं स्पर्धा करीत असे ( म. उ. १६५. २७ कुं. ). हा संह्लादाचा अंशभूत होता ( म. आ. ६८.६ कुं. ). याची राजधानी शाकल ( म. स. ३५. १४; क. ३७. ३५ कुं. ). यास युधिष्ठिरानें आपल्या साहाय्यार्थ बोलावणें पाठविलें होतें ( म. उ. ४. ८ कुं. ). पण त्याच्याकडे जात असतां वाटेंत दुर्योधनानें याची इतकी उत्तम व्यवस्था ठेविली होती कीं, यानें त्याचा पक्ष स्वीकारिला. युधिष्ठिरास हा पक्ष स्वीकारल्याचें हा सांगावयास गेला असतां युधिष्ठिरानें याजजवळून कौरवांचा–विशेषतः कर्णाचा–तेजोभंग करण्याचें अभिवचन घेतलें (म. उ. ८.३७–६० कुं.). याचें भीमाशीं युद्ध झालें, पण याचाच पराभव झाला (म. द्रो.१५ कुं.). यानें विराटाचा चवदाव्या दिवसाच्या रात्रियुद्धांत ( म. द्रो. १६८ कुं. ) व श्रुतकीर्तीचा सोळाव्या दिवशीं पराभव केला ( म. क. १३ कुं. ). नंतर सतराव्या दिवशीं कर्णानें सांगितल्यावरून दुर्योधन याकडे आला व यास मोठमोठ्यांनीं सारथ्य केल्याचे दाखले देऊन त्यानें कर्णाचें सारथ्य करण्यास विनविलें. यानें प्रथम नाकारिलें (म. क. २८ कुं.), पण नंतर कबूल केलें (म. क. २९ कुं.). कर्णाच्या गर्वोक्ति सहन न होऊन यानें त्याची निंदा (म. क. ३१;३३;३५ कुं.) व त्यानें याची निंदा केली (म. क. ३४;३६; ३७ कुं. ) व शेवटीं ते एकमेकांत भांडूं लागले. पण दुर्योधनाच्या मध्यस्थीनें तें भांडण मिटलें (म. क. ३८ कुं.). यानें कर्णास उत्तेजनहि दिलें होतें (म. क. ८३ कुं.). अठराव्या दिवशीं अश्वत्थाम्याचे सांगण्यावरून यास दुर्योधनानें सैन्याधिपत्याभिषेक केला ( म. श. १; ५-६ कुं. ). शल्याचें भीमाशीं गदायुद्ध झालें त्यांत शल्यानें खूप पराक्रम केला ( म. श. ११-१२ कुं. ). नंतर याचें युधिष्ठिराशीं युद्ध होऊन त्यानें याच्या भावासह यास ठार केलें ( म. श. १६ कुं. ). त्या दिवशीं मार्गशीर्ष वद्य अमावास्या होती ( भारत-सावित्री ). यानें गौतमेश्वराची आराधना करून शस्त्रास्त्रविद्येंत नैपुण्य मिळविलें होतें ( स्कंद ७.१.८० ).

**शवकर्ण**—( शिवकर्ण पहा ).

**शवस्**—अग्निभू काश्यपाचा शिष्य. याचा शिष्य देवतर शावसायन ( वं. ब्रा. २ ).

**शश भारद्वाज**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १५२ ).

**शशकर्ण काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ९ ).

**शशबिन्दु**—( सो. सह. ) चित्ररथाचा पुत्र. हा मोठा राजा असून महायोगी होता ( भा. ९. २३ ). अशा थोर राजालाहि मृत्यूनें सोडलें नसल्याचें नारदानें राजकीयांतील कथांत याची कथा आहे ( म द्रो. ६५; शां. २९; २०८. ११ कुं. ). वैवस्वत यमाच्या सभेंत सहस्रावधि शशबिंदूंचा उल्लेख आहे ( म. स. ८. २७. कुं ). ही सर्व प्रजा शशबिंदूचीच आहे, असें प्राचीन ऋषींनीं म्हटलें आहे. शशबिंदूला एक लक्ष भार्या व दहा लक्ष पुत्र होते ( म. शां. २९. १०५ कुं. ). भागवतामध्यें ह्याच्या प्रत्येक स्त्रीला लक्ष लक्ष ह्याप्रमाणें एकंदर एक अब्ज पुत्र होते, असें आहे. पृथुश्रवस्, पृथुकीर्ति व पृथुयशस् वगैरे याचे प्रमुख पुत्र होत (भा. ९. २३; म. शां. २०८). याची मुलगी बिंदुमती. ती मान्धाता राजास दिली होती ( भा. ९. ६. ). हा रुद्रेश्वर लिंगाची आराधना करून राजकुलांत जन्मास आला होता ( स्कंद. ७. १. ३९. ).

**शशलोमन्**—एक राजर्षि (म. आश्र. २१. १४ कुं.).

**शशाद**—( सू. इ. ) इक्ष्वाकूचा ज्येष्ठ पुत्र विकुक्षि, त्यास पडलेलें दुसरें नांव ( म. व. २०५. १ कुं ). अष्टका श्राद्धाकरितां मारून आणलेला एक ससा यानें भक्षण केला, म्हणून इक्ष्वाकूनें यास राज्यांतून हद्दपार केलें. इक्ष्वाकूनंतर हा राजा झाला ( भा. ९. ६ ).

**शशि**—( सो. क्रोष्टु. ) मत्स्यमतें अंधकपुत्र ( १ शुचि पहा ).

**शशिकला**—काशीराज सुबाहूची कन्या व सूर्यवंशीय सुदर्शनाची पत्नी.

**शशीयसी**—तरंताची स्त्री (ऋ. ५.६१. ६ अनुक्रमणी).

**शश्वती आंगिरसी**—मंत्रद्रष्ट्री ( ऋ. ८. १. ३४ ). ही आसंगाची स्त्री होय.

**शांवत्य**—शूलगवांत मारलेल्या पशूचें कातडें जोड्या-करितां उपयोगांत आणावें, असें याचें मत आहे ( आश्व. गृ. ९.२४.)

**शांशपायन**—रोमहर्षणाचा शिष्य. यानें पुराणसंहिता केल्या ( अग्नि. २७२. ११-१२. ).

**शाकटाक्ष**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**शाकटायन**—भृगुकुलोत्पन्न गोत्रकार.

२ अंगिराकुलोत्पन्न गोत्रकार.

३ पाणिनि व यास्क यांनीं निर्देश केलेला एक आचार्य. याच्या नांवावर शाकटायनस्मृति व शाकटायनव्याकरण नामक ग्रंथांचा उल्लेख आहे ( C. C. ). प्रातिशाख्यांत याचा निर्देश आहे ( ऋ. प्रा. १७; ७४७; अ. प्रा. २. २४; शु. प्रा. ३. ८; ९; १२; ४. ५; १२७; १८९ ). या उल्लेखावरून वर्णविचार ( ऋ. प्रा. ७४७ ), संधिविचार वगैरे बहुतेक विषयांवर याच्या मताचा किंवा मतभेदाचा

निर्देश येतो. सर्वच शब्द धातुज आहेत असें याचें मत आहे ( नि. १. ३; १. १२. ).

**शाकतवत**--( शौक्रतु पहा ).

**शाकदास भाडितायन**--हा विचक्षण तांड्याचा शिष्य. याचा शिष्य संवर्गजित् लामकायन ( वं. ब्रा. २ ).

**शाकाधि**--वसिष्ठकुलांतील गोत्रकार गण.

**शाकपूणि**--एक व्याकरणकार ( नि. ३. ११; ६. १४; ८. ५; १२. १९; १३. १०-११ ).

**शाकपूणि रथंतर**--विष्णुमतें व्यासाच्या ऋक्शिष्य-परंपरेंतील इंद्रप्रमतीचा द्वितीय शिष्य. वायुमतें शाकपूर्ण रथीतर किंवा रथांतर व ब्रह्मांडमतें रथीतर असा पाठ आहे.

**शाकपूर्ण रथीतर ( रथांतर )**--व्यासाच्या ऋक्-शिष्यपरंपरेंतील वायुमतें सत्यश्रीचा पुत्र ( व्यास पहा ).

**शाकंभरी**--( दुर्गा पहा ).

**शाकल**--शाकल्याचा शिष्य अशा अर्थी शाकल शब्द तयार होतो ( पा. सू. ४. १. ८९ ). सायणानें शाकल शब्दाचा अर्थ एका जातीचा साप असा केला आहे. तेथें दृष्टान्तादाखल याचा उल्लेख आला आहे. अग्निष्टोम हा आदिरहित असतो, असें सांगण्याकरितां चाक व तोंडांत शेंपूट धरून चाकासारखा बनलेल्या सापाचा दृष्टान्त दिला आहे. कदाचित् ऐतरेयानें शाकलाला उपरोधून हें लिहिलें असावें ( ऐ. ब्रा. ३.५ ). पाणिनि, कात्यायन व पतंजलि यांनी शाकलाचा उल्लेख केला आहे ( पा. सू. ४. १. १८; ३. १२८; ६. १. १२७ ). शाकलाला शंभर शिष्य होते. पण त्यांपैकीं शिशिर, बाष्कल, शांख, वात्स्य व आश्वलायन हे गृहस्थाश्रमी असून शाखाभेदप्रवर्तक होते ( विकृतिवल्ली १.४ ). ह्या पांच शाखाप्रवर्तकांना दुजोरा मिळतो. उपलब्ध ऋग्वेदसंहिता शाकलशाखेची आहे. यानें प्रसार किंवा त्या संहितेची विशेष कांहीं व्यवस्था केल्यामुळें शाकलसंहिता असें म्हणत असावेत ( शाकल्य पहा ). प्रातिशाख्यांतहि शाकलाचा अनेक ठिकाणीं उल्लेख आहे ( ऋ. प्रा. ६५; ७६; ३९०; ४०३; ६३१; ६३३ ). याचा शाकलस्मृति नांवाचा एक ग्रंथ उपलब्ध आहे.

**शाकलायनि**--अत्रिकुलांतील गोत्रकार.

**शाकलि**--ऋग्वेदी श्रुतर्षि.

**शाकल्य**--हा मांडूकेयाचा मुलगा ( भा. १२. ६. ५७ ). यानें ऋग्वेदाचा सध्याचा पदपाठ केला, असें निरुक्तावरून दिसतें ( ६. १८. ). शाकल्यकृत पदगाठ नांवाचें एक पुस्तक सध्यां मुद्रित आहे. पण त्यांत पदपाठ कोणत्या नियमास अनुसरून केला याचा खुलासा नाहीं. पदगाठांत कांहीं समान पदांचा परिगणनपूर्वक एकत्र संग्रह आहे. वैदिक वाङ्मयांत विदग्ध शाकल्य ( श. ब्रा. ११. ६. ३. ३; बृ. उ. ३. ९. १ ४. १. ७ ) आणि स्थविर शाकल्य यांचा उल्लेख आहे ( ऐ. आ. ३. २. १. ६; सां. आ. ७.१६; ८.१.११ ). स्थविर हें सायणानें शाकल्याचें विशेषण घेतलें आहे. विदग्धानें याज्ञवल्क्याशीं मोठा कडाक्याचा वाद केला, पण त्यांत शेवटीं विदग्धाला हार खावी लागली. संहितेचा तात्त्विक अर्थ लावणाराहि एक शाकल्य आहे ( ऐ. आ. ३. १. २ ). ऋग्वेदसंहितेंत संधि कसे होतात, याविषयीं नियम सांगणारा म्हणून शौनकानें ऋक्प्रातिशाख्यांत याचा वारंवार उल्लेख केला आहे ( ऋ. प्रा. १९९; २०८;२२२; शु. प्रा. ३.१० ). प्रातिशाख्यांतल्या उल्लेखावरून हाच पदपाठकार असण्याचा जास्त संभव दिसतो. हेंच नांव पुराणांत वेदमित्र किंवा देवमित्र शाकल्य असें आहे (वायु. १.६०; ब्रह्मांड. २.३४).

पाणिनीनें अष्टाध्यायींत ( ६. १. १२७; ८. ३. १९; ४. ५० ) याचा संधिनियमाकरितांच उल्लेख केला आहे. हे सर्व शाकल्य एकच होते कां भिन्न होते, हें ठरविण्याला भक्कम आधार नाहीं. ऋग्वेदाची सध्यां उपलब्ध असलेली संहिता शाकलशाखेची आहे. षड्गुरूनें सर्वानुक्रमणीच्या भाष्यांत ‘ शाकल्योच्चारणं शाकलकम् ’ ( १. १ ) असें म्हटलें आहे. यामुळें शाकल्य व शाकल यांचा संबंध उलगडतो. तात्पर्य शाकल्यानें ऋग्वेदसंहितेचा पदपाठ केला. प्रवचनद्वारा अनेक गोष्टींचा निश्चय केला व शेंकडों शिष्यांच्या द्वारा तिचा प्रसार केला म्हणून शाकलशाखा असें नांव पडलें. यानें आपली संहिता विभागून वात्स्य, मुद्गल, शालीय, गोखल्य आणि शिशिर यांना शिकविली.

ऋग्वेदाच्या एकवीस शाखा होत्या अशी महाभाष्य-वचनावरून प्रसिद्धी असली तरी त्यांचीं नांवेंहि उपलब्ध नाहींत. पांच शाखा आहेत असें लिहिलेलें आढळतें व त्यांचीं नांवेंहि आढळतात ( चरणव्यूह ). पण इतर कांहीं ठिकाणीं तीनच शाखा असल्याचा निर्देश आहे ( दे. भा. ७ ). ऋग्वेदी ब्रह्मयज्ञांतील तर्पणांत तीन गण पाहून महीदासानें चरणव्यूहभाष्यांत हेंच दाखविलें आहे.

शाकल्याच्या नांवावरील ग्रंथ--शाकल्यसंहिता व शाकल्यमत ( C. C. ).

एक ब्रह्मर्षि यानें नऊशें वर्षें शिवाची आराधना करून त्याची कृपा संपादन केली. शिवकृपेनें हा मोठा ग्रंथकार झाला व याचा मुलगा सूत्रकार होईल, असा वर मिळाला ( म. अनु. १४; शिव. रुद्र. ४३-४७ ). शाकल्याचा मुलगा कोण हें सांगतां येत नाहीं.

२ शुभ्रगिरीवरील एक ऋषि. परशु राक्षस यास खाण्यास

आला असतां हा विष्णुकृपेनें लोहमय बनला. नंतर यानें परशूचा उद्धार केला ( ब्रह्म. १६३ ).

**शाकल्यपितृ**—संधिनियमाविषयीं याचें मत आलें आहे ( ऋ. प्रा. २२३ ).

**शाकवैण रथीतर**—व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें सत्यश्रीचा पुत्र.

**शाकायन**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

२ ( एकायन पहा ).

**शाकायनि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**शाकायन्य**—एक आचार्य. बृहद्रथ ऐक्ष्वाकाकडे ज्ञान मिळविण्याकरितां हा गेला होता ( मै. उ. १. २ ).

२ जाताचें पैतृक नांव ( क. सं. २२. ७ ).

**शाकाहार्य**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**शाकिनी**—दूर्व ब्राह्मणाची स्त्री ( ७ बुध पहा).

**शाकुनि**—मधुवनांतील एक ऋषि. यास नऊ पुत्र होते. ध्रुव, शील, बुध, तार व ज्योतिष्मत् हे अग्निहोत्री व गृह्यकृत्यांत तत्पर होते. बाकीचे चार निर्मोह, जितकाम, ध्यानकोश व गुणाधीक हे विरक्त होते ( पद्म. स्व. ३१ ).

**शाकृत्य**—( गौरवीति पराशर पहा ).

**शाक्य**—( सू. इ. भविष्य ) हा भागवत, मत्स्य, विष्णु, भविष्य व वायु यांच्या मतें संजयपुत्र होय. ह्याच्या मुलाचें नांव शुद्धोद. भविष्यमतें याला शाक्यवर्धन असें म्हटलें आहे.

**शाक्रवत**—( शौक्रतव पहा ).

**शाक्रायण**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**शाकर**—( ऋषभ पहा ).

**शाख**—अनल वसूचा पुत्र.

**शाखेय**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**शांखायन**—एक आचार्य. याच्या नांवावर उपलब्ध असलेले ग्रंथ-श्रौतसूत्र व गृह्यसूत्र ( c. c. ). पदपाठांत अनुनासिक प्लुत होतो असें याचें मत आहे ( तै. प्रा. १५. ७ ). याच्या गृह्यसूत्रांत किंवा श्रौतसूत्रांत याचा निर्देश आढळत नाहीं. आश्वलायनगृह्यसूत्रांत गार्गी वाचक्नवी-पासून सुयज्ञ, सांख्यायनापर्यंत सांख्यायनगणांतील आचार्य दिले आहेत. तेथें कौषीतक व सांख्यायन भिन्न दिले आहेत ( ३.३ ). सांख्यायन, शांखायन व हा एकच होय. टीकाकार आनर्तीयानें याचें नांव सुयज्ञ दिलें आहे. या सूत्रांत शौनक, जातूकर्ण्य, पैङ्ग्य, कौषीतक, कौषीतकि, आरुण, आरुणि यांचा निर्देश आहे. याच्या सूत्रांत भारतीय युद्धाचा निर्देश असावा. यांत एका सर्पसत्राचाहि निर्देश आहे (सां. श्रौ. १३.२३.८). सांख्यायनाचें श्रौतसूत्र १८ अध्यायांचें असून त्याचा उताऱ्या-वरून सांख्यायन ब्राह्मणाशीं संबंध लागतो. १७ व १८ वा भाग कौषीतकी आरण्यकांतील पहिल्या दोन भागांसारखे आहेत.

ऐतरेय ब्राह्मणापैकीं महीदास ऐतरेय ( ऐ. ब्रा. १–६ ), सांख्यायन व आश्वलायन ( ऐ. ब्रा. ७–८ पंचिका ) यांनीं वरील भाग केले असावेत. महीदास ऐतरेय, कौषीतकि, शांखायन व आश्वलायन असा कालक्रम असावा. शांखायन ब्राह्मणांत कौषीतक व कौषीतकि यांचा निर्देश असल्यामुळें हा आचार्य वेगळा असावा. शांखायनानें सुमन्तु-जैमिनि-वैशं-पायनपैलसूत्रभाष्य यांचा उल्लेख केला आहे.

**शाट्यायनि**—शाट्यायनगृह्यसूत्र नामक ग्रंथ याच्या नांवावर उपलब्ध आहे ( c. c. ). शाट्यायनब्राह्मणावरून पुष्कळशा कथा सायणभाष्यांत दिलेल्या असतात. शाट्यायनींचे उतारे आधारादाखल घेतलेले आढळतात ( श. ब्रा. ८. १. ४. ९; १०. ४. ५. २ ). हें शंगाचें पैतृक नांव आहे. याचे उतारे इतरत्रहि आढळतात ( जै. उ. ब्रा. १. ६. २; ३०. १; २. २. ८; ४. ३; ९. १०; ३. १३. ६; २८. ५ ). सामविधानब्राह्मणांतील शेवटल्या वंशावळींत हा बादरायणाचा शिष्य दिला आहे. शाट्यायनिनः म्हणून याच्या अनुयायांचा अनेक ठिकाणीं निर्देश आला आहे (ला. श्रौ. १. २. २४). आश्वलायनश्रौतसूत्रांत शाट्यायनक म्हणून याच्या मताचा निर्देश आहे ( आश्व. श्रौ. १. ४. १३ ). शाट्यायनब्राह्मण उपलब्ध नाहीं.

जैमिनीय उपनिषद्‌ब्राह्मण अथवा गायत्र्युपनिषद् हें इंद्रा-पासून क्रमानें अनेक शिष्यांना मिळालें. त्यामध्यें हें ज्वालाय-यनानें शाट्यायनीला व शाट्यायनीनें रास क्रातुजातेय वैया-घ्रपद्याला दिलें. अशा क्रमानें जरी मोठी शिष्यपरंपरा आहे तरी शाट्यायनीच्या नांवानेंच वरील ग्रंथाला प्रसिद्धी मिळाली ( जै. उ. ब्रा. ४. १६-१७ ). हा शब्द शाट्यायनि असा व त्यांच्या अनुयायांकरितां शाट्यायनिनः असा येतो.

२ विश्वामित्रकुलोत्पन्न गोत्रकार.

**शांड**—भरद्वाजाला दान देणारा ( ऋ. ६. ६३. ९ ).

**शांडिलायन**—सुतेमनसचें व गर्दभीमुखाचें पैतृक नांव.

**शांडिलि**—वसिष्ठकुलोत्पन्न गोत्रकार.

२ ( दीर्घिका व मांडव्य पहा ).

**शांडिली**—शांडिल्य ऋषीची कन्या. हिलाच स्वयंप्रभा असें म्हणत असत ( म. भी. ८.९ कुं.; वा. रा. कि. ५१). ही तपस्विनी असून पूर्वसमुद्राच्या तीरीं ऋषभ पर्वतावर राहत असे. एकदां गालव ऋषीस घेऊन गरुड हिच्या आश्रमीं आला असतां हिनें त्यांचा उत्तम सत्कार करून त्यांना भोजन दिलें. रात्रीं झोंप घेऊन सकाळीं जागे होऊन पाहतात तों गरुडाचे सर्व पंख गळून पडलेले होते. गालवानें विचारतां गरुड

म्हणाला, 'शिव व विष्णु राहतात तेकडे हिला नेण्याचें माझ्या मनांत आलें होतें, त्यामुळें कदाचित् असें झालें असेल.' तेव्हां ते दोघेहि हिला शरण आले, व गरुड पुनः सपक्ष झाला (म. उ. ११४; स्कंद. ६.८१-८२). हिचा केकय देशाच्या राजाची कन्या सुमना, हिच्याशीं पातिव्रत्याविषयीं संवाद झाला होता (म. अनु. १२२).

**शांडिल्य**—एक आचार्य (ला. श्रौ. ६. १०. १५.). हें अनेक व्यक्तींचें पैतृक नांव आहे (उदर व सुयज्ञ पहा). हा यज्ञविधींत मोठा कुशल होता (श. ब्रा. ९. ४. ४. १७; ५. २. १५; १०. १. ४. १०; ४. १. ११; ६. ३. २). याचे शिष्य कौंडिन्य, आग्निवेश्य, वात्स्य, वामकक्षायण (बृ. उ. २. ६. १; २; ३; ६. ५. ४.), वैष्टपुरेय व भारद्वाज (श. ब्रा. १४. ७. ३. २६). याचे गुरु कौशिक, गौतम, कैशोर्य काप्य, वात्स्य (बृ. उ. २. ६. १; ४. ६. ३; ६. ५. ४), वैजवाप (श. ब्रा. १४. ७. ३. २५), व कुश्रि (श. ब्रा. १०. ६. ५. ९.). शतपथाचे सहा ते दहा अध्याय शांडिल्यमतानें वेदीचा विचार करणारे आहेत. हा आश्वलायनसूत्रांतील गोत्रांच्या यादींत असून याचे प्रवर शाण्डिल, असित व देवल असे तीन आहेत. भक्ति या विषयावर शाण्डिल्यसूत्रें पुढील वाङ्मयांत प्रसिद्ध आहेत. ब्रह्मसूत्रावरील शांकरभाष्यांत शांडिल्यविद्या म्हणून ज्याचा उल्लेख येतो तो फक्त उपनिषदांतील वाक्याला उद्देशून आहे. याचे शांडिल्यस्मृति, शांडिल्यधर्मसूत्र व शांडिल्यतत्त्वदीपिका हे ग्रंथ आहेत (C. C.). याचा गृह्यसूत्राचा उतारा आला आहे (आप. ध. ९. ११. २१).

२ मरीचिपुत्र कश्यपाच्या वंशामध्यें उत्पन्न झालेला एक ऋषि. याच्याच कुलामध्यें पुढें वैश्वानर अग्नि उत्पन्न झाला. म्हणून अग्नीला शाण्डिल्यगोत्री असें म्हणतात (वैश्वदेवप्रयोग पहा). भक्ष्यभोज्यांच्या पर्वतप्राय राशी सुमन्यूनें यास दिल्या होत्या (म. अनु. २००. २२ कुं.).

किशोरवयांत मातीचे शिवलिंगाची यानें पूजा केली. पुढें हा राजा झाला असतां अत्यंत कामासक्त होऊन स्त्रियांवर बलात्कार करूं लागला, परंतु अत्यंत शिवभक्तीमुळें यास यम कांहीं करूं शकला नाहीं. ही तक्रार शिवाकडे नेली. तेव्हां शिवानें '१०० वर्षे कूर्म हो' असा यास शाप दिला (स्कंद. १. २. १२).

३ अग्नीपासून शाण्डिल्य झाला. व तो कश्यपाचा थोरला भाऊ होता (म. अनु. ५३.२६ कुं.).

४ यानें वैदिक मार्गानें विष्णूचें पूजन न करतां अवैदिक मार्गांनीं विष्णूचें आराधन केलें व ग्रंथ करून अवैदिक मार्गाचा प्रचार केला म्हणून हा नरकवास भोगून भृगुवंशांत जमदग्नि झाला (वृद्धहारीतस्मृति १८०-१९३).

५ हा ब्रह्मदेवाचा सारथि होता (स्कंद. ७.१.१२६).

**शांडिल्यायन**—याला अग्निचयनाबद्दल दैय्याम्पतीनें प्रश्न केला आहे (श. ब्रा. ९.५.१.१४). हें चेलकाचें पैतृक नांव आहे (श. ब्रा. १०.४.५.३). चैलकि हें जीवलाचें पैतृक नांव आहे (श. ब्रा. २.३.१.३४).

**शांतकर्णि**—(आंध्र. भविष्य.) विष्णु व ब्रह्मांड यांच्या मतें कृष्णाचा पुत्र. यास भागवतमतें शान्तकर्ण, वायुमतें सातकर्णि व मत्स्यमतें श्रीमल्लकर्णि म्हणतात.

२ (आंध्र. भविष्य.) विष्णु व मत्स्य यांच्या मतें पूर्णोत्संगाचा पुत्र.

३ (आंध्र. भविष्य.) ब्रह्मांडमतें पुरीषभीरूचा पुत्र. यास वायुमतें सातकर्णि म्हणतात.

**शातपर्णेय**—धीराचें पैतृक नांव.

**शातवनेय**—भरद्वाजाचा आश्रयदाता (ऋ. १.५९.७).

**शातातप**—एक स्मृतिकार (याज्ञ. १.५). व्यंकटेश्वर व आनंदाश्रम यांच्या स्मृतिसंग्रहांत याची गद्यपद्यात्मक सहा अध्यायांची स्मृति छापलेली आहे. मिताक्षरा (३.२९०) व विश्वरूप (३.२३६) यांनीं याचीं वचनें उद्धृत केलीं आहेत. शिवाय लघु व वृद्ध शातातपस्मृति आनंदाश्रमसंग्रहांत छापलेली आहे. व्यवहारमातृकेंत वृद्धशातातप (३०५) व हेमाद्रीनें वृद्धशातातपाच्या भाष्यकाराविषयीं लिहिलें आहे तें (३.१.८०१). मिताक्षरेंत बृहत्शातातपाचा निर्देश आहे (याज्ञ. ३.२९०). श्री. मित्रानें ८७ अध्याय व २३७६ श्लोकांची याची स्मृति दिली असून त्याचें नांव कर्मविपाक असें दिलें आहे. शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण पाळीत असलेला मातुलगोत्र पाळण्याचा नियम यानेंच दिला आहे.

**शाद्वलायन**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**शांत**—(स्वा प्रिय.) प्रियव्रतपुत्र इध्मजिह्वाचा पुत्र. याचा वर्ष प्लक्षद्वीपांत आहे (भा. ५.२०.३).

२ दुर्दम स्त्री सुभद्रेचा पिता (मार्कं. ७२. ४५).

३ अहन् किंवा आप वसूचा पुत्र (म. आ. ६७.२३ कुं.).

४ (सो. पुरूरवस्.) आयूचा पुत्र.

५ तामस मनूचा पुत्र.

**शांतकर्ण**—(१ शातकर्णि पहा).

**शांतनव**—यानें वेदाच्या स्वराविषयीं विचार करणारीं फिटसूत्रें लिहिलीं.

**शांतनु**—(सो. कुरु.) प्रतीप व सुनंदा यांचा दुसरा पुत्र. याचें मूळ नांव महाभिषज्. पण शांत मनःस्थितींतल्या पुरुषाचा पुत्र म्हणून हें नांव (म. आ. १०३. २२ कुं.).

आणि वृद्धासहि यौवन देणारा याचा स्पर्श होता म्हणून शांतनु असें नांव पडलें (भा. ९.२२.१२; म.आ.६३.४८कुं.). देवापि राज्याधिकारास योग्य नसल्यामुळें यास तो मिळाला. मृगयार्थ फिरत असतां यानें गंगेस तिच्या अटी मान्य करून पत्नी म्हणून घरीं आणिलें. ती आठव्या पुत्रास बुडवूं लागली असतां, अट मोडून यानें तिला अडविलें. तेव्हां ती भीष्मासह अंतर्धान पावली व पुढें छत्तीस वर्षांनीं याच्या विनंतीवरून तिनें भीष्मास परत आणून दिलें. याच्या राज्यांत एकदां बारा वर्षें सतत दुष्काळ पडला होता ( देवापि पहा ). भीष्माच्या स्वार्थत्यागी प्रतिज्ञेमुळें याचें सत्यवतीशीं लग्न झालें. तिचे ठायीं यास चित्रांगद व विचित्रवीर्य झाले. सत्यवतीला व्यास झाल्याचें वृत्त यास कळलें नव्हतें ( दे. भा. २. ३ ). यानें कृपकृपींचें पालन केलें होतें. मेल्यानंतर भीष्मानें दिलेले पिंड घेण्याकरितां हा प्रत्यक्ष आला होता. त्यास यानें इच्छामरणाचा आशीर्वाद दिला ( गंगा, भीष्म, सत्यवती पहा ).

**शांतपायन**--व्यासाच्या पुराणशिष्यपरंपरेंतील विष्णुमतें रोमहर्षणाचा शिष्य; वायुमतें शांशपायन असा पाठ आहे.

**शांतरथ**--(सो. आयु.) भागवतमतें धर्मसारथीचा पुत्र.

**शांता**--ही मत्स्य व भारत यांच्या मतें दशरथकन्या; वायु व रामायण यांच्या मतें ( वा. रा. बा. ११ ) ही रोमपाद-कन्या आहे. चित्ररथ अंगराज, लोमपाद व रोमपाद हे एकच मानिले पाहिजेत. लोमपाद हें दशरथालाहि नामांतर आहे ( ह. वं. १. ३१ ). त्याला संतति झाली नाहीं म्हणून त्याला त्याचा मित्र दशरथ यानें आपली मुलगी शांता ही दत्तक दिली ( भा. ९. २३. ७-१०; ऋश्यशृंग, १ दशरथ व १ रोमपाद पहा ).

**शांति**--दक्ष प्रजापतीची कन्या व धर्माची पत्नी.

२ ही देवहूतीचे ठिकाणीं झालेली कर्दमकन्या व अथर्वाची पत्नी. हिचा पुत्र दधीच.

३ (सो. नील.) हा भागवत व विष्णु यांच्या मतें नीलपुत्र.

४ हा भागवतमतें यज्ञ व दक्षिणा यांचा पुत्र.

५ वारुणि अंगिरा ऋषीच्या आठ पुत्रांतील चवथा ( म. अनु. १३२. ४२ कुं. ).

६ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील इंद्र.

७ स्वारोचिष मन्वंतरांतील एक देव.

८ कृष्ण व कालिंदी यांचा पुत्र.

९ भूति नामक ऋषीचा शिष्य. कनिष्ठ भ्राता सुवर्चस् यानें बोलाविल्यावरून भूतीनें यावर आश्रमाची व्यवस्था सोंपविली व आपण सुवर्चसूच्या यज्ञार्थ गेला. नंतर हा कांहीं कामांत गुंतला असतांना अग्नि नाहींसा झाला. त्यामुळें हा घाबरला व अग्नीची अखंड स्तुति करूं लागला. अग्नीनें प्रसन्न होऊन यास वर देऊं केला. तेव्हां 'अग्नीनें आपलें स्थान पूर्ववत् घेतल्याचें भूतीच्या दृष्टीस पडावें व निपुत्रिक भूतीस पुत्र व्हावा व सर्व भूतांवर प्रेम राहून स्तोत्रानें उद्धार व्हावा,' असे यानें वर मागितले. पुढें त्यांस भौत्य मनु झाला. त्यानें यावर संतुष्ट होऊन याला सांगोपांग वेद दिले ( मार्कं. ९७ ).

**शांतिदेवा** ( वी )--देवककन्या व वसुदेवाची पत्नी.

**शापहस्ता**--दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

**शापेय**--एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**शापेयिन्**--व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा शिष्य.

**शाम**--सरमेचा पुत्र व यमाचा अनुचर ( ब्रह्मांड. ३. ७. ३१२ ). याला शाम व शबल नांवांचे यमाचे दोन कुत्रे पुत्र होते ( स्कंद. २. ४. ९ ).

**शांब**--आप नामक वसूचा पुत्र.

**शांब शार्कराक्ष्य**--मद्रगार शौंगायनीचा शिष्य. याचा शिष्य आनंदज चांधनायन ( वं. ब्रा. १ ).

**शांबव्य**--शांबव्याचें गृह्यसूत्र सध्यां उपलब्ध आहे.

**शांबु**--अंगिरसांपैकीं एक घराणें (अ. वे. १९. ३९.५)

**शारदण्डायनि**--एक केकय राजा. याची बायको कुंतीची बहीण श्रुतसेना. याला पुत्र होईना, तेव्हां पित्याच्या संमतीनें श्रुतसेनेनें आपल्यापेक्षां श्रेष्ठ अशा सिद्ध ब्राह्मणाला चौकांत गांठून पुंसवन होम करून दुर्जयादि तीन पुत्र उत्पन्न करवून घेतले ( म. आ. १२६. ३६-४० कुं. ).

**शारदा**--( रौद्रकेतु पहा ).

२ महेश्वरव्रतमाहात्म्याकरितां हिची कथा आहे ( स्कंद ३. ३. १८-१९ ).

**शारद्वत**--गौतमांगिरसाचें एक कुळ ( अंगिरस् पहा ).

**शारद्वतिक**--भृगुकुलांतील गोत्रकार.

**शारद्वती**--द्रोणाचार्यांची भार्या कृपी, तिचें नामांतर.

२ एक अप्सरा ( म. आ. १३२. ४६ कुं. ).

**शारायण**--अत्रिकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**शारिमेजय**--( सो. वृष्णि. ) विष्णुमतें श्वफल्काचा पुत्र. भागवतमतें यास सारमेय म्हटलें आहे.

**शार्कराक्षि**--भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**शार्कराक्ष्य**--शांब व जन यांचें पैतृक नांव. शार्कराक्षि नांवाच्या महर्षींचे पुत्र. यांनीं उदराचे ठिकाणीं ब्रह्मदृष्टि ठेवून उपासना केली ( ऐ. आ. २. १.४ ).

**शार्ङ्ग**--( जरितृ, द्रोण, सारिसृक्व व स्तम्बमित्र पहा.

**शार्ङ्गरव**--भृगुकुलांतील गोत्रकार.

२ एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**शार्दूल**—रावणपक्षीय एक राक्षस. हा रावणाचा हेर होता ( वा. रा. यु. २९ ).

२ एक शाखाप्रवर्तक ( द्राह्यायण पहा ).

**शार्दूली**—कश्यप व क्रोधा यांची कन्या.

**शार्यात**—( शर्यात पहा ).

**शाल**—वृक व दुर्वाक्षी यांचा पुत्र ( भा. ९. २४. ४३ ).

**शालंकायन**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार व मंत्रकार.

**शालंकायनि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

२ विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**शालहलेय**—कश्यपकुलांतील गोत्रकार व ऋषिगण.

**शालायनि**—भृगुकुलांतील गोत्रकार ऋषि.

**शालावती**—विश्वामित्राची स्त्री.

**शालावत्य**—शिलकाचें व गल्लनस आर्क्षाकायणाचें पैतृक नांव.

**शालि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**शालिन्**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**शालिपिंड**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**शालिमंजरिपाक**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें हिरण्यनाभाचा शिष्य ( व्यास पहा ).

**शालिवाहन**—विक्रमादित्यपुत्र देवभक्ताचा पुत्र. यानें साठ वर्षे राज्य केलें. यानें पितृराज्य तर मिळविलेंच, पण चीन (तैत्तिरी) तार्तर यांतील शक व बाल्हीक, रोमांतील शठ व खुरज यांस जिंकिलें व त्यांचा खजिना लुटला. यानें सिंधुस्थान आर्य देश ठरविला व सिंधूपलीकडे म्लेच्छस्थान ठरविलें ( भवि. प्रति. ३. २ ). याचा पुत्र शालिहोत्र.

**शालिशिरस्**—कश्यप व मुनि यांचा पुत्र.

**शालिशूक**—( मौर्य. भविष्य. ) भागवत व विष्णु यांच्या मतें संगताचा पुत्र. याचा पुत्र सोमशर्मन्.

**शालिहोत्र**—कपिल ऋषीचा पुत्र. हा अश्वशास्त्रप्रणेता होता. यानें रचिलेल्या ग्रंथास शाल्यहोत्र हें नांव आहे ( म. व. ६९. ३० कुं. ). यानें सुश्रुताला घोड्याचा आयुर्वेद शिकविला ( अग्नि. २९२. ४४ ). यानें सामवेदाच्या सहा संहिता केल्या ( लांगलि पहा ).

२ शूलिन् नामक शिवावताराचा शिष्य.

३ सामवेदी श्रुतर्षि.

४ शालिवाहनाचा पुत्र.

**शालीय**—व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील भागवतमतें शाकल्याचा, व विष्णुमतें वेदमित्राचा शिष्य. वायुमतें शालीय व ब्रह्मांडमतें खलीयस असे याबद्दल पाठ असून हे वेदमित्राचे शिष्य आहेत.

**शाल्व**—भीमानें मारिलेला एक राजा.

२ म्लेच्छाधिपति ( म. श. २० ). वाराणशीचा राजा काशिराज यानें आपल्या अंबा, अंबिका व अंबालिका या तीन कन्यांचें स्वयंवर मांडिलें असतां भीष्मानें त्या तिघींना रथांत घालून पळवून नेलें. तेव्हां यानें त्याचा पाठलाग सुरू करून त्याच्याशीं युद्ध केलें परंतु याचा पराभव झाला. त्या तिघींपैकीं अंबेनें शाल्व राजाला पूर्वीच मनानें वरिलें असल्यामुळें ती भीष्माची अनुज्ञा घेऊन शाल्वाकडे परत आली व स्वतःचा स्वीकार करण्याविषयीं तिनें यास परोपरीनें विनविलें. परंतु भीष्मानें तिला जिंकून नेली असल्यामुळें यानें तिचा स्वीकार केला नाहीं ( म. आ. १०२; उ. १७५ ). हा भारतीय युद्धांत कौरवांच्या बाजूनें लढावयाला होता. याचा सात्यकीनें वध केला ( म. श. २० ).

३ (सो. क्रोष्टु.) सौभ देशाचा अधिपति (ह. वं. २. ५२). परंतु सौभ हें याच्या विमानाचें नांव असून याला सौभपति म्हटलें आहे ( भा. १०. ७६ ). हा दानव ( अग्नि. २७६. २२ ) किंवा दैत्य ( म. व. २० ) होता. हा शिशुपालाचा बंधु ( म. व. १४ ) किंवा मित्र ( भा. १०. ७६ ) होता.

कृष्णाच्या पराक्रमाची जरासंधाला अत्यंत भीति वाटत होती. तेव्हां त्याचा नाश कसा होईल, या विवंचनेंत जरासंध होता. इतक्यांत शाल्वाच्या सांगण्यावरून जरासंधानें, रुद्रप्रसादानें गार्ग्य मुनीला प्राप्त झालेला अवध्य पुत्र कालयवन याच्याकडे शाल्वाला पाठविलें. तेथें गेल्यावर शाल्वानें कालयवनाला जरासंधाच्या सांगण्यावरून कृष्णाला मारण्याविषयीं विनंति केली. तेव्हां कालयवनानें कृष्णाला ठार मारण्याचें आनंदानें कबूल केलें. नंतर त्यानें याचा चांगला सत्कार करून याला स्वनगरींत परत पाठविलें ( ह. वं. २. ५२-५४ ).

पुढें रुक्मिणीच्या विवाहसमयीं यादवांचें व जरासंधाचें युद्ध झालें. त्यांत जरासंध व शाल्वादिक राजे यांचा पराभव झाला. तेव्हां यानें सर्व पृथ्वी निर्यादवी करण्याची प्रतिज्ञा केली व त्याकरितां एक वर्षपर्यंत रुद्राची घोर आराधना चालविली. नंतर त्या तपश्चर्येच्या जोरावर यानें शंकराला प्रसन्न करून घेतल्यावर त्यापासून सर्व देवासुरांना अभेद्य व प्रसंगविशेषीं कोणाच्याहि दृष्टीस न पडणारें असें मयासुरनिर्मित सौभ नामक विमान मागून घेतलें, व लवकरच कृष्ण पांडवांच्या राजसूय यज्ञाकरितां हस्तिनापुरीं गेला असतां यानें सौभ नामक विमानांत बसून द्वारकेवर चाल केली. तेव्हां तेथें प्रद्युम्नाचें व याचें घनघोर युद्ध झालें. शेवटीं शाल्व ससैन्य सौभ विमानांत बसून स्वनगरीस परत गेला. हें युद्ध एकंदर सत्तावीस दिवस चाललें होतें.

ही वार्ता कृष्णाला इंद्रप्रस्थीं समजतांच तो ताबडतोब द्वारकेस निघून आला व याला ठार मारण्याचा निश्चय करून त्यानें याच्यावर चाल केली. तेव्हां हा समुद्रावरतीं सौभ नामक विमानांत बसलेला होता. युद्धांत दोघेहि अत्यंत दमून गेले असतां मध्येंच हा अंतर्धान पावून उग्रसेनाच्या सेवकाचा वेष घेऊन कृष्णाकडे आला व यानें कृष्णाला सांगितलें कीं, शाल्वानें द्वारकेवर स्वारी करून वसुदेवाला ठार मारिल्यामुळें उग्रसेनानें मला हें वृत्त कळविण्यास तुजकडे पाठविलें असून तुला तातडीनें द्वारकेस परत येण्यास सांगितलें आहे. तथापि, पुनरपि कृष्णानें युद्ध सुरू केलें. इतक्यांत सौभ विमानांतून वसुदेव खालीं पडत असल्याचा कृष्णास भास झाला. परंतु भागवतामध्यें पुढीलप्रमाणें हकीगत आढळते. शाल्व गुप्त झाल्यावर एक पुरुष रडत रडत कृष्णाकडे आला व त्यानें कृष्णाला सांगितलें कीं, 'शाल्वानें वसुदेवाला बांधून नेल्यामुळें देवकीमातेनें हा वृत्तांत तुला कळविण्याकरितां मला तुजकडे पाठविलें आहे.' हें सर्व वर्तमान कृष्ण ऐकत आहे, तोंच शाल्व वसुदेवास घेऊन तेथें आला व कृष्णाची निर्भर्त्सना करून त्याच्या समोर त्यानें वसुदेवाचा वध केला (भा. १०.७७). इतक्यांत सौभ विमान, शाल्व व वसुदेव हीं सर्व दिसेनाशीं झालीं. तेव्हां ही शाल्वाची कपटमायाच असावी, अशी कृष्णाची खात्री होऊन चुकली व पुनः युद्ध सुरू झालें. लवकरच कृष्णानें आपलें सुदर्शनचक्र याच्या विमानावर सोडून तें मोडून टाकिलें व यास ठार केलें (म. व. १४–२२; भा. १०. ७६–७७).

४ याला सैंहिकेय किंवा सिंहिकापुत्र असें म्हणत असत. याला जिंकण्याकरितां शंकरानें परशुरामाला आज्ञा केली होती; त्याप्रमाणें त्यानें याला ठार मारिलें (विष्णुधर्म. १. ३७. ४८–४९).

५ एक दैत्य. यानें धर्म उध्वस्त केला तेव्हां विष्णूनें संभलग्रामांत विष्णुयशस् नामक ब्राह्मणाचे घरीं अवतार घेऊन याचा नाश केला (स्कंद. १. २.४०).

**शाल्वल**—दधिवाहन नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**शावस्त**—(सू. इ.) भागवतमतें दुसऱ्या युवनाश्वाचा पुत्र. मत्स्य, विष्णु व वायु यांच्या मतें हा श्रावस्त होय.

**शाश्वत**—(सू. निमि.) हा विष्णुमतें श्रुतपुत्र होय.

**शाष्पेय**—एक शाखाप्रवर्तक (पाणिनि पहा).

**शास्तृ**—कश्यप व सुरभि यांचा पुत्र.

**शिक्ष**—ऋषभ पर्वतावर राहणाऱ्या गंधर्वांतील एक.

**शिख**—यानें सर्पसत्रांत नेष्ट्याचें काम केलें (पं. ब्रा. २५. १५. ३).

**शिखंडिन्**—सातव्या वाराहकल्पांत वैवस्वत मन्वंतराच्या अठराव्या चौकडींतील हा शंकराचा अवतार आहे. हिमालयावर शिखण्डी नांवानें एक पवित्र शिखर आहे. तेथें हा अवतार झाला. शिखण्डीवनहि तेथेंच आहे. याला अनुक्रमें पुढीलप्रमाणें पुत्र आहेत. १ वाचःश्रवस्, २ रुचीक, ३ स्यावास्य, ४ यतीश्वर (शिव. शत. ५).

२ (सो. अज.) द्रुपदाचा पुत्र. हा प्रथम स्त्री असून नंतर शिवकृपेनें पुरुष झाला. लहानपणापासून याचें पालनपोषण पुरुष म्हणूनच करण्यांत आलें होतें. एवढेंच नव्हे तर दशार्णदेशाधिपति हिरण्यवर्मन्च्या मुलीशीं याचें लग्नहि करून देण्यांत आलें होतें. हिरण्यवर्म्यास आपला जांवई स्त्री आहे हें कळतांच युद्धाचा प्रसंग आला. अशा वेळीं शिखंडीनें घरांतून निघून अरण्यांत पलायन केलें. तेथें स्थूणाकर्ण यक्षाच्या कृपेनें परत बोलीनें याला पुरुषत्व मिळालें. त्यामुळें हिरण्यवर्म्याचें संशयनिरसन झालें. पुढें स्थूणाकर्णाला कुबेरानें शाप दिल्यामुळें पुरुषत्व शिखंडीकडे आमरण राहिलें (म. उ. १८८-१९२).

हा द्रोणाकडून धनुर्विद्या शिकला यानें भारतीय युद्धांत पांडवांच्या बाजूनें चांगली कामगिरी केली. हा एक अक्षौहिणी सैन्याचा अधिकारी होता. कोणत्याहि व्यूहांत याची महत्त्वाच्या जागीं नेमणूक असे. भीष्म आपल्या नियमाप्रमाणें पूर्वी स्त्री असणाऱ्या याच्याशीं लढण्यास तयार नव्हता. याच गोष्टीचा पांडवांनीं फायदा घेऊन याला पुढें करून दहाव्या दिवशीं अर्जुनानें भीष्माला घायाळ केलें (म. भी. ११९). पुढें अठराव्या दिवशीं रात्रीं अश्वत्थाम्यानें यास मार्गशीर्ष वद्य आमवास्येस ठार केलें (म. सौ. ८; भारतसावित्री). अंबेनें कार्तिकस्वामीपासून एक माला मिळविली होती. ती माला गळ्यांत घालणारा भीष्माला ठार करणारा होणार होता. ती माला अंबेनें द्रुपदाच्या घरीं टाकून दिली होती. ती शिखंडिनीनें गळ्यांत घातली. तेव्हां द्रुपद घाबरला व त्यानें यास अरण्यांत घालवून दिलें. पण गंधर्वानें यास पुरुषत्व दिल्यावर द्रुपदास आनंद झाला व त्यानें यास घरांत घेतला. ही अगदीं वेगळी हकीगत फक्त कुंभकोण प्रतींत आहे (म. आ. ११० कुं.).

याचे घोडे भुरकट रंगाचे होते. ते यास तुंबुरूनें दिले होते. पांचालांकडे बारा हजार वीर होते, त्यांपैकीं सहा हजार एकट्या याच्याबरोबर होते (म. द्रो. २३).

**शिखंडिन् याज्ञसेन**—यानें केशिन् दाल्भ्याच्या यज्ञांत दीक्षेविषयीं अनेकांशीं भाषणें केलीं (सां. ब्रा. ७. ४).

**शिखंडिनी**—विजिताश्व राजाची स्त्री.

२ (शिखंडिन् पहा).

**शिखंडिनी अप्सरा काश्यपी**—या दोन असून सूक्तद्रष्ट्या आहेत ( ऋ. ९. १०४ ).

**शिखाग्रीविन्**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**शिखावत्**—युधिष्ठिरसभेंतील ऋषि ( म. स. ४.२०कुं. ).

**शिखावर्ण**—एक भृगुकुलोत्पन्न गोत्रकार.

**शिखावर्त**—कुबेरसभेंतील यक्ष (म. स. १०.१८कुं.).

**शिखि**—तामस मन्वंतरांतील इंद्र.

**शिखिध्वज**—एक राजा. हा चूडालेचा पति होय.

२ मयूरध्वजासहि शिखिध्वज हें नांव आहे.

**शिग्रु**—दाशराज्ञयुद्धांतील सुदासाचा एक शत्रु. अज, यक्षु आणि शिग्रु यांनीं इंद्रास घोड्यांच्या डोक्यांचा बलि अर्पण केला आहे ( ऋ. ७.१८.१९ ).

**शिंजय**—हा क्षत्रिय असून तपानें ब्राह्मण व ऋषि झाला ( वायु. २. २९. ११४ ).

**शिंजार**—एक ऋषि. अश्वींच्या कृपेंतील एक मनुष्य ( ऋ. ८. ५. २५; १०. ४०. ७ ).

**शित**—विश्वामित्र ऋषीच्या पुत्रांतील एक.

**शितिपृष्ठ**—सर्पसत्रांत मैत्रावरुण ऋत्विजाचें काम करणारा आचार्य ( पं. ब्रा. २५. १५. ३. ).

**शितिबाहु ऐषकृत नैमिशि**—एक यज्ञकर्ता. याच्या यज्ञांतील हवि वानरानें पळविला ( जै. ब्रा. १. ३६३ ).

**शिनि**—( सो. पुरूरवस्. ) हा विष्णु व भागवत यांच्या मतें गर्गपुत्र होय. हा गार्ग्य नांवानें प्रसिद्ध होऊन तपानें ब्राह्मण झाला. हा आंगिरस् कुलांतील मंत्रकार होता. मत्स्यांत यास शिबि म्हटलें आहे.

२ ( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें भजमानपुत्र.

३ ( सो. क्रोष्टु. ) मत्स्यमतें शूरपुत्र. वसुदेवदेवकींचा विवाह झाला, त्या वेळीं विघ्न करण्यास आलेल्या सर्व राजांचा यानें पराभव केला. तेव्हां यानें सोमदत्ताला दया करून सोडलें ( म. द्रो. १४४ ).

४ ( सो. वृष्णि. ) हा भागवत, मत्स्य व वायु यांच्या मतें अनमित्रपुत्रांतील धाकटा होय. विष्णुमतें सुमित्रपुत्र होय.

५ ( स्वा. उत्तान. ) चक्षु व नड्वला यांचा पुत्र.

**शिनेयु**—( सो. क्रोष्टु. ) विष्णुमतें उशनस्पुत्र.

**शिप्रक**—( आंध्र. भविष्य. ) विष्णुमतें आंध्रवंशीय पहिला राजा. यास बलि, सिंधुक व शिशुक अशीं नांवें आहेत.

**शिबि**—तामस मन्वंतरांतील इंद्र.

२ हिरण्यकशिपूचा पुत्र. पण हा कांहीं ठिकाणीं प्रह्लादाचा पुत्र म्हणून सांगितला आहे.

३ ( स्वा. उत्तान. ) चक्षु व नड्वला यांचा पुत्र.

४ ( सो. वृष्णि. ) मत्स्यमतें वृष्णीचा पुत्र.

५ ( १ शिनि पहा ).

६ ( सो. अनु. ) उशीनर व माधवी ( म. उ. ११८. २० कुं. ) किंवा दृषद्वती (वायु. २. ३७. २१; ब्रह्मांड. ३. ७४. २०; मत्स्य. ४८. १८ ) यांचा पुत्र. हा मंत्रद्रष्टा आहे (ऋ. १०. १७९. १). याच्या यज्ञाचा निर्देश आहे ( बौ. श्रौ. २१.१८). एकदां याची परीक्षा पाहण्याकरितां अग्नीनें कपोताचें व इंद्रानें श्येनाचें अशीं रूपें घेऊन श्येन कपोताचे मागें लागला. कपोत यास शरण आला. तेव्हां श्येनानें ‘ माझें अन्न कपोत मला दे, किंवा मला त्याच्या वजनाचें तुझें मांस दे, ’ असें म्हटलें असतां यानें आपलें थोडें थोडें करतां करतां सबंध शरीर दिलें. तेव्हां प्रगट होऊन त्यांनीं याची स्तुति केली व ते निघून गेले ( म. व. १३२-१३३; २०० कुं. ). हीच कथा याचा पुत्र वृषदर्भाची म्हणूनहि दिली आहे ( म. अनु. ६७ कुं ). एकदां शिबि व सुहोत्र हे एकमेकांस वाटेंत भेटले असतां दोघांनीं यथोपचार परस्परांचें स्वागत केलें. पण थोरांस वाट द्यावी या न्यायानें कोणी कोणास वाट द्यावी हें न कळल्यामुळें ते स्वस्थ उभेच राहिले. पण दानाचें महत्त्व इतर गोष्टींपेक्षां जास्त आहे हें कळतांच सुहोत्रानें यास वाट दिली ( म. व. १९७ कुं. ). एकदां याचे येथें एक अतिथि आला व त्यानें बृहद्गर्भ नांवाच्या याच्या पुत्राचें मांस शिजवून मागितलें. त्याप्रमाणें यानें त्यास मारून तें शिजविलेंहि. पण इकडे तो ब्राह्मणहि दुसरीकडे जाऊन कोष, शस्त्रागार, अंतःपुर, हत्ती व घोड्यांच्या पागा जाळीत सुटला. इतक्यांत शिबि तें मांस डोक्यावर घेऊन त्याकडे गेला. पण त्यानें तें यासच खावयास सांगितलें व हा खाणार इतक्यांत त्या ब्राह्मणानें याचा हात धरून त्या बृहद्गर्भास जिवंत केलें व याचा स्तुति करीत तो गुप्त झाला ( म. व. १४०.१९; अनु. २००.४ कुं. ). याचा बंधु अष्टक. याच्या येथील यज्ञ झाल्यावर वसुमनस्, अष्टक, प्रतर्दन व हा असे सर्व माधवीपुत्र विमानांतून फिरत असतां वाटेंत यांस नारद भेटला. नंतर विमानांतून खालीं उतरतांना अगोदर जमिनीस पोहोंचणारा कमी पुण्यवान् असा यांचा संकेत ठरला. त्यांत हा आपल्याहि मागाहून जमिनीस पोहोंचेल, असें नारदानें सांगितलें होतें ( म. व २०१ कुं. ). एकदां इंद्रानें यास आपल्या मदतीस बोलावून नेलें होतें. पुढें आपणास त्रास होऊं नये म्हणून इंद्रपद यासच सांभाळण्यास सांगितलें. यास गोपति नामक एक पुत्र होता ( म. शां. ४८. ८५ कुं.). यास चार पुत्र होते, त्यांचीं नांवें–वृषादर्भ, सुवीर, मद्र व कैकेय ( भा. ९.२३.३ ). इतरत्र थोड्या फरकानें हींच नांवें आढळतात. बृहद्गर्भ नांवाच्या पुत्राचा उल्लेख गोपतीप्रमाणें फक्त महाभारतांतच आहे. सप्तर्षींचीं कमळें चोरीस गेलीं त्या वेळीं यानें शपथ घेतली होती ( म. अनु. १४३.

२६ कुं. ). माहात्म्यवर्णनार्थ याच्या दोन कथा सांगितल्या आहेत ( पद्म. उ. ८२; १९९ ). हा यमसभेतील एक सभासद आहे (म. स. ८.१० कुं.). ययातीस स्वर्गप्राप्तीकरितां यानें आपल्या अंतरिक्षांतील प्रदेश देऊन टाकिले ( म. आ. ८७.८ कुं. ). हा अतिशय संपत्तिवान्, उदार, पराक्रमी, उत्तम राज्यकर्ता व बहुत यज्ञ करणारा असा राजा होऊन गेला ( म. द्रो. ५८ ). हा ब्रह्मदेवाच्या यज्ञांतील प्रतिष्ठाता होता (पद्म. सृ. ३४). गोग्रहणकालीं पांडवांस जय मिळाला तो पाहण्याकरितां इतर देवांसमवेत हाहि विमानांतून आला होता ( म. वि. ५३.१४ कुं. ). याचें नगर शिवपूर होय.

७ पांडवपक्षीय एक राजा. याला द्रोणानें मारिलें ( म. द्रो. १५६.१९ कुं. ).

**शिमिदा**—एक राक्षसीण ( अ. वे. ४.२५.४; श.ब्रा. ७. ४. १. २७ ).

**शिम्यु**—दाशराज्ञ युद्धांतील सुदासाचा एक शत्रु. याचा सुदासानें पराभव केला ( ऋ. ७.१८.५ ). दस्यूबरोबर याचा उल्लेख आहे ( ऋ. १.१००.१८ ). याच्याबरोबर नहुष, भरत, वार्षागिर ऋज्राश्व, अंबरीष, सहदेव, भयमान इत्यादिकांचा उल्लेख येतो.

**शिरिंबिठ**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १५५ ). अनुक्रमणी याला भरद्वाजपुत्र म्हणते. हा वरील सूक्तांत अवदसा दूर घालविण्याचा प्रयत्न करीत आहे.

**शिरीष**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**शिरीषक**—नारदानें मातलीला वर म्हणून दाखविलेला सर्प ( म. उ. १०३.१४ कुं. ).

**शिर्[illegible]न्**—[illegible]चा पुत्र.

**शिलक शालावत्य**—एक आचार्य. चैकितायन दाल्भ्य व प्रवाहण जैवलि यांचा हा समकालीन होता ( छां. उ. १. ८. १ ).

**शिलर्दनि**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**शिलवृत्ति**—एक ऋषि. याचा गंगेच्या माहात्म्याविषयीं सिद्धाशीं संवाद झाला आहे (म. अनु. ६५. २१ कुं. ).

**शिलस्थलि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**शिलाद्**—नंदीचा पिता ( १ नंदिन् पहा ).

**शिलयूप**—विश्वामित्राचा पुत्र.

**शिलास्थलि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**शिलीन**—जित्वन् ऋषीचा पिता.

**शिल्प काश्यप**—हा काश्यप नैध्रुवीचा शिष्य. याचा शिष्य हरित कश्यप ( बृ. उ. ६. ५. ३ ).

**शिव**—वाराहकल्पांतील चालू मन्वंतरांत शिवाचे अवतार अठ्ठावीस झाले. या प्रत्येकास चार शिष्य असून, हा तत्कालीन द्वापरांत उत्पन्न झालेल्या व्यासाच्या मदतीकरितां कलियुगीं उत्पन्न होई. याच्या उत्पन्न होण्याच्या जागाहि दिल्या आहेत.

(१) श्वेत–( छागलपर्वत ), श्वेत, श्वेतशिख, श्वेताश्व, श्वेतलोहित.
(२) सुतार–दुंदुभि, शतरूप, हृषीक, केतुमत्.
(३) दमन–विशोक, विशेष, विपाप, पापनाशन.
(४) सुहोत्र–सुमुख, दुर्मुख, दुदर्भ, दुरतिक्रम.
(५) कंक–सनक, सनत्कुमार, सनंदन, सनातन.
(६) लोकाक्षि–सुधामन, विरजस्, संजय, अंडज.
(७) जैगीषव्य–( काशी ), सारस्वत, योगीश, मेघवाह, सुवाहन.
(८) दधिवाहन–कपिल, आसुरि, पंचशिख, शाल्वल.
(९) ऋषभ–पराशर, गर्ग, भार्गव, गिरीश.
(१०) भृगु–(भृगुतुंग), भृंग, बलबंधु, नरामित्र, केतुशृंग.
(११) तप–(गंगाद्वार), लंबोदर, लंबाक्ष, केशलंब, प्रलंबक.
(१२) अत्रि–( हेमकंचुक ), सर्वज्ञ, समबुद्धि, साध्य, शर्व.
(१३) बलि–( वालखिल्याश्रम ), सुधामन्, कश्यप, वसिष्ठ, विरजस्.
(१४) गौतम–अत्रि, दवशद, श्रवण, श्रविष्कट.
(१५) वेदशिरस्–( सरस्वतीतीर ), कुणि, कुणिबाहु, कुशरीर, कुनेत्रक.
(१६) गोकर्ण–( गोकर्णवन ), काश्यप, उशनस्, च्यवन, बृहस्पति.
(१७) गुहावासिन्–( हिमालय ), उतथ्य, वामदेव, महायोग, महाबल.
(१८) शिखंडिन्–( सिद्धक्षेत्र— [illegible] ), वाचःश्रवस्, रुचिक, स्यावास्य, यतीश्वर.
(१९) जटीमालिन्–हिरण्यनामन्, कौशल्य, लोकाक्षिन्, प्रधिमि.
(२०) अट्टहास–( अट्टहासगिरि ), सुमंतु, बर्बरि, कबंध, कुशिकंधर.
(२१) दारुक–( दारुवन ), प्लक्ष, दार्भायणि, केतुमत्, गौतम.
(२२) लांगली भीम–( वाराणसी ), भल्लविन्, मधु, पिंग, श्वेतकेतु.
(२३) श्वेत–( कालंजर ), उशिक, बृहदश्व, देवल, कवि.
(२४) शूलिन्–( नैमिषारण्य ), शालिहोत्र, अग्निवेश, युवनाश्व, शरद्वसु.
(२५) दंडीमुंडीश्वर–छगल, कुंडकर्ण, कुभांड, प्रवाहक.
(२६) सहिष्णु–( भद्रवटपूर ), उलूक, विद्युत्, शंबुक, आश्वलायन.

(२७) सोम-(प्रभासतीर्थ) अक्षपाद, कुमार, उलूक, वत्स.

(२८) लकुलिन्-कुशिक, गर्ग, मित्र, तौरुष्य ( वायु. १. २३; शिव. शत. ४-५. वायु. ४८-९. २०; ) वरील शिवाचे अवतार तीनहि ठिकाणीं असले तरी आम्हीं शतरुद्रसंहितेंतील दिले आहेत. इतरत्र प्रायः हेच आहेत, पण शुद्धाशुद्धतेमुळें फरक पडला आहे. याशिवाय सद्योजात, अघोर, तत्पुरुष, ईशान व वामदेव हेहि शिवाचे अवतार आढळतात ( शिव. शत. १; रुद्र पहा ).

२ उत्तम मन्वंतरांतील देवगण. हे बारा आहेत. प्रतर्दन, यति, यम, यशस्कर, वह्नि, वसुदान, विष, सुदान, सुचित्र, सुमंजस्, स्वार, हंस ( ब्रह्मांड. २. ३६. ३२-३३ ).

३ अंगिराकुलांतील गोत्रकार.

४ उत्तम मन्वंतरांतल्या सप्तर्षींतील एक.

५ तामस मन्वन्तरांतील एक योगवर्धन.

६ हे सुदासाच्या शत्रूंपैकीं असावेत ( ऋ. ७. १८. ७ ). सुदासानें अलिन, पक्थ, भलानस आणि विषाणिन् यांचेबरोबर याचा पराभव केला.

७ एक ब्राह्मण. हा वितस्त्याचा मुलगा. याच्या मुलाचें नांव श्रवस् होय ( म. अनु. ८. ६२ कुं. ).

८ गरुडानें गालवाला पृथ्वी दाखविली, तेव्हां दक्षिणेकडे सिद्ध व वेदपारग शिव ब्राह्मणांचें स्थान दाखविलें आहे ( म. उ. १०९. १८ कुं. ).

९ ( स्वा. प्रिय. ) इध्मजिह्वाच्या सात पुत्रांतील ज्येष्ठ. याच्या देशासहि याचेंच नांव आहे.

**शिवकर्ण**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार. याबद्दल शवकर्ण असा पाठ आहे.

**शिवशर्मन्**—एक विष्णुभक्त ब्राह्मण. यानें आपल्या पुत्रांची कठोरपणें परीक्षा पाहिली. पण मुलांच्या पितृभक्तीनें याच्या सर्व कुटुंबाचा उद्धार झाला(यज्ञशर्मन् व सोमशर्मन् पहा).

२ यास तीर्थयात्रेमुळें नंदिवर्धन राजाच्या कुलांत जन्म प्राप्त झाला ( स्कंद. ४. १. ८-२४ ).

३ ( सुदेवा पहा ).

**शिवशातकर्णि व शिवश्री**—( आंध्र. भविष्य. ) विष्णुमतें पुलिमत्त्या पुत्र. भागवतांत यास मेदशिरस् व मत्स्यांत शिवश्री म्हटलें आहे.

**शिवस्कंद**—(आंध्र. भविष्य.) भागवतमतें मेदशिरस्चा, विष्णुमतें शिवशातकर्णीचा व मत्स्यमतें शिवश्रीचा पुत्र.

**शिवस्वाति** किंवा **शिवस्वामिन्**—( आंध्र.भविष्य.) भागवतमतें चकोराचा, विष्णुमतें चकोरशातकर्णीचा, मत्स्यमतें चकोरशांतिकर्णीचा, ब्रह्मांडमतें शातकर्णीचा व वायुमतें सातकर्णीचा पुत्र.

**शिवा**—अंगिरस् ऋषीची स्त्री ( म. व.२२७. १ कुं.; सुभा व २ वसुदा पहा ).

२ अनिल वसूची पत्नी ( म. आ. ६७. २५ कुं. ).

३ कश्यप व खशा यांची कन्या.

**शिशिर**—धर नामक वसूच्या पुत्रांतील एक.

२ विश्वामित्रकुलोत्पन्न एक मंत्रकार.

३ व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील विष्णुमतें वेदमित्राचा शिष्य; भागवतमतें देवमित्राचा शिष्य. याबद्दल शैशिरेय असा वायु व ब्रह्मांड यांच्या मतें पाठभेद आहे.

**शिशु**—( सो. वसु. ) विष्णुमतें सारणपुत्र.

**शिशु आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ११२ ) व सामद्रष्टा ( पं. ब्रा. १३. ३. २४ ).

**शिशुक**—(आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें आंध्रवंशीय पहिला राजा ( शिप्रक पहा ).

२ ( किलकिला. भविष्य. ) ब्रह्मांड व विष्णु यांच्या मतें नंदियशपाचा पुत्र. दौहित्रपुरिकेंत राज्य करणारा एक राजा.

**शिशुनंदिन्**—(किलकिला. भविष्य.) भागवत व भविष्य यांच्या मतें भूतनंदाचा पुत्र. यानें वीस वर्षें राज्य केलें.

**शिशुनाग**—( शिशु. भविष्य. ) सूर्यवंशाचा उच्छेद करून प्रद्योतवंशाचें मगधांत राज्य सुरू झालें. प्रद्योतापैकीं नंदिवर्धनाचा पाडाव करून शिशुनाग गादीवर बसला. हा मूळचा काशीचा; नंतर मगधांत गेला.शिशुनागाच्या वंशांतील दहा पुरुषांनीं तीनशें साठ वर्षें राज्य केलें.

**शिशुपाल**—चेदि देशाधिपति दमघोष व वसुदेवभगिनी श्रुतश्रवा यांचा पुत्र. हा पूर्वजन्मीं हिरण्यकशिपु ( मत्स्य. ४६. ६; विष्णु. ४. १४. ११; ब्रह्म. १४. २० ), रावण ( वायु. २. ३४. १५८; ब्रह्मांड. ३. ३१. १५९ ) होता. यास चैद्यहि म्हणत. महाभारतांत व मत्स्यांत यास सुनीथ म्हटलें आहे ( म. स. ३९. ५४; ४२. १ कुं. ). जन्मतांक्षणीं हा चतुर्भुज, त्रिनेत्र व गर्दभासारख्या आवाजाचा होता. पण आकाशवाणीनें ' हा महाबलिष्ठ व भाग्यशाली होणार असून याचा मृत्यु शस्त्रानें होणार आहे, तो शस्त्रधर जन्मलाहि आहे. आणि ज्याचे मांडीवर यास दिलें असतां याचे दोन भुज गळून डोळा जिरेल, तोच तो शस्त्रधारी होय,' असें सांगितलें. हा विचित्र मुलगा पाहण्याच्या इच्छेनें व समाचार वगैरे घेण्याकरितां इतर राजांप्रमाणें कृष्ण व बलराम हेहि आले. बराच वेळ तो शस्त्रधारी कोण हें ओळखण्याचा प्रयत्न केला, पण शेवटीं वरील गोष्टींप्रमाणें कृष्ण याचा शत्रु ठरला ( म. स. ६६.१ कुं.). श्रुतश्रवेनें कृष्णास विनंति केल्यामुळें त्यानें याचे शंभर अपराध क्षमा करण्याचें वचन दिलें. हा जरासंधाचा एकसेनापति होता ( ह. वं.२. ३४ ). हा आपले

मावसभाऊ पांडव ( भा. ७. १; ९.२४ ) व आतेभाऊ कृष्ण ( म. स. ६६. २३; व. १५. २ कुं.) यांचा फार द्वेष करी. राजसूय यज्ञांत भीष्माचे अनुमतीनें कृष्णास अग्रपूजेचा मान मिळाला, म्हणून यानें भीष्मकृष्णांची निंदा केली ( म. स. ३९-४०; ६४ कुं. ). यास भीम वगैरे मारावयास धांवले; पण कृष्णानें त्यांचें निवारण केलें (म. स. ६५.९-१४). कृष्णादिक प्राग्ज्योतिषपुरास गेले, अशी कंडी पिकविली, द्वारका जाळली, रैवतकावर भोजास मारिलें, अश्वास अडवून वसुदेवाच्या अश्वमेधांत विघ्न आणिलें. विशालकन्या व करूषपत्नी भद्रेस करूषांच्या वेषानें आणि बभ्रूच्या स्त्रीस यानें पळविलें ( म. स. ६८. १८ कुं. ) इ. यानें कृष्णाचे अपराध केले होते ते त्यानें वचनाकरितां सहन केले ( म. क. ६८ कुं. ). पण आतां 'रुक्मिणीस आपण वरिलें असून हा तिला आपली स्त्री म्हणवितो ' असें मंडपांतून बाहेर पडतांना हा म्हणाल्यावर कृष्णानें अपराध पूर्ण झाले असें पाहून याचा सुदर्शन चक्रानें वध केला ( म. स. ७०.५२ कुं.; भा. १०. ७४ ). त्या वेळीं याच्या देहांतील तेज कृष्णदेहांत विलीन झालें. यास धृष्टकेतु, सुकेतु, व शरभ असे पुत्र व करेणु( रेणु )मती कन्या होती.

**शिशुमार**—याचें नांव शर्कर. शिशुमार म्हणजे सुसर. हा ऋषि पाण्यांत सुसरीच्या रूपानें राहत असे. इंद्राची सर्वत्र प्रशंसा झाली, पण यानें इंद्राची स्तुति केली नव्हती. इंद्र याच्याकडे आला असतां यानें ' मी पाणी उडवितों. त्यांत जितके बिंदु असतील तितका वेळ मी तुझी स्तुति करीन ' असें हा म्हणाला व पाण्याला वेग देऊं लागला. पण याला आढळून आलें कीं, आपली स्तुति कमी आहे. तेव्हां यानें तपश्चर्येनें साम मिळविलें. त्या सामाचें याच्या नांवावरून शार्करसाम असें नांव पडलें ( पं. ब्रा. १४. ५. १५ ).

२ स्वायंभुव मन्वंतरांतील एक प्रजापति. यानें आपली कन्या भ्रमी ध्रुवास दिली होती.

३ दोष वसु व शर्वरी यांच्यापासून झालेला भगवंताचा अवतार ( भा. ६. ६. १४ ).

**शिशुरोमन्**—तक्षककुलांतील जनमेजयाच्या सत्रांत दग्ध झालेला सर्प ( मे. आ. ५७. १० कुं. ).

**शिष्ट**—( स्वा. उत्तान. ) ध्रुव व धन्या यांचा पुत्र. यास सुच्छाया स्त्री असून कृप, रिपुंजय, वृत्त आणि वृक असे चार पुत्र होते ( मत्स्य. ४ ). शिष्ट व सृष्टि एकच होत.

**शीघ्र**—( सू. इ. ) हा भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें अग्निवर्णपुत्र होय. भविष्यमतें यास अपवर्गापुत्र शीघ्र. गंतृ म्हटलें आहे.

**शीघ्रग**—संपातीच्या पुत्रांतील एक.

**शीघ्रगंतृ**—( शीघ्र पहा ).

**शीततोया**—वरुणाची स्त्री.

**शीतवृत्त**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार गण.

**शुक**—शरभाचा पुत्र. याची स्त्री व्याघ्री व पुत्र ऋक्ष.

२ रावणपक्षीय एक राक्षस. हा त्याचा अमात्य असून यानें सारणाबरोबर हेराचेंहि काम केलें होतें ( वा. रा. यु. २५ ). हा प्रथम ब्राह्मण होता; पण अगस्त्यानें याजवळ मांसाशन मागितलेलें वज्रद्रंष्ट्रानें ऐकून याच्या स्त्रीच्या रूपानें त्यास नरमांस घातलें म्हणून अगस्त्यानें यास राक्षस होण्याबद्दल शाप दिला. पण उःशापानें रामाचें दर्शन व रावणास उपदेश केल्यावर हा मुक्त झाला.

३ ( सू. ) नरिष्यंताचा पुत्र ( पद्म. सृ. ९ ).

४ दीर्घतमस् व्यासाचा पुत्र. यास कृष्णदर्शन घडल्यामुळें उत्तर जन्मीं हा उपनंद गोपाची कन्या झाला ( पद्म. पा. ७२ ). दीर्घतमस् हा व्यासाच्या यादींत नाहीं.

५ सुबलाचा पुत्र. यास इरावतानें मारिलें ( म. भी. ९०. ३०–४९ कुं. ).

६ पुत्रार्थ तप करून व्यासानें शंकरापासून वर मिळविला नंतर अरणीमंथन करीत असतां तेथें घृताची आली व तिनें यास कामोत्सुक करून ती शुकीरूप बनली. कामोत्सुक्यामुळें त्याचें शुक्र अरणीवर न कळत पडलें व त्या मंथनापासून हा उत्पन्न झाला. पण हा व्यास व वटिका यांचा पुत्र होता, असेंहि आढळतें ( स्कंद. ६. १४७-१४८ ). याचें उपनयन महादेवानें केलें, त्या वेळीं इंद्रानें यास कमंडलु व वस्त्रें दिलीं. हा बृहस्पतीपासून वेद, उपनिषदें, वेदसंग्रह, इतिहास, राजनीति व मोक्षादि धर्म व्यासापासून शिकला. नंतर हा बहुलाश्व जनकाकडे ब्रह्मज्ञान शिकण्याकरितां व शंका निरसन करून घेण्याकरितां गेला. तेथेंहि जनकानें यास स्त्रीजालांत गोंवण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. पुढें जनकाकडून परत आल्यावर यानें पीवरीशीं लग्न केलें व तीपासून यास कृष्ण, गौरप्रभ, भूरि, देवश्रुत हे पुत्र व कीर्ति कन्या ( दे. भा. १. १४; नारद. १. ५८ ), भूरिश्रवस्, शंभु, प्रभु, कृष्ण, गौर असे पुत्र व कन्या कीर्तिमती (ब्रह्मांड. ३. ८.९३; वायु. २.९.८५). हरिवंश, भागवत व मत्स्य यांत भूरिश्रवस् नाहीं व कन्येचें नांव कृत्वी दिलें आहे. तिला गो असेंहि नांव आहे (भा. ९.२१.२५; मत्स्य. १५; ह.वं. १. १८ ). पण हरिवंशांत यास सुकाल पितराची कन्या गो अथवा एकशृंगा नांवाची आणखी एक स्त्री असल्याचें दिलें आहे. महाभारतांत व स्कंदांत हा ब्रह्मचारी होता असें सांगून स्कंदांत वाटिकेनें आपणांस दुसरा पुत्र व्हावा, एतदर्थ तप केल्याचें सांगितलें आहे ( स्कंद. ६.१४७-१४८ ). यास धर्माचें ज्ञान ( म. शां. ३२९ कुं. ) व जगदुत्पत्ती( म. शां.

२३८ कुं.) विषयीं माहिती व्यासानें सांगितली. यास व्यासानें (भा. १.७-८) किंवा सूतानें भागवत सांगितलें (पद्म. उ. १९८). यानें परीक्षिताकडे जाऊन (भा. १.१९-२५) त्यास सांगितलें (भा. २.१.१०). त्या वेळीं हा तेजस्वी, तरुण व आजानुबाहु होता (भा. १.१९.१६-२८). हा धर्मराजाच्या मयसभेस गेला होता (म. स. ४.१७ कुं.). यानें गंधर्वादिकांस भारत सांगितलें (म. आ. १.१२४ कुं.). नारदानें सनत्कुमारोक्त वैराग्याचा उपदेश दिल्यावर आदित्य लोकांत जाण्याच्या इच्छेनें कैलास शिखरावरून उड्डाण करून हा पंचमहाभूतांत विलीन झाला (म. शां. ३४१ कुं.; यो. वा. २.१)

**शुकनाभ**—रावणपक्षीय राक्षस (वा. रा. सुं. ६).

**शुकी**—कश्यप व ताम्रा यांची कन्या. हिचे पुत्र सुख, सुनेत्र, विशिख, सुरूप, सुरस व बल (ब्रह्मांड. ३. ७. ४५०).

२ अनलेची कन्या.

**शुक्ति आंगिरस**—सामद्रष्टा (पं. ब्रा. १२. ५. १६).

**शुक्र**—भृगु व हिरण्यकशिपुकन्या दिव्या यांचा पुत्र. हा अघोराचा शिष्य होता. यानें हिरण्याक्षाला निग्रहविधि सांगितला (लिंग. २. ५०). हाच बलि वामनाला त्रिपाद भूमि देत असतां संकल्पाचें उदक पडूं नये म्हणून, झारीच्या तोंडाशीं जाऊन बसला. तेव्हां दर्भाग्रानें झारीचें तोंड मोकळें करीत असतां शुक्राचार्यांचा एक डोळा फुटला. म्हणून यास एकाक्ष म्हणतात (नारद. १. ११). यानें जालंधरास संजीवनी विद्या दिली (पद्म. उ. ४; उशनस् पहा).

हा व अंगिरस् पुत्र जीव यांना अंगिरस्नें शिकवावें असें ठरलें. पण शिकवितांना हा दोघांच्या शिक्षणांत प्रतारणा करूं लागला हें सहन न होऊन शुक्रानें शिवाची आराधना केली व त्याजवळून मृतसंजीवनि विद्या प्राप्त करून घेतली. ती याचेजवळून कचानें, कचाजवळून बृहस्पतीनें व बृहस्पतीजवळून सर्व देवादिकांनीं प्राप्त करून घेतली (ब्रह्म. ९५. ३; २८). गौतमीमाहात्म्याकरितां आणखीहि याच्या नांवाचा उपयोग केला आहे (ब्रह्म. १५२). यानें एक हजार अध्यायांचें बार्हस्पत्यशास्त्र केलें व नंतर लोकांनीं आणखी संक्षिप्त केलें (म. शां. ५८. ९३ कुं.).

२ शर्यातीचा पुत्र. यान पांडवांना धनुर्विद्या दिली (म. आ. १३३. ५१ कुं.).

३ पांडवांकडील एक पांचालदेशीय क्षत्रिय. यास कर्णानें मारिलें (म. क. ९१. ४६-४७ कुं.).

**शुक्र जाबाल**—एक आचार्य (जै. उ. ब्रा. ३. ७. ७).

**शुक्ल**—(स्वा. उत्तान.) भागवतमतें हविर्धान व हविर्धानी यांचा पुत्र.

२ अंगिराकुलांतील गोत्रकार.

३ भारतीय युद्धांत कर्णानें मारिलेला पांडवपक्षीय राजा (म. क. ५६). याचे घोडे, धनुष्य, कवच व ध्वज हीं शुभ्र होतीं (म. द्रो. २३).

४ उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**शुंग**—मौर्यवंशांतील शेवटला राजा बृहद्रथ त्याचा शुंगवंशांतील पहिला राजा पुष्पमित्र हा सेनापति होता. पुष्पमित्रानें बृहद्रथाचा वध करून राज्य बळकाविलें. या घराण्यांतील दहा पुरुषांनीं ११२ वर्षें राज्य केलें.

**शुचंति**—याचें अश्वींनीं रक्षण केलें (ऋ. १. ११२. ७).

**शुचि**—(सो. क्रोष्टु.) हा भागवत व विष्णु यांच्या मतें अंधकपुत्र होय. मत्स्यमतें याचें नांव शशि असें आहे.

२ भरद्वाज व अंगिरस्कुलोत्पन्न एक ऋषि. हाच वसिष्ठशापानें मनुष्ययोनींत विजिताश्वपुत्र झाला.

३ (स्वा. उत्तान.) भागवतमतें विजिताश्वाचा पुत्र होय.

४ (सू. निमि.) हा भागवत व विष्णु यांच्या मतें शतद्युम्न जनकाचा पुत्र होय. वायुमतें यास मुनि हें नांव आहे.

५ विश्वामित्र ऋषीचा पुत्र.

६ चेदि देशचा राजा सुबाहु, याजकडे जाणारा एक व्यापारी लोकांचा मुख्य (म. व. ६४. १२७ कुं.).

७ उत्तम मनूचा पुत्र.

८ भौत्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

९ भौत्य मन्वंतरांतील इंद्र.

१० भृगुपुत्र व भार्गव देवांपैकीं एक.

११ विकुंठ देवांपैकीं एक.

१२ सुधामन् देवांपैकीं एक.

१३ (सो. पुरूरवस्.) अनेनस्चा पौत्र व शुद्धाचा पुत्र. ह्याच्या मुलाचें नांव त्रिककुद् होय.

१४ (सो. मगध. भविष्य.) भागवत व विष्णु यांच्या मतें विप्राचा, वायुमतें महाबाहूचा, ब्रह्मांडमतें रिपुंजयाचा, व मत्स्यमतें विभूचा पुत्र.

१५ कश्यप व ताम्रा यांची कन्या.

**शुचिका**—कश्यप व मुनि यांची कन्या.

**शुचिद्रव**—(कविरथ पहा).

**शुचिविद्य**—(सो. पुरूरवस्.) मत्स्यमतें पुरूरवापुत्र.

**शुचिवृक्ष गौपालायन**—वृद्धद्युम्न आभिप्रतारिन्चा पुरोहित (ऐ. ब्रा. ३. ४८. ९; मै. सं. ३. १०. ४).

**शुचिश्रवस्**—हा ब्रह्ममानसपुत्र असून एक प्रजापति होता (वायु. २. ४. ५४).

२ स्वायंभुव मन्वंतरांतील अजित् देवांपैकीं एक.

**शुचिष्मत्**—कर्दम प्रजापतीचा पुत्र. याला त्यानें समुद्रापासून परत मिळविलें. यानें शंकरापासून समुद्रावरचें स्वामित्व मिळविलें व पश्चिमेचाहि हा अधिपति झाला ( स्कंद. २. ४. १. १२ ).

**शुचिस्मिता**—एक अप्सरा ( म. स. १०. ११ कुं. ).

**शुद्ध**—( सो. आयु. ) अनेनस् वा पुत्र.

२ भौत्य मन्वन्तरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**शुद्धोद**—( सू. इ. भविष्य. ) विष्णु, वायु व भागवत यांच्या मतें हा शाक्यपुत्र होय. याचा मुलगा लांगल अथवा पुष्कल. याबद्दल भविष्य व मत्स्य पुराणांमध्यें शुद्धोदन असा पाठ आहे. भविष्यमतें शाक्य मुनीचा पुत्र. यानें तीस वर्षें राज्य केलें ( भवि प्रति. १. ७ ).

**शुद्धोदन**—बुद्धाचा पिता ( अग्नि. १६; शुद्धोद पहा).

**शुनःपुच्छ**—शुनःशेपाचा भाऊ ( ऐ. ब्रा. ७. १५ ).

**शुनःशेप**—हा भृगुकुलांतील ऋचीकाचा मधला मुलगा होय. ऋचीकाला अजीगर्त म्हणत असावेत. शुनःपुच्छ व शुनोलांगूल हे याचे बंधु होत. याला आजीगर्ति व सौयवसि अशीं पैतृक नांवें आहेत. हा सूक्तद्रष्टा आहे ( ऋ. १. २४. १३-१४ ).

हरिश्चंद्राला मुलगा होईना म्हणून त्यानें वरुणाला मुलगा झाल्यास 'तुला बळि देईन' असा नवस केला. पण पुढें प्रत्यक्ष मुलगा झाल्यावर तो नवस फेडणें लांबणीवर टाकूं लागला. रोहिताला कळूं लागल्यावर तोहि या भीतीनें घरांतून पळून गेला. हरिश्चंद्राला उदर रोगानें ग्रासलें. अशा स्थितींत रोहितानें शुनःशेपाला बळि देण्याकरितां अजीगर्ताकडून विकत घेतलें. पण शुनःशेपाला विश्वामित्रानें यज्ञस्तंभापासून सोडवून आपला पुत्र मानिलें व देवरात असें नांव ठेविलें. विश्वामित्र याचा मामा असून हरिश्चंद्राच्या यज्ञांत विश्वामित्र अध्वर्यु होता ( ऐ. ब्रा. ७.३; सां. श्रौ. १५.२०-२१; १६. ११.२). वेदार्थदीपिकेंत या कथेचा ऋग्वेदांतील सूक्ताशीं संबंध लाविला आहे. शेवटीं मंत्रप्रभावानें याची सुटका झाली व हरिश्चंद्राचें पोट ओसरलें. या सूक्ताखेरीज याला पाशमुक्त केल्याचा निर्देश अग्नीच्या स्तुतींत आला आहे ( ऋ. ५. २. ७ सायणभाष्य ). ही कथा थोड्या फरकानें बऱ्याच ठिकाणीं आली आहे ( म. अनु. ३; दे. भा. ७. १४-१७; भा. ९. ७; १६; वा. रा. बा. ६१-६२; ह. वं. १. २७; विष्णु. ४. ७; ब्रह्म. १०; म. शां. २९४ ). विश्वामित्रानें याला वांचवून पुत्र मानिल्यामुळें हा भृगुगोत्री असूनहि विश्वामित्रगोत्री झाला. शुनःशेप म्हणजे दीर्घरात्रीनंतर अस्तास गेलेला सूर्य होय. कारण आईबापांच्या भेटीविषयीं उत्सुक असल्याचें या सूक्तांतील वर्णन व शेवटीं उपेनें सोडविणें हें वरील कथेशीं बिलकुल जुळत नाहीं ( ऋ. १. २४ श्री. घुलेशास्त्री यांचें भाषान्तर ).

**शुनःसख**—वृषादर्भीनें प्रतिग्रह घेईनात म्हणून कृत्येकडून सप्तर्षींना मारण्याचा प्रयत्न केला. पण इंद्रानें या नांवानें संन्याशाचें रूप घेऊन कृत्येस ठार केलें व सप्तर्षींना वांचविलें ( म. अनु. ९३ ).

**शुनक**—( सू. निमि.) हा भागवतमतें ऋतपुत्र होय. विष्णु व वायु यांच्या मतें सुनयाचा पुत्र.

२ (सो. क्षत्र.) हा भागवत व वायु यांच्या मतें गृत्समदपुत्र होय. पण महाभारताप्रमाणें रुरुला प्रमद्वरेपासून हा झाला. पुराणांत रुरुपर्यंतच्या मधल्या पिढ्या गाळल्या आहेत. शुनकाच्या पुत्राचें नांव शौनक होय ( म. अनु. ८. ६५ कुं. ). धर्मराजाच्या मयसभेत जे अनेक ऋषि अधिष्ठित होते, त्यांत शुनकाचें नांव आहे ( म. स. ४. २३ कुं. ).

३ (प्रद्योत. भविष्य.) रिपुंजय राजाचा हा एक दुष्ट अमात्य होता. रिपुंजयाला शुनकानें मारून स्वतःच्या प्रद्योत नांवाच्या मुलास राजा केलें ( रिपुंजय पहा ).

४ व्यासाच्या अथर्वन्शिष्यपरंपरेंतील भागवतमतें पथ्याचा शिष्य.

**शुनस्कर्ण बाष्किह**—याच्या नांवानें शुनस्कर्णस्तोम नांवाचा एक याग प्रसिद्ध आहे ( पं. ब्रा. १७. १२. ६ ). यानें सर्वस्वार नांवाचा विधि केल्यामुळें हा निरोगी स्थितींत मरण पावला ( बौ. श्रौ. २१. १७ ).

**शुनहोत्र भारद्वाज**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ६. ३३-३४ ).

**शुनोलांगूल**—अजीगर्ताचा कनिष्ठ पुत्र व शुनःशेपाचा भाऊ ( ऐ. ब्रा. ७. १५; सां. श्रौ. १५. २०. १ ).

**शुभ**—स्वायंभुव मन्वंतरांतील धर्म व श्रद्धा यांचा पुत्र.

२ रैवत मन्वन्तरांतील एक देवगण.

**शुभध्वज**—( मेखलमणि पहा ).

**शुभा**—बृहस्पतीच्या दोन स्त्रियांतील एक.

२ गांधारराज सुबलाची कन्या ( म. आ. ११९.१० कुं. ).

**शुभांगद**—द्रौपदीस्वयंवरास आलेला एक क्षत्रिय ( म. आ. २०१. २२ कुं. ).

**शुभांगी**—कुरु राजाची स्त्री. हिचा पुत्र विदूरथ ( म. आ. ६३. ४२ कुं. ).

**शुभानन**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

२ पितरांपैकीं एक.

**शुभासुर**—जालंधराचा सेनापति ( पद्म. उ. ४ ).

**शुभ्र**—वसुदेव व पौरवी यांचा पुत्र.

२ रैवत मन्वंतरांतल्या अवताराचा पिता.

**शुंभ**--तारकासुराचा सेनापति ( मत्स्य. १५१ ).

२ रामसेनेंतील एक वानर ( वा. रा. उ. ४० ).

३ जालंधराचा एक आवडता दैत्य. याला जालंधरानें स्वर्ग जिंकिल्यावर अमरावतीच्या सिंहासनावर बसविलें (पद्म.उ.८).

**शुंभनिशुंभ**--हे दोघे भाऊ पातालांत राहत असत. ब्रह्मदेवानें यांना पुरुषापासून मृत्यु नसल्याचा वर दिला होता. नंतर भृगूच्या सल्ल्यानें शुंभ राज्य करूं लागला व निशुंभ बाह्य व्यवस्था पाहूं लागला. चंडमुंड, रक्तबीज व धूम्रलोचन हे यांचे आश्रित होते. शेवटीं या सर्वांना कालिकेनें ठार केलें ( दे. भा. ५. २१-३१; स्कंद. १. ३. २. १७; वायु. १. ५५-५६; मार्क. ८६ ).

**शुल्व**—उदंक ऋषीचा पिता.

**शुष्क**—गोकर्ण क्षेत्रांत राहणारा मुनि. भगीरथानें भूतलावर गंगा आणल्यानें समुद्राचें पाणी वाढलें त्यांत समुद्र-कांठच्या इतर गांवांप्रमाणें गोकर्णक्षेत्र बुडालें. तेव्हां शुष्क-प्रमुख मुनि महेंद्रावर जाऊन परशुरामाला भेटले. शुष्कानें परशुरामाला शस्त्रग्रहण करून समुद्राला हटविण्याबद्दल विनंति केली व गोकर्णाचा पुनरुद्धार करून घेतला ( ब्रह्मांड. ३. ५७ ).

**शुष्कभृंगार**—एक आचार्य ( सां. उ. २. ६; सां. श्रौ. १७ ७. १३ ).

**शुष्ण**--इंद्रानें कुत्साकरितां याचा वध केला ( ऋ. २. १९. ६ ).

**शुष्मायण सोम**—एक व्यास ( व्यास पहा ).

**शुष्मिण**--अमित्रतपनाचें पैतृक नांव.

**शूद्रक**—एक राजा. हा कलीचीं ३२९० वर्षें गेल्यावर राज्य करील ( स्कंद. १. २. ४० ).

**शूद्रा**—अत्रीची स्त्री ( ब्रह्मांड. ३. ८. ७४-८७ ).

**शून्यबंधु**—(सू. दिष्ट.) हा भागवतमतें तृणबिंदूचा पुत्र.

**शूर**—( सो. सह.) हा विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें सहस्रार्जुनपुत्र होय. भागवतमतें याचें नांव शूरसेन होतें.

२ ( सो. द्रुह्यु. ) हा मत्स्यमतें द्रुह्युपुत्र होय.

३ (सो. क्रोष्टु. ) यास दुसरें नांव राजाधिदेव होतें. हा भागवतमतें देवमीढपुत्र व विष्णु व मत्स्य यांच्या मतें देवमीढुषपुत्र होय. यास आर्यक नागाची कन्या भोजा अथवा मारिषा नांवाची पत्नी होती. तिच्यापासून यास वसुदेव, देवभाग, देवश्रवस्, आनक, सृंजय, श्यामक, कंक, शमीक, वत्सक व वृक असे दहा पुत्र व पृथा, श्रुतदेवा, श्रुतकीर्ति, श्रुतश्रवस् व राजाधिदेवी अशा पांच कन्या झाल्या (म. आ. ६८, १२९; १२० १ कुं.; भा. ९.२४; ह. वं. १. ३४). यास अश्मकी, भाषी, माषी आदि स्त्रिया दिल्या आहेत. अश्मकीचा देवमानुषि, माषीचा देवमीढुष, भाषी व भोजा एकच. भाषीचे पुत्र वायुपुराणांत पुढीलप्रमाणें वेगळे दिले आहेत. वसुदेव, देवभाग, देवश्रवस्, अनादृष्टि, कड, नंदन, भृंजिन, श्याम, शमीक, गंडूष ( वायु. २.३४.१४३-१४८ ).

४ दशरथपत्नी सुमित्रेचा पिता व मगधाचा राजा.

५ वसुदेव व मदिरा यांचा पुत्र.

६ कृष्ण व भद्रा यांचा पुत्र.

७ जयद्रथाचा एक मित्र.

**शूरतर**--एक राजा. यानें पटच्चर राक्षसास मारिलें होतें. हा भारतीय युद्धांत पांडवांकडे असून याच्या रथाचे अश्व पोपटी रंगाचे असत ( म. द्रो. २३ ).

**शूरभू** किंवा **शूरभूमि**—कंसकन्या.

२ उग्रसेनाची कन्या. वसुदेवभ्राता श्यामक याची स्त्री.

**शूरसेन**—( सू. इ. ) हा मत्स्यमतें शत्रुघ्नपुत्र होय.

२ ( १ शूर पहा ).

३ कर्णपुत्र वृषसेनाचें नामांतर होय.

४ सोमवंशी प्रतिष्ठानपूरचा एक राजा. यानें पुत्राकरितां बराच प्रयत्न केला. पण पुष्कळ उशीरां त्याला एक सर्प पुत्र झाला. ही गोष्ट दाई, अमात्य किंवा पुरोहित या कोणांसहि कळूं दिली नाहीं. त्याचें उपनयन व विवाह करण्यांत आले. शेवटीं गौतमीच्या कृपेनें तो मनुष्यरूप पावला ( ब्रह्म. १११ ).

५ मध्यदेशांतील सहस्रगांवचा राजा. चतुर्थीव्रत-माहात्म्याकरितां याची कथा आली आहे ( गणेश. १. ५६ ).

६ एक क्षत्रिय. हा पांडवपक्षीय पांचाल असून कर्णाकडून मारिला गेला ( म. क. ४३.१५ कुं. ).

**शूरवीर माण्डूक्य**—एक आचार्य (ऐ. आ. ३.१.१. ३-४; सां. आ. ७.२.८;९.१० ऋ. प्रा. ३ ).

**शूर्पणखा** किंवा **शूर्पनखी**—विश्रवस् व कैकसी यांची कन्या आणि रावण, कुंभकर्ण व बिभीषण यांची बहीण. हिच्या आईचें नांव राका असून खर हा सख्खा भाऊ दिला आहे (म. व. २७६.८ कुं.). कालकेयाधिपति विद्युज्जिह्वाशीं हिचा विवाह झाला होता. पुढें रावणाकडून हिचा पति अश्म नगरामध्यें चुकून मारिला गेल्यामुळें ही लंकेंत आली. नंतर रावणाच्या आज्ञेनें ही आपला मावसभाऊ खर यासहित दंडकारण्यांत राहूं लागली ( वा. रा. उ. २३-२४ ). तेथें राम आला असतां ही मोहित झाली. परंतु रामानें लक्ष्मणाशीं विवाह करण्यास हिला सांगितल्यामुळें ही लक्ष्मणाला तसें विचारूं लागली. परंतु त्यानें नाकारिल्यामुळें ही सीतेच्या अंगावर धांवली. त्याक्षणीं लक्ष्मणानें हिचें नाक, कान कापून हिला विद्रूप केलें. तेव्हां ही ओरडत खराकडे गेली ( वा.

रा. अर. १७-१९). त्यामुळें खर व राम यांची लढाई होऊन खर मारिला गेला (१ खर पहा). तेव्हां ही पुनः लंकेंत गेली व रावणाला झालेली हकीकत सांगून हिनें सीताहरण करण्यास सांगितलें (वा. रा. अर. ३३-३४; म. व. २७८ कुं.). पुढें सीताहरण झाल्यावर हिनें सीतेला रावणाला वरण्याविषयीं आग्रह केला होता (वा. रा. सु. २४; ४३).

**शूल**--(८ कामदेव पहा).

**शूलिन्**--वैवस्वत मन्वंतराच्या चोवीसाव्या चौकडींतील शिवाचा अवतार. हा अवतार नैमिषारण्यांत कलियुगांत झाला. तेथें याचे चार शिष्य झाले:--शालिहोत्र, अग्निवेश, युवनाश्व व शरद्वसु.

**शूष वार्ष्णेय**--या आचार्याला आदित्यानें सावित्राग्नीचा उपदेश केला (तै. ब्रा. ३. १०; ९. १५).

**शूष वाह्नेय भारद्वाज**--अराल दार्तेय शौनकाचा शिष्य (वं. ब्रा. २).

**शृगाल वासुदेव**--करवीरपूरचा राजा. यास सृगाल वासुदेव असेंहि म्हणतात (म. शां. ४. ७ कुं.). याची स्त्री पद्मावती व पुत्र शक्रदेव. परशुरामानें सुचविल्यावरून कृष्णानें यास मारून शक्रदेवास गादीवर बसविलें (ह. वं. २. ४४).

**शृंग**--कामधेनूला वेतालापासून हा पुत्र झाला. शंकरानें प्रसन्न होऊन याला आपलें वाहन केलें. हा शंकर ध्यानासक्त असतां मध्येंच वरुणाच्या घरीं येऊन सुरभि-कन्यांशीं रममाण होत असे. त्यांच्यापासून ही सर्व गोसंतति निर्माण झाली (कालि. ९३).

२ (ऋश्यशृंग पहा).

**शृंगबेर**--सर्पसत्रांत दग्ध झालेला कौरव्य कुलांतील सर्प (म. आ. ५७. १३ कुं.).

**शृंगवत्**--गालव ऋषीचा पुत्र. याची स्त्री वृद्धकन्या (म. श. ५३. १५ कुं.).

**शृंगवृष**--एक ऋषिक. याच्या पोटीं इंद्र आला होता. हा कुंडपायिन् ऋषीच्या कुलांतील असावा (ऋ. ८.१७.१३).

**शृंगिन्**--अङ्गिरसकुलोत्पन्न शमीक ऋषीचा गाई-पासून झालेला पुत्र. हा तरुण असून तपाचरण करणारा होता. हा ब्रह्मदेवाची त्रिकाल उपासना करीत असे. हा घरीं येत असतां कृश नांवाच्या याचा मित्र असलेल्या ऋषि-पुत्रानें याला याच्या बापाची परीक्षित् राजानें केलेली विटंबना सांगितली (शमीक पहा). त्यावरून यास राग येऊन यानें परीक्षितास शाप दिला. मागाहून बापानें यास पुष्कळ उपदेश केला. परंतु, यानें आपला शाप परत घेतला नाहीं (म. आ. ४०. २५; ५०. २ कुं.; १ परीक्षित् पहा). याला गविजात असेंहि नांव आढळतें (दे. भा. २. ८; मत्स्य. १४५. ९५-९९).

**शृंगीपुत्र**--व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें कुथुमीचा शिष्य.

**शैनिन्**--अंगिरसकुलांतील मंत्रकार.

**शेरभ**--एक सर्प किंवा राक्षस (अ. वे. २. २४. १).

**शेष**--एक आचार्य. यानें यजुर्वेदी वेदांगज्योतिष केलें. त्याच्यांत ४३ श्लोक आहेत. त्यांपैकीं तीस ऋग्वेद-ज्योतिषांतील असून १३ वेगळे आहेत. त्याच्यावर सोमाकराची टीका आहे (लगध पहा).

२ कश्यपास कद्रूपासून झालेला मुलगा. हा एक प्रमुख नाग असून निरंतर पातालांत राहतो. यास सहस्र फणा असून अनंत हें नांव आहे. यास इतर सर्व नागांप्रमाणें कामरूपधरत्वशक्ति आहे. याची एक कला क्षीरसागरांत असून तिच्यावर विष्णु शयन करितो. वसुदेव कृष्णाला गोकुलांत नेत असतां यानें आपल्या फणा त्यावर धरिल्या होत्या (भा. १०. ३. ४९). यानें तपश्चर्या करून ब्रह्मदेवापासून पृथ्वी धारण करण्याचा वर मिळविला (म. आ. ३६. ५-२२ कुं.).

**शेषसेवकि**--(शैपसेवकि पहा).

**शैखावत्य**--एक ऋषि. भीष्माकडून व शाल्वाकडून अंबा परतल्यावर ती याच्या आश्रमांत तप करीत राहिली होती (म. उ. १७५. ३९-४६ कुं.).

२ पांडवपक्षीय राजा. सुवर्णालंकार व अनेक तऱ्हेच्या माला यांनीं शृंगारलेले नीलोत्पलाच्या रंगाचे याचे अश्व असत (म. द्रो. २३).

**शैत्यायन**--संधिनियम सांगणारा आचार्य (तै. प्रा. ५. ४०).

**शैब्य**--कोटिक अथवा कोटिकास्याचें पैतृक नांव (म. व. २६८. २ कुं.).

२ वृषादर्भीचें नांव (म. अनु. १४१. १२ कुं.).

३ अमित्रजित् शुष्मिन्चें नांव.

४ संजयाचें पैतृक नांव.

५ गोवासनाचें नांव (म. द्रो. ९५. ३९ कुं.).

६ सुरथाचें प्रादेशिक नांव.

७ सत्यकामाचें नांव.

८ (सो. पूरु.) मत्स्यमतें शिबीचा पुत्र.

९ युधिष्ठिरसभेंतील एक राजर्षि (म. स. ४. ३१ कुं.).

१० कृष्णानें याचा पराजय केला होता (म. व. १२. ३१ कुं.).

शैब्या—द्युमत्सेनाची स्त्री व सत्यवताची माता ( म. व. २९१.१ कुं. ).

२ प्रतीपपत्नी सुनंदेचें पैतृक नांव (म. आ. ६३.४७कुं.).

३ सगरपत्नी सुमतीचें पैतृक नांव (म. व.१०५.१०कुं ).

४ कृष्णपत्नी मित्रविंदेचें पैतृक नांव (म. मौ. ८.७४ कुं.).

**शैरालय**—( १ शैलालय पहा ).

**शैरीष**—( सुवेदस् पहा ).

**शैलन**—आचार्यसंघाचें नांव ( जै. उ. ब्रा. १. २. ३; २. ४. ६; पार्ष्ण व सुचित्त पहा ).

**शैलालय**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार. याबद्दल शैरालय व शैवलेय असे पाठभेद सांपडतात.

२ भगदत्ताचा आजोबा ( म. आश्र. २१.१० कुं. ).

**शैलालि**—आहुति देण्याचा क्रम सांगणारा आचार्य ( श. ब्रा. १३. ५. ३. ३ ). इतरत्र एक आचार्य म्हणून याचा निर्देश आहे ( आप.श्रौ. ६.४ ७; अनुपद. ४. ५ ). हा नटसूत्रकार होता व याच्या सांप्रदायाचा नटवर्गहि होता ( पा. सू. ४. ३. ११० ).

**शैलिनि**—जित्वन्चें पैतृक नांव.

**शैलूष**—( कुलमलबर्हिष पहा ). सायणानें या शब्दाचा अर्थ, आपल्या बायकोच्या व्यभिचारावर उपजीविका करणारा असा केला आहे (वा. सं. ३०. ६; तै. ब्रा. ३. ४. २.१).

२ बिभीषणाची स्त्री सरमा, तिचा हा पिता. हा ऋषभ पर्वतावर राहात असे.

**शैवलेय**—( १ शैलालेय पहा ).

**शैशिर**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**शैशिरिन्**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**शैशिरेय**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

२ व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें देवमित्राचा शिष्य. याच शाखेला उद्देशून केलेले अनुवाकानुक्रमण्यादि शौनकाचे ग्रंथ सध्यां उपलब्ध आहेत. व ते सध्यांच्या शाकल संहितेशीं चांगले जमतात ( अनुवाकानुक्रमणी ७; १० ). वास्तविक शैशिरेयादि शाकल्याचे शिष्य म्हणून यांनीं केलेल्या संहितेस शाकलसंहिता म्हणतात. व्याडिकृत अष्टविकृतिवल्लीतहि अष्टविकृति सांगण्याकरितां शैशिरीयसंहितेचा निर्देश आहे.

**शैशिरोदवहि**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**शोकपाणि**—ऋग्वेदी श्रुतर्षि.

**शोण**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

२ कलेचा पति. सोमवारव्रत केल्यामुळें मेल्यानंतर हा शिवलोकीं गेला ( ४ देवरात पहा ).

**शोण सात्रासह**—हा पांचाल राजा असून कोकाचा पिता आहे. यानें अश्वमेध केला, तेव्हां तुर्वशहि आले होते ( श. ब्रा. १३. ५. ४. १६-१८ ).

**शोणाश्व**—( सो. विदू. ) राजाधिदेवाचा पुत्र.

**शोणित**—( सो. क्रोष्टु. ) हा वायुमतें शूरपुत्र होय.

**शोणिताक्ष**—रावणपक्षीय एक राक्षस (वा. रा. सुं. ६ ).

**शोणितोद**—एक यक्ष ( म. स.. १०. १८ कुं. ).

**शोभन**—मुचुकुंदाचा जांवई. याची पत्नी चंद्रभागा. रमा एकादशी घडल्यानें हा ऐश्वर्ययुक्त झाला (पद्म. उ.६०).

**शौक्रतव**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**शौक्रतु**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**शौक्रवत**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**शौंग**—आंगिरस्कुलोत्पन्न जो शुंग ऋषीचा पुत्र, त्यास विश्वामित्रकुलोत्पन्न शैशिर ऋषीनें आपला पुत्र मानिलें, म्हणून हा द्व्यामुष्यायण म्हणजे द्विगोत्रीय आहे.

२ अंगिराकुलांतील गोत्रकार.

**शौंगायनि**—मद्रगाराचें पैतृक नांव.

**शौंगीपुत्र**—याचा शिष्य आर्तभागीपुत्र. हा सांकृतीपुत्राचा शिष्य ( श. ब्रा. १४. ९. ४. ३० ).

**शौच**—आह्वेयाचें पैतृक नांव.

**शौचद्रथ**—प्राचीनयोग्य व सुनीथ यांचें पैतृक नांव.

**शौचय सार्वसेनि**—यानें पंचरात्र यज्ञ करून पशूंची प्राप्ति करून घेतली ( तै. सं. ७. १. १. २ ).

**शौचिवृक्षि**—एक आचार्य ( ला. श्रौ. ६. ९. १४ ).

**शौचेय**—प्राचीनयोगाचें पैतृक नांव.

**शौण**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**शौनक**—( सो. क्षत्र. ) भागवत व वायु यांच्या मतें हा गृत्समदपुत्र शुनकाचा मुलगा. पण विष्णुमतें हा गृत्समदाचाच पुत्र होय. याच्यापासून चारी वर्णांची संतति झाली ( वायु. २. ३०. ३-४; ब्रह्म. ११. ३४; ह. वं. १. २९ ). हा भार्गव होता ( म. आ. ५. १२ कुं. ). विष्णुपुराणांत हा चातुर्वर्ण्याचा प्रवर्तक होता असें म्हटलें आहे (विष्णु. ४.८.१). हा बह्वृचप्रवर होय (भा. १.४. १; १. १७. ३ ). ऋग्वेदासंबंधीं पुढें सुप्रसिद्ध ग्रंथ झाले त्यांचा कर्ता म्हणून प्रसिद्ध असलेला शौनक हाच असावा असें भागवतावरून दिसतें. दुसऱ्या मंडळाचा द्रष्टा गृत्समद शौनक होय. हा शुनहोत्राचा औरस पुत्र असून शुनकाचा मानिलेला पुत्र होय. हा प्रथम आंगिरस असून नंतर भार्गव झाला ( ऋष्यनुक्रमणी २ ). याचा खुलासा करणारा संदर्भ इतरत्र आढळत नाहीं. ज्या ऋष्यनुक्रमणीवरून शौनक गृत्समदाची माहिती मिळते, तीहि शौनकप्रणीतच

आहे. यामुळें दोन शौनक वेगळे होते हें म्हणण्यास पुष्टि मिळते. शिवाय एका ठिकाणीं शौनक हें केवळ पैतृक नांव असून दुसऱ्या ठिकाणीं मात्र शौनक हें स्वतंत्र व्यक्तीचें नांव आहे. शौनकाच्या नांवावर पुढील ग्रंथ प्रसिद्ध आहेतः १ ऋक्प्रातिशाख्य, २ छन्दोनुक्रमणी, ३ ऋष्यनुक्रमणी, ४ अनुवाकानुक्रमणी, ५ कथानुक्रमणी, ६ बृहद्देवता, ७ ऋग्विधान, ८ सूक्तानुक्रमणी, ९ पादविधान, १० स्मृति व ११ चरणव्यूह. शौनकानें एकंदर दहा अनुक्रमणी केल्या, असें कात्यायनकृत सर्वानुक्रमणीवरील भाष्यांत प्रारंभींच षड्गुरूनें म्हटलें आहे. त्यांपैकीं चारच सध्यां उपलब्ध आहेत. हा वास्तुशास्त्रावरील ग्रंथकार आहे (मत्स्य. २५२). याच्या नांवावरील ग्रंथ शौनकस्मृति, शौनकगृह्य व गृह्यपरिशिष्ट व इतर बरेचसे लहान लहान (मुख्यतः वैदिक) ग्रंथ आहेत (C. C.). आश्वलायनानें आपल्या गृह्यसूत्राच्या शेवटीं ‘नमः शौनकाय’ असें म्हटलें आहे, त्यावरून आश्वलायन शौनकाच्या परंपरेंतील असावा.

शुक्लयजुःप्रातिशाख्यांत संधीविषयीं मतभेद दाखविण्याकरितां शौनकाचा उल्लेख आहे (४. १२०). तसाच अथर्ववेदप्रातिशाख्यांतहि शब्दांच्या शेवटीं कोणते वर्ण येतात, यासंबंधीं शौनकाचा उल्लेख केलेला आहे (१. ८.).

द्वादशवार्षिक सत्र शौनकानें केलें व त्याप्रसंगीं उच्चैःश्रवस् सौतीनें महाभारत सांगितल्याचा महाभारतांत आरंभींच उल्लेख आहे.

कल्पकृत्, शिक्षाकृत्, शाखाप्रवक्ता व आचार्य शौनक हा वेदव्यासांनीं संहिता बनविल्यावर झाला. शिक्षाकृत् शौनक पाणिनिच्या पूर्वीचा असावा, असें एका सूत्राच्या प्रत्युदाहरणावरून अनुमान निघतें (४. ३. १०६). या शौनकीय शिक्षेमध्यें कल्पकार शौनकाचा उल्लेख आहे. कल्पालाच शाखा म्हणतात. शाकलाः शौनकाः सर्वे कल्पं शाखां प्रचक्षते (विकृतिकौमुदी). विकृतिकौमुदी ही विकृतिवल्लीवरील गंगाधरभट्टाचार्याची टीका होय. शाखाप्रवक्ता शौनक व शिक्षाप्रवक्ता शौनक एकच असावा. ब्रह्मयज्ञांतलि तर्पणांत याचा उल्लेख आहे (आश्व. गृ. ३. ३).

शौनककृत ऋक्प्रातिशाख्यांत व्याडीचा जागोजागीं उल्लेख केलेला आहे. (२०९; २१४). शौनकाचा व्याडी हा शिष्य होता. व्याडीनें आपल्या विकृतिवल्लीच्या आरंभीं शौनकाला गुरु म्हणून नमन केलें आहे. यावरून हे दोघेहि समकालीन दिसतात. व्याडीचा पाणिनीय व्याकरणावर लक्षश्लोकात्मक संग्रह नांवाचा एक ग्रंथ आहे. त्याचा महाभाष्यांत उल्लेख आलेला आहे. (१. २. ६४; ६. २. ३९). शौनकस्मृति ही सध्यां उपलब्ध नसली तरी तिचा उल्लेख आहे (मनु. ३. १६३). यावरून भृगूक्तमानवसंहिता शौनकोत्तर अतएव व्यासोत्तर आहे. शौनकाची गुरुपरंपरा चरणव्यूहाचे भाष्यांत महीदासानें पुढीलप्रमाणें दिली आहे. ती वरील म्हणण्यास पुष्टिदायक आहे. कृष्णद्वैपायन व्यास-शौनक-शाकलाचार्य-आश्वलायन-बाळकृष्ण.

नारदानें धर्माला शौनक अरण्यांत ‘तुझी वाट पहात आहे’ असें सांगितलें (म. व. ८३. १२१ कुं.). हा द्वैतवनांत धर्माला सामोरा आला होता (म. व. २६. २३ कुं.). बरोबर आलेल्या ब्राह्मणांना भोजन घालणें अशक्य झाल्यामुळें कष्टी झालेल्या धर्माला योग, सांख्यशास्त्रनिपुण व विद्वान् अशा शौनकानेंच चार उपदेशाचे शब्द सांगितले (म. व. २). जनमेजयपुत्र शतानीकाला यानें तत्त्वज्ञान शिकविलें होतें (विष्णु. ४. २१. २).

महाभारतांत गृत्समद व शुनक यांच्यामधील बऱ्याच पिढ्या दिल्या आहेत (म. अनु. ८ कुं.). त्यांवरून धर्मशतानीक वगैरेंच्या समकालीन हा असणें शक्य आहे.

२ व्यासाच्या अथर्वन्‌शिष्यपरंपरेंतील विष्णु, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें पथ्याचा शिष्य (व्यास पहा). भागवतमतें यास शुनक म्हटलें आहे. हा शाखाप्रवर्तक आहे (पाणिनि पहा). हा भृगुकुलांतील मंत्रकार आहे.

३ अतिधन्वन्, इंद्रोत व दृति यांचें पैतृक नांव.

**शौनक स्वैदायन**—एक यज्ञशास्त्रनिपुण (श. ब्रा. ११. ४. १. २-३; गो. ब्रा. १. ३. ६.).

**शौनकायन जीवन्ति**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**शौनकिन्**—कुंडाचें परिमाण सांगतांना याच्या मताचा उल्लेख आहे (कौ. ८५. ८).

**शौनकीपुत्र**—याचा शिष्य पैंगीपुत्र व हा काश्यपीबालाक्यामाठरीपुत्राचा शिष्य होय (श. ब्रा. १४. ९. ४. ३१-३२).

**शौनहोत्र**—(१ गृत्समद पहा).

**शौरिद्यु**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें कुथुमीचा शिष्य.

**शौल्कायनि** किंवा **शौकायनि**—व्यासाच्या अथर्वन्‌शिष्यपरंपरेंतील देवदर्शाचा शिष्य.

**शौल्बायन**—उदंकाचें पैतृक नांव (अयस्थूण पहा).

**श्याकार**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**श्यापर्ण**—विश्वंतरानें सोमयाग केला, तेव्हां त्यानें याला सोडून दुसरे पुरोहित केले. पण यांच्यापैकीं राम मार्गवेयानें एक निराळीच सोमाची उपपत्ति सांगून आपलें पौरोहित्य परत मिळविलें (ऐ. ब्रा. ७. २७). याला सायकायन असें पैतृक नांव दिलें आहे (श. ब्रा. १०. ४. १. १०). वेदीवर

पांच पशु मारण्यासंबंधीं याचा निर्देश आहे ( श. ब्रा. ६. २. १. ३९ ).

**श्याम**--( सो. क्रोष्टु. ) हा विष्णु व मत्स्य यांच्या मतें शूरपुत्र होय. भागवतांत यास श्यामक म्हटलें आहे. यास शूरभू अथवा शूरभूमि नांवाची स्त्री होती. तिच्यापासून याला हिरण्याक्ष आणि हरिकेश असे दोन पुत्र झाले.

२ ( ५ सरमा पहा ).

**श्यामपराशर**--पराशरापैकीं एक कुल. यांत पाटिक, बादरि, स्तंब, क्रोधनायन आणि क्षेमि हे ऋषि प्रसिद्ध आहेत.

**श्यामबाला**--ही द्वापरयुगांतील भद्रश्रवा वाण्याची मुलगी. ही सौराष्ट्रांत राहत असे. लक्ष्मीव्रताचें माहात्म्य सांगण्याकरितां हिची कथा आली आहे ( पद्म. ब्र. ११ ).

**श्यामवय**--वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**श्यामसुजयन्त लौहित्य**--कृष्णधृति सात्यकीचा शिष्य. याचा शिष्य कृष्णदत्त लौहित्य ( जै. उ. ब्रा. ३. ४२. १ ).

२ हा जयन्त पाराशर्याचा शिष्य. याचा शिष्य पल्लिगुप्त लौहित्य ( जै. उ. ब्रा. ३. ४२. १ ).

**श्यामा**--मेरूची कन्या व हिरण्वाची पत्नी.

**श्यामायन**--विश्वामित्राचा पुत्र व एक गोत्रकार.

३ अंगिरस्कुलांतील गोत्रकार.

**श्यामायनि**--व्यासाच्या कृष्णयजुःशिष्यपरंपरेंतील पूर्वेकडील एक ( १ वैशंपायन व व्यास पहा ).

२ अंगिरस्कुलांतील गोत्रकार.

**श्यामावत्**--दत्ताच्या वंशांतील व अत्रिकुलांतील मंत्रकार ( वायु. १. ५९. १०४ ). याला श्यावास्य किंवा श्यावाश्व ( मत्स्य. १४५. १०७-१०८ ) व शावाश्व ( ब्रह्मांड. २. ३२. ११३-११४ ) अशीं दुसरीं नांवें आहेत.

**श्यामोदर**--कश्यपकुलांतील गोत्रकार.

**श्याव**--श्याव व श्यावाक एक आहेत ( ऋ. ५. ६१. ९ ). श्याव हा वध्रिमतीचा मुलगा. पण सायणानें हें हिरण्यहस्ताचें विशेषण केलें आहे ( ऋ. १०. ६५. १२ ). श्याव, श्यावाक व हिरण्यहस्त हे सर्व एकहि असतील. हा अश्वींच्या कृपेंतील असून याला अश्वींनीं रुशती नांवाची स्त्री दिली ( ऋ. १. ११७. ८ ).

**श्यालायनि**--( भृगु पहा ).

**श्यावक**--इंद्राच्या कृपेंतील एक गृहस्थ ( ऋ. ८. ३. १२; ४. २ ).

**श्यावसायन**--देवतरसचें पैतृक नांव.

**श्यावाश्व**--अर्चिनानसचें पैतृक नांव तरन्त व पुरुमीळ्ह यांचा हा पुरोहित होता ( तरन्त पहा ). हा अत्रिकुलांतील असून याचा ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं निर्देश आहे ( ऋ. ५. ५२. १; ६१. ५; ८१. ५; ८. ३५. १९; ३६. ७; ३७. ७; ३८. ८; अर्चनानस् व श्यामावत् पहा ). हा सूक्तद्रष्टा आहे ( ऋ. ५. ५२-६१; ८१-८२; ८. ३५-३८; ९. ३२ ).

**श्यावास्य**--( श्यामावत् पहा ).

**श्येन आग्नेय**--सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १८८ ).

**श्येनगामिन्**--खर राक्षसाच्या बारा अमात्यांतील एक ( वा. रा. अर. २३. ३१ ).

**श्येनचित्र**--एक क्षत्रिय ( म. अनु. १७७. ७० कुं. ).

**श्येनजित्**--( सू. इ.) दलाचा पुत्र. दलाजवळ वामदेवानें शलानें नेलेले घोडे मागितले असतां तोहि परत करीना. उलट त्यानें त्यास मारण्यासाठीं विषदिग्ध बाण मागविला. पण वामदेवानें परस्पर श्येनजितासच त्या बाणानें ठार मारिलें. त्या वेळीं हा दहा वर्षांचा होता. नंतर दलाचें शरीरहि स्तब्ध केलें, हें पाहून याच्या मातेनें क्षमा मागून घोडे परत केल्यावर यास व दलास पूर्ववत् केलें ( म. व. १९९ कुं.; शल पहा ).

२ सेनजित् राजाचें नामांतर.

३ पांडवपक्षीय एक क्षत्रिय ( म. उ. १४१. २७ कुं. ).

**श्येनभद्र**--प्रसूत देवांतील एक.

**श्येनी**--कश्यप व ताम्रा यांची कन्या. हिजपासून ससाणे झाले. हीच गरुडाची स्त्री ( ब्रह्मांड. ३. ३. ४४९ ). पण अरुणाची स्त्री असून हिला जटायु व संपाति झाल्याचें दिलें आहे ( वा. रा. अर. १४. ३३ ).

**श्रद्धा**--स्वायंभुव मन्वंतरांतील कर्दम प्रजापति व देवहूति यांची कन्या व अंगिरा ऋषीची स्त्री.

२ ( स्वा. ) भागवतमतें स्वायंभुव मन्वंतरीय दक्ष प्रजापति प्रसूती यांची कन्या व धर्म प्रजापतीची स्त्री ( म. आ. ६७. १४ कुं. ). हिच्या पुत्राचें नांव शुभ असें आहे.

३ सूर्याची मुलगी ( म. शां. २७०. ८ कुं. ).

४ वैवस्वत मनूची पत्नी.

**श्रद्धा कामायनी**--सूक्तद्रष्ट्री ( ऋ. १०. १५१ ).

**श्रद्धादेवी**--वसुदेवाच्या स्त्रियांतील एक.

**श्रद्धालु**--हंसध्वज राजाच्या प्रधानांतील एक.

**श्रम**--वसुदेव व शांतिदेवा यांचा पुत्र.

**श्रमदागोपि**--भृगुकुलांतील गोत्रकार ऋषि.

**श्रमिष्ट**--अक्रूराचा पुत्र.

**श्रवण**--हा ब्राह्मण कुरुजांगल देशांत असे. याची स्त्री कुंडा व भाऊ कुरंटक. हा आचारहीन होता. पण

गाईला चिखलांतून वर काढल्यानें हे सर्व मुक्त झाले ( पद्म. उ. २२२ ).

२ ( ४ श्रवस् पहा ).

३ गौतम नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

४ अक्रूर यादवाच्या पुत्रांतील एक.

५ मुर दैत्याचा सात पुत्रांतील एक. यास कृष्णानें मारिलें.

६ सोमाच्या सत्तावीस स्त्रियांतील एक.

७ ( श्रावण पहा ).

**श्रवणदत्त कौहल**--सुशारद शालंकायनाचा शिष्य. याचा शिष्य कुस्तुक शार्कराक्ष्य ( वं. ब्रा. १ ).

**श्रवस्**--दक्षसावर्णि मनूचा पुत्र.

२ अमिताभ देवांपैकीं एक.

३ शिव नांवाच्या ब्राह्मणाचा पुत्र. याचा पुत्र तम होय. ( म. अनु. ८. ६३ कुं. ). गणपत कृष्णाजीच्या प्रतींत यास सन्त असें नांव आहे.

४ वसिष्ठकुलांतील गोत्रकार. श्रवण असा पाठभेद आहे.

**श्रविष्कट**--गौतमनामक शिवावताराचा शिष्य.

**श्राद्धदेव**--सूर्याचा पुत्र. हाच वैवस्वत मनु होय. हा निपुत्रिक असल्यामुळें यानें वसिष्ठाचे संमतीनें एक पुत्रकामेष्टि करविली. श्रद्धा या नांवाची याची एक भार्या होती. तिला पुत्रांपेक्षां कन्याच प्रिय असल्यामुळें तिनें होत्याजवळ जाऊन 'ज्यायोगें मला कन्या होईल, असे मंत्र म्हणा,' असें त्याला सांगितलें. पुढें होत्यानें यज्ञ चालू असतां कन्याप्राप्तीचा मंत्र म्हटला. त्यामुळें श्राद्धदेवाला इला नांवाची कन्या झाली. पुत्राचे ऐवजीं कन्या झाली, हें पाहून यास वाईट वाटलें. होत्याचें तें कपट वसिष्ठाचे लक्षांत येऊन त्यानें आपल्या तपाचे योगानें इलेला पुत्रत्व दिलें ( दे. भा. माहात्म्य. ३ ).

**श्राद्धाद्**--तिसऱ्या वृषाचा पुत्र.

**श्रायस**--कण्वाचें व वीतहव्याचें पैतृक नांव.

**श्रावण**--वैश्यापासून शूद्र स्त्रीचे ठिकाणीं झालेला तपस्वी. दशरथानें हत्ती समजून रात्रीं याला मारिलें. दशरथाला ब्रह्महत्येची रुखरुख लागूं नये म्हणून यानें आपल्या कुलाची हकिगत दशरथास सांगितली ( वा. रा. अयो. ६३ ). रामायणांत कोणाचेंच नांव नाहीं; पण ब्रह्मपुराणांत पित्याचें श्रवण असें नांव दिलें आहे. तेथें हा ब्राह्मण आहे, असें म्हटलें आहे. त्यावरून पुत्राचें नांव श्रावण असें प्रसिद्ध झालें ( ब्रह्म. १२३. ३७ ).

**श्रावस्त** किंवा **शावस्त**--( सू. इ. ) भागवत, विष्णु, वायु व मत्स्य यांच्या मतें दुसऱ्या युवनाश्वाचा पुत्र व इंदूचा नातू होय. महाभारतामध्यें युवनाश्वाला श्राव नांवाचा पुत्र असून यानें श्रावस्त नांवाचें शहर वसविलें. याच्या मुलाचें नांव बृहद‍श्व होय ( म. व. २०२. ४ कुं. ). यास वंशक किंवा वत्सक नांवाचाहि आणखी एक पुत्र होता. श्रावस्त नगरास श्रावस्ती नगरी असेंहि नांव होतें ( ह. वं. २. ११; ब्रह्मांड. ३. ६३. २८; वायु. २. २६. २७ ). दाशरथि राम निजधामास गेल्यावर त्याचा कनिष्ठ पुत्र लव तेथें राज्य करीत होता ( वा. रा. उ. १०७ ).

**श्राविष्ठायन**--पराशर कुलांतील गोत्रकार.

**श्री**--( स्वा. ) भृगु व ख्याति यांची कन्या. हो भृगूनें विष्णूस दिली होती ( भृगु पहा ). हिची क्षीरसमुद्रांतून उत्पत्ति झाल्याची कथा आहे ( म. आ. १८. ४९ कुं.; भा. ८. ८ ). हिनें रुक्मिणीचे ठिकाणीं मी आहें म्हणून सांगितलें आहे ( म. अनु. ३२ कुं. ).

**श्रीकर**--गोपपुत्र. यानें काशींतील मध्यमेश्वराचें आराधन करून शिवगाणपत्य मिळविलें ( शिव. उ. ४४. ८५ ).

**श्रीदामन्**--कृष्णसखा गोप ( भा. १०. १५. २०; कुचैल पहा ).

**श्रीदेव**--( सो. क्रोष्टु. ) कूर्ममतें लोमपादशाखेंतील बृहन्मेधसचा पुत्र.

**श्रीदेवा (वी)**--देवककन्या व वसुदेवपत्नी.

**श्रीधर**--या ब्राह्मणाला बालव्रतानें पुत्र झाला ( पद्म. ब्र. ५ ).

**श्रीनिवास**--याची स्त्री पद्मिणी. हाच गिरीवरचा व्यंकोबा होय ( स्कंद. २. १. ४-८ ).

**श्रीभानु**--कृष्ण व सत्यभामा यांचा पुत्र.

**श्रीमत्**--आप नामक वसूचा पुत्र.

२ दत्तात्रेयपुत्र निमीचा पुत्र ( म. अनु. १३८. ५ कुं ).

**श्रीमती**--अंबरीष राजाची कन्या ( २ दमयन्ती पहा ). नारद व पर्वत यांना फसवून हिला विष्णूनें पळविलें म्हणून ते शिवभक्त झाले ( लिंग. २. ५; अ. रा. ४; शिव. रुद्र. २. ४ ).

**श्रीमलकर्णि**--( १ शातकर्णि पहा ).

**श्रीमाता**--हिनें मातंगीचें रूप घेऊन कर्नाटक राक्षसास मारिलें. हा कर्नाटक राक्षस ब्राह्मणाचें सोंग घेऊन ऋषिस्त्रिया पळवीत असे ( स्कंद. ३. २. १७-१८ ).

**श्रीमानिन्**--भौत्य मनूचा पुत्र.

**श्रीवह**--एक सर्प ( म. आ. ३५. १३ कुं. ).

**श्रीविद्वेश**--एकादश रुद्रांपैकीं एक.

**श्रुत**--( सू. निमि. ) हा विष्णुमतें उपगुपुत्र. भागवत-मतें सुभाषणपुत्र व वायुमतें सुवर्चसचा पुत्र.

२ ( सू. इ. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें भगीरथपुत्र होय.

३ ( सो. अज. ) पांचाल राजा द्रुपद याचा हा पुत्र. रात्रि युद्धांत हा अश्वत्थाम्याकडून मारिला गेला ( म. द्रो. १५७. १८२ कुं. ).

४ कृष्ण व कालिंदी यांचा पुत्र.

५ वसुदेव व शांतिदेवा यांचा पुत्र ( भा. ९.२४.५० ).

**श्रुतकक्ष आंगिरस**--या ऋषीनें गाई व घोडे यांच्याकरितां इंद्राची स्तुति केली आहे ( ऋ. ८. ९२. २५ ). हा सामाचाहि द्रष्टा आहे (पं. ब्रा. ९. २. ७).

**श्रुतकर्मन्**--( सो. कुरु. ) भागवत व विष्णु यांच्या मतें सहदेवपुत्र पण मत्स्यमतें हा नकुलपुत्र होय. याच्या आईचें नांव द्रौपदी. याला श्रुतसेन असें दुसरें नांव आहे ( म. द्रो. २३. ३२ कुं. ) याचें सुदक्षिण नांवाच्या काम्भोज राजाबरोबर युद्ध झालेलें आहे. हा महारथी होता ( म. भी. ४५. ६६ कुं. ). हा अश्वत्थाम्याकडून शिबिरांत मारिला गेला ( म. सौ. ८. ६६ कुं. ). मोराच्या कंठाप्रमाणें कांति असलेले याचे घोडे असून त्यांच्या खोगीराच्या तंगास सोन्याचा मुलामा दिलेला होता ( म. द्रो. २३ ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

३ ( १ श्रुतकीर्ति पहा ).

**श्रुतकीर्ति**--( सो. कुरु. ) अर्जुन व द्रौपदी यांचा मुलगा ( म. आ. ६३. ७४; ६४. १६५; द्रो. २३. ३३ कुं. ). याचा शल्याकडून पराजय झाला ( म. क. १३ कुं. ). यास अश्वत्थाम्यानें ठार केलें (म. सौ. ८. कुं. ). हा अमावास्येच्या दिवशीं रात्रीं मारिला गेला ( भारतसावित्री ). चास पक्ष्याच्या पिसांसारख्या रंगाचे याचे घोडे होते ( म. द्रो. २३ ). याचें श्रुतकर्मन् हे नामांतर आहे ( म. आ. २४७. ७५ कुं. ).

२ कुशध्वज जनकाची कन्या व दशरथपुत्र शत्रुघ्नाची स्त्री ( वा. रा. बा. ७३ ).

३ शूर राजाची कन्या व वसुदेवाची भगिनी. ही केकयदेशच्या धृष्टकेतूची स्त्री.

**श्रुतंजय**--( सो. पुरूरवस्. ) भागवतमतें सत्यायुपुत्र.

२ एक त्रैगर्त. अर्जुनानें याला ठार केलें ( म. क. १८. ११ कुं. ).

३ ( मगध. भविष्य. ) मत्स्य, वायु व ब्रह्मांड यांच्या मतें सेनाजित्‌चा व विष्णुमतें सेनजित्‌चा पुत्र. भागवतमतें याचें नांव रिपुंजय. वायु, मत्स्य व ब्रह्मांड यांच्या मतें यानें चाळीस वर्षे राज्य केलें.

**श्रुतदेव**--बहुलाश्व जनक मिथिलेचें राज्य करीत असतां मिथिलेंत वैराग्यानें राहणारा एक कुटुम्बवत्सल ब्राह्मण. एकदां कृष्ण रथांत बसून मिथिलेंत आला असतां बहुलाश्व व श्रुतदेव या दोघांनींहि त्याला आपल्या घरीं बोलविलें. कृष्णाहि दोघांची भावना लक्षांत घेऊन एकसारखीं दोन रूपें घेऊन दोघांच्या घरीं गेला, व त्यानें दोघांनाहि उपदेश केला ( भा. १०. ८६ ).

२ कृष्णाच्या पौत्रांतील एक. हा महारथी होता ( भा. १०. ९०. ३३ ).

३ कृष्णाचा अनुयायी एक यादव ( भा. १. १४. ३२ ).

४ विष्णूचा एक पार्षद ( भा. ८. २१. १७ ).

**श्रुतदेवा ( वी )**--शूर राजाची कन्या व वसुदेवाची भगिनी. ही करूषदेशीय राजा वृद्धशर्मा याची स्त्री. हिला पृथुकीर्ति असेंहि नांवें होतें ( ब्रह्म. १४ ).

**श्रुतध्वज**--विराटाचा भ्राता ( म. द्रो. १५८ ).

**श्रुतबंधु गौपायन** किंवा **लौपायन**--सूक्तद्रष्टा व मंत्रद्रष्टा ( ऋ. ५. २४. ३; १०. ५७-६० ).

**श्रुतय**--( श्रोतन पहा ).

**श्रुतरथ**--हा कक्षीवताचा आश्रयदाता होता ( ऋ. १. १२२. ७ ). प्रभुवसु आंगिरसानेंहि याच्या दातृत्वाची प्रशंसा केली आहे ( ऋ. ५. ३६. ६ ).

**श्रुतर्य**--अश्वीनीं याचें संरक्षण केलें ( ऋ. १. ११२. ९ ).

**श्रुतर्वन्**--एक राजा. गोपवनानें याच्या दातृत्वाची प्रशंसा केलेली आहे. हा ऋक्षाच्या कुलांतील असल्यामुळें यास आर्क्ष असें पैतृक नांव आहे ( ऋ. ७. ७४. ४ ). यानें मृगयावर जय मिळविला ( ऋ. १०. ४९. ५ ). एकदां अगस्त्य ऋषि द्रव्य मागण्याकरितां याजकडे आला असतां यानें आपले जमाखर्च त्यास दाखविले. त्यावरून यास बरोबर घेऊन अगस्त्य ब्रध्नश्व राजाकडे गेला होता ( म. व. ९६. १-५ कुं. ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा मुलगा. याला भीमानें ठार केलें ( म. श. २५. २९ कुं. ).

**श्रुतवत्**--( सो. मगध. ) भविष्य व विष्णु यांच्या मतें सोमावीचा पुत्र. इतरत्र याचें नांव श्रुतश्रवस् असें आहे.

**श्रुतवर्मन्**--भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा. हा धृतराष्ट्राचा पुत्र असावा ( म. क ४. १८ कुं. ).

**श्रुतविद् आत्रेय**--सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ६२ ). याचा मंत्रांतहि निर्देश आहे ( ऋ. ५. ४४. १२ ).

**श्रुतश्रवस्**--( मगध. भविष्य ). हा मत्स्य व वायु यांच्या मतें सोमाधिपुत्र, भागवतमतें मार्जारिपुत्र व ब्रह्मांडमतें सोमापिपुत्र.

२ यमसभेंतील राजर्षि क्षत्रिय ( म. स. ८. ९ कुं. ).

३ एक ऋषि. जनमेजयानें चालविलेल्या दीर्घसत्रांत देवशुनीनें त्यास शाप दिला. पुढें मृगया करीत जनमेजय हिंडत असतां त्याची व श्रुतश्रवा ऋषीची भेट झाली. श्रुतश्रव्याच्या मुलानें म्हणजे सोमश्रवस्‌नें आपलें सत्राचें पौरोहित्य करावें, अशी जनमेजयानें श्रुतश्रवस्‌ला विनंति केली. श्रुतश्रवस्‌ला सोमश्रवस् हा एक सर्पिणीपासून झाला होता (म. आ. ३. १३ कुं. ). हा स्वतः जनमेजयाच्या सर्प सत्रांत सदस्य म्हणून होता ( म. आ. ५३. ९ कुं. ).

४ गरुडानें मारिलेला एक असुर.

**श्रुतश्रवा**—शूर राजाची कन्या व चेदिराज दमघोषाची भार्या. वसुदेवाची बहीण व कृष्णाची आत्या. हिच्या मुलाचें नांव शिशुपाल ( म. व. १५. २ कुं. ).

**श्रुतश्री**—गरुडानें मारिलेला एक असुर.

**श्रुतसेन**—( सो. कुरु. ) हा भागवत व मत्स्य यांच्या मतें भीमपुत्र होय. पण हा सहदेवापासून द्रौपदीस झालेला मुलगा असें भारतांत आहे ( म. आ. ६३. ७४; ६४. १६२ कुं. ). द्रौपदी कृत्तिका नक्षत्रावर याला प्रसवली म्हणून लोक यास श्रुतसेन म्हणूं लागले ( म. आ. २ ४७. ८१ कुं.) यास अश्वत्थाम्यानें अमावास्येच्या रात्रीं ठार केलें ( भारतसावित्री ).

२ (सो. कुरु.) परीक्षिताचा पुत्र ( म. आ. ३. १ कुं.; श. ब्रा. १३. ५. ४. ३; सां. श्रौ. १६. ९. ४ ).

३ शत्रुघाती राजाचें नामांतर.

४ भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय एक राजा (म.क.२७).

**श्रुतसेना**—हिला विष्णु, वायु व भागवत यांच्या मतें श्रुतकीर्ति म्हटलें असून हिचा पति कैकय दिला आहे. मत्स्यमतें हिचा पुत्र अनुव्रत, विष्णु व भागवत यांमध्यें संतर्दनादि पांच पुत्र. संतर्दन, चेकितान, बृहत्क्षत्र, विंद व अनुविंद अशीं नांवें वायूंत आढळतात. पण महाभारतांत शारदंडायनि कैकेय हा पति व दुर्जयादि नियोगविधीनें झालेले तीन पुत्र दिले आहेत ( शारदंडायनि पहा ).

**श्रुतान्त**—( सो. कुरु.) धृतराष्ट्राचा मुलगा. भीमसेनानें ठार केला ( म. श. २५. ९ कुं. ).

**श्रुतायु**—( सू. इ. ) मत्स्यमतें भानुश्चंद्राचा पुत्र.

२ ( सो. पुरूरवस्. ) भागवत व विष्णु यांच्या मतें पुरूरवस्‌पुत्र.

३ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा मुलगा. हा भीमसेनाकडून मारिला गेला ( म. क. ४६. ७-११ कुं. ).

४ द्रौपदीस्वयंवरार्थ आलेला एक क्षत्रिय ( म. आ. २०१. २१; स. ४. ३४ कुं. ).

५ एक कलिंगदेशीय क्षत्रिय. याच्या भार्येचें नांव अयुतायु होय ( म. क. ७६. १४ कुं. ). याचें भीमाशीं युद्ध झालेलें आहे ( म. भी. ५४ कुं. ). दीर्घायु व नियुतायु हे याचे दोन पुत्र होत. पित्याचा वध होतांच हे दोघे अर्जुनावर धांवून गेले. परंतु अर्जुनानें त्यांचा वध केला ( म. द्रो. ९३. २७-२९ कुं. ).

६ ( सू. निमि. ) हा भागवत व विष्णु यांच्या मतें अरिष्टनेमिपुत्र. याच्या मुलाचें नांव सुपार्श्वक.

**श्रुतायुध**—कलिंगदेशांतील एक क्षत्रिय ( म. स. ४. ३२; भी. १६. ६ कुं. ). वरुणापासून शीततोया ( पर्णाशा ) हिला झालेला पुत्र. यास वरुणानें एक गदा अभिमंत्रित करून देऊन असें सांगितलें होतें कीं, ' या गदेनें तूं पाहिजे त्यास जिंकून विजयी होशील; परंतु जो मुळींच युद्ध करीत नसेल, त्यावर मात्र ती टाकूं नकोस, नाहींतर तूंच मरशील.' भारतीययुद्धांत हा दुर्योधनास येऊन मिळाला होता. यानें कृष्णावर गदा टाकली व आपणच मरण पावला ( म. द्रो.९२. ५८-६०कुं ).

**श्रुतावती**—भरद्वाजाची कन्या. हिनें बदरीपाचनतीर्थी तप केलें, त्यामुळें इंद्राची ही भार्या झाली ( म. श.४८ ).

**श्रुति**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**श्रुति आत्रेयी**—ही स्वायंभुव मन्वंतरांत अत्रीची कन्या असून पुलहपुत्र कर्दमाला दिली होती ( १ पुलह पहा ).

**श्रुतिविद्ध**—( सो. कुरु. ) वायुमतें धर्मराजपुत्र.

**श्रुतुशृण**—स्वायंभुव मन्वंतरांतील जिताजित देवांपैकीं एक.

**श्रुष वाह्नेय काश्यप**—हा देवतरस् श्यावसायन काश्यपाचा शिष्य व याचा शिष्य इंद्रोत दैवाप शौनक ( जै. उ. ब्रा. ३. ४०. २; शुष पहा ).

**श्रुष्टि आंगिरस**—सामद्रष्टा ( पं. ब्रा. १३. ११. २१-२३ ).

**श्रुष्टिगु काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ५१ ). सांवरणि मनु, नीपातिथि, मेध्यातिथि वगैरेबरोबर याचा निर्देश आहे ( ऋ. ८. ५१. १ ).

**श्रेणिमत्**—गोशृंग नामक पर्वतशिखरवासी राजा. हा भारतीय युद्धांत पांडवांकडे होता ( म. द्रो. २३ ). कौरवपक्षीय वीरांच्या हातून हा मारला गेला. याचे घोडे पिवळ्या रेशमी वस्त्राप्रमाणें व थंड स्वभावाचे होते. त्यांचीं खोगिरें सुवर्णाचीं असून त्यांच्या गळ्यांत सुवर्णाच्या माला असत ( म. द्रो. २३ ).

२ भीमानें दिग्विजयकाळीं जिंकलेला कुमार देशाचा राजा ( म. स. ३० ).

**श्रेष्ठ**--सुधामन् देवांतील एक.

**श्रोतन**--कश्यपकुलांतील गोत्रकार गण. श्रुतय असा पाठभेद आहे.

**श्रोतृ**--श्रावणमासींचा हा यक्ष आहे.

२ आद्य देवांतील एक.

**श्रोत्र**--तुषित देवांपैकीं एक.

**श्रोष**--सूर्याच्या दोन भालदारचोपदारांतील एक ( भवि. ब्राह्म. ७६ ).

**श्रौतर्ष**--देवभागाचें पैतृक नांव.

**श्रौतश्रवस**--शिशुपालाचें मातृक नांव

**श्लोमत्य**--एक आचार्य ( श. ब्रा. १०. ४. ५. १ ).

**श्वफल्क**--( सो. वृष्णि. ) पृश्नीचा पुत्र. याच्या भावाचें नांव चित्ररथ असें आहे. पूर्वी एकदां पाऊस पडेना, तेव्हां काशीच्या राजानें आपल्या घरीं आलेल्या श्वफल्काला आपली गांदिनी नांवाची कन्या दिली व सत्कार केला. त्याबरोबर काशीदेशांत पाऊस पडूं लागला (भा. १०.५७. ३२ ).

श्वफल्कास गांदिनीपासून अक्रूर, आसंग, सारमेय, मृदुर, मृदुवित्, गिरि, धर्मवृद्ध, सुवर्मन्, क्षत्रोपेक्ष, अरिमर्दन, शत्रुघ्न, गंधमाद व प्रतिबाहु असे तेरा पुत्र आणि सुचिरा नांवाची कन्या, याप्रमाणें अपत्यें झालीं ( भा. ९. २४. १५-१७ ). यास मत्स्य व पद्म यांत जयंत म्हटलें आहे.

**श्वसन**--सर्पसत्रांत दग्ध झालेला धृतराष्ट्रकुलांतील नाग ( म. आ. ५७. १७ कुं. ).

**श्वसृप**--तेरा सैंहिकेयांतील एक.

**श्वाजनि**--एक वैश्य ( जै. उ. ब्रा. ३. ५. २ ).

**श्वात**--ब्रह्मधनेचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ७. ९८ ).

**श्वाहि**--( सो. क्रोष्टु. ) हा भागवतमतें वृजिनवत्-पुत्र होय. याच्या मुलाचें नांव रुशेकु. स्वाह असें मत्स्यमतें व स्वाहि असें विष्णु व वायु यांच्या मतें याचें नांव आहे.

**श्विक्न**--या लोकांचा ऋषभ याज्ञतुर राजा होता ( श. ब्रा. १२. ८. ३. ७; १३. ५. ४. १५; गौरिवीति पहा ).

**श्वेत**--कद्रूपुत्र नाग. हा पातालांत राहतो.

२ सातव्या वाराहकल्पांत हा वैवस्वत मन्वंतराच्या पहिल्या चौकडींतील शंकराचा अवतार आहे. हा हिमालयाच्या छागल नांवाच्या शिखरावर झाला. याला शिखायुक्त चार शिष्य आहेत. श्वेत, श्वेतशिख, श्वेताश्व व श्वेतलोहित. हा ध्यानाशिवाय दिसणें शक्य नाहीं. त्या वेळीं स्वयंप्रभु व्यास होता ( शिव. शत. ४ ).

३ सातव्या वाराहकल्पांत वैवस्वत मन्वंतराच्या तेविसाव्या चौकडींतील हा शिवाचा अवतार आहे. हा कालंजर पर्वतावर झाला. तेथें याला उशिक, बृहदश्व, देवल व कवि असे पुत्र झाले ( शिव. शत. ५ ).

४ शिवाचा शिष्य ( २ श्वेत पहा ).

५ क्रोधवशेची कन्या श्वेता हिचा एक पुत्र दिग्गज.

६ इंद्राच्या विमानांत असलेला अगदीं पूर्वकालीन एक क्षत्रिय ( म. वि. ५३. १३ कुं. ).

७ विप्रचित्ति दानवाचा पुत्र ( मत्स्य. १७७. ७ ).

८ रामाच्या पक्षाचा एक वानर ( वा. रा. यु. ३० ).

९ सुदेव नामक राजाचा ज्येष्ठ पुत्र. पुढें याचें मरण यास कांहीं कारणामुळें कळलें. तेव्हां यानें आपल्या कनिष्ठ भ्रात्यास-सुरथास–राज्याभिषेक केला. आपण वनांत गेला व तेथें यानें तपश्चर्या केली. पण अन्नदान कधींहि केलें नाहीं. त्यामुळें स्वर्गप्राप्तीनंतरहि यास क्षुधेतृषेनें सोडिलें नाहीं. म्हणून याला सध्या ब्रह्मयानें आपलें मांस खाऊन राहण्यास सांगून पुढें अगस्त्याच्या आगमनानें तुझी मुक्तता होईल असें सांगितलें. त्याप्रमाणें एकदां अगस्त्य आला असतांना यानें त्यास कांहीं एक भूषण दान केलें व त्यामुळें याची मुक्तता झाली ( वा. रा. उ. ४८; पद्म. सृ. ३४ ).

१० ( सो. क्रोष्टु. ) कूर्ममतें आहुतीचा पुत्र.

११ विराट राजाचा सुरथेपासून झालेला पुत्र. उत्तरास शल्यानें मारिल्यावर हा धांवला असतां याचें शल्याशीं थोडा वेळ युद्ध होऊन त्यानंतर यास भीष्मानें ठार केलें ( म. भी. ४८. ११ कुं. ).

१२ यानें शिवभक्तीनें मृत्यूस जिंकिलें होतें ( स्कंद. १.१. ३२; ब्रह्म. ५९. ७४; लिंग. १. ३० ).

१३ माणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**श्वेतकि**--यानें अतिशय यज्ञ करून अग्नीला संतुष्ट केलें. यानें शतसंवत्सरात्मक सत्र केलें ( म. आ. २४९. १७-६९ कुं. ).

**श्वेतकेतु औद्दालकि आरुणेय**--हा अरुणाचा नातु व उद्दालक आरुणीचा मुलगा. हा लहानपणीं हूड असल्यामुळें बाराव्या वर्षापर्यंत याचें उपनयन झालें नव्हतें. पण पुढें याचें उपनयन होऊन यानें चोविसाव्या वर्षापर्यंत अध्ययन केलें. तथापि हा मोठा गर्विष्ठ होता. पण पित्यानें याचें अज्ञान दाखवून याला नम्र बनविलें व ' तत्त्वमसि ' या महावाक्याचा उपदेश केला ( छां. उ. ६. १.१६ ).

जनकाच्या यज्ञांत याज्ञवल्क्यानें याचा पराजय केला होता ( श. ब्रा. ११. ६. २. १ ).

हा पांचालराज प्रवाहण जैवलीच्या सभेंत वादाकरितां गेला होता. पण तेथें फजीत होऊन परत आला. शेवटीं बापलेकांनीं प्रवाहणीकडून ज्ञान संपादन केलें ( बृ. उ. ६. २ ). याचें

गोत्र गौतम होतें. चित्र गार्ग्यायणीकडूनहि यानें त्याकडे जाऊन ज्ञान संपादन केलें ( कौ. उ. १. १ ).

ब्रह्मचाऱ्यानें मध खाऊं नये असें याचें मत होतें ( श. ब्रा. ११. ५. ४. १८ ). यज्ञविषयक गोष्टींतहि याच्या मताचा निर्देश आहे ( सां. ब्रा. २६.४; गो. ब्रा. १. ३. ३ ). जल जातूकर्ण्य काशी, कोसल व विदेह यांचा पुरोहित झाल्यामुळें यानें बापाला दोष दिला. पण केवळ पैसा मिळविणें हें ध्येय गौण असून ज्ञान महत्त्वाचें होय, असें बापानें प्रतिपादन केलें ( सां. श्रौ. १६. २९ ). कुसुरुबिन्दु औद्दालकि याचा भाऊ असावा.

हा उद्दालकाचा पुत्र होय ( म. आ. १२२ ). याला उद्दालकानें आपल्या स्त्रीचे ठिकाणीं शिष्याकरवीं उत्पन्न केल्याचा चमत्कारिक निर्देश आहे ( म. शां. ३३.२४ कुं. ). याच्यावर सरस्वतीचा प्रसाद होता ( म. व १३२ ). याच्या मामाचें नांव अष्टावक्र. त्याच्याबरोबर वादांत बंदीला जिंकण्याकरितां हाहि गेला होता ( म. व. १३३ ). जनमेजयराजानें केलेल्या सर्पसत्रांत हा सदस्य होता ( म. आ. ५१ ). देवलकन्या सुवर्चलेशीं पुरुषार्थसिद्धीवर याचा संवाद झाला व नंतर लग्न झालें ( म. शां. २२४ ).

याच्या आईला उद्दालकासमक्ष एक ब्राह्मण हात धरून घेऊन चालला; तेव्हां यानें स्त्रियांना पातिव्रत्य व पुरुषांना पत्नीव्रताचा नियम घालून दिला (म. आ. १२२ ). दीर्घतमसनें पुनर्विवाह करूं नये, असा स्त्रियांविषयीं नियम केला.

शाकल्य, आसुरि, मधुक, प्राचीनयोग्य, आणि सत्यकाम यांच्याशीं हा समकालीन होता. उपवेश, अरुण, उद्दालक व श्वेतकेतु असा श्वेतकेतूचा वंश आढळतो. ब्राह्मणाशीं असत्य वर्तन केल्यामुळें उद्दालकानें याचा त्याग केला होता ( म. शां. ५७ ). कुंतीनें उल्लेख केलेल्या कथेवरून एक प्राचीन श्वेतकेतु असावा व दुसरा जनमेजयाच्या सत्रांतील असावा. याला शंकरानें मृत्यूच्या पाशांतून सोडविलें ( शिव. शत. १५. १४ ).

२ लांगली भीम नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

३ कुंतीनें उल्लेख केलेला प्राचीन श्वेतकेतु.

**श्वेतचक्षु**—प्रसूत देवांतील एक.

**श्वेतपराशर**—पराशरवंशांतील एक कुल.

**श्वेतपर्ण यौवनाश्व**—हस्तिनापुरच्या पूर्वभागीं वीस योजनांवर असणाऱ्या भद्रावती नगरीचा राजा. याच्याजवळ एक उत्तम घोडा होता. तो भीमानें युद्ध करून अश्वमेधाकरितां धर्माला आणून दिला ( जै. अ. १७ ).

**श्वेतलोहित**—श्वेत नामक शिवावताराचा शिष्य.

**श्वेतवराह**—आदिवराह, श्वेतवराह व वराह एकच.

**श्वेतवाहन**—(सो. क्रोष्टु.) वायुमतें शूरपुत्र. मत्स्यमतें शूरबंधु राजाधिदेवाचा पुत्र.

**श्वेतशिख**—श्वेत नामक शिवावताराचा शिष्य.

**श्वेता**—क्रोधा व कश्यप यांची कन्या. हिला श्वेत नांवाचा दिग्गज झाला ( म. आ. ६७. ६६ कुं. ). हिचा वंश दिला आहे ( ब्रह्मांड. ३. ७. १८०-१८१ ).

**श्वेताश्व**—श्वेत नामक शिवावताराचा शिष्य.

**श्वेताश्वतर**—स्वायंभुवापासून ब्रह्मविद्या संपादन केलेला ऋषि. या नांवानें कृष्णयजुर्वेदाची एक शाखाहि आहे.

**श्वैक्र**—प्रतीदर्शाचें पैतृक नांव.

**श्वैत्य**—श्वित्यपुत्र संजयाचें नामांतर.

**श्वैत्रेय**—इंद्रानें श्वैत्रेयास उठविलें ( ऋ. १. ३३. १४; ५. १९. ३ ).

# ष

**षट्पुर**—शंकरानें त्रिपुरदाह केला असें प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणें कृष्णानें षट्पुराचा वध केला. वास्तविक त्रिपुर या नांवाचा कोणी मनुष्य नव्हता. त्याप्रमाणेंच षट्पुर नांवाचाहि कोणी पुरुष नव्हता. निकुंभ नांवाचा एक दानव अनेक देहांनीं वावरत असे त्यांपैकीं दोन शरीरांचा वध कृष्णानें केला. निकुंभाला व त्याच्या ठिकाणाला षट्पुर म्हणत ( ह. वं. २. ८५-९० ).

**षटांकुर**—शठ व कठ या दोहोंस मिळून पाठांतर आहे.

**षंड**—पंचविंशब्राह्मणांत वर्णिलेल्या सर्पसत्रांत हा एक ऋत्विज् होता (२५. २. ५३). हा शंडामर्कांपैकीं शंड असावा.

**षंडिक**—केशिन्चा प्रतिस्पर्धी खंडिक व हा एकच.

**षष्ठी**—स्कंदपत्नी देवसेना ( दे. भा. ९. ४६ ). हिच्या कृपेनें प्रियव्रताचा मेलेला पुत्र सुव्रत जिवंत झाला ( ब्रह्मवै. २. ४३ ). स्कंदाला षष्ठीप्रिय असें म्हणतात ( म. व. २३३. ६ कुं. ).

# स

**संयम**--( ६ संजय पहा ).

**संयमन**--दुर्योधनपक्षीय शल राजाचें नामांतर. याच्या पुत्रास सांयमनि म्हणत.

२ एक आचार्य ( प्रातर्दन पहा ).

**संयाति**--कश्यपकुलोत्पन्न गोत्रकार.

२ ( सो. पुरूरवस्. ) नहुषाचा पुत्र.

३ ( सो. पूरु. ) विष्णु व भागवत यांच्या मतें बहुगवीचा पुत्र. यास संपाति व संजाति अशीं नामांतरें आहेत.

**संयूप**--( सो. क्रोष्टु. ) मत्स्यमतें शूराचा पुत्र.

**संयोधकंटक**--वैश्रवणाचा अनुचर यक्ष ( वा. रा. उ. १४ ).

**संवनन आंगिरस**--सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १९१ ).

**संवरण**--( सो. ऋक्ष. ) ऋक्षपुत्र. संवरणावर पांचाल राजानें स्वारी करून याची दाणादाण केली. तेव्हां सिंधुनदीच्या तीरीं हा लपून बसला असतां तेथें वसिष्ठ आला. वसिष्ठाच्या साहाय्यानें यानें पृथ्वी जिंकून खंडणी वसूल केली ( म. आ. ९४). वसिष्ठानें सूर्याकडून यास तपती मिळवून दिली. तिच्या नादांत संवरण असतां देशांत बारा वर्षे दुष्काळ पडला. पण वसिष्ठानें त्यांतून राष्ट्राचें संरक्षण केलें ( म. आ. १७१-१७४ ). याचा पुत्र कुरु.

२ ध्वन्य लक्ष्मणाचा पुरोहित ऋषि ( ऋ. ५. ३३. १० ).

**संवरण प्राजापत्य**--सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ३३-३४ ).

**संवर्गजित् लामकायन**--हा शाकदास भाडितायनाचा शिष्य. याचा शिष्य गातु गौतम ( वं. ब्रा. २ ).

**संवर्त**--स्वायंभुव मन्वंतरांतील आंगिरसचा पुत्र ( म. अनु. १३२.४३ कुं. ). यानें जेथें तप केलें त्या स्थानाचें नांव संवर्तवापी ( म. व. ८३. ३२ कुं. ).

२ एक स्मृतिकार. याज्ञवल्क्यानें दिलेल्या स्मृतिकारांत याचें नांव आहे. आनंदाश्रमस्मृतिसमुच्चय, जीवानन्दस्मृतिसंग्रह व व्यंकटेश्वरस्मृतिसंग्रह यांमध्यें याच्या स्मृतींत अनुक्रमें २३०, २२७ व २३२ इतके श्लोक आहेत. उपलब्ध स्मृतींत आचार व प्रायश्चित्तविषयक वचनें आहेत.पण व्यवहारविषयक पुष्कळच वचनें विश्वरूपादिकांच्या टीकाग्रंथांतून आढळतात. छापील स्मृतींतील कांहीं श्लोक अपरार्कांत आढळतात. मिताक्षरेंत बृहत्संवर्ताचा ( याज्ञ. ३. २६५; २८८ ) व हरिनाथाच्या स्मृतिसारांत स्वल्पसंवर्ताचाहि निर्देश आहे.

**संवर्त आंगिरस**--सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १७२ ). हा मरुत्ताचा पुरोहित होता ( ऐ. ब्रा. ८. २१ ).

अंगिरसच्या पुत्रांपैकीं एक. मरुत्तानें यज्ञ केला, त्या वेळीं नारदाचे सांगण्यावरून यासच त्यानें पुरोहित केलें होतें. याला वीतहव्य म्हणत ( यो. वा. ५. ८२-९० ). हा बराच प्राचीन यज्ञकर्ता आहे ( ऋ. ८. ५४. २; ३ मरुत्त पहा ).

**संवर्तक**--कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

२ धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**संशाती**--पवमान अग्नीची स्त्री. हिचे पुत्र सभ्य व आवसथ्य ( मत्स्य. ५१. १२ ).

**संश्रवस् सौवर्चनस**--सत्रांतील होत्यानें करावयाच्या इडोपाह्वानासंबंधीं याचा तुमिंजाशीं संवाद झाला आहे ( तै. सं. १. ७. २.१ ).

**संश्रुत्य**--विश्वामित्राचा पुत्र व गोत्रकार.

**संस्कृति**--( सो. क्षत्र. ) भागवतमतें जयसेनाचा, विष्णु व वायु यांच्या मतें जयत्सेनाचा पुत्र. विष्णु व वायु यांत संकृति असें नांव आहे.

**संहत**--( सो. सह. ) मत्स्यमतें हा कुंतीचा पुत्र. याचें नांव भागवतमतें सोहंजि, विष्णुमतें साहंजि व वायुमतें संज्ञेय होय.

**संहताश्व**--बर्हणाश्वाचें नामान्तर.

**संहिता**--सुबलकन्या, गांधारीभगिनी व धृतराष्ट्रपत्नी.

**संहृति**--अंगिराकुलांतील मंत्रकार.

**संह्राद**--हिरण्यकशिपु व कयाधू यांचा पुत्र. याची स्त्री कृति. यास पंचजन (भा. ६.१८. १२), आयुष्मत्, शिबि व बाष्कल असे पुत्र होते ( विष्णु. १. २१. १ ).

याचे पुत्र निवातकवच. त्यांपैकीं चार मुख्य आहेत. जंभ, बाष्कल, कालनेमि, शंभु. यांचीहि वंशावळ आढळते ( ब्रह्मांड. ३. ५. ३८-३९; ६ महोदर पहा ).

२ जालंधराच्या सैन्यांतील एक.

**सकतिपुत्र**--व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें लोकाक्षीचा शिष्य. ब्रह्मांडांत सकोतिपुत्र असा पाठ आहे.

**सकौगाक्षि** व **सकौवाक्षि**--भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**सक्तुप्रस्थ**--( उंच्छवृत्ति पहा ).

२ पूषमित्र गोभिलाचा शिष्य ( वं. ब्रा. ३ ).

**सगर**—(सू. इ.) बाहूचा किंवा बाहुकाचा, पण पद्ममतें गराचा पुत्र. वास्तविक बाहु निपुत्रिकच मरण पावला. पण त्याच्या मृत्युसमयीं त्याची स्त्री केशिनी अथवा कालिंदी और्वाश्रमी गरोदर होती. तिच्या सवतींनीं मत्सरानें तिला विष घातलें. तेव्हां विष गर्भात उतरून पुढें विषयुक्त पुत्र जन्मला. तोच सगर होय. याचे क्षत्रियोचित संस्कार और्वानें केले व यास भार्गव नांवाचें अग्न्यस्त्र दिलें (विष्णु. ४. ४). और्वकृपेनें यास तें विष बाधलें नाहीं. शस्त्रास्त्रांची माहिती च्यवनानें (विष्णुधर्म. १.७) व वसिष्ठानें देऊन तालजंघादिकांस जिंकण्यास साहाय्य केलें (नारद. १. ८-९). यास स्त्रिया दोन. एक सुमति व दुसरी शैब्यकन्या केशिनी अथवा भानुमती (भा. ९.८.९) व विदर्भकन्या केशिनी (विष्णु. ४. ४). या दोघी विदर्भाच्याच कन्या होत्या (२ विदर्भ पहा). केशिनीस असमंजस् व सुमतीस साठ हजार पुत्र झाले. असमंजस् योगभ्रष्ट असल्यामुळें विरक्त होऊन लोकांनीं आपल्यापासून दूर राहावें, म्हणून मुद्दाम दुर्वृत्तपणें राही. तेव्हां त्यास यानें हांकून दिलें. सुमतीपुत्रांस कपिलानें जाळिलें.

वरील अस्त्रादिकांच्या साहाय्यानें यानें हैहय तालजंघाचा नाश करून राज्य मिळविलें. शक, यवन, कांबोज, पारद, बर्बर, पल्लव यांचा नाश चालविला. परंतु वसिष्ठाच्या (पद्म. उ.२१) किंवा विश्वामित्राच्या रदबदलीमुळें त्यांस फक्त विकृतवेषधारी करून यानें सोडून दिलें. नंतर यानें अश्वमेध केला. पण त्यांत वरील साठ हजार पुत्र (नारद. १. ९-१०.), हृषीकेतु, सुकेतु, धर्मरथ, पंचजन खेरीज कपिलानें भस्म केलें. वरील चौघांनीं किंवा अंशुमानानें अश्व परत नेऊन अश्वमेध पुरा करविला. हा पराक्रमी, सत्यधर्मी, सत्यवक्ता, दानशूर व विचारज्ञ होता. यानें पापनाशिनीव्रताचें फल मिळविलें (पद्म. उ.२०; ३८). याचे शिक्के मोहेंजोदरोच्या उत्खननांत सांपडल, असं वॅडेल म्हणतो (*Egyptian Civilization: its Sumerian Origin and Real Chronology*).

**सगालव**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**संकट**—धर्म व ककुब् यांचा पुत्र. याचा पुत्र कीकट.

**संकर गौतम**—पुष्पयशस् औदव्रजि हा याचा शिष्य व याचे गुरु अर्यमराध गौतम व पूषमित्र गोभिल (वं.ब्रा. ३).

**संकल्प**—धर्म व संकल्पा यांचा पुत्र. याचा पुत्र काम.

**संकल्पा**—दक्ष व आसिक्री यांची कन्या आणि धर्मपत्नी.

**संकील**—वैश्यज्ञातींतील मंत्रद्रष्टा (ब्रह्मांड. २. ३२. १२१; मत्स्य. १४५. ११७).

**संकु**—(१ शकुं पहा).

**संकुसुक यामायन**—सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १८).

**संकृति**—अंगिरसकुलांतील गोत्रकार. हा तपानें ऋषि झाला (ब्रह्मांड. २. ३२. १०५; १ गुरु पहा).

२ (सो. पूरु.) भागवत व विष्णु यांच्या मतें नराचा पुत्र. यास वायुमतें सांकृति हें नामांतर आहे. याची स्त्री सत्कृति.

३ (संस्कृति पहा).

**संक्रंदन**—भौत्य मनूचा पुत्र.

२ विदर्भराजा. याचा पुत्र वपुष्मत्.

**संग प्रयोगि**—आसंग प्रायोगि व हा एकच असावा (मै. सं. ३. १. ९).

**संगत**—(मौर्य. भविष्य.) भागवतमतें सुयशसचा व विष्णुमतें दशरथाचा पुत्र.

**संगर**—गंगास्नानानें हा यशोभद्र राजा झाला (पद्म कि. ३).

**संगव**—दुर्योधनाचा गवळी. यानें गोहरणाच्या वेळच्या गाई जवळच असल्याचें धार्तराष्ट्रांना कळविलें व त्यानंतर गोहरण केलें गेलें (म. व. २४०. २ कुं.).

**संग्रामजित्**—कृष्ण व भद्रा यांचा पुत्र.

२ एक यादव (भा. ११. ३०. १६).

३ युधिष्ठिराच्या सभेंतील क्षत्रिय (म. स. ४.२७ कुं.)

**सचेलेय**—(संवेलेय पहा).

**सच्य**—(स्वा. उत्तान.) भागवतमतें हविर्धानाचा पुत्र.

**सजातंबि**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**सजीवि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**सज्जनाद्रोहक**—(धर्माकर पहा).

**संजय**—लोकाक्षि नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

२ (सो. क्षत्र.) वायुमतें प्रतिपदाचा व भागवतमतें प्रतीचा पुत्र हाच. विष्णुमतें प्रतिक्षत्राचा पुत्र सृंजय होय.

३ (५ सृंजय पहा).

४ (७ सृंजय पहा).

५ (सू. निमि.) विष्णुमतें सुपार्श्वाचा पुत्र. भागवतांत याचें नांव चित्ररथ आहे.

६ सौवीर देशच्या राजाचा पुत्र. याची आई विदुला. याचें राज्य सिंधु राजानें बळकाविलें म्हणून विदुलेनें यास प्रोत्साहन व द्रव्यसाहाय्य देऊन सिंधुराजाशीं युद्धास प्रवृत्त केलें (म. उ. १३३-१३६ कुं.). हें कथानक कुंतीनें युधिष्ठिरास युद्धास प्रवृत्त करण्याकरितां सांगितलें होतें.

७ द्रौपदीहरणप्रसंगीं सपरिवार हिंडत असलेल्या जयद्रथाच्या अकरा भावांमध्यें हाहि त्याबरोबर असल्याचें कोटिकाश्यानें द्रौपदीस सांगितलें (म. व. २६६. ११ कुं.).

८ (सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

९ गवल्गण सूताचा पुत्र. याचें गावल्गणि असें पैतृक नांव आढळतें. हा धृतराष्ट्राचा सारथि व सल्लागार होता ( म. आ. ६४. १३९ कुं. ). भीष्मादिकांचें न ऐकल्यामुळें व द्रौपदीचा अपमान केल्यामुळें यानें दुर्योधनाची निंदा केली व युधिष्ठिरास उपदेश केला (म. स.१०३ कुं.). धृतराष्ट्राज्ञेवरून हा उपप्लव्यास साम घडवून आणण्याकरितां पांडवांकडे गेला होता (म. उ. २३. १ कुं.). युद्ध पाहतां यावें म्हणून व्यास धृतराष्ट्रास दृष्टि देणार होता. परंतु त्यानें तें पाहवणार नाहीं, करितां नुसतें ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली. म्हणून व्यासानें यास दिव्यदृष्टि, रणांगणावर युद्ध पहात असतां श्रमराहित्य व घनघोर युद्धांतहि अवध्यता असे वर दिले ( म. भी. २९ कुं.). यानें धृष्टद्युम्नावर चाल केली. पण त्यानें यास पळवून लाविलें. सात्यकीनेंहि यास एकदां मूर्च्छित केलें ( म. श. २४. ५० कुं. ). तसेंच हा रणभूमीवरून परत जात असतां याच्या बरोबर धृतराष्ट्रास दुर्योधनानें निरोप पाठविला (म. श. २९. १९-२१. कुं. ). यावरून हा युद्धप्रसंग पाहण्याकरितां प्रत्यक्ष हजर असे व याचें सर्व गोष्टींकडे लक्ष असे.हा रात्रीं धृतराष्ट्रास सर्व बातमी सांगत असावा. कृष्णानें अर्जुनास सांगितलेली गीता व युद्धाचें विस्तृत वर्णन यानें धृतराष्ट्रास सांगितलें ( म. भी. २५-४२ ). युद्ध संपल्यानंतर याची दिव्यदृष्टि संपली ( म. सौ.९. ६२ कुं. ). युद्धानंतर हा धृतराष्ट्रादिकांसमवेत युधिष्ठिराजवळ होता. पण विदुराच्या सांगण्यावरून यास चुकवून धृतराष्ट्र गांधारीसह वनांत गेला. धृतराष्ट्राचा वियोग सहन न झाल्यामुळें नारदानें दिलेल्या माहितीवरून हा हिमाचलावर धृतराष्ट्राच्या शोधार्थ गेला ( भा. १. १३. ३१ ). पुढें धृतराष्ट्र, गांधारी, कुंती व हा असे हिमाचलावर तप करीत असतां याच्या शिवाय सर्व वणव्यांत सांपडून मेले. नंतर हा इतरत्र तपार्थ निघून गेला ( म. आश्र. ३९. ३३ कुं. ).

१० (सू. इ. भविष्य.) वायु, विष्णु व भागवत यांच्या मतें रणंजयाचा आणि मत्स्यमतें रणेजयाचा पुत्र. याचा पुत्र शुद्धोद.

**संजाति**—( ३ संयाति पहा ).

**संज्ञा**—( विवस्वत् व सुरेणु पहा ).

**संज्ञेय**—( सो. सह. ) वायुमतें कीर्तीचा पुत्र ( संहत पहा ).

**सती**—अंगिरस्ची पत्नी. हिनें अथर्वांगिरस् वेदाला पुत्र मानिलें.

२ दक्ष व प्रसूति यांची कन्या. विष्णूच्या अंशानें ही झाली ( पद्म. सृ. २९ ). मूळ भवानीनें नारीसृष्टि निर्माण करण्याकरितां दक्षाच्या घरीं अवतार घेतला ( शिव. शत. ३; दे. भा. ७. ३० ). हिनें मुख पाहण्याकरितां ब्रह्मदेवानें धूर करून शंकरास डोळे झाकावयास लाविलें ( स्कंद. ६. ७७ ). शंकरास न बोलाविल्यामुळें रागावून हिनें दक्षाच्या यज्ञांत देहत्याग केला. ही कथा सर्वत्र आहे ( पद्म. सृ. ५; वायु. १. ३०; कालि. १८; दुर्गा पहा ). पण शंकरानें हिचा त्याग केल्यामुळें हिनें देहत्याग केल्याचीहि कथा आहे ( शिव. रुद्र. स. २५ ).

**सत्कर्मन्**—( सो. अनु. ) धृतव्रताचा पुत्र. याचा पुत्र अधिरथ व नातू कर्ण ( भा. ९. २३. १२ ). यानें ब्राह्मण स्त्रीशीं शास्त्रविधीनें विवाह केला होता. हा सूतवृत्ति करीत असे. सत्यकर्मन् असें याचें नांव विष्णु व वायु यांच्या मतें आहे.

**सत्कृत**—पृथुक देवांतील एक.

**सत्कृति**—संकृति राजाची पत्नी व रंतिदेवाची माता.

**सत्य**—कलिंगाचा चक्ररक्षक. यास भीमानें मारिलें ( म. भी. ५४. ७६ कुं. ).

२ ( स्वा. उत्तान. ) हविर्धान व हविर्धानी यांचा एक पुत्र.

३ उत्तम मन्वंतरांतील देवविशेष ( भा. ८. १०. २४ ).

४ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

५ दहा विश्वेदेवांपैकीं एक.

६ वितत्याचा पुत्र. याचा पुत्र संत ( म. अनु. ३० ).

७ अंगिरस् व सुरूपा यांचा पुत्र. एक देव (मत्स्य. १९६).

८ तामस मन्वंतरांतील देवविशेष.

९ दक्षसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

१० उत्तम मन्वंतरांतील अवतार. हा सत्येचा पुत्र होय.

११ दुसऱ्या द्वापरांत झालेला व्यास ( व्यास पहा ).

१२ ( उंच्छवृत्ति पहा ).

१३ सुधामन् देवांतील एक.

१४ अमिताभ देवांपैकीं एक.

१५ आभूतरजस् देवांपैकीं एक.

१६ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें हिरण्यनाभाचा शिष्य.

१७ तामसांतील देवगण. अश्व, आनंद, क्षेम, दिक्पति, दिवि, बृहद्वपु, वर्चोधामन्, वाक्पति, विश्व, शंभु, सदश्व व स्वमृडीक ( ब्रह्मांड. २. ३४-३५ ).

**सत्यक**—तामस मन्वंतरांतील देवगण.

२ रैवत मनूचा एक पुत्र.

३ कृष्ण व भद्रा यांचा पुत्र.

४ ( सो. वृष्णि. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें हा शिनीचा पुत्र ( म. आ. २३९. ११ कुं. ). मत्स्यमतें याचें नांव सत्यवत् असें आहे.

**सत्यकर्मन्**—( सो. अनु. ) विष्णु व वायु यांच्या मतें धृतव्रताचा पुत्र.

२ त्रिगर्तांपैकीं एक. यास अर्जुनानें मारिलें ( म. श. २६. ३७ कुं. ).

**सत्यकाम जाबाल**—श्रद्धा व तप हीं ब्रह्मोपासनेचीं अंगें आहेत, हें दाखविण्यासाठीं याची सुंदर कथा आली आहे. ती अशी–जबाला नामक स्त्रीला सत्यकाम नांवाचा पुत्र होता. गुरुकुलांत जाण्यापूर्वी आईला गोत्र विचारितां तिनें सांगितलें कीं, तुझें गोत्र काय, हें मला ठाऊक नाहीं. मात्र माझें नांव जबाला आहे आणि तुझें नांव सत्यकाम आहे, एवढेंच मला ठाऊक आहे. पतिगृहीं अतिथिअभ्यागतांच्या सेवेमध्यें व इतर कामांमध्यें मी अत्यंत व्यग्र होतें. शिवाय, मी तरुण होतें. तेव्हां तूं मला झालास. लज्जेनें त्या वेळीं मीं ती गोष्ट विचारिली नाहीं. आणि तूं झाल्याबरोबर तुझा पिता मरण पावला. तर तूं गुरूंना सांग कीं, 'मी जबालेचा पुत्र सत्यकाम आहें.' नंतर सत्यकाम गौतम हारिद्रुमत यांजकडे गेला आणि नम्रतेनें म्हणाला, 'हे भगवन, ब्रह्मचर्यपूर्वक अध्ययन करावें, म्हणून मी आपणांकडे आलों आहें.' गौतमानें विचारिलें, 'बाळा, तुझें गोत्र काय ?' त्यावर आईनें सांगितल्याप्रमाणें यानें सर्व गुरूला सांगितलें. तेव्हां गौतमानें याच्या सत्यवक्तेपणाची प्रशंसा करून याचें उपनयन केलें. कृश व अशक्त अशा चारशें गाई गोठ्यांतून सोडून गौतमानें याला त्यांच्या मागें जाण्यास सांगितलें. 'नंतर चारशेंच्या हजार गाई झाल्याशिवाय आपण परत येणार नाहीं' अशी यानें प्रतिज्ञा केली. त्यानंतर बरींच वर्षे हा अरण्यांत राहिला. तेव्हां चारशेंच्या हजार गाई झाल्या. पुढें वायुदेवतेनें संचार केलेल्या एका ऋषभानें याला ब्रह्माचा चतुर्थांश सांगितला. नंतर आचार्यगृहीं अग्नीनें याला ब्रह्मज्ञानाचा दुसरा चतुर्थांश सांगितला. पुढें यानें आदित्यरूपी हंसाची सेवा केली व त्यापासून तिसऱ्या पादाचें ज्ञान संपादन केलें. चवथा पाद प्राणरूपी मद्गु नांवाच्या जलचर प्राण्यानें सांगितला. नंतर हा आचार्यगृहीं आला. याचें मुखावलोकन करून गौतमानें याला ज्ञान झाल्याचें जाणिलें. शेवटीं गौतमानें सांगितलें कीं, 'तूं जें जाणलें आहेस, त्याहून अधिक ज्ञान कांहींच उरलें नाहीं,' ( छां. उ. ४. ४-९ ).

हा मनाला ब्रह्म मानणारा असून याज्ञवल्क्याशीं समकालीन होता ( बृ. उ. ४. १. ६ ).

सत्यकाम जाबालानें राज्याभिषेकाच्या वेळीं म्हणावयाच्या मंत्रांसंबंधीं भिन्न मत दिलें आहे (ऐ. ब्रा. ८.७ ). व या होमाविषयीं याचें पैंग्याबरोबर मत दिलें आहे ( श. ब्रा. १३. ५. ३.१ ).

मैत्र्युपनिषदांत याचा उल्लेख आहे, पण तो हाच कीं काय, हें सांगतां येत नाहीं ( मै. उ. ६. ५ ).

२ हा जानकि आयस्थूणाचा शिष्य आहे (बृ. उ.६. ११).

**सत्यकाम शैब्य**—ब्रह्मज्ञान संपादण्याकरितां पिप्पलादाकडे हा गेला होता ( प्र. उ. १ ).

**सत्यकामा**—वायुमतें भंगकारकन्या व कृष्णपत्नी.

**सत्यकेतु**—( सो. क्षत्र. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें धर्मकेतूचा पुत्र.

२ ( १ पद्मावती व २ गोभिल पहा ).

**सत्यघोष**—एक शूद्र. याचे पुत्र गर व सगर (पद्मकि. ३).

**सत्यजित्**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

२ उत्तम मन्वन्तरांतील इंद्र.

३ कार्तिकांत विष्णु सूर्याबरोबर असणारा यक्ष.

४ ( सो. क्रोष्टु. ) आनक व कंका यांचा पुत्र.

५ (सो. मगध. भविष्य.) विष्णुमतें सुनीताचा पुत्र. वायु व ब्रह्मांड यांच्या मतें सुनेत्राचा पुत्र. याचा पुत्र विश्वजित् ( भा. ९. २२. ४९ ).

६ द्रुपदाचा पुत्र ( म. आ. १४८. ५० कुं. ). यास द्रोणाचार्यांनें मारिलें ( म. द्रो. २१.२१ कुं. ).

७ मरुतांच्या दुसऱ्या गणांपैकीं एक.

**सत्यज्योति**—मरुतांच्या पहिल्या गणांपैकीं एक.

**सत्यतपस्**—उतथ्याला खरें बोलण्याच्या नियमामुळें मिळालेलें नांव. याला सत्यतपस् किंवा सत्यव्रत म्हणत असत. हा अत्यंत विद्याहीन व आचारहीन असे. एकदां याच्या पुढून व्याधानें जखमी केल्यामुळें रक्तबंबाळ झालेला एक वराह गेला. त्याला पाहिल्याबरोबर याच्या मुखांतून 'ऐ ऐ' असे दुःखोद्गार सहज बाहेर पडले. पण 'ऐ' सारस्वतबीज मंत्र याच्या तोंडून बाहेर पडल्यामुळें याला सत्यांतील तारतम्य समजूं लागलें. व व्याध वराहाच्या शोधार्थ आला असतां वराहाच्या मृत्यूला कारण होणार हें सत्य नव्हे, असें जाणून यानें त्याला कांहींच उत्तर दिलें नाहीं. पुनः विचारतां 'दृष्टीला बोलतां येत नाहीं व वाणीला पाहतां येत नाहीं' असें यानें उत्तर दिलें ( दे. भा. ३.११ ).

२ एक ऋषि. याच्या तपाला विघ्न आणल्यामुळें शापानें बोरी झालेल्या अप्सरांचा भरतानें उद्धार केला (८ भरत पहा).

३ हा ऋषि कृष्णोपासनेनें भद्रा नांवाची गोपी झाला (पद्म. पा. ७२ ).

**सत्यतर**—व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें सत्यहिताचा पुत्र व शिष्य.

**सत्यदृष्टि**—पृथुक देवांतील एक.

**सत्यदेव**—भीमानें मारिलेला कलिंगाचा एक चक्ररक्षक ( म. भी. ५४. ७६ कुं. ).

२ त्रिगर्त राजांपैकीं एक. यास अर्जुनानें मारिलें ( म. क. १८. २१-२२ कुं. ).

**सत्यदेवी**—देवककन्या ( मत्स्य. ४४.७३ ).

**सत्यधर्म**—धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**सत्यधर्मन्**—एक राजा. हा पापी मनुष्य गंगास्नानानें व रामस्मरणानें मुक्त झाला ( पद्म. क्रि. ९ ).

**सत्यधृत**—( सो. ऋक्ष. ) विष्णुमतें पुष्पवताचा पुत्र. भागवत व वायु यांचे मतें याचें नांव सत्यहित व मत्स्यमतें सत्यधृति असें आहे.

**सत्यधृति**—( सो. द्विमीढ. ) भागवतमतें कृतिमत्‌चा आणि मत्स्य व वायु यांच्या मतें धृतिमत्‌चा पुत्र.

२ ( सो. नील. ) शतानंदाचा पुत्र. हा धनुर्वेदनिष्णात होता.

३ द्रौपदीस्वयंवरांतील एक राजा ( म.आ.२०१.१० कुं. ).

४ द्रुपदाचा पुत्र. यास द्रोणाचार्यानें ठार केलें ( म. क. ३. ३४ कुं. ).

५ सुचित्राचा पुत्र असावा ( म. उ. १९६. २८ कुं. ). हा पांडवांचे बाजूस होता ( म. उ. १७१. १८ कुं. ). हा धनुर्वेद व ब्राह्मवेद यांत पारंगत होता. याचे अश्व अरुण वर्णाचे होते ( म. द्रो. २३ ). यास द्रोणानें मारिलें ( म. क. ३. ३१ कुं. ).

६ ( सो. वसु. ) विष्णुमतें सारणाचा पुत्र.

७ ( सो. ऋक्ष. ) मत्स्यमतें पुण्याचा पुत्र ( सत्यधृत पहा ).

८ ( सू. निमि. ) विष्णुमतें महावीर्याचा पुत्र. वायु व भागवत यांच्या मतें यास सुधृति असें नामांतर आहे.

**सत्यध्वज**—( सू. निमि. ) ऊर्जवहाचा पुत्र. याचें नांव भागवतमतें सनद्वाज व वायुमतें सुतद्वाज असें आहे.

**सत्यनेत्र**—वैवस्वत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**सत्यभामा**—सत्राजित्‌ची कन्या व कृष्णपत्नी. हिला कृष्णानें अर्जुनाचा त्रिदंडीसंन्यास सांगून त्यास बंधूप्रमाणें वागविण्यास सांगितलें ( म. आ. २३८ कुं. ). नरकासुरास मारिल्यावर हिच्यासह कृष्ण स्वर्गी गेला व तेथून इंद्राचा पारिजातवृक्ष हिच्याकरितां त्याशीं युद्ध करून कृष्णानें आणिला ( म. स. ५६ कुं.; भा. १०. ५९; ह. वं. २. ६४-७३; विष्णु. ५. ३० ). नारदानें स्वर्गाहून आणलेलीं पारिजात-पुष्पें कृष्णास दिलीं. त्यानें तीं हिला न देतां इतर स्त्रियांस दिलीं, हें पाहून हिला राग आला. तेव्हां त्यानें इंद्राकडून पारिजातकवृक्ष आणून हिच्या घरीं लाविला. पुढें जन्मोजन्मीं हाच पति लाभावा म्हणून नारदाच्या कुचेष्टेंतील सांगण्यावरून हिनें त्यास वृक्ष व कृष्ण दान दिलें. पण नारद त्यांस घेऊन चालला असतां त्यांच्या मोबदला भारंभार सुवर्ण, सवत्स धेनु वगैरे देऊन हिनें त्यांना परत मिळविलें ( ह. वं. २. ६४-७३; पद्म. उ. ८८ ). हिच्यासह कृष्ण पांडवांस भेटण्याकरितां काम्यकवनांत गेला होता ( म. व. १८५. ७ कुं. ). तेथें द्रौपदीस हिनें पतिवश कसा ठेवावा हें विचारल्यावरून तिनें अहंकार न धरतां निर्दोष वृत्ति ठेवावी, हा उपाय सांगून त्याचाच स्वतः सदा अवलंब केला असल्याचें सांगितलें ( म. व. २३४. ४ कुं. ). कृष्णनिधनानंतर स्वर्गलोकीं जाण्याकरितां ही तपोवनांत जाऊन तप करीत राहिली ( म. मौ. ८. ७५ कुं. ). हिला भानु व भैमरिक ( विष्णु. ५. ३२. १ ), भानु, सुभानु, स्वर्भानु, प्रभानु, भानुमत्, चंद्रभानु, बृहद्भानु, अतिभानु, श्रीभानु, प्रतिभानु ( भा. १०. ६१. १० ), सानु, भानु, अक्ष, रोहित, मंत्रविद्, जर, अंधक, ताम्र, चक्र, सौभरि, जरंधर व भानु हे पुत्र आणि सौभरिका, ताम्रपर्णी, जरंधरा या कन्या होत्या ( ब्रह्मांड. ३. ७१. २४७; वायु. २. ३५. २४०; सत्राजित् पहा ).

**सत्ययज्ञ पौलुषि**—एक आचार्य ( श. ब्रा. १०. ६. १. १; छां. उ. ५. ११-१३ ). याला प्राचीनयोग्यहि म्हटलें आहे ( जै. उ. ब्रा. ३. ४०. २ ).

**सत्ययज्ञ पौलुषित**—एक आचार्य ( जै. उ. ब्रा. १. ३९. १ ).

**सत्यरथ**—( सू. निमि. ) भागवतमतें समरथाचा व विष्णुमतें मीनरथाचा पुत्र.

२ दुर्योधनपक्षीय त्रिगर्तराजा. यास अर्जुनानें मारिलें ( म. उ. १६६. ११; श. २७ कुं. ).

३ ( सू. इ. ) मत्स्यमतें सत्यव्रताचा पुत्र.

४ ( सो. अनु. ) मत्स्यमतें चित्ररथाचा पुत्र.

५ शिवपूजा अर्धवट टाकल्यानें या विदर्भराजाचे व याच्या कुटुंबाचे हाल झाले ( २ पांड्य पहा; शिव. शत. ३१ ). स्कंदांत याला सत्यसंध म्हटलें आहे ( स्कंद. ३. ३. ६ ).

**सत्यवचस् राथीतर**—सत्याची महती गाणारा ऋषि ( तै. उ. १. ९. १ ).

**सत्यरथा**—त्रिशंकूची पत्नी.

**सत्यवत्**—( ३ सत्यवाच् पहा ).

२ शाल्वदेशचा राजा द्युमत्सेन हा याचा पिता होय. यास लहानपणापासूनच अश्वांची फार आवड होती. हा अश्वांचीं चित्रें करी व भिंतीवरहि तीं चित्रित करी. म्हणून यास चित्राश्व म्हणत. हा अल्पायु होता. पण याची स्त्री सावित्री हिनें यास पातिव्रत्यप्रभावानें दीर्घायु केलें ( सावित्री पहा ).

३ ( सो. वृष्णि. ) मत्स्यमतें शिनीचा पुत्र ( ४ सत्यक पहा ).

४ तेजःपुरचा राजा व ऋतुंभराचा पुत्र. हा ऋतुंभरास रामभक्ति, गोसेवा व ब्राह्मणांस दानधर्म केल्यामुळें झाला. पुढें रामाचा अश्वमेधीय घोडा याचे नगरांतून जात असतां

हा मोठ्या आनंदानें शत्रुघ्नास मिळाला व अश्वरक्षक होऊन त्याबरोबर गेला ( पद्म. पा. ३०-३२ ).

**सत्यवती**—लोपामुद्रेचें नामांतर.

२ गाधि राजाची कन्या, ऋचीक ऋषीची स्त्री. ही जमदग्नि ऋषीची माता व विश्वामित्राची ही बहीण होय. पतिव्रता देहासह स्वर्गास गेली, व कौशिकी नदीच्या रूपानें पृथ्वीवर आली ( वा. रा. बा. ३४ ).

३ सुबाहूची स्त्री. रामानें अश्वमेध केला, त्या वेळीं जीं जोडपीं त्या अश्वास स्नान घालावयास सरयूवर गेलीं होतीं, त्यांपैकीं हेंहि एक होतें ( पद्म. पा. ६७ ).

४ उपरिचर वसु राजाची कन्या. हिला कालीं, मत्स्यगंधा, गंधवती व योजनगंधा अशीं नांवें होतीं. हिला कौमारदशेंत पराशर ऋषीपासून कृष्ण द्वैपायन नांवाचा सुप्रसिद्ध मुलगा झाला. हीच पुढें शंतनु राजाची स्त्री झाली. चित्रांगद व विचित्रवीर्य हे हिचे पुत्र होत. शेवटीं ही आपल्या सुनांसह अरण्यांत गेली व तेथेंच मरण पावली ( म. आ. १३७. १२ कुं.). ही वसूच्या वीर्यापासून झाली असल्यामुळें क्षत्रियकन्या होय ( स्कंद. ५. ३. ९७ ).

**सत्यवर्मन्**—त्रिगर्तांचा बंधु.

**सत्यवाच्**—कश्यप व मुनि यांचा पुत्र.

२ चक्षुर्मनु व नड्वला यांचा पुत्र. यास सत्यवत् असेंहि नामांतर आहे ( भा. ४. १३. १६ ).

३ रैवत मनूचा पुत्र.

४ सावर्णि मनूचा पुत्र.

**सत्यव्रत**—त्रिशंकूचें नामांतर.

२ द्रविड देशाचा राजा ( भा. ८. २४. १३ ). हा राज्य दुसऱ्यावर सोंपवून आपण कृतमाला नदीच्या तीरीं स्नानसंध्या करीत राहिला. ही कृतमाला नदी म्हणजे मदुरा शहर जिच्या तीरावर आहे ती वैगा नदी होय. हिचा उगम मलय पर्वतावर आहे ( मार्क. ५७; विष्णु. २. ३ ). मनु आपल्या मुलावर राज्य सोंपवून मलयपर्वताच्या एका भागावर तपश्चर्येस गेला, व तेथें यानें मोठी तपश्चर्या करून स्थिरचर पृथ्वीचा संरक्षक होण्याविषयीं वर मागून घेतला ( मत्स्य. १).

गेल्या कल्पाच्या शेवटीं नैमित्तिक ब्राह्म प्रलय झाला. तेव्हां हयग्रीवानें ब्रह्मदेवापासून वेद पळविले म्हणून हरीनें मत्स्यावतार घेतला. त्या वेळीं जो प्रियव्रत केवळ पाण्यावर राहून तप करीत होता, तो सध्यां वैवस्वत मनु असून श्राद्धदेव म्हणून प्रसिद्ध आहे. हा कृतमालेंत तर्पण करीत असतां याच्या ओंजळींत सांपडलेला मासा हा पाण्यांत सोडूं लागला, तेव्हां त्यानें आपल्या ज्ञातीपासून संरक्षण करण्याविषयीं विनंति केली तेव्हां त्याला योग्य स्थळीं ठेवून यानें त्याचें संरक्षण केलें व शेवटीं समुद्रांत सोडलें. शेवटीं त्यानें सांगितलें कीं, आजपासून सातवे दिवशीं सर्व लोक पाण्यांत बुडतील तेव्हां एक प्रचंड नौका तुझेजवळ येईल. पण मत्स्यपुराणांत शंभर वर्षें अवर्षण पडून नंतर प्रलय होईल असें आहे ( मत्स्य. २. ३ ). त्यांत तूं सर्व लोकांना घेऊन बैस. सूर्याचा प्रकाश नसला तरी तुला सर्व दिसेल. वासुकीच्या दोरीनें माझ्या शिंगाला ती नौका बांध. ब्रह्मदेवाची रात्र म्हणजे ब्राह्मप्रलय संपेपर्यंत मी तुला घेऊन फिरेन. नंतर मी तुला ज्ञानाचा उपदेश करीन. त्याप्रमाणें पुढें होऊन मत्स्यानें सत्यव्रताला ज्ञान, योग व क्रिया यांचें वर्णन सांगितलें असून आत्मज्ञान असलेल्या मत्स्यपुराणाचा उपदेश केला. व शेवटीं मत्स्याच्याच कृपेनें सत्यव्रतास श्राद्धदेव वैवस्वत मनूचा मान मिळाला (भा. ८. २४.१०; मत्स्य. १. २; २९० ). ह्या मत्स्यावताराच्या वेळीं झालेल्या प्रलयासंबंधीं टीकाकार श्रीधरानें पुढीलप्रमाणें शेरा मारिला आहे. हा वास्तविक प्रलय नव्हे. भगवंताच्या मनांतून सत्यव्रताला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करावयाचा होता. म्हणून त्यास प्रथम वैराग्य उत्पन्न होण्यासाठीं व आपलें सामर्थ्य कळून येण्यासाठीं भगवंतानें नुसता भास दाखविला. चालू वैवस्वत मन्वंतरांत मार्कंडेयास प्रलयभास दाखविल्याचें असेंच दुसरेंहि एक उदाहरण आहे.

३ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. यास सत्यसंध असें नामान्तर आहे.

४ दुर्योधनपक्षाचे जे संशप्तक त्रिगर्त त्यांतील एक (म. भी. ६२. १७ कुं. ).

५ ( १ सत्यतपस् पहा ).

६ सत्यसेन अवताराचा एक अनुचर ( भा. ८. १. २५ ).

**सत्यव्रता**—सुबलकन्या, गांधारीभगिनी व धृतराष्ट्रपत्नी.

**सत्यश्रवस्**—( सू. नरि. ) भागवतमतें वीतिहोत्राचा पुत्र. याचा पुत्र उरुश्रवस्.

२ अभिमन्यूनें मारिलेला दुर्योधनपक्षीय राजा ( म. द्रो. ४५ ).

३ व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील वायुमतें मार्कंडेयाचा शिष्य व पुत्र. ब्रह्मांडमतें मांडूकेयाचा शिष्य व पुत्र.

**सत्यश्रवस् आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ७९-८० ). हाच वाय्य सत्यश्रवस् होय.

**सत्यश्री**—व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें सत्यहिताचा शिष्य व पुत्र.

**सत्यसंध**—यानें आपले प्राण देऊन लोकांचे प्राण वांचविले ( म. शां. २४०. १६ कुं. ).

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

३ ( ५ सत्यरथ पहा ).

**सत्यसहस्**—याची पत्नी सूनृता व पुत्र स्वधामन्.

**सत्यसेन**—उत्तम मन्वंतरांतील अवतार. हा धर्म व सूनृता यांचा पुत्र होय ( भा. ८. १. २५ ).

२ कर्णाचा मुलगा ( म. क. ४३. ४८; श. ९. २२ कुं. ). यास नकुलानें शक्ति टाकून ठार केलें ( म. श. ९. ४१ कुं. ).

**सत्यसेना**—सुबल कन्या, गांधारीभगिनी व धृतराष्ट्रपत्नी.

**सत्यहविस्**—एक आचार्य (मै. सं. १. ९. १. १५).

**सत्यहित**—( सत्यधृत पहा ).

२ व्यासाच्या ऋक्शिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें सत्यश्रव्याचा शिष्य व पुत्र.

**सत्या**—मन्यूची पत्नी व भौवनाची माता.

२ धर्माची कन्या व शंयूची पत्नी.

३ बृहद्रथाची पत्नी. हिचा पुत्र जरासंध.

४ कोसल देशांतील नग्नजित् राजाची कन्या. हिच्या स्वयंवरप्रसंगीं सात मस्त बैलांना जिंकील त्याला ही द्यावयाची असा पण होता. तो पण जिंकून कृष्णानें हिला वरिलें ( भा. १०. ५८. ३२-४७ ). हिला वीर, चंद्र, अश्वसेन, चित्रगु, वेगवान, वृष, आम, शंकु, वसु व कुन्ति असे पुत्र होते ( भा. १०. ६१. १३ ). हिनें आपला विवाहवृत्तान्त द्रौपदीस सांगितला होता (भा. १०. ८३. १३). ही विष्णुभक्तीनें हा जन्म पावून कृष्णपत्नी झाली होती ( पद्म. सृ. १३; गरुड. २. २० ).

५ उत्तम मन्वंतरांतील अवताराची माता.

**सत्याधिवाकच् चैत्ररथि**—एक आचार्य ( जै. उ. ब्रा. १. ३९. १ ).

**सत्यायु**—पुरूरवस् व उर्वशी यांचा पुत्र (शतायु पहा ).

**सत्याषाढ**—( हिरण्यकेशिन् पहा ).

**सत्येयु**—( सो. पूरु. ) रौद्राश्व व मिश्रकेशी अप्सरा यांचा पुत्र.

**सत्येषु**—अर्जुनानें मारिलेला त्रिगर्तांपैकीं एक ( म. श. २६. ३९ कुं. ).

**सत्राजित्** किंवा **सत्राजित**—( सो. वृष्णि. ) निम्नाचा पुत्र सत्राजित् ( भा. ९. २४ ). दुसऱ्या ठिकाणीं निघ्न असून त्याचा पुत्र सत्राजित् किंवा शक्तिसेन असें म्हटलें आहे ( मत्स्य. ४५. ३; पद्म. सृ. १३ ). सत्राजित् हा गतजन्मीं मायापुरींतील अग्निगोत्रज देवशर्मा ब्राह्मण होता व याची कन्या गुणवती. ती पुढें सत्यभामा झाली ( पद्म. उ. ८८ ). याला एकंदर दहा स्त्रिया असून त्यांना एक हजार मुलें होतीं. वीरवती स्त्रीपासून याला भंगकार झाला ( ब्रह्मांड. ३. ७१. ५६ ). भंगकाराची आई द्वारवती असाहि उल्लेख आहे ( वायु. १. ३४. ५४ ). सत्राजिताला प्रसेन नामक भाऊ होता ( भा. ९. २४. १३ ).

याला सूर्यप्रसादानें अत्यंत तेजस्वी असा स्यमंतक मणि प्राप्त झाला होता ( भा. १०. ५५. ३ ). तो मणि जेथें असेल, तेथें रोग, दुर्भिक्ष यांपासून बिलकुल पीडा होत नसे. शिवाय तो रोज आठ भार सोनें प्रसवत असे. एके दिवशीं सत्राजित् तो मणि कंठांत धारण करून द्वारकेस परत येत असतां जणूं काय सूर्यच कृष्णाच्या भेटीस येत आहे, असें लोकांस वाटलें. परंतु कृष्णानें त्यांना वस्तुस्थिति सांगून त्यांच्या भ्रमाचें निरसन केलें. नंतर सत्राजित् घरीं गेल्यावर कृष्णाला वाटलें कीं, तो मणि उग्रसेनाजवळ असावा, म्हणून तो मण्याची याचना करण्याकरितां सत्राजिताच्या घरीं गेला. परंतु यानें कृष्णाला विन्मुख परत पाठविलें. पुढें कांहीं काल लोटल्यावर सत्राजिताचा भाऊ प्रसेन तो मणि कंठांत धारण करून अरण्यांत मृगयेस गेला असतां त्याला व त्याच्या अश्वाला सिंहानें ठार मारून तो मणि काढून घेतला. सिंह जरा पुढें जातो, तों जांबवानानें त्याला ठार मारिलें व मणि घेऊन तो आपल्या गुहेंत प्रवेशला. इकडे सत्राजितानें प्रसेनाची पुष्कळ वाट पाहिली, तरी प्रसेन परत आला नाहीं, हें पाहून याला फार दुःख झालें. परंतु कृष्णानें केलेल्या मण्याच्या मागणीची याला आठवण होऊन त्यानेंच प्रसेनाला मण्याच्या लोभानें ठार मारिलें असावें, असें हा उघड उघड बोलूं लागला. ही वार्ता कृष्णाला समजतांच तो कित्येक यादवांसहवर्तमान प्रसेनाचा शोध लावण्याकरितां बाहेर पडला. वनांत प्रवेश करतांच कृष्णाला प्रसेन, त्याचा अश्व व सिंह मरून पडलेले आढळून आले. परंतु मणि मात्र तेथें दिसेना. तेव्हां समीपच जमिनीवर उमटलेल्या पावलांच्या धोरणानें त्यांनीं चोरणाराचा माग सुरू केला, तों ते एका गुहेपाशीं आले. नंतर बाकीच्या यादवांना गुहाद्वारापाशीं ठेवून कृष्ण स्वतः एकटाच आंत प्रवेशला. आंत जाऊन पाहतो, तों त्या स्यमंतक मण्याशीं ऋक्षशिशु खेळत असल्याचें त्याला आढळून आलें. कृष्णाला पाहतांच त्या मुलाची दाई घाबरून ओरडली, त्याबरोबर जांबवान् बाहेर आला; व त्याचें आणि कृष्णाचें प्रचंड बाहुयुद्ध सुरू झालें. तें एकंदर अठ्ठावीस दिवस चालू होतें. शेवटीं जांबवान् थकून जाऊन त्यानें कृष्णाचा स्तव केला. नंतर कृष्णानें आपण येथें कां व कशाकरितां आलों, तें सर्व वृत्त जांबवानाला निवेदन केलें. तें ऐकून जांबवानानें आपली कन्या जांबवती व स्यमंतक मणि हीं कृष्णाला अर्पण केलीं. इकडे गुहाद्वारापाशीं बसलेले यादव बारा दिवस कृष्णाची वाट पाहून दुःखानें परत द्वारकेस गेले.

तेव्हां कृष्णहि त्वरेनें निघून द्वारकेस आला. नंतर कृष्णानें उग्रसेनाच्या समक्ष सत्राजिताला बोलविलें. व त्याला घडलेलें सर्व वर्तमान निवेदन करून मणि त्याच्या स्वाधीन केला. तेव्हां कृष्णावर मिथ्या आळ घेतल्याबद्दल याला पश्चात्ताप होऊन हा मनांत खजिल झाला व मणि घेऊन घरीं गेला. पुढें कृष्णाशीं सख्य जोडण्याकरितां यानें आपली कन्या सत्यभामा व आंदण म्हणून स्यमंतक मणि हीं कृष्णाला दिलीं. परंतु कृष्णानें तो मणि सत्राजिताजवळच ठेविला.

पुढें कुंतीसहवर्तमान पांडव लाक्षागृहांत दग्ध झाले, ही बातमी कृष्णाला समजतांच तो बलरामासमवेत हस्तिनापुरीं गेला. इकडे कृष्ण द्वारकेंत नाहीं, अशी संधि पाहून व सत्राजितानें सत्यभामा आपणांस द्यावयाची, असें कबूल करून शेवटीं कृष्णास दिली, म्हणुन अक्रूर व कृतवर्मा यांनीं शतधन्व्याला तो मणि सत्राजिताला ठार मारून चोरून आणण्यास सांगितलें. त्याप्रमाणें शतधन्व्यानें सत्राजिताकडे जाऊन हा निद्रित असतां याचा वध केला ( भा. १०.५७.५ ) व मणि घेऊन तो परत आला. हें वर्तमान सत्यभामेकडून हस्तिनापुरीं कृष्णास समजतांच तो शतधन्व्याच्या शोधाला निघाला. पण शतधन्व्यानें मणि अक्रूराचें स्वाधीन केला व आपण आनर्तांहून विदेहांत शिरला. तेथें त्याचा घोडा मेल्यामुळें तो मिथिलेच्या रानांत कृष्णाच्या हातीं सांपडून मारला गेला. पण मणि मिळाला नाहीं. तेव्हां कृष्ण द्वारकेस आला. तेथें मणि अक्रूराजवळ असल्याचें त्याच्या लक्षांत आलें. कृष्णानें अक्रूरास सामोपचारानें द्वारकेंत आणवून सर्वांना मणि दाखविला व मणि अक्रूराजवळ ठेवूनच सर्वांचा संशयनिरास केला ( भा. १०.५६-५७; विष्णु. ४.१३-१४; ह. वं. १.३८-३९ ).

'अक्रूरो ददते मणिम्' ही म्हण निरुक्ताच्या वेळीं प्रसिद्ध होती ( नि. २. ११ ). हाच मणि सध्यांचा कोहिनूर हिरा असावा.

सत्राजिताला एकंदर एक हजार मुलें होतीं. भंगकार, वातपति व तपस्वी असे तीन पुत्र व सत्यभामा, व्रतिनी व दृढव्रता अशा तीन कन्या प्रसिद्ध होत्या (ब्रह्मांड. ३. ७१. ५४-५७ ). तपस्वीला वसुमेध असें नामांतर आहे ( ब्रह्म. १६. ४६ ). दुसऱ्या ठिकाणीं भंगकार, व्रतपति व तपस्वान्त अशीं नांवें आढळतात ( वायु. २. ३४. ५३ ). मत्स्य, वायु व ब्रह्मांड यांवरून सत्यभामादि संतति भंगकाराची आहे असें वाटतें, पण संदर्भावरून पाहतां तें बरोबर नाहीं. हा सूर्योपासनेनें मुक्त झाला ( भवि. ब्राह्म. ११६-११७ ).

**सत्रायण**—याची स्त्री विताना व पुत्र बृहद्भानु ( भा. ८. १३. ३५. ).

**सत्व**—रैवत मनूचा पुत्र.

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

३ ( सो. क्रोष्टु. ) वायुमतें पुरुद्वहाचा पुत्र.

**सत्वत**—( सात्वत पहा ).

**सत्वदंत**—वायुमतें वसुदेव व भद्रा यांचा पुत्र.

**सद्**—अंगिरा व सुरूपा यांचा पुत्र, देव.

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**सदश्व**—सत्य देवांतील एक.

२ ( सो. पूरु. ) विष्णु, वायु व मत्स्य यांच्या मतें समराचा पुत्र.

३ यमाच्या सभेंतील एक सभासद (म. स. ८. १२ कुं.).

**सदसस्पति**—कश्यप व सुरभि यांचा पुत्र.

**सदस्यवत्** किंवा **सद्भस्यमत्**— आंगिरसकुलांतील गोत्रकार व मंत्रकार

**सदस्यु**—अंगिरसांतील कुत्सांचा प्रवर.

**सदस्योर्मि**—यमसभेंतील राजर्षि ( म. स. ८. ११ कुं. ).

**सदाचंद्र**—( भविष्य. ) वायुमतें मथुरा नगरींतील एक राजा. पण ब्रह्मांडमतें वैदेशांतील नागवंशीय राजा.

**सदापृण आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ४५ ). याचा प्रत्यक्ष मंत्रांत उल्लेख आहे ( ऋ. ५. ४४. १२).

**सद्योजात**—शिवाचें नांव व त्याचा अवतार.

**सध्रि वैरूप**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ११४ ). सध्रीचा प्रत्यक्ष मंत्रांत उल्लेखहि आहे ( ऋ. ५. ४४. १० ).

**सध्वंस काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ८ ).

**सनक**—हें दोन काण्यांचें नांव असून विभिंदुकीयाच्या यज्ञांत यांनीं भाग घेतला होता ( जै. ब्रा. ३. २३३ ). ब्रह्मदेवानें तप केल्यामुळें विष्णु सनक, सनंदन, सनातन व सनत्कुमार या चार रूपानें त्याचा मानसपुत्र झाला ( भा. ३. १२. ४; ४. ८. १). महाभारतांत एक सनत्सुजातीयपर्व आहे ( म. उ. ४१-४६ कुं. ). ब्रह्मसभेस जातांना सीता नांवाच्या गंगेच्या फांट्यावर यांचा नारदाशीं संवाद झाला होता ( नारद. १. १-२ ). हे लहान बालकाएवढे दिसत. यांस आंत जाण्यास अटकाव केल्यामुळें वैकुंठाच्या द्वारपालांस यांनीं शाप दिला ( भा.७.१.३५ ). पारस्कर गृह्यसूत्रांतील ( परिशिष्ट ) तर्पणांत यांचा ( सनत्कुमाराखेरीज ) उल्लेख असून हे सर्व कंक नांवाच्या शिवावताराचे शिष्य होते. हे विरक्त होते म्हणून यांनीं प्रजोत्पादन केलें नाहीं ( पद्म. सृ. ३ ). हा भृगुकुलांतील असून याच्या नांवावर सनकसंहिता नांवाचा एक ग्रंथ आहे ( C. C. ).

२ वृत्राचे अनुयायी ( ऋ. १. ३३. ४ ).

**सनग**—हा परमेष्ठिन्चा शिष्य व याचा शिष्य सनातन (बृ. उ. २. ६. ३; ४. ६ ३; श. ब्रा. १४. ७. ३. २८).

**सनति**—(सो. द्विमीढ.) वायुमतें सन्नतिमत्चा पुत्र.

**सनत्कुमार**—स्कंदाचें नांव.

२ यानें नारदास उपदेश केला (छां. उ.७.१. १; २६). यानें सांख्यायनास भागवत (भा. ३. ८. ७), नारदास भागवताचें महत्त्व(पद्म.उ.१९३–१९८), ऋषींना भगवत्स्वरूप (म. शां. २२७ कुं.), वृत्रासुरास विष्णुमाहात्म्य (म. शां. २८६ कुं.), नारदास (म. अनु. ३८ कुं.) व रुद्रास तत्त्वसृष्टि (म. अनु. १६५–१६९ कुं.) सांगितली. शापामुळें प्राप्त झालेला उष्ट्रदेह टाकून यानें नंदीपासून शिवव्रत ऐकिलें (लिंग. २. ९). यानें दशरथपुत्रासंबंधीं भविष्य केलें होतें (वा. रा. बा. ९; १ सनक पहा). याच्या नांवावरील ग्रंथ–वास्तुशास्त्र, सनत्कुमारसंहिता, सनत्कुमारतंत्र, सनत्कुमारकल्प (C. C.).

३ आयु वसूचा पुत्र.

**सनत्सुजात**—यानें धृतराष्ट्रास धर्मोपदेश केला (म. उ. ४१–४६ कुं.; १ सनक पहा.).

**सनद्वाज**—(सू. निमि.) शुचीचा पुत्र (सत्यध्वज पहा).

२ अंगिराकुलांतील मंत्रकार.

**सनंदन**—(१ सनक पहा).

**सनातन**—चितींत इष्टकांचे उपाधानप्रसंगीं पूर्वादि दिशांची स्तुति करितांना पूर्वादि दिशांचे ठिकाणीं अनुक्रमें सानग, सनातन, अहभून, प्रत्न व ऊर्ध्व दिशेस सुपर्ण यांचीं नांवें आहेत (तै. सं. ४. ३. ३. १). हा युधिष्ठिराच्या मयसभेंत आला होता (म. स. ४. २२ कुं.; सनक, सनग व १ सनारु पहा).

२ तामस मनूचा पुत्र.

**सनाच्छन्न**—एक आचार्य (क. सं. २. १). याबद्दल शहनाच्छिव असा पाठभेद आहे (कपि. सं. ३१. ३).

**सनारु**—एक आचार्य. याचा शिष्य व्यष्टि व हा सनातनाचा शिष्य (श. ब्रा. १४. ७. ३. २८; बृ. उ. २. ६. ३; ४. ६. ३).

२ एक मुनि. याला उपजंघनि नांवाचा पुत्र होता, तो एकदां अरण्यांत गेला असतां त्याला सर्पदंश झाला. त्याला आश्रमांत आणल्यावर स्वर्गद्वाराजवळ असलेल्या लिंगाची पूजा करतांच तो जिवंत झाला (स्कंद. ४. २. ९४).

**सनेयुक्र**—(सो. पुरूरवस्.) मत्स्यमतें भद्राश्वाचा पुत्र.

**संत**—सत्याचा पुत्र. याचा पुत्र श्रवस् (म. अनु. ३०). हें नांव कुंभकोणम् प्रतींत शिव असें आहे (म. अनु. ८.६२ कुं.).

**संतति**—(१ सन्नति पहा).

२ दक्षाची कन्या व क्रतूची स्त्री.

**संततेयु**—(सो. पूरु.) भागवत व विष्णु यांच्या मतें रौद्राश्वाचा पुत्र.

**संतर्दन**—केकयाधिपति धृष्टकेतुचा पुत्र.

**संतोष**—भागवतमतें यज्ञ व दक्षिणा यांचा पुत्र.

२ धर्माचा पुत्र. याचें नामांतर हर्ष.

३ तुषित देवांपैकीं एक.

**संधक**—(सो. क्रोष्टु.) विष्णुमतें शूराचा पुत्र.

**संधि**—(सू. इ.) भागवतमतें प्रसुश्रुताचा पुत्र. याचा पुत्र अमर्षण. विष्णुमतें याचें नांव सुगवि व वायुमतें सुसंधि आहे.

**संध्य**—ब्रह्मयानें उत्पन्न केलेल्या अकरा रुद्रांपैकीं एक (पद्म. सृ. ४०).

**संध्या**—ही ब्रह्मदेवाची मानसकन्या. हिच्यामुळें ब्रह्मदेवाला कामवासना झाली म्हणून हिनें देहत्याग केला व ही अरुन्धती झाली. मग हिच्याशीं वसिष्ठाचा विवाह झाला (शिव रुद्र. स. ५; कालि. २२-२३) व शक्ति वगैरे पुत्र झाले.

२ पुलस्त्य ऋषीची भार्या (म. उ. ११७.११ कुं.).

३ विद्युत्केशी राक्षसाची स्त्री सालकटंकटा, तिची ही आई.

**सन्नति**—पहिल्या ब्रह्मदत्ताची पत्नी. ही नवऱ्यासह मानससरोवरावर तपश्चर्येस गेली होती (पद्म. सृ. १०).

२ (सो. क्षत्र.) विष्णु व वायु यांच्या मतें अलर्काचा पुत्र. भागवतांत संतति असा पाठ आहे.

**सन्नतिमत्**—(सो. द्विमीढ.) भागवत, विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें सुमतीचा पुत्र. याचा पुत्र कृति (भा. ९.२१.२८).

**सन्नतेयु**—(सो. पूरु.) मत्स्य, वायु व भारत यांच्या मतें रौद्राश्व व मिश्रकेशी यांचा पुत्र (म. आ. ८८.१० कुं.).

**सन्नादन**—रामसेनेंतील वानर (वा. रा. यु. २७).

**संनिवेश**—त्वष्टा प्रजापति व रचना यांचा पुत्र (भा. ६.६.४४).

**सपत्न**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**सपरायण**—व्यासाच्या यजुःशिष्यपरंपरेंतील वायुमतें याज्ञवल्क्याचा वाजसनेय शिष्य.

**सपौल**—एकोणतिसाव्या युगपर्यायांतील ऐल देवापीचा मुलगा (९ सुवर्चस् पहा).

**सप्तकर्ण प्लाक्षि**—हा प्लक्षपुत्र असून तत्त्वज्ञानी होत (तै. आ. १.७.३).

**सप्तकेतु**—ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**सप्तगु आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ४७ ). या सूक्ताच्या शेवटच्या ऋचेंत याचा उल्लेख असून हा आपणांस आंगिरस म्हणवितो.

**सप्तजित्**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**सप्तति**—( मौर्य. भविष्य. ) मत्स्यमतें दशरथाचा पुत्र.

**सप्तपाल**—युधिष्ठिरसभेंतील एक ऋषि ( म. स. ४. २० कुं. ).

**सप्तराव**—वरुणाचा पुत्र.

**सप्तर्षि**—प्रत्येक मन्वंतरांत सप्तर्षि दिलेले असतात. प्रत्येक मन्वंतरांत सात म्हणजे चवदा मन्वंतरांत अठ्ठ्याण्णव सप्तर्षि होतात. पुराणभेदानें यांचीं नांवें वेगळीं आहेत. महाभारतांत पुढीलप्रमाणें दोन याद्या मिळतातः—१ कश्यप, २ अत्रि, ३ भरद्वाज, ४ विश्वामित्र, ५ गौतम, ६ जमदग्नि, ७ वसिष्ठ ( म. श. ४९.५२; अनु. १४. ४ कुं. ). १ मरीचि, २ अत्रि, ३ अंगिरस्, ४ पुलस्त्य, ५ पुलह, ६ क्रतु, ७ वसिष्ठ ( म. शां. ३४३. ३० कुं. ). इतर मन्वंतरांत नांवें बदललेलीं आहेत. पण यांच्या वंशांतील माणसें सप्तर्षींत असावींत, असें ब्रह्मांडांतल्या यादीवरून दिसतें. मनु, देव, सप्तर्षि व इंद्र हीं अधिकाराचीं स्थानें असावींत ( मनु; ब्रह्मांड. २. ३६; ह. वं. १. ७. मार्कं. ५०; विष्णु. ३. १; ब्रह्म. ५ ). हे सूक्तद्रष्टे आहेत ( ऋ. ९. १०७; १०. १३७ ). सप्तर्षिशक होता.

**सप्तवध्रि आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ७८; ८. ७३ ). याला भावानें पेटींत कोंडून ठेविलें असतां अश्वींनीं याची सुटका केली. अथर्ववेदांतहि याचा निर्देश आहे ( बृहद्दे. ५.८२-८५; अ. वे. ४. २९. ४ ).

**सप्ताश्व**—रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक (मनु पहा).

**सप्ति वाजंभर**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ७९ ).

**सप्रथ भारद्वाज**—मंत्रद्रष्टा ( ऋ. १०. १८. १-२ ).

**सबल**—भौत्य मनूचा पुत्र.

२ दक्षसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**सबालेय**—अत्रिकुलांतील गोत्रकार.

**सभाक्ष**—( सो. वृष्णि. ) भंगकाराचा पुत्र.

**सभानर**—( सो. अनु. ) भागवत, विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें अनूचा पुत्र. याचा पुत्र कालानल.

**सभापति**—याचें भूतकर्मा असें नामांतर होतें ( म.द्रो. २५ ).

**सभ्य**—पवमान व संशती यांचा पुत्र.

**सम**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

२ हंसध्वजाचा पुत्र.

३ अमिताभ देवांपैकीं एक.

**समंग**—अष्टावक्राला तो सरळ झाल्यावर त्याला पडलेलें नामांतर. याचा व नारदाचा ‘ ज्ञान दुःखनाशक आहे ’ यावर संवाद झाला होता ( म. शां. २९२ कुं. ).

२ संगवाचें नामांतर.

**समचेतन**—मरुद्गणांतील सहाव्या गणांपैकीं एक.

**समंज**—पारावत देवांतील एक.

**समतापन**—भौमतापनाचें नामांतर.

**समबुद्धि**—शततेजस् नामक शिवावताराचा शिष्य.

**समय**—अजित देवांपैकीं एक.

२ रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ ( जैह्मप पहा ).

**समर**—( सो. पूरु. ) मत्स्यमतें काव्याचा पुत्र. विष्णु व वायु यांच्या मतें नीपाचा पुत्र. याचा पुत्र संपार.

**समरथ**—( सू. निमि. ) भागवतमतें क्षेमधीचा पुत्र. याचा पुत्र सत्यरथ.

२ मत्स्यराजा विराटाचा भाऊ ( म. द्रो. १५९. ४१. कुं. ).

**समवृत्ति**—मरुगांतील सहाव्या गणांपैकीं एक.

**समसौरभ**—जनमेजयाच्या सर्पसत्रांतील एक सदस्य ( म. आ. ५३. ९ कुं. ).

**समाधि**—( १५ सुरथ पहा ).

**समान**—तुषित देवांपैकीं एक.

**समित**—मरुत् गणांतील पांचव्या गणांपैकीं एक.

**समितार**—वशवर्तिन् देवांतील एक.

**समितिंजय**—भारतीय युद्धांतील दुर्योधनपक्षीय राजा.

**समीक**—द्रौपदीस्वयंवरास आलेला राजा ( म. आ. २०१. १९; स. ७. १६ कुं. ).

**समीची**—एक अप्सरा. ही मगरी असतां अर्जुनानें नारीतीर्थावर हिचा उद्धार केला ( म. आ. २३६. २०; स. १०. १३ कुं. ).

**समुद्रसेन**—पांडवपक्षीय एक राजा. याचा पुत्र चंद्रसेन ( म. द्रो. २३. ६१ कुं. ). यास दिग्विजयाचे वेळीं भीमानें जिंकिलें होतें ( म. स. ३१. २५ कुं. ). याला अश्वत्थाम्यानें मारिलें ( म. द्रो. १५७. १० कुं. ).

२ एक दुर्योधनपक्षीय राजा. हा कालेयांचा राजा होता ( म. आ. २०१. ११ कुं. ). यानें पांडवपक्षीय चित्रसेनास मारिलें ( म. क. ३. १५ कुं. ).

**समृद्ध**—जनमेजयाच्या सर्पसत्रांत दग्ध झालेला सर्प ( म. आ. ५७. १८ कुं. ).

**संपाति**—अरुण व श्येनी यांचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ७. ४४६ ). याची माता श्येनी दिली आहे ( वायु. २. ८. ३१७; अ. आ. ६७. ७५ कुं. ). हा व जटायु विंध्याच्या पायथ्याशीं असलेल्या निशाकर ऋषीकडे येऊन त्याची सेवा करीत. एकदां वृत्रास इंद्रानें कपटानें मारून तो स्वर्गीं जात असतां त्यास गाठून त्याशीं हा युद्ध करूं लागला. पण वज्रानें जखमी झाला. नंतर कोण जास्त उडूं शकतो या स्पर्धेनें ते उडूं लागले असतां जटायु कासावीस होऊन पडूं लागला. त्याच्या रक्षणार्थ यानें आपले पंख वर धरून त्यावर छाया केली व त्यावरोबर खालीं जाण्याकरितां यानें आपलें अंग टाकून दिलें. पण निष्काळजीपणामुळें सूर्यतापानें याचे पंख जळाले. जटायु जनस्थानांत व हा विंध्य पर्वतावर दक्षिण समुद्रतीरीं पडला. तेथेंच निशाकर मुनि राहत असे. त्यास यानें वरील सर्व हकीगत सांगून देहत्याग करण्याचा विचार कळविला. तेव्हां त्यानें पुढील रामकार्याकरितां यास थांबण्यास सांगितलें. त्याप्रमाणें हा थांबला. पुढें याच्या सुपार्श्व नामक पुत्रानें रावण व सीता जात होतीं त्यांस भक्ष्यार्थ आणण्याचा प्रयत्न केला; पण रावण काकुलती आला म्हणून त्यानें त्यास सोडून दिलें. पुढें भक्ष्यार्थ कांहींच मिळालें नाहीं. पित्यास ही सर्व गोष्ट त्यानें सांगितली. नंतर सुग्रीवानें पाठविलेले वानर याच्या गुहेच्या खालींच बसले होते ते पाहून हा त्यांकडे त्यांस खाण्याकरितां सरपटत जाऊं लागला. पण त्यांचें जटायूच्या मृत्यूबद्दल हळहळीचें आपसांतील बोलणें ऐकून यास भ्रात्याची हकीगत विचारली. ती कळतांच अंगदानें समुद्रतीरीं नेऊन ठेवल्यावर यानें भ्रात्याचें तर्पण केलें. त्यांस याकडून सीतेसंबंधीं सर्व माहिती कळल्यावर निशाकराच्या वरावरून यास पंख फुटले म्हणून हा उडून गेला ( वा. रा. कि. ५६-६३; म. व. २८३. ४८-५६ कुं.; अध्या. रा. कि. ८ ). यास बभ्रु व शीघ्रग असे दोन पुत्र (पद्म. सृ. ६). एक पुत्र व एक कन्या (वायु. २. ८. ३६), पुष्कळ पुत्र होते ( ब्रह्मांड. ३. ७. ४४६ ). निशाकराबद्दल चंद्र किंवा चंद्रमस् असें नांव सांपडतें. हा आपणास मनुष्येतर समजत नसे ( वा. रा. कि. ५६. ४ ).

२ किष्किंधेंतील एक वानर ( वा. रा. कि. ३३ ).

३ बिभीषणाचा एक अमात्य ( वा. रा. सुं. ३७ ).

४ लंकेंतील एक राक्षस. याच्या घरावर धूम्राक्षाच्या घरावरून मारुतीनें उडी मारली ( वा. रा. सुं. ६ ).

**संपार**—( सो. पूरु. ) विष्णु व मत्स्य यांच्या मतें समराचा पुत्र.

**संप्रिया**—विदूरथाची स्त्री ( म. आ. ६३. ४३ कुं. ). ही मगधकन्या होती.

**संबंधि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**संभव**—( सो. ऋक्ष. ) मत्स्यमतें सर्वाचा पुत्र. वायुमतें याचेंच नांव नभस्.

**संभाव्य**—एक ऋग्वेदी ब्राह्मण. यानें धृतराष्ट्रास वानप्रस्थाश्रम घेण्यास सांगितलें ( म. आश्र. ११. ११ कुं.).

**संभूत**—दक्षसावर्णि मन्वंतरांतील एक देवगण.

२ ( सू. इ. ) विष्णु व वायु यांच्या मतें त्रसदस्यूचा पुत्र. मत्स्यमतें याचें नांव संभूति असें आहे.

**संभूति**—चाक्षुष मन्वंतरांतील अजित् नामक अवताराची माता व वैराजाची स्त्री.

२ दक्षाची कन्या व मरीचीची स्त्री.

३ जयद्रथाची पत्नी व विजयाची माता.

४ रैवत मन्वंतरांतील मानस नामक अवताराची माता.

५ ( सू. इ. ) वसुदाचा पुत्र. यास त्रिधन्वा नामक पुत्र होता. हा दुस्सह व नर्मदा यांचा पुत्र ( पद्म सृ. ८).

**संमत**—सावर्णीचा पुत्र.

**संमर्दन**—वसुदेव व देवकी यांचा पुत्र.

**संमित**—मरुतांच्या सहाव्या गणापैकीं एक.

**संमिति**—उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**संमोद**—हिरण्याक्षाकडून लढत असतां वायूनें यास ठार केलें ( पद्म. सृ. ७५ ).

**सम्राज्**—(स्वा. प्रिय. ) चित्ररथ व ऊर्णा यांचा पुत्र. याची स्त्री उत्कला व पुत्र मरीचि ( भा. ५. १५. १४ ). कांहीं विशिष्ट देश जिंकलेल्या राजांना हा शब्द लावीत. या शब्दाची व्याख्याहि आढळते (वायु. १. ४५ ८६ ).

**सयष्टव्य**—रैवत मनूचा पुत्र ( मनु पहा ).

**सरघा**—( बिन्दुमत् पहा ).

**सरण्यू**—सूर्याची पत्नी ( ऋ. १०. १७. २ ).

**सरभभेरुंड**—हा गीतेच्या पंधराव्या अध्यायाचा अर्धा श्लोक म्हटल्यानें मुक्त झाला ( पद्म. उ. १८९ ).

**सरमा**—ही ऋषभ पर्वतावरील शैलूष नामक गंधर्वाची कन्या. हिचा जन्म मानस सरोवराच्या कांठीं झाला. त्या वेळीं त्या सरोवराचें पाणी सारखें वाढत होतें. त्या वेळीं हिची आई त्या पाण्याला ‘ सरमा ’ असें म्हणाली म्हणून पाणी सरण्याचें थांबलें. त्यावरून हिचें हें नांव पडलें. ही बिभीषणाची पत्नी (वा. रा. उ. १२). ही सीतेस खरी हकीगत सांगत असे व तिचें नेहमीं सांत्वन करी. त्यामुळें सीतेचें भय कमी होई व तिला धीर येई. बिभीषणानें रामाच्या हस्तें वामनमूर्ति स्थापिली तेव्हां तो लंकेस गेला असतां सरमेनें सीतेची मोठ्या उत्कंठेनें चौकशी केली होती ( पद्म. सृ. ३८ ).

२ ही देवशुनी असून मंत्रद्रष्ट्री आहे ( ऋ. १०. १०८ २; ४; ६; ८; १०; ११ ). पणीनें पळविलेल्या गाईंचा

तपास लावण्याकरितां ही पणीकडे गेली असतां हिचा पणींशीं संवाद झाला. तो वरील सूक्तांत आहे (बृहद्दे. ८. २४-३६).

हिचा मुलगा जनमेजयाचे सत्राचे मंडपांत जाऊन उभा राहिला असतां त्यास जनमेजयाचे बांधवांनीं मारून हांकून लाविलें. आपल्या मुलास अपराध नसतां मारिलें म्हणून तुझ्यावर दैवी विघ्नें येतील, असा हिनें जनमेजयास शाप दिला (म. आ. ३).

३ दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या व कश्यपाची भार्या.

४ कश्यप व क्रोधा यांची कन्या. हिचे पुत्र श्याम व शबल. हे यमाचे अनुचर होत (ब्रह्मांड. ३. ७. ३१२).

**सरमाण**--सिंहिकेच्या पुत्रांपैकीं एक.

**सरल**--वीरवर्मन्‌चा पुत्र.

**सरस्वत्**--सरस्वती व पुरूरवस् यांचा पुत्र. याचा पुत्र बृहद्रथ (ब्रह्म. १०१. ९).

**सरस्वती**--ब्रह्मदेवाची स्त्री. ज्ञानशक्ति, सावित्री, गायत्री व वाच् अशीं हिला नामान्तरें आहेत (२ ब्रह्मन् पहा). वीरभद्राच्या कोपास भिऊन ही अन्तर्धान पावली (पद्म. पा. १०७).

२ सन्नतीचें नामांतर.

३ सार्वभौम अवताराची माता.

४ शतरूपेचें नामांतर. ही दंडनीत्यादि शास्त्राची कर्त्री आहे (म. शां. १२२).

५ अन्त्यनाराची स्त्री. हिचा पुत्र त्रस्नु (म. आ. ६३. २६ कुं.).

६ युयुधानाची स्त्री (म. मौ. ८. ७२ कुं.). हें गणपत कृष्णाजीच्या प्रतींत बायकोचें नांव नसून सरस्वतीच्या कांठचा प्रदेश याच्या मुलाला दिला असें आहे. हिला पुरूरव्यापासून सरस्वत् नांवाचा मुलगा झाला (ब्रह्म. १०१).

**सरिद्भुवि**--अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**सरिद्‌मत्रृकक**--मरुतांच्या पांचव्या गणांतील एक.

**सरूपा**--भूतऋषीची स्त्री (भा. ६. ६. १७).

**सरूथ**--(शरूथ पहा).

**सरोगेय**--एक प्रकारचे देव (१८ भीम पहा).

**सरोजवदना**--ही गीतेच्या दहावा अध्याय म्हटल्यानें मुक्त झाली (पद्म. उ. १८४).

**सर्प**--ब्रह्मधानाचा पुत्र.

२ कश्यप व सुरभि यांचा पुत्र.

३ (अर्बुद काद्रवेय पहा).

४ एक जात. यांच्या विषानें कांहीं ऋषि त्रस्त झाले. त्यांनीं हें मरुत्ताचे आजीस कळविलें. तिनें मरुत्तास निरोप पाठवून सर्पांचें पारिपत्य करावयास त्यास भाग पाडिलें. त्याप्रमाणें त्यानें आपल्या अस्त्राच्या योगानें यांचें भस्म करण्याचा सपाटा चालविला. तेव्हां सर्प मरुत्तमाता भामिनीस शरण गेले. भामिनीनें आपल्या पतीस म्हणजे आविक्षितास सांगितलें. तेव्हां त्यानें मरुत्ताचें अस्त्र त्यास परत घ्यावयास लाविलें. ही गोष्ट संवर्त्तानें मरुत्ताचे येथील यज्ञ केल्यानंतर झाली (मार्कं. १२६).

**सर्पराज्ञी**--सूक्तद्रष्ट्री (तै. सं. १. ५. ४. १; ७. ३. १. ३; तै. ब्रा. १. ४. ६. ६; २. २. ६. १; ऐ. ब्रा. ५. २३). सार्पराज्ञी असा पाठभेद आहे (ऋ. १०. १८९).

**सर्पाक्ति**--गरुडाचा पुत्र.

**सर्पास्य**--खरानुयायी एक राक्षस (वा. रा. अर. २३ ३२).

**सर्पिर्मालिन्**--मयसभेंतील ऋषि (म. स. ४. १६ कुं.).

**सर्पिर्वासि**--एक आचार्य. यानें कांहीं स्तोत्रें म्हणून सौबलाला पशुसंपत्ति प्राप्त करून दिली (ऐ. ब्रा. ६. २४).

**सर्याति**--(सो. पुरूरवस्.) मत्स्यमतें पुरूरव्याचा पुत्र.

**सर्व**--(सो. अज.) मत्स्यमतें धनुषाचा पुत्र.

**सर्वकर्मन्**--(सू. इ.) ऋतुपर्णपुत्र नलाचें नामांतर. मत्स्यमतें सौदास कल्माषपादाचा पुत्र. याचें रक्षण पराशरानें केलें होतें. नल शूद्रांप्रमाणें वागला म्हणून त्याला हें नांव पडलें (भा. ९. ९. १७; म. शां. ४८. ८४ कुं.). याला सर्वकाम असेंहि म्हणत.

**सर्वकाम**--(सर्वकर्मन् पहा).

**सर्वकामदुघा**--कामधेनूची मुलगी (म. उ. १०२. १० कुं.).

**सर्वग**--पंडुपुत्र भीमसेन व काली यांचा याची सर्वगत अशीं नामांतरें आहेत.

२ धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**सर्वगत**--(१ सर्वग पहा).

**सर्वजनि**--हा ब्राह्मण विष्णुप्रसाद भक्षिल्यानें मुक्त झाला (पद्म. क्रि. १९).

**सर्वजित**--कश्यप व मुनि यांचा पुत्र.

**सर्वज्ञ**--शततेजस् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**सर्वतेजस्**--(स्वा. उत्तान.) व्युष्ट व पुष्करिणी यांचा पुत्र. यास आकूतीपासून चक्षु नांवाचा पुत्र झाला. तोच सहावा मनु होय (भा. ४. १३. १४).

**सर्वत्रग**--धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**सर्वदमन**--दुष्यंतपुत्र भरताचें नामांतर (म. आ. ९५. ३३ कुं.).

**सर्वधर्मन्**--धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**सर्वमेधस्**--सुमेधस् देवांतील एक.

**सर्ववेग**—धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**सर्वसंज्ञ**--एकादश रुद्रांपैकीं एक.

**सर्वसारंग**--सर्पसत्रांत दग्ध झालेला धृतराष्ट्रकुलांतील एक सर्प ( म. आ. ५७.१८ कुं. ).

**सर्वहरि ऐन्द्र**---सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ९६ ).

**सलोमधि**—( आंध्र. भविष्य. ) भागवतमतें चंद्रविज्ञाचा पुत्र. यास पुलोमार्चि व पुलोमत् अशीं नामान्तरें आहेत.

**सलौगाक्षि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**सवन**—( स्वा. प्रिय.) प्रियव्रतपुत्रांतील जे विरक्त होते त्यांपैकीं एक. याची माता बर्हिष्मती ( भा. ५. १. २६ ). परंतु यास स्वायंभुव मनूचा वंशवर्धक म्हटलें आहे ( पद्म. सृ. ७ ). हा स्वायंभुव मनूचा पुत्रहि दिला आहे.

२ वारुणि भृगूच्या सात पुत्रांपैकीं एक.

३ दक्षसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**सवर्णा**—शतद्रुतीचें नामांतर ( ह. वं. १.२ ). छाया व ही एकच होय. हिचा ऋग्वेदांतहि निर्देश ( ऋ. १०. १७. २ ).

**सवितृ**--कश्यप व आदिति यांचा पुत्र ( विष्णुधर्म. १ १०६ ). द्वादशादित्यांपैकीं एक ( विवस्वत् पहा ). हा शुक्र ( ज्येष्ठ ) महिन्यांत प्रकाशतो ( भा. १२. ११. ३६ ). यास पृश्नि नांवाच्या पत्नीपासून सावित्री, व्याहृति, त्रयी, अग्निहोत्र, पशु, सोम, चातुर्मास्य व पंचमहायज्ञ अशीं अपत्यें झालीं ( भा. ६. १८ १ ).

२ व्यासांपैकीं पाचवा व्यास ( व्यास पहा ).

**सवेधस्**--भृगुकुलांतील गोत्रकार.

**सवैलेय**--आत्रिकुलांतील एक गोत्रकार. याबद्दल सचैलेय असा पाठभेद आहे.

**सव्य आंगिरस**--सूक्तद्रष्टा ( ऋ. १.५१-५७ ).

**सव्यसिव्य**--विप्रचित्ति व सिंहिका यांचा पुत्र. यास परशुरामानें मारिलें ( ब्रह्मांड. ३. ६. १८-२२ ).

२ दक्षसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

**सस्न आत्रेय**--सूक्तद्रष्टा ( ऋ. ५.२१ ).

**सस्मित**--उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ तामस मन्वंतरांतील योगवर्धन.

**सह**--स्वायंभुव मनूचा पुत्र.

२ प्राण वसूचा पुत्र.

३ उत्तम मनूचा पुत्र.

४ आभूतरजस् देवांतील एक.

५ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. यास भीमानें ठार केलें ( म. क. ४६. १६ कुं. ).

६ कृष्ण व लक्ष्मणा यांचा पुत्र.

**सहज**—चेदिमत्स्यांपैकीं एक. हा कुलांगार असल्यानें यानें आपल्या आप्तबांधवांचा नाश केला ( म. उ. ७३. ११-१६ कुं. ).

**सहजन्य**--आषाढ महिन्यांत सूर्याबरोबर फिरणारा यक्ष ( भा. १२. ११. ३६ ).

**सहजन्या**—एक अप्सरा. हिरण्यकशिपूस रंजविणाऱ्या अप्सरांपैकीं एक ( पद्म सृ. ४५ ).

**सहदेव**--( सू. इ. ) दिवाक किंवा दिवाकराचा पुत्र.

२ ( सू. इ. ) भागवतमतें संयमाचा आणि विष्णु व वायु यांच्या मतें सृंजयाचा पुत्र.

३ ( सो. नील. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें सुदासाचा पुत्र.

४ ( सो. मगध. ) जरासंधाचा पुत्र. यास सोमापि, मार्जारि व मेघसंधि असे तीन पुत्र होते. हा द्रोणाकडून मारिला गेला ( भा. ९. २२. ९; १०. ७२. ४८; म. द्रो. १२५. ४२ कुं. ).

५ ( सो. वसु. ) वसुदेव व ताम्रा यांचा पुत्र.

६ ( सू. इ. भविष्य. ) वायुमतें सुप्रतीकाचा पुत्र. इतरत्र यास मरुदेव म्हणतात.

७ ( सो. क्षत्र. ) भागवतमतें हर्यवनाचा, वायुमतें हर्यद्वताचा व विष्णुमतें हर्षवर्धनाचा पुत्र.

८ भास्करसंहितेंतील व्याधिसिंधुविमर्दनतंत्राचा कर्ता ( ब्रह्मवै. २. १६ ).

९ कुंडल नगरीचा राजा सुरथ, त्याचा पुत्र.

१० ( सो. कुरु. ) पांडु राजाचा पुत्र. याची आई माद्री ( म. आ. ९५ ). कुंतीनें दिलेल्या मंत्राचा जप करून माद्रीनें अश्विनीकुमारांचें ध्यान केलें, तेव्हां तिला [illegible]-जावळे दोन पुत्र झाले. त्यांपैकीं हा दुसरा. तसेंच हा [illegible] पैकीं पांचवा असून नकुलाचा कनिष्ठ भ्राता होता. हा [illegible] याचा मोठेपणा सांगणारी आकाशवाणी झाली [illegible] १२४; भा. ९. २२. २८; ३०-३१ ). [illegible] उपनयनादिसंस्कार हिमालयाच्या शतशृंग [illegible] शस्त्रास्त्रविद्या द्रोणापासून घेतली. शर्याति[illegible] धनुर्वेदाचें शिक्षण दिलें ( युधिष्ठिर पहा [illegible] होत्या. एक द्रौपदी ( म. आ. ६३ ). [illegible] शल्याची कन्या विजया ( म. आ. ९[illegible] भानुमती नामक कन्या ( ह. वं. [illegible] जरासंधाची कन्या ( म. आश्र. २[illegible]

यानें द्रौपदीच्या स्वयंवरकालीं दुःशासनाचा पराजय केला होता ( म. आ. १९०; क. २३ ). पुढें युधिष्ठिरानें राजसूय यज्ञ केला, तेव्हां त्याच्या आज्ञेनें बरोबर मोठें सैन्य घेऊन दक्षिण दिशेकडे दिग्विजय करण्यास हा गेला ( भा. १०. ७२. १३ ). प्रथम शूरसेन देश पूर्णपणें हस्तगत करून घेतल्यावर यानें मत्स्यराजास जिंकिलें. नंतर दंतवक्त्राचा पराजय करून त्याजपासून कर घेतला. तसेंच पाश्चिम मत्स्य, सुमित्र राजा, चोरदेश, निषादभूमि, श्रेष्ठगिरि, गोशृंग व श्रेणिमान् राजा यांनाहि यानें जिंकिलें; व नरराष्ट्र जिंकून हा कुंतिभोज राजाकडे गेला. कुंतिभोजाच्या मनांत पांडवांविषयीं उत्कृष्ट प्रेम वसत असल्यामुळें सहदेव त्याच्याकडे जातांच त्यानें युधिष्ठिराची आज्ञा मान्य केली. पुढें सहदेव चर्मण्वतीच्या तीरीं गेला. तेथें कृष्णाचा वैरी जंभक असुराचा पुत्र याच्याशीं गांठ पडतांच मोठा संग्राम होऊन जंभकपुत्राचा पराभव झाला. नंतर हा दक्षिण दिशेकडे वळला; आणि सेक व अपर सेक यांचा पराभव केल्यावर त्यांजपासून कर म्हणून अनेक प्रकारचीं रत्नें घेऊन हा त्या सेकांसह नर्मदेच्या आसमंताद्भागाकडे वळला. तेथें अवन्ती देशाधिपति विंद व अनुविंद राजे यांच्याशीं याचा सामना होऊन त्यांस यानें जिंकिलें; व त्यांच्यापासून करभार घेऊन हा भोजकट नामक नगरास आला. त्या ठिकाणीं भीष्मकाचें व याचें दोन दिवस अनिवार युद्ध होऊन यानें भीष्मकास जिंकिलें. पुढें कोसल व वेण्यातीर या देशींच्या राजांचा पराभव करून कांतारक देशांत शिरला; व अनुक्रमें कांतारक, प्राक्कोसल, नाटकेय व हेरंबक या देशांतील राजांना युद्धांत जिंकून यानें मारुध, रम्यग्राम, नाचीन व अनर्बुक या राजांचाहि पराभव केला. मग वनाधिपतींना जिंकून वाताधिप राजाला यानें स्वाधीन करून घेतलें.

नंतर पुलिंद राजाला जिंकल्यावर हा दक्षिण दिशेचा पुढचा मार्ग आक्रमूं लागला. वाटेंत पांड्य राजांशीं एक दिवस [illegible] होऊन त्यांचा पराभव झाला व हा किष्किंधा [illegible] प्राप्त झाला. तेथें मैंद व द्विविद नांवाचे [illegible] सात दिवस लढले. पण शेवटीं त्यांनींहि [illegible] अर्पण केलीं. तेथून हा माहिष्मती [illegible] राजांशीं याचें घोर युद्ध झालें. नीलाला [illegible] तो अग्नि सहदेवाचें सैन्य जाळूं लागला. [illegible] आपल्या पराभवाचीं चिन्हें दिसूं लागलीं. [illegible] सहदेवानें शुचिर्भूत होऊन त्याची [illegible] तुष्ट केलें. नंतर नील राजानें याला [illegible] सहदेवानें त्रैपुरास स्वाधीन करून [illegible] केलें. नंतर सुराष्ट्रदेशाधिपति कौशिकाचार्य आकृति राजाला मोठ्या प्रयासानें वश केल्यावर हा तेथेंच राहिला. नंतर रुक्मी व भीष्मक यांचेकडून कर वसूल केला. नंतर शूर्पारक, तालाकट, दंडक, समुद्रद्वीपवासी व म्लेच्छ, निषाद, पुरुषाद, कर्णप्रावरण, नरराक्षसयोनि, कालमुख, संपूर्ण कोलगिरी, सुरभीपट्टण, ताम्रद्वीप, रामकपर्वत व तिमिंगल राजा यांना हस्तगत करून घेतलें. पुढें यानें एकपाद, पुरुष, वनवासी, केरल, संजयंती नामक नगरी, पाषंड, करहाटक, पांड्य, द्रविड देश, उड्र, केरल लोक, अंध्र, तालवन, कलिंग, उष्ट्रकर्णिक, आटवी पुरी व यवनपुर या सर्वांना नर यानें दूतांकडून जिंकून त्यांजपासून करभार आणविला. नंतर लंकेस घटोत्कच दूत पाठवून सलगीनें बिभीषणाकडून कर घेतला. अशा प्रकारें सर्व दक्षिण दिशा जिंकून इंद्रप्रस्थास आला व आणलेली सर्व संपत्ति यानें धर्मराजास अर्पण केली ( म. स. ३१ ). पुढें राजसूय यज्ञ समाप्त झाल्यावर भीष्माच्या आज्ञेनें यानें कृष्णाची अग्रपूजा केली ( म. स. ३६; भा. १०. ७५. ४ ). नंतर कांहीं कालानें पांडव द्यूतांत हरल्यावर, ते वनवासाला निघाले, त्या वेळीं कौरवांनीं त्यांचा उपहास केला, म्हणून यानें धृतराष्ट्रासमोर शकुनीचा वध करण्याची प्रतिज्ञा केली ( म. स. ७७ ). अज्ञातवासाकरितां पांडव विराटगृहीं राहिले होते; तेव्हां यानें तंतिपाल असें नांव धारण करून हा विराटाच्या अश्वशालेवर राहिला. कारण हा उत्तम अश्वचिकित्सक होता ( म. वि. ३; १० ). याचें तेथील गुप्त नांव जयद्बल असें होतें ( म. वि. ५ ).

पुढें भारतीय युद्ध सुरू झाल्यावर हा युद्धभूमीवर उपस्थित असून याच्या रथाचे अश्व तित्तिरपक्षाच्या रंगाचे होते व ध्वजावर हंसाचें चिह्न होतें. याचें आश्विन नांवाचें धनुष्य होतें ( म. द्रो. २३ ). याचा युद्धकाळीं वाजविण्याचा मणिपुष्पक नांवाचा शंख होता ( म. भी. २५ ). पुढें हा द्रोणावर चाल करीत असतां याचा कर्णानें पराभव केला ( म. द्रो. १६७). शेवटीं शकुनीचा वध यानेंच केला ( म. श. २८ ).

भारतीय युद्धांत संपूर्ण कौरव नष्ट झाल्यावर युधिष्ठिर राज्य करूं लागला. छत्तीस वर्षें राज्य केल्यावर द्रौपदीसहित सर्व पांडव निजधामास जाऊं लागले असतां मार्गांतच यानें आपला देह टाकून स्वर्गारोहण केलें ( म. महा २; भा. १. १५. ४५ ). या वेळीं याचें वय १०५ वर्षांचें होतें ( युधिष्ठिर पहा ). याला दोन पुत्र होते. एक द्रौपदीपासून झालेला श्रुतसेन ( म. आ. ६३ ) व दुसरा विजयेपासून झालेला सुहोत्र ( म. आ. ९५ ). हा रूपानें अत्यंत सुंदर होता ( म. आ. १२४ ). शस्त्रास्त्रविद्या याला चांगल्या अवगत असून हा खड्गयुद्धांत विशेष निपुण होता ( भा. १०. ७२. १३ ). हा उत्तम रथी होता ( म. उ.

१६९ ). तसाच पशुपरीक्षकहि होता. याच्या नांवावर व्याधिसंघविमर्दन, अग्निस्तोत्र व शकुनविषयक ग्रंथ आहेत.

**सहदेव आर्षांगिर**—यानें ऋज्राश्व, भयमान, सुराधस् व अंबरीष या भावांबरोबर इंद्राची प्रशंसा केली आणि शिम्यु व दस्यु यांच्यावर जय मिळविला (ऋ. १. १००. १७-१८).

**सहदेव सार्ञ्जय**—वामदेवानें प्रशंसा केलेला कुमार. सोमक साहदेव्याचा व याचा संबंध असावा (ऋ. ४. १५. ७). सोमक साहदेव्य व सहदेव सार्ञ्जय यांच्या सोमाच्या विशेष परंपरेंत गुरुशिष्य-संबंध होता ( ऐ. ब्रा. ७. ३-४ ). सुप्लन् सार्ञ्जयानें दाक्षायण यज्ञ करून सहदेव सार्ञ्जय असें नांव धारण केलें ( श. ब्रा. २. ४. ४. ४ ). सुप्लनूचा अन्यत्रहि निर्देश आहे ( श. ब्रा. १२. ८. २. ३ ).

**सहदेवा**—देवकाची कन्या व वसुदेवाची पत्नी.

**सहसात्यपुत्र**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु-मतें लोकाक्षीचा शिष्य.

**सहसाह**—परशुरामाचा सारथि ( ब्रह्मांड. ३. ४६. १४; २८ ).

**सहस्रचित्य**—केकयराज शतयूपाचा पितामह (म. आश्र. २१. ६ ). यानें ब्राह्मणाकरितां प्राणाचेंहि दान केलें (म. अनु. ९३; शां. २४०. ३१ कुं. ). शांतिपर्वांत सहस्र-जित् असा शब्द आहे.

**सहस्रजित्**—( सो. पुरूरवस्. ) भागवत, मत्स्य, वायु व पद्म यांच्या मतें यदूचा पुत्र ( सहस्राद पहा ).

२ कृष्ण व जांबवती यांचा पुत्र.

**सहस्रज्योति**—विवस्वत्चा पुत्र ( म. आ. १. ५७ कुं. ).

**सहस्रधार**—वशवर्तिन् देवांतील एक.

**सहस्रपाद्**—द्वैतवनांत पांडवांबरोबर असणारा ऋषि ( म. व. २६. २२ कुं.; खगम. व १ रुरु पहा ).

**सहस्रमुख**—( रावण सहस्रमुख पहा ).

**सहस्रवाच्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**सहस्राजित्**—( सो. क्रोष्टु. ) भजमान व उपबाह्यका यांचा पुत्र.

**सहस्राद**—पहिल्या सहस्रजित्चें नामांतर.

**सहस्रानीक**—( सो. पूरु. ) भागवतमतें शतानीकाचा पुत्र. इतरत्र हा गाळून एकदम असीमकृष्ण दिला आहे. तो शतानीकास अश्वमेध केल्यामुळें झाला म्हणून त्यास अश्व-मेधज (भा. ९. २२. ३९) व अश्वमेधदत्त ( म. आ. ६३. ८ कुं. ) अशा विशेषणात्मक नांवांनींहि संबोधितात.

**सहस्राश्व**—( सू. इ. ) मत्स्य व पद्म यांच्या मतें अहीनगूचा पुत्र. यांचा पुत्र चंद्रावलोक.

**सहस्वत्**—( महस्वत् पहा ).

**सहानंदिन्**—(शिशु. भविष्य.) ब्रह्मांडमतें नंदिवर्धनाचा पुत्र. भागवत, विष्णु, वायु व मत्स्य यांच्या मतें याचें नांव महानंदिन् आहे.

**सहाभोज**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें सात्वताचा पुत्र. इतरत्र महाभोज असें नांव आहे.

**सहितंडिपुत्र**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें लोकाक्षीचा शिष्य.

**सहिष्णु**—वैवस्वत मन्वंतराच्या सव्विसाव्या चौकडींत भद्रवटपुरांत हा अवतार झाला. तेथें यास चार शिष्य होते. त्यांचीं नांवें—उलूक, विद्युत्, शम्बूक व आश्वलायन ( शिव. शत. ५ ).

२ स्वायंभुव मन्वंतरांतील पुलह व गति यांचा पुत्र ( मार्क. ५२. २३-२४ ).

३ चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**सहोत्र**—( १ बक पहा ).

**सांयमनि**—दुर्योधनपक्षीय शल किंवा शल्य राजाचा पुत्र. याचा पुत्र धृष्टद्युम्नानें मारिला ( म. भी. ६१. ११ कुं. ).

**सांवर्णि** किंवा **सांवरणि**—( १ सावर्णि पहा ).

**साकमश्व देवरात**—विश्वामित्राचा शिष्य असणारा एक आचार्य ( सां. आ. १५. १ ).

**सागर**—शक्तीचें पैतृक नांव.

**सागरध्वज**—पांड्य देशाधिपति. परशुराम, भीष्म, द्रोण व कृप यांचा शिष्य. याचा पिता व बंधु यांस कृष्णानें मारिलें, म्हणून हा द्वारकेवर चालून जात असतां याच्या मित्रांनीं यास परावृत्त केलें. हा भारतीय युद्धांत पांडवांकडे होता. याचे घोडे चंद्रकिरणाप्रमाणें प्रकाशमान असून वैदूर्य रत्नांच्या जाळ्यांनीं वेष्टित असे होते. याच्या सैन्यांत एक लक्ष चाळीस हजार मुख्य रथ असून त्यांस पांढरे घोडे जोडलेले होते ( म. द्रो. २३ ).

**सांग्नि**—एक पितर.

**सांकाश्य**—यमसभेंतील एक राजर्षि ( म. स. ८. १० कुं. ).

**सांकृति**—संकृतीच्या वंशजांना नांव. हे आंगिरस झाले होते ( वायु. २. ३७. १६० ).

२ अत्रिकुलांतील एक ब्राह्मण. यानें शिष्यांना निर्गुण ब्रह्माचा उपदेश केला ( म. शां. २४०. २२ कुं. ).

३ विश्वामित्राची स्त्री.

**सांकृत्य**—एक वैयाकरण ( तै. प्रा. ८. २१ ).

२ भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**सांख्य**—( अत्रि सांख्य पहा ).

**सांकृतीपुत्र**—हा आलम्बीपुत्राचा शिष्य. याचा शिष्य शौंगीपुत्र ( श. ब्रा. १४. ९. ४. ३१ ).

**सांख्यायन**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार. शेषपरंपरेंतील भागवत पढणारा सनत्कुमाराचा शिष्य. हा परमहंस होता ( भा. ३. ८. ७ ).

२ ( शांखायन पहा ).

३ एक ऋषि. याचेच कुलांत गायत्री झाली.

**सांग**—हविर्धानपुत्र गयाचें नामांतर.

**सांगर**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**सांजीवीपुत्र**—याचा शिष्य प्राचीनयोगीपुत्र. हा प्राश्नीपुत्र आसुरवासिन्चा व माण्डूकायनीचा शिष्य ( बृ. उ. ६. ५. २-४ ). शिवाय हा मांडव्याचा शिष्य आहे ( श. ब्रा. १०. ६. ५. ९ ).

**सातकर्णि**—( आंध्र. भविष्य. ) वायुमतें कृष्णाचा पुत्र ( १ शातकर्णि पहा ).

२ ( आंध्र. भविष्य. ) वायुमतें पुत्रिकषेणाचा पुत्र.

**साति औष्ट्राक्षि**—सुश्रवस् वार्षगण्याचा शिष्य. याचा शिष्य मद्रगार शौंगायनि ( वं. ब्रा. १ ).

**सात्यकि**—( युयुधान पहा ).

**सात्यमुग्र**—सामवेदाच्या उपाकर्मांगतर्पणांत येणारा एक आचार्य ( जै. गृ. १. १४ ). हा सामवेदाचा शाखाप्रवर्तक असून याबद्दल शात्यमुग्र, सात्यमुग्र वगैरे अनेक पाठ सांपडतात.

**सात्यमुग्रि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**सात्ययज्ञ**—याज्ञवल्क्यानें वार्ष्ण्याशीं बोलतांना याचा निर्देश केला आहे ( श. ब्रा. ३. १. १. ४ ).

**सात्यहव्य वासिष्ठ**—हा अत्यराति जानंतपीचा ( ऐ. ब्रा. ८. १३. ९ ) व देवभागाचा ( तै. सं. ६. ६. २. २ ) समकालीन होता. याचा देवभाग श्रौतर्षाशीं मैत्र म्हणण्याविषयीं संवाद झाला होता.

**सात्यरथि**—( सू. निमि. ) विष्णुमतें सत्यरथाचा पुत्र.

**सात्यायनि**—भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**सात्वत**—विष्णूचा एक पार्षद ( भा. ८. २१. १६ ).

२ ( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें आयूचा, वायुमतें सत्वाचा, मत्स्यमतें जंतूचा व विष्णुमतें अंशाचा पुत्र सत्वत होय. यास सात पुत्र होते. त्यांचीं नांवें—भजमान, भजि, दिव्य, वृष्णि, देवावृध, अंधक व महाभोज. यांच्या नांवांवरून याच्या कुलास हे नांव मिळालें ( भा. ३. १. २९; ९. २५. ७ ).

**साद्यसुग्रीवि**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**साधक**—हिरण्याक्षाशीं देवांच्या झालेल्या युद्धांत याला वायूनें ठार केलें ( पद्म. सृ. ७५ ).

**साधन भौवन**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १५७ ).

**साधित**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार व ऋषिगण.

**साधु**—सत्यनारायणव्रत व त्याचा प्रसाद यांच्या माहात्म्याकरितां याची कथा आली आहे ( भवि. प्रात. २. २९; स्कंद. रे. सत्यनारायणकथा ३ ). सध्यांच्या स्कंदपुराणांतील रेवाखंडांत ही कथा नाहीं.

**साधुद्विज**—देवांना अशी भीति पडली कीं, अनेक रत्नांचा आगर असणारा हिमालय शिवभक्तीनें मोक्षाला जाईल आणि सृष्टीचें अत्यंत नुकसान होईल. म्हणून त्यांनीं देवगुरूला संकटाची कल्पना दिली. तेव्हां सर्व देवांनीं शंकराची प्रार्थना केल्यावरून शंकरानें हिमालय व मेना यांच्याकडे साधूच्या वेषानें जाऊन शिवाची खूप निंदा केली आणि त्यांना शिवभक्तीपासून निवृत्त केलें व पार्वतीशीं आपण विवाह केला. तेव्हां शंकर साधुद्विजाच्या रूपानें गेला म्हणून हा एक शंकराचा अवतार आहे ( शिव. शत. ३५ ).

**साध्य**—धर्म व साध्या यांचे पुत्र. तामस मन्वंतरांतील देवगण. हे बारा आहेत. यांचीं नांवें—मनस्, अनुमन्तृ, प्राण, नर, नारायण, वृत्ति ( वीति ), तपस् ( अपान ), हय, हंस, विभु, प्रभु, धर्म ( नय ). हे यज्ञभाग ग्रहण करणारे असून यांना यज्ञांत पूज्य मानिलें आहे ( साम्ब. १८; मत्स्य. २०३. ११ ). वरील यादींत कंसांतील नांवें ब्रह्मांडांतील आहेत. मत्स्यांतील कांहीं नांवें बरींच भिन्न आहेत.

तुषित, सत्य, वैकुंठ इत्यादि यांचींच स्वायंभुवादि मन्वंतरांतील नांवें आहेत. वैवस्वत मन्वंतरांत हेच आदित्य झाले ( ब्रह्मांड. ३. ३ ८-१२ ).

२ चाक्षुष मनूचा पुत्र ( भा. ६. ६. १५ ).

३ रुद्राचे त्रिनेत्री गण. हे चवऱ्यांऐशीं कोटी आहेत ( मत्स्य. ४ ).

४ शततेजस् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**साध्या**—प्राचेतस दक्षाची कन्या व धर्म ऋषीची पत्नी. हिचे पुत्र साध्य देव ( भा. ६. ६. ४-७ ).

**सानुप्रस्थ**—रामसेनेंतील एक वानर.

**सांदीपनि**—हा काश्यकुलांतील ब्राह्मण असून अवंतीस राहत असे. कृष्ण आणि बलराम यांना उपनयन झाल्यानंतर अध्ययनार्थ याच्याकडे ठेवण्यांत आलें होतें. यानें त्यांना वेद, उपनिषदें, सरहस्य धनुर्वेद, राजनीति व चौसष्ट कला शिकविल्या. याच्या इच्छेवरून कृष्णानें गुरुदक्षिणा म्हणून समुद्रानें गडप केलेला याचा मुलगा दत्त यमापासून याला परत आणून दिला ( म. स. ५४. १. कुं; विष्णु. ५. १ ). हा उज्जनींस राहत असे ( भा. ३. ३. २; १०. ४५. ३१; पद्म. उ. २४६ ).

**साम्लौमाकि**--अंगिराकुलांतील गोत्रकार.

**साम्शश्रवस्**--हा याज्ञवल्क्याचा शिष्य ( बृ. उ. ३. १. २). यालाच याज्ञवल्क्यानें स्मृति सांगितली ( मुंज पहा ).

**साम्श्रवस**--( कुषीतक सामश्रवस पहा ).

**सामुकि**--( यामुनि पहा ).

**सांपेय**--एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा).

**सांब**--कृष्ण व जांबवती यांचा पुत्र ( भा. १०. ६१. ११; म. आ. २०१ १७; २३९. ९; स. ४. ४१ कुं.). हा कृष्ण व रुक्मिणी यांचा पुत्र असें विष्णुपुराणांत आहे. हा उपमन्यूच्या उपदेशाप्रमाणें शिवाची उपासना केल्यामुळें झाला म्हणून यास साम्ब म्हणतात (शिव. वा. २. १). यानें स्वयंवर-प्रसंगी दुर्योधनाची कन्या लक्ष्मणा हिरावून नेली. पण शेवटीं कौरवांनीं यास बांधून नेलें. ही गोष्ट बलरामादिकांस कळतांच ते धांवून आले. प्रथम बलरामानें त्यांना सामोपचाराच्या गोष्टी सांगितल्या. पण ते ऐकेनात. तेव्हां रामकृष्णांनीं त्यांचा पराभव केला व सांब आणि लक्ष्मणा यांचा विवाह झाला ( भा. १०. ६८ ). पुढें एकदां यादवांचीं पोरें सहज खेळत खेळत पिंडारकक्षेत्रीं आलीं; तेथें त्यांनीं सांबास गरोदर स्त्रीचा वेष दिला व तेथील ऋषींस नमन करून त्यांनीं या गर्भिणी स्त्रीस काय होईल असें विचारिलें. तेव्हां त्या ब्राह्मणानें-दुर्वासानें (साम्ब-३)-' हिचे उदरीं लोखंडी मुसळ होऊन तें तुमचा नाश करील ' असें रागानें सांगितलें. नंतर भिऊन त्या यादव कुमारांनीं साम्बाचें पोट सोडिलें, तो तेथें एक लोखंडी मुसळ होतें. तें त्यांनीं उग्रसेनाजवळ नेऊन दिलें. उग्रसेनानें ती गोष्ट कृष्णास न कळवितां त्याचें चूर्ण करवून समुद्रांत फेंकविलें (भा.११.१). पण पद्मपुराणांत कृष्णानेंच त्या मुसळाचें चूर्ण केलें असें म्हटलें आहे ( पद्म. उ. २५२ ). साल्व व यादव यांचें युद्ध झालें, त्या वेळीं याचें व क्षेमधूर्तीचें मोठें तुंबळ युद्ध झालें. याची पत्नी सुनाथकन्या गुणवती व पुत्र गुणवत् ( ह. वं. २९६ ). वज्रनाभपुत्री प्रभावतीचें हरण करण्याकरितां वज्रनाभाच्या सुपूर नगरांत प्रद्युम्नसांबादि नाटकमंडळीच्या मिषानें गेले होते. प्रद्युम्न नायक व हा विदूषक झाला. त्यांनीं रामायण, रंभानलकूबर इत्यादि नाटकें केलीं (ह. वं.२.९२). शेवटीं प्रभासक्षेत्रीं मैरेयक नामक उन्मादक पेय प्याल्यामुळें ओळख विसरून प्रद्युम्नाशीं लढत असतां हा मरण पावला ( भा. ११. ३०. १६ ).

हा अत्यंत रूपसंपन्न असल्यामुळें कृष्णस्त्रियांपैकीं कांहीं याच्यावर अनुरक्त होत्या. ही गोष्ट नारदानें कृष्णाच्या नजरेस आणून दिली. तेव्हां कृष्णानें त्या स्त्रियांना ' चोरांकडून पळविल्या जाल' व याला 'कुष्ठ रोग होईल' असे शाप दिले. पण पुढें नारदाच्या सांगण्यावरून सूर्याराधनेनें याचें कुष्ठ नष्ट झालें व त्यामुळें जंबुद्वीपांतील चंद्रभागेच्या तीरीं यानें स्थापिलेल्या साम्बपुरांत सूर्य येऊन राहिला ( साम्ब. ३; भवि. ब्राह्म. ६६. ७२-७३; ७५; १२७; स्कंद. ४. १. ४८; ६. २१३; मग पहा ).

२ चक्रपाणि राजाचा प्रधान ( गणेश. २. ७३. १३ ).

३ एक अंत्यज. हा चतुर्थीस गणेशाचें सहज नांव घेतल्यानें मुक्त झाला ( गणेश. १. ५९ ).

**सांमद मत्स्य**--सूक्तद्रष्टे ( ऋ. ८. ६७ ).

**सायक जानश्रुतेय**--जानश्रुत काण्ड्वीचा शिष्य ( जै. उ. ब्रा. ३. ४०. २ ).

**सायकायन**--श्यापर्णाचें पैतृक नांव.

२ कौशिकायनीचा शिष्य. याचा शिष्य काषायण ( बृ. उ. ४. ६. २ ).

**सायकायनि**--अंगिराकुलांतील गोत्रकार.

**सायम्**--( स्वा. उत्तान ) पुष्पार्ण व प्रभा यांचा पुत्र.

२ धाता आदित्य व कुहू यांचा पुत्र.

**सारंग**--( रंगवेणी व हरिधाम पहा ).

**सारण**--( सो. वसु. ) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र. यांचे पुत्र मार्ष्टि, मार्ष्टिमत्, शिशु व सत्यधृति ( विष्णु. ४. १५. १४ ).

२ लंकेतील एक राक्षस ( वा. रा. यु. ५५ ).

३ रावणाचा अमात्य ( म. व. ३८४. ५२ कुं. ).

४ माणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**सारमेय**--( सो. वृष्णि. ) श्वफल्क व गांदिनी यांचा पुत्र ( भा. ९. २४. १६ ).

**सारवाह**--अगस्त्यकुलांतील गोत्रकार.

**सारस**--गरुडाचा पुत्र.

**सारस्वत**--अत्यंत कडक तपश्चर्या करणाऱ्या दधीचि ऋषीचें वीर्य इंद्रानें पाठविलेल्या अलंबुषा नांवाच्या अप्सरेला पाहून स्खलन पावलें. त्या वीर्यापासून सरस्वती नदींत एक पुत्र उत्पन्न झाला, त्याचें नांव सारस्वत होय.

दधीचीचा देह देवांच्या कारणीं लागल्यानंतर बारा वर्षे अवर्षण पडलें. तेव्हां मोठमोठे ऋषि अन्नाकरितां दाही दिशांना गेले. पण सारस्वत मात्र सरस्वती नदींतील मासे खाऊन राहिला. त्याचा परिणाम असा झाला कीं, याचें अध्ययन उत्तम राहिलें व इतरांचें मात्र प्रवास वगैरेमुळें नष्ट झालें. दुष्काळ संपल्यानंतर मुनींमध्यें पुनः अध्ययनाविषयीं तत्परता उत्पन्न झाली. पण अध्ययन सांगणारा सारस्वताशिवाय कोणी

आढळेना. तेव्हां याचें शिष्यत्व पत्करून साठ हजार मुनींनीं वेदाध्ययन केलें ( म. श. ५० ).

तैत्तिरीय संहितेंत कांडानुक्रमपाठ व सारस्वतपाठ अशा दोन अध्ययन-पद्धति आहेत. आज कांडानुक्रमपाठ चालू नसून सर्वत्र सारस्वतपाठ चालू आहे. त्यासंबंधीं पुढीलप्रमाणें आख्यायिका आहे. दुर्वासानें शाप दिल्यामुळें सरस्वती आत्रेय ब्राह्मणाच्या घरीं अवतरली. तिच्या पोटीं हा जन्मास आला. याला एक दिवस पित्यानें मारिलें. पण सरस्वतीनें याला बापाच्या हातून सोडवून वेदांसुद्धां सर्व विद्यांचा उपदेश केला. पुढें हा कुरुक्षेत्रांत तप करीत असतां सर्वत्र दुष्काळानें वाताहात झाली. सर्व मुनि वेदहि विसरले. तेव्हां सर्वांनीं याच्याकडून पुनः वेद संपादन केले. त्यांत तैत्तिरीय संहितेचा क्रम नेहमींपेक्षां वेगळा आढळला. तोच सारस्वतपाठ या नांवानें प्रसिद्ध आहे. हा पाठहि शास्त्रमान्य आहे ( संस्काररत्नमाला पा. ३०२ ).

२ जैगीषव्य नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

३ भार्गवकुलांतील मंत्रकार.

४ पुरूरव्यास सरस्वतीपासून झालेला पुत्र.

५ ब्रह्मदेवानें भोः शब्दाचा उच्चार करून सरस्वती उत्पन्न केली. तिचे ठिकाणीं झालेल्या पुत्राचें नांव सारस्वत होय. यालाच अपांतरतम, वेदाचार्य व प्राचीनगर्भ असें म्हणतात. यानेंच स्वायंभुव मन्वंतरांत वेदविभाग केला. म्हणजे हा स्वायंभुव मन्वंतरांतील व्यास होय ( म. शां. ३५९. ३८. ३९; ६६; व्यास पहा ). पण इतरत्र हा वैवस्वत मन्वंतरांतील नववा व्यास म्हणून म्हटलें आहे.

६ कौशिक ऋषीच्या सात शिष्यांतील एक (अ. रा. ७).

७ भृगुकुलांतील गोत्रकार.

८ एक मुनि. यानें आपल्या शिष्यांस तुंगकारण्यीं वेद पढविले ( पद्म. स्व. ३९ ).

**सारिक**—युधिष्ठिराच्या सभेंतील एक ऋषि ( म. स. ४. १९ कुं. ).

**सारिमेजय**—वृष्णिकुलांतील एक यादव ( म. आ. २०१. १९ कुं. ).

**सारिसृक्त शार्ङ्ग**—मंत्रद्रष्टा (ऋ. १०. १४२. ५-६). महाभारतांत हा शब्द सारिसृक्क असा असून हा मन्दपाल ऋषि व जरितृ-शार्ङ्ग जातीची पक्षीण-यांचा मुलगा दिला आहे. खांडववनदाहांत यानें अग्नीची स्तुति केली. तेव्हां अग्नि प्रसन्न होऊन त्यानें यास दाहापासून मुक्त केलें ( म. आ. २५८. ३ कुं. ).

**सार्ञ्जय**—प्रस्तोकाचें पैतृक नांव.

२ सहदेवाचें पैतृक नाव. सायणाचार्य सहदेव व सार्ञ्जय वेगळे समजतात ( ऐ. ब्रा. ७. ३४ ).

**सार्धनेमि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**सार्धसुग्रीवि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**सार्पराज्ञी**—सूक्तद्रष्ट्री ( ऋ. १०. १८९; सर्पराज्ञी पहा ).

**सार्पि**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**सार्वभौम**—( सो. द्विमीढ. ) मत्स्यमतें सुधर्म्याचा व वायुमतें सुवर्म्याचा पुत्र.

२ ( सो. पूरु.) अहंयाति व भानुमती यांचा पुत्र. याची स्त्री सुंदरा. याचा मुलगा जयत्सेन (म. आ. ६३. १५ कुं.).

३ ( सो. कुरु. ) विदूरथाचा पुत्र. याचा पुत्र जयत्सेन ऊर्फ जयत्सेन.

४ सावर्णि मन्वंतरांतील अवतार. हा देवगुह्य व सरस्वती यांचा पुत्र ( भा. ८. १३. १७ ).

**सार्वसेनि**—शौचेयाचें पैतृक नांव.

**सालकटंकटा**—विद्युत्केश राक्षसाची पत्नी. संध्या नामक स्त्रीची कन्या.

**सालकटंकटी**—हिडिंबेचें नामांतर ( म. आ. १६७. १७. कुं ).

**सालंकायन**—विश्वामित्राचा पुत्र.

**सालिमंजरिसत्य**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायुमतें हिरण्यनाभाचा शिष्य.

**साल्व**—( शाल्व पहा ).

**सालडि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**सावर्ण**—युधिष्ठिराच्या सभेंतील एक ऋषि ( म. स. ४. २१ कुं. ).

**सावयस**—अषाढाचें पैतृक नांव.

**सावर्णि**—या नांवाच्या मनूचा ऋग्वेदांत सावर्ण्य व सावर्णि असा दोनदां निर्देश आहे. तेथें याच्या दक्षिणेची प्रशंसा असून याला दीर्घायुष्य देण्याविषयीं प्रार्थना आहे ( ऋ. १०. ६२. ९-११). यदुतुर्वशांनीं याला नजराणे दिले आहेत. हें नाभानेदिष्ठाच्या सूक्तांत आहे. याच्याचप्रमाणें सांवरणि मनूहि आलेला आहे ( ऋ. ८. ५१. १ ). याच्या सूक्तांतहि मनूचा संबंध आहे. यावरून हे निर्देश मनूसंबंधाचेच असावेत.

हा विवस्वत् व छाया यांचा पुत्र ( भा. ६. ६; दे. भा. १०. १०; मार्क. ७४). छायेला मृण्मयी म्हटलें आहे ( म. अनु. ५३. २५ कुं. ). याचा थोरला भाऊ जो श्राद्धदेव ( सातवा मनु ) त्याच्याशीं हा समान वर्ण होता म्हणून किंवा याच्या आईचें नामांतर सवर्णा असें होतें म्हणून यास सावर्णि असें म्हणत ( विष्णु. ३. २. १३; ब्रह्म. ६.१९ ).

हा पूर्वजन्मीं सुरथ नामक चैत्राच्या वंशांतील राजा होता (१३ सुरथ पहा; दे. भा. १०.१०; मार्क ७८). हा आठव्या मन्वंतराचा अधिपति होईल.

२ सहा हजार वर्षे महादेवास उद्देशून तप करणारा एक ऋषि. यास महादेवानें 'तूं अजरामर होशील' असा वर दिला होता (म. अनु. ४५. ८७ कुं.). हा इंद्रसभेंतील एक सभासद आहे (म. स. ७. १२ कुं.).

३ कृतयुगीन ग्रंथकर्ता ऋषि (शिव. उ. २. ४९).

४ उपाकर्मांगतर्पणांतील एक आचार्य (१ जैमिनि पहा).

५ व्यासाच्या पुराणशिष्यपरंपरेंतील रोमहर्षणाचा शिष्य. वायु व ब्रह्मांड यांत यास सावर्णि सोमदत्ति म्हटलें आहे.

**सावर्णिक**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**सावर्ण्य**—(१ सावर्णि पहा).

**सावित्र**—एक रुद्र.

२ अष्टवसूंपैकीं एकाचें नांव. यानें रावणाचा आजा सुमालिन् यास मारिलें (वा. रा. उ. २७).

३ (४ सावित्री पहा).

**सावित्री**—मद्रदेशाधिपति अश्वपति राजाची कन्या. हिच्या आईचें नांव मालती. मत्स्यपुराणांत तिला मालवी असें म्हटलें आहे. वसिष्ठ व आकाशवाणी यांनीं अश्वपतीस गायत्रीचा दशलक्ष जप करण्यास सांगितला. त्याप्रमाणें जप केल्यानें ही झाली. ही अत्यंत गुणवान् व रूपवान् होती व अश्वपतीहि अत्यंत श्रीमंत होता. यामुळें 'अश्वपतीच्या घराण्याचा व आपल्या घराण्याचा संबंध घडून येणें अशक्य आहे,' असें वाटून कोणीहि राजपुत्र सावित्रीस मागणी घालावयास आला नाहीं. अर्थात् अश्वपतीस कन्येच्या विवाहाची अत्यंत काळजी लागली. हिला जेव्हां हें कळलें तेव्हां ही स्वतःच वरसंशोधनार्थ लवाजमा बरोबर घेऊन निघाली. फिरतां फिरतां ही शाल्व देशच्या द्युमत्सेन राजाच्या आश्रमांत आली. द्युमत्सेनाचें राज्य शत्रूंनीं हरण केल्यामुळें तो स्त्री व सत्यवान् नांवाचा एक पुत्र यांसह वनांतच राहत असे. सावित्रीला सत्यवानाचे गुण पूर्वींच कळले होते. आतां त्याला प्रत्यक्ष पाहिल्यावर हिची त्यावरील प्रीति दृढ होऊन हिनें सत्यवानालाच वरण्याचा निश्चय केला व ही आपल्या घरीं आली. नंतर ही आपण केलेल्या निश्चयाची बातमी सांगण्यास राजवाड्यांत गेली. त्या वेळीं अश्वपतीकडे नारद आला होता. सावित्रीनें आपला निश्चय त्या दोघांना कथन केला. त्या वेळीं नारदानें हिला सत्यवान् हा किती जरी चांगला असला तरी तो एका वर्षाच्या आंत मरणार असल्यामुळें त्याला वरून आपलें जीवित दुःखमय करून घेऊं नकोस म्हणून पुष्कळ सांगून पाहिलें. परंतु सावित्रीनें निश्चय न सोडिल्यानें अश्वपतीस हिच्या म्हणण्याला रुकार द्यावा लागला. विवाहानंतर विनयशीलपणानें हिनें सर्वांचें लक्ष आपणांकडे वेधून घेतलें.

नारदाच्या भविष्याप्रमाणें सत्यवानाच्या मृत्यूचा काळ फक्त चार दिवसांवर आला. तेव्हां सावित्रीनें त्रिरात्रव्रत करण्याचा निश्चय केला; व त्याकरितां हिनें तीन दिवस सारखें उभें राहून तप करण्याचा संकल्प केला. द्युमत्सेनाला सावित्रीच्या कडक नियमाची बातमी कळतांच त्यानें हिला त्या नियमापासून परावृत्त करण्याचा बराच प्रयत्न केला. पण ही आपल्या संकल्पापासून ढळली नाहीं. नंतर हिचें त्रिरात्रव्रत संपन चौथा दिवस उजाडला. त्या दिवशीं संध्याकाळीं तीन दिवसांच्या उपवासाचें पारणें हिला फेडावयाचें होतें. इतक्यांत सायंकाळ झाली व सत्यवानास वनांत जाऊन लांकडें आणावयाची इच्छा झाली. तेव्हां सावित्रीस नारदानें सांगितलेल्या भविष्याचा अनुभव आतांच येणार असें वाटलें व ही आपला विचार बाजूस ठेवून सत्यवानाबरोबर वनांत गेली. वनांत गेल्यावर सत्यवानानें काष्ठें, फलें वगैरे गोळा केलीं व तो दमल्यामुळें विश्रांतीकरितां जरा स्वस्थ बसला. परंतु इतक्यांत त्याला मस्तकशूलाच्या वेदना होऊं लागल्या व झोंप येऊं लागली. त्याबरोबर हिनें त्याचें मस्तक आपल्या मांडीवर घेतलें. हिला नारदानें सांगितलेला तो दिवस, तो मुहूर्त, तो क्षण वगैरे सर्व जुळून आलीं आहेत, असें वाटलें. इतक्यांत यम आपला पाश घेऊन त्या ठिकाणीं आला. त्यानें सत्यवानाच्या देहांतून एक अंगुष्ठमात्र पुरुष पाशानें ओढून काढिला. त्याबरोबर ही दुःखाकुल होऊन यमाच्या मागून निघाली. हिनें यमास अध्यात्मज्ञानाविषयीं बरेच प्रश्न विचारिले व यमानेंहि त्यांचीं समर्पक उत्तरें देऊन हिला एक वर मागावयास सांगितला. तेव्हां हिनें आपल्या श्वशुरास दृष्टि व राज्य प्राप्त व्हावें म्हणून सांगितलें. यमानें 'तथास्तु' म्हणून हिला परत फिरावयास सांगितलें. परंतु ही परत न फिरतां त्याच्या मागून जाऊं लागली. यमास हिच्या पातिव्रत्यानें फार संतोष झाला व त्यानें हिला आणखी दोन वर मागावयास सांगितलें. एका वरानें हिनें आपल्या पित्यास शंभर पुत्र मागून घेतले व 'मला शंभर मुलगे व्हावेत' असा दुसरा वर मागून घेतला. यमानेंहि 'तथास्तु' असें म्हटलें. तरीहि ही यमाच्या मागून जाऊं लागली. तेव्हां यमानें 'आतां कशाला माझ्या मागून येतेस?' म्हणून विचारिलें. तेव्हां सावित्रीनें यमास सांगितलें कीं, 'तुम्हीं मला पुत्र होतील म्हणून वर दिला; परंतु माझ्या पतीला घेऊन चाललांत, तेव्हां आपलें म्हणणें खरें कसें होणार?' या हिच्या बोलण्यानें यम कुंठित झाला व त्यानें सत्यवानास जिवंत सोडिलें. ब्रह्मवैवर्तांत

सत्यवान् झाडावरून पडून मेला व सावित्रीनें त्याला परत सजीव केलें असें आहे ( २. २४ ).

नंतर सत्यवान् सावध झाला व सावित्रीनें त्याला घडलेलें सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकून सत्यवानास हिच्या पातिव्रत्याबद्दल फारच आनंद झाला व तो सावित्रीसह आश्रमांत निघाला. इकडे आश्रमांत येऊन पाहतात तों द्युमत्सेनास चांगलें दिसूं लागलें असून तो यांच्याच येण्याची काळजी करीत होता. घडलेली सर्व हकीकत ऐकल्यावर त्याला सावित्रीच्या पतिभक्तीचें अत्यंत कौतुक वाटलें. नंतर त्यानें दुसरे दिवशीं सावित्रीच्या व्रताचें पारणें करविलें.

पुढें लवकरच द्युमत्सेनानें स्वतःचें राज्य परत मिळविलें व अश्वपतीला शंभर मुलगे झाले. त्याचप्रमाणें सावित्रीलाहि शंभर मुलगे झाले. नंतर द्युमत्सेनामागून सत्यवान् गादीवर बसला व त्यानें सावित्रीसह चारशें वर्षें राज्य केलें ( म. व. २९३-२९९; मत्स्य. २०७-२१३; दे. भा. ९. २६-३८; ब्रह्मवै. २. २३-३४ ).

२ ब्रह्मदेवाची पत्नी. एकदां ब्रह्मदेवानें यज्ञ करावयास सुरुवात केली. त्या वेळीं त्यानें सर्वांस निमंत्रण केलें होतें. ब्रह्मदेवाची गायत्री म्हणून दुसरी स्त्री होती. ब्रह्मदेवानें सावित्रीच्या येण्याची वाट न पाहतां गायत्रीलाच यजमानपत्नीची दीक्षा दिली. हें कळतांच हिला अत्यंत क्रोध आला व हिनें यज्ञांत उपस्थित झालेल्या सर्वांस शाप दिला, पण पुढें समजूत पटल्यावर उःशाप दिले (पद्म. सृ. १७ उ. १११).

एकदां ब्रह्मदेव आपली कन्या सरस्वती हिजवर मोहित झाला. हें पाहून ती हरिणीच्या वेषांत पळूं लागली. ब्रह्माहि हरीण होऊन तिच्यामागें लागला. हें पाहून शंकरानें ब्रह्म्यास ठार केलें. तेव्हां गायत्री व सावित्री विधवा झाल्या. त्यांनीं शंकराची स्तुति करून त्यास प्रसन्न केलें. तेव्हां शंकरानें ब्रह्म्यास जिवंत करून त्यांचे स्वाधीन केलें. या ठिकाणास गायत्रीसरस्वतीतीर्थ म्हणतात ( स्कंद. ३. १. ४० ).

३ सवितृ आदित्य व पृश्नि यांची कन्या (भा.६.१८.१).

४ हिनें कुंडलें दान केलीं होतीं (म. शां. २४०. ४४ कुं.). शांतिपर्वांत 'सावित्री' असा शब्द असून अनुशासनपर्वांत 'सावित्रः' असा शब्द आहे. तरी कुंडलें दान करणारी सावित्री कीं कर्ण असा प्रश्न उद्भवतो. तो कर्णच दिसतो ( म. अनु. २००.९ कुं. ). ध्रुवसंधीला सावित्री नांवाची पत्नी आढळत नाहीं. दोनहि ठिकाणीं अर्थ 'कर्ण'च घेतला पाहिजे ( २ पौष्य पहा ).

**सावैनस**—गृत्समदाचा पुत्र ( म. अनु. ८.६१ कुं. ).

**सास्सिाहारितायन**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**साहंजि**—( सो. सह. ) विष्णुमतें कुंतीचा पुत्र ( संहंत पहा ). यानें साहंजनि नगरी वसविली ( ब्रह्म. १३.१५६ ).

**साहदेव्य**—सोमकाचें पैतृक नांव (ऐ. ब्रा. ७.३४.९).

**साहरि**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**साहुल**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**साह्य**—मरुद्गणांतील चवथ्या गणांपैकीं एक.

**सिंह**—कृष्ण व लक्ष्मणा यांचा पुत्र.

२ रामाच्या सुज्ञ नामक मंत्र्याचा पुत्र ( कुशलव पहा ).

**सिंहकेतु**—कर्णानें मारिलेला पांडवपक्षीय चेदिपुत्र ( म. क. ५१. ५० कुं. ).

**सिंहचंद्र**—भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय पांचालराजा ( म. द्रो. १५९. ३९ कुं. ).

**सिंहसेन**—गोपति पांचालाचा पुत्र. याच्या रथाचे घोडे श्वेतरक्तवर्ण असत ( म. द्रो. २३. १५८ कुं ) यास कर्णानें मारिलें ( म. क. ५६ ).

**सिंहिका**—प्राचेतस दक्ष प्रजापति व आसिक्नी यांची कन्या. कश्यपाची भार्या व चार सैंहिकेयांची माता.

२ कश्यप व दिति यांची कन्या ( २ विप्रचित्ति पहा ). समुद्रोल्लंघनाचे वेळीं हिनें मारुतीची वाट आडवून त्यास त्रास दिला, म्हणून मारुतीनें हिला समुद्रांत मारिलें व तो पुढें लंकेस गेला ( वा. रा. सुं. १ ).

**सिकता नीवावरी**—मंत्रद्रष्टी ( ऋ. ९. ८६. ११-२०; ३१-४० ).

**सित**—विश्वामित्र ऋषीचा पुत्र.

२ तामस मन्वंतरांतील एक योगवर्धन.

**सिद्ध**—कश्यप व प्राधा यांचा पुत्र.

२ एक मुनि. याचा काश्यपाशीं संवाद झाला. त्यांत अनुगीता, जननमरण, जीवाचा गर्भप्रवेश, मोक्षसाधन इ. विषय होते ( म. आश्व. १७.२० कुं.). याचा शिलोंछवृत्ति ब्राह्मणाशीं गंगामाहात्म्यावर संवाद झाला ( म. अनु. ६५ कुं. ).

**सिद्धसमाधि**—गीतेच्या बाराव्या अध्यायाच्या पठनानें दुसऱ्याला सजीव करण्याची शक्ति आलेला कोल्हापूरचा ब्राह्मण ( पद्म. उ. १८६ ).

**सिद्धसेन**—( बर्बरिक पहा ).

**सिद्धार्थ**—दशरथाचा प्रधान ( वा. रा. अयो. ३६ )

२ मणिभद्र व देवजनी यांचा पुत्र.

**सिद्धि**—भग नामक आदित्याची स्त्री ( भा.६.१८.२).

२ दक्षाची कन्या व धर्माची स्त्री.

३ वीर, अग्नि व शरयू यांचा पुत्र (म.व. २२१.१९ कुं.).

**सिद्धैश्वर्य**—( बर्बरिक पहा ).

**सिनीवाक**—युधिष्ठिराच्या मयसभेंतील ऋषि ( म. स. ४. २० कुं. ).

**सिनीवाली**—अंगिरा ऋषि व श्रद्धा यांची कन्या. धाता आदित्याची पत्नी. हिचा पुत्र दर्श ( भा. ६.१.८३ ).

२ कर्दमपत्नी देवहूतीचें नामांतर असावें ( मत्स्य. २३ ).

३ बृहस्पति व शुभा यांची कन्या.

**सिंदूर**—एक असुर. यास गजाननानें मारून याचें रक्त आपले अंगास माखलें ( गणेश. २.१३७ ).

**सिंधु**—सिंधुद्वीपाचें नामांतर ( ब्रह्म. १६९. १९ ).

२ एक असुर. याला मयूरेश्वरानें मारिलें ( गणेश. २. ७३-१२६ ).

**सिंधुक**—( आंध्र. भविष्य. ) वायु व ब्रह्मांड यांच्या मतें आंध्रवंशांतील पहिला राजा ( शिप्रक पहा ).

**सिंधुक्षित्**—एक राजर्षि. हा राज्यभ्रष्ट झाला असतां एका सामानें याला पुनः वैभव प्राप्त झालें (पं.ब्रा.१२.१२.६).

**सिंधुक्षित् प्रैयमेध**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ७५ ).

**सिंधुद्वीप**—( सू. इ. ) भागवत व हरिवंश यांच्या मतें नाभाचा मुलगा. विष्णु, वायु व मत्स्य यांच्या मतें हा अम्बरीषाचा पुत्र. सिंधुद्वीप आंबरीष नांवाचा सूक्तद्रष्टा हाच असावा ( ऋ. १०.९ ).

२ ( सो. अमा. ) जह्नूचा पुत्र. हा जन्मानें क्षत्रिय, पण तपोबलानें ब्राह्मण झाला. याचा पुत्र बलाकाश्व ( म. श. ४१. १०; अनु. ७. ४ कुं. ).

३ एक ऋषि. याचा भाऊ वेद ( ब्रह्म. १६९. ४ ).

४ ( वेदनाथ पहा ).

**सिंधुवीर्य**—मद्रदेशाचा राजा. याची कन्या केकयी. ही यानें महत्तास दिली होती ( मार्क. १२८ ).

**सिंधुसेन**—एक राक्षस. यज्ञाचें हरण करून हा रसातलांत गेला म्हणून पृथ्वीवरचे यज्ञ बंद पडले. तेव्हां देवांच्या प्रार्थनेवरून विष्णूनें वराहरूपानें याचा नाश केला व यज्ञास परत आणिलें ( ब्रह्म. ७९ ).

**सीता**—ही सीरध्वज जनकाची मुलगी म्हणून प्रसिद्ध असली तरी त्याची ही औरस कन्या नव्हती. हिच्या जन्माच्या कथा पुढीलप्रमाणें आढळतात.

( १ ) जमीन नांगरीत असतां नांगराच्या फाळाला लागून वर आली. नांगरतांना नांगरानें पडणाऱ्या पाळीला सीता असें म्हणतात. त्यांतून निघाली म्हणून ह्या मुलीचेंहि नांव सीता असें ठेवण्यांत आलें ( वा. रा. बा. ६६. १३-१५ ). हिचा जन्म उत्तराफल्गुनी नक्षत्रावर झाला.

( २ ) पद्माक्ष नांवाचा एक राजा होता. त्यानें लक्ष्मी आपली कन्या व्हावी, म्हणून विष्णूला प्रसन्न करून घेतलें. विष्णूनें दिलेल्या महाळुंगांतून सुंदर कन्या निघाली. पुढें हिच्या स्वयंवर-प्रसंगीं दैत्यांनीं त्याला ठार केलें. तेव्हां लक्ष्मीनें लज्जा रक्षणा-करितां अग्नींत उडी टाकली. तेव्हां तिचा शोध करण्याकरितां सर्व नगर उध्वस्त केलें. एकदां ही अग्निकुंडांतून बाहेर येऊन बसली असतां विमानांतून जाणाऱ्या रावणानें हिला पाहिलें व कामातुर होऊन तो हिच्या मागें लागला. तेव्हां ही पुनः अग्नींत प्रविष्ट झाली. तें पाहून रावणानें अग्नि विझवून हिचा खूप शोध केला, पण रावणाला तेथें पांच रत्नांशिवाय कांहींहि सांपडलें नाहीं. तीं घेऊन तो घरीं आला व त्यानें त्या रत्नांची पेटी देवघरांत ठेवली. रात्रीं मंदोदरीस सांगूं लागला कीं, ‘ तुझ्याकरितां मी रत्नें आणलीं आहेत. रत्नांची पेटी देव-घरांत ठेवली आहे.’ परंतु पुढें असें आढळून आलें कीं, ती पेटी कोणालाहि हलत नाहीं व तिचें झांकणहि काढतां येत नाहीं. तेव्हां रावणानें ती पेटी फोडली असतां त्या पेटींतून एक कन्या बाहेर पडली. ती इतकी सुंदर होती कीं, तिला पाहून सर्व चकित झाले. मंदोदरीनें मात्र सर्वांना हिच्यामुळें पद्माक्षाच्या घराचा नाश कसा झाला हें सांगितलें व ही कन्या आपल्या घरांत राहतां उपयोगी नाहीं असें बजाविलें. तेव्हां हिला करंडींत घालून दूर देशीं नेऊन पुरून टाकण्याचें ठरलें. हिनें जातांना सांगितलें होतें कीं, ‘मी तुझा नाश करण्याकरितां, नंतर निकुंभाचा पुत्र पौण्ड्र व शतमुखी रावण यांना ठार करण्याकरितां व नंतर कुंभकर्णाच्या मूलकासुर नामक पुत्राला ठार करण्याकरितां येईन.’ हें ऐकून रावण संतापला. परंतु त्याला मंदोदरीनें आवरलें. पुढें ती पेटी मिथिल देशांत आणून पुरली. ज्या भूमींत पेटी पुरली तीच भूमि सूर्य-ग्रहणानिमित्त मिथिल राजानें ब्राह्मणाला दिली. ब्राह्मण नांगरीत असतां त्याला ती पेटी सांपडली. ती त्यानें राजाकडे पाठविली. राजानें या मुलीचें कन्येप्रमाणें पालन केलें. तीच सीता होय. तिला मातुलिंगांतून निघाल्यामुळें मातुलिंगी, अग्नींत शिरल्यामुळें अग्निगर्भा, रत्नांत राहिल्यामुळें रत्नावती, धरणीं-तून निघाल्यामुळें धरणीजा, जनकानें पाळल्यामुळें जानकी, नांगराच्या फाळाबरोबर निघाल्यामुळें सीता, पद्माक्ष राजाची कन्या म्हणून पद्मा, अशीं नांवें आहेत ( आ. रा. सार. ३ ).

( ३ ) नारदानें लक्ष्मीला शाप दिला होता कीं, ‘ तूं राक्षस-कुलांत उत्पन्न होशील. ’ पण लक्ष्मीनें उःशाप मागितल्यावरून ‘ कलशांत भरून ठेवलेलें मुनींचें थोडथोडें रक्त जी आपल्या इच्छेप्रमाणें भक्षण करील, तिच्या गर्भांत मी उत्पन्न व्हावें ’ असा तिनें अशक्य म्हणून उःशाप मागितला. रावणाची दण्डकारण्यावर सत्ता चालत होती व तेथें पुष्कळ तेजस्वी ऋषि तपश्चर्यादि करीत असत. त्यांना मारावयाचें नाहीं, पण त्यांना आपली सत्ता जाणवावी म्हणून रावण बाणाच्या

टोकांनीं त्यांच्या शरीरांतील थोडें रक्त काढी व तें मडक्यांत सांठवी. त्याच अरण्यांत गृत्समदाचा आश्रम होता. त्याला शंभर मुलगे होते. त्याच्या बायकोस एखादी मुलगी हवी होती. तिच्याकरितां 'लक्ष्मी माझी मुलगी होवो,' असा संकल्प करून मंतरलेलें दूध दर्भाच्या अग्रानें तो ऋषि घागरींत टाकी. तो घट त्यानें जपून ठेवला होता. पण एकदां तो मुनि वनांत गेला असतां रावणानें त्याच घटांत मुनींचें रक्त साठविलें व तो घेऊन आपल्या घरीं गेला. घरीं मंदोदरीस सांगितलें कीं, हा घट संभाळ, यांत मुनींचें रक्त आहे. तें विषापेक्षांहि भयंकर आहे. मंदोदरी रावणाच्या दुर्वर्तनामुळें त्रासलेली होती. वर्षांवर्षांत तिची रावणाशीं गांठ पडत नसे. त्यामुळें विष म्हणून तिनें तें रक्त भक्षण केलें. पण त्यामुळें ती गर्भार राहिली. तेव्हां तिला आश्चर्य वाटून ती यात्रेच्या मिषानें कुरुक्षेत्रीं गेली. तेथें गर्भपात करून तिनें तो जमिनींत पुरून टाकला व सरस्वतींत स्नान करून ती परत आली. पुढें एकदां कुरुक्षेत्रांत जनक आला. त्याला त्या जांगल प्रदेशांत यज्ञ करावा अशी इच्छा उत्पन्न झाली व त्यानें सुवर्णाच्या नांगरानें नांगरण्यास सुरुवात केली. तेव्हां फाळाला लागून जी कन्या वर आली तीच सीता होय (अ. रा. ९).

आपलें अवाढव्य धनुष्य सीतेनें घोडा म्हणून खेळावयास घेतलेलें परशुरामानें पाहिलें. तेव्हां त्याला मोठें आश्चर्य वाटलें. कारण, तें धनुष्य इतकें जड होतें कीं तें नेण्या-आणण्यास बैलांच्या अडीचशें जोड्या लागत. तें धनुष्य जनकास देऊन त्यावर दोरी चढवील त्याला सीता देण्याविषयीं त्यानें सांगितलें (आ. रा. सार. ३; वा. रा. बा. ६७. ४).

हिचे विवाहाकरितां जनकानें शिवधनुष्य सज्ज करण्याचा पण लावला होता, तो पण पुरा केल्यानें सीता रामाला मिळाली (वा. रा. बा. ७३; सीरध्वज पहा). लग्नाच्या वेळीं सीतेचें वय सहा वर्षांचें होतें (पद्म. पा. ३६).

पुढें रामलक्ष्मणांबरोबर ही वनवासास गेली (अनसूया पहा). वनांत असतां पंचवटींतून रावणानें हिला पळविलें. जातांना आपला माग लागावा म्हणून हिनें आपले दागिने ऋष्यमूकावर टाकिले. पुढें रामानें माग काढून वानराच्या मदतीनें लंकेवर स्वारी केली.

रावण हिच्याकडे प्रथम भेटींतच पापी दृष्टीनें पाहत आहे असें लंकेंत गेल्यावर हिच्या ध्यानांत आलें. त्याबरोबर हिनें तोंडावर पदर घेतल्याचा उल्लेख आहे (वा. रा. अर. ५५. ३२). पुढेंहि परपुरुषाशीं प्रत्यक्ष बोलूं नये म्हणून ही तृण आड धरून बोलत असे (वा. रा. अर. ५६. १). अशोकवनिकेंत मारुतीनें प्रवेश केल्यावर तो पाहत असतां सीता व रावण यांच्या झालेल्या संवादाचें वर्णन रामायणांत आहे. तेथें रावण येत आहे, असें पाहून हिनें मांड्यांनीं उदर व बाहूंनीं स्तन झांकून घेतल्याचें लिहिलें आहे (वा. रा. सुं. १९. ३). तेथेंहि हिनें तृण आड धरूनच भाषण केलें आहे व शेवटीं तर पाठ केली आहे (वा. रा. सुं. २१. ६). तरीच रावणानें हिला उचलून नेलें, तेव्हां हिला परपुरुषाचा स्पर्श झाला. त्याची हिला सारखी रुखरुख लागून राहिली होती (वा. रा. सुं. ३७. ६२).

मारुति सीतेला 'खांद्यावर बसून चल' असें म्हणाला असतां हिनें उतावळेपणा न दाखवितां गंभीरपणें पुढील उत्तर दिलें आहे. 'सर्व राक्षसांचा वध करण्यास खरोखर तूंहि समर्थ आहेस. परंतु तूं राक्षसांचा वध केलास, तर रामाचा लौकिक जाईल. राक्षसांसहवर्तमान रावणाचा वध राम येथें येऊन करील आणि मला घेऊन जाईल, तर तें रामाला शोभण्यासारखें होईल' (वा. रा. सुं. ३७.५७-६४).

रावणवधानंतर मारुति सीतेला बोलावण्याकरितां अशोकवनिकेंत गेला. तेथें सीतेच्या भोंवतीं अनेक राक्षसी दिसल्या. त्यांनीं सीतेला पूर्वी दिलेल्या त्रासाचें त्याला स्मरण झालें व त्यांना मारण्याची अनुज्ञा त्यानें सीतेला मागितली. तेव्हां हिनें त्यांचें समर्थन केलें व मारुतीला नकार दिला (वा. रा. यु. ११३. ३६-४०; ३ राम पहा).

युद्धसमाप्तीनंतर हिच्या चारित्र्याविषयीं रामानें शंका प्रदर्शित केली. त्या वेळींहि हिनें 'मारुतीबरोबर मला त्याग केल्याचा निरोप पाठविला असता तर मीं त्याच वेळीं जीवितांचा त्याग केला असता,' असा निश्चयात्मक जबाब दिला व अग्निप्रवेशानें आपलें पावित्र्य सिद्ध केलें (वा. रा. यु. ११६. ११).

वनांतून आल्यानंतरहि लोकापवादामुळें रामानें हिचा पुनः त्याग केला. त्या वेळीं पोटांत गर्भ असल्यामुळें हिला आत्महत्या करतां येईना. पण, पुढें वाल्मीकीसारखा मुनि भेटल्यामुळें हिचें सर्व संकट टळलें.

**सीमन्तिनी**--चित्रवर्मन्‌ची कन्या. हिला 'चवदावे वर्षी वैधव्य येईल' असें ज्योतिषांनीं सांगितलें होतें. पण त्यावर उपाय म्हणून याज्ञवल्क्यपत्नी मैत्रेयीनें सोमप्रदोषव्रत कधींहि न सोडण्यास सांगितलें. पुढें चित्रांगदाशीं लग्न होऊन चित्रांगद समुद्रांत बुडाला. बापाचें राज्यहि शत्रूनें घेतलें. पण सोमप्रदोषव्रताच्या सामर्थ्यानें चित्रांगदाला नागकन्यांनीं वांचविलें (स्कंद. ३. ३. ८. ९).

**सीरध्वज**--(सू. निमि.) सीर म्हणजे नांगर. याच्या कीर्तीचा ध्वज झाल्यामुळें यास हें नांव पडलें (भा. ९. १३. १८). हा ऱ्हस्वरोमाचा पुत्र (वा. रा. बा. ७१). याची पत्नी सुमेधा. हा मिथिला नगरीमध्यें राज्य करीत होता. एकदां हा अभियजनाकरितां क्षेत्र नांगरीत असतां याला सीता

मिळाला ( सीता पहा ). सीता उपवर झाल्यावर सांकाश्या नगरीचा राजा सुधन्वा यानें शिवचाप व सीता यांची सीरध्वज जनकाकडे मागणी केली. परंतु जनकानें तीं दोन्हीहि त्याला दिलीं नाहींत. त्यामुळें उभयतांचें प्रचंड युद्ध होऊन जनकानें सुधन्व्याला ठार केलें; व कुशध्वजाला सांकाश्या नगरीचा अधिपति नेमलें ( वा. रा. बा. ७१ ). याप्रमाणें अनेक राजांनीं जनकाकडे येऊन सीतेची मागणी केली. ' जो कोणी शिवचाप सज्ज करील त्यासच सीता द्यावयाची ' अशी जनकाची प्रतिज्ञा होती, पण एकहि राजा तें धनुष्य सज्ज करूं शकला नाहीं. शेवटीं सीतेच्या प्राप्तीविषयीं अत्यंत निराश झालेल्या त्या राजांनीं एकत्र होऊन मोठ्या आवेशानें मिथिला नगरीस वेढा दिला व ते सीरध्वजाला फार पीडा देऊं लागले. याप्रमाणें वेढा पडून एक वर्ष लोटलें. पण दैवी सामर्थ्यानें हा त्यांतून मुक्त झाला ( वा. रा. बा. ६६ ).

पुढें जनकानें वाजपेय यज्ञ केला. तो पाहण्याकरितां रामलक्ष्मणांसहित विश्वामित्र तेथें आला ( पद्म. उ. २४२ ). शेवटीं माहेश धनुष्य सज्ज करून रामानें सीता मिळविली.

नंतर सीरध्वजानें आपला भ्राता कुशध्वज याच्याकडे दूत पाठवून त्यासहि आणविलें. नंतर जनकानें दशरथाला बोलावून आणिलें व सर्वानुमतें सीरध्वजाच्या कन्या सीता व उर्मिला आणि कुशध्वजाच्या मांडवी व श्रुतकीर्ति यांचे विवाह अनुक्रमें राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांच्याशीं सुमुहूर्तावर व्हावयाचें ठरलें. पद्मपुराणामध्यें उर्मिला ही कुशध्वजाची कन्या असें सांगितलें आहे ( पद्म. उ. २४२ ). नंतर सीरध्वज व कुशध्वज यांनीं कुलगोत्राचा त्रिवार उच्चार करून आपल्या कन्या त्यांना दिल्या ( वा. रा. बा. ७०-७४ ).

**सुकक्ष आंगिरस**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ९२. ९३).

**सुकंदर**—हा म्लेच्छाधिपति होता ( भवि. प्रति. ४. २१ ) हा सिकंदर असावा.

**सुकन्या**—शर्यातीची कन्या. ही च्यवन ऋषीची भार्या होय. हिचा पुत्र प्रमति (म. आ. ८. १ कुं.; पद्म. पा.१५; १ च्यवन पहा ). हिची कन्या सुमेधस् ही निध्रुव काण्वास दिली होती.

२ मंकणक ऋषीची माता.

**सुकमल**—मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**सुकर्मन्**—हा गीतेचा दुसरा अध्याय पाठ केल्यानें मुक्त झाला ( पद्म. उ. १७६ ).

२ रुद्रसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

३ रौच्य मन्वंतरांतलि देवगण.

४ ( सो. वृष्णि. ) श्वफल्क व गांदिनी यांचा पुत्र.

५ व्यासाच्या सामशिष्य परंपरेंतील विष्णु व भागवत यांच्या मतें जैमिनीचा, वायुमतें सुत्वनूचा व ब्रह्मांडमतें सुन्वानाचा शिष्य. यानें सामवेदाच्या हजार शाखा केल्या ( भा. १२. ६. ७६ ). याचे शिष्य अनाध्यायाचे दिवशीं शिकत, म्हणून त्यांस इंद्रानें ठार केलें. पण यानें प्रायोपवेशन आरंभिलें; म्हणून इंद्रानें ते सर्व जिवंत केले व आणखी पौष्यंजि व हिरण्यनाभ असे दोन शिष्य दिले (वायु. १. ६०; ब्रह्मांड. १. ३. १४ ).

६ युधिष्ठिराच्या सभेंतील क्षत्रिय ( म. स. ४. १ कुं. ).

७ मातृपितृमाहात्म्याकरितां याची कथा आहे ( पद्म भू. ६३; ८४ ).

**सुकला**—वाराणशींतील कृकल वैश्याची पत्नी. ही पतिव्रता असून हिच्याशिवाय कृकलानें तीर्थयात्रा केली म्हणून ती निष्फळ झाली ( पद्म. सृ. ४१-६१ ).

**सुकाल**—( सुमूर्तिमत् पहा ).

**सुकीर्ति**—उत्तम मन्वंतरांतील इंद्र.

२ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**सुकीर्ति काक्षीवत**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०.१३१ ). या सूक्ताचा हा द्रष्टा आहे असें इतर वैदिक ग्रंथांत आहे ( ऐ. ब्रा. ५.१५.४; ६.२९.१; सां. ब्रा. ३०.५ ).

**सुकुंडल**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**सुकुमार**—( सो. काश्य. ) भागवतमतें धृष्टकेतूचा पुत्र. विष्णु व वायु यांच्या मतें हा सुविभूचा पुत्र.याचा पुत्र वीतिहोत्र.

२ पूर्वदिग्विजयांत भीमानें जिंकिलेल्या दोघां पुलिंद राजांपैकीं एक ( म. स. ३०.१० कुं. ).

३ मत्स्य देशाजवळच असणारा एक राजा. यास दिग्विजयाच्या वेळीं सहदेवानें जिंकिलें ( म. स. ३२.४ कुं.).

४ जनमेजयाच्या सत्रांत दग्ध झालेला तक्षककुलज एक सर्प ( म. आ. ५७. ९ कुं. ).

५ शाकद्वीपाधिपति भव्याचा पुत्र. याचा सुकुमार नांवाचाच वर्ष होता ( मार्क. ५०.२२ ).

**सुकुमारी**—परीक्षित्पुत्र भीमसेनाची भार्या.

२ संजयाची कन्या. नारदाची पत्नी ( म. शां. २९.१३ कुं.; ३ नारद पहा ).

**सुकृत**—स्वारोचिष मन्वंतरांतील प्रजापति. (पद्म.सृ.७).

२ ( सो. पूरु. ) विष्णु व मत्स्य यांच्या मतें पृथूचा पुत्र. वायुमतें ऋषूचा पुत्र. विष्णु व वायु यांत सुकृति असा पाठ आहे.

**सुकृति**—ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ स्वारोचिष मनूचा पुत्र.

३ ( २ सुकृत पहा).

**सुकृत**--(सो. मगध. भविष्य.) वायुमतें निरामित्राचा पुत्र. याचें नांव ब्रह्मांड व विष्णु यांच्या मतें सुक्षत्र, भागवतमतें सुनक्षत्र व मत्स्यमतें सुरक्ष असें आहे.

**सुकृश**--विपुलस्वान् नामक ऋषीचा पुत्र. यास चार पुत्र होते. एकदां याची परीक्षा पाहण्याकरितां इंद्र याजकडे पक्षिरूपानें आला व नरमांस मागूं लागला. सुकृशानें त्यास अगोदर वचन दिल्यामुळें आपल्या पुत्रांस नरमांस देण्याबद्दल विचारिलें. पण त्यांपैकीं कोणीच तयार होईना, म्हणून यानें त्यांस तुम्हीं 'तिर्यग्योनींत जन्मास याल' असा शाप दिला. पण ते शरण गेल्यावर त्यांस 'तुम्ही तेथेंहि ज्ञानी असाल' असा उःशाप दिला. नंतर हा स्वतः आपल्या अंगांतील मांस देणार, इतक्यांत इंद्रानें आपलें रूप प्रगट करून यास 'तूं महाज्ञानी होऊन तुझ्या तपाला विघ्न येणार नाहीं,' असें सांगितलें. याचे पुत्र पुढें गरुडवंशांत पिंगाक्ष, विबोध, सुपुत्र व सुमुख नांवानें द्रोणपुत्र झाले (मार्क. ३; ६ शिवि पहा).

**सुकेतन**--(सो. क्षत्र.) भागवतमतें सुनीथाचा पुत्र. याचा पुत्र धर्मसेतु. विष्णु व वायु यांच्या मतें याचें नांव सुकेतु.

**सुकेतु**--(सू. निमि.) वायु व भागवत यांच्या मतें नंदिवर्धनाचा पुत्र. याचा पुत्र देवरात.

२ (सुकेतन पहा).

३ एक यक्ष. ताटकेचा पिता.

४ रामाच्या सुज्ञ प्रधानाचा पुत्र (कुशलव पहा).

५ चित्रकेतूचा पुत्र (म. आ. २०१. ९ कुं.). हा भारतीययुद्धांत पाण्डवपक्षीय होता. यास कृपाचार्यानें मारिलें (म. क. ४९. २१-२९ कुं.).

६ शिशुपालाचा पुत्र. हा पांडवांच्या पक्षाला होता. यास द्रोणाचार्यांनीं मारिलें (म. क. ३. ३२ कुं.).

७ कपिलाच्या शापांतून वांचलेल्या सगर पुत्रांपैकीं एक (पद्म. उ. २०).

८ सुबाहूचा भ्राता. रामाच्या अश्वमेधप्रसंगीं शत्रुघ्ना-बरोबर झालेल्या सुबाहूच्या युद्धांत हा होता. हा गदायुद्धांत प्रवीण असून याचें लक्ष्मीनिधीशीं प्रचंड युद्ध झालें (पद्म. पा. २५-२६).

९ कश्यप व दनु यांचा पुत्र.

**सुकेतुमत्**--भद्रावतीचा राजा. याच्या स्त्रीचें नांव चंपका. याला पुत्रदा एकादशी केल्यानें पुत्र झाला (पद्म. उ. ४१).

**सुकेश**--विद्युत्केश राक्षस व सालकटंकटा यांचा पुत्र. हा रुद्रगण झाला (वा. रा. उ. ४). याचें लग्न ग्रामणी गंधर्वाची कन्या देववती हिच्याशीं झालें. तिच्यापासून यास मालि, सुमालिन् व माल्यवान् असे तीन पुत्र झाले (वा. रा. उ. ५).

**सुकेशिन् भारद्वाज**--हा ज्ञानप्राप्तीकरितां पिप्पलादा-कडे आला होता (प्र. उ. १. १).

**सुकेशी**--एक अप्सरा (म. अनु. ५०. ४८ कुं.).

२ गांधार देशच्या राजाची कन्या व कृष्णाची स्त्री (म. स. ५७. २६ कुं.).

३ मगधराज केतुवीर्याची कन्या व तिसऱ्या मरुत्ताची स्त्री (मार्क. १२८).

**सुक्षत्र**--कोसल देशचा राजा. भारतीय युद्धांत हा पांडवांकडे होता. याच्या घोड्याचे पोटास चक्रवाकांप्रमाणें थोडी पांढरी झांक असे (म. द्रो. २३. ५८ कुं.).

२ (सुकृत पहा).

**सुक्षेत्र**--ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

**सुख**--ऋत, तप, दानिन्, दाता, दाम, देय, ध्रुव, निधि, नियम, यम, वित्त, विधान, वैद्य, शम, सोम, स्थान, हव्य, हुत, होम या व्यक्ति या देवगणांत असतात (ब्रह्मांड. ४. १. २०).

२ धर्म व शांति यांचा पुत्र (भा. ४. १. ५१).

३ गरुड व शुकी यांचा पुत्र (ब्रह्मांड. ३. ७. ४५०).

**सुखद**--पितरांपैकीं एक.

**सुखसंगित**--(प्रमोदिनी पहा).

**सुखामन व सुखासीन**--ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

**सुखीनल**--(सो. कुरु. भविष्य.) नृचक्षुचा पुत्र. भागवत व वायुमतें हेंच नांव असून विष्णु व मत्स्य यांच्या मतें सुखीबल असें नांव आहे.

**सुगति**--गय व गयंती यांचा पुत्र (भा. ५. १५. १४).

२ हंसध्वज राजाचा प्रधान.

**सुगंध**--हिरण्याक्षाशीं देवांचें जें युद्ध झालें, त्यांत अग्नीनें दग्ध केलेल्या सात राक्षसांतील एक (पद्म. सृ. ७५).

२ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**सुगंधा**-- कृतवीर्याची स्त्री.

२ एक अप्सरा (म. आ. १३२. ४५ कुं.).

**सुगवि**--(संधि पहा).

**सुगृध्री**--कश्यप व ताम्रा यांची कन्या.

**सुग्रीव**--शुंभ व निशुंभ या दोघां असुरांचा दूत (दे. भा. ५. २३; मार्क. ८२. ५७).

२ ग्रीवा म्हणजे मान. याचा जन्म सूर्यापासून ऋक्षरजस् वानराच्या ग्रीवेच्या ठिकाणीं झाला, म्हणून याला सुग्रीव हें नांव पडलें (ऋक्षरजस् पहा). याला सूर्यपुत्र म्हणतात. याला रुमा नांवाची स्त्री होती (वा. रा. कि. ३४). वाली मेल्यावर

याची स्त्री तारा. ही याची भार्या झाली (वा. रा. कि. २९). शिवाय, मोहना नांवाची स्त्री याला होती (पद्म. पा. ६०). द्विविद नामक वानर याचा अमात्य होता (भा. १०. ६७. २). हा वालीचा कनिष्ठ भ्राता.

याला पंचमेढ्र नामक राक्षसानें गिळिलें, तेव्हां वीरभद्रानें राक्षसाला उभा चिरून याला सोडविलें (पद्म. पा. १०७). याचें आणि वालीचें पुष्कळ दिवसपर्यंत ऐकमत्य होतें. पण पुढें मायावी राक्षसाबरोबर वालीचें युद्ध झाल्यानंतर वालीचें आणि याचें वितुष्ट पडून वालीनें याला राज्याबाहेर हांकलून दिलें, व याची स्त्री हरण केली. तेव्हांपासून हा आपल्या अमात्यासह ऋष्यमूक पर्वतावर राहिला होता. ऋष्यमूक पर्वतावर असतांना एके दिवशीं रामलक्ष्मण याच्याकडे येत असलेले यानें पाहिले. तेव्हां ते वालीनें कपटानें पाठविलेले कोणीतरी धनुर्धर असावेत, अशी याची समजूत होऊन हा अत्यंत भयभीत झाला व त्यांच्या चौकशीकरितां यानें हनुमानाला पाठवून दिलें. तेथें गेल्यावर हनुमानानें राम-लक्ष्मणांशीं मधुर भाषण करून याचें समग्र वृत्त त्यांना निवेदन केलें. नंतर हनुमानानें विचारिल्यावरून रामाच्या आज्ञेनें लक्ष्मणानें आपली सर्व हकीकत त्याला सांगितली व 'सीताशोधार्थ आम्हीं सुग्रीवाकडे जात आहों,' असेंहि कळविलें. तेव्हां रामलक्ष्मणासहवर्तमान हनुमान् ऋष्यमूक पर्वतावर आला. तेथें आल्यावर हनुमानानें अग्नि प्रदीप्त करून त्याच्या समक्ष राम व सुग्रीव यांचें सख्य घडविलें. नंतर यानें वालीपासून स्वतःच्या भयनाशार्थ रामाला प्रार्थना केली असतां रामानें याला वालीचा वध करण्याविषयीं खात्री दिली. इतक्यांत यानें रावण सीतेला नेत असतां तिनें टाकलेलें उत्तरीय वस्त्र व अलंकार रामाला दिले.

पुढें वालीशीं वैर पडण्यास काय कारण झालें, असें रामानें याला विचारिल्यावरून यानें मायावी राक्षसाच्या वधाचें समग्र वृत्त रामास कथन केलें. नंतर वालीच्या पराक्रमाचें वर्णन करितांना दुंदुभीच्या वधाची हकीकतहि यानें त्याला सांगितली. रामाच्या पराक्रमाबद्दल याला शंका आल्यामुळें रामानेंहि आपल्या सामर्थ्याची याला प्रतीति आणून देण्याकरितां सात ताड वृक्षांचें एकाच बाणानें छेदन करून भूमि विदीर्ण केली. यावरून याची रामाच्या पराक्रमाविषयीं खात्री होऊन हा रामलक्ष्मणांसहवर्तमान रामाच्या आज्ञेवरून किष्किंधानगरीला गेला व यानें वालीला युद्धार्थ आह्वान केलें. वालीहि युद्धाकरितां किष्किंधा नगरीच्या बाहेर आला. उभयतांचें युद्ध झालें, त्यांत सारखेपणानें ओळखतां न येऊन रामानें वालीस न मारिल्यामुळें याचा पराभव होऊन हा ऋष्यमूक पर्वतावर पळून आला. नंतर खुणेकरितां रामाच्या आज्ञेवरून लक्ष्मणानें याच्या गळ्यांत नागपुष्पी लता घातली व हा रामासह पुनः किष्किंधेस गेला (वा. रा. कि. २-१२).

तेथें गेल्यावर यानें रामाला वालीवधाविषयींची आपली प्रतिज्ञा सफल करण्यास सांगितलें; व वालीला युद्धाकरितां पुनः आह्वान केलें. भ्राल्याची ती गर्जना ऐकतांच वालीहि तारा नको म्हणत असतां युद्धाकरितां बाहेर पडला. सुग्रीव व वाली यांचें युद्ध सुरू झाल्यावर, रामानें वालीवर बाण सोडून त्याला मूर्च्छित पाडिलें. कांहीं वेळानें सावध झाल्यावर वालीनें याला चांगल्या प्रकारें उपदेश केला व प्राण सोडिला (वालिन् पहा). वाली मेल्यावर तारेनें अत्यंत विलाप केला. यालाहि भ्रातृवधाबद्दल पश्चात्ताप होऊन यानें स्वतः अग्निप्रवेश करण्याविषयीं रामाजवळ परवानगी मागितली. परंतु रामानें तारेचें व याचें सांत्वन करून वालीचें और्ध्वदेहिक कर्म करण्याबद्दल याला आज्ञा केली. तेव्हां यानें वानरांकडून वालीचा और्ध्वदेहिक संस्कार करविला. नंतर रामानें याला हनुमानाकडून राज्याभिषेक करवून व वालिपुत्र अंगदाची युवराजपदावर स्थापना करवून आपण लक्ष्मणासहवर्तमान प्रस्रवण पर्वतीं वास्तव्य केलें (वा. रा. कि. २४-२६). याला राज्य प्राप्त झाल्यावर चार मासपर्यंत हा विषयसुखामध्यें अत्यंत निमग्न झालेला होता. याबद्दल एके दिवशीं हनुमानानें सीताशुद्धीविषयीं रामाला दिलेल्या वचनाची याला आठवण करून देऊन याची चांगली कान-उघाडणी केली. तेव्हां हा शुद्धीवर येऊन यानें पंधरा दिवसांत सर्व सैन्य एकत्र जमविण्याविषयीं नीलाला आज्ञा केली.

राम प्रस्रवण पर्वतावर असतांना चार महिन्यांत हा त्याच्याकडे बिलकुल गेला नाहीं. तेव्हां राम अत्यंत क्रोधयुक्त झाला. हें पाहून लक्ष्मणहि अत्यंत संतप्त होऊन त्यानें याला ठार मारण्याची प्रतिज्ञा केली. परंतु रामानें त्याचें सांत्वन केलें व त्याला तसें न करण्यास सांगून याच्याकडे पाठवून दिलें. तेथें आल्यावर त्यानें अंगदाबरोबर याला निरोप पाठविला. लक्ष्मण आल्याचें ऐकतांच हा अत्यंत भयभीत झाला. नंतर अंगद परत निरोप घेऊन आल्यावर लक्ष्मण क्रोधयुक्त होऊन किष्किंधा नगरीमध्यें शिरला. परंतु तारेनें लक्ष्मणाला याला क्षमा करण्यास सांगून त्याच्या कोपाचें सांत्वन केलें. लक्ष्मण याच्या दृष्टीस पडतांच हा हात जोडून उभा राहिला. परंतु लक्ष्मणानें याला पूर्ववचनाची आठवण करून देऊन चांगलेंच शुद्धीवर आणिलें. इतक्यांत हनुमानानें पृथ्वीवरील सर्व वानर किष्किंधा नगरीकडे येत असल्याची वार्ता आणिली. त्याबरोबर याला आनंद होऊन हा लक्ष्मण व कित्येक वानर यांसह रामाकडे आला (वा. रा. कि. २९-३८).

नंतर दोघांचें प्रेमयुक्त संभाषण सुरू झालें, तों आणखी वानरसैन्य तेथें आलें. तेव्हां त्या वानरांना रामानें सीताशुद्धयर्थ चारी दिशांना पाठवून दिलें. अंगदप्रमुख मारुति इत्यादि वीरांना त्यानें दक्षिण दिशेकडे पाठविलें. जातांना रामानें हनुमानाजवळ सीतेच्या खुणेकरितां अंगठी दिली. तो गेल्यावर रामानें याला भूमंडलपर्यटनाची हकीकत विचारिली. तेव्हां हा म्हणाला, ‘ मायावी व वाली यांच्या युद्धामुळें माझें व वालीचें वितुष्ट येऊन वालीनें माझा प्राण घेण्याकरितां पाठलाग सुरू केला. तेव्हां मी पळतां पळतां पृथ्वीपर्यटन केलें. शेवटीं मी ऋष्यमूक पर्वतावर वास्तव्य केलें. वाली मात्र मातंग मुनीच्या शापामुळें तेथें येऊं शकला नाहीं. याप्रमाणें त्या वेळीं मी भूमंडल प्रत्यक्ष पाहिलें ’ ( वा. रा. कि. ३८-४६ ).

पुढें हनुमानानें सीतेचा शोध लाविल्यावर अंगदप्रभृति वीरांना आनंद होऊन ते मधुवनांत शिरले व यथेष्ट मध प्राशन करून त्यांनीं दधिमुख नांवाच्या वनपाल वानराला फार त्रास दिला. तेव्हां तो याच्याकडे येऊन त्यानें समग्र वृत्त याला कथन केलें. यानें त्याला अभय दिलें ( वा. रा. सुं. ६३-६४ ). सीताशुद्धीची बातमी रामाला कळतांच समुद्रोल्लंघन कसें होईल, याबद्दल तो शोध करूं लागला असतां यानें त्याला सेतु बांधण्यास सांगून धीर दिला. पुढें सर्व सैन्यासह राम समुद्रकिनारीं आला ( वा. रा. यु. २ ). तेव्हां बिभीषण रामाकडे आश्रयाकरितां आला असतां यानें त्याचा स्वीकार न करण्यास रामास सांगितलें. परंतु रामानें याची बिभीषणाविषयीं खात्री केल्यावर यानें बिभीषणाशीं सख्य करण्यास रामास संमति दिली ( वा. रा. यु. १८ ). पुढें याची सेना समुद्रकिनाऱ्यावर उतरली असतां रावणानें यास रामाला मदत न करितां स्वनगरीं परत जाण्यास सांगितलें. तेव्हां यानें रावणाचा निषेध केला ( वा. रा. यु. २० ). नंतर रावण दृष्टीस पडतांच यानें त्याच्यावर झडप घालून त्याचा मुकुट जमिनीवर पाडिला. त्याबरोबर दोघांचें युद्ध होऊन यानें रावणास चांगलेंच जेरीस आणिलें ( वा. रा. यु. ४० ). पुढें रामरावणयुद्धांत राम-लक्ष्मण मूर्च्छित पडले असतां वानरसैन्य पळूं लागलें, तेव्हां यानें जांबवानाला सांगून त्यांना परत फिरविलें व मूर्च्छित पडलेल्या रामलक्ष्मणांना पाहून बिभीषण शोकाकुल झाला असतां यानें त्याचें सांत्वन केलें ( वा. रा. यु. ५० ). पुनः युद्ध सुरू झाल्यावर रावणानें याला बाणांनीं मूर्च्छित पाडिलें ( वा. रा. यु. ५९ ). पुढें याचें कुंभकर्णाशीं युद्ध होऊन हा मूर्च्छित पडला असतां कुंभकर्णानें याला धरून नेलें. परंतु लवकरच त्याला फसवून हा रामाकडे परत आला ( वा. रा. यु. ६७ ). नंतर कुंभकर्ण मारिला गेल्यावर याच्या सांगण्यावरून वानरांसह हनुमानानें लंकेस आग लावल्यावर लंकेंतील सर्व राक्षस जिकडेतिकडे सैरावैरा पळूं लागले असतां यानें सर्व वानरांना दरवाजे रोखून ठेवून त्यांच्यावर हल्ला करण्यास सांगितलें. राक्षस व वानर यांचें युद्ध जुंपून कुंभकर्णपुत्र कुंभास यानें ठार केलें ( वा. रा. यु. ७५-७६ ). लवकरच विरूपाक्षाशीं युद्ध करून त्याला ठार मारिलें. विरूपाक्ष मेलेला पाहतांच महोदर याच्यावर चालून आला. परंतु त्याचाहि यानें शिरच्छेद केला ( वा. रा. यु. ९७ ). नंतर रामानें रावणवध केल्यावर तो सीतेसहवर्तमान अयोध्येस निघाला असतां मार्गांत किष्किंधा नगरी लागली. तेव्हां त्यानें याला आपल्या सर्व वानरस्त्रियांसह अयोध्येस येण्यास सांगितलें ( वा. रा. यु. १२३ ). याप्रमाणें याला बरोबर घेऊन सर्व परिवारासह राम अयोध्येस पोहोंचला. पुढें रामाला राज्याभिषेक झाल्यावर त्यानें याचा चांगला सत्कार करून याला स्वनगरीस परत पाठविलें ( वा. रा. यु. १२८ ). नंतर अकरा सहस्र वर्षें अयोध्येस राज्य करून राम निजधामास जाऊं लागला असतां हा सुद्धां अंगदाची राज्यावर स्थापना करून रामाबरोबर गेला ( वा. रा. उ. १०७-१०९ ).

**सुग्रीवी**--कश्यप व ताम्रा यांची कन्या.

**सुघोर**--एक राक्षस. हिरण्याक्षाशीं झालेल्या देवांच्या युद्धांत कार्तिकेयानें याला ठार केलें ( पद्म. सृ. ७५ ).

**सुचंद्र**--कश्यप व सिंहिका यांचा पुत्र.

२ कश्यप व क्रोधा किंवा प्राधा यांचा पुत्र.

३ ( सू. दिष्ट. ) विष्णु व वायु यांच्या मतें हेमचंद्राचा पुत्र. यास महाकाली नांवाचें कवच प्राप्त झालेलें होतें. त्यामुळें हा अवध्य होता. याचें व परशुरामाचें युद्ध झालें, त्या वेळीं याचे रथांत याजवळ काली बसली होती व ती जें जें शस्त्रास्त्र येई तें तें गिळी. पुढें परशुरामानें याजवळ याचें कवच मागितलें. हा उदार असल्यामुळें यानें तें देऊन टाकिलें. कवच मिळतांक्षणींच परशुरामानें यास ठार केलें ( ब्रह्मवै. ३. ३६ ). कार्तवीर्याच्या बाजूनें हा या वेळीं लढत होता ( ब्रह्मांड. ३. ३९. १८-५३ ).

४ एक यादव ( भा. १०. ८२. ६ ).

५ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**सुचल**--( सो. मगध. भविष्य. ) वायुमतें सुमतीचा पुत्र. यास भागवत व विष्णु यांच्या मतें सुकल आणि मत्स्यमतें अचल असें नांव आहे.

**सुचारु**--( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

२ कृष्ण व रुक्मिणी यांचा पुत्र.

३ ( सो. वसु. ) विष्णुमतें प्रतिबाहूचा पुत्र. कृष्णापासून याची पिढी ६ वी होय. हा वज्राचा पौत्र.

**सुचित्त**--(५ सत्यधृति पहा).

**सुचित्त सैलन**--एक आचार्य (जै. उ. ब्रा. १. १४. ४).

**सुचित्र**--(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र.

२ पांचाल देशाचा राजा. यास द्रोणानें मारिलें (म. द्रो. २१. ६२ कुं.). याचा पुत्र चित्रवर्मा.

३ शिव देवांतील एक.

**सुचिरा**--श्वफल्क व गांदिनी यांची कन्या.

**सुचेतस्**--(सो. क्षेत्र.) गृत्समदाचा पुत्र. याचा पुत्र वर्चस्.

२ (६ प्रचेतस् पहा).

**सुच्छाया**--ध्रुवपुत्र शिष्टाची स्त्री. हिला कृप, रिंपुजय, वृक इत्यादि पुत्र होते.

**सुजन**--भृगु व पौलोमी यांचा पुत्र, देव.

**सुजंतु**--(सो. अमा.) विष्णुमतें जह्नुपुत्र (३ पूरु पहा). याचें वायुमतें सुहोत्र असें नांव आहे.

**सुजन्य**--बारा भार्गव देवांपैकीं एक.

**सुजय**--या राजानें अश्वमेधाचे वेळीं पांडवांस मदत केली (जै. अ. ५३).

२ भव्य देवांतील एक.

**सुजात**--(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें मारिलें (म. श. २५. ५ कुं.).

२ (सो. सह.) विष्णुमतें भरताचा पुत्र.

३ पुलह व श्वेता यांचा पुत्र (ब्रह्मांड. ३. ७. १८०-१८१).

**सुजातवक्र**--पितृतर्पणांत येणारा एक आचार्य (आश्व. गृ. ३. ३).

**सुजाता**--उद्दालकाची कन्या. ही कहोलाची पत्नी व अष्टवक्राची माता होय (म. व. १३४. ९ कुं.).

२ सुराष्ट्राची कन्या व दुर्गमाची स्त्री.

**सुजातेय**--विश्वामित्रकुलांतील एक गोत्रकार ऋषिगण.

**सुज्ञ**--दशरथाचा मंत्री याचे पुत्र दहा. जितश्रम, धार्मिक, सुकेतु, शत्रुसूदन, चंद्र, मद, शल, काल, मल्ल व सिंह. (जै. अ. ३४. ४३).

**सुज्येष्ठ**--(शुंग. भविष्य.) अग्निमित्राचा पुत्र.

**सुतंजय**--एक राजा. भारतीय युद्धांत हा कौरवांकडे होता (म. क. २७).

**सुतद्राज**--(सत्यध्वज पहा).

**सुतनु**--कलाप ग्रामांतील एक ब्राह्मणपुत्र (स्कंद. १. २. ६).

२ वसुदेवाची एक स्त्री.

३ अक्रूराची स्त्री व आहुकाची कन्या (म. स. १४. ३४ कुं.).

४ (सो. कुरु.) मत्स्य व वायु यांच्या मतें उग्रसेनाचा पुत्र. पण विष्णुमतें उग्रसेनाची कन्या.

**सुतपस्**--आर्चिष्मत्, कीर्ति, क्रतु, कृतिनेमि, तप, तेज, द्योतन, धर्म, धृति, प्रभाकर, प्रभास, बुध, भानु, मारकृत, यश, रश्मि, विराज् व शुक्र हे सुतपस् देव आहेत (ब्रह्मांड. ४. १. १५). हे सावर्णि मन्वंतरांत असतात.

२ निर्वृतिचक्षु ऋषीचा पुत्र. यास स्त्रीसमागमापासून परावृत्त केल्यामुळें उत्पलावतीस हा शाप देणार, पण तिनें शाप न देण्याबद्दल यास विनविलें. तेव्हां यौवन स्वतःस अर्पण करीत असल्यास शाप न देण्याचें सांगितलें. पण तिनें यास हीन लेखिल्यामुळें तिला मृगी होण्याचा यानें शाप दिला. तथापि सिद्धवीर्य मुनीचा पुत्र लोल उदरीं येऊन तो तामस मनु होईल असा उःशाप दिला (मार्क. ७१).

३ हा भरद्वाजकुलोत्पन्न होता. याची बायको तीर्थयात्रा करीत फिरत असतां सूर्यानें बलात्कार केल्यामुळें तिला अश्विनीसुत नांवाचा मुलगा झाला. अशा स्थितींत सुतपसनें दोघांनाहि टाकून आपण तपश्चर्या केली. कृष्ण प्रसन्न झाल्यावर यानें भक्ति मागितली असतां, ‘ स्त्रीपुत्रांचा स्वीकार कर ’ अशी आकाशवाणी झाली. दुसरी एक पितरांची मानसकन्या याला दिली होती. तिचे ठिकाणीं याला कल्याणमित्र नांवाचा मुलगा झाला (ब्रह्मवै. १. ११).

४ सावर्णि मन्वंतरांतील देवगण.

५ मरुतांच्या पहिल्या गणांपैकीं एक.

६ एक प्रजापति. हाच वसुदेवरूपानें जन्माला आला (भा. १०. ३. ३२).

७ उत्तम मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

८ तामस मनूचा पुत्र.

९ दक्षसावर्णि मन्वंतरांतील एक ऋषि.

१० रुद्रसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

११ रौच्य मनूच्या पुत्रांपैकीं एक.

१२ रौच्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

१३ (सो. अनु.) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें हेमाचा पुत्र. मत्स्यमतें हा सेनाचा पुत्र. याचा पुत्र बलि.

१४ (सो. कुरु. भविष्य.) मत्स्यमतें हा परिष्णवाचा पुत्र. याबद्दल इतरत्र सुनय असें नांव आहे.

१५ (सू. इ. भविष्य.) भागवतमतें अंतरिक्षाचा पुत्र. याचें नांव वायुमतें सुपर्ण, विष्णुमतें सुवर्ण, मत्स्यमतें सुषेण व भविष्यमतें सुवर्णांग आहे.

**सुतमित्र**--मरुतांच्या दुसऱ्या गणांतील एक.

**सुतंभर आत्रेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. ११-१४ ). यानें नहुषपुत्राचा निर्देश केला आहे ( ऋ. ५. १३. ६ ). अवत्सारानें याला ज्ञाता म्हटलें आहे (ऋ. ५.४४.१३ ).

**सुतरा**--श्वफल्काची कन्या.

**सुतार**—वैवस्वत मन्वंतराच्या दुसऱ्या चौकडींतल्या कलींतील हा शंकराचा अवतार होय. याचे शिष्य-दुंदुभि, शतरूप, हृषीक व केतुमत् होत. त्यांनीं ध्यानयोगानें मोक्ष प्राप्त केला ( शिव. शत. ४ ).

२ अनुशाल्व राजाचा सेनापति.

**सुतारा**—सुप्रभ गंधर्वाची कन्या ( पद्म. स्व. २२ ). परंतु दुसऱ्या ठिकाणीं ही चंद्रकांत गंधर्वाची कन्या असें म्हटलें आहे ( पद्म. उ. १२८ ).

**सुतीक्ष्ण**--अगस्त्याचा शिष्य. यानें रामकुंडावर तप करून त्रैलोक्यांत गमन करण्याचें सामर्थ्य मिळविलें ( स्कंद. ३. १. १८ ). याच्या आश्रमांत राम दोनदां राहिला होता. यानें अगस्त्याकडून ज्ञान व कर्म यांची आवश्यकता समजावून घेतली ( यो. वा. १ ).

**सुतीर्थ**--( ५ सुनीथ पहा ).

**सुतेजन**—भारतीय युद्धांतील पांडवांच्या बाजूचा राजा ( म. द्रो. १५९. ३९ कुं. ).

**सुतेमनस् शांडिल्यायन**--हा अंशु धानंजय्याचा शिष्य. याचा शिष्य सुनीथ कापटव ( वं. ब्रा. १ ).

**सुत्रामन्**--रौच्य मन्वंतरांतील देवगण.

**सुत्वन्**—व्यासाच्या सोमशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांड व वायु यांच्या मतें सुमंतूचा शिष्य.

**सुत्वन् कैरिशय भार्गायन**—एक राजा. मैत्रेय कौषारवानें याला ' ब्रह्मणः परिमरः ' नांवाचें कर्म सांगितलें व त्यामुळें आपले पांच द्वेष्टे मारून हा थोर पदवीवर चढला ( ऐ. ब्रा. ८. २८ ).

**सुदंष्ट्र**—( सो. क्रोष्टु. ) वायुमतें असमौजसचा पुत्र.

२ ( सो. विदू. ) मत्स्यमतें अजाताचा पुत्र.

**सुदक्ष**—श्रुतकक्ष्याच्या सूक्तांत याचा निर्देश आहे ( ऋ. ८. ९२. ४ ).

**सुदक्षिण**—कामरूपचा राजा. भीमशंकरानें भीमासुरास मारून यास वांचविलें ( शिव. शत. ४२.१९ ).

२ कांबोजाधिपति ( म. आ. १८६ ). शक व यवन लोकांचा राजा ( म. उ. १९ ). याचा धाकटा भाऊ भारतीय युद्धांत अर्जुनाकडून मारिला गेला ( म. क. ५६ ). राजसूय यज्ञाच्या वेळीं अर्जुन दिग्विजय करीत असतां त्यानें याला जिंकिलें होतें ( म. स. २७ ). पुढें भारतीय युद्धांत सहदेवपुत्र श्रुतकर्म्याशीं याचें प्रचंड युद्ध झालें ( म. भी. ४५ ). शेवटीं अर्जुनानें याला ठार मारिलें ( म. द्रो. ९२ ). हा उत्तम रथी होता ( म. उ. १६६ ).

३ पौंड्रक वासुदेवाचा मित्र काशिराज, त्याचा हा पुत्र. काशिराजाला कृष्णानें ठार मारिल्यावर त्याची उत्तरक्रिया करून यानें बापाच्या मरणाबद्दल कृष्णावर सूड उगाविण्या-करितां उपाध्यांसह वाराणसी क्षेत्रामध्यें जाऊन रुद्राची घोर तपश्चर्या आरंभिली. तेणेंकरून शंकर प्रसन्न होऊन त्यानें याला जारणमारणाची अधिदेवता जो दक्षिणाग्नि त्याची आराधना करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें हा ऋत्विजांसहित दक्षिणाग्नीच्या आराधनेंत निमग्न झाला असतां कुंडांतून अति भयंकर अग्नि मूर्तिमंत प्रकट झाला व दशदिशा जाळीत द्वारकेवर गेला. तेव्हां द्वारकावासियांची त्रेधा उडून त्यांनीं सर्व प्रकार सभागृहांत अक्षक्रीडा करीत बसलेल्या कृष्णास विदित केला. त्याबरोबर कृष्णानें त्यांना अभय देऊन लागलीच सुदर्शन चक्र अग्नीवर सोडिलें. कृत्याग्नि व सुदर्शन चक्र यांचें युद्ध होऊन अग्नीचा पराभव झाला व तो वाराणसीकडे माघारा वळून त्यानें ऋत्विजांसहित याला क्षणांत भस्मसात् केलें ( भा. १०. ६६ ).

**सुदक्षिण क्षैमि**--एक आचार्य. याला तिरस्कृत करून शुक्र व गोश्रु जाबालींना यज्ञांत घेतल्याची कथा आहे ( जै. उ. ब्रा. ३. ६. ३; ७. १. ३-६ ).

**सुदक्षिणा**—अंशुमतपुत्र दिलीपाची स्त्री.

**सुदती**--कश्यप व मुनि यांची कन्या, अप्सरा.

**सुदत्त पाराशर्य**—एक आचार्य. याचा गुरु जनश्रुत वारक्य व शिष्य अषाढ उत्तर् ( जै. उ. ब्रा. ३.४१; ४.१७ ).

**सुदमोदन**—( ३ दम पहा ).

**सुदरिद्र**—( पितृवर्तिन् पहा ).

**सुदर्शन**—एक विद्याधर. अंगिराच्या शापानें हा सर्प झाला होता. परंतु नंदाला गिळिल्यावर कृष्णानें याला मुक्त केलें ( भा. १०. ३४ ).

२ हंसध्वजाचा पुत्र.

३ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र. भीमानें यास ठार केलें (म. द्रो. १२७. ४९; श. २६. ४८ कुं. ).

४ दुर्योधनपक्षीय राजा. यास सात्यकीनें ठार केलें ( म. द्रो. ११८; १२८; १५६ ).

५ एक ऋषि. हा भीष्म शरपंजरीं पडला असतां आला होता ( भा. १. ९ ).

६ अग्नि व दुर्योधनकन्या सुदर्शना यांचा पुत्र. याची पत्नी ओघवती ( भा. ९.२ ). यानें गृहस्थाश्रमधर्मानें वागून मृत्यूलाहि प्रसन्न करून घेतलें. ओघवती अर्ध्या शरीरानें नदी

झाली व अर्ध्या शरीरानें याबरोबर ब्रह्मलोकास गेली (म. अनु. २)

७ (सू. इ.) हा मनुवंशांतील दीर्घबाहूचा पुत्र. याची पत्नी काशिराजसुता. यानें सर्व पृथ्वी जिंकून राज्य केलें. एकदां महाकालीनें यास पृथ्वी लय पावणार असें सांगून हिमालयावर जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें स्त्री व वसिष्ठ यांसह हा हिमालयावर गेला. तेव्हां क्रमानें उत्तरेकडील हिमसमुद्र, पश्चिमेकडील रत्नाकर व दक्षिणेकडील वाडवसमुद्र यांतील बेटें समुद्रांत नष्ट झालीं. पुनः दहा वर्षांत सर्व स्थलमय झालें व हा वैशाख शुद्ध तृतीयेस अयोध्येस आला (भवि. प्रति. १. १). यानें हिमालयांतील एक अरण्य मोडून तेथें खांडवी नगरी वसविली. पुढें भैरववंशांतील विजयानें याला ठार केलें (कालि. ९२).

८ विष्णुतीर्थाचा स्पर्श झाल्यानें या ब्राह्मणाचा उद्धार झाला (पद्म. सृ. १७).

९ (सू. इ.) ध्रुवसंधीचा पुत्र. याच्या आईचें नांव मनोरमा. एकदां मृगया करीत असतां ध्रुवसंधि मारिला गेल्यामुळें याला राज्य प्राप्त झालें. परंतु याचा शत्रु युधाजित्-लीलावती नांवाच्या दुसऱ्या बायकोचा बाप--यास हें बरें न वाटून त्यानें याला पदच्युत केलें, व शत्रुजित् नांवाच्या याच्या सावत्र भावास गादीवर बसविलें. नंतर हा आपल्या आईसह भारद्वाजाचे आश्रमांत पळून गेला व तेथें देवीची आराधना करीत राहिला.

पुढें दैवयोगानें स्वयंवरांत शशिकलेनें यालाच माळ घातली. तेव्हां या भिकाऱ्यास असलें रत्न मिळालें हें पाहून सर्व राजे लोकांत असंतोष पसरला व याची व त्यांची लढाई होऊन तींत देवीच्या प्रभावानें याचा जय झाला. नंतर यास आपलें पूर्वीचें राज्य मिळालें (दे. भा. ३. १३-२५).

१० मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

११ एक गंधर्व. हा गालवाच्या शापानें वेताल झाला. वेतालवरदतीर्थांत स्नान केल्यानें हा मुक्त झाला (स्कंद. ३. १. ९).

**सुदर्शना**—दुर्योधनाची कन्या व सुदर्शनाची माता.

२ माहिष्मतीचा राजा नील याची कन्या व अग्नीची स्त्री (म. स. ३२. ३२ कुं.).

३ (५ सुद्युम्न पहा).

**सुदान**—शिव देवांतील एक.

**सुदांत**—(सो. क्रोष्टु.) वायुमतें हृदीकाचा पुत्र.

**सुदामन्**—सीरध्वज जनकाचा मंत्री.

२ कृष्णाचा एक गुरुकुलांतील मित्र. याची सोन्याची नगरी म्हणजे पोरबंदर होय असें म्हणतात. हा गोलोकांत होता (कुचैल व श्रीदामन् पहा).

३ दशार्णाधिप राजा. हा चेदिराज सुबाहु व दमयंती यांचा आजा (म. व. ६६. १४ कुं.).

४ मोदापूरचा राजा (म. स. २८. ११ कुं.).

५ कर्णाचा पुत्र. वृषसेनाचा धाकटा भाऊ. यास अर्जुनानें द्रौपदीस्वयंवरप्रसंगीं झालेल्या युद्धांत ठार केलें (म. आ. २१८. ३२ कुं.).

६ चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

७ पांडवांकडील एक राजा. याचे घोडे कमलाच्या देंठांच्या वर्णाचे होते व त्यांचा वेग श्येन पक्ष्याप्रमाणें होता (म. द्रो. २३).

८ कृष्णाचा सखा. हा मुख्य आठ गोपांतील एक असून कृष्णाच्या पार्षदांतहि होता (दे. भा. ९. १८; २ शंखचूड पहा).

**सुदामिनी**—वसुदेवबंधु शमीकाची पत्नी. हिचे पुत्र सुमित्र व अर्जुनपाल (भा. ९. २४. ४४).

**सुदास**—सुदासाला पैजवन म्हटलें आहे (ऋ. ७. १८. २३). सुदास पैजवनाचें सूक्तहि आहे (ऋ. १०. १३३). पण तें कुलनाम आहे कां पैतृक नाम आहे हें सांगण्यास साधन नाहीं. निरुक्तांत पिजवनाचा मुलगा असें सुदासास म्हटलें आहे (नि. २. २४). दिवोदास हा सुदासाचा बाप असल्याचा उल्लेख आहे (ऋ. ७. १८. २५). सुदासाला देववताचा नातू म्हटलें आहे (ऋ. ७. १८. २२). दिवोदास हा वध्र्यश्वाचा मुलगा होता. कदाचित् देववत् हें वध्र्यश्वाचें विशेषण असेल किंवा आईचा बाप समजावा. याला वसिष्ठानें राज्याभिषेक केला (ऐ. ब्रा. ८. २१).

ऋग्वेदांतील दाशराज्ञ युद्धांतील दहा राजांच्या विरुद्ध लढणारा प्रमुख राजा. हा शेवटीं विजयी झाला. दाशराज्ञ युद्धाचा ऋग्वेदाच्या सर्व मंडळांत उल्लेख आहे. यावरून संहिताकाळीं हें युद्ध सर्वतोमुखीं झालें होतें असें दिसतें. या युद्धावर विशेष प्रकाश पाडणारीं सूक्तें सातव्या मंडळांत आहेत (ऋ. ७. १८). सुदासाच्या बायकोचें नांव सुदेवी (ऋ. १.११२. १९). पण सुदेवी शब्दाचा हा अर्थ सायणाचार्यांना मान्य नाहीं. ती याला अश्वींच्या कृपेनें प्राप्त झाली होती. याचा एके वेळीं विश्वामित्र पुरोहित होता. विश्वामित्रानें सुदासाकडून एक अश्वमेध करविला होता (ऋ. ३. ५३. ९; ११). सातव्या मंडळांतील सूक्तांवरून वसिष्ठ पुरोहित होता असें दिसतें. विश्वामित्र पुरोहित असतांना सुदास विपाट्छुतुद्रीच्या (बियास सतलज) नद्यांवरून खालीं आला (ऋ. ३. ३३). सुदासविश्वामित्रांचा संबंध स्पष्ट दिला आहे (बृहद्दे. ४. ९९-११०).

ज्या राजांशीं युद्ध झालें त्यांचीं नांवें–१ शिम्यु, २ तुर्वश, ३ द्रुह्यु, ४ कवष, ५ पुरु (पूरु), ६ अनु, ७ भेद, ८ शंभर, ९ वैकर्ण, १० दुसरा वैकर्ण, ११ यदु, १२ मत्स्य, १३ पक्थ, १४ भलानस्, १५ अलिन १६ विषाणिन्, १७ अज, १८ शिव, १९ शिग्रु, २० यक्षु, २१ युध्यामधि, २२ याद्व, २३ देवक मान्यमान, २४ चायमान कवि, २५ सुतुक, २६ उचथ, २७ श्रुत, २८ वृद्ध, २९ मन्यु, ३० पृथु. दाशराज्ञयुद्ध या शब्दांतील दहा हा शब्द अनेक अशा अर्थी दिसतो.

यांपैकीं पुष्कळच नांवांबद्दल मतभेद आहे. १३-१६ हीं नांवें पुरोहितांचीं आहेत, असें सायणाचार्य मानतात. २७-२९ या नांवांच्या अस्तित्वाविषयींहि शंका आहे.

एकंदर दोन सुदास प्रसिद्ध होते. एक अयोध्येचा राजा असून त्याचा पुत्र कल्माषपाद होता व दुसरा सुदास हा उत्तर पांचालांचा राजा असून ऋग्वेदांतील सुदास हाच होय. पण या दोन सुदासांचा घोटाळा शक्ति ऋषीच्या हत्येबद्दलच्या कथेंत केला आहे.

२ (सू. इ.) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें सर्वकामाचा पुत्र. याचा पुत्र मित्रसह (कल्माषपाद पहा).

३ (सो. नील.) विष्णु व वायु यांच्या मतें च्यवनाचा पुत्र. मत्स्यमतें चैद्याचा पुत्र. याचा पुत्र सहदेव. याचें बृहद्रथ असें नामांतर होतें. वंशावळीच्या आत्यंतिक साम्यावरून हाच ऋग्वेदांतील असावा.

४ (सो. कुरु.) तिमिराजाचा पुत्र. याचा पुत्र शतानीक.

५ एक यवन जातीचा राजा (मनु. ७).

६ हा पूर्वजन्मीं एक शूद्र असून या जन्मीं कृतघ्न नामक पिशाच झाला होता. वैशाखव्रताच्या पुण्यानें हा उद्धरला (पद्म. पा. ९८).

**सुदिवातंडि**—एक ऋषि (म. शां. २५०. १६ कुं.).

**सुदीति आंगिरस**—सूक्तद्रष्टा (ऋ. ८. ७१).

**सुदेव**—नलदमयंतींच्या शोधास भीम राजानें पाठविलेला ब्राह्मण. हा दमयंतीच्या भावाचा मित्र होता (म. व. ६५). यानें दमयंतीस शोधून काढिलें (म. व. ६८).

२ स्वारोचिष मन्वंतरांतील देवगण.

३ (सू. इ.) भागवतमतें चंपाचा पुत्र. विष्णु व वायु यांच्या मतें चंचूचा पुत्र.

४ दाशरथि रामाच्या वेळचा विदर्भ देशचा एक राजा. याचे पुत्र श्वेत व सुरथ (वा. रा. उ. ७८. ४).

५ तुषित देवांपैकीं एक.

६ (सो. काश्य.) काशीपति हर्यश्वाचा पुत्र. याचा वीतिहव्यानें पराभव केला. याचा पुत्र दिवोदास (म. अनु. ८. १४ कुं.).

७ एक वैश्य. हा बभ्रुवाहन नांवाच्या राजास प्रेतरूपांत भेटला. 'माझी क्रिया करावयास कोणी नाहीं, करितां हा मणि घे व कार्तिकी पौर्णिमेस वृषोत्सर्ग कर म्हणजे माझा उद्धार होईल,' असें सांगितलें (गरुड. २. ९).

८ अंबरीषाचा सेनापति. अंबरीष स्वर्गांत गेला असतां तेथें त्यानें यास पाहिलें. त्यावरून त्यानें इंद्रास विचारिलें कीं, 'यानें यज्ञ केला नसतांना यास हा लोक कसा प्राप्त झाला?' त्यावरून त्यानें धर्मयुद्धांत मरणारास स्वर्ग मिळतो, असें सांगितलें, यावरून हा धर्मयुद्धांत मेला होता (म. शां. ९८).

९ या राजाची कन्या गौरी. ही करंधमपुत्र अविक्षिताची स्त्री. हिनें त्यास स्वयंवरांत वरिलें (मार्कं. ११९. १६).

१० एक प्रख्यात राजा. याचा धूम्राक्षबंधु नल हा मित्र होता. नलानें दारूच्या धुंदींत च्यवनपुत्र प्रमति याच्या पत्नीस धरिलें. प्रमतीनें जवळच पाहत उभा असलेल्या यास तिचें रक्षण करण्यास सांगितलें. तेव्हां 'मी वैश्य आहें. क्षतांचें रक्षण करणाऱ्या क्षत्रियास तूं बोलाव' असें उत्तर यानें दिलें. तें सहन न होऊन प्रमतीनें नलास शापानें भस्म केलें. तेव्हां सुदेव चपापला व प्रमतीस शरण गेला. म्हणून प्रमतीनें 'तूं वैश्य होशीलच, पण त्याच जन्मांत लवकरच, तुझी कन्या क्षत्रियानें जबरीनें हरण केल्यामुळें क्षत्रिय होशील,' असा शाप दिला. अशा तऱ्हेनें सुप्रभेचा पिता व नाभागाचा सासरा हा सुदेव वैश्य झाला (मार्कं. १२१. ११२).

११ (सो. कुकुर.) भागवत, विष्णु, मत्स्य, वायु व पद्म यांच्या मतें देवकाचा पुत्र.

१२ एक ऋषि. राम आपल्या परिवारासह एकदां याच्या आश्रमांत गेला होता (पद्म. पा. ११७).

**सुदेव काश्यप**—ब्रह्मचाऱ्याचा व्रतभंग झाला असतां प्रायश्चित्त सांगणारा आचार्य (तै. आ. २. १८).

**सुदेवला**—ऋतुपर्णाची स्त्री (बौ. श्रौ. २०. १२).

**सुदेवा**—हिला पतीशीं वाईट वर्तन केल्यामुळें डुकरीचा जन्म आला (पद्म. भू. ४७. ५२).

२ काशीच्या देव राजाची कन्या व इक्ष्वाकूची पत्नी (पद्म. भू. ४२).

**सुदेवि**—मेरुदेवीचें नामांतर (भा. २. ७. १०).

**सुदेवी**—सुदासाची पत्नी.

**सुदेष्ण**—कृष्ण व रुक्मिणी यांचा पुत्र.

**सुदेष्णा**—बलीची भार्या. हिला दीर्घतमा ऋषीपासून अंग, वंग, कालिंग, पुंड्र व सुह्म असे पांच पुत्र झाले (म. आ. ११३. ५१ कुं.; भा. ९. २३; ह. वं. १. ३१).

२ मत्स्याधिप विराटाची स्त्री. कीचकाची बहीण व रथकार केकयाची दुसरी स्त्री मालव्या, तिची ही मुलगी ( म. वि. २१.१६-२० कुं. ). हिचीं मुलें उत्तर व उत्तरा ( म. वि. २१. १९ कुं. ).

३ सुबलकन्या, गांधारीभगिनी व धृतराष्ट्रपत्नी.

**सुद्यु**--( सो. पूरु. ) भागवतमतें चारुपादाचा पुत्र. यास धुंधु व सुद्युम्न अशीं नांवें आहेत.

**सुद्युम्न**—( इल व इला पहा ).

२ मनु व नड्वला यांचा पुत्र.

३ वसिष्ठकुलांतील मंत्रकार.

४ ( सू. इ. ) युवनाश्वाचा पिता ( म. व. १२६.१० कुं. ). यमसभेच्या वर्णनांत सुद्युम्न आहे ( म. स. ८.१६ कुं.; १ लिखित पहा ).

५ सुद्युम्न व सुदर्शना यांना राजस्थलावर समुद्रस्नान केल्यानें पुत्र झाला ( स्कंद. ५. १. १४ ).

**सुधनु**—( सो. ऋक्ष. ) कुरूचा पुत्र. यास मत्स्य व वायु यांच्या मतें सुधन्वा असें नामांतर आहे. चेदि व मगध देशांतील राजघराणीं याच्यापासून उत्पन्न झालीं. याचा वंश अनेक ठिकाणीं आला आहे ( उपरिचर पहा ).

२ एक राजा. हा भारतीययुद्धांत दुर्योधनाच्या बाजूस होता ( म. द्रो. १७-१८ कुं. ).

३ एक पांचाल राजा. हा भारतीय युद्धांत पांडवांचे बाजूस होता ( म. द्रो. २३. ५६ कुं. ). यास द्रोणानें ठार केलें ( म. द्रो. १२२. ४३-४८ कुं. ). याचे घोडे काळे असून निरनिराळ्या रंगांच्या फुलांनीं सुशोभित केलेले होते ( म. द्रो. २३).

**सुधन्वन्**—धनुर्वेद व अर्थशास्त्र यांत निष्णात ब्राह्मण ( वा. रा. अयो. १००.१४ ).

२ इंद्र देशाचा राजा. यानें सीरध्वजाशीं, त्यानें सीतेबद्दल केलेली मागणी नाकारिली म्हणून, युद्ध केलें; त्यांत हा मरण पावला. याची राजधानी सांकाश्या नगरी. याचा पुत्र कंबुग्रीव ( वा. रा. बा. ७१ ).

३ हंसध्वजाचा पुत्र ( २ लिखित पहा ).

४ ( सू. निमि. ) विष्णुमतें शाश्वताचा पुत्र.

५ ( सो. ऋक्ष. ) विष्णुमतें सत्यधृताचा, वायु व भागवत यांच्या मतें सत्यहिताचा व मत्स्यमतें सत्यधृतीचा पुत्र. भागवतांत जह्नु व मत्स्यांत धनुष असें याबद्दल नांव आहे.

**सुधन्वन् आंगिरस**—हा पतंचल काप्याच्या मुलीच्या अंगांत येत असे. यानें अंगांत येऊन भुज्यु लाह्यायनीला विशेष प्रकारचें ज्ञान कथन केलें; तेंच प्रश्नरूपानें वादांत जिंकण्याकरितां त्यानें याज्ञवल्क्याला विचारिलें ( बृ. उ. ३. ३. १ ).

२ अंगिरा ऋषीचा पुत्र ( म. अनु. १३२.४३ कुं. ). केशिनी राजकन्येच्या स्वयंवरप्रसंगीं याचा व विरोचनाचा स्वतःच्या श्रेष्ठत्वाविषयीं वाद झाला. त्यांत यानें त्यास जिंकिलें ( म. स. ९०. ६७-८९; उ. ३५. कुं.; १ विरोचन व केशिनी पहा ).

**सुधर्मन्**—हा राजा दीपव्रतानें संपन्न झाला ( पद्म. उ. ३० ).

२ धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

३ पूर्व दशार्णाचा राजा. दिग्विजयकालीं याच्याशीं झालेल्या युद्धांत भीमानें संतुष्ट होऊन यास सेनाधिपतित्व दिलें ( म. स. ३०. ५-६ कुं. ).

४ ( सो. वृष्णि. ) अक्रूराचा पुत्र.

५ भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय राजा ( म. स. ४. ३४; उ. १५१. ६५; द्रो. १८ कुं. ) यानें भारतीय युद्धांत मेलेल्यांच्या धौम्य, विदुर, युयुत्सु, संजय व इंद्रसेन वगैरेसह क्रिया केल्या ( म. स्त्री. २६. २४ कुं. ).

६ दुर्योधनाचा पुरोहित (म. शां. ३९. ५; ४३. १४ कुं. ).

७ एक राजा. भारतीय युद्धांत हा दुर्योधनपक्षीय संशप्तक होता ( म. द्रो. १७. १८ कुं. ).

८ ( सो. द्विमीढ. ) मत्स्यमतें दृढनेमीचा पुत्र. वायुमतें सुवर्मन् असें याचें नांव आहे.

९ रुद्रसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

१० पृथु राजाच्या वेळचा दिक्पाल ( मत्स्य. ८. ९ ).

११ दक्षसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

१२ रौच्य मन्वंतरांतील देवगण.

१३ प्रतर्दन देवांपैकीं एक.

१४ ( ३ भद्रसेन पहा ).

**सुधर्मा**--सोमकांताची स्त्री.

२ मातलीची स्त्री. हिची कन्या गुणकेशी ( म. उ. ९७. १९ कुं. ).

**सुधा**—काल नामक रुद्राची स्त्री (भा. ३. १२. १३).

**सुधामन्**--( स्वा. प्रिय. ) घृतपृष्ठाच्या पुत्रांपैकीं एक. याचा देश क्रौंच द्वीपांत होता ( भा. ५. २०.२१ ).

२ चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

४ लोकाक्षिन् नामक शिवावताराचा शिष्य.

५ नारायण नामक शिवावताराचा शिष्य.

६ उत्तम मन्वंतरांतील देवगण. हे बारा आहेत. इष, ऊर्ज, क्षम, क्षाम, सत्य, दम, दांत, धृति, ध्वनि, शुचि, श्रेष्ठ व सुपर्ण ( ब्रह्मांड. २. ३६. २८ ).

७ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

**सुधार्मिक**—केरलाधिपति. याचा पुत्र चंद्रहास.

**सुधावत्**—पितरांपैकीं एक.

**सुधी**—तामस मन्वंतरांतील देवगण.

**सुधृति**—( सू. दिष्ट. ) विष्णु व भागवत यांच्या मतें राज्यवर्धनाचा पुत्र.

२ ( सू. दिष्ट. ) भागवतमतें दमाचा पुत्र.

३ ( ८ सत्यधृति पहा ).

**सुनक्षत्र**—( सुकृत्त पहा ).

२ ( सू. इ. भविष्य. ) वायुमतें सहदेवाचा पुत्र. मत्स्य, भागवत व विष्णु यांच्या मतें मरुदेवाचा पुत्र.

**सुनंद**—( प्रद्योत. भविष्य. ) भविष्यमतें प्रद्योताचा पुत्र. येथून पुढें भविष्यपुराणांत भविष्य सांगण्यास सुरवात झाली व आतां म्लेच्छमय होणार असल्यामुळें अठ्ठयांयशी हजार नैमिषारण्यांतील ऋषि हिमालयावर गेले. तेथें विशाला नगरींत विष्णुगाथा सांगितली ( भवि. प्रति. १. ४ ).

२ या ब्राह्मणानें गीतेच्या अकराव्या अध्यायाच्या सामर्थ्यानें अनेकांवरचीं संकटें दूर केलीं ( पद्म. उ. १८५ ).

३ विष्णूचा एक पार्षद ( भा. २. ९. १४ ).

४ एक गोप. याच्या घरीं उग्रतप नांवाच्या तपस्व्यानें याची कन्या म्हणून जन्म घेतला. तिचें नांव सुनंदा ( पद्म. पा. ७२ ).

**सुनंदन**—( आंध्र. भविष्य.) भागवतमतें पुरीषभीरूचा पुत्र.

**सुनंदा**—( ४ सुनंद पहा ).

२ नीलध्वज राजाची स्त्री ( जै. अ. ६१ ).

३ जनमेजयाची स्त्री. हिचा पुत्र प्राचीन्वत् ( म. आ. ६३. १० कुं. ). ही मागधी या नांवानें प्रसिद्ध होती.

४ भरतपत्नी काशेयी सार्वसेनी (म. आ. ६३.३४ कुं.).

५ शैब्या सुनंदा ही प्रतीपाची स्त्री होय.

६ ( ४ सुबाहु पहा ).

**सुनय**—( सो. कुरु. भविष्य. ) परिप्लवपुत्र. याचा पुरोहित काश्यप प्रमति दिला आहे ( मार्क. ११४ ).

२ ( सू. निमि. ) विष्णु व वायु यांच्या मतें ऋताचा पुत्र. भागवतांत शुनक असें याचें नांव आहे.

**सुनर्तकनट**—हा एक शंकराचा अवतार आहे. तप करणाऱ्या पार्वतीला 'मी तुला वरीन' असें आश्वासन देऊन डाव्या हातांत शिंग, उजव्या हातांत डमरू, पाठीवर तांबडी गोधडी घेऊन नाचत, गात हा मेनेच्या अंगणांत आला व इतर कांहीं न घेतां यानें पार्वतीची भिक्षा मागितली. शेवटीं हिमालयाला तें समजून पार्वती याला देण्यांत आली ( शिव. शत. ३४ ).

**सुनहोत्र**—( २ सुहोत्र पहा ).

**सुनाभ**—( सो. विदू. ) मत्स्यमतें अजाताचा पुत्र.

२ कटदेशाधिप. दिग्विजयकालीं यास अर्जुनानें जिंकिलें ( म. स. २७. १२ कुं. ).

३ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें मारिलें ( म. भी. ८८. १३ कुं. ).

४ वज्रनाभ दानवाचा भाऊ. याला चंद्रवती व गुणवती अशा दोन मुली असून त्या अनुक्रमें गद व सांब यांनीं याला ठार करून पळविल्या ( ह. वं. २. ९७ ).

**सुनामन्**—कंसाचा भाऊ. यास बलरामानें मारिलें ( भा. ९. २४. २४; म. स. १४. ३५; ५४. २५ कुं. ).

२ गरुडाचा पुत्र.

३ द्रौपदीस्वयंवरास आलेला सुकेतूचा पुत्र ( म. आ. २०१. ९ कुं. ).

४ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें लोकाक्षीचा शिष्य ( व्यास पहा ).

**सुनीक**—तिसऱ्या शुनकाचें नामांतर.

**सुनीत**—( ६ सुनीथ पहा ).

**सुनीति**—उत्तानपादाची पत्नी. हिला सूनृता असेंहि नामांतर आहे. हिचे पुत्र ध्रुव व कीर्तिमत् ( भा. ४. ८. ८ ).

**सुनीथ**—कापटवाचा शिष्य. याचा शिष्य कोहल ( वं. ब्रा .१ ).

२ ( सो. काश्य. ) भागवतमतें संततीचा, विष्णु व वायु यांच्या मतें सन्नतीचा पुत्र.

३ ( सो. द्विमीढ. ) मत्स्यमतें क्षेमाचा पुत्र. भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें याचें नांव सुवीर.

४ शिशुपालाचें नामांतर (म. स. ८. ११; ४२. ६ कुं.).

५ ( सो. कुरु. भविष्य. ) हा सुषेणपुत्र होय. वायुमध्यें याचे ऐवजीं सुतीर्थ असें नांव पडलें आहे.

६ ( सो. मगध. भविष्य. ) भागवतमतें सुबलाचा पुत्र. विष्णुमतें सुनीत, वायु व ब्रह्मांड यांत सुनेत्र असा पाठ आहे.

**सुनीथ शौचद्रथ**—याने वाय्य सत्यश्रवसला उषेकडून प्रकाश प्राप्त झाल्याचें दिलें आहे ( ऋ. ५. ७९. २; सत्यश्रवस् पहा ).

**सुनीथा**—यमाची कन्या व अंग राजाची पत्नी (भा.१४. १३. १८ ). हिनें बालपणीं तप करणाऱ्या सुशंख नामक गंधर्वास जाणून बुजून त्रास दिला म्हणून हिला वेनासारखा दुष्ट पुत्र झाला. हिचें लग्नहि मोहिनीविद्येच्या साहाय्यानें झालें होतें (पद्म. सृ. ८; भू. ३०-३६ ).

**सुनेत्र**—किष्किंधेंतील एक वानर ( वा. रा. किं. ३३ ).

२ रौच्य मनूचा पुत्र.

३ गरुडाचा पुत्र.

४ ( ६ सुनीथ पहा ).

**सुनेत्रा**—कश्यपाची भार्या.

**सुंद**—( सुंदोपसुंद पहा ).

२ ताटकेचा पति. यांचे पुत्र सुबाहु व मारीच.

**सुंदर**—वीरबाहु गंधर्वाचा पुत्र. हा वसिष्ठशापानें राक्षस झाला. पण वसिष्ठानें दिलेल्या उःशापानें ५६ वर्षांनीं विष्णूच्या चक्रानें नाश पावल्यावर मुक्त झाला ( स्कंद. २. १. २४ ).

**सुंदर शातकर्णि**—( आंध्र. भविष्य. ) विष्णुमतें अरिष्टसेनाचा पुत्र.

**सुंदर शांतिकर्ण**—( आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें सोम्याचा पुत्र.

**सुंदरा**—सार्वभौमाची स्त्री. हिला कैकयी असें नामांतर होतें. हिचा पुत्र जयत्सेन ( म. आ. ६३. १५ कुं. ).

**सुंदरी**—शिवमंदिरांतील केर काढिल्यानें हिचा उद्धार झाला ( स्कंद. [illegible] ).

२ नर्मदेची कन्या व माल्यवताची पत्नी.

**सुंदोपसुंद**—हिरण्यकशिपूच्या वंशांतील निकुंभ नामक दैत्याचे पुत्र. या उभयतांनीं विंध्य पर्वतावर मोठें उग्र तप केलें. त्याच्या योगानें ब्रह्मदेवापासून यांस माया, अस्त्र, विद्या, अतुल बल, वाटेल तें रूप घेण्याचें सामर्थ्य व एकमेकांस न मारितां अमर राहण्याची शक्ति मिळाली. हे दोघे एकमेकांवर फार प्रेम करीत. परंतु यज्ञयाग सिद्धीस जाऊं देईनात व ऋषींसहि जिवंत राहूं देईनात. याप्रमाणें जेव्हां अतिशय सर्वत्र त्रास झाला, तेव्हां हें गाऱ्हाणें ब्रह्मदेवाच्या कानापर्यंत जाऊन या उभयतांमध्यें कलह उत्पन्न होण्याकरितां त्यानें विश्वकर्म्याकरवीं एक अति लावण्यवती स्त्री निर्माण करविली. तिचें सौंदर्य पदार्थमात्रांतील तिळतिळ सौंदर्य घेऊन तयार केलें असल्यामुळें तिला तिलोत्तमा असें नांव पडलें. पुढें तिला आज्ञा केल्यावरून ती या उभय बंधूंच्या दृष्टीस पडली. त्यामुळें दोघांचा तिजकरितां कलह होऊन हे एकमेकांस मारून मेले. ही गोष्ट नारदानें युधिष्ठिरादि पांडवांस एक पत्नी जी द्रौपदी तिजमुळें भांडूं नका असें [illegible]तव सांगितली ( म. आ. २०८-२१२ ).

**सुन्वत्**—सुमंतूचा पुत्र. यास जैमिनीनें सामवेदाची एक संहिता शिकविली ( भा. १२.६.७५; व्यास पहा ).

**[illegible]**—अजित देवांपैकीं एक.

**सुपथ**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**सुपर्ण**—एक ऋषि. याचा पितरांशीं संबंध आहे ( तै. सं. ४. ३. ३. २.; क. सं. ३९. ७ ).

२ ज्या वेळीं ब्रह्मदेवाचा तिसरा वाचिक जन्म झाला त्या वेळीं एक धर्म नारायणापासून पुनः प्रकट झाला, हाच धर्म ब्रह्मदेवाच्या पहिल्या जन्माचे वेळीं नारायणापासून झाला होता. पुढें हा धर्म सुपर्ण नांवाच्या ऋषीनें दम, नियम व अत्युत्कृष्ट तप यांच्या जोरावर नारायणापासून संपादन केला. हा ऋषि या धर्माच्या रोज तीन आवृत्या करी. म्हणून या धर्मास त्रिसौपर्ण असें नांव पडलें. या व्रताचा उल्लेख ऋग्वेदांत ‘चतुष्कपर्दा युवति’ ( ऋ. १०. ११४. ३ ) इत्यादि तीन मंत्रांत आहे. हा धर्म पुढें सुपर्णापासून वायूनें घेतला ( म. शां. ३५८. २१-२३ कुं. ).

३ गरुडाचें नामांतर. सुपर्णानें सोम आणिला व गरुडानें अमृत आणिलें. या वैदिक पौराणिक कथा मूळ एकच होत. त्यांचा सूर्याशीं संबंध आहे ( श. ब्रा. १०. २. २. ४ ).

४ कश्यप व प्राधा यांचा पुत्र.

५ ( सू. इ. भविष्य. ) वायुमतें अंतरिक्षाचा पुत्र.

६ सुधामन् देवांतील एक.

**सुपर्ण काण्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ५९ ).

**सुपर्ण तार्क्ष्यपुत्र**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १४४ ).

**सुपर्णा**—विनतेचें नामांतर. शिवमाहात्म्याकरितां हिच्या कथेचा उपयोग केला आहे ( ब्रह्म. १०० ).

**सुपर्णी**—देवांनीं स्वर्गांतून सोम आणावा म्हणून सुपर्णी व कद्रू यांना उत्पन्न केलें. नंतर यांचें भांडण लागलें. ‘दूरच्यांत दूरचें कोण पाहूं शकतो’ यावर यांनीं आपल्या भांडणाचा निकाल सोंपविला. सुपर्णी म्हणाली ‘समुद्राच्या पलीकडे खांबाला बांधलेला घोडा मला दिसतो आहे.’ पण कद्रू म्हणाली, ‘त्याचें हलणारें शेंपूट मला दिसतें आहे.’ खात्री करितां सुपर्णीचा जय झाला. याचें तात्त्विक स्पष्टीकरणहि तेथें आहे ( श. ब्रा. ३. ५. १. १-७; कद्रू पहा ). या शब्दाचा अर्थ वाणी असाहि केलेला आहे ( श. ब्रा. उ. ३.२.२ ).

**सुपर्वन्**—एक राजा. भारतीय युद्धांत हा पांडवांच्या बाजूस होता. यानें रुचिपर्व्यास मारिलें ( म. द्रो. २६. ५३ कुं. ).

२ ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील मनूचा पुत्र.

**सुपाटल**—रामसेनेंतील एक वानर ( वा. रा. किं. ३३ ).

**सुपार**—रुद्रसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

**सुपार्श्व**—( सो. द्विमीढ. ) मत्स्य व वायु यांच्या मतें रुक्मरथाचा पुत्र, भागवत व विष्णु यांच्या मतें दृढनेमीचा

पुत्र. भागवत व विष्णु यांत दृढनेमीपासून सुपार्श्वापर्यंतच्या मधल्या पिढ्या गाळल्या आहेत.

२ ( सू. निमि. ) विष्णुमतें श्रुतायूचा पुत्र. भागवतमतें यास सुपार्श्वक म्हटलें आहे.

३ दुर्योधनपक्षीय राजा.

४ रावणाचा अमात्य. यानें इंद्रजितवधानंतर सीतावधास प्रवृत्त झालेल्या रावणास निवृत्त केलें ( आ. रा. सार. ११ ).

५ पूर्वजन्मीं कपटासुर असलेला राजा ( म. आ. ६८. ३९ कुं. ).

६ संपातीचा पुत्र ( वा. रा. कि. ६० ). यानें रावणापासून सीतेला सोडविलें नाहीं म्हणून संपाति रागावला असतां हा भीतीनें पळून गेला ( आ. रा. सार. ८ ).

**सुपार्श्वक**--( २ सुपार्श्व पहा ).

२ ( सो. वृष्णि. ) अक्रूराचा पुत्र.

३ ( सो. वसु. ) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.

**सुपुंजिक**--विप्रचित्ति व सिंहिका यांचा पुत्र. याला परशुरामानें मारिलें ( ब्रह्मांड. ३. ६. १८-२२ ).

**सुप्तघ्न**--रावणाच्या बाजूचा राक्षस ( वा. रा. यु. ९ ).

**सुप्रचेतस्**--प्रसुत देवांतील एक.

**सुप्रज्ञा**--( कोचरश पहा ).

**सुप्रतीक**--( सो. सह. ) हा दुर्जयामित्रकर्षणाचा मुलगा होय. हा उर्वशीचा मुलगा असावा. यानें व याच्या भावांनीं गंधर्वकन्यांशीं विवाह केला होता ( कूर्म. १. २६ ).

२ ( सू. इ. भविष्य. ) भागवतमतें प्रतीकाश्वाचा, विष्णुमतें भानुरथाचा व भविष्यमतें भानुरत्नाचा पुत्र. यासच वायुमतें सुप्रतीत व मत्स्यमतें सुप्रतीप असे नामभेद आढळतात.

३ एक ऋषि. हा भावाच्या शापानें गज झाला होता ( ५ विभावसु पहा ).

४ ऐरावताचा पुत्र दिग्गज ( म. भी. १२. ३४ कुं. ). यास भद्र असें नामांतर आहे. हा हिरवा असून वरुणाचें वाहन आहे.

५ ( नाग. भविष्य. ) वायुमतें मथुरानगरींत राज्य करणाऱ्या भूमिनंदाचा पुत्र.

६ कृतयुगांतील एक राजा. याला दोन बायका होत्या. विद्युत्प्रभा व कांतिमती. अत्रियाच्या कृपेनें इंद्र विद्युत्प्रभेच्या पोटीं आला. त्याचें नांव दुर्जय.

**सुप्रतीक औलुण्ड्य**--बृहस्पति गुप्त कायस्थीचा शिष्य. याचा शिष्य मित्रवर्चस् स्थैरकायन ( वं. ब्रा. १ ).

**सुप्रतीत**--( २ सुप्रतीक पहा ).

**सुप्रतीप**--( २ सुप्रतीक पहा ).

**सुप्रभा**--स्वर्भानु ऊर्फ राहूची कन्या. नमुचीची पत्नी.

२ वदान्याची कन्या. अष्टावक्राची पत्नी.

३ सुरथ राजर्षीची कन्या. ही नाभागाची पत्नी. अगस्त्य नांवाच्या अगस्त्य ऋषीच्या भ्रात्यास तो वन्यफळें गोळा करीत असतांना हिनें चिडवून कोपविलें. तेव्हां त्यानें हिला वैश्या होण्याचा शाप दिला. 'पण वैश्य योनींत उत्पन्न होऊन पुत्रास राज्यसंबंधीं उपदेश केल्यानंतर पतीसह क्षत्रिय व्हावें,' असा हिनें उःशाप मिळविला. पुढें नाभाग राज्यत्याग करून भलंदनास राज्य करण्यास सांगूं लागला. 'आपण वैश्य कन्येशीं लग्न लावून वैश्य झाल्यामुळें शास्त्रदृष्ट्या राज्य करितां येत नाहीं.' हें ऐकून वरील हकीगत हिनें सांगून तो क्षत्रिय कायम असल्याचें सांगितलें. हिचें दुसरें नांव कृपावती होय ( मार्क. ११२ ).

४ कृशाश्व प्रजापतीच्या दोन कन्यांतील एक. जयेची ही भगिनी ( वा. रा. बा. २१ ).

५ राजा आर्ष्टिषेण व जया यांच्या भर नांवाच्या पुत्राची स्त्री.

**सुप्रवृद्ध**--जयद्रथाचा भाऊ.

**सुप्लन् सार्ञ्जय**--( सहदेव सार्ञ्जय पहा ).

**सुबंधु गौपायन** अथवा **लौपायन**--सूक्तद्रष्टा ( ऋ. ५. २४. २, १०. ५७-६०; असमाति राथप्रोष्ठ पहा ).

**सुबल**--सोमकांताचा प्रधान ( गणेश. १. २९ ).

२ भौत्य मनूचा पुत्र.

३ गांधार देशाधिपति. याचे पुत्र शकुनि, वृषक व बृहद्बल होत. गांधारी, सत्यव्रता, सत्यसेना, सुदेष्णा, संहिता, तेजश्रवा, सुश्रवा, निकृति, शुभा, शंभुवा व दशार्णा या याच्या कन्या होत ( म. आ. ११९. २२-२४ कुं. ).

४ ( सो. मगध. भविष्य. ) भागवत व विष्णु यांच्या मतें सुमतीचा पुत्र.

५ बलराम व कृष्ण यांचा मित्र ( भा. १०. १५. २०; २२. ३१ ).

६ हंसध्वजाचा पुत्र.

७ ( सुभग पहा ).

**सुबालक**--ब्रह्मदत्ताच्या मंत्र्याचा पुत्र.

**सुबाहु**--रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ कश्यप व प्राधा यांची कन्या.

३ कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

४ वीरबाहूचा पुत्र व चेदि देशाचा राजा. याच्याच येथें दमयंती सैरंध्री बनून राहिली होती ( म. व. ६२. ४५; ६६. १५ कुं. ).

५ सुंद व ताटका यांचा पुत्र. हा विश्वामित्राच्या यज्ञांत

विश्वंस [illegible] आला असतां यास रामानें ठार केलें ( म. स. ५०. ५ कुं. ).

६ रामाच्या सैन्यांतील एक वानर.

७ चक्रांग नगरीचा राजा. अश्वमेधीय अश्व अडविल्यानंतर याचें शत्रुघ्नाच्या सैन्याशीं युद्ध झालें. त्यांत याचा पुत्र [illegible] मरण पावला व यास मारुतीनें मूर्च्छित पाडिलें. नंतर राममाहात्म्य ध्यानीं येऊन यानें आपलें राज्य आपला ज्येष्ठ पुत्र दमन यास देऊन आपण अश्वसंरक्षणार्थ निघाला. यास विचित्र नांवाचा एक भाऊ होता. असितांगानें यास रामाची हकीकत सांगितली असतां, यानें रामास 'विषयी' म्हटलें, म्हणून यास असितांगानें शाप देऊन संसारमग्न केलें होतें; पण या युद्धांत मारुतीच्या पादस्पर्शानें हा मुक्त झाला ( पद्म. पा. २८-२९ ).

८ ( सू. इ. ) शत्रुघ्नाचा पुत्र. याची स्त्री सत्यवती ( पद्म. पा. ६७ ). यास शत्रुघ्नानें मधुरा अथवा मथुरा येथील राज्य दिलें ( वा. रा. उ. १०८ ). यास श्रुतसेन नांवाचा भाऊ होता ( भा. ९. ११. ११ ).

९ ऋतध्वज व मदालसा यांचा पुत्र. यानें आपला ज्येष्ठ बंधु अलर्क यावर स्वारी केली पण त्यानें आपण होऊन राज्य याचे स्वाधीन केलें ( मार्क. ४१ ). यानें आपली कन्या शशिकला सुदर्शनास दिली होती ( दे. भा. ३. २१. २२ ).

१० किरात, तंगण व कुलिंद यांचा अधिपति. अर्जुनास भेटावयास जात असतां तिथे पांडव व द्रौपदी खेरीज इतरांस युधिष्ठिरानें याच्याकडेच ठेविलें होतें ( म. व. १४२; १७९. ११ कुं. ).

११ ( सो. वृष्णि. ) अक्रूराच्या पुत्रांपैकीं एक.

१२ कृष्ण व कालिंदी यांचा पुत्र.

१३ दुर्योधनपक्षीय एक राजा. हा संशप्तक होता. युयुत्सूनें भारतीय युद्धांत याचे हात तोडिले ( म. द्रो. २५. १३-१४ कुं. ).

१४ (सो. कुरु.) धृतराष्ट्राच्या पुत्रांपैकीं एक. यास भीमानें मारिलें ( म. भी. ९६. २७; क. ४६. १८-२१ कुं. ).

१५ या चोल राजाची कथा दानमाहात्म्याकरितां आली आहे ( पद्म. भू. ९४-९९ ).

१६ एक क्षत्रिय. याची पत्नी चंद्रकला ( पद्म. क्रि. ५ ).

**सुबुद्धि**—बभ्रुवाहनाचा मंत्री.

**सुभग**—सुबल राजाचा एक पुत्र. यास रात्रियुद्धांत भीमानें मारिलें ( म. द्रो. १५८. २४-२५ कुं. ).

**सुभगा**—कश्यप व प्राधा किंवा अरिष्टा यांची कन्या.

**सुभद्र**—( स्वा. प्रिय. ) इध्माजिह्वाचा पुत्र. याचा वर्ष प्लक्षद्वीपांत होता ( भा. ५. २०. ३ ).

२ ( सो. वसु. ) वसुदेव व पौरवी यांचा पुत्र.

३ कृष्ण व भद्रा यांचा पुत्र.

४ एक गोप. सत्यतपस् मुनीनें याच्या घरीं याची कन्या म्हणून जन्म घेतला. तिचें नांव भद्रा ( पद्म. पा. ७२ ).

५ मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**सुभद्रक**—रुद्रगणांपैकीं एक.

**सुभद्रा**—शांताची कन्या व दुर्गमाची स्त्री ( मार्क. ७२. ४५ ).

२ बलिकन्या व अवीक्षिताची स्त्री ( मार्क. ११९. १६ ).

३ वसुदेव व देवकी यांची कन्या. पण स्कंदांत हिची माता सुप्रभा ही दिली आहे. बलरामानें हिला दुर्योधनास देण्याचें ठरविलें. पण अर्जुनानें हिला यतिवेषानें पळविलें. पळून जात असतां हिनें अर्जुनाचें सारथ्य केलें होतें. पुढें अर्जुनाच्या संमतीनें गोपीच्या वेषांत द्रौपदीकडे जाऊन हिनें आशीर्वाद मिळविला (म. आ. २४१-२४६). नंतर कृष्णानें रागावलेल्या बलरामाचें सांत्वन करून या दोघांस कुंती, युधिष्ठिर व विदुर यांच्या परवानगीनें द्वारकेस नेलें व तेथें यथोचित विवाह केला ( म. आश्व. ५२ ). लग्नसमयीं कृष्णानें पुष्कळ द्रव्य, हजार सुवर्णरथ, दहा हजार दुभत्या गाई, हजार सुवर्णालंकृत घोड्या, पांचशें खेचरी, हजार तरुण व गौरवर्ण दासी, लक्ष बाल्हीकदेशीय घोडे, दहा ओझीं सोनें व हजार उन्मत्त हत्ती अहेर म्हणून अर्पण केले ( म. आ. ६३. २१८-२२१ ). हिचा पुत्र अभिमन्यु. हीं गतजन्मीं माधवी होती. शेवटीं गालवानें विष्णूस अर्पण करण्याकरितां नेली असतां बालस्वभावानें ही विष्णूच्या गादीवर बसली. हें लक्ष्मीस सहन न होऊन तिनें 'अश्वमुखी जन्मास येशील' असा हिला शाप दिला. पण कृष्णबलरामांनीं ब्रह्मधाकडून हिला सुभद्र करून घेतलें म्हणून हिचें नांव सुभद्रा पडलें होतें ( स्कंद. ६. ८१; ८४; १ अर्जुन पहा ).

**सुभय**—सुपुष्पित राजाचा पिता.

**सुभा**—अंगिरसाची पत्नी. कुंभकोणम् प्रतींत वसुदा असें नांव आहे ( म. व. २२१. १ कुं.; २ वसुदा व १ शिवा पहा ).

**सुभानु**—कृष्ण व सत्यभामा यांचा पुत्र.

**सुभाल**—वीरवर्म्याचा पुत्र.

**सुभाषण**—( सू. निमि. ) भागवतमतें युयुधानाचा पुत्र. हाच विष्णुमतें सुधन्व्याचा पुत्र सुभास होय.

**सुभीमा**—कृष्णाची स्त्री ( पद्म. सृ. १३ ).

**सुभुजा**—कश्यप व मुनि यांची कन्या. एक अप्सरा.

**सुभ्राज्**—वैवस्वत मनूचा पुत्र (म.आ. १. ५६ कुं.)
**सुभ्राज**—सूर्यामागें असणारा स्कंदाचा पार्षद ( म. श. ४६. ३१ कुं. ).
**सुभ्रू**--( सो. वसु. ) वसुदेव व रोहिणी यांचा पुत्र.
**सुमंगल**—अत्रिकुलांतील एक ऋषि.
**सुमंजस्**—शिव देवांतील एक.
**सुमति**—( स्वा. प्रिय.) भरत व पंचजनी यांचा पुत्र. हा ऋषभदेवाच्या मार्गानें मुक्त झाला. जैन लोक यास देवता मानितात. याला वृद्धसेना व आसुरी अशा दोन स्त्रिया होत्या. त्यांपासून यास अनुक्रमें देवताजित् व देवद्युम्न हे पुत्र झाले ( भा. ५. १५. १-३ ).
२ ( सू. इ. ) भागवतमतें नृग राजाचा पुत्र.
३ ( सू. दिष्ट.) भागवतमतें सोमदत्ताचा पुत्र. याचा पुत्र जनमेजय. हा विशाल नगरींत दशरथाचे काळीं राज्य करीत होता ( भा. ९. २. ३७ ). विष्णुमतें याचें नांव स्वमति व वायुमतें प्रमति असून हा जनमेजयाचा पुत्र दिला आहे. रामलक्ष्मण विश्वामित्राबरोबर मिथिलेला निघाले, तेव्हां याची व त्यांची भेट झाली होती ( वा. रा. बा. ४८ ).
४ विदर्भकन्या व सगर राजाची धर्मपत्नी ( भा. ९. ८. ९ ). हिचें दुसरें नांव महती ( ब्रह्म. ८. ६४ ) किंवा प्रभा. हिला और्वकृपेनें साठ हजार पुत्र झाले (पद्म. उ. २०-२१). अन्यत्र शंकराच्या वरानें हिला भोपळा झाला व त्या भोपळ्यांतील बियांचे साठ हजार पुत्र झाले असें आहे (म. व. १०५-१०६ कुं.). शिवाय शंकरप्रसादानें शंभर वर्षांनीं एक मांसपिंड झाला व त्याच ब्राह्मणरूपी शंकरानें त्याचे साठ हजार पुत्र केले असेंहि आढळतें ( ब्रह्मवै. २. ६१. १० ).
५ ( सो. पूरु. ) भागवतमतें रंतिभाराचा पुत्र. याचा पुत्र रैभ्य.
६ (सो. द्विमीढ.) सुपार्श्वाचा पुत्र. याचा पुत्र सन्नतिमत्.
७ ( सो. मगध. भविष्य. ) भागवतमतें द्युमत्सेनाचा पुत्र. मत्स्यमतें याचें नांव महीनेत्र.
८ युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञांतील एक ऋषि ( भा. १०. ७४. ८ ).
९ रामपुत्र लवाची स्त्री.
१० हंसध्वज राजाचा मुख्य प्रधान.
११ बभ्रुवाहनाचा सेनापति.
१२ सावर्णि मनूचा पुत्र.
१३ वरुणसभेंतील असुर ( म. स. ९. २७ कुं. ).
१४ ( स्वा. प्रिय. ) भागवतमतें गयाचा पुत्र.
१५ नलाचा पुरोहित ( परा. मा. प्रस्तावना ).
१६ भृगुकुलोत्पन्न एका ब्राह्मणाचा मुलगा. याला आपल्या दहा हजार जन्मांची आठवण होती. यानें आपल्या पित्याला ज्ञान सांगितलें ( मार्क. १०. १०-१८ ).
१७ अमिताभ देवांपैकीं एक.
१८ आभूतरजस् देवांपैकीं एक.
१९ व्यासाच्या पुराणशिष्यपरंपरेंतील विष्णु व ब्रह्मांड यांच्या मतें रोमहर्षणाचा शिष्य.
२० सुबाहूचा प्रधान ( पद्म. पा. २६ ).
२१ हा दुष्ट महाराष्ट्रीय ब्राह्मण वेंकटाचलावरील स्वामी पुष्करिणीतीर्थांत स्नान केल्यानें मुक्त झाला ( स्कंद. २. १. १४ ).
२२ हा दुराचारी ब्राह्मण पापविनाशन तीर्थांत स्नान केल्यानें मुक्त झाला ( स्कंद. ३. १. १० ).
**सुमद्**—कामाक्षी देवीच्या सांगण्यावरून या राजानें शत्रुघ्नास राज्य दिलें ( पद्म. पा. १२-१३. ).
**सुमध्यमा**--मदिराश्वाची कन्या व हिरण्यहस्ताची स्त्री.
**सुमन**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.
**सुमनस्**—( स्वा. उत्तान. ) उल्मुक व पुष्करिणी यांचा पुत्र.
२ रुद्रसावर्णि मन्वंतरांतील देवगण.
३ प्रसूत देवांतील एक.
४ वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार.
५ माणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.
६ वरुणसभेंतील एक असुर ( म. स. ९. १७ कुं. ).
७ यमसभेंतील राजा ( म. स. ८. १२ कुं. ).
८ धर्मसभेंतील किरातधिप ( म. स. ४. ३१ कुं. ).
९ ( पितृवर्तिन् पहा ).
**सुमना**-दशार्णाधिप चारुवर्मन्‌ची कन्या. हिनें स्वयंवरांत नरिष्यंतपुत्र दमास वरिलें. हिजवर मद्रराजपुत्र महानाद व विदर्भराज संक्रंदनपुत्र वपुष्मत् या दोघांचें प्रेम होतें. पण हिनें दमास वरिल्याचें पाहून त्यांनीं हिला पळविलें. पुढें दमानें त्यांचा पराभव करून हिजशीं विवाह केला ( मार्क. १३० ).
२ च्यवनाची कन्या. हिचा पति सोमशर्मन्.
३ मधूची पत्नी व वीरव्रताची माता.
४ या केकयराजकन्येचा पातिव्रत्यावर शांडिल्येशीं संवाद झाला ( म. अनु. १८५).
**सुमंत**—( सो. अनु. ) कूर्ममतें कौशिकाचा पुत्र.
**सुमंतु**--व्यासाचा अथर्ववेदाचा शिष्य. हा मयसभेंत होता. यानें शतानीकाला भविष्यपुराण सांगितलें ( भवि. ब्राह्म. १ ).

२ भीम राजाचा प्रधान ( १३ भीम पहा ).

३ व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील जैमिनीचा शिष्य.

४ अट्टहास नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

५ एक स्मृतिकार. याचे गद्य व क्वचित् पद्य उतारे आढळतात. मिताक्षरेंत ब्रह्महत्या ( ३. २३७ ), मद्यपान ( ३.२५० ), सुवर्णापहार ( ३.२५२ ), परदारागमन ( ३.२५३ २५४ ), गोहत्या ( ३. २६१ ) इत्यादि विषयांवर याचे उतारे आहेत. विश्वरूपानें याचे उतारे घेतले आहेत. सरस्वतीविलासांत व्यवहारविषयक याचे अनेक श्लोक आले आहेत.

**सुमंतु बाभ्रव गौतम**—वासिष्ठ आरिहण्य राजन्याचा शिष्य व शूष वाह्नेय भारद्वाजाचा गुरु ( वं. ब्रा. २ ).

**सुमंत्र**—दशरथाच्या अष्टप्रधानांपैकीं एक. हा रामाच्या अरण्यवासाच्या वेळीं भागीरथीपर्यंत त्याला पोहोंचविण्यास गेला होता. तसेंच रामाच्या अश्वमेधप्रसंगीं रामानें आपल्या पराक्रमी नऊ वीरांना अश्वाचें रक्षण करण्याकरितां शत्रुघ्नाबरोबर पाठविण्याची याला आज्ञा केली होती ( पद्म. पा. ११ ).

**सुमन्यु**—यानें शांडिल्यास भक्ष्यभोज्याचे पर्वतप्राय ढीग दान केले ( म. अनु. २००. २२ कुं. ).

**सुमहायशस्**—( सो. नील. ) हा मुद्गलपुत्र होय. याबद्दल ब्रह्मिष्ठ असें विशेषनाम धरावें कां हें विशेषनाम धरावें याबद्दल शंका येत.

**सुमागध**—रामसभेंतील एक हास्यकार.

**सुमालि**—वृत्राचा एक अनुयायी ( भा. ६. २०. २१ ).

२ रावणाचा मातामह. याची पत्नी केतुमती. याची कन्या कैकसी अथवा केशिनी. शिवाय राका, पुष्पोत्कटा, बलाका व कुंभीनसी या याच्या मुली विश्रव्यास दिल्या होत्या ( १ विश्रवस् व १ माल्यवत् पहा ).

३ कश्यप व खशा यांचा पुत्र.

**सुमाल्य**—( ५ नंद पहा ).

**सुमित्र**—( सू. इ. भविष्य. ) विष्णु, वायु व भागवत यांच्या मतें सुरथाचा पुत्र. या कुलांतील हा शेवटचा राजा होय.

२ ( सो. वृष्णि. ) विष्णु, पद्म, वायु व भागवत यांच्या मतें वृष्णीचा ज्येष्ठ पुत्र. यासच अनमित्र हें नांव होतें.

३ शमीक व सुदामिनी यांचा पुत्र ( भा. ९. २४.४४ ).

४ कृष्ण व जांबवती यांचा पुत्र. हा यादवींत मरण पावला.

५ एक हैहय राजा. याचा ऋषभ ऋषीबरोबर आशा या विषयावर संवाद झाला होता ( म. शां. १२५. ९ कुं. ).

६ पुलिंद नगरच्या राजाच्या बंधूचें नांव. यास दिग्विजयकालीं भीमानें वश केलें होतें ( म. स. ३०. २० कुं. ).

७ ( सुमित्र वाध्र्यश्व पहा ).

८ अर्जुनानें पराजित केलेला सौवीर देशीय एक राजा ( म. आ. १५१. ४७ कुं. ). हा मयसभेंत होता ( म. स. ४. ३१ कुं. ). याला राजसूयाच्या वेळीं सहदेवानें जिंकिलें होतें ( म. स. ३२. ४ कुं. ).

९ अर्जुनपुत्र अभिमन्यूचा सारथि ( म. द्रो. ३५. ३२ कुं. ).

१० ( २ फेनप पहा ).

११ द्रुपदाचा पुत्र. यास सौमित्र असें नामांतर होतें. यास जयद्रथानें मारिलें ( म. आ. २१८.३० कुं. ).

१२ ( सू. इ. भविष्य. ) मत्स्यमतें सुषेणाचा पुत्र.

१३ देवद्युति नामक ब्राह्मणाचा पुत्र.

**सुमित्र कौत्स**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १०५ ).

**सुमित्र वाध्र्यश्व**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ६९-७० ). हा वाध्र्यश्वाचा पुत्र असून सुमित्र नांवाच्या लोकांचाहि याच्याशीं संबंध आहे ( ऋ. १०. ६९. १; ७; ८ ).

**सुमित्रा**—ही मगधदेशाधिपति शूरसेनाची कन्या व दशरथाच्या तीन मुख्य स्त्रियांतील दुसरी. हिला लक्ष्मण व शत्रुघ्न असे दोन पुत्र होते. लक्ष्मण रामाबरोबर वनवासाला गेला, तेव्हां हिनें त्याला उपदेश करून संमति दिली.

२ कृष्णाची स्त्री.

३ ही दुराचारी बाई शिवाला बिल्वपत्र वाहिल्यानें उद्धरली ( स्कंद. ३. ३. २ ).

**सुमीढ**—( सो. पुरु. ) सुहोत्राचा मुलगा ( म. आ. १०१. १८ कुं. ).

**सुमीहळ**—हा भरद्वाजाचा आश्रयदाता आहे. याच्यापासून भरद्वाजाला शंभर गाई मिळाल्या ( ऋ. ६. ६३. ९ ).

**सुमुख**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

२ गरुडाचा पुत्र.

३ ऐरावतकुलांतील आर्यकाचा नातू. याची स्त्री गुणकेशी. ज्या वेळीं मातलि हा वरसंशोधनार्थ आला, त्या वेळीं यास गरुडानें पुढल्याच महिन्यांत खाण्याचें ठरविलें होतें. पण मातलि व नारद यांनीं इंद्राकडे नेऊन यास चिरायु केलें. त्यामुळें गरुड रागावून इंद्र व विष्णु यांची स्पर्धा करूं लागला. पण विष्णूनें त्याची खोड मोडून सुमुखास पायाच्या अंगठ्यानें गरुडाचे छातीवर टाकून तेथेंच त्यास कायमचें वसविलें ( म. उ. १०४–१०५ कुं. ).

४ नारदाबरोबर मयसभेंत आलेला ऋषि ( म. स. ५ ).

५ रामसेनेंतील एक वानर ( वा. रा. यु. ३० ).

६ अतिप्राचीन एक राजा. उद्धटपणामुळें नाश पावलेल्यांच्या यादींत याचें नांव आहे ( मनु. ७. ४१ ).

७ सुहोत्र नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

८ दशरथपुत्र भरताचा प्रधान ( पद्म. पा. ५ ).

५ दुर्योधनपक्षीय एक राजा ( म. द्रो. १२७ ).

**सुमुखी**—एक अप्सरा ( म. अनु. ५०. ४८ कुं. ).

**सुमुष्टिद्**—( सो. कुकुर. ) मत्स्यमतें उग्रसेनाचा पुत्र.

**सुमूर्तिमत्**—हे पितर आहेत. हे वसिष्ठाचे मानसपुत्र होत. हे अतिशय धार्मिक असून स्वर्गाच्या पलीकडे ज्योतिर्भासिन् नांवाच्या लोकांत राहतात. हे सर्व इच्छा सफल करणाऱ्या विमानांत बसतात व श्राद्धें करणाऱ्या ब्राह्मणांजवळ नेहमीं वास करितात. यांना गो नांवाची एक मानस कन्या आहे. ती शुक्राची आवडती भार्या असून देवांची कीर्ति वाढविणारी आहे ( मत्स्य. १५ ). हरिवंशांत सुकाल नामक पितरांचें जें वर्णन दिलेलें आहे, तें तंतोतंत यांच्याशीं जुळतें. यावरून सुमूर्तिमत् व सुकाल हे एकच असावेत असें वाटतें ( १. १८ ).

**सुमेध**—याचें मित्रावरुणांनीं रक्षण केलें असें शकपूत नार्मेध म्हणत आहे ( ऋ. १०. १३२. ७ ).

२ ( हरिमेध पहा ).

**सुमेधस्**—भार्गवकुलांतील मंत्रकार.

२ या नांवाचा एक देवगण व त्यांत अल्पमेधस्, दीप्तिमेधस्, पृश्निमेधस्, प्रतिमेधस्, प्रभु, भूयोमेधस्, मेघहंतृ, मेधजस्, मेधस्, मेधातिथि, यशोमेधस्, सत्यमेधस्, सर्वमेधस् व सुमेधस् या व्यक्ति आहेत ( ब्रह्मांड. २. ३६. ५८-६० ).

३ अगस्त्यकुलांतील एक गोत्रकार ऋषि.

४ चाक्षुषमन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

५ एक ब्रह्मर्षि ( १३ सुरथ पहा ).

**सुमेधा**—निध्रुव काण्वाची स्त्री. च्यवन व सुकन्या यांची कन्या.

२ सीरध्वजाची पत्नी.

३ और्व ब्राह्मणाची पत्नी ( ३ और्व पहा ).

**सुम्नयु**—उद्दालकाचा शिष्य ( सां. आ. १५. १ ).

**सुयज्ञ**—यानें सांख्यायन गृह्यसूत्र केलें म्हणून तर्पणांत यांचें नांव असावें (आश्व. गृ. ३. ३).

२ ( सो. क्रोष्टु. ) मत्स्यमतें पृथुश्रवस्‌चा पुत्र ( २ तम हा ).

३ उशीनर देशाचा एक प्राचीन राजा (भा. ७.२.२८).

४ वसिष्ठाचा पुत्र. हा दशरथाचें पौरोहित्य करी.

५ रामाच्या सभेंतील एक.

६ ( सू. इ. ) एक राजा. हा यज्ञ करीत असतां तेथें वाडव नामक ऋषि आला. यानें त्यास बसूनच नमस्कार [illegible] म्हणून त्यानें यास 'महारोगी व राज्यभ्रष्ट हो,' असा [illegible] ( ब्रह्मवै. २.५५ ).

७ विष्णूचा अवतार ( १ यज्ञ व १ हयग्रीव पहा ).

**सुयज्ञ शांडिल्य**—हा कंस वारक्याचा शिष्य व याचा शिष्य जयंत वारक्य ( जै. उ. ब्रा. ४. १७. १ ).

**सुयज्ञा**—महाभौमाची स्त्री.

**सुयशस्**—( मौर्य. भविष्य. ) भागवत व विष्णु यांच्या मतें अशोकवर्धनाचा पुत्र.

**सुयशा**—भीमरथपुत्र दिवोदासाची स्त्री ( वायु. २.३०. ४४; ब्रह्मांड ३. ६७. ४७ ).

**सुयोधन**—( सू. इ. ) मत्स्य व पद्म यांच्या मतें ककुत्स्थाचा पुत्र.

२ दुर्योधनास सुयोधन म्हणून संबोधित असे.

**सुर**—संहादपुत्र बाष्कलाचा पुत्र.

**सुरकृत**—विश्वामित्राचा पुत्र.

**सुरक्ष**—( सुकृत पहा ).

**सुरघु**—विवेकानें ज्ञानी झालेला एक राजा ( यो. वा. ५. ६१-६४ ).

**सुरजा**—कश्यप व प्राधा यांची कन्या.

**सुरतचंद्रिका**—सौराष्ट्र देशांतील भद्रश्रवस् नामक राजाची स्त्री ( पद्म. ब्र. ११ ).

**सुरता**—कश्यप व प्राधा यांची कन्या.

**सुरथ**—जयद्रथ व दुःशला यांचा पुत्र. युधिष्ठिरानें अश्वमेध केला, त्या वेळेस अर्जुन अश्वरक्षणाकरितां त्या अश्वामागें फिरत असतां सिंधु देशास आला. ही बातमी ऐकून भीतीनें यानें प्राण सोडिला ( म. आश्व. ७८ ). परंतु कृष्णानें याला जिवंत करून अश्वमेधसमारंभासाठीं दुःशलेसह हस्तिनापुरीं आणिलें होतें ( जै. अ. ६१ ).

२ त्रिगर्त राजाचा मुलगा व दुर्योधनपक्षीय दहा संशप्तकांपैकीं एक. याला भारतीय युद्धांत अर्जुनानें ठार मारिलें ( म. द्रो. १८ ).

३ द्रुपदाचा पुत्र. अश्वत्थाम्यानें याला भारतीय युद्धांत ठार मारिलें ( म. क. ५६; श. १४ ).

४ शिबि देशाचा राजा. याची व जयद्रथाची मैत्री होती. याच्या मुलाचें नांव कोटिकास्य असें होतें ( म. व. २६६ ).

५ कृपाचार्यांचा चक्ररक्षक ( म. वि. ६१ ).

६ यमसभेंतील एक राजर्षि ( म. स. ८ ).

७ हंसध्वजाच्या पांच पुत्रांपैकीं एक. याचें अर्जुनाशीं युद्ध झालें. त्यांत अर्जुनानें याचें डोकें तोडिलें व तें गरुडास प्रयागांत नेऊन टाकण्यास सांगितलें. तेथून तें नंदीनें नेऊन शंकराला नररुंडमाळेंत घालण्यास दिलें (जै. अ. २०-२१).

८ यानें दाशरथी रामाचा अश्वमेधाकरितां सोडिलेला घोडा अडविला होता. शिवाय, हनुमान्, सुग्रीव वगैरेंनाहि बांधून ठेविलें व शत्रुघ्नास मूर्छित पाडिलें. तेव्हां स्वतः रामानें यास जिंकून अश्व व हनुमान् प्रभृतींस सोडविलें. पद्मपुराणांमध्यें हा कुंडल नगरीचा राजा होता, असें म्हटलें आहे. हा परम रामभक्त होता (पद्म. पा. ४९-५२; बलमोदक पहा).

९ (सो. ऋक्ष.) ज़ु राजाचा पुत्र.

१० कुशद्वीपाधिप ज्योतिष्मताचा पुत्र. याचा वर्ष याच्या नांवाचा होता (मार्क. ५०.२६).

११ विदर्भ देशचा राजा सुदेव, त्याचा हा पुत्र (वा. रा. उ. ७८).

१२ एक राजर्षि. गंधमादन पर्वतावर तप करीत असतां याच्या अंगापासून यास एक कन्या झाली. तीच नाभागपत्नी सुप्रभा होय (मार्क. ११३).

१३ हा राजा स्वारोचिष मन्वंतरामध्यें झाला. यानें म्लेच्छांशीं घनघोर युद्ध केलें. त्यांत याच्या प्रधानांनीं प्रतिपक्षाचा अवलंब केल्यामुळें याचा पराभव झाला (२ नंदि पहा). पुढें सुमेधस् ऋषीच्या आश्रमांत हा जाऊन राहिला. तेथें यास समाधि नांवाचा समदुःखी वैश्य भेटला व त्यांशीं याचें सख्यहि झालें. एकदां या दोघांनीं ऋषीला संसारांत विघ्नें येण्याचीं कारणें विचारिलीं. तेव्हां ऋषीनें प्राणी कर्मपरतंत्र असल्यामुळें असें होतें, असें सांगून देवीचें अर्चन करण्यास सांगितलें. यांची निःसीम भक्ति पाहून देवी प्रसन्न झाली व तिनें वर मागण्यास सांगितलें. वैश्यानें स्वर्ग व यानें ऐहिक ऐश्वर्य मागितलें. त्याप्रमाणें देवीनें वैश्यास स्वर्ग व याला पुनः राज्य दिलें; व त्याच वेळीं यास 'तूं विवस्वान् आदित्याचा सावर्णि नांवाचा पुत्र होऊन माझ्या अर्चनप्रभावानें वैवस्वत मन्वंतर संपल्यावर सावर्णि नांवाचा मनु होशील,' असें सांगितलें व देवी गुप्त झाली (दे. भा. ५. ३२-३५; ब्रह्मवै. २. ६२; मार्क. ७८-९०; शिव. उ. ४५).

१४ (सू. इ. भविष्य.) भागवतमतें रणकाचा, विष्णुमतें कुंडकाचा, वायुमतें क्षुलिकाचा व मत्स्यमतें कुलकाचा पुत्र.

**सुरथा**—उशीनराची पत्नी.

२ विराटाची प्रथम स्त्री.

**सुरपुरंजय**—(किलकिला. भविष्य.) ब्रह्मांडमतें वैदेशांतील नागवंशी एक राजा.

**सुरभ**—वीरवर्म्याचा पुत्र.

**सुरभि**—कश्यप व क्रोधा यांची कन्या. हिला रोहिणी व गंधर्वी अशा दोन कन्या होत्या (म. आ. ६७). एका सुरभीनें अत्रि ऋषीचीं कमळें चोरीस गेलीं, त्या वेळीं जो शपथविधि झाला, त्यांत शपथ घेतली असल्याचें आढळतें (म. अनु. १४३. ४१ कुं.).

२ प्राचेतस दक्ष प्रजापति व असिक्नी यांची कन्या व कश्यपाची स्त्री. हिनें आपला पुत्र एक बैल याला एक शेतकरी दुष्टपणें वागवीत आहे हें इंद्रास सांगितलें व ही रडूं लागली (म. व. ९).

३ ब्रह्मदेवानें पोटभर अमृत प्याल्यावर ढेंकर दिला, त्या वेळीं ही उत्पन्न झाली. पुढें हिच्या कासेंतून दूध पृथ्वीवर गळालें व त्यामुळें एक डोह झाला. तोच क्षीरसागर होय. हिला चार कन्या झाल्या. त्या चार दिशांच्या पालक व आश्रयदात्या होत. त्यांचीं नांवें—१ सुरूपा (पूर्व दिशेस), २ हंसिका (दक्षिणेस), ३ सुभद्रा (पश्चिमेस), ४ सर्वकामदुघा (उत्तरेस). हिचें राहण्याचें ठिकाण रसातल नामक सातवें भूतल होय (म. उ. १०२).

**सुरस**—गरुड व शुकी यांचा पुत्र.

**सुरसा**—कश्यप व क्रोधा यांची कन्या. हिला कंक नांवाचा एक पुत्र झाला (म. आ. ६७). हिनें मारुतीची परीक्षा पाहून शेवटीं 'यशस्वी होशील.' असा आशीर्वाद दिला. हिला नागमाता म्हटलें आहे (वा. रा. सुं. १; स्कंद. ३. १. ४६).

**सुरा**—वरुण व ज्येष्ठा यांची कन्या.

२ मद्यदेवता. ही मंथनकालीं समुद्रांतून निघाली (म. आ. १८. ४९ कुं; १ विष्णु पहा).

**सुराजि**—रामसभेंतील एक हास्यकार.

**सुराधस् वार्षागिर**—सूक्तद्रष्टा (ऋ. १. १००). अंबरीष, ऋज्राश्व वगैरेबरोबर वृषागिरपुत्र म्हणून याचा निर्देश आहे (ऋ. १. १००.१७).

**सुराप**—विधृत राजाचा प्रधान (पद्म. पा. १११).

**सुरामित्र**—मरुद्गणांपैकीं दुसऱ्या गणांतील एक.

**सुरायण**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**सुरारि**—भारतीय युद्धांतील पांडवपक्षीय एक राजा (म. उ. ४. १५ कुं.).

**सुराल**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें शृंगीपुत्राचा शिष्य.

**सुराष्ट्र**—दशरथाच्या अष्टप्रधानांपैकीं एक (वा. रा. बा. ७).

**सुरुच्**—गरुडाचा पुत्र.

**सुरुचि**—उत्तानपादाची स्त्री.

२ माघांत पूषा सूर्याबरोबर असणारी अप्सरा (भा. १२. ११. ३९).

३ वैरोचन बलीची आई (स्कंद. १. १. १८).

४ कश्यप व अरिष्टा यांचा पुत्र.

**सुरूप**—(सो. क्रोष्टु.) वायुमतें असमौजसपुत्र.

२ रौच्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ तामस मन्वंतरांतील एक देवगण.

४ गरुड व शुकी यांचा पुत्र (ब्रह्मांड. ३. ७. ४५०).

**सुरूपा**--वैवस्वत मन्वंतरांतील मरीचीची कन्या व वारुणि अंगिराची स्त्री.

२ केकय राजाची कन्या. दशरथ राजाची स्त्री व भरताची माता (पद्म. पा. २१६).

३ कौषीतकाचा पुत्र मंकि, त्याच्या दोन स्त्रियांपैकीं एक.

**सुरेणु**--संज्ञेचें नामांतर (ह. वं. १. ९). पण ही संज्ञेची आई दिली आहे (स्कंद. ७. १. ११).

**सुरेश्वर**--एक शंकराचा अवतार. हा उपमन्यूकरितां अवतीर्ण झाला (१ उपमन्यु वासिष्ठ पहा; शिव. शत. ३२).

**सुरैषिण**--अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**सुरोचन**--(स्वा. प्रिय.) भागवतमतें इध्मबाहूचा पुत्र. याचा वर्ष शाल्मलिद्वीपांत होता.

**सुरोचि**--वसिष्ठ व अरुंधती यांचा पुत्र (भा. ४. १. ४१).

**सुरोमन्**--जनमेजयाच्या सर्पसत्रांत मेलेल्या तक्षककुलांतील सर्प (म. आ. ५७. १० कुं.).

**सुलक्षण**--या राजानें आपला घोडा चोरिला म्हणून मांडव्यास सुळीं दिलें (पद्म. उ. १२१).

**सुलभा मैत्रेयी**--कुणि गर्गाची कन्या. याज्ञवल्क्याच्या दोन स्त्रियांत असणाऱ्या मैत्रेयीपेक्षां ही वेगळी असावी. कारण उपनिषदांत मैत्रेयीबरोबर सुलभा शब्द कोठेंच आला नाहीं. तसेंच प्रधान नांवाच्या राजाच्या मुलीचें नांव सुलभा असें आहे व ती संन्यासिनीहि आहे. पण तिला मैत्रेयी असें पद कोठेंहि लाविलेलें नाहीं. त्यामुळें तीहि वेगळीच आहे कीं काय असा संशय येतो (म. शां. ३२५). फक्त आश्वलायन गृह्यसूत्रांत ब्रह्मयज्ञांगतर्पणांत सुलभा मैत्रेयी असा जोडीनें उल्लेख आला आहे. त्यावरून ही कोणीतरी वाङ्मयात्मक कार्य केलेली सुप्रसिद्ध स्त्री असावी असें दिसतें.

**सुलोचन**--(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें मारिलें (म. भी. ६४. ३७ कुं.).

**सुलोचना**--इंद्रजिताची पत्नी. हिनें त्याबरोबर सहगमन केलें.

२ (१ गुणाकार व ५ माधव पहा).

३ हरिस्वामीची कन्या. ही ज्ञानवापींत स्नान करीत असतां हिला एका गंधर्वानें पळविलें. पण मेल्यावर तो गंधर्व माल्यकेतु व त्याची पत्नी ही कलावती झाली. ही काशीक्षेत्रांतील चित्रें पाहून कृतार्थ झाली. ज्ञानवापीच्या माहात्म्याकरितां वरील कथा आली आहे (स्कंद. ४. १. ३३).

**सुलोमन्**--हा व्याध अमावस्येला नदींत स्नान केल्यानंतर उद्धरला (पद्म. भू. ३०).

**सुवंश**--(सो. वसु.) वसुदेव व श्रीदेवा यांचा पुत्र.

२ (सो. भज.) पद्ममतें समौजस्चा पुत्र.

**सुवचोतथ्य**--अंगिरस् गोत्रांतील एक प्रवर.

**सुवर्चला**--दुसऱ्या परमेष्ठिन्ची पत्नी.

२ प्रतीहाची पत्नी.

३ सूर्याची पत्नी (म. अनु. १४६).

४ देवलाची कन्या. ही ब्रह्मज्ञानी होती. हिच्या प्रश्नांचीं उत्तरें उद्दालकपुत्र श्वेतकेतूनें दिल्यामुळें हिनें त्यास वरिलें (म. शां २२४. ४; २२८. २९ कुं.).

**सुवर्चस्**--देव आपल्या अस्थि मागण्यास आले आहेत, असें समजल्याबरोबर दधीचीनें हिला दुसऱ्या आश्रमांत पाठविलें. परंतु पुढें हिनें आपला पति दधीचि याचा इंद्रानें अस्थि घेण्याकरितां केलेला घात ऐकून देवांना 'तुम्ही पशु व्हाल' असा शाप दिला. पद्मपुराणामध्यें 'तुमचा निर्वंश होईल,' असा शाप दिला असें आहे. व ही सहगमन करूं लागली. पण पोटांत गर्भ आहे असें हिला आकाशवाणीनें कळलें. तथापि ही सती जाण्याविषयीं आतुर झाली असल्यामुळें हिनें दगडानें पोट फोडून आंतून गर्भ बाहेर काढिला व त्याला पिंपळाच्या मुळाशीं ठेविलें व ही सती गेली (पद्म. उ. १५५; शिव. शत. २४-२५; १ पिप्पलाद पहा).

२ (सू. निमि.) वायुमतें स्वागताचा पुत्र.

३ (२ करंधम पहा).

४ (सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें मारिलें (म. क. ८८. १९ कुं.).

५ एक राजा. भारतीय युद्धांत हा दुर्योधनाकडे होता. यास अभिमन्यूनें मारिलें (म. द्रो. ४८. १५ कुं.).

६ वसिष्ठास नांव (म. आ. १०१. ३१ कुं.).

७ ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

८ रुद्रसावर्णि मनूचा पुत्र.

९ कलींत क्षत्रियवंश नष्ट होईल, पण पौरव, देवापि व ऐक्ष्वाकव मरु हे योगसामर्थ्यानें कलापग्रामांत क्षत्रियांच्या वंशरक्षणार्थ राहतील. तेथें ऐक्ष्वाकव मरूला एकोणतिसाव्या युगपर्यायाच्या आरंभीं सुवर्चस् नांवाचा मुलगा होईल (ब्रह्मांड. ३. ७४. २५१) व देवापीला सपौल होईल (वायु. २. ३७. ४३३). पण वायूंत देवापि हा एकटाच होता, असें म्हटलें आहे. मत्स्यांत सपौलाऐवजीं सत्य दिला आहे (मत्स्य. २७३. ५६-५८).

१० भूति ऋषीचा भ्राता. यानें भूतीस यज्ञाकरितां

बोलाविल्यामुळें शांति नामक शिष्यावर आश्रमाचा भार सोंपवून तो यज्ञार्थ आला ( मार्क. ९६ ).

**सुवर्ण**--एक तपस्वी ब्राह्मण. याचा मनूशीं धपदीपादि विषयावर संवाद झाला ( म. अनु. १५५ ).

२ सावर्णि मनूचा पुत्र.

३ रुद्रसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

४ ( १६ सुतपस् पहा ).

५ कुशध्वज ऋषीच्या दोन पुत्रांपैकीं एक. यानें पायांच्या आंगठ्यांवर उभें राहून तीन अक्षरी मंत्राचा जप केला. तेव्हां यास सुवीर नांवाच्या गोपाच्या घरीं कन्येचा जन्म प्राप्त झाला ( पद्म. पा. ७२ ).

६ हा राजा सहज 'ॐ नमो नारायण' म्हटल्यानें मुक्त झाला ( पद्म. क्रि. १० ).

**सुवर्णचूड**--गरुडाचा पुत्र.

**सुवर्णरतस्**--विश्वामित्रकुलांतील एक ऋषि.

**सुवर्णवर्मन्**--काशी देशचा राजा. याची कन्या वपुष्टमा ( म. आ. ४४. ८ कुं. ).

**सुवर्णशिरस्**--वरुणसभेंतील एक गायक ( म. उ. ११०. १२ कुं. ).

**सुवर्णष्ठीविन्**--शैब्य सृंजयाचा पुत्र ( ३ नारद पहा ).

**सुवर्णाभ**--स्वारोचिष मनूचा पुत्र शंखपाद. त्याचा हा पुत्र ( म. शां. ३४८ ).

**सुवर्मन्**--( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें मारिलें ( म. द्रो. १२७. ४८ कुं. ).

२ ( ८ सुधर्मन् पहा ).

३ सुशर्मन् त्रिगर्ताचा भाऊ ( म. वि. ६५. ९ कुं. ).

**सुवाच्**--पांडवांबरोबर द्वैतवनांत असलेला एक ऋषि.

२ ( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**सुवासन**--ब्रह्मसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

**सुवाहन**--जैगीषव्य नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**सुवित्त**--एक ऋषिक.

**सुवित्ति**--अंगिराकुलांतील मंत्रकार. याला सुचित्ति असेंहि म्हणत.

**सुविभु**--( सो. क्षत्र. ) विष्णु व वायु यांच्या मतें विभुपुत्र.

**सुवीर**--( तोण्डमान् पहा ).

२ या राजाची कन्या सौवीरी मरुत्तास दिली होती ( मार्क. १२८ ).

३ ( सो. द्विमीढ.) ब्रह्मांड, विष्णु व भागवत यांच्या मतें क्षेम्याचा पुत्र ( ३ सुनीथ पहा ).

४ ( सो. अनु. ) विष्णु, मत्स्य व भागवत [illegible] शिबीचा पुत्र.

५ ( सो. क्रोष्टु.) देवश्रवस् व कंसावती [illegible]

६ ( सू. इ. ) द्युतिमताचा पुत्र. याचा पुत्र दुर्जय ( म. अनु. २. १० कुं. ). या व्यक्ति महाभारत [illegible] इक्ष्वाकु वंशावळींत आढळत नाहींत.

७ ( ४ चित्रा पहा ).

८ एक गोप ( ५ सुवर्ण पहा ).

९ एक लोकांची जात किंवा वंश. यांच्यात कोणी [illegible] अजबिंदु नांवाचा पुरुष होऊन गेला. तो अति [illegible]चारी व कुलांगार होता. कारण त्यानें आपल्या [illegible]यानें आपल्या जातीच्या, मित्रांच्या व भाऊबंदांचा नाश करून घेतला ( म. उ. [illegible] ११; १४ कुं. ).

**सुवेदस् शैरीष**--सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १४७ ).

**सुवेषा**--( ४ परीक्षित् पहा ).

२ दशरथाची पत्नी. हिचा पुत्र शत्रुघ्न (पद्म. पा. ११६).

**सुव्रत**--पुलह व श्वेता यांचा पुत्र.

२ ( सो. उशी. ) मत्स्य व वायु यांच्या मतें उशीनराचा पुत्र.

३ याला पराशरानें पराशरस्मृति सांगितली.

४ ( सो. मगध. भविष्य.) भागवत व ब्रह्मांड यांच्या मतें क्षेमाचा पुत्र. विष्णुमतें क्षेम्याचा पुत्र. वायुमतें भुवन व मत्स्यमतें अनुव्रत असें याचें नांव आहे. वायुमतें यानें चौसष्ट वर्षें राज्य केलें.

५ ( सो. मगध. भविष्य. ) वायुमतें नृपतीचा पुत्र.

६ रौच्य मनूचा पुत्र. हा मरण पावला असतां षष्ठी देवीच्या कृपेनें जिवंत झाला ( ब्रह्मवै. २. ४३ ).

७ एक ऋषि. यानें विदूरथास कुजृंभाची माहिती सांगितली ( मार्क. ११३ ).

८ हा पूर्वजन्मीं त्रिदिशेंतील संध्यावली व रुक्मभूषण यांचा पुत्र होता. नंतर सोमशर्म्याला सुमनेच्या ठिकाणीं झाला. तेव्हां नर्मदेच्या तीरीं यानें वैडूर्य पर्वतावर तप केलें. पुढील जन्मीं वसुदत्त होऊन इंद्र झाला ( पद्म. भू. २०-२२ ).

**सुव्रता**--दक्ष व वीरिणी यांची कन्या. एकदां दक्ष हिला घेऊन ब्रह्म्याकडे गेला होता. त्या ठिकाणीं धर्म व रुद्र बसले होते. त्या वेळीं ब्रह्मा दक्षास म्हणाला कीं, 'या तुझ्या कन्येस चार मनु होतील.' तेव्हां दक्ष व धर्म, ब्रह्मा व रुद्र यांनीं हिला मनानें संभोगिल्यामुळें दक्षसावर्णि, धर्मसावर्णि, ब्रह्मसावर्णि व रुद्रसावर्णि असे चार पुत्र झाले. ते चौघांनीं अनुक्रमानें घेतले ( ब्रह्मांड. ४. १. ३९-५१ ).

**सुशंख**--एक गंधर्व (सुनीथा पहा ).

**सुशर्मन्**—याच्या बापाचें नांव वृद्धक्षेम म्हणून यास वार्धक्षेमि म्हटलेलें आढळतें. हा त्रिगर्तांचा राजा. हा द्रौपदी-स्वयंवरास आला होता. पांडव अज्ञातवासांत असतां दुर्योधनाच्या सल्ल्यानें यानें विराटाच्या गाई हरण केल्या व युद्धांत विराटास पकडून आणिलें. परंतु भीमानें याचा पराजय करून याला बांधून आणलें. पण धर्मराजानें यास विनशर्त सोडून दिलें (म. वि. ३०-३३). हा भारतीय युद्धांत दुर्योधनपक्षीय होता (म. श. ३०). हा संशप्तक असून यानें प्रथम पराक्रम केला. पण अर्जुनानें यास ठार केलें (म. द्रो. २८; श. २७).

२ कर्णाचा मुलगा. भारतीय युद्धांत नकुलानें यास ठार मारिलें (म. श. १०).

३ पांचाल देशांतील क्षत्रिय. भारतीय युद्धांत कर्णानें याचा वध केला (म. क. ५६). याचें व कर्णाचें हें युद्ध स्यमंतपंचकीं झालें (भा. १०.८२.२५). याच्याहि बापाचें नांव वृद्धक्षेम असावें (१ वार्धक्षेमि पहा ).

४ (कण्व. भविष्य.) या वंशांतील हा शेवटचा राजा. यास याच्या बलि नामक अमात्यानें मारिलें (भा. १२. १. २२ ).

५ धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

६ व्यासाच्या पुराणशिष्यपरंपरेंतील वायुमतें रोमहर्षणाचा शिष्य.

७ हा दुराचारी ब्राह्मण गीतेचा पहिला अध्याय म्हणून मुक्त झाला (पद्म. उ. १७५).

८ रैच्य मन्वंतरांतील देवगण.

९ विशालपुत्र. याची स्त्री बलाक नामक राक्षसानें नेली. ती उत्तम राजानें उत्पलावतक वनांतील त्या राक्षसाचे आश्रमांतून तिचें दुःशील त्याकडून खाववून परत आणिली ( मार्क. ६६-६७).

**सुशांति**--( सो. अज. ) विष्णु व भागवत यांच्या मतें शांतीचा पुत्र.

२ ( सो. नील. ) मत्स्य व वायु यांच्या मतें हा नीलाचा पुत्र.

३ उत्तम मन्वंतरांतील इंद्र.

**सुशारद शालंकायन**--ऊर्जवत् औपमन्यवाचा शिष्य. याचा शिष्य श्रवणदत्त कौहल ( वं. ब्रा. १ ).

**सुशील**—एक गंधर्व (पद्म. स्व. २२; उ. १२८ ).

**सुशीला**—स्वरवेदी गंधर्वाची कन्या ( पद्म. सृ. २२). दुसऱ्या ठिकाणीं सुशील गंधर्वाची कन्या असें सांगितलें आहे ( पद्म. उ. १२८ ).

२ दशपुरांतील कृष्णदेवाची स्त्री ( पद्म. ब्र. १२ ).

**सुशोभना**—( २ परीक्षित व ३ शल पहा ).

२ चेदिराजकन्या व मरुत्तस्त्री ( मार्क. १२८ ).

**सुश्यामा**—( वृद्धा पहा ).

**सुश्रम**—( सो. मगध. भविष्य. ) विष्णुमतें धर्माचा पुत्र व ब्रह्मांडमतें नृपतीचा पुत्र.

**सुश्रवस्**—साठ राजांसह लढणाऱ्या या राजाचें इंद्रानें संरक्षण केलें ( ऋ. १. ५३. ९. उपगु सौश्रवस पहा ).

२ हा एक देवांचा गुप्त हेर होता. देवांना यानें 'कात्यायन मुनीनें धर्म श्रवण करून तपश्चर्या केली. तेव्हां सरस्वती प्रसन्न होऊन तिनें सारस्वत मुनि तुला सारधर्म सांगतील ' वगैरे हकीकत कळविली ( स्कंद. १. २. ५ ).

३ जयत्सेनाची स्त्री.

४ गांधारीची भगिनी व धृतराष्ट्राची स्त्री.

५ आभूतरजस् देवांतील एक.

**सुश्रवस् कौश्य**—कुश्रि वाजश्रवसाचा समकालीन आचार्य ( श. ब्रा. १०. ५. ५. १ ).

**सुश्रवस् वार्षगण्य**—प्रातरह्न कौहलाचा शिष्य. याचा शिष्य साति औष्ट्राक्षि ( वं. ब्रा. १ ).

**सुश्रुत**—हा विश्वामित्राचा पुत्र ( म. अनु. ७. ५५ कुं. ). शालिहोत्रानें याला घोड्याचा आयुर्वेद शिकविला ( अग्नि. २९२. ४४ ).

पण धन्वंतरीनें सुश्रुतादिकांना शिकविलें असेंहि आढळतें ( गरुड. १. १७५ ). मूळ सुश्रुतसंहिता यानें केली असावी.

२ (सू. निमि.) वायुमतें श्रुतपुत्र व विष्णुमतें सुभासपुत्र.

**सुश्रुवस्**--हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्र असून प्रजापति होता ( वायु. २. ४. ५४ ).

**सुषामन्**—सायणाचार्य ही व्यक्ति मानीत नसले तरी वरोसुषामन् नांवाची व्यक्ति असावी (विश्वमनस् वैयश्व पहा).

**सुषिनंदिन्**—(किलकिला. भविष्य.) विष्णुमतें छत्रनंदाचा पुत्र. यास वायु व ब्रह्मांड यांच्या मतें भूतिनंद हें नांव असावें.

**सुषेण**—स्वारोचिष मनूचा पुत्र.

२ कंसानें मारिलेला एक देवकीचा पुत्र.

३ माघांत पूषाबरोबर फिरणारा गंधर्व ( भा. १२. ११. ३९ ).

४ जमदग्नि व रेणुका यांचा पुत्र.

५ एक प्रमुख वानर. हा योद्धा व वैद्य होता. हा सीताशोधाकरितां पश्चिमेस गेला होता. याचें विद्युन्मालीशी, युद्ध झालें ( वा. रा. यु. ४३ ). इंद्रजिताला मारिल्यावर रावणानें लक्ष्मणावर शक्ति टाकिली असतां यानें गुदमरावयास लावणारें औषध हुंगवून सैनिकांचीं शल्यें बाहेर काढिलीं (वा. रा. यु. ९१ ) व लक्ष्मणाकरितां विशल्यकरिणी,

सावर्ण्यकरिणी, संजीवनी व संधानी हीं औषधें आणवून त्यासहि सावध केलें. मारुतीनें याच वेळीं औषधी समजेनात म्हणून महोदय पर्वताचें शिखरच आणून याचे पुढें ठेविलें (वा. रा. यु. १. १). रामाच्या राज्याभिषेकाकरितां यानें सर्व समुद्रांचें पाणी आणिलें ( वा. रा. यु. १२८ ). याला तारा नांवाची कन्या आणि मैंद व द्विविद नांवांचे पुत्र होते (वा. रा. कि. ४२; म. व. २८४. २ कुं. ).

६ मरुद्गणांपैकीं दुसऱ्या गणांतील एक.

७ ( १६ सुतपस् पहा ).

८ (सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें मारिलें (म.भी. ६४ ३४; म. द्रो. १२७. ४२ कुं. ).

९ दुर्योधनपक्षीय एक राजा. यास उत्तमौजानें मारिलें ( म. क. ७९. १४ कुं. ).

१० कर्णाचा पुत्र. यास भीमानें मारिलें ( म. क. ४३. १८; ७९. १४ कुं. ).

११ जनमेजयाच्या सर्पसत्रांत दग्ध झालेला धृतराष्ट्रकुलांतील नाग ( म. आ. ५७. १६ कुं. ).

१२ एक दुर्योधनपक्षीय राजा ( म. आ. २०१. १६; श. ५. ३ कुं. ).

१३ ( '१ माधव पहा ).

१४ ( सो. कुरु. भविष्य. ) मत्स्य व विष्णु यांच्या मतें [illegible]मत्पुत्र, भागवतमतें वृष्टिमत्पुत्र व वायुमतें रतिमत्पुत्र.

**सु[illegible]**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील ब्रह्मांडमतें लोकाक्षीचा शिष्य.

**सुसंधि**—( सू. इ. ) वायुमतें प्रसुश्रुतपुत्र.

**सुसंभाव्य**—रैवत मनूचा पुत्र.

**सुसामन्**—युधिष्ठिराच्या राजसूयांतील उद्गाता. हा धनंजयगोत्रीय होता ( म. स. ३६. ३४ कुं. ).

**सुस्वधा**—आज्यप नामक पितरांचें नांव. हे कामदुध लोकांत राहत असून निपुत्रिक आहेत ( पद्म. सृ. १९ ).

**सुस्वर**—गरुडाचा पुत्र.

**सुस्वरा**—स्वरवेदी गंधर्वाची कन्या (पद्म. उ. १२८).

**सुहनु**—वरुण लोकांतील असुर (म. स. ९. १७ कुं.).

**सुहविस् आंगिरस**—सामद्रष्टा (पं. ब्रा. १४.३.२५).

**सुहस्त**—(सो. कुरु.) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें मारिलें ( म. द्रो. १९८. १७–१९ कुं. ).

**सुहू**—( सो. वृष्णि. )—उग्रसेनाचा पुत्र ( भा. ९. २४. २४ ).

**सुहस्त्य**—घोषेचा मुलगा. हा सूक्तद्रष्टा आहे ( ऋ. १०. ४१ ). याला घोष नांवाचा एक भाऊ असावा. पण सायणाचार्य घोष शब्द घौषेय असा मानून सुहस्त्य या अर्थीच आहे असें समजतात.

**सुहोत्र**—शंकराचा अवतार. याच्या योगसाधन करणाऱ्या चार पुत्रांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत.—१ सुमुख, २ दुर्मुख, ३ दुदर्भ व ४ दुरतिक्रम. यानें शिष्यांसह व्यासाला साहाय्य केलें ( शिव. शत. ४ ).

२ ( सो. क्षत्र. ) भागवतमतें क्षत्रवृद्धाचा व वायुमतें धर्मवृद्धाचा पुत्र. याचे पुत्र काश्य, कुश व गृत्समद ( भा. ९. १७. २ ). इतरत्र यास सुनहोत्र म्हणतात. याच्यापासून काश्यवंश सुरू झाला ( अग्नि. २७७; ब्रह्म. १३ ).

३ ( सो. अज. ) विष्णु, व भागवत यांच्या मतें सुधनुषाचा व वायुमतें सुधन्वन्‌चा पुत्र.

४ ( सो. कुरु. ) भागवतमतें सहदेव व विजया यांचा पुत्र. विष्णु, मत्स्य व वायु यांच्या मतें हा नकुलपुत्र.

५ पांडवांबरोबरचा द्वैतवनांतील ऋषि ( म. व. २६. २४ कुं. ).

६ एक राजा. हा दानशूर होता. म्हणून इंद्रानें याच्या राज्यांत सुवर्णवृष्टि केली ( म. द्रो. ५६; शां. ५८. २५ कुं.).

७ रामसैन्यांतील एक वानर.

८ ( सो. अमा. ) वायुमतें जह्नुचा पुत्र.

९ ( सो. अमा. ) विष्णुमतें कांचनाचा व वायुमतें कांचनप्रभाचा पुत्र. भागवतमतें याचें नांव होत्रक.

१० ( सो. पूरु. ) विष्णु व वायु यांच्या मतें बृहत्क्षत्राचा पुत्र.

११ (सो.पूरु.) भुमन्यूचा पुत्र. याची स्त्री जयन्ती. यांचा पुत्र अजमीढ (म.आ. ६३.३५; १०१.१२; १९७.२ कुं.).

**सुहोत्र घौषेय**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ४१ ).

**सुहोत्र भारद्वाज**—सूक्तद्रष्टा ( ऋ. ६.३१–३२ ).

**सुह्म**--( सो. अनु.) बलीचा पुत्र ( २ अंग व २ बलि पहा ).

**सुहृदय**—( बर्बरिक पहा ).

**सूक्त**—एकदां प्राणदेवतेनें आपला महिमा असलेला मंत्र ऐकला व मंत्रास व मंत्रद्रष्ट्यास सूक्त हें नांव दिलें ( ऐ.आ. २. २. २ ).

**सूक्ष्म**—कश्यप व दनु यांचा पुत्र.

**सूक्ष्मायणि**—एक व्यास ( व्यास पहा ).

**सूत**—ब्राह्मण स्त्रीचे ठिकाणीं क्षत्रियापासून झालेली एक जात. यांना रथकार म्हणतात. हे क्षत्रियांपेक्षां हलके व वैश्यांपेक्षां वरच्या दर्जाचे होत. यांच्याशीं क्षत्रिय राजांनीं विवाहसंबंध केले तरी यांना राजा हा शब्द लावीत नाहींत.

कीचक, रोमहर्षण यांपैकीं होते ( म. वि. २१ कुं.; रोमहर्षण पहा ).

मूळ सूत व मिश्रजातीचे सूत भिन्न दिसतात ( कौटिलीय अर्थशास्त्र ). मूळ सूतांचा देश अनूप व मागधांचा देश मगध होय ( ब्रह्म. ४. ६०-६७; ब्रह्मांड. २.३६.१६०-१७२ ).

सूतांना शेंडी व जानवें असून वेदांचा अधिकार आहे व आचार ब्राह्मणांसारखा असतो. मागधांना वेदांचा अधिकार असत नाहीं. स्तुति करणें हा यांचा धर्म आहे. पृथु राजानें सूत, मागध, बंदी व चारण यांना कलिंग देश बक्षिस दिला ( पद्म. भू. २९ ).

वेदांतहि सूताचा अनेक ठिकाणीं निर्देश आहे ( वा. सं. १६. १८; तै. ब्रा. ४. ५. २. १ ).

क्षत्ता व वैश्य ( क. सं. १५. ४ ), सेनानी व ग्रामणी ( तै. सं. १. ८. ९ ). महिषी व ग्रामणी यांच्यामध्यें याचा क्रम धरिला आहे ( श. ब्रा. ५. ३. १. ५ ).

२ विश्वामित्राचा एक पुत्र.

**सूनामुख**—कश्यप व कद्रू यांचा पुत्र.

**सूनुभार्गव**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. १७६ ).

**सूनृता**—रुद्रसावर्णि मन्वंतरांतील स्वधाम नामक अवताराची माता व सत्यसहाची पत्नी (भा. ८. १३. २९).

२ ( सुनीति पहा ).

**सूरि**—हा शिवदत्ताचा पुत्र. यास हरणाचा जन्म प्राप्त झाला असतां याचा अगस्त्याश्रमांत रामानें उद्धार केला ( ब्रह्मांड. ३. ३५ ).

**सूर्मी** किंवा **सूर्या**—अनुह्लादाची पत्नी.

**सूर्य**—सवितृ, पूषन् व भग वगैरे याचींच वेगवेगळ्या अवस्थेंतील नांवें होत ( विवस्वत् व आदित्य पहा ).

**सूर्य सौवश्व**—( एतश पहा ).

**सूर्यक**—( प्रद्योत. भविष्य. ) मत्स्यमतें विशाखयूपाचा पुत्र.

**सूर्यतेजस्**—मणिभद्र व पुण्यजनी यांचा पुत्र.

**सूर्यदत्त**—विराटाचा भाऊ. यास द्रोणाचार्यानें मारिलें ( म. उ. १७१. १५; वि. ३३. २१; द्रो. १५९. ४०; क. ३. ३४ कुं. ).

**सूर्यध्वज**—द्रौपदीस्वयंवरास आलेला एक राजा ( म. आ. २०१. १० कुं. ).

**सूर्यनेत्र**—गरुडाचा पुत्र.

**सूर्यभास**—दुर्योधनपक्षीय एक राजा. यास अभिमन्यूनें मारिलें ( म. द्रो. ४८ ).

**सूर्यवर्चस्**—कश्यप व मुनि यांचा पुत्र. हा कार्तिक महिन्यांत विष्णु आदित्याबरोबर असतो ( बर्बरिक पहा ).

**सूर्यवर्मन्**—त्रिगर्त राजांपैकीं एक. यास अर्जुनानें मारिलें ( म. आश्व. ७४. ११ कुं. ).

**सूर्यशत्रु**—लंकेंतील एक राक्षस ( वा. रा. यु. ९ ).

**सूर्या सावित्री**—सूक्तद्रष्ट्री ( ऋ. १०. ८५ ). हिच्या सूक्तांत हिच्या विवाहाचें वर्णन आहे. सवितृकन्या सूर्या अश्वींच्या रथावर चढली असें दुसरीकडे आहे ( ऋ. १. ११६. १७; ११९. ५ ). अश्वींनीं शर्यत जिंकली व हिचें अश्वींशीं लग्न झालें ( ऐ. ब्रा. ४. ७-८ ). हें वास्तविक वर्णन आहे कां रूपकात्मक आहे, हें सांगतां येत नाहीं. तथापि ह्या सूक्तांत विवाहविषयक कांहीं सामान्य गोष्टींचा उल्लेख आहे.

**सूर्याक्ष**—रामसेनेंतील एक वानर.

२ एक क्षत्रिय (म. आ. ६८. ५७ कुं.; घटोत्कच पहा).

**सृंजय**—हा तुर्वशाचा शत्रु होता. इंद्रानें तुर्वशाला याचे ताब्यांत दिलें ( ऋ. ६. २७. ७ ). याचेंच दैववात असें पैतृक नांव आहे ( ऋ. ४. १५. ४; सोमक साहदेव्य पहा ). सृंजय हें एका लोकांचें नांव आहे (श. ब्रा. २. ४. १. ३).

२ उत्तम मनूचा पुत्र.

३ ( सू. नाभाग. ) विष्णुमतें नाभागाचा पुत्र.

४ ( ५ सृंजय पहा ).

५ ( सो. अनु. ) भागवतमतें कालनराचा, विष्णुमतें कालनराचा, वायुमतें कालनलाचा व मत्स्यमतें कोलाहलाचा पुत्र. मत्स्यांत यास संजय म्हटलें आहे.

६ ( सू. दिष्ट. ) वायु व विष्णु यांच्या मतें धूम्राश्वपुत्र होय. भागवतांत यास धूम्राक्षपुत्र संयम म्हटलें आहे. वैशालीसृंजय हाच होय.

७ ( सो. नील. ) विष्णुमतें हर्यश्वाचा व वायुमतें रिक्षाचा पुत्र. भागवतमतें हाच भर्म्याश्वपुत्र संजय व मत्स्यमतें भद्राश्व पुत्र जय होय. हाच पांचाल सृंजय होय.

८ ( सो. नील. ) हरिवंशांतच फक्त हें नांव आहे. तेथें याच्या पित्याचें नांव स्पष्ट नाहीं. पण पुत्र पंचजन दिला आहे ( ह. वं. १. ३२ ). इतरत्र सृंजयाचा वंश च्यवनापासून मुद्गलांत सामील झाला. म्हणजे वरील व हा सृंजय एकच असावेत.

९ शैब्याचा पुत्र. याची स्त्री कैकेयी, पुत्र सुवर्णष्ठीविन् व कन्या दमयंती, मदयंती अथवा श्रीमती ( ३ नारद पहा )

१० ( सो. क्रोष्टु. ) भागवत, विष्णु व मत्स्य यांच्या मतें शूरपुत्र याची स्त्री कंसभगिनी राष्ट्रपाली. याचे पुत्र वृष व दुर्मर्षण.

११ हे लोक भारतीय युद्धांत पांडवांच्या बाजूस होते ( म. द्रो. ३५. ५; ४०. २०; भा. कृ. प्रत ).

...श्वैतहव्य--( केसरप्राबंधा पहा ).

...होत्रवाहन--होत्रवाहनाचें नांव.

...श्रुतंजय--( ३ श्रुतंजय पहा ).

...बिंदु--इंद्रानें याचा वध केला ( ऋ. ८.३२.२ ).

...ष्टि--( सो. वृष्णि. ) उग्रसेनाचा आठवा पुत्र ( भा. ९. २४. २४ ).

२ ध्रुव व भूमि यांचा पुत्र.

...क--जनमेजयाच्या सर्पसत्रांत दग्ध झालेला धृतराष्ट्रकुलांतील सर्प ( म. आ. ५७.१५ कुं. ).

**सेतु**--( सो. द्रुह्यु ) भागवतमतें बभ्रूचा, पण मत्स्य व वायु यांच्या मतें द्रुह्यचा पुत्र. विष्णुमतें सेतुपुत्र अथवा आरद्वत् असें याचें नांव आहे (अंगार पहा ).

**सेदुक**--( वृषदर्भ पहा ).

**सेन**--( १ हेम पहा ).

**सेनक**--एक वैयाकरण ( पा. सू. ५. ४. ११२ ).

**सेनजित्**--( सो. अज. ) भागवतमतें विशदाचा, विष्णु व वायु यांच्या मतें विश्वजित्‌चा आणि मत्स्यमतें अश्वजित्‌चा पुत्र. यास रुचिराश्व, दृढहनु, काश्य व वत्स असे चार पुत्र होते ( भा. ९. २१. २३ ). यानें नीतिशास्त्र ( राजधर्म ) सांगितलें ( म. शां. २५. १३-२९ कुं. ).

२ ( सू. इ. ) भागवतमतें कृशाश्वाचा पुत्र. इतरत्र यास प्रसेनजित् म्हटलें आहे.

३ ( सो. मगध. भविष्य. ) बृहत्कर्म्याचा पुत्र.

४ फाल्गुन महिन्यांतील सूर्याबरोबर फिरणारी अप्सरा ( भा. १२. ११. ४० ).

५ मरुद्गणांपैकीं दुसऱ्या गणांतील एक.

**सेनानी**--( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

२ एकादश रुद्रांपैकीं एक.

**सेनापति**--( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र. यास भीमानें ठार केलें ( म. भी. ६४. ३२ कुं. ).

**सेनाबिंदु**--एक राजा. याची राजधानी देवप्रस्थ. द्रौपदी-स्वयंवरास हा गेला होता ( म. आ. २०१. ९ कुं. ). उत्तर-दिग्विजयकालीं यास अर्जुनानें जिंकिलें होतें ( म. स. २८. १० कुं. ). भारतीय युद्धांत हा पांडवांच्या बाजूस होता व भीष्मानें यास रथसत्तम ठरविलें होतें ( म. उ. १०१. २० कुं. ). याचे घोडे पिवळ्या रेशमासारख्या रंगाचे असून त्यांवर सुवर्णाचें भारी सामान असे. ते स्वभावानें गरीब असत ( म. द्रो. २३. २६ कुं ). यास कर्णानें ठार केलें ( म. क. ४३. १५ कुं. ). हा पूर्वजन्मीं तुहुंड नांवाचा असुर होता ( म. आ. ६८. २० कुं. ).

...न--विश्वामित्राचा पुत्र.

**सैंहिकेय साल्व**--यास परशुरामानें देवांकरितां शंकराच्या आज्ञेनें ठार केलें ( विष्णुधर्म. १. ५२ ).

**सैतव**--एक आचार्य. पाराशर्याचा शिष्य. याचे शिष्य गौतम ( बृ. उ. २.६.२; ४.६.२ ) व आग्निवेश्य ( श. ब्रा. १४.७.३.२७ ).

**सैत्य**--आंगिराकुलांतील एक प्रवर.

**सैंधवायन**--विश्वामित्राचा पुत्र व विश्वामित्रकुलांतील एक गोत्रकार ऋषिगण.

२ व्यासाच्या अथर्वशिष्यपरंपरेंतील शौनकाचा शिष्य.

**सैवलक**--वसिष्ठकुलांतील गोत्रकार. याबद्दल सर्वसौलाब असा पाठ आहे.

**सैरंध्रि**--कश्यपकुलांतील गोत्रकार.

२ केकयाची कन्या व मरुत्तस्त्री ( मार्क. १२८ ).

**सैशिरिरि**--विश्वामित्रकुलांतील एक गोत्रकार.

**सोक्ति**--भृगुकुलांतील एक गोत्रकार.

**सोदन्ति**--विश्वामित्रानें याच्यावर जय मिळविला ( पं. ब्रा. १४. ५. १३ ).

**सोभरि काण्व**--सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. १९-२२; १०३ ). एकविसाव्या सूक्ताखेरीज सर्व सूक्तांत याचा उल्लेख आहे. याला त्रसदस्यूकडून पन्नास वधू मिळाल्या होत्या ( ऋ. ८. १९. ३६ ). पक्थ व दैवोदासी यांच्याशींहि याचा संबंध असावा ( ऋ. ८. १०३ ). याच्या पित्याचें नांव सोभरि असावें ( ६ चित्र व सौभरि पहा ).

**सोम**--स्वायंभुव मन्वंतरांतील अत्रीचा पुत्र. हा बापाप्रमाणेंच प्रजापति होता ( चंद्र, दक्ष व मारिषा पहा ).

२ शाल्मलि द्वीपांतील लोकांची उपास्य देवता ( भा. ५. २०. ११ ).

३ सवितृ व पृश्नि यांचा पुत्र.

४ आंगिरस्कुलांतील गोत्रकार.

५ ( सोमतान्वि पहा ).

६ मंत्रद्रष्टा ( ऋ. १०. १२४. १; ५-९ ).

७ सुखदेवांपैकीं एक.

८ धर्म व वसु यांचा मुलगा (विष्णु. १. १५. १११ ).

९ शिवावतार ( १ शिव पहा ).

**सोम प्रातिवेश्य**--प्रातिवेश्याचा शिष्य ( सां. आ. १५. १ ).

**सोम शुष्मायण**--एक व्यत्स ( व्यास पहा ).

**सोमक साहदेव्य**-(सो. नील.) सृंजयांचा राजा (ऋ ४.१५.७-१० ). याचा सोमक सार्ञ्जय असाहि निर्देश आहे ( ऐ. ब्रा. ७. ३४ ). याचे पर्वत व नारद पुरोहित होते. हा वामदेवाचा आश्रयदाता होता. वामदेवानें सोमकापासून

आपणांस घोडे मिळाल्याचा उल्लेख केला आहे ( ऋ. ४. १५.८ ). याच सूक्तांत दैववात सृंजयाच्या अग्नीचें वर्णन आहे (१ वामदेव व १ सृंजय पहा ). सहदेवालाहि साञ्जेय म्हटलें आहे ( श. ब्रा. २. ४. ४. ४ ).

सहदेव राजाचा पुत्र ( भा. ९. २२; ह. वं. १. ३२; ब्रह्म. १३; वायु. २. ३७ ). यास शंभर भार्या होत्या. पुढें म्हातारपणीं याला एक जंतु नांवाचा पुत्र झाला. एकदां खेळत असतांना जंतूला एक मुंगी चावली. त्यामुळें त्या वेदनेनें तो फार व्याकुळ झाला. तें पाहून हा व याच्या शंभरहि बायका आक्रोश करावयाला लागल्या. नंतर मुंगीच्या दंश-वेदना कमी झाल्यावर जंतु पूर्ववत् खेळूंबागडूं लागला. परंतु आपल्याला एकच पुत्र आहे, हें पाहून हा मात्र सदोदित दुःखांत राहूं लागला.

नंतर हा आपल्यास आणखी पुत्र व्हावेत म्हणून प्रत्येकास उपाय विचारूं लागला. कांहीं दिवसांनीं याच्या एका पुरोहितानें याच्याकडून नरमेध करविला. याचा पुत्र जंतु हाच त्यांमधील पशु होता. पुढें त्याच्या मांसाचें हवन केल्यावर यज्ञांतील वेदीमधून धूर निघूं लागला. तो धूर सर्व राजपत्न्यांनीं ग्रहण केला व त्याच्या योगानें याच्या प्रत्येक स्त्रीला एक एक पुत्र झाला.

कांहीं दिवसांनीं हा व याचा पुरोहित हे दोघेहि मरण पावले. हा स्वर्गास गेला; परंतु याचा पुरोहित मात्र पुरुष-हत्येच्या पापानें नरकांत पडला. त्यामुळें याला दुःख झालें व हा आपल्या पुरोहितास सोडून एकटाच स्वर्गसुख भोगण्यास तयार होईना. तेव्हां यमाच्या सांगण्यावरून हा कांहीं काल-पर्यंत आपल्या पुरोहितांसह नरकांतच राहिला व पुढें हे दोघेहि उत्तम गतीप्रत गेले ( म. व. १२७-१२८ ).

२ कृष्ण व कालिंदी यांचा पुत्र

**सोमकान्त**—हा पूर्वजन्मींचा कामंद. हा गणपतीच्या कृपेनें या नांवाचा सौराष्ट्राचा राजा झाला. याची राजधानी देवनगर व पत्नी सुधर्मा. ज्ञानगम्य व सुबल या दोन प्रधानांसह भृगूकडे जाऊन हा कुष्ठरहित झाला व यानें गणेशपुराण ऐकिलें ( गणेश. १. १-९ ).

**सोमकीर्ति**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्राचा पुत्र.

**सोमतन्वि**—अंगिरस्कुलांतील गोत्रकार. सोम व तन्वि असा पाठभेद आहे.

**सोमदक्ष कौश्रेय**—एक आचार्य ( क. सं. २०. ८; २१. ९; मै. सं. ३. २. ७ ).

**सोमदत्त**—( सो. कुरु. ) बाह्लीकाचा पुत्र. शिनि नामक यादवानें वसुदेवासाठीं देवकीचें हरण केलें. त्या प्रसंगीं यानें त्यास अडथळा केल्यामुळें शिनीनें याला याचे केंस धरून पाडिलें व लत्ताप्रहर केला. या अपमानामुळें हा क्रोधवश होऊन तपानें रुद्राजवळ यानें शिनीचा सूड घेणारा पुत्र मागितला. तोच भूरिश्रवस् होय. भूरिश्रव्यानें शिनिपुत्र सात्यकि याची भारतीय युद्धांत आपल्या बापाची शिनीनें ज्याप्रमाणें अवस्था केली होती, तीच अवस्था केली. भारतीय युद्धांत सात्यकीच्या हातून याचा पराभव व वध झाला ( भा.९.२२.१८; म. द्रो. १४४; १५६; १६२ ). याला भूरि, भूरिश्रवस् आणि शल असे तीन पुत्र होते ( म. आ. १८६. १५ कुं. ).

२ ( सू. दिष्ट.) विष्णु व भागवत यांच्या मतें कृशाश्वपुत्र. यानें अनेक अश्वमेधांनी व महायोगाच्या संगतीनें उत्तम गति मिळविली. याला सुमति नांवाचा पुत्र होता ( भा. ९. २. ३५ ).

४ ( कल्माषपाद पहा ).

५ ( सो. नील. ) अग्निमतें सुदासास नामांतर.

**सोमदन्ति**—व्यासाच्या पुराणशिष्यपरंपरेंतील रोमहर्षणाचा शिष्य. याचें सावर्णि सोमदन्ति असें संपूर्ण नांव असावें.

**सोमदा**—ऊर्मिला नामक गंधर्वीची कन्या व चूलिपुत्र ब्रह्मदत्त राजाची माता ( चूलि पहा ). हिनें नवरा न करितां पुत्र मागून घेतला.

**सोमनाथ**—शंकराचा अवतार. हा काठेवाडांत आहे. यानें चंद्राचें दुःख नाहींसें केलें, म्हणून याची चंद्रानें पूजा केली. तेथें चंद्रकुंड आहे. याची पूजा केल्यानें क्षयकुष्ठादि सर्व रोग नाहींसे होतात ( शिव. शत. ४२ ). याचें उपलिंग उपकेश होय ( शिव. कोटि. १ ).

**सोमप**—हे पितर प्रलयान्तीं उत्पन्न झाले. हे ब्रह्मांडाच्या वर असलेल्या मानस किंवा सुमनस् नांवाच्या स्वर्गाच्या एका भागांत राहतात. हे मूर्तिमान् धर्मच आहेच. यांना ब्रह्मत्व प्राप्त झालेलें आहे. नर्मदा नदी ही यांची मानसकन्या होय. मनूसहित सर्व प्रजा यांच्याचपासून उत्पन्न झाली ( मत्स्य. १५; पद्म. सृ. ९; ह. वं. १. १८; प्रियव्रत सोमप पहा ).

२ रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ रेणुकेचा पालक पिता.

**सोमभोजन**—गरुडाचा पुत्र.

**सोमराजन्**—व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील वायु व ब्रह्मांड यांच्या मतें हिरण्यनाभाचा शिष्य. ब्रह्मांडमतें सोमराजायन असा पाठभेद आहे.

**सोमवाह**—अगस्त्यकुलांतील गोत्रकार.

**सोमवित्**—( सो. अज. ) मत्स्यमतें सहदेवाचा पुत्र.

**सौमशर्मन्**--( मौर्य. भविष्य. ) भागवत व विष्णु याच्या मतें शालिशुकाचा पुत्र.

२ शिवशर्मन्‌चा पुत्र. हा मोठा पितृभक्त होता. हा पुढील जन्मीं प्रह्लाद झाला ( पद्म. भू. ४-५ ).

३ एक वामनक्षेत्रांतील ब्राह्मण. यास सुमना नामक स्त्री होती. यास विष्णुकृपेनें सुव्रत नांवाचा पुत्र झाला ( पद्म. भू. ११-२२ ).

**सौमशुष्म सात्ययज्ञि**--हा फिरस्ता ब्राह्मण विदेह जनकाला भेटला होता ( श. ब्रा. ११. ६. २. १ ). सात्ययज्ञ प्राचीनयोग्य हें याचें पैतृक नांव आहे ( जै. उ. ब्रा. ३. ४०. २ ).

**सौमशुष्मन् वाजरत्नायन**--शतानीकाला राज्याभिषेक करणारा पुरोहित ( ऐ. ब्रा. ८. २१. ५ ).

**सौमश्रवस्**--श्रुतश्रवस् ऋषीस नागिणीपासून झालेला पुत्र. हा पांडवांचा प्रपौत्र जनमेजय याचा उपाध्याय होता ( म. आ. ३. १३ कुं. ). हा मूकव्रतानें राहत असे व कोणीहि कांहींहि मागितलें तरी देत असे, असें याचें व्रत असल्यामुळेंच सर्पसत्र बंद करण्याची आस्तिकाची मागणी याच्याकरितां जनमेजयास मान्य करावी लागली. कारण या अटीवरच हा त्याचा उपाध्याय झाला होता ( म. आ. ३. १८ कुं. ).

**सौमाहुति भार्गव**--सूक्तद्रष्टा ( ऋ. २. ४-७ ).

**सौम्य**--( आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें पुरींद्रसेनाचा पुत्र.

**सौंहंजि**--( संहत पहा ).

**सौकरायण**--हा काषायणाचा शिष्य. याचा शिष्य माध्यंदिनायन ( बृ. उ. ४. ६. २ ). हा त्रैवणीचा शिष्य असेंहि आढळतें ( श. ब्रा. १४. ७. ३. २७ ).

**सौचकि**--भृगुकुलांतील गोत्रकार.

**सौचित्ति**--सत्यधृतीचें पैतृक नांव. हा भारतीय युद्धांत पांडवांकडे होता ( म. उ. १९६. २८ कुं. ).

**सौचीक**--( अग्नि सौचीक पहा ).

**सौजन्य**--भृगु व पौलोमी यांचा पुत्र, देव (मत्स्य. १९५).

**सौजात आराळि**--याच्या आहुतिविषयक मताचा पुरस्कार आढळतो ( ऐ. ब्रा. ७. २२ ).

**सौटि**--अंगिराकुलांतील गोत्रकार.

**सौति**--उग्रश्रव्याचें नामांतर. यानें शौनकादिकांस त्यांच्या द्वादशवार्षिक सत्रांत जाऊन त्यांनीं विचारिल्यावरून महाभारत सांगितलें.

कांहीं लोकांच्या मतें ' नारायणं नमस्कृत्य ' या श्लोकापासून ( म. आ. १. १ ), कांहींच्या मतें आस्तीक पर्वापासून ( म. आ. १३ ) व कांहींच्या मतें उपरिचर वसूच्या कथेपासून ( म. आ. ६४ कुं. ) भारतास आरंभ होतो, असें महाभारतांतच म्हटलें आहे ( म. आ. १.६५-६६ कुं. ). या ग्रंथाचे संक्षेप व विस्तार बऱ्याच वेळां झाले असावेत.

याचा शौनकाशीं संवाद झाला ( म. आ. १. ५; ४ कुं. ). बलरामानें याच्या पित्यास मारिल्यावर ' हाच पुराणें सांगेल ' असें त्यानें सांगितलें होतें ( भा. १०. ७८ ). सौति ही एकच व्यक्ति नसून कोणाहि सूतवंशजाला सौति म्हणत असावेत.

**सौत्रामणि**--द्रुपद राजाची स्त्री. हिचें कौसवी असें नामांतर होतें ( म. आ. १४९. ५० कुं. ).

**सौदामिनी**--कश्यप व विनता यांची कन्या.

**सौदास**--वसिष्ठाचे पुत्र मेले असतां यज्ञ करून पुनः पुत्रादिक प्राप्त करून त्यानें सौदासाला मागें सारिलें ( सां. ब्रा. ४. ८; तै. सं. ७. ४. ७. १; पं. ब्रा. ४. ७. ३; कल्माषपाद पहा ).

२ ( सो. नील. ) विष्णु व वायु यांच्या मतें सहदेवाचें पैतृक नांव.

**सौदेव**--सुदेवपुत्र दिवोदासाचें पैतृक नांव.

**सौद्युम्नि**--युवनाश्वाचें पैतृक नांव ( म. व. १२७. १ कुं. ).

२ भरत दौष्यन्तीचें पैतृक नांव ( श. ब्रा. १३. ५. ४. १२ ).

**सौधिक**--भृगुकुलांतील गोत्रकार.

**सौनकर्णि**--अत्रिकुलांतील एक गोत्रकार.

**सौनंदा**--( सुदावती पहा ).

**सौपुरि**--अंगिराकुलांतील गोत्रकार.

**सौपुष्पि**--अत्रिकुलांतील गोत्रकार.

**सौबल**--शकुनीचें पैतृक नांव.

२ सार्वसेनीचा शिष्य ( ऐ. ब्रा. ६. २४. १६ ).

**सौबुधि**--अंगिराकुलांतील गोत्रकार.

**सौभग**--बृहच्छ्लोकाचा पुत्र ( भा. ६. १८. ८ ).

**सौभद्र**--( सो. वसु. ) वसुदेव व रथराजी यांचा पुत्र.

**सौभपति**--सौभ देशाचा राजा शाल्व याचें नांव.

**सौभर**--पथिन्‌चें पैतृक नांव.

**सौभरि**--हा यमुनेच्या डोहांत उग्र तप करीत होता. एकदां एक मासा रतिसुखांत मग्न झालेला पाहून यास तसें सुख उपभोगण्याची इच्छा झाली. म्हणून हा मांधात्याकडे गेला व त्याजवळ यानें कन्या मागितली. त्यानें हा फार वृद्ध आहे, असें पाहून प्रत्यक्ष नकार देण्याचें टाळलें. त्यानें याला सांगितलें कीं, ' आपण अंतःपुरांत जावें व जी कन्या

आपणांस वरील तिचें पाणिग्रहण करावें.' यानेंहि त्या उत्तरांतील मर्म जाणून असें रूप स्वीकारिलें कीं, पन्नासहि कन्यांनीं याला वरिलें. पुढें यानें तपःसामर्थ्यानें असें ऐश्वर्य उपभोगिलें कीं, चक्रवर्ति मांधातासुद्धां थक्क झाला. याला प्रत्येक स्त्रीचे ठिकाणीं शंभर शंभर मुलें झालीं. शेवटीं याचें यालाच आश्चर्य वाटून वैराग्य उत्पन्न झालें. याच्या स्त्रियाहि याच्याचप्रमाणें वैराग्ययुक्त झाल्या (भा. ९. ६. ३८-५५; विष्णु. ४. २-३). हीं गोष्ट वंशावळ सांगत असतां मांधात्याच्या पन्नास मुलींच्या लग्नाकरितां सांगण्यांत आली आहे. हा बह्वृच् होता (विष्णु. ४. २; सोभरि काण्व पहा).

२ एक ऋषि. यानें गरुडाला शाप देऊन यमुनेच्या डोहांत येण्यास प्रतिबंध केला होता (भा. १०. १७. १०).

३ व्यासाच्या ऋक्‌शिष्यपरंपरेंतील भागवतमतें देवमित्राचा शिष्य (व्यास पहा).

४ या ऋषीचा आश्रम विंध्य पर्वतांत होता. युधिष्ठिरानें अश्वमेध केला, त्या वेळीं अश्वाच्या संरक्षणाकरितां बरोबर अर्जुन होता. वाटेंत अर्जुनाची व याची भेट झाली. त्या वेळीं यानें अर्जुनास उद्दालक व चंडी यांची पुरातन गोष्ट सांगितली व अर्जुनाच्या हस्तस्पर्शानें चंडीला मुक्त केलें (जै. अ. १६).

**सौमदत्ति**—भूरिश्रवसचें पैतृक नांव.

**सौमनस्य**--(स्वा. प्रिय.) भागवतमतें यज्ञबाहूचा पुत्र.

**सौमाप**--मानुतन्तव्याचें पैतृक नांव.

२ (प्रियव्रत सोमप पहा).

**सौमायन**—बुधाचें पैतृक नांव.

**सौमुक**--विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**सौम्य**--एक प्रकारचे पितर (भा. ४. १. ६३).

२ (सो. क्रोष्टु.) मत्स्यमतें रुषद्‌चा पुत्र.

३ बुधाचें पैतृक नांव.

**सौयवसि**--अजीगर्ताचें पैतृक नांव. मनूनेंहि अजीगर्ताच्या कथेचा उल्लेख केला आहे (१०. १०७).

**सौर**--भृगुकुलांतील गोत्रकार.

**सौरभेय**--दीर्घतमसचा गुरु (म. आ. ११३. २६ कुं.).

**सौरभेयी**—शापानें मगरी झालेली अप्सरा (समीची पहा; म. आ. २३६. १०; स. १०. १३ कुं.).

**सौरि**--भृगुकुलांतील गोत्रकार.

**सौर्य**--अभितपस्, धर्म व चक्षुस् यांचें पैतृक नांव.

**सौवीरी**—सुवीरकन्या व मरुत्तस्त्री (मार्क. १२८).

**सौवेष्ट**--अंगिराकुलांतील गोत्रकार.

**सौश्रवस्**--(उपगु सौश्रवस पहा).

**सौश्रवस काण्व**—एक आचार्य (क. सं. १३.१२).

**सौश्रुति**—हा भारतीय युद्धांत दुर्योधनाकडे होता. यास अर्जुनानें मारिलें (म. क. २७).

**सौश्रोमतेय**—(अषाढि सौश्रोमतेय पहा).

**सौषद्मन**--विश्वंतराचें पैतृक नांव.

**सौसुक**—विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**सौह**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**सौहसोक्ति**—मृगकुलांतील गोत्रकार.

**सौहोत्र**—अजमीढ व पुरुमीढ यांचें पैतृक नांव.

**स्कंद**—शंकरपार्वतींना होणारा पुत्र भयंकर होईल, या भीतीनें इंद्रानें विघ्न करण्याकरितां पाठविलेला अग्नि तेथें गेला व त्यानें त्यांचा एकान्त भंग केला. त्यामुळें शंकराचें वीर्य अर्धें जमिनीवर सांडलें. याबद्दल शिक्षा म्हणून पार्वतीनें तें तेज अग्नीस धारण करावयास लाविलें. तें शापभीतीनें त्यानें कष्टानें धारण केलें. तो अग्नि अष्टवसूंपैकीं अनल होय (१५ वसु पहा). पण पुढें तें त्यानें मोठ्या मिनतवारीनें गंगेस घ्यावयास लाविलें. तिनेंहि तें जमिनीवर सोडिलें. त्यापासून स्कंद झाला (ब्रह्मांड. ३. १०. २२-६०; वायु. २. ११. २०-४९). सप्तर्षि यज्ञ करीत असतां यज्ञरूप अग्नि ऋषिस्त्रियांविषयीं कामासक्त झाला. अग्नीची अप्रिय स्त्री स्वाहा हिनें प्रिय होण्यास ही उत्तम संधि असल्याचें जाणून अरुंधतीखेरीज सहा स्त्रियांच्या रूपांनीं त्याशीं संभोग केला व प्राप्त झालेलें तेज एका कुंडांत नेऊन सांठविलें. त्यापासून हा झाला (म. व. २२६-२२७. कुं.). निरनिराळ्या फरकानें वरील कथा खालील ठिकाणीं आल्या आहेत (पद्म. सृ. ४४; स्कंद. १. १. २७; मत्स्य. १५८. २७-४८; वा. रा. बा. ३६; म. व. २३१. ९-१२ कुं.). यानें दानव स्कंदिले (ठार केले), म्हणून किंवा स्कन्न वीर्यापासून जन्म पावला म्हणून स्कंद, सहा ऋषिपत्न्या किंवा कृत्तिकांनीं यास आपला पुत्र मानिलें म्हणून षाण्मातुर व कार्तिकेय, यास शाखा (हात) फार म्हणून विशाख, कृत्तिकांनीं यास सहा मुखें दिलीं म्हणून षण्मुख, देवांचा सेनापति म्हणून सेनानी किंवा देवसेनापति, स्वाहापुत्र म्हणून स्वाहेय, वगैरे अनेक नांवें होतीं (म. व. २३३ कुं.). यास प्रजापतिकन्या (म. व. २२६, १ कुं.), इंद्रकन्या (मत्स्य. १५९. ८) अथवा मृत्युकन्या (स्कंद. १.१.२७) देवसेना नांवाची स्त्री होती. तारकासुरहननार्थ याचा अवतार होता. त्यास सात दिवसांच्या बालकापासून मृत्यु असल्याबद्दल ब्रह्मदेवाचा वर होता. त्याप्रमाणें जननापासून सातव्याच दिवशीं यानें तारकास ठार केलें (पद्म. सृ. ४४; मत्स्य. १६०). महाभारतांत

यानें महिषासुरास ठार केलें असें आहे ( म. व. २३२ कुं.). पण तारकासहि मारिल्याचें आहे ( म. श. ४७. ७३; अनु. १३३. १९ कुं. ). म्हणजे याचा अमावास्येला जन्म व शुद्ध षष्ठीला यानें तारकाचा वध केला. तारकासुराला मारण्यापूर्वीच यास देवांनीं क्रौंचपर्वतावर (ब्रह्मांड. ३.१०) किंवा वारुणतीर्थी (पद्म. स्व. २७ ) सैनापत्याचा अभिषेक केला. तेव्हांपासून हा त्यांचा सेनापति आहे. तारकवधानंतर पार्वतीच्या लाडामुळें हा देवस्त्रियांवर बलात्कार करूं लागला. तेव्हां देवांच्या तक्रारींवरून यानें इच्छिलेल्या स्त्रीचे ठिकाणीं पार्वतीनें आपलें रूप दाखविण्याचा उपक्रम केला. तेव्हां याला इतका पश्चात्ताप झाला कीं, त्या भरांत 'जगांतील स्त्री जात तेवढी मला मातेसमान होय,' अशी यानें प्रतिज्ञा केली ( ब्रह्म. ८१ ). याच्या मातांनीं व्यभिचार केला ( ब्रह्म. ८२; पद्म. सृ. ४४ ) अशी शंका आली म्हणून त्यांस त्यांच्या पतींनी म्हणजे सप्तर्षींनीं टाकून दिल्या ( म. व. २२८. ८ कुं. ). विश्वामित्रानें सप्तर्षीस खरी हकीगत सांगितली असतांहि त्यांनीं ऐकिली नाहीं. याचें उपनयनादि विश्वामित्रानें केलें ( म. व. २२८. १४-१५ कुं. ). यास विष्णूनें गरुड, मयूर व कुक्कट हीं वाहनें, वायूनें पताका, सरस्वतीनें वीणा, ब्रह्मदेवानें बोकड व शंभूनें मेंढा इत्यादि दिलीं. याची शक्ति जृंभ दैत्याच्या तोंडांतून निघालेली अपराजिता होय ( ब्रह्मांड. ३. १०. ४५-४८ ). देवसेना याची पत्नी म्हणून जरी दिली असली तरी तें रूपक असावें. शिवाय, यास देवांनीं सैनापत्याचा अभिषेक केला म्हणूनच यास देव-सेनापति म्हणत असें म्हटलें आहे. अलीकडे याचे दर्शनास स्त्रिया जात नाहींत. याबद्दल पुराणांतरीं कोठेंहि पुरावा नाहीं. मात्र मराठी वाङ्मयांतील शिवलीलामृतांत यानें आपल्या दर्शनास येणाऱ्या स्त्रियांस 'सात जन्म वैधव्य येईल,' असा शाप दिल्याचें दिलें आहे ( १३ ). याचे पुत्र शाख, विशाख व नैगमेय होत. ( १५ वसु पहा ). पैकीं विशाख व आणखी कन्यापुत्र याचे पाठीवर इंद्रानें यास मारण्याकरितां केलेल्या वज्राघातानें झाले ( म. व. २२८. ४६-५० कुं. ). हे कन्यापुत्र याचे पार्षद व पुत्र असून याचे मातृगणांनीं आपणांस स्कंदग्रहत्व मागून घेतलें ( म. व. २३० कुं. ). हे स्कंदग्रह म्हणजे अपस्मारासारखे रोग असावेत ( २ बाण पहा ).

यानें क्रौंच पर्वतास बाण मारून आरपार भोंक पाडिलें. याला षष्ठीप्रिय म्हणतात. याला शुद्ध पंचमीस सैनापत्याचा अभिषेक झाला व षष्ठीस यानें असुरांचा पराजय केला म्हणून या दोन्ही तिथि यास प्रिय आहेत. ब्राह्मी, माहेश्वरी इत्यादिहि याच्या सप्तमाता आहेत. शिवाय काकी, हलिमा, माता, हली, आर्या, बाला व धात्री असाहि एक मातृगण आहे. याची व सप्तमाता वगैरेंची पूजा लहान मुलांच्या आरोग्याकरितां करितात ( म. व. २२६-२३३ कुं. ). यानें यमास ठार केलें ( १२ श्वेत पहा ). याला सनत्कुमार असेंहि म्हणत ( ह. वं. १. ३; म. व. २३० कुं. ).

२ शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

३ आठव्या आयूचा पुत्र.

**स्कंदस**—अंगिराकुलांतील एक गोत्रकार.

**स्कंदस्वाति**—( आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें स्वातीचा पुत्र.

**स्कंध**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**स्कंभ**—एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**स्तनयित्नु**—वियोताचा पुत्र ( भा. ६. ६. ५ ).

**स्तनित**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**स्तंब**—श्यामपराशरकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

२ स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**स्तंबमित्र**—मंदपाल ऋषि व जरितृ शार्ङ्गी यांचा पुत्र. यास अग्नीनें दाहमुक्त केलें ( म. आ. २५८. १२ कुं. ). हा मंत्रद्रष्टाहि आहे ( ऋ. १०. १४२. ७-८ ).

**स्तंभ**—स्वारोचिष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**स्तुति**—( स्वा. प्रिय. ) भागवतमतें प्रतिहर्तृची पत्नी.

**स्तुत्यव्रत**—( स्वा. प्रिय. ) हिरण्यरेतस्‌चा पुत्र. याच्या देशाचेंहि सत्यव्रत असेंच नांव होतें ( भा. ५. २०. १४ ).

**स्तोक**—कृष्णाचा मित्र गोप ( भा. १०. १५. २० ).

**स्थंडिलेयु**—(सो. पूरु.) रौद्राश्व व घृताची यांचा पुत्र.

**स्थपति**—जनमेजयाचा सूत. याचें मूळ नांव लोहिताक्ष. यास स्थलमापनादि शास्त्रें माहीत होतीं ( म. आ. ५१.१५; ५८. १२ कुं. ).

**स्थल**—( सू. इ. ) भागवतमतें बलाचा पुत्र.

**स्थलपिंड**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**स्थलेयु**—( सो. पूरु. ) रौद्राश्वाचा पुत्र.

**स्थविर कौंडिन्य**—नकाराचा अनुनासिक तीव्रतर उच्चार सांगणारा आचार्य ( तै. प्रा. १७. ४ ).

**स्थविर शाकल्य**—एक उच्चारशास्त्रज्ञ आचार्य ( ऋ. प्रा. १८५ ). प्राणाच्या ठिकाणीं सूक्ष्म स्वरूपांत चक्षु, कान, वाणी, मन वगैरे सर्व असतात असें हा म्हणतो ( ऐ. आ. ३. २. ७ ). स्थवीर असाहि पाठ आहे.

**स्थाणु**—एकादश रुद्रांपैकीं एक ( म. आ. ६७. ३ कुं. ). याचा प्रजापतींशीं संवाद झाला होता ( म. शां. २६३. १-१२ कुं.; १ रुद्र पहा ).

**स्थान**—सुख देवांपैकीं एक.

**स्थिरक गार्ग्य**--वसिष्ठ चैकितानेयाचा शिष्य. याचा शिष्य मशक गार्ग्य ( वं. ब्रा. २ ).

**स्थूण**—विश्वामित्राचा पुत्र.

२ ( स्थूणाकर्ण पहा ).

**स्थूणकर्ण**--द्वैतवनांत पांडवांसमवेत असणारा एक ऋषि ( म. व. २६. २३ कुं. ).

**स्थूणाकर्ण**--एक यक्ष. यानें शिखंडिनीस पुरुषत्व दिलें ( २ शिखंडिन् पहा ). हा कुबेराचा अनुचर होता ( म. उ. १९१. २०-२२ कुं. ). याला स्थूण असेंहि म्हणत.

**स्थूलकर्ण**--मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**स्थूलकेश**—( प्रमद्वरा पहा ).

**स्थूलशिरस्**—एक ऋषि. हा अश्वशिरस्चा पुत्र ( वराह. ५ ). यानें विश्वावसूला शाप देऊन कबंध राक्षस केलें.

**स्थूलाक्ष**--दूषणाचा अमात्य ( वा रा. अर. २३. ३३ ).

**स्थूरकायन**--मित्रवर्चस्चें पैतृक नांव.

**स्थौर**—अग्नियुत व अग्नियूप यांचें पैतृक नांव.

**स्थौलाष्ठीवि**--एक वैयाकरण ( नि. १०. ३. १ ).

**स्नातप**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

**स्पर्श**—तुषित देवांपैकीं एक.

**स्फूर्ज**--एक राक्षस. पौषांत हा भग सूर्याबरोबर असतो ( भा. १२. ११. ४२ ).

**स्फूर्ज**--यातुधानपुत्र. याचा पुत्र निकुंभ ( ब्रह्मांड. ३. ७. ९५ ).

**स्फोटन**—एक वैयाकरण (अ. प्रा. १. १०३;२.३८ ).

**स्फोटायन**--एक वैयाकरण ( पा. सू. ६.१.१२३ ).

**स्मदिभ**--इंद्रानें तुग्र व स्मदिभ यांना कुत्साच्या ताब्यांत दिलें ( ऋ. १०. ४९. ४ ).

**स्मय**--स्वारोचिष मन्वंतरांतील प्रजापति.

२ धर्म व पुष्टि यांचा पुत्र.

**स्मर**—मरीचि व ऊर्णा यांचा पुत्र.

**स्मरदूती**—वृंदेची सखी ( पद्म. उ. ९ ).

**स्मृत**--स्वारोचिष मनूचा पुत्र.

**स्मृति**--धर्म व मेधा यांचा पुत्र.

२ अंगिरस्कुलांतील गोत्रकार.

३ दक्षाची कन्या व अंगिरसची स्त्री.

**स्यातपायन**--( जपातय पहा ).

**स्यावास्य**--शिखंडिन् नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**स्यूमरश्मि**--सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ७७-७८ ). अश्विनीं कळकाच्या बाणांनीं याचें रक्षण केलें ( ऋ. १. ११२. १६ ). इंद्र याच्या घरीं सोम प्याला ( ऋ. ८. ५२. २ ).

२ कपिलाच्या कृपेनें ज्ञानी झालेला ऋषि. गोरूप धारण केलेल्या याचा कपिलाशीं संवाद झाला होता ( म. शां. २७४-२७६ कुं. ).

**स्योद**—भव्य देवांतील एक.

**स्रवस्**—स्वायंभुव मन्वंतरांतील जित् देवांपैकीं एक.

**स्वकेतु**—पहिला सुकेतु व हा एकच.

**स्वधर्मन्**—वैवस्वतपुत्र धृष्टाचा पुत्र ( पद्म. सृ. ८ ).

**स्वधा**—दक्षकन्या व पितरांना कव्य पोंचविणारी अंगिरस् अग्नीची पत्नी. हिच्या कन्या वयुना व धारिणी ( भा. ४. १. ६३ ). हिनें पितर व अथर्वांगिरस् पुत्र मानिले होते ( भा. ६. ६. ९ ).

**स्वधामन्**—उत्तम मन्वंतरांतील देवगण.

२ रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ सत्यसह व सूनृता यांचा पुत्र. रुद्रसावर्णि मन्वंतरांतील अवतार.

**स्वनद्रथ**—मेधातिथीचा आश्रयदाता ( ऋ. ८. १. ३२ ).

**स्वनय भावयव्य**—एक राजा. यास बृहस्पतीची कन्या रोमशा दिली होती ( ऋ. १. १२६. ६-७; बृहद्दे. ३. १४५-१५५; सां. श्रौ. १६.११. ५ ). याला भाव्य म्हटलें आहे.

**स्वभूमि**—( सो. कुकुर. ) विष्णुमतें उग्रसेनाचा पुत्र.

**स्वमति**—( सू. दिष्ट. ) विष्णुमतें जनमेजयाचा पुत्र ( ५ प्रमति पहा ).

**स्वमूर्धन्**—भृगूचा पुत्र, देव.

**स्वमृडीक**—सत्य देवांतील एक.

**स्वयंप्रभा**--मेरुसावर्णीची कन्या व हेमा अप्सरेची सखी. हेमेनें स्वर्गास जाते वेळीं मयानें बांधून दिलेलें स्थळ व त्यास रक्षण्याचें सामर्थ्य हिलाच दिलें होतें. पुढें अंगदादि वानरांना हिनें समुद्रतीरीं पोहोंचविलें. नंतर ही रामाचें दर्शन घेऊन स्वर्गी गेली ( वा. रा. किं. ५०-५२ ). हिला प्रभावती असें नामांतर होतें ( म.व. २८३. ४१ कुं.; शांडिली पहा ).

**स्वयंप्रभु**--एक व्यास ( व्यास पहा ).

**स्वयंभु ब्रह्मन**--एक व्यास ( व्यास पहा ).

**स्वयंभोज**—( सो. क्रोष्टु. ) भागवतमतें शिनीचा, विष्णुमतें प्रतिक्षत्राचा व वायुमतें प्रतिक्षिप्ताचा पुत्र.

**स्वररक्षस्**--एक व्यास ( व्यास पहा ).

**स्वरवेदिन्**--या गंधर्वाची कन्या सुस्वरा.

**स्वरा**--सावित्रीचें नामांतर ( पद्म. उ. १०५ ).

२ उत्तानपाद व सूनृता यांची कन्या.

**स्वराज्**--कर्दमाची कन्या व अथर्वन्‌ची स्त्री. हिचे पुत्र अयास्य, उतथ्य, उशिति, गौतम व वामदेव ( ब्रह्मांड. ३. १. १०२ ).

**स्वराष्ट्र**—( ३ तामस व लोल पहा ).

**स्वरूप**—वरुणलोकांतील असुर (म. स. ९. १८ कुं.).

**स्वरोचि**—कलि व वरूथिनी यांचा पुत्र ( इंदीवराक्ष पहा ). मंदारविद्याधरकन्या विभावरीनें यास सर्व प्राण्यांची भाषा समजण्याची विद्या आणि पार व पुंजिकस्थला यांची कन्या कलावती हिनें पद्मिनीविद्या दिली ( मार्क. ६१ ).

हा आपल्या पत्नींसह मंदरपर्वतावर राहत असे. यास विजय, मेरुनंद व प्रभाव अशीं तीन मुलें अनुक्रमें मनोरमा, विभावरी व कलावती या स्त्रियांच्या ठिकाणीं झालीं ( मार्क. ६२-६३ ).

यानें पद्मिनीविद्येच्या साहाय्यानें पूर्वेस कामरूपावर विजय, उत्तरेस नंदवतीनगरी व दक्षिणेस तालनगर वसवून अनुक्रमें वरील मुलांस दिलीं. एकदा यास वनदेवतेपासून स्वारोचिष ऊर्फ द्युतिमत् नांवाचा मनु झाला. हंसांनीं कामासक्त म्हणून केलेल्या निंदेनें हा विरक्त होऊन तपास गेला ( मार्क. ६३).

**स्वर्ग**—धर्म व यामी यांचा पुत्र. याचा पुत्र नंदिन्.

**स्वर्जित् नाग्नजित**—एक राजा ( श. ब्रा. ८. १. ४. १० ).

**स्वर्णर**—एक यज्ञकर्ता ( ऋ. ८. ३. १२; १२. २).

**स्वर्णरोमन्**—( सू. निमि. )महारोमा जनकाचा पुत्र.

**स्वर्णा**—एक अप्सरा, वृंदेची माता ( पद्म. उ. ४ ).

**स्वर्भानवी**—आयूची स्त्री. हिचा पुत्र नहुष ( म. आ. ६९. २९ कुं. ).

**स्वर्भानु**—यानें सूर्याला ग्रहण लाविलें ( ऋ. ५. ४०. ५-९ ). हा असुर होता. देवांनीं साम्नें म्हणून सूर्याचें ग्रहण नाहींसें केलें ( पं. ब्रा. ४. ५. २; ६. १३ ). देवांनीं अत्रीकडून ग्रहण नाहींसें केलें (पं.ब्रा.६.६.८). या असुरानें सूर्याला अंधारानें झांकून टाकिलें, पण सोम व रुद्र यांनीं सूर्याला पुनः प्रकाशित केलें (श. ब्रा. ५. ३. २. २). यानें लाविलेलें ग्रहण देवांनीं दूर केलें: प्रथम अंधार नाहींसा झाला. त्यापासून काळी, दुसऱ्यांदा तांबडी, तिसऱ्यांदा पांढरी, चवथ्यांदा वांझ मेंढी उत्पन्न झाली. ती आदित्याला देऊन देवांनीं औषधी उत्पन्न केल्या ( तै. सं. २. १. २. २; सां. ब्रा. २४. ३ ).

कश्यप व दनु यांचा पुत्र ( भा. ६. ६. ३०; म. आ. ६६. २४ कुं.; विष्णु. १. २१. ५). याची कन्या प्रभा (विष्णु. १. २१ ) किंवा सुप्रभा. ती यानें नमुचीस ( भा. ६. ६. ३५ ) किंवा नहुषास दिली होती (ब्रह्मांड. ३.६.२३-२५ ). हा व राहु एकच. फक्त वरील ठिकाणीं स्वर्भानु शब्द आहे.

२ विप्रचित्ति व सिंहिका यांचा पुत्र.

**स्वर्वीथी**—(स्वा. उत्तान.) भागवतमतें वत्सराची स्त्री.

**स्वश्न**—इंद्रानें याचा वध केला ( ऋ. २.१४. ५ ).

**स्वश्व**—अंगिराकुलांतील मंत्रकार

**स्वश्व**—याच्या पोटीं सूर्य आला होता. त्याचें व एतशाचें युद्ध चालू असतां इंद्र एतशाच्या बाजूस आला व स्वश्वपुत्र सूर्याचा पराजय झाला ( ऋ. ४. १७. १४ ).

**स्वसृप**—कौशिक ऋषीचा पुत्र ( पितृवर्तिन् पहा ).

**स्वस्तिकर**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**स्वस्तितर**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**स्वस्त्यात्रेय**—अत्रिकुलांतील एक ऋषि ( म. आ. ८. २४ कुं. ). सूक्तद्रष्टा ( ऋ. ५ ५०; ५१ ).

**स्वस्थली**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**स्वह्न**—स्वारोचिष मन्वंतरांतील देवांपैकीं एक.

२ ( स्वा. प्रिय.) भागवतमतें यज्ञ व दक्षिणा यांचा पुत्र.

**स्वागज**—शक्तिपुत्र पराशरास नांव.

**स्वागत**—( सू. निमि. ) वायुमतें शकुनीचा पुत्र.

**स्वाति**—सोमाच्या सत्तावीस स्त्रियांपैकीं एक.

२ ( आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें मेघस्वातीचा पुत्र.

**स्वातिवर्ण**—( आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें कुन्तलस्वातिकर्णाचा पुत्र.

**स्वायंभुव**—हा ब्रह्मदेवाचा पुत्र. ब्रह्मदेवानें आपल्या निरनिराळ्या अवयवांपासून प्रजा उत्पन्न केल्या. पण त्या वाढेनात, म्हणून त्यानें आत्मतुल्य नऊ पुत्र उत्पन्न केले. तरीहि प्रजा वाढेना म्हणून ब्रह्मदेव रागावला. तेव्हां हा त्याच्या क्रोधापासून झाला. याच्या आईचें नांव सावित्री असेंहि आढळतें ( मत्स्य ३. ३१ ). हा अर्धनारी देहधारी होता. ब्रह्मदेवानें यास आज्ञा करून हे दोन्ही देह निरनिराळे करविले. पैकीं त्याचे एक पुरुष व एक स्त्री असे दोन देह झाले. यांपैकीं स्त्री देह तो शतरूपा व पुरुषदेह हा होय ( मार्क. ५०; विष्णु. १.७; भा. ३. १२. ५३; वायु. १. १. १०). यास प्रियव्रत व उत्तानपाद असे दोन पुत्र होते ( दे. भा. १०.१-८ ). यास विराज् असें नांव आहे (मत्स्य. ३.४५). हा पहिल्या मन्वंतराचा अधिपति होय.

**स्वायव**—कूशाम्ब लातव्याचें पैतृक नांव.

**स्वायष्ट**—श्वेतपराशरकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**स्वार**—शिव देवांतील एक.

**स्वारोचिष**—अग्नीचा पुत्र ( भा. ८. १.१९ ). पण मार्कंडेय पुराणांत हा स्वरोचीला वनदेवतेपासून झालेला पुत्र, असें दिलें आहे. स्वरोचीनें याचें नांव द्युतिमत् असें ठेविलें होतें. तथापि हा स्वरोचीचा पुत्र म्हणून यास स्वारोचिष असें नांव पडलें (मार्क. ६३; मनु पहा). हा प्रियव्रताचा वंशज होता (विष्णु. ३.१.२४). हा प्रियव्रताचा पुत्र. यानें देवीची मृण्मय मूर्ति करून व स्वतः सुकलेलीं पानें

खाऊन तप केल्यानें देवीनें यास मन्वंतराधिपत्य दिलें. यानें धर्मस्थापना केली. नंतर आपला अधिकार सोडून हा स्वर्लोकीं गेला ( दे. भा. १०.८ ). हा द्वितीय मन्वंतराधिप मनु होय.

**स्वाह**—( सो. क्रोष्टु. ) मत्स्यमतें वृजिनीवताचा पुत्र ( श्वाहि पहा ).

**स्वाहा**—स्वायंभुवांतील दक्ष व प्रसूति यांची कन्या. ही अग्नीस दिली. हिला तपानें देवाला अन्न पोहोंचविण्याचें सामर्थ्य मिळालें. हिला पावक, पवमान, शुचि असे तीन अग्नि व स्वारोचिष मनु असे पुत्र झाले (ब्रह्मवै. २.४०;भा.४.१.६०). स्वाहेनें सप्तर्षींच्या स्त्रियांचीं रूपें घेऊन संभोग केला, तेव्हां हिला स्कंद नांवाचा मुलगा झाला ( म. व.२२७-२३१ कुं ). आहुति देतांना सर्व लोक ' स्वाहा ' म्हणतील असा स्कंदानें मातेस वर दिला ( म. व. २३१. ५ कुं. ).

२ दैवस्वतांतील बृहस्पति व तारा यांची कन्या व वैश्वानर अग्नीची स्त्री. हिला काम, अमोघ व उक्थ असे तीन पुत्र होते ( म. व. २२१. ३१-३३ कुं. ).

३ माहिष्मतीच्या नीलध्वजाची कन्या व अग्नीची पत्नी ( जै. अ. १५ ).

**स्वाहि**—( श्वाहि पहा ).

**स्वाहेय**—स्कंदाचें मातृक नांव.

**स्विष्टकृत्**—बृहस्पति व तारा यांचा पुत्र, एक अग्नि ( म. व. २२१. २९ कुं. ).

**स्वैदायन**—शौनकाचें पैतृक नांव.

---

# ह

**हंस**—ब्रह्मदेवाचा मानस पुत्र ( भा. ४. ८. १ ).

२ विष्णूचा अवतार. यानें सनकादिकांच्या शंका नाहींशा केल्या ( भा. ११. १३. १९ ). हा प्रजापति असून यानें साध्य देवांना मोक्षसाधन सांगितलें ( म. शां. ३०५ कुं. ).

३ साध्य देवांपैकीं एक.

४ कश्यप व अरिष्टा यांचा पुत्र, एक गंधर्व. याच्याच अंशानें धृतराष्ट्र झाला ( म. आ. ६८. ८३ कुं. ).

५ शिव देवांपैकीं एक.

६ ( सो. वसु. ) वसुदेव व श्रीदेवा यांचा पुत्र.

७ शाल्वाधिप ब्रह्मदत्ताचा पुत्र. डिबिकाचा थोरला भाऊ. हे दोघे परशुरामाचे शिष्य होते ( ह. वं. ३. १०३ ). याचे मित्र विचक्र व मित्रसह नांवाच्या पित्याच्या मित्राचा पुत्र जनार्दन. हंस, डिबिक व जनार्दन यांचें शिक्षण एकत्र व विवाह एका समयीं झाले होते. पुढें या दोघां बंधूंनीं शिवभक्तीनें अजेयत्व, रुद्रास्त्रें, माहेश्वरास्त्र व ब्रह्मशिरास्त्रें व युद्धसमयीं स्वसंरक्षणार्थ दोन भूतें मिळविलीं होतीं ( १०५ ). यांनीं दुर्वासाला पुष्कळ त्रास दिला, तेव्हां ' विष्णु तुमचा नाश करील ' असा त्यानें यांस शाप दिला. त्या वेळीं जनार्दनानें यांस छळापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला होता ( १०७-१०८ ). दुर्वासानें द्वारकेस जाऊन हें वृत्त कृष्णास सांगितलें. पुढें राजसूय यज्ञ करण्याच्या हेतूनें करभार गोळा करण्याकरितां हे बाहेर पडले, व यांनीं कृष्णाकडे जनार्दनास पाठविलें ( ११३-११५ ). कृष्णानें करभार देण्याचें नाकारिलें व युद्धास आह्वान केलें. पुष्करक्षेत्रीं युद्ध होऊन त्यांत विचक्राचा वध झाला नंतर हंसाचें कृष्णाशीं युद्ध होऊन त्याच्या लत्ताप्रहारानें—कोणी म्हणतात हा पाताळांत गेला व तेथें सर्पविषानें—मरण पावला ( १२८ ). बलरामानें यास मारिलें. याच्या अशा मरणाच्या बातमीनें डिबिकानें यमुनेंत जीव दिला. हें पाहून यानेंहि जीव दिला ( म. स. १४. ४३-४५ कुं. ).

**हंसचूड**—कुबेरसभेंतील यक्ष ( म. स. १०.१८ कुं. ).

**हंसजिह्व**—भृगुकुलांतील गोत्रकार.

**हंसडिंभक**—( ७ हंस पहा ).

**हंसध्वज**—चंपक नगरीचा राजा. यास विदूरथ, चंद्रकेतु व चंद्रसेन इत्यादि बंधु होते. याचे सुमति, सुगति, तुष्ट व श्रद्धालु हे मंत्री होते. शंख व लिखित हे बंधुद्वय उपाध्याय होते. हा विष्णुभक्त होता. यानें एकपत्नीत्वाचा पुरस्कार करून तसा राज्यांतहि कायदा केला होता. यानें अर्जुनानें रक्षिलेल्या अश्वमेधीय अश्व अडविला. त्यामुळें याच्या सुधन्वा व नंतर सुरथ पुत्रांस अर्जुनानें युद्धांत ठार केलें. तेव्हां हा चवताळून आला. हा अर्जुनास मारील ही खात्री कृष्णास वाटल्यावरून त्यानें दोघांचें सख्य घडवून अर्जुनास सांभाळण्याविषयीं विनविलें. याचे सुरथ, सुधन्वन, सुदर्शन, सुबल व सम पुत्र होत ( जै. अ. १७-२१ ).

**हंसिका**—कामधेनुकन्या. ही दक्षिण दिशेचें पालन करिते ( म. उ. १०२. ८ कुं. ).

हंसी--भगीरथाची कन्या. कौत्साची स्त्री (म. अनु. १०७. २६ कु.).

हंसिद्रात्र—अंगिराकुलांतील गोत्रकार.

हनुमत्—सुमेरूचा राजा केसरिन् व गोतमकन्या अंजना यांचा पुत्र. तिला वायूपासून चैत्र शुद्ध पौर्णिमेस हा झाला. शिव व भविष्य या पुराणांत शंकरास विष्णूनें मोहिनीरूपानें कामोत्सुक करून पतन पावलेलें वीर्य सप्तर्षींनीं कानांतून अंजनीच्या क्षेत्रीं ठेविल्यामुळें हा उत्पन्न झाला असें दिलें आहे (शिव. शत. २०; भवि. प्रति. ४. १३.). तसेंच दशरथानें केलेल्या पुत्रकामेष्टि यज्ञांत दशरथस्त्रियांस मिळालेल्या पायसापैकीं कांहीं भाग घारीनें नेला. तो तिच्या तोंडून निसटून बद्धांजलियुक्त तप करीत बसलेल्या अंजनीच्या ओंजळींत पडला व त्यामुळें हा झाला (आ.रा.सा.२१). एकदां अमावास्येच्या दिवशीं अंजना फळें आणावयास गेली असतां, क्षुधार्थ हनुमान् सूर्यास फल समजून त्यास खावयास धांवला. जातांना मध्येंच राहूस धक्का लागला. तेव्हां त्याच्या तक्रारीवरून इंद्रानें यास वज्रानें पर्वतावर मूर्च्छित पाडिलें. पुत्रास इजा झाल्याचें पाहून वायूनें निरोध केला. तेव्हां सर्व लोक घाबरले. म्हणून ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून इंद्रानें माला, वज्रानें अवध्यत्व व हनुमान् हें नांव, सूर्यानें आपल्या तेजाचा शंभरावा अंश व शास्त्राध्ययनकालीं शास्त्रें, वरुणानें पाशापासून अबद्धत्व, यमानें आरोग्य, अवध्यत्व, व संग्रामांत न दमणें, तसेंच ब्रह्मदेवानें अजिंक्यत्व, भयोत्पादकत्व, मित्रभयनाशकत्व, कामरूपधारित्व व यथेष्टगामित्व दिलें. शंकरानें यास दीर्घायुष्य (पद्म. पा. ११४), शास्त्रज्ञत्व व समुद्रोल्लंघनसामर्थ्य दिलें (पद्म. उ. ६६; नारद. १. ७९). त्यामुळें फुशारून जाऊन यानें भृगु व अंगिरस् गोत्री ऋषींस त्रास देण्यास सुरुवात केली. त्यामुळें ऋषींनीं यास 'आपल्या बलाची तुला आठवण राहणार नाहीं,' असा शाप दिला. सूर्याज्ञेनें (शिव. शत.२०) हा सुग्रीवाचा स्नेही व नंतर मंत्री झाला. पुढें सूर्यापासून हा व्याकरण, सूत्रें, सूत्रवृत्ति, वार्तिक, भाष्य व संग्रह शिकला. ऋषींच्या वरील शापामुळें यास वालीचें पारिपत्य करितां आलें नाहीं (वा. रा. किं. ६६; पद्म. उ. ३५-३६). सुग्रीवाज्ञेनें यानें भिक्षुरूपानें पंपा सरोवरावर जाऊन रामलक्ष्मणांची शुद्ध व धार्मिक भाषेंत चवकशी केली (वा.रा. कि. २०३). शरत्काल प्राप्त होतांच पूर्वी रामास वचन दिल्याप्रमाणें रामकार्य करण्याचा समय आल्याची सुग्रीवास यानें आठवण दिली (वा. रा. कि. २९). इतक्यांत वचन दिल्याप्रमाणें सुग्रीव वागत नाहीं, असें वाटून लक्ष्मण रागावून त्याजकडे आला असतां सुग्रीव घाबरला. पण 'मदत देण्यास लागावें म्हणजे राग जाईल,' असा यानें सल्ला दिला (३२). पुढें नलनीलादिकांसह हा सीतेच्या शोधार्थ निघाला. हा काम करील या खात्रीमुळें यास रामानें सीतेस दाखविण्याकरितां खुणेची अंगठी दिली (४४). जातांना कंडूकाचा आश्रम, लोध्रवन व सुवर्णवन यास लागलीं. नंतर पुढें विंध्याच्या एका गुहेंत गेल्यावर तेथील तपस्विनी स्वयंप्रभेनें यास व इतर वानरांस एका क्षणांत समुद्रतीरीं पोहोंचतें केलें. त्या वेळीं वानरांस संपातीनें सीता अशोकवनांत असल्याचें सांगितलें (५८-६३). इतरांनीं समुद्रपार होणें आपणांस अशक्य आहे असें जाणून त्यांनीं यास पाठविलें. वाटेंत यास विश्रांति देण्याकरितां मेरु समुद्रांतून वर आला. देवांनीं पाठविलेल्या सुरसेनें याच्या बलाची परीक्षा पाहिली. पुढें सिंहिका राक्षसीनें मात्र यास जोराचा प्रतिकार केला, पण यानें तिचा पराभव केला. यानें प्रथम लंब पर्वतावर उतरून मांजीएवढ्या रूपानें लंकेंत प्रवेश केला (म. व. २८२; वा. रा. सुं. १). तेथें लंकादेवीचा पराभव केला (वा. रा. सुं. २). सीतेचा शोध करण्याकरितां यानें लंकेंतील प्रत्येक घर शोधिलें. रावणाच्या घरांत गेल्यावर तेथील पुष्पक विमान पाहिलें. नंतर यानें रावणाच्या शयनागारांत प्रवेश केला. तेथें असलेली मंदोदरीच सीता आहे असें यास प्रथम वाटलें. नंतर यानें पानगृहांत प्रवेश केला व कोठेंहि सांपडेना म्हणून सीतेस खाल्लें कीं मारिलें कीं बुडविलें वगैरे शंका यास उत्पन्न झाल्या व त्या विचारांतच हा अशोक वनांत नलिनीतीरीं गेला (४-१४). तेथें राक्षसी सीतेचा छळ करीत असल्याचें याच्या दृष्टीस पडलें. पुढें एकान्त पाहून यानें रामचरित्र व स्वचरित्र गाऊन हीच सीता असल्याबद्दल खात्री करून घेतली व हा रामदूतच आहे किंवा काय याबद्दल संशय प्रदर्शित केल्यावरून यानें तिला राममुद्रा दिली (३५-३६). रामलक्ष्मणांच्या खाणाखुणा सांगितल्या व आपल्या खांद्यावर बसून चलण्याबद्दल विनंति केली. पण ती नाकारून रामास खुणेकरितां चूडामणि दिला व सुटकेची वाट फक्त एकच महिना पाहूं शकेन असें यास सांगितलें व जाण्यास आज्ञा दिली (३८). नंतर प्रत्यक्ष रावणाची गांठ पडावी एवढ्याकरितां यानें अशोकवनाचा नाश केला (४१). हें कळल्यावर रावणानें पाठविलेले अनुक्रमें जंबुमालिन्, ८००० दळासह विरुपाक्षादि पांच सेनापति, व आपला पुत्र अक्ष यांचा यानें नाश केला. पण पुढें इंद्रजितानें याला ब्रह्मास्त्रानें बांधून रावणासमोर आणिलें (४१-४७). रावणानें यास ठार करण्याची आज्ञा केली. पण बिभीषणाच्या रदबदलीवरून व आपला मृत्यु शेपटींत असल्याचें यानें सांगितलें म्हणून याच्या शेपटीस आग लावून सोडून देण्यांत आलें (५२). शेपटीस गुंडाळण्यास सर्व वस्त्रें आणलीं जावींत म्हणून जों जों कपडे गुंडाळावे तों तों यानें आपलें शेंपूट वाढवावें. यामुळें सर्व लंका नग्न झाली व पुढें सीतेचीं वस्त्रें आणण्याचा

प्रसंग येतांच यानें शेंपटी आवरती घेतली. नंतर रावणानें फुंकल्याखेरीज पेटणार नाहीं असें सांगून रावणानें फुंक मारतांच त्याची दाढी यानें जाळून टाकिली (आ. रा.सार. ९). व पेटलेल्या शेपटीनें सर्व लंकेस आग लाविली. पण सीता जळेल या भीतीनें यास त्याबद्दल पश्चात्ताप झाला व तसें झालें नाहीं हें लोकवार्तेनें कळतांच आनंद झाला. नंतर सीतेचा निरोप घेऊन एका झपेंत हा महेंद्रावर उतरला ( वा. रा. सुं. ५७-६१ ). तेथून सर्वजण मधुवनांत गेले. उशीर झाल्यामुळें कसें जावें याचा विचार करून यांनीं सुग्रीवाच्या मधुवनाचा नाश केला. तेव्हां त्याच्या दधिमुख नांवाच्या सुग्रीवानें नेमिलेल्या रक्षकानें सर्वांस पकडलें व सुग्रीवास कळविल्यावर त्यानें हे विजयी होऊन आले असावेत असें वाटून अधीरतेनें यांस लवकर आणण्यास दधिमुखास आज्ञा केली ( ६४ ). युद्धप्रसंगीं यानें सहस्रावधि राक्षस मारिले. इतकें बल यास कपीश्वराराधनेनें आलें ( पद्म. उ. १४२ ). वानरादिकांस सजीव करण्याकरितां औषधी यानें द्रोणागिरीवरून अनेक वेळां आणिल्या ( यु. ५० ). यानें रावणाचा पराभव केला (५९). शक्तीनें लक्ष्मण मूर्च्छित झाला त्या वेळीं हा औषधी आणण्याला गेला असतां औषधी ओळखतां येईनात म्हणून यानें द्रोणागिरि पर्वतच दोनदां आणिला ( ७४; १०१ ). नंतर हा व सुग्रीव एकदां लंकेंतून फिरून आले ( ७५ ). याचें निकुंभाशीं युद्ध झालें (७७). इंद्रजित् मायामय सीतेस—सीता मारली गेली अशी रामलक्ष्मणांची समजूत व्हावी म्हणून—मारीत असतां यानें त्याचा अतिशय उपहास केला ( ८१; १ मकरध्वज; अहिरावणमहिरावण पहा). लंकेहून परत जात असतां रामानें कुशल प्रकृति पाहून येण्यास व आपण आल्याचें कळविण्यास यास भरताकडे पाठविलें होतें ( १२५-१२७ ). राज्याभिषेकसमयीं यानें समुद्राचें पाणी आणिलें. सीतेनें यास याच्या गौरवार्थ एक हार दिला ( १२८ ). हा रामसेवा करीत तेथेंच राहिला होता. पण लंकेस बिभीषणाकडे राम भेटीस जात असतां वाटेंत सुग्रीवाबरोबर हा रामाच्या दर्शनार्थ गेला होता ( पद्म सृ. ३८ ); यावरून हा सुग्रीवाकडे असावा. रामानें यास ब्रह्मविद्या व रामचरित्र जोंपर्यंत गाइलें जात आहे, तोंपर्यंत यानें पृथ्वीवर रहावें असा वर दिला ( उ. ४०; लवकुश पहा ). यानें भीमास त्याचा शक्तीविषयींचा गर्व आपली शेंपटी उचलण्यास सांगून नाहींसा केला ( म. व. १४७-१५० ). एका मुनीनें याचा सीतासंशोधनाबद्दलचा ( आ. रा. सार. ९ ) व रामानें शक्तीविषयींचा गर्व नाहींसा केला ( आ. रा. सार. १० ). हा सप्तचिरंजीवांपैकीं एक आहे. हा अर्जुनाच्या रथावर बसत असे. हा अकरावा व्याकरणकार आहे. यानें लिहिलेल्या रामचरित्रास नाटकरामायण म्हणतात.

यास मरुत्-पुत्र म्हणून मारुति, वज्रानें हनु तुटल्यामुळें हनूमत्, वज्रदेही म्हणून वज्रांग—बजरंग, बलानें भीषण म्हणून बलभीम असें म्हणतात.

वानर ही मनुष्यांतील एक जात असून त्यांचे आचार, विचार उच्च पद्धतीचे असत. त्यांचें राज्यहि नियमांनुसार चाललें होतें. रामाच्या चरित्रांत अद्भुततेची भर टाकण्याकरितां नरांना वानर बनविलें असण्याचा संभव आहे.

**हंतृ**—अमिताभ देवांपैकीं एक.

**हय**—तुषित व साध्य देवांपैकीं एक.

**हयग्रीव**—अग्नि, इंद्र, यज्ञ आणि वायु यांनीं एका सत्राला आरंभ केला व जें मिळेल तें सर्वांनीं वांटून घ्यावें असें ठरविलें. यज्ञाला प्रथम दैवी यश मिळालें. पण तो तें एकट्याच घेऊन पळाला. म्हणून बाकीच्या सर्वांनीं त्याशीं युद्ध आरंभिलें. यज्ञहि धनुष्य सज्ज करून उभा राहिला. देवांचें याच्यापुढें कांहीं चालेना. यज्ञालाहि गर्व झाला, तेव्हां देवांनीं वाळवीला धनुष्याची दोरी तोडावयास लाविलें. सज्ज धनुष्याची दोरी वाळवीनें तोडिल्यानें याचें डोकें उडालें ( पं. ब्रा. ७. ५. ६; तै. आ. ५. १ ). देवांनीं अश्वींना हविर्भाग कबूल करून यज्ञाचें डोकें त्यांच्याकडून जोडविलें ( तै. सं. ६. ४. ९. १ ). तैत्तिरीय आरण्यकांत यज्ञ व विष्णु एकच असें दाखविलें आहे. हें कथानक प्रवर्ग्याच्या प्रशंसेकरितां वरील ठिकाणीं आलें आहे. पौराणिक हयग्रीवाची कथा या कथेवरून निघाली असावी.

हीच कथा स्कंद, देवीभागवत या पुराणांत थोड्या फरकानें पुढीलप्रमाणें आली आहे. एकदां विष्णूकडे ब्रह्मादि सर्व देव हयग्रीवानें वेद चोरून नेले म्हणून तक्रार करण्याकरितां गेले. पण हा जमिनीवर टेकलेल्या धनुष्यास मान टेंकून झोंप घेत होता. जवळच असलेल्या वाळवीच्या सल्ल्यानें त्यांनीं हविर्भाग देण्याच्या करारावर वाळवीकडून त्या धनुष्याची प्रत्यंचा तोडविली. प्रत्यंचेबरोबरच विष्णूचें शीर तुटून गेलें. तेव्हां विश्वकर्म्यास हविर्भाग कबूल करून त्याकरवीं शिर बसविलें. तें त्यानें घोड्याचें घेतलें होतें, तेव्हांपासून विष्णु हयग्रीव झाला. देवीनें ‘ हयग्रीवच तुला मारील ’ असा वर दिलेल्या हयग्रीव दैत्यास यानें ठार केलें ( दे. भा. १.५ ). पण पुढील कथा स्कंदांत आहे. विष्णु श्रेष्ठ ठरल्यामुळें चिडून ब्रह्मयानें त्यास ‘ मस्तक तुटो ’ म्हणून शाप दिला. ज्या मुखानें शाप दिला तें मुख रुद्रानें खुडलें. यज्ञाला आमंत्रण देण्याकरितां देव गेले असतां वरील गोष्ट घडली. नंतर हा यज्ञास गेला व यानें यज्ञसमाप्तीनंतर धर्मारण्यांत तप केलें. त्यामुळें शंकरकृपेनें यास पूर्वमुख प्राप्त झालें ( स्कंद. ३.२. १४–१५ ). ब्रह्मयानें यज्ञ केला, त्या वेळीं हा झाला आणि याच्या श्वासोच्छ्वासां-

तून वेद बाहेर आले ( भा. २. ७. ११ ). हा अवतार झाल्याचा महाभारतांत आणखीहि उल्लेख आहे ( म. उ. १३०. ६४; शां. १२२. ७५; ३४७. ६० कुं. ). यानें मधुकैटभांना मारुन वेद परत आणिले ( म. शां. ३५७ कुं.).

२ हा कश्यप व दिति यांचा पुत्र ( पद्म. उ. २३० ). याचा जन्म पूर्वकल्पाच्या रात्रींत झाला. यास हयग्रीवावतारीं विष्णूनें मारिलें ( १ हयग्रीव पहा ). पण यास मत्स्यावतारीं मारिल्याचेंहि सांगितलें आहे ( भा. ८.२४.९-५७ ).

३ कश्यप व दनु यांचा पुत्र. हा वृत्राचा ( भा. ६. १०. १९ ), हिरण्यकशिपूचा ( भा. ७. २. ४ ) व तारकाचा ( मत्स्य. १७३. १५ ) अनुयायी होता.

४ एक राजा. क्षात्रधर्मानुरूप राज्यप्राप्ति, उपभोग व व्यय करून यानें मुक्ति मिळविली (म. शां. २४. ३१-४२ कुं.).

**हर**—एकादश रुद्रांपैकीं एक.

२ कश्यप व दनु यांचा पुत्र.

३ मालीचा पुत्र. हा बिभीषणाचा अमात्य होता.

४ रामसेनेंतील एक वानर ( वा. रा. यु. २७ ).

**हरकल्प**—विप्रचित्ति व सिंहिका यांचा पुत्र. यास परशुरामानें मारिलें.

**हरप्रीति**—अत्रिकुलांतील गोत्रकार व गण. याबद्दल रसद्वीचि असा पाठ आहे.

**हरयाण**—यानें विश्वमनसला दान दिलें ( ऋ. ८. २५. २२ ). हें व उदक्ष्णायन हीं वरोसुषामन्ची विशेषणें असावीत असें सायणाचार्य म्हणतात.

**हरि**—यज्ञ व दक्षिणा यांच्या सुयम नामक पुत्राचें ब्रह्मानें हें नांव ठेविलें. कारण यानें देवांचें दुःख हरण केलें ( भा. २. ७. २ ).

२ तामस मन्वंतरांतील देवगण.

३ तामस मन्वंतरांतील अवतार. हरिमेधस् व हरिणी यांचा पुत्र. यानेंच गजेंद्राचा उद्धार केला ( भा. ८. १. ३०; ३. ३० ).

४ गरुडाचा पुत्र अथवा वंशज.

५ ताराक्षाचा पुत्र. यानें तपानें ब्रह्मयाकडून स्वर्गात असलेल्या आपल्या पित्याच्या सुवर्णपुरांत मृतसंजीवनी वापी मिळविली ( म. क. २४. ३१ कुं. ).

६ अंगिरस्‌कुलांतील एक गोत्रकार.

७ ( स्वा. प्रिय. ) भागवतमतें ऋषभदेव व जयंती यांचा पुत्र. यानें निमीस उपदेश केला ( भा. ११. २. ४५ ).

८ अकंपनाचा पुत्र ( म. द्रो. ५२. २८; शां. २६२. ८ कुं. ).

९ रावणपक्षीय एक असुर.

१० पांडवपक्षीय चेदिराजा. यास कर्णानें मारिलें ( म. क. ५१. ४९ कुं. ).

११ हरिहरपुरांतील एक कर्मठ ब्राह्मण. याच्या दुर्वर्तनी स्त्रीस वाघानें खाल्लें ( पद्म. उ. १८७ ).

**हरिकर्णि**—अंगिरस्‌कुलांतील गोत्रकार.

**हरिकेश**—( २ पूर्णभद्र पहा ).

२ वसुदेवभ्राता श्यामक व शरभूमि यांचा ज्येष्ठ पुत्र ( भा. ९. २४. ४२ ).

**हरिजटा**—रावणानें सीतेचें मन वळविण्याकरितां सीतेजवळ ठेवलेली एक राक्षसी (वा. रा. सुं. २३ ).

**हरिण**—ऐरावतकुलांतील एक नाग ( म. आ. ५७. ११ कुं. ).

**हरिणाश्व**—यास खड्‌गविद्या रघूपासून मिळाली. यानें शुनकास ती विद्या दिली (म. शां. १६४. ७९ कुं.).

**हरिणी**—तामस मन्वंतरांतील हरि अवताराची माता व हरिमेधस्‌ची पत्नी.

२ हिरण्यकशिपूची कन्या व विश्वपतिपत्नी. हिला रोहिणी असेंहि नांव होतें ( म. व. २२३. २८ कुं. ).

**हरित**—( सू. इ. ) रोहिताचा पुत्र. याला मत्स्यांत वृक असेंहि नांव आहे.

२ स्वायंभुव मनुपुत्र वपुष्मत्‌चा हा पुत्र. याचा वर्ष याच्याच नांवानें शाल्मलि द्वीपांत होता ( मार्क. ५०. २८).

३ रुद्रसावर्णि मन्वंतरांतील देवगण.

४ ( सू. इ. ) युवनाश्वाचा पुत्र.

४ ( सो. यदु. ) यदूचा पुत्र ( ह. वं. २. ३८ ).

**हरित काश्यप**—शिल्प काश्यपाचा शिष्य. याचा शिष्य असित वार्षगण ( बृ. उ. ६. ५. ३).

**हरितक**—अंगिराकुलांतील गोत्रकार.

**हरिताश्व**—इलाचा पुत्र. हा दक्षिणेंत राज्य करीत होता ( पद्म. सृ. ८ ).

**हरिदत्त**—( ३ विमल पहा ).

**हरिदास**—पुलह व श्वेता यांचा पुत्र ( ब्रह्मांड. ३. ७. १८१ ).

**हरिधामन्**—या ऋषीनें वीस अक्षरी मंत्रानें कृष्णाची उपासना केल्यामुळें हा सारंग गोपाची रंगवेणी नामक कन्या झाला ( पद्म. पा. ७२ ).

**हरिप्रिया**—कृष्णाच्या स्त्रियांपैकीं एक (पद्म. पा. ७०).

**हरिप्रीति**—अत्रिकुलांतील एक गोत्रकार.

**हरिबभ्रु**—युधिष्ठिराच्या सभेंतील ऋषि (म.स.४.२२कुं.).

**हरिभद्रा**—कश्यप व क्रोधा यांची कन्या. पुलहाची स्त्री.

**हरिमन्त आंगिरस**--सूक्तद्रष्टा ( ऋ. ९. ७२ ).

**हरिमित्र**—एक ब्राह्मण. याला कमला एकादशी व्रतानें मुक्ति मिळाली ( पद्म. उ. ६२ ).

**हरिमेध**—याला सुमेधानें तुळसीमाहात्म्य सांगितलें ( स्कंद. २. ४. ८ ).

**हरिमेधस्**--तामस मन्वंतरांतील अवताराचा पिता.

२ एक ब्रह्मर्षि. याची कन्या ध्वजावती ( म. उ. ११०. १३ कुं. ).

**हरिलोमन्**—रामसेनेंतील वानर ( वा. रा. यु. ७३ ).

**हरिवर्मन्**--( सो. तुर्वसु. ) एक राजा. याचा पुत्र एकवीर. हा वंशावळींत नाहीं ( एकवीर पहा ).

**हरिवर्ण आंगिरस**--सामद्रष्टा (पं.ब्रा. ८. ९. ४-५).

**हरिवर्ष**—( स्वा. प्रिय. ) आग्नीध्र व पूर्वचित्ति यांचा पुत्र ( भा. ५. २. १९-२३ ). याचा वर्ष याच्याच नांवानें प्रसिद्ध होता ( मार्कं. ५०. ३५ ).

**हरिवाहन**--( मणिवाहन पहा ).

**हरिवीर**--( विदैवत पहा ).

**हरिशर्मन्**--विष्णुभक्तीनें यास विष्णुलोक प्राप्त झाला. परंतु अन्नदान न केल्यामुळें तेथेंहि यास भुकेनें पीडिलें. ब्रह्मदेवाच्या सूचनेवरून यानें स्वप्नांत पुत्राला दानें करावयास सांगून आपला भूकेचा ताप नाहींसा केला ( पद्म. क्रि. २०-२१ ).

**हरिश्चंद्र**—( सू. इ. ) सत्यव्रताचा पुत्र. याचा गुरु वसिष्ठ देवराज होता. यास शंभर स्त्रिया होत्या ( ऐ. ब्रा. ७. १३ ). यानें शैब्यकन्या तारामतीशीं विवाह केला ( दे. भा. ७. १८; १ रोहित पहा ). विश्वामित्रापासून अष्टसिद्धींचें यानें रक्षण केलें; पण त्यानें मायेनें उत्पन्न केलेल्या कन्येच्या लग्नांत मायेनें उत्पन्न केलेल्या वरास याकडून राज्यदान करविलें. नंतर स्वतःस, स्त्रीस व पुत्रांस दानाच्या पूर्ततेकरितां याच्या लागणाऱ्या दक्षिणेसाठीं विकून घेऊन यास दान पुरें करावयास लाविलें. यानें तारामती व रोहित यांस एका वृद्ध ब्राह्मणास व स्वतःस एका स्मशानाधिकारी चांडाळास विकिलें. विश्वामित्रानें मायेनें सर्पदंशानें रोहितास मारिलें. तेव्हां हा व तारामती यांनीं अग्निप्रवेश करण्याचें ठरविलें. पण वसिष्ठ, विश्वामित्र व देव यांच्या कृपेनें रोहित जिवंत झाला व पूर्वस्थिति प्राप्त झाली ( ब्रह्म. १०४; मार्कं. ७.८; दे. भा. ७. १८ ). हें अजा एकादशीचें फल होय (पद्म. उ. ५६). याचा पुरोहित वसिष्ठ यानें स्वर्गांत केलेली याची स्तुति वसिष्ठशत्रु विश्वामित्रास सहन न झाल्यामुळें यास वरील आपत्ति सहन कराव्या लागल्या ( दे. भा. ७. १७ ). हा पूर्वजन्मीं एक सदाचारी शूद्र होता ( पद्म. उ. ३१ ).

**हरिश्चंद्र वैधस ऐक्ष्वाक**—यानें आपला पुत्र रोहित यास वरुणाला बलि देण्याचें ठरविलें ( ऐ. ब्रा. ७. १४, सां. श्रौ. १५. १७ ). वरचा व हा एकच होय.

**हरिश्रवस्**—( सो. कुरु. ) धृतराष्ट्रपुत्र.

**हरिस्वामिन्**--( सुलोचना पहा ).

**हरिषेण**--ब्रह्मसावर्णि मनूचा पुत्र.

**हरी**—कश्यप व क्रोधा यांची कन्या. हिला सिंह, वानर, तरस वगैरे प्राणी झाले ( म. आ. ६६ ).

**हर्यक्ष**—( स्वा. उत्तान. ) भागवतमतें पृथु व अर्चिस् यांचा पुत्र.

२ सुरथाचा पुत्र. पित्यानें रामाचा अश्वमेधीय अश्व धरिला असतां हा रामसैन्याशीं लढत होता ( पद्म. पा. ४९ ).

**हर्यंग**—( सो. अनु. ) भागवतमतें चंपाचा पुत्र. वायुमतें चित्ररथाचा पुत्र. हा चंपास पूर्णभद्र वैभांडकीच्या कृपेनें झाला. याकरितां पूर्णभद्रानें इंद्राचा ऐरावत मंत्रप्रभावानें आणिला होता ( ब्रह्म. १३. ४३; ह. वं. १. ३१; मत्स्य. ४८.९८ ).

**हर्यद्वन्त**—(सो. क्षत्र) वायुमतें जयपुत्र. हाच विष्णुमतें हर्षवर्धन व भागवतमतें कृतपुत्र हर्यवन.

**हर्यन्त प्रागाथ**--सूक्तद्रष्टा ( ऋ. ८. ७२ ).

**हर्यश्व**—प्राचेतस दक्षाचे दहा हजार पुत्रांना संज्ञा.

२ ( सू. इ. ) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें दृढाश्वाचा व मत्स्यमतें प्रमोदाचा पुत्र.

३ ( सू. इ. ) भागवतमतें अनरण्याचा, विष्णुमतें पृषदश्वाचा व वायुमतें त्रसदश्वाचा पुत्र. हा अयोध्येस राज्य करी. गालवानें दिलेल्या ययातिकन्या माधवीचे ठायीं वसुमनस् ( म. उ. ११५. १८. कुं. ), मधुदैत्यकन्या मधुमतीचे ठायीं यदु ( ह. वं. २. ३७ ) व दृषद्वतीचे ठायीं अरुण असे याला पुत्र झाले.

४ ( सो. क्षत्र. ) याचा पुत्र सुदेव व पौत्र दिवोदास. यांस हैहयपुत्रांनीं ठार केलें ( म. अनु. ८. ११-१४ कुं. ).

५ ( सू. निमि. ). धृष्टकेतु जनकाचा पुत्र.

**हर्याश्वि**—नीलपराशरकुलांतील एक गोत्रकार.

**हर्यात्मन्**—एकविसावा व्यास.

**हर्ष**—धर्म व तुष्टि यांचा पुत्र.

**हर्षण**--विश्वरूप व विष्टि यांचा पुत्र. यानें यमानें सांगितलेल्या उपायांनीं मातापित्यांचीं भीषण रूपें शांत केलीं ( ब्रह्म. १६५ ).

**हर्षवर्धन**—( हर्यद्वन्त पहा ).

**हल**—वसिष्ठकुलांतील गोत्रकार.

**हलमय**--विश्वामित्रकुलांतील गोत्रकार. याबद्दल हलयम असा पाठभेद आहे.

**हला**—अत्रीची स्त्री ( ब्रह्मांड. ३. ८. ७५ ).

**हलिक**—एक नाग ( म. आ. ३५. १५ कुं. ).

**हलीमक**—वासुकिकुलोत्पन्न एक नाग. जनमेजयाच्या सत्रांत हा दग्ध झाला ( म. आ. ५७. ५ कुं. ).

**हवि**—वसिष्ठपुत्र. स्वारोचिष मन्वंतरांतील प्रजापति.

**हविघ्न**—स्वारोचिष मनूचा पुत्र.

**हविर्धान**—( स्वा. उत्तान. ) विजिताश्व व नभस्वती यांचा पुत्र. याची स्त्री हविर्धानी व पुत्र बर्हिषद, गय, शुक्र, सत्य, जितव्रत व कृष्ण ( भा. ४. २४. ८ ).

**हविर्धान आंगि**—सूक्तद्रष्टा ( ऋ. १०. ११-१२ ).

**हविर्धानी**—हविर्धानाची स्त्री.

**हविर्भू**—कर्दम व देवहुति यांची कन्या. पुलस्त्याची स्त्री.

**हविष्कृत् आंगिरस**—सामद्रष्टा ( पं. ब्रा. ११.१०. ९-१०; २०. ११. ३; तै. सं. ७. १. ४. १ ). याबरोबर हविष्मत् आंगिरसाचाहि उल्लेख आहे.

**हविष्पंद**—विश्वामित्राचा पुत्र.

**हविष्मत्**—चाक्षुष मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

२ धर्मसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

३ इंद्रसभेंतील एक ऋषि ( म. स. ७. १३ कुं. ).

४ मरीचिगर्भ लोकांतील पितर. यांची पूजा क्षत्रिय करितात. याची मानसकन्या यशोदा, अंशुमत्‌ची स्त्री व दिलीपाची माता. याची पत्नी कुहू ( पितरः पहा ).

५ अंगिरस् व सुरूपा यांचा पुत्र, देव ( मत्स्य. १९६ ).

**हविष्मत् आंगिरस**—( हविष्कृत् आंगिरस पहा ).

**हविष्मती**—अंगिरसाची कन्या (म. व. २२१. ७ कुं.).

**हवींद्र**—वसिष्ठाचा पुत्र. स्वारोचिषांतील प्रजापतींपैकीं एक.

**हव्य**—स्वायंभुव मनूचा पुत्र.

२ हव्यवाहनाचें नामांतर.

३ सुख देवांपैकीं एक.

४ आद्य देवांतील एक.

**हव्यघ्न**—गौतमीतीरीं आपल्या पैठीनसी नामक भार्येसह राहत असलेल्या भरद्वाजानें एकदां यज्ञ सुरू केला. पण त्यांतील धुरांतून एक राक्षस बाहेर येऊन हविर्द्रव्य खाऊं लागला. म्हणून यास हव्यघ्न म्हणतात. भरद्वाजानें विचारिल्यावरून यानें आपण कृष्ण असून आईबापहि कृष्णा व कृष्ण आहेत व आपणांस ब्रह्मयानें शाप दिला आहे, तरी 'मला गंगोदक, सुवर्ण, गाईचें तूप व सोम यांनीं प्रोक्षण करा म्हणजे मी मुक्त होईन,' असें सांगितलें, त्याप्रमाणें भरद्वाजानें करितांच हा मुक्त झाला (ब्रह्म. १३३).

**हव्यप**—रैवत मनूचा पुत्र.

२ रौच्य मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक

**हव्यवत्**—रैवत मनूचा पुत्र.

**हव्यवाह**—धर वसूचा पुत्र.

२ पवमान अग्नीचा पुत्र.

**हव्यवाहन**—दक्षसावर्णि मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक.

**हस्त**—दक्षकन्या व सोमस्त्री.

२ ( सो. वसु. ) वसुदेव व रोचना यांचा पुत्र.

**हस्तिन्**—( सो. पूरु. ) भागवत, विष्णु व मत्स्य यांच्या मतें बृहत्क्षत्राचा पुत्र. वायुमतें सुहोत्राचा पुत्र. यानें हस्तिनापूर वैभवास चढविलें ( भा. ९. २१. २० ). पण ही सुहोत्र व जयंती यांचा पुत्र असून याची स्त्री यशोदा अथवा यशोधरा असें दिलें आहे ( म. आ. ६३. ३७ कुं. ).

२ ( सो. कुरु. ) पहिल्या धृतराष्ट्राचा पुत्र ( म. आ. १०१. ४६ कुं ; ५ धृतराष्ट्र पहा ).

**हस्तिदान**—कश्यपकुलांतील गोत्रकार ऋषिगण.

**हस्तिमुख**—रावणपक्षीय लंकेंतील एक राक्षस ( वा. रा. सुं. ६ ).

**हस्तींद्र**—वसिष्ठाचा पुत्र. स्वारोचिषांतील एक प्रजापति.

**हारव**—ब्रह्मयाच्या अश्रुबिंदूपासून हा राक्षस उत्पन्न झाला व शिवलिंगज्योतीमुळें भस्म होऊन मरण पावला ( स्कंद. ५. २. ४८ ).

**हारिकर्णि**—अंगिरस्कुलांतील गोत्रकार.

**हारिकर्णीपुत्र**—भरद्वाजीपुत्राचा शिष्य ( श. ब्रा. १४.९. ४.३० ).

**हारितायन**—( सासिसाहारितायन पहा ).

**हारिद्रव**—हा मैत्रायणीयांपैकीं एक शाखाप्रवर्तक आहे याच्या वाक्याचा हारिद्रविक म्हणून निर्देश आहे ( नि. १०.५ ).

**हारिद्रुमत गौतम**—सत्यकाम जाबालाचा शिष्य ( छां. उ. ४. ४. ३ ).

**हारीत**—(सू. इ.) भागवतमतें मांधात्याचा व विष्णुमतें युवनाश्वाचा पुत्र.

२ विश्वामित्राचा पुत्र.

३ व्यासाच्या पुराणशिष्यपरंपरेंतील रोमहर्षणाचा शिष्य.

४ अंगिरस्कुलांतील एक ऋषि ( म. शां २७९ )

५ एक वैखानसवृत्ति ब्राह्मण. यानें माघस्नानाचें माहात्म्य दिलीपाला वसिष्ठास विचारावयास सांगितलें (पद्म.उ. १२५).

६ कलियुगामध्यें हा ब्राह्मण मौलिस्थान(मुलतान) येथें राहत होता. तेथें नृसिंह याचा पुत्र झाला. मुलतानांत नृसिंह शब्दाचा मोठा प्रतिध्वनि होतो. तेथें म्लेच्छांची वस्ती मोठी आहे ( पद्म. उ. १७५ ).

७ एक वैयाकरण ( ते. प्रा. १४. १८ ).

८ एक स्मृतिकार. आनंदाश्रमस्मृतिसंग्रहांत लघुहारीतस्मृति व वृद्धहारीतस्मृति असे दोन ग्रंथ छापिले आहेत. पहिलींत प्रायश्चित्त व दुसरींत विष्णूच्या उपासनादिकांची माहिती आहे. पहिलींत श्लोक ११७ व दुसरींत ११ अध्याय व ३५४ श्लोक आहेत. तिसरी हारीतस्मृति व्यंकटेशप्रेसच्या स्मृतिसंग्रहांत आढळते. तिच्यांत सात अध्याय असून चातुर्वर्ण्याच्या आचारादिकांचें विवेचन आहे. ब्रह्मचर्य व अभक्ष्य यांविषयीं आपस्तंब व बौधायन यांनीं याच्या मताचा निर्देश केला आहे. ( आप. ध. १. १३. १०; १८. २; १९. १२; बौ. ध. २.१. २. २१ ). हारितानें ब्रह्मवादिनींना उपनयन वेदाध्ययनादिकांचा अधिकार सांगितला आहे ( स्मृतिचं. १. २४ ). यानें राजधर्मावरील नियम इतर स्मृतींतून घेतले आहेत. याचा पुत्र कमठ (स्कंद. १. २. ५१ ). याची एक शिक्षा आहे.

**हारितक**—कश्यपकुलांतील गोत्रकार गण.

**हार्दिक्य**–(सो. क्रोष्टु.) हृदीक पुत्रांचें विशेषतः कृतवर्म्याचें नामांतर (म. द्रो.११४. ५९ कुं.; भा. १०. ७५.६). याचा पुत्र मृत्तिकावताच्या गादीवर अधिष्ठित झाला ( म. मौ. ८. १० कुं. ).

**हाल**—वसिष्ठकुलांतील एक गोत्रकार.

२ ( आंध्र. भविष्य. ) मत्स्यमतें अरिक्तवर्णाचा, ब्रह्मांड व भागवत यांच्या मतें अनिष्टकर्म्याचा व वायुमतें नेमिकृष्णाचा पुत्र. यास भागवतमतें हालेय असें नांव आहे.

**हालाहल**—शंकर व विष्णु यांनीं मारिलेला असुर ( दे. भा. ७. २९–३० ).

**हालिङ्गव**—एक आचार्य ( श. ब्रा. १०. ४. ५. १ ).

**हालेय**—( २ हाल पहा ).

**हाहा**—कश्यप व प्राधा यांचा पुत्र, एक गंधर्व. हा ज्येष्ठ महिन्यांतील सूर्यासमागमें असतो ( भा. १२. ११. ३५. ).

**हिंसा**—लोभ व निकृती यांची कन्या व धर्माची स्त्री.

**हिंस्र**—कौशिक ऋषीचा एक पुत्र ( पितृवर्तिन् पहा ).

**हिडिंब**—किर्मीराचा भ्राता ( म. व. ११. ३२ कुं., १८ भीम पहा ).

**हिडिंबा किंवा हिडिंबी**—हिचें कमलपालिका असें दुसरें नांव होतें (म. आ. १६९. २१ कुं.). हिला भूतभविष्य गोष्टींचें ज्ञान असे ( म. आ. १६७. २७ कुं.; १८ भीम पहा).

**हिमवत्**—एक पर्वत ( देवता ). याची स्त्री पितरांची कन्या मेना. यास दोन पुत्र क्रौंच व मैनाक आणि तीन कन्या अपर्णा, एकपर्णा, एकपाटला होत्या. या अनुक्रमें महादेव, असित व जैगीषव्य यांच्या स्त्रिया होत ( ह. वं. १. १८; मत्स्य १३ ).

**हिरण्मय**—( स्वा. प्रिय. ) आग्नीध्राचा पुत्र. याचा वर्ष याच्याच नांवचा होता. याची स्त्री श्यामा ( भा. ५. २. १९-२३ ). यासच मार्कंडेयांत हिरण्य म्हटलें आहे ( मार्कं. ५०. ३७ ).

२ कश्यप व दनु यांचा पुत्र.

**हिरण्य**—अंगिरस्कुलांतील गोत्रकार.

२ ( १ हिरण्मय पहा ).

**हिरण्यक**—एक दैत्य. वसिष्ठाच्या होतृत्वाखालीं चालू असलेल्या यज्ञांत हा गेला असतां सर्व देव मिळून लपले. पण वसिष्ठानें याचें निवारण केलें ( ब्रह्म. १०३ ).

**हिरण्यकशिपु**—कश्यप व दिति यांचा पुत्र. कश्यपानें एकदां अश्वमेध केला. त्या वेळीं प्रमुख ऋत्विजांस ठेवलेल्या पांच सुवर्णासनांपैकीं होत्याच्या सुवर्णासनावर दहा हजार वर्षें गरोदर असलेली दिती प्रसूत झाली व गर्भ त्या आसनावर पडला. म्हणून यास वरील नांव मिळालें ( ब्रह्मांड. ३. ५. ७–१२; वायु. २. ६. ६० ). पुढें यानें अधःशिर राहून शंभर वर्षें तप करून, घरीं किंवा दारीं, दिवसां किंवा रात्रीं मनुष्याकडून किंवा पशूकडून, शस्त्रानें किंवा अस्त्रानें, सजीवाकडून किंवा निर्जीवाकडून, शुष्कानें किंवा आर्द्रानें मृत्यु येऊं नये असा शंकराकडून ( पद्म. उ. २.३८ ) किंवा ब्रह्मद्याकडून वर मिळविला. याची स्त्री जंभकन्या कयाधू ( भा. ६. १८. १२ ), उत्तानपादकन्या कल्याणी (पद्म. उ. २३८ ), व कीर्ति ( वा. रा. सुं. २०–२८ ). हा तपास गेला असतां नारदानें कयाधूस उपदेश केला. त्या वेळीं ती गरोदर असल्यामुळें आंतील गर्भानें तो ऐकिला. तो गर्भ विष्णुभक्त प्रह्लादाचा होता. तसेंच यानें पुढें प्रह्लादास शिकण्याकरितां ज्या गुरुकडे पाठविलें त्यांनीहि त्यास विष्णुभक्ति शिकविली. हें दृष्टोत्पत्तीस येतांच ती सोडून देण्यास यानें त्यास नानातऱ्हेनें सांगितलें. शेवटीं छळहि केला. पुढें एकदां 'या खांबांत तुझा विष्णु आहे काय?' असें उपहासानें विचारीत त्या खांबावर यानें मुष्टिप्रहार केला. त्याबरोबर नृसिंह प्रगट झाला व 'माझ्या पित्याची पूर्वकृत्यांतून मुक्तता व्हावी' असा प्रह्लादास त्यानें वर दिला. नंतर याचे मनांत प्रह्लादाविषयीं प्रेम उत्पन्न झालें. प्रह्लादानेंहि पुढें पिता व गुरु यांची योग्य शुश्रूषा केली ( विष्णु. १. १५–२० ). पुढें नृसिंहानें यास ठार केलें असावें असें विष्णुपुराणावरून दिसतें. परंतु इतरत्र यास तात्काळ वरांतील सर्व अटी पाळून नखानें फाडून ठार केल्याचें आहे व ब्रह्मांड व वायु पुराणांत तर यास द्वंद्वयुद्धांत नखानें फाडून

ठार केलें असें आहे ( १ नृसिंह पहा ). याचे पुत्र प्रह्लाद, संह्लाद, ह्लाद व अनुह्लाद ( भा. ६. १८. १३; विष्णु. १. १७. १४०; ह. वं. १. ३ ), प्रह्लाद, संह्लाद, अनुह्लाद, शिबि व बाष्कल ( म. आ. ६६. १८ कुं. ). कन्या सिंहिका ( भा. ६. १८. १३ ); हरिणी अथवा रोहिणी ( म. व. २२३. १८ कुं. ), व भृगुपत्नी दिव्या ( वायु. २. ४. ७३; ब्रह्मांड. ३. १. ७४ ). व पुरोहित भृगुपुत्र ( विष्णु. १. १७. ४८ ). हा एकदां इंद्रहि झाला होता ( १ इंद्र पहा ). हा पूर्वजन्मीं जय होता ( जयविजय पहा ). यानें ८२ लक्ष ८८ हजार वर्षे ( पद्म. सृ. १३ ). १ अर्बुद १ लक्ष ७२ हजार वर्षे राज्य केलें ( ब्रह्मांड. ३. ७२. ८८; वायु. २. ३५. ८७ ). हा व हिरण्याक्ष हे दोघे सर्वांचे पूर्वज होते ( वायु. २. ६. ५०; ब्रह्मांड. ३. ५. ३ ).

**हिरण्यकेशिन्**—कृष्णयजुर्वेदाच्या तैत्तिरीयशाखेंतील एका सूत्राचें नांव. हा खांडवीयांचा पोटभेद आहे. या सूत्रकाराचें नांव सत्याषाढ असून लोक प्रसिद्धी हिरण्यकेशिन् या नांवानें होती. हा आद्य कल्पांत ब्रह्मदत्त नांवानें प्रसिद्ध होता (महादेवकृत वैजयन्ती प्रस्तावना १२-१४ ). याचें श्रौतसूत्र प्रसिद्ध असून त्यांतच धर्म ( २६-२७ ), गृह्य ( १९-२० ) व शुल्ब सूत्राचा ( २५ ) अन्तर्भाव होतो. या सूत्राचे अनुयायी चित्पावनब्राह्मण आहेत.

या सूत्रावर महादेव दीक्षितांची वैजयन्ती वगैरे त्रुटित टीका आढळतात.

महीदासाच्या चरणव्यूहावरील महीदासाच्या भाष्यांत हिरण्यकेशिन्चा लोकवाचक बहुवचनी उल्लेख आहे. हे सह्याद्रीच्या पश्चिमेला चिपळूण वगैरे भागांत राहतात असें तेथें म्हटलें आहे.

सह्याद्रीच्या पूर्वभागीं परशुराम क्षेत्रांत हरणकाशि नदीचे कांठीं तपश्चर्या करून यानें महत्त्व संपादिलें ( स्कंदोपपुराण ).

या हिरण्यकेशी ब्राह्मणांचा उल्लेख पांचव्या शतकांतील कोंगणी राजानें दिलेल्या भात जमिनीच्या ताम्रपटांत सांपडतो. त्यावरून पांचव्या शतकापूर्वी हें सूत्र व तदनुयायी ब्राह्मण यांचा काल निश्चित ठरतो ( I. A. ४. १३६ ). या सूत्राचा गळटला भाग भरद्वाज सूत्रांतून घेतला आहे. आपस्तंबसूत्रांशीं याच्या सूत्राचें साम्य आश्चर्यकारक आहे.

**हिरण्यगर्भ**--उत्तम मन्वंतरांतील ऊर्ज ऋषीचा पिता.

**हिरण्यगर्भ प्राजापत्य**--सूक्तद्रष्टा (ऋ. १०. १२१).

**हिरण्यदत् बैद**—एक आचार्य ( ऐ. ब्रा. ३. ६. ३; ऐ. आ. २. १. ५ ). यानें वषट्काराचें वर्णन केलें आहे ( ऐ. ब्रा. ३. ६ ) व प्राण अग्निरूप आहे असें हा म्हणतो.

**हिरण्यधनुस्**—एकलव्य निषादाचा पिता ( म. आ. १४२. ४० कुं. ). आणि याला हिरण्यधेनुहि म्हणत.

**हिरण्यनाभ**--( सू. इ. ) भागवतमतें विधृतीचा विष्णु व वायु यांच्या मतें विश्वसहाचा पुत्र. हा व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील सुकर्मन्चा शिष्य. व याचा शिष्य कृत. हा एक योगाचार्य असून योग विषयांत पौष्यंजीचा शिष्य होता व याचा शिष्य याज्ञवल्क्य होता. हा सामवेदी श्रुतर्षीहि होता. याचा पुत्र पुष्य.

**हिरण्यनाभ कौसल्य**—कोसल देशाचा राजा. यानें अश्वमेध यज्ञ केला होता. याचा पर आटणार पुरोहित होता ( सां. श्रौ. १६. ९. १३ ). याचा प्रश्नोपनिषदांत उल्लेख आहे ( प्र. उ. ६. १ ).

**हिरण्यबाहु**—कश्यपकुलांतील गोत्रकार.

२ जनमेजयसत्रांत दग्ध झालेला वासुकिकुलांतील एक सर्प ( म. आ. ५७. ६ कुं. ).

**हिरण्यरेतस्**-(स्वा. प्रिय. ) भागवतमतें प्रियव्रताचा पुत्र. कुशद्वीपाधिपति यानें आपल्या वसु, वसुदान, दृढरुचि, नाभिगुप्त, स्तुत्यव्रत, विविक्त आणि वामदेव या पुत्रांना कुशद्वीपाचे भाग करून दिले व त्यांचीं नांवें त्या द्वीपभागांस दिलीं ( भा. ५. १. २५; २०. १४ ).

२ विश्वामित्रकुलांतील गोत्रकार.

**हिरण्यरोमन्**—रैवत मन्वंतरांतील सप्तर्षींपैकीं एक. हिरण्यलोमन असाहि पाठभेद आहे.

२ रुक्मिणीपिता भीष्मकाचें नामांतर (म. उ. १५८. १ कुं. ).

**हिरण्यवर्मन्**—दशार्णाधिपति. यानें आपली कन्या शिखंडीस दिली होती. पण शिखंडी पुरुष नसल्याचें कळतांच यानें द्रुपदावर स्वारी केली होती ( म. उ. १८९. १० कुं. ).

**हिरण्यशृंग**—कुबेराच्या दूताचें नांव.

**हिरण्यस्तूप**—अनुक्रमणीप्रमाणें हा सूक्तद्रष्टा आहे ( ऋ. १. ३१-३५; ९. ४; ६९ ). यास आंगिरस म्हटलें असून (ऐ. ब्रा. ३. २४. ११) येथें हा सूक्तद्रष्टा असल्याचा उल्लेखहि आहे. ( ऐ. ब्रा. १. ३२ ). हें एका माणसाचें नांव म्हणून आलें आहे ( ऋ. १०. १४९. ५; श. ब्रा. १. ६. ४. २ ).

**हिरण्यहस्त**—वध्रिमतीचा पुत्र. हा तिला अश्वींच्या कृपेनें प्राप्त झाला ( ऋ. १. ११६. १३ ).

२ कालकवृक्षाचा पुत्र, एक महर्षि ( म. अनु. ५३. २३ कुं. ). यास मदिराश्वानें आपली कन्या सुमध्यमा दिली होती ( म. शां. २४०. ३५; अनु. २००. २४ कुं. ).

**हिरण्याक्ष**—कश्यप व दिति यांचा पुत्र. यास भिऊन सर्व देव पळून गेले. शेवटीं याचें विष्णूशीं युद्ध झालें. प्रथम विष्णु ठार होणार अशी भीति वाटत होती; पण पुढें विष्णूचाच जय होऊं लागल्याचें पाहून हा पृथ्वी घेऊन पळून

चालला. पण विष्णूनें वराहरूप घेऊन यास ठार केलें (पद्म. सृ. ७५). परंतु याचें पृथ्वी वर आणीत असलेल्या वराहाशीं युद्ध होऊन त्याच्या खुरांनीं हा ठार झाला असें आहे (भा. ३. २८). या बाबत सूड उगविण्याचा प्रयत्न हिरण्यकशिपूनें तपश्चर्येनें वर मिळवून केला (हिरण्यकशिपु पहा). हा पूर्वजन्मीं विजय होता (जयविजय पहा). याची स्त्री रुषाभानु (भा. ७. २. १५). याचे पुत्र उत्कूर, उत्कच, झर्झर, शकुनि, भूतसंतापन, महानाभ, महाबाहु व कालनाभ. भागवतांत शंबर, धृष्ट, वृक व हरिश्मश्रु हे जास्त दिले आहेत (विष्णु. १. २०. ३; ह. वं. १. ३; ब्रह्मांड. ३. ५. ३०-३१). हा स्वायंभुव मन्वंतरांत होऊन गेला (लिंग. १. ९४).

२ वैश्वानरकन्या (भा. ६. ६. ३४). अथवा मयासुरकन्या उपदानवीचा पति. मत्स्यांत हा चालू मन्वंतरांत होऊन गेल्याचें आहे (मत्स्य. ६).

३ मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

४ विश्वामित्राचा पुत्र.

५ वसुदेवबंधु श्याम व शरभू अथवा शरभूमि यांचा पुत्र (भा. ९. २४. ४२).

**हीक**—एक पिशाच (म. क. ३७. ५२ कुं.).

**हीन**—(सो. क्षत्र.) भागवतमतें सहदेवाचा पुत्र.

**हुंड**—विप्रचित्तीचा पुत्र. पार्वतीकन्या अशोकसुंदरीवर मोहित झाल्यामुळें यानें तिला मागणी घातली. पण ती तिनें नाकारली. तेव्हां यानें स्त्रीरूपानें तिला फसवून वैडूर्यपुरांत नेलें व आपलें रूप प्रगट केलें. तेव्हां तिनें आपला भावी पति 'नहुष तुला ठार करील' असा शाप दिला. यानें नहुषास बालपणींच पकडून त्याचें मांस शिजवून आपणांस खाण्याकरितां तयार करण्यास आचाऱ्याजवळ दिलें. पण आचाऱ्यानें नहुषास वसिष्ठाश्रमीं पोहोंचतें केलें. पुढें त्यानें यास ठार केलें. याचा पुत्र विहुंड (पद्म. भू. ११३-११८).

**हुत**—अंगिरसकुलांतील गोत्रकार.

२ सुख देवांपैकीं एक.

**हुतहव्य**—धर वसूचा पुत्र.

**हूण**—(भविष्य.) मत्स्यमतें एक राजवंश.

**हूहू**—कश्यप व प्राधा यांचा पुत्र, एक गंधर्व. हा आषाढ महिन्यांत सूर्यासमागमें असतो (भा. १२. ११. ३६). यास देवलाच्या शापानें नक्रत्व आलें होतें. पण गजेंद्राबरोबर यासहि मुक्ति मिळाली (भा. ८. ४. ३. आ. रा. सार. ९).

**हृत्स्वाशय आल्लकेय माहावृष राजन्**—सोमशुष्म सात्ययज्ञि प्राचीनयोग्याचा शिष्य व याचा शिष्य जनश्रुत कांडवि (जै. उ. ब्रा. ३. ४०. २).

**हृदिक** किंवा **हृदीक**—(सो. क्रोष्टु.) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें स्वयंभोजाचा पुत्र. महाभारतांत हृदिक हें नांव असून त्यास यादव म्हटलें आहे. याचे पुत्र कृतवर्मन् (म. आ. ६४. १४७ कुं.), देववाहु, शतधनु, देवमीढ (भा. ९. २४. २६). मत्स्य व पद्म यांच्या मतें हा विदूरथपुत्र राज्याधिदेव वंशज भोजाचा पुत्र दिला आहे (पद्म. सृ. १३).

**हृषीक**—सुतार नांवाच्या शिवावताराचा शिष्य.

**हृषीकेतु**—कपिलकोपांतून वांचलेल्या सगराच्या चार पुत्रांपैकीं एक (पद्म. उ. २०).

**हेति** किंवा **हेतु**—प्रहेतीचा बंधु. याची स्त्री कालकन्या भया. याचा पुत्र विद्युत्केश (भा. ६. १०. २०; वा. रा. उ. ४). हा वृत्रानुयायांपैकीं एक होता. चैत्र महिन्यांत धाता सूर्याबरोबर हा असतो (भा. १२. ११. ३३). याचा विष्णूनें पराभव केला होता. यानें आपली व भावाची अशा सुकेशी व मिश्रकेशी नांवाच्या दोन मुली दुर्जयास दिल्या. सुकेशीचा पुत्र प्रभव व मिश्रकेशीचा सुदर्शन (वराह. १०).

**हेम**—(सो. अनु.) भागवत, विष्णु व वायु यांच्या मतें उषद्रथाचा पुत्र. मत्स्यांत याचें नांव सेन आहे.

**हेमकंपन**—हा भारतीय युद्धांत दुर्योधनाच्या बाजूस होता (म. द्रो. १५६).

**हेमकांत**—वंगाधिपति कुशकेतूचा पुत्र. हा मृगया करीत शतर्चींच्या आश्रमांत गेला. तो ध्यानस्थ असल्यामुळें त्यानें याचें आदरातिथ्य केलें नाहीं, म्हणून हा त्यास ठार करण्यास तयार झाला. पण शिष्यांनीं याचा निषेध केला म्हणून यानें ३०० शिष्यांस ठार केलें. म्हणून यास बापानें रानांत हांकून दिलें. तेथें यानें २८ वर्षांच्या अवधींत एकदां उन्हानें मूर्च्छित झालेल्या त्रितास छाया केली व पाणी पाजिलें. एवढ्याच पुण्यानें याच्या ब्रह्महत्यांचा नाश झाला. पुढें यास यमदूत नेत असतां विष्णूच्या आज्ञेनें विष्वक्सेनानें सोडवून कुशकेतूकरवीं यास राज्यावर बसविलें (स्कंद. २. ७. १२).

**हेमकुंडल**—कृतयुगीं होऊन गेलेला निषधपुरांतील एक वाणी. यानें तरुणपणीं व्यापारांत बराच पैसा मिळवून वृद्धपणीं त्याचा एक षष्ठांश दानधर्मांत घालविला. याचे पुत्र श्रीकुंड व विकुंड (पद्म. स्व. ३०).

**हेमकूट**—वरुणपुत्र वानर. शार्दूल नामक रावणाच्या हेरानें या रामपक्षीय वानराची माहिती रावणास सांगितली (वा. रा. यु. ३०).

**हेमगुह**—एक सर्प (म. आ. ३५. ९ कुं.).

**हेमचंद्र**—(सू. दिष्ट.) विशालाचा पुत्र.

**हेमधन्वन्**—धर्मसावर्णि मनूचा पुत्र.

**हेमधर्म**—अविक्षितपत्नी वरेचा पिता (मार्क. ११९. १६).

**हेमनेत्र**--कुबेराच्या सभेंतील एक यक्ष ( म. स. १०. १८ कुं. ).

**हेमप्रभा**--कांचनपुरींतील वल्लभाची स्त्री. ही दुर्गुणी होती. हिला एकदां नवऱ्यानें मारिलें, म्हणून हिनें दोन दिवस उपवास केला. ते दिवस श्रावणांतील परिवर्तिनी एकादशी व द्वादशी असे होते. या सहज पुण्यानें ही वैकुंठीं गेली ( पद्म. ब्र. १६ ).

**हेमप्रभावती**--त्रेतायुगांत श्रीधर नांवाचा एक ब्राह्मण होऊन गेला, त्याची ही स्त्री. बालव्रतानें या दोघांस पुत्र झाला, तो पुढें सार्वभौम राजा झाला. हीं पूर्वजन्मीं अनुक्रमें चंद्र व शुभांगी होतीं ( पद्म. ब्र. ५ ).

**हेममालिन्**--कुबेराचा पूजेसाठीं फुलें आणून देणारा एक अनुचर. पत्नीशीं गप्पा सांगत बसला असतां फुलें नेऊन देण्यास उशीर झाल्यामुळें कुबेरानें यास कुष्ठी होण्याचा व स्त्री-वियोग होण्याचा शाप दिला. पुढें मार्कंड ऋषीच्या सांगण्या-वरून योगिनी एकादशीच्या व्रतानें यास पूर्वस्थिति प्राप्त झाली (पद्म. उ. ५२).

२ खराचा अमात्य (वा. रा. अर. २३. ३२).

**हेमवर्ण**--गरुडाचा पुत्र.

२ रोचमानाचा पुत्र. हा पांडवांच्या बाजूस असून याचे घोडे कमलवर्णी व उत्तम होते ( म. द्रो. २३. ६८ कुं. ).

**हेमवर्मन्**--( हिरण्यवर्मन् पहा ).

**हेमसदन**--एकादश रुद्रांपैकीं एक.

२ मगध देशाचा राजा. याचा पुत्र बुध (स्कंद. १.२.४०).

**हेमा**--एक अप्सरा. मयाची पत्नी. एक स्थळ निर्माण करून तेथें हिच्यासह मय राही. मयास तेथून इंद्रानें हाकून दिल्यामुळें हिनें तें स्थळ आपल्या स्वयंप्रभा सखीस दिलें (वा. रा. कि. ५०-५२; उ. १२; १ मय पहा).

**हेमांग**--(सू. इ.) एक राजा. यानें गरिबांकरितां देह झिजविला. पण विद्वानांकरितां कांहींहि केलें नाहीं. म्हणून यास अनेक जन्म आले. शेवटीं पालीच्या जन्मांत श्रुतदेव ब्राह्मणाच्या पादोदकानें व पुण्यांशानें याचा उद्धार झाला ( स्कंद. १. १६ ).

**हेमांगद**--( सो. वसु. ) वसुदेव व रोचना यांचा पुत्र.

२ ( सू. इ. ) एक राजा ( स्कंद. २. ६ ).

**हेमांगी**--द्रविड देशच्या वीरवर्मन् राजाची स्त्री. प्रधान-कन्या कलेसह चित्रें पाहतां पाहतां इंद्रप्रस्थाचा देखावा पाहून हिला आपण पूर्वजन्मीं मोहिनी वेश्या असल्याचें आठवलें. तें पतीला सांगून तीं दोघें पापनाशार्थ प्रयागास जाऊन राहिलीं. तेथें यांस ब्रह्माविष्णूंचें दर्शन झालें (पद्म. उ. २२१-२२२ ).

**हेरंब**--शिवकांचींतील शिवभक्त. यास शिव व विष्णु यांचे दूत न्यावयास आले असतां त्यांत युद्ध झालें. पण शिवविष्णूंच्या मध्यस्तीनें तें मिटलें. नंतर हा प्रथम कैलासीं आणि नंतर वैकुंठीं गेला ( पद्म. उ. २२२ ).

**हैतनामन आह्त**--एक आचार्य ( मै. सं. ३. ४. ६ ).

**हैमवत**--मणिवर व देवजनी यांचा पुत्र.

**हैमवती**--पार्वतीचें पैतृक नांव.

२ विश्वामित्राची स्त्री ( म. उ. ११७. १३ कुं. ).

३ कृष्णपत्नी. ही कृष्णाबरोबर सती गेली ( म. मौ. ८. ७४ कुं. ).

**हैमिनी**--जारुजाची कन्या, विक्रांताची स्त्री व चैत्राची माता. जातहारिणीनें अनमित्र व गिरिभद्रा यांच्या पुत्रास चैत्राचे जागीं ठेवून चैत्रास बोधाचे येथें नेऊन ठेविलें. विक्रांत त्या मुलाचे संस्कार करूं लागला असतां हें सर्व त्या मुलानें स्वतः ज्ञानी असल्यामुळें सांगितलें. तेव्हां विक्रांतानें चैत्रास परत नेलें ( मार्कं. ७३ ).

**हैहय**--( २ वीतहव्य पहा ).

**होड**--एक ऋषि. यानें बकुलासंगमीं तप केलें ( पद्म. उ. १३८ ).

**होतृ**--पारावत देवांपैकीं एक.

**होत्रक**--( सो. अमा. ) भागवत व विष्णु यांच्या मतें कांचनाचा, वायुमतें कांचनप्रभाचा पुत्र सुहोत्र होय.

**होत्रवाहन**--एक राजर्षि. अंबेचा मातामह (अंबा पहा). यास सृंजय असेंहि म्हणत. हा कांहीं काळ पांडवांबरोबर द्वैत-वनांत होता ( म. व. २६. २४ कुं. ).

**होम**--सुख देवांपैकीं एक.

**ह्रस्वकर्ण**--रावणपक्षीय एक राक्षस (वा. रा. सुं. ६).

**ह्रस्वरोमन्**--( सू. निमि. ) भागवत व वायु यांच्या मतें स्वर्णरोमन्चा व विष्णुमतें सुवर्णरोमन्चा पुत्र. याचे पुत्र सीरध्वज व कुशध्वज.

**ह्राद**--हिरण्यकशिपु व कयाधू यांचा पुत्र.

# परिशिष्ट पहिलें

## कालनिर्णयकोश

श्रुति, स्मृति, सूत्रें व पुराणें हे ग्रंथ व यांतील ऐतिहासिक व्यक्ति यांच्या स्थलकालांविषयीं विद्वानांत अत्यंत मतभिन्नता आहे. पौराणिकपद्धतीची कालगणना थोडक्यांत पुढें दिली आहे. पण ती पद्धति सरसहा उपयोगांत आणलेली नाहीं. या पुस्तकांत तशा कालगणनेचें कोष्टक ब्रह्मन् शब्दावर व पुढे दिलें आहे. शिवाय अर्वाचीन पद्धतीनं झालेला कालनिर्णय आधारांसह शकावलीप्रमाणें नमूद केला आहे. त्यावरून आतांपर्यंत झालेल्या कालनिर्णयाची कल्पना येईल व जरूर तर मूळ विवेचन पाहून स्वतःलाहि मत बनवितां येईल.

या बाबतींत दोन प्रवाह उघड रीतीनें दिसून येण्यासारखे आहेत. एक परंपरित युधिष्ठिरशक मानणारांचा आणि दुसरा ज्योतिष व उपलब्ध वंशावळि यांच्या आधारांनीं परंपरित युधिष्ठिरशक नाकारणारांचा. परंपरा ही स्थिर असल्यानें तिच्या समर्थनाचे व्हावे तसे प्रयत्न अद्यापि झाले नाहींत. परंपरेच्या अनुयायी वर्ग स्वाभाविकच मोठा असतो व त्यावर समर्थनाची विशेषशा जबाबदारीहि पडत नाहीं. तथापि कै. वि. का. राजवाडे व श्री. चिं. वि. वैद्य अशीं विद्वान् व झुंझार माणसें परंपरेच्या बाजूला आहेत. दुसऱ्या बाजूला श्री. के. ल. दप्तरी कै. काळे, कै. दीक्षित, कै. टिळक अशीं सखोल अभ्यास करणारी माणसें आहेत. परदेशी अभ्यासकांनींहि दुसऱ्याच पक्षाचा पाठपुरावा केला आहे. त्यामुळें भारतीय युद्धाचा काल (इ. स.पू. ३१०२ सोडून) इ. स पू. अकराशें ते पंधराशेंच्या दरम्यान येऊन पडतो. दुसरा पक्ष जोरदार होण्याचें कारण पुराणांत परीक्षितापासून महापद्मनंदापर्यंत कारकीर्दींच्या वर्षांसुद्धां वंशावळि दिल्या आहेत हें होय. पुढें आम्हीं इ. स. पूर्वकालीन कालगणनापद्धति व कालनिर्णय आधारांसह नमूद केले आहेत.

**पौराणिक काळ**—पुढीलप्रमाणें पुराणांत कालाचें कोष्टक आढळतें. भागवतांत आरंभीं व मध्यें अधिक सूक्ष्मता असून पळेची कल्पनाहि आहे.

२ त्रुटि =½ निमेष.
२ अर्धे निमेष =१ निमेष.
१५ निमेष =१ काष्ठा.
३० काष्ठा =१ कला.
३० कला =१ मुहूर्त.
३० मुहूर्त =१ अहोरात्र.
१५ अहोरात्र दिवस =१ पक्ष.
२ पक्ष =१ महिना.
६ महिने =१ अयन.
२ अयन =१ वर्ष.
४३ लक्ष २० हजार वर्षें ( सौरमानाप्रमाणें ) = पर्याय ( कृत, त्रेता, द्वापर व कलि ).
७१ पर्याय व कांहीं वर्षें = १ मन्वंतर ( इंद्राचें आयुष्य ).
१४ मन्वन्तरें = १ कल्प.

( भवि. ब्राह्म. २; मार्कं. ४३; विष्णु. १. ३; मत्स्य. १४२; स्कंद. ६. १९४; ७. १. १०५; पद्म. सृ. ३ ).

मनुष्याचा महिना म्हणजे पितरांची अहोरात्र होय. त्यापैकीं शुक्लपक्ष दिवस व कृष्णपक्ष रात्र होय. तसेंच मनुष्याचें वर्ष म्हणजे देवांचा अहोरात्र होय. त्यांपैकीं उत्तरायण दिवस होय.

कल्पांचीं नांवें पुढें देत आहें. त्यांत पहिली यादि मत्स्यांतील असून कंसांतील नांवें स्कंदांतील आहेत. दुसरी यादि वायूंतील असून कंसांत दिलेलीं नांवें लिंगांतलि आहेत.

१ श्वेत, २ नीललोहित, ३ वामदेव, ४ रथंतर, ५ रौरव ( रौक्म ), ६ देव ( प्राण ), ७ बृहत्, ८ कंदर्प, ९ सद्य, १० ईशान, ११ तम ( ध्यान ), १२ सारस्वत, १३ उदान, १४ गरुड, १५ कौर्म, १६ नारसिंह, १७ समान ( समाधि ), १८ आग्नेय, १९ सोम, २० मानव (भावन), २१ तत्पुरुष (सुप्तमाली), २२ वैकुंठ, २३ लक्ष्मी ( आर्चि ), २४ सावित्री, २५ घोरकल्प (लक्ष्मी), २६ वाराह, २७ वैराज ( गौरी ), २८ गौरी ( अंध ), २९ माहेश्वर, ३० पितृ ( मत्स्य. २८९; स्कंद. ७. १. १०५ ).

१ भव, भुव, ( भवोद्भव ), २ तप, ३ भव, ४ रम्भ, ५ ऋतु, ६ क्रतु, ७ वह्नि, ८ हव्यवाहन, ९ सावित्र,

१० भुव ( शुद्ध ), ११ उशिक, १२ कुशिक, १३ गंधर्व, १४ ऋषभ, १५ षड्ज, १६ मार्जालिय ( मज्जालीय ), १७ मध्यम, १८ वैराजक, १९ निषाद, २० पंचम, २१ मेघवाहन, २२ चिन्तक ( चित्रक ), २३ आकूति, २४ विज्ञाति ( ज्ञान ), २५ मनस् ( सुदर्श ), २६ भावदर्श (दर्श), २७ बृहत्, २८ श्वेतलोहित, २९ रक्त, ३० पीतवासस्, ३१ सित ( असित ), ३२ विश्वरूप ( वायु. १. २१; लिंग. १.४ ).

ऋग्वेदांत युग शब्दाचा अर्थ दहा वर्षें असावा (ऋ. १.१५८. ६). संवत्सर, परिवत्सर, इद्वत्सर, अनुवत्सर व इदावत्सर अशा क्रमानें पंचसंवत्सरात्मक कालालाहि युग म्हणत असत ( वायु. १. ३१. २७-२८ ). अथर्ववेदांत शत, अयुत व युग असा युग शब्दाचा उल्लेख आहे. त्यावरून युग म्हणजे अयुतापेक्षां जास्त वर्षांचें असें होतें ( अ. वे. ८. २. २१ ). यावरून या वाङ्मयांतील कालगणनेविषयीं कल्पना येईल. चवदा मनु व त्यांची माहिती मनु शब्दावर दिली आहे.

**कलिकाल** किंवा **युधिष्ठिरशक**—कालगणनेंत कलियुगाचा उपयोग ज्योतिषग्रंथांत आणि पंचांगांत करितात. ताम्रपटादि लेखांत याचा उपयोग फारसा आढळत नाहीं. सांप्रत व्यवहारांत हें वर्ष कोठेंहि नाहीं. शकांत ३१७९ व सनांत ३१०२ मिळवून गत कलिवर्ष निघतें. या कालाचा उल्लेख स्कंदांत आढळतो ( नंद, शूद्रक पहा ).

**सप्तर्षिशक**—कधीं कधीं या कालास 'लौकिककाल' अथवा 'शास्त्रकाल' म्हणतात. सांप्रत हा काल काश्मिरांत व त्याच्या आसपास प्रचारांत आहे. अल्बेरुणीच्या वेळीं ( शक ९५२ ) हा काल मुलतान आणि इतर कांहीं प्रांतांत चालू होता. याच कालाच्या वर्षांनीं राजतरंगिणी ग्रंथ सांगितला गेला. सप्तऋषींना गति आहे, ते शंभर वर्षांत एक नक्षत्र आक्रमितात आणि २७०० वर्षांत भचक्र फिरतात. म्हणून या कालगणनेंत २७०० वर्षांचें चक्र मानतात. मोजतांना शंभर वर्षें भरल्यावर पुनः पहिलें, दुसरें वर्ष असें मोजण्याचा प्रचार आहे. शतकें सोडून दिलीं तर सप्तर्षिवर्षांत ४६ मिळविले म्हणजे चालू पद्धतीचें शकवर्ष आणि २४-२५ मिळविले म्हणजे इ. स.चें वर्ष अशीं निघतात. काश्मीरांतील ज्योतिषांच्या मतांप्रमाणें कलिवर्ष २७ चैत्र शु. १ या वर्षी सप्तर्षिकालाचा आरंभ झाला. पुराणांत सप्तर्षिकालाचा वरीलप्रमाणें उल्लेख आहे ( वायु. २. ३७. ४१०-४१७; भा. १२. २. २६-३१; ब्रह्मांड. ३. ७४. २३१-२४०; विष्णु. ४. २४. ३३; मत्स्य. २७३. ३९-४४ ).

**परशुरामशक**—हा शक सध्यां मलबार प्रान्तांत मंगलोरपासून कुमारीपर्यंत व तिनीवेल्ली जिल्ह्यांत सुरू आहे. याचें वर्ष सौर आहे. मलबारच्या उत्तरभागांत कन्या महिन्यापासून, दक्षिणभाग व तिनीवेल्लीप्रान्त यांत सिंहमासापासून सुरुवात होते. याचें चक्र एक हजार वर्षांनीं होतें. हलीं चवथें चक्र आहे. शकवर्ष ७४७ या वर्षी परशुरामशक पहिला होता. याच्या पूर्वी हा शक प्रचारांत असल्याचा पुरावा नाहीं. सनांतून ८२४।८२५ वजा केले म्हणजे परशुरामशक येतो.

**हिब्रुशक**—इ. स. पू. ७ ऑक्टोबर ३७६१ पासून ज्यू लोकांच्या वर्षगणनेस सुरुवात होते.

**विक्रमसंवत्**—इ. स. पू. ५७।५८ व्या वर्षी हा शक सुरू झाला. हा काल गुजराथ व बंगालखेरीज सर्व उत्तर हिंदुस्थानांत प्रचलित आहे. याचें वर्ष नर्मदेच्या उत्तरेस चैत्रादि आहे व महिने पूर्णिमान्त आहेत. गुजराथेंत वर्ष कार्तिकादि आहे.

### संक्षेपांचें स्पष्टीकरण

( इतर पुस्तकें व लेख यांचा स्पष्ट निर्देश केला आहे ).

गी. र. गीतारहस्य.
ध. र. धर्मरहस्य.
ध. शा. History of Dharmashastra.
पु. नि. पुराणनिरीक्षण
भा. का. नि. भारतीय युद्धकालनिर्णय.
भा. ज्यो. भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास.
भा. सा. भारतसावित्री.
म. उ. महाभारताचा उपसंहार.
रा. का. नि. रामचंद्रजन्मकालनिर्णय.
ह. प्र. हरप्रसादशास्त्रींची प्रस्तावना ( Descriptive Catalogue of Sanskrit Manuscripts in the Collections ).

**स्मिथ**—The Early History of India, 4th Edition 1924, by Vincent A. Smith.

**रॅप्सन**—The Cambridge History of India, Vol I. Ancient India 1922, by E. G. Rapson.

**डॉ. वेलवलकर**-Systems of Sanskrit Grammar 1915, by S. K. Belvalkar.

इ. स. पू.-इसवी सनाच्या पूर्वी.
श. पू.-शालिवाहन शकापूर्वी.

### कालनिर्णय

**अग्निपुराण**—इ. स. पू. १०१-७६ (ध. र. २२६). इ. स. ५००-५५० ( पु. नि. १०२ ). इ. स. ८००-९०० ( ह. प्र. १४७ ).

**अजातशत्रु**—( शिशु. भविष्य. ) इ. स. पू. ४८८ (दप्तरी, सद्विचार ७. १).-मृत्यु इ. स. पू. ५२७(रॅप्सन).

**अधिसीमकृष्ण**—( सो. पूरु. भविष्य. ) कृत, त्रेता, द्वापर व कलि या चार युगांचीं मिळून १००० वर्षें पूर्ण झालीं, म्हणजे द्वादशवार्षिक सत्र करीत. त्याप्रमाणें हा दुसऱ्या द्वादशवार्षिक सत्राचे वेळीं राज्य करीत होता ( ध. र. १५० ).

**अभिमन्यु**—पांडव अज्ञातवासांतून प्रगट झाल्यावर आषाढ शुद्ध पक्षांत विवाह व मार्गशीर्ष शुद्ध द्वादशीस निधन ( भा. का. नि. ), मार्गशीर्ष शुद्ध अष्टमीला निधन ( भा. सा. ).

**अशोक**—( मौर्य. भविष्य. ) राज्याभिषेक इ. स. पू. २७३ ( गौरीशंकर ओझा ).

**आंध्र**—(आंध्र. भविष्य. ) इ. स. २५० त शेवट ( पु. नि. २३७ ). आरंभ इ. स. पू. २४० किंवा २३०–व शेवट इ. स. २२५ ( स्मिथ ). मगध जिंकिला इ. स. पू. ५५ ( दप्तरी, सहविचार ७. ५ ).

**आपस्तंबसूत्र**—इ. स. पू. ३ रे शतकाहून पलीकडे ( S. B. E., Vol. II. Intro. P. 43; Vol. XIV. Intro. P. 43; ). इ. स. पू. ३ रे शतकाच्या अलीकडे ( गी. र. ५६१–५६२ ). इ. स. पू. १४२० ( चिं. वि. वैद्यकृत संस्कृत वाङ्मयाचा इतिहास; इंग्रजी ३. ७३ ). इ. स. पू. ६००–३०० ( ध. शा. ४५ ).

**आपिशलि**—(व्याकरणकार) इ. स. पू. ७००–७५० ( डॉ. बेलवलकर ).

**आयु**—( सो. पुरूरवस्. ) इ. स. पू. २१८७-२१०० ( पु. नि. ३२७ ). इ. स. पू. २१०२ ( दप्तरी ६.३ )

**आश्वलायन गृह्यसूत्र**—इ. स. पू. १००(म. उ. ५३).

**इक्ष्वाकु**—इ. स. पू. २६०० ( पु. नि. ३१५ ). इ. स. पू. २१०२; इ. स. पू. २१२७ (दप्तरी, सहविचार ६.२).

**इडादिडा**—इ. स. पू. १६६४ (रा. का. नि. ४६ ).

**उदयन**—( सो. कुरु. भविष्य.) इ. स. पू. ६०० ( पु. नि. २७९ ).

**उपनिषद्**—इ. स. पू. ५५० च्या पूर्वी.

**उपवर्ष**—( पाणिनि पहा ).

**उलूक**—मार्गशीर्ष वद्य अमावास्येला वध ( भा. सा. ).

**उशनस्स्मृति**—( स्मृति पहा ).

**ऋग्वेद**—श. पू. ३००० हून प्राचीन ( भा. ज्यो. १२९ ).कांहीं सूक्तें इ. स. पू.४०००(वेदकालनिर्णय९०;९९). इ. स. पू. १२०० ( मॅक्समुल्लर ). इ. स. पू. २५००० ( अविनाशचंद्रदास, वैदिक इंडिया ). इ. स. पू. ६६००० ( अमळनेरकर, ६ ). यांतील कांहीं सूक्तें पुष्कळ प्राचीन आहेत; पण संहितीकरण भारतीय युद्धाच्या वेळीं कृष्णद्वैपायन व्यासानें केलें. इ. स. पू. ३१०२–१६६२ वेद (ध.र.२०४–२०६).

**कंस**—इ. स. पू. १२३७ वध ( दप्तरी, सहविचार. ७.१ विविधज्ञानविस्तार १९२९ मे ).

**कपिलसंहिता**—इ. स. ११००-१२०० ( ह. प्र. २१८ ).

**कर्ण**—मार्गशीर्ष वद्य चतुर्दशीला वध ( भा. सा. ).

**कर्दम**—हा पूर्वकल्पांतील चाक्षुष मन्वंतरांत ( पु. नि. ३०७ ).

**कलि**—प्रारंभ इ. स. पू. ३१०२.

**कल्कि**—इ. स. पू. ४०२ ( ध. र. २२६ ).

**कश्यप**—इ. स. पू. ५६९४ ( पु. नि. ३०९ ).

**काकवर्ण**—( शिशु. भविष्य. ) इ. स. पू. ७०० हून प्राचीन ( पु. नि. ३२४). इ. स. पू. ५७२–५५४ (दप्तरी, सहविचार ७.१).

**काण्वराजे**—( काण्व. भविष्य.) इ. स. पू. ७३-२७ ( स्मिथ ). इ. स. पू. १००–५५ (दप्तरी, सहविचार९.१)

**कात्यायन**—वार्तिककार. इ. स. पू. ५००–४०० ( पु. नि. २९१ ). इ. स. पू. ६००-४०० (डॉ. बेलवलकर).

२ पारस्करसूत्रकार. इ. स. पू. १००० ( चिं. वि. वैद्यकृत संस्कृतवाङ्मयाचा इतिहास, इंग्रजी ).

**कात्यायनस्मृति**—इ. स. ४००–६०० ( ध. शा. २१८ ).

**किलकिल**—( कैनकिल ) इ. स. ५५० त शेवट ( पु. नि. २३७ ).

**कूर्मपुराण**—इ. स. २ रें शतक ( ह. प्र. १८७). इ. स. ५०० पूर्वी ( पु. नि. १४७ ).

**कृष्ण**—( सो. वृष्णि. ) इ. स. पू. १२५१–११७५ ( दप्तरी, सहविचार ७. १ ). इ. स. पू. १२८९ निर्वाण ( पु. नि. २६१ ).

२ ( आंध्र. भविष्य. ) इ. स. पू. १६८–१५० ( पु. नि. २१८ ).

**क्षेमक**—( सो. पूरु. भविष्य. ) इ. स. पू. ३८४ ( पु. नि. २७९; ३२७ ). इ. स. पू. ८०१ मध्यें शेवट असावा ( दप्तरी, सहविचार ६. ५ ).

**गरुडपुराण**—इ. स. ३ रें शतक ( ह. प्र. १९३ ).

**गर्ग**—( यादवपुरोहित ) इ. स. पू. ११८१ ( पु. नि. २५० ).

**गर्गसंहिता**—इ. स. पू. १४५ ( म. उ. ४७). इ. स. १० वें शतक ( ह. प्र. २१७ ).

**गुप्त**—इ. स. ३१९-४९९ पर्यंत ( पु. नि. २२७ ).

**गोनर्द** किंवा ( कल्हणमतें ) **गोनंद**—इ. स. पू. १२६३ ( पु. नि. २४५ ). हा राजा जरासंधाच्या बाजूनें कृष्णाशीं लढण्यास गेला असतां बलरामाकडून मारिला गेला ( राजतरंगिणी. १. ५०–७० ). श. पू. १३१५ ( दप्तरी, सहविचार, राजतरंगिणीनिरीक्षण; कंसवध, विविधज्ञानवि. ६०.५ ).

२ इ. स. पू. ११९२–११८२ ( पु. नि. २४६ ).

**गौतमधर्मसूत्र**—इ. स. पू. ६००–४०० ( ध. शा. १९ ). इ. स. पू. ६०० ( ध. र. २३० ).

**गौतमस्मृति**—( स्मृति पहा ).

**गौतमीपुत्र**—( आंध्र. भविष्य. ) इ. स. १४२-१६३ ( पु. नि. २१९ ).

**घटोत्कच**—मार्गशीर्ष वद्य एकादशीला मध्यरात्रीं वध ( भा. सा. ).

**चंद्रगुप्त**—( मौर्य भविष्य. ) इ. स. पू. ३१२ त राज्याभिषेक ( पु. नि. १९३, २०४, ३१५ ). इ. स. पू. ३११ त राज्याभिषेक ( दप्तरी, सहविचार ९.१ ) इ. स. पू. ३२१-२९७ ( रॅपसन ).

**चाक्षुष मनु**—इ. स. पू. २४२२ ( रा. का. नि. ).

**चार्वाक**—युधिष्ठिरशक ६६१ ( जैनग्रंथ ).

**जनमेजय पारीक्षित**—( दुसरा ) इ. स. पू. ११८७ ( पु. नि. २७७ ).

**जयद्रथ**—मार्गशीर्ष वद्य नवमीला वध ( भा. सा. )

**जरासंध**—इ. स. पू. १२१० त मृत्यु ( दप्तरी, सहविचार ७. १ ).

**जातूकर्ण्यस्मृति**—इ. स. २००-४०० ( ध. शा. १२० ).

१ **जैमिनि**—जैमिनिसूत्रें इ. स. पू. ६००-५००. जैमिनिअश्वमेध इ. स. पू. १०० ( पु. नि. ८२ ).

**तृणबिंदु**—इ. स. पू. १६९४ ( रा. का. नि. ४६ ).

**तैत्तिरीयसंहिता**—कै. टिळकांच्या मतें इ. स. पू. २३५० व बेंटले प्रभृतींच्या मतें इ. स. पू. १४२६ ( वेदकालनिर्णय २६ ).

**दक्ष**—( प्रजापति ) इ. स. पू. ५७७४ ( पु. नि. ३१४ ).

( स्वायंभुवांतील ) इ. स. पू. २६५४ ( दप्तरी, सहविचार ६. २ ).

( चाक्षुषांतील ) इ. स. पू. २२०६–२१५० पर्यंत राज्य ( दप्तरी, सहविचार ६. २ ).

**दक्षस्मृति**—( स्मृति पहा ).

**दिवाकर**—( सू. इ. भविष्य. ) इ. स. पू. ११०६ ( ध. र. १७१ ).

**दीर्घतमस्**—इ. स. पू. २००० ( पु. नि. २८१ ).

**दुर्योधन**—मार्गशीर्ष वद्य अमावस्येला वध ( भा. सा.

**देवलस्मृति**—इ. स. ४००–६०० ( ध. शा. २२१ ).

**द्रुपद**—मार्गशीर्ष वद्य त्रयोदशीला सकाळीं वध ( भा. सा. ). सावित्री ).

**द्रोण**—मार्गशीर्ष वद्य द्वादशीला वध ( भा. सा. ).

**धृष्टद्युम्न**—मार्गशीर्ष वद्य अमावस्येला वध ( भा. सा. ).

**नंद**—( नंद. भविष्य. ) इ. स. पू. ३८४–३१२ ( पु. नि. २०२ ). इ. स. पू. ४२२–३२२ ( ध. र. २१७ ). Sacred Books of the Hindoos, Vol. XVII, Part 1, p. 68 ).

**नारदपुराण**— यांतील इतर पुराणांची सूचि इ. स. ५००–६०० च्या पूर्वीची ( पु. नि. ९४ ).

**नारदस्मृति**—इ. स. १०० ते ३०० ( ध. शा. २०५ ).

**नारायण**—( कण्व. भविष्य. ) मृत्यु इ. स. पू. ६५ ( दप्तरी, सहविचार ९.१ ).

**निमि**—( सू. निमि. ) इ. स. पू. २१०२ ( पु. नि. २७८ ).

**नृसिंहपुराण**—इ. स. १४०० च्या पूर्वी ( इ. प्र. ).

**पंचशिख**—इ. स. पू. २१०२ ( पु. नि. २७८ ).

२ बुद्धाचा समकालीन ( म. उ. ५९ ).

**पतंजलि**—महाभाष्यकार इ. स. पू. १५०–१०० ( म. उ. ५८ ). इ. स. पू. १४० ( पु. नि. २८९ ).

**पतंजलीचें योगसूत्र**—इ. स. पू. १०० ( म. उ. ५८ ).

**पद्मपुराण**—इ. स. चवदावें शतक.

**परशुराम**—इ. स. पू. १५८८ त जन्म ( पु. नि. २६७ ).

**पराशरस्मृति**—इ. स. १००–५०० ( ध. शा १९५ ).

**परीक्षित्**—( सो. कुरु. ) इ. स. पू. १२६३ ( पु. नि. १९१ ).

**पाणिनि**—व्याकरणकार. इ. स. पू. १२००–१६०० ( पु. नि. २९१–२९२ ). इ. स. पू. १२००–९०० ( वि. का. राजवाडे, इ. सं. मं. १८३२ ).

**पालक**—( प्रद्योत. भविष्य. ) इ. स. ४७० ( पु. नि. १९२ ).

**पुरूरवस्**—इ. स. पू. २१७७ ( पु. नि. २७७, २७९ ). याच वेळीं पहिलें द्वादशवार्षिक सत्र झालें ( ध. र. १५० ).

**पुलस्त्यस्मृति**—इ. स. ४००–७०० ( ध. शा. २२८ ).

**पुलोमत्**—( आंध्र. भविष्य. ) इ. स. २४९-२५० ( पु. नि. २२० ). इ. स. २११–२२५ ( स्मिथ ).

**पुष्पमित्र**—( शुंग. भविष्य. ) इ. स. पू. १७५–१३९ (पु. नि. २८९). जन्म इ. स. पू. २१३; अश्वमेधारंभ इ. स. पू. १७५ (युगपुराण). इ. स. पू. १८४–१४८ (रॅपसन ).

**पृषदश्व**—इ. स. पू. २१०२ (पु. नि. २७९ ).

**प्रद्योत**—(प्रद्योत. भविष्य.) इ. स. पू. ४७० (पु. नि. १९२ ). इ. स. पू. ९२०–७८२ Sacred Books of the Hindoos, Vol. XVII, Part 1, p. 58 ).

**प्रसेनजित्**—(सू. इ. भविष्य). इ. स. पू. ६०० ( पु. नि. २७९ ). हा बुद्धाच्या वेळीं राज्य करीत होता.

**बलि**—( असुर ) इ. स. पू. १६७८ त इंद्र झाला ( दप्तरी, सहविचार ६. २ ).

**बुद्ध**—इ. स. पू. ७९४–५१० ( पु. नि. २६७ ). इ. स. पू. ४७५ त मृत्यु ( म. उ. ४७ ). मृत्यु इ.स.पू.४८० ( दप्तरी सहविचार, ६. २ ).

**बृहद्रथ**—( सो. मगध. ) इ. स. पू. १४०१ (दप्तरी, सहविचार ७. १ ).

**बृहस्पति स्मृति**—इ.स.२००-४००(ध.शा.२१०). इ. स. सातवें शतक ( S. B. E. Vol. ३३. २७६ ).

**बौधायन सूत्र**—इ. स. पू. ४०० ( S. B. E. Vol. XIV, Intro. p. XV ) श. पू. ४०० ( गी. र. ५६२ ).

**बौधायनधर्मसूत्र**—इ. स. पू. ५००–२०० ( ध. शा. ३० ).

**बौधायनस्मृति**—इ. स. पू. ४०२ ( स्मृति पहा ).

**ब्रह्मपुराण**—इ. स. ५ व्या शतकापवीं.

**ब्रह्मवैवर्तपुराण**—इ. स. पू. ८००-९०० ( ह. प्र. १५९ ).

**ब्रह्मांडपुराण**—इ. स. ५ शतकांहून प्राचीन. इ. स. ४०० पूर्वी ( पु. नि. १४३ ).

**भगदत्त**—याचा वध मार्गशीर्ष वद्य दशमी ( भा. सा.).

**भगवद्गीता**—इ. स. पू. २०० ( विंटरनिझ ). श. पू. ५०० च्या पलीकडे ( गी. र. ५६४ ) दोन हजार ते एक हजार (चिं. वि. वैद्यकृत संस्कृत वा. इ.त इंग्रजी, पा. ४. ४६. ४९ ) इ. स. पू. ११९७ ( ध. र. १६६-१७२ सहविचार ६. ५). मार्गशीर्ष शुद्ध १३ (भारतसावित्री, नीळकंठी टीका, चिं. वि. वैद्य, संस्कृत वा. इ. ), गीतेची तिथि मार्गशीर्ष शुद्ध ११ ( ज. स. करंदीकर ), अमावस्या ( दप्तरी ).

**भर्तृहरि**—सुमारें इ. स. ६१० ( पु. नि. २९१ ).

**भविष्यपुराण**—इ. स. पू. पांचव्या शतकापूर्वी.

**भागवत**—इ. स. ९ वें शतक (दा. ना. आपटे, विविध-ज्ञानविस्तार, १९२३ डिसेंबर).इ. स. ८०० पूर्वी (पु.नि. ९०). इ. स. पू. ३९८ ( ध. र. २१७ ).

**भारतीय युद्ध**—श. पू. ६३०६ ( विसाजीपंत लेले ). श. पू. ५०७८ ( जनार्दन बाळाजी मोडक ). श. पू. ३१८० ( पुराणमताभिमानी लोक व चिं. वि. वैद्य ). श. पू. २५२६ ( वराहमिहिर, राजतरंगिणीकार कल्हण पंडित ). २०१४ ( ज. स. करंदीकर, चित्रमयजगत् ६।११।२३ ). श. पू. १५७८ ( लो. टिळक, दीक्षित भा. ज्यो. १२५. १२७, कांहीं पाश्चात्य ग्रंथकार). श. पू. १४७८ ( रमेशचंद्र, दत्तप्रभृति इतिहासकार ). श. पू. १२७२ ( वळंडी अय्यर). इ. स. पू. १२६३ ( पु. नि. २६३). इ. स. पू. ११५१ ( डॉ. सीतानाथ प्रधान ). इ. स. पू. ११९७ ( दप्तरी भारतीय युद्धकालनिर्णय पा. ४८).

**भास**—(कवि) इ. स. २००–३०० (गी. र. ५५५). श. पू. २००–३०० ( पं. गणपतिशास्त्री .) पण शकानंतर दोनतीनशें वर्षें याचा काल कित्येक मानितात ( गी. र. ५६०–५६१ )

**भीष्म**—मार्गशीर्ष वद्य अष्टमी पतन ( भा. सा. ). पतनापासून ५८ व्या दिवशीं निर्याण. माघ शु. ८ला निर्याण.

**मगधराजे**—इ. स. पू. ११२०–९२० ( Sacred Books of the Hindoos, Vol. XVII, Part 1st, p. 67 ).

**मत्स्यपुराण**—इ. स. पू. २ रे शतकाहून प्राचीन ( ह. प्र. १९१; पु. नि. १५२. )

**मनु**—( स्वायंभुव ) इ. स. पू. २६७० (रा. का. नि. ५५ ).

**मनुस्मृति**—इ. स. पू. १५२ ( स्मृति पहा ).

**मन्द**—असुरदेशचे शूद्र राजे इ. स. पू. ७००–५५० ( पु. नि. २९४ ).

**मन्वंतर**—

१ स्वायंभुव मन्वंतर—इ. स. पू. २६७० पासून.
२ स्वारोचिष ,, } इ स. पू. सुमारें २६६६ पासून.
३ उत्तम ,, } सुमारें २६२२ पावेतों.
४ तामस ,,
५ रैवत ,, इ. स. पू सुमारें २६२२ पासून
६ चाक्षुष ,, इ. स. पू. २४२२ पासून २१५० पर्यंत.
७ वैवस्वत ,, इ. स. पू. २१५० पासून पुढें.
८ सावर्णि इ. स. पू. १६७८
९ शीघ्रपुत्र शांति इ. स. पू. १३३०
१० दिवाकर इ. स. पू. ११९०
११ सुपर्ण इ. स. पू. ९५० (रा. का. नि. ४६-५६).

**मरु**—( सू. इ. ) इ. स. पू १३३० (ध. र. १६५).

**महानंदिन्**—( शिशु. भविष्य. ) इ. स. पू. ३८४ (पु.नि. २७९). अंत इ.स.पू.४१२ (दप्तरी,सहविचार७. १).

**महापद्म**—( नंद. भविष्य. ) राज्याभिषेक काल इ. स. पू. ३९८. शिशुनागाशीं याचा चवदा वर्षें झगडा चालला होता ( दप्तरी ). परीक्षिताच्या जन्मापासून १०५० वर्षांनीं याला राज्याभिषेक आला.

**महाभारत**—चेदि संवत् १९७ म्हणजे शके ३६७च्या गुप्त राजांच्या शिलालेखावरून हा ग्रंथ तत्कालीं एक लक्ष होता. त्यावरून शके ३६७ च्या पूर्वी निदान एकदोन शतकें तसा अस्तित्वांत असला पाहिजे. हा शिलालेख Inscriptionum Indicarum नांवाच्या पुस्तकाच्या तिसऱ्या खंडांत पृ. १३४ वर दिला आहे व त्याचा उल्लेख कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं आपल्या भारतीय ज्योतिःशास्त्र पृ. १०८ वर केलेला आहे. म्हणजे हल्लींच्या महाभारताचा काल शकापूर्वी ५०० वर्षें येतो, असें कै. शं. बा. दीक्षित यांचें ( भा. ज्यो. ८७-९०, १११ व १४७ ) व कै. लो. टिळक यांचें मत आहे ( गी. र. ५५७ ). इ. स. पू. ३९८ ( ध. र. २१७ ).

**महावीर**—जैन इ. स. ५२७ त निर्वाण ( पु. नि. १९२-१९३ ).

**मांधातृ**—इ. स. पू. २१८० त जन्म ( पु. नि. २६७ ). इ. स. पू. १६४२ ( दप्तरी, सहविचार ६.२ ).

**मार्कंडेय पुराण**—याचा शंकराचार्य, बाणभट्ट व मयूरभट्ट यांनीं निर्देश केला आहे.

**मेधातिथि**—( दीर्घतमस् पहा ).

**मैत्र्युपनिषद्**—इ. स. पू. १९०० ( चिं. वि. वैद्यकृत संस्कृत वाङ्मयाचा इतिहास, इंग्रजी ).

**मौर्यराजे**—इ. स. पू. ३१२- १७५ (पु. नि. २१५). इ. स. पू. ३२२ ते १८५ ( स्मिथ ).

**यमस्मृति**—( स्मृति पहा ).

**ययाति**—इ. स. पू. २१०२ ( पु. नि. २७९ ). इ. स. पू. २०४२ ( ध. र. २०९ ).

**याज्ञवल्क्यस्मृति**—इ. स. पू. ३००–इ. स. १०० ( ध. शा. १८४ ). इ. स. पू. १०२ ( ध. र. २२७ ).

**यास्क**—इ. स. पू. १००० (पु. नि. २९१). इ. स. पू. ८०० ( डॉ. बेलवलकर ).

**युधिष्ठिर**—इ. स. पू. १२६३ ( पु. नि. २६३ ).

**युधिष्ठिरशक**—इ. स. पू. ३१०२ ( परंपरा ). इ. स. पू. २२०० ( ज. स. करंदीकर, चित्रमयजगत् ६।११।२४ ). श. पू. २५२६ ( राजतरंगिणी ). इ. स. पू. १९२० आर्यभट व वि. का. राजवाडे यांनीं परंपरेला पुष्टि दिली आहे. वृद्ध गर्गाचें वचनहि लावून दाखविलें आहे.

**यौवनाश्व**—इ. स. पू. २१७० ( पु. नि. २७९ ).

**रजि**—( सो. पुरूरवस्. ) इ. स. पू. १६५० यानें प्रल्हादापासून इंद्रपद घेतलें ( दप्तरी, सहविचार ६. २ ).

**राम**—जन्मकाल श. पू. २४८० ( रामायणसमालोचना, पृ. २४१ ).

सर वुइल्यम जोन्स यानें इ. स. पू. २०२९ वे वर्षी राम होता असें ठरविलें आहे. इ. स. पू. ९५० हा रामाचा काल हॅमिल्टन यानें ठरविला आहे. रामाचें जन्मपत्रिकेवरून रामजन्म इ. स. पू. ९४० वे वर्षी झाला असें वेंटले या ज्योतिषाचें मत आहे. यानेंच दुसऱ्या ठिकाणीं रामाचा काल इ. स. पू. १२४९ असावा असें मत दिलें आहे. वुइल्फोर्ड याला राम इ. स. पू. १६०० ते १७०० च्या मधील कालांत झाला असें वाटतें. गॉरशिओ यानें आपल्या रामायणावरील निबंधांत रामाचा काल इ. स. पू. १४ वें शतकाचा प्रारंभ इतका ठरविला आहे ( श्रीरामायणसमालोचना ५७ ).

रामजन्म इ. स. पू. १६०९ व अखेर १५३० मध्यें झाली. एकोणिसावे वर्षी विवाह, २५ व्या वर्षी वनवास, ४० वर्षें राज्य केलें ( रा. का. नि. ).

याचा काल इ. स. पू. १५६८ होय ( पु. नि. २६७; २७९ ).

**रामायण**—रामायणाचे कालनिर्णयाचे बाबतींत मतभेद फार झाले आहेत. म्हणजे श. पू. ८॥ लक्ष वर्षांपासून इ. स. २९५ पर्यंत निरनिराळे काल, निरनिराळ्या विद्वानांनीं रामायणाचे ठरविले आहेत. वेंटले या ज्योतिषानें रामायण रचनेचा काल इ. स. २९५ ठरविला आहे. प्रो. याकोबीचे मतें रामायणकाल इ. स. पू. ६०० वर्षें आहे. मॉनियर वुइल्यम्सचे मतें तो इ. स. पू. ५०० आहे. टॉडचे मतें इ. स. पू. १०० हाच रामायणकाल आहे. गेऱ्याम् नांवाच्या ज्योतिषाच्या मतें इ. स. पू. १०५ मध्यें रामायण झालें असें आहे. कै. न्या. तेलंग यांचें मत इ. स. पूर्वी कांहीं शतकें रामायणाची रचना झाली असावी असें आहे. रा. ब. वैद्य यांनीं रामायणाची पुनर्रचना होऊन बनलेली आवृत्ति इ. स. पू. १०० च्या सुमारास झाली, असें ठरविलें आहे.

कै. दीक्षित यांनीं रामायणाचा कांहीं भाग श. पू. १५००, नंतरचा व कांहीं भाग त्यापूर्वीचा असावा असें सांगितलें आहे. रा. रा. म. गों. अभ्यंकर यांनीं रामायणकाल इ. स. पू. २५०० पासून इ. स. पू. ४००० पर्यंत केव्हां तरी असावा असा तर्क केला आहे. ज्ञानकोशकारांनीं इ. स. पू. २३५० वर्षें हा रामायणकाल ठरविला आहे. कीथ यानें याचा काल इ. स. पू. ४०० ठरविला आहे. प्रो. वेबर यानें तो इ. स. पू. २०० ठरविला आहे ( श्रीरामायण-समालोचना, २. ५७; १०७ ).

**रावण**-राज्यकाल इ. स. पू. १६२३-१५७१ (रा. का. नि.).

**रैवत**—(मनु) इ. स. पू. २६२२ ( रा. का. नि. ५५).

**लगध**—याचा काल इ. स. पू. १४०० किंवा १२०० (म. उ. ५७). इ. स. पू. ११८१ ( पु. नि. २५० ). इ. स. पू. १४०० ( भा. ज्यो. ८८ ). याच्या वेदांग ज्योतिषाचा काल लो. टिळकांच्यामतें इ. स. पू. १२६९-११८१ ( ओरायन ३७-३८ टीप इंग्रजी ).

**लिखितस्मृति**—इ. स. पू. ( ४०२-२०२ ( ध. र. २३७ ).

**वराहपुराण**—इ. स. पू. ११०० (पु. नि. १२८ ).

**वराहमिहिर**—इ. स. ६०० ( ध. शा. ६९ ). जन्म इ. स. ५१८ ( दसरी, सहविचार ७.५ ).

**वसिष्ठ-स्मृति**—इ. स. पू. ६०० ( ध. र. २३७ ).

**वामनपुराण**—इ. स. २ रें शतक ( ह. प्र. १८३ ).

**वायुपुराण**—इ. स. पू. २०३८ ( ध. र. १६४ ). सध्याचें इ. स. ६२० पूर्वी ( पार्गि. ५० ). इ. स. ४०० पूर्वी ( पु. नि. ७० ).

**विक्रमादित्य**—१ ( विळव पहा ), २ (स्वातिकर्ण पहा).

**विलव**—( आंध्र. भविष्य.) पहिला विक्रमादित्य. याच्या मगधविजयाचा काल श. पू. १३३ (दसरी, सहविचार, ७.५ ).

**विष्णुपुराण**—इ. स. ३ रें शतक ( ह. प्र. ). इ. स. ५ व्या शतकाच्या सुमारास ( पार्गि. ८० ).

**विष्णुस्मृति**—( स्मृति पहा ).

**वृषसेन**—मार्गशीर्ष वद्य द्वादशीला सकाळीं वध (भा. सा. ).

**वेदांतसूत्रें**—इ. स. पू. १५०-१०० ( म. उ. ५१ ). सध्याची सूत्रें बौद्ध, जैन व पांचरात्र यांच्या खंडणामुळें तदुत्तरकालीन आहेत.

**वैवस्वतमनु**—इ. स. पू २५५० ( पु. नि. २७९ ). इ. स. पू. २१५० आरंभकाल ( रा. का. नि. ४७ ).

**व्यास**—पांडवपितामह. जन्म १२९३-१२८९ ( दसरी, सहविचार ६. ३; ध. र. २१८ ). दुसरा व्यास भागवतकार, बुद्धानंतर इ. स. पू. ४०० च्या पूर्वी ( ध. र. २१८ ). यानेंच महाभारतातील शांतिपर्व व अनुशासनपर्व रचिलें.

**व्यासस्मृति**—इ. स. २००-५०० (ध. शा. २३८).

**शकुनि**—मार्गशीर्ष वद्य अमावास्येला वध ( भा. सा. ).

**शंकराचार्य**—इ. स. ७८८-८२० ( ध. शा. २६१ ). जन्मशक ६१० ( गी. र. ५५९ ).

**शंखस्मृति**—इ. स. पू. ४०२-२०२ ( ध. र. २ ३७ ).

**शतपथब्राह्मण**—श. पू. ३१०० (भा. ज्यो. १२८). इ. स. पू. २५०० ( रामायण-समालोचना ८, ४१). इ. स. पू. १४२२, उत्तरार्ध ११२२ ( विविधज्ञानवि. १९२८ पा. २७-२८ ).

**शतानीक**—( सो. कुरु. भविष्य ) इ. स. पू. ६०० ( पु. नि. ३२६ ).

**शल्य**—मार्गशीर्षवद्य अमावास्येला वध ( भा. सा. ).

**शाकटायन**—व्याकरणकार, इ. स. पू. १००० ( डॉ. बेलवलकर ).

**शातातप**—( स्मृति पहा ).

**शालिवाहन**—( स्वातिकर्ण पहा ).

**शालिशूक**—( मौर्य. भविष्य. ) सुमारें इ. स. पू. २१९ नंतर कांहीं वर्षें ( पु. नि. ३१७ ).

**शिखंडिन्**—मार्गशीर्ष वद्य अमावास्येला वध (भा. सा.).

**शिवपुराण**—सुमारें ३ऱ्या शतकांपूर्वी.

**शिशुक**—( आंध्र. भविष्य. ) इ. स. पू. १९१-१६८ ( पु. नि. २१८ ).

**शिशुनाग**—( शिशु. भविष्य.) इ. स. पू. ७८२-४२२ (Sacred Books of the Hindoos, Vol. XVIII, Part I, p. 68 ). इ. स. पू. ६४२-३२० ( स्मिथ ).

**शुक**—दुसऱ्या व्यासाचा पुत्र.

**शुंग**—( शुंग. भविष्य. ) इ. स. पू. १८५-७३ ( स्मिथ ). इ. स. पू. ६३ व्या वर्षी आंध्रांनीं पाडाव केला ( भाऊ दाजी लेखसंग्रह, १२६-१३१ ).

**शुचि**—( सो. मगध. भविष्य. ) इ. स. पू. ९६७-९३८ ( ध. र. १७२ ).

**शौनक**—( सो. क्षत्र. ) इ. स. पू. २०५० ( पु. नि. २८५-२८६ ).

२ इ. स. पू. ११०२-१०९० ( पु. नि. २८६ ). शतानीकपुत्र जनमेजयाचा समकालीन.

**श्रीशातकर्णि**—( आंध्र. भविष्य. ) इ. स. पू. १५०-१४० ( पु. नि. २१८ ).

**श्वेतकेतु**—इ. स. पू. २१०२ ( ध. र. १७९ ).

**संवर्तस्मृति**—( स्मृति पहा ).

**सहस्रार्जुन**—( सो. सह.) इ. स. पू. १५८७-१५६७ ( पु. नि. २८४ ).

**सावर्णि मनु**—इ. स. पू. १६७८-१६७४ ( ध. र. २०६ ).

**सुपर्ण**—(सू. इ. भविष्य.) इ. स. पू. ९५० ( ध. र. १७१ ).

**सुमित्र**—( सू. इ. भविष्य. ) इ. स. पू. ३८४ मृत्यु ( पु. नि. २१४; २७९ ). इ. स. पू. ६०१ ( दसरी. सहविचार ६. २ ).

**सृष्टयुत्पत्तिशक**—पौराणिक कालगणनेप्रमाणें गतकाल एक अब्ज, श्याहाण्णव कोटि, आठ लक्ष, त्रेपन्न हजार, चौतीस ( १९६०८५३०३४ ). भूगर्भशास्त्रवेत्त्यांच्या मतानें दीड अब्ज ते तीन अब्ज वर्षे. बायबलमधील अशरच्या मतें इ. स. पू. ४००४; सध्यांच्या मताप्रमाणें इ. स. पू. ४७१४.

**स्मृति**—

याज्ञवल्क्यस्मृति--सुमारें इ. स. पू. १०२.

भृगुप्रोक्त मनुस्मृति-- ,, ,, १५२.

बृहस्पतिस्मृति-- ,, ,, १२७.

विष्णुस्मृति-- ,, ,, १७५ मध्यें किंवा त्यानंतर लवकरच भृगुप्रोक्त मनुस्मृतीच्या पूर्वी.

गौतमस्मृति—सुमारें इ. स. पू. ६०२.

व्यासस्मृति—महाभारताचा काल.

बौधायनस्मृति—सुमारें इ. स. पू. ४०२.

वसिष्ठस्मृति—गौतमस्मृतीनंतर इ. स. पू. ६०२ च्या सुमारास.

शंख व लिखित यांच्या स्मृति—इ. स. पू. ४०२–२०२.

अत्रिस्मृति, हरित ,, उशना ,, अंगिरा ,, यम ,, आपस्तंब ,, संवर्त ,, कात्यायन ,, पराशर ,, दक्ष ,, शातातप ,, } इ. स. पू. १०२ च्या पूर्वी (ध. र. २२७–२३७).

**स्वातिकर्ण**—( आंध्र. भविष्य ) हा दुसऱ्या विक्रमादित्याचा बाप होय. दुसऱ्या विक्रमास पुराणांत अरिष्टकर्मा, शिलालेखांत गौतमीपुत्र आणि विलयवकुरा म्हटलें आहे, व हालानें गाथासप्तशतींत शालिवाहन म्हटलें आहे. दुसऱ्या विक्रमानेंच शके ० च्या सुमारास "नहपानादि" शकांचा फडशा उडविला व आंध्रांचें साम्राज्य पुनः मजबूत केलें. त्यानें २४ वर्षे राज्य केलें.

**स्वायंभुव**--इ. स पू. ३१०२ ( पु. नि. ३१५ ). इ. स. पू. २६७० ( रा. का. नि. ५५ ). इ. स. पू. २६७०-२१५० पर्यंत याच्या वंशजांचें राज्य(दप्तरी सहविचार ६. २).

**हाल**--इ. स. ९९-१०२ ( पु. नि. २१९ ).

**हिरण्यकशिपु**--इ. स. पू. १६९०-१६७८ ( दप्तरी, सहविचार ६. २ ). हा इंद्र होता.

## परिशिष्ट दुसरें

# पौराणिक भूगोल व त्याची सध्यांच्या जगाशीं तुलना

पुराणांत भूवर्णाचे बरेच अध्याय असतात ( वायु. १. ३४-५०; ब्रह्मांड. २.१५; मत्स्य. १२१; भा. ५. १६-२०, विष्णु. २. २-७; मार्क. ५१-५७; नारद. ३; पद्म. स. ३-९; कूर्म. १. ४४-४९; वराह. ७४-८९; ब्रह्म. १८-२७; दे. भा. ८. ४-१३; लिंग. १. ४६; गरुड.१.५४-५७; शिव. उ. १७-१८ ). त्यांत जरी पुष्कळच विस्तृत वर्णन असलें तरी त्याची सध्यांच्या भूगोलाशीं संगति दाखविणें कठीण पडतें. तथापि बारकाईनें समालोचन केल्यास सध्यांच्या भूगोलाशीं त्या वर्णनाचा कांहींसा मेळ घालतां येतो. तो आम्हीं पुढें दाखविला आहे.

पर्वत, नद्या व समुद्र हीं स्थिर साधनें या कामीं चांगलींच उपयोगीं पडतात. समुद्रामुळें सृष्टींत उलथापालथ होते. भूगर्भशास्त्रवेत्त्यांनीं यावरून कांहीं कयास बांधले आहेत. त्यांचा आम्हीं बराच उपयोग केला आहे. हें शाकद्वीपाच्या माहितीवरून लक्षांत येईल. गोबी,कलहारी वगैरे वाळवंटें व सरोवरांचीं रांग असलेला प्रदेश पूर्वीचे समुद्राचे तळ होत. या सर्वमान्य सिद्धान्ताचाहि परिपोष पौराणिक माहितीनें बरोबर होतो.

प्लक्षद्वीपापेक्षां क्रमानें पुढील द्वीपें एकापेक्षां एक मोठीं हें पौराणिक भूगोलांतील वर्णन आम्हांलाहि बरोबर दाखवितां आलें आहे.

भाषाशास्त्राच्या दृष्टीनें विचार करून काढलेले सिद्धान्तहि आम्ही दिलेल्या नकाशाला पोषक असेच आहेत. पण कांहीं बाबतींत मतभेद कायम राहतातच. याचें कारण पुराणांतील भूगोलवर्णन फारच प्राचीन आहे हें होय.

सध्यांचीं नांवें व प्राचीन नांवें यांचा कारणांसह मेळ पुढील कोष्टकांत दिला आहे.

हा नकाशा व माहितीकरितां श्री. एम्. एम्. याज्ञिक, प्रिन्सिपॉल, संस्कृतमहाविद्यालय, बडोदा ( नकाशा व इंग्रजी टीपा ), श्री. के. ल. दप्तरी, बी. ए., एलएल. बी., नागपूर (सहविचार२.१लेख),कै. वि. का. राजवाडे, कै. त्र्यं. गु. काळे ( पुराणनिरीक्षण ), श्री. नंदलाल दे ( Rasatala or the Under-world ), विल्फर्ड ( एशियाटिक रिसर्चेस, खंड. ११) व श्री. वडेर, एम्. ए., एलएल. बी. (चित्रमयजगत्, मे १९३१ ) यांच्या लेखांचा व इतर निर्देश केलेल्या आधारभूत ग्रंथांचा उपयोग केला आहे. व त्यांच्या मतांचें व आमच्या मतांचें ऐक्य व फरक दर्शविणारा तक्ताहि सोबत जोडला आहे.

| समुद्रांचें पूर्वीचें नांव | आजची स्थिति | कारण व मतांतर | वेष्टिलेलें द्वीप | द्वीपाची आजची स्थिति | कारण व मतांतर | लोक | वृक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ लवण | अरबी समुद्र, हिंदी महासागर, कास्पियन समुद्र. सॉल्ट डेझर्ट (पूर्वी समुद्र), कास्पियन समुद्र व आर्क्टिक समुद्र, यांना जोडणारी उरल पर्वताच्या पूर्वेकडील जमिनीची पट्टी. | हा भाग सखल आहे. राजवाडेमताचा क्षारोद भूमध्य समुद्र होय. वडेरमतें हिंदी महासागर व अरबी समुद्र. | जम्बु द्वीप | हिंदुस्थान, अफगाणिस्तान, पूर्व इराण, आशियांतील रशिया, चीन (मंगोलियांतील वाळवंटाखेरीज). | राजवाडे यास जम्मु म्हणतात. वडेरमतें हें सप्तसिंधु व हिंदुस्थान होय. | सिद्ध, पितर, दैत्य, दानव, नाग, गंधर्व, यक्ष, राक्षस, पिशाच, देव. | जंबु (जांभूळ) |
| २ इक्षुरसोद | एडनचें आखात, तांबडा समुद्र, भूमध्य समुद्राचा पूर्वेकडील भाग, मार्मोराचा समुद्र, काळा समुद्र, पश्चिम रशिया (पूर्वी समुद्र), अझोव्ह, बाल्टिक व श्वेत समुद्र. | राजवाडे व विल्फर्ड यांच्या मतें फक्त काळा समुद्र | प्लक्ष द्वीप | आशिया मायनर, अरबस्तान, पूर्व रशिया, नोव्हाया झेम्लिया बेट. | राजवाडे व वडेर यांच्या मतें ग्रीक द्वीपकल्प व आसपासचा प्रदेश. | आर्यक, कुरव, विविंश व भावी. | प्लक्ष (पायरी किंवा पिंपरी) |
| ३ सुरोद | ट्रिपोली, पश्चिम ईजिप्त, व्हिक्टोरिया-नियांझा, टांगानिका, अल्बर्ट नियांझा, यांना जोडून कलहारी वाळवंट व ऑरेंजचें खोरें हीं सर्व मिळून होणारी पट्टी. | राजवाडेमतें कास्पियन व वडेरमतें काळा समुद्र. | शाल्मल द्वीप | इजिप्त, अबिसीनिया, ब्रि० इस्ट आफ्रिका, सोमाली लँड्स्, ऑरेंज नदीच्या दक्षिणेकडील भाग. | राजवाडेमतें काळा व कास्पियन समुद्रांमधील प्रदेश. हाच वडेरांच्या मताचा बाबिलोनिया. | काळे, तांबडे, पिंगट व पिवळे आहेत. मनुष्य व किन्नरहि वास करितात. | शाल्मलि (सावरीचें झाड) |

| समुद्राचे पूर्वीचें नांव | आजची स्थिति | कारण व मतांतर | वेष्टिलेलें द्वीप | द्वीपाची आजची स्थिति | कारण व मतांतर | लोक | वृक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ घृतोद | दक्षिण अटलांटिक व ट्रिपोलीपासून कपव्हर्ड-पर्यंतचा पट्टा. | हे भाग सखल आहेत. राजवाडेमतें अरल समुद्र. वडेरमतें इराणचें आखात किंवा तांबडा समुद्र. विल्फर्ड-मतें क्रीटबेटासभोंवारचा समुद्र. | कुश द्वीप | सहारा, सुदान, गिनी, कामेरून, कांगो स्टेट्स् व पश्चिम व दक्षिण आफ्रिका. | राजवाडेमतें हिंदु-कुशाच्या उत्तरेकडील कास्पियन व अरल यांमधील प्रदेश. वडेरमतें कॉकेशस् पर्वतासभोंवारचा प्रदेश. | गोरे | दर्भ किंवा लव्हाळे |
| ५ दधिमण्डोदक | आर्क्टिक व उत्तर अटलांटिकचा पूर्वभाग. | दधि समुद्र म्हणजे अरल असें वडेर म्हणतात. | क्रौंच द्वीप | अल्जीरिया, मोरोक्को, बार्बरी संस्थानें, पूर्वेकडील भूमध्यसमुद्र ( पूर्वी जमीन असावी), उत्तर समुद्र व आयरिश समुद्र ( पूर्वी जमीन असावी ) व रशियाखेरीज सब यूरोप. | या भागांत बगळे फार आहेत. राजवाडेमतें समरकंद व बुखारा या सभोंवारचा प्रदेश. वडेरमतें पूर्व तुर्कस्तान व चीनचा कांहीं भाग. विल्फर्डमतें स्कॅंडिनेव्हिया. | देव व किन्नर | |
| ६ क्षीरोद | उत्तर अटलांटिकचा पश्चिम भाग व आर्क्टिक समुद्र | वडेरमतें कास्पियन समुद्र विल्फर्डमतें जर्मन समुद्र | शाक द्वीप | बुडालेलें अटलांटिस्ट खंड व आसपासच्या उथळ समुद्राचा प्रदेश. | त्या भागांतील समुद्र उथळ आहे. राजवाडे व वडेर यांच्या मतें सिथिया प्रांत. | | शाकवृक्ष म्हणजे साग' असावेत. सागाच्या पानाची एक बाजू खरखरीत असते. |
| ७ स्वादूदक | पासिफिक महासागर | | पुष्कर द्वीप | दक्षिण व उत्तर अमेरिका. | शेवटच्या सहा द्वीपांत हें सर्वांत मोठें आहे. राजवाडेमतें कुएनलूननें दुभागला जाणारा चीनच्या उत्तरेकडील प्रदेश, विल्फर्डमतें ऐसलंड बेट व वडेरमतें बुखारा व ट्रान्स ऑक्सिआना प्रदेश. | | वटवृक्ष |

| पूर्वीचें नांव | हल्लींची स्थिति | कारण व मतान्तर |
|---|---|---|
| | **१ जंबुद्वीप-वनें** | |
| चैत्ररथ | पामीरच्या पूर्वेस लगतचा प्रदेश. | पुराणांतील वर्णन |
| गंधमादन | पामीरच्या दक्षिणेस लगतचा प्रदेश | ,, |
| वैभ्राज | पामीरच्या पश्चिमेस लगतचा प्रदेश. | ,, |
| नन्दन | पामीरच्या उत्तरेस लगतचा प्रदेश. | ,, |
| | **सरोवरें** | |
| अरुणोद | गोबीच्या वाळवंटावरील प्रदेश | पूर्वेस |
| महाभद्र | बाल्खष | उत्तरेस |
| असितोद | अरल समुद्र | पश्चिमेस |
| मानस | मानस | दक्षिणेस |
| | **वर्षे** | |
| १ इलावृत्त | पामीरच्या सभोंवारचा प्रदेश | राजवाडेमतें इलिप्रीप्रांत |
| २ केतुमाल | इराणचा उत्तरेकडील भाग, तुर्कस्थान, अफगाणिस्थान व बलुचिस्थान. | विल्फर्डमतें यूरोप, आशियामायनर व आफ्रिकेचा उत्तर किनारा. |
| ३ भद्राश्व | मंगोलिया, मांचुरिया, झुंगेरु. | राजवाडेमतें मानससरोवराचा प्रांत. |
| ४ भारत | हिंदुस्थान. | |
| ५ किंपुरुष | तिबेट. | कुत्सित माणसें. |
| ६ हरिवर्ष | ब्रह्मदेश, सयाम, चीन. | लोकांचा वर्ण पिवळा आहे |
| ७ कुरु | सैबेरिया ( उत्तर रशिया ) | दप्तरीमतें मध्य आशियांतील तुर्कस्तान. |
| ८ हिरण्मय | आशियांतील रशियाचा दक्षिणभाग. | सोनें सापडतें. |
| ९ रम्यक | रशियन सेंट्रल एशिया | विल्फर्डमतें इटली. |
| | **पर्वत** | |
| १ मेरु | पामीर | पर्वतांमध्यें कर्णिकेप्रमाणें आहे. |
| २ गंधमादन | एल्बूर्झ | वेडर व विल्फर्ड खेरीज इतरमतें हि ह्याच्या आसपासच आहेत. |
| ३ श्वेत | थिएनशान | |
| ४ हिमालय | हिमालय | |
| ५ हेमकूट | क्वेनल्न | राजवाडेमतें हिंदुकुश, दप्तरीमतें सुलैमान. |
| ६ निषध | आराकान, पतकाई, लुशाई, नानलिंग. | दप्तरीमतें हिंदुकुश, राजवाडेमतें सुलैमान, |
| ७ शृंगवत | स्टानोव्हाय. | राजवाड्यांचा श्रृंगी हाच असून त्यांच्या मतें हा थिएनशान होय. |
| ८ हिरण्यक | याब्लोनाय | |
| ९ रमणक | अलताई | |
| | **२ प्लक्ष द्वीप-वर्षे** | |
| १ शांतनव | दक्षिण अरबस्तान | |
| २ शिशिर | सिरिया | नामसादृश्य |
| ३ सुखद | कुर्दिस्थान, अर्मेनिया | |
| ४ आनंद | आशिया मायनर | |
| ५ शिव | यूरोपांतील दक्षिण रशिया. | |
| ६ क्षेमक | मध्य रशिया | |
| ७ ध्रुव | रशियाचा उत्तर किनारा नोव्हाया झेम्लियाबेट धरून | उ. ध्रुवाकडील प्रांत. |
| | **पर्वत** | |
| १ गोमेद | जेबेल अखडर | हिरवा पर्वत |
| २ चंद्र | लिबॅनॉन | पांढरा पर्वत |
| ३ नारद | आराराट | अतिशय उंच शिखर |
| ४ दुंदुभि | तौरस | |
| ५ सोमक | कॉकेशस् | |
| ६ सुमनस् | उरल | |
| ७ वैभ्राज | उरलचा उत्तर भाग | |
| | **नद्या** | |
| १ अनुतप्ता | | |
| २ शिखी | असुदारिया | प्रांत क्रमानें |
| ३ विपापा | सरदारिया | ,, |
| ४ त्रिदिवा | किझिल इर्माक | ,, |
| ५ क्रतु | व्होल्गा | ,, |
| ६ अमृता | डीना व | ,, |
| ७ सुकृता | पेचोरा | ,, |

## ३ शाल्मली द्वीप-वर्षे

( यांतील बराचसा भाग बुडालेला आहे असें दिसतें ).

| | | |
|---|---|---|
| १ श्वेत | मादागास्कर | जंबुद्वीपाप्रमाणें दक्षिणेकडून उत्तरेकडे. |
| २ हरित | मादागास्कर जवळील बुडालेली जमीन. | |

| पूर्वीचें नांव | हल्लींची स्थिति | कारण व मतान्तर |
|---|---|---|
| ३ जीमूत | न्यासालँड व कांहीं बुडालेली जमीन, | जंबुद्वीपांतील वर्षाप्रमाणें दक्षिणेकडून उत्तरेस |
| ४ रोहित | पूर्व आफ्रिकेचा उत्तर भाग. | ,, |
| ५ वैद्युत् | सोमालीलँडस नाईलच्या द. खोऱ्यांतील कांहीं भाग. | ,, |
| ६ मानस | अबिसीनिया व नाईलचें मध्य खोरें. | ,, |
| ७ सुप्रभ | ईजिप्त | ,, |
| | **पर्वत** | |
| १ कुमुद | मादागास्करमधील पर्वत. | प्रांतक्रमानें |
| २ उन्नत | | |
| ३ सुबलाहक | | |
| ४ द्रोण | लिव्हिंग्स्टन पर्वत. | ,, |
| ५ कंक | किलिमांजारो व केनिया. | ,, |
| ६ महिष | अबिसीनियन पर्वत | ,, |
| ७ ककुद्मत् | मारा पर्वत | आकार बैलाच्या वशिंडाप्रमाणें आहे. |
| | **नद्या** | |
| १ योनि | | |
| २ तोया | | |
| ३ वितृष्णा | | |
| ४ चंद्रा | | |
| ५ शुक्रा | नाईलचा दक्षिणेकडील भाग म्हणजे श्वेत नाईल. | प्रांतक्रमानें |
| ६ विमोचनी | नाईलचा मधला भाग म्हणजे नील नाईल. | ,, |
| ७ निवृत्ति | नाईलच्या उत्तरेकडील भाग म्हणजे मुख्य नाईल. | ,, |
| | **४ कुशद्वीप-वर्षे** | |
| १ उद्भिद | केप कॉलनी, बेचुआनालँड कॉलनी | दक्षिणेकडून उत्तरेकडे क्रमानें |
| २ वेणुमत् | नाताळ, ऑरेंज- | ,, |

| पूर्वीचें नांव | हल्लींची स्थिति | कारण व मतान्तर |
|---|---|---|
| | फ्रीस्टेट, माताबिलीलँड, ट्रान्सवाल व मध्य आफ्रिकेचा कांहीं भाग. | |
| ३ वरथ | अंगोला, मध्य आफ्रिका, कांगो-स्टेटचा पूर्व भाग. दक्षिण व पश्चिम आफ्रिकेचा १६° ते २५° मधला भाग. | दक्षिणेकडून उत्तरेकडे क्रमानें |
| ४ लंबन | कांगो, अंगोला. | ,, |
| ५ धृति | पूर्वगिनी, व सुदान चाड सरोवरापासून नायजर नदीपर्यंतचा प्रदेश. | ,, |
| ६ प्रभाकर | पश्चिमगिनी व पश्चिमसुदान. | ,, |
| ७ कपिल | सहारा वाळवंट | ,, |
| | **पर्वत** | |
| १ विद्रुम | न्यू व्हेल्ड | दक्षिणेकडून उत्तरेकडे क्रमानें |
| २ हेमशैल | ड्रेकनबर्ग | ,, |
| ३ द्युतिमत् | जेंकर आफ्रिकांडर | ,, |
| ४ पुष्पवत् | लोव्हिली | ,, |
| ५ कुशेशय | कॅमेरून पर्वत | ,, |
| ६ हरि | गिनीमधील द. किनाऱ्याशीं समांतर असलेले पर्वत | ,, |
| ७ मन्दराचल | टथूमो पर्वत | ,, |
| | **नद्या** | |
| १ धूतपापा | ऑरेंज | दक्षिणेकडून उत्तरेकडे क्रमानें |
| २ शिवा | लिंपोपो | ,, |
| ३ पवित्रा | क्वूनेन | ,, |
| ४ सन्नति | कांगो | ,, |
| ५ विद्युत् | नायजर | ,, |
| ६ अम्भा | सेनिगॉल | ,, |
| ७ मही | | |
| | **५ क्रौंचद्वीप-वर्षे** | |
| १ कुशल | मोरोक्को, अल्जीरिया. | दक्षिणेकडून उत्तरेकडे क्रमानें घेतले आहेत. नांवाप्रमाणें नद्या व |

| पूर्वीचें नांव | हल्लीचें नांव | कारण व मतान्तर |
|---|---|---|
| | | पर्वत खालवर घेतले आहेत. |
| २ सनुग | स्पेनपोर्तुगालपासून कार्सिकापर्यंत पाण्यांत बुडालेली जमीन. | |
| ३ उष्ण | कार्सिका, सार्डिनिया इटली, बेल्जम, हालंड व फ्रान्स. | |
| ४ पीवर | स्वित्झर्लंड, आस्ट्रिया जर्मनी, जटलंड. | |
| ५ अन्धकारक | हंगेरी, पोलंड, तुर्कस्थान. | |
| ६ मुनि | स्कँडिनेव्हियन द्वीपकल्प. | |
| ७ दुन्दुभि | ग्रेटब्रिटन व उत्तर समुद्रांत बुडालेली जमीन. | |

### पर्वत

| | | |
|---|---|---|
| १ क्रौंच | ॲटलास | |
| २ वामन | पिरीनीज | |
| ३ पुण्डरीक | ॲपेनाइन | |
| ४ देवावृत्त | आल्प्स् | |
| ५ अन्धकारक | कार्पेथियन | |
| ६ महाक्रौंच | स्कँडिनव्हियन पर्वत | |
| ७ दुंदुभि | | |

### नद्या

| | | |
|---|---|---|
| १ गौरी | ग्वाडालक्विव्हर | |
| २ कुमुद्वती | डयूरो | |
| ३ पुण्डरीका | पो | |
| ४ रात्रि | ओडर | |
| ५ मनोजवा | डॅन्यूब | |
| ६ ख्याति | | |
| ७ सन्ध्या | | |

### ६ शाकद्वीप

पाण्यांत बुडालेलें ॲटलांटिस्ट खंड व अमेरिकेच्या ईशान्येकडील बेटें मिळून होणारा एक प्रदेश.

### ७ पुष्करद्वीप-वर्षें

| | | |
|---|---|---|
| महावीर | उत्तर अमेरिका | |
| धातकीष | दक्षिण अमेरिका | |

### पर्वत

| पूर्वीचें नांव | हल्लीचें नांव | कारण व मतान्तर |
|---|---|---|
| मानसोत्तर | रॉकी व ॲंडी मिळून होणारा एक पर्वत | मध्य अमेरिकेंतील यांच्या आडव्या भागानें दोन वर्षें पडतात. |

### सप्तपाताल

| पूर्वीचें नांव | हल्लीचें नांव | कारण व मतान्तर |
|---|---|---|
| अतल | सुमात्रा | |
| वितल | बोर्निओ | वडेरमतें असुदारिया कांठचा प्रदेश. |
| नितल ( सुतल ) | जावा | वडेरमतें जुना सार्डियाना प्रांत. |
| गभस्तिमत् ( रसातल ) | सेलिबिस् | वडेरमतें मार्गिआना प्रदेश. |
| महातल | आस्ट्रेलिया | सर्वांत मोठें आहे. वडेरमतें जक्झार्टिस् व चू या नद्यांमधील प्रदेश. |
| सुतल ( तलातल ) | न्यू गिनी | येथें सोन्याच्या खाणी आहेत. |
| पाताल | न्यू झीलंड | वडेरमतें ऑक्सस् नदीकांठचा प्रदेश. |

### नरक लोकः—

| | | |
|---|---|---|
| १ तामिस्र २ अंधतामिस्र, ३ रौरव, ४महारौरव, ५ कुंभीपाक, ६ कालसूत्र, ७आसिपत्रवन ८ सूकरमुख, ९ अंधकूप, १० कृमिभोजन, ११ संदंश, १२ तप्तभूमि, १३ वज्रकंटक, १४ शाल्मलि, १५ वैतरणी, १६ पूयोद, १७ प्राणरोध, १८ विशसन, १९लालाभक्ष, २० सारमेयादन, २१ अवीचिरय:पान, २२ क्षारकर्दम, २३ रक्षोगणभोजन, २४ शूलप्रोत २५ दंदशूक, २६ अवट निरोधन, २७ पर्यावर्तन, २८ सूचिमुख (भागवत५.२६.६) | ( १ ) पासिफिक समुद्रांतील बेटें. ( २ ) उत्तर अमेरिकेंतील बराचसा भाग नरक लोक असण्याचा संभव दिसतो. कारण त्या भागांत सूचिपत्र वनस्पतींचें वन आहे तेंच आसिपत्रवन असण्याचा संभव आहे. | खुलासाः— भागवताखेरीज आणखी इतरत्रहि नरक दिले आहेत. नांवामध्यें व संख्येमध्यें पुष्कळ ठिकाणीं फरक आढळतो. पद्मपुराणांत ( उ. ११४ ) तर ८४ दिले आहेत. ( व्या. सू. ३. १. १५; याज्ञ. स्मृ. ३. २२१ ते २२५; स्कंद. १. २. ३९; ३. १. ३०; विष्णु. २. ६. १-५; म. अनु. २३०; स्वर्ग. २. १६-२५; मार्कं. ११-१२; दे. भा. ८. २१-२३; शिव. उमा. ८-१०; ब्रह्मवै. २. २९-३१; पद्म सृ. ३ ). |

# परिशिष्ट तिसरें

# स्थलसूचि

प्राचीन चरित्रकोशांत आलेल्या स्थलांचा अकारादि क्रमानें या सूचींत संग्रह केला आहे. संग्रह करितांना अरण्य, आश्रम कुंड, कूप, क्षेत्र, खंड, तल, तीर्थ, देवस्थान, देश, द्वार, द्वीप, नगर, नद, नदी, नरक, परलोक, पर्वत. ( कूट, घाट, गुहा, पर्वत-पृष्ठ, शिखर ), प्रदेश, मार्ग, वन, वापी, वर्ष, विवर, संगम, समुद्र, सरोवर व स्थानें (इतर) असें क्रमानें वर्गीकरण केलें आहे. हीं स्थलें भारतवर्षांतीलच नसून सर्व जगांतील आहेत. क्वचित् सध्यांच्या स्थलांशीं असलेला संबंधहि दाखविला आहे. पौराणिक भूगोलवर्णनाला अनुसरून तयार केलेला पृथ्वीचा नकाशा व खुलासा सोबत जोडिला आहे. व अर्वाचीन दृष्टया त्याचा खुलासाहि करून दाखविला आहे. यांशिवाय हिंदुस्थानचा आणखी एक नकाशा सोबत दिला आहे. त्यांत भारतीय युद्धांतील देश, लोक, व स्थलें दाखविलीं आहेत. शिवाय वैदिक व पौराणिक स्थलांचा त्यांत संग्रह केला आहे. खालील सूचींत स्थलांचा आधार कंसांत दिला आहे.

**अरण्य**—तुंगकारण्य ( २ भृगु ). दंडकारण्य ( कबंध; गृत्समद; धर्मभृत्; पृथु; बलराम; मांडकर्णि; शूर्पणखा ), -निर्मिलें ( ६ दंड ),–विंध्य व शैवल किंवा नील यांमध्यें (दंड). धर्मारण्य ( यम; लोलजिह्व; हयग्रीव ). नैमिषारण्य ( ७ दुर्जय; बलराम; बल्वल; ययाति; रोमहर्षण; शिव; शूलिन् ). शतशृंगारण्य ( १८ भीम ). शालग्रामारण्य ( आग्नीध्र ). वन पहा).

**आश्रम**—अगस्त्य ( अगस्त्य; बलराम; सूरि ). अत्रि ( अत्रि; अनसूया ). अश्वत्थामन् ( अश्वत्थामन् ). आपव वासिष्ठ ( कार्तवीर्य ). आर्ष्टिषेण ( आर्ष्टिषेण; लोमश ). उत्तंक (कुवलाश्व; बृहदश्व ). ऋश्यशृंग (ऋश्यशृंग). और्व ( नर्मदा; फल्गुतंत्र; बाहु ). कंङ्क ( हनूमत् ). कण्व ( कण्व ). कपिल अंशुमत् ). कहोड ( कुकर्दम ). कान्यकुब्ज ( परशुराम ). कौण्डिन्य ( ५ कौंडिन्य ). गालव–जयपूरापासून ३ मैलांवर किंवा चित्रकुटावर ( २ गालव ). गौतम ( गौतम; २ बाण ). च्यवन ( च्यवन ). जमदग्नि ( ११ चित्ररथ ). जह्नु ( २ जह्नु ). दत्त ( दत्त आत्रेय ). दधीच ( दधीच ). नरनारायण ( नरनारायण; लोमश ),–हा व विशाला आणि बदरिकाश्रम एकच ( उद्धव ). पांडव ( ३ जयद्रथ ). बदरिक ( उद्धव; चंद्र; जटासुर; नरनारायण; मुर; बलि ). भरद्वाज (४ भरत; ३ भरद्वाज ). भार्गव ( अरजा; गर ). भृगु ( ५ अग्नि ). मतंग ( अयोमुखी; दुंदुभि; २ बलि; मतंग; ३ राम ). मेधस ( नंदी ). रुक्मिणी ( रुक्मिणी ). वसिष्ठ ( हुंड ). वसिष्ठशिला ( वसिष्ठ ). वालखिल्य ( शिव ). वाल्मीकि ( कुशलव; शत्रुघ्न ). विश्वामित्र ( ताटका ). वृषपर्वन् ( लोमश ). व्यास (अर्जुन), शतयूप (युधिष्ठिर ). शरभंग (३ राम). शैखावत्य (अंबा ). सिद्ध ( रोमहर्षण ). सुतीक्ष्ण ( ३ राम; शरभंग ).

**कुंड**—चंद्र ( सोमनाथ ). देव ( विश्वामित्र ). ब्रह्म ( व्यास ). योगिनी ( ४ रैक्व ). राम ( सुतीक्ष्ण ). हनुमत् ( धर्मसख ).

**कूप**—अवियोगद ( २ मार्कंडेय ). त्रित ( बलराम ). (वापी ).

**क्षेत्र**—कालभीति ( कालभीति ). कुरु ( २ कुरु; ८ जनमेजय; तक्षक; रोमहर्षण; वृद्धद्युम्न अभिप्रतारिण; सारस्वत). कोकामुख ( वराह ). क्षुप्त ( बर्बरिक ). गोकर्ण ( अर्जुन; कर्कट, कल्माषपाद; चारुशीर्ष; बलराम; २ रावण; शुष्क ). चिंतामणि (रुक्मांगद). जगन्नाथ ( गाल; २ ब्रह्मन् ). परशुराम ( बलराम ). पिंडारक ( असितकश्यप; कुकर्दम; सांब ). पुरुषोत्तम ( २ इंद्रद्युम्न ). पुष्कर ( अंशपायन; अर्जुन; इंद्र; एनक; प्रावाच्यवन; चार्वाक; धनवर्धन; १४ धर्म; नारद; २ नारायण; २ पुलस्त्य; बृहस्पति; भरद्वाज; मार्कंडेय; लक्ष्मण; ६ लीलावती; वराह; ४ वसिष्ठ; विश्वामित्र; २ शमीक; ७ हंस ). प्रभास ( अर्जुन, ३ इंदुमती; उशनस्; गयासुर, २ नंद; बलराम; २ ब्रह्मन्; लोमश; वसुदेव; विदुर; शिव; सांब ). प्रवाल ( कार्तवीर्य ). मल्की ( परशुराम ). वराह ( वराह ). वामन ( ३ सोमशर्मन् ). शूर्पारक ( बलराम ). स्यमंतक ( असित कश्यप; ). स्यमंतपंचक ( अक्रूर; अंगिरस्; कुंतिभोज; वसुदेव ). सिद्ध. ( लकुलिन्; शिव ).

**खंड**—कर्ण ( कर्ण ). पवमान ( आवमान ). भरत ( ३ भरत ). विदर्भ ( ३ विदर्भ ).

**तल**—अतल–पातालांतील एक दालन ( ८ बल ). पाताल ( जटिन्; धनंजय; २ नंदा; नमुचि; बलि; मिथु; रावण; ८ विद्युन्मालिन्; शत्रुघ्न; शुंभनिशुंभ; २ शेष; ७ हंस), –निवासस्थान (अहिरावण व महिरावण; विप्रचित्ति), –कौरव्यांचें

(अर्जुन). महातल ( ३क्रोधवश). रसातल (शर्यात; सिंधुसेन; ३ सुरभि ). सुतल ( ४ इंद्रसेन; बलि ).

तीर्थ—अग्नि ( दुष्पण्य ). अघादितीर्थ ( ३ वेदशर्मन् ). ४ अमरकेश्वर ( पार्वती ). अपरनंदा ( अर्जुन ). अश्व ( ऋचीक ). आकाशगंगा ( अंजना). आत्म (दत्त आत्रेय). आदित्य ( असित काश्यप ). आद्य ( इंद्र ). आर्या ( बलराम ). इंद्रप्रस्थांतलि सात तीर्थें( ४ वसिष्ठ ). इंद्रागम (इंद्र). उत्कोचक ( धौम्य ). उर्वशी ( उर्वशी ). औशनस ( ४ महाधर ). कण्व ( कण्व ). कंबु ( विश्वामित्र ). कश्यप (कश्यप). केशरंध्र ( कश्यप ). कोटि ( अहल्या; ऐतरेय; नारद ). कौबेर ( कुबेर ). गया ( अर्जुन ). गायत्रीसरस्वती ( २ सावित्री ). गोप्रतार ( भरत; शत्रुघ्न ). चक्र ( अष्टावक्र; बलराम; विवस्वत् ). जयादित्य (२ कमठ; नारद). जाबाल ( दुराचार ). दधीच ( दधीच ). दुर्गा ( बलराम ). धनुष्कोटि ( दुराचार; दुर्विनीति; वेदनाथ ). नंदा ( अर्जुन ). नवदेवी ( नारद ). नाग ( नाग ). नारी ( समीची ). निगमोद्बोधक ( ४ विकट; विष्णुशर्मन्; १० शरभ ). पांडुरार्या ( नकुल ). पापविनाशन ( २१ सुमति ). पिप्पलाद ( १ पिप्पलाद). पुष्करिणी ( अंजना; धर्मगुप्त ). पृथूदक ( ३ देवापि; बलराम ). प्रमाणकोटि ( आर्यक ). प्रयाग ( अग्नि. इंद्र ). प्लक्षावरण ( २ मरुत्त ). बदरपाचन ( अरुंधती; श्रुतावती ). बदरी ( देवदास ). बिंदुतीर्थ ( अर्जुन; बलराम ). भद्रादित्य ( नारद ). भल्ल ( जरस् ). मंकि ( मंकि ). मनु ( बलराम ). मातृ ( दत्त आत्रेय; परशुराम ). मुनिमरण ( रहस्युदेव; मलिम्लुच; ४ वैखानस ). ययाति ( ययाति ). रामनाथ ( ५ शंबर ). वरुण ( स्कंद ). विशाल ( बलराम ). विश्वामित्र ( मांडव्य ). विष्णु ( ८ सुदर्शन ). शंखतीर्थ ( वत्सनाभ ). शंखोद्धार ( चार्वाक ). शशपान ( चंद्र ). शालिग्राम ( मृकंड ). शुक्र ( चाणक्य ). शूलभेद ( ऋष्यशृंग ). सप्ततीर्थ ( ४ वसिष्ठ ). सप्तसागर ( ३ राम; शबरी ). सप्तसारस्वत ( मंकणक ). सहस्रधारा ( लक्ष्मण ). साध्यामृत ( पुरूरवस् ). सुदर्शन ( बलराम ). सुवर्ण ( कृष्ण ). सेतुबंध ( बलराम ). सोम (कौषीतकेय). सौभद्र ( अर्जुन ). स्तंभगर्व ( २ पुलस्त्य ). स्थाणु (विश्वामित्र ). स्वामी पुष्करिणी ( २१ सुमति ). हालास्य (दुर्दम).

देवस्थान—अग्नीश्वर ( अग्नि ). अरुणाचलेश्वर ( इल; कलाधर; वज्रांगद ). अविमुक्तेश्वर ( विश्वेश्वर ). औंढ्या नागनाथ ( नागेश्वर ). कैंदुकेश्वर ( विदल ). कपिलेश्वर ( नंदभद्र; कपिल ). कुक्कुटेश्वर (११ कुक्कुटेश्वर). कुमारीश ( ४ चित्रलेखा ). गौलमेश्वर ( शल्य ). गौलमेश्वरलिंग ( अहल्या ). चंद्रेश्वर ( चंद्र ). जांबवंत ( जांबवत् ). ज्वालेश्वर ( ११ कौशिक ). दुग्धेश्वर ( कोलासुर; पिप्पलाद ). देवीचीं अष्टोत्तरशत स्थानें ( दुर्गा ). द्वादशार्क ( देवमित्र ). घृष्णेश्वर ( गणपति ). पापनाशनलिंग ( कांतिशालिन् ). भीमाशंकर ( भीमशंकर ). भूतेश्वर ( नागेश्वर ). मध्यमेश्वर ( श्रीधर ). महेश्वर ( दत्त आत्रेय ). महोदयालिंग ( ३ जैगिषव्य ). मूर्तिलिंग ( ३ नरक ). रामेश्वर ( अगस्त्य; बिभीषण; रामेश्वर ). रुद्रेश्वर ( शशबिंदु ). वालुकेश्वर ( देवमित्र; परशुराम ). वीरेश्वर वेंकटाचलेश्वर ( तोंडमत; दुराचार ). व्याघ्रेश्वर ( दुंदुभिनिह्राद ). शुक्रेश्वर (उशनस्). सिद्धेश्वर ( ३ जैगीषव्य ). सोमेश्वर ( २ कौषीतकेय ). हाटकेश्वर ( त्रिशंकु; ५ भानुमती ).

देश—अंग ( अर्जुन; कर्ण; काम; दीर्घतमस् औचथ्य; मदिरेक्षणा; वसुहोम; शतुघ्र ). अनूप ( सूप ),–कर्कोटकापासून जिंकला ( कार्तवीर्य ). अभय ( १८ भीम ). अम्बष्ठ ( नकुल ). अवंती ( अनुविंद; कर्ण; चार्वाक; जरासंध; पाणिनि; मित्रविंदा; युधाजित्; राजाधिदेवी; १० सहदेव ); अश्मक ( वेणुदारि ). अहिक्षत्र ( कर्ण ). आग्नेय ( कर्ण ). आनर्त ( अर्जुन; आनर्त; धर्मवर्ण; बलराम ). आनव ( २ बलि; १४ भीम; रुक्मिणी; रेव; सत्राजित् ),–यांत अंग, कलिंग, पुंड्र, वंग व सुह्म यांचा समावेश होतो ( दीर्घतमस् ). आंध्र ( अर्जुन; २ बलि; १० सहदेव ).–शरावतीच्या उत्तरेस ( आपस्तंब ). आर्यदेश भिन्न केला ( ५ मागध ). आवशीर ( कर्ण ). इंद्र ( २ मंदोदरी; २ सुधन्वन् ); –मिथिलेंतलि ( २ कुशध्वज ). उड्र ( १० सहदेव ). उत्कल ( २ नंदिन् ). उदच्–हा प्राच् याच्या उलट अर्थानें देशविभाग असतो ( पाणिनि; ). उदीच्य–देशविभाग प्राच्य याचे उलट अर्थानें ( व्यास ). उलूक ( अर्जुन; बृहंत ).–उत्तर ( अर्जुन ). उशीनर ( पाणिनि; ३ सुयज्ञ ). उष्ट्रकर्णिक ( १० सहदेव ). ऋषिक ( अर्जुन ),–उत्तर ( अर्जुन ). ऐषुकाय ( पाणिनि ). कट ( २ सुनाभ ). करूष ( करूषक; दंतवक्र; द्रुम; पौंड्रक वासुदेव; ३ राम; २ वृद्धशर्मन्; श्रुतदेवा ),–जिंकिला ( उपरिचर वसु ),–निवासस्थान ( ताटका ) कर्कोट ( कर्कोटक ). कर्नाटक (अर्हत). कर्पट (नकुल; भीम ). कलिंग. ( अर्जुन; कर्ण; क्षेमशर्मन्; जरासंध; पाणिनि; ५ भानुमत्, रुक्मिणी; शक्रदेव; शतधन्वन्; शत्रुघ्न; सत्य; सत्यदेव; १० सहदेव ). काठेवाड ( सोमनाथ ). कांतारक ( १० सहदेव ). कान्यकुब्ज ( अजामिळ; कुशनाभ; गाधि; नकुल; २ नारद; मूर्तिमत; ३ राम ). कापिश्या–काबूल ( पाणिनि ). कामरूप ( कपिल; सुदक्षिण; स्वरोचि ). कांबोज ( अर्जुन; १ श्रुतकर्मन्; २ सुदक्षिण ). कारस्कर ( कौंकुर; पाणिनि ). कारुपथ ( लक्ष्मण ). कालकूट (अर्जुन; पाणिनि). काशि (अर्जुन;

पांडु; सुवर्णवर्मन् ). काश्मीर ( अर्जुन; जरासंध; धर्म; व्याध; परशुराम; प्रकाम; ३ भद्रसार; मत्स्य; मदनावती २७ वसु ). किष्किंधा ( अंगद; मैंद; १० सहदेव ). किरात ( भगदत्त; १० सुबाहु ). कीकट ( गयासुर; प्रमगंद; बुद्ध; शंबर ). कुंतल ( ५ गालव ). कुंति ( परशुराम; पाणिनि ).–हाच कुंतिभोज ( कुंती ). कुमार ( १८ भीम; २ श्रोणिमत ). कुरु ( पाणिनि; शत्रुघ्न ). –उत्तर ( अत्यराति जानंतपि; विवस्वत्; शत्रुघ्न ). कुरुजांगल ( श्रवण ). कुलिंद ( अर्जुन; चंद्रहास; सुबाहु ). केकय ( धर्मरस; ५ धृष्टकेतु; २ बृहत्क्षत्र; ६ भद्रा; ४ भरत; युधाजित्; शतयूप; शारदण्डायनि; ३ श्रुतकीर्ति; सहस्राचित्य; ४ सुमना; २ सुरूपा ). केरल ( अर्जुन; कर्ण; चंद्रहास; बलराम; २९ वसु; १० सहदेव; सुधार्मिक ). कैकट ( गयासुर). कोकनद (अर्जुन). कोंकवेक कुटक–कर्नाटकांत (अर्हत्). कोसल ( अर्जुन, २ गाधि; ध्रुवसंधि; नल; पाणिनि; बृहस्पति; १८ भीम; ३ राम; ४ सत्या; १० सहदेव; सुक्षत्र; हिरण्यनाभ कौसल्य ),–उत्तर ( १८ भीम ),–प्राच् (१०सहदेव ),– –दक्षिण व त्याची राजधानी ( कौसल्या ). कौंतलक (चंपकमालिनी ). कौरुपांचाल ( कौरुपांचाल ). क्रीवि ( क्रीवि; क्रैव्य पांचाल ). क्षुद्रक ( परशुराम ). खुराज ( नारद ). गंधर्व (अर्जुन ). गय ( ५ गय ). गांधार ( अर्जुन; जरासंध; तक्ष; नग्नजित् ; पाणिनि;. पुष्कल; ७ भोज; ६ शकुनि; २ सुकेशी; ३ सुबल ). गुर्जर ( मूलवर्मन् ). गोपालक ( ब्राह्मी; १८ भीम ). गौड ( दूर्व; धर्मराज; नरसिंह; नल; वीरभद्रक ). चिताभूमि ( वैद्यनाथ ). चीन (धौतमूलक; भगदत्त; शालिवाहन ). चेदि ( अर्जुन; उपरिचर वसु; कर्ण; कुशांब; जरासंध; नल; २ वीरबाहु; शिशुपाल; ६ शुचि; सुधनु; ३ सुदामन्; ४ सुबाहु; २ सुशोभना). चेदिमत्स्य ( सहज ). चोल ( अर्जुन; मत्स्य; १० सहदेव; १५ सुबाहु ). जालंधर–वृंदावन ( जालंधर ). ज्योतिष–प्राच् ( अर्जुन; भगदत्त ),–उत्तर ( नकुल ). तंगण ( अर्जुन; १० सुबाहु ). ताम्रलिप्त ( परशुराम; १८ भीम ). तार्तर ( शालिवाहन ). त्रिगर्त ( अर्जुन; ३ गार्ग्य; जरासंध; नकुल, २ निरामित्र; पाणिनि; बलराम; ३ विराट; २ श्रुतंजय; २ सत्यकर्मन्; २ सत्यदेव; २ सत्यरथ; ४ सत्यव्रत; सत्येषु; २ सुरथ; ३ सुवर्मन; सुशर्मन्–सूर्यवर्मन् ),–पश्चिम ( क्षेमंकर ) दक्षिणमल्ल ( १८ भीम ). दरद ( अर्जुन; परशुराम ). दशार्ण ( अर्जुन; नकुल; पांडु; भांगासुरि; शत्रुघ्न, ३ सुदामन; सुमना; हिरण्यवर्मन् ).–पूर्व ( ३ सुधर्मन् ). द्रविड ( अर्जुन; ७ चित्र; बिभीषण; मोहिनी; लोपामुद्रा; २ वीरवर्मन्; २ सत्यव्रत; १० सहदेव; हेमांगी ).

दार्व ( अर्जुन ). द्विज ( नकुल ). धूम ( पाणिनि ). धृति ( १४ धृति ). नरराष्ट्र ( १० सहदेव ), नाटकेय ( १० सहदेव ). नामदेव नामकेय ( अर्जुन ). निषध ( नल ). निषाद ( अर्जुन; २ बृहत्क्षत्र; १८ भीम, १० सहदेव ). नील ( कर्ण ). पंचनद ( अर्जुन; जरासंध; नकुल ). परमकांबोज ( अर्जुन; पशुभूमि ). पांचाल ( द्रुपद; बक दाल्भ्य; विदुर; शत्रुघ्न; ३ सुशर्मन् ). पांड्य ( अगस्त्य; कर्ण; दुर्विनीत; ५ प्रवीर; रुक्मिणी; लोपामुद्रा; वज्रांगद; १० सहदेव; सागरध्वज ). पार्श्व ( कर्ण ). पुंड्र ( अर्जुन, पांडु; पौंड्रक वासुदेव; १८ भीम ). प्रत्यग्रथ ( पाणिनि ). प्रसुह्म ( १८ भीम ). प्रस्थल ( अर्जुन ). बहुधान्य ( नकुल ). बाह्लीक ( अर्जुन; इल ). भर्ग ( पाणिनि; १८ भीम ). भल्लाट ( १८ भीम ). भूतमंडल ( २ गाधि ). भोज ( गववर्मन्; जरासंध; ज्यामघ ). भौरिक्य ( पाणिनि ). मगध ( अर्जुन; अश्वकेतु; कर्ण; ६ गृत्समद; दाशूर; देवदास; पाणिनि; ७ भरत; १८ भीम; महानंद; ३ मागध; वल्गा; विश्वस्फाणि; शिशुनाग; सुकेशी, सुधनु; सुमित्रा; सूत ). मत्स्य ( उपरिचर वसु; १८ भीम; २ विराट; ३ शंख; २ सुकुमार ). मथुरा ( जरासंध ). मद ( ३ राम ). मद्र (अश्वपति; कर्ण; जरासंध; नकुल; प्रियव्रत; माद्री; २ रुक्मरथ; लक्ष्मण; शल्य; १० सहदेव; सावित्री; सिंधुवीर्य ). मध्य ( इक्ष्वाकु; ऋचीक; ५ गौतम; त्रसदस्यु पौरुकुत्स; ययाति ). मध्यमकेय ( नकुल ). मरुभूमि ( त्रित; नकुल ).–मारवाड ( उत्तंक ). मलद ( १८ भीम ).–निवासस्थान ( ताटका ). मल्ल ( १८ भीम; लक्ष्मण ). मण्णार ( ३ भरत ). महेत्थ ( नकुल ). माथुर ( पद्मावती ). मारवाड ( उत्तंक ). मार्तिकावतक ( ११ चित्र ). मालव ( इंद्रवर्मन्; कर्ण; खड्गबाहु; जरासंध; नकुल;. परशुराम ). माहिषक ( अर्जुन ). मिथिल ( कर्ण ). मुलतान-मौलिस्थान ( ६ हारीत ). म्लेच्छस्थान ( शालिवाहन ). युगंधर ( पाणिनि ). योध्य ( कर्ण ). यौधेय ( पाणिनि ). रक्षोमाह ( परशुराम ). राजस्थल ( ५ सुद्युम्न ). रुश [रूमशाम?] (ऋणंचय). रूपदेश (दिव्यादेवी ). रोहितक ( कर्ण ). रौद्र ( अर्जुन ). लोहितक ( रोहित ). वंग ( अर्जुन; पौंड्रक वासुदेव; १८ भीम; शत्रुघ्न; हेमकांत ). वत्सभूमि ( कर्ण; १८ भीम ). वर्मक ( १८ भीम ). वाटधान ( नकुल ). वाहिक ( पाणिनि ). विदर्भ ( अगस्त्य; जरासंध; नग्नजित्; नल; २ नारद; २ निमि; १३ भीम; २३ भीम; ३ यदु; रुक्मकेश; रुक्मबाहु; रुक्मरथ; रुक्मिणी; रेणुका; ४ सुदेव; ११ सुरभ ). विदेह ( कुंददंत; जनक; नमी साप्य; ३ नरक, १८ भीम; रहूगण; सत्राजित् ). वीतिहोत्र ( परशुराम ). वैदेश ( धनधर्मन्; नखवत्; सदाचंद्र;

सुरपुरंजय ). वैशालि ( अथर्वन् ). शर्कस्थान ( कशाक ). शर्मक ( १८ भीम ). शाकल ( प्रतिविंध्य ). शाल्व ( जयद्रथ; सावित्री ). शिबि ( ३ जयद्रथ; नकुल; ६ शैन्य; ४ सुरथ). शुंडिक ( कर्ण ). शूर्पारक ( कश्यप; परशुराम; १० सहदेव ). शूरसेन (२ चित्रकेतु; १० सहदेव ),–स्थापिला–कार्तवीर्यपुत्रानें ( कार्तवीर्य ),–शत्रुघ्नपुत्रानें ( कार्तवीर्य ). शैरीषक ( नकुल ). श्रीविशाल ( शत्रुघ्न ). साल्व ( पाणिनि ). साल्वेय ( पाणिनि). सिंहल ( खड्गबाहु ). सिनी ( जरासंध ). सिंधु ( अर्जुन; कल्याण; ३ जयद्रथ; ३ भरत; विदारण; सुरथ ),–हाच आर्यांचा देश ( शालिवाहन ). सीस्थान ( शक ). सुदामन् ( अर्जुन ). सुराष्ट्र ( अर्जुन; शक; १० सहदेव ). सुवर्णकूट (२ इंदु). सुह्म (अर्जुन; पांडु; २ बलि; १८ भीम ). सूरमस ( पाणिनि ). सौभ ( अनुशाल्व; कालकेय; ३ शाल्व; सौभपति). सौराष्ट्र (ज्ञानभद्र; श्यामबाला; सुरतचंद्रिका; सोमकांत ). सौवीर ( २ अंकारक; अर्जुन; कुंजर; कुहन; ३ जयद्रथ; पाणिनि; भरत; विदुला; ३ विपुल; ६ संजय; ८ सुमित्र ). हाटक–याचा राजा गुह्यक ( अर्जुन ). हिंदुस्थान उत्तर व दक्षिण ( इक्ष्वाकु ). हेरंबक ( १० सहदेव ).

**द्वार**—गंगाद्वार; ( जयद्रथ; तपस्; धाम; ३ भरद्वाज; लोपामुद्रा; शिव). स्वर्गद्वार (२ सनारु). हरिद्वार (बलराम).

**द्वीप**—अरुग–पराभूत राक्षसांचें निवासस्थान ( प्रजापति ). कुश ( १४ धृति; लंबन; १० सुरथ; हिरण्यरेतस् ). क्रौंच ( क्रौंच; धृतपृष्ठ; सुधामन् ). जंबु ( आग्नीध्र, निक्षुभा; ३१ वसु; सांब ). ताम्र ( १० सहदेव ). पुष्कर ( धातकि; रावण सहस्रमुख ). प्लक्ष ( इध्मजिह्व; गुणाकर; चंद्रकला; दिव्यादेवी; ५ माधव; मेधातिथि ). ब्रह्मावर्त ( ऋषभ ). यमुना ( व्यास ). रमणक ( कालिय ). शाक (निक्षुभा; प्रियव्रत; मग; सुकुमार ),–दधिसमुद्रवेष्टित (मेधातिथि). शाकल ( अर्जुन ). शाल्मलि (यज्ञबाहु; सुरोचन; २ सोम; २ हारित). श्वेत ( २ नंदन; २ नारद; २ मुरु; रावण ). सिंहल ( इंदुमती; गुणनिधि; २ मंदोदरी ).

**नगर, ग्राम, पुर, पुरी, स्थान ( ष्ठान ), स्थल ( स्थली ) वगैरे**—अगस्तिपुरी ( अगस्त्य ). अंगदीया ( २ अंगद; लक्ष्मण ). अजितंजय ( कालयवन ). अजमेर ( नागवाह; २ महादेव; महासिंह; माणिक्य, मोहन ). अजस्तुंद ( पाणिनि ). अनंतपुर ( बलराम ). अभिसारि ( अर्जुन; ४ चित्रसेन ). अमरावती ( अंधक; इंद्र ). अंबा ( भ्रमर ). अयोध्या ( अनरण्य; इक्ष्वाकु; कुंददंत; धनपाल; फल्गुतंत्र; ४ भरत; ३ भरद्वाज; १८ भीम; युधाजित; रघु; ३ राम; लक्ष्मण ).–पुनरुद्धार ( पुष्पमित्र ),–वसविली ( वैवस्वत मनु ). अलकावती ( अमिप; धर्मगुप्त; ३ नरक; पुरूरवस् ),–कुबेराची ( कुबेर )–स्वारी ( ध्रुव )–मेरुवर ( ययाति ). अवंती ( २ जयशर्मन्; धनेश्वर; ३ भद्रक; ३ वीरसेन; सांदीपनी ). अविस्थल ( युधिष्ठिर ). अश्म ( रावण; शूर्पणखा ). अश्वमेध ( ३ रोचमत् ). अहिच्छत्र (शत्रुघ्न). आटवी ( १० सहदेव ). आसंदीवत् राजधानी ( जनमेजय ). इंद्रप्रस्थ ( त्वष्टृव; दुर्योधन; २ नंदिन्; २ वज्र; ३ शाल्व; १० सहदेव; हेमांगी ),–निर्मिलें ( अर्जुन; कृष्ण; मय; युधिष्ठिर ). इंद्रवती ( इंद्रपाल ). उज्जयिनी ( ३ चंद्रसेन; महाकाल ),–राजधानी ( अंधक ). उत्कल ( ३ उत्कल ). उदयपुर वसविलें ( उदय ). उपप्लाव्य ( उलूक; कृष्ण; दुर्योधन; ९ संजय ). उरग ( अर्जुन; रोचमत् ). उर्वीमाया ( महीपति ). एकचक्रा (कुंती; बक; १८ भीम; युधिष्ठिर). ओंकार मांधाता ( ओंकार )–हीच माहिष्मती अथवा भोगावती ( कार्तवीर्य ). कनौज–अमावसूस दिले ( पुरूरवस् ). करवीर ( कलहा; धर्मदत्त )–हेंच कोल्हापूर ( शृगाल वासुदेव )–ब्रह्मावर्तांत दृषद्वतीकांठीं ( पौष्य ). कर्ण ( चंद्रांगद ). कलापि ( २ देवापि; सुतनु; ९ सुवर्चस् ). कलिंजर ( परिहर ). कांचन ( हेमप्रभ ). कांचनका ( ३ प्रवीर ). कांची ( बलराम; रत्नग्रीव ). कांति–हेंच श्रीरंगपट्टण असावें ( चोल ). कामोद (कामोदा). कांपिली किंवा कांपिल्य ( कुशनाभ; ४ वीरबाहु; २ ब्रह्मदत्त; २ तत्त्वदर्शिन्; यज्ञदत्त ). काशी ( अक्रूर; गृहपति; धीरधी पुरूरवस्; पौंड्रक वासुदेव; भरत; भैरव; मंकन; विश्वेश्वर; व्यास; शतानीक; शिव; शिशुनाग; सत्राजित्; २ सुदेव; ३ सुलोचना )–येथें शंकर राही (कश्यप). कास्तीर ( पाणिनि ). किलकिला ( कृतनंदन ). किष्किंधा ( अंगद; ऋक्षरजस्; रावण; २ सुग्रीव; सुनेत्र ). कुंडला ( चंपक; दुर्वार; शत्रुघ्न; ९ सहदेव; ८ सुरथ ). कुंडिनपुर ( कर्ण; नल; भीष्मक; रुक्मिणी ). कुंतल–हेंच खेडा जिल्ह्यांतील ( चंद्रहास ). ( कुंतिभोज; कुंती ). कुशस्थली ( ककुद्मिन्; रेव; रैवत),–आनर्तानें स्थापिली ( आनर्त ). कोल ( २ नंदिन्; ३ मेघ). कोल्हार ( चिद्रूप ). कोसला ( कर्ण ). कोहल ( आत्मदेव ). कौंडिन्यपूर (७ चंद्रसेन; रुक्मांगद ). कौंतलपुर ( कुंतल; चंद्रसेन ). कौशांबी ( आधिसामकृष्ण; कुशांब; भद्रमति; रुक्मिणी मणिवाहन पहा ). खांडवप्रस्थ ( नकुल, भैरव; १९ विजय; ७ सुदर्शन). गंधवती (२ प्रभंजन). गया (६ गय; बलराम; मतंग). गिरि–येथें दत्ताचा आश्रम आहे ( दत्तात्रेय ). गिरिव्रज ( जरासंध ; १८ भीम; ५ वसु ),–हीच गिरिप्रजा ( दीर्घतमस् ). दंड व कर्ण यांची युद्धभूमि ( ४ दंड ). गुणवती ( परशुराम ). घाटपूर ( मल्लशर्मन् ). चक्रांक (शत्रुघ्न).

चक्रांग ( ७ सुबाहु ). चंदनावती—बडोदें? ( चंद्रहास ). चंद्रकांत (३ चंद्रकेतु; लक्ष्मण). चंपक ( विदारुण; वैखानस; हंसध्वज ). चंपका ( २ अमित्रजित्; २ लिखित ). चंपा ( माहिष्मत; रोमपाद ). चिपळूण ( हिरण्यकेशिन् ). चूडापूर ( चूडामणि ). चेदिपुर ( दमयंती ). ठाठंगांव ( ३ प्रसेन ). तक्षशिल ( ८ जनमेजय; तक्ष; ४ भरत ). तालनगर ( स्वरोचि ). तेजःपूर ( शत्रुघ्न; ४ सत्यव्रत ). त्रिपुरी ( कर्ण; त्रिपुर ). दिव्यकटपुर ( नकुल ). देवनगर ( सोमकांत ). देवपुरनगर ( शत्रुघ्न ). देवप्रस्थ ( अर्जुन; सेनाबिंदु ). दशपुर ( रंतिदेव ). द्वारका ( अर्जुन; आहुक ६ इंद्रसेन; चक्रिक; धौम्य; ३ नरक; बलराम; यज्ञशर्मन्; वसुदेव ३ वितल; ३ शाल्व; शिशुपाल; सत्राजित्; सागरध्वज; ३ सुदाक्षिण, ७ हंस ).—हीच कुशस्थली ( ककुद्मिन् रैवत ),—यादवांची राजधानी ( कालयवन ). द्विजग्राम ( पुरूरवस् ). धर्मारण्य नगर (मूर्तय) नंदवती (स्वरोचि). नंदिग्राम ( ४ भरत; ३ भरद्वाज; ३ राम ). निकुंभिला (इंद्रजित्). निम्लोचिनी मानसोत्तरपर्वतामागें ( वरुण ). निषधनगर (विकुंडल; हेमकुंडल). पट्टण ( चंद्रगुप्त ). पवनपूर ( देवमित्र; २ याज्ञवल्क्य ). परळी ( वैद्यनाथ ). पांचाल ( रुक्मरथ ) द्रौपदी स्वयंवर येथें झालें ( अर्जुन ). पाटलीपुत्र ( पुष्पपूर पहा; उपवर्ष ). पाताळ ( शत्रुघ्न ). पाली—सिंधुदेशांत ( कल्याण ). पुण्यपूर ( धर्मवल्लभ; बकवाहन ). पुरंदर ( ६ देवशर्मन् ). पुलिंद ( ६ सुमित्र ). पुष्कलावती ( पुष्कल; ४ भरत ). पुष्पपूर—हेंच पाटलीपुत्र ( २ उदयन ) पोरबंदर ( २ सुदामन् ). पौदन्य बसविलें ( अश्मक ). प्रतिष्ठान ( १६ कौशिक; पुरूरवस्; ३ भरत; ४ शूरसेन ),—अलाहाबाद ( ययाति ),—राजधानी ( इल; दुष्यंत; पूरू ),—गोदावरीकाठी ( ज्ञानश्रुति; दुर्दम; ४ दुर्दम ). प्रयाग ( च्यवन; प्रमति; ३ भरद्वाज; ३ राम; २ विदुर ),—राजधानी ( चंद्र ). प्राग्ज्योतिष (अदिति; अर्जुन; घटोत्कच; ३ नरक; भगदत्त; २ महोदर; मौर्वी कामकटका; वज्रदत्त; शिशुपाल ). बहुधा ( उपरिचर वसु ). बाष्कलग्राम ( बिंदुग ). भद्रवटपुर ( शिव; सहिष्णु ). भद्रावती (३ धनपाल; धृष्टबुद्धि; श्वेतपर्ण यौवनाश्व; सुकेतुमत् ),—सरस्वती तीरीं ( ६ द्युतिमत् ). भोगावती—हीच ओंकारमांधाता किंवा माहिष्मती ( कार्तवीर्य ),—राजधानी—अनूप देशाची ( कार्तवीर्य ),—नागांची ( कर्कोटक ). भोजकट ( भीष्मक; १० सहदेव ). मणलूर—हेंच मणिपूर ( अर्जुन; चित्रवाहन; प्रभंजन; बभ्रुवाहन; मयूरध्वज ). मणिमती ( इल्वल ). मणिवाहन; हीच कौशांबी ( उपरिचरवसु ). मथुरा ( अक्रूर; कृष्ण; जरासंध; घनधर्मन्; नखवत्; नंदियशस्; १४ भीम, ५ सुप्रतीक),—हीच मधु किंवा मधुरा ( नंद; ८ मधु; शत्रुघ्न; ८ सुबाहु ),—यादवांची राजधानी ( ३ अंधक; कालयवन ), —शूरसेन देशांत ( कार्तवीर्य ). मदिना ( ७ भोज ). मदुरा ( बलराम; २ सत्यव्रत ). मधमत्त किंवा मधुमंत—विंध्याच्या दोन शिखरांमध्यें ( दंड ). मधु किंवा मधुरा ( मथुरा पहा ). मयूर नगर ( २ मयूरध्वज ). मही ( २ कमठ ). महोदय ( कुशिक ). माकंदी ( युधिष्ठिर ),—द्रुपदाची राजधानी ( द्रुपद ). मागधग्राम ( मग ). मायापुरी ( सत्राजित् ); मालिनी ( कर्ण; जरासंध ). माल्यवती ( २ माल्यवत् ). माहिष्मती ( ५ अग्नि; इक्ष्वाकु; १० इंद्रसेन; कार्तवीर्य; दशाश्व; धनेश्वर; परशुराम; माहिष्मत्; १० सहदेव; २ सुदर्शन; ३ स्वाहा ),—राजधानी ( तालजंघ ),—हीच भोगावती मिथिला ( जनक; धर्मव्याध; बलराम. २ मार्कंडेय; मिथि; ३ राम; श्रुतदेव; सत्राजित्; सीरध्वज; ३ सुमति ). मृत्तिकावत् ( अर्जुन; कर्ण; ज्यामघ; हार्दिक्य ). मोदागिरिपूर ( अर्जुन; १८ भीम; ८ वामदेव; ४ सुदामन् ). मोरगांव ( मयुरेश्वर ). मोहन ( कर्ण ). यवनपुर ( १० सहदेव ). रत्ननगर ( मयूरध्वज ). रत्नातट ( ४ विमल; शत्रुघ्न ). राजपुत्र ( ३ कण्व ). राजपूर—कलिंगाची राजधानी ( कर्ण; ४ चित्रांगद ). रोम ( शालिवाहन ). रोहितपुर ( रोहित ) लंका ( अगस्त्य; इंद्रजित्; मारीच; माल्यवत् ). लक्ष्मीनगर ( २ लक्ष्मी ). लोहगपुर ( २ लोहासुर ). वनरसा—बनारस ( अलिक; नरिन् ). वनवासी ( निमि ). वातापि—बदामी ( अगस्त्य ). वारणावत (कुंती; दुर्योधन; धृतराष्ट्र; युधिष्ठिर). वाराणसी ( अगस्त्य; इंद्र; कृष्ण; ४ चित्रा; ४ निकुंभ; ८ भरत; वंजुल; १९ विजय; २ शाल्व, शिव; सुकल; ३ सुदाक्षिण ),—पुनः वसविली ( अलर्क ). विजयदुर्ग ( निमि ). विजयपुर ( २ कालानल ). विदर्भ ( रुक्मिणी ). विदिशा ( धरापाल; धर्मांगद; ८ सुव्रत ). विपाशा ( पाणिनि ). विभावरी ही मेरूच्या उत्तरेस असून कुबेराची नगरी आहे ( कुबेर ). विराट ( जयेश; दुर्योधन; युधिष्ठिर; ३ विराट ). विराध ( २ वीरवाहन ). विशाला ( ३ राम ),—हिमालयावर ( सुनंद ). वृकस्थल ( कृष्ण; युधिष्ठिर ). वृंदावन ( ४ वज्रनाभ ). वेदगर्भपुरी ( विश्वामित्र ). वैजयंत ( निमि ), —दंडकारण्यानजीक ( तिमिध्वज ). वैडूर्य ( हुंड ). वादश ( शत्रुघातिन् ). वैशाली ( अथर्वन्; नाभाग; भरत; विशाल ). शंभल ( कल्कि; शाल्व ). शर्यणावत ( दधीच ). शाकल ( नकुल; माद्री ),—राजधानी ( शल्य ). शुक्तिमती ( धृष्टकेतु ),—ऋक्षवत् पर्वतावर ( ज्यामघ ). शुक्तिसा ( ७ शरभ ). शृंगवेर ( ४ भरत; ३ राम ),—राजधीना ( २ गुह ). शोणित—राजधानी ( उषा; २ बाण ). श्रावस्ती

( बृहदश्व; श्रावस्त ). श्रीरंग ( बलराम ). संकल (पाणिनि) संजयंती (१० सहदेव). सहस्रगांव–मध्यदेशांत (५ शूरसेन). संयमिनी–मानसोत्तर पर्वतावर ( यम ). साकेत ( पतंजली ). सांकाश्या ( सीरध्वज; २ सुधन्वन् ). सारस्वत ( वीरवर्मन् ). साहंजनि ( साहंजि ). सिद्धपुर ( कपिल ). सिंदुरवाड ( गणपति ). सिंहपुर–चित्रायुधाची राजधानी ( अर्जुन ). सुमानस ( दशरथ ). सुरभिपट्टण (१० सहदेव) सुवर्णपुर ( ५ हरि ),–त्रिपुरांपैकीं एक ( कमलाक्ष ). सुवास्तु ( पाणिनि ). सौपुर ( मित्रवत् ). सौराष्ट्र ( कलह्रा ). स्थावर ( ४ कौडिन्य ). स्वयंप्रभा–कैलासावर ( गंधर्वसेना ). हरिहरपुर ( ११ हरि ). हस्तिनापुर ( अधिसामकृष्ण; अनुशाल्व; धृतराष्ट्र; बभ्रुवाहन; १८ भीम; माद्री; युधिष्ठिर; रतिविदग्धा; विदुर; शंपाक; ३ शाल्व; श्वेतपर्ण यौवनाश्व. सुरथ ),–ची जागा बदलली ( बलराम ),–ही राजधानी सोडून कौशांबीस नेली ( निमिचक्र )–वसविली ( हस्तिन् ). हिरण्यपुर ( कालकेय; निवातकवच; पौलोम ).

**नद**—भ्रमे–काशींत ( २ वेदशिरस् ). शोण (३ राम). शोणभद्र ( बलराम ).

**नदी**—अलकनंदा ( ३ नरक ). अश्व–अश्वरथ (कुंती). आपया ( देववात ). इरावता ( ३ गोपति ). उत्पलिन–हस्तिनापुराच्या पूर्वेस ( अर्जुन ). ओघवती (६ सुदर्शनी). कपिला ( कपिल ). कामोष्णी ( बलराम ). करोती ( तुर: कावषेय ). कालिंदी ( कद्रु ). कावेरी ( ८ देवशर्मन्; बलराम; ३ युवनाश्व ). कुब्जा ( २ फेनप ). कृतमाला ( बलराम; मत्स्य; २ सत्यव्रत ). कौशिकी ( अर्जुन; कौशिकी; ऋचीक; ऋश्यशृंग; पौंड्रक-वासुदेव; १८ भीम; विभांडक; २ सत्यवती). क्षिप्रा ( चार्वाक ). गंगा ( अगस्त्य; अर्जुन; गांगेय; गुह; ३-४ भरत)–हीच कृतवती व गिरिकर्णिका ( कश्यप ). गौतमी ( गौतमी; ययाति ).–चंदना व साभ्रमती (कश्यप),–गंधमादनस्थ (रुद्र),–चित्रकूटस्थ (अनसूया); –पाताल (त्रिशंकु),–बाण ( जयद्रथ ).–सीता ( सीता पहा ), –हेमकूटस्थ ( धर्मद्रवा ). गंडकी ( जयविजय; बलराम; २ भरत ). गोदावरी (अश्विनसुत; अहल्या; बुद्ध; शरभंग),–सप्त (बलराम). गोमती ( बलराम; ३ राम ). गौतमी ( कपिल; दत्त आत्रेय; ३ भरद्वाज ). चंद्रभागा ( मग; १ सांब ). चर्मण्वती ( कुंती ). चर्मण्वती ( कर्ण; यदु; रंतिदेव; १० सहदेव ). चामला (चार्वाक). चिनाब (माद्री). तमसा (कुशलव; वाल्मीकि). तापी व ताम्रपर्णी (बलराम). दृषद्वती (देववात). देवहूति ( देवहूति ). नर्मदा ( कल्माषपाद; कार्तवीर्य; गणपति; गृहपति; बलराम; मयुरध्वज; रुक्मिणी; १० सहदेव, सोमप ). निर्विंध्या ( बलराम ). पयोष्णी (बलराम; शत्रुघ्न). परुष्णी ( आत्रेयी ). पर्णाशा ( देवावृध ). पुष्पभद्रा ( २ नंदी ). बाहुदा ( ३ युवनाश्व; लिखित ). भवनाशिनी ( २ धनंजय ). भागीरथी ( २ अंशुमत्; यवक्रीत; ३ राम; रेणुका; सुमंत्र ). भीमरथी ( बलराम ). मंदाकिनी (पुरूरवस्; शरभंग ). महानदी ( अगस्त्य; अर्जुन). महोदय (कुशनाभ); मालिनी (कण्व). यमुना ( अक्रूर; चित्रकेतु; दीर्घतमस्; ३-४ भरत; ३ मरुत्त; मुकुंद; यम; याज; लक्ष्मण; लोमश; वसुदेव; सौभरि ),–प्रवाह वळविला (बलराम). रावी ( माद्री ). रेवा (कल्माषपाद). विपाट्शुतुद्री (४ विश्वामित्र; सुदास). विपाशा (बलराम; १ ; ४ वसिष्ठ). विरजा ( ६ चाक्षुष) विश्वामित्री ( ऋचीक ). वेणा ( बलराम ). वेत्रवती (२ यदु; विदारुण), –उगम महागंभीर खंदकांत ( वृत्र ). वेदश्रुति ( ३ राम ). वैगानदी ( २ सत्यव्रत ). शतद्रु ( ४ वसिष्ठ ). शरावती ( आपस्तंब, पाणिनि ). शीततोया–पर्णाशा ( श्रुतायुध ); शुक्तिमती ( उपरिचर वसु; गिरिका; २ यदु ). शुष्करेवती ( अंधक ). सदानीरा ( विदेघ माथव ). समंगा ( अष्टावक्र ). सरयू ( असमंजस्; बलराम; लक्ष्मण ).–उगम मानस सरो-वरांत ( कुबेर ). सरस्वती ( अंतिनार; उद्धव; कर्दम; कवष ऐलूष; ५ गय; त्रित; देववात; ३ धनपाल; ध्वसन्; द्वैतवन नकुल; २ नहुष; पूरु; ३ प्रद्युम्न; बलराम; बृसय; २ ब्रह्मन् ३ भरत; मंकणक, मिथु; ययाति; लोमश; वध्र्यश्व; विश्वामित्र; वेदशिरस्; सारस्वत ),–मध्यदेशांत ( त्रसदस्यु पौरुकुत्स ). साभ्रमती ( इंद्र; कल्माषपाद; ५ कौडिन्य; नकुल; विकर्तन ). सिंधु ( नकुल; संवरण ),–सप्त (इंद्र). सीता,–गंगेचा फांटा ( सनक ). सुदामन् ( क्षेमधृत्वन् पौण्डरीक .) स्पंदिका ( ३ राम ) स्वर्णदी ( जालंधर ). हस्तिमती ( ५ कौडिन्य ). हिरण्वती ( युधिष्ठिर ).

**नरक**—भौम ( ययाति ).

**परलोक**—इंद्र ( ९ चित्रसेन ). कामदुघ ( सुस्वधा ). कालेय ( २ समुद्रसेन ). गंधर्व ( दुर्दम ). गोलोक ( २ सुदामन् ). ज्योतिर्भासिन् ( सुमूर्तिमत् ). द्यु–एकंदर तीन आहेत( यम ). नाग ( १८ भीम ). नैर्ऋत ( ३ नरक ). ब्रह्म ( शरभंग; ६ सुदर्शन ). मरीचिगर्भ ( ४ हविष्मंद ). मानस किंवा सुमनस् ( सोमप ). यति ( पृथुरश्मि ). यम–तीन्ही द्युलोकांवर ( यम ). रुद्र ( ४ चित्रलेखा ). वरुण (सुहनु). वैकुंठ ( ७ देवशर्मन् ). वैभ्राज ( २ बर्हिषद ) सत्य–ब्रह्मदेवाचा ( त्रिशंकु ). स्वर्ग ( इंदुल ),–प्राग्ज्योतिषपलीकडे ( सत्यभामा ).

**पर्वत—कूट**—कालकूट ( पांडु ). चित्रकूट ( अनसूया; गुह; ३ राम; ४ भरत; लक्ष्मण;),–प्रयागापासून १० कोसांवर

( ३ भरद्वाज ). त्रिकूट ( ४ इंद्रद्युम्न; माल्यवत् ). निष्कूट–हिमालयाचा भाग ( अर्जुन ). हेमकूट ( धर्मद्रवा; शत्रुघ्न ).

**—गुहा—**अमृत ( गरुड ). तोता ( निंबादित्य; बोपदेव ). सिंहावती ( मुर ).

**—घाट—**लोहा.

**—पर्वत—**अमर ( नकुल ). अमरकंटक ( २ बाण ). अरुणाचल ( अर्धनारीनटेश्वर; पार्वती; महिषासुर ). अर्धकील ( दर्भि ). अर्बुदाचल ( त्रिशंकु; बलि ). अस्ताचल पर्वत ( बलि ). इंद्र ( १८ भीम ). इंद्रकील ( मूक ). उत्तरगिरि ( मत्स्य ). उदयगिरि ( अलंबुसा ),–हा मेरु नव्हे ( वामन ). ऋक्षवत् ( ज्यामघ ). ऋषभ ( शिक्ष; सरमा ). ऋष्य ( ३ केशिन् ). ऋष्यमूक ( ३ राम; लक्ष्मण; वालिन्; सुग्रीव ). ऋष्यवत् ( विदूरथ ). कटक–दक्षिणेंत ( ऋषभ ). कलिंजर (वंजुल; वेदवृद्ध). कालंजर (शिव; ३ श्वेत), कुटक–कर्नाटकांतील कोंकवेंक कुटक देशांत ( अर्हत् ). कोलगिरि ( १० सहदेव ). कोलाहल ( गयासुर; गिरिका; रजि ),–फोडून मध्यें नदीस मार्ग दिला ( उपरिचर वसु ). क्रौंच (मैनाक; स्कंद). गंधमादन ( कुबेर; घटोत्कच; धर्मवर्ण; पांडु; पुरूरवस्; २ पूर्णभद्र; २ बलि; २ ब्रह्मन्; १८ भीम; रुक्मिन्; रुद्र; लोमश; १२ सुरथ ). गयशिर ( शमठ ). गोकर्ण ( केसरिन् ). गोमंत–द्वारकेजवळ ( कृष्ण; परशुराम ). गोवर्धन ( कृष्ण ). त्रिककुद् (वृत्र). त्रिशिखर (२ फेनप). त्र्यक्ष ( दत्त आत्रेय ). दशांग ( जांबवत् ). नागशत ( पांडु ). नील ( इंद्रद्युम्न; गालि; रत्नग्रीव; शत्रु ;). पारियात्र ( गौतम ). प्रवर्षण ( कृष्ण; ३ राम ). ब्रह्मगिरि ( अहल्या ). भोगवत् ( १८ भीम ). मणि ( ३ नरक ). मंदधार ( १८ भीम ). मंदराचल ( आग्नीध्र; कूर्म ). मंदर ( स्वरोचि; ३ जाबालि; मणिचार ). मलय ( अगस्त्य; ३ मनु; २ सत्यव्रत ). महेंद्र ( अगस्त्य; दीर्घतपस्; परशुराम; पुण्य ),–कलिंग ते मणिपूर रस्त्यावर ( अर्जुन ). महोदय ( ५ सुषेण ). मूजवत्–कैलासापलीकडे ( रुद्र ). मेरु ( आपव वासिष्ठ; पुलस्त्य; प्रियव्रत; १८ भीम; २ मेरुसावर्णि; ५ वामदेव; वैशंपायन ),–उत्तरेस ( ययाति )–उत्तर ध्रुव–हिमालय ( रुद्र ). मैनाक ( मय; मैनाक ). यज्ञ ( चार्वाक ). यामुन ( ३ यज्ञदत्त; लोमश ). युगंधर ( अमोघा ). रम्यक ( २ कुमुद ). रामक ( तिमिध्वज; १० सहदेव ). रैवतक ( अर्जुन; जरासंध; नकुल; युधिष्ठिर; रैवतक; शिशुपाल ). विंध्य ( अगस्त्य; कार्तवीर्य; २ दक्ष; बिंदुग; भूत; शत्रुघ्न; संपाति; सुंदोपसुंद; सौभरि; हनुमत् ). विशाखयूप (लोमश). वेंकटाचल ( अंजना; काश्यप; बलराम; भद्रवती; रंगदास; २ रामकृष्ण; ३० वसु ). वैद्युत–कैलासाच्या दक्षिणेस ( कुबेर ). शालग्राम ( परशुराम ). शुक्तिमत् ( १८ भीम ). शुभ्रगिरि ( २ शाकल ). शैल ( बलराम ). शौकट ( वीरभद्र ). शैल ( २ बाण ). श्रीशैल (मल्लिकार्जुन). श्वेत ( अर्जुन; सिंजिक ). संध्याचल ( वेताल ). सह्याद्रि ( परशुराम; भीमशंकर; भास; विलास; हिरण्यकेशिन् ); साल्वेय ( ५ शरभ ). सुमेरु ( हनुमत् ). सुवर्ण ( शंख ). सुवेला ( अहिरावण; महिरावण; ३ राम ). हंसगिरि (पांडु). हिमालय ( अकृतव्रण; आपव वासिष्ठ; नकुल; पांडु; ३ मणिमत्; मत्स्य; मत्स्येंद्रनाथ; मुचुकुंद; युधिष्ठिर; रथवीति दार्भ्य; लक्ष्मण; ३ विमल; वेदशिरस्; शिव; ९ संजय; ७ सुदर्शन).

**—पृष्ठ (पठार)—**मुंज (वसुहोम). मेरु ( याज्ञवल्क्य ).

**—शिखर—**अट्टहास ( अट्टहास; शिव ). कुमार ( ५ वामदेव ). कैलास ( अंधक; गंधर्वसेना; धन्वंतरि; २ नंदन; नलकूबर; २ मणिभद्र; रावण; रुद्र; लोमश; २ विष्णुरूप ). गोशृंग ( श्रेणिमत् ). छागल ( शिव; २ श्वेत ). नौकाप्रभ्रंशन, नौबंधन ( मनु ). भृगुतुंग ( शिव ). मेरु ( वामन ). वेदशीर्ष ( वेदशिरस् ). शतशृंग ( अर्जुन; नकुल; पांडु; १८ भीम; युधिष्ठिर; १० सहदेव ). शिखंडि ( शिखंडिन् ).

**प्रदेश—**जलोद्भव ( १८ भीम ). उज्जालक–वालुकामय ( कुवलाश्व ).

**मार्ग—**कलिंग–मणिपूर ( अर्जुन ). हस्तिनापूर–वृकस्थल ( कृष्ण ).

**वन—**अशोक ( अक्ष; २ कला; दीर्घजिह्व; धर्षा; प्रघसा; रावण; सीता; हनुमत् ). उत्पलावतक ( ९ सुशर्मन् ). उमा ( इल ). काम्यक ( कृष्ण; ३ जयद्रथ; युधिष्ठिर; लोमश; सत्यभामा ). कारा ( नकुलीश ). कुबेर ( ३ मणिमत् ). क्रौंच ( कबंध ). क्रौंचापर ( २ विराध ). खांडव ( ५ अग्नि; अर्जुन; तक्षक; दार्तेय; परशुराम; मैत्र; मय; १९ विजय; सारिसृक्क शार्ङ्ग ). गोकर्ण ( गोकर्ण; शिव ). गौतम ( अहल्या ). चित्ररथ ( उर्वशी; पांडु; पुरूरवस्; ४ मेधाविन्; ययाति ). ताटका–कारुष व मलद देश मिळून ( ताटका ). ताल ( धेनुक; १० सहदेव ). दारु (२ दारुक; शिव; )द्वैत (आग्निवेश्य; ७ इंद्रद्युम्न; दुर्योधन; २ बृहद्रथ; भालुकि; युधिष्ठिर; ४ विश्वावसु; वृषामित्र; शौनक; सहस्रपाद; सुवाच्; सुहोत्र; स्थूणकर्ण; होत्रवाहन ). नंदन ( उर्वशी; पुरूरवस्; ययाति ). पुष्कर ( नकुल ). मधु ( ४ निर्मोह; शाकुनि; लवण ),–किष्किंधेंतील ( हनुमत् ),–यमुनाकांठीं ( ध्रुव ). मंदार–काशीच्या उत्तरेस ( ऋक्षशृंग ). महाकाल–अवंती देशांत ( अंधक ). लोध्र ( हनुमत् ). वेत्र–किंवा वेत्रकी ( २ बक ). शर–कैलासाजवळ ( रावण ).

येथें पुरुषांचें स्त्रियांत रूपांतर होतें असे ( इल; रावण ). दिग्देवि ( शिखंडिन्; शिव ). सिद्ध ( परशुराम ). सुवर्ण ( हनूमत् ). सौगंधिक ( कुबेर; १८ भीम ).

**औषधी**—ज्ञान ( ईशान; ३ सुलोचना ). मृतसंजीवनी ( ५ हरि ). संवर्त ( संवर्त ). कूप पहा.

**वर्ष**—अजनाभ ( ऋषभ; नाभि ).–हेंच भारत (२ भरत ) आम ( आम ). इलावृत ( इल; पुरूरवस् ),–यांत मेरु पर्वत आहे ( इलावृत ). किंपुरुष ( जरासंध ). केतुमाल–हेंच गंधमादन ( केतुमाल ). क्षेम ( क्षेम ). गंधमादन ( केतुमाल ). ब्रह्मावर्त (कर्दम). भद्राश्व–मेरुच्या पूर्वेस (भद्राश्व). भारत ( २ भरत ).–हें हिंदुस्थान नव्हे ( भूत ). रम्यक–यांत नील पर्वत आहे ( रम्य ). लोहितार्ण ( लोहितार्ण ). शृंग ( कुरु ). श्वेत ( हिरण्वत् ). हरि–उत्तरकुरूंत ( अर्जुन ),–हेंच नैषध ( हरिवर्ष ). हरित ( २ हरित ). हिमवर्ष–हिंदुस्तान ( नाभि ). हेमकूट–हेंच किंपुरुष वर्ष ( किंपुरुष ).

**विवर** ( भूगर्भमार्ग )—( ९ विदूरथ ).

**संगम**—कावेरी-नर्मदा ( कुबेर ). गंगा–सागर ( धर्मबुद्धि ). पुष्कर ( कुकर्दम ). बकुला ( कौपतिक; ५ वामदेव, होड ). मही–सागर ( ५ देवशर्मन् ). सरस्वती–समुद्र ( ३ इंदुमती ).

**समुद्र**—क्षीर ( क्रामोदा; घृतपृष्ठ; श्री; ३ सुरभि; ). नील ( ३ नरक ). पश्चिम ( जाजलि ). वालुका ( नकुल ). श्वेत ( दत्त आत्रेय ).

**सरोवर**—अहल्या ( अहल्या ). इंद्रद्युम्न ( इंद्रद्युम्न; पांडु ). कौसुम ( नारदी ). पंचाप्सर ( धर्मभृत; बलराम ). पंपा ( बलराम; ३ राम; शबरी; हनूमत् ). बिंदुसर ( कपिल; बलराम ),–वृषपर्वन्‌चें स्थान ( अर्जुन; मय ). ब्रह्म ( शमठ ). मानस ( सन्नति ),–वैद्युतपर्वाच्या पायथ्याशीं ( कुबेर ). सिता ( कपालभरण ). सौगंधिक ( क्रोधवश ). अमरकंटक ( ७ दमन ). कशेरु ( ३ नरक )

**स्थानें इतर**—गोकुल ( अघ; कृष्ण; २ तेजस्विन्; नंद ). जनस्थान (२ अकंपन अहल्या; खर; जड; मकराक्ष; शुष्क; संपाति ). पंचवटी ( ३ राम; सीता ). परिसारक ( कवष ऐलूष ). भृगुकच्छ( बलि ). मतंगकेदार ( मतंग). लक्ष्मणझला ( लक्ष्मण ). वाजखङ्ग ( विकर्तन ). शालिग्राम ( शंख ). शठनाख–काश्मीरांतील ( ७ भोज ). हावधान ( ३ भरद्वाज ). हेम-कंचुक ( शिव ).

## परिशिष्ट चवथें

## पुराणांतील वंश व त्यांचें स्पष्टीकरण

### सूर्यवंश ( सू. )

सूर्यवंशांत खालील पोट वंश आहेत. १ इक्ष्वाकु, २ दिष्ट, ३ निमि, ४ शर्याति, ५ नृग, ६ नभग, ७ नरिष्यन्त. यांची व इतर वंशांची माहिती वर्णक्रमानें पुढें दिली आहे. व शेवटीं भविष्यकालीन राजवंश कालक्रमानें दिले आहेत.

**इक्ष्वाकु**—( इ. ) मनूचा पुत्र. याचा वंश अनेक ठिकाणीं आढळतो ( ब्रह्मांड. ३. ६३. ८; वायु. २. २६. ८; ब्रह्म. ७. ४७; ह. वं. १. ११; मत्स्य. १२. २५; गरुड. १. १३८. १९; विष्णु. ४. २. ३; भा. ९. ६. ४; लिंग. १. ६५. ३१–६६. ४५; अग्नि. २७२. १९; कूर्म. १. २०. १०–२१. ६०; पद्म. सृ. ८; शिव. उ. ३७. १; सौर. ३०; ३२-७२ ). रामायणांत रामापर्यंतची वंशावळ दोन ठिकाणीं दिली आहे ( वा. रा. बा. ७०. २१; अयो. ११०. ६ ). महाभारतांत दृढाश्वापर्यंत दिली आहे (म. व. २०५. १ कुं.). रघुवंशांत दिलीपापासून अग्निवर्णापर्यंत दिली आहे. पुराणांतील वंशावळींत प्रायः एकवाक्यता आहे. पण रामायणांतील वंशावळ पुराणांशीं बिलकुल जमत नाहीं. रामायणांत त्रसदस्यु, पुरुकुत्स, हरिश्चन्द्र, रोहित वगैरे सुप्रसिद्ध सूर्यवंशजांचीं नांवें नाहींत. कल्माषपाद सौदासाला रघुपुत्र म्हटलें आहे. वंशावळींत सुदास नाहीं. शिवाय दोन दिलीपाऐवजीं एकच दिलीप मानणें वगैरे गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या आहेत. रघु-

वंशांत कालिदासानें रामायणांतील वंशावळ न घेतां पुराणांतील घेतली आहे.

या वंशांत भारतीय युद्धापर्यंत भागवतमतें ८८, वायुमतें ९१व विष्णुमतें ९३ माणसें दिलीं आहेत. मत्स्यमतें सहस्वत्पासून वेगळींच नांवें आलीं असून एकंदर पिढ्या ६७ आहेत. पण सर्वत्र वंश सांगितल्यानंतर शेवटीं मुख्य मुख्य पुरुष सांगितले, असें म्हटलें आहे (मत्स्य. १२. ५७इ.). आम्ही तुलनात्मक कोष्टकांत भागवताप्रमाणें नांवें दिलीं आहेत.

या वंशावळींत दृढाश्व व हर्यश्व यांमध्यें मत्स्यांत प्रमोद जास्त दिला आहे. मांधात्याचीं मुलें तीन किंवा चार असा मतभेद आहे. सौदास कल्माषपादापासून दिलीप खट्वांगापर्यंत दिलेल्या नांवांशिवाय सर्वकर्मन, अनरण्य, निघ्न, अनमित्र व दुलीदुह अशीं निराळीं नांवें ब्रह्म, हरिवंश व मत्स्य यांत आढळतात. इक्ष्वांकुवंशांत नाहींत, पण इक्ष्वाकुवंशांतले म्हणून प्रसिद्ध असणारे राजे, असमाति ऐक्ष्वाक, क्षेमदार्शि, ६ सुवीर हे होत. कांहीं पुराणांनीं मध्येंच वंशावळ पुरी केली आहे. ब्रह्मपुराणानें नलावर, हरिवंशानें मरुवर व मत्स्यानें रामानंतर पंधरा लोक सांगूनच वंश संपविला आहे.

इक्ष्वाकुवंशांत क्षेमधन्वन्पासून हिरण्यनाभापर्यंत स्वतंत्र शाखा असावी व पुष्यापासून बृहद्रथापर्यंतची दुसरी शाखा असावी. कारण हिरण्यनाभ कौसल्य हा याज्ञवल्क्याचा गुरु होता. नाहींतर व्यासाच्या सामशिष्यपरंपरेंतील व याज्ञवल्क्याच्या समकालीन असणारा हिरण्यनाभ कौसल्य वेगळा कल्पावा लागतो. अशी परंपरा असण्याला आधार विशेषसा मिळत नाहीं. म्हणून हें निश्चयानें बोलतां येत नाहीं. विधृति व परीक्षित् यांचें स्कंदपुराणावरून आढळणारें समकालीनत्व फक्त याला पोषक असें आढळतें. तसेंच क्षत्रियत्वाची परंपरा कलियुगाच्या शेवटापर्यंत टिकविणारे देवापि व मरु यांमुळें समकालीन दाखवितां येतात. रामानें कुशाला अयोध्येस व लवाला श्रावस्तीस राज्याभिषेक केला. पुढें लवाचा स्वतंत्र वंश दिलेला आढळत नाहीं. पण बुद्धाचा जन्म श्रावस्तीच्या शाखेंत झाल्याचें आढळून येतें. श्रावस्तीस बुद्धाचा जन्म झाला व प्रसेनजित् राज्य करीत होता. पण अयोध्येंत कोण होते व त्या शाखेचें काय झालें याचा निर्देश नाहीं. कदाचित् रामानंतर अयोध्येचें वर्चस्व कमी होऊन लवाची शाखा व श्रावस्तीलाच महत्त्व आलें असावें. महापद्म नंदाच्या वेळीं क्षेमक हा शेवटला पुरुष होता.


**दिष्ट**—हा मनूचा पुत्र. याचें नांव नाभानेदिष्ट, नेदिष्ट वगैरे अनेक प्रकारें येतें. याचा वंश अनेक ठिकाणीं येतो (ब्रह्मांड. ३. ६१. ३; वायु. २. २४. ३; लिंग. १.६६. ५३; मार्क. ११०–१३३; विष्णु. ४. १. १६; गरुड. १. १३८. ६; भा. ९. २. २३; वा. रा. बा. ४७. ११; म. आश्व. ४. ४ कुं.). प्रमतिपर्यंत हा वंश आढळतो. प्रमति हा दशरथाच्या समकालीन असून राम विश्वामित्राबरोबर मिथिलेस चालला असतां त्याला भेटला होता. यांच्यापैकीं विशाल राजानें वैशाली नगरी बसविली. तेथून या वंशाला वैशाल असें म्हणतात. थोड्या फरकानें हा वंश चहूंकडे सारखाच आहे. या वंशांतील भलंदन, वत्सप्री व संकील हे वैश्य जातीचे मंत्रकृत् म्हणून दिले आहेत (मत्स्य. १४५. ११६-११७; ब्रह्मांड. २. ३२. १२१–१२२). पण वत्सप्री भालंदनाचींच फक्त सूक्तें आढळतात हे पुनः क्षत्रिय झाल्याची कथा आहे (सुप्रभा पहा). तसेंच हे ब्राह्मण झाल्याचेंहि आढळतें (ब्रह्म. ७. ४२).

**नरिष्यन्त**—(नरि.) मनूचा पुत्र. याचा वंश खालीलप्रमाणें फक्त भागवतांत आढळतो (भा. ९. २. १८)

यांत चित्रसेन, दक्ष, मीढ्वस्, कूर्च. इंद्रसेन, ~~धार्तिहोत्र,~~ सत्यश्रवस्, उरुश्रवस्, देवदत्त, कानीन जातुकर्ण्य व आग्निवेश्य असे पुरुष आढळतात. हें घराणे पुढें आग्निवेश्यायन ब्राह्मण झालें (भा. ९. २. २२). दिष्टवंशांतील नरिष्यंताशीं यांचा कांहीं संबंध नाहीं. याबद्दल मू. नरि. असा संक्षेप वापरला आहे.

**नभग**—हा मनूचा पुत्र. याचा वंश अनेक ठिकाणीं आढळतो (विष्णु. ४. २. २; भा. ९. ४; मत्स्य. १२. २०; लिंग. १. ६६. ५०; शिव. उ. ३६. २२; ब्रह्म. ७. २४; गरुड. १. १३८. १७; ब्रह्मांड. ३. ६३. ५; वायु. २. २६. ५). यांत नाभाग, अंबरीष, विरूप, पृषदश्व आणि रथीतर असे पुरुष आढळतात. हे पुढें आंगिरस झाले. रथीतराचा वेदांत संबंध आहे.

**निमि**—इक्ष्वाकूचा पुत्र. याचा वंश अनेक ठिकाणीं दिला आहे (ब्रह्मांड. ३. ६४. १; वायु. २. २७; विष्णु. ४. ५. ११; भा. ९. १३; गरुड. १. १३८. ४६; वा. रा. बा. ७१. ३; उ. ५७. १८). गरुडानें या वंशांत बराच फरक दिला असून हा वंश इक्ष्वाकूंतील प्रसुश्रुताला जोडिला आहे. भागवत, विष्णु व गरुड यांत शकुनि व स्वागत यांच्यामध्यें अंजन वगैरे बारा लोक अधिक दिले आहेत. स्वागत व सुवर्चस् हे विष्णु व भागवत यांत नाहींत, कदाचित् या दोन शाखा स्वतंत्रच असून सत्यरथ भारतीय युद्धांत असावा. रामायणांत सीरध्वजापर्यंतचेच कांहीं पुरुष दिले आहेत. तसेंच भागवतांत सीरध्वजापुढें पुढीलप्रमाणें अधिक माहिती आहे.




खांडिक्याचा वेदांत उल्लेख आहे.

या वंशांतील दुसरा पुरुष मिथि यानें मिथिला नगरी स्थापन केली व जनक हें सुप्रसिद्ध नांवहि यावरूनच पडलें. जनक हा शब्द व्यक्तिनामांना जोडून व केवळ असा वेदापासून सर्वत्र येतो.

यांपैकीं केशिध्वज मोठा तत्त्वज्ञानी होता व त्याचा चुलत भाऊ खांडिक्य यज्ञकुशल होता. महाभारतांत देवरात जनक याज्ञवल्क्याशीं समकालीन म्हणून दिला आहे. पण वंशावळी-प्रमाणें तें चुकीचें दिसतें. याज्ञवल्क्याशीं समकालीन असणारा जनक म्हणजे जनदेव किंवा उग्रसेन असावा. बहुलाश्वाला श्रीकृष्ण भेटला होता व कृति भारतीय युद्धांच्या वेळीं होता. भारतीय युद्धानंतर भागवतांत फक्त एक पुरुष दिला आहे. पण उग्रसेन, जनदेव वगैरे पुढेंहि कांहीं पुरुष या घराण्यांत असावेत. या वंशाकरितां विदेह, जनक, निमि वगैरे सामान्य शब्द वापरीत असले तरी आम्ही सर्वत्र सू. निमि. असा शब्द वापरला आहे. या वंशांत न आढळणारे, पण निमिवंशांतील म्हणून आढळणारे राजे उग्र, जनदेव, पुष्करमालिन्, माधव व शिरिध्वज.

निमिवंशांत शकुनीपुढें अंजनापासून उपगुप्तापर्यंतचे लोक फक्त कांहीं पुराणें देतात. त्यांवरून शकुनीपासून या दोन शाखा सुरू झाल्या असण्याचा संभव आहे. इतर पुराणांत अंजनादिकांचीं नांवें दिलीं नाहींत, याचें येथें दुसरेंहि एक महत्त्वाचें कारण आढळतें. वेदांत शकुनीला कुणि म्हटलें असून अंजनाला रजन म्हटलें आहे. कुणि, रजन, उग्रदेव, क्रतुजित् हीं नांवें वेदांतहि आहेत व ते यज्ञयागादि करीत आहेत, यावरून ते राजकीय दृष्ट्या कमी महत्त्वाचे झाले असावेत किंवा क्षत्रियत्व सोडून ब्राह्मणधर्माचा आचार करूं लागले म्हणून बहुतेक पुराणकारांनीं त्यांचीं नांवें जनक वंशांतून गाळलीं असावींत.

**नृग**—हा मनूचा पुत्र. याचा वंश सुमति, वसु व ओघवत् असा भागवतांत आढळतो ( भा. ९. २. १७ ).

**शर्याति**—हा मनूचा पुत्र. शार्यात वंश अनेक ठिकाणीं आला आहे ( विष्णु. ४. १. २०; भा. ९. ३; लिंग. १. ६६. ४७; ह. वं. १. १०; गरुड. १. १३८. १५; मत्स्य. १२. २१; वायु. २. २४. २३; ब्रह्मांड. ३. ६१. १८; ६३. १. ४; ब्रह्म. ७. २७; पद्म. सृ. ८; अग्नि. २७३. ११ ). यांत आनर्त, रोचमान, रेवत, ककुद्मिन् असे पुरुष आढळतात. ककुद्मिन्ची मुलगी रेवती बलरामाची पत्नी होय. याची राजधानी कुशस्थली ( द्वारका ). या घराण्याचा हैहयांत संबंध दिसतो. शर्यातीची कन्या सुकन्या च्यवनास दिली होती. शर्याति, सुकन्या व च्यवन यांची कथा वेदांत आहे.

## सोमवंश ( सो. )

**अजमीढ**—(अज.) अजमीढपुत्र बृहदिषूपासून हा वंश सुरू झाला. हें दक्षिणपांचालाचें राजघराणें असून हा वंश सहा पुराणांत दिला आहे ( वायु. २. ३७. १६६; मत्स्य. ४९. ४७; ह. वं. १. २०; विष्णु. ४. १९. ११; गरुड. १. १४०. १०; भा. ९. २१. २२ ). मत्स्यांत बृहत्नें आरंभ होणारीं दोन नांवें दिलेल्या नांवांपेक्षां अधिक आहेत. तसेंच नीपानंतर काव्यापासून समर झाल्याचें दिलें आहे. गरुडांत शेवटले तीन गाळले आहेत. भागवतांत बऱ्याच पिढ्या गाळल्या आहेत. विष्णूंत शेवटला जनमेजय नाहीं. यांची राजधानी दक्षिण पांचालांतील कांपिल्य होय.

**अनु**—हा ययातीचा पुत्र. याचा वंश अनेक ठिकाणीं आला आहे ( ब्रह्मांड. ३. ७. १२; वायु. २. ३७. १२; ब्रह्म. १३. १५; ह. वं. १. ३; मत्स्य. ४८. १०; विष्णु. ४. १८; भा. ९. २३; अग्नि. २७७. ५; गरुड. १. १३९. ६८ ). हा वंश सर्वत्र बहुतेक सारखा आहे. फक्त ब्रह्म व हरिवंश यांत हा वंश पौरववंशांतील रौद्राश्व राजाचा पुत्र कक्षेयु याच्या-पासून निघाला असें दिलें आहे. हयांपैकीं कांहींचा समावेश या वंशांत असाच चुकीचा दिसतो. अनूपासून आठवा पुरुष महामनस् याला उशीनर व तितिक्षु असे दोन पुत्र होते. त्यांच्यापासून या वंशाच्या दोन शाखा झाल्या. उशीनर शाखेंतून केकय व मद्रक लोक निघाले व तितिक्षुशाखेंतील लोकांनीं अंग, वंग, कलिंग, सुह्म व पुंड्र हे भाग आक्रमिले. या वंशांतील असण्याचा संभव असलेले लोक अनिल, कोटिक व सुरथ होत.

**अमावसु**—( अमा. ) पुरूरवसूचा पुत्र. याचा वंश अनेक ठिकाणीं आला आहे ( ब्रह्मांड. ३. ६६. २२; वायु. २. २९. ४९; ब्रह्म. १०. १३; ह. वं. १. २७; विष्णु. ४. ७. २; भा. ९. १५. ३; गरुड. १. १३९. ३; वा. रा. बा. ३२-३४; म. आ. १०१. २१; शां. ४८; अनु. ७ कुं. ). भागवतांत याला विजय म्हटलें आहे.

रामायणांतील व महाभारत शांतिपर्वांतील वंश जुळतो. पण अग्नि व महाभारत अनुशासनांतील वंशांत जह्नूला भरतवंशज ठरविलें आहे व आदिपर्वांत याचा अजमीढाशीं संबंध जोडला आहे. किरकोळ पाठभेदांशिवाय एकवाक्यता आहे. भरत किंवा भरतर्षभ कोणालाहि महत्त्व देण्याकरितां म्हणून असत. त्याप्रमाणें ऋग्वेदादि ग्रंथांत विश्वमित्राला लाविलें असावें. हें घराणें कान्यकुब्जांत राज्य करीत होतें.

**आयु** ( पुरूरवस् पहा ).

**उशीनर**--( उशी. )-( अनु पहा ).

**ऋक्ष**--अजमीढाचा पुत्र. यांपैकीं तिसरा पुरुष कुरु होय. त्याचा पुत्र जह्नू त्यापासून कुरुवंश सुरू झाला आणि नववा वसुपुत्र बृहद्रथ याच्यापासून मगधांत राज्य करणारा मगधवंश सुरू झाला. त्यांशिवाय या वंशांतील लोकांना आम्हीं सो. ऋक्ष. असा संक्षेप वापरला आहे.

**काश्य**--( क्षत्र पहा ).

**कुकुर**--( यदु पहा ).

**कुरु**--( पुरूरवस् पहा ).

**क्रोष्टु**--( यदु पहा ).

**क्षत्रवृद्ध**--( क्षत्र. ) हा पुरूरवसपुत्र आयूचा पुत्र. याचा पुत्र सुनहोत्र किंवा सुहोत्र यापासून हा वंश सुरू झाला. या वंशापैकीं अभिभू ( सुविभु ) व सुकुमार हे भारतीय युद्धांत होते. हा वंश अनेक ठिकाणीं दिला आहे ( ब्रह्मांड. ३. ६६. २; वायु. २. ३०. १; ब्रह्म. ११. ३२; ह. वं. १. २९; विष्णु ४. ८; गरुड. १. १३९. ९; भा. ९. १७. २). भागवतांत काश्य व दीर्घतपस् यांमध्यें काशि व राष्ट्र हीं दोन नावें अधिक आढळतात. पहिल्या दिवोदासापासून दुसऱ्या दिवोदासापर्यंतचीं नांवें महाभारत व काल या दृष्टींनीं कल्पावीं लागतात. हरिवंश, ब्रह्म व अग्नि यांमध्यें पौरव सुहोत्रापासून हा वंश सुरू केला आहे. पण ते हैहयाशीं तुलना करितां बरोबर नाहीं. यांची राजधानी काशी. यांची व हैहयांचीं अनेक पिढ्या युद्धें चालू होतीं. यांचा पुरोहित भरद्वाज.

क्षत्रवृद्धाचा दुसरा पुत्र प्रतिक्षत्र. त्यापासूनहि एक शाखा सुरू झाली आहे. त्यांत सुमारें दहा ते तेरा लोक आहेत. त्यांची स्थळें व समकालीनता शोधावयास पाहिजे. या वंशावळींत न सांपडणारे पण इतरत्र काशीचे राजे म्हणून आढळणारे लोक अंबेचा पिता, अजातरिपु, धृतराष्ट्र वैचित्रवीर्य, ययाति, सुबाहु, सुवर्णवर्मन् व होमवाहन हे होत.

**चेदि** किंवा **चैद्य**--यांचा वसु चैद्याचा पुत्र प्रत्यग्रह व विदर्भपुत्र चिदि अशा दोघांपासून संभव दिसतो. पण दोन्ही ठिकाणीं पुढें नांवें नाहींत. विष्णु व भागवत यांखेरीज पुराणांत जरासंध हा कुशाग्राचा भाऊ न मानतां बराच पुढला म्हणजे कुशाग्रादिकांच्या पुढला वंशज मानला आहे.

खालील नांवें चैद्य म्हणून आलीं आहेत, पण वंशावळींत नाहींत. कशु चैद्य, कौशिक, ३ चित्र, चिदि कौशिकपुत्र, ३ दंडधार, दमघोष, ४ देवापि, धृष्टकेतु, ३ शलभ, शिशुपाल, सिंहकेतु, १० हरि.

**जह्नु**--जह्नु व कुरु एकच ( पुरूरवस् पहा ).

**तुर्वसु**--ययातीचा पुत्र. याचा वंश अनेक ठिकाणीं दिला आहे ( ब्रह्मांड ३. ७४. १; वायु. २. ३७. १; ब्रह्म. १३. १४२; ह. वं. १. ३२; विष्णु. ४. १६; भा. ९. २३. १६; अग्नि. २७७. १; गरुड. १.१३९. ६५; मत्स्य. ४७). अग्निपुराणांत द्रुह्युवंशीय गांधाराचा या वंशांत समावेश केला आहे. मत्स्य, विष्णु, गरुड व भागवत यांत दुष्यन्तापासून पुढचा भाग नाहीं. यांतील मरुत्त किंवा भरत यानें पौरव दुष्यन्तास दत्तक घेतलें व हा वंश पौरवांत समाविष्ट झाला. पांड्य, चोल, केरल व कुल्य हीं दक्षिणेंतील राज्यें यांनीच शेवटल्या लोकांनीं स्थापन केलीं. वेदांत कुरुंगाला तुर्वसुवंशांतील धरलेलें आहे. तुर्वसु हा म्लेच्छांचा राजा होता. हरिवर्मन् वंशावळींत नाहीं.

**द्रुह्यु**--ययातीचा पुत्र. याचा वंश अनेक ठिकाणीं आढळतो (ब्रह्मांड. ३. ७४. ७; वायु. २. ३७. ७; ब्रह्म. १३. १४८; ह. वं. १. ३२; मत्स्य. ४८. ६; विष्णु. ४. १६; गरुड. १. १३९. ६६; अग्नि. २७७. ४; भा. ९. २३. १४ ). ब्रह्म. व हरिवंश यांनीं यांतील गांधारीपासूनची वंशावळ अनुवर घेतली आहे. शेवटीं हे उत्तरकडे जाऊन म्लेच्छपति झाले. द्रुह्यूचा वेदांत उल्लेख आहे.

**द्विमीढ**--हा हस्तिन् पौरवाचा पुत्र. यांचा वंश अनेक ठिकाणीं आहे (वायु. २. ३७. १८०; मत्स्य. ४९. ७०; ह. वं. १. २०; विष्णु. ४. १९. १३; गरुड. १. १४०. १४; भा. ९. २१. २७ ). आम्ही वायुप्रमाणें नांवें व क्रम दिला आहेत. मत्स्य व हरिवंश यांत हा वंश अजमीढाचा म्हणून दिला आहे. विष्णूंत भल्लाटाचा पुत्र द्विमीढ असें चुकीनें उत्पन्न झालेल्या पाठानें वाटतें. भागवत, विष्णु व गरुड यांत सुवर्मन् (सुधर्मन्) पासून रुक्मरथापर्यंतचे राजे गाळले आहेत. भागवतांत उग्रायुधाला नीप म्हटलें आहे. उग्रायुधानें भल्लाटपुत्र जनमेजयाचा वध करून दक्षिण पांचालाची गादी मिळविली. भीष्मानें उग्रायुधाला ठार केला.

**नील**--हा अजमीढ व नलिनी यांचा पुत्र. याचा वंश अनेक पुराणांत आला आहे ( वायु. २. ३७. १८९; मत्स्य. ५०. १; ह. वं. १. ३२; ब्रह्म. १३. ९३; विष्णु. ४. १९. १५; अग्नि. २७८. १८; गरुड. १. १४०. १७; भा. ९. २१. ३०). नील व रिक्ष हरिवंश, ब्रह्म व अग्नि यांत नाहींत.

पण सृंजय यांतच फक्त जास्त आहे. सहदेव मत्स्यांत नाहीं. विष्णु, गरुड व भागवत यांत मैत्रेय नाहीं. बाकीच्या वंशाबद्दल मतैक्य आहे.

भर्म्याश्वाच्या पांच पुत्रामुळें दिल्लीच्या आग्नेयेस गंगेच्या दक्षिणोत्तर भागास पांचाल हें नांव मिळालें. त्यापैकीं उत्तरेकडील भागाचें राज्य या घराण्याकडे होतें. याची राजधानी अहिच्छत्र. मुद्गल वध्र्याश्व, दिवोदास, सुदास, पृषत् व द्रुपद हे या घराण्यांतील प्रसिद्ध पुरुष होत. सृंजयापासून सृंजय व सोमकापासून सोमक असे लोक निर्माण झाले. द्रोण द्रुपदाला सोमकि म्हणतो ( म. आ. १४१. ६१ कुं. ).

ऋग्वेदांतील दाशराज्ञयुद्धांत दहा राजांविरुद्ध लढणारा सुदास या वंशापैकीं होय. थोड्या फरकानें या वंशांतील बऱ्याच लोकांचा निर्देश ऋग्वेदांत सांपडतो. असें नामसाम्यावरून वाटतें.

पांचालांच्या वंशावळींत न आढळणारे पण पांचालवंशज, म्हणून प्रसिद्ध असणारे लोक—उत्तमौजस्, केशिन् दार्भ्य, कोक, २ गोपति, ८ चंद्रकांत, चंद्रदेव, ३ चित्रवर्मन्, चित्रसेन, चित्रायुध, जयंत, तपन, ४ दंडधार, दुर्मुख, पुरुयशस्, पृषत, प्रतीदर्श श्वैक्न, प्रवाहण जैवलि, भद्रसेन, भानुदेव, व्याघ्रदत्त, शोण, सत्रासह, सुहन्.

पुरूरवस्—पुरूरवस्पासून ययातिपुत्र पूरुपर्यंतच्या लोकांना आम्हीं पुरूरवस् वंशांतील म्हटलें आहे व आयुपुत्र अनेनस् वंशाला सो. आयु. म्हटलें आहे.

पूरु—ययातिपुत्र पूरूपासून हा वंश सुरू झाला. या वंशाचे तीन भाग पडतात. पूरूपासून अजमीढापर्यंत एक भाग, अजमीढापासून कुरूपर्यंत दुसरा भाग व कुरुपुत्र जह्नूपासून पांडवांअखेर तिसरा भाग. पहिल्या भागास सो. पूरु. असा वंशसंक्षेप वापरला असून तिसऱ्या भागास सो. कुरु. किंवा सो. जह्नु असें म्हटलें आहे. दुसरा भाग सो. ऋक्षांत आला आहे. हा वंश अनेक ठिकाणीं आढळतो ( वायु. २. ३७. ११६; ब्रह्म. १३. २-८; ५०-६३; ८०-८१; ह. वं. १.२०. ३१-३२; मत्स्य. ४९. १; विष्णु. ४. १९; भा. ९. २०-२१; अग्नि. २७८. १; गरुड. १. १३९; म. आ. ६१३; ८८; १०१ कुं. ). ह. वं. १. २० मध्यें हा वंश विभागशः आढळतो. पहिल्या भागासंबंधीं पुराणांत मतैक्य आहे. महाभारतांत आदिपर्वांत हा तीन ठिकाणीं सांगितला असून ६३ व्या अध्यायांत संपूर्ण आहे व ८८ आणि १०१ मधील मिळून एक होतो. अहंयाति व अन्त्यनार यांमध्यें १ सार्वभौम, २ जयत्सेन, अपराचीन, ३ अरिह, ४ महाभौम, ५ अयुतानायिन्, ६ अक्रोधन, ७ देवातिथि, ८ ऋच् व ऋक्ष हीं नांवें ६३ व्या अध्यायांत आढळतात. पण हीं आठ नांवें पुराणांत पुढें सुरथ व भीमसेन यांच्यामध्यें घेतलीं आहेत. रौद्राश्व व ऋचेयु अजिबात गाळले आहेत. दुसऱ्या ठिकाणीं पुराणासारखी पण तुटक यादि आहे, तेथेंच त्यांचा अंगराजकन्यांशीं व कलिंग कन्येशीं विवाह केल्याचें दिलें आहे. तें महाभारताप्रमाणें हे पूर्वी धरल्यास अशक्य आहे. कारण हीं राज्यें कालदृष्ट्या पुढें स्थापन झालीं आहेत. तसेंच पुराणाप्रमाणें पुढें दिले तरी त्रिशंकु व कृतवीर्य कन्यांशीं संबंध अशक्य दिसतो. तात्पर्य कोणत्याहि ठिकाणीं ही यादि महाभारताच्या वर्णनाप्रमाणें बसूं शकत नाहीं. महाभारतानें पुराणांत दुरुस्ती करण्याचा केलेला हा प्रयत्न दिसतो.

तंसु व दुष्यन्त यांच्यामध्यें इलिन, अनिल किंवा इलिना अशीं नांवें आढळतात. पुढें हस्तिन्‌ला अजमीढ व द्विमीढ असे पुत्र झाले. द्विमीढानें स्वतंत्र वंश सुरू केला. अजमीढाला नील, बृहदिषु व ऋक्ष असे तीन पुत्र होते. त्या प्रत्येकानें स्वतंत्र वंश सुरू केला. त्यांपैकीं ऋक्षाच्या वंशांतून पुढें सुप्रसिद्ध कुरुवंश निघाला.

कुरूला परीक्षित्, जह्नु व सुधन्वन् असे तीन पुत्र होते. सुधन्व्याच्या वसु नांवाच्या वंशजानें मगध व चेदि येथील राज्यें स्थापन केलीं. परीक्षित्‌ला जनमेजय व जनमेजयाला श्रुतसेन, उग्रसेन व भीमसेन असे तीन पुत्र होते. जह्नूपासून पूरुवंश चालू राहिला व कुरु या नांवानें प्रसिद्धीस आला. हस्तिनापुरची गादी जनमेजय दुर्वर्तनी असल्यामुळें त्यास न मिळतां ज[ह्नु]पुत्र सुरथास मिळाली. पुढें अभिमन्यूपर्यंतच्या वंशांत विशेष मतभेद नाहीं.

मगध व चैद्यवंश कुरुपुत्र सुधन्व्याच्या वंशांतील वसूनें स्थापन केला. चेदीचा वंश दमघोष व शिशुपालांपलीकडे विशेषसा आढळत नाहीं. पण मगधवंश अनेक ठिकाणीं दिला आहे ( मत्स्य. ५० २३; विष्णु. ४. १९. १९; भा. ९. २२. ४; ह. वं. १. ३२; ब्रह्म. १३. १०९ टीप; वायु. २. ३७. २१७; गरुड. १. १४०. २५; अग्नि. २७८. २७). वसूला बृहद्रथ (मगध), प्रत्यग्रह(चेदि), कुशांबा(कौशांबी), मत्स्य ( करूष ) व मावेल्ल असे पांच पुत्र होते. बृहद्रथ व जरासंध यांमधील नांवें भागवत व विष्णु या पुराणांत स्वतंत्र शाखा म्हणून असून वायु वगैरे कांहीं पुराणांत या दोघांच्यामध्यें दिलीं आहेत.

कुरुवंशावळींत आढळत नाहींत, पण कौरव म्हणून प्रसिद्ध असलेले लोक पुढे दिले आहेत. अभिप्रतारिन् काक्षसेनि, उच्चैःश्रवस्, कौपेय, पौरव, बाह्लिक प्रातिपीय, ब्रह्मदत्त चैकितानेय.

यदु—यदुपुत्र क्रोष्टूपासून हा वंश सुरू झाला. या वंशाचे दोन भाग आहेत. क्रोष्टूपासून सात्वतापर्यंत एक भाग व

बाकीचा भाग दुसरा होय. हे दोन्ही भाग अनेक पुराणांत दिले आहेत ( ब्रह्मांड. ३. ७०. १४; वायु. २. ३३. १४; ब्रह्म. १५. १; ह. वं. १. ३६; २. ३७-३८; मत्स्य. ४४. १४; पद्म. सृ. १३; लिंग. १. ६८. २१; कूर्म. १. २४; विष्णु. ४. १२; भा. ९. २३. ३०; अग्नि. २७५. १२; गरुड. १. १३९. २६ ). महाभारत ( अनु. २५१. २६ कुं. ) व ह. वं. यांत विभागशः हा वंश आला आहे. क्रोष्टूपासून पृथुश्रवसपर्यंत सर्वांत एकवाक्यता आहे.

पृथुश्रवस्, उशनस्, रुक्मकवच व निर्वृति यांनंतर कांहीं पुराणांत एकेक पिढी जास्त आहे. मधूपासून सात्वतापर्यंतच्या व सात्वतापासून पुढील वंशांत फारच मतभेद आहे. सात्वतपुत्र अंधक व वृष्णि यांपासून दोन शाखा सुरू झाल्या. ब्रह्म व हरिवंश यांत वृष्णीच्या ऐवजी क्रोष्टु असा शब्द आहे व या वृष्णींत कृष्ण झाल्याचें दिलें आहे. पण इतरत्र सात्यकि आणि अक्रूर झाले व अंधकपुत्र कुकुर व भजमान यांपासून दोन शाखा सुरू झाल्या. त्यांत अनुक्रमें कंस व कृष्ण झाले. भीम-सात्वतापासून या वंशाला वृष्णि या नांवानेंहि संबोधितात. आम्ही कुकुरादि वंशांतील नांवें विष्णुपुराणाप्रमाणें कोष्टकांत घेतलीं आहेत. व बाकीची नांवें कंसांत दिली आहेत. कूर्मांत विदर्भपुत्र रोमपादाची स्वतंत्र शाखा दिली असून तींत तेरा लोक आहेत. त्यांचीं नांवें—रोमपाद, बभ्रु, आहुति, श्वेत, विश्वसह, कौशिक, सुमन्त, अनल, श्वेनि, द्युतिमत्, वपुष्मत्, बृहन्मेधस्, श्रीदेव आणि वीतरथ. शूरपुत्र वसुदेवाची संतति आम्ही वसुदेवशब्दावर दिली आहे. व त्याकरितां सो. वसु. असा संक्षेप वापरला आहे. विदूरथपुत्र राजाधि-देवापासून समौजसपर्यंत आम्ही सो. विदू. असा संक्षेप वापरला आहे. या वंशांतील असण्याचा संभव असलेला आयांग प्रायोगि होय.

**वसुदेव**—( यदु पहा ).

**विदूरथ**—( यदु पहा ).

**वृष्णि**—( यदु पहा ).

**सहस्रजित्**—( सह. ) हा यदूचा पुत्र व क्रोष्टूचा भाऊ. याचा वंश अनेक ठिकाणीं दिला आहे ( ब्रह्मांड. ३. ६९. ३; वायु. २. ३२. ३; विष्णु. ४. ११; भा. ९. २३. २०; मत्स्य. ४३. ७; ब्रह्म. १३. १५४; लिंग. १. ६८. ३; पद्म. सृ. १२; कूर्म. १. २२. १३-२१; २२. १-४; ४५; ह. वं. १. ३३; अग्नि. २७५. १; गरुड. १. १३९. २१ ). शेवटल्या तीन पुरुषांखेरीज बाकीच्या वंशांत मतैक्य आहे. शेवटले तीन पुरुष व मधील कांहीं यांत पाठभेद आहेत. तालजंघ हें व्यक्तीचें नांव असलें तरी पुढें तेंच संघाचें नांव झालें. त्या संघांत वीतिहोत्र, भोज, आनर्त ( आवन्ति ), तुंडिकेर ( कुंडिकेर ) व शार्यात हे सामील होते. ब्रह्म व हरिवंश यांत यांशिवाय भरत हें एक नांव अधिक आढळतें. यांना हैहेय असें सामान्य नांव आहे. यांचा देश शूरसेन ( ह. वं. १.३३ ). यांची राजधानी माळव्यांतील माहिष्मती होती. यांचे पुरोहित भार्गव होत. शिवाय दत्त ( अत्रि ), वसिष्ठ, परशुराम, जमदग्नि व पुलस्त्य यांचा यांच्याशीं संबंध होता. यांपैकीं वृषणापासून वृष्णि झाले असें म्हटलेलें आढळतें ( ब्रह्म. १३. २०६ ). हैहयवंशांतील वीतहव्य भृगूंच्या वंशांत सामील होऊन ब्राह्मण बनला. क्षत्रियांचा राज्याधिकारी वंश राज्यभ्रष्ट झाल्यावर कितीहि उत्कर्षास चढला किंवा वाढला तरी पुराणांतील राजांच्या वंशावळींत त्याला स्थान मिळत नसे. वीतहव्याचा पुढील वंश हें त्याचें उदाहरण आहे. महाभारतांत वीतहव्यानंतर शौनकापर्यंतचा वंश दिला आहे. पण पुराणांत वीतहव्यापाशीं हैहयवंश पुरा केला आहे. याशिवाय या वंशांच्या नांवानें प्रसिद्ध असलेले लोक पुढे दिले आहेत. एकवीर, कुमार, शशिबिंदु.

**हैहय**—( सहस्रजित् पहा ).

## स्वायंभुवमनुवंश ( स्वा. )

**उत्तानपाद**—हा स्वायंभुव मनूचा पुत्र म्हणजे प्रिय-व्रताचा भाऊ होय. या वंशांतील व्यक्ति भागवताप्रमाणें आम्ही दिल्या आहेत. याच वंशांतील ध्रुव व वैन्य पृथु या प्रसिद्ध व्यक्ति झाल्या आहेत. हा वंश हविर्धानाच्या संततीपर्यंत दिलेला आढळतो ( भा. ४. ८ ).

**प्रियव्रत**—( प्रिय. ) हा स्वायंभुव मनूचा पुत्र होय. प्रियव्रतापासून विरजापर्यंत हा वंश भागवतांत दिला आहे ( ५. १ ). याच्या पुत्राकरितां प्रथम भूविभाग करून सत्ता विभागण्यांत आली. यांच वंशांतील नाभीपासून पुढला वंश विष्णु पुराणांत सांगितला आहे ( २. १ ) व तो भागवतापेक्षां दोन पिढ्या जास्त दिला आहे. याकरितां स्वा. प्रिय. व स्वा. नाभि. असें संक्षेप आम्हीं वापरले आहेत.

## भविष्य—वंश

**मगध**—भारतीय युद्धानंतर झालेले मगध देशांतील बार्हद्रथ राजेः—

| विष्णुपुराण | वायुपुराण | मत्स्यपुराण |
|---|---|---|
| जरासंध | जरासंध | जरासंध |
| सहदेव | सहदेव | सहदेव |
| सोमापि ( मार्जारि ) | सोमाधि( सोमापि ) ५८ | सोमाधि ५८ |
| श्रुतवत् ( श्रुतश्रवस् ) | श्रुतश्रवस् ६४,( ६७) | श्रुतश्रवस् ६४ |
| अयुतायुत ( अयुतायु ) | अयुतायु २६ | अप्रतिकर्मन् ३६ |

| | | |
|---|---|---|
| निरमित्र | निरामित्र १०० | निरमित्र ४० |
| सुक्षत्र ( सुनक्षत्र ) | सुकृत्त ( सुक्षत्र ) ५६ | सुरक्ष ५५ |
| बृहत्कर्मन् ( बृहत्सेन ) | बृहत्कर्मन् २३ | बृहत्कर्मन् २३ |
| सेनजित् ( कर्मजित् ) | सेनाजित् २३ | सेनाजित् ५० |
| श्रुतंजय ( शृतंजय ) | श्रुतंजय ४० | श्रुतंजय ४० |
| विप्र | महाबाहु ३५ | विभु २८ |
| शुचि | शुचि ५८ | शुचि ६४ |
| क्षेम्य ( क्षेम ) | क्षेम २८ | क्षेम २८ |
| सुव्रत | भुवत ( सुव्रत ) ६४ | अनुव्रत ६० |
| धर्म ( धर्मसूत्र ) | धर्मनेत्र ५ | सुनेत्र २५ |
| | नृपति ५८ | निवृत्ति ५८ |
| सुश्रम ( श्रम ) | सुव्रत ( सुश्रम ) ३८ | त्रिनेत्र २८ |
| दृढसेन ( द्युमत्सेन ) | दृढसेन ५८ | द्युमत्सेन ४८ |
| सुमति | सुमति ३३ | महीनेत्र ३३ |
| सुचल ( सुबल ) | सुचल २२ ( नाहीं ) | अचल ३२ |
| सुनीत ( सुनीथ ) | सुनेत्र ४० | |
| सत्यजित् | सत्यजित् ८३ | |
| विश्वजित् | वीरजित् ( विश्वजित् २५ ) | |
| रिपुंजय | अरिंजय ५० | रिपुंजय ५० |

सहदेवपुत्र सोमापीपासून हा वंश सुरू झाला. हा वंश अनेक पुराणांत दिला आहे ( ब्रह्मांड. ३. ७४; वायु. २. ३७; मत्स्य. २७३; विष्णु. ४. २३; भा. ९. २२ ). सर्वत्र विष्णुपुढें भागवतांतील व वायुपुढें ब्रह्मांडांतील पोटभेद दिले आहेत. हा वंश रिपुंजयाच्या तेथें संपतो. बृहद्रथापासून या वंशांत बत्तीस राजे झाले व त्यांनीं एक हजार वर्षे राज्य केलें. भागवतांत कर्मजित् आहे, त्याबद्दल इतर पुराणांत सेनजित् असा पाठ आहे. सेनजित् राज्य करीत असतां मत्स्य, वायु व ब्रह्मांड पुराणें लिहिलीं गेलीं. सुनीथ, सत्यजित्, व विश्वजित् या तीन पिढ्या मत्स्यांत नाहींत. पुराणांत सर्वच राजे सांगितले नसून प्राधान्यतः सांगतों असें याविषयीं म्हटलें आहे. याशिवाय मागध म्हणून पुढील राजे आढळतात. अबुवोन्त्र, इंद्रद्युम्न, ४ इंड, ३ जयत्सेन, ३ जयसेन, ३ जलसंध, दीर्घ, ४ शूर.

**प्रद्योत**—

| विष्णु. | वायु. | मत्स्य. |
|---|---|---|
| प्रद्योत | ,, २३ | ,, २३ |
| पालक | ,, २४ | ,, २८ |
| विशाखयूप | ,, ५० | ,, ५३ |
| जनक ( राजक ) | अजक ३१ ( २१ ) | सूर्यक २१ |
| नंदिवर्धन | वर्तिवर्धन ( २० | ,, ३० |
| | १४८ | १५५ |

राजे पांच व वर्षे १३८. एकशेंअडतीस बेरीज कोणत्याच पुराणाची जमत नाहीं. ब्रह्मांडांत प्रद्योताचीं वर्षे २३ धरल्यास ब्रह्मांडाप्रमाणें १३८ वर्षे होतील. याचा काल इ. स पू. ६८९-५५२ हा होय. मगधांत बार्हद्रथघराणें रिपुंजयापाशीं संपलें. पण त्याचें राज्य कोणीं घेतलें, वगैरेंचा निर्देश नाहीं. प्रद्योतघराणें मगधानंतर नेमकें सुरू झालेलें नाहीं. मध्यें अवन्तीस वीतिहोत्र उदयास आले होते. त्यांपैकीं एकाचा खून करून शुनक नांवाच्या प्रधानानें आपला मुलगा प्रद्योत गादीवर बसविला.

**शिशु**—

| भागवत. | वायु. | मत्स्य. |
|---|---|---|
| शिशुनाग | शिशुनाग | शिशुनाक ४० |
| काकवर्ण | शकवर्ण ३६ ( काकवर्ण ) | काकवर्ण २६ |
| क्षेत्रधर्मन् | क्षेमवर्ण ३६ (क्षेमधर्मन्) | क्षेमधर्मन् ३६ |
| क्षेत्रज्ञ (क्षत्रौजस्) | अजातशत्रु(क्षत्रौजस्) ४० | क्षेमजित् २४ |
| विधिसार (बिंदुसार) | क्षत्रौजस् ४० (विधिसार ३८) | विन्ध्यसेन २८ |
| | | कान्वायन ९ |
| | | भूमिमित्र १४ |
| अजातशत्रु | बिंबिसार २८(अजातशत्रु२५) | अजातशत्रु २७ |
| दर्भक | दर्शक २५ ( दर्भक ) | वंशक २४ |
| अजय (उदयन) | उदायी ३३ | उदासीन ३३ |
| नंदिवर्धन | नंदिवर्धन ४० ( ३३ ) | नंदिवर्धन |
| महानंदी | महानंदी ४३ | महानंदी |

प्रद्योतांतील शेवटला राजा नंदिवर्धन. त्याचा पाडाव करून काशीचा शिशुनाग मगधचा राजा झाला. या घराण्यांत शिशुनागासुद्धां सुमारें दहा पुरुष झाले. त्यांनीं विष्णु व वायु यांच्या मतें तीनशेंपासष्ट व मत्स्य, भागवत व ब्रह्मांड यांच्या मतें तीनशेंसाठ वर्षे राज्य केलें. इतरांपेक्षां अजातश - वायुमध्यें दोन पिढ्या मागें घेतला आहे. मत्स्यांमध्यें विंध्यसेन व अजातशत्रु यांच्यामध्यें कान्वायन व भूमिमित्र असे दोन राजे जास्त दिले आहेत. या वंशांतील अजातशत्रूच्या वेळेस गौतमबुद्ध उदयास आला.

**नंद**—या वंशांत एकंदर नऊ राजे झाले. यांपैकीं पहिला पुरुष महापद्म नंद किंवा महापद्म. त्यानें अठ्ठ्यायशीं वर्षे राज्य केलें. यानंतर ( मत्स्याप्रमाणें सुकल्पादि ) आठ राजे झाले. त्यांनीं बारा वर्षे राज्य केलें. म्हणजे या वंशानें शंभर वर्षे राज्य केलें. यांपैकीं महापद्मानें सर्व क्षत्रिय घराणीं धुळीस मिळविलीं. हा दुसरा परशुराम होय. यानंतर कौटिल्यानें यांचा संहार केल्यानें मौर्यांकडे राज्य गेलें, या

वंशांतील नऊ नांवें फक्त भविष्यपुराणांत पुढीलप्रमाणें दिलीं आहेत. १ नंदसुत, २ प्रनंद, ३ परानंद, ४ समानंद, ५ प्रियानंद, ६ देवानंद, ७ यज्ञदत्त, ८ मौर्यानंद, ९ महानंद. यांचा काल इ. स. पू. ४२२–३२२ होय.

**मौर्य—**

| विष्णुपुराण | वायुपुराण | मत्स्यपुराण |
|---|---|---|
| चंद्रगुप्त | चंद्रगुप्त २४ | शतधन्वा ६ |
| बिंदुसार ( वारिसार ) | भद्रसार २५ | बृहद्रथ ७० |
| अशोकवर्धन | अशोक २६ (३६) | शक ३६ |
| सुयशस् | कुनाल ( कुशाल ) ८ | त्याचा नातू ७० |
| दशरथ | बंधुपालित ८ (१०) | दशरथ ८ |
| संगत | इंद्रपालित १० | |
| शालिशूक | देववर्मन् ७ | |
| सोमशर्मा | शतधर ८ ( शतधनु ) | |
| शतधन्वन् | बृहदश्व ७ | |
| बृहद्रथ | १२५ वायु. | |
| | १३७ ब्रह्मांड. | |

एकंदर दहा राजे, यांनीं १३७ वर्षें राज्य केलें. विष्णुपुराण व वायुपुराण यांतील राजांच्यापुढें कंसांत अनुक्रमें भागवत व ब्रह्मांडपुराण यांतील पाठभेद दिले आहेत. मत्स्यपुराणांतील वंशावळ अगदींच चमत्कारिक असून मागले गाळून पुढले अधिक दिलेले दिसतात. याचा काल इ. स. पू. ३२१–१८४ होय.

**शुंग—**

| विष्णुपुराण | वायुपुराण | मत्यपुराण |
|---|---|---|
| पुष्पमित्र | पुष्पमित्र ६० | पुष्यमित्र ३६ |
| अग्निमित्र | ( अग्निमित्र ८ ) | |
| सुज्येष्ठ | ज्येष्ठ ७ ( सुज्येष्ठ ) | वसुज्येष्ठ ७ |
| वसुमित्र | वसुमित्र १० | वसुमित्र १० |
| आर्द्रक ( भद्रक ) | ध्रुक २ ( भद्र ) | अंतक २ |
| पुलिन्दक ( पुलिंद ) | पुलिंदक ३ | पुलिंदक ३ |
| घोषवसु ( घोष ) | घोषसुत ३ | |
| वज्रमित्र | विक्रमित्र ३ ( वज्रमित्र ७ ) | वज्रमित्र १ |
| भागवत | भागवत ३२ | पुनर्भव ३२ |
| देवभूति ( देवभूमि ) | क्षेमभूमि १० | देवभूमि १० |
| | १३० वायु | १०१ |
| | १४२ ब्रह्मांड. | |

एकंदर दहा राजे. यांनीं ११२ वर्षें राज्य केलें. विष्णुपुराण व वायुपुराण यांतील राजांच्यापुढें कंसांत अनुक्रमें भागवत ( भा. १२. १. १७ ). व ब्रह्मांडपुराण यांतील पाठभेद दिले आहेत. पुष्पमित्र हा शूद्र असून बृहद्रथाचा सेनानी होता. त्याला पदच्युत करून हा गादीवर आला यांचा काल इ. स. पू. १८४–७२ होय.

**काण्व किंवा काण्वायन**–शुंगवंशांतील शेवटला राजा. देवभूति किंवा देवभूमि किंवा क्षेमभूमि याचा कण्वांपैकीं पहिला राजा वसुदेव हा प्रधान होता. यानें त्याचें राज्य बळकाविलें. या घराण्यांत चार पुरुष झाले. या वेळीं दक्षिणेंत उदयास आलेल्या आंध्रांपैकीं एकानें यांचें राज्य घेतलें. हें घराणें ब्राह्मण होतें, असें यांना लाविलेल्या द्विज शब्दावरून दिसतें.

| विष्णुपुराण | वायुपुराण | मत्स्यपुराण |
|---|---|---|
| वसुदेव | वसुदेव ९ | वसुदेव ९ |
| भूमित्र | भूतिमित्र २४ ( भूमित्र ) | भूमिमित्र १४ |
| नारायण | नारायण १२ | नारायण १२ |
| सुशर्मन् | सुशर्मन् १० | सुशर्मन् १० |
| | ५५ | ४५ |

या चार राजांनीं एकंदर ४५ वर्षें राज्य केलें. विष्णुपुराण व भागवत यांतील राजे एकत्र असून वायुपुराणांतील राजांच्या पुढें कंसांत ब्रह्मांडांतील पाठभेद दिले आहे. यांचा काल इ. स. पू. ७२-२८ होय.

**आंध्र ( भृत्य )—**

| विष्णुपुराण | वायुपुराण | मत्स्यपुराण |
|---|---|---|
| शिप्रक ( बली ) | सिन्धुक २३ | शम्शु २३ |
| कृष्ण | भात ( कृष्ण ) १० | कृष्ण १८ |
| श्रीशातकर्णि ( शांतकर्ण ) | श्रीशातकर्णि ५६ | श्रीमल्लकर्णि १० |
| पूर्णोत्संग ( पौर्णमास ) | | पूर्णोत्संग १८ |
| | | स्कंदस्तंभ १८ |
| शातकर्णि | सातकर्णि ५ ( शांतकर्णि ) | शांतकर्णि ५६ |
| लंबोदर | | लंबोदर १८ |
| दिविलक (चिबिलक) | आपादबद्ध १० (आपोलव १२) | आपीतक १२ |
| मेघस्वाति | | मेघस्वाति १८ |
| ( यानें इ. स. पू. २७मध्यें काण्वायनांचा उच्छेद केला ) | | |
| पटुमत् (अटमान्) | पटुमत् २४ | स्वाति १८ |
| | | स्कंधस्वाति ७ |
| | | मृगेंद्र स्वातिकर्ण ३ |
| | | कुंतल स्वातिकर्ण ८ |
| | | स्वातिकर्ण १ |

| | | |
|---|---|---|
| अरिष्टकर्मन् ( अनिष्टकर्मन् ) | नेमिकृष्ण २५ ( अनिष्टकर्मन्) | आरिक्तवर्ण २५ |
| हाल ( हालेय ) | हाल १ | हाल ५ |
| पत्तलक ( तलक ) | सप्तक ५ | (पत्तलक)मंदुलक ५ |
| प्रविल्लसेन (पुरीषभीरु) | पुत्रिकषेण (पुरीषभिरु ) | पुरींद्रसेन २१ |
| | | सोम्य |
| सुंदरशातकर्णि (सुनंदन) | सातकर्णि १ ( शातकर्णि ) | सुंदरशातकर्णि १ |
| चकोरशातकर्णि ( चकोर ) | चकोरशातकर्णि | चकोरस्वातिकर्ण ½ |
| शिवस्वाति (शिवस्वामी) | शिवस्वामी २८ ( शिवस्वाति ) | शिवस्वाति २८ |
| गोतमीपुत्र | गोतम (गौतमीपुत्र) | गौतमीपुत्र २१ |
| पुलिमान् ( पुरीमान् ) | | पुलोमत् २८ |
| शिवशातकर्णि (मदीशर) | | शातकर्णि २९ |
| | | शिवश्री ७ |
| शिवस्कंधः ( शिवस्कंदः ) | | शिवस्कंध ३ |
| यज्ञश्री ( यज्ञश्रीः ) | यज्ञश्री १९ (यज्ञ) | यज्ञश्री २९ |
| विजय | विजय ६ | विजय ६ |
| चंद्रश्री ( चंद्रविज्ञ ) | दंडश्री ३ | चंडश्री १० |
| पुलोमार्चिः[सलोमधि] | पुलोवा ७(पुलोमा) | पुलामा ७ (२) |

एकंदर राजे तीस. परंतु मत्स्यपुराणांत एकोणतीस वायूंत बावीस( अठरा ),व विष्णूंत चोवीस राजे दिले आहेत. यांनीं ब्रह्मांड, भागवत व विष्णु यांच्या मतें ४५६ वर्षें राज्य केलें. मत्स्यपुराणांत ४६० ( ३६० ) वर्षें यांनीं राज्य केलें, असें सांगितलें आहे. विष्णुपुराण व वायुपुराण यांतील राजांच्या-पुढें कंसांत अनुक्रमें भागवत व ब्रह्मांडपुराण यांतील पाठभेद दिलें आहेत. पुरुषभीरूपासून इतर ऐतिहासिक साधनांचा पुरावाहि उपलब्ध आहे. यांचा काल ख्रि. इ. स. पू. २२०-२२५ हा होय.

या शिवाय आभीर, गर्दभिल, शक, यवन, तुषार, गुरुंड, हूण, मौन, कैलकिल वगैरे इतरहि बरेंच भविष्यकालीन राजे व लोक यांचा पुराणांत संख्येसह निर्देश आहे ( ब्रह्मांड. ३.७४; वायु. २.३७; विष्णु. ४. २४; भा. १२.१; मत्स्य. २७३ ). त्याच्या प्रारंभीं मूळ कोशांत भविष्य. असें शब्द कंसांत घालून पुढें माहिती दिली आहे.

## तुलनात्मक कोष्टकाचें स्पष्टीकरण

पुराणांतील वंशावळि एकमेकांशीं सदृश आहेत. हें त्यांचा विचार करतांना मागें दिसून आलें. त्यांच्यांतील समकालीन निवडल्यास मधील गळलेल्या पिढ्यांची कल्पना येते. ज्यांची समकालीनता विश्वसनीय आधारावर उभारलेली आहे, अशांचा निर्देश आम्ही कोष्टकांत जाड्या अक्षरांनीं दिला आहे व ज्यांची समकालीनता तर्कानेंच ठरवावी लागते, अशांचा निर्देश साध्या अक्षरांनीं केला आहे. समकालीनता न ठरवितां आलेले लोक मध्यें अदमासानें भरले आहेत. वेदांत निर्देश असलेल्या नांवांवर तान्याचें * असें चिन्ह घातलें आहे, सर्वांत जास्त पिढ्या उपलब्ध असलेला इक्ष्वाकुवंशांतहि मध्येंमध्यें खंड आहेत हें दिसून येतें. भारतीय युद्धोत्तरकालीन वंशांचीहि समकालीनता दाखविली आहे. यावरूनहि मध्यें खंड आहेत हें ठरतें. समकालीनतेला गृहीत धरलेलीं कारणें ज्या शब्दांवर येऊन गेलीं आहेत, तो शब्द नेमका सांपडावा म्हणून तो शब्द जाड्या अक्षरांत देऊन शिवाय अधोरेखांकित केला आहे. असें असल्यामुळें समकालीनतेचें वेगळें स्पष्टीकरण केलें नाहीं. क्रमांक अनुक्रमापुरते आहेत, पिढ्यांचे निदर्शक नाहींत.

पुराणांत, रामायणांत किंवा महाभारतांत दिलेल्या वंशावळि राजांच्या आहेत. सत्ताधारी नसलेले राजघराण्यांतील लोक किंवा ब्राह्मणादि वर्णान्तर केलेले लोक वंशावळींत दिलेले नाहींत, हें आपणांस इक्ष्वाकु, निमि व हैहय घराण्यांतील वंशावळीवरून दिसून येईल. या राजघराण्यांतहि ज्यांच्या राजवटींना विशेष महत्त्व नाहीं, असे लोक गाळलेले आहेत हेंहि दिसून येतें.

| १ | सू. इ. (अयोध्या) २ | सू. निमि. (मिथिला) ३ | सू. दिष्ट. (वैशाली) ४ | सो. अमा. (कान्यकुब्ज) ५ | सो. पुरूरवस्. (प्रतिष्ठान) ६ | सो. तुर्वसु ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनु ... | मनु ... | मनु ... | मनु ... | मनु ... | ... ... |
| २ | * इक्ष्वाकु ... | * इक्ष्वाकु ... | * नाभानेदिष्ट ... | इल ... | इल ... | ... ... |
| ३ | विकक्षि ( शशाद ) | निमि ... | ... ... | पुरूरवस् ... | * पुरूरवस् ... | ... ... |
| ४ | ककुत्स्थ ... | ... | ... ... | अमावसु ... | आयु ... | ... ... |
| ५ | अनेनस् ... | मिथि जनक ... | * भलंदन ... | ... ... | * नहुष, रजि .. | ... ... |
| ६ | पृथुरोमन् ... | ... ... | * वत्सप्री ... | भीम ... | ययाति ... | ... ... |
| ७ | विश्वरंधि ... | ... ... | ... ... | ... ... | *पूरु ... | *तुर्वसु .. |
| ८ | चंद्र ( आर्द्र ) ... | उदावसु ... | प्रांशु ... | ... ... | १ जनमेजय ... | ... ... |
| ९ | १ युवनाश्व ... | ... ... | ... | कांचनप्रभ ... | प्राचीन्वत् ... | ... ... |
| १० | शा ( श्रा ) वस्त | ... ... | प्रजानि ... | ... ... | प्रवीर ... | ... ... |
| ११ | ... ... | नंदिवर्धन ... | ... ... | ... ... | अविद्ध ... | ... ... |
| १२ | ... ... | ... ... | खनित्र ... | १ सुहोत्र ... | मनस्यु ... | वह्नि ... |
| १३ | ... ... | ... ... | क्षुप ... | ... ... | अभय ... | ... ... |
| १४ | बृहदश्व ... | सुकेतु ... | विंश ... | ... ... | सुद्युम्न, धुंधु ... | ... .. |
| १५ | कुवलयाश्व ... | ... ... | विविंश ... | जह्नु ... | बहुगवि ... | ... ... |
| १६ | दृढाश्व ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... |
| १७ | प्रमोद ... | देवरात ... | ... ... | २ सुहोत्र ... | संयाति ... | ... ... |
| १८ | १ हर्यश्व ... | ... ... | खनिनेत्र ... | ... ... | ... ... | भर्ग ... |
| १९ | निकुंभ ... | ... ... | ... ... | अजक ... | भद्राश्व ( रौद्राश्व ) | ... ... |
| २० | बर्हणाश्व ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... |
| २१ | ( संहताश्व ) ... | ... ... | ... ... | बलाकाश्व ... | ऋतेयु ( ऋचेयु ) | ... ... |
| २२ | कृशाश्व ... | ... ... | अतिभूति ... | ... ... | ... ... | ... ... |
| २३ | ( प्र ) सेनजित् ... | ... ... | करंधम ... | कुश ... | अन्तिनार ... | मोनाग ... |
| | ( रेणु ) ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... |
| २४ | २ युवनाश्व ... | ... ... | अविक्षितत् ... | ... ... | तंसु ... | ... ... |
| २५ | * मांधातृ ... | बृहद्रथ ... | मरुत्त ... | कुशाश्व-कुशिक ... | ... ... | ... ... |
| २६ | * पुरुकुत्स ... | ... ... | नरिष्यन्त ... | * गाधि किंवा ... | ... ... | ... ... |
| २७ | * त्रसदस्यु ... | ... ... | दम ... | * गाथिन् ... | ... ... | ... ... |
| २८ | ( संभूत ) ... | महावीर्य ... | राज्यवर्धन ... | ... ... | ... ... | ... ... |
| २९ | अनरण्य ... | ... ... | सुधृति ... | ... ... | ... ... | ... ... |
| ३० | त्रसदश्व ... | ... ... | नर ... | ... ... | ... ... | ... ... |
| ३१ | २ हर्यश्व ... | ... ... | केवल ... | ... ... | ... ... | त्रिसानु ... |
| ३२ | ( वसुमत् किंवा वसु- | सुधृति ... | बंधुमत् ... | ... ... | ... ... | ... ... |
| | मनस् ) ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | करंधम ... |
| ३३ | त्रिधन्वन् ... | ... ... | वेगवत् ... | ... ... | ... ... | ... ... |
| ३४ | * त्रैय्यारुण ... | ... ... | बुध ... | ... ... | ... ... | ... ... |
| ३५ | त्रिबंधन ... | ... ... | तृणबिंदु ... | ... ... | ... ... | ... ... |
| ३६ | ... ... | ... ... | विशाल ( विश्रवस ) | ... ... | ... ... | ... ... |
| ३७ | सत्यव्रत त्रिशंकु ... | धृष्टकेतु ... | हेमचंद्र ... | विश्वामित्र ... | ... ... | * मरुत्त ... |

| सो. द्रुह्यु. | सो. सह. (हैहय) (माहिष्मती) | सो. यदु. | सो. अनु. | सो. अनु. | सो. क्षत्र. (काशी) | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | मनु ... | हिरण्याक्ष, हिरण्यकशिपु | १ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | इल ... | प्रह्लाद, च्यवन | २ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | पुरूरवस् ... | बलि | ३ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | आयु ... | विप्रचित्ति, तारक, | ४ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | क्षत्रवृद्ध ... | शुक्र, दत्त, आत्रेय, वृषपर्वन् | ५ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | षण्डामर्क, देवासुरांचे बारा संग्राम | ६ |
| द्रुह्यु ... | * यदु ... | *यदु ... | *अनु ... | ... ... | सुनहोत्र, प्रति- | व कायमचा विरोध. | ७ |
| ... ... | सहस्राजित् ... | क्रोष्ट ... | ... ... | ... ... | क्षेत्र ... | | ८ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | काश्य ... | | ९ |
| ... ... | शताजित् ... | वृजिनीवत् | ... ... | ... ... | काशिराज ... | | १० |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | राष्ट्र ... | | ११ |
| बभ्रु ... | हैहय ... | स्वाहि ... | सभानर | ... ... | दीर्घतपस् ... | | १२ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | धर्म ... | | १३ |
| ... ... | धर्मनेत्र ... | रशादु ... | ... ... | ... ... | धन्वन्तरि ... | उत्तंक | १४ |
| ... ... | कुंति ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | | १५ |
| ... ... | साहंजि ... | ... ... | ... ... | ... ... | केतुमत् ... | | १६ |
| सेतु ... | महिष्मत् ... | चित्ररथ | कालानल | ... ... | ... ... | उदंक शौल्वायन | १७ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | भीमरथ ... | | १८ |
| ... ... | भद्रश्रेण्य ... | ... ... | ... ... | ... ... | १ दिवोदास | प्रभाकर आत्रेय | १९ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | अष्टारथ ... | | २० |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | | २१ |
| ... ... | ... ... | ... ... | संजय ... | ... ... | ... ... | | २२ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | | २३ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | | |
| ... ... | ... ... | शशबिन्दु | ... ... | ... ... | ... ... | | २४ |
| अंगार ... | दुर्दम ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | च्यवन | २५ |
| गांधार ... | ... ... | ... ... | पुरंजय... | ... ... | ... ... | | २६ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | | २७ |
| धर्म ... | ... ... | पृथुश्रवस् | ... ... | ... ... | ... ... | | २८ |
| ... ... | ... ... | (तम) | जनमेजय | ... ... | ... ... | रावण | २९ |
| धृत ... | धनक (कनक) | ... ... | ... ... | ... ... | ... ... | | ३० |
| ... ... | ... ... | उशनस्... | महाशाल | ... ... | ... ... | | ३१ |
| ... ... | ... ... | [ शिनेयु ] | ... ... | ... ... | ... ... | | ३२ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | | |
| दुर्गमा ... | कृतवीर्य ... | मरुत्त | महामनस् | ... ... | हर्यश्व ... | | ३३ |
| ... ... | ... ... | कंबलबर्हिष | उशीनर | तितिक्षु | ... ... | वृष जान | ३४ |
| ... ... | ... ... | रुक्मकवच | शिबि ... | ... ... | सुदेव ... | | ३५ |
| प्रचेतस् | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ऊर्व | ३६ |
| ... ... | कार्तवीर्य ... | (परावृत्त) | ... ... | ... ... | ❀२ दिवोदास | दत्त, आत्रेय, शुनःशेप, रावण | ३७ |

| | सू. इ. (अयोध्या) | सू. निमि. (मिथिला) | सू. दिष्ट. (वैशाली) | सो. अमा. (कान्यकुब्ज) | सो. पूरु. (प्रतिष्ठान) | सो. तुर्वसु. |
|---|---|---|---|---|---|---|
| ३८ | ❀ हरिश्चंद्र ... | ... | सुचंद्र ... | ... | ... | ... |
| | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३९ | रोहित ... | ... | ... | मधुच्छंदस ... | ... | ... |
| ४० | हरित, चंप ... | ... | ... | ( अष्टक लौहि ) | ... | ❀ दुष्यन्त ... |
| ४१ | विजय ... | हर्यश्व ... | ... | ... | ... | शरूथ ... |
| ४२ | भरुक ... | मरु ... | ... | नय ... | ... | जनापीड ... |
| ४३ | वृक ... | ... | ... | ... | ... | ( आंडीर ) ... |
| ४४ | बाहु ( फल्गुतंत्र ) | प्रतीपक ... | धूम्राश्व ... | ... | ... | पांड्यादि ... |
| ४५ | सगर ... | ... | ... | ... | ... | ... |
| ४६ | असमंजस् ... | ... | ... | ... | ❀ दुष्यन्त ... | ... |
| ४७ | ... | कृतिरथ ... | ... | ... | ❀ भरत ... | ... |
| ४८ | अंशुमत् ... | ... | ... | ... | भरद्वाज ... | ... |
| ४९ | ... | ... | ... | ... | वितथ ... | ... |
| ५० | १ दिलीप ... | देवमीढ ... | ... | ... | भुवन्मन्यु ... | ... |
| ५१ | ... | ... | ... | ... | बृहत्क्षत्र ... | ... |
| ५२ | ... | ... | संजय ... | ... | सुहोत्र ... | ... |
| | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५३ | ... | विसृत ... | ... | ... | हस्तिन् ... | सो. अज... |
| ५४ | * भगीरथ किंवा | ... | ... | ... | * अजमीढ ... | दक्षिणपांचाल... |
| ५५ | भगेरथ ... | ... | ... | ... | ऋक्ष, * जह्नु ... | बृहदिषु ... |
| ५६ | श्रुत ... | महाधृति ... | ... | ... | ... | बृहद्वसु ... |
| ५७ | नाभाग ... | ... | ... | ... | ... | बृहत्कर्मन् ... |
| ५८ | अम्बरीष ... | ... | ... | ... | ... | जयद्रथ ... |
| ५९ | सिंधुद्वीप ... | कृतिरात ... | सहदेव ... | ... | ... | विश्वजित् .. |
| ६० | अयुतायु ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६१ | ऋतुपर्ण ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६२ | सर्वकाम ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६३ | सुदास ... | महारोमन् ... | ... | ... | ... | ... |
| ६४ | मित्रसह कल्माषपाद | ... | ... | ... | ... | ... |
| ६५ | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६६ | अश्मक ... | ... | ... | ... | ... | सेनाजित् ... |
| ६७ | मूलक ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६८ | १ दशरथ ... | स्वर्णरोमन् ... | कृशाश्व ... | ... | ... | ... |
| ६९ | ऐडाविड ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७० | १ विश्वसह ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७१ | २ दिलीप खट्वांग... | ... | ... | ... | ... | रुचिराश्व ... |
| ७२ | दीर्घबाहु ... | ह्रस्वरोमन् ... | ... | ... | ... | ... |
| ७३ | रघु ... | ... | ... | ... | ... | ... |
| ७४ | अज ... | ... | ... | ... | संवरण ... | ... |
| ७५ | २ दशरथ ... | सीरध्वज ... | प्रमति ... | ... | कुरु ... | ... |

| सो. नील. | सो. सह. (हैहय) (माहिष्मती) | सो. यदु. | सो. अनु. | सो. अनु. | सो. क्षत्र. (काशी) | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ... | (वृषण) ... | ज्यामघ | केकय ... (गोपति) | ... | ... | चैत्रा, ऋचीक... | ३८ |
| | | | | | ... | ... | |
| ... | ... | ... | ... | ... | ... | और्व ... | ३९ |
| ... | जयध्वज ... | विदर्भ ... | मद्रक | ... | ... | ... | ४० |
| ... | ... | क्रथ ... | ... | वृषद्रथ... | ... | ... | ४१ |
| ... | ... | कुंति ... | ... | ... | ... | ... | ४२ |
| ... | ... | धृष्ट ... | ... | सेन | ... | ऊर्व ... | ४३ |
| ... | तालजंघ वीतिहोत्र | निर्वृति... | ... | ... | ... | ... | ४४ |
| ... | (❀ वीतहव्य) | (विदूरथ) | | | ❀ प्रतर्दन | ... | ४५ |
| ... | अनंत ... | दशार्ह... | ... | सुतपस् | वत्स | ... | ४६ |
| ... | दुर्जय ... | व्योमन् ... | ... | बलि ... | अलर्क | ❀ दीर्घतमस्, रावण ... | ४७ |
| ... | सुप्रतीक ... | जीमूत... | ... | अंग ... | ... | ... | ४८ |
| ... | ... | विकृति ... | ... | ... | सन्नति | ... | ४९ |
| ... | ... | भीमरथ ... | ... | ... | सुनीथ | ... | ५० |
| ... | ... | रथवर ... | ... | ... | ... | ... | ५१ |
| ... | ... | दशरथ... | ... | दधिवाहन (अनपान) | सुकेतु ... | ... | ५२ |
| सो. नील | सो. द्विमीढ ... | एकादशरथ | ... | ... | ... | ... | ५३ |
| उत्तरपांचाल | द्विमीढ ... | शकुनि... | ... | ... | धर्मकेतु | ... | ५४ |
| नीलि ... | यवीनर ... | करंभक | ... | ... | ... | ... | ५५ |
| शांति ... | ... | देवरात | ... | ... | सत्यकेतु | ... | ५६ |
| पुरुजानु ... | ... | देवक्षत्र | ... | ... | ... | ... | ५७ |
| रिक्ष ... | धृतिमत् ... | देवन ... | ... | ... | विभु | ... | ५८ |
| भर्म्याश्व ... | ... | मधु ... | ... | दिविरथ | ... | ... | ५९ |
| ... | सत्यधृति ... | पुरुवस... | ... | ... | सुविभु | ... | ६० |
| ... | ... | पुरुद्वत्... | ... | ... | ... | ... | ६१ |
| मुद्गल ... | दृढनेमि | ... | ... | ... | सुकुमार | ... | ६२ |
| (ब्रह्मिष्ठ) | ... | ... | ... | ... | ... | ... | ६३ |
| ... | ... | ... | ... | धर्मरथ | ... | ... | ६४ |
| ... | ... | ... | ... | ... | धृष्टकेतु | ... | ६५ |
| वध्र्यश्व ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ६६ |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ६७ |
| ... | सुवर्मन् ... | ... | ... | ... | ... | ... | ६८ |
| ... | ... | ... | ... | ... | वेणुहोत्र | ... | ६९ |
| ... | सार्वभौम ... | ... | ... | ... | ... | ... | ७० |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ७१ |
| ... | ... | ... | ... | ... | भर्ग ... | ... | ७२ |
| ... | महत्पौरव ... | ... | ... | ... | ... | ... | ७४ |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ७३ |
| ❀ दिवोदास | ... | जन्तु | ... | चित्ररथ (लोमपाद) | ... | शतानन्द, अहल्या ... | ७५ |

| | सू. इ. ( अयोध्या ) | सू. निमि. ( मिथिला ) | सू. दिष्ट. ( वैशाली ) | सो. मगध. | सो. कुरु. | सो. अज. ( दक्षिण पांचाल ) |
|---|---|---|---|---|---|---|
| ७६ | राम ... | कुशध्वज ... | *परीक्षित ... | सुधन्वन् ... | जह्नु ... | पृथुसेन ... |
| ७७ | कुशलव ... | भानुमत ... | *जनमेजय ... | सुहोत्र ... | सुरथ ... | ... ... |
| ७८ | अतिथि ... | प्रद्युम्न शतद्युम्न | | च्यवन ... | ( ऋक्ष ) ... | ... ... |
| ७९ | निषध ... | मुनि ... | | कृत ... | सार्वभौम ... | ... ... |
| ८० | नल ... | ऊर्जवह ... | सो. चैद्य ... | वसु चैद्य ... | जयत्सेन ... | ... ... |
| ८१ | नभ ... | सुतद्वाज ... | प्रत्यग्रह ... | बृहद्रथ ... | अराधिन् ... | ... ... |
| ८२ | पुंडरीक ... | *कुणि ... ( शकुनि ) | ... ... | ( कुशाग्र ... | महासत्त्व ... ( महाभौम ) | १ पार ... |
| ८३ | क्षेमधन्वन् ... | *रंजन ... ( अंजन ) | ... ... | ऋषभ ... | अयुतायु ... | ... ... |
| ८४ | देवानीक ... | ( *उग्रदेव ) ... | ... ... | पुष्पवत् ... | अक्रोधन ... | ... ... |
| ८५ | अहीन ... | *क्रतुजित् ... | ... ... | सत्यहित ... | देवातिथि ... | ... ... |
| ८६ | पारियात्र ... | अरिष्टनेमि ... | ... ... | सुधन्वन् ... | २ ऋक्ष ... | नीप ... |
| ८७ | बल ( दल ) ... | श्रुतायु ... | ... ... | ऊर्ज ... | भीमसेन ... | ... ... |
| ८८ | स्थल ... | सुपार्श्व ... | ... ... | नभस् ... | दिलीप ... | ... ... |
| ८९ | उक्थ ... | संजय ... | ... ... | (संभव) ... | ... ... | समर ... |
| ९० | वज्रनाभ ... | क्षेमारि ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... |
| ९१ | खगण ... | अनेनस् ... | ... ... | ... ... | ... ... | २ पार ... |
| ९२ | विधृति ... | मीनरथ ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... |
| ९३ | ( व्युषिताश्व ... | सत्यरथ ... | ... ... | ... ... | ... ... | पृथु ... |
| ९४ | २ विश्वसह ) ... | उपगु ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... |
| ९५ | हिरण्यनाभ ... | स्वागत ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... |
| ९६ | पुष्य ... | सुवर्चस् ... | ... ... | ... ... | ... ... | सुकृति ... |
| ९७ | ध्रुवसंधि ... | श्रुत ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... |
| ९८ | सुदर्शन ... | सुश्रुत ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... |
| ९९ | अग्निवर्ण ... | जय ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... |
| १०० | शीघ्र ... | विजय ... | ... ... | ... ... | प्रतीप ... | ब्रह्मदत्त ... |
| १०१ | मरु ... | ऋत ... | ... ... | ... ... | ... ... | विश्वक्सेन ... |
| १०२ | प्रसुश्रुत ... | सुनय ... | ... ... | ... ... | ( ऋष्टिषेण ) ... | उदक्सेन ... |
| १०३ | ( सु ) संधि ... | ... ... | ... ... | ... ... | शंतनु ... | भल्लाट ... |
| १०४ | अमर्षण ... | वीतहव्य ... | दमघोष ... | ... ... | भीष्म ... | जनमेजय ... |
| १०५ | सहस्वत् ... | ... ... | ... ... | जरासंध ... | विचित्रवीर्य ... | द्रुपद ... |
| १०६ | विश्वसाह्व ... | धृति ... | शिशुपाल ... | ... ... | ( धृतराष्ट्र ... | ... ... |
| १०७ | प्रसेनजित् ... | ... ... | ... ... | ... ... | पांडु ) ... | ... ... |
| १०८ | तक्षक ... | बहुलाश्व ... | ... ... | सहदेव ... | युधिष्ठिर ... | ... ... |
| १०९ | बृहद्बल ... | कृत किंवा कृती | ... ... | ... ... | अभिमन्यु ... | धृष्टद्युम्न ... |
| ११० | बृहद्रण ... | महावशिन् ... | ... ... | सोमापि ... | परीक्षित् ... | ... ... |
| १११ | ... ... | ... ... | ... ... | श्रुतश्रवस् ... | जनमेजय ... | ... ... |
| ११२ | उरुक्रिय ... | ... ... | ... ... | अयुतायु ... | शतानीक ... | ... ... |

| सो. नील. (उत्तर पांचाल) | सो. द्विमीढ | सो. यदु. | सो. यदु. | सो. अनु. | सो. क्षत्र | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मित्रयु ... | रुक्मरथ ... | भीमसात्वत | ... ... | चतुरंग... | ... ... | सत्यधृति, रावण ... | ७६ |
| मैत्रेय (सोम) ... | ... ... | अंधक ... | भजमान, वृष्णि | ... ... | ... ... | ... ... ... | ७७ |
| (सृंजय) ... | सुपार्श्व ... | कुकुर ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | ७८ |
| च्यवन ... * * पंचजन, (पिजवन) | ... ... | धृष्ट ... | विदूरथ ... | ... ... | ... ... | ... ... ... | ७९ |
| *सुदास ... | ... ... | ( वृष्णि | शूर ... | ... ... | ... ... | दाशराज्ञयुद्ध ... ... | ८० |
| * सहदेव ... | सुमति ... | धृति )... | शमिन् ... | पृथुलाक्ष | ... ... | ... ... ... | ८१ |
| * सोमक ... | ... ... | कपोतरोमन | प्रतिक्षत्र ... | चंप ... | ... ... | ... ... ... | ८२ |
| जन्तु-पृषत् | ... ... | ... ... | ... ... | हर्यंग ... | ... ... | ... ... ... | ८३ |
| ... ... | सन्नतिमत् ... | ... ... | स्वयंभोज ... | भद्ररथ... | ... ... | ... ... ... | ८४ |
| ... ... | ... ... | (तैत्तिरि) | ... ... | बृहत्कर्मन् | ... ... | ... ... ... | ८५ |
| ... ... | ... ... | ... ... | हृदीक ... | बृहद्रथ... | ... ... | ... ... ... | ८६ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | बृहद्भानु | ... ... | ... ... ... | ८७ |
| ... ... | सनति ... | विलोमन् | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | ८८ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | ८९ |
| ... ... | ... ... | भव ... | ... ... | बृहन्मनस | ... ... | ... ... ... | ९० |
| ... ... | ... ... | ( नल ) | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | ९१ |
| ... ... | कृत किंवा कृति | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | ९२ |
| ... ... | कृति ... | अभिजित् | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | ९३ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | ९४ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | जयद्रथ... | ... ... | ... ... ... | ९५ |
| ... ... | ... ... | पुनर्वसु | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | ९६ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | ९७ |
| ... ... | ... ... | आहुक | देवमीढुष ... | बृहद्रथ... | ... ... | ... ... ... | ९८ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | ९९ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... .. | १०० |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | १०१ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... ... | १०२ |
| द्रुपद ... | उग्रायुध कार्ति | उग्रसेन | शूर ... | दृढरथ... | ... ... | ... ... ... | १०३ |
| द्रोण ... | क्षेम ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | जैगीषव्य ... ... | १०४ |
| ... ... | सुवीर ... | ... ... | ... ... | जनमेजय | ... ... | अक्षित, देवल, पराशर ... | १०५ |
| ... ... | नृपंजय ... | ... ... | वसुदेव ... | अधिरथ | ... ... | कृष्ण द्वैपायन, अग्निवेश ... | १०६ |
| ... ... | बृहद्रथ ... | ... ... | ... | कर्ण ... | ... ... | कृप, द्रोण ... ... | १०७ |
| ... ... | ... ... | कंस ... | ... | ... ... | ... ... | उत्तंक ... ... | १०८ |
| अश्वत्थामन् | ... ... | ... ... | कृष्ण ... | वृषसेन... | ... ... | भारतीय युद्ध ... | १०९ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | वैशंपायन, भूरिश्रवस ... | ११० |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | लोमश, सुमन्तु, जैमिनि, याज्ञवल्क्य | १११ |
| ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | ... ... | पैल, शुक, धौम्य ... | ११२ |

| | सू. इ. | सो. पूरु. | सो. मगध |
|---|---|---|---|
| ११३ | वत्सवृद्ध | ... | ... निरामित्र |
| ११४ | ... | ... | ... सुनक्षत्र |
| ११५ | प्रतिव्योमन् | ... | बृहत्सेन |
| ११६ | ... | ... | ... |
| ११७ | भानु | ... | ... बृहत्कर्मन् |
| ११८ | दिवाकर | ... असीमकृष्ण | सेनाजित् |

( वायु, ब्रह्मांड व मत्स्य हीं पुराणें रचलीं गेलीं तेव्हां हे राज्य करीत होते ).

| | | | |
|---|---|---|---|
| ११९ | सहदेव | ... निमिचक्र | ... श्रुतंजय |
| १२० | बृहदश्व | ... उक्थ | ... विप्र |
| १२१ | भानुमत् | ... चित्ररथ | ... शुचि |
| १२२ | प्रतीकाश्व | ... कविरथ | ... क्षेम |
| १२३ | सुप्रतीक | ... वृष्टिमत् | ... निर्वृत्ति |
| १२४ | मरुदेव | ... सुषेण | ... सुव्रत |
| १२५ | सुनक्षत्र | ... सुनीथ | ... धर्मसूत्र |
| १२६ | पुष्कर | ... नृचक्षु | ... शम |
| १२७ | अन्तरिक्ष | ... सखीनल | ... सुमति |
| १२८ | सुतपस् | ... परिप्लव | ... सुबल |
| १२९ | ... | ... सुनय | ... सुनीथ |
| १३० | ... | ... मेधाविन् | ... सत्यजित् |
| १३१ | ... | ... नृपंजय | ... विश्वजित् |
| १३२ | ... | ... ... | ... पुरंजय |
| १३३ | ... | ... | ... अवन्ती राजे |
| १३४ | अमित्राजित् | ... दुर्व | ... वीतिहोत्र |
| १३५ | बृहद्राज | ... ... | ... प्रद्योत |
| १३६ | ... | ... तिमि | ... पालक |
| १३७ | बर्हि | ... ... | ... विशाखयूप |
| १३८ | कृतंजय | ... ... | ... अजक |
| १३९ | ... | ... बृहद्रथ | ... नंदिवर्धन |
| १४० | रणंजय | ... ... | ... शिशुनाग ( इ.स.पू.६४२ ) |
| १४१ | ... | ... सुदास | ... काकवर्ण |
| १४२ | संजय | ... ... | ... क्षेमधर्मन् |
| १४३ | ... | ... ... | ... क्षेत्रज्ञ |
| १४४ | शाक्य | ... शतानीक | ... विधिसार |
| १४५ | शुद्धोद | ... ... | ... ( कान्वायन |
| १४६ | लांगल | ... ... | ... भूमिमित्र ) |
| | प्रसेनजित् ( गौतमबुद्ध ) | उदयन ( दुर्दमन ) | अजातशत्रु |
| १४७ | ... | ... ... | ... ( इ. स. पू. ४९१–४५९ ) |
| १४८ | क्षुद्रक | ... वहीनर | ... दर्भक |

| | | | |
|---|---|---|---|
| रणक | ... दंडपाणि | ... अजय (उदयन) | १४९ |
| सुरथ | ... निरमित्र | ... नंदिवर्धन ... | १५० |
| सुमित्र | ... क्षेमक | ... महानंदि नंद | १५१ |
| ... | ... ... | ... सुमाल्यादि ८ | १५९ |
| ... | ... ... | ... चंद्रगुप्त मौर्य ( इ. स. पू. ३२२–१८५ ). | १६० |
| ... | ... आंध्र | ... बिन्दुसार ... | १६१ |
| ... | ... ... | ... अशोक ( इ. स. पू. २३७ ) | १६२ |
| ... | ... शिप्रक इ. स.पू.२४० | ... सुयशस्(संपदि) | १६३ |
| ... | ... कृष्ण | ... दशरथ ... | १६४ |
| ... | ... ... | ... संगत ... | १६५ |
| ... | ... ... | ... शालिशूक ... | १६६ |
| ... | ... ... | ... सोमशर्मन् ... | १६७ |
| ... | ... श्रीमल्लकर्णि | ... शतधन्वन् ... | १६८ |
| ... | ... पूर्णोत्संग | ... बृहद्रथ ... | १६९ |
| खारवेल जैन | ... शातकर्णि | ... पुष्पमित्र शुंग ( इ. स. पू. १८४–७२ ) ... | १७० |
| ... | ... ... | ... अग्निमित्र ... | १७१ |
| ... | ... ... | ... सुज्येष्ठ ... | १७२ |
| ... | ... ... | ... वसुमित्र ... | १७३ |
| ... | ... ... | ... आर्द्रक ... | १७४ |
| ... | ... ... | ... पुलिंदक ... | १७५ |
| ... | ... ... | ... घोषवसु ... | १७६ |
| ... | ... लंबोदर | ... वज्रमित्र ... | १७७ |
| ... | ... अपीतक | ... भागवत ... | १७८ |
| ... | ... ... | ... देवभूति ... | १७९ |
| ... | ... मेघस्वाति | ... वसुदेव काण्व | |
| ... | ... ... | ... ( इ. स. पू. ७३–२७ )... | १८० |
| ... | ... स्वाति | ... भूमित्र ... | १८१ |
| ... | ... स्कंधस्वाति | ... नारायण ... | १८२ |
| ... | ... मृगेन्द्रस्वातिकर्ण | ... | १८३ |
| ... | कुन्तलस्वातिकर्ण | ... सुशर्मन् ... | १८४ |
| ... | ... स्वातिकर्ण | ... ... | १८५ |
| ... | ... अरिक्तकर्ण ( नेमिकृष्ण ) | ... ... | १८६ |
| ... | ... हाल | ... ... | १८७ |

हालाचा गाथा सप्तशती नांवाचा ग्रंथ आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ... | ... मंदुलक | ... ... | १८८ |

| | | |
|---|---|---|
| १८९ | ... ... पुरींद्रसेन | ... ... ... |
| १९० | ... ... सोम्य | ... ... ... |
| १९१ | ... ...*सुंदरशांतिकर्ण | ... चष्टण इ. स. ८० |
| १९२ | ... ... चकोर स्वातिकर्ण | ... ... |
| १९३ | ... ... *शिवस्वाति | ... ... ... |
| १९४ | ... ... *गौतमीपुत्र | ... ... ... |
| १९५ | ... ... *पुलोमत् | ... जयदामन् ... |
| १९६ | ... ... *शातकर्णि | ... रुद्रदामन् ... |
| १९ | ... ... *शिवश्री | ... दामजदश्री ... |
| १९८ | ... ... शिवस्कंध | ... ... ... |
| १९९ | ... ... *यज्ञश्री | ... जमदामन् ... |
| २०० | ... ... विजय | ... रुद्रसिंह ... |
| २०१ | ... ... चंडश्री | ... रुद्रसेन ... |
| | ... | ... संघदामन् |
| २०२ | ... ... ... | ... दामसेन ... |
| २०३ | ... ...*पुलोमा (इ.स. २११-२२५). | ... ... ... |

*खुणा केलेल्यांचे शिलालेख किंवा नाणीं आहेत व त्यामुळें काळ निश्चित आहे.

---

# परिशिष्ट ५ वें

## विषयसूचि

( या सूचींत कांहीं महत्त्वाच्या विषयांचा संग्रह केला आहे )

अकुलीनतेचा परिणाम ( १ मतंग).

अग्नि–अग्निमंथन ( अथर्वन ),–पूजाविचार ( आक्ताक्ष्य ),–गोत्र शांडिल्य व स्त्रीपुत्र ( गृहपति ),–नाचिकेत ( गोबल वार्ष्ण ),–अग्निहोत्र ( २ ज्योतिष्मत् ),–राक्षसत्रांतील ( पराशर ),–फक्त गृहस्थास पूज्य (१ पवमान),–होम दोनदां(प्रैयमेध),–हवन ( ४ भरत ),–अग्निहोत्री क्षत्रिय ( भूरिश्रवस् ),–शोध ( १ भृगु ),–पुनराधान दिले ( १ मनु ),–रुद्र नांव ( १ मनु ),–साक्षीनें सख्य (३ राम),–रुद्रत्व ( रुद्र ),–तोंडांत ठेवणें ( विदेघ माथव ).

अग्निप्रवेश–लोकनिंदेनें (धर्माकर),–पुत्राच्या मृत्यूनें ( २ भरद्वाज ), शुध्यर्थ सीतेचा ( ३ राम ).

अंगठी–खुणेकरितां ( सुग्रीव ).

अंगाचा दुर्गंधनाश ( पराशर ).

अंगावरील खूण दमयंतीच्या(नल).

अंगांत येणें (कबंध आथर्वण, पतंचल काप्य, सुधन्वन् आंगिरस ).

अजगरमुक्ति ( १८ भीम ).

अतिथिसत्कार–( बालावती ).

अथर्ववेदाची उत्पत्ति–( १ भृगु),–मान (भृग्वंगिरस् ),–संहिता (४बभ्रु).

अदृश्य होणें ( नल ).

अद्भुत गोष्टींचें फळ ( वृद्ध गर्ग ).

अनध्याय न पाळल्यामुळें ठार ( इंद्र, सुकर्मन् ).

अनुष्ठान–युध्यसिध्यर्थ ( इंद्रजित्, रावण ),–पुरें होऊ न देणें, ( लक्ष्मण, ३ राम ).

अनेक रूपें घेणें ( कृष्ण ).

अन्तर्धान पावणें ( ३ शाल्व ).

अन्तर्हित दाखविणारें उदक (मैंद).

अंधकसंग्राम ( १ अंधक ).

अन्नछत्र ( जानश्रुति ).

अन्न देणारी थाळी ( १ युधिष्ठिर ).

अन्नदानाची आवश्यकता ( विनिताश्व ).

अपशकुन ( १८ भीम ).

अपांतरतमा व्यास केव्हांचा ( व्यास ).

अप्सरा अनेकांची पत्नी ( उर्वशी, घृताची, मेनका ).

अब्राह्मण म्हणून यज्ञास अयोग्य ( कवष ऐलूष ).

अभिचारानें बुद्धिभ्रंश ( इंद्र ).

अभिजियोग ( मिहिराचार्य ).

अभिमानामुळें स्वर्गच्युति (ययाति).

अभिषेकाचा उपयोग ( प्रजापति ).

अभ्यासाचे विषय ( नारद, बाभ्रव ).

अमरत्व संपादणें ( नंदिन् ).

अमरपुत्राचा प्रयत्न ( बालधि ).

अमावास्या व पितर ( पुरूरवस् ).

अमावास्येस युद्धास निघाला ( ३ राम ).

अमृतरक्षक ( अश्वकंद, २ तपन, प्ररुज ).

अमृतकुंड ( १ मय ).

अमृतपान–विष्णु व ब्रह्मदेव यांचे ( १ मय ),–राहूचें.

अराजकतेचा परिणाम ( वेन ).

अर्थशास्त्र–कणिक भरद्वाजाचें ( ९ भरद्वाज ), मनूचें ( १ मनु ).

–निपुण ( रुरुक ).

अर्धराज्याभिषेक–धर्मराजास(त्वष्टृ)

अवतार–काल ( विष्णु ), नारायणाचा अर्जुन ( लोमश ), पार्वतीचा लंबा (२ बाण), शंकराचे ( शंकुकर्ण व शिव ), सुदर्शन चक्राचा ( कार्तवीर्य ),

अवदसा घालविणें ( शिरिंबिठ ).
अवध्यत्व गाईचें (कपिल, पृषध्र).
अवयवापासून उत्पत्ति ( ब्रह्मन् ).
अवरंगजेब ( नवरंग ).
अवर्षण ( १० वसिष्ठ ).
अवस्थान्तर ( च्यवन, ययाति ).
अवैदिकधर्मप्रचार ( ४ शांडिल्य ).
अशुद्ध म्हणणे ( गृत्समद ).
अश्वमेधांत रामायण ( ३ राम ).
अश्वशास्त्रप्रणेता ( शालिहोत्र ).
अश्वीनीं घोडा दिला ( पेदु ).
अश्वीरूप घेणें ( संज्ञा, विवस्वत् )
अश्वीस मनुष्यरूप पुत्र ( अश्विनीकुमार ).
अष्टभैरव ( भैरव ).
असुर–उत्पत्ति ( १ पद्मावती ), –यज्ञ व ब्राह्मण ( कालकंज ),–इंद्र ( प्रल्हाद, बलि, हिरण्यकशिपु ).–ब्राह्मणवेष ( जटासुर ).
अस्त्र–अगन्यस्त्र भार्गव नांवाचें (सगर), आग्नेय ( द्रोण, ३ भरद्वाज ), रामाचें (और्व), ऐषिक(उत्तरा), नारायण, अश्वत्थामन्, ध्रुव, १८ भीम ), पाशुपत ( अर्जुन, इंद्र, जयद्रथ ), ब्रह्म ( द्रोण, रुक्मिन्, हनूमत् ), महावीर्य (वेदशिरस् ), मोहिनी ( बभ्रुवाहन, रुद्र ), रौद्र ( अभिमन्यु ), वारुण, (१८ भीम ), वैष्णव ( कृष्ण, नरक, भगदत्त ), सुदर्शन चक्र (६ इंद्रद्युम्न ), इतर अस्त्रांचीं नांवें ( अर्जुन व परशुराम ),–गर्भावर परिणाम (परिक्षित् ), –स्फूर्ति ( कर्ण ).
अस्थि–गंगेंत ( पद्मगंधा ),–यमुनेंत (मुकुंद),–मागणें ( १ सुवर्चस् ), –दिल्या नाहींत ( २ याज्ञवल्क्य ), –माहात्म्य ( ३ धनंजय ).
अहिंसेवर गीता ( विचख्नु ).
अहेर ( ३ सुभद्रा ).
आचारज्ञ ( माहित्थि ).
आतिथ्य ( अरुंधती व गुह ). –सैन्याचें ( ३ भरद्वाज ).
आदिराजा ( पृथु ).
आधिभौतिकाला आसुरीरूप ( १ शंबर ).
आयुर्वेद–( कृष्ण आत्रेय ),–आठ भाग ( २धन्वन्तरि ),–अश्वांचा ( १ सुश्रुत ),–हत्तीचा ( अंगराज, पालकाप्य ).
आयुष्य—साठ हजार वर्षे(जटायु), लक्ष वर्षें ( बक, दाल्भ्य ),चवदा कल्प ( १ मार्कंडेय ). एकशें सोळा वर्षे ( महिदास ऐतरेय ). ( कृष्ण, पांडव, द्रोण, भीष्म, राज्यवर्धन व लोमश पहा ).
आयुधजीविसंघ ( पर्शु ).
आशौच कोणी पाळावें ( प्रचेतस् ).
आहारनिद्राराहित्य ( लक्ष्मण ).
इच्छेनें पाप ( ५ वामदेव ).
इतिहास ऐकविणें ( १ युधिष्ठिर ), –अध्ययन ( ६ शुक ).
इंद्र–इंद्रत्व–( कितव, जालंधर, तारक, नहुष, प्रल्हाद, बलि, रजि, हिरण्यकशिपु ), पूर्वजन्म ( उदारधी ), –मूर्छित करणें ( बल ),–(१ मय ),– –( ययाति ),–मगर झाला ( रंतिदेव ),–गुप्तपणें येणें ( वसुक्र ऐंद्र ),–अश्व चोरणें( विजिताश्व )–स्त्री होणें (वृषणश्व),–प्रशंसा (शिशुमार), –कमंडलु व वस्त्र ( ६ शुक ).
उच्चारशास्त्रज्ञ–( वात्सप्र, स्थविर कौंडिन्य व स्थविर शाकल्य ).
उणादिसूत्रें ( कात्यायन, २ वररुचि ).
उत्सव इंद्राचा ( कृष्ण ), रैवतकावरील ( कृतवर्मन् ).
उदितहोमवाद ( नगरिन् जानश्रुतेय ).
उदीच्यप्राच्यविभाग ( आपस्तंब व पाणिनि ).
उद्यानरक्षक ( हनुमत् ).
उपदेशाचा गर्भावर परिणाम ( अभिमन्यु व प्रल्हाद ).
उपनयनांत दंड व यज्ञोपवीत ( १ मार्कंडेय),–गायत्र्युपदेश ( पौष्करसादि ).
उपवास अठेचाळीस दिवस ( रंतिदेव ).
उष्टया भांड्यांचा मारा (युयुधान).
ऊर्ध्वरेतस् ( क्रतु व वालखिल्य ).
ऋषिसंघ ( फेनप, मरीचिप ).
एकच मुलामुळें दुःख ( १ सोमक साहदेव्य ).
एकादशीची सुरुवात ( कुर्ध ).
एकदम वीस मुलें ( पर्शु मानवी ).
एका रात्रींत पूर्वदिशा जिंकणें ( प्राचीन्वत् ).
एकादशादेती ( १ मुर ).
एकाचें पुण्य दुसऱ्यास ( माधवी ).
एकाची दोन जातीची संतति ( दीर्घतमस् ).
एक मेल्यानें दुसरा जिवंत ( ५ नारद ).
ऐश्वर्याकरितां पूजा ( १ मतंग )
ऐन्द्रमहाभिषेक ( अत्यराति जानंतपि, दीर्घतमस् औचथ्य, दुर्मुख, बलि, युधांश्रौष्टि औग्रसैन्य, शतानीक सात्राजित ).
ऐन्द्र व्याकरण ( २ वररुचि ).
ॐकाराचें गोत्र ( लातव्य ).
ॐनमो नारायणाय ( ६ शुक्र ).
ओलीं वस्त्रें वाळणें ( नरोत्तम ).
औषधें–विशल्यकारिणी, संजीवनी, संधानी, सावर्ण्यकरिणी ( ५ सुषेण ), –नदीचें पाणी ( अष्टावक्र ),–हुंगवून शल्यें काढणें ( ५ सुषेण ).
कण्वशाखेंत राधेचें वर्णन (१राधा).
कन्यादान ( १ भगीरथ ).
कपटानें वश करण्याचा प्रयत्न ( ६ महोदार ).
कपिलाचें अमरत्व ( बिल्व ).
कर्कोटकाचें रक्षण ( नल ).
कर्णदिग्विजय ( भगदत्त ).
कर्नाटक राक्षस ( भीमाता ).

कला-गायनर्तनवादन ( उर्वशी, कच, तुंबरु ), -चित्रकला (उषा),-चवसष्ट ( गर्ग ),-सेतु बांधणें ( ९ नल ).

कलि-कलिप्रवेश ( नल ),-कलियुग सुरु (मुचुकुंद),-गतकलि वर्षे (५ नंद, शूद्रक, प्रमिति, बुध, विक्रमादित्य व शक ),-श्वेतकलि नांवाचा भाग ( ४ योगेश्वर ).

कल्प-( गानबंधु ), बृहत् ( धर्ममूर्ति, ),-मेघवाहन (धुंधुमूक), रथंतर ( ब्रह्मरूप, ५ वामदेव ), भेदानुसार नांवें ( १५ वसु ),-कल्पान्तदर्शन ( १ मार्कंडेय ),-पंचविसावा (मत्स्य), पूर्व कल्पाच्या रात्रीं किंवा मत्स्यावतारीं ( २ हयग्रीव ).

कवच-महाकाली ( ३ सुचंद्र )-दान ( कर्ण व ३ सुचंद्र )

कामरूपधारिणी ( ताटका )

कांडानुक्रमपाठ ( १ सारस्वत )

कातंत्रकृत्प्रकरण ( ३ वररुचि )

कामाख्यादेवी ( सुमद ).

कारीर इष्टीनें चारा ( आंगिरस ).

कालविभाग व गणना ( ब्रह्मन्, १ मनु, मात्स्य; यज्ञेषु; ३ राम ).

कालिदासाची कथा ( शकुन्तला ) -कवि ( ७ भोज ).

कालोख करणें ( कृष्ण; पराशर ).

किराताधिपतीचा सत्कार (लोमश).

किरीट छेदणें ( ३ राम )

किल्ले व नगरें ( १ शंबर ).

कुक्कुटवाहन ( १ स्कंद ).

कुंडपरिमाण ( शौनकिन् ).

कुदळखोरें ( लक्ष्मण ).

कुंतीनें नदींत मुलगा सोडला ( २ राधा )

कुबेराची आई ( मंदाकिनी ),-प्रदेश ( अर्जुन ).

कुमारी व डाकिनी यांची उत्पत्ति ( रुद्र ).

कुराज्य ( त्रिशंकु, वेन ).

कुष्ठ-सूर्योपासनेनें गेले ( बृहद्दल, ध्वज, भद्रेश्वर, २ याज्ञवल्क्य, सांब ), -विमान हालेना ( ७ बुध )-गजानन मंत्रानें गेलें ( ७ बुध ).

कृतघ्न ( वत्सनाभ )

कृत्या-उत्पन्न करून सोडणें ( २ दंडपाणि, पिप्पलाद, प्रह्लाद, विश्ववेदिन्, वृषादर्भि ),-कृत्याग्नि ( ३ सुदक्षिण ),-नें मुलास मृत्यु (२ भरद्वाज), -चें शुद्धाचरणा पुढें कांहीं चालत नाहीं ( विश्ववेदिन् ),-ठार केलें ( शुनःसख ),-केसाच्या होमांतून उत्पत्ति (यवक्रीत).

कृमि-नरमांसभक्षक ( कर्ण ).

कृष्णाची नक्कल ( पौंड्रक वासुदेव ). -दोन रूपें ( १, राधा ),-गोकुळांत पोंचविण्याचा संकेत ( १ वसुदेव ).

कैलास पर्वतावरून उड्डाण ( ६ शुक ).

कोंगणी राजे (हिरण्यकेशिन).

कोणी वाट द्यावी ( ६ शिबि ).

कौलितर ( १ शंबर ).

कौन्सिल ( विकटावती ).

कौटिल्य ( ५ नंद )

क्रमकर्ता ( १ बाभ्रव्य, २ पांचाल ).

क्षत्रिय करणें ( १५ पृथु ),-क्षत्रियाचा ब्राह्मण ( आर्ष्टिषेण, उरुक्षय; कक्षीवत्, कपि, कवि, दिवोदास, देवापि, धृष्ट, ५ पृथु, १ पृषदश्व, प्रदर्दन, मांधातृ, १ रथीतर, रुन्द, विष्णुवृद्ध, विश्वामित्र, २ वीतहव्य, शिजय, १ शिनि, २ सिंधुद्वीप ),-व्याध (जरस्) -वंश अबाधित ( ९ सुवर्चस् ).-वैश्य बनणें ( १० सुदेव ).

क्षत्रिय घराण्यांत ब्राह्मण ( नरिष्यंत, प्रियमेध आंगिरस ).

क्षत्रियापासून ब्राह्मणास शिक्षण ( महाशाल जाबाल ).

क्षत्रियविरुद्ध ब्राह्मण ( अत्यराति जानंतपि ).

क्षपणक ( तक्षक ).

खजूरीच्या झाडांची उत्पत्ति ( वरत्रिन् ).

खड्गयुद्धांत निष्णात(१०सहदेव).

खंडणी कर्णाची ( २ अश्मक ).

खंदक खणणें ( १ युधिष्ठिर ),-महागंभीर नांवाचा ( वृत्र ).

खांडवदाह ( ५ अग्नि ).

खाद्यपेय-अपूप दूध व फेंस ( उपमन्यु वासिष्ठ ). काकडी ( देवातिथि काण्व ), कोंबडे ( कौशिक ), कोहळा ( ज्ञानभद्र ), खीर ( क्रोध ), चरु पुत्राकरितां ( ऋचीक ), पुरोडाश ( बृहस्पति ), पोहे ( कुचैल ),-मद्य ( दत्तात्रेय ), निषाद, कासव व हत्ती ( गरुड ), -उष्टें खात नसत ( उषस्त ).

खासगी संपत्ति ( १८ भीम ).

खूण आश्रमाची ( ३ चित्ररथ ).

खेळण्याचा पट सोन्याचा ( रुक्मिन् ).

खोटें बोलणें भोगावें लागलें ( १ युधिष्ठिर ).

गंगा-ला घाट बांधणें ( १ भगीरथ ),-नें समुद्राचें पाणी वाढणें ( शुष्क ),-ला त्रिस्रोतस् नांव (धर्मद्रवा ),-प्याल्यानें मुक्ति (मोहिनी),-त देह टाकणें ( युधिष्ठिर ).

गजेंद्रमोक्ष तामसांत ( ३ तामस, ३ हरि ).

गणपतीची पूजा ( बौधायन ).

गणाधिपत्य शंकराचें ( अंधक, उपमन्यु ).

गदा कौमोदकी कृष्णाची (जरासंध).

गदायुद्ध शिकविलें ( बळराम ).

गंधर्वाशीं लढाई (अर्जुन, दुर्योधन, ध्रुव, विचित्रवीर्य, व युधिष्ठिर ), -पारिपत्य ( ४ भरत ),-शीं संवाद ( २ याज्ञवल्क्य ),-शीं ७ पत

( पुरूरवस् ),–कन्या पिशाच झाल्या ( लोमश ),–गोलभ मेळा ( गोलभ ), –चा प्रदेश सिंधुतीर ( ४ भरत ).

गर्भ–फलानें ( धुंधुलि ), मनुष्यापासून मत्स्यीस ( उपरिचर ),–इतर प्राण्यांस ( ऋक्षरजस् ),–पुरुषाला ( मांधातृ ),–चरूमुळें (अदिति),–स्थलान्तर ( ८ बलराम ), गर्भाशयांतून मांडीत ( और्व ),–शीं संवाद ( १ वामदेव ),–नें उपदेश ऐकणें ( हिरण्यकशिपु ),–तून थट्टा ( अष्टावक्र ),–नें आंतून प्रतिबंध करणें ( इंद्र ),–नाकांतून बाहेर ( अश्विनीकुमार, १ वामदेव ),–पोट फोडून काढणें ( अश्मक, पिप्पलाद, १ सुवर्चस् ),–टाकणें ( विद्युत्केश ), –पाडणें (दुर्योधन),–सुलभतेनें ( बार्हस्पत्य ),–घर्म व अश्रूंपासून उत्पत्ति ( २ मंगळ ), रक्तापासून (५ नर).

गर्वपरिहार—देवांचा ( यक्षेश्वर ), ब्रह्मयाचा ( बक दाल्भ्य ),–मुंगुस सुवर्णाचा झाला ( युधिष्ठिर ).

गवताची जात ( वीरणक ).

गाई पळविणें ( १ पणि ),–मालकिनाची ( ४ वसिष्ठ ).

गाथा—ऋषभ याज्ञतुराची ( गौरवीति शाक्त्य ), ययातीची.

गायत्री—गणेशाची (गणपति),–पासून वेद व जग झालें ( माया ),–नें सर्वज्ञता ( भगेरथ ऐक्ष्वाक ),–वेत्ता ( बुडिळ आश्वतराश्वि ),–चा जप ( अरुण, १ सावित्री ).

गायनवादन ( मांडकर्णि ),–पासून त्रास ( पुलस्त्य ).

गिरीवरचा व्यंकोबा–( श्रीनिवास ).

गुढी पाडव्याची ( उपरिचर वसु ).

गुणांचें श्रेष्ठत्व ( इंद्र ).

गुप्त होण्याची शक्ति ( विजिताश्व ).

गुप्तपणें राहणें ( मैत्रेय कौषारव ).

गुरुपासून गुप्त ठेवण्याचें पाप ( २ विपुल ).

गृहपतीचा मान ( शर्यात ).

गृहस्थाश्रम धर्म ( ६ सुदर्शन ).

गोत्र बदलणें ( शुनःशेप, शौनक ).

गोपी होणें (पुण्यश्रवस्, २ प्रचंड)

गोपीचंदन ( विष्णु ).

गौरवार्थ अलौकिक उत्पत्ति ( २ याज्ञवल्क्य ).

ग्रहमंडलावर स्वारी ( शनि ), –ग्रहत्व व नैऋताधिपत्य ( मेघहार ), –रामाचें ( राम ).

ग्रहण ( अत्रि ),–चें कारण ( राहु ), –नाहींसें करणें ( अक्रूर, १ प्रभाकर, स्वर्भानु ).

ग्रिष्मीथ, मत ( प्रियरथ ).

घंटा ( अशुद्ध, ७ विभावसु ).

घोड्याचें तोंड बसविणें ( हयग्रीव ).

चक्ररक्षक–अर्जुनाचा ( धृष्टकेतु, चंद्रदेव, चंद्रसेन, जयद्रथ, २ दुनरसेन, १८ भीम, ३ विराट, १ सत्य, ५ सुरथ ).

चक्रवर्ति राजा ( कार्तवीर्य, कुवलयाश्व ).

चाणक्य ( विक्रमादित्य ).

चक्षुर्मनंतील इतिहास ( पृथु, नरनारायण ), समुद्रमंथन ( मोहिनी, नारद ).

चातुवर्ण्याचा प्रवर्तक ( शौनक ), –ची पुनर्घटना ( दत्त आत्रेय ), –वानरांत चातुर्वर्ण्य ( ऋक्षरजस् )–ची संस्थापना ( २ बलि ).–सर्पात चातुर्वर्ण्य ( १ नाग ).

चांद्रमास चालू असावा ( युधिष्ठिर ), –रामाच्या वेळीं ( ३ राम ).

चार मनूंची उत्पत्ति ( सुव्रत ).

चारांपेक्षां अधिक मुखें ( ब्रह्मन् ).

चिरंजीवित्व ( अश्वत्थामन्, कृप, परशुराम, मालि व हनूमत् ).

चूडामणि ( हनूमत् ).

चोरांनीं गाईबैल चोरली ( मुद्गल ).

चोरीचें द्रव्य सत्कारणीं ( रूपक ).

छत्री व पादत्राण यांची उत्पत्ति ( जमदग्नि ).

छत्रचामरें ( तुर्वसु, देवापि ).

छंदशास्त्र ( १ पिंगल ).

जखमेंतून भस्म व शाकरस ( मंकणक ).

जगन्नाथाचें दर्शन ( ४ शंख ).

जंतु निर्माण करणें ( ८ नमुचि ).

जन्मांध—(दीर्घतमस् व धृतराष्ट्र)

जप—कामराजकूट ( ३ तामस ).

जरा घेणें ( तुर्वसु, ययाति ),–न घेण्याचें तात्त्विक कारण ( २ यदु ).

जलचर प्राणी मद्गु ( सत्यकाम जाबाल ).

जमिनींत कन्या ( राधा, सीता ).

जलपर्यटण–गंगापार करणें ( १८ भीम ), घोड्यानें समुद्र तरणे (५ माधव), शंभर वल्ह्याची नाव ( भुज्यु ).

जलप्रलय ( मत्स्य ).

जात– अनामय ( जगतीव ) अयोगव, ( ३ मरुत्त ) औलान ( देवापि ), कीर ( गाधि ), कायस्थ ( २ चित्रगुप्त ), चारण ( सूत ), पक्षी ( संपाल ), बंदिन् ( सूत ), बलीह, ब्रह्मक्षत्रिय ( मैत्रेय ), ब्राह्मण कान्यकुब्ज ( च्यवहानि ). मागध ( सूत ), मांग ( उत्तंक ), यवन ( ४ यवन ).–वाल्मीकीची जात ( वाल्मीकि ), वैश्य ( जजलि ), सार्थवाह ( दमयंती ), सूत ( कर्ण, सूत ), –संततीची जात वीर्यावरून ( ४ सत्यवती ), निषादाचें म्लेच्छ ( गरुड ), ब्राह्मणाचें देव ( दिव्या ), संकर ( रोमहर्षण ).

जातहारिणी ( हैमिनी ).

जानवें–नसणें ( दत्त ).

जारणमारणाची अधिदेवता दाक्षिणाग्नि ( ३ सुदक्षिण ).

जैन व वैदिक ( धर्मराज ).

जोड्याकरितां कातडें कोणतें ? ( शांवत्य ).

ज्ञानीपणा मुखावरून ओळखणें ( सत्यकाम जाबाल ).

( अश्विनीसुत, गर्ग, रोहिणीशकटभेद ( दश- काश्यप, १ म्‍न. शुक्राचें क्रमण ( १ बुध ).

तों दास्य ( शर्मिष्ठा ).

श पापण्यास पद्य ( भग-

ळे ( ३ नि-द्रुमती ),–सीतेचें ( ३ राम ).

तत्त्व—( कपिल, जमदग्नि ),–वेष्णनें भूमि व आकाश धारण केले ( धन्‍व काण्व ).

तंत्र करणें ( २ माठर ).

तपानें ब्राह्मण ( आक्रिय, अनूहवत्, आर्ष्टिषेण, गार्ग्य, ३ देवापि ),–स्त्रीचा पुरुष ( श्राद्धदेव ), तपाचा प्रकार, मानस यज्ञ ( पंचशिख ),–अर्थ ( तपोनित्य पौरुशिष्टि ),–भिन्न ( ३ दौशाश्व ),–भंगाकरितां अप्सरा ( १ प्रम्लोचा, रंभा ).

तरुण करणें ( अलर्क, वंदन )

तालवनांत व व्याघ्र ( २ बाण ).

तापयावरून सोडणें ( २ बलि ).

ताम्रपट–( २ याज्ञवल्क्य, ३ राम, हिरण्यकेशिन् ).

तारकामययुद्धकाळ ( १० वसिष्ठ).

तारा ( अगस्त्य ).

तीन पावलें पृथ्वी ( बलि ).

तीन मण तांदुळांचा भात, एक मनुष्य व दोन रेडे खाद्य ( २ बक ).

तीर्थयात्रा ( २ जरत्कारु, १ युधिष्ठिर, १ विदुर ).

तीर्थोत्पत्ति ( १ पद्मनाभ ).

तुरुंगवास ( अत्रि, ३ नरक, पुरुकुत्स, १ वसुदेव ).

तृण आड धरणें ( सीता ).

तोंडावर पदर ( सीता ).

त्यक्तान्नभक्षण ( धनवर्धन ).

त्रिदंडीसंन्यास ( सत्यभामा ).

त्रिपुरदाह कथेचें मूळ ( रुद्र ).

त्रिसौपर्णधर्म ( २ सुपर्ण ).

थोरांच्या तिरस्कारानें स्वर्गच्युति ( माधवी ).

दचा अर्थ ( प्रजापति ).

दक्षयज्ञविध्वंसाचें मूळ ( रुद्र ).

दक्षिणदिशा ( विमुख ).

दक्षिणा–च्या ऐवजीं ज्ञान ( अश्वपति कैकय ),–विद्वत्तेवर ( उषस्त ),–देऊं नये ( कण्व ),–( कौकूस्त, जयविजय ), गुरुदक्षिणा ( २ पौष्य, सांदीपनि ),– एकवीस गाई ( बकदाल्भ्य ),––शून्यकर्म ( बलि ),–घेण्यांत दोष ( बुडिल आश्वतराश्वि ),–चें महत्त्व ( १ माधवी ),–हजार घोडे ( वृषदर्भ ),–मुळें शूद्रालाहि तत्त्वज्ञान ( रैक्व ),–पुत्र ( वृषादर्भि ),–प्रशंसा ( १ सावर्णि ),–( हरिश्चंद्र ).

दक्षिणायन व उत्तरायण ( भीष्म ).

दक्षिणेंतील चालीरीति ( बौधायन ).

दक्षिणेकडील राजा ( यम ).

दक्षिणेंतील राजा ( ८ विदूरथ ).

दक्षिणचें राज्य ( २ धूम्रकेश ).

दत्तक ( अगस्त्य, अत्रि, इध्मवाह, उत्तानपाद, गृत्समद, दुष्यंत, धीमत्, नर भारद्वाज, पुलह, पृथा, ३ भरत ),–विरुद्ध ( १ वसिष्ठ ).

दंडनीति ( ४ सरस्वती, मांधातृ ).

दवंडी पिटविणें ( ९ विदूरथ ).

दश शब्दावर कल्पना ( नल ).

दहा हजार जन्मांची आठवण ( १६ सुमति ).

दाई ( घूर्णिका, चंद्रहास, जरा ).

दागिना–इंद्रमाला ( उपरिचर वसु ).

दान—शाल्वदेश ( ऋचीक ),–नेत्रदान ( अलर्क ),–कुंडल ( उत्तंक, कर्ण, कृष्ण, सावित्री ),–हजार गाई व घर ( ऋणंचय ),–( कण्वायन ), उंट, गाई व राजे ( कशु चैद्य ),–स्वतःचा पुत्र ( कश्यप ),–नाकारणें ( गौतम ),–( तक्ष ),–सुवर्ण ( दाक्षायण ),–सुवर्णवृक्ष ( धर्ममूर्ति ),–मृतपशु ( बक दाल्भ्य ),–( बौधायन ),–अर्धशरीर ( १ मयूरध्वज ),–गृह ( ७ मौद्गल्य ),–प्रियस्त्रिया व गृह ( ३ युवनाश्व ),–रोहितपूर ( रोहित ),–लवणाचल व सुवर्णवृक्ष ( ६ लीलावती ),–ग्राम व वस्त्रें ( वज्रदंष्ट्र ),–संपत्ति ( ४ वसिष्ठ ),–अठ्ठेचाळीस हजार गाई ( विभिंदु ),–सोनें व रुपें ( वृषदर्भ ),–सुवर्णगृह ( २ शतद्युम्न ),–शंभर गाई ( मुमीढ्ळु ),–नें क्षुधाशान्ति ( हरिशर्मन् ),–नें रथ पुढें जाणें ( ययाति ),–चिकित्सा ( नचिकेतस् ),–शूद्रत्वाचा गर्वपरिहार ( रैक्व ),–स्तुति ( बल्बू थ पाकस्थामन्, मेधातिथि काण्व ),–कोणाकडून घ्यावें ( बृबु तक्षन् ),–भूमि ( कश्यप ),–मीठ ( पुष्पवाहन ),–स्वमांसदान ( ६ शिबि ).

दारू पिणें ( बळराम ).

दाशराज्ञयुद्ध ( तुर्वश, पूरु, सुदास )–आपसांतील ( यदु ).

दासी—कद्रूची विनता ( गरुड ), दोन हजार दासी ( ययाति ),–चा पुत्र ( विदूर ).

दिवाणी व फौजदारी ( बृहस्पति ).

दिव्य ( ३ नारद, प्रजापति ),–जातिविषयक शुद्धतेकरितां ( वत्स काण्व ).

दिव्यदृष्टि ( ९ संजय ).

दीक्षा—( शिखंडिन् याज्ञसेन ),–परमहंस ( ऋषभ ),–पाशुपत ( कृष्ण ).

दीरापासून संतति ( १ पांडु ).

दीर्घ झोंप ( १ मुचुकुंद ).

दुधाकरितां क्षीरसागर ( उपमन्यु )

दुश्चिह्न ( दुर्योधन ).

दुष्काळ ( गौतम ),–राष्ट्राचा बचाव ( १० वसिष्ठ ),–कारण अयकोंचा नाद ( १ संवरण ).

दुसऱ्यानें जिंकलेलें राज्य अमान्य ( युयुधान ).

देवगंधर्वांचे पितर ( बर्हिषद ).

देवता–अश्वकंद, अश्विनीकुमार, अहिर्बुध्न्य, आदित्य, एकवीरा, गंगा,

२ तपन, त्रित, दक्ष, दुर्गा, द्युतान-मारुत्, भव्य, भार्गव, भूतरजस्, भृगु, मन्यु, मृत्यु, याम्य, लेख, वाच्, (कृष्ण, हारीत), वारिमूत्र, विकुंठ, सत्य, सुमेधस्, ९ सुधर्मन्, ६ सुधामन्, सुमनस्,–मनुष्याचा देव बनणें (ऋभु),– अंगिरस् पुत्र देव झाले (अंगिरस्),–गण (प्रसूत),–विरुद्ध (बृसय),–यांनीं मुचुकुंदाची मदत घेतली (१ मुचुकुंद),–सेनापति मुचुकुंद व कार्तिकस्वामी (१ मुचुकुंद),–उत्पत्ति प्रथम(वराह,विवस्वत्), –स्पर्धा (भंगास्वन),–शाप (२ ब्रह्मन्),–स्त्रियांना बंदिवास (३ भरत),–चें प्राथम्य (प्रजापति),–दैत्यांशीं तंटा (२ बल),–पैकीं शूद्र (अश्विनीकुमार),–च्या खूणा(नल),– व मनुष्य (१ रजि),–देवदर्शन (२ याज्ञवल्क्य).

देवयजनविधि (वार्ष्ण).

देवालय (अमित्र, धरापाल, रंगदास व मकन),–वराहलक्ष्मीचें (वराह).

देहत्याग (२ सती).

दैत्य निस्तेज व राजा (बलि),–दैत्ययाजक (त्वष्टृ, वरत्रिन् व षण्डामर्क).

द्यूत (नल),–क्रीडा (निमि),–त राज्य जिंकणें (४ पुष्कर),–मुळें ठार मारणें (२ रोचना).

द्रविडाधिपति (१ पांड्य, १ मत्स्य, सत्यव्रत).

द्रोणागिरि आणणें (हनुमत्).

द्वंद्वयुद्ध (जरासंध, हिरण्यकशिपु).

धन (तरुक्ष),–मोबदला एक अश्व, (ऋतध्वज),–सवत्सधेनु, सुवर्ण, (सत्यभामा).

धनुष्य–शार्ङ्ग कृष्णाचें (जरासंध). पौलस्त्य घटोत्कचाचें, वैष्णव ऋचीकाचें,–शिव (देवरात),–माहेश (सीरध्वज),–च्या दोरीनें बांधणें (रावण)–१०१ धनुष्य तोडणें (युयुधान).

धनुर्वेद–चार प्रकाराचा (कृप),–किन्नरापासून (रुक्मिन्).

धंदा–कुंटिणीचा (४ चित्रा),–शेतकी ब्राह्मणाचा (३ चेकितान),–व्यापार ब्राह्मणाचा (३ देवराज),–वाटमारीचा (भृशुंडिन्).

धर्मयुद्धांत मृत्यु (१ सुदेव)

धर्मशास्त्रांत समावेश (पितामह)

धर्मभ्रष्ट करण्याचें साधन (बुद्ध)

धुकें उत्पन्न करणें (पराशर).

ध्वज–माणसाचें डोकें असलेला मार (२ बाण).

ध्वजभंग युद्धसूचक (२ बाण).

नक्षत्र—मूळ (चंद्रहास),–रेवती (रेवती), रोहिणी (रौहिण वासिष्ठ), पुष्य (३ राम).

नगररक्षण (धौम्य).

नगारे—(२बृहद्रथ).

नग्नगोसावी (वातरशन).

नजराणे–(यक्षु, यमक, शिग्रु, १ सावर्णि).

नरकचतुर्दशी (३ नरक).

नरमांसभक्षण (इल्वल, कल्माषपाद, २ नहुष, वृषादर्भि, २ शुक, सुकुष, हुंड).

नरमेध—(नारद),–पुत्रार्थ (दीननाथ, १ सोमक, हरिश्चंद्र वेधस).

नवग्रहाची पूजा (९ नल).

नवऱ्याशिवाय पुत्र (२ ब्रह्मदत्त).

नवा वेद (२ याज्ञवल्क्य).

नवे क्षत्रिय निर्माण करणें (विश्वस्फणि).

नहुष अजगर झाला (ययाति).

नागांचे शत्रु गंधर्व (२ पुरुकुत्स).

नागपाशानें बांधणें (३ राम), रावण).

नाटकें—लक्ष्मीस्वयंवर (उर्वशी), –रंभानलकूबर, राम... –वामनावतार (यया...

नाटक मंडळी—(... सांब).

नाट्यशास्त्रप्रणेता—(...

नाणें—(सगर), द... (बृहस्पति), मोहोरा ... रघु), सुवर्ण (भर्तृहरि).

नाममाहात्म्य—(३ सांब).

नालायनी द्रौपदी झाली (३ मौद्गल्य).

नांवानें तत्त्व प्रसिद्धी (१ मातंग).

नास्तिकता—(त्रिपुर, विदेवत)-बृहस्पतीनें प्रचार (बृहस्पति).

निकुंभिलेच्या मंदिरांत होम (लक्ष्मण).

निग्रहविधि (शुक).

निघंटूचें भाष्य (यास्क).

निंदकाच्या तोंडावर कोड (धर्माकर).

निंदा–स्मृतींत कपिलाची (कपिल).

नियोगपद्धति–(अंबिका, अंबालिका, विचित्रवीर्य व विदुर),–त्याज्य (आदिस्तंब), – नियोगावधि (श्रुतसेना).

निषादादिकांची उत्पत्ति(पृथु व वेन).

निस्पृहपणा प्रह्लादाचा (विरोचन).

नीति—कर्ता (शंबर), शास्त्र (कणिक, पृथु, १ सेनजित्).

नीळें वस्त्र (बलराम).

नृत्य–शाळा (१८ भीम), नेतालपणा (पुष्पदन्ती, २ माल्यवत्).

नृसिंहावताराचें मूळ (१ नमुचि, वीरभद्र),–चा शब्द (६ हारीत).

नैमित्तिक प्रलय (२ ब्रह्मन्).

नौकेचा विस्तार (१ मत्स्य),–तून नदीपार (१ युधिष्ठिर).

न्यायशास्त्रकार (गौतम).

पक्षी–भूतभविष्यवर्तमानज्ञ (कालकवृक्षीयमुनि),–वेदपठन करणारा (गरुड),–भाषाविज्ञान (२ अश्वपति केकय),–नांवें कां पडतात? (औपमन्यव).

पंक्तिपावन—व्यभिचारज नव्हते ( ६ गृत्समद ),–राजाश्रयामुळें ( ५ गौतम),–ऋभूमद्द सोमपान केल्यामुळें प्रजापतीवर बहिष्कार.

पंचमहायज्ञ—( उपरिचर वसु ).

पंचरात्र—कर्ता ( पंचशिख ),–आगम ( नारद ).

पंचाग्निसाधन ( देवद्युति ).

पट्टमित्र राजे ( मेकल ).

पणीकडून भरद्वाजाला संपत्ति (बृबु तक्ष ).

पत्नी—टाकणें ( अश्वपति केकय ),–चें वय नवऱ्यापेक्षां जास्त ( ४ रति १ रेवती),–आशिष्याकडून पुत्रोत्पादन (श्वेतकेतु औद्दालकि),–शिवाय तीर्थयात्रा (सुकल)–ची सुवर्ण प्रतिमा (४ राम).

पद्च्युति—( खनिनेत्र ).

पदपाठ—तैत्तिरीयांचा ( आत्रेय ),ऋग्वेदाचा ( शाकल्य ),–रावण.

परक्यांचें निशाण घेणें (१ पांडु).

परपुरुषसंभोग ( अश्विनीकुमार ),–चा स्पर्श ( सीता ),–पासून संतति ( २ आप् ).

परलोक–बंद ( ३ राम ),–जैगीषव्य( शुक ),–मृत्यु व स्वर्ग ( अर्जुन, द्विगत व भार्गव ).

परस्त्री–चा अहेर ( अष्टावक्र )–अपहाराबद्दल निषेध ( जटायु ),–ची कल्पना ( ८ जनमेजय ).

पराजय करणाऱ्याकडून ज्ञानसंपादन ( श्वेतकेतु औद्दालकि ).

पराशराचा गायत्रीमंत्र (अश्वपति).

परिषद् ( अंगिरस् ).

पर्यंक ( च्यवन ).

पर्वत आणणें ( ५ सुषेण ),–पर्वता इतकें आयुष्य मागणें ( बालधि ),–चे पंख तोडलें ( मैनाक ),–संतति ( उपरिचर वसु ).

पशु–यज्ञ बंद केले ( रंतिदेव ),–विरुद्ध ( पुष्करमालिनी ),–वेदीवर मारणें ( श्यापर्ण ),–मैत्री ( पशुसख ),–हिंसा ( अगस्त्य ).

पहिला मनुष्य ( यम ).

पहिल्या जन्मांतील स्त्री दुसऱ्या जन्मांत ( मायावती ).

पाऊस—सन्मानानें (श्वफल्क),–अवर्षण नष्ट ( अरुंधती ),–मायेनें (ऋषभ),–सूर्यमंत्रानें ( मेघशर्मन् ),–धूळीचा ( दंड ).

पाकशालाधिपतित्व ( १८ भीम ).

पांचालाचा निर्वंश ( धृष्टकेतु ).

पांचाल नांवाचें कारण ( भर्म्याश्व )

पाण्यांत राहणें आपव वसिष्ठाचें ( कार्तवीर्य ).

पातालांत जाण्यास बंदी (१ वृष).

पातिव्रत्य—( जालंधर तुलसी ),–ची कल्पना ( मांडव्य ),–भंगानें पराजय ( २ शंखचूड ).

पादुका घेणें ( ४ भरत ).

पानगृह ( हनुमत् ).

गाय चोरणें ( १३ पृथु ).

पाप—द्वादशीस तेल खालें (पुरूरवस् ),–अपशब्दामुळें स्वर्गच्युति (प्रतर्दन ),–नें रथ अधांतरी न चालणें ( युधिष्ठिर ),–बाराचौदांपर्यंत केलेल्याला दोष नाहीं ( मांडव्य ),–उच्छिष्ट ( यवक्रीत ).

पाय लागून मुलगा मेला ( २ याज्ञवल्क्य ).

पाराशरी शाखा ( २ पराशर ).

पारीक्षित जनमेजय नष्ट झाले ( पारिक्षित ).

पार्थहोम ( पृथु ).

पार्षद ( घंटाकर्ण ).

पालन ( जनक ).

पालीच्या जन्मांतून पादोदकानें मुक्ति ( हेमांग ).

पाषाणयोधिवीर ( युयुधान ).

पिंड–दान ( कुशल, गया ),–घेण्यास प्रत्यक्ष येणें ( शांतनु ).

पितर ( पितरः, यायावर ),–आज्य व वैराज ( २ मेना ),–व्युत्पत्ति व त्यांच्या मूर्ति ( पितर ),–शीं संवाद (वृद्ध गार्ग्य),–उद्धार (१वैखानस),–नीं कोणतेहि रूप घेणें ( २ बर्हिषद ).

पिप्पलादशाखा ( पिप्पलाद ).

पिशाच–अंगांत येणें (असमंजस),–चा नायक (वेताळ),–योनि ( सुनिशर्मन्, विदैवत ),–त्रसदस्यूची पत्नी ( त्रसदस्यु पौरुकुत्स ),–( २ माल्यवत् ),–मुक्ति ( धनशर्मन् ),–वृत्ति ( १ विदुर ),–उद्धार ( ६ नंद ).

पिंपळाची फांदी मोडल्यानें विष्णूला जखमा ( ४ धनंजय ).

पुण्य–दिलें (प्रतर्दन),–केर काढणें ( १ सुंदरी ),–गाय चिखलांतून काढणें ( १ श्रवण ).

पुत्र–आम्रफलानें ( आयु, धुंधुलि, २ बृहद्रथ ),–पिंपळ व उंबर यांस आलिंगन दिल्यानें ( ऋचीक ),–इष्टीनें ( धर्मसख, हनुमत् ),–गोसेवेनें ( ऋतंभर ),–चरु किंवा पायसभक्षिल्यानें ( ३ राम ),–तीर्थस्नानानें ( १ मरीचि ),–तपश्चर्येनें ( १ प्रतीप),–पुतळ्यापासून(४धन्वन्तरि)–पृषदाज्यानें ( मांधातृ ),–यज्ञानें (पर आट्णार,१भरद्वाज),–वरानें(१३ भीम ),–मंत्रानें ( १ पांडु ),–त्याग असत्यभाषणानें(श्वेतकेतु औद्दालकि),–सर्प ( ४ शरसेन ),–नदींत बुडविणें ( भीष्म ),–भोपळ्यांतून मुलें ( ४ सुमति ),–विकत घेणें (शुनःशेप ),–त्याग ( २ मूलक ),–ची पूर्व कल्पना ( गांधारी ).

पुनर्जन्म–( इंद्र, उग्रतप, ३ जाबालि, पर्वतेश्वर, ३ पिंगला, पितृवर्तिन्, पूर्वेंद्र, प्रजा, प्रह्लाद, २ बलि, बिन्दुमती, भीमवर्मन्, २ मंथरा, ५ सुपार्श्व, हिरण्यकेशिन् ).

पुनर्विवाह–(दमयंती, प्रद्वेषी ),–प्रतिबंध ( दीर्घतमस् ).

पुरन्दर इंद्र ( मार्कंडेय ).

पुराण–कर्ता व्यास व व्यासाचा गुरु

नारद ( व्यास ), पुराणप्रवक्ते (त्र्य्यारुण, पराशर, मार्कंडेय ), पुराणचर्चा ( बळराम ),–कोणीं किती पुराणें सांगितली ? ( रोमहर्षण ), मार्कंडेयानें मार्कंडेय व वराह ( १ मार्कंडेय ), पराशरानें विष्णुपुराण सांगितलें (मैत्रेय कौषारव ), सुमन्तूनें भविष्यपुराण सांगितलें ( ४ शतानीक ),–नारदपुराण सारस्वत कल्पांत सांगितलें ( ३ नारद ), रोमहर्षणानें सहा पुराणें केलीं ( रोमहर्षण ),–शांशपायनानें केली ( शांशपायन ),–सांगणें व लिहिणें यांतील फरक ( रामहर्षण ),–श्रवणानें दोष नाश ( बहुला ).

पुरुकुत्साच्या नांवानें सर्पभयनाश ( २ पुरुकुत्स ).

पुरुष अंगुष्ठमात्र ( १ सावित्री ).

पुरुषाची स्त्री ( आसंग प्लायोगि, भंगास्वन ),–अदलाबदल ( द्रुपद व शिखंडिन् ).

पुरुषत्वाची प्राप्ति ( वध्रिमती ). –स्त्रीत्वच बरें ( भंगास्वन ).

पुरोहित–मुळें उत्कर्ष ( वृद्धद्युम्न आभिप्रतारिण ),–पराजय ( मुचुकुंद ),–वांचून नसावें ( अंगारपर्ण ),–अथर्ववेदांत कुशल असावा ( भृग्वंगिरस् ),–भरतांचें कुशिक, यदुतुर्वशांचे कण्व, यादवांचे गर्ग.

पुलहाश्रम गंडकीतीरीं (२ भरत).

पूजा–नवरात्र ( ३ तामस ),–अर्धवट टाकण्याचा परिणाम( २पांड्य).

पृथ्वी–प्रदक्षिणा ( परशुराम ),–सपाट व सुपीक करणें ( पृथु ),–त प्रवेश ( ३ राम ), एकावर एक विभाग ( मरुत् ),–दोहन ( पृथु ), अर्धप्रसूत–गाईस प्रदक्षिणा (अहल्या),–साहित्य ( घटोत्कच ).

पेटींतून सुटका (सप्तवध्रि आत्रेय).

पैयनिषेक ( अज एकपाद् ).

पैंगायणिब्राह्मण ( पैंग्य ).

पैशापेक्षां ज्ञान श्रेष्ठ ( श्वेतकेतु औद्दालकि ).

पौरोहित्य–( उदमय आत्रेय, उशनस् , कुरुश्रवण ),–क्षत्रियांचें वाजसनेयेतरांनीं नाकारिलें (८ जनमेजय),––अट (सोमश्रवस् ),–निष्णात क्षत्रिय (१ शर्याति),–क्षत्रियानें (१ देवापि),–( ३ द्रुम ),–यज्ञांत इंद्राचा ऐरावत आणणें ( पूर्णभद्र वैभांडकि),–असुरांचें ( शंडामर्क ),–तंटा, स्पर्धा, वाद (त्रिशंकु, २ परावसु, बृहस्पति, भूतवीर ३ मरुत, राम मार्गवेय, ३ वसिष्ठ, श्यापर्ण, संवर्त, सुदक्षिण क्षैमि ),–घातक दैवी उपाय ( असमाति, विश्वदिन् ).

प्रकाश मिळाला (सुनीथ शौचद्रथ).

प्रजोत्पत्तीविषयीं ( प्रजापति ).

प्रजोत्पादन दुसऱ्याकडून(दीर्घतमस्)

प्रजासत्ताक राज्य ( आनंद, ध्रुव, आंगिरस ).

प्रतिग्रह–हीनाकडून (वृधु तक्षन् ),–न करणारा ( कृश ).

प्रतीहारि नंदिन् ( कालभीति ).

प्रत्यक्स्थली नांवाची वेदि (शबरी).

प्रद्योतांची स्थापना( रिपुंजय ).

प्रलय–( ७ सुदर्शन ),–प्रलय केव्हां होतो ( १ मनु ). प्रलयभास ( २ सत्यव्रत ),–ब्राह्म ( २ सत्यव्रत ).

प्रवचन–( ऐतरेय ).

प्राचेतस मनूचें धर्मशास्त्र( १ मनु).

प्राणनिरोधानें देहत्याग( लक्ष्मण ).

प्राणाला इंद्रियें (स्थविर शाकल्य).

प्राणी–गेंडा ( धर्मबुद्धि ),प्राणहत्ती ( ४ विकट ).

प्रायश्चित्त–जप व पुराणश्रवण ( कौथुमिन् ),–( नचिकेतस् ),–गुप्त पातकाला (३ नारद ),–क्षत्रहत्येबद्दल ( परशुराम ),–पाखंडवादाचें ( १ वाल्मीकि ),–( बळराम, सुंडिभ औदन्य ),–ब्रह्मचाऱ्याचा व्रतभंग ( सुदेव काश्यप ).

प्रायोपवेशन–( ५ सुकर्मन् ).

प्राशित्रपुरोडाश ( विवस्वत् ).

प्रासाद शिखराचें पाडणें (३राम),

प्रेत–भेटणें ( ७ सुदेव ),–दाह (१ वसुदेव),–ला अग्नि दिल्यानें मुक्ति ( ९ भरत ),–उद्धार ( पर्युषित ),–मूल्यवान् गाडींतून नेणें (१ वसुदेव),–तेलांत ठेवून रक्षिणें (निमि, ४ भरत).

फांसे खेळणें ( बलि ).

फिट्सूत्रकार ( शांतनव ).

फितुर( शंडामर्क ).

फुलें मोफत देणें ( पुष्पवाहन ).

फेंसावर उपजीविका करणें (फेनप).

फेसानें शिरच्छेद ( १ नमुचि ).

बलि–राजे देणें ( जरासंध ),–मुलगा देणें ( रोहित, विश्वामित्र ).

बक्षिस देणें (४ भरत),–(चंद्रहास)

बंदुकीची दारु ( १ वैशंपायन ).

बलीला पातालांत घातल्याची मिति ( १ वामन ).

बलीच्या यज्ञाचा काल (१ वामन).

बहिष्कार ( काश्यप ).

बहिणीची भावास संभोगप्रार्थना(यम).

बाण–विषदिग्ध ( १ श्येनजित् ), कळकाचे ( स्यूमरश्मि ),–ला जाती ( ३ राम ),–एका बाणाने सातसात आठआठ वीर मारणें ( युयुधान ),–एकानें सात ताड छेदणें ( २ सुग्रीव ).

बादरायण–व व्यास भिन्न व बादरि भिन्न.

बांधणें-देऊळ गणपतीचें( निकुंभ),–पर्णशाला(लक्ष्मण),–सेतु ( ३ राम).

बांधून विहीरींत टाकणें ( रैभ ).

बार्हस्पत्यशास्त्र ( बृहस्पति ).

बालकापासून मृत्यु ( १ स्कंद ).

बालेय क्षत्र व ब्राह्मण ( बलि ).

बिल्ववृक्षाचें नांव ( बिल्व ).

बुद्धि तपानें ( वृद्ध गौतम ).

बृहन्नडेचें सारथ्यकर्म ( ३ विराट),

बेटें समुद्रांत बुडालीं (७ सुदर्शन ).

बोपदेवाला भागवत मिळालें ( बोपदेव ).

बौद्धधर्मांत घेण्याचे मार्ग ( २मय ).

बौद्धभिक्षु ( उत्तंक ).

ब्रह्मदेवाचें पाचवें मस्तक तोडणें (२ ब्रह्मन्, १ भैरव, १ महाकाल ), –चें अपूज्यत्व ( २ भृगु ),–लोकेश्वर नांवाचा.

पूज्यत्व ( २ भृगु ).

ब्रह्महत्या–( देवमित्र ),–चा दोष ( १ भैरव ),-चा नाश ( हेमकांत ),–नें रथ गेला ( लोहगंध ).–नाशार्थ अश्वमेध ( इंद्र ).

ब्रह्मचाऱ्यानें मध खाऊं नये ( श्वेतकेतु औद्दालकि ).

ब्रह्मणःपरिमरकर्म (मैत्रेय कौषारव).

ब्राह्मण–राज्यांत अनुज्ञा (ऋषभ ), –वंशानें, तपानें नाहीं ( १ मतंग ), –होणें व करणें ( २ गृत्समद, ३ भृगु ).–एपवीर जातीचें निंद्य ( ऐषवीर ).–पूरुकुलांतील;—चे रक्षण( कायव्य ),–वरानें ( कुशिक ) –वैश्याचा ( चित्रमुख, भलंदन ), मान व श्रेष्ठता ( ५ अग्नि व इंद्र ),–राक्षसकुलोत्पन्न ( ३.वपुष्मत् ),–फक्त दुराचारी क्षत्रियांचें शासन (दुर्वासस्), –क्षत्रिय होणें ( वितथ ).–देहान्तराशिवाय नाहीं ( १ विश्वामित्र ),– ब्राह्मणेतर ( परशुराम ),–ना त्रास दिल्यानें क्षत्रियांचा नाश ( बृहत्सामन् ),–च्या वादांत राज्यत्याग ( वैशंपायन ),–चें बल विद्या व तत्त्वज्ञान ( १ मुचुकुंद, २ याज्ञवल्क्य ),– व युद्ध ( अगस्त्य, वामन ).

भक्ति ( आकथ, बल्लाळ, जमदग्नि, द्रोण, परशुराम )–,भरद्वाज.

भरद्वाजसूत्र ( हिरण्यकेशिन् ).

भस्मानें ब्रह्मराक्षसाचा उद्धार- ( ५ वामदेव ),–सजीव करणें ( वीरभद्र ).

भस्म करणें ( १ सगर ),–मर्मस्थान ओळखण्याचे ( बर्बरिक ).

भाऊबीज–( यमी वैवस्वती ).

भागवतधर्म ( ४ योगेश्वर ).

भालदारचोपदार ( श्रोष ).

भिक्षेंतील मुलीशीं लग्न ( २ जरत्कारु ).

भुताटकी– जातहारिणी ( ६ चाक्षुष ).

भुंग्यांनीं मारणें ( ५ अरुण ).

भुयार ( १८ भीम ).

भूत ( २ बभ्रुवाहन ).-त विवाहसंस्था नव्हती ( १ भूत ),-संरक्षणार्थ ( ७ हंस ).

भूतभविष्यज्ञान ( हिडिंबा ).

भूमि–दान देऊं नये ( कश्यप ), –चाक गिळणें व उचलली जाणें ( कर्ण ),–समुद्र खणल्यानें समुद्रांत जाणें ( परशुराम ).

भौत्य मनु व सांगोपांग वेद ( ९ शांति ).

मच्छिद्र–( नाथशर्मन् ).

मणि–मृतसंजीवक ( दीर्घजिह्व २ धृतराष्ट्र, बभ्रुवाहन ), स्यमतंक ( अक्रूर, जांबवत्, सत्राजित् ), –अश्वत्थाम्याच्या डोक्यांतील ( युधिष्ठिर ),–पासून सोनें ( सत्राजित् ).

मणिमतराजे (पूर्व),–(१८ भीम).

मत्स्ययंत्रभेद (अर्जुन, २ लक्ष्मणा).

मत्स्यभक्षण ( १ सारस्वत ).

मदनाचीं स्थळें ( २ ब्रह्मन् ).

मद्यपान ( ३ कच, देवराज, बलराम, कृष्ण ),–मैरेयक (१ सांब).

मद्रक राजे ( १८ भीम ).

मधुपर्क कसा करावा ? (भागलि),– –गाईनें ( २ पार्थुश्रवस ).

मनुष्य नदी बनणें ( ८ बळ ).

मनुष्याचा वानर ( वेदनाथ ).

मनुष्यापासून इतरास संतति ( मत्स्यगंधा ),–मनुष्यास जनावरापासून संतति ( महिषासुर ),–स पोपट बनवणें ( मकरंद ),–चें पशुपक्ष्यांकडून संरक्षण ( पिप्पलाद, २ मूलक),–चा देवांशीं संबंध (१ बाण).

मनुस्मृतीचे चार भाग ( बृहस्पति ).

मंत्र–अश्लील ( अभ्यग्नि ऐतश ), –गर्भाधानांतील ( आत्रेय ),–संजीवनी (उलूपी, २ भृगु),–वाग्भव(औत्तम),– पठण ( औपमन्यव ),–भूताखेताचा (कश्यप ),–शांति ( उपरिबभ्रव, कांकायन, कौरुपथि ),–ह्रीम् फट् घेघें –( चंडिका ),–वाग्भव (६चाक्षुष),– षडाक्षर ( जमदग्नि ), अष्टाक्षर ( जयविजय-तांड),-शांति(जाटिलायन),-शिव (दाशार्ह),–नें विटी काढणें (द्रोण ),– शिव पंचाक्षर,शिवषडक्षर (धुंधुमूक),– पारीक्षित ( परीक्षित् ),–सामर्थ्य( परुच्छेप दैवोदासि ),– ७ भोज ( प्रगाथ, काण्व ),–बलि जिवंत करणें (बलि),– म्हणण्यांत मतभेद (भस्मासुर ),–भैरव ( १ भैरव ),–नें दीर्घायुष्य ( वत्सप्रि भालंदन),–नें उत्कर्ष (वसिष्ठ वैडव),– महामृत्युंजय ( १ वसिष्ठ ),–राम (वाल्मीकि ),–नें सैन्याचा मलमूत्रावरोध (शर्याति),–कन्याप्राप्तीचा (श्राद्धदेव ),– तीन अक्षरीं (५सुवर्ण),–वीस अक्षरी ( हरिधाम ),–इंद्राचा ऐरावत ( हर्यंग ),–द्वादशाक्षर ( ).

मन्वन्तर चाक्षुष ( वीरण ),– अधिप ( धर्मसावर्णि ),–तील विसंगति ( रुद्रसावर्णि )

मरण आधीं कळणें ( ९ श्वेत ).

मरणोत्तर गंधर्व अंगांत येणें. ( पतंचल काप्य ),–सामानें धूम्रशरीर (पतंग प्राजापत्य ).

मल्लयुद्ध ( कर्ण ).

मस्तक अर्पण करणें ( धर्मांगद ).

महः व्याहृतीचा पुरस्कार ( २ माल्यवत ).

मांस–स्वतःचें देणें ( वृषादर्भि),– खाणें सोडणें ( विचकाश्व २ वीरसेन, ३ शंकर ) ,–स्वतःचें मांस खाणें (९ श्वेत),–खावें काय ? ( नारद ).

मागणी सत्यवतीस(असित काश्यप).

मातुलगोत्राचा नियम ( शातातप ),–चा शाप ( ययाति ).
मातुलकन्यापरिणय ( रुक्मवती ).
मातृहत्या व तिला जिवंत करणें ( परशुराम, यज्ञशर्मन् ).
मानवांचा मूळपुरुष ( मनु ).
मानलेला मुलगा व भ्रातृत्व ( मधुच्छंदस् वैश्वामित्र ).
माप–आढक–,खारी ( पाणिनि ) जमीनीचे ( वरिभद्रक ).
मामाच्या गोत्रानें मातेला पाणी ( प्रजापति ).
माया–सोडणें ( प्रह्लाद ),–नें पक्षी बनविणें ( २ चित्रलेखा ).–गांधर्वी,–वैष्णवी (जालंधर),–प्रयोग (३शाल्व).–मृग (लक्ष्मण),-शहाण्णव प्रकार (?),–मिळविणें ( १ मय ),–विष्णुपुढें चालत नाहीं ( बलि ),–मय सीता ( ३ राम ).–शिर व धनुष्य ( २ विद्युज्जिह्व ),–युद्ध ( ३ प्रद्युम्न ).
माशाच्या पोटांतून जिवंत निघणें ( ३ प्रद्युम्न ),– नें सूक्ष्मरूप (हनुमत्).
मारेकरी ( चंद्रहास, ).
माहात्म्य–अन्नदान (रतिविदग्धा), अरुणाचल ( १ नंदिन् ), आकाशदिवा (वालखिल्य), एकादशी ( जयशर्मन्, बकदाल्भ्य, २ माल्यवत्, ४ मेधाविन्, शोभन, हरिश्चंद्र), कमल (१लोमश), कार्तिक ( ८ देवशर्मन् ), काशी ( ७ दमन), क्षीरकुंड ( ६ मुद्गल ), गंगा (धर्माश्वर, पद्मावती, मही, रत्नाकर, २९ वसु, बाह्लिक, सगर, सत्यधर्मन्), गयानदी ( युगादिदेव), गीता ( कुशीलव, खड्गधर, चंद्रशर्मन्, ज्ञानश्रुति, २ दुःशासना, ६ देवशर्मन्, धीरधी, ३ पिंगल, बटु, ५ माधव, मित्रवत्, ५ शंकुकर्ण, सरभभेरुंड, सरोजवदना, सिद्धसमाधि, १ सुकर्मन्, २ सुनंद, ७ सुशर्मन्, गो ( कल्माषाद, च्यवन, फेनप ), गोदान ( नाचिकेतस् ),–गौतमी माहात्म्य (१शुक, ४शूरसेन ),–चिताभस्म ( १ शबर ), ज्ञानवापी ( ३ सुलोचना,–तलिदान–तीर्थ ),–(५ ( भोज ), तुलसी ( १ धर्मदत्त, १ पवित्र, भक्षक, १ शबर ), त्रितकूप ( त्रित ), दीप ( १ निष्ठुर ),द्वीपदान ( ८ बुध, १८ भद्र,–देवीभागवत ( १ लोमश ), नदी ( गौतम ),–मातापितृ ( नरोत्तम, नारायण,(गरुड), पातिव्रत्य ( ७ कौशिक ), पादत्राण ( २ शंख ), प्रयाग ( १ मार्कंडेय, १ युधिष्ठिर, ७ सुरथ ), बिल्वपत्र ( ३ सुमित्र), ब्राह्मण( इंद्र ),(भस्म) भागवत ( ४ वज्रनाभ ), भूमिदान ( भद्रमति ), मंगल ( १ विरोचन ), महेश्वरव्रत (२ शारदा), माघस्नान (कार्तवीर्य, ३ भद्रक, ५ हारीत ), रामनाम ( जीवंती ), रुद्र ( आलंबायन ), लक्ष्मीव्रत, ( श्यामबाला ), वेतसीवेत्रवतीसंगम ( धरापाल ), वेताच्या काठ्याच्या वळांचें ( १ विष्णु ), वैशाख (कीर्तिमत् रूपवती, २ शंख ), व्याघ्रेश्वर ( दुंदभि, निहाद ), शमी ( ४ पिंगल ), शिवभक्ति ( ३ भद्रसार ), शिवसहस्रनाम (तंडि), संगमस्नान (विदुर), समुद्रस्नान (५ सुद्युम्न ), सरस्वतीबीजमंत्र (सत्यतपस् ),–साबरमती( गंगा ), स्नान ( ३ चेकितान ).
माहितींत फरक पडण्याचें कारण ( २ धर्म ).
मिश्रजातींची उत्पत्ति ( रोमहर्षण.)
मुलें मारणें ( कृष्ण, कंस ).
मुकुट–रावणाचा (२ सुग्रीव). मुलांकरितां क्लिष्टसूक्त (भूतांश काश्यप).
मुक्ति–सरूपता ( रत्नग्रीव ).
मुलामुलींचें हक्क ( १ मनु, ).
मुलांचें आरोग्य ( रोहित ).
मुली जिंकून आणणें(भीम,२विदर्भ).
मूद्गर गाडीला जुंपणें ( मुद्गल ).
मुनीची अजगरवृत्ति ( प्रह्लाद ).
मुसळ पोटीं येणें ( कृष्ण ).
मूर्ति–करणें ( स्वारोचिष)–वासुदेवाची ( ३ राम ),–विक्रय ( १ वामदेव ),–हयग्रीवउपासना ( भद्रश्रवस् ),–वामनाची ( १ ऽरमा ).–(२ धन्वन्तरि ).
मृताला जिवंत करणें ( कुमार, कृष्ण, कृश, १६ कौशिक, २ भरद्वाज, २ रैभ्य, ६ सुव्रत ).
मृतांचें पुनर्दर्शन (कुंती, व्यास),–शब्द ऐकविणें ( ८ बल ).
मृत्यु–वणव्यानें(धृतराष्ट्र,९संजय),–स जिंकणें ( १२ श्वेत ),–वर जय ( नचिकेतस् ).
मूळगंडान्त ( मिहिराचार्य ).
मेलेल्या स्त्रीबद्दल तीच स्त्री मिळविणें ( अश्वचक्र, ऋतध्वज ).
मैत्रायणीशाखा( मित्रयु, हारिद्रव).
मुंडकें पायांस चिकटणें ( ४ महोदर ).
मृगव्यासानें मृगजन्म (२भरत),–मृगमांसानें हव्य व कव्य ( अगस्त्य ).
मृग, मृगव्याध व रोहिणी यांची उपपत्ति ( रुद्र ).
मृत शरीरांतील भाग नेण्याविषयी प्रार्थना ( बृहदुक्थ वामदेव ).
मृत्युयोग ( मरुत् ).
म्लेच्छाचें ब्राह्मणांत परिवर्तन ( अग्निहोत्रिन् ),–( ३, ४ अंग ),–( द्रुह्यु ),–( नग्नक, निरय ),–त्यांची कृत्यें ( पुरोचन ),–झालें ( ६ प्रचेतस् ),–यज्ञ ( २ प्रद्योत ),–चा नाश करणें ( प्रमिति ),–भाषा ( ९ भरद्वाज, १८ भीम ),–चा नाश करणारा),अग्नियंत्र, वायुलोक(महावायु),–( महीचंद्र, मादी, मिहिराचार्य ),–मतप्रचार ( मूशा ),–( मोदसिंह ).
यक्षांचा गुप्तसंचार (१ युधिष्ठिर),–राक्षस ( ताटका ).
यजुर्वेद–रामाला येत होता ( ३ राम ).
यज्ञ ( कौलकावती ),–अग्निचयन (कालकंज, शांडिल्यायन, सीरध्वज),–

अग्निष्टोम ( इंद्रजित्, प्रजापति, भंगास्वन, रोमहर्षण), अतिरात्र, ( औदवन ), अभिचार ( भद्रसेन, आजातशत्रव ), अश्वमेध ( २ अंशुमत् आंबष्ठ्य, अविक्षित, २ इंद्रद्युम्न, इंद्रजित्, इंद्रोत दैवाप शौनक, उलूपी, ऋषभ याज्ञतुर, और्व, कल्माषपाद, ऋत्रांग), शेवटला अश्वमेध ( जनमेजय, जानकि, त्रसदस्यु, पौरकुत्स, देवमित्र शाकल्य, दैवराति, धृतराष्ट्र, वैचित्रवीर्य, नकुल, १ नंदिन्, नल, ९ नल, बकदाल्भ्य, बलि, बभ्रुवाहन, १ बाहु, ३ भरत, ३ भरद्वाज, भागुरि, १८ भीम, मयूरध्वज, मांधातृ, मिधु, भेद्रिम औदन्य, मेघवर्ण, मेघसंधि, मौद्गक, मोहना, २ याज्ञवल्क्य, युधिष्ठिर, रथाग्रणी, ६ रिपुंजय, रिपुताप, रिपुवार, ३ रुक्मांगद, १ वसुदेव, विजिताश्व, ४ विमल, वैशंपायन, शतानीक, शर्याति, शिशुपाल, १ सगर, ४ सत्यवत्, ३ सत्यवती, ८ सुकेतु, सुदास, ७ सुबाहु, सुमंत्र, ८ सुरथ, सोमदत्त, ४ सौभरि, हंसध्वज, २ हर्यश्व, हिरण्यकशिपु, हिरण्यनाभ कौसल्य ), एकोनपंचाशद्रात्र ( १ वसिष्ठ ), गोमेध ( इंद्रजित् ), गोवर्धन ( इंद्र ), चतूरात्र (अत्रि जमदग्नि), ज्योतिष्टोम(अरुंधती ), त्रिष्टोमक्षत्रधृति ( वृद्धद्युम्न आभिप्रतारिण ), डोळे साफ होण्याकरितां त्रिहविष्का ( ऋतुजित् ), दाशरात्र ( उदंक शौल्बायन, कुसुरुबिंदु औद्दालकि ). दाक्षायण ( देवभाग श्रौतर्ष, सहदेव साञ्जय), द्विरात्र(आंगिरस, कपिवन, २ चित्ररथ) धनुर्याग ( कंस, कूट, २ चाणूर ), नऊ महिन्याचा यज्ञ( नवग्व ), नवान्न ( कहोड ), पंचरात्र ( शौचेय सार्वसेनि ), पवतृत्वाकरितां ( बबर प्रावाहणि ), पुत्रकामेष्टि (इल, जनक, ३ राम, श्राद्धदेव ), बहुसुवर्णक ( इंद्रजित् ), बृहस्पतिसव ( जानश्रुतेय ), मरुत्स्तोम ( १ भरत, ३ भरत ), माहेश्वर (इंद्रजित्, बकदाल्भ्य), राजसूय ( कृष्ण, इंद्रजित्, जमदग्नि, जैत्राप सहोजित, नकुल, बभ्रुवाहन, भगदत्त, १८ भीम, मांधातृ, ८ वामदेव, १ युधिष्ठिर, १ रोचमान, ३ रोचमान, २ लवण, ४ विशालाक्ष, ३ शाल्व, शिशुपाल, १० सहदेव, २ सुदक्षिण, ८ सुमति ). वाजपेय ( औपावि, जानश्रुतेय, सीरध्वज ), विश्वजित् यज्ञ ( नचिकेतस्, बकदाल्भ्य, बलि, बुलिल आश्वतर आश्वि, रघु), वैष्णव ( इंद्रजित्, दुर्योधन, ६ मुद्गल ), शमनचिमेढ्र (कुषीतक सामश्रवस ), शुनस्कर्णस्तोम ( शुनस्कर्ण बाष्किह ), सप्तरात्र ( कुसुरुबिंद औद्दालकि, क्रतुवित् जनक, जानकि), सोमयाग ( प्रजापति, वम्र, श्यापर्ण ), सौत्रामणि ( दुष्टरितु पौंस्यायन ),–दृष्टि येण्याकरितां ( रजन कोणेय किंवा कौणेय ),–संतति देणारा ( वीतहव्य श्रायस ).

—अग्न्याधानसमयीं मौन ( अरुण औपवेशि ),–न्यून सुधारणें ( अर्बुद काद्रवेय ),–कुंडाच्या विकृततेमुळें मृत्यु ( आषाढि सौश्रोमतेय ), अयोग्यत्व (कवष ऐलूष),–मांधात्याचा(कार्बंधि), –तून रथ व ध्वज (कार्तवीर्य ),–अभिगिर व अपगर ( कुर्षंड ),–कशिध्वजाचा ( क्षेमधृत्वन्, खांडिक्य ),–गयाचा ( ५ गय ),–( गयासुर ),–( गोश्रु जाबाल ),–बुलिल आश्वतराचा ( गोश्ल ),–दक्षाचा (चंडी ), –युधिष्ठिराचा (३ चित्ररथ),–मरुत्ता ( जयविजय ),–( त्रिशंकु ),–प्रथम वाजपेय व नंतर बृहस्पतिसव ( दक्ष ), –प्रक्रिया निश्चित ( दिलीप ),–एकच एका पिढींत दोनदां नाहीं (दुर्योधन), –श्वेतकीचा( दुर्वासस् ),–देववाताचा, –पात्र द्रोणकलश ( द्रोण ),–त हविर्भाग ( १ धन्वन्तारि ),–बत्तीस हात सोन्याची वेदि ( परशुराम ),– तीन अंगुळें वेदि ( पांचि ),–त मत देणारा ( पैंगिन् ).–( प्रागहि ),–प्रायश्चित्त ( प्रावहि ),–युद्धसाहित्य व माला ( बलि ),–ब्रह्मयाचा ( गायत्री, २ ब्रह्मन् ),–मरुत्ताचा ( युधिष्ठिर ),–हौत्रकर्म ( रथवीति दार्भ्य),–(लामकायन ),–ज्ञाता ( शंयु ),–हवि वानरानें पळविला ( शितिबाहु ऐशकृत ),–शास्त्रनिपुण ( शौनक स्वैदायन ), ( हयग्रीव ).

यमुनातीरीं राजधानी ( पृथु ).

ययातीला स्वर्ग देण्याकरितां इतर प्रदेश देणें ( ६ शिबि ).

यात्रा–वारणावताची ( १८ भीम )

याद्व तिरिंदिरांचे दास( २याज्ञवल्क्य)

युग–कृत ( उपमन्यु वासिष्ठ, तंडि, २ बभ्रुवाहन, बलि, १ बाहु, मत्स्य, ८ मधु, १ विश्वामित्र ), त्रेता(जनक, तृणबिंदु, ३ नरक, १ मंकि, १ भरद्वाज, ), द्द्वावें ( १ मार्कंडेय ), –अठ्ठाविसावें (३ राम), द्वापार (ज्ञानभद्र, १ मंकि, व्यास, श्यामबाला ),–एकोणिसावा पर्याय ( सपौल ).

युद्ध–त नम्र (कोटरा); भूरिश्रव्याचा गैरसावध स्थितींत हात तोडणें ( युयुधान ),–त प्रार्थना ( बृहस्पति ),–करितां ब्राह्मणवेशानें ( जरासंध, १८ भीम ),–दृष्टिभ्रम उत्पन्न करणें ( ३ राम ),–शरासनस्थ व सुवर्णकवचधारी ( १ अलंबुस ),–लग्न ( प्रमिक ),–शक्ति तोडणें ( ३ राम ),–त स्त्रियांची विटंबना ( रावण ),–शस्त्रास्त्रें ( पायु भारद्वाज ),–नियमभंग (अभिमन्यु ), दुर्गयुद्ध व मिरच्याची धुरि ( परशुराम ),–( युधामन्यु ),–हस्ति (दण्डधार ).

योग–ध्यान (१सुतार),–(शौनक), महायोग्याची संगति (मंदार, २ सोमदत्त ),– ( २ भरत ),–निमणात ( बर्हिषद ),–शास्त्र व सूत्रें (जैगीषव्य,

२ यति, २ याज्ञवल्क्य ),–सामर्थ्य ( उषा, गरुड, ९ सुवर्चस् ),–मुलें जिवंत करणें ( असमंजस् ),–आचार्य ( हिरण्यनाभ ),–माया ( १ मुर ),–मायेनें गर्भचलन ( २ रोहिणी ),–परकायाप्रवेश ( कल्माषपाद, मरुत्, लकुलिन् वैखानस ),–अभ्यासकास दृष्त व पूर्णतेच्या अभावाचा परिणाम ( वैराज ), योगवासिष्ठ ( ४ वसिष्ठ ), –साधन करणें ( १ सुहोत्र ),–( शशबिन्दु ),–( भालुकि ). योगतंत्रग्रंथ ( ब्रह्मदत्त ), योगभ्रष्ट ( १ सगर ), —सिद्धि ( १ मरु ),–मुक्ति (मधुच्छंदस् वैश्वामित्र ).

योगिनीपासून शक्ति ( १ शत्रुघ्न ).

योनि–प्रेत ( कुकुर्दम ).

यौवराज्याभिषेक ( अंगार, कैकेयी, ४ भरत ).

रक्ताची घाण ( लोहगंध ),–पासून संतति ( रक्तबीज ),–नें पितृतर्पण व पिंडदान ( ३ वपुष्मत् ),–सुवासिक ( गणपति ).

रंगभूमि ( कर्ण ).

रत्नाची खाण ( ८ बल ).

रथ–चाकें, बैठकी व धुरा तनि असलेला पक्षी व गाढव वाहन (अश्विनी कुमार ),–ला घोडे ( इंद्र),–दिव्य ( इंद्रजित् ),–सोन्याचा ( २ गार्ग्य ),–पाण्यांत न बुडणारा ( दिलीप ),–अप्रतिहत ( देवव्रत् ),–आकाशात उडणारा ( शरभंग ), –अष्टाश्व ( अक्ष ),–( त्रिंशदश्व ),–एक चाकी ( १ प्रियव्रत ),–यज्ञ सामुग्री आणणाऱ्या, रथास गाढव ( अश्विनीकुमार, १ मतंग ), हजार घोड्यांचा ( ३ नरक ),–तेहतीसशें घोड्यांचा ( ४ भरत ),–शताश्वाचा ( अलायुध व घटोत्कच ),–नेहमीं दोन घोडे ( ३ शल ),–आठ रथ फेकणें ( १८ भीम ),–वरील बाणसंग्रह ( २ विशोक ), युद्धांत दुसऱ्याच्या रथांत शिरणें ( १८ भीम ),घोडे गुडघ्यावर करण्यानें योद्ध्याचा बचाव ( अश्वसेन ),–रथाचें वंशान्तर ( ५ जनमेजय ),–सुवर्णरथानें सर्व पृथ्वी सहा दिवसांत जिंकली ( ययाति ).

रथी लोकांचे दर्जे ( १ युधिष्ठिर ).

राक्षस–( १ पुलक ),–कुबेरानें निर्माण केले ( मुचुकुंद ), राक्षस व असुर भिन्न-राक्षस दुसऱ्यावर सोडणें ( ५ मद, ३ शल ),–ना मनुष्याचा वास ( १८ भीम ),–सामर्थ्य रात्रीं (घटोत्कच), वारांगना राक्षसी (रंभा), राजा निवडीत ( २ गाधि ),–पराक्रमानें राज्य संपादीत ( १ मुचुकुंद ).

राज–नीति ( इंद्र उद्धव उशनस्, २ वसुमत्, वसुमनस् ), राजधर्म व अर्थशास्त्र परशुरामानें भीष्मास शिकविलें ( भीष्म ),–पदच्युताचा सत्कार केल्यास दंड ( नल ), राजशास्त्रकार ( ९ भरद्वाज ), राजा कोणा ला म्हण तात ? ( १ सूत ),–नें यज्ञ थांबविणें ( बकदाल्भ्य ),–चे उपचार छत्र, चामर, नजराणें ( ४ भरत ),–राज्यपद्धति ( दुष्यंत ),–ला सोळा प्रधान असावेत ( बृहस्पति ),–चा वारसा ( १ बाह्लीक ),–वारस त्वग्रोगी किंवा पाखंडी नसावा ( १ देवापि ),–वारस वडील मुलगा ( २ चित्ररथ ),–नें मुक्ति ( ४ हयग्रीव ).

राज्याभिषेक–ला सद्रोदक ( जांबवत् ).– नें पशुसंपत्ति ( पृथु ) ( ४ भरत ),–च्या मंत्रांतील मतभेद ( सत्यकाम जाबाल ). लोकशासित राजा व राज्य ( अत्रि व जनमेजय ) राज्याचें उत्पन्न ( गालव ).

राधेची उत्पत्ति जन्मतिथि व लग्न.

रामलीलेचा प्रचार ( मधुव्रति ).

रामानंद राजा ( प्रियानंद ).

रामायण रामानंतर ( वाल्मीकि ).

राशि—तूळ ( युधिष्ठिर ),–प्रजापति.

रुद्रपशु ( ३ पूषन्, मिहिर व सत्यदत्त ).

रुद्रशिर ( २ ब्रह्मन् ).

रूपांतर–गाढवाची लांडगी ऋज्राश्व, नागाच्या विषानें ( कर्कोटक ),–नें बाई पळविणें ( २ विशालाक्ष ),–( अकृणव्रत अरुंधती., कूर्म, घटोत्कच ). अश्वमेधानें ( इल ),–धूरांत ( उच्चैश्रवस् ), पुरुषाची स्त्री ( भंगास्वान ),–( २ दमयंति ),–( २ अरिष्ट ),–( त्रित ),–डुकरांत ( गीतविद्याधर ),–किंदम ( किरात ),–मृगांत ( कुंती ),–पक्ष्यांत ( उद्धत ),–रात्रीं कोंबडा होणें ( ११ कौशिक ),–शंखरूपांत ( २ पंचजन ), वगैरे.

रेखागणित ( २ मय ).

रोग–अपस्मारादि ( १ स्कंद ), –उदर ( रोहित ), कुष्ठ ( घोषा, जयस्तोम, २ नंद, विदारुण, १ सांब, सोमकान्त, सोमनाथ, हेममालिन् ),–क्षय ( दक्ष, भीष्म, रोहिणी, विचित्रवीर्य, घोर ), शीत-ज्वर ( २ ज्वर ),–त्वग्रोग ( देवापि आर्ष्टिषेण ),–मस्तकशूल ( १ सावित्री ), –महारोग ( ६ सुयज्ञ ).

रोहिणीशकटभेद ( शनि ).

लग्नापूर्वी भवानीचें दर्शन ( रुक्मिणी ).

लिंगदेह ( मांडव्य ).

लेखक–यमाचा ( ३ चित्र ),–सूर्याचा पिंगळ ( विवस्वत् ),–( गणपति ).

लेखनांतील दुष्कर्मांबद्दल प्रायश्चित्त ( ३ रोचमान ),–व्यवहार ( १ मरीचि ).

लेपन–चंदन ( दत्त ),–रक्त ( गणपति ).

लोक–अलिन ( ६ शिष्ट ),–अश्व ( १ विश्वामित्र ),–आंध्र ( १ मनु ), आभीर ( अष्टावक्र, नकुल ), उत्सवसंकेतगण ( नकुल ), उदकराक्षस ( धुंधु ), ओड्र ( १ मनु ), कांबोज ( १ मनु, १ सगर ), कारूपक, ( करूष ), किरात, नकुल, पौंड्रक वासुदेव ( विश्वामित्र ),

कुरु ( ३ कुरु ), कृमि ( ३२ वसु ), कोल्लगिरेय ( अर्जुन ), कौळी (गरुड), गज ( २ इरावती ), गुह्यक (३कृत ग्रामणीय ( नकुल ), चीन ( १ मनु ), जहु, तालजंघ (और्व), दस्यु (कायव्य) दानव ( ३ भरत ), द्रविड (१ मनु), द्वारपाल ( नकुल ), धार्ष्टक( १ धृष्ट), नंदिवेग ( ६ शम ), नाग, निषाद ( कायव्य ), नीप ( ७ जनमेजय ), पक्थ ( ६ शिष्ट ), पन्नग( कालिय ), पह्लव ( नकुल, १ मनु, विश्वामित्र, १ सगर ), पारद (१ सगर ),पारावत ( १ पारावत ), पिशाच ( पिशाच ), पुंड्र ( १ विश्वामित्र ), पुलिन्द ( १ विश्वामित्र ), पूरु (त्रसदस्यु पौरुकुत्स), –प्रियमेध, बर्बर ( कर्ण, नकुल, [ पूर्व ] १८ भीम ), विश्वामित्र ( १ सगर ), भरत ( १ भरत ), भलानस् ( ६ शिष्ट ), भोज, भोजक ( निशुंभ ) मग ( निशुंभ ), मत्स्य ( श्वसन् द्वैतवन ), मत्स्याहारिन् ( नकुल ) मरुक, पंजाबचे मनु, ( २ मौन ), मुष्टिक ( मुष्टिक ), मूतिब ( १ विश्वामित्र ), मेद ( १ मनु ), म्लेच्छ ( ३ भरत ), (१ यति), यवन ( और्व, कर्ण, नकुल, १ मनु, १ मुरु, विश्वामित्र, १ सगर), रुम, रुशम ( ऋणंचय, रुशम ), लौहित्य (१८ भीम), रामठ (नकुल), विषाणिन् ( ६ शिष्ट ), व्याध ( एकलव्य ), शक ( नकुल, ३ भरत, [ पूर्व ] १८ भीम, १मनु, विश्वामित्र, १ सगर ), शबर ( १ विश्वामित्र ), शशक ( कर्ण ), शिव ( ६ शिष्ट ), शिव ब्राह्मण ( ८ शिव ), शूद्र ( नकुल ), श्रोणिमत् ( १८ भीम ), श्विक्र, सर्प, सागरवासी ( १८ भीम ), सुवीर (९ सुवीर), सृंजय (१ सृंजय), सोमपेय [ पूर्व ] ( १८ भीम ), सौदन्ति ( ४ विश्वामित्र ), हारहूण ( नकुल ), हिरण्यकेशिन्, हैहय (और्व).

लोखंडी अवयव बसविणें ( अश्विनी कुमार ).

लोहमय बनला ( २ शाकल्य ),

वंश नसल्यानें स्वर्गच्युति ( २ यायावर ).

वज्रनिवारक—( जैमिनि. )

वत्स नांव पडण्याचें कारण ( ३ वत्स ).

वनरक्षक ( जंबुमालिन् ).

वनवास(—असमंजस्,त्रिशंकु,नल, १ युधिष्ठिर, रोहित), वानप्रस्थ, (बृहदश्व, ययाति ).

वय–वरापेक्षा वधूचें जास्त ( ज्यामघ, रेवती ).

वराहापासून अवतार सुरु ( वराह ).

वर्णाश्रम—सुरु केलें ( आनंद )- (कल्कि १ रैवत,–विश्वस्फणि ),–कैवर्त मद्रक, पुलिंद व ब्राह्मण यांचा वर्णांत संग्रह ( ६ पुरंजय, विश्वस्फणि ),–तीन भाऊ तीन वर्णांचे ( बृहद्गिरि ), कर्मानें वर्णान्तर ( २ भलंदन ),–क्षत्रिय व वैश्य होणें ( ३ सुप्रभा ), वर्णाश्रम धर्मांत दृष्टिभेद ( ३ राम, शंबूक ), शूद्र व शूद्रस्त्री (५ गौतम), वर्णाश्रम (२ देवापि), वर्णसंकर (गंगासिंह ), गोहत्येनें शूद्रता ( १ पृषध्र ).

वर्षांतून एक उपवास (१८ भीम).

वशीकरण ( प्रजापति ).

वषट्कारवर्णन ( हिरण्यदत् बैद).

वसंतसंपात ( पराशर, बौधायन).

वसाहतकार ( काश्यप ).

वस्त्रें नलास दिलीं ( कर्कोटक ),–बरच्या अंगावर नाहींत ( कंस ),–एकवस्त्रा रजस्वला ( द्रौपदी ),–चिंध्या नेसणें ( दुर्वासस् ),–वस्त्रानें विषबाधा कमी होणें ( नल ),–गळलेल्या मयूरपिच्छाचें(पुष्करमालिनी), लक्ष्मीपासून झाली ( माया ), चोळी घालणें ( मारीच ).

वाजसनेयब्राह्मण ( वैशंपायन ).

वांटणी–द्रव्य व पशु यांची (कात्यायनी, गिरिज बाभ्रव्य, देवभाग श्रौतर्ष, १ नाभाग ).

वाडवांचा प्रसाद( २ याज्ञवल्क्य),

वाद–अजवध ( उपरिचर वसु ), गायत्रसाम( गिरिक्षित औच्चामन्यव), दक्षिणेसंबंधीं (जयविजय),-(कहोड), वसिष्ठविश्वामित्र(कल्माषपाद,वसिष्ठ), ब्राह्मणक्षत्रिय ( दधीच ),–सार्यहोम ( आसुरि ),–(देवमित्र शाकल्य ),–त ब्रह्महत्या ( कहोल, कौथिमिन्, बंदिन्, वैशंपायन, १ विदग्ध शाकल्य ).

वाद्य–दुंदुभि (४ ऋषभ,जरासंध).

वानरानें वाढविलेला मनुष्य ( ९ बृहद्रथ ).

वायूंत संचार ( मरुत् ).

वाऱ्यानें शिळा उडाल्या(रंभा),

वार (४ पुलस्त्य, २ याज्ञवल्क्य ).

वारस–मुलीचा मुलगा (बभ्रुवाहन ).

वारुणीपाशानें बांधणें ( प्रह्लाद ).

वार्तिककार–(कात्यायन,पौष्करसादि वाजप्यायन, व्याडि, शाकटायन, शाकल्य ).

वास्तु–कार्यांत प्राधान्य(विपाप्मन), –शास्त्रकार ( अत्रि, अनिरुद्ध, उशनस्, कुमार, गर्ग, नंदीश, ३ नारद, पुरंदर, बृहस्पति, १ मय, २ ब्रह्मन्, ३ भृगु, ३ मानव, ४ वसिष्ठ, ५ विशालाक्ष, २ सनत्कुमार ),–तत्त्वकार ( भरद्वाज ).

वाहन–पक्षी व गाढव(ऋक्षाश्व), पालखी (नल, २ नहुष, बक दाल्भ्य), –मयूर ( २ बाण ).

विदर्भकुल ( ३ भरत ).

विदुराचा प्राण युधिष्ठिरांत आला ( युधिष्ठिर ).

विदेहांतील गाई ( वृत्र ).

विद्या–अक्ष ( ऋतुपर्ण, नल, २ बृहदश्व, १युधिष्ठिर ),–अग्नि (नल), –अग्निशिरास्त्र ( अंगारपर्ण ),–अध्यात्म ( उद्दालक, उदंक शौल्बायन आरुणि, धर्मारण्य ),–अंतर्धान (२ क्रोधवश ).

–अद्य ( नल ),–अर्थशास्त्र ( १ मनु, सुधन्वन् ),–अश्व ( ऋतुपर्ण, नकुल, नल ),–अस्त्र ( इंदीवराक्ष, कृप, घटोत्कच, द्रोण, ४ शतानीक ), –आकृति ( नल ),–आत्म (कुशध्वज, खांडिक्य),–आयुर्वेद, ( इंदीवराक्ष ), –कर्ममार्ग ( खांडिक्य ),–क्षात्र ( कुशलव, १ यति),–खड्ग ( १८ भीम, हरिणाश्व ),–गदा ( १८ भीम ),–खोदकाम (खनक),–गणित ( नल ),–गान (उत्तरा, ऋतध्वज, २ दमयंती ),–गारुड (आकृति),–गोरति ( दीर्घतमस् ),–चाक्षुषी (अंगारपर्ण), –जल ( नल ),–जलस्तंभन ( दुर्योधन ),–देवहूति ( दुर्वासस्),–धनुष्य (कृप, चंद्रहास, धर्मव्याध, २ नहुष, १८भीम, युधिष्ठिर, वृषपर्वन्, २ शिखंडिन, १ शुक्र, ५ सत्यधृति, १ सुधन्वन्),–पंचाक्षरी (दुरासद, १ रुद्र), –पद्मिनी ( स्वरोचिष ),–पर्वतस्तंभन ( अगस्त्य ),–पुष्प ( नल, उपरिच वसु),–प्रति ( १ युधिष्ठिर ), –प्रवर्ग्य ( दधीच ),–प्राण ( आरुणेय, उपकोसल कामलायन, ब्रह्मदत्त चैकितानेय, १ यति ),–ब्रह्म (उद्दालक आरुणि, कबंधी कात्यायन, त्वष्टाधर, नारद, प्रतर्दन, बलराम, ब्रह्मन्, १ मनु, २ यदु, युयुधान, वीरण, हनूमत् ),–चा संकेतानें उपदेश ( विरोचन ),–सांगण्याकरितां राज्यत्याग(१ बालाकि), –मंत्रतंत्र (अश्विनीसुत, १ धन्वन्तरि), –मधु ( दधीच ).–माया ( प्रह्लाद), –मोहिनी( सुनीथा ),–रत्न (व्याडि), –रथ (१८भीम),–राक्षसी(घटोत्कच), –वास्तु ( १८भीम ),–वायु ( गर्ग, प्रह्लाद ),–वारि ( गर्ग ),–विषहारी ( काश्यप ),–वेद ( बळराम ),–वेदविद्या प्रथम असुराकडे ( वृत्र ),–वैद्य ( आत्रेय, कृष्ण आत्रेय, धन्वतरि, ),–वैश्य ( १यति ),–शस्त्रास्त्र (अश्वत्थामन्, कर्ण, च्यवन, दुःशासन, शल्य, वसिष्ठ, सगर, १० सहदेव ),–शांडिल्य ( १ शांडिल्य ),–शिल्प ( त्वष्टृ ),–संजीवनी ( उशनस, कच, जालंधर, देवयानी, ३ भृगु, शुक्र ),–ससर्परी ( जमदग्नि, पुत्रजितजमदग्नि, ४ विश्वामित्र, १ शक्ति ),–साम ( चैकितानेय ),–सारथ्य (दुर्योधन),–साविन्राग्नि ( अहाना आश्वत्थ्य, जनक, १ भरद्वाज, शूष, वार्ष्णेय ),–सोम ( नारद, भीम वैदर्भ ),–स्थल ( नळ), –स्थलमापन ( स्थपति ),–स्थापत्य ( ८ जनमेजय ),–दुसऱ्यास दिली नाहीं ( गिरिज बाभ्रव्य ),–परत करणें ( २ याज्ञवल्क्य, वैशंपायन ).

विधवा-अदृश्यन्ती ( पराशर ),–(अनसूया),–(कुन्ती,कुब्जा,५गौतम).

विनायक,( २ पिंगल, १ माठर ).

विमान–स्फटिकमय ( उपरिचर वसु ),–( २ चित्रकेतु ),–सवर्णाचें ( दत्तात्रेय ),–( धनपाल धरापाल, ध्रुव),–देवांचीं ( २ भृगु ),–वैहानस नांवाचें (बलि),–पुष्पक (कुबेर, माल्यवत्, ३ राम, हनुमत् ),–( ६ शिबि ), –शीघ्रगामी ( खट्वाङ्ग ),–( सुमूर्तिमत् ),–सौभ ( ३ शाल्व ),–( ६ श्वेत ),–पितरांचीं ( २ बर्हिषद ),–विस्तृत विमानें ( ७ बुध ),

विवाह–पुत्र देण्याच्या अटीवर ( अर्जुन, उद्दालक, प्रभंजन),–अनेकपतित्व (जटिला, द्रौपदी, माधवी),–गांधर्व (उलूपी, २कण्व, गायत्री, घंट, ३ भरत, शकुंतला ),–जरठकुमारी विवाह ( च्यवन, २ जरत्कारु ),–मिश्रविवाहाला प्रतिबंध ( जातूकर्ण्य ),–स पित्याची संमति ( तपती ),–मुलीस मागणी घालणें ( १ पांडु ),–मुली करितां पैसा देणें ( १ पांडु ),–मन व विधि यांत विधि श्रेष्ठ ( अम्बा, पुलोमा, भीष्म ),–( माधवी ),–मुली करितां मागणी घातल्यानें यज्ञांतन हकालपट्टी ( रथवीति दार्भ्य ),–दुसऱ्या विवाहाकरितां विशेष नियम ( १ रुक्मांगद ),–ची आवश्यकता ( २ रुचि),–चा पण मत्स्ययंत्रभेद (द्रौपदी, लक्ष्मणा ),–गुहेंत येणें ( वृद्धा ), –सात मस्त बैलांना जिंकणें (४ सत्या), –जिंकलेल्या स्त्रीशीं विवाह (२ शाल्व, रुक्मिणी )–संस्थेचा प्रारंभ ( श्वेतकेतु औद्दालकि, दीर्घतमस्), पैशाच व प्राजापत्य ( आपस्तंब ),–पितरांच्या उद्धारार्थ ( धर्मवर्ण, जरत्कारु ),–( शरीरसंबंध पहा ).

विश्वरूपदर्शन ( कृष्ण, धृतराष्ट्र, अक्रूर, प्रह्लाद, भीष्म ),–( वृद्धकन्या २ मंदोदरी ).

विष–( असित, कर्कोटक, पूतना, १८ भीम ).

विष्णूनें सांगितलेला धर्म ( बर्हिषद् ),–नें हविर्भाग खाणें(बृहस्पति), –चें पाखंडी अवतार ( मायामोह ),–चें सहस्रनाम ( ४ वामदेव ),–च्या बारामूर्ति व अवतार ( १ विष्णु ),–चें मस्तक तुटणें ( हयग्रीव ).

वायप्राशनान संतति ( २ नारद, १ मकरध्वज),–कानांतून ( हनुमत ), पतितवीर्यापासून संतति (मंकणक),–द्रोणांतील वीर्यांतून उत्पत्ति ( ३ भरद्वाज ).

वृत्तिकार–( उपवर्ष, कौंडिन्य ).

वृद्धस्त्रीची प्रेमयाचना ( अष्टावक्र ).

वृषपर्व्याच्या सभेचें साहित्य मयसभेला ( १ मय ).

वृषोत्सर्ग ( ७ सुदेव ).

वेडा देणें ( सीरध्वज ).

वेद–ची उत्पत्ति ( २ ब्रह्मन् ), –चें पुनरुज्जीवन (दत्तात्रेय),–अनर्थक ( कौत्स ), वेदवेदांगपारंगत ( ऋश्यशृंग, च्यवन, बृहस्पति ),–प्रचार ( जमदग्नि ),–सर्व वेदांचें अध्ययन अशक्य ( १ भरद्वाज ),–(मूलवर्मन्), –मुलें पळाविल्यामुळें वेद विसरलें ( युक्ताश्व आंगिरस ),–चा अधिकार

(१ सूत–),–तपापेक्षां श्रेष्ठ गुरुकडूनच ( यवक्रीत ),–अक्षरसंख्या ( २ याज्ञवल्क्य), वेदांग ज्योतिष ( लगध, शेष ),–वेदांचा अधिकार नसल्यानें ऐंद्राग्नविधानानें दक्षणा दिली ( २ पैजवन ),–सांग अध्ययन तीन वर्षांत ( विश्वानर ).

वेश्या—( ऋष्यशृंग )–चें पातिव्रत्य ( महानंदा ).

वैदेशांतील भविष्य राजवंश ( ३ पुष्पमित्र ).

वैदिक मंत्रानें यज्ञ करणारे शूद्र ( बुद्ध ).

वैद्यक—औषधांचें पाठ ( इंद्र ), - मुंडकें जोडणें (कुत्स औरव,हयग्रीव), ~~–प्रेताचें रक्षण ( दशरथ, निमि ),~~ –चहूराचा अनुयायी (२ धन्वन्तरि ), –धन्वन्तराचा गुरु भरद्वाज ( १ भरद्वाज ).

वैवस्वतमनूची वेळ व स्थळ ( वैवस्वत ).

वैशाखधर्म ( पुरुयशस् ).

वैश्य—( तुलाधार ),–चें पितर (पितरः),-क्षत्रियांचें (वत्सप्रि भलंदन), -चा क्षत्रियांशीं,शरीरसंबंध(३सुप्रभा).

वैश्वदेव ( धनवर्धन ).

व्याकरण–( अग्निवेश्यायन, अन्यतरेय, आत्रेय, आपिशलि, उख्य, उत्तमोत्तरीय, औदुंबरायण औपमन्यव, और्णवाभ, कांडमायन, कांडायन, काण्व, कात्यायन, काशकृत्स्न, काश्यप, कुणरवाडव, कुलि, कूशांब, कौण्डरव्य, २ कौंडिन्य, क्रौष्टुकि, गार्ग्य, चर्मशिरस्, जातूकर्ण्य, दाल्भ्य, पाणिनि, पौष्करसादि, प्लाक्षायण,प्लाक्षि, बाडबीकार, भर्तृहरि, भागुरि, माचाकीय, २ वररुचि, वाल्मीकि, वेदमित्र, व्यास, ३ शाकटायन, शाकपूणि शाकल्यपितृ, शैत्यायन, १ शौनक, हनुमत्, ७ हारीत ).

व्यासाच्या यादींत नसणारें व्यास दीर्घतमस् व शुक ( २ शुक ).

व्युत्पत्ति–असुर, गृत्समद, घटोत्कच, २ जरत्कारु, तिलोत्तमा, ३ तृणबिंदु, तारा कवच( १ मूलक ),–मरुत १मार्कंडेय, निमि, विदेध, माथव, रावण, रोमहर्षण, वितथ (१भरद्वाज),–व्यास.

व्यूह—चक्र ( १ अभिमन्यु ), सुपर्णाकार ( क्षेमशर्मन् ), शकट,–पद्म, –सूचि ( जयद्रथ ).

व्रत—अक्षय्यतृतीया ( इंद्र ),– अनशन ( अषाढ सावयस ),–अन्त्यजक्रिया करतात ( १० चित्रसेन ), –अशून्यशयन ( दिव्यादेवी ),–( असित काश्यप ),–उद्वास ( च्यवन ),– उदार ( कर्ण ),–एकादशी ( कोचरश, हेममालिन् ),–गणेश ( नल ), –त्रिरात्र ( १ सावित्री ),–प्रदोष ( इंद्र ),–इंदिरा एकादशी ( १० इंद्रसेन ),–कार्तिक ( दशरथ ),– पक्षवर्धिनी ए. ( १ ध्रुव ),– विष्णु, गौ व शिव यांची सेवा ( एकांगी, ३ जाबालि ),– त्रिस्पृशा ए. ( इंद्र, गंगा ), पापनाशिनी एकादशी ( ककुत्स्थ ),–बाल ( श्रीधर ),-भीमद्वादशी ( इंद्र, २ कल्याणिनी, विवस्वत् ),–संकष्टी चतुर्थी ( कार्तवीर्य ),–दमनक (कुशध्वज),– भीष्मपंचक ( ६ गर्ग ),–महत्त्वप्राप्ति ( गोश्रुति,–जयविजय ),–शिवसहस्रनाम ( तंडि ),–विष्णुपंचक ( दंडधर ),–( दंड औपर ),–गौरी ( इंद्राणी पार्वती ),–भीष्मपंचक ( २ भृगु,४ वसिष्ठ),–द्वादशी ( पुष्पवाहन, ६ मुद्गल मालिनी ),–राधाष्टमी ( ५ लीलावती ),–लिंगपूजा (धुंधुमूक),– गंगास्नानादि ( यम ),–मूकव्रत(सोमश्रवस् ),–दीपव्रत ( १ सुधर्मन् ),– शिव ( २ सनत्कुमार ),–सोमवार (२ शोण),–सोमप्रदोष ( सीमान्तनी ),– ( हरिमित्र )–व्रतानें शापमुक्ति ( १ मार्कंडेय ),–व्रतस्थांचे नियम ( रोमहर्षण ).

–व्यभिचारानें गर्भवती झाल्यामुळें स्त्रीस टाकणें ( अश्विनीसुत ).

व्रात्य–( २ वृष्णि ).

शक–(परशुराम,युधिष्ठिर, सप्तर्षि).

शक्तिवर्धक अमृतकुंड्या(१८भीम).

शंकरादि देवयुद्धांत हजर (२बाण)-

शंकराला 'नृसिंहकृत्तिवसन' म्हणण्याचें कारण ( १ शरभ ).

शंकराचार्य वीरभद्राचा अवतार.

शतलक्ष मौद्गल्य.

शतशाखाध्यायी(लांगलि लौगाक्षि).

शत्रुत्वाचा परिणाम ( मारीच ).

शनि ( इंद्र, पिप्पलाद ).

शब्द–धातुज ( शाकटायन ).

शब्दार्थ–ख ( कौरव्यायणीपुत्र ), क्षत्तृ, गृत्समद, देवराजन्, जमदग्नि, जित्वन् शैलिनि, गांधार नग्नजित्, तांडिन्, [ रयि ] बुडिल आश्वतराश्वि माक्षव्य, मांडव्य, मांडूकेय, मार्तांड, १ वसुदेव, वाजसनेय (२ याज्ञवल्क्य), वृषाकपि, शाकल्य, शांतनु, शुनःशेप, १ शैलूष, २ सत्यवत्, सम्राज्, सर्वकर्मन्, [ संवत्सर ] विश्वसृज्, [ संहिता ] पंचालचंड, मक्षव्य, सहस्रानीक, [ सैरंधी ] द्रौपदी.

शरणागत–रक्षण ( १ मुचुकुंद).

शरबंध ( लक्ष्मण ).

शरीरसंबंध—क्षत्रिय व अप्सरा ( आग्नीध्र, कृतेयु ), क्षत्रिय व नाग ( आर्यक, उलूपी ), ब्राह्मण व नाग ( आस्तिक ),–आर्य व अनार्य ( २ उपदानवी ), क्षत्रिय व ब्राह्मण ( उशनस्, कच, २ गो, देवयानी ),– देव व ब्राह्मण ( उशनस् ),–राक्षस व ब्राह्मण ( कैकसी ),–ब्राह्मण व कोळी ( गरुड ),–देव व गोप ( गायत्री, ब्रह्मन् ),– नाग व देव ( गुणकेशी ),–क्षत्रिय व पर्वत ( गिरिका ),–देव व पर्वत (गिरिजा),–

ब्राह्मण व शूद्र ( गौतम ),–गुरुभगिनी (गौतम),–क्षत्रिय व शूद्र (चंद्रगुप्त),–शिष्य व गुरुभगिनी ( चंद्रशर्मन् ),–मनुष्य व सर्प ( ८ जनमेजय ),–आतेमामेभाऊ (८ जनमेजय),–ब्राह्मण व क्षत्रिय (जमदग्नि),–क्षत्रिय व ऋक्ष ( जांबवत् ),–ब्राह्मण व पर्वत (जैगीषव्य ),–ब्राह्मण व देव (३ ज्येष्ठा),–क्षत्रिय व इतर ( तपती ),–पक्षी व इतर (तार्क्षी),–देव व राक्षस(त्वष्टा),–ब्राह्मण व इतर ( दत्त ),–क्षत्रिय व पितर ( २दिलीप ),–ब्राह्मण व क्षत्रिय (ययाति),–मनुष्य व सर्प (३ नर्मदा),–वानर व गंधर्व ( ९ नल );–क्षत्रिय व गंधर्व ( पुरूरवस् ),–क्षत्रिय व राक्षस ( १८ भीम ),–देव व मनुष्य किंवा अप्सरा व दानव ( १ मय ),–मनुष्य व गंधर्व (४ मेधाविन् ),–बहीण भाऊ (रोचन),–नाग व राक्षस (लक्ष्मण),–वसिष्ठ व कन्या (२ वसिष्ठ),–मनुष्य व वानर ( १ विरजा ),–मनुष्य व पितर (२विरजा),–मनुष्य व गंधर्व (विश्वाची) मनुष्य व दानव ( वैश्वानर ),–कपि, पिशाच व मनुष्य (२ शंड),–गंधर्व व मनुष्य ( ६ शुक ),–पितर व मनुष्य ( ६ शुक),–ब्राह्मण व देव ( शुक्र ), मनुष्य व राक्षस ( शूर्पणखा),–मनुष्य व सर्प ( ३ श्रुतश्रवस् ),–ब्राह्मण व सूत ( सत्कर्मन् ),–गंधर्व व राक्षस (सुकेश),–पितर व मनुष्य ( ३ सुतपस् ),–मनुष्य व पितर ( १ सुपर्ण, सुमूर्तिमत्),–मनुष्य व गंधर्व (१ सुप्रतीक),–शाकाहारी व मांसाहारी ( धर्मव्याध ),–ब्राह्मण व शूद्र (श्रावण),–मनुष्य व नदी ( दधीच ),–अग्नि व नदी ( ४ गोपति ),–समुद्र व नदी ( जालंदर ),–क्षत्रिय व अग्नि ( २ दुर्योधन ).

शरीराचा सांधा ढिला करणें (कर्ण)

शरीरस्तंभन करणें ( वेन, १ श्येनजित् ).

शलंकायन ( पाणिनि ).

शस्त्रक्रिया—लोखंडी पाय बसविणें ( यज्ञ, विश्पला व हयग्रीव ).

शर्यत ( सूर्यासावित्री ).

शलाकाप्रश्न ( ९ शंबूक ).

शाकलशाखा कां म्हणतात? ( शाकल ).

शाकल म्हणजे काय? ( २ शैशिरेय ).

शालवृक्ष ( २ भरत ).

शाखाप्रवर्तक—( उख, कात्यायन, कठ, कापेय, कौथुम, कौशिक, कौषीतक [ कुषीतक सामश्रवस ], खंडिक औभ्दारि, गोखल्य, चरक, २ छगल, जैमिनि, तल, तलवकार, खांडवीय ( हिरण्यकेशिन् ), गौतम, तित्तिरि, देवदर्श, देवदत्त शठ, पुरुषासक, भाल्लवि, [राणायन] गोभिल, द्राह्यायणि, शार्दूल, हिरण्यकेशिन् [ कौंडिन्य ], इत्यादि शिवाय ( पाणिनि व व्यास पहा ).

शाप–( ऋश्यशृंग, कबंध, कल्माषपाद, धनुषाक्ष, धन्वन्तरि, धर्मव्रता, धर्मव्याध, धान्यमालिनी, नचिकेतस्, नंदिन्, नलकूबर, नहुष, नारद, निमि, परीक्षित्, पर्वत, पावक, पुंजिकस्थला, १३ पृथु, प्रभंजन, बलराम, २ बाण, बृब्दुदा, ययाति, रंभा, लक्ष्मी, विश्वामित्र, वेताळ, व्यास, सत्यतपस्, १ सांब, सारस्वत, सुदर्शन, सुदेवा, सुंदर, सुप्रतीक, सुबाहु, सुयज्ञ, सौरभेयी, हनुमत्, हव्यघ्न, हूहू ).

शास्त्र–सांख्य ( आसुरि, कपिल, देवहूति ).

शिक्के ( १ सगर ).

शिक्षण–शिक्षक नेमणें ( १८ भीम, १ शुक ),–शिक्षणाकरितां पाठवीत ( दीर्घतमस्, दुर्योधन ),–विषय ( परशुराम, ३ राम, सांदीपनि ), ब्राह्मणाचें धनुर्वेद व इतर वेद (द्रोण), व्याकरण, सूत्र, सूत्रवृत्ति, वार्तिक, भाष्य, संग्रह ( हनुमत् ).

शिक्षा–( ग्रंथ )—( अमरेश, आत्रेय, कात्यायन, जयंत, नारद, पाणिनि, पाराशर, १ बाभ्रव्य, १ मंडूक, मल्लशर्मन्, २ माध्यंदिन, २ याज्ञवल्क्य, १ रामकृष्ण, १ लिखित, १ शौनक ).

–वरील टीका ( १ पिंगल ).

शिक्षा–अंडाला बांधणें ( कुत्स लुश धानाक ), पांच पाट काढणें ( ३ जयद्रथ).–डोक्याचें केस काढणें (नारद). जाळण्याची(१८ भीम),–केस व दाढी काढणें ( २ यवन ),–विरूप करणें ( रुक्मिणी ),–उकळत्या तेलाच्या कढईत टाकणें ( २ लिखित ),–विकृत करणें ( १ सगर ),–लांडग्याकडून खावविणें ( १ यति ).

शिलालेख–धरसेनाचा ( १ मनु ).

शिंग, डमरु व गोंधडी(सुनर्तक नट)

शिल्पशास्त्र–(काश्यप, प्रजापति व १मय ), शिवलिंग ज्योति ( हारव ).

शीलोञ्छवृत्ति ( ४ मुद्गल ).

शुक्र एकाक्ष झाला ( बलि; यज्ञेषु, ३ राम ).

शुल्कपद्धति ( ऋचीक ).

शूद्र-आश्रम-संरक्षक ( यवक्रीत ).

शेंडी-उजव्या बाजूस ( १ वसिष्ठ ),–पांच (अंगिरस),–नसणें ( ६ मुद्गल ).

शैवी दीक्षा (उपमन्यु वासिष्ठ).

शोध–वडवाग्नीचा ( ऋचीक )

शौनकानें सूत्र फाडून टाकलें–( आश्वलायन).

श्राद्ध–( ४।५ देवशर्मन् ),–श्राद्धप्रवर्तक ( जमदग्नि, ४ निमि ),–उपयोग ( पितृवर्तिन् ),–वंध्यापति (पुण्यशील),–ससा ( शशाद ).

श्रीवत्सचिह्न ( २ भृगु ).

संस्कार–( बक दाल्भ्य ),–उपनयन–( अर्जुन, चंद्रहास, २ नहुष, २ भरत,१८ भीम, ३राम, ३ विमल, ६ शुक, सत्यकाम जाबाल, १० सहदेव, सांदीपनि;१ स्कंद, ८ हारीत ),–

उपनयन पांचवे वर्षी ( १मार्कंडेय ),–बारा वर्षांपर्यंत ( श्वेतकेतु औद्दालकि आरुणेय ),–जातकर्म ( दशरथ ),–और्ध्वदेहिक ( जटायु, जड, दुष्यण्य, ४ भरत, १८ भीम, ३ राम, २ वालिन्, २ सुग्रीव, ३ सुदक्षिण, ५ सुवर्मन् ),–और्ध्वदेहिक केल्यानें उद्धार ( ८ पुंडरीक ),–पुत्ररक्षणार्थ ( कृष्ण ).

संस्कृत भाषेचा मोठेपणा(७ भोज).

संहितेचा पदपाठ व शिक्षा ( ब्रह्मदत्त ).

संहितेचा अर्थ ( पांचालचंड ).

सगुणदर्शन ( ५ पुंडरीक ).

संकर ( कुशिक ).

संगकालीन स्थितीचा संततीवर परिणाम ( कैकसी, १ पांडु ).

सती जाणें–(चंद्रहास, कृष्ण, माद्री, रुक्मिणी,रेणुका,वृंदा,वसुदेव, वेदवती).

सत्यनिष्ठा, ( नाभाग, प्रह्लाद, सत्यकाम जाबाल ),–सारासार विचार ( ३ कौशिक ).

सदेह स्वर्ग ( त्रिशंकु )

संध्या करणें ( जयद्रथ, नल, ३ राम ),–व अर्घ्य ( प्रजापति ).

संन्यास जैगीषव्यानें असितास ( असित काश्यप ),–व भक्ति ( १ महावीर ),–चा पुरस्कर्ता (दत्तात्रेय).

समुद्रावरचें स्वामित्व व पश्चिमेचा अधिपति ( शुचिष्मत् ).

सत्तावीस दिवस युद्ध ( ३ शाल्व ).

सत्र ( अच्युत, आंगिरस, कुंडपायिन्, दार्तेय, नाभाग, २ सरमा ),–जाबालाचें ( गौश्रायणि ),–विभिंदुकीयांचें (काप्य, नवक ),–वृषपर्व्याचे (१ मय ),–दीर्घ (८ जनमेजय, श्रुतश्रवस् ),–द्वादशवार्षिक ( १ अंतिनार, २ कैटभ, १ कौशिक, पुरूरवस् [ सोन्याकरितां हल्ला ], रोमहर्षण, बक दाल्भ्य, सौति ),–ब्रह्म ( नारद ), –भारद्वाजायन,–राक्षस ( पराशर ), –वासतीवर ( उर्वशी ), शतसंवत्सरात्मक ( श्वेतकि ),–१ सर्प ( ऐरावत, चक्र ),–२ (जनमेजय). ( चंडभार्गव, पंड, मुंडवेदांग, मुद्गर, शांखायन, शिख, ३ श्रुतश्रवस्, श्वेतकेतु औद्दालकि ),–सहस्रवार्षिक (गृत्समद, निमि, विश्वसृज् ),–सत्रांत विघ्न येणार ( लोहिताक्ष ),–अर्धे राहिलें ( वातवत् ).

सप्तर्षींना गाडीला जुंपणें ( २ भृगु, सप्तर्षि ).

सप्तसूर्य प्रत्यक्ष पाहणें ( पंचकर्ण वात्स्यायन ).

सभानिर्माण ( १ मय ).

समाधि–शंभर वर्षें ( ३ जाबालि).

समुद्र–समुद्राचें शोषण (उचथ्य),–दक्षिण ( ३ धनंजय ),–ची उत्पत्ति ( प्रियव्रत ),–मंथनांतून निघालेल्या वस्तु ( अलक्ष्मी ),–रत्नें चवदाच नव्हती ( बलि ).

संपत्ति–चतुष्पाद (कुसुरुबिंद औद्दालकि ).

संपातऋचा ( ४ विश्वामित्र ).

सम्राट् ( ३ भरत ).

सरस्वतीकांठचा प्रदेश ( युयुधान, परशुराम, यौयुधान, ६ सरस्वती ).

सरस्वतीमंत्रजप ( १ बाल ).

सर्पदंश–नें मृत्यु (धनेश्वर, प्रमद्वरा, १भरद्वाज, हरिश्चंद्र),–नें मृत झालेल्यास जिवंत करणें ( रुरु ),–नें मृत्यु न येणें ( रोहित ),–नें कुरूप व कृष्णवर्ण ( नल ),–विष लिंगपूजेनें नष्ट ( २ सनाक ).

सर्पांचें पारिपत्य ( ४ सर्प ),–बाणावर आरोहण ( अश्वसेन ).

सर्व प्राण्यांची भाषा समजणें ( ब्रह्मदत्त ).

सवतीमत्सर ( १ रोहिणी ).

सवतीचा नाश करणारें सूक्त(शची).

सांकेतिक निरोप ( कालयवन ).

सांख्ययोगाचार्य ( १ वार्षगण्य ).

सात दिवसाचें मूल चोरणें (प्रद्युम्न, ३ शंबर ).

सातु ( उंच्छवृत्ति ).

सामलदेव ( १ महादेव ).

साम–( वत्सप्रि भालंदन ),–गायन ( रावण ),–नें गाई मिळविणें, ( मेधातिथि काण्व ),–नें स्वर्ग (शमद्), पांचशें संहिता (पौष्यंजि, सुन्वत् ),–नें वैभव ( ३ गोतम, ३ दिवोदास, सिंधुक्षित् ).

सामाजिक रचनेच्या पूर्वी (मारिषा).

सायणाचा अर्थ( नगरिन् जानश्रुतेय, नमजित्, नमी साप्य, पणि, पुरुमाय्य).

सारथ्य–व लढवय्या (इंद्रजित्),–( इंद्रसेना, मुद्गल ),–सारथि व सळागार ( कृष्ण, शल्य, ९ संजय ),–कर्मज्ञ ( दुःशासन ).

सारस्वतपाठ ( १ सारस्वत ).

सार्वभौम ( ३ तामस. ).

सावर्णि मनूची प्रशंसा ऋग्वेदांत ( १ मनु ),–विवस्वत्‌चा मुलगा ( विवस्वत् ),–मन्वन्तर ( बलि ).

सावित्राग्नि ( देवभाक श्रौतर्ष, प्लक्ष दय्यांपति ).

सिद्धान्तकौमुदीचा कर्ता ( भट्टोजी)

सिद्धि प्राप्त होणें ( ओड्र, २ धन्वन्तरि, हरिश्चंद्र. ).

सीतेचा पृथ्वीप्रवेश ( ३ राम ).

सुकंदर ( ११ बलि, २ मय ).

सुपर्णीची कथा विनतेसारखी.

सुराज्य—( अश्वपति, केकय, कार्तवीर्य, ८ जनमेजय, जालंधर ).

सुरापानाचा निर्बंध ब्राह्मणास( कच).

सुवर्णपशु ( बृहस्पति ).

सूक्तकार किंवा मंत्रकार स्त्रिया ( आपाला, इंद्राणी, ममता, यमी, लोपामुद्रा, वाच् ).

सूक्तानें अश्वप्राप्ति ( ऋचीक ),–पशु ( सर्पिर्वात्सि ).

सूत, मगध व बंदि यांचीं कामें ( रोमहर्षण ),–उत्पत्ति ( ऐंद्रद्युम्नि जनक, पृथु ).

सूर्य उगवूं न देणें ( मांडव्य ).
सूर्याची उपासना नारदभट्टानें सुरू केली ( भट्टादित्य ).
सूर्यतेजानें पंख जळणें (१ संपाति ).
सूर्यमंदिर ( धनपाल ),–च्या गति ( १ लोमश ),–उगवणें बंद ( १६ कौशिक ),–तेजानें आयुधें ( विवस्वत् ), –डागांचा शाप ( काश्यप ).
सूळ ( अनसूया, १६ कौशिक ).
सेनापति ( ४ गो ).
सैन्योत्पत्ति नखांतून ( घटोत्कच ),– हस्तकंपनानें ( २ करंधम ).
सोन्याचे हात ( विवस्वत् ),–चीं शहरें ( १ मय ),–पाऊस ( रघु ).
सोम—( इंद्र ),–ची परंपरा ( २ जानकि, नग्नजित्, बंबा विश्वावयस्, बभ्रु ),–प्रत्येक वर्णाचा वेगळा ( राम मार्गवेय ).
सोमवती अमावास्या ( वंजुल ).
सोमाकराची टीका ( १ शेष ).
स्कंदाचें दर्शन स्त्रियांना वर्ज ? ( १ स्कंद )
स्खलितवीर्यापासून संतति ( ३ भरद्वाज ).
स्तोमभागमंत्र ( १ वसिष्ठ ).
स्त्रियांचें संरक्षण–( १० बभ्रु ),–नीं शत्रूपुढें नग्न होणें ( २ बाण ),–भ्रष्ट केल्यानें पुरुष पराभूत ( २ बाण ),– युद्धांत ( २ जयन्ती, २ शंखचूड ),– स्त्री किंवा माय पळविल्यानें पराजय ( वीतहव्य आ. ), स्त्रीचा पुरुष होणें ( इल, २ शिखंडिन् ),–स्त्रीधन ( कौसल्या ),–पळविणें ( ८ दमन ),– अश्वींनीं देणें ( श्याव ),–राज्याधिकारी ( चित्रांगदा ),–राजकारणी ( ज्वाला ), –वध ( २ भृगु, १ मंथरा ),–लढाऊ स्त्रिया( इंद्रसेना, कैकेयी, गंगा, विश्पला ).
स्थालीची प्राप्ती( धौम्य, लोपामुद्रा ).
स्नान–सवस्त्र ( दुर्वासस् ),–नग्न ( देवयानी, ४ कुशध्वज ),–गणपति ( ५ दुर्दम ),–गोशृंग ( अरुन्धती ).
स्मरणगामी ( घटोत्कच, नारद, २ बाण ).
स्मृतिकार—( अंगिरस्, अत्रि अरुण, उशनस्, ऋश्यशृंग, कमठ, कवष ऐलूष, गोभिल, कुणि, ४ काश्यप, कार्ष्णाजिनि, गौतम, च्यवन, जातूकर्ण्य, जाबालि, दक्ष, देवल, धौम्य, नारद, पराशर, बुध, ४ पुलस्त्य, बभ्रु आत्रेय, बृहस्पति, बौधायन, ३ भृगु, मार्कंडेय, यम, ४ वसिष्ठ, विश्वामित्र, २ विष्णु, वैशंपायन, व्याघ्रपाद, शंखलिखित, ३ शाकटायन १ शांडिल्य, शातातप, १ शौनक, १ संवर्त, ५ सुमन्तु, ८ हारीत ).
सुव्याचा उपयोग ( अयस्थूण ).
स्वतःच्या गदेनें स्वतःचा मृत्यु ( श्रुतायुध ).
स्वतःचा भीष्मानें मृत्यु सांगणें ( अर्जुन ).
स्वप्नांत दान ( हरिश्चंद्र, त्रिजटा ).
स्वयंवर–( कमद्यू, कुंती, केशिनी, द्रौपदी, मान्यवती, वैशालिनी, ९ सुदर्शन ),–दमयंतीचें पुनः.
स्वर ( २ नारद ).
स्वरूप–नऊ डोकीं व अठरा हात ( ऊरुनेत्र ), दहा हात आठ डोकीं पांच इंद्रियें ( पंचमेढ्र ),–चतुर्भुज, त्रिनेत्र ( शिशुपाल ),–( यक्ष, रक्षस् ),– ( कालिय, कीर्तीमुख, गयासुर, चतुर्मुख, ४ चित्रलेखा, दुर्गा, पूषन् ).
स्वर्गांत जाणें येणें ( अष्टक, पिप्पलाद, बलि, ययाति, विश्वरूप ).
स्वर्गांतहि क्षुधातृषेची बाधा ( ९ श्वेत ).
स्वर्गांत खावयास मिळेना ( प्रजापति )
स्वर्ग अशाश्वत म्हणून त्याचा त्याग ( ४ मुद्गल ).
स्वायंभुवाच्या पूर्वी ( भूत ).
स्वायंभुव मनूचे लाख श्लोकांचे धर्मशास्त्र ( १ मनु ),
स्वायंभुवांत मुलीपासून संतति ( १ रुचि ),–अवतार ( १ यज्ञ ).
स्वारोचिषांतील युद्ध ( १३ सुरथ ).
स्वारोचिष, वैवस्वत व सावर्णि यांचा संबंध ( १३ सुरथ ).
हंसण्यारडण्यापासून फुलें ( विदुंड ).
हंसद्वारा निरोप ( नल ).
हत्यार–सुदर्शन ( अंबरीष ),–वज्र, अद्रि, दधीच्या अस्थि, धनुर्बाण, भाला ), फेस, बर्फ ( इंद्र ),–वासवी शक्ति,( कर्ण ), लोखंडीचक्र ( कुत्स ),–राक्षसाकडे नव्हती ( खर ),–वासवी शक्ति ( घटोत्कच ), मुसळ सौनंद बळरामाचें ( जरासंध ), संवर्तक हल व गदा ( फेकून मारणें ), ( जरासंध ),–चक्र ( २ जलंधर ), नांगराचा फाळ, कुदळ, आकडी ( त्रिजट ),–( दधीच ), तामसी व राजसी शक्ति ( दुर्गा ),–पोलादी शक्ति व सोन्याचा दांडा ( धृष्टकेतु ),–पाश ( नरक ),–वज्राची कल्पना ( प्रजापति ). वरुणपाश ( बलि ),–धनुष्य, बाण, गाळे, वज्र, कुन्हाड ( मरुत् ),–नांगर ( लांगुलिन् भीम ), मुसळ सौनंद ( ९ विदूरथ ),–एकावर फेकली असतां उलटून दुसऱ्यास लागणें( ४ विरूपाक्ष ), –वैष्णव सुदर्शन ( शंकर ),–सुदर्शनचक्रानें विमान मोडणें ( ३ शाल्व ).
हवनानें राष्ट्रनाश ( कालयवन ),– युद्धास जातांना ( इंद्रजित्, कालयवन रावण ),–कोणाचें स्वीकारावें ( दुरश्रवस् ),–तून उत्पत्ति ( धृष्टद्युम्न, द्रौपदी, वृत्र ), –हवीनें पुत्राऐवजीं कन्या ( इल ),–बद्दल हरकत ( इंद्र ).
हविर्भाग अश्वीस–( च्यवन ).
हाटकाच्या रसानें पुरुष कामोन्मत्त होतो ( ८ बल ).
हात लावला कीं ठार ( २ मुर ).
हुंकारानें भस्म करणें ( महाकाल ).
हेमाद्रीचें परिशेषखंड ( वत्स काण्व ).
हेर ( उपनंद, उलूक, २ कला, ५ केशिनी, २ सुश्रवस् ).
हैहय ( प्रतर्दन ).

# परिशिष्ट ६ वें

## अधिक माहिती

" अजबिंदु--सौवीराधिप. लोभानें नाश (कौ. अ. ६).

अनुविंद--पहिला व तिसरा एकच

अभिभू--(म. उ. १५१. ६२; द्रो. ९५. ३९ कुं ). यास वसुदानपुत्रानें ठार केलें ( म. क. ३. २३. कुं. ).

अमिताभ--सावर्णि मन्वन्तरांतील देवगण.

अम्वर्य--( नसिंह पहा ).

अर्कज--( बलीह पहा )

१ अर्जुन--याचे रथाचें नांव नंदिघोष ( गरुड. ३. १४५. १६ ). अर्जुनानें ६५ वर्षे गांडीव वापरिलें (म. वि. ४७, ७ कुं. ).

अलंब पारिजानत ( माल्य पहा ).

अलंब्म--( माल्य पहा ).

अविक्षित्-- " याला' अश्ववान् ' असें प्रसिद्ध नांव आहे" हें वाक्य पहिल्यावर आहे तें दुसऱ्यावर पाहिजे.

अशना--( बाण पहा ).

३ अविक्षित्--( लीलावती पहा ).

अविद्ध--( सो. पूरु. ) प्राचीन्वत्चें नामान्तर.

अश्मकी--शूरपत्नी.

अश्वपति कैकेय--अर्जुनानें याला शेवटीं खांडववनाचें राज्य दिलें ( म. मौ. ८. ७० कुं. ).

अष्टावक्र--सर्व आंकडे महाभारताच्या कुं.प्रतीचे आहेत.

अष्टारथ--( २ दिवोदास पहा ).

अह्न्--अष्ट वसूंपैकीं एक ( म. आ. ६७.१८ कुं. ).

आडीर--( जनापीड पहा ).

आरालिह--( सौजात पहा ).

आर्य--( माल्य पहा ).

३ आर्ष्टिषेण--( वृद्धा पहा ).

आर्संदिव--नारायणमाहात्म्याकरितां याची कथा आहे ( ब्रह्म. १६७ ).

आहृति--( सो. क्रोष्टु.) कूर्ममतें रोमपादवंशांतील एक.

इध्व --( २ सुदेवा ).

२ इंद्रसेना--बाभ्रवी हें हिचें पैतृक नांव. ही नारिष्यंताची स्त्री व दमाची माता ( ३ वपुमष्त् ).

३ इंद्रसेना--( ३ मौद्गल्य पहा ).

इरावत्--( वृषक पहा ).

उग्रकर्मन्--हा कैकयाचा सेनापति होता. याचे कर्णपुत्र प्रसेनाशीं युद्ध झालें होतें. याला कर्णानें मारिलें ( म. क. ८२ ).

८ उग्रसेन--( पुष्करमालिन् पहा ).

उत्तंक--( ८ जनमेजय पहा ).

उदर्क--( १० विदूरथ पहा ).

उद्दालक आरुणि--( चंडी पहा ).

उपजंघनी--( सनारु पहा ).

उपवाह्यका--संजयाची मुलगी व भजमानाची स्त्री ( ह. वं. १. ३६ ).

१ उषा--त्वष्ट्रीचें नामान्तर ( ब्रह्म. १६५.२ ).

एकादशी--( मुर पहा ).

ऐंद्रद्युम्न--( पुष्करमालिन् पहा ).

ऐरावत--( म. आ. ५७.११-१२ कुं. ).

औक--( सू. इ. ) वायुमतें बलाचा पुत्र.

औपमन्यव--( नि. ३.१८ ).

कठ--( २ रेवती पहा ).

कति--विश्वामित्राचा पुत्र.

कन्दली--दुर्वासपत्नी.

कंधर--( मदनिक पहा ).

कयोवधि--( ऋतुपर्ण पहा ).

कराल--याचा ब्राह्मणस्त्रीच्या अभिलाषानें नाश झाला ( कौ. अ. ६ ).

कर्ण--कर्णपुत्र प्रसेनास सात्यकीनें मारिलें (म. . ८२).

११ कवि--( पितृवर्तिन् पहा).

कात्या न--विश्वामित्र पुत्र कतीचा पुत्र.

३ काण्व--( सौश्रवस् पहा ).

कांदम--( एक्यावन् गांदम पहा ).

कापच्य--( कायव्य पहा ).

कामप्रमोदिनी--( मांडव्य पहा ).

कामली--( रेणु । पहा ).

कायव्य--याबद्दल कुंप्रतींत कापच्य असा पाठ आहे.

कारडि--( भगवत् औपमन्यव कारडि पहा ).

काश्यपीबालाक्यामाठरीपुत्र--हा कौत्सीपुत्राचा शिष्य. व याचा पुत्र शौनकीपुत्र ( श. ब्रा. १४. ९. ४. ३१-३२ ).

२ काश्या--जनमेजयाची पत्नी.

**कीर्तिमालिनी**--( पिंगला पहा ).

**कुंभकर्ण**--याला रामायणाप्रमाणें रामानें मारिलें; पण महाभारताप्रमाणें लक्ष्मणानें मारिलें.

**कृतवर्मन्**--हा द्रौपदीस्वयंवरास गेला होता ( म. आ. २०१.६ कुं. ).

**कृष्णीय**--( विश्वक कार्ष्णि पहा ).

**१ केकय**--याची कन्या सैरंध्री ही मरुत्ताची स्त्री ( मार्क. १०८ ).

**२ केतुवीर्य**--मगधराजा. याची कन्या सुकेशी. ही मरुत्तास दिली होती.

**८ केशिनी**--( बृहध्वज पहा ).

**२ कोहल**--( भगीरथ पहा ).

**क्रतुस्थला**--( २ यक्ष पहा ).

**क्रोधन**--( पितृवर्तिन् पहा ).

**क्षत्रश्री प्रातर्दनि**--( प्रातर्दनि पहा ).

**२ क्षेमक**--( ३ शुनक पहा ).

**खसृप**--( पितृवर्तिन् पहा ).

**खाडायन**--एक शाखाप्रवर्तक ( पाणिनि पहा ).

**गजेन्द्र**--गजेन्द्रमोक्षाचें आख्यान महाभारतांत नाहीं ( इंद्रद्युम्न व जयविजय पहा ).

**गणपति**--( बाण पहा ).

**गविजात**--( शृंगिन् पहा ).

**गाणगारि**--( आश्वलायन पहा ).

**५ गांधारी**--कृष्णपत्नी. हिनें शेवटीं अग्निप्रवेश केला ( म. मौ. ७ ).

**७ गो**--( यति पहा ).

**गोनर्द**--( कालनिर्णयकोश पहा ).

**गोपवन आत्रेय**--( पौतिमाष्य पहा ).

**३ गौरी**--( ९ सुदेव पहा ).

**ग्रामणी**--देववतीचा पिता.

**२ घटोदर**--( पूतना पहा ).

**चारुवर्मन्**--दशार्णाधिपति. याची कन्या सुमना. ही दमाची पत्नी ( मार्क. १३० ).

**१ च्यवन**--तिसरा प्यारा तिसऱ्या च्यवनावर वाचावा.

**५ जनमेजय**--याला दुर्बुद्धि जनमेजय म्हटलें आहे. सातव्याला नव्हे ( ब्रह्मांड. ३.६८ २२; ह. वं. १. ३१ ).

**९ जनमेजय**--दुष्यन्तपुत्र (म. आ. ८८. १८ कुं.).

**२ जह्नु**--पहिला व पांचवा एकच.

**जीव**--आंगिरसपुत्र ( शुक्र पहा ).

**ज्ञानगम्य** ( गणेश. १. २९ ).

**ढुंढि**--शक्तिपुत्र.

**ढुंढा**--एक राक्षसी.

**तुषार**--कै. वि. का. राजवाडे म्हणतात 'हे शकद्वीपांतील लोक होत' (भा. इ. सं. म. इतिवृत्त १८३५ ले. ५९).

**तौंडमानू**--( २३ भीम पहा ).

**तौल्वलि**--( आश्वलायन पहा ).

**त्रसदश्व**--( २ पृषदश्व पहा ).

**३ दत्त**--पुलस्त्य व प्रीति यांचा पुत्र. हा पूर्वजन्मीं स्वायंभुव मन्वन्तरांत अगस्त्य होता ( मार्क. ४९.२६ ).

**१ दधिवाहन**--( ४ योगेश्वर पहा ).

**१ दम**--याची आई इंद्रसेना जाह्नवी (३ वपुष्मत् पहा).

**दंभोलि**--( विष्णु. १.१०.९ ).

**५ दशरथ**--( १ रोमपाद पहा ).

**२ दिवोदास**--याची पत्नी सुयशा.

**दीर्घयज्ञ**--राजसूयाच्या वेळीं भीमानें जिंकलेला अयोध्येचा राजा ( म. स. ३१. २ कुं. ).

**४ दुर्गम**--( १ रेवती व विपाठा पहा ).

**दुर्योधन**--हा बलरामाचा जांवई होता (मार्क. ६.३)

**२ दुर्व**--( ७ बुध पहा ).

**दुवस्यु**--( वान्दन पहा ).

**दृप्तबालाकि गार्ग्य**--( श. ब्रा. १४. ५. १ ).

**४ दृषद्वती**--उशीनराची पत्नी.

**२ देवकुल्या**--( प्रस्ताव पहा ).

**देवजनी**--मणिवराची बायको.

**द्रविडा**--( विश्रवस् पहा ).

**द्रुपद**--( सात्रामणि पहा ).

**धर्मव्याध**--याला इंद्राबरोबर कालंजर गिरीवर सोम प्यावयास मिळाला होता ( ब्रह्म. १३.३९ ).

**धूम्राक्ष**--( वा. रा. यु. ९ ).

**६ धृतराष्ट्र**--( पार्थुश्रवस पहा ).

**धृतराष्ट्र पांचाल**--( बक दाल्भ्य पहा ).

**धेना**--बृहस्पतीची पत्नी.

**११ ध्रुव**--कौरवपक्षीय. राजा याला भीमानें ठार केलें ( म. द्रो. १५६ कुं. ).

**नभस्**--( सो. ऋक्ष. ) वायुमतें ऊर्जाचा पुत्र ( संभव पहा ).

**नाभाग**--( ३ सुप्रभा ).

**नालायनी**--( ३ मौद्गल्य ).

**नाभविति**--( भागविति पहा ).

**६ निकुंभ**--( वा. रा. यु. ९ ).

**२ पद्माक्ष**--( सीता पहा ).

**४ पद्मावती**--( शृगाल वासुदेव पहा. ).

२ पष्ठवाह--सामद्रष्टा ( पं. ब्रा. १२.५.११ ).
२ पुंडरिका--वसिष्ठाची मुलगी.
पुष्कराक्ष--(सू. दिष्ट.) सुचंद्राचा पुत्र (परशुराम पहा).
पूर्णभद्र--( हर्यंग पहा ).
२ पृथुरश्मि--( वरत्रिन् पहा ).
पैठीनसी--भरद्वाजाची पत्नी ( ब्रह्म. १३३ ).
२ प्रजानि--मार्कंडेयांत परिलवाबद्दल पाठभेद आहे ( ५ सुनय पहा ).
प्रतर्दन--यानें ब्राह्मणाला आपले डोळे दिल ( म. शां. २४०. २० कुं. ).
प्रविलसेन--( पुत्रिकषेण पहा ).
प्रह्लाद--यानें काश्यपास उच्चैश्रवस् दिला होता ( म. शां. २४०.१५ कुं. ).
७ प्राण--याची पत्नी पुंडरिका ( वसिष्ट पहा ).
वक दाल्भ्य--( दाल्भ्य पहा ).
४ बभ्रु--( व्यास पहा ).
बलाका--( २ सुमालि पहा ).
२ बैद--हिरण्यदताचें पैतृक नांव.
४ ब्रह्मदत्त--( ७ हंस पहा ).
भगीरथ--यानें कोहलास एक लाख गाई दिल्या ( म. अनु. २००.२७ कुं. ).
८ भद्रा--विशाल राजाची कन्या व करुषदेशाधितीची पत्नी ( म. स. ६८ कुं. ).
११ भरत--(१ मरुत्त पहा ).
भार्गव--हे देव असून बारा आहेत ( मत्स्य. १९५. १२-१३ ).
भीम--याची पत्नी काली. हीच शल्याची, श्री. चिं. वि. वैद्य यांचें म्हणणें शिशुपालाची बहीण होय ( म. आश्र. २७. १२ कुं.; म. उपसं. २१४ ).
२ मंजुघोषा--( ४ मेधाविन् पहा ).
८ मधु--( लोला पहा ).
१ मधुमती--( ३ हर्यश्व पहा ).

मधुर--वृत्रपुत्र.
मरुत्त--यानें आंगिरसाला आपली कन्या दिली ( म. शां. २४०; अनु. २००.१६ कुं. ). याच्या स्त्रिया विदर्भकन्या प्रभावती, सुवीरकन्या सौवारी, केतुवीर्य कन्या सुकेशी, सिंधुवीर्यकन्या केकयी, केकयकन्या सैरंध्री, सिंधुराजकन्या वपुष्मती व चेदिराजकन्या सुशोभना. यांस १८ पुत्र झाले ( मार्कं. १२८ ).
२ मलयध्वज--( लोपामुद्रा ).
मांडूकेय--याचा पुत्र शाकल्य.
माया--( पद्म. सृ. ६२ ).
यशोदेवी--( बृहन्मनस् पहा. ).
रजन कोणेय--किंवा कौणेय--पं. ब्रा. चा आंकडा नको.
२ रहूगण--( २ भरत पहा ).
राका--दुसरी व चवथी एकच.
वरोसुषामन्--( सुषामन् पहा ).
वसुदम--( मांधातृ पहा ).
विठ्ठल--पंढरपुरच्या विठ्ठलाचा निर्देश असलेलीं वचनें विठ्ठलभूषण ग्रंथांतून वे. बाळाचार्य सुपेरकर, सातारा यांनीं आमच्याकडे पाठविलीं आहेत. त्यांपैकीं पद्मपुराणांतील वचन शोधतां आम्हांस आनंदाश्रम प्रतींत सांपडलें आहे ( पद्म. उ. १७६. ५७ ).
३ विराट--( जरासंध पहा ).
विवस्वत्--याला मृत्यूचें भय वाटलें ( तै. सं. १. ५.९. ).
व्याडि--कात्यायनानें याचा निर्देश केला आहे.
२ शमिन्--यावरील माहिती २ शमीकची आहे.
७ शल--याला सांयमनि असें पैतृक नांव असावें.
शलंक--( २ पाणिनि पहा ).
१ शांति--( सू. इ. भविष्य ) शीघ्रपुत्र.
६ सत्या-- बृहन्मनस्‌ची पत्नी.
१४ सुमित्र--( ३ विपुल पहा ).
सूर्यासावित्री--( प्रजापति पहा ).

# शुद्धिपत्र

| अशुद्ध | शुद्ध |
|---|---|
| **अक्रूर**—आधार नाहीं | आधार आहे ( बभ्रु पहा ). |
| **अंग**—१०८. ११० | १०८-११० |
| **अंगार**—(म. शां. २८. ८८) | (म. शां. २८. ८८कुं.). |
| **अंगिरस्**—वज्रकुल | पज्रकुल |
| वा. २. ४. ९८. | वायु. २. ४. ९८. |
| **१ अज**—( पद्म. सृ. ९. ) | ( पद्म. ८ ). |
| **३ अज**—उरुजित् | पुरुजित्. |
| **११ अज**—जंतुधान | जंतुधना. |
| **३ अजक**—( सो. इ. ) | ( सू. इ. ) |
| **अत्रि**—सूत्रकार | सूक्तकार |
| लेद्राणि | लैद्राणि. |
| ( वायु. १५९ १०४ ) | ( वायु. १.५९.१०४ ). |
| **अणीचित् मौन**— | **अणीचिन् मौन**— |
| **२ अजमीढ** ( सो. पूरु. ) | ( सो. अमा. ). |
| **अंध्रिगु श्यावाश्व**— ( ऋ. १९. १०१. १-३ ) | (ऋ. ९. १०१ १-३). |
| **४ अनुविंद**— | **अनुव्रत**— |
| **अपराचीन**—(म. आ. ६३) | (म. आ. ६३. १७ कुं.). |
| **अपिशाली** ( आपाशि पहा ) | ( आपिशलि पहा ). |
| **अरुरु**—(तै. सं. १०. १.१९) | (तै. सं. १. १. १९). |
| **अरिष्टनेमि**—(म. शां. २०८). | (म. शां. २०८. ८ कुं.). |
| **अरुद्ध**—सेसपुत्र. | सेतुपुत्र. |
| **अलंबल**—( अलंबुश पहा ) | ( अलब्ध पहा ). |
| **अश्मक** ( वायु. २. २७ ) | ( वायु. २. २६ ). |
| **अश्रुतायु**—(अच्युतायु पहा). | नको. |
| **अश्वमेधज**—सहस्राधीक. | सहस्रानीक. |
| **अष्टादंष्ट्र वैरूप**—सक्तद्रष्टा. | सूक्तद्रष्टा. |
| **आत्रेय**—तै ब्रा. १. १. १. | तै. ब्रा. १. १. ९. १. |
| पद्म. पा. | पद्म. सृ. |
| **आनर्त**—ह. वं. २. १०. | ह. वं. १ १०. |
| **आर्यक**—(म. आ. ३५.१२८) | (म. आ. ३५; १२८ ). |
| **इध्मजिह्व**—यक्य. | यवस. |
| **इलविला**—( ब्रह्मांड. ३. ७. ३९-४२. ) | ब्रह्मांड. ३. ८. ३८. ) |
| **इंद्र**—( भवि. प्रति. २. ५). | ( भवि प्रति. १. ५ ). |
| **उद्तुगा**— | **उद्गातृ**— |

| अशुद्ध | शुद्ध |
|---|---|
| **उपरिचरवसु**—म. भा. ६३. | म. आ. ६३. |
| **उरुक्रम**—भवि. १७८ | भवि. ब्राह्म. १७८. |
| **उर्वशी**—म. भा. २०० | मत्स्य. २००. |
| **ऋक्ष**—( सो. पुरु. ). | ( सो. कुरु. ). |
| **एतश**—(ऋ. ४. १४. १७). | ( ऋ. ४. १७. १४ ). |
| **ऐरावत**—मेद, प्रमेद | मोद, प्रमोद. |
| **और्व**—( अग्नि पहा ). | ( अग्नि कुत्स पहा ). |
| **ककुद्मिन् रैवत**—(सू. नरिष्यंत) | ( सू. शर्याति ). |
| **कपिल**—( दे. भा. ). | ( दे. भा. |
| **कल्कि**—( ब्रह्मांड ३. ७३-१०४ ). | ( ब्रह्मांड. ३. ७३. १०४ ). |
| **२ कल्याणिनी**—(पद्म. सृ. ३) | ~~( पद्म. सृ. २३ ).~~ |
| **कश्यप**—बह्वीच. | बह्वीच. |
| ( म. आ. ३५. ६६ ). | ( म. आ. ६६ कुं.) |
| माठार. | माठर. |
| **कालिंदी**—भा. १०.६. १. | भा. १०. ६१. |
| **कालिय**—( ३५. ६ ५३. १५). | (म. आ. ३५. ६; स. ५३. १६ कुं. ). |
| **कीकक**— | **कीकट**—. |
| **कीर्तिमती**—शुक्राचार्य | शुकाचार्य |
| कुकण | कुकुण |
| **कुंभीनसी**—( मत्स्य ) | ( मत्स्य. १८७.४१ ). |
| **कुरुवश**—( सो. क्रोष्टु. ) | ( सो. क्रोष्टु. ). |
| **२ कुशांब**—( सो. पूरु. ) | ( सो. ऋक्ष. ). |
| **कुशिक**—भूतकीळ | भूतकील. |
| **कृतिरात**—विष्णुमतें | विष्णुमतें व भागवत-मतें कृतिरात. |
| **२ केशिनी**—(भा. ६.८.१५) | ( भा. ९.८.१५ ). |
| **३ केशिनी**—( म. १.१ २० कुं. ) | ( म. आ. १०१. २० कुं. ). |
| **कौषाख**— | **कौषारव**— |
| **२ क्षेमक**—मतवायु | वायुमतें |
| **खरपुरंजय**— | **स्वरपुरंजय**— |
| **खर**—शिरस् | त्रिशिरस्. |
| **गभस्तिनी**—नातिथेयी | प्रातिथेयी. |
| **५ गौतम**—( म. शां. १६८-१७३ ). | ( म. शां. १६८-१७२ कुं. ). |

| अशुद्ध | शुद्ध |
|---|---|
| चतुरंग—पृथुलाश्व | पृथुलाक्ष |
| चरक ( भवि. प्रति. २.५ ) | ( भवि. प्रति. १.५ ). |
| जटायु—( ब्रह्मांड. ३.७.४४ ) | ( ब्रह्मांड ३.७.४४८ ). |
| २ जनमेजय—२९व्या ओळींत लोहगंध शब्द नको. | |
| जंतुधाना—यातुधानाची पत्नी | जंतुधना—यातुधानाची माता. |
| २ जरितृ शार्ङ्ग—सारिसृक्व | सरिसृक |
| २ जह्नु—( सो. अमा. ) | ( सो. अज. ). |
| २ जातूकर्ण्य—( सू. दिष्ट. ). | ( सू. नरि. ). |
| जामिन— | जामि— |
| ज्ञानंजय—( गणेश. २९ ) | गणेश. १.२९ ). |
| ज्वालायन—गोक्तीचा | गोषूक्तीचा. |
| तरंत—पुरुमी | पुरुमीळ्ह. |
| तलक—मुडलक | मंदुलक. |
| तिरिंदर | तिरिंदिर. |
| तृणबिंदु—( ब्रह्मांड. ३.८. २६. ६१. १० ). | ( ब्रह्मांड. ३.८. २९-६० ) |
| त्रसदस्यु पौरुकुत्स्य—( ऋ. सायण भाष्यांतलि ) | ( ऋ. ५. २९ सायणभाष्यांतील ). |
| त्रिशिरस्—चवाका | वाका. |
| दमयंती—( दे. भा. २. २६-२७ ). | ( दे. भा. ६. २६-२७ ) |
| दिवोदास भैमसेनि—( क. सं. ७.१.८ ) | ( क. सं. ७.१.८ ). |
| दिव्या—पुलोम्याची ( ब्रह्मांड. २.२८ ) | हिरण्यकशिपूची ( ब्रह्मांड. ३.१.७४ ) |
| दुष्पहर्ष— | दुष्प्रधर्ष— |
| दूषण—चवाका | वाका. |
| २ देवरक्षित—देवरक्षित | देवरक्षिता. |
| देववती—प्राणी | ग्रामणी. |
| १ देवश्रवस्—कंका | कंसवती. |
| द्रौपदी—प्रतिकामिन् | प्रातिकामिन्. |
| द्वित—मुक्तवाह | मुक्तवाह्. |
| धर्मसारथि—शांतरथ | शांतरय. |
| नरिष्यंत—चित्रसेन व दम | चित्रसेन, शुच किंवा शुक. |
| नाडपित्—( श. ब्रा. ८.५. ४. १२ ) | ( श. ब्रा. १३. ५. ४. १३ ) |
| पराशर—( प. रा. मा., १. १. २३० ) | ( परा. मा. १.१. २३० ). |
| पाराशर्य—( जै. उ. ब्रा. ३.११.१ ). | ( सामविधान ब्रा. ) |
| पुरुणीथ शातवनेय—पुरुणीय | पुरुणीथ |
| पुरुपथ— | पुरुपथिन्— |
| २ पुष्कल—( सू. इ. भविष्य ) सुद्धोदनाचा | शुद्धौदनाचा. |
| प्रजापति—कल्पशास्त्र | शिल्पशास्त्र. |
| प्रमिति—बुधानंतर ४४०० | बुधानंतर गतकलि ४४०० |
| ५ प्रवीर—( म. क. ५६. १. ४४. कु ). | ( म. क. ५६. १-४४ कुं. ) |
| प्रसेनजित्—( म. शां. ४०. ३६ कुं. ) | ( म. शां. २४०. ३६ कुं. ). |
| १ वभ्रु—सहदेव साञ्जय | सहदेव सार्ञ्जय. |
| बृहन्मेदस्—( सो. अनु. ) | ( सो. क्रोष्टु. ). |
| बोपदेव—तोताद्रीवर | तोतादरीवर. |
| १ ब्रह्मदत्त—शंखनिधि | शंखाला निधि. |
| ५ भद्रा—( भा. ९.२४. २५ कुं. ) | ( भा. ९.२४. २५ ). |
| मंकि—सरूपा ( पद्म. उ. ६. १४३ ) | सुरूपा. ( पद्म. उ. १४३ ). |
| मधुक पग्य— | मधुक पैंग्य— |
| महाकाल—४ | २ |
| महावीर—घृतेद | घृतोद |
| ६ मालिनी—( मार्कं. ९.५ ) | ( मार्कं. ९५.५ ) |
| मुकुंद—लाझा | झाला. |
| २ रुचि—मानिनी | मालिनी |
| रुद्र—( रुद्र. १६ ) | ( शिव. शतरुद्र. १७ ). |
| लोमश—३ | २ |
| ८ वामदेव—( शूल पहा ) | ( शल पहा ) |
| विक्रमादित्य—३३२० | गतकलि ३२० |
| २ शमिन्—यावरील माहिती २ शमीकची आहे. | |
| शमीक—क्रशासामक | कृशानामक. |
| शंशारि— | शरारि— |
| १ शांतकर्णि— | शातकर्णि. |
| २ शांत—दुर्दम | दुर्गम |
| शीघ्र—( सू. इ. ) | सू. इ. भविष्य ). |
| शौचेय सार्वसेनि—( तै. सं. ७.१.१.२ ). | ( तै. सं. ७.१.१०.२ ). |
| सात्यरथि—रत्नरथाचा | सत्यरथाचा. |

00101425

Digitized with financial assistance from the
Government of Maharashtra
on 15 June, 2016